महाराष्ट्र वाक्संप्रदाय कोश

विभाग–दुसरा

—×—

ट–ज्ञ

संपादक
यशवंत रामकृष्ण दाते
चिंतामण गणेश कर्वे

प्रकाशक विक्रेते
य. गो. जोशी, प्रसाद प्रकाशन, पुणें.

महाराष्ट्र वाक्संप्रदाय कोश

विभाग दुसरा

द–ज्ञ

संपादक

यशवंत रामकृष्ण दाते
चिंतामण गणेश कर्वे

महाराष्ट्र कोशमंडळ, लिमिटेड, पुणें.

[शक १८६९

किंमत २० रुपये

इ. स. १९४७]

प्रकाशकः—
महाराष्ट्र कोशमंडळ, लिमिटेड, पुणेंतर्फे
मॅनेजिंग डायरेक्टर, यशवंत रामकृष्ण दाते.
कोशकचेरी, ३ बुधवार, पुणें २.

मुद्रकः—
पृष्ठें १ ते ११२ प्रतिभा प्रेस, पुणें २.
,, ११३ ते १७६ ऑल इंडिया रिपोर्टर, नागपूर.
,, १७७ ते ६५६ व संक्षेपसूचि
हिंदुराष्ट्र मुद्रणालय, पुणें २.
मुखपृष्ठें, संपादकीय निवेदन व प्रस्तावना,
ल. ना. चापेकर, आर्यसंस्कृति मुद्रणालय, टिळक रस्ता, पुणें २.

सुभाषितांचें महत्त्व

२

[पहिल्या विभागाच्या आरंभीं दिलेलीं यांपूर्वीचीं वचनें पहावींत]

१५ संसदि तदेव भूषणमुपकारकमवसरे धनं मुख्यम् ।
सूक्तं दधाति सुवर्णं कल्याणमनर्धमिह धन्याः ॥

१६ अकलितशब्दालंकृतिरनुकूला स्खलितपदनिवेशापि ।
अभिसारिकेव रमयति सूक्तिः सोत्कर्षशृङ्गारा ॥

१७ आस्वादितदयिताधरसुधारस्येव सूक्तयो मधुराः ।
अकलितरसालमुकुलो न कोकिलः कलमुदञ्चयति ॥

१८ धन्याः शुचीनि सुरभीणि गुणोम्भितानि
वाग्वीरुधः स्ववदनोपवनोद्गतायाः ।
उच्चित्य सूक्तिकुसुमानि सतां विवक्त-
वर्णानि कर्णपुलिनेष्ववतंसयन्ति ॥

१९ किं हारैः किमु कङ्कणैः किमसमैः कर्णावतंसैरलं
केयूरैर्मणिकुण्डलैरलमलं साडम्बरैरम्बरैः ।
पुंसामेकमखण्डितं पुनरिदं मन्यामहे मण्डनं
यन्निष्पीडितपार्वणामृतकरस्यन्दोपमाः सूक्तयः ॥

२० सुभाषितज्ञेन जनेन साकं संभाषणं सुप्रभुसेवनं च ।
आलिङ्गनं तुङ्गपयोधराणां प्रत्यक्षसौख्यं त्रयमेव लोके ॥

२१ सुभाषितरसास्वादः प्रौढस्त्रीसंगमस्तथा ।
सेवा विवेकिनो राज्ञो दुःखनिर्मूलनं त्रयम् ॥

२२ सुभाषितस्याध्ययने ऽनुषक्तं शुकं वराकाः प्रहसन्ति काकाः ।
तमेव संसत्सु गिरं किरन्तं दृष्ट्वा भवन्ति त्रपयानतास्याः ॥

२३ सुभाषितैः प्रीतिरनुन्नति श्रिया परार्थनिष्पत्तिपटीयसी क्रिया ।
गुणेष्वतृप्तिर्गुणवत्सुचादरो निगूढमेतच्चरितं महात्मनाम् ॥

संपादकांचीं सिद्ध आणि नियोजित कोशप्रकाशनें

सिद्धः—

१ महाराष्ट्रीय ज्ञानकोश, विभाग १–२३
२ महाराष्ट्र शब्दकोश, विभाग १–७
३ महाराष्ट्र वाक्संप्रदाय कोश, विभाग १–२

नियोजितः—

१ शास्त्रीय परिभाषा कोश (छापत आहे.)
२ संक्षिप्त शब्दकोश (हस्तलिखित तयार)
३ महाराष्ट्र शब्दकोश, पुरवणी विभाग ,,
४ सुलभ विश्वकोश ,,

संपादकीय निवेदन

महाराष्ट्र वाक्संप्रदाय कोशाचा हा दुसरा विभाग आमच्या ग्राहकांच्या हातीं देतांना एक प्रकारचा आनंद व त्याबरोबरच विषादहि वाटत आहे. आनंद अशा करितां कीं, महाराष्ट्रशब्दकोशाच्या एक प्रकारें अंगभूत अशा या वाक्संप्रदायकोशाच्या कार्यास आम्हीं हात घातला व त्याचें संपादन पूर्णहि केलें. परंतु याच्या मुद्रणाचा आरंभ करण्यापूर्वीच दुसरें जागतिक महायुद्ध सुरू होऊन आमच्या कार्यांत एकामागोमाग अडचणी येऊं लागल्या तरी त्यांतूनहि परमेश्वरकृपेनें आम्ही तग धरून राहिलों व संकल्पित कार्य पूर्ण करून तें मुद्रित स्वरूपांत आज आमच्या ग्राहकांच्या स्वाधीन करून आपल्या जबाबदारींतून मुक्त झालों. विषाद अशाकरितां कीं, जें कार्य एक दोन वर्षांच्या अवधींतच वास्तविक पुरें व्हावयाचें त्यास आज जवळ जवळ दहा वर्षें लागलीं व एवढा दीर्घ काळ आमच्या ग्राहकांस आम्हांस केवळ आशेवर अवलंबून ठेवावें लागलें. वास्तविक याचें संपादन आम्हीं १९४१ मध्येंच केलें होतें पण महायुद्ध सुरू झाल्यामुळें व तें प्रथमतः लवकरच समाप्त होईल असें त्याच्या आरंभींच्या द्रुतगतीवरून अनुमानल्यामुळें आम्हीं प्रथम थोडे दिवस मुद्रण लांबवणीवर टाकलें. परंतु युद्धाचा रंग लवकर बंद होण्याचा दिसेना म्हणून अखेरीस पुढें वाट न पाहतां हा कोश मुद्रणास हातीं घेतला.

प्रथम मोदवृत्त छापखान्याकडे छपाईचें काम दिलें होतें परंतु त्याच्याकडून तें काम पूर्ण होईल असें दिसेना म्हणून पुढें प्रतिमा प्रेसकडे हें काम दिलें व पहिला भाग १९४२ मध्यें बाहेर पडला.

अडचणी—या ग्रंथाकरितां कागद घ्यावयाचा तो पूर्वीच्या शब्दकोशाप्रमाणेंच देशी व येथील गिरणीकडून घ्यावा म्हणून शेट पदमजी यांचेकडे करार करावयास गेलों व त्यांनीं मोठ्या आनंदानें आम्हांस कागद द्यावयाचें मान्य केलें व त्याप्रमाणें कागदाची चणचण असतांहि त्यांचेकडे गिरणीची व्यवस्था असेपर्यंत त्यांनीं आम्हांस कागद पुरविला; एवढेंच नव्हे तर गिरणीची व्यवस्था सोडण्यापूर्वी आठच दिवस आम्हांस त्यांनीं ५० रिमांचा शेवटचा हप्ता पाठविला व त्यांचेकडे पुढें गिरणीची व्यवस्था असती तर आमचें काम कधींच अडून राहिलें नसतें. पण त्यानंतर या गिरणीची व्यवस्था बदलल्यावर मात्र आम्हांस या गिरणीकडून प्रत्यक्ष एकहि कागदाचा कपटा मिळाला नाहीं.

शब्दकोशाच्या सातव्या विभागामध्यें या कागद मिळण्यासंबंधीं आम्हीं पुढें दिल्याप्रमाणें मजकूर लिहिला होता: 'या गुजराथी बोलणाऱ्या पारशी गृहस्थांनीं जी सहानुभूति आम्हांस दाखविली तिचा सहस्रांशहि मराठी बोलणाऱ्या ब्राह्मण कागदाचे व्यापाऱ्यांनीं दाखविली असती तर आम्हांस अधिक आनंद झाला असता.' या वाक्संप्रदायकोशाच्या वेळीं हेंच वाक्य शतपटींनीं आमच्या प्रत्ययास आलें. यासंबंधीं गिरणीच्या नवीन व्यवस्थापकांशीं जो आमचा पत्रव्यवहार झाला आहे तो फारच उद्बोधक आहे पण तो येथें छापून या टंचाईच्या वेळीं अधिक कागद अडविण्याची आमची इच्छा नाहीं. येथें कागद मिळेना म्हणून आमच्या नागपूरच्या कांहीं मित्रांकडून आमचें कार्य झालें तर पहावें या हेतूनें नागपूरला जाऊन तेथील ऑल इंडिया रिपोर्टरकडे काम दिलें व आठ फॉर्म छापून झाल्यावर हें काम आतां लवकर पूर्ण होईल असें वाटूं लागलें. परंतु त्या कारखान्याच्या व्यवस्थेमध्यें बदल होऊन आपलें काम पुढें करूं शकत नाहीं असें आम्हांस कळविण्यांत आलें. त्यामुळें हें काम पुन्हां पुणें येथेंच करावयाचें ठरविण्याशिवाय गत्यंतर नसल्यामुळें येथें पुन्हां हें काम आणण्यांत आलें व हें हळूहळू चालून आतां पूर्ण झालें आहे.

मध्यंतरीं १९४४ मध्यें कागद काटकसरीचा हुकूम निघाला तेव्हां आमचा शब्दकोशाचा शेवटचा भाग १९३८ मध्यें व वाक्संप्रदायकोशाचा पहिला भाग १९४२ मध्यें निघाल्यामुळें १९३९ व १९४३ या दोन्ही वर्षांत आमचें काम बसेना, म्हणून स्वतंत्र कागदाच्या वांट्याबद्दल दिल्लीस पत्रव्यवहार केला. तेव्हां एक आठवड्याच्या आंत आम्हांस तीन टन कागदाचा वांटा मंजूर केला गेला. या कामीं श्रीमंत किबेसाहेब यांनीं वजन खर्च केल्याबद्दल त्यांचे आभार मानणें अवश्य आहे व परभाषाभाषी अधिकाऱ्यांनीं या मराठी भाषेंतील कार्यास स्वभाषीयांपेक्षां अधिक सहानुभूति दाखविली याबद्दल त्यांचेहि आभार मानणें अवश्य आहे.

संपादनाच्या मर्यादा—वाक्संप्रदायकोशाचें संपादन करतांना आम्हांस अनेक ठिकाणांहून माहिती मिळवावी लागली. म्हणी या जितक्या वाङ्मयांत विशेषतः लिखित मुद्रित किंवा वाङ्मयांत आढळतात त्यापेक्षां कितीतरी पटीनें अधिक बोलण्यांत आढळतात, पण त्यांचा संग्रह करणें फार कठिण असतें. तेव्हां या कार्यास आम्हांस शब्दकोशापेक्षांहि अधिक

परिश्रम करावे लागले. कांहीं संग्रह आम्हीं शब्दकोशाबरोबर केला होता. पण हें काम स्वतंत्र ग्रंथ म्हणून प्रसिद्ध करावयाचें ठरल्यावर त्याच्या कितीतरी पट अधिक संग्रह मागाहून करण्यांत आला. हा संग्रह करण्याकरितां जेव्हां आम्हीं जाहीरपणें वर्तमानपत्रांतून विनंति केली तेव्हां अनेकांनीं आम्हांस म्हणींच्या याद्या पाठवून मदत करण्याचा उपक्रम केला. पण याखेरीज कांहीं मंडळींनीं एक निराळाच उपक्रम सुरू केला. विविधवृत्तामध्यें 'महाराष्ट्र शब्दकोशकारांना सूचना' म्हणून असें सुचविलें गेलें कीं, "मराठी भाषेत अशा कांहीं म्हणी व वाक्प्रचार आहेत कीं त्यामुळें हिंदुसमाजांतील कित्येक जातींच्या भावना दुखावल्या जात आहेत. या म्हणी व वाक्प्रचार मराठी भाषेंतून एकदम नष्ट होणें शक्य नसलें तरी त्यांचा लेखनांत उपयोग होऊं न देणें व कोशासारख्या ठिकाणीं त्यांचा अंतर्भाव न करणें या गोष्टी आपल्या हातीं आहेत. तरी 'चांभारचौकशा', 'घेडगुजरी भाषा', 'चांभाराच्या देवाला खेटरांची पूजा' अशांसारखे वाक्प्रचार कोशांतून वगळावेत." यानंतर अशाच प्रकारचें आणखी एक पत्र टोपणनांवाखालींच आशा या मासिकांत प्रसिद्ध झालें. आंधळा, बहिरा, थोटा अशाप्रकारें व्यंग असलेल्या व्यक्तींवरून बरेचसे वाक्प्रचार व म्हणी मराठींत रूढ झालेल्या आहेत. यांमध्यें मनुष्याच्या शारीरिक व्यंगांचा उपहास ध्वनित होतो; तरी अशा प्रकारचे वाक्प्रचार म्हणी वगैरेहि सदरहू कोशांतून अजाबीत गाळून टाकाव्या, अशी त्यांत सूचना होती. याखेरीज आम्हांला कचेरींतहि कांहीं पत्रें आलीं त्यांत सासू, सून, नणंदा, इ० नात्यांच्या म्हणी गाळाव्यात अशा सूचना होत्या.

पण यानंतर लवकरच केसरींत रा. रा. पाळंदे यांचें पुढील पत्र प्रसिद्ध झालें : 'हल्लीं शब्दकोश मंडळ 'मराठी भाषेंतील वाक्प्रचार व म्हणी' यांचा संग्रह करीत आहे. त्याबाबत सूचना करतांना एकदोघांनीं 'चांभारचौकशा' यासारखे जातिवाचक आणि मनुष्याच्या शारीरिक व्यंगाविषयींचे वाक्प्रचार यांचा या संग्रहांत समावेश करूं नये म्हणून लिहिलें आहे. परंतु माझ्या मतें हा प्रकार अयोग्य आहे. कारण चांभारचौकशा सारखे वाक्प्रचार केवळ त्या जातीची अवहेलना करावी ह्या हेतूनें कांहीं कोणी वापरीत नाहीं. पूर्वी कदाचित् असेल पण निदान हल्लीं तरी नाहीं. तोच प्रकार शारीरिक व्यंगांबाबत आहे. तेव्हां लिहिण्याचा उद्देश इतकाच कीं, शब्दकोशकारमंडळानें अशा प्रकारचा भेद न करतां सर्वच वाक्प्रचार संग्रहित करावे."

अश्लील–ग्राम्य वाक्संप्रदाय कोशांत यावे कीं नाहीं ?—यासंबंधी संपादकांचें ठाम मत होतें कीं, हा सर्वसंग्राहक कोश असल्यानें असे वाक्संप्रदाय गाळणें चुकीचें होईल. तथापि महाराष्ट्रांतील विद्वान् मंडळींचा विचार घ्यावा म्हणून १ प्रा. वा. म. जोशी, २ प्रा. द. वा. पोतदार, ३ प्रा. श्री. नी. चाफेकर, ४ प्रा. श्री. म. माटे, ५ प्रा. रा. श्री. जोग, ६ प्रा. के. ना. वाटवे, ७ प्रा. गो. वि. तुळपुळे, ८ प्रा. गं. भा. निरंतर, ९ प्रा. नी. शं. नवरे, इत्यादींना निमंत्रण करून एक सभा घेतली. सभेस येऊं न शकणाऱ्या मंडळीस लेखी मत पाठविण्यास कळविलें होतें. सभेंत एकमतानें ठरलें कीं, या कोशांत सर्वच म्हणींचा व्यवस्थितपणें संग्रह करावा; छाटाछाट किंवा बदल कांहीं करूं नये. "सर्व म्हणी शिष्ट-अशिष्ट सर्व झाडून दिल्या पाहिजेत. हा कोश आहे. तेथें वगळावगळ कशाला ? ग्राम्य असा शेरा द्यावा. उदाहरणें फार तर देऊं नयेत व विशेष विवेचन न केलें तरी चालेल. विवेचनांत तारतम्य राहावें.—" असें लेखी मत प्रा. द. वा. पोतदार यांनीं लिहून पाठविलें. असो. या निर्णयाप्रमाणें कोशांत सर्व जमलेल्या वाक्संप्रदायांचा अंतर्भाव केला.

विचारविनिमय व चर्चा—म्हणी जमविण्याच्या कामीं जसें अनेकांचें साहाय्य लागतें तसेंच म्हणींच्या नक्की रूढ अर्थासंबंधी आणि उपमासंबंधी जुन्या लोकांची आणि भाषापंडितांची गरज लागते. ज्या म्हणींचे अनेक अर्थ होऊं शकतात किंवा मुळींच कांहीं अर्थबोध होत नाहीं त्यांच्यासंबंधी जाहीर विचारणा वृत्तपत्रांतून केली होती. त्यावर कांहीं आस्थेवाईक मंडळींनीं उत्तरेंहि पाठविलीं. पण पुढें वृत्तपत्रेंच जागेच्या टंचाईमुळें मजकूर घेईनात तेव्हां अशी जाहीर चर्चा बंद करावी लागली.

साहाय्यस्मरण व आभार

महाराष्ट्र शब्दकोशाचें संपादन करतांना ज्याप्रमाणें अनेक ठिकाणच्या अनेक मंडळींनीं शब्दसाहित्य पुरविलें त्याचप्रमाणें या कोशाच्या वेळींहि अनेकांनीं वाक्प्रचार व म्हणी यांच्या याद्या पाठविल्या व म्हणींच्या अर्थाबाबत चर्चा केल्या. त्यांचीं नांवें पुढें दिलीं आहेत. तथापि कांहींचा उल्लेख चुकून राहिला असेल, त्यांनीं क्षमा करावी.

१ श्री. अच्युत दामोदर केळकर, पुणें, २ श्री. श्रीधर शामराव हणमंते, सोलापूर, ३ श्री. बाबूराव गोखले, कऱ्हाड, ४ श्री. गो. वि. राजगुरु, अहमदनगर, ५ श्री. शंकर हरि मुळे, पुणें (जुना संग्रह), ६ श्री. कृष्णाजी गोविंद साठ्ये, देवाचें गोठणें, ७ श्री. दा. ना. कुलकर्णी, कल्लोळ, ८ श्री. ना. म. भिडे, भोर, ९ श्री. विठ्ठल नारायण

कोठीवाले, १० श्री. आ. कृ. पुरोहित, रत्नागिरी, ११ श्री. जयराम सावजी, नागपूर, १२ श्री. शं. र. साने, इन्सीन (ब्रह्मदेश), १३ श्री. रघुनाथ कृष्ण मंडपे, मुरडें (रत्नागिरी), १४ डॉ. नारायण विनायक भट गोठोस्कर, माणगांव (सावंतवाडी), १५ श्री. विश्वनाथ सदाशिव अभ्यंकर, रत्नागिरी, १६ प्रा. र. श्री. जोगळेकर, नाशिक, १७ मि. महंमद अमीन हिसामुद्दीन लांबाते, कुमठा, १८ श्री. परशुराम महादेव गोडबोले, पनवेल, १९ श्री. मो. रा. जोशी, मनमाड, २० श्री. वा. अ. कुलकर्णी, बेलापूर, २१ डॉ. बी. जी. चिकेरूर, जळगांव, २२ डॉ. बी. जी. घाणेकर, बनारस, २३ श्री. धरमपुलिया, वणी (वऱ्हाड), २४ श्री. शिवराम विठ्ठल काळे, दादर, २५ श्री. प्रल्हाद धोंडो कानिटकर, वाई, २६ श्री. शंकर बळवंत कोरडे, पुणें, २७ श्री. नि. वि. दळवी, मडगांव, २८ श्री. द. ज. जोगळेकर, पुणें, २९ श्री. कृ. वि. भागवत, मुंबई, ३० श्री. श्री. स. पंडित, पुणें, ३१ श्री. श्री. शं. पट्टणकर, बडोदें, ३२ श्री. वि. ह. निजसुरे, धुळें, ३३ श्री. वा. रा. जयवंत, दादर, ३४ श्री. माधव केशव काटदरे, मुंबई, ३५ श्री. विश्वंभर गणेश केसकर, म्हसवड (सातारा), ३६ श्री. वामन गणेश लाडखेडकर, वर्धा, ३७ श्री. ना. गो. चापेकर, बदलापूर, ३८ श्री ल. ना. चापेकर, बदलापूर, ३९ श्री. रमाबाईसाहेब देशपांडे, यावल, ४० श्री. रा. ना. आढळराय, नशिराबाद, ४१ श्री. श. वा. रानडे, नागपूर, ४२ श्री. रा. म. काटे, लोणार, ४३ श्री. पुंडलिक तुकाराम राऊत, रोहें, ४४ श्री. सरदार पोतनीस मार्फत खेडशिवापुर येथील मंडळी, ४५ श्री. कृ. ना. देशपांडे, कोल्हापूर, ४६ श्री. महंत गोपीराज महानुभाव, पंजाब. इ. इ.

इ. स. १९०० मध्यें अहमदाबादचे श्री. एच. के. पाठक यांनीं क्यांडी व मोलस्वर्थ यांचे कोश संशोधन करून नव्यानें काढण्याची योजना केली. त्यांना संपादकीय साहाय्य करण्याविषयीं सरकारनें एक पत्रक काढून ठिकठिकाणीं पाठविलें. त्याप्रमाणें कांहीं याद्या श्री. पाठक यांकडे गेल्या. त्यांतील १९०१ सालच्या आम्हांस पुढील गृहस्थांनीं पाठविलेल्या डॉ. य. गं. लेले यांच्या मार्फत उपलब्ध झाल्या—

१ श्री. दत्तात्रेय नारायण बोडपकर, हेडमास्तर, साकरी (खानदेश). २ हेडमास्तर, सावदे. ३ श्री. नारायण बापूजी जोशी, हेडमास्तर, पारोळें. ४ श्री. गोविंद आबाजी शौचे, असि. मास्टर, हायस्कूल, नासिक. ५ श्री. म. ग. कोंढे, नागोठणें. ६ श्री. महादेव बाळकृष्ण भट, हेडमास्तर, भिकाड. ७ श्री. हेडमास्तर, धरणगांव.

यांखेरीज मुंबईचे श्रीयुत वसंत सखाराम राऊत यांनीं एक बराच मोठा म्हणींचा संग्रह लिहून काढला होता तो प्रा. न. र. फाटक यांचेजवळ होता तो सर्व त्यांनीं आम्हांस पाठविला. श्री. श. वा. रानडे, नागपूर. यांनीं आपल्या वडिलांनीं जमविलेला संग्रह आमच्या हवालीं केला. श्रीमंत लक्ष्मीबाईसाहेब मुजुमदार, बडोदें, यांनीं संख्यावाचक कोश स्वतःसाठीं तयार केला होता तो आमच्या उपयोगासाठीं दिला. मालवणचे रा. मुणगेकर यांनीं दीर्घ स्वप्रयत्नानें जो बराच मोठा म्हणींचा संग्रह केला होता तो प्रथमच आमच्या हातीं येता तर आमचे बरेच श्रम व पैसा वांचला असता; परंतु आमच्या जेव्हां तो दृष्टीस पडला तेव्हां योग्य मोबदला देऊन आम्ही तो आमच्या उपयोगाकरितां घेतला. आज श्री. मुणगेकर या कोशाच्या प्रसिद्धिसमयीं हयात नाहींत याबद्दल आम्हांस फार खेद होतो. त्यांस हा कोश पूर्ण झालेला पाहून फार संतोष वाटला असता. असो. या सर्वांचे आम्ही मनःपूर्वक आभार मानतों.

कोणताहि ग्रंथ लिहावयाचा म्हणजे अनेक ग्रंथांचें साहाय्य लागतें. व हे सर्व ग्रंथ एका ठिकाणीं मिळणें दुरापास्त असतें. तेव्हां अनेक व्यक्ती व ग्रंथालयें यांचें साहाय्य घ्यावें लागतें. असें साहाय्य आम्हीं मागितलें असतां अद्यापि कोणीं नाकारिलें नाहीं. विशेषतः मुंबई मराठी ग्रंथालयानें आम्हीं मागितलेले ग्रंथ आमचेकडे स्वखर्चानें पाठविले. फर्ग्युसन कॉलेजचे ग्रंथालय व ग्रंथपाल या दोघांचीहि आम्हांस फार मदत झाली आहे. नागपूर येथें असतां तेथील विश्वविद्यालयाच्या ग्रंथालयाचा, आम्हीं शक्य तो उपयोग केला. या सर्व संस्थांचे व त्यांच्या चालकांचे आम्ही आभारी आहों.

मुंबई विश्वविद्यालयानें वाक्संप्रदायकोशाचा पहिला विभाग पाहून या दुसऱ्या विभागाच्या प्रकाशनाला थोडी आर्थिक मदत दिली याबद्दल त्या विश्वविद्यालयाचेहि आम्ही आभारी आहों.

जाहिराती कां घेतल्या—शब्दकोशापेक्षां या ग्रंथांत आम्हीं एक नवा उपक्रम केला. आणि तो म्हणजे कांहीं जाहिराती घेण्याचा. याबद्दल अनेकांचा मतभेद आहे व कित्येकांचा आम्हांवर रोषहि आहे. पण ज्या संस्थांनीं आम्हांस जाहिराती दिल्या त्यांची आमच्या कार्याबद्दल विशेष आपुलकी या उपक्रमामुळेंच आमच्या प्रत्ययास आली. या जाहिरातींमध्यें कांहीं जाहिराती मराठी न बोलणाऱ्या व्यापाऱ्यांच्याहि आहेत व या जाहिरातींमुळेंच आम्हांस हे दोन्ही भाग भरमसाट किंमत न ठेवतां व हल्लींच्या मुद्रणाच्या व कागदाच्या टंचाईच्या व महागाईच्या दिवसांत प्रकाशांत आणतां आले ही गोष्टच आमच्या उपक्रमाच्या समर्थनास पुरेशी आहे. प्रत्यक्ष आपल्या हातून शक्य तें साहाय्य करणारे फार थोडे असतात

व असे आपली सहानुभूति प्रत्यक्ष कृतींत उतरविणारे साहाय्यक आम्हांस होते म्हणून या जाहिरातींपासून चार आंकड्यांत मांडतां येईल अशी मदत आम्हांस मिळाली व त्यामुळें आमचा भार पुष्कळच हलका झाला. ही गोष्ट आमच्यावर दुरून टीका करणाऱ्यांसहि नाकारांत यावयाची नाहीं.

याप्रमाणें अनेकांचें साहाय्य मिळून हा महाराष्ट्र भाषेच्या दृष्टीनें महत्त्वाचा पण कार्यातील अडचणींमुळें फारच दीर्घ काल लांबलेला हा ग्रंथ आज पूर्ण होऊन परमेश्वरकृपेनें वाचकांच्या हातांत देतां आला; तेव्हां सर्व अडचणींतून पार पाडून इच्छित कार्य तडीस नेण्याचें सामर्थ्य ज्यानें आम्हांस दिलें, त्या जगन्नियंत्याचे अनन्यभावेंकरून आभार मानून हे प्रास्ताविक शब्द पूर्ण करतों.

यशवंत रामकृष्ण दाते
चिंतामण गणेश कर्वे

मंडळ ग्रंथसंग्रहांतील उपयोजिलेले ग्रंथ

१ फर्डुंक वही, इ. सन १८४२.
२ सर्व देशांतील निवडक म्हणी (छंदोबद्ध)--सदाशिव विश्वनाथ (हाटे) कृत, मुंबई १८५८.
३ मराठी प्रचारांतील म्हणी--गं. गो. सापकर कृत, पुणें, १८७२. (यांत ज्ञानचक्षूचे संपादक वामन बाळकृष्ण रानडे यांनीं लेखी भर घालून ठेवली होती.)
४ महाराष्ट्र भाषेतील म्हणी.
५ Green's Idiomatic Sentences (Translated into Marathi)--सदाशिव विश्वनाथ हाटे कृत, मुंबई १८८७.
६ म्हणीरत्नमाला--रंगो रामचंद्र सोळंकर, पुणें, १८८७.
७ म्हणी आणि दाखले, १२ भाग, कर्नाटक प्रेस, मुंबई १८९४.
८ Marathi Proverbs—Rev. A. Manwaring, Oxford, 1899.
९ केहवतमाळा (गुजराथी) भाग १–२—संग्राहक जमशेदजी नशरवानजी पीतीत, मुंबई १९०३. (यांत आरंभीं ११९ पृष्ठांचा म्हणींसंबंधी निबंध आहे.)
१० मराठी भाषेचे संप्रदाय व म्हणी—ले० वासुदेव गोविंद आपटे, पुणें १९१०.
११ मराठी भाषेचे वाक्प्रचार, म्हणी इत्यादि--विद्याधर वामन भिडे, पुणें १९१०.
१२ Marathi Phrases and Proverbs Explained in English by G. S. Muley, 1911.
१३ Companion to the Study of Marathi, by S. V. Pendse, Baroda, 1911.
१४ म्हणींचा कोश--तारळेकर-देशपांडे.
१६ सुभाषितरत्नाकर (संस्कृत)--कृष्ण शास्त्री भाटवडेकर, मुंबई, १९१३.
१६ प्रचलित म्हणी व संप्रदाय यांवरील निवडक गोष्टी--ब. ल. कुलकर्णी व ह. बा. रोडे, पुणें, १९३०.
१७ सुवचनानि—संग्राहक द. वि. आपटे, १९३४.
१८ सुभाषितरत्नभाण्डागारम्—पां. का. परब, निर्णयसागर, सातवी आवृत्ति, १९३५.
१९ मराठी म्हणीरत्नकोश--ना. न. फडणीस, जळगांव १९३५.
२० हिन्दी मुहावरा कोष--ले० आर. जे. सरहिन्दी, इलाहाबाद, १९३७.
२१ अन्योक्ति-कल्पद्रुम (हिन्दी)--ले० श्यामलाल पचौरी, मेरठ, १९३७.
२२ कहावतकोष और सूक्तियाँ--शं. गं. जोशी, अहमदनगर, १९४३.
२३ Ramulu's Popular Penny Publications मधील म्हणींवरचीं छोटीं पुस्तकें.
२४ The Book of Proverbs and Epitaphs by S. C. Johnson (Foulsham Series).
२५ The Konkani Proverbs by Rao. Dr. V. P. Chavan.
२६ Konkani Proverbs, Parts I & II by S. S. Talmaki.
२७ समयोचितपद्यमालिका, गं. कृ. द्रविडकृत, निर्णयसागर प्रेस.

प्रस्तावना

वाक्संप्रदाय-विवेचन

विषयप्रवेश—वाक् म्हणजे वाणी अथवा भाषा, आणि संप्रदाय म्हणजे रूढि किंवा प्रघात. प्रत्येक भाषेमध्यें असे कांहीं शब्दप्रयोग किंवा शब्दसमुच्चय रूढ असतात कीं ज्यांचा अर्थ त्यांतील शब्दांच्या वाच्यार्थाहून भिन्न किंवा कांहीं विशेष असतो. अशा शब्दसमूहांस वाक्संप्रदाय असें म्हणतां येईल. याच अर्थी वाक्प्रचार, म्हण, सुभाषित वगैरे शब्द रूढ आहेत. जगांतील प्रत्येक भाषेंत असे कांहीं संप्रदाय अनादिकालापासून रूढ असलेले आढळून येतात. या दृष्टीनें पाहूं गेल्यास आपणांस असें आढळून येईल कीं, एखाद्या भाषेची पूर्वपीठिका अथवा परंपरा जितकी प्राचीन कालापर्यंत दूर गेलेली असेल तितके त्या भाषेंत वाक्प्रचार अधिक आढळून येतील. आज जगांत ज्या भाषा प्रचलित आहेत त्यांमध्यें इंडो-इराणी, सेमिटिक व चिनी या भाषांची परंपरा सर्वांत जुनी असून त्या भाषांच्या अगदीं लगतच्या भाषा आजहि आपणांस प्रचलित असलेल्या दिसून येतात. इंडो-युरोपियन भाषांच्या कन्या ग्रीक व लॅटिन या भाषांचा युरोपखंडांत जरी फारच थोडा प्रचार राहिला असला तरी इंडो-इराणी भाषेपासून उत्पन्न झालेल्या फारसी व संस्कृत या भाषा आज साक्षात् प्रचलित आहेत. तशीच सेमिटिकसंभव अरबी भाषाहि आज जगांतील बऱ्याच मोठ्या प्रदेशावर वावरत आहे व चिनी भाषा तर आज प्रत्यक्ष एका मोठ्या भूखंडाची भाषा आहे. यामुळें या भाषांतील बरेचसे वाक्-संप्रदाय आज त्या त्या भाषांत दीर्घ कालापासून चालत आलेले आहेत. पाश्चात्य लोक यासंबंधीं नेहमीं लिहितांना व बोल-तांना आढळतात कीं, पश्चिमेकडील लोकांपेक्षां पौरस्त्य लोकांत म्हणींचा संग्रह फार मोठा असून तो दीर्घ काल चालत आलेला आहे. याचें कारण वास्तविक हेंच आहे कीं, पश्चिमेकडे ग्रीक व लॅटिन भाषा व संस्कृति यांची परंपरा फारशी प्राचीन नसून तिचाहि मध्यंतरीं जवळ जवळ लोप झाला होता व अर्वाचीन भाषांचा उगम बराच आधुनिक असून त्या-मध्यें मागील परंपरा फारशी शिल्लक राहिली नाहीं. त्यामुळें त्या भाषांत प्राचीन संस्कृति व समाज यांतील अनेक अंगांची परंपरा नष्ट झाल्यामुळें त्या समाजांत वाक्संप्रदायहि फारसे प्राचीन कालाशीं किंवा भाषाशीं संबद्ध असे राहिलेले नाहींत. पाश्चात्य वाङ्मयाचें संशोधन करूं लागल्यास त्यामध्यें जुन्यांत जुना सुभाषितांचा संग्रह म्हणजे बायबलांतील होय. तो संग्रह ख्रिस्ताच्या मृत्यूनंतर एक दोन शतकांमध्यें तयार झाला असावा. पाश्चात्य ग्रंथकारांस ग्रीक किंवा लॅटिन सुभाषि-तांचीं उदाहरणें द्यावयाचीं झाल्यासहि फारसें प्राचीन कालांत जातां येत नाहीं. अरबी भाषाहि अशा सुभाषितांनीं समृद्ध आहे व आज फारसी वगैरे भाषांमार्फत अनेक अरबी म्हणी लोकांत रूढ असलेल्या व नित्यशः वापरांत असलेल्या आढळतात व त्यांची परंपराहि फार प्राचीन असल्याचें व पितापुत्रपरंपरेनें त्या रूढींत शिलक राहिलेल्या असल्याचें दृष्टो-त्पत्तीस येतें. चिनी भाषा तर या बाबतींत फारच समृद्ध आहे व चिनी म्हणी किंवा सुभाषितें फारच चटकदार, अर्थप्रवण व परिणामकारक असलेलीं दृष्टीस पडतात. आपल्या भरतखंडांतील संस्कृतीची परंपरा तर वेदकालाइतकी म्हणजे आज सुमारें सात हजार वर्षांची अगदीं अखंड अशी चालत आलेली आहे व त्याप्रमाणें आपल्या भरतखंडांत वाक्संप्रदाय अथवा म्हणी किंवा सुभाषितें यांची समृद्धि आहे ही गोष्ट आपणां सर्वांस परिचितच आहे. संस्कृत भाषेचें समृद्ध भांडार व त्यावर साक्षात् पुष्ट होणाऱ्या प्रांतिक देश्य भाषा यांचा व्यवहार सतत परंपरेनें निगडित असल्यामुळें साहित्य व भाषा-विषयक ग्रंथांची समृद्धि साहजिकच आपल्या देशामध्यें एकसारखी वृद्धि पावत आलेली आहे.

वाणीचें महत्त्व—भाषा ही परंपरागत चालत आलेली एक समाजाची टेव आहे ही गोष्ट आमच्या पूर्वजांनीं फार प्राचीन काळापासून ओळखली होती एवढेंच नव्हे तर मानवी संस्कृतीचें सर्व सार समाजाच्या भाषेमध्यें म्हणजे वाणीमध्यें आहे ही गोष्ट त्यांस पूर्णपणें पटल्यामुळें त्यांनीं वाणीचें महत्त्व फार मानलें आहे. वाणीला ब्रह्माची उपमा दिलेली आपणांस सर्व वेदग्रंथांत आढळून येते, उदा० ब्रह्मायं वाचः परमं व्योमन् (ऋ. १.१६४.३५; तै.ब्रा.३.९.५.५; अथर्व.) अशा तऱ्हेचें वाणीचें महत्त्व वर्णन केलेलें आपणांस अनेक ठिकाणीं दृष्टीस पडतें, ते सर्व उतारे येथें देण्यास अवकाश नाहीं. तथापि या गोष्टीस अनुसरूनच 'एकः शब्दः सम्यक् ज्ञातः सम्यक् प्रयुक्तश्च स्वर्गे लोके कामधुग् भवति' असें योग्य शब्दांच्या योग्य ठिकाणीं केलेल्या उपयोगाबद्दल म्हटलें आहे. प्रख्यात नीतिकथाजनक ईसॉप यानें जगांतील अत्यंत उत्तम

व अत्यंत दुष्ट वस्तु म्हणून मनुष्याची जीभच निर्दिष्ट केली, या गोष्टींतहि हेंच तत्त्व ग्रथित आहे. गौतम बुद्धानेंहि वाणीस फार महत्त्व दिलें असून बौद्धसुभाषितसंग्रह जो धम्मपद त्यामध्यें अशी एक गाथा आढळते : 'सहस्समपि चेद् वाचा अनत्थ पदसंहिता । एकं अत्थपदं सेय्यो यं सुत्वा उपसम्मति ॥'—धम्म. १००.

याप्रमाणें सामान्य लोकांच्या वाणीस जर इतकें महत्त्व देण्यांत येतें तर अलौकिक अशा साधु लोकांच्या वाणीस विशेषच महत्त्व असलें पाहिजे व हीच गोष्ट भवभूतीनें वाल्मीकीसंबंधीं आपल्या उत्तररामचरित्रामध्यें सांगितली आहे : 'लौकिकानां हि साधूनामर्थं वागनुवर्तते । ऋषीणां पुनराद्यानां वाचमर्थोऽनुधावति ॥'

अशा ज्या थोर लोकांच्या व विद्वान् पंडितांच्या किंवा अनुभवी वृद्ध पुरुषांच्या तोंडून प्रसंगोपात्त कांहीं विशेष प्रकारच्या उक्ति बाहेर पडतात त्यांसच लौकिकोक्ति अथवा सुभाषित असें आपण म्हणतो व त्यांचाच आपण वेळप्रसंगीं आधारादाखल उपयोग करतों. व याप्रमाणें अशीं वचनें परंपरेनें भाषेमध्यें रूढ होऊन परंपरागत चालत येतात व सर्वांच्या तोंडीं होतात. म्हणून त्यांस आभाणक, आहणा, अथवा म्हण असें नांव मिळतें.

सूक्तिरत्नें—अशा सुभाषितांचें फार प्राचीन काळापासून महत्त्व मानण्यांत येत आहे व त्यामुळें अनेक संस्कृत कवींनीं सुभाषितांची स्तुति केली आहे. त्यापैकीं एकच उक्ति द्यावयाची म्हटल्यास 'पृथिव्यां त्रीणि रत्नानि जलमन्नं सुभाषितम् । मूढैः पाषाणखंडेषु रत्नसंज्ञा विधीयते ॥' याप्रमाणें अन्नपाण्याइतकीच सुभाषितांची जीविताला आवश्यकता असून त्यांची थोरवी हिरेमाणिकादि पाषाणमय रत्नांपेक्षां अधिक आहे असें या कवीनें म्हटलें आहे. आणि एका अर्थी खरोखरच तीं भाषेंतील रत्नें आहेत. कारण रत्नें ज्याप्रमाणें आकारानें लहान पण अत्यंत तेजस्वी असतात, तीं अनेकांच्या हातांत जाऊन त्यांचा सर्वत्र प्रसार होतो, तीं कोणत्याहि प्रदेशांत नेलीं तरी त्यांची किंमत कमी होत नाहीं तर सर्व देशांत तीं नाण्यांप्रमाणें चालू शकतात, त्यांच्या आकारांत पैलू पाडून ठाकठिकीनें सौंदर्य आणलेलें असतें व तीं पृथ्वीच्या पोटांतून निघतात पण तेथें तीं कशीं उत्पन्न होतात हें गूढच असतें, त्याप्रमाणेंच लोकोक्ति किंवा सुभाषितें हीं आकारानें लहान पण चटकदार असून त्यांचा प्रसार लोकांमध्यें फार मोठ्या प्रमाणावर व फार दूरवर झालेला असतो. त्यांच्या रचनेंत कल्पकता, कौशल्य व सौंदर्य दिसून येतात व त्यांच्या उत्पत्तीबद्दलहि गूढच असतें. तसेंच आज प्रगत अशा शास्त्रज्ञांसहि खरीं रत्नें बनविणें अशक्य असतें त्याप्रमाणें नवी म्हण बनविणेंहि तितकेंच कठीण असतें.

तथापि अशा या सुंदर वाङ्मयरत्नांकडे अद्यापि फारसें कोणाचें लक्ष गेलें नसून त्याचा पद्धतशीर अभ्यास करण्याचा प्रयत्न आतांपर्यंत कोणींच केलेला नाहीं व त्याचें महत्त्व अद्यापि कोणास फारसें पटलेलें दिसत नाहीं. म्हणी या बहुतेक तोंडी परंपरेनें चालत येत असून त्यांचा लिखित संग्रह फारसा करण्यांत येत नाहीं व मारदस्त वाङ्मयांतहि त्यांचा फारसा उपयोग केलेला आढळत नाहीं. त्यामुळें त्यांतील बऱ्याचशा हळू हळू विस्मृतिपथास लागून नष्ट होण्याच्या मार्गास लागल्या आहेत. तसेंच म्हणींचा प्रचार बहुधा सुशिक्षित लोकांपेक्षां अशिक्षित लोकांतच अधिक असल्यामुळें त्या लुप्त होण्याचें कार्य अधिकाधिक झपाट्यानें अलीकडे होऊं लागलें आहे. याकरितां त्यांचा संग्रह जितक्या लवकर करून ठेवतां येईल तितका करणें अवश्य आहे. असो.

वैदिक लोकोक्ति—आपल्या भरतखंडामध्यें अत्यंत प्राचीन काळापासून म्हणींचा उपयोग करण्यांत येत असे हें आपलें प्राचीनतम जें वैदिक वाङ्मय त्याकडे सहज दृष्टि टाकली तरी सुद्धां दिसून येण्यासारखें आहे. उदाहरणार्थ ऋग्वेदसंहितेमध्यें आपणांस 'न वै स्त्रैणानि सख्यानि सन्ति'—स्त्रियांचें सख्य हें सख्य नव्हे. 'अग्निनाग्निः समिद्धते'—अग्नीपासून अग्नि प्रदीप्त होतो. 'न ऋते श्रान्तस्य सख्याय देवाः'—परमेश्वर कष्ट न करणारास साहाय्य करीत नाहीं. अशा तऱ्हेच्या म्हणी जागोजाग विखुरलेल्या आढळतात. ब्राह्मणग्रंथामध्यें तर सुभाषित हा शब्द प्रत्यक्ष योजलेला आढळतो; उदा० एषा वक्ष्यमाणा गाथा याज्ञिकैः सर्वैर्गीयमाना सुभाषितरूपाऽभिहितः सर्वतो गीयते वक्ष्यते । यथाह्वाऽस्थुरिणैकेन यायादकृत्वाऽन्यदुपयोजनाय । एवं यान्ति ते बहवो जना सः पुरोदयाज्जुह्वतियेऽग्निहोत्रम् ॥ (ऐ.ब्रा.२५.५). तसेंच हरिश्चंद्राच्या कथेंत 'नानाश्रांताय श्रीरस्तीति रोहित शुश्रुम (ऐ.ब्रा.३३) व त्यानंतर पुढें 'आस्ते भग आसीनस्योर्ध्वस्तिष्ठति तिष्ठतः । शेते निपद्यमानस्य चराति चरतो भगः ॥' असें एक सुभाषित दिलें आहे.

आज मराठी भाषेंत रूढ असलेला 'चक्षुर्वै सत्यम्' हा वाक्प्रचार निदान तैत्तिरीय ब्राह्मणाइतकातरी जुना (तै. ब्रा. १.१.४; ३.३.५) आहे. तसेंच अन्नमय प्राण या अर्थी 'अन्नं प्राणः' हें वाक्य तैत्तिरीय ब्राह्मणांत आढळतें (तै. ब्रा. ३.२.४.४).

याप्रमाणें अनेक वाक्प्रचार व म्हणी यांचें मूळ आपणांस वैदिक वाङ्मयामध्यें आढळून येतें.

उपनिषदांतील म्हणी—वैदिक वाङ्मयाच्या आद्यस्थानीं असलेल्या संहिता व ब्राह्मण ग्रंथ यांमध्यें अनादिकालापासून चालत असलेल्या म्हणींचें अथवा सुभाषितांचें अस्तित्व आपणांस दिसून येतें व त्यावरून अशा तऱ्हेच्या वाक्प्रचारांची परंपरा किती जुनी आहे तें आपल्या प्रत्ययास येतें. ही परंपरा आजपर्यंतहि अव्याहतपणें चालू आहे ही गोष्ट आपणांस निरनिराळ्या काळच्या ग्रंथांचें अवलोकन केल्यास सहज दाखवून देतां येण्यासारखी आहे. व तसें करण्याचा थोडासा प्रयत्न करूं. ब्राह्मण ग्रंथांनंतर महत्त्वाचे संस्कृत भाषेंतील ग्रंथ म्हटले म्हणजे उपनिषदें होत. या उपनिषदांमध्यें हि आपणांस आज परिचित असलेल्या वाक्प्रचारांचीं बीजें विखुरलेलीं दृष्टीस पडतात; उदाहरणार्थ, वर सांगितलेला 'चक्षुर्वै सत्यम्' हा वाक्प्रचार आपणांस बृहदारण्योपनिषदामध्यें दोन ठिकाणीं वापरलेला आढळतोः 'का सत्यता...चक्षुरेव... चक्षुणा वै।'–बृह. ४.४.४. तसेंच 'चक्षुर्वै सत्यं च चक्षुर्हिवै सत्यम्।'–बृह. ५.१४.४.

त्याप्रमाणेंच आज मराठींत रूढ असलेला ओतप्रोत हा वाक्प्रचारहि आपणांस उपनिषदांमध्यें योजिलेला दृष्टीस पडतो. बृहदारण्यकांत तर ही शब्दयोजना आप, वायु, आकाश वगैरे अनेक तत्त्वांबद्दल वापरली आहे. 'कस्मिन्नु खल्वाप ओताश्चप्रोताश्च, कस्मिन्नु खलु वायुरोतश्च प्रोतश्च इ०' (बृह. ३.६.१). तसेंच 'एताभिः सर्वमिदमोतप्रोतम्।' (मैत्र्यु. ६.३) 'स ओतश्च प्रोतश्च विभुः प्रजासु।'–महाना. २.३–'ओतश्च प्रोतश्च ओंकारः।' नृसुत. ८. तसेंच 'अन्धेनैव नीयमाना यथान्धाः' ही आंधळ्यांची माळ दर्शविणारी लोकोक्ति जशी आज आपल्या भाषेंत रूढ आहे तशीच ती उपनिषत्कालींहि होती ही गोष्ट आपणांस हीच उपमा (कठ. २.५. मैत्र्यु. ७.९. मुंड. १.२.८) तीन उपनिषदांत दिलेली आढळते यावरून प्रत्ययास येईल. त्याप्रमाणें 'दर्वी पाकरसं यथा' हा सर्व परिचित दृष्टान्तहि आपणांस मुक्ति उपनिषदांत आढळून येतो (२.६५). न मे स्तेनो जनपदे (छां. ५.११.५) इत्यादि सुभाषित छांदोग्योपनिषदांत दृष्टीस पडतें. मनाची चंचलता अमृत व मुक्ति उपनिषदांत वर्णिलेली आपणांस पाहावयास सांपडते 'मनश्चैवातिचंचलम्।'–अमृत. ५. 'अतिचंचलं चित्तम्।'-मुक्ति२.२५.'मन एव मनुष्याणां कारणं बन्धमोक्षयोः।'-मैत्र्यु६.३४ही उक्तीहि आपणांस उपनिषदांत आढळून येते. बीजांकुरन्यायहि आपणांस उपनिषदांत योजिलेला आढळतो. 'यथैव बीजस्यांकुरावा' मैत्र्यु. ३.३१.'जायते तन्मयोंकुरः।' –गौड४.५९. 'बीजस्यांकुरक्रमः।'–मुक्ति २.२६. तसेंच 'विद्ययामृतमश्नुते।'-'ईश.१.१.' मैत्र्यु.७.९. 'नेह नानास्ति किंचन' –बृह. ४.४.१९. कठ. ४.११. 'नायमात्मा बलहीनेन लभ्यः।'–मुंड ३.२.४. 'धर्मो विश्वस्य जगतः प्रतिष्ठा।'–महाना. २२.१. एवढेंच काय पण प्रत्येकाच्या तोंडीं विनोदाचा विषय होऊन बसलेला वाक्प्रचार 'शिवस्य हृदयं विष्णुर्विष्णोश्च हृदयं शिवः।'–स्कंद ८ हाहि एका उपनिषदांतच आपणांस आढळून येतो. याप्रमाणें आज प्रचलित असलेल्या अनेक वाक्संप्रदायांची परंपरा आपणांस अव्याहतपणें उपनिषत्कालापर्यंत सहज जोडतां येते.

यापुढेंहि आपणांस ही परंपरा शोधूं गेल्यास अव्याहतपणें चालू असलेली आढळल्याशिवाय राहणार नाहीं.

स्मृतिग्रंथांतील वचनें—वेदसंहिता, ब्राह्मणें व उपनिषदें अथवा आरण्यकें यांच्यानंतर महत्त्वाचे भारतीय ग्रंथ म्हटले म्हणजे स्मृतिग्रंथ होत. यांच्या नांवांवरूनच हे ग्रंथ प्रथम प्रथम केवळ स्मृतिरूपानें चालत आले होते व दीर्घ कालपर्यंत अशा रीतीनें चालत आल्यानंतर ते लिखितरूपांत आपणांस उपलब्ध झाले. स्मृतिग्रंथ अनेक आहेत पण त्यांत महत्त्वाचे म्हणजे मनु व याज्ञवल्क्यस्मृति हे होत. यांपैकीं विशेषतः मनुस्मृति सर्वसामान्यपणें सर्वत्र प्रचलित व मान्य आहे. ही स्मृतीहि मनुप्रणित समजली जाते पण प्रत्यक्ष मनु या व्यक्तिप्रणित नसून मनूच्या परंपरेंतील आहे एवढेंच आपणांस म्हणतां येईल. प्रत्यक्ष आज उपलब्ध असलेली मनुस्मृति ही भृगूनें मनुप्रणित धर्म म्हणून जो सांगितला आहे त्याचा संग्रह असून त्यांत मधून मधून भर पडत जाऊन तो तयार झाला आहे हें अंतर्गत गोष्टींवरून सहज दिसून येतें. तथापि यांतील पुष्कळसा भाग प्राचीनपरंपरागत आलेला आहे ही गोष्ट निःसंशय आहे. या मनुस्मृतीचें आपण लोकोक्तींच्या दृष्टीनें अवलोकन करूं गेल्यास आपणांस आज प्रचलित असलेल्या सुभाषितांचें व लोकोक्तींचें मूळ तींत आढळून येतें. उदाहरणार्थ, 'मनःपूतं समाचरेत्' हा वाक्प्रचार आपणांस प्रथम या मनुस्मृतींत आढळून येतो (मनु. ६.४६). तसेंच 'स्त्रीरत्नं दुष्कुलादपि' (मनु. २.२३८). 'बालादपि सुभाषितम्' (मनु. २.२३९). 'नित्यमास्यं शुचि स्त्रीणाम्' (मनु. ५.१३०) हीं सुभाषितेंहि आपणांस मनुस्मृतीमध्यें दृष्टीस पडतात. त्याप्रमाणेंच 'बलवानिन्द्रियग्रामो विद्वांसमपि कर्षति' (मनु. २.२१५) हें व्यासकथेमुळें प्रसिद्ध पावलेलें सुभाषितहि मनुस्मृतीमध्यें आपल्या दृष्टीस पडतें.

एका काळीं सर्व सुधारकांच्या तोंडीं झालेला व मनु हा स्त्रियांस हीन लेखणारा आहे या आक्षेपाचें खंडन करणारा प्रसिद्ध श्लोक 'यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः। (मनु. ३.५६) प्रथम आपणांस मनुस्मृतीमध्येंच दृष्टीस

पडतो. त्याप्रमाणेंच पंचतंत्रामध्यें आढळणारा 'आकारैरिंगितैर्गत्या चेष्टया भाषितेन च । नेत्रवक्त्रविकारैश्च गृह्यतेन्तर्गतं मनः ॥' (मनु. ८.२६) हा प्रसिद्ध श्लोक विष्णुशर्म्यानें मनुस्मृतीमधूनच घेतला असावा किंवा तो एका काळीं अगदीं सार्वभारतीय असावा. याच श्लोकाच्या आरंभींच्या शब्दांवरून 'आकारे रंगते चेष्टा' ही मराठी म्हण रूढ झाली आहे. असाच एक बौद्धवाङ्मयांतील एक सुभाषितसंग्रह जो धम्मपद त्यामध्यें आपणांस 'न तेन वृद्धो भवति येनास्य पलितं शिरः । यो वै युवाप्य धीयानस्तंदेवा स्थविरं विदुः ॥' (मनु.२.१५६) या श्लोकांचा प्रथमार्ध पुढें दिल्याप्रमाणें पाली मार्फत आढळतो. 'न तेन थेरो सो होति येनस्स पलितं सिरो'–(धम्म. २.६०). वास्तविक ही लोकोक्ति एका काळीं सर्व भरतखंडांत रूढ असून अनेकांच्या तोंडीं बसलेली असावी व त्यामुळें अनेक वक्त्यांनी व लेखकांनीं तिचा उपयोग आपल्या भाषणांत व लेखनांत केला असला पाहिजे. आपणांस प्रत्यक्ष ग्रंथांत अंतर्भूत केलेला असा या दोन ठिकाणीं आढळतो. तसाच तो महाभारतांतहि एका ठिकाणीं आढळून येतो. तेथें या श्लोकाचा पाठ पुढें दिल्याप्रमाणें आहे. 'न तेन स्थविरो भवति येनास्य पलितं शिरः । बालोऽपि यः प्रजानाति तं देवाः स्थविरं विदुः ॥'–महा.३.१३३.११. याप्रमाणें स्मृतिग्रंथांमध्यें अनेक सुभाषितें अथवा लोकोक्ति ठिकठिकाणीं ग्रथित केलेल्या आपणांस आढळून येतात.

रामायणांतील म्हणी — यानंतर भरतखंडांतील महत्त्वाचें वाङ्मय म्हणजे रामायण व महाभारत हीं महाकाव्यें होत. यांपैकीं रामायण हें वेदोत्तर वाङ्मयामध्यें अत्यंत महत्त्वाचें व श्रेष्ठ असें ऐतिहासिक महाकाव्य समजलें जातें व त्याचे प्रणेते वाल्मीकि महर्षि यांस आद्य कवि म्हणून मानण्यांत येतें. या काव्यांत अनेक निरनिराळे महत्त्वाचे प्रसंग वर्णन केलेले आहेत व त्यांच्या अनुषंगानें मानवी जीवनाच्या तत्कालीन अनेक अंगांचा परिचय आपणांस सहज होतो व तत्कालीन समाजस्थितीचें यथार्थ ज्ञान होण्यास फार मदत होते. अर्थात् अशा महत्त्वाच्या ग्रंथामध्यें अनेक निरनिराळ्या प्रसंगांच्या वर्णनांच्या अनुषंगानें अनेक दृष्टान्त व उपमा देण्याचा प्रसंग वरचेवर येणारच आणि त्या प्रसंगास अनुसरून कांहीं तत्कालीन रूढ वाक्प्रचार अथवा म्हणी किंवा सुभाषितें म्हणजे लोकोक्ती वापरल्या जाण्याचा संभव असणारच. आणि त्या दृष्टीनें या काव्याचें नुसतें ओझरतें परीक्षण केल्यासहि आपणांस कांहीं सुभाषितें सहज नजरेस पडल्याशिवाय राहणार नाहींत. वास्तविक रामायण व महाभारत या दोन्हीं ग्रंथांचें या दृष्टीनें सूक्ष्म अवलोकन करून त्यांतून अशीं सर्व सुभाषितरत्नें निवडून काढणें हें फार मनोरंजक व बोधप्रद होणार आहे; परंतु सध्या आपणांस येथें तितका अवकाश नसल्यामुळें एकवार दृष्टि फिरवून आपण पुढें जाऊं.

कैकेयीनें रामाच्या राज्याभिषेकास आणलेला व्यत्यय व त्यानंतर घडलेला एकंदर शोकदायक प्रसंग हा एक रामायणांतील फार काव्यमय प्रसंग आहे. अशा प्रसंगीं सुमंत कैकेयीची निंदा करतांना तिला अनुलक्षून म्हणतो : 'नाभिजात्यंहिते मन्ये यथा मातुस्तथैव च । न हि निंबात्स्रवेत्क्षौद्रं लोके निगदितं वचः ॥'–वारा.२.३५,३७. या सुभाषितांत एक लोकोक्ति प्रत्यक्ष लोकोक्ति असें नांव देऊनच ग्रथित केली आहे. ती म्हणजे 'न हि निंबात्स्रवेत्क्षौद्रं' ही होय. कडूनिंबाच्या झाडापासून कधीं मध पाझरत नाहीं ही गोष्ट सर्वत्र लोकांच्या तोंडीं आहे, असें सुमंत कैकेयीस बजावीत आहे. एक सर्वलोकपरिचित वाक्प्रचार त्यावेळीं रूढ असल्याचा आपणांस पुरावा देत आहे. याच श्लोकाच्या प्रथमार्धांत दुसरीहि एक म्हण आपणांस वापरलेली दिसून येते. तीमध्यें आपणांस आज मराठीमध्यें प्रचलित असलेल्या 'खाण तशी माती व आवै तशी धुती' या म्हणीचें मूळ आढळून येईल. पहिल्या पादांत तुझें आभिजात्य तुझ्या मातेप्रमाणेंच मी मानतों असें म्हणून तूं आपल्या आईसारखीच आहेस असें सुमंतानें कैकेयीस बजाविलें आहे. या अर्थी मराठींत 'खाण तशी माती' 'खाण तशी माती व जाती तशी पोती' याहि म्हणी रूढ आहेत. एवढेंच नव्हे तर मुक्तेश्वरानें एका ठिकाणीं प्रत्यक्ष या म्हणीचा उपयोग केला आहे. उदा० 'म्हणोनि खाण तशी माती । आइ लोकीं प्रसिद्ध ॥' याच्याच पुढें सुमंतानें प्रत्यक्ष या म्हणीसारखाच एक लौकिक प्रवाह त्या वेळींहि रूढ होता ही गोष्ट या श्लोकाच्या थोड्याच श्लोकांनंतर एका श्लोकांत स्पष्ट मांडली आहे. तो श्लोक असा 'सत्यश्चात्र प्रवादोयं लौकिकः प्रतिभाति मे । पितॄन्समनुजायन्ते नरा मातरमंगनाः ॥'–वारा. २.३५.२८. म्हणजे पुत्र बापाप्रमाणें होतात व कन्या आईप्रमाणें होतात हा जो लोकापवाद आहे तो खरा आहे असें मला वाटतें. तसेंच 'सत्यापरता नाहीं धर्म' ही आज आपणांस मराठीमध्यें सर्वत्रांच्या तोंडीं आठवणारी म्हण रामायणकालींहि परिचित होती ही गोष्टहि आपणांस एकदोन ठिकाणीं दृष्टीस पडते. उदाहरणार्थ, रामायणाच्या दुसऱ्या कांडांत चवदाव्या अध्यायामध्यें असा उल्लेख आढळतो : 'आहुः सत्यं हि परमं धर्मं धर्मविदो जनाः ।'–वारा. २.१४.३. तसेंच याच कांडांत एकशेंनवव्या अध्यायांत पुन्हा हीच गोष्ट एक

सार्वत्रिक उक्ति म्हणून सांगितली आहे : ‘ धर्मः सत्यपरो लोके मूले सर्वस्य चोच्यते ॥ ’–वारा. २.१०९,१२. तसेंच ‘ अनिर्वेदः श्रियो मूलम् ’ (वारा. ५.१२.१०) ‘ रामो द्विर्नाभिभाषते ’ (वारा. २.१८.३०.) ‘ मृदुर्हि परिभूयते ’ (वारा. २.२१.१२) ‘ विगरतु परवश्यताम् ’ (वारा. ५.२५.२०). हीं सुभाषितें आपणांस अगदीं सार्वत्रिक आहेत. तसेंच ‘जखमेंत मीठ मरणें’ ही आज सर्वत्र प्रचारांत असलेली म्हण निदान रामायणकालाइतकी जुनी आहे ही गोष्टहि आपल्या प्रत्ययास येते. ‘ दुःखे मे दुःखमकरोद्व्रणे क्षारमिवाददाः । ’ (वारा. २.७३.३) तसेंच ‘ मरणान्तानि वैराणि ’ (वारा. ६.१०९.२६) ‘कालो हि दुरतिक्रमः’ (वारा.३.६८.२१) ‘सन्तश्चारित्रभूषणाः’ (वारा.६.१३.४२.) हीं सर्व सुभाषितें आपणांस प्रथम रामायणांत दृष्टीस पडतात. एवढेंच नव्हे तर आज इंग्रजी भाषेंत परिचित असलेला To err is human हा वाक्प्रचार आमच्या भारतीयांस ‘ न कश्चिन्नापराध्यति ’ (वारा. ४.३६.१.) या शब्दांत रामायणकालींच परिचित होता व त्याचप्रमाणेच Save me from my friends याला सदृश असा ‘ ज्ञातयो नो भयावहाः ’ (वारा. ६.१६.७) हा रावणाच्या तोंडचा वाक्प्रचार पाहून विस्मय वाटेल.

याप्रमाणेंच मंथरा ही कैकेयीला रामास यौवराज्याभिषेक होण्यापूर्वीच आपले कबूल केलेले वर दशरथाजवळ मागून रामास वनवासास पाठविण्याचा उपदेश करतांना दिरंगाई केल्यास व एकदां वेळ निघून गेल्यास मग उपयोग व्हावयाचा नाहीं ही गोष्ट पटवून देण्याकरितां ‘गतोदके सेतुबन्धो न कल्याणि विधीयते’ (वारा. २.९.५४) हें सुभाषित योजीत आहे. आज हें सुभाषित सार्वत्रिक झालेलें आपणांस आढळतें. कदाचित् तें यापूर्वीच्या काळांतच सर्वत्र प्रचारांत असलें पाहिजे; कारण प्रस्तुत सुभाषित आपणांस पुन्हां महाभारतांतहि दृष्टीस पडतें. ‘गतोदके सेतुबन्धो यादृक्तादृग्मतिस्तव । संदीप्ते भवने यद्वत्कूपस्य खननं यथा ॥’ (महा. ९.४९.२३) या महाभारतांतील श्लोकांत खरोखर दोन सुभाषितें ग्रथित केलेलीं आहेत. एक वर सांगितल्याप्रमाणें रामायणांतील असून दुसरें आपणांस भर्तृहरीच्या वैराग्यशतकांत आढळतें (वै. ७५). याप्रमाणें कांहीं रामायण-महाभारतांत आढळणारीं सुभाषितें हीं भारतीय वाङ्मयांतील अनादि कालापासून चालत आलेलीं व सार्वजनिक ठेव्याच्या स्वरूपाचीं असलेलीं आपणांस वरचेवर दृष्टीस पडतात.

महाभारत सुभाषितें—महाभारत हा ग्रंथ तर भरतखंडांतील लोकसमाजाचें एका कालचें संपूर्ण सामाजिक चित्र देणारा आदर्श ग्रंथ होय. महाभारत हा एक सामाजिक ज्ञानकोशच होय. त्यामध्यें तत्कालीन समाजाच्या सर्व अंगांचें विस्तृत वर्णन केलेलें आपणांस आढळून येतें. मानवसमाजाच्या एका दीर्घकालीन आयुष्यक्रमांतील सर्व प्रकारचे प्रसंग त्यांत निरनिराळ्या कथांच्या अनुषंगानें वर्णन केलेले आढळून येतात व अर्थात् अशा अनेक विविध प्रसंगांस अनुसरून तत्कालीन अनेक लोकोक्तींचा उपयोग त्यांत केलेला आपणांस आढळून येतो. अशा तऱ्हेच्या या प्रचंड ग्रंथाचें सुभाषित किंवा लोकोक्ति निवडण्याच्या दृष्टीनें अवलोकन करणें हें एक प्रचंडच काम होईल. तेवढा अवकाश आपणांस येथें नाहीं. तथापि विहंगमदृष्टीनें त्यांतील सहज दृष्टीस पडणारे व सदैव लोकांच्या तोंडीं आढळणारे कांहीं वाक्प्रचार अथवा सुभाषितें आपणांस सहज दिग्दर्शित करतां येतील.

रामायणाप्रमाणें ज्यांना मूळांतच लोकोक्ति किंवा बहुजनसमाजांत प्रचलित असलेलीं वचनें असें म्हटलें आहे अशीं उदाहरणें द्यावयाचीं म्हटल्यास पुढील कांहीं नमुन्याकरितां दाखवितां येतील. ‘सर्वे लाभाः साभिमाना इति सत्यवती श्रुतिः ।’–महा. १२.१८.१०. तसेंच ‘धनमाहुः परं धर्मं ।’ तसेंच ‘प्रवारणं हि बालानां पूर्वं कार्यमिति श्रुतिः ।’ –महा. ५.७.१७.

याप्रमाणेंच रामायणांत आढळणाऱ्या ‘अनिर्वेदः श्रियो मूलम् ।’–महा. ५.३९,५९ व ‘कालो हि दुरतिक्रमः ।’–महा. ११.२.२४. व ‘आत्मानं सततं रक्षेत्’ याबद्दल ‘आत्मार्थे पृथिवीं त्यजेत् ।’–महा. ५.३७.१७ ही उक्ति आढळते.

भारतीय आयुष्यक्रमामध्यें धर्माचें महत्त्व फार मानलें असून सर्व गोष्टी धर्माशीं निगडित केलेल्या आढळतात. यामुळें धर्मसंबंधीं वचनें सर्व ग्रंथांत आढळून येतात तशीं तीं प्रामुख्यानें महाभारतांतहि आढळल्यास नवल नाहीं. या ग्रंथांत आपणांस ‘आचारप्रभवो धर्मः’–महा. १३.१०४.१५६, ‘धर्मो हि परमागतिः ।’–महा. १२.१४७.८, ‘धर्मे मतिर्भवतु नः ।’–महा. १.२.३९१. ‘धर्मे ते धीयतां बुद्धिः’ ।–महा. या उक्ती आपणांस धर्मप्रवृत्तिपर आढळून येतात.

तसेंच राजाचें सामर्थ्य वर्णन करणाऱ्या प्रसिद्ध 'राजा कालस्य कारणम् ।'–महा १२.६९.७९, 'राजैव युगमुच्यते ।'–महा.१२.९१.६, 'सर्वो हि लोको नृपधर्ममूलः ।'–महा.१२.१२०.५६, या उक्तीहि आपणांस महाभारतांत आढळून येतात. तसेंच प्रयत्न अथवा क्रियेचें महत्त्व गाणारें प्रसिद्ध वचन 'यः क्रियावान्स पंडितः ।'–महा. ३.३१३.११० हें आपणांस याच ग्रंथांत प्रथम आढळतें. ज्ञानाची महति तर महाभारतामध्यें वारंवार गायिलेली दृष्टीस पडते व त्यापैकीं 'न हि ज्ञानेनसदृशं पवित्रमिह विद्यते ।'–महा. ६.२८.३८ ही उक्ति आज सर्वतोमुखीं झाली आहे. याच्याच जोडीला 'ज्ञानं तत्त्वार्थसंबोधः'–महा. ३.३१३.९० ही उक्तीहि आपणांस चिरपरिचित आहे.

याप्रमाणेंच आज मराठींत प्रचलित असलेल्या 'पेरल्याशिवाय उगवत नाहीं' या म्हणीचें मूळ आपणांस 'नह्यनुप्तं प्ररोहति'–महा. १३.१६३.११ या वचनांत आढळतें. तसेंच 'आंधळ्यापुढें नाच बहिऱ्यापुढें गायन' ह्या म्हणीचें मूळ 'बधिरेष्विव गायनः ।'–महा. ५.९२.१३ या श्लोकपादांत आढळतें. तसेंच 'मोडेल पण वाकणार नाहीं' या म्हणीसारखेंच 'मध्येतापि न संनमेत ।'–महा. ९.५.१३ हें सुभाषित आढळतें.

तसेंच मनस्मृतींतील 'यत्र नार्यस्तु पूज्यन्ते' या पूर्वी उल्लेखिलेल्या व महाराष्ट्रांत सर्वतोमुखीं असलेल्या उक्तीशीं समान अशी 'स्त्रियो यत्र च पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः ।'–महा.१३.४६.५ ही उक्ति आढळते. यावरून हा वाक्प्रचार किती सार्वत्रिक होता याची कल्पना येते.

तसेंच 'भिन्नश्लिष्टा तु या प्रीतिर्न सा स्नेहेन वर्तते ।'–महा. १२.१११.८५ ही पंक्ति आपणांस पंचतंत्रांत सर्प व मनुष्य यांच्या मैत्रीबद्दलच्या कथेंत योजिलेली आढळते (पंच. ३.१३५).

'कर्म तसें फळ' किंवा 'करावें तसें भरावें' या म्हणींचें मूळहि आपणांस महाभारतांत 'करोति यादृशं कर्म तादृशं प्रतिपद्यते ।'–महा. १२.२९०,२२ ह्या श्लोकार्धांत आढळतें. तसेंच हिंदी भाषेमध्यें 'मारे सिपाही जय सरदारका' अशी एक म्हण आहे या म्हणीचें मूळहि आपणांस महाभारतांत पहावयास सांपडतें. 'सेनापतौ यशो गन्ता न तु योधान्कथंचन ।'–महा.५.१६८,२८. तसेंच मराठी भाषेंतील 'सगळ्यांचीं पावलें हत्तीच्या पावलांत' या म्हणीचें मूळ 'यथा राजन्हस्तिपदे-पदानि, संलीयन्ते सर्वं सत्वोद्भवानि ।'–महा. १२.६३,२५. तसेंच 'पेरावें तसें उगवतें' या म्हणीचें मूळ पुढील श्लोकांत आढळून येतें: 'यादृशं वपते बीजं क्षेत्रमासाद्यकर्षकः । सुकृते दुष्कृते वापि तादृशं लभते फलम् ।।'–महा.१३.६,६. तसेंच 'जलेमत्स्यानि वा भक्ष्यन्दुर्बलान्बलवत्तराः ।।'–महा.१२.१५,३० या श्लोकांत मात्स्यन्याय किंवा मोठा मासा लहान माशास गिळतो तसा बलवान दुर्बलांस नष्ट करतो या गोष्टीचें मूळ दृष्टीस पडतें. त्याचप्रमाणेंच 'असें वसावें, कोणी न म्हणे ऊठ' या म्हणीस 'तदेवासनमन्विच्छेद्यत्रनाभिपतेत्परः । '–महा. ४.४,१३ या श्लोकार्धाचा आधार देतां येईल. 'ऋषीचें कूळ आणि नदीचें मूळ पाहूं नये' ही म्हण आज सर्वत्रांच्या तोंडीं आहे पण ही गोष्ट महाभारतकालींहि लोकांस परिचित होती हें आपणांस पुढील श्लोकावरून सहज समजून येईल. 'ऋषीणां च नदीनां च कुलानां च महात्मनाम् । प्रभवो नाधिगन्तव्यः स्त्रीणां दुश्चरितस्य च ।।'–महा. ५.३५ ७२.

याप्रमाणें कांहीं महाभारतकालीन श्लोकांत आपणांस मराठी वगैरे म्हणींचीं बीजें कशीं दृष्टीस पडतात याचा नमुना वरील उदाहरणांवरून आपणांस पाहतां आला. अशा तऱ्हेनें सर्व महाभारताचें आलोडन केल्यास ही संख्या पुष्कळच वाढेल यांत शंका नाहीं. परंतु आपणांस येथें तेवढा अवकाश नाहीं. तसेंच कांहीं श्लोकखंड मराठी भाषेंतहि मूळ संस्कृत शब्दांतच वरचेवर उपयोगांत आणले जातात अशांचीं कांहीं उदाहरणें पुढें दिली आहेत. 'अर्थस्य पुरुषो दासः ।'–महा. ६.४३,४१ हें भीष्मद्रोणादिकांनीं युधिष्ठिराला दिलेलें उत्तर, 'राजा कालस्य कारणम्'–महा. १२.६९,७९ हें भीष्मानें युधिष्ठिराला दिलेलें उत्तर, तसेंच 'यस्य नास्ति स्वयंप्रज्ञा ।' (महा.२.५५,१), 'सुखस्यानंतरं दुःखम् ।' (महा. ३.२६१,४९) 'दर्वी सूपरसानिव ।' (महा. २.५५,२). 'संवासाज्जायते स्नेहो' । (महा. १२.१३९,४०). 'श्वःकार्य-मद्यकुर्वीत । (महा. १२.३२१,७३) इत्यादि अनेक सुभाषितें महाभारतांत इतस्ततः विखुरलेलीं आढळतात व त्यापैकीं कांहीं इतर ग्रंथांतहि आढळून येतात.

भगवद्गीतेंतील उक्ति—महाभारत ग्रंथामध्यें अंतर्भूत झालेली भगवद्गीता ही तर भारतीय सर्व तत्त्वज्ञानाचें सार आहे. म्हणून या ग्रंथावर प्राचीन कालापासून आतांपर्यंत कितीतरी भाष्यें व विवेचनात्मक ग्रंथ झालेले आहेत. हें एक सुभाषितांचें अथवा मानवी जीवितांत हरघडी येणाऱ्या अनुभवांवर प्रकाश पाडणारें किंवा मनुष्याच्या अनेक क्रियां-संबंधीं मार्गदर्शक उपदेश करणारें एक अमोल अशा सदुक्तींचें भांडार आहे. या ग्रंथामध्यें पदोपदीं आपणांस सुभाषितें

आढळून येतात. या ग्रंथांतील कितीतरी वचनें आज मनुष्यांस अनेक व्यापारांत मार्गदर्शक झालीं आहेत व कित्येक संस्थांनीं आपलीं ब्रीदवाक्यें म्हणून उपयोगांत आणलीं आहेत. उदाहरणेंच द्यावयाचीं तर सहज पाहू जातांहि आपणांस कितीतरी उदाहरणें देतां येतील. 'योगः कर्मसु कौशलम्' (२.५०), 'समत्वं योग उच्यते' (२.४८), 'कर्मण्येवाधिकारस्ते' (२.४७), 'नियतं कुरुकर्मत्वम्' (३.४८), 'नास्तिबुद्धिरयुक्तस्य' (२.६६), 'कृपणाः फलहेतवः' (२.४९), 'चंचलंहि मनः कृष्ण' (६.३४), 'जातस्य हि ध्रुवो मृत्युः' (२.६६), तसेंच 'यद्यचारति श्रेष्ठतस्तत्तदेवेतरोजनः।' (३.२१), 'स्वे स्वे कर्मण्यभिरतः संसिद्धिं लभते नरः' (१८.४५), 'धर्म्याद्धि युद्धाच्छ्रेयोन्यत्क्षत्रियस्य न विद्यते' (२.३१), 'हतोवाप्राप्स्यसि स्वर्गं जित्वा वा भोक्ष्यसे महीम्।' (२.३७) हीं क्षत्रियास स्वकर्मतत्पर करणारीं सुभाषितें किंवा 'जीतेसे गाझी, हरेसो हाजो और मरेसो पीर' या आधुनिक कालातील उक्तीशीं जुळणारीं वाक्यें तसेंच 'उद्धरेदात्मनात्मानं नात्मानमवसादयेत्। आत्मैव ह्यात्मनो बंधुरात्मैव रिपुरात्मनः॥' (६.५), 'ये यथा मां प्रपद्यन्ते तांस्तथैव भजाम्यहम्' (४.११) 'यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत। अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम्॥' (४.७) 'श्रेयान्स्वधर्मो विगुणः परधर्मात्स्वनुष्ठितात्।' 'स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः।' (३.३५) इत्यादि सुभाषितें सर्व परिचित आहेत तेव्हां आणखी उदाहरणें देऊन विस्तार वाढवीत नाहीं.

बौद्ध सुभाषितें—याप्रमाणें आतांपर्यंत आपण वैदिक वाङ्मयापासून महाभारतापर्यंत संस्कृत वाङ्मयाचें वरवर आलोडन करून त्यामध्यें किती बहुमोल सुभाषिताचा ठेवा सर्वत्र पसरलेला आहे तो पाहिला व त्यांपैकीं कांहींमध्यें आज आपल्या मराठी किंवा देशी भाषांमध्यें प्रचलित असलेल्या अनेक म्हणींचें मूळ अथवा बीज कसें दृष्टीस पडतें तें पाहिलें. आतां यानंतरच्या संस्कृतपुराणादिवाङ्मय किंवा अभिजातसंस्कृतवाङ्मय यांचेकडे दृष्टि वळविण्यापूर्वी भरतखंडामध्यें, विशेषतः सामान्य जनतेमध्यें, जे दोन मोठे वाङ्मयप्रवाह याचवेळीं वाहत होते त्यामध्यें किंचित अवगाहन करण्याचा प्रयत्न करणें इष्ट होईल. हे दोन प्रवाह म्हणजे बौद्ध व जैन वाङ्मयाचे होत. बौद्ध व जैन हे दोन जरी स्वतंत्र पंथ होते तरी त्या पंथांतील सर्व लोक भारतीय परंपरेतच वाढलेले होते त्यामुळें त्यांचे सामाजिक आचारविचार, वागणूक, कल्पना इत्यादिमध्यें व सनातनी आचारविचारादिकांमध्यें फारसा फरक आढळून येत नाहीं. सर्व सामान्य सनातनी समाजाप्रमाणें त्यांच्यामध्येंहि अनेक व्यावहारिक अनुभव व कल्पना वेळोवेळीं व्यक्त केले जात होते व त्यांचें वाङ्मय अगदीं स्वतंत्र असें कधींच नव्हतें. उलट बौद्ध किंवा जैन उपदेशात्मक अथवा कथात्मक वाङ्मयामध्येंहि आपणांस अनेक दृष्टान्त, उपमा, व वैयक्तिक उदाहरणें दोहोंमध्येंहि सामान्यपणें आढळणारीं अशीं कितीतरी पदोपदीं दाखवितां येतील. बौद्ध व जैन या दोन्ही वाङ्मयावर ब्राह्मणी वाङ्मयाचा व समजुतींचा ठसा पूर्णपणें पडलेला आपणांस दिसून येतो व अनेक कथा व दृष्टान्त दोहोंतहि तंतोतंत तेच दिलेले आढळतात व या एकाच परंपरेंतील पण भिन्न स्वरूपांतील वाङ्मयाचेंहि आपण सुभाषितदृष्ट्या व विहंगमावलोकन करूं, कारण फार खोल जाऊन विवेचन करण्यास येथें अवकाश नाहीं.

ज्याप्रमाणें सनातनी लोकांमध्यें किंवा ब्राह्मणांमध्यें आज उपलब्ध असलेल्या वैदिक वाङ्मयांत न आढळणाऱ्याहि कांहीं गाथा फार प्राचीन कालापासून प्रचलित होत्या व त्यांपैकीं कांहींचा उल्लेख प्रसंगोपात्त मधून मधून ब्राह्मण ग्रंथांत वगैरे केलेला आढळून येतो, त्याप्रमाणें बौद्धांनींहि कांहीं लौकिक अशा सामान्य जनसमूहामध्यें प्रचलित असलेल्या जुन्या गाथांचा उपयोग आपल्या धर्मप्रसाराच्या कामीं केलेला आढळतो व अशा गाथा त्यांच्या अनेक ग्रंथांत मधून मधून योजलेल्या व अन्तर्भूत केलेल्या आढळतात. एवढेंच नव्हे तर त्यांच्या ९ अंगांमध्यें केलेल्या वाङ्मयवर्गीकरणांत गाथा हा एक स्वतंत्र वर्गहि मानण्यांत आलेला दिसून येतो. संयुत्त निकायामधील पहिल्या वर्गाला तर सगाथवग्ग म्हणजे गाथायुक्त वर्ग असेंच म्हटलें आहे. तसेंच जातककथांकडे पाहिल्यास बहुतेक जातककथांचें केन्द्र अथवा मूळ कांहीं गाथा असून बाकीचा भाग त्यांस अनुसरून रचलेला पूरणात्मक भाग असून तो उत्तरकालीनहि असावा असें दृष्टीस पडतें. या गाथांच्या मागें फार प्राचीन परंपरा असली पाहिजे असें त्यांच्या प्राचीन स्वरूपावरून सहज ओळखतां येतें. तसेंच या जातककथांतील सुभाषितांवर सांप्रदायिक छटा बहुधा मुळींच दिसून येत नसून तीं सामान्य व्यवहारांतील व सामान्य जनतेच्या सर्वत्र तोंडीं असलेलीं अशीं आढळून येतात. उदाहरणार्थ, जातककथा ५१२ ४५३, ४७३ यांतील सुभाषितें अगदीं सामान्य नीतिपर अशीं आहेत. याप्रमाणें बौद्ध वाङ्मयांतील महत्त्वाचे असे धम्मपद, उदान, इतिवुत्तक हे भाग सुभाषितांच्या संग्रहासारखेच आहेत. या सर्व सुभाषितांचें अवलोकन करण्यास येथें अवकाश नाहीं. तेव्हां त्यांतील फक्त धम्मपद या महत्त्वाच्या संग्रहाचें आपण थोडक्यांत स्थूल अवलोकन करून पुढें

जाऊं. या धम्मपदांतील निम्यापेक्षां अधिक श्लोक इतर पाली धार्मिक ग्रंथांत आढळून येतात. यावरून त्यांचा प्रसार व सार्वत्रिकता यांची सहज कल्पना करतां येते.

'उदबिन्दुनिपातेन उदकुम्भो पि पूरति ।'–धम्म. १२१.१२२. 'अक्कोधेन जिने कोधं असाधुं साधुना जिने। जिने कदरियं दानेन सच्चेनालिक वादिनं ॥'–धम्म.२२३ या सुभाषिताचें मूळ सामवेदाइतकें जुनें आहे ही गोष्ट आपणांस 'अक्रोधेन क्रोधं, दानेन अदानम्' हीं वाक्यें सामवेदांत छन्द आर्चिकांत (६.१.९) आढळतात यावरून स्पष्ट होईल. 'न तेन थेरो होति' ही गाथा पूर्वीं दिलीच आहे. तसेंच 'यथापि रुचिरं पुप्फं वण्णवन्तं सगंधकं । एवं सुभासिता वाचा सफला होति कुब्बतो ॥'–धम्म. ५२ 'यावजीवम्पि चे बालो पण्डितं पयिरुपासति । न सो धम्मं विजानाति दब्बी सूपरसं यथा ।'–धम्म. ६४. यांतील दर्वी सूपरसं यथा ही उपमा किती सार्वजनिक होती याचा प्रत्यय पूर्वी आपणांस आलाच आहे. तसेंच 'परिजिण्ण मिदंरूपं रोगनिळं पभङ्गुनं । भिज्जति पूति सन्देहो मरणन्तं हि जीवितं ॥'–धम्म. १४८. 'चक्खुना संवरो साधु साधु जिव्हाय संवरो । घानेन संवरो साधु साधु जिव्हाय संवरो ॥'–धम्म. ३६०.

याप्रमाणें अनेक उतारे देतां येतील परंतु या ठिकाणीं आपणांस सर्व बौद्ध वाङ्मयाचें आलोडन करण्यास अवकाश नसल्यामुळें केवळ अंगुलिनिर्देशावर भागवून घेऊन आपणांस पुढें जाणें प्राप्त आहे.

जैन लोकोक्ति—बौद्धा नंतर महत्वाचा दुसरा पंथ म्हटला म्हणजे जैन होय. जैन पंथाचेंहि वाङ्मय समृद्ध असून तें अनेक विषयांवर तयार झालेलें आहे. जरी बौद्ध व जैन वाङ्मय हीं दोन्हीं ब्राह्मणी अथवा संस्कृतवाङ्मया वर बरींचशीं आधारलेलीं असलीं तरी त्या पंथांचा प्रसार बहुजन समाजामध्यें किंवा ब्राह्मण व समाजाचा वरचा थर सोडला तर जो मध्यम वर्ग व खालचा वर्ग त्यामध्येंच जास्त झालेला असल्यामुळें या दोन पंथांच्या वाङ्मयांतच खरोखर त्यावेळच्या समाजाचें चित्र अथवा लोकस्थिति अधिक अवलोकन करावयास सांपडते. तत्कालीन समाजाचें सर्वांगीण चित्र जितकें या दोन वाङ्मयामध्यें आपणास दृष्टीस पडतें तितकें संस्कृत वाङ्मयांत दिसून येत नाहीं. विशेषतः अभिजात संस्कृत वाङ्मय हें हळूहळू समाजापासून दूर दूर जाऊं लागलें व तें केवळ पंडित व राजे लोकांच्या करमणुकीचें एक स्थान झालें व त्यांत पांडित्यप्रकर्षासच अधिकाधिक वाव मिळूं लागून लौकिक गोष्टींपेक्षां विद्वत्त्वप्रदर्शन हाच त्याचा आत्मा बनला. त्यामुळें आपणांस जर तत्कालीन लोकसमाजांतील रूढ गोष्टींचें अवलोकन करावयाचें असेल तर बौद्ध व जैन वाङ्याचें अवलोकन करणें अधिक लाभदायक झाल्याशिवाय रहाणार नाहीं. या दृष्टीनेंच जेव्हां आपणांस लोकोक्तींचा अभ्यास करावयाचा असेल तेव्हां या दोन पंथाच्या वाङ्मयाकडे विशेष लक्ष दिलें पाहिजे.

जैन वाङ्मयांत आपणांस अनेक सुभाषितें व लोकोक्ति इतस्ततः विखुरलेल्या आढळून येतात व त्यांचे कांहीं सुभाषितसंग्रहहि ग्रथित केलेले आहेत.

परंतु त्यांचेकडे विशेष खोलांत शिरून पाहण्यास येथें अवकाश नसल्यामुळें केवळ नमुन्यादाखल जैन वाङ्मयांतील एक शके ८५३ अथवा इ. स. ९३१–३२ मध्यें लिहिलेला म्हणजे त्यापूर्वीच रचलेला हरिषेणाचा कथाकोष नांवाचा एक गोष्टींचा संग्रह आहे त्यांत इतस्ततः विखुरलेल्या कांहीं सुभाषितांचा येथें उल्लेख करून आपण पुढें जाऊं. या कथाकोषाची भाषा संस्कृत-प्राकृतमिश्रित अथवा संक्रमणावस्थेंतील आहे. हा ग्रंथ जैन वाङ्मयाच्या प्राचीनत्वाच्या मानानें जरी अर्वाचीन असला तरी यावरून आपणांस त्यांच्या वाङ्मयांतील सुभाषितांची कल्पना येण्यास पुरेसा आहे. या ग्रथांत आपणांस परिचित अशीं पुढें दिलेलीं सुभाषितें व त्यांच्या सारखींच कांहीं इतर सुभाषितें आढळून येतात. 'इतो व्याघ्रः समायाति इतस्तिष्ठति दो तटी ।' १९.३२. 'काकतालीय योगेन यदि मे राज्यसंभवः ।' २२.१० 'शौण्डैःसह पयः पीतं वारुणीं मन्यते जनः ।' ३१.३५. 'प्रत्यक्षमेतद्भवतापि दृष्टं संसर्गजा दोषगुणा भवन्ति ।' ३३.३८ यापेक्षां अधिक उतारे देणें किंवा चर्चा करणें स्थलाभावामुळें येथें शक्य नाहीं.

नीतिवाङ्मय—यानंतर अभिजात संस्कृत वाङ्मयाकडे वळण्यापूर्वी एका निराळ्याच वाङ्मयाच्या भागाकडे आपणांस थोडासा दृष्टिक्षेप करणें अवश्य आहे. हें वाङ्मय म्हणजे नीतिप्रवर्तक वाङ्मय होय. सामान्यतः नीतिप्रवर्तक वाङ्मय म्हटलें म्हणजे सामान्य जनतेस नैतिक आचरण शुद्ध कसें ठेवावें, सामान्यतः आपली वागणूक समाजाला अपायकारक न होईल व आपलाहि वैयक्तिक, आर्थिक, सामाजिक व व्यावहारिक उत्कर्ष कसा होईल या दृष्टीनें मनुष्यानें वागावयाचें झाल्यास त्याला मार्गदर्शक असें वाङ्मय समजामध्यें जो विचारीवर्ग आहे किंवा समाजाचें ज्याला नियमन अथवा नियंत्रण करावयाचें आहे त्या वर्गाला निर्माण करावें लागतें अशा तऱ्हेचें वाङ्मय भारतीय वाङ्मयांतहि समृद्ध असें आहे.

पूर्वी उल्लेखिलेल्या रामायण व महाभारत विशेषतः महाभारत या ग्रंथामध्यें सामान्यतः सामाजिक नीतिनियमांचें ठिक ठिकाणीं वर्णन करण्यांत आलें आहे व समाजास मार्गदर्शक अशा आदर्श व्यक्तींच्या चरित्रांचें, त्यांच्या आयुष्यक्रमाचें प्रसंगोपात्त वर्णन देऊन तदनुषंगानें सामान्य नीतितत्त्वें ग्रथित करण्यांत आलीं आहेत एवढेंच नव्हे तर राजधर्म, गृहस्थधर्म, स्त्रीधर्म किंवा राजनीति, व्यावहारिक नीति, कौटुंबिक नीति या विषयांचा उहापोह करण्यासाठीं शांतिपर्व, वनपर्व, उद्योगपर्व वगैरेमध्यें अनेक अध्याय खर्ची घातलेलें आहेत. अशाच विषयासंबंधीं स्मृतिग्रंथांमध्येंहि विवेचन आलेलें आहे. त्याचेंहि आपण पूर्वीच अवलोकन केलें आहे पण त्याखेरीज बार्हस्पत्यनीति, शुक्रनीति, चाणक्यनीति वगैरे ग्रंथहि या विषयाचें स्वतन्त्रपणें विवेचन करण्याकरितां तयार झालेले आपणांस आढळून येतात. या ग्रंथांचाहि मुख्य आधार मोठमोठ्या विद्वान पंडित लोकांचा स्वानुभव व त्यांचा त्यांनीं ठिकठिकाणीं करून ठेवलेला सूत्ररूपानें अथवा टांचण रूपानें किंवा श्लोकबद्ध संग्रह हाच होय. असे संग्रह एखाद्या विद्वान घराण्यामध्यें किंवा गुरुकुलामध्यें किंवा गुरुशिष्यपरंपरेमध्यें दीर्घकाल जतन करून ठेवण्यात येत असत व त्यांमध्यें मधून मधून भर घालण्यांत येत असे पण ते बहुधा मूळ पूर्वाचार्यांच्या नावानेंच प्रचलित असत. अशा ग्रंथामध्येंहि आपणांस कांहीं विचार, विद्वान व कार्यकर्त्या लोकांचे अनुभव ग्रथित करणाऱ्या किंवा पूर्वीपासून समाजांत रूढ असलेल्या लोकोक्ति ग्रथित केलेल्या आढळतात.

चाणक्यनीति—अशा तऱ्हेच्या अनेक ग्रंथांचें अवलोकन करण्यास आपणांस येथें वेळ नाहीं. तथापि त्यांतील एक वैशिष्ट्यपूर्ण ग्रंथ म्हणून कौटिल्य अथवा चाणक्य याचें अर्थशास्त्र हा आपणांस आदर्शग्रंथ म्हणून समजण्यास हरकत नाहीं. या ग्रंथाच्या रचनेस आधारादाखल म्हणून मानण्यांत येत असलेलीं चाणक्यसूत्रें म्हणूनहि कांहीं प्रसिद्ध आहेत व अशा कांहीं सूत्रांचे संग्रह चाणक्यनीति म्हणून प्रसिद्ध आहेत. चाणक्य या नांवास महाराष्ट्रामध्यें किती महत्त्व आहे ही गोष्ट या नांवावरूनच मराठींत चाणाक्ष हा अत्यन्त विचिकित्सक व धूर्त मनुष्यास लावण्यांत येणारा शब्द बनला आहे एवढ्यावरून दिसून येईल. चाणक्यसूत्रें म्हणून प्रसिद्ध असलेला संग्रह कौटिलीय अर्थशास्त्रास किती आधारभूत झाला असेल किंवा ह्यापेक्षां तो किती प्राचीन असेल या बाबतींत पंडितांत पुष्कळच मतभेद आहेत परंतु सध्या आपल्यास त्या वादांत शिरावयाचें नसून आपणांस फक्त लोकोक्ति अथवा सुभाषितें याच दृष्टीनें या ग्रंथाकडे पहावयाचें आहे.

या चाणक्य सूत्रांत आपणांस पुढील सामान्यतः सर्व लोकांत प्रचलित असलेल्या लोकोक्ति आढळून येतातः

१ षट्कर्णाद्भिद्यते मन्त्रः। २ नातप्तलोहो लोहेन संधीयते। ३ न देवचरितं चरेत्। ४ अर्थमूलौ धर्मकामौ। ५ क्षुधार्तो न तृणं चरति सिंहः। ६ नास्तिरत्नमखंडितम्। ७ शौण्डहस्तगतं पयोप्यवमन्येत। ८ अजीर्णे भोजनं दुःखम्। ९ विषादप्यमृतं ग्राह्यम्। १० स्वभावो दुरतिक्रमः। ११ श्वो मयूरादद्य कपोतो वरः।

प्रत्यक्ष कौटिलीय अर्थशास्त्रांत यापैकीं एक दोन लोकोक्ति प्रत्यक्ष उपयोगिलेल्या आढळून येतात व इतरहि कांहीं आपल्या दृष्टीस पडतात. त्यांतील कांहीं पुढें दिल्या आहेतः—

मृदुदण्डः परिभूयते। १.३. अप्रणीतोहिमात्स्यन्यायमुद्भावयति। १.३. अर्थमूलौ हि धर्मकामाविति। १.७. पृष्टः प्रियहितं ब्रूयान्न ब्रूयादहितं प्रियम्। अप्रियं वाहितं ब्रूयाच्छृण्वतोऽनुमतो मिथः॥ ५.४. आत्मारक्षाहि सततं पूर्वं कार्या विजानता। नातप्तलोहं लोहेन सन्धत्त इति। ७.२. आपद्धि सौहृदस्थैर्यमुत्पादयति। ७.८. एकं हन्यान्नवाहन्यादिषु क्षिप्तो धनुष्मता। प्राज्ञेन तु मतिः क्षिप्ता हन्याद्गर्भगतानपि॥ १०.६.

पंचतंत्र कथा—यानंतरचा या नीतिवाङ्मयांतील महत्त्वाचा ग्रंथ म्हटला म्हणजे पंचतन्त्र हा होय. या ग्रंथांत पशुपक्ष्यादिकांच्या व कांहीं मनुष्यांच्या काल्पनिक गोष्टी किंवा कथाभागास अनुसरून सामान्य व्यवहारांतील नीतितत्त्वें सांगितलेलीं आहेत व या ग्रंथाच्या उपोद्घातावरून या ग्रंथाच्या वाचनानें सामान्य मनुष्यच काय पण राजपुत्र देखील सज्ञानी होऊन आपल्या राज्याची धुरा वाहण्यास समर्थ होतील असें मूळ योजिलेल्या कथेवरून दिग्दर्शित केलें आहे. या पंचतन्त्रासारखाच किंबहुना त्यावरच आधारलेला हितोपदेश या नांवाचा दुसरा एक ग्रंथ आहे व बहुतेक या ग्रंथाशीं सर्वस्वीं सदृश आहे. या ग्रंथांतील कथा भरतखंडामध्यें फार प्राचीन कालापासून परंपरेनें चालत आलेल्या असून त्यांचा प्रसार इतका दूरवर झालेला होता कीं, यापैकीं कांहीं कथा जागतिक लोकवाङ्मयांत अंतर्भूत झालेल्या आपणांस आढळून येतात. व त्यामुळें यांतील कांहीं सुभाषितें अनेक देशांत प्रचलित असलेलीं दृष्टीस पडतात. या ग्रंथाचे अनुवाद इतर आशियांतील व यूरोपांतील अनेक भाषांत झालेले असून जगांतील फार मोठ्या भागांत आतापर्यंत लोकांचें मनोरंजन व त्याबरोबरच त्यांस बोधामृतपान करवीत आले आहेत.

तेव्हां या दृष्टीनें खरोखरच हे ग्रंथ म्हणजे भरतखंडाचा एक मोठा ठेवा असून त्यांत अनेक सुभाषितें व लोकोक्ति इतस्ततः विखुरलेल्या दृष्टीस पडतात. त्यांतील कांहीं रामायण, महाभारत मनुस्मृति वगैरे ग्रंथांतहि आढळून येतात. ह्यावरून अशा तऱ्हेचीं सुभाषितें किंवा लोकोक्ति या खरोखर फार प्राचीन काळापासून सार्वभारतीय स्वरूप पावलेल्या असाव्या असें वाटतें.

अर्थात् आपणांस या ठिकाणीं पंचतंत्रांतील सर्वच सुभाषितें देतां येणार नाहींत, कारण त्यांची संख्या फारच मोठी आहे तथापि त्यांतील कांहीं विशेष प्रचलित अथवा सर्वतोमुखीं असलेलीं येथें उद्धृत करण्याचा प्रयत्न करूं.

अनन्तपारं किलशब्दशास्त्रम्।–पंच. प्र. १०. अरक्षितं तिष्ठति दैव रक्षितम्। १.२४. अव्यापारेषु व्यापारं। १-२६. षट्कर्णो भिद्यते मन्त्रः। १.११२. स्वस्थे को वा न पण्डितः। १.१४३. अनिर्वेदः श्रियो मूलम्। १.३७४. घटे दीप इवाहितः। १.४४०. अतितृष्णा न कर्तव्या। २.७८. छिद्रेष्वनर्था बहुली भवन्ति। २.१८८. बुभुक्षितः किं न करोति पापम्। ४.१६; ४.३२. कण्टकेनैव कंटकम्। ४.१९. मौनं सर्वार्थ साधनम्। ४.५१. प्राहुः साप्तपदं मैत्र्यम्। ४.७०. सतां सप्तपदा मैत्र्यम्। २.४७. अतिलोभो न कर्तव्यः। ५.२०. कलहान्तानि हर्म्याणि। ५.६४. दुष्टे दुष्टं समाचरेत्। ५.७०.

यांपैकीं कांहीं सुभाषितें तर संस्कृत रूपांतच आज मराठी भाषा बोलणाऱ्यांच्या तोंडीं आढळून येतात. कांहीं सुभाषितें मराठींत भाषांतर करून आलीं आहेत. उदा० 'देवतारी त्याला कोण मारी. गोष्ट षट्कणा होणें. तसेंच मृच्छकटिकांतील 'रंग पिळुनि अळिता जणु देति फेकुनी' ही पदपङ्क्ती पंचतन्त्रांतील 'स्त्रियः कृतार्थाः पुरुषं निरर्थं निष्पीडितालक्तकवत्यजन्ति।' या पंक्तीचें भाषान्तर आहे. मराठीमध्यें अतिशय रूढ असलेल्या 'एका हातानें टाळी वाजत नाहीं' या म्हणीचें मूळहि आपणांस पंचतन्त्रापर्यंत नेता येतें ही गोष्ट कौतुकास्पद होय. 'यथैकेन न हस्तेन तालिकः संप्रपद्यते' (पंच. २-१३८) या लोकार्धांत ही म्हण ग्रथित केलेली आपणांस प्रथम पंचतन्त्रात आढळते.

तसेंच 'पक्ष्यांत काऊ व माणसांत न्हाऊ' या मराठी म्हणींत व्यक्त झालेली लोकांची समजूत निदान पंचतन्त्राइतकी तरी जुनी आहे, ही गोष्ट आपणांस 'नराणां नापितो धूर्तः पक्षिणां चैव वायसः।'–पंच ३.७३ या श्लोकावरून कळून येते. तसेंच 'हत्तीला अंकुश केवढा असतो.' या मराठी म्हणीचें मूळ आपणांस 'हस्ती स्थूलतरः स चांकुशवशः किं हस्तिमात्रोंकुशः।' पंच १.३७३ या श्लोकापर्यंत नेता येतें.

तसेंच 'आकारे रंगते चेष्टा' ही म्हण आकारैरिंगितैर्गत्या चेष्टया भाषणेन च (पंच. १.५०) या पंचतंत्रांतील श्लोकार्धाचें अपभ्रष्ट स्वरूप होय ही गोष्ट आपल्या लक्ष्यांत येते. हा श्लोक मनुस्मृतीमध्येंहि आढळून येतो (मनु. ८.२६).

या प्रमाणेंच हिंदी भाषेमध्यें आढळणारी 'अकेला चणा भाड नही फोड सकता' ही म्हण उत्पतितोऽपि चणको भ्राष्ट्रं भंक्तुं न शक्नोति।' (पंच. १.१४८) या श्लोकाचा अनुवाद आहे.

एवढेंच नव्हे तर सर्व पृथ्वीवरहि एकाच तऱ्हेच्या उक्ती कशा उगम व विकास पावत असतात व एकाच प्रकारचा चमत्कार अथवा गोष्ट मनुष्यास एकसारखी दृष्टीस पडत गेली म्हणजे ती त्याच्या अन्तःकरणावर कायमचा ठसा उठवून तत्सदृश गोष्ट दिसली असतां त्या चमत्काराची स्मृति त्यास होऊन कदाचित् तेच किंवा त्याच प्रकारचे उद्गार त्याच्या तोंडून निघतात किंवा कोणी तसे उद्गार पूर्वी काढले असल्यास त्यांचें पुनरुच्चारण करून मनुष्य वर्तमान व भूतसदृश गोष्टींची सांगड घालतो व अशा प्रकारें कांहीं वाक्प्रचार अथवा म्हणी उत्पन्न करतो किंवा प्रचारांत आणतो ही गोष्ट आपणांस पुढें दिलेल्या एक दोन उदाहरणांवरून लक्ष्यांत येईल.

उदाहरणार्थ संस्कृतमध्यें 'जलबिंदुनिपातेन क्रमशः पूर्यते घटः' ही उक्ति रूढ आहे तशाच तऱ्हेचें वाक्य अथवा उक्ति Constant dropping wears away a stone ही इंग्रजींत आढळते. या दोहोंची आपण सांगड घालतों पण यापेक्षांहि सदृश असा 'अम्भसा भिद्यते शैलस्तथा मंत्रोप्य रक्षितः' या श्लोकार्धांतील प्रथम पादाकडे आपण पाहिलें म्हणजे मनुष्याच्या मनावर तेच तेच सृष्टचमत्कार पाहून तोच तोच ठसा उमटत जातो व त्यामुळें अशा तऱ्हेचे सर्व जगांस परिचित असे वाक्यप्रचार उत्पन्न होतात हें पाहून मोठें कौतुक वाटतें.

याप्रमाणेंच Prevention is bettar than cure या इंग्रजी म्हणीशीं सदृश अशी 'प्रक्षालनाद्धिपंकस्य दूरादस्पर्शनं वरम्।'–पंच. २.१६८ श्लोकपंक्ति पाहिली म्हणजेहि आपल्या मनास मानवी मन हें सर्वत्र एकाच दिशेनें कसें विचार करीत असतें व त्याचा विकासहि कसा एका विशिष्ट पद्धतीनेंच होत जात असतो ही गोष्ट आपल्या प्रत्ययास येते.

भर्तृहरिशतकत्रय—यानंतरचा या नीतिवाङ्मयांतील एक महत्वाचा ग्रंथ म्हटला म्हणजे भर्तृहरीचें नीतिशतक होय. भर्तृहरीच्या नांवावर असलेलीं तीनहि शतकें अतिशय लोकप्रिय आहेत; तथापि त्यांपैकीं नीतिशतक हें सर्वत्रांच्या अधिक परिचयाचें आहे. कारण त्याचें वामनपंडितादिकांनीं भाषांतर केलेलें आहे. त्यामुळें त्यांतील मराठी श्लोक पुष्कळांच्या वाचनांत येऊन अनेकांनीं तोंडपाठ केलेले आढळतात. यामुळें त्यांतील कांहीं भाग म्हणीचें स्वरूप पावला आहे. अशीं कांहीं उदाहरणें द्यावयाचीं तर प्रथम संस्कृत भाषेंतील मूळाकडे पाहिल्यास आपणांस पुढें दिल्याप्रमाणें कांहीं वाक्यें अतिशय सार्वत्रिक व लोकोक्तिरूप आढळतील. 'बोद्धारोमत्सरग्रस्ताः।'–नी. १. 'विभूषणं मौनमपंडितानाम्।'–नी. ६. 'मूर्खस्य नास्त्यौषधम्।'–नी. १०. 'विद्याविहीनः पशुः'–नी. १६. 'न खलु वयस्तेजसां हेतुः'–नी. ३०. 'सर्वे गुणाः कांचनमाश्रयन्ति'–नी. ३२. 'शीलंपरंभूषणम्'–नी. ८०. भाषांतररूपानें 'केला जरी पोत बळेंचि खाले। ज्वाला तरी ते वरतीं उफाळे।–नी. ७६. किंवा 'कीं तोडिला तरू फुटे अणखी भरानें। तो क्षीण हि विधु महोन्नति घे क्रमानें,'–नी. ७९. या सारखीं सुभाषितें सर्वत्रांच्या तोंडीं आपणांस आढळून येतात. वैराग्य शतकांतील 'कालाय तस्मै नमः'–वै ४१ किंवा 'संदीते भवनेतु कूपखननं प्रत्युद्यमः किंदृशः'–वै. ७५ अथवा 'शून्यालये दीपवत्'–वै. ४६ यांसारखीं कांहीं सुभाषितेंहि लोकप्रिय झालेलीं आपणांस दिसून येतील.

याप्रमाणें या नीति वाङ्मयानेंहि संस्कृतभाषेच्या सुभाषित संग्रहांत फार मोठी भर घातलेली असून अनेक लोकोक्ति जपून ठेवण्याचें किंवा प्रचलित करण्याचें फार महत्वाचें व समाजास अत्यंत उपकारक असें कार्य केलें आहे.

लौकिक न्याय—याप्रमाणें आतांपर्यंत आपण संस्कृत वाङ्मयाचें लोकोक्तींच्या दृष्टीनें वेदसंहिता, ब्राह्मणें, उपनिषदें, स्मृतिग्रंथ, रामायण, महाभारत, भगवद्गीता इत्यादींचें विहंगमावलोचन केलें. रामायण व महाभारत यांस इतिहास व अग्निपुराण, वायुपुराण, भागवतादि ग्रंथास पुराणें म्हणतात पण सामान्यतः त्यांचे स्वरूप आपल्या सध्यांच्या नियमित दृष्टीनें पहावयाचें म्हणजे फारसें भिन्न नाहीं व त्यांतील सुभाषितांची कल्पना रामायण-महाभारतावरून येण्यासारखी असल्यामुळें व स्थलाभावामुळें येथें पुराणांचें अवलोकन करण्याचें रहित केलें आहे.

त्यानंतर महत्त्वाचें असें नीतिवाङ्मय यांचेंहि विहंगमावलोकन आपण केलें आहे. त्यांत नमुन्यादाखल चाणक्यनीति सूत्रें व अर्थशास्त्र, पंचतन्त्र, भर्तृहरीचें शतकत्रय यांचें ओझरतें दर्शन आपण घेतलें आहे.

यानंतर लोकोक्तींच्या दृष्टीनें महत्त्वाचें असें संस्कृत वाङ्मय म्हटलें म्हणजे संस्कृत भाषेंत ज्यास न्याय म्हणतात तें होय. अशा तऱ्हेचे न्याय अथवा दृष्टांत संस्कृत ग्रंथात अत्यंत प्राचीन काळापासून म्हणजे वेदसंहिताकालापासून योजण्याचा प्रघात आहे व अशा न्यायांचे संग्रहहि लहान मोठे आतांपर्यंत प्रसिद्ध झाले आहेत व ते इतस्ततः संस्कृत वाङ्मयांत सर्वत्र विखुरलेले दृष्टीस पडतात.

या न्यायांमध्यें अनेक दृष्टान्त व म्हणी ग्रथित केलेल्या आपणांस आढळतात. तसेंच या संग्रहामध्यें प्राचीन काळापासूनचे ब्राह्मणी, जैन व बौद्धग्रंथांतीलहि न्याय ग्रथित केलेले आहेत. त्यांपैकीं कांहींस आभाणक असें मूळांतच स्पष्ट म्हटलेलें आहे. कांहीं अगदीं दोन तीन शब्दांत रूपक, उपमादिस्वरूपांत आढळतात तर कांहीं पूर्ण श्लोकांत दृष्टीस पडतात. अनेक प्रकारच्या चर्चा व विवेचन प्रसंगीं व अनेक प्रकारच्या ग्रंथांत हे उदाहरणादाखल अथवा दृष्टांताकरितां योजिलेले आपणांस दिसून येतात. या सर्वांचें सोदाहरण विवेचन करावयाचें म्हणजे एक स्वतंत्र ग्रंथच होईल. तेवढा अवकाश आपणांस येथें नाहीं याकरितां केवळ त्यांच्या स्वरूपाचें थोडेंसें दिग्दर्शन करून आपणांस सध्या आपली जिज्ञासा भागवून घेतली पाहिजे. पुढें मागें एखाद्या स्वतंत्र ग्रंथांत या सर्वच विषयाचें साग्र विवेचन करणें शक्य झाल्यास तसें करण्याचा विचार येथें प्रदर्शित करून सध्या पुढें जाऊं.

संस्कृत वाङ्मयांत प्रचलित असलेल्या अनेक दृष्टान्तरूप न्यायांपैकीं कांहीं न्याय मूळ संस्कृतप्रमाणेंच जशाचे तसे मराठींत रूढ असलेले आढळून येतात. अशांचीं उदाहरणें अनेक देतां येतील; परंतु येथें केवळ नमुन्याकरितां कांहीं देत आहे. उदाहरणार्थः–अजाकृपाणीय न्याय, अंधगजन्याय, अंधदर्पणन्याय, अंधपरंपरान्याय, अशोकवनिकान्याय, अहिनकुलन्याय, काकतालीय न्याय, काकाक्षिगोलकन्याय, कूपयंत्रघटिकान्याय, कूपमंडूकन्याय, देहलीदीपन्याय, मण्डूकप्लुति न्याय, विषकृमिन्याय, विषवृक्षन्याय, इत्यादि अनेक न्याय संस्कृत स्वरूपांतच मराठी भाषेमध्यें वापरले जातात. तसेंच गंधर्वनगर, अरण्यरोदन, तुषकंडन, इंद्रजाल, खपुष्प, बीजांकुर, स्मशानवैराग्य, इत्यादि वाक्प्रचार तत्सम स्वरूपांतच मराठींमध्यें रूढ आहेत.

काहीं दृष्टान्तपर न्याय भाषांतर होऊन मराठींत उतरले आहेत. अशांपैकीं काहीं उदाहरणें द्यावयाचीं झाल्यास आजा मेला नातु झाला (सुतजन्ममृतिन्याय), जो करील तो भरील (यःकुरुते स भुंक्ते), दगडापेक्षां वीट मऊ (अश्मलोष्ठ-न्याय, पाषाणेष्टकान्याय), बुडत्यास काडीचा आधार, (काश कुशावलंबन न्याय), शेळीमागून शेळी जाते (गड्डुरिका प्रवाहन्याय), भटास दिली ओसरी भट पाय पसरी (भिक्षुपादप्रसारण न्याय), सासूनें नाहीं म्हणून सांगणें (श्वश्रूनिर्गच्छोक्तिन्याय), दांतीं तृण धरणें (तृणभक्षणन्याय), जीवावरचें शेपटावर गेलें (मरणाय गृहीतोंगच्छेदं स्वीकरोति), कांट्यानें कांटा काढावा (कंटकन्याय, कंटकेनैव कंटकम्), चोर सोडून संन्याशाला सुळीं देणें (चौरापराधान्माण्डव्यनिग्रहः), शितावरून भाताची परीक्षा (स्थालीपुलाकन्याय), आधीं कळस मग पायारे (कलश पुरःसर प्रासाद निर्माणम्), जांवई शोध (जामातृशुद्धिन्याय). काहीं न्याय हिंदी भाषेमार्फत मराठींत रूढ झालेले आहेत किंवा होऊं पाहात आहेत. उदाहरणार्थ–अंधेके हात बटेर (अंधचटकन्याय, अन्धकवर्तकीन्याय), पूत मंगनेको गई और कसम खाके आई किंवा भर्ता खोके आई (पुत्र लिप्सया देवं भजन्त्या भर्तापि नष्टः), आग लगनेपर कुवा खोदना (संदीप्ते भवने तु कूपखननं), अकेला चना भाड नहीं फोड सकता (उत्पत्तितोऽहि चणकः शक्तोनभ्राष्ट्रकं भंक्तुम् ।).

याप्रमाणे संस्कृत भाषेमध्यें प्रचलित असलेल्या न्यायरुपी दृष्टान्त किंवा सुभाषितांवरून पुष्कळच मराठी वाक्प्रचार व म्हणी रूढ झालेल्या आहेत त्यांचा विस्तृत प्रपंच करणें स्थलाभावामुळें येथें शक्य नाहीं तथापि हा एक स्वतंत्र विषयच असून त्याचें विस्तृत विवेचन केल्यास तें फारच मनोरंजक व उद्बोधक झाल्याशिवाय राहणार नाहीं.

येथें न्यायांसंबंधानें एक गोष्ट मात्र नमूद केली पाहिजे कीं, यांपैकीं कित्येक न्याय अत्यन्त प्राचीन कालापासून दृष्टान्तादाखल उपयोगांत येत असल्याचें आढळून येतें. उदाहरणार्थ 'आयुर्धृतम' व नासिप्रोतोष्ट्रन्याय हे तैत्तिरीय संहिते मध्यें (तैसं.२.३.२,२; तैसं.२.१.१.२) योजलेले आढळतात. तसेंच काहीं न्याय बौद्ध वाङ्मयामध्येंहि प्रथम उल्लेखिलेले आढळतात, उदाहरणार्थ, मनुष्य जन्माची दुर्लभता दाखविण्याकरितां योजलेला दृष्टान्त 'महार्णवगयुच्छिद्रेकूर्मग्रीवार्पणन्याय'–अत एवाहभगवान्मानुष्यमति दुर्लभम् । महार्णवयुगच्छिद्रेकूर्मग्रीवार्पणोपमम् । हा मज्झिमनिकाय या बौद्ध ग्रंथांत व बोधिचर्यावतार टीकेमध्यें आढळतो; तसेंच मागें उल्लेखिलेल्या जैन कथाकोशांतहि ही गोष्ट वर्णन केलेली आढळते. 'आम्रान्पृष्टः कोविदारानाचष्टे' हा न्याय बहुधा पतंजलीनें बौद्ध ग्रंथांवरून घेतला असावा. कारण याचा उल्लेख प्रथम सामञ्ञ फलसुत्तांत 'अंबंवापुट्ठो लबुजंव्याकरेय्यल बुजं वा पुट्ठो अंबंव्याकरेय्य' अशा प्रकारें केलेला आढळतो. अशीं आणखीहि काहीं उदाहरणें देतां येतील. हे न्याय सर्व वाङ्मयांत अत्यंत दीर्घकालापासून इतस्ततः विखुरलेले असून अनेक ग्रंथकारांनीं त्यांचा उपयोग आपल्या विवेचनामध्यें स्वमतसमर्थनार्थ व परमतखंडनार्थ केलेला आढळून येतो. तसेंच ते पंचतंत्र, हितोपदेश इत्यादि नीतिग्रंथांतहि विपुलतेनें उपयोगांत आणलेले दिसतात. त्या त्यांच्या सार्वत्रिकतेमुळेंच त्यांनीं मराठी व इतर देश्य भाषांत अनेक म्हणींस जन्म दिला आहे.

अलंकार—या न्याय किंवा दृष्टान्तांचें अथवा म्हणींचें अर्थालकारांच्या दृष्टीनें परीक्षण करावयाचें असल्यास आपणांस असें दिसून येईल कीं, यांचा विकास उपमा, रूपक, दृष्टान्त, अर्थान्तरन्यास व लोकोक्ति या क्रमानें झालेला आहे. प्रथम केवळ एखादा प्रसंग, परिस्थिति किंवा एखादी गोष्ट मनुष्यास दिसल्यास त्याच्या मनांतील काहीं स्मृति अथवा संकेत जागृत होऊन तो प्रस्तुत प्रसंगाची अथवा वस्तूची आपल्या स्मृतींतील प्रसंगाशीं अथवा वस्तूशीं सहज-सादृश्यामुळें तुलना करतो व त्या स्मृत प्रसंगाची उपमा प्रस्तुत प्रसंगास किंवा वस्तूस देतो. याप्रमाणें केवळ उपमेनें एखादा न्याय व्यक्त होतो. उदाहरणार्थ पर्जन्यवत् , प्रदीपवत् , मदशक्तिवत् , सिकताकूपवत् , मध्यदीपिका, मन्दविष, नर्तकन्याय, दग्धपटन्याय, धनंजन न्याय इ. आयुर्धृतम् , नड्वलोदकं पादरोगः, दधित्रपुसं सीतज्वरः, इत्यादि न्याय रूपकात्मक आहेत.

यानंतर काहीं प्रसंगांचा अथवा गोष्टींचा दृष्टान्त म्हणून उपयोग करून काहीं न्याय सिद्ध होतात. उदाहरणार्थ, कूपमण्डूकन्याय, कूपयंत्र घटिकान्याय, चित्रांगनान्याय, तप्तायःपीतांबुन्याय, तस्करकन्दुकन्याय, तिलतण्डुलन्याय, दग्धबीजन्याय, इत्यादि.

काहीं न्याय अर्थांतर न्यासाचीं उदाहरणें आहेत. उदा० क्रियासिद्धिःसत्त्वे भवति महतां नोपकरणे ।, सर्वेगुणाः कांचनमाश्रयायन्ति ।, परोपकाराय सतां विभूतयः ।

काहीं न्याय तर लोकोक्ति अलंकार म्हणूनच मानण्यांत येतात.

अभिजात वाङ्मयांतील सुभाषितें—यानंतर अभिजात संस्कृत वाङ्मयाचें केवळ ओझरतें जरी अवलोकन केलें तरी त्यांत आपणांस अनेक लोकोक्ति अथवा सुभाषितें इतस्ततः विखुरलेलीं आढळतील. तसेंच अशा सुभाषितांचें

अनेक संग्रह आतांपर्यंत प्रसिद्ध झालेले आहेत. अर्थात् अशा सुभाषित संग्रहांमध्यें केवळ लोकोक्ति किंवा सुभाषितापेक्षां कूटपद्यें, निरनिराळीं स्वभावादि वर्णनें, काव्यमय चमत्कार वगैरेचें मिश्रण केलें आहे. त्यामुळें त्यांस बाडाचें स्वरूप आलें आहे हें खरें. तथापि एकंदरींत त्यांत सुभाषितांचाहि चांगला संग्रह केलेला आढळून येतो.

आपणांस येथें सर्वसामान्य सुभाषितांकडे किंवा त्यांच्या अनेक प्रकारांकडे लक्ष घ्यावयास अवकाश नाहीं. तथापि कांहीं प्रमुख संस्कृत कवींच्या काव्यांतून जीं सुभाषितें इतस्ततः विखुरलेलीं आढळतात व ज्यामध्यें अनेक मराठी म्हणींचें मूळहि आपणांस जागोजागीं दृष्टीस पडतें किंवा जीं मराठींत प्रत्यक्षच म्हणींप्रमाणें वापरण्यांत येतात अशा कांहीं प्रसिद्ध कवींच्या काव्यांतील सुभाषितांकडे विहंगमावलोकन करून पुढें जाऊं.

अर्थात् अशा कवींच्या काव्यांचें अवलोकन करावयाचें म्हणजे प्रथम कविकुलगुरु कालिदास याच्या काव्यांकडे प्रथम दृष्टिक्षेप करून नंतर इतर कवींच्या कृतींतील सुभाषितांचा नमुन्यादाखल उल्लेख करून पुढें जाऊं.

कालिदासाच्या सर्व ग्रंथांत शाकुंतलास आद्यस्थान देतात. त्या ग्रंथाचें प्रथम अवलोकन केल्यास आपणांपुढें सहजच पुढील सुभाषितें येतात. अशीं बरींचशीं सुभाषितें आज सामान्य जनांच्या तोंडींहि आढळून येतात. अतिस्नेहः पापशंकी, अनिर्वर्णनीयं परकलत्रम्, रन्ध्रोपनिपातिनोऽनर्थाः, नास्त्यगतिर्मनोरथानाम्, पत्तने सति ग्रामे रत्नपरीक्षा. यानंतर इतर ग्रंथांतहि अनेक सुभाषितें दृष्टीस पडतात. त्यांतील कांहीं पुढें दिलीं आहेत. पुराणमित्येव न साधु सर्वम्, प्रसादचिह्नानि पुरःफलानि, रत्नं समागच्छतु कांचनेन, विषमप्यमृतं क्वचिद्भवेत्, मरणं प्रकृतिः शरीरिणाम्, तेजसां हि न वयः समीक्ष्यते, आज्ञा गुरूणां ह्यविचारणीया, शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम्, मनोरथानामगतिर्न विद्यते, याच्ञामोघावरमधिगुणे नाधमेलब्धकामा, नीचैर्गच्छत्युपरि च दशा चक्रनेमिक्रमेण इ०.

यानंतर बाण कवीच्या काव्यांतील कांहीं सुभाषितें घ्यावयाचीं तर उदाहरणांदाखल हर्षचरितांतील कांहीं पुढें उद्धृत केलीं आहेत. अतिद्रुतवाहिनी चानित्यता नदी, उपयोगं तु प्रीतिर्न विचारयति, औरसदर्शनं हि यौवनं शोकस्य, गन्तैव ननु गन्तव्या एव लोकवृत्तयः, को हि नाम सहते विरहमपत्यानाम्, भव्यान द्विरुच्चारयन्ति वाचम्, प्रतापसहायाहि सत्त्ववन्तः, शुभागमो निमित्तेन स्पष्टमाख्यायते लोके, श्रियो हि दोषान्धतादयः कामला विकाराः, स्त्रियो हि विषयः शुचाम्।

यानंतर भारवी कवीच्या ग्रंथामध्येंहि आपणांस अनेक सुभाषितें आढळतात. त्यांपैकीं 'हितं मनोहारि च दुर्लभं वचः', बालादपि सुभाषितं ग्राह्यम्', 'ज्वलितं न हिरण्यरेतसंचयमास्कन्दति भस्मनां जनः' 'वरं विरोधोपि समंमहात्मभिः' हीं लोकप्रिय आहेतच पण 'सहसा विदधीत न क्रियां अविवेकः परमापदां पदम्' हें भारवीचें वचन तर सर्वतोमुखीं असून त्यावर अनेक कथा रचलेल्या ऐकिवांत येतात.

हर्षाच्या नैषधचरिताकडे पाहिल्यास त्यांतहि 'स्वत एव सतां परार्थता ग्रहणानांहि यथा यथार्थता' यासारखीं सुभाषितें आपल्या दृष्टीस पडतात.

अशा प्रकारें संस्कृतवाङ्मय हें म्हणी अथवा लोकोक्ति किंवा सुभाषितें यांनीं अतिशय समृद्ध असें असून त्यांतील अनेक सुभाषितें सर्वतः सामान्य लोकांच्या तोंडींहि असलेलीं आपणांस आढळतात व त्यांतील अनेक सुभाषितांनीं मराठींतील कित्येक म्हणींस जन्म दिला आहे. यामुळें त्यांचें महत्त्व फार आहे.

याप्रमाणें आतांपर्यंत आपण म्हणींचा इतिहास पहावयाच्या दृष्टीनें भरतखंडांतील अर्वाचीन सर्व भाषांच्या व त्याप्रमाणें मराठीच्याहि मातृस्थानीं असणारी जी संस्कृतभाषा त्या भाषेंतील अगदीं आद्यवाङ्मय जें वैदिक वाङ्मय त्यापासून उत्तरकालीन अभिजात वाङ्मयाचें विहंगमावलोकन केलें व त्या वाङ्मयांत ज्या लोकोक्ति अथवा सुभाषितें इतस्ततः विपुलतेनें विखुरलीं आहेत त्यांचें ओझरतें निरीक्षण केलें आणि हें करण्याचें मुख्य कारण म्हणजे आज मराठींत विद्यमान असलेल्या अनेक वाक्प्रचार व म्हणींचें मूळ आपणांस वेदकालाइतक्या प्राचीन कालापर्यंतहि आढळून येतें हें होय. आपल्या या भारतांत ही म्हणींची परंपरा इतकी प्राचीन आहे ही गोष्ट खरोखरच कौतुकास्पद आहे आणि अशा रीतीनें आपणांकडील ही परंपरा सातत्यानें इतक्या दीर्घकाल टिकल्यामुळेंच पाश्चात्यांना पौरस्त्य भाषांत इतकी लोकोक्तींची समृद्धि असलेली पाहून आश्चर्य वाटतें.

म्हणींची परंपरा—संस्कृत भाषा ज्यावेळीं सर्वसामान्य लोकांच्या बोलण्यांत प्रत्यक्ष वापरली जात होती त्यावेळीं संस्कृत भाषेंत अनेक वाक्प्रचार व म्हणी उत्पन्न झाल्या हें आपणांस दिसून आलेंच आहे. यानंतर सामान्य लोकांच्या बोलण्यांतील भाषा हळूहळू वाङ्मयीन व पाणिनीय संस्कृतभाषेपासून दूरावत चालली व त्या ठिकाणीं प्रथम संस्कृत

मिश्रित प्राकृत व पुढें प्राकृत भाषांचा प्रचार वाढत चालला. ही प्राकृत भाषांची परंपराहि फार जुनी असून बौद्ध कालापर्यंत तिचा माग आपणांस पाली व मागधी भाषांतील वाङ्मयावरून सहजच काढतां येतो. हें वाङ्मयहि विपुल असून त्याचाहि प्रचार प्रथम प्रथम तोंडी परंपरेनेंच होत असे. स्वतः बुद्ध आपल्या प्रचाराच्या कामीं सामान्य लोकांच्या बोलीचाच म्हणजे पालीचाच उपयोग करीत असे व त्यांतहि दृष्टान्त कथा, प्राचीन गाथा व अनेक जुन्या पुराण्या गोष्टी, दाखले वगैरेचा भरपूर उपयोग करीत असे व आपला उपदेश लोकांच्या मनांवर ठसावा म्हणून प्राचीन वचनांचा व म्हणींचा उपयोग वरचेवर करीत असे यामुळें सामान्यतः बौद्ध वाङ्मय हें अशा प्रकारच्या दृष्टान्त कथा, गाथा व सुभाषितें यांनीं भरपूर समृद्ध आहे. याचा मासला आपणांस धम्मपदादि ग्रंथांत व जातक कथादि कथा संग्रहांत पुष्कळच प्रमाणांत आढळून येतो. जैन वाङ्मयांतहि प्राकृत भाषेंतील अशा कथांचा व गाथांचा विपुल संग्रह असून त्यांत सुभाषित संग्रहहि अनेक आहेत हेंहि आपण कथाकोशादिकांच्या उदाहरणांवरून पाहिलें आहे.

याखेरीज हालाची गाथासप्तशती वगैरे जें प्राकृत वाङ्मय आहे त्यांतहि अनेक म्हणी वापरलेल्या आपल्या दृष्टीस पडतात व त्यांतील कित्येक म्हणी आजहि मराठी स्वरूपांत आपणांमध्यें रूढ आहेत. याप्रमाणें अनेक मराठी म्हणींचें मूळ वैदिक वाङ्मयापासून प्राकृत वाङ्मयापर्यंत निरनिराळ्या विस्तीर्ण क्षेत्रांत पसरलें आहे ही गोष्ट आपल्या प्रत्ययास येईल.

आज मराठी भाषेंत रूढ असलेल्या 'हातीं असेल तो दाम' या म्हणीचें मूळ आपणांस हालाच्या सप्तशतींत पुढील गाथेंत आढळून येतें. 'सो अत्थो जो हत्थे तं मित्तं जं णिरंतरं वसणे। तरूअं जत्थ गणा तं विण्णाणं जहिं धम्मो॥' तसेंच पाषाणावरची रेघ किंवा काळ्या दगडावरची रेघ आणि पाण्यावरची रेघ या दोन्ही परस्परविरुद्ध स्थिर व अस्थिर असतात हा वाक्प्रचारहि आपणांस या गाथासंग्रहांत दृष्टिस पडतो. करिन्ति त्रिअ णासइ उअए रेहव्व खलजणे मेत्ति। सा उण सुअणम्मि कआ अणहा पाहाण रेहव्व॥

तसेंच हातच्या कांकणाला आरसा कशाला ही म्हण कर्पूरमंजरीसट्टक या प्राकृत नाटकांत योजलेली आढळते. अहवाहत्थकंकणं किं दप्पणेण पेक्खी अदि' (कर्पू. १७.२). तसेंच हातचें सोडून पळत्याच्या पाठीस लागणें या अर्थी संस्कृतमध्यें 'वरमद्य कपोतः श्वो मयूरात' असा जो वाक्प्रचार आहे त्याचा उपयोग विद्धशालभंजिका या नाटिकेंत केलेला आढळतो 'वरं तत्कालोपनता तित्तिरी न पुनर्दिवसांतरितामयूरी।' याप्रमाणें प्राकृत भाषा ह्या संस्कृत भाषेच्या आधारानेंच वाढीस लागल्या असल्यामुळें ही संस्कृत सुभाषितांची परंपरा प्राकृत भाषांमार्फत अव्याहत रीतीनें आजच्या अर्वाचीन भाषांपर्यंत अखंडित रीतीनें चालू असलेली आढळते.

पाश्चात्य वाङ्मयाचें अवलोकन्—ज्याप्रमाणें पौरस्त्य देशांत अत्यंत प्राचीन कालापासून सामान्य लोकांच्या व्यवहारांत म्हणींचा उपयोग करण्यांत येत असल्याचें आपण पाहिलें त्याप्रमाणें पाश्चात्य राष्ट्रांतहि लोकव्यवहारामध्यें म्हणींचा उपयोग मधून मधून केलेला आपल्या दृष्टीस पडतो. ख्रिस्ती धर्माचा आद्यग्रंथ जो बायबल त्यामध्यें तर अशा प्रकारच्या म्हणींनीं ३१ प्रकरणें व्यापलीं आहेत व त्यांपैकी कांहीं म्हणींचें मूळ इजिप्तचा एक प्रसिद्ध बादशहा अमेनोफिस याच्या व अहिकार याच्या सुभाषितसंग्रहांत असावें असें विद्वानांचें मत आहे. या बायबलांतील संग्रहावर विस्तृत विवेचन करण्यासारखें आहे पण येथें त्यास अवकाश नाहीं. येशूख्रिस्ताच्या तोंडींहि कांहीं म्हणी घातलेल्या आपणांस बायबलांत आढळून येतात. उदाहरणार्थ 'वैद्यानें प्रथम स्वतःस रोगमुक्त करावें' (Physician cure Thyself) या बरोबरच 'साधूला स्वदेशांत मान नसतो' (A Prophet is not honoured is his own country) ही म्हण व 'एकानें पेरावें व भलत्यानें कापावें' (John) ४.३७) ही म्हणहि ख्रिस्ताच्या तोंडीं घातलेली आपणांस आढळते.

तथापि बायबलांतील म्हणींचा संग्रह हाहि कांहीं पाश्चात् देशांतील सर्वांत जुना संग्रह म्हणतां येणार नाहीं. ख्रिस्तपूर्व वाङ्मयांतहि आपणांस म्हणींचा उपयोग केलेला आढळून येतो. व बायबलांतीलहि कांहीं म्हणी पूर्वीच्या वाङ्मयांत वापरलेल्या आढळून येतात. उदाहरणार्थ, सेंट पॉल यानें (१ कोरिंथियन १५.३३) 'दुर्जनसंगतीनें सज्जन बिघडतात' ही म्हण वापरली आहे. ती ख्रिस्तपूर्व चवथ्या शतकांत होऊन गेलेल्या मिनँडर नांवाच्या एका ग्रीक नाटककारानें आपल्या एका नाटकामध्यें एका पात्राच्या तोंडीं घातलेली आढळते. त्यानेंहि ती म्हण म्हणूनच वापरलेली असल्यामुळें ती त्यापेक्षांहि कदाचित् फार प्राचीन असणें संभवनीय आहे. आपलें 'असंगसंगदोषेण सत्यश्च मतिविभ्रमः' हें सुभाषित वरील म्हणीशीं ताडून पाहण्यासारखें आहे.

त्याप्रमाणेंच ग्रीक लोकांतील अत्यंत प्रसिद्ध असे जे स्पार्टा येथील लॅसिडोमोनियन लोक त्यांच्यामध्यें 'आत्मानं प्रथमं विद्धि' प्रथम स्वतःला ओळख याअर्थी 'Know thyself' ही म्हण रूढ असलेली आढळते. आज ही म्हण जवळ जवळ सर्व भाषांत व सर्वांच्या तोंडीं झालेली आपणांस आढळते. पण हिची प्राचीनता स्पार्टन कालापर्यंत आपणांस ज्ञात आहे. हे स्पार्टन लोक अगदीं अल्पभाषित्वाबद्दल फार प्रसिद्ध होते. ते ज्याप्रमाणें प्रत्येक गोष्टींत साधेपणाचा बाणा बाळगीत, त्याप्रमाणें ते बोलतांनाहि अगदीं मोजके शब्द वापरीत; विनाकारण पाल्हाळ लावणें हा त्यांच्यामध्यें दुर्गुण समजला जात असे. म्हणून त्यांच्या भाषेवरूनच किंवा बोलण्यावरून अल्पभाषित्वाला Laconic हा शब्द रूढ झाला होता.

प्लेटोनें या स्पार्टन किंवा लॅसिडिमोनियन लोकांबद्दल असें म्हटलें आहे कीं, एखाद्यानें जर यांचेपैकीं एखाद्याजवळ संभाषणाचा प्रयत्न केला तर या बाबतींत ते त्यास प्रथमतः अगदींच कनिष्ठ प्रतीचे व अनभ्यस्त वाटण्याचा बहुधा संभव असे. परंतु योग्य संधि आली असतां वरून सामान्यतः अडाणी किंवा बावळट दिसणारा हा मनुष्य एखाद्या बाणाप्रमाणें एखादें असें अचूक, तीक्ष्ण, व चटकदार पण अगदीं मोजक्या शब्दांचें लहानसें वाक्य झोंकून देई कीं त्याचा प्रतिपक्षी त्याच्या पुढें अगदीं बालिश ठरून जावयाचा. यावरूनच 'लॅकॉनिक स्पीच' म्हणजे एखादें तत्त्वपूर्ण व अन्वर्थक लहानसें चटकदार वाक्य हा अर्थ तत्कालीन लोकांत रूढ झाला. व अशा तऱ्हेच्या भाषणपद्धतींत हे स्पार्टन लोक फार तरबेज म्हणून प्रसिद्ध होते.

यांच्या भाषेचा जर विशेष अभ्यास केला तर त्यांच्या भाषेंत किंवा वाङ्मयांत म्हणींचा बराच महत्त्वाचा संग्रह असण्याचा संभव आहे. कारण अशा तऱ्हेनें अगदीं मोजके शब्द व तेहि मुद्यास धरून अत्यंत अन्वर्थक व एखादें विशेषत्व विशद करणारे शब्दच म्हणीचें स्वरूप पावत असतात.

मराठीमध्यें आपणांस अगदीं परिचित असलेल्या 'धर्माचेगायी दांत कांगे नाहीं' या म्हणीशीं समानार्थक असलेली इंग्रजी म्हण ' Look not a gift horse in the mouth ' ही अगदीं अर्वाचीन दिसते व ती इंग्रजी असून इंग्लंडमध्येंच जन्म पावली असावी असें वाटतें. परन्तु शोधकरून पाहूं लागलें असतां ती निदान खिस्ती शकाच्या चवथ्या शतकाच्या तरी पूर्वीची असली पाहिजे मग ती त्यापेक्षां किती जुनी असेल ती असो, कारण चवथ्या शतकांत होऊन गेलेल्या सेंट जेरोम या साधूनें तिचा उपयोग केल्याचा दाखला सांपडतो. त्याच्या ग्रंथांतील कांहीं लेखनास एकानें कांहीं आक्षेप घेतला असतां त्यानें चिडून असें उत्तर दिलें कीं, हे ग्रंथ मीं आपल्या स्वेच्छेनें लिहून जनतेपुढें ठेवले व जनतेला ही देणगी अर्पण केली आहे तेव्हां या देणगीच्या घोड्याचे दांत मोजण्याचें कांहीं कारण नाहीं. हीच म्हण पुढें मध्ययुगांत एका लॅटिन पद्यामध्यें उपयोग केलेली आपणांस आढळते. याप्रमाणेंच 'खोटें बोलणारास चांगली स्मरणशक्ति लागते' या अर्थी 'Liars should have good memories' ही म्हणहि याच सेंट जेरोमच्या ग्रंथांत आढळते. एवढेंच नव्हे तर त्याच्याहि पूर्वीच्या एका लॅटिन ग्रंथामध्येंहि ती आढळते. (Oblitus veteris proverbii mendaces memores esse oportere). त्याप्रमाणेंच 'प्रवासामध्यें चांगली सोबत ही गाडीप्रमाणें असते.' Good company on a journey is worth a couch) ही म्हण जुन्या लॅटिन ग्रंथात आढळते (Quintilian Inst 1.4).

शेक्सपिअर या जगद्विख्यात इंग्रजी नाटककारानें तर ठिकठिकाणीं आपल्या नाटकांतील पात्रांच्या तोंडीं म्हणींचा उपयोग केला आहे एवढेंच नव्हे तर त्यानें आपल्या कांहीं नाटकांसच म्हणींसारखीं नांवें दिलीं आहेत. उदाहरणार्थ Measure for measure, 'All's well that ends well, Much ado about nothing' या म्हणीच आहेत. तसेंच स्पेन देशाच्या वाङ्मयांतील सर्व्हांटिस या लेखकाचा प्रसिद्ध ग्रंथ 'डॉन क्विक्झोट' यामध्यें ग्रंथकारानें त्यांतील एक प्रमुख पात्र सँकोपांझा याच्या तोंडीं इतक्या म्हणी घातल्या आहेत कीं, प्रत्येक वाक्यागणिक जवळ जवळ त्यानें म्हण वापरली आहे. एका इंग्रज ग्रंथकारानें त्यांचा स्वतंत्र संग्रह भाषांतरासुद्धां प्रसिद्ध केला आहे. (Ulick Ralph Burke). अशा तऱ्हेनें आपल्या ग्रंथांत म्हणींचा उपयोग केलेल्या अनेक ग्रंथकारांचीं नांवें देतां येतील. लॅटीन कवींपैकीं विशेष सहृदय म्हणून परिचित असलेला प्लाटस, फ्रेंच ग्रंथकारांपैकीं सर्वांस ज्ञात असे राबेले व मॉंटेन, तसेंच आद्य इंग्रज कवि चॉसर यानें तर लोकोक्तींचा सरसहा उपयोग केलेला आढळतो. त्याचप्रमाणें कोलेरिज यानें ज्याला मोठा विनोदी ग्रंथकार म्हणून नांवाजलें आहे त्या फुलरची ही कीर्ति त्यानें जो ठिकठिकाणीं लोकप्रिय म्हणींचा मार्मिक व भरपूर उपयोग केलेला आहे त्यावर किती अवलंबून आहे हें मर्मज्ञ वाचकच जाणतील. ज्याला इंग्रजी भाषेंतील या लौकिक वाङ्मयाचा विशेष परिचय नाहीं व त्यांतील निरनिराळे दूरवरचे संदर्भ ज्याच्या लक्ष्यांत येणार नाहींत त्याला बटरलच्या ह्यूडिब्रास

[illegible] नाहीं व त्याला त्या काव्यांतील विनोदाची खरी मौज कधींहि लुटतां येणार नाहीं. सर वॉल्टर स्कॉट यानें आपल्या कादंबऱ्यांत अनेक ठिकाणीं म्हणींचा उपयोग केला आहे. विशेषतः त्याच्या 'माझ्या घरमालकाच्या गोष्टी' (Tales of my Landlord) या कथासंग्रहांत तर त्यानें म्हणींचा भरपूर उपयोग केलेला दिसून येईल. तसेंच त्याच्या 'टॅलिस्मन' या कादंबरींत फकीराचा वेश घेतलेल्या सालाडिनच्या तोंडीं त्यानें त्या पात्राच्या वैशिष्ट्यास अनुसरून कितीतरी म्हणी अथवा सुभाषितें घातलीं आहेत.

म्हणींची उत्पत्ति—वाक्प्रचार अथवा म्हणी कोणत्याहि भाषेंत प्रथम उत्पन्न कशा होत असतील या गोष्टीचा विचार करणेंहि फार मनोरंजक व ज्ञानप्रद झाल्यावाचून राहणार नाहीं आज आपणास एखादा मनुष्य एखादी म्हण आपल्या संभाषणांत सहजगत्या वापरतांना दृष्टीस पडतो त्यावेळीं त्याच्या मनांत कांहीं आपण एखादी अत्यंत प्राचीन अशा महर्षींच्या अथवा एखाद्या पंडिताच्या तोंडचेंच वाक्य उद्धृत करीत आहों किंवा एखाद्या कवीनें फार प्राचीन काळीं लिहिलेल्या एखाद्या मोठ्या महाकाव्यांतील अथवा नाटकादि प्रबंधांतील एखाद्या श्लोकाचें अवतरण देत आहों असें किंवा एखादा प्राचीन वाङ्मयांतील उतारा ऐकत आहों असेंहि त्यास वाटत नसतें तर ती गोष्ट जणूं काय रोजच्या व्यवहारांतील असून नित्यशः कानीं पडणाऱ्या इतर वाक्याप्रमाणेंच तें एक वाक्य असून तें प्रत्यक्ष वाक्य किंवा त्याचें मूळ गूढ अशा प्राचीन कालांत कोठेंतरी एखाद्या मोठ्या प्रसंगाच्या अनुषंगानें प्रथम अवतरलें असेल ही कल्पनाहि त्यास येत नाहीं. याप्रमाणें वक्ता व श्रोता ही गोष्ट सहजगत्या घडून येणारी असें मानतात व ती घटना नित्य परिचयाची समजतात पण वास्तविक अशा म्हणींचें मूळ फार दूरवरच्या कालांतहि असलेलें आपणांस दृग्गोचर होतें. या दृष्टीनें या म्हणी प्रथम कशा बनत असतात हें पाहणें खरोखरच फार उद्बोधक होईल व आपणांस असें दिसून येईल कीं म्हणींची उत्पत्ति ही भाषेच्या उत्पत्तीइतकीच प्राचीन आहे.

कोणत्याहि भूभागांत जेव्हां एखादा जनसमूह कांहीं काल स्थायिक होतो तेव्हां त्या जनसमूहामध्यें परस्परव्यवहाराकरितां भाषा निर्माण होते. या भाषेस थोडी फार स्थिरता आली म्हणजे त्या भाषेंत वाङ्मय तयार होतें. हें वाङ्मय प्राथमिक अवस्थेंत अर्थातच तोंडी परंपरेनें चालत येतें. कारण लेखनकला अस्तित्वांत येणें ही बरीच पुढची पायरी आहे. यामुळें प्राथमिक वाङ्मय केवळ अलिखित स्वरूपांत व तोंडी परंपरेनेंच एका पिढीपासून दुसऱ्या पिढीकडे किंवा समाजाच्या एका गटापासून दुसऱ्या गटाकडे असें प्रसृत होत असतें. या प्राथमिक अवस्थेंतहि अशा वाङ्मयाचे दोन भाग असतात. यांतील कांहीं भाग गद्य वाङ्मय हें प्राथमिक अवस्थेंत फारच अस्थिर स्वरूपाचें असतें. याचें कारण त्याची शब्दयोजना व क्रम स्मृतींत राहणें अधिक कठिण असतें. एकाद्या वाक्याचा तात्पर्यार्थ लक्ष्यांत राहतो पण तीच शब्द योजना गद्य स्वरूपांत ध्यानांत ठेवणें कठीण असतें. आजहि भाषेच्या स्वरूपामध्यें इतकी वाढ झालेली असतांना व व्याकरण वगैरेचे नियम इतके दृढ व चिरपरिचित झालेले असतांना सुद्धां एखादा लांबलचक गद्य उतारा तसाच्या तसाच म्हणून दाखविणें व तो वाटेल त्यावेळीं दाखविणें बरेंच जड जातें. त्यामानानें पद्य उतारे लांबचलांब असले तरी सहज म्हणून दाखवितां येतात. यावरून गद्य हें स्मृतीमध्यें ठेवणें पद्यापेक्षां अधिक कठीण आहे ही गोष्ट स्पष्ट होते. यामुळें गद्यापेक्षां पद्य हें ध्यानांत ठेवण्यास अधिक सुलभ व सोयीस्कर असल्यामुळें सामान्यतः कोणत्याहि समाजांत पद्य रचनेसच प्रथम वाङ्मयाचें स्वरूप येतें व याच स्वरूपांत प्राथमिक वाङ्मय तयार होतें. या गोष्टीचें प्रत्यंतर आपणांस ऋक्संहिता व यजुःसंहिता यांमध्यें पहावयास सांपडतें. ऋक्संहिता ही सर्व पद्यमय असल्यामुळें ती संहिता पाठभेदाशिवाय हजारों वर्षें एकाच स्वरूपांत परंपरेनें चालत आली आहे. याचे उलट यजुर्वाङ्मय हेंहि तितकेंच किंबहुना ह्यापेक्षांहि कदाचित् अधिक प्राचीन असलें तरी तें गद्यमय मिश्रस्वरूपांत असल्यामुळें त्यांत पाठभेद व शाखाभेद अनेक झाले आहेत व त्याचीं संस्करणेंहि अनेकवार झालीं आहेत. यावरून कोणत्याहि समाजांत गद्य वाङ्मय हें सामान्यतः उत्तरकालीन व पद्यवाङ्मय हें प्राचीन समाजण्याची पद्धति आहे व ती वरील विवेचनावरून सार्थ आहे असें दिसून येईल.

अशा तऱ्हेनें हें प्राथमिक वाङ्मय तयार होत असतांना कांहीं विशिष्ट गोष्टी ज्या वरचेवर समाजामध्यें आढळून येतात किंवा ज्यांचें प्रत्यंतर वरचेवर येत असतें अशा गोष्टींचा ठसा मानवीमनावर पडून त्याबद्दल कांहीं विशेष मनुष्य शब्दरूपानें व्यक्त करतो. अशा तऱ्हेचे विचार अथवा कल्पना जेव्हां पद्यमय भाषेंत व्यक्त होतात तेव्हां त्यांचा ठसा ऐकणाऱ्या व्यक्तींच्या मनावर विशेष होऊन त्यांपैकीं कांहीं व्यक्तींस ते स्मृतींत ठेवण्याची साहाजिकच इच्छा होते व अशा रीतीनें कांहीं पद्यें अनेक लोकांकडून वरचेवर कानीं पडल्यामुळें स्मृतिपटावर पक्कीं बिंबून तीं पाठ होतात व सहजच त्यांचें योग्य प्रसंगीं पुनरुच्चारण होतें व त्यामुळें अशा पद्यांचा प्रसार हळू हळू दूरवर होत असतो. अशीं पद्यें अनेक

प्रकारचीं असूं शकतील. कांहीं गमतीदार प्रसंगवर्णन करणारीं असतील, कांहीं ईश्वरी शक्तीचें अचाट सामर्थ्य वर्णन करणारीं असतील, कांहीं निसर्ग चमत्कारांचें वर्णन करणारीं असतील, किंवा कांहीं सामान्य व्यवहारांतील एखादें सत्य अथवा एखादी उपदेशपर गोष्ट किंवा नीतिपर कल्पना किंवा कांहीं प्रसंगसादृश्य वर्णन करणारीं असतील पण अशीं अनेक प्रकारचीं पद्यें हळूहळू निर्माण होत जातात. प्रथम हीं स्फुट स्वरूपांत उत्पन्न होत असलीं पाहिजेत. पुढें पुढें त्यांतील विचार कल्पना, अगर इतर साम्यांवरून त्यांचें संग्रह होत जात असले पाहिजेत. कांहीं विशेष प्रसंग वर्णन करणारी पद्यमालिका असल्यास तिला आख्यानाचें स्वरूप येत असलें पाहिजे. अशा तऱ्हेनें हें पद्य वाङ्मय हळूहळू फोफावत जात असलें पाहिजे.

अशा पद्य वाङ्मयापैकींसुद्धां कांहीं पद्यें विशेष ठसकेदार अथवा मनावर विशेष परिणाम करणारीं किंवा मनाची विशेष रीतीनें पकड घेणारीं असल्यास तीं सहजच अधिक लवकर श्रोतृवर्गाकडून स्मृतींत ठेवलीं जात असलीं पाहिजेत व त्यामुळें त्यांचा प्रसार अधिक होत गेला असला पाहिजे व अर्थातच तीं वरचेवर लोकांकडून योग्य प्रसंगीं उच्चारून दाखविलीं जात असलीं पाहिजेत. याप्रमाणें कांहीं पद्यें किंवा पद्यांचा भाग विशेष रूढ होऊन त्यांस सर्वमान्यता मिळत गेली असली पाहिजे व त्यांसच पुढें सुभाषितांचें अथवा म्हणींचें स्वरूप प्राप्त झालें असावें.

आपणांस असें दिसून येतें कीं, प्रत्येक राष्ट्रामध्यें त्या राष्ट्राचा म्हणींचा संग्रह आढळून येतो. कोणतेंहि राष्ट्र घ्या व तें संस्कृतीच्या कोणत्याहि पायरीवर कां असेना त्यांत कांहीं तरी म्हणी प्रचलित असलेल्या आपणांस आढळतील व त्यांचा संग्रहच करावयाचा म्हटल्यास तो अगदीं लहान होईल असें नाहीं. मात्र जितकें तें राष्ट्र अप्रगत असेल व त्याचें अलिखित वाङ्मय असेल त्या मानानें हें संग्रह करण्याचें काम अधिक कठिण होत जाईल एवढेंच. तेव्हां आपणांपुढें हा प्रश्न उत्पन्न होतो कीं, अशा या म्हणी उत्पन्न तरी कशा होतात व त्यांचा सांठा एकसारखा वाढत कसा जात असतो ?

या गोष्टीबद्दल विचार करूं लागलें असतां आपणांस असें दिसून येतें कीं, कोणत्याहि कालीं आपण एखाद्या भाषेंतील किंवा राष्ट्रांतील म्हणींचा शोध करूं लागलों असतां आपणांस असें दिसेल कीं, त्या भाषेंतील म्हणी त्या लोकांनीं स्वतः बनविलेल्या असून त्या लोकांत त्या प्राचीन कालापासून पिढ्यानुपिढ्या एक तऱ्हेचा बौद्धिक अगर नैतिक धनाचा वारसा म्हणून चालत आलेल्या आहेत व जगाची उत्पत्ति होऊन आतांपर्यंत इतका दीर्घ काल लोटला आहे आणि मनुष्याच्या इतक्या अनेक पिढ्यांनीं आजपर्यंत अनेक प्रकारच्या गोष्टींवर इतका विचार केला आहे, इतके अनुभव घेतले आहेत, इतकीं नानाप्रकारचीं सुखदुःखें भोगिलीं आहेत व ज्ञानाचाहि आतांपर्यंत इतका विकास घडवून आणला आहे कीं, सर्व मानव जातीस सामान्य असें कांहीं तरी ज्ञान, अनुभव, व शहाणपणा प्राप्त झालीं आहेत व त्या अनुभवादिकाचें कांहीं तरी फल त्यांना प्राप्त झालें आहे. आरिस्टॉटलनें दोन हजारवर्षांपूर्वींच या म्हणीसंबंधीं जे म्हटलें आहे कीं, या म्हणी म्हणजे 'प्राचीन लोकांच्या शहाणपणाचे, एकंदर कालकृत ऱ्हास व नाश यातूनहि त्यांच्या औचित्यामुळें व अल्पत्वामुळें राहिलेले' अवशेष आहेत. ती गोष्ट आपण पूर्णत्वानें मान्य करूं. अशा तऱ्हेनें हे जे अनुभवजन्य ज्ञानाचे लहान लहान तुटके हाच पाहिल्या या संस्कृत जगांतील म्हणींचा साठा होय. हीच प्रत्येक राष्ट्राची पूर्वार्जित संपत्ति होय. या संग्रहापासूनच आपली प्रथम सुरुवात होते. या बहुतेक तोंडी परंपरेनें चालत आलेल्या असतात अथवा कांहीं जुन्या लेखकांनीं आपल्या लेखनांत अंतर्भूत करून इतर लोकांस परिचित करून दिलेल्या असतात. याप्रमाणें भरतखंडांत वैदिक कालापासून आजपर्यंत परंपरनें चालत आलेल्या अनेक म्हणी आजहि प्रचलित असलेल्या आपणांस आढळून येतील. त्याचप्रमाणें पाश्चात्य राष्ट्रांतहि ईजिप्त, हिब्र्यू, ग्रीक, लॅटिन वगैरे भाषांतील अनेक म्हणी परंपरेनें निरनिराळ्या लोकांत व भाषांत प्रचलित असलेल्या दृष्टीस पडतात.

अशा तऱ्हेनें विचार करूं लागल्यास कांहीं म्हणी ज्या आपणांस अगदीं दिसावयास अर्वाचीन दिसतात त्यांचेंहि मूळ शोधूं लागल्यास तें फार प्राचीन काळापर्यंत गेलेलें पाहून आपणांस फार आश्चर्य वाटेल.

जी स्थिति आपल्या भरतखंडाची आहे तशीच स्थिति इतर सर्व राष्ट्रांतहि आपणांस दिसून येईल. प्रत्येक राष्ट्रामध्यें तत्तद्राष्ट्रविषयक अशा आचार विचारादिकांस अनुसरून कांहीं म्हणी प्रचलित असतात व त्या इतक्या प्राचीन काळापासून चालत आलेल्या असतात कीं त्यांचें मूळ शोधून काढणें फार कठिण असतें.

तसेंच कांहीं म्हणी लोकसमूहाबरोबर किंवा व्यापारादिकांकारितां जे लोक प्रवास वगैरे करितात त्यांच्या बरोबर निरनिराळ्या राष्ट्रांत प्रसार पावतात व अशा तऱ्हेनें त्यांस एक प्रकारचें सार्वराष्ट्रीय स्वरूप येतें. ज्याप्रमाणें भिन्न संस्कृतीच्या राष्ट्रांतील परस्पर संपर्कांमुळें शब्दांची देवाण घेवाण होते तशीच कांहीं म्हणींची देवाण घेवाण झाल्याशिवाय राहात

या काव्याच्या अंतरंगाची कधींच पूर्ण ओळख होणार नाहीं व त्याला त्या काव्यांतील विनोदाची खरी मौज कधींहि लुटतां येणार नाहीं. सर वॉल्टर स्कॉट यानें आपल्या कादंबऱ्यांत अनेक ठिकाणीं म्हणींचा उपयोग केला आहे. विशेषतः त्याच्या 'माझ्या घरमालकाच्या गोष्टी' (Tales of my Landlord) या कथासंग्रहांत तर त्यानें म्हणींचा भरपूर उपयोग केलेला दिसून येईल. तसेंच त्याच्या 'टॅलिस्मन' या कादंबरींत फकीराचा वेश घेतलेल्या सालाडिनच्या तोंडीं त्यानें त्या पात्राच्या वैशिष्ट्यास अनुसरून कितीतरी म्हणी अथवा सुभाषितें घातलीं आहेत.

म्हणींची उत्पत्ति—वाक्प्रचार अथवा म्हणी कोणत्याहि भाषेंत प्रथम उत्पन्न कशा होत असतील या गोष्टीचा विचार करणेंहि फार मनोरंजक व ज्ञानप्रद झाल्यावाचून राहणार नाहीं आज आपणास एखादा मनुष्य एखादी म्हण आपल्या संभाषणांत सहजगत्या वापरतांना दृष्टीस पडतो त्यावेळीं त्याच्या मनांत कांहीं आपण एखादी अत्यंत प्राचीन अशा महर्षींच्या अथवा एखाद्या पंडिताच्या तोंडचेंच वाक्य उद्धृत करीत आहों किंवा एखाद्या कवीनें फार प्राचीन काळीं लिहिलेल्या एखाद्या मोठ्या महाकाव्यांतील अथवा नाटकादि प्रबंधांतील एखाद्या श्लोकार्चे अवतरण देत आहों असें किंवा एखादा प्राचीन वाङ्मयांतील उतारा ऐकत आहों असेंहि त्यास वाटत नसतें तर ती गोष्ट जणूं काय रोजच्या व्यवहारांतील असून नित्यशः कानीं पडणाऱ्या इतर वाक्याप्रमाणेंच तें एक वाक्य असून तें प्रत्यक्ष वाक्य किंवा त्याचें मूळ गूढ अशा प्राचीन कालांत कोठेंतरी एखाद्या मोठ्या प्रसंगाच्या अनुषंगानें प्रथम अवतरलें असेल ही कल्पनाहि त्यास येत नाहीं. याप्रमाणें वक्ता व श्रोता ही गोष्ट सहजगत्या घडून येणारी असें मानतात व ती घटना नित्य परिचयाची समजतात पण वास्तविक अशा म्हणींचें मूळ फार दूरवरच्या कालांतहि असलेलें आपणांस दृग्गोचर होतें. या दृष्टीनें या म्हणी प्रथम कशा बनत असतात हें पाहणें खरोखरच फार उद्बोधक होईल व आपणांस असें दिसून येईल कीं म्हणींची उत्पत्ति ही भाषेच्या उत्पत्तीइतकीच प्राचीन आहे.

कोणत्याहि भूभागांत जेव्हां एखादा जनसमूह कांहीं काल स्थायिक होतो तेव्हां त्या जनसमूहामध्यें परस्परव्यवहाराकरितां भाषा निर्माण होते. या भाषेस थोडी फार स्थिरता आली म्हणजे त्या भाषेंत वाङ्मय तयार होतें. हें वाङ्मय प्राथमिक अवस्थेंत अर्थातच तोंडी परंपरेनें चालत येतें. कारण लेखनकला अस्तित्वांत येणें ही बरीच पुढची पायरी आहे. यामुळें प्राथमिक वाङ्मय केवळ अलिखित स्वरूपांत व तोंडी परंपरेनेंच एका पिढीपासून दुसऱ्या पिढीकडे किंवा समाजाच्या एका गटापासून दुसऱ्या गटाकडे असें प्रसृत होत असतें. या प्राथमिक अवस्थेंतहि अशा वाङ्मयाचे दोन भाग असतात. यांतील कांहीं भाग गद्य वाङ्मय हें प्राथमिक अवस्थेंत फारच अस्थिर स्वरूपाचें असतें. याचें कारण त्याची शब्दयोजना व क्रम स्मृतींत राहणें अधिक कठिण असतें. एकाद्या वाक्याचा तात्पर्यार्थ लक्ष्यांत राहतो पण तीच शब्द योजना गद्य स्वरूपांत ध्यानांत ठेवणें कठीण असतें. आजहि भाषेच्या स्वरूपामध्यें इतकी वाढ झालेली असतांना व व्याकरण वगैरेचे नियम इतके दृढ व चिरपरिचित झालेले असतांना सुद्धां एखादा लांबलचक गद्य उतारा तसाचा तसाच म्हणून दाखविणें व तो वाटेल त्यावेळीं दाखविणें बरेंच जड जातें. त्यामानानें पद्य उतारे लांबचलांब असले तरी सहज म्हणून दाखवितां येतात. यावरून गद्य हें स्मृतीमध्यें ठेवणें पद्यापेक्षां अधिक कठीण आहे ही गोष्ट स्पष्ट होते. यामुळें गद्यापेक्षां पद्य हें ध्यानांत ठेवण्यास अधिक सुलभ व सोयीस्कर असल्यामुळें सामान्यतः कोणत्याहि समाजांत पद्य रचनेसच प्रथम वाङ्मयाचें स्वरूप येतें व याच स्वरूपांत प्राथमिक वाङ्मय तयार होतें. या गोष्टीचें प्रत्यंतर आपणांस ऋक्संहिता व यजुःसंहिता यांमध्यें पहावयास सांपडतें. ऋक्संहिता ही सर्व पद्यमय असल्यामुळें ती संहिता पाठभेदाशिवाय हजारों वर्षें एकाच स्वरूपांत परंपरेनें चालत आली आहे. याचे उलट यजुर्वाङ्मय हेंहि तितकेंच किंबहुना ह्यापेक्षांहि कदाचित् अधिक प्राचीन असलें तरी तें गद्यमय मिश्रस्वरूपांत असल्यामुळें त्यांत पाठभेद व शाखाभेद अनेक झाले आहेत व त्याचीं संस्करणेंहि अनेकवार झालीं आहेत. यावरून कोणत्याहि समाजांत गद्य वाङ्मय हें सामान्यतः उत्तरकालीन व पद्यवाङ्मय हें प्राचीन समाजण्याची पद्धति आहे व ती वरील विवेचनावरून सार्थ आहे असें दिसून येईल.

अशा तऱ्हेनें हें प्राथमिक वाङ्मय तयार होत असतांना कांहीं विशिष्ट गोष्टी ज्या वरचेवर समाजामध्यें आढळून येतात किंवा ज्यांचें प्रत्यंतर वरचेवर येत असतें अशा गोष्टींचा ठसा मानवीमनावर पडून त्याबद्दल कांहीं विशेष मनुष्य शब्दरूपानें व्यक्त करतो. अशा तऱ्हेचे विचार अथवा कल्पना जेव्हां पद्यमय भाषेंत व्यक्त होतात तेव्हां त्यांचा ठसा ऐकणाऱ्या व्यक्तींच्या मनावर विशेष होऊन त्यांपैकीं कांहीं व्यक्तींस ते स्मृतींत ठेवण्याची साहाजिकच इच्छा होते व अशा रीतीनें कांहीं पद्यें अनेक लोकांकडून वरचेवर कानीं पडल्यामुळें स्मृतिपटावर पक्कीं बिंबून तीं पाठ होतात व सहजच त्यांचें योग्य प्रसंगीं पुनरुच्चारण होतें व त्यामुळें अशा पद्यांचा प्रसार हळू हळू दूरवर होत असतो. अशीं पद्यें अनेक

प्रकारचीं असूं शकतील. कांहीं गमतीदार प्रसंगवर्णन करणारीं असतील, कांहीं ईश्वरी शक्तीचें अचाट सामर्थ्य वर्णन करणारीं असतील, कांहीं निसर्ग चमत्कारांचें वर्णन करणारीं असतील, किंवा कांहीं सामान्य व्यवहारांतील एखादें सत्य अथवा एखादी उपदेशपर गोष्ट किंवा नीतिपर कल्पना किंवा कांहीं प्रसंगसादृश्य वर्णन करणारीं असतील पण अशीं अनेक प्रकारचीं पद्यें हळूहळू निर्माण होत जातात. प्रथम हीं स्फुट स्वरूपांत उत्पन्न होत असलीं पाहिजेत. पुढें पुढें त्यांतील विचार कल्पना, अगर इतर साम्यांवरून त्यांचें संग्रह होत जात असले पाहिजेत. कांहीं विशेष प्रसंग वर्णन करणारी पद्यमालिका असल्यास तिला आख्यानाचें स्वरूप येत असलें पाहिजे. अशा तऱ्हेनें हें पद्य वाङ्मय हळूहळू फोफावत जात असलें पाहिजे.

अशा पद्य वाङ्मयापैकींसुद्धां कांहीं पद्यें विशेष ठसकेदार अथवा मनावर विशेष परिणाम करणारीं किंवा मनाची विशेष रीतीनें पकड घेणारीं असल्यास तीं सहजच अधिक लवकर श्रोतृवर्गाकडून स्मृतींत ठेवलीं जात असलीं पाहिजेत व त्यामुळें त्यांचा प्रसार अधिक होत गेला असला पाहिजे व अर्थातच तीं वरचेवर लोकांकडून योग्य प्रसंगीं उच्चारून दाखविलीं जात असलीं पाहिजेत. याप्रमाणें कांहीं पद्यें किंवा पद्यांचा भाग विशेष रूढ होऊन त्यांस सर्वमान्यता मिळत गेली असली पाहिजे व त्यांसच पुढें सुभाषितांचें अथवा म्हणींचें स्वरूप प्राप्त झालें असावें.

आपणांस असें दिसून येतें कीं, प्रत्येक राष्ट्रामध्यें त्या राष्ट्राचा म्हणींचा संग्रह आढळून येतो. कोणतेंहि राष्ट्र घ्या व तें संस्कृतीच्या कोणत्याहि पायरीवर कां असेना त्यांत कांहीं तरी म्हणी प्रचलित असलेल्या आपणांस आढळतील व त्यांचा संग्रहच करावयाचा म्हटल्यास तो अगदीं लहान होईल असें नाहीं. मात्र जितकें तें राष्ट्र अग्रगत असेल व त्याचें अलिखित वाङ्मय असेल त्या मानानें हें संग्रह करण्याचें काम अधिक कठिण होत जाईल एवढेंच. तेव्हां आपणांपुढें हा प्रश्न उत्पन्न होतो कीं, अशा या म्हणी उत्पन्न तरी कशा होतात व त्यांचा सांठा एकसारखा वाढत कसा जात असतो ?

या गोष्टीबद्दल विचार करूं लागलें असतां आपणांस असें दिसून येतें कीं, कोणत्याहि कालीं आपण एखाद्या भाषेतील किंवा राष्ट्रांतील म्हणींचा शोध करूं लागलों असतां आपणांस असें दिसेल कीं, त्या भाषेतील म्हणी त्या लोकांनीं स्वतः बनविलेल्या असून त्या लोकांत त्या प्राचीन कालापासून पिढ्यानुपिढ्या एक तऱ्हेचा बौद्धिक अगर नैतिक धनाचा वारसा म्हणून चालत आलेल्या आहेत व जगाची उत्पत्ति होऊन आतांपर्यंत इतका दीर्घ काल लोटला आहे आणि मनुष्याच्या इतक्या अनेक पिढ्यांनीं आजपर्यंत अनेक प्रकारच्या गोष्टींवर इतका विचार केला आहे, इतके अनुभव घेतले आहेत, इतकीं नानाप्रकारचीं सुखदुःखें भोगिलीं आहेत व ज्ञानाचाहि आतांपर्यंत इतका विकास घडवून आणला आहे कीं, सर्व मानव जातीस सामान्य असें कांहीं तरी ज्ञान, अनुभव, व शहाणपणा प्राप्त झालीं आहेत व त्या अनुभवादिकांचें कांहीं तरी फल त्यांना प्राप्त झालें आहे. आरिस्टॉटलनें दोन हजारवर्षांपूर्वींच या म्हणींसंबंधी जे म्हटलें आहे कीं, या म्हणी म्हणजे 'प्राचीन लोकांच्या शहाणपणाचे, एकंदर कालकृत ऱ्हास व नाश यातूनहि त्याच्या औचित्यामुळें व अल्पत्वामुळें राहिलेले' अवशेष आहेत. ती गोष्ट आपण पूर्णत्वानें मान्य करूं. अशा तऱ्हेनें हे जे अनुभवजन्य ज्ञानाचे लहान लहान चुटके हाच पाहिल्या या संस्कृत जगांतील म्हणींचा साठा होय. हीच प्रत्येक राष्ट्राची पूर्वार्जित संपत्ति होय. या संग्रहापासूनच आपली प्रथम सुरुवात होते. या बहुतेक तोंडी परंपरेनें चालत आलेल्या असतात अथवा कांहीं जुन्या लेखकांनीं आपल्या लेखनांत अंतर्भूत करून इतर लोकांस परिचित करून दिलेल्या असतात. याप्रमाणें भरतखंडांत वैदिक कालापासून आजपर्यंत परंपरेनें चालत आलेल्या अनेक म्हणी आजहि प्रचलित असलेल्या आपणांस आढळून येतील. त्याचप्रमाणें पाश्चात्य राष्ट्रांतहि ईजिप्त, हिब्र्यू , ग्रीक, लॅटिन वगैरे भाषांतील अनेक म्हणी परंपरेनें निरनिराळ्या लोकांत व भाषांत प्रचलित असलेल्या दृष्टीस पडतात.

अशा तऱ्हेनें विचार करूं लागल्यास कांहीं म्हणी ज्या आपणांस अगदीं दिसावयास अर्वाचीन दिसतात त्यांचेंहि मूळ शोधूं लागल्यास तें फार प्राचीन काळापर्यंत गेलेलें पाहून आपणांस फार आश्चर्य वाटेल.

जी स्थिति आपल्या भरतखंडाची आहे तशीच स्थिति इतर सर्व राष्ट्रांतहि आपणांस दिसून येईल. प्रत्येक राष्ट्रामध्यें तत्तद्राष्ट्रविषयक अशा आचार विचारादिकांस अनुसरून कांहीं म्हणी प्रचलित असतात व त्या इतक्या प्राचीन काळापासून चालत आलेल्या असतात कीं त्यांचें मूळ शोधून काढणें फार कठिण असतें.

तसेंच कांहीं म्हणी लोकसमूहाबरोबर किंवा व्यापारादिकांकारितां जे लोक प्रवास वगैरे करितात त्यांच्या बरोबर निरनिराळ्या राष्ट्रांत प्रसार पावतात व अशा तऱ्हेनें त्यास एक प्रकारचें सार्वराष्ट्रीय स्वरूप येतें. ज्याप्रमाणें भिन्न संस्कृतीच्या राष्ट्रांतील परस्पर संपर्कामुळें शब्दांची देवाण घेवाण होते तशीच कांहीं म्हणींची देवाण घेवाण झाल्याशिवाय राहात

नाहीं. यामुळें अशा तऱ्हेची सार्वराष्ट्रीय स्वरूपाची एखादी म्हण मूळ अमुकच देशांत उत्पन्न झाली आहे असें निश्चयपूर्वक सांगणें कठिण आहे. याकरितां ज्याप्रमाणें नदीचें मूळ व ऋषीचें कूळ याचा शोध करणें कठिण त्याप्रमाणें म्हणीचें मूळ शोधून काढणेंहि कठिण असतें.

अशा तऱ्हेनें म्हणींची उत्पत्ती प्रथम एखाद्या विशिष्ट लोकांत कांहीं प्रसंगानें होऊन पुढें तिला सार्वत्रिक स्वरूप येतें. प्रथम अशा म्हणी केवळ असंस्कृत व बोलभाषेंत उत्पन्न होतात व पुढें त्यांचा दीर्घ कालानें वाङ्मयांत अंतर्भाव होतो. त्याप्रमाणेंच कांहीं काव्यें, नाटकें वगैरे जे लोकवाङ्मयाचे प्रकार आहेत त्यांत प्रसंगोपात्त जीं कांहीं पात्रांच्या तोंडीं वाक्यें घातलीं असतात त्यांसच सार्वत्रिक महत्त्व येऊन तीं लोकांच्या विशेष प्रचारांत आलीं म्हणजे त्यांस म्हणीचें स्वरूप येतें. तसेंच एखाद्या राष्ट्राच्या इतिहासांत किंवा एखाद्या समाजाच्या वारंवार परिवर्तन होण्याच्या अवस्थेमध्यें एखाद्या विशिष्ट महत्त्वाच्या घटनेच्या वेळीं एखाद्या महान् व्यक्तीच्या तोंडून जे उद्गार बाहेर पडतात त्यांचा परिणाम त्या समाजावर किंवा राष्ट्रावर एवढा होतो कीं त्या उद्गारांस चिरस्थायी स्वरूप येतें व त्या उद्गारांसच म्हणीचें स्वरूप येतें. उदाहरणार्थ—दत्ताजीचें कुंजपुरा येथें मरण समयींचें प्रसिद्ध उत्तर 'बचेंगे तो और लडेंगे' हें म्हणीचें स्वरूप पावलें आहे. तसेंच शिवाजीचे तानाजीच्या मृत्यूवरून सिंहगड संबंधीचे उद्गार 'गड आला पण सिंह गेला' सीझरचे प्रसिद्ध उद्गार 'आतां फांसा तर टाकला' यांस म्हणीचें रूप प्राप्त झालें आहे.

अशा तऱ्हेनें अनेक भिन्न भिन्न मार्गांनीं कांहीं प्रसिद्ध पुरुषांच्या उक्ती म्हणून, कांहीं विशिष्ट घटना बोधक वाक्य म्हणून, कांहीं विशिष्ट प्रसंगाच्या वेळीं उत्पन्न परिस्थितीचें वर्णन करणारीं म्हणून अशीं वाक्यें लोकप्रियता व सार्वत्रिकता पावून म्हणीचें स्वरूप पावतात ही गोष्ट खरी असली तरी सर्वच म्हणीचें मूळ आपणांस शोधून काढतां येईल असें नव्हे तर ती गोष्ट किंबहुना अशक्यच आहे व बहुतेक म्हणींचें मूळ गूढ व धुक्याप्रमाणें अस्पष्ट व अज्ञातच असतें.

हें म्हणीच्या मुळा संबंधानें झालें तथापि कांहीं म्हणींवर त्या ज्या राष्ट्रांत प्रचलित असतात त्या राष्ट्राचा विशिष्ट ठसा उमटलेला असतो या दृष्टीनें निरनिराळ्या राष्ट्रांतील म्हणींच्या संग्रहाचें अवलोकन केल्यास त्या त्या राष्ट्राचे स्वभाव विशेष त्यांच्या म्हणींच्या संग्रहावरून सहज अनुमानतां येतात याबद्दल शंका नाहीं.

म्हणींतील राष्ट्रीय वैशिष्ट्यें-ग्रीक—ग्रीक भाषेंतील म्हणींचें जर आपण अवलोकन केलें तर जसजसा आपण त्यांचा अभ्यास करीत जावा तसतसा विचारी वाचकास त्यापासून अधिक अधिक आनंद व आश्चर्य वाटूं लागतें. त्यांच्या म्हणींमध्यें ग्रीक लोकांच्या प्राचीन पुराणकथा इतिहास व काव्य यांचे उल्लेख इतके भरपूर व जागोजाग आढळतात कीं त्यांचा सर्व जीवितक्रम जणूं कांहीं आपणांपुढें चित्रपटाप्रमाणें उभा आहे असें वाटतें. त्यांच्या पौराणिक आख्यानांतील देवदेवता व मोठमोठाले वीर पुरुष यांच्या अनेक विविध कृतींचा उल्लेख या म्हणींमधून आढळून येतो. त्यामुळें ज्या लोकांत या म्हणी प्रचलित होत्या त्या लोकांस होमरच्या काव्यांचाच नव्हे तर तत्कालीन सर्व प्राचीन कवींच्या काव्यांचा व इतिहासाचा व त्यांत ग्रथित केलेल्या व्यक्तींच्या चरित्रांचा व त्यांनीं केलेल्या अद्‌भुत कृत्यांचा पूर्ण परिचय असला पाहिजे हें उघड होतें. कारण या सर्व गोष्टी माहीत असल्याशिवाय कोणत्याहि मनुष्यास त्या म्हणींतील रहस्य ग्रहण करतां येणार नाहीं. तसेंच या म्हणींवरून व्यक्त होणारी जी उच्च प्रकारची संस्कृति ती केवळ समाजांतील एकाच वर्गांत प्रचलित होती असें नसून तिचा समाजाच्या खालपासून वरपर्यंतच्या सर्व थरामध्यें सर्वत्र प्रसार झालेला असून ती सर्वांच्या आयुष्यक्रमांत पूर्णपणें अंतर्भूत होऊन पक्की मुरली होती असें सहज दृष्टीस पडतें. या दृष्टीनें या म्हणींची तुलना बरीचशी संस्कृत भाषेंतील सुभाषितांशीं करतां येईल. त्या सुभाषितांमध्येंहि समाजांतील अनेक गोष्टींचा, संस्कृति, इतिहास, पुराणें वगैरे घटनांचा उल्लेख आपणास आढळून येतो व तीं विस्तृत प्रमाणांवर व विपुलहि आहेत. पण त्यांत समाजांतील फक्त वरच्या थराचेंच चित्र आपणांस आढळेल ही गोष्ट लक्ष्यांत घेतली पाहिजे. कांहीं ग्रीक म्हणी—१ गौरवर्ण सुंदर व शुद्ध स्त्री ही परमेश्वराची पूर्ण कृति आहे. २ रागाचा उगम मूर्खपणांत व अंत पश्चात्तापांत होतो. ३ काम उद्यां ४ पराक्रमाचा सुगंध म्हणजे कीर्ति ५ सावलीबरोबर भांडणारा.

रोमन—रोमन लोकांच्या बुद्धीचें कार्यक्षेत्र ग्रीक लोकांच्या मानानें फार मर्यादित होतें तसेंच त्यांची प्रतिभाहि ग्रीक लोकांच्या मानानें मर्यादित दिसते. रोमन लोक आपल्या शौर्य, शिस्त, नियमबद्ध वागणूक व साधेपणा याच गोष्टीबद्दल विशेष प्रसिद्ध आहेत. रोमन म्हणींमध्यें पौराणिक किंवा दंतकथात्मक किंवा प्राचीन आख्यानांचा वगैरे उल्लेख करणाऱ्या म्हणी फारच क्वचित् आढळतात व याचें कारणहि उघड आहे कीं, ग्रीक लोकांच्या मानानें रोमन देवतांची संख्या फारच अल्प व मर्यादित होती. त्यामध्यें विशेष प्रगत किंवा उच्चदर्जाचीअशी संस्कृति व सफाईदारपणाहि फारसा

आढळत नाहीं. त्याप्रमाणें या म्हणींमध्यें फारसें काव्यहि दृष्टीस पडत नाहीं. तसेंच या म्हणींमध्यें व्यक्त होणाऱ्या मनोभावनाहि फारशा उच्च किंवा नाजुक अशा आढळत नाहींत. प्रेमाच्या बाबतींत तर रोमन म्हणीच नव्हे तर ग्रीक म्हणीहि अर्वाचीन यूरोपीय भाषांतील म्हणींच्या मानानें फारच मागासलेल्या व निकृष्ट दिसून येतात– उदाहरणार्थ 'विवाह गांठि स्वर्गांत बांधली जाते' (Marriages are made in heaven) या सारखी म्हण तत्कालीन लोकांमध्यें रूढ होणेंच अशक्य होतें. याचे उलट मैत्रीविषयींच्या म्हणींमध्यें मात्र अत्यंत तीव्र अशी उत्कटता व गाढ प्रेमळपणा दृष्टीस पडतो यांचें कारण त्यावेळीं प्रेमापेक्षां मैत्रीलाच अधिक प्राधान्य देण्यांत येत असे व अर्वाचीन प्रेमाचा उगम बऱ्याच अर्वाचीन काळीं झालेला आहे. तथापि एकंदरीत विचार करतां रोमन म्हणींमध्येंहि कांहीं उत्कृष्ट गुण असून त्या कांहीं कमी महत्वाच्या नाहींत. बऱ्याचशा म्हणींमध्यें उच्च नीतितत्त्वें ग्रंथित केलेलीं आपणांस दिसून येतात. तसेंच रोमन लोक हे जास्त व्यावहारिक, काटकसरी, उग्र, असे असल्यामुळें केटोच्या स्वभावास शोभतील व त्याच्या तोंडी खुलून दिसतील अशा अनेक चटकदार म्हणी आपल्याला लॅटिन भाषेंत आढळून येतील. त्याप्रमाणेंच रोमन लोकांचें प्रथमपासूनच शेतीकडे विशेष लक्ष असल्यामुळें शेतीसंबंधीं म्हणींचे प्रमाण बरेंच मोठें असलेलें आपल्याला आढळून आल्यास त्यांत आपणांस आश्चर्य वाटावयास नको. तसेंच एकंदर लॅटिन भाषेंतील म्हणी रोमन लोकांच्या स्वभावास अनुसरून असलेल्याच आढळतात. उदा. १ युद्धानंतर मदत ही उशिरा सहाय्य केल्याप्रमाणें होय. २ गरुड माशा मारीत नाहीं. ३ कला दीर्घ आहे आयुष्य अल्प आहे. ४ पुरलेलीं माणसें चावत नाहींत. ५ नांवें बदललीं कीं गोष्ट तुला लागू होईल.

स्पॅनिश—अर्वाचीन यूरोपीय भाषांचा विचार करूं लागलें असतां आपणांस असें दिसून येतें कीं, त्या सर्व भाषांमध्यें अनेक प्रकारच्या निरनिराळ्या विषयांसंबंधी व निरानिराळ्या समजुती, विचार, कल्पना वगैरे व्यक्त करणाऱ्या म्हणी प्रचलित आहेत. अशा म्हणींचे निरनिराळे संग्रहहि आतांपर्यंत अनेकांनीं केलेले आहेत व असे अनेक संग्रह आतां पर्यंत प्रसिद्ध झालेले आहेत.

अशा अर्वाचीन भाषांपैकीं स्पॅनिश भाषेंतील म्हणींस बिशप ट्रेंच यानें विशेष महत्त्व दिलें आहे. कारण स्पॅनिश भाषेंत जरी इतर विषयांवरील वाङ्मय त्या मानानें अल्प असलें तरी या बाबतींत मात्र तें फार संपन्न आहे. व ही समृद्धि संख्येच्या व गुणांच्या दोहीं बाबींमध्य आपणांस दिसून येते. साल्माशियस या ग्रंथकारानेंहि आपलें हेंच मत नमूद करून ठेवलें आहे. तो म्हणतो कीं, यूरोपिय भाषांमध्यें स्पॅनिश भाषा ही उत्कृष्ट आहे तिच्यानंतर इटालियनचा क्रम दुसरा लागतो, गॉल भाषा ही त्यानंतर जवळ जवळ येते. या भाषेंतील सुमारें पंचवीस ते तीस हजार म्हणींचा हस्तलिखित संग्रह एका गृहस्थानें (जॉन प्रिआर्ट) केला होता. (हा संग्रह रिचर्ड हेबरच्या पुस्तकालयांत होता. कॅट. ९.१६९७). त्यांच्या संख्येच्या मानानें गुणांमध्येंहि त्या कांहीं कमी नाहींत. या म्हणींमध्यें सामान्यतः एक प्रकारचा गंभीरपणा, भव्यता, विचारशीलता, यांचा थोडासा विनोद व वक्रोक्ति यांच्याशीं मिलाफ केलेला असून त्यांत स्त्रीदाक्षिण्य, स्वाभिमान, स्वातंत्र्य वगैरे वृत्ती दिग्दर्शित होतात. तसेंच स्पॅनिश लोकांच्या मनांत एकदां द्वेषानें प्रवेश केला म्हणजे तो किती तीव्र व दीर्घकाल टिकणारा असतो हीहि गोष्ट त्यांच्या कांहीं म्हणींवरून स्पष्ट होते.

उदा. गोरे हात इजा करीत नाहींत. या म्हणींमध्यें स्त्रियांची किती खुबीदार खुशामत केलेली आहे. शेक्सपिअरप्रमाणें स्पॅनिश नाटककार Calderon यानें या म्हणीचा (Las manos blancas no offenden) आपल्या एका नाटकास नाव देण्याच्या कामीं उपयोग केला आहे. त्याप्रमाणें त्यानें आणखीहि कांहीं म्हणींचीं नांवें आपल्या नाटकांस दिली आहेत. उदा.–Manana sera otro dia, Casa con dos puertas mala es de guardar, Guardate de la agua mansa, Bien vengas, mal, si vienes solo, 'गाढवास आपण कोणापुढें ओरडतों हें चांगलें कळतें' ही म्हण किती सुंदर व उपहासगर्भित आहे. तसेंच 'राजाला शक्य तितकें दूर जातां येतें पण पाहिजे तितकें दूर जातां येत नाहीं' यामध्यें किती स्वातंत्र्यप्रियता व राजाच्या सत्तेसहि मर्यादा घालणारी वृत्ति दिसून येते. कॅस्टाईल प्रांतांतील लोकांनीं आपणांविषयीं एक म्हण रूढ केली आहे ती अशीः 'कॅस्टाईल प्रांतांतील कोणीहि सामान्य मनुष्य राजा होऊं शकतो व पाद्री पोर होऊं शकतो.' पोर्तुगीज लोकांविषयीं यानीं एक तुच्छतादर्शक म्हण तयार केली आहे ती अशीः 'स्पॅनिश लोकांतील चांगले गुण काढून घेतले म्हणजे राहतो तो पोर्तुगीज. परंतु त्यांनीं स्वतःलाहि टीकास्त्रापासून सोडलें नाहीं. स्पॅनिश लोकांनींच आपणांबद्दल अशी म्हण केली आहे कीं, 'स्पेनची मदत, मिळाली तर उशीरां, नाहीं-तर मुळींच नाहीं' यावरून स्पेन देशांतील लोकांचा प्रत्येक बाबतींत दिरंगाई लावण्याचा गुण उघड होतो. या बाबतींत

त्यांची किर्ति सर्वत्र होऊन 'स्पेनची मदत' या म्हणीवरूनच इटालियन लोकांत एक म्हण अशी पडली आहे कीं, 'माझा मृत्यु यावयाचा असला तर तो स्पेनच्या मार्गे येवो' (Mi venga la morte da Spagna) म्हणजे तो उशीरा तरी येईल किंवा मुळींच येणार नाहीं. स्पॅनिश लोकांमध्यें असलेलीं सुडाची तीव्र लालसा व त्यांच्यामध्यें परम्परागत चालत आलेलें हाडवैर व रक्तपाताची परम्परा पुढील म्हणींत फार चांगल्या रीतीनें व्यक्त झालेली आपणांस पहावयास मिळेल. 'तूं मार म्हणजे तुला मारतील व तुला मारणाऱ्याला पुन्हा ते मारतील, ('Mataras y matarte y mataran a quien te matara')

इटालियन--इटालियन भाषाहि म्हणींच्या बाबतींत बरीच समृद्ध आहे. पण इटालियन म्हणींकडे पाहिलें असतां म्हणींबद्दल आपला जो सर्वसाधारण उच्च व उत्कृष्ट ग्रह झालेला असेल तो थोडाफार बदलल्याशिवाय राहात नाहीं. इटालियन म्हणी सामान्यतः तितक्या उच्च पातळीवरच्या दिसत नाहींत. या म्हणींबद्दल एका लेखकानें असें म्हटलें आहे कीं, इटालियन म्हणींमध्यें त्या लोकांची एक प्रकारची गूढ व खोल अशी राजकीय वृत्ति दिसून येते व त्यांच्या मधील सूज्ञतेवर बराचसा स्वार्थाचा पगडा बसलेला दिसतो. एकंदर इटालियन म्हणींपैकीं दहावा हिस्सा म्हणी केवळ स्वार्थपर किंवा संकुचित व दुसऱ्याबद्दल उपहासगर्भ खोंच असलेल्या असून त्या क्षुद्रबुद्धीच्या लोकांनीं केल्या असाव्या असें वाटतें. (Curiosities of Literature London 1838. p 391).

या म्हणींपैकीं बऱ्याचशा मोठ्या धूर्त कांहीं अंशीं फारच धूर्तत्व व्यक्त करणाऱ्या व सर्व जगाबद्दल साशंकवृत्ति बाळगणाऱ्या असून, सर्वत्र जणूं काय शत्रू असून, जणूं काय प्रत्येक दगडाखालीं विंचू असावा या दृष्टीनें पाहणाऱ्या व या बिकट अशा जगांतून ज्याला मार्ग काढावयाचा असेल त्यानें मोठ्या युक्तीनें व कौशल्यानें वागलें पाहिजे असें सांगणाऱ्या आढळतात. त्यामुळें या सर्व म्हणींमध्यें जणूं काय मॅकाव्हेलीची वृत्ति भरलेली आपणांस दिसून येते असें ट्रेंचनें म्हटलें आहे. त्यामुळें या एकंदर म्हणींविषयीं जरी आपला ग्रह त्या धूर्तता, स्वार्थ व अनिर्बंध विकारांनीं प्रेरित झालेल्या असून एक प्रकारची अविश्वासू व शंकेखोरवृत्ति त्यांमध्यें आढळून येते असा झाला तरी त्यामध्यें बऱ्याचशा म्हणी अशा आहेत कीं विशेषतः त्यांतील बऱ्याचशा म्हणींमधयें जी सुडाची (Vendetta) तीव्र भावना दिसून येते ती पाहिली व त्याबरोबर इटालीच्या इतिहासाकडे नजर टाकून या वृत्तिबद्दल मिळणारे अनेक प्रत्यंतराचे प्रसंग लक्ष्यांत घेतले व त्यावरून या म्हणींच्या सत्यतेबद्दल खात्री पटली म्हणजे ही भावना या राष्ट्रांतील लोकांच्या अंतःकरणांत किती तीव्रतेनें वास करित होती या गोष्टीचा मनावर फार दृढ परिणाम होतो व अशाप्रकारची वृत्ति इतरत्र इतकी तीव्र कोठेंहि आढळत नाहीं. त्यामध्यें कांहीं नाजुक व उच्च भावना, युक्ति, कल्पकता, कौशल्य व चातुर्य इत्यादि गूण आढळून येतात तसेंच त्यामध्यें स्वाभिमान, प्रामाणिकपणा, साधेपणा, सरळ व्यवहार व विश्वासूपणा इत्यादि गोष्टींचीहि शिकवण दिलेली आढळते.

उदाहरणार्थ 'मित्रांचे कसे कोळ्याच्या तंतूनें बांधलेले असतात' या म्हणींत मित्रांमध्यें आपपर भाव नसतो ही गोष्ट उघड होते. तसेंच 'प्रामाणिक मनुष्याला अर्धें शहाणपण पुरतें कपटी मनुष्याला सगळेंहि पुरत नाहीं' यामुळें सत्य हें सरळ धोपटमार्गी असून कपटाचे मार्ग वांकडे व बिकट असतात ही गोष्ट उघड होते.

चिनी--चिनी म्हणींबद्दल एका लेखकानें म्हटलें आहे कीं, चिनी म्हणीमध्यें वैशिष्टय काय आहे असें विचारल्यास असें सांगतां येईल कीं त्यामध्यें एक प्रकारची शांत पण दीर्घ व लांब पोंचणारी दूरदृष्टि, मनुष्यस्वभावाबद्दल एक प्रकारची संशयी किंवा अनुदार पण व्यावहारिक दृष्टि व मनुष्य स्वभावाचें सखोल ज्ञान दिसून येतें. यामुळें चिनी म्हणी त्यांतील माधुर्यापेक्षा चातुर्याबद्दल अधिक प्रसिद्ध आहेत. कारण त्या अत्यंत कष्टाळू, दीर्घोद्योगी व विशेषशी आनंदि वृत्ति न बाळगणाऱ्या अशा गंभीर वृत्तीच्या लोकांत उत्पन्न झालेल्या आहेत. त्यामध्यें मनुष्यांतील गुणापेक्षां दोषांचें अवलोकन विशेष सूक्ष्म रीतीनें केलेलें आढळून येतें.

वरील गोष्टी आपणांस पुढें दिलेल्या उदाहरणांवरून सहज पटतील. 'मित्राकडे राहण्यापेक्षां त्यास भेटणें सोपें असतें.' 'धनी सुस्तावला कीं चाकर मंदावला.' 'एकदां निघून गेलेला शब्द चार घोड्यांची गाडी पाठविली तरी परत येणार नाहीं.' 'मासा पकडण्यासाठीं त्याच्या मागून तळ्यांत उडी टाकण्यापेक्षां घरीं जाऊन जाळें वीण.' 'मोठ्या लोकांनीं गांव जाळला तरी चालतो. गरीबांनीं मात्र दिवाहि लावतां कामा नये.' 'दहा बोटें सारखीं नसतात.' 'लांडग्याची शिकार वाघालाच करूं दे.' 'पावसापासून राखणारीं कौलें उन्हाळ्यांत होतात.' 'फळ कितीहि पिकलें तरी तें कांहीं तोंडांत पडत नाहीं.' 'जो बांधण्याकरितां कर्ज काढतो तो विकण्याकरितां बांधतो.' 'हिशोब सर्व पूर्ण झाला तर पुरा नाहींतर अपुराच.' 'मनुष्य चुकीनें पकडला जातो पण चुकीनें सुटत नाही.'

फ्रेंच--फ्रेंच म्हणींबद्दल बोलावयाचें म्हणजे त्या भाषेमध्यें असणारे जे सर्व गुण ते त्या भाषेंतील म्हणींमध्येंहि आढळतात. त्यामध्यें सौंदर्य, नीटनेटकेपणा, तीक्ष्णता व सफाई इत्यादि सर्व गुण असून कांहीं कांहीं अगदीं तीक्ष्ण सुरी-प्रमाणें बोंचक असतात. उदाहरणार्थः— मरणानंतर वैद्य. नन्नांतून कांहींच निघत नाहीं. नवा धनी नवा कायदा. चढण्यापेक्षां पडणें त्वरित. शक्तीपेक्षां युक्ति श्रेष्ठ. आज मी उद्या तूं. वारुळाचा पर्वत.

जर्मन—जर्मन म्हणींबद्दलहि विशेष सांगावयास पाहिजे असें नाहीं. त्यांमध्यें त्या राष्ट्राचे सर्व गुण आपणांस दिसून येतात व ते इतके आहेत कीं त्यांचीं सर्व उदाहरणें देणें फार कठिण आहे. सामान्यतः उत्कृष्ट म्हणीमध्यें असणारे सर्व गुण दाखविणाऱ्या अनेक म्हणी जर्मन भाषेमध्यें आपणांस आढळून येतील. विशेषतः जर्मन राष्ट्रामध्यें असणारा जो एक पूर्णपणाचा गुण, प्रत्येक गोष्टींत पूर्णत्वाप्रत पोंचवावयाची वृत्ति, ती या बाबतींतहि आपणांस दृष्टीस पडते. आयुष्यांतील प्रत्येक बाबीवर त्या भाषेंत उत्कृष्ट म्हण आढळून येईल येवढेंच नव्हे तर आजपर्यंत प्रसिद्ध झालेल्या म्हणींच्या संग्रहांत जर्मन भाषेएवढा संग्रह दुसऱ्या कोणत्याहि भाषेंत आढळून यावयाचा नाहीं. वांडर यानें प्रसिद्ध केलेला संग्रह एवढा मोठा आहे कीं (Deutsches sprichworter- Lexicon) त्यांत एक लाखापेक्षां अधिक म्हणी असतील. त्यांत एकट्या हौस (Haus) शब्दाखालीं ६८६, फ्रा Frau शब्दाखालीं ७७०, ग्लुक (Gluck) शब्दाखालीं १०२५ तर गॉट (Gott) शब्दाखालीं २६६० म्हणी दाखल केलेल्या आहेत. इतरहि अनेक शब्दांखालीं अशीच मोठी संख्या दाखल आहे. कांहीं जर्मन म्हणींचीं उदाहरणें द्यावयाचीं झाल्यास पुढील प्रमाणें देतां येतील. १ सौंदर्याचें कोठेंहि स्वागत होतें. २ आशा ही दुःखी मनुष्याचा दुसरा आत्मा आहे. ३ नुसती इच्छा करून भागत नाहीं कृति पाहिजे. ४ मत्सरानें लहान दोषहि मोठे दिसतात. ५ कीर्ति मिळवावयाची असते, प्रतिष्ठा राखावयाची असते. ६ कोटीबाज स्वतः हसला कीं कोटीतील गम्मत जाते. ७ कल्पना ही सर्वांत जुलमी राजासारखी आहे. ८ सत्य शोधून काढण्यापेक्षां चुका काढणें सोपें आहे.

इंग्रजी—इंग्रजी म्हणींमध्यें कांहीं विशेष गुण म्हणून जरी दाखवितां आला नाहीं तरी सर्वसामान्य सर्व गुण इंग्रजी भाषेमधील म्हणींत आपणांस आढळून येतील. उदाहरणार्थ १ टकलाची हजामत झटकन होते. २ मुक्यांना जमीन मिळत नाहीं. ३ भुंकतो तो डसत नाहीं. ४ प्रेम आणि खोकला झांकत नाहीं. ५ बंद असलेलें पुस्तक म्हणजे लांकडाचा ठोकळा. ६ कोंबड्याला हिऱ्यापेक्षां जोंधळ्याचा दाणा अधिक. ७ काल सर्वांची पारख करतो. ८ सन्मित्र हा माझा निकटचा आप्त. ९ जो घोड्यावर बसत नाहीं तो कधीं पडत नाहीं. १० जिभेपेक्षां पाय घसरलेला बरा.

स्कॉच—ब्रिटिश बेटांतील स्कॉटलंड देश मात्र आपल्या म्हणींकरतां विशेष प्रसिद्ध आहे. सामान्यतः इंग्रजी भाषेमधल्या बऱ्याचशा म्हणी स्कॉटलंडमध्यें प्रचलित असतात. कांहींमध्यें किंचित् उच्चारांत किंवा शब्दांत फरक आढळतो एवढेंच. परंतु अशा पुष्कळच म्हणी आहेत कीं ज्यांचा केवळ स्कॉटलंडमध्येंच प्रचार असून त्या देशाबाहेर त्या क्वचि-तच आपल्या कानीं पडतील. इतर राष्ट्रांमध्यें स्कॉटलंडपेक्षां कदाचित् संख्येनें जास्त म्हणी असतील किंवा कांहीं म्हणी विशेष चातुर्ययुक्त, तीक्ष्ण किंवा कुशाग्र व बोंचक आणि अतिशय अन्वर्थक असतील पण सामान्यतः ज्यामध्यें सर्वच म्हणी चांगल्या याच सदरांत पडतील व ज्यांत पोरकट, बोथट किंवा मिळमिळीत अशा म्हणी फारच थोड्या दृष्टीस पडतील असा एकंदर संग्रह पाहावयाचा असेल तर आपणांस स्कॉटिश संग्रहाकडे बोट दाखवितां येईल. त्यांमध्यें एक दोष मात्र विशेषेंकरून दिसून येतो तो हा कीं, त्यांचें क्षेत्र फार मर्यादित असून बहुतेक म्हणी स्कॉटलंडमधील लोकांचेच रीति-रिवाज त्यांच्या कल्पना, त्यांच्या आकांक्षा, त्यांचीं सुखदुःखें, त्यांच्या मनोवृत्ति वगैरे दाखविणाऱ्या असून त्यांचें जग अगदीं आकुंचित आहे. त्यामुळें सार्वलौकिक किंवा सार्वत्रिक स्वरूपाच्या व बाह्य जगासहि ज्यांचा उपयोग होईल व चिर-कालिक व सार्वदेशीय गोष्टी ज्यामध्यें अंतर्भूत केल्यामुळें ज्यांस जागतिक महत्त्व येईल अशा म्हणी त्यामध्यें फारशा आढळत नाहींत. यामुळें त्या फारशा वरच्या पातळीवर येऊं शकत नाहींत तथापि त्यामध्यें व्यक्त केलेल्या नैतिक, बोधपर व उपदेशपर कल्पना फार सुंदर असून नांवाजण्यासारख्या आहेत. तसेंच त्यांत व्यवहारचातुर्यहि चांगलें दृष्टीस पडतें.

उदाहरणार्थ, 'आपणांस बसवता येतील त्यापेक्षां अधिक भुतें उठवूं नये' हीमध्यें चटकदारपणा चांगला आहे यांत शंका नाहीं. अशा सारखींच दुसरीं उदाहरणें द्यावयाचीं झाल्यास 'मूर्ख मेजवानी देतात व शहाणे झोडतात.' तसेंच 'जोपर्यंत कोल्ह्याची चाकरी करावयाची आहे तोपर्यंत त्याचें शेंपूट उचललें पाहिजे.' 'कावळा धुतल्यानें पांढरा होत नाहीं.' 'मला पडण्यापूर्वी सावरूं नको.' 'दुबळें मांजर असलें कीं उंदराला गर्व चढतो.' 'सैतानाला बाहेर घालविण्यापेक्षां बाहेरच ठेवलेला बरा.' या म्हणी खरोखरच विनोदी असून तितक्याच बोधपरहि आहेत.

यापेक्षां वरच्या दर्जाच्या म्हणींचें उदाहरण द्यावयाचें म्हटल्यास 'धूर्तास दोरखंडानें बांधण्यापेक्षां सज्जनास दोऱ्यानें बांधणें सोपें असतें.' पुढील उदाहरणांवरून आपणांस या म्हणींची कांहीं कल्पना येईल. १ मूर्ख गांठी मारतो शाहणा सोडवतो २ तणास वाढ फार ३ आपली जीभ दांताआड ठेवावी ४ काच व कुमारी ठिसूळ असतात. ५ कर्ज देऊन मित्र गमविणें ६ दोन काळ्यांचा एक पांढरा होत नाहीं. ७ रात्र ही विचाराची जननी आहे. ८ आंधळया-इतका कोणी धीट नसतो. ९ न्याय महाग असतो तडजोड बरी १० एक मूर्ख अनेकांस बनवितो.

आयरिश—आयरिश म्हणींबद्दलहि सामान्यतः वरील प्रमाणेंच म्हणतां येईल. स्पेन्सरनें उल्लेखिलेल्या एका म्हणींत त्या राष्ट्राची वृत्ति चांगलीच प्रकट होते. 'माझें खर्च करा आणि माझें रक्षण करा' यावरून तत्कालीन लोकांची त्यांच्या राज्यकर्त्यांबद्दल किंवा सामान्य शेतकऱ्यांची त्यांच्या उमरावांबद्दल काय वृत्ति होती तें स्पष्ट होतें. शेतकऱ्यांकडून करभार घेऊन देशाचें संरक्षण करण्याची जबाबदारी उमरावांवर किंवा राज्यकर्त्यांवर असे ही गोष्ट व त्यांची मनोरचना या म्हणीवरून कळून येते. १ प्रत्यक्ष दंश होण्यापूर्वी ओरडूं नका. २ लवकर करा आणि चांगलें करा या दोन गोष्टींचें जुळत नाहीं. ३ मौन हें कधीं तुझा विश्वासघात करीत नाहीं ४ सद्गुण मृत्यूनंतरहि राहतात. ४ जें परमेश्वर करूं शकत नाहीं तें साधुहि करूं शकत नाहीं.

रशियन—रशियन म्हणींमध्येंहि रशियन राष्ट्राचा स्वभावविशेष आपणांस दिसून येतो. आणखी एक विशेष रशियन म्हणींमध्यें हा आहे कीं, त्या भाषेवर व अर्थात त्या भाषेंतील म्हणींवर पौरस्त्य भाषांचा पगडा विशेष बसल्यामुळें पौरस्त्य भाषांतील व पौरस्त्य देशांतील लोकांच्या स्वभावविशेषाचाहि परिणाम विशेष तऱ्हेनें आपणांस दिसून येतो. या संबंधी विस्तृत विवेचन करण्यास आपणांस सध्या येथें वेळ नाहीं. तथापि पुढें दिलेल्या कांहीं नमुन्यांवरून ही गोष्ट आपल्या दृष्टीस पडेल. उदाहरणार्थ १ सॅमसन मोठा बळकट मनुष्य होता पण त्याला देखील जवळ पैसा आल्याशिवाय देतां येत नसे. २ जो तरुण विधवेशीं लग्न लावीत नाहीं त्याला आपत्ति ठाऊक नसते ३ यहुद्याला बाप्तिस्मा देतांना त्याला पाण्याखालींच राहूं देणें बरें. ४ तार्तर हा जन्मानेंच डुकर आहे म्हणून तो त्याचें मांस खात नाहीं. ५ सत्य सरळ असतें पण न्यायाधिश वांकडा असतो.

अरबी—ईजिप्तमधील अरबी म्हणींचा संग्रह बर्कहार्ट यानें प्रसिद्ध केला आहे. वास्तविक अर्वाचीन ईजिप्त देश इतके दिवस पारतंत्र्य व गुलामगिरी यांत खितपत पडला आहे कीं, खरे राष्ट्रीयत्वाचे गुण त्यांच्या वाङ्मयामध्यें व अर्थातच म्हणीमध्यें आढळणें फार कठिण आहे. त्यामुळें अशा तऱ्हेच्या परिस्थितींत असणाऱ्या लोकांमध्यें सामान्य. पणें आढळणारे जे स्वार्थीबुद्धि, सार्वजनिक दृष्टीचा किंवा आपल्यापलीकडे पाहण्याच्या वृत्तीचा अभाव, दास्यत्व, इत्यादि गोष्टी अंगीं खिळल्यामुळें त्यांचा आयुष्यावर होणारा परिणाम व बलिष्ठांकडून दुबळ्यांवर होणारा जुलूम, दुर्बलांस स्वतःबद्दल वाटणारी असुरक्षितता व एकंदर दीनदुर्बल, क्षुद्र, भेकड व अभिमानशून्य वृत्ति यांमुळें आयुष्यावर होणारा परिणाम या सर्व गोष्टी आपणांस या म्हणींवरून स्पष्टपणें दृग्गोचर होतात व त्यामुळें मनाला थोडीशी उद्विग्नता येते. तथापि यांतहि मधून मधून सामान्यतः पौरस्त्य देशांत आढळून येणारी अद्भुतता थोडीफार डोकावत असते.

यामुळें ज्या प्रदेशांत राज्यकर्ते स्वतः दुष्ट वृत्तीचे असल्यामुळें सर्व चांगल्या वृत्ती या आपल्या शत्रूसारख्या मानतात व त्यामुळें नेहमीं त्यांचा द्वेष करितात. अशा ठिकाणीं राज्यकर्ते नेहमीं प्रजेला त्यांच्या अपकृत्यांबद्दल शिक्षा करतात पण सत्कृत्यांबद्दल मात्र कांहीं बक्षिस किंवा उत्तेजन मिळत नाहीं. व यामुळें राज्यकर्त्यांची दृष्टि चुकविणें हीच गोष्ट ज्यांस महत्त्वाची वाटते अशाच प्रदेशामध्यें पुढें दिलेल्या म्हणींसारख्या म्हणी उत्पन्न होणें शक्य आहे; उदा० 'सत्कृत्य करूं नको म्हणजे तुला दुष्कृत्य आढळणार नाहीं.' यावरून अशा समाजामध्यें सत्यापेक्षां असत्याचेंच नेहमीं वर्चस्व असणार ही समजूत दृढमूल झालेली असते ही गोष्ट स्पष्ट होते पण या लोकांत व इतरहि जवळपासच्या अरबी, फारसी व तुर्की भाषांत आढळणाऱ्या कांहीं उत्तमोत्तम म्हणींचे संग्रह प्रसिद्ध आहेत.

अरबी भाषा तर म्हणींकरतां फार प्रसिद्ध आहे. सामान्यतःअरब लोकांत संभाषणामध्यें किंवा चर्चेमध्यें उत्तमोत्तम म्हणी वापरण्याचाहि प्रघात बराच आहे. त्याप्रमाणेंच अरबी संस्कृतीचा पगडा अर्वाचीन फारसी भाषेवर बराच पडला आहे. फारसी ही भाषा जरी मूळ अवेस्ता या संस्कृत भाषेच्या स्वसृभाषेपासून पेल्हवीमार्फत उत्पन्न झालेली असली तरी आज तिच्यावर अरबी भाषेचा बराच संस्कार दिसून येतो. तथापि त्या भाषेंतलि म्हणींवर पूर्णतः तितका झालेला दिसत नाहीं. यामुळें संस्कृत व अरबी या दोन्ही संस्कृतींचें मिश्रण फारसी भाषेमध्यें व त्या भाषेंतील म्हणींमध्यें दिसून येतें. नमुन्या-करितां कांहीं फारसी म्हणी पुढें दिल्या आहेत.

१ आंधळ्याला विद्याची गरज नसते. २ गाढवभर अकलेपेक्षां रतिभर दैव अधिक. ३ शाहणा मनुष्य दोनदां फसत नाहीं. ४ अपकीर्तीपेक्षां मरण बरें. ५ अग्नि कांहीं शत्रुमित्र पाहात नाहीं. ६ रागाला औषध मौन. ७ रिकामा हाजी भिंतींत सुया टोंचतो. ८ दोरी जळली पण पीळ राहिला. ९ एका हातानें दोन कलिंगडें घेतां येत नाहींत. १० गरिबाच्या घरांत चांदण्याशिवाय दिवा नसतो.

यहुदी—अरबांचे शेजारी जे यहुदी लोक त्यांच्या हिब्रयू भाषेंतहि कांहीं सुंदर म्हणी आहेत. या यहुदी लोकांविषयींहि इतर भाषांत अनेक म्हणी बनल्या आहेत त्या त्यांच्या स्वभावावरून बनलेल्या आहेत आणि कोणत्याहि राष्ट्राची मानसिक ठेवण ही त्या राष्ट्राच्या म्हणींत प्रतिबिंबित झालेली असते ही गोष्ट त्यांच्या म्हणींवरूनहि आपल्या प्रत्ययास येते; उदाहरणार्थ, त्या लोकांत स्त्रियांस तुच्छ लेखण्याची जी प्रथा आहे ती त्यांच्या एका म्हणींत पूर्णपणें उतरली आहे. तसेच कांहीं विशेष आपणांस त्यांच्या इतर म्हणींतहि आढळून येतील; उदा, १ शहाण्याला शब्दानें आणि मूर्खाला टोणप्यानें रोखावें. २ जुन्या मित्राशीं कृतघ्न होऊं नको. ३ जाळ्यांतला एक पक्षी उडणाऱ्या शंभरांपेक्षां बरा. ४ मेंढीमागून मेंढी जाते. ५ कुऱ्हाड जंगलांत जाते व दांडा मागून आणते. ६ उंट शिंगें मागायला गेला आणि कान गमावून आला. ७ दिवस लहान कामें फार. ८ राजाचा चाकर राजाच असतो. ९ सोन्याला ठोकणी आणि मुलाला दटावणी १० जेव्हां गाढव शिडीवर चढेल तेव्हां स्त्रियांस अक्कल येईल.

तुर्की—याप्रमाणें तुर्की भाषेंत प्रचलित असलेल्या कांहीं म्हणी पुढें दिल्या आहेत त्याहि आपणांस मनोरंजक वाटल्याशिवाय राहणार नाहींत. १ बांधलेल्या शत्रूला कोणीहि मारूं शकतो. २ ज्याचेजवळ भाकरी नाहीं त्याला सत्ता नाहीं. ३ जो हात आपण तोडूं शकत नाहीं त्याचें चुंबन घ्यावें. ४ कांहीं असत्यें सत्यापेक्षां बरीं असतात. ५ पक्ष्याला आपले पंख जड नसतात. ६ उंटाची लाथ मऊ असते पण मूर्च्छा आणते. ७ धुराला भिऊन आगींत उडी घेऊं नये. ८ दुसऱ्यांच्या चुका पाहून मनुष्य शाहणा होतो. ९ जो आपल्या मुलाला बडवीत नाहीं त्याला पुढें ऊर बडवून घेण्याची पाळी येते. १० चांगल्या संगतींत कोणताहि रस्ता लांब नसतो.

याप्रमाणें भरतखन्डाच्या बाहेरील अनेक लोकांत प्रचलित असलेल्या म्हणींचे कांहीं मासले आपल्या नजरेपुढें ठेवण्यांत आले आहेत त्यांवरून त्या त्या लोकांचें वैशिष्ट्य आपल्या नजरेस येईल. त्यानंतर आपल्याच देशांतील आपले शेजारी गुजराथी, हिंदी, कानडी, तेलगु वगैरे भाषांतील व पाश्चात्य लोकांतील प्रचलित म्हणींचा तुलनात्मक म्हणींसह थोडासा मासला आपल्यापुढें मांडण्यांत येत आहे. त्यामुळें त्यांचेंहि वैशिष्ट्य आपल्या लक्षांत आल्यावांचून राहणार नाहीं.

म्हणींची तुलना—आतांपर्यंत आपण निरनिराळ्या राष्ट्रांतील व लोकांतील म्हणींचें विहंगमावलोचन केलें. यांचें तुलनात्मक निरीक्षण किंवा परीक्षण करणेंहि फार उद्बोधक आणि मनोरंजक झाल्याशिवाय राहणार नाहीं. परंतु तसें करण्यास आपणांस येथें सवड नाहीं. तथापि मनुष्याची मानसिक प्रगति सर्व विश्वामध्यें एकाच प्रकारें सामान्यतः चालू असते व कांहीं देशकालपरिस्थित्यनुसार त्यामध्यें फरक होत जातो ही गोष्ट आपणांस कांहीं म्हणी जवळ जवळ सारख्याच शब्दांत अनेक दूरदूरच्या देशांतहि प्रचलित असतात यावरून दिसून येईल. अशा तऱ्हेच्या शोधूं गेल्यास पुष्कळच म्हणी आपणांस आढळून येतील. परंतु त्या सर्वांचा परामर्श आपणांस येथें घेतां येण्यासारखा नाहीं. याकरितां कांहीं थोड्याच म्हणी उदाहरणांदाखल पुढें दिल्या आहेत. यावरून वरील विधानाचें आपणांस प्रत्यंतर येईल.

१—आगींतून निघून फुफाट्यांत पडणें.

कढ्डामांथी उछलीने चूल्हामां पडवुं. (गुजराती)
ओलतीसे निकल परनालेके नीचें. (हिंदुस्तानी)
बेलके मारे बबुलतले बबुलके मारे बोलतले.
To jump from frying pan to fire.
Sauter de la poele sur la braise (फ्रेंच)
Se jeter dans l'eau de peur de la pluie.
(To jump into the water for fear of rain).
Cader della padella nelle bragie. (इटालियन)
(To jump out of the frying pan into the fire.)
Huyendo de toro cayo en el arroyo.

(Flying from the bull he fell into the river.)
Salter de la sarten y dar en las brasas (to jump.......) (स्पॅनिश)
Cahir da certa na braza (out of the frying pan into the fire)
Fugir do fumo e cahir no fogo (to get out of the smoke and fall into the fire). (पोर्तु)
Fugir do lodo e cahir no arroio (to get out of the mire and fall into the river.
Den rook outvulgtende valt hij int vuur (escaping from the smoke he falls into the fire)
Van den wal in de sloot vallen (to fall from the wall into the ditch). (डच)
एक नदी दुसरीपेक्षांहि थंड असते. (काश्मिरी)
वाघाच्या भीतीनें त्यानें धनी केला तो वाघापेक्षांहि क्रूर निघाला. (चितगांव)
माणसापासून बचावण्याकरितां नदींत उडी टाकणें. (कानडी)
अस्वलापासून पळाला तो खड्ड्यांत पडला. (अरबी)
धूर टाळण्याकरितां आगींत उडी टाकूं नये. (तुर्की)
लांडग्यापासून पळाला तो अस्वलाच्या हातीं लागला. (रशियन)
सुसरीपासून बचावून वाघाच्या जबड्यांत पडला. (मलायी)
पुढील दारचा वाघ हांकून द्यावा तों मागील दारानें लांडगा आंत शिरतो. (चिनी)

२—करावें तसें भरावें; करील तो मरील.
करशे ते भरशे, ने पांकशे ते पसताशे (गुज.)
Gather thistles expect prickles; Do evil and look for like.
As you sow so shall you reap (इंग्रजी) Do well and have well.
As you make your bed so you must lie; As you brew so you must drink.
Hvo som Synden saaer skal hoste skam. (डॅनिश)
(He who sows iniquity shall reap shame)
Qui seme des chardons recueille des epines. (फेंरच)
(He who sows thistles reaps thorns).
Quien abrojos siembra espinas coje. (स्पॅनिश)
(He who sows brambles reaps thorns).
Faze mal e espera outro tal (पोर्तुगीज).
(Do ill & expect the like)
करणी तेवी पार उतरणी, (गुज)
पेरावें तसें कापावें, करावें तसें पावावें. (काश्मिरी)
जैसा करोगे वैसा पावोगे; करेगा सो भरेगा.
आम बोतो आम खाओ इमली बोतो इमली खाओ.
इस हाथ दे उस हाथ ले.
नुकसान करे नुकसान मिले एहसान करे एहसान मिले.

३—अहंकाराचें घर खालीं, गर्वाचें घर खालीं.
Pride goeth before destruction
Pride goes before and shame follows after.
Pride will have a fall
Pride and grace never dwell in ae place.
Pride ne' r leaves its master till he gets a fa'. (स्कॅाच)
Pride will hav'e a fa'.
Hochmuth kommt Zu fall. (जर्मन)
Hovmod gaær for Fald. (डॅनिश)

La uuperbia ando a cavallo e torno a piedi. (इटॉ.)

एइंकारनु घेर खाली. (गुज)

एंकारजा घर खाली आईन. (कच्छी)

रावनने अभिमानसे खोई अपनी जात. (हिंदुस्थानी)

म्हणीची व्याख्या—आतांपर्यंत म्हणींबद्दल व त्यांच्या महत्त्वाबद्दल व उपयुक्ततेबद्दल एवढें विवेचन केलें, पण म्हण म्हणजे तरी काय ? म्हणीची व्याख्या तरी काय ? असा प्रश्न विचारला असतां आपणांस निश्चितपणें उत्तर देणें बरेंच कठिण आहे. म्हण या साध्या व दुसरीशब्दाची व्याख्या करणें खरोखरच फार अवघड कार्य आहे. आतांपर्यंत अनेकांनीं म्हण या शब्दाची व्याख्या करण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु यांच्या व्याख्यांतील दोष काढून दाखविणें जितकें सोपें आहे त्या मानानें बरोबर तंतोतंत लागू पडेल अशी म्हणीची व्याख्या करणें सोपें नाहीं.

म्हण हा शब्द संस्कृत भण धातुपासून अपभ्रंश होऊन बनलेला आहे. याचा अर्थ जें म्हटलेलें तें, जें म्हणण्यांत येतें तें, असा आहे म्हणजे जी गोष्ट लोकांच्या वारंवार म्हणण्यांत म्हणजे बोलण्यांत येते तिलाच म्हण असें म्हणतात. अर्थात् संस्कृत लोकोक्ति हा शब्द आणि मराठी म्हण हा शब्द हे दोन्हीहि एकाच अर्थाचे शब्द होत. तेव्हां म्हण या शब्दाचेंच कार्य लोकोक्ति हा शब्द वापरून करतां येईल. व लोकांची उक्ति ती लोकोक्ति हें त्या शब्दाचें स्पष्टीकरणच त्याची उत्कृष्ट व्याख्या होय. अर्थात् लोकांच्या तोंडच्या सर्वच उक्तींस आपण लोकोक्ति या विशिष्ट अर्थानें मानीत नाहीं. तर कांहीं विशेष गुण असलेल्या उक्तिसच आपण लोकोक्ति म्हणतों. अशा तऱ्हेचे कोणते गुण लोकोक्तिच्या ठिकाणीं अवश्य आहेत हें आपण पुढें पाहूं.

लोकोक्ति या शब्दाची व्याख्या आतांपर्यंत आपल्या वाङ्मयामध्यें कोणी केलेली आढळत नाहीं. पण लोकोक्ति या अर्थी पाश्चात्यांमध्यें रूढ असा जो 'प्रॉव्हर्ब' हा शब्द आहे, त्याची व्याख्या करण्याचा अनेकांनीं प्रयत्न केल्याचें आढळतें. तरी त्यांच्या प्रयत्नांचें प्रथम आपण थोडेसें अवलोकन करूं.

ॲरिस्टॉटल यानें लोकोक्ति शब्दाची अशी व्याख्या केली आहे कीं, लोकोक्ति या प्राचीन तत्त्वज्ञानांतील ऱ्हास पावलेल्या व नष्ट झालेल्या भागांतील लघुत्वामुळें व अचूकपणामुळें सुरक्षित राहिलेले अवशेष आहेत.

ॲग्रिकोला याची व्याख्या अशी आहे कीं, प्राचीन लोकांनीं जीविताचें सार म्हणून काढलेलीं नीतिपर लघुवाक्यें म्हणजे लोकोक्ति.

एरॅस्मस यानें म्हटलें आहे कीं, रूढ मार्गाहून किंचित् निराळ्या पद्धतीनें व निराळ्या प्रकारानें ग्रथित केलेलीं सर्व प्रसिद्ध व अतिशय प्रचलित अशीं वचनें.

बेकन यानें म्हणींस व्यवहारांतील व प्रसंगोपात्त उत्पन्न होणाऱ्या बिकट ग्रंथी सोडविणारें किंवा कापणारें तीक्ष्ण वाग्शस्त्र असें म्हटलें आहे. हर्बर्ट यानें सूज्ञ लोकांचे बाण किंवा भाले अशी संज्ञा या लोकोक्तींस दिली आहे.

डिस्राएली यानें लोकोक्तींस 'ज्ञानमय स्फुट उक्ति' किंवा शहाणपणाचे चुटके असें म्हटलें आहे.

सर्व्हॅटिस हा स्पॅनिश ग्रंथकार लोकोक्तींस दीर्घ अनुभवाचे लघुबोल असें म्हणतो.

डॉ. जॉन्सननें लोकांच्या प्रचारांतील वरचेवर उपयोगांत येणारीं लघुवाक्यें असें यांचें वर्णन केलें आहे.

हॉवेल यानें यांस लोकोक्ति, जनवार्ता, लोकांचे शब्द असें नांव दिलेलें आहे. एकानें संक्षिप्त कल्पनेचें तीव्र प्रकटन असें म्हटलें आहे.

जरी याप्रमाणें म्हण किंवा लोकोक्ति या वाक्संप्रदायाची व्याख्या करण्याचा प्रयत्न वर दिल्याप्रमाणें अनेक ग्रंथकारांनीं केला आहे तरी या सर्व व्याख्यांमध्यें आपणांस या लोकोक्तीच्या शास्त्रीय व्याख्येपेक्षां तिच्या गुणांचें वर्णन अथवा लोकोक्तीमध्यें कोणत्या मुख्य गोष्टींची अपेक्षा असते हीच गोष्ट प्रामुख्यानें व्यक्त केलेली आढळून येते व त्या दृष्टीनें प्रत्येक ग्रंथकाराचा प्रयत्न आपणांस लामदायक आहे कारण याप्रमाणें प्रत्येकानें लोकोक्तीमध्यें कोणत्या गोष्टी अवश्य आहेत त्या त्याच्या त्याच्या दृष्टीनें सांगितल्या आहेत पण या सर्वांमिळूनहि निश्चित अशी व्याख्या बनवितां येणें शक्य नाहीं.

अर्ल रसेल यानें लोकोक्तीची व्याख्या 'एकाची कोटी व अनेकांचें ज्ञान' अशी केली आहे.

जॉन बिलिंगज या टोपण नांवानें लिहिणाऱ्या एका लेखकानें असें म्हटलें आहे कीं, खऱ्या म्हणी या सुईप्रमाणें आंखुड, तीक्ष्ण व चकचकीत (short, sharp & shiny) असल्या पाहिजेत.

म्हणींमध्यें लघुता, सुज्ञता व तीक्ष्णता (shortness, sense and salt) हीं असली पाहिजेत असें हॉवेलनें म्हटलें आहे.

आबील या ग्रंथकारानें सूक्तींबद्दल अशाच प्रकारचे तीन गुण अवश्य म्हणून सांगितले आहेत. ते म्हटले म्हणजे तीक्ष्णता, मधुरता व लघुता हे होत.

म्हणींचा आत्मा—परंतु म्हणींस आवश्यक असणारे जे लघुत्व सुज्ञत्व, तीक्ष्णत्व असे वर तीन गुण सांगितले आहेत त्यांपैकीं पहिला जो लघुत्व त्याचा विचार करूं लागलों असतां आपणांस असें दिसतें कीं, जरी बहुतेक म्हणी आंखुड व थोड्याच शब्दांत व्यक्त झालेल्या असतात व त्याच विशेष चटकदार वाटतात उदा० अती तेथें माती, खंडींत पाव रती, माल तसें मोल, आयत्यावर कोयता, एरंडाचें गुऱ्हाळ, कुंपणानेंच शेत खाल्लें, दुकळांत तेरावा महिना, उंटावरचा शहाणा, बैल गेला झोपा केला, कोल्हा काकडीस राजी, गरुडापुढें मशक, पराचा कावळा, बगळा भगत भया, सूर्यापुढें काजवा, ज्याचे दांत त्याचे घशांत, एका माळेचे मणी, भाव तेथें देव, पांचामुखीं परमेश्वर, फिरे तो चरे, बुडत्याचा पाय खोलांत, ताकापुरतें रामायण. तरी कांहीं कांहीं म्हणी लांब असूनहि आपण त्यांस म्हणी नाहींत असें म्हणूं शकत नाहीं. आंखुडपणा ही गोष्ट केवळ सापेक्षत्वानें घ्यावयाची आहे. प्रत्येक म्हणीमध्यें आवश्यक तेवढे व तेवढेच शब्द असले पाहिजेत. निरर्थक व अनावश्यक शब्द सहसा म्हणीमध्यें अंतर्भूत असत नाहींत. सामान्यतः लोकांची प्रवृत्तीच अल्पत्वाकडे असते व अनावश्यक शब्द परंपरेनें चालत येऊं शकत नाहींत तर मध्यंतरी असे शब्द गळून जाऊन आवश्यक तेवढेच म्हणीमध्यें शिल्लक राहतात. कारण म्हण ही तोंडि परंपरेनें चालत यावयाची असते व या क्रियेमध्यें अनावश्यक भागाची छाटाछाट होणें साहजिकच असतें. अर्थात् कांहीं लांबलचक म्हणीहि भाषेमध्यें रूढ असतातच. उदा० काशी केली वाराणशी केली तरी कपाळाची कटकट नाहीं गेली; वाळकांचा हारा आणि ताकाचा डेरा फार दिवस राहात नाहींत; खावयास आधीं, निजावयास मधीं, कामास कधीं मधीं; कडू कारलें तुपांत तळलें, साखरेंत घोळलें तरी कडू तें कडूच; सोनार, शिंपी, कुळकर्णी आप्पा यांची संगत नकोरे बाप्पा; उत्तम शेती, मध्यम व्यापार, कनिष्ट चाकरी, निदान भीक न मिळे तर वैद्यगिरी शीक; नाचतां येईना अंगण वांकडें, रांधतां येईना ओलीं लांकडें.

याप्रमाणेंच सुज्ञत्व व तीक्ष्णत्व या संबंधी गोष्ट आहे. सामान्यतः म्हणीमध्यें कांहीं तरी बोध असतो, ज्ञान असतें ही गोष्ट खरी आहे पण प्रत्येक म्हणीमध्यें तें असतेंच असें नाहीं व ज्या म्हणीमध्यें तें नाहीं ती म्हणच नव्हे असेंहि आपणांस म्हणतां यावयाचें नाहीं. उदाहरणार्थ आंखूड शिंगी बहुदुधी अल्पमोली, सध्याच साळी पिकवी दुकाळी, एक घर उणें तर दस घर सुणें, क्वचित् गानी पतिव्रता इत्यादि.

चटकदारपणा अथवा तीक्ष्णत्व याबद्दलहि असेंच म्हणतां येईल. बहुतेक म्हणी चटकदार असतात ही गोष्ट खरी पण हा गुण सर्वच म्हणींत असतो असें नाहीं व व्याख्येंत घालण्याइतका तो आवश्यक आहे असेंहि नाहीं. उदा. पाण्यांत म्हैस वर मोल; गाढवाचा घोडा बनविणें; ज्याच्या हातीं ससा तो पारधी; एक पाहुणा तर घर पाहुणें; ओटी जड पाहुणा गोड; मांडे करणारणीचा शेंबूड पुसावा इत्यादि.

पण या सर्व तीनहि गोष्टींमध्यें म्हणीस आवश्यक असा जो एक गुण आहे तो मात्र मुळींच अंतर्भूत केलेला नाहीं. तो म्हणजे सर्वमान्यता, अथवा लोकमान्यता. कोणतीहि उक्ति सर्व लोकांस मान्य असल्याशिवाय तिला म्हणीचें स्थान मिळणार नाहीं म्हणूनच खऱ्या म्हणीला लोकोक्ति असें म्हणतात. लोकांचा मान्यतेचा शिक्का तिच्यावर पडल्याशिवाय ती कितीहि सुटसुटीत, सार्थ किंवा बोधपर व चटकदार असली तरी तिला कोणी म्हण म्हणणार नाहीं. वास्तविक लोकमान्यता हीच म्हणीची खरी कसोटी आहे. परंतु आतांपर्यंत होऊन गेलेल्या अनेक म्हणींच्या संग्रहकारांनीं या लोकमान्यतेच्या निकषाचा विचार केलेला दिसत नाहीं. तर त्यांना जीं कांहीं सुटसुटीत, बोधपर व बोंचक अशीं लहान लहान वाक्यें आढळलीं त्यांचाहि त्यांनीं आपल्या म्हणींच्या संग्रहांत अंतर्भाव केला. पण वास्तविक जोंपर्यंत यांपैकीं बऱ्याचशा वाक्यांवर लोकमान्यतेचा छाप बसला नाहीं म्हणजे जोपर्यंत त्यांचा वारंवार पुनरुच्चार होऊन तीं अनेकांच्या तोंडी झालीं नाहींत व याप्रमाणें जोपर्यंत त्यांचा प्रचार सार्वत्रिक झाला नाहीं तोंपर्यंत त्यांस म्हणींचें स्वरूप येत नाहीं. मग इतर बाबतींत तीं कितीहि सुंदर, बोधयुक्त किंवा चटकदार कां असेनात. त्यांस सार्वत्रिकतेशिवाय लोकोक्ति म्हणतां येणार नाहीं.

उदाहरणार्थ गटेचें वाक्य 'घरांत राहणाऱ्या प्रत्येक मनुष्यास शिल्पशास्त्र अवगत असावें लागत नाहीं.' (प्रत्येक घरधनि कांहीं सुतार मिस्त्री नसतो) यांत म्हणीस लागणारे वास्तविक सर्व गुण आहेत पण ती सर्व लोकांच्या तोंडी नसल्यामुळें तिला म्हणींत दाखल करतां येत नाहीं. वास्तविक या म्हणीची व्याप्ति फार मोठी आहे व तीमध्यें एक व्यापक तत्त्व ग्रथित केलें आहे. त्या वाक्यामध्यें ही गोष्ट दाखविली आहे कीं, गुलाबाच्या फुलापासून आनंद घेण्याकरितां वनस्पतिशास्त्राचें ज्ञान आवश्यक नाहीं. एखाद्या काव्याचा रस ग्रहण करण्यास कवीच व्हावें लागतें असें नाहीं, किंवा एखाद्या धर्मावरील श्रद्धेमुळें मनास शांति प्राप्त करून घेण्याकरितां स्वतः धर्मोपदेशक पुरोहित व्हावयास पाहिजे असें नाहीं.

त्याप्रमाणेंच शिलरची उक्ति : 'मूर्खांपुढें स्वर्ग पृथ्वीहि हात टेकतात' हिलाहि म्हणीमध्यें स्थान मिळूं शकत नाही. कारण ही उक्ति किती जरी चांगली असली तरी तिला सर्व मान्यतेची बैठक नाहीं. वास्तविक ही शिलरची उक्ति पुढील एका चिनी म्हणीपेक्षांहि अधिक चांगली आहे. 'मूर्खांबरोबर वाद करतांना (शहाण्या मनुष्याला) जेवढी बुद्धि खर्चावी लागते तेवढी इतर केव्हांहि लागत नाही.'

यापेक्षांहि हॉवेल या इंग्रज ग्रंथकाराचें उदाहरण विशेष ध्यानांत घेण्यासारखें आहे. यानें अनेक म्हणींचा व ग्रंथकारांच्या लोकोक्तींचा संग्रह करून त्यांत स्वतः रचलेल्या पांचशें म्हणी अंतर्भूत केल्या व पुढें मागें यांसहि म्हणींचें स्वरूप येऊन पुढील पिढ्यांस त्याचा उपयोग होईल असें म्हणून ठेवलें. परंतु त्याची ही आशा सफल झाली नाही व त्याच्या म्हणी प्रचारांत येऊं शकल्या नाहींत, कारण अशा कृत्रिम रीतीनें म्हणी बनवितां येत नाहींत.

तथापि त्यानें बनविलेल्या कांहीं म्हणी खरोखर अन्वर्थक व म्हणण्यास सहज सुलभ असून मनोरंजक आहेत. उदा. 'गर्व हें सैतानाच्या उपवनांतील फूल आहे.' 'दुसऱ्याच्या दिव्याची काजळी काढण्याकरितां आपलीं बोटें माजून घेऊं नयेत.' 'श्रद्धा ही एक थोर स्त्री असून सत्कृत्यें या तिच्या परिचारिका आहेत.' 'निर्धन हे परमेश्वराचे धनव्यवस्थापक असून देवदूत हे हिशेबतपासनीस आहेत.' यामध्यें पहिलींत प्रयोजकता, दुसरींत सार्थता व तिसरींत धार्मिक भावना चांगल्या रीतीनें व्यक्त करण्यांत आल्या आहेत. पण यांस म्हणी असें नांव देतां येणार नाहीं कारण त्यांचा सर्वत्र प्रसार कधींच झाला नाहीं व ग्रंथकाराचीहि पुढें मागें त्यांचा प्रसार व्हावा अशी अपेक्षा होती पण त्या केवळ त्याच्या खासगी संग्रहांत तशाच पडून राहिल्या त्यामुळें त्यांस सार्वत्रिकता आली नाहीं व त्या जनतेच्या तोंडीं बसल्या नाहींत. त्यामुळें जरी त्यांस सूक्ति, वचनें, उक्ति वगैरे नांवें देतां आलीं तरी त्यांस लोकोक्ति किंवा म्हणी असें नांव देतां येत नाहीं.

याप्रमाणेंच संस्कृत सूक्तिमुक्तावली वगैरे ग्रंथ आहेत किंवा इतरहि सुभाषितसंग्रह आहेत त्यांत जरी कांहीं म्हणी ग्रथित झाल्या असल्या तरी तीं सर्व सुभाषितें म्हणजे कांहीं म्हणी नव्हत.

आम्हीहि जेव्हां या कोषाकरितां म्हणींचा संग्रह करण्याचें काम आरंभिलें व त्याप्रमाणें जाहीर विनंती केली तेव्हां एक सद्‌गृहस्थानीं बरींचशीं यमक व चटकदार वाक्यें तयार करून आमच्याकडे पाठविलीं. त्यांतील कांहीं चांगली बोधपर होतीं व कांहींचा उपयोग त्यांनीं आपल्या लिखाणातहि क्वचित् केला होता पण म्हणीला आवश्यक असणारी जी सार्वत्रिकता म्हणजे सर्वांच्या तोंडीं बसणें ती त्यांच्या ठिकाणीं नसल्यामुळें आम्हांस त्यांचा समावेश या ग्रंथांत करतां आला नाहीं.

त्याप्रमाणेंच सदाशिव विश्वनाथ हाटे यांनीं 'निरनिराळ्या देशांतील म्हणी' या आपल्या संग्रहांत पाश्चात्य अनेक म्हणींचें यमक, प्रासादियुक्त मराठींत भाषांतर केलें आहे पण हीं भाषांतरित वाक्यें म्हणींचें स्थान पावूं शकली नाहींत.

म्हणींची लोकप्रियता व सार्वत्रिकता— याकरितां लोकप्रियता किंवा सार्वत्रिकता हा मुख्य गुण म्हणीमध्यें आवश्यक आहे. हा ज्या वाक्यांत नाहीं तें कितीही चांगलें असलें, उपदेशपर असलें, त्यांत कितीहीं चांगलें नीतितत्त्व ग्रथित केलेलें असलें, किंवा एखादें सार्वत्रिक सत्य आविष्कृत केलेलें असलें, व्यवहारांत नित्य दिसणारें व पटणारें असलें, लहान असलें, सुटसुटीत असलें, चटकदार असलें तरी त्यास म्हणीचें स्थान देतां येणार नाहीं. यामुळें असा मात्र समज करून घेतां कामा नये कीं, तें वाक्य म्हण नसलें तरी त्यांतील नीतितत्त्व, किंवा सार्वत्रिक सत्य अथवा जी कोणतीहि गोष्ट अभिप्रेत असेल तिचें महत्त्व कमी आहे किंवा तिला कोणत्याहि प्रकारें बाध येत आहे, तर त्या वाक्याची योग्यता इतर दृष्टींनीं जी असेल तींत कोणत्याहि रीतीनें कमीपणा येऊं शकत नाहीं मात्र म्हण या वाङ्मय प्रकारांत मात्र त्यांस अंतर्भूत करतां यावयाचें नाहीं एवढेंच. ॲरिस्टॉटल यानें आपला म्हणींचा संग्रह करतांना जरी इतर गोष्टींकडेहि लक्ष्य दिलें आहे तरी लोकमान्यता व सार्वत्रिकता ही

गोष्ट त्यानें अवश्य पाहिली आहे. ही गोष्ट त्याच्या संग्रहाचें अवलोकन केलें असतां दिसून येते. म्हणींमध्यें ग्रथित केलेलें तत्त्व कदाचित् पूर्णपणें सत्यहि नसेल पण तें लोकप्रिय व सार्वत्रिक असते ही गोष्ट मात्र खरी असते. कांहीं ठिकाणीं आपणांस असें आढळेल कीं, एखाद्या म्हणीतील तत्त्व पूर्णतया सत्य नसतें एवढेंच नव्हे तर एका म्हणीच्या अगदीं परस्पर विरुद्ध अशीहि दुसरी म्हण असूं शकतें. उदाहरणार्थ– जनीं जनार्दन, जनता जनार्दन, जनवाक्य जनार्दन, जनामुखी प्रगट कीर्ति, विरळा दोष देती (common fame is seldom to blame) वगैरे म्हणींमध्यें जरी सर्व लोक ज्याला चांगलें म्हणतात त्यांत बहुधा दोष नसतो अशी कल्पना ग्रथित केली आहे तरी ऐकावें जनाचें करावे मनाचें, जनाचे हातीं दोन घोंडे, तुका म्हणे जन दुतोंडी सावज, जन त्रिविध आहे (They say so is half a lie) इत्यादि म्हणींत लोकमतावर फारसें विसंबून राहूं नये आपणच काय तो आपल्या मनानें निश्चय करावा असें सांगितलें आहे.

त्याप्रमाणेंच क्षमावीरस्य भूषणम् (The noblest vengeance is to forgive) ही एक अत्युत्तम म्हण आहे व हींत अपराधी मनुष्यावर सूड घेण्याऐवजीं त्यास क्षमा करावी असें सांगितलें आहे. पण याच्या उलट देवो दुर्बल घातकः, नायं आत्मा बलहीनेन लभ्यः, गरीब असावें पण दुबळें नसावें, गरीब पाहती त्यास सर्व दाबती, गरीब सर्वांच गुन्हेगार (He who cannot revenge himself is weak, he who will not is vile) या म्हणींमध्यें आपणांस घडलेल्या अन्यायाचा प्रतिकार न करणें किंवा करितां न येणें ही गोष्ट दूषणास्पद मानली आहे. याप्रमाणें परिस्थिती-प्रमाणें जी गोष्ट आपणांस इष्ट असेल त्याप्रमाणें आपण आपल्या समर्थनार्थ योग्य अशी म्हण वापरतों व त्या म्हणींत जरी आंशिक सत्य असेल तरी ती लोकसंमत असल्यामुळें आपला तात्पुरता कार्यभाग होतो व त्या म्हणीचा हेतुहि साध्य होतो.

याप्रमाणें म्हणीचें मुख्य गमक हें आहे कीं, ती लोकसंमत अथवा जनमान्य पाहिजे. एखादा बुद्धिवान मनुष्य एखादी चांगली कोटीबाज, जोरदार, खोंचदार व चटकदार अशी नवीन उक्ति तयार करूं शकेल पण ती त्याची एकट्याची बुद्धीची करामत व 'कोटी' होईल पण ती 'अनेकांचें अनुभविक ज्ञान' असूं शकणार नाहीं- कारण तिचा पडताळा अनेकांस आल्याचा दाखला आपणांजवळ नाहीं. व म्हणींमध्यें तर तो अंतर्भूत असतो व कदाचित् या उक्तिसहि तो पुढें दीर्घकालानंतर प्राप्त होण्याची शक्यता असते.

जेव्हां एखादा मनुष्य जुनी म्हण वापरतो तेव्हां तो सव्हेंटीसच्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे 'दीर्घ अनुभवाचे लघु बोल' काढीत असतो. तो स्वतःच्या किंवा एखाद्या व्यक्तीच्या पदरचे कांहीं एक सांगत नसतो तर अनेकांच्या फार दूरवरच्या काळांतील अनुभवाचें सार ग्रथित करीत असतो. म्हणून लॉर्ड बेकनच्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे ते केवळ भाषेचे अलंकार किंवा मनोविनोदात्मक शब्द नसून, ते अत्यंत व्यावहारिक व अन्वर्थक किंवा कारागर असे शब्द असून ते आपलें कार्य एखाद्या तीक्ष्ण शस्त्राप्रमाणें व्यवहारांतील व निरनिराळ्या बाबींतील कूट ग्रंथी भेदून टाकण्याचें कार्य करतात.

ज्याप्रमाणें खाणींतून नुकत्याच काढलेल्या अशोधित व अमुद्रित सोन्याच्या कणांपेक्षां टांकसाळींतून मुद्रा ठोकून बाहेर पडलेल्या नाण्याचा व्यवहारांत तात्काल व सार्वत्रिक उपयोग अधिक सुकरतेनें होतो त्याप्रमाणें एखाद्या नवीन तयार केलेल्या उक्तीपेक्षां पूर्वींच रूढ असलेली व सर्वमान्यता पावलेली लोकोक्ति ही अधिक उपयुक्त असते. खाणींतून नुकतेंच काढलेलें सोनें कदाचित् नाण्याइतकेंच शुद्ध व कसाला उतरणारें असेल, पण नाण्यावर फार पूर्वींच मुद्रा उठलेली असते व तें एकामागून एक अनेकांच्या हातांत अगोदरच जाऊन आलेलें असतें व त्यामुळें अनेकांकडून त्याचा स्वीकार आधींच झालेला असतो. त्यामुळें त्या नाण्याबद्दल जशी एक प्रकारची लोकांची खात्री पटलेली असते तशी या धातूच्या तुकड्याबद्दल नसते. ज्याप्रमाणें एखादी गोष्ट सुशिक्षित मनुष्य त्या बाबतींत असलेल्या नियमांशीं ताडून पाहून आपलें समाधान करून घेतो तेंच समाधान सामान्य मनुष्यास त्या गोष्टीला एखाद्या म्हणीची कसोटी लावून प्राप्त करून घेतां येतें. या ठिकाणीं दोघेहि आपल्या स्वतःच्या वैयक्तिक अनुभवावर विसंबून राहण्यापेक्षां अनेक लोकांच्या अनुभवानें सिद्ध झालेल्या तत्त्वांचा फायदा घेऊन आपल्या मनाचा निश्चय करीत असतात.

म्हणींचें स्वरूप—याप्रमाणें लोकमान्यता व सार्वत्रिकता या दोन मुख्य गोष्टी कोणत्याहि सूक्तिस म्हण या स्वरूपास प्राप्त होण्याकरितां आवश्यक आहेत ही गोष्ट आपण आतापर्यंत स्पष्ट केली आहे. पण म्हण ही दीर्घकालपर्यंत परंपरेनें जी चालत येते, व तींतच तिचें खरें सामर्थ्य आहे, ती कशी असा आपणांपुढें एक प्रश्न उभा राहतो. सामान्यतः लिखित वाङ्मयापेक्षां अलिखित म्हणजे लोकवाङ्मयांतून किंवा तोंडी परंपरेनेंच म्हणींचा प्रसार अधिक होतो व

त्या पिढ्यानुपिढ्या चालत येतात. तशा त्या चालत याव्या व त्या विस्मृतिपथांत न जातां लोकांच्या तोंडीं कायम राहाव्या व सहज आठवतां याव्या याकरितां बऱ्याचशा म्हणींमध्यें शब्दयोजना करतांना कांहीं गोष्टींकडे विशेष लक्ष दिलेलें आपणांस दिसून येतें.

यमक—अशा गोष्टींपैकीं यमक ही पाहिली व महत्त्वाची गोष्ट होय. या ठिकाणीं काव्यामध्यें किंवा पद्यामध्यें यमकाचें महत्त्व किती आहे, सयमक व निर्यमक कवितांमध्यें श्रेष्ठ कोणती या गोष्टीच्या विवेचनामध्यें शिरण्याचें आपणांस कारण नाहीं. परंतु वाक्यांतींच्या यमकामुळें सामान्यतः वाचकांस आनंद होतो यांत कांहीं शंका नाहीं. संस्कृत काव्य जरी निर्यमक असलें तरी मराठी काव्य आतांपर्यंत विशेषतः सयमकच करण्यांत आलें आहे ही गोष्ट आपणांस सहज दिसून येणारी आहे. आज जरी मुक्त छंदापर्यंत काव्याची प्रगति झालेली असली तरीं अद्यापिहि बहुतेक कविता छंदोबद्ध व सयमक निर्माण होत आहे ही गोष्ट आपणांस प्रत्यहीं दिसून येते.

याकरितां या यमकाचा फायदा अनेक म्हणींतून घेतलेला आढळून येतो. व ही गोष्ट आपल्या भाषेंतील म्हणींतच नव्हे तर अनेक भाषांतील म्हणी आपण पाहिल्या तरी त्यांत दिसून येते. या यमकामुळें अर्थात् म्हण लक्षांत राहण्यास व तिची स्मृति जागृत होण्यास मदत होते. उदाहरणार्थ—अति तेथें माती; पिकेल तसें विकेल; चारू तो वारू; फिरे तो चरे; बैल गेला झोपा केला; दाढी पाहून वाढी; इळा आणि भोपळा; आपले गरजे गाढव राजे; काडीचोर तो पाडीचोर इत्यादि म्हणी लक्षांत ठेवण्यास त्यांतील यमकाची पुष्कळच मदत होते ही गोष्ट आपल्या सहज लक्षांत येईल.

प्रास—यमकाप्रमाणेंच प्रासाचाहि उपयोग म्हणींमध्यें बराच केलेला आपणांस आढळून येतो. सामान्यतः एकाच अक्षरानें आरंभ होणारे शब्द योजले, किंवा एकच अक्षर किंवा शब्द म्हणीमध्यें पुन्हा पुन्हा आला म्हणजे ती ध्यानांत ठेवण्यास सोपी जाते एवढेंच नव्हे तर ती म्हणून दाखविणारासहि ठसकेबाज वाटते. संस्कृत काव्यामध्यें शब्दालंकारांस कांहीं कवींनीं बरेंच महत्त्व दिलेलें आढळतें व दीर्घ दीर्घ प्रास साधलेले, किंवा एकच अक्षर वारंवार उपयोग केलेले संस्कृत श्लोक सुभाषितांतून अनेक आढळतात. वामनादि मराठी कवींनींहि प्रासयुक्त कविता बरीच केलेली आपणांस आढळते व हा प्रकार सर्व काव्यांत आढळतो. अलीकडे मात्र या प्रकारास गौणत्व देण्यांत येते. इंग्रजी कवींत टेनिसननें प्रासाचा बराच अवलंब केलेला आढळतो. म्हणीमध्यें विशेषतः महत्त्वाचे शब्द प्रासयुक्त वापरण्याकडे विशेष कल दिसून येतो. उदाहरणार्थ—असत्याचा बाप नसत्याची आई; चार दिवस सासूचे चार दिवस सुनेचे; नवें नवें जेवी सवें; नव्याचे नऊ दिवस; बोला फुलास गांठ; फूल नाहीं फुलाची पाकळी, सुतानें स्वर्गास जाणें; समुद्रांत सुई शोधणें; घुसळी करितां उकळी बरी; जनी जनार्दन; नाग्या नागवला तुक्या उजवला; विषानें विष उतरतें; नाकीं नऊ आले; अगोदर चारा मग चोंच, इत्यादि.

अतिशयोक्ति—यमक व प्रास याप्रमाणेंच अतिशयोक्तिचाहि उपयोग म्हणींमध्यें पुष्कळच केलेला आपणांस आढळून येतो. यामुळेंहि चटकदारपणा येतो व तिच्यामध्यें अनेकदां दृष्टीस पडणारा विरोधाभास मनाला आनंददायक होतो. अशा तऱ्हेच्या अतिशयोक्तियुक्त म्हणी मराठी भाषेंत पुष्कळच आहेत. त्यांपैकीं उदाहरणार्थ कांहीं द्यावयाच्या म्हटल्यास पुढील प्रमाणें देतां येतील. पराचा कावळा; कांटा मोडला नायटा झाला; बालेघांट आणि सोन्याचा कांठ; गळा कापला खोकला गेला; जेपाळाची मात्रा वैकुंठीची यात्रा; केस उपटल्यानें काय मढें हलकें होतें; एका पिसानें मोर होणें; उष्ट्या हातानें कावळा हाकणार नाहीं; हत्ती पोसवतो पण मुलगी पोसवत नाहीं; तळ हातानें सूर्य झांकत नाहीं, इत्यादि.

म्हणींचे विषय—याप्रमाणें आतांपर्यंत आपण सुभाषितें, लोकोक्ति किंवा म्हणी यासंबंधीं सामान्य विवेचन केलें. आतां आपण म्हणींच्या विषयांच्या स्वरूपाकडे व उपयोगाकडे थोडेसें लक्ष्य देऊं. म्हणजे सामान्यतः समाजामध्यें ज्या निरनिराळ्या घडामोडी होत असतात किंवा अनेक प्रकारचे व्यापार चालत असतात तसेंच समाजामध्यें जे निरनिराळ्या प्रकारचे अनेक लोक असतात तसेंच त्यांचे जे संबंध एकमेकांशीं निगडित होत असतात अशा कोणकोणत्या समाजाच्या अंगावर एखाद्या समाजामध्यें म्हणी प्रचलित होतात व त्यामानानें समाजांतील कोणते व्यापार, कोणते संबंध किंवा कोणत्या समजुती, व्यवहार, आचारविचार, अंगें, उपागें यासंबंधी म्हणी तयार होतात म्हणजे कोणत्या गोष्टी म्हणींचे विषय होऊं शकतात यासंबंधीं थोडेसें निरीक्षण केलें असतां तें बरेंच उद्बोधक झाल्यावांचून राहणार नाहीं.

तेव्हां यापुढें निरनिराळ्या समाजांत जे विषय प्रामुख्यानें म्हणींस आधारभूत झाले आहेत त्यांचें विहंगमावलोकन केलें आहे तें करीत असतां केवळ मराठी भाषा अथवा महाराष्ट्र समाज ह्याच डोळ्यापुढें न ठेवतां एकंदर जगांतील

निरनिराळ्या समाजांतील म्हणींकडेहि लक्ष्य पुरविलें आहे ही गोष्ट पुढें दिलेल्या उदाहरणांवरून आपल्या लक्षांत येईल.

स्त्री—कोणत्याहि समाजामध्यें स्त्री व पुरुष हे दोन वर्ग प्रमुखतः असतातच त्यापैकीं वाङ्मयनिर्मिति व एकंदर व्यवहार या बाबतींत पुरुष वर्गाकडेच पुढाकार असल्यामुळें व त्या वर्गानें स्त्रियांस या बाबतींत आतापर्यंत मागेंच ठेवल्यामुळें स्त्रियांच्या वास्तविक व कांहीं काल्पनिक स्वभाव वैशिष्ट्यांवर अनेक म्हणी प्रचारांत आल्या आहेत. या बाबतींत पुरुषवर्गानें कांहींसा अन्यायच आपल्या सहभागीवर्गावर केला असें म्हणतां येईल व या कामीं कांहीं राष्ट्रांनीं फारच अनुदार वृत्ति धारण केली आहे. अशा प्रकारच्या कांहीं म्हणी पुढें दिल्या आहेत त्यावरून सामान्यतः या प्रकाराची कल्पना आपणांस येईल. पुढील म्हणी मुद्दामच परकीय भाषांतील दिल्या आहेत. मराठी भाषेंतील म्हणी तर आपणांस कोशांत आढळतीलच व त्यांचेशीं यांची तुलना करतां येईल.

स्त्री आणि शिकारी कुत्रा यांची कमर बारीक असावी. (स्पॅनिश)
सुंदर स्त्री व मागील दार हीं पुष्कळदां श्रीमंतास दरिद्र लावतात. (इटालियन)
कुमारी आईबापांकरितां व विधवा स्वतःकरितां लग्न लावते. (चिनी)
स्त्रिया शक्य तेव्हां हंसतात आणि वाटेल तेव्हां रडतात. (फ्रेंच रशियन)
स्त्रियांचे केंस लांब असतात पण अक्कल आंखूड असते. (रशियन)

यानंतर समाजामध्यें जसा कांहीं ज्ञानी वर्ग असतो तसा कांहीं अडाणी वर्गहि असतो; या दोहोंच्या तुलनेनें वगैरेहि अनेक म्हणी प्रचारांत आल्या आहेत.

शहाणपणा व मूर्खपणा—शहाणा आपलें मत बदलतो, मूर्ख धरून बसतो (स्पॅनिश). मूर्ख लोक जर बाजारांत गेले नाहींत तर खराब माल खपणार नाहीं (स्पॅनिश). मूर्खास वाटेल तें बोलण्याचें स्वातंत्र्य असतें (इटा). मूर्ख किमयागर लोखंडाचें सोनें करायला जातो आणि सोन्याचें लोखंड करतो (इटा). जे जाणतात ते बोलत नाहींत, व जे बोलतात ते जाणत नाहींत (चिनी). मूर्ख पक्षी पहिल्यानें उडतात (चिनी). मूर्खांची घाई म्हणजे त्वरा नव्हे (स्कॉच). मूर्ख गांठी मारतो शहाणा सोडवतो (स्कॉच). शहाणा सोबती म्हणजे अर्धा प्रवास (रशियन).

निर्धनता व सधनता—समाजामध्यें श्रीमंत व गरीब हे दोन वर्ग सर्वत्र असतातच त्यामुळें त्यासंबंधी कांहीं म्हणी प्रचारांत येणें साहजिकच असतें. अशापैकीं कांहीं म्हणी पुढें दिल्या आहेत

ऋणकऱ्याला दरवर्षी घोंडमार (स्पॅ). दारिद्र्याला लाज नाहीं (स्पॅ). भिकाऱ्याजवळ मागूं नको व चाकराची चाकरी करूं नको. (स्पॅ). श्रीमंताचे सर्वच सोयरे (इटा). जेव्हां पैसा बोलूं लागतो तेव्हां सत्य गप्प बसतें (राशि). गरिबाच्या घरांत चांदण्याशिवाय दिवा नसतो (फारसी).

धनि आणि चाकर—धनि गरीब होतो आणि चाकर उपाशी मरतो (स्पॅ). धनिणीनें सूत कातलें नाहीं म्हणून मांजरास मार (स्पॅ). चाकराच्या चार डोळ्यापेक्षां धन्याच्या एक डोळ्याला अधिक दिसतें (इटा). गुलामाचे लाड करूं नका आणि मुलाला फसवूं नका (चिनी). नवा धनी नवा कायदा (फ्रेंच). नोकराच्या अंगांत रेशमी कपडे असले कीं मालक कर्जदार आहे असें समजावें (राशि).

मित्र व शत्रु—जो सर्व मित्र तो अमित्र (स्पॅ). दुष्ट भावापेक्षां दयाळु मित्र बरें (चिनी). कुसंगतीपेक्षां असंगति बरी (स्कॉच). मित्र विरुद्ध गेला तर शत्रूपेक्षां वाईट (राशि). हजार मित्र कमी पडतात पण एक शत्रु अधिक असतो (राशि). दुष्टाची संगत धरतो त्याचा उत्कर्ष होत नाहीं (फारसी).

प्रेम—प्रेमाची खूण कृतींत असते शब्दांत नसते (स्पॅ). प्रेमाला पोंच नसतो आणि रागाला हितबुद्धि नसते (इटा). विवाह हें प्रेमाचें थडगें आहे (राशि). मत्सर ही प्रेमाची बहीण (राशि). प्रेम आणि बुरखा लपत नाहींत (फारसी). प्रेमाकरितां विवाह केला म्हणजे पैशाकरितां कष्ट करावे लागतात (स्कॉच). प्रेम आणि खोकला लपत नाहींत (इंग्लिश). प्रेम पातळ असलें कीं दोष अधिक असतात (इंग्लिश).

याप्रमाणें आळस, राग इत्यादि मनोविकार, सद्गुण आणि दुर्गुण, नम्रता, विनय, गर्व इत्यादि गुण व शौर्य, धाडस, भीरुता इत्यादि विषयांवर अनेक म्हणी सर्व समाजांत प्रचलित असतात व त्यातील कांहीं सर्वतोमुखी असून निरनिराळ्या समाजांमध्येंहि त्यांचा प्रसार होतो. या सर्वांचें पर्यालोचन करण्यास आपणांस आतां वेळ नाहीं. आतांपर्यंत दिलेल्या उदाहरणांवरून त्यांची कल्पना येईल.

समाजाचा ठसा—याप्रमाणें निरनिराळया समाजांत सामान्यपणें असलेल्या अनेक विषयांतील म्हणींचें आपण विहंगमावलोकन केलें. तथापि प्रत्येक समाजाचें कांहीं वैशिष्ट्य असतें. प्रत्येक समाजाची रचना, आचार, विचार व वागणूक वगैरे भिन्न असून त्यांतील परस्पर संबंध, नातींगोतीं, कुटुंबव्यवस्था, सामाजिक चालीरीती यांस अनुसरून कांहीं म्हणी साहजिकच प्रचारांत येतात. उदाहरणार्थ मराठी भाषा बोलणाऱ्या समाजामध्यें निरनिराळया ज्या जाती आहेत तद्विषयक प्रत्येक जाती वैशिष्ट्यांस अनुसरून कांहीं म्हणी सर्व भारतीय समाजांतच प्रचलित आहेत, त्याप्रमाणें महाराष्ट्र समाजांतहि कांहीं रूढ होणें अपरिहार्य आहे तशा कांहीं म्हणी मराठी भाषेंतहि आहेत.

त्याप्रमाणेंच महाराष्ट्रीय समाजाच्या राहणीस अनुसरून सासुसुनेचा संबंध, जांवई, इतर नातेवाईक यांच्या संबंधावर व परस्पर वागणुकीवर आधारलेल्या कांहीं म्हणी आपल्या व आपल्या शेजारच्या भाषांत प्रचलित आहेत.

एखादी व्यक्ति आंधळी किंवा बहिरी असणें हा कांहीं तिचा दोष नाहीं पण या शारीरिक व्यंगावरहि अनेक म्हणी आधारलेल्या आपल्या दृष्टीस पडतात.

त्याप्रमाणें निरनिराळया प्रकारच्या आयुष्यक्रमास अनुसरून कांहीं म्हणी मराठीमध्यें रूढ झाल्या आहेत उदाहरणार्थ शेतीचा धंदा, त्याला लागणाऱ्या पावसाची आवश्यकता व अस्थिरता, त्यास अनुकुल प्रतिकूल ऋतुमान, भरतखंडांत वैशिष्ट्यानें नियमित पडणारी हंगामी वृष्टि व तीस अनुसरून ऋतु, नक्षत्रें वगैरेवर आधारलेल्या म्हणी महाराष्ट्रांतच नव्हे तर इतर अनेक प्रांतात प्रचलित असलेल्या आपणांस आढळून येतील.

याप्रमाणें म्हणींचें वर्गीकरण करूं गेल्यास तें अनेक प्रकारें करतां येईल पण तसा आपणास येथें अवकाश नसल्यामुळें सामान्यतः एवढें सर्व व्यापक असें विधान करतां येईल कीं कोणत्याहि समाजामध्यें रूढ असलेल्या म्हणींचें अवलोकन केलें असतां त्या समाजाची राहणी, आचारविचार, व्यवहार, ज्ञानाची मर्यादा, त्या समाजांतील व्यक्तिंच्या विशेष संवयी, त्यांचे गुण, दोष वगैरे सर्व बाबींचें यथार्थ चित्र त्यांच्या म्हणींमध्यें सांठविलेलें आपणांस दृष्टीस पडेल. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे म्हणी हा कोणत्याहि समाजाचा आदर्श होय. त्यांत त्या समाजाचें पूर्णपणें प्रतिबिंब पडलेलें आपल्या दृष्टीस पडेल इतकें त्यांचें क्षेत्र व्यापक व सर्वांगपरिपूर्ण आहे. अशा दृष्टीनें कोणत्याहि देशाच्या वाङ्मयांत त्या राष्ट्रांत प्रचलित असलेल्या म्हणी हा त्या वाङ्मयाचा एक बहुमोल ठेवा असून ही अत्यंत पुरातन काळापासून परंपरागत चालत आलेली देणगी नीट जतन करून ती पुढील पिढीच्या हवाली करणें हें त्या राष्ट्रांतील प्रत्येक व्यक्तीचें पवित्र कर्तव्य आहे आणि या दृष्टीनें म्हणींचें वाङ्मयीन महत्त्व फार मोठें आहे ही गोष्ट सर्व जनतेच्या प्रत्ययास येईल अशी आशा आहे.

ज्याप्रमाणें हा म्हणींचा संग्रह जमवितांना अनेक ग्रंथांचा उपयोग करण्यांत आला त्याप्रमाणें ही प्रस्तावना लिहितांनाहि अनेक ग्रंथांचा उपयोग करण्यांत आला व निरनिराळया ग्रंथालयांतून ते मिळविण्यांत आले. प्रथम यापेक्षां बरीच विस्तृत प्रस्तावनेची आंखणी केली होती परंतु कागदाची टंचाई व छपाईची अडचण या दोन गोष्टींमुळें ती मागें ठेवून वरील संक्षिप्त प्रस्तावना या ग्रंथास जोडली आहे. पुढें मागें या विषयावर स्वतंत्र ग्रंथरुपानेंच विवेचन करण्याचा विचार आहे एवढें येथें नमूद करून व आधारभूत अनेक ग्रंथ व ग्रंथकार यांचे ऋणाचा निर्देश करून सध्या येथें विराम करतों.

यशवंत रामकृष्ण दाते

महाराष्ट्र वाक्संप्रदाय कोश

१ ग्रंथसंक्षेप सूची

संक्षेप	ग्रंथनाम	संपादक, प्रकाशक, इ.	आंकड्यांचा खुलासा
अकक	अनेककविकृत कवितासंग्रह	काव्येतिहाससंग्रह	भाग, कविता
अन्योक्ति	अन्योक्तिकल्पद्रम [हिंदी]	लेखक शामलाल मचौरी, मिरत.	म्हण क्रमांक
अफला	अनंतफंदीकृत कविता अथवा लावण्या	प्रका. चित्रशाळा, आवृत्ति ४, सन १९२१	भाग, पृष्ठ
अमृ	श्रीअमृतानुभव	संपा. बाबा गर्दे, प्रकाशक के. भि. ढवळे, १९२९	प्रकरण, ओंवी,
अमृत	अमृतरायकृत कवितासंग्रह	काव्यसंग्रह २६. संपा. वा. दा. ओक, निर्णयसागर १८९६	पृष्ठ
अमृतध्रुव	,, ध्रुवचरित्र	,, ,, ,,	,,
अर्वा	अर्वाचीन कविता (पूर्वार्ध)	संपा. कवि चंद्रशेखर; प्र. ग्रंथप्रसारक मंडळी, सन १९०४	पृष्ठ
अस्तंभा	अस्तंगतभानु	संपा. द. वि परांजपे, प्रका. मोदवृत्त, वांई १९२६	पृष्ठ
आगर	आगरकर-निबंधसंग्रह	प्रका. सुधारक प्रिंटिंग ब्युरो, पुणें	भाग पृष्ठ
आजोच	डॉ- आनंदीबाई जोशी यांचें चरित्र	संपा. काशीबाई कानिटकर, कुळकर्णी आणि मंडळी. आवृ. १	पृष्ठ
अडिमहा	आडिवऱ्याची महाकाली	संपा. चिं. कृ. दीक्षीत, १९३७	पृष्ठ
आप, आपद	आनंदतनय-पदें	आनंदतनयकृत कवितासंग्रह. संपा ज. वा. मोडक वा. दा. ओक निर्णयसागर १८९१	कविता
आभासु.	गोष्टी आरबी भाषेंतील सुरस गोष्टी		
आफ, आदिफ	आदिलशाही फर्मानें	भा. इ. सं. मं. यादी	
आय	आनंदतनय-यज्ञरक्षण		
आसु	आनंदतनय-सुदामचरित्र		,,
इनाम	मुंबई इलाख्यांतील इनामकमिशनखातें-यांतील गैर इन्साफ	(शिळाप्रत) ज्ञानप्रकाश सन १८५९	पृष्ठ
इंप	इंग्रजांचा पराभव	संपा. अ. ब. कोल्हटकर, प्रका. भावे आणि मंडळी, मुंबई शके १८४८.	पृष्ठ

संक्षेप	ग्रंथनाम	संपादक, प्रकाशक, इ०	आंकड्याचा खुलासा
इपुस्त्रिपो	इतिहासप्रसिद्ध पुरुष व स्त्रिया यांचे पोवाडे	संपा. आक्वर्थ व शंकर तुकाराम शाळिग्राम, निर्णयसागर १८९१	पृष्ठ
इमं	इतिहासमंजरी	संपा. द. वि. आपटे. शके १८४६, चित्रशाळा पुणें	पृष्ठ
इसं	इतिहाससंग्रह मासिक	संपा. द. बा. पारसनीस प्रका. सिर्णयासागर	
उग्र	उग्रमंगळनाटक	संपा. वासुदेवशास्त्री खरे	अंक, प्रवेश
उषा	उषाहरण	चोभाकृत, प्रका. भा. इ. सं. मं अहवाल, शके. १८३३	पोथीपृष्ठ, ओवी
ऋ	ऋद्धिपूरवर्णन	नारायणव्यास बहाळियेकृत (महानुभाव), प्रका. य. खु. देशपांडे, यवतमाळ, सन १९२९	पृष्ठ
एक	एकच प्याला	ले. रा. ग. गडकरी, नाटक. पुस्तक आवृत्ति ६वी. १९३२,	अं. प्र. पृष्ठ.
एभा	एकनाथी भागवत	विष्णुबोवा जोग संप्रदायी. संपा. मा. कृ. देशमुख, आवृ. २. शके १८४९	अध्याय, ओंवी
एरुस्व	एकनाथ-रुक्मिणीस्वयंवर	प्रका. मा. कृ. देशमुख, चित्रशाळा, शके १८४७	,,
ऐटि	ऐतिहासिक टिपणें	इतिहाससंग्रह विविध	भाग, पृष्ठ
ऐपो, ऐतिपो	ऐतिहासिक पोवाडे	संपा. य. न. केळकर, १९२८.	पृष्ठ
ऐले	ऐतिहासिक लेखसंग्रह	संपा. वा, वा. खरे	भाग, पृष्ठ
कथा	कथाकल्पतरु	कृष्णयाज्ञवल्किकृत	स्तबक, अध्याय
कथासा [रा]	कथासारामृत	महिपति	अध्याय, ओंवी
कफा	करंजांचा मनोरंजक फार्स [प्रसहन]	संपा. का. म. थत्ते, दशप्रसारक छापखाना, पुणें १८८८	पृष्ठ
कमं	कर्पूरमंजरी-सट्टक [मराठी भाषांतर]	संपा. स. प. पंडित, मुंबई, इंदुप्रकाश १८७७	जवनिका, पृष्ठ
काव्ये, कासं.	काव्येतिहासंग्रह	संपा. का. ना. साने.	
किंसुदा, किंसु	किंकरकृत सुदामचरित्र	अनेक कवि भाग २	कविता
कीर्तन	कीर्ततनतरंगिणी	संपा. दा. ग. जोशी, आवृ. १० वी सन १९१२	भाग, पृष्ठ.
कृकौ	कृष्णकौतुक		कविता
के	केसरी वर्तमानपत्र		तारीख, माहे, सन
केक	केशवसुत यांची कविता	प्रका. हरि नारायण आपटे, आर्यभूषण प्रेस, पुणें	पृष्ठ
केका	मोरोपंतकृत केकावली	केकादर्श, संपा. परशुरामतात्या गोडबोले, आवृ. ४, सन १९१७. प्रका. गजानन चिंतामण देव	श्लोक

संक्षेप	ग्रंथनाम	संपादक, प्रकाशक, इ.	आंकड्यांचा खुलासा
केळे, केळ	केळकरांचे लेख	प्रका. शि, वा आवटी, विजय प्रेस, १९२५	खंड, पृष्ठ
कोआ	कोल्हटकरांचें आत्मवृत्त	प्रका. ह वि. मोटे, १९३६	पृष्ठ
कोको	ए कॉपेंडियम ऑफ मराठी–मराठी ॲंड इंग्लिश डिक्शनरी	अंबाजी कान्हेरेकरकृत मराठी–मराठी व इंग्रजी कोश, सन १८९६	
कोराकि, कोकि	कोरलईचा किल्लेदार	संपा. वि वा. भिडे, प्रका. भारतगौरवग्रंथ-माला, मुंबई १९२५	पृष्ठ
कृषि, कृषिवि	कृषिकर्मविद्या	संपा. रा. आ. राजे, व रा. स. गुप्ते आवृ. १	पृष्ठ
ख, खरे	ऐतिहासिक लेखसंग्रह	संपा. वा. वा. खरे, सन १८९७–१९२६	भाग, पृष्ठ
खरादे	खरा देशभक्त	संपा. वा. कृ. भावे, भारतगौरवग्रंथमाला	पृष्ठ
खेस्व	खेड्यांतील स्वभावाचित्रें	संपा. मो. गो. सोमण	पृष्ठ
ख्रि; ख्रिपु	ख्रिस्तिपुराण	फादर स्टीफन्सकृत, संपा. जोसेफ साल्ढाणा मंगळूर १९०७	पुराण, अवस्वरु, ओंवी
गलि वृ	गलिव्हरचा वृत्तांत		पृष्ठ
गांगा, गांव	गांवगाडा	संपा. त्रिं. ना. अत्रे. १९१५	पृष्ठ
गीचं	गीताचंद्रिका		
गीर, गी	गीतारहस्य	संपा. बा. गं. टिळक, चित्रशाळा, १९१५	पृष्ठ
गुजा	गुन्हेगारी जाती	संपा. त्रिं. ना अत्रे	पृष्ठ
गुमं	गुप्तमंजूष		
गोप	बापूगोप पहा.		
घाको	घाशीराम कोतवाल	मोरोबा कान्होबाकृत, सन १८६३	पृष्ठ
चंद्र ग्र	चंद्रग्रहण नाटक	संपा. य. ना. टिपणीस	पृष्ठ
चं, चंद्र	चंद्रगुप्त	संपा. ह. ना. आपटे, आर्यभूषण प्रेस, पुणें.	पृष्ठ
चीज	चित्रमयजगत्	नियतकालिक, चित्रशाळा प्रेस, पुणें	वर्ष. अं. पृष्ठ
छच	कै. पं, विष्णूपंत छत्रे यांचें चरित्र	संपा. ना. कृ. गद्रे. शके १८२८	पृष्ठ
जै, जैअ	जैमिनि अश्वमेध	श्रीधरस्वामीकृत चित्रशाळा प्रत	अध्याय, ओंवी
जोगतुगा	जोगसंपादित तुकारामाची गाथा.		अभंग
झांमू	झांकली मूठ	संपा. वि. वा. हडप	पृष्ठ
टि, टिले	लो. टिळकांचे केसरींतील लेख भाग १–४	प्रका. केसरी-मराठा, संस्था, पुणें १९२२–३०	भाग, पृष्ठ
टिक	टिळकांची कविता	रे. ना. वा. टिळक यांच्या कवितांचा ह, प्रका. भा. कृ. उजगरे, १९१४	पृष्ठ
टिव्या	लो. टिळक यांचीं व्याख्यानें	संपा. स. ह. भावे, १९०८	पृष्ठ
टिसू	टिळकसूक्तिसंग्रह	संपा. स. वा. बापट, विजय प्रेस, १९२६	,,
तीप्र	तीर्थयात्राप्रबंध	संपा. गणेशास्त्री लेले	,,
तुगा	तुकाराममहाराजांची गाथा	संपा. मा. कृ. देशमुख, शं. वा. दांडेकर चित्रशाळा १९२५	अभंग
तोबं, तोबंड	तोतयाचें बंड	संपा. न. चिं. केळकर, प्रका. भट आणि मंडळी, पुणें १९१३	पृष्ठ

संक्षेप	ग्रंथनाम	संपादक, प्रकाशक इ.	आकड्यांचा खुलासा
थोमारो	थोरले माधवराव रोजनिशी	संग. ग. चि. वाड	भाग, पृष्ठ
थोशाच	थोरले शाहूमहाराज यांचें चरित्र	काव्येतिहाससंग्रह	,,
दा, दास	श्रीमत्‌दासबोध	रामदासस्वामीकृत, प्रका. सत्कार्योत्तेजक सभा, धुळें, आवृ. ५, शके १८४४	दशक, समास, ओंवी
दावि	दासविश्रामधाम	आत्मरामस्वामीकृत, प्रका. सत्का. सभा, धुळें, रामदास आणि रामदासीग्रंथमाला, भाग ७ वा.	पृष्ठ
दिमरा	दिल्ली येथील मराठ्यांचीं राजकारणें	संपा. द. ब. पारसनीस १९१३	भाग, पृष्ठ
देप	देवनाथमहाराजकृत पदसंग्रह	संपा. वा. दा. ओक, निर्णयसागर, १८९६	कविता
धर्मांजी	धर्मांजीरावाचें कुटुंब	संपा. बळवंत मनोहर पंडित, जगद्धितेच्छु १८९६	पृष्ठ
नपुक	नवपुष्पकरंडक	संपा. वा. म. जोशी, मनोरंजन, मुंबई.	,,
नल, नळ	नलदमयंतीस्वयंवराख्यान	रघुनाथपंडिताचे काव्यग्रंथ, प्रका. ह. त्रिं. बापट, १९०९	कविता
नव	नवनाथभक्तिसार	धुंडिराजसुतमालोकृत, प्रका. बा. ल. पाठक, जगदीश्वर प्रेस, १८९६	अध्याय, ओंवी
नाकु	नाट्यकलारुक्कुठार मात्रा	संपा. स. ना. ठोसर, १९२६	वळसा, पृष्ठ
नाना, नाम, नामना	नामदेवनाटक	संपा. वा. रं. शिरवळकर, आर्यभूषण, १९०४	पृष्ठ
नि	निबंधमाला	संपा. विष्णुशास्त्री चिपळुणकर, चित्रशाळा १९१७	पृष्ठ
निचं	निरभ्रचंद्र	संपा. वि. वा. हडप १९२०	,,
निगा	श्रीनिळोबामहाराज यांच्या अभंगांची गाथा	नानामहाराज साखरे संप्रदायी, प्रका. त्रिं. ह. आवटे, शके १८३०	पृष्ठ
निमा	निरंजनमाधवाची कविता	प्रका. ल. रा. पांगारकर, शके १८४१–४७	भाग, पृष्ठ
नीति, नीशाप्र	नीतिशास्त्रप्रवेश	संपा. वा. म. जोशी, मनोरंजन १९०९	पृष्ठ
नीति	नीतिशतक	भर्तृहरि	श्लोक
न्यायप	न्यायपद्धति	न्यायशास्त्र—मोरो केशव दामले	पृष्ठ
पकोघे	पण लक्षांत कोण घेतो ?	संपा. ह. ना. आपटे,	,,
पंच	पंचतंत्र (मराठी भाषांतर)	प्रका. महाराष्ट्रकवि, शके १८२९	,,
पदाव	पदार्थवर्णन	संपा बा. प्र. मोडक, निर्णयसागर	भाग, पृष्ठ
पपप्रे, पप्रे	पतिपत्नीप्रेम	संपा. वा. रा. कोठारी, प्रका. सुरस ग्रंथमाला आवृ. २ री.	पृष्ठ
पया	पत्रेयादी वगैरे	काव्येतिहाससंग्रह.	,,
पला	परशुरामकृत लावण्या	प्रका. चित्रशाळा, १९२०	पृष्ठ; प्रकरण, पृष्ठ
पाआमा	पाव आणे माला		अंक पृष्ठ
पामो	पानपतची मोहीम	संपा. ना. वि. बापट, आवृ १ ली.	पृष्ठ
पाब	पानपत बखर	रघुनाथ यादवकृत, संपा. का. ना. साने	,,

संक्षेप	ग्रंथनाम	संपादक, प्रकाशक, इ.	आकड्यांचा खुलासा
पारिभौ	पारिजातभौमासुर नाटक	संपा. नारायण आनंदराव पै, प्रका. नारायण-भिकशेट खातू, शके १८१३ [शिळाप्रत]	पृष्ठ
पाव्ह	पाल व व्हर्जिनिया	संपा. गो. शं. बापट, प्रका. गव्ह. सें. बुकडेपो १८७५	पृष्ठ
पुद	पुरंदरे दप्तर	संपा. कृ. ना. पुरंदरे	भाग, ले.
पेद	पेशवे दप्तरांतील निवडक पत्रें,	संपा. गो. स. सरदेसाई	भाग, पत्र
पेब	पेशव्यांची बखर	संपा. कृ. वि. सोहनी, प्रका. का. ना. साने आवृ. ५ वी.	
प्रला	प्रभाकरकृत लावण्या	प्रका. चित्रशाळा, १९२०	पृष्ठ
ब	बहिणाबाईचा गाथा	प्रका. वि. ना. कोल्हारकर, शके १४४८	अभंग
बापूगोप	बापू गोखले पत्रव्यवहार	म. इ. साधने २५; राजवाडे संशोधक मंडळ,	लेखांक
बायं, बाबं	बायकांचें बंड (नाटक)	संपा. कृ. प्र. खाडिलकर, चित्रशाळा, १९०२	अंक, प्रवेश
बाळ	बाळमित्र	संपा. वि. कों. ओक, आवृ. २, निर्णयसागर १८९०	भाग, पृष्ठ
ब्रप	ब्रम्हेंद्रस्वामी पत्रव्यवहार	संपा. द. ब. पारसनीस	पृष्ठ
ब्रवि	ब्राह्मण आणि त्यांची विद्या	संपा. म. शि. गोळे, आर्यभूषण, १८९५	पृष्ठ
भग	भगवद्गीता		
भज	भजनी बोधपर पदसंग्रह	प्रका. शं. ग. चिंचलकर, निर्णयसागर	पृष्ठ
भदि	भयंकर दिव्य	संपा. ह. ना. आपटे	
भवि	भक्तविजय	महिपतिकृत. प्रका. जगदीश्वर प्रेस मुंबई	अध्याय, ओंवी
भा	भावबंधन	संपा. रा. ग. गडकरी, चित्रशाळा, १९२०	पृष्ठ
भाअ	भारत इ. सं. मंडळ अहवाल	प्रका. चिटणीस, भा. इ. सं.	,,
भाइ, भाइमं	भारत इ. सं. मंडळ इतिवृत्त	,, ,, ,,	,,
भात्रै	भारत इ. सं. मं. त्रैमासिक	,, ,, ,,	
भाब, भाऊ	भाऊसाहेबांची बखर	संपा का. ना. साने, शके १८४४	
भारा	भावार्थ रामायण		अध्याय, ओवी
मदबा	महेश्वरदरबारची बातमीपत्रें	संपा. द. बा. पारसनीस, १९१०	भाग पृष्ठ
मदमं	मदनमंजरी	संपा अ. गो. इनामदार	
मदरु	मराठी दफ्तर रुमाल	संपा. वि. ल. भावे	भाग, पृष्ठ
मध्व	मध्वमुनींची कविता	संपा. प्र. व्यं. गुर्बी, १९३३	
मॅन	मॅनवरिंगकृत मराठी प्राव्हर्ब्स	संपा. रे. मॅनवरिंग १८९९	
मनु	मनुस्मृति		
मराचिथेशा	म. रा. चिटणीस–थोरले शाहुमहाराज	संपा. का. ना साने.	पृष्ठ
मराचिधाशा	म. रा. चिटणीस–धाकटे शाहुमराज	,, ,, ,, १८०६ शके	,,
मराचिशिच	म. रा. चिटणीस–शिवाजी चरित्र	,, ,, ,,	,,
मरासंग्राम	मराठ्यांचीं संग्रामगीतें	संपा. दु. आ. तिवारी.	
मसाप	महाराष्ट्र साहित्यपत्रिका	प्रका. चिटणीस, महाराष्ट्र साहित्यपरिषद.	वर्ष अंक, पृष्ठ

संक्षेप	ग्रंथनाम	संपादक, प्रकाशक, इ.	आंकड्यांचा खुलासा
महा	महाभारत		
महिकथा	महिपतिकृत कथासारामृत		अध्याय, ओंवी
मुरंभा, मुरंशु	मुक्तेश्वर–रंभाशुकसंवाद		ओंवी
मुसभा	मुक्तेश्वर–महाभारत सभापर्व		अध्याय, ओंवी
मूक	मूकनायक नाटक	संपा. श्री. कृ. कोल्हटकर	
मृ, मृच्छ	मृच्छकटिक नाटक	संपा. गो. ब देवल	
मो, मोरो	मोरोपंत [मो या संक्षेपापुढें मोरोपंताच्या महाभारतांतील पर्वांचीं नांवें दिलीं आहेत. उदा० मोसभा, मोनामरसा, मोमंत्र, इ.]		
मोप्र, मोर	मोर, एल्. एल्. बी. प्रहसन	संपा. नारायण हरि भागवत, नेटिव ओपिनियन नियन प्रेस, १८८२	पृष्ठ
यथादि	यथार्थदीपिका	वामनपंडितकृत, प्रका. काव्यसंग्रह १९०८–१९१७	अध्याय ओंवी
यशख	यशवंतराव खरे	संपा. हरि नारायण आपटे	
योर, योगर	सार्थ योगरत्नाकर	प्रका. य. गो दीक्षित, आवृ. २, सन १९२३	भाग, पृष्ठ
र, रनल	रघुनाथपंडित–काव्यग्रंथ	प्रका. ह. लिं. बापट, सन १९०९	पृष्ठ
रघु	रघुवंश		सर्ग, श्लोक
रत्न	रत्नकांता नाटक	संपा. सी. ना. परुळेकर मालवणसमाचार छापखाना १८९०	अंक, प्रवेश
रा, राज	मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें	संपा. वि. का. राजवाडे	खंड, पृष्ठ
राक	रामदासकविता	रामदास–रामदासी, भाग ३	कविता
रादा	रामदासकृत दासबोध		दशक, समास ओंवी
राम, रा	रामदासी मनाचे श्लोक	प्रका. आत्माराम प्रेस, धुळें, शके १८३२	श्लोक
राला	रामजोशीकृत लावण्या	चित्रशाळा प्रेस, १९०८ आवृ. ३	पृष्ठ
रावि	रामविजय	श्रीधरकृत. प्रका. बा. ल. पाठक, शके १८२८	अध्याय, ओंवी
राज्ञा	राजवाडेसंपादित ज्ञानेश्वरी	संपा. वि. का. राजवाडे	,, ,,
रुद्द	सारुद्द पहा		
लोक, लोककथा	लोककथा	संपा. शं. ग. दाते, पुस्तक १, २. प्रका. गणेश सदाशिव, पुणें. १९२९–३०	भाग, पृष्ठ
वशाप	वऱ्हाडशालापत्रक	उमरावती (वऱ्हाड)	वर्ष, अंक, पृष्ठ
वसा	वटसावित्रींचें गाणें	प्रका. के. सी कुलकर्णी, सुवर्ण प्रिं. प्रेस मुं., १८८२	पृष्ठ
वाड–मा, वाडथोमा	वाड–थोरले माधवराव रोजनिशी	संपा. ग. चि. वाड	भाग, पृष्ठ
वाड–शाछ–शाहू	वाड–शाहू छत्रपति रोजनिशी	संपा ग. चि. वाड व द. ब. पारसनीस	पृष्ठ
विक	विनायकाची कविता	संपा. द. अ. आपटे, चित्रशाळा प्रेस, शके १८४२	पृष्ठ
विकार	विकारविलसित नाटक	संपा. गो. ग. आगरकर	

संक्षेप	ग्रंथनाम	संपादक, प्रकाशक, इ.	आंकड्यांच्या खुलासा
विचावि	विचारविलास	संपा. वा. म. जोशी, लक्ष्मीनारायण प्रेस, मुंबई १९२७	पृष्ठ
विपु–उ	विवेकसिंधु–पूर्वार्ध, उत्तरार्ध	मुकुंदराजकृत. प्रका. ग. चिं. देव,	प्रकरण, ओंवी
विवि. विज्ञावि	विविधज्ञानविस्तार	नियतकालिक, मुंबई	वर्ष, अंक, पृष्ठ
विक्षिप्त	विक्षिप्त–इंदूरसंस्थान	संपा. व्ही. एन. भाटे, मुंबई न्यूज प्रेस, १८९५–८६, भाग १–३	भाग, पृष्ठ
वेसीस्व, वेणासीस्व	वेणा–सीतास्वयंवर	वेणाबाईकृत. प्रका. सत्का. सभा, धुळें, शके १८३५	
V. S.	V. S. चे मार्मिक ऐतिहासिक लेख द्वितीय गुच्छ	संपा. धुं. स. जोशीवाईकर	समास, ओंवी पृष्ठ
व्यं, व्यंस्तो	व्यंकटेश स्तोत्र	देवीदासकृत	ओंवी
व्यनि	व्यभिचारनिषेध	संपा. बाबा पदमनजी, प्रका अमेरिकन मिशन सोसायटी, मुंबई १८५४	पृष्ठ
शाब	शामभट्ट आणि त्याचा शिष्य बटो	ले. चिं. मो. आपटे, सन १८९३	भाग, पृष्ठ
शिचप्र, शिवच	शिवचरित्रप्रदीप	संपा. द. वि. आपटे व स. म. दिवेकर, शके १८४७	पृष्ठ
शिदि, शिवदि, शिवदिग्वि	शिवदिग्विजय	संपा. पां. रा. नंदुबारकर व ल. का. दांडेकर	,,
शिली	शिवलीलामृत	श्रीधरकृत	अध्याय, ओंवी
शिशु	शिशुपालवध	भास्कर कविकृत (महानुभावी). प्रका. मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे, शके १८४४	ओंवी
शिसं.	शिवसंभव नाटक	संपा. वा. वा. खरे	अंक, प्रवेश
संक	संशयकल्लोळ नाटक	संपा. गो. ब. देवल	,, ,,
संग्राम, संगी संग्रामगी संग्रामगीतें	मराठ्यांचीं संग्रामगीतें	संपा. डु. आ. तिवारी	पृष्ठ
सप्र, स, सम	समर्थप्रताप	गिरिधरस्वामीकृत, प्रका. सत्का. सभा, धुळें, शके १८३४	समास, ओंवी
समपद्य	समयोचितपद्यमालिका	निर्णयसागर	पृष्ठ
समारो	सवाईमाधवराव यांची रोजनिशी	संपा ग. चि. वाड, प्रका, डे. व्ह. ट्रा. सो. सन १९०८	भाग, पृष्ठ
सनि	सर्व देशांतील निवडक म्हणी	संपा सदाशिव विश्वनाथ, मुंबई १८५८	म्हणींचा आंकडा
संवि	संतविजय	महिपतिकृत	अध्याय, ओंवी
साइंस मं-एले	सातारा इतिहास सशोधक मंडळ ऐतिहासिक लेख		
सागोप्र	सावित्री आणि गोपाळ, प्रहसन	संपा. रा. चिं. करमरकर, वीरक्षेत्र मुद्रणालय बडोदें, १८९०	अंक, प्रवेश

२. भाषादिसंक्षेपांची सूची

संक्षेप	स्पष्टीकरण
अप.	अपभ्रंश, अपभ्रष्टरूप
अहि.	अहिराणी
इं.	इंग्रजी
उ., उदा.	उदाहरण
उप.	उपरोधिक
ऐति.	ऐतिहासिक
क, कर.	करवीर प्रांतीय भाषा
कर्ना.	कर्नाटक
क्रि.	क्रियापद
कु.	कुडाळ
कुण.	कुणबाऊ
कों.	कोंकणी
खा.	खानदेशी
खि.	खिस्ती
गु., गुज	गुजराथी
गो.	गोवेप्रांत
चि.	चित्पावनी
तु., तुल.	तुलना
ना.	नागपुरी
प्र.	प्रशस्त
फा.	फारसी
बे.	बेळगांवीं
महानु.	महानुभावी
माण.	माणदेशी
राजा.	राजापुरी
ल.	लक्षणेनें
व.	वऱ्हाडी
वाप्र.	वाक्प्रचार
वांय	वायदेशी [वाई]
वि.	विशेषण
सं	संस्कृत
सां.	सांकेतिक
सामा.	सामान्यार्थी
हिं.	हिंदी
हेट.	हेटकरी

॥ श्री ॥

महाराष्ट्र वाक्संप्रदाय कोश

विभाग दुसरा

द

दगड——१ मंदबुद्धीचा माणूस; मूर्ख; टोणपा. 'बोधुनि दगडासि कां न भागावें।'—मो उद्योग ११·७७. २ कांहीं नाहीं; मुळींच नाहीं; शून्य. 'त्याला काय येतें दगड!'

दगड उचलणें—एखाद्यावर तुफान रचणें; एखाद्या विरुद्ध मसलत करणें; एखाद्यास संकटांत घालणें; एखाद्यावर आपत्ति आणणें.

दगड उचलणें—घेणें—फेकणें—मारणें; दगडमार करणें; दगड हातीं घेणें—(दगड मारण्याइतकें) रागानें वेडावून जाणें; बेफाम रागावणें; क्रोधानें संतप्त होणें; मारावयास धांवणें; अंगावर चालून जाणें.

दगड खाऊन जिरविणें; दगड जिरविणें—अतिशय सशक्त किंवा प्रखर कोठ्याचा असणें; कोणतेंहि खाद्य पचेल अशी शक्ति असणें.

दगड चहूंकडे टाकून पाहणें—चाचपून पाहणें; अंदाज घेणें; प्रत्येक उपाय अथवा युक्ति योजून पाहणें; सर्व दिशांनीं प्रयत्न करणें.

दगड टाकून ठाव पाहणें-घेणें—१ तळ शोधणें अथवा खोली काढण्याचा प्रयत्न करणें; ठाव पाहणें. २ खुबीदार प्रश्न विचारून दुसऱ्याच्या मनांतील विचारांची अटकळ करणें; अंदाज घेणें; कल पाहणें; मनाचा ठाव घेणें.

दगडन् (अन्—आणि) धोंडे—(बायकी) सटरफटर क्षुद्र गोष्टी. कांहीं अर्थ नाहीं अशी स्थिति; निरर्थक गोष्टी. 'रमाकाकूंनीं थोडे का धिंगाणे घातले! पोराला मार मार मारलें, लुगड्याच्या चिंध्या केल्या, सुनेला घरांतून हांकून दिलेन्. दगडन् धोंडे! किती गोष्टी सांगावयाच्या!'—पकोघे. 'प्रायश्चित्त दगड आणि धोंडे'—मोरप्र १७.

डोक्यांत दगड पडणें—सत्यानाश होणें. एखाद्याच

अतिशय धिक्कार करण्याकरितां योजतात. 'दगड पडो रे जळो तव जिणें!' –दावि १५. ११५.

दगड मारावयास लागणें—वेड लागणें; धोंडमार करूं लागणें; भ्रमिष्ट होणें.

दगड मारून हात लपविणें—एखादी गोष्ट गुप्तपणें करून पुन्हां नामानिराळे राहणें; साळसूदपणें खोडी काढून अलिप्त राहणें.

दगडाखालीं हात सांपडणें--गुंतणें—कांहीं दुःखकारक स्थितींत, अडचणींत, पेंचांत, नुकसानकारक कामांत सांपडणें; एखादी मोठी जबाबदारी अंगावर पडणें; कात्रींत सांपडणें; गुंतून पडणें. 'जिजाऊः— मग दगडाखालीं सांपडलेला हात कसातरी सोडवून घेण्यासाठीं माझ्या संभाजी-राजाला मोठी मोठी मोंगलाई सरदारी बादशहाकडून देववायची आणि पुढेंमागें बापलेकांची लढाई लावून द्यायची; हा होता त्यांचा त्या वेळचा डाव!'—शिसं १·१.

दगडाखालून हात काढून घेणें—अडचणींच्या कामांतून स्वतःस युक्तीनें मोकळें करून घेणें; जबाबदारींतून निसटणें; आपत्तींतून सुटणें.

दगडाचा दोर काढणें; दगडाचा दोर होत नाहीं—भलत्याच वस्तूपासून भलत्याच वस्तूची अपेक्षा करणें या अर्थी. दगडाची साल काढणें; वाळूचे दोर वळणें, पहा.

दगडाची नाव—प्राणनाश करणारी वस्तु. 'दगडाची नाव आधींच ते जड। ते काय दगड तारूं जाणे॥'–तुगा २९०३. 'जाणता बैसलों दगडाच्या नावें॥ तिचा तो स्वभाव प्राण घ्यावा॥'–तुकाराम. [अशा तऱ्हेची दगडासारखी, जड दगडाप्रमाणें दिसणारी १ फूट लांबीची नाव पंढरपुरांत वाळवंटींत पुंडलीकाचे पुढें जे लहान हौद दगडी आहेत त्यांत पाणी घालून सोडलेली असते. पण ती बुडत नाहीं. हें आश्चर्य, महिमा वाटून भाविक लोक नावेस हात लावून पाया पडतात व एकेक पैसा देतात. –दा. ना. कुलकर्णी–संग्रह]

दगडाची साल काढणें—दुष्कर, अद्भुत किंवा अशक्य गोष्ट करणें. 'काढिन दगडाचीही मी कोणाहि न निघेल, परि साल॥' –मो उद्योग ५-२५. वर पहा.

दगडाचे नाविक—दगडाच्या नावेप्रमाणेंच दगडाचे नाविक घातकी. 'दगडाची नाव' पहा.

दगडाला पाझर येणें—निघणें—फुटणें; दगडाला घाम येणें—अशक्य गोष्टी शक्य कोटींत येणें; जड, निर्घृण वस्तूला देखील दया येणें. 'मी त्याची येवढी विनवणी केली कीं त्यानें दगडालासुद्धां घाम आला असता, पाझर फुटला असता. परंतु त्याला बिलकूल दया आली नाहीं.' 'निर्मळ चित्तें झालीं नवनीतें पाषाणा पाझर फुटतीरे॥'–तुका.

दगडाला शेंदूर—दगडाला शेंदूर फांसला तरच त्याला देवपण येतें. 'पूजा कैची लोकीं जरि दगड शिरीं धरी न शेंदूर॥'–मोआदि. कचोपाख्यान.

दगडाला शेंदूर फांसून देव करणें—कोणाहि सामान्य किंवा नालायक मनुष्यास आपल्या सत्तेच्या अगर इतर बळावर महत्त्वाच्या स्थानीं नेऊन ठेवणें, त्यास महत्त्व प्राप्त करून देणें.

दगडावरची (काळी) रेघ—[दगडावर खोदलेलें कधीं पुसून जात नाहीं यावरून] वज्रलेप झालेली गोष्ट; कधीं न फिरणारी, पुसली जाणारी, खोटी ठरणारी गोष्ट, शब्द. 'हा मुलगा अशा गुणांनीं धुळीचे दिवे खात जाणार, ही दगडावरची रेघ मी लिहून देतों पहा!' 'आपल्या भोळ्या आणखी थंड स्वभावानं उद्यां पहा बयासाहेब कशा डोक्यावर बसतील त्या! ही माझी आपली दगडावरची काळी रेघ.' –बाजीराव–मस्तानी.

दगडाशीं गांठ पडणें—१ कठोर, गळग्रह अथवा नदेतें कूळ इत्यादिकांच्या तावडींत सांपडणें. २ ज्याच्या हृदयास मुळींच द्रव येणार नाहीं अशा मनुष्याशीं प्रसंग येणें; ज्याच्यावर कांहीं परिणाम होणार नाहीं अशाशीं बोलण्याचा प्रसंग येणें. ३ मठ्ठ मनुष्याची समजूत करण्याची पाळी येणें.

दगडाशीं भांडणें—दगडास टक्कर दिली तर त्याला न लागतां आपणासच इजा होते यावरून, बलाढ्य शत्रु, मोठी अडचण, कठिण काम इत्यादिकांशीं झगडणें; कठिण प्रसंगास तोंड देणें; अवघड शत्रूशीं सामना करणें.

दगडास पाझर (पान्हा) आणणें; दगडापासून दूध काढणें—१ नैसर्गिक नडी, अडचणी न जुमानतां आपले हेतू सिद्धीस नेणें. २ कठिण हृदयाच्या अथवा कंजूष मनुष्यास द्रव आणणें. ३ अशक्य गोष्ट घडवून आणणें.

❀ **दगड तासून पाझर फुटत नाहीं**—ज्याजवळ कांहीं नाहीं त्याला छळलें तरी काय मिळणार?–सवि ११३२.

दगड बारा वर्षें पाण्यांत राहिला तरी कोरडाच (निघाला)—ज्यावर केव्हांहि परिणाम होऊं शकत नाहीं त्यावर कितीहि कार्य केलें, तरी तें निष्फळच होय.

दगडाकडे पाहून खालचा विंचू दिसत नाहीं—वरवरच्या गोष्टीकडे केवळ लक्ष दिलें असतां अंतरंग कळून येत नाहीं. बाह्यांग पाहून अंतरंगाची कल्पना येत नाहीं.

दगडाखालीं सांपडलेला हात युक्तीनें काढावा—आंपण जर एखाद्या अडचणींत सांपडलेलों असलों, एखाद्या दुष्ट मनुष्याच्या तावडींत सांपडलों असलों, तर युक्तीयुक्तीनें आपली सोडवणूक करून घेतली पाहिजे.

दगडाचा देव (सुद्धां) सोन्याचे मेखेला गांड वासतो—(अशिष्ट) कितीहि मोठा माणूस असला तरी त्याला द्रव्यबळानें वश करतां येतें.

दगडाचा दोर होत नाहीं—वाळूचें तेल निघणें जसें अशक्य त्याप्रमाणें दगडाचे दोर करणें ही अशक्य गोष्ट आहे. शशशृंग, वंध्यापुत्र याप्रमाणें.

दगडाचा दोर होत नाहीं आणि भलतीच आशा पुरी होत नाहीं—अशक्य गोष्ट ज्याप्रमाणें घडत नाहीं, त्याप्रमाणेंच भरमसाट आशा धरून राहिल्यास ती कधींच सफल होणार नाहीं.

दगडाचे देव घालतां खळखळ, काढतां खळखळ—दगडाच्या मूर्ति असल्या म्हणजे त्या संबळींत घालतांनाहि आवाज करतात व काढतांनाहि आवाज करतात. यावरून नेहमीची असमाधानी वृत्ति दिसून येते. 'दगडाचें पेव' पहा.

दगडाचें नांव धोंडा, धोंड्याचें नांव दगड—१ जेव्हां एखादी गोष्ट इतकी स्पष्ट असते कीं, तिच्या संबंधाचा वाद फुकट असतो अशाप्रसंगीं योजतात. उजेडाइतकी स्पष्ट, अगदीं सहज समजण्यासारखी गोष्ट. २ कांहीं म्हटलें तरी सारखेंच; त्याचें नांव तेंच; क्षुल्लक, क्षुद्र अशा गोष्टीस कोणत्याहि नांवानें संबोधली तरी एकच. तु०—भटाचें नांव कानभट.

दगडाचें पेव घालतां खळखळ, काढतां खळखळ—दगडी बांधलेल्या पेवांत दाणे ओततांना आवाज करतात व काढतांना आवाज करतात. किंवा पेवामध्यें जर दगड सांठविले, तर ठेवतांना व काढतांना दोन्ही वेळां त्रास होतो. तयार करण्यास व निस्तारण्यास, दोहोंसहि अवघड अथवा त्रासदायक अशी घटना.

दगडांतील बेडकीस, पोशितो जगन्निवास—परमेश्वर सर्वांचें रक्षणपोषण करतो. खडकाच्या पोटांत बेडकांसारखे प्राणी जिवंत राहातात; ही परमेश्वराची लीला आहे. तो आपण निर्माण केलेल्या प्राण्यांचें कोठेंहि रक्षण करतो. 'खडक फोडतां सजिव रोडकी। सर्वांनीं पाहिली बेडकी।' —रामदास.

दगडापरीस ई(वी)ट मऊ; दगडापेक्षां वीट मऊ—(हालअपेष्टा इ०) दोन स्थितींची, गोष्टींची तुलना करून त्यांतल्या त्यांत एक बरी असें दर्शविणें; निरुपाय म्हणून मोठ्या संकटापेक्षां लहान संकट पत्करणें.—शाव ३·८०. (गु.) पथरकरतां ईट कुमली.

दगडापासून रक्त निघत नाहीं—अगदीं नादार कुळापासून काय मिळणार!—सवि ४२८०. 'दगड तासून पाझर फुटत नाहीं' पहा.

बायको तोंडाळ, शेत दगडाळ—तोंडाळ पहा. 'गवत गोंडाळ०' पहा.

दगडीं (दगडावर) आपटल्यानें भीति नाहीं—इतकी भक्कम, सशक्त, टिकाऊ गोष्ट, व्यक्ति इ.

दगा——**दगा, ठकपणा (करणारा), त्यांना असते बहुधा त्वरा**—लबाडी करणारास नेहमीं आपलें काम त्वरित करून घ्यावयाचें असतें. नाहींतर वेळ लागल्यास त्यांची लबाडी उघडकीस येण्याचा संभव असतो.—सवि ११११.

दगा दिला पावसानें, सरकारचें आलें मागणें—पाऊस न पडल्यामुळें पीक तर आलेलें नसावें व सरकारचा साऱ्याकरितां तगादा यावा, अशी चमत्कारिक स्थिति असणें.

दगा न कोणाचा सगा—दगा करणारास कोणी मित्र असत नाहीं. त्याला शिक्षा ही मिळतेच. 'आमचे दुसरे भाऊबंद आहेत, ते वाटा मारतात. पण त्यांचा माझा संबंध नाहीं. त्यांचें चालतें तोंपर्यंत बरें आहे पण जर कां ते एकदां सोटेवाल्यांच्या तावडींत सांपडतील, तर मग सुळाशींच गांठ. दगा न कोणाचा सगा! नको रे बाबा, आपणाला तो घातपात आणि तो सूळ!'—वि. मो. महाजनी (मोह विलसित). (हिं.) दगा न किसका सगा. Cheating play never thrives.

दचक——**दचक खाणें**—भीति वाटणें; धास्ती घेणें; जरब बसणें. 'तेणें दचक खाऊनि मानसीं।'—दावि३६८.

दचकी——**दचकी भरणें**—(व.) भीतीनें धडकी भरणें.

दच्च्या——**दच्च्या देणें**—चाट मारणें; फसवून निसटून जाणें. 'तो त्याला अखेरीस दच्च्या देऊन गेला.'

दट्ट्या——**दट्ट्या लावणें**—पिच्छा पुरविणें; जोरानें तगादा करणें; तोस्तान लावणें.

दड——**दड पाडणें**—(व.) [दड=दंव] पिकावर दंव पडल्यास पीक निरुपयोगी होतें. यावरून (ल.) निरुपयोगी ठरणें; बेकाम ठरणें. 'तुम्ही तेथें जाऊन काय दड पाडाल तेंहि लौकरच दिसेल.'

दंड——**दंड आवळणें-बांधणें; दंडाला काढण्या लावणें**--चतुर्भुज करणें; कैद करणें; बांधणें.

दंड ठोकून तयार होणें--'दंड थोपटणें' पहा.

दंड थोपटणें--(कुस्ती खेळण्यापूर्वी दंड ठोकतात यावरून) १ कुस्तीस सिद्ध होणें; आव्हान देणें. २ (ल.) साहसानें अथवा कोणासहि न जुमानतां एखादें कार्य करण्यास उभें राहणें; तयार होणें; सिद्ध असणें.

दंड थोपटून उभें राहणें--(ल.) वाग्युद्धास तयार होणें; तसें आव्हान देणें.

दंड दरदरून फुगणें--(आपल्याशीं कुस्तीला योग्य असा गडी पाहिला म्हणजे पहिलवानाचे दंड स्फुरण पावून फुगतात.) युद्धोत्सुक होणें; बाहु स्फुरण पावूं लागणें; युद्धाची कंडू उत्पन्न होणें.

दंड धरून-खेंचून आणणें--जबरदस्तीनें घेऊन येणें; पकडून आणणें.

दंड फुरफुरणें--मारामारीची, कुस्तीची वगैरे उत्कट इच्छा होऊन दंड स्फुरण पावणें; खुमखुमी वाटणें.

दंड भरणें—तालीम वगैरेमुळें दंड बळकट व जाड होणें.

दंडाला माती लावणें--(कुस्तीपूर्वी दंडाला माती लावतात) कुस्तीला तयार होणें.

दंडावर गोणी देणें--इच्छेविरुद्ध काम सोंपविणें, लादणें. 'मी धर्मस्थापनेसाठीं युगायुगाचे ठिकाणीं संभवत असतों अशा प्रकारचें विधान केलेंस, त्यावेळेस ते करण्याविषयीं तुझ्या दंडावर कोणीं गोणी दिली होती?'-काळ.

दंडास दंड लावून-घांसून--बरोबरीच्या नात्यानें; सारख्या सन्मानानें; बरोबरीनें; शेजारीं बसून.

❀ **दंडाच्या काढण्यांत मुसक्यांची भर**--अधिक शिक्षेंत अधिक भर.

दडंची——**दडंची मारणें-देणें**--बेपत्ता होणें; जरूर प्रसंगीं हजर नसणें; दडी मारणें.

दडपण——**सुनेला दडपण सासू**—सुनेवर सासूचा जसा दरारा असतो, तसा प्रत्येकावर कोणींना कोणीं हुकमत करणारा पाहिजे.

दडपणें——**दडपता नवरा, हडपती सासू**--'अडपती नाहीं सासू, दडपता नाहीं भाऊ' पहा. सासू किंवा नवरा असल्यास सासुरवाशीण व्यवस्थित वागते.

दंडवत——**अटकळल्या देवा दंडवत**--सहज ठेंच लागून पडलें असतां देवास नमस्कार केला असें मानणें. एखादें अरिष्ट सुपरिणामकारक बनल्यास योजतात. खालीं पहा.

सहज पडो, दंडवत घडो—देवाला जातांना ठेंच वगैरे लागून अडखळून पडल्यावर दंडवत घालण्याचें श्रेय मिळालें, अशी गोड कल्पना करून घेणें.

दंडापूपन्याय——काठी व अपूप दोन्ही एकत्र असतां, जेव्हां काठीला उंदरानें खाल्लें असें आपण म्हणतों तेव्हां साहजिकच अपूपहि खाल्ले असले पाहिजेत, हें सिद्धच आहे. एकाची जी गत तीच दुसऱ्याची असली पाहिजे, हें दाखवितानां योजतात. यावरून ओघानें स्पष्ट; क्रमप्राप्त.

दडी——**दडी देणें**--लपून बसणें; गुप्तपणें बसणें; सुगावा लागूं न देणें. 'मातेच्या उदरांत दडी देणें, त्या गर्भाला अशक्य झालें.'-इंप १४०.

दढी——**दढी बोलणें**--घालून पाडून, उपरोधिक, व्याजोक्तीनें बोलणें.

दणका——**दणका मारणें**--जोरानें झगडणें, प्रयत्न करणें.

दंत——**दंत भग्न होत, इच्छा नाहीं जात**--दांत पडले तरी वासना सोडीत नाहींत. वृद्धपणींहि आशा सुटत नाहीं-सवि ३७११.

दंतभग्नो भवेत् बाबा।——दांत पडक्या माणसास बाबा म्हणावें. घरांत कोणाला काय म्हणावें याबद्दल एक विनोदी सुभाषित आहे:—धष्टपुष्टो भवेद्दादा सुन्दरी वहिनी तथा। दंतभग्नो भवेद्बाबा आवा च गतभर्तृका ॥-समपद्य.

क्वचित् दंतांतरो मूर्खः।--ज्याचे दांत विरळ असतात तो बहुधा मूर्ख नसतो. सबंध श्लोक--क्वचित् दन्तालको मूर्खः क्वचित् गानवती सती। क्वचित् काणो भवेत् साधुः खल्वाटो निर्धनः क्वचित् ॥

दत्त——**दत्त म्हणून उभा**—[दत्तात्रेय भिक्षेस अकल्पित येत अशी कथा आहे] फकीर, भिक्षेकरी दारांत 'गुरुदेव दत्त!' म्हणून एकदम येऊन उभे राहतात. १ अकल्पितपणें उपस्थिति; अचानक येणें. 'इतक्यांत निजामच्या हत्तीवरून त्यांचा बॉडीगार्ड उठला, आणि...मधोमध भीमसेनाप्रमाणें नग्न तलवार घेऊन एकाएकी पेशव्यापुढें दत्त म्हणून उभा राहिला.'-लक्ष्मी आणि सरस्वती. २ पिच्छा पुरविणें.

दत्त म्हणून उभें राहणें--आयते येऊन हजर होणें; कांहीं श्रम न घेतां उपभोगापुरतें येणें.-इंप १३५.

पुढल्या दत्ताला भिणें--भावी परिणामाविषयीं धास्ती वाटणें, भिणें; त्यासाठीं मन कचरणें. 'तुका म्हणे भितो पुढिलिया दत्ता। म्हणऊनि चिंता उपजली ॥'-तु गा २८६७.

दत्तक——**दत्तक मुलाचा प्रपंच**--हा बहुतेक अखेरीस निरर्थक, त्रासाचा व अप्रीतीचा ठरतो. दत्तक मुलाचे अंतःकरणांत दत्तक घेणाऱ्याच्याविषयीं आवड, आदर, प्रेम वसत नाहीं. उलट दत्तक घेणाऱ्यांना पोटच्या मुलाबद्दल वाटणारें प्रेम दत्तक मुलाचे ठिकाणीं वाटत नाहीं, यावरून 'गांवावर उपकार, मढ्यास श्रृंगार, धर्मशाळेची उठाठेव, दत्तक मुलाचा प्रपंच,' हे चार निरर्थक आहेत.

ददा——**ददाची बाराखडी; ददाची विद्या**--फक्त देण्याची गोष्ट माहीत असणें. या उलट 'घघाची बाराखडी' पहा.

दंभ——**दंभवृक्ष निर्मूल कर, बाढीव सत्याचा अंकूर**--खोटें अवडंबर माजविणें टाकून देऊन खरेपणानें वागण्यांत फायदा आहे.-सवि २९५०.

दम——**दम कोंडणें**--१ श्वास कोंडणें; श्वासाचा अवरोध होणें. २ हिंमत, उत्साह खचणें; नाउमेद होणें; धैर्य खचणें; निरुत्साह होणें.

दम खाणें—१ थांबणें; श्वास घेणें; थोडावेळ स्वस्थ बसणें; विश्रांति घेणें. २ वाट पहाणें; धीर धरणें. तु०—खानेमे खाना, गम खाना.

दम घेणें—थांबणें; विश्रांति घेणें.

दम छाटणें—१ श्वासाचा निरोध करणें; श्वास कोंडून धरणें. २ धीर धरणें; सहनशीलपणा धारण करणें. ३ श्वासोच्छ्वास अनियंत्रित चालणें; गुदमरणें; घाबरें होणें. 'कफामुळें दम छाटत नाहीं.'

दम टाकणें-सोडणें—१ आशा, विश्वास, धैर्य सोडणें. निरुत्साह होणें; गलितधैर्य होणें. २ श्वास घेणें; विश्रांति घेणें; थांबणें.

दम देणें—१ धीर देणें; प्रोत्साहित करणें; उत्तेजन देणें. २ धमकी देणें; धाकदपटशा दाखविणें. ३ जोरानें खडसावणें; भोसडणें. ४ क्षणभर विसांवा घेऊं देणें.

दम धरणें--१ श्वासावरोध करणें. २ थांबणें; विसावा घेणें. ३ धीर धरणें. ४ कांहीं वेळ वाट पाहणें.

दम पाहणें--(एखाद्याच्या) अवसानाची, शक्तीची परीक्षा घेणें, करणें; धैर्य, शक्ति वगैरेचा अंदाज घेणें; बल अजमावून पाहणें.

दम भरणें--धमकावणें; खडकावणें; तंबी देणें; भेडसावणें; दहशत घालणें; ताकीद देणें; धाक दाखविणें; भीति घालणें; घाबरवून सोडण्याचा प्रयत्न करणें.

दम मारणें--१ झुरका घेणें (गुडगुडी.इ. चा). २ आपल्या करामतीची पराकाष्ठा करणें; शक्ति खर्च करणें. 'पुन्हा एकदां दम मार म्हणजे तो धोंडा सरकेल.' ३ गट्ट करणें; दाबणें (पैसा, अन्न इ.).

दम लागणें--श्वास कोंडणें; श्वास घेणें कठीण होणें; जीव खालींवर होणें; जलद व कष्टानें श्वास घेणें; धाप लागणें.

दम सुटणें--धैर्य, विश्वास नाहींसा होणें; धीर खचणें; अवसान सुटणें; गलितधैर्य होणें.

दमावर धरणें--सावकाश, न कंटाळतां काम करणें.

दमास येणें--थकणें; दमणें.

❀ **दम कोता और घुस्सा बहुत**--शक्ति थोडी असून राग लवकर येणारा मनुष्य. अशक्त मनुष्य बहुतेक चिडखोर असून लवकर रागावतो.

दमडी——**दमडीवर चमडी करणें—काढणें—मिळविणें**--थोड्या भांडवलावर पुष्कळ नफा मिळविणें.

❀ **दमडी ठेवतां संभाळून, रुपया जाई खर्चून**--एखादा मनुष्य अतिशय कंजूषपणें वागून दमडी दमडी राखून ठेवतो, पण एखाद्या वेळीं त्यास एकदम खोट बसून बराच पैसा खर्च करावा लागतो. तु० तेलिण राखे धारोधार खुदा मारे एकच बार. Pennywise, pound foolish.

दमडी दमडी जोड जोड करुनीया लाख करूं--थोडथोडें सांचविलें असतां पुष्कळ मोठा संग्रह होतो.

चमडी देना मगर दमडी नहि छोडना--चमडी देईल परंतु दमडी सोडणार नाहीं, इतका चिक्कू प्राणी.

दमडी म्हालाक दुगाणी दलाली--(गो.) दमडीच्या मालाला दुगाणी दलाली. 'अडक्याची भवानी०' पहा.

दमडी रोकडी, कंबर कां वांकडी--पैसा रोख घेतला असतां काम करण्याची कुरकुर कां करावी? दुगाणी पहा.

दमडी सोदूक दुगाणी तेल वे--(गो.) दमडी हुडकण्याकरितां दुगाणीचें तेल जाळणें.'अडक्याची भवानी०'पहा.

दमडीचा चाकर, लाखांचा बेकार--चाकराची किंमत कांहीं नसली तरी तो श्रीमंतांना त्रास पडूं देत नाहीं हेंच त्याचें लाखपट मोल (?)

दमडीचा सौदा, येरझारा चौदा--थोडक्या कामाकरितां अतिशय श्रम पडणें.

दमडीची वरू, कोठें घेऊन फिरूं--[वरो=(गो.) खाद्य, अन्न, पदार्थ] एखाद्या क्षुल्लक गोष्टीचें फार कौतुक करणें.

दमडीची सणकाडी, लाख रुपयांची हवेली--अतिशय मौल्यवान् इमारत जाळण्यास एक कवडी किंमतीची सणकाडी पुरते. अतिशय मोठ्या गोष्टीचाहि नाश एखाद्या क्षुल्लक गोष्टीपासून होतो. आगकाडी, काडी पहा. तु.-हत्तीला अंकुश तो केवढा !

दमडीचें घेणें आणि खंडीचा भाव—अतिशय अल्प घेणें असतां चौकशी मात्र फार मोठमोठ्या गोष्टींची करणें.

दमडीचें तेल, सारी रात्र दिवा, उरलें सुरलें माझ्या झुलपाला लावा—अतिशय अल्प वस्तूमध्यें अनेक कार्यें साधण्याचा प्रयत्न करणें. अतिकंजूषपणा.

दमडीच्या कोंबडीला चार आण्यांचा मसाला--क्षुल्लक वस्तूसाठीं प्रमाणाबाहेर खर्च करणें. तु०-अडक्याची भवानी सापिकेचा शेंदूर; वगैरे.

दमडीच्या घुगऱ्या, सारी रात्र मचमच--'दमडीचें तेल०' पहा.

दमडीवर झिमडी--१ थोडक्या गोष्टीबद्दल फार फुशारकी मारणें. २ क्षुद्र गोष्टीवर लोकांच्या उड्या !

दमडीसाठीं मशीद ढासळूं नये--क्षुल्लक लाभासाठीं फार मोठी हानि करूं नये.

दयदय——दय दय असणें—(व.) [दयदय= द्या ! द्या !] दारिद्र्यामुळें उणीव असणें.

दयादया होणें--अतिशय करुणास्पद स्थिति प्राप्त होणें.

दया——दया उधार, खता रोकडी--[खता=चूक, दोष] आपण दुसऱ्यावर उपकार केला असतां त्याचें फल मिळण्यास उशीर लागतो, परंतु दुसऱ्यास अपकार केला असतां त्याबद्दल मात्र ताबडतोब शिक्षा होते; किंवा एखादी चूक केल्यास त्याबद्दल मात्र ताबडतोब अद्दल घडते.

दया चोराला, दंड सावाला--एकाचा अपराध असतां भलत्यालाच शिक्षा करणें. अपराध्यावर दया करून निरपराध्यास शिक्षा करणें. चोरास सोडून संन्याशास सुळीं देणें.

दया तिचें नांव भूतांचें पाळण । आणिक निर्दळण कंटकांचें ॥ --तुगा ३४६८. सर्व प्राणिमात्रांचें रक्षण करणें व दुष्टांना शासन करणें याचेंच नांव दया.

दया तेथें देव--जो मनुष्य दयालु असतो त्याचेवर परमेश्वराची कृपा असते. किंवा दयावंत माणूस परमेश्वरासारखा असतो. God is mercy incarnate. 'दया तेथें देव शास्त्रहि प्रमाण।'-सप्र २·८४.

दया धर्म नाहीं मनीं, मुखोटा पाही दर्पणीं--मूळ कबीराचा दोहा असा--'दया धर्म नहिं मनमों, मुखडा क्या देखे दर्पणमों।' मनांत दया किंवा धर्म मुळींच बाळगावयाचा नाहीं व स्वतः मात्र चैन करीत असावयाचें. केवळ आपल्याच स्वास्थ्याकडे लक्ष्य देणाऱ्या व गरीबगुरिबांची काळजी न घेणाऱ्या मनुष्याबद्दल म्हणतात.

दया धर्मका मूल है--धर्माचा पाया दया ही आहे. -विक्षिप्त ३.८७. दयाधरमका मूल है, पाप मूल अभिमान । तुलसी कहे दया न छांडिये, जबलग घटमों प्राण ॥

दया नाहीं ठाऊक, त्याला म्हणावें खाटीक--जो मनुष्य दया करीत नाहीं त्याला खाटकाप्रमाणें निष्ठुर समजावें.

दया माया दुर्भागी, ती विसरली आत्म्यालागीं--आपण आपल्याभोंवतीं असलेल्या लोकांवर दयालोभ ठेवून त्यांच्याबद्दल आसक्ति बाळगली तर आपण या मायेच्या पाशांत गुंतून राहूं व आत्म्याच्या कल्याणाची म्हणजे मोक्षाची काळजी करणार नाहीं.

दया मांसाशिनः कुतः ।--जो मनुष्य मांसाहार करतो त्याला दया कशी येणार ? नित्य प्राणी मारून खाण्यानें त्याचें अंतःकरण कठोर होतें.

दया क्षमा शांति । तेथें देवाची वसति ॥--ज्या मनुष्याच्या अंतःकरणांत दया असते, जो दुसऱ्यास क्षमा करतो व शांत मनानें राहतो. त्याचेवर परमेश्वराची कृपा असते.-तुगा (जोग) ८८०.

दयेसारखा धर्म नाहीं--दुसऱ्यावर दया करणें अत्यंत श्रेष्ठ असें धार्मिक कृत्य आहे. इतर धर्मपालनाकरितां करावयाच्या व्रतवैकल्यांपेक्षां दुसऱ्यावर दया करणें अधिक श्रेष्ठ होय. (अ) क्षांतितुल्यं तपोनास्ति संतोषान्न सुखं परम् । नास्ति तृष्णासमो व्याधिर्न च धर्मो दयापरः ॥ (आ) न च विद्यासमो बन्धुर्न च व्याधिसमो रिपुः । न चापत्यसमः स्नेही न च धर्मो दयापरः ॥

दयाराम——दयाराम मुकुंददासाचे नातू—१ अतिशय धनाढ्य. २ (व्याजोक्तीनें) अतिशय दरिद्री.

दर——दर एक गांवीं एक एक घर बांधावें—जेथें जेथें आपण जातों तेथें तेथें असा आपला एक तरी मित्र करावा कीं ज्याच्याशीं आपला पूर्ण घरोबा असून, त्याच्या घरीं गेलें असतां त्यास आपणाबद्दल आपलेपणा वाटेल व आपणासहि संकोच वाटणार नाहीं.

दर कुच, दर मुक्काम—प्रवासामध्यें जेथें जेथें रहावयाचें, त्या प्रत्येक ठिकाणीं रोज नव्या ठिकाणीं मुक्काम करून

तेथून रोज कूच करणें; एक दिवसापेक्षां अधिक कोठेंहि मुक्काम न करतां मजल मारणें.

दर न्हाणाला नवें मखर लागत नाहीं; दर न्हाणाला मखर कोण घालतो—मुलीस प्रथम न्हाण आलें असतां मखर घालून सोहळा करण्याची पद्धति होती. मोठेपणा द्याव-याचा किंवा गौरव करावयाचा तो एकेकदाच करावयाचा असतो. त्याची प्रत्येक वेळीं अपेक्षा करणें चूक आहे. कोणत्याहि गोष्टीची अपूर्वाई प्रथमच असते. वारंवार त्याच गोष्टी व्हावयास लागल्या तर त्यांचें कांहीं वाटेनासें होतें. तु०—नित्य मरे त्याला कोण रडे.

दर बारा कोसांवर भाषा बदलते--बोलण्याची भाषा सर्वत्र एक असत नाहीं. थोड्या थोड्या फरकानें ती बदलत जाते. या फरकांनीं झालेल्या भाषा, एखाद्या प्रधान लेखन भाषेच्या उपभाषा किंवा बोली म्हणून समजण्यांत येतात.' दर बारा कोसांवर भाषा बदलते ही स्थूल म्हण जर खरी मानली, तर श्रेष्ठ कोण व कनिष्ठ कोण हें कोण कसें ठरविणार ?' —न. चिं. केळकर, सह्याद्रि १४·३·६७२.

दररोज सव्वा लक्षाची घडामोड आहे—चालते--जगाचें रहाटगाडगें फार मोठें आहे. रोज केवढी तरी घडामोड चालली आहे. रोज लाखों माणसें जन्मतात आणि लाखों मरतात.

दरेक बांगडे तीस, शणैच्या भिडेक वीस--(गो.) सामान्य दराप्रमाणें तीस बांगड्या मिळतात, पण ओळखीच्या माणसाला मात्र वीस म्हणजे कमी देणें. परिचित माणसाला फसविणें.

दरेवैर खरवड ना--(गो.) दर ठरलेला असल्यावर त्याचेवर अधिक खरवड (मासळीचें एक परिमाण) मिळणार नाहीं.

दर——दराची माती दरीं जिरते—[दर-खड्डा] जमिनींत दर केला, खड्डा पाडला, तर जी माती निघते ती खड्डा बुजविण्याच्याच कामीं येते, शिल्लक उरत नाहीं. मनुष्याचें उत्पन्न कितीहि वाढलें तरी अखेरीस शिल्लक कांहीं उरता दिसत नाहीं; कारण तितकीं त्याचीं खर्चाचीं द्वारेंहि वाढतात. पुढें पहा.

दराची माती दरास पुरत नाहीं--एखादा खांब,मेढ पुरावयाची असली म्हणजे खड्डा खणावा लागतो. त्यांतून जी माती निघते ती तो खांब पुरल्यावर बुजविण्यास पुरेशी होत नाहीं. कारण तो खड्डा ठांसून भरावा लागतो व मेढ घट्ट बसावी म्हणून आणखी दगड वगैरे ठेंचावे लागतात. जेथलें तेथें करून भागत नाहीं; पदरचें कांहीं घालावें लागतें.

दरद——गरजवंत तो दरदवंत—[दरदवंत = आस्थेवाईक] गरजू माणूस मोठा आस्थेवाईक व सावध असतो. ज्याला गरज असते तो अधिक काळजीपूर्वक काम करतो.

दरदी——दरद्याजवळ दुःख सांगावें—जो मनुष्य जाणता असेल त्यालाच आपला रोग सांगितला असतां तो कांहीं तरी उपाय सुचवितो. इतरांस सांगून उपयोग नाहीं व जाणत्यापासून लपविण्यांत फायदा नाहीं.

दरबार——दरबारखर्च—दरबारांतील लोकांस मध्यस्थी करण्याकरितां, आपलें काम करून देण्याकरितां, खूष करण्याकरितां किंवा दंड वगैरे म्हणून द्यावयाची रक्कम; लांच; रुखसत. ' जानोजीची जीभ कापण्याची शिक्षा झाली. दरबार खर्च करून जानोजीस सोडविलें. '—वतनपत्रें, वाड २६.—पेशवाईच्या सावलींत ५८.

❀ **दरबारीं आपला हितकर, तो पैशाचा चाकर**--जो मनुष्य राजदरबारामध्यें आपलें काम करून देण्यास उपयोगी पडतो, त्याला स्वतःला कांहीं तरी पैशाची प्राप्ति व्हावी अशी अपेक्षा असते. दरबारी मनुष्य दुसऱ्याच्या उपयोगी पडतो तो लांचखाऊ असतो.

दरबारीं मान, विड्याचें पान--राजदरबारांत जरी मोठा सन्मान झाला, तरी हातांत फक्त विड्याचें पानच येतें. प्रत्यक्ष आर्थिक लाभ काहीं होत नाहीं. म्हणजे गाजावाजा पुष्कळ पण प्रत्यक्ष अर्थ फायदा कांहीं नाहीं. मॅनवेरिंगनें ' दरबारीं मान विद्येचें पान ' अशी म्हण दिली आहे.

दरबारीं सर्वांशीं बरें वागणें, तर फार दिवस टिकणें--राजदरबारामध्यें जर सर्वांशीं गोडीगुलाबीनें वागलें तरच आपलें स्थान तेथें टिकण्याचा संभव असतो. नाहींतर कोणी-तरी आपला मत्सर करून आपलें उच्चाटन केल्याशिवाय राहात नाहीं.

दरवडा——दरवडेखोरांच्या घोड्यांना चोरपाऊल असतें—चोर लोक आपला सुगावा मुळींच लागणार नाहीं अशी काळजी घेतात. लबाड व धूर्त लोक आपला डाव नेहमीं कोणास थांगपत्ता लागूं न देतां साधतात. —गांगा २४६.

दरवाजा——दरवाजा कोंडणें—१ आगमन, प्रवेश बंद करणें. २ राबता बंद ठेवणें.

दरवाज्यांत हत्ती बांधणें—अब्रूदार मानकरी लोकांस दिलेली सन्माननीय दंडाची शिक्षा. उत्तर हिंदुस्थानांत राजे लोक पदरच्या मोठ्या लोकांना दंड करावयाचा असेल तर 'तेरे दरवाजेमे हत्ती बांधेगे' असें म्हणून त्याचे दरवाज्यांत सरकारी हत्ती नेऊन बांधीत असत. त्यामुळें हत्ती व नोकर यांच्या खादीचा येणारा खर्च येवढी रक्कम पर्यायानें दंड दिल्यासारखी होत असे व बाह्यात्कारीं याचे दरवाज्यांत हत्ती झुलूं लागल्यामुळें सामान्य लोकांत त्याचा इतमाम राजानें वाढविला असें होई. अजूनसुद्धां पुष्कळ राजे या नमुन्याच्या म्हणजे सरकारी मोटारी- रेसीसचे घोडे वगैरे खैरातींत निघालेले पदरच्या लोकांना देऊन पर्यायानें त्यांचेकडून किंमत वसूल करितात.

दरवाज्याला केळीचा खुंट आणि वरातीला उंट—उंटावर वरात कोणी काढीत नाहींत. भलतीच गोष्ट करणें.(?)

दरसन——दरसन थोडा, दिमाख बडा—मुख्य मुख्य गोष्टीपेक्षां अवांतर गोष्टीचाच जेथें गाजावाजा चाललेला असतो अशाबद्दल योजतात.

दरा——ज्या गांवीं भरे दरा, तोच गांव बरा—ज्या गांवीं आपली उपजीविका चालते त्या गांवालाच चांगलें म्हणावें; त्याला नांवें ठेवण्यांत अर्थ नाहीं व दुसऱ्या गांवांची स्तुति करून कांहीं फायदा नाहीं.

दरिद्र——दरिद्रनाम संवत्सरे--१ सबंध वर्षांत दारिद्य; सदोदित अतिशय दारिद्य. २ अगदीं दरिद्री.

❀ **दरिद्राची उत्पत्ती, आळशांची संगती**—आळशी मनुष्याशीं सहवास ठेवला असतां दारिद्य येतें.

दरिद्री——दरिद्री चाले दर्याकू (दर्याकडे), दरिद्र (करम–नशीब) चाले साथ, मोतीखातर डुबी मारी, शंख लागे हाथ—दरिद्री मनुष्य मोतीं आणण्याकरितां समुद्राकडे गेला असतां त्याचें दुर्दैव त्याच्याबरोबरच असल्यामुळें, त्यानें समुद्रांत मोत्यें काढण्याकरितां बुडी मारली तरी हातांत शंखच येतो. मनुष्याच्या नशीबीं दारिद्य असलें तर तें त्याला चुकवितां येत नाहीं.

दरिद्री जगाचा मेहुणा; दरिद्री साऱ्यांचा मेव्हणा—१ 'गरीबकी जोरू सबकी भाबी' याप्रमाणें गरीबाला सर्वांची चाकरी करावी लागते. दरिद्री मनुष्याची कोणीहि थट्टा करावी. मेहुणा अथवा बायकोचा भाऊ (श्यालक) हा एक नेहमीं थट्टेचा विषय असतो.

दरिद्री जनाचे उद्योग घरांतून पळतात—दरिद्री मनुष्यानें पैसे मिळविण्याकरितां कांहींहि खटपट केली, तरी ती निष्फळ होते.

दरिद्री जिणें अन् जिभेला चवणें—दरिद्री पण मिजासी अशाबद्दल म्हणतात.

दरिद्री बलहीनास, लोक लाविती दोष—जो मनुष्य दरिद्री व अशक्त असतो, त्याला सर्व लोक नांवें ठेवितात.

दरिद्रेषु मनुष्येषु प्रभुत्वं कुरुते धनी—धनवान मनुष्य हा दरिद्री लोकांवर सत्ता चालवितो.

दरिद्र्याची मूठ उघडली आणि झांकली सारखीच—दरिद्री मनुष्याजवळ केव्हांच कांहीं द्रव्य असण्याचा संभव नसल्यामुळें त्याची मूठ झांकली काय आणि उघडली काय सारखीच. 'झांकली मूठ सव्वालाखाची' अशी एक म्हण आहे पण ती दरिद्र्याच्या बाबतींत लागू नाहीं.

दरिद्र्यास खोड असूं नये—दरिद्री मनुष्यानें कधींहि आपणास अमुक आवडतें तमुक आवडत नाहीं, असें म्हणूं नये; जें मिळेल त्याचा स्वीकार करावा.

दरींखोरीं——दरींखोरीं–दऱ्याखोऱ्यांत पडणें—१ नुकसानींत, संकटांत येणें. २ दरिद्री होणें.

दर्जी——दर्जीका बेटा, जबलग जीवे, तबलग सीवे--(हिं.) शिंप्याच्या मुलाचें शिवणकाम मरेपर्यंत सुटत नाहीं. शिंप्याच्या मुलास शिवतां शिवतां मरण यावयाचें.

दरजीनो छोकरो मरे त्यांसुधि शिवे-(गु.) वर पहा.

दर्पण——दर्पण अंधळ्याकरीं, देतां न होय उपकारी--अंधळ्याच्या हातांत आरसा दिला तरी त्यांचा काय उपयोग ? तो तुमचा उपकारी कसा राहाणार ? अंधदर्पण न्याय.

दर्पणासी बुझे । नकटें तोंड लपवी लाजे ॥--तुगा ३१४५. कुरूप, नकटा माणूस आरशापासून दूर राहातो.

दर्भ——दर्भ घेऊन उभा असणें--उत्तरक्रियेसाठीं दर्भ लागतात. यावरून एखादा मनुष्य केव्हां मरेल व आपण त्याची उत्तरक्रिया केव्हां करूं अशी वाट पाहात असणें. दुसऱ्यास कांहीं इजा करण्याच्या संधीची वाट पाहणें.

दर्भ्या——१ उत्तरक्रिया करणारा ब्राह्मण, कार्टी. हा नेहमीं हातांत दर्भ घेऊन उभा असतो. २ (ल.) अपशकुनी; अपेशी. ३ दरिद्री माणूस.

दर्‍म्यान——दर्‍म्यान येणें--मध्यस्थी करणें; मध्यें पडणें.

दर्या——दर्याक मारप--(गो.) समुद्राला बळी देणें.

❀ **दर्याकिनारीं केळी, मोडत नाहीं कदाकाळीं**--समुद्रावर जरी अत्यंत सोसाट्याचे वारे वाहात असतात तरी त्यामुळें माडाचीं झाडें पडतात, कारण तीं वांकत नाहींत; पण केळी वांकतात, त्या वाऱ्यास वाट करून देतात, त्यामुळें त्या कधीं पडत नाहींत. मनुष्य संकटकाळीं नम्र झाला असतां त्यास संकटाची बाधा होत नाहीं. तु०-महापुरें झाडें जातीं। तेथें लव्हाळें वांचतीं ॥-तुकाराम.

दर्यांत आस मासो, ताचें मोल करतलो पिसो—(गो.) समुद्रांत मासा असतांना त्याचें मोल ठरविणारा मूर्ख असतो. तु०-पाण्यांत म्हैस बाहेर मोल.

दर्यामें खसखस—समुद्रात खसखस कोठच्या कोठें जाणार ! समुद्र केवढा व खसखस केवढी. मोठ्यापुढें अगदीं क्षुद्र व्यक्तीला कोण विचारणार ? तु०-खंडीं पावरति. होय पुढेंचि, न मागें पार्थ शराहतहि शतमखसख सरे। मुनि म्हणति अर्जुनीं तव शक्ति, जशी सागरांत खसखसरे ॥ -मोद्रोण २.६३. -पामो १८३.

दर्यामें रहना और मगर मच्छीसे बैर करना--समुद्रांत राहून मगर व मासे यांच्याशीं शत्रुत्व करणें. ज्यांच्याबरोबर आपणांस नेहमीं वागावयाचें त्यांच्याशीं गोडीनेंच राहिलें पाहिजे. तु०-जळांत राहून माशांशीं वैर.

दर्यावर काठी मारली तर दर्या वेगळा होणार नाहीं—पाण्यावर कितीहि जोरानें काठी मारली तरी पाणी तुटत नाहीं; निष्फळ प्रयत्न करण्यांत अर्थ नाहीं. भलत्याशीं वैर करूं नये. जलताडन.

दर्शन——दर्शन देणें-(व्याजोक्तीनें) तोंड दाखविणें.

दलाल——दलालाच्या अंगावर घोडे पडत नाहींत—घोड्यांच्या खरेदीविक्रीमध्यें घोडे कसेहि बरे वाईट निघालें तरी ते विकत देणारा किंवा घेणारा यांच्याच कडे राहावयाचे असतात. सौदा पटला तर घेणाराकडे, नाहीं तर विकणाराकडे; पण दलालावर कांहीं त्यांचा भार नसतो. तो केवळ दलालीचा मालक. त्याचें स्वतःचें नुकसान कांहींच नसतें. जो मनुष्य जबाबदार असतो त्याचेवरच कामाच्या बरेवाईटपणाची जोखीम असते. इतर दुय्यम, किंवा अलबत्या गलबत्या लोकांवर नसते. ‘ दलालीवरी घोडे पडतात कीं काय !’-शिवदि ३६६.

दलालाच्या अंगावर धोंड पडत नाहीं--कोणत्याहि व्यवहारांत नफानुकसानीस जबाबदार विकणारा व विकत घेणारा हे असतात. दलालास त्यामध्यें कांहींच घस लागत नाहीं. तो आपली दलाली तेवढी दोघांकडूनहि लाटून मोकळा होतो.

दलालास दिवाळें काय—माल विकणारा व विकत घेणारा कोणाचाहि तोटा झाला तरी दलालाची दलाली कायम. तेव्हां त्याला दिवाळें ठाऊक असण्याचें काय कारण ! (हिं.) दलालका दिवाला क्या.

दंव——दंवावयलें लोणी काढून संसार करणें—(गो.) दंव कितीहि घुसळलें तरी त्यावर लोणी येणें शक्य नाहीं. अशक्य गोष्टीची आशा धरणें.

दवडणें——हातचें दवडा आणि पळत्याचे पाठीस लागा--हातचें सोडून पळत्याच्या पाठीस लागणें. जवळची वस्तु घालवून दूरची मिळण्याची आशा करणें. अर्धं सोडून सगळीच्या मागें लागणें.

तोंडावाटें काढावें आणि देशांतरास दवडावें—एखाद्यास बळेनें त्रास देणें. (?)

दवदव——दवदव करणें—दगदग करणें; त्रास करणें; जिकीर करणें; मेहनत करणें.

दश——दशक चढविणें—वर्चस्व स्थापणें.

दशकामज (व्यसनें)--मृगया, द्यूत, दिवसां झोंप, मद्यपान, नृत्य, गायन, क्रीडा, शिवीगाळ, बाहेरख्यालीपणा, दांभिकपणा.

दशग्रंथ--(अ) संहिता, ब्राह्मण, आरण्यक, शिक्षा, कल्प, व्याकरण, निघंटु, निरुक्त, छंद व ज्योतिष. किंवा (आ) संहिता, पद, क्रम, ब्राह्मण, व्याकरण, शिक्षा, ज्योतिष, कल्प, छंद, निरुक्त, हे दहा वैदिक ग्रंथ.

दशग्रंथी ब्राह्मण--ज्यानें वरील दहा ग्रंथांचें चांगलें अध्ययन केला आहे असा. (ल.) फार विद्वान् ब्राह्मण.

दशदानें--गो, भूमि, तिल, सुवर्ण, घृत, वस्त्र, धान्य, गूळ, मीठ, रुपें. दानें पहा.

दशदिशा--पूर्वपश्चिमादि चार मुख्य, आग्नेयादि चार उपदिशा, ऊर्ध्व व अधर, मिळून दहा.

दशदिशा मोकळ्या असणें--कोठेंहि संचार करणें; वाट फुटेल तिकडे जाणें; स्वैर संचार करणें.

दशनाडी--इडा, पिंगला, सुषुम्ना, गांधारी, जीवनी, दशतुंडी, दीक्षा, बाणदशा, शंखिनी, सौक्षिणी.

दशनाद--चिणी, चिंचिणी, घंटा, शंख, तंत्री, ताल, वेणु, मृदंग, भेरी, मेघ.

दशनाम (दसनाम) गोसावी-संन्यासी--गिरी, पुरी, पर्वत, सागर, मन, तीर्थ, भारती, सरस्वती, अरण्य, आश्रम- हे गोसावी संन्याशाचे दहा वर्ग आहेत.

दशमग्रह--(थट्टेनें) जांवई. नवग्रह प्रसिद्धच आहेत. त्यांत भर हा दहावा. ' जामाता दशमो ग्रहः ' पहा.

दशमद्वार—१ ब्रह्मरंध्र. २ (सांकेतिक) गुद.

दशमी पूर्तें पंचांग शिकिलो—(गो.) दशमीपुरतेंच पंचांग शिकलेला. पुरी माहिती नसणारा.

दशमूळ—(अ) शालिपर्णी (रानगांजा), पृष्टिपर्णी (भाल), रिंगणी, डोरली (मोत रिंगणी), गोखरूं, बिल्व, ऐरण (टाहाकळ), टेंटू, पहाडमूळ, शिवण. (आ) बेल, टाकळा, टेंटू, शिवण, पाडळ, साळवण, गोखरूं, पिठवण, डोरली, रिंगणी.

दशावतार—विष्णूनें घेतलेले दहा अवतारः--मत्स्य, कूर्म, वराह, नारसिंह, वामन, परशुराम, राम, कृष्ण, बौद्ध, कलंकी.

दशेंद्रियें--डोळे, कान, नाक, जीभ व त्वचा हीं पांच ज्ञानेंद्रियें व हात, पाय, वाणी, गुद व उपस्थ हीं पांच कर्मेंद्रियें.

दशोपनिषदें—ईश, केन, कठ, मुंडक, मांडूक्य, तैत्तिरीय, ऐतरेय, छांदोग्य, बृहदारण्यक, प्रश्न.

❀ **दशशंखी राख फुंकी**—हाताच्या बोटांच्या अग्रावर शंख किंवा चक्र यांच्या आकाराच्या रेषा असतात त्यांवरून शुभाशुभ फळ पाहतात. ज्याच्या दहाहि बोटांवर शंख अस तात तो दरिद्री होतो. पुढील एक श्लोक पहा—' एकचक्रः सदाभोगी द्विचक्रो राजपूजितः । त्रिचक्रो देशपर्यटनी चतुः चक्रोहि पंडितः ॥ ' यापुढचा दशशंखी म्हणजे दळभद्या.

दंश——दंश करण्याच्या अगोदर सापाचा बंदोबस्त झाला पाहिजे—एखाद्या गोष्टीपासून आपणास प्रत्यक्ष इजा पोंचण्यापूर्वीच तिची तजवीज केली पाहिजे. Prevention is better than cure.

दशा——दशा वचप—(गो.) निर्लज्ज होणें.

❀ **दशा घरोघर सारखी**--कोठेंहि गेलें व पाहिलें तरी सामान्यतः एकच प्रकारची परिस्थिति आढळते; घरोघरीं एकच परी, पहा.

दशा फिरती, सोन्याची माती होती—मनुष्यास अवदशा प्राप्त झाली म्हणजे त्याला चांगल्या गोष्टींचेंहि फळ मिळत नाहीं व प्रत्येक गोष्टींत नुकसान येतें.

दशी——दशी वाहणें—शुद्ध प्रतिपदेच्या दिवशीं चंद्राला आपल्या जुन्या वस्त्राची दशी वाहाणें व 'घे जुनें दे नवें (वस्त्र)' अशी प्रार्थना करणें. याप्रमाणें जुंन्या वस्त्राची दशी वाहली असतां नवीन वस्त्र मिळतें अशी समजूत आहे. चंद्र पहा. शंभुः श्वतार्कपुष्पेण चंद्रमा वस्त्रतंतुना । अच्युतः स्मृतिमात्रेण साधवः करसंपुटैः ॥—सुर १५८.२३९.

❀ **कांबळ्याची दशी आणि पासोड्या ऐशीं**—एक कांबळ्याची दशी ऐशीं पासोड्यापेक्षां थंडी निवारण्याच्या कामीं अधिक असते. कांबळें पहा.

दस——दस गये और पांच रहे—दहा गेले, पांच राहिले. १ एखाद्या मनुष्याच्या आयुष्याचा पूर्वार्ध संपूनहि बरेच दिवस गेले म्हणजे म्हणतात. २ संपलें, थोडें उरलें, तेव्हां धीर धरा या अर्थी. दहा पहा.

दसघर भीक मांगना और एक मशालजी रखना—१ भीक मागून बडेजावी करणें; उसना मोठेपणा आणणें; वरवर दिमाख दाखविणें. २ ऋण काढून सण करावा, याप्रमाणें.

दसकी लकडी, एकका बोजा—प्रत्येकाची एकेक काठी अशा दहा जणांच्या काठ्या झाल्या म्हणजे एका माणसाचें तें ओझें होतें. प्रत्येकानें थोडाथोडा हातभार लाविला तरी फार मोठें कार्य होतें. संहतिः कार्यसाधिका॥—शाव१-१६८.

दसरा——दसऱ्याऽवांजप--(गो.) दसऱ्याला पुष्कळशीं वाद्यें वाजवितात व मोठा निनाद होतो. त्याला उद्देशून मोठया वाद्याला हा शब्द लावतात.

❀ **दसरा आणि घसरा**--दसऱ्याच्या मुहूर्तानें नवीन उद्योगाला जोरानें लागावयाचें असा निश्चय.

दसऱ्यांतून जगूं (जगेल, निभेल) तेव्हां दिवाळी (दिवाळीचा दिवा) बघूं (पाहील)--दसऱ्याच्या वेळीं बोकडास, रेड्यास बळी देतात. तेव्हां एखादा बोकड किंवा रेडा त्यावेळीं बळी दिला गेला नाहीं तरच त्याला दिवाळी दिसणार. प्राप्त संकटांतून सुटका झाली तरच पुढील मार्ग आक्रमण करण्याची पाळी यावयाची. ' रेडा म्हणत असतो कीं, मी दसऱ्यांतून वांचेन तर दिवाळीचा दिवा पाहीन. ' —शाव ३.७७.

दसऱ्यांतून बांचलों तर पुढें दिवाळी पाहावयाची—वर पहा. —पामो ३३७.

दस्त——दस्त करणें—पकडणें; कैद करणें. ' दस्त करा शिवराजाला, ' —ऐपो १४.

दस्तूर——**दस्तूर अम्मल कीं अम्मल दस्तूर**—कायद्याप्रमाणें अंमल कीं स्वतःच्या लहरीप्रमाणें कायदा. जे नियम असतील त्यांच्या अनुरोधानें वर्तन करणें योग्य होय. आपल्या स्वैर वागणुकीप्रमाणें नियम बदलणें चांगलें नाहीं.

दहा——**दहा खाय पांच खाय, वैदा माहा हात पाहाय**—(व.) एखाद्या राक्षसी खादाड मनुष्याचा आहार पूर्वी एका जेवणास दहा भाकरी होता, तो कांहीं कारणानें जर पांच भाकरीवर आला, तर त्याला वाटतें कीं, आपल्याला कांहीं आजार झाला असावा. वास्तविक त्याला कांहीं झालेलें नसतें. आपल्याला कांहींतरी झालें आहे व वैद्याची सल्ला घेतली पाहिजे, असा ज्यानें विनाकारण आपला ग्रह करून घेतला आहे, अशाला लावतात.

दहा (दस) गेले, पांच उरले—मोठा भाग (आयुष्याचा) गेला फार थोडा उरला. 'दस गये और पांच रहे' पहा. "या थेरड्याला आतां या नसत्या उठाठेवी कशाला पाहिजेत ? 'दस०' आतां यानें जपमाळ हातीं घेऊन रामराम म्हणत स्वस्थ राहिलेले दिवस काढावे."—संभाजी. 'दहा गेले पांच राहिले आतां आपलें काय उरलें आहे.'–नि.

दहा गोष्टी ऐकाव्या, एक खरी निवडावी—अनेक लोक एखाद्या गोष्टीबद्दल निरनिराळ्या रीतींनें सांगू लागले असतां, सर्वांचें बोलणें ऐकून घेऊन, त्यांतून सत्य कोणतें असेल त्याची निवड करावी.

दहा बारा कोसांवर भाषा बदलते—भाषेचें स्वरूप हें भिन्नभिन्न प्रदेशांत भिन्न असतें. थोड्याथोड्या अंतरानें भाषेमध्यें थोडाफार फरक झालेला आपणांस आढळून येतो व प्रांतिक भाषा किंवा बोली असें त्यांना नांव पडतें. "'दहा बारा०' ही स्थूल म्हण जर खरी मानली, तर श्रेष्ठ कोण व कनिष्ठ कोण हें कोण कसें ठरविणार ?"–सह्याद्रि १४·३.६७२. दर पहा.

दहा मरावे पण दहांचा पोशिंदा (पालनवाला) मरूं नये—सामान्य मनुष्यें अनेक मेलीं तरी त्यांचें इतकें दुःख वाटत नाहीं, पण ज्यावर अनेक लोक अवलंबून आहेत असा मनुष्य मेला असतां फार लोक उघडे पडतात.

दहांचा हात दुष्मानावरहि पडूं नये—संघशक्ति ही इतकी अचाट असते कीं, प्रत्यक्ष प्रबल शत्रूला सुद्धां तिला तोंड देण्याचा प्रसंग येऊं नये. पुढें पहा.

दहांचा हात वैऱ्यावरहि पडूं नये—एकाच मनुष्यास अनेक शत्रु उत्पन्न झाल्यास त्याचा निभाव लागणें कठिण असतें व तो आपला शत्रु असला तरी त्याबद्दल आपणास कींव वाटते.

दहाच्या तोंडांत असावें पण एकाच्या दांतांत असूं नये—आपल्याबद्दल अनेकांनीं चांगलें बोलत असलेलें ठीक आहे, पण एकाचाहि आपणांवर दांत असला, म्हणजे आपला एकहि शत्रु असला तरी तो आपणांस त्रासदायक होतो.

दहांत मरण लग्नासमान—आपले सगेसोयरे, नातेवाईक वगैरे सर्व कुटुंब एकत्र जमलें असतां मरण येण्यांत लग्नघराप्रमाणें आनंद आहे.

दहीं——**दहीं खाऊन येणें**—लवकर काम करून येणें.

दहीं खाऊन आला होतास—(व.) एखाद्यास हटकून यश मिळालें म्हणजे म्हणतात. बाहेर निघतांना हातावर दहीं देण्याची चाल आहे. याच्यामागें अशी समजूत आहे कीं, दहीं खाऊन गेल्यास लवकर काम होऊन मनुष्य परत येतो.

दहींमही करणें-खाणें—कांकू करणें; संशयांत पडणें.

❀ **दहीं खाऊं कीं मही खाऊं**—[मही = ताक] ताक घेऊं कीं दहीं घेऊं, असें कोडें पडणें. हें करूं कीं तें करूं अशी मनाची दोलाचल स्थिति होणें. –पामो ४९७.

दहीं खाणाराचें गळ्याकडे कचरतें—दहीं अंबट असतें त्यामुळें दहीं खाणाऱ्याच्या घशाशीं जळजळतें. आपण केलेल्या गोष्टीचें फळ आपणांस भोगावें लागतें. तु०–खाई त्याला खवखवे.

दहीं, दूध, तूप नी पोटार हात—(गो.) चमचमीत जेवण झाल्यावर समाधान वाटून पोटावर हात सहज जातोच.

दहीं वाळत घालून भांडण—दहीं वाळत घातल्यास तेथें कांहीं उरत नाहीं व तें नाहींसें झालें म्हणून भांडत सुटावयाचें. यावरून नसतें भांडण उकरून काढून भांडत बसणें.

दळ——**दळभंजन**—(प्र.) दलभंजन. हें घोड्याचें विशिष्ट अशुभ चिन्ह असून हा शब्दप्रयोग माणसाला लाविल्यास १ दुर्दैवी, दळभद्र्या; २ बावळा, असे अर्थ होतात.

❀ **दळांत हत्ती, बागांत सुरू**–ज्याप्रमाणें बागेंत सुरूचें झाड शोभिवंत दिसतें त्याप्रमाणें सैन्यांत हत्ती शोभिवंत दिसतो.

दळ——**दळ भरणें-भरविणें**—अंगांत पिशाच्यवारें, समंध संचारणें.

दळणें——**दळकांडा (दळा-कांडा) करावा, आणि शिनळांचीं पोटें भरावीं**—एखादे वेळीं आपण श्रम करून

पैसा मिळवावा, आणि दुष्टांची भरती करावी, असा प्रसंग येतो. अतिशय श्रम व कष्ट करूनहि ते अकारणीं खर्च झाले असतां म्हणतात. अयोग्य, अपात्रीं विनियोग.

दळण दळते चत्री, पीठ खाते कुत्री—चतुर स्त्री दळण दळते आहे व स्वतःच्या सफाईदार दळणांतच गुंगल्यामुळें कुत्रें पीठ खातें आहे याकडे तिचें लक्ष नसतें. स्वतःस शहाणी समजणाऱ्या व्यक्तीसमक्ष अनेक इष्टानिष्ट घडामोडी घडत असतात. परंतु स्वतःच्या शहाणपणाच्या घमेंडींत तिचें त्या कडे कधींच लक्ष जात नाहीं. व शेवटीं 'अति शहाणा त्याचा बैल रिकामा' अशी तिची स्थिति होते व असेंच नुकसान होतें.

दळणारीचा पसा, शिंप्याचा खिसा, सोनाराचा मासा; दळणारीचा पसा, सोनाराचा मासा, दरज्याचा कसा—हा प्रत्येक व्यवहारांत असतो तो कधीं सुटत नाहीं. दळणारीण पसाभर धान्य काढून ठेविते, शिंपी खिसा होईल इतकें कापड चोरतो तर सोनार मासाभर सोनें काढून घेतोच घेतो. या तिघांवर विश्वास ठेवतां येत नाहीं. तु०-सोनारशिंपी० पहा.

दळतलो भरतलो, करतलो भरतलो—(गो.) 'दळील तो भरील करील तो पावील' पहा.

दळतां दळतां जातें फुटलें—एखादें काम इतकें मोठें असतें कीं तें करतां करतां साधनांचाहि नाश व्हावा अशी स्थिति असतांना म्हणतात.

दळतांना घट्टा पडला, म्हणे मी भला वागविला—चांगली वागणूक दिल्याची फुशारकी मारावयाची आणि इकडे पाहावें तों सारखें दळण्याचें काम करून हातांस घट्टे पडलेले असावयाचे.

दळायाला बसलें म्हणजे ओंवी आठवते—पूर्वी दळतांना गाणें म्हणणें अवश्य मानीत असत. काम करावयास आरंभ केला म्हणजे तें कसें करावें हें आपोआप सुचत जातें. तु०—जात्यावर बसलें म्हणजे ओंवी आठवते. गादी काम शिकवते.

दळील तो भरील, करील तो पावील—प्रत्येक मनुष्याला आपल्या कृतीचें बरेंवाईट फळ मिळाल्याशिवाय राहात नाहीं. जो कष्ट करील त्याला त्याचें फळ मिळेल.

दळे तिला कळे, फुकटी गोंडा घोळे—काम करणाऱ्यास काय अडचणी येतात हें त्याचा तोच जाणे. डौलानें पागोट्याचा जर किंवा वेणीचा शेपटा सोडून फिरणारास किंवा पुढें पुढें करणारास त्याची काय कल्पना.

दळ्ळेलें पीठ आनि दळचें—(गो.) दळलेलें पीठ पुन्हां दळणें. चर्वितचर्वण.

दळूबाई——"दळूबाई दळू । जात्याला नाहीं पाळू । दळीते नकटी साळू ।—बाई ॥" अशी ओंवी मुली दळतांना म्हणतात. यावरून भित्रा, कर्तृत्वशून्य माणूस; बायकी माणूस. 'धान्यांच्या आणि दारूच्या कोठारावर बसवून ठेवून प्रतापराव दळूबाईचें काम सांगताहेत हें जसें कांहीं आम्हां बायकांना कळत नसेल !'—कांचनगडची मोहना.

दक्षिण——**दक्षिण बाधणें**—पोफळ इ. वृक्षाचें (दक्षिणायनांतील) उन्हानें करपून जाणें. दक्षिणेकडील वाऱ्यानें पोफळी वगैरे झाडें पोकळ होतात, वाळतात व पानें गळून जातात यावरून.

दक्षिण सुटणें—वाहणें—दक्षिणेकडील वारा वाहणें, सुरू होणें. हेटचा वारा वाहणें.

दक्षिणचा दिवा—घरांत माणूस मेलें असतां त्या जागेवर दक्षिणेकडे वातीचें तोंड करून पंती ठेवतात. तेव्हां साहाजिकच दक्षिण दिशेकडे वात असलेला दिवा अशुभकारक मानतात. यावरून कुलक्षणी मनुष्य; कुलास हानिकारक पुत्र.

दक्षिणची चहादारी—भलेपणा. —गांगा १६२.

❀ **दक्षिण उत्तर चमके बिजली, पश्चिम वाहे वात**—दक्षिण उत्तर वीज चमकली म्हणजे पाऊस पडतो अशी शेतकऱ्यांची समज. सहदेव-भाडळी भाविष्य. "छातीवरून सरणाऱ्या जानव्याप्रमाणें विजा चमकूं लागल्या. 'दक्षिण उत्तर चमके बिजली पश्चिम वाहे वात,' हा भाडळी ज्योतिषाचा दोहरा म्हणत लोक पाणकळा आला असें सर्वांना सांगत सुटले. "—पाणकळा ४.

दक्षिण वायु सुटे, पाउस घेऊन उठे—दक्षिणेकडील, वास्तविक नैर्ऋत्येकडील, वारे वाहूं लागले म्हणजे पाऊस येतो.

दक्षिणा——**भात भक्षणा, पोळी दक्षिणा**—नुसतें जेवण. वेगळी दक्षिणा वगैरे नाहीं. पण भिक्षुकाचें जेवणापेक्षां दक्षिणेवर लक्ष अधिक असतें.

दक्षिणा तशी प्रदक्षिणा; पैसा दक्षिणा लक्ष प्रदक्षिणा—जशी मजुरी तसें काम. मजुरी, वेतन थोडें असेल तर कामहि थोडेंच अशी स्थिति. तु०-जशी देणावळ तशी धुणावळ.

दाई——**दाईके आगे पेट क्या छपाना**—(हिं) सुइणीपुढें पोट लपविण्यांत काय अर्थ. तिला तें दाखविलें.

पाहिजे. सुईण पहा. 'सुइणीपुढें चेटा । काय लपविशी चाटा।' –तुगा ६२३. Hide nothing from thy minister, physician or lawyer.

दाईपण धंदा होतो पण आईपण धंदा होत नाहीं– दाई मुलाला पाजते व त्याचे तिला पैसे मिळतात; पण आई मुलाच्या खस्ता खाते त्याची कोणी किंमत करीत नाहीं.

दाखल——दाखल होणें—१ हजर होणें; प्रविष्ट होणें. २ (घर, तंबू, इ.त) राहावयास जाणें. 'सर्व डेरे-दाखल झाले.'

दाखला——दाखला घेणें—एखाद्या गोष्टीपासून, व्यक्तीपासून धडा घेणें, बोध घेणें, शहाणपण शिकणें; उदाहरण घेणें.

दाखला पटणें—(एखादें भविष्य इ काचा) प्रत्यय, अनुभव, पडताळा येणें; खूण पटणें; प्रत्यक्ष अनुभवानें कळून येणें, खातरी होणें.

दाखला येणें—(एखादी गोष्ट) पुराव्यानें, प्रमाणानें सिद्ध होणें; अनुभव येणें; प्रचीतीस येणें.

दाखल्यास उतरणें—(एखाद्याच्या) अनुभवास जुळणें; पटणें.

दाखविणें——दाखवायचे दांत निराळे,खाण्याचे निराळे—'खायचे दांत निराळे०' पहा. बाहेरून एक व आंतून एक अशी वृत्ति. –विक्षिप्त ३·६८. –टिसू५६.

दागिने——दागिन्याची पेटी हरवली आणि रिकामी पेटी सांपडली—उपयोगी वस्तु जाऊन निरुपयोगी वस्तु मिळणें; चांगल्या गोष्टीबद्दल क्षुद्र, वाईट मोबदला मिळणें.

दाजी——दाजी अन् पक्का वादी—[दाजी= वडील दीर] दीर हा कधीं सुखासमाधानानें, गोडीनें वागावयाचा नाहीं.

दाजीबा——दाजीबा फडके—या नांवाची एक व्यक्ति (दुसऱ्या बाजीरावाचा सासरा ?) होती. (ल.) नाजूक, चोखंदळ माणूस.

दाट——दाट हत्यार लागणें—हातघाईची लढाई होऊन खूप कत्तल होणें; घनचक्कर होणें; टिपुरघाई उडणें.

दाट झालें पाणी घाल, पातळ झालें पीठ घाल—[एक बाई पीठ भिजवीत होती. प्रथम तिनें पिठांत पाणी थोडें घातल्यामुळें तें घट्ट झालें; म्हणून तिनें आणखी पाणी मागून ओतलें, तों तें फार झाल्यामुळें पीठ पातळ झालें. तेव्हां आणखी पीठ मागितलें. तें घातल्यावर पाहते तों पुन्हां पीठ जास्त झाल्यामुळें घट्ट झालें. तेव्हां पुन्हां पाणी व पुन्हां पीठ याप्रमाणें तिचा क्रम चालू राहून भाकऱ्या होण्याची कांहीं आशा दिसेना. यावरून] व्यवस्थित रीतीनें काम न केल्यास तें काम कधींहि नीट होत नाहीं. हीच म्हण ' घट्ट झालें दूध घाल, पातळ झालें पीठ घाल ' या स्वरूपांतहि आढळते. (गो.) दाट जाल्यारि उदाक घालि, पातळ जाल्यारि पिट्टि घालि !

दाटणी——वरण दाटणीं, आणि बायको आटणीं—आटणीं पहा.

गहूं घालावा दाटणीं, बायको घालावी कांचणीं—(व.) गहूं कणगी इ.कांत दाटून ठेवावे व बायको जरबेंत ठेवावी. वरीलप्रमाणेंच

दाटणींत समाराधना—गडबड गोंधळाचें काम; कसें तरी गडबडींत उरकून घेतलेलें काम.

दांड—दांड काढणें—(मनुष्य, जनावर इ.कांस) खूप राबवून घेणें; तांगडणें: ताण देणें; पादाडणें, कुट्टया काढणें; खूप काम करून घेणें.

दांडा——दांडेवासे मोजणें—(एखाद्यानें) कृतघ्न होणें; उपकारकर्त्याचे उपकार विसरून त्याच्या नाशास प्रवृत्त होणें, नाश चिंतणें. तु०–खाल्लया घरचे वासे मोजणें.

दांडा——दांड्याचें पाणी दांड्यासच जावयाचें—पाण्याला जें वळण लावलं असेल त्या वळणांतलें पाणी त्या वळणानेंच जातें. त्याप्रमाणें एकाच नात्यागोत्यातील माणसें एकत्र येतात. जातीस जात मिळावयाचीच. Blood is thicker than water.

दांड्यानें पाणी तोडलें आणि पुनः एक झालें; दांड्यानें पाणी तोडलें म्हणून निराळें होत नाहीं—१ पाण्यामध्यें काठी मारली असतां तात्पुरतें वेगळें झालेलें पाणी पुन्हां एकत्र होतें. त्याप्रमाणें एकाच कुटुंबांतील किंवा गटांतील माणसें तात्पुरतीं वेगळीं केलीं तरी तीं पुन्हा एकत्र होतात. २ लोकांनीं कितीहि कलागती लावल्या तरी खरी मैत्री, आपुलकी नाहींशी होत नाहीं.

दाढ——दाढ बांधणें—१ खाण्याची शक्ति अजीबात नाहींशी करणें (मंत्रतंत्र इ. नें). २ निरुत्तर करणें; तोंड बंद करणें.

दाढसुद्धां (देखील) न माखणें—खाणें इतकें थोडें कीं त्या खाण्यानें मुळींच तृप्ति न होणें, चांगली चवहि न

समजणें; खाल्लें न खाल्ल्यासारखें वाटणें; फार थोडें खावयास मिळणें.

दाढेंत धरणें—कैचींत धरणें; तावडींत धरणें; पेचांत धरणें.

दाढेंत सांपडणें--तावडींत अडकणें; पेंचांत सांपडणें.

दाढी——दाढी करणें—हनुवटीवरील केंस काढणें; चेहऱ्याची हजामत करणें.

दाढी धरणें; दाढी होटी धरणें; दाढीला हात लावणें—(एखाद्याची) विनवणी करणें; काकुळतीनें प्रार्थना करणें; खुशामत करून वश करणें. 'ओटी पसरोनि धरितों मी दाढी । नरकांतुनि काढी येकदाचें ॥'–मध्व ८३ 'पाहून जो हात न लावी रुसलेल्यांच्या दाढीला'–संग्रामगीतें.

दाढी धरून टांचा-पाय तुडविणें—वर दाढी धरून विनवणी करीत असतां पायांनीं लाथा मारणें. (एखाद्यास) वाह्यात्कारीं स्तुतीनें मोहवून आंतून त्याचें अनिष्ट करणें; मैत्रीचा अविर्भाव दाखवून घात करणें; वरून स्तुति करून आंतून नाशाची तजवीज करणें.

दाढी पाहून वाढणें; दाढी पाहून वाढी—बाह्य स्वरूपाकडे, पोषाखाकडे पाहून त्याला अनुरूप मानपान, आदरातिथ्य करणें; योग्यतेप्रमाणें आदर करणें; वयाकडे पाहून बडदास्त ठेवणें.

दाढी राखणें-वाढविणें--वैरागी होणें किंवा होण्याकरितां तयारी करणें.

(एखाद्याची) दाढी हालविणें—एखाद्याला रागानें दपटशा देणें; एखाद्यावर ताशेरा झाडणें; एखाद्यास चिडविणें, डंवचणें.

दाढीचा गधडा—(तिरस्कारार्थीं) लांब दाढी असलेला मनुष्य; वृद्ध पण अक्कलशून्य मनुष्य; थेरडा.

दाढीस कांदे बांधणें—एखाद्याची फजिती, अप्रतिष्ठा करणें; मानखंडना करणें; उपमर्द करणें; चेष्टा करणें.

दाढयावर धूळ (ढी) फेकणें—अपमान करणें 'तूं आमच्या दाढ्यावर धूळ फेंकतोस.' –विवि.८.११.२०७.

❀ **घडी घडी, लांब दाढी (करणें-मांडणें)**–(रागावलेला मनुष्य दाढीवरून हात फिरवीत असतो त्यावरून) घडी घडी रागावणें, संतापणें.

एकाची जळते दाढी, दुसरा तीवर पेटवितो विडी—अशीच दुसरी म्हण-एकाच्या मिशीला आग लागली दुसरा म्हणतो मला त्यावर दिवा लावूं दे! दुसऱ्याच्या संकटाचा विचार न करतां त्यापासून सुद्धां कठोरपणानें स्वतःचा यत्किंचित् फायदा घेऊं पाहाणाऱ्याविषयीं तिरस्कारानें ही म्हण योजतात. तु०–खाडाक उजो इ. पहा.

दाढी हें हुशारपणा ओळखण्याचें साधन नाहीं—दाढीच्या लांबीवरून कोणी चातुर्याचें मोजमाप करीत नाहीं. एकदां ग्रीसमध्यें मॅसिडोनिया येथें निरनिराळ्या शहरांचे प्रतिनिधि एकत्र जमले असतां अथेन्सचा प्रतिनिधि अगदीं तरुण होता. तेव्हां त्यास विचारण्यांत आलें कीं, अथेन्समध्यें वकील म्हणून पाठविण्यास कोणी वृद्ध माणूस नव्हता काय. तेव्हां त्यानें उत्तर दिलें कीं, शहाणपण दाढींत असतें असें आम्हांस वाटतें तर् आम्ही मनुष्य पाठविण्याच्या ऐवजीं एक दाढीवाला वृद्ध बोकड पाठविला असतां! शहाणपण दाढींत नसतें.

दाढीला आग लागली, म्हणे माझा दिवा लाऊन घेऊं द्या—वर पहा.

दाढीला आग लाविती, नाश करून घेती--दाढीला आग लावली असतां शरीर भाजण्याचा संभव असतो. यावरून आपण होऊन संकट ओढून घेणें.

दाढीला वेगळें आणि डोईस वेगळें (कोण देतो ?)—डोक्याची हजामत करावयाची म्हणजे त्यांत दाढी व डोई दोन्ही आलींच. प्रत्येकाचे वेगवेगळे पैसे कोणी देत नाहींत. (पूर्वी नुसती दाढीच कोणी करीत नव्हते) मिळावयाचें तितकें मिळाल्यावरहि जर कोणी मनुष्य काहीं तरी सबबीवर जास्त मागूं लागला तर त्याला जास्त कोण देणार? डोई पहा.

दाढीस वेगळें आणि मिशास वेगळें तेल कोण देणार ?--वरील प्रमाणेंच.

दाढीवाला——दाढीवाला सोडला आणि शेंडीवाला धरला; दाढीवाला धरला आणि शेंडीवाला सोडला—चोरास सोडून संन्याशास शिक्षा करणें; एकाचा अपराध असतां भलत्यालाच दंड करणें.

दाणा——दाणे टाकून कोंबडीं झुंजविणें—कोंबड्यांची झुंज पाहाणें कित्येकांना आवडतें व ते स्वतःच्या खर्चानें दाणे टाकून दोन कोंबड्यांत भांडणें लावतात व मजा पाहतात. यावरून पदरचें खर्चून, विनाकारण, मुद्दाम भांडणें लावणें.

दाणा दाणा टिपती, पक्षी पोट भरती—थोडथोडें काम करीत गेल्यास बरेंच मोठें कार्य होतें. काटकसरीनें संसार होतो. तु०–थेंबें थेंबें तळें सांचें.

दाणादाण——कोंबडी मेली, पिलें दाणादाण—कुटुंबांतील कर्ता, आवरता गेला म्हणजे त्यावर अवलंबून असणाऱ्यांची दुर्दशा होते. तु०—मुरगी मरी बच्चे दाणादाण.

दांत——**दांत उठणें**—दातांनीं धरलेल्या पदार्थावर दांताच्या खोलगट खुणा उमटणें.

दांत ओठ खाणें–चावणें—रागानें दांतांवर दांत घासणें, दांतांनीं ओठ चावणें; अतिशय चिडणें; रागावणें; संतापणें; खाऊं किं गिळूं असें करणें. ' भरदरबारांत आपली अशी अवज्ञा झालेली पाहून तो मानी राजा दांत ओठ खाईल. '–उग्र ३. ४. ' आणि दुसऱ्याच्या अधराचं आपल्या दांतांनीं खंडण करण्याचं पर्यवसान आपल्याच ठिकाणीं दांत ओठ खाण्यांत होत जातं ! '–एकच प्याला. ' कुतुबशहा व सैमदखान कत्तलबाज यांच्या शिरच्छेदाची वार्ता ऐकून दांत ओंठ चावून मनगटें तोडूं लागले. ' –भाव ९८.

दांत काढणें–दाखविणें––दांत विचकून फिदिफिदि हंसणें; चेष्टा करणें; उपहास करणें. –मो.दिव्यरामायण१२६.

दांतकिची खाणें—(ना.) (राग इ. कानें) कचाकच, कडकड दांत चावणें; अतिशय संतापणें, रागावणें; क्रोधायमान होणें.

दांत किरकिटीस येणें––विपन्नावस्था, अन्नान्नदशा प्राप्त होणें; अति निकृष्ट परिस्थितीनें ग्रस्त होणें.

सोन्यानें दांत किसणें––(ल.) पैशाच्या राशींत लोळणें, अतिशय श्रीमंत असणें.

दांत खाऊन; दांत ओठ खाऊन—मोठया रागानें व अवसानानें. 'नरवर गर धर खरतर शर दांत खाउनी सोडी।' –मोशल्य २.८४.

दांत खाऊन–चावून अवलक्षण करणें—(प्रतिकार करण्याचें सामर्थ्य नसतां) रागाचा दुबळा अविर्भाव आणून, शिव्याशाप देऊन स्वतःचें हंसें करून घेणें; व्यर्थ बोटें मोडणें.

दांत खाणें–चावणें—झोपेंत किंवा रागानें चड्फड्न, दांतांवर दांत घासणें.'कोपें खातात दांत बा हेर।'-मोस्त्री४ २६. 'सात्यकिला माराया, खातचि धांवे तुझा तनय दांत।' ––मो द्रोण १९.३.

दांतखीळ–खिळी बसणें––१ (सन्निपातादि दोषांमुळें) वरील दांत व खालचे दांत एकमेकांवर घट्ट चिकटून बसणें. 'रामनाम घेतां तुझी बैसे दांतखीळ।'––एकनाथ. २ (ल.) निरुत्तर होणें; एखाद्या पुढें बोलतां न येणें. गप्प बसणें.

दांत खोचरणें—दांताच्या फटींत, खळग्यांत काडी, कोरणी घालून अडकलेले अन्नाचे कण इ. काढणें; दांत कोरणें.

दांत घशांत उतरणें––पदरांत माप पडणें; लबाडी, बोल इ. उलटून आपल्या अंगावर येणें. 'ज्योतिष्याचा कांहीं उपयोग नाहीं, असें दुराग्रहानें म्हणणाऱ्यांचे दांत, हे मी विक्रमावर केलेले उपकार पाहून आतां त्यांच्या घशांतच उतरतील.'––शाब १.१५७.

दांत झिजणें—(ल.) निष्फळ उपदेश केल्यानें, केलेल्या विनवण्या व्यर्थ गेल्यानें, शिकविलेला विषय मूर्ख विद्यार्थ्यांस न समजल्यानें तोंडाला फुकट शीण, श्रम होणें.

(एखाद्याचे) दांत त्याच्याच घशांत घालणें–– (एखाद्याची) लबाडी बाहेर काढून, त्याच्या पदरांत माप घालून त्याची फजिती करणें; (एखाद्याची) लबाडी त्याच्यावर उलटविणें; ज्याचें कृत्य त्यावर उलटविणें; ज्याचा पेंच त्याचेच अंगावर उलटाविणें. 'त्याचे दांत मी त्याच्याच घशांत घालीन'–इंप १०२.–विवि ८.४.८२.

दांत धरणें––दंश धरणें, डूग धरणें; सूड घेण्याची इच्छा मनांत बाळगणें. पुढें पहा.

दांत धरणें–असणें–ठेवणें––राखणें––बाळगणें–– (एखाद्याशीं) द्वेष, अदावत, मत्सर करणें; (एखाद्यावर) डाव धरणें; पूर्वीचें शल्य मनांत ठेवून (एखाद्याच्या) नाशासाठीं टपून बसणें.

दांत निसकीस येणें––त्वेष, स्फुरण, आवेश इ.कांनीं युक्त होणें; जिवावर उदार होणें. ' मल्हारराव यांचे इरेनें दांत निसकीस येऊन मोठमोठे खेतांत येऊन जीवाअधिक केली. ' –भाव ११. ' तों हें वर्तमान दत्ताजी शिंदे यांनीं ऐकून दांतनिसकीस येऊन तिकडून घोडे घातले.'–भाव ४६.

दांत पाडणें––१ शिक्षा करणें; पारिपत्य करणें ' हंसलास तर दांत पाडीन.' –विक्षिप्त २·११७. २ तोंडघशीं पाडणें ३(एखाद्याची) फजिती करणें. ४ (एखाद्यास) वादांत पराजित करणें; टोमणा मारणें; निरुत्तर करणें. ' इतका खोटें बोलणारा तूं असशील असें मला वाटलें नव्हतें. नाहीं-तर दोन चार साक्षी ठेवून तुझे चांगले दांत पाडले असते.' –त्राटिका अंक ४ प्र. ३.

हसतां हसतां दांत पाडणें––हंसून, गोड गोड बोलून फजिती करणें, टोमणें मारणें; निरुत्तर करणें; कुंठित करणें; विनोदाच्या मिषानें फजीत करणें.

दांत पाडून हातावर देणें––(अशिष्ट) (एखाद्याची)

कंबख्ती काढणें; पारिपत्य करणें; उट्टें फेडणें. (विशेषतः धमकावणी देतांना उपयोग.)

दांत लागप—(गो.) पैसे पदरीं असणें; गबर असणें; खाऊन पिऊन सुखी असणें.

दांत वठणें–लागणें––उच्चारलेला शाप (एखाद्यावर) फलद्रूप होणें. ' त्याच्यावर त्या चेटकीचा दांत वठला. ' (=त्याला शाप भोंवला.)

दांत वासणें –(ल.) हातीं घेतलेलें कार्य शेवटास नेववत नाहीं, म्हणून निराश होऊन स्वस्थ बसणें; हतबल होणें; निरुत्साह होऊन पडणें, दमणें; जेरीस येणें.

दांत वासून पडणें—१ आजारानें अशक्त होऊन अंथरुणास खिळणें. २ मेहनत फुकट गेल्यानें हिरमुसलें होऊन बसणें. दांत वासणें पहा. ' वासुनि दांत मुखांत दहांत पडे मति गाढ तमीं पचली । '–वामन सीतास्वयंवर, ११.

दांत विचकणें––१ उपहास करून हंसणें. ' जो ऐसा प्रभु त्या जना न विचकूं दे दांत, वाहे रहा । वैकुंठींच सदा ..'–मोरोपंत. ' प्रमदांत पावुनीया श्रम दांत क्षुद्र विचकिती कीं जे । ' –भक्तमयूरकेका ६५. २ याचना करणें; कांहीं जिन्नस मिळविण्याकरितां एखाद्यास लाचारीनें विनविणें.

दांतां ओठांवर जेवणें—(प्र.) नखां बोटांवर जेवणें. चोखदळपणानें जेवणें; फार चिकित्सा करीत खाणें; खाल्लें न खाल्लेंसें करणें; मोठेपणा दाखविण्यासाठीं केवळ पदार्थांची चव घेणें.

दांतांखालीं घालणें––धरणें––(एखाद्यावर) करडा, सक्त अंमल चालविणें; कडकपणानें वागविणें, अतिशय छळणें, गांजणें; त्रास देणें; जाच करणें.

दांतांची मिरवणूक काढणें––(कर.) (एखाद्यानें) स्वतःचें हंसें करून घेणें; उपहास करून घेणें.

दांताचें विष बाधणें––१ (एखाद्याचे) शापोद्गार फलद्रूप होणें; दांत वठणें–लागणें पहा. २ दुसऱ्यास बाधेल असा शाप देण्यास समर्थ असणें.

दांतांच्या कण्या करणें––१ विनवण्या, याचना करून, व्यर्थ उपदेश करून, शिकविण्याचा निरर्थक खटाटोप करून दांत झिजविणें; तोंड शिणविणें. २ अनेकवार सांगणें, विनविणें. ' एक कांबळी पासोडी द्या म्हणून दांतांच्या कण्या केल्या. ' –नामना ५४.

दांतांच्या कण्या–घुगऱ्या होणें––व्यर्थ याचना करून, उपदेश करून, शिकविण्याचा निरर्थक खटाटोप करून तोंड शिणणें; फार व निरर्थक बोलावें लागणें. ' हांका मारतां मारतां माझ्या दांताच्या कण्या झाल्या. '–पकोघे.

दांतांच्या घुगऱ्या होणें––१ दांत हलूं लागणें, खिळखिळे होणें. २ उपदेश, विनंति इ. प्रकारें दातांस फार शीण देणें.

दांतावर मारावयाला पैसा नसणें––अगदीं अकिंचन, निर्धन असणें, होणें, बनणें; जवळ एकहि पैसा नसणें.

दांतावर मांस नसणें––१ (ल.) पैशाचें पाठबळ नसणें; दारिद्र्यानें ग्रस्त होणें. २ (दुसऱ्याशीं) भांडण्याचें, (दुसऱ्यास) इजा करण्याचें सामर्थ्य अंगीं नसणें. ' उगीच भरीस भरल्याप्रमाणें लग्नांत खर्च केला. आपल्या तर दांतांवर मांस नाहीं. कुटुंब एवढें थोरलें···असें शकर मामंजींचें रडगाणें चालू होतें. ' ––पकोघे.

दांतावर मांस येणें––जवळ माया जमणें; धन संपत्ति मिळणें.

दांतावून बोलणें––दांत ओठ खाऊन बोलणें.

दांतास दांत लावणें––१ तोंड मिटून बसणें; गप्प बसणें; दांतांस खीळ घालणें. २ (खाण्यासाठीं दांत न चालविणें) उपाशी राहाणें.

दांतांस दांत लावून असणें–निजणें–बसणें–राहाणें––तोंड मिटून, कांहीं न खातां, उपाशी असणें, निजणें, बसणें इ.

दांतीं तृण–तण–कडब्याळ धरणें—मान तुकविणें; नम्रपणा स्वीकारणें; शरण येणें; पराजय कबूल करणें.

दांतीं तृण धरायला लावणें—शरण आणणें. ' तृणाप्रमाणें तुच्छ असलेल्या या शत्रूला याच दरबारापुढें दांतीं तृण धरायला लावतों. '–उग्र ३.४.

दांतीं बळ धरणें—अतोनात मेहेनत, धडपड, नेट करणें; प्रयासानें नेटानें काम करणें.

दांतीं येणें––१ (एखाद्यावर) रागानें दांतओठ खाणें; दांत ओठ खाऊन भांडण्यास प्रवृत्त होणें. 'येकीस येकी ढकलून देती । येताति येकीवरि एक दांतीं ।'–सारुह ७.६०. २ फार अडचणींत, पेचांत येणें, सांपडणें.

दांतीं येणें; दांतावर येणें––(एखाद्या) कार्यांत अपयश येणें; (व्यापार इ. कांत) नुकसान, तोटा येणें.

❀**दांत आपले, ओठ आपले; आपलेच दांत, आपलेच ओठ**—१ शिक्षा करणारा आपणच आणि ज्याला शिक्षा करावयाची तोहि आपल्यांतलाच, अशी स्थिति असते तेव्हां, भांडणारे दोन्ही पक्ष निवाडा, शिक्षा करणारांला सार-

खेच जवळचे स्वकीय असल्यामुळें दोहोंपैकीं कोणाचेंहि बरें वाईट करतां येत नाहीं. अशावेळीं योजितात. २ स्वतःच्याच दुष्कर्माचें फळ भोगतांना स्वतःलाच दोष द्यावा लागतो.

दांत आसतांना चणे खावचें—(गो.) दांत असल्यावरच चणे खाणें. सामर्थ्य असल्यास काम हातीं घ्यावें.

दांत आहेत तर चणे नाहींत आणि चणे आहेत तर दांत नाहींत--पूर्ण सुदैव, सुखसाधनें कधींहि लाभत नाहींत; त्यांत कांहीं तरी कमीपणा असतोच. एक गोष्ट आवश्यक असते पण ती अनुकूल नसते अशावेळीं योजतात. "ज्यांस बुद्धि आहे त्यांस आपलें शिक्षण पुढें चालू ठेवण्यास पैसा न हीं; ज्यांपाशीं पैसा आहे, त्यांस बुद्धि नाहीं; 'दांत०' अशांतला प्रकार!" चणे पहा.

दांत कोरल्यानें पोट भरत नाहीं; दांत कोरून कोठें पोट भरत नसतें; दांत कोरून कोठें पोट भरतें?--निष्कारण किंवा अल्प काटकसर करून कांहीं भागत नाहीं. किरकोळ ठिकाणीं काटकसर करून पुरवठयास येत नाहीं. अत्यंत अपुऱ्या साधनांनीं कार्य सिद्धीस जात नाहीं. याकरितां तयारी भरपूर पाहिजे. तु०—केंस काढून मढें हलकें होत नाहीं. पुढें पहा.

दांत चावून अवलक्षण—दांत चावणें हें अशुभ मानतात यावरून आपण होऊनच आपणांला अनुपकारक अशी गोष्ट करणें. पुढें पहा.

दांत दाखवून अवलक्षण--वरप्रमाणें. 'हात दाखवून अवलक्षण' पहा.

दांत ना दाढा, चबिना गाढा--(व.) [चाबिना = नरम, सुग्रास अन्न. गाढा = रगड, भलें.] दांत दाढा पडून गेल्या म्हणजे त्या माणसाला खावयास भलें नरम सुग्रास अन्न लागतें; कदान्न अगर कडक पदार्थ त्याला चालत नाहींत; दांत पडलेला म्हातारा मनुष्यसुद्धां कडक अन्न चावूं लागला तर त्यास थट्टेनें ही म्हण लावतात.

दांत नाहीं मुखांत, विडे घाली खिशांत--विडा चावावयास तोंडांत दांत नसतांना विड्यांचा सोस करून काय उपयोग. ज्या गोष्टीचा उपभोग घेतां येत नाहीं ती जवळ बाळगण्याचा हव्यास व्यर्थ होय.

दांत पाडल्यावर नागीण नाहीं, डोळे फोडल्यावर वाघीण नाहीं—नागिणीचा विषारी दांत पाडला किंवा वाघिणीचे डोळे फोडले तर तीं अगदीं निरुपद्रवी बनतात एखाद्याचें अपकार करण्याचें साधन काढून घेतल्यावर मग त्याचें सर्व सामर्थ्य व्यर्थ होतें.

दांत फुटो वा बदाम फुटो--दांत तरी फुटेल किंवा बदाम तरी फुटेल अशा निश्चयानें दांतानें बदाम फोडावयाचा प्रयत्न करावयाचा व दोहोंपैकीं एक गोष्ट घडून येईपर्यंत थांबावयाचें नाहीं, असा नेट धरावयाचा. कोणती तरी एक थड लागेपर्यंत कार्य करण्याचा निश्चय. तु०--शेंडी तुटो कीं पारंबी तुटो.

खावयाचे दांत वेगळे, दाखवावयाचे दांत वेगळे—हत्तीला शोभेचे बाहेर आलेले मोठे सुळे आणि चावण्याकरितां तोंडांत निराळे असलेले, असे दोन प्रकारचे दांत असतात, त्यावरून. वर दाखवावयाचें एक आणि मनांत भलतेंच असावयाचें अशा रीतीचें ढोंग. आंत एक आणि बाहेर एक. दाखविणें पहा.

दांताला मळ, पोटांत तळमळ--दांत घाणेरडे असले म्हणजे रोगाची विशेषतः अपचनाची उत्पत्ति होते व मळमळूं लागतें.

दांतांवर नाहीं मांस आणि मोठ्याशीं गांठ—स्वतः तर अगदीं दरिद्री पण संबंध ठेवतो मोठ्याशीं. तेव्हां किती अप्रयोजक आणि मूर्खपणाचें हें वागणें!

दाता——दाता दे, भंडारिका पेट फटे—मालक उदारपणें देतो पण कोठवळ्याचें पोट दुखतें. तु०—खचर्णाऱ्याचें खरचतें पण कोठवळ्याचेंपाटे दुखतें.

देई तो दाता, न देई तोहि दाता—याचक मनुष्य सर्वांनाच भले म्हणत असतो. त्याला कोणालाच दोष देऊन चालत नाहीं. म्हणून तो देणाऱ्याला व न देणाऱ्यालाहि चांगले म्हणतो. निदान त्यामुळें तरी न देणाऱ्याला देण्याची स्फूर्ति व्हावी.

दाता पंचदश रत्नं—समुद्र मंथन करून काढलेलीं चौदा रत्नें प्रसिद्ध आहेत. पंधरावें रत्न म्हणजे दाता; इतकी त्याची मोठी योग्यता मानलेली आहे. "'दाता पंचदश रत्नं!' दाता हें पंधरावें रत्न आहे बरें, पंधरावें रत्न!" —उग्र २·१.

दांताळपुरी——दांताळपुरी ओसाड होणें—दांत पडून तोंडाचें बोळकें होणें. तु०—दंताजीचें ठाणें उठलें.

दातृत्व——दातृत्वानें शत्रूचे मित्र आणि अभिमानानें मित्राचे शत्रू होतात——औदार्यानें शत्रूहि आपले मित्र बनतात पण ताठ्यानें वागलें असतां मित्रहि आपणावर रुष्ट होऊन शत्रू बनतात.

दातृत्वापेक्षां दया अधिक—प्रत्यक्ष एखादी वस्तु देण्यापेक्षां कनवाळूपणाची वागणूक दाखविली असतां ती लोकांस अधिक आवडते.

दाद——दाद घेणें—अर्ज, तक्रार इ. ऐकून घेऊन न्याय देणें.

दाद देणें—१ दुसऱ्याच्या अधीन होणें. २ मानणें; जुमानणें.

दाद मागणें—१ दयेची, न्यायाची याचना, मागणी मानणें. २ अन्यायाबद्दल फिर्याद करणें.

❀ **दाद ना फिर्याद, न्याय ना अन्याय**—अंदाधुंदी: अव्यवस्था; जेथें कोणाचें कोणी ऐकून घेत नाहीं, तक्रार केल्याचा उपयोग होत नाहीं, योग्य अयोग्य पाहात नाहीं, अशी स्थिति.

दादला——दादला झाला गोसावी आणि पोरें कोणीं पोसावीं——नवरा जर संन्यासी, गोसावी झाला तर त्याचीं पोरें कोण पोसणार ? त्यानेंच याचा विचार करून तरतूद केली पाहिजे.

दादला फुगला आणि तसाच निजला—नवरा जर बायकोवर रुसला तर त्यास उपाशी व एकटेंच निजण्याची पाळी येते.

दादला बायकोला, बुधला तुपाला—ज्याप्रमाणें तूप ठेवण्यास बुधल्याची आवश्यकता असते, त्याशिवाय तें नीट राहात नाहीं त्याप्रमाणें प्रत्येक स्त्रीस नवरा असणें आवश्यक आहे.

दादलो, बायले आदलो——(गो.) बायकोपूर्वीं नवरा म्हणजे बायकोहून नवरा श्रेष्ठ (वयानें किंवा मानानें).

दादल्यानें मारलें व पावसानें झोडलें, दाद ना फिर्याद—ज्याप्रमाणें पावसानें आपणांस भिजविलें तरी त्याबद्दल तक्रार करण्यांत अर्थ नाहीं त्याप्रमाणें नवऱ्यानें बायकोस मारलें तर तिला तक्रार करून चालत नाहीं. तु०—राजा लुटि जरी प्रजाजनाला । माता मारी निज बाळाला । बंधु विकी जरी निज भगिनीला । शरण कुणा जावें ॥

दादल्यापरीस बाईल मोठी, मुसळ घेऊन लागे पाठीं—जर नवऱ्यापेक्षां बायको वयानें मोठी असेल तर ती त्याला अगदीं नकोनकोसें करते, डोईजड होते. तेव्हां बायको नवऱ्यापेक्षां वयानें लहान करण्याची आपल्याकडे चाल आहे.

दादा——दादा बाबा (पुता) करणें—सौम्य भाषणानें आर्जवानें मन वळविणें, राग घालविणें.

❀ **दादा अंगें वहिनी सोयरी**——भावामुळें तर त्याच्या बायकोशीं नातें जडतें. भावाचें नातें प्रत्यक्ष असतें पण वहिनीचें नातें त्यामानानें दूरचें असतें. भाऊ आहे तर वहिनी आहे.

दादा दादा मार साप, मी लेंकरांबाळांचा बाप—दादाला(एखाद्याला)साप मारायला सांगितला असतां तो लेंकरांबाळांची सबब पुढें करून साप मारावयास पुढें येत नाहीं. तेव्हां कितीहि जवळचा नातलग, मित्र असला तरी तो वेळेवर आपल्या उपयोगी पडेल असा भरंवसा नाहीं. तो कांहीं कारण दाखवून मदत करण्याचें टाळेल.

दादा बाबा मला करा, पण ठकवूं नका जरा—माझी खुशामत केलेली मला आवडते पण मला फसविलेलें आवडत नाहीं. माझ्याशीं गोडीनें वागा पण फसवूं नका. Call me cousin but cozen me not. सवि ६३१.

दादा बैल, धाकटा कांहींतरी होईल—बहुधा वडील मुलगा निर्बुद्ध असतो व धाकटा होतकरू असतो.

दादा ब्राह्मण, वहिनी सवाष्ण—आपल्याच घरीं दानधर्माचा खर्च जिरविणें. म्हणजे धर्म केला असें तर व्हावें पण पैसा मात्र बाहेर जाऊं नये. आप्पलपोटा धर्मव्यवहार.

दादा रामराम, बाबा रामराम—कामापुरता संबंध ठेवून लागलीच रजा घेणें; पुढें संबंध न ठेवणें.

दादाची किल्ली वहिनीजवळ—बहुधा भाऊ हा पूर्णपणें भावजयीच्या तंत्रानें वागणारा असतो. याकरितां भावाकडून काम करून घ्यावयाचें असल्यास वहिनीस खूष करावें लागतें; म्हणजे तिकडून काम होतें.

दादाची खोड वहिनीला माहीत—आपल्यापेक्षां भावाच्या बायकोला त्याची संवय-खोड पूर्ण माहिती. तेव्हां तिच्याच अनुरोधानें दीर-नणंदा वगैरेनीं चालणें बरें. आणखी पुढें पहा.

दादाचें बळ वहिनी जाणे; दादाचें बळ वहिनीस माहीत—१ नणंदा दिरानें भावजयीमार्फत भावाला वळवावें, कारण तिला त्याचा स्वभाव ठाऊक असतो, या अर्थी. २ दादा बाकीच्यांना कितीहि कर्दनकाळ असला तरी वहिनीपुढें गाय ! तिनें त्याचें पाणी जोखलेलें असतें.

दान——दश दानें—दश पहा.

❀ **दान केल्यानें कोणताहि मनुष्य गरीब होऊं शकत नाहीं अगर चोरीनें श्रीमंत होऊं शकत नाहीं**—दानानें जशी गरीबी येत नाहीं त्याप्रमाणें चोरी करून कोणी श्रीमंत

होत नाहीं. यथाशक्ति दान करावें असा पुरस्कार करण्यासाठीं योजतात. Alms giving never made any man poor nor robbery rich.–सवि ३७६.

दानतीर्थाटणांचीं पुण्यें, घडतीं हरिहर नामानें--नुसतें परमेश्वराचें नांव घेतलें तरी क्षेत्रांची यात्रा केल्याचें किंवा दानधर्म केल्याचें पुण्य मिळतें. तु०–तीरथ कोन करे, हमारो ।–कबीर.

दानधर्म करतो, तो ईश्वरास आवडतो--दानधर्म करणाऱ्या मनुष्यावर परमेश्वराची कृपा असते.

दानधर्म किल्ली, स्वर्गद्वार उघडवी—दानधर्म केल्यानें स्वर्गाची प्राप्ति होते.–सवि ३७५.

दानधर्म फार करतो तो कृपण—[कृपण याचा अर्थ येथें भिकारी असावा] जो फार उदार तो सदा नादार, या अर्थी. तु०–दिवाळखोर नारायण० (?)

दानधर्माची आई, जाणे चतुराई—औदार्य आणि दातृत्व हीं शहाणपणामुळें येतात. Prudence is the mother of generosity and charity. —सवि २८३८.

दान मेळ्ळले गायिचे दांत चोवप आस्स वे ?--(गो.) दान मिळालेल्या गाईचे दांत बघूं नयेत. दान हें फुकटचें असतें तेव्हां त्याबद्दल चिकित्सा करणें वाईट. तु०–धर्माचे गाई दांत कांगे नाहीं. Do not look a gift-horse in the mouth.

दान हें प्रथम जवळच्यास व नंतर दूरच्यास करावें--दानधर्म करतांना तो प्रथम शक्य तों जवळच्या ठिकाणीं व जवळच्या मनुष्यास करावा; नंतर दूरच्याकडे पाहावें. प्रथम आप्त, कुल, स्वजन यांच्या उपयोगी पडावें व नंतर इतराकडे पाहावें. तु०–Charity begins at home.

दानावर दक्षिणा--(गो.) दक्षिणेवांचून दानाची सांगता होत नसते. त्यावरून मोठ्या नुकसानीच्या भरीस आणखी थोडेंसें नुकसान झाल्यास ही म्हण योजतात.

दानें गरिबी येईना, दैन्य चोरीनें जाईना, द्रव्यानें शहाणा होईना, अलंकारें मान मिळेना--दानधर्मानें कांहीं दारिद्र्य येत नाहीं, किंवा चोरी करून श्रीमंती प्राप्त होत नाहीं; तसेंच संपत्ति प्राप्त झाल्यावर मनुष्य एकदम शहाणा होत नाहीं कीं दागीने घातल्यानें लोक मान देत नाहींत.—सवि ३७६.

दानत—जशी दानत तसें फळ; जशी दानत तशी बरकत--आपल्या शीलाच्या बरेवाईटपणावर मनुष्यास बरें किंवा वाईट फळ मिळतें; आपल्या दानतीप्रमाणें आपणांस आयुष्यांत यशापयश येतें. सद्वासना, सद्वर्तन असेल तर सुखसमृद्धि होईल.

दाना—दाने दानेपर लिखा है, खानेवालेका नाम--(हिं.) प्रत्येक दाण्यावर तो कोण खाईल त्याचें नांव परमेश्वरानें लिहिलेलें असतें. प्रत्येक व्यक्तीला आपल्या कर्माप्रमाणें फळ मिळत असतें. त्यापेक्षां जास्त अथवा कमी त्याला मिळत नाहीं. आपल्या केलेल्या संचयांतून जेवढें नशिबांत असेल तेवढ्याचाच आपण उपभोग घेतों; व बाकी उरलेल्यांत इतरांचा हिस्सा असतो, हें तात्पर्य.

दानेको टापै, सवारीको पदै--(हिं.) तोबऱ्यास पुढें व स्वारीस मागें. खावयाच्या वेळीं तयार असणें व कामाची आळंटाळं करणें.

दाव—दाबांत आणणें—अडचणींत धरणें. ' आम्हीं मोंगल पाठीवर घेऊन दाबांत आणून बुडवावें या विचारें ...'–ब्र५२१.

दाबा—दाबा देणें—१ झांकून ठेवणें. २ चोरणें; लांबविणें.

दाम—दाम करी काम—पैसा असला म्हणजे सर्व गोष्टी घडवून आणतां येतात.–मोरप्र २२. तु०–द्रव्येण सर्वे वशाः । पुढें पहा.

दाम करी काम, बिबी करी सलाम—सर्व गोष्टी पैशानें साध्य होतात, किंबहुना कोणी स्त्रीसुद्धां पैशानें वश करतां येतें. money makes the mare go.

दाम तसें काम--जशी देणावळ तशी धुणावळ; जशी मजुरी तसें काम; जशी मिळकत तशी करामत, पहा.

दाम दुप्पट, कण तिप्पट; दाम दुप्पट भूस चौपट--धान्याचा भाव दुप्पट सांगावयाचा पण त्यांत कणी, भूस मात्र तिप्पट चौपट असावयाचें. अवाच्या सवा किंमत मागणें व फसविणें.

दामाशिवाय काम नाहीं--पैशाशिवाय कोणतीहि गोष्ट होत नाहीं. –गांगा २०४.

दामो रूठा, बातोंसे नही मंता--(गो.) पैशाकरितां रुसलेल्याची कोरड्या शब्दांनीं समजूत पडत नाहीं.

दामटी—दामटी वळणें--अगदीं कृश होणें.

पोटाची दामटी वळणें–पोट खपाटीस जाणें (उपासमार, अशक्तपणा इ. मुळें).

दाय——दाय असोन हात कित्याक लासतां; दाय असतांना हात लासचो व्हय—(गो.) डाव असतांना हात कशाला भाजून घ्यावा. साधनें असतांना त्रास कां करून घ्यावा ? सरळमार्ग सोडून आडमार्गानें कां जातां ? डाव पहा.

दायजी——दायजी मागता पाड, सोसो मागता झाड—(गो.) भाऊबंद आपल्या नातलगांचें अहित चिंतितो तर ससा झाडाखालीं येण्याची इच्छा करतो. प्रत्येकजण आपला स्वार्थ बघत असतो.

दार——दार काढिना—(गो.) दाद देईना.

दार फळणी; दारफळी होणें--दार बंद होणें; दिवाळें वाजणें; घर बसणें.

दारचा--घरापुढें, परसांत लावून वाढविलेला (भाजीपाला, फळें इ.); घरचा; घरींच तयार झालेला; स्वतःच्या बागेतील. २ सहज मिळण्याजोगा. ३ घराबाहेरचा; परकी.

दारांत हत्ती झुलत असणें--एखाद्याची वैभवसंपन्न स्थिति असणें; गजान्त लक्ष्मी असणें

दारीं जाणें--दुखवटा घेऊन जाणें; मृत मनुष्याच्या आप्तांचा समाचार घेण्यास जाणें.

दारीं जाणें-बसणें-लागणें--(बायकी) लघुशंकेस, शौचास जाणें इ. बाहेर जाणें पहा.

❀ **दार काडिना जाल्यार एक अन्यांव, दार काडल्यार हजार अन्यांव**--(गो.) दार न काढल्यास एकच अन्याय कराल पण दार काढल्यास हजार अन्याय कराल. नको असणाऱ्या माणसांना आंत घेतलें नाहींत, तर त्यांच्यावरच फक्त एक अन्याय केल्यासारखें होईल पण पुढलीं हजार संकटें तुम्ही टाळाल. तु०-एक नकार०

दार लोटलें आणि बाहेर झोपलें--घराचें दार स्वतःच्या संरक्षणाकरितां म्हणून बंद करावयाचें पण स्वतःच बाहेर उघड्यावर निजल्यावर दार लावण्याचा काय फायदा ?

दारापेक्षां अडसर जड— मुख्य गोष्टीपेक्षां आनुषंगिक गोष्ट प्रमाणाबाहेर मोठी असणें. तु०--शेट सवाशेर, लिंग अडीच शेर. मिया मूठभर, दाढी हातभर.

दारीं झाडाची सावली, घरवाला भाग्यशाली-- ज्याच्या दारापुढें झाडाची सावली पडत असेल तो भाग्यवान होय. घराच्या दारापुढें सावली असणें चांगलें.

दारीं बोर, नवरा चोर--घरा शेजारीं एखादी वस्तु उपभोग घेण्यासारखी असल्यास, घरांतील मनुष्य त्या वस्तूचा एकदां तरी चोरून उपभोग घेतो. घरांतला चोर याअर्थी.

दारिद्र्य——दारिद्र्य आलें घरा, तेथें कशाला दिवाळी दसरा--दरिद्री मनुष्यास दिवाळी, दसरा वगैरे सण साजरे करतां येणें शक्य नसतें. त्याला सर्व दिवस सारखेच कष्टप्रद असतात. दरिद्र पहा.

दारिद्र्य दोषी, गुणराशि नाशी; दारिद्र्यदोषो गुणराशिनाशी--एका दारिद्र्यानें सर्व गुणांची माती होते. तु०-एकोहि दोषो गुणसन्निपाते निमज्जतींदोरिति यो बभाषे। न तेन दृष्टं कविना समस्तं दारिद्र्यमेकं गुणकोटिहारि ॥ -सुर ६६·४३. " चित्तपावनांच्या अलिकडील ऱ्हासाच्या बुडाशीं दारिद्र्य हें एक कारण असूं शकेल. कारण ' दारिद्र्य दोषी गुण राशि नाशी,' हें तर प्रसिद्ध आहे. " -केसरी ९·५-४१.

दारिद्र्याचें मूळ आळस--आळसामुळें दारिद्र्य येतें.

दारू——दारू ठासणें--१ रगडून, गटागट, ढसांढसां दारू पिणें; खूप दारू पिणें. २ बंदुकींत वगैरे बाराची दारू गजानें ठासून भरणें.

दारू पिकविणें--पिण्याची दारू तयार करणें.

दारूचें फूल--अर्क; कडक, निर्भेळ, गाळलेली दारू.

❀ **दारू चढती, अक्कल जाती**--दारूची निशा आली म्हणजे बुद्धि नष्ट होते. When the wine is in, the wit is out.

दारू, जुवा, रंडीबाजी, तेणें लोकीं इतराजी--जो मनुष्य दारूबाज, जुगारी व रंडीबाज असतो तो सर्वांस अप्रिय होतो.

दारू पाठीवर आहे, गाढव पाणी पिऊन राहे--पाठीवर दारूचें ओझें असतां गाढव ती न पितां पाणीच पितें. ज्याला एखाद्या वस्तूची किंमत कळत नाहीं त्याला तिचा काय उपयोग. कृपण धन असून दारिद्र्य भोगतोच ना. तु०-साखरेची गोणी बैलाचिये पाठीं । तयासी शेवटीं करबाडें ॥ -तुगा ३०१८. ज्याचें त्याला गाढव ओझ्याला.

दारू पोटीं जिरती, शब्द ओठीं तरती--पोटांत दारू गेली म्हणजे मनुष्य बडबडूं लागतो.

दारूचा कैफ करणें, बळें वेड घेणें--दारूची निशा करणें म्हणजे स्वतः होऊन वेडें बनणें आहे. - सवि ८७१.

दारूची निघे तान, निजायला मैदान--दारूची धुंदी आली म्हणजे मनुष्य घरदार न पाहतां मैदानावर लोळण घेतो.

दारूच्या कैफांत गुंगतो, तो पशूसारखा दिसतो-- ज्याच्या अंगावर दारूची निशा चढते तो पशूप्रमाणें वागूं लागतो.-सवि ८७२.

दारूच्या छंदीं लागतो, संसारांतून उठतो—ज्याला दारूचें व्यसन लागतें त्याच्या संसाराचा नाश होतो.

दारूनें बहु बुडाले, समुद्रानें थोडे ग्रासले--समुद्रानें जेवढें बुडविलें नाहीं एवढें दारूंत बुडालें आहे. Wine has drowned more men than the sea.—-Latin.

दारूबद्दल पाणी पिणें, न होय ऋण आणि दुखणें—दारूच्या ऐवजीं जर पाणी प्यालें तर कर्ज होणार नाहीं व रोग होणार नाहीं.–सवि ८६८.

दारूबाज——**दारूबाज वाईटवाणा, करितो जिवाची हेळणा**--दारुडे लोक आपल्या आयुष्याची धूळधाण करतात.

दारूबाज ह्याचे अंगावरील वस्त्र व बैलावर बांधलेलें शास्त्र सारखेंच असतें--ज्यास ज्या वस्तूची किंमत कळत नाहीं किंवा सांभाळ करवत नाहीं ती त्याजवळ असून नसून सारखीच आहे,असा भावार्थ. Wine wears no breeches.—French.

दाली——**दाली बांधणें**--[दाली=तलवारीचा पट्टा] जिंकण्यासाठीं अभिमानानें सज्ज होणें. 'बांधोनिया पुण्यावर कंनर चढती दाली । हिंदुपद घेईन म्हणतो निजामअली ।'--ऐपो २३१. 'दाली बांधली ती माघारी घेण्यास बांधली कीं काय ?'–हब ६५.

दावणें——**दावतां नये, दडवतां नये**--एखादी गुप्त गोष्ट (दुखणें) उघडपणें दाखवतां येत नाहीं व झांकूनहि ठेवतां येत नाहीं, अशी स्थिति. 'ढुंगणावरचा घाव दावतां नये दडवितां नये' अशी मूळ म्हण आहे.

दावा——**उभा दावा**--खडें वैर; तीव्र शत्रुत्व; हाडवैर; विरोध. 'जावा जावा, उभा दावा.'

दुस्मान दावा--कट्टें वैर; हाडवैर; शत्रुत्व.

दावा उगवणें-घेणें--(एखाद्यानें) केलेल्या अपकारांचा सूड उगविणें; (एखाद्यानें) केलेल्या अपकारांचें उट्टें काढणें; बदला घेणें; परतफेड करणें.

दावा गाणें-सांगणें--(एखाद्यावर) सूड उगविण्याबद्दल धमकी देणें; आव्हान देणें; तक्रार करणें.

दावा तोडणें--कज्जा मिटविणें; (हक्कासंबंधीं भांडणाचा) निकाल लावणें; कलह मिटाविणें.

दावा धरणें--द्वेष करणें; मत्सरबुद्धि बाळगणें; डाव, दांत, डूक धरणें.

दावा पदरीं पडणें--शत्रुत्व निर्माण होणें; वांकडेपणा येणें. 'कारभार करितां बहुतांचा दावा पदरीं पडतो तो कारभार कशास पाहिजे.'--रा ३·१२१.

दावा रद्द करणें--फिर्याद काढून टाकणें; खारीज करणें.

दावा लावणें--१ शत्रुत्व पुकारणें; भांडणें. २ फिर्याद गुदरणें; तक्रार करणें.

दावा साधणें--पूर्वजन्मींचा दावा साधणें, असा रूढप्रयोग. १ यशस्वी रीतीनें सूड उगवून घेणें. २ फिर्याद जिंकणें. 'म्हणे तुकयानें साधिला दावा । न्याय सांगावा कवणासी ।'

⁂ **जावा जावा आणि उभा दावा**--जावांचें कधीं पटत नाहीं ही वस्तुस्थिति.

दावें——**दाव्यास दावें असणें**--१ (जनावराची) संतति फार नसणें. २ सामान्यतः एका वंशांतील एक गुरूं नेहमीं गोठयांत असणें.

दाव्यास दावें देणें--जनावर पोसणारानें त्याचें वेत फक्त मालकास देणें.

दुष्ट——**दुष्टयास देव धार्जिणा**—दुष्ट मनुष्यास नेहमीं देव साह्य करतो. या जगांत दुष्ट मनुष्य अनेकदां उत्कर्ष पावलेले दिसून येतात.

दास——**दासांचा पालनहार**—दीनांचा रक्षक; परमेश्वर; गरीबनवाझ.–संग्रामगीतें ५०.

दाहा——दहा पहा.

दाहांचा हात--दहाजणांचे, एकजुटीनें असलेल्या जनसमूहाचे हात. संघशक्तीचा द्योतक वाक्प्रचार.

दाहीजण--गांवांतील वंशपरंपरागत हक्कदार.

दाही दिशा--१ दशदिशा पहा. २ (ल) सर्व जगः सर्वत्र.

दाहीदिशा मोकळ्या असणें--स्वैर वर्तन करण्यास मुभा असणें; जगांत कोठेंहि आडकाठी नसणें; सर्वत्र स्वतंत्रता असणें. 'या जगांत एकाच गोष्टीची जरूरी, ती प्राप्त करून घेण्यासाठीं दाही दिशा मोकळ्या आहेत.' –भयंकर दिव्य. –शाब २·१८३.

दाळ——डाळ पहा.

आपल्या पोळीवर दाळ ओढणें—स्वतःचाच फायदा करून घेणें; स्वार्थी, आपलपोटे बनणें. आपल्याच पोळीवर रूप ओढणें, असाहि पाठ आहे.

दाळ गळणें-शिजणें-विकणें--(एखाद्याच्या)लबाड्या कावे, कपट, डावपेंच इ. फलद्रूप होणें, भरभराटीस येणें; काम साधणें; लाग लागणें. सामान्यतः अकरण रूपी योजितात.

(एखाद्यानें) दाळ नासणें-व्यर्थ खाऊन गमाविणें--१ (मूल, बायको इ.कानीं) निरुपयोगी, आळशी बनणें. २ उर्मट, बेमुर्वतखोर बनणें.

❀ **दाळरोटी, सब बात खोटी**--(हिं.) जेवणा शिवाय बाकी सर्व गोष्टी व्यर्थ होत. जेवणामध्यें डाळरोटी खाल्यानें जें समाधान मिळतें तें अनेक प्रकारचें अन्न खाल्ल्यानें मिळत नाहीं. तु०-(हिं.) दाल भात विन फीक रसोई.

दिक्पाल——(अष्ट)—इंद्र, वन्हि, यम, नैऋति, वरुण, मारुत, कुबेर, ईश. (दश)--वरील आठ+सोम, व अनंत.

दिखना——**दिखनेमे ढब्बू, चलनेमे शिवराई**-ढब्बू पैसा शिवराईच्या दुप्पट किंमतीचा असतो. वरून दिसावयास चांगला पण उपयोगाच्या दृष्टीनें कुचकामाचा. तु०-Oxford knives, London wives.

दिखाऊ——**आम्ही केवळ दिखाऊ बाहुलीं, फुंकरानें उभीं रहाणार व फुंकरानें पडणार**--मोठीं दिखाऊ पण दुर्बल माणसें. -टिसू ३२१.

दिगन्त——**दिगंतीं जाणें-पसरणें**--सर्व पृथ्वी वर चोहोंकडे फांकणें, पसरणें; दशदिशा होणें.

दिट——**दिटगत माया, परानगत मोह**--दृष्टीस पडते आहे तोंवर मायामोह असतो व प्राण आहे तोंवर प्रेम असतें. Deception is connected with sight and affection with life.- सवि ७७३.

दिठी——**दिठीं असणें**--(व.) १ ऐकण्यांत असणें. २ ध्यानांत असणें.

दिडकी——**दिडकी दक्षिणा, लक्ष प्रदक्षिणा**--पैसा दक्षिणा० पहा. पुष्कळ श्रमाला थोडें मोल.

दिडकीची हुंडी गेली पण कुत्र्याचें मन ओळखलें गेलें—दिडकीच्या हुंडीस कुत्रा लोभास गुंतला. गरीबाची एखादी वस्तु श्रीमंतानें जबरीनें नेल्यास गरीब मनुष्य त्यास असें म्हणतो.

दिडकीला तीन शेर--फारच स्वस्त, मुबलक माल असला म्हणजे म्हणतात. (गु.) दोहड्यानुं दोहड शेर.

दिढी——**दिढीचा काला, आत्मा नाहीं धाला**-थोडकें असल्यानें तृप्ति न होणें. पोटभर न झाल्यानें असमाधान.

दितला——**दितलो रूप, आनी करतलो खूप**—(गो.) मजुरी थोडी देऊन श्रम पुष्कळ करून घेणें.

दिधणें——**मुखावरी दिधणें**—थोबाडींत मारणें; चपराक मारणें. 'विप्राच्या दिधली मुखावरी'-सप्र २·४२.

❀ **दिधलें नसे जें परमेश्वरानें, तें काय द्यावें इतरा जनानें।**—आपणाला जी गोष्ट परमेश्वरानें दिली नाहीं ती दुसरा कोणी देईल अशी अपेक्षा कां करावी.

दिन——**दिन गया डेरे, और मूसिल (मोसल) गया घेरे**--(हिं.) सूर्य मावळला तसा हमाल घरीं गेला. दिवस बुडाला कुणबी (मजूर) उडाला, याप्रमाणें.

दिनका भय्या, रातका लगवय्या--दिवसा नोकर रात्रीं यजमान (नवरा)! मोठ्याच्या घरच्या एखाद्या व्यभिचारी किंवा नवऱ्याला रावविणाऱ्या स्त्रीबद्दल म्हणतात.

दिमाख——**दिमाख भारी, खिस्त्या दारीं**--[खिस्ती=हप्तेबंदीनें वसूल करावयाच्या बोलीनें कर्ज देणारा सावकार] एकीकडे ऐट तर करावयाची पण इकडे पाहावें तों सावकार हप्त्याकरितां दाराशीं खेपा घालीत आहे. ऋण-करी असून बडेजावी करणें.

दिमाख लवडी आणि कानांत कवडी--[लवडी = लवंडी] इकडे दारिद्र्य दिसतें आहे पण दिमाख, ताठा केवढा !-शास्त्रीको.

दिया——**दियाही आडे आता है**--(हिं.) दिलेलेंच आड येणें. ज्याच्यावर उपकार करावा तोच आपल्या विरुद्ध येणें.

दिल——**दिल कच्चा होणें-असणें**—कच खाणें; हिंमत खचणें; धीर सुटणें. 'एक वेळ दिल कच्चा जाहला म्हणून शिपाई नव्हेत कीं काय?'-हब २५.

दिल देणें—अंतःकरण खुलें करणें; प्रेम करणें. 'दिल किसीकू देना नहि, दिलसे देना दिल।'

दिल फाटणें—१ बेचैन होणें; फार काळजी लागणें. २ गोंधळून जाणें; घाबरणें. ३ आश्चर्यचकित होणें; थक होणें.

❀ **दिल उतावीळ झाला तरी माल उतावीळ होत नाहीं**—मनांत पुष्कळ घाई असली तरी एखादी गोष्ट व्हावयास कांहीं काळ लागतोच.

दिल लगा गद्धीसे (मेंडकीसे), पद्मीन क्या इयांट (चीज) है--गाढवीवर (वेडकीवर) एकदां प्रेम बसलें तर तीपुढें अतिसुंदर स्त्रीहि तुच्छ वाटते. इष्क अंधळें असतें म्हणतात.

दिलपर दिल लेना है--(हिं.) ज्याप्रमाणें आपण दुसऱ्याला दिलासा द्यावा तितका तो आपणाला देतो. तु०-माया द्यावी माया घ्यावी.

दिलमें चंगा तो काथवटमें गंगा -[चंगा=शुद्ध. काथवट=परात] मन शुद्ध असल्यावर घरच्या परातींतल्या पाण्यांत देखील गंगास्नान घडतें. अंतःकरण शुद्ध, पवित्र असल्यास तीर्थाची पवित्र गंगा आपणाजवळ असल्याप्रमाणेंच होय. तु०--मनमें गंगा मनमें काशी। मनमें स्नान करे। तीरथ कोन करे, हमारो ॥ -कबीर.

दिल्ली——दिल्ली येथील दासनवमी--शेख मिरा व गोकुळाष्टमी, पहा.

दिल्लीचा सोदा; दिल्लीकर--दिल्ली ही मोगल राजधानी फार ऐश्वर्यसंपन्न असल्यानें तेथें अट्टल भामटे, चोरहि पुष्कळ. यावरून फार पटाईत भामटा, चोर.

❀ दिल्ली तो बहोत दूर है--अद्याप फार अवकाश आहे या अर्थी. देहली पहा.

दिवटा——दिवटा--दिवे लावणारा. (ल.) कुळाला कलंक लावणारा.

दिवटी——दिवटी पाजळणें--टेंभा मिरविणें; प्रौढी मारणें.

❀ दिवटीमागें बुधली आहेच; दिवटीबरोबर बुधली -दिवटीवर तेल घालण्यास बुधली लागतेच. मुख्य गोष्टीबरोबर आनुषंगिक गाष्टींचा अंतर्भाव होतोच. तु०-सुईमागें दोरा.

दिवड——दिवडान बेब्याक गिळिल्ल्यावरी--(गो.) (दिवड) सापानें बेडूक गिळल्याप्रमाणें. कांहीं चव न पाहतां, न चावतां खाणाऱ्या माणसाबद्दल म्हणतात.

दिवली——दिवली शेटीची, तेल म्हगेलें--(गो.) एका देवळांत कथाकीर्तनाकरितां दिवा लावावयास एका शेटनें दिवा दिला पण त्यांत तेल दुसऱ्यानें घातलें. यावरून समयी शेटीनें दिली तरी तिच्यांत तेल माझें घातलें. शेटीस कांहीं खर्च आला नाहीं पण माझें तेल खर्च होऊन गेलें. एकाचा खर्च जास्त पण श्रेयाला मात्र सारखे वांटेकरी होणें.

दिवले मुळ्यां काळोख -(गो.) दिव्याखालीं अंधार.

दिवस——वर्षा येवढा दिवस--१ उत्तरायणांतील मोठे दिवस. २ फार कंटाळवाणा, फार दुःखकारक वाटणारा दिवस, काळ.

नवा दिवस उगवणें--जिवावरच्या दुखण्यांतून बरें होणें किंवा महासंकटांतून पार पडणें; पुनर्जन्म होणें.

दिवस करणें—मृताचें क्रियाकर्मीतर करणें; और्ध्वदेहिक क्रिया करणें. “ बरें नुसतें प्रेत नेऊन कोठें आटपतें. दुसरे किंवा तिसरे दिवशीं राख गोळा करण्यास गेलें पाहिजे व दिवसही तेथेंच केले पाहिजेत. '--आगरकर.

दिवस काढणें-घालणें-ढकलणें-दवडणें-रगडणें-सारणें--अडचणींत, कष्टांत दिवस कंठणें; कसातरी काळ घालविणें.

दिवस घेऊन--दिवसा उजेडीं; संध्याकाळच्या आंत; काळोख पडण्याच्या आंत.

दिवस घेणें--गरोदर स्त्री बाळंत होण्यास किती काळ घेईल याविषयीं बोलतांना वापरतात. (ल.) दिवस कंठणें, लोटणें. ' मला आधार भरंवसा सर्व स्वामीचे चरणाचा. येणे करून दिवस घेत आहे. ' – बापूगोप १९६.

दिवस चढणें--सूर्य वर येणें; दिवस वाढणें; दोन प्रहरची वेळ येणें.

दिवस जाणें--गर्भ राहणें; पोट राहणें. ' सुवृत्ताबाईला कांहीं दिवस गेले. ' –विवि ८·४·९६.

दिवस झाडावर आला--सूर्य थोडासा वर आला; सकाळ होऊन थोडा वेळ झाला.

दिवस डोईवर येणें--दुपारचे बारा वाजणें; भर दोन प्रहर होणें; माध्यान्ह होणें. 'दिवस कसा डोईवर आला होता.'–के १–७–३०.

दिवस दारीं आला; दिवस दारीं बाहेर आला--दिवस उगवला; सूर्य उगवला; सकाळ झाली.

दिवस पूर्ण भरणें--१ सद्दी संपणें; उत्कर्षकाल संपणें; ऊर्जितदशेचे दिवस संपणें. 'महाराज होळकरांचे दिवस पूर्ण भरले गेले आहेत. '–विक्षिप्त १.१२४. २ गरोदर स्त्रीस नववा महिना पूर्ण होणें.

दिवस फिरणें--वाईट काल येणें; अवदशा येणें; आपत्ति येणें; कष्टदशा येणें. 'सध्यां आपले दिवस फिरले आहेत–रूपाजी म्हणाला.'–स्वप.

दिवस भरणें—१ गरोदरपणाचे दिवस पूर्ण होणें; प्रसूतिसमय प्राप्त होणें. २ विटाळशी होण्याचे, बसण्याचे दिवस जवळ येणें; पाळी येणें.

दिवस मागें पाहातात--काळ वाईट येणें, उलट फिरणें; निकृष्ट स्थिति आलेली असणें; दैव प्रतिकूल असणें.

दिवसमास वाढणें--एकसारखें वाढत जाणें. 'सृष्टिक्रमाप्रमाणें यमू दिवसमास वाढूं लागली.'-आजोच ३.

मागला प्रहर दिवस राहतां--दुपारच्या तीन वाजतां; एक प्रहर दिवस शिल्लक असतांना.

दिवसा उजेडीं-सकट-पूर्वीं--दिवस मावळण्यापूर्वीं; संध्याकाळ होण्याच्या पूर्वीं; काळोख पडण्यापूर्वीं.

दिवसाढवळ्या--भर दिवसां; दिवसा उजेडीं; राजरोस

दिवसाढवळ्या डोळ्यांत धूळ घालणें--देखतां देखतां फसविणें; उघड उघड ठकविणें. 'त्यानीं दिवसा ढवळ्या सरकारचे डोळ्यांत धूळ घालण्याचा यत्न केला.' -विक्षिप्त ३·१५०.

दिवसाढवळ्या स्वप्न पाहणें--स्वप्न झोपेंत पडतें. पण दिवसां जागेपणीं पडलें म्हणणें म्हणजे अशक्य गोष्ट बोलणें. 'कॉंग्रेसनें आतां ज्याप्रमाणें जर्मनी आतां भांडत आहे त्याप्रमाणें इंग्लंडशीं भांडावें. आणि लढाईच्या मैदानांत इंग्लंडला हरवावें. नाहींतर पूर्ण स्वातंत्र्याची भाषा बोलणें म्हणजे दिवसा ढवळ्या स्वप्न पाहणें होय.'-केसरी ४-६-४०.

दिवसानें डोकें काढणें--नुकताच दिवस उगवणें; सूर्य वर येणें; उजाडणें; प्रभात होणें.

दिवसाबरोबर—सूर्योदया बरोबर किंवा सूर्यास्ताबरोबर; बरोबर सकाळीं किंवा सायंकाळीं

दिवसा मशाल पाजळणें--हा एक मान पालखीचा मान असणारांना असतो. शंकराचार्य दिवसा मशाल पाजळीत पालखींतून जातात.

दिवसा मशाल लावणें-पाजळणें--१ दिवसा दिवे लावणें; उधळपट्टी करणें; अनीतीचीं कृत्यें उघडपणें करणें. (दारू पिणें, जुवा, रंडीबाजी इ.). २ एखादें महत्कृत्य करणें.

दिवसाची रात्र व रात्रीचा दिवस करणें--दिवसा निजून रात्रभर जागत बसणें. २ एकसारखें खपणें.

दिवसावर नजर देणें; दिवसासारखा होणें--काळाप्रमाणें वागणें; वारा येईल तशी पाठ फिरविणें; काळवेळ पाहून वागणें.

दुसऱ्या दिवसावर नेणें--थांबविणें; तहकूब करणें; काळांतरावर टाकणें; पुढें ढकलणें; दिरंगाईवर टाकणें.

❀ **जेथें जावें तेथें डोईवर दिवस**--कोठेंहि गेलें तरी परिस्थिति सारखीच असते. सूर्य नेहमीं वरच उगवतो.

अजून पहिला-प्रथम-पूर्व दिवस आहे—अजून प्रारंभासारखीच स्थिति आहे, तींत फरक नाहीं; बराच काळ प्राथमिक अवस्था असणें; कांहीं बदल नसणें.

दिवस उगवेना न् आळशी लुगडें नेसेना--अत्यंत आळशी स्त्रीबद्दल म्हणतात. दिवस उजाडला तरी अंथरुणांतूनहि बाहेर न येणारी स्त्री.

दिवस गेला उटारेटीं मग दिव्यांत कापूस रेटी; दिवस गेला उटारेटीं मग बोटानें काडवाती रेटी--रात्रीं कामासाठीं दिवा नीट जळावा व चांगलें दिसावें म्हणून दिव्याची वात सारणें. सबंध दिवस रिकामा घालवून रात्रीं कामाला लागावयाचें. अव्यवस्थित, अयोग्य वर्तन.

दिवस गेला दातींमेटीं-हिटींमिटीं-उटारेटीं, चांदण्यांत (दिव्यानें) कापूस वेटी--दिवसभर कांहीं उद्योग न करतां दिवस आळसांत घालवावयाचा व मग रात्रीं काम करीत बसावयाचें (कापसाच्या सरक्या काढीत बसावयाचें).

दिवस गेला धामा, पुढे करा कामा—[धाम=घर] ज्या वेळचें काम त्यावेळीं उरकावें, दुसऱ्या दिवसावर टाकूं नये.—सवि ७७९.

दिवस गेला नागव्यानी आणि नाहतांना पडदणी—सर्व दिवस उघडें राहावयाचें तेव्हां लोकांची लाज बाळगावयाची नाहीं व नाहतांना मात्र वस्त्र नेसावयाचें. योग्यवेळीं लाज मर्यादा न बाळगतां भलत्याच वेळीं त्याचा आव आणावयाचा.

दिवस जातो पण बोल उरतो—काल निघून जातो पण वाईट भाषणें कायम राहतात. एखाद्याला दुरुत्तर बोललें तर तें त्याच्या कधीं स्मरणांतून जात नाहीं. गेलेला शब्द परत येत नाहीं.

दिवस बुडाला, मजूर उडाला-पळाला—दिवस संपला कीं मजूर कशाला कामावर असणार! मनापासून काम न करणाऱ्या, पगारी, मजुरीच्या माणसाबद्दल म्हणतात.

दिवसभर चरते, मंगळवार करते—उपास करण्याचा आव आणून फराळाच्या पदार्थांवर मात्र एकसारखा ताव मारीत असावयाचें.

दिवसभर राबली, फजीत पावली—दिवसभर श्रम करून शेवटीं तें निष्फळ ठरणें.

दिवसभर वाचली गीता, रात्रीचा गोंधळ बरा होता—एखाद्या मनुष्याला पुष्कळ उपदेश केला तरी त्यावर त्याचा कांहीं परिणाम होत नाहीं, त्याचा देहस्वभाव कांहीं

पालटत नाहीं व त्याला आपलाच आयुष्यक्रम चांगला वाटतो. तु०—गांवढ्यापुढें (गाढवापुढें) वाचली गीता, कालचा गोंधळ बरा होता. पालथ्या घागरीवर पाणी.

दिवस मंदीचे आणि अंगावर दागिने चांदीचे—१ धंदा चालत नाहींसा झाला म्हणजे त्याप्रमाणें काटकसर करावी लागते. याकरितां सोन्याच्या दागिन्यांऐवजीं चांदीचे दागिने घालावे लागतात. किंवा २ एकीकडे धंदा तर चालत नाहीं असें म्हणावयाचें व एकीकडे अंगावर दागिने घालावयाचे व बडेजाव दाखवावयाचा, याप्रमाणें विसंगत वर्तन करणाराबद्दल म्हणतात.

दिवस सारखे नसती, चढते पडते असती—मनुष्याला नेहमींच कांहीं काळ अनुकूल नसतो. बरे वाईट दिवस हे येतच असतात. चक्रनेमिक्रम.

चार दिवस सासूचे, चार दिवस सुनेचे—प्रथम सासू अधिकार गाजवून घेते, नंतर सुनेला तो अधिकार प्राप्त होतो. म्हणजे एकच अवस्था नेहेमीं राहात नाहीं. प्रत्येकाचा चालता काळ केव्हां तरी येतो. तु०—Every dog has its day, and every man has his hour.

दिवसां कांडणें, रात्रीं भांडणें—दिवसभर कांडणाच्या आवाजामुळें झोंप येत नाहीं व रात्रीं बायकांचीं भांडणें चालतात त्यामुळें झोंप येत नाहीं. याप्रमाणें नेहमीं कटकटीपासून त्रास पावणारा मनुष्य वैतागून म्हणतो.

दिवसां कुतरें निजतें, रात्रीं भोंकतें—दिवसभर कुत्रा निजून राहतो व तोंडावाटें आवाज काढीत नाहीं पण रात्र झाली कीं भुंकूं लागतो. त्याप्रमाणें एखादा दुबॅल मनुष्य आपला पडता काळ असला म्हणजे गप बसतो, बोलत नाहीं, पण अनुकूल संधी आल्याबरोबर गुरगुरूं लागतो.

दिवसां गंगाभागीरथी, रात्रीं (रात्रौ) सौभाग्यवती-दिवसां बायकोस, रांडे! बोडके! म्हणून शिव्या घालावयाच्या पण रात्रीं सौभाग्यवती म्हणून जवळ करावयाची. घटकेंत शिव्या तर घटकेंत लघळपणा, असें करणाऱ्या माणसाबद्दल म्हणतात.

दिवसां घोडें, रात्रीं मढें—दिवसास खूप काम करणारा मनुष्य रात्रीं अगदीं गाढ झोंपी जातो व अगदीं प्रेताप्रमाणें निचेष्ट पडतो. त्याच्यानें रात्रीं कांहीं हालचाल होत नाहीं.

दिवसां चूल आणि रात्रीं मूल—एखाद्या स्त्रीचा सर्व दिवस स्वयंपाक करण्यांत व रात्र मुलास निजाविण्यांत किंवा त्याची काळजी घेण्यांत खर्च होते. मुळींच उसंत नसते.

दिवसां चोर आला, रात्रीं दरवडा पडला—१ एखादा चोर दिवसां टेहळणी करून जातो किंवा पाहुणा म्हणून येतो व रात्रीं चोरी करतो. २ एकामागून दुसरें संकट येणें.

दिवसां दिवा, रात्रीं अंधार—भलत्याच वेळीं भलतीच गोष्ट करणें. अव्यवस्थित वर्तन. हा एका म्हणीचा उत्तरार्ध आहे.

दिवसां पाहावें, रात्रीं ऐकावें—आपणास दिवसास दृष्टीचा उपयोग करतां येतो त्यावेळीं नीट निरीक्षण करावें व रात्रीं दिसत नाहीं पण ऐकूं येतें, त्यावेळीं कान तीक्ष्ण ठेवून काय कानीं पडेल तें लक्षांत ठेवावें. याप्रमाणें सावधपणें राहावें. ज्यावेळीं ज्या साधनाचा उपयोग होईल त्यावेळीं त्या साधनाचा उपयोग करून आपलें कार्य साधित असावें. तु०—The day has eyes, the night, has ears.–Scotch.

दिवसां पाट लावला ती रडती, रात्रीं लावला ती गडबडा लोळती—आधीं नीट विचार करून एखादी गोष्ट केली नाहीं म्हणजे मग पश्चात्तापाची पाळी येते. दुसरा नवरा करावयाचा तो नीट विचार करून करावा. नाहींतर मग तो दिवसां केला काय किंवा रात्रीं केला काय, शिवटीं रडण्याची पाळी येते. पाट नेहमीं रात्रीं लावतात. लग्नाप्रमाणें त्याला शुभतिथि किंवा मुहूर्त पहात नाहींत. तु०—एकपुती रडे०

दिवसां भागला आणि रात्रीं निजला—जो मनुष्य दिवसा चांगले श्रम करतो त्याला रात्रीं स्वस्थ झोंप येते.

दिवसां मजूरी आणि रात्रीं हजेरी—काम मात्र दिवसां करून घ्यावयाचें व हजेरीला रात्रीं बोलवावयाचें. एखाद्याच्या श्रमाची कदर करावयाची नाहीं. काम केल्याबरोबर त्याचें वेतन द्यावयाचें नाहीं, त्यास दिरंगाई लावावयाची असा कांहीं लोकांचा स्वभाव असतो.

दिवसां माधुकरी आणि रात्रीं चोरी—कांहीं लोक माधुकरी मागण्याच्या निमित्तानें दिवसां घरांत येऊन टेहेळणी करतात व रात्रीं चोरी करतात. भिकाऱ्याचा वेष घ्यावयाचा पण आंतून चोरीचा धंदा करावयाचा, अशी ठकाची वृत्ति.

दिवसां वागणूक, रात्रीं करमणूक—दिवसभर योग्य प्रकारें वर्तन केल्यावर, आपलें काम नीट केल्यावर रात्रीं थोडीफार विश्रांतीकरतां गप्पा गोष्टी वगैरे करमणूक करण्यास हर-

कत नाहीं. तु०—Work while you work and play while you play.

दिवसां हांसणें आणि रात्रीं रडणें—हर्ष आणि शोक हे एकापाठीमागून एक असे येत असतात. चांगले वाईट दिवस क्रमाक्रमानें येतच असतात. तेव्हां दिवस आनंदांत गेला तर रात्रीं कदाचित् दुःख करण्याचीहि पाळी येते. विशेषतः लहान मुलाबद्दल म्हणतात. जें दिवसा फार खेळतें हंसतें तें रात्रीं सारखें रडतें.

दिवसाचा आखरपक, रात्रीची आठवी—(व.) ज्याच्या घरीं दिवसाचे जेवणाला दुपारचे दोन वाजतात व रात्रीचे जेवणाला बारा वाजतात अशाला म्हणतात.

दिवसाची रात्र, रात्रीचा दिवस—१ जो मनुष्य दिवसां झोंप घेतो किंवा दिवस आळसांत घालवतो व मग रात्रीं काम करीत बसतो अशास म्हणतात. २ जिवाकडे न पाहातां रात्रंदिवस काम रेटणारा जो असतो त्याला उद्देशून.

दिवसोंदिवस टांचणी, बहू दिवसांची मिळवणी—अनेक दिवस काटकसर केली असतां कांहीं तरी सांचवितां येतें. तु०—थेंबें थेंबें तळें सांचे.

दिवसोंदिवस पैसा, काळेंकरून होतो लैसा—अनेक दिवस थोडा थोडा संग्रह करीत गेलें तर कांहीं काळानें थोडीफार पुंजी जमते.

दिवा——दिवा उंबऱ्यावर पाजळणें—दिवाळें काढल्याचें जाहीर करणें; शेणाचे दिवे लावणें.

दिवे ओवाळणें—आरती करणें हा मूळ अर्थ. (उप.) कुचकिमतीचा समजणें; क्षुद्र लेखणें; तिरस्कार दाखविणें. ' अहाहा ! दिवे ओवाळावे त्या प्रीतीवर. !' —त्राटिका.

दिवे लावणें—औपरोधिक प्रयोग—१ पराक्रम, शतकृत्य करणें. २ दुर्लौकिक करणें; अप्रतिष्ठा संपादणें. ' तूं मोठी शहाणी आहेस तें आहे ठाऊक; जा आतां. आपल्या शहाणपणाचे काय दिवे लावावयाचे असतील ते नवऱ्याच्या घरीं लाव ! '—नाट्यकथावर्णन.

दिव्याचे पोटीं काजळ धरणें—चांगल्या आईबापाच्या पोटीं कुपुत्र उत्पन्न होणें.

दिव्याच्या वातीनें शोधणें-प्रत्येक कानाकोपरा बारकाईनें शोधणें; सूक्ष्म तपास करणें.

दिव्यानें रात्र, दिवस काढणें-उजाडणें-लोटणें—१ रात्रभर, रात्रंदिवस जागत बसणें; जागून काढणें. २ अतिशय आजारी असणें. ३ रात्र दिवे लावून चैनींत घालविणें.

दिव्यास निरोप-पदर-फूल देणें—दिवा मालविणें. दिवा देवतेसमान पवित्र मानतात. तेव्हां दिवा तोंडानें फुंकून मालवीत नाहींत तर पदरानें वारा घालून किंवा पुढें फूल धरून तो घालवितात. तसेंच ' दिवा मालव ' न म्हणतां ' दिव्यास निरोप दे ' इ० असें सांकेतिक म्हणतात.

❀ **घरांत दिवा तर देवळांत दिवा**—१ गांवांत प्रथम दिवा लावणारा कोणी असेल, गांव, घर नांदतें असेल तर देवळांत दिवा लागून देवाची वास्तपुस्त होईल. आधीं पोटोबा मग विठोबा या अर्थी. 'दिवा लावी घरांत०' पहा.

दिवा दिवठणीं आणि बाईल हांतरुणीं—दिवा आपल्या स्थानावर शोभतो त्याप्रमाणें स्त्री ही शय्येवर शोभते. प्रत्येक गोष्ट स्वस्थानीं चांगली दिसते किंवा स्वस्थानीं ठेवणें चांगलें.

दिवा दिवठाणीं, बाई प्रस्थानीं—दिवा नेहमीच्या जागीं आहे पण बावरून गेल्यामुळें बाई त्याचा सर्वत्र शोध करते तशांतली गत. मनुष्याची वृत्ति स्थीर नसली कीं असलाच गोंधळ होतो. तेव्हां त्याच्या गोंधळलेल्या स्थितीला उद्देशून ही म्हण वापरतात.

दिवा पाहून येतें, फडा पाहून जातें—[फडा=केरसुणी] येथें दुखणें शब्द अध्याहृत समजावा. दिवा पाहून म्ह० रात्र पडतांच याला दुखणें येतें व रात्रभर त्या दुःखांत हा निमग्न राहतो. पण फडा पाहून म्ह० उजाडतांच तें दुखणें पळतें व कामाला सुरुवात करून हा दिवसभर कामांत निमग्न असतो. कर्तव्यनिष्ठेपुढें याच्यावर शरीराच्या अस्वास्थ्याचा प्रभाव पडत नाहीं असा भाव.

दिवा लावी घरांत, मग देवळांत—आधीं घरची सोय नीट पाहावी व मग इतरांच्या सोयीकडे किंवा परमार्थाकडे पाहावें. तु०—आधीं प्रपंच करावा नेटका । मग पहावें परमार्थ विवेका ॥ Charity begins at home but should not end there.

दिवा लावून येणें, हात हालवीत जाणें—(क.) रात्रीच्या वेळीं, अवेळीं एखाद्याकडे कामाला गेल्यास तें काम होत नाहीं.

दिव्याखालीं अंधार; दिव्याचे गांडीखालीं अंधार—दिवा दुसऱ्याला उजेड देतो पण त्याच्या बुडाखालीं अंधारच राहतो ! प्रत्येक चांगल्या गोष्टींत कांहींतरी दोष असतो, या अर्थी. Nearer the church, the farther from God.

दिव्याचें तेल संपलें, पुराण आयतेंच आटोपलें—एक पुराणिकबोवा देवळांत पुराण सांगत होते. ते सांगत असतां देवळांतील दिव्यांतील तेल संपलें. तेव्हां अर्थात् त्यांना पुढें वाचतां येईना म्हणून चालू आख्यान पूर्णपणें न सांगतां तेथेंच आंखडतें घेतलें व पुराण थांबविलें. जोंपर्यंत साधन असेल तोंपर्यंतच कार्य होईल. तु०—यावत्तैलं तावदाख्यानम् ।

दिव्याच्या पोटांत काळें—दिवा जरी स्वतः तेजस्वी असला तरी तो जळत असतां त्यापासून निघणारें काजळ काळेंच असतें. त्याप्रमाणें कांहीं सज्जन लोकांच्या पोटींहि कुपुत्र निर्माण होतात. तु० — सूर्यापोटीं शनैश्वर. तुळशींत भांग दीपो भक्षयते ध्वान्तं कज्जलंच प्रसूयते । यदन्नं भक्षयेन्नित्यं जायते तादृशी प्रजा ॥—सुर १५८.२४२.

दिव्यांत वात, तोंडांत हात (घास); दिव्यांत वात पानांत भात—तिनिसांजा झाल्याबरोबर कांहीं लोक, विशेषतः मुलें जेवण्यास उतावीळ झालेलीं असतात, अशांबद्दल योजतात.

दिवाण——दिवाणाचें तेल पदरांत घेणें—मोठ्या मनुष्याकडून जर एखादा लहानसा कां होईना, लाभ होत असेल तर तो आदरानें स्वीकारावा. त्यावेळीं मागें पुढें पाहूं नये. कांहींहि नुकसान होवो आपल्या धन्याची देणगी स्वीकारणें; अवमान न करणें. पाठभेद—सरकारचें तेल शेल्यांत घेणें.

दिवाणा——दिवाणी कोर्टांत जाणारा मनुष्य दिवाणा होतो—कोर्टकचेरीच्या नादीं लागणारा मनुष्य शेवटीं भिकेस लागून वेडा होण्याची पाळी येते.—केसरी ४-८-३९. तु०—दीवानीमां जवुं, ने दीवाना थवुं.

देख दिवाने अपना सौदा—(हिं.) मूर्ख माणसाचा व्यवहार बुडीतच असावयाचा.

दिवाळखोर——दिवाळखोर नारायण, त्याला (त्यावर) बहूतांचें ऋण !—१ परमेश्वर हा भक्तांचा सदोदित ऋणी असल्यानें त्यांना देतां देतां तो दिवाळखोर बनतो. परोपकारी माणूस फार जणांचा देणेकरी लागतो. त्याला सर्वांचें ऋण (स्वतःवर ओढवून घेतलेलें) फेडावयाचें असतें. २ जो मनुष्य दिवाळखोर असतो तो कर्जबाजारी असतो व त्याला अनेकांचें देणें असतें.

दिवाळखोरा देऊं नका, खराबींत येऊं नका—दिवाळखोर मनुष्यास कर्ज दिलें असतां तें सर्व खात्रीनें बुडून नुकसान होतें.

दिवाळी——दिवाळी करणें-उडविणें—(दिवाळींत करतो त्याप्रमाणें) अवाच्या सवा खर्च करणें.

❀ **दिवाळी दसरा, हातपाय पसरा**—दसरा दिवाळी इत्यादि सण आले म्हणजे ते सुगीचे दिवस असतात; त्यामुळें मनुष्य आळशी बनून कांहीं काम करीत नाहींसा होतो. खुशाल चैनींत दिवस काढतो.

असेल त्या दिवशीं दिवाळी, नसेल त्या दिवशीं शिमगा—दिवाळींत चैन करतात व शिमग्यांत बोंब मारतात; यावरून जवळ असेल तोंपर्यंत चैन करावयाची, नसेल त्यावेळीं उपवास काढावयाचे.

दसऱ्यांतून पार पडेन तेव्हां दिवाळीचा दिवा पाहीन—मारण्यास काढलेला बोकड किंवा रेडा असें म्हणतो. सध्याच्या अडचणींतून पार पडूं द्या, मग पुढें पाहूं. दसरा पहा.

दिवाळें——दिवाळें तासप-मारप—(गो.)टवाळी करणें; निंदा करणें.

दिवाळें वाजणें—कर्जबाजारी होणें; कफल्लक बनणें.

दिवाळेर तांबडी टोपी—(गो.) दिवाळ्यावर तांबडी टोपी. तांबडी टोपीसुद्धां राहिली नाहीं.

दिवोडु——दिवोडु खावंच्या गांवांतु गेल्हारी मध्य कुटुको—(गो.) जेथें दिवड (साप) खातात अशा गांवांत गेल्यास आपण दिवडाचा मधला भाग खावा. जसा देश तसा वेष याप्रमाणें वागावें.

दिव्य——दिव्य उतरणें; दिव्यास उतरणें—१ कसोटीस उतरणें; खरें ठरणें. २ मोठ्या संकटांतून पार पडणें.

दिव्य पंचामृत—गाईचें तूप, दहीं, दूध, मध व साखर यांचें मिश्रण. पंचामृत पहा.

दिशा——दिशा कोंडणें—अवष्टंभ होणें; बहिर्दिशेस न होणें; शौचास अवरोध होणें. ' मुरडा हागवण उन्हाळे । दिशा कोंडता आंदोळे । '—दा ३-६-३०.

दिशा दाखवणें—संकेत, मार्ग दाखविणें; सूचना देणें; थोडें समजावून देणें; चालू करून देणें.

दशदिशा पळणें—कोणीकडेहि पळणें; पांगापांग होणें; त्रेधा उडणें; सैरावैरा पळणें.

दिशा फाकणें-फुलणें-पालटणें—(आकाश) प्रकाशानें प्रफुल्लित होणें; उषःकाल होणें; उजाडणें.

दिशा भारणें-बांधणें—मंत्र सामर्थ्यानें चोहोंकडचा प्रदेश, लोक यांची नजरबंदी करणें; कोणास आपलें कृत्य कळणार नाहीं असें करणें.

दिशाभूल होणें—१ वाट चुकणें. २ गोंधळणें. ' भगीरथः—मी दुर्दैवाची दिशाभूल होऊन या आडवाटेला लागलों आहें ! '—एकच प्याला २.३.

चारहि दिशा मोकळ्या होणें—सर्व जग मोकळें असणें (कोठेंहि भटकणें, भीक मागणें इ. करितां); किंचितहि आडकाठी नसणें; स्वैरसंचारास मोकळीक होणें.

दिशेस जाणें—बर्हिदिशेस, परसाकडेस जाणें. ' प्रातःकालचे घटका रात्रौ उठोन दिशेस जाऊन पादप्रक्षालन मुखप्रक्षालन करून... '—काव्ये. ३९३. ' आज दोन वेळ दिशेस जावें लागल्यामुळें दोन स्नानें घडलीं. '

दिष्ट——दिष्टि पडल्यार चोर, ना जाल्यार साव- (गो.) पाहिला–पकडला तर चोर, नाहींतर साव.

दिस——दिस असल्यास बरें–(गो.) संधि मिळाली असेल तों साधून घेणें.

भररे पोटा आणि जारे दिसा—कोणीकडून तरी पोट भरलें व एक दिवस पार पडला म्हणजे झालें. उद्याची काळजी कोण करतो किंवा इतर गोष्टींचा विचार कोण करतो अशा वृत्तीच्या माणसांस उद्देशून म्हणतात.

दिसा कैळया देकिलारी भिवींची भायल रत्तीची न्हयी पोवनु वत्ता; दिसा कावळो देखल्यार भियेणी बायल रातची न्हंय पेवन वेता—(गो.) दिवसा कावळ्याला भिणारी बाई रात्रीची नदी पोहून जाते ! भित्र्या बाईच्या अंगीं आकस्मिक येणारें धाडस प्रसंगप्राप्त असेल किंवा ती नाटकी वृत्तीची असेल.

दिसणें——दिसण्यांत गुळकट, कामाला पोंचट——दिसावयाला सुंदर पण कामाला निरुपयोगी अशा वस्तूबद्दल म्हणतात.

दिसण्यांत बाळबोध, कृतींत दुर्बोध——(वांय.) वरून सरळ, सालस, पण आंतल्या गांठीचा असणारा माणूस.

दिसतें तसें नसतें, म्हणून जग (मनुष्य)फसतें——अनेक वस्तूंचें स्वरूप जसें वरून दिसतें तसें अंतरंगांत नसतें यावरून म्हणतात. All that glitters is not gold.

दिसतो मोठा, अकलेचा तोटा—एखादा मनुष्य वयोवृद्ध अगर श्रेष्ठ असूनहि मूर्ख असतो. अशाला उद्देशून योजतात.

दिसायला काम नाहीं आणि बसावयाला वेळ नाहीं——कांहीं कामें अशीं असतात कीं, तीं करतांना समजून येत नाहींत व दुसऱ्यास वाटतें हा रिकामाच आहे. पण वस्तुस्थिति अशी असते कीं, अशा कामांत थोडी देखील विश्रांति घ्यावयास फुरसतच मिळत नाहीं.

दिसायला भोळा आणि मुदलावर डोळा——वरपांगी भोळा दिसणारा पण मतलबसाधु मनुष्याबद्दल म्हणतात.

दिसायला साधा भोळा, कपाळीं गंधाचा टिळा—(व.) वरून मोठा धार्मिक किंवा कर्मठपणाचा आव आणून आंतून कपटी वर्तन करणाऱ्या मनुष्याबद्दल म्हणतात.

दिसायला साधी भोळी, काखेंत पुरणाची पोळी–(व.) वरून भोळी पण आंतून कपटी.

दिसून दृष्टि करी मंद, तो असे पूर्ण अंध——ज्याला प्रत्यक्ष कांहीं गोष्टी दिसत असूनहि त्यांचेकडे लक्ष देत नाहीं किंवा त्यांचा विचार करीत नाहीं तो दिसत असूनहि अंधळा मानावा.

दिसे कुरूप कलेवर, आत्मा असतो सुंदर——कांहीं लोक शरीरानें कुरूप असले तरी अंतःकरणानें फार थोर असतात.

दिसे मढें, येई रडें——स्मशानवैराग्य. समोर असलें म्हणजे त्याविषयीं वाटणें. नाहींतर दृष्टीआड सृष्टि.

दिसे साधेपणाचा, तो गूढ मनाचा——जो मनुष्य वरून अगदीं शांत व साधाभोळा दिसतो तो आंतल्या गांठीचा असतो. Simplicity of character is the natural result of profound thought.

दिसलें तें पाहावें——१ नेहमीं आपली दृष्टि तीक्ष्ण ठेवून आपल्या भोंवतीं काय चाललें आहे याचें निरीक्षण करीत असावें. २ जें जें होईल तें तें पाहावें. दुसरें काय करणार !

दीड——दीड दमडीचा——क्षुद्र हलकट, कांहीं किंमत नाहीं असा (माल, माणूस इ.)

दीड दमडीचा शिपाई—अतिशय भित्रा, लढाईला निरुपयोगी असा शिपाई.

दीड शहाणा—बेअकली; मूर्ख;फाजील शहाणा; वाजवीपेक्षां अधिक शहाणपणा खर्च करणारा.

दीड शहाणा कोष्टी—जो वाजवीपेक्षां जास्त शहाणपणा दाखवतो त्यास म्हणतात.

❀ **दीड आणा,बाबू,उताणा**—थोड्या प्राप्तीवर बेफिकीर बनलेल्या माणसाबद्दल योजतात. थोडेसें मिळतांच उडूं लाग-

णारा मनुष्य. तु०—क्कां रे महारा उताणा, म्हणे हातीं दीड आणा.

दीड तोळा, पाव रती—अगदीं सूक्ष्मपणानें एखादी गोष्ट सांगणें.

दीड दाणा, कोष्टी उताणा—कोष्टी लोक थोडा पैसा जवळ असला म्हणजे आळशी बनतात. ' दीड आणा बाबू उताणा ' पहा. घरांत दीड दाणा शिल्लक आहे म्हणून उताणा पडून झोंप घेणारा, कामास हात न लावणारा. तु०—कोंग म्हारणी उताणी, शिंगट भरलें दाण्यांनीं.

दीड पाव वेणी आणि तीन पाव गंगावन—'मिया मूठभर, दाढी हातभर' याप्रमाणें.

दीड बुटली, उरीं फुटली—दीड बुटली तेल सांडल्या-बद्दल उरीं फुटणें. थोडेसें क्षुल्लक नुकसान झाल्याबरोबर अतिशय शोक करून आकाश पाताळ एक करणें.

दीड हळकुंडांत दिपवाळी—थोड्याशा मोठेपणानें हुरळून जाणारा. तु०—अर्ध्या हळकुंडानें पिवळी होणारी.

दीन दुनिया——दीन दुनिया खात्रींत नसणें—चढून जाणें; अगदीं बेपर्वा असणें; मगरूर होणें; गर्विष्ठ होणें. 'या पानपतच्या प्रसंगापूर्वी मराठ्यांना दीनदुनिया खात्रींत नव्हती. '—पामो ३८०.

दीप——दीपाबले पक्कुट; दिव्यावैलें पिसोळें—(गो.) दिव्याभोंवतीं घिरट्या घालणारा पतंग. बळेंच मृत्यु ओढवून घेणारा.

❀ दीप जळे विघ्न पळे, पूण ज्याचें सरे त्यास कळे—(गो.) बरें केल्यास बरें होतें पण तें करतांना भोगावा लागणारा त्रास, श्रम ज्याचे त्यालाच ठाऊक. [एकदां एक मनुष्य एकाकडे पाहुणा गेला असतांना सायंकाळीं ओटीवर समई लावून ठेवण्यांत आली. तिच्या एका नाकांत वात तेवत होती. त्या पाहुण्यानें जवळची चिंधी फाडून सर्व नाकांत वाती घातल्या व पेटविल्या. यजमानानें असें करण्याचें कारण विचारतांच, ' दीप जळे विघ्न पळे ' असें त्यानें उत्तर दिलें. तेव्हां यजमानानें प्रत्युत्तर केलें कीं, ' ज्याचें सरे त्यास कळे, ' व सर्व वाती विझवून टाकल्या !] ज्याचें जळे त्याला कळे पहा.

दिपापोटीं काजळ—दिव्यापोटीं० पहा.

दीपाचिया अंगसंगा । कोण सुख आहे पतंगा ॥—दिवा जरी तेजस्वी असला तरी त्याचा अंगसंग पतंगानें केल्यास तो जळून मरेल. तेव्हां चांगली गोष्ट झाली तरी तिचा योग्य उपभोग योग्य तऱ्हेनें व योग्य त्यांनींच घेतला पाहिजे. इतरांस ती घातक होण्याचा संभव असतो.—तुगा.

दीर्घ——दीर्घलिंगी दरिद्राणां—जननेंद्रिय दीर्घ असलेला मनुष्य दरिद्री असतो, असें फलज्योतिषांत पुरुषांच्या लक्षणांत सांगितलें आहे.

दीक्षा——दीक्षा देणें—१ धर्मांत, पंथांत सामील करून घेणें. 'आमच्यांत जशीं बाहुल्याबाहुलींचीं लग्नें होतात तशीं लोकांच्या अज्ञानाचा, धर्मभोळेपणाचा फायदा घेऊन गाळण्यांत चिल्ल्यापिल्ल्यांना धर्मदीक्षा किंवा पंथदीक्षा देण्यांत येते.'—गांगा १३५. २ एखाद्या कामाची, व्यवसायाची संथा देणें, त्यांत प्रवेश करून देणें.

दुई——दुई असणें—द्वैत असणें; फूट पडणें; भेद असणें. 'दुई नसते तेव्हां कोठेंच पेंच पडत नाहीं.—पया १७८.

दुकर——डुकर पहा. दुकर धुयत तितलो चिखलांत लोळत—(गो.) जों जों डुकराला धुवावें तों तों तो चिखलांत लोळतो.

दुकान——दुकान घालणें-स्थापणें-रचणें मांडणें—१ (अक्षरशः) पदार्थांच्या विक्रीसाठीं मांडामांड करणें. २ (ल.) (एखाद्या स्त्रीनें) प्रसिद्धपणें द्रव्य घेऊन व्यभिचार करूं लागणें; कसबिणीचा धंदा करूं लागणें; अनाचारानें वागणें. 'भरबाजारीं उघडउघड जी बसली दुकान मांडोनी । जनलज्जेचें, मनलज्जेचें वसन अंगचें फेडोनी ।'—मनोविजय.

दुकानदारी फैलावणें—(गोसावी, वेश्या इ. नीं) अनेकांना आपल्या जाळ्यांत गुरफटविणें. व्यापार वाढविणें.

दुकान पसरणें—पसारा मांडणें. 'रे ! काय दवाग्निपुढें पसरूनि दुकान कानन रहातें ।'—मो उद्योग १३.१०८.

दुकान मोडणें—दुकान बंद करणें; धंदा, व्यापार इ. पासून निवृत्त होणें.

दुकान वाढणें—(एखाद्याची) गिऱ्हाईकी वाढणें; धंदा व्यापार भरभराटीस येणें.

❀ दुकान चांगलें संभाळ, तेणें होईल उदयकाळ—दुकान काळजीपूर्वक चालविलें असतां धनप्राप्ति होते. व्यापारांत चांगलें लक्ष्य घातलें असतां भरभराट झाल्यावांचून राहात नाहीं.

दुकाळ——दुकाळांत तेरावा महिना—ज्या वर्षी दुष्काळ पडावा त्याचवर्षी अधिक महिना यावा. आधींची

अडचण असतांना त्यांत आणखी भर पडणें. (गु.) दुकालमां अधीकमास. दुकालमां तेरमो महीनो.

दुकाळांत मिष्टान्न—दुष्काळ पडला असतां जाडेंभरडें अन्न मिळणेंहि कठिण असतें, मग गोडधोड कोठून मिळणार? पण तें जर मिळालें तर केवढें भाग्य. आपत्काळीं लाभ. 'दुकाळियास मिष्टान्न मिळतें तसें जहालें. '–भाव १८.

दुकाळीं माळी, सुकाळीं साळी—दुष्काळ पडला असतां माळी कसेंबसें पाणी घालून झाडें जगवून किंवा कांहीं तरी पीक काढून महागाईचा फायदा घेऊन गबर होतो व सुकाळ पडला असतां लोक पुष्कळ तऱ्हेतऱ्हेचे कपडे विकत घेतात व त्यामुळें साळी गबर होतो.

दुःख——दुःख घोटणें–-दुःख करणें; शोक करणें; आक्रोश करणें; विलाप करणें; पुन्हां पुन्हां आठवण करून रडणें. ' बोलतां असें दुःख घोटिती ! '–-कीर्तन १·२७.

दुःख चतुष्टय—१ सहज, २ दोषज, ३ आगुंतुक व ४ अंतरंगज. १ सहज–-क्षुधातृषादि शारीरिक विकारापासून पीडा. २ दोषज–-वात, पित्त, कफ यापासूनची पीडा. ३ आगंतुक–-वारा, पाऊस, ऊन व थंडी यापासूनची पीडा. ४ अंतरंगज–-धिक्कार, अपमान, चिंता इत्यादि पासूनची पीडा. —पामो ५१५.

दुःख पाहून डाग देणें—१ दुःखाचें बीज शोधून तेवढ्याच जागीं इलाज करणें; रोगाच्या ठिकाणीं लास देणें. २ ज्या मानानें अपराध असेल त्याच मानानें शिक्षा करणें; जरूर तेवढें शासन करणें.

दुःख मानणें–(एखाद्या गोष्टीबद्दल) वाईट वाटणें; विषाद, खेद मानणें; शोक करणें; खिन्न होणें; खट्टू होणें.

दुःख वेशीस बांधणें–-टांगणें–-(गांवच्या वेशीला बांधलेली वस्तु सर्वांस दिसते यावरून) आपलें दुःख, अडचण सर्वांना कळविणें; आपलें संकट, त्रास, पीडा लोकांमध्यें जाहीर करणें; त्याचा सर्वत्र बोभाटा करणें, बभ्रा करणें.

दुःखाचा–दुःखी प्राणी—ज्याला जन्मभर संकटें व व दुःखें सोसावीं लागलीं असा मनुष्य; जन्मांतहि सुखाचें वारें न मिळालेला मनुष्य; ज्यावर एकामागून एक दुर्दैवाचे घाले आले असा मनुष्य; जन्मांतहि सुखाचें वारें न मिळालेला मनुष्य. याच्या उलट ऐश्वर्याचा प्राणी.

दुःखाचा वांटा–-कपाळीं, वांट्यास आलेलें दुःख, भोग; खडतर दुर्भाग्य.

दुःखाचा वांटा उचलणें–-(एखाद्याच्या) दुःखांत वांटेकरी होणें; सहभागी होणें; सहानुभूति दाखविणें.

दुःखाचा वांटेली–विभागी–-(प्रत्यक्ष, सहानुभूतीनें एखाद्याच्या) दुःखाचा वांटेकरी झालेला; समदुःखी.

दुःखाचे डोंगर–पर्वत—अतिशय दुःख; दुःखाचा कळस. ' दुःखाचे पर्वत झाले. '–ख २७८१.

दुःखावर डाग–डागण्या देणें–फासळ्या घालणें–फासळ्या टाकणें–-दैववशात् दुःख पावलेल्या मनुष्यास मर्मभेदक भाषणानें आणखी दुःख देणें; जखमेवर मीठ घालणें, चोळणें; दुखावलेल्या अंतःकरणास आणखी टोंचून बोलून दुखाविणें.

दुःखें पापें—अतिशय कष्ट व त्रास सोसून; मोठ्या प्रयासानें; अत्यंत हाल सोसून.

❀ **दुःखें अग्नीपरी, झांकतां वाढे भारी**—आपलें दुःख (दुखणें, रोग) झांकून ठेवण्यापेक्षां तें योग्य माणसास दाखवून त्यावर इलाज करून बरें करणें चांगलें; तसें न केल्यास तें बळावतें व शेवटीं त्रासदायक होतें.

दुःखं दुःखानुबंधि—(विक्रमोर्वशीयम् ४.) एकदां दुःखें किंवा संकटें यावयास लागलीं म्हणजे तीं लागोपाठ येतात. तु०–छिद्रेष्वनर्था बहुली भवन्ति । Misfortunes never come singly.

दुःख धरून बसला, कर्ज न फिटे त्याचे बाला–-जो मनुष्य नेहमीं शोक करण्यांत वेळ घालवितो, प्रयत्न करीत नाहीं त्याचे हातून कर्जाची फेड कधीं होत नाहीं. Sorrow will pay no debt.

दुःख पाहून डाग द्यावा–-जेथें दुखणें असले तेथें डाग द्यावा म्हणजे तें बरें होतें. रोग असेल त्याची परीक्षा करून त्यावर उपाय करावा. जो दोष असेल तो शोधून काढून त्याचा निरास करावा. वर वाक्प्रचार पहा.

दुःख वेशीला बांधावें—आपणास होणाऱ्या पीडेची वार्ता अनेकांस दिली तर कोणीतरी त्यावर उपाय सुचवितो. मनांतच ठेवल्यास तिचें निवारण होत नाहीं.

दुःख शोका वाद्य गान, चित्तास वाटे समाधान—मनाला दुःख किंवा शोक झाला असतां, वाद्य किंवा गायन ऐकण्यानें मनाला विरंगुळा पडतो. मधुर गायन वादन ऐकिल्यानें शोकाचा परिहार होतो.

दुःख सांगावें मना, सुख सांगावें जना—आपणांस पीडा होत असेल तर ती आपली आपण भोगावी, लोकांस सांगून त्यास त्रास देऊं नये. पण आपली भरभराट होत असेल तर ती ऐकून दुसऱ्यास आनंद होत असेल तर तो अवश्य होऊं द्यावा.

दुःख सांगे दुख्याक, सुख सांगे सुख्याक—(गो.) दुःखी माणसाला आपलें दुःख सांगावें व सुखी माणसाला आपलें सुख सांगावें. उलट करूं नये.

दुःखाअंतीं वैद्य—१ दुखणें (रोग) झाल्यास वैद्याकडे जावें. २ दुखणें बरें व्हावयाची वेळ आली म्हणजे वैद्याची गांठ पडते.

दुःखाअंतीं सुख--प्रथम दुःख किंवा कष्ट भोगल्यावर सुख मिळतें व तसें झाल्यास वाईट नाहीं. तु०—All is well that ends well.

दुःखाची सत्ता मनुष्यावर, मनुष्याची नाहीं दुःखावर--दुःख झालें असतां मनुष्य त्याच्या आहारीं जातो. तें कांहीं मनुष्याच्या आहारी नसतें.–सवि २३४५.

दुःखाची स्वारी येती, जिवा पुरेवाट होती—संकट आलें असतां मनुष्य लवकरच अगदीं हैराण होतो. –सवि ३१०३.

दुःखाच्या गळ्यांत किंकाळीचा ढोल--दुःखी माणूस किंकाळत असतो तेव्हां म्हणतात.

दुःखांत सुख--मनुष्य संकटांत असला म्हणजे एखादीहि चांगली गोष्ट झाली असतां तीपासून त्यास आनंद होऊन थोडें तरी दुःख हलकें होतें.

दुःखावरचे डाग निघत नाहींत—अंगास इजा झाली असतां ज्याप्रमाणें पडलेले वण कधीं बुजत नाहींत त्याप्रमाणें मनुष्य आधींच दुःखानें पोळला असतां त्यास कटु शब्दांनीं दुखविल्यास ते शब्द तो कधींहि विसरणार नाहीं.

दुःखीं आठवे राम, सुखीं बातांचें काम—मनुष्याचे दिवस मजेंत जात असले म्हणजे तो गप्पा मारण्यांत काळ घालवतो पण तोच संकटांत सांपडला म्हणजे मग परमेश्वराची आळवणी करूं लागतो.

दुखणाईत——**दुखणाइतास पाहावें, चांगलें बोलावें**–आजारी मनुष्यास भेटावयास जावें व अशा मनुष्या बरोबर नेहमीं त्याला बरें वाटेल असें बोलावें. त्याचें मन दुखावेल किंवा त्याचा चित्तक्षोभ होईल असें कधीं बोलूं नये.

दुखणें——**दुखणें काढणें**–१ दुखण्याची व्यथा सहन करणें; रोगापासून होणारी पीडा निमूटपणें सहन करणें. 'दुखणें काढावें पोरांनीं आणि भूक काढावी गुरांनीं.' २ एखाद्याच्या आजारांत रोग्याची शुश्रूषा करणें; दुखण्यांत मदत करणें.

दुखणें घेणें--१ आजारी होणें; दुखणाईत होणें; रोगग्रस्त होणें. २ आजारी असल्याचें ढोंग करणें; बळेंनें दुखणें आणणें; रोगाची बतावणी करणें.

दुखण्याची सोबत करणें—(बायकी) आजारी पडणें. 'तूं अशी सारखी हायहाय करीत बसशील तर दुखण्याची सोबत करून घेशील.'

दुखण्याचें अंग असणें—अंगांत आजाराचा थोडा-फार अवशेष असणें; आजार पूर्णपणें बरा झालेला नसणें; नुकतेंच आजारांतून उठलेलें असणें; रोगाची छाया असणें.

दुखण्यानें–दुखण्यास पडणें—आजारी होणें; अंथरूण धरणें; रोगग्रस्त होणें.

❀ **दुखणें आणि वाईट हवा न बोलावतां येतात**–आजारी पडणें व वाईट हवा पडणें या गोष्टी नको असतां आकस्मिकपणेंच येतात.

दुखणें आलें जोराबर, कांदाभाकर उराबर—१ अनेक रोगांवर कांदा हा उपकारक ठरतो. कुणबी लोकांत कांदा हें दुखण्यावर औषध मानतात.–मॅन ९०९. २ एकीकडे म्हणावयाचें दुखण्याचा जोर वाढत आहे म्हणून व एकीकडे सारखे भाकरीशीं कांदे खावयाचे, याप्रमाणें विसंगत खादाडपणाचें वर्तन.

दुखणें आलें जोरावर, पथ्य गेलें शेरावर—एकीकडे म्हणावयाचें दुखण्याचा जोर वाढत आहे म्हणून व एकीकडे आवडते पथ्याचे पदार्थ मात्र 'शेरावारी' खावयाचे.

दुखणें कधीं नाहीं माहीत, तो मरतो पहिल्या दुखण्यांत—ज्या मनुष्याला दुखणें काढावयाची संवय नसते किंवा जो सहसा आजारी पडत नाहीं त्याला एखादा आजार झाल्यास तो अतिशय हैराण होतो व कदाचित् मरणापर्यंत पाळी येते. प्लेगसारखे कांहीं सांथीचे रोग तरुण व निरोगी मनुष्यासच फार तीव्र स्वरूपांत होऊन त्यांत त्यांचा अंत होतो.—सवि १६०१.

दुखणें काढावें पोरांनीं, आणि भूक काढावी गुरांनीं—लहान मुलें आजारी पडलीं असतां फारसा त्रागा हळवेपणा नकरतां निमूटपणें दुखणें सहन करतात व निपचीत पडून असतात. मोठीं माणसें नेहमीं कण्हतात, कुंथतात, आरडाओरड करतात. तसेंच गुरांस खावयास मिळालें नाहीं तरी बिचारीं निमूटपणें उपास काढतात.

दुखणें दिवा पाहून येतें न् फडा पाहून जातें--(व.) दिवा संध्याकाळ झाल्याचा निदर्शक आहे. व फडा किंवा केरसुणीं झाडण्याचें साधन; यास्तव फडा दिवसाचे कामास सुरवात झाल्याचें निदर्शक आहे. संध्याकाळ झाली कीं

येतें व दिवस निघाला कीं पळतें, अशा प्रकारचें दुखणें दिवसभर काम करणें आवश्यक असल्यामुळें आजाराला फुरसत सांपडत नाहीं. पण रात्र झाली कीं फुरसतीमुळें आजाराचा अंमल बसतो. मजूर, कष्टाळू किंवा गरीब माणसें यांचें दुखणें असेंच असते. त्यांना दिवसां पडून राहातां येत नाहीं. ' आमच्या आईच्या दुखण्याला कांहीं औषध लागत नाहीं; तें रोज दिवा पाहून येतें व फडा पाहून जातें. '

दुखणें महागाईचें, औषध काडीचें (कवडीचें)– अतिशय मोठा रोगहि एखाद्या क्षुल्लक औषधानें, कारणानें बरा होतो.

दुखणें येतां चैन नाहीं, समाधानीं न कळे कांहीं—जोपर्यंत मनुष्य आजारी पडत नाहीं तोंपर्यंत त्यास आरोग्य जाणवत नाहीं. पण आजारी पडल्यावरोबर मात्र दुखणें तेवढें जाणवतें. Sickness is felt, but health not at all.—सवि ३०४.

दुखणें वाईट संसारीं, स्त्री होई म्हातारी––एखाद्या स्त्रीस दुखणें आलें असतां किंवा तिला घरांतलीं दुखणीं काढावीं लागतात म्हणून ती अगदीं वृद्ध दिसूं लागते. याकरितां संसारांत कोणी आजारी पडणें फार वाईट.

दुखणें वाटे बरवें, उपाय सहन न करवें––कांहीं कांहीं प्रसंगीं रोगावर करावयाचे उपचार इतके भयंकर असतात कीं त्यापेक्षां तो रोग सहन करणेंच बरें असें वाटतें. The remedy is worse than the disease. —Scotch.—सवि ३५२३.

दुखणें वेशीला टांगावें––दुःख पहा.

दुखणें वेशीवर बांधावें आणि पोटासाठीं रांधावें- आपणास एखादा त्रास होत असेल तर त्याची लागलीच वाच्यता करून तो निवारण करून घ्यावा व आपणास भूक लागली असेल तर आपणच स्वयंपाक केला पाहिजे; दुसऱ्यावर अवलंबून राहूं नये.

दुखणें हत्तीच्या पायीं येतें आणि मुंगीच्या पायीं जातें—दुखणें येतांना एकदम जलद येतें व फार जोरदार असतें पण त्यांतून मनुष्य बरें व्हावयास फार दिवस लागतात व तें फार हळूहळू बरें होतें. Misfortunes come on wings and depart on foot.

देणें आणि दुखणें हीं कोणासहि आवडत नाहींत (चुकत नाहींत)—मनुष्याला कर्ज असणें व रोग होणें या दोन्हीं गोष्टी अप्रिय असतात. पण त्या चुकत नाहींत. कोणी आपलें घेणें उगवावयास आला म्हणजे जसें आपणांस बरें वाटत नाहीं त्याप्रमाणें आजारी पडणेंहि बरें वाटत नाहीं; पण या गोष्टी हटकून घडतातच, असा अनुभव आहे.

दुखण्याची पारख करा, पथींचें (पथ्याचें) गाडगें चौघांनीं धरा—रोग्याची नीट परीक्षा करून औषधोपचार करवावा. पथ्याचें नीट सांभाळावें. (?)

दुखणें——दुखतें पोट, म्हणे कवाड लोट—साधें पोट दुखत असतां, प्रसूतिसमय आला असें समजणें व तरतूद करण्यास लागणें. (?)

दुगाणी——दुगाणी रोकडी, चूत कां बांकडी ?—(अशिष्ट) रोख पैसे दिल्यावर माल किंवा मोबदला बरोबर पाहिजे. त्यांत कुचरपणा चालणार नाहीं.

दुगाणीचा मुळा आणि तीन पैसे हेल––अर्ध्या पैशाच्या वस्तूला तीन पैसे हमाली. क्षुल्लक गोष्टीसाठीं अवाच्या सवा खर्च. तु०–अडक्याची भवानी नि सापिक्याचा शेंदूर, वगैरे.

दुग्ध——दुग्धं पश्यति माजारः परं न लगुडाहतिम् ।—मांजराला दूध तेवढें दिसतें बडगा दिसत नाहीं. एखाद्या गोष्टीपासून मिळणारा लाभ तेवढा लक्ष्यांत येतो परंतु ती प्राप्त करून घेण्याच्या कामीं येणाऱ्या विघ्नांचा किंवा त्यानंतर होणाऱ्या परिणामांचा मनुष्य विचार करीत नाहीं. तु०––घी देखा पर बडगा नहिं देखा. गुलाबाला कांटे असतात.

दुग्धानें तो अग्नि विझवोनी पाहे—भलत्याच साधनांनीं भलतीच गोष्ट करूं पाहणें.–सप्र २·१२७.

दुग्धें न्हाणिला वायस, तरी कां होईल राजहंस—कावळ्याला दुधानें न्हाऊं घातला तर तो राजहंसासारखा (पांढरा) होईल काय ? कधींहि नाहीं. व्यर्थ श्रम.––शाब १·१११.

दुघाड——दुघाड भरणें––(ग्रा.) अतिशय श्रम केल्यामुळें अंग दुखूं लागणें.

दुजा——दुजा आपणाहून दुःखी, पाहून स्वतःस मान सुखी––जगामध्यें जे लोक आपणांपेक्षांहि अधिक दुःखी असतील त्यांचेकडे पाहून स्वतःची स्थिति त्यापेक्षां बरी आहे म्हणून समाधान मानून राहावें.

दुजाची पत राख, तो ठेवील तुझी साख––वेळेवर आपण जर दुसऱ्याची अब्रू संभाळली तर तोहि आपल्या वेळेवर उपयोगी पडेल.

दुजाचें घेऊं पाहती, शेवटीं आपलेंहि घालविती--जो मनुष्य दुसऱ्याचें अन्यायानें बळकावयास बघतो तो शेवटीं स्वतःचेंहि घालवून बसतो. बहुधा कोर्ट कचेरीमध्यें तंटे करणाऱ्यांस हा अनुभव येतो.

दुटप्पी——दुटप्पी भाषण अवघड, केवळ लबाडीचें भांडण—संदिग्ध अथवा द्व्यर्थी बोलून एखाद्याजवळ तंटा करीत राहाणें ही केवळ लबाडी आहे.

दुट्टा——दुट्टा लावणें—पिच्छा पुरविणें: तगादा करणें; लकडा लावणें; टुमणें लावणें. दट्टा पहा.

दुडु–डु——दुडु आशिल्याक सोयरे चड–(गो.) ज्याच्यापाशीं पैसा असतो त्याच्यापाशीं गोतावळा फार.

दुडु आशिल्यार गुडो हालवयेद--(गो.) पैसा असला तर पर्वतसुद्धां हालवतां येईल.

दुडु आसल्यारि भय, गेल्यारि बेजार—(गो.) पैसा असला तर भीति आणि नसला तर कष्ट.

दुडु आसा तॅन्नां केळ्यीं सवाय, ना तॅन्नां म्हारग--(गो.) पैसे असतील तेव्हां केळीं स्वस्त आणि नसतील तेव्हां महाग. खिशांत पैसे खुळखुळत असले तर महाग वस्तु सुद्धां स्वस्त वाटते. नसले कीं स्वस्त असली तरी ती घेणें अशक्य असतें.

दुडु आसा थीं कॅस्तांव आसा--(गो.) पैसा आहे तेथें भांडणतंटे असायचेच.

दुडु करता सगळे काम, लोक करता माका सलाम--(गो.) पैसा असला कीं सगळीं कामें होतात आणि सगळे लोक हात जोडतात.

दुडु दवरि बांधुनु घालुनु, तो वता सुटुनु धेवनु–(गो.) पैशाला कितीहि घट्ट बांधून ठेवा, तो सुटून पळतोच.

दुडु दिवनु चाबूच्या सुण्याक काणु धेवप; दुडु दिवन चाबण्या सुण्याक विकतें घेवप--(गो.) पैसे देऊन चावरा कुत्रा विकत घेणें. विकत श्राद्ध.

दुडु दिवप, सोरो पिवप—(गो.) प्रथम पैसे मोजून दारू प्यावी. रोखीचा व्यवहार करणें.

दुडु नासिल्ल्यांत तारीर पहिलीच बसूंक जाय--(गो) पैसा जवळ नसल्यास तरीवर पहिल्यानेंच बसावें. गरीब माणसांनीं आधींच कामाला लागलेलें बरें.

दुडु नासून पापी--(गो.) पैसे नसल्यामुळें पापी ठरणें, किंमत कमी होणें; दारिद्र्यामुळें अपमान होणें. तु०-Poverty is a sin.

दुडु वोखदाक पडप--अन्यायानें मिळविलेला पैसा दुखणीं इ. तच खर्च होतो; त्यापासून सुख मिळत नाहीं. तु०--अगापाचा माल गपापा.

दुडु सगळे वाटेने व्हरता, स्वर्गा वाट मात्र चुकता–(गो.) पैसा सगळ्या वाटांनीं नेतो, स्वर्गाची वाट मात्र चुकतो. पैशाचा बहुधा सद्व्यय होत नाहीं अशा अर्थानें म्हणतात.

दुडवा आशेन कॉणँ खीं लॅण गिळिहँ--(गो.) द्रव्याच्या लोभानें म्हणे कोणीतरी लेंड (विष्ठा) गिळलें होतें.

दुडवा मोल उसणें घेतिल्याक गोत्तु--(गो.) पैशाची किंमत उसनें घेणाऱ्याला समजतें.

दुडुवाक फातोरसुद्धां तोंड आ करता--(गो.) पैशासाठीं दगडसुद्धां तोंड उघडतो.

दुडवांचे आशेक गोड विकून गोणी ल्हेवता--(गो.) पैशाच्या आशेनें गूळ विकून मग त्याचीं गोतीं (गोणपाटें) चाटतो. स्वतः पैशाचा उपभोग न घेणारा.

दुणा——आळशास दुणें काम आणि कृपणास दुणा खर्च--एखादें काम आळसानें बरोबर न केल्यास तें पुन्हां करावें लागतें व एखाद्या कामांत गैरवाजवी काटकसर केल्यास तें नीट न होऊन पुन्हां खर्च करावा लागतो. यामुळें पहिल्यास दुप्पट काम व दुसऱ्यास दुप्पट खर्च करावा लागतो. याकरितां कोणतेंहि काम करतांना योग्य ते श्रम व खर्च केला पाहिजे. आळशी पहा.

दुण्या कामीं दुप्पट राबे अन् चवली तिथें पावली लागे--(वाय.) अव्यवस्थित कारभारांत दुप्पट श्रम आणि पैसा खर्च होतो.

दुद्धेवाली——दुद्धेवाली गुर्बा–उधुका–बुल्ली; जुदेवाली गुलाबा--उदका–बुल्ली—(गो.) ज्यूची गुलाब पाण्याची बाटली. [एका ज्यू गुरूनें आपल्या शिष्यांना आपल्याला गुरु–दक्षिणा म्हणून एकेक गुलाब पाण्याची बाटली आणण्यास सांगितलें. प्रत्येकाला वाटलें, बाकीचे सर्व गुलाब पाण्याच्या बाटल्या आणतीलच तेव्हां आपण नुसती पाण्याची बाटली नेल्यास कोणाला ओळखणार नाहीं. याचा

परिणाम असा झाला कीं, प्रत्येकानेंच पाण्याची बाटली आणली व गुरूला नुसतें पाणी मिळालें !] अशाच अर्थाची दुसरी म्हण—दुसरे दूद घालतले म्हूण आपणें उदक घाल्यारि भाणांत दूद एकोटूत वे ? म्हणजे दुसरें दूध घालतील म्हणून आपण पाणी घातलें तर हंड्यांत दुधाचा थेंब सुद्धां पडणार नाहीं !

दुनिया——दुनिया झुकती आहे पण झुकविणारा पाहिजे—नादीं लागणारे, भुलणारे लोक जगांत पुष्कळ आहेत पण त्यांना नादीं लावणारा भेटला पाहिजे. (हिं.) दुनिया झुकती है झुकानेवाला चाहिये.––शाव २·२६४.

दुनिया दुलंगी आहे-लोक दुतोंडे असतात; दुरंगी दुनिया.

धनावांचून दुनिया पंगू––पैशावांचून जगांत चालत नाहीं; जगामध्यें पैशासाठीं सर्व अडतें; पैशाशिवाय एक पाऊल पुढें टाकतां येत नाहीं. 'निर्धनः परिभूयते।'–सुर६४·४

दुनयाभर जी अक्कल, ती नाहीं एकाजवळ—सर्व जगांतील शहाणपण कोणाहि एकस्थाच्या अंगीं असणें शक्य नाहीं. कोणाहि मनुष्यानें आपणास सर्वज्ञ समजूं नये. कांहीं बाबतींत इतर लोक त्यापेक्षां शहाणे असण्याचा संभव आहे.

दुनया भुकी मरती है, घी–शक्कर क्यौं नही खाती––धान्य न मिळाल्यामुळें उपाशी मरणारे लोक उपाशी कां मरतात, ते तूपसाखर कां खात नाहींत ? असें विचारणाऱ्या मनुष्यास एवढेंहि कळत नाहीं कीं, ज्यास साधें धान्य मिळत नाहीं त्यास तूपसाखर कोठून मिळणार.

दुनया है, और खुशामद है–जगामध्यें खुशामती लोक सर्वत्र आढळतातच. जग आहे तोंपर्यंत खुशामत चालणार.

दुपार——दुपारची सावली––अल्पकाळ टिकणारी गोष्ट. क्षणभंगुरता दाखविण्यासाठीं योजतात. दोन प्रहरीं सूर्य अगदीं डोक्यावर आला म्हणजे झाडाची सावली त्याच्या बुंधाशींच पडते; तिचा दुसऱ्या कोणास उपयोग होत नाहीं. त्याप्रमाणें वेळीं व फार वेळ न उपयोगी पडणारी गोष्ट.

दुपित——दुपित धेन्वा सोडायची अन् जळत गाढव हातीं धरायचें—(वांय) [दुपित=दुभती] जवळचें चांगलें टाकून वाईट कां घ्या ! पाठभेद––दुपित धेन्वा सोडायची अन् झवतं गाढव हातीं धरायचें.

दुप्पट——दुप्पट अवसानें भरला––एखाद्या गोष्टीमुळें मनुष्यास चेव आला म्हणजे त्याचें धैर्य किंवा बळ जणुं द्विगुणी होतें. अशा वेळीं म्हणतात.–संग्राम ५२.

❀ एकादशी, दुप्पट खाशी––एकादशी पहा.

दुबळा——दुबळा आणि खजेला––मनुष्य अशक्त असून चिडखोर असला म्हणजे त्याचे फार हाल होतात. अशक्त मनुष्यानें निदान चिडूं नये, गप्प बसावें. पण बहुतेक अशक्त मनुष्यें चिडखोर बनतात. (गु.) दुबली गाय पर मच्छर घणां.

दुबळा धनी, त्याच्या बायकोला कोण मानी––नवरा जर भेंगळा किंवा गरीब असेल तर त्याच्या बायकोला कोणी विचारणार नाहीं. करड्या, जबरदस्त नवऱ्यांच्या बायकांना नोकर वगैरे भितात.

दुबळी आई, कोरडी नई—आई अशक्त झाली असतां व नदी कोरडी पडली असतां दोन्हीहि निरुपयोगी होतात. त्यांना कोणी विचारीत नाहीं.

दुबळे देवाची दीपमाळ––१ म्हसोबासारख्या क्षुद्र देवापुढची ओबडधोबड दीपमाळ. ज्या देवाचें माहात्म्य फारसें नसतें त्याच्या दीपमाळेवर कोणी दिवा लावीत नाहीं. ज्याचें सामर्थ्य फार अशाच देवाची सर्व लोक भक्ति करतात. श्रीमंत ·नुष्याची सर्व लोक खुशामत करतात. पण गरीबास कोणी विचारीत नाहीं. २ (ल.) एखाद्या दरिद्री, पंगू नवऱ्याची तशीच बायको. ३ उंच, कुरूप माणूस.

दुबळ्या माणसाला बढाई बहूत––अशक्त मनुष्याच्या हातून प्रत्यक्ष कांहीं कृति होत नसल्यामुळें तो नुसता तोंडानेंच खूप बडबड करतो. तु०–सिद्धं ह्येतद्वाचि वीर्यं द्विजानाम्। बाह्वोर्वीर्यं यत्तु तत्क्षात्रियाणाम्।–उत्तरराम.

दुबळ्याक पर्वा ना, पिशाक न्हिद ना—(गो.) गरीबाला कांहीं काळजी नसते व वेड्याला, मूर्खाला झोंप नसते.

दुबळ्याक शेंटां भोव—(गो.) गरीबाच्या मागें लेंढार फार.

दुबळ्याची कळकळ आणि उथळ्याची खळखळ—दोन्ही फलश्रुतीच्या दृष्टीनें सारखींच. ज्याप्रमाणें दुर्बल मनुष्याच्या मनांत कितीहि सहानुभूति असली तरी तिचा कांहीं उपयोग होत नाहीं त्याप्रमाणें उथळ नदीच्या पाण्याच्या खळखळींतहि कांहीं अर्थ नसतो.–केसरी १२–७–३०.

दुबळ्याची मरूं नये बाईल, गिरेस्थीचा मरूं नये घोव—(गो.) गरीब माणसाची बायको मरूं नये व ब्राह्मण बाईचा नवरा मरूं नये. कारण अशा वेळीं दोघांचे फार हाल होतात.

दुबळ्यांच्या भुरग्यांची गोमटी लांब, गिरेस्तांच्या भुरग्यांची जीभ लांब—(गो.) गरीबाच्या मुलांची मान

लांव तर श्रीमंतांच्या मुलांची जीभ लांब. गरीबाचीं मुलें भिक्षेसाठीं जेथें तेथें डोकावतात तर श्रीमंतांचीं मुलें फार बडबडतात.

दुबळ्याला देववत नाहीं, फाटक्याला शिववत नाहीं—दुबळ्या मनुष्याला कितीहि मदत केली तरी ती पुरवत नाहीं; कारण त्याला स्वतःला कांहींच मिळविण्याचा पराक्रम नसतो. त्याप्रमाणें जें वस्त्र अगदीं जीर्ण होऊन चिंध्या चिंध्या झालें आहे त्याला शिवूं लागलें तरी दोरा राहात नाहीं.

दुबळ्याला द्यावें किती, फाटक्याला शिवावें किती ?—वरप्रमाणें.

दुभणें——**व्याही (जांवई) पाहुणा आला तरी रेडा दुभत नाहीं**—कितीहि निकडीची, आवश्यक गोष्ट असली तरी अशक्य शक्य कसें होणार ? बाप पाहुणा आला० असाहि पाठ आहे.

दुभती——**दुभती गाय सोडा आणि झंवता गाढव धरा**—दुपित पहा.

दुभती म्हैस देऊन मूढें गाढव कोण घेतो; दुभती म्हैस दऊन गाढव कोण घेतो ?—चांगली वस्तु देऊन निरुपयोगी वस्तु घेण्याचा आंतबट्ट्याचा व्यवहार कोण करील

दुभत्या गाईच्या (म्हशीच्या) लाथा गोड—गाय जरी लाथाळ असली, तरी ती दुधाळ आहे म्हणून माणूस तिला वागवून घेतो. लाभासाठीं माणूस दुसऱ्याचे दोष, तिरस्कार इ. सहन करतो. (हिं.) दुधेली गाय दो लाते भी भली.

दुम——**दुम करणें**--धूम ठोकणें; पळ काढणें. 'दुम करी तो शाहणा । पाठोवाटीं तयाच्या॥'—तुगा२३०.

दुमची——**दुमची उचलणें**—[दुमची=घोड्याच्या खोगीराची वादी, बंद; मागें शेपटाखालून घातलेली असते ती] शेपटीं वर करणें; अनेक कचाटें घालून एखाद्याची उचलबांगडी करणें; पळवून लावणें; घालवून देणें.

दुमची पुरवणें--(आपलें कार्य साधण्यासाठीं एखाद्याची) पाठ, पिच्छा पुरविणें; मागें लागणें; शेपूट धरून बसणें; तगादा लावणें.—मो ऋषिरामायण ३१.

दुमची सोडविणें--(एखाद्यास) नामोहरम करून पळ काढावयास लावणें; घालवून देणें. 'त्यांनीं आपले हिमतीनें कंदाहाराचा पातशहा दुराणी गिलच्या याची पगडी व दुमची सोडविली ते मर्यादा अजुनी चालते.'—भाब ९.

दुमच्या झाडणें—लाथा मारणें; दुगाण्या झाडणें (घोडा, गाढव वगैरेनीं).

दुमणी——**दुमणी मारणें**--(माण.) घोड्याला टांच मारणें; घोड्यास इशारा देणें; घोडा पिटाळणें.

दुमात्रा——**दुमात्रा काना कौ**--'क'ला दोन मात्रा व एक काना दिला म्हणजे त्याचा 'कौ' होतो. दोघे एकमेकांना तिसऱ्याबद्दल खुणा करतात, तेव्हां म्हणतात.

दुमाला——**दुमाला धरणें-धरून असणें**--(एखाद्या जवळ) आश्रयार्थ, रक्षणार्थ येऊन राहाणें; (एखाद्याला) चिकटून असणें; धरून राहणें; कच्छपीं असणें; पंखाखालीं असणें.

दुमाला पुरविणें--मदत देणें; साहाय्य करणें; पाठपुरावा करणें.

दुमाला सोडणें—(एखाद्यास दिलेला) आश्रय काढून घेणें; आपल्यापासून दूर करणें; संबंध सोडणें.

दुमल्यावर असणें--पाठपुरावा करीत असणें; साहाय्यक असणें; (एखाद्याच्या) पाठीशीं उत्तेजन, हुकूम, मदत देण्याकरितां असणें.—पाब १२.

दुमाल्यावर पाठविणें--(एखाद्याच्या) पाठलागाकरितां पाठविणें; मागें लावणें; तपासाकरितां धाडणें; शोध काढणें.

दुमाल्यास लावणें--खालीं लिहिणें; जोडणें; पुस्ती जोडणें; भर घालणें.

दुराचरण——**दुराचरण तेव्हांच जडतें**--मनुष्य सद्गुणापेक्षां दुर्गुण सहज उचलतो. चांगल्यापेक्षां वाईट बाबतींत लवकर अनुकरण होतें.

दुराचरणी माने खर्च—दुराचरणी मनुष्य वाटेल तसा खर्च करतो.

दुराही——**दुराही बांधून टाकणें**—एखाद्या घर वगैरे वस्तूचा उपयोग मना केलेला असल्यास तशा प्रकारची खूण त्या वस्तूवर बांधीत असत. यावरून हरकत घेणें; बंधन घालणें; सरकारी मनाईचें चिन्ह करणें; मना करणें; शपथ घालणें.

दुराही मोडणें--मनाई न जुमानणें; हरकतीचें उल्लंघन करणें; शपथ मोडणें; प्रतिबंध न जुमानणें.

दुरून——दूर पहा.

दुरेघी——दुरेघी मारणें—१ साल अखेरीस हिशेब पुरा झाल्याबद्दलची निशाणी करणें; एखाद्याचा खात्यावरील सर्व रकमांची हिशेब रुजवात पाहून त्याखालीं दुरेघी, दोन रेघा आडव्या मारतात. २ पुढील व्यवहार बंद ठेवणें-करणें. 'या पुढें त्याच्या नांवावर दुरेघी मारा.'

दुर्गुण——दुर्गुण आणि विपत्ति, आळसापासून उत्पत्ति–आळशी मनुष्य दुर्गुणी बनतो व पुढें दुःखी होतो.

दुर्गुण घाय, सद्गुण औषधोपाय—दुर्गुण हा एक रोग किंवा जखम असून त्यावर सद्गुण हें औषध अथवा उपाय आहे.

दुर्गुणापासून वाईट काम—दुर्गुणी मनुष्य नेहमीं वाईट कामें करीत असतो.

दुर्गुणी लपून चाले, सद्गुणाचा डौल घाली—दुर्गुणी मनुष्य सद्गुणी मनुष्याचा आव वरून आणून आंतून हळूच दुष्कृत्यें करतो.

दुर्गुण्यावर, विघ्नें येतीं वारंवार—जो मनुष्य दुर्गुणी असतो त्यावर नेहमीं संकटें येतात.

दुर्जन——दुर्जनं प्रथमं वंदे ।–दुष्ट मनुष्याला प्रथम नमस्कार करावा, कारण त्यापासून पीडा होण्याचा संभव असल्यामुळें त्यास प्रथम संतुष्ट करावें. सबंध श्लोक असाः—दुर्जनं प्रथमं वंदे सज्जनं तदनन्तरम् । मुखप्रक्षालनात्पूर्वं गुदप्रक्षालनं यथा ॥–सुर ५४.३४.

दुर्जनसंगापेक्षां एकांतवास बरा—दुष्ट मनुष्याबरोबर सहवास करण्यापेक्षां एकटें बसणें बरें.

दुर्जनं सज्जनं कर्तुमुपायो नहि भूतले ।—दुष्ट मनुष्याला सज्जन करण्याचा कोणताहि उपाय नाहीं. तु०—दुर्जनः सुजनीकर्तुं यत्नेनापि न शक्यते । संस्कारेणापि लशुनं कः सुगन्धीकरिष्यति ॥–सुर ५६.११४. दुर्जनः सुजनो न स्यादुपायानां शतैरपि । अपानं मृत्सहस्रेण धौतं चास्यं कथं भवेत् ।–सुर ५४.३५.

दुर्जनस्य च सर्पस्य वरं सर्पो न दुर्जनः—दुष्ट मनुष्य व सर्प यांची तुलना केली असतां दुष्ट मनुष्यापेक्षां सर्प बरा असें वाटूं लागतें. सर्पदुर्जनयोर्मध्ये वरं सर्पो न दुर्जनः । सर्पो दशति कालेन दुर्जनस्तु पदेपदे ॥—सुर ५४.३०.

दुर्जनाचा संग, सौख्याचा भंग—दुष्टाची संगति केली असतां सुखाचा नाश होतो.

दुर्जनास्तव देशत्याग, सज्जनांचें सांनिध्य माग—दुष्ट मनुष्याची संगति टाळण्याकरितां देश सुद्धां सोडून जावें व सज्जनांची संगति करण्याचा प्रयत्न करावा. तु०—शकटं पञ्चहस्तेन दशहस्तेन वाजिनम् । गजं हस्तसहस्रेण देश त्यागेन दुर्जनम् ॥—समपद्य ३१.

दुर्दशा——दुर्दशा उडून येती, जातांना चालत जाती—संकट येतांना एकदम येतें पण निवारण होण्यास दीर्घ काळ लागतो. तु०–दुखणें हत्तीच्या पायानें येतें व मुंगीच्या पायानें जातें. Misfortunes come on wings and depart on foot.

दुर्दशा जाती, दैवदशा येती—दुर्दैवाचे दिवस संपल्यानंतर भाग्याचे दिवस येतात.

दुर्दैव——दुर्दैव पुढें उभें राहणें—नशीबीं असलेलें संकट ओढवणें. 'परंतु लग्नाच्या सोळाव्या दिवशींच तिचें दुर्दैव तिच्यापुढें उभें राहिलें.'—एकच प्याला १.१.

दुर्दैवानें दुःख मोठें, निराशेनें अधिक वाटे—एखादें संकट आलें असतां आपणास दैव अनुकूल नसेल तर त्यापासून फार त्रास होतो. व त्यांत आणखी निराश झाल्यास तें सहन करणें फारच कठिण जातें.

दुर्दैवानें बाप फसला, तें पाहून मुलगा सुधारला—एखादा मनुष्य संकटांत व आपत्तींत सांपडून जर बुडाला व त्याच्या मुलानें जर त्यापासून बोध घेतला, तर त्या अनुभवाचा फायदा त्यास मिळून, त्याला त्यांतून मार्ग काढतां येतो.

दुर्बळ——दुर्बळा पॉरा पोमुर्पें फॅस्त खंचें ?-(गो.) गरीबाच्या पोराला पोंबुर्पे गांवची जत्रा कुठून पाहायला मिळणार. अटोक्या बाहेरची गोष्ट.

दुर्मंत्री——दुर्मंत्री राज्यनाशाय—राज्यास जर वाईट मंत्री मिळेल तर त्याचा नाश होतो. सबंध श्लोक असाः—दुर्मंत्री राज्यनाशाय ग्रामनाशाय कुञ्जरः । श्यालको गृहनाशाय सर्वनाशाय मातुलः ॥–सुर१५६-१३७. तु०–दौर्मन्त्र्यान्नृपतिर्विनश्यति यतिः संगात्सुतो लालनात् । विप्रोऽनध्ययनात्कुलं कुतनयाच्छीलं खलोपासनात् । ह्रीर्मद्यादनवेक्षणादपि कृषिः स्नेहः प्रवासाश्रयात् । मैत्री चाप्रणयात्समृद्धिरनयात्त्यागात्प्रमादाद्धनम् ॥–सुर १७८.१०१०.

दुर्योधन——दुर्योधन कृष्णाच्या उशाशीं, आणि अर्जुन बसे पायापाशीं—कौरवपांडवांचें युद्ध होण्याचें निश्चित झाल्यावर दुर्योधन व अर्जुन हे दोघेहि कृष्णाकडे त्याचें साहाय्य मागावयास गेले. त्या वेळीं दुर्योधन प्रथम गेला तेव्हां कृष्ण पलंगावर निजला होता. याकरितां तो त्याचेजवळ पण ऐटीनें उशाच्या बाजूला बसला. अर्जुन

नंतर आला पण तो नम्रपणें त्याच्या पायथ्याशीं बसला. त्यामुळें कृष्ण उठल्यावर त्यास प्रथम अर्जुन दिसला व नंतर दुर्योधन दिसला. त्यामुळें अर्जुनाचें मागणें त्यानें त्यास प्रथम दिलें व नंतर दुर्योधनाचें म्हणणें ऐकलें. यांत अर्जुनानें पायांशीं बसण्यांत लीनता दाखविली व दुर्योधनानें पायाशीं न बसतां उशाशीं बसण्यांत आढ्यता दाखविली. यामुळें अर्जुनाचें काम चांगलें झालें तसें दुर्योधनाचें झालें नाहीं. याकरितां मनुष्यानें उद्धतपणाऐवजीं नम्रता धारण केल्यानें त्याचें हित होतें.

दुर्लभ——पिंपळाच्या फुलाप्रमाणें दुर्लभ—उंबराच्या फुलाप्रमाणेंच पिंपळाचें फूल दुर्मिळ असतें म्हणून त्याची उपमा प्रिय परंतु वारंवार न भेटणाऱ्या मनुष्यास देतात. 'दुर्लभा पिंपळाच्या फुला । कोठें गुप्त कोठें उघडे सख्या रात्रीं फिरसी दुला ।'—होला १०२.१३८.

दुर्लभाची आशा धरती, आपल्या हिता मुकती—दुष्प्राप्य वस्तूंच्या पाठीमागें लागतात त्यांची हानि होते.

दुर्व्यसनी——दुर्व्यसनी असतो, तो मनीं स्वस्थ नसतो—ज्या मनुष्याला वाईट खोड्या लागलेल्या असतात त्याच्या मनांत शांतता नसते.

दुवाळें——दुवाळ्याक खाईन दिसलें तेरें, पुढें फितलें जातलें बरें—(गो.) डोहाळ्यावरून मुलाची परीक्षा.

दुश्मन——दुश्मन असावा पण दाणा (शहाणा) असावा—शत्रु पुरवेल पण तो समंजस, उदार असावा. थोर मनाचा शत्रूहि पुरवतो.

दुश्मन न सोवे, न सोने देवे—शत्रु स्वतः झोपत नाहीं व प्रतिस्पर्ध्याला झोंपू देत नाहीं. असा तो जागरूक व त्रासदायक असतो. तेव्हां फार सावध राहावें लागतें.--सवि ३९०. पाठभेद—दुश्मन सोवै न सोने दे.

दुश्मनानें दिला हिसका, गडबडीनें पळाला पैका—शत्रूनें त्रास दिला असतां किंवा फसविलें असतां—धोका दिला असतां गडबड गोंधळ होऊन द्रव्याचा नाश होतो.

दहाचा हात दुश्मनावरहि पडूं नये—शत्रूवरसुद्धां दहाजणांकडून पारिपत्य होण्याचा प्रसंग येऊं नये. दहा माणसांनीं एकाकी शत्रूवरहि हात टाकूं नये. कारण या संघशक्तीनें हटकून शत्रूचा नाश होतो. दहा पहा.

दुष्कर्म——दुष्कर्म परहस्तें, तें स्वतःच केलेसें होतें—दुसऱ्याकडूनहि जरी एखादें निंद्य कृत्य करविलें तरी त्याचा दोष पर्यायानें आपणाकडे येतो.

दुष्कर्म व्यभिचार, नासाडीचा प्रकार—वाईट कर्मे व व्यभिचारादि गोष्टी केल्यास सर्वप्रकारें नाश होतो.

दुष्कर्माला आधीं भ्यावें—कोणत्याहि वाईट कृत्यापासून नेहमीं दूर असावें.

दुष्काळ——दुष्काळांत उपजणें—अन्नासाठीं हाव हाव करणें; खा खा करणें. 'दुष्काळांत उपजल्याप्रमाणें अशी खा खा कां करतोस?'

❀ **दुष्काळ आला, परभारी गेला**—श्रीमंत मनुष्यास कधीं दुष्काळापासून बाधा होत नाहीं.

दुष्काळांत खाल्लें आणि भांडणांत काढलें—दुष्काळ पडला असतां एखाद्यानें कांहीं अभक्ष वगैरे खाल्लें व भांडण चालू असतां कोणी कांहीं बोललें, परस्परांचीं वर्मे काढलीं तर मागाहून त्याबद्दल विचक्षणा करूं नये.

दुष्काळांत तेरावा (धोंडा) महिना—दुकाळ पहा. दुष्काळांत वर्षाचे बारा महिने काढतां काढताच मुष्कील पडते. अशावेळीं अधिक मास (तेरावा महिना) आला म्हणजे संकटांत अधिक भर पडते असा अर्थ. आपत्तींत आणखी भर. (गु) दुकळांत चाडित म्हैनो.

दुष्काळांत मिष्टान्न--दुकाळ पहा.

दुष्कीर्ति——दुष्कीर्तीहून मरण बरें--अपकीर्ति होण्यापेक्षां मृत्यु आलेला बरा. तु०—तैसा न भी मी नरकासी देवा, या पाशबंधासिहि वासुदेवा । न भी सुरांच्या जयवाद्यनादा, भीतों जसा मी अपकीर्तिवादा॥—वामनचरित्र ३८.

दुष्ट——दुष्ट कारभारी, समुदायाचा वीट करी—दुष्ट नेता असेल तर सर्व मंडळीचा नाश करतो. दुर्मन्त्री राज्यनाशाय, पहा.

दुष्ट मनुष्य कारभारी, लोका उपद्रव भारी—एखाद्या संस्थानामध्यें किंवा राज्यांत जर दुष्ट मंत्री असेल तर सर्व लोकांस त्रास होतो. दुष्टाच्या हातांत कारभार असेल तर सर्व लोकांस पीडा झाल्यावांचून राहात नाहीं.

दुष्ट मेला, विटाळ गेला—दुष्ट मनुष्य मेला असतां पीडा गेली असें समजतात. पाठभेद—महार मेला विटाळ फिटला.

दुष्ट राजाची द्वाही फिरली, गांवांत गडबड झाली—दुष्ट राजा गादीवर आल्याबरोबर सर्व गांवांतील लोक घाबरून जातात.

दुष्ट रूढीमुळें घोर अत्याचार घडतात—समाजामध्यें जर एखादी वाईट चाल पडली तर तीपासून फार अनर्थ होतो.

दुष्ट वांकडी सर्वां पाहीं, सरळ असे स्वगृहीं—दुष्ट मनुष्य इतरांशीं वांकडें वर्तन करतो पण स्वतःच्या घरीं सरळपणें वागतो. (हिं.) सांप बिलमें सीधा चलता है.

दुष्ट वादांत पडणें तें घातक—दुष्ट माणसांच्या भांडणांत पडणें घातुक होतें.—सवि १९६६.

दुष्ट संगतीनें मन, दोषी न करिती सुजन—जे सज्जन असतात ते दुष्ट लोकांनीं कांहीं सांगितलें तरी त्यांच्या बोलण्यावरून आपलें मन कलुषित करून घेत नाहींत.

दुष्टा गांठीं पैका झाला, उपद्रव करी लोकांला—दुष्ट मनुष्याला द्रव्य मिळालें असतां त्यापासून लोकांस अधिकच उपद्रव होतो.

दुष्टाचरणी मनुष्याला अंतीं दुःख—दुष्ट मनुष्याला शेवटीं दुःखच भोगावें लागतें.

दुष्टा भार्या शठं मित्रम् ।—दुष्ट बायको, लबाड मित्र, प्रत्युत्तरें करणारा चाकर मिळणें व सर्पाच्या घरांत रहिवास करावा लागणें, या सर्व गोष्टी मृत्यूसारख्याच पीडादायक आहेत. दुष्टा भार्या शठं मित्रं भृत्यश्चोत्तरदायकः ॥ ससर्पे च गृहे वासो मृत्युरेव न संशयः ॥ —सुर १५५·१११.

दुष्टाचे तोंडीं कुटका, देतां होय सुटका—दुष्ट मनुष्याला थोडें फार कांहीं तरी दिलें म्हणजे सुटका होते.

दुष्टाचे नेत्र झांकी पाप, दंड उघडवी आपोआप—दुष्ट मनुष्याच्या डोळ्यांवर त्याच्या पापाचरणानें झांपड येते; परंतु त्यास शिक्षा झाली म्हणजे त्याचे चटदिशीं डोळे उघडतात.

दुष्टाचे बोलणें, त्याच्या इच्छेप्रमाणें—दुष्ट मनुष्य आपल्या स्वभावाप्रमाणें म्हणजे दुर्भाषणच करतो.

दुष्टाच्या कल्पनाहि दुष्टच—दुष्ट मनुष्याला नेहमीं दुष्टच विचार सुचतात.

दुष्टाच्या दुष्टपणाला भिऊन वागावें—दुष्ट मनुष्याचें आचरण नेहमीं दुष्टपणाचें असल्यामुळें त्याच्यापासून भिऊन दूरदूर असावें.

दुष्टाला सर्व दुष्टच दिसतात—धर्माला एकदां जगांतील वाईट लोकांचीं नांवें सांगण्यास सांगितलें. तेव्हां त्याला वाईट कोणीच दाखवितां येईना. उलट दुर्योधनास चांगल्या लोकांचीं नांवें घेण्यास सांगितलें. पण त्याला कोणीच चांगला दिसेना. तेव्हां दुष्ट मनुष्याची दृष्टीच विकृत असल्यामुळें त्याला सर्व लोक दुष्टासारखेच दिसतात. तु०—आपणावरून जग ओळखावें.

दुष्टालागीं मिळे धन, त्यागी आपले बंधुजन—दुष्ट मनुष्याला द्रव्यप्राप्ति झाली असतां तो आपल्या आप्तेष्टांस विसरून जाऊन त्यांचा त्याग करतो.

दुष्टाशीं दुष्टच झालें पाहिजे—दुष्ट मनुष्याशीं दुष्टपणाचेंच वर्तन ठेवलें पाहिजे. (अ) दुष्टे दुष्टं समाचरेत् । (आ) शठं प्रति शाठ्यम् ।

दुष्टास दूर ठेवावा, अपमान न करावा—दुष्ट मनुष्याशीं संबंध मुळींच ठेवूं नये. त्यापासून दोन पावलें दूरच राहावें व सहसा त्यास दुखवूं नये. नाहीं तर तो आपणास त्रास द्यावयाचा.

दुष्टास देणें, गुणाप्रमाणें—दुष्ट मनुष्याशीं वर्तन त्याच्या गुणाप्रमाणें म्हणजे दुष्टपणाचेंच ठेवावें. Give the devil his due.

दुष्टास दैव धारजिणा—आपणास जगामध्यें अनेकवेळां असें आढळून येते कीं, दुष्ट मनुष्यासच दैव अनुकूल असून त्याची भरभराट होते व गरीब मनुष्यास त्यापासून पीडा होते. याच म्हणीचा दुसरा पर्याय—कसायास गाय धारजिणी; दाष्ट्यास दैव धाराजिणें, पहा.

दुष्टास येऊं न देतां घरीं, जाईल आपोआप माघारीं—दुष्ट मनुष्यास आपल्या घरीं आश्रय दिला नाहीं म्हणजे तो आपोआपच आपणापासून दूर राहातो.

दुष्टपणा——**दुष्टपणानें वागे, हलकेपणानें मरे**—जो मनुष्य जन्मभर दुष्ट आचरण सोडीत नाहीं त्यास आपत्तींत मरण येतें.

दुसगी——**दुसगीचा पाहुणा उपाशी मेला**—ज्या घरांत नवराबायकोंत वितुष्ट आहे त्या घरांतील पाहुण्याची स्थिति फार चमत्कारिक व संकोचाची होते. कारण नवऱ्याचा पाहुणा बायकोला खपत नाहीं, व बायकोचा पाहुणा नवऱ्याला खपत नाहीं. तु०—दोघरचा पाहुणा०. पुढें पहा.

दुसगीचें ढोर किवणानें मरावयाचें—दोघांच्या मालकीची वस्तु नीट राहात नसते. पाठभेद—भागीचें घोडें किवणानें मेलें.

दुसरा——**दुसऱ्याचें घर दाखविणें**—घरांतून हांकून देणें.

दुसऱ्याचें घर निघणें—नवरा सोडून दुसऱ्याजवळ राहाणें. 'कोळ्यांच्या बायका जातींतल्या जातींत व्याभिचार करतात व दुसऱ्याचें घरही निघतात.'—गुजा ५९.

दुसऱ्याचें पागोटें गुंडाळणें—फसविणें; लुबाडणें; ठकविणें.

दुसऱ्याच्या तोंडाकडे बघणें—दुसऱ्याच्या आश्रयाची अपेक्षा करणें; दुसऱ्याकडे आशाळभूतपणें पाहाणें.

दुसऱ्याच्या तोंडानें जेवणें-ओंजळीनें पाणी पिणें-दुसरा सांगेल त्याप्रमाणें वागणें; स्वतंत्र नसणें.

दुसऱ्याच्या पागोट्यावर नजर ठेवणें—दुसऱ्याच्या वस्तूंचा अभिलाष धरणें.-गांगा २१७.

दुसऱ्याच्या होळीवर स्वतःची पोळी भाजणारा—(व.) अग्नीनें ज्याच्या घरादाराची होळी होते त्याचें भयंकर नुकसान होतें. परंतु जगांत कांहीं असे सहानुभूतिशून्य व आपमतलबी लोक असतात कीं, त्या आगींतील विस्तवाचा ते आपली पोळी भाजून घेण्याच्या कामीं उपयोग करून घ्यावयास चुकत नाहींत. दुसऱ्याच्या नुकसानीची पर्वा न करतां आपला शक्य तो फायदा साधूं पाहणारा मनुष्य, स्वार्थसाधू मनुष्य.-पामो ४९७.

❀ दुसरा उपकार करी ते स्मर, आपले विसर—मनुष्यानें आपण दुसऱ्यावर केलेले उपकार ध्यानांत ठेवूं नये, पण दुसऱ्यानें आपल्यावर केलेले उपकार कधीं विसरूं नये.

दुसऱ्याकरितां याचना करितो, तो स्वार्थ साधतो—जो मनुष्य दुसऱ्याच्या हिताकरितां याचना करीत फिरतो त्यांत त्याचा कांहीं तरी स्वार्थ आहे असें समजावें. उगाच कोणी दुसऱ्याकरितां राबत नाहीं.

दुसऱ्या खातीर फोडुं काळो, पाय निसरूनु आपण पळो—(गो.) दुसऱ्यासाठीं खड्डा खणला आणि पाय घसरून आपणच त्यांत पडला.

दुसऱ्या गळया माळ घाल्लि ती तान्नें तिसऱ्या घाली—(गो.)आपण दुसऱ्याच्या गळयांत माळ घातली ती त्यानें तिसऱ्याच्या गळयांत घातली. एकाला काम सांगितलें असतां तें त्यानें तिसऱ्यावर ढकलावें अशा वेळीं म्हणतात.

दुसऱ्यागेले सोदी गुण, आपणागेले पळे अवगुण—(गो.) दुसऱ्याचे गुण घ्यावे आणि आपल्यांतले अवगुण हुडकावे.

दुसऱ्याजांगेरि दोरीक पीळ दिवंचो—(गो.) दुसऱ्याच्या मांडीवर दोरीला पीळ द्यावा. त्यामुळें केस ओढायचे ते दुसऱ्याचे ओढतील आणि त्याला दुखेल पण आपण राहूं

दुसऱ्या हातानें उदाक पिवंचें, पटक्या घारा जेवणा पडचें—(गो.) दुसऱ्याच्या ओंजळीनें पाणी पिणें आणि परक्यांच्या घरीं जेवण्याचा प्रसंग येणें, या गोष्टी कष्टदायक होत.

दुसऱ्याचा आनंद पाहून मत्सरी श्रमी होती—मत्सरी मनुष्यांस दुसऱ्यास आनंद झालेला पाहून वाईट वाटतें.

दुसऱ्याचा तो भोसडा, आपली ती चीर—(अशिष्ट) आपला तो बाब्या० या अर्थी.

दुसऱ्याचा न्याय करतो, आपला कोणी पाहत नसता—मनुष्य दुसऱ्याच्या वर्तणुकीवर योग्य, अयोग्य म्हणून टीका करीत असतो पण स्वतःच्या वर्तनाकडे लक्ष्य देत नाहीं. तु०-दुसऱ्याच्या डोळयांतील कुसळ दिसतें पण आपल्या डोळयांतील मुसळ दिसत नाहीं.

दुसऱ्याचा वरवंटा घेऊन आपला काळ्या कुटणें—दुसऱ्याचीं साधनें वापरून आपलें काम करून घेण्याची स्वार्थी वृत्ति.

दुसऱ्याची उठाठेव, जीवाला घोर—दुसऱ्याच्या भानगडींत लक्ष्य घालून स्वतःच्या पाठीमागें व्यर्थ काळजी लावून घेणें.

दुसऱ्याची कढी, धांवधांवून वाढी—दुसऱ्याची वस्तु देण्यास उदार. तु०-हलवायाच्या घरावर तुळशीपत्र.

दुसऱ्याची कामिनी, ती मानावी जननी—परस्त्री मातेसमान मानावी.

दुसऱ्याची खोड काढणें, पहिली आपली सुधारणें—प्रथम आपले दोष सुधारावे व नंतर दुसऱ्याचे काढण्याकडे लक्ष द्यावें.

दुसऱ्याची दाढी जाळून उजेड मिळवावयाचा—दुसऱ्याचें नुकसान होत असतां आपला फायदा करून घेण्याचा प्रयत्न करणें.

दुसऱ्याची स्त्री विषवल्ली—परस्त्री विषाप्रमाणें मानावी. तु०-परनार विषाचा प्याला।

दुसऱ्याचें कर्ज वारावें, तर त्याला पुसावें—दुसऱ्याचें कर्ज निवारण करण्याचें सामर्थ्य असेल तरच त्याला किती कर्ज आहे त्याची चौकशी करावी. नाहींतर दुसऱ्याच्या वैगुण्याचें ज्ञान करून घेण्यांत काय फायदा.

दुसऱ्याचे केस लांब लांब म्होण आपणाचे ओढून जातत—(गो.) दुसऱ्याचे केस लांब असलेले पाहून आपले केस ओढले तरी ते लांब होणार नाहींत. दुसऱ्याला निसर्गानें दिलेली गोष्ट आपणांस प्रयत्नानेंहि साध्य होत नाहीं.

दुसऱ्याचें नांव, आपलें गांव--दुसऱ्याचें नांव सांगून आपला स्वार्थ साधणें.

दुसऱ्याचें परमदुःख, पाहून हेवा मानी सुख--दुसऱ्याचें दुःख पाहून मत्सरी माणसाला सुख होतें. --सवि ९१८.

दुसऱ्याचे बायकोला लुगडें नेसवून (चोळी-लुगडें करून) फळ काय--ज्या वस्तूचा आपणास उपयोग नाहीं त्या वस्तूचें सौंदर्य वाढविण्यांत किंवा त्या वस्तूबाबत खर्च करण्यांत कांहीं अर्थ नाहीं.-टि १.६६६.

दुसऱ्याचें मूल चाटूं जाणें, छोटूं न जाणें; दुसऱ्याच्या मुलाला चाटतां येते पण मारतां येत नाहीं—दुसऱ्याच्या मुलाचें लाड करतां येतील पण त्याला मार किंवा शिक्षा देतां यावयाची नाहीं. आपला त्यावर हक्क नसतो.

दुसऱ्याचे वस्तूवर, कदापि लोभ न धर--जी वस्तु दुसऱ्याची आहे त्या वस्तूबद्दल कधीं आशा धरूं नको.

दुसऱ्याचे वेडेपणें, आपण चातुर्य शिकणें--दुसऱ्याच्या हातून चुकी घडली असतां त्याच्या अनुभवापासून आपण शहाणपणा शिकावा. तु०-पुढच्यास ठेंच मागला शाहणा.

दुसऱ्याचे व्यवहारांगीं, न करावी हुंगाहुंगी—दुसऱ्याच्या भानगडींत पडूं नये. दुसऱ्याच्या कामांत तोंड खुपसूं नये.

दुसऱ्याचें हरिशी, शासन पावशी--दुसऱ्याची वस्तु घेतल्यास त्याबद्दल शिक्षा होण्याचा संभव असतो.

दुसऱ्याच्या डोळ्यांत भसकन् बोट जातें—दुसऱ्याला अपकार करतांना कांहीं वाटत नाहीं. दुसऱ्याचे दोष लवकर दिसतात.

दुसऱ्याच्या डोळ्यांतलें कुसळ दिसतें पण आपल्या डोळ्यांतलें मुसळ दिसत नाहीं—दुसऱ्याचे क्षुल्लकहि दोष सहज दिसतात पण आपले मोठेमोठेहि दिसत नाहींत. तु०-We can see the mole in another's eye but cannot see the beam in our own.

दुसऱ्याच्या पतीस लावून धक्का, आपली पत स्थापूं नका—स्वतःची अब्रू बचावण्याकरितां दुसऱ्याच्या अब्रूचा नाश करूं नये.

दुसऱ्याशीं भांडण्यापेक्षां गुडघ्याशीं भांडावें—दुसऱ्याशीं भांडण करण्यापेक्षां स्वतःजवळच काय ती बडबड करावी.

दुसऱ्यास्तव खाडा खणणें, तर स्वतः हुशारींत राहाणें—जर आपण दुसऱ्याचा नाश व्हावा म्हणून कारस्थान करीत असलों तर त्यांत आपणावर कांहीं शेकणार नाहीं याची चांगली काळजी घेतली पाहिजे.

दुही——**दुही पडणें**—फूट पडणें; द्वैत उत्पन्न होणें; वांकडें येणें. 'आपल्यांत दुही पडते तेव्हां शत्रूचें बळ फावतें.'

दुहेरी——**दुहेरी बोलाची, कवडी मोलाची**–दुट्टपी माणसाला कांहीं किंमत नसते.

दूती——**दूती म्हणून गेली व स्वतःच प्रिया होऊन बसली**--(काव्यप्रकाशांत एक श्लोक आहे त्यावरून) दुसऱ्याच्या कामासाठीं जाऊन स्वतःचेंच काम साधणें. मुलासाठीं बायको पाहतांना स्वतःच लग्न करून घेणें, याप्रमाणें. -कोल्हटकरांचा लेखसंग्रह.

दूध——**प्रथम-पहिल्या धारेचें दूध**—(तान्ही गाय, म्हैस इ. कांचें) प्रथमचें दूध, चीक. व्याल्या बरोबर प्रथम काढलेलें दूध.

दूध चढविणें–दूध जास्त देणें (जनावरानें). 'जनावरांची कातडी सतेज होते. तीं दुधें चढवतात. दूध-दुभतें, हुळा-हुरडा विपुल खाण्यास मिळाल्यामुळें लोक तेजस्वी दिसूं लागतात.'–पाणकळा ६.

एखाद्याच्या ओठावर दूध दिसणें-वाळलेलें नसणें–बाल्यावस्थेंत असणें; (तिरस्कारार्थी) वयानें लहान असणें; प्रौढ नसणें; जगाचा बिलकूल अनुभव नसणें. तु०-ओठावरचा जार न वाळणें.

दूध निघणें—(गाय, म्हैस इ. कानें) दूध देऊं लागणें. (ल.) फायदा मिळणें.

दूधपाण्यासारखी मैत्री--ज्याप्रमाणें दूध व पाणी एकत्र मिसळलें असतां एकजीव होतें त्याप्रमाणें कधींहि न तुटणारी मैत्री.

दूद पियेवन वीख ओंकचें-(गो.) दूध पिऊन वीष ओकणें; कृतघ्नपणा. तु०- फणी दुग्धातेंही पिउनि गरळा तेंचि वमती। उपकारोपि नीचानामपकारोहि जायते। पयःपानं भुजंगानां केवलं विषवर्धनम् ॥-सुर ५४.१०.

दूधभात खाणें—सुखांत, ऐष आरामांत असणें. 'दूधभात खावयाचे वेळीं मात्र भाऊ (परशुराम), मरावयाचे वेळीं मात्र दाजी (पुरुषोत्तम)'–हब ४५.

दुधाचा थेंब—अतिशय थोडें दूध; दुधाचें अत्यत थोडें परिमाण. जसें तुपाचें नख, ताकाचें पाणी, तेलाची धार, दह्याची कवडी, इ. तूप, ताक, तेल, दहीं इ. चें अल्प परिमाण दाखवितात.

दुधाची तहान ताकानें घालविणें-ताकावर भागविणें—इष्ट ती वस्तु साध्य होत नाहीं असें पाहून तिच्यापेक्षां निकृष्ट वस्तूच्या लाभानें संतुष्ट होणें; मोठी गोष्ट साध्य न झाल्यास तिच्या पेक्षां कमी दर्जाची गोष्ट साध्य करून समाधान मानणें. (गो.) दुदा भूक ताकान.

दुधांत मीठ कालविणें—दुधांत मीठ टाकलें तर तें फाटतें, तें दूध नासतें. एखाद्याच्या बसलेल्या घडीचा विचका करणें किंवा एखाद्याचें नुकसान करणें हा भावार्थ.

दुधांत साखर पडणें—दूध स्वभावतःच मधुर असतें, त्यांत साखर टाकल्यास त्याची गोडी अधिकच वाढते. त्यावरून आधींच चांगल्या असलेल्या गोष्टींत दुसऱ्या चांगल्या गोष्टींची भर पडणें. समसमा योग होणें; दोन चांगल्या गोष्टींचा मिलाफ होणें. तु०--(गो.) दुद आनी पेयीन्तार सरी; दुद आनी साकरे वरी. अधिकस्याधिकं फलम् ।

दुधातुपाच्या गुळण्या मारणें—गुळण्या करण्यास पाण्याऐवजीं दूध तूप वापरणें. वैभवामुळें उन्मत्त होणें; वैभवाचा अपव्यय करणें.

दुधानें धुपणें--निर्दोष असणें; अगदीं निर्लेप स्वच्छ असणें; निर्मळ असणें. 'हें कूळ दुधानें धुपलेलें आहे.'

दुधानें धुपलेला—पूर्णपणें निर्मळ; निष्कलंक; सोज्वळ; निर्दोष; सज्जन.

दुधास-ला तुटणें--दूध कमी देऊं लागणें.

दुधास-ला फुटणें—(गाय, म्हैस इ. नीं) पुष्कळ दूध देऊं लागणें; दूध चढविणें.

❀ **दुद आनी उधाक सरी; दुदा उदका वरी**--(गो.) दूधपाण्याच्या मिश्रणाप्रमाणें अविभाज्य.

दूध उघडें ठेवी, मांजराशीं बोल नाहीं—आपण दूध उघडें ठेऊन गेल्यावर तें मांजरानें खाल्लें तर त्यांत मांजराचा दोष नाहीं. आपण चुकी केली व तिचा फायदा दुसऱ्यानें घेऊन आपलें नुकसान झालें तर त्याबद्दल दुसऱ्यास दोष देण्यांत अर्थ नाहीं.

दूध गाईचें, फूल जाईचें—सर्व दुधामध्यें गाईचें दूध उत्तम, तसें सर्व फुलांत जाईचें फूल उत्तम.

दुद चोयिल्या माजराक दुदगळि चोंवचें काम ना--(गो.) दूध दिसल्यावर दुधाच्या भांड्याची पर्वा करण्याचें मांजराला कारण नाहीं. तें पडो अथवा फुटो.

दुद नासल्यारि दुदगळि पाडि, आपण नासल्यारि जग पाडि--(गो.) दूध नसलें तर चरवी ओसाड आणि आपण नसलों तर जग ओसाड. तु०-आपण मेलें, जग बुडालें.

मेले म्हशीस दूध बहू (फार); मेल्या म्हशीस पांच शेर दूध—मेल्या माणसाबद्दल बहुधा लोक चांगलेंच बोलतात. तु०--मरणान्तानि वैराणि ।

दूधभात खाऊन दहींभात पदरीं बांधणें—जेवढें मिळेल तेवढें सध्या पदरांत पाडून घेऊन पुढच्याहि तजविजीसाठीं अधिकाचा लोभ करणें. मिळालें म्हणजे अधाशीपणानें घेणें.

दुदा रुचि नातिलो चलो, पिठा उदकाक भुलूनु गेलो—(गो.) दुधाची चव ठाऊक नसलेला मुलगा पिठाच्या पाण्यालाच दूध समजला. अज्ञानानें फसवणूक.

दुदाक आइल्याक म्हशीचें मोल कित्याक?--(गो.) दूध मागण्याकरितां येऊन म्हशीची किंमत विचारणें. नसती चवकशी करणें; रिकामी उठाठेव. तु०-पाय धू तर तोडे केवढ्याचे ?

दुदाक विर्जण कितलें जाय ? घराक उजो कितलो जाय ?—(गो.) दुधाला विर्जण किती लागतें व घर पेटण्यास विस्तव किती लागतो ? थोड्या ताकानें दुधाचें दहीं होतें (दूध नासतें) व लहान ठिणगीनें घर जळतें. लहान गोष्टीपासून मोठीं संकटें ओढवतात.

दूधका जला, छांक फुंक फुंक पीय—' दुधानें तोंड भाजल्यावर ताक फुंकून फुंकून पितो, ' पहा.

दूधका दूध, पानीका पानी—दूध वेगळें व पाणी वेगळें करून योग्य निवाडा करणें. तु०-काचः काचो मणिर्मणिः ।

दुधाचा घोट पिववेना (घेववेना) आणि ओकवेना—दुधाचा घोट घेतला असतां पोटांत जागा नसल्यास तो घशाखालीं जात नाहीं व दुधाचा लोभ तर सुटत नाहीं. किंवा त्याचा अनादर करवत नाहीं. एखादी चांगली वस्तू ठेवतांहि येत नाहीं व टाकतांहि येत नाहीं अशी स्थिति. तु०-खाल्लें तर बाधतें, टाकलें तर शापतें.

दुधाची तृषा (तहान) ताकानें भागत-पुरी होत नाहीं—दूध प्यायची इच्छा झाली असतां ती ताक पिऊन शांत होत नाहीं. जेथें चांगल्या वस्तूचें काम असेल तेथें तिच्या ऐवजीं कोणती तरी निकृष्ट वस्तु चालत नाहीं.

दुधाची भूक ताकावर भागली—जी गोष्ट इष्ट किंवा आवश्यक तिच्या ऐवजीं दुसरी वापरल्यानें गरज संपली असतां म्हणतात. कशानें तरी, कसें तरी समाधान करणें.

दुधाचे घागरीं मद्याचा हा बुंद । पडिलिया शुद्ध नव्हे मग ॥—तुगा २८६४. दारूचा लहानसा थेंब सुद्धां घागरीभर दुधाला अपवित्र करतो. म्हणजे लहानशा वाईट गोष्टीनेंहि चांगली मोठी गोष्ट बिघडते.

दुधाचे रांजणींत कांज्याचे शिंतोडे--भाव ८२. वर प्रमाणेंच. चांगल्या प्रसंगाचा विरस होणें; रंगांत भंग.

दुधाचो घोंट भायर बडयल्यार दुध वता, गिळ-ल्यार ताळो लासता--(गो.) दुधाचा घोट थुंकून टाकला तर दूध फुकट जातें; गिळला तर घसा भाजतो. दुधाजाला घोट, सोडूं कय गेल्या गांठपण्णा आणि गिळूं कय गेल्या गांठपण्णा, अशी दुसरी म्हण आहे.

दुधाच्या नित्य स्नानानें कावळा काळाच राहणार—कावळ्यानें जरी रोज दुधानें स्नान केलें तरी त्याचा काळा रंग पांढरा होणें शक्य नाहीं. मनुष्याचे जे उपजत गुण आहेत ते कधीं बदलूं शकत नाहींत. खलः सत्क्रियमाणोऽपि ददाति कलहं सताम् । दुग्धधौतोपि किं याति वायसः कलहं सताम् ॥-सुर ५४.२६.

दुधांत पाणी, बोलण्यांत कहाणी—दुधांत पाणी घातलें असतां तें जसें वाढतें तसें बोलतांना गोष्टी सांगूं लागलें असतां बोलणेंहि लांबत जातें.

दुधान जेववून ताकान (सुतान) आचवप-(गो) आधीं गोड नंतर कडू (भाषण इ.) करणें. आरंभीं चांगलें व मागाहून वाईट असें करणें, वागणें. मिष्टान्नाचें जेवण व मुताचें आंचवण, याप्रमाणें.

दुधान नाणयलो म्हण्टा कावळो धवो जाता?--(गो.) दुधाच्या न्हाण्यानें कावळा पांढरा होतो काय? काळा तो काळाच.

दुधानें तोंड भाजलें म्हणजे मांजर ताक सुद्धां फुंकून पितें; दुधानें तोंड पोळलें, म्हणजे ताक फुंकून पिणें; दुधानें तोंड भाजल्यावर ताक फुंकून पितात--एखाद्या गोष्टींत वाईट अनुभव आला म्हणजे साध्या गोष्टींतसुद्धां मनुष्य जास्त काळजीपूर्वक वागूं लागतो व फाजील शंका काढून सावधगिरी दाखवितो. 'मी दुधास पोळलें म्हणून या ताका फुंकुन सखे पितें।'-होला ११८. १५२. दुर्जनदूषितमनसां पुंसां सुजनेऽपि नास्ति विश्वासः। बालः पयसा दग्धो दध्यपि फूत्कृत्य भक्षयति॥-सुर५७.१२४.

दुधानें भाजला तो ताक फुंकून पितो--वर पहा.

दुधामधली माशी, खाती अधाशी--अधाशी लोक दुधांत पडलेली माशीसुद्धां दुधाच्या आशेनें खातात. लोभी मनुष्य थोडक्याशा लाभाकरितांहि घाणेरडें काम करतो.

दुधाला आणि तुपाला झांकण कोण न ठेवील—दूध, तूप या वस्तु कोणी उघड्या टाकीत नाहीं. मौल्यवान वस्तूंचें संरक्षण करणें अवश्यच असतें.

दुधाला गेली, तिकडे कांटे खायाला राहिली—चांगलें काम करावयास गेलें असतां भलत्याच वाईट कृत्यांत वेळ घालविणें.

दुधाला साय आणि ताकाला पाणी—दुधाला ज्या-प्रमाणें हटकून साय येते त्याप्रमाणें पाण्याशिवाय ताक होत नाहीं.

दूम——**दूम निघणें-बाहेर पडणें**—[दूम=शेपटी] (एखाद्याचा) भुसा पडणें; फार त्रास, कष्ट होणें; पादाडलें जाणें; अगदीं दशादशा होणें.

दूम पुरविणें—शेपटीप्रमाणें पाठीस चिकटून असणें; (एखाद्याचा) पिच्छा पुरविणें; गळीं पडणें; खनपटीस बसणें.

दूर——**दूर धरणें-पाहणें**--परकेपणानें वागाविणें.

दूरवर विचार करणें--एखाद्या गोष्टीचे दीर्घकालानें होणारे परिणाम लक्ष्यांत घेऊन वागणें; दूरदृष्टीनें पाहणें. 'माणसाचे बचास विचार दूरवर करावा. दाण्यांचीं कणसें नाहींत कीं वर्षास नवीन उत्पन्न होतील.' -पया ४३७.

दूरशी—विटाळशी. 'दुष्ट म्हणे, स्वसभेला तुजला नेतोंचि, दूरसी अस कीं ।'-मोसभा ५.६.

❀**दूरकालाची दृष्टि, लोकक्षोभ उत्पन्न करिती**—फार दूरवर विचार करून एखादी गोष्ट करावयाची म्हटलें म्हणजे ज्यास लवकर फल मिळावें अशी इच्छा असते त्यास राग येतो.

दूरस्था (दूरतः) पर्वता रम्याः ।--पुढें, दुरून डोंगर साजरे पहा. सबंध श्लोकः-दूरस्थाः पर्वता रम्या वेश्या च मुखमण्डने । युद्धस्य वार्ता रम्या च त्रीणि रम्याणि दूरतः ॥

दुरून डोंगर साजरा; दुरून डोंगर साजरा, जवळ जातां काजरा--डोंगर दुरून हिरवेगार व रमणीय दिसतात पण जवळ गेलें असतां रुक्ष व भयाण दिसतात. यावरून, पुष्कळ गोष्टी दुरून चांगल्या दिसतात व त्यांच्या संबंधीं आदर वाटतो. पण प्रत्यक्ष जवळ त्या बारकाईनें पाहिल्या तर त्यांच्यांत पुष्कळ दोष आढळतात, व त्यांचा कंटाळा येतो.

दुरून डोंगर साजरे आणि म्हणे माझें घर बरें--दुरून दिसावयास एखादी गोष्ट चांगली दिसते पण ती जवळ गेलें असतां अगदीं भिकार दिसते; पण आपली असली म्हणजे तिची आपण वाखाणणी करतों.

दुरून डोंगर साजरे वाटे, आणि जवळ जातां कांटे भेटे (कांटेकुटे)—वरील म्हणीचाच पर्याय. एखादी वस्तु दुरून चांगली दिसते पण जवळ जाऊन पाहिलें असतां तिचें स्वरूप तसें नसून रुक्ष आढळतें. जसें दिसतें तसें नसतें.

दुरून बगळा दिसतो साधा, आंत कपटाची बाधा—बगळा वरून साधूसारखा ध्यानस्थ दिसतो पण मनांतून मासा पकडण्याची मार्गप्रतीक्षा करीत असतो. तसे कांहीं लोक साधेसुधे व भोळे दिसतात, पण आंतून कपटी असतात.

दृढ——दृढ छाती, सूक्ष्म दृष्टि, मृदु हात जाणें, अशीं असावीं शस्त्रवैद्याचीं लक्षणें—अर्थ स्पष्ट आहे. Surgeons should have an eagle's eye, a lion's heart, and lady's hand.–सवि ३१६६.

दृढभाव तोच देव—परमेश्वराची एकनिष्ठपणें भक्ति केली असतां त्याची प्राप्ति होते. भाव तोचि देव. तु०– भावदेवाचें उचित । भाव तोचि भगवंत ।–तुगा ३५३८. न देवो विद्यते काष्ठे पाषाणे न च मृन्मये । भावे हि विद्यते देव स्तस्मात् भावो हि कारणम् ॥

दृढविश्वास हें कार्यसिद्धीचें लक्षण आहे—आपण कोणतेंहि कार्य नेटानें व निश्चयानें आणि तें सिद्धीस जाईल अशा खात्रीनें केल्यास त्यांत यश हटकून येतें. निश्चयाचें बळ । तुका म्हणे तेंच फळ ॥ –तुगा ३६६७.

दृष्टि——दृष्टि ओळखणें—(एखाद्याच्या) नजरेवरून, चेहऱ्यावरून त्याचें मनोगत ओळखणें; दृष्टीवरून परीक्षा करणें.

दृष्टि (दृष्ट) काढणें–उतरणें–ओवाळून टाकणें—एखाद्यास वाईट दृष्टीची झालेली बाधा, मंत्रतंत्र, तोडगा इ. कानें काढून टाकणें.

दृष्टि घालणें--१ डोळा मोडणें, मिचकावणें; डोळ्यानें इशारा करणें; नेत्रसंकेत करणें. २ (एखाद्या गोष्टीकडे) काळजीपूर्वक पाहाणें, लक्ष देणें, मन लागणें; सूक्ष्मपणें पाहणें; मन घालणें. ‘ स्वर्गांगनेसी जरि साम्य आली । परंतु तेथें दृष्टी न घाली । ’–रामदासी २.४३.

दृष्टि चढणें–गर्वानें फुगणें; उन्मत्त होणें; डोळ्यांवर धूर येणें; वैभवानें डोळे धुंद होणें.

दृष्टि चुकणें—विसरणें; गोंधळून जाणें; घोटाळ्यांत पडणें. ‘ दृष्टि विश्वाची चुकली । ’—तुगा.

दृष्टि चुकविणें–चोरणें--(एखाद्याच्या) डोळ्यास डोळा न देणें; नजरेस पडण्याचें टाळणें; आड होणें; समोर न येणें; मागें राहाणें.

दृष्टि चोरणें--नजर मारून टाकणें; नजरबंद करणें; दृष्टीस माहे घालणें. ‘कीं पुढिलाची दृष्टि चोरिजे । हा दृष्टिबंधु निफजे । तरि नवल लाघव तुझें । जें आपणपें चोरे ॥’–ज्ञा १४.५.

दृष्टि ठेवणें–देणें–राखणें--(एखाद्या गोष्टीची, वस्तूची) काळजी घेणें; लक्ष देणें; हिफाजत करणें; नीट संगोपन करणें. ‘ ठेवीना गर्भींही दृष्टिस ती नीट जळहि सेवीना । ’–मोअश्व ४.८.

दृष्टि देखणें--(काव्य) पाहणें; डोळ्यानें पाहणें; समोर पाहणें.

दृष्टि निवळणें--१ बिघडलेले, आलेले डोळे पूर्ववत् स्वच्छ होणें. २ (ल.) गर्व, ताठा, उन्माद नाहींसा होणें. ३ भ्रमाचें निरसन होणें; भ्रमाचें पटल नाहींसें होणें.

दृष्टि (दृष्ट) पडणें–होणें–लागणें--(एखाद्याच्या) वाईट नजरेची बाधा होणें; दृष्ट होणें; दृष्टिदोष बाधणें.

दृष्टि फांकणें—१ गोंधळून जाणें; भांबावून जाणें. २ नजर बेताल–ओढाळ होणें; नीट दिसेनासें होणें; गर्वानें डोळ्यावर धुंदी येणें.

दृष्टि फाटणें--(एखाद्याच्या) आकांक्षा, महत्त्वाकांक्षा, हेतु इ. वाढणें; विस्तृत होणें.

दृष्टि फिरणें—१ राग येणें. ‘ येतां त्याची दृष्टि फिरली म्हणे । ’–रामदासी २.९८०.२ ताठा चढणें; गर्व इ. नें दृष्टि अंध होणें; धुंदी चढणें.

दृष्टि बंद करणें—नजर मारून टाकणें; मोहून टाकणें; नजरबंद करणें; दृष्टि चोरणें.

दृष्टि भरून पाहणें—पोटभर, डोळे भरून, तृप्ति होईपर्यंत, मनमुराद पाहणें; मनाचें समाधान होईपर्यंत पाहणें; धणीभर पाहणें. ‘ पाहा जा सदृढ दृष्टि भरूनि । ’–दावि४६.

दृष्टि मरणें--तीच वस्तु अनेक वेळां पाहिल्यानें, किंवा तीच गोष्ट अनेक वेळां केल्यानें तिच्या बद्दलची भीति, आश्चर्य, हिडिसपणा इ. वाटेनासा होणें. संवय होणें; सराव होणें; रोजच्या वहिवाटींतील होणें. 'माडावर चढून चढून भंडाऱ्याची दृष्टि मेलेली असते.'

चार दृष्टि होणें-भेट होणें; नजरानजर होणें; समोरासमोर येणें; परस्परांचे डोळे परस्परांकडे लागणें.

दृष्टीखालून जाणें--(एखादी गोष्ट, वस्तु इ. एखाद्याच्या) डोळ्याखालून, नजरेंतून जाणें; स्थूलपणें माहीत असणें; ठाऊक होणें; ज्ञान असणें. 'ज्यांचे दृष्टीखालून गेलें। ऐसें कांहींच नाहीं उरलें।'-दा१·६·९.

दृष्टीचा अंमल--१ पाहण्यांत, नजरेंत आलेला काळाचा अवधि; दृष्टीसमोरची स्थिति; ज्ञात अवधि. 'हा दरिद्र्याचा श्रीमंत झाला हें माझ्या दृष्टीच्या अंमलांतलें.' २ नजरेचें कार्यक्षेत्र. 'चित्र काढणें हें दृष्टीच्या अंमलांत.' पुढें पहा.

दृष्टीचा खेळ—नजरेनें-दृष्टीनें करावयाची चमत्कृति, पूर्ण कुशलतेची गोष्ट; नजरेचा खेळ, डोळ्याच्या साहाय्यानें करावयाची गोष्ट. 'पाहून लिहिणें, चित्र काढणें, इ. दृष्टीचे खेळ आहेत.'

दृष्टीचा खोटा-पापी--दुसऱ्याचें चांगलें पाहून मनांत जळफळणारा; मत्सरबुद्धीचा; वाईट नजरेचा; वाईट हेतु मनांत धरून पाहणारा; मनांत पाप ठेवून नजर लावणारा.

दृष्टीचा पसारा—डोळ्यांना दिसणारें विश्व; दृष्टीच्या क्षेत्रांतील सर्व विषय; सर्व पृथ्वीवरील भाग.

दृष्टीची मुर्वत राखणें--(एखाद्याच्या) भावनेस मान देणें; (एखाद्यास) न आवडेल अशी गोष्ट त्याच्या समक्ष न करणें.

दृष्टीचें पारणें फिटणें--जें पाहण्याविषयीं उत्कंठा आहे तें पाहण्यास मिळाल्यानें समाधान पावणें.

दृष्टींत न येणें—(एखाद्यास) तुच्छ लेखणें; कःपदार्थ मानणें. 'ज्याच्या दृष्टींत न ते सहसुत पांडवबळी न कंसारी।' -मो आदि २·३.

त्या दृष्टीनें—त्या ^ोरणानें, बुद्धीनें; तो हेतु मनांत धरून. 'पुत्राकडे पुत्रदृष्टीनें पाहिलें असतां ममता वाटते, नाहीं तर सर्व एकच आहे.'

आडव्या दृष्टीनें पाहणें—वाकड्या, काऱ्या डोळ्यानें पाहणें; अपांगवीक्षण करणें; तिरपें पाहणें.

दृष्टीस पडणें—आढळून येणें; नजरेस येणें; अनुभवास येणें. 'तेव्हां दैवें तीच्या दृष्टिस पडला तिचाच शेजारी।'

दृष्टीस फांटा फुटणें—दृष्टि फाटणें; दृष्टीचें सामर्थ्य वाढणें. 'जैसें डोळयां अंजन भेटे। ते वेळीं दृष्टीसी फांटा फुटे।'-ज्ञा १.२३.

❀ **दृष्टीआड तें सृष्टीआड**—जी आपल्या दृष्टीसमोर गोष्ट घडत नसते ती आपल्या लक्ष्यांत येत नाहीं. तेव्हां तिच्याकडे आपलें दुर्लक्ष होणें साहाजिक आहे. out of sight, out of mind.

दृष्टीआड सृष्टि--आपल्या मागें कांहीं का होईना, आपल्याला तें दिसत नाहीं, तेव्हां घोर नाहीं. तु०--डोळयांआड मसण पाड.

दृष्टीआड सृष्टि आणि वस्त्राआड जग (जन) नागवें—जें आपल्या देखत घडत नाहीं त्याला आपण जबाबदार नाहीं व त्याचा प्रतिकार करणेंहि कठिण. आपल्या समोर जें दिसतें त्याबद्दल आपण विचार करतों पण आपल्या दृष्टीस दिसत नाहीं अशा कित्येक गोष्टी असतात तेव्हां तिकडे लक्ष्य देण्याचें कारण नाहीं. कारण आपण जर वरील पडदा दूर करून जगाकडे पाहूं लागलों, तर अनेक वाईट गोष्टी आपल्या नजरेस येतील. त्या सर्वांचा विचार आपण कोठवर करावयाचा.

दृष्टीं माया, भाता भूक-दृष्टीस मूल पडलें कीं माया उत्पन्न होते, व भात पाहिला तर भूक लागते. दृष्टीसमोर कांहीं वाईट घडलें तर वाईट वाटतें व चांगली गोष्ट दिसली तर आनंद होतो. पुढें पहा.

दृष्टीं माया, भानां भूक—(व.) [भानें=जेवणाचें वाढलेलें पान; भानां=जेवणाच्या पानावर (बसला असतां).] कोणी प्रेमाला लायक मनुष्य दृष्टिपथांत आला असतां संघटनानें त्याच्याबद्दल तात्कालिक प्रेम उत्पन्न होतें; पण तें प्रेम अंतःकरणापासून उत्पन्न झालेलें नसल्यामुळें, तो मनुष्य दूर जाऊन दृष्टीआड होतांच आपोआप लयास जातें. तसेंच खरी तीव्र क्षुधा लागली नसली तरी एखाद्या मनुष्याला आग्रहानें जेवावयास बसविलें म्हणजे तो थोडें तरी अन्न खातोच. आपल्याला थोडी तरी भूक आहे अशीच त्याला भावना होते.

दृष्टि मोठी, पोट लहान—पुष्कळ खावें अशी इच्छा असली तरी पोटांत जेवढें मावेल तेवढेंच खातां येतें. एखाद्या मनुष्यास फार हांव असते पण प्रत्यक्ष मिळाल्यास फार थोड्याचाच सांभाळ करण्याची पात्रता असते. His eye is bigger than his belly.–सवि १६६१ .

दृष्टीस पडतां नावडे, इच्छा न होय त्याकडे—दृष्टीला जें नको तें मनालाहि नको असतें.–सवि१७८९.

दृष्टीसमोर नसतो, त्यास विसर पडतो—फक्त समोर असणाऱ्या गोष्टींबद्दल किंवा व्यक्तींबद्दल माणसाला आपलेपणा वाटतो. दूर असलेल्याबद्दल साहाजिक विसर पडतो. Out of sight, out of mind.

देऊळ——देउळची गेली घांट, गुरवाचें गेलें चऱ्हाट (झ्यांट, शेट)—गुरव पहा.

देउळची फुटली घांट तर गुरविणीचें गेलें झ्यांट—ज्यापासून स्वतःस कांहीं तोषीस लागत नाहीं त्याबद्दल काळजी कोण करील ? अगदीं बेफिकीर वृत्ति.

देउळची सहाण, धर्मशाळेचें उखळ—या वस्तु सार्वजानिक असून त्यांचा कोणीहि उपयोग करावा. अनिर्बंध सार्वजनिक स्वरूपाच्या वस्तूंस किंवा व्यक्तीस म्हणतात.

देवळा कलशारि कायळो बसल्यारि देवापाशि होडु वेतो ?—(गो.) देवळाच्या शिखरावर कावळा बसला म्हणून तो देवापेक्षां श्रेष्ठ होईल काय ? तु०–प्रासादस्योऽपि शिखरे काको न गरुडायते ।

देवळाजवळ राहातो तो देवापासून दूर असतो—जो मनुष्य नेहमीं देवळाजवळ राहतो त्याला त्या देवाचें महत्त्व वाटत नाहीं व तो कधीं त्याच्या दर्शनास जात नाहीं. अनेकदां आपणांस लोक दूरच्या देवास विशेष भक्तीनें जातांना, आढळतात. तु०–अतिपरिचयात् अवज्ञा । Nearer the church is farther from God. (गो.) देवळ किवळें लागि, देवु तितलो दूर.

देवळांत काशाची घंटा टांगली, आवाज न निघे कदाकाळीं—देवळांत घंटा टांगली पण त्या देवळांत कोणी दर्शनासच जात नसेल तर तिचा आवाज कसा ऐकूं येणार ? एखादी गोष्ट करूनहि तिचा कांहीं परिणाम न दिसल्यास म्हणतात. निष्फळ गोष्ट.

देवळांत डोळे मिटावे व बाहेर सौंदर्य लुटावें—एकीकडे धार्मिक गोष्टी कराव्यात व दुसरीकडे अनाचार करावा; दांभिक वृत्ति.

देवळांतली हांसली म्हाण मंटपांतली हांसली—(गो.) देवळांतली हंसली म्हणून मांडवांतली हंसली. एकीनें केलेलें पाहून त्याचा अर्थ न समजतां दुसरीनें तिचें अनुकरण करणें. अंधानुकरण.

देवळीं रावळीं तीनदां—देवकृपेची व राजकृपेची प्राप्ति एकदम होत नसते. अनेक यत्न केल्याशिवाय हातीं घेतलेलें काम सोडूं नये. पुन्हां पुन्हां यत्न करावा.

देखणें, देखना——देखते रहना जवान—असा कीं बघत राहावा ! अशा अर्थानें. (ल.) खरपूस; सपाटून. 'म्हणजे त्याला असा चोप देतों, असा लंबे करतों कीं देखते रहना जवान !'–शिसं ३.४.

***देख दिवाने आपना सवदा**—(हिं.) शहाण्या मनुष्यानें आपला व्यवहार नीट पारखून करावा. शहाण्या मनुष्यानें स्वतः केलेल्या कृतीच्या परिणामाला जबाबदार असले पाहिजे. दिवाना पहा.

देखदुख्या करितो स्तुति, निंदेपेक्षां अधिक असती—जो मनुष्य केवळ तोंडापुरती स्तुति करतो तो निंदकापेक्षां वाईट असतो. कारण तो आपणांस फसवितो व निंदक आपणांस जागरूक ठेवतो.

देखनेमें और सुननेमें चार उंगलका फरक—डोळ्यांत आणि कानांत चार बोटांचें अंतर, पहा.

देखनेमें ढब्बू, चलनेमें शिवराई—खालीं पहा.

देखण्यांत ढबू, आणि चालण्यांत शिवेराइ—वरवर दिसण्यांत मोठा पण वास्तविक कमी किंमतीचा. दिखनेमें ढबू चलनेमें शिवराई, पहा.

देखला गोहो, लागला लोहो—पतीस पाहिल्याबरोबर त्याचा लळा लागणारी, व आईबाप वगैरेंना विसरणारी जी नवी नवरी तीबद्दल म्हणतात. (गु.) देखो मेरा रूप, ने भागे तेरी भुख.

देखला धोंडा, घातला कपाळीं—भरमसाटपणाची, अविचाराची वागणूक.

देखला नाहीं दिवा आणि पाहिला आवा; कधीं न पाहिला दिवा अन् एकदम देखिला आवा—दिवाहि पाहिला नाहीं त्यानें आवा (कुंभाराची भट्टी) पाहावा, त्याप्रमाणें. अगदीं थोडेसें सुद्धां ज्यानें पाहिलें नाहीं त्यानें पुष्कळ पाहिलें असतां जी मनाची स्थिति होते ती. " कलकत्ता शहर पाहून मी किंचित् स्तिमित झालों. आमच्या चंद्रपुरी भाषेंतच म्हणावयाचें झाल्यास 'कधीं न पाहिला

दिवा अन् एकदम देखला आवा,' अशीच माझी स्थिति झाली. "–चित्रमय जगत्, सप्टेंबर १९४१ पान ३७७. 'ज्यानें देखला नाहीं आवा, त्यानें पाहिला दिवा' अशीहि या उलट म्हण आहे.

देखला वडा, उपास मोडा––खाण्याचे पदार्थ पाहिल्याबरोबर उपास मोडूनहि खाण्यास तयार होणें. एखादी गोष्ट दिसल्याबरोबर तिच्याबद्दल मोह उत्पन्न होणें, ती हवीशी वाटूं लागणें; तिच्यावर भाळणें.

देखलें तेथेंच टेंकलें (टांकलें)— जेथें आधार मिळेल असें वाटेल तेथेंच ठाण मांडून बसणें. कोणी जरा सहानुभूति दाखविली कीं त्याचेच पाठीस लागावयाचें.

जोंवरी देखलें नाहीं पंचानना। तोंवरी जंबुक करी गर्जना।—(श्रीधर) सिंहाला पाहिलें नाहीं तोंपर्यंत कोल्हा गर्जना करतो. जोंपर्यंत जबरदस्ताशीं गांठ पडली नाहीं तोंपर्यंत बढाईखोर लोक खूप मर्दुमकीच्या गोष्टी करीत असतात; पण वेळ आली कीं पलायन करतात. 'जोंवरि तोंवरि जंबुक करी गर्जना। जंव त्या पंचानना देखिलें नाहीं॥'–तुगा३२३८.

देखलो गुंडो, घेतलें कपाळ—(गो.) पुढें, देखल्या देवा दंडवत, पहा.

देखल्या देवा दंडवत—'तोंड करा उगवत' असा चरण याच्यापुढें कधीं जोडण्यांत येतो. केवळ वाटेंत देऊळ दिसलें म्हणून हात जोडणें; सहजगत्या, निष्ठापूर्वक नव्हे, केलेला नमस्कार; तोंडापुरता आदर; वरवरची भक्ति; दिखाऊ उपचार; ओंठावरची स्तुति.

देखल्याचा लोभ सुटत नाहीं; देखल्या धनाचा लोभ सुटत नाहीं—समोर वस्तु दिसली म्हणजे ती हवीशी वाटूं लागते. जसें सीतेस सुवर्णमृग पाहतांच हवासा वाटला.

देखादेखी गांड (कुल्ले) शेकी—(गो.) एक शेकावयास बसला कीं दुसरा बसतो. तथ्य न समजून घेतां अनुकरण करणें; अंधानुकरण.

देखीय दिदार, और मारीय पैजार—मोहक वस्तूकडे कौतुकानें पाहावें पण तिच्या तावडींत सापडूं नये.—सवि. २१३.

देखे मढें, येई रडें—प्रेत पाहिल्याबरोबर रडें येणें. वरवर होणारा परिणाम; स्मशान वैराग्य (गो.) देकलें मढें आइलें रडें. सहजगत्या भेट झाल्यास प्रेमाचा पान्हा फुटणें.

देखोदेखी लिया जोग, घटे काया बढे रोग—(हिं.) दुसऱ्याचें पाहून वैरागी बनल्यास, मनापासूनचें वैराग्य नसल्यास, केवळ शरीर कृश होतें व शरीरांत रोग वाढतो. त्या वैराग्यापासून कांहीं फायदा होत नाहीं; केवळ शरीरकष्ट मात्र पडतात.

देख्या गुरु, कां शेक्या गुरु––गुरु ढोंगी, मतलबी कीं खरा, स्वतः तोषीस लावून घेणारा. पाठभेद––देख्या गुरु कीं शेख्या गुरु.

देखभट्टी———देखभट्टीचें ज्ञान––गुरूशिवाय घेतलेलें ज्ञान; दुसऱ्याचें पाहून, खरें रहस्य कळल्याशिवाय केलेलें अनुकरण; केवळ पाहून शिकलेलें.

देठ———देठीं लागणें––लाग लागणें; जम बसणें. 'माणूस भुकेकंगाल जाले आहे, चित्त स्थिर राहात नाहीं येक्या देठीं लागलें म्हणजे बखेडे होणार नाहीं.'–बापूगोप२३७.

❀ **देंटा तवशें देंटा लागलें**—(गो.) देठाची काकडी देठाला लागली. ज्याचें अधिष्ठान त्याला मिळालें अशा अर्थी.

देड———देड दमडेक म्हारग–(गो.) दीड दमडीला महाग. अत्यंत क्षुद्र वस्तु. दीड पहा.

देड बुदवंताक पोट रितें–अतिशहाण्याचें पोट उपाशीं.

देणगी———देणगी तसें भोरीप––मोबदल्या प्रमाणें काम. तु०–जशी देणावळ, तशी धुणावळ.

देणें———देणेंघेणें ठरविणें––लग्नाच्यावेळीं हुंडा, करणी वगैरे संबंधीं यादी करणें; देण्याघेण्याचा करार करणें. 'मुलगी पसंत करून देणेंघेणें नक्की ठरवून येतों.'–मोरप्र २२.

❀ **देणें आणि दुखणें कोणालाहि आवडत नाहींत**–– अर्थ स्पष्ट आहे. पुढें पहा.

देणें आणि दुखणें कोणालाहि वाईटच–कर्ज व रोग हीं सर्वांनाच फार पीडादायक असतात. दुखणें पहा.

देणें कुसळाचें आणि घेणें मुसळाचें—थोडें देऊन पुष्कळ मिळण्याची अपेक्षा करणें. तु०––आवळा देऊन कोहळा काढणें.

देणें कुसळाचें, झवणें मुसळाचें––(अशिष्ट) वरील प्रमाणेंच.

देणें, घेणें, राखणें, चतुराईनें करणें––सर्व व्यवहार कुशलतेनें करावा; सर्व हिशोब बरोबर ठेवून देणें घेणें करावें.

देणें घेणें रोम, माझ्या कामाला झोंब—कांहीं एक मोबदला न देतां आपलें काम दुसऱ्याकडून चांगलें करवून घेण्याची वृत्ति.

देणें घेणें, श्रीहरि जाणे--कर्ज वगैरे काढून तें फेडण्याची काळजी न करतां चंगळ करणें. 'ऋणं कृत्वा घृतं पिबेत।' या चार्वाक तत्त्वाप्रमाणें वागणें.

देणें तसें घेणें, देव तसें धुपाटणें—आपण जशी परमेश्वराची भक्ति करावी तशी तो आपणावर कृपा करून प्रसाद देतो व जसा देव अनुकूल प्रतिकूल असेल त्या मानानें त्याची पूजा होते व पूजेचीं उपकरणेंहि त्याच प्रकारचीं असतात. ज्या देवापासून लाभ होत असेल त्याची आपण भक्तिभावानें व बहुमोल उपचारांनीं पूजा करतों. ज्या मनुष्यापासून आपणास लाभ होतो त्याची आपण त्या प्रमाणांत स्तुति करतों.

देणें ना घेणें अन् कंदील लावून येणें--(वांय.) जुन्या काळीं वेश्येकडे सरदार श्रीमंतांनीं जावयाचें तें बरोबर शिपाई, कंदील इ. घेऊन थाटानें! मात्र वेश्येला पैसे देण्याच्या कामीं हात आंखडावयाचा. अशा प्रसंगींचे वेश्येचे उद्गार. रिकामका डौल याअर्थी.

देणें ना घेणें, दोन्ही सांज येणें--कांहीं काम नसतां विनाकारण खेपा घालणाऱ्या मनुष्यास म्हणतात. रिकामटेकडा, वारंवार येणारा मनुष्य.

देणें (देणं) नास्ति, घेणें (घेणं) नास्ति--देणें नाहीं कीं घेणें नाहीं. कोणताहि व्यवहार नाहीं. कोणाच्या भानगडींत न पडणें; कोणाच्या आगींदुगींत नसणें; सर्वस्वीं अलिप्त असणें; कांहीं संबंध नसणें. खालीं पहा.

देणं नास्ति घेणं नास्ति, लोभ करावा हे विनंति--ज्या ज्याशीं आपण कोणताहि व्यवहार ठेवीत नाहीं त्याला केवळ औपचारिक नमस्कार करून, परस्पर लोभ करण्याची विनंति केली म्हणजे झालें.

देण्याघेण्यांत चूक पडतेच--हिशोबामध्यें आंकड्यांत चूक होण्याचा संभव असतो म्हणून 'चूकभूल द्यावी घ्यावी' असा शेरा असतो. ज्यास द्यावयाचें असतें त्याचा हात आंखडता असतो व ज्यास घ्यावयाचें असतें त्यास अधिक आशा असते; अर्थात् चूक होणारच.

देण्याचा भरणा केला लोकाला, सावकार आला मागाला--कर्जाची फेड करण्याकरितां म्हणून भलत्याच माणसाजवळ पैसे दिले असतां तो फसविण्याचा संभव असतो व सावकारास पोंच न होतां त्याचें देणें तसेंच राहातें. याकरितां व्यवहारांत काळजी बाळगावी.

देण्याला (द्यावया) नाहीं थार, आड आला शनिवार--एखादी गोष्ट देण्याचें मनांत नसलें म्हणजे शनिवारचें निमित्त पुढें करतां येतें. शनिवारीं सामान्यतः देण्याघेण्याचा व्यवहार करीत नाहीं. आपल्याकडे तो शनीचा वार म्हणजे मंदवार म्हणून त्या दिवशीं व्यवहार करीत नाहीं. पण यहुदी लोकांचाहि तो शब्बाथ म्हणजे विश्रांतीचा दिवस असतो, ही गोष्ट लक्ष्यांत ठेवण्यासारखी आहे. तु०-न कर्त्याचा वार शनिवार.

दिली गाय, तिची आशा काय--(व.) मुलीच्या सासरीं छळ होत असला म्हणजे तिचे आईबाप म्हणतात. एकदां मुलगी दिली खरी मग तिच्याबद्दल हळहळ वाटून काय उपयोग?

दिले गाय दांत कां नाहीं--दान मिळालेल्या गाईचे दांत बघण्यांत अर्थ नाहीं. कोणती वस्तु फुकट मिळाल्यावर तिची परिक्षा करण्यांत काय अर्थ आहे. पाठभेद-धर्माच्या गायी दांत कांगे नाहीं. तु०-Do not count the teeth of a gift horse. Beggers are not choosers.

दिलें घर कीं उपजलें घर--मुलीला जगामध्यें फक्त दोन घरांचा आधार असतो: एक ज्या घरीं जन्म होतो त्या घरचा किंवा ज्या घरीं तिला दिली जाते त्या घरचा. तु०-आपघर कीं बापघर.

दिलेलें नाका नातिलें (होगडायिले) जाय--(गो.) मिळत असलेलें नाकारायचें आणि गेलेल्याबद्दल हळहळत रहायचें.

दिलेल्या उत्राक, घेतिल्या रिणाक अेक लेक आसका--(गो.)दिलेला शब्द आणि घेतलेलें ऋण हीं समान समजावीं. दोहोंचीहि भरपाई करावी लागते.

दिलेल्या तुकड्याचा व घातलेल्या भिक्षेचा--जेवढें मिळेल तेवढ्यावरच गुजराण करावी असा प्रसंग आलेला. कैद्याप्रमाणें दुसऱ्यावर अवलंबून असणें.-इंप ६२.

दिलेल्या मापान घेवंका, केलें तशें भोगका--(गो.) ज्या मापानें दिलें त्याच मापानें घ्यावें आणि केलें असेल तसें भोगावें.

दिल्या भाकरीचा, सांगितल्या चाकरीचा--दुसऱ्याची चाकरी पत्करून त्यावर अवलंबून असलेल्यानें मिळेल तें अन्न खाऊन पडेल तें काम केलें पाहिजे. पाठभेद-घातल्या अन्नाचा, सांगितल्या कामाचा.

दी मान तर घे मान--(गो.) [दी=दे] आपण दुसऱ्यास मान दिला तरच आपणास मान मिळतो.

देएंगे दिलाएंगे (और लवडा बतलाएंगे)–(हिं.) देऊं, देऊं म्हणून पुढें अजिबात नकार द्यावयाचा; दिरंगाईनें देणें चुकविणें व वर शिरजोरी करणें.

दे ग बाई जोगवा! म्हटल्यानें कोणी देत नाहीं––भीक मागितली असतां ती मिळेलच अशी खात्री नसते. भीक मागण्यासाठींहि दात्याचीं पुष्कळ आर्जवें करावीं लागतात. कोणतीहि गोष्ट श्रम केल्याशिवाय सहजासहजीं प्राप्त होत नाहीं.

दे गा देवा घळघळ मांडे, कष्ट करून खा गे रांडे!—जर भरपूर मांडे खाण्यास पाहिजेत तर त्यासाठीं कष्ट केले पाहिजेत. देवहि असेंच म्हणेल. सुखानें कोणी घालणार नाहीं. तर त्यासाठीं स्वतः श्रम केलेच पाहिजेत.

दे दान, सुटे गिराण––ग्रहण लागलें असतां दान मिळावें म्हणून मांग लोक वरीलप्रमाणें म्हणत भीक मागत हिंडतात. ग्रहणांत दान केलें म्हणजे अधिक पुण्य लागतें व ग्रहण लवकर सुटतें अशी जुन्या लोकांची समजूत आहे. (ल.) भिक्षेकऱ्यांची हीन वृत्ति.

दे धरणी ठाव—'दे माय धरणी ठाव' पहा. 'दे धरणी ठाव असा प्रकार जाला.'–भाब ६७.

दे बाय लोणचें, बोलेन तुझ्या हारचें––दुसऱ्याकडे एखादी गोष्ट मागावयास गेलें असतां त्याच्यासारखें त्याच्या बाजूनें बोलावें लागतें. तु०–ज्याची खावी पोळी, त्याची वाजवावी टाळी.

दे माय! धरणी ठाय (ठाव)––धरणी माते! मला तुझ्या पोटांत आश्रय दे. [रामानें रावणाकडून सीता सोडवून आणल्यानंतर व पुढें तीस टाकल्यावर सीता म्हणते.] अतिशय त्रास झाल्यावर माणूस असें म्हणतो. पुरेंपुरेंसें, नकोनकोसें होणें.–पामो १४७.–शाब २·२२८. धरणी पहा.

दे रे देवा! कुरूप, तर देवानें दिलें स्वरूप—मुद्दाम वाईट मागतां चांगलें मिळणें. कधीं कधीं चांगली गोष्टहि पथ्यावर पडत नाहीं तेव्हां म्हणतात.

दे रे वाण्या, खा रे प्राण्या––वाणी जसा जिन्नस देईल तसा घेऊन कांहीं विचारपूस न करणाऱ्या गिऱ्हाइकास खावा लागतो. चार ठिकाणीं भावाची, मालाच्या गुणदोषाची चवकशी न करतां एके ठिकाणींच एका वाण्याकडून माल घेणाऱ्या ऐदी माणसाबद्दल म्हणतात. वाणी अशा माणसाला हटकून फसवितो.

दे रे हरी, पलंगावरी (बाजेवरी)––स्वतः परिश्रम न करतां केवळ परमेश्वराच्या कृपेवर किंवा यदृच्छेवर अवलंबून असणारा, आळशी, कर्तबगार नसलेला मनुष्य असें म्हणतो. 'असेल (माझा) हरि तर देईल खाटल्यावरी' असाहि पाठ आहे.

दे लाख तर घे दोन लाख, देतोस काय तर घेतोस काय?––देणेंघेणें कांहीं नाहीं, नुसत्या तोंडाच्या वाफा दवडणें. (अ) हस्तादपि न दातव्यं गृहादपि न दीयते। परोपकरणार्थाय वचने किं दरिद्रता॥–सुर १५५·११९. (आ) प्रियवाक्यप्रदानेन सर्वे तुष्यंति जंतवः। तस्मात्तदेव वक्तव्यं वचने का दरिद्रता॥–सुर १५५·८३.

दे सोबी दाता, न दे सोबि दाता––'देईल तो दाता, न देईल तोहि दाता' पहा.–शाब २·२५१.

देई घेई ती आईबाई, न देई ती मसणांत जाई–ज्याच्याकडून आपणाला कांहीं प्राप्ति होते त्याची आपण स्तुति करतों पण ज्याच्याकडून प्राप्ति होत नाहीं त्याची अगदीं पर्वा करीत नाहीं.

देईल तो दाता, न देईल तोहि दाता––दाता पहा. तु०–देएगा उसका भी भला, न देएगा उसका भि भला.

देईल दाता, तर खाईल मागता––याचकाला कोणी दिलें तरच त्याला खावयास मिळणार. तेव्हां दाते पाहिजेतच.

देईल वाणी तर खाईल प्राणी––दे रे वाण्या० पहा.

देऊन फेडी लोकांचें कर्ज, राहील तें तुझें समज––आपणाला जी प्राप्ति होईल त्यांतून प्रथम लोकांचें देणें देऊन टाकल्यावर जें राहील तेंच खर्च करण्याचा आपणास अधिकार असतो.

देतां घेतां परमेश्वर—मनुष्य हा निमित्त मात्र असतो. दान करणारा व घेणारा दोघांसहि प्रवृत्ति परमेश्वराकडून होते. व त्यांत त्यांच्याकडे कांहीं श्रेय किंवा कमीपणा नसतो. सर्व गोष्टी परमेश्वरी नेमानुसार होतात. तु०–(कन्यादान मंत्र) क इदं कस्मा अदात् कामः कामाय अदात्। कामो दाता कामो गृहीता कामः समुद्रमाविशेत्। इत्यादि.

देतां घेतां रोख ठोक, त्याला घेरती सर्व लोक––जो मनुष्य देण्याघेण्याच्या व्यवहारांत चोख असून नेहमीं रोखीनें व्यवहार करतो, त्याच्या भोंवतीं सर्व लोक जमतात. त्याचें गिऱ्हाईक वाढते.

'देतां घेतां शनिवार––'देण्याला नाहीं थार०' पहा.

देतां घेतां शिमगा––दुसऱ्याची वस्तु परत देण्याची इच्छा नसणें.

देतां चोख, घेतां रोख—देण्याच्या व घेण्याच्या बाबतींत नेहमीं स्पष्ट व रोखीनें व्यवहार करावा. माल चांगला द्यावा व पैसा रोख घ्यावा.

देतां दिवाळी, घेतां शिमगा –(अगर उलट)— एखाद्या मनुष्यास देतांना आनंद होतो पण परत करतांना फार त्रास होतो. त्याच्या उलट देतांना कठिण वाटतें पण घेतांना गोड लागतें.

देतां नये ठाव, धरतां नये वाव—वाऱ्याला धरून ठेवणें ज्याप्रमाणें कठिण असतें, त्याप्रमाणें एखाद्याला आश्रय देणें कठिण असतें.

देना थोडा, दिलासा बहुत—देणें थोडेंच पण त्याबद्दल आश्वासन फार मोठें. देण्याचें आश्वासन देऊन मोठा धीर द्यावयाचा पण प्रत्यक्ष फारच अल्पावर पाठवणी करावयाची.

देनेकू ना लेनेकू, (पण) लढनेकू मजबूर—देणें घेणें कांहीं नाहीं पण मारामारीस मात्र नेहमीं तयार.

देय घेय ती गोमटी, नाय ती हिमटी—(कों.) 'देई घेई ती आईबाई०' पहा. माणूस आपल्याला जें बरें तें बरें म्हणतो व इतर वाईट ठरवितो.

देयाघेयाला इयाट नाहीं, माणुसकीला खोट नाहीं—(व.) अघळ पघळ सहानुभूति दाखवावयाची, मोठा भलेपणाचा आव आणावयाचा पण प्रत्यक्ष हातून कांहीं सुटावयाचें नाहीं.

देलं दान, मगे मुसलमान—(व.) दिलेलें दान हिंदु कधींहि परत मागणार नाहीं, मुसलमान मागेल. 'दिले दान, घेतलें दान, पुढल्या जन्मीं मुसलमान !' असें मुलें दिलेलें परत मागणाऱ्याबद्दल म्हणतात.

देवाण घेवाण—देण्याघेण्याचा परस्पर व्यवहार. सौदा किंवा व्यवहार जमविण्याकरितां थोडेंफार दोन्ही बाजूंनी सोडणें; तडजोड; एरंडोली न्याय.—गांगा २७७.

देवेगा सो पावेगा—जो देईल त्याला मिळेल. जो या जन्मीं दानधर्म करतो त्यास त्याचें फळ पुढील जन्मांत मिळतें.

द्या भर, करा तर्र—एखाद्या मनुष्यास उत्तेजन देऊन एखाद्या कामास प्रवृत्त करणें. एखाद्यास हरभऱ्याच्या झाडावर चढविणें.

द्यावी काळावर दृष्टि, समाधान मानावें पोटीं—आपला ज्याप्रमाणें अनुकूळ किंवा प्रतिकूळ काळ असेल त्या मानानें असेल त्या परिस्थितींत समाधान मानून राहावें.

द्यावें तर उधळ्या, न द्यावें तर कृपण—दोन्ही बद्दून पंचाईत. जग दोन्ही बाजूंनीं हंसतें.

द्यावें तसें घ्यावें, करावें तसें भोगावें—आपण जसें दुसऱ्याशीं वागतों तसें दुसरे आपणाशीं वागतात. आपण कोणावर उपकार केले नाहींत तर दुसरेहि आपल्या उपयोगी पडत नाहींत. तसेंच आपल्या कर्माचीं फळें आपणासच भोगावीं लागतात.

द्यावें देवानें, घ्यावें माणसानें—परमेश्वर नेहमीं मनुष्यांस अनेक गोष्टी देत असतो व मनुष्य त्या घेत असतो. मनुष्य कांहीं परमेश्वरास देऊं शकत नाहीं. तेव्हां आपणांस जें जें कांहीं प्राप्त होतें त्याबद्दल आपण परमेश्वराचे ऋणी असलें पाहिजे. तु०–अनंत हस्तें कमलावरानें, देतां किती घेशिल दो करानें ।

देणावळ——जशी देणावळ तशी धुणावळ— जसें मोल तसें काम. जसें वेतन तसें वर्तन.

देणेंदार——देणेंदारापेक्षां घेणेंदाराला जास्त स्मरण—ज्याला ऋण परत करावयाचें असतें त्यापेक्षां ज्याला वसूल करावयाचें असतें त्यास त्याचें अधिक स्मरण असतें.

देव——देव करणें-घालणें—एखाद्या मनुष्याचा नाश होण्याकरितां, वेड वगैरे लावून त्याला माणसांतून उठविण्याकरितां जादू, टोणा, मंत्र तंत्र, मूठ वगैरे प्रयोग करतात त्यास म्हणतात.

देवगडास जाणें—मरणें; मृत्यु पावणें; वैकुंठास, कैलास जाणें.

देव तुमचें भलें करो!—१ दुसऱ्याबद्दल सदिच्छा, कृतज्ञता व्यक्त करण्याकरितां हा वाक्प्रचार योजतात. २ बोलणारांना कांहीं आठवलें नाहीं म्हणजे म्हणतात. ३ एक तऱ्हेचें निरर्थक पालुपद.

देव दिसणें—मनुष्य निकृष्टावस्थेंत गेला म्हणजे देवाचें स्मरण करतो. यावरून विपन्न दशा येणें; हाल होणें; संकटांत परमेश्वराची आठवण होणें. 'बायको मेल्यावर देव दिसतील.'

देव देव करणें—१ फार देवार्चन करणें. २ फार प्रार्थना करणें. ३ अतिशय श्रम करणें.

देव देव करतां--पुष्कळ प्रयत्न, हांजी हांजी, प्रार्थना करून; मोठ्या मिनतवारीनें; अतिशय विनवण्या करून.

देव देव्हाऱ्यांत नसणें--१ जी वस्तु ज्या ठिकाणीं पाहिजे तेथें ती नसणें. २ मालक (मन) ठिकाणावर नसणें; धनि नाहींसा होणें. ' बाजीरावसाहेब पळून गेल्यावर इंग्रजांनीं पुणें घेतलें यांत नवल नाहीं. आपला देव जर देव्हाऱ्यांत नाहीं तर दुसऱ्यास दोष देण्यांत अर्थ काय?' ' ह्याप्रमाणें संस्थानिकांचे-धन्याचेच देव देव्हाऱ्यांतून नाहींसे झाल्यावर अश्रितांचे हाल कोण कुत्रा खाणार ? '-छच २७.

देव देव्हाऱ्यांत बसणें--पुन्हां मूळजागीं येणें; स्थिर होणें. 'सर्व जग फिरून एकदाचे आमचे देव देव्हाऱ्यांत बसले.'

देव नवसाला पावणें--इच्छित फळ मिळणें; मनांतील हेतु पूर्ण होणें; मनासारखें होणें. ' भूप म्हणे कर्णा हा जरि अर्जुन देव पावला नवसा । '-मोविराट ३.८८.

देव पाण्यांत घालणें--कांहीं निर्वाणीचें संकट प्राप्त झालें असतां देवांवर संकट घालून त्यांना पाण्यांत बुडवून ठेवण्याचा भाविक लोकांचा प्रघात आहे. उदाहरणार्थ आवर्षण, अतिवृष्टि, गंडांतर इत्यादि प्राप्त होतांच भाविक लोक देव पाण्यांत घालतात व विघ्न निवारण होतांच देव पाण्यांतून बाहेर काढून त्यांची यथाविधि पूजाअर्चा करतात. त्यावरून, देवावर संकटाचा भार घालणें; चिंताजनक परिस्थिति असणें; उत्कंठेनें संकटनिवृत्तीची वाट पाहात बसणें. ' नोकरी जाऊं नये म्हणून देव पाण्यांत घातलेत अगदीं. '

देव पावणें--देव प्रसन्न होऊन मनीषा पुरी करणें. पाहिजे तेंच होणें; ईप्सित सिद्ध होणें; मनाजोगी गोष्ट घडणें. ' विप्रा सुरवर कन्या पाहुनि हर्षे मनीं म्हणे बलहा । भगवंत पावला, या दोघींत प्रथम लावितो कलहा ॥'-मोआदि १०६. ' इसा०-(स्वगत) निदान शहाजीची बायको जरी सांपडली तरी देवच पावला म्हणायचा ! '-शिसं ३.४.

देवपूजा वाढणें--थोडी प्रतिष्ठा वाढल्यामुळें फुगणें. 'गांड भरे आणि देवपूजा वाढे.'

देवबाप्पा करणें--(बालभाषा) नमस्कार करणें; हात जोडणें; देवास नमन करणें. ' तो देवबाप्पा कर म्हणाला त्याबरोबर तिनें हात जोडून नमस्कार केला.'-सुदे ५.

देवब्राम्हणांचें राज्य--हिंदूंचें राज्य. ' तिरचनापली व चंदावर देवब्राह्मणांचें राज्य, यास चंदाखानानें उपद्रव केल्याकरितां......साहेबांस यश येऊन देवब्राह्मण राज्यास निरोपद्रव जाला. '-पेद २८. ८५.

देवलोक होणें--मृत्यु पावणें; परलोकास वैकुंठास जाणें. 'त्याप्रमाणें तो गेला आणि देवलोक झाला.'-विक्षिप्त १.६१.

देव होऊं लागणें--अरेराव, दंडेल होणें, होऊं लागणें; वरचढपणा गाजविणें; उन्मत्तपणें वागणें; सत्ता गाजविणें; वर्चस्व स्थापन करूं पाहणें.

देवाकडे जाणें--(मृत्यूची वार्ता लहान मुलास सांगतांना) मरणें; देवलोकास जाणें; स्वर्गास जाणें.

देवाची (चे) आण; देवाचेण; देवाच्यान—(कुण.) देवाची शपथ.

देवाचें डोकें धरणें--देवपूजा करणें; देवभजनीं लागणें. एखाद्याविषयीं अनादरानें बोलतांना म्हणतात.

देवाचें देवपण दिसून येणें--खऱ्या खोट्याची प्रचिती येणें; खरेखोटें निवडलें जाणें; मूळस्वरूप बाहेर पडणें.

देवाचें नांव घेणें--कोणत्याहि सत्कार्याला आरंभ करतांना देवाची पूजा, स्मरण करतात. यावरून कार्याला प्रारंभ करणें. ' हं ! घ्या देवाचें नांव नि करा सुरुवात. '

देवानें डावी देणें--नकार मिळणें. मनांत कांहीं हेतु धरून मूर्तीच्या डाव्या-उजव्या अंगास फुलें किंवा अक्षता चिकटवितात व कोणता तरी प्रश्न विचारतात. उजव्या अंगचीं फुलें पडल्यास संमति-होकार समजावयाचा व डाव्या बाजूचीं पडल्यास नकार समजावयाचा. त्यावरून कौल विरुद्ध देणें; अमान्य होणें; संमति न मिळणें.

देवानें भरणें-धरणें--भरणें पहा.

देवानें मारणें—देवाची अवकृपा होणें; देव रागावणें; परमेश्वराचा कोप होणें.

देवापुढचा--सामान्यतः देवापुढें शंख ठेवलेला असतो व सांबाच्या पिंडीपुढें नंदी बसविलेला असतो यावरून. १ शंख. २ नंदी. (ल.) मूर्ख माणूस.

देवाऽमाध्यावैले फूल चुकप—(गो.) नित्याचा नियम चुकणें.

देवावर हवाला घालणें-देणें--देवावर विश्वास टाकणें; भरंवसा ठेवणें; सर्वस्वीं अवलंबून असणें.

देवावर हात ठेवणें--शपथ घेणें; देवावर हात ठेवून प्रतिज्ञा करणें; देवाची आण वाहाणें.

देवावरची तुळस-फूल-बेल काढणें-उचलणें--१ देवावरील निर्माल्य काढणें. २ शपथ घेण्याचा एक प्रकार. दिव्य करणें. बेल भंडारा उचलणें पहा.

देवाशीं बसविणें--ज्याच्या अंगांत देवाचें वारें येतें तो प्रथम देवाजवळ बसून धूप वगैरे जाळून देवाची प्रार्थना करतो व नंतर त्याच्यांत संचार होतो. यावरून अंगांत वारें, देव आणण्यास सांगणें.

देवास--ला करणें--देवाची करणी, देवाची इच्छा या अर्थी. एखादें अघटित कार्य घडून आलें असतां तोंडांतून निघणारा उद्गार.

देवास पेंचणें--शत्रूवर संकट आणण्यासाठीं देवाला अडकून ठेवणें; देवावर संकट घालणें.

देवास शिताळ देणें--देवाला स्नान घालणें.

देवासारखा बसणें--चुपचाप बसणें; स्वस्थ, शांतपणें बसणें.

देवाज्ञा होणें—मृत्यु पावणें; देवाकडे जाणें; देव लोकास जाणें.

❀ **देव आकाशाहून मोठा आणि मुंगीहून धाकटा**--देव मोठ्यांत मोठा व लहानांत लहान आहे. अणोरणीयान् महतो महीयान् ।

देव आला द्यायाला, तों पदर नाहीं घ्यायाला--वैभव प्राप्त होण्याची संधि आली असतां ती साधून न घेणें, ती गमावणें.

देव करतां खेव लागतें--एक गोष्ट करावयास जावें तों भलतेंच घडून येतें. देवधर्म करावयास जावें तों पाठीमागें लचांड लागतें. धर्म करतां कर्म उभें राहातें.

देव कराया दोन डोया, किडवळ कराया तीन डोया--[डोई–य = पिढी] साठ वर्षांत चांगला राजा प्रजेला वैभवसंपन्न करतो तर वाईट राजा नव्वद वर्षांत तिला अनाथ दीनहीन करतो.

देव करी ती वाट--(गो.) देव करील ती दशा.

देव कोणाला चातुर्य देतो, कोणाला पैका देतो—परमेश्वर सर्वच गोष्टी सर्वांस देतो असें नाहीं. कोणाच्या वांट्यास बुद्धि येते तर कोणाच्या वांट्यास संपत्ति येते. बहुधा संपत्तीवान् मनुष्य बुद्धिवान् नसतो.

देवु जाला लागी, मन गेलें दूर--(गो.) देव जवळ आला आणि मन मात्र दूर गेलें.

देव जांवका, तरि चणे खांवका—(गो.) देव व्हायला हवें असेल तर लोखंडाचे चणे खावे लागतात. तु०—चणे खावे लोखंडाचे । तरी ब्रह्मपदीं नाचे ॥—तुगा.

देव झाले लटके, ब्राह्मण (बामन) झाले घटके--या कलियुगामध्यें देवांत सत्त्व राहिलें नाहीं; तो नवसास पावत नाहींसा झाला आहे व ब्राह्मण सगळे चाकरीच्या मागें लागले आहेत. त्यांनींहि आचार सोडला. तेव्हां चालू विपत्काळ हा क्रमप्राप्त आहे असा बोलण्याचा आशय.

देव तशी पूजा आणि संगत तशी वागणूक--ज्या प्रकारचा देव असेल त्या प्रकारचे त्यास उपचार करतात. ग्राम्य देवतेस पशु वगैरे बळी देतात तसे पौराणिक देवतांस ते देत नाहींत. त्याचप्रमाणें जसा माणूस असेल तशी त्याच्या योग्यतेप्रमाणें त्याबरोबर वर्तणूक ठेवावयाची असते. तु०—चांभाराच्या देवाला खेटरांची पूजा.

देव तसें धुपाटणें, न्हावी तसें थापटणें—जसा देव तशीं त्याचीं उपकरणें व जसा न्हावी तशीं त्याचीं हत्यारें किंवा त्याचें काम. ज्याच्या त्याच्या योग्यतेप्रमाणें तो काम करतो व तशी त्यास वागणूक मिळते.

देव तारी, त्यास कोण मारी--ज्याचें परमेश्वराच्या मनांत रक्षण करावयाचें आहे, त्याचा नाश कोणाच्याहि हातून होत नाहीं. तु०--अरक्षितं तिष्ठति दैवरक्षितम् । सुरक्षितं दैवहतं विनश्यति । जीवत्यनाथो विपिने ऽ प्यरक्षितः । कृतप्रयत्नोऽपि गृहे विनश्यति ॥ –सुर ९१·४७. ‘देव राखे तया मारील कोण । न मोडे कांटा हिंडतां वन ॥ –तुगा ३७१०.

देव दमडीचा, ऊद पैशाचा--क्षुल्लक गोष्टीकरितां अव्वाच्या सव्वा खर्च करणें. तु०–अडक्याची भवानी व सापिक्याचा शेंदूर.

देव दितलो जाल्यार घरा बसिल्ल्याकडेन दिता—(गो.) देवानें द्यायचें ठरवलें तर तो घरीं बसल्या ठिकाणींच आणून देतो.

देव दितां देवच्चार नाडतां (नाट्टा)--(गो.) देव देतो पण मधला पिशाच आडवा येतो, लुबाडतो. देव देतो० पहा.

देव देउळांत आणि देऊळ देवांत--त्यांतल्या त्यांत. गुळाचा गणपति व गुळाचा नैवेद्य याप्रमाणें.

देव देतो अन् (पर) कर्म नेतें–परमेश्वरानें दिलें तरी नशीबांत नसलें तर लाभत नाहीं. –स्वरापरि ७९.

देव देतो नी देवाचार अडवा येतो--देव दितां० पहा. कर्मांत नसलें म्हणजे मिळत नाहीं.

देव देव्हाऱ्यांत नांत; देव ना देवाऱ्यांत—(गो.) देव देव्हाऱ्यांत राहिले नाहींत. एखाद्याची अवनत दशा यावी, आधार तुटावा अशावेळीं म्हणतात. वाक्प्रचार पहा.

देव न मारे लाठींसे, कुमत देत चढाय—(हिं.) दुष्क्र त्याला शिक्षा म्हणून देव प्रत्यक्ष काठानें मारीत नाहीं तर त्य माणसाला कुबुद्धि देतो व त्यामुळें त्याचा नाश आपोआप होतो. –सवि ११८१.

देवनामें भिक्षा मागतो, तो आपला अर्थ साधतो-- जो परमेश्वराच्या नांवानें भिक्षा मागतो तो त्यांत आपला स्वार्थ साधीत असतो; कारण परमेश्वराला कशाचीच जरूर नसते. 'जो दुसऱ्याकरितां भीक मागतो तो आपला अर्थ साधतो' पहा.

मानला तर देव, नाहींतर धोंडा--आपला जर भाव असेल तर मूर्तींत आपणांस परमेश्वर दिसेल; नाहींतर तीच मूर्ति दगडाची वाटेल. परमेश्वराच्या अस्तित्वाची प्रचिति श्रद्धेनेंच होऊ शकते.

देव नाहीं देव्हारीं, धुपाटणें (धुपाटणेंवाला) उड्या मारी--देवळांत देव नसला म्हणजे उपकरणें किंवा पुजारीच जणूं काय देव बनतो. घरांत यजमान नसला म्हणजे चाकरांचें फावतें व ते मजा करतात व शिरजोर बनतात.

देव नाहीं भेटला आणि शेवटीं मेला—अनेक प्रयत्न करूनहि परमेश्वर प्राप्ति न झाल्यामुळें शेवटीं प्राणास मुकला सर्व प्रयत्न निष्फळ होऊन हताश झालेल्याबद्दल म्हणतात.

टांकीचे घाव सोसल्यावांचून देवपण येत नाहीं—दगडाचा देव करण्यासाठीं दगडावर टाकी मारून मारून त्याला विशिष्ट रूप द्यावें लागतें. तेव्हां, मोठेपणा येण्यासाठीं कष्ट सोसावे लागतात. टाकी पहा. तुका म्हणे टांकीघायें देवपण। फुटलिया जन कुला पुसी ॥–तुगा २७९२. साहोनि टांकी घाये। पाषाण देवचि झाला पाहे। –तुगा २०६५

देव पाहावा किंवा राव पाहावा—एक परमेश्वर तरी आपली ददात दूर करण्यास समर्थ असतो किंवा राजा तरी तसें करूं शकतो. तेव्हां या दोघांसच विनवणी करण्यांत अर्थ आहे; बाकीच्यापुढें तोंड वेंगाडण्यांत कांहीं अर्थ नाहीं. 'देव पहावा किंवा राव पहावा अशी आपल्यांत म्हण आहे ती यथार्थ आहे.'–धर्माजी ६१.

देवपूजेचा कंटाळा। हातीं सोंगट्यांचा चाळा।—एखादा मनुष्य देवाची पूजा करण्याचा मात्र कंटाळा करतो पण सर्व वेळ सोंगट्या वगैरे खेळण्यांत निष्कारण खर्च करतो. वेळेचा सत्कारणीं व्यय न करणाऱ्याबद्दल व विशेषतः अश्रद्ध मनुष्याबद्दल म्हणतात.–तुकाराम.

देवप्रीतीच्या पडिभरें। उद्धरिले भक्त सारे ॥—तु –देव सर्वांवर प्रेम करतो व आपल्या भक्तांचा उद्धार करतो.

देव मन पळौन धन दिना--(गो) देव माणसाचें मन पाहातो आणि त्याप्रमाणें त्याला धन देतो.

देवमूर्तींत नाहीं शक्ति, मुसलमान तिला फोडिती—ज्या मूर्तीमध्यें कांहीं सत्त्व किंवा सामर्थ्य नाहीं तिचा मुसलमान भंग करतात. तींत म्हणजे तिच्या अनुयायांत सामर्थ्य असेल तर तिचा भंग होणार नाहीं.

देव सर्वत्र जगीं भरला, तो कैसा दिसे निराळा—परमेश्वर सर्व स्थिरचर व्यापून असल्यामुळें आपणांस तो त्यावेगळा दिसून येत नाहीं. सर्वत्र परमेश्वर आहेच.त्यांवाचून रिता ठाव कोठेंच नसल्यामुळें त्यास आपणांस इतर गोष्टींपासून वेगळें करून पाहतां येत नाहीं. तु०–स्थिरचर व्यापुनि अवघं जो जगदात्मा दशांगुळें उरला।

देव सारावे परते। संत पूजावे आरते।—देवापेक्षां संतांची योग्यता मोठी दाखविली आहे. प्रथम संतांची उपासना करा मग देव पुढें घ्या. देव देखील संतांना मानतात. तु०—देव ते संत देव ते संत ॥–तुगा २४०६.

देव होतां पाठमोरा। नसतीं विघ्नें येतीं घरा।—परमेश्वराची अवकृपा झाली म्हणजे नाहीं तेथून आपत्ति येऊं लागतात.

देवा! आपण कशाचे? नंदी! आपण पाषाणाचे—देवाला विचारतांना, नंदीला पाषाणाचा म्हणणें म्हणजे देवालाहि तसेंच म्हणण्यासारखें आहे. तु०–लेकी बोले सुने लागे.

देवा तूं पाव,तणा भात जांव--(गो.)देवा तूं प्रसन्न हो आणि गवताला भात पिकेल असें कर.

देवा! दिरे पूत, देवान् दिलें भूत—देवाजवळ सुपुत्र मागितला आणि देवानें कुपुत्र दिला! मुलाची हौस होती पण कुपुत्रामुळें नको तो मुलगा! असें होऊन गेलें. मुलगा वाईट निघाला म्हणजे वैतागानें आई बाप म्हणतात.

देवांक चुकलेना, मनशा खंचो पाड ?—(गो.) देवास चुकत नाहीं तर माणसाची काय कथा.

देवाक पावो, माका गावो--(गो.)देवाला पावो, मला मिळो. भक्तानें देवाला दिलेली एखादी वस्तु पुजारी केवळ देवाला दाखवतो आणि ती स्वतःसाठीं उपयोगांत आणतो.

देवाक हात, गुरवाक भात--(गो.) देवाला हात, गुरवाला भात. देवाला नुसता नैवेद्य दाखवायचा आणि भात खायचा गुरवानें. 'धन्याला धत्तुरा नि चाकराला मलिदा' अशा अर्थानें म्हणतात.

देवाकई दैत्यां गेलें कारभार होड—(गो.)देवांपेक्षांहि दैत्यांच्या घरचा कारभार मोठा.

देवाकडे हात, आपल्याकडे भात—देवास नैवेद्य दाखवितांना फक्त हात त्याकडे करतो व नैवेद्याचा भात मात्र आपणाकडे घेतो. मनुष्य वरून भक्ति दाखवितो पण आंतून स्वार्थी असतो.

देवा करता शेवा, लोकां करतां हेवा—(गो.) देवाची सेवा करायची आणि लोकांचा हेवा दावा करायचा.

देवाची करणी देवास ठाऊक—परमेश्वराची लीला अगाध आहे

देवाची करणी, नारळांत पाणी—नारळामध्यें वर कवची असतां आंत पाणी कसें उत्पन्न होतें? ही परमेश्वराची कृति असून तिचा उलगडा मनुष्यास होऊं शकत नाहीं —शाब २·२२४.

देवाची करणी, राक्षस मारिले माकडांनीं—परमेश्वराची लीला अशी विचित्र आहे कीं, रामाचे अनुचर असणाऱ्या माकडासारख्या क्षुद्र प्राण्यांनीं धिप्पाड अशा रावणाच्या राक्षसांचा नाश केला.

देवाची गेली घांट, तर पुजाऱ्याचें गेलें शेट (इयांट)—पुजाऱ्याला घांटेच्या चोरीचें काय होय? त्याच्या पदरचें कांहीं जात नाहीं. देऊळ, घांट पहा.

देवाची दया आणि आईची माया—या गोष्टी कधीं सरत नाहींत. यांचा अंत लागत नाहीं.

देवाचें नांव आणि आपला गांव—दुसऱ्याच्या नांवावर स्वतःचा फायदा करणें. मागें पहा.

देवाच्या नांवें संसार, हलका होतो दुःखभार—देवावर भरंवसा ठेवून संसार केल्यास मनाला हलकें वाटतें व संकटें सोसणें सुलभ होतें.

देवाजवळ मागितला एक (डोळा), देवानें दिले दोन—थोडक्याची इच्छा केली असतां अधिक लाभ होणें एका अंधळ्यानें देवाजवळ एक डोळा मागितला, पण देवानें त्यावर प्रसन्न होऊन त्याला दोन डोळे दिले. तेव्हां इच्छेपेक्षां प्राप्ति मोठी झाली म्हणजे म्हणतात. 'अंधळा मागतो एक डोळा०' पहा.

देवाजवळ मागितला पूत, (तों) देवानें दिला भूत—'देवा दिरे पूत०' पहा.

देवान दिल्लें कोणाच्यान व्होर नोजो—(गो.) देवानें जें दिलें असेल त्याच्यापुढें कोणास जातां येत नाहीं.

देवान दिल्लें ते मनशाकड किने—(गो.) देवाच्या हातांतील गोष्ट मनुष्याच्या हातांत नसते.

देवान दिलें म्हुण भोगूंक समजुं नाका?—(गो.) देवानें दिलें म्हणून त्याचा उपभोग घ्यायला शहाणपण नको का?

देवान दिल्लें सर्ना आनी मनशांनीं दिल्लें उर्नो—(गो.) देवानें दिलेलें सरत नाहीं व माणसानें दिलेलें उरत नाहीं. देवाचें देणें पुरवठ्याचें असतें

देवानिमित्तान भोटटू खाता; देवानिमित्तान भट खाता—(गो.) देवाच्या निमित्तानें भटाला सर्व मिळतें. देव पुढें ठेवलेल्या सर्व वस्तु पुजाऱ्यास मिळतात, किंवा धार्मिक विधींतील साहित्य उपाध्यायास मिळतें.

देवांनीं घडला नूर, तो कधीं नाहीं होणार दूर?—देवानें जसें एखाद्याला रूप वगैरे दिलें असेल तें तसेंच राहणार. त्यांत बदल होणें नाहीं.

देवानें दिलें व कर्मानें (नशीबानें) नेलें—देव देतो कर्म नेतें, पहा.

देवानें दिलें व कर्मानें नेलें, कर्माचें फळ पुढें आलें—(त्याचें फळ तुला आलें)—(कहाणींतील विधान) परमेश्वरानें कांहीं दिलें तरी नशिबांत नसल्यास तें लाभत नाहीं व उलट नशिबांत असलेली विपत्ति भोगावी लागते.

देवानें दिलेलें सरेना, माणसानें दिलेलें पुरेना—देव देतांना इतकें देता कीं तें भरपूर होतें पण मनुष्यानें कितीहि दिलें तरी तें पुरवठ्यास येत नाहीं. 'देवान दिल्लें सर्ना०' पहा.

देवानें पंख दिले ते आकाशांत उडण्यासाठीं—परमेश्वरानें जे आपणांस गुण दिले असतील त्यांचा आपण योग्य उपयोग करून घ्यावा.

देवानें पाहिलें, तेंच जगाला दिसलें—आपण एखादी गोष्ट कितीहि गुप्तपणें केली तरी ती परमेश्वरास दिसतच असते व अशी गोष्ट पुढें उघडकीस आली तरी त्यांत जें सत्य असेल, जें आधीं परमेश्वरास कळलें असेल तें इतरांस कळलें म्हणून त्यांत विषाद मानण्याचें काय कारण आहे.

देवापेक्षां गुरवाची प्रतिष्ठा अधिक—यजमानापेक्षां नोकराचा इतमाम, महत्त्व जास्त असल्यास म्हणतात.

देवापेक्षां दानव बळी—आपणांस अनेकदां देवांचा पराभव राक्षसांनीं केलेला आढळतो. त्याप्रमाणें सज्जनापेक्षां दुर्जनांची भरभराट झालेली अनेक वेळीं आपणास दृष्टीस पडते. पण अखेरीस ज्याप्रमाणें राक्षसांचा पराभव होतो त्याप्रमाणे दुर्जनांस अधोगति प्राप्त होते.

न देवाय न धर्माय—कोणत्याच चांगल्या कार्याकरितां (पैसा, श्रम) उपयोगी न पडणें; वायां जाणें. संबंध श्लोक–(अ) न देवाय न धर्माय न बन्धुभ्यो न चार्थिने । दुर्जनस्यार्जितं वित्तं भुज्यते राजतस्करैः॥ –सुर ५५·५७. (आ) न देवाय न धर्माय विधवायै नमो नमः । प्रज्वालितानि शष्पाणि नाङ्गाराय न भस्मने ॥—समपद्य.

बाहेरच्या देवाला टिळे गोळे आणि घरच्या देवावर हगती कावळे—आपले जे आप्तसंबंधीं असतील किंवा आपली जी विवाहित स्त्री असेल तिची अनास्था करावयाची व बाहेर दुसऱ्या लोकांची अगर स्त्रियांची खुशामत करून त्यास देणग्या वगैरे देऊन खूष करावयाचा प्रयत्न करावयाचा. हा मूर्खपणा आहे.

देवाला द्यावे कण, द्यावे मण—परमेश्वरास थोडेसें अर्पण केलें तरी तो आपणास भरपूर देतो. तु०—पत्रं पुष्पं फलं तोयं यो मे भक्त्या प्रयच्छति ।

देवाला नैवेद्य, आपली चंगळ—देवाला नैवेद्य दाखविण्याकरितां म्हणून एखादा चांगला पदार्थ केला, तरी तो शेवटीं आपणांसच खावयास मिळतो.

देवाला फूल, घराला मूल—ज्याप्रमाणें देवावर फूल वाहिल्यानें शोभा येते त्याप्रमाणें घरांत मुलानें शोभा येते.

देवाला भट आणि मुलाला पंतोजी-मास्तर–देवाला ज्याप्रमाणें पूजेची नीट तजवीज होण्याकरितां पुजाऱ्याची आवश्यकता असते, त्याप्रमाणें मुलाला नीट वळण लागावें म्हणून शिक्षकाची आवश्यकता असते.

देवावरच्या विंचूचा आदर केला, त्याला जोड्याचा मार मिळाला—देवाच्या पिंडीवर जरी विंचू बसला असला तरी त्याला जोड्यानें ठार मारणें हेंच योग्य असतें. मग त्या क्रियेंत पिंडीस जोडा लागला तरी हरकत नाहीं. नीच मनुष्याला जर आश्रय दिला तर आपणांस तसदी पोंचल्यावांचून राहात नाहीं. 'तेथें पैजाराचें काम । अधमासी तो अधम ॥'–तुगा ४१९१.

देवाविषयीं हुरहुरी, तोच करील दुरी—आपल्याला जर देवाबद्दल आतुरता लागली असेल तर त्याचेंच नामस्मरण केल्यानें ती दूर होईल.

देवास वास, माणसास घास—पूजा करतांना देवाला गोडगोड पदार्थांचा नैवेद्य समर्पण करतात. देव तो नैवेद्य प्रत्यक्ष कधीं खात नाहीं, केवळ वास मात्र घेतो. पण तो नैवेद्य पूजा करणारा भक्षण करतो अगर इतरांस वाटतो. कारण दुसऱ्याचें व फायदा आपला, अशावेळीं म्हणतात.

देवीं धर्मीं पैसा नाहीं, खर्च झाला अनाठायीं—देवाधर्मामध्यें जो पैसा खर्च होतो तो व्यर्थ खर्च झाला असें मानूं नये. भलत्याच गोष्टींत पैसा खर्च करून टाकून देवाधर्माच्या वेळीं मात्र पैसा नाहीं म्हणून सांगावयाचें, ही रीत चांगली नव्हे. जो पैसा देवाधर्माच्या कामीं येत नाहीं ज्याचा भलत्याच गोष्टींकडे खर्च होतो, तो सत्कारणीं लागत नाहीं.

देवो दुर्बलघातकः ।—देव नेहमीं दुर्बलांच्याच मुळावर आलेला असतो असें वाटतें. कारण गरीब लोकच तेवढे दैवहीन असतात व श्रीमंत मात्र चैनींत व अनीतींत लोळत असतांना दिसतात. तेव्हां देवहि प्रबलांचा पक्षपाती दिसतो, असें उद्वेगानें वाटूं लागतें. संबंध सुभाषित असें:—(अ) अश्वं नैव गजं नैव व्याघ्रं नैव च नैव च । अजापुत्रं बलिं दद्यात् देवो दुर्बलघातकः ॥ (आ) सर्वोद्वेगकरं मृगादनममुं संत्यज्य हा धिक् त्वया, लोकस्यानपकारिणं गिरिनदीतीराटवीनिर्वृतम् । अश्नन्तं तृणमेणशावमदयं व्याध घ्नतामु वृथा, देवो दुर्बल घातकोऽयमिति सा गाथा यथार्थीकृता ॥

देवघर——**देवघर काढून शेतखाना बांधणें**—देवघर मोडून त्याचा शौचकूप करणें म्हणजे चांगली वस्तु मोडून घाणेरडी वस्तु करणें हा मूर्खपणा आहे.

देवजी——**देवजी धसाडा**—माकडाच्या खेळांत पुरुषवेष घेतलेल्या माकडाला देवजी धसाडा म्हणतात. माकडिणीला रत्नी किंवा भागाबाई म्हणतात. (ल.) कुरूप, दांडगा माणूस. 'देवजी धसाडे चेले । त्या अनेक रूपें दिधलीं । अस्सल करामतवाली । भलोबा, भलिरे लाधली शिकार ॥'–सन्मित्र समाज मेळ्यांतील पदें (१९०८).

❀**देवजी धसाड्या, पुंजाई पाद्री**—(व.) नवरा हाणमार करणारा व बायको गरीब असें जोडपें.

देवता——**देवतार्चन**–'श्रीसमर्थांनीं मोंगली अत्याचारी सत्तेविरुद्ध करावयाच्या क्रांतीस, मसलतीस, हा सांकेतिक शब्द ठरविला होता.' –आबा चांदोरकर (गजेंद्रमोक्ष). 'या देवतार्चनांत जसे नंदलाल मंडलोई होते तसे माळव्यांतील कांहीं ठाकूर, जहागीरदारहि होते!'–गजेंद्रमोक्ष १·१२१.

देवते जोर, संभ्रमा पेज—(गो.) देवीला ताप आला असला तर देवळाच्या नोकरांना फक्त पेज मिळते (रोजच्याप्रमाणें मिष्टान्नें मिळत नाहींत). आश्रयदाता संकटांत असेल तेव्हां आश्रितांना मिळेल त्यावर राहावें लागतें.

देवमणी——एक देवमणी बहात्तर खोड्या चोरतो—घोड्यास देवमणी हें फार शुभलक्षण आहे. एक देवमणि असला म्हणजे खोड्या किती का असेना त्या खपतात. ‘ तुका म्हणे खोडी । देवमणी नेदिती दडी ॥ –तुगा ३१८७. ‘ बहात्तर खोडी परी देवमणी कंठीं । तैशा मी जगजेठी तुका म्हणे ॥ ’–तुगा १६७५.

देवर्षि——नारद, अत्रि, मरीचि, भरद्वाज, पुलस्त्य, पुलह, क्रतु, भृगु, वसिष्ठ, प्राचेतस, भरत, तुंबरु, कणाद इत्यादि प्रत्येक. यांमध्यें नारद सर्वश्रेष्ठ. अश्वत्थः सर्व वृक्षाणां देवर्षीणां च नारदः । –गीता १०.२६.

देवस्की——देवस्की नको, माणुसकी हवी—नुसती देवभक्ति काय कामाची ? मनुष्यधर्माला उचित असे दयादातृत्वादि गुण पाहिजेत.

देवस्तान——देवस्तान पडणें-घालणें—देवाची आराधना करून त्याजकरवीं शत्रूंचा नाश करणें; मंत्रतंत्र जादूटोणा करून दुसऱ्यास देवाकडून पीडा करविणें; देव घालणें.–पेंडसे कुल वृत्तांत, पान ५९.

देवालय——देवालयाची नित्य फेरी, मोक्ष लाधे संसारीं—दररोज जर देवदर्शन घेण्याकरितां देवळांत जाव याचा परिपाठ ठेवला, तर संसारी मनुष्य देखील मोक्षास जातो.

देवालयीं दुर्वासना, त्यास भारी यमयातना––जो मनुष्य देवळामध्यें कुकर्म करतो किंवा वाईट इच्छा करतो त्यास पातक लागून अंतीं यम त्यास शिक्षा करतो. तु०–अन्यक्षेत्रे कृतं पापं पुण्यक्षेत्रे विनश्यते । पुण्यक्षेत्रे कृतं पापं वज्रलेपं भविष्यति ॥

देवी——देवी देवळांत, नायटे घरोघर–गांवांत–मुलुखांत–देवी देवळांतच असते पण ती रागावली असतां तिच्या रागापासून घरोघर किंवा सर्व गांवांत, प्रांतांत नायट्यांचा उपद्रव होतो. एखाद्या वाईट गोष्टीचें मूळ दूर असतें पण तिचा परिणाम फार दूरवर पोंचतो व जीपासून तो त्रास होतो ती व्यक्ति अगर वस्तु मात्र अलिप्तच असते. दुष्कृत्यांचा दूरवर परिणाम होणें.

देवी रडते हगतां, प्रसन्न होय गे भक्ता––(बायकी) देवी स्वतः आजारी असतांना तीपुढें आपलेंच गाऱ्हाणें मांडणें. (निंदार्थी) फाजील स्वार्थीपणा.

देवी रानांत, नायटे गांवांत—‘देवी देवळांत०’पहा.

देवीचा भोप्या नाचतो अन् दाणे गोळा करतो—देवीचा भक्त देवीकरितां नाच करतो असें दाखवितो पण स्वतःकरितां दाणे मागत असतो.

देव्हारा——देव्हारा फैलावणें-माजणें-वाढणें-फवडीमोल मनुष्याची नसती प्रतिष्ठा वाढणें.

देव्हारा माजविणें––प्रस्थ माजविणें; स्तोम माजविणें; फार प्रतिष्ठा वाढविणें.–विक ५७. ‘ या सुधारकांना प्रत्येक बाबतींत बायकांचे देव्हारे माजविण्याची मोठी हौस !’ ––एकचप्याला २. ३.

देव्हाऱ्यांत देव नाहींसा होणें––१ एखादी थोर व्यक्ति, राजा, अधिकारी स्वस्थानीं नसणें. २ भीति किंवा आश्चर्य यामुळें मन ठिकाणीं नसणें.

देव्हाऱ्यांत बसविणें–मांडणें—अतिशय भक्ति, प्रीति करणें; अतिशय मान देणें; देवाप्रमाणें मानणें.

देश——देश घेणें; आपला देश घेणें—आपल्या स्वतःच्या कामांत लक्ष घालणें;आपल्या कार्यक्षेत्रांत कार्य करणें.

देशाचा पाटा वरवंटा होणें—प्रदेश बेचिराख, ओसाड होणें; नासधूस होणें.

देशांतरीं जाणें––स्वदेशांतून स्वगृहांतून बाहेर जाणें; जगांत भटकणें; परदेशी होणें; परागंदा होणें; तोंड काळें करून देश सोडून जाणें.

देशावरून कोकणांत मीठ पाठविणें—जेथें एखादी वस्तु विपुल आहे तेथें ती अल्प असलेल्या ठिकाणाहून पाठविणें. अशा प्रकारचा उलटा, बिनलाभाचा कारभार. –केसरी २७-५-३०. To carry coals to New Castle.

देशीं जाणें—१ स्वदेशास जाणें; आपल्या मुलखास जाणें. २ (आंग्ल.) विलायतेस जाणें.

❀ **देशकाळ वर्तमान । सदा असावें सावधान।**——रामदास. नेहमीं सभोवतालची परिस्थिति पाहून सावधपणें वागावें.

❀ **देश गेला, परदेश गेला, शीक माझी कहाणी, (water) वाटर म्हणतां प्राण गेला, खाटखालीं पाणी**––जवळ वस्तु असतां तीबद्दल उगाच आरडाओरडा आटापीटा करणें. स्वभाषा, स्वसंस्कृति सोडणाऱ्याची काय स्थिति होते तें सांगितलें आहे.

देश तसा वेश—परिस्थितीप्रमाणें वागणें. तु०–गंगा गये गंगादास, जमुना गये जमुनादास, मथुरागये मथुरादास. Be a Roman when you go to Rome.

देशस्थ (देसुगी) दांडगा, भाकरीवर सांडगा—देशस्थ लोक मजबूत असतात; कारण ते भाताऐवजीं भाकरी खातात व सांडगे तोंडीं लावतात. तु०—कोंकणस्थ इ० पहा.

देशातकिन वेसु, हें विसर्ल्यारि मेसु—(गो) देशा सारखा वेश आणि ही गोष्ट विसरल्यावर फजातीच.

देस्पेज——देस्पेज केल्याबगर रस्पेत मॅयूणा—(गो.)श्रम केल्य वांचून अधिकार अथवा मान मिळत नाहीं.

देह——देह उगाळणें—(चाकरी इ. कामीं) शरीर झिजविणें; कष्ट करणें; खस्ता खाणें.

देह कारणीं लावणें—एखाद्याच्या कार्याकरितां स्वदेह खर्च करणें, कामास लावण; देहाचें सार्थक करणें; परोपकार वगैरे सत्कृत्यांत देह झिजविणें.

देह टाकणें-ठेवणें-सोडणें-मरणें; देहत्याग करणें-इहलोक सोडून जाणें.' देह त्यागितां कीर्ति मागें उरावी।'—राम

देहत्रय—१ स्थूलदेह, २ लिंगदेह, ३ कारणदेह.

देहद्वय—१ स्थूलदेह, २ लिंग किंवा सूक्ष्मदेह.

देह पडणें—मृत्यु येणें; देहत्याग होणें; शरीर कामास येणें; शरीर झिजणें. 'तुझ कारणीं देह माझा पडावा । '-राम.

देहबुद्धि राहणें—धडगत असणें.

देह लोटणें—मूर्च्छा येणें; मूर्छित पडणें; बेभान होऊन पडणें; शुद्धि गेल्यामुळें शरीर गळून पडणें.

देहांत असून विदेही—जीवन्मुक्त; जाणीवेच्या पलीकडे गेलेला.

देहांत उजेड पडणें—अपराधाबद्दल शिक्षा भोगल्यानें प्रश्चात्ताप होणें; खरें ज्ञान होणें; उमज पडणें.

देहान्त प्रायश्चित्त—मृत्यूची शिक्षा. 'यास देहांत प्रायश्चित्त करावें.'-हव ४४.

देहावर असणें—शुद्धींत असणें; देहभानावर असणें

देहावर नसणें—मन ठिकाणावर नसणें; भ्रम होणें; बुद्धिभ्रंश होणें.

देहावर येणें—१ शुद्धीवर येणें.'देहावरी ये ये म्हणती।'—गुच ५३·६. २ वाईट खोड्या अथवा बेबंद चालीरीती टाकून देणें.

देहीं देवपण दाखविणें-आणणें-येणें—(एखाद्यानें) मनुष्यरूपी असूनहि, याच जड देहावस्थेंत आपल्यांत दैविक आत्मीय सत्याचें ज्ञान किंवा ब्रह्मज्ञान आहे अशी लोकांस प्रचीति आणून देणें.

❀ **देह कबरींत पडल्यावर पुष्कळच झोंप घ्यावयाची आहे**—आपण जोंपर्यंत जीवत आहों तोंपर्यंत काम केलें पाहिजे. झोंपेंत काल व्यर्थ दवडतां कामा नये. मेल्यावर सर्व वेळ विश्रांतींतच घालवावयाचा असतो.

देह त्यागितां कीर्ति मागें उरावी ।—मनुष्यानें असें कार्य करावें कीं त्यामुळें तो मरण पावल्यानंतर त्याची कीर्ति पाठीमागें राहील. ' देह त्यागितां कीर्ति मागें उरावी । मना सज्जना हेचि क्रीया धरावी ॥ '—राम.

देह दुःख सहन होतें, मनाचें फार कठिण वाटतें—मनुष्याला शारीरिक श्रमाचें किंवा कष्टाचें फारसें वाटत नाहीं, तो तें सहज सहन करतो. पण मानसिक त्रास झाल्यास तो फार जाचक होतो.

देह देवापाशीं आणि चित्त जोड्यापाशीं—एखादा मनुष्य देवळांत देवदर्शनासाठीं गेला असतां देवळाबाहेर जोडा काढून ठेवतो व मग दर्शनास जातो. तेव्हां त्याच्या मनांत आपला जोडा चोरीस जाईल काय हा विचार सारखा घोळत असतो; म्हणून देवदर्शन करतांना सुद्धां त्याचें लक्ष देवाकडे नसून जोड्याकडे असतें.

देह देवापाशीं, चित्त भातापाशीं—(बायकांत रूढ) वरीलप्रमाणेंच. देवापुढें जप वगैरे करीत बसावयाचें पण लक्ष सारें चुलीकडे. अशी देवभक्ति काय उपयोगी ?

देह म्हातारा होतो, जीव तरणा असतो—शरीर जरी वृद्धपणानें क्षीण होऊन गेलें तरी मनाचा उत्साह कायम असतो. जीव अमर असतो; आत्मा अमर आहे.

देह राजाचा, कष्ट कावाड्याचे—प्रत्येकाला आपल्या योग्यतेनुसार कामाचा बोजा उचलावा लागतो. व्यक्ति जितकी मोठी तितकी जबाबदारी जास्ती. मोठीं माणसें ऐषआरामांत असतात अशी सर्वसाधारण कल्पना असते, पण ती चुकीची आहे. राजकुलांत जन्म घेऊन-प्रत्यक्ष राजा होऊनहि-त्या व्यक्तीला कावडी (पाण्याच्या घागरी) वाहणाऱ्या साधारण माणसासारखेंच कष्ट करावे लागतात; कारण कष्टाशिवाय इष्ट साध्य होत नाहीं.

देहं वा पातयेत्, अर्थं वा साधयेत् ।-प्राण तरी द्यावा किंवा ध्येय तरी साध्य करावें. हें टोंक नाहीं तर तें टोंक.

देहांत पित्थ, संसारांतु वित्त, परमथांतु चित्त हाळीत(हवण) आसका—(गो.)देहांत पित्त, संसारांत वित्त आणि परमार्थांत चित्त या गोष्टी अवश्य हव्यात. देहीं पित्त० पहा.

देहामध्यें शक्त, घेतलें दिल्लीचें तक्त — जर शरीरामध्यें सामर्थ्य असेल तर दिल्लीचें राज्यहि मिळवितां येईल. मनगटाच्या जोरावर काय करतां येणार नाहीं ?

देहाला दहा दरवाजे, त्यांत बैसले प्राणराजे—देहाला दहा द्वारें असतात व आंत प्राण असतो. तीं दहा द्वार पुढील प्रमाणें-२ डोळे, २ कान, २ नाकपुड्या, १ तोंड, १ गुद, १ मूत्रद्वार, १ तालुरंध्र.

देहीं आरोग्य नांदतें, भाग्य नाहीं यापरतें—प्रकृति उत्तम असणें हें मोठें भाग्याचें लक्षण आहे.–मन्वन्तर, सप्टेंबर १९४०.

देहीं देवाची वस्ती, आणि मानव फिरतो रस्तो रस्तीं--मनुष्याच्या शरीरांतच परमेश्वराचें अस्तित्व असून मनुष्य परमेश्वर प्राप्तीसाठीं रानोमाळ भटकत असतो. तु०—(अ) देहींच देव असतां कां रे भ्रमतोसि व्यर्थ तू रानीं। नाभिंत सुगंधि असुनी कस्तुरिमृग जेविं तो फिरे रानीं ॥ (आ) देहीं असोनिया देव। वृथा फिरतो निदैंव। देव आहे अंतर्यामीं। व्यर्थ हिंडे तीर्थाश्रमीं। नाभीं मृगाचे कस्तुरी। व्यर्थ हिंडे वनांतरीं। साखरेचें मूळ ऊंस। तैसा देहीं देव दिसे। दुधीं असतां नवनीत। नेणे तयाचें मथित। तुका सांगे मूढ जना। देहीं देव कां पहाना ॥ –तुगा ४४३१.

देहीं पित्त, प्रपंचीं वित्त, परमार्थीं चित्त—शरीरांत पित्ताची आवश्यकता असते, संसारांत द्रव्याची व परमार्थाच्या कामीं चित्ताच्या एकाग्रतेची आवश्यकता असते.

देहली——देहलीदीपन्याय–[सं. देहली= उंबरठा] उंबरठ्यावर दिवा ठेविला असतां त्याचा उजेड दोन्ही बाजूंस (दोन्ही खोल्यांत) पडतो. भाषणाचा एखादा भाग, मुद्दा, शब्द दोन्हीकडे जेव्हां सारखाच लागू पडतो तेव्हां म्हणतात.

जनाब, देहली तो बहोत दूर है—महाराज, अजून दिल्ली तर खूपच दूर आहे. एखाद्या कार्याची सिद्धि बऱ्याच दीर्घकालानें व्हावयाची असल्यास म्हणतात.–दि ३·४१४. (फारसी) हनोज देहली दूर आस्त.

दैत्य——दैत्यांची वेळ–तिन्हीसांज; राक्षसवेला. –श्यामची आई.

दैना——दैना भाकणें--दाखविणें--सांगणें—आपली दैन्यावस्था उघडी करून मदतीची याचना करणें; दैन्य दाखविणें.

दैन्य——दैन्य करणें —भीक मागणें. दैना पहा. 'मग निदैव निघे किरीटी। दैन्याचि करूं ॥ '--ज्ञा ९·३१.

❀ दैन्य ताठा विलग सोबती पण वास एकत्र करिती –दैन्य व गर्व हीं वास्तविक विसंगत आहेत, पण तीच आपणांस अनेकदां एकत्र आढळतात. गरीब मनुष्यानें गर्व करूं नये पण पुष्कळदां आपणांस गरीब मनुष्यें ताठ्यानें वागतांना दिसतात. यामुळें त्यांचें नुकसान होतें.

दैन्य सांगण्याला सोपें, भोगण्याला कठीण--गरीबीचें वर्णन करणें सोपें पण तिचा अनुभव फार वाईट आहे.

दैव——दैव उघडणें-उपटणें-खुलणें—भरभराट होणें; सुखाची प्राप्त होणें; चांगली ग्रहदशा येणें; ऊर्जित काळ येणें.

दैव उभें राहणें—दैवाचा जोर होणें; प्रक्तनाचा परिणाम घडणें; नशीबानें अकस्मात् सुखदुःखाचा प्रसंग येणें; एखादी गोष्ट कर्मवशात् घडून येणें.

दैव काढणें; दैवास चढणें—भरभराट होणें; पुढें येणें; नशीबवान निघणें; दैव अनुकूल होणें.

(तस्मात्) दैव प्रधान —नशीब हें फार बलवत्तर आहे, त्यापुढें कोणाचें कांहीं चालत नाहीं.

दैव फिरणें—नशीब प्रथम चांगलें असतां पुढें वाईट स्थिति होणें; वाईट दिवस येणें; ग्रहदशा पालटणें; अनिष्ट दिवस येणें; नशीबानें उलट खाणें.

दैवाचा पुतळा–नशीबवान; भाग्यशाली. 'जाणे भक्तीचा जिव्हाळा। तोचि दैवाचा पुतळा ॥ '--तुगा २३१०.

दैवाचा भोपळा—कमनशीबी; दुर्दैवी; हाडकपाळ्या.

दैवाची परीक्षा करणें-पाहणें—एखाद्या गोष्टींत पडलें असतां धोका आहे असें समजूनहि ती गोष्ट करण्याचें साहस करणें; प्रयत्न करून पाहणें.

दैवाचे ताले—भाग्य; दैवरेषा. 'असे त्याचे दैवाचे ताले की कुत्र्यावर नौबत चाले.' ताले पहा.

दैवाच्या नांवानें हांका मारणें—नशीबाला बोल लावणें; प्राक्तनास दोष देणें.

दैवांतून उतरणें–नष्ट होणें; नामशेष होणें (माणूस, वस्तु).

दैवानें उचल करणें-यारी देणें–हात देणें—नशीबानें मदत करणें; नशीब उघडणें, फळफळणें; भाग्यरेषा उमटणें.

दैवानें उपट खाणें—दैव पराकाष्ठेचें अनुकूल होणें; दैव उघडणें.

दैवानें ओढ घेणें; दैव ओढवणें—वाईट (नुकसानीची) गोष्ट करण्याकडे प्रवृत्ति होणें; नशीबानें भलतीच बुद्धि सुचणें; कर्मानें अधोगतीस नेणें.

दैवानें धांव घेणें-करणें—चांगल्या किंवा वाईट गोष्टीकडे अकारण प्रवृत्ति होणें; कर्मानें ओढून नेणें; दैवगतीनें ओढ घेणें.

दैवानें मागें घेणें-पाहणें-सरणें-हटणें—नशीब फिरणें; दैव पालटणें; ग्रहदशा पालटणें; भाग्य उलटणें.

दैवावर हवाला देणें—नशीबावर सोपाविणें; नशीबावर भिस्त ठेवणें; दैवगतीवर अवलंबून ठेवणें; दैवावर विसंबून बसणें.

दैवास येणें—नशीबीं येणें; दैवानें एखाद्यावर येणें, गुदरणें.

दैवास रडणें—नशीबाच्या नांवानें हांका मारणें; प्राक्तनास दोष देणें, बोल लावणें.

धड कांव्यावर घालून दैवास रडणें—स्वतः आपत्ति ओढवून घेऊन नशीबास दोष देणें.

❀ **दैव आलें घरा अन् कवाड आड करा; दैव आलें द्यायला अन् पदर नाहीं घ्यायला**—(वांय.) 'दैव देतें, कर्म नेतें' याप्रमाणें. तु०—अनंत हस्तें कमलावरानें, देतां किती घेशिल दोकरानें.

दैव आसिल्याक सदा लेंडा, नासिल्याक खेंची लेंडा—(गो.) [बायकांची जुनी म्हण] नशीबांत असल्यास मुलें होतात, नसल्यास कोठून होतील.

दैव-उदय झाल्यावीण, प्रगट होत नाहीं गुण—मनुष्याच्या अंगीं चांगले गुण, कौशल्य, बुद्धि असली तरी अनुकूल काल आल्याशिवाय तिचा उपयोग होत नाहीं.

दैव उपाशी राही आणि उद्योग पोटभर खाई—जो मनुष्य नशीबावर हवाला ठेवून स्वस्थ बसतो तो उपाशीं मरतो व जो उद्योग करतो तो पोटभरून खातो.

दैवगति न सारखी, कदा न व्हावें दुःखी—नशीब कांहीं नेहमींच सारखें नसतें. कधीं प्रतिकूल तर कधीं अनुकूलहि होतें. याकारितां कोणत्याहि परिस्थितींत दुःख मानूं नये. वाईट दशा असली तरी ती कालांतरानें बदलतेच.

दैव देतें आणि कर्म नेतें—एखाद्याच्या दैवयोगानें उत्कर्ष व्हावा पण त्याच्या कर्मानें-वाईट वर्तनानें त्याची अधोगति व्हावी अशी अवस्था. तु०—देव देतो व कर्म नेतें.

दैव देतें तितकें नेतें—एखादी गोष्ट नशीबानें प्राप्त होते पण तेंच फिरलें म्हणजे ती नष्ट होते. पुढें पहा.

दैव देतें, दैव घेतें, भाग्य कधीं स्थिर नसतें—नशिबाच्या योगानें आयुष्यांत नेहमीं भरती ओहोटी चालूच असते. एकच स्थिति फार दीर्घकाल चालू नसते. तेव्हां भाग्याच्या दिवसांत ताठून जाऊं नये.

दैव नसतां अनुकूल, होती आप्तहि प्रतिकूल—दैव प्रतिकूल असतां आपले आप्तइष्टहि आपल्याविरुद्ध वर्तन करतात. तु०—घर फिरलें म्हणजे घराचे वांसेहि फिरतात.

दैव नाहीं लल्लाटीं, पाऊस पडतो शेताच्या कांठीं—दैव अनुकूल नसल्यास आपल्या शेताजवळ जरी पाऊस पडला तरी तो शेतांत न पडतां शेताच्या कांठावर पडतो.

दैव पडतां माघारीं, उड्या मारून काय करी—दैव अनुकूल नसेल तर पुष्कळ धडपड केली तरी तिचा कांहीं उपयोग होत नाहीं.

दैव फिरलें कीं बुद्धि फिरते—मनुष्याचें दैव प्रतिकूल बनलें म्हणजे भलतीच गोष्ट करावीसें वाटूं लागतें. व बुद्धीस एक प्रकारचा भ्रम उत्पन्न होऊन आपणांस नुकसानकारक अशा गोष्टी आपल्या हातून होतात. (अ) कर्मायत्तं फलं पुंसां । (आ) किं करोति नरः प्राज्ञः प्रेर्यमाणः स्वकर्मणा । प्रागेवहि मनुष्याणां बुद्धिः कर्मानुसारिणी ॥ (इ) विपरीत दैव होती विपरीताचि मत पहा कसें रचितें । —मोमोसल १·३४. (ई) विनाशकाले विपरीतबुद्धिः ।

दैव फिरलें, सारेंच उलटापालट झालें—एक. नशीब प्रतिकूल असलें म्हणजे सर्व गोष्टी आपल्या विरुद्ध होतात.

मनसा चिंतितं कार्यं दैवमन्यत्तु चिंतयेत् ।—मनानें कांहीं एक ठरविलें असतां नशीबानें दुसरेंच घडतें. (अ) तारुण्ये च मृता भार्या पातकं किमतःपरम् । मनसा चिन्तितं कार्यं दैवमन्यत्तु चिन्तयेत ॥ (आ) मनसा चिन्तितं कार्यं दैवमन्यत्तु चिन्तयेत । राजकन्याप्रसङ्गेन गुरुर्भवति भिल्लवः ॥ Man proposes & God disposes.

दैव येईल तेव्हां दरोडा पडेल—आपणांजवळ कांहीं नसलें तर दरवडा पडण्याची भीति नाहीं. जेव्हां दैव अनुकूल होऊन कांहीं लाभ होईल तेव्हा पुढें दरवडा पडण्याची भीति. याकारितां प्रथम दैव उघडून द्रव्यलाभ तर होऊं द्या. मग दरवड्याचें पाहून घेतां येईल. तु०—सोन्याचा उंबरठा तर होऊं द्या, मग कपाळ फुटूं द्या !

दैव वतकीर दशा वता; दैव वतरीच दशा वता—(गो.) दैव गेलें कीं त्याच्या मागून अवूहि जाते.

दैवहीन प्राण्यावर, संकटें येतीं वरचेवर—दुर्दैवी प्राण्यावर एकामागून एक संकटें येतात. तु०–प्रायो गच्छति यत्र भाग्यरहितस्तत्रापि यान्त्यापदः ॥

दैव हें देवापेक्षांहि एका मात्रेनें अधिक—[दैव यांत 'देवा'पेक्षां एक मात्रा अधिक] परमेश्वरी कृपेपेक्षांहि दैवाची अवकृपा फार बलवत्तर आहे. तु०–देव देतो कर्म नेतें. देवानें दिलें कर्मानें नेलें.

दैवाचा फटका, नाहीं अद्यापि ठाउका––दुर्दैवाचा अनुभव प्रत्यक्ष आल्याशिवाय त्याची तीव्रता कळत नाहीं

दैवाची गति, विलक्षण अति––नशीबाचे खेळ अगम्य आहेत.

दैवाची भोपळी आणि चारी पाय मोकळी––कमनशिबी व स्वैर, फटिंग स्त्री.–छच ८८.

दैवाचें पारडें फिरलें आणि दिवस काढिले––एकदां कर्मदशा प्राप्त झाली म्हणजे ती भोगल्याशिवाय चुकत नहीं.

दैवानें दिलें पण कर्मानें नेलें––दैव देतें आणि कर्म नेतें, पहा.

देवानें पालखींत बसला आणि दैवानें उचालितो पालखीला–नशीब अनुकूल असेल तर पालखींत बसायास मिळतें म्हणजे वैभव प्राप्त होतें व नशीब प्रतिकूल झालें तर वैभव जाऊन पालखी वाहण्याची म्हणजे भोई बनण्याची पाळी येते.

दैवायत्तं कुले जन्म मदायत्तं तु पौरुषम् ।––कोणत्या कुलांत जन्म यावयाचा हें दैवाधीन असेल पण पराक्रम करणें हें पुरुषाच्या हातांत असतें. कर्ण अश्वत्थाम्याला म्हणतो–सूतो वा सूत पुत्रो वा यो वा को वा भवाम्यहम् । दैवायत्तं कुले जन्म मदायत्तं तु पौरुषम् ॥ –वेणीसंहार ३·३३.

दैवीं आलें तें भोगलें पाहिजे––जें नशीबांत असेल तें भोगल्याशिवाय सुटत नाहीं.

दैवीं लिहिलें तें कदापि न टळे—जें भाळीं तें न चुके कदा काळीं. तु०–ललाटलिखिता रेखा परिमार्ष्टुं न शक्यते ।

दैवी विचित्रा गतिः।–नशीबाचे खेळ अगाध असतात. (अ) कांता वक्ति कपोतिकाकुलतया नाथान्तकालोऽधुना । व्याधोऽधो धृतचापसज्जितशरः श्येनः परिभ्रामति । इत्थं सत्यहिना स दष्ट इषुणा श्येनोपि तेनाहतः । तूर्णं तौ तु यमालयं प्रति गतौ दैवी विचित्रा गतिः॥–सुर ९५·१२४. (आ) चित्रागतिः कर्मणाम् ।–सुर ९४·१०४. (इ) वक्रं विधेः क्रीडितम् । –सुर ९४·१०५.

दो——दो दिवसाची (चाकरी, मजा इ.)—क्षणभंगुर; थोडा वेळ टिकणारी. 'दो दिवसाची तनु ही साची सुरतरसाची करूनि मजा । '

दो टक्यांनीं धड––धडधाकट; बळकट.

❀ **दो तांगा लग्नाक, तिन तांगा वाजंतरां**––(गो.) [तांग=आणेली] लग्नाला वीस आणि वाजंत्रीला तीस, पहा.

दोमें तिसरा जैसा आंखमें कंकर—दोन मनुष्यांत विशेषतः स्त्रीपुरुष एकत्र असतां तिसरा मनुष्य तेथें आला तर तो डोळ्यातील खड्याप्रमाणें सलतो. स्थितो न खादामि हसन्न जल्पे गतं न शोचामि कृतं न मन्ये । द्वयोस्तृतीयो न भवामि राजन्केनास्मि मूर्खो वद कारणेन ॥––सुर १७४· ८९१. द्वाभ्यां तृतीयो न भवामि राजन् ।—पंचतंत्र.

दो हातीं मिळवावें, एक हातीं खर्चावें—मिळवतांना खूप द्रव्य मिळवावें पण जपून खर्च करावा.

दोघे——दोघे जोडीचे, बैल गाडीचे—दोन सारख्या योग्यतेचीं माणसें एकत्र आलीं म्हणजे गाडीचे दोन बैल जसे गाडी इष्ट दिशेला नेतात तसें सहकार्यानें काम करून कार्य पूर्ण करतात.

दोघे डोळे शेजारीं, भेट नाहीं संसारीं—ज्याप्रमाणें दोन डोळे जवळ जवळ असून कधीं एकाला एक लागत नाहींत, त्याप्रमाणें दोघे भाऊ किंवा मित्र अगदीं जवळ जवळ राहात असूनहि, केव्हां केव्हां त्यांची भेट जन्मभरहि होत नाहीं.

दोघे भांडितां तिसऱ्यासी जाये—दोघांचें भांडण, तिसऱ्याचा लाभ.–समर्थांचें संभाजीस पत्र. इमं ११२.

दोघे श्रीमंत झगडती, त्यांत गरिबाची आहुती—दोन श्रीमंत मनुष्यांचा तंटा लागला म्हणजे त्यांत जवळपासच्या गरीब लोकांचा मात्र उगाच चुराडा होतो.

दोघांचा धंदा सारखा, एक कमावी, दुसरा मारी हांका––आपणास दोन निरनिराळ्या स्वभावांचीं माणसें एकच धंदा करतांना आढळतात. पण त्यांपैकीं एक यशस्वी होतो व दुसरा अयशस्वी होतो.

दोघांचें भांडण, तिसऱ्याचा लाभ—दोन मनुष्यांचा तंटा लागला असतां भलत्याच तिसऱ्या व्यक्तीचा फायदा होतो. खव्यासाठीं दोन मांजरांचें भांडण लागून तीं माकडाकडे न्याय करण्यासाठीं जेव्हां गेलीं तेव्हां माकडानें लबाडीनें

सर्व खवा गट्ट केला व भांडणाचें मूळ नाहींसें केलें, ही पंचतंत्रांतील गोष्ट प्रसिद्धच आहे.

दोघांचें भांडण, वकिलांची धन—दोन पक्षकारांत कज्जा सुरू झाला म्हणजे दोन्ही वकिलांस खूप प्राप्ति होते.

दोघांचें वैरपण, मिटवितां कठीण—दोन पक्षांत दीर्घकाल भांडण असेल तर तें मिटविण्यास फार जड जातें; कोणीच समजुतीनें घेत नाहीं.

दोघांत तिसरा आला म्हणजे गर्दी वाटूं लागते—दोन मनुष्यांचा एकांत होतो व त्यांना गुजगोष्टी करतां येतात; तिसरा आला म्हणजे व्यत्यय येतो व तो नकोसा वाटतो.—कुलाव्याची दांडी दोमें तिसरा० पहा. Two is company, three is crowd.

दोघींकडे फजीत पावला, तेणें झाला बावळा—एखादा मनुष्य दुटप्पी वर्तनाचा असतो, परंतु त्यास दोघांसहि खूष करतां येत नाहीं व प्रसंगीं त्याचा दुटप्पीपणा उघडकीस येऊन, दोन्ही पक्ष त्यावर नाराज होतात व त्याची फजिती होते. दान दगडीवर हात ठेवणारा.

दोघींचा सागोसा, तिघींचा अडथळा आणि एक करते धसाबसा—एक काम दोघींनीं करावयाचें म्हटले कीं एक म्हणते दुसरी करील; आणि तिघी करावयाला लागल्या म्हणजे काम न होतां आणखी विनाकारण अडथळे उत्पन्न होतात. शेवटीं एकटीच करावयास लागल्यामुळें तिला त्रास होतो.

दोट्टी——**दोट्टी भाडें कांतारां व्हडें**—(गो.) दुप्पट भाडें आणि गाण्याच्या समारंभाला होडें गोमंतकांतले ख्रिस्ती लोक त्यांच्या ' कांतार 'च्या समारंभाला जायचें असलें म्हणजे वाटेल तें भाडें खर्च करून जातील. त्यावरून या म्हणीचा उगम असून ' हौसेला मोल नाहीं ' अशा अर्थानें म्हणतात.

दोण——**दॉणॅभर तूप पडका, तॅन्हा ध्रुपद वैर पडका**—(गो.) द्रोणभर तूप पोटांत जाईल तेव्हां ध्रुपदाला रंग चढेल. आधीं अंतरात्मा तृप्त झाल्यावांचून एखादें काम करायला मन लागत नाहीं, किंवा ताकद येत नाहीं अशा अर्थी वापरतात.

दोंद——**दोंद येणें**—१ तृप्ति होणें. २ पोट मोठें होणें. ३ वैभवास चढणें. पोट पहा.

दोंद वाढणें—वैभव प्राप्त होणें; दर्जा वाढणें. पोट वाढणें हें सुस्थितीचें, खुशालीचें लक्षण आहे. यावरून दोंद वाढणें म्हणजे चांगलें वैभव प्राप्त होऊन ऐषआरामांत आयुष्य जाणें. दोंद वाढो अशी इच्छा याचक वगैरे यजमानापुढें व्यक्त करतात. 'दादाचें दोंद वाढेल गा । बाईचें प्वाट फुगेल गा ।'—कुडबुड्या जोशाचें गाणें, चंद्रग्रहण.

दोंदावर दोंद येणें—भरून वाहाणें; पूर येणें. अतिशय सुख, समृद्धि असणें.

❀ **दोंदील घोडे, चालती थोडे**—जे घोडे लठ्ठ (पोटाचे) असतात ते चालीला चांगले नसतात.

दोंदे——**दोंयालो म्हाळ**—(गो.) दोंदे घराण्याच्या जेवणातील गोंधळ. एखादी गोष्ट करतांना गोंधळ उडाला म्हणजे म्हणतात.

दोन——**दोन अलीकडे कीं पलीकडे**—कमीजास्त, थोडाफार फरक असलेलें.—मोरप्र २२.

दोन कांकणें जास्त—थोडासा सरस; थोडा अधिक.

दोन चव्वल घेणें—कांहीं देणें लागणें; मिंधा असणें. 'मीं थोडेच तुझे दोन चव्वल घेतले आहेत ?'—शाब १-१५८.

दोन जिवांचा निवाडा करणें—सुखप्रसूति करविणें. 'बायको अडली आहे......दोही जीवांचा निवाडा श्रीनें सत्वर करावा.'—रा ३.२१९.

दोन जिवांचा निवाडा होणें—गरोदर स्त्री हातींपायीं सुटणें; सुखरूप बाळंत होणें; सुखरूप प्रसूति होणें.

दोन डगरीवर हात असणें-ठेवणें—दुटप्पी वर्तन असणें; दुटप्पीपणा करणें. 'माधवसिंग जयनगरकर याचा दोही डगरीवर हात आहे. '—भाब २४. ' सुजा मोठा धूर्त आहे. तो दोन डगरीवर हात ठेवून बसला आहे.'—पामो ३०५.

दोन धक्के द्यायला घ्यायाला बळकट—धकाधकी सहन करणारा; कमीअधिक त्रास सहन करणारा; सशक्त.

दोन प्रहरची काळजी—पोटापाण्याची चिंता.

दोन बोटें स्वर्ग उरणें—अतिशय गर्व होणें; गर्वानें अस्मान ठेंगणें होणें, अति गर्विष्ठ होणें.

दोन हातांचे चार हात होणें—लग्न होणें; चतुर्भुज होणें. ' यंदा त्याचे दोन हाताचे चार हात करा.'—मोरप्र९.

दोन्ही गालांत पुऱ्या—(व.) दुटप्पी बोलणाऱ्यास म्हणतात.

❀ **दोन आण्याची कोंबडी नि आठ आण्याची फळगावळ**—वस्तूंच्या किंमतीपेक्षां तिच्या तरतुदीचीच

किंमत जास्त. तु०—अडक्याची भवानी सापिक्याचा शेंदूर, वगैरे म्हणी पहा.

दोन आण्याची चट्टीपट्टी, बारा आण्याची मलमपट्टी——थोडक्यांत चैन केली म्हणजे तिचे परिणाम वाईट होऊन मागाहून दुप्पट त्रास होतो व फार खर्च करावा लागतो

दोन डोळे-भाऊ शेजारीं, भेट नाहीं संसारीं——'दोघे डोळे०' पहा.

दोन तर सुडकीं, एक दांडीला व एक गांडीला (मांडीला)——(बायकी) [सुडकें = जुनें फाटकें वस्त्र.] अगदीं विपन्नावस्था, गरीबी.

दोन तोबे खाऊंगा और एक मेंढी लेउंगा——वाघमेंढ्यांच्या खेळांत वाघ म्हणतो:—दोन तोबे खाईन पण एक मेंढी नेईन. फायद्यासाठीं शिक्षा सोसण्याची तयारी.

दोन दगडांवर पाय ठेवूं नये——'दोन डगरीवर हात ठेवणें' पहा.

दोन दिवस असे, दोन दिवस तसे——सारे दिवस सारखे नसतात; कांहीं सुखाचे तर कांहीं दुःखाचे असतात.

दोन दिवस सासूचे, दोन दिवस सुनेचे—प्रत्येकाला चांगले दिवस येतात; प्रत्येकास अनुकूल काल केव्हां तरी येतोच. चार दिवस सासूचे चार दिवस सुनेचे, पहा. तु०—Every dog has his day.

दोन दिवसांचें चांदणें, दोन दिवसांचें नांदणें—जोंपर्यंत चलती चालली असेल तोंपर्यंत मजा करून घेणें.

दोन दिवे विकत घ्यावयास सोपे, पण एक जळत ठेवणें कठीण—दिवे विकत घेणें सोपें कारण त्यास एकदांच खर्च येतो; तेव्हां ते दोन घेणें सुद्धां कठीण नाहीं. पण दिवे नेहमीं तेवत ठेवणें कठिण असतें कारण त्यास सारखें तेल पुरवावें लागतें. तेव्हां एक दिवाहि जळत ठेवणें कठिण असतें. एकदांच खर्च करावयाचा असला म्हणजे थोडा अधिक करावयाचा असला तरीहि परवडतो; पण कायमचा खर्च करावयाचा असला म्हणजे तो थोडा असला तरी परवडत नाहीं.

दोनपरा आसल्यार सांजे पंचायत—(गो.) दुपारीं असलें तर संध्याकाळची भ्रांत; फार गरीबी.

दोन पैच्या भाजीस तीन पैचा हेल——क्षुल्लक गोष्टीसाठीं प्रमाणाबाहेर खर्च. तु०——अडक्याची भवानी सापिक्याचा शेंदूर.

दोन प्रहर आचार, नंतर अनाचार——आचार पहा.

दोन बायकांचा दादला आणि सुख नाहीं जिवाला——जो मनुष्य एकाच वेळीं दोन बायका करतो त्यास मुळींच सुख मिळत नाहीं. तु०——बायको दुसरी फजिती तिसरी.

दोन बायलांचो घोव मधीं हुमकलता——(गो.) दोन बायकांचा दादला मधल्यामधें लोंबकळतो.

दोन बोटें अभाळ उरलें आहे—गर्वामुळें आकाश ठेंगणें वाटणें; गर्वानें अतिशय चढून जाणें; स्वर्ग दोन बोटें उरणें. 'अभाळ' पहा.

दोन मांज्रा लडायितुं उंदुरु पोळ्नु गेलो—(गो.) दोन मांजराच्या भांडणांत उंदीर पळून गेला.

दोन मांजरांचा खवा, वानर न्यायाधिशानें खुशाल खावा—दोन मांजरांना एक खव्याचा गोळा सांपडला. तेव्हां कोणीं किती घ्यावा याबद्दल ते आपसांत भांडूं लागले. तेव्हां त्यांनीं वानराला न्यायाधीश नेमलें. वानरानें खवा पारड्यांत घालून सारखा करीत करीत सर्व खाऊन टाकला. 'दोघांचें भांडण तिसऱ्याचा लाभ,' पहा.

दोन मांडवांचा वऱ्हाडी उपाशी—दोन्हींकडचा पाहुणा असला म्हणजे इकडचे लोक तिकडे जेवला असेल असें समजतात, तिकडले लोक पाहुणा इकडे जेवला असेल असें समजतात; यामुळें वऱ्हाडी अखेर उपवाशी राहतो. दोघांवर अवलंबून राहणाऱ्याची फजगत होते.

दोन लढेंगे, इसमें एक पडेंगे; दो लढेंगे, इसमें एक पडे होगा?—दोघांचें भांडण लागलें असतां त्यांपैकीं कोणीतरी एक हरतोच. कोणातरी एकाची नेहमीं सरशी ठरलेलीच.

दोन वेळां ऐकणें, एक वेळां बोलणें—चांगलें ऐकल्याशिवाय भाषण करूं नये. दुसरा आपणास बोलला तर एक वेळ लक्ष देऊं नये. पण पुन्हा बोलल्यास एकाच शब्दांत त्यास उत्तर देऊन गप्प करावें.

दोन वेळां काम केलें, सहज होतें चांगलें——एखादें काम केल्यावर त्याकडे पुन्हा चांगलें पाहिलें किंवा तें नीट तपासलें म्हणजे चांगलें होतें.

दोन वेळां शहाणा ठकत नाहीं——जो मनुष्य चतुर असतो तो फार झालें तर एक वेळ फसतो. त्यास पुन्हां चकवूं म्हटलें तर तो सावध होतो व सांपडत नाहीं. (गु.) कीकीरे कीकी तो यकवार सीकी.

दोन व्हडयाचेर पाय दवरप; दोन होड्यार पाय दोवोल्ल्यार मधींच पेंचता——(गो.) दोन होड्यांवर

पाय ठेवणें. दोन्ही होड्या दोन दिशेस निघून गेल्या कीं माणूस मधल्यामध्यें पाण्यांत बुडायचा. कोणतेंतरी एक ठिकाण कायम करून घट्ट धरून ठेवावें. दोहोंवर थोडें थोडें अवलंबून राहिल्यास एकहि गवसत नाहीं अशा अर्थी.

दोन हस्तक आणि तिसरें मस्तक—१ दोन्ही हात व डोकें हीं मिळून केलेला नम्रतायुक्त नमस्कार. लीनतेचें प्रदर्शन २ इतर देण्याला कांहीं नाहीं, फक्त नमस्कार करतां येईल, या अर्थानें.

दोन हातीं मिळवावें, एक हातीं खर्चावें—दो पहा.

दोनी घरच्या सोयराक दोनीकडे जेवण ना--(गो.) दोन घरचा पाहुणा उपाशी.

दोनो हातो पगडी संभालने पडी है—दोन्ही हातांनीं पागोटें संभाळण्याची पाळी येणें. अतिशय जिकीर होणें; फार प्रयत्नानें संकटांतून निभावणें.

दोनय् चुली सारख्यो तर मायधुवो लाडक्यो—(गो.) आई व लग्न झालेली मुलगी यांची आर्थिक स्थिति सारखीच असेल तर त्या दोघींत प्रेम राहातें.

दोन्ही कुळें सारखीं, नामदेव पारखी—ठकास महाठक भेटणें; दोन लबाड मनुष्यें एकत्र येणें; दोन सारख्याच गुणांच्या व्यक्ति ज्यामध्यें कोणाहि एकास नांवें ठेवण्यास नको अशा एके ठिकाणीं भेटणें. दोन गोष्टी सारख्या दिसत असतांना त्यांत फरक करणें फार कठीण आहे. मॅनवेअरिंगनें असा अर्थ दिला आहे कीं, नामदेव हा एक ज्योतिषि होता व त्याचे कडे एकाच आडनांवाच्या दोन कुळांमध्यें विवाह होतो कीं नाहीं हा प्रश्न आला. तेव्हां त्यांचें वास्तविक एकच गोत्र असल्यामुळें विवाह होणें शक्य नव्हतें; पण नामदेवाला त्यांच्यामध्यें फरक काढतां आला. परंतु हा अर्थ पटत नाहीं. वास्तविक नामदेव हा ज्योतिषी नसून सहदेव हा ज्योतिषी म्हणून प्रसिद्ध आहे.

दोन्ही घरचा पाहुणा उपाशीं (मरे)—दोन ठिकाणीं राहाण्याजेवण्याची सोय असली म्हणजे अशी एखादे वेळीं फजीती होते कीं, प्रत्येक घरीं वाटतें कीं, पाहुणा दुसऱ्या घरीं जेवून येईल. अशानें पाहुणा मात्र उपाशीं राहातो. तेव्हां दोन्ही दगडीवर हात ठेवूं नये. 'दोन मांडवांचा वऱ्हाडी०' पहा.

दोन्ही डोळ्यांनीं अंधळा, मग बसला पुराणाला—प्रथम आयुष्यांत अतिशय चाळे करून मग नाइलाज झाला म्हणजे परमार्थाच्या पाठीमागें लागणारा. तु०—वृद्धा नारी पतिव्रता.

दोन्ही हातीं पुऱ्या, नवसूबाई खऱ्या—(व.) [नवसूबाई=मोठ्या नवसानें जिचा लाभ झाला आहे अशी मुलगी; लाडूबाई.] खायला जर कोणा मुलीला पुरी पाहिजे असेल तर तिच्या एका हातीं ती दिली म्हणजे झालें. तिनें जर दोन्ही हातीं पुऱ्या घेऊन खातें म्हटलें तर तिला तसें करूं देणें फाजील लाडाचें द्योतक आहे.

दोर——**दगडाचे दोर काढणारा**—अशक्य गोष्ट शक्य कोटींत आणणारा; मोठा युक्तिवान्; उद्योगी.

आडांत घालून दोर कापणें—फसवून संकटांत लोटणें; विश्वासघात करणें. 'येकच विचार आडांत घालून दोर कापणें हीं लक्षण कुलवंताची नवेत्.'—साइसंम—ऐले २.३५२.

दोर सैल देणें-सोडणें—नियंत्रण कमी करणें; स्वतंत्रता देणें.

दोराला पाय लावणें—अपमान करणें.—मरासंग्रा ५८.

❀ **दोर तुटला, पोहरा बुडाला**—आधार सुटला म्हणजे मनुष्य खालीं येतो.

दोरा——**दोरा लावणें**—(प्र.) धागादोरा लावणें; शोध करणें; मूळ हुडकणें; थांग, पत्ता लावणें.

दोरी——**दोरी जळणें**—'सुंभ जळणें' पहा. 'जळलेल्या दोरींत तिचा पीळ जशाच्या तसाच कायम राहतो.'—टि ४.३१६.

दोवलॉ——**दोवलॉ करणें**--(गो.) लुडबूड करणें.

दोष——**दोषत्रय**—त्रिदोषः वात, पित्त व कफ.

❀ **दोष दुसऱ्याचे पाहून, सुज्ञ घेती सुधारून**—शहाणे लोक दुसऱ्यांच्या चुका सांवरून घेतात किंवा दुसऱ्यांच्या चुका झालेल्या पाहून त्यांच्या अनुभवानें आपलें वर्तन सुधारतात. तु०—पुढच्यास ठेंच मागचा शहाणा.

दोस्त——**दोस्त नादान, दाणा दुसमान**—मित्र नादान पण शत्रु दाणा. नादान मित्रापेक्षां शहाणा दिलदार शत्रु चांगला.

दोहीं-हों——**दोहीं पेवावर हात ठेवणें**—'दोन डगरीवर हात ठेवणें,' पहा. 'दोहीं पेवावरी ठेवूं जातां हात। शेवटीं अपघात शरीराचा॥'—तुकाराम.

दोहों होडीवर पाय--'दोन दगडीवर पाय' पहा.

❀ **दोहोंकडून मिळवूं पाहती, मिळतें तें दवडिती**—जे दोन्ही बाजूंनींहि फायदा करूं पाहातात ते शेवटीं कोणा एकीकडून होणाऱ्या फायद्यासहि मुकतात. हातचें सोडून

पळत्याच्या पाठीस लागणारा. दुटप्पी वर्तन करून दोघांकडून लाभाची इच्छा करणारा शेवटीं दोघांसहि अविश्वासी म्हणून समजून येऊन दूर ठेवला जातो.

दोहों घरचा पाहुणा उपाशीं मरे–दोन पहा.

दोहोंतर्फे जो विचार न करी, तो एकाचें वाईट करी—जो दोन्ही पक्षांचें हित नीट लक्षांत न घेतां न्याय करतो तो एका पक्षाचें नुकसान करतो; तो पक्षपाती बनतो.

दोहों मांडवांतला कोडगा–वऱ्हाडी–दोन पहा.

दोहों ससांचे लागतां पाठीं, एकहि नये हातीं–एकाच वेळीं दोन ससांचा पाठलाग करूं गेल्यास एकहि सांपडत नाहीं. हातचा सोडून पळत्याच्या पाठीस लागणें. तु.–A bird in hand is worth two in the bush.

दोळा——दोळ्याक उधक लावनु फट्टी सांगप—(गो) डोळ्याला पाणी लावून खोटें बोलणें. कांहीं अकर्म केल्यास शुद्धीसाठीं नेत्राचमन करतात (डोळयास पाणी लावतात)·

दोळे धांकिल्याक केंदनाअी काळोख--(गो.) डोळे झांकलेल्याला केव्हांहि अंधार.

दोळे धांपल्यारि राति जाता वे—(गो.) डोळे झांकले म्हणून कांहीं रात्र होत नाहीं.

दोळे पाणी मन सुवराती--(गो.) डोळ्यांना पाहावेसें वाटतें, मनाला हवेसें वाटतें.

दोळे फुटले म्हुण हिशेब बुडलो ?—(गो.) डोळयांनें दिसतनासें झालें म्हणून हिशेब खोटे ठरतात काय ? खरें ते खरेंच. मागें डोळ पहा.

दोळो आसतन दिष्टी न--(गो.) डोळे असून दृष्टि नाहीं. स्वतः बुद्धि न चालविणारा.

दोळ्या दोळ्याक भेट ना, शेजारा आसून गुर्तु ना--(गो.) डोळयांची एकमेकांना भेट नाहीं आणि शेजारीं असून संबंध, आठवण नाहीं.

दोळ्यांत रगत नातिल्याक सुख दुःख सांगाचें वे ?--(गो)ज्याच्या डोळयांत रक्त नाहीं त्याला आपलें सुखदुःख सांगून काय फायदा ? सामर्थ्यवान् माणसालाच आपलें सुखदुःख सांगितलें तर त्याच्याकडून कांहीं मदत मिळण्याची आशा. दुबळया माणसाकडून काय होणार ?

दौड——दौड चले, गीर पडे--धांवत गेलें तरच पडण्याचा संभव असतो. जो पळतो तो पडतो. सावकाशीनें जातो त्याचें काम साधतें.

दौत——दौतीचा घाणा घालणें–१ दौतींत लेखणी बुडवून ठेवणें. २ (ल.) भिजत घोंगडें ठेवणें.

दौलत——दौलतजादा होणें—१ सरकारदरबारीं प्रतिष्ठा होणें, वाढणें. 'त्याची दौलत जादा झाली.' २ (तमाशांत) शृंगारचेष्टादि असभ्य, अशिष्ट प्रकार होणें.

दौलत बुडविणें--राज्याचा नाश करणें. 'वडिलोपार्जित चाकर नेकीनें वागेल, त्याचे हातून दौलत बुडविणें घडणार नाहीं'.–शिवादि ४६.

दौलत रक्षणे—राज्याची राखण करणें; राज्याचा सांभाळ करणें. 'दौलत रक्षणें नी धन्यावांचून राखवत नाहीं.'–शिवादि ४५५.

दौलतीचा खांब—१ दौलत कमावणारा; दौलतीचा आधार, आश्रयस्थान. २ दौलतींतील कारभारी, मुत्सद्दी. –इमं २३६.

दौलतीचा नाश--राज्यनाश. 'चार हुतुया म्हणजे दौलतीचा नाश आहे.' –इ.सं. होकै ६.

दौलतीची कायमी—राज्याची स्थिरता. 'दौलतीची कायमी महापुरुषांचे कृपेनें असती'.–पया ४३७.

दौलतीस धक्का--राज्यास संकट; राज्यास अपाय, धोका. 'भाऊबंद बेदील असल्यास दौलतीस धक्का व फितुर करतात.'–पया ४३८.

दौलतीस पेंच बसणें—राज्य धोक्यांत येणें; राज्यावर संकट येणें. 'फितूर कीं दंगा केल्यानें दौलतीस पेंच बसावयाचा.'–पया १६८.

दौलतीस वाळवी लागणें—ऐश्वर्यास ओहटी लागणें.

द्या——द्या थै देव--(गो.) दहा तेथें देव. जनता-जनार्दन.

द्यूत——द्यूत, मद्य, प्रतारणा, युवती, संपत्ति घालवून विपत्ति आणिती--जुगार, दारू, लबाडी व स्त्रिया यांचा नाद लागल्यास, संपत्तीचा नाश होऊन दारिद्र्य येतें.

द्रव्य——द्रव्याचा धूर निघणें—पुष्कळ श्रीमंत असणें; अलोट संपत्ति असणें.

द्रव्याचे धुडके उडविणें–करणें--पैसा नासणें, उधळणें.

❀ **द्रव्य अधिक मानतात ते गुण कमी जाणतात**–जे संपत्तीसच केवळ महत्त्व देतात, त्यांच्या हातून गुणांचें चीज होत नाहीं.

द्रव्य असतां भय प्राप्त, नसल्या दुःखव्याप्त—ज्याजवळ द्रव्य असतें त्याला भीति वाटते; ज्याजवळ नसतें तो दरिद्री असल्यामुळें त्यास दुःख होत असतें.

द्रव्य असल्या बहु भय, नसल्या नसे सोय—वर पहा.

द्रव्य आणि चांगल्या रिती, सभ्यपणा आणिती—मनुष्य संपन्न असून जर मर्यादशील असेल तर त्यास सभ्य समजतात.

द्रव्य आणि समाधान अंगाला कांती आणितात--संपत्ति असूनहि जो समाधानी वृत्तीचा असतो त्याचें शरीर तेजःपुंज असतें.

द्रव्य आणि समाधान उभयतां राहतां कठीण—संपत्ति व समाधानी वृत्ति हीं एकत्र क्वचितच असतात.

द्रव्य, चतुराई, कीर्ति ऐकावी, चतुर्थांश खरी मानावी--स्वतःची संपत्ति, चातुर्य व कीर्ति यासंबंधीं जर कोणी सांगू लागला तर तो जें सांगेल त्यापैकीं एक चतुर्थांश खरें आहे असें मानावें. श्रीमंत लोकांची पुष्कळ लोक वाजवीपेक्षां जास्त स्तुति करतात; तींत बरीच अतिशयोक्ति असते.

द्रव्य ज्याचे हातीं, त्याची करिती भक्ति—जो मनुष्य श्रीमंत असतो, त्याची सर्व खुशामत करतात.

द्रव्य ज्याच्या संग्रहीं, त्याला सगळें जग वश होई—ज्याच्याजवळ संपत्ति असते त्याला सर्व लोक अनुकूल असतात. तु०-द्रव्येण सर्वे वशाः ।

द्रव्य झाल्या गांठीं, आठवती मोठ्या गोष्टी--मनुष्याजवळ संपत्ति असली म्हणजे मग तो मोठमोठ्या गोष्टी करूं लागतो.

द्रव्य देऊन मित्र जोडे, समयीं उपयोगी न पडे—जो मनुष्य पैशासाठीं मैत्री करतो तो वेळेवर कामास येत नाहीं, तो केवळ आपल्या लाभावर दृष्टि ठेवून असतो.

द्रव्यदेवता समान जगीं मान्य--जगांत पैशाचे सर्व दास आहेत. जगांत पैशाला परमेश्वर समजतात.

द्रव्य नाहीं ज्याच्या पदरीं, तो अर्धा दुखणेकरी--ज्या मनुष्याजवळ पुरेसा पैसा नसतो, त्याचा सर्व कारभार लंगडा पडतो.

द्रव्य फैलावल्याशिवाय वाढत नाहीं—जवळ पैसा असला तरी तो कोठें तरी व्यवहारांत गुंतवल्याशिवाय त्याची वाढ होत नाहीं. Riches like manure do no good till they are spread.—सवि २४९३.

द्रव्यबळ चांगलें, अंगबळ पांगळें—मनुष्याच्या स्वतःच्या अंगीं कितीहि शक्ति असली किंवा त्याला कितीहि मनुष्यांचें साहाय्य असलें तरी त्याजवळ जर द्रव्य नसेल तर त्याचा कांहीं उपयोग होत नाहीं; तें लुलें पडतें.

द्रव्य मिळण्यास आयास, तितके रक्षणीं प्रयास—जितके पैसा मिळविण्यास श्रम पडतात तितकेच तो राखण्यास पडतात.

द्रव्य येतां मूर्खा हातीं, मूर्खपणा वाढे अती—मूर्ख मनुष्यास संपत्ति मिळाली तर त्याच्या मूर्खपणाच्या चाळयास ऊतच येतो.

द्रव्य वाढतें, शरीर क्षीण होतें—जसजशी संपत्ति वाढत जाते तसतसें त्याच्या रक्षणाच्या वगैरे काळजीनें शरीर झिजूं लागतें.

द्रव्यव्यय करतां येत नाहीं, त्याजवळ द्रव्य रहात नाहीं—ज्याला पैसे योग्यतऱ्हेनें खर्च करतां येत नाहींत त्याजवळ कितीहि पैसा असला तरी तो टिकून राहात नाहीं.

द्रव्यशक्ति सर्वांवरी, चालत नाहीं स्वर्गद्वारीं—संपत्तीमुळें जरी सर्व गोष्टी प्राप्त होऊं शकल्या तरी संपत्तीच्या जोरावर स्वर्ग मिळवितां येत नाहीं.

द्रव्यसंग्रह आहे पुरा, तर प्रगट राहे घरा—जर पुरेसें द्रव्य असेल तर उघडपणीं घरांत राहात जावें.

द्रव्यहरण प्रीति, तीच पापोत्पत्ति—परधनाचा अपहार करण्यांत मौज वाटूं लागली म्हणजे पातक करण्याकडे प्रवृत्ति होऊं लागते.

द्रव्याचा उपभोग घेत नाहीं, त्यास लक्ष्मी शोभत नाहीं—ज्या मनुष्यास योग्यतऱ्हेनें द्रव्याचा उपभोग घेतां येत नाहीं त्याजवळ द्रव्य असून नसून सारखेंच; त्यामुळें त्यास मुळींच शोभा येत नाहीं.

द्रव्याचिया कोटी । नये गांडीची लंगोटी ॥—द्रव्य किती जरी असलें तरी अंतःकाळीं त्यांतलें कांहींहि उपयोगी पडत नाहीं.--तुगा ३५९९.

द्रव्याची अव्यवस्था, श्रीमंताची दीनावस्था—भरमसाटपणें पैसा खर्च करीत गेल्यास श्रीमंत मनुष्यहि दरिद्री बनतो.

द्रव्याची आशा हीच नशीबाची परिक्षा—द्रव्याची आशा करणें म्हणजेच नशीबाची परीक्षा पाहणें आहे. नाहींतर जे नशीबांत असेल तें सहजच प्राप्त होईल.

द्रव्याचे लालची पेंढीचें ढोर—(शिवकालीन म्हण.) ज्याप्रमाणें गवताची पेंढी पाहिली, कीं ढोर तें खाण्याच्या आशेनें पाठीस लागतें, त्याप्रमाणें द्रव्याची हाव असणारे लोक मोठयांच्या पाठीस लागतात.–श्रीशिवछत्रपतिचरित्र १२२.

द्रव्याजवळ द्रव्य जातें, दरिद्र्याजवळ दरिद्र जातें–धनवान् मनुष्यासच सहज अधिक पैशाची प्राप्ति होते व गरीब मनुष्य बहुधा व्यवहारांत फसतो व त्याची कींव फक्त गरीबच लोक करतात.

द्रव्यापरी द्रव्य गेलें, बायको परी बायको गेली—दोन्हीकडून नागवणूक.

द्रव्यापुरती इच्छा, इच्छेपुरतें धन—जरूरीपुरतें धन मिळवावें व तेवढेंच मिळविण्याची इच्छा करावी. अधिक हांवभरीस पडूं नये.

द्रव्यापेक्षां कीर्ति, लोक पसंत करिती—लोकांस संपत्तीपेक्षां कीर्ति अधिक आवडते.

द्रव्यापेक्षां मनीं, सत्य अधिक मानी—संपत्तीपेक्षां सत्याची किंमत अधिक मानावी व संपत्तीकरितां सत्य सोडूं नये.

द्रव्यापेक्षां विद्याधन, योग्य पुत्रासमान—द्रव्यापेक्षां विद्या श्रेष्ठ होय व तीच शक्य तेवढी मुलास द्यावी. –सवि २८१.

द्रव्याधीण हिंमत धरी, त्याचा नाश होय भारी—जो जवळ पैसा असल्याशिवाय धाडस करतो त्याचें शेवटीं नुकसान होतें.

द्रव्याशा धरिती, मूर्खाशीं लग्न लाविती—कांहीं स्त्रिया द्रव्यलोभानें मूर्ख असलेल्या श्रीमंत मनुष्याशीं विवाह करतात

द्रव्येण सर्वे वशाः।—द्रव्यानें कोणाहि मनुष्यास आपलासा करतां येतो. (अ) निर्द्रव्यं पुरुषं सदैव विकलं सर्वत्र मन्दादरं, तातभ्रातृसुहृज्जनादिकुपितं दृष्ट्वा न संभाषितम्। भार्या रूपवती कुरङ्गनयना स्नेहेन नालिङ्गते, तस्माद् द्रव्यमुपार्जयाशु सुमते द्रव्येण सर्वे वशाः ॥ (आ) माता निन्दति नाभिनन्दति पिता भ्राता न संभाषते, भृत्यः कुप्यति नानुगच्छति सुतः कान्ता च नालिङ्गते। अर्थप्रार्थनशङ्कया न कुरुतेऽप्यालापमात्रं सुहृत्, तस्माद् द्रव्यमुपार्जयाशु सुमते द्रव्येण सर्वे वशाः ॥–समपद्य. गांगा.

द्रव्यवान्——**द्रव्यवान् असतां मूर्ख, शहाणा त्याचा मालक**—धनवान् मनुष्य जर मूर्ख असेल, तर त्या धनाचा उपयोग त्यास न होतां शहाण्यास होतो.

द्रव्यवान् कर्ज मागती, सर्व नेऊन देती—श्रीमंत मनुष्यास जर कर्ज मागण्याची जरूरी लागली तर सर्व लोक त्यास कर्ज देण्यास पुढें येतात. पण गरीबास कोणी देत नाहीं.

द्रव्यवान् खातो पितो, देव गरिबालाहि देतो—श्रीमंत मनुष्य जसा खातोपितो तसा गरीब मनुष्यहि कांहीं उपाशी मरत नाहीं त्याचीहि काळजी परमेश्वर घेऊन त्याची उपजीविका चालवितो.

द्रव्यवान् बोलती, सर्व मौन धरिती—श्रीमंत मनुष्य भाषण करूं लागला म्हणजे बाकीचे सर्व स्तब्ध बसतात.

द्रव्यवानाला दूषण नसतें—श्रीमंत मनुष्याला कोणी नांवें ठेवीत नाहीं. तु०–सर्वे गुणाः कांचनमाश्रयन्ते।

द्राविड——**द्राविडी प्राणायाम**–प्राणायाम करतांना सरळ उजव्या हातानें नाकपुडी न धरतां डोक्याच्या मागून हात नेऊन नाकपुडी धरणें. म्हणजे सरळ मार्ग सोडून लांबचा त्रासदायक मार्ग पत्करणें. "'वेताळ पंचविशी' हा ग्रंथ मूळचा संस्कृत; त्या भाषेंतून त्याचा तर्जुमा फारशी भाषेंत झाला; तींतून इंग्रेजींत; इंग्रेजींतून मराठींत! केवढा द्राविडी प्राणायाम हा!!"––निबंधमाला.

❀ **द्राविडो लुडबुडाम्यहम्**—जें पाहिजे तें एकदम न मिळतां त्यासाठीं इकडून तिकडे व तिकडून इकडे हेलपाटे घालावे लागणें. [एकदां एक द्रविड ब्राह्मण पेशव्यांची भेट घेऊन दक्षिणा मिळवावी म्हणून श्रीमंतांचा शोध करीत सासवडाहून पुरंदरास व तेथून पुन्हां सासवडास, असे हेलपाटे घालून त्रासला. त्याचें वर्णन त्यानें पुढील कवितेंत केलें आहे. गडाच्च सास्वडं यामि सास्वडाच्च पुनर्गडम्। गडसास्वडयोर्मध्ये द्राविडो लुडबुडाम्यहम् ॥]

द्राक्ष——**द्राक्षापाकात्मक**—तोंडांत टाकतांच विरघळणारी वस्तु. (ल.) अल्पश्रमानें ज्यांतील स्वाद घेतां येतो अशी वस्तु. 'खरी कविता म्हटली म्हणजे द्राक्षापाकात्मक असावी; कीं द्राक्षांत जसा अंतर्गत रस बाहेर लखलखींत दिसत असतो व द्राक्ष तोंडांत घालण्याचा अवकाश कीं तें विरघळून गेलेंच; तसा कवितेच्या अंगीं सुबोधपणा असावा.'––निबंधमाला.

❀ **द्राक्षलता करा खसी, फळांच्या पडतील राशी**—द्राक्षाच्या वेलाची वेळचेवेळीं छाटणी केल्यास त्यास फार फळें येतात. Make the vine poor, it will make you rich.

द्राक्षाची माधुरी आणि फुलांचा वास, उत्तरोत्तर वाढे तयाची आस—द्राक्षांची गोडी व फुलांचा वास यांचा जों जों उपभोग घ्यावा तों तों त्याबद्दलची इच्छा वाढतच जाते. यांची तृप्ति कधींहि होत नाहीं.

द्राक्षें अंबट !—मिळत नाहीं ती गोष्ट वाईट म्हणणें. इसापनीतींतील कोल्ह्याची गोष्ट सर्वश्रुत आहे. "सोमालीलँड हा प्रांत खरोखरीच अगदीं निरुपयोगी असता तर, त्यासाठीं आजवर ब्रिटिशांनीं इतकी प्राणहानि व वित्तहानि कशाला केली असती ! अर्थात्च, ब्रिटिशांना सोमालीलँड राखणें अशक्य झालें असलें पाहिजे म्हणून 'द्राक्षें आंबट' असा न्याय त्यास आतां सुचला असावा !"—केसरी २३-८-४०.

द्राड——द्राड मशालजी थोडा उजेड पाडतो—ज्या मशालजीस मशाल नीट धरतां येत नाहीं किंवा जो वाटेनें खोड्या करीत जातो त्याचें वाटेकडे लक्ष्य नसल्यामुळें त्याच्या हातून नीट उजेड दाखविण्याचें काम होत नाहीं. It is an ill procession where the devil holds the candle.

द्वादश——द्वादशमंडळ—अरि, मित्र व उदासीन असे चहूं दिशेस असतात ते मिळून बारा. 'अरि, मित्र, उदासीन; पैकीं आपले राज्याचे भोंवतें चहूं बाजूंस राज्याचे लगत राजे'—श्रीशिवछत्रपतिचरित्र ९०. मनुस्मृति पहा.

द्वादशी——द्वादशीचा दिवस आला, आरंभ नाहीं चुलीला—एकादशीचा उपास सोडण्याची वेळ आली, द्वादशी लागली तरी एकादशीच्या दिवशीं जी चूल थंड केली ती तशीच. कामाचें फळ मिळण्याची वेळ यावी किंवा अपेक्षा करावी तो कामास आरंभच नाहीं असें आढळून यावें. अक्षम्य दिरंगाई.

द्वेष——द्वेष उगविणें-वागविणें—वैर करणें, सूड घेणें. 'इतका द्वेष वागवीत मनीं । परि लौकिकार्थ बैसे कीर्तनीं ।'

द्वेष करतो सापापरी आणि म्हणतो मी निर्मत्सरी—सर्पाप्रमाणें द्वेष करून पुन्हां मी मत्सरी नाहीं असें म्हणणारा. करून सवरून वर अगदीं निरपराध्याचें सोंग आणणारा.

द्वेषानें कोणी श्रीमंत झाला नाहीं—दुसऱ्याचा द्वेष केल्यानें कांहीं स्वतःची श्रीमंती वाढत नाहीं; तीकरितां स्वतः श्रम केले पाहिजेत.

द्वेषी आणि जुलमी न्यायाधीश, करती न्यायाचा सत्यनाश—जे न्यायाधीश पक्षकाराचा द्वेष करतात किंवा ज्यांची वृत्ति क्रूर असते ते कधींहि बरोबर न्याय करीत नाहींत.

द्वेषी दुसऱ्यास मारूं पहातो, आपल्या हातीं आपण मरतो— जो दुसऱ्याचा द्वेष करून त्याचा घात करण्याची इच्छा करतो, त्याचा स्वतःचाच घात होतो.

द्वैत——द्वैतभाव नसणें—फूट नसणें; मतभेद नसणें; वांकडें नसणें. 'आपल्या घरांत काडीमात्र द्वैतभाव नसावा.'

द्वौ——द्वाभ्यां तृतीयो न भवामि राजन् ।—दोघांमध्यें मी तिसरा होत नाहीं. म्हणजे मी दोघांमध्यें जात नाहीं. 'खादन्न गच्छामि हसन्न जल्पे, गतं न शोचामि कृतं न मन्ये । द्वाभ्यां तृतीयो न भवामि राजन्' किं कारणं भोज भवामि मूर्खः ॥'

ध

ध——'ध' चा 'मा' करणें—राघोबादादानें नारायणरावाला धरावें असा जो गारद्यांना हुकूम दिला होता त्यांत आनंदीबाईनें 'ध' च्या ठिकाणीं 'मा' हें अक्षर घातलें, असा प्रवाद आहे. "'ध' चा 'मा' कोणी केला हें गूढ अद्याप उलगडलें नाहीं."—आनंदीबाई पेशवे १८. यावरून आपल्या फायद्याचा नवीन मजकूर घुसडणें; मूळ गोष्टींत, लेखांत आपणास अनुकूल असा बदल करून घेणें.

धकाधकी——धकाधकीचा मामला—१ दंग्याधोक्याचा काळ, प्रसंग. २ भांडणें, वाद इत्यादि जींत अवश्यमेव असतात अशी चळवळ, कार्य. 'धकाधकीचा मामला । कैसा घडे अशक्ताला ।'—दा १९·१०·२२.

धकाधकीचा मामला, कैसा घडे अशक्ताला (जड जातो अशक्ताला)—अशक्त मनुष्याला एखाद्या दंगलीमध्यें किंवा धोक्याच्या कामांत भाग घेतां येत नाहीं. त्याला कणखर मनुष्य, टक्के टोणपे खाऊन तयार झालेला मनुष्यच पाहिजे.—दा १९-१०-२२.

धका——धक्यास बुकी व शिवीस चपराकी—जशास तसें फळ. जसा अपराध तशी शिक्षा मिळणें.—शाब २·२४६.

धग——धग घेत बसणें—शेकणें; शेकत बसणें. 'शेकोटीजवळ थंडीच्या दिवसांत धग घेत बसणें.'—विवि ८·१·२.

धग बडविणें-लागणें—(वे.) झळ लागणें; नुकसानी पोंचणें, चट्टा बसणें.–दा. ना. कुळकर्णी यादी.

धगड——**जेथें दगड तेथें धगड**—दगड पहा. जेथें नवरा दुर्बल किंवा मूर्ख असतो तेथें जाराचें फावतें.

धज——**धज देणें**—१ खांदा, नेट, धीर देणें. २ पुढें होणें.

धज मारणें—वाट काढणें; मार्ग काढून पुढें जाणें.

धट——**धट घेणें-घेऊन बसणें**—धरणें धरून बसणें; तगादा लावणें.

धट चालणें-लागणें—(एखादी गोष्ट, क्रिया) अव्याहत चालू असणें.

धट लावणें —बेसुमार करणें.

धटास लावणें—शहानिशा करण्यासाठीं जाहीरपणें पुढें मांडणें.

धट, धटाई——**धट (धटाई) खाई मिठाई, गरीब खाई गचांड्या (गुद्दे)**—जो मनुष्य धीटपणानें, किंवा जबरदस्तीनें वागतो, तो आपलें काम साधतो; दुर्बल मनुष्याला गचांड्या मिळतात, त्याला कोणी विचारीत नाहीं.

धट्टीकटी——**धट्टीकट्टी गरिबी, लुलीपांगळी श्रीमंती; धट्टीकट्टी गरीबी बरी, लुलीपांगळी श्रीमंती नको**—गरीब मनुष्य बहुतेक शरीरानें मजबूत असतो व श्रीमंत मनुष्य बहुधा दुर्बल, अशक्त असतो. तेव्हां गरीब सशक्त, निरोगी माणूस, रोगी किंवा व्यंग असलेल्या श्रीमंतापेक्षां अधिक सुखी असतो.

धड——**धड गांडीनें**—सुरक्षितपणें; जिवानिशीं; अब्रूदारपणानें; सहीसलामत; इजा, नुकसान न होतां; कोणताहि त्रास न होतां; सरळपणानें.

धडा ना गोडाचा—१ अव्यवस्थित; भिकार; निरुपयोगी, टाकाऊ. २ संदिग्ध; मोघम; अनिश्चित; अभरवशी.

❀ **धड गाढव ना ब्रम्हचारी**—' गाढवहि गेलें व ब्रह्मचर्यहि गेलें ' पहा. तुकारामाचा पुढील अभंग उद्बोधक आहे–एक ब्रह्मचारी गाढवा झोंबता, हाणोनिया लाता पळालें तें ॥ १ ॥ गाढवही गेलें, ब्रह्मचर्य गेलें, तोंड काळें झालें जगामाजीं ॥ २ ॥ –तुगा २९८५.

धड तुला न मला, घाल कुत्र्याला—आततायाई माणसें स्वतःचा लाभ होत नसेल तर दुसऱ्याचाहि लाभ होऊं नये म्हणून नासाडी करतात. एखादा पदार्थ स्वतःला खातां येत नसेल तर तो दुसऱ्याला खाऊं न देतां बिघडवून टाकून शेवटीं कुत्र्याला खाण्यास देण्याची पाळी आणावयाची, पण दुसऱ्यास धडपणें मिळूं द्यावयाचा नाहीं.—विक्षिप्त ३·१५७.

धड दिसेना नी मन बसेना—वस्तु चांगली धड अशी न दिसल्यावर तिच्याबद्दल आवड कशी उत्पन्न होणार?

धड ना गृहस्थ, धड ना भिक्षुक—अर्धवट; इकडे ना तिकडे असा.

धड पॉल शॅताचें आनि वाय्ट बरें कुशीचें—(गो.) चिंबचळें शेतचें, थोटें पांगळें पोटचें, पहा.

एक ना धड, भाराभर चिंध्या—चिंध्यांची मोठी रास असून त्यांत धड एकहि तुकडा नसेल तर त्यांचा नेसावयाच्या कामीं कांहीं उपयोग होत नाहीं. नेसायला एखादें धडच वस्त्र लागतें, चिंध्यांच्या भाऱ्याचा नेसायला उपयोग होत नाहीं. 'एक धड ना भाराभर त्या चिंध्या काशाला ॥' —हरिकवि (नवनीत ४५१).

धड ना संसार नि धड ना तप—सर्व अर्धवट. संसारांत नीट लक्ष नाहीं किंवा परमार्थाकडेहि मोठा ओढा नाहीं. त्यामुळें कोणतेंच साधत नाहीं.

धड नाहीं गालांत, उभे आपल्या तालांत; धड नाहीं मुंडयांत, उभे केलें खोंडयांत; धड नाहीं डौल, लोका देते कौल—या म्हणी एकाच अर्थाच्या आहेत. मुळांत जेथें वस्तु चांगली नाहीं तिला बाह्य गोष्टींनीं नटवून कां कोठें जमतें ?

धड हिंदु ना मुसलमान—अरत्र ना परत्र. नीट हिंदूप्रमाणेंहि आचार ठेवावयाचा नाहीं व मुसलमानाप्रमाणेंहि वागावयाचें नाहीं अशी अर्धवट वागणूक. न संध्यां संधत्ते नियमितनिमाजं न कुरुते । न वा मौंजीबंधं कलयति न वा सौनतविधिम् ॥ न रोजां जानीते व्रतमपि हरेर्नैव कुरुते । न काशी मक्का वा शिव शिव न हिंदुर्न यवनः ॥–समपद्य ३६-४.

धडांत ना भाकडांत—(दुभतें नाहीं किंवा भाकडहि नाहीं) धड उपयोगीहि नाहीं व अगदीं टाकाऊहि नाहीं असा. अर्धवट, अर्धकच्चा, अपुरता. चांगल्या कोटींतीलहि नाहीं व त्याज्य कोटींतीलहि नाहीं असा. यावरून एखादी गोष्ट, काम, कला, विद्या इ. पूर्णपणें केल्यासच तिचा उपयोग; अनेक अर्धवट केलेल्या गोष्टींचा उपयोग होत नाहीं असा अर्थ.

धडांत ना भाकडांत, आणि शेळींत ना बोकडांत— धड इकडे नाहीं धड तिकडे नाहीं. नीटपणें कोणांतहि जमा नाहीं असा अर्धवट मनुष्य.

धड——धड कांद्यांवर घालून दैवास रडणें— स्वतःच आपणावर आपत्ति ओढवून घेऊन नशीबास दोष देणें. –विक ७२.

धडांत उतरणें–घालणें–गिळणें–टाकणें—गिळंकृत करणें; खाणें (पैसा, लांच).

❀ **धड कांद्यावर–कुंदणावर घालूं नये**— चांग ल्याची खराबी, नाश करूं नये; स्वतः होऊन एखादी आपत्ति आपणांवर ओढून घेऊं नये.

धड देवळांत, चित्त पायपोसांत—देऊळ पहा.

धड शाळेंत, चित्त बायकोंत—शाळेंत जाऊन अभ्यासाकडे लक्ष्य न देतां मनांत बायकोचें चिंतन करीत बसणें. पूर्वीं लहानपणीं लग्नें होत त्यावेळची म्हण.

धडं——धडं धडवा आणि अवसेचा पाडवा— अमावास्येच्या दिवशींहि पाडवा आहे म्हणून बेधडक सांगणें. कांहींतरी धडकावून सांगणें. धडप पहा.

धडकी——धडकी भरणें—भीतीनें ऊर धडधडणें; फार घाबरणें; घास्ती घेणें. 'पाहुनि ज्याला प्रजाजनाच्या धडकी भरतें हृदयांत । '–ल. ग. लेलेशास्त्री.

धडधड——(हृदय) धडधड करणें—छाती जोरानें उडूं लागणें; धडकी भरणें. 'दोघांच्या हृदयीं धडधड करी । '–मो सीतागीत ६९.

धडप——धडप धाडवा, अवसेचा पाडवा— (व.) आदळ आपट करणाऱ्या सुनेला उद्देशून सासून वापरावयाची ही म्हण आहे. कांहींतरी भरमसाटपणें काम करणें; कसेंतरी काम करणें. ताळ ना तंत्र असें वागणें.

धडा——(मनाचा) धडा करणें— धीर, हिय्या करणें; निश्चय करणें. 'आतां मनाचा धडा करून करंजा खातो. '–कफा २.

धडा घेणें—शिकणें; बोध घेणें. 'बाळूताई ! धडा घे' असें एका कादंबरीचें नांव आहे.

धडा धरणें—एक सारखा, सतत परिपाठ ठेवणें. 'निजण्यापूर्वीं भजन व पोथीवाचन करण्याचा जो एकदां त्यानें धडा धरला तो धरला.'

धडा गेला तरी हरकत नाहीं पण पासंगाला जपावें— कांहीं लोकांची वृत्ति अशी असते, कीं ते बारीकसारीक गोष्टींत लक्ष्य फार घालतात. पण त्यांच्या हातून मोठ्या गोष्टींकडे दुर्लक्ष्य होतें. तराजूच्या पासंगापेक्षां धडा करतांना लबाडी केल्यास वजनांत मोठीच खोट येण्याचा संभव असतो. तेव्हां तिकडे आधीं लक्ष्य दिलें पाहिजे; शिवाय पासंग वाटेल तेव्हां मागाहूनहि पाहतां येतो; पण भांड्याचा धडा केलेला माप केल्यावर तपासणें सोपें नसतें.

धडी——धडीनें पैसा मोजणें—तराजूनें पैसा मोजण्याइतका विपुल असणें; अतिशय पैसा असणें; अमोप, अमोज द्रव्य असणें; अलोट संपत्ति असणें.

धडेल——धडेल मौला—अगडबंब माणूस.

धडोती——धडोतीचें पाट(ड)गें—फार कामसू व निकोप स्त्री. ज्याप्रमाणें रोज नेसावयाचें धडोतीचें वस्त्र मजबूत, टिकाऊ पण जाडेंभरडें असतें त्याप्रमाणें कामाला बळकट अशी स्त्री; सुंदर, नाजूक नव्हे पण संसाराच्या रगाड्यास उपयोगी अशी स्त्री.

धण——धण करणें–होणें—धन पहा. आपसांतील दुहीमुळें तिसऱ्याचा विनाकारण लाभ, फायदा होणें.

धण घेणें—मनसोक्त पोटभर खाणें; (खाद्य इ. कांचा) समाचार घेणें. 'एकानें मोठमोठे लाडवांचे तुकडे करून गट्ट केले, दुसऱ्यानें चटण्या, सांभारीं यांची धण घेतली.' –बाळमित्र.

धण पुरस्तुर—धण पुरें तोंवर; समाधान होईपर्यंत; तृप्ती होईपर्यंत; मनसोक्त; पोटभर.

धण पुरणें—(एखाद्याची) इच्छा तृप्त करणें; एखाद्यास संतोषविणें; मनसोक्त मिळणें; लाभ होणें. 'धणी न पुर गातां । '–एकनाथ आरती.

धण——धन पहा. धण ना जाल्हे तरी होड ना, रीण नाका—(गो.) धन नसलें तरी मोठीशी पर्वा नाहीं; ऋण मात्र असूं नये.

धत्तुरा——धत्तुरा देणें–दाखविणें—(धोत्र्याचें विष घालून एखाद्याला लुबाडणें असा मूळचा अर्थ) फसविणें; ठकविणें; हात दाखविणें; हातावर तुरी देणें.

❀ **धन्याला धत्तुरा व चाकराला मलिदा**—धनी पहा. 'न्याय असा जगतीं, चाकरा मलीदा मिळे धन्याला धत्तुरा हातीं ॥ '–सन्मित्रसमाज मेळ्याचीं पदें.

धंत्र——धंत्रीं--धंत्रमीं लागणें-नादीं लागणें; छंदास लागणें; मागें लागणें.

धंदर——धंदराधंदरं प्रवर्तति—कांहींतरी थातुर मातुर चालू आहे; लबाडी दिसते.

धंदा——धंदा करणें; धंद्याला रहणें--वेश्या व्यवसाय, कसब करणें;

❀**धंदा रोखीचा आणि वायदा दिवाळीचा**—एकीकडे तोंडानें रोखीचा धंदा करीन म्हणून म्हणावयाचें व देणें दिवाळीला द्यावयाचें; म्हणजे वर्ष अखेरीस देईन म्हणून वायदा करावयाचा, असा उलटा व्यवहार.

धंदा हजामाचा आणि मिजास पादशाहाची--हजामाचा धंदा करून बादशाहाची ऐट मारावयाचा. क्षुल्लक मनुष्यानें मोठमोठ्या गोष्टी करावयाच्या.

धंद्यांत केली सरकत. होते कशाची बरकत—पातीचा धंदा केला म्हणजे त्यांत फायदा होत नाहीं. कारण स्वतःच्या धंद्याइतकी त्यांत आस्था वाटत नाहीं व जबाबदारी नसते. शिवाय पातीदारहि तितका नेटानें काम करील हा विश्वास नसतो.

धन——धन करणें-होणें—दुसऱ्याचा फायदा करून देणें; दुसऱ्याच्या हवाली करणें; दुसऱ्यास देऊन टाकणें. 'फुकटाचे खाऊन कावळ्याची धन करूं नकोस.'

धन पाडणें-लावणें—(उप.) उत्कर्ष पावणें; वैभवास चढणें; मानमरातब मिळणें; पराक्रम करून वैभव मिळविणें; स्वपराक्रमानें लाभास येणें. (विपरीत लक्षणेनें योजतात.) 'पंचवीस वर्षें झालीं, आतां पुढें विद्या करून धन लावाल हें समजतच आहे.'

धन पुरणें—धन पुरणें; समाधान होणें; कांहीं एक पदार्थ मनमुराद उपभोगिल्यानें आशा पूर्ण होणें; मनाची तृप्ति होणें; मन धाणें. 'धन न पुरें गातां। आरती एकनाथा।'

धना जाणें—[जनावराला संतती होऊन तिच्या मालकाचें धन वाढतें, त्याला जास्त पैसा मिळूं शकतो, यावरून धना=धनास, धनसाठीं] (ना व.) (गाय, म्हैस इ जनावर) गर्भवती होणें. 'आमची म्हैस धना गेली आहे, चारसहा महिन्यांत ती विईल.'

❀**विशीं विद्या, तिशीं धन**--विद्या संपादन करण्याचें वय वीस वर्षें किंवा एकूणतीस वर्षेंपर्यंत व पैसा तीस किंवा एकूणचाळीस वर्षांपर्यंत मिळतो. या मर्यादेपुढें विद्या किंवा धन नसतें.

धन असल्या बहुभय, नसल्यानें तापत्रय--जवळ पुष्कळ द्रव्य असेल तर तें चोरीस जाण्याची भीति असते, तें संभाळण्यास फार यातायात पडते; बरें, मुळींच नसलें तर फार हाल होतात.

धन असे पाताळीं, तर तेज दिसें कपाळीं--पैसा जवळ असला कीं तोंडावर साहजिकच तेज चढतें; द्रव्याची ऊब असली म्हणजे मनुष्याची कळी खुलते.

धनकण पुरें धन, भांडींकुंडीं अर्धें धन, आणि रोखें पुर्जे रावणाची खाई—जें प्रत्यक्ष रोख द्रव्य किंवा धान्य तें केव्हांहि पूर्ण कामास येतें, त्याची किंमत पूर्ण धरण्यास हरकत नाहीं. भांडींकुंडीं वगैरे असल्यास वेळेवर तीं विकलीं असतां त्यांची किंमत अर्धी तरी येते पण दस्तऐवज, कर्जरोखे वगैरे दुसऱ्याकडून येणें असणाऱ्या पैशासंबंधीं जें कागदपत्र असतात त्यांची काहीं किंमत नसते. ते जाळून टाकण्याच्या उपयोगीं समजावें. तु०—धान्याना संग्रहो राजन्नुत्तमः सर्वसंग्रहात्। निक्षिप्तं हि मुखे रत्नम् न कुर्यात्प्राणधारणम्।।—सुर १४८·२३५. नास्ति धान्यसमं प्रियम्। —सुर १५९·२८८.

धन जड जना, मदत पतना—मूर्खाच्या हातीं धन असल्यास तें त्याच्या नाशास कारणीभूत होतें. —खाडिलकर, मानापमान नाटक.

धन देवापरी वागवी, तरच भूतचेष्टा द्यावी—धनाला जर अगदीं परमेश्वराप्रमाणें मानलें तर त्याचा रात्रंदिवस पिशाच्चाप्रमाणें त्रास सोसावा लागतो.—सवि १८२६.

धन प्राप्तीस बहू यत्न, त्याहून कठीण तद्रक्षण--पैसा मिळावण्यास पुष्कळच श्रम पडतात पण तो मिळाला तरी त्याचें रक्षण करणें हें त्यापेक्षांहि अधिक श्रमाचें किंवा काळजीचें काम आहे; नाहींतर लबाड लोक तो आपणांस अनेक आमिषें दाखवून आपणाजवळून काढून नेतात.

धनलोभ आणि हेवा, त्याची तृप्ति न होय केव्हां—मनुष्याला एकदां द्रव्याची हांव वाटूं लागली किंवा तो एखाद्याचा मत्सर करूं लागला म्हणजे ही वृत्ति कधींहि त्याला सोडीत नाहीं. जन्मभर या गोष्टी त्याच्या पाठीस लागलेल्या असतात.

धनलोभ दाविती, सज्जनांचीहि दृष्टि फिरती—पैशाच्या आशेनें कधीं कधीं चांगले लोकहि मोहास बळी पडतात.

धनलोभ सदा, त्याची तृप्ति न होय कदा—एकदां मनुष्यास पैसा मिळविण्याची हांव लागली म्हणजे ती जन्मभर सुटत नाहीं.

धन शहरांत आणि आरोग्य देशांत—पैसा मिळवावयाचा असेल तर शहरांत राहिलें पाहिजे, तो खेड्यांत राहून मिळत नाहीं; पण जर आरोग्य पाहिजे असेल तर खेड्यांत राहिलें पाहिजे, तें शहरांत मिळत नाहीं.

धनका धट गया, और दोस्तका दोस्त गया—आपल्या मित्रास द्रव्य उसनें दिल्यास द्रव्यापरी द्रव्य जातें व मित्रत्वाचा संबंधहि राहात नाहीं. तुलना—टक्क्या कोठें जातोस ? सखा तोडावयास !

Neither a borrower nor a lender be,

....

For loan oft loseth both itself and friends.

—Shakespeare, Hamlet.

धनावर बसला नागोबा, त्याचा कशाचा घरोबा—जो मनुष्य सर्पाप्रमाणें आपल्या द्रव्याचें रक्षण करीत असतो त्याला आपल्या आप्तेष्टांची, नात्यागोत्याची किंवा माणुसकीचीहि पर्वा नसते.

धनावांचून दुनिया पंगू—एक पैसा नसेल तर सर्व जग व्यर्थ आहे. पैशाशिवाय सर्व लंगडें पडतें, पैशावांचून जगांत कांहीं चालत नाहीं. तु०—शौर्ये वैरिणि वज्रमाशुनिपतत्वर्थोस्तु नः केवलं । येनैकेन विना गुणास्तृणलवप्रायाः समस्ता इमे ॥ —सुर ६४·१५.

धनेन परिलभ्यंते जनेन बहुबांधवः ।—मनुष्याजवळ पैसा असला म्हणजे सर्व आप्तइष्ट मिळवितां येतात.

धनवंताला विघ्नें फार, गरीबाला थोडीं—श्रीमंत मनुष्यावर अनेक संकटें पैशामुळें येतात तशीं गरीबावर येण्याची भीति नसते.

धनाढ्याची द्रव्यसंख्या, त्याहून अधिक त्याची आख्या—श्रीमंत मनुष्याजवळ प्रत्यक्ष जितका पैसा असतो त्यापेक्षां तो फार अधिक आहे अशी लोकांत बोलवा असते; प्रत्यक्ष द्रव्यापेक्षां त्याचा आव अधिक असतो.

धनगर——धनगर बसला जेवाया, ताकाबरोबर (संगें) शेवाया—धनगराचें अन्न म्हटलें म्हणजे शेवया बरोबर ताक हें होय. त्यास शेवयांत घालावयास दूध कोठून मिळणार ?

धनगरभाई, दोन-सव्वा प्रहर दिवस येई, तेव्हां खोडीचें वेड जाई—धनगर एकदां निजला म्हणजे दोन प्रहर दिवस येईपर्यंत उठत नाहीं. किंवा धनगराला दोन प्रहर दिवस येईपर्यंत कामधंदा सुचत नाहीं. तोंपर्यंतचा वेळ तो कांहीं तरी खोड्या करण्यांत घालवितो.

धनगराचा जांवई, ताकासंगें शेवया खाई—वर पहा. धनगराला आपल्या जांवयास मेजवानी करावयाची असली व त्यानें शेवया केल्या तरी त्यांची खीर करण्याकरितां दूध व साखर त्यास मिळणें शक्य नसल्यामुळें त्या ताकाबरोबरच वाढाव्या लागतात. धनगराला कोणता पदार्थ कसा खावा हेंहि कळत नाहीं.

धनगराचें कुत्रें, लेंडयापाशीं ना मेंढयांपाशीं—धनगराचें कुत्रें कधीं ठिकाणावर नसतें. तु०—धोबीका कुत्ता०

धनगराच्या ओठीं, तें मेंढरांच्या पोटीं—धनगराचें व त्याच्या मेंढ्यांचें अन्न बहुतेक एकच असतें. दोघेंहि झाडपाल्यावर राहतात.

धनगराला माणिकाचा काय उपयोग—धनगराला रत्नाची किंमत कळत नाहीं व त्याचा काहीं उपयोग करतां येत नाहीं. तेव्हां त्याला माणिक दिलें तरी तें निरुपयोगीच होय.

धनाजी——धनाजी व संताजी पाण्यामध्यें तुला दिसतात काय ?—हा ऐतिहासिक वाक्प्रचार मराठ्यांच्या अमदानींत मोतद्दारांच्या तोंडीं असे. धनाजी जाधव व संताजी घोरपडे यांनीं मोंगल सैन्याला अगदीं जेर करून सोडलें असल्यानें मुसलमान स्वारांच्या घोड्यांनींहि हाय खाल्ली होती. जेव्हां घोडा पाणी पिईनासा होई तेव्हां ही म्हण योजीत.-किंकेड प्रॉव्हर्बियल फिलॉसॉफी इन वेस्टर्न इंडिया.

धनिक——धनिक गरीब व्यवहारांत, परस्परें आश्रयांत—व्यवहारामध्यें श्रीमंत व गरीब लोकांनीं परस्परांचें साहाय्य घेतल्यास ठीक होतें. श्रीमंत व गरीब यांचा व्यवहार झाल्यास तो परस्परांस पोषक होतो.

धनिक द्रव्यानें चालती, गरीब आश्रयांत राहती—श्रीमंत मनुष्य आपल्या द्रव्यबलावर आपले सर्व व्यवहार पार पाडूं शकतो. गरीब मनुष्यास मात्र त्याचा आश्रय करावा लागतो.

धनिकाचा संसार, निर्धनिकाचा ईश्वर—श्रीमंत मनुष्य आपल्या संसारामध्यें गढलेला असतो. त्याला परमेश्वराची आठवण करण्यास सवड नसते; पण गरीब मनुष्यास वारंवार देवाची आठवण होते व त्याची करुणा भाकावी लागते.—तु०—विपदः संतु नः शश्वत् ।

धनिकाची सत्ता गरिबावर, रिणको धनकोचा चाकर—श्रीमंत मनुष्याचा नेहमींच गरीबांवर वरचष्मा

असतो व ऋणकरी मनुष्यास सावकारापुढें सेवकासारखें वागावें लागतें.

धनिकाचे घरीं, गरजी घाली फेरी--ज्याच्याजवळ पैसा असेल त्याच्याकडे गरजू मनुष्यास वारंवार खेपा घालाव्या लागतात.

धनिकांचें लांछन, द्रव्याचें झांकण--श्रीमंत लोकांचें दुर्गुण-दुष्कृत्यें पैशामुळें झांकलीं जातात.-सवि २९३८.

धनिकाहून अधिक मान्य, विद्वज्जन--श्रीमंत लोकांपेक्षां विद्वान् मनुष्यास अधिक मान मिळतो. तु०-विद्वत्व च नृपत्वं च नैव तुल्यं कदाचन । स्वदेशे पूज्यते राजा विद्वान् सर्वत्र पूज्यते ॥-सूर ३८.७.

धनी——**धनी ना गोसावी**--ज्यास कोणी मालक नाहीं अशी वस्तु; बेवारसी घर, जमीन, माल इ.

धनी माथ्यावर नसणें--मालक हजर नसेल तर सेवक अनिर्बंध वर्तन करतात. 'धनी माथ्यावर नसतां स्वार्थाकरितां बखेडा करावा ही नेक सल्ला नाहीं.' -इसं ६.

❀ **धनी कुंभार असो कीं परीट असो, गाढवाचे हाल कांहीं चुकत नाहींत**--गाढवाचा मालक कोणीहि असला तरी त्याचेकडून भरपूर काम घेऊन त्यास खावयास न घालतां उकिरडे फुंकावयास सोडून देतो. त्याप्रमाणें मजूर वगैरे लोक कोणाच्याहि आश्रयास असले तरी त्यांस भरपूर श्रम केल्याशिवाय कांहीं मिळत नाहीं. तीच कथा परतंत्र लोकांची आहे. -टिसू ११०.

धनी झाला जागा, चोर आला रागा--चोर चोरी करावयास एखाद्याच्या घरीं गेला असतां जर मालक जागा झाला, तर त्या चोरास त्या मालकाचा फार राग येतो. चोर पहा.

धनी झोपेनें नाडला, आनंद झाला चोराला--चोर चोरी करीत असतां घरचा मालक जर गाढ झोंपला असेल, तर चोराला आनंद होतो.

धनी दिलगीर, चोट्टे खुशाल--(व.)खऱ्या मालकाला वस्तूंचा उपयोग न मिळतां ती उपटून नेणारालाच तो मिळाला तर असें म्हणतात. उपभोग न मिळल्यानें मालक दिलगीर राहतो; पण उपट्या मात्र तिचा सुखानें उपभोग घेतो. तुलना-धन्याला धत्तुरा आणि चाकराला मलिदा.

धनी धजला, नौकर जागला, पैशाला पूर आला-जर मालकानें धाडसानें व्यवहार केला, नोकरचाकर इमानानें वागले तर पुष्कळ लाभ झाल्याशिवाय राहात नाहीं.

धनी नाशिल्लयें बदिक; धनि नाशिल्लँ बदिक, हातभर अधिक--(गो.) धनी नसला म्हणजे नोकराचें चांगलें फावतें. त्याचा कुणगा वाढत जातो.

धनी नाहीं पास, तर कुळवाडयाचा नास--[कुळवाड=शेतकी] मालक जर शेतावर नसेल तर शेतकी तोट्याची होते. पुढील म्हण पहा.

धनी नाहीं मेरे आणि शेत भरलें बेरें--[मेर=बांध; मर्यादा; कांठ. बेर=एक प्रकारचें जाड गवत] शेताचा मालक जर शेतावर राहात नसेल किंवा शेतावर देखरेख करीत नसेल तर शेतांत सर्व तण माजून राहातें. त्याची कोणी निगा राखीत नाहीं.

धनी नाहीं शेतापाशीं, शेत पैसा नाशी--धन्याची जर शेतावर देखरेख नसली तर त्यांत कितीहि पैसा घातला तरी तो फुकट जातो. (गु.) धणी न होवे पास, खेती धनका न श.

धनी फांकडा, नथीचा आंकडा—नवरा गबर असेल तर मोठी नथ नाकांत घालतो; नवरा श्रीमंत असला तर स्त्रीला मोठमोठ्या अलंकारांनीं नटवतो, मढवतो.

धनी बसतो तेथें काम चांगलें होतें—धनी प्रत्यक्ष देखरेख करीत असला म्हणजे नोकरचाकर चांगलें काम करतात.

धनी बोलतो आणि नोकर री ओढतो—ज्याप्रमाणें धनी बोलतो त्याप्रमाणें चाकर त्यास पुष्टी देतो. नोकर कधीं धन्याच्या विरुद्ध गोष्ट बोलत नाहीं. His master's voice.

धनी मेला, बाजार आटोपला--घरचा धनी मेला म्हणजे सर्व व्यवहार एकदम बंद पडतात. मग त्या व्यवहारास कोणी आळा घालील असा नसतो.

धनी राबेना शेतीं, तरी झोळी येई हातीं—शेताच्या धन्यानें जर शेतावर स्वतः काम केलें नाहीं तर पीक कमी येऊन लवकरच दरिद्री होण्याची पाळी येते.

धनीने सुझे ढांकणीमां, पडोशीने सुझे आरसीमां-(गु) चाकरांपेक्षां धन्याची दृष्टि खोल. One eye of the master sees more than four of the servants.

धन्याचा डोळा चाकराचे हातापेक्षां जास्त काम करितो--चाकर प्रत्यक्ष हातांनीं काम करीत असतात व धनी केवळ देखरेखीचें काम करतो; पण त्याच्या देखरेखीमुळेंच कामाची उठावणी अधिक होते.

धन्याची घोडी उधळली, मनाला चुटपुट लागली—घरचा धनी बसलेली घोडी जर उधळली तर त्याच्या जिवा बद्दल जशी घरच्या सर्व माणसास व नोकरचाकरास चुटपुट लागते, तसाच तो जर बेताल वागूं लागला तर सर्व माणसास काळजी वाटूं लागते.

धन्याची दृष्टि, घोडयाची पुष्टि--धन्याची देखरेख चांगली असेल, तरच त्याच्या घोड्याची निगा बरोबर ठेवली जाते.

धन्याचें नांव गण्या आणि चाकराचें नांव रुद्राजी बोवा (आप्पा)—धनी बेंगरूळ व चाकर ऐटबाज असला म्हणजे म्हणतात. वर पहा. (गो) धानियांपरस राव यिल्लयाच्यो फकियो चढ. पाठभेद–धन्याचें नांव गण्या, कुत्र्याचें नांव मानाजीराव.

धन्यानें कधीं पाहावें, ऐकावें, कधीं अंध बधीर राहावें—घरच्या मालकास कांहीं गोष्टी फार बारकाईनें पाहव्या लागतात कांहीं गोष्टींबद्दलची माहिती मुद्दाम विचारून किंवा दुसऱ्याचें ऐकून करून घ्यावी लागते, तर कांहीं गोष्टीकडे डोळझांक करावी लागते (भांडणतंटे वगैरे); व कांहीं गोष्टी ऐकल्या न ऐकल्याशा करून त्यांकडे दुर्लक्ष करावें लागतें (चुगली चहाडी वगैरे); तरच त्यास नीट संसार चालवितां येतो. masters should be sometimes blind and sometimes deaf.

धन्यानें सांगलें चाकराक, चाकरानें सांगलें सुण्याक, सुण्याने सांगलें बाझक—धन्यानें कसलें तरी काम चाकराला सांगितलें. चाकरानें तें स्वतः न करतां कुत्र्याला करायला सांगितलें. कुत्रें कसलें वस्ताद ! तें ‘ बाझा ’ नांवाच्या माणसाला सांगून मोकळें झालें. चाकराला पडचाकर.

धन्याला घाव आणि प्रेमाला बाब—धन्याशीं बेइमानी करून आपल्या आवडत्या माणसाची भर करणाऱ्याबद्दल म्हणतात.

धन्याला धत्तूरा आणि चाकराला, चोराला मलीदा—जेथे धन्याची आबाळ होऊन चाकरनोकरांची चंगळ चालते अशाबद्दल योजतात. योग्य हक्कदाराला कांहीं मिळत नाहीं त्यावेळीं वापरतात. ज्याची मालकी त्याला कांहीं नाहीं व तिसऱ्यानेंच त्याचा उपभोग घ्यावयाचा. “ आम्ही आपल्या भांडणांत परक्याला घालून, ‘ धन्याला० ’ अशी स्थिति नेहमीं करून घेत असतों. ” तु०–ज्याचा माल त्याचे हाल, कोल्हे कुतरे पडले लाल.

धन्यास कण्या व चाकरास मलिदा—धनी काटकसरीनें आपल्या पोटाचे हाल करतो पण उलट त्याचेच नोकर मालकाच्या मालमत्तेवर चैन करतात हा भावार्थ.

धन्यावांचून दुनिया व्यर्थ--‘ धनावांचून ’ असाहि पाठ आहे पहा. पुढें पहा.

धन्याशिवाय सर्व व्यर्थ--घरचा मालक जाग्यावर असल्याशिवाय कोणतीहि गोष्ट व्यवस्थितपणें होऊं शकत नाहीं.

धनीण——धनीण म्हणते म्हैस ठेविली, म्हैस म्हणते बटीक ठेवली—घरीं म्हैस बाळगली म्हणजे ती जरी दूध देत नसली तरी तिची चाकरी धानणीस करावी लागते.

धनीणीस धक्का, कुंटणीस टका--स्वतःच्या बायकोचे हाल करावयाचे आणि दुसऱ्या स्त्रिया वश करण्याकरितां कुंटिणीस पैसे चारावयाचे, अशा दुर्वर्तनी मनुष्याबद्दल ही म्हण योजतात.

धनुष्य——धनुष्य कंठांत (गळ्यांत) घालणें—गळ्यांत धनुष्य अडकाविणें. पराभव करून शरण येण्यास लावणें. ‘ घालुनि धनुष्य कंठीं सहदेवा अभय दान दे हांसे । ’ –मोकर्ण ६.५२.

❀ **धनुष्य बाणाबिगर, मनुष्य धनाबिगर, व्यर्थ**--ज्याप्रमाणें बाण असल्याशिवाय धनुष्याचा कांहीं उपयोग होत नाहीं, त्याप्रमाणें मनुष्याजवळ पैसा नसला तर त्यास कांहीं करतां येत नाहीं.

धनुष्याक एकुचि बाणू आसु नयें—(गो.) धनुष्याला एकच बाण असूं नये. एखादें महत्कार्य करायचें तर साधनांची विपुलता असावी.

धपका——धपका सोसावतो पण टिपका सोसवत नाहीं—एक वेळ कोणीं धक्का दिला तर तो सहन करतां येईल पण अब्रूला धक्का लावलेला खपणार नाहीं; आळ सोसत नाहीं.

धपकावणें——विचारी तो विचारी, धपकावी तो लष्करी—१ जो मनुष्य वाजवीपेक्षां जास्त विचार करीत बसतो त्याच्या हातून कांहीं होत नाहीं; तो विचारच करीत राहतो पण जो धडाकून एखादी गोष्ट शूर शिपायाप्रमाणें करतो, तो काम साधून जातो. साहसाशिवाय कांहीं होत नाहीं. तु०–साहसे श्रीः प्रतिवसति । २ जो चवकशी करतो तो विचारवंत, पण जो प्रथमच धपकावतो तो लष्करी शिपाई.

धपाटा——धपाटा वळणें-होणें—पोट खपाटीस जाणें. 'खपाटा वळणें' पहा.

धबला——गांड फाटे पण धबला ना फाटे—[धबला-जाडेंभरडें कापड] कापडाच्या भक्कमपणाच्या गुणाविषयीं योजतात. कपडा इतका भक्कम कीं एकवेळ शरीर जीर्ण होईल पण कपडा होणार नाहीं. गांड पहा.

धमकट——बायको धमकट, दादाला कसपट—नवरा दुर्बळ व स्त्री धडधाकड असली म्हणजे म्हणतात. विजोडदंपती.

धर——धर लाहणें—टिकाव धरणें; बरोबरीला येणें. 'मेणिका तारा उर्वशी। ओळी धर न लहाती कव्हणीं दीसीं।'–शिशु ६३१.

धर सुटणें— गर्भगळित होणें; धीर जाणें; घाबरणें; धैर्य सुटणें. 'शहाजणें केलीं परंतु लष्करचा धर सुटला.' –भाव ८८.

धरण——धरण फुटणें—(ग्राम्य) विटाळशी होणें; रजस्वला होणें.

धरणी——दे माय धरणी ठाय होणें—फटफजिती, भीति इ. मुळें जीवित अशक्यप्राय होणें; नकोसें वाटणें.

धरणीचा भाग धरणीनें घेणें—(व.) एखादी वस्तु जमिनीवर सांडली व निरुपयोगी झाली असतां म्हणतात. कृष्णार्पण.

धरणीवर पडणें—मृत्युपंथाला लागणें; जमिनीवर काढणें. मनुष्य मरणोन्मुख झाला म्हणजे त्यास खाटेवरून काढून जमिनीवर ठेवतात खाटेवर मरण आलें तर 'खट्वा मरणदोषा' बद्दल प्रायश्चित्त घ्यावें लागतें.

❀ **दे माय धरणी ठाय; धरणी माय, दे ठाय**—वरील प्रमाणें. सीतेला दुर्लौकिक, छळ असह्य झाला तेव्हां तिनें आपली आई जी धरणी तिला आपल्याला पोटांत घेण्याविषयीं विनविलें. यावरून म्हण. देणें पहा.

धरणें——धरणें घेणें-धरणें—हट्ट धरून बसणें; मागितलेलें मिळेपर्यंत उंबरा अडवून बसणें, सत्याग्रह करणें; हट्टास पेटणें.

(एखाद्याला) धरून बांधून मुसलमान करणें—(व.) पुरातन काळापासून मुसलमानांची प्रवृत्ति परधर्मीयांस आमिष दाखवून किंवा जुलुमजबरदस्तीनें सुद्धां मुसलमान करण्याची आहे. तीस अनुलक्षून हा वाक्प्रचार आहे. खुषी नसतांहि जुलुमजबरदस्तीनें एखाद्याकडून एखादें कृत्य करवून घेणें 'संस्कृत शिकण्याचें त्याच्या मनांत नव्हतें, पण बापानें त्याला धरून बांधून मुसलमान केलें.'

धरून सोडून वागणें--१ वेळप्रसंग पाहून, तारतम्यानें वागणें. २ धरसोडीचें वर्तन करणें; पक्कें चिकटून न राहतां जसें सोईस पडेल तसें वागणें. 'कपटी पुरुषाबरोबर धरून सोडून वागावें लागतें.'

❀ **धर टांक कीं लाव कागदाला**--भरमसाट वाटेल तें लिहिणें; अविचारानें लिहीत सुटणें. 'बाकी धर टाक कीं लाव कागदाला हाच जिथें उद्योग तेथें अधिक काय बोलावयाचें!'–ज्ञाप्र १७·७·२५.

धर धपट, दगडावर आपट—अविचारानें आदळआपट करणें; धसमुसळेपणानें वागणें.

धर धपट, सालीसकट--एखादें फळ सालीसकट स्वाहा करणें इतका अविवेक किंवा घाई होणें.

धरतो तर डसतो, सोडतो तर पळतो; धरलें तर चावतें, सोडलें तर पळतें-बाधतें--एखाद्या मनुष्याला साप दिसला असतां त्याला धरावयास जावें तर तो चावण्याची भीति वाटते व सोडून द्यावें तर पळून जाऊन पुन्हां आपणास किंवा दुसऱ्यास चावण्याची भीति असते; अशी त्याची द्विधा मनस्थिति होऊन काय करावें तें सुचत नाहींसें होतें. तु०—इकडे आड तिकडे विहीर. खालें तर बाधतें टाकलें तर श्रापतें.

धरतो दुष्टाची संगत, त्याचें कल्याण नाहीं होत—जो मनुष्य दुष्ट मनुष्याच्या तंत्रानें चालतो त्याचें कधीं कल्याण होत नाहीं.

धरला तर रोडका, सोडला तर बोडका—ही म्हण दुसऱ्याहि एका स्वरूपांत आढळते ती अशी:–हातीं धरला तर रोडका, शेंडी धरला तर बोडका जो मनुष्य सहसा हातांत सांपडत नाहीं, सहज निसटून जातो, पण किरकोळ त्रास देत असतो अशाबद्दल योजतात.

धरलें तर चावतें नी सोडलें तर अंगावर येतें--वर पहा.–टि ३·२५६.

धरशील धीर तर बनशील वीर--मनुष्यानें धीर सोडतां कामा नये. कोणतीहि गोष्ट धिम्मेपणानें व नेटानें करीत राहिलें तर शेवटीं यश मिळाल्याशिवाय राहात नाहीं.

धरशील हिंमत तर तुला नाहीं किंमत--हिंमतवान् माणसाची अखेरीस फार चहा होते.

धरायला डहाळी, ना (आणि) बसायला सांवली—जो मनुष्य अगदीं निराधार असतो, ज्यास घरदार वगैरे कांहीं नसतें अशाबद्दल योजतात. आधार म्हणून धरण्यास फांदी नाहीं कीं बसण्यास सावलीची जागा नाहीं. 'डहाळी' पहा.

धरावें तर डसतें, सोडावें तर पळून जातें—वर धरतो तर डसतो. पहा. –पामो ८०.

धरितां गर्व आणि स्वार्थ, संसारीं होय अनर्थ—मनुष्य फार ताठ्यानें व गर्वानें आणि आप्पलपोटेपणानें वागल्यास त्यास आयुष्यांत यश येत नाहीं.

धरिती जातीचा अभिमान, सर्व अज्ञान सज्ञान—अडाणी लोकांप्रमाणेंच शहाणे लोकहि सर्व आपल्या जातीचा अभिमान धरतात. सुज्ञांसहि जातीचा अभिमान सुटत नाहीं. जातीस जात मिळते, पहा.

धरी चांगली रीत रव, बहु मान जनीं पाव—मनुष्यानें पद्धतशीरपणें व चांगल्या रीतीनें वागणूक ठेवल्यास त्याला लोकांपासून मानसन्मान मिळतो. शिष्टपणानें वागल्यास सन्मान मिळतो.

धरू नका तोरा, मागलें स्मरा--मनुष्य वैभवास चढल्याबरोबर त्यानें गर्वानें फुगून आपलें पूर्वायुष्य विसरूं नये. त्याची आठवण ठेवल्यास त्यास इतरांबद्दल सहानुभूति वाटेल.

धरमधक्का——धरमधक्का मिळणें-बसणें--कांहीं काम न होतां उगीच हेलपाटे आणि श्रम पडणें, येरझारा पडणें. 'तोडा जाऊनी खोडा येईल बसेल एखादा धरमधक्का।'–राला ८५.

धर्म——धर्म करतां कर्म उभें राहणें-पाठीस लागणें--दुसऱ्यावर उपकार करावयाला जावें तों आपल्यावरच कांहीं तरी संकट ओढवणें.

धर्मखुंटी (टा) स बांधणें--(जनावराला) ठाणबंध करून उपाशी ठेवणें.

धर्म जागो!--(विशिष्ट गोष्टीचा संबंध पुन्हां न घडावा अशाविषयीं) पुण्य उभें राहो! परमेश्वराची कृपा होऊन असें पुन्हां घडूं नये; सर्व पुण्याई खर्च होवो पण असा प्रसंग पुन्हां न येवो.

धर्म पंगु!--(कलियुगांत) धर्म एक पायावर उभा आहे. त्याचे तीन पाय मागील तीन युगांत गेले. यावरून (ल.) धर्म सध्यां अतिशय दुबळा, अनाथ आहे या अर्थी योजतात.

धर्माआड कुत्रें येणें--दानधर्माच्या आड येणाऱ्याला म्हणतात. सत्कृत्यामध्यें विघ्न येणें.

धर्माचा जीव—संकटांतून, आजारांतून वांचलेला, बचावलेला.

धर्माची गाय--१ फुकट मिळालेली वस्तु २ मुलगी-हिला दुसऱ्याच्या घरीं राहावें लागतें. ३ दीन अनाथ गाय.

धर्माची वाट बिघडणें-मोडणें--एखाद्या दानधर्माचा ओघ थांबणें, थांबविणें; धर्मकृत्याच्या आड येणें; सत्कृत्याच्या मार्गांत विघ्न आणणें.

धर्माचे पारीं बसणें--१ दुसऱ्याचे पैसे खर्चीत रिकामटेकडे बसणें; धर्मावर काळ कंठणें. २ सद्गुणांचें चांगलें फल मिळणें; सदाचारामुळें चांगले दिवस येणें. ३ सदोदित दानधर्म करणें; धर्मकृत्यें आचरणें.

धर्माच्या वाटेला लागणें—सदाचरणानें वागणें. 'रावण धर्माच्या वाटे न लागला। सांगोनी भागला बिभीषण॥' –मो सीतागीत १२०.

धर्माधर्मीवर काम चालविणें--पैसा खर्च न करतां फुकट काम करून घेणें. स्वतःस तोषीस लागूं न देतां परभारें गुजराण करणें.

धर्मावर लोटणें-टाकणें-सोडणें--एखाद्याच्या न्यायबुद्धीवर सोंपविणें; एखाद्याच्या सदसद्विवेकबुद्धीवर अवलंबून ठेवणें.

धर्मावर सोमवार सोडणें--सोमवार म्हणून एकभुक्त करावयाचें व तें एकवेळचें जेवणहि दुसऱ्याच्या घरीं! स्वतः झीज न सोसतां परभारें होईल तें पाहणें. –गांगा २६३.

धर्मास--(कंटाळल्यावरचा उद्गार) कृपा करून; मेहेरबानीनें; माझे आई! या अर्थी. 'माझे रुपये तूं देऊं नको, पण तूं एथून धर्मास जा!' 'मी काम करतों, तूं धर्मास नीज.'

धर्मास नको--फुकट, धर्म म्हणून दिली तरी नको. अगदीं, मुळींच नको.

धर्मास भिऊन चालणें-वागणें-वर्तणें-करणें--धर्माप्रमाणें वागणें; नीतीनें वागणें; सदाचार पाळणें.

धर्मास येणें--उचित दिसणें; पसंतीस येणें; मान्य होणें. 'मी तुला सांगायचें तें सांगितलें, आतां तुझे धर्मास येईल तें कर.'

*** धर्म आहे कर्मांगीं, कळलें पाहिजे प्रसंगीं**—आपण जसें कर्म करावें तसें आपणास पुण्य प्राप्त होतें ही गोष्ट नेहमीं लक्ष्यांत ठेवावी.

धर्म करतां कर्म उभें राहतें--एखाद्यावर उपकार करावयास जावें तों मध्येंच विघ्न येऊन आपणांसच त्रास होतो, असा केव्हां केव्हां अनुभव येतो.

धर्म करतां त्याला उधळ म्हणती, न केल्या बोलती पोटपोशा--मनुष्य उदारपणें दानधर्मांत व्यय करूं लागला तर त्यास उधळ्या म्हणतात व खर्च न केल्यास आप्पलपोटा म्हणतात. याप्रमाणें जग दोहींकडूनहि नांवें ठेवितें.

आज मरा आणि उद्यां धर्म करा—पुढील कल्याणासाठीं आज हालअपेष्टा सोसावयाच्या, भावी सुखासाठीं चालू घटका दुःखांत काढावयाची, या गोष्टीला तयार नसल्यास म्हणतात. चालू घडी ती आपली, पुढचें कोणीं पाहिलें आहे या अर्थी.

धर्म करून ठेवावा, तो कधीं वायां जाणार नाहीं—पुण्यकृत्य केल्यास त्याचें फळ केव्हां तरी मिळतेंच.

धर्म थोडा, कर्म अधिक--एखादा मनुष्य स्नान संध्यादि कर्में करण्यांत मोठा कर्मठपणा दाखवितो; पण प्रत्यक्ष पुण्यकारक कृत्य त्याच्या हातून फार थोडें होतें. धार्मिक कृत्य करण्याचें अवडंबर मोठें माजवावयाचें, पण हातून प्रत्यक्ष सत्कृत्य थोडेंच व्हावयाचें, अशा मनुष्याबद्दल म्हणतात.

धर्मस्य तत्त्वं निहितं गुहायाम्।—मूळ अर्थ—धर्मतत्त्व जर खरें कळून घ्यावयाचें असेल तर संसार सोडून अरण्यवास पत्करला पाहिजे व तेथें तपश्चर्या केली पाहिजे—असा आहे. हा अर्थ जाऊन धर्माचें रहस्य गुहेमध्यें ठेवलेलें असतें (गूढ किंवा अज्ञेय असतें) असा अर्थ आला. खरा धर्म फारच थोड्यांस कळतो. मूळ श्लोक—श्रुतिर्विभिन्नाः स्मृतयश्च भिन्नाः। नैको मुनि(ऋषि)र्यस्य वचः प्रमाणम्। धर्मस्य तत्त्वं निहितं गुहायाम्। महाजनो येन गतः स पन्थाः॥ –सुर १७३.८५५.

धर्मस्य त्वरिता गतिः।—धर्मास विलंब लावूं नये या अर्थी; कोणतेंहि धर्मकृत्य करावयाचें असल्यास तें ताबडतोब उरकून टाकावें. कारण कालाचा भंरवसा नाहीं व कदाचित् बुद्धि पालटण्याचाहि संभव असतो. सबंध श्लोक असा—क्षणं चित्तं क्षणं वित्तं क्षणं जीवति मानवः। यमस्य करुणा नास्ति धर्मस्य त्वरिता गतिः॥ खालीं एक समस्या आहे तिचा चरण हाच आहे. युधिष्ठिरः कस्य पुत्रो गङ्गा वहति कीदृशी। हंसस्य शोभा का वास्ते धर्मस्य त्वरिता गतिः॥

धर्माची आई आणि काय देई—मानलेली, उसनी आई असेल तर तिच्या पासून काय लाभ होणार !

धर्माची गाय, कांटे (कांट्या) खाय—जी गाय देवाची म्हणून सोडलेली असते तिला कोणी खावयास घालीत नाहीं; म्हणून तिला अखेरीस गवत न मिळाल्यामुळें कांटे खाण्याची पाळी येते. निराधाराची कोणी काळजी घेत नाहीं.

धर्माची गाय, तोंडाकडे पाहाय—धर्म म्हणून दिलेली, सोडलेली गाय दीनवाणी होऊन जाणाऱ्या येणाऱ्याकडे पाहात राहाते. तिला अन्नपाण्याची व निगेची अपेक्षा असते.

धर्माची गाय, दांत ना दाढा—वृद्ध गाईस दांत किंवा दाढा नसतात, त्या पडलेल्या असतात. आपणास दान मिळालेल्या गाईच्या तोंडांत दांत आहेत कीं नाहींत हें पाहण्यांत अर्थ नाहीं. देणगी म्हणून मिळालेल्या वस्तूबद्दल चिकित्सा करूं नये. बहुतेक निरुपयोगी वस्तु धर्म म्हणून देण्यांत येते. 'धर्माचे गाई०' पहा.

धर्माची डाळ, म्हणे पाखडून घाल—दान मिळालेल्या वस्तूची चिकित्सा करूं नये.: Beggars cannot be choosers.

धर्माचें आणि ऊन ऊन—फुकटचें खावयाचें व ऊन ऊन मागावयाचें. तु०—अन्नसत्रीं जेवणें व मिरपूड मागणें.

धर्माचें खरें तत्त्व गहन, अगम्य आहे—वर पहा. धर्मस्य तत्त्वं निहितं गुहायाम्।

धर्माचे गायी आणि दांत (दूध) कां गे नाहीं—फुकट मिळालेल्या वस्तूची चिकित्सा करूं नये. (जनावर घ्यावयाचें झाल्यास प्रथम दांत पाहून परीक्षा करतात). फुकटचा जिन्नस किंवा काम क्वचितच चांगलें असतें. Look not a gift horse in the mouth. (गो.) धर्माचे गायक दांत ना ओंठ.

धर्माचें घेणें, खोड न ठेवणें--वरप्रमाणेंच.

धर्मांत (धर्मानें) दिलें नेसायला आणि परसांत गेली मोजायला--वरप्रमाणेंच. फुकट मिळालेलें वस्त्र पुरें लांबरुंद आहे किंवा नाहीं हें पाहावयाचें म्हणजे वाईटच.

धर्मादारीं आणि (झाली) मारामारी--एखादा मनुष्य दानधर्म करूं लागला असतां जे याचक लोक जमतात तेच आपसांत मारामारी करूं लागून घड कोणासच मिळत नाहीं असें करतात. कोणास कांहीं लाभ होत असल्यास त्या ठिकाणीं तंटा उपस्थित करणाऱ्या लोकांबद्दल म्हणतात.

धर्मादारीं (चावरें) कुत्रें--एखादा मनुष्य दानधर्म करीत असतां याचक लोकांवर ज्याप्रमाणें त्याचें कुत्रें भुंकूं लागतें, त्याप्रमाणें मोठ्यांच्या आश्रयानें राहणारे लोक त्यांच्या हातून होणाऱ्या सत्कृत्यांच्या आड येतात. 'धर्माआड कुत्रें होणें' पहा.

धर्मानें दिलें, कर्मानें नेलें, कर्माचें फळ थोर झालें—दैवांत नसलें म्हणजे धर्मानें कोणाकडून मिळालें तरी लाभत नाहीं. दैव पहा.

धर्माला साडावा हत्ती, पण हिशेबाला सोडूं नये रती--दानधर्म म्हणून वाटेल तेवढा बेहिशोबी खर्च करावा, पण हिशेबाची वेळ आली म्हणजे एक पै देखील सोडूं नये. हिशेबाला केव्हांहि चोख असावें

धर्मी जय, पापीं क्षय—धर्मानें वागल्यास यश मिळतें, पापाचरण केल्यास हानि होते.

धर्मशाळा——धर्मशाळेची उठाठेव–निरर्थक त्रास.

धर्मशाळेचें उखळ--ज्याप्रमाणें धर्मशाळेंत उखळ पुरलेलें असलें म्हणजे त्यावर वाटेल त्यानें येऊन आपला जिन्नस कुटून न्यावा, त्याप्रमाणें कोणीहि जिच्याशीं गमन करावें अशी स्त्री, वश्या. तु०–वेशीवरचा आरसा. 'चावडी' पहा.

***धर्मशाळेचें उखळ, पाहिजे त्यानें खर्चावें बळ**--वरीलप्रमाणेंच.

धर्मशाळेचे उखळीं येत्याजात्यानें कांडावें–धर्मशाळेमध्यें असलेल्या उखळांत कोणासहि कांडण्यास मनाई करतां येत नाहीं. सार्वजनिक वस्तूचा कोणीहि उपभोग घेऊं शकतो. ज्या वस्तूस एक मालक नाहीं ती वाटेल त्यानें वापरावी. अनाथ स्त्रियांच्या बाबतींतहि ही म्हण वापरतात.

धव——धव्यार काळें पडलें तें जन्मजुगा वचना—(गो.) पांढऱ्यावर काळें झालें कीं तें जन्मभर जात नाहीं. एकदा अब्रू मलीन झाली म्हणजे ती कायमची होते.

धश्चोट——धश्चोटं पंचलक्षणं—धश्चोटांची पांच लक्षणें अशीं--मठे भोज्यं सुखे निद्रा शंखतुल्या सरस्वती। मानापमानं न जानाति धश्चोटं पंचलक्षणं ॥ पाठभेद–सुखा भोज्या मठानिद्रा अती विषयलंपटा । दीर्घ द्वेषी (वादी) बहुक्रोधी धश्चोटं पंचलक्षणं ॥ हा विडंबनात्मक श्लोक आहे.

धष्टपुष्ट——धष्टपुष्टो भवेत् दादा—चांगल्या लठ्ठ व बळकट मनुष्याबद्दल म्हणतात. अशा मनुष्याचा वचक सर्वांवर बसतो. सबंध श्लोक–धष्टपुष्टो भवेद्दादा सुन्दरी वहिनी तथा। दन्तभग्नो भवेद्बावा आवाच गतभर्तृका ॥–सम २९·१०.

धस——धशीं-धसास-धसावर घालणें-लावणें देणें--१ कडक उपाय योजून काम बिघडविणें. २ अपकार करणें; छळणें.

धसास लावणें—शेवट, निकाल करणें; तडीस पोंचविणें.

धा——धा जणाचो मासो जागच्या जागीं कुसप—(गो.) दहा जणांचा मासा जागच्या जागीं कुसतो. अनेक माणसांच्या मालकीचा जिन्नस सर्वांच्याच चालढकलींत नाश पावतो.

धा जाण आवयक कोण रडनार; धा जाणांची आवै वाटेर पडून मेली खैं; धा जाणांली आवसु वट्टेरी--(गो.) दहा जणांच्या आईबद्दल कोण रडेल ? दहा जणांची आई वाटेंत कोठें मरून पडली. दहा जणाचें काम (अव्यवस्थित). या म्हणीवरून दहा जणांच्या म्हणजे सार्वजनिक कामाविषयीं सर्व बेफिकीर असतात, असें तात्पर्य निघतें. तु०–Everybody's business is nobody's business.

धा जाणाचो हात पडल्यार कितें उरता ?--(गो.) दहांचे हात पडल्यावर काय उरणार ? अनेक शत्रूंपुढें एकट्याचें काय चालणार ? तु०–दहांचा हात दुष्मनावरहि पडूं नये.

धा जाणांनीं कावळो खावन, खायनाशिल्ल्याक जातीभायर घालो खैं—(गो.) ज्या दहा जणांनीं कावळा खाल्ला त्यांनीं न खाणाऱ्या अकराव्यास वाळींत टाकलें ! बहुसंख्याक वाईट लोकापुढें अल्पसंख्याक सज्जनांचें कांहीं चालत नाहीं.

धा जाणांनीं धा मुठी हाडल्यो घर भलें—(गो.) दहा जणांनीं दहा मुठी आणल्यावर घर भरलें. यावरून संघशक्तीचें बळ दिसून येतें.

धा, जाय तें खा—(गो.) दहा वर्षांचा नी, मग लागेल तें खा. लहान मुलाना लागेल तितकें खाऊं द्यावें, व त्यांस वाटेल तें पचतें या अर्थी.

धा थंय देव--(गो.) दहा जणांच्या ठिकाणीं देव वास करतो. म्हणजे त्यांचें म्हणणें देवाच्या आज्ञेप्रमाणें मानावें. तु०– महाजनो येन गतः स पंथाः । पांचामुखीं परमेश्वर.

धा सड्डे पांच उब्जे, आमगेलें कितें ?—(गो.) 'दहा गेले पांच उरले' पहा.

धाक——धाक दरारा–दहशत; वचक; जरब; भीति; धास्ती. (क्रि० पडणें, असणें, बसणें, बाळगणें, धरणें, राखणें).

धाक दाखविणें--भीति, दहशत घालणें; दरारा ठेवणें; जरबेंत वागविणें.

धाक फिटणें-उडणें--भीति जाणें; दरारा न वाटणें. तेवीं त्याचा समूळ धाक । फिटून गेला तत्काल ।'–नव

२४. १४९. ' चालला शिंदा दखनचा धाक उडाला । ' –ऐपो ४३३.

धाक लावणें—भीति वाटेल असें करणें, वागणें; धाक-दपटशा दाखविणें; जरबेंत ठेवणें. ' तूं असतां मत्पक्षीं लाविन मी धाक लोकपाळाला । '– मोभीष्म ११-१९.

❀ **धाक कृपणा न कोणाचा, शत्रु आप आपणाचा**-- कृपण मनुष्याला दुसऱ्या कोणाची भीति वाटत नसली तरी त्याला स्वतःचीच भीति वाटते. कृपण मनुष्य धन रक्षणाबद्दल इतका साशंक असतो कीं त्याला स्वतःचीच भीति वाटते.

धाक ना दरारा, फुटका नगारा--वडील माणसांचा किंवा धन्याचा आपल्या मुलांवर अगर चाकरांवर मुळींच वचक नसला म्हणजे त्यास म्हणतात. नुसता दिखाऊ मोठेपणा असून उपयोगी नाहीं. हाताखालच्यावर चांगला वचक पाहिजे.

धाक ना धोका--कांहीं भीति, आदर नसणें; मुळींच धास्ती न वाटणें. पूर्ण निर्भीड, निर्भय, बेडर वृत्ति.

धाक नाहीं शरीरीं, हवें तैसें करी--वर कोणाचा धाक नसला म्हणजे मनुष्य स्वैरवर्तन करूं लागतो.

धाकासारखी चीज नाहीं—प्रत्येक मनुष्यावर कोणाचा तरी वचक पाहिजे. त्याला शिस्तींत ठेवणारा असल्याशिवाय त्याच्या हातून बरोबर काम होत नाहीं.

धाकटी——धाकटी आई—लक्ष्मी; ऐश्वर्याची देवता. याच्या उलट थारली आई (अवदशा, आक्काबाई.)

धागा——कच्च्या धाग्याची रयत—अतिशय आज्ञाधारक व गरीब रयत.

कच्च्या धाग्यांत असणें-वागणें--अतिशय आज्ञेंत असणें; बंदा गुलाम असणें.

❀ **धाग्यावरून ताग्याची परीक्षा**—एका सुतावरून सबंध कापडाची परीक्षा करतां येते. तु०--शितावरून भाताची परीक्षा.

धाड——धाड बडवणें--भरणें-पडणें--[धाड= रोग, आपत्ति] (एक शिवी) ' तुला काय धाड भरली आहे ! ' म्हणजे तुझ्यावर काय मोठें संकट आलें आहे ! ' काय धाड बडवली आहे त्याला ! '–माटे (अस्पृ. डायरी).

❀ **धाड पडावी पण चीत पडूं नये**--पिकावर टोळधाड इ. घाले आले तरी हरकत नाहीं पण चित्रा नक्षत्राचा पाऊस मात्र पडूं नये (कारण हा पाऊस पिकाला अतिशय मारक आहे).

धाडणें——धाडलो आगीक, तो पडलो वडयाचे खाजीक--(गो.) विस्तवासाठीं पाठविला तो वडे खाण्यास राहिला. सोंपविलेलें काम न करणाऱ्या बेजबाबदार माणसाबद्दल म्हणतात. तु०—अंगाऱ्याला गेला. इ.

धाडस——धाडसाला लक्ष्मी वश—धाडस केल्याशिवाय संपत्ति प्राप्त होत नाहीं.--इंप १६१. साहसे श्रीः प्रतिवसति ।

धात, धातु——धातुपोषण; धातु पोषणाचें बोलणें—थापेबाजी; खुशामतीचें बोलणें. ' लोभ भय दंभ मानार्थ । धातुपोषण बोलती बहुत । ' –मुसभा ५.१२४.

धातु फुटणें--१ कांहीं रोगांमुळें मूत्रविसर्जनादि प्रसंगीं आपोआप गळण्याइतकें वीर्य पातळ होणें. २ वयांत येणें.

धात पडे, मनुष्य तडफडे--मनुष्याची धातु जाऊं लागली म्हणजे मनुष्य दिवसेंदिवस क्षीण होऊं लागतो ?

धांदल——धांदलीचा दिवस आला, घरीं रिकामाच बैसला—कामाची घाई चालली असतां आळसांत वेळ घालविणाऱ्या मनुष्यास म्हणतात.

धादांत——धादांताला सिद्धांताची गरज नाहीं--जी गोष्ट उघड दिसत आहे ती सांगण्याला, दाखविण्याला शास्त्राच्या पुराव्याची जरूरी कशाला ?

वेदांत्यापेक्षां धादांत्या बरा--वेदांत पहा.

धान——धानाधिस्पट होणें-- (कु.) धुळधाण होणें.

धान्य——धान्य झटकणें--धान्य साफ करणें, वारवणें. धान्यांतील तूस वगैरे पाखडून टाकणें.

धान्य हुडकणें—धान्य शोधणें, निवडणें, धुंडणें. पूर्वीं पेवांत धान्य पुरून ठेवीत त्यावेळीं लष्करी लोक लष्कराकरिता तें शोधून काढण्याचा प्रयत्न करीत. त्यांची पद्धति:-एक लांब लोखंडी गज जमिनींत मारून व त्याचा वास घेऊन अमुक ठिकाणीं धान्य पुरलें आहे असें नेमकें सांगणें. ' लष्करांतील कित्येक लोकांचा धान्य हुडकून काढण्याचा धंदाच होता. '–ख१०५५.

अठरा धान्यें, अठरा धान्यांचें कडबोळें--'अठरा' पहा.

❀ **धान्य तेथें घुशी, निधान (घर) तेथें विवशी**-- जेथें धान्य असेल तेथें घुशी जमतात, तसें पुरलेलें द्रव्य असतें किंवा संपन्न घर असतें, त्या ठिकाणीं पिशाच्च वसति करतें. जेथें कांहीं लग्गा असेल तेथें लाभाकरितां लोक गोळा होतात.

धान्याप्रमाणें उपकार, पेरण्यानें वाढ नी फार—ज्या प्रमाणें धान्य पेरल्यानें तें अनेकपटीनें पिकून वाढतें, त्या प्रमाणें उपकार केला असतां तो अनेक पटींनीं फळ देतो.

धाप——**धाप खाणें**--[धाप=खेळांतील मर्याद-रेषा.] हद्दीच्या पलीकडे जाणें.

धापा——**धापा करणें**--(को.) नाश, खराबी, विध्वंस करणें.

धापू——**धापू होणें**—(कु.) १ मरणें. २ हरवणें. ३ फुकट जाणें.

धाबें——**धाबें दणाणणें**--धाब्याच्या घरावर जोरानें चाललें असतां किंवा वर कांहीं आघात झाला असतां तें हादरतें. यावरून भीतीनें तारांबळ उडणें; अतिशय भीति वाटणें.

धाब्यावर बसविणें--१ कांहीं हक्काचें देखील न देणें; (सर्वस्व लुबाडून) भिकेस लावणें, बाजूस ठेवणें. ' चुलत्यानें घरांत भाउबंदकी करून सुभानजीला धाब्यावर बसविलें. ' –स्वराप १७८. २ फसविणें; ठकविणें.

धामधूम——**धामधूम बलोंका राज**--जेथें अव्य-वस्था असत, तेथें बलिष्ठ लोक सत्ता बळकावतात.

धाय——**धाय मोकलणें-रडणें,धायींधायीं रडणें**--रडून आकांत करणें; टाहो फोडणें; अतिशय दुःख करणें. ' दुःश सन मोकली धाय । म्हणे गेले हातपाय ॥ '--मुआदि ४४·७. ' मग धाय टाकुनी रडे माये ॥ '–ब ५५३. ' रडवील कोण रणरंगीं । यवनांना धायी धायी । या पुढें॥ ' --विक १०. –प्रला १३६.

धाय——**धाय धाय, करम लिखा सो पाय**—कितीहि खटपट केली तरी नशिबांत असेल तेवढेंच मिळणार.

धार——**धार मारणें**—तलवार गाजविणें; पराक्रम करणें.

धार मारून न पाहाणें--अगदीं तुच्छ लेखणें.

धारेवर आणणें-धरणें—१ कडक शिस्तीनें वागाविणें. २ अगदीं सतावून सोडणें; छळणें.

धारेवर येणें--(एखादें काम, इ.) कडक शिस्तीखालीं चालू होणें, राहणें.

धारेवर वागणें–१ सावधानपणानें वागणें. २ धोक्याचा मार्ग चोखाळणें.

धारेवरचा वाघ—डोंगराच्या धारेवर उभ्या राहिलेल्या वाघास जशा डोंगराच्या दोन्ही उतारांवरील वस्तू दिसतात व त्याच्या मनांत येईल त्याप्रमाणें तो कोणत्याहि बाजूस हल्ला करूं शकतो, त्याप्रमाणें सुसज्ज असलेला व कोणत्याहि दिशेस आपलें तोंड वळवूं शकेल असा शत्रु.

धार——**धार काढणें-पिळणें**—दूध काढणें.

धार देणें—उंचावर उभे राहून (धान्य इ. स्वच्छ करण्यासाठीं) एक धारेनें खालीं ओतणें; वारवणें.

धार पडणें—वर्षाव होणें. ' तुम्ही फार खर्च करावयास सांगतां तर माझ्या घरीं कांहीं पैशाची धार पडत नाहीं. '

धार फुटणें--(जनावर) पुष्कळ दूध देऊं लागणें.

धार लागणें—फार वाहूं लागणें; बुळकी लागणें.

धारा घालणें—जोरानें पाऊस पाडणें. ' घाली धारा मेघ कडाडिला माथां । '

❀ **चारहि धारा कोणाच्या तोंडांत पडत नाहींत**--गाईच्या चारी आंचळांचें दूध एकदम पितां येत नाहीं. सर्व सुखें, चांगल्या गोष्टी एकाच्याच वांट्यास कधीं येत नाहींत.

धारक——**धारकीं धरणें**—१ धारेवर धरणें पहा. ' अल्प अन्याय क्षमा न करी । सर्वकाळ धारकीं धरी । ' –दा २·१·५६. २ (घोडा इ.) मंडळावर धरणें; फेर-फटक्यास नेणें. ' जैसें कोल्हेरीचें वारु । न येती धारकीं धरूं । '–अमृ ७·४.

धारकस——**धारकशी धरणें-टाकणें-लावणें-सोडणें**—मोठ्या संकटांत, पेचांत आणणें.

धारजिणा——**दुष्टास देव धारजिणा**--'देव' पहा; 'दुष्ट' पहा.

कसाबास गाय धरजिणी—'गाय' पहा.

मेसा देवी चोरास धारजिणी—[मेसा देवी=महिषी देवी ? मेसाई.] मेसादेवी ही चोरांची एक देवता आहे; त्यामुळें ती नेहमीं चोरांसच साहाय्य करते. तु०--ब्राह्मण म्हणविती मद्यमांस सेविती । मेसाई पूजिति वश्यकर्मी ।' –ब ५३०.

धारण——**पांचावर धारण बसणें**—पूर्वी फार महागाई झाली म्हणजे रुपयास पांच शेर धान्य मिळे. तेव्हां एवढी धारण झाली म्हणजे लोक अस्वस्थ होत. यावरून गर्भगळित होणें, घाबरून जाणें.

❀ **धारण आणि मरण कांहीं कळत-समजत-नाहीं**--धान्याचा भाव केव्हां बदलेल याचा नेम नसतो. त्याचा नक्की अंदाज कधीं करतां येत नाहीं. त्याचप्रमाणें मरण केव्हां येईल हेंहि नक्की सांगतां येत नाहीं.

धारण, मरण, पाऊस कोणाचे हातीं नाहीं--वर पहा.

धारणा——धारण शक्ति, तेथें विस्मृति—ज्याला फार धारण शक्ति असते तो लवकर विस्मरण्याचाहि संभव असतो. Men apt to promise, are apt to forget या म्हणीचा अनुवाद म्हणून सवि. (२३२०) नें दिला आहे !

धारवाड——धारवाडी कांटा--धारवाड शहर खऱ्या मापाविषयीं प्रसिद्ध असल्याचें दिसतें. १ बरोबर वजन देणारा कांटा. बरोबर तोल, वजन. ‘ टीकाकाराच्या हातांत नेहमीं धारवाडी कांटा असला पाहिजे. ’ –जि. मा. २ समतोल, निःपक्षपाती वर्तन.

धारा——धाऱ्यानें चालणें--घालून दिलेल्या पद्धतीप्रमाणें शिरस्त्याप्रमाणें वागणूक करणें. ‘ थोरले महाराजांचे धारयानीं दौलत चालविली आहे. ’–थोशाच ३९.

धारा——धारातीर्थ--शस्त्राची धार हेंच कोणी पवित्र तीर्थ. त्या धारेंत मृत्यु आला असतां मोक्ष मिळतो अशी समजूत. (ल.) रणांगण; समरभूमि. “ राजा शिवसिंग धारातीर्थी देह विसर्जन करून ‘ शिव शिव ’ म्हणत शिवलोकास गेला. ”–संभाजी.

धारातीर्थी पडणें--युद्धांत, लढतां लढतां मरणें.

धारिष्ट——धारिष्टास दैव धार्जिणें—जो मनुष्य धीट असतो त्यास दैव अनुकूल असतें. धैर्य दाखविणारास बहुधा त्याच्या कार्यांत यश मिळतें. तु०–साहसे श्रीः प्रतिवसति ।

धारें——धाऱ्याला बोळा व दरवाजा मोकळा—बाहेरून कोणी घरांत येऊं नये म्हणून धाव्यावरील धारेंहि बंद करावयाचें, पण दरवाजा बंद करावयाचें विसरावयाचें! बारीकसारीक गोष्टींची काळजी घेत असतां, महत्त्वाची व मोठी गोष्ट विसरणें.–गांगा २३१.

धाला——धाले धन्याचा लेक–मोठ्याचा मुलगा.

धांव——धांव घालणें—जोरानें धांवून जाणें; संकट निवारणाला तत्परतेनें जाणें. ‘धांव घाली आई । आतां पाहातीस काई ।’–तुगा ८३३.

धांवणें——धांवण्या(स) धांवणें—विनवणीप्रमाणें साहाय्यार्थ लवकर येणें. पुढें पहा. ‘झडकरि बहु माझ्या धांवण्या आजि धांवें । ’–सारुह ३.८१.

धांवण्यास पोंचणें-येणें—१ साहाय्य करण्यास धांवून जाणें. २ पळणारास धरण्यासाठीं मागें लागणें.

धांवणें——धांवत जाणें आणि पळत येणें—अगदीं लवकर जाऊन येणें. “ जिजाऊः—(हंसत) अरे धांवतोस कां ? रायबाः—धांवत जातों आणि पळत येतों बाईसाहेब ! ”--शिसं ११.

धांवून धुपून काम करणें—अतिशय श्रम घेऊन, धांवपळ करून काम करणें.

❀ **धावं तसं आवं**—(ठाकरी) जो धांवल त्यास मिळेल. शिकारीसंबंधीं ही म्हण आहे. श्रम करणाऱ्यास फलप्राप्ति होते.

धांव धांव, जो बेध लिखासो पाव—कितीहि धांवाधांव केली तरी जितकें नशिबांत असेल तितकेंच मिळतें. धायधाय पहा.

धांव धांव धांवलें आणि तारीकडेन पाऊं रावलें—(गो.) खूप धांवलें पण तरीवर पोंचून थांबलें. कारण तरीची होडी सुटून गेली होती. माणूस आटोकाट प्रयत्न करतो; पण मध्येंच अेखादे वेळीं दैव असें आडवें पडतें कीं तेथें मनुष्याचे सगळे यत्न फुकट ठरतात. घाई करूनहि गाडी चुकणें.

धांव धांव धांवले, फजीत पावले—विनाकारण गडबड, धांवाधांव केली तर शेवटीं फजीती होते. पुष्कळ खटपट करूनहि यश न आल्यास म्हणतात.

धांवणार पडतो, पोहणार बुडतो, आणि शहाणा चुकतो—जो मनुष्य धांवतो तोच पडण्याचा संभव असतो, जो पोहतो तोच बुडण्याचा संभव असतो व जो शाहणा मनुष्य कांहीं कार्य करतो त्याच्या हातूनच चूक होण्याचा संभव असतो. जो कधीं या गोष्टी करीत नाहीं, निवळ आळशांत वेळ घालवितो त्याला कधीं या आपत्ति येण्याचा संभव नसतो.

धांवण्यांत मारेकरी—गडबड उडाली म्हणजे गुप्त शत्रु आपलें वैर साधून घेतात. संकटांत संकट.

धांवतल्याक एकी हादी; सोदित्तल्याक धा; धांवतल्याक एकूच वाट, सोदतल्याक धा वाटो—(गो.) धांवणारास एक वाट तर शोधणारास दहा वाटा. पळून गेलेल्यास शोधणें फार कठीण जातें.

धांवा——धांवा मांडणें—धांवा ! धांवा ! असें ओरडणें; मदतीची याचना करणें. देवाची साहाय्यार्थ विनवणी करणें. उदा.–द्रौपदीचा धांवा.

❀ **धावा धांव बहुत, दैवीं असेल तें प्राप्त**–कितीहि धांवा धांव किंवा खटपट केली तरी जें नशिबांत असेल त्यापेक्षां अधिकाची प्राप्ति होत नाहीं. नशीबांत असेल तसेंच घडतें. धांवधांव पहा.

धास्ती——**धास्त-स्ती खाणें-घेणें**—भिऊन जाणें; घाबरणें; भेदरून जाणें.

धिटाई——**धिटाई खाई मिठाई, गरीब खाई गचांडया**––धट, धटाई पहा.

धिंबडी——**दमडीवर धिंबडी**—अल्पसाधनानें आनंद, मजा करणें; थाडक्यांत मजा, चैन.

धिमा——**धिमा शत्रु, अकल्पित सखा, हे जाणून जरा हुशारी राखा**—आपला शत्रु जर वरून शांत असेल (तर तो कांहीं तयारी करीत असेल) व एखादा मनुष्य अवचित येऊन जर मित्रत्व दाखवूं लागेल (तर त्याच्या मनांत कपट असेल), तर त्या गोष्टींच्या मागें कांहीं तरी काळें बेरं आहे, असें समजून सावधपणानें वागावें.

धिमी पाऊल टाक मैदान सारते—धिमेपणानें काम करीत गेल्यास यश मिळाल्याशिवाय राहात नाहीं; धीरें धीरें कार्य केल्यास सिद्धि मिळते.

धिरडें——**(पाठ हात इ. चें) धिरडें काढणें-निघणें**––पाठ, हात, इ. मारण्यानें धिरड्यासारखें करणें, हुळहुळे करणें; खूप मारणें.

धिस——**धिसपिटाविणें**—हूर्यो करून पळवून लावणें.

धीट——**धीट नीट, लाखाचें पीठ**––(व.) जी कुणाला भीत नाहीं, मोठी धीट असते तिला म्हणतात.

धीटपणें वागतो, तो जगीं प्रसिद्ध होतो––धैर्यशाली मनुष्यास कीर्ति मिळते.

धीर——**धीर चेपणें**—भीति मोडणें; धैर्य येणें.

धीर निघणें—१ दम धरवणें. २ धैर्य, निश्चय टिकणें.

❀ **धीर असेल पोटीं, तर बरें होईल शेवटीं**—मनुष्य उतावीळ न होतां जर धीमेपणानें वागूं लागेल, तर त्याचा शेवटीं फायदा होतो.

धीर धरील, तो खीर खाईल—जो मनुष्य धीमेपणानें वागतो त्यास लाभ होतो. तु०–धीर सो गंभीर उतावळा सो बावळा.

धीर सो गंभीर––जो मनुष्य धीम्या स्वभावाचा असतो तो गंभीर असतो.

धीर सो (तो) गंभीर, उतावळा सो (तो) बावळा––धीर धरणारा माणूस शांत गंभीर असतो पण तोच उतावळा माणूस त्या प्रसंगीं बावचळल्यासारखा होतो.

धीरे धीरे, दैव उघडे––धीर धरला असतां कधीं तरी नशीब उदयास येतें.

धीरे धीरे दैव उघडे, जशी बाजारी किंमत पडे––ज्याप्रमाणें दमानें घेतल्यास बाजारभाव खालीं पडून तुमचा फायदा होतो, तसें हळूहळू नेटानें काम करीत गेल्यास नशीब उघडलें म्हणजे लाभ होतो. मूळ इंग्रजी म्हण अशी–Fortune is like the market, where if you bid your time, the price will fall.—सवि ११.१३.

धीरज——**धीरज धरम मितर और नार, आपतकाल परखते चार**—(हिं.) धीर, धर्म, मित्र व कांता या चार गोष्टींची परीक्षा विपत्कालीं होते. मित्रस्वजन बंधूनां बुद्धेर्धैर्यस्य चात्मनः। आपन्निकषपाषाणे नरो जानाति सारताम् ॥–सुर १५३-१५.

धुडका——**धुडके-क्या उडविणें-करणें**—ठिकऱ्या उडवणें. अगदीं पराभूत करणें; फजीती उडविणें.

धुड्डा——**धुड्डा उडविणें**—फडशा पाडणें; निःपात करणें.

धुणावळ——**जशी देणावळ, तशी धुणावळ**––जसा पैसा तसें काम. दाम तसें काम.

धुणी——**धुणी घालून बसणें**—ज्याप्रमाणें साधु किंवा बैरागी विस्तव पेटवून सभोंवतीं बसतात; त्याप्रमाणें धरणें धरणें; सत्याग्रह करणें.

धुणें——**धुणीं धुणें**––दुसऱ्याचे दोष, व्यंगें काढीत बसणें; दोषैक दृष्टि असणें.

धुणें——**धुतलें जाणें**––लुबाडण्यांत येणें; साफ होणें; नागवलें जाणें.

धुतल्या तांदुळासारखे निर्मळ––अत्यंत शुद्ध, पवित्र. ' पुरुष मात्र अगदीं धुतल्या तांदुळा सारखे निर्मळ, पाप करायचं कसं तें देखील समजत नाहीं हो त्यांना ! '–हांकाध. –संशय कल्लोळ १-५-२१.

धुवावें तिला मळ, भांडावें तिला कळ—एखादा कपडा कितीहि स्वच्छ असला तरी तो धुऊं लागल्यास त्यांतून थोडा तरी मळ बाहेर पडतांच; त्याप्रमाणें ज्याला भांडावयाचेंच असेल त्याला थोडें तरी निमित्त मिळतेंच.

धुतरा——धोतरा पहा.

धुनरा चारणें—धोत्र्याचें बीं खावयास घालणें. विष घालणें; मारणें. 'ते एकदाचि निजले; जाणों सर्वांसे चारिले धुतरे ॥'–मोमंत्र १०·६७.

धुंद——धुंद धरणें–बांधणें–ध्यास घेणें;नाद लागणें.

धुंध(धु)रमास——धुंधरमासाचा बेत, नक्ताचें जेवण—धुधुरमासांत सकाळीं जवतात व नक्तांत संध्याकाळीं. सकाळीं जेवणाचा बेत केला पण रात्रीं पानें मांडावयाची तयारी झाली, अशा वेळेस म्हणतात. कांहीं ताळतंत्र नाहीं अशी अव्यवस्थित वागणूक; दिरगाई.–के२३·१२-३८.

धुपाटणें——देव तसें धुपाटणें, न्हावी तसें थापटणें--जशास तसें. इतर म्हणींसाठीं देव पहा.

तेल गेलें तूप गेलें, धुपाटणें हातांत (हातीं) आलें–तेल पहा.

धुमश्चक्री——धुमश्चक्री घालणें·करणें—[धुमसणें + चक्र = धुमश्चक्र = सारखा धुमाकूळ] दांडगाई, गोंधळ, गोंगाट करणें.

धुमश्चक्री चालविणें—गोंधळ, अव्यवस्थितपणा, चैन इ. प्रकारें वागणें.

धुरळा——(डोळ्यांत) धुरळा घालणें—फसविणें; भुरळ पाडणें.

धुरळा मरणें—पाण्यानें धूळ खालीं बसणें.

धुरी——धुरी देणें—मांत्रिक, जादूगार इ. लोक आपल्या 'झाडा'ला प्रथम धुरी देतात, त्यावरून (ल.) फसविणें; भोंदणें.

धुऱ्या——धुऱ्यावर ठेवणें-बसविणें—(ना.) मुद्दाम उपेक्षा करणें. बाजूस ठेवणें; कडेला, कांठावर ठेवणें.

धुव्वा——धुव्वा उडविणें—नाश करणें; दाणादाण करणें. 'दोहींकडून दोघे उठले म्हणजे आमचा धुव्वा उडवून देतील.'–पामो ४०६.

धू——धुव दिवन जांवय जोडला--(गो.) मुलगी देऊन जांवई जोडायचा.

बोले सुने आणि लागे धुवे--सुनेला बोललें म्हणजे लेकीला लागतें. याच्या उलट एक म्हण आहेः–'लेकी बोले सुने लागे.' अप्रत्यक्ष बोलणें.

धुवे आधीं लेवंचा, झिला आधीं खावंचा--(कों.) मुलीच्या अगोदर ल्यावें व मुला अगोदर खावें. कारण मुलगी पुढें आईचे दागिने आपणच वापरते व मुलगा आईला धड खाऊ देत नाहीं तेव्हां मूल होण्यापूर्वीं खाण्यापिण्याची व दागिन्यांची हौस फेडून घ्यावी.

'धुवे, कॅन्नां न्हाणयलेली गे?'–'हॅं सॉम्ना तॅंऽऽऽऽ सॉम्ना'...'सुने, कॅन्नां न्हाणयलेली गे?' 'हॅं दिव्ळे तॅं दिव्ळे!'—(गो.) मुलीला केव्हां न्हायला घातलें? तर याऽऽऽ सोमवारीं ते त्याऽऽऽ सोमवारीं. आणि सुनेला? या दवाळीला, ते त्या दिवाळीला. लेकीसुनेंत असा पक्षपात.

धुवे दिवन् जांवयां उपकार—(गो.) मुलीला देऊन जांवयावर उपकार.

धूप——धूप घालणें—अंगांतील भुतानें बोलावें म्हणून त्याच्या पुढें धूप जाळतात. यावरून, १ (ल.) विनंति करणें; आर्जवणें. २ (अकरणरूप) न जुमानणें.

धूप दाखविणें—चाळवण्या देणें; झुलविणें.

धूम——धूम घेणें–ठोकणें—पळणें; सूं बाल्या करणें; निसटणें. 'हातचें काम तसेंच टाकून धूम घेतली.'–मोरप्र२७.

धूम पाहणें—कसोटीस लावणें; पारखणें.

धूर——धूर काढणें--पुढें होणें; मार्गदर्शक होणें. 'शिंताडा न लागतां धूर मी काढी । परापर थडी तत्काळ ॥'–एभा १२·५७७.

धूर घेणें--(व.) धुऱ्यास जू बांधणें.

धूर हाकलणें—(व.) गाडी हाकलणें.

धूर——धूर देणें-दाखविणें—फसविणें.

धूर निघणें—गुप्त बातमी थोडी बाहेर फुटणें. ख ४९३३.

(डोळ्यावर) धूर येणें--मदांध होणें, बेपर्वा असणें.

धुरावर धरणें—धुरी देण्यावरून वाक्प्रचार. गांजणें; छळणें.

❀जेथें जेथें धूर तेथें तेथें अग्नि असतोच—कारणावांचून कार्य घडत नाहीं. कार्य दिसलें कीं तेथें कारण सांपडावयाचेंच. –टि ४·१५. यत्र यत्र धूमस्तत्र तत्र वन्हिः।

धुरानें वाऱ्याची दिशा कळते--ज्या दिशेकडे धूर वाहात असतो त्या दिशेकडे वारा वाहातो असें समजावें. आनुषंगिक गोष्टींवरून मुख्य गोष्ट किंवा कार्यावरून, परिणामावरून कारणाचा अंदाज करणें.

धुरापाना देंट्ट आंगारि उडूवूनु लडाई सोधी—(गो.) तंबाकूच्या पानाचें देंठ अंगावर टाकून भांडण उकरून काढायचें. कांहीं कांहीं माणसांचा स्वभावच तंटा ओढून घेण्याचा असतो तो असा.

धुवरु लागिलो वासो जाईना, मशि लागिलें मडकें जाईना—(गो.) एखाद्या दांडक्याला धूर लागला म्हणून तो वांशासारखा वळकट होत नाहीं आणि एखाद्या भांड्याला मस लागली म्हणून तें मडकें होत नाहीं. स्वभावसिद्ध गुण ज्याचे त्याला.

धूळ——**धूळ उडणें**--ओसाड पडणें.

धूळ खाणें--१ भिक्षा मागणें; अगदीं निकृष्ट दशा असणें. तु०--' खाल रणीं रज मजसह न करुनियां या महर्षिचें कथिलें ॥ ' -मो उद्योग ३·१८. २ नाश होणें; मातीस मिळणें.

धूळ खात पडणें--(वस्तु, व्यक्ति इ.) वर धूळ सांचणें; निरुपयोगी होऊन राहणें; एखाद्या पदार्थाचा उपयोग करणारा नसला, किंवा उपयोग केला नाहीं तर होणारी स्थिति.

धूळ चारणें--तोंडांत धूळ जाईल अशा रीतीनें खालीं पाडणें. चीत करणें (विशेषतः कुस्तींत); पुरता मोड, मानभंग करणें.

धूळ फुंकणें--अन्नान्नदशा होणें; पोटाला न मिळणें. धूळ खाणें पहा.

धूळ फुंकून डोळ्यांत उडवून घेणें--स्वतःच उचापत करून स्वतःस इजा करून घेणें; आपण होऊन आपणांवर आपत्ति ओढवून घेणें.

(डोळ्यांत) धूळ फेकणें--फसविणें; विपरीत भासविणें.

धुळीचे दिवे खात जाणें--भिक्षा मागत फिरणें.

धुळीचे दिवे चारणें--फसविणें; ठकविणें; नाश करणें. ' त्या कृतांतकन्येनें राज्याधिकाऱ्यांना धुळीचे दिवे चारले.' -इंप ३९.

धुळीचे दिवे पाहणें--धूळ फुंकणें इ. वरप्रमाणें.

धुळीचे दिवे लावणें--दुष्कृत्यें करून प्रसिद्धी मिळविणें.

धुळीवरचें सारवण--धुळीवर सारवलें असतां तें टिकत नाहीं. यावरून क्षणभंगुर गोष्ट; अळवावरचें पाणी. (गु.) धुळपर लीपणुं, ने वारपर तीपणुं.

धुळीस मिळणें—अगदीं नाश होणें.

धुळीस मिळविणें—नायनाट करणें; रसातळास पोंचविणें. ' मराठेशाही मी पार धुळीला मिळविली. आतां मी खराखुरा सम्राट झालों. ' -स्वप १३४.

❀ **धूळ गांव धोलेरा, बंदर गांव बारा, कच्च्या गव्हांची रोटी, पाणी पिती खारा**--धोलेरा गांवांत धूळ फार म्हणून बंदरावरच्या गांवास यावें तों तेथील लोकांस गव्हांची रोटी नीट करतां येत नाहीं व खारें पाणी प्यावें लागतें. (गु.) धुलगाम धोलेरा, बंदर गाम बारा, काचा घंउनी रोटली, पाणी पीवां खारा.

धूलकी रसी नहीं बांधी जाती--(हिं.) धुळीचे दोर होत नाहींत. वाळूचे दोर. असंभाव्य गोष्ट.

धेडा——**नवऱ्याला मिळेना काट (कट), धेडा मागतो वरण**—नवऱ्या मुलाला (जांवयाला) वरणावरचें पाणी (नितळ) सुद्धां मिळत नाहीं तर पाणजांवई मागतो वरण ! म्हणजे तें त्याला कधींच मिळावयास नको. मोठ्यांची जेथें डाळ शिजत नाहीं तेथें इतरांची काय कथा, या अर्थी. तु०-नवरा रडतो तरणास, वऱ्हाडी रडतात वरणास.

धेंडा——**टाळ गेला, मांदळ गेला माझा धेंडा नाचूं द्या**—[धेंडा नाचविणें=वधूवरास खांद्यावर घेऊन लग्नमंडपांत माणसें नाचतात तो प्रकार] टाळ मृदंगवाले निघून गेल्यावर धेंडा नाचवूं पाहणें. वेळ गेल्यानंतर आपली गोष्ट करावयास बघणें; अप्रासंगिक वर्तन. टाळ पहा.

धैर्य——**धैर्य आणि थोरपण, हीं नाहींत भिन्न**—धैर्य असलें म्हणजे श्रेष्ठपणाहि मिळतो.

धैर्य धरून श्रम घेती, ते पर्वतादीक उलटती--जे धैर्यानें श्रम करतात ते डोंगरहि उलटून टाकूं शकतात. धैर्यानें मोठमोठीं कामें होऊं शकतात.

धैर्य पैका काळ अनुकूल, सर्व घडून येतें तात्काळ--धैर्य, द्रव्य व परिस्थिति अनुकूल असल्यास सर्व कांहीं जुळून येऊन कार्य त्वरित होतें.

धैर्यावांचून आचरण म्हणजे भारावांचून जहाज--आपल्या वागणुकींत धैर्याचा जर अभाव असेल तर आपला संसार रिकाम्या गलबताप्रमाणें हेलकावे खाऊं लागेल. त्याची सर्व बाजूंनीं गडबड उडेल. -सवि ७२१.

धैर्यावांचून प्राप्तीची इच्छा खोटी--आपल्या अंगांत जर धैर्य नसेल तर कोणतीहि गोष्ट प्राप्त करून घेण्याची आशा करूं नये.

धोकरा---**धोकऱ्या बैलान गाय आडयलो**--(गो.) म्हाताऱ्या बैलानें गायीला आडविलें. तरण्या बैलाचें असें कृत्य रास्त झालें असतें. यावरून अशक्तानें मोठ्या कामास हात घालणें.

धोका---**धोका देणें**--फसविणें; दगा देणें; तोंडघशीं पाडणें.

धोंगडा---**गांडी धोंगडा, पोटाला तुकडा**--नेसण्यास दणकट वस्त्र व खाण्यास पोटभर असलें म्हणजे पुरे. यांत समाधान आहे. थोडक्यांत संतोष मानून घेण्याची वृत्ति.

धोंड---**डोकीवर धोंड चढविणें-देणें-वळविणें**—एखाद्या मनुष्यावर बळेंनें लादणें (काम). कांहीं मागणीविषयीं एखाद्याकडून जुलमानें कबुली घेणें; रुकार मिळविणें.

धोंड दिवस--ज्याप्रमाणें अधिक महिन्यास धोंड्याचा महिना म्हणतात, त्याप्रमाणें अधिक तिथीस धोंड दिवस म्हणतात. धर्मकृत्यास योग्य अशा दोन तिथीमधली तिथि, वृद्धीमुळें येणारा दिवस, भाकड दिवस.

डोकीवर धोंड पडणें-येणें--१ अतिशय द्रव्यनाश होई असें दरवडा इ. संकट प्राप्त होणें. 'या व्यापारांत पांच हजारांची मजवर धोंड पडली.' २ गळ्यांत येणें; अंगावर येऊन पडणें.

धोंडभट्टी--धोंडभट नांवाचा एक ब्राह्मण होता. तो स्नान न करतां तसेंच गंध लावून बाहेर फिरत असे. स्नान केलें नसून स्नान केल्यासारखें दिसण्यासाठीं गंध,भस्म इत्यादिकांनीं आपलें शरीर सजविणें; स्नानाशिवाय गंध लावणें. 'येतो हा धोंडभट्टी द्विज करुनि सदा तीर्थ द्याया पदांचें।' —मसाप ४-३-१६४.—आगर ३-१०.

धोंड महिना-मास--चांद्रवर्ष व सौरवर्ष यांचा मेळ घालण्याकरितां सुमारें तीन वर्षांनीं धरावा लागणारा अधिक महिना. पुरुषोत्तम मास; अधिक मास; मलमास (या महिन्यांत धर्मकृत्यें होत नाहींत म्हणून.)

धोंडा---**वाटोळा धोंडा**--(ल.) दुसऱ्याच्या पेचांत कधीं न सांपडणारा असा धूर्त माणूस. दगड पहा.

पायावर धोंडा ओढून-पाडून घेणें—एखादें लचांड पाठीशीं लावून घेणें; आपत्ति ओढवून घेणें; जबाबदारी पतकरणें.

चिखलांत-गुवांत धोंडा टाकून अंगावर उडवून घेणें—बळेंनें संकट ओढवून घेणें. एखाद्याची मुद्दाम कुचाळी करून स्वतःवर त्याच्या शिव्या वगैरे ओढवून घेणें.

चिखलांत धोंडा टाकून पलीकडे जाणें—संकट उपस्थित करून त्यांतून निभावून जाणें. वाटेंत अडचण आल्यास तींतून मार्ग काढून जाणें.

धोंडापाणी दाखविणें--परिटाचें जुजबी धुणें. कपडे नुसते पाण्यांतून भिजवून पिळून आणणें; बरोबर न धुणें.

धोंडा लोटणें-घालणें--एखाद्यावर मोठें तुफान आणणें; कचाटें घालणें; आळ घेणें; आरोप करणें.

धोंडे खणून काढणें--पाया खणून काढणें; निर्मूलन करणें; पाळेंमुळें खणून काढणें; उखडणें; काढून देणें; एखाद्यानें अजीबात निघून जावें म्हणून हात धुऊन त्याच्या पाठीस लागणें.

हातीं धोंडे घेणें—अतिशय चिडणें; मारावयास उठणें; धोंडे मारूं लागणें.

चार ठिकाणीं धोंडे टाकून पाहणें—स्वकार्यसाधनार्थ अनेक स्थळीं अनेक प्रयत्न करून पाहणें; ठाव घेणें; सुगावा लावू पाहणें; अंदाज घेणें.

धोंडे फोडणें—दगड मारावयास लागणें; वेडे होणें.

धोंडे मारूं लागणें—१ एखाद्यावर चालून जाणें; मारावयास धांवणें. २ (उप.) वेडा होणें; वेड लागणें.

धोंड्याखालीं हात सांपडणें—पेचांत अडचणींत येणें; एखादी जबाबदारी अंगावर येऊन पडणें. दगड पहा.

धोंड्याचे दोर काढणें—वाळूच्या दोराप्रमाणें. अशक्य गोष्ट करूं पाहणें. दोर पहा. १ कृपणापासून पैसे, पाषाणहृदयी मनुष्यापासून दया मिळवावयास झटणें; अशक्य गोष्ट करावयाचा प्रयत्न करणें. २ अनुरूप साधनाचें साहाय्य नसतां मोठ्या खुबीनें आणि निश्चयानें मोठे उद्देश सिद्धीस नेणें.

धोंड्याला शेंदूर फासून म्हसोबा बनविणें—एखाद्याचें विनाकारण स्तोम माजविणें; अपात्र मनुष्यास महत्त्व देणें.

धोंड्यावर धोंडे घालणें—निष्फळ प्रयत्न करणें; उपयोग नाहीं अशा गोष्टी करणें.

धोंड्यावर धोंडे घालून करणें—द्रव्यादि साहाय्य

नसतां नाना प्रकारचे प्रयत्न करून एखादें कार्य करणें; नाना प्रकारच्या युक्त्या योजणें; अनेक उपायांनीं एखादी गोष्ट पार पाडणें.

धोंड्याशीं कपाळ घासणें--स्वतःस व्यर्थ शिणविणें (मूर्खास शिकविण्यांत इ.). अशक्य कार्य करूं पाहणें.

* **पावला तर देव, नाहीं तर धोंडा**—जर आपलें काम झालें तर एखाद्यास सन्मान देणें योग्य असतें, नाहींतर त्यास कांहीं महत्त्व देण्यांत अर्थ नाहीं. प्रयत्नास तर हरकत नाहीं या अर्थी.

धोंडा आणि पिकाचा लोंढा--ज्यावर्षी अधिक महिना येतो त्यावर्षी पीक चांगलें येतें.

देखला धोंडा, घातला कपाळीं—अतिशय चिडखोर आणि आततायी माणसास लावतात.

धोंडा टाकून पाहावा ! पडला तर आंबा. नाहीं तर धोंडा—प्रयत्न करून पाहावा; सफल झाल्यास ठीकच. नाहींतर कांहीं विशेष हानि नाहीं. तु०-गाजराची पुंगी०

धोंडा तिकडेच आणि गोफणहि तिकडेच--एक मनुष्य गोफणीनें धोंडा उडवीत होता. त्याला तें नीट साधत नसल्यामुळें त्यानें धोंडा उडवल्याबरोबर त्याची गोफणहि उडून गेली. याप्रमाणें १ अर्धवट ज्ञान असलेला मनुष्य एखादी गोष्ट करूं लागला म्हणजे अधिक लाभ होण्याच्या ऐवजीं जवळ असेल तेंहि गमवून बसतो. २ एकासाठीं दुसरा पाठविला व दोघेहि तिकडेच राहिले, म्हणजे म्हणतात.

धोंडिया कपलातलों फातोर चुकना—(गो.) धोंड्याच्या डोक्यांतला दगड चुकायचा नाहीं. दुर्दैव्याला जिथें जाईल तिथें अपेश. धोड्यारो पहा.

धोंड्यावरून उठले, डेंड्यावर बसले—[धोंडा व डेंडा हीं पक्वान्नें आहेत] एका कामाकडून तशाच प्रकारच्या दुसऱ्या कामास लागणें. म्हणजे तशीच मेहनत, वगैरे पडणें. स्थितिपालट न होणें.

धोंडावचें——धोंडावन फणसूल पिकवप—(गो.) धोंडे मारून फणस पिकवणें; मारून मुटकून फणस पिकवणें; एखाद्यास मारून मुटकून वैद्य बनावणें. तु०-Doctor inspite of himself.

धोड्यारो——धोड्याऱ्याच्या कपळांत तीन गुंडे--(गो.) [धोड्यारो=एक मासा, याच्या डोक्यांत तीन धोंडे सांपडतात.] भाग्यहीन माणसानें कितीहि प्रयत्न केले तरी तो अपेशीच. तु०-पळसाला पानें तीनच.

धोतर——धोतर सोडून नाचणें—१ आनंदानें बेहोष होणें. २ वेडे होणें. ३ उच्छृंखल बनणें.

धोतरांत निखारा बांधणें--धोतरांत निखारा घेतल्यास धोतर पेटून जिवावर बेतावयाची. यावरून घातक, तापदायक, अनिष्ट अशी जबाबदारी पत्करणें. 'तुम्हीं बोलून चालून व्यसनी, तुमची जामिनकी म्हणजे धोतरांत निखारा बांधूनच हिंडायचें-हो, तुम्हीच सांगा-व्यसनी माणसांचा भरंवसा काय घ्या ?'-एकच प्याला ४•३.

धोत्र होड जाल्यारि गोत्र होड जात्तावे ?—(गो.) धोतर मोठें असलें म्हणून गोत्र मोठें होत नाहीं. मनुष्याची योग्यता पोषाखावरून ठरत नाहीं, गुणांवरून ठरते.

धोतरा——धोतरा येणें होणें—धोतऱ्याच्या विषामुळें भ्रम लागणें; बेशुद्ध होणें. धुतरा पहा.

धोंद——धोंदाचा सोंडेक आणि सोंडेचा धोंदाक--(कों) दोंदाची (माती) सोंडेला व सोंडेची दोंदाला. याची त्याला, त्याची याला. साटेलोटे.

धोपट मार्ग——धोपट मार्गा सोडूं नको—सरळ वाट सोडूं नये. आड मार्गानें न जातां सर्व लोक जातात अशा राजमार्गानें जात असावें. 'विकट वाट वहिवाट नसावी धोपट मार्गा सोडूं नको ।' -अफला ६०.

धोपरा बुद्धू——(गो.) प्रत्युत्पन्नमतित्व.

धोबी——कुत्ता धोबिका, घरका न घाटका—धोब्याचा कुत्रा धड घाटावरहि नसतो व धड घरींहि नसतो; कोठें तरी भटकत असतो. धड एके ठिकाणीं नसणाऱ्याबद्दल म्हणतात. (गु.) धोबीनो कुतरो, नहि घेरनो, नहि घाटनो, के नहि बहारे वाटनो. Like Wood's dog, he will neither go to church, nor stay at home.

धोबीसे जीत नहीं, तो गद्धेको क्यौं मारना---धोब्याला जिंकलें नाहीं तर त्याचा राग गाढवावर काढून त्याला विनाकारण कां मारावें.-विक्षिप्त ७५. तु०-वड्याचें तेल वांग्यावर. गाढव पहा.

धोब्याचा पोऱ्या-घाटचा ना घरचा—एकच ठिकाण धरून राहणारा नाहीं असा, भटक्या. कुत्ता धोबीका० पहा.

राजाचें नेसणें, धोब्याचें गांड पुसणें—राजाचे कपडे जरी बहुमोल असले तरी ते धोब्याकडे धुवावयास आल्यावर तो त्यांचा वाटेल त्या कामीं उपयोग करतो. चांगली वस्तूहि अडाणी व जबाबदार माणसाच्या हातीं लागल्यास तो तिचा भलताच उपयोग करतो.

धोब्याच्या लग्नाला, उणें काय पायघड्याला ?— धोब्याच्या घरीं लग्न असल्यावर पायघड्यांस वस्त्रें काय कमी असतात. त्याचेकडे अनेकांचे कपडे धुवावयास आलेले असतात ते तो पायघड्यांस घालतो. तु०–राजाचें नेसणें

धोरडा——धोरडा काढणें—नागविणें; लुबाडणें.

धोरडा निघणें—लुबाडला जाणें.

धोरण——धोरण बांधणें—वशिला लावणें; संधान बांधणें.

धोरण नाहीं अंगीं, फजिता होतो प्रसंगीं—नीट धोरणानें वागलें नाहीं म्हणजे वेळेवर फजीति होते.

धोला——धोलार काठी पडलीकीं आपाप पिशीं खुपतात; धोलार बडी पट्टकीर पिशें खुबपटा—(गो.) ढोलावर काठी पडली कीं ज्यांच्या अंगात येतें तीं माणसें घुमूं लागतात. The cap is thrown.

धोशा——धोशा बाळगणें—भीति, धाक वाटणें

धोशा लावणें—१ मोठा जोर, नेट करणें. २ सारखा एकाद्या गोष्टीवर तडाखा ठेवणें; तीच तीच गोष्ट सारखी करणें.

ध्यान——ध्यानांत येणें—१ लक्षांत येणें; समजणें. २ पसंत पडणें; मान्य होणें. "ती मसलत बापूंच्या ध्यानांत येईना. कारण राव वाड्यांत गुंतले आहेत."–पेब ८६.

ध्यानास लागणें—ध्यास लागणें; चिंता वाटणें; एखाद्या गोष्टीबद्दल काळजी वाटणें; हुरहुर लागणें.

ध्यानीं मनीं असणें—सारखें मनांत घोळत असणें.

❀ ध्यानीं तें मनीं—ज्याकडे लक्ष असतें तसेच विचार मनांत चालतात. Our wishes are fathers to our thoughts.

ध्यानीं मनीं पानगा—नेहमीं खाण्याकडे लक्ष्य असणें.

ध्यानीं बसे तें स्वप्नीं दिसे—जे विचार मनांत असतात त्या संबंधींच स्वप्न पडतें.

ध्रुव——ध्रुवपदीं बसविणें—ज्याप्रमाणें परमेश्वरानें ध्रुवास अढळस्थान दिलें त्याप्रमाणें. १ अढळ, कायमस्थानीं ठेवणें. २ वैभवाला चढविणें.

ध्वज-जा——ध्वजा लावणें—एखादी विशेष आनंददायक गोष्ट घडली म्हणजे आपण निशाणें उभारून आनंद व्यक्त करतों त्यावरून, पराक्रम करणें; (प्रपंचांत) उन्नतदशा प्राप्त करून घेणें. २ (उप.) अपकीर्ति मिळविणें.

ध्वनि——ध्वनी करणें–लावणें—शंख करणें.

❀ ध्वनि तसा प्रतिध्वनि—जशी क्रिया तशी प्रतिक्रिया. Action and reaction are equal and opposite.

न

न चा पाडा–पाढा–फाडा; नन्नाचा पाढा—नाहीं या शब्दाच्या आरंभीं न हें अक्षर आहे, यावरून नकार; कोणतेंहि काम करावयास सांगितलें असतां नाकारणें; नाहीं म्हणणें; असंमति दर्शविणें; अमान्य करणें.

नचा पाढा वाचणें–सांगणें–घट(ट्ट) करणें–घोकणें–पाठ असणें – नेहमीं प्रत्येक गोष्ट, काम नाकारणें; प्रत्येक कामास, गोष्टीला नकार देणें; कोणतीहि गोष्ट सांगितली असतां नाहीं म्हणणें. ह्याला नचा पाढा पाठ आहे=प्रत्येक गोष्टीला, कामाला त्याचा नकार आहे. कर न करत्याचा वसा.

❀ न ऐके हिंदूचें, न ऐके यवनाचें, तेथें धर्मबंधन कशाचें ?—जो मनुष्य धड हिंदूप्रमाणेंहि आचरण ठेवात नाहीं, धड मुसलमानाप्रमाणेंहि वागत नाहीं, त्याला कोणत्याच धर्माचें बंधन नसतें. त्याची वागणूक अगदीं स्वैर असते. त्याला कोणतेच आचार नियम लागू नसतात. तु०–न हिंदुर्न यवनः ।

न करत कांहीं, वाईट शिकूं पाही—जो मनुष्य कांहीं एक न करतां रिकामा बसतो, त्याला कांहीं तरी खोड्या करावेसें वाटूं लागतें. रिकाम्या मनुष्यास उपद्व्याप करावेसे वाटतात. आळशी मनुष्य बहुधा व्यसनी बनतो. तु०–रिकामा न्हावी कुडाला तुंबड्या लावी. –A vacant mind is a Satan's workshop.

न करावी चोरी, न भ्यावें राजाला—जो चोरी करील त्यालाच राजापासून शासनाची भीति. इतर लोकांना भीतीचें कारण नाहीं. अपराध करील तो दंडास पात्र होईल, दुसरा नाहीं.

न कर्तीची नवरी, देजानीं मोडली—मुलगी करावयाची नसली म्हणजे हुंडा पटत नाहीं अशी सबब सांगणें.

न कर्त्याचा वार शनिवार—शनिवार हा अशुभवार, मंदवार, घातवार असल्यानें या दिवशीं नवीन काम घेत नाहींत. तेव्हां काम करण्याचें मनांत नसलें म्हणजे शनिवारीं करूं असें सांगावयाचें. किंवा आज शनिवार आहे, काम

करणें इष्ट नाहीं म्हणून टोलविणें. यहुदी लोकांत शनिवार हा सब्बाथचा दिवस मानतात व त्या दिवशीं खिस्ती लोक ज्याप्रमाणें रविवारीं काम करीत नाहींत त्याप्रमाणें काम करीत नाहींत. याकरितांच बेने इस्राएल हे शनिवारीं तेलाचा घाणा बंद ठेवतात. म्हणून त्यांस शनिवाऱ्ये तेली असें म्हणतात.

न कळे काय अरिष्टें येती भोगा, हांसूं नये दुसऱ्याचे दैवयोगा—एखाद्या मनुष्यावर आपत्ति आली असतां त्याला हंसूं नये, त्याची चेष्टा करूं नये; कारण आपणावर केव्हां काय आपत्ति येईल याचा नेम नसतो.

न खात्या देवाला वोनें (नैवेद्य)—जो देव खात नाहीं त्याला खूप मोठा नैवेद्य दाखवतात; कारण तो दाखवणाऱ्यालाच मिळावयाचा असतो. पण ज्याला जरूर आहे त्याला कोणी देत नाहीं. नको म्हणत असेल त्याला आग्रह करणें. श्रीमंत मनुष्यास लोक भेटी वगैरे पाठवून त्याचा गौरव करतात पण गरजू मनुष्यास कोणी साहाय्य करीत नाहीं.

न खादी नार नी पायलीचा आहार—कांहीं न खाणारी स्त्री म्हणून मिरवावयाचें, पण आहार मात्र फार मोठा. ढोंगीपणा. तु०—नको नको, पायलीचें चाखो.

न गच्छेद् ब्राह्मणत्रयम्।—तीन ब्राह्मण एका कामाला गल्यास कार्यनाश होतो अशी समजूत आहे. याकरितां तीन ब्राह्मणांनीं एकावेळीं जाऊं नये. संबंध श्लोक असा—(अ) न गच्छेच्छूद्रचातुष्कं न गच्छेद्वैश्यपंचकम्। न गच्छेद्युग्मकं राज्ञोर्न गच्छेद्ब्राह्मणत्रयम्॥ (आ) न गच्छेतां पितापुत्रौ न गच्छेत्सोदरद्वयम्। नव नार्यो न गच्छेयुर्न गच्छेद्ब्राह्मणत्रयम्॥

न घडे तें घडो येई, एका विठ्ठल चिंतनें।—परमेश्वराचें नामस्मरण केल्यास अशक्य वाटणारी गोष्टहि घडून येते.

न घे ऐकून कोणाचें, कान फार बधीर त्याचे—एखादा मनुष्य नेहमीं आपल्या मनाप्रमाणें वागतो, दुसऱ्या कोणाचें सुळींच ऐकत नाहीं अशाबद्दल म्हणतात; हेकेखोर हट्टी मनुष्य.

न च धर्मो दयापरः।—प्राणिमात्रावर दया करणें हा सर्वांत श्रेष्ठ धर्म होय. दया धरमका मूल है। (अ) क्षान्तितुल्यं तपो नास्ति संतोषान्न सुखं परम्। नास्ति तृष्णासमो व्याधिर्न च धर्मो दयापरः॥ (आ) न च विद्यासमो बन्धुर्न च व्याधिसमो रिपुः। न चापत्यसमः स्नेही न च धर्मो दयापरः॥

न चोरहार्यं (विद्याधन)—विद्या चोराला नेतां येत नाहीं. (अ) न चोरहार्यं न च राजहार्यं न भ्रातृभाज्यं नच भारकारि। व्यये कृते वर्धत एव नित्यं विद्याधनं सर्वधनप्रधानम्॥—सुर ३०.१३. (आ) न चोराला लाधे प्रकट न दिसे दे सुख सदा। दुणावे कीं देतां किमपि न सरे लेशहि कदा। (इ) न बलात्कारें राजा न चोर कपटें जया हरायास। होई समर्थ ज्याच्या अल्पहि संरक्षणीं न आयास॥—कृ. शा. चिपळूणकर, विद्याप्रशंसा.

न जाणे समय कैसा लोटावा, तो पूर्ण दुःखी समजावा—ज्याला वेळ प्रसंगीं कसें वागावें व अडचणींतून कसा मार्ग काढावा, हें समजत नाहीं, त्याला फार दुःख भोगावें लागतें. —सवि १३६९.

न जावें सुंदरपणावर, आधीं गुण श्रवण कर—बाह्यरूपावर भुलून जाऊं नये, गुणांकडे लक्ष्य द्यावें.

न झेंपे ऐसें ओझें, दुसऱ्यावर न घालावें—दुसऱ्यास सोसणार नाहीं असा भार त्यावर कधीं घालूं नये. दुसऱ्याच्या मदतीचा गैरफायदा घेऊं नये.

न तिहींत, न तेरांत, न शेरभर सुतळींत—कशांतच नाहीं; पूर्ण अलिप्त.

न देखे रवि, तें देखे कवि—कविकल्पना या प्रत्यक्ष सृष्टीच्याहि पलीकडच्या असूं शकतात. कविकल्पनांस अगम्य कांहीं नाहीं. कवि पहा. कवयः किं न पश्यन्ति किं न भक्ष्यंति वायसाः। मद्यपाः किं न जल्पंति किं न कुर्वंति योषितः॥ —सुर १६०.३०४.

न देण्याचा वार, शनिवार—शनिवारीं सामान्यतः देण्याघेण्याचा व्यवहार करीत नाहींत. मनांत द्यावयाचें नसलें म्हणजे शनिवाराचें निमित्त पुढें करावयाचें. तु०—न कर्त्याचा वार शनिवार.

न देवाय न धर्माय—धड देवाकडे खर्च झालें नाहीं कीं धर्माकडे नाहीं, मधल्यामधेंच वायां गेलें. चांगल्या कामास न आलेल्या गोष्टीबद्दल योजतात. धर्म पहा. (अ) न देवाय न धर्माय न बन्धुभ्यो न चार्थिने। दुर्जनेनार्जितं द्रव्यं भुज्यते राजतस्करैः॥ (आ) न देवाय न धर्माय विधवायै नमो नमः। प्रज्वालितानि शष्पाणि नांगाराय न भस्मने॥

न देवाय न धर्माय अश्वत्थाय नमो नमः।—पिंपळाच्या झाडावर देवतेचा वास नसतो तर मुंजाची वसति असते असें मानतात व मुंजा हा पिशाच्च योनींतील असतो. त्यामुळें पिंपळास केलेला नमस्कार धड ना देवाला कीं धर्माला.

न धरीं शस्त्र करीं मी—कृष्णानें पांडवांना साहाय्य देण्याचें कबूल केलें तें या अटीवर कीं, मी प्रत्यक्ष हातांत

शस्त्र घेऊन लढणार नाहीं; फक्त सल्लामसलत देईन. यावरून नुसती सल्ला मसलत देणें; प्रत्यक्ष वादांत वगैरे न पडणें. ' न धरीं शस्त्र करीं मी गोष्टी सांगेन युक्तिच्या चार। हें जरि मान्य परी तुज जन्मापासून पार्थ परिचार ॥ '–मो.

न नीचो यवनात्परः ।—[यवन याचा अर्थ परकीय, परधर्मीय] यवनापेक्षां नीच कोणी नाहीं अशी कांहीं धर्म-वेत्त्यांची समजूत आहे ती पुढील श्लोकांत व्यक्त केली गेली आहे. चाण्डालानां सहस्रैश्च सूरिभिस्तत्त्वदर्शिभिः । समो हि यवनः प्रोक्तो न नीचो यवनात्परः ॥

न पडती चित्रा, तर भात न मिळे पितरा—चित्रांचा पाऊस पडला नाहीं तर पितरांस पिंड द्यावयासहि भात मिळणार नाहीं, इतका दुष्काळ पडेल. याचे उलटहि, चित्रा नक्षत्राचा पाऊस वाईट अशीहि समजूत आहे. उदा० धाड पडावी पण चित्रा न पडावी. कदाचित् उत्तराबद्दल चित्रा शब्द येऊन ही म्हण बनली असावी. किंवा एक कोंकणांत व एक देशावर पिकांच्या मानानें रूढ असावी.

न पडतील मघा, तर वरतीं बघा !––मघा नक्षत्राचा पाऊस पडणार नाहीं तर दुष्काळाचें भय आहे, आकाशाकडे डोळे लावून बसण्याची पाळी येते.

न पडे उत्तरा तर भात मिळेना पितरा—उत्तरा नक्षत्रांत पाऊस नसेल तर श्राद्धाला सुद्धां तांदुळ मिळणार नाहीं. इतकें दुर्भिक्ष होईल.

न पढा न सिखा, नाम विद्यासागर—नांव तर विद्यासागर पण लिहितां वाचतां येत नाहीं; नांवांत कांहीं अर्थ नसतो. तु०–' नांव सोनुबाई हातीं कथलाचा वाळा. लछमी तो गोबर बेचे, भीक मागे धनपाळ। अमरसिंह तो मर गये, भला बिचारा ठणठणपाळ ॥

न पश्यति च जन्मांधः कामांधो नैव पश्यति ।—जन्मापासून अंधळा असलेल्या मनुष्यास कांहीं दिसत नाहीं हें खरेंच पण कामानें अंध झालेल्या मनुष्यास त्यापेक्षांहि दिसत नाहींसें होतें. सर्व श्लोक असा—न पश्यति च जन्मांधः कामांधो नैव पश्यति । न पश्यति मदोन्मत्तो ह्यर्थी दोषं न पश्यति ॥–सुर १५९·२८२. तु०–कामातुराणां न भयं न लज्जा ।

न पुत्रो न पुत्री—(मुलगा नाहीं किंवा मुलगी नाहीं) १ एखाद्या गोष्टीची असंदिग्धता किंवा अनिश्चितता दाख-विण्यासाठीं योजतात. २ नरो वा कुंजरो वा ! या अर्थीं कानावर हात ठेवणें.—मदमं ४५.

न पुरे माझ्या गारीं, कोठला आला माधुकरी—[गार=पोटाची खळगी] माझ्या पोटालाच पुरत नाहीं तर माधुकऱ्यास कोठचें घालावयाचें. अति दरिद्री किंवा कंजुष माणसाबद्दल म्हणतात.

न बासी रहे, न कुत्ता खावे––[बासी=घरांत राखून ठेवावयाची पेज] घरांत इतकी गरीबी कीं पिढ्यान् पिढ्या राखून ठेवण्याची पेजहि उरत नाहीं किंवा कुत्र्यालाहि कांहीं मिळत नाहीं.–सवि ३६५७. उत्तर हिंदुस्थानांत गोंड वगैरे लोकांत रोज केलेल्या पेजेंतून थोडी पेज रात्रीं राखून ठेवण्याची पद्धति आहे. ही बासी (शिळी पेज) दुसऱ्या दिवशींच्या पेजेंत घालावयाची असते व पुन्हां दुसऱ्या दिवशीं रात्रीं पेज राखून ठेवावयाची असते. मूळ हेतु हा कीं, रात्रीं बेरात्रीं कोणी पाहुणा आला अगर जरूर लागली तर घरांत थोडें तरी अन्न घर म्हणून तयार असावें. आतां केवळ चाल म्हणून राहिली आहे. अशा तऱ्हेची बासी कांहीं घरा-ण्यांत अविच्छिन्नपणें अनेक पिढ्यांची असते व त्याबद्दल ते प्रौढी मारतांना आढळतात.

न बोलणाराचे नाहीं गहूं विकत, पण बोलणाराचे करडई विकतात––जो मनुष्य बोलका नसतो त्याचे गहूंहि विकत नाहींत व बोलक्या मनुष्याच्या करडईहि विकतात. व्यवहारांत घुमेपणा चालत नाहीं. मोकळेचाकळेपणानें बोलावें लागतें. मालाचें गुणवर्णन करावें लागतें. हल्लींचें युग जाहि-रातीचें आहे. जाहिरात केल्याशिवाय माल खपत नाहीं. अबोल्या मनुष्याकडे कोणी लक्ष्य देत नाहीं.

न बोलतां काम करणें, तें चांगलें होणें—न बोलतां निमूटपणें, एकाग्रमनानें काम केलें असतां तें चांगलें होतें.

न बोलावतां भोजना आला, कोठें बसावें हें न सुचे त्याला––एखादा मनुष्य आगांतुकपणें जेवावयास आला असतां त्याचें पान मांडलेलेंच नसल्यामुळें कोठें बसावें हें त्याला सुचत नाहीं. पूर्वतयारी नसली म्हणजे वेळेवर गडबड उडते. विशेषतः इंग्रजी समाजांत जेवढे लोक जेवावयास बोलावितात तेवढ्यांच्याच खुर्च्या मांडलेल्या असतात व वशा वगैरे ठेवलेल्या असतात. नवीन अधिक मनुष्य आला असतां त्यास जागा होत नाहीं. तु०—Uninvited guests sit on thorns.

न बोलून शहाणा––ज्यावेळीं बोलण्याचा कांहीं उपयोग होत नाहीं, किंवा उलट बोलण्यानेंच बिघडतें त्यावेळीं मौन हें शहाणपणाचें ठरतें. कांहींचें शहाणपण त्यांच्या बोलण्या-

वरून कळतें तर कांहींचें न बोलण्यावरून. तु.–विशेषतः सर्वविदां समाजे विभूषणं मौनमपंडितानाम् ।

न भीतो मरणादस्मि केवलं दूषितं यशः।––मला अपकीर्तीचें जितकें भय वाटतें तितकें मरणाचेंहि वाटत नाहीं. सबंध श्लोकः––न भीतो मरणादस्मि केवलं दूषितं यशः । विशुद्धस्य हि मे मृत्युः पुत्रजन्मसमः किल ॥ तु०–न भी तसा मी नरकासि देवा । या पाशबंधासहि वासुदेवा । न भी सुरांच्या जयवाद्यनादा । भीतों जसा मी अपकीर्तिवादा ॥ –वामन.

न भूतो न भविष्यति––पूर्वी कधीं झालें नाहीं कीं पुढेंहि होणार नाहीं अशा तऱ्हेची गोष्ट. अतिशय अपरंपार अशा अर्थानेंहि वापरतात. हा चरण ज्यांत आहे ते चार श्लोक असे :––(अ) कृपणेन समो दाता न भूतो न भविष्यति । अस्पृशन्नैव वित्तानि यः परेभ्यः प्रयच्छति ॥ (आ) जीवन्ति च म्रियन्ते च मद्विधाः क्षुद्रजन्तवः । अनेन सदृशो लोके न भूतो न भविष्यति ॥ (इ) भृत्यकार्ये हनुमता कृतं सर्वमशेषतः । सुग्रीवसदृशो लोके न भूतो न भविष्यति ॥ (ई) वेङ्कटाद्रिसमं स्थानं ब्रह्मांडे नास्ति किंचन । वेङ्कटेशसमो देवो न भूतो न भविष्यति ॥ 'तुझिया ऐसा पक्षपाती । आतां न भूतो न भविष्यति । पुराणमुख राहेल कीर्ति । ऐसें कांहीं मज सांगे ॥'–मुक्तेश्वर. 'तेसमयीं दुतर्फा यंत्रांचा कडाखा ऐसा जाहला कीं न भूतो न भविष्यति.'–भाब ३४. 'आणि त्या ब्राह्मणास न भूतो न भविष्यति शिव्या देऊं लागला.' –मायेचा बाजार.

न मागतां कृपा करतो, त्याचा उपकार मोठा होतो–मागितल्यावर कोणीहि देईल पण जो न मागतांच देतो त्याचे उपकार अधिक वाटतात. पण असे दाते किंवा उपकारकर्ते फारच थोडे. आजकाल न मागल्याला हक्काचें सुद्धां मिळत नाहीं. दातव्यमिति यद्दानं दीयतेऽनुपकारिणे । देशेकाले च पात्रे च तद्दानं सात्त्विकं विदुः ॥–सुर ६९.९.

न मागे तयाची रमा होय दासी।––जो मनुष्य याचना करीत नाहीं त्यावर लक्ष्मी आपण होऊन कृपा करते. न मागणारास परमेश्वर आपण होऊन देतो. "निरपेक्षतेची साक्ष कालच त्यानीं (पं. भाऊशास्त्री वझे) केलेल्या भाषणावरून पटेल. तथापि 'न मागे तयाची रमा होय दासी' या वचनाप्रमाणें त्यांचा आदर जनता शक्त्यनुसार आपण होऊन करते."–माझा चित्रपट १०३.– कावळा व ढापी पृ. २२८. सबंध श्लोक असा :––सदा मागतां दास देवा न साहे । न मागे तयाची रमा दासी होये ॥ असे आस तो दास झाला जगाचा । नसे आस तो ईश ब्रह्मादिकाचा ॥–समर्थ करुणाष्टकें व स्फुट श्लोक १३०.

न मातुः परदैवतं।––आईसारखी श्रेष्ठ देवता नाहीं. नान्नोदकसमं दानं न तिथिर्द्वादसी समा । न गायत्र्याः परो मन्त्रो न मातुः परदैवतम् ॥

न मानावें तैसें गुरुचें वचन । जेणें नारायण अंतरें तें ॥––ज्याच्या योगानें परमेश्वर आपणांस अंतरत असेल ती गुरूचीसुद्धां आज्ञा मानूं नये.

न मारतां भय दावी, ती बरवी नीति म्हणावी––ज्या नीतीच्या शिकवणुकीनें मनामध्यें इतका धाक उत्पन्न होतो कीं कधीं मारावयाची पाळी येत नाहीं ती उत्तम नीति समजावी. कधीं मारण्याची पाळी येणार नाहीं अशी जर शिस्त लागेल तर ती चांगलीच.

न मिळे भीक, तर कांहीं तरी शीक––भीक सुद्धां जर मिळत नसेल तर निदान शिक्षण घे. सध्याच्या शिक्षणानें भीक मागून होणाऱ्या प्राप्तीइतकीहि प्राप्ति होत नाहीं, हें निराळें !

न म्हणे उत्तम वाईट कोणाला, तो पात्र होतो जननिंदेला––जो कोणालाच उत्तम अगर वाईट म्हणत नाहीं, त्याला सर्वच लोक नांवें ठेवतात. तो कोणालाच खूष करूं शकत नाहीं.

न रहे आप, तो क्या करे मा ने बाप––(गु) स्वतःच जर घरीं राहात नसेल तर आईबाप किती ठेवून घेऊं शकणार.

न रहे बांस, न बाजे बांसरी––मूळचा वेळूहि शिल्लक नाहीं कीं बांसरीहि झाली नाहीं. हेंहि नाहीं तेंहि नाहीं. 'एक पदवी व तिच्या बरोबर मिळणारे सालीना शंभर रुपये यांच्या लोभानें दासाप्रमाणें तिष्ठत उभें राहून एका यवन–राज प्रतिनिधीची मार्ग प्रतीक्षा करावी, हें मला निमुटपणें सहन करावें लागत आहे, याचें मला फारच वाईट वाटलें. तेव्हां वरील म्हणीप्रमाणें एकादा योग्य प्रसंग पाहून पदवी सोडून द्यावी असें मनानें ठरविलें.' –पं. वझे-काशीचा संपूर्ण इतिहास, पान ७७.

नलगे नलगे, बळेंच गिळगे––नको नको म्हणून बळेंच गळ्यांत पडणारा. तु०–नको नको पायलीचें चाखो.

न लागती मघा, तर ढगाकडे बघा––'न पडतील मघा०' पहा. "दुष्काळी वातावरण अजून कायम आहे. कालपासून मघा नक्षत्र सुरू झालें आहे व शेतकऱ्यांना 'न

लागती मघा तर वरती ढगाकडे बघा, 'मघाच अगोदरच ढगाकडेच बघण्याची दुर्दैवानें पाळी आली आहे." —काळ १९-८-४१.

न लागो पुत्राचा हात, पण लागो डोंबाची लाथ— मृत्युसमयीं जवळ पुत्र नसला तरी चालेल पण काशींत मृत्यु येऊन डोंगच्या लाथेनें गंगेंत फेकून दिल्यानें मोक्ष मिळतो. अशी समजूत आहे. काशींत मरण यावें यासाठीं पूर्वी बरेच धर्मभोळे म्हातारपणीं काशीवास करीत. 'काश्यांतु मरणात् मुक्तिः।' असें वचन रूढ आहे.

न वदेद्यावनीं भाषां।—यावनी भाषेचा मुखानें कधींहि उच्चार करूं नये. 'न म्लेच्छितव्यम्।' इतका परकीय भाषाविषयीं पूर्वी तिटकारा असे. सबंध श्लोक असा— हस्तिना ताड्यमानोऽपि न गच्छेज्जैनमन्दिरम्। न वदेद्यावनीं भाषां प्राणैः कण्ठगतैरपि ॥

न सोसे तर थट्टा करूं नये—आपली थट्टा दुसऱ्यानें केलेली सोसत नसेल तर—करावें, करून घ्यावें, याप्रमाणें आपण दुसऱ्याची थट्टा करूं नये.

न स्त्री स्वातन्त्र्यमर्हति।— स्त्रीस कधींहि स्वतंत्रता, मोकळीक देऊं नये. स्त्रीस नेहमीं कोणीतरी रक्षणकर्ता लागतो, असें मन्वादिकालापासून मत आहे. पिता रक्षति कौमारे भर्ता रक्षति यौवने। पुत्रो रक्षति वार्धक्ये न स्त्री स्वातन्त्र्यमर्हति॥

न हिन्दुर्न यवनः।—धड हिंदु नाहीं कीं धड मुसलमान नाहीं. त्रिशंकुसारखी स्थिति. हिंदूप्रमाणेंहि वागणूक करीत नाहीं व मुसलमानांचाहि धर्म आचरीत नाहीं असा. धड ना इकडे धड ना तिकडे असा अर्धवट मनुष्य. न संध्यां संधत्ते नियमित निमाजं न कुरुते, न वा मौञ्जीबन्धं कलयति न वा सौनतविधिम्। न रोजा जानीते व्रतमपि हरेर्नैव कुरुते, न काशी मक्का वा शिवशिव न हिन्दुर्न यवनः॥

न हिंदुः प्रभुरात्मनः।—हिंदु मनुष्य हा कधींच स्वतंत्र नसतो; त्याच्यावर सदैव निरनिराळ्या काळीं कोणीतरी वर्चस्व गाजवावयास तयार असतो. बाल्ये राजगुरुर्यन्ता यौवने भृतिदो नृपः। तथा पेन्शनदाता च न हिंदुः प्रभुरात्मनः॥—टि ३.३४.

न हि वंध्या विजानाति गुर्वीं प्रसववेदनां।—वांझेला बाळंतपणाचे कष्ट काय तें कळणार नाहीं. ज्याची कळ त्याला. विद्वानेव विजानाति विद्वज्जनपरिश्रमम्। न हि वन्ध्या विजानाति गुर्वीं प्रसववेदनाम्॥

न हि सुप्तस्य सिंहस्य प्रविशंति मुखे मृगाः—आळसानें कांहीं मिळत नाहीं. झोंपलेल्या सिंहाच्या तोंडांत श्वापदें कांहीं आपोआप येऊन पडत नाहींत, त्याला तीं मारून खावीं लागतात. याकरितां प्रत्येकानें श्रम करणें अवश्य आहे. सबंध श्लोक—उद्यमेन हि सिद्ध्यंति कार्याणि न मनोरथैः। न हि सुप्तस्य सिंहस्य प्रविशन्ति मुखे मृगाः॥—हितोपदेश.

नानृतात्पातकं परम्।—असत्यापेक्षां अधिक वाईट असें पातक नाहीं. (अ) न पुत्रात्परमो लाभो न भार्यायाः परं सुखम्। न धर्मात्परमं मित्रं नानृतात्पातकं परम्॥ (आ) क्षत्रधर्मे परा हिंसा याच्ञायां लाघवं महत्। असत्यमेव वाणिज्यं नानृतात्पातकं परम्॥—समपद्य.

नई——**इकडे नई, तिकडे वई**—इकडे नदी तिकडे कुंपण; इकडे आड तिकडे विहीर; कोठेंहि गेलें तरी भयानक परिस्थिति; बिकट परिस्थितींत सांपडणें; पेंचाची, अडचणीची, कुचंबणीची स्थिति.

नऊ——**नऊ कोट नारायण**—नऊ कोटी सुवर्णमुद्रा जवळ असणारा; अतिशय श्रीमंत. 'नवकोट नारायण तुमचे वडील, लक्ष्मीशीं सारीपाट खेळण्यांत तुमचा जन्म गेला; आणखी आतां हें काम करायचं!' एकच प्याला ४.२.

नऊ खंडें—(अ) १ इलावृत्त, २ भद्राश्व, ३ हरिवर्ष, ४ किंपुरुष, ५ केतुमाल, ६ रम्यक, ७ भरत, ८ हिरण्मय व ९ उत्तरकुरु. (आ) १ भरत, २ वर्त्त, ३ राम, ४ द्रमिल, ५ केतुमाल, ६ हीरक, ७ विधिवस, ८ महि, ९ सुवर्ण. (इ) १ इंद्र, २ कशेरु, ३ ताम्र, ४ गभस्ति, ५ नाग, ६ वारुण, ७ सौम्य, ८ ब्रम्ह, ९ भरत. —हंको.

नऊ गुण—१ बुद्धि, २ सुख, ३ दुःख, ४ प्रयत्न, ५ इच्छा, ६ द्वेष, ७ संस्कार, ८ पुण्य, ९ पाप. —विउ ३.४.

नऊ ग्रह—१ सूर्य, २ चंद्र, ३ मंगळ, ४ बुध, ५ गुरु, ६ शुक्र, ७ शनि, ८ राहु, ९ केतु.

नऊ द्वारें—१-२ दोन डोळे, ३-४ दोन कान, ५-६ दोन नाकपुड्या, ७ एक तोंड, ८ एक गुदद्वार व ९ एक मूत्रद्वार. —ज्ञा ५.७५.

नऊ नाग—१ अनंत, २ वासुकी, ३ शेष, ४ पद्मनाभ, ५ कंबल, ६ शंखपाल, ७ धृतराष्ट्र, ८ तक्षक, ९ कालिय. (अनंतं वासुकिं० इत्यादि श्लोक)

नऊ नाथ—(अ) १ प्रकाश, २ विमर्श, ३ आनंद, ४ ज्ञान, ५ सत्यानंद, ६ पूर्णानंद, ७ स्वभावानंद, ८ प्रतिभावानंद व ९ सुभगानंद (आ) १ मच्छिंद्र, २ गोरक्ष, ३ जालिंदर, ४ कानीफा, ५ चरपटी, ६ नागेश, ७ भरत. ८ रेवण व ९ गहिनी. (इ) गोरक्ष जालिंदर चर्पटाश्च, अडभंग कानीफ मच्छिंदराद्याः । चौरंगिरेवाण च भर्तृसंज्ञो भूम्यां बभूवुर्नवनाथसिद्धाः ॥

नऊ नारायण—१ कवि, २ हरि, ३ अंतरिक्ष, ४ प्रबुद्ध, पिप्पलायन, ६ आविर्होत्र, ७ द्रुमिल, ८ चमस व ९ करभाजन. –नव १.२९-३०.

नऊ निधि—१ महापद्म, २ पद्म, ३ शंख, ४ मकर, ५ कच्छप, ६ मुकुंद, ७ कुंद, ८ नील, व ९ खर्व 'मंल तुमाचिया या श्रीचरणरजाचे न होय निधि नवही।' –मोमंभा १.११२.

नऊ महारोग—१ राजयक्ष्मा, २ कुष्ठ, ३ रक्तपिती. ४ उन्माद, ५ श्वास, ६ मधुमेह, ७ भगंदर, ८ उदर व ९ मूतखडा.

नऊ रत्नें—१ हिरा, २ माणिक, ३ मोती, ४ गोमेद, ५ इंद्रनील, ६ पाच, ७ प्रवाळ, ८ पुष्कराज, ९ वैडूर्य किंवा तोरमल्ली.

नऊ रत्नें—(विक्रमाच्या दरबारांतील). १ धन्वन्तरि, २ क्षपणक, ३ अमरसिंह, ४ शंकु, ५ वेतालभट्ट, ६ घटकर्पर, ७ कालिदास, ८ वराहमिहिर, व ९ वररुचि धन्वन्तरिःक्षपणकोऽमरसिंहशंकुःवेतालभट्टघटकर्पर कालिदासाः। ख्याता वराहमिहिरा नृपतेः सभायां रत्नानि वै वररुचिर्नव विक्रमस्य ।–सुर ३७ ३७.

नऊ रस—१ शृंगार, २ वीर, ३ करुण, ४ अद्भुत, ५ हास्य, ६ भयानक, ७ बीभत्स, ८ रौद्र व ९ शांत. 'ज्ञाता जो सरसावला नवरसां माझारि शृंगारसा।'–र५.

नऊ लक्षणें—(ब्राह्मणाचीं). १ आचार, २ विनय ३ विद्या, ४ प्रतिष्ठा, ५ तीर्थदर्शन, ६ निष्ठा, ७ वेदपठन, ८ तपस्या, व ९ दान.

नऊ स्थायी भाव—१ प्रेम, २ उत्साह, ३ शोक, ४ विस्मय, ५ भय, ६ हास्य, ७ जुगुप्सा, ८ क्रोध, आणि ९ निर्वेद.

नऊ हस्तवाद्यें—१ झांज, २ टाळ, ३ चिपळी, ४ करताळ, ५ जलतरंग, ६ घंटा, ७ तास, ८ घुंगूर, व ९ घागऱ्या.

नवग्रह पालथे पडणें—ग्रह पालथे असले म्हणजे त्यांचें कांहीं चालत नाहीं. विपरीत दशा येणें. 'पद्मावतीः–पण रावणाच्या पायऱ्या झालेले नवग्रह त्यावेळीं पालथे पडले होत, म्हणूनच रावणाची जबरदस्ती चालली बरें!' –उग्र १.१.

नवचंदरी म्हैस—जिचे आंचळ, चार पाय, एक डोळा व तोंड पांढरें असून शेपटीच्या टोंकाचे केंस पांढरे असतील व कपाळाला पांढरा तिलक असेल अशी म्हैस.–नवाकाळ ७ ३ ३४.श्यामकर्णी वारूप्रमाणें अशी म्हैस लाभणें कठीणच.

नवविधा भक्ति—१ श्रवण, २ कीर्तन, ३ स्मरण, ४ पादसेवन, ५ अर्चन, ६ वंदन, ७ दास्य, ८ सख्य, ९ आत्मनिवेदन. स्मरणं कीर्तनं विष्णोः स्मरणं पादसेवनं । अर्चनं वंदनं दास्य सख्यमात्मानवेदनम् ॥ –विपू ५.२३. –दा १-१-३.

***नऊ अंगुळी, संध्येची पळी**—संध्येची पळी नऊ बोटें लांबीची असते. त्याप्रमाणें जन्मतः लहान मूल.

नऊ कारभारी, अठरा चौधरी—[चौधरी–चौगुला= एक ग्रामाधिकारी] ज्या गांवांत किंवा घरांत सर्वच कारभार जो तो पहातो तेथें सर्वत्र गोंधळ होतो. अनेक मालक असले म्हणजे एकहाती कारभार नसल्यामुळें अव्यवस्था होते; निर्नायकी.

नऊ–नव खंड पृथ्वी, दहावें खंड काशी—पूर्वींची पृथ्वीसंबंधीची कल्पना. त्यांत काशी हे एक स्वतंत्र खंड असून तेथें काशीविश्वेश्वराचें राज्य चालतें अशी समजूत होती. नऊ खंडें पहा. गुजराथेंत 'नऊ खंड पृथ्वी, दहावें खंड काशी व अकरावें खंड अगाशी' अशी म्हण आहे. अगाशीस (वसईजवळ) वैतरणी नदी समुद्रास मिळते.–मॅन ११३२.

नऊ चोवीस एकादशी, कशाला पाहिजे गांवचा जोशी—फारसी व मराठी तिथींचा मेळ घालणारा वाक्संप्रदाय. फारसी किंवा मुसलमानी नवव्या व चोविसाव्या तारखांस हिंदूंची एकादशी ही तिथि असते.

नऊ नगद, तेरा उधार—दुकानदार गिऱ्हाइकाला म्हणतोः 'नगद दाम द्यायचे असतील तर या वस्तूची किंमत नऊ रुपये पडेल; पण पैसे उधार ठेवायचे असतील तर किंमत तेरा रुपयांपेक्षां कमी घेणार नाहीं.' म्हणजे ही किंमत सरासरी दीड पट पडते. उधार ठेवलेले पैसे बुडण्याच्या धोक्यामुळें व रकमेवरील व्याजामुळें किंमत वाढवून सांगितलेली असते 'अनुभव असा येतो, कीं नऊ नगद बरें पण तेरा उधार खोटें.' उधार पहा.

नऊ नडियादी सात पेटलादी आणि एक उमरेठी (बरोबर)--(गु.) नडियादचे नऊ असामी तर पेटलादचे सात असामी बरोबर होतात; तर त्या सर्वांस एक उमरेठी मनुष्य पुरून उरतो. कारण हा फार वस्ताद असतो. तु०-शंभर काशीकर एक नाशिककर.

नऊ नायक, दहावा पायक--सैन्यामध्यें दहा शिपाई असले व त्यांत नऊ जण जर आपण नायक आहों असें म्हणूं लागले, तर हुकूम चालवायला कायतो एक पाईक उरणार. अशा रीतीनें सर्वच अधिकारी झाले तर काम कोणी करावयाचें? अशी स्थिति चालत नाहीं. तर नऊ पायकावर एक नायक असला पाहिजे. पुढील म्हण पहा. तु०-तुम तांडेल, हम तांडल तर घमत कोण सांडेल. तूं राणी, मी राणी, मग डुंगणावर कोण घालील पाणी.

नऊ पायक, दहावा नायक--ही म्हण वरच्या म्हणीच्या उलट आहे पण हा सयुक्तिक आहे १ नऊ शिपाई व दहावा नाईक. २ नऊ इंद्रियांवर दहाव्या मनाचा ताबा असतो.

नऊ मण तेल शृंगाराला जळलं, आणि नाचायला गेलें तेथें पटकन् उजाडलं !--नर्तकीचा शृंगारसाज होता होतां रात्र निघून गेली व नाच राहिलाच. नमनाखालीं सारा वेळ जाणें. प्राथमिक कार्याला, साधनें जुळविण्याला फार काळ लागल्यास म्हणतात.

नव जाण मोच्यांनीं उदक पिले, एकलो कसो आनवाणो उरतलो ?--(गो.) नऊ इसम जोड्यांतून पाणी प्याले, मग दहावा एकटाच कुठून सोंवळा राहाणार ? दुष्कृत्य करणाऱ्या माणसांच्या सहवासाला असलेला सज्जन मनुष्यहि त्याच्या सारखाच समजला जातो अशा अर्थानें.

नव दिन चले ढाई कोस--[ढाई अढाई=अडीच] नऊ दिवस चाललें तरी मजल अडीच कोस. 'केदारनाथ आणि बद्रिनाथ यांच्यामध्यें अंतर पाच मैल आहे. परंतु मध्यें मोठा पहाड असल्यामुळें, आल्या रस्त्यानें परत येऊन, अनेक डोंगरांना वळसे घालून नऊ दिवसांच्या प्रवासाच्या अंतीं बद्रिनारायणाला जावें लागतें, यावरून वरील म्हण पडली आहे.' --काका कालेलकर, हिमालयांतील प्रवास, पान २०८.

नकटा------**नकटयापुढें नाक खाजविणें**--मुद्दाम खिजविणें; एखाद्याच्या व्यंगावरून त्यास चिडविणें, त्याचे उणें काढणें. (गु.) नकटीनी सामे नाक घकड्यु, तोंके महने नकटी कही.

सुरुखुरु साविका आणि नकटा तिरुका--[सुरुखुरु=उजळ तोंडाचा. साविका=एक नाणें, शिवराई (दहा रुक्याचें माप). तिरुका=१ पैसा.] साविका नाणें तिरुक्यापेक्षां लहान असतें. पैशापेक्षा साविका अधिक डौलदार दिसते ? जें सुंदर असेल तें साविकेप्रमाणें डौलदार दिसतें व नकटें पैशाप्रमाणें बेडौल दिसतें. गरीब पण ऐटदार, श्रीमंत पण बेडौल.

नकटा तो नकटा, पण घी तो चट्टा--कुरूप असला तरी भरपूर खावयास लागणारा.

नकटाबडा, दिमाख बडा--व्यंग असून ऐट मारणें, करणें. माणसानें आपला दोष ओळखून नम्रपणें वागावें.

नकटी बायको व खोटा पैसा जगांत कुठें राहिला आहे काय--नकट्या मुलीचेंहि कसें तरी लग्न होतें व खोटा वाटणारा पैसाहि केव्हां तरी चालून जातो याप्रमाणें सर्व गोष्टीस खरें आहे. कोणचीहि वस्तु पडून राहात नाहीं.

नकटीच्या लग्नाला सतराशें विघ्नें--प्रथम नकट्या मुलीचें लग्न लवकर जुळत नाहीं, जुळलें तरी त्यांत अनेक अडचणी येतात. यावरून आधींच दुष्कर असलेल्या कामांत अडचणींवर अडचणी येणें. (गु.) नकटीना लगनमां सोलसे वघन. 'दारुबंदीस मुहूर्त चांगला लाभला नाहीं कीं काय अशी शंका, तिच्या मार्गांत जे अनेक अडथळे निर्माण होत आहेत त्यावरून मनांत येते. नकटीच्या लग्नाला सतराशें विघ्नें असें म्हणतात.' --केसरी ५-७-४०.

नकटें तें नकटें आणि पुन्हां नाकाचा डौल--आपलें व्यंग ओळखून माणसानें वागलें पाहिजे. नाहींतर जास्त हसें होतें.

नकटें नाक मारतें झाक, लांबडें नाक कापून टाक--ज्याला त्याला स्वतःच्या वस्तूबद्दल, स्वतःबद्दल प्रतिष्ठा वाटते व दुसऱ्याच्या गोष्टीबद्दल तुच्छता वाटते.

नकटें रुसलें, पायरीं जाऊन बसलें--नकटें मनुष्य त्याला चिडविल्यावरून घराबाहेर येऊन पायरीवर बसलें तों उलट येणाऱ्या जाणाऱ्यांच्या नजरेस पडून त्याची वाटेचे वाटसरूहि चेष्टा करूं लागले. यामुळें त्यास अधिकच चीड आली तेव्हा आपल्या व्यंगाबद्दल चिडण्यांत अर्थ नाहीं.

नकटें व्हावें (असावें), पण धाकटें होऊं (असूं) नये--शरीरानें व्यंग असलेलें चालेल पण धाकटा मान, धाकटेपण येऊं नये. कारण धाकट्याची प्रतिष्ठा कोणी ठेवीत नाहीं। त्याला नेहमीं अरे तुरे करतात, कामें सांगतात व

हलकें लेखतात, तसें नकट्याचें होत नाहीं. "जनकोजी शिंदे आपले जागां परम श्रमी जाले कीं, 'नकटें असवें परंतु धाकटें असो नये.' यत्न कोणाचा चालेना."—भाव ४२.

नकटेकी नाक कटे, सवागज और बढे—नकट्याचें नाक कापलें असतां सवागज अधिक वाढतें. ज्याची अब्रू गेली आहे त्याला अधिक गेली म्हणून काय वाटावयाचें आहे.—सत्रि ३४८४.

नकट्याला नाकाची खीज—नकट्या मनुष्याला कोणीहि आपल्या नाकास हात लावला तरी चीड येते तु०—अंगीं उणा तर जाणे खाणा खुणा. खाई त्यास खवखवे.

नकट्याला लाज नाहीं, वकट्याला भाज नाहीं— १ [भाज = भाजा, बायको] नकटें मनुष्य लाजत नाहींसें होतें, निर्लज्ज बनतें व कुरूप मनुष्याला बायको मिळत नाहीं. २ [भाज = आवड] नकट्याची ज्याप्रमाणें लाज लज्जा जाते त्याप्रमाणें ओंगळ, कुरूप माणसाची आवड निवड नाहींशी होते. त्याला कांहीहि चालतें.

नका-को——नको नको होणें—अगदीं वीट, कंटाळा येणें.

***नका करूं कसरत, तुम्ही जाल घसरत**—(फार कसरत करूं नये, नाहींतर घसरण्याचा संभव असतो —मॅन. ?) कोणत्याहि गोष्टींत फार चिकित्सा करूं नये, नाहीं तर अंगावर शेकण्याचा संभव असतो.

नका सोडूं रांडा पोरें, बांधा घरें माडय सोपारें—संसार सोडून जाऊं नये, तर संसारांतील माणसां-करितां घरें, माड्या वगैरे बांधावीं. संसारांत पडलेला मनुष्य त्यांत अधिकच गुरफटला जातो.

नको गे बाई! कोंकणांनलो घोव, सोंवळा (नेसणें) सोडून घेव पण निरोप देव--(कों.) कोंकणी नवरा सुधारक व सुशिक्षित मुलींना न आवडणें साहाजिक आहे.

नको नको म्हणावयाचें, कोंदून भरावयाचें— एकीकडे नको नको असें म्हणत दुसरीकडे भराभर रगडून माल घ्यावयाचा. रिकामा निस्पृहपणा, निरपेक्षिता. खालीं पहा.

नको नको आणि पायलीचें चाखो—(पायलीचा खो)—तोंडानें नको नको म्हणावयाचें पण एकीकडे खूप खावयाचें अशी वरवर मोठेपणाचा आव आणण्याची वृत्ति.

नको म्हटलें कीं तेंच चांगलें !—एखाद्यानें एक गोष्ट नको म्हटली कीं दुसऱ्याला तीच चांगली व हवीशी वाटणें. नेहमीं एखाद्याच्या अगदीं विरुद्ध मत देणें.

नकोरे नको जन्म तो रे भटाचा। कदां तृप्ति नाहीं सदा दीन वाचा॥—भिक्षुकाचा जन्म व त्याची वृत्ति फार वाईट; कारण तींत नेहमीं दैन्य व याचकाची वृत्ति असून त्यांत कधींहि मनाचें समाधान होत नाहीं. याकरितां हा जन्म कधीं येऊं नये.

नको स्वर्गाची नौकरी, व्हावें नरकाचे अधिकारी— स्वर्गांत राहून नोकर होण्यापेक्षां नरकांत राहून राज्य करणें बरें! असें सैतानाला वाटतें. [Better to reign in hell than serve in heaven या सेटनच्या उक्तीचें भाषांतर (Paradise Lost)] मोठ्या ठिकाणीं दुय्यम किंवा ताबेदारीनें राहाण्यापेक्षां कुग्रामांत किंवा वाईट भागां-तहि एकमेव पुढारी होणें चांगलें, अशी मनोवृत्ति.

नको क्षमा कृतघ्नाची, करील हानि सत्त्वाची— कृतघ्न मनुष्याजवळ क्षमेची याचना करण्याची पाळी येऊं नये; कारण त्यामुळें सत्त्वाची हानि होते.

नक्कल——नक्कल उचलली आणि अक्कल गमा-वली—दुसऱ्याचें अनुकरण करीत गेल्यास स्वतःची बुद्धि चालत नाहींशी होते.

नक्कल करण्यास अक्कल नको—कोणत्याहि गोष्टीची हुबेहूब नक्कल करण्यास शहाणपणा लागत नाहीं. दुसऱ्याचें अनुकरण करणारास स्वतःची बुद्धि चालवावी लागत नाहीं. एखादी नवीन गोष्ट करावयास मात्र अक्कल, कल्पना लागते. 'कॉपी टु कॉपी, माशी टु माशी !' केलें म्हणजे झालें.

नक्कारखाना——नक्कारखानेमें तूती की आवाज —(हिं.) नगाऱ्याची घाई तेथें टिमकीचें काई, पहा. —केसरी २३·५·४१.

नक्र——नक्राश्रू ढाळणें-गाळणें—[To shed crocodile tears याचें भाषांतर] सुसर हा हिंस्रप्राणीहि आपलें भक्ष खाण्यापूर्वी अश्रू ढाळतो अशी समजूत. यावरून ढोंगीपणा करणें, वरपागी दुःख दाखविणें. 'जुन्या कारागिरांच्या स्थितीबद्दल नक्राश्रु ढाळण्याचा धंदा सोडून देऊन...यांत्रिक कारखाने घालण्याकडे आम्ही लक्ष देत गेलों तरच आमच्या व्यापाराचें पुनरुज्जीवन होणार आहे.'—आगरकर ३.९९.

नख——नख दृष्टीस न पडणें—मुळींच कोणाच्या दृष्टीस न पडणें; अगदीं गोषांत, अंतःपुरांत असणें. (ल.) स्त्रीनें अगदीं पातिव्रत्यानें, मर्यादशीलपणें राहाणें; सहसा बाहेर न पडणें.—सप्र २.११६.

नख देणें-लावणें—नुकत्याच जन्मलेल्या मुलाच्या मानेला नखांनीं टोंचलें कीं तें मरतें. नाजूक गुप्त रीतीनें हत्या करणें; जन्मतःच ठार करणें; आरंभींच नाश करणें. 'उदकाचें तेज देख । न लावी नख शोषाचें ॥'-एभा २४.१३९. 'अरिहि न करील असें त्वां केलें, कां नख न लाविलें जननी !' --मोउद्योग ११.२३. 'नीतीला नख देणारे।'-संग्रामगीतें ९.

नख नख बोलणें—१ तोलून बोलणें; अगदीं मोजकें बोलणें; मितभाषी असणें. २ दिमाखानें, ऐटीनें, कुर्रेबाजपणानें बोलणें.

नख लागत नाहीं तेथें कुऱ्हाड लावणें—ज्याचा नाश करण्याला केवळ नखाचा उपयोगहि पुरा होतो, त्याचा नाश करण्याला कुऱ्हाडीसारख्या विध्वंसक शस्त्राचा उपयोग करण्याची आवश्यकताच काय ! लहानशा सुकर उपायानें जर इष्टार्थ साधत असेल तर तेथें जालीम उपायाची योजना करणें शहाणपणाचें नव्हे. तु०-गुळानें मरतो त्यास विष कशास.-'कुऱ्हाड' पहा.

नख शिरणें—१ शिरकाव होणें; चंचुप्रवेश होणें. २ भेद होणें. बोट शिरकणें, पहा.

नखांबोटांवर काम करणें—नाजुकपणाचा आविर्भाव, दिमाख करून काम करणें.

नखांबोटांवर खेळविणें-चाळविणें—(एखाद्यास) भूलथाप देणें; चाळविणें; झुलविणें; भुरळ पाडणें. अगदीं आपल्या मर्जीप्रमाणें वागावयास लावणें.

नखांबोटांवर चालणें—ठमकत-ठमकत, मिजासीनें चालणें; अगदीं नाजुकपणानें चालणें; नखरेबाजपणानें चालणें.

नखांबोटांवर जेवणें—चाखत माखत, चोखंदळपणानें जेवणें; जेवलें न जेवलेंसें करणें; फार थोडें खाणें.

नखांबोटांवर दिवस मोजणें—(एखाद्या गोष्टीची) अत्यंत आतुरतेनें वाट पाहाणें, प्रतीक्षा करणें; हाताच्या बोटांवर दिवस मोजीत असणें.

नखाला आग लागली—(अजून सारें अंग जळायाचें आहे). संकटावर संकटें येण्यास नुसती सुरवात झाली, अजून पुष्कळ संकटें यावयाचीं आहेत. 'अंगठ्यास आग लागणें' पहा.

नखाला माती न लागणें—काम करण्यासाठीं अगदीं हातपाय न हालविणें; नखांना घाण लागेल म्हणून जपणें; कोणतेंहि काम न करणें.

(एखाद्याच्या) नखीं दोष नसणें; नखाला माती न लागणें—(एखादा) अत्यंत शुचिर्भूत, निष्कलंक, पवित्र असणें.

नखीं पातक लागूं न देणें—पापापासून अलिप्त राहणें; यत्किंचितहि पाप न करणें; पूर्णपणें निर्दोष असणें; पापाचा संपर्कहि होऊं न देणें. 'नको लागों देऊं किमपि विमळे पातक नखीं ।'-सारुह ७.१४६.

नखें चार्वीत-कुरतुडीत-वाजवीत बसणें—१ निरुद्योगी, रिकामटेकडेपणानें असणें; उद्योगधंदा न मिळतां असणें. २ कुंठित, हिरमुसलें होऊन बसणें.

नखोनखीं सुया मारणें-नखांत सुया टोंचणें; शिक्षेचा एक प्रकार. 'नखोनखीं सुया मारिती । या नांव आदिभूतिक ॥'-दा ३.७.७१.

※ **नखभर सुख, हातभर दुःख**-या जगांत सुख फार थोडें असतें व दुःख पुष्कळ असतें. तु०—सुख पाहतां जवापाडें । दुःख पर्वताएवढें.

जेथें नखानें काम होतें तेथें कुऱ्हाड कशाला—जेथें क्षुल्लक, अल्प साधनानें, शक्तीनें काम होण्यासारखें असेल, तेथें मोठें साधन व शक्ति कशाला योजावी ? 'नखहि नको ज्या कार्या, त्या काढावा कशास करवाल ।'-मोभीष्म ४.४८.

आपलींच नखें, आपणांस विखें—आपल्याच दुष्कृत्यांनीं आपल्याच माणसांकडून आपल्यावर आलेलीं संकटें. नखांनीं अंग खाजविलें असतां त्यांचें विष बाधून खरूज होते यावरून.

नखानें तुटेल त्यास कुऱ्हाड कशास पाहिजे ?—वर पहा.

नखी——नख्या बाहेर काढणें—मांजर ज्याप्रमाणें हल्ला करतांना आपलीं नखें बाहेर काढतें, त्याप्रमाणें खरें स्वरूप प्रगट करणें; उलटणें.

नग——नगास नग देणें—एका वस्तूबद्दल दुसरी देणें (मग ती दुसरी कशीहि असो).

नगद——नगद होऊन बसणें—दिवाळें निघणें; नादार बनणें.

नगद-न नारायण—१ नागवा अगडबंब माणूस. २ दिवाळखोर, कफल्लक माणूस.

आज नगद, उद्यां उधार—उधार द्यावयाचें नसल म्हणजे म्हणतात.

नगदी दान व कागदी मान-सरकारास वगैरे पैसा मात्र

रोख द्यावयाचा व त्याबद्दल एखादा किताब वगैरे मिळा-ल्याचा नुसता कागद घ्यावयाचा हा उलटा व्यवहार आहे.

नंगा——नंगा नाच घालणें-अगदीं स्वैरपणें वागणें.

❀ **नंगा खुदासे जोरावर**--देवापक्षां जबरदस्त; नंग्याला कोणाचाच भीति असत नाहीं. निर्लज्ज मनुष्य परमेश्वरालाहि भीत नाहीं. 'त्यक्तलज्जः सुखी भवेत् ।' तु०-नंगेसे खुदा भी डरता है.

नंग खुदास बेजार-वर पहा. ही शब्दयोजना चुकीची दिसते. खालीं पहा.

नंगेसे खुदा बजार; नंगेसे खुदाभी डरता है--नंग्या माणसाला ईश्वर देखील भितो म्हणजे निर्लज्ज. शिष्टाचार नसलेल्या माणसापुढें सर्व हात टेकतात; कारण त्याच्याप्रमाणें नंगा कोण होणार ?

नगारा——नगारा भरणें--पोटाला नगाऱ्याची उपमा दिली आहे. (ल.) भरपूर जेवणें.

नगारा वाजणें; नगाऱ्यावर टिपरू पडणें--लोकांत प्रसिद्धी होणें (वाईट अर्थी).

नगाऱ्यावर टिपरूं टाकणें--चव्हाट्यावर आणणें; जाहीर करणें. डंका पहा.

❀ **खरारा खाजवी, नगारा वाजवी**--हातांनीं खरा खरा खाजावेण व पोट बडवून घेणें. अतिशय खाजविल्या नंतर आग झाल्यामुळें शंख करणें किंवा अतिशय गाजावाजा करणें (?)

नगाऱ्याची घाई तेथें टिमकी तुझें काई; नगाऱ्याची घाई, तेथें टिमकीची काय बढाई; नगाऱ्यापुढें टिमकीचें काय जाई--नगारा विशेष जलदीनें वाजूं लागला म्हणजे टिमकीचा आवाज ऐकूं येत नाहीं. जेथें मोठमोठ्या महत्त्वाच्या गोष्टी चाललेल्या असतात, तेथें बारीक सारीक किर-कोळ गोष्टींकडे लक्ष्य कोण देतो.

नगाऱ्यापुढें तुणतुणें--वर प्रमाणेंच. (गो.) नगा ऱ्यापुढें टुणटुणें खंयचें.

नज——नज जायना, हागूं जाता--(गो) कंटाळा आला असें नाहीं, शौचला लागली आहे. अर्थ तोच, पण शब्द भिन्न अशा अर्थी.

नज जालेल्यानि बाळ्यारि मीठभाजी आळणी--(गो.) नको असलेल्या माणसानें वाढल की मीठ सुद्धां अळणी लागतें. तु०-नवडतीचें मीठ अळणी.

नजर——नजर टाकणें--नुसतें वरवर, ओझरतें पाहाणें; दृष्टिक्षेप करणें; डोळे फिरविणें.

नजर देणें—एखादी गोष्ट चांगली विचारांत घेणें; लक्ष पुरविणें.

नजर धरणें—इच्छा करणें; हेतु धरणें. 'कदाचित् त्याचे वंशजानीं त्यामागें हरमखोरीची नजर धरली तर त्यास त्याच वृत्तीचें बल होणार.'-मराआ २४.

नजर पडणें--दृष्ट लागणें. -विचावि २३०.

नजर पोचणें-वाहणें--१ दूरवरचें दिसणें. २ अंदाज करणें. ३ (किंमतीचा) अंदाज बांधणें. 'या जिनसाची किंमत १०० रुपयांपर्यंत होईल; त्यापेक्षां जास्ती माझी नजर वाहात नाहीं, पोंचत नाहीं.'

नजर फाटणें--१ गर्वानें चढून जाणें; डोळ्यावर धुंदी येणें. 'होय, हा बोध चांगला आहे; पण कोणाला ? ऐकेल त्याला ! ज्याची नजर फाटून गेलेली त्याला त्याचा काय उपयोग ?'-पामो ४०. २ अतिशय आश्चर्य वाटणें; थक्क होणें.

नजर फिरणें—दूरवर दिसेनासें होणें; मागचें पुढचें न दिसणें. 'खुन्यास जो खून चढावयाचा तो सरकारास चढून त्यांची नजर फिरून गेली आहे.'-टिले १.६७३.

नजर मरणें-बसणें--निशाणबाजी करीत असतां डोळेझांक झाली तर निशाण लागत नाहीं; त्याकरितां डोळे उघडे राहावे लागतात. हें संवयीनें साध्य होतें. वरचेवर एखादी गोष्ट पाहून तीबद्दल विशेष वाटत नाहींसें होणें; संवयीचें होणें; सराव होणें.

नजर लागून राहाणें--एकसारखी दृष्टि दिलेली असणें; आशा बाळगून बसणें; तीव्र अपेक्षा असणें. 'त्याची जमादारी मिळविण्याकडे माझी नजर लागून राहिली होती.'-विवि ८. ८. १५२.

नजरे खालचा--माहितीचा; वळणाचा. 'हा प्रदेश आमच्या नजरेखालचा आहे.'

नजरेचा खेळ--१ केवळ दृष्टिक्षेपानें, एकदां नजर टाकण्यानें होणारें काम, गोष्ट; किरकोळ सुलभ काम. २ मुख्यतः दृष्टीनेंच साध्य असलेलें काम, विषय. उदा० चित्रकला, तिरंदाजी, लेखन. ३ दृष्टीचें अद्भुत, विलक्षण, आश्चर्यकारक कृत्य, काम. जसें:-अतिशय सूक्ष्म अक्षरें, चित्रें काढणें; बारीक शिवणें; घड्याळाचीं सूक्ष्म यंत्रें बसविणें, इ. ४ चांगली बळकट दृष्टि, पराकाष्ठेची तारतम्य दृष्टि लागणारी गोष्ट. दृष्टीचा खेळ पहा.

नजरेची बाधा—दृष्ट लागणें; दृष्ट पडणें; दृष्टिबाधा. ' आज रामूला नजरेची बाधा झाली. '

नजरेचें पाप—प्रत्यक्ष (एखादी वाईट गोष्ट) पाहाण्यानें होणारें पाप; पाहण्याचें पाप. (एखादी विशिष्ट गोष्ट नजरेआड घडल्यास खपते पण समोर घडल्यास खपत नसते, अशावेळीं उपयोग).

नजरेंत आणणें—१ डोळ्यासमोर ठेवणें. २ ताब्यांत ठेवणें. ' नजरांत आणिला कारभार। ' –दावि ३१.

नजरेंत धरणें—पर्वा करणें; किंमत देणें. ' हंबीरराव यांणीं दिलेरखान नजरेंत धरला नाहीं. ' –सभासद ६४.

नजरेंत भरणें—मनावर ठसणें; छाप बसणें. ' तो आमचा थाटमाट पाहणाऱ्याच्या नजरेंत भरण्यासारखा होता. ' –विवि ८. ११. २०४.

नजरेनें—समक्ष; प्रत्यक्ष. ' त्यासही येथील विचार नजरेनें दाखवून जो विचार सांगणें.....' –पेद ३. १८३

नजरेनें पाषाण उलणें—फार वाईट नजर असणें; दृष्टिदोषानें दगडहि फुटेल इतकी घातक दृष्ट असणें.

नजरेस येणें—१ पसंत पडणें. २ माहीत होणें. इत वाक्प्रचार ' दृष्टि ' खालीं पहा.

ॐ नजर दिली फायद्यावर, मुद्दा आला खांद्यावर—फायद्याकडे पाहून एखादी गोष्ट केली म्हणजे एखाद्यावेळीं ती नुकसानकारक होते.

नजरबंदीनें दृष्टि फसते पण कलमबंदीनें सृष्टि फसते—मनुष्य एखादी हातचलाखी करून एखाद्या मनुष्यास तात्पुरताच फसवूं शकतो; पण चुकीचें लेखन केल्यानें मागाहून येणारे सर्व लोक फसतात.

नट——नटामाजीं नेटकी जाया—१ पुरुष नट कितीहि सुंदर असला तरी तो शेवटीं पुरुषच. अशा पुरुषांस्त्रिवेषावर मन गेलें तर त्यापासून फायदा काय? स्त्रीलाच स्त्रीचें काम शोभतें. पूर्वीं रंगभूमीवर स्त्रिया काम करीत नसत. ' कीं नटामाजील कामिनी। कीं तममय कुहूची यामिनी। कीं अजा कंठींचे स्तन दोन्ही। तैसे प्राणी व्यर्थ ते ॥ ' –हा १६.३२. २ (ल.) दिसण्यांत चांगली पण बनावट निरुपयोगी वस्तु.

नटणें——नटणें दिमाखाचें अन् जिणें कवडीमोलाचें—क्षुद्र, हलका माणूस नटला थटला तरी त्याला कोणी किंमत देत नाहीं.

नटाई——नटाईस-नटाईवर येणें—लबाडी करणें.

नट्टूचें——नट्टूलें नट्टा, मेरेवैलें पर्वता—(गो.) [नडणें=वेणणें.] तण काढणारी बाई कांहीं एक कुरकूर केल्याशिवाय तण काढते; पण बांधावर बसलेला बघ्या मात्र कुरकुरतो. उगीच कुरकूर करण्याची कांहींना संवय असते.

नट्टीपट्टी——नट्टीपट्टीचा बोभाटा आणि झिरपी पारी झपाटा—चट्टीपट्टी पहा.

नड——नडीचें घोडें पडित आणि आवडीचें कुतरें चावडीन—जें वेळेवर उपयोगी पडतें त्या घोड्याची गरज सरल्याबरोबर त्याची कोणी काळजी घेत नाहीं व जें कुत्रें केवळ शोकाकारितां बाळगलेलें असतें, ज्याचा कांहीं उपयोग नसतो तें मोठ्या दिमाखानें चावडात, बैठकींत बसतें. मनुष्य उपयुक्त वस्तूपेक्षां दिखाऊ वस्तूचीच जास्त काळजी घेतो.

नडणी——नणणी कशीय् आसूं कंडॉं बरॉं हालना—(गो.) नडणें (वेणण) कसेंहि होवो, इरलें मात्र चांगलें हालवते. पावसाळ्यांत माथ्यावर इरलें घेऊन बायका शेतांत नडायला जात असत त. त्यांतील काहीं बायका अशा असतात, कीं त्यांची अिरल्याची चाळवाचाळव तेवढा पहून घ्यावी. मग नडणें होवो अथवा न होवो. कामापेक्षां देखावा अधिक अशा अर्थानें म्हणतात.

नडता——नडल्याचा सहकारी भगवान्—अडलेल्या मनुष्यास परमेश्वर साहाय्य करतो. मनुष्यास आयुष्यामध्यें कसलीहि अडचण आली, ती त्यावेळीं इतर कोणी उपयोगी पडला नाहीं तरी परमेश्वराचें स्मरण केल्यास तो साहाय्य करतो. अडणें पहा.

नडी——नडी बचत् पुण वडी वचा?—(गो.) आगंतुक दोष जातील पण वंशपरंपरेचे किंवा स्वभावसिद्ध दोष जाणार नाहींत.

नड्डा-ड्डी——नड्डा ड्डी पाडणें–मोटा आक्रोश करणें.

नणंद——नणंद आणि कळीचा आनंद—नणंद ही बहुतेक घरामध्यें तंटे लावण्यास विशेषतः भावजय आणि भाऊ किंवा आई यांमध्यें कलह लावण्यास कारण होते. तिला भांडण लावण्यापासून आनंद होतो.

उतरंडीला नसावी केळी, घरांत नसावी नणंद खेळी—उतरंड पहा.

नणंद खेळी, रहाटाची फळी—रहाटाच्या फळीवरून हळूच रहाट फिरवतां येतो त्याप्रमाणें नणंद नकळत कलागती लावते. घरामध्यें खेळी नणंद असली म्हणजे ती रहाटाच्या फळीसारखी एकसारखी आवाज करीत असते. ती

कधीं स्वस्थ बसत नाहीं, तर कांहींतरी उत्पाती करून कलागत लावीत असते. तु०—उतरंडीला नसावी केळी, घरांत नसावी नणंद खेळी.

नणंद ना जाव, सुखेगड-हात्र—(गो.) ना नणंद ना जाऊ, तेव्हां सुखानें राहा. नव्या नवरीस नणंद किंवा जाऊ यांचाच त्रास होतो. ह्यीं नसल्यावर मग सुखानें राहण्यास हरकत नाहीं.

नणंद भावजया दोघी जणी, शिंक्यावरचें लोणी खाल्लें कोणीं—घरांत जर नणंद व भावजय अशा दोन स्त्रिया असतील, तर शिंक्यावरचें लोणीं कोणींहि खाल्लें तरी भावजयीवरच आळ यावयाचा. नणदेवर आळ घेण्याची कोणाची प्राज्ञा नसते. ही अर्थात् एकत्र कुटुंबासंबंधीं म्हण आहे.

बारा कोसांवर नणद वसे, तिच्या वासानें दहींदूध नासे—नणंदेबद्दल भावजयीच्या मनांत मोठी भाढी असते. कांहीं वाईट झलें तर ती तें नणंदेवर लोटून देते.

न(नणं दुल्याच्या कं(कणं)दूल्या जाचूं नको मला, तूं ाशील परघरां तर माझीच गत येईल तुला—गाणें आहे. भावजय नणंदेला म्हणते आहेः तूं मला त्रास देऊ नकोस. तुलाहि सासरीं जावें लागेल व तुझी स्थिति माझ्या सारखीच होईल.

नण्यारी——नण्यारी लगले बाधसणी; न्हाणार लागिल्ल बाधेवरी—(गो.) विटाळशीपणाच्या चौथ्या दिवशीं न्हातांना बाईला पछाडलेल्या भुताप्रमाणें. या दिवशी पछाडण्याचा परिणाम भयंकर रोगांत होतो.

नथ——नथींतून तीर मारणें—बायकांच्या आडून बोलणें. समोरासमोर वादास न येतां आड राहून बोलणें.

नथींतून तीर मारणारा—भ्याड; बायक्या.

नंद——नंदाचें गोकूळ—मुलेंबाळें, गाई, म्हशी यांनीं गजबजलेलें सुखी कुटुंब, वाडा.

नंद——नंद ठेवणें-थाकणें-गुप्तपणें दलाली मिळविणें.

नदी——नदीला जीभ फुटणें—नदीला पाणी येणें; कोरड्या पात्रांत पाणी भरणें. "नदीच्या पात्रांतील लोक 'नदीला जीभ फुटली' असा इतरांना इषारा देत जीव घेऊन पळत सुटतात."—पाणकळा ५.

❀**नदी नारी व्यापारी, गर्जना कधी दिवसचारी—**नदीच्या पाण्याचा आवाज, स्त्रियांचें तोंड व व्यापारी लोकांची बोलाचाल (मुंबईचा शअर बाजार पहा!) यांस कधीं खळ पडत नाहीं, सारखीं चाललेलीं असतात.

नदी भेटली समुद्राला, आनंद झाला दोघांला—नदी आणि समुद्र यांचें पतिपत्नीचें नातें मानतात. तेव्हां नदी समुद्रास मिळाली म्हणजे दोघांसहि पतिपत्नी भेटल्याप्रमाणें आनंद होतो. त्याप्रमाणें पतिपत्नी किंवा आपलीं प्रिय माणसें भेटल्यास परस्परांस फार आनंद होतो.

नदीचा शोध करितो, त्यास समुद्र भेटतो—जो मनुष्य नदीच्या पात्राचा शोध करीत जातो त्यास नदीचा शोध तर लागतोच पण शेवटीं नदीपेक्षांहि मोठ्या अशा समुद्राचा शोध लागतो. जो मनुष्य नेटानें एखाद्या कार्यास लागतो त्याला हातांत घेतलेल्या कामापेक्षांहि मोठमोठ्या कामांत यश येतें. Follow the river and you will get the sea.—सवि १०७१.

नदीचें मूळ आणि ऋषीचें कूळ पाहूं नये—केवढीहि मोठी नदी असली तरी तिचा उगम एखाद्या लहानशा ओहोळांत किंवा अतिशय अडचणीच्या, वाईट जागीं असतो. त्याचप्रमाणें एखाद्या परमपूज्य ऋषीचा जन्म अतिशय हीन कुळांतहि असूं शकेल. यावरून पूज्यपणा, पवित्रता ही पूर्वपरंपरेवर अवलंबून नसतात तर व्यक्तीच्या अंगच्या गुणांवर अवलंबून असतात. किंवा मोठ्याचा मागचा इतिहास पाहण्याचा प्रयत्न करूं नये, तो चांगला नसावयाचाच. तुलना—दैवायत्तं कुले जन्म मदायत्तं तु पौरुषम् ।—वेणीसंहार.

नदीवर न्हाण (स्नान), गांवांत भीक—ज्यास कोठें आश्रय नाहीं, स्वतःचें घरदार नाहीं अशाबद्दल म्हणतात. त्यास नदीवर स्नान करावें लागतें व गांवांत भीक मागून पोट भरावें लागतें.

नंदी——नंदीबैल—संकेतानें होय किंवा नाहीं या अर्थी नुसती मान हलविण्यास शिकविलेल्या बैलाप्रमाणें टोंग्या, बेअक्कली माणूस. 'मी एक शब्दसुद्धां त्या नंदीबैलाजवळ, बोलणार नाहीं.'—भयंकर दिव्य.

❀**नंदी आपण पाषाणाचे, आपण देवा कशाचे?—**नंदी जसा दगडाचा तसा देवहि पण दगडाचाच. तेव्हां एकाला नांवें ठेविलीं म्हणजे दुसऱ्याला तेंच लागू असतें. दोघेहि सारखेच. तु०—एका माळेचे मणी. देव पहा.

नन्ना——नन्नाचा पाढा वाचणें—प्रत्येक गोष्टीला नकार देणें.

नन्ना म्हणणें-करणें—कांपणें; अस्थिर राहाणें; एकसारखें हलत असणें. (डोकें इ०) 'डोळे रुसले कांहिं न बघती नन्ना म्हणते मान। अवघें पाऊणशें वयमान ॥'—शारदा.

नपुंसक——नपुंसकाचें लिंग सोळा हात—अशक्य गोष्ट बोलणें, बाता मारणें.

नपुंसकाच्या हातीं पद्मिनी; नपुंसकाला पद्मीण—षंढाला सुंदर स्त्री मिळाली तरी तिचा त्याला काय उपयोग? ही उपमा वारंवार देण्यांत येते ' नपुंसका काय करील पद्मिणी । रुचिविण वाणी तैसी होय ॥ ' -तुगा ३१३१.

नफा——नफा दिसता है, मुद्दल घुसता है—नफ्याकडे पाहून भांडवल जातें. व्यापारामध्यें अनेकदां अधिक नफ्याच्या आशेनें मनुष्य मूळ मुद्दलहि घालवून बसतो.

नफानुकसानीचा खरडा, दावी आंकडेशास्त्री फरडा—आंकडेशास्त्री कागदावर पुष्कळ फायदा किंवा तोटा झाला आहे असें दाखवितो पण प्रत्यक्ष वस्तुस्थिति पाहूं गेल्यास निराळीच असते. तेव्हां केवळ ताळेबंदावरून संस्थेची स्थिति नीट कळत नसते. तु०-कागदी मेळ हातीं केळ.

नंबर——नंबर मारणें—आंकडे टाकणें; अनुक्रमांक घालणें.

(वर) नंबर मारणें—अनुक्रमांत वर जाणें.

नंबर येणें—क्रम, पाळी येणें, वेळ येणें, क्रमानें येणें.

नंबरी माल—१ खरा माल; शिक्केमोर्तब असणारा माल; ज्याबद्दल खात्री असते असा माल. २ सार्वत्रिक उपयोगाचा म्ह. सार्वत्रिक ठिकाणीं वरचढानें विकला जाणारा माल. साखर, चहा, साबण, रॉकेल, विड्या इ. ' अलीकडे या नंबरी मालांत फायदा होत नाहीं.

शंभर नंबरी सोनें—अगदीं उत्कृष्ट, पहिल्या प्रतीचें सोनें. सोन्याबद्दल पूर्वी साडेपंधरें किंवा बावनकशी असें म्हणण्याचा प्रघात असे. अलीकडे पाश्चात्य पद्धतीप्रमाणें शंभर ही पूर्ण गुणांची संख्या धरून परीक्षा करतात.

नमणें—नमतें घेणें—पड, माघार घेणें; आपला हेका सोडणें.

नमन——नमन करणें-लावणें—आरंभीं देवाला गणपतीला स्तवतात यावरून, आरंभ करणें.

नमन लावणें-होणें—वर प्रमाणेंच. (कार्य) आरंभिलें जाणें.

नमनांत धडाभर तेल जाळणें—(गोंधळ घालण्याच्या प्रकारावरून) आरंभ करण्यालाच जास्त वेळ, पैसा खर्च करणें.

नमनांत वेळ घालविणें—मुख्य विषय बाजूस ठेऊन प्रस्तावनाच फार वाढविणें.

❀ **नमन चार घटका आणि कथेचा चुटका**—कथेचा पूर्वरंग फार मोठा, पाल्हाळीक व कथा पाहावी तों अगदीं थोडीशी. मुळापेक्षां प्रस्तावनाच मोठी.

नमस्कार——नमस्कार करणें—हात जोडणें. (ल.) सोडणें; त्याग करणें; निरोप देणें. ' म्यां आजि मुनि शपथ करुनि नमस्कार सच्छला केला । ' -मोवन ८. ३६.

नमस्कार असो !—मनुष्याला निरोप देतांना नमस्कार करतात. यावरून पुन्हां नांव नको. अशी गोष्ट, व्यक्ति पुन्हा नको, तिचें दर्शन पुन्हां होण्यास नको, या अर्थी.

❀**नमस्कार फुकाचा, आशीर्वाद लाखाचा**—आपणास नमस्कार करावयास कांहीं खर्च लागत नाहीं पण आपणास जो आशीर्वाद मिळतो तो फार मोलाचा असतो. नुसता नमस्कार करून एखाद्यास खूष करण्यांत आपलें कांहीं वेचत नाहीं पण प्रसंगीं त्याच्या कृपेनें मोठा लाभ होण्याचा संभव असतो. तेव्हां योग्य ठिकाणीं नमस्कार करण्यास चुकूं नये.

नमाज——नमाज करायला गेलों आणि गळ्यांत मशीद आली – चांगली गोष्ट करायला गेलों पण माझ्यावर अनिष्ट ओढवलें. गळा पहा. वास्तविक, रोजा सोडावयास गेला आणि नमाज गळ्यांत पडली, अशी मूळ म्हण आहे तिच्या विपर्यासानें प्रस्तुत म्हण बनली आहे. गया रोजा छुडानेकू और नमाज गलेमे पडी –रोजा सोडावयास मशीदींत गेलें म्हणजे खावयास मिळतें तेव्हां खाण्याच्या आशेनें गेला तों काम पाठीस लागलें.

नमो——नमो नमो करणें—अतिशय आदर दाखविणें; लीनता दाखविणें; नम्रपणें स्वागत करणें.

नमो नमो होणें—नमस्कार करण्याची वेळ येणें; पायां पडण्याची पाळी येणें. पुरे पुरेसें होणें; तोबा तोबा होणें. ' लग्नांत पाहुण्यांनीं इतका त्रास दिला कीं नमो नमो होऊन गेलें. '

नम्र——नम्र झाला भूतां । तेणें कोंडिलें अनंता ।—जो सर्व भूतांचे ठायीं लीनतेनें वागतो त्याचे स्वाधीन परमेश्वर असतो. -तुगा (जोग) ९२८.

नम्रता——नम्रता आणि संपत्ति, एके ठायीं क्वचित् राहती—वैभव आणि लीनता हीं क्वचितच एका

ठिकाणीं दृष्टीस पडतात. मनुष्यास वैभव प्राप्त झालें असतां तो बहुधा उन्मत्त होतो.

नम्रतेची काया, हाच सद्‌गुणाचा पाया—नम्रता हा सर्व सद्‌गुणांचा आरंभ होय.

नयन——नयनीं कण खुपणें—डोळ्यांत सलणें; असह्य होणें; दृष्टीसमोर नकोसा होणें. ' तोहा तुमचा खुपतो कण होऊनि सर्वकाळ जो नयनीं । ' –मोभीष्म १२. ३२. ' ब्राह्मण कणसा खुपतो तुमच्या नेत्रीं न सोसवे काढा । ' –मोआदि. कचोपाख्यान.

नर——नर मोडून नारायण घडणें—१ एक जिन्नस मोडून त्याचा दुसरा करणें; घडणें मोडणें हा व्यापार. घडामोड. २ मनुष्यास परमेश्वर पदास पोंचविणें; श्रेष्ठपदास चढविणें.

नराचा नारायण—वर २ पहा. –गांगा २०९.

❀ **नर करणी करे तो नरका नारायण हो जाय**—मनुष्यानें जर मनांत आणलें व योग्य तें कर्तव्य केलें तर तो परमेश्वरस्वरूपी होतो. मनुष्यास कोणतीहि गोष्ट करणें शक्य असतें व साध्य होतें. सबंध दोहा. –पशुका होत पनय्या नरका कछु नहि होत । नर करणी करे तो नरका नारायण होत ॥

नर करे सो होयगा—मनुष्य जें मनांत आणील व नेटानें करूं लागेल तें त्याला साध्य होतें.

नरभक्षक मानवानें, मोक्षाचें हरविलें ठाणें—मनुष्य प्राणी हा हिंस्र पशूप्रमाणें क्रूर असल्यानें तो मोक्ष गमावून बसला. जो मनुष्य दुसऱ्याला लुबाडतो त्यास कधींहि सद्गति मिळत नाहीं.

नरा शब्दांत गोवावें, पशूस शिंगीं धरावें—मनुष्याला शब्दानें सांगून एखाद्या गोष्टीपासून परावृत्त करावें व पशूस शिंगें धरून दूर करावें. मनुष्यास वचनानें बांधावें, पशूस शिंगांतील पाशानें. तु०–शहाण्यास शब्दाचा मार. मूर्खास टोणप्याचा मार.

नरा हर हुन्नर कर आणि पोटभर, नाहींतर आळसानें मर—मनुष्यानें कांहीं तरी काम करुन आपलें पोट भरलें पाहिजे. नाहींतर त्यावर आळसानें उपाशीं मरण्याची पाळी यावयाची.

नरा हराहुन्नरा—मनुष्याला हजारों धंदे व कलाक्या करतां येण्यासारख्या आहेत.

नराचा जन्म नारायणासाठीं व नारीचा नरासाठीं—स्त्रीचा जन्म सारा पुरुषासाठीं असतो ही पूर्वापार कल्पना. ' स्त्रियांचीं सर्व कर्तव्यें, त्यांचें जीवन–सर्वस्व त्यांच्या जीवनाचें सार्थक्य पुरुषाच्या व्यक्तित्वांत केंद्रित करून टाकण्यांत आलें. ' –स्त्री जीवन विषयक कांहीं प्रश्न पान १७८. He for God, she for the God in him.

नरो वा कुंजरो वा—अश्वत्थामा ठार झाला अशी वार्ता आल्यावर द्रोण खरेंखोटें करण्यासाठीं सत्यवचनी धर्मराजाकडे गेला. कोणी अश्वत्थामा युद्धांत मारला गेला पण तो मनुष्य कीं हत्ती हें मला माहीत नाहीं, अशा प्रकारचें गुळमुळीत उत्तर धर्मराजानें द्रोणाचार्यास देऊन त्यास चकविलें त्यावरून. एखाद्या गोष्टीविषयीं पूर्ण अज्ञान, औदासिन्य दर्शविण्याकरितां दिलेलें संदिग्ध उत्तर; कानावर हात ठेवणें; माहीत नाहीं असें दाखविणें.

नरक——नरक अंगावर घेणें—(एखाद्याचें) वाईट, दुष्कीर्तिकारक काम अंगावर घेणें.

नरक उपसणें—(एखाद्याच्या) घाणेरड्या गोष्टी, कृत्यें बाहेर काढणें; (एखाद्या) घाणेरड्या गोष्टीची, प्रश्नाची शहानिशा, चर्चा करणें. To wash dirty linen.

नरक तोंडांत सांठविणें—बीभत्स शब्द उच्चारणें; वाचा विटाळणें. तोंडांत नेहमीं अपशब्द, ग्राम्य शब्द भरलेले असणें; नेहमीं ग्राम्य, अश्लील, शिवीगाळीचें भाषण करणें.

नरकाची वाट दाखविणें—(एखाद्यास) दुराचारास प्रवृत्त करणें; दुर्मार्गाला प्रवृत्त करणें; वाईट उदाहरण घालून देणें; कुमार्गास नेणें.

नरकाची सामुग्री—१ (नरकवासास पात्र करणाऱ्या) दुष्कृत्यांचा समुदाय. २ (उप.) संसार. ३ (उप.) नकोशी, तिरस्करणीय गोष्ट, काम.

नरकाचें खापर–टोपलें—१ विष्टेनें भरलेलें खापर, टोपलें. २ (ल.) कर्ज; आंतबट्ट्याचा धंदा; तिरस्करणीय, नकोशी गोष्ट, काम; लोकापवाद, अपकीर्ति इ. (क्रि०—डोईवर येणें–फुटणें–घेणें.)

नरकांत जीभ घालणें—१ खोटें बोलणें; असत्य भाषण करणें. २ घाणेरड्या गोष्टींचें अभिवचन देणें; दुष्कृत्यास अनुकुलता दर्शविणें. ३ बीभत्स, अश्लील शब्द उच्चारणें.

नरकांत धोंडा टाकून शिंतोडा घेणें—१ घाणेरडीं कृत्यें करण्यांत पुरुषार्थ, समाधान मानणें. २ वाईटाशीं संबंध ठेवून त्याचा वाईट परिणाम भोगणें.

नरकांत पचणें—घाणेरड्या, किळसवाण्या जागेंत, परिस्थितींत खितपत पडणें; दुष्कृत्यें करण्यांत आयुष्य घालविणें; अनीतिमय वर्तन करणें; पापाचरण करण्यांत काळ घालविणें.

(लोकांच्या) नरकांत बुडणें—१ लोकांचें पराकाष्ठेचें देणें होणें; लोकांच्या कर्जांत बुडणें. २ लोकांचे अनंत उपकार करून घेऊन ते न फेडणें.

नरकानें अंग भरणें—(ल.) कर्जाखालीं बुडणें; पराकाष्ठेचें कर्जबाजारी होणें.

नरकासारखें घाणणें—(एखादी गोष्ट, व्यक्ति इ.) नरकाप्रमाणें तिरस्करणीय वाटणें; नकोसें होणें; दूर ठेवावें असें वाटणें.

नरकीं धजा-ध्वजा लावणें—ज्यामुळें नरकांत श्रेष्ठपणा गाजेल अशीं घाणेरडीं कृत्यें करणें; मोठीं पापकृत्यें करणें; नीच आयुष्यक्रम आचरणें.

❀ **नरक आहे तेथें स्वर्ग नाहीं**—जो मनुष्य अधोगतीस जाण्यास योग्य आहे त्यास सद्गति कधीं मिळत नाहीं. बिघडलेल्या वातावरणांत चांगली गोष्ट कधीं घडून येत नाहीं.

नरडी-डें——**नरडी-डें घेणें**—ठार मारणें; नाहींसें करणें; नायनाट करणें; शेवट करणें. 'अभावाची घेतली नरडी । धाकें उदर तडाडी ।'–दा ५.९.४६.

नरडी-डें दाबणें—(एखाद्याचा) गळा दाबून जीव घेणें; ठार मारणें; खून करणें.

नरडी-डें धरणें—१ (एखाद्यास) जेवणास खोळंबा करणें. २ गळा धरणें; संकट आणणें, नरडीस बसणें; प्राणावर बेतवणें; प्राणसंकट आणणें; जीवास अपघात होईल अशी गोष्ट करणें.

नरडी-डें फोडणें—(एखाद्याचा) गळा कापणें, दाबणें; मारणें; खून करणें; ठार करणें; जीव घेणें; प्राण घेणें.

नरडी-डें बसणें—घसा बसणें, कोंदणें; आवाज न निघणें; गळा दाटणें; घशांत कफादि उत्पन्न झाल्यामुळें आवाज स्पष्ट न होणें, श्वासोच्छ्वासास अडथळा होणें.

नरडी-डें वाजणें—श्वासोच्छ्वास करतांना घसा घरघर वाजणें (दमेकरी इ. कांचा वाजतो त्याप्रमाणें).

नरडीचा घोट घेणें; नरडीचें रक्त पिणें—ठार मारणें; जीव घेणें; प्राण घेणें. 'तुझ्या नरडीचा घोट घ्यावयास कोणी उरले नाहीं असें कां तूं समजतोस !—उषःकाल–विक्षिप्त ३.१३८. 'चल घे हा दारूचा घोट, का घेऊं नरडीचा घोट ?'–एकच प्याला ३.२.

नरडीला नख लावणें—१ ठार मारणें; बालपणींच गळा दाबून मारणें. २ नुकसान करणें; पेंचांत आणणें; अडचणींत आणणें. 'लेका माझ्या नरडीला नख लावलंस !'–केसरी.

नरडीला हात घालणें—जीव घेणें; ठार मारणें. 'त्याचवेळीं बाजीच्या नरडीला हात घालावा, असा त्या मंडळींना त्वेष चढलेला होता.'–स्वप १४८.

नरडीला हात देणें—ठार मारणें.–संग्रामगीतें ७८.

नरडीस नख देणें—(लहान मूल उपजतांच त्याचा) गळा दाबून ठार मारणें. प्रारंभींच नाश करणें.

नरडीस बसणें—खणपटीस बसणें; पिच्छा पुरवून, तगादा करून, सतावून सोडणें; गळग्रह घालणें; गळीं पडणें.

❀ **नरडें दाबलें तरी डोळे वटारतो !**—एखाद्याला पेंचांत धरला, त्याला अडचणींत आणलें तरी आपला तो जोरांतच. जिवावर बेतली तरी अशीं माणसें नम्रपणा धरीत नाहींत कीं मिटतें घेत नाहींत.

नरम——**(काम) नरम करणें**—फत्ते करणें–इमं २५३.

नरम पडणें-होणें—(बाजारभाव) कमी होणें, उतरणें.

नरम येणें—तीव्रता कमी होणें; स्वभावानें गरीब बनणें. 'आतां हा फारच नरम आला.'–पारिभौ. २३.

नरसिंह——**नरसिंहअवतार घेणें**—हिरण्यकशिपूला मारण्यासाठीं विष्णूनें जसा नरसिंहाचा उग्र (भयंकर) अवतार धारण केला, त्याप्रमाणें करणें. अतिशय रागावणें; उग्रस्वरूप धारण करणें.

नरसु——**नरशा जेवला घरीं, अन् परशाची शिदोरी**—नरशा व परशा एका बाईचीं दोन मुलें समजावीं. आईचे विचार या म्हणींत वर्णिले आहेत: मी येथें जेवलें, माझी व्यवस्था लागली. नरशापुरतें अन्न घरीं होतें, तेव्हां तो घरीं जेवला असेलच. उरला परशा. त्याजकरतां एवढी अन्नाची शिदोरी मी नेतें. अशी घरांतल्या सर्व मंडळींचीच सोय ही बाई पाहूं लागते ! मालक, म्हणतो बाई तूं आपल्यापुरतें पहा. सर्व गोष्टी साधूं पाहशील तर आम्हाला तें परवडणार नाहीं.

नर्सपा मुंडासु, पुर्सपा बोडाक—(गो.) नर्सप्पाचें मुंडासें पुर्सप्पाच्या डोक्याला. याचें त्याला याप्रमाणें.

नरहरि——**नरहरिदेवाची पालखी**—१ पुष्कळ लोकांनीं हातभार लावण्याचें व त्यांचे मर्जीवर अवलंबून

असणारें कार्य. गांवांत नरहरिदेव आहे त्याची पालखी काढावी न काढावी याबद्दल प्रथम गांवांतील प्रमुख लोकांत वाटाघाट व्हावयाची. नंतर पंचांचे घरांतील पालखी आणावयाची. तेल्यानें तेल आणावें, दिवटीवाल्यानें दिवटी तयार करून आणावी, वाजंत्री लोकांनीं आपल्या घरून यावें याप्रमाणें सर्व जमून आलें तर पालखी निघायची, नाहींतर राहायची. यावरून म्हण रूढ झाली २ पालखीला खांद देण्यासाठीं भक्तमंडळींत फार अहमहमिका चालते व दांडगाई गोंधळ होतो. यावरून जेथें एकाची सत्ता नाहीं; एकावर जबाबदारी नाहीं व त्यामुळें जेथ गोंधळ, अव्यवस्था माजलेली असते असें काम, बारभाई कारभार.

नरोटी——**नरोटी हातांत घेणं-येणें**—भीक मागण्याचा प्रसंग येणें. 'स्नेही शेजाऱ्यांत जर इस्टेटीची वाटणी होऊं लागली तर मालकाच्या हातीं नरोटीच यायची !' –सत्तेच गुलाम ३.

नर्मदा——**नर्मदेचा गोटा, नर्मदा नदींतला गोटा**— नर्मदा नदींतील गोटे वाटोळे असतात, त्यांस खांचाकोंपरे कांहीं नसतात; त्यामुळें त्यांस कांहीं चिकटत नाहीं पाण्यांत असे तोंपर्यंत ओला, कडेला काढल्यावर वाळून ठणठणीत. सल्लामसलत (उपदेश) ऐके तोंपर्यंत मनःप्रवृत्ति एक प्रकारची (पण) मागाहून त्यांतील कांहीं शिल्लक न राहणें. ज्याला सांगितलेली गोष्ट कधींहि मनांत राहात नाहीं असा;ज्याला कांहीं कळत नाहीं असा. निर्बुद्ध, समज नसलेला.

❀ **नर्मदेंत जितके कंकर तितके शंकर**—नर्मदेंत सर्वच गोटे बाणाच्या आकाराचे असतात व ते देव म्हणून (शाळिग्राम) पूजनीय ठरतात. एका खाणींत एकाच प्रकारचे दगड सांपडतात. एकाच परिस्थितींत एकाच स्वभावाचे लोक तयार होतात.

नवती——**नवतीची गरव्हार उताणी चाले**—जी स्त्री प्रथमच गर्भार राहते तिला त्याबद्दल अतिशय गर्व वाटतो. प्रथम नव्यानें मिळालेल्या धनलाभानें, जयानें वगैरे गर्विष्ठ बनणें.

नवरा——**नवरा आणि देव सारखा**—स्त्रीला पति हा देवासारखा अक्षयीं पूज्य असला पाहिजे असें धर्मशास्त्र सांगतें. (गु.) खावींद ने खोदा बराबर.

नवरा उपवासी, बाईल अधाशी—अधाशी बायको नवऱ्यासहि पोटभर जेवूं घालीत नाहीं.

नवरा एकपट तर नवरी चौपट—नवऱ्यापेक्षां बायको मोठी व सशक्त असल्यास म्हणतात –मोरप्र २६.

नवरा केला सुखाला, पण पैसा नाहीं कुंकवाला—व.) सुखाकारितां नवरा केला पण त्याजजवळ कुंकवाला घावयासहि पैसा नाहीं. हौसेसाठीं केलं पण तें अंगलट आलें.

नवरा कोल्हा, बायको हाल्या—विजोड दंपती, नवरा केरकोळ व बायको लठ्ठ नवरा लबाड तर बायको मठ्ठ.

नवरा गेला गांवाला आणि बाईल गेली ख्यालीखुशालीला—नवरा परगांवीं गेला म्हणजे अनीतिमान बायको स्वैराचार करते तु०–दुर्दिवस घनतिमिरे दुःसंचारासु नगरवीथीषु । पत्युर्विदेशगमने परमसुखं जघनचपलायाः ॥ –पंच. ३१.१८४.

नवरा जातो नवरीसाठीं वऱ्हाड जातें खायासाठीं पोटासाठीं)—जो तो आपआपल्या फायद्याकडे पहात असतो व एखाद्या गोष्टींत जेवढा लाभ होईल तेवढाच पदरांत पाडून घेतो कन्या वरयते रूपं माता वित्तं पिता श्रुतं । बान्धवाः कुलमिच्छन्ति मिष्टान्नमितरे जनाः॥-सुर १६५.५४३

नवरानवरी अंतर्पटा, एकदम झाली दृष्टादृष्टी—नवरानवरांची अंतःपट धरण्यापूर्वी कधींहि भेट झाली नसल्यास म्हणतात; किंवा पूर्वी दृष्टभेटहि झाली नसली तरी लग्न लावल्याबरोबर पतिपत्नीचें मेतकूट जमतें.

नवरानवरी एक, वऱ्हाडी अनेक—१ लग्नामध्यें मुख्य पात्रें नवरा व नवरी एवढींच असतात, पण बाकीची गर्दीच फार असते मुख्य गोष्टींपेक्षां आनुषंगिक गोष्टींचाच पसारा फार असला म्हणजे म्हणतात. २ लग्नांत वधूवरपक्षांत भांडण झालें तरी ते पुढें एक होतात. भांडणांत पडणारे वऱ्हाडी मात्र भांगतात तेव्हां त्यांनीं अशा भांडणांत पडूं नये.

नवरानवरी एक, वऱ्हाडी गांवचे–जगाचे लोक—लग्नानंतर नवरानवरी एक होतात व इतर वऱ्हाडे परके बनतात; तेव्हां त्यांनीं या दोघांत लग्नप्रसंगीं वितुष्ट आणण्याचा प्रयत्न करूं नये.

नवरानवरीचें बाशिंग हरवलें, लग्न तसेंच राहिलें—क्षुल्लक कारणाकरितां एखादें कार्य दिरंगाईवर पडणें किंवा बिघडून जाणें.

नवरा बायकोचें भांडण नी मिटवला आं × ×—(को) नवराबायको भांडली तरी त्याचा शेवट त्यांच्या संयोगांतच होतो.

नवराबायकोचें भांडण, राळ्याराळ्याचें कांडण—

राळा कांडीत असतां आवाज होत नाहीं, त्यप्रमाणें नवरा बायकोचें भांडण चालू असलें तरी तिसऱ्याच्या कानावर येत नाहीं।

नवरा बोलत नाहीं, नवरी मुलगी चालत नाहीं—मुका नवरा व पांगळी नवरी यांचें लग्न. दोघेहि व्यंग असल्यामुळें कोणी कोणास हंसण्याचें कारण नाहीं. इकडे बोलायला नको तिकडे चालायला नको.

नवरा मरो कीं नवरी मरो, उपाध्याला दक्षिणेशीं कारण–प्रयोजन–काम— उपाध्याय नवरानवरींचें लग्न लागेपर्यंत मोठी काळजी बाळगतो. तें एकदाचें लागून दक्षिणा पदरांत पडली, कीं मग नवरानवरींचें कांहींहि होवो; त्याला फिकीर नसते. मतलबापुरती गरज. तु०–गरज सरो, वैद्य मरो.

नवरा रडतो तरणास, वऱ्हाडी रडतात वरणास—नवरदेवासच वरणावरचें पाणी सुद्धां मिळण्याची पंचाईत तेथें वऱ्हाड्यांस वरण काढून मिळणार ? जेथें यजमानासच पोटभर अन्न मिळण्याची मारामार तेथें पाहुण्यांस चमचमीत जेवण कोठचें ? जांवई पहा. पाठभेद –नवरानवरीला नाहीं उडदाचें पाणी, करवली मागते गुळवणी.

नवरा शिखंडी आणि बाईल लोखंडी—नवरा दुर्बल (नपुंसक) व बायको सुदृढ, बळकट असली म्हणजे म्हणतात. विजोड दंपती.

नवरा साधा भोळा, आणि बाईल गांजते सासूला—नवरा भोळसर असला म्हणजे घरांत त्याच्या बायकोचा तोरा चालतो व मग त्याच्या आईला ती त्रास देते. ती सासूच्या धाकांत राहणें शक्य नसतें.

नवरोजीनें मारिलें तें गेलें कुणीकडे, आणि म्हणते भाऊजीनें हूं म्हटलें—नवऱ्यानें प्रत्यक्ष मारल्याचें वाईट वाटत नाहीं, पण दिरानें जरा कांहीं बोलल्यास भावजयीस राग येतो.

नवऱ्याचा चालला प्राण, नी धेडा मागतो वरण—जावयाला जेथें कोणी विचारीत नाहीं तेथें पाणजांवयाची काय प्रतिष्ठा ‘ धेडा ’ पहा.

नवऱ्याचें पाहिलें रूप, विसरला तहानभूक—(व.) घरांत नवरा आला कीं सुनेस कांहीं कामधंदा सुचत नाहीं असें सासू म्हणते.

नवऱ्याचें पीठ, बायकोचें मीठ—पीठ व मीठ एकत्र मिसळलें म्हणजे भाकरी चवदार, मिष्ट लागते; त्याप्रमाणें नवराबायकोंचें सूत असलें म्हणजे त्या दोघांसहि संसारांत सुख होतें.

नवऱ्याचें मारणें, चिखलांत पडणें—आपण चिखलांत पडलों व चिखल आपल्या अंगास लागला तरी जसें आपण त्यास दोष देत नाहीं व चिखलांत पडल्याचा आवाजहि होत नाहीं त्याप्रमाणें नवऱ्यानें बायकोस मारल्याचा बोभाटा होत नाहीं, होऊं नये.

नवऱ्यानें मारलें आणि पावसानें भिजविलें, याची फिर्याद कोणाकडे—अपरिहार्य स्थिति. तु०–राजा लुटि जरी प्रजाजनाला।

नवऱ्याला दिली थाळी, आपण घेतली ताटली, लाज नाहीं वाटली !—ओबडधोबड वस्तु नवऱ्यास देऊन आपण नाजूक वस्तु घेणें. नवऱ्याचा मान न राखणें.

नवऱ्याला मिळेना काट आणि धेडा मागतो वरण—[काट = वरणावरचें निवळ पाणी. धेडा = मेहुणा] जांवई पहा. धेडा पहा. वर पहा.

नवऱ्यास नाहीं थांग, बुधवारचें लग्न—कशाचीच पूर्वतयारी नसतां एखादें मोठें कार्य करण्यासाठीं कंबर बांधणें.

नवल——**नवल झालें, गाढव मेलें**—एखाद्या क्षुल्लक गोष्टीस नसतें महत्त्व देणें.

नवल विपरीत, कांदा झिपरींत—केसांत कांदा ठेवणें यासारखी कांहीं तरी चमत्कारीक गोष्ट करणें–पाहाणें.

नवलाची बायको, कवलाचें घर—पूर्वी खेड्यांतून कवलारू घर क्वचित् असे; त्याविषयीं लोकांना कौतुक वाटे. आवडती बायको असली म्हणजे तिचें परोपरीनें कौतुक करणें.

नवस——**नवस करणें**—१ एखादी गोष्ट सिद्धीस नेण्याबद्दल ईश्वरास प्रार्थणें व कांहीं वस्तु अर्पण करण्याचा संकल्प करणें. ‘ दूर प्रिय जन वसती । देखाया करिति नित्य नवस नव सती ॥ ’–मोकृष्ण ४७.७७. २ (ल.) (एखाद्या गोष्टीबद्दल) मोठ्या उत्कंठेनें याचना करणें; ती गोष्ट अत्यंत उत्सुकतेनें इच्छिणें.

नवस देण—(व.) मार देणें.

नवस पुरणें–फळास येणें—(एखाद्याचें) इष्ट कार्य (नवस केल्यामुळें) सिद्धीस जाणें; देवाजवळ केलेली मागणी साध्य होणें; मनांतील हेतु पूर्ण होणें. ‘ आजि पुरले नवस । ’ –तुगा.

नवस फेडणें—नवस फळाला आल्यावर, पूर्ण झाल्या

वर देवास वस्तु इ. अर्पण करण्याची जी प्रतिज्ञा केली असेल ती पार पाडणें; देवानें आपलें मागणें दिल्यावर त्याला योजिलेली वस्तु अर्पण करणें.

नवसाचा नाऱ्या—(व.) (उप.) नवस करून झालेला नवानवसाचा मुलगा. (हा पुढें वाईट निघाल्यास त्याला उद्देशून योजण्याचा वाक्प्रचार.)

नवसास पावणें—(नवस केलेल्या देवतेनें नवस करणाराचे) मनोरथ पूर्ण करणें; इच्छित पूर्ण होणें; मनकामना सिद्धीस जाणें.

❀ **नवस केले परोपरी, पण एक देव नाहीं घरीं**—घरीं मुळींच देव नसतां व देवाची पूजा कधींच करीत नसतांना संकटाच्या वेळीं तेवढें देवास अनेक प्रकारें आळवावयाचें. गरजेपुरतें देवाकडे गाऱ्हाणें न्यावयाचें व इतर वेळीं त्याची आठवणहि करावयाची नाहीं. पाठभद–नवस केले परोपरी, पण पावेना श्रीहरी.

नवस पावला अवेळीं, म्हातारी बाळंत झाली—परमेश्वराजवळ एका गोष्टीची मागणी केली असतां भलतीच गोष्ट प्राप्त होणें. एका कार्यासाठीं खटपट करावी तों विपरीत फळ हातीं येणें.

नवस फळत नाहींत, सायास फळतात—नवसामुळें इष्ट कामना सिद्धीस जात नाहींत तर आपल्या खटपटीमुळें, श्रमांमुळें सिद्धीस जातात तु०–नवसें कन्यापुत्र होती। तरि कां करणें लागे पति ॥–तुगा ३२६१.

नवसाचा भोपळा, चारी वाटा मोकळा—(व.) नवस करून झालेल्या मुलाच्या दुर्वर्तनाबद्दल, स्वैरतेबद्दल म्हणतात.

नवसानें मागितलें, तें मुळावर आलें—पुत्र व्हावा म्हणून नवस केला पण तो मूळ नक्षत्रीं जन्मामुळें पित्यालाच मारक व्हावा. एखादी गोष्ट मोठ्या प्रयत्नांनीं मिळवावी तों तिजपासूनच पुढें त्रास भोगण्याची पाळी येते. "या वर्षी मुसलमानांकडून आगळीक होण्याचा संभव दिसत असल्यानें पोलिसांना कळविण्यांत आलें, पण 'नवसांनीं मागितलें आणि तें मूळावर आलें,' अशी स्थिति झाली."–केसरी ३०-४४०. अतिशय आशेनें एखादी गोष्ट मिळवावी पण ती हानिकारक व्हावी, अशा वेळीं योजतात.

नवसें कन्यापुत्र होती। तरी कां करणें लागे पती ॥ नवसानें पोरें होती, तरी कां करणें लागे पती–तुगा३२६१. नवस केल्यानें जर पुत्र मिळते तर कोणी लग्नाच्या भानगडींत पडले नसते. कोणत्याहि गोष्टीची प्राप्ति करून घ्यावयाची असली तर योग्य तो मार्गच अनुसरला पाहिजे. भलत्याच मार्गानें जाऊन कांहीं उपयोग होत नाहीं.

नवा——**नवा जुना करणें**—जुना बदलून नवा घेणें, करणें (करारनामा, हिशेब, करार, अंमलदार इ.); बदलून घेणें; आजतागायत करून घेणें.

नवा जुना होणें—नवीनपणा, नवखेपणा नाहींसा होणें; वहिवाटला जाणें; सवयीचा होणें; रुळणें.

नवीजुनी ओळख—पुन्हां नव्यानें करून घेतलेला, नवा केलेला जुना परिचय; पुन्हां नवीन पटलेली ओळख; पुन्हां उजळा दिलेली मैत्री.

नवीजुनी सोयरीक—पुन्हां नव्यानें जोडलेला (एखाद्या व्यक्तीचें मरण इ. सारख्या कांहीं कारणामुळें तुटल्यानंतर जोडलेला) संबंध, सोयरीक.

नवी नवरी—१ नुकतेंच लग्न झालेली मुलगी. २ (उप.) जणूं नवखा स्वाभाविकपणें जी गोष्ट माहीत असायला पाहिजे ती माहीत नसलेला, माहीत नसल्याचा आव आणणारा. ३ लाजाळु मुलगा, मुलगी.

नवी नवलाई–नवाळ–नवाळी–नवाई—१ नव्यानें नुकतेंच निघालेलें (प्रतिवर्षी होणारें) धान्य, फळ, इ.; नवान्न. 'हे पेरू पाठवाया जोगे नव्हेत परंतु नवीनवाळ म्हणून पाठवावे.' २वर्षाच्या नवधान्याच्या,नवीन निघालेल्या फळांच्या भक्षणाचा योग, क्रिया. ३ (ल.) नवीन, अपूर्व व सुंदर वस्तु; नवलाची वस्तु; अपूर्व चीज.

नवें टाकणें—(ना.) नवीन उपक्रम सुरू करणें; दीर्घ कालानंतर एखादी गोष्ट करणें; नव्यानें करणें.

नव्या जुन्या चिकण्या—(बे.) कांहीं तरी उणीव सांगणें. पण हा अर्थ खालील आर्येच्या उलट आहे. चिकण्या या शब्दाऐवजीं चि कण्या. नव्या काय किंवा जुन्या काय कण्याच असें म्हणणें. 'खीर न खाय खाळाची प्रभु विदुराच्याहि सेवितोचि कण्या। आवडतिच्या सुपाऱ्या रोठ्या बरव्या नव्या जुन्या चिकण्या'॥–मो उद्योग कृष्णशिष्टाई.

नव्या जुन्याचा मेळ—नवे आचार, नवे विचार त्यांचें सार व जुन्या आचारविचारांचा विचार करून योग्य असेल तें घेऊन ऐक्य करणें; जुनी रीत व नवीन रीत यांचा मेळ घालणें; नवे नवे येणारे प्रचार व जुन्या रूढी यांचा योग्य मिलाफ करणें.

नव्याची पुनव—आश्विन शुद्ध पौर्णिमा. 'नव्याची पुनव घरोघरीं सण।'–सप्र –२.११९.

❀ **नवा जोगी, मांडभर (गांडभर-पावेतों) जटा**— नवीनच जोग घेतला असतां मांडीपर्यंत जटा लांब वाढत नाहींत म्हणून तो वडाचा चीक लावून केस चिकटवून लांब जटा करतो. त्याप्रमाणें एखाद्या मनुष्यास नुकताच अधिकार प्राप्त झाला म्हणजे तो त्याचें फार अवडंबर माजवितो व प्रदर्शन करतो.–' कालचा जोगी ' पहा.

नवा नोकर हरन मारे—नव्या नोकरानें हरण मारणें. म्हणजे नवी गोष्ट नेहमीं चांगली वाटते.

नवा मनु, नवा धनु—सुधारलेला काळ आणि सुधारलेलीं हत्यारें. तु०–नवी विटी, नवें राज्य.

नवी आली नांदाया, चिटकी नाहीं रांधाया— [चिटकी = एका प्रकारचें मातीचें भांडें, गाडगें.] १ नवथर सासुरवाशीण असेल त्या परिस्थितींत वागावयास शिकलेली नसते. तेव्हां कांहीं गोष्टीवांचून तिचें अडून बसतें व बोलणीं खावीं लागतात. २ नवी बायको करून तर आणली पण घरांत तर एक मडकेंसुद्धां नसावें. दरिद्र्यानें नवीन संसार कशास थाटावा !

नवी नवतार, बसली गवतार—नवी नवथर, बसली गवतावर. वरप्रमाणें.

नवी नवरी बोऱ्याचें अंथरूण—नव्या नवरीला गोणपाटावर निजावयास लावणें म्हणजे चांगल्या वस्तूस भलतेंच, अयोग्य स्थान देणें होय.

नवी नवलाची आणि वापरली कवडी मोलाची— एखादी वस्तु नवी असते तोंपर्यंत तिचें फार कौतुक करावयाचें, पण थोडी वापरून जुनी झाल्याबरोबर तिला कोपऱ्यांत टाकून द्यावयाचें. स्त्री नवीन असेल तों तिचे लाड करावयाचे व कांहीं दिवस गेल्यावर तिची अवहेलना करावयाची. –संक १.५.१८.

नवी नवी नवलाची, आणि मागून माती मोलाची– वरीलप्रमाणें. प्रथम नवी वस्तु फार आवडते, तिचें कौतुक होतें पण पुढें ती कोंपऱ्यांत जाऊन पडते. तिची किंमत राहात नाहीं.

नवी विटी, नवा डाव—विटीदांडूच्या खेळांत विटी बदलून नवी घेतली तर सर्वच बदलतें. त्याप्रमाणें एखाद्या कारभारांत नवीन कारभारी आला तर त्याचें सर्वच तंत्र नवीन असतें. तु०–नवी गिल्ली नवा डाव.

नवी विटी, नवें राज्य—नव्या जमान्यांत सर्व गोष्टी नवीन पद्धतीनें चालू होतात. "सध्यां जे जे तसे आहेत ते खपून गेले म्हणजे 'नवी विटी नवें राज्य' या म्हणीप्रमाणें सगळा हिंदुस्थान लखलखीत होईल."–निमा ४३६. Old order changeth yielding place to new. New lords, new laws.

जुने डोळे आणि नवे चाळे-तमाशे–जुन्या माणसांना नवीन माणसांनीं केलेले नवीन नवीन प्रकार आवडत नाहींत.

नवें तें हवें—प्रत्येकास नवीन वस्तु आवडते.

नवें तेव्हां सवें, जुनें आपला वा झवें—नवीन वस्तु असली म्हणजे मनुष्य नेहमीं ती आपल्या जवळ बाळगतो, तिचें कौतुक करतो व जुनी अडगळींत टाकतो; तिच्याकडे दुर्लक्ष करतो. पुढें पहा.

नवें तेव्हां सवें (मग) शिंक्याला लावून ठेवें— मनुष्य नवी वस्तु जवळ बाळगतो व पुढें कांहीं दिवसांनीं तिचा वीट येऊन ती कोठेंतरी ठेवून देतो. पुढें पहा.

नवें नऊ दिवस, खेळणें तीन दिवस—नवी वस्तु घेतली तर ती नऊ दिवस नवी वाटते मग जुनी होते. नव्या खेळण्याबरोबर मूल तीन दिवस चांगलें खेळतें, पुढें त्याच्यावरचें त्याचें लक्ष्य कमी होतें.

नवें नवें, अंगारि धवें—(गो.) माणसाला वस्त्रप्रावरण नवें नवें असावेंसें वाटतें.

नवे नवे, जेवी सवें—नवीन मनुष्य किंवा पाहुणा आला म्हणजे त्यास थोडे दिवस आपल्या पंक्तीला घेऊन बसतात. कांहीं संस्थानांत ही चाल अद्यापि रूढ असलेली दिसते.

नवे नवे डोळे, नवे नवे तमाशे—कोणत्याहि बाबतींत नवीन नवीन माणसें आलीं म्हणजे त्यांची दृष्टिहि नवीन असते व ते नवीन नवीन गोष्टी करूं लागतात. तु०–जुने डोळे, नवे चाळे पहा.

नवें नवें नि खाटल्याभवतें भवें—नवीन संबंध जोडला म्हणजे तें मनुष्य नेहमीं जवळपास फिरत असतें; किंवा तें नेहमीं जवळ असावें असें वाटतें.

नवें नवें मांडयेर, पन्नें पन्नें दांडयेर—(गो.) नवें नवें असेल तें मांडीवर आणि जुनें झालें असेल तें दांडीवर. मनुष्याच्या नावीन्यप्रियतेला उद्देशून म्हणतात.

नवें लुगडें नुताचें, आहे सुताचें—नवीन लुगडें सुताचें असलें तरी तें चांगलें दिसतें.

नवां (व्या) दिवशीं नवी विद्या—रोज नवीन पाठ, प्रकार. कोणत्याच गोष्टीची पाठ नेटानें न धरतां थोडथोड्या दिवसांनीं नवीन नवीन प्रकार करीत राहावयाचें.

नव्या देवाचा फूर मोठा, जुन्या देवाचा गांडगोटा--(व) नव्या माणसाचा कांहीं दिवसपर्यंत नावीन्यामुळें मोठा बोलबाला राहतो; परंतु पुढें कांहीं दिवसांनीं परिचयामुळें त्यास कोणी विचारीनासें होतें; नव देव आले म्हणजे जुन्या देवाला गांडगोटयापेक्षां जास्त मान मिळत नाहीं. नव्याचा मात्र महिमा गाजतो.

नव्या नव्या बायकांच्या नव्या परी, पाहिली होती ती असें न करी--नवीन बायको केली म्हणजे तिची नवीन पद्धतीची वागणूक पाहून मनाला जरा विस्मय वाटतो व मग पहिलीची आठवण होते व ती कांहीं असें करीत नसे, असें वाटून तिच्याबद्दल अधिक आदर वाटूं लागतो.

नव्याचे नऊ दिवस--कोणत्याहि नव्या गोष्टीचें लोक कांहीं दिवस कौतुक करतात; मग त्याला विटतात. नव्याची पर, नवलाई. तुलना--A wonder lasts for nine days.

नव्याचे नऊ दिवस, खळणीचे तीन दिवस--नवीन गोष्टीचें प्रथम कौतुक होतें व एखाद्या गोष्टीला तीन दिवस खंड पडला कीं ती विसरून जाते. किंवा एखादी गोष्ट बरेच दिवसांच्या खंडानंतर दिसली तर पुन्हां तीन दिवस आवडूं लागते.

नव्याचे नऊ दिवस, मेल्याचे तीन दिवस--नवीन मनुष्याचें कौतुक नऊ दिवस होतें व मेलेल्या मनुष्याचें दुःख तीन दिवस टिकतें. दूरच्या आप्ताचें सुतकहि साधारणतः तीन दिवस असतें.

नव्याण्णव--नव्याण्णव वाटांनीं-हिश्शांनीं--शंभरापैकीं नव्याण्णव हिस्से अनुकूल, म्हणजे बहुतेक अंशांनीं.

नव्याण्णवाचा फेरा--एका साधुवृत्ति माणसास नव्याण्णव रुपये सांपडल्यावर शंभरावा मिळविण्यासाठीं त्यानें जे प्रयत्न केले त्यामुळें तो भ्रष्ट झाला. यावरून वाढत जाणारी वासना, लोभ. 'एकं दृष्ट्वा शतं दृष्ट्वा दृष्ट्वा पंचशतान्यपि। अतिलोभो न कर्तव्यश्चक्रं भ्रमति मस्तके ॥'

नव्हे--नव्हे ब्रह्मचर्य बाईलेच्या त्यागें। वैराग्य वाउगें देशत्यागें ॥-तुगा (जोग) ८१५. बायकोच्या त्यागानें ब्रह्मचर्याची प्राप्ति होत नाहीं, व स्वदेशांतून परदेशांत जाण्यांत खरें वैराग्य नव्हे.

नशा--नशा करणें--अंमली पदार्थाचें सेवन करणें; दारू इ. पिणें.

नशीब--नशीब उघडणें-उचकटणें--भाग्य उदयाला येणें; चांगले दिवस प्राप्त होणें; ऊर्जितदशा येणें; उत्कर्ष होणें.

नशीब काढणें--नशीब उदयाला येणें; दैव अनुकूल होणें; भरभराटीस चढणें; उत्कर्ष होणें. 'मुलानें गारवीत शिक्षण संपादून मोठ्या पगाराची जागा मिळविली, नशीब काढलें'.

नशीब ठोकुनि जाणें--दैवावर भरंवसा ठेवून एखाद्या कृत्यास धडाडीनें आरंभ करणें.-संग्रामगीतें ४७.

नशीब फुटणें--१ मोठी आपत्ति येणें; अभागी असणें; संकट कोसळणें. २ वैधव्य येणें. 'जरा नशीब माझें फुटलें'-गडकरी, राजहंस.

नशीब शिकंदर असणें--(एखाद्याचें) दैव चांगलें भरभराटीचें असणें; काल अनुकूल असणें; दैववान असणें.-स्वप्न २२४.

नशिबाचा खेळ--दैवांत असेल त्याप्रमाणें घडणाऱ्या गोष्टी. नशिबाचे ताले पहा. 'काय नशिबाचा खेळ आहे पाहा!'-एकच प्याला ४.४.

नशिबाचा दोरा तुटला--नशीबानें वेळेवर हात दिला नाहीं, उलट खाल्ली म्हणजे म्हणतात.

नशीबाची कवटी उलटी लागणें--कवटी उलटी लागली असतां उलटे प्रकार होतात. यावरून दुर्दैव ओढवणें. 'दुर्दैव हिंदुस्तानचें कीं, तो जर्मनीनें जिंकून आपल्या पदतळीं घातला नाहीं! तसें झालें असतें व मग जर हिंदुस्ताननें युद्धसहाय्य केलें असतें तर मात्र स्वयंनिर्णयानुसार हिंदुस्थानाला इंग्रजांनीं स्वातंत्र्य खास दिलें असतें! या दृष्टीनें हिंदुस्थानच्या नशीबाची कवटी उलटी लागली कीं, मि. चर्चिल यांची बुद्धीच उफराटी आहे, हें ठरविणें कठीण वाटतें.'-केसरी १२-९-४१.

नशिबाचे ताले--कर्मानुसार घडणाऱ्या बऱ्या वाईट गोष्टी, दैवयोग, प्रारब्ध; प्राक्तन. असे नशिबाचे ताले कीं कुत्र्यावर नौबत चाले, पाहा.

नशीबाचें पारडें फिरणें--नशीबीं पूर्वी असेल त्याच्या उलट होणें. 'नशिबाचें पारडें फिरून आम्ही जर विजयी झालों... ......तर दिल्लीची हिंदुबादशाहीची वझीरात आपण एकाद्या हिंदुलाच आपण देणार नाहीं कशावरून?'-पामो ३०५. कमाल--नशिबाचें पारडें फिरलें तर जे आज अमीर ते उद्या फकीर होत असतात बाबा!'-शिसं ३.३.

❀ **नशीब तिळाएवढें, हाव डोंगराएवढी**—दैव विशेष अनुकूल नसतां मोठी महत्त्वाकांक्षा बाळगणें.

नशीब नाहीं ललाटीं नि पाऊस पडे शेताचे कांठीं—नशीब अनुकूल नसलें म्हणजे पाऊस पडला तरी तो शेतावर न पडतां शेताचे बांधावर पडतो. मार्गें पहा.

नशीब पाठीराखें व दुष्काळ पाठी राखे—नशीब अनुकूल असल्यास दुष्काळाची बाधा होत नाहीं.

नशीब लागलें द्यायला, पदर नाहीं घ्यायला—एकदां सुख किंवा संपत्ति मिळावयास लागली म्हणजे नको इतकी मिळते. तु०—अनंत हस्तें कमलावरानें, देतां किती घेशिल दोकरांनीं ।

नशीबाचा शिकंदर पण करणीचा कमकुवत—एखादा दैववान् पण कर्तबगार नसलेला मनुष्य.

नशीबाचे घडे नी म्हाराघरीं पडे—एखादा गुणी किंवा सुंदर मनुष्य जर अस्पृश्यवर्गांत आढळला तर म्हणतात. अयोग्य ठिकाणीं दैवयोगानें स्थापना.

नशीबापुढें कोणाच्यानें जाववत नाहीं—नशीबाच्या विरुद्ध कोणाच्यानें कांहीं होत नाहीं. 'दैव' पहा. तु०—हरिणापि हरेणापि ब्रह्मणापि सुरैरपि । ललाटलिखिता रेखा परिमार्ष्टुं न शक्यते ॥

नशीबीं असेल तें भोगलें पाहिजे—जें आपल्या दैवांत असेल त्यास आपण सादर असलें पाहिजे. तु०—नशिबीं असे नच तें टळे । —प्रभावती नाटक.

नसीबकी चाल, और सैतानका खेल, मगरेवकी जालमें पकड गये शेर—नशीबानें जाळें पसरलें व सैतानानें खेळ केला आणि मगरीच्या जाळ्यांत वाघ अडकला. काल प्रतिकूल झाला व आपले शत्रु मातले म्हणजे आपणावर अनपेक्षित संकट ओढवतें.

नष्ट——नष्टजातक—ज्याची जन्मवेला, दिवस, नक्षत्र वगैरेचें टिपण केलेलें नसतें अशाचें हस्तसामुद्रिक, चेहरा पाहून कुंडली मांडणें.

नष्टांश होणें—सत्यनाश होणें; मागें कोणीहि वारस नसणें; नकल होणें; वंशक्षय होणें; निर्वंश होणें; अंशहि शिल्लक न राहणें.

❀ **नष्ट वस्तूचा शोक, उगाच जडला हृद्रोग**—जी वस्तु हरवली असेल तिच्याबद्दल वाईट वाटून काय उपयोग. तु.-(अ) गेल्याचा शोक वृथा न करावा वित्त सर्व जायाचें । वित्ताची काय कथा शाश्वत टिकणें नसेच कायाचें ॥ (आ) गतं न शोच्यम् । (इ) गतं न शोचामि कृतं न मन्ये ।

नस——नस दाबणें-धरणें—दुसऱ्याच्या मर्माला हात घालून किंवा त्याला प्रतिकूल अशी गोष्ट करण्याचा धाक घालून, त्याचा मार्ग, कार्य थांबविणें.

नस न सांपडणें—एखाद्या गोष्टीचें योग्य प्रकारें आकलन न होणें; खुबी न कळणें. 'त्याला कातकरी जातीची नस सांपडली नाही.'—केसरी.

नसानसांतून रक्त सळसळणें—१ रागानें रक्त उसळूं लागणें; क्रोध येणें; राग येणें; अतिशय संतापणें. २ तडफदार, शूर पुरुषाचें रक्त तापणें. 'हे अपमानाचे शब्द ऐकल्याबरोबर त्याचे नसानसांतून रक्त सळसळूं लागून त्यानें तरवारीस हात घातला.'

नसनस——नसनस करणें—(व.) किरकिर करणें; जिगजिग करणें; कुरबुर लावणें.

नसणें——नसतें विघ्न आणिलें घरा—विनाकारण उपद्व्याप अंगावर ओढवून घेणें.

नसल्या बसल्या शिळका करणें—एकसारखी दुसऱ्याची कुरापत काढणें.

❀ **असल्याचे विकार, नसल्याचे घोरंकार**—सुखसाधनें असलीं म्हणजे त्यांपासून ताप होतो व नसलीं तर हाल होतात. पैसे असल्यानें श्रीमंतांना चैन कराविशी वाटते व तीपासून त्यांस पुढें पीडा होते. तर गरीबास पैसे नाहींत म्हणून काबाडकष्ट करावे लागतात व हाल होतात.

नसशील धड, तर मसणांत जाऊन पड—नीट वागावयाचें नसलें, दुर्वर्तनीच राहावयाचें असलें तर तुझें कांहीं का होईना, मला कशाला तुझ्या मदतीची चिंता हवी! माणूस नीट वागेल तर त्याला साहाय्य करतात.

नसता——नसति गवाय पंचवाड्या—(गो.) खोटया नाटया साक्षी 'पंचवाडा' या ठिकाणीं व्हायच्या.

नसाण——नसाणकुकडी, भाजी उकडी—(व. ना.) [नसाणा=एकलकोंडा; माणूसघाण्या. नसाणकुकडी हा तिरस्कारसूचक शब्द बनला.] केवळ भाजी उकडून त्यावर निर्वाह करणारा जो त्याला लोकांची पर्वा बाळगण्याची गरज नसते. त्यावरून जो मनुष्य किंवा व्यक्ति माणूसघाणी असून इतराविषयीं बेपर्वा असते, तिच्याबद्दल ही उक्ति वापरतात.

नसनखवडा आणि शेजार दवडा—[नसनखवडा = माणूसघाण्या] किरकोळ गोष्टीवरून शेजाऱ्याशीं भांडणतंटा करून वितुष्ट आणतो, अशाबद्दल वापरतात.

नहाण——**नहाणपदास येणें**—(मुलगी) न्हाती धुती होणें; ऋतुमती होणें.

नही——नई पहा.

इकडे नही तिकडे वही—नई पहा.

नहीं——**नहीं नहीं म्हनस, सत्रंजी पसरस**— (अहि.) [सत्रंजी = सतरंजी] नको नको म्हणावयाचें पण बैठक ठोकावयाची. म्हणजे हवें असून वरवर नकार दाखविणें; नको नको म्हणत ठाण द्यावयाचें.

नळकांडें——**कुत्र्याचें शेंपूट सहा महिने नळकांड्यांत घातलें तरी वांकडें तें वांकडेंच**—'कुत्रा' पहा. स्वभाव कांहीं केल्यानें पालटत नसतो.

नळपट——**नळपट नारायण**—[नळपट = शिस्न] गबाळग्या, ढेरपोट्या माणसाबद्दल म्हणतात. नगद(न) नारायण, पहा.

नळा——**गाड्याबरोबर नळ्याला यात्रा**—गाडी जेथें जाईल तेथें तिच्या चाकांना लावण्याचें ओंगण ठेवण्याचा नळा बरोबर असतोच. यावरून मुख्य गोष्टीबरोबर आनुषंगिक गोष्टींनाहि त्या त्या स्थितींतून जावें लागतें; मुख्य मनुष्याबरोबर आश्रितांसहि मान मिळतो.

नळी——**नळी काढप**—(गो.) पळ काढणें; धूम ठोकणें.

नळीं नख देणें; नळी दाबणें—१ एखाद्याच्या पोटावर पाय देणें. २ निष्ठुरपणें वागविणें.

नळी निमटणें—नरडें दाबणें; प्राण घेणें. 'सूर्योदयो जाहल्या पाठीं । समूळ अंधाराते घोंटी । खद्योताची नळी निमटी । नक्षत्रकोटी तत्काळ गिळी ॥'—एभा १३.४२२.

नळीचें बऱ्हाड करणें—तळीराम गार करणें; तुंबडी भरणें.

*** नळी फुंकिली सोनारें, इकडून तिकडे गेलें वारें**—ज्याप्रमाणें सोनारानें नळींत फुंकर घातला असतां वारा नळीच्या एका तोंडानें आंत येऊन, दुसऱ्या तोंडानें बाहेर जातो, नळीमध्यें कांहीं राहात नाहीं, त्याप्रमाणें केलेल्या उपदेशाचा कांहीं परिणाम न होणें. एका कानानें ऐकून दुसऱ्या कानानें सोडून देणें. 'नळी फुंकिली सोनारें । इकडून तिकडे जाय वारें । तैसीं तीं व्यर्थ शास्त्रें । हरिलीला न वर्णितां ॥' —ह ९.४. —ज्ञाब १.६२.

नळींत श्वपुच्छ—ज्याप्रमाणें कुत्र्याचें शेंपूट सहा महिने नळींत घातलें तरी सरळ होत नाहीं, त्याप्रमाणें दुष्ट मनुष्याची बुद्धि कधीं पालटत नाहीं. 'नीतींत तसें खळमन जेविं नळींत श्वपुच्छ सामासी ।' —मो विराट.

नक्षत्र——**(एखाद्याच्या) तोंडावर नक्षत्र पडणें**—१ बडबड, वटवट करण्याचा स्वभाव असणें; बडबड्या असणें; फार बोलका असणें. २ वाईट, अशुभ बोलणें. 'याच्या तोंडावर नक्षत्रच पडलें आहे जसें ! हा मेला काय पाहिजे तसलें अभद्र बडबडतो !'—अतिपीडचरित.

पायावर नक्षत्र पाडणें—पायावर भोंवरा असणें; नेहमीं भटकत राहणें, फिरणें;एकसारखें फिरत राहण्याची संवय असणें.

हातावर नक्षत्र पडणें—चोरी करण्याची संवय असणें.

नक्षा——**नक्षा उतरणें**—घमेंड जिरणें.

नक्षा उतरविणें—घमेंड जिरविणें; दिमाख, गर्व नाहींसा करणें.

ना——**ना घरबारी, ना गोसावी**—धड गृहस्थ नाहीं व धड बैरागी नाहीं, असा अर्धवट मनुष्य.

ना धडांत ना भाकडांत, ना बऱ्यांत ना वाइटांत—धड चांगल्यांत जमा नाहीं व धड वाइटांत जमा नाहीं असा अर्धवट निरुपयोगी.

ना बुझती ना शिलगती, क्यौं खामोखा धुमसती—गोंवऱ्या नुसत्या धुमसत राहतात, त्या विझतहि नाहींत व त्यांचा जाळहि होत नाहीं. त्याप्रमाणें एखादा घुम्या मनुष्य नुसता रुसून फुरंगटून बसतो, धड बोलतहि नाहीं व रागहि सोडीत नाहीं.

ना मला ना तुला, घाल कुत्र्याला—मागें 'तुला ना मला०' पहा.

ना मेंढरांपाशीं, ना शेरडांपाशीं—' धनगराचें कुत्रें.' पहा. तु०—कुत्ता धोबीका०

ना विष्णुः पृथिवीपतिः।—विष्णु हा सर्व पृथ्वीचा राजा आहे. विष्णूशिवाय कोणी पृथ्वीचा राजा होऊं शकत नाहीं. संबंध श्लोक—ना ऋषिः कुरुते काव्यं, ना रुद्रः क्रमपाठकः । ना देवांशो ददात्यन्नं, ना विष्णुः पृथिवीपतिः॥

नाईक——**नाइक रिवण सांत्रि कुस्मणा; नाइक रिवणा सांतली कुस्मणा**—(गो.) नाईक रिवण गांवाला आणि छत्री कुस्मण गांवाला. विसरभोळ्या माणसाच्या कृतीला उद्देशून म्हणतात.

नाक——नाक उंच करून—निर्लज्जपणानें; वर मान करून; बेमुर्वतपणानें.

नाक ओरबडणें——नाकांतील अलंकार हिसकून घेणें.

नाक कापणें——१ खोडकी, गर्व जिरविणें; पराभव करणें. २ फजीति करणें; अद्दल घडविणें.

नाक कापलें जाणें——पराजय होणें; फजीति होणें; अपयश येणें. 'आज आमचं नाक कापलं जायचा प्रसंग!'—इंप १००.

आपलें नाक कापून दुसऱ्यास अपशकून—अवलक्षण करणें—दुसऱ्याचें नुकसान व्हावें म्हणून आपला स्वतःचा नाश करून घेणें; स्वतःचें नुकसान करून दुसऱ्याच्या कामांत व्यत्यय आणणें.

नाक कापून पाटावानें पुसणें—एखाद्याची मोठी अप्रतिष्ठा करून नंतर थोडा सन्मान करणें; प्रथम अपमान करून मग समजूत करणें. (गु.) नाक कापीनें पाटो बाके

नाक खाजविणें—चिडविणें; वांकुल्या दाखविणें; हेटाळणी करणें.

नाक खालीं पडणें—पाडणें—होणें—गर्व नाहींसा होणें; मानहानि होणें.

नाक गुंडाळणें—आपला कमीपणा, पराभव कबूल करणें; शरण जाणें; क्षमा मागणें.

नाक गेलें तरी भोकें राहिलीं आहेत असें म्हणणें—पुन्हां निर्लज्जपणें बोलणें, वागणें; मागील गुन्ह्याची लाज सोडून चालणें; अपमान झाला तरी पुन्हा कोडग्यासारखें वर्तन करणें.

(मध्यें) नाक घालणें—खुपसणें—मध्यें पडणें; तोंड घालणें पहा. 'लोकांच्या कामांत नाक घालण्याचा तिचा स्वभाव नव्हता.' —कोकि २००.

नाक घासणें—१ आर्जव, खुशामत करणें; हांजी हांजी करणें. २ क्षमा मागणें; चूक कबूल करणें. 'नाकभ्रष्ट न व्हाया, वज्री घांसी पुढें तदपि नाक।' —मोद्रोण २४.२६.

नाक चिरून मीठ भरणें——एखाद्यास फजीत करणें; नक्शा उतरविणें; अप्रतिष्ठा करणें; चांगली अद्दल घडविणें.

नाक चेचणें—ठेचणें—१ फजीती, पारिपत्य होणें, करणें. २ नक्षा उतरणें; खोड मोडणें. "स्त्रियांच्या उन्नतीस विरोध करणारांचीं आनंदीबाईनें आपल्या धारिष्टानें विद्येनें, सौजन्यानें व शुद्धाचारानें······कशीं नामीं नाकें ठेचलीं!"—विवि. 'अशा उर्मट माणसाचें असेंच जागच्या जागीं नाक ठेंचलें पाहिजे. ठीक झालें!'— शिसं २.३.

नाक जळणें; नाकांतले केस जळणें—फार दुर्गंधि येणें; अतिशय घाण सुटणें.

नाक झाडणें—१ नाक चेचणें; तिरस्कार दाखविणें; ताठा गर्व उतरविणें. २ नाक शिंकरणें. ३ घोडा इ. जनावरानें नाकांतून वारा काढणें.

नाकझाडया——दुसऱ्याच्या कृत्याबद्दल, जिनसाबद्दल, स्तुतीबद्दल नेहमीं नाक मुरडणारा, नांवें ठेवणारा.

नाक तोंड मुरडणें——नापसंति दर्शविणें; नांवें ठेवणें; तोंड वाकडें करणें.

नाक तोडून कडोसरी खोवणें——लाज लज्जा सोडून देणें; अगदीं लोंचट बनणें; कोडगेपणा करणें.

नाकदुराया (ऱ्ह्या), नाकधुऱ्या काढणें—१ शरण जाणें; क्षमा मागणें. 'सद्गति दे म्हणुनिच तो जाणा काढी मयूर नाकधुऱ्या।'—मोआर्याकेका, प्रस्तावना. २ नम्र होणें; लाचार होणें.

नाकदुराया—धुऱ्या काढायला लावणें—१ नम्रता स्वीकारण्यास लावणें; लीनता घ्यावयास लावणें; वांकविणें; लवविणें. 'एकाच लढाईत त्यांचा धुव्वा उडवून त्यांना नाकदुराया काढायला लावतो आणि पंधराव्या दिवशीं परत येतो!'—उग्र १.३. २ क्षमा मागावयास लावणें; माफी मागावयास लावणें; मान वांकवावयास लावणें. 'लग्नांतल्या अगदीं बारीकसारीक बाबीगणिक किती ग बाई मला वांकवायला नी नाकधुऱ्या काढायला लावलंन, विचारूं नका!' —फाटक, नाट्यछटा १.

नाक धरणें—१ धार्मिक कृत्यांत मग्न असणें. नाक धरून बसणें पहा. २ वाट पाहावयास लावणें; खोळंबा करणें; दम खावयास लावणें. ३ एखाद्याचें मर्मस्थान, गुह्यगोष्ट, छिद्र माहित असणें.

नाक धरल्यास—दाबल्यास तोंड उघडणें—(नाक व तोंड यांनीं श्वासोच्छ्वास होतो. त्यापैकीं एक दाबलें तर दुसरें उघडावेंच लागतें). एखाद्यास पेंचांत धरल्याशिवाय तो आपल्या म्हणण्यास कबूल होत नाहीं या अर्थीं.

नाक धरून बसणें—प्राणायाम करीत असतां एक नाकपुडी दाबून धरावी लागते; यावरून धार्मिक कृत्यांत गुंतलेला असणें, वेळ घालविणें. (ल.) कर्तव्य न करतां वेळ गमावीत बसणें.

नाकनिपट करणें—पश्चात्ताप करणें; निस्तरणें. 'भलत्याला भलतेंच काम सांगून तें बिघडल्यास आपल्यालाच निपट करण्याची वेळ येईल.'

नाकपुडया पिंजारणें-फुलविणें-फुगावेिणें-फुरफुरविणें-फेंदारणें--रागानें खेंकसणें; अंगावर जाणें; नाक फुगवून राग दाखविणें; संतापणें; रागावणें.

नाक फेडणें--नाक शिंकरणें.

नाक मुक्यापुढें खाजविणें—चिडविणें; क्षोभविणें; वांकुल्या दाखविणें.

नाक मुठींत धरावयास लावणें—शरण आणणें; नमविणें; वांकावणें; पराजित करणें. 'महादजी शिंदे यांनीं कोल्हापुरास वेढा देऊन येसाजीला नाक मुठींत धरायला लावलें.'—भक्तमयूरकेकावली ८.

नाक मुठींत धरून जाणें—निरुपायास्तव, नाइलाजानें शरण जाणें; अभिमान सोडून जाणें; नम्र होणें; लीन होणें; आर्जवें करणें; प्रार्थना करूं लागणें.

नाक मुरडणें-मोडणें—नाक वांकडें-तिकडें करून नापसंति दाखविणें; तुच्छता दर्शविणें; असंमति दर्शविणें; नांवें ठेवणें; खोडी काढणें. 'आणि एकाद्याच्या तोंडाला दारूचा वास आल्याबरोबर लोक लागलीच नाकं मुरडायला लागतात.'—एकच प्याला ४.२.

नाकमुष्टया हाणणें—नाक मुष्टीप्रमाणें, मुठीप्रमाणें करणें; नाक वर नेणें; नाक मुरडणें; हिणवणें.'आम्ही कितीही कसोशीनें पक्वान्न बनविलें तरी तुम्ही शेवटीं नाकमुष्टया हाणून मोठ्या मिनतवारीनें तें खाणार हें मला ठाऊक.'

नाक मोडणें—फजीती उडविणें; गर्व उतरविणें; मानहानि करणें; अप्रतिष्ठा करणें.

नाक लावून--धिटाईनें; निलाजरेपणानें.

नाक वर करणें-वर करून चालणें-वर असणें—१ दिमाख, ताठा, गर्व, निर्लज्जपणा दाखविणें; वरचढ असणें. २ स्वतः दोषी असतांनाहि दिमाख दाखविणें; शरम न वाटणें; शेखी मिरविणें.

नाक वाहणें—पडसें येणें; नाकांतून स्राव होणें.

नाक सावरणें—(बायकी) मूल जन्मल्याबरोबर त्यास न्हाऊ घालतांना त्याच्या नाकांत तेलाचे एकदोन थेंब सोडून त्याच तेलाच्या हातानें नाकाच्या वरच्या भागापासून शेवटपर्यंत हलकें चोळणें; नाक सरळ करणें.

नाकाचा कांटा फिटणें—(व.) दागिन्याची हौस फिटणें. नाकाला नथ घालतां येण्यासाठीं भोंक पाडून तें बुजूं नये, म्हणून जो त्यांत कांटा घातला असेल, तो पुढें नथ मिळाल्यामुळें काढून टाकला जाणें. नथ घालण्याची पुढें वेळ येणें. 'जन्मदरिद्री तो. त्याला मुलगी दिली तर मुलीच्या नाकाचा कांटा या जन्मांत नाहीं फिटायचा.'

नाकाचा बाल; नाकांतील बाल---नाकांतील केंस. हा काढतांना फार त्रास होतो; म्हणून फार जपतात. यावरून अत्यंत आवडता माणूस; गळ्यांतील ताईत. 'हंबीरराव कितीहो हलकट माणूस! पण आमच्या भोळ्या यजमानसाहेबांनीं त्याला अगदीं नाकाचा बाल करून ठेविलें आहे.'

नाकाची घाण मरणें-जाणें—१ संवयीमुळें किंवा पडशामुळें वास न येणें; घाणीची संवय होणें; गलिच्छ जागेंत राहून घाण येत नाहींशी होणें; नाकांतील केंस जळणें,किडे मरणें. २ (ल.) वाइटाचा तिरस्कार न वाटणें; वाईट गोष्टींची संवय होऊन त्यांबद्दल विशेष वाटेनासें होणें.—गांगा २४६.

नाकाचो कवळो करप—(गो.) नाक मुरडणें; कंटाळणें.

नाकाडोळ्याचा वैद्य (वैदू)—वैदू लोक अशा रोगांचीं नांवें घेऊन ओरडत जातात त्यावरून; गैरवाकबगार, अडाणी वैद्य.

नाकांत काडया घालणें—खिजविणें; चेष्टा करणें; चिडविणें; टोमणे मारणें; कुरापत काढणें; (एखाद्यास) चीड येईल असें कृत्य करणें. 'हरिच्या पुनः पुन्हां कां काड्या नाकांत घालिशी शशका।'—मोसभा ४.८४.—मोद्रोण ३.१०८. 'आमचे आपसांतले तंटे असतील ते मागाहून पाहून घेऊं. ते उकरून काढून एकमेकांच्या नाकांत काड्या घालण्याचा हा प्रसंग नव्हे.'—पामो ३५०.

नाकांत काडया जाणें—रुसणें; चिडणें; राग येणें.

नाकांत दम येणें--(माळवी) १ नाकीं नऊ येणें; दमणें; थकणें; मेटाकुटीस येणें. २ जोरानें श्वासोच्छ्वास चालूं लागणें; दम लागणें; धापा टाकूं लागणें.

नाकांत बोलणें--१ सानुनासिक बोलणें; अनुस्वारयुक्त बोलणें. (कोकणी लोकांप्रमाणें). २ नाकांतून, गेंगाण्या स्वरांत शब्द काढणें.

नाकांतले केंस जाळणें—उपरोधोक्तीनें किंवा टोमणे मारून दुसऱ्याच्या मनाला यातना देणें; असह्य करणें; झोंबविणें.

नाकातोंडाची गुंजडी करणें--(नाक, तोंड आवळून, चंबूसारखें करून) राग किंवा नापसंति दाखविणें.

उंच्या नाकानें--मिजासीनें; निलाजरेपणानें (करणें, बोलणें, फिरणें, वागणें इ.). बेदरकारपणें (वागणें).

नाकानें कांदे सोलणें—१ ताठ्यानें वागणें; ऐट मारणें. २ खोटा सोंवळेपणा, अभिमान इ. दाखविणें. 'लोक नाकानें कांदे मात्र सोलतात.'—मोरप्र १५.

नाकानें कांदे-वांगीं सोलणें--१ नसता, खोटा शुचिर्भूतपणा दाखविणें; उगीच पावित्र्याच्या गोष्टी सांगणें. २ एखादे वेळीं फार चोखंदळपणा करणें, पण एरवीं वाटेल तसें वागणें. (एखाद्याचा ढोंगीपणा दाखवितांना वापरतात.)

नाकापेक्षां मोतीं जड होणें--(नाकास शोभा आण ण्याकरितां मोतीं असतें; पण तें जड झालें तर नाकास इजा होईल यावरून). एखाद्याच्या अंगचा खरा गुण लोकांच्या अपेक्षेहून कमी आहे असें निदर्शनास आल्यावर योजतात. एखाद्या गौण वस्तूला अधिक महत्त्व प्राप्त होणें; कनिष्ठ दर्जाचा मनुष्य वरिष्ठाहून वरचढ होणें. तु०-सासूपेक्षां सून अवजड.

नाकार गॉडाबेली दोवोरप--(गो.) नाकावर गुळाचा तुकडा ठेवणें. एखाद्यानें कांहीं लालूच दाखविली तर म्हणतात

नाकाला-स चुना लागणें--नाकाला चुना लागल्यानें जसें रूपाचें बेरूप होतें, तसें स्वतःच्या किंवा आप्ताच्या बद चालीमुळें बदनाम झाल्यानें तोंड दाखविण्यास लाज वाटते. 'सकाळीं नबाबाच्या नाकाला चुना लागलाच.' -विवि १०.१०.२२७.

नाकाला-स चुना लावणें--१ अब्रू घालविणें. २ फजिती करणें; अप्रतिष्ठा करणें; टर उडविणें. 'नाकावर पाय देणें' पहा. 'नाकास लाविला, तो मानधना साहवे चुना काय ?' -मोद्रोण १६.३. 'नाकां चुना लाउन जात आहे।' -सारुह ८.४८.

नाकाला जीभ लावणें--तिरस्कार दाखविणें; गर्व, ताठा, दिमाख दाखविणें.

नाकाला झिमोटा घालणें- तिरस्कार दाखविणें; नाक मुरडणें; नापसंती दर्शविणें.

नाकाला-स पदर येणें--बेअब्रू होणें; लाज वाटणें; मानखंडना होणें. 'नाकावर'० पहा.

नाकाला पदर लावणें-लागणें--१ लज्जेनें, अपकीर्तीमुळें तोंड झाकणें. २ घाणीचा तिरस्कार करणें.

नाकाला-स मिरच्या लागणें-झोंबणें--नाकाला तिखट लावलें असतें तें झोंबतें व आग होते त्याप्रमाणें बोलणें वर्मीं लागलें असतां अतिशय राग येणें; संतापणें; लाल होणें.

नाकावर असणें--अगदीं तयार असणें; अगदीं पुढें असणें. 'राग कसा त्याच्या अगदीं नाकावर आहे.'

नाकावर टिचणें--१ एखाद्याचे पैसे ताबडतोब देणें. २ काकूं न करतां, अडथळ्यास न जुमानतां एकदम देणें, करून टाकणें. ३ प्रत्यक्ष करणें; समोर करून दाखविणें.

नाकावर टिचून--अगदीं बेधडक; मुळींच न भितां; न जुमानतां. समोर तोरा मिरविणें; प्रत्यक्ष करून दाखविणें. 'बाजीराव साहेब फडणिविसांच्या नाकावर टिचवून स्वतंत्र अधिकार गाजवूं पहात.' -अस्तंभा १८. 'पण तुम्हा पुरुषांच्या नाकावर टिचून आजपर्यंत कोणीच स्वतंत्र स्त्रीराज्य स्थापलें नव्हतें.' -बावं ३.१. 'दादासाहेब, उद्यां त्या लोकांच्या नाकावर टिचून दारू पिऊनच कचेरींत हजर व्हा !' -एकच प्याला २.३.

नाकावर निंबू घासणें-पिळणें--प्रतिपक्ष्यास न जुमानतां आपलें कार्य साधणें; प्रतिपक्ष्यास चीत करणें. 'नाकाला चुना लावणें' प्रमाणें.

नाकावर पदर येणें--१ वैधव्य येणें. २ लाजेनें लपून एकांतवासांत बसणें; तोंड दाखविण्यास जागा नाहींशी होणें; नाक कापलें जाणें.

नाकावर पाय देणें--विरोधाची पर्वा न करणें; प्रतिपक्ष्यावर मात करणें.

(म्हशीनें) नाकावर पाय देणें--नकटें असणें; नाक चापट, बसकें असणें.

नाकावर बोट ठेवणें--१ गुप्त ठेवण्यास किंवा गप्प बसण्यास सांगणें. २ (रागानें किंवा अन्य कारणानें एखाद्यास) दबकावणें.

नाकावर माशी बसूं न देणें--१ अगदीं तल्लख, तरतरीत असणें. २ अतिशय चिडखोर, रागीट असणें; अपमान किंवा तिरस्कार अगदीं सहन न होणें; थोडें देखील उणें न सोसणें. 'जागृदवस्थेंत जसी नासाग्रीं बैसली नरा माशी।' -मोगदा ५.२. 'आजीबाईच्या नाकावर माशीसुद्धां बसण्याची पंचाईत पडूं लागली.' -आजोच ३०.

नाकावर मिरीं वांटणें--फजिती करणें; अपमान करणें. (गु.) नाकपर मर्युं खासडुं. 'या मेल्यांच्या नाकांवर मिरीं वांटून लावावीं चांगलीं.' -मोरप्र १६.

नाकावर राग असणें--अतिशय लवकर राग येणें; शीघ्रकोपी असणें.

नाकावर निंबूं ठरत नाहीं--उतारावरून निंबू जसें अनायासें खालीं येतें, त्याप्रमाणें दुसऱ्याचें बोलणें ज्याच्या ठिकाणीं चालत नाहीं, म्हणजे जो बिलकूल सहन करीत नाहीं त्यास म्हणावें; अतिशय तल्लख मनुष्य.

नाकावर लिंबूं थांबत नाहीं--'माझं नाक इतकं सरळ आहे कीं, त्यावर लिंबूं थांबत नाहीं.' असें कुणी म्हटलें तर

तें सयुक्तिक व खरं आहे काय? तसेंच, माझ्याकडून कोणतीहि चूक कालत्रयीं होणार नाहीं अशी ग्वाही दिल्यास तिच्यावर आपला कितपत विश्वास बसेल? मनुष्य चुकतो पण चुकीचें खापर दुसऱ्यावर फोडण्याची त्याची वृत्ति असते व वरून आपण निर्दोषी आहोंत असा तो कांगावा करतो व सत्य उजेडांत आल्यावर मग चिडतो. अशा व्यक्तीचें वर्णन या वाक्प्रचारांत आहे.

नाकावर वाट करणें--विरोधास न जुमानतां काम सिद्धीस नेणें, करणें; नाकावर पाय देणें; समोरासमोर करणें.

नाकावरची माशी तरवारीनें हाणणें--(व.) लवकर राग येणें व अविचार करणें.

नाकाशीं-नाकीं सूत धरणें--(मरतांना श्वास आहे कीं नाहीं हें पाहण्याकरितां नाकाशीं सूत धरतात.) अगदीं मरणोन्मुख होणें.

नाकासमोर जाणें--१ अगदीं सरळ मार्गानें जाणें; इकडे तिकडे न पाहतां चालणें; आजूबाजूच्या गोष्टींकडे बदलणाऱ्या परिस्थितीकडे न पाहणें. २ साधेभोळे असणें; छक्केपंजे माहीत नसणें.

नाकाहोटावर जेवणें--चाखतमाखत खाणें; चोखंदळपणानें जेवणें.

नाकीं नऊ-नव-नऊ येणें--नाकाशीं नऊ प्राण येणें. वास्तविक नऊ प्राण हे शरीराच्या नऊ द्वारांशीं असतात. पण अंतकाळीं सर्व नऊ प्राण जणूं नाकाशीं येऊन मग सर्व प्राण जाऊन मनुष्य निर्जीव होतो. हीं नऊ द्वारें म्हणजे २ डोळे, २ कान, २ नाकपुड्या, १ तोंड १ उपस्थ व १ गुदद्वार. याप्रमाणेंच नऊ प्राण असतात असें तैत्तिरीय संहितेंत म्हटलें आहे-' नव वै पुरुषे प्राणाः नाभिर्दशमी।' हे नऊ प्राण वरील नऊ द्वारांशीं असतात ते सर्व नाकाशीं येणें म्हणजे अंतकाल समीप येणें. १ (नऊ इंद्रियांची शक्ति नाकांत येणें). मरणाच्या दारीं असणें. २ अतिशय कंटाळणें, दमणें, भागणें (कामानें, श्रमानें). ३ अतिशय कष्ट, त्रास पडणें. 'आपल्याकडे कारागीर लोकांची तब्येत सांभाळणें म्हणजे नाकीं नऊ येतात.'-विवि. 'इब्राहिमखान गारदी आपल्या कंपूचे बुरूज बांधून उभा होता. त्या जागेपर्यंत जाऊन पोंचण्यास त्याच्या नाकीं नव आले.'-पामो ५५०.

नाकींपाडीं नसणें--(व.) मेहनतीची कांहीं किंमत नसणें; मनास न येणें; पर्वा नसणें; महत्त्व न वाटणें. 'आम्हीं तुमची इतकी मनधरणी करतों, तरी तुमच्या ती नाकींपाडीं लागत नाहीं.'

नाकीं वेसण घालणें--गुरांच्या नाकांत वेसण घातली असतां तें आपल्या आधीन असतें. यावरून एखाद्यास कबजांत, कह्यांत ठेवणें, लगामीं लावणें.

❀ **नंकापरसी मत्ती व्होड; नाखापरस व्हड मोती**-(गो.) नाकापेक्षां मोठें मोती. 'नाकापेक्षां मोती जड' पहा.

नाक असलें तर नथ ल्यावी-आपणांत सामर्थ्य असेल तर मोठेपणा मिरवावा.

नाक कटा तो कटा, लेकिन घी तो चटा-नाक कापलें गेलें तर जाऊं दे, पण तूप तर मिळविलें! अपमान सोसूनहि स्वार्थ साधणारा व ऐट मारणारा.

नाक कापलें तर म्हणे भोंक आहे—अपमान झाला तरी पुन्हां वर तोंड करून बोलणें.

नाक कापावें व पाटावानें पुसावें—करूनच्या करून वर मखलाशी. अगोदर गुन्हा करून मग माफी मागण्याप्रमाणें. वर वाक्प्रचार पहा.

आपलें नाक कापून दुसऱ्यास अपशकून—वाक्प्रचार पहा.-विक्षिप्त ३·१८०.

नाक खाजविलें आणि नकटें वरमलें (खिजलें)-कोणीहि सहज नाक खाजविलें तर नकट्या मनुष्यास तो आपणास हिणवीत आहे असें वाटतें. तु०-अंगीं उणा तर जाणे खाणाखुणा.

नाक गेल्यावर काय, माझा चवरी गोंडा हाय--(गो.) निलाजरा मनुष्य आपली कितीहि अब्रू गेली तरी पुन्हां नाक वर करतोच.

नाक दाबलें कीं आ वासतो; नाक दाबलें (धरलें) कीं, (म्हणजे) तोंड उघडतें—श्वासोच्छ्वास नाकानें किंवा तोंडानें चालतो. तेव्हां एक तरी उघडें असलेंच पाहिजे. मिटलेलें तोंड उघडण्यास नाक दाबलें म्हणजे झालें. यावरून एखाद्याकडून काम करून घ्यावयाचें असल्यास त्याची कोठेंतरी कुचंबणा करावी, म्हणजे तो कबूल होतो. वाक्प्रचार पहा.

नाक दिल्ल्या नांव ना, नथ दिल्ल्या व्हडविक—(गो.) ज्यानें नाक दिलें त्याचें कोठें नांव नाहीं, पण नथ दिलेल्याची मात्र मोठी बडेजावी. मूळ ज्यानें उपकार केले त्याची किंमत मानावयाची नाहीं. तर मागाहून थोडेफार विचारणारांची जास्त प्रतिष्ठा ठेवावयाची अशी वृत्ति.

नाक नकट, तोंड वकट—(व.) कुरूप, अष्टावक्र अशा माणसास उद्देशून म्हणतात.

नाक नकटें आणि डोईला तिकटें—[तिकटें=पागोटें] चेहरा कुरूप असल्यास कपड्यानें कितीहि शोभा आणली तरी येऊं शकत नाहीं.

नाक नातिल्लाकडे कस्तुरी वरप—(गो.) नाक नसलेल्याकडे कस्तुरी घेऊन जाणें. त्याला कस्तुरीची पारख कशी होणार ? (ल.) मूर्खाकडे ज्ञान मिळविण्याकरितां जाणें.

नाक नाहीं धड आणि तपकीर ओढ—ज्याला धड नाकच नाहीं त्याला तपकिरीचा स्वाद काय उपयोगी ? ज्याला एखाद्या गोष्टीचा उपभोग घेतां येत नाहीं त्यास ती देऊन काय उपयोग ? तु०-षंढास पद्मिनी.

नाक नाहीं नथेला, भोंक पाडा भिंतीला—(उप.) नाक नकटें असल्यावर नथेकरितां भोंक काय भिंतीला पाडावयाचें ?

नाकपुडींत हरिकीर्तन—हरिकीर्तन अथवा हरदासाची कथा जेथें चालते तेथें प्रायः श्रोत्यांची बरीच गर्दी जमते. नाकपुडीसारख्या अत्यंत संकोचित जागेंत कथा करून तितक्यांत इतक्या समाजाची व्यवस्था करणें अशक्य होतें. त्याप्रमाणें एखाद्या समारंभाला जागा अगदीं अपुरी असल्यास म्हणतात. लहान जागेंत मोठ्या गोष्टीचा समावेश करूं पाहाणें.

नाक मुठींत, हरभरे ओटींत—१ आपला लाभ होत असेल तर खालीं मान घालून अपमान सुद्धां सहन करावयाचा. २ पडसें झालें असतां नाक गळत असतें; तेव्हां तें मुठींत धरावयाचें व पडसें जाण्याकरितां फुटाणे खातात ते ओटींत घ्यावयाचे.-मॅनवेरिंग.

नाक मोठें, दर्शन खोटें--वरून दिसावयास चांगलें पण निरुपयोगी. 'नांव मोठें, लक्षण खोटें' या म्हणीसारखी रचना

नाकशिमच्या लज् ना, आनि काल उलयिल्लें आज ना--(गो.) नकट्याला लाज नाहीं, कालचें बोलणें आज नाहीं. कोडग्या माणसाबद्दल म्हणतात.

नाक होड आशिलो सगळे आपणाक चोयतातिशें लेकता--(गो.) नाक मोठें असलेला माणूस सगळे लोक आपणाकडेच पाहतात असें समजतो.

नाकचें मोतीं ठेवून गहाण, राखी जांवयाचा मान—जांवयाचा वडेजाव करण्याकरितां जरूर तर नथ गहाण टाकावी. जांवयापुढें आपला कमीपणा व्यक्त नये म्हणून स्वतःवर आपत्ति ओढवून, कर्ज काढूनहि सासूसासरा जांवयाची बडदास्त ठेवतात, सासू जांवयाचें इतकें कौतुक करते कीं, जांवयाची सरबराई करण्याकरितां व त्याचें आदरातिथ्य करण्याकरितां आपली नथ सुद्धां गहाण टाकण्यास कमी करीत नाहीं. वास्तविक सौभाग्यती स्त्रिया नाकांतली नथ सहसा दूर करीत नाहींत, बाहेर पडावयाचें झाल्यास नथ घातल्याशिवाय बाहेर जात नाहींत. ही आतांपर्यंतची स्थिति व समजूत होती.

नाकाक आनि आंदोळेक सोयरिक ना--(गो.) नाकाला आणि बिळीला संबंध नाहीं.

नाकाक नत्तु जड्ड न्हयि, वटाक मिश्यो जड न्हयि--(गो.) नाकाला नथ जड होत नाहीं आणि ओठाला मिशा जड होत नाहींत. स्वतःचेच कोणाला जड नसते.

नाकाडोळ्यांचा चकचकाट, चुलीवर माशांचा वसवसाट--(अशिष्ट) वरून झकपक व आंतून घाण या अर्थी.

नाकांत नाहीं कांटा, रिकामा (कोरडा) ताठा; नाकांत नाहीं कांटा, दिमाख मोठा--जवळ कांहीं नसतां, नथीचा कांटाहि नाकांत नसतां, उगाच मोठेपणाची ऐट मारावयाची. पोकळ डौल.

नाकांत नाहीं मणका, नटाईचा झणका--वरीलप्रमाणें. [मणका=मणी. नटाई=नटवी].

नाकांत पूर, डोळ्यांत धूर--डोळ्यांस धूर लागला म्हणजे नाकांतून व डोळ्यांतून पाणी वाहूं लागतें.

नाकांत वेसण दुहिरी, तरी पाय राहिना घरीं--एखाद्या स्त्रीस बाहेर फिरण्याची संवय लागली म्हणजे तिच्यावर कितीहि नियंत्रण ठेवलें तरी ती बाहेर गेल्याशिवाय राहात नाहीं.

नाकान जेवल्यावर पोट भरता ?--(गो.) नाकानें जेवल्यावर पोट भरतें काय ? यश येण्यास परिश्रम केले पाहिजेत.

नाकापर्यंत पदर आणि वेशीपर्यंत नजर--एकीकडे तोंडावर मोठा बुरखा घेऊन लज्जेचें व विनयाचें प्रदर्शन करावयाचें व एकीकडे रस्त्यानें कोण जात येत आहे त्याकडे दूर वेशीपर्यंत नजर द्यावयाची. वर दिखाऊ नम्रता धारण करून, आंतून स्वैर आचरण ठेवावयाचें.

नाकापेक्षां मोतीं जड--मोतीं हें नाकापेक्षां हलकेंच पाहिजे; नाहींतर नाक तुटावयाचें. डोईजड नोकर, हाताखालचा माणूस.

नाकापेक्षां मोतीं जड, सासूपेक्षां सून अवजड--ज्याप्रमाणें नाकास तोलतां येणार नाहीं अशी नथ उपयोगी नाहीं त्याप्रमाणेंच सासूच्या आज्ञेंत वागणार नाहीं अशी सून असली तर तें योग्य होणार नाहीं.

नाकार गोडा वेली, तोणाँ पड्ल्या पड्ली--(गो.) नाकावर ठेवलेला गुळाचा तुकडा तोंडांत पडला तर पडला. एखाद्यानें कांहीं देतों म्हटलें पण तें निश्चित मिळेल असा आपणास भरंवसा वाटला नाहीं तर अशा वेळीं म्हणतात.

नाकाला धाका आणि कपाळाला थुंका--कपाळाला कुंकू लावण्याच्या ऐवजीं तें नाकाला लावावयाचें व मग कपाळाला थुंका लावावयाचा. याप्रमाणें कांहींतरी भलतेंच आचरटपणाचें कृत्य करावयाचें.-मॅन. (?)

नाकाला नाहीं जागा, नांव चंद्रभागा--[चंद्रभागा =सुंदर स्त्री असा अर्थ] आहे नकटी, कुरूप, पण नांव तर सुंदर. तु०-नांव सोनूबाई०

नाकालागी कापूस धरला, हावको केदनाचि उडून गेला--(गो.) नाकाजवळ कापूस धरला, पण प्राण केव्हांच निघून गेला. नाकाशीं सूत धरलें म्हणतात त्या अर्थानें.

नाका——**नाका म्हणयार राजा जांवय करतात**--(गो.) नको म्हटल्यावर राजा देखील जांवई करून घेतो. निरपेक्ष माणसामागें ऐश्वर्य धांवत येतें.

नाकिर्द——**नाकिर्दीस येणें**--ओसाड पडणें; वहित न होणें.

नाखट——**नाखटा कामा कुराड् (कित्याक)**--(गो.) जेथें नखाचें काम तेथें कुऱ्हाड कशाला पाहिजे. लहानशा कामाला मोठी तयारी लागत नाहीं.

नाखटानें बोच्च्याक खोरें अित्याक--(गो.) नखानें होणाऱ्या गोष्टीला खोरें कशाला ?

नाखटावेल्यान रावण चितारता-(गो.)-नखावरून रावण काढणें. अतिशय हुषारी, चाणाक्षपणा. तु०-अंगुष्ठाचा दशशिर करणें.

नाग——**नाग, साग, काग**—सर्प, सागवृक्ष व कावळा हे फार दीर्घायु असतात. 'काग' पहा.

नागास दूध पाजलें, शेवटीं प्राणास मुकलें--सर्पाला दूध पाजलें तरी तो शेवटीं चावून प्राण घेतो. दुष्ट मनुष्यावर उपकार केला तरी शेवटीं तो आपल्यावर उलटून आपला नाश केल्याशिवाय राहात नाहीं. तु०-पयः पानं भुजंगानां केवलं विषवर्धनम् । 'भुजंग' पहा.

नागी बाळंत्रो--(गो.) नागिणीचें बाळंतपण कोण करूं घजेल ! कांहीं गोष्टी अशाच अशक्य कोटींतल्या असतात.

नागीण पोसली आणि पोसणारालाच डसली--सर्पिणीस आश्रय दिला तरी शेवटीं ती आपणांस दंश केल्याशिवाय राहात नाहीं. दुष्टावर कितीहि उपकार केले तरी तो आपला दुष्टपणा टाकीत नाहीं, एवढेंच नव्हे तर उपकारकर्त्याशींहि दुष्टपणाचें वर्तन करतो.-संक १.५.१९.

आयत्या पिठावर (बिळावर) नागोबा--(मुंग्यांनीं तयार केलेल्या वारुळांत नाग आयता जाऊन राहतो यावरून) दुसऱ्याच्या श्रमाचें फल आयता उपभोगणारा. आयता पहा.

नागझरी——**नागझरीच्या पाण्यानें तोंड धुऊन ये !**--[पुण्यास नागझरी म्हणून एक सांडपाण्याचा नाला आहे. त्या घाणेरड्या पाण्यानें तोंड धुवावयाचें म्हणजे मोठें संकटच.] एखाद्यास एखादी गोष्ट द्यावयाची नसल्यास त्यास हिणविण्यासारखें कांहीं तरी उत्तर देणें.

नागडा——**नागडा येतो, नागडा जातो**--१ वारा जसा येतो तसा जातो. २ मनुष्य जन्माला येतो तो नागवा व जातो तो तसाच. बरोबर कांहीं आणीत नाहीं किंवा घेऊनहि जात नाहीं.

नागपूर——**नागपुरी आंकडा**-(नागपुरांत व इतरत्रहि कपड्यावरील लिहिलेल्या दर्शनी किमतींत हिला आंख म्हणतात) कांहीं वजावाट घालून माल गिऱ्हाइकाला देण्याची पद्धत आहे. यावरून बाद करणें; ठराविक प्रमाणांत कमी करून घेणें. – न. चिं. केळकर, आत्मचरित्र, पान ६४६.

नागमोड——**नागमोडीचा पितांबर नेसणें**--नागवें असणें.

नांगर——**नांगर उचलणें-टाकणें-सोडणें**--शेतकाम सोडणें (जुलुमामुळें वगैरे). त्रासून नांगर सोडून जाणें; शेतीचें काम कंटाळून अर्धवट टाकून जाणें.

एखाद्यावर नांगर धरणें--जुलूम करणें; त्रास देणें; छळ करणें; जाच करणें.

नांगर धरणारे; नांगऱ्ये--अडाणी; निर्बुद्ध लोक. 'नांगर धरणारे याजवर अबदागिऱ्या धरल्या.'-इब १९.

नांगर वगैरे काव्यावर देणें--(व.) नांगर आडवा धरणें; करळ धरणें.

नांगरास जुंपणें--कष्टाच्या कामास लावणें. त्यामुळें माणूस कृश, रोड होणें.

नांगरास जुंपलेला--एखादें काम सतत, विश्रांति न घेतां करणाऱ्यास म्हणतात. 'तुला कोणीं नांगरास जुंपला आहे काय ?'

नांगरास पाळ—नांगरतांना मध्येंच नांगर थांबल्यास एखादें झाडाचें मूळ आडवें आलें आहे म्हणून सांगणें. दिरंगाई लावण्यास, रेंगाळण्यास कांहीं तरी क्षुद्र कारण पाहाणें; एखाद्याला त्याच्या शब्दांत पकडणें; कांहीं तरी निमित्त पाहाणें; एखाद्या क्षुल्लक गोष्टीची सबब सांगणें.

नांगरे दादा — १ बळिराम दादा; हलधर. २ कुणबी मनुष्य. ३ अडाणी मनुष्य.

नांगरे पाटील—मुख्य पाटील.

* **जेथें जावें तेथें नांगरास पाळ** — सर्वत्र अडथळे. संकटें एकामागोमाग सारखीं येतात. 'नांगरास पाळ' पहा.

नागरपाटा ~ **नागरपाटा नेसणें**—नागवें हिंडणें. (लहान मुलीस म्हणतात.)

नागवण ~ **समर्थाची सांठवण, दुर्बळांची नागवण** — ऐश्वर्यवान लोक पैसा जमवूं लागले म्हणजे तो गरीब लोकांस पिळून काढून जमवितात.

नागवणें ~ **नागवला जाणें** — दिवाळें निघणें; कफल्लक बनणें.

* **नागवलासरे बाबा, नागवल्या आयाबाया** — एखाद्या साधूला किंवा बैराग्याला अथवा गुरूला लुबाडलें तर त्याचा अप्रत्यक्ष परिणाम गरीब आयाबायांस लुबाडण्यांत होतो. कारण त्या माणसाला सर्व गोष्टी या गरीब आयाबायांपासून मिळालेल्या असतात व एकदां गेल्यावर त्या बाया त्यास पुन्हां आणून देतात तेव्हां नुकसान झालें तें जो नागवला गेला त्याचें नव्हे तर बायाबापड्यांचें. 'परीट, धोबी' पहा.

नागौन व्हरतरीच आडांबो घालो म्हूण कित्याक उपकरता?—(गो.) चोर चोरी करून गेल्यावर मग दाराला अडणा घातला तर त्याचा काय उपयोग?

नागवा ~ **नागवा कोल्हा भेटणें**—अकल्पित मोठा लाभ होणें; अकस्मात् लाभ होणें. 'कीं भेटला कपटमित्र साक्षात् कोल्हाचि नागवा याला'। –मोसभा ४.६५.

नागवा पाऊस — ऊन असतां पडणारा पाऊस. 'हा नागव्या पावसाचा काव्यमय देखावा पाहून मला फारच मजा वाटली.'–आ. इंदूचें शिक्षण पृ. ७४.

नागवा होणें — १ सर्वस्व गमावणें; कफल्लक बनणें. २ आपल्याजवळ देण्यास कांहीं नाहीं असें दाखविणें; नादार बनणें; दिवाळें काढणें.

नागवी सवाशीण भेटणें—अकल्पित लाभ होणें.

नागवें नाचणें — १ आनंदातिशयानें बेहोष होणें. २ स्वैर वर्तन करणें.

नागव्या गोष्टी करणें-सांगणें — निर्भीडपणें, उघड उघड बोलणें; आडपडदा न ठेवतां बोलणें.

नागव्या तरवारीचा पहारा—खडा व सक्त पाहरा.

* **नागवी पाहिली म्हणजे संन्याशाचा सुद्धां उठतो (चोट); नागवें दिसलें (पाहिलें) कीं (म्हणजे) संन्याशाचें सुद्धां उठतें** — अर्थ उघड आहे. विकार हे सर्वांनाच आहेत. ते विवेकानें दाबले असतात एवढेंच. पण समोर कोणतीहि आकर्षक, मोहक गोष्ट सहज मिळण्यासारखी दिसली म्हणजे कोणालाहि ती हवीशी वाटते. (गु.) नागी जोइने मुनीवर चले.

नागवें नाचणार तर रंगण तरी धर — स्वैर वर्तन करावयाचें झालें तरी तें सुद्धां कांहीं तरी पद्धतशीर असणें बरें.

नागव्याकडे उघडें गेलें, रात्र सारी हिंवानें मेलें; नागव्यापाशीं उघडा गेला सारी रात्र हिंवानें मेला— 'उघड्यापाशीं नागडें गेलें' पहा. (गु.) नागानी सोडे उंधाडो गयो के तुं महने ढांक.

नागव्याची तर नागव्यानेंच उतरावी; नागव्याच्या तरीवर नागव्यानेंच गेलें पाहिजे — जशास तसें; जसा देश तसा वेष, याप्रमाणें.

नागव्याला लाज नाहीं—ज्यानें वस्त्रसुद्धां सोडलें त्याला इतर गोष्टींची कसली लाज वाटणार. ज्यानें सर्व धरबंध सोडले त्याला मग समाजाबद्दल कांहींच वाटत नाहींसें होतें.

नागी जोइने संन्यासी जागे—(गु.) नग्न स्त्री दृष्टीस पडल्यास संन्याशाच्या अंगीं सुद्धां काम जागृत होतो. 'नागवें पाहिलें' पहा.

नागवेल ~ **नागवेलीची आर एकदां रुजली म्हणजे वेल वाढतो**—(आर = अंकुर, धुमारा) एकदां लागीं लागलें म्हणजे पुढें वाढ होत जाते. मग काळजी राहत नाहीं. तेव्हां प्रथम रुजण्याकडे लक्ष द्यावयास पाहिजे.

नांगा; नांगी ~ **नांगी दाबणें**—१ नक्षा उतरविणें. २ तोंड बंद करणें.

नांगी मारणें—१ टोमणा, टोला देणें. २ लागरें भाषण करणें. ३ हानि करणें.

नांगी टाकणें — विंचवाचें कांहीं चालेनासें झालें म्हणजे तो नांगी खालीं करतो. (ल.) गलितधैर्य होणें; पराभव कबूल करणें; हात पाय गाळणें. 'दरबारला नुसते बोलावणें येतांच आतां आपली धडगत नाहीं असें पाहून त्यानें नांगी टाकली'–नाट्यकथार्णव.

नांगी न राहणें — विंचवाची नांगी काढल्यावर तो निरुपद्रवी होतो. (ल.) समूळ नष्ट होणें.

नांगी पडणें—१ जोरानें चाललेलें भाषण किंवा कोणतेंहि चाललेलें काम बंद होणें. २ वरमणें: 'मला पाहतांच त्याची नांगी पडली.'

नांगी रुतणें-लागणें—जम वसणें ; पाय रोवले जाणें.

नागीण~**नागीण सडकली पाहिजे, विंचू ठेचला पाहिजे**—नांगी उभारुन आघात करावयास सवकलेल्या विंचवाचें सौंदर्य, दंश करावयास धावलेल्या गव्हाळ्या नागिणीच्या फणीचा डौलदारपणा कधींहि कौतुकाचा विषय होऊं शकत नाहीं.
—धनुर्धारी

नागेश्वर~**नागेश्वराला नागवून सोमेश्वराला वात लावणें**—[नागेश्वर व सोमेश्वर हीं पुण्यांतील दोन प्रसिद्ध देवस्थानें आहेत.] एकाला लुबाडून दुसऱ्याची भर करणें. एखादें मोठें अपकृत्य करावयाचें व त्याचें प्रायश्चित्त म्हणून लहानसा दानधर्म वगैरे करावयाचा. तु०— Rob Peter to pay Paul.

नाच~**नाच नाचावा लागणें** — अनेक खटपटी कराव्या लागणें; पुष्कळ आटापीटा करावा लागणें; बरेच श्रम करावे लागणें.

नाच मांडणें—धांगडधिंगा घालणें; धुडगूस घालणें; गडबड करणें.

नाच न जाने आंगन तेढा—(हिं.) नाचतां येईना अंगण वांकडें, पहा.

नाचकें~**नाचक्यांतून निघतो कऱ्ह्यांत जातो** [नाचकें = तोटीचें भोंक.] टाळाटाळी करणाऱ्या माणसाबद्दल म्हणतात.

नाचणी~**नाचणीचे राशींतून मोहरीचा दाणा शोधणें**—नाचण्या व मोहऱ्या दिसावयाला सारख्याच दिसतात. यावरुन दुर्घट काम. 'त्या रानांत सकऱ्या भिल्लाला शोधणें ह्मणजे नाचणीचे राशींतून मोहरीचा दाणा शोधणें.' —पाणकळा, पान १४७.

नाचण्यांची मळणी—रडगाणें; पिरपिर; तीच तीच गोष्ट फिरुन फिरुन सांगणें; तोंडाची टकळी सारखी सुरू असणें.

नाचणें~**एखाद्याच्या पुढें पुढें नाचणें** — हांजी हांजी करणें; खुशामत करणें; खुष करण्याचा प्रयत्न करणें; जवळ राहून सेवेंत तत्पर आहों असें दाखविणें.

नाचणें उडणें; नाचूं उडूं लागणें—धांगडधिंगा घालणें; खिदळणें; गडबड करणें.

* **लग्नामध्यें खरचण्यापेक्षां नाचणें फार**—१ लग्नसमारंभात पैसा खर्च होतोच पण त्यापेक्षांहि धांवाधाव फार होते, खर्चापेक्षांहि मनुष्य खटपटीनें जास्त त्रासून जातो. २ एखादी गोष्ट प्रत्यक्ष करण्यापेक्षां तिच्याबद्दल बढाईच फार मारणें.

नाचतल्याचे पांय म्हेळटात, आनी पळेतल्याचे दोळे वळटात — (गो.) नाचणाराचे पाय मळतात व बघणाराचे डोळे दुखून येतात. काम करणाऱ्याला त्रास कळतो.

नाचतां येईना (म्हणून) अंगण वांकडें—आपणांस एखादें काम चांगलें करतां आलें नाहीं म्हणजे आपला उणेपणा झांकण्यासाठीं कांहीं तरी वस्तूंत खोड काढणें. तु०— A bad workman quarrels with his tools.

नाचतां येईना आंगण वांकडें, रांधतां येईना ओलीं लांकडें—वर प्रमाणेच.

नाचतांना मोराचा पिसारा हाले आणि पिसारा नसतांना लांडोरी डोले—मोर नाचतांना त्याचा पिसारा हालतो म्हणून लांडोरीला पिसारा नसला तरी ती नाचून हालवून पाहण्याचा प्रयत्न करते. दुसऱ्याचें विनाकारण, आपणाजवळ साधन नसतांहि अनुकरण करणें.

मोर नाचतो म्हणून लांडोरहि नाचते—दुसऱ्याचें मूर्खपणानें अनुकरण करणें.

नाचरी~**आधीं बाई नाचरी, तिचे पायांत बांधली घागरी**—आधीं पहा.

नाचारी~**नाचाऱ्याचें खावें पण उचाऱ्याचें खाऊं नये** — [नाचारी = कंगाल भिकारी.] एखाद्या कंगाल किंवा नीच मनुष्याचेहि उपकार करून घ्यावे पण जो आपण केलेले उपकार नेहमीं तोंडानें बोलून दाखवितो अशाचे उपकार कधींहि घेऊं नयेत.

नाजुक~**नाजूक जागीं करट (दुखणें), जांवई वैद्य** — गुह्यभागीं दुखणें झाल्यास साध्या वैद्याला सुद्धां दाखवावयाची लाज वाटते, मग जांवयाला दाखवावें कसें? दाखवितां येत नाहीं व दाखविल्याशिवाय उपचार होऊन बरें होत नाहीं अशी अडचणीची परिस्थिती येणें. अवघड जागीं दुःख, पहा.

नाजुक नार, तिला चाबकाचा मार—जी स्त्री फार नाजुकपणाचा आव आणते तिच्यावर विश्वास ठेवूं नये. तिला चांगली चोपून धाकांत ठेवावी. वरवर ढोंग करणाऱ्यास चांगलें जरबेंत ठेवावें.

नाट ~ **नाट करणें**—चोरून नेणें; पळविणें.

नाट जाणें-येणें — १ खुंटणें; तूट येणें. २ नापसंतीमुळें ओढून धरणें; नाकबूल करणें. 'रुक्मा तो परि नाट जाऊनि वदे नाहींच तो जिंकिला.'–कृ. कौ. ९७.

नाट जाळणें-भाजणें — (अमंगलता काढून टाकणें) १ बोहणी करणें. २ धैर्य धरून पुढें सरणें.

नाट लागणें—१ बरी किंवा वाईट रीतीची कोणत्याहि कामाची सुरवात व त्यानंतर तीच परिस्थिति टिकून राहणें. 'अरे आजचा पाडव्याचा दिवस आहे शिवीगाळ करूं नका, नाहींतर वर्षभर तोच नाट लागेल.' २ अपशकुन होणें; अशुभ आरंभ होणें.

नाटक ~ **नाटकवाला दारिद्र्यांतच मरायचा**—कवी–ग्रंथकाराप्रमाणें नाटकवाल्याला पैसा मिळत नाहीं. तो जन्मभर दरिद्रीच राहतो. 'नाटकवाला दारिद्र्यांतच मरायचा' या म्हणीला प्रथम कोल्हापूरचे विनायकराव कवठेकर आणि दुसरे मोरोबा वाघोलीकर यांनीं हरताळ पाडला'.–बोडस, माझी भूमिका, पान ४३.

नाटानाट ~ **नाटानाट करणें**—(कर.) थोडक्यांत चांगलें करणें.

नाठाळ ~ **नाठाळ जांवई लेकीनें गोड, अन् शिळी भाकरी ताकानें गोड**—(वांय.) खाष्ट जांवयाला आपली लेकच दिली असल्यानें त्याचा खाष्टपणा त्रासदायक वाटत नाहीं. ज्याप्रमाणें ताकाबरोबर शिळी भाकर गोड लागते त्याप्रमाणें लेकीमुळें जांवई प्यार होतो.

नाठीं ~ **साठीं बुद्धि नाठी**—वयाला साठ वर्षें झालीं म्हणजे बुद्धि मंद होते. म्हातारपणीं माणूस बावचळतो.

नाड ~ **नाड आटपणें**—१ मरणोन्मुख होणें; रुधिराभिसरणक्रिया थांबणें; नाडी ऐकूं येत नाहींशी होणें; हृदयक्रिया थांबणें. २ (ल.) एखादें कार्य शेवटास नेण्यास असमर्थ होणें; त्याकामीं थकणें; हातपाय गळणें.

नाड दाखविणें—रोग परीक्षा करण्याकरितां वैद्यास नाडी दाखविणें; हात दाखविणें.

नाड पाहणें — रोगपरिक्षेकरितां नाडी कशी चालते तें हात लावून निरीक्षण करणें; प्रकृति पाहणें.

नाड सांपडणें — युक्तिप्रयुक्तीनें एखाद्याचा स्वभाव ओळखणें; खुबी समजणें; बरोबर कल्पना येणें.

नाडा ~ **नाडा घरपाडा**—(गो.) दुष्ट माणसाची बुद्धि दुसऱ्याचें घर कसें पडेल, त्याचें वाईट कसें होईल हेंच पहात असते.

नाडा पसरणें—गोंधळ घालणें; पसारा मांडणें.

(आईवर) नाडा सोडणें — मात्रागमन करणें; गर्ह्य गोष्ट करणें: 'बुगाजी नाइकानें आण घातली कीं मी आईवर नाडा सोडीन तर आज येथें राहिन.'–साष्टीची बखर ३८.

नाडी ~ **नाडी आकर्षण करणें होणें; नाडी गोळा होणें; नाड्या ओढूं लागणें** — मनुष्य मरण्याच्या पंथास लागला म्हणजे त्याच्या नाड्या आकुंचित होऊं लागतात व त्याला त्या ओढल्या तोडल्याप्रमाणें वाटतें. विनाशकाळ जवळ येऊन ठेपणें.

नाड्या आंखडणें — प्रगति थांबणें; गति खुंटणें; मति कुंठित होणें. 'वैद्य:–काय करावं? शास्त्रांत उजव्या हाताची नाडी पाहावी असं आहे. इथं आमच्या नाड्या आंखडल्या!'

–एकच प्याला ४-४

नात ~ **नातजांवयानें नात नेली, बुढी आपटूं आपटूं मेली** — (व.) नातीच्या नवऱ्यानें नातीला आपल्या घरीं नेलें कारण तिच्यावर त्याची मालकी होती; परंतु मुलीच्या आजीचें प्रेम मुलीवर फार असल्यामुळें तिला दुःख झालें पण उपयोग कांहीं झाला नाहीं. खऱ्या मालकानें आपली वस्तु नेली असतां इतरांस चुरसुरे खात गप बसावें लागतें. तु०– ज्याचें त्यानें नेलें, पाया पडणें वाया गेलें.

नात तशी पोती, खाण तशी माती—(नात = ज्ञाति) मुलगी जाती सारखी होते व खाणीप्रमाणें तींतून माती निघते. मनुष्य आपल्या जातीचें वळण सोडूं शकत नाहीं.

नातेकी रांड, गोदका छोरा, वालूकी भीत और बहमी बोरा, ये किसीकू निहाल नहीं करते—जातींतील विधवा (रांड), स्वतःचा मुलगा, वाळूची भिंत, संशयित व्यापारी हे कोणाला पूर्ण समाधान द्यावयाचे नाहींत.

नातें ~ **नातें लावणें**—आप्तसंबंध जोडणें. बहुधा तो नसतो किंवा लांबचा असतो, अशा ठिकाणीं हा प्रयोग योजतात. 'आलेकिती नित्य परांगनातें। लावीत त्यांसीं अनुकूळ नातें॥'–सारुह ६.५६.

नातें एकपट तर प्रेम दुप्पट — नातें थोडें असूनहि प्रीति अधिक असली तर योजतात. प्रेम हें नात्यामुळें आलेले नसून अन्य कारणानें आलें अशी स्थिति.

नात्याची जवळीक तशी आदराची कौंवळीक—जितकें जवळचें नातें असेल त्यामानानें आदर जास्त होतो. तु० Blood is thicker than water.

नात्यांत नातें आणि कडकडा खातें—नातेवाईकाशीं संबंध आला म्हणजे आपणास चाट लागते किंवा आपणाविषयीं मत्सर अथवा द्वेष आढळून येतो.

नात्याला नाहीं पारा, बसायला नाहीं थारा—अनेक नात्याचीं माणसें असलीं तरी वेळेवर कोणी उपयोगी पडत नाहीं. कोणाकडूनहि आश्रय मिळत नाहीं.

नाथ ॰ नाथीचा बैल— (नाथ = वेसण) १ वेसण घातलेला बैल. २ ताब्यांतला, हाताखालचा माणूस.

नाथ ॰ नाथाच्या घरची उलटीच खूण—नाथ म्हणजे एकनाथ महाराज. यांनीं हें रूपक केलेलें आहे. 'चिंचेच्या पानावरी देऊळ रचिलें, आधीं कळस मग पायारे।' —याप्रमाणें सर्व उलटीकडून व्यवहार. 'नाथाचे घरची उलटीच खूण । पाण्याला मोठी लागली तहान ॥' — श्रीधर स्वामींचें पद.

नाद ॰ नाद जाणें—१ बद्द होणें; २ पत, नांव जाणें.

नाद तुटणें—नादांतून मुक्त होणें.

नाद दवडणें ॰ घालविणें—अब्रू घालविणें.

नाद, नादा लावणें—छंद, वेड लावणें.

नादांत असणें; नादीं लागणें-भरणें — १ गर्क असणें; छंदीं लागणें; कच्छपीं लागणें.

नादानें नाद—भांडणापासून भांडण.

नादावादांत पडणें — क्षुल्लक लोभांत गुंतणें; नादीं लागणें.

नांदणें ॰ नांदते घरचीं केरसुणी — आपल्या फायद्यासाठीं ऐपतदार व मोठ्या माणसांची खुषामत करणाऱ्या बद्दल म्हणतात.

नांदायला जाणें—(बाय) प्रथम सासरीं जाणें; सासरीं राहणें. मागें लग्नांत मुली लहान असत तेव्हां सासरीं राहण्यास त्यांस फार जड जाई तेव्हां साहजिकच त्या जाण्यास, नांदण्यास खळखळ करीत.

नादान ॰ नादान दोस्तसे, दाना दुश्मन भला — मूर्ख किंवा नीच मित्रापेक्षां शहाणा व थोर शत्रु चांगला. नीचाशीं मैत्री करण्यापेक्षां थोर पुरुषाशीं शत्रुत्व आलेलें अधिक बरें. दुश्मन पहा.

नादान बात करे, दाना कियास करे—नादान मनुष्य कांहीं बोलला तरी त्यावरून शाहणा मनुष्य अंदाज करतो, उमजतो. मूर्ख बडबडतो, शहाणा विचार करतो.

नादान की दोस्ती जीका जान—नादान मनुष्याशीं मैत्री केल्यास जीवावर बेतावयाची. तु०—असंगाशीं संग आणि प्राणाशीं गांठ.

नादार ॰ नादाराचा एक पैसा—गरीब मनुष्याला एक पैसा देखील भारी असतो.

नानक ॰ नानक (कहे) नन्हे होईजे जैसी दूब, और घांस जर जात है दूब खूब की खूब — नानक म्हणतो दूर्वेप्रमाणें लहान व्हावें म्हणजे इतर गवत जरी जळून गेलें तरी दूर्वा जशाचा तशाच राहतात.

नाना ॰ नानागर्दी — दुसऱ्या नानासाहेब पेशव्याचें १८५७ चें क्रांतिकारक युद्ध. या प्रमाणें १७६१ च्या पानपतच्या युद्धाला भाऊगर्दी म्हणतात. 'नाना गर्दींच्या-वेळीं प्रथम प्रथम शिखांनीं उचल केली होती.' ज्ञा. को. विभाग १७.

नाना पुता करणें—बाबापुता करणें पहा.

नाना फडणीस—१ बाळाजी जनार्दन भानु या नांवाचे पेशवाईतील फार थोर मुत्सद्दी पुरुष. 'भले बुद्धीचे सागर नाना ऐसे नाहीं होणार ।'—ऐपो ४३९. २ (ल) फार हुषार धोरणी माणूस. ३ (उप.) मूर्ख, ठोंब्या.

नाना फडणीस काय, वेंकटनरसी काय, दोन्ही सारखीच ?—नाना फडणीस हे पेशव्यांचे कारभारी होते व वेंकटनरसी हीं पेशवाईतील एक नामांकित कलावंतीण होती. या दोघांची तुलना करणें हा मूर्खपणा आहे.

नानांत नाना फडणीस नाना, इतर नाना करिती तनाना—नाना फडणीसांचें श्रेष्ठत्व व्यक्त करणारी एक म्हण. तु०—तात्यांत तात्या हरिपंत तात्या, इतर तात्या करिती चपात्या.

नाना ॰ नाना प्रकार करणें—रागानें आदळ आपट करणें; अकांड तांडव करणें; थेर करणें; चाळे करणें.

नाना मताचें बंड । लोकीं चाले अखंड ॥ — जगामध्यें अनेक मतांचे लोक असणारच. —राम.

नानारत्ना वसुन्धरा—पृथ्वीवर अनेक विविध रत्नें आहेत. तेव्हां एखादें नवें आढळल्यास आश्चर्य वाटावयास नको. 'बहुरत्ना वसुंधरा' असा पाठ अधिक रूढ आहे. सबंध सुभाषित असें:—१ माने तपसि शौर्ये वा विज्ञाने विनये नये । विस्मयो नहि कर्तव्यो नानारत्ना वसुन्धरा ॥ २ पिण्डे पिण्डे मतिर्भिन्ना तुण्डे तुण्डे सरस्वती । देशेदेशे विभाषा-स्यान्नानारत्ना वसुन्धरा ॥

नाम—नाम असे उदारकर्ण, कवडी देतां जाई प्राण—कर्ण हा औदार्याविषयीं फार प्रसिद्ध होता; नांव कर्णाचें पण हातून कवडीहि सुटत नाहीं असा कृपण मनुष्य.

नाम उच्चारतां शब्दीं: अनेका पावती सिद्धि:—(महानु.) नुसतें परमेश्वराचें तोंडानें नांव घेतलें तरी किती लाभ होतात. नाम महिमा असाच आहे.

नाम उंदरी, सांगे सुंदरी—खरें नांव उंदरी असतां सुंदरी म्हणून सांगणारी. वरून दुसराच भास उत्पन्न करणारी.

नाम टिळे नायकांचे, घरीं हाल बायकांचे—वरून दिसावयास किंवा लौकिक मोठा नाईक म्हणून पण घरी पाहावें तों स्त्रियास पुरतें अन्नवस्त्रहि मिळत नाहीं अशी स्थिति. पोकळ वडेजाव.

नाम तारीत नाहीं, काम तारतें—आपले कामामुळें आपल्याला महत्त्व, प्रतिष्ठा. नांवाला कोणी विचारीत नाहीं.

नाम वडा, दरसन थोडा—१ नांव मोठें लक्षण खोटें याप्रमाणें, नांव मोठे ऐकून आशा धरून जावें तर निराशा पदरांत पडावयाची.–अन्योक्ति कल्पद्रुम. २ लहान मूर्ति, थोर कीर्ति.
—सवि १२२

नामे शाहा कमा खावे, नामे चोर मारा जावे—प्रसिद्ध राजाला मान मिळतो, पण प्रसिद्ध चोराला देहांत-शासन मिळतें.—सवि ६१. शाहा म्हणून नांव असलें व राज्य जरी नसलें तरी स्वत: कमवून तरी खातां येईल, कोणी त्रास देणार नाहीं. पण नांव जर चोर असेल तर फुकट मार मिळायचा किंवा फांशी जावयाची वेळ यावयाची. तेव्हां नांवानें कां होईना पण नीचाशीं संबंध असण्यापेक्षां थोरांशीं असलेला चांगला.

नामदार—नामदार तो नम्र फार—जो नामजाद, श्रेष्ठ असतो तो विनयी असतो.

नामा—नाम्या निराळा, धोकटी विठूचे गळां—नामदेवासारख्या भक्तांचीं लचांडें विठोबाला निस्तरावीं लागतात. भक्तांसाठीं देव झीज सोसतो पण भक्त आपला मोकळाच. करून सवरून नामानिराळा राहणारा मनुष्य. एखादी गोष्ट आपण करून त्याबद्दल दुसऱ्यास प्रायश्चित्त देणारा मनुष्य.

नाय—नाय, निरगूड, माका, ह्या तिहींचा घेइजे फांका आणि उडजाइजे पडलंका—(हिं.) नाय निर्गुड माका, तीनोका मारी फक्का, तो उडजाय लंका. नाय, निर्गुड व माका या तीन वनस्पतींचें सेवन केल्यास अतिशय बल येतें व लंकेपलीकडे उडून जाण्याची शक्ति येते.

नाय, निर्गुड, माका, सर्व औषधांचा काका—नाय, निर्गुड व माका या तीन औषधी सर्व औषधांत श्रेष्ठ आहेत. औषध पहा.

नायकीण—नायकिणीचा भाऊ—वेश्येचा भाऊ हा जगांतील सुखी प्राण्यांपैकीं एक आहे. नाइकीण पहा.

नायकिणी-कसबिणींच्या कांहीं खाणी नसतात—जन्मतःच नायकीण-कसबीण कोणी नसते, ती जन्मावरून पडलेली जात नव्हे तर चांगल्या समाजांतूनच अधःपतनानें अशा स्त्रिया तयार होतात.

नायकिणी दारां हति बांधलो, तिगेलो जालो—(गो.) कलावंतिणीच्या दारांत हत्ती बांधला कीं तो तिच्या मालकीचा झाला. नायकिणीच्या हातीं गेलेलें द्रव्य अथवा कोणतीहि लहान मोठी वस्तु परत मिळणें कठीण, अशा अर्थानें म्हणतात.

नायकिणीक दिलें आणि रेवें मुतलें सारखेंच—(गो.) नायकिणीला दिलें आणि वाळूंत मुतलें सारखेंच. वाळूंतलें मूत जसें आंतल्या आंत जिरतें तसेंच नायकीणीला दिलेल्या द्रव्याचें आहे. तु०—वाळूंत मुतलें फेस ना पाणी.

नायकिणीचें वय गोसाव्यानीं चोरलें—(न. चिं. केळकर कृत 'पाला पाचोळा') नायकीण नेहेमीं आपण तरुण म्हणून समजलें जावें यासाठीं वय कमी सांगते; याच्या उलट गोसावी हा आपण वृद्ध दिसावें व तसें समजण्यांत यावें म्हणून वय जास्त सांगतो.

नायकिणीच्या पोरा दिसाचा बापुय ना, रातची आवय ना—(गो.) नायकिणीच्या मुलाला दिवसाचा बाप दिसणें शक्य नाहीं व रात्रीच्या वेळीं आई मिळणें शक्य नाहीं. पुढें पहा.

नायकिणीच्या पोरास रात्री आई नाहीं, दिवसा बाप नाहीं—वरच्याप्रमाणें. वेश्येच्या मुलास दिवसा घरीं कोणी पुरुष नसल्यामुळें आपला बाप कोण तें कळत नाहीं व रात्रीं वेश्या त्याजवळ राहूं शकत नसल्यामुळें तो आईवेगळा असतो; अशी अर्धवट स्थिति.

नायटा—देवी देवळांत, आणि नायटे गांवांत; भवानी तुळजापुरीं आणि नायटे पृथ्वीभर—देवी देवळांत नी नायटे गांवांत पहा.

नार—नारीचें बोलणें, गवताचें शेकणें—ज्याप्रमाणें गवताचा शेक हा फार थोडा वेळ टिकतो त्याप्रमाणें स्त्रियांचें बोलणें हें वरवरचें असतें, पक्कें नसतें, क्षणिक असतें. गवत पहा.

नारद ~ नारदासारखी कळ लावी, जगीं म्हणतो मी गोसावी—नारद स्वतः गोसावी असून एकसारखीं भांडणें लावीत असतो. साधुत्वाचा आव आणून नसते उपद्व्याप करणारा.

नारवें ~ नारवेंचे चोर—(गो.) [डिचोली परगण्यांत नारवें हें एक गांव आहे.] नारवे गांवचे चोर म्हणजे अट्टल चोर. तु०—पुण्याचा भामटा. काशीकर.

नारसिंह ~ नारसिंहाचा अवतार धारण करणें—अतिशय, परमावधीचे रागावणें, संतप्त होणें. नरसिंहावतार घेणें पहा.

नारळ ~ नारळपंचा हातीं देणें—नारळ व वस्त्र देऊन पाठवणी करतात यावरून १ विन्मुख पाठविणें. २ हकालपट्टी करणें.

नारळ फुटणें—प्रारंभ होणें. कोणत्याहि शुभकार्याला आरंभ करतांना देवापुढें नारळ फोडतात, त्यावरून. 'माझ्या कार्याचा आयताच नारळ फुटला.' —दाजी १. २७.

नारळ हातीं देणें— १ निरोप देणें २ हाकलणें; काढून टाकणें.

नारळाची आई—करवंटी. भिकारी करवंटींतून भिक्षा मागतात यावरून भीक; अत्यंत दारिद्र्य. 'आणि ही नारळाची आई विसरलीस वाटतं...एकतर ही आई तेव्हां जेऊं घालील पाणी पिण्याच्याहि उपयोगीं पडेल.' —कमला.

नारलु गडगडेलो, पोळो कटकटेलो—(गो.) नारळ कुजायला आलेला आणि घावन करपलेला. एका बाईला घरांत चोरून खातांना पाहून मालकिणीनें विचारलें, 'कांग बया, घावन आणि खोबरें चोरून का खातेस ?' तेव्हां बाईनें उत्तर दिलें, 'अहो, तो नारळ कुजूं लागला होता आणि घावन करपला होता. फुकट जायच्या या दोन्ही वस्तु म्हणून खाऊन टाकल्या झालें.'

नारळहि पाहिजे व खोबरेंहि पाहिजे—दोन्हीकडून फायदे उपटणाऱ्या व्यक्तीबद्दल वापरतात. 'विवाह संस्थेच्या पावित्र्याची ऐट मिरवावयास पाहिजे, पण एकनिष्ठतेनें हजारों, लाखों बाला आचरीत असलेलें असिधाराव्रत टाळून "मन:पूतं समाचरेत्" चा परवानाही पाहिजे असा बालिश व अरेरावीचा हट्ट कसा चालेल.' — कमलाबाई टिळक, स्त्रीजीवनविषयक कांहीं प्रश्न, पान ७५

*** नारळांत पाणी, ही देवाची करणी**—नारळाची कवटी जाड असून आंत पाणी कसें उत्पन्न होतें ही गोष्ट परमेश्वरासच ठाऊक. देवाची लीला अगाध आहे तिचा मनुष्यास थांग लागणार नाहीं.

नाल्ल खातूल्यान् दैंठ पागार करूं जाय; नाल्ल खाल्ल्यानं दैंठ फारीक करूंकच जाय—(गो.) नारळ खाणारानें वरची देंठें मोजून दिलीं पाहिजेत. नाहींतर असुकच नारळ खाल्ले याला कांहीं आधार सांपडणार नाहीं. एखाद्या गोष्टीबद्दल पुरावा दिला पाहिजे असें सांगण्याऐवजीं म्हणतात.

नाल्ल तर म्होवो, नाल्लकारय रडता, तेलकारय रडता; नाल्लकारय रट्टा आनि तेलकारय रट्टा—(गो.) नारळ पहावा तर मोहाचा; पण इतर नारळांच्या भावानेंच तो स्वस्त खपणार म्हणून नारळवाला रडतो आणि तेलाला तो निरुपयोगी म्हणून तेलीहि रडतो. वस्तु कितीहि चांगली असो पण तिचा व्यवहारांत जर उपयोग झाला नाहीं तर तिच्यापासून खरा आनंद कोणालाहि होत नाहीं अशा अर्थानें म्हणतात.

नाल्ला दर आयली म्हुण बुकल्यांचेर घोणि व्हांवच्यो ?—(गो.) नारळाला भाव आला म्हणून बोक्याच्या पाठीवर का गोण्या वहायच्या आहेत ? एखाद्याला उर्जित काळ आला अन् त्यानें विचित्र वर्तन सुरू केलें तर म्हणतात.

नाल्ला राग कोयतेकडेन् धन्ना; नाल्ला राग फातराकडेन धटना—(गो.) नारळाचा राग कोयत्यापुढें टिकूं शकत नाहीं. प्रत्येकाचें कांहींना कांहींतरी मर्मस्थान असतेंच. केवढाहि उन्मत्त मनुष्य असो. तिथें पोंचला कीं तो नांगी टाकतोच.

नारायण ~ अडला नारायण गाढवाचे पाय धरी—अडलेला माणूस क्षुद्र पशूलाहि शरण जातो. अगतिक झालेला मनुष्य नीचाचीहीं विनवणी करूं लागतो. अडणें पहा.

नरकरणी करे तो नरका नारायण हो जाय—नर पहा.

नारायणीं जरी घडे अंतराय। हो कां बापमाय, त्यजावीं तीं ॥—तुकाराम. जर परमेश्वराची सेवा करण्यांत व्यत्यय येत असेल तर आईबापांचासुद्धां त्याग करावा.

नारायणीं जरी झालें तें ओंगळ। करावा संभाळ, लागे त्याचा ॥ —तुकाराम. परमेश्वराला जरी एखाद्याच्या ठिकाणीं एखादें व्यंग दिसलें तरी त्याबद्दल तो खंत वाटूं देत नाहीं. त्याची योग्य व्यवस्था करतो.

नारा-रा ~ नारो शंकरची घंटा—नाशीक येथें नारो शंकर राजेबहाद्दर यांनी बांधलेल्या घांटावरील देवळावर एक मोठी पोर्तुगीज घंटा आहे. ती नारो शंकराची घंटा. तिचा आवाज फार मोठा होतो. १ मोठा आरडाओरडा व गाजावाजा करणें. २ मोठमोठ्यानें बोलणारी स्त्री; भांडखोर स्त्री; कजाग बायको. —खे. स्व. २०.

* **मी आणि माझा नारा, दुसऱ्याचा न लागे वारा**—स्वतःची व स्वतःच्या मुलांची तेवढी काळजी घेणारा व दुसऱ्याकडे मुळींच लक्ष न देणारा मनुष्य. अतिशय स्वार्थी मनुष्य.

नाऱ्या जाणे बारा, तर केशा जाणे (साडे) तेरा—एकापेक्षां एक वरचढ, तु०—तुम झाडोझाड हम पतेपते.

नाऱ्या नागविला, न् तुक्या उजीवला—१ एका जवळून धन लुबाडून घेऊन त्याचा विनियोग भलताच कोणीतरी गृहस्थ याच्या उजविण्याच्या म्ह. लग्नाच्या कामीं केला. एका सत्कृत्यानें दुसऱ्या अपकृत्याचें पाप क्षालनाचा प्रयत्न झाला आहे; तु०— Rob Peter to Pay Paul २ (व.) आतां माझ्या घरीं पुढें काय समारंभ व्हायचा आहे. दोन मुलें होतीं. दोन्हीं मुलांचीं कार्यें कसींबसीं उरकलीं. आतां पुढें कांहीं कर्तव्य मला उरलें नाहीं. अशा भावानें या म्हणीचा उपयोग होतो.

नाऱ्याचें प्रायश्चित्त केऱ्याला (केश्याला)—एकाचा अपराध असतां भलत्यालाच शिक्षा करणें. तु०—चोर सोडून संन्याशाला सुळीं देणें.

नाऱ्यानें गावें, विठ्यानें ऐकावें—परस्परांची प्रशंसा करणारे लोक. तु०—अहो रूपमहो ध्वनिः

नारा ◌ **नारा नाचणें**—बेअब्रू होणें.

नारा नाचविणें—१ दंगा, उपद्रव करणें. २ थेरथेर करणें.

नारिकेल ◌ **नारिकेलपाकन्याय**—नारळ वरून ओबडधोबड रुक्ष दिसतो. पण तो सोलून फोडण्याचे श्रम केल्यावर आंतलें गोड खोबरें खावावयास मिळतें. वरून रुक्ष दिसण्याऱ्या वस्तूच्या–व्यक्तीच्या पोटांत माधुर्य दिसलें म्हणजे योजतात. "जे गतवृत्तांत अतज्ज्ञ जनांस बाह्यतः केवळ नीरस वाटतात, त्यांच्या आंत नारिकेलपाकन्यायानें अत्यंत आल्हाद-कारक व उत्साहप्रद असा रससंचय असतो." —नि. मा.

नाल ◌ **नाल तो मिल गया, अब क्या रहा? जीन और घोडा**—वास्तविक जीन व घोडा मोलाच्या जिनसा व नाल अगदींच थोड्या किंमतीचा व सहज मिळणारा. पण या म्हणींत उलट नाल तर मिळाला आतां काय जीन व घोडा सहज मिळवूं असें म्हटलें आहे. बिन किमतीच्या वस्तूला महत्त्व देतो पण मौल्यवान वस्तूला महत्त्वाची समजत नाहीं असा प्रकार घडल्यास ही म्हण लावतात. "आम्हाला घर बांधावयाचें आहे. त्यासाठीं आज लांकडें तर घेतलीं. आतां पैसा, जागा, माल मसाला, याची सोय झाली कीं घर तयार.' 'वा! तुम्हीं तर कमाल केली. कशास कांहीं ठिकाण नाहीं नी म्हणतां कीं घर तयार. नाल तो मील गया इ० प्रमाणें गत झाली.'"

नालकार ◌ **नालकार रट्टा नाळाक, तेलकार रट्टा तेलाक**—(गो.) नारळवाला नारळाकरितां रडतो, तेली तेलाकरितां रडतो. नारळविक्या ओरडतो कीं, आपले नारळ मोहाचे असून भाव नाहीं तर तेली ओरडतो कीं त्यांपासून पुरेसें तेल निघत नाहीं.

नाला ◌ **नाला ओढ्याला खळमळ फार**—नाले, ओढे नद्यांपेक्षां लहान असतात पण त्यांचें पाणी खळाळीनें वाहतें; तर मोठ्या नद्या संथपणानें वाहतात. तु०—उथळ पाण्यास खळखळ फार.

नाव ◌ **एका नावेंत असणें–बसणें**—[इंग्रजी To be in the same boat याचा अनुवाद.] एकाच परिस्थितींत, अडचणींत असणें. 'हिंदु आणि मुसलमान आपण सगळे सध्यां एका नावेंत आहों; आपलें हितसंबंध एक आहेत. मग आपण सख्या भावाप्रमाणें प्रेमानें व एकदिलानें कां वागूं नये.'

* **गाड्यावर नाव, नावेवर गाडा**—नाव तयार केल्यानंतर ती नदीपर्यंत नेण्यासाठीं गाड्यावर घालावी लागते, त्याचप्रमाणें नदीला पूर आला असतां पैल तीराला नेण्यासाठीं गाडा नावेवर घालावा लागतो. म्हणजे परस्परांची मदत लागते किंवा एकदां एक वरचढ एक खालीं असा सृष्टिक्रम चाललेला असतो. सर्व दिवस सारखे नसतात असा अर्थ.

नांव ◌ **नांव करणें–काढणें** — नांव, कीर्ति गाजविणें, प्रसिद्धि मिळविणें.

नांव काढणें—१ वाटेस जाणें; कुरापत काढणें; कळ लावणें; खोडी काढणें. २ अपकार करणें.

नांव खारणें—(कों.) नांव घेऊन निर्देश करणें; नांवाचा उल्लेख करणें. नांव घेणें.

नांव गांव विचारणें — चौकशी करणें; माहिती विचारणें; सामान्य विचारपूस करणें.

नांवग्रहण टाकणें–सोडणें—नांव टाकणें पहा.

नांवग्रहण (निशाण) ठाऊक नसणें—नांवागांवाची माहिती नसणें; कुल, शील, परंपरा इ. माहीत नसणें.

नांव जळो; नांवास हळद लागो—तळतळाट किंवा शाप देण्याचा वाक्प्रचार; नांवहि न राहो; नायनाट होवो.

नांव टाकणें—संबंध सोडणें; त्याग करणें; नांव सोडणें. 'सुधाकरः–तर काय तुझें नांव टाकूं?'—एकच प्याला, ३, १.

नांव (नांवें) ठेवणें.—१ दोष देणें; व्यंग काढणें; खोड काढणें. २ जन्मलेल्या मुलाचे नामकरण करणें.

नांव ठेवणें व फोडणें—(बायकी) खेळांत एखाद्या वेळीं दोन मुलींस एकदम शिवल्याचा प्रसंग येतो तेव्हां डाव कोणी घ्यावा ह्याविषयीं तंटा होतो त्यावेळीं त्या दोन्ही मुली एकमेकांच्या संमतीनें नांवें बदलून ठेवतात, मग त्यांतील एखाद्या मुलीस आपलीं नांवें सांगून तीं त्यांतील कुठलें नांव मागेल तें तिला देऊन उरलेल्या नांवाच्या मुलीनें डाव घ्यावयाचा असतो; एकप्रकारचें चकणें.

नांव डहाळ होणें—(ना.) बदनामी होणें; अपकीर्ती होणें; नांवास कलंक लागणें.

नांव डालणें—(परदेशी तेली) प्रेताच्या सारवलेल्या जागेवर केळीचें पान ठेवून त्यावर प्रत्येक मनुष्यानें मयताचें नांव घेऊन कालवलेल्या भाताचा घास ठेवणें—बदलापूर २६७. मृतास पिंड देणें; तिलांजलीप्रमाणें पिंडदान करणें.

नांव डाहोर करणें—(व. ना.) नांव बद्दू करण; नांवास बट्टा लावणें.

ज्याचें नांव तें—(नांव घेण्यास अयोग्य अथवा अमंगल म्हणून ज्याचें नांव घेतलें नाहीं तो अथवा तें) जें पाहिजे असतें अथवा ज्याची आशा केलेली असते तें (कधीं न देणाऱ्या करणाऱ्या मनुष्य-वस्तु इ० संबंधीं योजतात.)

नांव धुळींत-मातींत-पाण्यांत इ०त जाणें-मिळणें-पडणें—नांवावर पाणी घालणें पहा; नांव बद्दू होणें; नांव नाहींसें होणें.

नांव न काढणें—१ विचारपूस न करणें. २ चुकून देखील नांवाचा उच्चार न करणें. 'त्याचें नांवसुद्धां काढूं नकोस, माझ्या अंगाची लाही होते.' पुढें पहा.

नांव न घेणें—अलिप्त राहणें; संबंध न ठेवणें; नांव न काढणें. —मोशांति १. १६.

नांव नको !—तिटकारा, चिळस, द्वेष दाखविणारा उद्गार. नांवाचा उच्चारहि सहन होत नाहीं अशी स्थिति.

नांव नाहीं !—१ (विद्या, पैसा इ०कांचा) पूर्णपणें अभाव असणें. २ नांव, निशाण, खूण कांहीं नसणें; मागमूस नसणें; अल्पांशहि नसणें.

नांव बदलणें—चालू नांवास बट्टा लागल्यामुळें तें टाकून नवें घेण्याची पाळी येणें; चालू नांवास कलंक लागून तें नकोसें होणें; नामोशी पत्करणें (प्रतिज्ञेच्या वेळीं योजतात). 'अमूक झालें तर नांव बदलून टाकीन.'

नांव बसणें—घर बुडणें. —ख. २७८५.

नांव मिळविणें—वादविवाद, लढाई इ० मध्यें कीर्ति मिळविणें; प्रसिद्धि मिळविणें; विजयी होणें.

नांव राखणें—पूर्वीची कीर्ति, लौकिक सांभाळणें. 'यास्तव सर्वेहि रक्षूं, आजि करूनि यत्न, नांव रायाचें ॥' —मोद्रोण ३. १२१

नांव राशीस उतरणें-जमणें-येणें—(वधूवरांच्या) कुंडल्या जमणें; विवाहास योग्य गुण उतरणें.

नांवसांगणी—वाङ्निश्चय; कुणब्यांतील वधूवरांचीं व त्यांच्या मात्यापित्यांचीं नांवें जातीच्या सभेमध्यें जाहीर करून लग्न ठरविण्याचा समारंभ.

नांव सांगणें-लावणें-घालणें-देणें—किंमत, शर्ती ठरविणें.

नांव सोडणें-टाकणें—त्याग करणें; संबंध सोडणें; इच्छा न करणें.

नांवाचा—१ खरा; आईबापांनीं दिलेलें नांव लावण्यास लायक. 'मी तें काम करीन तरच नांवाचा.' २ नामधारी; केवळ नांवापुरता. 'मी जॉन्सनचा नांवाचा मात्र गुरु होतों, खरोखर पहातां तो माझ्याहून वरचढ होता.'–नि. ३ चांगलें नांव लौकिक असलेला; नामवंत.

नांवाची द्वाही असणें—शपथ असणें. 'शहाजी राजे, याउपर जाधवरावांशीं भांडणाचा एकमुद्धां शद्ध बोलाल तर तुम्हांला माझ्या नांवाची द्वाही आहे !' —शि. सं. २, २.

नांवाची बोंब पडणें—वाईट गोष्टीला कारणीभूत होणें किंवा एखाद्या तक्रारीचा विषय होऊन बसणें; नांवानें ओरड होणें, हांकाटी होणें.

नांवानें आंघोळ करून मोकळा होणें—सोयरा, आप्त मेल्यावर त्याच्या नांवानें आंघोळ करतात व कायमचा संबंध सुटला असें मानतात. यावरून संबंध सोडणें. आपण कांहीं एक यापुढें लागत नाहीं असें करणें. 'तुझ्या नांवानें आंघोळ करून मोकळा होईन !' —एकच प्याला, ३, २.

नांवानें घागर फोडणें—उत्तरक्रियेंत क्रिया करणारा प्रेताभोंवती प्रदक्षिणा करून खांद्यावरची घागर खालीं टाकून देतो, यावरून संबंध तोडणें; मेला असें समजणें. 'तियेचेनि नांवें फोडावी घागरी। नाहीं ते संसारीं वहिणी म्हणे॥'--ब.४७०.

नांवानें पाणी तावणें-तापविणें—एखाद्याचा द्वेष करणें किंवा मरण चिंतणें. एखादा नातेवाईक मेला म्हणजे त्याच्या नांवानें स्नान करून त्याचा सुतक संबंध वगैरे सोडतात. त्याकरितां पाणी तापवून स्नान करून मोकळें होणें.

नांवानें पूज्य असणें—पूर्ण अभाव असणें; संपलेलें असणें; जाग्यावर नसणें. 'विद्येच्या नांवानें जरी आवळ्याएवढें (पूज्य) म्हणतां येणार नाहीं तरी मासला तोच ।' मधली स्थिति.

नांवानें बोंब मारणें-शंख करणें-खडे फोडणें—एखाद्याविरुद्ध बोभाटा, ओरड करणें; तक्रार करणें; कागाळ्या करणें; दोष देणें; शिव्या देणें; तळतळाट करणें.

नांवानें भंडार उधळणें — उदोउदो करणें; स्तुति करणें; प्रशंसा करणें; नांवाजणें.

नांवानें शंख—पूर्ण अभाव असणें; शिल्लक नसणें.

नांवानें शंख करणें; नांवानें हांका मारीत बसणें—दुसऱ्यानें नुकसान केलें अशी विनाकारण ओरड करीत सुटणें; तक्रार करणें; शिव्याशाप देणें; तळतळाट करणें. 'मग तूंच उलटी माझ्या नांवानें हांका मारीत सुटशील !'

—एकच प्याला १. १.

नांवावर गोवऱ्या फोडणें-घालणें-रचणें —(गोवऱ्या प्रेतास जाळण्यास लागतात.) एखाद्याचें वाईट करणें-चिंतणें; शाप देणें; मरण इच्छिणें.

नांवावर पाणी घालणें—तर्पण करण्याचा प्रकार. कीर्तीवर पाणी सोडणें; चांगलें नांव, लौकिक बुडविणें.

नांवावर विकणें—एखाद्या तिसऱ्याच व्यक्तीशीं संबंध असल्यामुळें ज्ञात होणें; एखाद्यामार्फत पुढें येणें; वशिल्यानें महत्व प्राप्त करून घेणें. स्वतःच्या नुसत्या किंवा दुसऱ्या-मोठ्याच्या नांवाचा फायदा घेणें, त्यावर नांव, प्रसिद्धि मिळविणें, त्यावर माल खपणें.

नांवास-नांवारूपास चढणें—कीर्तिमान होणें; लौकिक वाढणें; प्रसिद्धीस येणें; बोलबाला होणें.

नांवास देखील नाहीं—मुळींच नाहीं; निर्देश करण्या-इतकासुद्धां नसणें; पूर्ण अभाव. शपथेस किंवा नांव घेण्यास देखील नाहीं.

नांवारूपास आणणें-येणें — प्रसिद्धीस, मान्यतेस आणणें-येणें; चांगल्या दशेस आणणें; ऊर्जित दशेस आणणें.

* **नांव अन्नपूर्णा, टोपल्यांत भाकर उरेना**—नांवानें जगाला अन्नाचा पुरवठा करणारी पण स्वतःलाच पुरेसें अन्न न मिळणारी. 'नांव सोनुबाई हातीं कथलाचा वाळा' याचप्रमाणें; नांव मोठें लक्षण खोटें.

घाम गाळील तो नांव काढील—जो श्रम, खटपट करील त्याचेंच नांव पुढें येणार, तोच कीर्ति मिळवील.

नांव गंगाबाई, रांजणांत पाणी नाहीं—गंगा म्हटली म्हणजे पाण्याची समृद्धता, पण येथें रांजणांत देखील पाणी नाहीं.

नांव गोड, पण वाईट खोड—नांवाप्रमाणें कृति नाहीं तेव्हां म्हणतात.

नांव ठेवी लोकाला, शेंबूड आपल्या नाकाला—आपण हांसतो० पहा. पाठभेद—मी हांसें लोकाला, शेंबूड माझ्या नाकाला.

नांव देवाचें आणि गांव पुजाऱ्याचें—देवाच्या नांवानें इनामगांव मिळवावयाचा पण त्याचा उपभोग मात्र पुजाऱ्यानें स्वतः घ्यावयाचा. झांकून स्वार्थ.

नांव नावराचें, सुख मातब्बराचें — गरीबासाठीं एखादी योजना करावी आणि तिचा फायदा श्रीमंतांनीं घ्यावा.

नांव पळेल्यारि कुबेर, घारा तपिल उमती—(गो.) नांव पहावें तर कुबेर पण घरीं तपेली पालथी.

नांव बडा, मुशारा थोडा—(गो.) नांव बडें आणि वेतन थोडें.

नांव महीपती, तिळभर जागा नाहीं हातीं—नांवानें पृथ्वीचा राजा पण वसावयास मुळींच सत्तेची जागा नाहीं अशी स्थिति. वर पहा.

नांव मोठें, पण लक्षण खोटें—प्रसिद्धी फार व वागणूक भिकार. कीर्तीला बट्टा लावणारी कृति.

नांव लक्ष्मी, वेंचिते गोवऱ्या—नांव सोनूबाई० इ. पहा.

नांव सगुणाबाई, पण करणी कव्यादेची—नांव सद्गुणी अर्थाचें पण वागणूक क्रूरपणाची. नांवाच्या उलट कृति करणारी स्त्री.

नांव सांगावें पण गांव सांगूं नये—स्वतःचें नांव सांगितलेलें चालेल पण आपण ज्या गांवचें असूं त्या गांवाचें नांव सांगूं नये. कारण आपल्या बऱ्यावाईट वागणुकीवरून आपली स्वतःची किंमत होते ती आपल्या बाबतींत कशीहि असली तरी चालते पण निदान आपल्या वागणुकीवरून आपल्या गांवाच्या नांवास तरी बट्टा लागूं नये.

नांव सांगावें लक्षापति, आपण भिक्षा मागत असावी—नांव मोठें लक्षण खोटें याप्रमाणें. वर पहा.

—गोप १५९

नांव सोनुबाई हातीं कथलाचा वाळा—केवळ नांव सोनुबाई असल्यानें ती श्रीमंत ठरत नाहीं. नांवाची सोनुबाई असेल पण ती दरिद्री असल्यामुळें सोन्याच्या वाळ्या-ऐवजीं कथलाचेच वाळे तिच्या हातांत दिसतात. पोकळ श्रीमंती आढळून आली म्हणजे असें म्हणतात.

नांव होड, करणी सानि—(गो.) नांव मोठें आणि करणी लहान.

नांवाचा नाईक, पण जगाचा पाईक—वरील प्रमाणेंच. पुढारी, राजा वगैरे लोकांचे नोकर असतात.

नावडणें ~ नावडे वरा, ती नावडे अवघ्या घरा—(महानु.) जी नवऱ्याला नकोशी होते ती स्त्री सर्व घरादारालाच नकोशी होते. नवऱ्यामुळेंच तिचें घराशीं सूत असतें. एकदां कां नवऱ्यानें तिला टाकलें की तिला कोणी वाली असत नाहीं.

नावडती ~ नावडतीचें मीठ अळणी—मीठ हें कोणीहि वाढलें तरी खारट असणारच; पण नावडतीनें वाढल्यास अळणी वाटतें ! नावडत्या माणसानें कांहींहि केलें तरी तें वाईट लागतें. "अशाप्रकारें स्वराष्ट्रीय मनोरंजनाच्या प्रत्येक प्रकारास, ह्या नाहीं त्या कारणानें, नांवें ठेवण्यांत 'नावडतीचें मीठ अळणी' ठरविण्यांत येऊं लागलें." —छ. च. १०५

नावडतीचें मीठ अळणी, आवडतीचा शेंबूड गोड—वरील प्रमाणें. आवडत्या माणसानें कांहीं केलें तरी तें गोड लागतें.

नावडीची (नावडतीची) आली पाळी, गांवाची झाली होळी—बहुधां कधीं नावडतीवर चांगल्या गोष्टीची पाळी येत नाहीं. पण सुदैवानें तशी कधीं काळीं आलीच तर तिचें दुर्दैव आड येतें व त्या गोष्टीचें कारणच संपतें ! कधीं न लाभणारें भाग्य जर कांहीं अकल्पित कारणामुळें लाभूं शकलें नाहीं, तर त्यावेळीं म्हणतात.

नांवाजणें ~ नांवाजलेला गुरव देवळांत मुतला—ज्याची विशेष प्रशंसा करावी त्याच्याच हातून प्रमाद घडणें. तु०—भरवंशाच्या म्हशीस टोणगा.

आवाजी आवाजी, आपलेच कुले नांवाजी—स्वतः भोंवती दिवे ओवाळून घेणारी; स्वतःचा बडेजाव सांगणारी व्यक्ति.

नाशिक ~ शंभर काशीकर, एक नाशिककर—नाशिककर इतका लबाड असतो तो शंभर काशीकरांसहि फसवूं शकतो; काशीकर हा एक लबाड तर नाशिककर शतपट लबाड ! ही जुनी समजूत दिसते व तिला कांहीं कारणेंहि असावींत.

नाशिककर, काशीकर, गांठ पडली वेळेवर—दोन लबाड लोकांची गांठ पडली म्हणजे म्हणतात. तु०–गांठ पडली ठकाठका.

नाशिक गेलें त्रिंबकास, नाशिक परगणा ओसाड; नाशिक त्रिंबकास जाणें, नाशिक परगणा ओसाड असणें—[नाशिक = नाक] नाक बसकें किंवा अपुरें असणें. नकट्या माणसाला याप्रमाणें चिडवितात.

नाशिकची कल्हई-जिल्हई आणि पैठणचा आदर—नाशिकास भांड्यांना जशी झिलई दिली जाते तशी इतरत्र आढळत नाहीं. म्हणजे त्या भांड्यांची वरवर झांक चांगली, त्याचप्रमाणें पैठणला नुसता दरबारी आदर. यावरून पोकळ आदर–खुशामत (मनापासून नव्हे); वर करणी प्रेम, खुशामत, गौरव वगैरे.

नासणें ~ नासलीं मिरीं, जोंधळयांपेक्षां वरीं; नासलीं मिरीं जोंधळयाला हार जात नाहीं – जोंधळयाबरोबर विकत नाहीं—मिरीं कितीहि खराब झालीं तरी त्यांचा गुण जोंधळयापेक्षां केव्हांहि अधिकच राहणार. उंची वस्तु किंवा व्यक्ति अगदीं हीन दशेस आली, तरी मूळच्या हीन दर्जाच्या वस्तू–व्यक्तीपेक्षां श्रेष्ठच राहणार. जोंधळा पहा.

नासलें फळ दुसऱ्या फळा, नासून हरी त्याची कळा— आढींतील किंवा टोपलींतील एक फळ नासलें म्हणजे त्याच्या संसर्गानें दुसरीं फळें नासतात. एक मुलगा बिघडला म्हणजे तो दुसऱ्या मुलांस बिघडवितो.

नासलें मिरें का केजास महाग झालें ?—(व.) लहानसा धान्यराशी देऊन त्या मोबदल्यांत जुजबी जिन्नस खरीदल्या जातात त्या छोट्या धान्यराशीला केजा म्हणतात. ही देवघेवीची पद्धत खेड्यापाड्यांतून अजूनहि आढळते. मिरें कितीहि नासलें, निरुपयोगी झालें, तरी तें कधीं इतकें स्वस्त होईल कीं तें केजावर घेण्याच्याहि लायकीचें राहणार नाहीं ? नाहीं. केजाच्या मोलापेक्षां त्याचें मोल सदैव जास्तच राहील. चांगली वस्तू, गोष्ट कितीहि निकृष्ट दशेस पोचली तरी हीन, क्षुद्र वर्गांतल्या वस्तूपेक्षां केव्हांहि भारीच वाटेल. नासलीं मिरीं० पहा.

नासल्या गीताचा तनाना—गाणें गातां येत नसलें म्हणजे कसें तरी बेसूर आलाप काढीत राहिलें असतां ते कर्णकटु होतात.

नासिका ~ नाशिका विणु शृंगार—(महानु.) नाक नसल्यावर शृंगाराची काय शोभा ? मुख्य नाक हवें. मुख्य गोष्ट नसून इतर त्याला पोषक गोष्टी असतील तर त्या काय कामाच्या !

नास्त ~ नास्त भाकणें—(नाहीं नाहीं म्हणणें) १ दारिद्र्याचें ढोंग करणें. २ नुकसानीचें भाकित करणें.

नास्ति ~ नास्ति धान्यसमं प्रियम् ।—अन्नासारखी प्रिय वस्तु दुसरी कोणतीहि नाहीं. सबंध श्लोकः— नास्ति मेघसमं तोयं नास्ति चात्मसमं बलम् । नास्ति चक्षुःसमं तेजो नास्ति धान्यसमं प्रियम् ॥ —सुर. १५९-२८८

नास्ति नष्टे विचारः ।— समाजाच्या रसातळास गेलेल्या मनुष्याच्या ठिकाणीं विचार कोठून असणार? सबंध श्लोकः — भिक्षो कन्था श्लथाते नहि शफरिवधे जालमश्नासि मत्स्यां । स्ते वै मद्योपदंशाः पिबसि मधुसमं वेश्यया यासि वेश्याम् ॥ दत्वांघ्रिं मूर्ध्नरीणां तव किमु रिपवो भित्ति भेत्तास्मि येषां । चोरोसि द्यूतहेतोस्त्वयि सकलमिदं नास्ति नष्टे विचारः ॥ —सुर. ६२–२८० तु० — भिक्षोमांसनिषेवणं प्रकुरुषे किं तेन मद्यं विना । मद्यं चापि तव प्रियं प्रियमहो वारांगनाभिः सह । वेश्या द्रव्यरुचिः कुतस्तवधनं द्यूतेन चौर्येण वा । चौर्यद्यूतपरिग्रहोपि भवतो नष्टस्य कान्या गतिः ॥ —सुर. ६१-२७१

नास्ति प्राणात् परं प्रियं ।—प्राणापेक्षां दुसरी कोणतीहि प्रिय गोष्ट नाहीं.

नास्ति यस्य गृहे माता, तस्य माता हरीतकी ।—ज्याच्या घरांत आई शरीराचें स्वास्थ्य राखण्यास नसेल त्याला हिरडा आईप्रमाणें आहे. दीक्षितकृत अण्णासाहेब पटवर्धन यांचें चरित्र, पान ८७.

नाहणें ~ नाहूं लागणें—१ विटाळशी होऊं लागणें; पदर येणें; न्हातीधुती होणें. २ वयांत येणें.

नाहीं ~ नाहीं करणें—१ नाश, नष्ट करणें. 'नाहीं करील दुर्जन शत्रू...' —मुआदि २७-२०३. २ नाहीं असें दाखविणें. —एभा २८-५०३

नाहीं तेंच—अशक्य कोटींतलें; भलतेंच कांहीं.

***नाहीं उचलण्याची शक्ति, त्यावर भार घालिती**—ज्याला उचलण्याची शक्ति नाहीं त्याचेवर भार घालतात. ज्याच्या हातून काम होणार नाहीं त्याला सांगून काय उपयोग?

नाहीं काष्ठाचा गुमान । गोवी भ्रमरा सुमन ॥—ज्या भ्रमरास मोठीं लांकडें कोरण्याची खातर नसते, त्या भ्रमरास सुगंधी कमळ आपल्यामध्यें गुंतवून ठेवितें. नाजुक बंधनें हीं कठिण बंधनांपेक्षां तोडावयास कठिण असतात. —तुगा (जोग) १२८२

नाहीं काळ अनुकूल, ऐसें म्हणत असती सगळे—नालायक लोक आपणास परिस्थिति अनुकूल नाहीं असें नेहमीं म्हणत असतात. जे कर्तबगार असतात ते अशी कुरकुर कधीं करीत नाहींत; ते पुढें आलेलें काम परिस्थिति कशीहि असली तरी पार पाडतात.

नाहीं गुणाचें, बोलून घेईल कुणाचें—गुणी मनुष्य असेल तो दुसऱ्याचे गैरवाजवी शब्द कधीं ऐकून घेणार नाहीं. ज्याच्या अंगीं गुण नाहींत त्याला कोणीहि बोलावें.

नाहीं देवापाशीं मोक्षाचें गाठोडें । आणुनि निराळें द्यावें हातीं ।— देवाच्याजवळ हातीं आणून देण्यासारखें मोक्षाचें गाठोडें नाहीं. तो मोक्ष आपणच आपल्या भक्तीनें मिळवावा लागतो. —तुगा (जोग) ३३६४

नाहीं धरायला डहाळी, नाहीं धरायला मुळी—कोठें कांहीं आसरा नाहीं अशी अनाथ स्थिति.

नाहीं नाहीं म्हणती, खालीं जागा झाडिती—नाहीं नाहीं म्हणत जागा वगैरे साफ करून ठाणें देण्याची तयारी करावयाची; नको नको म्हणत चंबुगवाळें टाकावयाचें. बहुधां स्त्रियांचा नकार हा वरपांगी असतो.

नाहीं नाहीं म्हणतो, कोंबून कोंबून भरितो—वरवर मात्र नाहीं, मला नको असें म्हणावयाचें पण आंतून घरांत ठेवण्यास जागा नाहीं असा संग्रह करतो. ढोंगीपणा. तु०—नको नको, पायलीचे चाखो.

नाहीं निर्मळ जीवन । काय करील साबण ॥—पाणी स्वच्छ नसेल तर पुष्कळ साबण नासला तरी कपडा स्वच्छ निघणार नाहीं. तसेंच वठलेल्या वृक्षास वसंतकाळांतहि फूल किंवा फळ येणें शक्य नाहीं. जेथें मूळांतच नाहीं तेथें वरवरच्या साधनांचा कांहीं उपयोग होत नाहीं. 'नाहीं० ।' वृक्ष न धरी पुष्पफळ । काय करी वसंतकाळ ॥' —तुगा (जोग) ३८१

नाहीं प्रपंच, ना परमार्थ—नीट संसारहि करतां येईना व परमार्थाच्या गोष्टीहि सुचेनात. अर्धवट मनुष्य. —एकनाथ. तु०—ना घरबारी, ना गोसावी.

नाहीं वर्ण धर्म याती । नामीं अवघेची सरती ।—परमेश्वराचें नांव घेतलें असतां सर्व लोक तरून जातात; त्यांच्या आड वर्ण, जाती, धर्म वगैरे कांहीं येत नाहीं. परमेश्वर नामाचा महिमा अगाध आहे. —तुकाराम

नाहू ~ पक्षांत काऊ आणि माणसांत नाहू—ज्याप्रमाणें सर्व पक्ष्यांत कावळा लबाड आहे, त्याप्रमाणें सर्व मनुष्य जातींत न्हावी हा लबाड असतो, अशी समजूत आहे. नराणां नापितो धूर्तः पक्षिणां चैव वायसः । चतुष्पदां शृगालस्तु स्वेच्छाचारी तपस्विनाम् ॥ —सुर. १५९-२७९

नाळ—**नाळ गुळॉ पाच्छाचॉ, फार मारू कितें ?**—तोफा आणि दारूगोळा बादशहाचा; हवे तसे बार काढावे. हरकत कोणती ? दुसऱ्याच्या द्रव्यावर आपली हौस भागवून घेणाऱ्या माणसाला उद्देशून म्हणतात.

निकर—**निकर करणें**—निकरावर येणें; पराकाष्ठा करणें; जिकिर करणें.

निकरा (निकुरा) जाणें—फारच वाढणें; वर्दळीवर येणें; कडेस पोंचणें; शेवटास जाणें. 'निकरा जाईल रांडोळी। आम्हां आणि रुक्मिया।'—एरुस्व ६-९ 'माझी मांझी म्हणतां विवादें। गेले निकुरा।' —कथा ५-१३-१३७

निकलणें—**निकलून शिकलून**—(बालभाषा) निपटून चिपटून; चाटून पुसून.

निकलना—**निकल गया पाणी, सुखी रहो भवानी**—निर्वेधपणा प्राप्त झाल्यावर म्हणतात.

निकस—**निकसून टाकणें**—(व.) हिणवणें; तुच्छ करणें.

निकाल—**निकाल लावणें**—१ स्वच्छ करणें. २ शेवट करणें; संपविणें. ३ ठार करणें.

निकालांत काढणें—भांडण, प्रश्न, मिटविणें; निर्णय करणें. 'भावाभावांनीं आपआपसांत संगनमत करून वडिलार्जित इस्टेटीचा तंटा निकालांत काढला.'

निखरण—**निखरणीचे दिवस**—अगदीं स्वच्छ, निरभ्र दिवस.

निखरून शिकरून खाई, आणि आजोळा जाई—ताटांतील शेवटचा घास मुलास देत असतांना मुलास म्हणतात. मुलानें सर्व खावें, टाकून देऊं नये म्हणून त्याची समजूत करीत असतात. 'निकलून शिकलून' पहा. 'निखरून शिकरून खाई तो राजा होई' असेंहि म्हणतात.

निखारा—**निखारा देणें**—(जठराग्नि प्रज्वलित करण्यावरून) उपाशी राहाणें; भूक मारणें.

निखारा घरावर ठेवणें—१ एखाद्याची दुष्कृत्यें बाहेर काढून त्याची निर्भर्त्सना करणें. २ भयंकर नुकसान करणें.

निखारा पदरांत बांधून फिरणें—दुष्ट मनुष्याच्या संगतीस राहणें; नीच मनुष्यास आश्रय देणें, पदरीं बाळगणें. अस्तनींतील निखारा.

निखारा पोटांत पडणें—कडकडीत भूक लागणें.

निखाऱ्याचें करणें—जेवणखाण करणें; पोटाकडे लक्ष देणें.

निखाऱ्यावर भाजणें-भाजून खाणें—सळो का पळो करणें; फार छळणें. 'ज्यांनीं सतत सोळा वर्षे मला निखाऱ्यावर भाजून खाल्लें त्या अच्युतरावांच्या आंतल्या मनाच्या एका कोंपऱ्यांत माझ्याविषयीं खरी आदरबुद्धि होती.'

—न. चिं. केळकर-गतगोष्टी

* **आपल्या पोळीवर निखारे कोण न ओढी ?**—मनुष्य हा स्वभावतःच स्वार्थी असतो तो आपली पोळी नीट भाजली जावी म्हणून आपल्या पोळीवर तेवढे निखारे ओढून घेतो.

निगरगट—**तूं कर वटवट, मी आहें निगरगट; तूं करीत जा कटकट, मी झालों निगरगट**—कोडग्या मनुष्याला एकदां एखादी संवय झाली म्हणजे कितीहि बोललें तरी त्याचें कांही वाटत नाहींसे होतें.

निग्रह—**निग्रह करणें**—१ प्रतिबंध करणें; शिक्षा करणें. 'निग्रहानुग्रहीं दक्ष अम्हि जाण हें' —शाकुंतल. २ जातीबाहेर टाकणें.

निग्रहपत्र देणें—ज्ञातीबाहेर टाकल्याबद्दलचें लेखानें प्रसिद्ध करणें.

निघणें—**निघतें घेणें**—पाय काढणें; माघार घेणें.

* **निघेल तें केरमाती, राहील तें माणिक-मोती**—(वांय.) झालें तें वाईट व आहे तें चांगलें, अशा समाधानवृत्तीनें वागावें. तु०—वाहिली ती गंगा, राहिलें तें तीर्थ.

निघरा—**निघरा जालें घरः घरच्या गोसाव्या जाली वोसरीः**—(महानु.) ज्याला घर नाहीं त्यानें दुसऱ्याकडे येऊन घर करावें, म्हणजे त्या घरच्या धन्याला घर राहात नाहीं; ओसरीप्रमाणें त्याला स्वतःचें घर अडचणीचें होऊन बसतें. पाहुणा येऊन मालक बनतो याप्रमाणें. तु०—भटाला दिली ओसरी० एक पाहुणा तर घर पाहुणें.

निज—**निजेवांचून (शिवाय) पूजा नाहीं**—१ कांहीं माणसें स्वतःसच फार श्रेष्ठ समजतात, इतरांस मान देत नाहींत. २ स्वकीयांवाचून इतरत्र आपला आदर होत नाहीं. आपलेपणाशिवाय प्रेम वाटत नाहीं. There is no worship (service) except for self.

निजणें—**निजलें-जागलें राहणें**—१ कर्जाची अर्धवट फेड करणें. २ साटेंलोटें करणें. 'शेटजी —सगळीच रक्कम कशी ठेवूं ? निजलें जागलें राहिलें पाहिजे.'

—खे स्व. १५४

निजल्या जागीं विकणें—१ कारवाई करून काम साधणें; २ बोटांवर नाचविणें.

निजतां आला मोहो। वीतां म्हणे मेला गोहो॥—नवऱ्याशीं संबंध ठेवण्याचा तर मोठा मोह होतो पण बाळंतपणाच्या वेळीं तीच नवऱ्याला शिव्या घालते. त्यावेळीं प्रसूति वैराग्य येतें. आरंभीं सुख पण परिणामीं दुःख देणाऱ्या गोष्टीविषयीं पहिल्यापासून सावध राहिलें पाहिजे. — तुगा ३०३८

निजलें कुत्रें उठवा कां? — निजलेल्या कुत्र्याला आपणच होऊन मुद्दाम जागें करून आपल्या अंगावर भुंकण्याची व चावण्याची संधि देण्यांत काय फायदा? आपण होऊन एखादी आपत्ति आपल्या अंगावर ओढवून घेण्यांत अर्थ नसतो.

निजलेल्याला कोणी उठवील, जाग्याला कोण उठवील?—एखादा मनुष्य जाणूनबुजून जर आडरानांत शिरत असेल तर त्याला वाटेवर कसा आणावयाचा. चुकलेल्यास मार्ग दाखवितां येतो.

निजलेल्यास जागें करतां येईल पण जाग्यास कोण जागें करणार?—वरीलप्रमाणेंच. —टि. ४४-६५

निजल्या सिंहाच्या तोंडीं, श्वापदें आपण न घालितीं उडी—उद्योगावांचून थोरास देखील बसल्याठिकाणीं खावयास मिळत नाहीं. तु०—नहि सुप्तस्य सिंहस्य प्रविशन्ति मुखे मृगाः।

निजानीज—**निजानीज झाली, घुबडें बाहेर आलीं**—घुबड ज्याप्रमाणें काळोखांत रात्रीं बाहेर पडतें त्याप्रमाणें जिकडे तिकडे सामसूम झाली म्हणजे जारिणी स्त्री, किंवा दुष्ट व्यक्ति घराबाहेर पडते.

निजाम—**निजाम आणि हजाम; एक निजाम और सब हजाम**—दक्षिणेंत एक निजाम तेवढा शाहणा व बलाढ्य, बाकी सर्व कुचकामाचे. पेशवाईकालीन म्हण. याच्या जोडीची म्हण—'एक बाजी और सब पाजी.' 'एक बाजी' पहा.

निठवें—**निठव्यांत घालून (वर) आठवें झांकण ठेवावें**—निठवें म्हणजे अर्धा शेर व आठवें म्हणजे छटाक. तेव्हां निठव्यांत धान्य भरलें असतां त्यावर लहान माप झांकण कसें ठेवतां येईल?

निढळ—**निढळाचा घाम**—कपाळाचा घाम. स्वतः श्रम करून एखादी गोष्ट प्राप्त करून घ्यावयाची म्हणजे घाम गाळावा लागतो. सुखासुखी मिळत नसते.

निढळींचा घाम भुडळींत जाणें—(व.) [भुदरीचा अपभ्रंश भुडळी. भुदरी—जमिनीला असलेली दरी; भेग; छिद्र] जबर श्रम शरीराला झाले म्हणजे प्रथम निटिल प्रदेशाला घाम येऊन तो हळूहळू उतरत उतरत गुदद्वारापर्यंत उतरतो. गुदद्वाराला येथें भुडळीची उपमा दिली आहे. यावरून अत्यंत परिश्रम होणें. 'निढळींचा घाम भुडळींत जातो तेव्हां चार आणे मिळतात.'

निढळाच्या घामाची मजुरी—अतिशय श्रम करून मिळविलेली मजुरी; योग्य रीतीनें मिळविलेला पैसा.

नितणणें—**नितणून उठणें** — माणसांतून उठणें; अब्रूची चाड न बाळगतां हवें तसें वागणें. 'तो एक माणुसकींतून नितणून उठला आहे. मला तसें कसें करतां येईल?'

नितांतणें—**नितांतल्या बायकोला बुरांडला दादल्या**—(कों.) भोगोत्सुक उठवळ बायकोला षंढ नवरा.

नितांतल्या शिरीं नातू दाल्ला करी—(व.) अडला नारायण गाढवाचे पाय धरी याप्रमाणें.

नितांतले भूत कोंडवळ्या राजी—ज्यास खाण्यास मिळत नाहीं असें पिशाच कोंडवळ्यास कबूल होतें. गरजेच्या पोटीं कांहींहि चालतें.

नितांतल्याला मसण गोड — एकलकोंडे स्वभावाचा.

नित्य—**नित्याखालीं पडणें - येणें** — नेहमींच्या परिपाठांत पडणें; सवईचें होणें; सरावांत येणें.

* **नित्य उद्योगानें मोह जाय, मोह गेल्या सिद्ध उपाय**—नेहमीं उद्योगांत मन गुंतवून ठेवलें असलें म्हणजे तें इतर गोष्टींकडे वळत नाहीं व इतर मोहांपासून अलिप्त राहिलें म्हणजे स्वीकृत कार्य पार पडतें. Constant occupation prevents temptation.—Italian—सवि. ७०५ तु० —Idle (Vacant) mind is Satan's workshop.

नित्य कर्माची रहाटी, संत न टाकिती संकटीं—श्रेष्ठ लोक संकटांत असले तरी आपल्या नित्याच्या कर्तव्यापासून च्युत होत नाहींत.

नित्य चमकुवंच्या वाटेरि जाले तरी पायु आदळु फावजाता — (गो.) नेहमींच्या सरावाच्या वाटेंत सुद्धां ठेंच लागणें संभवनीय असतें.

नित्य नेमें शांति वाढे, तणें तुटती पवाडे—नियमित व अखंडपणें काम (कर्म) करीत गेल्यास मनाला शांति उत्पन्न होते व त्यामुळें संसारांतील आपत्ति दूर होतात.

नित्य पाठ, त्याची काय वाट—ज्याच्या रोजच्या पाठांतलें त्याला काय अडणार आहे, किंवा ज्याला एखादी गोष्ट करण्याची रोजची संवय लागलेली असते ती त्याला सुटत नाहीं. संवयीला औषध नाहीं.

नित्य मढें, त्याला कोण रडे—रोज मढें दृष्टीस पडूं लागलें तर दुःख तरी किती दिवस टिकणार. परिपाठांतली गोष्ट झाल्यावर तीविषयीं कांहीं वाटेनासें होतें.

नित्य मरे, त्यास कोण रडे—जो मनुष्य रोज कुरकुर करीत असतो त्याच्याकडे कोणी लक्ष देत नाहीं. वरच्याप्रमाणें.

निद ⁓ निदेपेक्षां मांद्रे संभ्रम चड—(गो.) झोंपेपेक्षां आंथरुणाची ऐटच दांडगी. कांहीं माणसें एवढीशी गोष्ट करतात पण आव मात्र आणतात एखादा मोठा योग करण्याचा.

निंदक ⁓ निंदकाचें घर असावें शेजारीं—आपली निंदा करणारा मनुष्य जवळ असला म्हणजे तो आपल्या आचरणांतील दोष दाखवून देण्याचें काम करतो व आपणास ते सुधारण्याची सूचना देतो. तु०—निंदक तो परउपकारी। काय वर्णूं त्याची थोरी। तो रजकाहूनि भला। परि सर्व गुणें आगळा॥ ने घे मोल धुतो फुका। पाप वरच्यावरी देखा। करीतसे साधका। शुद्ध सरते तिहीं लोकीं॥ —तुगा ४३४५.

निंदकासारखा दुष्ट नाहीं, आणि वंचकासारखा नष्ट नाहीं—दुसऱ्याची नेहमीं निंदा करणारा मनुष्य फार दुष्ट स्वभावाचा असतो व दुसऱ्यास ठकवून लुबाडणारा मनुष्य फार घातकी असतो.

निदान ⁓ निदान करणें—१ शेवट करण्याचें ठरविणें; मरणास तयार होणें. "शेवटीं विश्वासरावसाहेब यांस अंबारींत गोळी कोणीं दुष्टानें मारली. त्यानें ते ठार झाले. ते सदाशिवपंत भाऊ यांनीं पाहून अगदीं निदान केलें." —पेब ६१. २ परिक्षा करणें; विशेषतः रोगपरिक्षा करणें. 'तरी सरोगु काय जाणे। निदान रोगाचें।'—ज्ञा ११. ९०.

निदणें ⁓ निदिलें मांजर उंद्राक धरिल वे?—(गो.) झोपलेलें मांजर उंदराला धरूं शकेल कां? गैरसावध माणसाच्या हातून कार्य घडत नाहीं.

निदिल्लेगेर चालॉ चलॉ आनी जागी आशिल्लेगेर आली चली—(गो.) जी झोंपली होती तिच्या घरीं झाला मुलगा आणि जी जागी राहिली होती तिच्या घरीं झाली मुलगी. जो स्वीकृत कार्याविषयीं दक्ष राहिला त्याला अपशय यावें आणि बेफिकीर रहाणाऱ्याचें साधून जावें अशावेळीं म्हणतात.

निदल्ल्याक कोणीय उठायत, जागो आसिल्ल्याक कोण उठाय तोलो?—(गो.) झोंपलेल्याला कोणीहि उठवील; झोंपेचें सोंग घेऊन निजलेल्याला कोण उठवणार? निजणें पहा.

निद्रा ⁓ निद्रा करावी वृक्षातळीं : ना तरी खांड देऊळीं :—(महानु.) एक झाडाखालीं तरी निजावें किंवा पडक्या देवळांत निजावें. अन्यत्र निजूं नये.

निद्रेचा भंग हा प्रकृतीला रोग—वरचेवर झोंपमोड होत गेल्यास प्रकृतीवर वाईट परिणाम होतो.

निद्राळू कोल्हा कोंबडीची शिकार करूं शकत नाहीं—झोंपाळू किंवा आळशी मनुष्याच्या हातून कोणतेंहि काम होत नाहीं.

निधनी ⁓ निधन्या धन आणि निकण्या कण—दरिद्री मनुष्यास द्रव्य मिळालें असतां व कंगाल मनुष्यास धान्य मिळालें असतां फार आनंद होतो. अधना धन होय अकणा कण होय पहा.

निधान ⁓ धान्य तेथें घुशी, निधान तेथें विवशी—धान्य पहा.

निनांदती ⁓ निनांदतीला (निनांदीला) हजार बुद्धि, फोडलें कपाळ बांधली चिंधी—ज्या स्त्रीच्या मनांत नवऱ्याच्या घरीं नांदावयाचें नाहीं तिला अनेक प्रकारच्या युक्त्या करून राहणें अशक्य करतां येतें. वेळेवर ती आपलें कपाळ फोडून घेऊन चिंधी बांधून बसते व काम करीत नाहीं. यामुळें नवऱ्याचा निरुपाय होतो.

निपट ⁓ निपट नागवी, तिचे बोच्या आड काडी—जी अगदींच नागवी असेल तिला निदान काडीचा आडोसा दिला तरी पुष्कळ. जेथें मुळांत कांहींच नाहीं तेथें थोडें फार जरी मिळालें तरी त्यांत आनंद मानावा.

निफजा ⁓ निफजा आणणें—घडविणें; उत्पन्न करणें. 'आगीचें काज पाणी। निफजा जरी आणी। अज्ञान या वाहणी। मानूं तरी तें॥' —अमृ ७.९७.

निंब ⁓ निंब घरावर टाकणें—एखाद्याचें घर वाळींत टाकावयाचें झाल्यास त्याचे घरावर लिंबाचे डाहाळे टाकतात. यावरून घर वाळींत टाकणें.

निंब नेसणें—(बायकी) नवसाचा एक प्रकार. निंबाचे डाळे कमरेभोंवतीं बांधून अंग झाकणें. नग्न नवस फेडण्यासाठीं बायका आपली नग्नता निंबाच्या डाहळ्यांनीं थोडीबहूत झांकून नवस केलेल्या देवास जातात. तेथें त्यांना आप्तमित्र नेसावयास वस्त्रें देतात. निंबसाडा पहा.

निंबपंचक—निंबाचें पान, साल, फूल, फळ व मूळ.

निंब लागणें-येणें—कालिमा इ. लागणें.

निंब लावणें-ठेवणें-देणें—कलंक, कालिमा, डाग आणणें—लावणें; दोष देणें; तुच्छ करणें.

* **निंबाचिया झाडा साकरेचें आळें।—आपलीं तीं फळें न संडीच ॥**—तुगा ३१०३. कडूलिंब पहा.

निंबाला आल्या निंबोळ्या, कावळ्याला आल्या गळचंड्या (गळचोऱ्या)—उन्हाळ्यांत कडू निंबाचीं फळें पिकतात व तीं जरी हिरवीं असतांना कडू असलीं तरी पिकल्यावर गोड होतात. पण त्याच वेळीं कावळ्याच्या गळ्याला एक विकार होतो व त्यामुळें त्यास तीं खातां येत नाहींत. ज्याच्या नशीबांत नसेल त्याला एखादी गोष्ट मिळाली तरी तिचा त्यास कांहीं कारणामुळें उपभोग घेतां येत नाहीं.

निंबाला निंबोळ्या, आंबे आंब्याला—निंब कितीहि मोठा झाला तरी त्याला निंबोळ्याच यावयाच्या; निंबाच्या झाडाला कधीं आंबे यावयाचे नाहींत, ते आंब्याच्या झाडालाच यावयाचे. निसर्गाचे जे नियम आहेत ते कोणाला मोडतां येत नाहींत. कितीहि मोठा झाला तरी त्याला निसर्गांत बदल करतां येत नाहीं. त्याच्या दैवाप्रमाणेंच त्याला मिळावयाचें.

निंबलोण ~ निंबलोण करणें—दृष्ट काढण्यासाठीं लिंबाचीं पानें, मीठ इ. घेतात. दृष्ट काढणें. 'रामदास म्हणे क्षणीं दृष्टी लागे । जीवें निंबलोण करी ।'—दावि ७-२-९.

निबर ~ निबराशिवाय लोखंड पाज ना—पोलादावांचून लोखंडास धार चढत नाहीं.

निंबू ~ निंबू तोंडावर ठरत नसणें—गोंडस, सतेज, दृष्ट लागण्यासारखा घोडा, गाय इ. स म्हणतात.

निभण ~ निभण घालणें— जेठा मारून बसणें. 'रमाबाई:—ओटीवर ती एक स्वारी निभण घालून बसते ना रोज.'—खेस्व ५१. निवणें पहा.

निम ~ निम हकीम, और कतरे जान—अर्धवट वैद्य प्राण घेतो.

निमक ~ निमक खाणें — अन्न खाणें; आश्रयास असणें. 'ज्याचे निमक खातात त्यांची चाकरी हलाल करितात.' —मराचिथोरा ७६. 'इसामियानें बादशाही सरकारचें निमक खाल्लें त्याचें नामी चीज केलें!' — शिसं ४-३.

निमक हराम — मिठाशीं कृतघ्नपणा करणारा. आपल्या अन्नदात्याशीं बेइमान होणारा. याच्या उलट :—

निमक हलाल — कृतज्ञ; स्वामिनिष्ठ. 'तुमचे लढाईची सर्थ जाहली निमक हलाल आहांत.' — मराचिथोरा ४१.

निमाज — नमाज पहा.

निमित्त ~ निमित्ताचा धनी— वाईटपणा, दोष ज्याला उगाच दिला जातो तो; आरोपास कारणीभूत होणारा; नांवाचा; नाममात्र. 'निमित्ताचा धनी केला असे प्राणी ।'
— नवनीत १४५.

निमित्तास — निमित्तावर टेंकणें—एखादी गोष्ट करण्यास कारणच पाहात असणें. तें सांपडल्याबरोबर ती गोष्ट करणें. 'त्याच्याशीं अगदीं बोलूं नका! स्वारी काय अगदीं निमित्ताला टेंकली आहे. तुम्ही एखादा शब्द बोलल्याबरोबर लागलींच वाजंत्री सुरू होतील.'

* **निमित्तास मूळ भोपळा, पादास मूळ खोकला** —हातून कांहीं दुष्कृत्य घडलें म्हणजे मनुष्य त्याचें बादरायण संबंध असलेलें कांहीं तरी निमित्त, कारण लावून देऊन मोकळा होऊं पहातो. भोपळा तेथें होता म्हणून असें घडलें म्हणतो. तसेंच वायु सरला तर तशी संवय आहे असें न म्हणतां म्हणतो कीं खोकल्यामुळें वायु सरला.

निम्मा ~ निम्मी मशीद, निम्में देऊळ — अर्धवट गोष्ट. एकहि धड नाहीं अशी स्थिति. किंवा सयामी जुळें.

नियमित ~ नियमित उद्योगाला, संवयीनें जोर आला — नियमितपणें उद्योग करीत गेलें म्हणजे कालांतरानें त्याचें फळ दिसूं लागतें व आपणास उद्योग करण्याची संवयहि लागते.

निरंकुश ~ निरंकुशाः कवयः ।—कवीस कोणच्याहि प्रकारचा—भाषेचा, व्याकरणाचा वगैरे प्रतिबंध नसतो. कवीस भाषा व्याकरणाचे सर्व दोष माफ असतात.

निरण ~ निरणावर किरण पडेपर्यंत निजणें—ढुंगणावर सूर्य येईपर्यंत झोंपणें, म्हणजे फार उशीरां उठणें.

निरंतर ~ निरंतर ज्ञानाची उत्पत्ति, अनुभव स्मृतीपासून होती— पूर्वीं होऊन गेलेल्या लोकांचे किंवा आपणास गत आयुष्यांत आलेले अनुभव व त्यांच्या आठवणी यांपासूनच जगांतील ज्ञान हळू हळू वाढत जात असतें. ज्ञानाचा पाया अनुभव व आठवणी होत. Experience is the father of wisdom, and memory the mother. — सवि ९९६.

निरनिराळा ~ निरनिराळ्या प्रांतीं, निरनिराळ्या रीती भाती — प्रांतोप्रांतीच्या चालीरीती भिन्न असतात. देशे देशे नवाचाराः ।

निरनिराळ्या युगांत, निरनिराळी रीतभात — कालाप्रमाणें चालीरीतींतहि फरक पडत असतो.

निरपण ~ निरपण खाई तें मोठें होई, मळ्यांत जाई तें केळें खाई — लहान मुलानें पदार्थ सर्व निपटून खावा, कांहीं टाकूं नये म्हणून त्यास म्हणतात.

निरपणें ~ भलत्या ठिकाणीं हगावें, आणि निरपत बसावें — आपणच भलतीच गोष्ट करून मागाहून ती निस्तारीत बसणें.

निरपराधी ~ निरपराधी मनास कशाचीहि भीति नसते—जो मनुष्य निरपराधी असतो त्यास कसलीच भीति वाटत नाहीं. तु०—ज्यास कर नाहीं त्यास डर नाहीं.

निरवानिरव ~ निरवानिरवीची वेळ—इहलोक सोडून जातांना माणसानें येथल्या पसाऱ्याची आवरासावर करावयाची असते. अंतकाळ; मृत्युघटका.

निरविणें ~ निरविलें गुरूं, कोणी वेशीपर्यंत नेत नाहीं—आपल्या परसांतून हांकून दिलेल्या गुरांस आपण गांवाबाहेर हांकून नेत नाहीं. आपण आपल्या परसाबाहेर तेवढें काढून देतों. जो तो आपल्या पुरेसें पाहतो. किंवा टाकून दिलेल्या, घरांतून घालवून दिलेल्या ढोरास कोणी वेशीबाहेर हांकून नेण्याची तसदी घेत नाहीं. गोठ्याबाहेर काढून देऊन वाट फुटेल तिकडे जाण्यास मोकळीक देतो.

निरस्त ~ निरस्तपादपे देशे एरंडोऽपि द्रुमायते — ज्या देशांत मुळींच झाडें होत नाहींत तेथें एरंडास देखील मोठ्या वृक्षाइतकें महत्व येतें. तु० — गांवळ्या गांवांत एरंड बळी. सबंध श्लोक असा—'यत्र विद्वज्जनो नास्ति श्लाघ्यस्तत्राल्पधीरपि । निरस्तपादपे देशे एरण्डोऽपि द्रुमायते ॥'

निराशा ~ निराशेची दूर दृष्टि, आशेची हाव मोठी — मनुष्याची एखाददोन गोष्टींत निराशा झाली म्हणजे तो पुढें अधिक विचार करून गोष्टी करूं लागतो; परंतु जो नेहमीं आशावादी असतो तो मोठमोठ्या गोष्टीस हात घालतो. एकदोनदां ठेंच लागल्यावर मनुष्य दूरवर विचार करून पाहतो. नव्या दमांत त्यास अधिक आशा व हुरूप असतो.

निराहार ~ निराहाराचे गेले पाण्या, फराळाचे गेले अनमान्या—निराहार करणारे जे होते ते गतप्राण होऊन पाण्या गेले म्हणजे नदीतीरावर अथवा स्मशानांत पोचले; फलाहारावर राहणारे जे होते त्यांनाहि अन्नाचा अभाव जाणवून ते अनमान्या म्हणजे मूर्च्छागत झाले. अन्न खावयास न मिळाल्यामुळें या लोकांची अशी कठीण दशा झाली. अतएव हे हपापलेले लोक आहेत. यांना खावयास दिलें पाहिजे.

निराळ ~ निराळें पोटीं — रिकाम्या पोटानें; अनशीं पोटीं.

निराळा ~ निराळा ओयरा, कोण कोणाचा सोयरा? (आपापला निराळा शिधा घेऊन स्वयंपाक करावा.) ज्यानें त्यानें आपल्यापुरतें पहावें. एकदां एकत्र कुटुंबांतून निघून वेगळें झाल्यावर व स्वयंपाक वेगळा करूं लागल्यावर मग तितका कुटुंबांत आपलेपणा राहत नाहीं. परस्परांबद्दल परकीभाव उत्पन्न होतो.

निरिच्छ ~ निरिच्छ प्राणी, जग तृण मानी—ज्या मनुष्याला कोणतीहि अपेक्षा नसते त्याला सर्व जग कस्पटाप्रमाणें वाटतें. तु०—निःस्पृहस्य तृणं जगत् ।

निरी निरी ~ निरी निरी करणें — अशक्त, रोड होणें; एकसारखें रडणें; चिरचिरणें; ताप, खोकला वगैरे पासून आजारी असणें. " आज २ महिन्यापासून मूल सारखें निरी निरी करतें "

निरुद्योगी ~ निरुद्योग्याचें नशीब लुलें — जो मनुष्य स्वतः उद्योग करीत नाहीं त्यास कधीं दैव सहाय्य करीत नाहीं. तु०—God helps those who help themselves.

निरुद्योगाचें फळ दारिद्र्य — निरुद्योगी मनुष्य पुढें दरिद्री होतो.

निरोप ~ निरोप घेणें — १ जाण्याची परवानगी विचारणें; जातांना सांगणें. २ नोकरी सोडणें. —इंप ६५.

निरोप देणें — पाठवणी करणें; रजा देणें; जाऊं देणें. 'राजकन्ये नीरोप मला देणें ॥' —नल. १३०

दिव्याला निरोप देणें — दिवा मालवणें; विझविणें. दिवा पहा.

निर्जीव ~ निर्जीव कागद सजीव करून लिहिणें — (पेद ३३.२१८.) अगदीं कळकळीनें, जणुं काय समोर उभा राहून सांगतो आहे या प्रमाणें लिहिणें.

निर्दय ~ निर्दय माणसाची प्रार्थना भय उत्पन्न करिते — दुष्ट मनुष्य परमेश्वराजवळ देखील दुष्ट कृत्यांत

मदत मागतो. त्याच्या मनांत नेहमीं दुष्ट विचारच असतात. दुर्जनस्य विशिष्टत्वं परोपद्रवकारणम् । व्याघ्रस्य चोपवासेन पारणं पशुमारणम् ॥ सुर. ५४.२७.

निर्धन—**निर्धन पुरुष मशका समान** — निर्धन मनुष्यास कोणी विचारीत नाहीं. तु०—(अ) पक्षविकलश्च पक्षी शुष्कश्च तरुः सरश्च जलहीनम् । सर्पश्चोद्धृतदंष्ट्रस्तुल्यं लोके दरिद्रश्च ॥ —सुर. ६६.३३. (आ) कुब्जस्य कीट खातस्य दावनिष्कुषितत्वचः । तरोरप्यूषरस्थस्य वरं जन्म न चार्थिनः ॥ —सुर. ६६.२३.

खल्वाटो निर्धनो क्वचित् — टक्कल पडलेला मनुष्य निर्धन क्वचित् असतो. क्वचित् काणा० पहा.

निर्धनको धन राम—निर्धन मनुष्याचें धन राम आहे. दरिद्री मनुष्यास आधार देवाचा. 'निर्धनको धन राम। हमारो ॥' —सूरदास.

निर्बंध—**निर्बंध नाहीं कवीला, कल्पनेला वाव मिळाला** — कवीच्या कल्पनेला कोणताहि निर्बंध नसतो, ती स्वैर विहार करते. तु०—निरंकुशाः कवयः।

निर्बळ—**निर्बळाचें बळ राजा** — दुर्बल मनुष्यास आधार राजाचा असतो. या जगांत कायदा असतो म्हणुनच अशक्त माणसांचा निभाव लागतो. तु०—दुर्बलस्य बलं राजा बालानां रोदनं बलम्। बलं मूर्खस्य मौनित्वं चौराणामनृतं बलम्॥ —सुर. १६२.३९३.

निर्बळा हातीं, बळकट काठी — (वांय.) दुर्बळ माणसाजवळ भक्कम काठी असली तरी ती त्याला उपयोगी न पडतां प्रतिस्पर्ध्याला उपयोगी पडते.

निर्मूळ—**निर्मूळ वृक्ष उभे होऊन येणें** — नसत्या शंका काढून अडथळा आणणें. —पया. २६९.

निर्लज्ज—**निर्लज्जः सदा सुखी** — निर्लज्ज मनुष्यास कोणत्याहि गोष्टीबद्दल कांहीं वाटत नसल्यामुळें त्यास कधीं वाईट वाटतच नाहीं व त्यामुळें तो करील त्यांत त्यास आनंदच वाटतो. तु०—धनधान्यप्रयोगेषु विद्यासंग्रहणेषु च । आहारे व्यवहारेच त्यक्तलज्जः सुखी भवेत् ॥ —सुर. १५९.२७५.

निर्लोभी—**निर्लोभी पंच आणि निःपक्षपाती साक्षीदार, विरळा** — निःस्वार्थी न्यायाधीश किंवा पंच व अगदीं कोणत्याहि बाजूकडे कल नसलेला असा साक्षीदार क्वचितच आढळतो.

निर्वंश—**निर्वंशी कलम** — (राजा.) वंशक्षय झालेल्या पिढींतील पिशाच. त्या वंशाची मालमत्ता वापरणारास हें झपाटतें.

निर्वाण—**निर्वाण करणें-मांडणें** — १ निकर करणें पहा. २ शेवटचा मार्ग पत्करणें; अखेरी करणें; हद्द करणें.

निर्वाण पाहणें — अंत पाहणें. 'अजुनी निर्वाण कोठवर पहाल ?' —भा. ब. ६.

निर्वाणीचा बाण — अखेरचा उपाय; शेवटचें शस्त्र.

* **निर्वाणीचा एक पांडुरंग** — मनुष्याला अखेरचा आधार काय तो परमेश्वराचा असतो. 'सोयरे धायरे संपत्तीचे लोक। निर्वाणीचा एक पांडुरंग॥'

निर्वाह—**निर्वाहः प्रतिपन्न वस्तुषु**—(मुद्राराक्षस २.१८) अंगीकृत कार्य चिकाटीनें तडीस नेणें; एकसारखा प्रयत्न करीत राहणें. कोणी या वचनाचा अर्थ असलेल्यांत कसातरी गुजारा करणें असा करतात पण तो चूक आहे. पुण्यांतील शिक्षणप्रसारक मंडळीचें हें बोधवाक्य आहे. या वचनाचा गैरअर्थ टाळण्यासाठीं 'हातीं घ्याल तें तडीस न्या' Efforts Unending अशी मराठी व इंग्रजी वचनें शेजारी लिहितात. — अग्रणी २२-१२-१९४१. किं कूर्मस्य भरव्यथा न वपुषि क्ष्मां न क्षिपत्येष यत्। किं वा नास्ति परिश्रमो दिनपतेरास्ते न यन्निश्चलः। किं चाङ्गीकृतमुत्सृजन्हि मनसा श्लाघ्यो जनो लज्जते । निर्वाहः प्रतिपन्नवस्तुषु सतामेतद्धि गोत्रव्रतम् ॥ —सुर. ५३.२६९.

निर्वीर—**निर्वीरमुर्वीतलम्।** — पृथ्वीवर आपल्याला कोणी प्रतिस्पर्धी राहिला नाहीं अशी स्थिति. "७२ साल आटोपतच आलें तरी परशुराम कोठें हूं का चूं करीना, तेव्हां जीनीसाहेबांस 'निर्वी०' झालें." — नि. ४५९. आद्वीपात्परतोऽप्यमी नृपतयः सर्वे समभ्यागताः। कन्येयं कलधौतकोमलरुचिः कीर्तेश्च लाभः परः । नाकृष्टं न च टंकितं न नमितं नोत्थापितं स्थानतः। केनापीदमहो महद्धनुरिदं निर्वीरमुर्वीतलम् ॥

निवडक—**निवडक प्रकार** — खरी वस्तुस्थिति; आंतलें रहस्य. 'निवडक प्रकार तेव्हांच उघडा दिसतो.' —पया. ८०

निवणें—**डोळे (कान) निवणें** — मनाजोगी गोष्ट झाल्यानें समाधान लाभणें.

शिजे तों राहवतें, निवे तों राहवत नाहीं — एखादी इष्ट वस्तु जरा दूर असते तोंपर्यंत जी तिच्याबद्दलची उत्सुकता असते ती जवळ अगदीं आटोक्यांत आली म्हणजे शतगुणानें वाढते.

निवाडा — **दोन जिवांचा निवाडा होणें** — गरोदर स्त्री सुखरूप बाळंत होणें; हातीं पायीं सुटणें; सुटका होणें.

निवाळणें ॰ निवाळलें लोखंड — (थंड झालेलें लोखंड) (ल.) निरोगी, टुणटुणीत म्हातारा.

निशाण (=लक्ष्य, नेम) ॰ निशाण उतरणें— गोळी बरोबर लागणें; लक्ष्य भेदणें.

निशाण (=डंका, नगारा) ॰ निशाणीं घाव घालणें-देणें — कूच करण्याचा इशारा देण्यासाठीं नगारा वाजविणें. 'हरीभक्तिचा घाव घाली निशाणीं।' —राम २८.

निशाण (=ध्वजा) ॰ निशाणाचें फडकें मोल नसतें फार, पण त्यासाठीं रण घेतें झुंजार — निशाणाची किंमत ती काय, पण तिच्या संरक्षणासाठीं केवढालीं युद्धें होतात. निशाण हें राष्ट्रचिन्ह असल्यानें त्याचा अपमान तो सर्व राष्ट्राचा अपमान असें मानण्यांत येतें.

निशाणी ॰ निशाणी होणें — फाजील होणें; मर्यादेबाहेर जाणें; हद्द होणें.

निशिल्यांतु (काष्टेंतु) इंगळे पळलेगादि करचें — (गो.) जणूं काय नेसलेल्या वस्त्रांत इंगळे पडले अशाप्रकारें नाचूं लागावयाचें. एवढ्याशा भीतीनें 'आतां काय करूं?' म्हणून जिवाची घालमेल करणाऱ्याला उद्देशून म्हणतात.

निशिल्या भितरी नागडें — (गो.) वस्त्राआड जग नागवें म्हणतात त्या अर्थानें.

निशें देकूनातिल्यानें कुय्यं देकलीं — (गो.) ज्याला पेज सुद्धा कधीं दिसायची नाहीं त्याला शितें मिळालीं, म्हणजे अपरिमित आनंद व्हावयाचा.

निशें वचनातिल्याक कडंवु तुर्किलो — (गो.) ज्याच्या घशांत पेज उतरत नाहीं त्याच्या तोंडांत कडवू कोंबायचा म्हणजे त्याचे मरणच. 'साहे ओझें त्यास तेंचि द्यावें।' अशा अर्थानें उपयोजितात.

निश्चय ॰ निश्चयाचें बळ। तुका म्हणे तेंची फळ। — तुमचा निश्चय जर दृढ असेल तर तीच तुमच्या यशाची किल्ली समजा. त्यानें तुम्हाला तुमच्या कामांत यश आल्याशिवाय राहणार नाहीं.—तु गा. ३६६७. गांगा. १९८.

निषिद्ध ॰ निषिद्ध वस्तूवर आवड फार — मनुष्यास मना केलेल्या गोष्टीच करण्याची उत्सुकता जास्त वाटते.

निषेध ॰ निषेध पडो माथा, वाढो माझा जथा — (महानु.) कष्ट झाले तरी पर्वा नाहीं परंतु माझा जथा, पंथ, दिंडी वाढो.

निष्काळजी ॰ निष्काळजी मनुष्याचा नोकर उद्धट असतो — जो मनुष्य स्वतःच्या व्यवहाराची किंवा वस्तूंची नीट काळजी घेत नाहीं त्याला आपल्या नोकरांवर अवलंबून राहावें लागतें व त्यामुळें तो नोकर वरचढ बनतो.

निष्ठा ॰ निष्ठा तसें फळ — श्रद्धेप्रमाणें फळ मिळतें; भाव तसा देव.

निष्ठुर ॰ निष्ठुरता जुलम्या परी, करितां भीति धरी — तुम्ही फार निष्ठुरपणें वागूं लागला तर तुमच्याबद्दल असंतोष उत्पन्न होऊन तुम्हांला शत्रु उत्पन्न होतात व त्यापासून तुम्हांस धोका होण्याचा संभव असतो.

—सवि. ७३९

निष्ठुरतेपासून, सूड होय निर्माण — आपण दुसऱ्याशीं निर्दयपणें वागल्यास त्याच्या मनात आपला सूड उगविण्याची बुद्धि उत्पन्न होते. —सवि. ७४०

निष्ठुरतेस नाहीं क्षमा, केवळ दुष्टाची प्रतिमा — क्रूर मनुष्याच्या अंगांत कधीं दया वसत नाहीं व त्याचा स्वभाव दुष्ट बनतो. —सवि. ७४१

निसुका ॰ निसुका निसुका (निसुक्या माणसाला) लाज नाहीं, कालचें बोलणें आज नाहीं — [निसका = निःसंग] कोडग्या मनुष्यास कांहीं बोललें तरी त्याच्यावर कांहीं परिणाम होत नाहीं. कोडगा पहा.

निसुकाचे गांडींत (अंगावर) घातला पाला, म्हणे थंडा झाला आणखी घाला — कोडग्या मनुष्यास कांहीं केलें तरी त्याची त्याला कांहीं लाज वाटत नाहीं; तो पक्का बेशरम असतो.

निसुकाला दिला हिसका, तर तो ह्मणे जुजुच केलें — कोडग्या मनुष्याला मार दिला तरी तो थोपटलें असेंच म्हणतो. त्याला माराचीहि पर्वा वाटत नाहीं.

निसत — निसुका पहा.

निसत बाजारीं, पडला शेजारीं — निसत = निसुक, निर्लज्ज माणसाला कोठें लाज वाटत नाहीं.

निसंतान ॰ निसंतान करणें — विध्वंस, नाश करणें.

निसंतान मानणें — (एक शाप) निसंतान होणें. 'तुझें अल्प काळें निसंतान मानें।' —किंकर द्रौपदी. २४

* **(कुसंतानापेक्षां) निसंतान बरें**—कुपुत्र होण्यापेक्षां मुलें न होणें चांगलें. किं तेन जातु जातेन मातृयौवनहारिणा। आरोहति न यः स्वस्य वंशस्याग्रे ध्वजो यथा॥—सुर. ९०.१.

निसरगांठ ~ **निसरगांठ देऊन ठेवणें** — निरगांठ पक्की असते पण निसरगांठ ही लवकर सुटते. (ल.) निसटण्याचें साधन राखून ठेवणें; पळवाट ठेवणें.

निसर्ग ~ **निसर्ग साधे, आणि उपसर्ग बाधे** — सृष्टिक्रमाप्रमाणें नेहमी चांगल्या गोष्टी होत असतात पण मनुष्य आपल्या कृतीनें कांहीं वेळां भलत्याच गोष्टी करून विघाड करतो.

निसर्गाचे कायदे स्थिरस्वरूपी आहेत — सृष्टीचें नियम कधीं बदलत नाहींत.

निसवणें ~ **उसवल्याला दोरा घालतां येतो निसवल्यास उपाय काय?** — उसवणें पहा.

निसुंदा ~ **शेतांत नसावा कुंदा आणि गांवांत नसावा निसुंदा** — (खा.) [कुंदा = हरळीसारखें गवत. निसुंदा = कुळकर्णी.] "शेतांत कुंदा कालवला म्हणजे जसें पीक वाढत नाहीं, तसा गांवांत कुळकर्णी राहिला म्हणजे लोक सधन होत नाहींत." —गांगा २२३.

निःस्पृह ~ **निःस्पृह बोध क्वचित एक, स्वार्थबुद्धि असती अनेक** — निःस्पृहपणानें आपल्या हिताच्या गोष्टी सांगणारा क्वचितच भेटतो; आपला स्वार्थ साधण्याकरितां सल्ला देणारे पुष्कळ असतात. तु०—सुलभाः पुरुषा राजन्सततं प्रियवादिनः । अप्रियस्य च पथ्यस्य वक्ता श्रोता च दुर्लभः ॥ — सुर. १४५.११५.

निस्पृहस्य तृणं जगत् — निरिच्छ मनुष्याला जग हें तृणासमान आहे. ज्याला कोणत्याहि वस्तूची इच्छा नाहीं, त्याला जग हें तृणतुल्य, म्हणजे तुच्छ होय. (अ) तृणं ब्रह्मविदः स्वर्गस्तृणं शूरस्य जीवनम् । जिताक्षस्य तृणं नारी निस्पृहस्य तृणं जगत् ॥ (आ) उदारस्य तृणं वित्तं शूरस्य मरणं तृणम् । विरक्तस्य तृणं भार्या निस्पृहस्य तृणं जगत् ॥

निळा ~ **इळयाचे घार्यी निळे कापणें** — कोयता चालविण्याच्या घाईंत न कापावयाचे तेंहि पण कापणें.

निळू ~ **निळू मजॉ निळू, कोल्ती घेवून् खेळूं, घर जळ्ळया जळूं; पुण निळु मजॉ खेळूं !!** — (गो.) निळू माझा बाब्या. जळतें कोलीत घेऊन खेळायचें म्हणतो का? खेळूं दे. आणि घर जळलें तर? जळूंदे मेलें! पण निळू तर थोडा वेळ खेळेलना !! मुलाचे फाजील लाड करणाऱ्याला उद्देशून म्हणतात.

नीच ~ **नीच रतली रायासीं । तिसी कोण म्हणेल दासी । [लोह लागतां परिसासी । पूर्व स्थिति मग कैंची ॥]** — देवीदास, व्यंस्तो. ३३. नीच स्त्री जर राजाची उपभोग्य स्त्री झाली तर तिची योग्यता वाढते. श्रेष्ठ मनुष्याच्या संगतीनें नीच मनुष्यासहि श्रेष्ठत्व येतें.

नीच व्यसनीं बुडतां निंदिति दैवासि न स्वकर्मातें ॥ — मोकर्ण ४९.१. नीच माणसें आपल्या हातांनीं संकटें ओढवून घेतात व संकटांत सांपडलीं असतां आपल्या दुर्वर्तनानें हा शेवट झाला असें न मानतां व्यर्थ देवाला दोष देतात.

नीच होय ते कवी उंच न थाय — (हिं) जें एकदां खालीं आलें तें पुन्हा कधीं उंच होत नाहीं. एकदां अधःपात झाला म्हणजे मनुष्य कधीं वर येऊं शकत नाहीं. पाणी वाहून खालीं गेलें म्हणजे तें वर येत नाहीं.

नीचाची प्रीत, जशी वाळूची भिंत — नीच मनुष्याचें प्रेम हें अस्थिर असतें. त्यावर कधीं विश्वास ठेवूं नये. तें वाळूच्या भिंतीप्रमाणें ढांसळून जावयाचें.

नीट ~ **नीट करणें** — बरें, दुरुस्त करणें.

नीट जाणें — कोठें न थांबता, सरळ जाणें.

नीट — वांकडें करणें — तडजोड करून बरोबर करणें; तंटा तोडणें.

* **नीट वाल नाऱ्या, तर बोडक्या झाल्या साऱ्या** — ज्या मनुष्यास नेहमीं अशुभ अपशब्द उच्चारण्याची संवय असते त्याच्या तोंडून कधीं चांगले शब्द बाहेर पडत नाहींत.

नीतिमत्ता ~ **नीतिमत्तेशिवाय व्यापार व उद्योग** — व्यापार किंवा उद्योग जर सचोटीनें केला नाहीं तर त्यांत कधींहि यश येत नाहीं.

नीर (= पाणी) ~ **नीरक्षीरन्याय** — दूध व पाणी अगदीं एकजीव होऊन जातात असा पूर्ण मिलाफ दर्शित करण्यासाठीं योजतात. हंसक्षीर न्याय.

नीर (= परिणाम, निकाल) ~ **नीर काढणें** — समूळ नाश करणें; सफा करणें. 'गनिमाचा नीर काढावा.' —पेद २१.८.

नीरावर येणें — १ निकरावर येणें २ संपत येणें.

नीळ ~ **नीळ नासणें-रांपणें; निळीचा रंग नासणें** — निळीचा रंग बिघडला अशी खोटी बातमी उठविल्यास रंग चांगला होतो अशी निळारी लोकांची समजूत असते. यारून खोटी बातमी उठविणें. एखाद्यानें सांगितलेली हकीकत आपणांस खरी न वाटली तर आपण म्हणतों 'नीळ नासली आहे असें वाटतें!'

नीळकंठ ~ **नीळकंठ खातें** — (उप.) पाणक्याचें काम.

नुसता ~ नुसत्या दृष्टीनें, पिलें पोशिलीं कासवानें — कासवास स्तन नसून तें नुसत्या दृष्टीनें आपल्या पिलांचें पोषण करतें अशी समजूत आहे. यावरून कूर्मदृष्टि हा वाक्प्रचार उत्पन्न झाला आहे. कूर्मदृष्टि पहा.

नूर ~ नूर पालटणें—रंग बदलणें; अवस्थांतर होणें.

नूर मिळविणें — (व.) मिळतें घेणें.

* **एक नूर आदमी, हजार नूर कपडा, लाख नूर गहिना, करोड नूर नखरा** — 'एक' पहा.

नूर तसा वकर — जसं रूप तशी कृति; चेहऱ्यावर ज्याप्रमाणें तेज असेल त्याप्रमाणें कर्तबगारी असते.

नृपति ~ नृपतिजनपदानां दुर्लभः कार्यकर्ता। —राजा आणि प्रजा या दोघांनाहि खूष ठेवून कार्य करणारा माणूस फारच विरळा ! सबंध श्लोकः — नरपतिहितकर्ता द्वेष्यतां याति लोके । जनपदहितकर्ता त्यज्यते पार्थिवेन । इति महति विरोधे वर्तमाने समाने । नृपतिजनपदानां दुर्लभः कार्यकर्ता ॥ —पंचतंत्र १.१४७.

नृसिंह ~ नृसिंहावतार धारण करणें — हिरण्यकशिपूला मारण्यासाठीं विष्णूनें जसें उग्ररूप धरलें त्याप्रमाणें भयंकर रीतीनें वागणें, कठोर होणें. 'कलुशाची गांठ पडल्यावर, ज्यांच्या मसलतीनें त्याला बापाची गादी मिळू नये असें ठरलें होतें, त्या सर्वांवर संभाजीनें कडक नृसिंहावतार धारण केला.' —संभाजी.

नेक ~ नेक नजरेनें पाहणें — कृपादृष्टीनें अवलोकन करणें.

नेट ~ नेट पुरविणें — (व.) पिच्छा पुरविणें.

नेटावर येणें — १ (व.) जमीन नेट सहन करण्यास समर्थ होणें. २ जिवावर येणें.

नेणता ~ नेणतें बाळ आणि लोंबतें नाळ — (उप.) अगदीं कुकुलें बाळ; अडाणी; मूर्ख. कळत असून बळेंच अडाण्यासारखें करणारा.

नेणें ~ ज्याचें होतें त्यानें नेलें, पाया पडणें वायां गेलें — 'ज्याचें०' पहा.

नेति नेति — [न+इति] अंत नाहीं अंत नाहीं म्हणून किंवा 'असें नाहीं' 'माहित नाहीं' या अर्थानेंहि वापरतात. 'तो आंथरुणातळवटीं दडे। येरु नेति नेति म्हणोनि बहुडे।'— ज्ञा. ९.३७१. 'तथापि त्यजिति विरक्त। नेति नेति मुखें।'— वि. पू. ७.६९. 'नेति नेति शब्द नये अनुमाना।' —आरती.

नेत्र ~ नेत्र मोडणें — डोळे मारणें. 'खेळतां नाटकें दशावतारी। तेथें येती सुंदर नारी। नेत्र मोडिती कळाकुसरी। परी ते अवघे धटिंगण ॥' —दा ६.८.११.

नेत्राचमन — ओवळ्या जागीं, एका बैठकीवर बाकीच्या जातींचे लोक असतांना, कपडे घालून बसले असतां किंवा इतर निषिद्ध गोष्टींत कांहीं विधी करण्याची जरूरी पडते त्यावेळीं नेत्राचमन (डोळ्यास पाणी लावून घेणें) करावें लागतें तें.

नेत्रांत उजेड पडणें — शुद्धीवर येणें; डोळे उघडणें; समजणें; डोळ्यांत अंजन पडणें. 'महाराजांच्या नेत्रांत उजेड पडावा हाच आमचा हेतु.' —विक्षिप्त २.११५.

नेपा ~ नेपा सारणें — (व.) बाणी किंवा पण करणें.

नेम ~ नेम सारणें — नेमधर्म उरकणें; नित्यकर्म पूर्ण करणें. 'पार्थें स्नान करून सकळ। नेम आपुला सारिला ॥' — ५३२.१७४.

* **नेम निष्ठा न पोकळ काष्टा (कासोटा)** — १ लघ्वीला, शौचाला वगैरे वारंवार जावें लागतें व त्यावेळीं कासोटा सोडला पाहिजे असा ब्राम्हणादिकांत शास्त्रानें आचार लावून दिला आहे. जो मनुष्य कर्मठपणाचा अतिरेक करतो इतका कीं ढिला कासोटा ठेवण्यासहि ज्याला दिक्कत वाटत नाहीं अशाबद्दल योजतात. २ एकीकडे देवधर्म पुष्कळ करावयाचा व एकीकडे व्यभिचार करावयाचा अशी विसंगत वागणूक. तुलना —काष्टयाची वळकट०

नेमानें काम करितो, त्याला क्वचित पश्चाताप होतो — जो नियमितपणें काम करतो त्याला कधीं पश्चाताप करण्याची पाळी येत नाहीं.

नेम ~ वांकडे मेढीस वाकडेंच नेम — [नेम= खड्डा; दर] मेढ वांकडी असल्यास ती पुरण्यास खड्डा द्यावयाचा तो वांकडाच द्यावा लागतो. याप्रमाणें जशास तसें; दुष्टाशीं दुष्टपणाचीच वागणूक ठेवावी लागते. शठे शाठयम्.

नेमस्त ~ नेमस्त करणें — नियुक्त करणें; योजणें. लग्नाच्या निमंत्रण पत्रिकेंत वापरावयाचा वाक्प्रचार.

नेसणें ~ मुसळ नेसणें — निर्लज्ज होऊन दुर्वर्तन करणें.

* **नेस वया नव, मला बदग्याची (फाटक्यांची) संवय** — १ दुसरी स्त्री नवें लुगडें नेसतांना पाहून खिजून न जातां आपल्या दारिद्र्यावर झांकण घालणाऱ्या स्त्रीचे उद्गार. २ एखादीस नवें लुगडें नेसावयास सांगावें तों ती म्हणते मला जुनेंच आवडतें. चांगलें लेणें घेणें तरी नशीबांत लागतें.

नेसतां येईना म्हणे लुगडें आंखुड ~ तोकडें— पुढें पहा.

नेसतां येईना म्हणे लुगडें तोकडें, नाचतां येइना म्हणे अंगण वांकडें — स्वतःला एखादी गोष्ट नीट करतां येत नसली म्हणजे साधनांमध्यें किंवा इतर भोंवतालच्या गोष्टींमध्यें दोष काढावयास सुरुवात करावयाची. नाचणें पहा.

नेसलें फटकूर, निजलें वटकूर — अगदीं विपन्न स्थितींत दिवस काढणाऱ्या स्त्रीबद्दल म्हणतात.

नेसायला आरसे, पुरायला पैसे — फाटकीं वस्त्रें नेसून गांठचें द्रव्य पुरून ठेवावयाचें; अतिशय कंजूषपणानें राहणें.

नेसेन तर पैठणी (शालू) च नेसेन नाहीं तर नागवी बसेन; नेसीन तर शायशीचें-शहाचें नेसीन, नाहींतर उघडीच बसीन—मोठी मानिनी स्त्री उद्गारते: 'मी लुगडें नेसेन तर फार भारी, हलक्या किंमतीचें मुळींच नेसायची नाहीं. नाहीं मिळालें शायशीचें (शायशी रुपये किंमतीचें) किंवा राजविलासी भारी किमतीचें लुगडें, तर नागवी सुद्धां राहीन.' बदलत्या परिस्थितीचा विचार न करतां आपलाच हेका चालवूं पाहणाऱ्या व्यक्तीचें वर्णन करणारी म्हण. एखादी गोष्ट करावयाची, घ्यावयाची तर ती अत्युत्कृष्ट पाहिजे, नाहीतर मुळींच नको अशी वृत्ति. सुवर्णमध्य माहीतच नाहीं.

नेस्सुंक नज्ज जालारी पिंजुनु पेल्लान घालप; न्हेसू नज जाल्यार पिंजून पेल्यान उडौप — (गो.) नेसतां येत नाहीं म्हणून चिंध्या करून टाकावयाच्या. आपल्याला उपयोगीं नाहीं म्हणून आणि दुसऱ्याला देण्याची बुद्धि पण नाहीं, म्हणून एखाद्या वस्तूचा नाश करून टाकावयाचा!

नेस्तनाबूत ~ नेस्तनाबूत करणें — नायनाट, नाश, खच्ची करणें; निर्मूलन करणें. 'परंतु सध्या गांधीजींचें वजन कमी होत असल्यानें त्यांचें नेतृत्व नेस्तनाबूत करावयास ही सोन्यासारखी संधि आहे.' —केसरी ६-११-४२.

नेहमीं ~ नेहमीं भिण्यापेक्षां संकटाला तोंड देणें बरें — एखाद्या गोष्टीची एकसारखी भीति बाळगीत राहण्यापेक्षां तिला एकदां तोंड देऊन सोक्षमोक्ष करून घेणें चांगलें. Better pass a danger once, than be always in fear. — Italian.

नेहमींचा पाहुणा हा तिसऱ्या दिवशीं दिवाणा— पाहुण्याचा आदर फार तर दोन दिवस होतो, तिसऱ्या दिवशीं त्यास कोणी विचारीत नाहीं व त्यानंतर तो राहिल्यास त्यास वेडा म्हटलें पाहिजे. तु०—एक दिवस पाहुणा, दुसऱ्या दिवशीं पै, तिसऱ्या दिवशीं राही त्याची अब्रू जाई.

नैराश्य ~ नैराश्यं परमं सुखम् — निराशेसारखें सुख नाहीं. आशा ही फार फसवी असते. आशा, निराशा पहा. सबंध श्लोक:— आशैव राक्षसी पुंसामाशैव विषमञ्जरी। आशैव जर्णिमदिरा नैराश्यं परमं सुखम्॥

नैव ~ नैवान्यथा भवति यल्लिखितं विधात्रा।— नशीबांत असेल तें होणारच. तु०—नशिबीं असे नच तें टळे। नशीब, दैव पहा. सबंध श्लोक: — आघोरणांकुशभयात्करिकुम्भयुग्मं। जातं पयोधरयुगं हृदयेंगनानाम्। तत्रापि वल्लभनखक्षतभेदभिन्नम्। नैवान्यथा भवति यल्लिखितं विधात्रा॥ —सुर. ९२.७८.

नैवेद्य ~ घरचे देवास नैवेद्य नको—लागत नाहीं — पाहुणे मंडळींना प्रथम द्या, घरच्या माणसांना मागाहून उरल्यास, अशा अर्थानें ही म्हण वापरतात.

नैवेद्य देवाचा आणि उपभोग भोक्त्याचा— देवाच्या नांवानें नैवेद्य तयार होतो पण तो पुजाऱ्यास मिळतो. एखादी गोष्ट बाह्यतः एकाच्या मालकीची असते पण तिचा उपभोग तिसराच घेत असतो अशा वेळीं म्हणतात.

नैसर्गिक ~ नैसर्गिक सौंदर्य शोभे भूषणाशिवाय — अलंकारांनीं नटविलेल्या शरीरापेक्षां कांहींचें रूप स्वाभाविकच अधिक सुंदर दिसतें. तु०— Beanty unadorned is adorned the best.

नोकर ~ नोकर काम करतो आणि धनी पैसे वांचवितो—इकडे मजूरवर्ग एकसारखा राबतो तर तिकडे मालकवर्ग पैसे सांचवीत राहतो. ?

नोकरी नित्य नवी — रोज नोकरी करावयाची ती आपण नवीन नोकरीस लागलों आहों अशा आस्थेनें करावी लागते. जुना नोकर म्हणून कोणी गय करीत नाहीं. —सवि. ३००९.

नोडगा ~ नोडगा आणि भोंडगा दोघे सारखेच — [भोंडगा=भंडारी] दोघेहि आडदांड आणि कडवे अशा अर्थी.

नौबत ~ नौबत गुजरणें — आपत्ति येणें; संकट येणें. 'शेवटीं अलमगिराचें कारकीर्दीत यज्ञोपवीतास साडेतीन रुपये जेजया बसून, ओलें अन्न विकावें, सर्वांनीं घ्यावें, हे नौबत गुजरली.' —ऐ. टि. भा. १ —ले. १३.

नौबत जंगावर आणणें — लढाईचा प्रसंग आणणें. 'खानदान असफजाही व खानदान श्रीमंत राजश्री पंत प्रधान

यांचा इतिफाक एकदिली मजबूत व दुरुस्त पहिलेपासून चालत असतां अलीकडे खलश नाखुशी दौलानीं केली व नौबत जंगावर आणिली व मुलकाची खराबी करविली.'

—ऐ. प. ८ (भारतवर्ष १.२)

नौबत झडणें — १ नगारा वाजणें. २ (व.) ताशेरा निघणें.

नौबत पोहोंचणें — प्रसंग येणें. 'सांप्रत घरांतील फूट पडल्यामुळें या थरास नौबत पोंहचली.' —रा. ६.५०.

नौबती ठोकणें — हर्षानें टाळ्या वाजवूं लागणें. 'नौबती ठोकणें आनंदानें।' —सप्र. २.१४.

न्यहाल ~ न्यहाल करणें — कृपा करणें. 'हंसिणी कधीं ग करशिल न्यहाल हंसाशीं।' —प्रला २०८.

* **न्याय ~ न्याय सांगणें** — तक्रार करणें; न्याय मागणें. 'म्हणे तुकयानें साधियेला दावा। न्याय सांगावा कवणासी ॥'

* **न्याय करतलो जाल्यार फोण्या वचुंक नाका** — (गो.) न्याय करायचा तर त्याला कांहीं फोंडें गांवींच जायला नको. कोठेंहि न्याय मिळावा.

न्याय नाहीं गांवाला, चोर दंडी सावाला — ज्या गांवीं न्याय नाहीं तेथें लबाड लोक साधु लोकांसच दंड करतात. अशा ठिकाणीं चोरांचेंच राज्य असतें.

न्याय व अधिकार हे बरोबर जातात — सत्ता असल्याशिवाय न्याय राखतां येत नाहीं.

न्यायाक नीतीचें बळ, अन्यावाक धुमक्यांचें बळ — (गो.) न्यायाला नीतीचें बळ तर अन्यायाला माराचें बळ. न्यायी लोक नीतीनें वागतात तर अन्यायी बळजबरी करून आपले हेतु तडीस नेतात.

न्यायाधीश ~ न्यायाधिशाला काळाची अपेक्षा नसते, गोष्टीची असते — न्यायाधिश परिस्थितीकडे पाहात नाहीं, वस्तुस्थितीकडे पाहात असतो.

न्हय ~ न्हय धुलें तडी वाळलें — (गो.) नदींत धुतलें आणि कांठावर वाळवलें.

न्हय भली म्हण बांय भली न्हीं, बांयचे बगले गॅल्या राजू जाय — (गो.) नदी चांगली म्हणून विहीर चांगली नव्हे. विहिरीजवळ गेलें तर हातानीं घेऊन पाणी पितां येत नाहीं. दोर लागतो. जात एक असली तरी एकाच मापानें सगळ्यांना मोजूं नये, त्यांतहि बरेंवाईट असतेंच अशा अर्थानें म्हणतात.

न्हंय भोळी, पुण बांय भोळी न्हंय — (गो.) नदी उघड उघड घात करील पण विहीर अचानकपणें घात करील.

न्हंयचें तोंड बांधु जाता पोण लोकांचें तोंड बांधु जायना — (गो.) एकवेळ नदीचें तोंड बांधतां येईल; पण लोकांचें तोंड बांधणें कठीण. लोकांच्या तोंडाला हात लावतां येत नाहीं.

न्हयंतलें काढलें, बांयक घालें — नदींतलें काढलें, विहिरींत घातलें. दोहोंकडें पाणी हें आहेच.

न्हाऊ ~ माणसांत न्हाऊ आणि पक्ष्यांत काऊ — मागें पहा.

न्हाऊ-काऊ, उपाध्या त्यांचा मावस भाऊ — न्हावी, कावळा व उपाध्याय हे सर्व लबाड असतात. नराणां नापितो धूर्तः पहा.

न्हाऊ, काऊ, कोल्हे कुत्रे चौघे भाऊ! — न्हावी, कावळा, कोल्हा व कुत्रा हे सर्व लबाड असतात.

न्हाणवणी; न्हाणोली ~ न्हाणवणीला गोड मिळे, विटाळशीला तुकडे शिळे — मुलीस प्रथम नहाण येतें त्यावेळीं मखर वगैरे घालून मोठा उत्सव करतात व तिला चांगलीं गोड पक्वान्नें खावयास घालतात पण त्या पुढें ती विटाळशी झाली म्हणजे शिळे तुकडे खावयास घालतात. नव्याचे नऊ दिवस.

न्हाणोलीबाई कान्होली खाई, बाळंतीणबाई तूप करंज्या खाई, विटाळशीबाई ताक पीठ खाई — वरील प्रमाणेंच.

न्हाणी ~ न्हाणी पाह्यला विटाळ येणें — (बायकी) बाळंतीण झाल्यापासून पहिल्या तीन महिन्यांच्या आंतच विटाळशी (बाहेरची) बसणें.

न्हाणी पाह्यला साप येणें — (गर्भवती स्त्रीनें साप पाहिल्यास त्याचे डोळे जातात अशा समजुतीवरून) बाळंतिणीचे न्हाणींत साप निघणें. असा साप न्हाणीच्या पाण्यांत लोळला म्हणजे त्याची गेलेली दृष्टि फिरून येते म्हणतात.

* **न्हाण्याचे वेळी नवरा नवरी थुकली, आईला उकळी फुटली** — वरवधूंचें नहाणें चालले असतांना तीं एकमेकांवर चुळा टाकतात त्या पाहून मुलीच्या आईस फार आनंद होतो.

न्हाणें ~ न्हातीचे बाल अन् खातीचे गाल केव्हांहि दिसणार — खाती पहा.

वधू न्हाली झाली आणि बाफा शिंपला गेला; जांवई न्हाला, बाफा शिंपला — दोन कामें एकदम होणें. जांवई पहा.

न्हांवचें चड जावये, जेंवचें चड जाव नये — (गो.) आंघोळीचें पाणी अधिक झालें तरी चालेल कारण तेवढें अंग स्वच्छ होईल. पण जेवण अधिक होऊं नये. अपचनाची भीति.

न्हावी ⁓ न्हावी उठला कीं खुंट फुटला — न्हावी हा नेहमीं खुंटावर बसणारा मनुष्य; तो असला म्हणजे चार लोक गप्पा मारावयाला तेथें जातात व तो उठला म्हणजे सर्वांची पांगापांग होते.

न्हाव्याचा उकिरडा कितीहि उकरला तरी केसच सांपडणार; न्हाव्याच्या उकिरड्यावर केसांचा (मोठा) भार — १ न्हाव्याजवळ केसांखेरीज काय असणार? जो ज्याचा धंदा त्या संबंधीच त्याचा संग्रह असणार. २ कोळसा उगाळावा तितका काळाच याप्रमाणें.

न्हाव्याची परीक्षा नखांत, कारकुनाची टाकांत— न्हाव्याची खरी परीक्षा तो नखें किती कौशल्यानें न दुखवितां व न उरवितां काढतो यांत असते; त्याप्रमाणें कारकुनाची परीक्षा त्याच्या लिहिण्यावरून करतां येते.

न्हाव्याची फुकट खेप, यजमान घेती गाढ झोप — यजमान निजून उठले नसले तर गरीब बिचाऱ्या न्हाव्याला पुन्हां खेप घालावी लागते. यजमानाच्या मर्जीप्रमाणें आश्रितास वागावें लागतें.

न्हाव्याचें न्हावण्य, ब्राम्हणाचें ब्राम्हण्य — ज्याला त्याला आपली जात श्रेष्ठ वाटते.

न्हवीण ⁓ न्हावणीचे शिंदळकेक परटिणीचें नाक — सोम्याच्या अपराधाबद्दल गोम्याला प्रायश्चित्त.

न्हिदचें ⁓ न्हिदिलो न्हिदून गेलो, सोप्यावेल्याचो आंड कापलो — (गो.) निजणारा निजून गेला (व्यभिचार केला), पण सोप्यांत निजणाराचें मात्र अंड कापलें. एकाचा गुन्हा शिक्षा भलत्याला.

प

पंक ⁓ पंकांतल्या गोष्टी — बायकी गोष्टी.

—पकोघे प्रकरण ३६.

पकड ⁓ पकड धरून बोलणें — सहसा आपण धोक्यांत येणार नाहीं, आपला मुद्दा सुटणार नाहीं अशा तऱ्हेनें धोरणानें बोलणें; पळवाट ठेवून सावधगिरीनें बोलणें.

पकडणें ⁓ पकडला कोल्हा, त्याच रानीं गेला —कोल्ह्याला मळ्यांत ऊंस वगैरे खातांना पकडलें तरी पुन्हां तो त्या मळ्यांत आल्याशिवाय राहात नाहीं. एक वेळ अन्याय मार्गी पडून लाभ झाला तर पुनः तोच मार्ग धरून जाऊं नये. पण मनुष्यास संवय लागली म्हणजे अद्दल घडूनहि ती सुटत नाहीं. वास्तविक येथें पकडला हा शब्द चुकीचा आहे पडकला असा पाहिजे. तशी म्हण आहे ती पहा. पडकणें = संवकणें.

पकडला तर चोर, नाहीं तर बादशहाहून थोर— चोर पहा.

पकडला रोही, त्याच राना जाई — (व.) संवय लागली म्हणजे तीच तीच गोष्ट पुन्हां करावीशी वाटते. पकडला कोल्हा० पहा.

पका ⁓ पके बडके तले, मरनेवाले हैं — वडाचीं फळें पिकलीं असतांहि खालीं उपाशीं मरणें; म्हणजे जवळ साधनें, संपत्ति असतांहि तिचा उपभोग न घेणें, उपभोग घेणें अशक्य होणें, किंवा आळसानें हातीं आलेला लाभ घालविणें.

पक्का ⁓ पक्क्या पानाचा हौशी आणि बारीण आली दाराशीं — विडा खावयास नेहमीं पक्कीं पानें लागत असतां त्यांचा पैसा देतां न आल्यामुळें पानवाली दाराशीं पैशाकरितां खेपा घालूं लागणें. चैन करावयाची पण ती करण्याकरितां जवळ पैसा मात्र नसावयाचा अशा मनुष्याच्या बाबतींत ही म्हण वापरतात.

पंक्ति ⁓ पंक्तिपठाण बारगीर—केवळ पंक्तिबरोबर जेवण्याचें काम करून इतर दिवस आळसांत घालविणारा; भोजनभाऊ. 'छे, छे, ! फुकटोजीराव पंक्तिपठाण हा ! आमच्या उद्योगराजासारखा मित्र नाहीं.'—केरळकोकिळ.

पंक्तिप्रपंच—एकाच पंक्तीस जेवावयास बसलेल्या लोकांपैकीं एकास एक दुसऱ्यास दुसरा, एकास चांगला दुसऱ्यास वाईट असा पदार्थ वाढणें; यावरून पक्षपात करणें; सारखी वर्तणूक न ठेवणें. 'पंक्तीस प्रपंच करूं नये.'

पंक्तिचा भेद करणें; पंक्तिभेद करणें — एकाच पंक्तींत जेवावयास बसलेल्या लोकांस एकास एक पदार्थ तर दुसऱ्यास दुसरा असा फरक करणें; पंक्तिप्रपंच करणें. 'न भेद करि पंक्तिचा अमृत पाजिती सत्यजी।'—केका० १०४. 'न करीच पंक्तिभेद श्रीकृष्णाचा उदारवर पाणी।'

— मोकर्ण ३०.६९.

पंक्तीचा लाभ — एखाद्यास गौरवपूर्वक भोजनाचें निमंत्रण करतांना योजतात. एकत्र भोजन; सहभोजन; एका पंक्तीस जेवणें.

पगडी बांधणें – सन्मान करणें ; अहेर करणें, देणग्या देणें. पगडी देणें पहा. 'तो श्रीकृष्णगडी तुम्हांस पगडी बांधी मला लगडी' – आसू. ६.

पगडीभाई – १ पगडी घालणारा गुजराथी मनुष्य ; गुजराथी लोक बहुधा पागोटें घालतात यावरून. २ आपल्या डोक्यावरची पगडी दुसऱ्याच्या डोक्यास घालून त्यास आपला भाऊ मानण्याची चाल पूर्वी रजपूत वगैरे लोकांत होती. तीवरून एकमेकांचीं पागोटीं बदलून बंधुभाव स्थापन केलेला. 'हिंदुस्थानांतील स्वधर्मे कीं पगडीभाई झाल्यावर पोटचें द्यावें पण पाठचें देऊं नये, त्यास रक्षावें.–भा ब. ५. 'खुदाबक्ष, आज आपण पगडभाई झालों ! '—एकच प्याला. २-३.

पगडीवाला – पुण्याचा ब्राम्हण. एकाकाळीं पुण्यास पगडी घालण्याची प्रथा बरीच रूढ होती त्यावरून म्हणत. अलीकडे ही प्रथा कमी होत चालली आहे. 'कोंकणचा पगडीवाला. '—संग्राम २८.

पगडी हरणें — खोड मोडणें ; अब्रू घेणें.

— मो हरिवंश १.८३.

* **शीर सलामत तो पगडी पचास** — मनुष्य स्वतः जिवंत राहिला तर तो पुढें वैभव मिळवूं शकतो पण शीरच गमावलें तर सर्वच ग्रंथ आटोपतो. याकरतां हर-प्रयत्नें करून स्वतःचा प्राण रक्षण करण्याची खटपट करावी. तु०—आत्मानं सततं रक्षेद्दारैरपि धनैरपि ।

पंगत~**पंगत वाजविणें** — लग्न वगैरे समारंभांत पंगत जेवावयास बसली असतां सनई वगैरे वाद्यें वाजवून तिची करमणूक करणें.

पंगत वाढणें — पंक्तींत जेवणारांस पदार्थ पुरविणें ; वाढप करणें.

पंगत साधणें — १ जेवण्याच्या वेळेवर उपस्थित होणें ; वेळेवर हजर राहणें. २ संधि साधणें.

पंगती करणें — प्रत्येकानें आपापल्या घरांतील फराळाचें आणून तें सर्व मुलींनीं एके ठिकाणीं एकमेकींस वांटून जेवण करणें. विशेषतः चांदण्यांत याला "आंगती पंगती" म्हणतात.

पंगतीस घेणें — १ आपल्या बरोबर जेवावयास बसविणें. २ बरोबरीचा मान देणें. ३ रोटीव्यवहार करणें.

पंगतीस चुकणें — १ उशीर झाल्यामुळें पंगतीबरोबर जेवावयास नसणें. २ संधि गमावणें ; होणारा लाभ गमावणें. ३ पंक्तींतील आपलें स्थान गमावणें ; उच्चपदावरून खालीं येणें.

पंगतीस बसणें—१ बरोबर भोजनास बसणें. २ समान दर्जा प्राप्त होणें ; एका माळेंत येणें ; बरोबरी होणें.

* **पंगतीस चुकला तो जेवावयास मुकला**—पंक्ति पहा.

पगती~**पगतीला येणें** — (वे.) वयांत येणें. 'मुलगा पगतीला आला आहे. ' —कुळकर्णी वही.

पगार~**बैठा पगार** — चाकरी न करतां घरबसल्या मिळणारा पगार; केवळ नोकरींत कायम ठेवण्याकरितां काम न करतांहि जें वेतन देतात तें. कांहीं कामागिरी नसल्यामुळें विनाकार्य वेतन द्यावें लागतें तें.

पंगिरो~**पंगिरो पोटल्न आंगा कांटे**—(गो.) पांगाऱ्याच्या झाडाला कवटाळलें तर अंगाला कांटेच बोचायचे. दुर्जनांचा आश्रय अनर्थावह असतो.

पंच~**पंच उपप्राण** — पांच वायु. १ नाग–शिंक येणारा. २ कूर्म–जांभई येणारा. ३ कृकल –ढेंकर येणारा. ४ देवदत्त–उचकी येणारा. ५ धनंजय–सर्व शरीरांत राहणारा व तें पुष्ट करणारा. 'नाग कूर्म कृकल देवदत्त । पांचवा धनंजय जाण तेथ।' — एभा. १३. ३२०.

पंच कन्या—१ अहिल्या, २ द्रौपदी, ३ सीता, ४ तारा, ५ मंदोदरी. या पांच सती. — प्रातःस्मरण.

पंच कर्मे—(अ) १ ओकणें, २ रक्तस्राव होणें, ३ मलोत्सर्ग, ४ मूत्रोत्सर्ग, ५ नाक शिंकरणें, (आ) १ उत्क्षेपण-वर करणें, २ अपक्षेपण–खालीं करणें, ३ आकुंचन–आंखडणें, ४ प्रसारण–पसरणें, ५ गमन–जाणें.

पंच कर्मेंद्रियें — १ हात, २ पाय, ३ वाणी, ४ शिस्न, ५ गुद.

पंच कल्याण–णी — १ चार पाय गुडघ्यापर्यंत पांढरे व तोंडावर पांढरा पट्टा असलेला घोडा. 'पंचकल्याणी घोडा अबलख।' २ (उप.) सर्व अवयव विकृत असलेला मनुष्य. ३ (उप.) भाड्याचें तट्टू (यास दोन टांचांनीं, दोन मुठींनीं व दांडक्यानें मारून किंवा तोंडानें चक्चक् करून चालवावें लागतें म्हणून). ४ (उप.) ज्याच्या नाकास सदैव शेंबूड असून तो मणगटानें टिरीस पुसतो असा पोर.

पंच कषाय — पथ्यामलकमंजिष्ठा लोध्रतिंदुकवाश्चवा । पथ्य (हिरडा), आमलक, मंजिष्ठ, लोध्र, तिंदुक (टेंभुरणी).

पंच काव्य—शिशुपालवध, रघु, किरात, नैषध, कुमारसंभव.

पंचकुळी—भोसले, गुजर, शिर्के, मोहिते आणि महाडिक पूर्वी भोसल्यांचा इतर कुळीशीं शरीरसंबंध होई. पण

* **पंक्तिस चुकला तो भोजनास (जेवायास) मुकला**—जो घरांतील सर्व लोकांबरोबर जेवावयास वेळच्या वेळीं हजर नसेल त्यास जेवण मिळणार नाहीं. आलेल्या संधीचा जो योग्य वेळीं फायदा करून घेत नाहीं, त्यास मागाहून पश्चात्ताप करण्याची पाळी येते.

पंक्तिस भोजन व सदरेस निद्रा—१ सुखी जीवन; निष्काळजी आयुष्यक्रम. २ केवळ पंक्तीबरोबर जेवण करून बाहेर ओसरीवर झोंपा काढणारा मनुष्य. आळशी मनुष्य.

पक्वान्न ~ पक्वान्नाचा घांस, त्याला विघ्नांची रास — चांगलीं चांगलीं पक्वान्नें मिळण्याच्या कामीं नेहमीं अनेक अडचणी मार्गांत असतात. जो मनुष्य सुखाचा उपभोग घेत असतो त्याला प्रथम पुष्कळ कष्ट करावे लागतात. सुखाचा लाभ सहज होत नाहीं.

पक्वान्नांत लाडू आणि गोतांत साडू — ज्याप्रमाणें लाडू हा पक्वान्नामध्यें श्रेष्ठ व आवडता त्याप्रमाणें नात्याच्या माणसांत बायकोच्या बहिणीचा नवरा हा अतिशय प्रिय वाटतो.

पंख ~ पंख फुटणें — १ वयांत येणें. पक्ष्याच्या पिलांस पंख फुटले म्हणजे तें स्वतः उडूं लागतें, आपलें भक्ष्य मिळवूं लागतें व याप्रमाणें स्वतंत्र होतें. २ उडून जाणें; पळून जाणें, ३ लबाडी वगैरे करण्यांत तरबेज होणें; शहाणें होणें; अट्टल बनणें.

पखवाज ~ पखवाजाला दोहींकडून मार — थपडा—पखवाज वाजवितांना त्याच्या दोन्ही बाजूंवर थापा मारतात तेव्हां गाण्याला साथ होते. यावरून दोन्हींकडून बोलणीं खाणें, वाईटपणा येणें. (गु.) पखवाजने बे पासानो मार.

पंखा ~ पंख्यानें धुकें फांकत नाहीं — थोड्या श्रमांनीं मोठें कार्य होत नाहीं. अल्प श्रमांनीं महत्कार्य साधत नाहीं. (जपानी म्हण)

पखाल ~ पखाल पार्वती—लठ्ठ बायको; ढेरपोटी.

पखाल सोडणें—(बायकी) मूत्र विसर्जन करणें. निंदार्थी योजतात.

पग ~ पगीं धरणें — [पग = पाय] पाय पकडणें; बोलण्यांत, शब्दांत पकडणें; युक्तीनें कबज्यांत आणणें.

पगीं सांपडणें—बोलण्यांत, शब्दांत सांपडणें.

पगदस्तीं धरणें—आणणें — दुसऱ्याला भाषणांत पकडणें.

पगदस्तीं सांपडणें — भाषण वगैरेंत स्वतः अडकणें.

* **पगे माछला मारे, मोडे राम पुकारे** — पायांनीं मासे मारतो व तोंडानें राम राम म्हणतो. वरून साधूचें सोंग आणून दुष्ट कृत्यें करणारा. तु० — मधु तिष्ठति जिव्हाग्रे हृदये तु हलाहलम्।

पगडबंद ~ पगडबंदाचें पागोटें मोडकें—पगडबंद एकसारखा दुसऱ्यांचीं पागोटीं नीट बांधून देतो पण त्याचें स्वतःचें पागोटें मात्र मोडकेंच असतें. म्हणजे स्वतः विषयीं बेफिकीर किंवा स्वतःकडे लक्ष देण्यास होतच नाहीं.

पगडा ~ पगडा पाडणें — श्रेष्ठत्व स्थापन करणें; पराक्रम करणें; महत्कृत्य करून प्रसिद्ध होणें. 'पगडा पाडीन जगीं शरटंकें करिन चूर्ण त्या दगडा।'

— मो. कर्ण २७.२४.

पगडा बसणें—बसविणें — पगड्याचें दान पडलें असतां मेलेली नरद बसवितां येते यावरून डावास जोर येणें, दुसऱ्यावर छाप पडणें; वरचष्मा होणें; प्रभाव पडणें. 'इंग्रजी-सारख्या प्रबल परभाषेचा मराठीवर अगदीं पगडा बसून तिचें स्वत्व नष्ट होण्याच्या बेतांत आहे.'

— नि. ६.

पगडी ~ पगडी उतरणें — अपमान करणें; मान-हानि करणें.

पगडी उरूं न देणें—१ नक्षा उतरणें; जेरीस आणणें; पाडाव करणें; हतबल करणें. 'जेणें अप्रणतांच्या न शिरीं शाश्वत उरों दिली पगडी॥' — मो द्रोण ६.२२. २ अप-मान करणें; मानहानि करणें.

पगडी घेणें—विद्यादि गुणांनीं एखाद्यावर वरचढ होणें; वरचष्मा मिळविणें; वर्चस्व स्थापन करणें.

पगडी देणें — बहुमान करणें; गौरव करणें. 'ज्या प्रभुनें अनताची हरिलीच, नता जना दिली पगडी॥'

— मो. हरिवंश १.८३.

पगडी फिरवणें — १ करार, वचन, शब्द न पाळणें; प्रथम केलेल्या कराराच्या विरुद्ध वर्तन करणें. २ पक्ष बदलणें; मतपरिवर्तन करणें. ३ सामोपचार सोडून विरोध करणें.

पगडी फेकणें — झोंकानें पागोटें चढविणें; वैभवाचें प्रदर्शन करणें; ऐट करणें.

पगडी फेंकून जाणें — पगडी फिरविणें; फेरपगडी करणें; वर पहा.

पुढें पंचकुळींतील मराठ्यांशिवाय इतरांशीं होऊं नये असें ठरलें. 'पंचकुळी' खेरीज बाकीच्यांस 'शहाण्णव कुळी' म्हणतात.

—मराचिथाशा ४८ (टीप).

—पंतप्रधान यांची दुसरी शकावली (भारतवर्ष) पृ. ६८.

पंच कृष्ण — महानुभावी पांच कृष्ण. (अ) १ कृष्ण चक्रवर्ती, २ मातापूर–दत्त, ३ ऋधिपूर–गुंडम राउळ, ४ द्वारावती–चांगदेव राउळ, ५ प्रतिष्ठान–चांगदेव राउळ. —चक्र. सि. सू. २१. (आ) १ हंस, २ दत्त, ३ कृष्ण, ४ प्रशांत, ५ चक्रधर. —ज्ञा. को. (म.) ७७.

पंचकें—१ राजपंचक, २ अग्निपंचक, ३ चोरपंचक, ४ रोगपंचक, ५ मृत्युपंचक.

अष्टपंचकें — (१) ज्ञानेंद्रियपंचक—१ श्रोत्र, २ त्वचा ३ चक्षु, ४ जिव्हा, ५ घ्राण. (२) कर्मेंद्रियपंचक—१ वाचा, २ पाणी, ३ पाद, ४ शिस्न, ५ गुद. (३) अंतःकरणपंचक—१ अंतःकरण, २ मन, ३ बुद्धि, ४ चित्त, ५ अहंकार. (४) प्राणपंचक—१ व्यान, २ समान, ३ उदान, ४ अपान, ५ प्राण. (५) विषयपंचक—१ शब्द, २ स्पर्श, ३ रूप, ४ रस, ५ गंध. (६) महाभूतपंचक — १ आकाश, २ वायु, ३ तेज, ४ आप, ५ पृथ्वी. (७) वायुपंचक — १ नाग, २ कूर्म, ३ कृकल, ४ देवदत्त, ५ धनंजय. (८) अवांतरपंचक — १ वैरनयो, २ प्रभंजन, ३ अंतर्यामी, ४ महाप्राण, ५ मुख्य प्राण.

—पंचीकृत विवेक.

पंच केणें — १ मिरी, २ मोहरी, ३ जिरें, ४ हिंग, ५ दगडफूल.–मसाल्याचे पदार्थ.

पंचकेण्याचें दुकाण — किराण्याचें दुकान; वाण-जिन्नसाचें दुकान.

पंच केदार—(अ) १ केदार, २ ममद, ३ तुंग, ४ रुद्र, ५ गोपेश्वर. (आ) १ केदारनाथ, २ मध्यमहेश्वर, ३ तुंगनाथ, ४ रुद्रनाथ, ५ कल्पेश्वर. (इ) १ यम्नोत्री, २ गंगोत्री, ३ केदारनाथ, ४ तुंगनाथ, ५ बदरीनाथ.

पंचकोल — पिंपळी, पिंपळीचें मूळ, चव्य (चवक), चित्रक व सुंठ.

पंच कोश — १ अन्नमय, २ प्राणमय, ३ मनोमय, ४ विज्ञानमय, ५ आनंदमय.

पंच खंडें — १ आशिया, २ यूरोप, ३ अमेरिका, ४ आफ्रिका, ५ ओशियानिया.

पंच खाज–खाद्य — (अ) १ खारिक, २ खोबरें, ३ खिसमिस, ४ खसखस (खवा), ५ खडी साखर, (आ) (गो.) १ नारळाचा खव, २ गूळ, ३ चण्याची डाळ इ. पांच जिन्नसांचा देवास दाखवावयाचा नैवेद्य. (इ) (कों.) १ तांदूळ किंवा गहूं, २ काजळ, ३ कुंकू, ४ उडीदाची डाळ व खोबरें यांचा भूतपिशाचांना द्यावयाचा बळी. (ई) १ खारीक, २ खोबरें, ३ डाळ, ४ लाह्या, ५ पोहे.

पंचगंगा — (अ) १ महाबळेश्वरांतील — १ कृष्णा, २ वेण्णा, ३ कोयना, ४ सावित्री, ५ सरस्वती (गायत्री) यांचें उगमस्थान. (आ) २ काशीक्षेत्रांतील — १ किरणा, २ धूतपापा, ३ गंगा, ४ यमुना, ५ सरस्वती. 'गंगा भारति सूर्यसूनु किरणा वा धूतपापा तसे। पांची एकवटोनि तीर्थ निपजे तें पंचगंगा असे।'—नरहरि-गंगारत्नमाला १५७. (इ) पंचधारा पहा. (ई) १ भागीरथी, २ माय, ३ जात, ४ ज्ञान, ५ सत्रावी (वेदांत). (उ) १ शिवा, २ भद्रा, ३ भोगावती, ४ कुंभी, ५ सरस्वती. —(करवीर महात्म्य).

पंचगणयोग — विदारिगंधा, बृहती, पृश्निपर्णी, निदिग्धिका, श्वदंष्ट्रा.

पंच गति — (अ) १ भरपळा–चौवड, २ तुरकी–गाम, ३ दुडकी, ४ वाजी, ५ चौक. यांची संस्कृत नांवें—१ आस्कंदित, २ धौरितक, ३ रेचित, ४ वालीत, ५ प्लुत.

पंच गंध—१ कापूर, २ कंकोळ, ३ लवंग, ४ जायफळ, ५ सुपारी.

पंचगव्य—१ दूध, २ दहीं, ३ तूप ४ गोमूत्र, ५ शेण (गोमय) यांचें मिश्रण.

पंच गोदानें — १ पापधेनु, २ उत्क्रांतिधेनु, ३ वैतरणीधेनु, ४ ऋणधेनु, ५ कामधेनु.

पंच गौड — (अ) १ गौड, २ कान्यकुब्ज, ३ मैथिल, ४ मिश्र, ५ गुर्जर. (आ) १ सारस्वत, २ कान्यकुब्ज, ३ गौड, ४ उत्कल, ५ मैथिल. (इ) १ कान्यकुब्ज, २ सारस्वत, ३ मैथिल, ४ मागध, ५ गौड.

पंच ग्रंथ—१ संहिता, २ ब्राह्मण, ३ आरण्यक, ४ पद, ५ क्रम.

पंच तत्वें—१ पंचमहाभूतें पहा. २ पंचमकार पहा.

पंचतंत्री नीति — पंचतंत्र हा एक जुना कथाग्रंथ आहे. त्यांत प्राण्यांच्या नीतिकथा आहेत. यावरून अनेक शत्रूंशीं झगडत असतां त्यांना शक्य तर एकत्र न होऊं देतां किंवा त्यांना वेगवेगळें फोडून नंतर त्यांचा समाचार घेणें; भेदनीति.

—केसरी ३-४-४२.

पंच तन्मात्रा — १ गंध, २ रस, ३ रूप, ४ स्पर्श, ५ शब्द.

पंच ताल — १ डोडी ताल, २ सप्तरुद्र ताल, ३ वासुकी ताल, ४ लोकपाल ताल, ५ सतोपंथ ताल; हीं हिमालयांतील तीर्थें आहेत. ताल = तलाव.

पंच तिक्त — पांच कडू पदार्थ :— निंबामृतावृषपटोल निदिग्धिकाश्च । निंब, अमृता, वृष, पटोल (पडवळ) व निदिग्धिका (रिंगणी).

पंच तीर्थ — (अ) १ हरिद्वार किंवा त्र्यंबकेश्वर येथील गंगाद्वार, २ कुशावर्त, ३ बिल्वक, ४ नील पर्वत, ५ कनखल. (आ) बदरीनाथ येथील तीर्थें:–१ वन्हितीर्थ, २ प्रल्हादकुंड, ३ नारदकुंड, ४ कूर्मधारा व ५ लक्ष्मीधारा.

पंचदश कर्में (ब्राह्मणांचीं) — १ यजन, २ याजन, ३ अध्ययन, ४ अध्यापन, ५ दान, ६ प्रतिग्रह, (हीं षट्कर्में) ७ शम, ८ दम, ९ तप, १० शौच, ११ शांति, १२ आर्जव १३ ज्ञान, १४ विज्ञान, १५ आस्तिक्य बुद्धि. याप्रमाणेंच क्षत्रियांचीं नवकर्में व वैश्यांचीं सहा कर्में सांगितलीं आहेत.

—पंचीकृत विवेक पृ. २९.

पंच दाळी — १ तूर, २ हरभरा, ३ मूग, ४ उडीद, ५ वाटाणा.

पंच दीर्घ—ज्याचे बाहु, नाक, डोळे, छाती आणि पोट हे पांच अवयव लांब असतात तो. सामुद्रिकांत हें शुभ लक्षण मानतात.

पंच देवता—पंचायतन पहा.

पंच देवी—१ दुर्गा, २ पार्वती, ३ सावित्री, ४ सरस्वती, ५ राधिका.

पंच देह — १ स्थूलदेह (औटहात प्रमाण), २ सूक्ष्मदेह (अंगुष्ठ प्रमाण), ३ कारणदेह (अंगुल प्रमाण), ४ महाकारणदेह (मसूर प्रमाण), ५ अनिकारणदेह (राई प्रमाण).

पंच द्राविड—(अ) १ तैलंग, २ द्राविड, ३ कर्नाटकी, ४ महाराष्ट्रीय, ५ कोंकणी. (आ) १ तैलंग, २ द्राविड, ३ महाराष्ट्रीय, ४ कर्नाटकी, ५ गुर्जर.

पंच धान्यें — पांच हवनीय धान्यें : १ गहूं, २ जव, ३ तांदूळ, ४ तीळ, ५ मूग.

पंच धान्यांचा काढा — १ धने, २ वाळा, ३ सुंठ, ४ नागरमोथा, ५ दालचिनी यांचा काढा.

पंच धार — १ तुपाच्या भांड्यांत पांच बोटें बुडवून अन्नावर शिंपडणें. २ झाडास पाणी घालण्याची पांच धारांची झारी.

पंच धारा—१ (विनोदानें) तिखट पदार्थ खाल्ला असतां किंवा नाकांत गेला असतां दोन डोळे, दोन नाकपुड्या व तोंड यांतून वाहणाऱ्या पांच धारा.

पंच नख-नखी — १ सायाळ, २ घोरपड, ३ गेंडा, ४ कांसव, ५ ससा. 'पंच पंचनखाः भक्ष्याः'

—भट्टीकाव्य ६. १३१.

पंच नद — १ शतद्रू, २ इरावती, ३ विपाशा, ४ चंद्रभागा, ५ वितस्ता या पांच नद्यांनीं युक्त असा देश (पंजाब), आधुनिक नांवें–झेलम, चिनाब, रावी, बियास व सतलज.

पंच नीरांजन — दीप, कमळ, वस्त्र, आंब्याचें किंवा वडाचें पान व साष्टांग नमस्कार हें पांच पदार्थ देवाला समर्पण करणें.

पंच पक्वान्न—लाडू, पुरणपोळी इ. पांच उंची मिष्टान्नें. १ घीवर, २ लाडू, ३ खाजी, ४ जिलबी, ५ गुळोरी.

पंच पक्वान्नाचें ताट पुढें येणें — सुख, ऐषआराम असणें, अगदीं चांगली स्थिति असणें. 'पंच पक्वान्नाचें ताट पुढें आलें तें एकीकडे लोटून देऊन तुमच्या मसलतीस लागलों त्याचें फल अतोभ्रष्ट ततोभ्रष्ट जालों.' —बापूगोप १३१.

(पुढें) पंच पक्वान्नाचें ताट वाढून ठेवणें—नशिबीं असणें; भोगावयाचें असणें. 'पण दुर्दैवानें अमेरिकेंत माझ्यापुढें कोणतें पंचपक्वान्नाचें ताट वाढून ठेवलें जाणार आहे, याची त्याक्षणीं थोडीसुद्धां कल्पना माझ्या मनांत आली नाहीं.'

—सुंद्राबाई ६३.

पंच पंच उषःकाल — सूर्योदयापूर्वीचा पांच घटकांचा काल; अरुणोदयाचा काल. 'पंच पंच उषःकालीं रविचक्र निघो आलें।' —होला १७.

पंच पर्व — १ व्यतिपात, २ वैधृति, ३ संक्रांत, ४ पौर्णिमा, ५ अमावास्या. चतुर्दश्यष्टमी चैव अमावास्या च पूर्णिमा । पर्वण्येतानि राजेंद्र रवि संक्रांतिरेव च ॥

पंच पल्लव — (अ) १ आंबा, २ पिंपळ, ३ वड ४ पिंपरी, ५ उंबर (नांदुरुखी). (आ) १ आंबा, २ उंबर, ३ दूर्वा, ४ पिंपळ, ५ रुई. (इ) १ आंबा, २ उंबर, ३ जांभुळ, ४ रुई, ५ पिंपळ.

पंच पाखंड—१ जैन, २ बौद्ध, ३ चार्वाक, इ. पांच.

पंच पांडव—१ धर्म, २ भीम, ३ अर्जुन, ४ नकुल, ५ सहदेव.

पंच पितर—१ जन्मदाता, २ अन्नदाता, ३ भयत्राता, ४ उपनेता, ५ विद्यादाता. जनकश्चोपनेताच यश्च कन्यां प्रयच्छति । अन्नदाता भयत्राता पंचैते पितरः स्मृताः ॥

पंच पुरुषार्थ — १ धर्म, २ अर्थ, ३ काम, ४ मोक्ष,

५ परमप्रेमरूपा—परानुरक्ति भक्ति. 'जैसा ज्यासी भावार्थ। तैसा पुरवी मनोरथ। पढिये पंच पुरुषार्थ। तो हरि नांदत वैकुंठीं।'
—एभा. २४, २७०.

पंच प्रमाणें — १ शब्द प्रमाण, २ आप्त वाक्य प्रमाण, ३ अनुमान प्रमाण, ४ उपमान प्रमाण, ५ प्रत्यक्ष प्रमाण.

पंच प्रयाग — (अ) १ नंदप्रयाग, २ स्कंदप्रयाग, ३ रुद्रप्रयाग, ४ देवेंद्रप्रयाग, ५ कर्णप्रयाग. (आ) १ देवप्रयाग, २ रुद्रप्रयाग, ३ कर्णप्रयाग, ४ नंदप्रयाग, ५ विष्णुप्रयाग.

(इ) १ विष्णुप्रयाग, लेटी व अलकनंदा यांचा संगम
२ कर्णप्रयाग, पिंडार व „ „ „
३ रुद्रप्रयाग, मंदाकिनी व „ „ „
४ देवप्रयाग, भागीरथी व मंदाकिनी „ „
५ भूतप्रयाग, यमुना व गंगा „ „

पंच प्रलय — १ निद्रा प्रलय, २ मरण प्रलय, ३ ब्रम्ह्याचा निद्रा प्रलय, ४ ब्रम्ह्याचा मरण प्रलय, ५ विवेक प्रलय.

पंचप्राण — १ प्राण, २ अपान, ३ व्यान, ४ उदान, ५ समान.

डोळ्यांत पंचप्राण उभे राहणें — अगदीं मरणाच्या अवस्थेला पोंचल्याप्रमाणें पाहणें; तशी मनाची स्थिति होणें. 'तिच्या डोळ्यांत तिचे पंचप्राण उभे राहिले होते. ते प्राणच जणूं काय द्रवीभूत होऊन तिच्या डोळ्यांतून निचरत होते.'—कवठेकर, अपुरा डाव २४४.

पंचप्राण ओवाळणें ; पंचप्राणांची आरती करणें —ओवाळणें—दुसऱ्याकरतां सर्वस्व, प्राणहि देणें; एखाद्यावरून प्राणहि कुरवंडी करून टाकणें; अत्यंत प्रेम दाखविणें; आत्यंतिक निष्ठा दाखविणें.

पंच बदरी — (अ) १ योग बदरी, २ राज बदरी, ३ आदि बदरी, ४ वृद्ध बदरी, ५ ध्यान बदरी. (आ) १ विशाल बदरी. २ ध्यान बदरी, ३ योग बदरी, ४ वृद्ध बदरी, ५ भविष्य बदरी.

पंच बला — १ बला, २ नाग बला, ३ अति बला, ४ राज बला, ५ महा बला.

पंच बाण — मदनाचे पांच बाण : १ अरविंद, २ अशोक, ३ च्यूत, ४ नवमल्लिका किंवा मोगरा, ५ नलोत्पल.

पंच भद्र — कंठ, पाठ, मुख, कटि व पार्श्व भाग या पांच ठिकाणीं भोंवरे असलेला (घोडा). हा शुभलक्षणी समजतात.

पंच भृंग — १ देवदाली (देवडंगरी) २ शमी, ३ भृंग (भांग), ४ निर्गुंडी, ५ तमालक.

पंचम — नाभि, कंठ, हृदय, कपाळ व रक्ताशय या पांच स्थानच्या वायूपासून निघालेला स्वर.

पंच मकार — शाक्तांच्या तंत्रविधींतील पांच 'म' अक्षरानें आरंभ होणाऱ्या वस्तु :—मद्य, मांस, मत्स्य, मुद्रा, आणि मैथुन.

पंच मघा — १ मघा नक्षत्रीं सूर्य आल्यानंतरचे पहिले पांच दिवस. २ मघापासून पुढचीं पांच नक्षत्रें.

पंच महाकाव्यें—१ रघुवंश, २ कुमारसंभव, ३ शिशुपाल वध ४ किरात, ५ नैषध.

पंच महातत्त्वांचीं देवस्थानें — १ पृथ्वी—कांचीवरम्; २ आप—जंबुकेश्वर (श्रीरंगपासून १२ मैल); ३ तेज — अरुणाचलम् (एम. एस. एम. मलय स्टेशनजवळ); ४ वायु — कालहस्ती (रेणीगुंठापासून गुडूर रस्त्यावर); ५ आकाश—चिदंबरम् (चेंगलपट रस्त्यावर).

पंच महापातकें — १ ब्रह्महत्या, २ मद्यपान, ३ सुवर्णचौर्य, ४ मात्रागमन—किंवा गुरुस्त्रीसंभोग, ५ वरीलपैकीं पातक्याची संगति.

पंच महाभूतें — १ पृथ्वी, २ आप, ३ तेज, ४ वायु, ५ आकाश.

पंच महायज्ञ—(अ) १ ब्रह्मयज्ञ—वेदाध्ययन, २ पितृयज्ञ—तर्पण, ३ देवयज्ञ—होम, वैश्वदेव, ४ भूतयज्ञ—बलि, ५ मनुष्ययज्ञ—अतिथि संतपर्ण. (आ) १ ब्रह्मयज्ञ, २ स्मार्तहोम, ३ अतिथिपूजन, ४ तर्पण, ५ बलिहरण.

पंच महासरोवरें—१ बिंदु सरोवर—सिद्धपूर (मातृगया), २ नारायण सरोवर—कच्छ—मांडवी, ३ मानस सरोवर—हिमालय, ४ पुष्कर—अजमीर, ५ पंपा—होस्पेटनजीक हंपी.

पंच महासागर — १ उत्तर, २ दक्षिण, ३ हिंदी, ४ पासिफिक, ५ अटलांटिक.

पंच माता — १ स्वमाता, २ सासू, ३ थोरली भावजय, ४ गुरुपत्नी, ५ राजपत्नी.

पंचमुखें — (अ) ब्रह्मदेवाचीं — १ दर्दुरमुख (ऋग्वेद जपणारें), २ अश्वमुख (यजुर्वेद जपणारें), ३ जंबुकमुख (अथर्ववेद जपणारें), ४ श्वानमुख, (सामवेद जपणारें), ५ खरमुख, (हें छेदलें गेलें). (आ) १ श्रीमुख, २ कच्छपमुख, ३ जंबुकमुख, ४ वृकमुख, ५ दर्दुरमुख. (मूळस्तंभ). (इ) १ बंदीजन, २ जसवंती, ३ भाट, ४ रायजी, ५ ठाकूर.

पंच मुद्रा — (योग) १ भूचरी (नासिकी—निळी), २ खेचरी (जिव्हा—लालवर्ण), ३ चांचरी (नेत्रकमळी—श्वेत), अगोचरी (श्रवणीं—पीत), ५ अलक्ष (सर्वव्यापक —रूपादिकांनीं रहित). — कथाकल्प. स्त. ८.

पंच मूत्र — १ गाय, २ शेळी, ३ मेंढी, ४ म्हैस, ५ गाढवी यांचें मूत्र.

पंच मूल — (१) शालपर्णी, पृष्ठिपर्णी, रिंगणी, डोरली, गोखरू (लघुपंचमूल). (२) बेल, ऐरण, टेंटू, पाडळ, शिसव (बृहत्पंचमूल). (३) शतावरी, विदारीकंद, जीवंती, पाषाणी, जीवक. (४) गंधाण गवत, हला, अश्वदंष्ट्रा, शिरीष, कासाविंदा. (तृणपंचमूल). (५) शर, इक्षु, दर्भ, कसई, साळीभात (तृणपंचमूल). (६) जीवक, ऋषभक, मेद, महामेद, जीवंती, (७) पुनर्नवा, बला, एरंड, रानउडीद, रानमूग. (८) गोखरू, लहान बोरी, इंद्रवारुणी, कासविंदा, शिरस. (९) गुळवेल, मेंडशिंगि, उपळसरी, विदारिका, निशा (वल्ली पंचमूल).

पंचरंगी घोटा — धोतरा, अफू इ. पांच अमली पदार्थ घालून तयार केलेला घोटा.

पंचरत्न गीता — १ भगवद्गीता, २ विष्णुसहस्रनाम, ३ भीष्मस्तवराज, ४ अनुस्मृति, ५ गजेंद्रमोक्ष.

पंच रत्नें — (अ) १ सोनें, २ हिरा, ३ नीळ, ४ पाच, ५ मोती. (आ) १ सोनें, २ रुपें, ३ पोवळें, ४ मोती, ५ राजावर्त.

पंच रस — (अ) १ सुवर्ण, २ रुपें, ३ लोह, ४ तांबें, ५ जस्त. (निर्णयसिंधु). (आ) १ सुवर्ण, २ रजत, ३ मुक्ता, ४ राजावर्त, ५ प्रवाल. (कुमारसंभव).

पंच लवण—(अ) मीठ, २ बांगडखार, (टांकणखार) ३ सैंधव, ४ बिडलोण, ५ संचळ, (आ) १ काच (क्षारमय रक्षा), २ सैंधव, ३ सामुद्र (मीठ), ४ बिड (एक कृत्रिम मीठ), ५ सौवर्चल (सज्जीखार).

पंच लक्षणें—(अ) पुराणांचीं पांच लक्षणें :—१ उत्पति, २ प्रत्युत्पत्ति, ३ वंश, ४ मन्वंतर, ५ वंशजांचें चरित्र.

सर्गश्च प्रतिसर्गश्च वंशो मन्वंतराणि च ।
वंशानुचरितं चैव पुराणं पंचलक्षणम् ॥ — अमरकोश.

म्हणजे जगाची उत्पत्ति, विनाश, पुनः उत्पत्ति, देव व योद्धे यांचीं वंशचरित्रें यांनीं युक्त असें जें व्यासकृत पुराण तें पंचलक्षणी मानतात. (आ) वैश्यांचीं पांच लक्षणें :— १ आस्तिकबुद्धि, २ विप्रसेवन, ३ ब्रह्मनिष्ठा, ४ अभेद, ५ निर्मत्सर.

पंच लोह—(अ) १ तांबें, २ पितळ, ३ जस्त, ४ शिसें, ५ लोखंड. (आ) १ सोनें, २ तांबें, ३ रुपें, ४ कांसें, ५ बटलोह. — (रत्नाकर.)

पंच वकार — १ विद्या, २ वपु, ३ वाचा, ४ वस्त्र, ५ विभव. विद्यया वपुषा वाचा वस्त्रेण विभवेन वा ! वकारैः पंचभिर्हीनो नरो नाप्नोति गौरवम् ।

पंच वक्त्र-वदन — शिवाचीं पांच तोंडें : १ सद्योजात, २ तत्पुरुष, ३ अघोर, ४ वामदेव, ५ ईशान.

पंचवटी — १ बिल्व, २ पिंपळ, ३ वट, ४ अशोक, ५ औदुंबर, यांचा समुदाय.

पंच वर्ज्य नामें — १ आत्मनाम, २ गुरुनाम, ३ कृपणनाम, ४ ज्येष्ठापत्यनाम, ५ पत्नीनाम.

पंच वल्कल — (अ) न्यग्रोध (अंजीर), उंबर, अश्वत्थ (पिंपळ), प्लक्ष (पिंपरी) व वेत यांची साल. (आ) १ वड, २ उंबर, ३ पारोसा पिंपळ, ४ पायरी (पिंपळ), ५ नांदुखी किंवा वेत. (चूडामणि.)

पंचविध साम — १ संबंध, २ लाभ, ३ उपकृति, ४ अभेद, ५ गुणवर्णन.

पंच विषय—१ कर्ण—शब्द, २ त्वचा—स्पर्श, ३ चक्षु —रूप, ४ रसना—रस, ५ घ्राण—गंध.

पंच वृत्ति — १ कृदवृत्ति, २ तद्धीतवृत्ति, ३ समासवृत्ति, ४ एकशेषवृत्ति, ५ धातुवृत्ति. (— सि. कौमुदी.)

पंच व्यास — १ बृहद्व्यास, २ देवव्यास, ३ मानवव्यास, ४ द्वैपायनव्यास, ५ वेदव्यास.

पंच शर—पंचबाण पहा.

पंच शिला—१ नारदशिला, २ नृसिंहशिला, ३ वराहशिला ४ गणेशशिला व ५ कुबेरशिला. हीं हिमालयांत तीर्थें आहेत.

पंच सच्छूद्र — १ गुरव, २ माळी, ३ गौळी, ४ तराळ, ५ कुंभार. (— धर्मशास्त्र.)

पंच सुगंध—१ कापूर, २ लवंग, ३ कंकोळ, ४ जायफळ ५ अगरू. कोठें अगरूबद्दल सुपारी योजतात.

पंच सूक्तें — ऋग्वेदांतील पांच प्रमुख सूक्तें— १ पुरुषसूक्त, २ देवीसूक्त, ३ सूर्यसूक्त, ४ पर्जन्यसूक्त, ५ श्रीसूक्त.

पंचसूना — १ कांडण, २ दळण, ३ चूल पेटविणें, ४ पाणी भरणें, ५ सारवणें. या क्रियांमुळें जीवनहत्या होऊन कांहीं दोष उत्पन्न होतो.

'पंचसूना किल्बिषें म्हणूनि । एथें वाखाणिती ।'
— यथार्थदी. ३.२३.

'वागेति ज्यांच्या अति संचरूना ।
घडे तयां कोठुन पंचसूना ॥'
— सारुह. ७. २०.

पंच सूक्ष्मभूतें — १ गंध, २ रस, ३ रूप, ४ स्पर्श, ५ शब्द.

पंच स्कंध—बौद्धांचीं दर्शनें—ज्ञानाचे पांच भाग. —(अ) १ रूप, २ वेदना, ३ विज्ञान, ४ संज्ञा, ५ संस्कार. (आ) १ विषयप्रपंच, २ ज्ञानप्रपंच, ३ आलयविज्ञानसंतान, ४ नामप्रपंच, ५ वासनाप्रपंच.

पंच स्थानें (वायूचीं) — १ अपानवायु (मलस्थान), २ समानवायु (नाभि), ३ प्राणवायु (हृदय), ४ उदानवायु (कंठ) ५ व्यानवायु (सर्वशरीर).

पंच स्नानें— १ प्रातः, २ संगव, ३ माध्यान्ह, ४ अपराण्ह, ५ सायंस्नान.

पंच हत्यार—(अ) १ ढाल, २ तरवार, ३ तीर कमान, ४ बंदूक, ५ भाला किंवा पेषकबज. (आ) तलवार, ढाल, तमंचा, कट्यार व दास्ताने हीं पांच हत्यारें दरबार प्रसंगीं वापरावयाचीं. लढाईच्या वेळीं व बाहेर शिलेदारांच्या हातीं जास्त भाला असे.

पंचहत्यारी तट्टू—ज्याला चालविण्याकरितां बसणाऱ्यानें २ हात, २ पाय, १ तोंड अशीं पांच हत्यारें उपयोग करावीं लागतात असें तट्टू; हरदासी तट्टू.

पंच हत्या — १ ब्रह्महत्या, २ भ्रूणहत्या, ३ बालहत्या, ४ गोहत्या, ५ स्त्रीहत्या.

पंच ज्ञानेंद्रियें— १ श्रोत्र, २ त्वक्, ३ चक्षु, ४ घ्राण, ५ जिव्हा. (— मूळस्तंभ.)

पंचांग — पुढील विविध पांच अंगें— (अ) १ त्वक्, २ पत्र, ३ कुसुम, ४ मूल, ५ फल. (आ) १ हस्त, २ मस्तक, ३ वाणी, ४ दृष्टि व ५ जानु. (इ) १ होम, २ मानसपूजा, ३ मूर्तिपूजा, ४ तर्पण, ५ ब्राह्मणभोजन. (ई) १ तिथि, २ वार, ३ नक्षत्र, ४ योग, ५ करण. (उ) चंची, हिच्यांत — पान, सुपारी, कात, चुना, तंबाखू असे पांच जिन्नस असतात यावरून.

पंचांगुलें — १ अंगुष्ठ, २ तर्जनी, ३ मध्यमा, ४ अनामिका, ५ कनिष्ठिका.

पंचाग्नि — (अ) चार दिशांस चार व वर सूर्य. (आ) शरीरांतील पांच अग्नि — कामानल, क्षुधानल, कोपानल, लोभानल इ. (इ) श्रौताग्नि — १ दक्षिणाग्नि, २ गार्हपत्य, ३ आहवनीय, ४ सभ्य, ५ आवसथ्य.

पंचामृत — (अ) १ दूध, २ दहीं, ३ तूप, ४ मध, ५ साखर. देवपूजेसाठीं या पांच पदार्थांचा समुदाय. पयोदधिघृतं चैव शर्करामधुसंयुतं । पंचामृतमितिख्यातं भाषितं मुनयोविदुः ॥ (आ) १ शेंगदाणे, २ मिरच्या, ३ चिंच, ४ गूळ ५ खोबरें यांचें तोंडीलावणें. (इ) १ सुंठ, २ मुसळी, ३ गुळवेल, ४ शतावरी, ५ गोखरू किंवा सुंडी. याला पंचामृत योग असेंहि म्हणतात. (ई) दह्यांत मोहऱ्या घालून करतात तें भोजनांतील.

पंचाम्ल — (अ) १ अम्लवेतस, २ आमसोल, ३ महाळुंग, ४ डाळिंब, ५ ईडनिंबु. (आ) १ आमसोल, २ डाळिंब, ३ बोर, ४ वेतस, ५ चिंच. (इ) १ ईडनिंबु, २ महाळुंग, ३ नारिंग, ४ वेतस, ५ चिंच. (ई) १ कविट, २ डाळिंब, ३ आमसोल, ४ चिंच, ५ अम्लवेतस.

पंचायतन—पंचदेवता पहा. १ विष्णु, २ शिव, ३ सूर्य ४ गणपति, ५ देवी. या पांच मुख्य देवता पंचायतनामध्यें असतात व त्यांत जो ज्या विशिष्ट देवतेचा उपासक असेल तो तीस मध्यें स्थापन करून बाकीच्या चार चारी बाजूस ठेवतो. उदा. विष्णुपंचायतन, शिवपंचायतन, सूर्यपंचायतन वगैरे. यांच्या प्रदक्षिणांचें प्रमाण--गणपति तीन, शिव '॥', हरि चार, सूर्य सात, शक्ति एक.

पंचारति — पांच दीपांची आरती किंवा कापूर पेटवून देवास ओवाळणें. याचे चौदा प्रकार आहेत.

पंचास्त्र (कामाचें)—१ शोषण, २ दीपन, ३ संमोहन, ४ तापन, ५ उन्माद.

पंचाळ — (पांचाळ) १ सोनार, २ सुतार, ३ कासार, ४ लोहार, ५ पाथरवट, हा विश्वकर्मा ब्राह्मणसमुदाय.

पंचाक्षरी मंत्र—नमः शिवाय.

पंचोपचार — (अ) १ गंध, २ पुष्प, ३ धूप, ४ दीप, ५ नैवेद्य. (आ) १ गंध, २ अक्षता, ३ पुष्प, ४ नैवेद्य, ५ मंत्रांजली.

पंचोपविष — १ स्नुही (शेर), २ अर्क (रुई), ३ करवीर (कण्हेर), ४ लांगली (नारळ), ५ विषमुष्टिका (काजरा).

***पंच कहे बिल्ली, तो बिल्लीसैं** — जी गोष्ट पांच लोकांनीं मान्य केली ती आपणासहि मान्य करणें भाग असतें. पांचामुखीं परमेश्वर.

पंच कामाक्षी, मदुरा मीनाक्षी— वरील म्हण फार प्राचीन काळापासून रूढ आहे. पहिली आसाममधील कामाक्षी (कामाख्या) व दुसरी मदुरेंतील मीनाक्षी. मदुरा एक पूर्व टोंकाची व दुसरी दक्षिण टोंकाची व या दोन्ही देवता फार पुरातन काळापासून भारतवर्षात आबालवृद्धांच्या तोंडीं आहेत. — केसरी ७-१-४१. वास्तविक मूळ श्लोक 'कांची कामाक्षी मदुरा मीनाक्षी, माशी पडेल तर धर्मराज साक्षी' असा जेवतांना माशी अन्नांत पडू नये म्हणून म्हणण्याचा प्रघात आहे. कांची येथें कामाक्षीचें व मदुरा येथें मीनाक्षीचें देवालय आहे.

पंचपक्वान्नी जेवण, मुतांचें आंचवण—'जेवावयास पंचामृत०' पहा.

पंच माने खुदा, खुदा माने पंच — पंच म्हणजेच ईश्वर व ईश्वर म्हणजेच पंच. म्हणजे पंचाचें म्हणणें खरें मानावें. जनता जनार्दन.

पंचभिः सह गंतव्यम् — अनेक लोकांच्या सहवासानें गमन केल्यास प्रवास सुखाचा होऊन धोक्याचा संभव कमी असतो. त्याचप्रमाणें चार लोक वागतात तसें वागल्यास आपणास कोणी नांवें ठेवीत नाहीं. सबंध श्लोक असा :— पञ्चभिः सह गन्तव्यं स्थातव्यं पञ्चभिः सह। पञ्चभिः सह वक्तव्यं न दुःखं पञ्चभिः सह ॥ तु०—महाजनो येन गतः स पंथाः ।

जेवावयास पंचामृत आंचवावयास मुतवणी खारें पाणी—प्रथम चांगला आरंभ करून शेवट वाईट करणें. अखेरीस चांगल्या गोष्टीचा विरस करणें. आरंभीं केलेल्या सत्कृत्यावर शेवटच्या कृतीनें पाणी फिरविणे.

पंचामृत खाई त्यास देव देई—जो मनुष्य चांगल्या राहणीनें राहतो त्याचें परमेश्वर चालवतो. चांगली इच्छा धरल्यास चांगलें फळ मिळतें. कृपण वांछा धरल्यास प्राप्तिहि तशीच होते. तु०—साखरेचें खाणार त्याला देव देणार.

वयं पंचोत्तरं शतं—कौरव व पांडव अनुक्रमें शंभर व पांच असून त्यांत उभा दावा होता. परंतु परकीय शत्रु आल्यास आम्हीं एक म्हणजे एकशेंपांच आहोंत असें धर्मराज म्हणत असे. सबंध श्लोक असा:—अन्यैः साकं विरोधेन वयं पञ्चोत्तरं शतम्। परस्परविरोधेन वयं पञ्च च ते शतम् ॥

पचंग~**पचंग बांधणें** — काचा मारणें; तयार होणें; कार्यास सिद्ध होणें 'ऐकोनी संज्ञा भाऊनीं। पचंग बांधिला म्हातारपणीं।' —अफला ४. १७.

पचणें~**पचणीस पडणें**—असाध्य रोगानें खितपत पडणें; दीर्घकाल रोगग्रस्त स्थितींत असणें.

***पचेल ते खावें (नि) रुचेल तें बोलावें; पचेल तितकें खावें, शोभेल तितकें बोलावें** — मिताहारी व मितभाषणी असावें. वाजवीपेक्षां अधिक आहार केल्यास जसा त्रास होतो तसा भलतेंच विधान केल्यासहि पश्चाताप करण्याची पाळी येते. याकरितां ज्याप्रमाणें आहारांत त्याचप्रमाणें बोलण्यांत संयम राखून प्रसंग पाहून भाषण करावें. (गो.) पचद तें खांवका, रुचद तें उलंवका.

पचेल ते खावें, रुचेल तें बोलावें आणि शोभेल तें ल्यावें — वरप्रमाणेंच. पण तसेंच वस्त्रभूषणेंहि आपल्या योग्यतेनुसार धारण करावीं. उगाच बडेजावी मिरवूं नये.

पचन~**पचनीं पडणें**—१ मानवणें; योग्य असणें; हितकारक होणें. २ लाभणें; प्राप्त होणें; पूर्णपणें हस्तगत किंवा आत्मसात होणें.

पचविणें~**खातां आलें तरी पचवितां आलें पाहिजे**—खातां कोणालाहि येईल पण तें सोसलें पाहिजेना! एखादी गोष्ट करण्यास किंवा उपभोगण्यास कठीण नसते पण तिचा परिणाम आपणास भोंवतो, तेव्हां ती गोष्ट करण्यापूर्वी परिणामाकडे लक्ष दिलें पाहिजें.

पंची~**पंची प्यारा**—प्रियकर; आवडता; लाडका 'तो पंची प्यारा चिरिला'। —संग्राम ७८.

पची~**पची करणें** — (पची = सुरक्षित, पक्कें). १ आपल्या वर्चस्वानें, कौशल्यानें दुसऱ्याला हटविणें, मागें सारणें. २ आपल्या कर्तबगारीनें एखादें काम पुरें करणें.

पंजा~**पंजाला येणें**—(बे.) (घोडा, माणूस इ.) तारुण्यांत येणें. 'तो पंजाला आला आहे त्यामुळें त्याला पायांतला दिसत नाहीं'

पंजाब~**पंजाबमेल सुरू करणें** — तोंडाचा पट्टा चालू करणें; सतत बोलणें; फार जलदीनें व एकसारखें बोलत राहणें. पंजाब मेल ही गाडी फार जलद चालते व ती मध्यंतरीं दीर्घकालपर्यंत उभी राहत नाहीं यावरून.

पट (पालथा) ~ **पट काढणें** — (मल्लविद्या) प्रतिपक्षाचा पाय ओढून त्यास चीत करणें. 'प्रसिद्ध गामा या मल्लानें आपल्या प्रतिपक्षी रशियन मल्लास पट काढून एका क्षणांत चीत केलें.'

पटकोडगें — निजविलें असतां चटकन उठून बसणारें बाहुलें. गुरुत्वाकर्षक बाहुली. जडबुडाची व अंग हलकें असलेली बाहुली.

पट घुसणें—(मल्लविद्या) मांड्यांत घुसणें.

पट ~ **पट खळणें** — (महानु.) पांघरूण घालणें. —धवळे, उ. ६.

पटाला बसणें — १ (स्त्री) विटाळशी होणें. २ आषाढ शु॥ १५ पासून भाद्रपद शु॥ १५ पर्यंत संन्याशी पटाला बसतात: या मुदतींत सीमांतर करावयाचें नाहीं. संन्याशानें तीन रात्रीपेक्षां जास्त एके ठिकाणीं राहूं नये असा शास्त्रनियम आहे. परंतु भर पावसाळ्यांत प्रवास करणें तापदायक, सबब ही योजना धर्मशास्त्रानें केली आहे.

पटाला बसणें-बसविणें—फिरती, फिरणें, बंद करणें; स्थानबद्ध करणें. ज्याप्रमाणें सोंगटी आपल्या पटांत आल्यावर पोटांत जाऊन बसते त्याप्रमाणें.

पटावरील सोंगटें—उच्चस्थानावरील मनुष्य; पटावरलि सोंगटी ज्याप्रमाणें मरत नाहीं त्याप्रमाणें महत्वाच्या स्थानीं अढळ बसलेला मनुष्य.

पट (आवृत्ति) ∾ **पटीचें गुणोत्तर** — हिश्याच्या गुणोत्तराची उलटापालट केली असतां निघणारें गुणोत्तर.

पटकी ∾ पटकी गेली आणि महामारी आली— पटकी आणि महामारी हें ऐकाच भयंकर रोगाचें नांव आहे. एक विघ्न दूर व्हावें तों तशाच प्रकारचें दुसरें भयंकर विघ्न यावें अशी स्थिति.

पटकी ∾ पटकी खाणें—१ मोठा तडाखा बसणें; अद्दल घडणें. २ अपथ्यानें दुखणें उलटणें; पलटणें.

पटकी दाखविणें-देणें-लावणें—फसविणें; चकविणें.

पटवा ∾ पटवा दोर — भाताचा मुडा बांधण्याचें केळीचें सोपट.

पट्टा ∾ पट्टा ओढणें-घालणें-पाडणें—क्षेत्रामध्यें यात्रेकरू बरेच आले म्हणजे न्हावी आपलें गिऱ्हाईक कायम रहावें याकरतां प्रथम केंसाचा एक पट्टा काढून तशीच अर्धवट हजामत ठेवून इतर गिऱ्हाईक मिळविण्याकरितां इकडे तिकडे करतात. यावरून, १ हजामत करतांना डोकीवरून वस्तरा खरडणें; एका ठिकाणचे केंस काढणें. २ ओबडधोबडपणें कामाला आरंभ करणें; कशीतरी कामास सुरुवात करणें. ३ काम अर्धवट करून खोळंबत ठेवणें; थोडेंसें केलेंसें दाखवून काम मध्येंच थांबविणें.

पट्टा परजणें — १ पट्टा फिरविणें, खेळणें. २ एकसारखें अकुंठित बोलणें; तडातड बोलणें; बडबडत राहणें; तोंडाचा पट्टा सोडणें.

पट्टा मारणें-देणें—बलात्कारानें लुबाडणें; हिसकून घेणें.

तोंडाचा पट्टा सोडणें—बडबड करणें; सारखी टकळी लावणें; एकसारखें बोलत राहणें.

पट्ट्याचा हात फिरविणें — १ पट्टा चालविणें; तरवार, दांडपट्टा वगैरे खेळणें. २ खोटा आविर्भाव आणणें; नसताच दिमाख दाखविणें.

पट्टाईत शराईत—निष्णात; कुशल; तरबेज.

पट्टी ∾ पट्टी करणें — आश्रयदात्यांची, मदत देणाऱ्यांची यादी करणें; वर्गणी जमविणें.

पट्टी काढणें—खरडपट्टी काढणें; गर्व नाहींसा करणें.

पट्टी चालणें-लागणें — वर्गणी गोळा करण्याचें काम सुरू होणें.

पट्टी देणें — सामान्यतः निरोप देतांना विडा किंवा पट्टी देण्याचा प्रघात आहे यावरून. १ कामावरून दूर करणें २ वाटेस लावणें.

पट्टी पढविणें—(व.) मनाप्रमाणें शिकवून ठेवणें.

पट्टीपलोडी; पट्टीपासोडी—कर; वर्गणी.

पट्टी फाडणें-तासणें — प्रत्येक नांवापुढें येणें रक्कम दाखवून यादी तयार करणें.

पट्टी लावणें — शेतसारा भरणें. 'गेलों होतों पट्टी लावायला'. —ऐपो. ४६.

पट्टी लंगोटी—कर, सारा.

पट्टीचा वैदिक—मंत्रजागर वगैरे ठिकाणीं वेद पठण करण्याकरतां ब्राह्मण समोरासमोर दोन ओळींत बसतात व क्रमानें वेदपठण करतात. अशा रांगेंत फक्त ज्या ब्राह्मणास न चुकतां वेदपठण करतां येत असेल अशासच बसविण्यांत येतें. यावरून विद्वान लोकांप्रमाणें ज्याची योग्यता आहे असा विद्वानांच्या ओळींत बसण्यास लायक वैदिक ब्राह्मण.

पठाडी ∾ पठाडी गोम—१ मोठी जाड, रुंद पाठीची गोम, घोण, २ घोड्याच्या पाठीवरलि केसांची गोम; ही फार मोठी असते व ती अशुभ असते. ३ ढोबळ चूक; फार मोठा दोष.

पठाण ∾ पठाणी खातें-हिशेब-वही — १ अव्यवस्थितपणें, कशीतरी ठेवलेली रोजच्या जमाखर्चाची वही. २ (ल). अव्यवस्थित पत्रक, सूचना इ०

पड ∾ पड घेणें-खाणें— माघार घेणें: हार कबूल करणें; मिटतें घेणें; आवरणें.

पडीचा आंबा—झाडावरून पडलेला, उतरलेला नव्हे असा आंबा.

पडकणें ∾ पडकली कोल्ही, तेंच रान — [पडकली = लालचावली, संवकली] एखाद्या रानांत एकदां पोटभर खाद्य मिळाल्यामुळें लालूच पडून एखादी कोल्ही पुन्हां पुन्हां त्याच रानांत जाईल तर ती प्राणसंकटांत पडण्याचा संभव आहे. मोहास भुलून एकादा माणूस एकदां ज्या गोष्टीनें लाभ झाला तीच गोष्ट पुन्हां करील तर लाभा-ऐवजीं हानि होण्याचा संभव आहे. 'म्हातारा म्हणून एक दिवस तुला शेरभर तांदूळ घातले. तूं आपला रोजच येऊं लागलास. पडकली कोल्ही तेंच रान'.

पडका ∾ पडक्या भिंतीला लिंपू किती, म्हातारा नवरा जपूं किती?—एखादी व्यक्ति किंवा वस्तू जीर्ण झाली म्हणजे तिचें संगोपन, सांभाळ करणें कठिण असतें. पुन्हां पुन्हां तिची अवस्था वाईट होत जाते.

पडचाकर॰चाकराला पडचाकर — आपण एखाद्यास काम सांगितलें असतां तो तें दुसऱ्यास सांगतो अशा वेळीं त्या दुसऱ्या मनुष्यास ह्मणतात. चाकर पहा.

पडणी॰पडणीं पडणें—संकट ओढवून घेणें; नाशास प्रवृत्त होणें. 'त्वदर्थ कोणें पडणीं पडावें । हुताशन प्राशन वा घडावें ॥' — सारुह २.९८.

पडणी॰पडणीस येणें—१ शेत चांगलें पिकणें; दाणा भरणें; दाण्याच्या भारानें कणसें वांकणें. २ वृद्ध होणें; जीर्ण होणें.

पडणें॰अनुमोदन पडणें—हकार मिळणें; संमति मिळणें. 'पडतां वानरांचें अनुमोदन । स्वयें पुसे रघुनंदन ।' — ए. भा. रामायण.

उघडें पडणें—निराश्रित होणें; निराधार होणें. 'ती खळसभेंत उघडी पडते न पडोनि सागरामाजी ।' —मोरोपंत.

कामांत पडणें—अंगावर घेणें; पत्करणें.

जीव खालीं पडणें—भांड्यांत पडणें—जीव पहा.

तुटून पडणें—१ अंगावर चाल करून जाणें; निकराचा हल्ला करणें. २ रागानें बोलणें; ताडताड बोलणें.

पडीं पडणें — १ नाहींसा होणें; बाजूला पडणें. २ अडथळे येणें.

एखाद्या गोष्टीवर-वस्तूवर पडणें — पिच्छा पुरवणें; नादीं लागणें; एकसारखें पाठीस लागणें.

शरपंजरीं पडणें—दुखण्यानें अंथरुणास खिळणें; असहाय होणें.

पडत उभें—१ उपजल्याबरोबर उभें राहूं शकणारें वासरूं वगैरे. २ (ल.) यशस्वी उपाय योजना; पडलेलें उभें करण्याचा उपाय. ३ अनुकूल प्रारब्ध; हीन दशेस गेलेल्याचा उत्कर्ष.

पडता काळ—उतरती कळा; अवकळा; हीन दशा; प्रतिकूल काल.

पडता पाया — १ ऱ्हास; उतरती कळा; ओहोटी. २ खालावलेली स्थिति; दैन्यावस्था.

पडती भावना—१ पाऊस वगैरे पडूं लागणें, येऊं लागणें, सुरुवात होणें. २ ऊन थंडी पडणें, सुरू होणें. ३ आरंभीचें किंवा सुरुवातीचें चिन्ह.

पडत्या पुठ्याचा—उतरत्या कुळ्याचा (घोडा).

पडत्या फळाची आज्ञा—मारुति ज्यावेळीं सीतेच्या शोधाकरितां अशोक वनांत गेला त्यावेळीं सीतेची भेट झाल्यानंतर त्यानें भूक लागली असल्यामुळें फळें खाण्याची आज्ञा मागितली. सीतेनें त्यास पडलेलीं फळें तेवढीं खाण्यास सांगितलें तेव्हां त्यानें कांहीं वृक्षच मुळासकट उपटून त्यांस खालीं आपटून त्यांचीं फळें खालीं पडल्यावर खाण्यास आरंभ केला व याप्रमाणें अशोक वनाचा पार विध्वंस करुन टाकला. यावरुन थोडी फार गोष्ट करण्यास अनुमति मिळाल्याबरोबर तिचा दूरान्वय करून वाटेल तें करण्यास आरंभ करणें, अशा अर्थी हा वाक्प्रचार योजतात. 'असें ह्मणतांच पडत्या फळाची आज्ञा होऊन जयाजी शिंदे यांचे डेरियास आले.' —भाव ८.

'आज बापानें सांगितलें तेव्हां तीच पडत्या फळाची आज्ञा घेऊन तूं माझ्याकडे धांवत आलीस असें उघड उघड दिसतें आहे. खरें ना हें ?' — उग्र ३.१.

पडला झडला—गळून पडलेला; खालीं आलेला.

पडलें पान—खेड्यांतील सर्वाधिकार. ज्याप्रमाणें जमिनीवर पडलेल्या पानाची मालकी जमिनीच्या मालकाकडे जाते; तें झाडावर असेल तोंपर्यंत झाडाच्या मालकाकडे असते. त्याप्रमाणें कोणतीहि गोष्ट जीवर प्रत्यक्षपणें कोणाची सत्ता नसेल ती ज्याच्या मालकीची समजली जाते त्यास पडल्या पानाची सत्ता असते असें ह्मणतात. 'जोशीपणा व कुळकर्ण हे दोनच अधिकार त्याच्याकडे आहेत असें नाहीं तर पडलें पान त्याचें आहे'.

पडल्या पडल्या — १ पडतां पडतां; लोळत असतां. २ आळसानें.

पडल्या पडल्या गोष्टी सांगणें—विचार न करतां गोष्टी सांगणें; कांहीं न करतां नुसतें बोलण्याचें काम करणें.

पडल्या पडल्या जिंकणें—सहज लीलेनें जिंकणें; कांहीं श्रम न करतां साध्य करणें.

पडल्या पानावर हक्क असणें—पडलें पान पहा. खेड्यांतील सर्वाधिकार असणें.

पडल्यावर पाय; पडिल्ल्याचेर पांय दिवप — (गो.) पडलेल्यावर पाय देणें. एखादा माणूस आपत्तींनीं घायाळ झाला असतां आणखी त्याच्यावर एखादें संकट आणणें हें चांगलें नव्हे. (गु.) पड्याउपर पाटुं.

खालीं पडूं देणें—फुकट जाऊं देणें; व्यर्थ करणें. 'वचन त्याचें कदा न पडूं देती खालीं.' —सप्र २.३९.

पळलेल्या फाटीरि पायु दिवंचो—(गो.) पडलेल्याच्या पाठीवर पाय देणें, संकटांत सांपडलेल्यावर प्रहार करणें.

***पट्टा तो वाट्टा** — (गो.) [पट्टा = पडतो] जो पडतो त्याचाच उत्कर्ष होतो. पराजयाच्या अनुभवाखेरीज जय प्राप्त होत नाहीं. तुलना—पडेल तो चढेल, बुडेल तो तरेल.

पडत पासो जाल्यार खेळत पिसो—(गो.) फांसा जर अनुकूल पडेल तर मूर्खसुद्धां जिंकू शकेल. अनुकूल परिस्थितींत मूर्ख मनुष्यसुद्धां महत्पदास पोहोंचतो.

पडतील आर्द्रा तर पडतील गडदरा—आर्द्रांचा पाऊस पडल्यास रेलचेल होते व कडे कोसळून पडतात.

पडतील उत्तरा, तर भात खाईना कुत्रा—उत्तरा नक्षत्राचा पाऊस पडला तर पीक चांगलें येतें व अशा वेळीं कुत्रासुद्धां भात खाईनासा होतो, — शाव १.१२५. पुढें पहा.

पडतील उत्तरा तर भात खाईना कुतरा, न लागल्या उत्तरा तर भात मिळेना पितरा—उत्तरा नक्षत्रांचा पाऊस पडला तर सुकाळ होतो पण तोच जर पाऊस पडला नाहीं तर पितरांस पिंड करण्यापुरतेंहि भात पिकत नाहीं.

पडतील चित्रा तर भात न खाय कुत्रा; न पडतील चित्रा तर हाल खाईना कुत्रा-भात न मिळे पितरा — चित्रा नक्षत्राचा पाऊस पडेल तर पीक उत्तम येते. वर पहा.

पडतील चित्रा स्वाती, तर पिकतील माणिक मोती, पण कापूस न मिळे वाती—चित्रा आणि स्वाती या नक्षत्रांचा पाऊस पडला तर धान्य पुष्कळ पिकून सुबत्ता होते पण कापसाचीं बोंडें गळून पडतात किंवा कापूस भिजून खराब होतो व देवांच्या वातींसहि पुरेसा कापूस पिकत नाहीं.

पडतील मघा, तर चुलीपाशीं (वई वई) हगा, नाहीं तर वर तरी बघा — मघा नक्षत्राचा पाऊस सुरू झाला तर संतत धार लागते व घराबाहेर तोंड काढावयास मिळत नाहीं पण तोच जर पाऊस पडला नाहीं तर आकाशाकडे डोळे लावून बघण्याची पाळी येते.

पडतील मांजऱ्या, तर मरतील उंदऱ्या—विशाखा नक्षत्राचा पाऊस पडला असतां पिकावर किडे वगैरे रोग पडतात ह्मणून त्या नक्षत्रास उंदऱ्या ह्मणतात व अनुराधा नक्षत्राचा पाऊस पडला ह्मणजे हे किडे मरून जातात ह्मणून त्यास मांजऱ्या ह्मणतात. यावरुन अनुराधा नक्षत्र पडलें तर विशाखा नक्षत्रानें आणलेले रोग नाहींसे होतील.

पडतील रोहिणी, तर भाऊ आणील बहिणी—रोहिणी नक्षत्रांत पावसास आरंभ होणें हें सुचिन्ह आहे. तसा पाऊस पडला तरच भावास आपल्या बहिणीस माहेरीं आणावयास सांपडेल, नाहींतर दुष्काळ पडेल.

पडतील स्वाती, तर पिकतील माणिक मोतीं ; पडतील स्वाती तर कापूस मिळेना वाती, पण पिकतील माणिक मोतीं — मागें चित्रा पहा.

पडतील हस्त, तर कुळवाडी होतील मस्त — हस्त नक्षत्राचा पाऊस पडेल तर अशी सुबत्ता होईल कीं कुणबी लोक खाऊन खाऊन चांगलेच माजतील.

पडला काजा, तोच माझा — जो आपल्या उपयोगी पडतो त्यालाच खरोखर आप्त मानावें. बाकीचे सर्व फुकट.

पडला कामाला, तोच खरा आपला — जो आपल्या वेळेवर उपयोगी पडतो त्यासच स्वजन म्हणावें बाकीचे केवळ नांवाचे होत, त्यांचा कांहीं उपयोग नाहीं.

पडला तर आंबा, नाहींतर ओलटा—[ओलटा = हातभर लांबीचा दांडा, काठी]. आंब्याच्या झाडावर ओलटा मारला तर, पडला तर, आंबा मिळेल नाहीं पडला तरी त्यांत कांहीं नुकसान नाहीं. ओलटा खालीं पुन्हां येतोच. प्रयत्न करून पहावें, यश आल्यास ठीकच नाहीं तर कांहीं विशेष हानि होत नाहीं. तु०—गाजराची पुंगी.

पडला तरी वैराटगड — वैराटगड जरी पडला तरी तो कांहीं जमिनीबरोबर होऊं शकत नाहीं. तो सभोंवतीच्या जमिनीपेक्षां उंचच राहणार. त्याचप्रमाणें एखाद्या मोठ्या मनुष्यास हीन दशा आली तरी तो कांहीं अगदीं दरिद्री होऊं शकत नाहीं व दैन्य दाखवीत नाहीं.

पडलें तर दुधांत, नाहींतर दह्यांत — दोन्हीकडून फायदा करून घेण्याची दुटप्पी वृत्ति. 'बिचारें बालक पर्वतराजाची अस्पष्टता किंवा "पडलें तर दुधांत नाहींतर दह्यांत" अशी वृत्ति ह्याबद्दल कुरकुर करीत निघून जातें.'

— सह्याद्रि डिसेंबर १९४२ पा. २१२.

पडलेलें शेण माती घेऊन उठतें — शेण जमिनीवर पडलें तर तें जर पुन्हां उचलूं लागलें तर खालची धूळमाती थोडी तरी त्यास चिकटून येते. त्याप्रमाणें एखाद्यावर दोषारोप केला गेला असतां तो जरी मागून धुवून निघाला तरी त्याला थोडाफार जाचक झाल्याशिवाय राहात नाहीं. दुष्ट मनुष्याचा संसर्ग झाल्यास कांहींतरी दूषण लागल्याशिवाय राहात नाहीं.

पडलेल्या माणसाक काय पिड्याचे घाय — (कों.) मेलेल्याला काय मारावयाचें ?

पडलों तरी आपलें (माझें) च नाक वर—एखादा मनुष्य कुस्तींत खालीं उताणा पडला असतां साहजिकच त्याचें नाक वरच्या बाजूस असतें व पाडणाराचें खालच्या बाजूस असतें. पण पडणारास अपयश येतें तें बाजूस ठेवून तो नाक वर असल्याचीच फुशारकी मारतो. याप्रमाणें निगरगट्ट मनुष्य अपमान झाला तरी कांहींतरी प्रौढी मारीतच असतो.

पडल्या कृत्तिका रोहिणी, तर मृग गेला शयनीं — कृत्तिका आणि रोहिणी या दोन्हीं नक्षत्रांचा पाऊस पडल्यास मृगांचा पाऊस पडत नाहीं.

पडल्ल्या दुःख ना, हांसता ताजो राग येता — (गो.) पडलेल्याचें दुःख नाहीं; लोक हंसतात त्याचा राग येतो. पडण्यापेक्षां दुसऱ्यानें हसण्याचें दुःख माणसाला फार होतें.

पडल्यार आदाव आसिल्लो — (गो.) कांहींतरी फायद्याची गोष्ट होती म्हणून पडला. एक मुलगा एकाएकीं रस्त्यांत पडला. तेव्हां जवळच्या लोकांनीं त्याच्या बापाला 'तुमचा मुलगा पडला' असें जाऊन सांगितलें. त्यावेळीं बाप म्हणाला, 'बाब्या उगीच पडायचा नाहीं. कांहींतरी फायदा होता म्हणून पडला असेल' आणि वस्तुस्थिति तशीच होती. मुलाला एक रुपया रस्त्यांत पडलेला दिसला. लोकांच्या देखत तो रुपया उचलणें धोक्याचें वाटल्यावरून त्यानें त्याच्यावर सपशेल अंग टाकलें आणि हळू हळू लोकांच्या नकळत तो रुपया हस्तगत केला. एखादा स्वार्थी माणूस संकटांत सांपडला तरी तो कसल्यातरी लाभासाठींच पडला असेल असें लोक समजतात.

पडसी जालेल्या माडारी मोरूंक चोल्लोलो पडो; पडसो जाल्ल्या माडार मरूंक चडलोलो पडलो — (गो.) मरणाची इच्छा उराशीं बाळगून जो मोडक्या माडाच्या झाडावर चढतो तो मरतोच. इच्छा तसें फळ.

पडिल्लें कष्ट शरीर सहाय्य — (गो.) जेवढे कष्ट पडतील तेवढे नाइलाज म्हणून कां होईना, शरीराला सोसावेच लागतात.

पडिल्लो दांत सो मधीं उलयता — (गो.) पडलेल्या दांतासारखा मध्यें बोलतो. सबंध कवळीच्या मधून एखादा दांत पटकन् पडावा त्याचप्रमाणें सगळे लोक स्वस्थपणें ऐकत असतांना एखादा माणूस मध्येंच बोलून चाललेल्या विषयांत अडथळा उत्पन्न करतो.

पडे कहर, न सोडावें शहर — (गो.) जरी दुर्धर प्रसंग ओढवला तरी शहर सोडून खेड्यांत राहण्यास जाऊं नये.

पडे झडे, माल वाढे — संस्कारानें, वापरानें वस्तूची किंमत वाढते; जसें शरीर जितकें झिजवावें, तितकें तें कार्यक्षम होतें.

— शाब. २.२०२.

पडे झडे, मूल वाढे — (व.) एखादें मूल पडलें असतां म्हणतात. मूल लहान असतां केव्हां तरी पडावयाचेंच; त्याबद्दल काळजी करण्याचें कारण नाहीं. त्यास नाचण्याबागडण्यास मोकळीक दिलीच पाहिजे.

पडे, झडे, ज्ञान वाढे — अनुभवानें, हिंडण्याफिरण्यानें आपल्या ज्ञानांत भर पडते. 'हा एक ज्योतिषशास्त्रांतील दाखला मला येऊन चुकला. पडे, झडे, ज्ञान वाढे.'

— शाब. १.५५.

पडेल हत्ती, तर पाडील भिंती — हस्त नक्षत्राचा पाऊस इतका जोरदार असतो कीं त्यामुळें इमारतींच्या भिंती पडण्याचा संभव असतो.

पडेल हस्त तर कुळंबी मस्त — हस्त नक्षत्राचा पाऊस पडल्यास खूप धान्य पिकून कुणबी मस्त होतात.

पडेल हस्त, तर पिकेल मस्त — हस्तांचा पाऊस पडल्यास खूप सुबत्ता होते.

पळ्ळेल्या दळाक सारथी — (गो.) पडलेल्या सैन्याला सारथी कशाला हवा?

पडदा〜पडदा उघडणें —(नाटकाचा पडदा जसा उघडला जाऊन कथानक सुरू होतें त्याप्रमाणें), १ एखादी गोष्ट उघड करणें; प्रगट करणें; उघडकीस आणणें; गुपित फोडणें. २ अनावरण करणें; उघड, जाहीर करणें.

पडदा उघडविणें—लाज सोडणें.

पडदा पाडणें—ओढणें — दृष्टीआड करणें; झांकणें; पांघरूण घालणें.

पडदा राखणें—(पड्याच्या चालीवरून.) मर्यादा राखणें.

पड्याआडची मिळकत — आड मिळकत; आडमार्गानें होणारी प्राप्ति; लांच वगैरे.

सातव्या पड्यांत असणें — अत्यंत गुप्त जागीं जाऊन बसणें.

पड्यानें शब्द बोलणें — आडून बोलणें; अप्रत्यक्षपणें बोलणें; लावून बोलणें. 'आतां दुरून पड्यानें शब्द बोलतां। झिजविला देह फिरे पहा पहा तुज खालता।'

— प्रला ५४.१५५.

* **पडदा मारी झडदा** — (व.) पडदा असून वाईट चालीच्या स्त्रीस म्हणतात.

पड्यांतली बाहुली पड्यांतच शोभते; पड्यांतील बाहुलीं पड्यांत शोभतात — ज्या गोष्टी उघड करून सांगण्यासारख्या नसतात त्या स्पष्टपणें पुढें मांडणें चांगलें नाहीं.

पड्यांतुलो वेसु, भायर आयिलेशिवाय रावना — (गो.) पड्यांतलें सोंग रंगभूमीवर आल्यावांचून राहात नाहीं. अंधारांतलें कर्म उजेडांत आल्यावांचून राहात नाहीं.

पडप ~ पडप पुरविणें — लाड करणें; हट्ट पुरवणें; आळ पुरवणें; कौतुक करणें. 'ऐसें निज भक्तांचें पडप। तूं मायबाप पुरविसी। — महि. पांडुरंग स्तोत्र.

पड पड कुडी ~ पड पड कुडी करणें—निजणें. खालील पद्याला अनुसरून—

पड पड कुडी। गंगा भागीरथीच्या तिरीं।
गयागी गमन। प्रयागी मरण।
नित्य काशी विश्वेश्वरा तुझें स्मरण॥

'आम्ही आपल्या घरीं जाऊन आपल्या फुटपाथवर पड पड कुडी केलें.' — स्मृतिचित्रें ४.५६.

पडवळ ~ हातापायांचें पडवळ होणें—हाडकुळें होणें; हातापायांच्या काड्या होणें; कृश होणें.

पडिंग ~ पडिंग गुंज्यार वीं पिकता?—(गो.) नापीक जमीन पीक देऊं शकेल काय? तुमचा मार्ग जर नीट आंखला गेला नाहीं तर तो फलदायक होणार नाहीं. तु०— तृण नाहीं तेथें पडला दावाग्नि। जाय तो विझोनी आपोआप॥

पंडित ~ पंडितमन्य-मानी-मान्य — १ गर्विष्ठ पंडित. २ अंगीं विद्वत्ता नसून ऐट मारणारा.

'जेवीं कां निदैवा हातीं। कनक पडलें होय मातीं।
तेवीं पंडितमन्याचि व्युत्पत्ती। विषयासक्ती नाशिली॥'
— एभा ११.५४०.

**पडिया ~ पडियाका मोल देना, भैस उसके साथ लेना* — (हिं.) पाडीचें मोल देऊन तिच्या बरोबर म्हैस मागणें. आवळा देऊन कोहळा काढणें.

पडोस ~ पडोस पाहण — ताडून पाहणें.

पडोशास उतरणें—तुलनेंत जुळणें.

पड्या — १ आळशी; सुस्त; निरुत्साही. २ पराभव खाल्लेला, कुस्तींत पडलेला गडी.

पड्या; पड्डू — (बे.) दुसऱ्याचें आर्जव करून, लाळ घोटाळून, खुशामत करून, आपलें कार्य साधणारा.

उड्या पुरवतो पण पड्या पुरवत नाहीं — उड्या बरा० पहा.

पढणें ~ पढतमूर्ख — शिकलेला असून व्यवहार-शून्य. दासबोधांत एका समासांत (२.१०) विस्तारानें पढतमूर्खाचीं लक्षणें सांगितलीं आहेत.

*** पढला पण कढला नाहीं** — मोठाहि पंडित जरी झाला, तरी पण जगांत टक्केटोणपे खाऊन त्याला जर अनुभव-जन्य ज्ञान प्राप्त झालें नसेल, तर तो व्यवहारांत कुचकामाचा ठरतो. अशा पुस्तकपंडिताविषयीं ही उक्ति आहे.

पढे फारशी बेचे तेल, एतो अजब कुदरतका (विधनाका) खेल — फारशी शिकून सुद्धां ज्यास तेल विकावयाची पाळी येते त्याच्या बाबतींत दैवाचा विचित्र खेळ आहे असें म्हणावें लागतें. विद्या शिकूनहि नशीबांत नसेल तर धन मिळत नाहीं व हलकें काम करण्याची पाळी येते.

— ठोंबरेकृत गौरांग प्रभुचरित्र, उत्तरार्ध ३४१.

पंढरपूर; पंढरी ~ पंढरी पिकणें — भरभराट होणें; दैव उदयास येणें.

पंढरीची वारी — ज्याप्रमाणें पंढरीची वारी घेतली कीं दरवर्षी खेप घालावी लागते त्याप्रमाणें एकसारखें जाणें येणें; वरवर होणारी खेप.

***आळश्याला गंगा दूर आणि पाप्याला पंढरपूर** — आळशी पहा.

पंढरपूर नी पैशाचा चूर — पंढरपुरास यात्रेला गेलें असतां फार खर्च येतो. बडवे वगैरे मंडळी लुटतात. तेव्हां नको ती यात्रा असें होऊन जाणें साहजिक आहे.

पंढरीच्या वाटे। बाभळीचे काटे। सखा विठ्ठल भेटे। पांडुरंग॥ — पंढरपूरची वारी जरी कष्टाची असली तरी शेवटीं पांडुरंगाची भेट होऊन अतिशय आनंद होतो. कष्टाशिवाय यात्रेचें फळ मिळत नाहीं.

पढियंता ~ पढीयंते दूरौनि दिसेः ऐसे सामर्थ्य मनातें असेः — (महानु.) कोण कोण खरे पढीक, अभ्यासी, विद्वान् आहेत हें दुरूनहि समजेल असें मनाचें सामर्थ्य पाहिजे. मनः साक्षी गोष्टी घडणें अवघड आहे.

पण ~ पण पचूं न देणें — प्रतिपक्षाला पणाला लावलेली वस्तु निर्वेधपणें घेऊं न देणें; पण एकदाचा त्यानें जिंकला असला तरी नंतरहि त्याला एकसारखा त्रास देत राहणें, चैन पडूं न देणें असा अर्थ. 'तुम्ही त्याचें घर गहाणांत घेतलें खरें, पण तुम्हांला तो पण पचूं नाहीं देणार.'

पण भोगणें — पैज मारणें; प्रतिज्ञा करणें; पण करणें. 'शहाजी राजांना जिंकायचा पण भोगून मोठ्या दिमाखानें डंका वाजवीत, निशाणें फडकावीत दिल्लीहून आलास.'

— शिसं ४. २.

पण ~ पणांत येणें — वयांत येणें; यौवनदशा प्राप्त होणें.

***बाई आली पणांत, बोवा बसले कोनांत** —वृद्ध पतीची भार्या जों यौवनदशेंत येते तों पति अशक्त व दुर्बल होऊन जातो.

पत ~ पत असणें — अब्रू असणें, साख असणें.

पतीवर पाणी पडणें — पतीस धक्का पोंचणें; नापत होणें; बेअब्रू होणें; बाजारांत किंमत कमी होणें.

पतीस चढणें — मानमरातब वाढणें; महत्त्वास चढणें.

पतपात, पतपातेरा, पतपासोडी — पत पहा. 'सावकारांतहि पतपात भारी जहाली.' — भाव १९.

पत-पातेज उडणें—पत, दरारा नाहींसा होणें. 'पत-पातेज उडाली. लोक फितूर झाले. धन्याचें वजन राहिलें नाहीं.' — ख १. ९९.

पति॰—पति मिळो, मैत्रीण पळो—कांहीं ठराविक वयानंतर मुलींना पतीची गरज लागते. त्यावेळीं पूर्वी हवीशी असणारी मैत्रीणहि नकोशी होते.

पतीच्या भेटीला मधुर फळें, देवाला रिकामें सोवळें — स्त्री जेव्हां पतीच्या भेटीस जाते तेव्हां चांगलीं चांगलीं फळें त्यास देण्यास घेऊन जाते पण जेव्हां ती देव-दर्शनास जाते तेव्हां केवळ सोंवळें नेसण्याचा, सोवळ्यानें वागण्याचा थाट करते. मनुष्य आप्तस्वकीयांबद्दल जितकी आपुलकी दाखवितो तितकी परमेश्वराबद्दल दाखवीत नाहीं.

पतिव्रत॰—पतिव्रत धर्म जिचा, पति ठेवी मान तिचा —जी स्त्री पतिव्रता असते तिचा आदर पति ठेवतो.

पतिव्रता॰—पतिव्रता आणि मुसळदेवता — अतिपतिव्रता पहा.

पतिव्रता चांगुणा, शंभरांत एक उणा; पतिव्रता चांगुणा आणि शंभराला एकहि नाहीं उणा — पतिव्रता अशी एक चांगुणा होऊन गेली. प्रौढी चांगुणेच्या पातिव्रत्याची मारावयाची व गांवभर गोंधळ घालावयाचा. तुझें पाऊल इतकें वाईट पडलें आहे कीं, शंभरांत एक उणा असेल नसेल इतके नवरे तुला आहेत. म्हणजे तूं छिनाल आहेस, अशा अर्थानें व्यभिचारी स्त्रीबद्दल म्हणतात.

पतिव्रता नार, रात्रीं हिंडे दारोदार — दिवसा पातिव्रत्याचें सोंग आणून रात्रीं व्यभिचार करणारी स्त्री.

पतिव्रता पाक, गांडींत बोडे लाख — (अशिष्ट) वरीलप्रमाणेंच.

पतिव्रता भली पण सारा मुलूख पालथा घाली— तोंडानें पातिव्रत्याचा टेंभा मिरवून गांवभर छिनालकी करणारी.

पतिव्रता भूकी मरे, कसबीण खाई लाडू, गांडू घेला घोडे चढे, मरद खेंचे गाडुं — पतिव्रता स्त्री उपाशीं मरते व कसबीण लाडू खाते. त्याचप्रमाणें भ्याड लोक घोड्यावर बसतात व शूर लोकांस गाडे ओढावे लागतात. याप्रमाणें या जगांत सद्गुणी लोकांस कष्ट पडतात व दुर्गुणी लोकांची चलती असते.

पतिव्रता भूकी मरे, पेढे खाई छिनाल—पतिव्रता उपाशी मरते व व्यभिचारी स्त्री पेढे खाते, अशी स्थिति. तु०—सतीच्या दारीं बत्ती व शिंदळीच्या दारीं हत्ती.

पतिव्रता मन पतीसी भेटे — पतिव्रतेच्या मनांत नेहमीं पतीबद्दलचेच विचार चालू असतात.

पतिव्रता मला म्हणा, हजारांत एक उणा — पातिव्रत्याचा टेंभा मिरवून बदफैली करणारी स्त्री. पतिव्रता चांगुणा॰ पहा.

पतिव्रता म्हणागे बाई, गांवचा तराळ सोडला नाहीं — पतिव्रता म्हणवून घेण्याचा आग्रह पण इकडे पहावें तों गांवांतील धेडापासून सर्वांशीं व्यभिचार करणारी.

पतिव्रता राख (साख), नवरे झाले लाख — व्यभिचार करून पतिव्रतेचा दिमाख दाखविणारी.

पतिव्रतेला नातीं नसतात — पतिव्रता स्त्री फक्त एक आपल्या पतीला ओळखते. इतर नातेवाईकांशीं ती मुळींच संबंधहि ठेवीत नाहीं. 'जा—बाप, भाऊ, माझें या जगांत कोणी नाहीं! पतिव्रतेला नातीं नसतात.' — एकच प्याला ३, ४.

पती॰—पती पसरॉ काबार — (गो.) नमुन्याला दुकान खलास. एखादा व्यापारी आल्या गेल्या गिऱ्हाईकाला जर एवढा एवढा तुकडा नमुन्यादाखल फुकट देऊं लागला तर त्याचें दुकान संपुष्टांत येण्याला कितीसा उशीर लागणार! कांहीं माणसांचें आयुष्यसुद्धां असेंच नमुन्यादाखल व्यर्थ जातें.

पत्तन॰—पत्तने विद्यमानेऽपि ग्रामे किं रत्न-परीक्षा — नगर विद्यमान असतां आडगांवांत रत्नपरीक्षा करण्याकरता कशास जावें? नगरांत जसे रत्नपारखी असतात तसे आडगांवांत असत नाहींत तेव्हां जी गोष्ट जेथें करण्यास योग्य तेथें न करतां भलत्याच ठिकाणीं करावयास जाणें हा मूर्खपणा आहे. — मालविकाग्निमित्र १.

पत्तर॰—बाबू जेवले, पत्तर पालथें केलें — फाजील उधळ्या माणसास म्हणतात. आपलें काम झालें म्हणजे झालें.

पत्नी॰—पत्नी गोणाई राजाई । थकल्या नाम-देवाच्या पायीं ॥ — नामदेवाच्या पत्नी राजाई व गोणाई या त्याच्या विठोबाच्या छंदामुळें व भजनाच्या नादामुळें अगदीं कंटाळून गेल्या. यावरून नादी मनुष्याबरोबर संबंध आला असतां आयुष्य मोठें कठिण व कंटाळवाणें होतें.

पत्र ~ पत्रं पुष्पं फलं तोयं — पत्रं पुष्पं फलं तोयं यो मे भक्त्या प्रयच्छति। तदहं भक्त्युपहृतमश्नामि प्रयतात्मनः॥

— गीता ९-२६.

परमेश्वराला जो कोणी कांहीं भक्तीनें अर्पण करतो त्याचा परमेश्वर मोठ्या प्रेमानें स्वीकार करतो. परमेश्वर लहानमोठा, चांगलेंवाईट याकडे न पाहतां केवळ भक्तीकडे पाहतो.

— टि ४-५२४.

पत्रेक गेल्ल्याक वाघान खाल्लो — (गो.) पाचोळा गोळा करायला गेला तेथें वाघानें खाल्ला. जेथें संभव नाहीं तेथें धोका प्राप्त होणें.

पत्रावळ ~ पत्रावळ उडणें — १ भर पंक्तींतून उठवून लावणें; वाळीस टाकणें. २ फजीति होणें; अपमान होणें; मानहानि होणें.

पत्रावळ चलप — (गो.) पंगतीला जेवण मिळणें; जेवणाची सोय असणें.

पत्रावळ साधणें—(व.) पत्रावळी वाढणें; पानें मांडून वाढप करणें.

भर पत्रावळींत राख घालणें; भर पत्रावळविरून उठविणें; भरली पत्रावळ ओढणें-हिसकणें — एखाद्याचा अपमान करणें; समाजांतून उठवून लावणें; समाजाच्या बाहेर काढणें.

* **पत्रावळ तेथें द्रोण** — मोठ्या माणसाच्या संगतीनें लहान माणसाचा सहज निर्वाह होणें. 'तुमची पत्रावळ जिथें पडेल तेथें माझा द्रोण आहेच.' गाड्याबरोबर नळा या न्यायानें.

पत्रावळी आधीं द्रोणा, तो जांवई शाहणा — पत्रावळ लावण्यास येण्यापूर्वी ज्याला तिच्याहून कठीण असा द्रोण नीट लावतां येईल तो जांवई शाहणा समजला जातो.

— श्यामची आई.

पत्रावळी काढ, म्हणे जेवले किती ? — नसत्या चवकशा करणें; आपलें काम न करतां विनाकारण भानगडी करणें. उष्टिकाढ० पहा.

पत्रावळीपाशीं द्रोण, गाईपाशीं वासरूं — ज्या-प्रमाणें पत्रावळीजवळ द्रोण शोभून दिसतो व पत्रावळीबरोबर त्याची आवश्यकताहि असते त्याप्रमाणें गाईजवळ असलेलें वासरूं सुंदर दिसतें व पान्हवण्यास त्याची जरूरहि असते. या दोन गोष्टींचा कधीं वियोग होत नाहीं.

पत्री ~ पत्री घालणें — वांटणें — (बे.) श्रावण मासांत गुरव (पुजारी) मठपती (अय्या) घरोघरीं बेल देऊन जोंधळे घेऊन जातात, यावरून सारखा फिरत राहणाऱ्या मनुष्याला (विनोदानें) म्हणतात.

पंथ ~ पंथ लागणें — निकाल लागणें; शेवट होणें; अंतास पोंचणें.

पंथास पोहोंचणें—मरणें; शेवट होणें; अंत होणें.

पंथास लागणें—टेकणें—मरणोन्मुख होणें; मृत्यूच्या वाटेस लागणें; आसन्नमरण होणें.

आल्या पंथें — आलेल्या मार्गानें; जसा आला तसा. 'मागुतीं जावें आल्या पंथें।'

***एक पंथ दो काज**—एकाच वेळीं दोन कामें साधणें; एकाच कृतीनें दोन कार्यें करणें. तु०— एकाच दगडानें दोन पक्षी मारणें.

पथर ~ पथर मारे मौत नहीं — (हिं.) दगड लागल्यानें कांहीं मरत नाहीं. थोडीशी इजा झाली म्हणून कांहीं नाश होत नाहीं.

पथरको जोंक नहीं लगती—(हिं) जळवा दगडाला चिकटत नाहींत. गरीबांच्या विनवणीनें निर्दयांचें हृदय द्रवत नाहीं.

पथ्य ~ पथ्य पडणें—पगडा बसणें; संधान बसणें. 'आम्हीही संस्थान व राज्य साधण्याविषयीं विनंति करीत गेलों. आपण न ऐकिलें. लहान माणसांचेंच पथ्य पडत गेलें.'

— श्री. शिव छ० चरित्र ११५.

पथ्यावर पडणें — हितावह होणें; अनुकूल गोष्ट घडून येणें. 'एकंदरींत पाहतां आमच्या नव्या लोकांची चाल ही दिसते कीं पथ्यावर पडण्यापुरती मात्र ते 'सुधारणा उचलतात.'

* **पथ्याचा हांडा चुलीवर चढवा — एकट्याला उतरेना पथाचें म्हणून हंडाभर अन्न खवायाचें.**

पथ्यासारखें दुसरें औषध नाहीं — दुखण्यामध्यें आहार बेताचा व योग्य तोच केला असतां इतर औषधें घेण्यापेक्षांहि अधिक फायदा होतो.

पथ्ये सति गदार्तस्य किमौषधिनिषेवणम्। — याचा दुसरा चरण—पथ्येऽसति गदार्तस्य किमौषधनिषेवणम्॥ जो पथ्य सांभाळतो त्याला औषधांची जरूर काय? जो पथ्य सांभाळीत नाहीं त्याला औषधाचा उपयोग काय? तु० — विनापि भैषजैर्व्याधिः पथ्यादेव निवर्तते। न तु पथ्य-विहीनस्य भेषजानां शतैरपि॥

पद ~ पदं कळनातिलो भागवत न्हयि, मंत्र येनाशिल्लो भट्ट न्हयि — (गो.) ज्याला अभंग, पदें येत नाहींत तो वारकरी नव्हे आणि ज्याला मंत्र येत नाहीं तो ब्राह्मण नव्हे. ज्याची विद्या त्याला आलीच पाहिजे.

पदर ~ पदर उतरणें—विधवा होणें.

पदरकरीण—१ न्हाण येण्यापूर्वीं पदर घेणारी मुलगी ; तारुण्याच्या प्रवेशद्वारीं असणारी मुलगी. २ नुकताच पदर घेतला आहे अशी मुलगी ; युवति.

(डोक्यावरचा) पदर काढणें—अब्रू, लाज गुंडाळून ठेवणें. डोक्यावरून पदर घेणें ही कुलीन स्त्रियांची चाल असे. अकुलीन, निर्लज्ज स्त्रियाच पदर न घेतां रस्त्यानें जात असत.

पदर खरचणें—खाणें—मोडणें—स्वतःच्या खर्चानें उपजीविका करणें ; आपल्या जवळचें खर्चून राहणें.

पदर घालणें — १ एखाद्या गोष्टीवर झांकण घालणें ; पांघरूण घालणें. २ वयांत येणें ; स्त्री वयांत आली म्हणजे पूर्वी परवंटाचें नेसत त्याऐवजीं पदराचें नेसूं लागतात यावरून.

दिव्यास पदर घालणें—देणें — दिवा मालवणें ; दिव्यास तोंडानें फुंकर न घालतां पदरानें वारा घालून मालवितात यावरून. दिवा पहा.

पदर घालणें—भरणें—गमावणें — तोटा सोसणें ; जवळचें भरीस घालणें ; नवीन कांहीं प्राप्ति व्हावयाच्या ऐवजीं जवळचीच पुंजी घालविणें.

पदर टाकणें — १ विधवा होणें. २ पदराच्या खुणेनें बोलावणें ; संकेत करणें ; पालविणें.

पदर धरणें — स्त्री गर्भवती होणें. 'श्रीमंतांस पुत्र कधीं होईल, तें देवास विचारून पाठवावें. उत्तरांत लिहिलें कीं, आठ महिन्यानें पदर धरेल.'

— आडिवऱ्याची महाकाली ११३.

पदर पसरणें — १ क्षमा मागणें ; पाया पडणें ; प्रार्थना करणें. 'चुकलें क्षमा करावी पसराया उशिर काय पदर मला.'

— मोस्त्री ४.४३.

'आनंदीनें पुरुषोत्तमरावापुढें पदर पसरलेला होता.'

— इंप ४९.

२ नम्रपणें याचना करणें ; विनवणी करणें ; काकुळतीस येणें. 'पदर पसरिला तुजला रिपुगज पंचानना नृपामाजीं।'

— मोकर्ण २१.३.

'पसरी, विधी करुनि सुरांसह नमन, स्तवन, दीनपा, पदर'॥

— मो द्रोण २४.२५.

पदर पसरून मागणें—पदर पसरणें ; दीनपणें याचना करणें. 'प्रभुला पदर पसरुनी मागति असुदान त्याचिया भार्या'।

— मो मंत्रभाग १०.२८६.

पदर फाडून देणें — स्त्रीनें नेसलेल्या वस्त्राचा पदर फाडून देण्याची कांहीं लोकांत विवाहविच्छेद निदर्शक चाल आहे यावरून. विवाहसंबंध तोडणें ; काडीमोड करणें ; घटस्फोट करणें.

पदरमोड करणें — जवळचें खर्च करणें ; स्वतःचें खर्च करणें. 'स्नेह्यासाठीं पदरमोड कर परंतु जामिन होऊं नको'

— अनंतफंदी. नवनीत ४३८.

पदर येणें—१ रजोदर्शन होणें ; ऋतुमती होणें. "दूरदूर सरा, पदर माशीं आला दुरुन चाल शहाण्या!" —लावणी. २ यौवन दशेंत येणें ; यावेळीं स्तनोद्गम झाल्यामुळें छातीवरून पदर घेऊन वस्त्र नेसण्यास सुरुवात होते यावरून.

तोंडावर पदर येणें — बाहेर तोंड काढण्यासारखी स्थिति नसणें, म्हणजे विधवा होणें.

पदर लागणें — १ नातें जुळणें ; आप्तसंबंध ज्ञात होणें. २ वाईट जातकुळीचा संबंध असणें ; कडूपणा असणें.

पदरचा माणूस—आश्रित ; ताब्यांतील ; हाताखालील.

पदरचें खावून लष्कराच्या भाकरी भाजणें — घरचें खाऊन गांवांतील लोकांची उसाबर करणें ; गांवाची उठाठेव करणें. लष्कर पहा.

पदरचें घालणें—१ स्वतः जवळचें खर्च करणें, एखाद्या कार्यांत दुसऱ्याकरितां स्वतः खर्च करणें. ३ एखाद्या ग्रंथांत अगर लेखांत मूळांत शब्द नसतां मध्येंच स्वतः कांहीं शब्द घालून अर्थ करण्याचा प्रयत्न करणें ; मूळांत भर घालून ग्रंथकर्त्यावर अर्थ अथवा हेतू लादणें ; भरती करणें ; मजकूर घुसडणें ; प्रक्षेप करणें.

पदराखालीं घालणें — १ छपविणें ; लपविणें ; झांकण घालणें ; पांघरूण घालणें. २ आश्रय देणें ; आधार देणें.

पदरांत-पदरीं घेणें — १ स्वीकारणें ; कबूल करणें ; मान्य करणें. उदा० चुकी पदरांत घेणें.

'शरणांगत अरिबंधुहि रामें प्रेमेंचि घेतला पदरीं।'

— मोवन १२-६.

२ आश्रय देणें. 'खलसंग त्यागुनी जो येइल, घेइन तयास मी पदरीं॥' —मोभीष्म १-१०७. —मोकर्ण ४५-२९.

३ लग्न लावणें ; विवाह संबंधानें नातें जुळविणें.

पदरांत-पदरीं घालणें-टाकणें—१ स्वाधीन करणें ; आश्रयास देणें. 'रवि गेल्यावर तो सुत गंगेच्या घातला तिनें पदरीं।' — मोआदि १५-१६.

२ मुलगी देणें ; विवाह संबंध जुळवून मुलगी स्वाधीन करणें. ३ कबूल करावयास लावणें (चुकी वगैरे).

पदरांत-पदरीं पडणें— १ मिळणें; हातीं येणें; स्वाधीन होणें; लाभ होणें. २ ताब्यांत येणें; सांपडणें; आढळणें; दिसणें. 'त्या भूमिकेवांचुनि सांपडेना । अन्यत्र ठायीं पदरीं पडेना ।' ३ निभावून जाणें; त्यापुरती गरज भागणें. ४ पार पडणें. 'आजचा दिवस पदरीं पडला.'

पदरांत-पदरीं-पदरें बांधणें — १ बाळगणें; जवळ ठेवणें; संग्रह करणें. 'अद्यापि बांधिलेंसे तुझिया मतिनें अधैर्य कां पदरें ।' — मोविराट ४-३.

२ माथीं मारणें; आरोप, चूक, दोष वगैरे लादणें, लावणें, सिद्ध करणें.

पदरांत येणें — ताब्यांत येणें; स्वाधीन होणें; मिळणें; लाभ होणें. 'गेल्या विना न येइल आलें जें भव्यराज्य पदरांतें ।' — मोशल्य ३-८१.

पदरान पदर—सरळ नातें नसतांना इतर नातेवाईकांकडून लागणारा नात्याचा संबंध; पदरानें पदर, दूरचा आप्तसंबंध.

पदराला-स गांठ बांधणें-मारणें—एखाद्या गोष्टीचें स्मरण राहण्यासाठीं उपरण्याच्या, लुगड्याच्या पदराला एक गांठ मारून ठेवण्याची पद्धति असे त्यावरून पक्कें स्मरण ठेवणें; ध्यानांत ठेवणें; आठवण ठेवणें. २ जुळविणें; ऐक्य घडवून आणणें. लग्नांत कांहीं कांहीं वेळां नवरानवरीचे पदराला एके ठिकाणीं गांठ देतात.

पदराला-स खांच पडणें — नुकसान लागणें; ठेंच लागणें; ठोकर बसणें; चट्टा लागणें; तोटा होणें.

पदरास खार लागणें-पडणें-लावणें-लावून घेणें — नुकसान होणें; चट्टा बसणें; तोटा होणें. 'उलट शेत-कऱ्याच्या पदरास खार लागत असेल तेथें भरमसाट कर आकारून' — सासं २-३१६.

पदरीं असणें — आश्रयास असणें; नोकरीस असणें; अवलंबून असणें.

पदरीं धरणें — एखादी गोष्ट करीत असतां करणाऱ्या व्यक्तीचा पदर धरून त्यास पकडणें; चोर वगैरेंना चोरी करतांना पकडणें; प्रत्यक्ष कृति करतांना धरणें. 'पदरीं धरूनि हरि, आणागे बाई ।'

पदरीं बांधणें—ज्याप्रमाणें एखादी वस्तु पदरांत बांधून द्यावी त्याप्रमाणें. १ स्वाधीन करणें; हवालीं करणें. २ माथीं मारणें; जबरदस्तीनें गळ्यांत घालणें.

पदरीं माप घालणें — ज्याप्रमाणें एखाद्या धान्याची रास मोजून तिचें नक्की माप करून आपण दुसऱ्याच्या पदरांत टाकतो त्याप्रमाणें एखाद्या गोष्टीची खात्री पटवून देणें; सिद्ध करून देणें; खरें करून दाखविणें. एखादी चुकी, दोष, अपराध वगैरे पूर्णपणें शाबित करणें.

एक पदरीवर येणें — १ एकेरीवर येणें; अरे तुरे याप्रमाणें एक वचनांत बोलूं लागणें; शिष्टपणाची भाषा सोडून असभ्यपणें भाषण करणें. २ हमरीतुमरीवर येणें; कलहास पेटणें.

* **पदरचें खावें पण नदरचें खाऊं नये**—स्वतःच्या पदरचें खर्चावें लागलें तरी खर्चावें पण दुसऱ्यानें मेहरबानीनें किंवा आपली कृपा संपादन करण्याकरितां किंवा लांच म्हणून दिलेल्या द्रव्याचा स्वीकार करूं नये.

पदरचें खावें व चौघांत जावें— आपण स्वतः खपून आपला निर्वाह केला असतां दुसऱ्या कोणावर अवलंबून राहिलें नाहीं तर चारचौघांत आपली प्रतिष्ठा वाढते.

पदरचें द्यावें तेव्हां चौघांत जावें; पदरचें द्यावें व चौघांत यावें — जेंव्हां आपण चारचौघां मंडळींत उठूं बसूं लागतों व त्यांच्याकडून आदरातिथ्याचा अगर इतर गोष्टींचा खाद्यपेय, धूम्रपान वगैरे गोष्टींचा स्वीकार करतों तेव्हां आपणांवरहि त्यांस देण्याची देवाणघेवाण करण्याची जबाबदारी आहे हें ओळखलें पाहिजे व स्वतःहि कांहीं खर्च केला पाहिजे किंवा हातभार लावला पाहिजे.

पदरचें द्यावें पण जामीन न व्हावें — एखाद्यास जामीन राहण्यापेक्षां प्रत्यक्ष जवळचा पैसा देऊन मदत करणें चांगलें. कारण जवळचा पैसा आपल्या शक्तीप्रमाणेंच आपण देऊं शकतों पण जामीन राहण्यांत प्रसंगीं आपल्या ऐपतीबाहेरचीहि जबाबदारी आपण पत्करतों. 'स्नेहासाठीं पदरमोड कर परंतु जामिन राहूं नको' — अनंतफंदी ।

अंगीं असेल तें काम, पदरीं असेल तो दाम— जें काम आपल्याला स्वतः करतां येत असेल तेंच हातीं घ्यावें व तसें केलें तरच तें सिद्धीस जातें; दुसऱ्यावर अवलंबून राहण्यांत फारसा अर्थ नसतो व वेळेवर फसगत होते; त्याप्रमाणेंच जो पैसा प्रत्यक्ष आपल्या संग्रहीं असेल तोच वेळेवर उपयोगी पडतो, इतरांकडून येणें असलेला किंवा दुसऱ्यानें कबूल केलेला वेळेवर उपयोगीं पडत नाहीं. अंग पहा.

पदरीं नाहीं पडलीं, द्राक्षें आंबट झालीं — कोल्हा आणि द्राक्षें यांची गोष्ट प्रसिद्ध आहे. एक कोल्हा एकदां द्राक्षांच्या मळ्यांत गेला असतां मांडवावर द्राक्षांचे घड लोंबत होते परंतु उड्या मारूनहि ते जेव्हां त्याच्या हातीं येत नाहींत असें त्यानें पाहिलें तेव्हां तीं द्राक्षें आंबट आहेत असें म्हणून तीं टाकून देऊन तेथून तो निघून गेला. याप्रमाणें जी गोष्ट आपल्याला मिळूं शकत नाहीं तिला नांवें ठेवण्याची प्रवृत्ति.

पदरीं पडलें झोड, हांसून केलें गोड — एखादें द्वाड मनुष्य जरी एकदां आपल्या गळ्यांत पडलें तरी त्याबद्दल कुरकुर न करतां त्याचा द्वाडपणा हंसण्यावारी नेऊन त्यास सांभाळून घेतलें पाहिजे.

पदरीं-पदरांत पडलें पवित्र झालें — जी गोष्ट एकदां आपल्या स्वाधीन झाली, जी आपली झाली तिला नांवें न ठेवतां सांभाळून घेत जावी व तीपासून मिळेल तेवढें सुख भोगून घ्यावें. — आजोच ३७६.

'पदरीं पडलें पवित्र झालें अमृतद्रवीं लोभावें ।
लागल शब्द जनांत आपलें म्हटल्या कां नुपेक्षावें ।'

— होला. ६९-१०१.

'पदरीं पडलें पवित्र झालें आतां तूं मला सुख दाखीव'

— होला ८८-१२४.

"पदरीं०' असें समजणाऱ्या कुलवधूचें मन निदान आपल्या पतीची विटंबना करायला धजत नसे."—कवठेकर, अपुरा डाव ३०.

पदवी—**पदवी येणें**—मोठेपणा मिळणें (फुकटचा.)
पदवीचा पोषाख—नटवेगिरीचा पोषाख.
पदवीचें भाषण—गर्वाचें, ताठ्याचें भाषण.

पद्धत—**पद्धत लावणें—जमविणें**—(ना.) संधान बांधणें; ओळख वगैरे काढून कार्य साधणें.

पद्मीण—**नपुंसकाच्या हातीं पद्मीण** — ज्यास एखाद्या गोष्टीचा मुळींच उपयोग करण्याचें सामर्थ्य नाहीं अशाच्या हातीं उत्तम वस्तु पडणें. भलत्याच ठिकाणीं चांगली वस्तु असणें, जाणें.

पंधरा—**पंधरा इंद्रियें व त्यांचीं दैवतें** — १ अंतःकरण—आदिप्रजापति, २ बुद्धि—शेष नारायण, ३ मन—ब्रह्मा, ४ चित्त—विष्णु, ५ अहंकार—रुद्र, ६ श्रोत्र—चंद्र, ७ नेत्र—सूर्य, ८ रसना—वरुण, ९ घ्राण—वायु, १० त्वचा—अश्विनीदेव, ११ वाचा—वैश्वानर, १२ पाणी—इंद्र, १३ पाद—त्रिविक्रम, १४ उपस्थ—प्रजापति, १५ अधारी—नैऋत्य.

—(दर्शनप्रकाश).

पंधरा मुहूर्ती संक्रांत — आर्द्रा, स्वाती, भरणी, शततारका, आश्लेषा व ज्येष्ठा या नक्षत्रीं येणारी संक्रांत. असा योग आला म्हणजे दुर्भिक्ष होतें.

पंधरा विभूतिस्थानें—१ मस्तक, १ गळा, १ कपाळ, ६ ठिकाणीं हातांस, २ ठिकाणीं कुक्षीस, २ ठिकाणीं खांद्यास, १ मुखास, १ नेत्रास.

पन्नें—**पन्नें सूप शेणान् घट्ट आनि म्हातारें मनीस खाणान घट्ट**—(गो.) जुनें सूप शेणानें सारवलें कीं घट्ट होतें आणि म्हातारें माणूस खाणेंपिणें व्यवस्थित असलें तर चार दिवस अधिक जगतें.

पन्हाळी—**पन्हाळी पडणें**—मनुष्य, जनावर अतिशय पुष्ट झालीं म्हणजे त्यांच्या पाठीला पन्हाळीसारखा लांब खळगा होतो. अतिशय पुष्ट होणें. "आमच्या बैलाच्या पाठीस पन्हाळी पडली आहे."

पंप—**पंप करणें**—ज्याप्रमाणें रबराच्या नळींत किंवा पायचेंडूंत हवा भरली असतां तो फुगतो त्याप्रमाणें एखाद्यास भर देणें; उत्तेजन देणें; फुगवणें; चेतविणें.

पपा—**पपा काढणें**—(गो.) पळ काढणें.

पयःपान—(१८) **पयःपानं भुजंगानां केवलं विषवर्धनम् ।** — (भुजंग पहा.) 'अहि सोडिला जसा पय पाजुनि, मनिं मणि हरूनि पोळविला।'—मो. आदि २७.३३

सबंध श्लोक :—

उपकारोपि नीचानामपकारोहि जायते ।
पयःपानं भुजंगानां केवलं विषवर्धनम् ॥

पर—**पर फुटणें**—१ पंख फुटणें; पक्ष्याच्या पिलास उडावयास येऊं लागणें. २ वयांत येणें; स्वतः समर्थ होणें; स्वातंत्र्य मिळणें; वाढीस लागणें. ३ मूल वगैरे खोडकर होणें; इकडे तिकडे फिरण्याइतकी शक्ति येणें. ४ आश्रय मिळणें; आधार मिळणें; साधनें मिळणें.

पर लावून जाणें — पळणें — धांवणें—चालणें— जणूं काय पायाला पंख लावल्यामुळें उडतां येऊं लागतें त्याप्रमाणें जलदीनें जाणें; अतिशय त्वरेनें जाणें पळणें वगैरे.

पराचा कावळा; पराचा कावळा करणें—कावळ्याचें एक पीस पाहिल्याबरोबर कावळा पाहिला असें सांगणें; अतिशयोक्ति करणें; फुगवून सांगणें. राईचा पर्वत करणें. पिसाचा कावळा करणें असाहि प्रयोग आहे.

'टाइम्स म्हणजे ब्रिटिश सरकारचें मुखपत्र; पराचा कावळा करण्यांत या पत्राचा हातखंडा !'—केसरी ३०-४-४०.

'तिला वाटे त्या (सासूबाई) तर पराचा कावळा करायला बसल्या आहेत !'—कवठेकर, अपुरा डाव, ९४.

पराचा लखोटा — जो लखोटा विशेष लवकर पोंचावा अशी इच्छा असेल त्यास खुणेकरितां एक पीस जोडण्याचा प्रघात होता यावरून १ ज्या लखोट्यास पीस अडकविलेलें असतें असा. अतिशय तातडीचा. २ तातडीचें पत्र; अतिशय जरूरीचें पत्र.

परलोकवासी होणें; परलोकीं जाणें — मरणें; मृत्यु पावणें; अंत होणें.

* **पर आस, सदा निरास**—आशा मोठी ठेविली कीं निराशा पदरीं पडावयाचीच.

पर की आस, सदा निरास — जो दुसऱ्याची आशा धरून बसतो त्याची नेहमीं निराशा होते. लावी पक्षीण आणि तिचीं पिलें या गोष्टींत हेंच तात्पर्य आहे. तु०–जो दुसऱ्यावरी विश्वासला । त्याचा कार्यभाग बुडाला ॥

परतंत्रतेच्या पक्कान्नापेक्षां स्वातंत्र्याची मीठ–भाकरी चांगली—परतंत्र होऊन वैभव भोगण्यापेक्षां गरीबी पत्करून स्वतंत्र राहणें चांगलें.

परदास्याची वेडी प्राण हरिते घडोघडीं — पारतंत्र्याचा जाच पदोपदीं होत असतो.

परदुःख शीतल — दुसऱ्याचें दुःख आपणांस हलकेंच वाटतें. दुसऱ्याचें दुःख पाहून फारच थोड्या लोकांचें अंतःकरण द्रवतें. – पामो ३११.

तु० 'परदुःखेनापि दुःखिता विरलाः।'

"'परदुःख शीतल' असें म्हणणाऱ्यांपैकीं भया नव्हता."

–शाव १.८९

परदुःखेन दुःखिता विरळा—परदुःख शीतल प्रमाणें. दुसऱ्याच्या दुःखानें विव्हळ होणारा माणूस क्कचित्.

सबंध श्लोक —

विरला जानान्ति गुणान्विरला कुर्वन्ति निर्धनस्नेहम्
विरला रणेषु धीराः परदुःखेनापि दुःखिता विरलाः ॥

घर सोडलें कीं अंगण परदेश — अंगण पहा.

परदेशीं भीक बरी — जर भिक्षाच मागावयाची पाळी आली तर ती स्वदेशांत जेथें आपले आप्तसंबंधी, ओळखीचे वगैरे लोक असतात तेथें न मागतां त्यापेक्षां परक्या ठिकाणीं जेथें आपणास कोणी ओळखीत नाहीं अशा ठिकाणीं मागणें बरें. म्हणजे मनास अपमानाचें शल्य टोंचणार नाहीं.

परधर्मो भयावहः — दुसऱ्याच्या धर्माचें आचरण करणें हें फार कष्टदायक असतें व त्यांत धोका फार असतो; त्यापेक्षां स्वधर्मांत राहून मरण पत्करलें.

श्रेयान्स्वधर्मो विगुणः परधर्मात्स्वनुष्ठितात् ।
स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः ॥

—गीता ३. ३५.

परनिंदा श्रवण न कर, हात ठेवी कानावर—जेथें दुसऱ्याची निंदा ऐकूं येत असेल तेथें कानावर हात ठेवणें चांगलें.

परस्त्री पराची माता— परस्त्रीला वास्तविक मातेप्रमाणें मानलें पाहिजे, परंतु कांहीं अनीतिमान लोक मूळ म्हणीचा विपर्यास करून परस्त्री ही परक्याची माता असते ती कांहीं आपली माता होऊं शकत नाहीं अशीं कृति लढवून वरील वाक्प्रचार योजतात.

परस्त्री मातेसमान — परस्त्रीला मातेप्रमाणें मानावें, तिच्याकडे डोळे वर करूनहि पाहूं नये.

परस्त्री यार, सदां खुवार कांटोंका बिछाना, और जूतीका मार— (हिं.) ज्याला परस्त्रीगमनाची चटक लागली त्याला नेहमीं धोका असतो. त्याला कांट्याच्या बिछान्यावर निजल्याप्रमाणें विवंचना असते व त्यास प्रसंगीं जोड्यांचा मार खावा लागतो.

परस्वाधीन जिणें (धन) आणि पुस्तकी विद्या कामास येत नाही — खालीं पहा.

परस्वाधीन प्राणसंकट — दुसऱ्याच्या तंत्रानें चाललें असतां प्राणावर बेतण्याचा प्रसंग येतो.

परहातीं धन व पुस्तकी विद्या — सावकारी मोठी आहे पण घरांत पैसा शिल्लक नाहीं तर प्रसंगीं अडचण पडते तसेंच पुष्कळ वाचलेलें आहे परंतु पुस्तक पाहिल्याशिवाय कांहींच आठवलें नाहीं तर ती विद्या फुकटच नाहीं काय ? प्रसंगीं उपयोगीं पडतें तेवढेंच आपल्या मालकीचें, बाकीचें आपलें नांवापुरतेंच ! तु०— पुस्तकेषुच या विद्या परहस्तेषु यद्धनम् । संग्रामेच गृहेसैन्यं तिस्रः पुंसां विडंबनाः ॥

— सुर. १५९.२६९.

परेच्छा प्रारब्ध—स्वतःच्या पराक्रमानें मिळविलेलें नव्हे, दुसऱ्यानें केलेल्या इच्छेमुळें उघडलेलें नशीब, दुसऱ्याच्या कृतीमुळें मिळालेलें वैभव.

परका—**परक्याचें पोर आलें भरी, पण घर तर राहिलें घरचें घरीं** — (ही म्हण दत्तकप्रकरणीं लागू पडते). निपुत्रिकाला दत्तक मुलगा घेण्यांत, त्याच्या कुटुंबांत एका माणसाची वाढ होते खरी, पण दत्तक घेतल्यानें त्याच्या कुळाकडे इस्टेट कायमची राहते. —(केसरी २९–५–३४.)

परडें—**परडें उतरणें–बसणें** — १ वजन कमी होणें; वैभवास उतरती कळा लागणें. २ योग्यता कमी होणें; खालीं येणें.

परडें जड होणें–चढणें — १ वजनांत जड भरणें; २ वैभव, पदवी, श्रेष्ठता वगैरे वाढणें. ३ अभिमान चढणें; गर्व होणें.

परडें बसणें—योग्यता उतरणें; वैभव नाहींसें होणें; मानमान्यता कमी होणें.

परतणें—**परतून पडणें** — (कर.) उलट बोल लागणें; विरूद्ध जाणें; उलटून पडणें; विरुद्ध होणें.

परव ~ परबेक पोळी, घराक माळी — (गो.) सणाला पोळी आणि घराला माडी या गोष्टी अवश्य असायला हव्या.

परबेर सॉयरॉ घरच्या समान — (गो.) सणाच्या दिवशीं व्याही हा घरच्यासारखा वाटतो. कारण त्यादिवशीं त्याच्यासाठीं म्हणून कांहीं जेवणाचा नवीन बेत करावा लागत नाहीं.

परभारा ~ परभारा, पावणे तेरा, परभारें, पावणे पांच — दुसऱ्याच्या संपत्तीवर उदारपणाचा आव आणणें; स्वतःला कोणत्याहि प्रकारची तोषीस लागूं न देतां दुसऱ्याबद्दल बेफिकीरपणानें वागणें.

परमार्ग ~ परमार्गी भिक्षाः नागार्जुनी दीक्षा— (महानु.) महानुभावी पंथांत भिक्षा मागणें हें मुख्य कर्तव्य आहे व त्याची दीक्षा **नागार्जुनानेंच (चक्रधराचा पहिला शिष्य)** घालून दिलेली आहे.

परमार्थ ~ प्रपंचाला धन, परमार्थाला वैराग्य— ज्याप्रमाणें संसार व्यवस्थितपणें करावयाचा झाल्यास द्रव्याची आवश्यकता असते, त्याप्रमाणें परमार्थसाधन करावयाचें झाल्यास वैराग्याची आवश्यकता असते.

परमेश्वर ~ परमेश्वर उपाशी उठवील पण उपाशी ठेवणार नाहीं—प्रत्येक मनुष्याला रोज कांहीं तरी अन्न मिळेल अशी तजवीज परमेश्वर करीत असतो, अशी समजूत आहे.

परमेश्वर तारी त्यास कोण मारी — देव पहा.

परवड ~ परवडी करणें — नानातऱ्हेनें त्रास देणें; अनेक रीतीनें दुःख देणें; तऱ्हा तऱ्हा करणें.

परवडीचें काम—१ आळीपाळीनें करावयाचें काम; एकामागून एक निरनिराळ्या गटांनीं करावयाचें काम. २ त्रासदायक काम; अनेक प्रकार, तऱ्हा, भानगडी असलेलें काम.

परवर ~ परवरास आणणें — येणें — एखादी गोष्ट उघडकीस आणणें, येणें; यामुळें दुर्लौकिक करणें, होणें.

परवर ~ परवराच्या भाजींत करटोल्यांचा फांका — परवरें व करटोलीं ह्या दोन्हीहि साधारणतः महाग भाज्या आहेत. त्या पथ्यकर असून अशक्त रोगी लोकांस खावयास देतात. या दोन्ही जवळ जवळ सारख्याच असल्यामुळें परवरांत करटोलींच्या फोडी घालणें म्हणजे दोन्ही चांगल्या गोष्टींचा मिलाफ करणें.

परवरदिगार ~ परवरदेगार, घऊंनी रोटलीने घीतुंल गाड — (गु.) परमेश्वराचें नांव घेऊन तूप लावून पोळी खाणें

परवशता ~ परवशता शतगुणें करी जाच — पारतंत्र्य हें अत्यंत त्रासदायक असतें. 'फारचि बरी निरयगति, परवशता शतगुणें करी जाच ॥' —मोविराट १.५६

परवशतो नरकः—परवशतेपेक्षां नरकवास सुसह असतो.

परशुराम ~ परशुरामाचा अवतार — रागीट मनुष्यांस उपमा देतात.

परस-सूं ~ परसाकडे जाणें — बहिर्दिशेस जाणें. खेड्यांतून परसांत शौचास बसतात. यावरून शौचास जाणें. परसाकडेस–ला लागणें—शौचास लागणें.

परसांतली भाजी — परसांतली भाजी केव्हांहि खुडतां येते यावरून सहज सुलभ गोष्ट; अगदीं हातांतील गोष्ट; पूर्णपणें ताब्यांतील वस्तु; 'स्वारी कराविशी वाटली कीं निघाले हिंदुस्थानांत, राज्य करावेसें वाटले कीं धरली वाट हिंदुस्थानची. हिंदुस्थान म्हणजे परसांतली–समजला काय?'

—पानपतचा मोबदला.

परसा ~ परशान बायल खाली; गजालीन घोव खालो—शेकण्यासाठीं शेगडीजवळ बसलेला नवरा आपल्या बायकोला व गृहकृत्यांना विसरतो. तसेंच बायको शेजारणीशीं बोलतांना नवरा व जेवण विसरते.

परस्पर ~ परस्पर पावणे तेरा—परभारा पहा.

परस्परं समर्पयामि — एकाचें घेऊन दुसऱ्यास देणें; स्वतःच्या पदराला खार न लावून घेतां फुकटचें दुसऱ्यास देणें. परभारें वासलात लावणें.

पराक्रम ~ पराक्रम करणें,-दाखविणें — अचाट कृत्य करणें; अमानुष कृति करणें; मोठी शौर्याची, धैर्याची, शक्तीची वगैरे गोष्ट करणें.

चमत्कारावांचून नमस्कार नाहीं आणि पराक्रमावांचून पोवाडा नाहीं — कांहीं विलक्षण व कर्तबगारीचें कृत्य केलें तरच लोक मानसन्मान करतात व अशा माणसाची कीर्ति होते. एरवी कोण विचारणार?

परान्न ~ परान्नं पुष्टिवर्धनम्—दुसऱ्याकडचें जेवण नेहमीं चमचमीत असतें, त्यामुळें चांगलें सकस व शरीरास पुष्ट करणारें असतें. पुढे पहा. तु०—परान्नं प्राप्य दुर्बुद्धे मा प्राणेषु दयां कुरु । परान्नं दुर्लभं लोके प्राणा जन्मनि जन्मनि ॥

परान्नं प्राणसंकटम् — ज्याप्रमाणें कांहीं लोकांस परान्न पुष्टिकारक वाटतें व फार आवडतें त्याप्रमाणेंच त्याच्या उलट कांहीं लोकांस घरचें अन्नच त्यांस सोसेल, पचेल व रूचेल असें असल्यामुळें दुसऱ्याकडे जेवण्यास जाणें म्हणजे प्राणसंकटाप्रमाणें वाटतें. कारण तेथें आपल्या रूचीस योग्य व आपणास पचेल असेंच अन्न मिळेल असा भरंवसा नसतो व त्यामुळें तें बाधण्याचा संभव असतो.

परान्नं विषभोजनम्—वरप्रमाणेंच.

पराधीन ~ पराधीन, (पराधीनता) स्वप्नीं सुख नाहीं—जो मनुष्य परतंत्र असेल त्यास स्वप्नांतहि सुख मिळणें शक्य नाहीं.

पराय ~ पराय घरपर लछमी नारायण, पराय-धनपर लक्ष्मीनारायण—परभारें पावणे तेरा; आयजीच्या जीवावर बायजी उदार.

आपली गाय परायाचा वेल खाय — स्वतःच्या गाईकडून दुसऱ्याचा वेल खावविणें म्हणजे दुसऱ्याचें घेऊन स्वतःची धन करण्यासारखें आहे. स्वार्थीपणा.

पराया गांडीचा पलीता—१ तोड्याची बंदूक (ही तलवार इ. शस्त्राप्रमाणें स्वतंत्र वापरतां येत नसून, तोड्यावर अवलंबून असते) २ (ल) दुसऱ्यावर अवलंबून असणारा.

परा ~ परासीमा ओलांडणें — उच्चांक स्थापन करणें; 'आजवर गांठली गेलेली कमाल मर्यादा ओलांडणें. (To break record) —केसरी २२-१०-३५

परिपाठ ~ परिपाठानें सर्व सोपें—सवयीनें सर्व गोष्टी सुलभ वाटतात.

परिश्रम ~ परिश्रमाचें बळें, कलाकौशल्य कळे — कोणतेंहि कौशल्ययुक्त कार्य करण्यास परिश्रम करावे लागतात.

परिस्थिति ~ परिस्थिति पाहून वागावें — नेहमीं सभोंवतीं ज्याप्रमाणें परिस्थिति असेल त्याप्रमाणें काळवेळ पाहून योग्य तसें वर्तन करावें.

परी ~ ज्याच्या त्याच्या परी — ज्याच्या त्याच्या प्रमाणें.

परी प्रकारचा-प्रकारें — नानातऱ्हेचा, नानातऱ्हांनीं; विविध.

*** घरापरी घर गेलें, बायको परी बायको गेली; द्रव्या (धना) परी द्रव्य गेलें, बायको परी बायको गेली** — घर किंवा धनहि गेलें व बायकोहि गेली असा दुहेरी तोटा.

बापापरी बाप गेला, बोंबलतांना हात गेला— बाप पहा.

परीट—(बे.) तूं शुद्ध परीट आहेस म्ह० बेफिकिर परीट ज्याप्रमाणें कापडाची काळजी करीत नाहीं त्याप्रमाणें तूं प्रपंचाची काळजी करीत नाहींस.

परीट नागविला तर आया बाया नागविल्या — धोबी पहा.

परटाचा डौल दुसऱ्याचें पांघरुणावर — परटाला स्वतःचे कपडे नसतात. तो गिऱ्हाइकाचे कपडे घालूनच ऐट करीत असतो. यावरून दुसऱ्याच्या जिवावर मोठेपणा मिरविणें.

परटाची खळ आणि ब्राम्हणाची सळ लागलीच आहे—[सळ = बायको] परटाला खळ सुटत नाहीं तशी ब्राम्हणाला बायको सुटत नाहीं. ती त्याच्यावर सर्वस्वी अवलंबून असते व तिच्याहिवांचून त्याचें अडतें.

परीस ~ परीस स्पर्शें सुवर्ण, तैसें मना समाधान — ज्याप्रमाणें परीसाचा स्पर्श झाला असतां लोखंडाचें सोनें होतें त्याप्रमाणें समाधानी वृत्तीनें मनास शांतता मिळते.

लोह परीसा रुसलें। सोनेपणासी मुकलें। — तुकाराम. लोह पहा.

परीक्षा ~ परीक्षा करणें — तपासणें; निरीक्षण करणें; चौकशी करणें.

परीक्षा घेणें—प्रयोग करून ठरविणें.

*** परीक्षा सोन्याची कसोटीनें, माणसाची द्रव्यानें** — सोन्याची परीक्षा ज्याप्रमाणें कसोटीच्या दगडावर घांसून करतात त्याप्रमाणें मनुष्याची परीक्षा त्यास थोडें फार द्रव्य दिल्यास तो तें परत करतो किंवा नाहीं या गोष्टीकडे पाहून करतां येते.

परीक्षेक भाण भेतचें — (गो.) परीक्षेला मडकें फोडायचें. एखादा कुंभार आव्यांतली मडकीं भाजलीं कीं नाहींत तें पहाण्यासाठीं प्रत्येक मडकें जर फोडून पाहूं लागला तर त्याच्यासारखा दुसरा मूर्ख कोण? कारण नेहमीं शिता-वरूनच भाताची परीक्षा करायची असते.

परोपकार ~ परोपकारी लागणें — दुसऱ्यावर उपकार करण्याकरतां झटणें; दुसऱ्याच्या उपयोगी पडण्या-सारखीं कामें करणें.

परोपकाराचें ओझें आणि घांसून चंदन झिजे — चंदन ज्याप्रमाणें दुसऱ्यास सुगंध देण्याकरतां स्वतः झिजतें त्याप्रमाणें मनुष्यानें परोपकार करून स्वतःस झिजवून त्याचें (परोपकाराचें) ओझें वाढवावें. तु०—मना चंदनाचे परी त्वां झिजावें । परी अंतरीं सज्जना नीववावें ।

परोपकारः पुण्याय, पापाय परपीडनम् — सर्व पुराणांचें सार जर थोडक्यांत काढलें तर तें असें निघतें कीं परोपकारासारखें पुण्य नाहीं व परपीडेसारखें पाप नाहीं.

अष्टादश पुराणानां व्यासस्य वचनद्वयम् ।
परोपकारः पुण्याय पापाय परपीडनम् ॥

परोपकाराय सतां विभूतयः — सज्जनांचा या जगांत अवतार होतो तो लोकांवर उपकार करण्यासाठीं होतो. हा चरण असणारे तीन श्लोक असेः —(अ) रत्नाकरः किं कुरुते स्वरत्नै । विंध्याचलः किं करिभिः करोति । श्रीखण्डखण्डै-र्मलयाचलः किं । परोपकाराय सतां विभूतयः ॥ (आ) पिबन्ति नद्यः स्वयमेव नाम्भः । स्वयं न खान्दन्ति फलानि वृक्षाः । पयोमुचाम्भः क्वचिदस्ति पास्यं । परोपकाराय सतां विभूतयः ॥ (इ) मूले भुजङ्गैः शिखरे विहङ्गैः । शाखाः प्लवङ्गैः कुसुमानि भृङ्गैः । आश्चर्यमेतत्खलु चन्दनस्य । परोपकाराय सतां विभूतयः ॥

परोपकाराला सुरवात घरापासून होते — लहान मुलाला घरांत परोपकाराचें वळण लावलें असतां तें जन्मभर लागतें. पुढील इंग्रजी म्हणीचें हें भाषांतर आहे. Charity begins at home.

परोपदेश ~ परोपदेशांत पंडितपणा स्वतःच्या आचरणांत उणेपणा — दुसऱ्याला उपदेश मात्र पंडितासारखा करावयाचा पण स्वतःचें आचरण मात्र त्याच्या अगदीं उलट असायाचें. पुढें पहा.

परोपदेशे पांडित्यम् — दुसऱ्यास उपदेश करण्याच्या कामीं विद्वत्तेचा उपयोग करणें, पण स्वतः मात्र त्याचा आचरणांत कांहीं उपयोग न करणें. लोकां सांगे ब्रह्मज्ञान, आपण कोरडा पाषाण. परोपदेशे पांडित्यं सर्वेषां सुकरं नृणाम् । धर्मे स्वीयमनुष्ठानं कस्यचित्सुमहात्मनः ॥ — सुर ४५.२६,

परोक्ष ~ परोक्षे कार्य हंतारं प्रत्यक्षे प्रियवादिनं — समोर गोड बोलून पाठीमागें घात करणारा. कुमित्राचें लक्षण म्हणून पुढील सुभाषित आहे. परोक्षे कार्यं हन्तारं प्रत्यक्षे प्रियवादिनम् । वर्जयेत्तादृशं मित्रं विषकुम्भं पयोमुखम् ॥ — सुर ८८.१.

पर्यंक ~ निष्क्रिय पर्यंक पंडित — [Arm-chair politician = पर्यंक पंडित] कांहीं न करतां केवळ पलंगावर बसून दिवस घालविणारा.

पर्व ~ पर्व चुकणें, टळणें — हातची संधि गमाविणें.

पर्व साधणें, गांठणें—संधि साधणें.

पर्वनी गांड होळी, ने माणसनी गांड कोळी — (गु.) सगळ्या पर्वांच्या म्हणजे सण उत्सव वगैरेंच्या शेवटीं होळी येते, त्याप्रमाणें सर्व मनुष्यांच्या शेवटीं कोळी येतात.

पर्वत ~ पर्वताची राई होणें — मोठ्या गोष्टीस लघुत्व प्राप्त होणें; महत्त्व जाणें; 'न कळे ईश्वरी सूत्र झाली पहा पर्वताची राई ।'—ऐपो ४०८.

पर्वती ~ पर्वतीच्या पायऱ्या व शेखमिऱ्याचा डोला — कशाला कांहीं पत्ता नाहीं या अर्थी; परभारें होणारी गाष्ट.

पलंग ~ पलंग चौकी — राजाच्या रात्रीच्या वेळच्या शरीर संरक्षणाचें (Body Guard) काम. 'सवाई माधवरावांच्या पलंग चौकीचें काम.'

पलंगसेवा—संभोग सेवा; पलंगकी खिजमत.

पलंगावर बसणें, बसविणें — काम धंदा न करणें, करूं न देणें, चैनींत रहाणें; ठेवणें. 'पलंगी बैसउनि राणी । मातेहातीं आणवी पाणी ॥'

पलटण ~ पलटण तोडणें — बरखास्त करणें 'ही पलटण तोडण्यांत आली व पलटणींतले शिपाई धर्मवीर म्हणून औंधच्या रस्त्याला लागले'—सन १८५७.१७५

पल्लक ~ पल्लकेंतु बेस्सुनु भीक माघप — (गो.)पालखींत बसून भीक मागणें. तु०—घोड्यावरचा भिकारी.

पल्लव ~ पल्लवग्राही पांडित्य — ज्याप्रमाणें झाडाच्या केवळ पानांस हात पोंचावा किंवा वस्त्राचा फक्त पदर हातांत यावा त्याप्रमाणें केवळ शास्त्राची तोंडओळख असलेला; वरवर अध्ययन केलेला. सबंध श्लोक असा—

पल्लवग्राहि पांडित्यं क्रयक्रीतञ्च मैथुनं ।
भोजनञ्च पराधीनं तिस्रः पुंसां विडम्बनाः ॥ —हितोपदेश.

पल्ला ~ पल्ला करणें, बांधणें—सहाय्यक मिळविणें; आश्रय मिळविणें; पाठबळ मिळविणें.

पल्ला गांठणें — १ कड पोचणें; सर्व अंतर चालून जाणें २ अपेक्षित स्थळीं जाऊन पोचणें; ठिकाणास पोंचणें.

पल्ला घेणें — (ना.) सूं बाल्या करणें; पळ काढणें; दूर जाणें.

पल्ला देणें — जागा, अवधि देणें; अवसर देणें. 'पेंढार पल्ला देईना उभें भंवतालें'.—ऐपो. २३५.

पळ्यावर असणें — जवळ, पाठीशीं असणें; नजीक असणें एका टप्प्यावर असणें; आटोक्यांत असणें.

पव ~ पववारा करणें, म्हणणें — पळ काढणें; निसटून जाणें; पळून जाणें. 'चोरांनीं भांडीं चोरून पववारा केला.'—विवि. ८.११.२०८.

पवळा ~ पवळ्याजवळ (शेजारीं) ढवळा बांधला वाण नाहीं पण गुण लागला — ढवळ्याजवळ पवळा बांधला० असाहि पाठभेद आहे. गुण पहा.

पवित्रा ~ पवित्रा बदलणें — पुढें असलेला पाय मागें घेऊन दुसरा पाय पुढें ठेवणें, यावरून बदल करणें; निश्चित केलेल्या धोरणांत बदल करणें. 'त्यानंतर पंतानीं पवित्रा बदलला.'—रम्य रात्री ११२.

पवित्र्यांत असणें ~ उभें रहाणें — भांडणाच्या तयारीनें असणें; जय्यत असणें; सुसज्ज असणें.

पशु ~ पशुपक्षांच्या लंग्नांत उपाध्या लागत नाहीं — अर्थ उघड आहे. उपाध्यायाची जरूरी नाहीं असें दाखविण्यासाठीं योजतात.

पशूका होत पनैया, नरका कछु नही होत, जो नर करणी करे तो नरका नारायण होत — नर पहा.

पश्चात्ताप ~ पश्चात्तापेन शुद्धते — दुष्कृत्याचा पश्चाताप झाला म्हणजे माणूस त्या पापापासून मुक्त होतो. "तेव्हां 'पश्चात्तापेन शुद्धते' हे शद्व तो मोठ्यानें म्हणाला."—शाव १.१३६. Repentance after base action is the salvation of life.

पश्चिम ~ पश्चिम दिशेला जाणें — (सांकेतिक, शौचास जाणें.

पश्चिमेस सूर्य उगवणें — सूर्य कधीं पश्चिमेस उगवत नाहीं यावरून, असंभाव्य गोष्ट घडून येणें.

पश्यतोहर — १ देखतचोर; पाहतां पाहतां लुबाडून नेणारा; देखतां देखतां चोरी करणारा; कोठें जाल उभे रे मत्स्येश्वर धेनुपश्यतो हर हो । सोडा गोधन नाहीं तरि वधिन तुम्हासि वश्यतो हर हो ।—मोवि. ४.८४. २ सोनार

पसणा ~ पसण्यापुतें सुरइ — पाहुण्यापुरेसा सुरइ तांदुळांचा भात. गोमंतकांत दोन प्रकारचे तांदुळ असतात. सडीक तांदुळ ते सुरइ आणि भात उकडून तयार केलेले ते उकडे. ज्या दिवशीं कोणी पै पाहुणा असेल त्या दिवशीं त्याच्यापुरता सुरइ तांदुळाचा भात करायचा असा सर्वसाधारण सांप्रदाय.

पसा ~ उलथा पसा पालथा पसा (माकडा तुझा संसार कसा)—उधळ पट्टी; उलथा पाहा.

पशाचें पायलीस उठेना — जो प्रथम पशावर काम करावयास राजी असतो तोच पुढें पायलीभर घेऊनहि काम करीत नाहीं; हळू हळू प्रस्थ माजणें.

पश्याचे पायलीं येणें — असें होत नसतें. 'परि ऐसें कां होईलः पसेयाचे पाइलिए कां एइल.' — लीलाचरित्र भाग ३ पृ. ८९.

पस्त ~ पस्त करणें — नाश करणें; समूळ नाश करणें; खलास करणें, 'सफेजंग लढाई करून कृष्णराव खटावकर यास मोडून पस्त केलें.'—रा. ४-३२.

पस्त खाणें—निखालस खाऊन टाकणें; साफ फन्ना उडविणें.

पस्त चोरणें — प्रत्येक चीजवस्त चोरून नेणें; साफ लुबाडणें; सर्वस्वी नागविणें.

पस्त जाळणें—जाळून राख करणें; भस्म करणें.

पहाट ~ पहाट फुटणें — आरंभ होणें; सुरुवात होणें. 'तो ज्यासि भेटे अदृष्टें । त्यास सुखाचा पहाट फुटे।'—एभा. १४.१११.

पहाड ~ पहाडची यात्रा — हिमालयाची यात्रा.

पहार ~ पहार गिळणें, सुई अडकणें — मोठी गोष्ट सहज करून टाकणें व लहानसहान गोष्टीच्या वेळीं अडणें. तु०–इं.—To strain at a gnat and swallow a camel.

पहारा ~ पहाऱ्याला संत्री आणि राज्याला (राजाला) मंत्री—ज्याप्रमाणें पहारा करण्यासाठीं संत्र्याची योजना करावी लागते त्याशिवाय नीट बंदोबस्त राहात नाहीं त्याप्रमाणें राज्य राखण्यासाठीं मंत्र्याची जरूरी असते, त्याशिवाय राज्य सुव्यवस्थित राहत नाहीं व त्याचें रक्षण होऊं शकत नाहीं.

पहिलटकरीण ~ पहिलटकरणीचे डोहाळेच फार—जी पहिल्यानेंच गरोदर असते तिला डोहाळे फार होतात व जाणवतात. तेव्हां एखादा नवशिक्या जर जास्त चोचले, मागण्या करूं लागला म्हणजे म्हणतात.

पहिला ~ पहिल्या वड्याला खडा लागणें — अपशकून होणें.

पहिला आघात म्हणजे निम्मे यश—पहिल्या प्रथम मोठा जोर करून पुढें पाऊल टाकलें म्हणजे बरेंचसें काम झाल्यासारखें होतें. पहिल्या धडाडीमुळेंच यशाचा मार्ग सुकर होतो. First stroke is half the battle.

* **पहिला दिवस पाहुणा दुसरे दिवस दिवाना आणि तिसरा दिवस गांवमें फिरना** — मनुष्य पाहुण्याचा एक दिवस आदर करतो, दुसऱ्या दिवशीं राहील त्यास वेडा समजतात व तिसऱ्या दिवशीं त्यास घराबाहेर घालवून देतात. एक, पाहुणा पहा.

पहिले गाना फिर खाना बाद एक दिन जाना— प्रथम गायन करावें मग खूप खावें व शेवटीं एक दिवस मरून जावें. याप्रमाणें बेफिकीरपणें सर्व आयुष्य चैनीनें घालवावें.

पहिले दिवशीं पाहुणा, दुसरे दिवशीं पै, तिसरे दिवशीं अक्कल नाहीं—एक पहा.

पहिले दिवशीं पाव्हणी, दुसरे दिवशीं मेव्हणी तिसरे दिवशीं तूंच रहायची कीं मीच रहायची— एखादा मनुष्य पहिल्या दिवशीं पाहुण्याप्रमाणें वागतो दुसऱ्या दिवशीं अधिक लगट करून नातें जोडावयास पाहतो व तिसऱ्या दिवशीं तर घरच बळकावून बसावयास पाहतो.

पहिला नवरा जनाचा न मागला नवरा मनाचा —(कुण.) प्रथम विवाहाचा केलेला पति हा आईबापांनीं अगर जातगोतानें पाहून ठरविलेला असतो त्याबद्दल विशेषसें प्रेम वाटत नसतें पण त्याच्यामागून जो म्होतुराचा दादला केलेला असतो तो स्वतः पसंत केलेला असतो त्यामुळें तो अधिक प्रिय असतो.

पहिली ऋतुमती नंतर पुत्रवती — ऋतुमती झाल्याशिवाय पुत्रप्राप्ति होत नाहीं. प्रथम अवश्य असणारी क्रिया झाल्याशिवाय पुढील कार्य होऊं शकत नाहीं.

पहिली रास, दुसरें आकण, तिसरें निकण, चौथा मणि, त्यास बलुता धणी — शेतांत धान्य पिकल्यानंतर त्यावर ज्या क्रिया होतात व शेवटीं बलुत्याच्या पदरांत पोंचट दाणे (मणी) कसे पडतात हें यांत वर्णिलें आहे. रास, आकण, निकण व मणि हे शब्द कृषिकर्मांतले पारिभाषिक आहेत.

पहिला~पहैले उदरः मग चक्रधरः—(महानु.) 'आधीं पोटोबा मग विठोबा,' याप्रमाणें.

पहिलीचा असा तसा दुसरीचा गुलाम जसा— नवऱ्यावर पहिल्या बायकोचा विशेषसा पगडा नसतो पण दुसरीचा मात्र त्याच्यावर पूर्ण पगडा असतो. बंद्या गुलामाप्रमाणें तो तिच्या आज्ञेंत वागतो.

पहिलीचा घेतला थू, दुसरीचा खाल्ला गू—(व.) दोन बायकांच्या नवऱ्यास म्हणतात. पहिली बायको नावडती असते, निदान फारशी लाडकी नसते. पण दुसरीकरितां मनुष्य वाटेल ती गोष्ट करावयास तयार होतो.

पहिली बेटी, मालाची (धनाची) पेटी (अगर तूप रोटी) — पहिली मुलगी फार लाडकी असते. किंवा पूर्वी मुलीचे पैसे घेत असत त्यावेळीं पहिली मुलगी होणें म्हणजे लाभाचें साधन असे.

पहिली शाळा विद्येची आणि दुसरी शाळा जगांत वागण्याची — मनुष्यानें प्रथम शाळेंत शिक्षण घ्यावयाचें असतें व नंतर जगांत कसें वागावें हें पुन्हां जगांत प्रत्यक्ष वागणूक करून शिकावयाचें असतें.

पहिले पाढे पंचावन; पहिले पाढे पढे पंचावन, बरोबर पंचावन — कितीहि शिकवलें तरी पहिल्या पाढ्याच्या पलीकडे न जाणारा. मठ्ठ मनुष्य. कितीहि सांगितलें तरी मूळपदापासून पुन्हां सुरुवात करावयास लावणारा. मूळ पदावर येणें. "कोचीन संस्थानांत प्राथमिक शिक्षणाची योजना चांगलीच फलद्रूप झाली असली तरी शाळेचा संबध सुटला ह्मणजे खेड्यांतील लोकांचें लक्ष्य वाचनावरून उडतें व तें पुनः 'पहिले पाढे पढो पंचावन्न' या श्रेणींत येतात." — केसरी २-१-४२.

पहिल्याच घासाला माशीनें दगा दिला — अन्नांत माशी गेली असतां अन्न ओकून पडतें. तेव्हां पहिलाच घांस तोंडांत घेतांना जर माशी गेली तर सर्वच अन्न ओकून पडावयाचें व सर्व जेवणाची माती व्हावयाची. याप्रमाणें प्रथमारंभींच संकट आल्यास म्हणतात. तु० — प्रथम ग्रासे मक्षिकापातः ।

पहिल्या चोरीला आईचें हसणें, दुसऱ्या चोरीला सरकारचें धरणें — एखाद्या मुलानें पहिलीच चोरी केली असतां त्याच्या आईनें जर त्याला शिक्षा करावयाच्या ऐवजीं हंसून उत्तेजन दिलें तर पुढें तें मूल मोठ्या चोऱ्या करून सरकारकडून पकडलें जाण्याचा संभव असतो. याकरतां पहिल्याच चोरीस न हंसतां शिक्षा केली पाहिजे.

पहिल्या दिवशीं कमी प्राप्ति, दुसऱ्या दिवशीं धंद्याची समाप्ति—आरंभींच जर थोडी प्राप्ति होऊं लागली तर तो धंदा लवकरच बंद करण्याची पाळी येते.

पहिल्या फांतींत हंसपादु — (गो.) पहिल्या पहांटेस हंसपाद नांवाचा मुहूर्त असतो. कोणत्याहि कार्याचा त्यावेळीं प्रारंभ करावा. इतर मुहूर्त पाहण्याची जरूर नाहीं.

पहिल्या वरा, तूंच बरा — एखाद्या बाईनें पहिला नवरा चांगला नाहीं म्हणून दुसरा करावा तों त्यानें तीस दारू

वगैरे पिऊन अधिकच मारझोड करावी अशी स्थिति झाली म्हणजे तिला पहिलाच नवरा बरा म्हणण्याची पाळी येते. त्याप्रमाणेंच एका मालकाची नोकरी सोडून दुसऱ्या मालकाची नोकरी धरण्यांत नेहमीं फायदा असतोच असें नाहीं, तर पहिल्याच मालकाच्या ठिकाणीं कांहीं काल गेल्यामुळें एक प्रकारचा आपलेपणा उत्पन्न झालेला असतो; तोहि दुसऱ्या मालकाच्या ठिकाणीं नसतो.

पहिल्यानें जेवावें, मागाहून नहावें — जेवण्याच्या वेळीं पहिल्या पंक्तीस जेवावें म्हणजे सर्व पदार्थ ऊनऊन मिळतात व भरपूर मिळतात, पुढें ते शिळे होतात व कांहीं संपून जातात. त्याप्रमाणेंच नहावयाचें झाल्यास सर्वांच्या मागून नहावें म्हणजे पाठीमागून कोणी नसल्यामुळें भरपूर पाणी घेतां येतें व स्वस्थपणें घाई न होतां नहातां येतें.

पहिल्यानें लिहा, मग द्या आणि त्यांत चूक भूल झाली तर मला पुसा — केव्हांहि कोणास पैसे द्यावयाचे झाल्यास ते प्रत्यक्ष देण्याच्या आधीं प्रथम जमाखर्चामध्यें त्याची नोंद करा व मग द्या. नाहींतर पैसे दिले जातील व लिहावयाचें विसरून जाईल व मग चूक लागेल. याकरतां प्रथम लिहून मग दिल्यास कधीं चूक भूल होणार नाहीं.

पहिल्यानें वागा, नंतर सांगा — प्रथम आपली वर्तणूक नीट ठेवण्याची काळजी घ्यावी व मग इतरांबद्दल तक्रार करावी. आपली वर्तणूक नीट नसल्यास दुसऱ्याबद्दल तक्रार करण्यांत अर्थ नाहीं.

पहिल्यानें सुईच्या भोंकातून जातात मग दाभणाच्या भोंकांत मावत नाहीं—(व.) पहिल्यानें सुईच्या छिद्रांतून पार जाण्याइतकें आपण लहान किंवा क्षुद्र आहोंत असें दाखवितात; पण काम साधल्यावर दाभणाच्या मोठ्या भोंकांतहि ते मावेनासे होतात, इतके गर्विष्ठ बनतात; कांहीं स्वार्थसाधु लोक काम साधेपर्यंत मोठी नम्रता धारण करतात, पण काम साधल्यावर गर्विष्ठ बनतात असा अर्थ.

पळ ~ पळभर तें वीळभर—जें एका क्षणाकरितां तेंच सर्व दिवसभर.

पळ ~ पळ काढणें — पळून जाणें. 'देउनि तोंडावरि, हरि पळ काढी, धाव घेउनी मागें ।'

— मोमंत्र १०.५३७.

'पळ काढिलाची तुमच्या पाहुनि तें कर्म तडक लेंकांहीं ।'

— मोद्रो. १६.४४.

पळ सुटणें — पळावें लागणें. 'धाकें तुझ्या पळ सुटे रिपु दानवासी ।' — अकक२.

पळचें ~ पळयात रे डोळयांनूं, आयकात रे कानांनूं जिबे पापणी मट्ट बस—(गो.) डोळ्यांनीं बघा, कानांनीं ऐका पण जिभेवर दाब ठेवा. पुष्कळ वेळां माहित असलेल्या गोष्टीबद्दल अज्ञानपणाचा बहाणा करा. तुलना (ऐकावें जनाचें करावें मनाचें).

पळणें ~ पळतां भुई थोडी होणें — खूब दूर पळून जाणें; अत्यंत दूर जाण्याइतकी स्थिति होणें.

— पामो ५९१.

'त्यांना पळतां भुई थोडी झाली' — इं. प. १३९.

'व्हावी भुई थोडी पळतां ।' — मरा. संग्रा. १२३.

'मृगेंद्र येतो ऐकतां कानीं । मातंगा पळतां थोडी मेदिनी।'

— ह १.२१.

पळतें पीक — १ शेवटचें पीक; अखेरचा बहार; शेंडे बहार. २ शेवटचा नफा; वर्षाच्या अखेरीअखेरीस मिळणारा नफा. ३ थोडे दिवस टिकणारें सुख.

पळोपळोसें करणें—सतावणें; नकोनकोसें करणें; पळून जावें असें वाटावयास लावणें.

पळोपळोसें होणें—त्रासणें, नकोनकोसें होणें.

पळणारास एक वाट शोधणारास दहा-बारा वाटा — पळणारा मनुष्य नीट एकाच वाटेनें पळत जात असतो पण त्याच्यामागें लागणाऱ्या मनुष्यास प्रत्येक ठिकाणीं वाट फुटेल तेथें तो कोणत्या वाटेनें गेला असेल याबद्दल संशय येऊन अनेक वाटा शोधाव्या लागतात. (गो.) पळतुवतल्याक एक वाट, सोधतल्याक धा.

पळतां भुई थोडी; पळत्या पायास भुई थोडी— कोठें पळावें असें होऊन जाणें; दाणादाण. 'पेशव्यांच्या सैन्यानें त्यांचे मागें लागून त्यांस पळता भुई थोडी केली.'

— V.S. 2. १०४.

पळत्या चोराचीं शेटां — (गो.) चोराची लंगोटी; सर्व नाश होत असतां जेवढें मिळेल तेवढेंच घ्यावें. जळत्या घराचा पोळता वांसा.

पळत्याच्या पुढें व हागत्याच्या मागें — याप्रमाणें वागलें तरच फायदा.

पळस कोठेंहि गेला तरी त्यास पानें तीनच; "पळस गेला कोकणां (त), तीन पानें चुकेना (त)"; पळसाला पानें तीनच — कोंकणांत पाऊस जास्त पडतो तेव्हां चवथें पान फुटेल म्हणून पळस कोंकणांत गेला तेथेंही तीन पानेंच फुटलीं. यावरून कोठें गेलें तरी कर्मदशा

बरोबर असते ती सोडीत नाहीं असा अर्थ. कोंकण पहा. 'पण पळस० अशी जी पुरातन म्हण आहे तिची सत्यता या प्रकारावरून अधिकच येते.'—टिळक चरित्र भाग १ पृ. ३००.

पळस गेला घाटा, तीन पानें देठा—वरील प्रमाणेंच.

पळसा तीन पाना, घांटार गेल्यार अडेच — (गो.) पळसाला पानें तीन, आणि घांटावर गेला तर अडीच. कमनशीबी माणूस कुठेंहि गेला तरी त्याची परिस्थिति बदलत नाहीं. अशानें स्थानत्याग केला तर उन्नतीच्या ऐवजीं अवनतिच होण्याचा संभव अधिक.

पळसासम देहीं नटला — पळस फुलला म्हणजे लाल होतो. त्याप्रमाणें लाल झाला. रक्तानें न्हाला.—मरा. संग्रा. ५३.

पळी ~ पळी असतां हात कां भाजून घ्यावा?; पळी असतां हात कां पोळवावा?—डाव पहा.

पक्षी ~ एका दगडानें दोन पक्षी पाडणें — एका कामांत दोन गोष्टी साधणें. एक पहा. 'एका दगडानें दोन पक्षी पाडण्याचा सतत प्रयत्न करणें हें सहसा कोणालाही हितावह होत नाहीं.'—टिळक चरित्र भाग १ पा. १८२.

पक्षी प्राणी—निराधार, निराश्रित मनुष्य.

पक्षी अंतरानें उडतात, मेंढ्या जथ्यानें चालतात —पक्षी एकत्र कळपानें जातात पण त्यांत परस्परांत थोडें फार अंतर असतें, उलट मेंढ्या नेहमीं अगदीं एकमेकांशीं चिकटून जात असतात. याप्रमाणें प्रत्येकाची वागण्याची रीत स्वाभाविक असते त्याप्रमाणें निरनिराळे प्राणी वागत असतात. जो चतुर असतो, तो स्वतंत्रपणें आपलें कार्य करतो पण इतरांस दुसऱ्याचें सहाय्य लागतें. तु. इ. — Eagles fly alone but sheep flock together.

पक्षी पायानें शिरकताति, मनुष्य जिभेनें—(गो.) पक्षी आपल्या पायांनीं जाळ्यांत गुरफटतात, मनुष्य जिभेनें गुरफटतो. आपलें बोलणें हेंच पुष्कळ वेळां अनर्थावह होतें.

पक्षी बारा कोसावरूनही आपल्या घरट्यावर लक्ष ठेवतो—प्रेम व काळजी ही अंतर वाढलें तरी कमी होत नाहीं. आईला मुलाची काळजी ती दूर असली तरी वाटत असते. 'पक्षी बारा कोसावरूनहि आपल्या घरट्यावर नजर ठेवतो' अशी म्हण आहे व आपल्या वर्तमानपत्रां-संबंधानें ही म्हण टिळक नेहमीं खरी करून दाखवीत.—टिळक चरित्र भा. १ पा. २७६.

पक्षांत काऊ आणि माणसांत न्हाऊ—काऊ पहा.

पक्ष्यांत कावळा जनावरांत कोल्हा—कावळा पहा.

पायून दिलें सलें, मायून दिलें उलें — (गो.) बापानें दिलेलें संपलें, आईनें दिलेलें राहिलें. आईनें दिलला वस्तु वात्सल्यानें शतगुणित होत असते. तु० — प्रसादपट झांकिती परि परागुरूचें थिटें । म्हणूनि म्हणती भल, ऋण न जन्मदेचें फिटे ॥—मोकेका. ९५.

पाईक—पायक पहा.

पाउण ~ पाऊण म्हातारी — साठीला टेकलेली म्हातारी; सामान्यतः वृद्ध स्त्री; अगदीं असहाय झालेली नव्हे पण वयातीत स्त्री.

*** घे मेरे पाउणे पांच** — कितीहि समजावून सांगितलें तरी आपलें पहिलेंच म्हणणें धरून बसणारा; आपला हेका कधींहि न सोडणारा; मूळ पदावरच वारंवार येणारा; पहिले पाढे पढ पंचावन पहा.

पाऊल ~ वाटेचें पाऊल आडवाटेस पडणें— सरळ रस्ता सोडून भलत्याच दिशेस लागणें; करूं नये अशी गोष्ट प्रमादानें घडणें.

पाऊल उचलणें, उचलून चालणें—झरझर चालणें; झपाझप पावलें टाकणें; जरा त्वरा करणें.

पाऊल ओळखणें, जाणणें, समजणें — ज्याप्रमाणें मनुष्याच्या चाहुलीवरून मनुष्य ओळखतां येतें त्याप्रमाणें एखाद्याची चालरीत, वागणूक वगैरे ओळखणें; स्वभाव, कल इ. जाणणें.

पाऊल जपून टाकणें, ठेवणें — कोणत्याहि गोष्टीचा प्रारंभ फार काळजीपूर्वक करणें; एखादी गोष्ट वगैरे विचार-पूर्वक करणें.

चांगल्या किंवा वाईट मार्गांत पाऊल ठेवणें— योग्य किंवा अयोग्य रीतीचें वर्तन करणें. 'भोगील दुःख भारी ठेवील असतपथांत पाउल तो । मो.

पाऊलावर पाऊल ठेवणें — अनुकरण करणें; मागून जाणें; अनुसरणें.

पाऊल पडणें, शिरणें — प्रवेश होणें; आरंभ होणें; थोडीफार प्रगति होणें; गति होणें.

पाऊल पुढें ठेवणें—एखाद्या कार्याचा भार शिरावर घेण्यास तयार होणें; पुढाकार घेणें.

पाऊल पुढें असणें — पुढें पुढें गति, वाढती गति असणें. पाऊल मागें नसणें. दुखणें वाढत आहे या अर्थी वापरतात.

पाऊल पुढें पडणें—प्रगति होणें; उत्कर्षाकडे जाणें; हळूहळू भरभराट होत जाणें.

पाऊल बाहेर टाकणें—योग्य मार्गानें न जातां आड-मार्गानें जाणें; भलत्याच वाटेस लागणें; सरळ वर्तन सोडून वांकड्या मार्गास लागणें; अनीतीनें वागणें.

पाऊल बुद्धि — १ क्षणिक बुद्धि; दर पाऊलास पालटणारी बुद्धि. २ चंचल; अस्थिर.

पाऊल मागें न देणें—पाऊल माघारें न घेणें.
— मो. कर्ण. ३९.५३.

पाऊल माघारें घेणें, काढणें—तोंड फिरविणें; माघार घेणें; पुढें प्रगति न करतां परत फिरणें. परावृत्त होणें.

पाऊल मोजीत चालणें—१ सावकाश जाणें; एकएक पाऊल टाकीत जाणें. २ गंभीरपणानें चालणें; धिम्मे धिम्मे पुढें जाणें.

पाऊल वांकडें पडणें — भलत्याच मार्गास लागणें; आडमार्गास लागणें; वाममार्गाचें अवलंबन करणें; अनीतीच्या मार्गानें जाणें.

(आपल्या) पावलापुरतें पहाणें — दुसऱ्याच्या सुख-दुःखाकडे दुर्लक्ष असणें; केवळ आपल्यापुरतें पहाणें; स्वार्थी असणें. व्यापक दृष्टि, विचार नसणें. 'किती ग तूं अगदीं पावलापुरतं पहाणारी आहेस! — आमच्या इंदूचें शिक्षण; पा. १३६

त्याच पावलीं — (निघणें–परतणें इ.) तावडतोब, टाकोटाक; न थांबतां. पोचल्यावरोबर विश्रांति न घेतां, मुक्काम न करतां तावडतोब (फिरणें.)

*** जेथें जावें तेथें पाऊलभर पाणी** — कोणत्याहि ठिकाणीं पाहिलें तरी उथळ असणारें; (ल) उथळ ज्ञान; फार सखोल अध्ययन नसलेला; अपुरें ज्ञान; तुटपुंजी विद्वत्ता.

चोराचीं पावलें चोर ओळखतो—चोर पहा.

पाऊस ~ दोनशें पाऊस — (उप.) अतिशय थोडा पाऊस.

पाऊस उघडणें — मेघांची आलेली काळोखी कमी होणें; आकाश स्वच्छ होणें; पर्जन्य थांबणें.

पाऊस उतरणें — आकाश भरून येणें; ढग अगदीं जवळ येणें.

पाऊस डोईवर येणें—अभ्रांची काळोखी येणें; आकाश ढगांनीं भरणें; पाऊस भरून येणें.

पाऊस पाणी — पर्जन्यमान वगैरे; हवापाणी.

पाऊस म्हणतो मी! — पावसाची झड; एकसारखी सतत धार; कांहीं काम करावयास संधि मिळत नाहीं असा संतत पाऊस.

पाऊस हडकणें — पाऊस थांबणें; पाऊस कमी होणें; पावसाचा जोर कमी होणें.

पावसाचा कोंडा — बुरबुर; कोंड्यासारखा पाऊस पडणें; बारीक बारीक तुषारांचा वर्षाव होणें.

पावसाचा तोडगा — पाऊस पडावा म्हणून कांहींतरी मंत्र, तंत्र, वगैरे करणें.

पावसाची झांक—१ सर; वर्षाव; २ ढगांची काळोखी; अभ्रच्छाया; मेघडंबर.

पावसाचें घर — १ इरलें;पाऊस निवारण्याचें साधन. २ अतिशय पाऊस पडणारा प्रदेश; नेहमीं पाऊस पडत असतो अशी जागा.

पावसाचें पिल्लूं — अतिशय थोडा पाऊस; अल्पवृष्टि; ल्हानशी सर.

पावसाचें पोट फुटणें — मुसळधार पाऊस पडणें; अतिशय वृष्टि होणें; सतत धार लागणें.

पावसाचे वारे—ज्या वाऱ्यांच्या योगानें पावसाचे मेघ येतात ते वारे; नैऋत्य किंवा ईशान्य वारे.

पावसानें झाडणें — पाऊस न पडणें; पावसानें दगा देणें, टाळा देणें. अनावृष्टि होणें.

पावसानें डोळे उघडणें — पाऊस थांबणें; आकाश स्वच्छ होणें; मेघांची काळोखी जाऊन सूर्य दिसूं लागणें.

पावसानें डोळे वटारणें, दिवा लावणें—पावसाचीं चिन्हें न दिसणें; अनावृष्टि होणें.

पावसानें तोंड बाहेर काढूं न देणें—इतका पाऊस पडणें कीं बाहेर पडणें अशक्य. सतत पाऊस पडणें; एकसारखी वृष्टि होत राहणें. सतत धार लागणें.

पडत्या पावसांत — भर पावसाळ्यांत; पाऊस पडत असतां; वर्षाकाळांत.

*** पाऊस धारोधार, वारा करितो सारासार** — कितीहि सारखा पाऊस पडत असला तरी वारा सुटल्यावरोबर तो उडून जातो. त्याप्रमाणें कितीहि सुखांत काळ जात असला तरी संकटें येऊं लागलीं म्हणजे सर्व गोंधळ उडून जातो.

पाऊस नाहीं, पाणी नाहीं, दुर्दशेला पारावार नाहीं — जर पाऊस मुळींच पडला नाहीं तर दुष्काळ पडून सर्वत्र हाहाःकार होतो.

पाऊस पडे आणि माती तुडे—पाऊस पडला म्हणजे धूळ माती वगैरे खालीं बसतात; वृष्टि झाली असतां सर्व धुरळा खालीं बसतो. कितीहि अस्ताव्यस्त परिस्थिति असली

तरी योग्य उपाय योजला म्हणजे सर्व स्थिरस्थावर होतें.

पाऊस पडे, मोती गळे—पाऊस जर वेळेवर व योग्य प्रमाणांत पडला तर अशी समृद्धि होते कीं जणूं काय मोत्यांचाच वर्षाव होऊन गेला आहे.

पाऊस पडेल तर पाणी सांचेल — जर पाऊस पडला तरच तळीं, विहिरी वगैरेमध्यें पाण्याचा सांठा होतो; त्याप्रमाणें मनुष्यानें कांहीं तरी नवीन प्राप्ति करून आणली तरच घरामध्यें धनाचा संचय होतो.

पाऊस पाणी, आबादानी, कण्याचें - धान्याचें - दाण्याचें मडकें दणदणी — पाऊसपाणी जर व्यवस्थित होईल तरच धान्याच्या मडक्यांत भरपूर दाणे येतील.

पाऊस विचारून पडत नाहीं, प्रेम विचारून जडत नाहीं, आणि स्वार्थत्याग विचारून घडत नाहीं — वरील गोष्टी दुसऱ्या कोणावर अवलंबून नसतात, त्या स्वयंस्फूर्तीनेंच व्हाव्या लागतात.

पावसाक भियेवन न्हंयेंत उडकी मारता — (गो.) पावसाला भिऊन नदींत उडी मारणें. कढईतून निघून आगींत पडणें. सावलीस भितो व भुतास बिलगतो.

पावसाचे निरंतर टपके आणि झगडाळू बायकोचे झटके — ज्याप्रमाणें पावसाचे थेंब वरचेवर गळत असतात त्याप्रमाणें भांडखोर बायको नेहमीं कांहीं झगडे करीत असते.

पावसानें भिजविलें आणि सरकारनें - राजानें लुटलें-कोणाजवळ फिर्याद करावी — पुढें पहा.

पावसानें भिजविलें, नवऱ्यानें - बापानें मारलें, कोणाजवळ फिर्याद करावी - फिर्याद कोणाकडे न्यावी — ज्याप्रमाणें पावसानें भिजविल्याबद्दल तक्रार करून चालत नाहीं, त्याप्रमाणें नवऱ्यानें बायकोस, बापानें मुलास मारलें, किंवा राजानें आपलें द्रव्य नेलें तर तक्रार करून कांहीं उपयोग होत नाहीं. तेव्हां वाईट वाटून कां घ्या ?—V.S.२.८

राजा लुटि जरी प्रजाजनाला । माता मारी निज बाळाला ।
बंधु विकि जरी निजभगिनीला । शरण कुणा जावें ॥

पावसानें भिजविलें व सरकारनें मारलें त्याची लाज नाहीं — वर प्रमाणेंच.

पावसानें येती शेतें आणि नशिबानें येती भातें— पाऊस पडून जरी भाताचीं रोपें चांगलीं तयार झालीं तरी त्यांस कणसें येऊन दाणे भरून पुन्हां ते दाणे आपल्या पदरांत पडण्याच्या कामांत अनेक विघ्नें येण्याचा संभव असतो. तेव्हां प्रत्यक्ष दाणे आपल्या पदरांत पडण्यास दैवच अनुकूल पाहिजे. सर्व परिस्थिति अनुकूल असून दैव जर प्रतिकूल असेल तर कांहीं लाभ होत नाहीं.

पांख ~ पांख उडलो म्हळ्यार कावळो उडलो — (गो.) पीस उडून गेलें तर कावळा उडून गेला (असें म्हणतो). जें कांहींतरी ऐकलें असेल त्याची अतिशयोक्ति करावयाची अशी पुष्कळांना संवय असते. पराचा कावळा.

पाखडणें ~ आग पाखडणें—रागें भरणें; रागावणें; संतापणें; क्रोधानें जळफळणें.

हातपाय पाखडणें—१ मरण समयीं हातपाय झाडणें; हातपायांस झटके देणें. २ रागानें हातपाय आपटणें.

पांखरूं — या ठिकाणीं नसलेल्या वाक्प्रचार म्हणीसाठीं उडणें पहा.

पांखरासारखी वाट पाहणें — उत्कंठेनें वाट पाहणें; ज्याप्रमाणें पक्ष्याचीं पिलें आपल्या आईबापांची घरट्यामध्यें वाट पाहतात त्याप्रमाणें अत्यंत उत्सुकतेनें वाट पाहणें.

पांखरें राखणें—शेताचें रक्षण करणें; शेतांतील पिकाचें पांखरांपासून रक्षण करणें.

पाखल ~ पाखल मारणें — (कु.) भुकेनें व्याकूळ होणें; पोट अगदीं पाठीशीं मिळणें; पोटांत कांहीं नसणें.

पाखलपूजा — १ पंचामृत स्नानयुक्त पूजा; प्रक्षालन पूजा; यात्रा होऊन गेल्यावर देवाची जी स्वच्छ धुवून स्नान घालून पूजा करतात ती. 'ससांग यात्रा जाली महाराजा । संपादूनिया पाखलपूजा ।' — दावि १६८.
२ (ल.) तिरस्कारयुक्त निर्भर्त्सना; खरडपट्टी.

पाखलो ~ पाखल्यां गॅलॉ रांच — (गो.) फिरंग्यांच्या घरचा मांसमय स्वयंपाक.

पाखान ~ पाखानीची रेघ काढीली — (महानु.) पाषाणावरील रेघ. अगदीं निश्चित, कायम केलें याअर्थी.

पाखाळी ~ पाखाळीं कीड — निर्णयांतीं वाईट; अखेरीस अहितकर. 'एन्हीं गोरी कीर काना गोड । परी साचाचा पाखाळीं कीड ।'—ज्ञा. १६.१२१.

पांग ~ पांग फिटणें — मनोरथ पूर्ण होणें; इच्छापूर्ति होणें. 'समस्तां भक्तांच्या नयनगतें हा पांग फिटला ।' —सारुह ८.१६७.

पांग फेडणें — मनोरथ सफल करणें; हेतु पूर्ण करणें; इच्छा तृप्त करणें, 'जेणें फेडिला पांग ब्रह्मादिकांचा ।' — राक १.७.

येतील वांग तर फिटतील पांग—[वांग = तारुण्य पीटिका] तारुण्यामुळें तोंडावर ज्या पुटकुळ्या येतात त्यामुळें चांगलें आरोग्य व यौवनाचा भर दिसून येतो, यावरून त्यांस शुभ मानतात व तसे वांग आल्यास पुढें सर्व इच्छा पूर्ण होण्याचा म्हणजे पतिसुख वगैरे मिळून मनोरथ पूर्ण होण्याचा संभव असतो.

पांगण ~ **पांगणाक जर पोकें तर फुडें थोरलेंच आसा** — (गो.) आरंभालाच जर रिकामें भांडें तर पुढें मोठेंच काम आहे त्याला काय मिळणार?

पांगशी ~ **पांगशीचें फळ**—१ दुसऱ्या बहाराचें फळ; शेंडेफळ; सरत्या बहाराचें फळ. २ (ल.) उतार वयांत झालेलें अपत्य.

पांगळा ~ **पांगळाक पाय आयले, गुवांक पडले**—(गो.) पांगळ्याला पाय फुटले आणि ते गुवांत पडले. अलभ्य वस्तु लाभावी आणि तिचा दुरुपयोग व्हावा असेंहि कित्येकदां घडतें.

पागा ~ **पागेचें तट्टू** — १ सरकारी पागेंतील घोडा. २ (ल.) चुणचुणीत मनुष्य. ३ मिळेल ती दाणावैरण यावर राहणें भाग पडलेलें तट्टू. (ल.) श्रीमंतीचा, असेल त्या परिस्थितींत रहाणारा आश्रित.

पागेस लागणें — १ ताब्यांत दिलें जाणें; स्वाधीन करणें. २ धोरणानें वागणें; नीट मार्गास लागणें. ३ जेथल्या तेथें ठेवली जाणें; व्यवस्थितपणें ठेवलें जाणें.

पागेस लावणें — १ हवाली करणें; स्वाधीन करणें; ताब्यांत देणें. २ तंत्राखालीं ठेवणें; हाताखालीं देणें. ३ सरकारी पागेंत जमा करणें.

पांगारा ~ **पांगारा मातलो म्होण पाटणेक उपकाराना** — (गो.) पांगाऱ्याचें झाड कितीहि मोठें झालें तरी वहालाच्या उपयोगीं पडूं शकत नाहीं.

अंगाऱ्याला गेला, पांगारा घेऊन आला — अंगारा पहा.

पांगूळ ~ **पांगूळकाठी - घोडा - धिरा** — अनाथांचा वाली, साहाय्य कर्ता; दीनदयाळ.

पांगूळ पोवा-पोहा-पोहो—पांगळ्याचा, दुबळ्यांचा जमाव. प्रवासांत स्त्रिया, मुलें इ. परावलंबी माणसें असल्यास म्हणतात.

पांगूळ वेळ — पांगूळ भिक्षेकरी ज्यावेळीं गांवांत फेरी घालतो ती वेळ, पहांट.

पागोटी-टें ~ **पागोटी-टें-घेणें** — एखाद्याला लुबाडणें, नागविणें. मनुष्य इज्जतदार बनून पागोटें वापरूं लागतो. त्याला कोणी लुटूं लागला म्हणजे त्याची सर्व चीजवस्त हरण करून अखेर त्याची पागोटीहि घेतो, त्यावरून पूर्णपणें नागविणें, 'लोकांचीं पागोटीं घेऊन सावकार बनला.'

याची पागोटी त्याच्या डोक्यावर करणें—घालमेल करणें; याचें त्याला, त्याचें याला, याप्रमाणें भानगडी करणें; उलाढाली करणें. 'पोटासाठीं आम्हांला याची पागोटी त्याच्या डोक्यावर करावी लागते. कांहीं लटपटी केल्याशिवाय पोट चालणार नाहीं.'

पागोटें उडविणें, खालीं करणें — दुर्लौकिक करणें; अपमान करणें; खालीं पहावयास लावणें.

पागोटें गमावणें—ठोकर खाणें; चट्टा बसणें; तोटा होणें.

पागोटें गुंडाळणें — एखाद्यास लुबाडणें; नागवणें; हिसकावून घेणें. फसविणें; ठकविणें.

पागोटें टाकणें—सर्वसंगपरित्याग करणें ; विरक्त होणें.

पागोटें देणें — दुसऱ्यास फसवून आपला फायदा करून घेणें; ठकविणें.

पागोटें पडणें: पागोटें पालथें पडणें: पागोटें वांकडें होणें—फजीति होणें; अपमान होणें; उपहास होणें.

पागोटें बगलेंत मारणें — १ मारामारीमध्यें पागोटें खालीं पडण्याचा संभव असतो म्हणून तें बगलेंत नीट धरून धक्काबुक्कीस सज्ज होणें; मारामारीस सिद्ध होणें; भांडण करण्यास तयार होणें; युद्धास सज्ज होणें; २ स्वतःचें संरक्षण होईल अशी तजवीज करून एखाद्या कामांत हात घालणें.

पागोटें बांधणें-बांधून देणें — पूर्वी सन्मान करावयाचा झाल्यास पागोटें बांधीत यावरून सन्मान करणें; पागोट्याचा अहेर करणें.

पागोटें बाळ णें; पागोट्याची लाज धरणें-बाळगणें — स्वतःचा नांवलौकिक राखणें; आपली कीर्ति सांभाळणें ; अब्रू, पत राखून असणें; कमीपणा येईल अशा गोष्टीपासून दूर राहणें.

पागोटें वागविणें-सांभाळणें; पागोट्याचे पेंच सांभाळणें. — स्वतःची पत राखणें; अब्रू संभाळणें; नांवलौकिक राखणें; आपल्या इभ्रतीस योग्य असें वर्तन करणें. 'कारकुनाचें पागोटें पडल्यास हरकत नाहीं स्वामींनीं आपले पागोटें सांभाळावें.'

पागोट्याचा धनी — मोठे लोकच पागोटें घालतात, यावरून ऐपतदार, अब्रूदार मनुष्य; नांवलौकिकाचा.

पागोट्याचे पेंच गळ्यांत येणें — लग्नांत पागोटें सुटलें असतां त्याचे पेंच, पीळ गळ्यांत येऊन जास्तच घोटाळा होतो. केलेलें कर्म अंगावर येणें; अंगलट येणें; बाजू अंगावर उलटणें. गळा पहा.

आपल्या पागोट्याशीं सांडावें — अगोदर आपल्या घरची स्थिति नीटनेटकी करावी व नंतर दुसऱ्याच्या गृह-स्थितींत दोष काढावे.

पागोट्यास फुलें बांधणें — आर्जव करणें; खुशामत करणें; हांजी हांजी करणें.

***पागोट्याचा समला, राजाराम दमला** — मराठे लोकांत झोंकदार रुमाल बांधून त्याचा डोक्यावर तुरा व पाठीवर शमला सोडण्याची चाल आहे. तो ऐटबाज येण्यासाठीं एकदां बांधून नीट आला नाहीं तर पुन्हां पुन्हां बांधावा लागतो. याप्रमाणें पागोटें बांधण्यांतच एखाद्याचा सारा वेळ जाऊं लागला म्हणजे म्हणतात. पोकळ ऐट करणारा; केवळ दिखाऊ, भपकेबाज.

पागोळी～पागोळया सोडणें—ज्याप्रमाणें पाऊस पडला असतां घराच्या पागोळया गळूं लागतात त्याप्रमाणें डोळ्यांतून अश्रू गाळणें; रडूं लागणें.

पाग्या～आधीं होता वाघ्या । दैवयोगें झाला पाग्या । त्याचा एळकोट राहीना । मूळस्वभाव जाईना ॥ — आधीं पहा.

पांघरूण～पांघरूण घालणें — १ कपडे, पोषाख करणें. २ झांकणें; आच्छादन घालणें; ३ उघडकीस येऊं न देणें; सारवासारव करणें (दोष, चूक, अपराध वगैरेच्या बाबतींत.) 'ते (गुन्हेगार) आपल्यावर पांघरूण घालणाऱ्या गांवकामगारांना पानसुपारी देतात.' —गुजा ३१.

पांघरूण जाळणें—त्रागा करणें; हट्टानें स्वतःचें नुकसान करून घेऊन दया आणण्याचा प्रयत्न करणें. 'खिजमतगारांनीं पांघरुणें जाळलीं तथापि हुजूर न आले.' — पया. ११८

पाघळणें～जीभ पाघळणें — भलतेंच बोलणें; अप्रासंगिक भाषण करणें; अयोग्य भाषण करणें.

पाघळत येणें, जाणें.—मानखंडना होणें. अपमान होणें.

पांच — पंच पहा.

पांच अवस्था—१ जागृति, २ स्वप्न, ३ निद्रा, ४ तुर्या, ५ गतावृत्ति. 'जागृति स्वप्न आणि निद्रा । गतावृत्ती तुर्या पुत्रा । या पांच अवस्था विचित्रा । असती देहीं ॥

—कथा. ५.७.२३

पांच खाणी — सृष्ट्युत्पत्तीचे पांच प्रकार. १ मानसिक, २ जरायुज, ३ अंडज, ४ स्वेदज, ५ उद्भिज. — हंको.

पांच जिन्नस—न्यायशास्त्रांतील बत्तीस पदार्थांचें पुढील प्रमाणें पांच जिन्नस कल्पिले आहेत. (१) पांच भूतें व पांच खाणी मिळून दहा, (२) पांच कर्मेंद्रियें व पांच प्राण मिळून दहा, (३) पांच ज्ञानेंद्रियें, मन व बुद्धि मिळून सात, (४) मूळ माया, विद्या व अविद्या मिळून तीन, (५) जीव व ईश्वर मिळून दोन.

— हंको.

पांच परतणें; पांच परतावण; पांच पर्यावण.— १ मांडव परतणें २ लग्नानंतर वर वधूसह आपल्या घराहून पांचव्या दिवशीं वधूगृहीं येतो त्यास म्हणतात.

— बदलापूर, १२०.१५०

पांच पाखांड-डी — पंच पाखंड-डी पहा.

पांच पांडव — १ धर्म, २ भीम, ३ अर्जुन, ४ नकुल, ५ सहदेव.

पांच पालव—१ पांच प्राण 'परी पांचहि पालव मोकलिले । मज प्रति ॥' —ज्ञा. ११.६३.

२ अंतःकरण पंचक.

पांच पाली-पाली भाजी — (राजा.) १ उडीद, २ चवळी, ३ माठ, ४ पोकळा . . . इत्यादि. चार पांच प्रकारच्या पालेभाज्यांचा पाला एकत्र करून केलेली भाजी; मिश्र पालेभाजी.

पांच पावली — १ लांब अंतरावर असलेल्या देवतेस केलेला नवस कांहीं अडचणीमुळें फेडण्याचा राहिल्यास, लांबणीवर पडल्यास, त्या देवतेच्या स्थानाच्या दिशेनें कांहीं पावलें चालून जाऊन कांहीं वेळानें घरीं परत येण्याचा एक प्रकार, विधि. २ सापसरडी; एक सापाची जात; या जातीचा साप चावल्यास मनुष्यास पांच पावलेंहि न जाववतां मृत्यु येतो असें म्हणतात.

पांच पोषाख — पोषाखांतील पांच वस्त्रें — १ जामा, २ निमा, ३ मंदिल, ४ इजार, ५ शेला.

'शिवाजी महाराज पांच पोषाख नटला' —ऐपो. ३२.

पांच प्रमाणें — १ प्रत्यक्ष, २ अनुमान, ३ उपमान, ४ आप्तवाक्य, ५ शब्द.

पांच वनी-वन्ही — १ प्रलयानल, २ विद्युदनल, ३ वडवानल, ४ शिवनेत्रानल, ५ द्वादशादित्यानल.

'सैंध पांचवनिया ज्वालांचे वळसे । पडतां ब्रह्मकटाहकोलिसे ।

— ज्ञा. ११.३०५.

पांचांतून उठणें — माणसांतून उठणें; लोकाचाराविरुद्ध वर्तन करणें; सभोंवतालच्या मंडळीप्रमाणें न वागणें.

पांचावर धारण वसणें — पूर्वी लष्करांत वगैरे फार महागाई झाली म्हणजे रुपयाला पांच शेर धान्य मिळूं लागे व मग सर्व लोक अगदीं हवालदील होऊन जात. कारण सामान्यतः तेव्हां फार स्वस्ताई असे. याप्रमाणें रुपयास पांच शेर असा निरख होणें म्हणजे पांचावर धारण वसणें म्हणजे अगदीं हलाखीची, निकृष्ट अवस्था होणें. यावरून अगदीं घाबरून जाणें, हवालदील होणें; भीतीनें गांगरून जाणें असा लाक्षणिक अर्थ होतो. मॅनवेरिंगनें पांच इंद्रियांवरचा तावा उडणें हा अर्थ दिला आहे तो चुकीचा आहे. 'मराठ्यांनीं हैवत खाण्याचें कारण दुराणींच्या लक्षांत आलें नाहीं. तरीपण, त्यांची पांचावर धारण वसल्याचें त्यांना स्पष्ट दिसूं लागलें.'

— पामो २८५.

'आधुनिक सुधारणेनें दिलेल्या दिव्यांच्या योगें जशी "दिव्याखालीं अंधार" ही म्हण खोटी पाडली तशी प्रचलित आश्चर्यकारक महागाईनें पांचावर धारण वसणें ही मूळ अत्यंत महर्गतानिदर्शक म्हणही पार खोटी ठरवली आहे.'

— केसरी ता. १९-१-४३ पा. ४.

* **पांच अवतार एकच निर्धारः** — (महानु.) प्रसंग अनेक आले तरी एक निर्धार ठाम पाहिजे. महानुभावांत पांच अवतार मानतात.

पांच करतील तें आपण करावें — बहुजन समाज जसा वागेल तसें आपण वागावें. तु०—महाजनो येन गतः स पन्थाः ।

पांच खा, सात खा आणि वैद्या माझा हात पहा — अधाशीपणानें खावयाचें व मग आजारी पडल्यावर वैद्याकडे जावयाचें. वेसुमार खाल्ल्यावर रोग व्हावयाचाच.

पांच जण मेळेलेकडे परमेश्वर — (गो.) पांच जण जमतात तिथें परमेश्वर असतो. पांचांमुखीं परमेश्वर.

पांच तेथें परमेश्वर; पांचामुखीं परमेश्वर—पांच संभावित गृहस्थ जें विधान करतात किंवा ज्या बाजूचा निर्णय देतात तो जणूं कांहीं परमेश्वरानें दिलेला निर्णय मानावा व त्याप्रमाणें वागावें. 'पांचामुखीं परमेश्वर म्हणुनि तया देउनि माना' तु० — Vox populi vox Dei.

— टिक. १४४.

पांच नागडो नाच—(गो.) पांच वर्षे पर्यंत मूल नागवें राहिलें तरी चालतें. 'लालयेत पंच वर्षाणि.'

पांच नाडि पिठाक, स नाडि मीठ — (गो.) पांच मापें पिठाला सहा मापें मीठ. कोणतीहि आवश्यक वस्तूसुद्धां तिच्या योग्यतेनुरूप प्रमाणांतच वापरली पाहिजे.

पांच भ्रतार, एक नारी—पांच पांडवांची स्त्री एकच द्रौपदी होती त्यामुळें कांहीं वेळां मोठी चमत्कारिक स्थिति होत असे व अशाच एका प्रसंगीं अर्जुनास तीर्थयात्रेस जाण्याचा प्रसंग आला. याच शब्दांत एक उखाणा घालतात त्याचा अर्थ लेखणी असा होतो कारण लेखणीही पांच बोटांनीं धरतात.

पांच लेकांची माय आणि खाटेवर जाय — पोटीं पांच पुत्र असून मरतेवेळीं खाटेवरून उतरून खालीं ठेवण्यासहि जवळ एकहि मुलगा नसणें.खाटेवर मरण येणें (खट्वामरण) हें प्रायश्चित्तार्ह समजतात. जवळ पुष्कळ असून वेळेवर उपयोगी न पडल्यास त्याचा काय उपयोग ?

पांच वर्षां चालि असल्यारि पंचवीस दंदा आधारु —(गो.) पांच वर्षांची मुलगी घरांतल्या पंचवीस कामांना आधार करते. मुलाचें तसें नसतें.

पांच शेर (पांचशें) पुतळी, म्हणे शेरभर सुतळी — पांच शेरांच्या किंवा संख्येनें पांचशें असणाऱ्या पुतळीस शेरभर सुतळी म्हणजे प्रमाणाबाहेर एखादी जिन्नस लागणें. अडक्याची भवानी व सापिक्याचा शेंदूर प्रमाणें, किंवा अपुरता जिन्नस; अर्धवट पुरवठा.

पांचा बुद्धि ती पंचविशी बुद्धि — लहान मुलाच्या ठिकाणीं पांचव्या वर्षीं जी बुद्धिमत्ता दिसून येते तिच्यावरूनच त्याला पंचविसाव्या वर्षीं किती बुद्धिमत्ता असेल तें कळून येतें. मनुष्याचे पाय पाळण्यांत दिसतात. Child is father to the man. तु० इं.— 'The childhood shows the man, as the morning shows the day.' (Milton).

पांचाची पांच बुद्धि; पांचाचे पांच प्रकार — पांच निरनिराळ्या प्रकृतीचे लोक जमले म्हणजे प्रत्येक मनुष्य निरनिराळ्या प्रकारचें मत देतो, किंवा प्रत्येक भिन्न भिन्न प्रकारचा सल्ला देतो. त्यांच्यांत ऐक्य होणें कठिण असतें. भिन्न मतें.

माझें घ्या नि पांचांत न्या — पदरचें खर्चून भांडण तंटा वाढविणें; स्वतःचा खर्च करून फिर्याद लढणें.

पांचार तें पंचविसार — (गो.) पांचांवर तें पंचविसांवर. पांचव्या वर्षीं मुलाची बुद्धिमत्ता किंवा गुणावगुण जे दिसतात त्यांचाच पुढें पंचविशींत विकास होतो.

'पांचा बुद्धि०' पहा.

पांचीं गुण तो पन्नाशीं गुण — लहान मूल पांच वर्षांचें असतां जे त्याच्या अंगीं गुण असतात तेच तो पन्नास वर्षांचा झाला तरी तसेच राहतात. वर पहा. तु०—जो गुण बाळा तो गुण जन्मकाळा.

पांची बोटें सारखीं नसतात — ज्याप्रमाणें एका हाताचीं पांच बोटें देखील सारखीं नसतात त्याप्रमाणें जगांत सर्व मनुष्यांचा स्वभाव सारखा नसतो. प्रत्येक व्यक्तीचा स्वभाव निरनिराळा असतो तशाच सर्व वस्तूहि सारख्या नसतात. थोडा फार फरक हा सर्वत्र दिसून येतो. विशेषतः एकाच घरांतील माणसें भिन्न स्वभावाचीं असल्यास वापरतात.

तु० — भिन्न प्रकृतिर्हि लोकाः । (हिं.) पांचों अंगुलिया बराबर नहीं.

पाचंग्या ~ पाचंग्या शिणगाण — कुडमुड्या जोशांच्या जातीचा प्रमुख पंच; प्रधान. —गांगा. ३०.

पांचजन्य ~ पांचजन्य करणें—[पांचजन्य=शंख] बोंब मारणें; शंखध्वनि करणें. 'कोणाचे हात तुटले, कोणाचे पाय तुटले . . . . . . म्हणून ते पांचजन्य करूं लागले.'

— लक्ष्मी आणि सरस्वती.

पाचणें ~ पाचत घालणें — पचत घालणें; पोसत घालणें; अळूं, आलें, इत्यादींचे कांदे कोंब येण्याकरितां ओल्या मातींत पुरणें.

पाचर ~ पाचर मारणें—ज्याप्रमाणें लाकूड फोडतेवेळीं त्यांत प्रथम पाचर ठोकतात त्याप्रमाणें अभंग असलेला विलग करणें. मागचा पुढचा आघाडी पिछाडीचा संबंध तोडणें. १ व्यूहरेषेमधील भाग काबीज करून त्या ठिकाणीं आपले सैन्य ठेवून शत्रुसैन्याची व्यूहरेषा विलग करणें २ एखाद्या कार्यांत विघ्न, अडथळा आणणें; कार्य बंद होईल, नीट चालणार नाहीं असें करणें.

पांचवी ~ पांचवीला पुजणें, पुजलेली असणें —१ बालपणापासून एखादी संवय असणें; जन्माची संवय, खोड इ. लागणें जन्मापासून जडणें 'पूर्ण स्वावलंबन मुमुक्षूच्या पांचवीला पुजलें असेल तरच त्याला मोक्षप्राप्तीची आशा आहे' —ल. रा. पांगारकरकृत 'मुमुक्षूंतील निवडक निबंध, भाग १ पृ. ६. २ नेहमी जवळ असणें; सन्निध असणें; न सुटणें. 'तो माझ्या पांचवीला पुजल्यासारखा माझा पिच्छा सोडणार नाहीं. कोठेंही गेलें तरी पांचवीला पुजल्यासारखा हजर.'

पांचशें रुपयांच्या तिजोरींत पैसा न दिडकी.— तिजोरी मोठी असून आंत कांहीं नाहीं. दिसावयास मोठें पण आंतून पोकळ असलेलें. तु. — बडा घर पोकळ वांसा.

पाचोळा ~ कोणाचे पाचोळयावर देखील पाय देऊं नये.—(हवी.) कोणाचे कांहीं घेऊन मिंधें होऊं नये.

पांजरा ~ अंगाचा, शरीराचा, हाडांचा पांजरा — अस्थिपंजर, हाडांचा सांपळा.

पाजवणें ~ मिशी पाजवणें—मिशीस ताव देणें; मिशी पिळणें; गर्वानें मिशीवरून हात फिरविणें.

पाजळणें ~ टेंभा पाजळणें — मशाल पेटवणें; प्रतिष्ठा प्राप्त होणें, मिरवणें. पूर्वी कांहीं विशेष पराक्रमाचें कृत्य केल्यास मशाल समोर धरण्याचा मान मिळत असे त्यावरून.

पाजी ~ पाजीचा गाजी व गाजीचा पाजी.— क्षुद्र मनुष्यास महत्पद प्राप्त होणें व थोर मनुष्यास लघुत्व येणें; जगांतील उलटापालट; कधीं कोणाचा उर्जित काळ येणें तर कधीं निकृष्ट अवस्था प्राप्त होणें.

पाजीचा झाला गाजी तरी अखेरीस पाजी तो पाजीच — क्षुद्र मनुष्यास कितीहि मोठेपणा प्राप्त झाला तरी त्याच्या ठिकाणची जन्मजात क्षुद्रवृत्ति नाहींशी होत नाहीं.

पाझर ~ दगडास पाझर फुटणें — ज्याप्रमाणें दगडास द्रव येऊन पाणी वहाणें कठिण, त्याप्रमाणें अतिशय कठोर हृदयाच्या मनुष्याच्या ठिकाणीं मृदु भावना उत्पन्न होणें दुरापास्त असतें.

पाट ~ पाट बांधणें—पट्टाभिषेक करणें; सिंहासनावर बसविणें; अधिराज्यावर स्थापन करणें. 'जे सकळार्थ मेळावा । पाटू बांधे ।' —ज्ञा. १५.९.

पाटाचा — १ सर्वोत्कृष्ट. तें माझें निजधाम पाहीं । पाटाचें गा । ज्ञा. १५.३१६. २ ऐक्याचा. – मनको ३ हक्काचा; अधिकाराचा; वसंता वाउगें वीकु । तें सुख चौगुणां अधिकु । भणओनि ते पाटाचे अंकु । मन्मथाचें ॥ – शिशु. ६२२.

पाटाचा पाव्हुणा—सन्मानाचा; मानाचा; आदरणीय; सन्माननीय पाहुणा.

पाटीं बसणें--१ विधि संस्काराच्या वेळीं पत्नीनें पतीशेजारी बसणें. २ (ल.) रजस्वला होणें. ३ अधिकाराचें स्थान प्राप्त होणें. श्रेष्ठपद मिळणें; महत्त्वास चढणें. 'ते वेळीं विजयश्रियेच्या पाटीं । एकुचि बैसे ।' ज्ञा.७.१२ ४ विवाह लावणें. 'यांचिये बैसोनि पाटीं । जन्में देखिली नाहीं सुख गोष्टी ।' स्वादि.२१.५८

पाटी बसविणें — सन्मानाचें स्थान देणें; श्रेष्ठपदास चढविणें. 'निगमा बैसवी पाटीं । परज्ञानाचा । ऋ.३.

पाट नाहीं बसायला, रांगोळी कशाला ? — जेथें बसावयास पाट देखील नाहीं तेथें रांगोळीचा थाटमाट काय कामाचा; साध्या जरूरीच्या गोष्टींची वाण असतां इतर फालतु मोठमोठ्या गोष्टींचा काय उपयोग ?

पाटा पाणी पाटा लागलें — (गो,) पाटाचें पाणी पाटाला मिळालें. पाटाच्याकडेला असलेल्या झाडांना पाणी शिंपलें कीं थोड्या वेळानें तेंच झिरपून पाटाला येऊन मिळतें. वियोगानंतर ज्याचें माणूस त्याला मिळालें कीं म्हणतात.

पाटापुढें रांगोळी, ताटामध्यें माधुकरी — पाट, रांगोळी वगैरे थाटमाट करून जेवावयास मात्र माधुकरींतले शिळेपाके तुकडे घालावयाचे; याप्रमाणें एकीकडे खूप वरवरचा आदरसत्कार दाखवून मुद्याच्या गोष्टीच्या वेळीं मात्र हात दाखवावयाचा अशी वृत्ति.

पाटावरचें (वरून) ताटावर आणि ताटावरचें (वरून) पाटावर — केवळ जेवणें व स्वस्थ बसणें याशिवाय कोणतेंहि काम नसण्याची स्थिति. स्वस्थ बसून खावें प्यावें चैन करावी अशी स्थिति किंवा वागणूक.

पाट~**पाटकर-पाटाची बायको; पाटकरीण; पाटकर** — ब्राम्हणेतर जातींत स्त्रीच्या दुसऱ्या लग्नाला पाट म्हणतात. पुनर्विवाहित स्त्री; झोतुराची बायको.

पाट लावणें—झोतुर करणें; विधवेनें दुसरा नवरा करणें.

पाटकरूं तें बटकरूं — जी स्त्री झोतूर करते तिला हलकी समजतात.

पाटाची बायको गडवडा लोळे — 'एक पुती रडे, सातपुती रडे' याच्यापुढें वरील चरण म्हणतात.

पाटका~**पाटका करणें**—(बे.) नवीन जनावर जुंपून गाडीस लावून मूड घालून माकण घालून त्यास थोडा वेळ काम करण्यास लावून शिकवून तयार करणें, कामाला लावणें, शिस्तीला लावणें. "बैल, गाडीला जोडून पाटका कर म्हणजे हंगामांत अडचण पडणार नाहीं."

पाटा~**पाटा पूजन**—मूल जन्मल्यानंतर पांचव्या दिवशीं अनिष्ट निवारणार्थ करावयाची पूजा; सटवी पूजन. 'पांचव्या दिवशीं पाटापूजन'——पाळणे संग्रह ३.

पाटा वरवंटा—१ पाटा व वरवंटा; चटणी वाटावयाचीं साधनें. २ कणकेचा गौरीस वहावयास केलेला पाटा वरवंटा. ३ चक्काचूर, विध्वंस, नाश.

*** पाटा चूर्ण करी तें काम। नोहे घेतां शाळीग्राम॥** —ज्या गोष्टीला कठोर अथवा भक्कम साधनें जरूर असतात, ती गोष्ट नाजूक साधनें वापरून होत नाहीं. जसें काम तशीं हत्यारें.

पाटा वरवंटा चटणीला आणि नरोटी जिलबीला —जसें काम असेल तशीं साधनें.

पाटा~**पाटे मोडणें**—पायघड्या घालणें; रस्त्यावर वस्त्रें पसरणें. 'मराठे लोक वगैरे यांजकडे लग्नें होतात तेथें पाटे मोडावे'—मसाप. २-२-१७४.

पाटाऊ~**नेसीन तर पाटाऊ नेसीन, नाहीं तर नागवी असेन**—नेसणें पहा.

वेडीचें सोंग घेतलें म्हणजे पाटाऊ फाडलें पाहिजे — जी भूमिका स्वीकारली असेल तसें वर्तन करावें लागतें.

पाटाव्यास रकट्याचें ठिगळ—चांगल्या वस्त्रास भिकार वस्त्राचें ठिगळ लावणें म्हणजे चांगल्यावाईटाचा संयोग करून उत्तम वस्तूस कमीपणा आणणें आहे. तु०—शालजोडीस घोंगडीचें ठिगळ.

पाटी~**पाटी उधळणें**—पूर्वीं धूळपाटीवर लिहीत असत त्यावेळीं, लांकडी पाटीवर बारीक विटकरीची पूड पसरून तीवर काडीनें अक्षरें काढीत असत. अशावेळीं पाटी हलविली तर वरची धूळ सारखी होऊन अक्षरें नाहींशीं होत. याप्रमाणें पाटी उधळणें म्हणजे काढलेलें सर्व नाहींसें करणें, नाश करणें, उध्वस्त करणें असा अर्थ होतो.

पाटी कोरी करणें—(इंग्रजी to have a clean slate याचें भाषांतर.) जुनें नाहींसें करून नवीन वळण घालण्यास संधी देणें; जुनें वदलणें, 'सरकारनें आपल्या जुन्या नोकरशाही स्वरूपाच्या कारभाराची पाटी कोरी करावी असेंहि श्री. जोशी यांनीं सुचविलें आहे.—केसरी १७-३-४२.

(मुलगा-मूल) पाटीवर घालणें, बसविणें, लावणें —शिक्षणास प्रारंभ करणें: श्री ग काढावयास शिकविणें.

पाट्या बदलणें—पूर्वीं शिक्षक मुलांस पाटीवर पाढे वगैरे काढावयास सांगत, अगर एखादें उदाहरण, किंवा शुद्धलेखन घालून तें लिहून झालें म्हणजे पाट्यांची अदलाबदल करून मुलांकडूनच परस्परांचें तपासून घेत. यावरून परस्परांचा अभ्यास तपासणें.

पाटी~**पाटींतलें मांस**—पाटींतलें मांस कोणीहि घ्यावें व त्याचें वाटेल तें करावें: तें कांहीं जिवंत नसतें. यावरून लाचार दीन मनुष्य; आगतिक मनुष्य. 'मी पाटींतली मास परमान सायासी लाधलें। अभकीसी नको टाकूं जसें जळ वळवाचें वाहवलें'—हौला १९४.

(दोन) पाट्या टाकणें — उपरणें झाडून मोकळें होणें; ठराविक मजुराप्रमाणें काम करणें; आपलें म्हणून काळजीनें काम न करणें. 'उपरणें झाडून मोकळें होण्याच्या किंवा दोन पाट्या टाकण्याच्या क्षुद्र वृत्तीनेंच शिक्षक काम करत असेल तर त्याला त्या धंद्यांत कांहींच किफायत नाहीं.' —आमच्या इंदूचें शिक्षण, पा. ९९.

* **पाटीभर बोलणें, गुंजभर अर्थ** — शब्दांचें मात्र अवडंबर पण अर्थ थोडा असा प्रकार; निरर्थक बडबड.

पाटील ~ पाटील चावडींत बसणें — योग्य मनुष्य आपल्या योग्य अधिकाराच्या जागीं स्थानापन्न होणें. — के. २७-१०-३३.

पाटील परांगदा होणें—(बे.) पुरुषत्व नसणें; षंढ असणें. 'त्याचा पाटील परांगदा झाला आहे.'

पाटलाची घोडी—पाटलाच्या गोठ्यांत गवताची काडी नसली तरी घोडी मात्र नेहमीं पुष्ट असते यावरून दुसऱ्याच्या जिवावर मजा मारणारी व्यक्ति. "'पाटलाची घोडी' हा भाषण संप्रदायही बराच रूढ आहे. व त्याचा अर्थ असा आहे कीं, पाटलाच्या गोठ्यांत गवताची काडी नसतां घोडीवर मात्र लिंबू ठरत नाहीं: म्हणजे ती दुसऱ्याच्या शेतांत फुकट चरते,'—गांगा २२३.

* **कांही नसो पण दादला पाटील असो**—पाटील हा खेड्यामध्यें प्रमुख असून त्याच्या हातांत सर्वाधिकार असतात. पूर्वीच्या काळांत पाटलाला फार मान आणि सत्ता असे. तेव्हां जरी पैसा वगैरे नसला तरी नवरा पाटील असल्यास पाटलिणीचा गावांत मोठा तोरा असतो. पैसा नसला तरी अधिकार असावा.

पाटिल पाटिल बायको करा, तर गांवावर चालत आहे — पाटलास लग्न करावयास सांगितलें असतां तो म्हणतो, कशाला? गांवांत काय बायका थोड्या आहेत? म्हणजे पाटलाशीं गावांतील बऱ्याच स्त्रिया लागू असतात, त्याचें लग्नावांचून अडत नाहीं.

पाटीलबुवा ! बायको करा तर म्हणे तुम्हीच व्हा —एखाद्याला त्याच्या हिताची एखादी गोष्ट सांगावयास जावें तों त्यानें आपल्याच मागें लागावें अशांतला प्रकार. 'भटजी बुवा! बायको. . . . .' असाहि पाठ आहे.

पाटिलबुवा भला, तर प्यादा लावून दिला — पाटलाला चांगला म्हणावयास जावें तों त्यानें वसुलाकरतां आपल्या मागें शिपाई लावावा. एखाद्याकडे जाऊन त्याला चांगुलपणा द्यावा तों त्याचा उलटच अनुभव येणें.

पाटीलबोवाच्या मोठ्या मिशा, घरच्या बायका घुबडी जशा —१ पाटलाची तेवढी ऐट पाहा, पण त्याच्या घरांतील बायका मात्र अगदीं वाईट स्थितींत. २ पाटील मिशांवर ताव देऊन लोकांत मी वाघासारखा, मी असा पराक्रमी म्हणून फुशारक्या मारतात आणि घरांतील त्यांच्या बायका रात्रीं घुबडीप्रमाणें बाहेर पडून वाईट कामास प्रवृत्त होतात.

उतरंडीला नसेना दाणा पण दादला असावा पाटील राणा. — उतरंड पहा. — गांगा ४६

पाटलाचा कोणी भाव पुसत नाहीं, आणि हजामाची धावपळ.—मुख्य पाटलास जरी गांवांत मान नसला तरी गांवचा न्हावी उगाच त्याच्या नांवावर फुशारक्या मारतो. मूळ गोष्टीचें महत्त्व नसतां आनुषंगिक गोष्टीसच विशेष महत्त्व दिलें गेल्यास म्हणतात. तु० — नवरा रडतो तरणास आणि वऱ्हाडी रडतात वरणास.

पाटलाचा घोडा (पाटलाचें घोडें), महाराला भूषण; पाटलाची घोडी, महाराची बढाई — घोडा जरी महाराचा नसला व पाटलाचा असला तरी त्याबद्दल महारानेंच बढाई मारणें किंवा त्याची बडेजावी गाणें. मालकापेक्षां नोकरांनाच आपल्या धन्याबद्दल अधिक गौरव वाटतो किंवा नोकर मालकाच्या जिवावर फुशारक्या मारतात.

पाटलाची सून अन् बटकीचा गुण — (वांय) नांव मोठें लक्षण खोटें, या प्रमाणें.

पाटलाची म्हैस व्याली म्हणून मठपती मिशा कातरून घेतो. — (बे.) लांब मिशा कातरल्यास पितांना अडचण होत नाहीं. पाटलाच्या घरीं म्हैस व्याली व दूधदुभत्याची चंगळ झाली तर त्याच्या मुलांलेकरांस आनंद व्हावा पण मठांत राहणाऱ्या जोग्यास आतां आपली चंगळ होणार म्हणून व आपणास खूप दूध प्यावयास मिळणार म्हणून त्यानें आपल्या मिशा कातरून घेणें हा मूर्खपणा आहे. कोणाची वस्तु व तिचा कोणास हव्यास.

पाटलाची सून, वडारणीचे गुण. — चांगल्या घराण्यांत अवगुणी मनुष्य निघाल्यास म्हणतात. वर पहा.

पाटलाचें घोडें, महाराला भुसकट — पाटलाच्या घोड्याच्यामागें पळतां पळतां महाराचे मात्र हाल होतात. किंवा पाटलाच्या घोड्याला दाणे खावयास मिळतात व महाराला केवळ त्यांतलें भूस मिळतें.

पाटलाला आला नजराणा, महार झाला दिवाणा — मालकाच्या वैभवाबद्दल नोकरानें फुशारकी मारणें.

पाटीलकी बुडाली, पाटिलकी देशमुखाची व बुडालें कुळकरण देशपांड्याचें — पाटील, कुळकरणी वगैरे ग्रामाधिकारी नेमण्या काढण्याचा अधिकार देशमुख देशपांड्यांचा असे. तेव्हां एखादी पाटीलकी जप्त झाली कीं ती देशमुखाकडे येई किंवा कुळकरणीपण बुडालें कीं तें देशपांड्यांचें होई. उदा. 'देशमुखास बुडाल्या पाटिलक्या असतात.'

लोकहितवादी संग्रह ८११. (शिळा छाप)

पाटीलकीचें नातें, घरीं नाहीं फुटकें जातें — अधिकार पाटिलकीचा पण घरांत पाहावें तों पूर्ण दारिद्र्य. नांव मोठें लक्षण खोटें. तु० नांव सोनूबाई हातीं कथलाचा वाळा.

पाठ करणें — १ एखादें वचन, श्लोक, कविता, कोष्टक वगैरे घोकणें; पुन्हां पुन्हां म्हणून कायमचें लक्ष्यांत ठेवणें. ऐसें गर्जुन अर्जुनसम, जो समजोनि, करुनि पाठ, कवी। पाठक विख्यात जगीं, तैशासहि तो महातपा ठकवी.॥

—मो. द्रोण. २३.५८

२ एखादा ग्रंथ, पोथी, काव्य वगैरे समग्र वाचणें; साग्र वाचन करणें. — मोशल्य १.४४.

पाठ पडणें — वहिवाट, शिरस्ता असणें; पद्धति असणें; रीत असणें; प्रथा पडणें.

***पाठांत असणें**—सरावांतील असणें; संवयीचें असणें; नित्य परिचित असणें.

पुढें पाठ मागें सपाट—एखादा ग्रंथ पाठ करीत असतां पुढील भाग पाठ करीत जावें तों मागील विसरून जावें असा प्रकार.

पाठ~पाठ उघडी पडणें — (ल.) पाठीचें भावंड मरणें.

पाठ उचलणें — पुन्हा तेज चढणें; व्यवसाय धंदा पुन्हां सांवरणें; पुन्हां बस्तान बसविणें; गमावलेला लौकिक, द्रव्य वगैरे पुन्हां संपादन करणें.

पाठ काढणें — अंगचोरपणा करणें; निसटून जाणें; कुचरपणा करणें; जबाबदारी टाळणें.

पाठ कांपणें — भिणें; घाबरणें; थरथर कांपूं लागणें.

पाठ घेणें — १ पिच्छा पुरवणें; पाठीस लागणें; पाठलाग करणें. २ सतावणें; गळ घालणें; एकसारखें खनपटीस बसणें. ३ बोकांडी बसणें; माथीं बसणें; शिरावर येणें. अंगावर येऊन पडणें.

पाठ चोरणें—१ बैल वगैरेनें अंग चोरणें; जोखडाखालून अंग काढून घेणें. २ चुकारपणा करणें; अंग काढून घेणें; जबाबदारी टाळूं पाहणें.

पाठ झांकणें — पाठीमागून जन्मास येणें.

पाठ टाकणें — आडवें होणें; विश्रांति घेणें; लवंडणें.

पाठ थोपटणें — शाबासकी देणें; गौरव करणें; उत्तेजन देणें. 'पाठविला काळानें जाणों थोपटुनि पाठ वीरगडी.'

— मोभीष्म. ६.४७.

'तूं तिला पाहून माझी पाठ थोपटावीस' — मोरप्र. २२.

पाठ दाखविणें — माघार घेणें; पलायन करणें. 'त्यांस रडावें मेले असतिल दावूनि जे परां पाठ' — मोशांति ४.३५.

पाठ देणें — १ पळून जाणें; निघून जाणें; निसटून जाणें. 'असुहर खरतरधर गुरु पुत्रा धर्मे पाठि दे चुकवी' — मोकर्ण ३४.२९. २ मदत, सहाय्य देणें; पाठ पुरावा करणें. 'विशेषा दिधली। पाठी जेणें।' — अमृ. ७.१०५. ३ अव्हेर करणें; टाकून देणें; तोंड फिरविणें; विन्मुख होणें. 'पितृ वचनासी पाठ दिधली' — एकनाथ. ४ मुकाट्यानें सहन करणें; सोसणें; प्रतिकार न करणें. 'देवोनि पाठि त्याला सर्वहि मी सोशितों मुकाट्यानें' — कुनाआ. 'आल्या प्रसंगाला पाठ दिली पाहिजे.' ५ समोर उभें न राहणें; पळून जाणें. 'देती, भिवोनि कौरव सेना समरांत पाठ, वीराया॥' —मो. द्रोण १९.२८

पाठ धरणें — पाठलाग करणें; पिच्छा पुरवणें; पाठीस लागणें,

पाठ निघणें-रिघणें — रक्षणार्थ आश्रय करणें; शरण जाणें; साहाय्याची याचना करणें.

पाठ पुरवणें-पुरती घेणें — १ गळ घालणें; आग्रह करणें 'मद्वात्सल्यें माझी तूं ही दे म्हणुनि पुरविली पाठ।'

—मोअनु. ५.७२

२ पिच्छा पुरविणें; हेका धरणें. 'ताप मनाची पुरवी, कक्षाची जेवि पाठ वणवा गे'॥ — मो.

पाठ पुरविणें-पुरावा करणें — मदत देणें; साहाय्य करणें; आश्रय देणें, 'आधींचि देखणी दिठी। वरी सूर्य पुरवी पाठी। तैं न दिसे ऐसी गोठी। कें ही आहे।' — ज्ञा. १८.१७३३. 'कमळेनें घरांत पाऊल टाकल्यापासून गोदुताईंनीं तिचा पाठपुरावा केला.' — रम्यरात्री पा. १२३.

पाठ पोट सारखें होणें — अत्यंत रोड होणें; पोट खपाटीस जाणें; पोटाचें बाखल होणें; कृश होणें.

पाठ फिरविणें — नापसंती दर्शविणें; विनंति अमान्य करणें; नाहीं म्हणणें; विन्मुख होणें. 'फडणीसांनीं रागाच्या भरांत बोलून पाठ फिरविली.'

—अस्तंभा. ६

पाठ फोडून निघणें — पाठीमागून जन्मास येणें.

पाठ भुईस लागणें — १ अतिशय खालावणें; निकृष्ट दशेस येणें; अगदीं जिकीरीस येणें; २ चीत होणें; दडपून जाणें.

पाठ भुईस लावणें — कुस्तीमध्यें एका गड्याची पाठ भुईस लागली म्हणजे त्याचा पराजय झाला असें समजतात, त्याप्रमाणें पाडणें, चीत करणें; मल्लयुद्धांत जिंकणें.

पाठ मऊ करणें — बडविणें; ठोकणें; मारणें; ताडन करणें. 'माझी पाठ मऊ करणें आपणाला नेहमीं हवें असतें.' —गुप्तमंजूष.

पाठ रगडणें — १ पाठ चेपणें. २ पाठीवर मार देणें. ३ पृष्ठमैथुन करणें.

पाठ राखणें — मदत करणें; पाठपुरावा करणें; साहाय्य देणें; संरक्षण करणें. 'मग ते लोक पाठी राखती । नाना प्रकारीं ।' —दा. १९.४.२९.

पाठ वळणें — पाठमोरें होणें; परत फिरणें; तोंड फिरविणें.

पाठ वळणें-पाहणें — मागें वळून पाहणें; तोंड फिरवून पाहणें.

पाठ सोडणें — १ पिच्छा सोडणें; पाठलाग करण्याचें टाकून देणें; नाद सोडणें; 'पाठी न सोडिती नको म्हणतांहि.' —दावि. ३४४. २ नेटानें चालविण्याचें सोडून देणें; पुरेसें लक्ष्य न घालणें.

पाठीं ना पोटीं — भाऊ किंवा संतति नाहीं असा; एकाकी; एकलकोंडा.

पाठीं हटणें — मागें जाणें; माघार घेणें; मागें पडणें. —देशीभाषा १६.

झांकल्या पाठीचा — प्रतिष्ठितपणाच्या बुरख्याखालीं केलेला गुन्हा, पाप वगैरे.

पाठीची चामडी सैल करणें — बेदम मारणें; खूप ठोकणें.

पाठीचे चकदे काढणें — पाठीच्या चामडीचे तुकडे निघतील इतकें मारणें; खूप मार देणें; ठोकणें; पिटणें.

पाठीचे चकदे निघणें — पाठीची चामडी लोंबेल असें मारणें; खूप मार बसणें.

पाठीचें धिरडें — एका मनुष्यास एका ठिकाणीं जेवावयास आमंत्रण आलें असतां तेथें त्यास धिरडीं खावयास मिळालीं. त्यानें त्या पदार्थाचें नांव विचारलें पण तें लक्ष्यांत राहिलें नाहीं. घरीं येऊन बायकोस त्यान तो पदार्थ करावयास सांगितला पण धिरडें हें नांव आठवेना व तीस कांहीं समजेना. तेव्हां त्यानें तीस मारावयास सुरवात केली. अखेरीस तिचा आरडाओरडा ऐकून शेजारीणबाई आली व म्हणाली काय हो मारमारुन पाठीचें धिरडें केलें आहे! तेव्हां तो म्हणाला, अग तेंच ग तेंच. तेव्हां प्रथमच जर नीट सांगितलें असतें तर अशी दशा कशाला झाली असती.

पाठीचें धिरडें करणें-काढणें — पाठीची कातडी धिरड्यासारखी खडबडीत होईल इतकें मारणें; खूप मार देणें; चोपणें. 'आई ही पाठ पहा, हें पाठीचें धिरडें तुझ्या जामदारानें करविलें.' —संभाजी.

पाठीचें धिरडें होणें — खूब मार बसणें. 'अरे, माझ्या पाठीचें धिर्डें झालें आहे, असें शामभट्टानें उत्तर केलें.' —शाब २. १९३.

पाठीचें साल जाणें — १ पाठीची चामडी सुटेल इतका मार बसणें २ ठोकर बसणें; चट्टा बसणें; नुकसान होणें. ३ नागविलें जाणें; फसणें; लुबाडलें जाणें.

झांकल्या पाठीनें — प्रतिष्ठा न गमावतां.

तापल्या पाठीनें — शरीरांत जोम आहे तों; रग असे पर्यंत.

पाठी पोटीं पिकणें — (व.) एक आशीर्वाद—भावंडें व मुलें होणें.

पाठीमागें असणें — अनुसरणें; मागून येणें; अनुसरणें; पाठपुरावा करणें. 'आपण निघाला कीं आपल्या पाठीमागें आम्ही आहोंत.' — विवि.

पाठीमागें ठेवणें — मेल्यावर मागें सोडणें; मृत्यूनंतर ठेवणें; ठेवून जाणें.

पाठीमागें देणें — परत करणें; वापस देऊन टाकणें.

पाठीमागें पडणें — १ प्रचारांतून जाणें; रूढींतून जाणें. २ महत्व कमी होणें; विस्मरणांत पडणें. ३ लांबणीवर पडणें; दिरंगाई होणें. ४ मंदगतीनें चालणें; प्रगति कमी होणें.

पाठीमागें भुंगा लावणें — सतत त्रास देणें; पिच्छा पुरविणें; सारखी मागें पिरपिर लावणें; टुमणें लावणें.

पाठीमागें लागणें — नादीं लागणें; छंद घेणें.

पाठीमागें सरणें — हरणें; माघार घेणें; पराजय पतकरणें.

पाठीला पाय देऊन येणें — मागाहून जन्मास येणें.

पाठीवर असणें — १ देखरेख करणें. २ पाठपुरावा करणें. ३ मागोमाग असणें. ४ कनिष्ठ असणें. 'माझ्या पाठीवर पांच भावंडें आहेत.'

पाठीवर उभें राहणें — कामकऱ्यांवर देखरेख करणें; पाठीवर असणें.

पाठीवर टाकणें — दिरंगाईनें करणें; लांबणीवर टाकणें.

पाठीवर, पाठीला तेल लावून ठेवणें — खरपूस मार खाण्यास तयार होणें; शिक्षा भोगण्याची मनाची तयारी करून ठेवणें.

पाठीवर धांवत येणें — मदतीस येणें; साहाय्य करणें; पाठपुरावा करणें. — नएतंग. ५०

पाठीवर-वरून हात फिरविणें — गोंजारणें; प्रेमानें कुरवाळणें; कौतुक करणें. 'धर्मासि म्हणे राजा, फिरवुनि सप्रेम पाठिवर हात।' — मोआश्रम. २-२४.

पाठीवाटे काळीज निघणें — पुरें पारिपत्य होणें, करणें; शिक्षा होणें. 'जो कोणी पंतप्रतिनिधीची अखत्यारी सुभेदारी काढूं म्हणेल त्याचें पाठीवाटे काळीज निघेल', — रा. ६-३५७.

पाठीशीं घालणें — १ आड उभे राहाणें; बाजू घेणें; साहाय्य करणें. 'नबाबाचा राघोवाला पाठीशीं घालण्याचा धीर होईना.' — V. S. २-१४२. २ स्वीकारणें; पतकरणें; आपलें म्हणणें 'रायें पाठीसी दासी घालितां। तिची सर्वांवरी चाले सत्ता।' — रावि. १. ४१.

पाठीशीं घेणें — १ पतकरणें; २ आश्रय देणें; स्वीकारणें.

पाठीस काळीज असणें — स्वभावानें, धाडसी, बेडर असणें; बेफिकीर असणें. निर्भय वृत्तीचा असणें.

पाठीस पोट लागणें — १ पोट खपाटीस जाणें २ उदरनिर्वाहाची जबाबदारी अंगावर असणें. 'पोट लागलें पाठीशीं। हिंडवितें देशोदेशीं।' — तुगा. ४१९६.

पाठीस लागणें—१ आग्रह करणें; गळ घालणें. 'मी त्याच्या पाठीस लागलों म्हणून तर काम झालें'—मोरप्र. ३१. २ पाठलाग करणें; पिच्छा पुरवणें. —मोशल्य. ३. १३.

पाठोपाठ येणें—लागलीच, मागोमाग येणें. 'देव भोळा धांवे भक्ता पाठोपाठीं।'—तुगा १३. मो. रुक्मिणी. ५३.

***आपली पाठ आपणांस दिसत नाहीं** — आपली पाठ ज्याप्रमाणें आपणांस दिसत नाहीं त्याप्रमाणें आपले दोष आपल्या लक्ष्यांत येत नाहींत.

पाठ फोडून भावंड नव्हे आणि पोट फोडून मूल नव्हे—कितीहि पाठीवर मारलें तरी कांहीं भाऊ होऊं शकत नाहीं त्याप्रमाणें पोट फोडून कांहीं मूल बाहेर येत नाहीं. ज्या गोष्टी आपल्या हातांत नाहींत त्या कितीहि कष्ट केले तरी मिळणें शक्य नसतें. त्या दैववशातच प्राप्त होतात.

पाठ रगडली पण बरगडी मोडली—पाठ रगडावयास सांगितली असतां ती इतक्या जोरानें रगडावयाची कीं बरगडीचें हाड मोडावयाचें. एखादें काम करावयास सांगितलें असतां तें असें करावयाचें कीं लाभापेक्षां हानिच मोठी होईल.

पोटचा द्यावा पण पाठचा देऊं नये—लहान भावास पुत्रापेक्षांहि अधिक जपलें पाहिजे.

पाठजाळ पुरवेल पण पोटजाळ पुरवत नाहीं — इतर अनेक दुःखें सहन करतां येतात पण क्षुधेचें दुःख असह्य असतें.

पाठी ना पोटीं; दारीं लागली कांटी — ज्याला भावंड नाहीं किंवा पोरवाळ नाहीं त्याच्या येथें कोणी जात येत नाहीं त्यामुळें त्याच्या दाराला जणूं काय कांट्या लावल्याप्रमाणें तें बंद असतें व तो अगदीं एखाद्या ओसाडयासारखा एकलकोंडा असतो.

पाठीचे केंस पाठीस शरण असतात—पाठीमागचे केंस पाठीवर पडतात किंवा पाठ जशी वळेल तसे वळतात. मुख्य गोष्टीच्या तंत्रानें आनुषंगिक गोष्टी चालतात, वागतात.

तोंड बोलतें, पाठीला आहेर — तोंडानें बोललेल्या शब्दाबद्दल पाठीला मार खावा लागतो. एकाच्या चुकीबद्दल दुसऱ्याला शिक्षा.

पाठीला डोळे नाहींत मागचें दिसत नाहीं — आपल्यामागें काय घडतें याची साहजिकच माहिती असत नाहीं.

पाठीवर मारा (मारणें) पण पोटावर मारूं नका (नये) — १ एखाद्याला त्याच्या अपराधाबद्दल इतर शिक्षा करावी पण त्याच्या तोंडचें अन्न काढूं नये. २ एखाद्याकडून काम वाटेल तितकें करून घ्यावें पण त्याचें वेतन तोडूं नये किंवा कमी करूं नये.

पाठीस पोट लागलें आहे — प्रत्येकाला आपलें पोट भरण्याची विवंचना असतेच.-मागें पहा.

पाठगा—पाठवळ ~ शेट शहाणे आणि बैल पाठगे—शेट शाहाणा आणि बैल पाठवळ—व्यापारी हुशार असून बैलहि सरावाचा असल्यास इच्छीत स्थळीं जाऊन योग्य तऱ्हेनें व्यापार करूं शकतो.

पाड ~ पाड नसणें—परवा नसणें; थोरवी, बरोबरी, प्रतिष्ठा नसणें. 'हरिशीं पावेल काय पाड ससा'। —मोभीष्म. 'त्या अल्प समुदायाचा त्या मुसुलमानी सेनासमूहापुढें कांहीं पाड नसे'–गुज. इति.

पाठ पडणें — महत्त्व येणें; मान चढणें. 'क्षणभर मग तेथें पाड त्यांचा पडावा।' —सारुह २. ८८.

पाडास जाणें — १ फळझाडांचा पाडाचा ऋतु टळणें; हंगामांत फळें न धरणें. २ जनावर फळण्याचें टळणें; अम्राट जाणें.

पाडास येणें-लागणें — फळ पिकण्याच्या अवस्थेस येणें; फळें पिकण्याचा हंगाम येणें. 'हें आंब्यांचें सदा फळलें वन । पाडा आलें प्रेमें करुन ।' —ह. १९. २२४.

***आंबे आले पाडा, निंवुणी आल्या रसा**—आंबा पहा.

पाडणें~पाडून देणें-घेणें—किंमत इ. कमी करून देणें.

पाडून नेणें — लढाईत जिंकणें. 'तेथें सदाशिव यमाजी यांणीं लोकांचीं घोडीं उंटें पाडून नेलीं होतीं'—थोमारो. १. १७.

पांडव ~ पांडव कृत्य — एखादें अचाट शिल्प, कोरीव लेणें. पुढें पहा.

पांडवांचें लेणें— कोरीव लेणें; सर्व कोरीव लेणी हीं पांडवांनीं अज्ञातवासाच्यावेळीं रहावयासाठीं कोरलीं अशी समजूत आहे. यावरून त्यांस पांडवकृत्यें असें म्हणतात.

पांडव किती तर बाजल्याच्या-माच्याच्या खुरा-इतके तीन, आणि बोटें हातानें दाखवावयाचीं दोनच! — अगदीं असंबद्ध भाषण व वागणूक, कशाला कांहीं मेळ नाहीं अशी स्थिति. केसरी १६-७-४०.

पांडव जुजानें गेले यादव सोऱ्यानें मेले — (गो.) पांडवांची युद्धामुळें वाताहात झाली आणि यादव दारू पिऊन आपआपसांत एकमेकांना मारून मेले. युद्ध काय नि मद्य काय दोन्ही गोष्टी वाईटच.

पाडवा~पाडव्याचें साल. चैत्रशुद्ध प्रतिपदे-पासून सुरू होणारें वर्ष; चैत्रीसाल; शालिवाहन शकाचें वर्ष. याहून भिन्न मृगसाल, दिवाळीचें साल. 'शकांतील वर्षास कोणी पाडव्याचें साल म्हणतात.' — मरा. ६ वें पुस्तक. गुढीपाडवा पहा.

पाडस~पाडसावयली कीट — (गो.) आढ्या-वरली ठिणगी ही सर्व घर पेटवूं शकते व विझाविण्यास कठीण असते. यावरून प्रतिकार करण्यास कठीण असें विघ्न, संकट.

पाडसावेलो कुंवाळो — (गो.) आढ्यावरचा कोहळा. १ घरावर आणि गोठ्यावर कोहळ्याचा वेल चढवतात. छप्परावर कोहळे लागतात तसा पाडसावरहि एखादा धरतो. पण पाडसाची जागा अत्यंत अरूंद असल्यामुळें तो कोहळा दोन्ही बाजूंना कलंडूं शकतो. घटकेंत एकाच्या तर घटकेंत दुसऱ्याच्या बाजूनें बोलणाऱ्या बिनबुडाच्या माणसाला उद्देशून ही म्हण उपयोजतात. २ सुरक्षित ठिकाणचा जिन्नस.

पाडा~पाडा पेटविणें—खोंडाला नांगर ओढण्यास शिकविणें. 'कीं न पेटवितांचि पाडा'—सिसं ८.१९१.

***पाड्याला बाळगून शेतकी करूं नये व लहान मुलीला घेऊन प्रपंच करूं नये** — या दोहोंमुळें नासाडी होते. गोऱ्हा पहा.

पाडा~पाडा वाचणें—लांबलचक तपशील सांगणें; सर्व इत्थंभूत हकीकत सांगणें.

नन्नाचा पाडा वाचणें—नाहीं म्हणणें; नकार देणें.

पहिले पाडे पंचावन्न—पहिला पहा.

पाडा ~ पाडा घालचें — (गो.) जमीन उध्वस्त करणें; नासाडी करणें; ओसाड पाडणें.

पाडा पडचें — (गो.) निर्वंश होणें; निर्मनुष्य होणें; ओसाड पडणें.

***पाडे बायत गांवकार; पाडे बायक गांवकार आसा** — (गो.) एका गांवकाराला (गांवांतल्या देवस्कीचा पहिला मानकरी) धरायला कांहीं लोक आले तेव्हां तो एका पडक्या व कोरड्या विहिरींत लपून बसला. त्यावेळीं तिथें जो एक माणूस होता तो अर्धवट होता त्याला गांवकारानें आपण विहिरींत लपल्याचें कोणाला सांगूं नको असें सांगितलें होतें. थोड्या वेळानें त्याला धरायला आलेले लोक तिथें येऊन त्यांनीं त्या अर्धवट माणसाला 'गांवकार कुठे आहे?' म्हणून विचारलें. तेव्हां तो म्हणाला. 'शू: आपण पडक्या विहिरींत लपून बसलों आहें असें कोणाला सांगू नको असें गांवकारानें मला बजावलें आहे तेव्हां मी नाहीं सांगणार.'

पाड्या रानांत एरंड वळी — ओसाड रानांत एरंड बळी.

पाडाव~पाडाव करणें—लढाईत पकडणें, जिंकणें; काबीज करणें.

पाडाव करून घेणें — किंमत फार कमी करून विकत घेणें; पाडून घेणें; थोडक्यांत घेणें.

पाडाव करून विकणें — विकतांना बळजबरीनें जास्त किंमत मागणें; वरचढ किंमतीनें विकणें.

पाडाव जिन्नस—लढाईत जिंकलेलें द्रव्य. सामान.

पाडुक करणें — [पाडूक—पारडूं] एक माणूस रात्रीं पिकलेल्या फणसाच्या झाडावर बसला होता. त्याला कारण विचारतां माझें हरवलेलें वासरूं शोधितों आहें असें त्यानें उत्तर दिलें व निसटला. (गो.) चोरी करणें.

पांढर ~ पांढरीचा डोळा — (ल.) गांवचा वतनदार महार; जागल्या; वेसकर.

पांढरीचा झेंडा — गांवच्या वतनदारांनीं आपली गरिबी व दैन्य इत्यादींस उद्देशून गांवासंबंधीं किंवा वतन दारांसंबंधीं योजावयाचा वाक्प्रचार.

पांढरीचें दैवत, पांढरीचा देव — ग्रामदेवता. गावांतील जुना देव.

पांढरीचे प्रभू — पाटील कुळकर्णी.

पांढरा ~ पांढरा परीस—१ दगड; कपाळकरंटा; पांढऱ्या पायाचा. 'आईबापांच्या पोटीं असला पांढरा परीस जन्माला आला.' — नामना.९९. २ अट्टल सोदा; लवाड; ठक.

पांढरा हत्ती — पोसण्यास जड असें जनावर; पांढरा हत्ती फार दुर्मिळ व दिसावयास जरी चांगला दिसला तरी त्यास खावयास घालणें कठिण असतें. यावरून आपल्या ऐपतीपलीकडची गोष्ट. इं. White Elephant.

पांढरे कावळे होणें—(व.) कावळे काळे असतात पण पांढरे उत्पन्न होणें म्हणजे सृष्टीक्रमाविरुद्ध बनाव घडणें व हें अनावृष्टीनंतर दुष्काळाचें लक्षण होय, यावरून नापिकी होऊन दुष्काळ पडणें. 'यंदा पाऊस पडता दिसत नाहीं, पांढरे कावळे तर नाहीं ना होणार'?

पांढरें पाणी—अगदीं पातळ ताक.

पांढरें वांगें—कोंबडीचें अंडें.

उखळ पांढरें होणें—उखळ पहा. श्रीमंती येणें; मुबलक द्रव्य मिळणें.

काळ्याचे पांढरे होणें — (केस). वृद्धपणा येणें; वार्धक्य येणें; लहानपणापासून वृद्धापकालपर्यंत एकाद्याची इमानानें नोकरी करणें. 'तुमची नोकरी करतां करतां माझे केस काळ्याचे पांढरे झाले.'

पांढऱ्या कपाळाची — विधवा; गतभर्तृका; कपाळास कुंकू नसलेली.

पांढऱ्या कावळयाकडे जाणें — १ देशांतर करणें; काळें करणें. 'अमुक गोष्ट करून दाखवीन नाहीं तर पांढरें कावळे असतलि तेथें जाईन.' — हब ६.
२ परागंदा होऊन भिकेस लागणें. 'आम्हांस पांढऱ्या कावळयाकडे जावें लागेल.' — हब.

पांढऱ्या पायाची-चा — सामान्यतः बालविधवा; हतभागी; अशुभ; कुलकलंक असलेली.

पांढऱ्याकडे, पांढऱ्या केसाकडे पाहाणें — पोक्त अनुभव, सल्ला ऐकणें; वृद्ध मनुष्यास मान देणें. 'माझ्या पांढऱ्या केसाकडे पाहून तरी ही गोष्ट करूं नका.'

पांढऱ्याचा काळा करणें; पांढऱ्यावर काळें करणें — १ लेखबद्ध करणें; लिहिणें; लेखनिविष्ट करणें. २ लिहितां येणें; साक्षर होणें. 'ज्यास पांढऱ्यावर काळें करतां येत नव्हतें ते हल्लीं मानसशास्त्राच्या गोष्टी सांगूं लागले आहेत.' — ओक.

पांढऱ्याचे काळे करणें — पांढऱ्या केसाला कलप लावून काळे करणें. म्ह. (ल.) वार्धक्यांत तरुणाचा आव आणणें. उसनी ऐट, अवसान दाखविणें.

पांढऱ्याचे काळे होणें — १ वार्धक्य येणें. म्हातारा असून तरुणासारखा उच्छृंखल वृत्तीचा होणें. याच्या उलट 'काळ्याचे पांढरे होणें' असें उपरोधानें म्हणतात.

पांढरा कागद, तरुण वय, डाग लागे निश्चय — ज्याप्रमाणें स्वच्छ पांढऱ्या कागदावर शाईचा डाग पडणें साहजिक असतें त्या प्रमाणें तारुण्यांत मनुष्याच्या हातून प्रमाद घडण्याचा संभव असतो.

पांढरा परीस नर्मदा गणेश -— (व.) वरून सोज्वल पण आंतून लवाड असा मनुष्य.

पांढरे डोळे झाल्यावांचून खड्डा दिसणार नाहीं. — अनुभव आल्यावांचून पटत नाहीं. खड्ड्यांत पडून पांढरे डोळे झाल्याशिवाय खड्ड्याची जाणीव होत नाहीं. मनुष्य आपल्या धुंदींतच एखादी गोष्ट करतो पण त्यांत चट्टा बसला म्हणजे सावध होतो.

पांढऱ्या मिशा, आल्या दशा — केंस पिकले म्हणजे वार्धक्य येऊन शक्ती क्षीण होतात.

पांढऱ्या व काळया मोहऱ्यांत डाव — बुद्धिबळांत एक रंग पांढरा व दुसरा काळा असतो यावरून युरोपिय व आशियाटिक यांचेमधील लढा. — टिसू. २१.

पाणउतारा ~ पाणउतारा करणें — मानखंडना, अवहेलना करणें. 'पेशवे आम्हां दोघा राव्यांचा पाणउतारा करण्यासाठीं दीडदमडी किंमतीच्या महाराजांच्या रखेल्याना हाताशी धरून कारस्थानें रचित आहेत.' — कादंबरीमय पेशवाई (हडप पा. ७१.)

पाणकणीस ~ ताटे पाणकणसाची—रामबाण.

पाणचट ~ (पांचट) पाणचट गुणाची, म्हणे मी पुण्याची — पुण्याची स्त्री चांगली, सभ्य व सद्वर्तनी असते असा लौकिक पण ही तशी नाहीं. चांगल्या ठिकाणीं

किंवा सभ्य लोकांत राहूनहि असभ्य वागणूक करणारी, चांगलें वळण न लागलेली.

पाणपत, पानिपत ~ पाणपत होणें — पानिपतास ज्याप्रमाणें मराठी सैन्याचा नाश झाला त्याप्रमाणें नाश, विध्वंस होणें. " बापू गोखले मोठे शर्तीनें इंग्रजांशीं लढले. शेवटीं त्यांचें पाणपत जाहलें. " — पेशव्यांची बखर आ. ५. पृ. २२२.

पाणबुड्या ~ पाणबुडो बुडलो तरी सांदन विसरना — (गो.) बुडत असलेला पाणबुड्या आपल्या आवडत्या भाकरी (सांधणें) शेवटपर्यंत विसरत नाहीं. अशी कांहीं माणसें आहेत कीं तीं जरी संकटांत असलीं तरी आपल्या आशा आकांक्षा उराशीं बाळगून असतात.

पाणि ~ पाणिप्रवाह — हस्तप्रयोग; मार. ' राजश्री स्वामी इतराज होऊन पाणिप्रवाह मुखावरी होऊन आवरू घेतली ऐसा प्रसंग येथील आहे. ' — पेद १७.९९.

पाणी ~ पाणी उतरणें — १ पराभूत होणें; पराजय होणें; मोड होणें. ' पाणिपतच्या लढाईनंतर मराठ्यांचें पाणी उतरल्यानंतर निजामास संधि सांपडली.' — विवि. ८.६.१०९. २ अब्रू जाणें; नापत होणें; दुष्कीर्ति होणें. ' ज्या स्नेहानें पाणी उतरलें तो स्नेह रुपये पाण्यांत टाकून राखावा त्यापेक्षां रुपये राखावे हें फार चांगलें. ' — बाळ. २.३. ३ तेज कमी होणें; निस्तेज होणें; चमक कमी मारूं लागणें. ' तिच्या सतेज डोळ्यांचें पाणी उतरूं लागलें. — पाव्ह. ५४,

पाणी ओतणें — १ असलेलें गमावणें. २ नाश करणें; निरुपयोगी करणें. ' तुझ्या ध्येयावर व आकांक्षांवर मी पाणी ओततो आहें असें मानून कष्टी किंवा निरुत्साही होऊं नको. ' — आ. इंदूचें शिक्षण १२५.

पाणी ओळखणें, जोखणें — योग्यता ओळखणें; तेज, पराक्रम याचा अंदाज करणें; गुण, धमक, धैर्य, विद्वत्ता इत्यादि कल्पनेनें ताडणें.

अंगाचें-रक्ताचें पाणी करणें — अतिशय श्रम करणें; जीवापाड मेहनत करणें. कष्ट करणें.

पाणी केस तोडतें — पाण्याच्या प्रवाहाचा जोर दाखविण्याकरितां योजतात. अत्यंत जोराचा प्रवाह असला म्हणजे म्हणतात.

पाणी कोंडणें — पाणी बंद करणें; पाणी मिळूं न देणें. 'कडवा दाणा बंद, कोंडलें पाणी कहर वर्षला। '—ऐपो २३६.

पाणी खाल्लेला — पाणी मुरलेला; अनुभवी; जाणता.

पाणी घालणें — १ पाणी देणें, वाढणें २ स्नान घालणें. ३ नाश करणें; गमावणें; खराब करणें. ' रोजगारावर पाणी घातलें. ' ४ जोपासना करणें; झाडास पाणी घालतात त्याप्रमाणें. ५ त्याग करणें; सोडून देणें. ६ मंत्राचें पाणी घालणें. ७ झाडास पाणी देणें.

(जखमेचें) पाणी घेणें — (ऐति.) लढाईंत लागलेल्या जखमा बऱ्या झाल्यावर स्नान करीत त्यास म्हणत. या प्रसंगीं प्रत्येक वीर आपआपल्या सामर्थ्याप्रमाणें समारंभ करी. ' होळकरांनीं जखमेचें पाणी घेतलें ते दिवशीं तोफांची सरबत्ती जाहली. ' — ख ७५९८. ' जखम हलकीच आहे. आठा चहूं दिवशीं पाणी घेतील.' — ऐति. पत्रव्यवहार १२५.

पाणी चढणें — महत्त्व प्राप्त होणें; त्वेष चढणें; आवेश येणें. ' थोरासंगें दुर्बळास पाणी चढे। '—पला. ४.१९

पाणी छाटणें-कापणें — १ पोहणारानें पाण्यांतून पुढें जाणें. २ पाणी दुभंगणें.

पाणी जाळणें — प्रखर, करडा अंमल चालविणें; जुलूम करणें; अतिशय कठोरपणें वागविणें.

पाणी जोखणें-ओळखणें — धमक अजमावणें; पराक्रमाचा अंदाज करणें. मागें पहा.

(एखाद्याच्या नांवानें) पाणी तापणें — प्रेत नेण्यापूर्वी त्यास पाणी तापवून स्नान घालतात यावरून. मरण इच्छिणें.

पाणी तुटणें — पाणी दुभंगणें; पाण्यांतून मार्ग मिळणें. ' पेनोवेणां दळ वहुतें मीनलें। वाटे पाणी तुटलें। '

— शिशु. न ५७८.

पाणी तुंबविणें — पाणी कोंडून धरणें; पाणी अडविणें.

पाणी तोडणें — पोहणाऱ्यानें पाणी कापणें; पाण्यांतून पुढें जाणें.

पाणी तोलणें — पाणी जोखणें पहा. ' रावसाहेबांनीं हैदराचें पाणी एकदां तोललें गेलें असतां,—' V. S. २.१०८.

पाणी दाखविणें — पाण्यावर नेणें; पाणी पाजणें.

(अंगचें) पाणी दाखविणें — पराक्रम दाखविणें; दौन हात करणें.

पाणी देणें — १ पोलादास योग्य उष्णतेनंतर थंड करणें; पोलादास योग्य तें काठिण्य आणणें. 'पाणी देण्याच्या कृतीनें लोखंडांत फेरफार होतात.' — पदाव. १.१५५. २ धार लावणें; परजणें. ३ तिलांजलि देणें; तर्पण करणें.

पाणी देणें, सोडणें — १ गमावून बसणें; घालविणें. 'ऐसी होतांचि भिळणी। दिलें संसारासि पाणी।' —एकनाथ. २ सोडून देणें; त्याग करणें; स्वत्व सोडणें.

पाणी (देखील) न घोटणें — मरणोन्मुख होणें; पाणी देखील घशाखालीं उतरणार नाहीं अशी अवस्था होणें.

पाणी पडणें — १ नाश होणें; बंद होणें. फुकट जाणें; निरुपयोगी होणें. 'हें पुसावें तर इकडील अवघेच जावसालास पाणी पडतें.' — पया २१२.
२ (ऐति.) तेज नाहींसें होणें.

पाणी पडत जात असणें — नष्ट होण्याच्या मार्गास लागणें. 'निरंतर इंग्रजीमुळें देशभाषेवर पाणी पडत जात असतें.' — ति. ४४५.

पाणी पाजणें—१ तिलांजलि देणें; तर्पण करणें. २ खूप बडविणें; ठोकणें. ३ जिंकणें; चीत करणें; पराक्रम दाखविणें. ४ ठार मारणें.

पाणी पाणी करणें — पाणी ! पाणी ! असें म्हणणें. १ पाणी मागत राहणें; तृषाक्रांत होणें. २ बेदम करणें; खूव तावडणें. ३ नासाडी करणें; नाश करणें.

अंगाचें पाणी पाणी करून सोडणें—हतवीर्य, गलितधैर्य करणें. 'इंग्रजांचे शंभरावर लोक मारून त्यांच्या अंगाचें पाणी पाणी करून सोडलें, हें वाचकानीं ध्यानांत ठेवावें.' — V. S. २,१८६.

पाणी पाणी होणें — १ पुन्हां पुन्हां पाणी लागणें; अतिशय तृषाक्रांत होणें. २ नाश, खराबी होणें. 'हें कठोर मांस आपोआप झडून जाईल किंवा त्याचें पाणी पाणी होईल तर किती बरें होईल'–विकार विलसित.

पाणी पिऊन भांडणें—वाद करणें—जोरानें आवेशानें भांडणें; पुन्हा पुन्हा अवसान घेऊन भांडणें.

दुसऱ्याच्या ओंजळीनें पाणी पिणें—१ दुसरा पाजील तेवढेंच पाणी पिणें; परक्याच्या नादानें वागणें. २ परावलंबी होणें; सर्वस्वी पराधीन होणें.

पाणी प्यायलासुद्धां न राहणें — अगदीं क्षणभरहि, लहानशी गरज भागविण्यालाहि न थांबणें; तावडतोब निघणें.
'ऊठ सिंधू, या घरांत पाणी प्यायला सुद्धां राहूं नकोस !' –एकच प्याला. ३.४
'महाराजांची स्वारी निघून गेल्याबरोबर राजवाड्यांत त्या पाणी प्यायलासुद्धां राहिल्या नाहींत !'–उग्र २.१.

पाणी फिरणें — बोळा फिरणें — व्यर्थ जाणें; फुकट जाणें; निरर्थक होणें. 'सेनापतीच्या चातुर्यावर व सैनिकांच्या शौर्यावर पाणी फिरतें'–सेवामहात्म्य १०.

पाणी भरणें—वहाणें—घालणें—सेवा करणें; बटकीप्रमाणें राबणें; कष्ट करणें. 'रूपाचेनि आहे। ऐरावतु पाणी वाहे।' –शिशु ५०८. 'उद्योगाचे घरीं, ऋद्धिसिद्धि पाणी भरी.'

पाणी मरणें — १ खोटेपणा, पोकळपणा असणें. २ गोंधळलेलें असणें; गडवड उडणें. 'उत्तर देण्यांत त्याचें पाणी मरत होतें'–बाळ. २.२०. ३ तेज नाहींसें होणें; शेळपटणें.

पाणी मागूं न देणें—(जखमी झाल्यावर माणूस लगेच पाणी मागूं लागतो पण तेंहि मागण्यापूर्वी) एकदम तडाक्यासरशीं ठार मारणें; मुळींच अवकाश न देतां निकाल लावणें; टाकोटाक मारणें.

पाणी मारणें—पाणी कापणें, छाटणें पहा.

पाणी मुरणें — १ कमीपणा, दोष, न्यून, व्यंग असणें. 'त्यांत मूळ पाणी कोठें मुरत आहे हें काय सांगावयास पाहिजे.' — केसरी ६-११-४२. 'कांहींतरी पाणी मुरतंय ग बाई ! असें म्हणून ती एकदम मोठ्यानें हंसली.' — दाजी, भाग १ पृ. २०. २ पाणी जिरणें.

पाणी लागणें — १ पाणी बाधणें. 'कैक जणाला पाणी लागलें मासोळीमागें खारी।'— ऐपो. ३५४. २ गुणदोष जडणें; संगतीचा, सहवासाचा परिणाम होणें.

गळ्याशीं पाणी लागणें —१ पाणी गळ्यापर्यंत होणें; बुडण्याच्या बेतास येणें. २ कर्जाची वगैरे पराकाष्ठा होणें; अतिशय कर्ज होणें.

आंत पाणी शिरणें — उतरती कळा लागणें.

(गांडींत) पाणी शिरणें—(अशिष्ट) भेकड बनणें.

पाणी सारणें — (व.) स्नानास पाणी काढणें; पाणी उपसणें, देणें.

(जिभेला) पाणी सुटणें — एखादा आवडता खाद्य पदार्थ पाहिला कीं लाळ उत्पन्न होते यावरून; एखादी वस्तु पाहिल्याबरोबर तिची इच्छा होणें; हवीशी वाटूं लागणें; आशा सुटणें.

पाणी सोडणें — १ कायमची टाकणें; देऊन टाकणें; स्वत्वत्याग करणें. 'हे स्त्री नव्हे प्रतिष्ठा तुमची जरि ईस सोडिता पाणी।' — मोविराट १.१०३. २ आशा सोडणें; नकोसें वाटणें. ३ विसरून जाण्यास तयार होणें; 'परि त्याही आम्ही त्या प्रेमासि रणांत सोडिलें पाणी'— मो. द्रोण.१७. ९०.४ उदक सोडणें; सोडून देणें; देऊन टाकणें. 'ब्राह्मण भोजना बैसता म्हणती। पाणी सोडा प्रीति नामदेवा।'— सप्र. २.९९.५ उदार होणें; त्याग करण्यास प्रवृत्त होणें. 'तों यज्ञसेनसुत भय धनु सोडी, जीवितासही तोय.॥—मो. द्रोण. २१. १४४. 'नात्याच्या जबाबदारीवर आणि विचाराच्या

मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या
केंद्रस्थानीं असलेली

शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

बॉम्बे प्रॉव्हिन्शियल को-ऑपरेटिव्ह बँक, लि.

(सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली)

स्थापना १९११.

मुख्य कचेरीः—सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरियल बिल्डिंग, ९, बँक हाउस लेन, कोट मुंबई.

टेलिफोन नं. २५४६१ तारेचा पत्ताः—'फार्मर बँक'

अधिकृत भांडवल	:	रु. २५,००,०००
काढलेलें भांडवल	:	रु. २२,००,०००
भरलेलें भांडवल	:	रु. १९,८९,७००
खेळतें भांडवल	:	रु. ५,००,००,००० वर

.........शाखा व उपशाखा.........

१ सातारा (जि. सातारा)	२४ लासलगांव (जि. नाशिक)
२ कऱ्हाड ,,	२५ मालेगांव ,,
३ किर्लोस्करवाडी ,,	२६ नांदगांव ,,
४ कोरेगांव ,,	२७ घोटी ,,
५ इस्लामपूर ,,	२८ सटाणा ,,
६ शिरोळें ,,	२९ येवलें ,,
७ तासगांव ,,	३० मनमाड ,,
८ वांई ,,	३१ धुळें (जि. प. खानदेश)
९ लोणंद ,,	३२ दोंडाईचें ,,
१० भिवंडी (जि. ठाणें)	३३ नंदूरबार ,,
११ कल्याण ,,	३४ साक्री ,,
१२ पालघर ,,	३५ शहादें ,,
१३ अकलूज (जि. सोलापूर)	३६ शिरपूर ,,
१४ अहमदनगर (,, अहमद.)	३७ शिंदखेडें ,,
१५ बेलापूर रोड ,,	३८ तळोदें ,,
१६ कोपरगांव ,,	३९ नरढाणा
१७ पाथर्डी ,,	४० दोहद (जि. भडोच व पंच.)
१८ राहुरी ,,	४१ गोध्रा ,,
१९ शेवगांव ,,	४२ झालोद ,,
२० वांबोरी ,,	४३ पनवेल (जि. कुलाबा)
२१ बेलापूर गांव ,,	४४ नडियाद (जि. खेडा)
२२ विरमगांव (जि. अहमदा)	४५ आनंद ,,
२३ नाशिक (जि. नाशिक)	४६ बोरसद ,,

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात आणि इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेड ऑफिस अगर शाखाकचेऱ्यांस लिहाः—

[illegible] ठाकूर
मॅनेजिंग डायरेक्टर

निरनिराळ्या स्वदेशी प्रदर्शनांत सोन्याचीं पदकें व प्रशंसा पत्र मिळालेली

ऑनेस्टी आणि कंपनी

स्टेशनरी मालाचे महाराष्ट्रांतील मोठे कारखानदार

(स्थापना १९०६) टे. नं. २२६००

खालील वस्तूमुळें आमचें नांव हिंदुस्थानभर मशहूर झालें आहे.

१ आलबम्स.	७ ब्लॉटिंग पॅडस
२ निमंत्रणपत्रिका व नूतन वर्षाभिनंदन-पत्रिका	८ एम्बॉस्ड नांवांच्या पाट्या.
३ रोजनिशी	९ पुस्तक बांधणी काम.
४ विमा कंपन्यांस लागणारी टॅबकार्डें	१० शाळा कॉलेजांस लागणाऱ्या वह्या.
५ कॅलेंडर्स	११ सर्व तऱ्हेच्या फायली क्लिपरिंग्ज रीफिल फाइल्स
६ गिरण्यांतील कापडांच्या नमुन्याचीं बुकें	१२ सर्व प्रकारचें पंचिंग केलें जातें.

ऑनेस्टी आणि कंपनी,
स्वदेशी मालाचे कारखानदार,
परशराम मॅनशन, गिरगांव मुंबई ४.

विमेदारांच्या सर्वस्वी मालकीची !

दि सेंट्रल म्युच्युअल विमा कंपनी लि. मुंबई

लालगीर चेंबर्स, फोर्ट मुंबई.

* अवघ्या तीन वर्षांत दीड लाख लाईफ फंड.
* सर्वांना परवडतील, अशीं आकर्षक कोष्टकें.
* रिन्यूअल खर्चाचें प्रमाण अवघें १० टक्के.
* एजंटाशीं स्नेहाची व सलोख्याची वागणूक.

अद्याप एकाहि क्लेमची नोंद झाली नाही.

आजच समग्र माहिती मागवा.

शं. न आगाशे,
मॅनेजिंग डायरेक्टर.

विवेक वृत्तीवरहि पाणी सोडायला मी तयार झालों, हा आमच्या आजच्या दुर्दैवी परिस्थितीचा परिपाक आहे.' --एकच प्याला ५. ३. 'परंतु एका देशप्रेमाच्या पायीं मी सर्व प्रकारच्या अभिमानांवर पाणी सोडायला तयार झालों आहें.'–शिसं १.२.

(गांडींत) पाणी सोडणें--(अशिष्ट) वर्चस्व स्थापणें; जिरविणें; हटविणें; पराभूत करणें. गांड मारणें पहा.

पाण्याचा कांटा मोडणें--पाणी कोमट होणें, त्याची शीतलता नष्ट होणें.

पाण्याची गार गोठणें--पाण्याचें बर्फ होणें.

पाण्यांत घटी बुडूं न देणें--वेळ पहाण्यासाठीं घटि-यंत्र ठेवतात. बंगाळांत घटका बुडली म्हणजे वेळ भरली. तरी ती न बुडेल अशी तजवीज करणें, थांबवून धरणें. यावरून दिरंगाई करणें; वेळ दवडणें; अडथळा करणें. 'पाण्यांत घटी बुडूं दिली नाहीं म्हणजे काळाची गति खुंटते असें नाहीं.'–विवि १०.१०.११९.

पाण्यांत घाम येणें--पाण्यानें सुद्धां अंगांतील संतापाची उष्णता कमी न होणें म्हणजे अतोनात संतापणें.

पाण्यांत घालणें--बुडविणें; नाश करणें. 'संसार घातला पाण्यांत। स्व तें समस्त बुडविलें॥'

पाण्यांत जाणें--व्यर्थ होणें; फुकट जाणें. 'नानाची मुत्सद्देगिरी सारी पाण्यांत जात असली तर'–नि.

पाण्यांत जाण्यापूर्वीं पोहणें शिकणें--अनुभव घेण्यापूर्वींच ज्ञानप्राप्तीची इच्छा करणें.–टिले ३. ३. २१.

पाण्यांत टाकणें--दुरुपयोग करणें; बिघडविणें; नासून टाकणें.

पाण्यांत डिखळ चिरणें--खजिल होणें; लाज वाटणें.–मो नामरसायन ४१.

पाण्यांत दिसणें--मनामध्यें एखाद्याबद्दल शत्रुत्व असलें म्हणजे नेहमीं त्याचेबद्दल विचार चालू असतात व नेहमीं तो जवळपास असल्याचा भास होतो व पाण्यांतहि दिसतो यावरून, निरंतर द्वेषास पात्र होणें.

पाण्यांत देऊळ असणें--(व.) नदीच्या पुराचें पाणी देवळाच्या भोंवतीं पसरलें म्हणजे भिंती भिजून देऊळ पडून जाण्याची भीति असते. त्यावरून चिंताजनक किंवा धोक्याची स्थिति असणें. 'त्याची तब्येत इतकी खालावली आहे कीं कोणत्याहि वेळीं त्याचें देऊळ पाण्यांतच आहे समजा.'

पाण्यांत पडल्यासारखें होणें--(पाण्यांत पडलेलें ढेंकूळ विरतें त्याप्रमाणें) फजित होणें; विरून जाणें; सर्द होणें; लज्जित होणें. 'मग देवाला लाज वाटली. पाण्यांत पडल्यासारखें झालें.'–नामदेव नाटक ६९.

पाण्यांत पाहणें—अत्यंत द्वेष करणें. पाण्यांत दिसणें, पहा.

खोल पाण्यांत शिरणें--१ आपल्या आवाक्या-बाहेरचें काम शिरावर घेणें. २ एखाद्या गोष्टीची फाजील चिकित्सा करणें; बारकाईनें पाहणें. ३ एखादें गूढ उकल-ण्याचा प्रयत्न करणें. ४ एखाद्या कामांत इतकें गुंतणें कीं बाहेर निघणें कठीण होणें.

पाण्यांतील पावष्यादे—जलसंचारांत प्रवीण, नेहमीं पाण्यांत वावरणारे (कोळी, खलाशी वगैरे). 'इंग्रज लोक पाण्यांतील पावष्यादे.'–इसं. ऐच ११५.

ऊन-उन्हान पाण्यानें घर जाळणें--खोट्या आरो-पानें नाश करणें; विनाकारण तोहमत आणणें; एवढ्यातेव-ढ्यानें नाश करूं पहाणें. अशक्य गोष्ट करूं पहाणें.

पाण्यानें वाती पाजळणें--पाण्यानें वाती जळत नाहींत. यावरून अशक्य गोष्ट शक्य करूं पाहणें. 'अवो दुजी कनुधार लागती। तरि पाणिअें वाति पाजळती।'–शिशु ६७५.

पाण्यापरीस-पेक्षां-हून पातळ करणें--फजीत करणें; लज्जित करणें; तेजोभंग करणें. 'धर्मासि करी सज्जन-वृंदीं पाण्यापरीस पातळ तें।'–मोसभा २.३४; मोउद्योग ३.८२;११.६१. 'नामाचि करि पाण्याहुनि पातळ यश भास्करादि तेजांचें।'–मोवन १२.५०.

पाण्यापाण्यानें--नदीच्या कांठाकांठानें; थोडथोड्या पाण्यांतून; फार धोका न स्वीकारतां; थोडीफार जबाबदारी घेऊन.

पाण्यापेक्षां पातळ होणें--विरघळणें; अगदीं गार, तृप्त होऊन जाणें; चीत होणें. 'ती अमृतमय स्तुती पिऊन मी पाण्यापेक्षां पातळ होऊन गेलों होतों.'–य. गो. जोशी, पुनर्भेट.

पाण्यापेक्षां शीतळ--अत्यंत थंड; सोशिक; अतिशय मृदु स्वभावाचा.

पाण्यावर घालणें-नेणें--पाणी पाजण्यासाठीं नेणें; पाणी दाखविणें.

पाण्यावर लोणी काढणें—पाणी किती घुसळलें तरी त्यावर लोणी येत नाहीं, तथापि कांही आलें आहे का तें पहाणें; अति कंजुषपणा करणें.

पाण्यावरचा बुडबुडा; पाण्यावरची रेघ—ज्याप्रमाणें पाण्यावरील रेघ किंवा बुडबुडा फार वेळ टिकत नाहीं त्याप्रमाणें क्षणभंगुर, अशाश्वत वस्तु. 'चितारसी कां चित्र जिवाचें पाण्यावरच्या रेघांनीं।'—वाग्वैजयंती. गोविंदाग्रज.

पाण्यास आश्रय—आसरा—पाणी पिण्यास आधार (कांहीं खाद्य.)

***पाणी आटतें, द्रव्य वाहातें**—ज्याप्रमाणें पाण्याचा सांठा केव्हां तरी आटून जातो त्याप्रमाणें कितीहि संपत्ति असली तरी ती केव्हां तरी संपुष्टांत येते.

रक्ताचें पाणी आणि हाडाचे मणी करणें--अत्यंत श्रम करणें; देह झिजवणें.

पाणी जिथें कोंडी, धान्य पिके खंडी---जेथें पाणी भरपूर असेल तेथें पीकहि भरपूर येतें.

पाणी(नी) तेरा रंग कैसा, जिसमें मिलाया-मिलुंगा-मिलावेंगे वैसा—(हिं.) पाण्याला स्वतःचा कांहीं रंग नसतो तर ज्या रंगाच्या बाटलींत घालावें किंवा ज्या द्रव्यांत मिसळावें त्याप्रमाणें त्याचा रंग बनतो. त्याप्रमाणें एखादा मनुष्य जशी भोंवतालची परिस्थिति असेल तसा वागतो, स्वतःचें कांहीं वैशिष्ट्य दाखवीत नाहीं, इतरांप्रमाणेंच बोलूं चालूं लागतो तेव्हां म्हणतात.

पाणी नवें आणि घाट जुने--'जुने डोळे व नवे चाळे' याप्रमाणें. जुन्या नव्याचा विषम संयोग.

पाणी नाहीं तोंवर पोहेन पोहेन, आणि बायको नाहीं तोंवर झेंबेन झेंबेन--रिकामी फुशारकी. तु०—जोंवरी देखिलें नाहीं पंचानना। तोंवरी जंबुक करी गर्जना॥

पाणी नाहीं, पाऊस नाहीं, शेतकऱ्याला जीव नाहीं--जर पाऊस पाणी झालें नाहीं तर शेतकऱ्याला तग धरणें शक्य नसतें.

पाणी पीकर जात पुछते है--(हिं.)पाणी प्याल्यानंतर जात विचारणें. जात पहा. तु०—'कन्या देऊनियां कुळ। मग काय विचारावें॥'

पाणी वाहण्याचा उसासा आणि आपण पारसा—सर्व दिवसभर पाणी वाहून स्वतः कोरडाच (स्नान न केलेला). एखाद्या गोष्टींत जन्म घालवूनहि तींत कांहींहि गम्य नसणारा.

पाणी सर्वांस धुतें पण पाणी कोणीं धुवावें--जो सर्वांना पावन, शुद्ध करतो त्याला कोणीं पावन करावें. जो सर्वांस शिकवितो, सल्ला मसलत देतो, त्यानें जर कांहीं चुकी केली तर त्याला कोण सुधारणार?

पाणी हालवून कोठें लोणी निघतें?--पाणी कितीहि घुसळलें तरी त्यांतून लोणी निघत नाहीं. व्यर्थ खटाटोप; निष्फळ प्रयत्न.

पाण्याआधीं वळण बांधावें--प्रथम पाण्याच्या निकालाची व्यवस्था करावी व मग पाणी घरांत घ्यावें. भावी संकटाची उपाययोजना आगाऊ करून ठेवणें इष्ट आहे.—माटे, उपेक्षितांचें अंतरंग १३५. 'पाण्याआधीं वळण बांधितां उत्तम. नाहीतर शेणामेणाचे लोखंडाचे जालियावर पुढें भारी पडेल.'—भाब ८३. तु०—(गु.) पानी पेहेला पाल बांधवी.

पाण्याची धांव समुद्राकडे आणि बायकांची धांव सोन्याकडे--पाणी ज्याप्रमाणें स्वाभाविकपणें समुद्राकडे वाहात जातें त्याप्रमाणें स्त्रियांचा ओढा स्वाभाविकच दागिन्यांकडे असतो.

पाण्यांत काठी मारली तर का दोन जागा होईल? पाण्यांत काठी मारली तर दोन होत नाहींत--पाण्यावर कितीहि काठीनें मारलें तरी तें दुभंगत नाहीं. जलताडन; व्यर्थ श्रम.

पाण्यांत पडल्यावर कृष्णार्पण--कणवठीचा, खिशांतील पैसा पाण्यांत पडल्यावर कृष्णार्पण म्हणणें. पडल्या देवा दंडवत. स्वतःच्या ताब्यांतून गेल्यावर तें देवास वाहणें. निरुपायानें संमति देणें. To make virtue of necessity.

पाण्यांत पडल्यावर (हगल्यावर-पादल्यावर) बुडबुडे आल्यावांचून राहणार नाहींत--एखादी वस्तु पाण्यांत पडली म्हणजे ती तळाशीं गेल्यावर वर बुड-

बुडे येतात. याप्रमाणें एखादी गोष्ट घडली तर तिचा परिणाम दृष्टीस पडल्याशिवाय राहात नाहीं. केलेली गोष्ट छपून राहात नाहीं. विशेषतः वाईट क्रियेबद्दल योजतात.

पाण्यांत पडल्याशिवाय पोहायला येत नाहीं--अनुभवाशिवाय शहाणपण येत नाहीं; प्रत्यक्ष करून पाहिल्याशिवाय कोणतीहि गोष्ट साधत नाहीं.--गांगा १९८.

पाण्यांत म्हैस, बाहेर मोल; पाण्यांत म्हैस वर मोल करून त्यांत काय फळ--ज्या वस्तूबद्दल व्यवहार करावयाचा ती नीट पाहिल्याशिवाय तिची किंमत कशी योग्यप्रकारें करतां येईल? यावरून कांहीतरी अर्धवट कारभार; नीट पाहिल्या देखल्याशिवाय व्यवहार. To buy a pig in a poke.

पाण्यांत राहून मगरांशीं वैर; पाण्यांत राहून माशांशीं वैर करूं नये---ज्याचा नित्याचाच सहवास त्यांच्याशीं वैर करणें म्हणजे सदोदित धोका, संकट होय. तेव्हां तें टाळावें. जळ पाहा.--गांगा १६३.

पाण्यांत हगलें तरी उमटल्या-उगवल्यावांचून रहात नाहीं---एखादी वाईट गोष्ट गुप्तपणें केली तरी ती उघडकीस आल्याशिवाय रहात नाहीं.

पाण्यांतील मासा तळीं जातो कैसा, जावें त्याच्या वंशा तेव्हां कळे; पाण्यामध्यें मासा झोंप घेतो कैसा। जावें त्याच्या वंशा तेव्हां कळे॥---कांहीं गोष्टी अनुभवाशिवाय कळत नाहींत.

पाण्यापासून जवळ, सोयऱ्यापासून दूर---मनुष्यानें नेहमीं पाण्याच्या आश्रयानें वसती करावी व आप्तइष्ट लोकांपासून शक्यतों दूर राहावें म्हणजे नित्य संबंध येऊन गैरसमज होण्याचा संभव नसतो.

पाण्यापेक्षां रक्त दाट असतें---नेहमीं रक्तसंबंध, जातगोताचा संबंध माणूस कळत नकळत लक्ष्यांत घेऊन वागत असतो. निर्विकार, निःपक्षपातीपणानें वागणें कठीण जातें. 'या (गांधी) चळवळीचा अमेरिकेवर अनुकूल परिणाम झाला असें जे समजतात तेहि मूर्खांच्या नंदनवनांत राहतात. पाण्यापेक्षां रक्त दाट असतें, हें ते विसरतात.'—महाराष्ट्र २१।९।४१. Blood is thicker than water.

पाण्यावयलो देव नि सवतीवयलो घोव---(गो.) पाण्याबाहेरच्या देवाची पूजा अर्चा करणें सुखकर जातें; तसेंच सवतीपासून वेगळा असणारा नवराहि सुखदायक होतो.

पाण्यावर पाणचट, गुळावर गुळचट---रोज रोज तेंच तेंच या अर्थी.

पाण्यावरून वळण बांधावें---पाणी नेहमीं सखल जागेकडे वहात जातें तेव्हां पाण्याची वाहण्याची दिशा पाहून त्यामानानें त्यास वळण दिल्यास तें इष्ट दिशेकडे नेणें सुलभ जातें. त्याप्रमाणें मनुष्याचा स्वभाव पाहून त्याशीं वर्तन केल्यास त्याचा आपणांस उपयोग करून घेतां येतो. —'पाण्याआधीं वळण बांधावें' पहा.

पाण्याहून तूप चांगलें पण माशीस काय ?---ज्याचें जें जीवन आहे तेंच त्यास उत्तम. अन्य पदार्थ किमतीनें, योग्यतेनें जरी मोठा आहे तरी त्याचा त्यास काय उपयोग ?

पानी पीना छानकर, गुरु करना पछानकर; पानी पिना छानके, और गुरु करना जानके---(हिं.) पाणी नेहमीं गाळून पीत जावें व गुरु नेहमीं परीक्षा घेऊन करीत जावा.

पानीमें पत्तर नही सडता---(हिं.) नदींतील वगैरे दगड नेहमींच पाण्यांत असतात त्यापासून त्यांस कांहीं अपाय होत नाहीं. पाण्यांत कांहीं दगड कुजत नाहीं. पाण्याची शक्ति किती झाली तरी दगडाला कुजवूं शकत नाहीं.

पात—हातावर मिळवावें, आणि पातावर खावें—[पात=पान] रोजच्या रोज कमाई करून उपजीविका करणें; जवळ कांहीं संचय नसणें.

पातक---पातक खाणें—पापाबद्दल पश्चात्ताप होणें; मनाची टोंचणी लागणें.

पातकें फेडतों आहों—मागें केलेल्या दुष्कृत्यांचा परिणाम भोगतों. 'गेल्या जन्मीं पातकें केलीं होतीं तीं या जन्मांत फेडतों आहोंत. झालं !' इंप १७.

***पातक आगमीं गोड, निर्गमीं कडू**---पाप करतांना गोड वाटतें पण त्याचें फळ भोगतांना कष्ट होतात.

पातकी वता थीं पावलभर उदक; पापी वेता थें पावलभर उदक---(गो.) पापी जाईल तिथें पाउलभर पाणी. पापी माणसें जिथें जातील तिथें मुळची भरभराट असली तरी त्यांच्या संसर्गानें कमतरताच व्हायची.

पातळ---पातळपोल्या--सपाट पोटाचा; किडकिडीत; कृश.

कृपा माया पातळ होणें--दृढता जाणें; कमी होणें. ‘ तुझी कृपा पातळ फार झाली । तेणें दशा है मज आजि आली ॥’--सारुह ४.१६.

***पातळपोल्या आणि पायली लोल्या**--दिसावयाला किरकोळ पण खाण्याला जबर.

पाताळ दाखविणें--पाताळ--पाताळांत घालणें; रसातळाला पोहोंचविणें; पूर्ण नाश करणें.

पाताळयंत्री--अत्यंत गूढ मसलती करणारा; कारस्थानी; फार खोल अंतःकरणाचा. ‘बडा पाताळयंत्री दिसतोस तूं, कुठें लग्गा साधलास वाटतं !’--जग हें असें आहे. ‘ हें बिंग ओळखूनच पाताळयंत्री चर्चिलसाहेबांनी स्टालिनची भीडमुर्वत न धरतां आफ्रिकेंतच दुसरी आघाडी करण्याची आपली योजना ठाम केली.’--केसरी १७-११-४२.

पाताळांतून-पाताळ फोडून काढणें--१ उघडकीस आणणें; बाहेर फोडणें. २ ओढूनताणून कल्पना काढणें; तर्क लढविणें; नवीनच शक्कल काढणें.

पाताळीं घालणें--पाताळ दाखविणें; पूर्ण नाश करणें; रसातळास नेणें.

पातें--पात्यास पातें न लागणें--मुळींच झोंप न मिळणें; डोळयास डोळा न लागणें.

पातेरा उडणें--बोज नाहींसा होणें; अब्रू जाणें; पत गमावणें. ‘जनाचारामध्यें उडाला पातेरा। झालों निलाजिरा म्हणवूनि॥’--तुगा १२२९.

पात्र---पात्र देणें--भोजन घालणें; जेवावयास वाढणें. ‘न दिले पात्रासि आज पहा ।’--सप्र २.१४०.

पात्र नाचविणें--उधळेपणानें राहणें; खर्चिक असणें.

पात्रांत राख कालविणें--जीवनाच्या साधनांचा नाश करणें; तोंडचें अन्न काढून घेणें.

पात्रावरून उठविणें--१ पंक्तींतून उठविणें;अपमान करणें. २ तोंडचें अन्न काढणें; उपजीविकेचें साधन नाहींसें करणें.

पात्रीं बसणें--भोजनास बसणें; जेवण करणें.

पात्रें पुजणें--पानावर थोडेसें नांवाला वाढणें, किंचित वाढल्यासें करणें.

पात्रें वाढणें--१ जेवणाचीं पानें वाढणें; पात्रें सिद्ध करणें. २ (ल.) साज मांडणें; सर्व तयारी करणें.

***पात्र पाहून दान करावें**--योग्यता पाहून देणगी द्यावी. तु०--दातव्यमिति यद्दानं दीयतेऽनुपकारिणे । देशे काले च पात्रे च तद्दानं सात्विकं विदुः ॥--गीता १७.२०.

पात्रांत असला तर डावेंत येईल--पदार्थ भांड्यांत असेल तर पळींत येईल. तु.--आडांत असेल तर पोहऱ्यांत येईल.

पाथ---पाथ धरणें--१ बैलांची रांग धरणें;धान्याची मळणी काढणें. २ (खा.) खळ्यांत मळणीकरितां बैल कणसांवरून फिरविणें.

पाद---पादचतुष्टय--वैद्य, औषधी द्रव्यें, परिचारक व रोगी हीं वैद्यक्रियेचीं चार अंगें होत. भिषग्द्रव्याण्युपस्थाता रोगी पादचतुष्टयम् ।

पाद---पादारविंदीं मिलिंदायमान होणें--पायाशीं चिकटून असणें; अगदीं लाचारी पत्करणें. ‘ज्यांचा लत्ताप्रहार त्यांच्या कपाळीं येतो, त्यांच्याच पादारविंदीं ते मिलिंदायमान होतात !’ आजोच ९५.

पाद---पाद गेला, बोचा आवळला--१ विशिष्ट कार्याकरितां उत्पन्न केलेली घटना किंवा परिस्थिति तें काम झाल्याबरोबर नाहींशी करणें. केवळ विशिष्ट हेतु साधण्यापुरती एखादी गोष्ट करणें. २ आधीं तजवीज न करतां अनिष्ट गोष्ट घडून गेल्यावर मग तरतूद करणें. तु०--बैल गेला, झोंपा केला.

पादणें---पादा पण नांदा; पादो पण नांदो--अगदीं वाटेल तें करा पण टिकून राहा, सोडून जाऊं नका. कसेंहि एकदां काम तडीस जावो अशी इच्छा. जेथें अवखळ लोकांशीं गांठ पडली असेल तेथें त्यांच्या कलानेंच घेऊन कार्य साधावें लागतें. ‘त्यांतहि उलट एक असें कांहीं विशेष लचांड उत्पन्न झालें कीं त्यायोगानें तर मोरोपंतादिकांस “ बाबा ! पाद पण नांद ” असें ह्या मुलापुढें म्हणण्याची पाळी आली.’--छच १४.

पादाक नांव परमेश्वर--(गो.) श्रीमंत मनुष्यानें केलेलें वाईट कृत्य निंद्य ठरण्याऐवजीं नेहमीं स्तुतीलाच

पात्र होतें. तुलनाः—नीच रतली रायासी। तीस कोण म्हणेल दासी ॥

पादाचा नाद आणि नादाचा परमेश्वर करणें--(व.) पादासारख्या क्षुल्लक वस्तूचा एकसारखा नाद लावणें; टुमणें लावणें व त्या नादाचा परमेश्वर करणें, म्हणजे त्याला परमेश्वरासारखें खूप महत्त्व देणें, क्षुल्लक गोष्टीला नसतें महत्त्व देऊन सारखें टुमणें लावणें.

पादाचा परमेश्वर—श्रीमंत मनुष्यानें अपान वायु सोडला तरी त्यानें परमेश्वराचें नांव घेतलें असें म्हणावयाचें, फुगवून सांगणें.

पादो तरि नांदो, माळिये घर बांदो—(गो.) पादूं दे पण नांदूं दे आणि माडीचें घर बांधू दे. घरांतलें एखादें माणूस हट्टी आणि आळशी असलें तर थोडेंसें त्याच्या तंत्रानें वागून त्याच्याकडून काम करून घ्यायचें आणि त्यासाठीं त्या माणसानें एखादी अट घातली तर तीहि मान्य करायची असा प्रकार पुष्कळ वेळां घडतो. त्यावेळीं ही म्हण उपयोजितात.

पादना---**पादनेसे क्या नफा? दिल तरावट गांड सफा**-(हिं.) अर्थ स्पष्ट आहे.

पादरधीट---**पादरधिटाई**--अंगीं सामर्थ्य नसतां वरवर दाखविला जाणारा धैर्याचा डौल.

***पादर धिटा ओझें हतियारें**—भित्र्या मनुष्याला हत्यारांचेंच ओझें होतें. -तुगा ३२७९.

पादरा---**पादरीला पावट्याचें-वालाचें मीस; पाद्याला निमित्त पावट्याचें**--पावटा किंवा वाल हा वातुळ असल्यानें तो खाल्ल्यावर अपान वायु जास्त सरतो. तेव्हां पादण्याची खोड असणाराला तेवढेंच निमित्त पुरवतें. नेहमीं वाईट गोष्ट करणारास कांहीं कारण मिळालें तर त्यास अधिकच ऊत येतो.

पादरीस मीस वालाचें, कौतुक आलें बोलाचें--(व.) जिला एवढेंसें निमित्त वाढवून सांगण्यास कारण होतें तीस म्हणतात.

पादरेला होय पावटेचा निमित्त नि हगरेला बाधे थालीपीठ—(कों.) पादऱ्याला पावट्याचें निमित्त होणें व हगऱ्याला थालीपीठ बाधणें. ज्या मनुष्याचा जो स्वभाव आहे तो वेळेवर प्रकट होतोच त्याला फारसें कारण लागत नाहीं व तो इतर गोष्टींनीं झांकूं पाहिल्यास झांकत नाहीं.

पादऱ्याचें गांडीचा आणि लहांबराच्या तोंडाचा विश्वास नाहीं--पादण्याची संवय असलेला मनुष्य केव्हां अपान वायु सोडील त्याचा जसा नेम नसतो तसें लुब्रा मनुष्य केव्हां काय बोलेल त्याचा नेम नसतो. वाईट संवयी असलेल्या मनुष्यांस कितीहि जपलें तरी वेळेवर ते केव्हां घाण करतील याचा नेम नाहीं.

पादशहा--**पादशहाला पादशाही आली म्हणून पिंजाऱ्यानें तार तोडूं नये**--पादशहाला सिंहासन मिळालें म्हणून त्याचा पिंजाऱ्याला कांहीं उपयोग नाहीं. तेव्हां त्यानें त्या आनंदाच्या भरांत आपल्या यंत्राची तार तोडली तर दुसऱ्या दिवशीं उपाशीं मरावयाची पाळी यावयाची. तिसऱ्याला लाभ झाला म्हणून आपण आनंदानें वेडें होण्यांत कांहीं अर्थ नाहीं. बादशहा पहा.

मन पादशाही पण दैव गांडू--मनुष्य थोर मनाचा पण दैव अनुकूल नसल्यानें तो थोरपणा दाखविण्यास वाव मिळत नाहीं. उमदा उदार माणूस दारिद्र्यांत किंवा संकटांत असला तथापि त्यांतूनहि आपल्या मनाचा थोरपणा दाखवीत असेल तर योजतात.

पाद्य--**पाद्यपूजा करणें; पाद्याचें घालणें-करणें**-यथेच्छ लाथा मारणें; तुडवणें.

पाद्यास पावली, उपाध्यास चवली--पाद्यपूजा करण्याकरितां जर पावली खर्च व्हावयाची असली तर उपाध्यास दक्षणा चवलीच्यावर मिळणें शक्य नाहीं. जशी मुख्य गोष्ट असेल त्यामानानें आनुषंगिक गोष्टीस महत्त्व असतें.

पाद्री---**पाद्री पडलो बोवाळाक, इगर्ज नागेली-लुटली गेली**—(गो.) पाद्री जर स्वतःच्या कामाव्यतिरिक्त दुसऱ्याच्या भानगडींत पडेल तर स्वतःच्या भजनमंदिरालाच त्याला मुकावें लागेल. स्वतःच्या कामाची हेळसांड म्हणजे सर्व नाशच. तुलनाः-अव्यापारेषु व्यापार करणें.--सह्याद्रीच्या पायथ्याशीं ३०१.

पाद्री वखद भटा पडले—(गो.) पाद्री (ख्रिस्ती धर्मोपदेशक) याला द्यावयाचें औषध भटाला दिलें गेलें. एखाद्याला त्याच्या स्वभावगुणांविरुद्ध अशी एखादी वस्तु मिळणें अथवा देणें.

पान---पानदान वाजणें---(व.) दिवाळें निघणें.

पान न हालणें---अगदीं अडणें; कोणतेंहि कार्य न होणें. 'पुढें पुढें तर मराठ्यांचें प्रस्थ इतकें वाढलें कीं, त्यांच्या हुकुमाशिवाय राज्यांत पान हालेनासें झालें.'---पामे १४.

(पुस्तकाचें) पान परतविणें---ओझरतें वाचणें.

पान पुजणें---पानावर थोडेसें अन्न वाढणें. पात्रें पुजणें पहा.

तोंडाला पान-पानें पुसणें---फसविणें; ठकविणें; सर्व लाभ हिरावून घेणें.

पान लागणें---सर्पदंश होणें.

पांचा पानांचा विडा-पट्टी देणें---निरोप देणें; रजा देणें; विडा देणें पहा.

पानावर पान टाकणें-घालणें-ठेवणें---दाबादाबी करणें; पांघरूण घालणें; लपविणें; छपविणें; अपमान इ. वर पांघरूण घालणें; कांहीं एक न करतां आपला मान राखून घेणें. 'श्रीमंत तितक्यांतच उमजून, पानावर पान ठेवून, कांहीं स्वारी खर्च दिला तो घेऊन स्वारी पुण्यास आली.' -पेब ७०.

पुढें वाढलेल्या पानास लाथ मारणें---१ आलेला लाभ झिडकारणें; हातचा लाभ गमावणें. २ ऐन उत्कर्षाच्या काळांत मरणें.

***दुसऱ्याच्या पुढलें पान ओढूं नये; दुसऱ्याच्या पुढल्या पानास माती घालूं नये**---कोणाच्या पोटावर पाय आणूं नये; त्याच्या तोंडचें अन्न काढूं नये.

पान ना फूल आणि कमळी माझी सून---कांहीं देणें घेणें झाल्याशिवाय सोयरेसंबंध जोडूं पाहणें; उगाचच नातें जोडूं पाहणें.

पानांत--पानावर भात, जानव्याला हात---पानांत भात वाढल्यावर संध्या वगैरे करावयास सुरवात करावयाची; त्रोटक स्नानसंध्या करणें; स्नानसंध्येबद्दल अळंटळं करणें. मॅनवेरिंगनें चांगली गोष्ट बाजूस ठेवून वाईट गोष्ट करणें असा अर्थ दिला आहे तो चूक आहे.

पानानें पान वाढतें आणि भांडणानें भांडण वाढतें---ज्याप्रमाणें एक माणूस जेवायास बोलाविला म्हणजे आणखी हा बोलवा, तो बोलवा असें होऊन फार मंडळी होतात. त्याप्रमाणें बारीकसारीक गोष्टींत कुरकुर चालू दिली, वेळींच तंट्यास आळा घातला नाहीं म्हणजे कलह पेटत जातो.

पानामागून आली व तिखट झाली---मिरचीला पानें प्रथम येतात व मिरच्या मागून येतात पण पानें तिखट नसतात व मिरच्या तिखट असतात. यावरून मागाहून येऊन प्राधान्य मिळविणें, नंतर येऊन पुढाकार घेऊं पाहणें. मूळ म्हण 'काना मागून आलें (शिंगट) तें झालें तिखट' अशी आहे (पहा). तिचा विपर्यास होऊन वरील म्हण बनली असून तसा तिचा अर्थ लावण्यांत येतो.

पानें कां नासलीं ? घोडा कां अडला ? भाकर कां करपली ? याचें (या तिहींचें) उत्तर (एक) 'न फिरविल्यानें'--- वेळेस दुर्लक्ष केल्यास कसें काम बिघडतें याचीं उदाहरणें आहेत. डब्यांतील पानें रोज पाहिलीं, नासलेलीं असतील तीं काढून टाकिलीं, पिकलेलीं वर ठेविलीं, घोड्यास नेहेमीं रपेटीस नेत गेलें व तव्यावरची भाकरी एका बाजूनें झाल्यावर ती बाजू वर केली तर वरील प्रकार घडणार नाहींत. प्रश्न तीन पण उत्तर एक, असें या म्हणीचें स्वरूप आहे.

पान---पान करणें---१ पिणें; प्राशन करणें. 'तो धृतराष्ट्र राया । सूतसे पान करा ।' ज्ञा. १५.५८९. २ दारू पिणें.

पानवेल---पानवेली निमतान म्हस्का उदक (पद्य); पानवेलीच्या धर्मान म्हस्काक उदक---(गो.) आपोआप वाढलेल्या शेवग्याच्या झाडाखालीं लावलेल्या पानवेलीला पाणी दिल्यानें शेगटाच्या झाडाला सहजच पाणी मिळतें. चांगल्याच्या सहवासानें इतरांचा आपोआपच फायदा होतो. तु०---गाड्याबरोबर नळ्याला यात्रा.

पान्हा---खाजवून पान्हा आणणें---बळेंच आस्था उत्पन्न करणें, बळेंच उकरून काढणें.

पान्हा चोरणें-घालणें-धरणें-पळविणें-न सोडणें---गाईनें दूध न देणें. 'मग स्तना मुखाचिये पोटीं । काय पान्हा चोरे'--माज्ञा ११.४०.

पान्हा फुटणें---१ (जनावरानें) दूध देऊं लागणें. २ प्रेम येणें.

पाप---पाप आढ्यावर बोंबलतें---(व.) पाप कदापि छपून रहात नाहीं. तें लोकांच्या नजरेस येतेंच. आढें

हा घराचा सर्वांत उंच भाग असतो. त्याच्यावर उभा राहिलेला माणूस लांबूनसुद्धां सर्वांस दिसतो व तेथून तो बोंबलून मोठ्यानें ओरडूं लागला तर सर्वांसच ऐकायला जातें. तसें पाप सर्वांस कळतें. 'तिनें त्या प्रांतांत कांहीं पापकर्म करून तें गुप्त राखण्यासाठीं ती दूर या प्रांतांत पळून आली खरी पण पाप तर आढ्यावर बोंबलतें. तिच्या चालचर्येवरूनच लोकांस संशय येऊन ती पकडली गेली.'

पाप उभें राहणें—पापामुळें मार्गांत, कार्यांत अडथळा आडवें येणें; आपलीच चूक आपणांस नडणें.

पाप खाणें—मनास हुरहुर लागणें, चुटपुट लागणें.

पाप बोंब देऊन-मारून उठणें; ज्याचें पाप त्याचे पुढें येऊन नाचणें--पाप उघडकीस येणें, पापास वाचा फुटणें.

पाप मागितल्यानें न देणें—वास्तविक पाप देण्यास कोणीहि राजी होईल पण कांहीं माणसें तेंसुद्धां कोणास देण्यास तयार व्हावयाचीं नाहींत तु०—कापल्या करंगळीवर न मुतणें. 'गीताः—त्या घरचीं माणसं मोठीं नतद्रष्ट आहेत.मेलीं पाप मागितल्यानं द्यायचीं नाहींत कुणाला !'-एकच प्याला५.

पापाचा घडा भरणें—अनेक पापें सांचणें; पापांची संख्या मर्यादेबाहेर वाढणें. एकदां घडा भरल्यावर त्या पापाबद्दल परमेश्वर हटकून शिक्षा करतो अशी समजूत.

पापाचा पाया घालणें--दुष्ट आचरण करणें; दुष्कृत्याचा आरंभ करणें, 'याच अवदसेनें पेशवाईत पापाचा पाया घातला'--इंप ४५.

पापाचा बाप---जन्मदाता बाप. जन्मदाता पिता हा मुलांच्या पातकांस जबाबदार असतो त्यामुळें तो पापाचा वांटेकरी असतो. याच्या उलट धर्माचा बाप म्हणजे जो पालनपोषण करतो अगर उपदेश देतो सन्मार्गास लावतो तो.

पापाचा वांटा उचलणें—पापाचे परिणाम भोगावयास सिद्ध होणें; पाप कर्मांत साहाय्य देणें.

पापानें पाय धुणें--सर्वदा पापाचरण करणें; नित्य ज्याप्रमाणें आपण पाय धुतों, त्याप्रमाणें रोज पापकृत्यें करणें.

पापानें पाय धुतलेला--अतिशय पापी; सदा पापाचरण करणारा.

***पाप करितां न भी मनीं। मग दिसे केवलवाणी॥**—प्रथम पापकृत्य करतांना कोणाची भीति वाटत नाहीं. पण तें उघडकीस आल्यावर अगर त्याचा परिणाम भोगावयाचा झाल्यास मग मात्र अनुकंपनीय स्थिति होते.

पाप जोडलें पदराला, राजा गेला नरकाला--राजानें जर राज्य चालवितांना पापाचरण केलें तर त्यास पुढें दुर्गति प्राप्त होते. तु०—राज्यांतीं नरक.

पाप देणार नाहीं तो पुण्य कोठून देणार; पाप नाहीं तर पुण्य कोठून मिळेल--एखादा मनुष्य इतका कृपण किंवा निर्दय असतो कीं तो अंगचें पाप किंवा त्यास नकोशी असलेली वस्तुहि दुसऱ्यास देत नाहीं तो पुण्य किंवा लाभदायक वस्तु कोठली देणार ?

पापपुण्य भटा माथ्यार--(गो.) पाप-पुण्य भटजीच्या डोक्यावर. आपण त्यास दक्षिणा उचलून द्यावी. मग भटजीनें धर्मकृत्य यथासांग केलें कीं नाहीं त्याच्या पाप पुण्याचा जबाबदार तो.

पापभयानें जैसी, टाकीजे काशी—(महानु.) लोक पापाचा क्षय करण्यासाठीं काशीवास करतात पण फार पाप झालें आहे म्हणून किंवा काशीस पाप होईल म्हणून काशीसारख्या तीर्थस्थळाचा त्याग करणें. तु०—येषां क्वापि गतिर्नास्ति तेषां वाराणसी गतिः।

पापाचा घडा भरतो, शेवटीं फुटूनीया जातो; पापाचा घडा भरला म्हणजे (आपोआप) फुटतो—अनेक पापें घडलीं म्हणजे त्यांचा परिणाम भोगण्याची पाळी येते. तु०--(हिंदी) सो दिन चोरके, एक दिन सावका. A pitcher that goes oft to the well is broken at last.

पापाचा बाप पैका--मनुष्यास पाप करावयाची बुद्धि पैशाकरितां होते किंवा जवळ पैसा असला तर होते. एक अत्यंत दरिद्री मनुष्य लोभामुळें किंवा श्रीमंत मनुष्य चैनीकरितां पापमार्गाचें अवलंबन करतो.

पापाचा भारा आणि स्वर्गीं वाजे नगारा--अनेक पातकांच्या राशी जमल्या म्हणजे स्वर्ग लोकांतहि दुष्कीर्ति होते.

पापाची पायली, भरली कीं लवंडली--अनेक पापें सांचलीं म्हणजे त्यांचेबद्दल प्रायश्चित्त मिळतें. वर पापाचा घडा पहा.

पापाचें नेते, बापाचें नांव करते--(व.) नवऱ्याच्या पैशानेंच चोरून माहेरीं जाऊन दागिने करून आणते व माझ्या बापानें करून दिले म्हणते.

पापाच्या वाढीला,बापाचा पुत्रशोक कारण झाला-- (या ठिकाणीं शोक=शौक.) बापाचा मुलगा जर एकुलताएक असला व विशेषतः त्याचे पुत्र वांचत नसले तर तो त्याचे फार लाड करतो व त्यामुळें मुलगा बिघडतो व पापाचरण करूं लागतो.

पापानें कधीं पोट भरवेल--अन्यायाचें आचरण करीत राहिलें असतां कधीं सुखानें पोट भरून अन्न मिळत नाहीं. पापी मनुष्यामागें नेहमीं अनेक विवंचना लागलेल्या असतात.

पापास नाहीं पार, त्यास नरकाची धार--जो अगणित पापें करतो त्यास निश्चयेंकरून नरकवास घडतो.

पापासारखें प्रायश्चित्त – ज्यामानानें पातकाची तीव्रता असेल त्यामानानें प्रायश्चित्त किंवा शिक्षा मिळते.

पापड---विहिणीचा पापड वांकडा— लग्नांत वरमाय व करवल्या फार तोरा दाखवितात व पदोपदीं वधूपक्षावर कांहींतरी कारण काढून रुसतात, कांहीं कारण मिळालें नाहीं तर तुम्ही आम्हांला वाढलेला पापड वांकडाच आहे, असें सांगून उठून जातात. विहीण पहा.

पापडाची कमताई झाली, विहीण रुसून बसली--विहिणीला रुसावयास कांहींतरी निमित्त लागतच असतें, तेव्हां पापड कमी झाले एवढें निमित्त तिला रुसावयास पुरेसें होतें. यावरून बारीकसारीक क्षुल्लक गोष्टींवरून नाराज होणारा.

पापणी---पापणी उडविणें--नेत्रसंकेत करणें; डोळा घालणें.

पापणीला पापणी न लागणें--झोंप न येणें; डोळा न लागणें.

पापी---पाप्याचा पितर--पापी मनुष्य कधी श्राद्धतर्पण वगैरे करीत नाहीं त्यामुळें त्याच्या पितरांस कधीं अन्न मिळत नाहीं म्हणून ते नेहमीं कृश असतात. अतिशय रोड, कृश, खावयास पुरेसें न मिळणारा. 'तीं पाप्याचीं पितरं पाहून भटाला हिसकी बसेल '--य.गो.जोशी--पुनर्भेट.

***पापीका धन कुत्ता खाय**--(हिं.)पापी मनुष्याचें द्रव्य कुत्रा खाऊन जातो म्हणजे चोरापोरीं जातें.

पापीका माल, खाय चंडाल—वरप्रमाणेंच. हपापाचा माल गपापा पापी मनुष्यानें मिळविलेल्या संपत्तीचा उपभोग भलतेच नीच लोक घेतात, त्यास स्वतःस तिचा कांहीं उपयोग नसतो.

पापीकी नाव डुबी पर डुबी--(हिं.)पाप करतो तो खाचित बुडतो, पाप्याची नाव हटकून बुडते; पाप्याला हटकून प्रायश्चित्त मिळतें.

पापयां देवु म्हणून फातरानें मारचें वे?—(गो.) पाप्यांचा देव म्हणून त्याच्यावर दगड मारणें हें योग्य नव्हे.

पाप्याचें धन प्रायश्चित्तास (अर्पण)—पातक करून मिळविलेल्या संपत्तीचा व्यय त्या पातकाचें निरसन करण्यांतच होतो. तीपासून तसा लाभ कांहीं होत नाहीं.

पाप्याच्या दारीं हत्ती आणि पुण्याच्या दारीं कांटी—(व.) दारीं हत्ती असणे वैभवास चढल्याचें द्योतक आणि दाराला कांटी लागणें अवदशेचें द्योतक आहे. जगांत पाहावें तो पापी मनुष्याला दारिद्र्य येण्याऐवजी तो वैभवास चढलेला आढळतो आणि पुण्यवान आनंदांत व ऐश्वर्यांत नांदण्याऐवजीं त्याच्यावर अवदसेचा फेरा आलेला आढळतो, असा विपरीत प्रकार दिसतो, तु०--सतीच्या दारीं बत्ती आणि शिंदळीच्या दारीं हत्ती.

पाप्याला पंढरपूर आणि आळशाला गंगा दूर----पापी मनुष्याला कधीं पंढरपुरास जाऊन पांडुरंगाचें दर्शन घेण्याची इच्छा होत नाही व आळशी मनुष्याला कधीं गंगेवर जाऊन स्नान करावेंसें वाटत नाहीं, तेव्हां हे जरी त्या क्षेत्राचें ठिकाणीं असले तरी त्यांस त्यांचा कांहीं उपयोग नाहीं. ज्या मनुष्याच्या ठिकाणीं श्रद्धा नाहीं त्याला परमेश्वर दूरच असतो. 'पाप्यासी पंढरी काय?'--मो.--पंढरीमाहात्म्य.

पाप्याला पंढरपूर, हागायाची गोद्री दूर--[गोद्री=हागावयाच्या उपयोगांत आणली जाणारी मोकळी जागा; ही बहुधा वस्तीपासून दूर असते.] पंढरपूर विठ्ठलाचें वसतिस्थान आहे व पुण्यक्षेत्र आहे. तेथें जाऊन विठ्ठलाचें दर्शन घडणें हें पुण्यवानालाच घडतें. पाप्याला दूर हाता

यच्या गोष्टीपर्यंतहि जाणें दुष्कर होतें मग पंढरपूरला जाऊन विठ्ठलाचें दर्शन घडणें तर लांबच. तात्पर्य पाप्याच्या हातून सत्कर्म घडणें मुष्किल असतें.

पाप्याला पंढरपूर आणि नकट्याला तुळजापूर—पापी मनुष्य ज्याप्रमाणें पंढरपुरास कधीं जाणार नाहीं, कारण त्याच्या ठिकाणीं देवावर भावच नसतो, त्याप्रमाणेंच नकटा मनुष्य कधीं तुळजापुरास जाऊं इच्छित नाहीं कारण तेथील मुरळ्या किंवा देवदासी त्याच्याकडे ढुंकूनहि पाहणार नाहींत.

पाय—पाय उचलणें—भराभर चालणें; जलद जाणें.

पाय उतारा—र्‍यां आणणें—येणें—१ नम्र करणें-होणें; खालीं आणणें; रग जिरविणें. २ पायीं चालत येणें-आणणें. 'पाय उतारा येईन मागें पळभर ना सोडीं।' —सला २०.

पाय उतारा होणें—येणें—(ल.)शिव्यागाळीवर येणें; अगदींच हातघाईवर येणें; खालच्या पायरीवर येणें. 'क्षुद्र गोष्टीवर पायउतारें यावें हें थोरपणास योग्य नाही.'—कृष्णाजी जगन्नाथ—इसं. जोध. राज. ४१.

पाय काढणें—१ निघून जाणें; निसटणें. 'निरुपम ममतेची लागली दाट झाडी। त्वरित बहुत आतां पाय येथून काढी॥' —सारुह ४. ९७. 'शिंद्यांनी तेथून पाय काढला.'—अस्तंभा ५७. २ व्यवहारांतून वगैरे अंग काढून घेणें.

पाय कांपणें—घाबरणें; भिणें; धास्ती घेणें.

पाय खोडणें—खुडणें—खुडकणें—निजतांना पाय अंगाशीं घेणें; पाय पोटाशीं घेऊन निजणें.

पाय खोडणें—मरतांना पाय झाडणें.

पाय घरांत शिरकाविणें—प्रवेश देणें; घरांत घेणें. 'राघोबा दादाप्रमाणें इंग्लिशांचा पाय घरांत शिरकविण्यास हा कारण झाला.' —विवि ८.६.११५.

पाय घेणें—प्रवृत्ति होणें.

जळता पाय जाळणें—पाय जळत असतां न विझवितां तसाच जळूं देणें; नुकसानीचा धंदा चालू ठेवणें; अधिकाधिक हानि करून घेणें.

पाय तोडणें—(ल.) विघ्न आणणें.

पाय दाखविणें—मोठया मनुष्यानें लहानांस दर्शन देणें; भेट देणें.'तो मज दावील काय पाय सखा।'—मोवि-राट ६.११८. 'दाखवि तव दिव्य पाय दयानिधे रामा।'

पाय देणें—१ अंग पायांनीं चेपणें; हातापायांवर हळूहळू पाय देऊन अंग दाबणें. २ तुडविणें. ३ पायाचा स्पर्श करणें.

पाय धरणें—१ एखाद्या रोगानें किंवा थंडीनें पाय आखडणें; पाय दुखत असणें; वातादिकांनीं पाय जखडणें. २ पायां पडणें; शरण जाणें; विनंति करणें; नम्रपणें विनविणें.—मोकर्ण ४३.९. 'सिंहलद्वीप सरकारचे गृहमंत्री सर जयतिलक यांनीं हिंदुस्थानांत येऊन हिंदुस्थान सरकारचे तांदुळासाठीं पाय धरले.' —केसरी ३-११-४२.

पाय धरून ओढणें—१ घालवून देणें; हाकालणें; मागें खेंचणें. २ (ऐति.) मनसुबा फिसकटविणें.

पाय धुणें—१ पादप्रक्षालन करणें; स्वतःचे पाय धुवून साफ करणें. २ दुसऱ्याचें पादप्रक्षालन करणें; आदरसत्कारार्थ पाय धुणें; एखाद्या विधीमध्यें किंवा जांवई, श्रेष्ठ व्यक्ति, देवता वगैरेंचे पाय धुणें. ३ [ल. बायको]. लघवी करणें; मोरीवर जाऊन येणें.

पाय धुवून—फुंकून टाकणें—ठेवणें—पुढील मार्ग नीट साफ आहे असें पाहून किंवा साफ करून घेऊन मग पाऊल टाकणें; मोठ्या खबरदारीनें काळजीनें वागणें; अत्यंत काळजीपूर्वक व्यवहार करणें.

पायधूळ झाडणें—घरीं आगमन करणें; दर्शन देणें; भेट देणें.—'बहुता दिवसा मज दुबळीवर पायधूळ झाडली।' —होला १६१.

पाय न ठरणें—एकसारखें हिंडणें; विश्रांति न मिळणें; एका जागीं स्थिर न राहणें.

पाय निघणें—मुक्त होणें; मोकळें होणें, बाहेर जाणें. 'या गांवांतून एकदां पाय निघो म्हणजे झालें.' —विवि ८. ११.२०९.

पाय पसरणें—१अधिकार प्रस्थापित करणें; एखादी जागा व्यापणें; आपला वरचष्मा हळूहळू स्थापन करणें. 'भटाला दिली ओसरी भट पाय पसरी,' पहा. २ मरणें (मरतांना पाय ताठ होतात यावरून).

पाय पसरून निजणें—आळसांत वेळ दवडणें; केवळ पडून राहणें; झोपा काढणें; निरुद्योगी असणें.

पाय पसरून, संसार विसरून—जो पाय पसरून बसतो किंवा झोंपतो तो संसाराला विसरतो. आळशी मनुष्य आपल्या संसाराकडे दुर्लक्ष करतो.

मागला पाय पुढें न घालूं देणें—काम केल्याशिवाय न सोडणें. मुळींच हलूं न देणें; जखडून ठेवणें; डांबून ठेवणें; धरून ठेवणें.

मागला पाय पुढें न ठेवणें—न हलणें; ठाम बसणें; पक्का निश्चय करून बसणें.

पाय पोटीं जाणें—भयभीत होणें; अतिशय भीति वाटणें; एकदम घाबरणें. 'जेव मेणें पाय पोटीं गेले नाहीं।'—दावि १६०.

पाय फांसटणें—पायपिटी करणें; सारखें पायांनीं हिंडणें; भटकणें; फार दूरवर चालत जाणें.

पाय फुटणें—१ (मुलाला)चालतां येणें; चालूं लागणें. 'इंदूला नुसतें तोंडच सुटलें होतें असें नाहीं तर तोंडाबरोबरच पायही फुटले होते.'—आ. इंदूचें शिक्षण ३६. २ विस्तार पावणें; वाढणें; फुगत जाणें. ३ नाहींसा होणें; कोणीतरी घेऊन जाणें; चोरलें जाणें. ४ पायास थंडी वगैरेमुळें भेगा पडणें; जळवात होणें.

पाय फोडणें—भलतीकडे नेणें; विषयांतर करणें; फांटे फोडणें; वाढविणें; लांबविणें.

पायबंद लागणें-लावणें—देणें-घालणें-पडणें—आळा घालणें; बंधन घालणें; बंदी करणें. 'भलत्या आशा व आकांक्षा यांना इतिहासादि शास्त्रांकडून पायबंद पडेल.'—विचावि ५२. 'निजामाला पायबंद लागणें शक्यच नाहीं.'—भाऊ (१·१)२.

पाय भुईला-भुईशीं लागणें—१ कायमपणा येणें; स्थिर होणें. २ जिवावरच्या संकटांतून बांचणें; हायसें म्हणणें; निभावणें.

पाय भुईला लागूं न देणें—जिवंत न ठेवणें; नेस्तनाबूत, खची करणें. 'नाना आतां आपले पाय भुईला लागूं देणार नाहीं.'—V.S.२.१३.

आपले पाय माझ्या घरीं लागावे—(आदरार्थी) आपण माझ्या घरीं येऊन मला धन्य करावें; घरीं येऊन दर्शन द्यावें; घरीं पायधूळ झाडावी.

पाय मोकळा-ळे करणें-होणें—१ अडचणींतून बाहेर पडणें; सुटणें; अंगावरील जबाबदारी निघून जाणें. २ फेरफटका करणें; इकडे तिकडे फिरणें.

पाय मोडणें—१ पायांत शक्ति नसणें; दमणें; चालवेनासें होणें. २ निराशेमुळें गलितधैर्य होणें; धीर सुटणें. ३ हरकत आणणें; धीर खचविणें; मोडता घालणें; अडथळा आणणें; विघ्न आणणें. ४ (नगरी) मुलाच्या पाठीवर गरोदर होणें.

पाय मोडून पाळण्यांत घालणें—मोठेपणा बाजूस ठेवून लहानपणाचा आव आणणें. तु०—शिंगें मोडून वासरांत शिरणें. 'तूं लहान काय? जुळले कीं, पाय मोडून पाळण्यांत घातलं पाहिजे तुला.'

पायमोडे घेणें—भीतीनें परावृत्त होणें; मागें सरणें; माघार घेणें.

पाय येणें—मुलास चालतां येणें. पाय फुटणें पहा.

(वर) पाय येणें—१ प्रतिबंध, अडचण होणें; विघ्न येणें. २ पोटावर पाय येणें; उदरनिर्वाहाचें साधन नाहींसें होणें.

पाय रोवणें—स्थिर, कायम होणें; जम बसणें; स्थैर्य येणें.

पाय लागणें—पाय भुईला लागणें पहा.

पाय वरपणें—ओरपणें—(कर.) सर्दीवर उपाय. पावसाळ्यांत किंवा थंडीच्या दिवसांत सर्दी बाधूं नये म्हणून कोकणांत पायास ताक वगैरे लावून वरून लाल केलेला कोयता वगैरे फिरवितात त्यास म्हणतात.

पाय वहाणें—१ जाण्याची प्रवृत्ति होणें; मनाचा कल होणें; जावेंसें वाटणें. २ एखादी गोष्ट करावीशी वाटणें. पाय घेणें पहा.

पाय वळणें—१ दुसरीकडे प्रवृत्ति होणें;तोंड फिरविणें; दिशा बदलणें. २ पायांत गोळे येणें; पेटके येणें. ३ आगमन होणें; येणें. 'आज इकडे कोणीकडे पाय वळले?'

पायवाट करणें—उतरून, ओलांडून जाणें; पलीकडे जाणें; तरून जाणें. 'पायवाट केले भवाब्धि।'—दावि ३३०. 'भवसिंधु पायवाट कराल।'—नाना १३५.

पाय शिंपणें—पाय धुणें; पायावर पाणी घालणें. 'ते माय आगोदर पाय शिंपी।'—दास्व १.५६.

पाय शिवणें—१ पायांस स्पर्श करणें; वंदन करणें. २ पायाची शपथ वाहणें; पायांस हात लावून बोलणें.

पायां पडणें—पायांवर डोकें ठेवणें; वंदन करणें; नम्र होणें. 'उत्तर म्हणे नकोगे पायां पडतो बृहन्नडे सोड।'—मोविराट ३.७४.

पायां पडून वाळा काढून घेणें—गोड गोड बोलून लुबाडणें; नम्रपणा दाखवून फसविणें.

पायां लागणें—पायां पडणें; वंदन करणें; नम्र होणें. 'मीं पायां लागें कां। कांइसे यालागीं।'—शिशु२२४

पायाकडे पाहून करणें—(ऐति.) एखाद्याच्या प्रतिष्ठेमुळें, उपकारामुळें करणें. 'कांहीं आपले पायाकडे पाहून करावें.'—शिवदि ११९.

पायाखालची वाट—अंगवळणीं पडलेली वाट; सरावाचा रस्ता; रोजचा राबता असलेला रस्ता.

पायाखालचें लागणें—फुरसें चावणें.

पायाखालीं जळणें— अंगीं असणें; जवळ असणें; स्वतःच्या वागणुकींत असणें; सन्निध एखादी गोष्ट घडत असणें.-'पायांखालीं काय जळत आहे.'—इंप ३०. 'त्यांच्या पायांखालीं कांहींहि जळत असो.'—V.S.2.१५९.

पायांखालीं तुडविणें—१ दुःख देणें; क्लेश देणें; त्रास देणें; जमीनीस मिळविणें. २ मानहानि करणें; अपमान करणें.

भरल्या पायांचा—बाहेर जाऊन आल्याबर धुळीनें भरलेले पाय धुतल्याशिवाय; पाय न धुतां.

पायाचा गू पायीं पुसणें—कोणत्याहि घाणीचा ताबडतोब बंदोबस्त करणें; तेथल्या तेथेंच एखाद्या अनिष्ट गोष्टीचा निकाल लावणें.

पायाचा जड—१ हळू चालणारा; मंदगति. २ चांगलें चालतां न येणारा; उशीरा चालूं लागणारा.

पायांचा जाळ--पायांची आग मस्तकास जाणें; पायांचें पित्त मस्तकास जाणें—अतिशय रागावणें; संतापणें; जळफळाट होणें.

पायाचा डोळा—घोटा.

पायाचा नरम—षंढ; नपुंसक.

पायांचा पारवा—जलद चालणारा; पुष्कळ चालणारा; फिरणारा.

पायाचा फटकळ—लाथा मारणारा; लाथाड.

आपल्या पायांची धूळ माझ्या घरीं झाडावी—(गौरवार्थी प्रयोग.) माझ्या घरीं आपण यावें.

पायांची बळ भागविणें—व्यर्थ खेपा घालणें; निरर्थक हेलपाटे घालणें.

पायांचीं माणसें—पायदळ; पाथिक. 'पायांच्या माणसांची सलाबत फौजेवर'—ख. ३५९४.

पायांचें खुबे—कण्याच्या खालच्या बाजूचा सांगाडा.

पायाचें भदें—पायांची खराबी; पायास इजा होणें; पाय खडबडीत होणें. 'चालतांना पायाचें भदें होऊं नये म्हणून पावलांकरितां कातड्याचें वेष्टण'—उषामाला.

पायांच्या पोळ्या—भाजलेले पाय; तापलेल्या जमीनीवरून चालल्यामुळें पायांचें झालेलें भदें.

पायांजवळ येणें—आदरानें एखाद्याकडे जाणें; भेटणें; दर्शन घेणें.

भरल्या पायांनीं; पायीं भरलें—पाय न धुतां.

पायानें जेवणें-खाणें—वेडा असणें-होणें; भ्रमिष्टपणा करणें.

पायानें लोटणें—तिरस्कार करणें; अवहेलना करणें; हेटाळणी करणें; दूर लोटणें. 'म्हणतो युधिष्ठिर नको पायें लोटूं मला अवनतातें।'—मोउद्योग. ८.१८.

पायांपाशीं-पुरतें पाहणें—जवळ असेल त्याचाच विचार करणें; केवळ स्वतःपुरताच विचार करणें; अदूरदृष्टि असणें; कोती दृष्टि असणें.

पायापाशीं येणें—पायाजवळ येणें; नम्र होणें

पायापुढें दोनच हात पाहणें—पावलापुरतें पाहणें; आपलाच स्वार्थ साधणें; व्यापक दृष्टि न ठेवणें; 'कांहीं लोक नुसतेच व्यवहारिक असून ते फक्त पायापुढें दोनच हात पाहतात' —केसरी १८-३-४२.

पायापुरती वहाण कापणारा—कृपण; कंजुष; केवळ आपल्यापुरतें पाहणारा.

पायां पैस—पायापुरती मोकळी जागा.

पायाला–पायांत–पायां अढी पडणें––पायला पाय अटकणें; पायांत पाय गुंतणें; अशक्ततेमुळें, वृद्धावस्थेमुळें चालतांना एका पायास दुसरा पाय घांसणें.

पायाला खुंट्या येणें––पाय ताठणें; पाय खुडकणें; पाय हलवेनासे होणें.

पायांवर कुर्ली–मांजरें घालणें––अतिशय प्रार्थना व विनवण्या करून एखाद्यास कांहीं काम करावयास उठविणें; प्रवृत्त करणें; भर देणें.

पायांवर घालणें––पायांशीं नम्रपणें सादर करणें; वंदन करावयास लावणें; स्वाधीन करणें. 'आम्ही बाळोबास श्रीमंतांच्या पायांवर घालतों'–अस्तंभा १६६.

पायांवर घेणें––मूल न्हाऊं घालणें.

पायांवर डोकी ठेवून कुरचे काढणें––एकीकडे नम्रपणाचा आव आणून हळूच खोड्या करणें; वरवर गोडी दाखवून आंतून नुकसान करणें.

एका पायावर तयार–सिद्ध असणें–– अत्यंत उत्सुक असणें; सज्ज असणें; तयार असणें.

पायांवर दगड–धोंडा पाडून घेणें––स्वतःची हानि करून घेणें. 'आणि मी आपल्या पायावर धोंडा पाडून घेतला असता.'––शाब ३. ६३.

पायांवर नक्षत्र पडणें––सदोदित फिरत असणें; स्थिरता नसणें; भ्रमंति लागणें.

पायांवर पाय टाकून निजणें––१ आळसांत दिवस घालविणें; निरुद्योगी असणें. २ चैनींत निजणें.

पायांवर पाय ठेवणें, देणें––अनुकरण करणें;पावलावर पाऊल ठेवणें; अनुसरणें; एखाद्यासारखें वागणें.

पायांवर भोवरा असणें–पडणें––एकसारखें भटकत असणें; भ्रमंति करणें; चक्करा मारीत असणें.

पायांवर लेकरें घालणें––मनधरणी करणें; दयेची याचना करणें; आग्रहाची विनंति करणें; लेंकरें वाढेत म्हणून साधुसंतांच्या, देवांच्या पायांवर घालतात. 'आम्ही काय लेंकरें पायांवर घातलीं होतीं तुमच्या ? तुम्ही होऊन आमचेकडे आलां, राहायला जागा मागितली.'

पायांवर वाहणें––अर्पण करणें; देणें. 'हें राज्य तुझेंचि, तुझ्या चरणावरि वाहतों महाबाहो ।' मो हरिवंश २२.४९.

पायांवर हात मारणें––पायाची शपथ वाहणें; पायास हात लावून शपथ घेणें.–नामना ११०.'इकडच्या पायावर हात मारून प्रत्येकानें इमानदारीची शपथ घ्या'.––इंप ३६.

पायाशीं पाय बांधून बसणें––पिच्छा पुरविणें; पाठीस लागणें; पाठ न सोडणें; मागें लागणें.

पायास कुत्रें बांधणें––शिव्या देत सुटणें; वाटेल तें बडबडणें.

पायास पाय बांधणें––एकसारखें संगतींत असणें; बरोबर असणें; पाठ न सोडणें.

पायांस भिंगरी–भोवरा असणें––सारखें फिरत असणें; चक्करा मारीत असणें.

पायांस–पायीं लागणें––पायां पडणें, वंदन करणें. 'तूं येकली त्वरित जाऊनि लाग पायीं।–सारुह ८.११२.

पायांस वाहाण बांधणें–बांधलेली असणें––एकसारखें भटकत राहणें; पायपीट करणें; फिरत असणें.

पायीं पैजारा बांधणें––'जोडे फाडणें' पहा. 'पायीं पैजरा बांधून हें अवघड कार्य त्यांनीं पार पाडलें'––गजेंद्रमोक्ष १.१६.

पायीं बांधणें––पूर्वी हत्तीच्या पायीं बांधून ठार मारीत. यावरून हानि, पराभव करण्यास तयार असणें; नाश करणें; मातीस मिळविणें.

मागल्या पायीं येणें––त्याच पावलीं परत येणें; ताबडतोब येणें.

त्या पायींच––ताबडतोब; न थांबतां; टाकोटाक; तडक.

पायींचा पारवा––पायांचा पारवा पहा.

पायींची वहाण पायींच ठेवणें––खालच्या दर्जाच्या लोकांना नेहमीं तुच्छतेनें वागविणें. 'हिंदु लोकांना तुच्छतेनें व कस्पटाप्रमाणें लेखण्याचें, पायींची वहाण पायींच ठेवण्याच्या प्रयत्नाचें अँग्लो इंडियनांना जसें बाळकडू पाजलें जातें म्हणतात तसें डच लोकांना पाजलें गेलें नसेल.'–कॅ. लिमये, ''सैन्यांतील आठवणी'' ४२.

***पाय असल्यावर पायतणाला काय तोटा**––पाय असले तर पायतणें वाटेल तितकीं मिळतील पण पाय नसले तर पायतणांचा काय उपयोग ? क्षुल्लक गोष्टीकडे

लक्ष्य न देतां महत्त्वाची गोष्ट राखण्याचा प्रयत्न करावा. तु०— शीर सलामत तो पगडी पचास.

पायु आदळे तावाळि आम्मा उगडाञ्जु—(गो.) पायाला ठेंच लागली कीं, त्यावेळीं आईची आठवण येते. संकटाच्या वेळीं आईची, देवाची आठवण माणसाला होत असते; कारण तींच यावेळीं उपयोगीं पडतात.

पाय घटि आसल्यारि गुडो चडयेद, मन घटि आसल्यारि खयीं चडयेद—(गो.) पाय घट्ट असले तर डोंगर चढतां येईल आणि मन घट्ट असलें तर कुठेंहि चढतां येईल. मनाची शक्ति अपार असते.

पाय घसरला तर घसरूं दे पण जीभ घसरूं देऊं नको—एखाद्या वेळीं पाय भलतीकडे गेला तरी चालेल म्हणजे प्रत्यक्ष वाईट गोष्ट घडली तरी हरकत नाहीं पण तोंडावाटे वाईट शब्द कधीं निघूं देतां कामा नये. वाईट कृतीपेक्षांहि अपशब्द बोलल्यानें अधिक नुकसान होतें.

पाय चुकल्यार हतीय पड़ा—(गो.) पाय निसटला तर हत्तीसारखा मोठा प्राणी सुद्धां खालीं येतो. धंद्यांतला समतोलपणा जर सुटला तर मोठीं माणसेंसुद्धां धंद्याला मुकतात.

पाय धू, म्हणे तोडे केवढ्याचे—सांखळ्याचें वजन किती–सांखळ्या केवढ्याच्या—पाय धुवायला सांगितलें असतांना, तोडे सांखळ्या इ. केवढ्या किंमतीचे असें विचारणें, म्हणजे जें काम करावयाचें तें सोडून भलत्याच गोष्टीची उठाठेव करणें. (गो.) पाय धुयि म्हळ्यारि पायजणाक मोल इतें?

पाय पडल्यार मुय काय मरचीना—(गो.) पाय पडला तर पायांखालची मुंगी कांहीं मरणार नाहीं. एखादा माणूस आळशीपणानें पावलें टाकीत निघाला तर त्याला म्हणतात.

आंथरूण पाहून पाय पसरावे—जसें साधन-साहित्य असेल त्याप्रमाणें कृति-कार्य करावें; आदापाहून, खर्च करावा; प्राप्ति पाहून व्यय करावा. Cut your coat according to your cloth.

भटास दिली ओसरी, भट हातपाय पसरी—एक भट थोडा वेळ टेंकण्यासाठीं जागा मागूं लागला, ती दिल्यानंतर हळूहळूं त्यानें तेथें बिऱ्हाडच थाटलें. थोडासा प्रवेश झाल्याबरोबर सर्व जागा अडवून बसण्याची कल्पना. एखाद्याचा गैरवाजवी फायदा करून घेणें. तु०— चंचुप्रवेशात् मुसलप्रवेशः।

मागील पाय पुढें नाहीं पुढील पाय मागें नाहीं—१ इकडेतिकडे मुळींच न हालणें; २ जागा न सोडणें. करारीपणा; हट्टीपणा.

पाय बरे आसल्यारि होणांक इतें भीक?—(गो.) पाय चांगले असले तर वहाणांना काय दुष्काळ? तु०— शीर सलामत०.

पाय मोण्णु पाळयां घालचे, कुटु मोण्णु खांदारि घेवंचे—(गो.) पाय मोडायचे आणि मग त्याला पाळ-ण्यांत घालायचें आणि कंबर मोडायची नि मग खांद्यावर घ्यायचें. आधीं आपत्ति आणायची नि मग त्यांतून त्या आपद्ग्रस्ताला वर काढायचें, यांत शहाणपण किंवा मोठेपणा नाहीं. नीचपणाचाच हा एक प्रकार.

पाय लहान मोठा तसा न्याय खराखोटा—नेहमीं जगांत श्रीमंत किंवा मोठ्या लोकांच्याच तर्फेनें कोणत्याहि गोष्टीचा निकाल लागतो किंवा लोक बोलतात; गरीबाला कधीं न्याय मिळत नाहीं.

पायां झाला नारू। तेथें बांधला कापरू॥—तेथें बिबव्याचें काम। अधमासी तो अधम' तुगा ४१९९. ज्या ठिकाणीं जी गोष्ट उपयोगी तीच तेथें योजिली पाहिजे. भलती गोष्ट तेथें चालणार नाहीं. या ठिकाणीं तुकारामानीं आणखी सुंदर उदाहरणें दिलीं आहेत.

पाया दुकी जाल्यारि कागद बरंवचाक जाइना वे?—(गो.) पाय दुखत असला म्हणून पत्र लिहावयाला काय अडचण? कारण पत्र लिहावयाचें तें हातानें लिहावयाचें असतें. एक खेडवळ गृहस्थ एका इसमाजवळ गेला आणि 'माझें एक पत्र लिहून द्या' असें म्हणाला. तेव्हां त्या गृहस्थानें 'माझा पाय बरा नाहीं' असें सांगितलें. त्यावर तो खेडवळ माणूस त्याला म्हणाला 'अहो, पत्र पायानें का लिहायचें असतें?' त्यावर तो म्हणाला, 'तुम्ही म्हणतां तें खरें; पत्र हातानेंच लिहायचें, पण तें ज्या गांवीं जाईल तेथें तें वाचून दाखवायला मलाच जावें लागेल. माझें अक्षर माझ्याशिवाय दुसऱ्या कोणाला वाचतां येत नाहीं!'

पायापंची इर्याळी, तिका झरणयू ना आनि

मरणयूना--(गो.) पायाखालचीं हरळी, तिला झरणहि नाहीं आणि मरणहि नाहीं. कांहीं कांहीं माणसेंहि अशीच असतात. त्यांनीं दुसऱ्याच्या पायदळीं पडतच जीवन कंठायचें.

पायाक लागल्यार पुसून उडौंचें--(गो.) पाणींत पडलेला पाय तेथल्यातेथेंच पुसून साफ केला पाहिजे. लहान सहान गोष्टींतूनच पुढें मोठ्या गोष्टी निर्माण होतात. जेथें एखादी गोष्ट उत्पन्न झाली असेल तेथेंच तिचा निकाल लावणें चांगलें. तु०--तुरीची कांटी तुरीवरच झाडावी.

पायाखालीं जळतें आणि डोंगरीं--डोंगर विझवावयास धांवतो--१ संकटाचें मूळ किंवा कारण जवळच असतां तिकडे दुर्लक्ष करून भलतीकडेच उपाययोजना करण्याची धांवपळ करावयाची. २ आपलें किंवा आपल्या घरांतलें संकट, अनिष्ट गोष्टी यांवर इलाज न करतां दुसऱ्याच्या किंवा सार्वजनिक दुःखावर इलाज करण्यास झटावयाचें. प्रथम स्वतःवरची आपत्ति दूर करावी.

पायाखालीं मुंगी मरणार नाहीं--१ एखादा मनुष्य इतका हळुवार गरीब व दयाशील असतो कीं, त्यानें पाऊल टाकल्यास त्याखालीं मुंगी सुद्धा मरणार नाहीं इतकें जपून टाकीत असतो. अत्यंत निरुपद्रवी मनुष्य. २ अत्यंत थंड प्रकृतीचा, आळशी, निरुत्साही मनुष्य. तु.-- To let the grass grow under one's feet.

पायाखालीं मुंगी मरेल--इतकें हळू नि जपून चालणें कीं, पाहाणाराला वाटावें कीं, ही व्यक्ति आपल्या पायाखालीं किडा, मुंगी हीं चिरडलीं जाऊं नयेत म्हणून काळजीनें पाऊल टाकीत आहे. वरप्रमाणेंच अत्यंत जपून वागणारा किंवा थंडा माणूस.

पायाचे अंगठे मुलाला चोखटे, अंगठ्याच्या पुरावा दस्तैवजांत भरावा--लहान मूल पायाचे अंगठे चोखतें; त्यास ते चालतात कारण त्यास समजत नसतें. मूल कोठें जात नसल्यामुळें त्याचे अंगठे स्वच्छच असतात. तसेंच हाताच्या अंगठ्याचा ठसा दस्तैवजाच्या उपयोगी; इतरत्र त्याचा कांहीं उपयोग नाहीं. जेथील वस्तु तेथेंच शोभते इतरत्र तिचा उपयोग करूं नये.

पायांचो कांटो काड्क कुराड कित्याक?--(गो.) पायांतला कांटा काढण्यास कुऱ्हाडीची आवश्यकता कशाला? लहानसहान दुखण्यास उपायहि लहानच असावेत. नखानें काम होतें तेथें कुऱ्हाड कशाला?--'नखहि नको ज्या कार्या त्या काढावा कशास करवाल।'

पायांत नाहीं कांटा, रिकामा नायटा--मूळांत कांहीं कारण नसतां आपण होऊनच एखादी भानगड उपस्थित करून स्वतःस त्रास करून घ्यावयाचा. कांट्याचा नायटा करणें यामध्यें निदान कांटा बोचलेला तरी असतो पण येथें आपण होऊनच कांटा बोचला नसतांहि उगाच पाय उकरून जखम करून घ्यावयाची, हा त्यापेक्षां अधिक मूर्खपणा होय.

पायांत पाय, त्याचा जन्म व्यर्थ जाय--जो नेहमीं बायकांप्रमाणें आपल्याच पायांत पाय घालून चालत असतो त्याच्यानें कधीं प्रगति होऊं शकत नाहीं. जो स्वतःच्याच भोंवतीं घुटमळत असतो त्याच्या हातून कांहीं कार्य न होतां त्याचा जन्म फुकट जातो.

पायांत बोंचती कांटे, नि डोक्यावर पायपोस--अत्यंत कष्टमय व अपमानकारक स्थिति.

पायांतील जोडा पायांतच बरा (डोकीवर घेऊं नये)--जेथील वस्तु तेथेंच बरी दिसते. पायींची वहाण पहा.

पायांनीं झोडपलें, हातानें कुरवाळलें--लाथा मारून वर आणखी हातानें गोंजारणें. एकीकडे छळीत असावयाचें व एकीकडे गोड बोलत असावयाचें, असें दुटप्पी वर्तन.

पायांनीं माशा मारी आणि मुखें वदे रामनाम--एकीकडे तोंडानें रामनामाचा जप करीत असावयाचें तर दुसरीकडे पायानें माशांची हिंसा करीत असावयाचें; असें दुटप्पी वर्तन. तोंडानें परमेश्वराचें नांव घेऊन मोठा धार्मिकतेचा आव आणावयाचा व प्रत्यक्ष हातानें पापाचरण करीत असावयाचें असा भोंदू मनुष्य.

पायावर पाय, हवालदाराची माय--हवालदाराच्या आईप्रमाणें कांहीं कामधाम न करतां केवळ पायावर पाय टाकून स्वस्थ बसणें; निरुद्योगी असणें; कांहीं काम करावें न लागतां यथेच्छ सर्व गोष्टी चालत असणें.

पायास लागलें, पायरीस पुसलें--जेथें एखादी गोष्ट उद्भवते तेथेंच तिचा निकाल लावणें. वर पहा.

घोड्याच्या-हत्तीच्या पायीं येणें आणि मुंगीच्या

पायीं जाणें—दुखणें ज्याप्रमाणें येतांना एकदम येतें व व जातांना हळूहळू जातें त्याप्रमाणें. जलद येणें व हळू जाणें. हत्ती पहा.

पायींची वहाण पायींच छान-बरी—जेथील वस्तु तेथेंच बरी दिसते. हलक्या वस्तूला किंवा व्यक्तीला कधीं डोक्यावर घेऊं नये. 'मज पामरासी काय थोरपण। पायींची वहाण पायीं बरी ॥'—तुगा. (गो.) पायां व्हाण पायांपोंदा असूं जाय.

पायंडा—पायंडा करणें-घालणें-पाडणें—वहिवाट पाडणें; पद्धति असणें-पाडणें; प्रथा पाडणें.

पायंडा पडणें—शिरस्ता सुरू होणें; पद्धति पडणें; चाल पडणें.

पायथा—पायथ्याशीं गर्दी असली तरी शिखरावर भरपूर जागा असते—डोंगऱ्याच्या पायथ्यापर्यंतच पुष्कळ लोक जातात. पण वर चढून शिखर गांठणारे क्वचित. त्याप्रमाणें खालच्या धंद्यांत किंवा नोकरीच्या जागांवर फार उमेदवार असतात. वरचें जबाबदारीचें व अत्यंत हुषारीचें काम करणारे फारच थोडे. जास्त माणसें तेथें पाहिजे असतात पण मिळत नाहींत. तेव्हां आपली लायकी वाढविली म्हणजे आपली प्रगति फार होते. There is always vacancy at the top.

पायपोस—कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत नसणें—अव्यवस्था असणें; अंदाधुंदी असणें; गोंधळ उडणें.

पायपोस खाऊ—अत्यंत क्षुद्र; हलकट; खेटरेंखाऊ.

पायपोस जळाला-तुटला-गेला!—पर्वा नसणें; बेफिकीर असणें; कांहीं संबंध नसणें. 'एका महारुद्राची सामग्री राधाबाई काय लागेल ती पाठवील न पाठवील तरी आमचा पायपोस गेला!'—व्रप २७३. तु०—I casre a fig.

पायपोस दांतीं धरणें—अतिशय लीनतेनें याचना करणें; अगदीं नम्र होणें; क्षमा मागणें.

पायपोस मारणें—जोड्यानें मारणें; मानहानि करणें; अपमान करणें.

पायपोसा पायपोशी—जोडाजोडी; मारामारी; लाथाळी.

पायपोसासारखें तोंड करणें—दुर्मुखलेलें असणें; खालीं तोंड घालणें; लज्जेनें तोंड वाईट करणें.

* **पायपोसाची जोड, हंशानें—हंशामध्यें केली गोड**—चांगले पायपोस बसले असतां हंशावारी नेणें; फजीती झाली असतांहि तीबद्दल खंती न वाटणें; निर्लज्ज बनणें; आपला अपमान झाला असतां थट्टेवारी घालणें; मानहानीच्या प्रसंगींहि तेज प्रगट न करणें; अपमान सोसणें.

पायरी—पायरी ओळखणें—दर्जा ओळखणें; योग्यता समजणें; 'आपली पायरी आपल्याला नाहीं ओळखत.'—निखळलेली हिरकणी.

पायरी टाकणें—सोडणें—स्वतःचा दर्जा विसरणें; आपली योग्यता न जाणतां वर्तन करणें; आदबी न संभाळणें. 'मी पायरी सोडून बोलतें याची मला क्षमा करा.'—स्वप ४५३.

पायरीपायरीनें चढणें—आज थोडें; उद्यां थोडें याप्रमाणें कार्य करीत जाणें; हळूहळू प्रगति करणें; क्रमाक्रमानें दर्जा, हुद्दा वाढत जाणें. 'तो कारकुन्या पायरीपायरीनें मामलेदार झाला.'

(पाप, पुण्य, भोग, सुख, दुःख, इत्यादींची) पायरी भरणें—परमावधि होणें; अंत होणें; पराकाष्ठेस पोचणें.

पायरीचा दगड पायरींत बसविणें—एखाद्याला त्याच्या स्थानांवर पुन्हां स्थापन करणें; जेथली वस्तु तेथें ठेवणें.

पायरीचा धोंडा होऊन पडणें-होणें—स्वतःच्या योग्य स्थानीं कायम चिकटून राहणें. २ अगदीं निकृष्ट अवस्थेंत कायमचें राहणें.

पायरीनें ठेवणें—योग्यतेप्रमाणें वागविणें; स्थानाप्रमाणें आदर दाखविणें; योग्य तो मान देणें.

पायरीला पाय लावणें—बरोबरी करणें; अपमान होणें. 'माणसें स्वतंत्रतेनें वागूं लागलीं कीं, थोरांच्या पायरीला म्हणे पाय लागतो!'—आजोच ४६.

आपल्या पायरीवर असणें; आपली पायरी धरणें—स्वतःची योग्यता ओळखून वागणें; आपल्या दर्जाप्रमाणें वर्तन करणें.

पायरीवर पाय देणें; पायरीस पाय लावणें--अपमान करणें; बरोबरी करणें; अप्रतिष्ठा करणें.

***पायरीच्या पाया पडून मग वर पाय द्यावा**--प्रथम नेहमीं कोणाशींहि वागतांना नम्रपणा धारण करावा व मग जसा प्रसंग पडेल तसें वर्चस्व गाजवावें. मोठ्या मनुष्याशीं वागतांना प्रथम नम्रतेनें बोलावें पण स्पष्टपणें बोलण्यास व बरोबरी करण्यास किंवा वरचढपणा करण्यास भिऊं नये.

पायली---पायली भरणें--१ स्वार्थ साधणें; स्वतःचें हित करून घेणें; आपला फायदा करून घेणें; स्वतःचें माप भरून घेणें. २ घडा भरणें; पूर्ण होणें.

पायली पसा करणें---होणें--कमी करणें; मोठी गोष्ट घेऊन ती लहान करणें.

पायलीचे पंधरा---(गो.) पायलेस पन्नास--विपुल; अतिशय; नकोनकोसे; अतिशय स्वस्त.

***आण पायली, करूंदे वायली**--एखाद्या स्त्रीनें कुटुंबांतून वेगळें होण्याची वारंवार इच्छा दर्शविल्यास म्हणतात. यावरून एक घाव आणि दोन तुकडे करणें; एकदाचा सोक्षमोक्ष करणें; ताबडतोब निकाल करून टाकणें.

पायलीची पिठी पोटांत--आपला पुरा स्वार्थ साधणाऱ्याबद्दल योजतात. पुढें पहा.

पायलीची पिठी, बोटान् चाटी, अदमणाची न्याहारी सवामणाची दोनपारीं--पायलीभर पीठ सहज बोटानें चाटून टाकणारी व न्याहारीला अदमणाचें व जेवणास सवामणाचें अन्न लागणारी. अतिशय खादाड, अधाशी बायको.

पायलीची सामसूम, चिपट्याची धामधूम--पायलीभर गेलें तरी गुपचूप बसावयाचें व चिमटीभर गेलें तर आरडाओरड करावयाची. मोठें नुकसान झालें असतां निमूटपणें सोसून थोड्याफार तोट्यासाठीं आकाशपाताळ एक करावयाचें अशी उलटी रीत. तु०--जातें तेथें हत्ती जातो, नाहीं तर मुंगीहि अडते. 'Penny Wise Pound Foolish.'

पायलीचे पंधरा, अधोलीचे सोळा--छप्पन--भरपूर; पुष्कळ, अतिशय; नकोनकोसे.

पायलीभर पीठ, माझो हरतालको--(गो.) हरतालिकेच्या उपासाला पायलीचें पीठ ! तु०--एकादशी दुप्पट खाशी.

पायलीभर वरी घ्या आणि पाटलीण म्हणा--पदरचें खर्चून रिकामा मोठेपणा मिळविणें; पोकळ बडेजावाकरितां पदरास खार लावून घेणारा. पाटील पाटलीण पहा.

पाया---पाया घालणें--आरंभ करणें; सुरवात करणें. 'वास्तव सरकारनें तीं तयार करवून भाषेच्या उत्कर्षास प्रथम पाया घातला.'--नि ८.

पायातळीं घालणें--१ इमारतीच्या पायामध्यें जिवंत मनुष्य किंवा इतर वस्तु पुरणें. २ सपशेल चिरडणें; नाश करणें; तुडवून टाकणें.

पार--पार झिजाविणें--१ पिंपळाला वगैरे प्रदक्षिणा घालणें; पुत्र व्हावा, किंवा इच्छित हेतु पूर्ण व्हावे म्हणून प्रदक्षिणा घालण्यासारखें एखादें व्रत करणें. २ देवाला संकट घालणें; देवावर भार टाकून आपली मनीषा पूर्ण करून घेणें.

पार---पार करणें--१ फडशा करणें; संपविणें; खलास करणें. २ निभावणें; बाहेर पडणें; जबाबदारींतून वगैरे मोकळें होणें; टप्प्याच्या बाहेर जाणें. ३ पैल तिराला नेणें; उतरून नेणें; पलीकडे नेणें.

पार जाणें--१ पलीकडे जाणें; तरून जाणें, उतरून जाणें. २ उद्दिष्ट स्थलीं पोंचणें;मुक्कामास जाणें. ३ निभावणें; उरकून टाकणें.

पार पाडणें--१ अडचणींतून निभावणें; संकटांतून सुटणें; पलीकडे जाणें. २ शेवटास जाणें; संपविणें; उरकणें.

पार पडणें--१ निभावून नेणें; पलीकडे नेणें. २ शेवटास नेणें; संपविणें; उरकणें.

पारका--की---पारका पाय व घराला अपाय--परकीय मनुष्य एकदां घरांत घुसलें म्हणजे तें घराचा नाश केल्यावांचून रहात नाहीं.

पारकी---पारकी आस । सदा निरास--पर पहा. दुसऱ्यावर अवलंबून असलें म्हणजे निराशाच.

पारकिडा---पारकिडा उठणें--जनावराच्या पोटांत एक रोग होणें.

पारखणें---पारखून सुलाखून--सोन्याची परीक्षा करावयाची झाली म्हणजे तें चांगल्या पारखी माणसाकडून तपासून त्याचा कस ठरवितात व त्यासाठीं त्यास छिद्र

पाडून सर्व एकजिनसी आहे किंवा नाहीं हें पाहातात. यावरून परीक्षा करून; नीट तपासून. तावून सुलाखून पहा.

पारखा——पारका पहा.—**पारखे होणें**—अंतरणें; दूर होणें; संबंध सुटणें, तुटणें. 'पतीच्या प्रेमाला पारखी होणारी आणि ही रूपमाया पशू ?'–बायबंड २.४.

पारंगत——**पारंगती मिळणें-लाधणें-लाभणें**— मुक्ति मिळणें; मोक्ष मिळणें. 'कृष्णातीर्थं पुनीत रक्षतगडी पारंगती लाधला ।'—भात्रै १०.३.११५.

पारगी——**पारगीवारगीचा-पारगीवारगीनें**— आळीपाळीचा; एकामागून एक क्रमानें; आळीपाळीनें.

पारजा——**पारजापरजा**—कागदपत्र; खतपत्र; दस्तऐवज वगैरे.

पारठा——**पारठा पडणें**—शिलकीस पडणें; मागें राहाणें; उरणें; शिल्लक राहणें.

पारठा पाडणें—वांचविणें; उरविणें; शिल्लक ठेवणें.

***तान्ह्याला वनीं, पारठ्याला स्तनीं**——अगदीं लहान मुलाला काम सांगावयाचें पण त्याच्याहून जो मोठा सुटवंगळ आहे त्याला मात्र मांडीवर घेऊन लाड करावयाचे असा प्रकार. तान्हा पहा.

पारडूं——**पारडूं गळ्यांत बांधणें**——पारडाचा संभाळ करणें हें त्रासाचें काम आहे यावरून, कष्टाचें काम लादणें; मेहनत करून घेणें; लचांड अडकविणें.

पारडें——**पारडें जड होणें**——तराजूच्या ज्या पारड्यांत अधिक जिन्नस असेल तें जड होतें यावरून, जास्त वजन होणें; मानसन्मान वाढणें; प्रतिष्ठा वाढणें; वैभवास चढणें.

पारडें फिरवणें—परिस्थिति बदलणें; विपरीत होणें. 'परंतु एकाएकीं फिरलें युद्धाचें पारडें ।'—विक २९. 'लढायांत जयाचें पारडें अकल्पित रीतीनें इकडचें तिकडे फिरतें.'—केसरी १७–११–४२.

नशीबाचें पारडें फिरणें——चांगले दिवस जाऊन वाईट दिवस येणें. 'शिवाजीमहाराजासारखे महात्मे उत्पन्न होण्यास साऱ्या राष्ट्राचें पुण्य खर्ची पडावें लागतें असें म्हणण्यास हरकत नाहीं. तें होऊन जाऊन नशीबाचें पारडें फिरलें म्हणजे रावबाजीसारखींच रत्नें उत्पन्न होतात.'—एल्फिन्स्टन चरित्र १.१६७.

पारड्यांत घालणें—१ वजन करणें. २ शिक्षेचा एक प्रकार. रोजच्या रोज अतिशय हाल करून त्यामुळें किती वजन घटतें हें पाहाणें. 'पारड्यामध्यें घालणें । कां कडेलोट करणें ।'–दा. ३.७.७२.

पारणा-णें——**पारणा करणें**——उपवास सोडणें. 'कर पारणा क्षुधा बहु पूर्ववयामाजिं कन्यके लागे ।'–मोवन १३.३९.

पारणा-णी-णें फिटणें——समाधान, तृप्ति होणें. 'फिटेल हे लोचन पारणाही ।'–सारुह ८.११९. 'मज फेडूं द्या नयनांचें पारणें ।'–विक २४.

पारतंत्र्य——पारतंत्र्यें सहा प्रकारचीं आहेत. १ स्वभाव पारतंत्र्य–प्रारब्धकर्म नसतां सृष्टीपूर्वी जें सृष्टि होणें हा जो स्वभाव, ब्रह्मांडादिक रचनेचा तो. २ ईश्वर पारतंत्र्य —"स्वभाविं नियतें जें सामर्थ्यें, नानापरवें नानाभूतें जें वायुआदित्यादिकें, जितुकें आपलाले व्यापारी नेमस्तें अन्यथा होऊं न शके तें ऐश्वर्य सर्वांच्या ठाईं तें"—पंचीकृत विवेक. ३ प्रकृतिपारतंत्र्य–"स्वभाव आणि ईश्वर प्रकृतिसंबंधें रचना, स्थावर जंगमात्मक नानारूप दृश्य नानाविकार क्रिया, इंद्रियादिकांच्या नेमस्ता; प्रतिशरीर भिन्नभिन्नातें"–कित्ता. ४ गुणपारतंत्र्य– "नानाविकारवंत प्रकृतिजनित सत्वरजतम आणि परस्परें निश्रित, एवंविध गुणकार्यें, अन्यथा हों न शके, म्हणोनि जंतुमात्रीं प्रगट गुणपारतंत्र्य"—कित्ता. ५ कर्मपारतंत्र्य–कर्मणा जायते जन्तुः कर्मणैव हि लीयते । ६ काळपारतंत्र्य–"स्वभाव पारतंत्र्यादि कर्मपारतंत्र्यपर्यंत जितुकीं; तितुकीं असताहि, स्थावर जंगम स्थूल सूक्ष्म सर्वहि ब्रह्मादि त्रिमूर्ति आदिकरून काळचि प्रकटता परंतु त्रिमूर्ति अलिप्त शक्तिस्तव द्रष्टेपणें भिन्ना, इतरांसितें"–पंचीकृत विवेक पृ. १९–२१.

पारध——**पारध खेळणें**——शिकार करणें; मृगया करणें. 'उदका आला त्वरिती । पारधी खेळतां ।'—कथा १.५.२३.

पारधी—ज्याच्या हातीं ससा तो पारधी—— ज्यानें ससा मारला असेल तोच त्याला उचलून घेतो. यावरून सामान्यतः ज्याच्या हातांत ससा दिसेल त्यासच आपण पारधी समजतो; जेथें एखाद्या गोष्टीचा पुरावा अथवा अवशेष

सांपडेल तेथेंच ती असली पाहिजे अशी सामान्य मनुष्य कल्पना करतात, मग मागें कोणी पाहात नाहीं किंवा मागच्या खऱ्या गोष्टीची चौकशी कोणी करीत नाहीं. जें समोर डोळ्यानें दिसेल त्यावरच विश्वास ठेवण्याची सामान्य जगाची प्रवृत्ति असते. दोन गृहस्थ रानांत शिकारीला गेले. त्यापैकीं एकानें एक ससा मारला, दुसऱ्यास कांहींच सांपडलें नाहीं—परंतु गांवांत परत येतांना ज्यानें ससा मारला तो रिकाम्याच हातानें येत होता व ससा दुसऱ्याच्याच हातांत होता. तेव्हां लोक ज्याच्या हातांत ससा होता त्यानेंच शिकार केली असें म्हणूं लागले व खऱ्या शिकाऱ्यास कांहींच मिळालें नाहीं असें मानूं लागले.

पारंबी——शेंडी तुटो कीं पारंबी तुटो—एक झाडाची पारंबी तरी तुटेल किंवा माझी शेंडी तरी तुटेल, या निश्चयानें ही तड किंवा ती तड. शेंडी पहा.

पारशी—— पारशी लोक उगवत्या सूर्याला भजतात—पारशी लोक अग्नि–सूर्याचे उपासक आहेत. ते सूर्य उगवला म्हणजे त्याला वंदन करतात, यावरून लक्षणेनें. पारशी लोक जेत्यांचा उदो उदो करतात. हिंदुस्थानांत जे पारशी लोक आहेत त्यांस परदेशांत राहावयाचें असल्यामुळें जे राज्यकर्ते असतील त्यांच्याशीं त्यांना नेहमीं सलोख्यानें वागावें लागतें. त्यामुळें ते नेहमीं त्यांस मोठेपणा देत असतात.

पारा——पारा चढणें––अतिशय संताप होणें. ज्याप्रमाणें हवामान उष्ण झालें म्हणजे उष्णमानमापकांतील पारा वरवर चढूं लागतो त्याप्रमाणें मनुष्य रागावला म्हणजे त्याचा संताप वाढत असतो.

पारावार——पारावार नसणें—मर्यादा नसणें; अंत नसणें.

पाल——पाल चुकचुकणें—१ पालीनें चुकचुक केल्यास त्यावेळीं जें बोललें गेलें असेल तें सत्य आहे असें मानतात. २ पालीचा शब्द अशुभ मानतात; त्यावरून एक अपशकून.–इंप ११३.

पाल होणें—पाल ज्याप्रमाणें अगदीं बारीक व चापट असते त्याप्रमाणें; झिजून हाड कातडें उरणें.

पालीसारखा—१ पांढरा फिकट; पांडुरोगी. २ सडपातळ; हाडकुळा; कृश.

***पालीचें तेल, विंचवाचें अनुपान**—पालीच्या तेलाचें औषध सांगितल्यावर त्याला अनुरूप असें अनुपान पाहूं गेल्यास विंचूच होय. जसें औषध तसें अनुपान; जशास तसें; सारख्या गोष्टींचा एकत्र मेळ घालणें; जसा रोग तसा दवा.

पालीला पाहून विंचू नांगी टाकतो—विंचवाची नांगी नेहमीं वर असते पण पालीपुढें विंचू आल्यास तो नांगी खालीं करून सपाट पडतो, यावरून शेरास सवाशेर भेटणें; जबरदस्त शत्रू भेटला म्हणजे कोणीहि नरम येतो.

पाल—पाल घालणें–मांडणें—[पाल = झोंपडी; खोपट] स्त्रीनें उघड व्यभिचार करणें, दुकान मांडणें.

पालखी——पालखी वचप—(गो.) पालखी जाणें, उचलून नेणें २ मरणें.

पालखींत बसणें—पूर्वी हिंदुस्थानांत मोठ्या योग्यतेचा मनुष्य झाला म्हणजे त्याला सरकारांतून पालखी बसावयाला मिळे किंवा तो पदरच्या खर्चानेंहि पालखी वापरी. त्यावरून योग्यता किंवा किंमत खूप वाढणें. 'यंदां गहूं पालखींत बसला आहे.'

पालथा——पालथा घालणें—१ धुंडाळणें; शोधणें; सर्व वस्तु उपड्या करून पाहणें. 'इतकी जवळ वस्तु असून सारा गांव पालथा घातला.'—पकोवि. २ पराजित करणें; खालीं पाडणें.

पालथा पडणें—(बाय की) १ मरणें; उलथून जाणें. 'पालथा पडला मेला!' २ तोंड काळें करणें; निघून जाणें. 'कुठें हवे तेथें पालथा पड जा! माझे समोर येऊं नकोस.'

पालथा पाडून तुडविणें—सडकून चोपणें.

पालथा येणें—उपडें जन्मणें; तोंड खालीं करून जन्मास येणें हें अशुभ मानतात.

पालथें उताणें करणें—लोळविणें; पाडणें; चीत करणें; जिंकणें. 'युरोपांतील मल्लांना पालथें उताणें करून विजयश्री खेंचून आणणारा अहमदबक्ष हिंदीच ना!'—भाग्योदय.

पालथ्या घागरीवर (घड्यावर) पाणी ओतणें—निष्फळ प्रयत्न करणें. 'ती त्याजवर प्रसन्न झाली नाहीं, पालथ्या घागरीवर पाणी ओतल्यासारखा त्याचा परिणाम

झाला.'–पामो ८१.–शाब १.४२. 'तथापि हा सर्व खटाटोप पालथ्या घड्यावर पाणी ओतण्याइतकाच निष्फळ झाला.'–केसरी ६.११-४२.

*पालथ्या घागरीवर पाणी—घागर उताणी असेल तरच तींत पाणी जाईल यावरून निष्फळ; निरुपयोगी कार्य. 'पालथीये घागरीवरी पानी : घालीजे घट रुहस्र दोनी: वरच्यावर जाय निगोनि : आंत कोरडी असे :'–महानुभावी वचन. 'पालथें घागरी घातलें जीवन। न धरीच जाण तेंही त्याला ॥'–तुगा ३०९४.

पालव—पालव कापून देणें—पदर कापून देणें. घटस्फोट करण्याचा एक प्रकार; काडी मोडून देणें.

पालव पसरणें—पदर पसरणें; याचना करणें. 'पालव पसरोनि तुम्हासी। मी मागतों अवधियांसी॥'–भारा किष्किंधा १२.९८.

पालवान पालव—विवाहसंबंधामुळें जडलेला आप्तपणा. पदरानें पदर पहा.

***सदैवाचा पालव बरा**—दैववान मनुष्याचा आश्रय केल्यास कल्याण होतें.

पाला—पाला करणें—१ (पुणेरी.) कच्च्या कढाचें लोणी करणें. २ (बे) उत्तम मध्यम माल मिसळून एक रास करणें.

पाला खोलणें–(ना.)–बिंग बाहेर काढणें; भ्रमाचा भोपळा फुटणें.

पाला पाला होणें—मातेरें होणें; फुकट जाणें.

पाला भरविणें—दुःख देणें; पीडणें; छळणें. 'दैवें मृत पुत्र विपच्छायेचा तीस भरविला पाला।'–मोस्त्री ४.१३.

पाला होणें—१ वाळलेल्या पाल्याप्रमाणें शुष्क होणें; कोमेजून जाणें. 'मृदुलत्व म्लानत्व स्वीकारुनि जाहलासि कां पाला।'–मोविराट ३.७७. २ हीनपणाप्रत जाणें; निर्माल्य होणें 'मी नसतों तर तूं कोणत्या झाडाचा पाला झाला असतास कोणास ठाऊक.'

पालाण—पालाण पडणें—वर्चस्व मिळविणें; भार पडणें. 'राज्यांचीं अनेक बंडें झालीं। गोब्राह्मणावरी पालाणें पडलीं।'–स्वादि ९.१.७५.

पालाश—पालाशविधि—एखादा मनुष्य दीर्घकालपर्यंत बेपत्ता झाला असल्यास व तो मेला असें समजल्यास त्याचा और्ध्वदेहिक विधि करण्याकरितां त्याचा पळसाच्या पानांचा पुतळा करून त्यास अग्नि देत, या विधीस पालाशविधि म्हणतात.

पालू—पालूघाल्या—बावळट; अजागळ; गांडीत शेपटी घालणारा.

पाव—नवा पाव, नवा डाव—[पाव=पाय] नवीन माणसें आलीं कीं नव्या गोष्टी करूं पाहातात. तु०–नवी विटी, नवें राज्य. वडील मंडळींस असें वाटतें कीं, आपल्या मुलानें तोंडांत आलेला घास टाकून 'नवा पाव, नवा डाव' न करतां आपल्या जुन्या धंद्यांत पडावें.''–गांगा १२१.

पावंड—पांवड्यावर–पांवडाखालीं चालणें–जाणें—संथपणें, हळू हळू जाणें.

पांवड्यावर-पांवडाखालीं—हांकणें-लावणें–धरणें-चालविणें—मंद गतीनें, एकएक पाऊल चालविणें.

पावडा–डी—पावडींत-पावड्यांत पाय, ब्रह्मदेवाचा उपदेश—१ आपण नांगर हांकतो आहे पण गोष्टी सांगतो आहे ब्रह्मदेवाप्रमाणें शहाणपणाच्या. २ कोणी कोणी पायांत खडावा घालून इतकें पवित्राचरण दाखवितात कीं, जसा त्यांस ब्रह्मदेवच उपदेशक झाला.

पावडें—पावडेओढ–पावड्यानें माती ओढावी त्याप्रमाणें सहज मिळविणें; लूट. 'हिंदुस्थानची जी पावडेंओढ चालली आहे.'–टि. २·२९६.

पावड्यावारी पैसे ओढणें—पुष्कळ पैसे मिळविणें.

पावणें—परत्र पावणें—परलोकीं जाणें; मरणें; इहलोक सोडून जाणें. 'व्योमासुर पावला परत्र।'—हरि १२.१७१.

***पावला तर देव, नाहीं तर धोंडा**—एखाद्या दगडाच्या देवाच्या मूर्तीस नवस केला असतां जर आपला मनोरथ पूर्ण झाला तर आपली त्यावर श्रद्धा बसेल व आपण त्यास देव मानूं पण न पावला तर त्याची धोंड्यापेक्षां अधिक किंमत मानणार नाहीं. पण नवस करण्यास तर हरकत नाहीं. त्यांत आपलें कांहीं नुकसान नाहीं. प्रयत्न करून पाहावा, साधलें तर ठीकच, नाहींतर कांहीं पदरचें जात नाहीं.

पावला तर परमेश्वर, नाहींतर घातशनैश्वर— एखादा मनुष्य अशा स्वभावाचा असतो कीं, त्याची मर्जी प्रसन्न झाली तर आपणाकरितां काय वाटेल तें करण्यास तयार होतो. उलट गैरमर्जी झाल्यास शनीप्रमाणें त्रासदायक अगर पीडाकारक होतो अशा मनुष्याबद्दल म्हणतात.

पावता—-पावता करणें—पोंचविणें. 'पावतीं करावीं जीवनें । तया वृक्षांसी ॥'-दा ४.७.१२.

पावलें—पाऊल पहा.

पावळण--पावळणीचें पाणी अढ्याला चढविणें-नेणें—गोष्टी शक्य कोटीला आणण्याकरितां वृथा श्रम करणें; पागोळ्यांचें पाणी अढ्यास नेणें; निसर्गाविरुद्ध गोष्ट करूं पाहणें; अशक्य गोष्ट करूं पाहणें.

पावळी--पावळ्या उदक पाख्यारि चण्णा— (गो.) पागोळ्यांचें पाणी वर पाख्याला चढत नाहीं तें खालींच पडायचें. प्रत्येक माणूस आपल्या स्वभावसिद्ध वळणानेंच जावयाचा.

पावळ्यानें फातरु झरता—(गो.) पागोळ्यांच्या पाण्याची धार नेहमीं पडत राहिली तर दगडसुद्धां झिजतो. दुर्बल माणूससुद्धां चिकाटी धरील तर फार मोठें कार्य करूं शकतो.

पाश—-पाश टाकणें—१ भूल पाडणें; वश करणें; नादीं लावणें. २ फसविणें; ठकविणें. ३ आटोक्यांत आणणें; आहारांत आणणें; पकडींत धरणें. 'पहा मी आतां त्याजवर कसा पाश टाकतों तो'—विवि ८. १०.२०७.

पाशुपत—पाशुपतास्त्र—पाशुपतास्त्र हें भयंकर जालीम तीव्र असल्यामुळें अगदीं निकराच्या प्रसंगींच योजीत असत, यावरून शेवटचा उपाय, इलाज, औषध वगैरे.

पाषाण—-पाषाणधारी--लिंगायत.

पाषाणेष्टिकान्याय—दगडापेक्षां वीट मऊ.

***दुसऱ्या-लोका सांगे ब्रह्मज्ञान, आपण कोरडा पाषाण--**स्वतः वाटेल तसें आचरण करून दुसऱ्यास नीतीचा उपदेश करण्याचा आव आणणारा.

पाषाणाला घाम येईल, पण याला येणार नाहीं--अतिशय निष्ठुर, पाषाण हृदयी मनुष्य.

पास---पास नहीं कौडी, आम खरीदने दौडी—(हिं.)जवळ कवडीहि नसतां आंब्याचा सौदा करण्यास धांवणारी; जवळ कांहीं नसता उगाच व्याप करणारा.

पासंग---पासंगास देणें--भरीस घालणें; पुरें करण्यास पदरचें लावणें.

पासंगास न पुरणें-न लागणें--१ अल्प असणें; अतिशय थोडें असणें. 'लागेल न पासंगातें ।'-संग्रामगीतें १३९. २ बरोबरी न होणें.

पासंगास लागणें-घेणें—बरोबर करणें, होणें.

पासंगीं आणणें—मान देणें; किंमत, महत्त्व देणें.

***पासंगीं आणीत नाहीं मग वजनाला कोठें आणणार--**अगदीं क्षुद्र; भिकार; कोणत्या झाडाचा पाला; कोणी भीक देखील घालणार नाहीं असा.

पासला--पासला पडणें--१ पालथा पडणें; उपडा पडणें. 'साळी उन्मत्त होउनि पासला पडला' —पंच १.३०. २ मध्यें तोंड घालणें; लुडबुड करणें; नसता कारभार करणें. पालथा पहा.

पासला पाडून अमृत पाजणें--बळेंनें एखाद्याचें हित करणें; एखाद्याला बळेंनें मोठेपणा देणें.

पासली पडणें--(बायकी.) संभोग देणें; व्यभिचार करणें.

पासले पाडणें—१ पराजित करणें; जिंकणें. २ हाणून पाडणें; ढासळविणें; पार नाहींसें करणें.

पासोडी—एके पासोडीचीं पाटगीं—पासोडी ही दोन पाटगीं जोडून करतात. हीं पाटगीं एकसारखींच असतात. एका माळेचे मणी; दोन सारख्याच गोष्टी.

घोंगड्यांत पासोड्या सरदार—गांवढ्या गांवांत गाढवी सवाशीण, पहा.

पाहणी—पाहणी मागणें—भाकरी मागणें; महाराचा एक हक्क.-बदलापूर १६६.

पाहणें---पाहत अर्थीं; पाहतांअर्थीं; पाहतार्थीं; पाहिले असतां; पाहिल्या अर्थीं—विचार केला असतां; वास्तविक; नीट पाहिलें तर. 'बरोबरी तयांची कोण करील पहातार्थीं ।'—ऐपो ४१५.

पाहतां पाहतां—१ डोळ्यादेखत; देखतां देखतां; हां हां म्हणतां. २ मोठ्या चातुर्यानें; सहज; लीलेनें.

पाहा पाहा—(व.) मागें लागणें; त्रास देणें; छळणें; दशा दशा करणें.

पाहून घेणें—१ सूड घेणें; उट्टें काढणें; खोड मोडणें. २ बंदोबस्त करणें; नीट नेटकें करणें; योग्य तजवीज करणें.

***पाहतां गोड वाटे, खातां मन विटे**—एखादें फळ वरून सुंदर दिसतें पण कडू असतें. उदा०–वृंदावन. त्याप्रमाणें दिसावयास सुंदर पण परिणामीं वाईट; वरून चांगलें पण अंतरंगीं वाईट.

पाहावें धोरण, बांधावें तोरण—योग्य संधि साधून पराक्रम करावा. योग्य मार्गाचा व रीतीचा अवलंब करून आपलें साध्य गांठावें.

पाहिला तर चोर नाहींतर बादशहाहून थोर—चोर चोरी करतांना पकडला गेला तरच त्याला चोर म्हणतां येतें, नाहींतर त्याला चोर म्हणतां येत नाहीं, त्याला सावच समजलें पाहिजे. कोणीहि मनुष्य अपराध शाबीत होईपर्यंत अब्रुदारच समजला जातो.

पाहिला न देखला आणि चांदण्यानें ओळखला—कधींहि न पाहिलेला मनुष्य म्हणे चांदण्यांत ओळखला. यावरून कांहीं तरी विश्वास न बसेल अशी गोष्ट सांगणें.

पाहिलें तसें करावें आणि ऐकलें तसें बोलावें—मनुष्य दुसऱ्यांचें सहज अनुकरण करतो.

पाहून द्रव्यशक्ति, थोरहि त्यापुढें लवती—श्रीमंतापुढें सर्व नम्र होतात. तु०–द्रव्येण सर्वे वशाः ।

पाहूनिया मेघाला, आनंद वाटे चातकाला—चातकास फक्त आकाशांतून पडणारें पाणीच पितां येतें अशी समजूत आहे; त्यामुळें आकाशांत मेघ आले म्हणजे त्यास मोठा आनंद होतो.

पाहाळी—**पाहाळी जाणें**—पान्हणें–पान्हा फुटणें. 'आतां श्रीचरण तीर्थीचे नि ओले । वरील सुख पाहाळी गेलें ।'—ऋ ९७.

पाहिजे—**पाहिजे तेव्हां**—कोणत्याहि वेळीं.

***पाहिजे तें होतें तर भिकारी भीक कां मागतें**—आपल्या सर्व इच्छा जर ताबडतोब पूर्ण झाल्या असत्या तर जगांत कोणी भिकारी राहिले नसतें. इच्छिणें पहा. If wishes were horses, beggars would ride.

पाहुणा—**पैपाहुणा; पाहुणा राऊळा**—अतिथि अभ्यागत वगैरे; अतिथि; कधीं कधीं येणारा मनुष्य.

पाहुण्याकडून साप मारणें–माराविणें—आपल्याला जें संकट वाटतें त्यांत दुसऱ्याला विशेषतः अतिथि म्हणून आलेल्याला ढकलणें. ही कृति अगदीं निंद्य आहे. परस्पर आपण मध्यें न पडतां काम करून घेणें. "कॉंग्रेस सरकारच्या पूर्ण मद्यपान बंदींतून आपण आयतेंच हायकोर्टाकडून मुक्त झालों हें 'पाहुण्याच्या हातून साप मारविण्यासारखें' उत्तम काम झालें असें मानून मुंबई सरकार मद्यपान बंदीच्या पुनरुज्जीवनासाठीं कांहींच करणार नाहीं."—केसरी १६-७-४०.

*** पाहुणा आला भेटीला, पहिला दिवस बायकोला**—घरीं पाहुणा फार दिवसांनीं यावा व त्याचें आदरातिथ्य करूं पाहावें तों बायको पहिल्याच दिवशींची रजस्वला असावी. मलत्याच वेळीं अडचण उपस्थित होणें.

दोहों घरचा पाहुणा उपवासी (मेला)—एखादा पाहुणा दोन घरीं उतरला म्हणजे एक म्हणतो दुसऱ्याच्या घरीं जेवेल व दुसरा म्हणतो याच्या घरीं जेवेल; मिळून त्यास उपाशीं राहण्याची पाळी येते. तु०–दोन दगडांवर हात ठेवणें.

बहुतांचा पाहुणा उपवासी—वर प्रमाणेंच. 'एक न धरितां उपासना । साधकीं प्रयत्न केलें नाना ॥ तरीं साक्षात्कार नव्हेचि जाणा । बहुतांचा पाहुणा उपवासी ॥'

एक पाहुणा घर पाहुणें—एक० पहा.

पाहुणा घरीं येतो, धनी बैलाला पान्हवितो—पाहुणा जेवावयास आला म्हणून कांहीं बैल दूध देत नाहीं. चांगल्या कामाकरितांहि करूं गेलें तरी अशक्य गोष्ट शक्य होत नाहीं.

पाहुणा जीवसा आणि तांदूळ जिवसे (कसें साधेल ?)—जीव पहा.

हंसतीला पाहुणा, रडतीलाहि पाहुणा--घरीं पाहुणा आला म्हणजे त्याचें आगतस्वागत हंसत म्हणा किंवा रडत म्हणा करावेंच लागतें; तें कांहीं चुकत नाहीं; मग उगाच दुःख तरी कशाला करावें, हंसत मुखानेंच करणें चांगलें. ज्या गोष्टी टळत नाहींत त्याबद्दल वाईट वाटून घेऊन उपयोगी नाहीं.

पाहुणी आली आणि म्होतुर लावून गेली—एखादी विधवा स्त्री पाहुणी म्हणून यावी आणि मालकाशीं पाट लावून घराची मालकीण बनावी त्याप्रमाणें एखाद्या उपटसुंभानें येऊन घरदार बळकवावें किंवा घरांत सत्ता चालवावी.

पाहुणे आले पुष्कळ, जीवाची झाली धांदल—घरांत फार पाहुणे आले असतां यजमानाची तारांबळ उडते.

पाहुणे जावें आणि दैवें खावें-रहावें-दैवीं असेल तें खावें—कोणाकडे पाहुणे म्हणून गेल्यावर जें नशीबानें पुढें येईल त्यांत संतोष मानावा. जेथें आपली सत्ता नाहीं तेथें उगाच मिजास करूं नये,आपल्या नशिबावरच हवाला ठेवावा.

पाहुण्या जा कीं रहा, व दाळी शीज कीं भीज—एखादी स्त्री संसारांत मुळींच लक्ष्य घालीत नाहीं, कसें तरी वेठीचें काम केल्यासारखें काम करते तेव्हां म्हणतात. तिला वरणाची डाळ भिजली नाहीं किंवा शिजली नाहीं तरी परवा नसते व पाहुणा आला किंवा गेला तरी त्याची फिकिर करीत नाहीं. अत्यंत बेपरवा वागणूक; उदासीन राहणी.

पाहुण्याचा आदर केला, त्याच्याकडून साप मारविला; मार पाहुण्या साप, मी मुलाबाळांचा बाप--पाहुण्याला मोठेपणा देण्याकरितां साप मारण्याच्या कामीं त्याला पुढें करावयाचें म्हणजे मोठेपणाच्या नांवाखालीं त्यास संकटांत लोटणें होय.

पाहुण्याचा सत्कार येतांना पोषाखावरून व जातांना गुणावरून—एखादा पाहुणा आला म्हणजे प्रथम त्याचें आगत स्वागत त्याच्या केवळ पोषाखावरून त्याच्या योग्यतेचा अंदाज करून केलें जातें पण तो थोडा राहिला म्हणजे त्याचे गुणावगुण कळून येतात व त्याप्रमाणें त्याची बोळवण होते.

पाहुण्याचे पाहुणे, कोंडीबाचे मेव्हणे—कोणाचा कोणाशीं संबंध नसतां उगाचच दूरान्वित संबंध जोडण्याचा प्रयत्न करणें. बादरायण संबंध.

पाहुण्याचें येणेंजाणें, धन्याचे केले वाधाणे—पाहुणा सहज येतो व जातो पण त्यामुळें घरच्या यजमानाची अगदीं त्याचा आदरसत्कार करण्याच्या कामीं तारांबळ उडून जसा कांहीं नवरदेव लग्नाला येण्याची वेळ झाली आहे त्याप्रमाणें धांदल उडते. [वाधावणें=वरधावा.]

पाहुण्याच्या चोटानें विंचू मारायचा--परभारें काम करून घेणें; स्वतः तोशीस लागूं न देतां एखादें कार्य परस्पर साधून घेणें. पाहुण्याच्या हातून साप मारणें.

पाहुण्याला पाहुण्याचा राग, नि घरधन्यास दोघांचा राग—एक मनुष्य पाहुणा असतां दुसरा पाहुणा आला म्हणजे आपल्या आदरातिथ्यांत वांटेकरी होणार म्हणून पहिल्या पाहुण्याला दुसऱ्याचा राग येतो व एकाच्या ठिकाणीं दोन पाहुण्यांची उठाबस करावी लागणार म्हणून यजमानास दोघांचाहि राग येतो.

पाळणा--पाळणा हलणें—नवीन मूल जन्मास आलें म्हणजे पाळणा बांधून त्यांत त्यास घालतात यावरून १ लहान, तान्हें मूल असणें; बालकाचा जन्म होणें. २ कुटुंबवत्सल असणें; मुलांबाळांनीं घर भरलेलें असणें. ३ मुलें होत असणें; नेहमीं एखादें लहान मूल असणें. 'आठ पोरांचा कुसवा झाला तरी भागीरथीबाईचा पाळणा अजून हलतच होता.'—रम्य रात्रीं पृ. १२१.

पाळण्यांत घालणें--मुलाच्या जन्माच्या अकराव्या अगर बाराव्या दिवशीं त्यास पाळण्यांत घालून त्याचें नांव ठेवतात यावरून नांव ठेवणें; बारसें करणें.

पाळण्यांतलें नांव--१ जन्म नक्षत्रावरून ठेवलेलें नांव. २ बारशाच्या दिवशीं ठेवलेलें नांव.

पाळण्याला बाशिंग बांधणें—पाळण्यांतील मुलांचें लग्न करणें (कुणबी लोकांत प्रचार आहे.)

***पाळणा पाहिला तें बाशिंग पहाणारच आहे**--प्रत्येक जन्मलेल्या मुलाचें लग्न हें होणारच.

जिच्या हातीं पाळण्याची दोरी, ती जगातें उद्धरी--(इंग्रजीचा अनुवाद) लहान मुलास माता जें वळण लावते तें त्याच्या जन्मभर टिकतें. राष्ट्राची मगदूर आयांवर अवलंबून असते. मातृपदाची थोरवी एवढी आहे.

मुलाचे पाय पाळण्यांत दिसतात--पाय पहा. Child is father of the man.

पाळत--पाळतीवर असणें--नजर ठेवणें; पहारा करणें; मागें असणें; लक्ष्य ठेवणें. 'ते म्हणाले, अहमद, तूं माझ्या पाळतीवर आहेस कीं काय?'--उषःकाल.

पाळती पाहणें-घेणें--तपास करणें; शोध करणें. 'मीं विप्र होऊनि त्वरित। पाळती घेतों गोकुळीं ॥'--ह ४.११०

पाळेंमुळें--पाळेंमुळें खणून टाकणें--ज्याप्रमाणें झाड पुन्हां वाढूं नये म्हणून त्याचीं बारीक सारीक मुळेंहि खणून काढावीं त्याप्रमाणें पूर्ण विध्वंस करणें; साफ नायनाट करणें; पूर्ण नाश करणें.

पाळी--पाळी टळणें--चुकणें--विटाळशीची पाळी न येणें, थांबणें; दिवस जाणें; गरोदर होणें. 'पाळी केव्हां टळली होती?'--निचं १३.९३.

पाळीव--पाळीव बकरा--(ल.) सांगितलेलें काम कशाचीहि पर्वा न करतां करणारा; अतिशय आज्ञाधारक; अगदीं हातांतील.

पिकणें--कौल पिकणें--इच्छिलेली वस्तु प्राप्त होणें; इच्छित हेतु पूर्ण होणें. 'लाभा नाहीं उणें पिकला कौल।'--निगा ३२५.

पिकलें झाड--(ल.) ज्याप्रमाणें झाडावरील फळांस बहर येऊन तीं पिकलीं म्हणजे सहज कोणासहि फळें सांपडतात त्याप्रमाणें ज्यापासून सर्वांस लाभ होतो असा अतिशय श्रीमंत व उदार मनुष्य.

पिकलें पान--ज्याप्रमाणें झाडावरचें पान पिकलें म्हणजे तें केव्हांहि गळून पडतें त्याप्रमाणें ज्याचें वय झालें आहे असा; अतिशय वृद्ध. 'आम्ही म्हातारीं पिकलीं पानें झालों आहोंत.'--नामना १३१. "जुन्या काळच्या 'पिकल्या पानाच्या' तोंडून मीं असें ऐकिलें आहे."--शाब ३.१७.

पिकलेलें शेणखत--कुजलेलें शेणखत; मुरलेलें खत; अनेक दिवस जमीनीच्या पोटांत राहून तयार झालेलें.

पिकलेल्या शेतावरचे घटकाभरचे सोबती--शाळू सोबती; थोडावेळ एके ठिकाणीं राहून मग पांगणारीं माणसें.

पिकल्या झाडाखालीं उपाशी मरणें--मरणारा-मरावयाचा--झाडावरचीं फळें पिकून खालीं पडत असलीं तरी तीं गोळा करून खावयाचेहि श्रम न करणारा; अतिशय आळशी;

***पिकतें तेथें विकत नाहीं**--एखादी वस्तु जेथें उत्पन्न होते त्यापेक्षां ती जेथें उत्पन्न होत नाहीं अशा ठिकाणीं तिची विशेष चहा होते व तिला मागणी विशेष असते; यामुळें तिकडेच ती वस्तु पाठविण्याची कोशीस जो तो करीत असतो. पण जाग्यावर तिला कोणीं विचारीत नाहीं. याप्रमाणेंच आपणास स्थानिक गोष्टींचें अगर व्यक्तींचें महत्त्व विशेष वाटत नाहीं; कारण अतिपरिचय. यामुळें परप्रांतांतच गुणीजनाची अधिक चहा होते. 'अतिपरिचयात् अवज्ञा' पहा.

पिकले काजूगरे, भट-बामण बरे--(कों.) काजू आणि फणस पुष्कळ असले म्हणजे कोंकणांत ब्राम्हणांना दुसरें कांहीं लागत नाहीं.

पिकल्या झाडावर धोंडा कोणीतरी टाकील--ज्या झाडावर फळें पिकलीं असतील त्यावरच दगड मारून तीं पाडण्याचा कोणीहि झालें तरी प्रयत्न करतो. ज्या झाडावर फळेंच नाहींत तिकडे कोणी ढुंकूनहि पाहत नाहीं. त्याप्रमाणेंच जो सधन व उदार आहे त्याकडेच कोणी याचना करण्यास जातो; दरिद्री अगर कृपण यांचेकडे कोणी जात नाहीं.

पिकल्यावांचून (गांवांत) विकत नाहीं--जी वस्तु एखाद्या ठिकाणीं उत्पन्न होते तीच बाजारांत येते. जेव्हां मुळांत कांहीं असेल तेव्हांच एखाद्या गोष्टीचा प्रसार होतो. जगामध्यें जो प्रवाद एखाद्याबद्दल निर्माण होतो, त्याला मुळांत कांहींतरी आधार असतोच; अगदींच निराधार गप्पा क्वचितच उठतात.

पिकल्याशिवाय विकत नाहीं आणि वारा आल्याशिवाय पान हालत नाहीं--वरप्रमाणेंच. कारणावांचून कार्य घडत नाहीं.

पिकेल डोण तर खाईल (ऐकेल) कोण--विजापूर जिल्ह्यांत डोण या नांवाचा एक प्रदेश आहे तो इतका सुपीक आहे कीं त्यावर योग्य वेळीं पाऊस पडला तर इतकें पीक येतें कीं धान्यास कोणी विचारीत नाहीं इतकें स्वस्त होतें.

मॅनवेरींगनें या म्हणीचा अर्थ जेथें एखाद्या गोष्टीची समृद्धि असते तेथें तिला कोणी विचारीत नाहीं असा अर्थ केला आहे तो चुकीचा आहे.

पिकेल तर विकेल—पिकल्याशिवाय विकत नाहीं पहा.

पिक्कली खोली पडनाफुडें हरवी खोली हस्सता—(गो.)पिकलेल्या पिवळ्या पानांना खालीं पडतांना पाहून ताजी हिरवीं पानें त्यांना हंसतात; पण बिचाऱ्यांना काय ठाऊक कीं आपल्या नशिबांत सुद्धां तेंच लिहिलेलें आहे. तु०- आधणांतले रडतात सुपांतले हंसतात.

पिंगल—पिंगल नाम संवच्छर—(उप.) अतिशय जुनाकाळ. दीर्घकालीन; पुरातन. 'हा रुमाल पिंगल नाम संवच्छरांत खरेदी केलेला दिसतो.'

पिंगळ-ळा, पिंगूळ—पिंगळा पादणें—पिंगूळ किड्याला हात लावला तर पादासारखी घाण येते. यावरून (ल.) अगदीं अमंगळ, बीभत्स बोलणें.

पिंगा—पिंगा घालणें—पिंगा हा एक मुलींचा खेळ आहे. यामध्यें मुलगी स्वतःचे भोंवतींच फेरे घेते. यावरून जागच्या जागींच घुटमळत राहणें; एखाद्या गोष्टीभोंवतींच घोटमळत राहणें. 'मी बायक्या होऊन भुंग्याप्रमाणें तिच्या भोंवतीं पिंगा घालूं लागलों.' –फाल्गुनराव. 'माझ्या दुष्ट बुद्धीपासून जन्म पावलेलीं संकटें भेसूर पिशाच्याप्रमाणें माझ्या डोळ्यांपुढें फेर धरून पिंगा घालीत आहेत.'–उग्र ५·१.

पिचका—पिचक्या डोळ्यांचा—अर्धवट मिटलेले डोळे असलेला; ज्याचे डोळे अर्धे उघडे दिसतात असा.

पिचकी डांग खरी, पण हंड्यांना भारीच आहे—बांबूची काठी जरी पिंजलेली असली तरी मडकीं फोडण्याच्या कामीं ती खबरदार असते.

पिचलेला चुना—भिजवून घाणींत घालून बारीक केलेला चुना; मळलेला चुना; मुरलेला व गाळलेला चुना.

पिचूं लागणें—मावळत जाणें; दिसेनासें होणें. 'भानूंत अस्तंगत समयीं पिचूं लागलेले आहेत' –अस्तंभा ४.

पिचून टाकणें—नाहींशीं करणें; नष्ट करणें.

पिचून पिचून—हालहाल करून, होऊन.

पिचाटी—पिचाटी सारखी राहणी—पिचाटी ही एक भटकी जात आहे. कोठेंतरी जेवण, कोठेंतरी निजणें, अशी अस्थिर वृत्ति; भटकण्याची संवय.

पिचाटी—पिचाट्या आवळणें—[पिचाटी = केस] मुसक्या आवळणें, बांधणें.

पिचुंड्या—पिचुंड्या बांधणें-बांधून घेणें—पक्के बांधणें; पूर्णपणें ताब्यांत घेणें; लेख वगैरेनें पूर्णपणें गुंतवून घेणें.

पिच्छा—पिच्छा करणें—१ मागें हटणें; माघार घेणें; मागें जाणें. २ बंदूक वगैरे उडवितांना तिचा मागें धक्का बसणें; प्रतिक्रिया करणें.

पिच्छा घेणें-पुरविणें-धरणें—१ निकड लावणें; नेट लावणें; मागें टुमणें लावणें. २ पाठलाग करणें; पाठीस लागणें; पाठ न सोडणें.

पिच्छा सोडणें—नाद सोडणें; पाठीमागें लागण्याचें टाकून देणें.

पिच्छ्यावर असणें—पिच्छा पुरविणें; मागें असणें; पाठ न सोडणें.

पिच्छ्यास बसणें-लागणें—पिच्छा पुरविणें; पाठीस लागणें; खणपटीस बसणें.

पिछाडी—पिछाड्या बांधणें—हात मागें बांधणें. 'त्या दुष्टाच्या पिछाड्या बांधून इकडे घेऊन या.'–रत्न ७·१.

पिछाड्या मारणें-झाडणें—लाथ मारणें; लाथा झाडणें.

पिंजणें—पिंजिल्ल्यांत (पिनल्ल्यांत) पाय—(गो.) फाटक्यांत पाय. वस्त्र जिथें फाटलें असेल तिथें पाय पडला कीं तें अधिकच फाटतें. आधींच आपत्ति आणि त्यांतच नवीन एखादें संकट कोसळावें म्हणजे पुरा नाश. तु०–छिद्रेष्वनर्था बहुली भवन्ति ।

पिंजिल्यांत पाय, झिजैल्ल्यांत दाय—फाटक्यांत पाय अडकला तर फाटकेंच जास्त फाटतें; तसेंच उकळता पदार्थ जास्त ढवळल्यानें तो पदार्थ बिघडतो. कामाचा विचका करणें.

पिंजरा—अंगाचा-शरीराचा-हाडांचा पिंजरा—केवळ अस्थिपंजर राहिला आहे असा; अत्यंत कृश मनुष्य; हाडें निघालेला.

*पिंजरा होणें—कृश होणें. वर पहा.

पिंजऱ्यांत व्याघ्र सांपडे, बायका मुलें मारिती खडे—एखादा थोर मनुष्य अडचणींत सांपडला म्हणजे त्याची कोणीहि हेटाळणी करतो.

पिंजारी—पादशहाला पादशाही आली म्हणून पिंजाऱ्यानें तार तोडूं नये. पादशहा पहा.

पिट्टा-ट्टा—पिट्टा-ट्टा पडणें-पाडणें-१ थकवा येणें; दमणें. २ त्रास देणें. ३ बोजा लावणें.

पिठाड—पिठाड करणें-पाडणें—फन्ना उडविणें; साफ करणें; पीठ करून टाकणें.

पिठ्या—पिठ्या पाडणें—१ (ना.) घोकंपट्टी करणें; एकसारखें घोकून घोकून पाठ करणें. २ एखादें काम तडीस नेणें; पूर्ण करणें; शेवटास नेणें. ३ (माण.) दमाविणें; थकविणें; घाम काढणें; नको नकोसें करणें.

पिंड—पिंडास खिळणें-जडणें-बसणें-लागणें—चिकटलेला असणें; सदोदित जवळ असणें; न सुटणें.

*पिंड ब्रह्मांडीं भजन : तेणें शमे विघ्न :—(महानु.) [भजन=भोजन] पिंड आणि ब्रह्मांड यांना तृप्त केलें म्हणजे सर्व संकटें टळतात.

(जें) पिंडीं तें ब्रह्मांडीं—१ आपणावरून जग ओळखावें; सर्व माणसें सारखींच असतात; कोठेंहि गेलें तरी एकच प्रकार आढळतो. २ जसा मनुष्य आहे तसेंच सर्व जग आहे. Man is a microcosm.

पिंड्ड रचिसुयिल्लो देवु डेंडि रचिसूंयिना वे?—(गो.) ज्या देवानें जन्माला घातलें तो देव पोटाची तजवीज करणार नाहीं का? आपण उगीच कशाला चिंता वहावी?

पिंडे पिंडे भिन्न मति, तुंडे तुंडे सरस्वती—प्रत्येकाचें निरनिराळें मत असतें त्याचप्रमाणें प्रत्येकजण निरनिराळ्या प्रकारची बुद्धि सांगतो. पुढें पहा. (हिं.) गुरुगुरु बिदया, सरसर अक्कल.

पिंडे पिंडे मतिर्भिन्ना।—सबंध श्लोक—पिण्डे पिण्डे मतिर्भिन्ना कुण्डे कुण्डे नवं पयः। जातौ जातौ नवा चारा नवा वाणी मुखे मुखे॥ व्यक्ति तितक्या प्रकृति; प्रत्येक मनुष्याचें मत स्वतंत्र असतें; जो तो आपल्या बुद्धीप्रमाणें विचार करतो.

पिडा—पिडा जावप—(गो.) वेणा येणें.

*पिडे वकत् कोणय् दीत, सभावा वकत् कोण दित् लो?—(गो.) रोगाला औषध कोणीतरी देईल, स्वभावाला औषध कोण देणार? 'स्वभावो दुरतिक्रमः।'

पिंडे—पिंडे लगावणें—(व.) मार देणें; ठोकणें.

पिढी—पिढी दर पिढी-पिढीन्‌पिढी—वंशपरंपरेनें.

पिढी—पिढी लागणें—लग्नसंबंधामुळें दोन गोत्रांच्या पिढ्यांचें परस्परांत मिश्रण होणें; पिढ्या न तुटलेल्या असणें; विवाहाच्या कामीं निर्बंधित पिढ्यांची अडचण येणें.

पिढीचा—वंशपरंपरागत; पिढीजाद; अनेक पिढ्यापासून लौकिक, स्नेहसंबंध किंवा कांहीं चांगले अथवा वाईट गुण वगैरे असलेला. उदा०—पिढीचा संपत्तिवान, बुद्धिवान्; दरिद्री; रोगी.

पिढीला लाथा मारणें-देणें-पाय लावणें—१ पूर्व परंपरेला झुगारून देणें; परंपरा सोडून देणें, मोडणें. २ कर्ज फेडींत मुद्दलाला सुद्धां कमी पडणें.

पिढ्या तोडणें-तुटणें—दोन घराण्यांतील सुतक; सोयेर वगैरेचा संबंध नाहींसा होणें; नात्याचा संबंध सोडणें.

*पिढीचें मोडलें आदवीचें जोडलें—आधवेचा पहा.

पिढें—पिढ्याचें काम; पिढ्या पाट्याचें काम—खांबावर लग ठेवण्याच्या ऐवजीं पिढें देऊन केलेलें काम.

*ढेंग बघून पिढें, तोंड बघून विडा-डे—जशी मनुष्याची योग्यता असेल तशी त्यास वागणूक मिळते.—लोक २·७३.

पिणें—पिववेना (तर) पिववेना पण लवंडूनहि देववेना—एखाद्या गोष्टीचा आपणास उपयोग नसला तर ती दूर तरी करावी. तिच्यापासून दुसऱ्यास उपसर्ग होणार नाहीं अशी तरी काळजी घ्यावी.

पी हळद आणि हो गोरी—हळद खाल्ल्याबरोबर शरीर गोरें होईल अशी अपेक्षा करणें; कोणत्याहि कृतीचें फळ अगदीं ताबडतोब मिळावें अशी इच्छा असणें; उतावीळ होणें; घाईस येणें.—शाव १·१३५.

पितर—पितर उद्धरणें-स्वर्गावर नेणें—(उप.)

पूर्वजांची निंदा करणें; पितरांवरून शिव्या देणें; आई-बापावरून शिवीगाळ करणें.

पितरें घालणें—(माण.) भुतें घालणें; देव घालणें; देवीच्या पुजाऱ्यास पैसे देऊन त्याजकडून भुतांचे धोंडे आणवून दुसऱ्यास त्रास देवविणें.

पितरांच्या शिंदळक्या काढणें—पूर्वजांची निंदा करणें; मातापितरांस उद्देशून अपशब्द बोलणें; वडिलांची निंदा करणें.

***काल मेला आणि आज पितर झाला**—थोड्या फार अधिकाराची वगैरे प्राप्ति झाली नाहीं तोंच त्याचा दिमाख दाखविणारा; सत्ता मिळाल्याबरोबर ती गाजवूं पाहणारा; विशेषतः तिचा दुसऱ्यास त्रास देण्याच्या कामीं उपयोग करणारा.

पितळ--पितळ बाहेर दिसणें-पडणें-निघणें—१ मुलामा दिलेल्या दागिन्यांतील मूळचें पितळ दिसूं लागणें; अंतरंग बाहेर येणें. २ वरपांगीं केलेला बहाणा नजरेस येणें; खरें स्वरूप दिसूं लागणें; बाहेरून आणलेला दिखाऊ मोठेपणा नष्ट होऊन क्षुद्रत्व प्रकट होणें.

पितळेच्या कानाचा--जो मनुष्य ज्यावेळीं जें सांगेल तें खरें मानणारा; चहाडी ऐकण्याची संवय असलेला.

***पितळे कान्नाक आयकता चड**—(गो.) ज्याचे कान पितळेचे (हलके) असतात त्यांना ऐकूं अधिक येतें. हलक्या कानाच्या माणसाची दुसऱ्याचीं उणीं दुणीं ऐकण्याकडे अधिक प्रवृत्ति असते.

पितळी—पिताळि भायर पळ्ळी, पुंगी बंद जालि—(गो.) गारुड्याची थाळी बाहेर पडली कीं पुंगी बंद होते. पैसा दिसला कीं इतर सारे व्यवहार आपोआप थांबतात आणि लक्ष तिकडे लागतें.

पिता—यो वै पिता स वै पुत्रः।—(सं.) पिताच पुत्ररूपानें पुन्हा जन्मास येतो; जसा बाप तसा बेटा.—योगतत्त्व ४.

पिती—जातीसारखी पिती, खाणीसारखी माती—(गो.) [पिती=संतति] मुलें नेहमीं आपल्या आईबापासारखींच होतात व जातींतील व्यक्तींत जातीचेच गुण येतात.

पित्त--पित्त उसळणें-चढणें-भडकणें—रागावणें; संतापणें; जळफळणें. ‘ व्यर्थ क्लेशीच होती म्हणुनि उसळतें सज्जनांचेंहि पित्त ।’—मोकृष्ण ५६.५०.

पित्त तापविणें—संतापविणें; राग आणणें.

पित्ताची कुपी-पिशवी—पित्ताशय.

पित्ताची जोत भरणें—पित्तांमुळें घशांत उरांत जळजळणें; घशाशीं आग होणें.

पित्तानें उचमळणें-जळजळणें—पित्तानें घशांत जळजळणें, आग होणें.

पित्तु--पित्त्या देणें--पोटामध्यें देणें. कमी असलेल्या गड्याबद्दल अधिक वेळ खेळण्याचा हक्क देणें; पोटांतील भिडू देणें.

पिन्हा--पिन्हा काढणें--पुरविणें—पाडणें—(व.) पिच्छा पुरविणें; पाठ घेणें; पाठीस लागणें. ‘ कामाचा पिन्हा पाडला म्हणून काम उरकलें.’

पिंपर---पिंपरासारखा आपटणें--पिंपळाच्या फळासारखें जमीनीवर आपटणें; एकदम जोरानें आपटणें; सहज उचलून जोरानें खालीं टाकणें.

पिंपळ—पिंपळाचा पार झिजविणें-- पार पहा.

पिंपळाची मुंज करणें--पिंपळाचे झाडास हजार किंवा त्यापेक्षां जास्त पानें फुटल्यानंतर त्याची मुंज करितात.

पिंपळाचें फूल-- उंबराच्या फुलाप्रमाणें दुर्मिळ वस्तु; क्वचित् घडणारी, दिसणारी वस्तु.

पिंपळाला प्रदक्षिणा घालणें--इच्छित हेतु साध्य होण्याकरितां पिंपळास दररोज ठराविक अगर एकंदर ठराविक प्रदक्षिणा घालणें; व्रतवैकल्यें करणें; देह कष्टविणें.

पिंपळावरचा मुंजा-- पिंपळाची मुंज करतात व त्यावर मुंज झालेल्या ब्रह्मचाऱ्याची देवता अगर पिशाच्च असतें अशी समजूत आहे.

बारा पिंपळावरचा मुंजा—बारा पिंपळावर एकच मुंजा असेल तर तो नेहमीं एकाच झाडावर बसणार नाहीं; यावरून त्यावर याप्रमाणें फिरत राहील. यावरून १ अपरात्रीं हिंडणारा. २ भटक्या; नेहमीं अस्थिर असणारा; एका ठिकाणीं कधीं न राहणारा.

पिंपळास पार बांधणें—पिंपळाच्या झाडाच्या

मुळाशीं ओटा बांधणें. यावरून पुण्यकारक कर्म करणें; सत्कृत्य करणें.

वडाची साल पिंपळास लावणें—लटपट करणें; इकडचें तिकडे, तिकडचें इकडे करणें; कांहीं तरी गडबड उडवणें; घोटाळा करणें,

***पिंपळाचें पान गळालें कीं पिंपळगांव जळालें**—एका मनुष्यानें एका गांवीं आल्याबरोबर समोर सर्व पानें गळालेल्या स्थितींत एक पिंपळाचें झाड पाहिलें तेव्हां त्यास वाटलें कीं सर्व गांव जळून जाऊन पिंपळाचें झाड वठलें असावें. पण वास्तविक केवळ थंडीमुळें पिंपळाचीं पानें गळालीं होतीं. यावरून एखादी गोष्ट पाहिली असतां तीवरून भलतेंच वाईट अनुमान न काढतां योग्य तेंच अनुमान काढावें.

पिंपळाला शेंगा, घरीं जाऊन सांगा—अघटित गोष्ट घडून येणें.

पिपि—पिपि करणें-वाजवणें—कर्कश आवाज करणें.

पिंपी—शिंपळगांवचा पिंपी—'पिंपळगांवचा शिंपी' म्हणण्याऐवजीं घाबरून बोबडी वळून 'शिंपळगांव चा पिंपी' असें म्हणणें. घाबरणें; बोबडी वळणें.

पिर्डुक—पिर्डुक नातिली वर्डीक; पिड्डुक नाथिलें लग्न—(गो.) मंगलसूत्राशिवाय लग्न; अत्यंत आवश्यक गोष्टीचाच अभाव. हिंदूंच्या लग्नपद्धतींत अति महत्त्वाची गोष्ट म्हणजे नवऱ्यामुलानें नवरीच्या गळ्यांत बांधावयाचें मंगलसूत्र होय. हें मंगलसूत्र तिच्या गळ्यांत मरेपर्यंत अगर विधवा होईपर्यंत असतें. हें मंगलसूत्र इतकें पवित्र मानलें आहे कीं, यावर न्यायसभेच्या हुकूमनाम्यानें सुद्धां जप्ती आणता येत नाहीं.

पिलकूं—पिलकूं पाठीमागें लावणें-काढणें—लचांड लावणें; एखादी ब्याद गळ्यांत घालणें.

पिलूं—पिलां पांद्री—(गो.) पक्ष्याच्या पिलांना पिंजरा आवश्यक.

पिवळा—पिवळी पगडी—१ पिवळी पगडी घालणारा. २ मुंबईचा पोलीस शिपाई. याच्या डोक्यावर पिवळी पगडी असते यावरून. 'या सर्वांचें मुसलमानलोकांपासून रक्षण करण्यास दोनशें पिवळ्या पगड्या पुरे आहेत.' —टि १.२६२.

पिवळे करणें-होणें—(विवाहप्रसंगीं वधूवरांस हळद लावतात यावरून) १ हळद लावणें. 'पोरगी पिवळी करून तुमच्या पदरांत टाकावयाची.'—भा १३.२ लग्न करणें.

पिवळोखी चढणें—पिंगट होणें; पिवळेपणा येणें; फिकट होणें; पित्ताची काविळ होणें, पिडा होणें.

***पिवळा रंग, कोणा करीना दंग**—(वांय.) गोरेपण फार मोहक असतें.

पिशाच—पिशाच्याचे हातीं कोलीत—आधींच पिशाच म्हणजे खोडकर व्रात्य व त्यांत त्याच्या हातांत कोलीत असल्यावर मग काय ? तु.—आधींच मर्कट. पिसा पहा.

पिष्ट—पिष्टपेषणन्याय—दळलेलें पीठच पुन्हां पुन्हां कांडणें; चर्वितचर्वण करणें. (ल.) पुन्हां पुन्हां तेंच तेंच सांगणें.

पिसा—आधीं पिसा, त्याचे हातीं दिलें कोलीत—पुढें पहा.

पिसो मन मेकळता, बुदवंतु बांदुन दवरता—(गो.) मूर्ख आपलें मन मोकळें सोडतो आणि शहाणा त्याला बांधून ठेवतो.

बायको वेडी, पोर पिसें, जांवई मिळाले तेहि तसेच—बायको पहा.

पिशा आनी किते शिंगां असतात—(गो.) वेड्याला म्हणजे कांहीं शिंगें का असतात ? वेड्या माणसांत आणि इतरांत शारीरिक फरक कांहींच नसतो. वेडा किंवा शहाणा हें त्याच्या कृतींवरून ठरत असतें.

पिशा हातां चूड दिली, पिशान् काडूली, घरा लायली—(गो.) वेड्याच्या हातांत चुडणी दिली, त्यानें उचलली घराला लावली. माकडाच्या हातीं कोलीत या अर्थानें.

पिशा हातीं पैसो आयलो, दीस राति खर्चून सोळो—(गो.) मूर्खाच्या हातीं पैसा आला आणि त्यानें दिवस रात्र खर्च करून नाहीसा केला. संपत्ति मिळवण्यापेक्षां ती टिकवण्यालाच अधिक शहाणपण लागतें.

पिशाक धुतो घालचो—(गो.) वेड्या माणसाला

घोतरा पाजावा म्हणजे मग त्याच्या वेडेचारांना ऊतच यायचा.

पिशाक पिंपळ दाखयता---(गो.) वेड लागलेल्या माणसाला पिंपळ दाखवणें. पिंपळ पाहिला कीं त्याचें वेड अधिक होतें असा लोकांचा समज आहे. छांदिष्ट माणूस एखादी चमत्कारिक वस्तु दिसली कीं तिच्याच नादीं लागतो.

पिशाक-पिस्साच्याक समुद्राकडे व्हरप-वेड्याला समुद्राकडे नेणें. मूर्खाला अधिक मूर्ख करणें. असें म्हणतात कीं समुद्राचा देखावा चांगल्या मनुष्याला सुद्धां वेड लावतो.

पिशाच्या हातांत-हातीं कोलती-वेड्याच्या हातांत कोलीत. अविश्वासू लोकांच्या हातीं महत्त्वाची कामें सोंपविल्यानें त्याचे परिणाम घातुक होतात. 'पाजी दुर्मति मद्य, दे खळ पिशाहातीं स्वयें कांकडा ।'-मोकृवि ६१·९.

पिशाच्या हातांत दिली वात, पिशे नाचता सगळी रात---(कों.) बुद्धिभ्रंश झालेल्या मूर्खाच्या हातीं दिवा दिला तर तो रातभर घेऊन नाचणारच. अयोग्य माणसांना विश्वासाच्या मोठ्या जागेवर कधींच नेमूं नये.

पिशाच्या हातीं कोलीत दिलं, चारहि घरं लावून आलं---(व.)वेड्याच्या हातीं एकदां कोलीत गेलें कीं तो त्यानें किती घरें जाळील याचा नेम नाहीं. त्याप्रमाणें दुसऱ्याच्या अकल्याणाची किल्ली एखाद्या मूर्खाच्या हातीं गेली असतां तो किती नुकसान करील याचा नेम नाहीं; त्याजपाशीं विचार नसतो.

पिशालो यजमान जांवच्याकई बुदवंतालो चाकर जांवचें बरें---(गो.) मूर्खाचा धनी होण्यापेक्षां शहाण्याचा चाकर होणें चांगलें.

पिशे मित्राकई बुदवंत शत्रु बरो---(गो.) मूर्ख मित्रापेक्षां शहाणा शत्रु अधिक चांगला.

पिशे हस्तेक शेंदूर वात्तिलेगादि---(गो.) वेडीच्या हातांत शेंदूर ओतावा मग त्यानें कपाळ मळवटून टाकायला तिला कितीसा उशीर ?

पिसणें-ना---पिसन हारीके पूतको, चबिना लाभ---(हिं.) दळणाऱ्याच्या मुलाला चबिन्याची प्राप्ति; कोल्हा काकडीला राजी याप्रमाणें.

करे तो बीस पचीस, नहि तो चक्की लेकर पीस---कर्तबगारी करावयाची असेल तर २०।२५ वर्षांच्या उमेदींत करावी,नाहींतर जन्मभर दळत बसावें.एकदां पराक्रमाची ज्वानी गेली कीं जन्मभर एकच कष्टाचा धंदा.

पिसाळणें---इसळा इसळला, शेजारी पिसाळला; इसाळा शेजारी पिसाळा---इसळा पहा.

पिसाळलिया कुतरियाची गत---ज्याप्रमाणें पिसाळलेलें कुत्रें सैरावैरा धांवतें व येणाऱ्या जाणाऱ्यास चावावयास पाहतें त्याप्रमाणें अगदीं कावरा बावरा होणें; कांहीं सुचत नाहींसें होणें. 'आम्ही त्यास पिसाळलिया कुतरियाची गत केली असती. '-भाव ३६.

पिसू---पिसाला उपास, ढेंकणाला रविवार---पिसू कधीं उपास करीत नाहीं व ढेंकूणहि कधीं वार पहात नाहीं. त्यांचा मनुष्याचें रक्त शोषण करण्याचा क्रम अव्याहत चालत असतो.

पीक---पीक जळणें---अतिशय उन्हानें पीक वाळणें; पीक करपणें.

पीक सोडणें---जमीनीची सुपीकता कमी होणें; जमीन नापीक होणें.

पिकाचा फुफाटा उडणें---पिकाची धूळधाण होणें; नासाडी होणें.

***पीक थीं भीक**---(गो.) जिथें पीक तिथें भीक. पुष्कळ वेळां असें घडतें कीं, वस्तु जिथें पिकते तिथेंच तिचा तुटवडा भासतो आणि दूर कुठें तरी तिचा भरपूर पुरवठा असतो.

पिकास द्या कोळपणी, धान्य भरा रे गोणीं--जमीन वारंवार कोळपली असतां जमीनींतील ओल वाळत नाहीं व तण निघतें. त्यामुळें पीक चांगलें येतें व भरपूर धान्य मिळतें.

पिकेवेलीं सवणीं---पिकावर टोळीनें येऊन बसणारीं शेवणीं नांवाचीं पांखरें. घरीं समृद्धि असली कीं खायला खूप माणसें जमतात. 'बा तुझा चालता काळ। खायाला मिळती सकळ ।।

पींग---पींग बांधणें---दोन माणसांस ओझें उचलतां यावें म्हणून आडवा दांडा बांधणें.

पीछे---आगे पहा.

आगे चले भानचोद, पीछे चले मादरचोद--पुढें चाललें तरी शिवी मागें चाललें तरीहि शिवीच. कांहीं केलें तरी शिव्या आहेत. दोन्हीकडून बोलणीं.

पिछेसे आई, आगे गई--ज्याप्रमाणें मागून आली त्याप्रमाणें पुढें जाणें; मागील प्रथा पुढें चालू ठेवणें; पूर्वीपासून चालत आलेली रीत पुढें चालू ठेवणें; आपल्यापर्यंत आलेलें लोण पुढें पाठविणें.

पीठ---पीठ करणें--चुराडा, नाश करणें. 'शुंडा पादाघातें साश्वर यातें पळांत पीठ करी।'--मोद्रोण २.४७.

पीठ आहे तर मीठ नाहीं आणि मीठ आहे तर पीठ नाहीं--नेहमीं कांहीं तरी उणीव असणें; कधींहि भरपूर सर्व गोष्टींचा पुरवठा नसणें; तुटपुंजा संसार.

पीठ खेल्या गोरी जायना, उडीद खेल्यारि काळी जायना--(गो.) पीठ खाल्लें म्हणून बाई गोरी होत नाहीं आणि उडीद खाल्ले म्हणून काळी होत नाहीं. रंगाप्रमाणेंच स्वभावहि कोणत्याहि परिस्थितींत कायम रहातो.

पीठ देक नातिल्याने गोवरु देकलो--(गो.) ज्याला पीठ पहावयास मिळालें नाहीं त्याला राख दिसली तेव्हां तेंच पीठ आहे असें तो समजला. पुष्कळ वेळां हिरा म्हणून गारगोटी पदरांत पडते.

पिठाण्यांत पीठ नाहीं मिठाण्यांत मीठ नाहीं--तुटपुंजी साधनसामुग्री; धड सर्व पदार्थ बरोबर नसलेलें अन्न; अनेक गोष्टींची उणीव.

पीठ विकायचें आणि गाजरें विकत घ्यायचीं?--पिठानें जसें पोट भरेल तसें गाजरांनीं भरणार नाहीं. चांगला पदार्थ देऊन हलकी वस्तु घेणें.

पीठ वेळ काढतें, भात नेऊन पोंचवितो, भाकरी नेऊन परत आणते--पीठ, भात व भाकरी यांमध्यें अनुक्रमें एकापेक्षां अधिक वरचढ गुण असतात; अधिकाधिक सकस असतात; लाह्या, सातू वगैरेचें पीठ खाल्लें तर तात्पुरती भूक शमते, भात खाल्ला तर कोठें जावयाचें असेल तर तेथपर्यंत पल्ला घेतां येतो पण तेथें गेल्याबरोबर भूक लागते पण भाकरी खाल्ली तर कोठेंहि जाऊन परत येईपर्यंत दम निघूं शकतो.

एका पिठाचे प्रकार सतरा--(महानु.) पिठाचे खाद्य प्रकार कितीतरी करतां येतात. तु०--एक गहूं, प्रकार बहु.

पिठांत मीठ--ज्याप्रमाणें भाकरीच्या किंवा पोळीच्या पिठांत थोडेंसें मीठ टाकलें असतां त्यास चव येते त्याप्रमाणें एखाद्या गंभीर भाषणांत थोडासा विनोद, किंवा एखाद्या पदार्थांत रुचि येण्याकरितां थोडीशी घातलेली दुसऱ्या पदार्थाची भर.

आधीं पिठोबा आणि मग विठोबा--आधीं पोटपूजा केल्यानंतर मग देवाचें स्मरण करणें; आधीं पोटोबा व मग विठोबा या म्हणीचाच प्रयोग.

पीर---त्याला पीर भेटला म्हणजे तो दबेल--एखाद्याला जबरदस्त प्रतिस्पर्धी किंवा शत्रु भेटल्याशिवाय तो वठणीवर येत नाहीं.

पीस---पिसाचा कावळा करणें--अतिशयोक्ति करणें; फुगवून सांगणें. पराचा कावळा पहा.

पिसें लावून कावळा करणें--सोंग, वेष देणें. 'कारकुनांनीं पिसें लावून कावळा करतात तसा करून एजंटांस भेटवावा.'--टिळक चरित्र भा. १ पा. ५७.

***कोंबडीला पिसें तेवढीं शेतकऱ्याला मिसें**--[मीस=मीष,सबब] (ठाकरी) शेतकरी नेहमीं सबबी सांगत असावयाचा. त्याच्याजवळ ढोंगें फार.

पीळ---पीळ पडणें--मनांत अढी धरणें; किंतु वाटणें; एखाद्याबद्दल मन दूषित होणें; प्रतिकूल ग्रह होणें.

***सुंभ जळेल पण पीळ जळत नाहीं**--कांहीं मनुष्याच्या मनांतील राग मूळ कारण नाहींसें झालें तरी जात नाहीं. कांहीं लोक फार दीर्घद्वेषी व कुढे असतात, ते आपला हट्ट कधीं सोडीत नाहींत अशाबद्दल म्हणतात. स्वतःचें नुकसान झालें तरीहि हट्ट न सोडणारा.

पुकार--पुकार कळणें-पडणें--बातमी पसरणें; जाहीर होणें; सर्वत्र कळून येणें. 'मग पुकार कळली पुणें शहराला। गर्भार बाया चालल्या पाहायाला।'--ऐपो १६७. 'सारे शहरामध्यें पुकार पडली उभे उभे माडीमाडी।'--पला ४·१३. ऐपो २१४.

पुखा---पुख्खा झोडणें--यथेच्छ हात मारणें; खूप जेवणें. "जोंपर्यंत पुख्खा झोडायला मिळे तोंपर्यंतच 'रावसाहेब' करीत"--कोकि ८८.

*पुखानंद आणि सुखानंद--१ ज्याला पोटभर जेवावयास मिळतें व कशाची काळजी नसते तो सुखी असतो. २ केवळ जेऊन खाऊन आळसांत दिवस घालविणारा. 'कुटाळ ब्राह्मण येक पुखानंद।'-रामदासी २·४१.

पुंगी---पुंगी बंद करणें—गप बसविणें; गडबड चालूं न देणें; टकळी बंद करावयास लावणें. 'एखाद्या लुच्चाची ठकविद्या जाणून त्याची पुंगी कोणी बंद केली असतां त्याचा जसा माथा भडकून जावा'-नि ३९७.

*पुंगी न राहे उगी--(महानु.) पुंगी वाजल्यावाचून रहात नाहीं. ज्याचा जो स्वभाव तो जात नाहीं.

गाजराची पुंगी वाजली तर वाजली, नाहींतर मोडून खाल्ली--एखाद्या गोष्टीचा जेवढा फायदा घेतां येईल तेवढाच घेऊन समाधान मानणें.

पुच्छ---पुच्छ फुटणें-लांबणें-वाढणें—(मारुतीची शेपटी जशी वाटेल तितकी लांबत जात असते त्याप्रमाणें) मूळ योजनेपेक्षां अधिक वाढणें (खर्च, काम इ.); लांबत जाणें; फांटे फुटत जाणें.

पुंजणे—लोकांचीं घरें दारें पुजणें--आपल्या कामाकरितां लोकांच्या घरीं वारंवार खेपा घालणें; येरझार घालणें; खेटे घालणें.

पान पुजणें--नांवाला खाणें; केवळ आग्रहास्तव जेवावयास बसणें.

पानें पुजणें--पानांवर नांवाला पदार्थ वाढणें. पात्रें पहा.

एखादा पदार्थ पुजून ठेवणें--उपयोग न करतां संग्रहीं ठेवणें; जपून ठेवणें; न वापरतां बाळगून ठेवणें.

पुंजी----पुंजी करणें--१ रास करणें; एकत्र करणें; जमविणें. २ पैसा सांठविणें; गांठीस ठेवणें; द्रव्याचा संग्रह करणें.

पुंजी बाळगून असणें -थोडीफार माया असणें; थोडा पैसेवाला असणें.

*पुंजी भडबुंजाची, मिजास राजाची--जवळ ऐपत भडबुंजाची, पण ऐट राजपुत्राची. योग्यता नसतां पोकळ बडेजाव दाखविणें.

पुठ चढाविणें—(महानु.) स्तुति करणें; खुशामत करणें; व्यर्थ प्रशंसा करणें; फुगवून सांगणें. 'सुदेवें ब्राम्हणें। पुठ चढविलें वायानें। शेवटीं एकेहि गुणें। भुंजों नये।'-शिशु २०३.

पुट्ठा---पुट्ठ्यांतील मंडळी--१ कूटांतील माणसें; एकाच गटांतील लोक. २ बगलबच्चे; हाताखालचे लोक; खुशामती लोक.

*पुट्ठ्याला शेण चोपडून मला कोठीचा बैल म्हणा--नुकसान सोसून महत्त्वास चढण्याचा प्रयत्न करणें; पदरचें खर्चून मोठेपणा मिळविण्याचा प्रयत्न करणें; मोठेपणा मिळविण्याकरितां कमीपणाचें वाटेल तें करण्यास तयार होणें.

पुडा---पुडा घालप--(गो.) दाणे सुपांत घालून निवडण्याचा एक प्रकार.

पुंडाई---पुंडाई माजविणें--गोंधळ करणें; गडबड करणें; आरडा ओरड, दंगा वगैरे करणें; धिंगामस्ती करणें. 'कांहींतरी सभेंत पुंडाई माजविणें हें शहाण्याला शोभत नाहीं.'-टि ४.१३०.

पुडी---पुडी आणणें—बाहेर न फुटलेली बातमी आणणें; गुप्त संदेश आणणें.

पुडी फुटणें—बातमी बाहेर फुटणें; षट्कर्णी होणें; बोभाटा होणें.

पुडी फोडणें—बातमी बाहेर फोडणें; बोभाटा करणें; वार्ता पसरविणें.

पुडी येणें—सुतक येणें; गुंता येणें; एखाद्या आप्ताच्या मृत्यूची वार्ता समजणें.

पुडी सोडणें—गप्पा मारणें; खाकेंतील गप्प काढणें; पदरचें वाटेल तें सांगणें.

पुडीस जाणें-बोलावणें--संन्याशाच्या जेवणास पुडी म्हणतात. यावरून संन्याशानें जेवणास जाणें; त्यास जेवणाचें आमंत्रण देणें. 'वृद्ध संन्यासी हरणाच्या कातड्याचे जोडे पायांत घालून ओवळे न होतां पुडीस जातात.' -आगरकर.

*कुडीला पुडी (पाहिजे)—शरीरास अन्न हें आवश्यक आहे. कुडी तशी पुडी पहा.

पुढचा-ला; पुढील---**पुढचा पाय**—पुढाकार; तयारी; पडेल त्या कामाला तयार. 'सार्वजनिक कामांत त्याचा नेहमीं पुढचा पाय असतो,' म्हणजे सर्वांपेक्षां अगोदर सुरवात असते.

पुढच्या जोताचा—१ पुढच्या जुंवास जोडण्यास योग्य; म्होरक्या बैल. २ (ल.) चलाख; हुशार; तरतरीत. ३ पुढारी; सूत्रधार; मुखर.

पुढच्या पुढें—१ अगदीं समोर; उघडउघड; समोरासमोर. २ इतर सर्वांच्या पुढें; अग्रेसर; प्रथम.

पुढिला मरण येणें—पुढाऱ्यांवर आपत्ति येणें; ज्येष्ठ लोकांवर संकट येणें. 'कैसें वो तुमचें करण। जे पुढिलां एओ पाहे मरण।'–शिशु ८२०. तु०–मुखरस्तत्र हन्यते।

***पुढचा-ला मागच्यास बरा म्हणवितो**—१ एक जाऊन त्याजागीं दुसरा आला व तो पहिल्यापेक्षां वाईट वागूं लागला म्हणजे पहिलाच बरा वाटतो. २ गेला काळ बरा असें चालू स्थितीवरून वाटूं लागतें.

पुढच्यामुळें मागला शहाणा; पुढच्यास ठेंच मागचा शहाणा-सावध-हुशार; पुढच्यास ठेंच लागे, मागला जपून वागे—मागें पहा. आपल्या अगोदर होऊन गेलेल्या लोकांच्या अनुभवाचा फायदा आपण घेऊन शहाणपणानें वागतों. 'पुढच्याला ठेंच मागचा हुशार, एवढें ज्ञान त्यांस होईल यांत शंका नाहीं.'–शाब २.१७८. शाब. २.२४५. One man's fault is another man's lesson.

पुढलें जोत तसें फाटलें जोतः पुढल्या जोता भाषेन फाटलें जोत; पुढील जोत तसें मागील जोत—(गो.) पुढचें औत तसें पाठीमागचें. शेतांत एकामागून एक अशीं चार पांच औतें जोडतात; त्यांमध्यें पहिलें औत ज्या होऱ्यानें जाईल आणि जिथें वळेल त्याच प्रमाणें मागचीं औतें चालत असतात. वाडवडिलांचा कित्ता घेऊन वागणाऱ्या माणसाला उद्देशून म्हणतात.

पुढल्यान् एक फाटल्यान् एक—(गो.) आधीं एक बोलायचें, मग दुसरेंच बोलायचें. शब्दाचा ढिला माणूस.

पुढारी---**पुढारी बोकड, फजिती रोकड**--मूर्ख अग्रणी असला म्हणजे अनुयायांची फजिती होणार हें निश्चित असतें. म्होरक्याच जर अडाणी असेल तर अनुयायांचें हंसें होतें.

पुढें---**पुढेंपुढें करणें-नाचणें**—लुडबूड करणें; खुशामत करणें; थुंकी झेलणें.

पुढें दोर वळणें, मागें वाक होणें-पुढें दोरा वळीत जात असतां असतां मागचा पीळ सुटत असणें व वाक मोकळा होणें; पुढें काम करीत जाणें पण मागें त्यावर देखरेख नसल्यामुळें पूर्वस्थिति येणें.

पुढें पडणें—समोर तोंडाशीं असणें. (ल.) लोकांच्या दृष्टीस पडण्यासारख्या स्थितींत असणें, वागणें, राहणें; नेहमीं अग्रभागीं असणें.

पुढें पाऊल पडणें—प्रगति होणें; वैभव वाढत जाणें; पुढें गति होणें. 'तुमच्यासारख्याच्या मदतीवांचून आमचें एक पाऊल सुद्धां पुढें पडणार नाहीं.'–भयंकरदिव्य.

पुढें वाढून आलेलें खाणें—प्रारब्धकर्मानुसार आलेली स्थिति भोगणें, आलेल्या प्रसंगास तोंड देणें.

पुढें वाढून आलेल्या ताटाला लाथ मारणें—चांगल्या परिस्थितीला लाथाडणें; आलेली संधि गमावणें.

पुढें वाढून येणें-जाणें—१ वांट्यास येणें; नशीबीं असणें. २ चाल करणें; हल्ला करणें; सैन्यानें पुढें कूच करणें. 'इंग्रज पुढें वाढून येत नाहींत.' –पया १७६.

***पुढें कोण चाले तुळजाभवानी, मागें कोण चाले आई गैबिनी**—पुढें दिसावयास सोज्वळ पण मागाहून अभद्र.

पुढें घट्ट, मागें पोंचट—प्रथम दिसावयास कणखर पण प्रत्यक्ष कमकुवत. बाभळीचा कांटा. पहा.

पुढें चालला झपाटा, मागें उडतो फुपाटा—वरून दिसावयास रुबाबदार पण पाठीमागें बरींच लचांडें असलेला. वरवर दिसावयास चांगला पण आंतून खराब.

पुढें चाले घमंडी, मागें चाले वितंडी—सेवा धर्म किती गहन आहे हें यांत ध्वनित केलेलें आहे. मालकाच्या बरोबर चाललें तर मालकाला राग येतो. मालकाच्या मागें मागें जावें तरीहि पंचाईत नि पुढें चालावें तरी तीच गत, अशा परिस्थितींत असणें. तु०–आगे चले भानचोद, पीछे चले मादरचोद.

पुढें तर लंका लाण—(व.) लंका अथवा जाऊन पोंचावयाचें ठिकाण तर अजून लांबच आहे; अद्यापि कांहींच झालें नाहीं; पुढें पुष्कळ गोष्टी घडावयाच्या आहेत, पुष्कळ मजल मारणें आहे असा अर्थ. 'आजच तूं भावाला घराबाहेर काढून द्यायाला तयार झालास; पुढें तर लंका लाण आहे.'

पुढें तिखट, मागें आंबट—सर्वत्र सारखाच अप्रिय, नकोसा.

पुढें तिखट, मागें पोंचट—वरून दिसावयास किंवा आरंभीं मोठा दिमाख दाखविणारा पण मागाहून पहावें तों अगदींच नरम, दुर्बल वगैरे. कांटा पहा.

पुढें पाठ, मागें सपाट—पुढें वाचत जाणें पण मागचें विसरणें.

पुढें ब्रह्मा, मागें सावित्री—[ब्रह्मदेवाची बायको सावित्री] १ सडेसोट; ज्यास आगापिच्छा कांहीं नाहीं असा. २ नंगा; निर्लज्ज.

पुढें येणारे प्रसंग आपली छाया आधीं टाकतात—बहुधा आगामी संकटांचीं पूर्वचिन्हें प्रथम दिसत असतात. Coming events cast their shadows before them.

पुढें विनाई, मागें तुकाई—(व.) विनाई, तुकाई इत्यादि देवी आहेत; अपमान किंवा हयगय कोणाच्या हातून झाल्यास, त्यांचा कोप होण्याचा संभव असतो. दोन्ही बाजूंसहि संकटमय स्थिति; दोन संकटांत सांपडणें. एखाद्या जागेंत जिनसांची फारच गर्दी असली तर त्यांतून जातां येतां एखाद्या जिनसेला धक्का लागून नुकसान होण्याचा संभव फार. तसें असल्यास ही म्हण लावतात. तुकाईला पाय लागतां उपयोगी नाहीं किंवा विनाईला पाय लावतां उपयोगीं नाहीं.

पुणतांबें—पुणतांब्याच्या म्हशी आणि ढोणगांव साजरा—ढोणगांवाशेजारींच पुणतांब्याच्या हद्दींतील गुरें चरत असल्यानें कोणाला वाटेल कीं हीं गुरें ढोणगांवचींच आहेत. शेजाऱ्याच्या वैभवावर उड्या मारणें.

पुणें——पुणेंकर—पुण्याबाहेरचे कांहीं लोक पुण्यांतील लोकांना त्यांच्या चढेलपणाबद्दल व इतर कांहीं वर्तनांबद्दल नांवें ठेवतात; यामुळें 'पुणेकर' ही एक निंदाव्यंजक संज्ञाच बनली आहे.

पुणेरी आग्रह—वरकांती आग्रह; दिखाऊ प्रेम.

पुणेरी भाषा—नाटकी आवेशाची, दरबारी भाषा; शब्दावडंबर.

पुण्याचा भामटा—पुणें शहरचा अट्टल सोदा; ऐतिहासिक काळीं पुण्यांतील भामट्यांच्या चौर्यकुशलतेची ख्याति असे. त्याबद्दल बऱ्याच आख्यायिकाहि आहेत.

पुण्याचे पगडीवाले—विशेषतः कोकणस्थ.

***एक घर उणें तर दस घर पुणें**—एक पहा.

पुणें तेथें काय उणें—पुण्याच्या वैभवाची दर्शक म्हण.

पुण्याची पगडी, सर्वांस रगडी—पुण्याचे पगडी घालणारे लोक सर्वांवर मात करून वरचष्मा मिळवितात.

पुण्य——पुण्य खर्चणें—१ पुण्याई खर्चणें; स्वतःचें महत्त्व उपयोजणें. पुण्याई खर्चणें पहा. २ (उप.) वाईट कृत्य करणें.

पुण्याई उभी राहणें—दैव अनुकूल असणें. 'बाजीरावसाहेब यांची पुण्याई उभी राहिली. यांची राज्य करण्याची पुण्याई सरली.'—पेब १५७.

पुण्याई खर्चणें—आपलें सर्व सामर्थ्य, पत इ. खर्ची घालणें. आटोकाट शिकस्तीचा प्रयत्न करणें. 'तो ठराव पास होण्याकरितां केतकरांनीं सारी पुण्याई खर्चिली.'—के १६-४-३०.

पुण्याई देणें—दान करणें; पुण्याईचें पाणी सोडणें—१ आपण केलेल्या कर्मानें मिळालेली जी पुण्याई तींतच दुसऱ्यासहि हिस्सेदार करून घेणें; आपली पुण्याई दुसऱ्यास देणें. 'जर हरिश्चंद्र आपल्या सत्यापासून ढळला नाहीं तर मी माझी पुण्याई देऊन टाकीन.'

पुण्याई पणास लावणें—आपलें सर्व सामर्थ्य खर्च करून एखादी गोष्ट करूं पाहणें; पुण्य देण्याची शर्थ करणें.

पुण्याई संपणें—सर्व बाजूंनीं महत्त्व कमी होणें; सद्दी संपणें; श्रेष्ठपणा सत्ता, मान इ. कमी होणें.

पुण्याईवर पाणी ओतणें—वाडवडिलांनीं मिळवलेली पुण्याई आपल्या कृतीनें नष्ट करणें, धुळीस मिळविणें; वर्चस्व, श्रेष्ठत्व, महत्त्व गमावणें.

पुण्याच्या पारीं—पुण्यद्वारीं बसणें; पुण्याचा पार बांधणें—परोपकाराच्या, दानधर्माच्या कृत्यांत सदोदित गुंतलेलें असणें; पुण्यकृत्यें करणें.

*पुण्य करतां जोडे पाप—एखादी चांगली गोष्ट करावयास जावें तों उलट पातकच घडून येणें; वरून दिसावयास सत्कृत्यासारखी गोष्ट परिणामीं घातक ठरणें.

पुण्य करतां होय पाप, दूध पाजून पोसला साप—सापाला दूध पाजणें हें एक दिसावयास पुण्यकर्म असलें तरी त्याचा परिणाम पापकारक आहे. दुष्टाला पोसणें हें जीवदयेचें कृत्य असलें तरी परिणामीं समाजास घातक आहे. तु०—पयः पानं भुजंगानां केवलं विषवर्धनम्।

पुण्य म्हणून आचरीजे : पाप त्यांत निफजेः—(महानु.) पुण्य म्हणून करावयास जावें तों कधीं कधीं पाप करण्यासच आपण प्रवृत्त होतों.

पुण्याचा शेवट आणि पापाचा आरंभ—मनुष्याचें पुण्य संपलें म्हणजे त्याची पापाकडे प्रवृत्ति होऊं लागते. जोंपर्यंत सत्प्रवृत्ति असते तोंपर्यंत हातुन चांगल्या गोष्टी घडतात पण तीस उलट दिशा मिळाली म्हणजे असन्मार्गास लागलें कीं हातून पापकृत्यें होऊं लागतात.

पुण्याची प्राप्ति म्हणजे पापाचरणाची निवृत्ति—पुण्यकारक कृत्यें करूं लागलें कीं आपोआपच हातून पापकृत्यें होत नाहींत, एवढेंच नव्हे तर पूर्वी केलेल्या पातकांचेंहि क्षालन होतें.

पुण्याच्या उतरंडी, पापाची घावरगुंडी—अनेक पुण्यकृत्यें केल्यास पापाचा लवलेशहि रहात नाहीं.

पुण्यान्तीं स्वर्ग, पापान्तीं नरक—पुण्यवान लोक स्वर्गास व पापी लोक नरकास जातात. मनुष्याच्या सदसत्कृत्यांप्रमाणें त्यास गति मिळेल.

पुतळी—शेरभर सुतळी, तेराशें पुतळी—(पुतळी = शेणी, गोवरी) मेल्यानंतर जाळण्याकरितां माणसाला तेराशें शेणी व शेरभर सुतळी (तिरडी बांधण्याकरितां) पुरी होते, इतर कांहीं लागत नाहीं.

पुती—जाती तशी पुती, खाण तशी माती—जात पहा.

एकपुती रडती, दुपुती रडती, सातपुती रडती, निपुती रडती; एकपुती रडे, सातपुती रडे—एकपुती पहा.

पुत्र—पुत्र मागण्यास गेली, भ्रतार (नवरा) खोवून आली—नवरा पहा. ज्या भांडवलावर नफा उत्पन्न करावयाचा तेंच गमावून येणें असा भावार्थ. (हिं.) पूत मंगनेको गयी और पति खोके आयी.

पुत्र व्हावा ऐसा गुंडा। ज्याचा तिन्ही लोकीं झेंडा॥—असा पराक्रमी पुत्र व्हावा कीं ज्याची कीर्ति त्रिभुवनांत पसरून राहील.–तुगा.

पुत्रशोक आटला, बाळ स्वर्गीं भेटला—पुत्राचा शोक आमरण सुटत नाहीं.

न लागो पुत्राचा हात, पण लागो डोंबाची लाथ—डोंब पहा. मृत्युसमयीं पुत्र जवळ नसला तरी चालेल पण काशीस मरण यावें अशी हिंदुमात्राची इच्छा असते. काशीस मणिकर्णिका घाटावर प्रेतें जाळतात तीं अर्धवट जळल्यावर डोंब लाथेनें गंगेच्या पात्रांत उडवून देतो, असें म्हणतात. –गांगा २७९.

पुत्रादिच्छेत्पराजयम्।—आपला मुलगा इतका कर्तबगार निघावा कीं तो आपल्यापेक्षां कांकणभर सरस व्हावा. बापाला मुलगा आपल्या वरचढ झाला तर त्यांत वैषम्य बिलकूल वाटणार नाहीं. सबंध श्लोक—सर्वत्र जयमन्विच्छेत्पुत्रादिच्छेत्पराजयम्। वासुदेवं नमस्यन्ति वसुदेवं न ते जनाः॥

पुत्रें विनु संसारू : वृथा भूमीभारूः—(महानु.) मुलांबाळांखेरीज संसार हा व्यर्थ होय.

पुनः—पुनरपि जननं पुनरपि मरणं।—जन्ममरणाचा फेरा. १ या जगांतील उत्पत्ति व नाश यांचें चक्र. २ पुन्हां पुन्हां तीच गोष्ट करावी लागणें. 'पुनरपि जननं पुनरपि मरणं पुनरपि जननीजठरे शयनम्। इह संसारे खलु दुस्तारे कृपया पारे पाहि मुरारे। भजगोविंदम्॥'—शंकराचार्य, चर्पटपंजरीस्तोत्र.

पुनश्च हरिः ओम् (ॐ)—पुन्हां पठनास सुरुवात. कर्मलोपानंतर पुन्हां स्वाध्यायाला सुरुवात करतांना पूर्वीचे ऋषि, आचार्य याप्रमाणें म्हणत. यावरून पुन्हां कामास प्रारंभ. लो. टिळक दुसऱ्यानें तुरुंगांतून सुटून आल्यावर त्यांनीं संपादिलेल्या पहिल्या केसरींतील (ता. ४ जुलै १८९९) अग्रलेखाचा मथळा. 'उद्गारचिन्हांकित "पुनश्चहरिः ॐ" हीं अक्षरें पाहतांच सामान्य वाचकानेंहि तेव्हांच तर्क केला असता कीं, हे पहा टिळक फिरून केसरीचे संपादक झाले!'—टिळक चरित्र १·६६९.

पुनव——अंवस पहा.

पुनवेक जेवलो, अमासेक ढेंकलो—(गो.) पूर्णिमेला जेवला आणि अमावास्येला ढेकर दिली. दोन गोष्टींतल्या कार्यकारणभावाला बाध आला कीं म्हणतात.

पुनवेची अंवस व अंवसेची पुनव कधीं झाली आहे ?—अशक्य गोष्ट कधीं घडत नाहीं.

पुनयेचें चोर आणि उमाशेचें पोर—(गो.) पौर्णिमेला जन्मलेलें मूल चोर होतें व अमावस्येला जन्मलेलें पोरकें होतें असें म्हणतात.

पुरण--पुरणावरणाचें; पुरणावरणाचा स्वयंपाक--देव-धर्म, सणवार, पाहुणे, इ. आले असतां नेहमींपेक्षां होणारा चारी ठाव, मोठा स्वयंपाक.

***पुरणाची करंजी, कोण वर्जी**—चांगला पदार्थ कोण टाकून देईल, चांगली वस्तु सर्वांसच आवडते.

पुन्न पोळियो पोटाक बांधल्यो म्हूण भुक वता ?—(गो.) पुरणाच्या पोळ्या पोटावर बांधल्या म्हणून भूक शमेल का ? वस्तु केवळ जवळ असली तरी तिचा उपभोग घेण्याला मिळेपर्यंत मनाला समाधान लाभत नसतें.

पुरणें—पुरेपुरे करणें—पुरे ! आतां नको ! असें करून सोडणें. (ल.) त्रासवून सोडणें.

***पुरेना माझ्या घरीं, तेथें आले मागतेकरी**--मलाच पुरेना तेव्हां मागावयास आलेल्याला काय देणार. तु०–एकादशीच्या घरीं शिवरात्र.

पुरव——पुरवेस पडणें--पुरवठ्यास येणें; समाधान, तृप्ति होणें,

पुरवठा-पुरोठा--उरवठा पहा.

पुरवठ्यास पडणें--पुरणें; बेताचें होणें; अवश्य ती गरज भागणें.

***पुरवठा असेल तर पोरें व दौलत असेल तर दुनिया**--घरांत समृद्धि असेल तर मुलें होण्यापासून आनंद होतो. नाहींतर त्यांच्या पोषणाची विवंचना पाठीस लागते. तसेंच जवळ संपत्ति असेल तर या जगांत निभाव लागतो, नाहींतर हाल होतात; किंवा संपत्ति असेल तर सर्व जगांतील लोक आपल्या भोंवतीं जमतात.

पुरोठ्याला उरोठा--उरोठ्याला पुरोठा. उरवठा पहा. 'पुरोठ्याला उरोठा म्हणूनच कीं काय तिचा हेवादावा अन् दुष्टावा करायला रामजीच्या नव्या कारभारणीची मुलगी रामजीकडे कायमची येऊन राहिली होती.'–द. र. कवठेकर, नाद–निनाद.

पुरवणें---पुरवली भीठ भाकरी, पण दुसऱ्याची नको चाकरी—अगदीं साधें अन्न मिळालें तरी चालेल पण तें स्वतंत्रतेनें मिळावें, दुसऱ्याची सेवा करून मिळविण्याचा प्रसंग येऊं नये.

पुरा——पुरा करणें--१ पार पाडणें; पूर्ण करणें. २ शेवट करणें; संपविणें. ३ मारून नाहींसा करणें. 'वृषध्वजा विश्वपते पुरारे। केला नसे मन्मथ तां पुरा रे ॥'–सारुह ३·१२५.

पुरा जाणें--थकणें; दमणें.

पुरा होणें--ठार होणें; शेवट होणें; अखेर होणें. 'म्हाडीक लुमाजीराया पुढें पुरा झाला।'–ऐपो ८७.

पुरी ताजीम—उभें राहून दिलेला मोठा मान.

पुरी पडणें--१ पुरवणें. २ परवडणें.

पुराण—पुराण काढणें–चालविणें–मांडणें–लावणें-सोडणें–पुराण लांबलचक असून त्यांत गोष्टींत गोष्टीहि असतात, तेव्हां कोणाला चऱ्हाटासारखें वाटतें. यावरून कंटाळवाणी गोष्ट सांगणें; चऱ्हाट लावणें.

पुराण गाणें – रडगाणें गाणें.

***पुराणांतील वांगीं पुराणांत**--जेथील गोष्ट तेथेंच लागू पडते; एकच सिद्धान्त सर्वत्र लागू करून पाहूं नये. एक पुराणिक बुवा देवळांत पुराण सांगत असतां त्यांनीं वांगीं हीं निषिद्ध आहेत, तीं खाऊं नये असें सांगितलें. पुढें एके दिवशीं त्यांच्या श्रोत्यांपैकीं एकानें त्यांस घरीं जेवावयास बोलाविलें असतां इतर पदार्थ वाढले पण भरलीं वांगीं केलीं होतीं तीं वाढलीं नाहींत. पण त्यांचा स्वाद वासानें त्यांस जाणवला तेव्हां पुराणिकबुवांनीं भरलीं वांगीं मागितलीं. तेव्हां यजमानानें त्यांस विचारलें कीं, आपण तर वांगीं निषिद्ध आहेत म्हणून त्या दिवशीं सांगितलें, मग आपणांस वांगीं कशीं वाढावीं. तेव्हां पुराणिकबुवानीं उत्तर दिलें कीं, अहो ! पुराणांतील वांगीं निषिद्ध

तीं पुराणांत राहिलीं, व्यवहारांत त्याचें काय?-शाव १·४२;२·१९८. (गु.) पोथीमांनां रींगणां.

पुराणांतलीं वायूंगीं शाके उपकर पण्णात्—(गो.) पुराणांतलीं वांगीं भाजीला उपयोगी पडत नाहींत. वैभव हवें असेल तर स्वतः अविश्रांत श्रम केले पाहिजेत. नुसते आमचे पूर्वज असे होते आणि तसे होते, असे इतिहासाचे दाखले देऊन भागणार नाहीं.

पुराण-णें--पुराणमित्येव न साधु सर्वम्।—जुनें तें सर्व चांगलें असतें असें नाहीं. सर्व श्लोक-पुराणमित्येव न साधु सर्वं। न चापि काव्यं नवमित्यवद्यम्। सन्तः परीक्ष्यान्यतरद्भजन्ते मूढः परप्रत्ययनेयबुद्धिः॥ -कालिदास, सुर १७४. ८९३. Antiquity is not always a mark of verity.

पुराणिक--पुराणिकानें पुराण सांगावें आणि घरीं जाऊन मद्य प्यावें—कोरडा उपदेश करून त्याच्या उलट वागणूक करणें. वरून साधुत्वाचा आव आणून आंतून निंद्यकर्म करणें. पुराणांतलीं वांगीं पहा.

पुरावा--पुरावा दाखविणें—आधार, प्रमाण दाखविणें; सिद्ध करणें.

पुरुष--पुरुष कळसूत्री आणि बायका पाताळयंत्री--पुरुष हे वाटेल तसे चाळे करणारे व बायका या फार खोल कारस्थानी अशा प्रकारची जेथें स्थिति तेथें योजतात.

पुरुष जेतूल जेतूला प्रयत्न करी : देव तेतूल तेतूला साहाय्य करीः—(महानु.) जेवढा जेवढा प्रयत्न माणूस करील तेवढें तेवढें ईश्वरीसाहाय्य त्याला मिळत असतें. प्रयत्नांतीं परमेश्वर.

पुरुष पळे ते लाठा : विरमला तो विरळाः—(महानु.) पुढें पळणारा पुरुष हा नशीब काढतो; जो थांबतो, निष्क्रिय होतो तो संपला म्हणून समजावें. माणसानें प्रगति करीत असलें पाहिजे.

पुरुष प्रयत्नी, देवाचें साहाय्य—(महानु.) वरील प्रमाणेंच.

पुरुषभर उदकां वचून सुकी काष्टी दाखवप—(गो.) पुरुषभर पाण्यांत जाऊन लंगोटी कोरडी दाखवणें. वास्तविक ही गोष्ट शक्य नाहीं. पण कुळवाडी वगैरे लोक नदींतून उतरून जायला लागले कीं जसजसें पाणी जास्त होईल तसतशी आपली लंगोटी वर सरकवूं लागतात. आणि त्यामुळें गळ्यापर्यंत पाण्यांतून जरी ते पलीकडे गेले तरी त्यांची लंगोटी कोरडी ती कोरडीच. कांहीं दुर्दैवी माणसें अशीं असतात कीं, जिथें संपत्तीचा ओघ वहातो अशा ठिकाणीं जरी तीं गेलीं तरी त्यांच्या हाताला कांहीं लागत नाहीं. अशांना उद्देशून म्हणतात.

पुरुष ही परमेश्वराची कीर्ति तर स्त्री ही परमेश्वराची प्रत्यक्ष मूर्ति आहे—[-राम गणेश गडकरी] दया, करुणा, वात्सल्य, प्रेमआदिकरून परमेश्वराचे कोमल गुण स्त्रियांत आहेत आणि धैर्य, शौर्य, धाडसआदिकरून इतर कठोर गुण फक्त पुरुषांतच आहे.-विविध वृत्त २९-१०-३९.

पुरुषांचा डोळा आणि स्त्रियांचा चाळा—या गोष्टी कधीं स्थिर नसतात. चाळा पहा.

पुरुषाचें नशीब पातेऱ्यांत—नशीबवान् पुरुषानें पालापाचोळा जरी इकडचा तिकडे केला तरी त्याच्या हातीं मोतीमाणकें लागतील.-पर्वते, मी घेतलेल्या मुलाखती, पान ६१. तु०- स्त्रियश्चरित्रं पुरुषस्य भाग्यं देवो न जानाति कुतो मनुष्यः।

पुरुषाचें पीठ आणि बायकोचें मीठ मिळून भाकर होते--स्त्रीपुरुष हीं एकमेकास पूरक आहेत; त्यांचा योग्य मिलाफ झाला असतां त्यांस सुख होतें. पीठ पहा.

पुरुषांच्या कष्टाचें खावें पण दृष्टीचें खाऊं नये—पुरुषाकरितां श्रम करून त्यानें मिळविलेलें धन घ्यावें पण केवळ त्याला दृष्टिसुख देऊन म्हणजे त्यानें कामुकतेनें दिलेलें धन घेऊं नये.

पुरुषाला पत आणि स्त्रीला पति--पुरुषाला ज्याप्रमाणें त्याची अब्रू ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट असते त्याप्रमाणें स्त्रीला पतीचें महत्त्व असतें.

पुरुषाला परमा, लांकडाला बरमा--[बरमा=भोंक पाडण्याचे गिरमिट] ज्याप्रमाणें पुरुषास परम्याची व्याधि जडली असतां तो पोखरून निघतो त्याप्रमाणें लांकडास बरमा हत्यारानें भोंकें पाडतां येतात. कांहीं ठिकाणीं 'बरमा' बद्दल 'गरमा' असा पाठभेद सांपडतो; पण तो त्याज्य वाटतो.

पुर्तुगाल---पुर्तुगालें खापुलें--[गो.] गौरवर्णीय फिरंग्यांना चिडविण्यासाठीं त्यांना निग्रो म्हणण्यांत येतें. ही एक अपमानकारच म्हण आहे.

पुष्कर---पुष्कर पत्र तोय तरल--कमळाच्या पानावरच्या पाण्याप्रमाणें क्षणभंगुर. तु०--नलिनीदलगत-जलमतितरलं ।

पुष्प---पुष्प ठेवणें--नावें ठेवणें; दोष काढणें; शंका काढणें.

पुष्प वर्षाव--वृष्टि--(उप.) शिवीगाळ; अपशब्द. 'महाराजांची जांवई व शालकमंडळी राहिली त्यांच्यावर पुष्पवृष्टि पडत असते'--विक्षिप्त ६५.

(वर) पुष्पांजलि करणें-देणें--लाखोली वाहणें; अपशब्द बोलणें.

पुष्पासंगें दोरा--सुईमागें दोरा याप्रमाणें. गाड्याबरोबर नळा. "वीर सावरकरासाठीं आणलेले पुष्पहार 'पुष्पासंगें दोरा' या न्यायानें त्यांच्याबरोबर असलेल्या श्री. नथुराम गोडसे यांच्या गळ्यांत दर स्टेशनवर पडत." --विविध वृत्त ४.१-४२.

पुसणें--- पुसता आकार सोय नसणें--(नापसंती दर्शवितांना योजितात) विचारणें शक्य नसणें.

पुसतां पुसतां लंकेस जाणें--वाट विचारीत विचारीत कोठेंहि प्रवास करतां येतो.

***पुसून चोळून रूप व मारून मुटकून प्रेम (येत नाहीं)**--मूळचें अंग गोरें नसलें तर कितीहि धुतलें तरी गोरें होत नाहीं; त्याप्रमाणें मूळचें प्रेम नसलें तर तें वरकरणी उपचारांनीं जडत नाहीं.

पुस्त---पुस्त दर पुस्त--पिढ्यान् पिढ्या; वंशपरंपरागत. 'तुमचें पुस्त दर पुस्त इनाम अनुभवून सरकार लक्ष्यांत चालत जावें'--समारो १. २९१.

पुस्तगारी-पुस्तपना-पुस्तपन्हा-पुस्तपन्हाई करणें-देणें-ठेवणें--मदत, टेका, आश्रय देणें इ. 'चोंडजी लवंडे तुम्हांस लिहून पाठवितील त्याप्रमाणें पुस्तपन्हां करणें'--दु. बाजीराव ७५.

पुस्तक---पुस्तकांवरून ओढणें--वरवर वाचन, अर्धवट ज्ञान असणें.

पराधीन जिणें, पुस्तकी विद्या--परस्वाधीन पहा. (गु.) पोथां ते थोथां, ने पाठे ते साथे.

***पुस्तकी विद्या आणि बांधलेली शिदोरी**--हीं पुरीं पडत नाहींत, तीं संपून जातात. स्वतःचेंच, स्वतःजवळ ज्ञान व अन्न लागतें.

पुस्ती---पुस्ती जोडणें--१ जोड देणें; ठिगळ जोडणें. २ भर घालणें; वाढविणें.

पुळण---पुळणास येणें--पुवळणें; पू होणें; सडणें.

पुळी---पुळीचें फांपर करणें--राईचा पर्वत करणें. कांड्याचा नायटा पहा.

पूजा---पूजाअर्चा-आरती--(उप.) शिवीगाळ; अपमान; अपशब्द. 'सासरे मंडळींची पूजाअर्चा चालूच आहे.'--विक्षिप्त १.६५. 'लोंढ्याची पूजाआर्ती महाराजांनीं केल्यामुळें ते छावणींत जाऊन राहिले.'--विक्षिप्त १.३३.

पूजा करणें-घालणें--(उप.) १ बडविणें; चोप देणें; ठोकणें; मारणें. २ खरडपट्टी काढणें; ताशेरा झाडणें. 'आज जितकी पूजा कराल तितकी सर्व निमूटपणें मान्य करणें मला भाग आहे!'--शिसं ४.२.

पूजा देणें--(व.) मारणें; ठोकणें; बडविणें; कांडात काढणें.

पूजा बांधणें--१ देवास सजविणें; निरनिराळ्या पदार्थांनीं, वस्त्रें, अलंकार, पुष्पं वगैरेनीं देवाच्या मूर्तीस वगैरे नटविणें. 'जैसीं रेवांता धूर्जेठी । पुजा बांधितुसे ।'--शिशु १००९. २ (उप.) मारणें; पिटणें; ठोकणें; बडविणें; खोड मोडणें.

***चांभाराच्या देवाला खेटराची पूजा**--चांभार पहा.

पूजेक गेलल्याच्या मात्यारि देवळ पलें--(गो.) पूजा करायला गेलेल्याच्या डोक्यावर देऊळच कोसळून पडलें. ज्याच्यावर उपकार करायला जावें तोच माणूस एखादे वेळीं आपल्यावर उलटतो.

पुजेचा कंटाळा, हातीं सोंगट्यांचा चाळा--चाळा पहा.

पूज्य--(विद्या,ज्ञानसंध्या इ.वर). **पूज्य पडणें**--शून्यास कांहीं किंमत नसते, शून्य हें अभाव दाखवितें.

यावरून बंद होणें; बाजूस सारणें; नाहींसें होणें; त्याबद्दल बेफिकीर असणें.-मोकर्ण ४२.४४.

(विद्या, पैसा इत्यादीच्या) **नांवानें पूज्य**--पूर्ण अभाव; नकार.

पुट--पुट करणें-घेणें--पिकाचा अजमास करून विकत घेणें.

पुट देणें--पुढें येणारें पीक विकणें.

पुड--पुड फुटणें-बाहेर येणें--रहस्य फुटणें. पुडी पहा.

पुड फोडणें--रहस्य प्रकट करणें.

पुत--बाबा पुता करणें--समजूत घालणें; गोंजारणें; लाड करणें. 'शेवटीं लातूरबाईनें बाबा पुता करून गोंजारून त्याचें सांत्वन केलें.'-पाव्ह ८३.

***पुत मागूंक यात्रेक गेलो, बाईल विसरनु घरीं आयलो**--(गो.) पुत्र मागण्यासाठीं यात्रेला गेला आणि बायकोला तिथेंच विसरून आला. पुत पहा.

पुता हातीं व्यवहार बाप कष्टी जाय, नी सुने हातीं संसार सासू फटके खाय--(कों.) मुलगा आणि सून यांच्याकडे संसार गेल्यानंतर बाप-आई यांच्या मनाप्रमाणें घडत नाहीं व ते दुःखी राहातात.

पुताक आयली सोयरीक, बापसूक जालि होरडीक--(गो.) मुलाला मुलगी सांगून आली आणि बापाला मोठें थोरपण वाटलें. सून येणार ही कल्पना आईइतकी नसली तरी बापालासुद्धां थोडीशी हर्षप्रद होतेच.

पूतना--पूतना मावशी--पूतना ही एक मायावी राक्षसी असून ती सुंदर स्त्रीचा वेष घेऊन कृष्णाला विषयुक्त स्तनपान करून ठार मारण्याच्या उद्देशानें गोकुळांत आली होती. मी तुझी मावशी आहे असें सांगून स्तनपान देऊं लागली. तीस कृष्णानें शोषून मारली. यावरून दिसावयास सुंदर, विनयशील पण अंतर्यामीं दुष्ट अशी स्त्री.

पूर--मुंगीस मुताचा पूर--मुंगी पहा.

पूर्व--पूर्वेचा सूर्य पश्चिमेस उगवणें--अशक्य गोष्ट घडणें; ज्या गोष्टीवर कधीं विश्वास बसणार नाहीं अशी गोष्ट होणें, सांगणें.

***राजा करील ती पूर्व (दिशा)**--राजाची सत्ता अप्रतिबद्ध असते त्यामुळें त्याच्या शब्दाला सर्व लोक मान तुकवितात. मग त्यानें एखादी अशक्य गोष्ट सांगितली अगर भलतेंच विधान केलें तरी तें सत्य मानून चालतात किंवा तो आपल्या अधिकारानें लोकांस तसें मानण्यास भाग पाडतो. तु०--राजा कालस्य कारणम्।

आपण म्हणूं ती पूर्व दिशा--स्वतःचें मत आज्ञाप्रमाण असें वागणें; आपल्याला वाटेल तें करणें, करविणें. 'त्यांच्या (बाजीरावाच्या) अंगीं थोडें अधिक धैर्य असतें, तर ते महत्वाकांक्षी होऊन आपण म्हणूं ती पूर्व दिशा असें करते.'-एल्फिन्स्टन चरित्र १·१६२.

सांगाल ती पूर्व दिशा--आज्ञाप्रमाण; सर्वस्वीं दुसऱ्याच्या शब्दाप्रमाणें वागणें, चालणें, मान्य करणें; पूर्णपणें अधीन असणें. तु०-बैल गाभणा०.

पूर्व--पूर्वपदावर येणें--मध्यंतरीं केलेले श्रम फुकट जाऊन पुन्हा जागच्याजागीं येणें; प्रथमपासून आरंभ करणें. तु०-पाढे पढो पंचावन. हरदासाची कथा मूळपदावर येणें.

पूर्वांग पुरवतें, उत्तरांग पुरवत नाहीं--एखाद्या गोष्टीचा आरंभ मोठा आनंददायक असतो पण शेवट कठीण असतो; करावयास सोपें पण निरतरावयास कठीण. तु०- आगमे सुखमाप्नोति निर्गमे प्राणसंकटम्।

पूर्वज--पूर्वजांला तीन तिरखे उणे न पडणें--(व). [तिरखे=शष्प.] पितराचें कांहींहि नुकसान न होणें बापाचें कांहीं उणें न पडणें असा अर्थ. 'अनाथालयाला दहा रुपये दिले तर काय तुमच्या पूर्वजांला तीन तिरखे ऊणे होतील ?'

पूर्वजन्म--पूर्वजन्मीं शंकराला पूजला असेल तसा मिळाला--कन्येला किंवा स्त्रीला पति कोणत्या प्रकारचा मिळावयाचा ही गोष्ट परमेश्वराधीन असते किंवा तिच्या पूर्वार्जितास अनुसरुन घडत असते.-गांगा.

पूर्वींच्या जन्मा रूण, या जन्मांत दिवंचें परतून--(गो.) पूर्वजन्मीचें ऋण या जन्मीं फेडावें लागतें.

पूर्वा--पूर्वा पोळा, उत्तरा जोंधळा--पूर्वा नक्षत्रांत पोळ्याचा सण पडतो म्हणजे शेतीचीं कामें संपतात व उत्तरा नक्षत्रांत जोंधळ्याचें पीक तयार होतें.

पूर्वाषाढा——पूर्वाषाढा सुरू होणें- श्रीमंयास रेच होणें.

पुल———पुलाखालून पुष्कळ पाणी वाहून गेलें आहे—(इंग्रजी म्हणीचा अनुवाद) बऱ्याचशा गोष्टी होऊन गेल्या आहेत, पुष्कळ दिवस लोटले आहेत. Much water has since flown under the bridge. तु०–बरेच पावसाळे होऊन गेले आहेत.–केळकर, कावळा आणि ढापी, पान ८८.

पुस—पूस घेणें; पुसी करणें; पुस गवस करणें——चौकशी, शोध करणें; विचारणें; प्रश्न करणें. ' ऋषीनें मग प्रसन्नमनें करुनिया तिजला पुसी केली ।'–होला ४८.

पुस—पुस आणि करी हुस्स—पौष महिन्यांत थंडी फार असते त्यामुळें मनुष्य शुकार करीत असतो. पुढें पहा.

पुस आणि थंडीनें पाडिला भूस—वरीलप्रमाणेंच; पौष महिन्यांत थंडीनें शरीर जर्जर केलें जातें.

पुस करी हुस, माही येई लाहू, शिमगा म्हणे हळूच जाऊं—पौष महिन्यांत थंडी फार पडते त्यामुळें मनुष्य शुः शुः करूं लागतो. माघ महिन्यांत दिवस कधीं जातील असें होऊन जातें किंवा धान्य पिकून लाभ होतो, व शिमग्याच्या महिन्यांत सणामुळें दिवस केव्हांच निघून जातात.

पुसा आणि थंडी दिवसां; पुसा, थंडी वाजे दिसां—पौष महिन्यांत थंडी दिवसास सुद्धां अधिक भासते.–पाणकळा ८०.

पृथ्वी——पृथ्वी उलथीपालथी करणें—देशभर शोध करणें; त्रिखंड शोधणें.

पृथ्वीच्या मोलाचा—बहुमोल; बिनमोल; अवाढव्य किंमतीचा.–' मन शुद्ध तुझें, गोष्ट आहे पृथिवी मोलाची ।' कुंकू बोलपट.

स्वर्गातल्या देवाची तुटली दोरी, पृथ्वीवरील देव बोंबल्या मारी—जेथें स्वर्गातल्या देवाला कोणी विचारीत नाहीं तेथें पृथ्वीवरच्या देवाला कोण विचारणार? जो मनुष्य परमेश्वराची देखील पर्वा कधींहि करीत नाहीं तो एखादा मनुष्य कितीहि मोठा झाला म्हणून त्याची थोडीच पर्वा करणार आहे.

पेकाट——पेकाट मोडणें— कंबरेंत मार देणें. (मारून) कंबर ढिली करणें; यथेच्छ मारणें; हलतां येत नाहींसें करणें.

पेंगट———पेंगटभर उदकांत बुडून सुकी काष्टी—(गो.) कमरभर पाण्यांत जाऊन सुद्धां कटीवस्त्र कोरडेंच. कांहीं माणसें निरनिराळ्या प्रकारांनीं खजाळी करतात, पण करतांना स्वतः नामानिराळे राहून सुरक्षित राहातात त्यांना वरील म्हण चांगलीच लागू आहे; समुद्रांत राहून कोरडा; पाण्यांत जाऊन कोरडाच. पुरुंभर उदका० पहा.

पेंगणें——पेंगतें मांजर उंदीर धरीत नाहीं——आळशी किंवा झोंपाळू माणसाच्या हातून कांहीं होत नाहीं.

पेंच–पेंच बसणें—(ऐति.) नुकसान पोंचणें; संकट ओढवणें. दौलत पहा. ' फितुरकी दंगा केल्यानें दौलतीसच पेंच बसावयाचा.'–पया १६८.

पेंचांत घालणें——संकटांत, अडचणींत लोटणें; एखाद्यावर आपत्ति आणणें.

पेंचांत धरणें—कचाटींत पकडणें; चांगला अडचणींत घालणें; सुटून जातां येणार नाहीं असें पकडणें,

पेज——पेज मारप—(गो.) गोमंतांकांत सकाळीं खातात यावरून. पेज जेवणें.

***पेज हानि जाल्यारि आंबलेक घासु**——(गो.) पेज कढत आणि आंब्लीवर फुंकर; रोग एकाला आणि औषध दुसऱ्याला.

पेजेक आनी लजेक पडाना——(गो.) लाज धरल्यावर पेज कशी मिळणार.

पेजेबु गत नाशिल्लो शिताक रडा—(गो.)कांजी न मिळणाऱ्या माणसानें भाताची कां अपेक्षा करावी. आपल्या आटोक्यांत नसलेल्या गोष्टी मिळत नाहींत म्हणून रडण्यांत काय अर्थ आहे.

पेट——पेट घेणें——(व.) एखाद्या गोष्टीची माहिती किंवा तपास घेणें.

पेट——पेटके वास्ते—(हिं.) पोटासाठीं; पोटाला अन्न मिळावें म्हणून. 'कमाल०:–पेटके वास्ते जनाब! पेटके वास्ते !'–शिसं ३·३.

पेट भरना भीकसे, चलना अपने टेकसे—(हिं.) भीक मागून पोट भरावयाचें व आढ्यता मिरवावयाची; खावयासहि जवळ नसतां पोकळ ऐट करणें.

पेटमें पडा चारा, कुदने लगा विचारा—(हिं.) पोट भरल्याबरोबर उड्या मारूं लागणारा; आपलें काम झाल्याबरोबर फुशारकी मारणारा, बेपर्वा होणारा.

पेटमें पडी रोटिया, तो सुझे कलाम मोटिया—(हिं.) पोटांत अन्न गेल्यावर बोलणीं सुचतात; जवळ पैसा असल्यावर मोठ्या गोष्टी सुचतात.

घासिया घोडा, पेटिया चाकर (काय कामाचा)—ज्या प्रमाणें गवत घातल्यास घोडा काम देतो त्याप्रमाणें पोट भरल्यावर चाकर काम करतो. पण असा भाडोत्री माणूस उपयोगी नाहीं.

पेटी——पेटींत सव्वामण दागिने आणि अंगावर गुंजभर सोनें—जवळ पुष्कळ संपत्ति असून तिचा उपभोग न घेणारा.

पेठ——पेठ नसावी हो !—बाहेर कोठें फुटूं देऊं नका; षट्कर्णी नसावें; गुप्त गोष्ट बाजारांत येऊं नये.

पेठ लागणें—बातमी फुटणें; बभ्रा होणें.

पेड——पेडं फुंडक, हलुयाचं सुंडकं—(व.) कमर बारीक व डोकें मोठें अशा ओबडधोबड माणसाला म्हणतात.

पेंड——(मागें) पेंड लागणें-लावणें—लिगाड लचांड लावणें, लागणें.

पेंडीचा खडा—जेव्हां तमाशा करणाऱ्या संचांतील नाच्या पोऱ्या सुंदर नसेल तेव्हां प्रेक्षकांचें लक्ष्य वेधण्यासाठीं एक खूबसुरत पोऱ्या त्या संचांत नुसताच उभा करीत असत त्यास म्हणत; खूबसुरत मनुष्य.

पेंडीचा खडा देणें-दाखविणें—आमिष दाखविणें; आतां मिळेल, घटकेनें मिळेल असें त्यास भासविणें; मधाचें बोट लावणें.

पेंडीचे गुरूं—१ पेंडीवर पोसलेलें जनावर. २ लांचखाऊ.

पेढा——पेढे चारणें—(ऐति.) फसविणें; हातावर तुरी देणें.

पेढे वाटणें-देणें—एखादें मोठें आनंददायक काम झाल्याबद्दल आप्तेष्टांना पेढे वाटणें.

पेढ्याचें खाणें—(सांकेतिक), बोडकीशीं रतिक्रीडा. २ भिन्न आयांचीं शेजारीं कामें, म्हण पहा.

पेढ्याचें खाणें, बोडकीचें मैथून—पेढे खातांना ज्याप्रमाणें आवाज होत नाहीं त्याप्रमाणें विधवेच्या बांगड्या वगैरे वाजत नाहींत. गुपचूपपणें पार पाडतां येण्यासारखी गोष्ट.

पेंढी——जळत्यांत पेंढी टाकणें—कलहास उत्तेजन देणें. तु०—आगींत तेल ओतणें.

पेंढी वळणीला लावणें—(व.) गवती घर शाकारण्याचें काम वळचणीला गवताच्या पेंढ्या लावल्यानें समाप्त होतें, यावरून कोणतेंहि काम अखेर निकालाला लावणें 'आम्हाला कशी तरी पेंढी वळणीला लावणें भाग आहे मध्यें टाकतां येत नाहीं.'

पेंढी वाही लावणें—(महानु.) (कृतत्वास लावणें) सार्थकीं लावणें.

पेण——पेण पोंचविणें—१ लोण पोचविणें; पुढें चालता करणें; पेणाला पोंचविणें पहा. रानटी लोकांच्या टोळ्या गांवोगांव फिरत असतात; अशा टोळ्या गांवांत वस्ती करून राहिल्यास त्यांच्या बंदोबस्ताकरितां गांवकऱ्यांकडून एक शिपाई नेमला जातो. या टोळ्या दुसऱ्या गांवांस जातांना शिपाई त्यांचेबरोबर दुसऱ्या गांवापर्यंत जाऊन तेथील गांवकऱ्यांचे ताब्यांत त्यांना देऊन लेखी लिहून घेऊन परत आपल्या गांवीं येतो या गोष्टीस म्हणतात.

पेणाला-पेण्यास पोंचविणें—मजलीस पोंचविणें; मुक्कामास नेऊन पोंचविणें; तड लावणें; निकाल लावणें.

पेन्ना—पेन्नयांच्यो लागो झुझाक उपकार पडनात—(गो.) डोंबाऱ्यांच्या कोलांट्या उड्या लढाईला उपयोगीं पडत नाहींत.

पेर——पेर तसें फळ—जसें पेरावें तसें फळ घ्यावें. द्यावें तसें घ्यावें; श्रम केले तरच फायदा. Reap as you sow.

पेर—पेर नासिल्ली नळी—(गो.) पेर नसलेली नळी; पेर नसलेल्या बांबूच्या नळींत पाणी घातलें तर दोहों बाजूंनें तें गळून जायचें, पेर असलें तरच तें आंत राहूं शकेल. ज्या माणसांच्या मनांत अखादें गुह्य राहूं शकत नाहीं व जीं तें बडबडत सुटतात त्यांना उद्देशून म्हणतात.

पेरणी—पेराणि नासालि लुवाणि खंयाचि— (गो.) पेरणी नाहीं तर कापणी कुठली ?

पेरणें—पेरा किंवा पेरूं नका पण मुईभाडें दिलें पाहिजे.—आपण दुसऱ्याची वस्तु घेतली म्हणजे तिचा उपभोग घेतला किंवा नाहीं घेतला तरी त्यास मोबदला हा दिलाच पाहिजे.

पेरलेलें उगवतें; जसें पेरावें तसें उगवतें— पेर पहा.

पेरी कडू मिरें, मागे अमृत फळें—वाईट कृत्यापासून चांगलीं फळें मिळण्याची अपेक्षा करणें.

पेला—पेला लागे ओठा, पण दैव मारी सोटा— आतां पिण्यासाठीं पेला ओठाला लावणार तोंच कोणी त्यावर सोटा मारल्यानें किंवा कांहीं अनपेक्षित घडून आल्यानें तो खालीं पडणें; म्हणजे परिपूर्तीची, सिद्धीची वेळ आली असतांहि मध्यें कांहीं विघ्न उपस्थित होणें; एखादी वस्तु हातीं पडल्याखेरीज किंवा गोष्ट घडल्याखेरीज ती मिळाली, घडली असें म्हणूं नये. There is many a slip between the cup and the lip याचा अनुवाद.

पेव--पेव फुटणें-उघडणें—ज्याप्रमाणें धान्याचें पेव फुटलें असतां त्यांतून एकसारखें दाणे बाहेर येऊं लागतात त्याप्रमाणें भराभर बाहेर पडणें; अनेक दिसूं लागणें; गर्दी होणें.

पेव भरणें--चातुर्मासांत देवापुढें दोन खळगे खणून त्यांत तांदूळ व दाणे घालून रोज उदक सोडणें.

पेवांत पडणें--ज्याप्रमाणें मनुष्य पेवांत पडल्यास त्यास आंतून बाहेर पडणें मुष्कील होतें त्याप्रमाणें एखाद्या अभेद्य अडचणींत सांपडणें; संकटांत पडणें.

दगडाचें पेव, घालतां खळखळ, काढतां खळखळ—दगड पहा.

पेश--पेशकदमी--१ प्रगति; पुढें चाल.'दिवसेंदिवस त्याचे फौजेची पेशकदमी आहे'–रा. ६.४३७. २ पहिली हालचाल; प्राथमिक कार्य. 'जितका मुलुख आपलें काबूंत येईल तितका पुर्तेपणें बंदोबस्त करून मग पुढें पेशकदमी करणें ठीक आहे'–दिमरा १.१८०. ३ आगळीक; प्रथमचें शत्रुत्व; शत्रुत्वाचें कृत्य. 'आम्हांकडून अंतर नसतां तिकडून पेशकदमी झाली तेव्हां इकडून पेशकदमीची तर्तूद करणें प्राप्त झालें'–ख ८.४०२८.

पेश—पेश करणें–पुढें ठेवणें; रुजु करणें; समक्ष मांडणें. 'बंदगीस पेश केली'–इमं. ६५.

पेशवे—-पेशव्याचा पेशवा—ज्याप्रमाणें पेशवे हे सातारकरांचे सर्वाधिकारी त्याप्रमाणें पेशव्यांचे सर्वाधिकारी नाना फडणीस. या नांवाचें एक नाटकहि आहे.

पेहली-—पेहली पुजा देवनि करवी--(गु.) प्रथम देवाला; पहिलें दान गजानना. पहिला पहा.

पै-—पै दर पै--प्रत्येक क्षणास; प्रत्येक वेळीं; लागलींच; सविस्तर. 'तुमचा मुलूक जवळ नाहीं कीं, हे हकीकत पै दर पै तुम्हांस पोहचवावी'–ऐ टि. भा १ ले. ३९.

***पयेन जोडचें, रुपयांनीं खरचुवचें**—(गो.) पै पै करून जोडावें आणि रुपयांनीं खर्च करावें. रुपयेच्या रुपये खर्च करायला हरकत नाहीं. पण पै पैनें जमवण्याचें चातुर्य आणि चिकाटी हे गुण अवश्य असावे.

पैचा घेतला गूळ, वर घातलें पाणी, देव केला, धर्म केला, घर पोरा ! मार बचक, गूळच गूळ !— चिकणमामांच्या औदार्याची बढाई. 'अडक्याचें तेल आणलें०' अडका पहा.

पैची जखम त्याला पंधरा आण्याची मलमपट्टी--अल्प कार्यास बेसुमार खर्च. तु०–अडक्याची भवानी नि सापिक्याचा शेंदूर.

पैची म्हातारी दोन पैचीं-टक्क्याचीं कांकणें-- वरप्रमाणेंच.

पै-पैची काळजी घेतली म्हणजे रुपयांकडे पहावयाला नको--पैपासून पैसा वांचवीत गेलें, पैचीहि काटकसर करावयाची, व्यर्थ उधळपट्टी होऊं द्यावयाची नाहीं असा निश्चय केला म्हणजे हळू हळू रुपये जमत जातात. रुपये वांचवावयास श्रम पडत नाहींत. ही पुढील इंग्रजी म्हणीवरून आली आहे. Take care of the pence and the Pounds will take care of themselves.

पैका--पैसा पहा.

पैक्या पासरी--(प्र.) पैशापासरी. पैशाला पासरी या भावानें; कमी किंमतीनें (विकणें); अतिशय स्वस्त; स्वंग सौदा; भरपूर; मुबलक.

पैका गेला, अडका गेला, नाक घांसण्याचा प्रसंग आला--जवळचें सर्व जाऊन पुन्हां मानहानीचा प्रसंग येणें; सर्वस्व गमावून नाकदुऱ्या काढण्याची वेळ येणें.

पैका तुटला, व्यवहार खुंटला--जवळचें द्रव्य संपलें म्हणजे सर्व गोष्टी अडतात. जोंवर पैसा असेल तोंवर सर्व सुरळीत चालतें. तो संपला कीं सर्व आटपलें.

जवळ नाहीं पैका, बाजार लागे फिका--(महानु.) पैशाशिवाय बाजार करणार काय? व बाजार करण्यास मौज वाटणार कशी?

पैज--पैज मारणें--पण भोगणें; प्रतिज्ञा करणें.

पैजेचा विडा उचलणें-उचलून देणें--एखादें अगदीं अवघड काम, मोहीम इ. करण्यास कोण पुढें येतो हें पहाण्यासाठीं दरबारांत ताटांत त्याबद्दल विडा मांडीत व जो तो उचलील त्यानें तें काम जिवाच्या मोलें पार पाडण्याचें पत्करावें असें मानीत. यावरून प्रतिज्ञा करणें. 'विडा पैजेचा उचलूं नको।'-अफला ६०. 'किर्लोस्कर मंडळीला गाणारें स्त्रीपात्र मिळवून देणें हें त्यावेळीं पैजेचा विडा उचलून देण्याइतकें दुर्घट काम होतें.'-भाउराव कोल्हटकर चरित्र (आ. २ पृ. ९).'शहाजी भोंसल्याचें बंड मोडीन तरच पुन्हां दिल्लीस परत येईन, असा बादशाही दरबारांत पैजेचा विडा उचलून मी इसामिय्या दक्षिणेंत निघून आलों.'-शिसं १.२.

पैंजण---पैंजणाचा नाद कंकणानें-कांकणानें ऐकला-सारख्याच गोष्टींचा मेळ होणें; सुराला सूर मिळणें; संगनमत होणें.

पैजार---पैजारखाऊ--खेटरखाऊ; निर्लज्ज; बेअब्रु झालेला.

पैजार पगडी--पागोटें--विशिष्ट रीतीनें बांधलेलें पागोटें.

जुते पैजार होणें--जोडाजोडी होणें; भांडण फार निकरावर जाणें.

पैठा--पैठ बसविणें--(बे.) जम बसणें, बसविणें; पत वाढविणें. "त्यानें आपल्या दुकानाचा पैठ चांगला बसविला."

पैठा करणें--स्थापणें; जम बसविणें. 'ते निजभाक्ति माझी जननी । ज्या पैठा केलों जनार्दनी।'-एभा २५. ५५५.

पैठा होणें--प्रवेश करणें; शिरकाव होणें; रंगणें; स्थिर होणें.'काम कामिका चपळ दृष्टि । संधि साधुनि विंधे हटीं । ते नव्हेचि पैठी । हरिरंगीं ।' -एभा १२.१५३.

पैठेला पडणें--दिसण्या सारख्या स्थितीला येणें; मान्यता मिळविणें.

पैठण--पैठणी आग्रह--पोकळ आग्रह. पुढें पहा.

पैठणी आदर-प्रेम--पूर्वीं पैठण येथील लोक दिसावयास मोठे आदरशील परंतु मनांतून उलट असत. सामान्यतः मोठमोठ्या शहरांत पाहुणा येण्यापासून त्रास होतो याकरितां अशा शहरांतील लोक जरी वरूनवरून आदरातिथ्य दाखवितात तरी तें मनापासून असणें शक्य नसतें. वरवरचा आदर. 'पुरे करा पैठणी आदर बरवरी हा ।'-प्रला १०७. 'मल्लिके, त्याच्या वचनावर भरंवसा ठेवूं नको. त्याचें तें सगळें पैठणी प्रेम आहे.'-विकार विलसित.

***पैठणी पागोटें घालायास नाहीं म्हणून डोकीची टोपी जाळावी काय**--आपणा जवळ विशेष उत्तम वस्तु नसली तरी जी जवळ असेल ती नाहींशी करण्यांत अथवा तिचा तिरस्कार करण्यांत मूर्खपणा आहे. आपणाजवळ असेल त्यांत समाधान मानावें; निष्कारण अधिकाची हांव करण्यांत जवळचें गमावूं नये.

पैठणी---नेसेन तर पैठणी नेसेन, नाहीं तर नागवी बसेन--नेसणें पहा. एक ही तड किंवा ती तड.

पैण---पैण भोगणें-बाळगणें--पाळणें--धरणें-मारणें--पण पहा. १ पैज मारणें. २ एखाद्याबद्दल तिरस्कारयुक्त आदर असणें.

पैल--पैलीं अनना, मागीर तनना-(गो.) आधीं अन्न आणि मग इतर सगळ्या चैनी. 'आधीं अनं०' पहा.

पैलीं आइले कान बरे, मागीर आइले शिंग बरें न्हय-(गो.) मागाऊन येणाऱ्या शिंगापेक्षां अगोदर येणारीं शिंगेंच (कान) मऊ व शाबूद असतात. तु०-काना मागून आलें शिंगट तें झालें तिखट. पहा.

पैलीं पोटोबा, मागीर विठोबा--आधीं पोटोबा मग विठोबा, पहा.

पैलीं शीत शेंळॅं, तातुं भलॅं वारॅं-(गो.) आधींच भात शिळा आणि त्यांतून त्याला वारा लागावा म्हणजे

अधिकच टचटचीत होतो. तु०–आधींच तारें त्यांत भरलें वारें.

पैलीं सोत्तात् इंद्रा आनि चंद्राक्, मागीर व्होन्न दितात् कळ उंदराक्—(गो.) मुलीचे आईबाप मुलीला स्थळ पहातांना प्रथम इंद्र-चंद्र हुडकतात आणि मागाहून तिला एखाद्या कोळ उंदराच्या (घुशी) गळ्यांत नेऊन बांधतात. अति चिकित्सेचें फळ. एका साधूनें एक उंदराचें सांपडलेलें पिलूं पाळलें. त्यास एका सुंदर मुलीचें रूप दिलें. पुढें तिनें इंद्र, चंद्र वगैरेस नापसंत करून उंदरासच वरलें व मूळ रूप पावली. या गोष्टीवरून.

पैशून्य—पैशून्य काढणें—व्यंग काढणें; दोष काढणें.

पैशून्य पाहणें—छिद्र पाहणें; उणेपणा पाहणें.

पैस—पायां पैस नसणें—अतिशय गर्दी असणें; पाऊल ठेवावयास जागा नसणें.

पैसा—पैसा अडका—रुका—नगदी रक्कम.

पैसा गांठीला लावणें—सांठविणें; शिल्लक टाकणें.

पैसा न जळणें—अपार पैसा असणें; मुबलक संपत्ति असणें; सरता न सरेसा पैसा असणें.

दांतावर मारायला देखील पैसा नसणें—अगदीं कंगाल, कफल्लक असणें. 'कैदेंत राहिलें म्हणून जवळ दांतावर मारायला देखील पैसा नाहीं.'–V. S. २.६४.

पैसा मरणें—निरुपयोगी होणें.

पैसे उडविणें—उधळपट्टी करणें; बेसुमार खर्च करणें.

पैसे उभे करतां येणें—जिन्नस विकून त्याचें द्रव्य करणें; वस्तूस किंमत येणें. 'सारा माल विकून सहज त्याचे पैसे उभे करतां येतील.'–विवि १०.५०.१२५.

पैसे काढणें—कर्ज काढणें; उसने घेणें. 'लोकांचे पैसे काढून तुला कापड घेऊन दिलें आहे.'–नामना ७६.

पैसे खाणें—लांच घेणें; लबाडीनें दुसऱ्याच्या संपत्तीचा अपहार करणें.

पैसेच पैसे—१ पुष्कळ पैसे; भरपूर द्रव्य. 'पैसाच पैसा' या नांवाचें एक नाटक आहे. २ नुसते पैसे.

पैसा पायली; पैसा पासरी—अतिशय स्वस्त; भरपूर; लयलूट. 'युनिव्हर्सिटी स्थापन होऊन नुकती १५।१६ वर्षें होताहेत तोंच लोकांत किताबी विद्वान पैशापासरी या मोलानें विकूं लागले.'–निमा.

पैशांचा-चे खेळ—पैसा असला म्हणजेच शक्य होणें.

***पैसा अगर सोनें कोणी खात नाहीं अगर चावीत नाहीं**—पोटाला अन्नच लागतें, पैसा चालत नाहीं; पोटाला कांहीं पैसा खाऊन चालत नाहीं; जगांत केवळ पैशानें सर्व गोष्टी होतात असें नाहीं.

पैसा आला पदरीं, नातें गोतें धांवतीं घरीं—संपत्ति जमली कीं भोंवतीं सर्व सोयरे धायरे जमतात. तु०–संपदा बहू आलिया वरी। बंधु सोयरे येति त्या घरीं॥

पैसा कसा मोडूं, मला येतें रडूं—कंजूष मनुष्यास पैसा खर्चणें मोठें जिवावर येतें.

पैसा गांठ और जोरू साथ—(हिं.) पैसा नेहमीं जवळ असेल तरच तो उपयोगी पडेल; त्याप्रमाणेंच बायको जोंपर्यंत आपल्यापासून दूर झाली नाहीं तोंपर्यंत तिचा भरंवसा धरावा. आसका बाप निरास की मा, पहा.

पैसा गेला पण जोडा चांगला मिळाला—(जोडा=जोडीदार) लग्न घडवून आणण्यांत पैसा पुष्कळ खर्च झाला हें खरें; पण समाधानाची गोष्ट इतकीच कीं जोडीदार मनाजोगा मिळाला.

पैसा जोडतो, पैसा तोडतो—पैशामुळें ज्याप्रमाणें कांहीं लोक जवळ येतात किंवा कांहीं संबंध जडतात त्याप्रमाणें कांहीं लोक दूर होतात व कांहीं संबंध तुटतात.

पैसा टाकुनिया संतापा, विकत घेऊं नका बापा—जवळचें द्रव्य खर्चून भलतेंच लचांड अंगावर घेऊं नये. विकत श्राद्ध घेऊन सव्यापसव्य करण्यांत काय फायदा ?

जया जवळ नाहीं पैसाः तो भला मानुस कैसाः—(महानु.) पैशाशिवाय भला कोण म्हणणार ? जवळ पैसा असला म्हणजेच लोक आपणांस चांगला म्हणतात.

पैसा दक्षिणा, लक्ष प्रदक्षिणा—ब्राह्मणाला एक पैसा देऊं करून लक्ष प्रदक्षिणा घालण्यास सांगितलें तर तो चुकारपणा करणारच. तेव्हां थोड्या मोलांत पुष्कळ काम करून घेण्याची अपेक्षा ठेवूं नये.

पैसा नाहीं पाव आणा, मिळून अर्थ एकच— सोंर सारखेंच. ' भटाचें नांव कान्हभट !'–शाब २.२४६.

पैसा पासरी कांदे आणि तोळ्यावारी केशर नांदे— कांद्यासारखी क्षुल्लक वस्तु बाजारांत पैशापासरी मिळतें पण केशर हें तोळ्यातोळ्यानेंच विकत घ्यावें लागतें. सामान्य वस्तु जगांत भरपूर असतात पण महत्त्वाच्या वस्तु दुर्मिळ असतात.

पैसा बडी खुशामत, पैसा बडी सलामत, पैसा बडी हजामत—(हिं.) पैसा जवळ असेल तर भोंवतीं खुषमस्करे लोक जमतात व हांजी हांजी करतात; त्याचप्रमाणें पैशामुळें मोठें वैभव, योग्यता व मानसन्मान प्राप्त होतो. त्याप्रमाणेंच पैशामुळेंच एखाद्यावेळीं मोठें संकट येऊन आपत्ति येते व फजीती होण्याचा प्रसंग येतो. याप्रमाणें द्रव्य हें दुधारीशस्त्र आहे.

पैसा वांचविणें म्हणजे पैसा मिळवणें—जेवढा पैसा आपण काटकसर करून शिल्लक टाकतों तो जणूं कांहीं मिळविल्यासारखाच असतो. कारण काटकसर केली नसती तर तो खर्च होऊन गेलाच असता.पुढील इंग्रजी म्हणीवरून: Money saved is money Gained.

पैशा हाड्लॅ घावन आनि जेवतलॅ जालॅ बावन—(गो.) पैशाचे आणले घावन आणि जेवणारे जमले बावन. अत्यल्प वस्तूंत पुष्कळांची संभावना कशी व्हायची ?

पैशाकडे पैसा जातो— धनिक मनुष्यच अधिक अधिक श्रीमंत होत जातो. दरिद्री मनुष्य कधीं वर येत नाहीं एका भोळ्या गरीब माणसानें वरील विधान ऐकून एक पैसा उसना आणिला व सरकारी तिजोरींत गेला व बाहेरून, गजांशीं टेंकून आपला पैसा आंतल्या थैल्यांतील रुपयांना दाखवूं लागला. इतक्यांत शिपायांची चाहूल लागल्यानें घाबरला व त्याचा पैसा तिजोरीच्या खोलींत पडला व तो सरकारजमा झाला. अशा रीतीनें म्हण खरी झाली !

पैशाचा उसासा आणि घरीं आली अवदसा— पैशापाठीमागें लागून घरादाराबद्दल बेफिकीर असणें.

असतां पैशाची पूर्णता, नाहीं मित्रांची न्यूनता—पैसा जवळ असेल तर लागेल तितके मित्र म्हणविणारे मिळतील. (गु.) पैसा हांथमां, तो दोस्त साथमां.

पैशाची भवानी, नवटांक तेल—अल्प किंमतीच्या वस्तूला बेसुमार उपचार.

पैशाची वाटाघाट आणि पगाराची काटाकाट—नुसतें वरवर पैशांबद्दल खूप बोलावयाचें पण हातून कांहीं सुटावयाचें नाहीं.

पैशाचें कांहीं झाड नाहीं लागत; पैसे कांहीं झाडाला लागत नाहींत—पैसे मिळविण्यास श्रम पडतात; ते आयते कांहीं झाडावर उगवत नाहींत कीं लागेल तेव्हां तोडून घ्यावेत.

पैशाचें तेल, दोन पैसे हेल—क्षुल्लक वस्तूला बेसुमार खर्च. Burning a half penny candle to find a farthing.

सारीं सोंगें येतात पण पैशाचें सोंग येत नाहीं—इतर गोष्टी कशाहि मिळवितां येतात पण पैसा मिळविणें मोठें कठीण असतें.

पैशाचो सोसो, देड तांगाऽमस्ती—(गो.) पैशाचा ससा आणि दीड तांगाची मस्ती. गोमंतकांत पूर्वी तांग म्हणून एक नाणें होतें. त्याची किंमत पाच पैसे एक पै असे. एवढासा गुण पण त्याचा अभिमान मात्र फार, अशा व्यक्तीला म्हणतात.

पैशानें पैसा जोडतो—वर पहा. तु०-थेंबें थेंबें तळे सांचे.

पैशानें मारलेला वर पहातो व अन्नानें मारलेला खालीं पाहतो—मूळ म्हण 'काठीनें मारलेला०' अशी आहे तीच सयुक्तिक दिसते. या म्हणीचा अर्थ असा होईल : ज्यास अन्न देऊन संतुष्ट केलेलें असतें तो गरीब असतो व तो आपले उपकार स्मरतो पण ज्याला आपण द्रव्याचा लांच देऊं पाहतो तो बहुधा मोठा मनुष्य असतो व तो मगरूर असतो; तो आपल्या उपयोगी पडेल असा भरंवसा नसतो. आपणाकडून देणगी किंवा कर्ज काढतो तो माणूस आपला मिंधा नसतो; पण आपल्या अन्नावर पोसलेला मात्र तसा असतो.

पैशावांचून खोटें, सगळें होतें उफराटें—द्रव्याशिवाय सर्व गोष्टी व्यर्थ होत व कांहीं करावयास गेलें तर तें उलट अंगाशींच येतें.

पोकळ——पोकळकाष्ट्या— ब्राह्मणी पद्धतीचें धोतर नेसणाऱ्यास अनुलक्षून म्हणतात. कासोटा फार मोठा

व ढैल असल्यास कामांत अडथळा येतो व जोर वाटत नाहीं. यावरून भ्याड, भित्रा.

पोकळधोत्र्या भट--१ वरील प्रमाणेंच. २ बुद्धिहीन, धनहीन ब्राह्मण. नुसता धोतरबडव्या.

पोकळ फुटणें--(बे.) बिंग बाहेर येणें, पडणें; गवगवा होणें; आब जाणें.

पोकळीस-पोकळाखालीं जाणें--निष्फळ होणें; व्यर्थ जाणें; फुकट जाणें; विफल होणें.

***पोकळ काष्टेच्याक झुजु इत्याक**--(गो.) पोकळ काष्ट्याच्या, भित्र्या माणसाला लढाई कशाला ?

पोकळ ताठा, हातीं खराटा—जवळ कांहींएक नसतां रिकामा खोटा डौल.

पोकळ लागलें (मऊ सांपडलें) म्हणून कोपरानें खणूं नये--थोडा आधार मिळाल्याबरोबर सर्वच बळकावूं पाहूं नये; एखाद्याच्या विनयाचा अथवा भिडस्त स्वभावाचा किंवा गरीबीचा गैरवाजवी फायदा घेऊं नये.

पोकळ वांशांचा आवाज मोठा—उथळ पाण्याला खळाळी फार, याप्रमाणें. "इतका प्रयत्न करूनहि त्यांच्या हातचलाखीचा खेळ संशोधनप्रिय वाचकांचें मन मुग्ध करूं शकत नाहीं. उलट 'पोकळ वाशांचा आवाज मोठा' या म्हणीप्रमाणें त्यांच्या संशोधनाचा फोलपणा अधिकाधिक उघड होऊं लागला आहे."–केसरी १७-१०-४१.

पोक्त—पोक्ता जिन्नस--विपुल वस्तु; महामूर; भरपूर; रेलचेल.

***पोक्त्याची पिलाई, नऊ जण जांवई**—पिलाई–पिलूबाई ही संज्ञाच पोक्तपणाच्या उलट आहे. एखादी लहान वयाची बाई पोक्तपणा दाखवावयास लागली म्हणजे म्हणतात. जसे कांहीं नऊ जांवई आले आहेत एवढी पोक्त वयाची दिसणारी पण पिलूबाईच.

पोचट—पोचट भाषण—पिळपिळीत, मिळमिळीत भाषण; ज्यांत कांहीं जोर, अवसान नाहीं असें बोलणें.

***बाभळीचा कांटा, पुढें तिखट आणि मागें पोचट**—प्रथम मोठा शूरत्वाचा, रागाचा आव आणून मागाहून नरमाईचें वर्तन. कांटा, बाभळ पहा.

पोट—पोटकटारी करून घेणें—पोटांत कट्यारी खुपसून आत्महत्या करणें. 'बायकामुलें होतीं त्यांनीं पोटकटारी करून घेतली म्हणोन वर्तमान आलें.'—महादजी शिंदे पत्रें १०८.

पोट करणें—१ गाभण राहणें; गरोदर होणें. २ लठ्ठ होणें; अंग धरणें.

पोट करणें-फुगणें-येणें-वाढविणें--व्यभिचारानें गर्भार होणें; अनीतिमूलक गर्भ राहणें.

पोट खराळणें-घळघळ करणें—(व.) पोटांत गडगडणें, गुरगुरणें; वायु वाजणें.

पोट गळ्याशीं लागणें—पोट आकंठ भरणें; भरपूर जेवण होणें.

पोट चोळून दुःख काढणें—स्वतःच आपत्ति ओढवून घेणें. यांत काय फायदा ? (गु.) पेट चोळीने सुल उपजाववी.

पोट जळेना ?--(बायकी.) पोटासाठीं करावें लागतें ना ! तें कांहीं केलें तरी भरत नाहीं. पोट भरावयास वाटेल त्या गोष्टी कराव्या लागतात याअर्थी.

पोट जाणें-ढाळणें—रेच होणें; पोट साफ होणें. 'हगले नाहीं पोट गेलें सारखेंच.'

पोट जाळणें--१ पोट भरणें; कसातरी उदरनिर्वाह करणें; लबाडीनें उदरनिर्वाह करणें; कपटानें पोट भरणें. २ दुसऱ्याचें नुकसान करून आपला फायदा करून घेणें.

पोट जिरणें—१ गर्भशमन होणें; गर्भ वाढीस न लागतां पोटांत नाहींसा होणें. २ पोटांत सल राहणें.

पोट जिरवणें-झाडणें-पाडणें-मारणें-सांडणें–कृत्रिम साधनांनीं गर्भपात करणें; गर्भाचा नाश करणें.

पोट तडीस लागणें—पोट आकंठ भरणें; पोट भरल्यामुळें तिडका लागणें.

पोटतिडिक धरणें—कळकळ असणें, बाळगणें. 'तुम्ही लोक या राज्याची पोटतिडीक धरितां तरि'–रा १५ ले. ३४७.

पोट दुखणें—१ पोटांत अजीर्ण वगैरेमुळें दुःख होणें; कळा येणें; तिडका लागणें. २ मत्सर वाटणें; वाईट

वाटणें; असूया वाटणें; एखाद्यास लाभ झाला असतां त्याबद्दल मनास दुःख होणें. ३ प्रसूतिसमयींच्या वेदना होणें; वेणा येणें.

पोट धरणें—जुलाब बंद होणें; रेच थांबणें.

पोट धरधरून हंसणें—अतिशय हंसणें; मनापासून हंसणें; खूप हंसणें. ' पोट धरधरून मनसोक्त हंसलों '—विवि ८.११.२०६.

पोट नकटें आहे—पोटास लाज नाहीं; मनुष्य पोट भरण्यासाठीं वाटेल ती गोष्ट करावयास तयार होतो.

पोट पाठीस लागणें—पोटासाठीं उद्योग करावा लागणें. ' पोट लागलें पाठीसी । हिंडवितें देशोदेशी ।।' —तुगा ४१९६.

पोट पाठीस लागणें;पोट पाताळास–रसातळास जाणें; पोटाची पत्रावळ होणें—पोट खपाटीं जाणें; पोटांत अन्न नसल्यामुळें बखळ पडणें.

पोट पिकणें—१ प्रसूत होणें; मूल होणें. २ गरोदर असणें; गर्भ संभव होणें. ' पोट पिकेना म्हणून बांधिले भाराभर गंडे।'—पला.

पोटपूजा—जेवण; क्षुधाशांति.

पोट फुगणें—१ गुबारा धरणें; पोटांत वायु धरणें. २ गुप्त बातमीमुळें अस्वस्थता वाटणें; पोटांत निरनिराळ्या भावना होणें; मनास रुखरुख लागणें. ३ गरोदर होणें; गर्भसंभव होणें. ' दादाचें दोंद वाढेल गा, बाईचें पोट फुगेल गा ! '—कुडबुड्याचें गाणें.

पोटफुगी झाडणें—गुप्त गोष्ट फोडणें; पोटांतील गोष्ट बाहेर टाकणें.

पोट फुटणें—१ वेदना होणें; उदरव्यथा होणें; हर्षातिशयानें हंसून हंसून पोटास वेदना होऊं लागणें.

पोट फोडणें—१ पोट फोडून मारणें. २ गुप्त बातमी फोडणें; बभ्रा करणें.

पोट खपाटीस–बखाटीस जाणें—पोट पाठीस लागणें, पहा.

पोट बांधणें—१ अर्धपोटीं राहणें. २ उपासमार करणें; पोटांत पुरेसें अन्न नसल्यामुळें त्यावर वस्त्राच्या घड्या बांधून काम करण्याची रीत आहे.

पोट बांधून चाकरी करणें–पैसा जमविणें–जेवणें–खाणें–खरचणें—अर्धपोटीं काम करणें वगैरे; पोटास न खातां काम करणें; पुरेसें अन्न न खातां काम करणें; आवश्यक त्या वस्तुहि न देतां दिवस काढणें.

पोट बाहेर पडणें—जेवणखर्च परभारा निघणें.

पोट बाहेर पाडणें—१ गुप्त गोष्ट उघडकीस आणणें; जाहीर करणें; फोडणें. २ पोटापुरता पैसा अन्यमार्गानें, लांच घेऊन वगैरे मिळविणें.

पोट बुडणें—चरितार्थाचें साधन नाहींसें होणें; पोटावर पाय येणें.

पोटभर अन्न व अंगभर वस्त्र मिळणें—निर्वाहास आवश्यक वस्तू मिळणें.

पोट भरणें—१ चरितार्थ चालविणें; निर्वाह होणें. ' माझ्या सामर्थ्यें भरिल आज पोटातें। '—मोआदि २६.१४. २ अन्न पुरेसें हाणें; भरपूर जेवण होणें. ३ इच्छा तृप्त होणें; मनोवांछित मिळणें; हेतु सफल होणें.

लबाडीवर पोट भरणें—अन्यायानें चरितार्थ चालविणें; अनीतीनें पोटास मिळविणें. ' तुम्ही लबाडीवरच पोट भरता '—नि १०१७.

पोट मोठें करणें—१ दया दाखविणें; उदार मन करणें. २ पोट करणें पहा.

पोट वाढविणें—गरोदर करणें; गर्भस्थापना करणें; पोट फुगविणें. ' एकनाथें पोट वाढविलें म्हणे ।'—सप्र २.७१. ' सटवीनें आपलें पोट वाढवून घेतलें.'—इंप ६२.

पोट सरणें-सुटणें—१ रेच होणें; कोठा साफ होणें.

पोट सुटणें—१ वातानें दोंद वाढणें; पोट लठ्ठ होणें. २ उदरनिर्वाहाचा खर्च बाहेर पडणें. ३ स्वास्थ्य, सुख असणें.

पोटचा गोळा–लोळा—स्वतःचें मूल. ' विचार पडला कसा पोटचा गोळा तोडावा ।'—विक ४०. ' पोटचा गोळा परक्याच्या पदरांत बांधायची गोष्ट फार न्यारी आहे बाबा !'—उग्र १.१.

पोटचें पाडणें—गर्भपात करणें; गर्भाचा नाश करणें.

पोटचें ज्ञान—१ नैसर्गिक ज्ञान; उपजतज्ञान. २ अंगची हुशारी. ३ स्वतःची बुद्धि.

पॉटां पांचपांच जावप--(गो.) पोटांत पांच पांच होणें. भीतीनें पोटांत धडकी भरली कीं म्हणतात. पांच ही संख्या दाखवावयाची झाली कीं हाताचीं पांचहि बोटें जुळवून दाखवतात. ही क्रिया एकसारखी करावयाची झाल्यास बोटांचें जें आकुंचन प्रसरण होत रहातें तशी पोटांतल्या आंतड्यांची स्थिति व्हायला लागते.

पोटां येणें—उदरीं येणें. 'पोटा येउनिया चांग । उत्तमांग पावला ॥'–एरुस्व १.७२.

पोटाखालीं जाणें-येणें—ओढया होऊन जाणें; पुनर्विवाह करणाऱ्या स्त्रीबरोबर पहिल्या घरचीं मुलें दुसऱ्या पतीकडे जाणें.

पोटाचा अदळ—पोटावर ताबा नसलेला; वाटेल तें खाणारा.

पोटाच्या कपोता वळणें—अतिशय कृश होणें; पोट खपाटीस जाणें; रोडावणें.

पोटाचा चाकर-पाईक—पोटाकरितां मजुरी करणारा; ज्यास स्वतः श्रम करून उदर निर्वाह चालवावा लागतो असा.

पोटाचा डमामा-नगारा होणें--पोट मोठें होणें; वायूनें पोट फुगणें; पोटांत वायु धरणें.

पोटाची आग—भूक; क्षुधा; पोटाची पीडा. 'एखादीनें पोटाच्या आगीमुळें असें केलें तर असो मेलें !'–फाल्गुनराव.

पोटाचें दुःख काढणें-सोसणें--उपास काढणें; अर्धपोटीं राहणें.

पोटाचें पाणी होणें-जोराची हागवण लागणें; फार रेच होऊं लागणें.

पोटाच्या पाठीस—मागें लागणें--पोटाकरितां वणवण करीत फिरणें, श्रम करणें. (प्र.) पोट पाठीस लागणें.

पोटांत आग पेटणें--अतिशय भूक लागणें; तीव्र क्षुधा लागणें. २ अतिशय दुःख होणें.

पोटांत कांटे भरणें—कांहींतरी खाऊन भूक शमविणें; कसें तरी पोट भरणें.

पोटांत कालवणें—१ पोटांत ढवळणें, गडबड होणें; पोटांत खुटखुट होणें; पोट साफ नसणें. २ दया येणें; दुसऱ्याचें दुःख, स्थिति इ.पाहून अति वाईट वाटणें.

पोटांत कावळे ओरडूं-कोकावूं-तोडूं-टोचूं लागणें; पोटांत कोंबडीं चरूं लागणें—भुकेनें व्याकूळ होणें; अतिशय क्षुधातुर होणें.

पोटांत कावळे कोरणें--वरीलप्रमाणेंच, अतिशय भूक लागणें. ''त्यासमयीं तमाम फौजेच्या पोटांत कावळे कोरूं लागले होते.'—पामो २८५.

पोटांत काळेंबेरें असणें—मनांत किल्मिष असणें; मनांत दुष्ट हेतु असणें; दिसतें तसें नाहीं, आपला हेतु शुद्ध आहे, असा लोक आव आणतात, पण त्यांच्या मनांत कांहीं तरी निराळाच हेतु असतो.

पोटांत खडबडणें—भूक लागणें.

पोटांत गोळा उभा राहणें— पोटांत धस्स होणें; अतिशय भीति वाटणें.

पोटांत घालणें-घेणें; पोटीं घालणें—क्षमा करणें; अपराध विसरणें; माफ करणें. 'पोटीं घालावा त्वां जोडा माझ्या नसेचि अपराधा । '

पोटांत चर्र होणें—एकदम धक्का बसणें; धास्ती वाटणें; भीतीनें घाबरें होणें. 'जान्हवी ताईच्या पोटांत चर्र झालं'–इंप १५०.

पोटांत जावप—(गो.) पोटांत दुखणें.

पोटांत ठेवणें—गुप्त ठेवणें; बाहेर स्फोट होऊं न देणें.

पोटांत-पोटास डोकें घालणें– आश्रय,कृपा संपादणें.

पोटांत डोळ पडणें—(व.) मन कलुषित होणें; संशय येणें.

पोटांत तटातट तुटणें—पोटांत कालवणें; अतिशय कींव, दया येणें; वाईट वाटणें. 'तुम्हाला उपाशीं तापाशीं पाहिलं म्हणजे माझ्या किनई पोटांत तटातट तुटतं अगदीं.' –एकच प्याला ४.२.

पोटांत तडस भरणें--पोटास रग लागणें.

पोटांत तोडणें--दयेनें कळवळणें;आंतडें तुटूं लागणें. 'तुझें गरिबीचें बोलणें ऐकलें म्हणजे पोटांत कसें तडातड तोडतें.'–नामना ११२.

पोटांत धस्स होणें--भीतीनें धक्का बसणें; धास्ती वाटणें. 'त्यावेळीं माझ्या पोटांत कसं धस्स झालं'-सं. रत्नप्रभा ७३.

पोटांत धाक पडणें—भीति उत्पन्न होणें; घाबरणें. 'माझ्या पोटांत धाक पडला आहे.'-मृच्छ ६.

पोटांत धोंडा उभा राहणें--भीति वाटणें; घाबरगुंडी होणें. 'तिला पाहतांच माझ्या पोटांत एवढा थोरला धोंडा उभा राहिला.'-पकोघे.

पोटांत पाय असणें--मनांत कपट असणें; पोटांत असलेले पाय जसे लोकांस दिसत नाहींत तसा मनांतील कावा न उमगणें; एखाद्याची लुच्चेगिरी नजरेस न येणें; कावा न कळणें. गोगलगाय पहा.

पोटांत पाय शिरणें—खचून जाणें; अगदीं बेहिंमत होणें.

पोटांत पोट—गौण गोष्ट; अनुषंगिक. गोष्टी.

पोटांत पोट करणें- आपल्या उपजीविकेमधून दुसऱ्याचें पोट भरणें.

पोटांत पोट चालणें—एकाच्या निर्वाहांत दुसऱ्याचा समावेश होणें.

पोटांत ब्रह्मराक्षस असणें-उठणें—अतोनात खाखा सुटणें; भयंकर भूक लागणें.

पोटांत भडभडणें--दुःखानें ऊर भरुन येणें; दुःखाचा उमाळा येणें 'अंध म्हणे या पुत्रव्यसनें पोटांत फार भडभडतें ।'-मोशल्य ४.४९.-पामो ४५०.

पोटांत शिरणें-निघणें—१ मर्जी संपादन करणें; मन अनुकूल करून घेणें. 'पण रातीं इंदूनेंच वाटतें तिच्या पोटांत शिरून तिला आपलेंसें करून घेतलें.' आ. इंदूचें शिक्षण १०१. २ गुप्त गोष्टी काढून घेणें; हळूच युक्तीनें मनांतील गोष्टी समजावून घेणें. 'त्यांनीं पाटीलबोवांच्या पोटांत शिरून काढून टाकिला असता.' V.S. २.६६.

पोटांत शूळ उठणें; पोटांत सलणें--मत्सर, हेवा वाटणें; अत्यंत द्वेष वाटणें.

पोटांत सांठवणें—पोटांत घालणें पहा. -मो.गीता उपोद्घात १४.

पोटांत हरणाचीं काळिजें शिरणें—हरिण हें फार भित्रें जनावर आहे; तें जरा कांहीं कोठें खुट् वाजलें कीं भीतानें पळत सुटतें. यावरुन घाबरणें; धास्ती घेणें; भेदरणें; भीतीनें गांगरुन जाणें. 'तुमच्या पोटांत हरणाचीं काळजें कशीं शिरलीं.'-भाब ७६. 'त्यांच्या पोटांत हरणाचीं काळजें शिरुन, निशाणें माघारी फिरवून तडक पळों लागले.' -भाब. ५७.

पोटांतील पाणी न हालणें—अगदीं संथ, स्वस्थ असणें; कांहीं हालचाल श्रम न करणें.-मोकर्ण ३९.४५. तु०-As demure as if butter would not melt in his mouth.

पोटांतील पाणी न हालविणें—एखादी गोष्ट गुप्त ठेवणें; अगदीं सुगावा लागूं न देणें.

पोटांतून उगळणें-कळवळा येणें—मायेचा पाझर फुटणें.

थंडा पोटानें—मित्र भावानें; सलोख्यानें; न रागावतां.

पोटानें पुरें म्हणविलें आहे--पोटाकरितां कितीहि कष्ट केले तरी पुरे पडत नाहीं. 'पोट जळेना' पहा.

पोटापाण्याचा बंदोबस्त—निर्वाहाची केलेली व्यवस्था.

पोटाला कुंकू लावणें--गरोदरपणीं वाङ्निश्चय करणें.

पोटाला गांठी देणें—कृपणपणें पोटाला चिमटा घेणें; अर्धपोटी राहणें.

पोटाला चिमटा घेणें--न खातां राहणें; कमी अन्न खाऊन निर्वाह करणें. 'शिधा सामग्री सरत आली तेव्हां लष्करी शिपायांना आपल्या पोटांना चिमटा घ्यावा लागला.'-पामो ३१४. 'पोटाला चिमटा घेऊन, उपासमार करून, रक्ताची शाई करून लिहिलेलें लिखाण छापावयास देखील ज्याच्या जवळ पैसा नाहीं अशा भुकेकंगाल पत्रकारांनीं महाराष्ट्र शारदेच्या कीर्तिमंदिरावर आपल्या कर्तृत्वाचे कळस चढवले आहेत.' -प्र. के. अत्रे.

पोटाला पाटा बांधणें—भुकेच्या वेदना बंद करण्यासाठीं पोटाला वस्त्र बांधणें.

पोटावर उठणें-मारणें-येणें; पोटाआड येणें; पोटावर पाय देणें—दुसऱ्याचें उदरनिर्वाहाचें साधन काढून घेणें.

पोटावर पाय आणणें--नुकसान करणें; एखाद्याचें अन्न काढून घेणें. 'माझ्या पोटावर पाय आणलास.' -केसरी १-७-३०.

पोटावारी नोकरी करणें-राहणें-फक्त जेवण घेऊन काम करणें.

पोटाशीं धरणें—१ प्रेम, ममता करणें; हृदयाशीं धरणें. २ मदत करणें; आश्रय देणें; आधार देणें. ३ (झाडांसंबंधीं तत्संबंधीं) झाडास कवटाळून शपथ घेणें.

पोटशीं, पोटाशीं, पोटिशीं, पोटीसीं, पोटेशीं, राहणें-असणें—गरोदर असणें. 'सौभाग्यवती भवानीबाई पोटीसी होती.' -रा ८.१९७.

पोटास अन्न व ढुंगास वस्त्र मिळणें—निर्वाहाचें साधन मिळणें; कसाबसा निर्वाह चालणें.

पोटास तडस लागणें--फार जेवल्यामुळें रग लागणें; पोट फार भरणें.

पोटास बिब्बे घालणें-चिमटे घेणें--उपास काढणें; अर्धपोटी राहणें.

पोटास यम येणें--आपल्याच उदरीं आपला शत्रू उत्पन्न होणें, जन्माला येणें; पुत्राशीं वैर संभवणें. 'आला हा पोटास येम जाणा।'-सप्र २.११८.

पोटास येणें—जन्म घेणें; उदरीं येणें. 'केला पहा कसा हा येऊनि पोटास घात लेकांनीं।'-उद्योग ४.७९.

भरल्या पोटीं-पोटानें—जेवणानंतर लागलीच.

रिकाम्या पोटानें—जेवणापूर्वीं; जेवल्याशिवाय.

पोटीं उरतणें--जिरणें; पचणें.

पोटी खोसणें--कनवटीस लावणें; हस्तगत करणें.

(अन्याय, अपराध) पोटीं घालणें—माफ करणें; क्षमा करणें; अन्याय विसरणें. 'अपराध कोटि पोटीं घालाया मुकुट पाय ते करितो।'-मोस्त्री ६.६३.

एखाद्याला पोटीं घालणें—आश्रय देणें; पाठीशीं घालणें. 'कृपेनें अनाथ घालीं पोटीं।'-मुक्तेश्वर.

पोटीं जन्मणें—उदरीं येणें.

पोटीं धरणें—स्वीकारणें; अंगीकार करणें. पोटाशीं धरणें पहा. 'पुण्यमार्ग पोटीं धरीं।'-दा. ५.८.२४.

पोटीं-पोटांत पडणें—१ भक्ष्य होणें. २ शरीरांत खिळणें. ३ स्वतःच बळकावणें. ४ पोटांत मुरणें.

पोटीं पाडणें—आक्रमण करणें; घशांत घालणें. 'सध्या नबाबाचा मुलुख पोटीं पाडा, व इकडे आम्हीही तसाच बेत धरितों.'-ऐति. पत्रव्यवहार ३७६.

पोटीं पाय सूदणें— पोटावर पाय देणें; नाश करणें. 'सर्पी पोटीं सूदले पाये'-उषा १७१३.

पोटीं पिकणें—पोटीं संतति बरीच होणें. पोट पिकणें पहा. 'पोटीं पिकली बिचारी नि लौकरच समाप्तहि झाली.'

पोटीं माती पडणें—एक शाप. नाश होणें. 'संदेह तयाचे पोटीं पडो माती'।-दावि २९.२३३.

पोटीं वागविणें—काळजी वाहणें. 'हें पांगुळें वागवितोसि पोटीं। '-सारुह १.८.

पोटीं संतान नसणें--निपुत्रिक असणें.

पोट्यां चालणें—(गो.) पोट सरपटत चालणें; पोटानें चालणें.

***पोट अंत, सांगे संत**—एखाद्याच्या मनांत काय आहे हें कधीं ओळखतां येत नाहीं. फक्त साधूच दुसऱ्याच्या किंवा आपल्या पोटांत काय आहे तें सांगतात. परज्ञानीं किंवा अगदीं मोकळ्या मनाचे लोक साधूंशिवाय कोठें आढळावयाचे नाहींत.

पोट कीं पट्टण-शहर?—(गो.) एखाद्यानें खूप खाल्लें कीं त्याला म्हणतात. 'अरे बाबा, तुझें हें पोट कीं पट्टण ?'

पोट जळे, माध्यान्ह कळे—पोटांत भूक लागली म्हणजे दुपार झाली आहे हें लक्षांत येतें. पोट कांहीं थांबत नाहीं तें वेळेची आठवण देतें.

पोट्ट दुकिलो कडु खातलो, चिकला आपलेलो धुवून घेतलो—(गो.) ज्याचें पोट दुखतें तो कडू औषध घेईल आणि चिखलांत पडलेला धुवून घेईल. सहज प्रवृत्तीनें माणूस या गोष्टी करीत असतो. पुढची म्हण पहा.

ज्याचें पोट दुखतें तो ओंवा मागतो—ज्याला एखाद्या गोष्टीपासून त्रास होईल तोच तीवर उपाय करण्याचा प्रयत्न करील, इतरांस त्याचें काय ?-ट्रिसू २५.

पोट दुखेल त्यानें सुंठ खावी –ज्याला संकट आलें असेल त्यानेंच उपाययोजना केली पाहिजे. भलत्यानें करून काय उपयोग ?

पोट पिंदल्यारि गू भायर पडता—(गो.) पोट फाडलें तर विष्ठाच बाहेर पडायची; दुर्जनांच्या अंतःकरणांत कुविचारावांचून काय आढळणार ?

पोटभर जेवचें, भाणभर हागचें; पोटभर जेवलों, भाटभर हागलों—(गो.) (भाण = हंडा. भाट = माडांची बाग.) खूप खावयाचें, जेवावयाचें आणि मोठा हंडा–बागभर हगावयाचें एवढेंच ? कांहीं काम न करतां केवळ खाऊन बसणाऱ्या ऐदी व त्रासदायक मनुष्यास म्हणतात.

पोटभर जेवला अन् देवाला विसरला—एकदां पोट भरलें म्हणजे मग देवाची आठवण कशाला होते ? ज्याचें यथास्थित चाललेलें असतें तो परमेश्वराची कधीं पर्वा करीत नाहीं.

पोट भरचें न्हयि जाल्यारि फाट भांगराची जातलि शिलि—(गो.) पोट भरायची जबाबदारी नसती तर सगळी पाठ सोन्याची झाली असती. म्हणजे हवे तेवढे दागिने करतां आले असते.

पोट भरतकूच गाण शेळोणी घालता—(गो.) (शेळोणी= शीळ) पोट भरल्यावर गांड शीळ घालते; संतुष्ट माणूस निष्काळजी, बेफिकीर असतो.

पोट भरतें पण डोळे भरत नाहींत—मनुष्याच्या पोटाला फार थोडें लागतें पण त्याची हांव फार असते; ती कधीं तृप्त होत नाहीं.

पोट भरलें म्हणजे उंबर कडू—उंबर पहा.

पोट भरा, नाचवून पहा—पोट भरलेलें नसल्यास नाचतां कसें येणार, पण पोट भरल्यावर नाचतां येईल.

पोट भराना नाचूं किते ?—(गो.) भरपूर मजुरी देऊन काम करुन घ्या. दाम तसें काम.

पोट भरे भुका, गांड मागे बुका—पोटांत कांहीं नसतां मिजास करणारा, किंवा पोट भरल्यावर मिजासखोरी करणारा.

पोट भरेना तर कांट्या भराव्या—अनीतीनें वागून पोट भरण्यापेक्षां काटे खाऊन रहावें. उपाशीं मरावें पण वाममार्गाचा अवलंब करूं नये.

पॉट मान्न जॉत् कॅलॅं, तॅंवय् अंतीं वाघान् खालॅं—(गो.) पोटाला चिमटा घेऊन जोत (नांगराला जुंपायची बैलांची जोडी) घेतलें तेंहि शेवटीं वाघानें खाल्लें. करंट्या माणसाचें कांहींच साधत नाहीं तें असें. तु०– तेलीण सांची धारधार, खुदा नेतो एकच बार.

पोट मोठें, वसूं कोठें—ज्या मनुष्यास स्वतःबद्दल फार मोठेपणा वाटतो किंवा ज्याचा पसारा फार वाढला आहे अशाबद्दल म्हणतात.

पोट लागलें पाठीशीं, हिंडवीतें देशोदेशीं—पोट पाठीस लागणें पहा.

पोट शिकैता वेव्हार आनी पेट शिकैता दर—(गो.) अन्नाची गरज माणसांशीं कसें वागावें हें शिकविते व बाजार धान्यांचे निरनिराळे भाव शिकवितो. तुमची परिस्थितीच तुम्हांला तुमचा मार्ग दाखविते. भूक लागली म्हणजे कांहींतरी धडपड मनुष्य करतो व बाजारांत गेलें म्हणजे दर, दाम, व्यवहाराची रीत वगैरे कळते. मागें कांहींतरी नेट असल्याशिवाय किंवा प्रत्यक्ष करून पाहिल्याशिवाय कोणतीहि गोष्ट करतां येत नाहीं.

पोटशूळ गेला, कपाळशूळ उठला—एक व्याधि बरी व्हावी तों दुसरी पाठीमागें लागणें. 'पोटशूळ गेला, कपाळशूळ उठला ! पटकी गेली, महामारी आली ! यांत आनंद मानावयाचा तो कशाबद्दल.'–शिसं १·३.

पोटचें द्यावें पण पाठचें देऊं नये—ज्यास आश्रय दिला त्याचा आपल्या पुत्राच्या रक्षणाकरितांहि विश्वासघात करूं नये; आपल्या आश्रयास आलेल्या मनुष्याचें पुत्रापेक्षांहि अधिक जतन करावें. 'हिंदुस्थानांतील स्वधर्म कीं, पगडीभाई झाल्यावर पोटचें द्यावें पण पाठीचें देऊं नये.'–भाब ५.

पोटचें पोर आडवें आलें तरी तें सुद्धां कापावें—ध्येयसिद्धीसाठीं किंवा एखाद्या मोठ्या कार्याच्या सिद्धीसाठीं मुलाबाळांचा देखील मोह दूर सारला पाहिजे व मन निष्ठुर करून त्याची अडचण दूर केली पाहिजे. 'आमच्या कारस्थानाच्या मार्गांत पोटचें पोर आडवें आलें तरी

तें सुद्धां आम्ही कापून बाजूस फेंकून देतों आणि आपला रस्ता चोखाळून दुरुस्त ठेवीत असतों.'—शिसं १.३.

पोटाक जळे आनि माथ्याक कळे कित्याक ते?–(गो.) पोटांत आग आणि डोक्यांत फुलांच्या कळ्या काय उपयोग त्यांचा? पोट थंड असलें तर भोगविलासांची किंमत.

सगळ्याचा वायदा चालतो पण पोटाचा वायदा चालत नाहीं—पोटाला एकदां कां भूक लागली कीं मग कांहीं कोणाचें चालत नाहीं. आतां नको, पुढें पाहू असा वायदा मुळीं चालतच नाहीं. क्षुधाशांति तात्काल करावी लागते. An empty belly hears nobody. (गु.) पेटने वायदो न होय.

पोटाची दुखी पोटास ठाऊक—१ पोटांत एकदां दुखूं लागलें म्हणजे तें दुःख सांगता येत नाहीं. पोटदुखी ही वाईटच. ज्याचें दुःख त्याला माहीत. (गु.) पेटनी आग पेट जाणे.

पोटाची नळी आणि कानाची पाळी वाडैत तितली वाडा—(गो.) पोटाला वाढण्याची जर परवानगी दिली तर तें कानाच्या चाप्याप्रमाणें वाढतें. त्यांना फक्त वाढणेंच माहित आहे. चैनीची आवड ही चैनींच्या आसक्तीवर अवलंबून आहे. जों जों अधिक खाऊं लागावें तों अधिकाधिक खावयास लागतें व कानाची पाळ वाढवावी तितकी वाढते.

पोटाची पत्रावळ आणि पाठीचें पडवळ—अगदीं क्षुधेनें पोट खपाटीस लागून अस्थिपंजर राहिलेला.

पोटांत एक, ओठांत एक—मनांत एक असतां भलतीच गोष्ट तोंडानें सांगणें. कपट.

पोटांत गू आस म्हणु भाईर काण्णु दाकवूं नये–(गो.) पोटांत विष्ठा असली तरी ती बाहेर काढून दाखवूं नये. अंतरांत कुविचार असले तरी ते निदान बोलून तरी व्यक्त करूं नये.

पोटांत जळे, माथ्यांत कळे—(गो.) पोटाला भूक लागली म्हणजे डोकें फिरावयास लागतें.

पोटांत दांत—छपवून ठेवलेलें कपट; लबाडी. (गु.) पेटमां दांत होवा.

पोटांत नाहीं पैस, जीव करे उठबैस—(महानु.) पोट अगदीं ठेंचून भरलें असल्यावर जिवाची तळमळ होणारच.

पोटांत नाहीं भूक, खाण्याचं काय सुख—(ब.) पोटांत भूक नसेल तर कोणताहि पदार्थ गोड लागत नाहीं.

पोटांत नाहीं रोटी, सर्व गोष्ट खोटी—(महानु.) पोट भरलें नाहीं तर इतर कोणतीहि गोष्ट होणार नाहीं. प्रथम पोटाची तजवीज केली पाहिजे.

पोटांत नाहीं वाढ अन् जीव करतो लाड—(व.) पोटांत भूक असली कीं अन्न सपासप जातें; पण पोटांत वाढ (जागा) नसल्यास जीवाला चवना सुचतात. 'जेवण संपत आलं अन् आतां म्हणतो वरण विटल्यासारखं लागतं; बरोबर ! पोटात नाहीं वाढ न् जीव करतो लाड.'

पोटांत भूक आणि डोळ्यांत काजळ—एका गोष्टीची जरूर असतां ती न देतां भलतीच गोष्ट देऊन समजूत करूं पाहणें.

पोटांत भूक माईना, तोंडांत घास जाईना—मनांतून खावयाची इच्छा असतांहि खातां न येणें; एखादी गोष्ट समोर दृष्टीपुढें असून व पाहिजे असूनहि न मिळणें.

पोटांत मंद आणि कपाळाला गंध—वरवर सर्व उपचार करावयाचे पण पोटाला मात्र घालावयाचें नाहीं असा प्रकार.

पोटांतील व्यथा नि घरांतील कथा—हीं कोणास सांगून कांहीं उपयोग नाहीं. स्वतःच्या पोटांत दुखत असलें तरी तें दुसऱ्याला सांगून काय फायदा? आपलें दुःख आपल्यालाच सहन केलें पाहिजे. तद्वत् घरांतील भांडण किंवा तेढ परक्यांना सांगून काय उपयोग? उलट त्यायोगें आपली अब्रू चव्हाट्यावर येते; कारण जोडणारे थोडे, फाडणारे जास्त.

पोटामुळें देश पारका— पोटाकरतां देशाटण करण्याची किंवा परदेशीं जाण्याची पाळी येते.

पोटार आड आयलो—(गो.) पोटावर आडवा आला. ऐन लाभाच्या वेळीं मध्येंच आडवा येऊन सगळी घटना बिघडवून टाकणाऱ्याला म्हणतात.

पोटार पाय निकाद—(गो.) पोटावर पाय देऊं नको. लाभांत अडथळा आणूं नको.

पोटाला टाच आणि बाहेर दिमाख— पोटाला खावयासहि पुरेसें नसतां पोकळ डौल आणावयाचा.

पोटाला द्यावें, काम घ्यावें—पोटाला घालून काम सांगावें. कोणाचेहि श्रम फुकट घेऊं नयेत.

पोटाला नाहीं घाटा, टीरीला उटणा वाटा—(महानु.) प्रथम पोटाला पुरेसें अन्न मिळाल्यावर मग इतर अवयवांचे सोपस्कार करावेत.

पोटाला नाहीं ठिकाण, चोटाला करा आरती—(अशिष्ट.) पोटाला न घालतां भलतेच उपचार करावयाचे. ज्या गोष्टीची जरूर असेल ती न देतां भलत्याच गोष्टींचा पाऊस पाडावयाचा. वरकरणी आदर.

पोटावर बांधल्यानें भूक जात नाहीं—पोटांतील भूक अन्न खाल्ल्यानेंच शमूं शकते; ती कांहीं अन्न पोटावर बांधल्यानें थांबत नाहीं कीं इतर उपचारांनीं थांबत नाहीं. त्याप्रमाणें कोणत्याहि गोष्टीस योग्य तो उपचार केला तरच कार्य साधतें.

पोटासाठीं केलें ढोंग । तेथें कैंचा पांडुरंग॥—तुकाराम. एखाद्यानें पोटास मिळविण्याकरिता साधुत्वाचें सोंग आणलें असतां त्याच्या ठिकाणीं खरें वैराग्य न बाणत्यामुळें त्यास परमेश्वरप्राप्ति कशी व्हावयाची?

पोटीं आलं, साव झालं—(व.) आपलें मूल कितीहि द्वाड असलें तरी आपल्याला तें गोडच वाटतें. आपला तो बाळ्या.

पोटीं कस्तूरी, वासासाठीं फिरे भिरीभिरी—कस्तूरी मृग नांवाची हरिणाची एक जात असते. तिच्या बेंबींत कस्तुरी असते. या हरणाला कस्तुरीचा सुवास येतो; पण त्याला ही जाणीव नसते कीं ती कस्तुरी आपल्याच पोटीं आहे. मग तो कस्तुरीचा शोध करीत फिरत असतो. सामान्य जनांची तीच गोष्ट! 'देहींच देव असतां कांरे भ्रमतोसि व्यर्थ तूं रानीं। नाभिंत सुगंधि असुनी कस्तुरि मृग जेविं तो फिरे रानीं॥'

पोटीं जळे, माध्यान्ह कळे— पोटांत भूक लागली म्हणजे दुपार झाली हें लक्ष्यांत येतें.

जें पोटीं, तें होटीं—(महानु.) पोटांत तें ओठांत.

पोटीं नाय पाठीं नी लागली घराला कांटी—(कों.) संतान नाहीं कीं भाऊबहिणी नाहींत असा फटिंग; यामुळें नेहमीं घर बंद किंवा ओसाड.

पोटीं येऊन छळीन, पाठीं येऊन छळीन—या जन्मीं आपण एखाद्यास छळलें तर त्याचा शाप पुढील जन्मांतहि आपणास भोंवतो व जसे कांहीं आपले शत्रू आपल्या पोटींच पुत्ररूपानें अगर पाठचीं भावंडें म्हणून जन्मास येऊन आपणांस नकोसें करतात. विशेषतः एखादा कुपुत्र अथवा दुष्ट भाऊ वगैरे आपणांस अतिशय त्रास देऊं लागला म्हणजे कोणीतरी मागील जन्माचे दावेदार पोटीं येऊन अगर पाठीं येऊन छळतो आहे असें म्हणतात.

पोटरी—**पोटरीस येणें**—पोटळणें; कणसांत दाणा भरणें. 'तांबडी जोंगी रयतानी पेरली होती ती पोटरीस आल्यावरी पिसारा पडोन दाणा अगदीं जाहला नाहीं.'—बापूगोप २५१.

पोत—**पोत पाजळणें**—(उप.) कीर्तीला बाद येईलसें करणें; कीर्ति, गुण उघळणें; दिवे लावणें.

पोती—**नात तशी पोती, खाण तशी माती**—पूत जात पहा.

पोतेरें—**पोतेऱ्यापेक्षां निपटारें**—पोतेरें हें घाण पुसण्याकरितां सारवणाकरितां वापरतात, त्यापेक्षां घाणेरडें; अगदीं ओंगळ; घाणेरडें; अतिशय गलिच्छ.

पोंद—**पोंद नाशिल्ली ओल्ली घेवून् या**—(गो.) बूड नसलेली रोवळी घेऊन ये. कोणी जर एखादी विक्रेय वस्तु अत्यंत स्वस्त भावांत मागायला लागला किंवा अतिरिक्त हाव दाखवूं लागला तर त्याला उपहासानें म्हणतात. 'हवें का तुला? पण कशांत भरून नेणार आहेस? जा, घरीं जाऊन बिनबुडाची रोवळी घेऊन ये.'

पोपट—**पोपटपंची**—पोपट ज्याप्रमाणें शिकवलेले शब्द अर्थ न कळतां उच्चारतो त्याप्रमाणें निरर्थक केलेली बडबड; वटवट; अल्पविद्या. 'अलीकडील जी पोपटपंची तीस पूर्वी मुळींच थारा न मिळून'—नि १०७.

***पोपट जों जों अधिक बोलतो तों तों पिंजऱ्यांत पडतो**—जों जों अधिक गुण दाखवावेत तों तों दुसऱ्यास ठेवून घेण्याचा मोह उत्पन्न होतो.—केसरी ६-९-४०.

पोपटनेत्री : विलक्षणसूत्री—(महानु.) पोपटासारखे डोळे म्हणजे ज्या डोळ्यांत लज्जा वास करीत नाहीं असे डोळे, अशा डोळ्यांचा माणूस पाताळयंत्री असतो.

पोफळ—**पोफळ घालणें**—देवापुढें सुपारी ठेऊन शपथ घेणें; प्रतिज्ञा करणें; पैज मारणें. 'लटके वाचाळ। ना म्हणसी तरि पोफळ। घातलें आहे॥—[illegible] १३.२[illegible]

पोराचें वटकण पंतोजीच्या हातीं, माकडाचें वटकण दरवेशाचे हातीं—पंतोजीच्या धाकांत जशीं पोरें तशीं माकडें दरवेशाचे धाकांत असतात.

पोरांच्या घरांत लिंबाचा भारा, वांझोट्याच्या घरांत उंसाचा भारा—जेथें एखादी गोष्ट असावयास पाहिजे तेथें तिचा अभाव असून भलतीकडेच तिचें अस्तित्व असणें.

पोरानें केली चोरी, पाटील झाला न्यायाधिकारी—पाटलाच्या पोरानें चोरी केली व पाटलाकडेच न्याय देण्याचें काम आल्यास तो पक्षपात करून आपल्या मुलास सोडणारच. याप्रमाणें पक्षपाती न्याय. आरोपीलाच न्यायाधीश नेमणें.

पोराला पंतोजी व पोरीला सासू— मुलास वळण लावावयास जसा शिक्षक लागतो तसें मुलीस वळण सासरींच सासूकडून लागतें.

पोरास जेऊं सांगे वाटींत तर पोर जेवी करटींत—अभद्र लक्षणें असणाऱ्याबद्दल म्हणतात. जेवणें पहा.

पोराहून पोरगळ, म्हाताऱ्याहून बारगळ—एखादा मनुष्य पोरापेक्षां पोरकट व वृद्धापेक्षांहि भरमसाटपणें वागणारा असल्यास म्हणतात.

पोरीं संसार, अन् गोऱ्हीं शेत, कधीं झालें आहे?—गोऱ्हा पहा.

पोरें फिरतीं दारोदारीं, म्हातारी पडली खाटेवरी—पोरें चपळ असतात व वृद्ध पंगू असतात. किंवा कोणी कोणाची काळजी करीत नाहीं.

पोऱ्या मागतो पैसा, घेतो उसासा—मुलानें पैसा मागितला असतां श्वास घेणारा, उसासे टाकणारा; कंजुष किंवा दरिद्री मनुष्य.

पोरगा—पोरगा शुद्धीवर आला, मुसळाला अंकुर फुटला—मुसळाला अंकूर फुटणें जसें अशक्य तसें एकदां बिघडलेलें मूल सुधारणें अशक्य असतें.

पोरस—पोरसांतली भाजी, जायत्तेन्ना खुंटची—(गो.) परसांतली भाजी, हवी तेव्हां खुडून आणावी. स्वाधीन वस्तूबद्दल म्हणतात. परस पहा.

पोरसातु हागुनु पूर्वार्जिताक रडचें—(गो.) परसदारीं मलविसर्जन करायचें आणि घाण सुटली कीं आपले नशीबच तसें म्हणून रडत बसायचें! पूर्वकर्मापेक्षां स्वतःचीं दुष्कृत्येंच स्वतःला नडतात.

पोल—पोलॅ पण्साक् पांख चड—(गो.) पोल्या (आंत गरे कमी असलेल्या) वांझ्या फणसाला चीक अधिक. ज्याला दोन वेळां अन्न मिळायची भ्रांत तोच बढाया मारतो.

पोव—पोव सारयला म्हुण फिरंगिण जायना—(गो.) पावडर लावली म्हणून फिरंगीण होत नाहीं. गोरेपण हें मूळचेंच असावें लागतें. समर्थांनी म्हटलें आहे—' स्वरूप सुंदर अभ्यासितां नये— '

पोवळ—पोवळयांक मुतुंक बरें; पोविल्लयांक मुतूं बरँ—(गो.) गळ्यांत लघुशंका करावयाला चांगली. कारण बाहेर जायला नको आणि कुणाला कळावयाचें पण नाहीं.

पोवळा—ढवळ्याजवळ बांधला पोवळा, वाण नाहीं पण गुण लागला—ढवळा पहा. तु०—संगतिं संगदोषेण.

पोवाडा—पोवाडे गाणें—स्तुति करणें; प्रशंसा करणें; वाखाणणें; पवाडा पहा.

पोषाक-ख—पोषाकी नांव—औपचारिक नांव.

पोषाखी भाषण—वरकांती बोलणें.

पोषाकी वस्त्रें-दागिने—सणावारीं घालावयाचे दागिने.

पोशिंदा—लाख मरोत पण लाखांचा पोशिंदा न मरो—जो अनेक लोकांना आश्रय देतो, त्यांना पोसतो तो मरूं नये, इतर लाख मेलेलीं चालतील. लाख पहा.

पोस—चांदण्याचा पोस—नुकतेंच पडूं लागलेलें चांदणें.—शर.

पोसणें—पोसल्या पोरा काय करशी? तर म्हातारीचे डोळे फोडशी—एखाद्या म्हातारीनें मोठ्या आस्थेनें एखाद्या पोरक्या पोरास आश्रय देऊन त्याचें पालनपोषण करावें व त्यानें वृद्धपणीं तिचे डोळे फोडावे हा कोण कृतघ्नपणा. यावरून कृतघ्न होणें; खाल्ल्या घरचे वासे मोजणें. पोर पहा.

पोशिलुया पोरा काय करशीं? पोर्तुन माका हाय कर्शी—(गो.) बाळगलेल्या पोरा, तू काय करशील? फिरून माझ्यावरच उलटशील. केलेले उपकार विसरून कृतघ्नपणा करणारीं माणसें जगांत का थोडीं आहेत?

पोबारा——पोबारा करणें—पववारा करणें पहा. तीन फाशीं खेळींत २ फाशांवर प्रत्येकीं ६–६ ठिपके व एकावर १ ठिपका असें दान पडलें म्हणजे त्यास पोबारा म्हणतात. (ल.) पळ काढणें.

पोम——पोम बाहेर पडणें-फुटणें—ढोंग उघडकीस येणें.

पोम माजविणें-वाढविणें—स्तोम वाढविणें; बडेजाव करणें.

पोमाडेंगी——पोमाडेंगी हाकलणें—(व.) आपलेंच म्हणणें खरें करणें.

पोर——पोरापोरीं; पोरासोरीं—१ पोरामध्यें; पोरांकडून. २ वंशपरंपरेनें.

पोरीटोरी—मुलीबाळी. 'पोरीटोरी गोरीकाळी सान्या पाहुनि कविराय बाला।'–राला ५४.

***पोर आणि ढोर दुसऱ्यावर विसंबूं नये**—स्वतःच्या मुलांची तशीच गुरावासरांची काळजी स्वतः घेतली तरच तीं चांगलीं होतात. तीं दुसऱ्याच्या हवालीं केल्यास बिघडण्याचा संभव असतो.

पोरचेष्टा कीं माकडचेष्टा––मुलें आणि माकडें हीं चेष्टा करण्याच्या कामीं सारखींच असतात.

पोर ना सोर, रिकामा घोर––पोरबाळ नसून व्यर्थ दुसऱ्याची काळजी असल्यास म्हणतात.

पोर नाहीं पोराची खरवड––अतिशय द्वाड मुलें असल्यास वैतागून आई म्हणते.

पोर पोटांत, खीर ताटांत—पोर होण्यापूर्वींच उष्टावणाची तयारी; फार उतावीळपणा.

पोर होईना व सवत साहीना—आपणांस पोर होत नाहीं तर सवत खपवून घ्यावी पण हेंहि नाहीं व तेंहि नाहीं. एखादी गोष्ट स्वतः तर करतां येत नाहीं व दुसऱ्यानें केलेली पाहवत नाहीं अशी स्थिति; आपणास एखादी वस्तु प्राप्त होत नसली तर ती दुसऱ्यासहि मिळूं नये अशी इच्छा. 'पोर होईना व सवत साहीना अशी या ब्राह्मणेतर पार्टीची स्थिति झाली आहे!'–सासं २.३५२. सवत पहा.

पोसल्या पोरा काय करशी? तर म्हातारीचे डोळे काढशी—पोसणें पहा.

पोरा, बुद्धि बारा-तेरा––१ मुलांची बुद्धि क्षणिक असते, ती वरचेवर बदलते; तिला स्थिरता आलेली नसते. २ पोरें मोठीं क्लृप्तिबाज असतात.

पोराचा कापला खवडा, तर न्हाव्याचा गेला लवडा––(अशिष्ट.) एकाचें दुःख दुसऱ्यास काय? पुढें पहा. तु०–देवळाची गेली वाट.

पोराचा कापला खवडा तर न्हाव्याला काय दुःख?––हजामत करतांना लहान मुलाच्या डोक्यावर जखम झाली तर त्याबद्दल न्हाव्याला वाईट वाटण्याचें कांहींच कारण नाहीं. परदुःख शीतल असतें.

पोराचीं लक्षणें पाळण्यांत––पाळणा पहा; मुलाचे पाय पाळण्यांत दिसतात.

पोराचे गांडीचा आणि चहाडाचे तोंडाचा विश्वास नाहीं––लहान मूल केव्हां आणि कोठें विष्ठा करील आणि चुगलखोर केव्हां आणि कोठें काय बोलेल याचा भरंवसा नसतो.

पोराचें चांगलें भाषण, आनंदवितें अंतःकरण––आपल्या मुलाचे गोड शब्द मनाला आनंद देतात.

पोराचें चिन्ह डोहाळ्यावरून ओळखावें––मातेला गरोदरपणीं ज्या इच्छा होतात त्यावरून पुढें होणाऱ्या मुलाचीं लक्षणें कळतात अशी समजूत आहे. तु०–मुलाचे पाय पाळण्यांत दिसतात.

पोराचें पोर गेलें आणि कातबोळाचें मागणें आलें––बाळंत होऊन मुलगा झाला होता तो तर गमावला पण त्यावेळीं मुलाकरितां दूध येण्याकरितां कातबोळ आणवावा लागला त्याच्या देण्याचा तगादा मात्र पाठीस लागला. काम यशस्वी न होतां व्यर्थ पीडा पाठीशी लागणें. कातबोळ पहा.

पोराचे बोबडे बोल, आईला अनमोल—मूल जरी बोबडें बोलूं लागलें तरी आईला त्याबद्दल कौतुक वाटतें.

पोराचे मळणेक, बीं ना भात––(गो.) अनभिज्ञ माणसाच्या हातून घडणारें काम निरुपयोगी ठरतें.

पोराचें वटकण पंतोजीच्या हातीं—मुलें बहुधा शिक्षकाच्या फार धाकांत असतात.

पोहणी---पोहणीस घालणें--(जनावर इत्यादी स.) पाण्यांत सोडणें.

पोहणीस लागणें---नदींतून उतरून जातांना घोडे, बैल वगैरेंस पाय जमिनीवर टेकतां न आल्यानें पोहून जावें लागणें.

पोहणें---पोहलेला-अनुभविक; तरबेज. "तो त्या धंद्यात अगदीं पोहलेला आहे."

***पोहणारा बुडतो, लिहिणारा चुकतो, शाहणा नडतो, खेळणारा पोळतो**—जो एखादें कार्य करतो तोच त्यामध्यें चुकी करण्याचा संभव असतो. ज्यानें कांहीं केलेंच नाहीं त्याच्या हातून चूकहि होत नाहीं. अकर्त्या मनुष्यास कांहींच महत्त्व नसतें.

पोहरा-पोहरा देईल तो विहिर दाखवील—ज्यानें थोडा फार आश्रय दिला तो अधिकहि मदत करण्याचा संभव असतो.

पोहऱ्याला चऱ्हाट बोळवण—एकानें विहिरींतून पाणी काढतांना पोहरा बुडविला तर त्याबरोबर चऱ्हाटहि गेलें समजावें. एका नुकसानीच्या गोष्टीबरोबर दुसरेंहि आनुषंगिक नुकसान होणें.

पोहो---पोहो फाकणें--(व.) अरुणोदय होणें.

पोळ---पोळजत्रा—१ पोळा. रेड्याला बळी देणें. २ (ल.) कत्तल; नाश; दाणादाण. 'याप्रकारें मल्हारराव याचे फौजेची पोळजत्रा झाली.' -भाव ८१.

पोळणें---पोळलेला जीव-दुःखी कष्टी माणूस.

पोळा--धाङ्ग माळू पोळा व चिपडी मिपडी संक्रांत—(गो.) पोळ्याच्या दिवशीं ज्याप्रमाणें बैल रेड किंवा वृद्ध कसाहि असला तरी त्याला शृंगारण्यांत येतें त्याप्रमाणेंच स्त्री कशीहि चिपड्या डोळ्यांची ओंगळ कां असेना, ती संक्रांतीला उंची वस्त्रें व अलंकार परिधान करून नटते.

पोळी---पोळी पडणें--होळींत ज्याप्रमाणें पोळी पडून जळते त्याप्रमाणें दग्ध होणें.

पोळी पिकणें--चंगळ उडणें; चैन होणें; मजा होणें. 'याचा परिणाम असा झाला कीं, ढोंगी व स्वार्थसाधु लोकांची देशात समृद्धि होऊन त्यांची पोळी पुष्कळ पिकली.'-पामो ३५४.

पोळीचें झाड—(बे.) लग्न, मुंज वगैरे कार्यप्रस्थ करणें.

आपल्याच पोळीवर तूप ओढणें—स्वार्थ साधणें; आप्पलपोटेपणा करणें; केवळ स्वतःचा फायदा करून घेणें.

पोळया पाठक—(विनोदी) पोळ्या करणारा आचारी.

***पोळीला आणि चोळीला कोणी लहान नाहीं**—फायद्याच्या वेळीं प्रत्येकजण आपला मोठेपणा प्रस्थापित करतो. आपण लहान तेव्हां आपल्याला कशाला असें कोणी म्हणत नाहीं.

पोळीपुरती टाळी—ताकापुरतें रामायण; कामापुरती खुशामत.

पोळ्यो खाल्यो, दिवळयो गेल्यो, आंबील पॅज संदांची--(गो.) पोळ्या खाल्ल्या, दिवाळी संपली, (आतां) आंबील आणि पेज हे पदार्थ रोजचे. चार दिवस चैन करायला मिळाली म्हणून आपल्या मूळच्या परिस्थितीला विसरूं नये.

पोळा—पोळॉ काट्ल्याचें चेमुड काडूं जाय--(गो.) मांडे करणारणीचा शेंबूड काढायला हवा. कार्यकर्त्यांच्या मदतीला जावें लागतें.

पौर्णिमा—पौर्णिमेचा चोर, अमावास्येचा पोर—एका वेळीं गुन्हेगार असलेला दुसऱ्या वेळीं साव म्हणून मानला जातो.

प्याज--प्याजकू क्यौं बिस्मिल्ला (हिं.) कांद्याला बिस्मिल्ला कशास-पहा.

प्यादा-प्याद्याचा फर्जी होणें—[प्यादें व फर्जी या बुद्धिबळांतील अगदीं लहान व मोठ्या दर्जाच्या बुदबळाच्या संज्ञा. प्यादें जर आपल्या समोरच्या शेवटच्या शेवटच्या घरापर्यंत पोंचलें तर त्याचा फर्जी होतो.] हलका मनुष्य मोठ्या पदवीस चढणें. 'मी पाटलाचा नातू आणि बारगिराचा मुलगा असतांहि केवळ करामतीच्या जोरावर प्याद्याचा फर्जी झालों यांतच माझा सर्व गौरव होऊन चुकला आहे !'-शिसं २.२.

प्यार---प्यार बैठा गद्धीपर तो पद्मीन क्या बात—(हिं)गर्दभीवर प्रेम बसलें तर तिच्यापुढें पद्मिनीहि व्यर्थ होय. प्रेम अंधळें असतें. गाढवी पहा.

प्याला—प्याला पिणें-घेणें—मुसलमान धर्माची दीक्षा देतांना काझी पेल्यांतून कांहीं पेय पिण्यास देतो. मुसलमान होणें.

प्रकरण—प्रकरण अंगावर येणें—किटाळ, तोहमत येणें; बाजू अंगावर येणें; एखादें लचांड पाठीशीं लागणें.

प्रकरण निकालांत काढणें—विचार करण्याची आवश्यकता दिसत नाहीं म्हणून बाजूला टाकणें; एखाद्या गोष्टीचा शेवट होणें; निकाल लागणें. To file

प्रकरण हातघाईवर येणें—१ कलह विकोपास जाणें; भांडणतंटा अगदीं अखेरच्या पायरीवर येणें; युद्ध होण्याची परिस्थिति उत्पन्न होणें. 'चीन व रशिया यांमधील प्रकरण गेल्या आठवड्यांत बरेंच हातघाईवर आलें.' —सासं २.३२८. २ हमरीतुमरीवर येणें; मारामारीचा प्रसंग येणें.

प्रकरण होऊन बसणें—एक मोठा वादाचा विषय बनणें; महत्त्व पावणें; प्रस्थ होणें. 'त्या म्हणजे एक प्रकरण होऊन बसल्या होत्या.'—रम्य रात्रीं, पा. १२४.

प्रकार—प्रकार करणें—१ भिन्न भिन्न गोष्टी, तऱ्हा करणें. २ विलक्षण वागणें. ३ निरनिराळ्या प्रकारें सतावणें.

***एक गहूं, प्रकार बहू**—एक पहा.

प्रकृतार्थ—द्वौ नञौ प्रकृतार्थं दृढ्यतः।—दोन नकारांचा एक होकार होतो. तु०—Two negatives make one affirmative.

प्रकृति—प्रकृति ताल्यावर येणें—तब्येत बरी होणें; आरोग्य प्राप्त होणें; प्रकृति सुधारणें.

प्रकृति तोळामासा होऊन राहणें—अगदीं हळुवार प्रकृति होणें; अगदीं निमित्ताला टेकणें. 'संपाच्या बाबतींत मुंबईची प्रकृति अशीच तोळामासा होऊन राहिली आहे.'—सासं २.२०९.

प्रकृतीचा ताळ बिघडणें-नासणें-सुटणें; प्रकृतीनें ताळ सोडणें-टाकणें; प्रकृति ताळ्यांतून जाणें—१ तब्येत बिघडणें; दुखणें येणें; व्याधि जडणें. २ रागावणें; संताप होणें; मनाची शांति बिघडणें.

प्रकृतीनें चालणें-जाणें-वागणें-असणें—मर्जीप्रमाणें, कलानें वागणें.

प्रकृतीला माहीत नसणें—अंगचें, अंगवळणीं नसणें; स्वभावांतच नसणें. 'कारण भिणें म्हणजे काय हें त्याच्या प्रकृतीला माहीतच नाहीं!'—शिसं २.१.

प्रकृतीवर टाकणें-ठेवणें-असूं देणें—आजार वगैरे नैसर्गिक रीत्या बरा होऊं देणें.

मूर्ती तितक्या प्रकृती—मूर्ति पहा.

प्रकृति तितक्या विकृति—जितकीं जास्त माणसें एखाद्या गोष्टींत पडतात तितके त्यांत अधिक फाटे फुटतात.

प्रजा—यथा राजा तथा प्रजा—जसा राजा तशी त्याची प्रजा; जसा वरिष्ठ किंवा सत्ताधीश असतो त्याप्रमाणें त्याच्या ताब्यांतील लोक होतात. (अ) राज्ञि धर्मिणि धर्मिष्ठाः पापे पापाः समे समाः। लोकास्तदनुवर्तंते यथा राजा तथा प्रजाः॥ (आ) यथा देशस्तथा भाषा यथा राजा तथा प्रजाः। यथा भूमिस्तथा तोयं यथा बीजं तथाङ्कुरः॥ (इ) स्वधर्मरूपो राजेन्द्रो दयारूपेण मन्त्रिणः। सेवकाः साधुरूपेण यथा राजा तथा प्रजाः॥ (ई) राजा राक्षसरूपेण व्याघ्ररूपेण मन्त्रिणः। सेवकाः साधुरूपेण यथा राजा तथा प्रजाः। (उ) अश्विनी सूयते वत्सं कामधेनुस्तुरंगमम्। तथैव सागरो वह्निं यथा राजा तथा प्रजाः॥

प्रजेचा निढळा घाम, राजाचा दाम—प्रजा कष्ट करून राजाला कर भरीत असते; प्रजेच्या कष्टाचें धन राजा कर म्हणून वसूल करतो.

प्रजेची होळी आणि राजाची दिवाळी—राजाची दिवाळी साजरी व्हावी म्हणून प्रजेला अनेक कष्ट करावे लागतात किंवा प्रजा पूर्णपणें नागविली जाते.

प्रजेला अहंता भरली, राजाला चिंता जडली—प्रजेच्या मनांत स्वत्वाची जागृति झाल्याबरोबर राजाच्या छातींत धडकी भरते.

प्रजापति—प्रजापति दाखविणें—(अशिष्ट) (प्रजापति=लिंग, शिश्न) लुच्छ मारणें; हात दाखविणें; हातावर तुरी देणें; फसविणें; ठकविणें; बुचाडणें.

***तोंड गायीचें, प्रजापति गाढवाचा**—(अशिष्ट.) वरून गरीब गायीसारखा पण करणी लबाड.

प्रताप—प्रताप उधळणें—अंगचे दुर्गुण प्रकट करणें. 'त्यांच्या शहाणपणाचा प्रताप त्यांना घरांत उधळूं दे.'—विकार.

प्रतिजीव——प्रतिजीवीं सृष्टि भिन्न—प्रत्येक प्राणि हा एक स्वतंत्र उत्पन्न झालेला जीव आहे. जगांतील कोणत्याहि प्राण्याचा दुसऱ्या कोणत्याहि प्राण्याशीं अर्थाअर्थी संबंध नाहीं.प्रत्येक प्राणि स्वतंत्र आहे. तु०—मूर्ती तितक्या प्रकृती.

प्रतिनिधि——प्रतिनिधि नाहीं तर करनिधि नाहीं—ज्या सरकारांत प्रजेच्या प्रतिनिधींचा समावेश केलेला नसतो त्या सरकारास कर वसूल करण्याचा हक्क नसतो. विशेषतः अमेरिकेच्या स्वातंत्र्याच्या चळवळीच्या वेळीं या तत्त्वावर ब्रिटिश सरकारनें बसविलेल्या कराचा निषेध अमेरिकन नागरिकांनीं केला.पुढील इंग्रजी म्हणीचा पर्याय. No Taxation without representation.

प्रतिमा——एके प्रतिमेचा—एक सांच्याचा; एकसारखा; अगदीं तुल्य.

***प्रतिमेवर नेम पण छायेवर टोला**—एकास उद्देशून बोलावयाचें पण भलतीकडेच लागू असावयाचें; अप्रत्यक्ष भाषण किंवा विसंगत भाषण. लेकी बोले सुने लागे यासारखीच पण उलट अर्थानें म्हण.—अस्तंभा ५३.

प्रतिष्ठा——पंधरा प्रकारच्या प्रतिष्ठा—फाजील डौल; रिकामा डौल; अव्यवहारी बेत.

कुचेष्टेवांचून प्रतिष्ठा वाढत नाहीं—कांहींतरी गडबड केल्याशिवाय कोणी आपल्याला विचारीत नाहीं. तु०—घटं भिंद्यात्पटं छिंद्यात् कुर्याद्वा रासभध्वनिम् । येनकेन प्रकारेण प्रसिद्धः पुरुषो भवेत् ॥

प्रतिज्ञा——प्रतिज्ञा भोगणें—वचन देणें; पण करणें; आणभाक घेणें. 'आम्ही पुस्तकास आरंभ करतेवेळीं अशी प्रतिज्ञा भोगलेलीहि कुठें आम्हांस आठवत नाहीं.'—नि ६३८.

प्रतीति——प्रतीतीस येणें—१ अनुभवास येणें; पटणें; प्रत्यक्ष दिसून येणें. २ तंतोतंत जुळून खात्री होणें; अगदीं खरें होणें.

प्रत्यंचा——प्रत्यंचा चढविणें—धनुष्यास दोरी लावून सज्ज करणें; युद्धास सिद्ध होणें; तयारी करणें. 'तिच्या स्वयंवराकरितां या धनुष्याला प्रत्यंचा चढविणें हाच पण तूं जाहीर कर.'—धनुर्भंग ६.

प्रत्यय——प्रत्ययास येणें—पटणें; अनुभवास येणें. 'म्हणोनि वळो हें झुंज। प्रत्यया नये मज ॥'—ज्ञा १.२०८.

प्रत्यवाय——प्रत्यवाय जाणें—१ आलेली अडचण दूर होणें. २ निश्चयास येणें.

प्रत्यक्ष——प्रत्यक्ष तें खरें—जें डोळ्यांस स्पष्ट दिसतें त्यावर कोणीहि विश्वास ठेवतो. तु०—प्रत्यक्षास प्रमाण नको. Seeing is believing.

प्रत्यक्ष देकिलें तरी परांवरसूनु पळंवुका—(गो.) प्रत्यक्ष पाहिलें तरी दुसऱ्याला दाखवून खात्री करून घ्यावी; कारण एखादे वेळीं आपले डोळे आपणालाच फसवतात.

प्रत्यक्ष पाही, त्याला मन साक्षी देई—जी गोष्ट आपणांस डोळ्यांनीं स्पष्ट दिसते तिच्याबद्दल आपली केव्हांहि खात्री असते.

प्रत्यक्षाला प्रमाण नको;प्रत्यक्षास प्रमाण कशाला—मागें पहा.

प्रत्येक——प्रत्येक गोष्टीस उपाय आहेच—प्रत्येक गोष्टीला कांहींतरी तोड असतेच. कोणत्याहि रोगास ज्याप्रमाणें कांहींतरी औषध असतें त्याप्रमाणें प्रत्येक गोष्टीवर कांहींतरी इलाज करतां येतोच.

प्रत्येक ढगाला चंदेरी (सोनेरी) कडा असते—प्रत्येक संकटापासून कांहींतरी अप्रत्यक्ष फायदा होत असतो किंवा त्यांतून सुटण्याचा कांहीं तरी मार्ग असतो. तु०—Every cloud has a silver lining.

प्रत्येकाची भूक ठरलेली असते—प्रत्येक मनुष्याला पुरेशी लालूच दाखविल्यास तो वश होतो. मूळ वॉलपोलच्या (Every man has his price) या प्रसिद्ध म्हणीचें भाषांतर. तु०—द्रव्येण सर्वे वशाः।

प्रत्येकाचें ध्येय स्तुति हें आहे—प्रत्येक मनुष्यास आपली दुसऱ्यानें स्तुति केलेली आवडते.

प्रथम——प्रथमग्रासे मक्षिकापातः।—पहिल्याच घांसाला माशी लागणें. माशी गिळल्यास सर्व अन्न ओकून पडतें. पहिल्याच पावलीं अडथळा आला म्हणजे म्हणतात. 'कांहीं संशयी मंडळींना वाटलें, प्रथम ग्रासे असा मक्षिकापात झाल्यावर कार्य पुढें न चालविणेंच इष्ट.'—दाजी, भाग १ पा. २००.

प्रथमचुंबने दंतभंगः।—वरप्रमाणेंच.

प्रथा——जी प्रथा पडली ती अंगीं जडली—जी एकदां संवय लागते ती कायमची होते. तु०—Habit is second nature.

प्रदक्षिणा--लक्ष प्रदक्षिणा आणि पैसा दक्षिणा-पुष्कळ काम करून घेऊन थोडासा मोबदला देणें. पैसा पहा.

प्रपंच---आधीं प्रपंच करावा नेटका।; प्रपंच करून परमार्थ--प्रथम प्रपंच उत्तम करून मग परमार्थाला लागावें. यासंबंधीं रामदासांनीं एका समासांत विवेचन केलें आहे. 'आधीं प्रपंच करावा नेटका। मग घ्यावें परमार्थ विवेका। येथें आळस करूं नका। विवेकी हो ॥'-रादा १२.१.१.

प्रपंच केला वेगळा वेगळा, तोच सगळ्याला भोवला--एकत्र कुटुंबांतून वेगळें निघालें म्हणजे प्रत्येकाला वेगळा वेगळा खर्च येऊन सर्वांसच अधिक त्रास होतो.

प्रपंच साधून परमार्थाचा लाभ ज्याणें केला। तो नर भला भला ॥--शिवदिन केसरीचें पद. आधीं प्रपंच करावा नेटका पहा.

प्रपंचाचा भार पत्नीच्या अंगावरी, करावी टापटीप संसारीं---संसाराचा सर्व भार खरोखर गृहपत्नीवर असतो व तिनें तो सांभाळून टापटिपीनें संसार करावा.

प्रपंचांत पैसा आणि परमार्थांत परमेश्वर---ज्याप्रमाणें संसारांत पैशाला महत्त्व आहे त्याप्रमाणें परमार्थमार्गांत परमेश्वरप्राप्तीस महत्त्व आहे.

प्रपंचाला धन, परमार्थाला वैराग्य---द्रव्य असलें म्हणजे ज्याप्रमाणें संसार करणें सुखकर होतें त्याप्रमाणें अंगीं विरक्ति बाणली म्हणजे परमार्थसाधन सुलभ होतें.

प्रपंचाला वित्त आणि परमार्थाला चित्त---ज्याप्रमाणें संसाराला द्रव्याची जरूर असते त्याप्रमाणें परमार्थसाधनास मनाची एकाग्रता किंवा चित्तशुद्धि यास महत्त्व आहे.

प्रपंचीं जो सावधान, तोच परमार्थ करील जाण--ज्याला संसार योग्यप्रकारें करण्याचें साधतें त्यालाच परमार्थसाधन सुलभ होतें. 'प्रपंचीं जो सावधान। तो परमार्थ करील जाण। प्रपंचीं जो अप्रमाण। तो परमार्थी खोटा ॥'-रादा १२.१.९.

प्रपंचीं पाहिजे सुवर्ण, परमार्थीं पंचीकरण---ज्याप्रमाणें संसारांत द्रव्याची गरज असते त्याप्रमाणें परमार्थांत पंचीकरणाची आवश्यकता असते. 'प्रपंचीं पाहिजे सुवर्ण। परमार्थीं पंचीकरण। महावाक्याचें विवरण। करतां सुटे ॥ -रादा ११-३-२९.

प्रभु---प्रभु तुझें मुख, पाहतां वाटे सुख-- (महानु.) परमेश्वराचें ध्यान केलें असतां मनास आनंद होतो.

प्रमाण---नैको ऋषिर्यस्य वचः प्रमाणम्।---कोणत्याहि एका ऋषीचें वचन प्रमाण मानून चालत नाहीं. अनेकांचीं अनेक मतें असतात त्यांतून आपणांस योग्य तीं निवड करून घ्यावीं लागतात. 'श्रुतिर्विभिन्ना स्मृतयश्च भिन्ना नैको ऋषिर्यस्य वचः प्रमाणम्। धर्मस्य तत्त्वं निहितं गुहायां महाजनो येन गतः स पन्थाः ॥

प्रयत्न---प्रयत्नांतीं परमेश्वर; प्रयत्नीं परमेश्वर---प्रयत्न केला असतां परमेश्वराचीहि प्राप्ति होऊं शकते. प्रयत्न केला नाहीं तर कांहींहि हातीं लागणार नाहीं. तु०-God helps those who help themselves. 'शेवटीं त्यांनीं "प्रयत्नीं परमेश्वर" ह्या वृद्ध वचनावर विश्वासून, जिवाचा धडा करून, नारायणरावास खालीलप्रमाणें खडखडीत उत्तर दिलें.'-छच ७७.

प्रयत्नाला विवेक जोडावा, हाच भाग्याचा ठेवा---मनुष्यानें कोणत्याहि कार्यामध्यें परिश्रम करावयाचे ते विचारपूर्वक केल्यास त्यास त्यांत यश आल्याशिवाय रहात नाहीं.

प्रयत्नावांचून प्रारब्ध लंगडें---केवळ दैवावर अवलंबून राहून कांहीं मिळत नाहीं. मनुष्यानें प्रयत्न केलाच पाहिजे. तु०-God helps those who help themselves.

प्रयत्नेविणें कार्य होत नाहीं, जेवल्याविणें पोट भरत नाहीं---ज्याप्रमाणें प्रत्यक्ष अन्न सेवन केल्याशिवाय क्षुधेचें शमन होत नाहीं त्याप्रमाणें प्रत्यक्ष खटपट केल्याशिवाय कोणतेंहि कार्य होत नाहीं.

प्रयाण---प्रयाण काल समय---मरण काल.

प्रयोग---प्रयोगशरणा वैयाकरणाः।---व्याकरणकाराला भाषेच्या रूढीस अनुसरूनच व्याकरण लिहावें लागतें. तु०-योगाद्रूढिर्बलीयसी -टि ४.३९५.

प्रयोजन---सांगण्याचें प्रयोजन काय?---"पूर्वी होतों याच कर्मी। आतां झालों सन्यास धर्मी। सांगण्याचें

प्रयोजन काय। व्हटाळीवांचुन तट्टू न जाय ॥" एका धर्मशाळेंत एक संन्याशी व घोड्याचा मालक निजले असतांना रात्रीं घोडें चोरून नेण्याकरितां चोर आले व ते घोड्याच्या गळ्यांतील दोरीने घोडें ओढीत नेऊं लागले; घोडें कांहीं केल्या जाईना. या धडपडीनें संन्याशी जागा होऊन पाहूं लागला आणि त्याला स्वस्थ बसवेना म्हणून त्यानें वरील श्लोकांत घोड्याला हाकलून कसें न्यावें तें सूचित केलें व त्याप्रमाणें चोरांनीं तट्टू नेलें. एखाद्याला आड पडद्यानें सूचना देणें.

प्रलय---प्रलय कालाची दुथडी, तेथें आले वऱ्हाडी--अत्यंत गडबडीच्या वेळीं पाहुणे येणें; आधींच धांदल उडाली असतां त्याच वेळीं आणखी कांहीं नवी भानगड उत्पन्न होणें.

प्रवरा---प्रवरापान, गंगास्नान--गंगा पहा.

प्रवाह---प्रवाहांत पडणें--रूढीप्रमाणें वागणें; प्रवाहपतिताप्रमाणें असणें.

प्रवाह सूत्रित--१ बाहत्या पाण्यांत मुतलेलें. २(ल.) व्यर्थ निष्फल केलेली खटपट, प्रयत्न वगैरे.

प्रवेश---चंचुप्रवेशे मुसलप्रवेशः।--चंचु पहा.

प्रशस्त---प्रशस्त वाटणें--पसंत पडणें; आवडणें; योग्य वाटणें; पटणें; मान्य होणें.

प्रश्न---प्रश्न उठविणें--प्रश्न टाळणें.

प्रश्न पाहणें--भूत, भविष्य गोष्टीचें ज्ञान फलज्योतिष, रमल इत्यादि शास्त्रांवरून पाहणें.

प्रश्न सांगणें--फलज्योतिष शास्त्रावरून विचारलेल्या प्रश्नाचें उत्तर देणें; कूट सोडविणें.

प्रसंग---प्रसंग घडणें--१ संग, संयोग घडणें. २ सुरतसुख भोगणें.

प्रसंग थाटणें--चांगल्या तऱ्हेनें पार पाडणें; योग्य वेळीं सर्व गोष्टी यथास्थितपणें होऊन एखादें कार्य घडून येणें. 'न थे गातां नीट अर्थान्वय सांगूं। थाटूनि प्रसंगु भरूं रंगा।'-दावि २७३.

प्रसंग मारून नेणें-काढणें-संपादणें-शेवटास नेणें--वेळ मारून नेणें; वेळ साजरी करणें; समारंभ वगैरे योग्य तऱ्हेनें पार पाडणें.

प्रसंगास येणें--ऐनप्रसंगीं येणें; वेळेवर येणें.

प्रसंगीं असणें-राहणें-वागणें-चालणें-निभणें--वेळेवर हजर असणें.

***प्रसंग आला तडातडी, तेथें करावी तातडी**--जेथें आणीबाणीची वेळ येईल तेथें घाई करून कसें तरी कार्य साधावें.

प्रसंग पडला बाका, तर गद्धयाला म्हणावें काका--वेळप्रसंगीं नीच मनुष्याचींहि आर्जवें करावीं लागतात; अडला नारायण गाढवाचे पाय धरी.

प्रसंग पडे बाका, तो गद्धेकू बोले काका-कहने लागे काका--(हिं)वर पहा.

प्रसंगावांचून परिचय नाहीं आणि परिचयावांचून अनुभव नाहीं--वेळ आल्याशिवाय किंवा कांहीं निमित्ताशिवाय कोणाची ओळख होत नाहीं व तसें संघटन घडलें नाहीं तर परस्परांचा स्वभाव परस्परांस माहीत होत नाहीं.

प्रसंगावांचून परीक्षा होत नाहीं--मनुष्याच्या खऱ्या स्वभावाची पारख कांहीं तरी निमित्ताशिवाय होत नाहीं.

प्रसवणें---प्रसवली माता, खाते पुत्राच्या लाथा--माता पुत्रास जन्म देऊन आणखी वर त्याच्याकडून होणारा अपमानहि सहन करते व त्याचा लळा पुरवीत असते.

प्रसवली माता, मळमूत्रीं पुत्र, आला गोतीं भाग्यवान्--माता जेव्हां मुलास जन्म देते तेव्हां तो मलमूत्रमय स्थितींत असतो पण तोच पुढें कर्तबगार निघाला म्हणजे सर्व कुळाला भाग्याचे दिवस आणतो.

प्रसाद---प्रसाददीक्षा--शाक्त लोकांत देवीचा प्रसाद म्हणून दारू पिण्याचा प्रघात आहे. यावरून, दारू पिणें; व्यसनास शिकविणें.

प्रसाद-देणें--(व्यंग्यार्थानें) मार देणें.

प्रसाद मिरवणें--लोकांत कीर्ति होईल अशी कृपा करणें. 'मिरवा प्रसाद लोकीं जिरवा मनिं रोष मज इला निरवा।'-मोआदि ११.५८.

प्रसाद मिळणें--(व्यंग्यार्थानें) १ मार मिळणें. 'त्या बिचाऱ्या अर्भकास आणखीहि थोडा आईचा प्रसाद

मिळाला असता.'–दाजी भा. १ पा. २५८. २. लहान मूल अंगावर हगणें. ३. कांहीं अनिष्ट, नुकसान इ. होणें.

प्रसाद मुद्रा—देवीचे वण.

***गुरविणीचीं शितें प्रसादावारी गेलीं**--गुरवीण पहा.

प्रसादोपि भयंकरः ।—अव्यवस्थित पहा.

प्रसूति–प्रसूतीच्या वेदना वांझेस काय ठाऊक–जिला मुलें होतात तिलाच प्रसूतिवेदनांचा अनुभव असतो. तो वांझेस कोठून येणार? जे कार्य करतात त्यांसच त्यांतील अडचणींची कल्पना असते. इतरांस त्यांची काय कल्पना येणार. तु०--विद्वानेव हि जानाति विद्वज्जनपरिश्रमः । न हि वंध्या विजानाति गुर्वी प्रसव वेदनां ।

प्रस्ताव---प्रस्ताव करणें—(व.) दिलगिरी, खेद व्यक्त करणें. प्रस्तावा याबद्दल चुकीनें असावा.

प्रस्थ---प्रस्थ करून–ठेवणें -माजविणें--वाढविणें–नसतें महत्त्व वाढविणें; बडेजाव वाढविणें.

प्रस्थान---प्रस्थान करणें--निघून जाणें; प्रयाण करणें.

प्रस्थान ठेवणें--निघून जाण्याची तयारी करणें; पूर्वी सामान्यतः प्रवासास निघण्यापूर्वी मुहूर्त पाहात असत. अशा वेळीं जर प्रत्यक्ष प्रवासास निघण्याच्या दिवशीं शुभ वेळा नसली तर थोडे तांदूळ, हळकुंडें वगैरे एका वस्त्रांत, बांधून ते शुभ वेळीं एखाद्या शेजारच्या घरीं नेऊन ठेवीत व प्रत्यक्ष जातेवेळीं ते घराहून निघाल्यानंतर बरोबर घेऊन जात. यास प्रस्थान म्हणत. २ उतरणें; बिऱ्हाड ठेवणें.

प्रस्थानी वऱ्हाडी—पूर्वी नेहमीं बराकडील लोकच वरप्रस्थानाबरोबर आपला गांव सोडून वधूच्या गांवीं येत. यावरून लग्नाच्या मिरवणुकींतील वरपक्षाकडील लोक.

प्रहर---प्रहर दिवस येणें—पापाचा घडा भरणें; वेळ भरणें. 'होळकरी जुलमी वेड प्रहर दिवस येईपर्यंत जाणारें नाहीं.' विक्षिप्त ३.१५९.

प्रहराचा ब्राह्मण—देवाच्या संततधार-अभिषेकांतील प्रत्येक प्रहराचे नेमणुकीचे ब्राह्मण.

***प्रहरभर दिवस आला, झोंप लागली आळसाला**—आळशी मनुष्य एकदां निजला म्हणजे प्रहरभर दिवस आला तरी उठत नाहीं.

घडीचा प्रहर होत नाहीं—थोडा वेळ मोडला म्हणजे मोठा खोळंबा झाला असें नाहीं. थोडक्यानें कांहीं बिघडत नाहीं याअर्थी.

प्राकृत–प्राकृत बोलणें; प्राकृतावर येणें—असभ्य भाषा बोलूं लागणें; अशिष्ट भाषण करणें; शिवीगाळीस आरंभ करणें.

प्राक्तन–प्राक्तनाची गति— नशीबाची गति; दैवयोग. 'प्राक्तनाची विचित्र गति । विधिनें लिहिलें उचितीं ।'

प्राक्तनाची दोरी--नशीबाचा धागा; 'एवम् तूंच अवघा सत्ताधारी । हलविशी प्राक्तनाची दोरी ॥'

आपुले रे हातीं आपुलें प्राक्तन । घडवूं तैसें घ्यान घडतसे ॥—आपला उत्कर्ष किंवा अपकर्ष होणें हा आपल्याच हातीं आहे. यांत दैवाचा कांहीं प्रश्न नाहीं. Man is the chisel of his own fortune.

प्राचीन—प्राचीन दोरी; प्राचीनाची दोरी—प्रारब्ध; प्राक्तन वर पहा. 'आपण राहोनिया दूरी । हलवी प्राचीनाची दोरी ।' –एरुस्य १२-३५.

प्राण--प्राण असणें—अत्यंत प्रिय असणें; जीव कीं प्राण असणें; प्राणासारखा आवडता असणें. 'दुर्गादेवीची तर ती खरोखर प्राणच होती.'–विवि ८.१.६.

प्राण ओकणें--१ अत्यंत दुःख करणें. २ अतिशय छंद असणें; नाद लागणें.

प्राण ओवाळून टाकणें—सर्वस्व अर्पण करणें; जीवावर उदार होणें; त्याकरितां जीवहि देण्यास तयार होणें. 'चारुदत्ता या तुझ्या गुणावरून प्राण ओवाळून टाकावे असें वाटतें.' मृ ४७.

प्राण कंठांत गोळा होणें;–प्राण कंठाशीं—कंठीं येणें—१ अतिशय घाबरून जाणें; जीव कासावीस होणें. २ फार चिंता पडणें. मोकृष्ण ८३.३५. 'सिंधू--भाई, माझे प्राण आतां कंठाशीं आले आहेत रे ! काय ऐकायचं असेल तें जितेपणीं ऐकून तरी घेऊं दे !' एकच प्याला.३.१ 'गणू अलीकडे रात्रीं पोथी वाचायला आणि शाळेंत शिकायला येत नसतो.........तें तिनें आपल्या आईला येऊन सांगतांच, आनंदीबाईचा प्राण कंठीं आला.' –गणपतराव चरित्र ५९.

प्राण काढून ठेवणें—परोपरीनें विनविणें; हट्ट घेणें; जीव तोडून तोडून सांगणें. 'करंजा घाल म्हणून प्राण काढून ठेवला पण नाहीं हो ऐकलें.'—कफा ३.

प्राण खाणें—अतिशय त्रास देणें; छळणें; गांजणें. 'तूं......आमच्या दोघांचा प्राण खाल्लास.' नामना १२३.

प्राण जाणें—मरणें.

प्राण ठेवणें—१ जीव, प्राण असणें. २ जगणें. 'प्राण ठेवीन कंठीं।' करुणाष्टक.

प्राण डोळ्यांत उतरणें—प्राण जाण्याची वेळ येणें; मरणोन्मुख होणें. 'तरुणाचे प्राण शेवटीं डोळ्यांत उतरण्याचा प्रसंग येतो.'—भावबंधन २२.

प्राण देणें—१ जीव देणें. २ मरणें.

प्राण न ठेवणें—मरणें.

प्राण पणाला लावणें—जिवावर उदार होणें; जीवाची क्षिति न बाळगणें. ' आपल्या मागें लागलेल्या काळपुरुषाच्या छायेला भिऊन ती प्राण पणाला लावल्यासारखी पळत सुटली '—कवठेकर, अपुरा डाव २४२.

प्राणप्रतिष्ठा करणें—देवमूर्ति तयार झाल्यावर ती पूजेला घेण्यास तीवर मंत्रतंत्र इ. संस्कार करतात व तिला देवत्व आणतात. यावरून रीतसर स्थापना करणें. 'दक्षिणेंत मराठी राज्याची प्राणप्रतिष्ठा करणाऱ्या शिवाजी राजांचें व अमेरिकेंत स्वातंत्र्यदेवतेची प्राणप्रतिष्ठा करणारा वॉशिंग्टन याचें अनेक गोष्टींत अतिशय साम्य होतें.'

प्राण फुटणें—अतिशय उत्कंठा असणें; जीव लोभावणें. 'तैसें देखावे वाटे। पहावया प्राण फुटे।' –दावि १५५.

प्राण वाहणें—सर्वस्व अर्पण करणें; प्राणहि ओवाळून टाकणें. 'प्राण वाहिला पायापरी।'

प्राण सोखणें—१ तहानेनें व्याकुळ होणें. २ एखाद्या गोष्टीचा ध्यास लागणें.

प्राण सोडणें—प्राण देणें; मरणें.

प्राणाचा घाली—१ प्राणनाथ. २ प्राणरक्षक; संरक्षणकर्ता.

प्राणापेक्षां कठीण—मरणापेक्षांहि वाईट.

प्राणाशीं गांठ—प्राणसंकट; जीवाला धोका.

प्राणाशीं जाणें—प्राणास मुकणें; प्राण देणें.

प्राणें उत्तीर्ण होणें—मरणें. 'तेथ उत्तीर्ण होईल प्राणें। परी तें कमळदळ चिरूं नेणें।' ज्ञा १.२०२.

प्राणें जाणें—प्राण देणें. 'आतां मी जाईन प्राणें। पुत्राविण व्यर्थ जिणें।' —कथा १.४.१०१

उघड्या डोळ्यांनीं प्राण न जाणें—आपल्या डोळ्यांसमोर एखादा अन्याय होत असतां स्वस्थ न बसवणें, देखत देखत होणारी गोष्ट पाहणें अशक्य होणें.

प्राणावर आलें होतें पण शेपटावर-बोटावर निभावलें गेलें—जिवावर बेतलेली गोष्ट थोडक्यानें टळणें; प्राणसंकट थोडक्यावर निभावणें.

असंगाशीं संग, प्राणाशीं गांठ—असंग पहा.

प्राणायाम—द्राविडी प्राणायाम—द्राविड पहा.

प्रांत—प्रान्त पाहणें—१ देश पाहाणें. २ आयुष्याचें सार्थक करण्याची सोय पहाणें. 'भ्रांत नसे जालों जों तों भी पाहेन आपुला प्रांत।' मोआश्रम २.४२.

प्राप्त—प्राप्ते तु षोडशे वर्षे पुत्रं मित्रवदाचरेत्—मुलगा सोळा वर्षांचा झाला म्हणजे जरा मोठा झाला कीं त्याच्याशी स्नेह्याप्रमाणें वर्तन ठेवावें. लहान असतांना जसा धाक दाखवून कह्यांत ठेवतात, त्याप्रमाणें वागून चालणार नाहीं. सबंध श्लोक असाः लालयेत्पञ्च वर्षाणि दशवर्षाणि ताडयेत्। प्राप्ते तु षोडशे वर्षे पुत्रं मित्रवदाचरेत्॥

प्राप्ते तु षोडशे वर्षे गर्दभी अप्सरा भवेत्।—सर्व मुली साधारण व कुरुपसुद्धां सोळाव्या वर्षी सुंदर दिसतात. हें वयच असें असतें.

प्राप्ति—प्राप्तीचा खरा वांटा—१ लाभांत निमी वांटणी. गांगा २८९. २ दुसऱ्याच्या कमाईत अन्यायानें आपला हिस्सा ठेवणें. एका कोळ्याला एक चांगला मासा सांपडला असतां तो एका सरदाराकडे घेऊन गेला. त्या सरदाराकडे त्या दिवशीं मेजवानी असल्यानें असा मासा हवाच होता व वाटेल ती किंमत देऊन आणावा असें त्यानें नोकरांना बजाविलें होतेंच. तेव्हां दारावरच्या नोकरानें आपल्याला मोबदल्याचा अर्धा वांटा मिळेल तर आपण आंत जाऊं देतों असें अडविल्यावरून कोळ्यानें कबूल

केलें व तो सरदार वाटेल ती किंमत देण्यास तयार असतांना तो आपणांस फक्त शंभर फटके देण्याचा आग्रह धरून बसला. त्याप्रमाणें नाइलाजानें सरदारानें त्याला पन्नास फटके लगावल्यावर बाकीचे पन्नास त्याच्या नोकराला देण्याविषयीं त्या कोळ्यानें सांगितलें व सर्व उलगडा केला! अर्थात् कोळ्याच्या हुषारीबद्दल त्याला बक्षीस मिळालें हें सांगणें नकोच.

प्रायः—प्रायः शुष्कस्तनी नारी कंचुकीमेव निंदति ।—ज्या स्त्रीला पुष्ट स्तन नसतात ती चोळीच वाईट म्हणते. स्वतःच्या अंगचा दोष दुसऱ्यावर घालणें. पर्याय : नाचतां येईना अंगण वांकडें. विपुलहृदयाभियोग्ये खिद्यति काव्ये जडो न मौर्ख्ये स्वे । निन्दति कंचुकिकारं प्रायः शुष्कस्तनी नारी ॥ समपद्य.

प्रारब्ध—-प्रारब्ध उघडणें—दैव उघडणें; चांगली ग्रहदशा येणें. 'यदीय प्रारब्ध प्रगटच असें हें उघडलें ।'—सारुइ १.५६.

प्रारब्धाचा दोरा—नशिबाचा धागा.

***प्रारब्धस्यान्तगमनम् ।**—जे धैर्यशाली लोक असतात ते एकदां सुरू केलेलें काम शेवटपर्यंत सोडीत नाहींत. सबंध श्लोक—अनारम्भो हि कार्याणां प्रथमं बुद्धिलक्षणम् । प्रारब्धस्यान्तगमनं द्वितीयं बुद्धिलक्षणम् ॥

प्रारब्धहीनाला सुवर्णाची मृत्तिका दिसते—ज्याच्या दैवांत नसतें त्याला वैभव किंवा संपत्ति प्राप्त झाली तरी लाभत नाहीं. एका मनुष्यानें बारा वर्षें तप केल्यावर त्याला ईश्वर प्रसन्न झाला व त्यानें त्यास वर मागावयास सांगितलें. तेव्हां त्यानें मला सायंकाळच्या आंत द्रव्य मिळावें असा वर मागितला. ईश्वरानें तथास्तु म्हटल्यावर हा घरीं जावयास निघाला. वाटेनें येतांना त्यास मध्येंच अंधळे लोक कसे चालतात याचा अनुभव घेण्याची इच्छा झाली. त्याप्रमाणें तो डोळे मिटून चालूं लागला. मार्गांत देवानें एक मोहोरांचा रांजण ठेवला होता. त्याला तो अडखळला पण त्यानें तो धोंडा समजून पायानें लाथडून दूर केला व तसाच तो घरीं आला. सायंकाळपर्यंत द्रव्य मिळालें नाहीं म्हणून पुन्हां देवास विचारतां त्यानें सांगितलें कीं, तुला मोहोरांचा रांजण वाटेंत आढळला पण तो तूं लाथेनें झुगारून दिलास.

प्रिय—-प्रिय करणें—संतोषविणें; आवडती गोष्ट करणें.

***प्रियवाक्यप्रदानेन सर्वे तुष्यंति जंतवः ।**—गोड बोलण्यानें सर्व लोक संतुष्ट होतात. नेहेमीं चांगलें बोलावें.

प्रीति—-प्रीति लावणें—लावून घेणें—एखाद्याचें प्रेम संपादन करणें.

प्रीतीची बाई खांद्यावर घेणें—आपल्या आवडत्या स्त्रीचे मनुष्य वाटेल ते लाड पुरवितो.

प्रीतीचें नाम—नांव—लाडिकपणानें दिलेलें नांव.

***प्रीति जी दुज्यावरि मोठी, ती सर्वहि आपुलेसाठीं ।**—मनुष्य हा कांहीं झालें तरी स्वार्थीच असतो. दुसऱ्यासाठीं जरी तो कांहीं करतो तरी तें स्वतःसाठींच असतें असें समजावें.—बाबा गर्दे (गीतापंचदशी.)

प्रीत जडे मेंडकीसे पद्मिनी क्या माल—इयाट है—बेडकीवर प्रेम जडल्यास ती पुढें पद्मिनी व्यर्थ होय. प्रेम अंधळें असतें. गाढवी पहा. पद्मीन पहा.

प्रीतकी रीत न्यारी है—प्रेमाची रीतच निराळी असते. प्रेमी लोक जगाविरहीत वर्तन करतात.

प्रेत—-प्रेतावरील पान—अत्यंत क्षुल्लक परंतु अत्यंत अशुभ वस्तु.

***प्रेत झांकून ठेवावें, आधीं पेरणीस जावें**—शेतीमध्यें योग्य वेळीं पेरणी करण्याचें महत्त्व इतकें असतें कीं, घात साधण्याकरितां घरांतील प्रेतहि तसेंच टाकून जावयास हरकत नाहीं पण पेरणीची घात फुकट जाऊं देऊं नये. मागाहून स्वस्थपणें प्रेतसंस्कार करावा.

प्रेताचा भार पृथ्वीला होतो—प्रेत फार वेळ तसेंच ठेवूं नये त्याचा संस्कार शक्य तितक्या लवकर करावा; सर्व गोष्टी टाकून प्रेतसंस्कार आधीं करावा.

प्रेताला स्मशान अंधारांत सांपडतें—प्रेताला स्मशानांत जावयास कांहीं दिवा लागत नाहीं. तें तिकडे आपोआपच नेलें जातें. आपोआप होणाऱ्या क्रियेस कांहीं साधन करावें लागत नाहीं.

प्रेम—प्रेम आणि युद्ध यांत कांहीं केलें तरी चालतें—प्रेमसाधनाच्या कामीं व युद्ध जिंकण्याकरितां काय वाटेल त्या गोष्टी केल्या तरी दोषार्ह ठरत नाहींत. पुढील इंग्रजी म्हणीचा पर्यायः —Every thing is fair in love and war.

प्रेमद्वेष वासनेचे, खेळ करती जगाचे--प्रेम आणि द्वेष या दोन भिन्न भिन्न भावना आहेत पण त्यांमुळें जगांत अनेक घडामोडी घडून येतात.

प्रेम प्रसंगाला जुमानीत नाहीं, माणसाला मानीत नाहीं--प्रेमाच्या प्रवाहांत कोणतीहि अडचण आली तरी त्याची गति निरुद्ध होत नाहीं. प्रेमी लोक आपला मार्ग कसा तरी काढीतच असतात.

प्रेम संपादणी आणि लढाई यांत जें जें केलें जातें तें तें उचित होय--वर पहा.

प्रेम हें अंधळें आहे--प्रेमामुळें परस्परांचे दोष परस्परांस दिसत नाहींत व दिसले तरी इतर गुणांकडे पाहून दोन व्यक्ति आपसांत परस्पर सहवासानें राहूं शकतात.आ. पुरुषार्थ, जानेवारी १९४१. Love is blind.

प्रेमाचा कडलग : टाको कैवल्य दुर्ग (महानु.) (कडलग=सिडी. टाको=आटोपो.) प्रेमाच्या शिडीच्या योगानें मोक्षासारखा कठीण गडहि हस्तगत होतो. म्हणजे प्रेमानें असाध्य गोष्टीहि साध्य होतात.

प्रेमाची नाहीं दाटवण तर कशाला होईल आठवण--ज्या मनुष्याबद्दल प्रेम वाटत नाहीं त्याची कधीं आपणाला आठवणहि होत नाहीं.

प्रेमाचें ऋण बाष्पांबूनें फिटे--प्रेमी मनुष्यानें आपणावर कितीहि उपकार केले तरी ते प्रिय माणसाच्या अश्रूंनीं हलके होतात.

प्रेमाच्या बाजारीं, नित्य चाले येरझारी--प्रेमी लोकांच्या भेटी वरचेवर घडून येतात; प्रेम संपादण्यासाठीं प्रणयी जनांना एकमेकांकडे सारखें जावें लागतें.

प्रेमाला मोल नाहीं----प्रेमाची तुलना कशाबरोबरहि करतां यावयाची नाहीं. प्रेम हें अतुलनीय आहे, अमोल आहे.

प्रोक्षण----**प्रोक्षणीय पात्र** = रखेली; रांड.

फ

फ बोलणें--खोटें बोलणें.

फकीर----**फकीर फुकरा**--फकीर गोसावी वगैरे भिक्षेकरी, भिकारी; दीन अनाथ. 'फकीर फुकरा यांस द्रव्यदान व अन्नदान करीत आपण जात्या आपले स्वकर्मी उजूतवाजू करून सावध होता.'--भाव ५२.

फकीर बनणें--संसार सोडणें; विरक्त होणें. 'आणि संसाराला रामराम ठोकून मी असा फकीर बनलों!'--एकचप्याला. 'पण मी स्वार्थावर पाणी सोडून फकीर बनायला अजून तयार झालों नाहीं!'--शिसं १.२.

फकीरबोडा--(अशिष्ट.) भिकारचोट.

फकीरी दौलत-संपत्ति--भिक्षेकऱ्याजवळ आज द्रव्य आहे, उद्या नाहीं याप्रमाणें; अस्थिर चंचल संपत्ति.

फकीरी बाणा--भिक्षेकऱ्याचा धंदा; वैराग्य; साधुवृत्ति.

फकीर नचिंत कीं ज्यां सुता त्यां मसीद--फकीर बेफिकीर असतो व मनांत समजतो कीं, जेथें आपण निजूं तीच मसजीद. फकीराला काय कोठेंहि पडलें तरी मशीदींत पडल्यासारखेंच. त्यास कांहीं कोणाचें घ्यावयाचें नसतें कीं द्यावयाचें नसतें किंवा कोणत्याहि गोष्टीवर हक्क सांगावयाचा नसतो. एक फकीर राजवाड्यामध्यें बसला असतां राजानें त्यास विचारल्यावरून राजवाड्यामध्यें जर एक राजा जातो व दुसरा येतो असें चालतें तर मशीदींत व राजवाड्यांत फरक काय? असा प्रश्न त्यास उलट विचारून निरुत्तर केलें अशी गोष्ट आहे.

फकीर मरा, तकीया उजाड--(हिं.) फकीराच्या मागें कोणी त्याचा वाली वारस नसतो त्यामुळें तो मेल्याबरोबर सर्व कारभार आटपतो व त्याची गादी मोकळी पडते.

फकीर मेला, तक्या बुडाला--वरप्रमाणेंच.

फकीरका कामला, वही उसका दुशाला--गरीबाला घोंगडी ही शालजोडीप्रमाणें असते.

फकीराजवळ धन नाहीं आणि धनवानाजवळ औदार्य नाहीं—फकीर मनानें मोठा उदार असतो; तो जवळची लंगोटीहि देण्यास तयार असतो पण त्याच्या जवळ द्यावयास कांहीं नसतेंच. पण श्रीमंताजवळ द्रव्य असतें परंतु त्यास देण्याची बुद्धि नसते. याप्रमाणें गरीब उदार मनाचे असून निरुपयोगी व श्रीमंत कृपण म्हणून निरुपयोगी. तु०—दांत आहेत तेथें चणे नाहींत.

फकीराला दिलगीर कसली—फकीर हा बेफिकीर असतो. त्याच्या मनाला केव्हांहि दुःख होण्याचा संभव नसतो. (गु.) फकीरीथी दिलगीरी दूर रहेछे.

फकी—फक्या मारीत फिरणें— पोटाला नसतांना गांवभर चकाऱ्या मारीत सुटणें; उपाशी पोटीं हिंडत राहणें.

फजीति—फजीतीचें जिणें—अपमानकारक जीवन; मानहानि होत असतां आयुष्य कंठित राहणें; परस्वाधीन जिणें.

***बायको दुसरी, फजीती तिसरी**—बायको पहा.

फजितीच्या जिण्यापेक्षां मरणें बरवें; फजितीच्या जिण्यापरीस मरणें हेंच बरवें—अपमानकारक अवस्थेमध्यें जगण्यापेक्षां मृत्यु बरा. तु०—न भीतो मरणादस्मि केवलं दूषितं यशः । विशुद्धस्यहि मे मृत्युः पुत्रजन्म समःकिल ।

फजितीच्या पायीं घुंगरूं—मनुष्याची फजीति झालेली लागलीच गांवभर होते.

फज्जा—फज्जा करणें—१ फजीति करणें; उपहास करणें; टप्पा करणें; फसविणें. २ निष्फल करणें; उधळून लावणें; कार्यहानि करणें.

फज्जाला पोचणें—(फज्जा=भोग्या) ठराविक ठिकाण गांठणें.

फट—फट फावणें—संधि मिळणें; अनुकूल प्रसंग घेणें; प्रवेश होणें.

फटकर—फट्कर-दिशीं बोलणें—१ विचार न करतां एकदम बोलणें; ताडकन् उत्तर देणें; लागेलसें भाषण करणें; तटकन् तोडून बोलणें.

फट्—फट् म्हणणें—१ धिकारणें; अपमान करणें. २ रागानें बोलणें; खेंकसणें.

***फटफट जिणें, लाजिरवाणें**—फजीति पहा.

फट् म्हणता ब्रह्महत्त्या—एका मनुष्यानें एका गाईस फट् म्हणून हांकललें तों तिनें पळतांना वाटेंत ब्राह्मणास धक्का देऊन पाडून मारलें. याप्रमाणें गाय हांकणारास ब्रह्महत्त्येचें पातक लागलें. गोतमाला अशी ब्रह्महत्या घडल्यानें त्र्यंबकक्षेत्रीं गंगा आणावी लागली अशी कथा आहे. तीर्थयात्रा प्रसंग पहा. याप्रमाणें कांहीं क्षुल्लक गोष्ट केल्याबरोबर मोठी आपत्ति येऊन पडणें.

फट—फट घालून खरें काढणें—(गो.) खोटें घालून खरें काढणें. खोटेंच कांहींतरी प्रश्न विचारायचे आणि दुसऱ्याच्या कडून खरें वदवून घ्यायचें.

फट्टि नाण्याक होडु मोहोरु—(गो.) खोट्या नाण्यावर मोहोर मोठी असते. कृत्रिम असेल तें खऱ्यापेक्षांहि अधिक चमकतें.

फटकळ—फटकळ काळ—प्रतिकूल, विषम काळ; दुर्दैवाची, संकटाची वेळ. 'काळ मोठा फटकळ आला'—ख.२९९९.

फटकारा—फटकाऱ्याचा पाऊस—पावसाची जोराची सर. याच्या उलट भिजपाऊस.

फटकी—फटकी साधणें—(गो.) उपाय, शहाणपण चालणें; शह लागणें.

फटफटीत—फटफटीत उजेडणें-होणें—प्रभात होणें; सकाळ होणें; चांगला प्रकाश पडणें.

फटलंडी—फटलंडीचें काम—१ अतिशय गर्ह्य कृत्य; नामर्दपणाचें काम. २ 'नांव बदलून देईन' या अर्थी वापरतात. 'हें मीं न केलें तर फटलंडीचें काम.'

फड—फड उलगडणें—१ सामना संपणें; कार्य, प्रसंग आटोपणें; जमलेला जमाव पांगणें.—खरादे ६४. २ बैठक उठणें; मंडळीची पांगापांग होणें; सभा विसर्जन होणें.

फड नासणें—कार्य बिघडविणें; सभा मोडणें. 'फड नासोच न द्यावा । पडला प्रसंग सांवरावा ।'—दा ११. ५.१२. 'अधीरपणानें फड नासतो.'—गजेंद्रमोक्ष २.२३.

फड पडणें—१ एखादें काम पूर्ण रंगांत असणें; सर्व मंडळी एकत्र येऊन एखादी गोष्ट होत असणें. २ कडाक्याचा वादविषय होणें; वादविवाद होणें.

फड मारणें–राखणें–संभाळणें—जुना डौल संभाळणें; आब राखणें; बाजू मारून नेणें; बाजू सावरणें.

फड मारणें–संपादणें–मारून जाणें–मारून नेणें—सभा जिंकणें; वादविवादामध्यें वगैरे यश मिळविणें; आपली बाजू यशस्वी रीतीनें मांडून आपला मुद्दा प्रस्थापित करणें.

फड संपादणी—सभाविजय; फड मारणें.

फडाच्या मापानें—साडीसांड; भरपूर माप घालून; भर मापानें; पेठेंतील मापानें.

फडास येणें—चर्चेचा विषय होणें; वाद माजणें; खडाजंगी उडणें.

फडका––फडका काढणें––तुकडा तोडणें; वाभाडे काढणें.

फडका फाडणें–फाडून देणें––रोखठोख उत्तर देणें; तुकडा तोडणें, पाडणें; एक घाव दोन तुकडे करणें; निकाल लावणें.

फडफडणें––आभाळ कडकडतां न भ्याला, सूप फडफडतां भिईल काय ?––मोठ्या संकटास ज्यानें दाद दिली नाहीं तो काय क्षुल्लक आपत्तीस डरतो काय ?

फडशा––फडशा उडणें—संपणें; खलास होणें; फन्ना उडणें.

फडशा उडविणें–पाडणें—संपवून टाकणें; संहार करणें; खलास करणें; आटोपणें.

फडशा चालविणें––संहार किंवा नाश करण्याचा क्रम ठेवणें. 'अनेक दुर्मतांनीं व दुराग्रहांनीं महारोगाप्रमाणें या देशाच्या बुद्धीचा, नीतीचा व शरीरसामर्थ्याचा हजारों वर्षें फडशा चालविला आहे.'––आगरकर.

फडसूळ–फडसूळ विकरी––भिकार विक्री; किरकोळ विक्री. याच्या उलट कुडताळ विक्री.

फडी––फडी फिंदारणें—१ नागानें फडा पसरणें. २ (ल.) डोळे वटारून पाहणें; रागानें पाहणें.

फणी—फणी गेली कैंस उगौंक––(गो.) कामाचा मनुष्य कामाला गेला.

फते–त्ते–फते–फत्ते मिळविणें—जय मिळवणें; यशस्वी होणें; यश संपादन करणें.

फत्ते होणें—१ यशस्वी होणें; विजयी होणें; जय मिळणें. २ हस्तगत होणें. 'स्वामींचे पुण्यॆंकरून जागा फत्ते जाहली '.–ख १.३.

फते लष्कर––१ नेहमीं यशस्वी होणारा मनुष्य. २ (उप.) अपयशी मनुष्य. (वि.) (निंदार्थी) स्थूल, लठ्ठ मनुष्य, जनावर.

***फतहा––फतहा दाद इलाही है––**(हिं.)जय होणें हें ईश्वरी देणें आहे.

फतोल्या—फत्तोल्या फोडणें—(व.) फांटे फोडणें; शंकाकुशंका काढणें.

फत्तर––पत्थर पहा.

फत्तरपूजा—दगड मारणें; धोंड मार करणें.

फत्तरफोड—१ दगड फोडणें. २ मेहनतीचें काम; कष्टाचें काम; अवघड कार्य.

फत्तरची रेघ—(व.) दगडावरची रेघ; अढळ गोष्ट; अक्षर गोष्ट.

फत्तरपर पाणी पडे, भीजे पण भीने नहीं, मूरखसे गीयान् कहे, बुझे पण रीझे नहीं—(हिं.) दगडावर पाणी पडलें तर दगड ओला होतो पण पाणी आंत जिरत नाहीं, त्याप्रमाणें मूर्खाला केलेला उपदेश त्यास समजतो पण उमजत नाहीं. उपच्या घागरीवर पाणी. तु०––न जाणें न नेणें अशा पामराला। बुझावूं शकेना विधाता तयाला.

फरक—फरक करणें—१ जागा मोकळी करणें; दूर करणें; घालविणें. २ वेगळेपणा करणें; अलग करणें. ३ अंतर करणें.

फरक होणें—१ वाटेंतून बाजूला होणें. २ भिन्नत्व भासणें.

फरङ्क—फरङ्क फोडणें—फाटे फोडणें; बयाद सांगणें; सबबी लावणें.

फरफटणें––फरफटत चालणें—फरफटणें; सरपटत चालणें; पोटावर, ढुंगणावर वगैरे चालणें.

फरफर––फरफर ओढणें––कसेंतरी वासपटत नेणें; फरफटत नेणें; ओढीत नेणें.ओढूं नको फराफरा घेऊं दे सावरून हा पदर ––मो सभा. ५.७. –मो. हरिवंश १७'१७


गुटगुटीत मुलें ?
डोंगरे यांचें बालामृत
दिल्यानें मुलें गुटगुटीत होतात.

फरफर होणें--१ ओढाताण, हाल होणें. २ अस्थिरपणा असणें.

फररर--फररर फूं, ने घेर जाईने खाशे शूं ?--(गु.) पोकळ गप्पा मारून किंवा निष्फळ खटाटोप केल्यानें कांहीं प्राप्ति होत नाहीं आणि पोट भरत नाहीं.

फरवुं--फरे कपाळ, तो शूं करे भूपाळ ?--(गु.) दैव प्रतिकूल असेल तर राजा जरी साहाय्यकर्ता असला तरी कांहीं लाभ होत नाहीं. किंवा दैवापुढें राजाचेंहि कांहीं चालत नाहीं. दैव पहा.

फरारी--फरारी होणें--पळून जाणें; बेपत्ता होणें; नाहींसें होणें.

फराळ--फराळ केला म्हणजे जेवणाचें मातेरें आणि अंगवस्त्र ठेवलें म्हणजे बायकोचें मातेरें--जेवणाच्या पूर्वी कांहीं खाल्लें म्हणजे ज्याप्रमाणें भूक मरून जेवण बरोबर जात नाहीं त्याप्रमाणें उपस्त्री ठेवल्यास स्वतःच्या पत्नीकडे दुर्लक्ष होतें.

फरेब--फरेब देणें--फसविणें; ठकविणें.–मौज २-६-३०.

फरोक्त--फरोक्त करणें--विकणें; देऊन टाकणें; दूर करणें.

फल--फळ पहा.

फलाम्लपंचक--१ संत्रें, २ नारिंग, ३ अम्लवेतस (चुका), ४ तित्तिडिक (चिंच), ५ बीजपूर (महाळुंग).

फलकारा--फलकारे मारणें--(जातां येतां पदर उडतो यावरून) ऐटीनें हिंडणें; दिमाखानें खेपा घालणें; येजा करणें. 'उगीच इकडून तिकडे तिकडून इकडे नांवाला चार कागद हातांत घेऊन फलकारे मारले कीं--फा...;नाट्यछटा २.

फलटण--फलटणी पारायण--(महानु.) पूर्ण उच्चार न करणें. फलटण हें महानुभावांचें एक तीर्थस्थान आहे. ' फलटणी पारायण करूं नका' असें म्हणतात.'

फलाणा--फलाणाविस्ताणा--अमुकतमुक;कोणी-तरी; फालतू.

फशीं--फशीं देणें--फसविणें; फशीं पाडणें; ठकविणें; संकटांत घालणें.

फशीं पडणें--फसणें; संकटांत सांपडणें; दुसऱ्याच्या कचाट्यांत फसवणुकीमुळें सांपडणें.

फशीं पाडणें--फसवून अडचणींत आणणें, गोत्यांत घालणें; संकटांत टाकणें; फसवून पेंचांत टाकणें. 'मनाजी पाटील देहगांवचा। विश्वास धरूं नका याचा। हा घात करील नेमाचा। पाडील फशीं ॥'–एकनाथ भारुड.

फसकी--फसकींत जाणें--फुकट्यावारी जाणें; नमुन्यावारी जाणें.

फसणें--फसली गाय : मंगळ गायः--(महानु.) 'अडलें कोल्हें मंगळ गाय' पहा.

फसविणें--फसविणाऱ्यास फसवणें, हींच इष्ट साधनें--लबाडास फसविणें ही चांगली गोष्ट आहे. धूर्तास फसविणें इष्ट असतें. लबाडाची लबाडी त्याच्याच गळ्यांत घालणें हें उपकारक आहे. Deceiving of a deceiver is no knavery.

फस्ती--फस्ती काढप-(गो.) १ इज्जत घालविणें; बेअब्रु करणें. २ भानगड करणें; घोंटाळा करणें.

फस्तीक पडप--भानगडींत पडणें; घोंटाळ्यांत, पेंचांत सांपडणें.

फळ--फळास-फळां येणें--फलद्रूप होणें; सिद्धीस जाणें; लाभास येणें. 'कोटिजन्मींचें पुण्य जाणें । फळासी आलें आज तुझ्या।'; 'संत कृपा झाली । इमारत फळा आली ॥'–ब.

***फळं पिकल्यारि तोंडांतु पडताति वे ?**--(गो.) झाडावर फळें पिकलीं म्हणून तीं आपोआप येऊन तोंडांत पडत नाहींत. मनोरथ सफळ व्हावयाला हवा असेल तर प्रयत्न अवश्य हवा.

फळ पिकल्याशिवाय तोडूं नये आणि गळूं पिकल्याशिवाय फोडूं नये--झाडावर असतांना फळ जितकें चांगलें दिसतें व मनांत भरतें तितकें तोडल्यावर दिसत नाहीं; तसेंच झाडावर फळ कांहीं दिवस टिकून चांगलें पिकतें तसें तोडल्यावर होत नाहीं. याकरितां तें झाडावर असतांनाच विकावें व मग तोडावें; म्हणजे अधिक लाभ होतो व नुकसान येत नाहीं. त्याचप्रमाणें गळूं पिकण्याच्या पूर्वी फोडल्यास निचरा व्हावयास वेळ लागतो व अधिक त्रास होतो. याकरितां त्यास प्रथम पिकवण बांधून तें पिक-

वावें व मग फोडावें. याप्रमाणें योग्यवेळीं कोणतीहि गोष्ट करावी. उतावळीनें केल्यास त्रास होतो व नुकसानहि होतें.

फळा तेकीत बीं, धरणी तेकीत उदक--(गो.) जसें फळ तसें बीं; जशी जमीन तसें पाणी. तु०-खाण तशी माती; बीज तसा अंकुर.

पडत्या फळाची आज्ञा--पडणें पहा.

फळाच्या झाडाला सर्वजण धोंडे मारतात--पिकल्या झाडावर० पहा. तु०(गु.)-फलनां झाडने सउ कोइ पत्थर मारे.

फळणें---अटक्याची कोंबडी टका फळणा-वळ--अटका पहा.

फळी---फळी येणें--युध्दास सिद्ध होणें; झोंबी येणें. 'जया केसरी पाहतां अश्रु गाळी। करी मत्त त्यासी फळी घे शृगाळी।'-वामन विराट ७·८.

फळी फुटणें---सैन्याची रांग मोडणें; अव्यवस्था माजणें; जूट मोडणें. 'पळालें फळी फूटली राक्षसांची।' -राक १,६५.

फळी फोडणें-फोडून जाणें--रांग तोडून जाणें; दुभंगून जाणें.

फळी मांडणें--सैन्याची रांग लढाईस उभी करणें. 'आम्ही कर्णप्रमुख स्वजयार्थें मांडिली रणांत फळी।' -मोकर्ण १४,९

फळें---फळें पडणें--पिशाच्चबाधेमुळें बेशुद्ध पडणें.

फळ्यांचा खेळ--आट्यापाट्यांचा खेळ.

फळ्यार बसवप--(गो.)एका जागेवर गप्प बसविणें.

फाईल--फाईल करणें--१ दप्तरीं दाखल करणें, ठेवणें. २ अर्ज इ. चा दखलगिरी न घेतां दप्तरी ठेवणें; निर्णय करण्याचें, उत्तर वगैरे देण्याचें कारण नाहीं म्हणून बाजूस काढणें. To File.

फाका---फाके मारीत फिरणें--१ कांहीं उपजीविकेचें साधन नसून भटकत राहाणें; भिक्षांदेहीची, दरिद्री वृत्ति असणें. २ रिकामकें भटकणें.

फाक्या--फाक्याचे लाखे, लाख्याचे फाके होणें--(व.) फाक्या = उपवास ज्याला पडतात, ज्याला खायला अन्नहि मिळत नाहीं असा अत्यंत दरिद्री मनुष्य. लाख्या = लक्षाधिपति, तालेवार, श्रीमंत. अत्यंत दरिद्री मनुष्याचें दैव उघडून तो श्रीमंत होणें किंवा उलट दैववशात् श्रीमंताचा दरिद्री बनणें. 'जगांत फाक्याचे लाखे व लाख्याचे फाके झालेले नित्यशः आपण पाहतों.'

फाटकें--**फाटक्या अंगाचा**--रोड;कृश;सडपातळ.

फाटक्यांत पाय घालणें-शिरणें-जाणें--एका वाईट गोष्टींत दुसऱ्या वाईट गोष्टीची भर पडणें.

***फाटकी चोळी, फुटकें भांडें**--निरुपयोगी वस्तु.

फाटकें नेसावें पण स्वतंत्र असावें--गरीबी पत्करली पण पारतंत्र्य नसावें.

फाटकें लुगडें तुटक्या वाह्या, चला आबाजी सुनमुख पाहाया--नांव मोठें लक्षण खोटें; आव मोठा पण पोकळ.

फाटकें लुगडें बाबाचें, मेलेलें माणूस गुणाचें--मेल्या म्हशीला पांच शेर दूध, याप्रमाणें. फाटलें पांघरूण० पहा.

फाटकें लुगडें बायकोचें आणि दणगट धोतर नवऱ्याचें--पुरुष बळकट व नीटनेटका असावा. बायको घरांत राहावयाची असते ती कशीहि असली तरी लोकांस दिसत नाहीं.

फाटक्यापरीस नेटकें बरें--वस्त्र साधें असावें पण धड व स्वच्छ असावें.

कशांत काय, फाटक्यांत पाय--(बायकी.) अगदीं कंगाल, निर्धन.

फाटक्याला ठिगळ, मोडक्याला कवळ--कसें तरी थातुरमातुर करणें; वेळेवर कशीबशी गुजराण करून घेणें.

फाटक्याला शिवावें किती, आणि दुबळयाला द्यावें किती ?--एकदां वस्त्र जीर्ण झालें म्हणजे त्यावर शिवणहि टिकेनाशी होते व तें बदलावेंच लागतें, शिवून भागत नाहीं. त्याप्रमाणें जो मनुष्य स्वतः आपलें पोट भरण्यास नालायक असतो त्याला कितीहि मदत केली तरी पुरवठ्यास येत नाहीं.

फाटलें पांघरूण वाणाचें, मेलें माणूस गुणाचें--एखादें वस्त्र फाटून गेलें म्हणजे त्याचा पोत फार चांगला

होता म्हणावयाचें व एखादा मनुष्य मरून गेल्यावर त्याची स्तुति करावयाची. वस्तु असते तोंपर्यंत तिची किंमत वाटत नाहीं; नाहींशी झाल्यावर किंमत कळूं लागते. तु० मेल्या म्हशीस पांच शेर (अदमण) दूध.

फाटलेल्या आभाळाला ठिगळें कोठवर देणार?— आभाळ पहा.

फांटा—फांटा देणें—१ बुट्टी देणें; टाळा देणें; लक्ष्य न देणें. २ वगळणें; कमी करणें. 'वरातीच्या मिरवणुकीला फांटा देण्यांत आला होता.'–प्रो. फडकेकृत प्रतिज्ञा २७३.

फांटा फुटणें—१ वेड लागणें. 'वीरभद्र म्हणे तूं काय करिशी। मरणकाळीं फांटा फुटला तुजशीं।'–नव ७.३९. २ फांकणें; प्रसार होणें. 'जैसें डोळ्यां अंजन भेटे। ते वेळीं दृष्टीसी फांटा फुटे।'–ज्ञा १.२३. ३ एका कामांतून दुसरें काम निघणें. 'तुका म्हणे वाटे। नको फुटूं देऊं फांटे॥' ४ वेगळा मार्ग, प्रकार, शाखा होणें. 'अति कठिण अव्हांटा चोखटा होति वाटा। हरिगुणकथनाचा फूटला ज्यास फांटा॥'–सारुह ४.७५.

फांटा-फांटें फोडणें—१ निराळी दिशा लावणें. २ (ल.) आडकाठी करणें. ३ निराळें वळण लावणें; फांदाडे फोडणें. "यासाठीं जें चाललें आहे तें चांगलें आहे. याला तुम्ही कांहीं फांटा फोडूं नये."–पेब १२९.

फांटा भरणें—१ बहकणें; बडबड करणें. 'स्वधर्म मार्गी चालावया नर। वेद स्वर्ग बोले अवांतर। ते फांटा भरले अपार। स्वर्गतत्पर सकाम॥'–एभा २१:३१८. २ भटकणें.'भ्रमणाच्या मोडी वाटा। न भर फांटा आडरानें।' –तुगा ३३८४.३ वेड लागणें.

मुखीं–तोंडीं–तोंडाला फांटा भरणें—तोंडाचा पट्टा सुरू होणें. 'म्हणौनि मुखीं भरला फांटा। बडबडे चोहटा भलतेंचि।'

फाटि—फाटि आशिल्यानें फुडे येवये, फुडे आशिल्यानें फाटि सरनये—(गो.) (फाट = पाठ) सगळ्यांना एका रेषेंत, एका पातळीवर आणायाचें तर पुढें असलेल्यांना मागें खेचूं नये; मागच्यांनाच पुढें आणावें.

फाटि दुकिलि सांगता, बाइलेनें मारलेलें निपयता—(गो.) पाठ दुखते म्हणून सांगतो, पण बायकोनें मारलें हा खरा प्रकार गुलदस्तांत ठेवतो. अब्रू आग्रची वेळ आली कीं, माणूस कांहींतरी इकडचें तिकडचें सांगून ती वांचवण्याचा प्रयत्न करतो.

फाटिक डोळे असल्यारि उपराटि चमकवुं येद— (गो.) पाठीला डोळे असते तर उफराटें चालतां आलें असतें. माणूस आपल्या परोक्ष काय काय गोष्टी घडतात त्या पाहूं शकत नाहीं. नाहींतर कितीतरी आपत्तींचा प्रतिकार त्याला करतां आला असता.

फाटीर मार, पुण पोटार मारूं नाका—(गो.) पाठीवर मारा पण पोटावर मारूं नका. मनुष्याची उपजीविकेची साधनें काढून घेऊं नका. भुकेची आपत्ति सर्वांत असह्य आहे.

फाटीरि देवु वसला म्हणु गाढवाक गर्व—(गो.) पाठीवर देवाची मूर्ति आहे म्हणून गाढव गर्व वहातें. सज्जनांच्या संगतीं असला तरी हीन तो हीनच.

फाडणें—डोळे फाडणें—डोळे वटारणें; रागावून पाहणें.

पट्टी फाटणें—१ येण्याची यादी लिहिणें. २ नांवनिशीवार यादी करणें.

फाडून खाणें—तुटून पडणें; छळणें; त्रास देणें; गांजणें.

***फाडी तिला साडी, तगवी तिला भगवी**— तगवणें पहा.

फातर-फातर दवरिलो, देव जालो—(गो.) दगड ठेवला होता त्याचा देव झाला.

फातर फोडुन वाय काढता—(गो.) दगड फोडून पाठींत चमक भरून घेणें. कांहींतरी करावयाचें आणि नसतें दुःख पाठीस लावून घ्यावयाचें.

फातोर वडौन ठाव पळायता—(गो.) दगड टाकून पाणी किती खोल आहे त्याचा अदमास घेणें. एखादा शब्द बोलून दुसऱ्याच्या मनाचा ठाव पाहणें.

फातरा मुळांत पळ्ळेलो हातु हळू काढका— (गो.) दगडाखालीं सांपडलेला हात हळू हळू काढून घ्यावा. जोरानें ओढल्यास जखम व्हावयाची. दुष्टाच्या कचाट्यांत आधीं सांपडूं नये आणि सांपडण्याचा प्रसंग आलाच तर युक्तीनें निसटावें.

फातरपें—फातरपेंच्यान गोंय लागी—(गो.) फातरपें गांवाहून गोवें (एक गोमांतकांतलें गांव) जवळ. द्राविडीप्राणायाम करणाऱ्याला म्हणतात.

फात्या—**हलवायाच्या घरावर फात्या मारणें-देणें**—दुसऱ्याचा माल उदारपणें देणें; हलवायाच्या घरावर तुळशीपत्र. तु०-आयजीच्या जीवावर बायजी उदार.

फांदा—**फांदा मारणें**—एखादी वस्तु लुबाडणें; घबाड मिळविणें.

फांद्यांत घालणें-पाडणें—गोंधळांत घालणें, पाडणें; घोटाळा करणें; भानगड उपस्थित करणें.

फांदी—**फांद्या फोडणें**—१ फाटे फोडणें; विषयांतर करणें. २ अडथळे, सबबी सांगणें.

फांफूं—**फांफूं करणें**—उधळणें; फुंकून टाकणें.

फायीं—**फायीं मोर्त्तोलो म्हणु आजी फोंडातु पडप आस्सवे? फाल्यां मरतलो म्हणु आज फोंडांत पडप आसे व्हय?**—(गो.) उद्यां मरावयाचें आहे म्हणून आजच थडगें बांधण्यांत काय अर्थ आहे? संकट आलें असतां सरळ संकटाला तोंड द्या. संकट येणार म्हणून आधींच घाबरून नाश झाला असें समजून चालूं नये. शेवट काय होतो तो प्रथम पाहवा.

फार—**फारकरून**—बहुतांशीं; अधिकांशानें; सामान्यतः; नव्याण्णव हिश्श्यांनीं.

फार फार विचारणें—फार आठवण काढणें. 'माझ्या स्त्रीला फार फार विचारलें.'-मृ ९७.

***फार खाणें व मरणाचे दारीं बसणें**—अतिशय खाल्लें असतां न पचून मरण ओढवण्याची भीति असते. तु०-अचाट खाणें मसणांत जाणें.

फार झालें, हंसूं आलें—एखादी वाईट गोष्टहि अतिशय झाली म्हणजे तिच्याबद्दलची भीति नाहींशी होते व दुःखहि वाटेनासें होऊन उलट त्याचा चमत्कार वाटून हंसूं यावयास लागतें. तु०-रोज मरे त्याला कोण रडे. पाठभेद-अति झालें, हंसूं आलें.

फार झालें हसूं, डोळां आले असू—अतिशय आनंद झाला म्हणजेहि डोळ्यांतून अश्रु येऊं लागतात; आनंदाश्रु येणें.

फार बोलेना, वाट भुलेना—कांहीं न बोलतां किंवा कोणाचें न ऐकतां आपलाच मार्ग अनुसरणें, आपल्याच मताप्रमाणें एखादी गोष्ट करीत राहणें. शिकविल्याप्रमाणें न वागतां आपला मार्ग सोडीत नाहीं असा. न बोलून शहाणा.

फारच संतापला, इंगळासारखा लाल झाला—अतिशय संतापणें.

फारक(ख)त—**फारकत होणें**—वेगळे होणें; निराळे होणें; अलग होणें; वेगळें घडणें. 'ते वृद्ध तरुणांत फारकत व्हावी असें कधींहि चिंतणार नाहींत.'-आगर.

फारीक-ख—**फारीक करणें**—फडशा करणें; फेडून टाकणें; चुकतें करणें.

फाल्गुन—**फाल्गुन वाद्य**—शिमग्यांत बोंबा मारतात यावरून बोंब; शंखध्वनि. अर्जुनवाद्य पहा.

फाल्गुनी बाब्या—(बे.) वाटेल त्या समाजांत वेळीं अवेळीं शुभाशुभ याचा विचार न करितां वाटेल तें बडबडणारा, बरळणारा,. "फाल्गुनीबाब्या बोल म्हणजे बोलला." तु०-शुभ बोलरे नाऱ्या०

फाल्या—**एका निजून फाल्या जायना**—(गो.) एका झोंपेंत उजाडत नाहीं; एकाच वेळीं कांहीं कोणतेंहि कार्य पूर्ण होत नाहीं.

फॉव-फॉव ना काल्ली, सुकॉ जागोर-(गो.) नाहीं पोहे, नाहीं खोबरें, कोरडा जागर. गोमंतकांत काकडाआरतीसारखे देवाचे जागर करीत असतात आणि पोहे व खोबरें ही त्या प्रसंगींची ठराविक खिरापत असते. फुकट श्रम केले, फायदा-कांहींच झाला नाहीं अशा अर्थानें म्हणतात.

फावडें—**फावडें घालणें**—एखाद्याच्या कामांत फांदाडे फोडणें; फाटे फोडणें; अडचणी उपस्थित करणें.

फावड लावणें; फावड्यावर—**फावड्यानें पैसा ओढणें**—अतिशय पैसा मिळविणें. खोरें पहा.

फाव—**फावा जाणें**—समजणें; कळणें; माहीत होणें. 'तरी सांग पां पांडवा। हा शास्त्रसिद्धांतु आघवा। तुज एक चित्तें फावा। गेला आहे।'-ज्ञा १८.१५४०.

फावा—**फावा ताका गावं**—(गो.) ज्याची जशी पात्रता तसें त्याला मिळतें.

फांस—**फांशी देणें**—१ फांसावर टांगणें. २ घोंटाळ्यांत घालणें.

फांशी देण्याची वेळ—अगदीं कडक ऊन -भर दुपार; उभी दुपार.

फांशी भरणें-येणें-लागणें—कचाटींत सांपडणें; संकटांत सांपडणें.

***चौकशी आधीं फांशी**—अन्याय्य वर्तन; जुलमी कारभार. —केसरी २७।२।१९४२.

फास—फासा-फासा पडणें—जाळें, पाश यांत अडकणें; सांपडणें; संकटांत पडणें. 'फांसा पडे केवळ मी कुरंगी ।'—सारूह ४२३.

फांसा घालणें—पसरणें—जाळें पसरणें; फसविण्याचा प्रयत्न करणें.

फांसा टाकणें—१ जाळें, फास-पाश टाकणें. २ आमीष दाखविणें. ३ खेरदी-विक्रीच्या वेळीं आपला भाव सांगणें.

फांसा तोडणें—मुक्त करणें; सोडविणें. 'तोड विभो भयदायक फांसा ।।'—कीर्तन २.३.

फांसाला तांब्या लावणें—विहिरींत तांब्या सोडून पाणी भरून आणणें.—श्यामची आई.

***फांसा त्याचा मासा**—जो जाळें टाकील त्यालाच मासे मिळतील. जो प्रयत्न करतो त्यालाच लाभ होतो.

फांसडी—दुःखावर फांसड्या टाकणें-मारणें—दुःखावर डाग देणें.

फासा—फासा उमगणें-जाणणें-समजणें—गुप्त बेत, लबाडी, ओळखणें; डाव ओळखणें.

फासा उलटा पडणें—प्रतिकूल गोष्ट घडणें; दैव प्रतिकूल होणें.

फासा टाकून पहाणें—(फासाच्या खेळांत करतात त्याप्रमाणें) नशीबाची परीक्षा पाहणें; प्रयत्न करून पहाणें;

फासा सोईचा पडणें—अनुकूल गोष्ट घडणें.

***फासा पडे, अनाडी जिते**—खेळण्यांत शहाणाहि हरतो. दैव अनुकूल असल्यास अडाणी मनुष्यहि यशस्वी होतो.

फासा पडेल तो डाव आणि राजा बोलेल तो न्याव—ज्याप्रमाणें खेळतांना दान पडणें हें फाशावर अवलंबून असते, त्याप्रमाणें न्याय करण्याच्या बाबतींत राजावर सर्व गोष्टी अवलंबून असतात. (हिं.) फासा पडे सो डाव, राजा करे सो न्याय्य.

फांसेपारधी—फांसेपारध्याचा कवडा—पशूंत जसा कोल्हा चलाख, तसा पक्ष्यांत कवडा चलाख समजला जातो व तो शिकारीलाहि कठीण असतो. फांसेपारधी रानांत जेव्हां कवडे पकडावयास जातो तेव्हां त्याच्याकडे एक पाळीव कवडा असतो. कवड्यावर पुष्कळसे बंदुकीचे छरे फुकट घालविणें गरीब फासेपारध्याला कठीण असतें. तेव्हां त्यांना जिवंत पकडण्यासाठीं तो एक जाळें घेऊन जातो आणि जमिनीवर तें पसरून आपला पाळीव कवडा त्याला अडकवून ठेवतो व आपण स्वतः लांब जाऊन बसतो. नंतर हा पाळीव कवडा ओरडून आपल्या जातभाईंना बोलावीत असतो. ते बिचारे आपल्या कोकटणाऱ्या जातभाईकडे त्याची विचारपूस करण्यासाठीं म्हणून येतात पण जाळ्यांत बसतांच आंत गुरफटतात. अशा रीतीनें तो एक फसव्या कवडा ठरतो. —विविधवृत्त १४-७-४०.

फाळा—फाळा पाडणें—१वांटप करणें; तुकडे पाडणें. २ जमिनीचे निरनिराळे वडे पाडणें.

फिका—फिका पडणें—निस्तेज, कमजोर होणें. 'रघोजीचा पक्ष नानांच्या अभावीं फिका पडला.'—विवि ८.७.१३७.

फिटणें—फिटास फिट—फिटंफाट; देवाण घेवाण सारखे होणें; दिलें घेतलें सारखें होणें; बाकी न उरणें.

***जशास तसें भेटे, मनाचा संशय फिटे**—जसा पहा.

शेरास सवाशेर भेटे, मनाचा संशय फिटे—वरप्रमाणेंच. जबरदस्ताशीं गांठ पडली म्हणजे सर्व शंका दूर होतात; मग कोणी शंका काढीत बसत नाहीं.

फितवा—फितवा पांजरा; फितवा फांदडा; फितवा फांदा—फितूर; अंतर्भेद. 'फितवा पांजरा कांहीं चालेना गालिम हो चिंता करी ।—ऐपो ३५५. चित्रगुप्त ३७. सभासद ३३.

***फितव्यानें राज्यें बुडालीं, खबरदारीनें वांचलीं**—फितुरीचा प्रसार झाला असतां राज्यें बुडतें तेंच सावध राहिल्यास वांचतें.

फिरकंडें—फिरकंड्यांत घालणें—पाडणें—हेलपाटा देणें; खेटे घालावयास लावणें; फिरावें लागणें.

फिरंग—फिरंग-रोग—गर्मीचा रोग; उपदंश; हा फिरंगी अथवा पोर्तुगीज लोकांनीं प्रथम हिंदुस्थानांत आणला अशी समजूत आहे.

फिरंगी न्याय—पोर्तुगीज मुलखांत कोणत्याहि खटल्याचा निकाल व्हावयास फार दीर्घ काल लागतो यावरून वेंगटपणानें चालणारा न्याय.

फिरंगी न्याय घरावर पडप—(गो.) फिरंग्यांचा न्याय घरावर पडूं दे. एखाद्याचें वाईट चिंतायचें झालें तर तुझ्या घरावर फिरंग्याचा न्याय पडो असें म्हणतात. फिरंग्याच्या कोर्टांत न्यायदानाला लागणारा अत्यंत विलंब, पैशाचा, बेसुमार खर्च आणि भयंकर दगदग या गोष्टी लक्षांत घेऊन कोणीतरी प्रथम ही शापवाणी उच्चारली व पुढें तिला म्हणीचें स्वरूप आलें.

फिरंगी लोह—१ पोलाद. २ तलवार.' तुका म्हणे नाहीं नम्रता अंगीं। नव्हे ते फिरंगी कठिण लोह॥' –तुगा २३९३.

फिरणें—फिरता रंग—प्रकाशाप्रमाणें वेगवेगळा दिसणारा रंग.

***फिरे तो रानोमाळ, येतो चोरीचा आळ**—जो मनुष्य नेहमीं भटकत असतो त्याचा लोकांना संशय येतो. जो स्थिर वृत्तीचा असेल त्याचा कोणी संशय घेत नाहीं.

फिरत्या भोंवऱ्याचे वेढे मोजतां येत नाहींत—भोंवरा फिरत असतांना त्याचे फेरे मोजणें कठिण असतें त्याप्रमाणें चंचल वस्तूबद्दल कांहीं नेम सांगता येत नाहीं. तु०—उडत्या पाखराचीं पिसें मोजणें.

फिरली नार तर भ्रतार मार—स्वतःची बायको जर नवऱ्याविरुद्ध वागूं लागली तर ती त्याचा प्राण घेण्यासहि कमी करीत नाहीं.

घर फिरलें कीं घराचे वांसे फिरतात—घर पहा.

फिरे तो चरे; फिरेल तो चरेल—जें गुरूं इकडे तिकडे फिरतें त्यास कांहीं तरी खावयास मिळतें. जें स्वस्थ बसून राहतें तें उपाशी रहातें. जो प्रयत्न करतो त्यास कांहीं तरी लाभ होतो. निरुपयोगी मनुष्यास कांहीं मिळत नाहीं. तु०—खटपट करी तो पोट भरी. (गु.) फरे तो चरे ने बांध्यो भुखे मरे, किंवा फरे तो चरे ने बांध्यो बल भुके मरे. चराति चरतोभगः। चैरेवेति चैरेवेति।

फिरेल काळ, तर बदलावी चाल—जशी परिस्थिति येईल तसें वागावें.

फिरविणें—फिरवून देणें—थोबाडींत देणें; मार देणें.

फिरस्ता—फिरस्त्यांतील तळाचा नाईक व मैना—फिरस्ते निरनिराळ्या वाटांनीं शेतांत घुसतात. एकाला घालवावयाला कुणबी आला कीं दुसऱ्यांनीं गर्दी करावयांची यामुळे सर्व त्याला घेरून गोंधळून सोडतात. तळाचा नाईक मैना घेऊन थोरलें मुंडासें घालून कुणब्यास रामराम करतो. बायका पुरुष यांना कणसें तोडतांना पाहून कुणबी रागावतो; परंतु मोठा दैवाचा बाळिराजा ! धर्माचा वांटा दे इत्यादि गुळचट भाषणें करून नाईक खुलवितो व मैना गळ्यांत हात घालून दाढीला हात लावून पोवाडे इश्किबाज गाणीं, उखाणे, म्हणून थट्टा करतो. एवढ्या अवधींत इतरांचा डाव साधतो वर नाईकाची भिक्षा, मैनेची ओवाळणी निराळीच.

फिर्याद—फिर्याद जाणें-येणें—तक्रार करण्याकरितां जाणें.

फिर्याद होणें—तक्रार करणें. ' सूर्या कुंभार हुजूर जाऊन फिर्याद जाला '। रा ६.१८.

फुक—फुक मारूं, नाहींच करूं—एका फुंकरानें नाहींसे भरणें; चमत्कार करणें.

फुकट—फुकट आणि चोखट—फुकट पाहिजे व चांगलें पाहिजे; फुकट खावयाचें व मिजास करावयाची. तु०—अन्नसत्रीं जेवणें व मिरपूड मागणें.

फुकट आणि तीन दम—[अशिष्ट] फुकटचें मिळाल्यावर सडकून ताबडावयाचें. फुकटाची चिलीम ओढावयास किंवा बाई भोगण्यास मिळाली तर एका दमांत संतुष्ट न होतां तीन दम मारावयाचे.

फुकट कृपेची सावली, जो न भरली पोटाची खळी—एखाद्यानें खूप मेहेरबानी दाखविली पण पोटाला दिलें नाहीं तर त्या मेहेरबानीची काय किंमत.

फुकट खाये, त्याला महाग ससता काये—(महानु.) फुकट बसून खाणाऱ्याला, किंवा स्वतः पैसे द्यावे लागत नाहींत त्याला जिन्नस महाग किंवा स्वस्त असला तरी त्याचें कांहीं सुखःदुख नाहीं. तो चैनच करीत असतो.

फुकट घेणार, दूर नेणार—वर प्रमाणें. फुकटची मिजास.

फुकट चोद, महाविनोद, रात्रभर दिवा, उरलें तेल शेंडीस लावा—(अशिष्ट) फुकटचें मिळाल्यावर वाटेल तसा हात मारावयाचा.

फुकट जेऊं तर बापलेंक येऊं—वरप्रमाणेंच.

फुकट झवा, सारे रात दिवा—(अशिष्ट.) वर प्रमाणेंच.

फुकट दर्शन, देवळांत दाटी—देवळामध्यें दर्शनाकरितां कांहीं पैसे पडत नाहींत म्हणून तेथें गर्दी जमते. जेथें द्रव्य खर्चावें लागतें तेथें कोणी येत नाहीं. जेथें फुकट मिळतें तेथें गर्दी जमते.

फुकट पिडा, बघायला चला—एखादी गोष्ट परभारी होत असेल तर मौज बघावयास सर्व लोक जमतात.

फुकट बिसनी, तंबाखू उसनी—(बिसनी=व्यसनी) उसन्या तंबाखूवर फुकट तलफ भागविणारा; पदरचें न खरचतां शोक करणारा; फुकट चैनी.

फुकट राग, भीक माग—ज्या मनुष्याला रागवायला कांहीं लागत नाहीं त्याला कोणी विचारीत नाहीं. विनाकारण रागावणाऱ्याची समजूत कोण घालणार ?

फुकटचा गाल आणि केला लाल—१ चुंबन घ्यावयास पैसा पडत नसला म्हणजे गाल लाल होईपर्यंत चुंबावयास कांहीं हरकत नाहीं. वर प्रमाणेंच. फुकटच्या वस्तूचा भरपूर फायदा घेणें. २ दुसऱ्याच्या मुलाला किंवा ज्यास कोणाचा आधार नाहीं अशा मुलाला कोणींहि मारावें. जो निराश्रित असेल त्याला कोणीहि त्रास देतो.

फुकटचा फोदा, झंवरे दादा ! झंवतो गे बाई, पण द्यायाला कांहीं नाहीं !—(अशिष्ट.) वर पहा.

फुकटचें आणि ऊन ऊन—फुकट अन्न पाहिजे आणि तेंहि ऊन पाहिजे. फुकटची मिजास. —विवि ८·९·१७३

फुकटचें खाय, त्याला सस्त महाग काय—ज्याला फुकट खावयाला मिळतें, ज्याला पैसे खर्चून बाजारांतून जिन्नस आणावे लागत नाहींत, त्याला जिनसांचे भाव चढले अगर उतरले तरी त्याची फिकीर बाळगावी लागत नाहीं. वर फुकट खाचे० पहा.

फुकटचे घावले, बापलोक धांवले—फुकट खावयास मिळत असल्यास सर्व मंडळी येतात.

फुटकच्या भिकेला, महागपणा आला—कोणी भीकहि घालीत नाहींसा होणें.

फुंकणें—**कान फुंकणें**—१ मंत्रोपदेश करणें. २ चहाडी करणें; कानांत सांगणें.

गडी फुंकणें—गडी फू करणें; मैत्री तोडणें.

बातमी फुंकणें—बातमी पसरणें.

फुंकून पाय टाकणें—रस्त्यांत कांटे वगैरे असतात ते दूर सारणें. (ल.) अतिशय विचारपूर्वक वर्तन करणें; दूरवर पाहून बहुत विचारानें वागणें.

***दुधानें भाजला तो ताक फुंकून पितो**—दूध पहा.

फुकाचा—**फुकाचा हत्ती झाला म्हणून काय भलत्यांनीं न्यावा !**—एखादी मोठी वस्तु फुकट द्यावयाची झाल्यास ती जो नीट सांभाळील, ज्याला ती शोभेल त्यालाच दिली पाहिजे. भलत्याला देणाराची व घेणाराची दोघांची फजीती. एका जुन्या पदांतील हा चरण आहे.

फुकाची आस, व्यर्थ झिजे अंगावरलें मांस—विनाकारण आशा ठेविल्यानें माणूस त्या आशेनें झुरत असतो. त्यापेक्षां निराशा बरी. एकदां व्हावयाचा तो त्रास होईल पण पुढें कांहीं नाहीं.

फुकाची बाईल, कशाला राहील—बायकोला जर पोटाला घातलें नाहीं तर ती जवळ कशी राहणार ? कोणतीहि वस्तु फुकट मिळत नसते व मिळविली तर टिकत नाहीं.

फुकाची भाजी, हगवणीस काळ—फुकट वस्तु मिळाली म्हणून जर ती यथेच्छ खाल्ली तर सोसत नाहीं व बाधते.

फुकाचें गांवजेवण होत नाहीं—कोणतेंहि कार्य करावयाचें झालें तरी पैसा लागतो. कोणतेंहि कार्य फुकट होत नाहीं.

फुकाचे मुखीं बोलतां काय वेचे, फुकाचे वाचे; काय बा वेचे—(रामदास.) गोड बोलण्याला कांहीं खर्च

लागत नाहीं. गोड बोलण्यानें कांहीं नुकसान नाहीं. तु०-गुळ नाहीं तर गुळशी वाचा तर खरी.

फुकेसवाय--**फुक्या सवाय तें फुक्या म्हारग**--(गो.) अति स्वस्त म्हणून ज्या गोष्टी आपणाला वाटतात त्याच खरोखर महाग असतात. महागाच्या वस्तूच जास्त दिवस टिकतात.

फुगडी--**फुगडी घालणें**--फुगड्या खेळणें. (ल.) धांगडधिंगा करणें; थेरथेर करणें.-मो कर्ण ३३.३.

***कानांत बुगडी, गांवांत फुगडी**--मोठेपणाला बट्टा येईल असें वागणें.

खेळु नेणें फुगडी : सांगे पृथ्वी वांकडी--(महानु) 'नाचतां येईना अंगण वांकडे' याप्रमाणें.

फुगा--**फुगो फुगयल्यारि फुट्टुनु वत्ता**--(गो.) फुगा अधिक फुगवला तर फुटून जातो. अधिक ताणलें कीं तुटतें.

फुगारो--**फुगार जाऊंक-करूंक**--(गो.) गुदमरणें.

फुगारमार--तोंड दाबून मार; कोंडमारा.

फुगी--**फुगीचें खाणें**--(कों.) वातुळ खाणें.

फुगीचां पाणी तां फुगीचां पण झर ती झर--(गो.) पुराचें फुगलेलें पाणी केव्हांतरी खलास व्हावयाचेंच पण झऱ्याचें पाणी सतत राहाणारें असतें. नेहमीचें जें असतें तेंच चांगलें.

फुगीर--**फुगीर चोट**--(अशिष्ट.) १ फोपशा; लठ्ठ. २ गर्वानें फुगलेला.

फुगीर दोडका--बढाईखोर. 'फुगीर दोडका बायकांमधीं ।'-पला४.३१.

फुगें--**फुगें मोतीं**--नकली, खोटें मोतीं.

फुटका--**फुटका मणि-कवडी-फोड नसणें**--अतिशय दरिद्री असणें.

फुटकी तिनिसांज--ऐन संध्याकाळ.

फुटकें कपाळ-नशीब-दैव--१ दुर्भाग्य. २ वैधव्य.

फुटक्या डोळ्याचा--अंधळा; दुर्दैवी. 'पण त्याचें नशीब फुटक्या डोळ्यांचें होतें.'-पहिलें प्रेम १५८.

फुटक्या मनाचा--१ चंचल, अनिश्चित स्वभावाचा. २ दुर्बल मनाचा.

***फुटका डोळा काजळानें साजरा**--डोळा पहा.

फुटका डोळा, खोल्या कानापेक्षां बरा--मुळींच ऐकूं न येणाऱ्या कानापेक्षां थोडें दिसणारा डोळा अधिक बरा. अगदीं निरुपयोगी वस्तूपेक्षां थोडीफार उपयुक्त वस्तु बरी.

फुटकी कांच नी गेली पत, पुन्हां येत नाहीं--कांच व अब्रु या गोष्टींस फार जपावें लागतें. त्या एकदां कां नष्ट झाल्या कीं पुन्हां कायमच्या गेल्याच.

फुटकी सहाण, तुटकी वहाण नि बायको लहान नसावी। बारे नसावी ॥--वरील वस्तु निरोपयोगी होत.

फुटणें--**दिशा फुटणें**--उजाडणें; दिशा फांकणें.

***फुटली घागर न जडे**--ज्याप्रमाणें मडकें फुटलें म्हणजे सांधतां येत नाहीं त्याप्रमाणें एकदां अब्रू गेली म्हणजे ती सावरतां येत नाहीं.

फुटलें जातें, तुटलें नातें--ज्याप्रमाणें जातें एकदां फुटलें म्हणजे सांधतां येत नाहीं, त्याप्रमाणें एकदां नात्याचा संबंध तुटला किंवा एकदां मनाचा बिघाड आला म्हणजे तो सुधारतां येत नाहीं.

फुटलें मोतीं, तुटलें मन, सांधूं न शके विधाता--ज्याप्रमाणें एकदां मोतीं फुटलें म्हणजे तें पुन्हां जोडतां येत नाहीं, त्याप्रमाणें एखाद्या विषयीं मनांत किल्मिष आलें म्हणजे तें ब्रह्मदेवाच्यानेंहि दूर होत नाहीं. -पामो १९०. 'सोनें अथवा हस्तचरण । मोडिल्या सांधिति विचक्षण । फुटलें मोतीं तुटलें मन । सांधूं न शके विधाता ॥'-मुक्तेश्वर. (गो.) फुटिल्लें मतीं आनी तुटिल्लें मन कॅन्नां साध्ना.

फुटाणे--**फुटाणे उडणें-फुटणें**--फुटाणे भाजले जात असतां उडतात यावरून. जोरानें ताडताड बोलणें.

फुटाणे करणें--(प्र.) चणेफुटाणे करणें. फुटाण्याएवढी किंमत देणें. वरचढ असणें.

फुटाणे फोडणें--पटापट उत्तरें देणें.

फुटाणे भाजणें--हरभारे तापल्या कढईत भाजतात त्याप्रमाणें जुलूम करणें.

भाषणाचे-शब्दाचे-वाणीचे फुटाणे भाजणें— शब्दांचा भडिमार करणें.

फुटाण्यासारखा उडणें—कढईत फुटाणे उडतात त्याप्रमाणें १ रागानें, जोरानें अंगविक्षेप करणें. २ फार चिडणें.

***फुटाणे खायचे अन् पिपाणी वाजवायची**—(वाय.) या दोन्ही गोष्टी एकदम साधणार कशा?

फुठ—फुठ उधुक्का फेणु; फुठ्या उद्‌काचो फेण—(गो.) निर्मल पाण्याला फेस; पाणी स्वतः फेंसाळ नाहींच तेव्हां स्वच्छ, निर्मळ अशा पाण्यापासून फेंस काढणें कधींतरी फलदायक होईल काय?

फुडलें, फुडा—फुडलें जोत तसें फाटलें जोत—पुढलें पहा.

फुडें गेल्यार फाटि कोण ना—(गो.) पुढें गेलें कीं मागें कोणी नाहीं. संबंधाची सांखळी तुटणें.

फुडे उपासु, तांतुई अधिक मासु—(गो.) आधींच दारिद्र्य आणि त्यांत अधिक महिना.

फुडेंच खुशाल, तांतुई शिमगो—(गो.) आधींच नाचरा अन् त्यांतून शिमगा, मग काय विचारावें?

फुडे माकड, तांतुई सोरो पिलां—(गो.) आधींच माकड आणि त्यांतून त्याला दारू पाजलेली, मग त्याच्या चेष्टांना काय उणें? आधींच मर्कट तशांतहि मद्य प्याला।

फुफू—फुफू करणें—(ध्वनि फुः Pooh) थट्टेनें उडवून देणें; चेष्टा करणें; मनावर न घेणें.

फुफाटा-फोफाटा—फुफाट्यांतून आगींत पडणें; आगींतून निघून फोफाट्यांत पडणें; आगींतून निघाला, फुफाट्यांत पडला-सांपडला—लहान संकटांतून निघून मोठ्या संकटांत सांपडणें किंवा एका संकटांतून दुसऱ्या संकटांत येणें. आग पहा. 'झालं खरं असं. ती आग कांहींतरी बरी होती, पण हा फुफाटा मात्र सहन होईलसें दिसत नाहीं.'—आ. इंदूचें शिक्षण ७२. 'पण लवकरच आपण आगींतून निघून फोफाट्यांत पडलों अशी तिची खात्री झाली.'—खांडेकरकृत पहिलें प्रेम १५६.

फुलगें—फुलगँ कलवंत—(गो.) फुलगें नांवाची एक कलावंतीण होती. ती नखरा फार करीत असे. त्यावरून एखाद्या मुलीनें फार नट्टापट्टा केला कीं तिला म्हणतात.

फुलणें—फुलून जाणें—फुलांप्रमाणें बहरणें; व्यापणें. 'या पुरुषांचीं अंगें हत्यारांनीं फुलून गेलीं होतीं.'—पामो ३.

***फुलिलें फूल परमळ नासतां ना रावना**—(गो.) पूर्ण फुललेलें फूल चोहोंकडे सुवास पसरवितेंच. चांगलीं कामें आपोआपच प्रसिद्धि पावतात.

फुलवणें—फुलवून काम करून घेणें— एखाद्याची स्तुति करून आपलें काम साधून घेणें; हरभऱ्याच्या झाडावर चढविणें.

फुली—फुली घालणें-पाडणें—रोग जाण्यासाठीं बिब्याच्या फुल्या घालतात किंवा नको असलेलें, चुकीचें फुली मारून खोडतात. १ विघ्न आणणें. २ खोडणें; चूक धरणें. ३ (ल.) थाबविणें.

गांडीवर फुली मारणें—एखाद्याकडून इच्छित किंवा विशिष्ट गोष्ट अजिबात होणार नाहीं असें धरून चालणें; त्याला बाद ठरविणें.

फुल्या पाडणें—सोनें गाळण्यापूर्वीं हिणकस सोनें व चांदी मिसळून त्यांचा रस पाण्यांत पाडणें.

फुलु—फुलुकुस्तार खॉजनॅ—(गो.)फुलु नांवाच्या कलावंतिणीच्या नांवावर खोजने (वायबार काढावयाचे गोळे) आणून ते लावावयाचे; दुसऱ्याच्या नांवावर स्वतःची चैन करणें.

फुसकट—फुसकट काढणें-पाडणें—दुर्दशा करणें; रग जिरविणें. भुसकट पहा.

फुसका—फुसकाईचा अंगारा—जी देवता अगदीं टाकाऊ आहे तिचा अंगारा परिणामकारक नसतो. १ (विटिदांडूच्या खेळांत) हुकणें. २ अपयश; निष्फळ प्रयत्न.

फुसक्या बाता मारणें—निरुपयोगी, रिकाम्या गोष्टी करणें.

***फुसकी शंका, फुसकें समाधान**—जशी शंका तसें समाधान; खोट्या शंकेला लटकें समाधान.

फुसकुली---फुसकुली सोडणें--(ल.) हळूच कुत्सित, व्याजोक्तिपर बोलणें; कोटी करणें; एखादवेळीं हळूंच खोचदार शब्द बोलणें.

फू-फूं---फू उडविणें—(फुंकरानें उडेल इतकी एखादी गोष्ट) हलकी मानणें; कःपदार्थ, क्षुद्र समजणें.

फू करणें-उडविणें; फू करून टाकणें--१ उधळणें; फुंकून टाकणें. २ क्षुद्र लेखणें.

फूं पडणें-होणें—१ तापांत जोरानें श्वास टाकणें; फणफणणें. २ फुरफुरणें (घोड्यानें).

फू होणें--१ उधळलें जाणें. २ रुसून फुगून बसणें. ३ गर्वानें ताठणें.

फूफू होणें--भरणें-भरून चालणें--फोफाट्यानें वाहणें.

फूल---फूल चळणें--गर्भाशय स्थानभ्रष्ट होणें.

फूल झडून जाणें--१ फुलवरा गळणें. २ लव निघून जाणें.

दिव्याला फूल देणें—दिवा मालविण्यासाठीं त्यावर बायका फूल टाकीत किंवा धरीत, असें संस्कृत काव्यांतून वर्णन असतें. (ल.) दिवा मालविणें.

फूल नाहीं फुलाची पाकळी देणें--यथाशक्ति देणें.

फूल बाहेर पडणें-निघणें—गुप्त गोष्ट बाहेर फुटणें; जाहीर होणें.

जमिनीस फूल येणें—उन्हानें तापून जमीन सकस होणें.

फूल वाहणें—(ल.)कन्यादान करणें.

फुलाचा वर्षाव--(उप.) शिवीगाळ. पुष्पवृष्टि पहा.

बोला फुलाला गांठ पडणें--तोंडातून शब्द निघावयाला आणि झाडाचें फूल खालीं पडावयाला अगदीं एक वेळ जमणें. 'कावळा टापी' न्याय. (गो.) बोलाफुला गांठ पडप.

फुलांत घालून ठेवणें-राखणें-जपणें—अत्यंत काळजीपूर्वक जपून ठेवणें.

फुलाऱ्यास येणें--फूल येणें; बहर येणें.

फुलें चढविणें--मुंडावळ बांधणें.- बदलापूर १४७.

फुलें देणें—बाह्यात्कारें मान्यता देणें; सन्मान करणें. ' मसलत ठीक केली, आणि उगेंच फुलें द्यावीं म्हणोन शिंदे होळकर व सूरजमल जाट यांस विचारणा केली.' —भाब ११६.

फुलें माळणें--१ फुलांची माळ करणें. २ (कु.) पहिल्या गरोदरपणांत पांचव्या महिन्यांत स्त्रीची ओटी भरणें. ३ (गो.) प्रशंसा करणें; भुलविणें. ४ फुलें डोक्यांत घालणें.

फुलें वाहणें--१ पूजा करणें. २ (उप.) पुजून ठेवणें. ३ शिवीगाळ करणें.

फुलें विकलीं-वेंचलीं तेथें गोवऱ्या-शेण्या विकाव्या लागणें--जेथें पूर्वी वैभवानें, मानानें दिवस काढले, तेथेंच हलक्या प्रतीचें काम करून, अपमानास्पद जिण्यानें राहाणें. मोठेपणा जाऊन वाईट दिवस येणें.

***फूल गळून पळयार फळ भायर येता**—(गो.) फूल गळून पडलें म्हणजे फळ बाहेर येतें. सगळ्या गोष्टी क्रमाक्रमानें घडत असतात.

फूल झडे तो फळ लगे—वरीलप्रमाणेंच. फूल गळल्यावर फळ येतें. एक गोष्ट जाते तों दुसरी तीपेक्षां अधिक चांगली मिळते. कमी प्रतीची वस्तु खर्च केल्यास अधिक किंमतीची वस्तु प्राप्त होते.

फूल झेंडूचें, गरिबागुरिबाचें--गुलाब, कमळ वगैरे फुलें हीं श्रीमंतांकारितां, गरिबांनीं आपलें झेंडूच्या फुलांवर समाधान मानून राहिलें पाहिजे. गरीबाचें लेणें गरीबासारखेंच असावें; त्यानें उगाच हावभरीस पडूं नये.

फूल नाहीं फुलाची पाकळी—फार मोठें नाहीं व लहानसेंच (आदर-सन्मान कृताज्ञतादर्शक खूण म्हणून) कांहीं तरी अल्पसें; थोडेंसें. (गो.) फूलथीं पाकळी. तु०-पत्रं पुष्पं फलं तोयं। 'फूल नाहीं फुलाची पाकळी या न्यायानें आम्हीं या मानपत्रासोबत सादर केलेली लहानशी रक्कम आपण स्वीकारावी'—लो. टिळक यांच्या ६१ व्या वाढदिवसाचें मानपत्र.

फूल फुलेले शिवाइ परमळु भायर पण्णा-- (गो.) फूल फुलल्यावांचून सुगंध सुटत नाहीं. मुळांत

कांहींतरी असल्यावांचून लोकांत त्याची वार्ता प्रसृत होत नाहीं. तु०—पिकल्यावांचून विकत नाहीं.

फुलाफळांला मुकली, सत्कार घेते नागवल्ली—नागवेलीला जरी फुलें अथवा फळें येत नाहींत तरी तिच्या पानांनाच एवढें महत्त्व आहे कीं तीं प्रत्येक समारंभांत लागतात व लोक त्यांचें सेवन करतात. यावरून कोणत्याहि एकाच गोष्टींत महत्त्व सांठविलेलें नसतें. कोणालाहि कोणत्या ना कोणत्या गोष्टीनें महत्त्व येतें.

फुलांमितिं वाय पावन--(गो.) फुलांच्या माळेंत दोरा पवित्र. चांगल्या वस्तूच्या साहचर्यानें हीन वस्तुसुद्धां महत्पदीं आरूढ झालेली दिसते.

फुलांमितिं वावळी विकता—(गो.) फुलांच्या भावानें वावळी (केळीचा दोर) विकली जाते. 'पुष्पमालानुषंगेण सूत्रं शिरसि धार्यते।' या अर्थानें म्हणतात.

फुलां विकलीं थै वावळ्यो विकच्यो न्हेयत--(गो.) ज्या ठिकाणीं तुम्हीं फुलें विकलींत तेथें नुसते दोरे विकण्यांत काय मजा! पत नाहींशी झाल्यावर ज्या लोकांनीं पूर्वी तुम्हांस गौरवानें वागविलें त्यांत मिसळण्यांत काय अर्थ आहे. खरें पाहिलें तर अशा जागेपासून दूरच राहिलेलें बरें. तु०—फुलें वेंचलीं तेथें गोवऱ्या वेंचणें.

फुलाचा वास भुंग्याला, आणि चिखल बेडकाला—ज्याच्या त्याच्या नशीबाप्रमाणें ज्याला त्याला मिळतें.

फुलांच्या झेल्यान माह्लेलें दुखलें, चाबकान माह्लेलें दुखलें ना?--(गो.) फुलांच्या झुबक्यानें मारलें तर लागतें, पण चाबकानें मारलें तर लागत नाहीं! मोठ्या प्रसंगांना तोंड देणारेच लहान गोष्टी मनाला फार लावून घेतात. कांहीं वेळीं यांत लबाडीहि असते. तु०—आवडतीचें मसण गोड. [भर्तृहरी राजाची राणी फार नाजुक होती. एका दिवशीं राजानें जाईचें फूल तिच्या अंगावर टाकल्याबरोबर तिला मूर्च्छा आली. पण रात्रीं ती ज्या एका खासदाराशीं लागू होती त्याच्याकडे तिला जावयाला उशीर झाला म्हणून त्यानें जेव्हां तिला चाबकानें मारलें तेव्हां तिला कांहीं झालें नाहीं. यावरून प्रियकराचीं खेटरें चालतात पण अप्रिय माणसाचीं फुलेंहि बोचतात.]

फुलानं मारली मूर्छना आली, मुसळानं मारली हांसत गेली--(व.) एका जारिणी स्त्रीला नवऱ्यानें फुलांचा हार फेंकून मारला तर तिनें इतक्या नाजुकपणाचें ढोंग केलें कीं आपणाला मूर्च्छा आलीसें दाखविलें; परंतु उशीर लागल्याबद्दल जारानें तिला चाबकानें मारलें तरी ती त्याजवर आशक असल्यानें ती न रडतां हासूं लागली. पूर्ण सोंग ढोंग करणाऱ्या मनुष्याला ही म्हण लावतात. वर पहा.

फुले ते करमाय—प्रत्येक फूल हें केव्हां तरी कोमजतेंच. त्याप्रमाणें प्रत्येक वस्तूला नाश हा असतोच.

फें — तुला फें आणि तुझ्या बापाला फें—एका देणेंकऱ्यावर सावकारानें फिर्याद केली तेव्हां वकीलानें त्यास वेड्याचें सोंग घेऊन देणें चुकविण्याचा सल्ला दिला. पुढें वकील आपली फी मागावयास गेला तेव्हां त्यासहि त्यानें वेडेपणाचें सोंग घेऊन टाळा दिला. जशास तसें.

फेट--फेट गळ्यांत घालणें--[फेट = कांठ, किनार] घट्ट धरणें; पकडणें.

फेट धरणें--रागानें घट्ट धरुन ठेवणें.

फेड--अपकाराची फेड उपकारानें करावी--अपकार पहा.

फेंड--फेंड फुणकें नि हल्याचें मुणकें--(व.) फुणकें हा कोंड्याचा बनणारा गरिबांचा एक खाद्य पदार्थ आहे. तो जरा फुगीर असतो. लठ्ठपणामुळें फुणक्याप्रमाणें जिच्या फेंडा म्ह. टिऱ्या मनस्वी फुगल्या आहेत व हेल्याच्या मुणक्याप्रमाणें जिचें मुणकें म्हणजे डोकें गलेलठ्ठ बनलें आहे व त्यामुळें जिला ठिकाणचें हालणें कठीण जातें अशा बाईला ही म्हण लावतात.

फेंपरी--फेंपरी(डी) वळणें—बोबडी वळणें; फेंफें होणें.

फेफे--फेंफें, फेफे होणें—उडणें—तोंडांतून शब्द स्पष्ट न येतां फे! फे! असा ध्वनि निघणें यावरून १ बोबडी वळणें; तिरपीट, त्रेधा होणें. २ दुबळेपणा, असमर्थता येणें.

फेर--फेर घेऊन मुतणें—वाईट गोष्टींत (शिकवणीवरहि) ताण करणें. उदा०—कोणीं उभ्यानें मुतावयास सांगितलें असतां वाटोळें फिरत फिरत मुतणें.

फेर देणें—घोडा वगैरे फिरवून आणणें. 'चाबूकस्वारांनीं श्रीमंतांचे घोडे फेर देऊन आणावे.'—डुकराची शिकार १४.

फेरा--अक्काबाईचा फेरा—अक्काबाई पहा.

चौऱ्यायशीचा फेरा—चौऱ्यायशी पहा.

फेस--फेस पाडणें—(तोंडास फेस येईतों जनावर, माणूस इ.स) दमविणें.

फेसाटी--गाडीची वाट फेसाटीनें मोडावी—गाडी पहा.

फेस्त--फेस्त करता गांव,व्हिगाराचें-प्रेजिदेन्तीचें नांव—(गो.)उत्सव करावयाचा सगळ्या गांवकऱ्यांनीं आणि नांव मात्र देवस्थानाच्या अध्यक्षाचें. लोकांनीं काम करावयाचें आणि त्याचें श्रेय मात्र गावांतल्या मोठ्या व्यक्तीनां मिळावयाचें असे प्रकार सगळीकडेच चालतात.

फेस्तापरस काम मोठें--(गो.) उत्सवापेक्षांहि त्याची प्रसिद्धी मोठी. कामापेक्षां वटवट अधिक.

फेस्तापुढें काम—(गो.) कामाच्या आधींच आरडाओरड. तु०—अस्वलाआधीं आरोळी.

फैल--फैल मचविणें-करणें—(ना.) नानातऱ्हेचे रंगढंग करणें.

फैल—फैलावर घेणें-धरणें—१ कठिण कामाला जुंपणें. २ कानउघाडणी करणें. ३ रिंगणावर धरणें; चिमट्यांत धरणें.

फैसला--फैसला करणें—१ निवाडा देणें. २ पुरें करणें; फडशा पाडणें. 'हें काम फैसला एका दिवसांत करून'—ख ८७५.

फोगोता--फोगोत्यान वाघ मारप--(गो.) १फटाकड्यांनीं वाघ मारणें. २ कष्टसाध्य गोष्ट सहजासहजीं करण्याचा आव आणणें.

फोगोत्यांनीं वाघ मर्ता ? वाघ मारूं गुळॉ जाय—(गो.) फटाकडयांनीं वाघ मरत नाहीं; त्याला बंदुकीची गोळीच हवी. एखादें पराक्रमाचें कृत्य करावयाचें झाल्यास त्याची तयारीहि तितकीच चांगली पाहिजे.

फोडणें—पाणी फोडणें--पाण्याला वाट करून देणें.

फोडलेलें पान--पत्त्यांमध्यें उताणें टाकलेलें पान.

फोडून काढणें--खूप मारणें.

डोळे फोडून पाहणें--(निंदार्थी) डोळे ताणून, मोठें करून पाहणें; निरखून पाहणें.

***फोडा व झोडा**—(इं.) Divide and Rule. फूट पाडून नाश करणें अशी रीत, नीति. 'फोडा व झोडा ही इंग्रजांची राज्य मिळण्याची राजनीति !'—के३.५.३०.

फोंडा---फोंडा माती फोंडा पावना—(गो.) खड्ड्याची माती खड्ड्याला पुरत नाहीं. अपुऱ्या प्राप्तीला उद्देशून म्हणतात.

फोंडा माती फोंडाक—(गो.) खड्ड्याची माती खड्ड्याला. खड्डा खणायचा आणि तीच माती त्याच्यांत लोटायची, यांत पदरचें काय खर्च झालें ? ज्याचें काढून त्यालाच तें परत देण्यांत औदार्य कसलें ?

फोंडु आशिह्लेकडे उदाक एकोट्टता—(गो.) जिथें खळगा असेल तिथेंच पाणी सांचतें. जिथें कांहीं लाभ होण्यासारखा असेल तिथेंच माणसें गोळा होतात.

फोडी---फोडीपान—पानसुपारी; विडा. 'असो सारिली आरोगणा। हडपिये दीधलें फोडीपाना।'—कथा ४.१७.९७.

फोंत---फोंत करप—(गो.) शरीरांतील दूषित रक्त काढणें; पोत करणें.

फोंतीर पान मारप—(गो.) जखमेवर मीठ घालणें.

फोदा—फोदलपट्टी काढणें—(अशिष्ट.)शिव्या देणें; भोसडणें.

फोदेपिसाट—नेहमीं बायकांच्यामागें हिंडणारा; गम्य, अगम्य विचार न करतां व्यभिचार करणारा.

फोपळ---फोपळ आसतना व्हांटींतुं घाले झणु झाड जातचि जात्तवे ?—(गो.) पोकळ होतें तेव्हां ओटींत राहिलें. त्याचें झाड झाल्यावर तें कसें ओटींत राहील ? मुलांना स्वतंत्र बुद्धि आली कीं ती वडिलांच्या आज्ञेंत राहात नाहींत.

फोलणें---फोलून फोलून खाणें—१ सावकाश हळूहळू सोलून खाणें. २ (ल.) युक्तीनें व दुसऱ्यास समजूं न देतां त्यापासून हळूहळू तत्त्वांश काढून घेणें.

फोव---फोवांडपख—(गो.)[फोव=पोहे] दिवाळींत फराळाला पोह्याचे निरनिराळे प्रकार करण्याची गोमांतक ख्रिस्ती लोकांत पद्धत आहे. यावरून सामान्यतः दिवाळी.

*फोव ना कातली गोड आसल्यार कालैन दितलों आसिल्लों—(गो.) पोहे नाहींत, खोबरें नाहीं, गूळ असता तर त्यांत कालवून दिले असते. म्हणजे सगळाच नन्नाचा पाढा. तु०—घरमे नहीं दाणा, अम्मा गई पिसनेकू.

फौज—फौज खर्चाचें तोंड—(ऐति.) फौजेला फार खर्च लागतो यावरून ही म्हण पडली.—इस.होळ. १६.

फौज फिरे, कर्ज नुरे (फिटे)—(ऐति.) पहिल्या बाजीरावाच्या वेळची ही म्हण आहे. मोहिमा चालू ठेवल्यास राज्यास कर्ज उरत नाहीं.

ाज लाजी (राजी) राखवी—(ऐति.) फौज जर संतुष्ट ठेविली नाहीं तर ती राज्याचा नाश करते. 'उमदे मनसुफे करून पैका भारी मिळवून कर्जाची वाढ करून फौज लाजी राखावी.'

फौत—फौत होणें—मरणें. 'एका रोजीचें खावयास नाहींसें जालें अजी सबब आपला भर्तार रानोजीराव फौत जाहला.'—रा१७.१.

ब

बक—बकबंधनन्याय—बगळ्यास धरणें झाल्यास त्याचे पुढें सरळ न जातां प्रथम त्याचे डोक्यावर लोणी टाकतात व तें विरघळून त्याच्या डोळ्यांत उतरून त्यास दिसेनासें झालें म्हणजे मग धरतात. यावरून कोणतीहि गोष्ट सरळ मार्गानें न करतां वळणा वळणानें करणें; सरळ होणाऱ्या गोष्टीसाठीं वांकड्या तिकड्या मार्गाचा केलेला अवलंब.

*बकध्यान मासाळे धरूंक, बोक्याध्यान उंदरा धरूंक—(गो.) बगळ्याचें ध्यान मासे धरण्यासाठीं आणि बोक्याचें ध्यान उंदीर धरण्यासाठीं. परमेश्वरप्राप्तीसाठीं ध्यानधारणा करणारे विरळा. बहुतेकांचा परमार्थाचा देखावा सावजें जाळ्यांत पकडण्यासाठींच असतो.

बकणें—हजार बका आणि एक लिखा—एक पहा. तोंडानें सांगितलेल्या हजार गोष्टींसहि एका लेखाची बरोबरी करतां येत नाहीं. हजार तोंडी पुरावे एका लेखीपुराव्यापुढें लटके पडतात.

बकबक-बकाबकां—बकाबकां खाणें—गपागप, भराभर खाणें; मटकावणें.

बकरा-री—बकरकुदीवर येणें—लढण्यासाठीं निकरावर येणें; ज्याप्रमाणें बकरीं एकमेकांशीं टक्कर घेण्याकरितां उडी मारतात त्याप्रमाणें युद्धास सरसावणें. 'पळतां येईना तेव्हां आला बकरकुदीवर.'

बकरसठ (ट)—मार्गशीर्ष शुद्ध षष्ठी; चंपाषष्ठी; या दिवशीं खंडोबापुढें बकरीं बळी देतात.

बकऱ्याची रेघ—बकरा मारणें, बळी देणें. 'दसऱ्यास गोंधळ व बकऱ्याची रेघ व्हावी लागते.'—पेशवेकालीन महाराष्ट्र ५००.

*बकरी घरोघरीं, धान्याची करिते चोरी—बकरीस जेथें जेथें खावयास दिसेल तेथें तोंड घालण्याची संवय असते. याप्रमाणें चोरटें असणें; कोणाचीहि वस्तु पाहिली कीं उचलण्याची संवय असणें.

बकरीकी मां कबतक दुवा मंगेगी—(हिं.)बकरी हें मानवी प्राण्याचें खाद्य. ती बकरी आज ना उद्यां केव्हांतरी खाण्यासाठीं मारली जाणारच. तिनें कुणाचाहि नि कितीहि आशिर्वाद मागितला तरी तिच्या कपाळचा मृत्युलेख चुकत नाहीं. दैवापुढें प्रत्येकाला हात टेंकावे लागतात, विधीलिखित चुकवूं म्हटल्यानें चुकत नाहीं.

बकरीने दूध दीया पर मेंगनीयों भरा—(हिं.) बकरीनें दूध दिलें पण सर्व लेंड्यांनीं भरलेलें. एखादी गोष्ट एखाद्यापासून मिळूनहि तींत कांहीं अर्थ नसणें, निरुपयोगी होणें. 'Madge, good cow gives a good pail of milk, and then kicks it down with her foot.'

बकऱ्याच्या आई! किती काळजी करशील बाई!—बकरें हें केव्हांना केव्हां तरी मारलें जाणारच. तेव्हां त्याच्या आईनें त्याची रात्रंदिवस अतिशय काळजी करून काय फायदा?

बकासूर—बकासूर आला आणि अन्नावर दरवडा पडला.—बकासूर हा एक अतिशय खादाड

राक्षस होता. यावरून एखाद्या अघाशी मनुष्यापुढें कितीहि अन्न ठेवलें तरी कांहीं शिल्लक उरत नाहीं. जबरदस्त मनुष्याशीं गांठ पडली कीं तो सर्व फायदा खाऊन टाकतो.

बखत--बखत पडे पर जानये, को वैरी को मीत—(हिं.) वेळ पडली म्हणजे मित्र कोण व शत्रु कोण हें ओळखू येतें. प्रसंगानेंच आपला मित्र किंवा शत्रु कळून येतो.

बखत पडे बांका, तो गद्धेकु कहना काका—(हिं.) प्रसंग पडला म्हणजे गाढवालाहि काका म्हणावें लागतें. तु०—अडला नारायण गाढवाचे पाय धरी.–शाब२.२१८.

बखतवारी उडगई है, बुलंदी रह गई है—(हिं.) पैसा गेला अभिमान राहिला.

बगड--बगडभावार्थी—आंतून कावेबाज असून वरून निष्कपटीपणाचें ढोंग दाखविणारा.

बगडमोड्या—पाठ मोडली आहे असा; कमरेंत जोर नसलेला; ढिला; बेवकूब.

बगल--बगल दाखविणें; बगल–ला वर करणें—आपल्याजवळ कांहीं नाहीं हें दाखविण्यासाठीं हात वर करणें; यावरून दिवाळें वाजविणें. खांका वर करणें, पहा.

बगल देणें—१ एका बाजूला होणें; बाजूला सरणें. २ डावलणें, बाजूला टाकणें; गाळणें; टाळणें.

बगलबच्चा—वाशिल्याचा माणूस.

बगलबिल्ली—१ लाडावलेलें मूल. २ वाशिल्याचें तट्टू.

बगलभावार्थी—वरून दिसावयास भोळा पण कार्य-साधु; लबाड; चोर.

बगल मारणें—१ सैन्याची एक बाजू मोडून काढणें. २ एका बाजूस सरणें; वाट देणें. ‘आम्हांस गिलच्यानें वाट देऊन एकीकडे बगल मारून जाहला.’—भाब११३.

बगला मारणें—एखाद्या झाडाचे बाजूस फुटणारे डोळे, मोड, अंकुर काढून टाकणें.

बगलेंत असणें—१ आश्रयाखालीं असणें. २ अंकित असणें; मुठींत असणें.

एखादी वस्तु बगलेंत घालून चतुःसमुद्राचें स्नान करून येणें—(ल.) ती वस्तु आपल्या खिसगण-तींत नाहीं असें धरून वागणें.

बगलेंत धरणें—(ल.) आश्रयाखालीं घेणें.

बगलेंत मारणें—१ छाती व बाहु यांच्यामध्यें दाबून धरणें. २ काखोटींत मारणें; हस्तगत करणें; दाबून बसणें.

बगलेंतलें असणें—तें काम सहज करतां येण्यासारखें असणें.

बगलेंतील गोष्ट—स्वकपोलकल्पित पदरची गोष्ट; थाप; गप्प.

गोष्ट बगलेंतून काढणें—खोटी गोष्ट बनवून ती खरी करून सांगणें; बात झोंकणें; बनावट गोष्ट करणें.

बगल्याचोर—उचल्या; सहज जातां येतां एखादी वस्तु पळविणारा.

* **बगलमें कोंबडा, और गांवमें दंडोरा; बगलमें बच्चा, शहरमें दंडोरो**—स्वतःजवळच वस्तु असून उगाच हरवली म्हणून ओरड करणें. तु०—कांखेंत कळसा गांवाला वळसा.

बगलमें छुरी, मुहमें रामराम—(हिं.) आंत एक बाहेर एक; वरून साधु आंतून कपटी.

बगलेंत पोर, गांवांत दांडोरा—बगलमें कोंबडा पहा.

बगले घाणूटा, पैसुल परमयूटा—(गो.) जवळच्याची घाण येते आणि दूरच्याला सुगंध सुटतो. जवळचीं माणसें नकोशीं होतात आणि दूरचीं चांगलीं वाटतात.

बगलेक यो, आफोडूं नाका—(गो.) जवळ ये पण शिवूं नको. एखादी वस्तु दिल्यासारखी दाखवायची पण पूर्णपणें द्यायची नाहीं अशा अर्थानें. आरती ये आपडूं नको, पहा.

बगळा--बक पहा. **बगळा भगत भया**—बगळा साधु झाला. भोंदु; साधुत्वाचा खोटा आव आणणारा.

बगला मारे, पंख हाथ—(हिं.) बगळा मारला पण पंख हाताला लागला. बगळ्यास गोळीनें मारणें सामान्यतः

कठीण असतें. बहुधा त्याच्या पिसांस गोळी लागून तीं खालीं पडतात व बगळा उडून जातो. भिकार प्राण्याच्या किंवा लबाडाच्या पाठीस लागलें तर क्षुल्लकच लाभ व्हावयाचा.

बगाड—-बगाड घेणें-लावणें—खंडोबा, बहिरोबा या देवापुढें उभ्या खांबावर एक गळ लाविलेला असतो, तो नवस फेडण्यासाठीं स्वतःला लावून घेणें. 'गुदस्तां महाराचे बायकोनें हणमंताजवळ बगाड लाविलें.' –वाडथोमा २.१३५.

बंगाल—-बंगाली दृष्टिबंधन; बंगाली विद्या—गौडबंगाल; बंगाली जादूटोणा; बंगाल प्रांत जादु विद्येकरितां फार प्रसिद्ध आहे. यावरून मंत्रतंत्र, जादुटोणा वगैरेस गौडबंगाल असा वाक्प्रचार प्रसिद्ध आहे. 'जसें ग बाई बंगाली दृष्टिबंधन ।'–राला १३. 'नर ठकडे बंगाली विद्या घेतली सखे प्रियकरे । बळेंच वेड लाविलें ।'

बगोटी—-बगोटी-टें धरणें; बगोटीस बसणें—१ मानगोटी, गळा धरणें. २ पिच्छा पुरवणें; पाठीस लागणें; हट्ट धरणें.

बगोपंत—-बगोपंताचे भाचे—अतिशय कृपण माणूस.

बघणें—-बघारे डोळ्यांनीं, ऐकारे कानांनीं—दुसरा कोणी साक्षीदार नसल्यास कान आणि डोळे साक्षी ठेवून एखादी गोष्ट करणें.

बचक—-बचकेंत पाणी धरणें—बचकेमध्यें पाणी धरूं लागल्यास तें सर्व सांडून जातें, हातांत कांहीं राहात नाहीं. अशक्य गोष्ट करूं जाणें.

बचना—-बचेगा नर, तो बांधेगा घर—(हिं.) मनुष्याचा जीव वांचेल तरच त्याला पुढें आपल्याकरितां घर बांधणें शक्य आहे. त्याचा जीवच गेला तर मग घर कोण बांधणार व कोणाकरितां बांधणार ? तु०–सीर सलामत०

बचेंगे तो औरबी लढेंगे—(ऐति.) पानपतच्या लढाईपूर्वी दत्ताजी शिंदे हा अबदालीच्या सैन्याशीं लढतांना जखमी होऊन पडला. तेव्हां एका गिलच्या सरदारानें त्याला त्या स्थितींत प्रश्न केला, 'पटेल, हमारे साथ तुम और लढेंगे ?' तेव्हां दत्ताजीनें चट्दिशीं वरील उत्तर दिलें. पण याचा परिणाम म्हणजे त्याचें शीर कापलें गेलें. तथापि या उत्तरावरून मराठे सरदारांचें शौर्य कसें होतें तें दिसून येतें. यांतून जगलों तर करीन या अर्थी आज वापरतात.

बचनाग—-बचनागाची कांडी—बचनाग ही विषारी वनस्पति आहे; यावरून उपद्रवी माणूस.

बचबच—-बचबच होणें—बोभाटा होणें; बभ्रा होणें; सर्वत्र चर्चा होणें.

बछडा—-बछडा खुंटेके बळ नाचता है—वांसरूं खुंट्याच्या आधारानें उड्या मारतें. एखाद्याच्या आधारानें फुशारकी मारणें; एखाद्या मोठ्या मनुष्याच्या जिवावर उड्या मारणें.

बजबजपुरी—-बजबजपुरी करणें-माजविणें—अव्यवस्था, गोंधळ, घोटाळा करणें.

बजबजपुरी माजणें—अव्यवस्था, गोंधळ असणें; अंदाधुंदी होणें. 'पण सरकारी नियंत्रणांत एकसूत्रीपणा नसल्यामुळें सर्वत्र बजबजपुरी माजली आहे.'—के ३.११-४२.

बजबजपुरी मोडणें—अव्यवस्था घालविणें; घोटाळा वगैरे काढून नीट व्यवस्था लावणें.

बजावणें—-बजावून ठेवणें; बजाजत लावणें—(व.) सांगून ठेवणें; निक्षून सांगणें; पक्कें सांगणें.

बजाही—-बजाही सावकार—स्वतःचे हिंमतीवर सावकारी, व्यापार करणारा.

बजीत-द; बाजीत-द—-बजीत-द होणें—आग्रह करणें; कृपा भाकणें. 'बाजीद होऊन जमान देऊन'–भाद्वि संवृ ५०.

बटके—देव झाले लटके, ब्राह्मण झाले बटके—कलियुगांत देवांत कांहीं सामर्थ्य राहिलें नाहीं; ते नवसास पावत नाहींसे झाले आहेत व ब्राह्मणांतहि तेज राहिलें नसून ते सर्व नोकर बनले आहेत.

बटाई—-बटाई म्हणजे लुटाई—बटाईनें जमिनी करण्यांत कुणब्यांचा फायदा असतो, ते मालकाला बटाईचा हिस्सा फारसा मिळूं देत नाहींत. "रोख खंड कबूल न करतां त्यांच्या जमिनी ते (कुणबी) बटाईनें

(वांट्यानें) घेतात. 'बटाई म्हणजे लुटाई' शक्य तितकी मेहनत ते आपल्या स्वतःच्या शेतांत करून फावला वेळ बटाईच्या शेताकडे लावतात आणि स्वतःच्या शेतावरीलसुद्धां खर्चांच्या सर्व बाबी दुसऱ्याच्या शेतावर घालतात." –गागा १७७.

बटाटे——पांढरे बटाटे—अंडीं. ' खरेंच–आपले पांढरे बटाटे घेण्याचें जमलें तर बघ. अशक्तपणा एकदम नाहींसा होईल. '–आमच्या इंदूचें शिक्षण, पा. १३५.

(डोक्यांत) बटाटे भरलेले असणें––मंदबुद्धि, जडबुद्धि असणें; स्मरणशक्ति कमी असणें.

बटीक——बटीक बाईल, कटक दादला——बायको गरीब व कामास राबणारी असली म्हणजे नवरा मोठा तोरेबाज होतो.

बटिकेची चाकरी, रोज शिळ्या भाकरी––एखादी स्त्री दासी म्हणून कोणाकडे नोकरीस राहिल्यास तिला ताजें अन्न कधीं खावयास मिळत नाहीं तर मालकाकडचे शिळे तुकडे तिच्या कम नशीबानें खावयास मिळतात.

बट्टा——बट्टा लागणें—कमीपणा येणें; दोष येणें; टपका येणें.

बट्टा लावणें—कमीपणा देणें, आणणें; अब्रू घेणें. ' अशी ही थट्टा । भल्याभल्यांसि लाविला बट्टा ॥' –एकनाथ भारूड.

बट्टें होणें—(बे.) नासणें.

बट्याबोळ—१ गोंधळ; गडबड. २ त्रास.

बठ्या——बठ्याचं बठ्या नि डिंवरा मोठा—(ब.) [बठ्या=सुस्त, जड. चालता चालता जमिनीवर बैठक मारणारा. डिंवरा=रुबाबदार दिसणारा.] अंगीं मोठा अवगुण असूनहि जो दिमाख मिरवितो अशा मनुष्याला अनुलक्षून ही म्हण वापरतात.

बंड——बंडफरोशी; बंडेफरोशी—१ बंडखोर; लुटारू. २ द्वाड; त्रासदायक.

***बंडें झालें मुलखीं, राजाला भरली धडकी**—राज्यांत कोठेंहि बंड झालें असतां राजास भीति उत्पन्न होते.

बडक–––वडक जावप––(गो.) म्हातारें होणें.

***बडक्या बैलान गाय आडायल्या.**— रेडक्या बैलानें गायीला अडवून धरलें. अशक्त माणसानें आपल्याला न झेंपणाऱ्या वस्तूला कवटाळणें.

बडगा––बडगा दाखविणें––काठी, दंडुका दाखविणें. १ मारीन असा धाक दाखविणें. २ स्वकार्य साधून दुसऱ्यास ठकविणें.

***घी देखा पण बडगा नहि देखा**––घी पहा.

दूध देखलें पण बडगा देखला नाहीं—मांजरानें दूध पाहिलें पण बडगा पाहिला नाहीं. घी पहा.–V.S. २·१३०

बडबड——बडबड करतां नाहीं जोम, पैका करी सर्व काम—जगांत सर्व कामें पैशाच्या बळानें होतात, नुसत्या बडबडीनें कांहीं होत नाहीं.

बडा–––बड्या बाजेचा ढेंकूण—(ल.) स्वतःची लबाडी, ढोंग नाकबूल करण्यांत शेखी मिरवणारा; शेंदाड शिपाई.

***बडा घर पोकळ वासा**––दिसावयास खूप डामडौल पण खरोखर दरिद्री; केवळ वरून दिखाऊ गोष्ट. नांव मोठें लक्षण खोटें.–मृच्छ.

बडा देखकर छोटा गमाया—(हिं.) मोठ्या गोष्टीच्या मागें लागून लहानशी हातची गोष्टहि न करतां येणें. " ' बडा० ' या म्हणीप्रमाणें पुष्कळ वेळां मोठ्या शिकारीच्या नादांत पोलिसांची लहान शिकारहि निसटून जाते. " टिच–२·१·९.

बडे बडे बह गये, गद्धा कहे कितना पानी––(हिं.)जेथें मोठमोठें प्राणी वाहून गेले तेथें गाढव पाण्याचा ठाव विचारतें. तु०–उंट बुडतो व शेळी ठाव विचारते.

बडे बापका बडा बेटा; बडे बापके बेटे—मोठ्या बापाचा मुलगा; बहुधा शोख; बापाच्या नांवावर विकणारा. ' जाधवराव हे बडे बापके बेटे या नात्यानें वजीरीवर हक्क सांगतात, खुशाल सांगोत ! '–शिसं २·२.

बडे भाई सो बडेभाई, छोटे भाई सो सुबानअल्ला—(हिं.)मोठे भाऊ ते दादा व धाकटे भाऊ सुभानअल्ला; दोघेहि मूर्ख, अकर्ते.

बडे लोकांचें मागणें, गरिबांस संकुचित करणें—मोठ्या लोकांनीं गरीबांजवळ कांहीं मागितलें असतां गरीबांस फार संकोच होतो कारण एखादी वस्तु नाहीं म्हणावें तर त्यांस राग यावयाचा व द्यावी तर ती त्यांच्या योग्यतेची नसावयाची; मिळून दोहों बाजूंनीं अडचणच.

बड्या घरचा पोकळ वासा, भीक मिळेना मूठ पसा--मोठे लोक नुसते नांवाचे मोठे असतात, त्यांच्या पासून गरीबांचा कांहींसुद्धां फायदा होत नाहीं.

बड्या बड्या बाता, नि मग खाय लाथा--प्रथम मोठमोठ्या गप्पा मारून मग फजीत पावावयाचें. गप्पी दासाची स्थिति कशी होते हें यांत दाखविलें आहे. गरजेल तो वर्षेल काय?

बड्याचें बडें, तेथें काय सुंठीचें कुडें--मोठ्या लोकांच्या गोष्टींत बारीकसारीक गोष्टींची दाद कसली लागते. तु०--नगाऱ्याची घाई तेथें टीमकीचें काई.

बडी--बडी हातांत घेवप--(गो.) मारण्यास हात उगारणें; हातांत काठी घेणें.

***बडी कातरून कुडके करूं येत, उदक कातरून कुडके करूं येत?**--(गो.) काठीचे तुकडे करतां येतील पण पाण्याचे तुकडे करतां येणार नाहींत.

बड्डि नास्तना पेट्टु मारचो--(गो.) काठी नसतांना मार देणें. मर्मभेदक शब्दांनीं दुसऱ्याचें मन दुखवणें.

बड्डि मोळ्यारि दोरियेनें बांद्ये, मन मोळ्यारि कसल्यानें बांदचें--(गो.) काठी मोडली तर तिला दोरीनें बांधतां येईल. पण मन मोडलें तर तें कशानें बांधायचें ?

बड्डि हालयल्यारि तुरि स्वतेंव हालता--(गो.) झाड हालवलें कीं शेंगा आपोआप हालतात. आधारभूत व्यक्तीला आपलेंसें केलें कीं तिच्या आश्रयानें असलेलीं सगळीं माणसें आपल्याला मदत करतात.

बडये भया खेते नाचता--(गो.) लहान माकड सुद्धां काठीच्या माराच्या भीतीनें नाचायास लागतें. धाकाशिवाय कोणतीहि गोष्ट होत नाहीं.तु०--लकडी शिवाय मकडी वळत नाहीं.

बंडूनाना--बंडुनानी किंत्ता-वळण--बंडूनाना रानडे या गृहस्थानें आंग्लाईत कित्त्यांचें एक विशिष्ट वळण घालून दिलें. 'बिवलकरी कित्ता' पहा. 'किर्लोस्करी वळण (नाट्य अभिनयाचें) हें बंडुनानी वळणाप्रमाणें दिखाऊ ढबीचें आणि बरेंच सोपें असल्यानें त्याचा प्रसार अद्यापि मध्यम अवस्थेंत जीव धरून राहिला आहे.'--गणपतराव चरित्र.

बडे(डी)जाव--बडे(डी)जाव करणें--१ गौरव करणें; आदरसत्कार करणें; मानसन्मान ठेवणें, दाखविणें. २ प्रतिष्ठा वाढविणें; मोठेपणा देणें; महत्त्व वाढविणें.

बडोदें--बडोदी मोती--(कर्ना.) खोटें मोती. 'बडोदा मोत्याची माळ गणपतीच्या गळ्यांत घालणेंकरितां करा.'

***काठिण बाई! बडोद्याची चाकरी**--(ऐति.) एका लावणींतील चरण. पूर्वी शिलेदारांना बडोद्याच्या चाकरीविषयीं फार धास्ती असे, असें दिसतें.

बड्डु--बड्डुरें खालें म्हण मास यता ?--(गो.) पुष्कळ खाल्लें म्हणून मांस वाढत नाहीं. अतिरिक्तपणा हा लाभापेक्षां हानिच घडवतो.

बढाई--बढाई भोगणें-मारणें--मोठेपणाचा डौल मारणें; मोठेपणाचा आव आणणें. (सामा.) फुकटची उगाच शेखी मिरविणें.

***बढाईखोर आणि लबाड, उभयतां असती भाऊबंद**--सामान्यतः बढाई मारणारे लोक लबाड असतात. बाताडे व लबाड यांत फारसें अंतर नसतें.--सवि १७.

बत्तिशी--बत्तिशी काढणें--(हंसतांना दांत बाहेर दिसतात यावरून) मोठ्यानें हंसणें; दांत दाखविणें. 'त्या इसमानें बाजीरावाकडे पाहून बत्तिशी काढली.'--अस्तंभा १०.

बत्तिशी दाखविणें--हंसणें; दांत काढणें.

बत्तिशी पाडणें-हलविणें--१ दांत घशांत घालणें. २ थोबाडींत मारून दांत पाडणें.

बत्तिशी रंगविणें--१ दांतांतून रक्त येईल इतक्या जोरानें थोबाडींत मारणें; श्रीमुखांत देणें. २ विडा खाऊन तोंड लाल करणें.

बत्तिशी लवणें--अशुभ भाकित करणें; अशुभ बोलणें; अमंगल भाषण करणें.

बत्तिशी हालविणें-हालणें--अशुभ भाकित करणें.

***तेहतिशी करीत नाहीं अशी बत्तिशी करिती**--तेहतीस कोटी देवांच्याकडून जें होऊं शकत नाहीं तें बत्तीस दातांनीं म्हणजे तोंडानें होतें. इतका बोलण्याचा मोठा परिणाम होतो.

बत्ती---बत्ती देणें---पेटविणें; आग लावणें; चेतविणें.

बत्ती लागणें---काम, घर, संपत्ति रोजगार यांस आग लावणें; राखरांगोळी होणें.

तिच्या पोटीं-पाठीं बत्ती लागो--एक शाप. एखादीचीं संतती भाऊबंद वगैरे लवकर मरोत याअर्थी.

बत्ती लावणें--१ घर वगैरेस आग लावणें; नाश करणें. २ भांडण लावणें, चेतविणें; कलह लावणें.

बत्तीस---बत्तीस अक्षरी मंत्र—कृष्णाय वासुदेवाय हरये परमात्मने । प्रणतक्लेशनाशाय गोविंदाय नमोनमः ॥ यांत बत्तीस अक्षरें आहेत.

बत्तीस राम पळौप--(गो.) पुष्कळ काळ जगून अनुभव घेणें.

बत्तीस लक्षणी पुरुष—बत्तीस लक्षणें कोणतीं तें खालीं दिलें आहे. पंचसूक्ष्मः पंचदीर्घः सप्तरक्तः षडुन्नतः। त्रिपृथुर्लघुगंभीरो द्वात्रिंशल्लक्षणः पुमान् ॥ ५ सूक्ष्म (बारीक)—१ त्वचा, २ केस, ३ बोटें, ४ दांत व ५ बोटाचीं पेरें. ५ दीर्घ (लांब)--१ हात, २ डोळे, ३ हनवटी, ४ जानू, ५ नाक. ७ रक्त (तांबडे)—१ पायाचे तळवे, २ हाताचे तळवे, ३ खालचा ओठ, ४ डोळे, ५ टाळा, ६ जीभ, ७ नखें. ६ उन्नत (उंच) —१छाती, २ कुशी, ३ केश, ४ खांदे,५ कर, ६ मुख. ३ पृथु (मोठे)—१कपाळ, २ कंबर, ३ छाती. ३ लघु (बारीक)—१ गळा, २ जंघा, ३ मेहन (लिंग). ३ गंभीर--१ स्वर, २ सत्व, ३ बेंबी.

बत्तीस लक्षणी बाब्या--(उप.) दुर्गुणाचें जणूं घर-असा मनुष्य.

बत्तीस विद्या—१ वृक्ष, २ पशु, ३ मनुष्य, ४ संसेचन, ५ संहरण, ६ स्तंभन, ७ द्दति, ८ भस्मीकरण, ९ सांकर्य, १० पार्थक्य, ११ तरी, १२ नौ, १३ नौका, १४ अध्वपथ, १५ घंटापथ, १६ सेतु, १७ शकुंत, १८ विमाननयन, १९ वास, २० कुट्टी, २१ मंदिर, २२ प्रासाद, २३ दुर्ग, २४ कूट, २५ आकर, २६ आपण, २७ राजगृह, २८ आराम, २९ देवालय, ३० नगर, ३१ रचना, ३२ युद्ध.

बत्तीस हलविणें—पाडणें—दांत पाडून टाकणें. बत्तिशी पहा.

***बत्तीस दांतकी भाखा खाली नहीं जाती**—(हिं.) तोंडांतून निघालेले शब्द व्यर्थ जात नाहींत; एकदां तोंडांतून शब्द बाहेर पडला कीं, त्याचा परिणाम झाल्याशिवाय राहात नाहीं

बंद---बंद बांधून देणें---धारा करून देणें; रीत घालून देणें. ‘याप्रमाणें बंद बांधून दिलें.’—श्रीशिवछत्रपति चरित्र ७५.

बंदाखालीं बसणें-सहस्र बंदाखालीं बसणें—कर्तव्यानें, शपथेनें बांधलें जाणें; घर वगैरेची आण वाहणें.

भरल्या बंदांत--बंदाखालीं—नांदत्या, वसत्या घरांत (रडूं नये, भांडूं नये इ.).

भरल्या बंदांत-बंदाखालीं बसणें--शपथेचा एक प्रकार. नांदत्या घरांत, भरल्या घरांत असल्यामुळें वचन पुरें करणार अशी खात्री देणें.

बंदर---बंदर वाहणें—तुफानामुळें बंद झालेलें बंदर खुलें होणें.

बंदरी मेवा--बदाम, पिस्ता, बेदाणा वगैरे सुकामेवा; परदेशांतून, बंदर मार्गें येणारा जिन्नस.

बंदर—बंदरकी दोस्ती, जीका जियान—(हिं.) वानराशीं स्नेह प्राण घेणार. मूर्खाची दोस्ती म्हणजे आयुष्यनाश होय.

बंदरके हात नारियेल--वांदराच्या हातीं नारळ; कोंबड्यापुढें मोती.

बदल—बदल; बदलावण; बदलाचें लग्न--साटेंलोटें, दोन घराण्यांत परस्पर मुली देणें व करून घेणें असा रिवाज.

बदल देणें--१ ऐवजीं, करितां देणें. २ खर्चाकरितां देणें. ‘बदल देणें वतनांत लोकांनीं’--वाडशाछ १.

बदलाई करणें; बदलाईस येणें—१ माघार घेणें; वचनांत बदल करणें. २ नाकबूल करणें; प्रतिकूल होणें.

बदस्तूर—बदस्तूर साबिका--पूर्वं वहिवाटी प्रमाणें.-रा ८.२१८.

बंदा—बंदे गुलाम--गुलामाप्रमाणें सर्वस्वीं स्वाधीन मनुष्य; पूर्णपणें ताब्यांतील; स्वाधीनचा. ‘आमचें जबरदस्त

शस्त्र म्हणजे त्यांचें आपल्यावरचें प्रेम. त्याच्याच योगानें ते राजे असूनही आमचे बंदे गुलामच बनतात.'— त्राटिका.

बंदाटी--बंदाटी घालणें— धार काढतांना काठीला दोरी बांधून जनावराच्या शिंगास अडकाविणें.

बदाम--बदाम बोऱ्या—बदाम घालून आलेले बारदान; यावर माशा सुद्धां बसत नाहींत. यावरून फकीरास, दरिद्री माणसाला लावतात. याच्या उलट खजूरी बोऱ्या पहा.

बंदिस्त--बंदिस्त लेख--पुस्तकांतील लेख. याच्या उलट मोकळा लेख.

बांध बंदिस्ती करणें—शेतावरील माती बांधावर घालणें व सपाट करणें.

बंदी—बंदी घालणें—१ आडकाठी करणें; मनाई, प्रतिबंध करणें, ठेवणें. २ कारागृहांत ठेवणें; तुरुंगांत घालणें; कैद करणें.'रावणें बंदीं घातलें इंद्रासी ।'--एभा ९.१५.

बंदूक—बंदूक उडणें—बंदुकींतील गोळी सुटणें.

बंदूक डांभणें—वाघाकरितां बंदूक पुरणें. डांभणें पहा.

बद्दू—(नांव) बद्दू होणें—खराब होणें; कलंक लागणें; डाग लागणें.

बधिर--बधिरास गाण्याची काय चव— बहिऱ्याला गायनाचा काय उपयोग. अंधस्य दीपं बधिरस्य गीतं । अंध पहा.

***बधिरापुढें गायन, अंधापुढें दर्पण, रोग्यापुढें मिष्टान्न**—हीं तिन्ही व्यर्थ आहेत. अंध, अंधळा पहा. 'बधिरापुढें गायन, अंधापुढें दर्पण, रोग्यापुढें मिष्टान्न, तशी ही मीं केलेली बडबड व्यर्थ आहे'-शाब १.१११.

बंधी--बंधीमूठ लाख बराबर--झांकली मूठ सवालाखाची, पहा.

बन--बनकी लकडी--निरनिराळ्या रानांतील लांकडें; एकाच कामांत स्वतंत्रपणें गुंतलेल्या भिन्न भिन्न मतांच्या माणसांची जमात.

बनणें-बनीं बनणें—१ सजणें. २ सज्ज होणें.

बनून ठनून चालणें--उंची घवघवीत पोशाखानें मिरवणें.

बनून राहणें--१(हिंदी प्रयोगाच्या धर्तीवर) होऊन राहणें; होणें. 'त्यांतील प्रत्येकजण केवळ धर्ममूर्ति बनून राहिला आहे.'-नि ६२९. २ झुंज, लढा लागणें. 'कमाल०:-पडली तर! त्याची माझी खूपच बनून राहिली होती!'-शिसं ३.४.

बनेल तेथपर्यंत—होतां होईतों.

बनेल तेव्हां—फावेल त्यावेळीं.

बनना—बनी तो भाई, नहीं तो दुशमनाई— (हिं.) जुळलें तर भावासारखा नाहीं तर शत्रूसारखा. वळलें तर सूत नाहीं तर भूत.

बनविणें—बनवून सांगणें—तिखट मीठ लावून सांगणें; मुळांत नसतांना तयार करून सांगणें.

बनिया--बनिया देते नहीं, पुरा तोल; बनिया तो कुछ देते बी नहिं, लेकिन आप कहते है पुरा तोल (हिं.)--वाणी तर मुळांतच कांहीं देत नसतां आपण पुरा तोल मागणें; मुळांतच कांहीं नसतां आणखी पुढील गोष्टी सांगणें. "वास्तविक दिल्लीचा ठराव केव्हांच ठार झाला असून, तो गुपचुप पुरून टाकण्याचें बाकी राहिलें आहे; आज आपण तो पुनः जिवंत करूं पाहत आहोंत. 'बनिया तो कुछ देते बी नहि, लेकिन आप कहते है पुरा तोल!' ही शरणागति कॉंग्रेसच्या प्रतिष्ठेला मुळींच शोभत नाहीं." -केसरी-३०-७-४०.

बनिया बनिया गूळ देता? नहिं देता तो जाव तेरा मूह काला--(हिं.)कांहीं भिकारी असे उर्मट असतात कीं त्यांस मागतील ती वस्तु दिली नाहीं तर शिव्या देत जातात. भिकारी पण बेपर्वा, उर्मट मनुष्य; भीक मागून वर शिरजोरी करणारा.

बनिया भी आपना गूड छुपाकर खाता है--(हिं.) वाणीसुद्धां आपला गूळ लोकांच्या आड खातो. आपली वस्तु असली तरी तिचा उपभोग आपण लोकांच्या डोळ्यांवर येईल असा घेऊं नये. आपलेंच खावें पण चोरून खावें.

बनिया मारे जानको, ठक मारे अजानको--(हिं.) ठक लोक अडाणी लोकांस फसवितात पण वाणी तर जाणत्यांस फसवितात.

बन्न--बन्नाखालीं बसून सांगणें--(ना.) बंदाखालीं बसून सांगणें, पहा.

बंब--बंब वाजणें—[वाजंत्र्याच्या संबळाबरोबर बंब नांवाचें एक वाद्य सूर देत असतें.] १ फजिति, दुर्लौकिक होणें. २ बारा वाजणें; दिवाळें निघणें; सर्व बाजूंनीं नाश होणें. ३. (उप.) कृति, पराक्रम करणें. दिवे लावणें पहा.

बवर्ची--बवर्ची फार झाले कीं स्वैयंपाक बिघडलाच--एखाद्या गोष्टींत फार लोक पडले म्हणजे ती बिघडते. पुढील इंग्रजी म्हणीचें रूपांतर-Too many cooks spoil the broth.

बभ्रा—बभ्रा करणें—बोभाटा करणें;सर्वत्र प्रसिद्धी करणें.

बभ्रा होणें—सर्वत्र पसरणें; बोभाटा होणें; जाहीर होणें; सर्वांस माहीत होणें.

बम्मन—बम्मनकी गई बछडी, रावणकी गई लंक, दोनो दुःख समान है, ओ राजा ए रंक—(हिं.) ब्राह्मणाची पाडी व रावणाची लंका गेल्याचें दोघांसहि सारखेंच दुःख होतें. कारण ब्राह्मण दरिद्री असतो व रावण राजा होता. तु०—गरीबाचें गेलें घोंगडें गरीब पडलें उघडें. गरीबाची घोंगडी तीच त्याची शालजोडी.

बया—बया माझी रोडवली आणि थुंक्यानें गिडबिडली—लहान मुलाचे फार लाड करून त्यास बिघडाविणें.

बयाणा—बयाणा बांधणें--विक्रीच्या जिन्नसावर मालकाची मोहोर करणें. (त्यानें ठरविलेली किंमत न आल्यास माल त्याचा त्यास परत करणें यासाठीं.)

बयाद्-ज—बयाद्-ज सांगणें-लावणें-दाखविणें—१ आक्षेप काढणें. २ सबबी सांगणें.

बरकत--बरकत सोडणें--कस, सामर्थ्य, सुपीकपणा गमावणें (शेतानें इ.)

***नियत तशी बरकत**--मनुष्य ज्या मानानें नीतीनें वागतो त्या मानानें त्यास प्राप्ति होते. जशी नियत० पहा.

बरकशी--बरकशी धरणें—राग धरणें; आकस धरणें.

बरका—बारक्या फणसाला म्हैस राखण—दुधाला मांजर राखण ठेवण्याप्रमाणें ज्याचें जें भक्ष्य तेंच त्याच्या हातीं देऊन त्यावर विसबून राहणें. चोराच्या हातीं जामदारखान्याच्या किल्ल्या

बरग—बरग पडणें—दुष्काळ पडणें; दुर्भिक्ष होणें. 'बरग पडलें कव्हणीं एका वरुषीं।'—भाए ४२०.

***बरगासाठीं खादलें शेण। मिळतां अन्न न संडी॥**—तुगा ३११९. अडचणीच्या प्रसंगीं आपद्धर्म म्हणून जी गोष्ट केली तीच पुढें सरावाची होऊन बसणें. दुष्काळांत शेण खाल्लें, पण पुढें अन्न मिळूं लागलें तरी तीच चट लागली!

बरगळणें--बरगळ भूत; बरगळलें-बरगळेल भूत--क्षुधाकुल, भुकेनें गांजलेला माणूस.

बरगळेल भूत कोडोळ्यावर राजी—भुकेच्या पोटीं एखाद्यास कांहींच मिळालें नाहीं तर तो कोडोळ्यावरहि खूष होतो; कांहींच न मिळाल्यास जें मिळेल त्यावर संतुष्ट होणें. तु०—कोल्हा काकडीस राजी.

बरट--बरट बोंबळणें—[बरट=चिखल] सारवणें.

बरड --बरड यॅवप--(गो.) एखादी वस्तु नासणें, विकृत होणें.

***तुरीबरोबर बरड चिरडला जातो**--तूर पहा. मोठ्याबरोबर गरीबाचाहि नाश होतो.

बरड--बरडबोंबल्या—बोंबाबोंब करणारा.

बरडेल--बरडेल काढणें—[बरडेल=वडेल] (ल.) मारणें.

बरबाद--बरबाद करणें—धूळधाण, नासाडी करणें.

बरवा--बरवा काळ होणें—(व.) परिस्थिति अनुकूल असणें; भरभराट होणें.

***बाहेर बरवा, आंत हिरवा**—वरून दिसावयास चांगला पण प्रत्यक्ष निरुपयोगी.

बरळ---बरळ जाणें--चांचरणें. 'देखा मंत्रज्ञु बरळु जाय।'—ज्ञा १.१९०.

बरा--बरा घेणें--चांगली खरडपट्टी काढणें.

बरें आहे म्हणावें बच्चंपेरी !--दम देण्यासाठीं म्हणतात. खोड मोडण्याचा, सूड घेण्याचा बेत.—उग्र २.१.

बरेंपण जावप--(गो.) मैत्री असणें.

बरें पाहणें—कल्याण चिंतणें. 'पंढरीचे ब्राह्मण देखतील कोणी। बरें मजलागोनी न पाहती॥'—तुगा.

एखाद्याला बरें मागणें—चांगलें व्हावें अशी इच्छा करणें.

बरें वाईट—१ दुखणें बाहणें वगैरे. २ मरण.

जिवाला बरें वाईट करणें—आत्महत्या करणें; स्वतःवर संकट ओढवून घेणें.

बरें वाईट होणें—मृत्यु येणें. 'परक्या देशांत बरें वाईट झालें तर कोण दुर्दशा.'–मोरप्र७.

बऱ्या बोलानें–वाणीनें—गोडीगुलाबीनें; राजीखुषीनें. 'या चळवळीवरील अत्याचाराचे आरोप बऱ्या बोलानें परत घ्यावेत.'–के २७.५.३०.

बऱ्यावर असणें—सहानुभूति असणें; चांगलें इच्छिणें.

बऱ्याशा झाडाची साल काढून न्हावप––(गो.) चांगल्या माणसाच्या आधारानें राहणें.

***बरा होतों घरीं । उगाच आठवली पंढरी ॥**—विनाकारण भानगडींत पडणें; त्रासांत पडून कांहीं लाभ न होणें. "मामाची सासुरवाड पुण्यांतच असल्यानें तिकडे एक दिवस, तर मोडकांकडे एक दिवस असा जेवूं लागलों. बरोबर ओळखीचे कोणी नसल्यामुळें पुणेंहि पाहणें झालें नाहीं; व त्यामुळें दिवसभर घरीं बसून राहावें लागत असे. 'बरा होतों घरीं उगाच आठवली पंढरी' असें वाटूं लागलें."–माझा चित्रपट व काशीचा संपूर्ण इतिहास ३५.

बरीं फुलां बाजारांत व्हरची लागतात—(गो.) चांगली फुलें बाजारांत नेण्याची गरज नाहीं; कारण त्यांच्या साठीं गिऱ्हाईकच तुमच्या घरीं येईल. चांगल्या वस्तूंचा खप त्वरित होतो. चांगल्या दारूला शिफारस लागत नाहीं.

बरी बोल वाचे,तुझें काय वेंचें ?—हे वाचे ! नीट बोल. त्यांत तुझें काय खर्चतें ? गोड बोलावयास कांहीं खर्च लागत नाहीं. तु०–गूळ नाहीं पण गुळशी वाचा तर खरी.

बरें करूंक कळाव जाय, वायट करूंक वेळ नाका—(गो.) चांगलें करायला वेळ लागतो पण वाईट करायला वेळ लागत नाहीं. घर बांधायला महिनोगणती दिवस आणि हजारों रुपये खर्च होतात. त्यालाच आग लावायची म्हटलें कीं, एका काडीचें काम.

बरें करीत असावें–करून ठेवावें, तें कधीं फुकट जात नाहीं—सत्कृत्याचें फळ केव्हां तरी मिळतेंच.

बरँ जात्लँ जाल्यार राती कित्या हागूं जात्लँ आशिल्लँ ?—(गो.) बरें व्हायचें असतें तर रात्रीं शौचाला कां झालें असतें ? एखाद्या रंजल्या गांजलेल्या माणसाला सांगावें कीं, 'बाबा, धीर धर. तुझें बरें झाल्यावांचून रहाणार नाहीं.' तर तो वैतागून म्हणतो 'माझें नशीब समजलें आहे मला. चांगलें व्हायचें असतें तर काल अमुक अमुक संकट माझ्यावर कां आलें असतें !'

बरँ जाल्यार ओक्ले वरँताचँ, ना जाल्यार रायभाऱ्याचँ––(गो.) चांगलें झालें तर तें वधूवरांचें आणि वाईट झालें तर ती सोयरीक जमवून आणणाऱ्या मध्यस्थाचें. बऱ्याचें श्रेय आपणाकडे घ्यायचें आणि वाईट झालें तर त्याचें खापर दुसऱ्याच्या माथीं फोडायचें ही सर्वसामान्य जनरीतच आहे.

बरँ जावगें भयणुलें तुका आनुलें मिळें माकां—(गो.) बहिणीच्या निमित्तानें आपणांस मिळणें. दुसऱ्याच्या अनुषंगानें वैभव प्राप्त होणें.

बरें झालियाचे अवघे सांगाती ।––वाईटाचे अंतीं कोणी नाहीं ॥––तुगा ४३८०. चांगलें चाललें असेल त्याच्या भोंवतीं सर्व जमतात पण जो अडचणींत असेल त्याच्याकडे कोणी ढुंकून पाहात नाहीं.

ज्याचें करावें बरें, तो म्हणतो माझेंच खरें––एखाद्याला त्याच्या हिताची गोष्ट सांगावयास जावें तों तो आपलाच हेका धरून बसतो.

बरे भांगराक कीड लगता—(गो.) चांगल्या वस्तूला धोका अधिक. चांगल्या सोन्याच्या दागिन्याला कीड लागते.

बरें वाईट करणें वरिष्ठाच्या हातीं—ज्याच्या हातीं सत्ता किंवा अधिकार असतो तो कोणाचेंहि बरें वाईट करूं शकतो. आपण आपलें कर्तव्य करीत असावें मग त्याचें फळ मिळणें आपल्या वरच्या अधिकाऱ्यावर किंवा परमेश्वरावर सोंपवावें.

बरें वाईट जो भाग्य, पत्नी जाणा हेंच योग्य—आपल्या बऱ्यावाईट नशीबाप्रमाणें आपणास पत्नी मिळते. किंवा चांगल्या व वाईट काळांत पत्नी आपली सहभागी होते.

बरॉ आसा मूं म्हळ्यार खायून म्हण यतालॉ–(गो.) बरा आहेस ना ? म्हणून विचारलें तर अंगावर

तुटून पडतो. कांहीं कांहीं व्यक्तींना साधी गोष्टसुद्धां विचारायची सोय नसते.

बऱ्या गेल्यार कल खोडी—(गो.) चांगलें करायला जावें तर पायांत खोडा पडतो.

बऱ्या गेल्यार परतें येता—(गो.) चांगलें करायला जावें तर अंगाशीं येतें.

बरोबर——बरोबर होणें—१ साफ जाणें; पूर्णपणें संपणें; साफ होणें. २ चुराडा होणें.

बरोबरी करणें—१बरोबरीच्या नात्यानें वागणें; वरच्या पायरीला पाय लावणें (खालच्या दर्जाच्या माणसानें). २ स्पर्धा करणें; चढाओढ करणें.

बरोबरी पाहणें–करून पाहणें—लावून पाहणें; तोलून पाहणें; तुलना करणें.

बलबलपुरी—बलबलपुरी माजणें– फार गोंधळ, अंदाधुंधी होणें. 'जसें ज्याला बरें वाटेल तसें त्यानें वागावें अशी बलबलपुरी व प्रपंच माजला आहे. मग आम्हांला जयाची आशा कशी करतां येईल !'–पामो २८३. 'राजे लोक ऐष आरामी झाले म्हणजे ... चांगल्याची बूज नसते यामुळें सगळी बलबलपुरी होऊन जातें.'–बाजीराव.

***बलबलपुरी टमटम राज्य**—सर्व अंदाधुंदी; घोटाळा; गोंधळ.

बलवान्——बलवाना पुढें, खरा माजीं पडे—जबरदस्तापुढें सत्याचेंहि कांहीं चालत नाहीं. Might is right.

बलाय—बलाय–या घेणें—इडा पिडा टाळण्यासाठीं बोटें मोडून दृष्ट काढणें. 'कित्येक घेती वनिता बलाया।' –सारुह ७. ७१. 'कितीक रूपवंत्या मुख पाहुनी बलाया घेती।'–पला ९२.

शाहण्याची बलाय दूर—शहाण्यापासून पीडा दूर असते. शहाण्या मनुष्यावर कधीं संकट येत नाहीं.

बलिष्ठ——बलिष्ठ तो वरिष्ठ—बळी तो कान पिळी. Might is right.

बशा—बशा खाणें—अडकून बसणें, बसावें लागणें.

बस–बसोटी—बस–बसोटी उडणें—छाप उडणें.

बस–बसोटी बसणें—(व.) छाप बसणें.

बसांत आणणें—ताब्यांत आणणें; वश करणें. 'दहाजणी मी बसांत आणिल्या प्रेमाचें पाजुन पाणी।'–पला १४.

बसकण——बसकण घेणें—वृद्धापकाळामुळें अशक्ततेमुळें, आजारानें जमीन धरणें; पडून रहाणें. 'ही म्हातारी माणसे हिंडतात तों पर्यंत ठीक. एकदां कां त्यांनीं बसकण घेतली तर पुनः उठत नाहींत. २ बसणें; खंड करणें.

बसणें—अंगाला बसणें—बरोबर, ठीक होणें (कापड वगैरे).

घरीं बसणें—उद्योग सुटणें; बेकार होणें; कामधंदा नसणें.

तोटा, ठोकर बसणें—नुकसान होणें.

पांचावर धारण बसणें–पांच पहा. अन्नान्न दशा होणें; घाबरणें.

मन बसणें—प्रेम जडणें.

हात बसणें— सराव होणें; संवय होणें.

उलट्या अंबारींत बसणें—भिक्षेची झाळी हातांत येणें.

बसले–ल्या घडीचा—पुष्कळ दिवस एकसारखा घडी घालून ठेवलेला. याचे उलट ताण्याचा.

बसले राहून—बसून. 'महाराज खिडकींत नेहमीं बसले राहून दिवस मोजतात'–विक्षिप्त १·१३१.

बसल्या महिना—काम न करतां दरमहा मिळणारा पगार.

***बसणारा असल खरमरीत, तर तेजी चाले झरझरीत**—घोड्यावर जसा स्वार असेल त्याप्रमाणें तो चालतो. काम करणारा जसा असेल तसें कार्य घडतें. राऊत असे खरमरा, तर घोडा चाले तरतरा. पहा.

बसणारास लाज नाहीं तर पहाणारानें तरी लाजावें—रस्त्यांत शौचास बसणाऱ्यास जर लाज वाटत नसेल तर रस्त्यानें जाणारा येणारांनीं तरी कां लाजावें ? एखादी गोष्ट करणारास जर तिची लाज वाटत नसेल तर इतरांस कशी लाज वाटेल. "कांहीं प्रकार इंदुरांत घडलेले इतके अश्लाध्य आहेत कीं 'बसणारास लाज नाहीं तर पहाणारानें तरी लाजावें' या म्हणीनुसार ते दिले नाहींत." –विक्षिप्त २·१०७.

बसतां लाथ, उठतां बुक्की—उठतां लाथ० पहा. गी, तिला करड्या नजरेनें वागवून बसतां लाथ उठतां बुक्कीचा खुराक चालू केला.'–फाल्गुनराव.

बसन म्हळ्या सावळी ना, आनी धरीन म्हळ्या ताळी ना—(गो.) बसेन म्हटलें तर छाया नाहीं, आणि आधार घेईन म्हटलें तर फांदी नाहीं असा वृक्ष काय उपयोगाचा? दरिद्री माणसाच्या आश्रयाला गेल्यानें कांहीं फायदा होत नाहीं.

बसल्या बसल्या, काड्या खोसल्या—(महानु.) रिकामपणीं उगीच कळ लावून देणें.

बसूं जाणे त्याला ऊठ कोण म्हणे—उठणें पहा. ज्याला कोठें बसावें हें कळतें त्याला कोणी उठवीत नाहीं. जो योग्य जागेवर बसतो त्याला तेथून कोणी उठवीत नाहीं. धोरणानें वागणाऱ्याचा कोणाहि उपमर्द करीत नाहीं.

बसे तो फसे, फिरे तो चरे—जो बसून राहतो त्यास कांहीं लाभ होत नाहीं; जो फिरतो त्यास कांहीं तरी मिळतें. आस्ते भग आसीनस्य......चराति चरतो भगः ॥

बस्तान---बस्तान बसणें--व्यवस्था, बेत बसणें; जम जमणें; नीट चालणें. ' माझ्या वडील बंधूंनीं याच सुमारास अकोल्यास दवाखाना घातला होता; पण त्यांचें बस्तान अजून नीटपणें बसलें नव्हतें. '–कोआ २१.

बस्तान बिघडणें--१ घडी बिघडणें; विस्कळीत होणें. २ जम उखडणें; व्यवस्था बिघडणें.

बहर---बहर मारणें--आनंदानें मौज मारणें; चैन करणें.

बहात्तर---बहात्तर खोडी--घोड्याचीं बाहात्तर अशुभ लक्षणें. हीं पुढीलप्रमाणें आहेत.

अंसुढाळ किंवा अंसुपात, शृंगी, अंजनी (चांदणी) द्वयखुरी, कुखावर्त, एकांगुळ, त्रिकर्णी, थनी, हीनदंती, अंडावर्त, अधिकदंत, काळवदन, विकाळ, पंचनखी, कराळ, अहीमुख, तुटपट्टा, वाणिया, वाशिंग, आसनखऊ, सर्भिण, कृष्णांजनी, खानखऊ, गोमीपांच, हरिणांग, पितअंजनी, काखावर्त, सारभूकण (सारभाजन), एकांडी, काळांजनी, अंगावर्त, दाढशृंखळ, पुसावर्त; श्वेतांजनी, लेंडावर्त; शून्यमस्तक, हृदावर्त, नासावर्त, पोटावर्त, तळावर्त, शिळावर्त, नेत्रावर्त, भाळलोचन, व्याघ्रकांत; कृष्णटाळू, कपिमुख; जानूवर्त, आर्जेळ; कर्णमूळ, शिंपला, पंचनखी, मेंढसुख, खरमुख, रावामुख, कौस्तुकी, हयभंग, केरसुण्या, मध्यदंती, खुंटीउपाड अश्रूपात; सेनाभंजन, ढाशी, पोटसूळ, खळतो, रातांधळ, लीदखातो, माथेशूळ, पडमुत, रक्त मुततो, पाण्यांत बसतो, चऱ्हाटे खातो, डसतो, बुजतो. याशिवाय इतर खोडी उतरड, चिमटा, डंकी, बेंबल्या, एका अंगावर झुलणें, बसला असतां उठतांना गुढगे टेकून उठणें, मगरूरी करणें, फार हिंडणें ,मितेपणा, उड्या मारणारा, पळण्याची खोड, लाथ मारणें, भांडखोर, पुढें आलेल्या जिनसावरून उडून जाणें, चावणें, दोन पायावर उभे राहणें, नालबंदी करूं न देणें, पंचवाख, बांधटीनाख (हरिनाख) उपानयन, जीनपाठक, तंगावर्त, मांडवर्त, चित्ती, शाखी, दोसीना, रूईकांती, जंबावर्त, पंचपर्व गुदक, पापवर्ण.

बहात्तर जुलुम--पराकाष्ठेचा जुलुम.

बहात्तर भोवरें—घोड्याच्या अंगावरील दहा शुभ व बासष्ट अशुभ केसांचीं वलयें.

बहात्तर रोग—देशी वैद्यकानें मानलेले बहात्तर निरनिराळे आजार.

बहात्तर रोगांचा–गुणांचा खंडोबा—सर्व रोगांनीं पोखरलेला.

बहाल---बहाल करणें--देणें; अर्पण करणें.

बहिरा---बहिरा म्हणतो वार्ता काय आणि अंधळा म्हणतो नाचतें काय ?--बहिऱ्याला ऐकूं येत नसल्यामुळें कोणाकडेहि पाहिलें तरी तो बोलतो आहे असें त्यास वाटतें व तो प्रत्येकाजवळ चौकशी करीत असतो व अंधळ्याला कोणाचींहि पाऊलें ऐकूं आलीं तरी त्यास कोणी तरी नाचतें आहे असा भास होतो म्हणून तो चौकशी करतो.

बहिरा वाचे, तुझें काय वेंचे--बहिऱ्यानें कांहीं वाचलें तरी त्याचें त्यालाच ऐकूं जात नाहीं म्हणून तें निरुपयोगी असतें. पण त्यानें व्यर्थ श्रम केले तरी त्याचें सुखदुःख आपणास कांहीं नसतें.

बहिरें ऐके तेरें, अचरट मागे सांबारें--'बहिऱ्याला भलतेंच ऐकूं येतें व तसाच अचरट मनुष्य कांहीं तरी भलतीच मागणी करतो. तेरें पहा.

बहिऱ्या कानीं कुयऱ्या, अडक्या वायती मोहऱ्या—बहिऱ्याला कांहीं सांगितलें तरी ऐकूं न आल्यामुळें तो कांहीं तरी भलतेंच समजतो.

बहिऱ्याचे हातीं, अंधळ्याची काठी—बहिरा अंधळ्यास मार्ग दाखविणार म्हणजे एकास ऐकूं येत नाहीं व एकास दिसत नाहीं; मिळून दोघेहि एखाद्या अपघातांत सांपडण्याचा संभव. किंवा बहिरा व अंधळा असे दोघे चालले तर बहिरा अंधळ्यास वाट दाखवील.

बहिऱ्यापुढें गाणें, अंधळ्यापुढें दर्पण आणि रोग्यापुढें मिष्टान्न, व्यर्थ होय—अंध, अंधळा पहा. —शाब १·१४०.

बहिऱ्यापुढें भाषण व अंधळ्यापुढें दर्पण—या गोष्टी व्यर्थ होत. अंध पहा. तु०--अंधस्य दीपं बधिरस्य नृत्यम् ।

बहिरी—**बहिरी बोका**—चलाख; वस्ताद; (बहिरी ससाण्याप्रमाणें) छाप बसविणारा.

बहिरोबा—**बहिरोबाची सेवा करणें**—बहिरा असणें.

बहीण—**बहीण भाऊ भांडती आणि नवराबायको नांदती**—बहीणभाऊ एकाच आईबापांचीं लेंकरें असतात पण त्यांचें पटत नाहींत; पण तींच नवरा बायको निरनिराळ्या घरीं जन्म घेऊनहि सुखाचा संसार करतात. सख्या भावंडांचें पटत नाहीं पण आपल्या पसंतीच्या तिऱ्हाइताशीं पटतें.

बहीण भावया, सासू जांवया—ज्याप्रमाणें बहीण भावाचें कौतुक करते त्याप्रमाणें सासू जांवयाचें कौतुक करते.

बहिणीमुळें भावोजी सोयरा—[भावोजी=मेहुणा] तिसऱ्या व्यक्तीमुळें जोडलेला संबंध; अप्रत्यक्ष नातें; दूरचें नातें. तु०--दादा अंगें बहिनी सोयरी.

बहु—**बहु कशास**—फार काय; किंबहुना.

***बहु उवा त्यास खाज नाहीं, बहु ऋणी त्यास लाज नाहीं**—अति उवा० पहा.

बहु कामें एका हातीं, सिद्धीस न जातीं—एकाच मनुष्यानें अनेक कामें अंगावर घेतल्यास ती आवरतां येत नाहींत.

बहु घेतो तो वेडा नसतो—जो मनुष्य स्वार्थी असतो तो कांहीं अर्धवट नसतो.

बहु चाकर कामावर, बातमी देती घरोघर—घरामध्यें फार नोकरचाकर असले म्हणजे घरांत कोणतीहि घडलेली गोष्ट सर्वत्र होते.

बहु धन ज्याचे हातीं, ते बहुधा मूर्ख होती—ज्यांच्याजवळ फार संपत्ति असते ते बहुधा मूर्ख निघतात.

बहु पांडित्य बोलती, ते मूर्खपणें वागती—जे केवळ फार शहाणपणाच्या गोष्टी तोंडानें सांगतात ते वागतांना मूर्खांसारखे वागतात,

बहु बडबड करी, तो थोडें आचरी—जो तोंडानें बडबड करतो त्याच्या हातून प्रत्यक्ष कृति फार थोडी होते, तु०–बोलेल तो करील काय.

बहु मूर्ख मिळती, बहु तमाशे होती—जेथें मूर्खांचा जमाव जमतो तेथें सर्व गोंधळ होतो.

बहुमोल कपडे आणि बक्षिसाचें सांकडें—अंगावर उंची पोषाख मात्र दिसतो पण नोकरचाकरांस इनाम द्यावयाच्या वेळीं संकट पडल्यासारखें होतें.

बहु मोठी, अल्प संतोषी—जो मोठा असतो तो थोडक्यांत संतुष्ट होणारा असतो.

बहुरत्ना वसुंधरा—या सृष्टीमध्यें अनेक प्रकारचे प्राणी, लोक आढळतात. ' विस्मयासी नसे स्थाना । बहुरत्ना वसुंधरा ।'–मुरामायण. 'दाने तपसि शौर्ये वा विज्ञाने विनये नये । विस्मयो नहि कर्तव्यो बहुरत्ना वन्सुधरा ॥'

बहुरत्ना वसुन्धरा, तिच्यांत वस्तूंचा पसारा—वरप्रमाणें. या पृथ्वीमध्यें अनेक प्रकारच्या चमत्कारिक गोष्टी पाहावयास सांपडतात.

बहु वचनांचा पाल्हाळ, भंग होतो तात्काळ—जो मनुष्य भरमसाटपणें वचनें देत सुटतो त्याच्या हातून तीं खरीं होत नाहींत; तीं भंग पावतात.

बहु वर्षें वांचला, अखेर मृत्यूचे स्वाधीन झाला—मनुष्य कितीहि दीर्घकाल जगला तरी त्यास शेवटीं मृत्यु हा आहेच.

बहूनां चैव सत्त्वानां समवायो रिपुं जयेत।—अनेक लोक एकत्र आले म्हणजे प्रबळ शत्रूसहि ऐक्यानें

जिंकू शकतात. तु०-अल्पानामपि वस्तूनां संहतिः कार्यसाधिका ।-सुर ८३.२. बहूनामल्पसाराणां समवायो दुरत्ययः ।-सुर ८३.३.

बहुत--बहुत करावें राजकारण । परंतु परपीडीं नसावें अंतःकरण।--कितीहि खटपटी उलाढाली केल्या तरी दुसऱ्यास त्रास देण्याची बुद्धि बाळगूं नये.

बहुतकरून साधणें, थोड्यासाठीं फसणें--अगदीं फळास येण्याच्या सुमारास कार्यनाश होणें.

बहुत देखिले टिळेटाळे, पण चिखलास नाहीं पाहिले डोळे—एक कोल्हा व मगर हे मित्र होते. एके दिवशीं कोल्ह्यानें मगरास जेवावयास बोलाविलें व अन्न तयार करून झाडावर बसला आणि मगरास हांका मारूं लागला; अर्थात् त्यास कांहीं वर जातां येईना. या गोष्टीचा सूड घेण्यासाठीं मगरानें कोल्ह्यास जेवावयास बोलावलें आणि सांगितलें कीं नदीच्या बाजूस तुला एक बीळ लागेल त्यांत अन्न तयार करून ठेवलेलें आढळेल. कोल्हा जेव्हां बिळाशीं गेला तेव्हां त्याच्या मनांत संशय येऊन तो कांहीं आंत शिरण्यास धजेना. मगरानें त्यास आग्रह करून सांगितलें कीं माझें घर आंत आहे. परंतु कोल्ह्यास त्या बिळामध्यें दोन डोळे लुकलुकतांना आढळले. तेव्हां त्यानें लबाडी ओळखून दूर जाऊन म्हटलें कीं 'बहुत देखिले०'

बहुत मिळती पिपीलिका । प्राण घेती सर्पा एका ॥—अनेक मुंग्या मिळून सर्पाचा प्राण घेतात.-पया २.१५.

बहुत मेजवान्या करतां, पैका न राहे पुरता—एकसारख्या मेजवान्या करण्यांत जर पैसा खर्च करूं लागलें तर तो पुरवठ्यास येणार नाहीं.

बहुताची मेळी, एकमेकां उपजे कळी—(महानु.) मोठ्या समाजांत परस्परांत भांडणें लागत असतात.

बहुत वस्तू उपयोगी, योजकाची कमताई--जगांत अनेक वस्तु चांगल्या उपयोगी पडण्यासारख्या असतात पण त्यांचा योग्य उपयोग करून घेणाराच आढळत नाहीं. तु०-अमंत्रमक्षरं नास्ति, नास्तिमूलमनौषधम् । अयोग्यः पुरुषो नास्ति योजकस्तत्र दुर्लभः ॥

बहुतांचा पाहुणा उपवासी—दोन घरचा पाहुणा पहा.

बहुतांचें जमलें मत, तेथें थोड्यांचें नाहीं चालत—अनेकांचें एकमत झाल्यावर अल्पमतवाल्यांचें कांहीं चालत नाहीं. Majority carries the day.

बहेल--बहेल देणें--(व.) चकविणें; भलतीच गप्प मारून फसविणें.

बळ--बळ करणें—१ जोरावर येणें; सामर्थ्य दाखविणें. २ सर्व शक्ति लावणें.

बळ धरणें--नेट धरणें; हिंमत बांधणें. 'खावंदासी बळ कोठवर धरावें.'-पया ३१९.

बळ बांधणें—१ नेट धरणें. 'कुंभेरींत बळ बांधोन राहिला.'-भाव ३. २ कमर बांधणें.

बळास येणें—जुलुम करण्यास आरंभ करणें.

***ज्याचें दळ त्याचें बळ**—ज्या राष्ट्राजवळ चांगलें सैन्य असतें, त्याला विजय मिळून तो दुसऱ्या राष्ट्रावर वर्चस्व गाजवितो.

बळ आसिल्ल्यालो कारभार--ज्याच्या अंगीं बळ आहे त्यानें कोणताहि कारभार केला तरी तो त्याला खपला जातो.

जिकडे बळ, तिकडे न्याय--जो बलिष्ठ असतो त्याच्या बाजूचा न्याय होतो. तु०-बळी तो कान पिळी. जिकडे सत्ता तिकडे मत्ता.

बळ मुंगीचें, धैर्य स्त्रीचें—ज्या प्रमाणें मुंगीच्या आकाराच्या मानानें तिचें सामर्थ्य विशेष असतें त्याप्रमाणें स्त्री ही जास्त धैर्यवान व सोशीक असते.

दादाचें बळ वहिनी जाणे-वहिनीला माहीत--दादा पहा.

बळाचा बळकट, तो धीराचा खोटा—शक्तिवान मनुष्य सामान्यतः धैर्यवान नसतात; शक्तिवान मनुष्य बहुधा भित्रे असतात.

बळीया हिरोनि नेती बाळाःतेथ कैचा सोहळाः--(महानु.) बळानें केलेल्या क्रियेंत शांतता नाहीं. नवरी बळेंनें पळवून नेल्यावर लग्न सोहळा तो काय होणार?

आपल्या बळें बांधावी कास आणि कोणाची धरूं नये आस—आपल्या० पहा.

बळेंच करणी करावी अन् ओढून लक्ष्मी आणावी—पराक्रम करुन हक्कानें, अधिकारानें संपत्ति मिळवावी. पराक्रमी माणसाला संपत्ति सहज प्राप्त होत असते.

बळेंच निघे घर, त्याचा काय होईल धड—(महानु.) आपलें विनाकारण घर सोडून दुसऱ्याच्या आसऱ्यास जाणाऱ्याचें नीट होत नसतें.

बळकव्वा—जोकमाराला बायको नाहीं, बळकव्वाला नवरा नाहीं—(कर्ना.) [बळकव्वा=एक अनार्थ देवता] सटवाई व म्हसोबा प्रमाणें दांपत्य. जोकमार पहा.

बळवंत—नांवाचे मात्र बळवंत, चटदिशीं नाहीं उठत—नांवाचे बळवंत पण अंगांत मुळींच शक्ति नसणें; नामधारी वैर्यवान.

बळवंताची जीभ म्हणजे ईश्वराचा नगारा—शक्तिवान मनुष्य वाटेल तसें बोलूं शकतो, त्याला बोलण्याला कोणी प्रतिबंध करुं शकत नाहीं.

बळस—बळस खेळणें—जनावर वोपले येणें; त्याला संभोगाची आवश्यकता असणें.

बळसणें—बळसायिलें आयदान, वापरलो मनुष्यु नव्याकइ बरो—(गो.) जुनें, वापरलेलें भांडें आणि अनुभव घेतलेला माणूस हीं नव्यापेक्षांहि चांगलीं असतात. तु०–जुनें तें सोनें.

बळी—बळी देण—देवतेस समर्पण करणें; देवाच्या तुष्टीकरितां मारणें; भक्ष्य म्हणून अर्पण करणें.

बळी पडणें—आटोक्यांत जाणें; ताब्यांत जाणें; भक्ष्यस्थानीं पडणें; तावडींत सांपडणें. 'विचार सोडुनि चार करी तो मनोविकारां पडे बळी॥'-- लक्ष्मणशास्त्री लेले.

बळी राजाचा धर्म—शेतकऱ्याचें दान.

बळीहरण घालणें—ज्याप्रमाणें जमिनीवर बळीहरणाच्या आहुती घालून चित्रविचित्र आकार करतात त्याप्रमाणें पोथी, पुस्तक चिताड करून ठेवणें.

बळीचा बकरा—(कर.) मुर्दाड मनुष्य.

***बळी तो कान पिळी**—जो जबरदस्त असतो तो आपल्या मनासारख्या गोष्टी करून घेतो. तु० –Might is right. जबरदस्ताचा ठेंगा शिरपर. --शाब १'१३०.

बळी मातला चोहोंकडे—एखादा शक्तिवान मनुष्य सर्वत्र वाटेल तसा धिंगाणा घालतो.

बळीच्या द्वारीं, देव झाला भिकारी—परमेश्वरहि बळीच्या दारांत वामनरूपानें भिक्षा मागण्यास आला.

बक्षीस—बक्षीस द्यावा हत्ती, हिशेबीं सोडूं नये रती—बक्षीस म्हणून वाटेल तितकी मोठी वस्तु, रक्कम द्यावी पण हिशोबांत रतिभरसुद्धां सोडूं नये.

बा—बाप पहा. **बा झवणें**—एक शिवी: घाण करणें; बिघडविणें; नासून टाकणें; भलतीच गोष्ट करणें.

***मागून पुढून बा च नवरा**—१ मुलाचें लग्न करण्याची वेळ आली असतां स्वतःचें लग्न लावणारा स्वार्थी विधुर. २ आपमतलबी मनुष्य; नेहमीं आपलें घोडें पुढें असा माणूस.

बाचा बा गेला नी बोंबलतां ओंठ गेला—दोहोंकडून नुकसान; दुहेरी तोटा. तु०–बाबा गेल्या नि दशम्याहि गेल्या.

बा तुझा चालता काळ । खायाला मिळती सकळ ॥—अमृत. जोंपर्यंत मनुष्याची चलती असते तोंपर्यंत त्याच्या भोंवतीं अनेक लोक गोळा होतात.

बाई—बायांचे मांड भरणें—[बाया=देवी] देवी आल्या असतां त्यांचा मांड भरून त्यांची पूजा करणें. –केसरी १२-११-३७.

***बाई आली पणांत, आणि बाबा गेला कोनांत; बाई आल्या पणांत आणि बोवा बसले कोनांत**—वधू तारुण्यांत आली असतां वर वृद्ध, क्षीण होणें. तु०–बिबी आली उमरींत, मिया गेले कबरींत.

बाई पापड उन्हांत घालते आणि सावलींत दळते—बाई स्वतः श्रम करतांना सावलींत बसते पण पापडांस मात्र उन्हांत टाकते. दुसऱ्याची काळजी न करतां स्वतःच्या सुखाकडे पाहणें.

बाई बाई तुझें दूध एकीकडे कर, माझें अंग (अंड) शेकूंदे—दुसऱ्याचें महत्त्वाचेंहि काम बाजूस टाकून आपलें काम आधीं उरकून घेणें, आपमतलबीपणा; स्वार्थ.

बाई माझी डोंबाळी, आणि अवसे पुनवे ओंवाळी--अव्यवस्थित स्त्री.

बाई मी भोळी, लुगड्यावर मागती चोळी--भोळेपणाचा आव आणून स्वार्थ साधणारी.

बाईची नथ रस्त्यांत आणि बोवाची भिकबाळी कानांत—अडचणीच्या प्रसंगीं आपली भिकबाळी न विकतां बायकोची नथ विकावयास काढणारा. स्वतः मागें राहून अडचणीच्या वेळीं बायकोस पुढें करणारा.

बाईनें पैसे खरचिले पण शेवटीं तिचें कपाळ फुटलें—स्त्रियांच्या जवळचा पैसा बहुधा अनाठायीं खर्च होतो व शेवटीं त्यांस दुःख करण्याची वेळ येते.

बाया बापड्यांचा जमाव तेथें गप्पांचा सुकाळ—बायका एकत्र आल्या कीं, गप्पा मारल्याशिवाय रहात नाहींत.

बाईल—बायल—-बायलगोवो-घोवो–(गो.) बाईलवेडा.

बाईलंबाद; बायलबोलो(गो.)—बाईलबुद्धीचा.

बायलेक येवप—(गो.) तारुण्य प्राप्त होणें; पणांत येणें.

बायलोचो भावोजी—(गो.) बाईलवेडा, रांड्या-राघोजी.

***बाईल केली न् अंगाला काचकुयरी लावली**—(व.) बायको करून संसार मागें लावून घेणें म्हणजे आपल्या हातानें दुःखाचें मूळ घरांत आणणें होय, असा भाव.

बाईल गेली यात्रेला आणि लौकरच आली घराला—एखादी बायको यात्रेला म्हणून दूर जावयास निघते पण नवऱ्याचा संशय आल्यामुळें किंवा घराचा ओढा लागल्यामुळें फार दूर न जातां लवकरच परत येते. स्त्रिया या फार संशयी व विशेषतः पतीविषयीं मत्सरी असतात. तसेंच त्यांचा संसारांतून पाय बाहेर निघत नाहीं. तु०—आवा चालली पंढरपुरा । वेशीपासून आली घरा ॥—तुगा २९६३.

बाईल ना बडगा अन् रिकामा धडगा—आगा-पिच्छा नसलेला; सडेफटींग; सडेसोट.

बाईल पैशाची—आपल्याजवळ जर खूप पैसा असेल तर बायको संतुष्ट राहील.

बाईल पैशाची पैशाची । कधीं नव्हे बा पुरुषाची॥—स्त्रिया द्रव्यानें वश होणाऱ्या असतात; त्यांस द्रव्यापुढें पतीची परवा नसते.

बाईल मरो पण बैल जगो—(शेतकऱ्यांत रूढ) बायको मिळते पण बैल घेण्यास पैसे मिळत नाहींत.—केसरी ५.४.४०.

बायल घोवा मार्ताली, आनि लजेलागून घोव म्हणालो, घे रांडे ! घे रांडे !—(गो.) बायको नवऱ्याला मारते आणि नवरा लोकलज्जेस्तव मार खातां खातांच खोटेंच ओरडत असतो, 'घे रांडे ! आणखी मारून घे तर ?'

बायल नाका जाल्ल्याक ताकांत फातर येता—(गो.) नावडत्या बायकोच्या हातच्या ताकांत सुद्धां माणसाला खडे आढळतात. नावडत्या बायकोबद्दल अगर इतर कोणाबद्दल प्रेम नसलें म्हणजे मनुष्य वेळीं अवेळीं कुरापती काढण्याच्या मागें असतो. तु०—नावडतीचें मीठ अळणी.

बायल बघी मॉट, आवय बघी पॉट—(को.) बायको बघते मोटेकडे व आई बघते पोटाकडे. तु०—बायको बघते पाठीकडे, आई बघते पोटाकडे.

लहानपणीं आई आई, थोरपणीं बायलाबाई—मनुष्य लग्न होण्यापूर्वी आईच्या पाठीमागें पाठीमागें असतो व आईवर फार प्रेम करतो; पण बायको आल्यावर आईला विसरून बायकोच्या पाठीमागें लागतो.

बायलांकडेन गूढ सांगू नाका, रायाकडेन फट मारूं नाका, चौगांचें उतर मोडूं नाका—(गो.) बायकांपाशीं गुपित फोडूं नये, राजाशीं खोटें बोलूं नये आणि चारचौघाविरुद्ध जाऊं नये.

बायलां गेली विद्या, रान्नी पोलींत—(गो.) बायकांची बुद्धि ऐकून परशांत (धुमींत) स्वैपाक करण्याचा प्रसंग. 'स्त्रीबुद्धिः प्रलयंयावहा करी ।'

बायलां तोंडांतु तीळ तिंबना—(गो.) बायकांच्या तोंडांत तीळसुद्धां राहात नाहीं. मग एखादी गुप्त गोष्ट कुठून रहाणार ?

बाई(य)लीला तूप, आईला धूप—आईकडे दुर्लक्ष करून बायकोचे लाड करणें.

बायलेगॅलँ हाड आणि कलावंतागॅलँ धाड——(गो.) बायकोचा नेहमीं 'हें आणा तें आणा' असा 'आणा' पाठीस लागलेला असतो आणि कलावंतीण नेहमीं 'हें धाडा, तें धाडा' अशा रीतीनें सतावीत असते. कलावंतीण आपल्या यजमानाला 'मला अमुक आणा' असें सांगायची नाहीं; 'पाठवून द्या' असें म्हणेल.

बायले दिवून् बटीक हाडप—(गो.) बायको देऊन बटीक आणणें. चांगल्या वस्तूच्या मोबदल्यांत क्षुद्र वस्तु घेणारेहि हरीचे लाल भेटतात कधीं कधीं.

बायले नाथिंतल्यान् बाण मारपू—(गो.)बायकोच्या नथेंतून तीर मारणें. पुष्कळ पुरुष असे असतात कीं ज्यांचा पराक्रम फक्त घरांतच दिसायचा.

बायले रागान भुरग्यां बडयता—(गो.) बायकोचा राग मुलांवर काढणें.

बायलेक जायिनि आट वरसां, पाळ्याखातिर संचगारू--(गो.) बायको नाहीं आठ वर्षांची आणि पाळणा करण्यासाठीं विसार देतो. तु०—बाजारांत तुरी०.

बायलेक मारका जाल्यारि बशिलि माणायिं न पुरो वे ?—(गो.) बायकोला मारायचें झाल्यास बसलेला पाटच पुरेसा आहे. त्यासाठीं कांहीं मोठमोठीं आयुधें जमवायला नकोत.

बाऊ—-बाऊ करणें–करून ठेवणें–सांगणें—दाखविणें—क्षुद्र गोष्टीला नसतें महत्त्व देणें.

बाऊ दाखविणें—भिवविणें; भेडसावणें; धाक दाखविणें.

बाऊ वाटणें—भीति वाटणें; घाबरणें; भिणें. 'ज्या लोकमताचा पुष्कळांस बाऊ वाटतो'—आगर.

बाकी—-बाकी ओढणें—१ मागील येणें असलेली रकम चालू वहीवर दाखल करणें. २ अडखळत बोलणें.

बाकी ठेवणें—मर्यादेनें वागणें; भीड मर्यादा राखणें. (निषेधार्थी प्रयोग.)

बाकी थकणें—लोकांकडचें येणें तुंबणें.

बाकी न ठेवणें--१ भीड मुरवत न राखणें. २ कर्ज फेडणें.

बाकी पूज्य करणें--सर्व देणें फेडणें; फडशा करणें.

बाकी—-बाकी फाटल्यान पनेळ—(गो.) तारवाच्या पाठीमागून लहान होडगें असायचेंच. आईच्या मागें मुलें आणि श्रीमंतांच्या मागून 'होयबा' असायचेच.

बाग--बाग पाडणें—(गो.) बागेंतील सर्व नारळ पाडणें; फळांचा पाडा करणें.

बांग--बांग देणें—(व.) कोंबड्याचें आरवणें.

बांग सलवात;—बांग पुकारणें—मुसुलमानांत प्रार्थनेकरितां बोलावण्यासाठीं मुअझ्झिन् मशीदींतून जो पुकारा करतो तो. 'मुलना होकर बांग पुकारे यौं क्या साहेब बहिरा है।'—कबीर.

बांगडी--बांगडी फुटणें—माणूस मेल्यावर त्याच्या स्त्रीस वैधव्य येऊन तिच्या बांगड्या फुटतात यावरून. १ पति मरणें. पुरुष मनुष्य मरणें. २ फजिती होणें. ३ माणूस मरणें (लढाईत). 'नऊ लाख बांगडी फुटली.'–पे ब ३२.

बांगडी बंद होणें--(व.) सामसूम होणें.

बांगड्या भरणें—पुरुषानें स्त्रीसारखें वर्तन करणें; भ्याडपणा दाखविणें; नामर्द असणें, होणें.

दुसऱ्याचे बायकोस बांगड्या भरणें—उसन्या, दुसऱ्याच्या मालकीच्या वस्तूवर पैसे खर्च करणें.

बांगड्या भरलेला चौक—बांगड्यांचा लहानसा ओटा. 'महाराणीसाहेब यांचें नहाणें झाल्यावर स्वारी बांगड्या भरलेल्या चौकावर श्रीमहाराज सरकार यांज समवेत बसते.'–प्रसूति कृत्यादर्श ८.

बांगड्या वाढणें–वाढवणें—(सांकेतिक) (फुटणें शब्द अशुभ म्हणून त्याच्या उलट शब्द वापरतात.) १ बांगडी फुटणें. २ वैधव्य येणें.

बांगड्यांचा वशिला--(व.) स्त्रीचा आधार किंवा टेकू असा अर्थ (बांगड्या स्त्रियाच फक्त हातांत घालतात, त्यावरून). 'बांगड्यांचा वशिला लावला तेव्हां त्याची कैदेंतुन सुटका झाली.'

बागल—बागलाक येवंचो रुकु खिळी हाळतानें कातरं नये—(गो.) ज्या झाडाच्या फळ्या दरवाजाला येण्यासारख्या आहेत तें झाड खुंट्या करण्यासाठीं तोडूं नये. मोठ्या योग्यतेची वस्तु क्षुल्लक कार्यांत खर्चीं घालणें हें वेडेपण आहे.

बागुल—बागुलबोवा—लहान मुलास भीति दाखविण्याकरितां केलेलें बुजगावणें; भीतिदायक वस्तु; भेडसावणारी वस्तु, मनुष्य. 'जो तो या लोकमताच्या बागुलबोवाला भिऊन दडून बसेल तर कोणत्याहि समाजाला उन्नतावस्था येणार नाहीं.'

बागेश्री--बागेश्री धारजणी असणें—(सोनारास ज्याप्रमाणें त्याच्या बागेश्री(शेगडी)मधून सोनें मिळून तो गब्बर होतो त्याप्रमाणें) विशेष परिश्रम किंवा बुद्धिमत्ता नसतांना श्रीमंत होणें.

बाज--कडव्या झाडास बहु बाज—ज्या झाडास कडू फळें येतात त्या झाडावर फळें बहुधा फार असतात. जगामध्यें चांगल्या वस्तूंपेक्षां वाईट गोष्टींचा भरणा अधिक असतो.

बाजरा-री--बाजरा (बाजरी) कहे मैं हूँ टीकला, और उखळ और मुसलके बीच लढूं एकला--(हिं.) बाजरी म्हणते मी एकटीहि उखळ-मुसळांशीं टक्कर देऊं शकेन. बाजरी हें कणखर धान्य आहे.

बाजरी काढ, तूर पाड—(कृषि.) बाजरीचें पीक काढतांना तूर जितकी तुडविली जाईल तितका तिचा विस्तार अधिक होतो.-ज्ञाको. (त) १४५.

बाजलें--बाजलें मोडणें—(उपहासार्थी.) बाळंत होणें.

***बाजलें पाहून बाळंतीण व्हावेंसें वाटतें**—एखादी गोष्ट पाहिल्याबरोबर तीबद्दल उत्सुकता, तिच्यापासून सुख घेण्याची प्रवृत्ति जागृत होणें.

बाजा--बाजा करणें-वाजविणें—ओरडत बसणें; (एखाद्याच्या नांवानें) शंख करणें. 'त्याला बाजा वाजवित बैस म्हणावें !'

बाजार--बाजार आटपणें—सर्व समाप्त होणें; कायमचा नाश होणें. 'सोन्या बापू:—अरेरे, आटपला बाजार ! दारूच्या या जिवंत गुत्त्याचे एकदम साडेआठ वाजले !'-एकच प्याला ५.२.

बाजार करणें—जिन्नस खरेदी करणें.

गेला बाजार तरी--किमान पक्षी.

वेड्यांचा बाजार पिकणें—बलबलपुरी होणें.

बाजार बसवी-बसणी-बुणगी-बूंदगी; बाजारची खाट; बाजारीण—वेश्या. नीतीनें, धर्मानें पातिव्रत्यानें न चालणारी स्त्री.

बाजारबुणगे—१ गैरलढाऊ लोक. या वर्गांतील कांहीं लोक पुढें दिले आहेत. (पा मो १६५).

१ दुकानदार (मारवाडी वगैरे), २ सराफ, ३ तांबे-पितळेचीं भांडीं वगैरे सामान विकणारे बोहोरी, ४ भराडी, ५ दासी (कुळंबिणी), ६ बहुरुपे, ७ भट, भिक्षुक, शास्त्री, पंडित, पुराणिक, आश्रित इ., ८ कामाठी व कामाठणी, ९ अत्तरवाले, १० भुसारी, ११ लमाण, १२ वाघे, मुरळ्या, १३ चित्रकथी, १४ खूषमस्करे, १५ राजवैद्य व हकीम, १६ कारकून मंडळी, १७ भाट, चारण, कवि, १८ चाबुकस्वार, १९ गवय्ये व बजवय्ये, २० कसबिणी व कलावंतिणी, २१ साजिंदे, सारंगे व तबलजी, २२ नायकिणींचे ताफे, २३ चित्तेवाले, २४ गोंधळी, २५ हुजरे व खिजमतगार, २६ फकीर लोक, २७ उचले, खिसेकापू, गड्डीचोर वगैरे, २८ गोसावी, बैरागी, वगैरे साधु लोक. २९ डौरे.व भुते, ३० ज्योतिषी, जोशी, ३१ न्हावी, परीट, शिंपी वगैरे कारागीर, ३२ तालीमबाज लोक, ३३ पाणके, आचारी व खटपटे, ३४ बावची (स्वयंपाकी), ३५ नाच्या पोऱ्यांच्या तमाशांतील ताफे, ३६ शाहीर, लावणीकार, ३७ पाखरांचा खेळ करणारे, ३८ शागीर्द. २ (ल.)निकामी गर्दी. कतवार पहा.

बाजार भरणें—गोंगाट करणें. गोंधळ असणें.

बाजार भरविणें—निकामी माणसांनीं उगीच गर्दी गोंधळ करणें.

बाजार माजणें—गर्दी असणें;गर्दी व गोंधळ माजणें. 'हिंदुसमाजांत पवित्र गोष्टींचा इतका बाजार माजलेला आहे कीं, त्यांना धक्का न लावतां त्या गर्दींतून सहीसलामत वाट काढणें ही अत्यंत कठीण गोष्ट होय.'-अत्रे.

बाजार मांडणें—(बाजारांत वेगवेगळ्या ठिकाणीं जिन्नसा पसरून असतात त्यावरून.) अनेक जिन्नस इतस्ततः पसरणें.

बाजारचा मेवा—१ बाजारांतील, कोणालाहि विकत मिळणारी वस्तु; बाजारी जिन्नस. २ (ल.) वेश्या. 'हा बाजारीचा मेवा । वाटेल तयांनीं खावा ॥'-मनोविजय.

बाजारच्या भाकरी भाजणें—पाठभेद–लष्करच्या भाकरी भाजणें. रिकाम्या उठाठेवी करणें.

उभ्या बाजारांत—भर बाजारांत.

बाजारांत पांच पायलीनें विकणें–मिळणें—अत्यंत स्वस्त होणें; कोणी विचारीत नाहींसें होणें.

***बाजार गप, विकते झप**—बाजारांत एखादी बातमी हातोहात पसरते; बाजार गप्प लवकर फैलावते. —पाआमा. पुणें.

बाजारचा मेवा, बाप लेकांनीं खावा—बाजारांतील वस्तु कोणालाहि मिळूं शकते. सार्वजनिक वस्तूचा उपभोग कोणीहि घेऊं शकतो.

बाजारची वेसवा, आज ना उद्यां दारांत—१ ज्याला बाहेरख्यालीपणाची चटक आहे तो एखादे दिवशीं घरांत देखील वेश्या आणून ठेवतो. २ वेश्या आज बाहेर आहे पण ती पैशासाठीं लवकरच घरीं आल्यावांचून राहाणार नाहीं.

बाजारच्या आधीं उचल्यानीं कंबरा बांधल्या; बाजार भरला, उचल्यांनीं कंबरा बांधिल्या; बाजार भरण्यापूर्वींच उचल्यांनी–बिगाऱ्यांनीं–भामट्यांनीं कंबरा बांधणें; बाजार भरण्यापूर्वींच चोरांची तयारी—कशास कांहीं पत्ता नाहीं तोंच एखादी गोष्ट उतावळीनें करणें. 'बाजार भरण्याच्या आधीं उचल्यांनीं आपल्या कंबरा बांधल्या तर त्यांस काय प्राप्त होणार आहे?' –शाब १.७५.

बाजाराच्या भाकरी भाजण्याची जरूर नाहीं—निरर्थक दुसऱ्यासाठीं खटपटी करण्याचें कारण नाहीं. लष्करच्या भाकरी पहा.

बाजारात गहूं, भट भटणीला ह्मणेः लाटणें पोळपाट धू—कशास कांहीं पत्ता नसतां भलत्याच उठाठेवी, तयारी करणें. बाजारांत तुरी० पहा.

बाजारांत गेले वेडे, पायांचें दिलें भाडें—वेडा मनुष्य जवळ पैसा नसता किंवा कांहीं समजत नसतां बाजारांत गेला तर त्यास व्यर्थ हेलपाटे घालावे लागतात.

बाजारांत तुरी, भट भटणीला मारी; बाजारांत तुरी आणि भट भटणीला मारी : रांडे घट्ट करशील कीं पातळ करशील?—कशास कांहीं पत्ता नसतां व एखादी गोष्ट मुळांतच घडली नसतां तिच्या पुढील गोष्टींचा काथ्याकूट करणें. "महायुद्ध सध्या ऐनरंगांत असतां युद्धोत्तर कालांतील जगाची उठाठेव 'बाजारात तुरी' प्रमाणेंच वाटणार आहे"–केसरी १२–६–४२. "आपलें मनोराज्य 'बाजारांत तुरी०'–अशाच मासल्याचें चाललें आहे."–श्रमसाफल्य ३.५.

बाजारांतील पेठा, सगळाच माल खोटा—बाजारांत पुष्कळच माल बहुधा दिखाऊ व नकली असतो.

बाजी––बाजी अंगावर येणें–देणें—हरणें, हरविणें; फजीत होणें, करणें. डाव लावणें-लागणें.

बाजी जाणें—अब्रु जाणें; फजीती होणें. 'बाजी जात बुंदेलनकी, राखो बाजी लाज।'–गोरेलाल (छत्रसाल चरित्र).

बाजी राखणें—मान, अब्रु सांभाळणें; बाजू राखणें. 'पहिली बाजी राखिली त्या अन्वयें बाजी राखणें'–पेद १२.४२.

बाजी–––बाजी आणि पाजी—एक बाजी० पहा.

बाजीराई—दुसऱ्या बाजीरावाप्रमाणें थाटमाट, ऐश्वर्य.

बाजीराव—(ऐति.) पहिला बाजीराव घेतल्यास त्याचा धाक व दरारा फार म्हणून. दुसरा घेतल्यास त्याची चैन, ऐदीपणा यावरुन. अधिकारी ऐश्वर्यवान् किंवा चैनी आणि आळशी माणूस. 'मोठे आले बाजीराव!'

बाजीरावाचा नातू—थोरल्या बाजीरावाचा नातू दुसरा बाजीराव हा फार चैनी व ख्यालीखुशाली करणारा होता यावरून रंगेल मनुष्यास म्हणतात. पुढें पहा

बाजीरावाचा बेटा—(बाजीराव याचा मुलगा नानासाहेब पेशवा हा फार ऐश्वर्यवान व मिजाशी होता.) गर्भश्रीमंत. मोठ्याचा मुलगा.

बाजीरावी धोतरजोडा—मोठमोठे रुंद रेशमी कांठ असलेला धोतरजोडा. 'नेसतें धोतर बाजीरावीच केवळ नाहीं पण तितक्या बेताच्याच करवती काठाचें होतें.'–भदि.

***बाजीराव पळाला, इंग्रज पुण्यांत शिरला**—दुसरा बाजीराव पुण्यांतून पळून गेल्यामुळें इंग्रजाचा पुण्यांत प्रवेश झाला. (१७ नोव्हेंबर १८१७)

बाजीराव होणार होता, पण कोंबडा पादला—एखादी मोठी गोष्ट हातून न घडली म्हणजे मग कांहीं तरी क्षुल्लक निमित्त सांगणें. पोकळ सबबी पुढें मांडणें.

बाजू——वर बाजू बेतणें; बाजू अंगावर येणें—हरण्याची वेळ येणें; कठिण प्रसंग येणें.

बाजू मारणें—सरशी करणें. बाजी राखणें पहा.

बाजू मारणारा-मारून नेणारा—सरशी करणारा.

बाजू राखणें—अब्रू संभाळणें; पाठपुरावा करणें; साहाय्य करणें.

बाजू राहणें—अब्रू, नांव राहणें; पत राहणें.

बाजूला बसणें—१ विटाळशी असणें. २ दूर बसणें. ३ वैधव्यदशा येणें.

बाठा——साठा आणि बाठा—मनुष्य साठ वर्षांचा झाला म्हणजे तो तावून सुलाखून निघाल्यामुळें कणखर होतो.

बाड——बाड झोंकणें——खालीं पहा.

बाड मारप——(गो.) थापा देणें; गप्प उठविणें.

बाड——बाड असणें—— (व.) गाडीचें चाक चाकोरीच्या बाहेर असणें.

बाड——बाड लावणें— (व.) वेडावणें; वेडावून दाखविणें.

बांडा——बांड्याची बारा औतं, घरांत नाहीं शेल जोतं—नांगर पुष्कळ असून त्यांस जोखडें वगैरे नसणें. पुरेशी सामुग्री नसणें; अर्धवट कारभार असला म्हणजे तो निरुपयोगी असतो.

बाण——हातचा बाण——हातांतली गोष्ट. (हातांत असलेला बाण वाटेल तेथें मारतां येतो)

***बाण आशिल्ले तरी त्राण आसका**—(गो.) भात्यांत बाण असले तरी ते सोडायला अगांत त्राण हवा ना.

बाणगुत्ती——बाणगुत्ती घेणें-आणविणें—जप्त करणें—(बाणगुत्ती=लष्करी पोशाख) लष्करांतून काढणें, कमी करणें.

बाणगुत्ती हरणें—सांडणें—देणें—जाणें—लष्करी कामावरून काढला जाणें.

बाणा——बाणा बाळगणें—प्रौढी मारणें; अभिमान बाळगणें.

बाणा मिरविणें——प्रौढीनें सांगणें; अभिमानानें सांगणें.

बाणी——बाणीवर येणें—चिडणें; रागावणें.

बाणी——बाणीवर येऊन ठेपणें——शेवटच्या टोंकाला येऊन थांबणें (एखादें काम).

बाणिवेळें बोट सोडिना—(गो.) आपलें तेंच खरें म्हणणारा माणूस.

बाणीर बोट——बणीर बॉट दोवोलॅल्या थीं आसा, व्हडँ खीं पावलां म्हण खबर ना—(गो.) गृहस्थ होडीच्या कडेवर बोट टेवून बसला आहे पण होडें किती दूर गेलें त्याचा पत्ताच नाहीं त्याला. एक गृहस्थ होडींत बसला असतांना त्याची अंगठी पाण्यांत पडली. गृहस्थ होता दीड शहाणा. त्यानें जेथून अंगठी खालीं पडली तिथें होडीच्या कांठावर बोट ठेऊन दिलें. होडी चालूच होती. ती जेव्हां पैलतीराला लागली तेव्हां तो कोळ्याला म्हणाला, ' अरे माझी अंगठी तेवढी काढून दे. मी जिथें बोट ठेवलें आहे तिथेंच नेमकी ती खालीं गेली आहे. ' कोळी हंसून म्हणाला, 'भल्या माणसा, तुझी अंगठी कशी मिळेल आतां ? अंगठीची जागा राहिली एकीकडे आणि होडी आली किनाऱ्याला. '

बात——बाता उडविणें—झोंकणें—फेकणें——हाकणें—कंड्या पिकवणें.

बाता-कुटणें——खबाळणें——छाटणें——मारणें——हाणणें——थापा मारणें.

***बात की बात, कुरापत की कुरापत**—सहज गोष्ट म्हणूनहि सांगून होते व कलहहि पेटविला जातो. एखादा मनुष्य सहज बोलतां बोलतां तंटा लावून देतो अशाबद्दल योजतात.

बात जो च्याहे आपनी, तो मांग न पी पानी—(हिं.) थोरपणा राखावयाचा तर याचना करूं नये.

बात रह जाती है, बखत नहीं रहता—(हिं.) वेळ निघून जाते पण शब्द राहतो.

बातांची बरकत, कामाची हरकत—गप्पा मारून वेळ घालविणें व काम न करणें.

बातमी— –**बातमी ठेवणें-राखणें**—टेहेळणी करणें, बातमी काढणें.

बातमी फोडणें, फुंकणें—फोकणें—खबर जाहीर करणें; गुप्त गोष्ट उघड करणें.

बाद—–**बाद करणें**—१ काढून टाकणें; रद्द करणें. २ (खेळांत गडी) मारणें. ३ दावा काढून टाकणें.

बांद—–**बांद बंदिस्ति**––बांध, बंधारे वगैरे जमिनीची मशागत.

बादरायण—–**बादराय संबंध** कोठून तरी कसातरी जोडलेला संबंध; बळेंच जोडलेलें नातें. एक मनुष्य एका गांवीं गाडींत बसून गेला असतां त्याला कोठें उतरावयास जागा मिळेना. अखेरीस कंटाळून त्यानें एक मोठा श्रीमंताचा वाडा पाहिला. तेथें एक बोरीचें झाड होतें तेथें त्यानें गाडी सोडून बैल बांधून ठेवले. यजमानानें आपण कोण, आपला आमचा संबंध काय ? असे प्रश्न विचारल्यावरून त्यानें सांगितलें : आमचा आपला बादरायणसंबंध आहे. कारण माझी गाडी बोरीच्या लांकडाची आहे व आपल्या येथें बोरीचें झाड आहे यावरून हा संबंध जुळतो. अस्माकं बदरीचक्रं युष्माकं बदरीतरुः । बादरायणसंबंधे यूयं यूयं वयं वयम् ॥ 'विष्णुपुराणांतला एखादा श्लोक घ्यावा आणि अमुक अमुक इतिहासकाराचा अमुक अमुक लेख आहे म्हणून त्याशीं तो ताडून पहावा आणि कांहीं तरी सांगड लावून बादरायणसंबंध जोडून द्यावा...'–नि.

बादशहा—–पातशहा पहा. **बादशहाची ओळख देणें**—रुपयावर बादशहाचा ठसा असतो तो पुढें करून ओळख काढणें. लांच देणें.

***बादशहास बादशाही झाली, म्हणून पिंजाऱ्यानें तार तोडूं नये**—बादशहा राज्यावर आला म्हणून पिंजाऱ्यानें आपलें काम बंद ठेवण्याचें कारण काय ? त्यांत त्याला काय फायदा ? एखाद्यास त्याच्या योग्यतेप्रमाणें अधिकार मिळाला असतां त्याविषयीं दुसऱ्या मनुष्यास बरें वाईट कां वाटावें ? पिंजारी पहा. तु०–पाटलाचें घोडें, महाराला भूषण.

बांदोडें—–**बांदोड्याचो दौलो, शिरोड्याची काईल**––(गो.) बांदोडें गांवचा पळा आणि शिरोड्याची कढई म्हणजे इकडचें तिकडचें साहित्य जमविणें.

बांधणें—––**बांधली गांठ**––सांठविलेले पैसे.

बांधल्या कमरेचा––सज्ज; तयार.

***बांधला मणी, झाला धनी**—(विवाहसमयीं स्त्रीच्या गळ्यांत मणिमंगळसूत्र बांधतात यावरून) मणि मंगळसूत्र माळ घालून नवरा होणें. असा विवाह लागला कीं पत्नी पतीच्या स्वाधीन होते.

बांधली शिदोरी, दिलेली-शिकविलेली-सांगितली बुद्धि––विद्या कामाला येत नाहीं; बांधली शिदोरी व संगितलें ज्ञान पुरत नाहीं—सांठवलेली पुंजी व पढविलेलें ज्ञान फार दिवस टिकत नाहीं. पैसा सारखा येत असला पाहिजे व ज्ञान हें स्वतः मिळविलेलें पाहिजे. म्हणजे हीं अक्षयीं कामास येतात.

बांधिल्या देखतकच धरिल्लो सुकता—(गो.) बांधलेल्या माणसाला पाहिलें कीं पकडलेला माणूस अधिकच घाबरतो. एखादा आपद्ग्रस्त माणूस पाहून सामान्य दुःखी माणूस, आपलीहि अशीच गत होणार नाहीं ना, या शंकेनें विव्हल होतो.

बांधून मारते न् भली सोसते––(व.) बाई भली सोसते म्हणजे मोठी सहनशील आहे अशी खोटीच प्रशंसा एकजण करतो. वास्तविक ती सहनशील नसून तिला बांधून मारल्यामुळें तिला हालचाल करतां येत नाहीं. म्हणून निरुपायास्तव ती माराच्या यातना सहन करते. दुःख तर लोकांजवळ बोलून दाखवितां येत नाहीं व निरुपायास्तव सोसावें लागतें. आपण होऊन कांहीं तो सहन करतो असें नाहीं.

बाप—–बा पहा. **बाप आजांचा धर्म**––परंपरागत धर्म.

बापजन्मांत; बापजन्मीं—(निषेधार्थी प्रयोग) कधींहि.

बाप होऊं लागणें; बाप म्हणविणें; बाप होऊन करणें—बोलणें—मोठेंपणा मिरविणें.

बाप होऊन लागणें––वरिष्ठ असणें; काम वगैरे करून घेण्यास अधिकार असणें. 'तुम्हां सगळ्यांचा विसूभाऊ बाप होऊन लागला आहे.'–अस्तंभा ५०.

एखाद्याचा बाप होणें—–**बाप लागून राहणें**—मागच्या प्रमाणेंच. एखाद्यापेक्षां वरचढ असणें.

जसा जणूं कांहीं बापाचा माल—शिवीप्रमाणें प्रयोग. १ (उप.) दुसऱ्याचा माल स्वतःचाच याप्रमाणें खर्चणें, नासणें या कृत्याबद्दल म्हणतात. २ दुसऱ्याची बळकावलेली जिन्नस. अपहार केलेली वस्तु.

बापाचें बारसें जेवणें—बापापेक्षां मोठें असणें म्हणजे बापापेक्षां वरचढ असणें; कोणास न जुमानणें. 'पण म्हणावं हें पोर तुमच्या बापाचं बारसं जेवलंय' दाजी, भाग १ पा. २१.

बापावरून पावणें—एखाद्याच्या बापास उद्देशून अपशब्द बोलणें.

बापाशीक झंवरी—(हेट.) शिवी. बापाशीं संभोग करणारी; बाझंवी.

बापास बाप न म्हणणारा—कोणाची भीड, मुरवत न धरणारा. पुढें पहा.

बापास बाप न म्हणणें—एखाद्या गोष्टींत कोणाचीहि भीड मुरवत न धरणें. 'बापास बाप न म्हणे ऐशाला काय होय आजोबा।'—मोवन १.६५.

***बाप आला घरीं मुलगा (दारीं), रांडेच्या घरीं**—दुर्व्यसनी पुत्राबद्दल म्हणतात.

बाप आला पाव्हणा न् निजला उताणा—बेमुर्वतखोर मुलाबद्दल म्हणतात. निर्लज्ज मनुष्य.

बाप करे बाप पावे बेटा करे बेटा पावे—जो करील तो भरील.

बाप चोर, पोऱ्या हाताळ—बापलेक सारखेच चोर. बीज तसा अंकुर.

बाप जातो देऊळीं, पोऱ्या जातो राऊळीं—वरप्रमाणेंच, बाप तसा बेटा.

बाप ठाऊक आईला, पाप ठाऊक मनाला—मन जाणे पापा आणि माय जाणे मुलाच्या बापा, पहा.

बाप तसा बेटा, कुंभार तसा लोटा—जसें बीज तसा अंकुर.

बाप तसा बेटा, झाड तसें फळ—वर पहा.

बाप तसें मूल, झाड तसें फूल—वरप्रमाणें.

बाप दाखीव, नाहींतर श्राद्ध कर—आपला बाप आहे असें सांगतोस तर तो दाखीव, नाहीं तर तो मेला म्हणून त्याचें श्राद्ध आतां कर. हें नाहीं तर तें, यांपैकीं कोणतें तरी कर. १ ही तड नाहीं तर ती तड. २ एक घाव दोन तुकडे. तडकाफडकी निकाल लावणें.

बाप निघाला कामाला, बाळ आडवा झाला—१ बाप बाहेर गेला कीं मुलगा आळसावलाच! मग कशाला तो आपलें काम करतोय. २ कामांत विघ्न आणणें.

बाप पाहुणा आला म्हणून रेडा का दोहायाचा—कितीहि आणीबाणीची वेळ असली तरी कांहीं अशक्य गोष्ट घडून येत नाहीं. जांवई पहा.

बाप भीक मागूं देईना, आई पोटभर जेऊं देईना—दोहींकडून अडचण. आई पहा.

बाप मरतांच घर अंगावर पडलें—बापामागें मुलांवर संसाराचा भार पडतो.

बाप मरेंगे जब (और) बैल बाटेंगे—(हिं.) बाबा मरेल तेव्हां बैलाची वांटणी; कालांतरानें घडणारी, लांबणीवरची गोष्ट. 'संपादकांना डो. स्टेटस, पूर्ण स्वराज्य अगर लोकसत्ताक राज्यपद्धति ही उभारल्यानंतर 'ज्यावेळीं मध्यवर्ति सरकार जबाबदार बनेल त्यावेळीं' या खुंटीला सर्व गबाळें अडकवणें भाग पडलें. 'बाप मरेंगे और बैल बाटेंगे' या म्हणींप्रमाणें हे सर्व प्रकार होत."—केसरी २१-२-४१. तु०—म्हैस पाण्यांत नि बाहेर मोल.

बाप मरेल बैल वांटा पडेल—वर प्रमाणेंच. पुढें होणाऱ्या गोष्टींवर अवलंबून राहणें उचित नाहीं, असा भावार्थ.

बाप मेला आणि भावानें दावा केला—बापाच्या पाठीमागें मुलांत कलह सुरू होतो.

बाप म्हणतो मला मुलगा झाला, भाऊ म्हणतो मला दाईद झाला—बापाला पुत्रजन्मापासून आनंद होतो पण मुलाला वांटेकरी झाल्यामुळें दुःख होतें. एकाच गोष्टीपासून एकास सुख तर दुसऱ्यास दुःख होतें.

बाप म्हाली, माय तेली—(व.) आईबाप बहुधा एकाच जातीचे असतात; परंतु आई एका जातीची आणि बाप एका जातीचा अशा संकरापासून मुलगा झाल्यास त्याच्या जन्मसंबंधाचा संकरदोष दाखविण्यासाठीं ही म्हण वापरली जाते.

बापलेकांचा जोडा एक आणि मायलेकींची चोळी एक झाली म्हणजे मर्यादा राहिली नाहीं—

मुलगा वयांत आला म्हणजे त्यास बरोबरीच्या नात्यानें वागवलें पाहिजे. लालयेत् पंचवर्षाणि दशवर्षाणि ताडयेत्। प्राप्ते तु षोडशे वर्षे पुत्रे मित्रसमाचरेत् ॥

बापुय करता पाप आनि पुत दिता जाप—(गो.) बापाच्या अपराधाचें प्रायश्चित्त मुलाला.

बापुय मेल्या वर्सा ओत चड, आवै मेल्या वर्सा भूक चड—(गो.) बाप मेल्या वर्षी सूर्य प्रखर असतो तर आई मेल्या वर्षी भूक फार तीव्र असते. बापाचा आधार आणि आईचें अन्नछत्र.

बापयलिं व्यसनां पुताक, बियेची कीडि झाडाक—(गो.) बापाचीं व्यसनें मुलाला जडतात आणि बीला असलेली कीड झाडाला लागते. वाईट तेवढें हमखास पुढें येतें.

बापसुतकीत पुतु, अबुसूतकीत धूव—(गो.) बापासारखा मुलगा आणि आईसारखी मुलगी.

बापसे बेटा सवाई—बापापेक्षांहि मुलगा अधिक पराक्रमी किंवा त्याच्या गुणांमध्यें अधिक निघाल्यास म्हणतात. " 'बापसे बेटा सवाई' निघत नाहीं, अशी शंका घेण्याचें त्यांस कांहीं कारण नव्हतें व ती त्यांनीं घेतलीहि नाहीं. "—शाब १'११३.

बापाची कीर्ति आणि पोरें भीक मागती—थोर मनुष्याच्या पोटीं कपाळकरंटी संतती होणें.

बापाची पैदास, पोरगा उदास—बापानें खूप संपत्ति मिळवून ठेवली म्हणजे मुलें आळशी बनतात.

बापानें केलें नांव व मुलानें वाहाविलें गांव—कीर्तिमान मनुष्याच्या पोटीं दुष्ट, वाईट मुलाचा जन्म होणें.

बापानें मुलाला मारिलें तर वेगळा होत नाहीं—बापानें मुलाला शिक्षा करणें हें वाजवी असून त्याबद्दल मुलाला राग येण्याचें कारण नाहीं.

तूं नाहीं तुझ्या बापानें शिव्या दिल्या असतील—कोणीकडून तरी दोष देणें. (कोल्ह्याची गोष्ट) तूं पहा. —टि ४'३९०.

बापचा बाप गेला, बोंबलतांना हात गेला; बापापरी बाप गेला, बोंबलतांना हातही गेला; बापापरी बाप गेला बोंबलतापरी हात-ओठ गेला; बापापरी बाप गेला, शंख वाजवितां हात गेला—बाप गेला म्हणून एक आपत्ति व दुसरी त्याच्यासाठीं बोंबलावें लागलें म्हणून अंग दुखावलें ही दुसरी. दोन्हीं-कडून नागवणूक, नुकसान.

बापापरीस लेक मोठा—१ बापसे बेटा सवाई, पहा. २ मुदलापेक्षां व्याज जास्त.

बापामागें बापडी आणि परसामागें झोंपडी—जशी परसाच्या मागील बाजूस झोंपडी असल्यास तिच्या-कडे दुर्लक्ष होऊन तींतील जिन्नस कोणीहि घेऊन जातो, त्याप्रमाणें मुलें बाप मेल्यावर पोरकीं होतात व त्यांच्या कडे कोणी पाहात नाहीं व त्यांस कोणीहि हिडिसफिडीस करतो.

बापायक पुत [illegible], आज्याक किल्याक नातु जाय—(गो.) बापाला मुलगा [illegible] असला तर आज्याला तरी नातू कशाला हवा? जि[illegible]त होच्या माण-सांची एखाद्यावर अप्रीति झाली कीं [illegible] माणूस सगळ्यां-नाच नकोसें होतें.

बापायची भैण आका, ते म्हाका दोळे मुखार नाका—(गो.) बापाची बहीण ही आत्या पण ती मला डोळ्यांसमोरसुद्धां नको. नातलगांविषयीं द्वेषभाव धरणाऱ्याला उद्देशून म्हणतात.

बापायचें जोतें पुताक जावक लागलें की बापायचो अवतार सोपलो—(गो.) बापाची वहाण मुलाच्या पायाला ठीक बसूं लागली कीं बापाची कारकीर्द संपली. मुलगा मोठा झाला कीं बापानें त्याच्याशीं अधि-कारानें न वागतां मित्रत्वानें वागावें. तु०—प्राप्ते तु षोडषे वर्षे पुत्रं मित्रवदाचरेत्।

बापायन दिलें सलें, आवैन दिलें उलें—(गो.) बापानें मुलीला जो हुंडा दिला तो संपून गेला आणि आईनें ज्या गोष्टी तिला दिल्या-कला शिकवल्या त्या मात्र तिच्याकडे राहिल्या. तु०—प्रसादपट झांकिती परि परा-गुरूचे थिटे।-मोकेका.

बापाला नाहीं भाऊ, व आईला नाहीं जाऊ—बापास भाऊ नसल्यास आईस जाऊहि नसते. कोणी नातेवाईक नसणें. जगांत भाऊबंद कोणी नसणें.—लक्ष्मी-बाई टिळक, स्मृतिचित्रें ४'५२.

बापाला बाप म्हणत नाहीं तो चुलत्याला काका काय म्हणणार; बापाला बाप म्हणेना तर चुलत्याला काका कोण म्हणतो ? बापासि बाप न म्हणे (ऐशाला काय होय आजोबा)—मागें वाक्प्रचार पहा.--मोवन १.६५. (गु.) बापाने बाप नहि कहुं तो पडोसीने काको केहवानो ?

बापे विनु पोरटा । माय विनु कारटा—(महानु.) मायबाप कोणी नसणें; अगदीं पोरका.

बापडें—आपलें तें बापडें, दुसऱ्याचें तें कातडें—कारटें—आपली वस्तु, आपलें मूल सर्वांस प्यार असतें व दुसऱ्याचें वाईट दिसतें.

बापशेट—बाप(व)शेटीची पेंड–पेठ–पेढी—बापशेट नांवाचा एक मोठा श्रीमान् व उदार माणूस असावा. वाटेल त्यानें वाटेल तितका माल न्यावा अशी त्याच्या घरची व्यवस्था दिसते. यावरून १ कोणासहि सहज मुबलक मिळणारी गोष्ट, विपुल व सुसाध्य गोष्ट. २ फुकट मिळालेली म्हणून वाटेल तशी खर्चली जाणारी गोष्ट.

बाब—बाब मजो जोडकार, गावचिं झगडीं घेता अंगार—(गो.) मुलगा माझा मिळवतो आणि गावातले तंटे बखेडे आपल्या अंगावर घेतो. दुसऱ्यांच्या कलागती लावून आपली पोळी पिकवणारे ग्रामकंटक असतातच प्रत्येक गांवांत.

बाबर—बाबऱ्या ओंटाचो!—(गो.) फाटलेल्या ओठाचा.

बाबरहोटी, दाढ विक्राळ—शिद्दी हे बाबरहोटे असतात. अक्राळ विक्राळ मनुष्याला म्हणतात.

बाबा—बाबा खाऊन उठणें—(व.) खवळून उठणें; जणूं खावयास धावणें.

दादा बाबा करणें–बाबा पुता–बाई करणें—१ आर्जव करणें २ लाडी गोडी लावणें.

बाब्या निरंजन—अक्कलशून्य.

बाबा गातो नि सोमा ऐकतो—(कों.) एका प्रमाणें दुसरा. उंदराला मांजर साक्ष याप्रमाणें.

बाबा गेला आणि दशम्याहि गेल्या—दोहींकडून नुकसान; दुहेरी तोटा. एकदां बापलेक प्रवासास निघाले असतां वाटेंत चोर आले. ते बापास बांधून नेऊं लागले तेव्हां मुलानें बापास सोडविण्याकरितां चोरांस दशम्या देऊं केल्या. त्यांनीं दशम्या घेऊन वर बापास नेलेंच.

बाबा जाणें संक्रांत जाणें—स्वतःला कांहीं माहिती नसून दुसऱ्यास विचारण्यास सांगण्याकरितां योजतात. एका ज्योतिषाचा मुलगा दुसऱ्या गांवीं गेला असतां यजमानानें संक्रांत कधीं म्हणून विचारलें. तेव्हां मुलानें आजच संक्रांत आहे असें सांगितलें. त्यावर संक्रांतीचें फल काय असें विचारल्यावरून तें आपणांस ठाऊक नसून बापास विचारावें असें सांगण्याकरितां त्यानें उत्तर दिलें : ' बाबा जाणें इ. ' कुत्ता जाने चमडा जाने याप्रमाणें.

बाबा ब्राह्मण–आई सवाष्ण, सुवासीन—घरच्या घरीं दानधर्म; घरांतील पैसा बाहेर जाऊं न देणें. पाठभेद –दादा ब्राह्मण, वहिनी सवाष्ण.

बाबावाक्यं प्रमाणं—वडील माणसें सांगतील तें खरें मानावें. आप्तवाक्य प्रमाण. ' तर मग बाबावाक्यं प्रमाणं हेंच पितृभक्तीचें परम स्वरूप होय. '–नि ८७६. ' वाटेल तसलीं शुद्ध आणि खात्रीचीं औषधें आतां उपलब्ध असतांना गोमूत्रासारखें अमंगळ औषध " बाबावाक्य प्रमाणं " म्हणून पोटांत ढकलणें हा शुद्ध गाढवपणा होय. '–दाजी, भा. १ पा. २४.

बाबाच्या माळ्यावर मुडे, त्याच्या पडपानें मी पडे—(क.) हातीं नसणाऱ्या पण हातांत येण्याची आशा असलेल्या गोष्टीबद्दल आगाऊच हवाला देणें. आशेवर असणें.

बाबू—बाबू जेवले, पत्तर पालथें—आपलें जेवण आटपलें कीं सर्व काम आटोपलें. एकटा एक मनुष्य. सडेसोट.

बाबूके भाई दरवेशी—संबंध मोठ्यांशीं पण अवस्था पाहावी तो भटक्याची, भिकाऱ्याची. मोठी विद्या, मोठा आप्तसंबंध इ. असून पुन्हां दरिद्री तो दरिद्री अशा इसमास म्हणतात. ' पण कोशकारांची अवस्था काय !... ते नेमके पूर्वस्थितीशीं येऊन भिडले; म्हणजे बाबूके भाई दरवेशी ही अवस्था कांहीं चुकली नाहीं. '–नि ७१५. खेस्व १३.

बांबू—बांबूवर आपणच चढावयाचें, ढोलकें आपणच वाजवावयाचें—कोल्हाट्याच्या खेळांत एक मनुष्य कसरत करीत असतो व त्याला अवसान येण्यासाठीं

एक मनुष्य ढोलकें वाजवीत असतो. पण हीं दोनहि कामें एकानें करावयाचीं तर साधणें कठिण. सर्वच कामें एका व्यक्तीस करतां येत नाहींत. कोणाची तरी मदत ही लागतेच. जीं माणसें अशा परिस्थितींत असतात त्यांच्याकडून सर्वच गोष्टी नीट न झाल्या तर तें क्षम्य ठरतें.

बाभ्या——बाभ्या गेला आणि दशभ्याही गेल्या दुहेरी नुकसान. बाबा पहा.

आपला तो बाभ्या, लोकाचा तो कारटा——लोकांचें तें कारटें—आपला पहा.

बाभूळ——बाभूळ बुडणें—नुकसान होणें; तोटा होणें. 'म्यां चोरी केली, म्यांच मार खाल्ला यांत तुझी काय बाभूळ बुडाली.'

बाभळीचा कांटा—आरंभीं चीट व फुशारकीच्या गोष्टी सांगणारा परंतु लवकरच कच खाणारा. 'बाभळीचा कांटा–पुढें तिखट मागें पोंचट.' कांटा पहा.

बाभळीस कांटा लावणें—बदमाषाला बदमाष म्हणणें; ज्याचा दोष त्याचे अंगीं चिकटविणें.

***ज्या गांवच्या बोरी त्याच गांवच्या बाभळी**—एकाच धंद्यांतील किंवा एकाच स्वभावाच्या माणसांची गांठ पडली म्हणजे ते परस्परांस ओळखून असतात. त्यांत कोणी कोणास फसवूं शकत नाहीं. जो पहा.

बाभळीचा कांटा, पुढें तिखट आणि मागें पोंचट—कांटा पहा.

बाभळीचा कांटा, बोरीचें साल, बाबा कशाचा पैसा आणि कशाचे लाड——कोठून तरी कसातरी संबंध जोडलेले असले म्हणजे तेथें प्रेम, लाड, उपचार, हद्द वगैरे गोष्टींची आशा करूं नये.

बाभळीचीं झाडें लावून बागवान ह्मणवून घेणें—बागेंत फुलझाडें व फळझाडें लावतात, कोणी बाभळीचीं झाडें लावीत नाहीं. तेव्हां बाभूळ लावणारानें बाग केल्याची ऐट मारल्यास ती कोणी मानणार नाहीं. यावरून भलतीच गोष्ट करून लौकिक मिळत नाहीं.–विक्षिप्त ३.५२.

बामण——बामण हुरडा–वरडा;बाम्हणी हुरडा—जून झालेला हुरडा; कुणबी लोकांस कोणचा हुरडा खावयास चांगला असतो तें कळतें. त्यामुळें ते स्वतः खाण्याकरितां कोंवळीं कोंवळीं कणसें तोडून आणतात पण ब्राम्हणास कांहीं तसें कळत नाहीं. म्हणून त्यांस जून कणसांचा हुरडा दिला तरी चालतो.

***बामुणा बाइलेलो उसो, मद्दें पडतलो पिसो**—(गो.) नवरा बायको भांडलीं तरी एक होतात आणि त्या भांडणांत मधें पडणारा माणूस मूर्ख ठरतो.

बामणा नाका जालेली बाइल सुण्याकइ नाका—(गो.) बामणाची नावडती बायको कुत्र्याला सुद्धां आवडत नाहीं. घरांत एखादें माणूस नकोसें झालें कीं बाहेर त्याचा उपहास होतो.

बामणा बुद्द कपलांत, कुळंब्या बुद्द घोंपरांत—(गो.) बामणाची बुद्धि डोक्यांत आणि कुळवाड्याची ढोपरांत. कुशाग्रबुद्धीच्या उलट अर्थानें.

बामणा वर्म कितँ, जानव्या तीन पेड——(गो.) ब्राह्मणा, तुझें वर्म काय तर जानव्याचे तीन पेड. एखाद्यानें आपलें मर्मस्थान लोकांना सांगितलें कीं लोक एक सारखा त्याच्यावरच प्रहार करतात. एखाद्याला क्षुद्र लेखण्यासाठीं वापरतात. तु०–ब्राह्मणा तुझें वर्म काय तर कापसाचें जानवें.

बामणाक दिली ओसरी, बामण हातपाय पसरी—भटास दिली ओसरी पहा.

बाय——बाय पत करतां, आका खाणां खाता—(गो.) धाकटी बहिण मिळवते व मोठी तिच्या जिवावर चैन करते.

बाय भांबावली नि तॅल कोदावली—(को.) बाईनें भांबावून तेलानें ढुंगण धुतलें ! म्हणजे भांबावलेल्या मनःस्थितींत माणूस वाटेल तें करतो.

बाया रुखा बगले वचीं ना, बाया सांगो खावचीं ना—(गो.) बाई झाडाजवळ जायची नाहीं आणि शेंगा खायची नाहीं. 'कष्टेवीण फळ नाहीं' या अर्थी.

बाये जोड फुलां कावार—(गो.) मुलीची मिळकत फुलें खरेदी करण्यांत खलास व्हायची.

बायेची जोड न्हाणाक नि खाणाक बाद—(गो.) बाईची मिळकत न्हाणें आणि खाणें याच्यांतच खर्च व्हायची. स्त्रिया या स्नान आणि खानपान यांच्या शोकीन असतात. या समजुतीवर ही म्हण आधारलेली आहे.

बांय—बांयचें तोंड कोणय बांधीत्, न्हयचें तोंड कॉणाच्यान् बांधूं जाता?—(गो.) विहिरीचें तोंड कोणीहि बांधील. नदीचें कोण बांधूं शकणार? एका व्यक्तीच्या तोंडाला कुलूप घालतां येईल. पण समाज अनंत मुखांनीं एखादी गोष्ट बोलूं लागला कीं त्याला आवरतां येत नाहीं.

बांयतलें काडून न्हयेंत—(गो.) विहिरींतून काढलें आणि नदींत फेकलें. विहिरींत पडलेली वस्तू सांपडणें फार कठीण असतें पण इतकें करूनहि जर ती मिळाली व अविचारानें जर नदीत फेंकली तर ती परत मिळणें दुरापास्त. मोठ्या येणाऱ्या संकटांतून निभाऊन जाण्यापेक्षां प्रथमारंभींच येणाऱ्या संकटांतून निभाऊन जाणें चांगलें.

बांयतलो बेबो—(गो.)विहिरींतला बेडुक उंबरांतला किडा,; बाह्य जगाची माहिती नसलेला माणुस कूपमंडूक.

बांयिंतु उडतल्याक दिवो कसल्याक?—(गो.) विहिरींत उडी घेणाऱ्याला दिवा कशाला? जाणून बुजून नाशाला प्रवृत्त झालेल्याला वांचविण्यास मदत कशाला पाहिजे.

बांयींतु बुडलारी न्हंयींतु—(गो) विहिरींत बुडी मारतो पण नदींतून बाहेर पडतो. ही म्हण धूर्त व हुशार अशा माणसास लागू आहे.

बांयिंतुलें उदाक चवळु जाल्यार अडसळींतुलें गोड जाईद कशी?—(गो.) विहिरींतलें पाणी जर मचूळ असलें तर पोहोऱ्यांतलें गोड असेल कुठून? तु०–खाण तशी माती.

बायींतुल्या मांडकाक बायींच ब्रह्मांड—(गो.) विहिरींतला बेडूक विहिर हेंच ब्रह्मांड समजतो. कूपमंडूक वृत्ति. संकुचित बुद्धीचा माणूस आपल्या माहितीच्या पलीकडे कांहींतरी आहे हें समजायलाच तयार नसतो.

बायको—बायको करणें—१ लग्न लावणें; विवाह करणें. २ घर करणें; माणूस करणें.

बायकोजवळ पट्टा खेळणारा—घरामध्येंच शौर्य दाखविणारा.

बायको माणूस—स्त्रीजन; अबला; बाई माणूस.

बायको वेल्हाळ—बाईलवेडा; बायकोच्या नादीं लागलेला; बायकोच्या तंत्रानें चालणारा.

बायको होऊन रडणें— बायकांसारखें रडणें. स्त्रियांच्या कपाळीं बहुधा रडेंच असतें.

बायकांचें शास्त्र—सुधारक पुरुष धार्मिक विधी चाली इत्यादि बायकांकडे सोंपवितात व त्यांचें शास्त्र म्हणून त्यांकडे स्वतः दुर्लक्ष करतात. बायकाचे नेमधर्म वगैरे; बायकांची रीति, पद्धति वगैरे.

बायकोच्या नथींतून तीर मारणें—स्त्रीच्या आड लपून भाषण करणें; घरांत शौर्य दाखविणें.

***बायको अघळपघळ, वाण्याची चंगळ**—बायको खार्चिक असली म्हणजे दुकानदाराचें फावतें.

बायको आली पणांत, नवरा चालला कोनांत–बाई पहा.

बायको करतां सुख वाटे, पण धबला घेतां गांड फाटे—लग्न करतांना मोठा आनंद वाटतो पण बायकोला वस्त्रें, दागिने वगैरे पुरवतांना नकोसें होतें.

नाहीं बायको, नाहीं घर, नाहीं स्वर्ग—बायको नाहीं, तर घर नाहीं आणि स्वर्गहि नाहीं. गृहिणीशिवाय इहलोक व परलोकहि साधत नाहीं–चंदावरकर चरित्र ५५७.

बायको केली गुणाची, आणि पाळी आली मरणाची—चांगली गुणवान म्हणून स्त्री पाहून तिच्या बरोबर लग्न करावें पण गुणवती स्त्रीकडे अनेक लोकांचें लक्ष्य असतें; यामुळें पुढें जीव नकोसा होण्याची पाळी येते. किंवा गुणी समजली जाणारी बायको पुढें दुर्गुणी निघून जीव नकोसा होणें.

बायको केली म्हणजे आणा पाठीस लागतो—विवाह करून बिऱ्हाड केलें म्हणजे रोज ही जिन्नस आणा ती जिन्नस आणा अशी घरांत मागणी सुरू होते.

बायको गेली कर्जानें, आपण गेला व्याजानें—लग्नाकरितां काढलेल्या कर्जाच्या मुद्दलांत सावकारानें बायको नेऊन आणि व्याजाकरितां त्याची चाकरी करावी लागणें. शेतवाडी सर्व मुद्दल पैशांत सावकारास गेली आणि व्याज फेडण्यासाठीं आपण शेतकीचें काम करण्यास त्याचे घरीं चाकर होऊन राहिला.

बायको गेली माहेरा, आरती येगा जुनेरा—बायको माहेरीं गेली म्हणजे नवऱ्याच्या कपड्यालत्त्यांची निगा नीट रहात नाहीं व जुने पाने कपडे वापरण्याची पाळी येते.

बायको माहेरीं गेली म्हणजे पतीचें लक्ष इकडे तिकडे भटकूं लागतें.

बायको दादल्याला, भक्त देवाला—ज्या प्रमाणें देवाचें महात्म्य भक्तावर अवलंबून असतें तशी नवऱ्याची कीर्ति बायकोवर अवलंबून असते.

बायको दुसरी, फजिती तिसरी—दुसरें लग्न केलें म्हणजे बहुतेक फजितीची पाळी येते. 'भाऊंच्या वेळचा अभिमान तुम्हींच राखिला पाहिजे. बायको दुसरी व फजिती तिसरी हा अनुभव आमच्याच घरीं येऊं पहात आहे.' —आमच्या आयु. आठवणी ११२.

बायको धमकट, व दादला कसपट—बायको दणगट असून नवरा जर अशक्त असेल तर तिच्यापुढें त्याचें कांहीं चालत नाहीं व अशा विजोड दंपतीचा संसार नीट चालत नाहीं.

बायको ना बिऱ्हाड, चोटाला बांधला शिराड—(कों.) (अशिष्ट) [शिराड=काटेरी फांदी] सड्या, फटिंग माणसाला म्हणतात.

बायको नाहीं पाहुणी अन् चरवी नाहीं ठेवणी—(वाय.) बायका दुसऱ्याकडे पाहुण्या म्हणून गेल्या तरी त्यांना पाहुण्याप्रमाणें नुसतें बसून राहतां येत नाहीं. त्या घरीं पडेल तें काम करावें लागतें. तसेंच चरवीचा उपयोग कशाला न् कशाला तरी केला जातोच. ती रिकामी ठेवीत नाहींत.

बायको भली तर नवरा भला—बायको चांगल्या स्वभावाची मिळाली तर नवऱ्यासहि भलेपणा मिळतो.

बायको मरेना, आशा सुटेना—एखाद्याची बायको रुग्ण शय्येवर पडली असली म्हणजे त्याला वारंवार संसाराबद्दल विरक्ति मनांत येते पण प्रत्यक्ष बायको जिवंत आहे तोंपर्यंत संसाराची आसक्ति सुटत नाहीं.

बायको माझी गुळाची भेली, म्हातारी मेली तर पीडा गेली—बायकोचा कैवार. बायकोपुढें म्हाताऱ्या आईची किंमत कांहीं न ठेवणें.

बायको मानभावाची, गरज नाहीं चोळी लुगड्याची—मानभावाची बायको आपलें स्वतःचें पोट भीक मागून भरते, तिचा भार नवऱ्यावर पडत नाहीं. तु०—कांद्याचे कोरड्यास, मानभावाची बायको व गाढवाचें जित्राप यांना श्रम व खर्च नाहीं.

बायको रे करीनास, तूंच गे रांडे होईनास—जो कोणी सल्ला देतो, सुचवितो त्याच्याच गळयांत ती गोष्ट घालणें. भट पहा.

बायको लंकेची पार्वती, नवऱ्याला रिकामी खंती—बायकोच्या अंगावर तर कांहीं उंची वस्त्रें व दागिने नसतांना नवऱ्याला विनाकारण तिच्या सुरक्षिततेची काळजी वाटण्याचें कांहीं कारण नाहीं.

बायको विलासी, नवरा उदासी—विजोडदंपती. स्त्रीला चैनीची चट असून नवरा जर उदासीन असेल तर त्यांस परस्परांपासून सुख होणार नाहीं.

बायको येडी, पोर पिसें, जांवई मिळाले तेही तसे—संसारांतील सर्व गोष्टी मनाला वैताग आणण्यासारख्या असणें. बायकोला वेड लागलेलें, पोरगीहि वेडीच व तिचें लग्न करून जांवई पाहिला तोहि त्यांसारखाच अशा संसारांत काय सुख लागणार.

बायको शहाणी असली तर संसार, नाहींतर विपचार—संसारामध्यें स्त्री सुज्ञ मिळाली तर त्या संसारापासून आनंद होतो नाहींतर तो दुःखास कारण होतो.

बायको ही काम जिंकण्याकरितां व मुलें हीं यम जिंकण्याकरितां असतात—बायको ही चार पुरुषार्थांपैकीं काम या पुरुषार्थाचें साधन करून देते व मुलांच्या मुळें आपलें नांव कायम राहतें.

बायका भांडती शेजारीं, आणि घरांत मारामारी—शेजारणी शेजारणींचें भांडण झालें म्हणजे त्याचा राग घरांतील माणसांवर निघतो.

बायकांची अक्कल चुलीपाशीं—स्त्रियांचें ज्ञान केवळ स्वयंपाक करण्यापुरतें असतें, अशी पुरुषांची समजूत.

बायकांचें गाणें आणि नागवें न्हाणें—१ कुलीन स्त्रीनें गाणें (जाहीर रीतीनें) व वस्त्राशिवाय स्नान करणें हीं पूर्वी निषिद्ध समजत. २ ज्याप्रमाणें नग्न स्त्री नहात असतां तिच्याकडे पाहणें असभ्यपणाचें मानण्यांत येते त्याप्रमाणें स्त्रियांच्या गाण्यास जाणें हेंहि असभ्य मानण्याची पद्धति होती. सामान्यतः वेश्यांशिवाय कोणी गाण्याचा धंदा करीत नसे अशा वेळच्या समाजांतील ही म्हण आहे.

बायकांचें शहाणपण चुलीपुढें-पुरतें—पुरुष बायकांना फक्त स्वयंपाकाच्या बाबतींत विचारतात. इतर कामांत त्यांना कांहीं समजत नाहीं असें धरतात. 'समजलं तुमचं शहाणपण ! बायकांचं शहाणपण चुलीपुढेंच म्हणतात तें खोटं नव्हे,'–इंप ३१.

बायकांच्या तोंडांत कोणतीहि गोष्ट राहात नाहीं—स्त्रिया कोणतीहि गोष्ट गुप्त ठेवूं शकत नाहींत अशी समजूत आहे. तु०–तोंडांत तीळ न भिजणें पहा.

बायकांत पुरुष लांबोडा,(भाजून खातो कोंबडा)—स्त्रियांमध्यें एखाद्या पुरुषानें बसणें हें अयोग्य आहे. तो बसल्यास मुलें असें चिडवितात. "मी त्यास 'रांड्या राघोजी' किंवा 'बायकांत पुरुष लांबोडा' असें म्हणावें मग त्यांनीं रागवावें "–पकोघे.

बायकांना लोण्याची सवतहि सहन होत नाहीं—स्त्रियांमध्यें सवतीमत्सर हा अगदीं जन्मजात असतो.

बायकोचा कावा, न कळे ब्रह्मदेवा—स्त्रियांची लबाडी ब्रह्मदेवासहि कळत नाहीं. स्त्रियश्चरित्रं पुरुषस्य भाग्यं। देवो न जानाति कुतो मनुष्यः ॥

बायकोचा पायगुण नवऱ्याला वढती—स्त्रीच्या नशीबानें, वशिल्यानें भरभराट होणें.

बायकोचा बोल आणि चाट्याचा अंक कळत नाहीं—ज्याप्रमाणें कापडाचा दुकानदार कापडावर सांकेतिक आंकडा घालतो तो आपणांस कळत नाहीं. त्याप्रमाणें स्त्रियांच्या बोलण्यांतील भावार्थ कळणें फार कठिण आहे.

बायकोचा भाऊ नि लोण्याहून (अंडापेक्षांहून) मऊ—बायकोचे नातेवाईक नवऱ्यास सर्व चांगलेच वाटतात. मेहुण्याला 'टांचेचें काळीज'–म्हणतात.

बायकोची रवानगी, वानगीची कमताई—बायको दूर अथवा माहेरीं निघून गेली म्हणजे मनुष्य इकडे तिकडे भटकूं लागतो.

बायकोनें केली कुचाळी आणि नवरा झाला गबाळी—बायकोनें कुरापत काढली असतां ती नवऱ्याच्या कमीपणास कारण होणें.

बायकोनें दिली भर, तों पती झाले तर—बायकोच्या म्हणण्या प्रमाणें वागून किंवा तिचे ऐकून अविचारानें एखादी गोष्ट करणें.

बायकोनें मारली लाथ पण तोडा पायांत—बायकोची लाथ, विशेषतः तिच्या पायांत तोडा असल्यानें जास्त गोड.

बायकोला ताठा, घरधन्याला सोटा—गर्विष्ठ बायकोचा नवरा भ्याड असतो बायकांस जसें हट्ट हें शस्त्र आहे तसें नवऱ्याचें काठी हें शस्त्र आहे.

बायकोला पायलीभर आणि नवऱ्याला शेरभर—बायकोपुढें नवऱ्याचें कांहीं चालत नसल्यास म्हणतात.

बायकोला पोर, जिवाला घोर.—स्त्रियांना मुलाची फार हौस असते पण एकदां मूल झालें म्हणजे त्याची काळजी करण्याचें काम नेहमीं पाठीस लागतें.

बायकोला शिळी पोळी, रांडेला पुरण पोळी.—घरच्या स्त्रीस वाईट रीतीनें वागवून वेश्येची धन करणें.

बायकोला साडी चोळी, माता अखंड चिंध्या गाळी—बायकोचे लाड पुरविणें व आईकडे दुर्लक्ष्य करणें.

बायकोशीं चांगलें तर मन तेथें रमलें—नवराबायकोचें जेथें प्रेम असतें त्यांचा संसार सुखाचा असतो व तो पाहून आनंद होतो. याच्या उलट पुढील म्हण पहा.

बायकोशीं वांकडे, तर खा चुलींतलीं लांकडें—पतीपत्नींचे स्वभाव जुळत नसले तर पतीस नीट जेवावयासहि मिळत नाहीं. त्यांचा संसार दुःखदायक होतो.

बायजाबाई—ही दौलतराव शिंद्याची बायको, मोठी सौंदर्यवान् व दुसऱ्यावर छाप पाडणारी होती. हिच्या जहाल स्वभावावरून तशाच बाईला लावतात.

बार—तेली जोके तारोतार खुदा जोके एकच बार—तेली पहा.

बार—बार उडविणें—१ काम फत्ते करणें. २ कार्य भाग उरकून घेणें.

बार देणें—पुष्टि देणें; संमति देणें; मान्य करणें.

बार देणें–ठासणें–भरणें—१ शिकवून ठेवणें; भर देऊन ठेवणें. २ संधान बांधून ठेवणें. युक्ति योजून ठेवणें.

बार भरणें—१ बंदुकींत दारू ठासणें. २ चिलमींत तंबाखु वगैरे भरणें. ३ विडा खाणें. ४ सर्व तयारी करून ठेवणें.

बार---बार करणें---१ बारनिशींत लिहिणें; नोंद करणें. २ (ना) संपविणें, पूर्ण करणें.

बारनिशी करणें---१ नोंद करणें; कागदपत्र हुंडी वगैरे नोंदणें. २ (वाढल्यानंतर शेवटचें काम) तूप वाढणें.

बारनिशीवर घालणें--१ बारनिशीच्या कामावर नेमणें. २ कंबरेचा कांटा ढिला होईल एवढें काम करावयास भाग पाडणें.

बार---बार धरणें--वृक्षादिकांवर पुष्पें, फलें येणें.

बारक-बारकस-बारका फाटी पनेल—(गो.) बारक म्हणजे मोठी होडी तिच्याबरोबर लहान होडकें आपलें असतेंच. गाड्याबरोबर नळ्याची यात्रा.

बारदेश---बारदेसकराची वय—बारदेसच्या शेतकऱ्याचें कुंपण. तें कुंपण चार काड्या उभ्या केलेलें केवळ नाममात्र असतें. आणि मग एखाद्या बैलाच्या वा माणसाच्या धक्क्यानें तें मोडलें कीं त्यावरून भांडणें सुरू होतात. दोघां बारदेसकारांना कोरड्या जळणांची जरूरी होती. तें मिळविण्यासाठीं त्यांनीं मुद्दाम आपआपसांत भांडण सुरू केलें व एकमेकांना मारण्यासाठीं म्हणून शेजारच्या कुंपणांतील काठ्या काढल्या.

बारभाई--१ नारायणरावाच्या वधानंतर राघोबादादाच्या विरुद्ध सवाई माधवरावास गादीवर बसविण्यासाठीं जे सरदार वगैरे एकत्र झाले ते पुढीलप्रमाणें होते. १ नाना फडणीस, २ नारो आपाजी, ३ बाबूराव केशव, ४ विसाजी कृष्ण बिनीवाले, ५ त्रिंबकरावमामा पेठे, ६ आपा बळवंत मेहेंदळे, ७ कृष्णराव बहिरव थत्ते ८ आपाजी पुरंदरे, ९ हरीपंत तात्या फडके, १० आनंदराव पानसे, ११ खासगीवाले, १२ सखाराम बापू बोकील. २ दुसऱ्या बाजीरावाच्या कारकीर्दीच्या आरंभीं शिंद्याच्या वर्चस्वाविरुद्ध जो शेणवी सरदारांचा कंपू असे त्यालाहि बारभाई असें म्हणत. त्यांत जिवाजी यशवंत, यशवंतराव शिवाजी, बाजीबा मोदी, मालजी गावडे वगैरे सरदार होते.-खरे ७३९५ (१४ व्या खंडाची प्रस्तावना.)

बारभाईचा कारखाना--कारभार; बारभाईची शेती--१ लोक प्रतिनिधींचा कारभार. ' बारभाईचा कारभार दिल्लीस आजपर्यंत कोणत्याहि गृहकलहानंतर चालला नाहीं. ' भाव ९६. २ गोंधळ; अव्यवस्था; अनेक मालक असून कोणाची कोणास दाद नाहीं असा कारभार. -गांगा २०७.

बारभाईची गाडी—उतारू व टपाल नेण्याची गाडी. इंग्रज कंपनीच्या पहिल्या अमदानीतील मुंबई-पुण्यामधील आजच्या रेल्वेप्रमाणें उतारूंसाठीं सरकारी घोडागाडी असे.

बारभाईचें कारस्थान— पेशवाईंत बारभाईनें केलेला कट, त्याचें कारस्थान. (ल.) विशिष्ट कार्यसिद्धीसाठीं कांहीं मंडळींनीं केलेला गुप्त कट.

***बारभाईची खेती, काय लागेल हातीं**—(व.) एकच शेत वहाणारे पुष्कळ शेतकरी असले म्हणजे सहसा कोणीच त्या शेताच्या वहितीबद्दल चिंता करीत नाहीं. कारण आपण नाहीं पाहिलें तर दुसरा कोणी पाहीलच ही समजूत. अशानें अखेर कोणी पाहात नाहीं व शेतांतील कांहींच पीक हातीं लागत नाहीं. तसें एका कामाची चिंता करणारे अनेक असल्यास तें काम कोणीच फिकीरीनें करत नाहीं.

बारभाईची शेती दमडी न लागे हातीं;--बारभाईची खेती, प्रजापती लागला हातीं--वरील प्रमाणेंच.

बारभाईची शेती, देते सर्वदा खंती— वर प्रमाणेंच.

बारसें--- एखाद्याच्या बारशास जेवणें-- मुलाच्या बारशास जो हजर असेल तो माणूस त्या मुलांपेक्षां अर्थात् मोठाच असणार. वयानें मोठें असणें; त्याच्या जन्माच्यावेळीं मोठें असणें.

बारशाची तयारी बाराव्याला—शुभकार्यासाठीं तयारीस लागावें तों त्यांतून अशुभ कार्य निघून तें करण्याची पाळी येणें.

बारशाला आणि बाराव्यालाहि तयार-हजर— कोणत्याहि प्रसंगीं ठेवलेला; कांहींहि असो हा गृहस्थ आपला नेमका कामाला तयार. (निंदा आणि स्तुति या दोन्ही अर्थीं वापरतात.)

बारा---संख्येनें बारा असणाऱ्या पुढील गोष्टी—

बारा अरण्यें--१ आपारण्य, २ द्वीपारण्य, ३ तमारण्य ४ लोकारण्य, ५ त्रिकूटारण्य, ६ स्वर्गारण्य, ७ अंधकारण्य;

८ कोक्षि अरण्य, ९ मनुष्यारण्य, १० उद्रूपारण्य, ११ कूर्मारण्य, १२ तलारण्य. (—किन्नरी रुक्मिणी स्वयंवर)

बारा अलुतें— गांवांतील शेतकऱ्याच्या पिकावरील हक्कदार माल यांचा हक्क ठराविक नाहीं——१ तेली, २ तांबोळी, ३ साळी, ४ माळी, ५ जंगम, ६ कलावंत, ७ डवऱ्या, ८ ठाकर, ९ घडशी, १० तराळ, ११ सोनार, १२ चौगुला. अलुतेदार व बलुतेदार यांच्या नांवामध्यें विविध प्रकार आढळतात. अमकेच नक्की अलुतेदार व बलुतेदार असें सांगतां येत नाहीं.—ज्ञाको 'अलुतीबलुती' पहा.

बारा आदित्य—(अ) १ मित्र, २ रवि, ३ सूर्य, ४ भानु, ५ खग ६, पूष्णि, ७ हिरण्यगर्भ, ८ मरीचि, ९ आदित्य, १० सवितृ, ११ अर्क, १२ भास्कर. (आ) १ विवस्वान्, २ अर्यमा, ३ पूषा, ४ त्वष्टा, ५ सविता, ६ भग, ७ धाता, ८ विधाता, ९ वरुण, १० मित्र, ११ शक्त, १२ उरुक्रम. (इ) १ धाता, २ मित्र, ३ अर्यमा, ४ रुद्र, ५ वरुण, ६ सूर्य, ७ भग, ८ पूषा, ९ सविता, १० विवस्वान्, ११ त्वष्टा, १२ विष्णु. (इ) १ भग, २ अंश, ३ अर्यमा, ४ मित्र, ५ वरुण, ६ सविता, ७ धाता, ८ विवस्वान्, ९ त्वष्टा, १० पूषा, ११ इंद्र, १२ विष्णु.

बारा आभरणें—१ नूपुर, २ किंकिणी, ३ हार, ४ चूरी, ५ मुदरी, ६ कंकण; ७ बाजूबंद, ८ कंठश्री, ९ बेसर, १० बिरीया, ११ टीका, १२ शिरफूल.

बारा एकादशी—चैत्र ते फाल्गुन महिन्यांतील. शुद्ध पक्ष—१ कामदा, २ मोहिनी, ३ निर्जला, ४ शयनी, ५ पुत्रदा, ६ परिवर्तिनी, ७ पाशांकुशा, ८ प्रबोधिनी, ९ मोक्षदा, १० पुत्रदा, ११ जया, १२ आमलकी. वद्य पक्ष—१ वरूथिनी, २ अपरा, ३ योगिनी, ४ कामिका, ५ अजा, ६ इंदिरा, ७ रमा, ८ उत्पत्ति, ९ सफला, १० षट्तिला, ११ विजया, १२ पापमोचनी.

बारा कृष्ण—१ वसुदेवनंदन, २ देवकीतनय, ३ नंदकुमार, ४ यशोदासुत, ५ गोपीजनवल्लभ, ६ वृंदावनविहारी, ७ अक्रूरोद्धवमित्र, ८ कंसदमन, ९ द्वारकाधीश, १० पांडवरक्षक, ११ भक्तपालक, १२ योगीश्वर.

बारा ज्योतिर्लिंगें—१ सोरटी सोमनाथ (काठेवाड), २ मल्लिकार्जुन (मोंगलाई), ३ महाकालेश्वर (उज्जयिनी), ४ ओंकार अमलेश्वर (ओंकार मांधाता), ५ परळी वैजनाथ (मोंगलाई), ६ भीमाशंकर (पुणें जिल्हा), ७ अवंढ्या नागनाथ (मोंगलाई), ८ काशी विश्वनाथ (काशी), ९ त्र्यंबकेश्वर (नाशिक), १० केदारेश्वर (हिमालय), ११ घृष्णेश्वर (वेरुळ), १२ रामेश्वर (मद्रास इलाखा).

बारा बलुतीं— गांवांतील शेतकऱ्याच्या पिकावर विशिष्ट हक्क असलेले हक्कदार. (अ) १ पाटील, २ कुलकर्णी, ३ चौधरी, ४ पोलदार, ५ देशपांड्या, ६ न्हावी-७ परीट, ८ गुरव, ९ सुतार, १० कुंभार, ११ वेसकर, १२ जोशी. (आ) १ सुतार, २ लोहार, ३ चांभार, ४ माहार, ५ न्हावी, ६ कुंभार, ७ परीट, ८ मांग, ९ गुरव, १० सोनार, ११ जोशी, १२ मुलाणा. —इंदापूर परगणा. सामान्य हक्क येणेंप्रमाणें——पहिली कास हक्क चार पाचुंदे (८पाचुंदे)—१ सुतार, २ लोहार, ३ मांग, ४ महार. दुसरी कास हक्क ३ पाचुंदे —५ कुंभार, ६ चांभार, ७ परीट, ८ न्हावी, तिसरीकास हक्क २ पाचुंदे—९ भट, १० मुलाणा, ११ गुरव, १२ कोळी. वेगवेगळ्या भागांत वेगवेगळे बलुतेदार आहेत व त्यांचे हक्कासंबंधी वर्गहि वेगळे आहेत.

बारा महिने—सौरमास—१ मधु, २ माधव, ३ शुक्र, ४ शुचि, ५ नभ, ६ नभस्य, ७ इष, ८ ऊर्ज, ९ सहस, १० सहस्य, ११ तप, १२ तपस्य. हिंदु—१ चैत्र, २ वैशाख, ३ ज्येष्ठ, ४ आषाढ, ५ श्रावण, ६ भाद्रपद, ७ आश्विन, ८ कार्तिक, ९ मार्गशीर्ष, १० पौष, ११ माघ, १२ फाल्गुन. इंग्रजी—१ जानेवारी, २ फेब्रुवारी, ३ मार्च, ४ एप्रिल, ५ मे, ६ जून, ७ जुलै, ८ आगष्ट ९ सप्टेंबर, १० आक्टोबर, ११ नोव्हेंबर, १२ डिसेंबर. हिजरी—१ मोहरम, २ सफर, ३ रबिलावल, ४ रबिलाखर, ५ जमादिलावल, ६ जमादिलाखर, ७ रजब, ८ साबान, ९ रमजान, १० सवाल, ११ जिल्काद, १२ जिल्हेज.

बारा मावळें—१अंदर, २नाणें, ३पवन, ४ घोटण, ५पौड, ६मोसें, ७मुठें, ८गुंजण, ९ वेळवंड, १० भोर, ११ शिवतर, १२ हिरडस.

बारा मुलगे— १ औरस, २ क्षेत्रज, ३ दत्तक, ४ कृत्रिम, ५ गूढोत्पन्न, ६ अपविद्ध, ७ कानीन, ८

सहोढ, ९ क्रीत, १० पौनर्भव, ११ स्वयंदत्त, १२ शौद्र. (- मिताक्षरा)

बारा रामनाम—१ श्रीराम, २ दशरथनंदन राम, ३ कौसल्यात्मजराम, ४ यज्ञोद्धारक राम, ५ अहल्योद्धरण राम, ६ ताटिकामर्दन राम, ७ धनुर्धारी राम, ८ सीताभिराम, ९ वनवासी राम, १० मारुतिप्रिय राम, ११ रावणांतक राम, १२ अयोध्यावासी राम.

बारा राशी—१ मेष, २ वृषभ, ३ मिथुन, ४ कर्क, ५ सिंह, ६ कन्या, ७ तूळ, ८ वृश्चिक, ९ धन, १० मकर, ११ कुंभ, १२ मीन.

बारा विनायक—१ सुमुख, २ एकदंत, ३ कपिल, ४ गजकर्ण, ५ लंबोदर, ६ विकट, ७ विघ्ननाश, ८ गणाधिप, ९ धूम्रकेतु, १० गणाध्यक्ष, ११ भालचंद्र, १२ गजानन.

बारा शृंगारावस्था—१ चक्षुःप्रीति, २ मनःसंग, ३ संकल्प, ४ प्रलापित, ५ जागर, ६ कार्श्य, ७ अरति, ८ लज्जा, ९ त्याग, १० संज्वर, ११ उन्माद, १२ मूर्च्छनामरण. [—प्रतापरुद्र].

बारा संक्रांती—१ धान्यसंक्रांत, २ लवणसंक्रांत, ३ भोगसंक्रांत, ४ रूपसंक्रांत, ५ तेजसंक्रांत, ६ सौभाग्यसंक्रांत, ७ तांबूलसंक्रांत, ८ मनोरथसंक्रांत, ९ विशोकसंक्रांत, १० आयुःसंक्रांत, ११ धनसंक्रांत, १२ मकरसंक्रांत,

बारा साध्वी स्त्रिया--१ अरुंधती, २ देवहुती, ३ लोपामुद्रा, ४ अदिती, ५ सावित्री, ६ लक्ष्मी, ७ पार्वती, ८ अनुसूया, ९ इंद्राणी, १० विंध्यावली, ११ कयाधू, १२ देवकी.

बारा अक्षरी; बाराखडी—व्यंजनांत निरनिराळे बारा स्वर मिळवून होणारी अक्षरमालिका.

बारा अक्षरी मंत्र—ॐ नमो भगवते वासुदेवाय।

बारा आणे—नपुंसक; पौरुषांत कमी; उणा.

बारा करणें; बाराचें करणें-ह्मणणें; बाराचा फाडा वाचणें; बाराचे लेख वाचणें—बाराचें दान पडलें असतां सोंगटी दूर जाते यावरून. सफाईनें, धूर्ततेनें पळून जाणें; पोबारा करणें.

बारा गांवचें पाणी प्यालेला--अनेक प्रदेश, रीतरिवाज पाहून आलेला.—इप ७७.

बारा गोष्टी-कथा सांगणें-करणें-गाणें; बारापंधरा करणें-सांगणें; बाराबत्तिशा लावणें—असंबद्ध बोलणें; खोट्या सबबी सांगणें.

बारा घरचीं बारा—कोणाचा कांहीं संबंध नाहीं अशीं यदृच्छया एकत्र झालेलीं माणसें; अनेक लोक.—सप्र २.३९.

बारा डेऱ्याला मुरवण घालणें—थोड्याशा ताकानें बारा रांजणांतील दुधास विरजण घालणें. १ अनेक गोष्टी एकदम उरकणें. २ एखाद्या स्त्रीनें अनेकांशीं गमन करणें.

बारापंधरा करणें—एकदां बारा एकदां पंधरा म्हणणें; बोलण्यांत मेळ नसणें.

बारा पांच—कुडाळदेशकर ब्राह्मण राजवटींतील बारा नाईक व पांच देसाई मिळून एकंदर सतरा मानकरी.

बारा पिंपळांवरचा मुंजा—पिंपळ पहा.

बाराबापू; बाराभाई; बारभाई; बारा घरचे बारा--अनेक हातीं सत्ता; कोणीहि एक नियंता नसून अनेकांनीं कारभारांत ढवळा ढवळ करीत असावें अशी स्थिति. यावरून अव्यवस्था, गोंधळ.

बारा बावती—१ अधिकाऱ्यांचे हक्क. : १ वसुलांतील शेंकडा हिस्सा, २ फसकी, ३ प्रत्येक चाहुरी ठराविक जमीन, ४ पितरांस लोणी भाजी, ५ दसऱ्यास बकरें, ६ तेल्यापासून तेल, ७ चांभारापासून जोडा, ८ तांबोळ्यापासून पानें, ९ राबता महार, १० बाजारच्या दिवशीं माळवें, ११ सणास फांट्यामोळ्या, १२ वाण्यापासून तंबाखू सुपारी. २ पाटलांचे हक्क (विडा, टिळा, शेला, वाटी, गणसवाशीण इ.)

बारा बाविशा—गांवातील हक्क. 'गांवामध्यें बाराबाविशा रामजी पाटलाच्या आहेत.'

बारा बोड्याचा--(अशिष्ट) शिवी. व्यभिचार, जारज.

बारा महिने तेराकाळ-अठरा काळ—सदोदीत; नेहमी; नित्याचा.

बारा मांडवांतला-मांडवांचा वऱ्हाडी--अनेक लग्नें पाहिलेला; अनेक व्यवहार केलेला; अनुभविक; व्यवहारी; सुरब्बी.

बारा वर्षें पुरलीं--एखादी गोष्ट किंवा काम दीर्घ काल चालविणें.

बारा वाजणें—सूर्य बारा वाजतां आकाशाच्या अगदीं मध्यावर येऊन पश्चिमेकडे उतरतो यावरून उन्नतावस्था संपणें. उतरती कळा लागणें; समाप्त होणें. (गु.) बार वागवा.

बारा वाटा उधळिला जाणें-करणें—अनेक मार्गांनीं पैसा, संपत्ति, सांठा इ. खर्च होणें, करणें; भरमसाट उधळणें.

बारा वाटा पळणें-होणें—१ अजीबात नाहींसा होणें. २ चारी दिशांनीं सैरावैरा पळणें. 'फाजिलखान बारा वाटा।'-ऐपो २१.

बारा वाटा मोकळ्या होणें—वाटेल तें करण्यास, वाटेल तेथें जाण्यास कांहीं अडकाठी नसणें.-गांगा २४१.

बारा वाटेस जाणें—निराकरण होणें; नाश होणें. 'इकडे जमीनदारांनीं मोठी फजिती केली होती. परंतु श्रीमंतांचे पुण्येकरून बारा वाटेस गेले'-रा ३.१६८.

बारा सूर्य तळपणें--एक सूर्य तळपतो तर इतकी प्रखरता, मग बाराहि सूर्य जर तळपूं लागले तर किती आग भडकेल! अतिशय दाह होणें. 'अनिश तपति किंवा सूर्य येकल बारा।'-सारुह ३.७२.

बारा हक्कदार—गांवांतील वंशपरंपरेचे हक्क असलेले अधिकारी देशमुख, देशपांडे, कुलकर्णी, शेट्या इ. बारा बलुते. बलुते पहा.

बाराचा अम्मल—मध्यान्ह काळ; मध्यान्ह रात्र.

बारावा बृहस्पति असणें—कोणताहि ग्रह बाराव्या स्थानीं असतां तो शत्रुस्थानीं मानतात. यावरून वांकडें असणें. वैर असणें.

बारावें वर्ष पालटणें—लागणें--बारा वर्षांच्या मुलाप्रमाणें वर्तन करणें.

बारा कारभारी आणि अठरा चौधरी—अनेकांच्या हातांत कारभार असून कोणीहि लुडबुड करावी अशी स्थिति; एकतंत्रीपणाचा अभाव.

बारा कोसावर नणंद वसे, तिच्या वासानें दहीं दूध नासे—वहिनीबाईंचे नन्सांविषयींचे उद्गार! नणंदेबद्दल भावजईस नेहमीं मत्सर वाटत असतो. कांहीं वाईट झालें कीं तिच्यामुळेंच झालें असें तिला वाटणें. नणंद पहा.

बारा कोसावरचा पाऊस, सिंवेचा राऊत, पाणवठ्याची घागर—१ या तीन गोष्टी मिळणें दुर्लभ. २ हीं बरोबर गांवांत येतात.

बारा कोसांवर भाषा बदलते—सामान्यतः थोड्या थोड्या अंतरानें लोकांच्या बोलींत फरक पडत जातो. दर पहा.

बारा गाड्यांची खडखड अन् दोन बायांची बडबड—(वांय.) दोन बायका जमल्या कीं त्यांची फार मोठी बडबड ऐकूं येते.

बारा गांव उजाड, आणि फिरतो उनाड--उनाड मनुष्याला सर्व दिशा मोकळ्या असतात.

बारा गांव सासरं, आधींच भोंकाड वासलं--सासर दूर आहे तोंच सासुरवासणीनें रडावयास सुरवात करणें.-मसाप १.२.११.

बारा गांवची मोकाशी, घरीं बायको उपाशी—(व.) बारागांवची मोकाशी (इनामदारी) असल्यामुळें कारभार खूब चालतो व त्यामुळें घरांत बायको अगर बायको इतकें जिव्हाळ्याचें मनुष्य असूनहि त्याच्या सुखसोईकडे लक्ष पुरविण्यास फुरसत मिळत नाहीं. बाहेरचा व्याप पुष्कळ झाल्यामुळें घरच्या व्यवस्थेकडे दुर्लक्ष झालें म्हणजे असें म्हणतात.

बारा तेरा, एक दिवशीं करा--और्ध्वदेहिक विधीमध्यें बाराव्या व तेराव्या दिवशींचें कर्म एकाच दिवशीं करणें. एकाच वेळीं अनेक कामें उरकून घेणें.

बारा बांदांचे उदक पिला—(गो.) बारा बांधांचें पाणी प्यालेला माणूस. खूप प्रवास करून धक्केचपेटे खाऊन शहाणा झालेला असा अर्थ. तु०-बारा गांवचें पाणी प्यालेला.

बारा पुरभय्ये व चौदा चुली--पुरभय्ये लोकांस एकमेकांच्या हातचें अन्न चालत नाहीं. त्यामुळें त्यांस वेगवेगळा स्वयंपाक करावा लागतो व विस्तव घ्यावयास आणखी स्वतंत्र चूल लागते. परस्परांचें पटत नाहीं असा समूह.-गांगा २३.

बारा पोडी बम्मणाक, तेरा पोडी बायल; बारा पडी घोवाक, तेरा पडी बायल—(गो.) बारा मापें

भात नवरा खातो तर बायको तेरा मापें खातें. वरचढ असलेल्या माणसाला कधीं काळीं त्याच्या पेक्षांहि वरचढ माणूस मिळूं शकतो. तु०—शेरास सव्वाशेर.

बारा बंदरांचें पाणी प्यालेला—अनेक अनुभव घेतलेला; अनेक प्रदेश फिरून आलेला; धूर्त; कावेबाज. मागें पहा.

बारा बंदरी, पांच पुणेरी, व एक जव्हारी—बंदर किनाऱ्याच्या बारा लोकांबरोबर पांच पुणेरी माणसें बरोबरी करूं शकतात पण एकटा जव्हारी त्यांस पुरेसा होतो. बंदरी, पुणेरी, व जव्हारी हे क्रमानें एकापेक्षां एक अधिक धूर्त असतात. तु०—काशीकर.

बारा बूटें, वर पागोटें—अतिशय; वाजवीपेक्षां जास्त.

बारा भाईकी खेती, बारा भाईची खती, धुपटणा लागे हाती; बारा भोयांची पालखी—अनेकाहातीं कारभार. बारभाई पहा.

बारा महिन्याचा उन्हाळा, आणि घटकेचा पावसाळा—सर्व उन्हाळ्यांत जेवढी एखादी वस्तु खराब होत नाहीं तेवढी एका पावसानें होते. थोड्या वेळच्या पावसानेंहि माणूस जेरीस येतो.

बारा म्हशी धुवीन पण देवाची पूजा करणार नाहीं—देवाची पूजा करणें हें एक कंटाळवाणें काम आहे त्यापेक्षां म्हशी धुणें-जरी दिसायला त्रासदायक असलें तरी तें करण्यास एखाद्या निर्बुद्ध मनुष्यास उल्हास वाटतो.

बारा रेडे धुवीन पण एक शाळिग्राम नाहीं धुणार—वर प्रमाणेंच. देवपूजा करण्याची नावड पण म्हशी धुण्याची आवड; सत्कृत्य करण्याचा कंटाळा पण घाणेरडीं कृत्यें करण्याची आवड. पाठभेद—बारा रेडे धुतों तर एक शाळिग्राम जड नाहीं.

बारा वरांचेर तॅरा गॉटॅ, सायाविणीचे कुलॅ मॉटॅ—(गो.) बारा वाजतां तेरा शितें आणि स्वैंपाकीण बाईचें ढुंगण मोठें. स्वैंपाकीण बाई अंगानें जाडजूड असावी पण तिच्या हातून स्वैंपाक मात्र वेळेवर होऊं नये, अशावेळीं म्हणतात.

बारा वर्षांनीं उचलला करा आणि माय म्हणते माझा कुसवा भरा (बरा?)—बारा वर्षांनीं मूल होऊन आणखी माझी कूस चांगली म्हणून तोरा मिरवणें. कधीं काळीं काम करून मी फार कामसू म्हणून ऐट मारणें.

बारा वर्षांनीं उचलला करा, माय म्हणते माझा कुसवा बरा—(गो.) बारा वर्सांचेन घल्लो करो, म्हजो कुस्वास बरो—बारा वर्षांची मुलगी भांडें घेऊन जेव्हां निघते तेव्हां तिची आई तिच्या या वागणुकीकडे साभिमानानें पाहात असते. मुलगी बारा वर्षांची झाल्या बरोबर काम करूं लागलेली पाहून आईस आपली कूस धन्य वाटते.

बारा वर्षें डोईवर वागविलें, तरी हळूच उतर भानचोद—बारा वर्षें डोक्यावर बाळगलें तरी उतरतांना हळू उतर म्हणून शिवी देणारा; कितीहि केलें तरी उपकार न स्मरणारा; कृतघ्न अस्त्युत्तर भानचोद.

बारा वर्षें तप केलें, गाढवासीं पाप केलें—(महानु.) अनेक वर्षांच्या तपावर, संयमनावर एका क्षुल्लक पापानें बोळा फिरतो. फार काळ ब्रह्मचारी राहून एखादेवेळीं गाढवीशीं संग करण्याची बुद्धि झाली कीं संपलें! तु०—एक ब्रह्मचारी। गाढवी झोंबला॥

बारा वर्षें तप केलें, गुवाशीं पारणें फेडलें—दीर्घकाल सत्कृत्य करून शेवटीं अकृत्य करणें. चांगल्या कार्याचा शेवट बिघडविणें, तु.—पंचपक्वान्नांचें जेवण, मुताचें आंचवण.

व्यापार करतां सोळबारा शेतकरतां डोईवर भारा—उदीम करतां पहा.

बारा वर्षें रामायण ऐकून रामाची सीता कोण हें माहीत नसणें—कितीहि सांगितलें तरी कांहीं एक न समजतां पूर्वीप्रमाणेंच अज्ञानी राहणारा. (गु.) बारा बरस दिल्लीमें रह्या लेकीन दिल्लीकी गांडबी खबर नहि.

बारा वर्षें शेला विणला, म्हणे राजाच्या दफणाला—राजाला देण्यासाठीं शेला बारा वर्षें मेहनत करून विणला व अखेर त्याला देण्याच्यावेळीं आपल्या दफनासाठीं असें बोलून नुकसान करून घेतलें. दीर्घकाल किंवा श्रम खर्चून एखादी गोष्ट सुंदर करावयाची पण शेवटीं एका शब्दानें सर्वांची घाण करून टाकावयाची.

पळणारास एक वाट, शोधणारास बारा वाटा—पळणारा पहा.

बारा सुघरनी, कढी आळनी—(महानु.) अनेकांनी केलेलें काम कधीं नीट होत नाहीं.

बारा हात कांकडी व तेरा हात बी—कांकडी पहा

बाराची भाय खाटल्यावर जीव जाय--(महानु.] १ जिला पुष्कळ मुलें आहेत तिची मरणापर्यंतहि चांगली सुश्रुषा होते. जवळचीं माणसें असलीं म्हणजे हाल होत नाहींत. नाहींतर कुत्राहि विचारीत नाहीं. २ बारा पुत्र असून मृत्यूच्या वेळीं खाटेवरून खालीं ठेवावयास सुद्धां एकहि मुलगा जवळ नसणें; अशी आबाळ होणें.

बाराव्याला आणि बारशाला जेवणें—शुभाशुभ अशा कोणत्याहि प्रसंगीं हजर. बारसें पहा.

बारी---देहाचा बारीःइंद्रियाचे वार धरी--(महानु.) देहावर छत्र धरणारा म्हणजे देहाला जो जपणारा त्याला इंद्रियांचे वार सहन करावे लागतात. वासना या देहाला घातक असतात तेव्हां त्यांच्यापासून संरक्षण करावें लागतें.

बारीक---बारीक कातणें—१ फार बारकाईनें पाहणें; कांटेकोरपणा करणें; फाजील हिशेबी असणें. २ कृश होणें.

एखाद्यावर बारीक कातणें—गोड बोलून फसविणें.

बारीक पाहणें—१ फार बारकाईनें लक्ष पुरविणें; तपशिलांत शिरणें. २ चिक्कूपणा करणें.

बारीक रडणें—हळू आवाजानें, मुळूमुळू रडणें.

बारीक हंसणें--स्मित करणें; गालांतल्या गालांत हंसणें.

बारीक गळी, सकन कळी—(व.) सकन कळी ही एक वेली आहे. हिची कळी सरळ लांब व बारीक असते. गळी हें गळा याचें न्यूनतादर्शक पद आहे. त्यावरून बारीक गळी म्हणजे बारीक कंठस्वर किंवा कोमल कंठस्वर असणारा. सकन कळीप्रमाणें बारीक स्वर ज्या व्यक्तीचा अशा व्यक्तीला उद्देशून ही उक्ति आहे.

बारीक नळी, चेपूं बरी--(गो.) बारीक नळी चेपायला सुलभ. दीन दुबळे सहज चिरडले जातात.

बारीश---बारिशेचा शदत—पावसाची झोड.

बारें---बारें बांधणें— भल्याबुऱ्या मार्गानीं आपल्या विरुद्ध ओरड थांबविणें; तोंड दाबणें.

बाल---बुढ्ढीके बाल—(म्हातारीचे केंस) एक बारीक तंतूचा गोड खाण्याचा पदार्थ.

बाल ठेवणें--केंस राखणें; विशिष्ट तऱ्हेनें केंसांची जोपासना करणें.

बालबाल—(हिं.) केंसागणिक.

बालंबाल खात्री होणें--पूर्णपणें खात्री होणें; पूर्णपणें पटणें.

बालबाल खूष होणें—अतिशय संतुष्ट होणें.

बालबाल बोलणें-सांगणें--वटवट लावणें; एकसारखी बडबड करणें.

बालचें कापड--केंसाळ कापड.

बालागणिक-त १ केंसागणिक. २ अविरत; एकसारखें.

बालाग्र--[बाल=केंस, अग्र=टोंक.] १ केंसाचें अग्रहि; किंचितहि; मुळींचसुद्धां. ‘ अशावेळीं बालाग्रहि न डगमगतां विश्वभक्षक काळाच्या जबड्यांत उडी टाकण्यास सिद्ध झाला. ’—पटवर्धनांचे पराक्रम. २ शष्पदेखील; अणुमात्रहि. ‘ तो माझें बालाग्रहि वांकडें करूं शकणार नाहीं.’

बाल-- बालग्रह--मुलांना उपद्रव देणारे ग्रहविशेष—१ स्कंद, २ स्कंदापस्मार, ३ शकुनि, ४ रेवती, ५ पूतना, ६ गंधपूतना (अंधपूतना) ७ शीतपूतना, ८ मुखमंडिका, ९ नैगमेय.—योर २.६५५.

बालबोध माणूस--१जुन्या वळणाचा, सनातनी माणूस. २ सरळ मनुष्य.

***बालं छंदानुवर्तनात्**—लहान मुलासारखा हट्ट करणारा.

बालहट्ट आणि स्त्रीहट्ट हे दोन्ही अनिवार्य असतात—लहान मुलें आणि स्त्रिया यांनीं एकदां का हट्ट घेतला म्हणजे त्यांची समजूत पाडणें फार कठीण असतें.—शाब २.२४५.

बालहट्ट, स्त्रीहट्ट आणि राजहट्ट हे पुरविल्याशिवाय माणसाला गत्यंतर नसतें- वरीलप्रमाणेंच. राजा म्हणेल तें होतें.

बालस्तावत् क्रीडासक्तः--लहान मुलांस खेळणें फार आवडतें. बालपण सर्व खेळण्यांत खर्च होतें. बालस्तावत्क्रीडासक्तः तरुणस्तावत्तरुणीरक्तः। वृद्धस्तावच्चिंतामग्नः परेब्रह्मणि कोपिनलग्नः।–शंकराचार्य चर्पटपंजरी.

'**बालादपि सुभाषितं ग्राह्यं**।--मनुस्मृति २.२३९. लहानमुलांकडूनहि चांगली बुद्धि शिकावी तु०–'....शिशुचें म्हणुनि न घे सूक्त जाणता कोण?'–मोआदि. २७.९. बालादपि गृहीतव्यं युक्तमुक्तं मनीषिभिः।

बालानां रोदनं बलम्।—लहानमुलांचें सामर्थ्य रडण्यांत असतें. मुलें आपला हट्ट रडून पुरवून घेतात. सबंध श्लोक असा–दुर्बलस्य बलं राजा बालानां रोदनं बलम्। बलं मूर्खस्य मौनत्वं चोराणामनृतं बलम्॥

बालक—बालकास माता, दुर्बळास त्राता-- ज्याप्रमाणें आई बालकाचें रक्षण करते त्याप्रमाणें दुबळ्याचा आश्रयदाता त्याचें रक्षण करतो. मुलाला ज्याप्रमाणें आईची त्याप्रमाणें दुबाळ्याला आश्रयदात्याची जरूरी असते.

बालपण—बालपण हें मनुष्याच्या पितृस्थानीं असतें--Child is father to the man. या इंग्रजी म्हणीचा पर्याय. मुलाच्या लहानपणच्या गुणावरून तो मोठा झाला म्हणजे काय करणार हें कळून येतें. तु०–मुलाचे पाय पाळण्यांत दिसतात.

बालपणापासून मनुष्याचे विचार बदलत असतात—मनुष्य जसजसा वाढत जातो तसतशी त्याच्या विचारांत क्रांति होत जाते.

बालंट--बालंटावर, बालंटास येणें–सरणें—वचन-करार मोडणें; तंटा करणें; भांडण करणें; कुभांड रचणें.

बालंपेच--बालंपेची पागोटें--विशिष्ट पिळदार पागोटें. 'रघुनाथराव यांनीं गयावळास भरगची किनखापी अंगरखा...बालंपेची पागोटें...याप्रमाणें वस्त्रें देऊन.'–तीप्र. १३४.

बाला–ल्या--बाला देणें–मारणें–हांकणें—हातावर तुरी देणें; फसविणें; ठकविणें. 'थोड्या लोकांनिशीं आपण तेथें घुटमळत राहणें, हा वेडेपणा होय, असें वाटून, लुतुफ्खानानें तेथून बाल्या हांकला.'–पामो १६०.

बाला होणें—अलग होणें; दूर होणें.

बालाबाला—१ थेट; परस्पर. २ फसवून; कपटेंकरून.

बालेघाट--बालेघाट आणि सोन्याचा कांठ—बालेघाट हा सधन आहे अशी समजूत आहे.

बावटा--बावट्या हाकारणें—(नाविक) निशाण दाखविणें.

बावन—बावनकशी सोनें—निर्भेळ सोनें; अत्युत्तम प्रतीचें सोनें; पूर्वीं सोन्याचा कस पारखीत असत त्यास पूर्ण गुण बावन असत. आज शंभर नंबरी सोनें उत्तम समजलें जातें. 'सोनेंच बावनकशी न कसें म्हणावें।'–नंल ६.

बावन बत्तिशा–बाविशा—बारा बाविशा पहा.

बावन बिरुदें—१ शिरताज, २ मायताजवा, ३ माहे मरातब, ४ गंडभैरी, ५ शार्दुल, ६ चवरी, ७ घंटा, ८ चंग, ९ पट्टा, १० समला, ११ गडी, १२ नागबंद, १३ रुमाल, १४ चाकी, १५ बरफ, १६ रणजोड, १७ तोडा, १८ शेरा, १९ कंकण, २० तुरा, २१ कलगी, २२ मेघडंबर, २३ सूर्य, २४ पान, २५ हुमा, २६ अंकुश, २७ त्रिशूळ, २८ खांडा, २९ फरश, ३० बाना मोरचल, ३१ बल्लम, ३२ लंगर, ३३ शैली, ३४ शिंगी, ३५ नाडी, ३६ नागज्योति, ३७ मोर, ३८ मुगुट, ३९ हालरवाक, ४० लंगोट, ४१ शेंदुर, ४२ कोरडा, ४३ गुरज, ४४ शंख, ४५ चक्र, ४६ गदा, ४७ सडका, ४८ मेख, ४९ मोगरी, ५० पंचरंगी, ५१ निशाण, ५२ पद्म.

बावन वीर—१ पुढील क्षुद्रदेवता समूह—१ महाबीर, २ हनुमान्, ३ वेताळ, ४ नरसिंह, ५ महंमदा, ६ भैरव, ७ कलवा, ८ शोक्या, ९ जिंदाशामदार, १० साकडे सुलतान, ११ रक्त्या, १२ मसण्या, १३ खापऱ्या, १४ हासासुर, १५ आंगीया, १६ गोग्या, १७ सगत्या, १८ लगा, १९ झापड्या, २० मुंजा, २१ नेपाळ, २२ जयपाळ, २३ इस्माल, २४ लखवा, २५ कवड्या, २६ काळ, २७ अघोरी, २८ नरक्या, २९ झोटिंग, ३० किलकिला, ३१ चेढा, ३२ समन्या, ३३ जमनजती, ३४ धावड्या, ३५ कचिया, ३६ पकिया, ३७ गोरखिया, ३८ धुरधुऱ्या, ३९ धुलियामसान, ४० जलतयामसान, ४१ मीराअमद, ४२ सैयदकबीर, ४३ गवरीखबा, ४४ रणधुमासुर, ४५ शेकिया, ४६ तेलिया, ४७ तुंडा, ४८ कोडलिजा, ४९ जंगली धुलीया, ५० वीरडीयामसान, ५१ बीर विक्रमाजीत, ५२ इस्माल जोगी.–(मंत्रशास्त्र). २ पराक्रमी हुशार मनुष्य. ३ (नाग.) नामर्द; भित्रा.

बावन मातृका--१ बावन मुळाक्षेरें. सोळास्वर व छत्तिस व्यंजनें. 'अकार उकार मकार । अर्धमात्राचें अंतर । औटमात्रा तदनंतर । बावन मातृका ॥'दा-१२.५.९. २ आधारचक्रीं ४, स्वाधिष्ठानचक्रीं ६, मणिपूरचक्रीं १०, अनुहातचक्रीं १२, विशुद्धचक्रीं १६, द्विदळचक्रीं २, सहस्रदळचक्रीं २. मिळून बावन मातृका.-(ब्रह्मपट).

बावन मुद्रा—गंधाचे ठसे शरीराच्या निरनिराळ्या भागांवर उठवतात ते. 'बावनमुद्रा बुद्धिसमुद्रा परखुणमुद्रा सुवर्णमुद्रा दे आमुच्या ॥-'पला ४.

बावन साहमे--१ पुण्य, २ गुरु, ३ विद्या, ४ यश, ५ मित्र, ६ माहात्म्य, ७ आशा, ८ सामर्थ्य, ९ भ्रातृ, १० गौरव, ११ राज, १२ तात, १३ मातृ, १४ अंबु, १५ पुत्र, १६ जीवित, १७ कर्म, १८ रोग, १९ मन्मथ, २० कलि, २१ क्षमा, २२ शास्त्र, १३ बंधु, २४ बंधक, २५ मृत्यु, २६ धन, २७ देशांतर, २८ पारदार्य, २९ अन्यकर्म, ३० वाणिज्य, ३१ कार्यसिद्धि, ३२ विवाह, ३३ प्रसूति, ३४ संताप, ३५ श्राद्ध, ३६ प्रीति, ३७ बल, ३८ देह, ३९ जाड्य, ४० व्यापार, ४१ पाणियपात ४२ रिपु, ४३ शौर्य, ४४ उपाय, ४५ दरिद्र, ४६ गुरुता, ४७ ज्वलध्वग, ४८ बंधन, ४९ कन्या, ५० अश्व, ५१ स्त्री, ५२ लाभ.-(ताजकभूषण; नीळकंठी).

बावन हाकाचा महार--महाराचे बावन हक्क-'बावन हाकाचा महार धनी याल पुरविल्या येईना ।' -अफला १५.७०

***एक ठेंच खाई तो बावन बीर होई, बावन ठेंचा खाई तो गद्धा होई**—[बावन बीर=बहाद्दूर, चलाख.] एक वेळ चूक करून जो अनुभवानें शाहणा होतो तो चतुर होतो परंतु अनेक ठेंचा खाऊनहि ज्यास कळून येत नाहीं त्यास मूर्ख समजावें. तो कधींहि सुधारण्याची आशा करूं नये.

बावरणें—बावरली गाय, कांटे खाय—गाय घाबरून तिला कांहीं सुचेनासें झालें म्हणजे गवत सोडून कांट्याहि खाऊं लागते त्याप्रमाणें मनुष्य गोंधळून गेला म्हणजे भलतीच गोष्ट करूं लागतो.

बावळा--बावळी मुद्रा आणि देवळीं निद्रा—१ दिसण्यांत बावळा पण व्यवहारांत शहाणा. २ दिसण्यांत बावळा व ज्यास कोठें आधार नाहीं, आगा पिच्छा नाहीं असा.

बावा--बावा होणें—बैरागी होणें. विरक्त बनणें.

***लोक म्हणती बावा बावा । न कळे गुलामाचा कावा** ॥-तुगा. वरून दिसावयास साधु पण धूर्त, लबाड मनुष्य.

बावीस--बावीस श्रुति—४ षड्जांत-अ अ अ अ. ३ ऋषभांत-इ इ इ. २ गांधारांत-अ अ. ४ मध्यमांत-अ अ अ अ. ४ पंचमांत--अ अ अ अ. ३ धैवतांत-अ अ अ. २ निषादांत-इ इ. या २२ श्रुति सप्तस्वरांत होतात.

बाशिंग--कामाचें बाशिंग कपाळीं असणें—एखाद्या कामाबद्दल विशेष योग्यता असणें; काम करणारा ठरलेला असणें; त्याच्या ठिकाणीं कांहीं वैशिष्ट्य असणें.

बाशिंग बळ उभें राहणें—विवाहास ग्रहांची व इतर अनुकूलता असणें; विवाहाची संधि येणें.

गुडघ्याला बाशिंग बांधणें--म्हाताऱ्यानें, प्रौढानें लहान मुलीशीं विवाह करणें. म्हातारा लग्नास उतावीळ झाला म्हणजे ढेंपराएवढ्या मुलीशींहि लग्न करण्यास तयार होतो व तिच्यापुढें गुडघ्यास बाशिंग बांधून उभा राहतो (म्हणजे तिच्या एवढा दिसतो).

पाळण्याला बाशिंग बांधणें--अगदीं बालवयांत लग्न होणें.

बाशिंग सुटणें—लग्नांत बाशिंग बांधतात; तें झालें म्हणजे बाशिंगहि सुटतें. यावरून लग्न आटोपणें. 'कमळेचे बाशिंग सुटल्याबरोबर तिच्या हातांत केरसुणी आली.' -रम्य रात्री, पा १२३.

***उतावळा नवरा, गुडघ्याला बाशिंग**—डोक्याला बाशिंग बांधण्याऐवजीं घाईनें गुडघ्यालाच बांधणें. एखाद्या कामाची अतिशय गर्दी झाली म्हणजे भलतीच कांहीं तरी गोष्ट करणें.

बाष्कळ--बाष्कळ खाणें—(निर्मांस, शाकाहारी वर्गांतील प्रयोग) (माण.) मांस खाणें.

***बाष्कळ जमा व पुष्कळ खर्च**—बिनहिशेबी कारभार.

बाष्कळ बोलणें, पुष्कळ खाणें—आचरटपणाची वागणूक.

बासा---बासा न राहे और कुत्ता न खाये-- (हिं.) कांहीं उरत नाहीं या अर्थीं.

बाहवा—बाहवापंचक—काढयांत घालण्याचीं बाहवा वगैरे पांच औषधें.

बाहिर---बाहिर भूमीस—बहिर्दिशेस; परसाकडेला. 'तव तो तपोधन माग्रा ठेउनि। बाहिरभूमिस दुरिं गेला '-पंच १.२८.

बाही---बाही देणें—१ खांदा देणें; ओझें उचण्यास हात लावणें. २ मदत करणें; साहाय्य करणें.

बाही धरल्याची लाज धरणें – आश्रयास आलेल्याचें धर्मबुद्धीनें संरक्षण करणें; त्याचा पाठपुरावा करणें.

बाह्या थापटणें-पिटणें-मारणें--दंड थोपटणें; सज्ज होणें; आव्हान देणें.

बाह्या फुरफुरणें-फुरारणें-उपासणें-उडणें— मारामारीस उत्सुक असणें.

बाही---बाही देणें--(खा.) पीक कोळपणें.

बाही-हे---बाहीचा वसूल--गांववसुलाच्या रकमेपेक्षां खजिन्यांत अधिक होणारी जमा.

बाहेजमा—उपऱ्या लोकांवर बसविलेला कर.

बाहुला-ली---बाहुली देणें– दुष्कृत्यास प्रोत्साहन देणें.

(हातांतलें) बाहुलें बनणें--एखादा सांगेल त्याप्रमाणें वागणें; अगदीं परतंत्र असणें.

बाहेर---बाहेर काढणें--हद्दपार करणें. ' दाहिजें प्रजळतीं वैरी चिंतिती आन् बाहेर काढिले ! ' -बसा ४.

घरांतून बाहेर काढणें--१ हाकलून देणें. २ नादीं लावणें. 'आन माझ्या सारख्या आयाबायांच्या दादल्यांना घरांतून बाहेर काढायचं.'-बायबं ३.२.

बाहेर चाल-ली; बाहेरची चाल--१(ज्योतिष) सूर्य नक्षत्रापासून चालू नक्षत्रापर्यंतच्या सातसात नक्षत्राचे गट करून त्यांतील पहिल्या चारांस आंत चालीचीं व पुढील तिहींस बाहेर चालीचीं नक्षत्रें म्हणतात. २ बाहेरख्याली. परदारागमन.

बाहेर जाणें--१ घराबाहेर पडणें. २ (सांकेतिक) लघुशंकेस जाणें. ३ (सा.) बहिर्दिशेस जाणें.

बाहेर निघणें-पडणें—१ गृहत्याग करणें. २ स्त्रीनें परद्वार करणें; नवरा सोडून जाणें.

बाहेर पडण्याची छाती--पुढें येण्याचें धैर्य. ' बाहेर पडण्याची कोणाची छाती '-इंप २०.

बाहेर पडून जाणें--मृत्यु पावणें.

बाहेर बसणें; बाहेरची होणें—विटाळशेपणांत घरांत कोठें शिवावयाचें नसतें तेव्हां स्त्रिया बाहेर बाहेरच असतात. विटाळशी होणें.

बाहेर बसावयास जाणें--१ मित्राकडे बसावयास जाणें. २ (बायकी) लघुशंकेस; बहिर्दिशेस जाणें.

बाहेरवाटेची असणें—व्यभिचारी असणें; वाईट चालीची असणें.

बाहेरचा--१(बायकी) अस्पृश्य जातीचा.२ (बायकी) न्हावी. ३ परका; तिऱ्हाईत. ' अस्सल वंश असतां बाहेरचा केल्यास पुढें निभावणें कलह पडतील. '

बाहेरचा छंद-नाद—रंडीबाजी; व्यभिचार.

बाहेरची असणें-होणें--रजस्वला असणें. बाहेर बसणें पहा.

बाहेरली-बाहेरची पीडा-बाधा—१ भूत बाधा. २ उपदंश; गरमी इ.

बाहेरचें-लें—भूतबाधा.

***बाहेरख्याल नायकाचे, आणि घरीं हाल बायकांचे--**घरचा पुरुष बाहेरख्याली निघाला म्हणजे त्यावर अवलंबून असणारांची दुर्दशा होते. टिळे पट्टे नायकाचे० पहा.

बाहेरगांवीं गेलों धंद्याला, तेथें दैवानें हात दिला--घर सोडून बाहेर रोजगारास गेल्यास कांहीं तरी द्रव्यप्राप्ति होते. घरीं बसून कांहीं मिळत नाहीं.

बाहेर गेला, तिकडेच टांगला—कांहीं कामचुकार लोक किंवा नादी लोक एकदां एखाद्या गोष्टीच्या पाठीमागें लागले कीं त्यांस घरादाराची शुद्धि रहात नाहींशी होते.

बाहेर चंदनाचे वाडे, आंत सावकाराचे निवाडे —दिसावयास खूप भपका पण आंतून दरिद्री. कर्जाखालीं दडपलेले थोर लोक. तु०-बडा घर पोकळ वासा.

बाहेर चांदणें अन् घरांत अंधार--[वांय] 'बाहेर झकपक, आंत भगभग,' याप्रमाणें. खालीं पहा.

बाहेर जटा वाढवाव्या, आंत संसार करावा--वरून दिसावयास वैराग्याचा वेश धारण करून गुप्तपणें संसारपाशांत गुरफटलेलें असणें. वरून साधु पण आंतून भोंदू.

बाहेर झकपक,पण आंत भगभग--वरून पोकळ ऐट आणणारा पण अंतरीं कांहीं राम नसणारा; दिखाऊ.

बाहेर तुपाशीं आणि घरीं उपाशीं—पोकळ ऐट.

बाहेर बडी पगडी, घरीं म्हातारी उघडी--वरून पोकळ भपका पण आंतून दरिद्री.

बाहेर बरवा, आंत हिरवा--वरून दिसावयास पिकलेलें पण वास्तविक कच्चें फळ.

बाहेर ब्राह्मण उपाशी, आणि आंत यजमान खेळती बायकोशीं—पाहुण्याला किंवा अतिथीला उपाशीं ठेवून स्वतः चैन करणारा यजमान.

बाहेर सांगे ब्रह्मज्ञान, आंत करी मद्यपान—वरून साधुत्वाचा आव आणून गुप्तपणें वाईट वर्तन करणारा.

बाहेरच्या देवांना टिळेगोळे, आणि घरच्या देवांवर हगती कावळे—घरच्यांना सोडून बाहेरच्यांना पूजणारा, त्यांचा आदर राखणारा असा माणूस असला म्हणजे म्हणतात.

बाहेरून कांटे, पण आंत गोड साटे—फणसाच्या फळास वरून कांटे असतात परंतु आंत गोड असे रसाळ गरे असतात. त्याप्रमाणें वरून दिसावयास खडबडीत पण आंतून अत्यंत सत्त्वशील असा मनुष्य.--तु०-उपरि सकंटक-क साचे परंतु सांचे जयांत सुरसाचे । घोंस असे फणसाचे षण्मासांचे कित्येक वरसांचे ।।—रनल.

बाह्य आचरतां : अंतरासी ये:--(महानु.) बाहेरचें आचरण तत्त्वाप्रमाणें ठेवलें म्हणजे तत्त्व अंतर्यामीं मुरतें.

बाह्य दावी थोर कर्म : कमावी वैश्याचे धर्म :--(महानु.) बाहेरून मोठेपणा दाखवावयाचा पण इकडे वैश्यधर्माप्रमाणें चालावयाचें. म्हणजे मारवाडीपणा करावयाचा.

बाळ--बाळकडू असणें—[बाळकडू=घुटी] उपजत वृत्ति, लहानपणापासूनचें वळण असणें. 'कोळयांच्या मुलांना पोहण्याचें बाळकडूच असतें.' 'सृष्टीसौंदर्याच्या अभिरुचीचें मात्र त्याला (गॅरिबाल्डीला) बाळकडूच होतें म्हटलें तरी चालेल.'—न. चिं. केळकर-ग्यारिबाल्डी.

बाळकडू मिळणें—लहानपणीं शिक्षण, वळण लागणें-मिळणें. 'यांचें त्यांना जसें कांहीं बाळकडूच मिळालेलें असे.'—V, S. २.१७५.

बाळ पिशाच्च उन्मत्तता--बाळ, पिशाच्च व उन्मत्तता या तीन अवस्था आत्मज्ञानी पुरुषाच्या असतात. साधुपुरुष केव्हां केव्हां बालाप्रमाणें निर्मळ, निष्कपट दिसतात. केव्हां केव्हां पिशाच्चाप्रमाणें त्यांची कृति दिसून पाहणाराला त्यांचा अजमासच होत नाहीं, व केव्हां केव्हां उन्मत्ताप्रमाणें ते आपल्याच ठिकाणीं रममाण असतात. 'समर्थें बाळपिशाच्चउन्मत्तता केली।'—सप्र ८.११५.

बाळसंतोष--एक भिकारी वर्ग. हा 'बाळ संतोष' असें म्हणत जातो. हे भिकारी कर्नाटकांत कागवाड येथील संतूबाई या देवीच्या नांवानें भीक मागतात. 'बाबा बाळसंतोष, बाबा बाळसंतोष। नाम घेतां हरती दोष॥'—दावि ५०१.

उघडा बोडका बाळसंतोष—उघडा पहा. १ निर्धन. २ ज्यास कोणी मागेंपुढें नाहीं असा.

***बाळ जेव वाटींत तो म्हणतो मी जेवीन नरोटींत**--जेवणें पहा.

असतील बाळ तर फडतील काळ--असणें पहा

बाळ दाणा आणि त्याला चाबूक नजराणा—आधींच मूल द्वाड असलें व त्याच्या हातांत चाबूक दिला तर तें येणाऱ्या जाणाऱ्यास उपद्रव देणारच. द्वाडाच्या हातांत हत्यार देणें.

बाळ बुंद पाडतो नि बाय गुलाल खेळते—आचारी यासारख्या हलकीं कामें करणाऱ्या माणसाची बायको छानछोक, नटवी असल्यास म्हणतात.

बाळ भिक्षुक : त्यागीयाचे लक्षुक :—(महानु.) लहानपणीं जो भिक्षू-संन्यासी झाला त्याच्या ठिकाणीं त्याग दिसून येतो.

बाळा ते-ती जन्मकाळा—जो, जे पहा. जे गुण बाळा ते जन्मकाळा.-गांगा २७४.-शाब १.५५.

बाळाची संध्या मुळावर—१ प्रारंभिक गोष्टींच्या पुढें गति न होणें. नेहमीं प्रथमावस्थेंत असणें. निर्बुद्ध असणें. २ हरदासाची कथा मूळपदावर याप्रमाणें.

बाळाच्या लीला बाळांसच आनंदवितात—लहान मुलांनीं केलेल्या गोष्टींपासून त्यांसच अधिक आनंद होतो. मोठ्या माणसांस त्या पोरकट वाटतात.

बाळाला बाळ झालं तरी बाळ अजून बाळच—मुलें झालीं तरी पोरचेष्टा करणारा.

बाळे चिन्न कयला बाळे—(गो.) मुलीचें लक्षण झिजून हलके झालेले वाळे तिच्या पायांत घातल्यावर कळतें. ते जर तिनें चांगले टिकवले तर ती मुलगी पुढें आपला संसार राखून सवरून करील ही खात्री पटते.

बाळंत—**बाळंत रोग**—बाळंतिणीस होणारा क्षयरोग.

***बाळंतिच्यो वेगो वांझेक समजनात**—(गो.) बाळंतीण होणाऱ्या स्त्रीच्या वेणा वांझेला कळायच्या नाहींत. जो कार्य करतो त्याला भोगावे लागणारे कष्ट काय आणि कसे असतात तें आळश्याला काय समजणार? नहि वंध्या विजानाति गुर्वीं प्रसववेदनाम् ।

बाळंतीण—बाळंतीण बाईचा बळिराणा पदरांत घेणें—बाळंतिणीचा बळीराणा अकराव्या दिवशीं असतो तो जी बाई आपल्या पदरांत घेते तिनें व तिच्या नवऱ्यानें त्या तांदुळाचा भात खाल्ला म्हणजे त्यांना मुलगा होतो अशी समजूत आहे. 'बाळंतिण बाईचा बलिराणा मी आपल्या पदरांत घेतला आहे'—कोकि २७.

बाळंतिणीच्या वेदना वांझेला काय ठाऊक—प्रसूतिवेदनांचा अनुभव घेतल्याशिवाय त्यांचें दुःख कळावयाचें नाहीं. वांझ स्त्रीस त्यांची कल्पनाहि होत नाहीं. त्याप्रमाणें एखादें कार्य करावयास लागणाऱ्या श्रमांची कल्पना तसें कार्य करणारांसच येते इतरास येणें शक्य नाहीं. विद्वानेवहि जानाति विद्वज्जनपरिश्रमम् । नहि वंध्या विजानाति गुर्वीं प्रसववेदनाम् ।

बाळंतिणीस सुख बोपयाचें अलंकरण—बाळंतिणीच्या जिवाची शाश्वती नसतां तिच्या मुलाचें कौतुक करूं जाणें. अप्रासंगिक वर्तन करणें.

बाळपण—बाळपणचें लोणी—पहिल्यानें व्यालेल्या गाईच्या किंवा म्हशीच्या दुधावरील लोणी.

***बाळपणीं आई मेली, पोराला कोण सांभाळी**—अल्पवयांतच आईचा मृत्यु झाल्यास अशा पोरक्या मुलाचे फार हाल होतात.

बाळपणीं तें काळपणीं—लहानपणीं लागलेले गुण जन्मभर सुटत नाहींत. जो गुण बाळा० पहा.

बाळसें—**तरण्याचे झाले कोळसे, म्हाताऱ्याला आलें बाळसें**—तरुण मनुष्याला जीव नकोसा होतो व म्हाताऱ्याला जणूं स्फुरण येतें. अस्थानी गोष्ट.

बाळी—**बाळी बुगडी लेणें नाहीं व खोकला पडसें दुखणें नाहीं**—बाळीबुगडी हा कोणी अलंकार समजत नाहीं. ती अंगावर असावयाचीच. त्याचप्रमाणें खोकला पडसें हें कांहीं दुखणें होऊं शकत नाहीं. तो किरकोळ आजार होय.

बिंग—बिंग बाहेर काढणें-पडणें—रहस्य उघडकीस आणणें. 'खाडिलकरी मेनकेनें मात्र त्या भगवंताचें बिंग बाहेर काढलें.'—नाकु ३.४१. 'विनोदाचें मूळ स्वरूप मुळीं प्रतिगामी समाजाचीं बिंगें बाहेर काढणाऱ्या साधनांचें आहे.'—अत्रे, नाशिकसंमेलन भाषण.

बिगा—बिगानि आस, नित उपास—[बिगाजा = दुसरा] दुसऱ्यावर अवलंबून असलें म्हणजे शेवटीं निराशा ठरलेली. तु०—जो दुसऱ्यावरी विश्वासला । त्याचा कार्यभाग बुडाला ।

बिगार—बैठेसे बिगार भली—रिकामें बसण्यापेक्षां बिगारीचें कां होईना पण काम करीत असणें चांगलें. काम केलें तर कांहीं तरी लाभ होण्याचा संभव असतो. रिकामें बसून कांहींच मिळत नाहीं.

बिगारीचें गाढव बिदीलाच चरणार—फुकटच्या गाढवाला खावयास कोण घालतो. त्याचेकडून काम घेऊन हांकूनच द्यावयाचें. ज्याला कोणी मालक नाहीं त्याची काळजी कोण घेतो?

बिगारीचें घोडें व तरवडाच फोंक—वेठीचें घोडें असलें म्हणजे त्यास मारण्यास तरवड या झुडुपाचा फोंक घेऊन मारावयाचें. असें कोणी स्वतःच्या घोड्यास करणार नाहीं. फुकटची वस्तु असली म्हणजे वाटेल तशी ताबडविणें.

बिगारीच्या कुत्र्यांनीं शिकार मारणें होत नाहीं—फुकट मिळविलेल्या साधनांनीं काम चांगलें साधत नाहीं. बिगारीचीं कुत्रीं शिकार करण्यास शिकविलेलीं नसणार तेव्हां त्यांच्याकडून शिकार पकडणें होऊं शकणार नाहीं.

बिछाना——बिछान्यासच जिरणें—अंथरुणास खिळणें.

बिछू——बिछुका मंतर ना ज्याने, सांपके बिलमें हात डाले—(हिं.) विंचवाचा मंत्र देखील माहींत नसतां सापाच्या बिळांत हात घालणें. लहान कार्यहि करण्याचें माहीत नसतांना मोठ्याला हात घालणें.

बिजवर——बिजवराची बायको, तिजवराची चोळी, नित्य लुगडें फाडी तिचें कोण काय करी?—बिजवर आपल्या बायकोस फार जपतो व तिला कपड्यांची वाण पडूं देत नाहीं त्यामुळें तिला लुगडीं चोळ्या किती पाहिजे तितक्या पुरवूं शकतो; त्याच्याहिपेक्षां तिजवर आपल्या बायकोचे लाड पुरवितो. पण ज्या बायकोला रोज नवें लुगडें लागूं लागलें तिला कोण पुरवूं शकेल? प्रत्येकाच्या प्रेमास किंवा सहनशीलतेस कांहीं तरी मर्यादा असते तिच्या पलीकडे गेल्यास कोणीहि सहन करीत नाहीं.

बिटकी——बिटकी उभारप—(गो.) गाशा गुंडाळणें.

बिट्टा——बिट्टा वासणें–ताणणें–मोकळा होणें–बाहेर पडणें–निघणें—१ परसाकडेस होणें; हगणें. २ (ल.) गाळण उडणें; जीव मट्टयाला येणें. 'सुपें टोपलीं बिगार वाहतां वाहतां बिट्टा वासला।'–अफला ६८.

बित्तं—बित्तंबातमी—खडानखडा माहिती; संपूर्ण बातमी; पूर्ण तपशिलासह माहिती. 'अबदल्लीच्या हालचालीची बित्तंबातमी समजण्यास मराठ्यांस कांहींच मार्ग नव्हता.'

बिदा——बिदा करणें—१ पाठवणी करणें; निरोप देणें. २ काढून टाकणें.

बिदागी——बिदागी तसें आख्यान—हरदासास ज्या प्रमाणें लहानमोठी बिदागी मिळावयाची असेल त्या प्रमाणें तो लहानमोठें आख्यान लावणार. तु०–जशी देणावळ तशी धुणावळ; दाम तसें काम.

बिदी——बिदीचें गाढव बिदीलाच येणार—जेथील वस्तु तेथेंच असावयाची. तु०–कुंभाराची सून उकिरड्यावर येणारच. बिगारीचें गाढव बिदीलाच चरणार. बिगार पहा.

बिंदु——बिंदूचा सिंधु करणारा—थेंबाचा समुद्र, एवढ्याचे एवढें करणारा. १ कवि. २ अतिशयोक्ति करणारा.

बिधरी——बिधरी तण तर शेतकरी फिरे वण-वण—शेतांत तण फार झाल्यास शेतकऱ्यास वणवण करीत फिरण्याची पाळी येते. तणानें शेत खाल्यास धान्य कोठून येणार?

बिन——बिनकदलीवर येणें—[बिनकदली = दुफाशी खेळांत जुगल्यानंतर कदली पडावी ती न पडल्यानें झालेला पराजय; असा पराभूत] चिरडीस येणें जाणें; भांडणास सुरवात करणें.

बिनभाड्याचें घर—(तुरुंगांत राहण्यास किंवा खाण्यापिण्यास कांहीं द्यावें लागत नाहीं यावरून उप.) तुरुंग; कैदखाना.

***बिन भाड्याच्या घरांत कज्जे दलाली**—तुरुंगांतहि तंटे करणें. म्हणजे आरोपी, गुलाम असतांहि निमूटपणें न राहणें.

बिन रोयोलडकाभी दूध नहीं पाता—(हिं.) मुलालाहि रडल्यावांचून दूध मिळत नाहीं. तक्रारीवांचून मिळत नाहीं. ठोठावल्या वांचून दार उघडत नाहीं, अशी खिस्ती म्हण आहे. तु०–दुःख वेशीवर टांगणें.

बिना मागे मोती मिले, मांगे न मिले भीक।—(हिं.) दैवाची घटना कशी विचित्र आहे पहा! ज्यांना तें अनुकूल असतें त्यांना विनायास मोठमोठे लाभ होतात आणि ज्यांना प्रतिकूल आहे त्यांना मेहनत करून, याचना करून भीक देखील मिळत नाहीं. किंवा विरक्त माणसाला सर्व कांहीं मिळतें. तु०–न मागे तयाची रमा होय दासी.

बिनामी——बिनामी व्यवहार—आपल्या पैशानें आपल्याकरितां परंतु दुसऱ्याच्या नांवावर व्यवहार करणें. सावकारांच्या किंवा सरकारच्या भीतीनें आपल्या नांवावर पैशाची उलाघाल न करणें.

बिनी——बिनीवर असणें—पुढें असणें; अघाडीवर असणें.

बिबवा;बिब्बा---(वर) बिबा घालणें-फासणें—(बिब्बा घातल्यास तो भाग उततो व जायबंदी होतो. यावरून) (एखाद्या कामांत) अडचणी उपस्थित करणें; हरकत आणणें.–संक ३.१.४३.

(आंत, मध्यें) बिब्बा घालणें—(नवराबायको, स्नेही, प्रेमीजन इ. यांच्यांत) वितुष्ट आणणें; कलागत लावणें. 'खचित कोणीतरी दुष्टानें मध्यें बिब्बा घातला.' –अतिपीडचरित.

बिब्बा चिडणें—रागावणें. 'चिडका बिब्बा चिडला, तेलांत जाऊन बुडला.'

बिब्बा फासणें—बिब्बा घालणें. काम नासणें; हरकत, अडचण उपस्थित करणें. 'नाहींतर, न जाणो, ती द्यायची तिकडे बिब्बा फासून!'–मोर १०.

बिब्बा येणें—बिब्बा उतणें; अंगावर बिब्यामुळें फोड, सूज इ. येणें.

बिबव्याचें शेवतें देणें—बिब्यांचीं फुलें दुधांत पाडून तें औषध देणें.

बिबी; बिब्बी—१ मुसलमान स्त्री, बायको. २ (ल.) गोषांतील स्त्री, बायको. ३ (उप.) घरांत बसून राहणारा; चारचौघांत न जाणारा.

***बिबि आये उमरीं, तो मिया चले कबरीं**—(हिं.) बिबी आली उमरींत, मिया चालले कबरींत;बाई आल्या पणांत बोवा बसले कोनांत, पहा.

मिया न् बिबी, तगारी उभी—[तगारी=थाळी, ताट] फक्त नवरा व बायको एवढींच दोन माणसें घरांत असल्याबर पसारा तो काय पडावयाचा. जेवण झालें कीं, ताट पालथें. सुटसुटीतपणा.

बीबीको बांदि कहा हंसादिया, बांदिको बांदि कहा रोदिया—(हिं.)बीबीला दासी म्हटलें तर ती नुसती हंसेल, पण दासीला दासी म्हणाल तर ती रडेल. अकुलीनाला, व्यंग असलेल्याना त्यांच्या हीनत्वाबद्दल कोणी बोललें तर वाईट वाटतें. नकट्याला नकटा म्हटलें तर राग येतो.

बिभूति--बिभूतीचें मूळ रेड्याच्या गांडींत—भस्म हें शेणापासून होतें व शेण रेडा हगतो. यावरून मोठ्या वस्तूंचें मूळहि क्षुल्लक वस्तूंत असतें. कोणत्याहि थोर, पवित्र गोष्टीची, व्यक्तीची चिकित्सा करूं गेल्यास असेंच कांहींसें सांपडणार. विभूति पहा. तु०-ऋषींचें कूळ आणि नदीचें मूळ पाहूं नये.

बियाणें--बियाण्यास नसणें—शेतकरी नवें धान्य आलें कीं प्रथम पुढील सालच्या बियाण्यास काढून ठेवतो, व मग बाकीचें वापरतो. पण येथें तें सुद्धां नसतें. पूर्णपणें संपणें; अगदीं बियास सुद्धां नसणें.

बिरयां--बिरयांक लागून काम करप--(गो.) हट्टास पेटून काम करणें.

बिरीज--बिरीज बिरीज होणें--टेंकीस येणें; फार त्रास होणें.

बिरुद—ब्रीद पहा.

बिरुद सत्य करणें—१ बाणा, अब्रू राखणें; सत्त्व राखणें. २ प्रतिज्ञा खरी करणें. 'मग कंठनाळ चरचर तो सत्य करावया बिरुद कापी।'–मोकर्ण ४५.१४.

बिर्मत, बिरामत-बिर्मत घेवप—(गो.) आरोप ठेवणें; आळ घालणें; कुंभाड रचणें; बालंट घेणें.

बिर्मत फुटप—प्रायश्चित भोगणें.

बिऱ्हाड--बिऱ्हाड आटोपणें—१ गाशा गुंडाळणें; स्थानत्याग करणें; जागा सोडणें. २ मरणें.

बिऱ्हाड उचलणें—तळ हालविणें; जागा बदलणें; निघून जाणें.

बिऱ्हाड करणें--१ वास्तव्य करणें. २ ठाणें देऊन राहणें; तळ देणें (रोग इ. नें शरीरांत).

***विंचवाचें बिऱ्हाड पाठीवर**—विंचवाची मुख्य दौलत काय ती त्याची नांगी. ती त्याच्या नेहमीं पाठीवर असते. त्याप्रमाणें एखाद्या सडेफटिंग मनुष्याचें सर्व सामान बहुतेक कांहीं नसतेंच व जें असतें तें नेहमीं त्याच्या जवळच असतें. सडासोट मनुष्य; आगापिच्छा नसलेला; जवळ फारशी चीज वस्तू नसलेला.

बिऱ्हाड बाजलें संगातीच असणें—घर, बायकामुलें इ. चा पाश नसणें; संसार इतका लहान अटोपता असणें कीं, तो बरोबर वागवितां येणें. अगदीं सडेसोट असणें.

बिवलकर--बिवलकरी कित्ता--वळण—पेशवाईच्या अखेरीस फडांत बिवलकर नांवाचे एक कारकून होते, ते कित्त्यांचें वळण काढून देत. त्यावरून, १ बिवलकरी वळण म्हणजे सरळ साधें वळण. ‘ महाराष्ट्रांत एकंदर नाटयाभिनयाचीं तीन वळणें......किर्लोस्करी, शाहूनगरवासी आणि महाराष्ट्रीय ...... शाहूंचें वळण बरेंच कठीण म्हणजे बिवलकरी कित्त्याप्रमाणें निसर्गस्वरूप असल्यानें तें यापुढें फार दिवस टिकेल असें वाटत नाहीं.’–गणपतराव चरित्र २२१. २ साधी बालबोध वागणूक.

बिवळा--बिवळा उतरणें—फुगलेलें पोट ओसरणें.

बिसनी--फुकट बिसनी आणि तंबाखु उसनी--[बिसनी=व्यसनी] फुकट पहा.

बिस्मिल्ला--मुर्गीस बिस्मिल्ला तो कशास--कांद्यास० पहा.–होकै ११.

बी, बीं--बीं दाणा शिळटणें—पेरलेलें बीं गारठून न उगवणें.

बीं फेकणें--बीं फेकून पेरणी करणें.

बीबुडी--बूड--१ पीक समूळ बुडणें; अजीबाद न पिकणें. २ नायनाट; उच्छेद.‘आशेची बीबुडी करी आधीं।’ –तुगा २७२७.

बीभरण--१ पेरणी. २ गर्भाधान; स्त्रीपुरुषसंबंध. ‘होईल कधीं बीभरण । आठवीन चरण ।’–प्रला २१८.

बी मोडणें--समूळ उच्छेद करणें; नायनाट करणें.

बी रुजणें—परिणामकारक होणें.

बी रुतणें—प्रवेश होणें.

***बीच मारली तर झाड कसें होईल**—कोणत्याहि कार्याच्या मूळ कारणाचा नाश केला तर तें कार्यच घडून येणार नाहीं.

बी तसा अंकूर—जसें बीं पेरावें तसलेंच झाड उगवतें. बाप तसा बेटा.–गांगा २७४.

बीं तसें भात—जसें बीं तसेंच भात पिकणार. खाण तशी माती याअर्थी.

बीच--बीचमें मेरा चांदभाई--चांदभाई पहा. —विक्षिप्त ३.३.

बीज--बीजांकुर न्याय--१ बीजापासून अंकुराची उत्पत्ति आणि अंकुरापासून बीजाची उत्पत्ति; आधीं झाड कीं आधीं बीं. जेथें दोन पदार्थ परस्परांचीं कारणें व कार्येंहि असूं शकतात, अशा ठिकाणीं योजतात. २ जसें बीं तसें फळ; जसें कर्म तसा परिणाम.

यथा बीज तथा अंकुर; बीज तसा अंकुर आणि झाड तसें फळ; बीज तसे दाणे, फळ—जसें बी किंवा मूळ बरें वाईट असेल त्याप्रमाणें फळ बरें वाईट येईल. बी पहा. ‘ बीज ऐशीं फळें । उत्तम कीं अमंगळ । ’ —तुगा ३२९१. ‘काय करील तया साखरेचें आळें । बीज तैसी फळें येतीं तया ।’—तुकाराम. ‘बीजा ऐसें फळ दावी परिपाकीं । परिमळ लौकिकीं जाती ऐसा ॥ ’–तुगा ३१२२. ‘ गोमट्या बिजाचीं फळेंही गोमटीं । ’ —तुगा ३१५४. ‘ बीज तैसें फळ येत असे गोड । ’–ब १२३. –विक ४३.

भ्रष्ट किंवा भर्जित बीज अंकुरत नाहीं; भर्जित किंवा भ्रष्ट बीजास अंकुर नाहीं; भाजलें बीज उगवत नाहीं; भाजलेल्या बीजास मोड येत नाहीं—बी भाजलें तर तें रुजत नाहीं. यावरून मुळांत कार्य नीट न केलें, मूळ जर नासलें तर त्याचें फळ मिळत नाहीं.

बियाह--बीयाह न कीया, बरातती देखी है—(हिं.) लग्न केलें नाहीं पण वरात पाहिली. तु०—लग्न केलें नसलें तरी मांडवाखालून तरी गेलें असेल. लग्न पहा.

बीर--बीर भरणें--भुताचा संचार करविणें.

बीर भरणें-देणें—उत्तेजन देणें; भर देणें; चेतविणें. ‘ त्यांना जिथें महाराज असतील तिथें जबरदस्तीनें जाऊन आपली दाद लावून घ्या म्हणून देतों बीर भरून ’ —उग्र १·३.

बीलाडी--बीलाडीनु हंसवुं थाय, ते उंदरनो जीव जाय--(ही म्हण अनेक भाषांतून आढळते.) (गो.) मांजराचा खेळ होतो पण उंदराचा जीव जातो. वरिष्ठांची करमणूक पुष्कळ वेळां कनिष्ठांना फार जाचक होते.

बीळ--बीळ उघडणें—१ घरटें, पोळें इ. उघडें पडणें. २ मुंग्या वगैरेचें पेंव फुटणें.

बीळ पाडणें—१ प्रवेशमार्ग खुला करणें. २ (ल.) संधान बांधणें; लग्गा लावणें.

*आयत्या बीळांत नागोबा—आयता पहा.

बिळांत ना रीघ आणि शेपडेक बांधतां सूप—(गो.) बिळांत शिरावयासच वाट नसतांना शेपटीला सूप आणखी कशास बांधावयाचें ? अल्पहि कार्य होण्याचा संभव नसतां आणखी मोठें कार्य होण्याची अपेक्षा करणें व्यर्थ होय. उंदीर पहा.

बुक——बुकिश नाटकें—मराठी गद्य (प्रोज) नाटकें. (रा. ब. का. बा. मराठे यांनीं हा शब्द रूढ केला.) 'शाहूनगरवासी नाटक मंडळी जरी बुकिश म्हणजे प्रोज नाटकांना मूर्तस्वरूप देण्यास कारणीभूत झाली,'—गणपतराव चरित्र १२१.

बुका——बुक्का लागणें-लावणें—(भाण.) कोणीतरी फसणें, फसाविणें.

बुक्का लावणें—(कथेकऱ्यानें पूर्वरंग संपाविला म्हणजे त्यास बुक्का लावतात यावरून) रजा देणें; निरोप देणें.

***बुक्या पुरुशाचें थापट वरें पुण मासळाकारणीचें आलिंगन नाको**—(गो.) अत्तरवाल्याची थापड बरी पण मासळीवाल्या बाईचें आलिंगन नको. कारण अत्तरवाल्याच्या थपडेनें गालाला सुगंध तरी लागेल. मासळीवालीच्या आलिंगनानें सगळ्या शरीराला दुर्गंधि ! मोठ्याच्या हातचा मारहि खावा व हलक्या माणसाचें बोलून घेऊं नये.

बुगड्या——बुगड्या गेल्या पण भोंकें राहिलीं—काप गेले० पहा. "मूळ चाल सुरू होण्यास झालेलीं कारणें जरी नष्ट झालीं तरी 'बुगड्या गेल्या पण भोंकें राहिलीं' या म्हणीप्रमाणें कोणतीही चाल त्या कारणाबरोबर नष्ट होत नाहीं."

बुचकळा——बुचकळ्यांत पडण—पेंच उत्पन्न होणें; साशंक होणें.

बुचकळी——बुचकळ्या खाणें—गटंगळ्या खाण; धडपड करणें.

बुचा—बुचा कारभार—लांडा कारभार. १ रिकामी अरेरावी. २ रिकामी लुडबुड.

***बुचे कारभारी आणि नकटे चौधरी**—लुडबुड करणारे; उपद्व्यापी.

बुटकळी——बुटकुळ्या खाणें—गटंगळ्या खाणें. बुचकळी पहा.

बुटली——बुटलीभट—(व.) बटु; ब्रह्मचारी.

***दीड बुटली, उरीं फुटली**—क्षुल्लक व्यक्तीनें गाजावाजा केला असतां म्हणतात.

बुट्टी-ट्टी——बुटी देणें; बुट्टी देणें—गुप्तपणें उत्तेजन देणें.

बुबी, बुट्टीस मारणें-देणें—गुंगारा देणें; चुकाविणें; टाळा देणें.

बुटी लावणें—हात बाजूला सारून, खालीं लवून, गुडघे टेकून, तोंडानें पाणी पिणें. 'पाणी बुटी लावून पिऊं ?'

बुट——बुटें काढून-नेऊन-हरून ठेवणें—[बुटें=गाडीच्या कण्यावरील फळी] (ल.) एखाद्या कामाचें जरूर तें साधन काढून घेणें; महत्त्वाची गोष्ट नाहींशी करणें.

बुटें गहाण ठेवणें—अत्यंत जरूर अशी वस्तु दुसऱ्याच्या स्वाधीन करणें.

बुडकी——बुडकीची विहीर नव्हे, पाटाची बायको नव्हे—(कानडी) भुडकी भावी इल्ला, 'उडकी हेंडती इल्ला. भुडकी म्हणजे नदी, ओढा इ. च्या पात्रांत सांचलेल्या पाण्याची खांच; ती खरी विहीर म्हणतां येणार नाहीं. त्याचप्रमाणें पाटाची बायको पहिल्या बायकोप्रमाणें वागणार नाहीं. या दोन्ही गोष्टी आपद्धर्म म्हणून जवळ कराव्या लागतात एवढेंच !

बुडणें—बुडतठाव—बुडण्याइतकी खोली.

बुडता काळ—र्‍हासकाळ; हीनदशा; अधोगति.

बुडता पाया—उतरती कळा.

बुडालेल्या घरचा मोड—कुटुंबांतील सर्व माणसें मरून जाऊन शिल्लक राहिलेला एकच मुलगा.

बुडीत खर्च—ज्यापासून कांहीं लाभ होत नाहीं असा खर्च; फुकट खर्च; पुन्हां परत मिळणार नाहींत अशा गोष्टींत झालेला खर्च.

बुडून शॅंवाळॉ सांपडत—(गो.) बुडून शेवाळ हातीं लागणें. मोत्यांच्या शिंपल्यासाठीं पाण्यांत बुडी

मारावी आणि शेवाळ हातीं लागावें असे प्रकार पुष्कळ वेळां आयुष्यांत घडतात.

बुडता पाय खोलीकडे; बुडत्याचा पाय खोलांत—मनुष्य एकदां अधोगतीला लागला म्हणजे खालीं खालींच जाऊं लागतो.–पामो ५६५. तु०–(अ) अधोधो गंगेयं पदमुगतं स्तोकमधुना। विवेक भ्रष्टानां भवति विनिपातः शतमुखः। (आ) विनाशकाले विपरीत बुद्धिः। 'ह्या खरमरीत उत्तरानें म्हटलें असतां बाजीरावाचे डोळे उघडयाला पाहिजे होते, परंतु बुडत्याचा पाय खोलांत म्हणतात त्याप्रमाणें त्याची दिवसेंदिवस स्थिति होत चालली.' –एल्फिन्स्टन चरित्र १.२०५.

बुडतीचे पाये डोहाकडे—(महानु.) जिला बुडून मरण यावयाचें असतें ती आपोआप डोहाकडे जाते. प्राक्तन ओढून नेत असतें.

बुडत्या घरचा तरता वासा—जेथें सर्व नाश होत असेल तेथें जें वांचेल किंवा हातीं लागेल तें वांचवावें. तु०–जळत्या घरचा पोळता वांसा.

बुडत्याला काडीचा आधार—एखादा मनुष्य बुडूं लागला म्हणजे एखादी काडी सांपडली तरी हातांनीं धरतो. मनुष्य निराश झाला म्हणजे क्षुल्लक वस्तूचाहि आधार मिळाला तरी घेऊं पाहतो. (गो.) बुडल्याक काडिये आधार. , लोकशाहीच्या धिम्या कारभारांत महत्वाच्या गोष्टी घडविण्यास व तरतुदी करण्यास अक्षम्य विलंब लागतो. तथापि "बुडत्याला काडीचा आधार" ह्या म्हणीप्रमाणें सर जेम्स यांच्या सैनिक-घटनेकडे ब्रिटिश जनता आशेनें पहात आहे.'–केसरी १३.३.४२.

चढेल तो पडेल, पोहेल तो बुडेल—चढणें पहा.

बुडबुड—**बुडबुडगंगा**—(उभे राहून तांब्यानें डोक्यावर पाणी घेतांना बुडबुड आवाज होतो तोच गगेंत बुडी मारण्याचा प्रतीक समजावा.) मुसळस्नान; धोपटस्नान.

बुडी—**बुडी मारणें-देणें**—१ पाण्यांत जाणें व कांहीं काळ पाण्यांतच राहणें. २ कांहीं काळ पळून जाऊन दडून बसणें. ३ कांहीं साध्यास्तव प्रयत्न करणें.

शंभर बुड्या मारून गांड कोरडी दाखविणारा—(राजा.) कर्म करून अलिप्तपणा दाखविणारा. करून सवरून नामानिराळा राहणारा.

बुडूख—**वडिलांचें बुडूख आणि नाचे तुडक तुडक**—थोडेंसें महत्त्व मिळाल्याबरोबर मिजास दाखविणारा.

बुड्ढा—**बुड्ढा तोता, पढता नाहीं**—(हिं.) म्हातारा पोपट बोलत नाहीं. म्हातारपणीं स्मरण नसतें.

बुड्ढापेका ब्याह पडोसियाके वास्ते—(हिं.)म्हाताऱ्याचा विवाह शेजाऱ्याकरितां. वृद्धपणीं लग्न केल्यास बायको धाकांत राहात नाहीं व ती परद्वार करण्याचा संभव असतो.

बुड्ढा-बाला बराबर होता हैं—वृद्ध आणि बालक सारखेच असतात. बालदशा मनुष्याला दोनदां येते. तु०–Old age is anothr childhood.

बुड्ढी घोडी, लाल लगाम; बुड्ढे घोडीकू लाल लगाम—वृद्धपणीं नखरा करणारी स्त्री. An old ewe dressed lamb fashion. 'कांहीं भारदस्त विषय आणि भारदस्त छंद यमकाच्या जोडीनें "बुड्ढी घोडी, लाल लगाम" दिसूं लागतात.'–काका कालेलकर.

बुंद—**बुंदसे गई वो हौदसे आती नहीं**—(हिं.) क्षुल्लक गोष्टीकरितांहि एकदां नापत झाली म्हणजे ती कितीहि मोठ्या गोष्टीनें भरून येत नाहीं. एकदां बादशहा व बिरबल एकत्र बसले असतां बादशहा अत्तर लावीत होता त्याचा एक थेंब खालीं पडला; तो फुकट जाऊं नये म्हणून बादशहानें जमिनीवरून बोटानें पुसून घेतला व हातास लावला. हें बिरबलानें पाहून त्याच्याकडे जरा तुच्छतादर्शक दृष्टीनें पाहिलें; कारण बादशहाला एक अत्तराचा थेंब फुकट गेलेला सहन होत नाहीं असें त्यास दिसून आलें. बादशहाच्या ही गोष्ट लक्षांत येऊन बिरबलाच्या मनांतील हा किंतु निघून जावा म्हणून त्यानें एका दिवशीं मजलसींत अत्तरांचे हौद भरून ते लोकांच्या अंगावर उडविले. त्यावेळीं बिरबल बादशहाकडे पाहून म्हणाला कीं, 'बुंदसे गई वो हौदसे आती नहीं.' 'आतां बोलावण्यांत काय अर्थ आहे? बुंदसे गयी वो हौदसे नहीं अती.'–प्रतिज्ञा २७७.

बुदवंत—**बुदवंत तीनकडे**—(गो.) शहाण्याला तीन ठिकाणीं. एक गृहस्थ फार शहाणा होता. कुठल्याहि गोष्टीची चिकित्सा करण्याची त्याला भारी खोड. एकदां रस्त्यांतून जातांना त्याचा पाय घाणींत पडला. काय बरें पायाला लागलें असावें म्हणून त्यानें ती घाण हाताच्या बोटाला लावून घेतली. तेवढयानेंहि उलगडा होईना

म्हणून वास घेण्यासाठीं त्यानें ती नाकाला लावली. अशा रीतीनें पाय, हात आणि नाक या तीन्ही ठिकाणीं ती घाण लागली. फाजील शहाणपण हास्यास्पद होतें तें असें.

बुद्वंताक फातरां शात—(गो.) अतिशहाण्याच्या कपाळीं धोंडा. तु०—अतिशहाणा त्याचा बैल रिकामा.

बुद्वंताक बुद्धि सांगची रेवेरि उदाक, पिश्याक बोध सांगचो अळवारि उदाक—(गो.) शहाण्याला ज्ञान सांगितलें तर तें वाळूंवरील पाण्याप्रमाणें आंतल्या आंत जिरतें आणि मूर्खाला उपदेश केला तर तो अळवावरच्या पाण्याप्रमाणें वरच्यावर निघून जातो. शहाणा शहाणपणाच्या घमेंडीवर दुसऱ्याचा सल्ला ऐकत नाहीं आणि मूर्खाला त्याचें आकलनच होत नाहीं.

बुद्वंताक सोदका जाता, पिसो खंईं मेलता—(गो.) शहाणा माणूस हुडकून काढावा लागतो; मूर्ख वाटेल तिथें आढळतात.

बुद्धि—**बुद्धि कळसाला चढणें**—बुद्धीची फाजील वाढ होणें. (उप.) बुद्धि चळणें. 'विचारें या व्हावा निखिल निज राज्यांत वळसा। चढे बाळे, कैसी असरळ तुझी बुद्धि कळसा।'—सारुह ६.१२४.

बुद्धि फाकणें—१ गोंधळणें. २ आकलनशक्ति वाढणें.

बुद्धि करणें-सांगणें—उपदेश करणें; सल्ला देणें; शिकविणें.

बुद्धीचा खंदक—पूर्णपणें मूर्ख. अक्कलेचा खंदक पहा.

बुद्धीचा खोटा—दुष्ट; वाईट, कठोर मनाचा. तु०—'पाखरूं हें मारणें बुद्धि खोटी।'—नल २११.

बुद्धीचा जड—मंदबुद्धीचा.

बुद्धीचा सागर—१ अत्यंत बुद्धिवान. 'भले बुद्धिचे सागर नाना। ऐसे नाहीं होणार।'—ऐपो ४३९. २ (उप.) अत्यंत मठ्ठ.

बुद्धीनें स्वर्गास जाणें—नुसत्या ज्ञानाच्या जोरावर मोठीं कृत्यें करणें.

बुद्धीशीं वैर करणें—स्वतःच्या बुद्धीला सुचेल तसें न वागणें; सदसद्विवेक बुद्धि बाजूला ठेवणें. 'अशा प्रसंगीं बुद्धीशीं वैर करणें चांगलें नाहीं.'—इंप.

बुद्धीस लागणें—तंत्रानें चालणें; नादीं लागणें.

***बुद्धि आस्सिल्ल्याक भंडार जायवे**—(गो.) बुद्धिमान मनुष्याला नुसता संपत्तीचा सांठा आवडतो काय? याचा अर्थ एवढाच कीं संपत्तीपेक्षां बुद्धि ही जास्त मौल्यवान आहे. बुद्धिमानास भांडवल लागत नाहीं.

बुद्धिः कर्मानुसारिणी—दैवाप्रमाणें। मनुष्यास वेळेवर बुद्धि सुचते. संबंध श्लोक असाः—(अ) सत्यानुसारिणी लक्ष्मीः कीर्तिस्त्यागानुसारिणी। अभ्याससारिणी विद्या, बुद्धिः कर्मानुसारिणी॥—सुर १५७.१८८. (आ) किं करोति नरः प्राज्ञः प्रेर्यमाणः स्वकर्मणा। प्रागेव हि मनुष्याणां बुद्धिः कर्मानुसारिणी॥ (इ) कर्मायत्तं फलं पुंसां बुद्धिः कर्मानुसारिणी। तथापि सुधिया भाव्यं सुविचार्यैव कुर्वता॥—समपद्य.

आधी बुद्धि जाते मग लक्ष्मी जाते—आधी पहा.

बुद्धि दगडाची, कृति शूराची—बुद्धिहीन मनुष्यहि पराक्रमी असूं शकतो.

ज्यास बुद्धि नाहीं, त्यास भांडवल नाहीं—बुद्धिवानास वाटेल तेवढा पैसा मिळतो. ज्याच्याजवळ बुद्धि नसते त्याला पैसाहि मिळत नाहीं.

बुद्धिर्यस्य बलं तस्य।—ज्याच्या जवळ बुद्धि असते तो बलवान असतो. त्याला पराक्रम करतां येतो. बुद्धिर्यस्य बलंतस्य (यस्य बुद्धिर्बलं तस्य) निर्बुद्धेस्तु कुतोबलम्। वने सिंहो मदोन्मत्तः शशकेन निपातितः॥—पंच १.२३७. [एका रानांत एक सिंह राहात होता. तो फार पशू मारून खाऊं लागला. म्हणून सर्व श्वापदांनीं एकत्र जमून त्याच्याशीं आहाराकरितां रोज एक पशु पाठविण्याचा करार केला व पाळीपाळीनें एकेक पशु पाठवूं लागले. एके दिवशीं सशाची पाळी असतां तो मुद्दामच खूप उशीर करून गेला. तेव्हां सिंह अगदीं क्षुधातुर होऊन अतिशय रागावला होता. एक लहान ससा पाहून त्यास फारच राग आला. तेव्हां त्यानें सशास रागावून उशीराचें कारण विचारलें. तेव्हां त्यानें आपण लहान असल्यामुळें आणखी तीनचार ससे बरोबर घेऊन येत असतां वाटेंत एका सिंहानें आपणांस अडवून इतर सशांस खाऊन टाकलें व मी कसाबसा पळून येथें आलों, असें सांगितलें. त्यावर सिंहानें तो दुसरा सिंह कोठें आहे म्हणून विचारतांच त्यानें त्यास एका विहिरीवर नेऊन आंत पहावयास सांगितलें. तों

त्यास पाण्यांत आपलेंच प्रतिबिंब दिसलें. तेव्हां त्यानें मोठी गर्जना केली. तिचा प्रतिध्वनि त्यास मोठ्यानें ऐकूं आला. त्याबरोबर त्यानें आंत उडी मारली व प्राणास मुकला. याप्रमाणें सशानें युक्तीनें सिंहास मारलें.

बुद्धि सांगे पोर, त्यास म्हणावें थोर—लहान मुलापासून अक्कल घ्यावी व त्याचें महत्त्व कबूल करावें. तु०—बालादपि सुभाषितं ग्राह्यम् ।

बुद्धि ही विद्येपेक्षां श्रेष्ठ आहे--विद्या पुष्कळ अध्ययन करून मिळवितां येते पण बुद्धि जात्याच लागते. ती नसल्यास अध्ययनाचाहि कांहीं उपयोग होत नाहीं. अक्कल पहा.

बुद्धीनें जड, पण शीलानें धड—जो मनुष्य मंद-बुद्धि असूनहि शीलवान् असतो त्याच्या बाबतींत म्हणतात. कमी बुद्धिवान् शीलभ्रष्टापेक्षां अधिक बरा.

बुद्धीसारखें फळ--जसें चिंतावें तसें मिळतें. वासना तसें फळ, पहा.

बुद्धिमानाला साहाय्याची गरज लागते—बुद्धि-वान् मनुष्यालाहि प्रसंगीं दुसऱ्याची मदत लागतेच. तो एकटाच सर्व कांहीं करूं शकत नाहीं.

बुद्धिवानाचा हात लांब—बुद्धीनें कितीहि दूरची वस्तु मिळवितां येते.

बुध—बुद्धि पहा.

बुध--आगळ बुध वाणिया, पाछळ बुध बामणिया--(गु.) आगळ पहा.

बुध करी शुद्ध—(महानु.) बुधग्रह अनुकूल असला म्हणजे चांगली गोष्ट घडते.

बुध भेसा आणि नव नेसा—बुधवारीं व गुरुवारीं नवीन वस्त्र नेसावयास काढावें, कारण हे शुभवार आहेत.

बुध भेसा, नवें नेसा, शनवार आइतवार कशाला पुसा--बुधवारीं व गुरुवारीं नवीन नेसावें. शनि-वारीं, आदितवारीं नेसूं नये; कारण ते अशुभवार आहेत.

जाशी बुधीं, येशी कधीं—जाणें पहा.

बुधे भेटी, ने फरी नहीं भेटी; बुधे वळावी बेटी ते कदी न आपने भेटी--(गु.) बुधवारीं मुलगी सासरीं गेल्यास ती पुन्हां भेटत नाहीं अशी समजूत आहे. तु०—जाशी बुधीं येशी कधीं.

बुधवार—बुधवारणें—म्हैस बुधवारीं विणें. हें अशुभ समजतात.

बुधवारी पंचा--आंखूड पंचा; ढोंपरा पावेतों पुर-णारा पंचा. हे पंचे पुण्यास बुधवार पेठेंत मिळत यावरून.

***नवऱ्यास नाहीं थांग, बुधवारचें लग्न**—कशास कांहीं पत्ता नसतां तिथिनिश्चय करणें, कांहीं ठरविणें.

बुधला-ली—बुधली उताणी पडणें; बुधली भोंवतीं येणें—लबाडी उघडकीस येणें.

***तोंडीं तीळ,गांडीस बुधली**—अतिशय उतावीळ-पणा. तोंडांत तीळ टाकल्याबरोबर त्याचें तेल बाहेर पडेल अशी अपेक्षा. तु०—पी हळद हो गोरी. रात्रीं खाई तूप सकाळीं पाही रूप.

बुधली वर आली—एका मनुष्यानें तेलाची बुधली चोरून पाण्यांत लपवून ठेवली होती. जेव्हां आंतील तेल संपलें तेव्हां ती पाण्यावर तरंगूं लागून त्याची चोरी उघ-डकीस आली. यावरून केलेलें पाप उघडकीस येणें.

बुधलाभर तुप खाऊन बुधल्याचा माल नाहीं; बुधलीभर तूप खावून बुधलीचा माल नाहीं--पुष्कळ घेऊन अल्प मोबदला देणें.

बुन्याद--बुन्याद होणें—(व.) अखेर होणें.

बुबुळ—बुबुळें थिजून जाणें—डोळे पांढरे होणें. (ल.) अतिशय दुःख होणें. 'त्याच्या बायकोला पाहिलें म्हणजे बुबुळें थिजून जातात.'—इंप.

बुभुक्षित—बुभुक्षितः किं न करोति पापं ।—, लोभी भुकेला माणूस कोणतें पाप करण्याचें शिल्लक ठेवील? असा माणूस वाटेल तें करील. सबंध श्लोकः—(अ) बुभुक्षितः किं न करोति पापं, क्षीणा नरा निष्करुणा भवन्ति। प्राख्याहि भद्रे प्रियदर्शनस्य न गंगदत्तः पुनरेतिकूपं॥—पंचतंत्र ४.१६. [एका विहिरींत गंगदत्त नांवाचा एक बेडूक राहात होता. त्याचें भाऊबंदांशीं वांकडें आल्यावर त्यानें प्रियदर्शन नांवाच्या एका सापाला भाऊबंदांचा नाश करण्यासाठीं विहिरींत आणलें. सापानें सर्व भाऊबंदांना खाल्ल्यावर तेथून जाण्याचें नाकारलें व गंगदत्ताच्या कुटुंबांतील बेडकां-वर ताव मारूं लागला. शेवटीं एकटा गंगदत्त राहिला. त्याला फार पश्चात्ताप झाला पण करतो काय? स्वतः तरी निसटावें म्हणून, दुसऱ्या विहिरींतील बेडकांना घेऊन येतों

अशी थाप मारून बाहेर पडला. सापानें बराच काळ त्याची वाट पाहून तेथील एका घोरपडीला गंगदत्तास घेऊन येण्यासाठीं पाठविलें. गंगदत्तानें वरील श्लोक सांगून परत येण्याचें साफ नाकारलें.] (आ) त्यजेत् क्षुधार्तो महिलां स्वपुत्रं । खादेत् क्षुधार्ता भुजगी स्वमण्डं ॥ बुभुक्षितः किं न करोति पापं । क्षीणा नरा निष्करुणा भवन्ति ॥–हितोपदेश.

बुरटा--**बुरटा चोर**—उचल्या; भुरटेचोर.

बुरटी चोरी--किरकोळ चोरी; उचलेपणा.

बुरणूस--**बुरणूस बुद्धि**--बुरणुसांत दाभण टोंचला म्हणजे भोंक पडतें, पण दाभण बाहेर काढला कीं पुनः भोंक न दिसतां जसेंच्या तसें राहतें. त्याप्रमाणें कोणताहि विषय समजावून देत असतांना फक्त लक्षांत राहणें पण मागाहून त्याचें बिलकूल स्मरण नसणें, अशी बुद्धि. याच्या उलट तैलबुद्धि.

बुरा--**बुरेके बुराईसें डरीये**--(हिं.) दुष्टाच्या दुष्टपणाला भ्यावें लागतें.

बुराण—**बुराणजी कापशा**--(व.) स्वतःला फाजील महत्त्व देणारा.

बुरुज—**बुरजांत जाणें**—(बुद्धिबळांत) राजा हत्ती पलीकडे जाणें.

बुरुजी तुरा--बुरुजाच्या आकाराचा फुलांचा गुच्छ.

बुलबुल--**बुलबुलचष्मी**--बुलबुलपक्ष्याच्या डोळ्यासारखे कांठ ज्याला आहेत असें वस्त्र.

बुवा--**बुवा गयावळ आणि बाई चंद्रावळ**—अजागळ नवऱ्याची नखरेबाज बायको.

बुवा तेथें बाया, वृक्ष तेथें छाया--साधूचा वेष घेतलेले बुवा असतील तेथें त्यांच्या सभोंवतीं बायकांचा घोळका असावयाचाच. वृक्षच्छायान्यायाप्रमाणें या दोघांचें एकत्र अस्तित्व आढळतें.–नर्स सुंद्राबाई ५७.

बुवा तेथें बाया आणि ब्रह्म तेथें माया--वरप्रमाणेंच. साधूच्या मागें नेहमीं बायका लागतातच. जसें ब्रह्म हें सर्वत्र मायेनें गुरफटलेलें आहे त्याप्रमाणें.

बुवाचे तुरे लाल, बाईचे रे हाल--एकाची चैन, दुसऱ्याचे हाल.–लक्ष्मीबाई टिळककृत, स्मृतिचित्रें, २.१३२.

बुळबुळ—**बुळबुळ पंचांग**—अजागळ, बावळट माणूस.

बू--**बू बाहेर पडणें-दाखविणें**—ढोंग, स्तोम उघडकीस येणें.

बू दाखविणें--१ बाऊ, भीति दाखविणें. २ पोकळ प्रदर्शन करणें.

बूच--**बूच उडविणें-बडविणें**--(दारूच्या बाटलीला बूच असतें तें दारू ग्लासांत ओतण्यासाठीं काढावें लागतें. त्यावेळीं त्याचा आवाज होतो यावरून.) दारू पिणें.

बूट--**बूट काढणें**--टूम निघणें; नवीन विचार प्रसृत करणें. 'असा एक बूट काढिला होता कीं, नवऱ्याकडे जाण्यास बायको नाखूष असल्यास......'–टि. ४.४४.

बूट कातरणें—कारस्थान, खलबत करणें.

बूट निघणें--बूट काढणें पहा. वेगळा प्रश्न, विषय, विचार निघणें. 'हा नवाच बूट निघाला. आम्ही घटवटना ही जी मांडिली आहे ती व्यर्थच तर !'–कीर्तनें, जयपाळ.

बूट बाहेर पडणें--रहस्य उघडकीस येणें.

बूट--**बूट दिवप**--(गो.) जनावरांच्या विशिष्ट रोगांवर इलाज म्हणून बांबूच्या काडीनें डाग देणें.

बूड--**बूड जड**--जड पहा. १ श्रीमंत: जड बुडाचा पहा. २ प्रतिष्ठित.

बूड टेकणें--थोडा वेळ बसणें; स्थिर होणें.

***बुडांत नाहीं तर वर कोठून येणार ?**—आडांत नाहीं तर पोहऱ्यांत कोठून येणार, याप्रमाणें. आड पहा.

बृहती—**बृहती तंतरणें-मारणें**—(अशिष्ट.) गुदमैथुन करणें. एक शिवी. 'एकानें पुढें डोचकें कापावें, एकानें मागें बृहती मारावी (व) डोकें कापून न्यावें तें सरकारांत रुजू करावें.'–भाव ५७. यावरून फसविणें; नागवणें.

बृहन्नडा—१ अर्जुन विराट राजाच्या घरीं नाचगाणें शिकविण्यासाठीं राहिला असतां घेतलेलें नांव. २ तृतीय पुरुषी; हिजडा.

बृहन्नडेप्रमाणें नेमस्तपणाचें व्रत—नपुंसकाप्रमाणें मिळमिळीतपणा.–टि ३.२१.

बृहस्पति—देवगुरु; गुरुग्रह. (उप.)वाचाट;बडबड्या.

बोलून बृहस्पति—बाष्कळ बडबड करणारा.

बृहस्पतीसो उलयता, शेणांत तोंड घालता—(गो.) बृहस्पतीसारखा बोलतो, पण शेणांत तोंड घालतो. पुष्कळ माणसें अशीं दिसतात कीं त्यांचें तत्त्वज्ञान तेवढें ऐकून घ्यावें. कृति पाहिली तर अगदीं अशिष्ट, हिडिस.

बे--बे मोहडांनी चाकल—(गु.) दुतोंड्याचा विश्वास धरूं नये.

बें— बें करणें-म्हणणें—बकरें बेंबें असा आवाज करतें यावरून बकऱ्याप्रमाणें शरण जाणें; गरीब होणें; हार खाणें.

बेकार---बेकार ठवय कुलॅ तासूता; बेकार मेस्त गांड तासता--(गो.) रिकामा सुतार स्वतःचेंच कुल्हे ताशीत बसतो. रिकामा न्हावी भिंतीला तुंबड्या लावी.

बेगसार---बेगसार झुरे, त्याची नखलामी उरे—(गो.) जो लवकर मरतो त्याची मागें खूण उरते. तु०- It is not growing like a tree, that makes men better be... A lily of a day, is fairer far in May.

बेचाळीस—बेचाळीस (कुळें) उद्धरणें-(आईकडील २१ पिढ्या व बापाकडील २१ पिढ्या मिळून बेचाळीस पिढ्या). सर्व पूर्वजांवरून शिव्या देणें; अतोनात शिव्या देणें.

बेचाळीस पूर्वजांसह नरकवास भोगणें--पतित होणें; अत्यंत हीन अवस्था प्राप्त होणें. 'जर असत्य होईल तर बेचाळीस पूर्वजांसह खास नरकवास भोगीन.'-सुरत सुधन्वा २४.

बेचाळीस स्मरून चाल--आपल्या बेचाळीस पिढ्यांना बट्टा लागूं नये अशा रीतीनें वाग. सुपुत्र बेचाळीस पिढ्या उद्धरतो तर कुपुत्र त्यांना नरकांत लोटतो.

(कागद, पत्र, लखोटा इत्यादींवर) बेचाळीसचा अंक असणें--पत्रांत मृत्यूची खबर असणें.

बेचाळीसचा अंक घालणें--१ बेचाळीस पूर्वजांस शिव्या देणें. २ ज्याचें त्यानेंच फोडावयाचें असें सुचविणारा ४२ आंकडा पत्रावर घालणें.

बेट--बेटीं लागणें--१ (पोहणारा) तडीस लागणें. २ एखादें कार्य रंगारूपास येणें.

बेटा-टी---बेटा-बेटी करणें--लग्न करणें.

***पहिला बेटा, भिकार चोटा**--पहिला मुलगा बहुधा मूर्ख निघतो.

पहिली बेटी, तूपरोटी; पहिली बेटी, मालाची -धनाची पेटी--पहिली मुलगी भाग्यवान् असते.

बेटी बापाची, जमीन बादशहाची—ज्या प्रमाणें राजाची सर्व भूमीवर पूर्ण सत्ता असते त्याप्रमाणें बापाची मुलीवर पूर्ण सत्ता असते; तो तिला वाटेल त्या स्थळीं देऊं शकतो.

बेंड--बेंड फुटणें-बाहेर येणें-बाहेर पडणें--गुप्त गोष्ट उघडकीस येणें.

बेडकी---बेडकीचें कुलुप—एक प्रकारचें कुलूप. नळीच्या कुलुपाच्या उलट.

बेडा; बेहडा--बेडा पार होणें-जाणें-असणें-करणें—१ सैन्यांतून, पहाऱ्यांतून, हद्दींतून पलीकडे जाणें. २ स्वतःची कार्यसिद्धि होणें. शब्दकोश बेहेडा पहा.

बेडी---बेडी घालणें-अडकाविणें—(लग्न म्हणजे एक बंधनच होय.) लग्न करणें.

आपल्या हातानें आपल्या पायांत बेडी घालून घेणें--आपण होऊन संकट ओढून घेणें.

बेडूक---बेडकानें चिखल खावा। काय ठावा सागर--तुगा ३२६४. बेडकाला नेहमीं डबक्यांत बसून चिखल खाण्याची संवय. त्याला समुद्राची किंमत काय कळणार! क्षुद्र मनुष्याला मोठ्या वैभवाची किंमत कळत नाहीं. तु०-बसणें थिल्लरीं। बेडूक सागरा धिक्कारी। -तुगा २८९४.

बेडकाला डबकें, त्याला जग पारखें—बेडकाला आपल्या डबक्याशिवाय बाहेरचें सर्व जग दूर असतें. त्याला डबक्या पलीकडचें ज्ञान नसतें. त्याप्रमाणें मंदबुद्धि लोक केवळ स्वतःभोंवतीं पाहात असतात. त्यांना विशाल दृष्टि असणें शक्य नाहीं. कूपमंडूकवृत्ति.

बेंड्या---बेंड्या बेंड्या वय केली ? वाऱ्यान् नेली—बेंड्याला वय-कुंपण घालावयास सांगितली असतांना घातल्यावर वाऱ्यानें उडून गेली असें तो सांगतो. यावरून मूर्खाला काम सांगितलें असतां तो तें न करतां भलतीच सबब सांगतो.

बेत---बेतावर असणें—१ नियमाप्रमाणें असणें. २ बेतशीर असणें.

*बेत बाजीरावाचा, उजेडाला दिवासळी नाहीं; बेत बाजीरावाचा, उजेड सणकाड्यांचा—[दिवासळी=गंधकाडी, आगकाडी] गाजावाजा खूप करावयाचा पण प्रत्यक्ष पहावें तों भिकार स्थिति असावयाची.

बेताळ—वेताळ पहा. बेताळाक ना बायल आनी भावका देवतेक ना घोव—(गो.) वेताळाला नाहीं बायको आणि भावकाईला—सटवाईला नाहीं नवरा. या दोन क्षुद्र देवतांना अनुरूप असा जोड मिळत नाहीं. तेव्हां आपण परस्परांना अनुरूप आहोंत असेंच तीं समजतात. सव्यंग अशा वधुवरांना आपआपसांतच वधू किंवा वर शोधावा लागतो व त्यांतच त्यांना संतुष्ट राहावें लागतें. किंवा समान दोष असणारांना परस्परांची संगतच बरी असते. तु०—झसोबास नाहीं बायको, सटवाईस नाहीं नवरा.

बेदर्द—बेदर्द कसाई, क्या ज्याने पीड पराई—(हिं.) कसायाला दुसऱ्याचें दुःख माहीत नसतें. कठोर माणसाला दुसऱ्याचें दुःख पाहून दया थोडीच येणार.

बेदिल—बेदिल नोकर, दुष्मन् बराबर—फितुर किंवा असंतुष्ट नोकर हा शत्रूप्रमाणें समजावा.

बेंदूर—बेंदूर आणि आलें शेणाचें लेंडूर—(क.) मुद्दाम एखाद्याचा गौरव करावयाच्या वेळींहि त्याच्या खोडी लक्षांत आल्यावांचून राहात नाहींत.

बेबंद—बेबंद नगरी आणि झोंटिंग बादशाही—अंधेर नगरी झोंटिंग पादशाही. अंधार पहा.—V. S.२.७०.

बेबदो—बेबदो जावप—(गो.) दारूनें बेशुद्ध होणें.

बेबल—बेबलच्या बुरूजावरील भाषा—[बाबेल (बाबिलोन) येथें एक आकाशाला जाऊन भिडेल इतका उंचबुरूज बांधण्याचें काम चालू होतें. परमेश्वरास तें न आवडून त्यानें तेथें कामावर असलेल्या लोकांच्या भाषेंत गोंधळ करून कोणाची भाषा कोणास समजणार नाहीं असें केलें. त्यामुळें अव्यवस्था माजून काम तसेंच पडून राहिलें. याप्रमाणें जगांत अनेक भाषा निर्माण झाल्या.] भाषेचा गोंधळ; भाषावैचित्र्य.—मन्वंतर फेब्रवारी, १९४२.

बेंबी—बेंबीचा देठ पिळणें; बेंबीचा देठ पिळून दुखूं लागणें; बेंबीच्या देठापासून कळवळा येणें—माया येणें—अतिशय कळवळा येणें, वरवरची माया नव्हे तर अगदीं मनापासून माया असणें.

बेंबीच्या देठापासून—अगदीं अंतःकरणापासून, खऱ्या भावनेनें.

बेंबीच्या देठापासून जोर करून बोलणें—सर्व शक्ति खर्चून बोलणें; फार मोठ्यानें, जोरानें बोलणें.

बेंबीचें उखळ होणें—झालें—लठ्ठ होणें; स्थूल होणें; खूप खाण्यापिण्यास असून काम नसल्यामुळें दोंद सुटणें. 'हे कोण बायकोचे साले । तुपावेगळा घास न गिळे । तांदुळ रांधियले मोकळे । केलें बेंबीचें उखळ । या तुझा चालता काळ ॥ '—अमृत.

*बेंबीखालील केस, ना केसांत जमा, ना शष्पांत जमा—निरुपयोगी वस्तु. अजागळ स्तनाप्रमाणें निरर्थक.

बेरीज—बेरीज भरती—शेवटीं बेरीज बरोबर येण्याकरितां घातलेली खोटीच भर; लबाडीनें घातलेली भर.

बेल—बेल घालणें; बेल घालीत फिरणें—कोठल्यातरी झाडाचा बराच बेल तोडून तो इकडे तिकडे वांटीत सुटणें. १ (ल.) विनाकारण गांवांत भटकणें. २ निरर्थक गप्पा गोष्टी करीत घरोघरीं फिरणें. 'खूप खूप बडबडल्यानंतर त्या शेजारच्या घरीं बेल घालण्याकरितां निघून गेल्या.'—रम्य रात्री, पा. ११७.

बेल देऊन आंवळा काहाडणें—उलटा व्यवहार करणें; आंतबट्याचा व्यवहार करणें.

बेलपत्र ठेवणें—वस्तूवरचा हक्क सोडणें.

बेलभंडार उचलणें-काढणें—देवावरचा बेल व भंडार उचलून शपथ घेणें. (सामा.) शपथ, आणभाक घेणें. 'मराठे बेलभंडार उचलून एकदां बेफाम होऊन निघाले म्हणजे त्यांच्या हल्ल्यापुढें कोणाच्यानेंही टिकाव धरवत नसे'—पामो ४६१.

बेल गेला, भंडार गेला, कोटिंबा हातीं राहिला-सर्व जाऊन निष्कांचन होणें. तेल गेलें, तूप गेलें० पहा.

बेल ना पत्री, पूजा करायले निघाली चत्री—(व.) [चत्री=चतुर, कुशल, शहाणी.] बेल, फुलें व पत्री (झाडाचीं पानें) हें सामान देवाच्या पूजेला अवश्य लागतें. याशिवायच एखादा मनुष्य देवपूजेला उद्युक्त झाला तर तो मूर्खच समजावा.

बेला---बेल्यांत मडक्या भरणें---(बेलफळ, नारळ इ. कोरून त्यांत खडे किंवा धान्य भरून तें वाजविणें.) गोंधळ करणें.

बेवकूब---बेवकुबाचा माल, अक्कलवंताचा खुराक—मूर्ख माणसाच्या पैशावर बुद्धिवान् लोक चांगले चरत असतात. मूर्खाला कळत नसल्यानें साहाजिकच हुशार माणूस आपला फायदा करून घेतो.

बेवड---बेवड करणें— १ ताग,उडीद वगैरे पेरून ते जमीनींत गाडणें. २ जमीनीचा कस कायम राहावा म्हणून एक वर्ष भारी पीक घेतल्यानंतर एक वर्ष हलकें पीक घेतात. म्हणजे पुढल्या वर्षी पुन्हां भारी पिक घेतां येतें. याप्रमाणें ज्या वर्षी हलकें पीक घेतात त्यावर्षी त्याला बिवड किंवा बेवड करणें म्हणतात.

बेशरम---बेशरमकी बला दूर, मारो पैजारा ताजा नूर—निर्लज्य मनुष्याला कोणत्याच गोष्टीचें कांहीं वाटत नाहीं, त्यामुळें त्यास जोडे मारले तरी त्याचें तोंड उतरत नाहीं.

बेशरमाच्या बारा बुद्धि, डोसकं फुटलं बांधली चिंधी—(व.) निलाजरा माणूस कोणत्याहि एका विचारानें न चालतां घटकोघटकीं धोरण बदलतो. डोसकें फुटल्यामुळें त्याला चिंधी बांधली असतां त्या चिंधीची साधारण मनुष्यांस लाज वाटते; पण बेशरम निगरगट्ट बनलेला असतो त्याला त्या चिंधाची तशीच चंचल बुद्धीची लाज वाटत नाहीं.

बेशुद्धि---बेशुद्धि एकदम येऊं शकते, उलट शुद्धि मात्र हळू हळू येत येत येते--अविचाराचें कृत्य हातून चटकन होतें. परंतु विचारानें करावयास माल वेळ लागतो.

बेष्ट---बेष्ट लावणें—(ना. व.) वेडांवणें; वांकुल्या दाखविणें.

बेहन—बेहनपर भाई आणि सासूपर जमाई— (हिं.) बहिणीच्या जीवावर भावानें उड्या मारणें व सासूच्या जिवावर जांवयानें चैन करणें.

बेळूस---बेळूस होणें--आंबणें; नासणें.

बैठक---बैठक मारणें--१ ठिया देणें; पुष्कळ वेळ बसून राहाणें. २ उठाबशा काढणें.

एका बैठकीस—मध्यें न उठतां; एका वेळेंत.

बैठना---बैठेसे बिगार भली---(हिं.) बिगार पहा. ‘बेलाशक पतकर, बैठेसे बिगार भली, मीं सांगून टाकलें.’ —दाजी १,१९.

बैठा--बैठा गुणाकार, भागाकार—गुणाकार-भागाकाराचा एक प्रकार. शब्दकोश पहा.

बैठी ठेप-सजा-कैद--साधी कैद.

बैठा पगार-मुशाहरा--बसून, काम न करतां पगार; पेन्शन.

बैठा पाहरा—बसून करण्याचा पाहरा, देखरेख; याच्या उलट टेहळता पाहरा.

बैठा भात--पेज न काढतां केलेला भात.

बैठा रोजगार; बैठी चाकरी--आपल्या गांवांत किंवा घरच्या घरीं करावयाचा रोजगार.

बैठी कीर्द—मुदतीचा जमाखर्च लिहून शिल्लक काढतात ती कीर्द.

बैठी पडणें--मुक्काम पडणें; राहाणें घडणें. ‘ हेही पागेस अधिक बैठी पडली. परंतु जरूर झालें. ’ -रा. ८·२८.

ठी वही—रोजवही.

बैठें खातें--एकदां दाखल करून विल्हेवास लावलेलें खातें.

बैठे घडीचा--बरेच दिवस दुकानांत पडून राहिलेला.

बैतन---बैतन खावाशी-माल; बैतल माल— बेवारशी माल; सरकार जमा होणारा माल.

बैद--बैद करे बैदाई, और चंगा करे खुदाई-(हिं.) वैद्य औषध देतो पण देव बरा करतो. God cures and the Doctor takes the fees.--सवि ११७९.

बैल---ठेंचलेला बैल--बडवलेला, खच्ची केलेला बैल.

बैल आंत बाहेर घालणें—जुंपलेल्या बैलाची खांदे बदल करणें.

बैल गाईस दाखविणें—गाय फळविणें.

बैलास करंदफोड उठणें—बैलाचें पोट तणावणें.

बैलास कुकडें होणें—बैलाच्या जिभेवर कांटे येणें.

बैलास मांजरी होणें—(माण.) बैलाच्या गळ्याजवळ गांठ येणें.

***बैल खाके रसी लीये; बैल खोके रस्सी लाये**—(हिं.) बैल गमावून दोरी तेवढी परत आणणें. महत्त्वाची गोष्ट घालवून अल्पावर संतुष्ट होणें.

बैल गाभणा, तर म्हणे नववा महिना--तोंडदेखलें बोलणें; री ओढणें; खुशामत करणें. 'साहिब वदतां बैल गाभणा, नववा महिना सांगे ।' --सन्मित्र समाज मेळ्याचीं पदें.

बैल गाभणा, तरी तेरावा महिना—वरील प्रमाणेंच. --सन १८५७, पृ. ११४.

बैल गायेक सोधता तो धन्यांक दुध दिंवक न्हंय—(गो.) बैल गायीच्या मागें लागतो तो ती विऊन धन्याला दूध मिळावें म्हणून नव्हे. प्रत्येक व्यक्ति स्वतःचा स्वार्थ पाहाते. म्हैस पहा.

बैल गेला, झोपा-झांपा केला—कारण नाहींसें झाल्यावर उपाय करणें. झोपा पहा. Shut the stable door when the horse is stolen.

बैल गेला झोपा गेला, मग काळजी कशाला---सर्वच गेल्यावर काळजीचें कांहींच कारण उरत नाहीं !

बैल नेला बाजारीं, तेणें हातावर दिल्या तुरी---बैल विकावयास म्हणून बाजारांत न्यावा तों त्यानें पळून जाऊन फसवावें. एक करतां एक होणें.

बैल शेणल्या कानाकडेन घांटी वाजतात--(गो.) बैल हरवला तर म्हणे कानाजवळ घंटी वाजते. सांडू-हरवूं नये म्हणून जपण्याऐवजीं उगाच तोंडपाटिलक्या करणें.

बैलाच्या पाठीवर साखरेच्या गोण्या—ज्याला ज्या वस्तूचा उपयोग नाहीं, उपयोग करतां येत नाहीं ती वस्तु त्याजवळ भरपूर असून व्यर्थ आहे. तु०-साखरेच्या गोण्या बैलाचिये पाठीं । तयासि शेवटीं करबाडें ॥-तुगा ३०१८.

अति शहाणा त्याचा बैल रिकामा—अति पहा.

बैलानें बैल खाल्ला, प्रजापतीनें कापूस खाल्ला—एक मनुष्य कापसाची गाडी भरून घेऊन विकावयास गेला. कापूस विकून पैसे आले ते चैनींत खर्च केले व परत येतांना बैलास खाण्याकरितां कडबा पाहिजे म्हणून एक बैल विकून टाकला. याप्रमाणें बहुतेक सर्व गमावून परत आला. यावरून उधळपट्टी करून पदरची भर घालणें.

बैलानें रडावें तों गोणीच रडते--ज्याला श्रम पडतात त्यानें कुरकुर करावयाच्या ऐवजीं भलत्यानेंच करणें.

आधींच असला-तसला, त्यांत बैलावर बसला--आधींच पहा. आधींच मर्कट तशांतहि मद्य प्याला, याप्रमाणें.

बैलास तांबडी चिंधी—बैल सामान्यतः तांबडा रंग पाहून बुजतो यावरून, एखाद्या मनुष्यास एखाद्या क्षुल्लक गोष्टीनें चीड यावी त्याप्रमाणें.-केसरी ३१-५-३०. -टिच २.३.५६. Red rag to a bullock या इंग्रजी वाक्प्रचारावरून.

बोकड---बोकड माते, दाढीवर मुते—बोकड माजला तर स्वतःच्याच दाढीवर मुततो; त्याप्रमाणें एखादा मनुष्य फार गडबड करूं लागला तर स्वतःचेंच नुकसान करून घेतो.

बोकड येईल तर दाढी जाईल—बोकड येऊन जास्त काय होणार ? एखाद्याची उपस्थिति असून नसून सारखीच.

बोकडेची नी मारेकऱ्याची दोस्तीशी—(गो.) बोकडाची आणि मारेकऱ्याची मैत्री जमावी तसें कांहीं कांहीं वेळां व्यवहारांत कट्टे हाडवैरीसुद्धां एका भूमिकेवर आलेले आढळतात.

बोका—बोके संन्याशी--भोंदू; ज्याप्रमाणें बोका डोळे मिटून बसून उंदीर येण्याची वाट पाहात असतो त्याप्रमाणें वरून संभावितपणाचें पांघरूण घेऊन लोकांस फसविणारा ठक.

शिंकें-शिंक्याचें तुटलें, बोक्याचें पटलें-फावलें--शिंक्यावरून खालीं दुभतें सांडलें तर तें बोक्याला चांगलेंच. एखाद्यास आयता लाभ होणें.

बोकांडी---बोकांडी धरणें—(मांजरी पिलें नेतांना त्यांचे गळे धरून नेते यावरून.) एखाद्याला कचाटींत धरणें; त्याला स्वेच्छेनें वागूं न देणें.

बोकांडीस बसणें—(बोका मांजरीच्या बसतो त्याप्रमाणें) १ मानगुटीस बसणें; सक्तीचें होणें; भाग

पडणें. 'रोज पायलीचें दळण तिच्या बोकांडीं बसूं लागलें.'– रम्यरात्रीं १२६. २ पिच्छा पुरविणें.

बोंगा---अंगापेक्षां बोंगा मोठा---अंग पहा.

बोचकें---बोचक्यांतला उंदीर--गुप्त व बारीक सारीक गोष्टी जाणणारा.

बोचकें कीं डोचकें—संपत्ति गमवावी कीं शीर गमवावें असा पेंच; द्रव्य कीं जान असा प्रश्न; आणी-बाणीची वेळ.

बोचो---बोचो मुहुप--(गो.) [बोचो=पशूचें तोंड, हनुवटी] मुस्का मारणें.

बोज-—बोज राहणें—वजन, मान, किंमत असणें; महत्त्व मिळणें. 'विना-दिल्या घेतल्या बिगर सरदारी कैची चालते व बोज कैसा राहतो.'

बोजा—-बोजा करणें—कर्ज काढणें; कर्ज करणें.

***बोजा उठाव, म्हणे बाजीराव किदर**—रिकाम्या चवकशा. तु.०उष्टी काढ तर म्हणे जेवले किती.

बोट-—बोट करणें–दाखविणें—निर्देश करणें; सुचविणें.

बोटचेपा—(भात किंवा एखादा चुलीवरचा पदार्थ शिजला कीं नाहीं हें पाहाण्यासाठीं बोटानें चेपून पाहातात यावरून.) १ आपलें काम होईल, करील असा; मऊ; अनुकुल. २ लांचलुचपत घेऊन काम करणारा.

एखाद्याकडे बोट दाखविणें—१ अंगुलीनिर्देश करणें. २ एखाद्याचा निर्देश करणें, हवाला देणें. ३ एखाद्यावर आरोप करणें.

बोटधरणी माप--मापाच्या कांठावर बोट धरून घेतलेलें माप.हा एक हक्क आहे.चवंगा लावून किंवा आडवा हात धरूनहि माप घेतात. पण यांना रास्ती मापें म्हणत नाहींत.

बोट न लावणें—मुळींच स्पर्श न करणें.

बोट लावल्यानें पोट येणें—(व.) थोड्या बोलण्याचा राग येणें.

बोट शिरकणें—प्रवेश मिळणें; चंचुप्रवेश पहा.

बोट शिरकूं न देणें--थारा न लागूं देणें; मुळींच आधार न देणें.

बोटाएवढें पोर—अगदीं लहान मूल.

(हाता) बोटांवर खेळविणें—आपल्यास पाहिजे तसें वर्तावयास लावणें. बोटावर नाचविणें पहा.

बोटावर नाचविणें--हवें तसें खेळविणें.

या बोटावरची थुंकी त्या बोटावर करणें—(एका बोटावर थुंकून माझ्या कोणत्या बोटावर थुंकी आहे असें विचारतात व बोटांची अदलाबदल करून गोंधळांत पाडतात.) १ फसविणें; चकविणें. २ शब्द बदलणें. ३ आरोप उडवून लावणें; सारवासारवी करणें. 'लढाई सुरु झाली तेव्हां दोस्तांस बिनशर्त मदत करावी असें गांधींनी प्रतिपादन केलें. हें त्यांच्या कांहीं ज्वलज्जहाल शिष्यांस रुचलें नाहीं म्हणून नेहमींच्या पद्धतीप्रमाणें गांधींनी आपल्या या मताबाबत या बोटावरची थुंकी त्या बोटावर करण्यास सुरवात केली.'–केसरी ३१–५–४०.

बोटीं बोटीं क्रिया सांचणें—(महानु.) अशी चाल होती कीं, घुसळून लोणी काढल्यानंतर बोटभर लोणी एका धर्मार्थ गाडग्यांत घालीत व रोज बोट बोट पुसून त्या गाडग्यांत बराच लोणी संचय झाल्यावर तो फुलवातीकरितां देवळांत देत.याप्रमाणें थोडी थोडी क्रिया संचित होत होत एखादे दिवशीं बराच संचय होऊन उपयोगी पडतो, जास्त क्रिया घडून येते.तरी बोटींबोटींप्रमाणें आचरण करावें. नामस्मरणाचा असाच थोडा थोडा तरी संचय करावा, हें सांगतांना वरील दाखला देतात.

ज्याचीं बोटें त्याच्याच डोळ्यांत घालणें—त्याच्याच युक्तीनें त्याला धरणें. ज्याच्या तंगड्या त्याच्याच गळ्यांत, पहा.

बोटें मोडणें—(मेल्या तुझें तळपट होवो ! असें म्हणून बायका कानशिलावर बोटें मोडतात यावरून) १ शाप देणें; रागावणें. २ चरफडणें. ' विधिवरि बोटें मोडुनि कोपें खातात दांत बाहेर । ' –मोरश्री ४·२६.

दोन–तीन बोटें स्वर्ग उरणें— अस्मान ठेंगणें वाटणें; अतिशय गर्व होणें; फार चढून जाणें.

***बोट गेलें म्हणजे डोकें जातें**—शत्रूस थोडासा आधार मिळूं दिला असतां तो सर्व बळकावून बसतो.

बोट चिंबल्यार पोट भरत वे?— (गो.) बोट

चोखून पोट भरेल का ? कोरडी सहानुभूति कोणीं दाखवली म्हणून आपलें दुःख दूर होत नाहीं.

बोटानें मुलें होत नाहींत, शेटानें आंबे पडत नाहींत—(अशिष्ट.) भलत्याच हत्यारांनीं, साधनांनीं काम होत नाहीं.

पांच बोटें कोठें सारखीं असतात काय ? पांची बोटें सारखीं नसतात; एका हाताचीं सारीं बोटें सारखीं नसतात—हाताच्या पांच बोटांत लहान मोठें असा प्रकार आहे. जगांत सर्व गोष्टी सारख्याच नसतात. त्यांत कमजास्तपणा असतोच.–टि ४·१५३.

बोटें चाटून कोठें पोट भरलें आहे ?—तुटपुंज्या सामुग्रीनें कार्य होत नाहीं. वर पहा.

बोट—-बोट देणें—राखरांगोळी करणें.

बोड—-बोड करणें—१ हजामत करणें. २ तासडपट्टी करणें; खरडपट्टी काढणें. ३ खोड मोडणें.

बोडभद्र करणें—एखाद्याचा सत्यनाश करणें.

***बोड तासल्यारि संन्यासी जाताचे, गोबरु पुसल्यारि यति जातावे?**—(गो.) मुंडण केलें म्हणून संन्यासी होत नाहीं, आणि राख फासली म्हणून गोसावी होत नाहीं. वरवरच्या उपचारांनीं अंतरंग बदलत नाहीं. तुल.– It is not the cowl that makes the monk.

बोडका-की-कें—-पाण्यांत बोडकें बुचकळणें—कसेंतरी स्नान करणें.–मोरप्र. ६.

***हातीं धरल्यास रोडका, शेंडी धरल्यास बोडका**—कशास कांहीं आधार नाहीं असा; सहज निसटून जाणारा.

बोडकी आरशांत पाहे । सहदेव म्हणे कांहींतरी आहे ॥–(सहदेव भाडळीच्या नांवावर बरींच व्यावहारिक व भविष्यसूचक वचनें आहेत) विधवा स्त्री नट्टापट्टा करूं लागली म्हणजे साहजिकच तिच्या वृत्तीबद्दल संशय येऊं लागतो. मनुष्य विनाकारण कोणतीहि गोष्ट करीत नाहीं. एखादी गोष्ट करण्यांत त्याचा कांहींतरी हेतु असतोच.

बोडकी आली व केसकर झाली—उपरी मनुष्यानें येऊन सर्व सत्ता बळकावून बसणें. विधवेनें घरांत निराधार स्थितींत प्रवेश करावा व मालकाशीं म्होतूर लावून घरधनीण बनावें अशांतला प्रकार.

बोडकीच्या लग्नाला सतराशें विघ्नें—(प्र.) नकटीच्या लग्नाला० एखादी जनविरहित गोष्ट करावयास लागलें म्हणजे तींत हजार अडचणी येतात.

बोडकीला कुंकवाची उठाठेव कशाला पाहिजे–बोडकी म्हणजे विधवा कुंकू लावीत नसल्यानें तिला कुंकवाची चौकशी वास्तविक असूं नये. भलत्याच गोष्टींत ढवळाढवळ करणें.

बोडक बोडायला नि गारा पडायला एक गांठ—डोक्याचे सर्व केंस ज्या दिवशीं काढले त्याच दिवशीं गारांचा वर्षाव झाला तर त्यांचा जोराचा आघात डोक्यावर होऊन वेदना होतात. बोडकें बोडलें त्याच दिवशीं गारा पडणें हा दैवदुर्विपाक समजावयाचा. दैवदुर्विपाक दर्शविण्यासाठीं ही म्हण वापरतात. ‘ घरांत शिरतांच वळचण डोक्याला लागून घरच्या घर कोसळलें, बोडकं बोडायला नि गारा पडायला एक गांठ पडली त्याला उपाय काय ? ’

बोडकीला कुंकू व वांझेला कातवोळ—ज्या वस्तूचा उपयोग नाहीं त्याची चवकशी करण्याचें कारण नाहीं. भलत्याच भानगडींत लक्ष्य घालण्याचें मनुष्यास कारण नसतें.

बोडकें नाहालें आणि पाणी वायां गेलें—विधवा स्त्रीस नहाण्याचें कारण नसतें. तेव्हां तिच्या नहाण्यास खर्च झालेलें पाणी व्यर्थ गेल्यासारखें आहे. निरर्थक गोष्ट.

बोडकें बोडलं नि कांहीं जाहीं सोडलं—बोडकें ज्या बाईनें बोडलें म्हणजे जी सोंवळी झाली तिनें सर्व भोगांचा त्याग करून संन्यस्त वृत्तीनें राहिलें पाहिजे. परंतु तिचे सर्व व्यवहार जर यथास्थित चालू राहिले तर त्या वरपांगी बोडकें बोडल्याचा काय उपयोग ? वरून संन्यस्त किंवा साधुवृत्तीनें राहणारा पण अंतस्थ रीतीनें सर्व उपभोग भोगणारा असेल त्याला ही म्हण लागते.

बोडक्यांचे गांवांत बोडक्यानें जावें—जसा देश तसा वेश. समानशील माणसेंच एकत्र राहूं शकतात.

बोडंती—-बोडंती करणें—१ हजामत करणें. २ पाणउतारा करणें, दुःसह टीका करणें.

बोडणें---बोडलेल्यावर कातरणारा—जेथें केंस नाहींत तेथें कातरून काय उपयोग? निष्फळ प्रयत्न करणारा.

बोंडें---बोंडेंखाऊ- नामर्द; भित्रा.

बोंडें वेंचणें-अपराधाच्या जाणीवेमुळें बोलतांना अडखळण

बोंडें वेंचायला लावणें—टांग मारणें; चकविणें. ' परंतु त्यांनीं इंग्रजांच्या विजयी सैन्याला कित्येक वेळां बोंडें वेंचायला लाविलीं. ' –V. S. 2. १८६.

बोंडलें---बोंडल्यानें दूध पाजणें—लहान मुलास स्वतः पितां येत नाहीं म्हणून बोंडल्यानें त्याच्या तोंडांत दूध घालतात. यावरून लहान मुलाप्रमाणें शिकविणें, करणें, वागविणें. 'आम्ही काय कुकुलीं बाळें आहोंत कीं आम्हांला गोड गोड बातम्यांचें दूध पाजतां ?'–झंकार.

बोंडल्यानें दूध पिणें—अज्ञानी असणें (लहान मुलाप्रमाणें).

बोडा---बोडेफकीर--(अशिष्ट.) निर्धन मनुष्य; सडेसोट; फटिंग.

***माळाचा कडा, गरीबाचा बोडा(फार पिकतो)**-कडा पहा.

बोणी---बोणी करप—(गो.) [बोणी = बोहणी, भवानी] भवानी करणें; सुरुवात, प्रारंभ करणें.

बोतर---बोतरार इतलें तर कापडार कितलें- (गो.) फाटक्या लुगड्यामुळें जर इतकी गर्विष्ठ तर घडक्यांत किती ? कांहीं गर्विष्ठ लोकांस आपल्या ताठर स्वभावामुळें आपला समाजांतला कमीपणा दिसत नाहीं. तु०- जिनें पाहिला नव्हता दिवा, तिनें पाहिला आवा, तिच्या गरी नाहीं ठावा.

बोंब---बोंब उठणें—१ बोंब लागणें. २ भुमका उठणें.

बोंब पडणें–वाजणें–होणें—१ ओरडा, हाकाटी होणें. २ दुर्भिक्ष होणें.

कोणेकाच्या नांवाची बोंब पडणें---अमक्यानें हें कर्म केलें असा बोभाटा होणें.

बोंब पाडणें---(ना.) (उप.) शतकृत्य करणें. दिवे लावणें पहा.

एखाद्याच्या नांवानें बोंब मारणें---एखाद्याच्या वाईट कृत्याचा बोभाटा करणें. बोंब पडणें पहा.

काय बोंब मारली !---(व.) काय कर्तबगारी गाजविली !

बोंब लागणें---कळ उठणें; वेदना होणें.

बोंबल बाराखडी-—मुळींच विद्वत्ता नसून पांडित्य मिरविणें.

बोंबलभिक्या- —कपाळकरंटा; दुर्दैवी.

बोंबल्या गणेश–हणमंत-—१ वाचाळ; वटवट्या. २ गुप्त गोष्ट मनांत न ठेवणारा. ३ अभद्रभाषी.

***बोंब मारू वाद**-—(गो.) बोंबलायला बाद अर्थात कामाच्या नांवानें शून्य.

बोंब माल्ली म्हूण स्वर्गाद पावना-—(गो.) बोंब मारली म्हणून तिचा आवाज स्वर्गांत पोंचत नाहीं. कितीहि अकांडतांडव केलें म्हणून माणूस मोठा समजला जात नाहीं.

बोंब रावणाची आणि करणी करटाची-—खूप आरडाओरड करून प्रत्यक्ष हातून कांहीं न घडणें.

मृगाआधीं पेरावें व बोंबेआधीं पळावें---(राजा.) मृग नक्षत्र सुरू होण्यापूर्वी धान्य पेरलें असतां पीक चांगलें येतें. तसेंच एखाद्या गोष्टीची परिस्फुटता होण्यापूर्वीच आपण पाय काढावा म्हणजे आपल्यावर किटाळ येत नाहीं.

येरे माझ्या मागल्या, पाप न जाई बोंबल्या— (व.) कांहींहि उपाय केले तरी एकदां एखादी वाईट गोष्ट हातून घडली म्हणजे ती जेथें तेथें पुढें उभी राहते.

बोंबलणें—बोंबलता हात-— स्मशानांत प्रेत दहनाचे वेळीं बोंब मारणारा.वारस मुलगा;

***रडत्याची शेती, बोंबलत्याचें दुभतें**-—रडक्या मनुष्याच्या हातून शेती होणें शक्य नाहीं व नेहमीं ओरड करणाऱ्याच्या घरीं दुभतें होत नाहीं.

बोबडी--तोंडास बोबडी पडणें-—बोबडी वळणें. ' मुरकुंडी कंसाची वळली । शस्त्रें हातींचीं गळालीं । बोबडी तोंडासी पडली । हांक फोडिली भयें तेव्हां ।। '–ह. ३.११७.

बोबडी वळणें—-तोंडांतून शब्द बाहेर न येणें; मुखस्तंभ होणें. 'याचा जाब देण्याचा प्रसंग आल्यावर तुमची बोबडी वळून जाणार आहे.'–विक्षिप्त ३.२३६.

बोंबाळ—गांवांत लगीन, कुत्र्याला बोंबाळ— गांव पहा.

बोंबी—-बोंबी पिकप--(गो.) तारुण्य येणें.

बोंबीचें उखळ होणें—पोट मोठें होणें; वात चढणें. बेंबी पहा.

बोंबीवर शेंदूर घालून बसणें—(व.) एखाद्या कामाविषयीं बेफिकीर किंवा निश्चित असणें.

बोभाट—काम थेडें, बोभाट मोठा--काम पहा.

बोर—बोरांतील कीड–आळी– १ नाजूक व सुंदर स्त्री. २ लठ्ठ व आत्मसंतुष्ट मनुष्य.

बोरीची कांटी—कुंपणाला बोरीची कांटी लाविली असतां शेत तटबंदी बांधल्याप्रमाणें सुरक्षित होतें. (ल.) भरभक्कम आधार; अभेद्य गोष्ट.–पाणकळा ८७.

बोरीस बोरें आणणें—१ (खोडकर मूल इ. स) झाडास टांगणें. २ अशक्य गोष्ट शक्य करून दाखविणें.

***ज्या गांवच्या बोरी त्याच गांवच्या बाभळी—** गांव पहा. बाभूळ पहा.

बोरीला बोरें येण्यास उशीर लागत नाहीं— ज्याप्रमाणें बोरीच्या झाडास मागेपुढें फळें येतातच त्याप्रमाणें मार दिला असतां खरी गोष्ट बाहेर पडल्याशिवाय राहात नाहीं.

बोरें घ्या बोरें, पाठीस लागलीं पोरें—बोरें खाल्लीं असतां पोरें होतात अशी गमतीची–बोरें विकणाराची कल्पना.

बोरडी—-बोरडी गायी महालया—(महानु.) गाय आटली म्हणजे ती दान देणें. वाईट गोष्ट दानाला. तु०–गणपतीच्या पूजेला कुचका नारळ.

बोरीबंदर—बोरीबंदर, बायको सुंदर—[बोरीबंदर=मुंबईचें व्हिक्टोरिया टर्मिनस स्टेशन.] (कांहीं तरी प्रास जोडून केलेला चरण.) मुंबईस राहाण्यास बायको सुंदर लागते !

बोरू—बोरूच्या लेखणीचा मान, गरिबाचा घेते प्राण--कारकुनाची नोकरी मोठी प्रतिष्ठेची वाटते पण हाडाचीं काडें होतात किंवा त्याच लेखणीनें गरीबांचे गळे कापले जातात.

बोऱ्या–बोऱ्या उडणें–वाजणें—बोजवारा, फजिती होणें; पराभव पावणें.

बोऱ्या वागवान--कंगाल; कफल्लक.

बोल—बोल करणें—बोलणें; भाषण करणें. 'तंव तो लक्ष्मीकांतु। वाकुटियासी बोलू करितु।'–शिशु १७५.

बोल ठेवणें–लावणें—दोष देणें; नांवें ठेवणें. 'लावियला मीं दुःखीं बाई त्या ईश्वरासहि बोल।'–मोकृष्ण ८३.३६.

बोल फोल न करणें—बोलणें खरें करणें; वचनभंग न करणें. 'ऐसा भरतासीं शत्रुघ्नाशीं बोल। प्रभूंनीं तो फोल केला नाहीं॥'–मो सीतागीत १६३.

बोल बोलणें—१ नुसतें बोलणें; तोंडावाटें शब्द काढणें. 'बोल बोलतां वाटे सोपें। करणीकरितां टीर कांपे॥' –तुकाराम. २ स्पष्टपणें सांगणें.

बोल लागणें–दोष लागणें; बट्टा लागणें. 'तरि भरतकुळगुरूच्या लगेना बोल काय गा महिम्या'–मोउद्योग ३.५०.

बोल लावणें—नांवें ठेवणें; दोष देणें. 'चुलीपाशीं हगावें व कर्मास बोल लावावा.' 'सूतासि बोल लावी नृप निंदी सुतमुखासमुदाया॥'–मोद्रोण २०·४४.–मोगदा ४.१६.

बोला फुलास गांठ पडणें—(कळें लावतांना) फूल पडणार म्हणण्याला व तें खरेंच पडण्याला एकच वेळ येणें. यावरून काकतालीय न्यायानें गोष्ट घडून येणें. 'बोलाफुला गांठि पडेल जेव्हां। तूं काय तेथें करशील तेव्हां॥'–सारुह ८.६ 'तरी पण इथेंहि बोला फुलाला गांठ पडली असें म्हणायला जागा आहे.'–शिसं १.३.–आजोच ६१.

बोलले बोल सिद्धीस नेणें—दिलेल्या वचनाप्रमाणें करणें.

बोलाचालीवर येणें—भांडूं लागणें; हमरीतुमरीवर येणें.

बोलांत बोल नसणें; बोलण्यांत बोलणें नसणें—बोलणें फिरविणें; बोलण्यांत मेळ नसणें, विसंगति असणें; शब्दाला किंमत नसणें.

***बोल गे वाचे, तुझें काय जातें-वेचें; बोल गोड वाचें, तुझें काय वेंचें**—चांगले शब्द बोलण्यांत कांहीं कोणाचें खर्च होत नाहीं.

बोल तर बोल, नाहीं तर हरभऱ्याचें फोल—शब्द खरा केला तर त्याची किंमत, नाहीं तर तो व्यर्थ होय.

बालकाचे बोल बोबडे : माता पिता आइकती कोडें—(महानु.) आपल्या लहान मुलाचें बोबडे बोलणें ऐकून आईबापांना फार कौतुक होतें. मुलाचें बोबडे बोल त्यांना आनंद देतात यांत शंका नाहीं.

बोल बोलतां वाटे सोपें। करणी करतां टीर कांपे॥—तुकाराम. बोलणें सोपें आहे पण त्याप्रमाणें कृति करण्यास फार जड जातें व माणूस अगदीं मेटाकुटीस येतो.—पामो २१५.

बोलाचीच कढी, बोलाचाच भातः—अशी कढी आहे, असा भात आहे असें नुसतें वर्णन कोणीं ऐकलें तर त्याची तीं खाण्याविषयींची तृप्ति होईल का? कधींहि नाहीं. केवळ शब्द बोलून केलेली पाठवणी; चांगले शब्द बोलून खूष करणें. 'बोलाचीच कढी बोलाचाची भात। जेउनियां तृप्त कोण झाला॥'—तुगा २८७५. "स्वातंत्र्य व राष्ट्रीयत्व या 'बोलाचाच भात व बोलाचीच कढी' यांनीं खरा कार्यभाग होऊं शकत नाहीं."—केसरी ३१-५-४०.

बोलाचे तीन पक्षःस्वोक्तिः शास्त्रोक्तिः लोकोक्तिः—(महानु.) उक्ति किंवा बोल तीन प्रकारचे असतातः स्वतःची, शास्त्रांतील व लोकांत रूढ असलेली उक्ति.

बोलासारिखें चालणें—रामदास. बोले तैसा चाले, पहा.

बोलका—बोलक्या सराफाचें सोनपितळ देखील खपतें आणि अबोल्या सराफाचें शंभर नंबरी सोनें देखील खपत नाहीं—आत्मश्लाघा करण्यांत पटाईत असणाराची या जगांत चांगली चलती असते आणि निर्दोष व सर्व श्रेष्ठ असणाऱ्याचें जीवन कष्टतर होतें. (केसरी २५-१०-३५)

बोलक्याचीं गांजरें विकतील पण न बोलक्याचीं केळीं विकावयाचीं नाहींत; बोलक्याचीं बोंडें विकलीं जातात पण निबोल्याचे गहूं विकले जात नाहींत—यांत जाहिरातीची महती वर्णन केली आहे. आपल्या मालाची तारीफ करून बोलका मनुष्य गिऱ्हाइकाच्या गळीं हलका माल देखील उतरवितो. तारीफ करण्याची कला नाहीं, शब्द तोंडाबाहेर काढणें ज्यास पाप वाटतें, अशा निबोल्या माणसाचा माल कितीहि उत्तम असला तरी जाहिरातीच्या अभावीं तो तसाच पडून राहतो.

बोलणें—उत्तर बोलणें—उत्तर देणें; करणें. 'कोणें तुकयास बोले उत्तर। कैसें बुडविलें माझें घर॥'

भाजीपाला बोलणें—निरर्थक बडबड करणें; व्यर्थ शब्द खर्च करणें.

बोलणेंचालणें—संभाषण, पत्रव्यवहार, दळणवळण.

बोलणें नमुदांत आणणें—बोलण्यांत एखादा निश्चय ठरविणें; ठराव करणें. 'ते नेहमीं नानाकडे येउन बोलणीं करूं लागले. असें मासपक्ष पर्यंत खेपा घालून बोलणें नमुदांत आणिलें.'

बोलणें फिरविणें—१ बोलतां बोलतां आशय बदलणें; शब्दास मागें जाणें. २ पूर्वी बोललेलें न मानणें; वचनभंग करणें.

बोलणें राहणें—१ भाषण बंद करणें. २ विसरणें. 'बोलणें इथंच राहील.'—मोरप्र १८. ३ केवळ बोलून दाखवून त्याप्रमाणें कृति न होणें.

बोलणें हृदयांत राहणें—मनावर पक्कें ठसणें. 'हें बोलणें आतां हृदयांत राहिलें.'—मोरप्र १८

बोलण्याची सीमा होणें—पुढें कांहीं बोलावयास बाकी न राहणें. 'आतां बोलण्याची जाली सीमा।'—सप्र ८.५.

बोलण्यानें-बोलण्यावरून बोलणें वाढणें—उत्तर प्रतिउत्तरानें भांडण होणें; वर्दळीवर येणें; वादविवाद होणें. 'हे आमुचे यादव तुंद मोठे। ते चैद्य पूर्वीहुन लौंद खोटे। वाढेल बोलेवरि बोल जेव्हां। लग्नापुढें येईल विघ्न तेव्हां॥'—सारुह ७.४८.

बोलण्यावर जाणें—शब्दावर विश्वास ठेवणें.

बोलून चालून—१ उघड उघड; धडधडीत; स्पष्ट. २ मुद्दाम.

***बोलणें थोडें थुंका फार, खाणें थोडें मच मच फार**—करणें थोडें पण गडबड बडबड फार.

बोलणें फोल झालें। डोलणें वायां गेलें॥—निजानंद कवि. सामर्थ्य नसतांना व्यर्थ फुशारकी मारली म्हणजे ती फुकट जाते.

बोलणाराचें तोंड दिसतें पण करणाराची कृति गुप्त राहते—एखादा मनुष्य हळूच एखादें दुष्कृत्य करून मुकाट्यानें बसतो, त्याची आगळीक कोणास कळून येत नाहीं; पण त्यावर रागावणाराचे शब्द लोकांस ऐकूं जाऊन त्याचेबद्दल मात्र लोक विपरीत ग्रह करून घेतात.

बोलणाराच्या करडी विकतात, न बोलणाराचे गहूं विकत नाहीत—(व.) बोलका, बोलणें पहा.

बोलणाऱ्याच्या तोंडास हात कोणीं लावावा—मारणाराचा हात धरवतो पण बोलणाराची जीभ धरवत नाहीं.

बोलणीं देवाचीं, पण करणीं पशूचीं—तोंड गोड पण कृति अधम. करणी कसाबाची० पहा.

बोलण्याची टकळी, खालीं गांड मोकळी—शब्दशूर पण नामर्द.

बोलण्याची ठसक, कोंबडीवर मसक—बोलणें मोठें ऐटबाज पण कृति पाहावी तों मूर्खपणाची. उदाहरणार्थ कोंबडीच्या पाठीवर पखाल घालण्यासारखी.

बोलण्याची बढाई, तोंडावर चिलटांची लढाई—तोंडानें पुष्कळ वटवट करून हातानें कोणतीहि कृति न होणें. बडबड्या मेषपात्र माणूस.

बोलण्याची भरभर, खालीं छपर वर घर—बोलण्यांत पटाईत पण कृति मूर्खपणाची करणारा.

बोलण्याची रेलचेल, खालीं घांटा वर तेल—केवळ बडबड करून कृति करण्यांत मूर्ख.

बोलण्यांत घळघळीत, वागण्यांत मुळमुळीत—बोलणें फार पण कृति थोडी.

बोलण्यांत जोर, अन् कामांत अंगचोर—बडबड करणारा पण कामचुकार.

बोलण्यांत पट्ट राघू, कामाला आग लागू—कामाच्या बाबतींत चुकार पण बोलण्यांत पटाईत.

बोलण्यांत बोल नाहीं, करण्यांत मेळ नाहीं—शब्दास व कृतीस मेळ नाहीं असा वरचेवर बोलणें बदलणारा.

बोलण्यांत वाचाळ (अघळपघळ) अन् कामांत अशुढाळ (अशुद्धाळ-अळंटळं)—नुसता बोलका पण कामचुकार अजागळ.

बोलण्यांत साखर आणि कृतींत खापर—बोलण्याला गोड पण कृतीच्या नांवानें शून्य.

बोलण्यांत सुघड, करण्यांत विघड (विघड)—बोलतांना गोड बोलून करतांना वाईट कृति करणारा.

बोलण्यापेक्षां कृतीस मोल आहे—शब्दांपेक्षां कार्यांचें महत्त्व अधिक असतें.

बोलण्याप्रमाणें कृति पाहिजे—शब्दाप्रमाणें वागणूक करणारास महत्त्व आहे. तु०—बोले तैसा चाले। त्याचीं वंदावीं पाउलें॥

बोलण्याला सुचेना, काम कसें रेटतें?—नीट सांगतां सुद्धां येत नाहीं मग हातून काम कसें होणार?

बोलतां कळ, धुतां मळ—बोलण्यानें बोलणें वाढत जातें व कपडा जों जों धुत जावा तों तों त्यांतून मळ बाहेर पडूं लागतो. या गोष्टी कधीं सरत नाहींत, कराव्या तों वाढतच जातात.

बोल बोलतां वाटती सोपे। करणी करतां टीरतिरडी कांपे॥—बोल पहा.

बोलत्याची एक लाज, केल्याची सात लाज—नुसतें वाईट बोलणें हें कमीपणाचें असतेंच पण तशी कृति करणें हें त्यापेक्षांहि गर्हणीय असतें.

बोलत्याचें कालें खपतें पण न बोलत्याचें आलें खपत नाहीं; बोलत्याचे कुळीथ विकतात पण न बोलत्याचे गहूं विकत नाहींत.—जो मनुष्य आपल्या मालाचें गुणवर्णन करून सांगतो व जाहिरात करतो त्याचा वाईट मालहि खपतो व न बोलणाराचा चांगला मालहि खपत नाहीं. जो मनुष्य स्वस्थ बसून राहतो त्याच्या चांगल्या कार्याचीहि कोणी दखल घेत नाहीं व जो जिकडे

तिकडे आपली टामटूम करतो त्याच्या क्षुल्लक गोष्टीसहि महत्त्व येतें. बोलका पहा.—केसरी ६—८—४०.

बोलनेकी रेलचेल, खरचनेकी टंचाई—(हिं-) बोलण्यांत अघळपघळ खरचण्यांत टंगळमंगळ.

बोलल्यावांचून सरत नाहीं (पण घडीभर पटत नाहीं)—बोलल्यावांचून चालत नाहीं; प्रसंगविशेषीं बोलावें लागतेंच. पण दोघांचें जमत मात्र नाहीं, अशी स्थिति.

बोला बाई चला, पोटाला घाला— (व.) आम्हाला वाटेल तर शिव्या द्या, त्याची आम्हाला पर्वा नाहीं; फक्त आमच्या पोटाला मात्र घालत चला. स्वाभिमानशून्य मनुष्याचें हे विचार आहेत. पोटभरण्यापलीकडे त्याची दृष्टीच जात नाहीं.

बोलायचें बोलून थोडें कां? रानांत निजून अडचण कां?—बोलणें जर भागच आहे किंवा नुसत्या गप्पागोष्टीच जर करावयाच्या आहेत तर पुष्कळ कां न बोला. तसेंच संकुचित घरांत नसून जर आपण रानांत आहों तर जागेची अडचण कशाला? तेथें तर पुष्कळ जागा! अनुकूलता असतांना संकोच करूं नये.

बोलावर टोल—१ बोलल्या बरोबर काम होणें. २ बोलल्याबरोबर उलट जबाब मिळणें. ३ बोलतांच मार खाणें.

बोलावें तर बडबड्या, न बोलावें तर मुका—चाकर मनुष्य फार बोलूं लागला तर त्यास बडबड्या म्हणतात. बोलला नाहीं तर मुका म्हणून दोष देतात या प्रमाणें दोहोंबाजूंनीं दोष देणें. ‘मौनें मूक दिसे वदे तरी महा...’ मौनान्मूकः प्रवचनपटुर्वाचको जल्पको वा । —नीति ४७.

जसें बोलावें तसें लिहावें—ज्याप्रमाणें आपण बोलतों तसेंच लिहिणें म्हणजे आपलीं मतें निर्भिडपणें पुढें मांडणें. ‘जसें बोलावें तसें लिहावें हें तत्त्व तोंडानें उच्चारणें जितकें सोपें तितकें अंमलांत आणणें कठिण आहे.’ —टि ४.४००.

बोलावें थोडें मितच, पण करावें युक्तच—थोडें बोलावें पण कृति योग्य करावी.

बोलूं जाणे त्यास फट कोण म्हणे—जो योग्य तेंच बोलतो त्याला कोणी दोष देऊं शकत नाहीं.

बोले तैसा चाले।—त्याचीं वंदावीं पाउलें ॥—तुकाराम. ज्याच्या बोलण्यांत आणि कृतींत मेळ आहे असा. ‘महिपतराव बोले० असा आंतबाहेर एक होता.’ —पामो २६७.

बोले तो मा मारी जाय, ना बोले तो बाप कुत्ता खाय—कहे तो मा मारी जाय, पहा.

बोले धुवे, लागे सुने—अप्रत्यक्ष टोंचणी. लेकी बोले सुने लागे, पहा.

बोले बिगर रहे ना जाय—बोलल्यावांचून सरत नाहीं पहा.

बोलेल तो करील काय, गर्जेल तो पडेल काय—गर्जणें पहा. Barking dogs seldom bite: A quiet tongue shows a wise head. “ ‘बोलेल तो०’ ही लौकिक शहाणपणाची म्हण लॉर्ड कर्झन यांच्या बाबतींत क्षणभर विसरून जाण्याला हिंदी प्रजेच्या मनाची तयारी झाली होती.”—टिच २.१.३.

बोलबाला करणें—१ गाजावाजा, प्रसिद्धी करणें. २ वर्चस्व स्थापणें. ‘शत्रूवर बोलबाला। आले करून शहर पुण्याला।’—ऐपो ५३७.

बोलबाला होणें—१ प्रसिद्धी, कीर्ति होणें. २ भरभराट होणें.

बोलावणें—**बोलावलं तर खरं पण न आलं तर बरं**—आपण एखाद्या समारंभाकरितां उपचार म्हणून एखाद्यास आमंत्रण करतों पण तो येण्यानें उलट आपणांस आनंद न होतां विरसच होण्याचा संभव असतो अशा व्यक्तीबद्दल अशा प्रसंगीं म्हणतात. नको असलेली घटना.

बोली—**बोलीचाली**—बोलाचाल; वाटाघाट.

बोली बोलणें—(व.) किंमत सांगणें.

बोली रसा येणें—बोलण्यास रंग चढणें; भाषणांत रंगणें. ‘नव्या नवतीचा बहर नूतनजी बोली आली रसा। ह्या रस बरवेपणीं हो तुमचे मर्जिस मानेल तसा॥’—होला ५६.८४.

बोली सोडविणें—करारांतून मुक्त होण्यास वाट ठेवणें.

ऐसी बोली बोल, मनकी गुंडी खोल—(महानु.) मनांतील अढी जाईल अशा प्रकारचें भाषण करावें.

बोली मानभावाची, करणी कसाबाची—तोंडानें साधुत्वाच्या गोष्टी सांगून मान कापणें. करणी पहा.

बोली राजहंसाची, चाली गिधाडाची—बोलणें मोठेपणाचें पण वागणें नीचपणाचें.

बोंवशणै—बोंवशणै करीत ती दिवाळी—(गो.) बोंवशणै सांगेल ती दिवाळी. मोठ्यामाणसांच्या लहरीवर अवलंबून असणें. तु०—राजा करी ती पूर्वदिशा. भट सांगेल ती अमावास्या.

बोहणी—बोहणीचे प्रहरीं–पाहरीं—पारीं—भवानीच्या वेळीं; बोहणीचे वेळीं; सकाळीं, रामप्रहरांत. प्रथम सौद्याच्या वेळी. बोणी पहा.

बोहलें—बोहल्यावर चढणें—लग्न लावणें. लग्न हें बोहल्यावर लागत असतें यावरून. 'कालपर्यंत बहीण मानलेल्या मुक्ताताई बरोबर तूं बोहल्यावर चढणार !'—श्रमसाफल्य २.१.

बोहल्यावर का रंडकी होईना, भटास दक्षिणा मिळण्याशीं कारण—नवरा नवरीचें कांहीं होईना ते कोणी का असतना, ब्राह्मण फक्त दक्षिणेकडे पाहतो. जो तो आपल्या स्वार्थाकडे पाहतो, इतर गोष्टींकडे लक्ष्य देण्याचें त्याला काय कारण. पाठभेद—नवरा मरो कीं नवरी मरो, उपाध्यास दक्षिणा मिळण्याशीं कारण.

बोळ—(पोटांत) बोळ घालणें—त्रास देणें;सतावणें

बोळ घालणें–घालीत बसणें—फार फार बोलणें; हुज्जत घालीत बसणें.

एखाद्या कामांत बोळ घालणें–पाजणें–पाडणें–देणें—काम बिघडविणें; बिब्बा घालणें.

बोळवण—बोळवण करणें—बोळविणें; पाठवणी करणें; निरोप देणें.

बोळा—बोळा फासणें–फिरविणें—१ पुसून टाकणें २ नाहींसा करणें. ३ नामंजूर करणें. 'पण येथेच सर्व मुद्यांवर बोळा फासला गेला'. —सासं २.३१.

बोळ्यानें दूध पिणें—(अगदीं लहान मुलास दूध ओढून घेतां येत नाहीं तेव्हां दुधांत बोळा भिजवून त्याच्या तोंडांत घालावा लागतो यावरून) अगदीं लहान बाळ असणें; बुद्धिहीन असणें; अज्ञानी असणें; स्वतःची बुद्धि नसणें. 'हें पहा, मी कांहीं बोळ्यानें दूध पीत नाहीं अशी फसायला.'—त्राटिका. बोंडल्यानें दूध पिणें पहा.

बोहोरा—बोहोऱ्यांचा सकाळचा रामराम म्हणजे मृत्यूचेंच बोलावणें होय—कर्जदाराचा तगादा हा प्रत्यक्ष मरणाहून वाईट. —सासं. २.१२.

बौद्ध—बौद्धावतार घेणें–धरणें—बुद्धाची मूर्ति ध्यानस्थ मौन धरून बसलेली असते यावरून, मौन धरणें; अगदीं तटस्थ राहाणें. (ल.) उपेक्षा करणें.

ब्याणा—ब्याणा बांधणें—मालकाशीं किंमतीबद्दल संकेत करून मालावर आपली मोहोर करणें.

ब्र—ब्र न बोलणें—चकार शब्द न काढणें. 'तो ब्र न बोलतां चालूं लागला.' —विक्षिप्त ३·३६.

ब्रह्म—ब्रह्मदर्शन देणें–दाखविणें—[ब्रह्म=प्रजापति = शिश्न, लंड] धतूरा दाखविणें.

ब्रह्म मिळणें–सांपडणें–प्राप्त होणें–हातीं लागणें—(ब्रह्म हें मिळणें फार कठीण यावरून) उत्कृष्ट गोष्ट मिळणें; अत्यंत दुर्लभ अपूर्व लाभ होणें.

ब्रह्मसूत्राची गांठ—दैवानें बांधलेली गांठ. ब्रम्हाची गांठ पहा.

***ब्रह्म सत्य जग मिथ्या**—जगांत सर्व माया असून एक ब्रह्म तेवढेंच वास्तविक आहे. अद्वैत सिद्धान्त.

हैक, फट् म्हणतां ब्रह्महत्या—फट् पहा.

ब्रह्मानुभव चित्तीं, हें गुरूच्या हातीं—ब्रह्मानंदाची प्राप्ति करून देणें हें सद्गुरुशिवाय घडत नाहीं.

ब्रह्मदेव—ब्रह्मदेव होणें—(कर.) विवाहित होणें.

ब्रह्मदेवानें दिलेल्या गांठी—ईश्वरी नेमानेम. 'तुम्ही आम्ही होऊं बाजूला म्हणजे ब्रह्मदेवानें दिलेल्या गांठीही तोडून टाकूं'—मोरप्र ११.

***ब्रम्हदेव देतो बुद्धीला, शक्ति नाहीं दीर्घायु करण्याला**—ब्रह्मदेव बुद्धि देतो पण आयुष्य देत नाहीं.

ब्रम्हदेव सगळ्यांक मुज बांधता, आपल्यांक-मुज बांधुक मात्र विसलो—(गो.) ब्रम्हदेव सगळ्यांच्या मुंजी लावतो. पण स्वतःची मुंज करायला मात्र

विसरतो. कांहीं व्यक्ति अशा असतात कीं, त्या जगाचीं कामें करतील पण आप्तेष्टांकडे पाहायला मात्र त्यांना फुरसत सांपडत नाहीं.

ब्रम्हदेवानें तारिलें आणि शंकरानें मारिलें—ब्रम्हदेव ही संरक्षक देवता असून शंकर ही संहारक देवता आहे. एकानें जरी अभय दिलें तरी दुसऱ्या संकटांत नाश होणें.

ब्रम्हा——ब्रम्ह्याची गांठ—लग्नासंबंधीं ब्रम्हदेवाची योजना; ब्रम्हदेवानें ठरवून ठेवलेला संबंध.

ब्रम्हा–मुंजी मंतिलो; ब्रम्ह देवाली मुंज केलो—(गो.) ब्रम्हदेवाची मुंज लावणारा.या म्हणीचा अर्थ एक तर तो मनुष्य अतिशय विद्वान् असावा, नाहींतर नंबर एकचा बिलंदर असावा.

ब्रम्ह्याचा लिखा, सटवीचा टांका, त्यास कोण देईल झोंका—जें ललाटीं लिहिलेलें असेल तें कोणाच्यानें मिथ्या करवत नाहीं. दैव पहा.

ब्रम्ह्याच्या गांठी, मग कां कपाळाला आंठी—ईश्वरी नेमानेमानें एकदां विवाहसूत्रानें बद्ध झाल्यावर परस्परांवर रागावण्यांत कांहीं अर्थ नाहीं. आनंदानें राहण्यांतच मौज आहे.

ब्रम्ह्यानें लिहिलें जें भाळीं तें न चुके कदा काळीं—विधिलिखित चुकत नाहीं. दैव, नशीब पहा.

ब्रम्हांड——ब्रम्हांड आठवणें—अगदीं व्याकुळ होणें; प्राण गोळा होणें. ' रस्त्यांनें चालतां चालतां रामलालाचं नांव लक्षांत आलं म्हणजे मला एक ब्रम्हांड आठवतं.'—एकच प्याला.१.१. 'त्यावेळीं मला सर्व ब्रम्हांड आठवलें. काय करावें, कोठें जावें हें कांहीं सुचेना !' —सुंदराबाई १६.

ब्रम्हांडांत न माणें–मावणें—अतिशय अफाट इ. असणें.

ब्रम्हानंद——ब्रम्हानंदीं टाळी लागणें——सच्चिदानंद स्वरूपांत लय पावणें; परमेश्वराच्या ठिकाणीं तल्लीन होणें.

ब्रम्हानंदीं लागली टाळी । कोण देहातें सांभाळी ॥——अगदीं ध्यानमग्न स्थितींत असणें; आपण आपला संसार, इहलोक इ. सर्व विसरणें व विशिष्ट गोष्टींत तल्लीन होणें. --पामो ४११.

ब्राह्म——ब्राह्ममुहूर्त—सूर्योदयापूर्वीचा चार घटकांचा काळ. ' चिंतीत त्वद्विजय ब्राह्ममुहूर्तीं उठोनि संतत मी । '—मोभीष्म १.९५.

ब्राम्हण——काळा ब्राम्हण गोरे शूद्र, यांस पाहून कोपे रुद्र——काळा पहा.

ब्राम्हण झाला जरी भ्रष्ट। तरी तो तिन्ही लोकीं श्रेष्ठ॥—ब्राह्मण जरी स्वकर्मापासून च्युत झाला तरी त्याची वागणूक इतरांपेक्षां बरीच असतें. इतरांनीं त्यास हिणविण्यांत कांहीं अर्थ नाहीं.—तुगा.

ब्राम्हण तुपाचा लालची—ब्राह्मणास तूप फार आवडतें तेव्हां तूप खाण्याकरितां तो कांहींहि करतो.

ब्राम्हण भट, कढी आंबट—पाठभेद–बामण भट कढी आंबट. ब्राह्मणलोक कढीभात खातात व दुबळे असतात.

ब्राम्हणमोळा, काखेंत सोंवळा—ब्राह्मणाच्या खांखोटीस नेहमीं सोंवळें असावयाचें.

ब्राम्हण वंदावे वंदावे । कदापि न निंदावे ॥—ब्राह्मण हे पूज्य आहेत त्यांची निंदा करूं नये.

ब्राम्हण शूद्राच्या तुटातुटी, तेणें वाढल्या कटाकटी—ब्राह्मण आणि शूद्र यांत मतांतर झाल्यामुळें कलह लागले आहेत.

ब्राम्हणांचा नांगर लोणी मागतो--ब्राह्मणाला श्रमाचें काम होत नाहीं, त्यास हलकें काम लागतें.

ब्राम्हणांचा रोग ओठांत—ब्राह्मण खादाड असतो.

ब्राम्हणाचा हरवावा तांब्या, मुसलमानाची मरावी बायको, वाढ्याचं मोडावं घर——[वाढी = सुतार] ब्राम्हणाचा तांब्या हरवला तर ब्राम्हण म्हणून त्याला सहज कोणीहि तांब्या दान करतो व त्याला फार दिवस अडचण पडत नाहीं. मुसलमानाची बायको मेली तर त्या विधुराला दुसरी बायको सहज मिळते;मुसलमानांत लग्नाला फारसे निर्बंध नसल्यामुळें मुसलमानांत विधुरावस्थेची तकलीफ फार दिवस सोसावी लागत नाहीं. सुतार हा

लोकांचीं घरें बांधतो. तेव्हां त्याचें स्वतःचेंच घर मोडलें तर तो अत्यंत कमी खर्चांत व अत्यंत थोड्या अवकाशांत तें घर दुरुस्त करतो.

ब्राम्हणाची बाई, कासोट्यावाचून नाहीं--ब्राम्हण स्त्रिया कासोटा घालून लुगडें नेसतात. कोकणांत खालच्या जातीच्या स्त्रिया ब्राम्हणी पद्धतीच्या नेसण्याला 'ब्राम्हण कासोटा' म्हणतात.

ब्राम्हणाची लाडीगोडी, अन् शूद्राची झोडाझोडी—ब्राम्हण आपलें काम गोड बोलून करून घेतो; शूद्र लागलाच मारामारीवर येतो.

ब्राम्हणाची संध्या व वाण्याचें उधार कधीं राहावयाचें नाहीं--ब्राम्हण कधीं संध्या केल्याशिवाय राहात नाहीं त्याप्रमाणें वाणी आपली उधारी वसूल केल्याशिवाय सोडीत नाहीं. -फडके, माझी तीर्थयात्रा १·१६.

ब्राम्हणाचें पोर, विष्णूचें कोर—ब्राम्हणाचें पोर श्रेष्ठ वर्णांत जन्म पावल्यानें विष्णूचा अंश (कोर) च समजावें. तें देवासमान मानणें असा अर्थ.

ब्राम्हणाला अहंपणा आला, शूद्राला मत्सर डसला—ब्राम्हण हे अभिमानाच्या भरीं पडून फसतात तर शूद्र हे मत्सरामुळें वेडे होतात.

ब्राम्हणी सोवळा, घरांत वोवळा—(महानु.) ब्राम्हणाचें सोवळेंओवळें मोठें कडक दिसतें पण आंत पाहावें तों विटाळाचा विधिनिषेध नाहीं. इतर जाती ब्राह्मणाबद्दल अशी टीका करतात.

ब्राम्हणो भोजनप्रियः।—ब्राह्मणाला सुग्रास जेवण फार आवडतें. सबंध श्लोक असा—अलंकारप्रियो विष्णुर्जलधाराप्रियःशिवः।नमस्कारप्रियो भानुर्ब्राह्मणो भोजनप्रियः॥

ब्रिटिश--ब्रिटिश साम्राज्य म्हणजे शेळीचें शेंपूट--शेळीचें शेपूट तिच्या अंगावरच्या माशा वारील इतकें लांब नसतें व लाज झाकील इतकें रुंद नसतें. तसें ब्रिटिश साम्राज्य हिंदी लोकांचें रक्षण करूं शकत नाहीं व लाजहि राखूं शकत नाहीं.

ब्रीद—ब्रीद पाळणें—आपलें तत्त्व, ध्येय, गुण पाळणें. 'अनाथासी संभाळावें । ब्रीद पाळावें आपुलें ॥'–एकनाथ.

ब्रीदास सत्य करणें—आपल्या बाण्याप्रमाणें शीलाला, ध्येयाला अनुसरून वर्तन ठेवणें. ब्रिरुद पहा. 'दयावंता हृषीकेशी । आपुल्या ब्रीदासी सत्य करी ॥'—व्यंस्तो १२.

भ

भकाट–टी—पोट भकाटीस जाणें—पोट खोल जाणें; पोटास बखल पडणें.

भकाटें भरणें--पोट भरणें; पोटाची खळगी भरणें.

भकाशा—भकाशा मारणें--(व.) भयाण वाटणें; उदास वाटणें; ओसाडासारखें वाटणें. 'घरांत वस्ती नसल्यास घर भकाशा मारतें.'

भक्त—भक्त तो शिरोमणी । धन्य तो संसारीं । नित्य अवधारी । गुरुवचनें ॥--जो सद्गुरूंच्या वचनाप्रमाणें सतत आचरण ठेवतो तो सर्व भक्तांत श्रेष्ठ असून संसारांत धन्यता पावतो.

भक्तराज त्यास, नाहीं संसार--जो ईश्वर भजनांत लीन होऊन भक्त श्रेष्ठ बनतो त्याचें संसारांतून लक्ष्य नाहींसें होतें.

भक्ताची करुणा : देवासी येईना--(महानु.) देवाला भक्ताची दया येत नाहीं, असे उद्गार काढण्याचा पुष्कळदां प्रसंग येतो.

भक्ताच्या कामकाजीं, देव सदा राजी—परमेश्वर नेहमीं भक्ताचे मनोरथ पूर्ण करण्यामध्यें आनंद मानतो.

भक्ताच्या प्रेमासाठीं, देव धांवे पाठोपाठीं—परमेश्वराच्या मनांत भक्ताबद्दल इतकें प्रेम असतें कीं तो नेहमीं भक्ताची पाठ राखण्यास सिद्ध असतो.

भक्ताच्या संगतीनें देव मायाळु झाला—प्रेमळ भक्तांच्या सहवासामुळें परमेश्वरहि प्रेममय बनला.

भक्ति—भक्ति बसणें--आदरार्ह, मान्य होणें; आवडणें; प्रिय होणें; योग्य वाटणें.

भक्तीचें दुकान घालणें–मांडणें–पसरणें–करणें– भक्तीचा डौल, आव आणणें; परमेश्वरभक्तीचा देखावा करणें; आपण मोठे ईश्वरभक्त आहों असें भासविण्याकरितां सर्व पसारा मांडणें.

भक्तीनें आवडणें—अत्यंत शोकी असणें; अत्यंत, मनापासून प्रिय असणें; अतिशय गोडी लागणें.

***भक्ति ही संकटकालीं जन्म पावते**—मनुष्यास कांहीं संकट आलें, एखादी आपत्ति कोसळली म्हणजे बहुधा परमेश्वराची त्यास आठवण होते.

भक्तीचा अंत सुखांत होतो—परमेश्वराची मनापासून भक्ति केली किंवा कोणावरहि मनापासून प्रेम केलें असतां, त्यास गोड फळें आल्याशिवाय राहात नाहींत.

भक्तींत चूक झाली, मरणाची पाळी आली— जर भक्ति करण्यामध्यें एकनिष्ठता नसली, जर आपल्या उपास्यमूर्तीपासून अगर प्रेमदेवतेपासून आपलें चित्त ढळलें तर सर्व भक्ति फुकट जाऊन आपत्ति ओढवते. विशेषतः राजभक्तींत अंतर पडलें व एखाद्याच्या राजनिष्ठेबद्दल किंतु आला तर देहान्त शिक्षाहि होण्याचा संभव असतो. याकरितां भक्ति अढळ असली पाहिजे.

भक्तीवीण मुक्ति खोटी, आणि शक्तीवीण युक्ति मोठी--थोटी—परमेश्वराची एकनिष्ठ भक्ति केल्याशिवाय मोक्ष मिळणें शक्य नसतें व कितीहि बुद्धि असली तरी अंगांत सामर्थ्य नसेल तर तिचा उपयोग होऊं शकत नाहीं. किंवा उलट युक्ति असेल तर शक्तीचीहि जरूरी लागत नाहीं.

भंग---भंग करी रंग, अफू करी चाळा, तमाखू बापडा भोळा---मनुष्य भांग प्याल्यानें लुच्चेगिरीच्या व उन्मत्तपणाच्या चेष्टा करतो, अफू खाल्ल्यानें क्रोधोत्पादक चेष्टा करितो, व तमाखूचें व्यसन हें तीव्र नसून तें करणारा चेष्टा न करतां जशाच्या तसा राहतो.

भंगर—[भंगर=सोनें] **भंगरा कोळस्या कुंकुमे तिलो**–(गो.) सोन्याच्या भांड्यावर कुंकुमाचा तिलक. सोन्याचें भांडें अगोदरच सुंदर असतें व त्यांतून जर त्याच्यावर कुंकुमाच्या तिलकाची भर पडली तर तें अधिकच सुंदर दिसतें. जो माणूस सुंदर आणि शीलवान् आहे तो कुंकुमाचा तिलक असलेल्या सोन्याच्या भांड्याप्रमाणें शोभतो. तु०–सोनें आणि परिमळ. दुधांत साखर.

भंगरा वह्यांतु दुद्दा पेज—(गो.) सोन्याच्या वाटींत दुधाची कण्हेरी. सुखाची परमोच्च जागा किंवा परमोच्च सुखाचा कळस.

भंगरा सूव मोणु दोळांतु गालुंवे? भांगरा सूय हूमण डोळ्यांत घालूं व्हय?—(गो.) सोन्याची सुई म्हणून ती काय डोळ्यांत खुपसावी? सोन्याची सुरी म्हणून पोटांत खुपसावी काय? तु०– 'सोन्याची सुरी झाली म्हणून काय उरींच मारावी।'–

भगल–भग्गल---भगल–भग्गल उडणें— फजीति होणें; चेष्टा होणें; फज्जा होणें; उपहास होणें; हुर्रेवडी होणें; ढोंग उघडकीस येणें; बेंड फुटणें. 'भगलीच्या उडाल्या भगल भणभण सारी। '–पला ८०.

भगल उडविणें--(ना.) थट्टा करणें; फजिती करणें; टर उठविणें.

भगल भावार्थी—भोंदू; थोतांडी; आपमतलबी; आंत कावेबाजी करून बाहेर निष्कपटीपणा दाखविणारा.

***भगल भावार्थी, सात्त्विक चांडाळ**—वरून दिसावयास मोठा सत्त्वशील पण आंतून चांडाळासारखा पाषाणहृदयी व कपटी मनुष्य.

भगलाच्या घरीं बारा औतं, पाहायला गेलं तर एकही नव्हतं--बाताड्या माणसाबद्दल म्हणतात.

भगवें---भगवें करणें घेणें--संन्यासी होणें; सर्वसंग परित्याग करणें.

भगवा (काळा) देवढा, लांब दोरे—(महानु.) महानुभावी भगवीं किंवा काळीं वस्त्रें पेहरतात. साधुवृत्ति दाखवावयाची मग छानछोकी कशाला?

भगीरथ---भगीरथ प्रयत्न–यत्न; भगीरथ प्रयत्न करणें--इक्ष्वाकु वंशांतील भगीरथ राजानें आपले पूर्वज सगरपुत्र यांस मोक्ष मिळावा याकरितां दीर्घ तपश्चर्या करून स्वर्गांतून गंगेला भूलोकावर आणली, या महाभारतांतील कथेवरून अत्यंत दीर्घपरिश्रम करून एखादें अचाट कार्य करणें; अत्यंत कष्टदायक असें कार्य तडीस नेणें. 'भगीरथ प्रयत्नांनीं शरद्च्या प्रेमाचा ओघ भाईसाहेबांकडे वळविलाच पाहिजे.'–एकच प्याला, अंक ५, प्रवेश १. 'तथापि तुमची खटपट म्हणजे हा एक भगीरथ यत्न आहे, असें म्हटल्यावांचून रहावत नाहीं.'–शिसं २.१.

भजणें---भजो भगवान्, त्यजो अभिमान---परमेश्वराची भक्ति करावी व अहंता सोडावी.

भजन---भजनांत दोन पाहारे घेणें--सामान्यतः नामसप्ताह वगैरेमध्यें भजन करावयाचें असलें म्हणजे रात्रंदिवस अष्टौप्रहर एकसारखें भजन चालू ठेवावयाचें असतें. अशावेळीं प्रत्येक तासास एक पाहरा म्हणतात व याप्रमाणें पाळीपाळीनें पाहरे वांटून घेऊन भजन चालूं ठेवतात. भजनांत खंड पडूं न देतां दोन तास भजन करणें. यावरून लक्षणेनें, कोणत्याहि कार्यांत साहाय्य करणें; आपला कार्याचा वांटा उचलणें.

भजनीं-भजनास लागणें---नादीं लागणें; एखाद्याला विशेष मान देऊन त्याच्या तंत्रानें वागूं लागणें; एखाद्याबद्दल विशेष आदर दाखवूं लागणें.

***भजनमठाची स्थापना, हीच ईश्वराविषयीं भावना**--परमेश्वराची भक्ति करण्याकरितां एखादा मठ स्थापन करण्यामध्यें परमेश्वरावरील भक्ति दृष्टीस पडते.

भट---भट पडप--[भट=आळया, किडे]. (गो.) लोणचें वगैरेंत अळ्या पडणें; फळाला कीड लागणें.

भट पडो--मूळ वरील वाक्प्रचारावरून किडे पडोत, आळ्या पडोत अशा वास्तविक अर्थाऐवजी कदाचित् पुढें भट म्हणजे ब्राह्मण हा अर्थ चुकीनें समजण्यांत येऊं लागला असावा. भट म्हणजे किडे पडल्यानें ज्याप्रमाणें एखाद्या फळाचा, लांकडाचा वगैरे नाश होतो त्याप्रमाणें एखाद्याच्या कार्याचा बिघाड व्हावा, नाश व्हावा अशी इच्छा दर्शविण्याकरितां तुझ्या कामांत भट पडो, असें म्हणण्याचा प्रघात पडला असावा. कार्य नाश होवो; बिघाड होवो; नासो; नाश होवो. 'हार नव्हता मधीं सहात कसें आज संकट वटवडले। संसार भट पडो दोघामधीं आड पर्वत पडले।'--होला ७८.११२.

भटमार्ग---(महानु.) महानुभाव पंथ; चक्रधराचा संप्रदाय. 'नको गा सींगणा। मज भटमार्गीचा उपदेसु असें।' --नागदेवाचार्य स्मृति १७३.

भटाक व्हरून मानतुकीर मारप---(गो.) भटाला नेऊन बळी देणें. दुर्बळाला कोणीहि फसवावें.

भटाच्या कुडवानें---(को.) [कुडव=एकमाप.] पुरेपूर मापानें.

***भट आहे तर तीथ नाहीं, तीथ आहे तर भट नाहीं**---एखादें धार्मिक कृत्य करावयाचें असल्यास प्रथम शुभ दिवस पाहावा लागतो व तें सांग, विधियुक्त व समंत्रक करण्याकरितां पुरोहित लागतो. या दोन गोष्टी असल्याशिवाय तें यथासांग पार पडत नाहीं. यांपैकीं कोणतीहि एक असून दुसरी नसेल तर तें कार्य होऊं शकत नाहीं. यावरून, आवश्यक असलेल्या गोष्टींपैकीं कांहीं एका वेळीं उपलब्ध असल्यास दुसऱ्या नसणें व दुसऱ्या असल्यास पहिल्या नसणें, याप्रमाणें सर्व तयारी एकाच वेळीं कधींच नसल्यामुळें कार्य दिरंगाईवर पडणें, अगर मुळींच न होणें. तु.--चणे आहेत तर.

भट करीत ती अमाश्या, आणि राजा ठरयत ती दिशा---(गो.) भट सांगेल ती अमावास्या आणि राजा करील ती पूर्वदिशा. विशिष्ट गोष्ट एखाद्याच्याच हातांत असणें.

बाजारांत तुरी, भट भटणीला मारी---तुरी पहा. बाजार पहा.

भट भिकारी, अवसे पुनवेस जाय लोकांचे दारीं--भट हा नेहमीं दरिद्रीच असतो, त्याला भिक्षुकीवर अवलंबून राहावें लागतें व त्यामुळें वरचेवर लोकांकडे दान मागण्याकरितां जावें लागतें. त्याप्रमाणें केवळ भिक्षेवर, दानधर्मावर अवलंबून असणारा व त्याकरितां लोकांकडे नेहमीं याचना करावी लागणारा.

भटवाड्यां कुंकड---(गो.) ब्राम्हणवाडींत कोंबडें. पवित्र ठिकाणीं अपवित्र वस्तु. जी गोष्ट जेथें कधींच नसावयाची ती तेथें असणें.

भटा खीं जाल्यारय् आसा, मॅल्यारै आसा---(गो.) भटाला एखाद्याचा जन्म झाला तर बारशाचा, आणि एखाद्याचा मृत्यू झाला तर बाराव्याचा, असा दोहोंकडूनहि लाभच.

भटा तुझी बायको कशी, तर परघर वर्ज्य--(वाय.) भटजी पहा.

भटा तुझें वर्म काय तर कापसाचें जानवें,-जानू---भटाची मुख्य खूण त्याचें जानवें ही वरवर दिसावयास खरी. खरें ब्राम्हण्य अंगीं नसून केवळ बाह्य उपकरणाचा वृथा अभिमान बाळगणें.

भटा तुला कशाचें पडप ? माझा पंचा दीड हात तडक--ब्राह्मणा तुला कशाचा मोठेपणा वाटतो बरें ? तो उत्तर करतो, माझा पंचा (नेसण्याचें धोतर) तडक दीड हात लांब आहे. एखादा माणूस क्षुल्लक प्रातीनें, मोठेपणानें फार चढून जातो. तु०—कारे महारा उताणा, खिशांत दीड आणा.

भटाऽघरांत सुपलीभर(शेरभर) सुंगटां-- (गो.) भटाच्या घरांत सूपभर वाळलेले मासे. ज्याच्या घरांत एखादी वस्तू असूं नये ती असणें. भटवाड्या कुंकड, पहा.

भटाक गर्वूय ना आनी विद्याय ना--(गो.) भटास विद्या नाहीं व गर्वहि नाहीं. शहाणपणा व स्वाभिमान नसणारांना हें चांगलें लागू आहे. सामान्य भिक्षुकाचें फारसें अध्ययन झालेलें नसतें. तो वैदिक किंवा शास्त्री नसतो व त्याला नेहमीं लोकांच्या दानधर्मावर अवलंबून राहावें लागत असल्यामुळें स्वाभिमानहि राखतां येत नाहीं.

भटाक पुराण होड, काजीक कुराण होड-- (गो.) भटाला पुराण श्रेष्ठ वाटतें तर काजीला कुराण श्रेष्ठ वाटतें. ज्याचा त्याचा धर्म ज्याला त्याला महत्त्वाचा वाटत असतो.

भटाची चाकरी आणि शिळ्या भाकरी--भटाकडे चाकरी करणारास त्याचें शिळेंपाकें अन्न खावें लागतें. कारण तोच दुसऱ्याकडे जेवून निर्वाह करतो तेव्हां तो चाकराला कोठून ताजें जेवण करून घालणार. तेव्हां भटाचा नोकर होणें म्हणजे बहुधा उपाशीं मरणें.

भटाची चाकरी कांहींच नाहीं, भुसकट पडलें माहीतच नाहीं—भटाच्या घरची चाकरी दिसावयास सोपी वाटते; तसें श्रमाचें काम कांहींच नसतें; पण एकसारखें बारीकसारीक कामांत राबावें लागतें, विश्रांति मुळींच मिळत नाहीं.

भट्टाची मुंज, तट्टाचें बारसें—कशास कांहीं ठिकाण नाहीं अशी गोष्ट. कांहीं तरी.

भटाचें काय गृहस्थाचें काय, एकच—भिक्षुक आणि गृहस्थ हे दोघेहि ब्राह्मणच असल्यामुळें त्यांच्या राहणींत फारसा फरक नसतो. दोघांचाहि व्यवहार बहुतेक बेताबाताचाच म्हणजे बहुतेक कंजुषपणाचा.

भटाचें नांव कानभट--[कान=कान्हा—न्हो] भट जातिवाचक नांव तर कानभट व्यक्तिवाचक नांव आहे. एखाद्याला नुसतें भट म्हटलें काय किंवा अधिक स्पष्टीकरण करून कानभट म्हटलें काय अर्थ एकच; व्यक्ति एकच. हें केलें काय अथवा तें केलें काय, फलश्रुति सारखीच असा अर्थ. 'सावकाराचें कर्ज काढणें किंवा बँकेचें कर्ज काढणें दोन्ही सारखींच, भटाचं नांव कानभट. 'तें कांहीं असो, भटाचें०—तुम्ही हार खाल्ली काय आणि दुसऱ्यानें खाल्ली काय, आम्ही एकच समजतों.'—पामो २६३.

भटाचें वतन, कुंभाराचें जित्रब--भटाच्या घरचा चाकर व कुंभाराच्या घरचें जनावर म्हणजे गाढव यांचे नेहमीं हालच असतात.

भटाचें वर्म जानव्यांत--मागें पहा.

भटाच्या पोराला जन्मतःच मुहूर्त नाहीं—ब्राह्मण इतरांना मुहूर्त सांगतो पण स्वतःचीं कृत्यें करण्यास त्यास मुहूर्त पाहून चालत नाहीं. तीं फुरसुदीनें, यजमान कृत्य नसतांना म्हणजे बहुधा मुहूर्त नसतांनाच उरकून घ्यावीं लागतात.

भटाला आणि तट्टाला अक्कल नाहीं—भट आणि तट्टू हीं निर्बुद्ध असतात म्हणजे त्यांना आपल्या बुद्धीप्रमाणें चालण्याचें स्वातंत्र्य नसतें; त्यांस यजमानाच्या मर्जीप्रमाणें वागावें लागतें, आपली अक्कल चालवून भागत नाहीं.

भटाला तारूं, गावत्याला गोरूं— ज्याप्रमाणें भिक्षुकाला तारूं दिलें तर तें चालवितां यावयाचें नाहीं व निरूपयोगी होईल त्याप्रमाणें गावत्याचा धंदा दर्यावर्दीपणाचा असल्यामुळें त्यास गायीचा उपयोग नाहीं. गावती पहा.

भटाला दिली ओसरी, भट हातपाय (हळूहळू पाय,)पसरी—ओसरी पहा.तु०—Give him an inch and he will take an all. एका गृहस्थानें, कोणी पांथस्थ भट रात्रीच्या निजण्यापुरती जागा मागूं लागला म्हणून ओसरीवर जागा करून दिली. सकाळीं त्यानें थोडी घरांतली जागा स्वयंपाकास मागितली. तीहि सौजन्यानें मालकानें दिली. पुढें हळूहळू त्यानें सर्वच घर वापरण्यास सुरुवात केली ! 'ओसरी' पहा. ' गोठण्याचा मजकूर तरी, भटास० हा लेख जाहला.'—ब्रच ३३.—म. इ. साधनें. ले. १७९ (ग्रंथमाला).

भटास तारवें, दालद्यास गोरवें—[दालदी= एक नावाडी जात] भलत्याला भलतेंच काम. मागें पहा.

भटो, तुमचें पोट कां वांकडें? उंबर राहिलें म्हणजे झालें--उंबर पहा.

भटो तुमचे लेक करटें खातात. हगतांना कळेल; भटो, तुमचे मुलगे खिळे खातात. तर हगतांना जाणवतील--एखादी गोष्ट करतांना गोड वाटते पण तिचे परिणाम कष्टदायक होतात. तु० आगमे सुखमाप्नोति निर्गमे प्राणसंकटम् ।

भटो बायको कां कराना? तर गांवावर चालतें!—पाटील पहा.

भटो, बाईल करा, तर म्हणे तुम्हींच व्हा; भटो बायको कां कराना? (तर) म्हणे तुम्हींच कां व्हाना?—एखाद्याला त्याच्या फायद्याची गोष्ट सांगावी तर तो आपल्याच गळीं पडूं पाहतो.

भटो भटो, आपल्यो वाटो--(गो.) भट हा आपलाच फायदा बघतो. भटासारखे स्वतः पुरतेंच पाहणारे कांहीं लोक आहेत. तु०–नवरा मरो नवरी मरो उपाध्याला दक्षिणेशीं कारण. गरज सरो, वैद्य मरो.

भटो सुगूर मांड पेरघार--आपली वस्तु मात्र राखावयाची, दुसऱ्याचें घर नाश पावलें तरी चालतें.

भाद्व्यांत भट्टू, आश्विनांत तट्टू—तट्टू पहा.

भटकणें---**भटकभवानी; भटक भैरव**--भटकणारी स्त्री, पुरुष; व्यर्थ हिंडणारा.

भटजी---**भटजी बाजारावरून स्वयंपाक ओळखतो**—यजमानानें बाजारांतून कोणकोणते जिन्नस विकत आणले आहेत, यावरून आपल्या ताटांत काय पडणार आहे, याची कल्पना भिक्षुकास येते. पूर्वचिन्हांवरून आगामी गोष्टीची कल्पना सुज्ञ मनुष्य करूं शकतो.–केसरी ३१–१२–४०.

भटजी, बायको कां कराना? तर भटजी म्हणतोः बाई, तुम्हीच कां व्हाना?--ज्याला कांहीं एखादी गोष्ट सुचवावी तो आपल्याच गळ्यांत पडायला पहातो. भट पहा.

भटजीबोवा तुमची बायको कशी? तर परघर वर्जी--(व.) १ भटजीबोवा म्हणतात, आमची पत्नी कशीबशी केवळ आमची सांसारिक गरज भागविणारी आहे; मनपसंत नाहीं. फक्त परघर मात्र आम्हांस पाहण्याचें कारण पडत नाहीं. एखादें मनुष्य किंवा वस्तु कशीतरी गरज भागविण्यापुरती आहे पण अगदीं उत्तम नाहीं अशा वस्तुस ही म्हण लावतात. २ भट आपल्या स्त्रीला फार जपतो. ब्राह्मण पहा.

भटजी, सोवळें कुठें? खुंटीवर, खुंटी कुठें तर सोवळें आहे तिथें--सरळ उत्तराची टाळाटाळी.

भटजीची संवळ वदलली आणि हजामाची धोपटी आली--चांगली गोष्ट जाऊन भलतीच व निरुपयोगी वस्तु हातांत येणें; नुकसानकारक अदलाबदल.

भटजीचें आडवें काय नि उभें काय?--भटजीला कांहींहि चालतें. त्याला कोणी विचारत, पुसत नाहीं.

भटजीचें घरीं शेरभर सुंकटें--भट पहा.

भट्टी---**भट्टी बिघडणें–बिनसणें**--एखाद्या गोष्टींत क्रमभंग, चूक इ. झाल्यामुळें ती व्हावी तशी चांगली न होणें; कोणतेंहि कार्य नीट न साधणें; कार्यांत चूक झाल्यामुळें अपेक्षित परिणाम न होणें.

भट्टी साधणें--१ स्वयंपाक वगैरे साधणें; एखादी गोष्ट उत्तम मनाप्रमाणें होणें. 'आमच्या पंतांसही केकावली लिहितांना खूपच भट्टी साधली; त्यांतहि शेवटच्या पंधरा सोळा केका लिहितांना.'–नि. २ हातोटी साधणें; हात बसणें; हातखंडा असणें. ३ कार्य पुरें होणें; इष्ट गोष्ट साध्य होणें.

भंड---**तोंडाचें भंड करणें**—शिवराळ होणें; अपशब्द उच्चारणें.

भंड---**भंड खुलणें–फुटणें**—(व.) १ गौप्य स्फोट होणें; बेंड फुटणें; बिंग बाहेर पडणें. २ ढोंग बाहेर येणें.

भंड माजणें–मातणें--एखाद्याचें निरर्थक स्तोम वाढणें.

भंड माजविणें—स्तोम, नसतें महत्त्व वाढविणें; गाजावाजा करणें.

भडभडणें---**भडभडून येणें**—शोकानें कंठ दाटून येणें; करुणा, दुःख इ. चा आवेग येणें.

भडभड्या---**भडभड्या तो कपटी नसतो**--जो मनुष्य फार बोलतो त्याला आंतबाहेर करणें साधत

नाहीं. तो बहुतेक मनांतील गोष्ट केव्हांना केव्हां तरी भावड्याप्रमाणें बोलून टाकतो. तु०—Great bakrers are not biters.—(Scotch).

भडभुंजा—-भडभुंजे की लडकी और केसरका टिकला—-योग्यतेपेक्षां अधिक डामडौल करणें.

भडस—-भडस भरणें—-दाढ भाजण्याकरितां टहाळे पसरणें; भाताच्या शेतांत राब पसरणें; दाढ करणें.

भडसाची दाढ—-झाडाच्या डाहळ्यांची दाढ; ज्यांत मुख्यतः गोवरीच्या ऐवजीं झाडांचे टहाळे उपयोगांत आणलेले असतात असा राब.

भडाग्नि—-भडाग्नि देणें—-(ज्याला कोणी वारस नसतो त्याला किंवा मंत्राग्नीची सोय नसते तेव्हां भडाग्नि देतात.) प्रेतास मंत्रपूर्वक संस्कार न करतां तें नुसतें पेटवून देणें; अमंत्रक अग्नि देणें. यावरून पेटविणें; आग लावणें; डोंबाळा करणें. 'एकावरती एक रचोनी भडाग्नि द्या या, पाहुं नका। दृष्टिआड ही सृष्टि करा, मज कशास याचा लोभ फुका ॥ '

भंडार--रा—भंडार उधळणें—-१ हळदीची पूड उधळणें. (देवीच्या किंवा खंडोबाच्या देवळांत असा भंडार उधळतात.) २ स्तुति करणें; बोलबाला करणें.

(बेल) भंडारा उचलून देणें—शपथ घेणें. बेल पहा.

भंडारा उठणें—बराच बोलबाला होणें; गाजावाजा होणें.

भंडारा करणें—-१ देवाचा प्रसाद,भोजन देणें. भंडारा घालणें, पहा. २ चट्टामट्टा करणें; खाणें.

भंडारा घालणें—-वारकरी वगैरे लोकांस जेवावयास घालणें; देवाचा प्रसाद म्हणून आल्यागेल्यास मुक्तद्वार भोजन घालणें.

डोकीवर भंडारा टाकणें—१ मनुष्य, जनावर देवास वाहणें, सोडणें. मुरळी, जोगती, करतांना भंडारा डोकीवर टाकतात. यावरून २ वाटेल तिकडे जाण्यास, वाटेल तें करण्यास मोकळीक, कबुली देणें.

***भंडार भरपूर, काळ कंटक दूर**—भिक्षा मागणारे लोक नेहमीं देतात असा एक तऱ्हेचा आशिर्वाद; समृद्धि व्हावी व शत्रूंचा नायनाट व्हावा असा. तु.--इडापिडा टळो अमंगळ पळो.

भणंग—भणंग भिकारी,गावांत त्याची रोज फेरी—ज्या मनुष्यास कांहीं आगापिच्छा नाहीं, ज्यास घरदार नाहीं व जो सडाफटिंग असून जवळ कपर्दिकहि नसते त्याला गांवांत भटकण्यावांचून दुसरा उद्योग नसतो.

भन्नंगे भन्नंगा काई द्यावें—-(महानु.) 'एकादशीच्या घरीं शिवरात्र' या प्रमाणें.

भणणें—-भणतव्यम तोबी मरतव्यम् । नही भणतव्यम् तोबी मरतव्यम् वृथा किम् माथाकूट कर्तव्यम् ।—मृत्यु हा कांहीं कोणास चुकत नाहीं. जरी अध्ययन केलें तरी मृत्यु चुकत नाहीं; नाहीं केलें तरीहि चुकत नाहीं. मग विनाकारण अध्ययनाचा खटाटोप कशाला करावयाचा. अध्ययन न करण्याकरितां किंवा तें चुकविण्याकरितां लढविलेलें तत्त्वज्ञान.

भणना, गणना, चातुर्य तीन्ही बाता सहेल, कामदहन, मनवशकरण, गगन चढन मुष्केल—वेदांचें अगर तत्त्वज्ञान ग्रंथाचें अध्ययन, गणित किंवा ज्योतिषाचें अध्ययन, इतर चातुर्य येण्याकरितां करावयाची विद्या या तिन्ही गोष्टी कठिण वाटल्या तरी सोप्या आहेत; पण कामावर जय मिळविणें, मनावर ताबा ठेवणें व आकाशांत आरोहण करणें या गोष्टी अतिशय कठिण आहेत.

भणभण—-भणभण करणें—-१ शून्य, भयाण-ओसाड दिसणें. २ (माशा इ.नीं) घों घों करणें.

भणभण फिरणें—स्वैरपणें, इतस्ततः फिरणें; भ्रमण करणें; भटकणें.

भणभणीत उजेडणें—फटफटणें; पहाट होणें; चांगला प्रकाश पडणें.

भणभणीत दुपार—भरदुपार; माध्यान्ह; ढळढळीत दुपार.

भदाड—-भदाड वासणें—आ पसरणें; मोठ्यानें रडणें.

भदें—-तोंडाचें भदें करणें—शिवीगाळ करणें;अभद्र उच्चारणें; तोंड विटाळणें.

भदें घेणें—विस्तव घातलेलें खापर डोक्यावर घेऊन शेताच्या, गांवच्या सीमेवर जाऊन शपथविधी करणें.

भद्रम्—-भद्रंकरण—-१भादरणें. २ शिवी गाळ; खरडपट्टी काढणें; हजामत करणें.

भद्रा---कपाळीं भद्रा असणें--लाभाच्या वेळीं दुर्दैवानें लाभहानि होणें.

भद्रा नक्षत्रावर जन्मणें--(व.) अभागी, दरिद्री असणें.

भद्या; भद्या कपाळाचा--कपाळकरंटा; कमनशिबी; दुर्दैवी.

भपका---भपका भारी, खिसा खाली, मार खानेकी निशाणी--जवळ पैसा नसतां कोरडी ऐट केली तर प्रसंगीं मानहानीची वेळ येते.

भय---भय घेणें--घाबरणें.

भय दाखविणें—भिण्यास लावणें; भिवविणें; भेडसावणें; घाबरें करणें; धास्ती घालणें.

भयां भयां करणें-करीत जाणें-करीत फिरणें--अत्यंत नीच वृत्तीनें व विपत्तीनें दारोदार भिक्षा मागत हिंडणें. ' विद्या दरिद्रानें पीडित होऊन लोकांच्या नरकांत बुडून भयांभयां करीत अन्नाचे मागें हिंडतात.'-बाळ. २.१२९.

भयांभयां होणें--अत्यंत हीनदीन होणें; विपन्नावस्थेंत असणें.

***भय आहे, तेथें जय नाहीं**--जय मिळविण्यासाठीं माणसानें निर्भयपणें, शौर्यानें पुढें सरसावलें पाहिजे.

एक भय दोहों जागीं—दोन्ही पक्षांस परस्परांची भीति वाटणें; परस्पर भिणें.

भय फेडलें सटिये दिसा—(गो.) सटवीच्या दिवशींच भीति पळून गेली. जन्मापासून निर्भय.

भयरा---बहिरा पहा—**भयऱ्याक मोठ्यानें उलौक जाय**—(गो.) बहिऱ्याशीं मोठ्यानें बोलावें लागतें. वेंधळ्या माणसाला एखादी गोष्ट तीनतीनदां बजावून सांगावी लागते.

भर---भर करणें—१ भरणें; आपण न भोगतां दुसऱ्यास देऊन टाकणें; बहाल करणें; स्वाधीन करणें. ' शेवटीं चोराची मात्र भर केली. ' २ न्यूनता पुरी करणें; पूर्ण करणें; भरून काढणें.

भर घालणें-देणें—उठावणी करणें; उत्तेजन देणें; चेतना देणें.

भर घेणें--आपल्यास पुरेसें घेणें; स्वतः भरपूर घेणें.

आपल्या भरानें चालणें---स्वच्छंद वागणें; मर्जीप्रमाणें वर्तन करणें; आपल्या बुद्धीप्रमाणें वागणें.

भरावर जाणें---केवळ आबांत जाणें; स्वतःच्या सामर्थ्यावर वाजवीपेक्षां जास्त विश्वास ठेवून वागणें;होडीस पेटणें. ' दादासाहेब आपले भरावर गेले. तो दुर्ग असाध्य सलाबत. '-भाब ३.

भरीं घालणें-देणें—प्रवाहांत, मार्गांत टाकणें; प्रवृत्त करणें; फूस देणें. ' तमोगुणें भरीं घातलेसे '-तुगा ५३९.

भरीं पडणें—१ सहकारी होणें; नादीं लागणें; तंत्रानें चालणें. २ हट्टास पेटणें; इरेस पेटणें. ३ हातांत जाणें; स्वाधीन होणें.

भरीं भरणें---१ नादीं लागणें; वेडें होणें; छंद घेणें. ' बहुमास भरीं भरला प्रियसख सचिवांस विसरला निपट।'-मोवन ४.९८. २ हट्टास पेटणें; इरेस पडणें. ३ चढवून देणें; भरीस घालणें. ' भरला भरीं भुलविला, दावुनि धनलोभ दुष्ट तो कांहीं॥'-मोसभा ६.८१. -मोविराट ५.३३.

भरीस घालणें—१ कमी असेल तें पुरें करणें. २ उत्तेजन देणें; चढविणें. ' लोकीं भरीस घातलें । '-दा ३.५.१३.

भरीस देणें—भरीस घालणें; नादीं लावणें. 'सर्व उदासीनपणें पाहाति आम्हांसि देवुनी भरिला ।'-मोआदि ४.८३.

भरीस पडणें--१ खर्च होणें; भरतीस लागणें; ग्रासलें जाणें. २ इरेस पडणें; नादीं लागणें.

भरून येणें--१ विस्मरण होणें; विसर पडणें; मागें पडणें (हानि, शोक, दुःख वगैरे). २ पूर्ण बरी होणें (जखम वगैरे).

भर आषाढे घर चुवे, भादरवे भैंस मरजाय, फूटे करम फकीरके, भरी चलम ढल जाय--(हिं.) भर आषाढ महिन्यांत घर गळत असावें, भाद्रपद महिन्यांत म्हैस मरावी, किंवा भरलेली चिलीम उपडी व्हावी, हीं सर्व फकिराच्या दुर्दैवाचीं फळें आहेत.

भरीवर भर, टेकड्यावर घर-(महानु.) एवढें कष्ट पुरे झाले नाहींत म्हणून कीं काय घरास जावयाचें टेकाड

चढण्याचे आणखी श्रम करावयाचे ! म्हणजे संकटें एक एकटीं येत नसतात.

भरणी——**भरणी देणें**—भराव घालणें; भर घालणें पहा.

भरणें——**भरताचें भांडें**—विशिष्ट मापाचें भांडें.

भरल्यावर भरतें——भरींत भर.

भरतें येणें——१ जोर येणें; भरभराट होणें; पूर्णतेस येणें. २ आनंद, शोक वगैरेचा आवेग येणें. ' आनंदानें सद्गदेतेनें भरतें ये चित्ता.'

भरला भरला—चांगला भरलेला; भरगच्च; परिपूर्ण.

भरलें कुंकूं—पूर्ण सौभाग्य.

भरलें घर—समृद्ध, माणसांनीं गजबजलेलें कुटुंब. 'माग म्हणतांचि म्हणे भरलें घर।'--राक २.३८.

भरलें धरणें--देवानें डावी किंवा उजवी न देणें; मुग्धता स्वीकारणें; कोणताहि निर्णय न लागणें.

भरलें शेत—भरपूर पिकलेलें शेत; पूर्णपणें तयार झालेलें शेत.

भरलेल्या अंगाची; भरली सरली—गरोदर.

भरल्या ओटीनें—मुलांबाळांसह सुखरुप; सर्व सौभाग्ययुक्त.

भरल्या घोसानें--बंदांत मरणें—तरणा ताठा मरणें; पूर्ण वैभवांत असतां मरणें; ऐन उमेदींत, भरल्या घरांत मरणें.

भरल्या चुड्याची--सौभाग्यवती.

भरल्या तिन्हिसांजा; भर तिन्हिसांजा—ऐन तिन्हिसांजाच्या वेळीं; सायंकालच्या संधिप्रकाशाच्या काळीं: ही वेळ अशुभ मानतात याकरितां यावेळीं सौभाग्यवती स्त्रीनें बाहेर जाणें, लहान मुलास बाहेर नेणें वगैरे गोष्टी करूं नये अशी समजूत आहे.

भरल्या पायांचा--बाहेरून आलेला; घराबाहेरून आल्याबरोबर पाय धुवून टाकावे म्हणजे बाहेरची इडापिडा घरांत येत नाहीं अशी समजूत आहे. यावरून बाहेरून येऊन पाय न धुतां.

भरल्या पायीं--पाय न धुतां. वरप्रमाणें.

भरल्या पोटीं—पोट भरलेलें असतां; नुकतेंच जेवण झाल्याबरोबर; पोटांत क्षुधा नसतां.

भरल्यावर भरतें—आधींच पुष्कळ असलेल्यांत आणखी घालणें; भरींत भर. (गु.) भरतीमां भरावूं. All strive to give to the rich man.

भरून देणें—न्यून पुरें करणें; नुकसान भरपाई करून देणें.

भरून पावणें—पुरी करून मिळणें; पूर्णपणें हातांत येणें (रकम वगैरे).

भरून येणें—वर येणें. मागें पहा.

भरभरकः ताक वरपा—(महानु.) अस्थिरपणा; चांचल्य.

*__भररे पोटा, जा रे दिवसा__—नोकरचाकर माणसांची वृत्ति कोणीकडून तरी दिवस पार पडला, आपलें पोट भरलें म्हणजे झालें; मग इतर गोष्टी कशा का होतना ! त्यांचें सुखदुःख कशास मानावें ? अशा प्रकारची असते तीस अनुसरून वरील म्हण वापरतात.

भरली माझी डिचकोली, फाटली माझी चिंधकोली, असा माझा गोहो, नीत वर जावो—गरीबींतच समाधान मानणारी पतिनिष्ठ स्त्री म्हणते.

भरली मूठ सव्वा लाखाची--झांकली मूठ पहा.

भरले पोटा, अंजिर कडू--पोटांत भूक नसली म्हणजे अंजीरसुद्धां कडूं लागतात. पोट भरलें असलें म्हणजे उत्तम वस्तुहि खाऊं नयेसें वाटतें. लक्षणेनें, एखादी गोष्ट नकोशी असली म्हणजे मनुष्य तीस नांवें ठेवूं लागतो. नकोशा वस्तूला दोष ठेवणें. ' भरल्या पोटा उंबर कडू ' असाहि पाठ आहे. उंबर पहा. ' A full Stomach loathes the honeycomb. '

भरले ब्राह्मणास दहीं करकरतें--पोट भरलें असलें म्हणजे दहींसुद्धां दातांखालीं वाजूं लागतें. नीट गिळत नाहीं. वस्तु नकोशी असली म्हणजे तींत दोष दिसूं लागतात. वरप्रमाणें.

भरलेल्या पेटीचें कुलूप गेलें आणि रिकाम्या पेटीचें कुलूप आलें--उपयोगी वस्तु जाऊन निरुपयोगी वस्तु हातांत येणें; नुकसानकारक अदलाबदल.

दाता असेल त्यास नेहमीं मान देत असावें व दुर्गुणी मनुष्याला थारा देऊं नये.

भलता---भलताच पसारा आणि झाला म्हातारा—आवांक्या बाहेर खटाटोप मांडला म्हणजे तो आवरतां येत नाहीं आणि त्यामुळें वाजवीपेक्षां अधिक कष्ट होऊन अकालीं वार्धक्य येतें.

भलताच व्यापार केला, तो आला अंगाला—भलत्याच गोष्टींत ढवळाढवळ केली, ज्यांत आपणांस कांहीं समजत नाहीं अशा गोष्टींत पडलें म्हणजे नुकसान पोंचतें.

भलतें ठिकाणीं हगावें, निरपत बसावें—भलतीच गोष्ट हातून घडली म्हणजे ती निस्तरावी लागते. त्यापेक्षां आधींच त्या गोष्टीपासून दूर राहावें हें बरें.

भला---भला घेणें—१ सपाटून मारणें; चांगला तावडींत सांपडला असतां त्याचा खरपूस समाचार घेणें; चांगलें उट्टें काढणें. २ निंदणें; रागें भरणें; बोलून घेणें; खरडपट्टी काढणें.

भलें घेऊन फिरणें-पुसणें-विचारणें—लुबेरेपणानें दुसऱ्याची काळजी वाहणें. विनाकारण स्वतःकडे मोठेपणा घेऊन दुसऱ्याची चौकशी करावयास लागणें

***भलाकर भला होवेगा, सवदा कर नफा पावेगा**—(हिं.) दुसऱ्याचें चांगलें केलें तर आपलेंहि चांगलें होतें व व्यापार केला तरच नफा होण्याचा संभव असतो. रिकामें बसून किंवा नसते उपद्व्याप करून कांहीं मिळत नाहीं.

भला करेगा, भला पावेगा—चांगलीं कृत्यें केल्यास चांगलें फळ मिळेल.

भली भसाडी, गंगथडीची पेंढी, आपटली तर सारा गळाटा—गंगथडींतील गवताची पेंढी फार मोठी व बेडौल व वाईट गवताची असते. तीवरून तशाच प्रकारच्या गोष्टीला उपमा देतात. ‘ दिसणेमें ढब्बू० ’ पहा.

भले आणि साता पाण्यानं धुले—(कों.) ज्याचें पूर्वायुष्य शुद्ध नाहीं अशासंबंधीं उपरोधानें म्हणतात.

भले घोडेको एक चाबूक, भले आदमीको एक बात—चांगल्या घोड्याला एकदां चाबूक मारला कीं पुरतो व चांगल्या मनुष्यास एका शब्दानें सांगितलेलें पुरें होतें.

भले बिचारे ठणठण पाळ—अमरसिंग पहा.

भलें भलें करून भागली व देवपूजेला लागली; भले भले भागले आणि देवपूजेला लागले—सर्व जन्म दुर्व्यसनांत घालवून वृद्धपणीं ईश्वराकडे मन लावणें. करून करून भागली, पहा.

भले भले गेले गोते खात, झिंझुरटें म्हणे माझी काय वाट?—जेथें मोठमोठ्यांचा पाड लागला नाहीं तेथें क्षुद्र लोकांस कोण विचारतो ? तु०–नगाऱ्याची घाई तेथें टिमकीचें काई.

भल्याची दुनिया नाहीं—पाठभेद—खऱ्याची दुनिया नाहीं. चांगल्या माणसाचें कोणी मानीत नाहीं. त्याचे हाल होतात व वाईट आणि खोटीं अशीं जीं माणसें आहेत त्यांची मात्र चलती असते. (गु.) भलानी दुनिया नथी.

भल्याच्या संगतीं भलाचि होतसे । दुष्टसंगे वसे बुद्धि तैसी॥—सज्जनाची संगती धरल्यास चांगले गुण अंगीं लागतात. दुर्जनांची संगत धरल्यास दुष्ट बुद्धि उत्पन्न होते.–सप्र. २.४६. हा संगतीचा परिणाम. तु०–‘भल्याच्या संगानें अवगुण असे तो गुण दिसे । खळाच्या संगानें सुगुण तरि तो लोपत असे॥’ Man is known by the company he keeps.

भल्यो जर अशो तर लावो म्हणतात त्यो कशो?—(गो.) चांगल्या बाया जर अशा तर लावा म्हणून ज्यांना म्हणतात त्या किती भयंकर असतील? ‘स्त्रियश्चरित्रं’ म्हणतात त्याला उद्देशून.

भंवई—भंवई उचलणें—रागानें पाहणें; क्रोधानें डोळे वटारणें.

भंवयास गांठी घालणें; भंवयां चढविणें—कपाळाला आठ्या घालणें.

भंवयास गांठी, तोंडास मिठी—रागावून, रुष्ट मुद्रा करून अबोला धरून बसणें.

भवति---भवति न भवति होणें—होतें किंवा होत नाहीं यासंबंधीं चर्चा, वाटाघाट होणें; वादविवाद होणें. ‘याबद्दल पुष्कळ भवति न भवति होऊन शेवटीं पूजा करावी असेंच ठरलें. ’ –शाब २·१८०. ‘इंदूच्या असल्या प्रश्नांचीं उत्तरें द्यावीं कां न द्यावीं यासंबंधीं आम्हां उभयतांत बरीच बरीच भवती न भवती झाली. ’ –आमच्या इंदूचें शिक्षण, पा. ५३. ‘ त्याच्या गैरहजेरींत

भरल्या गाडीला सुपाचें ओझें; भरल्या गाड्यास सूप जड नाहीं—सामानानें भरलेल्या गाड्यावर आणखी एक सूप टाकलें असतां त्याचें वजन फारसें वाढतें असें नाहीं. ज्याला बरेंच काम करावयाचें असतें त्यासच एखादें आनुषंगिक लहानसें काम करावयास सांगितलें असतां त्याला कांहीं विशेष श्रम घ्यावे लागतात असें नाहीं.

भरल्या पोटाला उंबर कडू—वर पहा.

भरल्या भांड्याची खरवड पुरे !—(महानु) गतवैभवाबद्दल फार अभिमान नको, मोठ्याच्या क्षुद्र अवशेषाची फार बडेजाव नको.

भरिल्लो कळसो चकनळ ना—(गो.) कांठोकांठ भरलेलें भांडें आवाज करीत नाहीं. बुद्धिवान् बायका बडबड करीत नाहींत. अथांग पाण्याला आवाज कमी. उथळ पाण्याला खळखळाट फार या म्हणीच्या अगदीं उलट ही म्हण आहे. तु.—अधभर घगरी छलकत जाय पहा.

भर्लेल्या समुद्रांत मजें एक जायफळ—(गो.) भरलेल्या समुद्रांत माझें एक जायफळ कांहीं अधिक नाहीं. तु.—भरल्या गाडीला सुपाचें ओझें नाहीं.

भरती—भरती येणें—चढ, वाढ होणें; उत्कर्ष पावणें; 'हिंदूंच्या सत्त्व—स्थापनेच्या या उद्योगांना उधान भरतीच आली.' (शि. ल. करंदीकरकृत) पाकिस्थानचें संकट, पा. १७.

***भरती नंतर सुकती नी सुकती नंतर भरती**—(कों.) चक्रनेमिक्रम. प्रथम उत्कर्ष, मग अपकर्ष, पुन्हां उत्कर्ष अशी अवस्था.

भरभराट—भरभराटीचा काल थोरपणा झांकून ठेवतो—मनुष्याची जेव्हां भरभराट असते तेव्हां त्याच्या हातून कांहीं गोष्टी सहज होऊन जातात. त्यामुळें त्याच्या मनाची खरी परीक्षा होत नाहीं. तर ज्यावेळीं तो स्वतः अडचणींत असतो अशा वेळीं त्यानें दाखविलेला मनाचा थोरपणा अधिक उठून दिसतो.

भरम—भरम भारी और खिसा खाली—(हिं.) जवळ कांहीं एक नसतां श्रीमंतीसंबंधीं बाहेर बोलबाला असणें किंवा स्वतःचीहि तशी समजूत असणें. भ्रम पहा.

भरंवसा—भरंवसा तुटणें—विश्वास उडणें; खात्री वाटेनाशी होणें; अंदेशा वाटणें. 'उतावेळी होसी म्हणवुनि तुटे हा भरंवसा ।'—सारुह १.१२६.

भरंवशाची मोट—म्हैस; भरंवशाचें कूळ— अगदीं खात्रीचा मनुष्य. उपरोधानें उलट अर्थींहि वापरतात.

***भरंवशाची मोट आणि पहा माझी वाट**—एखाद्यावर विश्वास ठेवून एखाद्या गोष्टीकरितां खोळंबून बसावें आणि त्यानें वाट पाहावयास लावावें.

भरंवशाची मोट, पाण्यांत लोट—ज्याच्याबद्दल आपली खात्री असेल त्यालाच एखादें काम सांगणें.

भरंवशाची म्हैस टोणगा व्याली; भरंवशाच्या म्हशीस टोणगा—म्हशीस रेडी झाली तर तिचा उपयोग असतो, रेड्याचा कांहीं उपयोग नसतो; याकरितां ज्या म्हशीस रेडी होईल असा पक्का अदमास असावा तिलाच आयत्यावेळीं टोणगा झाला म्हणजे फसगत होते. यावरून ज्यासंबंधीं अगदीं खात्री असावी त्यानेंच वेळेवर दगा दिला असतां म्हणतात. "हीं मुक्ताफळें जेव्हां मोर्ले यांनीं काढलीं तेव्हां टिळकांनीं लिहिलें, 'शेवटीं भरंवशाच्या म्हशीस टोणगाच झाला. याच्या आचळांतून दूध कसचें निघणार !' "—टिच २.५.३५.

भराका—भराक्या सरसा उठणें—झपाट्या बरोबर उठणें; एकदम उठणें; तडाकाफडकीं उठणें.

भराक्या सरसा येणें—जाणें—पडणें—सपाट्यानें, वेगानें येणें, जाणें वगैरे.

भरारी—राघो भरारी—रघुनाथराव पेशवे यास म्हणत. यांच्या स्वाऱ्या, मोहिमा फार जलदीनें होत. —विक १०.

भरारी मारणें—१ उडणें; उड्डान करणें. २ जलदीनें प्रवास करणें. ३ उड्या मारणें; गाळून पुढें जाणें.

भर्गोदेव—(व.) मूर्ख मनुष्य.

भर्ता—भर्ता गेला गांवाला अलंकार टांगले खुंटीला—एखाद्या स्त्रीचा नवरा घरीं नसला व गावांस गेला म्हणजे तिला अलंकार भूषणें वगैरे घालून वेषभूषा करावीशी वाटत नाहीं, त्याप्रमाणें एखाद्या गोष्टीची चहा होणार नाहीं अशी समजूत झाली म्हणजे ती कोणी पुढें मांडीत नाहीं, बाजूस सारून ठेवतो.

भर्त्याचा सत्कार करावा, दुर्गुणाचा उच्छेद करावा—[भर्ता पोषण करणारा]. आपला जो आश्रय-

संवादाचा कार्यक्रम करावा किंवा करूं नये याविषयीं बरीच भवति न भवती झाली.'–दाजी भाग १ पा. १३४.

भंवतीं––भंवतीं भंवतीं फिरली आणि घरची म्हातारी झंवली––(कों.) (अशिष्ट) घरच्या म्हातारीचा काळ, या अर्थी.

भवानी––भवानी आई देवळांत आणि नायटे जगांत; भवानी तुळजापुरीं आणि नायटे पृथ्वीवर––देवी पहा.

अडक्याची (सव्वा रुपयाची) भवानी, बारा (सोळा) रुपयांचा गोंधळ––देवीचा गोंधळ, यांत देवी म्हणून ताम्हनांत एक सुपारी ठेवतात. अडक्याची कोंबडी, पहा.

भवितव्य––भवितव्य तें ब्रम्हादिकां न चुके:––(महानु.) जें होणार तें कधीं चुकत नाहीं. मग तो माणूस कितीहि मोठा असो.

भवितव्यता––भवितव्यता बलवती––(शाकुंतल ६.) प्रारब्धाप्रमाणें सर्व गोष्टी होतात. सर्वंकषा भगवती भवितव्यतैव ।

भष्टी––भष्टी जावप––(गो.) विटाळशी होणें.

भष्टे ऽ कवळो––(गो.) विटाळशीचें अंथरूण. (ल.) अस्ताव्यस्त बिछाना.

भस्कापुरी––१ मिरच्यांची लाल पूड; तांबडें तिखट. २ कवडीमोल जिन्नस.

भस्म––भस्म करणें; भस्मसात् करणें––जाळून खाक करणें; मारणें; नाश करणें. –मो शल्य २·२.

भस्मरोग––भस्म्यारोग होणें–१अति खादाडपणा, खा खा करणें. २ खाल्लेलें अंगीं न लागणें; खूप भूक लागून अन्न पचन न होणें.

भस्मक––भस्मकाची भूक : कामांदयाची अभूक :––(महानु.) भस्मरोगी म्हणजे ज्याला सारखी खाखा सुटलेली असते त्याची जशी भूक किंवा आजारी माणसाला जशी अन्नावर वासना नसते तशी.

भस्मासुर––भस्मासुराक वरु दिलो, ईश्वरा भात्यार हातु दवरूं केलो––(गो.) शंकरानें भस्मासुराला असा वर दिला होता कीं, तूं ज्याच्या मस्तकावर हात ठेवशील त्याचें तात्काल भस्म होईल. या वरानें पुढें तो इतका उन्मत्त झाला कीं, वरदात्या शंकराच्या मस्तकावर हात ठेवून त्याला मारण्याच्या इच्छेनें त्यानें शंकरावरच चाल केली. उपकारकर्त्या माणसावरच उलटणाऱ्या कृतघ्नाला उद्देशून ही म्हण वापरतात.

भस्मासुरालो वोरु––(गो.) भस्मासुराचा वर. या वरामुळें भस्मासुराचा फायदा होण्याच्या ऐवजीं त्यांतच त्याचा अंत झाला. ज्यावेळीं मनुष्य आपल्या चुकीमुळें आपणावर संकट ओढवून घेतो त्यावेळीं, त्याला भस्मासुराचाच वर प्राप्त झाला आहे, असें आपण म्हणतों.

भळंदें––भळंद्याचा गोंधळ घालणें–करणें–[भळंदे=चिंध्यातेल घालून पेटलेलें खापर, मडकें] भळंदें हातां–डोकीवर घेणें. भदें घेणें.

भक्षण––भात भक्षणा, पोळी दक्षिणा––भात पहा.

भक्ष्य––भक्ष्यस्थानीं टाकणें–सोडणें उतरणें––गट्ट करणें; फन्ना उडविणें; फस्त करणें.

भक्ष्यस्थानीं पडणें–उतरणें––१ गट्ट केलें जाणें. २ खाऊन टाकलें जाणें.

भाई––भाईपगडी होणें––एकमेकांची पगडी एकमेकांनां घालून परस्पर मदतीचा करार होणें. अशांना पगडी -बदल भाई (पगडीभाई) म्हणतात. 'आपली त्यांची भाईपगडी झाली आहे तेव्हां पगडीबदल भाईनीं एकमेकांना जी मदत व कुमक करणें भाग आहे ती करा !'–पामो४९५.

भाईबंदीनें सांगणें–विचारणें––मित्रत्वाच्या नात्यानें विचारणें.

भाऊ––भाऊगर्दी––१ मूळ पानपत येथें झालेला मराठे आणि दुराणी यांमधील भयंकर रणसंग्राम. यांत मराठ्यांच्या बाजूला सेनापति सदाशिवरावभाऊ पेशवे होते व ते त्यांत पडले. यावरून निकराचें युद्ध.–पेद ४. 'सव्वा लक्ष फौजेनिशी भाऊगर्दी होऊन प्यादेमात कशी झाली.' –भाव१.२ (ल.) विध्वंस; सत्यानाश. ३ अंदाधुंदी; धामधूम. ' सवेचि झाली भाऊगर्दी । ' –अफला ६५. 'युद्धाच्या भाऊगर्दीत असल्या करारांना किंमत कितपत असते हें अनुभवसिद्धच आहे.' –केसरी १७-११-४१.

भाऊबंदकी पेशा––दावेदारी.

***भाऊबिजेला बहिण आली, लोभाला बळी पडली**––भावाला ओवाळण्याकरितां म्हणून तात्पुरतें

राहण्याचा विचार करून आलेली बहिण भावाच्या लोभानें आणखी राहिली तर तिकडे सासरीं तिजबद्दल गवगवा होण्याचा संभव असतो. थोडक्यांत आटपावयाची गोष्ट जर लांबवली तर परिणामीं अहितकारक होण्याचा संभव असतो.

भाऊभाऊ सख्खे आणि दाइद पके; भाऊ सख्खा आणि दावा पक्का—सख्या भावांत बहुधा त्रितुष्ट असतें. तु०—बाबा म्हणतो मला मुलगा झाला, भाऊ म्हणतो मला दायाद झाला.

भावांचा दावा आणि बायांची वांटणी—भावानें फिर्याद करून वहिनीनें वांटप करणें. भाऊ व भावजय यांच्याशीं बनेनासें झालें म्हणजे वेगळें होणें चांगलें.

भाक——भाक उतरणें; भाकेस उतरणें——वचनपूर्ति करणें; वचन पाळणें; प्रतिज्ञा पूर्ण करणें.

भाक देणें—वचन देणें; शपथ घेणें. ‘ दिली मजला दुब्ळीस भाक वाया । ’ – वत्सलाहरण. ‘ न करी चिंता वेळोवेळीं । म्हणोनी भाक देतसे ॥’– गुच १२.५३.

भाक सत्य करणें——वचन पाळणें.

भाकेस गुंतणें—शब्दास गुंतणें; वचन देणें. ‘ यदुतिलक जिचे हा गुंतला पूर्ण भाके । ’ —सारुह ४'४७. —मोशल्य १'४५.

***भाक जीयेची जाये : तो संसारीं जीये काये ?**—(महानु.) जो आपल्या बोलाला–वचनाला जागत नाहीं, ज्याचें भाषण फोल ठरतें त्याला संसारांत कांहीं फळें लाभत नाहीं.

भाकड—भाकडकथा——१ आडकथा; उपकथा. २ गप्पा गोष्टी; निरर्थक गोष्टी; निष्फळ, नीरस गोष्टी. ‘झाली ही सर्व भाकडकथाच वाटते.’—नाकु ३.८६.

भाकर-री—भाकर पायानें खाणें-मोडणें—मूर्ख, वेडगळ असणें.

भाकरी भाजायला लावणें——हीन सेवा करावयास लावणें; अयोग्य काम देणें, कडक अंमल गाजविणें. ‘ ती आपल्या नवऱ्याला भाकरी भाजायला लावील.’—मोरप्र: १५.

भाकरीचा खेळ खेळणें—भाकरीचा खेळ या नांवाचा मुलें खेळ खेळतात. या खेळामध्यें चपटा दगड घेऊन तो तळ्याच्या अगर नदीच्या कांठावर उभे राहून त्यांत सरपटता फेंकून, पाण्यामध्यें तो टेंकेल त्या ठिकाणीं वर्तुळकावर आकृति होतात त्यांस भाकऱ्या म्हणतात व त्या प्रत्येकाच्या किती होतात त्या मोजून त्याप्रमाणें डाव खेळतात. अशा खेळांत दगडाऐवजीं नाणें वापरून खेळ खेळणें म्हणजे पैशांनीं भाकरीचा खेळ खेळणें; म्हणजे पैशाची उधळपट्टी करणें होय. पर्याय—अत्तराचे दिवे लावणें.

भाकरीचा पिंड——मुख्यतः भाकरी खाणारा. याच्या उलट भाताचा पिंड.

भाकरीची चाकरी——पोटाकरितां चाकरी.

भाकरीला भूक लागणें—जेवण तयार असणें; वाट पाहात असणें.

भाकरीला महाग होणें—अन्नान्न करीत फिरणें; अन्न न मिळणें.

लष्कराच्या भाकऱ्या भाजणें—पूर्वी ज्या गांवीं लष्कराचा तळ असे त्या गांवच्या लोकांना शिपायांचीं, भाकऱ्या भाजणें यासारखीं कामें करावयास लावीत. यावरून आपला ज्याशीं अर्थाअर्थी संबंध नाहीं अशीं कामें करणें. नसत्या उठाठेवी करणें.

***भाकर खाईन व ती तशीच शिल्लक ठेवीन**——(हें होणार नाहीं)——दोन परस्पर विरोधी गोष्टी एकदम साधू पाहाणें.—अर्थमासिक २५-११-३६. तु०—You cannot eat and keep the bread at the same time.

भाकर मोडावी तें तोंड——भाकरी कोठेंहि मोडतां येतें. ती वाटोळी असल्यानें तिला तोंड कोठेंहि पाडावें. एखाद्या गोष्टीची सुरुवात कोठेंहि करतां येतें असें असेल तर म्हणतात.

भाकर भाजली, पोळी करपली, कढी बिघडली सैंपाकीण भली—सर्व स्वयंपाक बिघडून पुन्हां सुगरण म्हणविणें; सर्व कामाचा बिघाड करून चातुर्याची घमेंड मारणें.

भाकरी आसा ताका चाकरी नाका—(गो.) ज्याला खायला आहे तो दुसऱ्याची नोकरी कशाला करील ?

ज्याची खावी भाकरी, त्याची करावी चाकरी—ज्याची० पहा.

भाकरी रुचकर होण्यास पिठांत थोडें मीठ घालावें लागतें—पिठांत मीठ, पहा. —टिसू १५९.

भाकरीला तोंड नाहीं—वर पहा. 'भाकरीला तोंड नाहीं, ती मोडावी तेंच तिचें तोंड.'—निरंभ्रचंद्र १५१.

भाकरीला तोंड नाहीं, भांडणाला मूळ नाहीं—ज्याप्रमाणें भाकरी कोणत्याहि ठिकाणीं मोडून खाल्ली तरी सारखीच लागते, त्याप्रमाणें भांडण केव्हांहि व कसेंहि सुरू होतें.

भाकरेचें बोड्डंक खंयच्या वाटेन तें कळाना—(गो.) भाकरीचें तोंड कुठें असतें तें कळत नाहीं. वाटोळ्या वस्तूचा मुख्य भाग कळत नाहीं.

भाग—**भाग असणें–पडणें–होणें**—उचित असणें; जरूरी पडणें.

भाग तुटणें—निकालांत निघणें; संपणें.

भाग पाडणें—सक्तीनें करावयास लावणें. 'योग्य कारण दाखविल्यास अज्ञान मुलीला तिच्या सासरीं राहण्यास कोणतेंहि कोर्ट भाग पाडणार नाहीं.'—मसाप २.१३५.

भाग फिटणें—१ द्वैतभाव नाहींसा होणें. २ वांट्यांस येणें. 'जें महर्षी वाटलें। विरक्तां भागी फिटलें।'—ज्ञा ५.१४७.

भागा येणें; भागास येणें–पडणें—नशिबीं येणें; वांट्यास येणें. 'बहिणी म्हणे कर्म हेंचि भागा आलें। दुसरा न चाले उपाय हो ॥'—ब ५३७.

भागानें लागण करणें—शेत बटाईनें देणें.

भांग—**भांगाची भरती; भांगाचें पाणी**—कमी भरती.

भांग—जिची सहज लीला, तिला कशाला पाहिजे भांगटिळा!—जी स्वतः खुबसुरत आहे तिला फारसा शृंगार केल्याशिवायहि मनुष्यावर छाप टाकतां येते. जी पहा.

भांगेंत–भांगेमध्यें तुळस—वाईटांत चांगली गोष्ट. तुळस पहा.

भांगमें धत्तूर—भांगेमध्यें धोतऱ्याच्या बिया घातल्यास ती अधिकच मादक होते. यावरून एखाद्या वाईट गोष्टींत आणखी अधिक वाईट गोष्टीची भर घालणें.

भांगी वळींतु तुळशी रोपो—(गो.) भांगेत तुळस.

भागणें—**भागती भुगती**—दैवानें दिलेलें सुखदुःख.

भागल्या भुताचीं झाटें—[भागणें=पळणें] पळणाराच्या हातांतून हिसकून घेतलेली अल्पवस्तु. तु.—चोराच्या हातची लंगोटी; जळत्या घराचा पोळता वासा.

भांगर—**भांगरा कांटॉ**—(गो.) सोनें तोलायचा तराजू. 'मारवाडी कांटा' या अर्थानें म्हणतात.

भांगार पेटप—(गो.) दागिने करणें.

***भांगराऽ दाय, वंटीऽ आधार जाय**—सोन्याची दाय (भात वाढण्याचा पसरट पळा) जरी असली तरी तिला उभें राहण्यास वंटीचा (भिंतीचा) आधार पाहिजे. सोन्याच्या पळीला कुडाचें उटिंगण.

भांगरान बांधून धेवपासारखें उत्तर—(गो.) सोन्यानें मढविण्यासारखा शब्द.

भांगारकारीन मोडता आनी बोंदारकारीनय मोडता—(गो.) दागिने घातलेली बाई आपले दागिने दिसावे म्हणून मुरडते व फाटकें नेसलेली आपलें अंग दिसूं नये म्हणून मुरडते. कार्य एक पण कारणें निरनिराळीं.

भागवणें—**भागवण्याच्या गोष्टी**—अत्यंत कठीण व करावयास अशक्य गोष्टी.

भागानगर—**भागानगरास जाणें**—[भागणें= पळणें. भागानगर=दक्षिण हैद्राबाद] सुंबाल्या करणें; निसटून जाणें.

भागी—**भागीचें घोडें, किवणानें मेलें**—एखादें घोडें दोघांच्या मालकीचें असलें व त्यास किडे पडले तर त्यास बरें करण्याची काळजी दोघांपैकीं एकहि घेत नाहीं व त्यामुळें त्यांतच त्याचा अंत होतो. दोघांच्या मालकीच्या वस्तूची हेळसांड, होते.

भांगी—भांगी हांडी कई चुले चढे—फुटलेलें मडकें कधीं चुल्यावर चढतें काय? दैवहीन कधींहि भाग्यवंत होणार नाहीं.

भागूबाई—भित्रा; भ्याड मनुष्य. 'आरंभशूर आणि मागाहून भागूबाईप्रमाणें पलायन करणारे वीरपुरुष समाजसुधारणेला उपयोगी नाहींत.'—इंदुप्रकाश.

भागूबाईचा कुल्ला!—अत्यंत भित्रा माणूस.

***भागूबाई, दादाला कां कराना? म्हणे तुम्हीच कां व्हाना!**—एखाद्यास त्याच्या बऱ्याची गोष्ट सांगावयास जावें तों त्यानें आपल्याच गळीं पडावें. पाटील, मट पहा.

भागूबाई भित्री, मागें लागली (खाकेंत) कुत्री— भित्र्या मनुष्याच्या पाठीस टवाळ लोक लागतात. भित्र्यास अधिकाधिक त्रास होत जातो. तु.–भित्यापाठीं ब्रम्हराक्षस.

भागूबाईचें कर्म, भागूबाईस माहीत—ज्याची कृति त्यालाच कळते व तोच तिचें बरेंवाईट फळ भोगतो.

भागूबायच्यो आबोल्यो—(गो.)आज फुलझाडाचें बीं लावून उद्यां फुलें गोळा करण्यास निघाल्यासारखें आहे. फाजील घाई करण्यांत काय अर्थ! फार उताविळ होण्यांत काय मजा? तु.–उतवळा नवरा गुडघ्यास बाशिंग. पी हळद हो गोरी.

भागूबाये आबोली, रोयनाफुडें फुलोली— (गो.) भागूबाईची आबोली लावतां लावतांच फुलली. एखाद्या भाग्यवंताचें कार्य हां हां म्हणतां होऊन जाणें.

भागूबायेच्या रोव्ला, सगलो संसार भल्ला— (गो.) भागूबाईच्या रोवळींत सगळा तिचा संसार भरून राहिला आहे.

भाग्य—-भाग्य खुलणें–फळणें—सुखी होणें.

भाग्याचा भोपळा— हतभागी मनुष्य; दुर्दैवी.

भाग्यास चढविणें—श्रीमंत व सुखी करणें.

***भाग्य आल्यार चडूं नये, दरिद्र आल्यार रडूं नये**—(गो.)मोठेपणा प्राप्त झाल्यावर गर्व करू नये; गरिबी आल्यावर रडूं नये.

भाग्याचा भोपळा, चौपायीं मोकळा—(व.) जो चौपायीं म्हणजे चोहोंबाजूनें मोकळा आहे, बायका पोरांचें वगैरे संसाराचें कोणत्याच प्रकारचें लचांड ज्याचें मागें नाहीं, ज्याचा संसार सर्व नाशाप्रत गेला आहे, तो मनुष्य भाग्याचा गड्डा म्हणजे व्याजस्तुतीनें दुर्भाग्याचा पुतळाच समजावा. ज्याला कोणी उरले नाहीं, जो अगदीं दुर्दैवी आहे, अशा माणसाबद्दल म्हणतात.

भाचा—-भाच्यानें आपली जीभ कापली आणि मामीच्या ××त घालून बसला, तिघांचें काम अडलें—(अशिष्ट.) एकानें केलेला उपाद्व्याप अनेकांस भोंवतो.

भाजणें—-भाजला पापड न मोडणें—(व.)पापड ढिसूळ जिन्नस असतो व तो सहज मोडतो. त्यांतूनहि भाजलेला पापड मोडण्यास तर मुळींच आयास पडत नाहींत. हें भाजला पापडहि मोडण्याचें काम हातून न होणें म्हणजे कमालीची दुर्बलता अंगीं असणें होय.

***दुधानें भाजला तो ताक फुंकून पितो**—दूध पहा.

भाजलेला मुलगा हा अग्नीस भीत असतो— मनुष्याला एकदां अद्दल घडली म्हणजे तो दुसऱ्या वेळेस सावध होतो.

भाजून बीं पेरलें ना—(गो.) एखादी गोष्ट करायला किंवा एखाद्याचा प्रतिकार करायला मी नामर्द नाहीं, अशा अर्थानें म्हणतात.

भाजी—-(कागद, पांघरूण वगैरेची) भाजी करणें—गुंधडणें; नासधूस करणें; अव्यवथित ठेवणें.

***भाजी, जीव नाहीं राजी**—भाजी चांगली नसणें. कवळ अनुप्रासावरून बनविलेली म्हण.

भाजींत ढोकळा, अन् पांड्या मोकळा—(व.) [ढोकळा=चण्याचा वडा, गोळा.] ढोकळा प्रायः भाजी-बरोबर बरोबर शिजवून खातात. हा ज्या भाजीबरोबर शिजविला जातो तींत तो मिळून गिडबिडत नाहीं, अलिप्त राहतो. त्याप्रमाणें पांड्या अथवा पटवारी जरी गांवदप्तरचें कामकाज करतो तरी त्यापासून अलिप्त असतो; त्याच्या लिहिण्यानें कांहीं नफा नुकसान झालें तर असामीचें होतें; पांड्या आपला मोकळाच राहतो. 'नुकसान झालें तर आमचें होईल, तुम्ही आपले बरेंच आहांत, भाजींत ढोकळा अन् पांड्या मोकळा!'

भाजीसारखें परतावें आणि जगासारखें वर्तावें—(व.) जशीं साधनें असतील तसें कार्य करावें व आपल्या भोंवतीची परिस्थिति पाहून वर्तन करावें.

भाजेवेली कीडशी फापुडची—(गो.) एखाद्यानें आपल्यावर आलेलें संकट किंवा अंगावर चालून आलेला शत्रु यांना क्षणांत दूर ढकलून दिलें कीं, भाजीच्या पानावरची कीड जशी टिचकीसरशी झटकून टाकावी तसें त्यानें केलें असें म्हणतात.

भाट—-भाट्याची जमीन—मळीची जमीन. –कृषि १६.

भाटकाराच्या भेंसांतली कुळा—(गो.) दुसऱ्याच्या ताब्यांतले लोक.

***भाडकारा एकूच भाट, गुणकारा धा भाटां—**(गो.) सावकाराला एकच शेत पण गुणी माणसाला जिथें जाईल तिथें शेतेंच शेतें मिळतात. गुणी माणूस जिथें जिथें जाईल तिथें तिथें त्याला पैसा व कीर्ति मिळत असते.

भाटकाराक एकच भाट, मुंडकाराक हजार भाटां—(गो.) धन्याला शेत एकच; पण खंडानें जमीन करणाऱ्याला हें ना तें, तो करील तेवढीं मिळत असतात.

भाटकाराचें वारें, सगळें भाटाक सारें—(गो.) भाटकाराचें, जमीनीच्या मालकाचें नुसतें वारें हें भाटाला (माडांच्या बागेला) भागेल्यानें घातलेल्या खतपाण्यापेक्षां अधिक असतें. धन्याच्या दृष्टींत जी माया असते ती भागेल्याच्या श्रमांतहि असणें शक्य नाहीं.

भांड—-रांड भांड म्हैसा, बिघडे तो होय कैसा— रखेली स्त्री, नट किंवा निर्लज्ज मनुष्य आणि रेडा एकदां यांचें बिनसलें म्हणजे त्यांची समजूत करणें कठीण असतें.

भांडके साथ खेती कीया, गा बजाके उन्हेंच (उन्होंनेच) लिया—(हिं.)नटगवयाला शेतीमध्यें पातींत घेतल्यास तो श्रम तर करीत नाहींच,नेहमीं गात वाजवीत बसतो व आपणाला गाण्याबजावण्याच्या नादीं लावून सर्व फायदाहि आपणच गट्ट करतो. भलत्याच मनुष्याशीं सहकार्य करूं नये.

भांडाच्या गांडीखालून जाऊं नये— गवई, नाटकी वगैरे लोकांवर विश्वास ठेवूं नये. किंवा भांडखोर मनुष्याच्या वाऱ्यालाहि उभे राहूं नये.

भांडण—-भांडण उकरून काढणें—मुद्दाम भांडण उपस्थित करणें.

भांडणाचें तोंड काळें—भांडण शक्यतों टाळावें. —गांगा १६२.

***भांडणांत काय बोललें आणि दुष्काळांत काय खालें हें आठवूं नये; भांडणांत बोललेलें अन् दुष्काळांत खालेलें विसरून जावें—** मनुष्य भांडत असतां अविचारानें कांहीं तरी बोलून जातो; तसेंच दुष्काळ पडला असतां मनुष्य वाटेल तें खाऊन निर्वाह करतो. याकरितां अशा गोष्टी मागाहून आठवून त्याबद्दल खंती करीत बसूं नये.

भांडणापेक्षां अबोला बरा—भांडण करण्यापेक्षां न बोलणें अधिक बरें.

भांडणें—-दहीं (दहिंभात) वाळत घालून भांडणें—भांडण उकरून काढणें. दहिंभात पहा.

पाणी पिऊन भांडणें—-(पाणी, विश्रांति इ.घेऊन) ताजातवाना होऊन पुन्हां भांडणास सुरुवात करणें.

***भांडभांड भांडला आणि शेवटीं धरिला अबोला—**-पुष्कळ वेळ भांडण करून मग अबोला धरण्यापेक्षां आधींच अबोला धरला असता तर भांडण्याचे श्रम तरी वांचले असते.

भांडतें असावें पण नांदतें असावें—आपला शेजारी अगर नातेवाईक भांडखोर असला तरी तो नांदावा अशीच इच्छा करावी. कारण नांदता असेल तर वेळेवर केव्हां तरी उपयोगी पडण्याचा संभव असतो.

भांडतें असावें पण बुडतें असूं नये—-आपणाशीं विरोध असला तरी आपला शेजारी, नातेवाईक वगैरे कोणास अपयश, नाश करूं नये किंवा चिंतूं नये.

भांडवल—-भांडवल बाहेर पडणें—गौप्यस्फोट होणें. ' आणि सर्व भांडवल बाहेर पडलें. '—चंद्र १३६.

भाडें—-भाड्याचा बैल—ज्याप्रमाणें आपण भाड्यानें बैल घेतला म्हणजे त्याच्या खाण्यापिण्याची वगैरे काळजी न घेतां त्यास खूप राबवतों त्याप्रमाणें केवळ कामास जुंपलेला. तु०—बिगारीचें घोडें आणि तरवडाचा फोक.

बिन भाड्याचें घर—तुरुंग. बिन पहा.

जळतें घर भाड्यानें घेणें—नसतें लचांड गळ्यांत घेणें. जळणें पहा.

***भाड्या बैलाक देवा राखणें—**(गो.) भाड्याच्या बैलाला देवाची राखण. पोरक्यांना परमेश्वराचा आसरा. अरक्षितं तिष्ठति दैवरक्षितम् । सुरक्षितं दैवहतो विनश्यति ॥ तु०—अंधळ्याच्या गायी देव राखतो.

भाड्याचें घर आणि खालीं कर—ज्या गोष्टीवर आपली सत्ता नाहीं ती आपल्या हातून केव्हां जाईल त्याचा नेम नसतो. घर पहा.

भाड्याचें घोडें, ओझ्यानें मेलें—-केवळ काबाडकष्ट करणाऱ्याच्या श्रमाकडे कोणी पाहात नाहीं व त्याची काळजी कोणी करीत नाहीं. यामुळें तें कामाखालीं मेलें तरी त्याची काम घेणारास पर्वा नसते.

भाड्याचें घोडें-तट्टू आणि तरवडाचा फोक—बिगारीचें घोडें पहा. –गांगा १८०.

भाड्याचें घोडें आणि बायको रडे—जो मनुष्य केवळ काबाडकष्ट करतो पण ज्याच्या श्रमाची कोणी कदर करीत नाहीं अशा मनुष्याबद्दल त्याच्या बायकोशिवाय कोणाला सहानुभूतिहि वाटत नाहीं.

भाड्याचें घोडें केलें, तें रस्त्यांत मेलें—वर प्रमाणेंच.

भाड्याचें घोडें नडलें, मालकाचें काम अडलें—जें घोडें केवळ भाड्यानेंच द्यावयाचें असतें त्याची निगा घोड्याचा मालकहि नीट ठेवीत नाहीं; त्यामुळें तें वाटेंत चालेनासें होतें व भाड्यानें घेणाराचें काम अडून राहतें. भाडोत्री माणसांकडून काम सुरळीतपणें पार पडणें कठीण असतें. त्याला जिव्हाळ्याचींच माणसें लागतात.

भाडेकरी--भाडेकऱ्याची काळजी भाड्यापुरती—जो तो आपल्या फायद्याकडे पाहात असतो; अवांतर गोष्टींची कोणी फिकिर करीत नाहीं.

भांडें—भांडें बाहेर येणें—अंग बाहेर येणें.

भांडें फुटणें—१ गुह्य फुटणें. २ जुलाब होणें.

भांडीं खरवडणें—मोलमजूरी करणें. ' एकीला विद्वान् नवरा मिळतो, दुसरीला मूर्ख मिळतो; एक श्रीमंताच्या घरीं पडते, दुसरी लोकांचीं भांडीं खरवडते. ' –शाब १·१३९.

भांडीं डागणें—तोफेस बत्ती देणें. ' बंदुकीचा व भांडीं डागायाचा अभ्यास असावा.'–मराआ ३३.

भांड्याच्या तोंडीं-मुखीं उडविणें—तोफेच्या तोंडीं देऊन ठार करणें. 'कां भांड्यांमुखें उडविणें । या नांव आदिभूतिक ।।' –दा ३·७.७२.

भांड्यास भांडें लागणें—जवळ जवळ राहाणाऱ्या माणसांची बोलाचाली होणें; शेजाऱ्या शेजाऱ्यांत मतभेद तंटे इ. होणें.

***भांड्यास भांडें लागलें कीं आवाज व्हावयाचा**—एका घरांत असणारे किंवा शेजारी शेजारी यांमध्यें एखादे वेळीं तंटाभांडण व्हावयाचेंच, त्याला महत्त्व देऊं नये.

भांड्याला भांडें लागावयाचेंच; भांड्याला भांडें लागेलच लागेल—वर पहा.

भाडोत्री--भाडोती कामाची, दुर्दशा होते धन्याची—ज्या मनुष्याचें कामांत लक्ष नाहीं व जो केवळ पैशाकरितां काम करतो अशा मनुष्याच्या कामापासुन फायदा होण्याच्या ऐवजीं नुकसान मात्र होतें.

भाण—भाण फुटल्यावर कयल्यो आसात—(गो.) रांजण फुटला तरी तुकडे आहेत. ' पडलों तरी नाक वर ' अशा अर्थानें.

भाणवसा—भानवसा पहा.

भाणस—भाणस जाणें—व्यर्थ होणें; वायां जाणें; बुडणें. ' पिक सर्व कोंवळें कापिलें । आमचें जीवित भाणस गेलें । ' –गुच ४८·२४.

भात—भात मोडणें—(राजा.) भात विकणें.

भात रावणें—भात मुरण्याकरितां उडवी रचून ठेवणें.

***भात केला बायकोनें, फन्ना केला गोतवळ्यानें**—एक श्रम करतो पण त्याचें फळ अनेक लोक उपभोगतात.

भात पटणीचें आणि राज्य भटणीचें—पटणीचें भात हलकें असतें. हा तांदूळ भाकर पिठी इ. ला वापरतात. तेव्हां पटणीच्या भाताप्रमाणें भटणीचा कारभार दरिद्री असणार. श्रीमंती भोगण्याची संवय नसल्यानें तिची मनोवृत्ति क्षुद्रच असावयाची.

कोंकण्ये आणि भातबोकण्ये—कोंकणस्थ लोक बहुधा भातावर राहतात. म्हणून त्यांना इतर जाती याप्रमाणें चिडवितात. देशस्थ पहा.

भात भक्षणा, पैसा दक्षणा—थोडक्यांत समजूत काढणें. वरप्रमाणेंच.

भात भक्षणा, पोळी दक्षणा—अगदीं निकृष्ट प्रतीचें आदरातिथ्य.

भात सोडावा पण सांथ सोडूं नये—ज्याच्याशीं आपण एकदां सहकार्य करावयाचें ठरविलें त्याला जेवण टाकूनहि साहाय्य करावें; त्याची कधीं उपेक्षा करूं नये.

भातका खाना, उसके भरोसो गांव मत जाना—जो मनुष्य केवळ भात खाऊन राहतो त्याच्या अंगांत फारसा दम नसतो, तो फारसा नेट धरूं शकत नाहीं. यामुळें अशाच्या संगतींत दूरचा पल्ला घेणें कठिण असतें. दुर्बळाच्या संगतीनें श्रमाचें काम करण्यास घेऊं नये.

भाताचें खाणें काय आणि ब्राह्मणाचें मारणें काय--ज्याप्रमाणें भात खाल्लेला जिरून जातो त्याप्रमाणें ब्राम्हणानें दिलेला मारहि पोंचट असतो.

भाताचें खाणें काय, बायकोचें मारणें काय--वरप्रमाणेंच. किंवा बायकोचें मारणें कांहीं बाधावयाचें नाहीं.

भाताला तांदुळ नाहीं,पाण्याला आधण नाहीं--कशास कांहीं ठिकाण नाहीं. अगदीं प्रारंभापासून तयारी करावयाची असते.

भातावर तूप नसलें तरी चालतें, परंतु मिशास पाहिजे--घरीं खावयास नसलें तरी बाहेर पोकळ ऐट करणारा.

भांत---**भांतीभांतीचा**--तऱ्हतऱ्हेचा;नानाप्रकारचा.

भातें---**भातें मारप**--(गो.) ताव मारणें.

भादवा----**भादव्यांतला**--भाद्रपद महिन्यांतला ओला चारा खाऊन माजलेल्या रेड्यासारखा; माजलेला; दांडगोबा.

***भादवें भट्टू, आखाडीं तट्टू आणि पौषीं कुणबट्टू**—आखाड पहा.

भादव्यांत भट्टू आणि आश्विनांत तट्टू—आश्विन पहा.

भादा---**भादा पडणें**--(व.) नरम येणें.

भान---**भान्याची भूक अन् दृष्टीची माया**--(व.) ताट पाहिलें कीं भूक लागणें आणि समोर मनुष्य पाहिला कीं त्याबद्दल प्रेम वाटणें, हीं वरवरचीं असतात. मनापासूनचीं नसतात. तु०-देखल्या देवा दंडवत.

भानवसा, भानोसा---**ससा भानोशीं येणें**--**भानवश्यास सांपडणें**--[भानवसा=चुलीमागचा ओटा; स्वयंपाक घर.] इच्छित वस्तु प्रयत्नाशिवाय हातीं येणें; अगदीं आयता कचाट्यांत सांपडणें. ‘ जेवीं ससा माणवसा आला । तो मुके प्राणा ॥ ’–कथा ४.७.१२०. ‘ नजीबखान रोहिला ससें भाणवशिवास सांपडतें तैसा आला आहे.’ –माब ४१.

भांबावणें---**भांबावलें भूत झाडाला म्हणतें उदव उदव**--[झाड=भूतानें पछाडलेलें मनुष्य] भूत झाडाला वास्तविक छळीत असतें पण तेंच घाबरलें व त्यास सुचेनासें झालें म्हणजे त्यालाच धूपानें ओवाळूं लागतें. त्याप्रमाणें मनुष्य घाबरला म्हणजे भेकडाचेंहि पाय धरूं लागतो.

भामटा---**भामट्याच्या आई, भोंदून लोका खाई**--भामट्याची आई भामटीच असते.

भायर---**भायर करप**—(गो.) हद्दपार करणें.

भायर-भायरो जावप—(गो.) १ बहिर्दिशेस, शौचास जाणें. २ तोंड घेऊन जाणें. ३ मरून जाणें.

भायर पडप—(गो.) मरणें.

***भायर गोरो ,भितरीं काळो**—(गो.) बाहेरून गोरा पण आंतून काळा.मधु तिष्ठति जिव्हाग्रे हृदये तु हलाहलम् !

भायलें सुतक भायर गेलें—(गो.) बाहेरचें सुतक बाहेर गेलें. एखादी वस्तु किंवा पैसा इकडून घ्यावयाचा आणि परस्पर तिकडे देऊन टाकायचा, अशा वेळीं म्हणतात.

भायीर पोवोंतु, भित्तरीं खवोंतु; भयर पर्वत, भितर खर्वत— (गो.) आंतुन एक बाहेरून एक; वरून गुळगुळीत पण आंतून खडबडीत. बाहेरील देखण्यावरून फसूं नये.

भायरी--- **भायरी देणें**—१ रेचक देणें. २ निर्भर्त्सना करणें; टाकून बोलणें.

भायलो--- **भायलो लोक**—(गो.) शूद्र लोक.

भायली पीडा—१ उपदंशविकार. २ भूतबाधा.

भार--- **भार घालणें**— १ त्रास देणें ; आपलें ओझें एखाद्यावर लादणें ; मदतीसाठीं अवलंबून असणें. ‘किती भार घालूं रघूनायकाला । मजकारणें शीण येईल त्याला ।’–रामदास करुणाष्टकें ३.४. २ अंग चेपणें. ‘ कल्याण गोसावी भार घालिताती ।’– सप्र २·३१; ‘ तेथें स्त्रिया दिलभार घालिताती ।–’सप्र. २·४१.

भार टाकणें—ओझें टाकणें; आपणाकरितां श्रम देणें; स्वतःकरितां तोषीस देणें, खर्च करायास लावणें. ‘ आपले जांवयावर त्यांनीं भार टाकला.’– इंप ५१.

***भार, ना उपकार**—खर्चांत पाडून वाईटपणा देणें. गांगा २०६.

भार--- **भार येवप**—(गो.) अंगांत अवसर येणें.

भारा-- **भाराभर चिंध्या पण एक नाहीं धड**—एक पहा. चिंध्या पहा.

भाल—सुवर्णाची भाल, करडांत घाल—चांगल्या वस्तूवर चांगली वस्तूच चालवावी. नाजूक शत्रूवर नाजुकच हत्यार चालवावें. समसमायोग पहावा.

भाला—भालेराई गाजविणें— स्वच्छंदपणें लूट, लढाई इ. करणें; पुंडाई करणें. 'जाधव०– तुम्ही बंडाचा फैलाव करून चार दिवस भालेराई गाजवण्याचा विचार योजला आहे याचा परिणाम सुचा नाहीं.'–सिसं १.२.

***खांद्यावर भाला आणि जेवायास घाला**—खांद्यावर भाला टाकला कीं हक्कानें लोकांकडून सेवा घेणें; जबरदस्तीनें उकळणें; जरब दाखवून एखादी गोष्ट मिळविणें.

भालू—भालूसारखा असणें—कृश, रोड असणें.

भाव—भाव पाहणें– परीक्षा करणें; अनुभव घेणें.

भाव भाजणें—१ दुष्ट हेतु तडीस नेणें. २ दुष्ट भाकित प्रत्ययास येणें.

भाव सोडणें—१ पच्छाडलेल्या माणसास सोडणें. २ मरणें. ३ नाशाच्या मार्गांत असणें.

भावाचा भुकेला—भक्ति, श्रद्धा पाहिजे असलेला. 'देव भावाचा भुकेला।'

भावों सरणें— वाटूं लागणें. 'तेथ आदित्यापासौनि पार्थां। आइकेजि ऐसीचि अवस्था। दुणावली हे यदुनाथा। भावों सरलें।'–माज्ञा ६.४८७.

***जसा भाव, तसें फळ**—जशी भक्ति असेल त्याप्रमाणें परमेश्वर कृपा करतो. पर्याय– इच्छा तसें फळ. 'भाव तैसें फळ। न चले देवापाशीं बळ॥'– तुगा २७७७.

भाव धरी तया तारी पाषाण।—दुर्जना सज्जन काय करी॥–तुगा ३००५. परमेश्वरावर श्रद्धा असेल तर दगड बांधूनसुद्धां मनुष्य पाण्यावर तरंगूं शकेल. दृढ भक्ति असल्यावर मनुष्यास अशक्य कांहीं नाहीं.

भावाची भाजी आणि कुभावाचा भात—श्रद्धेनें दिलेली निकृष्ट वस्तुहि दुर्बुद्धि मनांत धरून दिलेल्या उत्तम वस्तूपेक्षां अधिक चांगली. तु०–विदुराच्या घरच्या कण्या.

भावासारिखा देव—जसा भाव तसा देव. परमेश्वर भक्तीनेंच वश होतो. जशी भक्ति करावी तशी परमेश्वराची कृपा होते. 'भावा सारिखा देव फलद्रूप आपण।'–सप्र ८ ८७. तु.–भावेन देवं कलया नरेंद्रम्।'

भावई, सण दिवई—[भावई = एक सणाचें नांव. जेष्ठ अमावास्या. दिवई = आषाढी आमावास्या; दिव्याची आवस] (कर.) भावई सणामागून दिवई सण येतो.

भावका—भावका देवीला नाहीं नवरा आणि वेताळाला नाहीं बायको—म्हाळसाबाईला नाहीं नवरा आणि म्हसोबाला नाहीं बायको याप्रमाणें. ज्याला ज्याची गरज तेंच दुसऱ्यामध्यें त्याला मिळालें म्हणून दोघांचें जमलें.

भावका देविक नासलो घोव, वेताळाक नासली बायल—(गो.) वरप्रमाणेंच. भावका देवीला नव्हता नवरा आणि वेताळाला नव्हती बायको. दोन गरजू माणसांनीं परस्परांचा उपयोग करून घेऊन कसातरी आपला हेतु साधून घेणें.

भावका देवीचो टिळो—(गो.) मोठ्या आकाराचा कुंकमतिलक, मळवट.

भावना—भावना तशीं फळें— भाव पहा.

भावपण—भावपणाचा सोनार पण जरा तरी चटका घेणार—सोनार कितीहि विश्वासु असला तरी थोडी तरी कसर काढल्यावांचून राहात नाहीं.

भावी—भावी होणार तें चुकत नाहीं— जें व्हावयाचें असा ईश्वरी नेमनेम असतो तें टळत नाहीं. यदभावी न तद्भावी भावीचेन्न तदन्यथा। 'कृष्णा म्हणे समर्थ न कोणीही सुज्ञ भावि टाळाया'–मोसभ ४.१०१.

भावीण—भाविणीचा कासोटा—(ल.) ज्याप्रमाणें भावीण कोणा एकाची नसते त्याप्रमाणें वाटेल त्यानें कोणालाहि न विचारतां वापरावयाची वस्तू, वस्त्र, इ. सार्वजनिक माल.

भाविणीचा कासोटा (सदा पोकळ)—भावीण ही बहुधा दुराचारी असते.

भाविणीचें चवर—(गो.) भावीण देवाजवळ उभी राहून चवरी वारते; पण ती देवावर वारते अशी दिसत नसून स्वतःच्या अंगावरच वारते अशी दिसते. यावरून बिगार काम, मनापासून होत नसलेलें काम.

***भाविणीच्या माथ्यांत खोवली कळी, नी भावीण नाचते सगळी माळी**—(कों.) आधींच नाचरी, त्यांत पायीं बांधली घागरी, याप्रमाणें.

भावार्थी—**भावार्थ्याक देव पावता**—(गो.) भाविकाला देव प्रसन्न होतो. भाव पहा.

भाष—**भाष घालणें**—शपथ घालणें. 'यास कोणी इस्कील करील त्यास गुरुद्रोहाची भाष असे.' ऐतिहासिक दानपत्रांतील शपथ.

भाष सत्य करणें—वचन पाळणें.

भाषण—**अरसिकभाषणतो रसिकजनैः सहवरं कलहः।**—अरासिक मनुष्याशीं भाषण करण्याचा प्रसंग येण्यापेक्षां रसिकाबरोबर कलह करणें पत्करतें.

भाषा—**भाषा करणें**—१ बोलणें; उच्चारणें. २ कामासंबंधीं बोलणें-चालणें, वाटाघाट करणें. ३ विरुद्ध ग्रह करून फसविणें.

भाष्य—**भाष्य करणें**—१ खरें खोटें, पदरचें घालून, तिखट मीठ लावून, राईचा पर्वत करून सांगणें, लिहिणें. २ चर्पटपंजरी, वटवट, बडबड करणें. ३ पराचा कावळा करणें.

भाळ—**भाळ पिटणें**—कपाळ आपटणें. 'तें कळजां तच्छोकें रुरु एकांतीं रडे पिटी भाळ।'—मोआदि ३.३१.

भाळ फुटणें—नशीब फुटणें; आपत्ति ओढवणें. 'आपुलें फुटलें जरि भाळ।'—संग्रामगीतें १२५.

भाळीं लिहिणें—नशीबांत असणें. 'सुखदुःख घडे विधिनें लिहिलें पहिलेंच कीं असें भाळीं।'—मोकर्ण २.२८. 'नसेल माझ्या लिहिलें भाळीं काव्यदेवीचा कंठमणी।'

भिकार—**भिकार चाळे**—दरिद्रीपणाचीं लक्षणें; निष्फळ चळवळ.

भिकारदासावर हुंडी—अत्यंत गरीब माणसाकडे केलेली पैशाची मागणी.

भिकारी—**भिकारी हाड**—१ गरीब कुळी. २ हीन जीवित.

***भिकारी आणि चोखारी;भिकारी जीभ चोखारी; भिकारी तर भिकारी पण ओकारी; भिकाऱ्याला ओकारी-ओकाऱ्या**—दरिद्री असून पुन्हां मिजासी. भिकाऱ्याला आवडनिवड असूं नये; तशी असेल तर कोणी मदत करणार नाहीं. 'बाकी तें असंच असतं. भिकाऱ्यांनाच भारी ओकारी असते.'—फाटक, नाट्यछटा १.

भिकारी उदार आणि श्रीमंत कृपण—भिकारी मनानें उदार असतो पण त्याजवळ द्यावयास कांहीं नसतें व श्रीमंत मनुष्याजवळ द्रव्य असतें पण तो कंजूष असतो. मिळून दोहोंपासूनहि कांहीं फायदा होत नाहीं.

भिकारी हे दानाची चर्चा करणारे नसावेत—भिकाऱ्याला जें मिळेल तें त्यानें संतोषानें घ्यावें. त्याबद्दल चिकित्सा करीत बसणें हा मूर्खपणा आहे. Beggars can not be choosers, या इंग्रजी म्हणीचा अनुवाद.

भिकाऱ्याऽ आवय विकाक गेली—(गो.) भिकाऱ्याची आई दुसऱ्याचे कष्ट उपसतां उपसतांच मरून जायची. तिला कधीं जन्मांत सुख म्हणून नसायचें.

भिकाऱ्याकडेन भीक मागल्यार हागसर मार—(गो.) भिकाऱ्याजवळ भीक मागितली तर तो दंडा पुढें करतो. गरीब लोकांकडून मदतीची अपेक्षा करूं नये, केल्यास त्यांच्यापासून मदतीऐवजीं त्रासच तुमच्या वांट्यास येईल. तु०—एकादशीकडे शिवरात्र गेली आणि साऱ्या रातभर कुडकुडून मेली.

भिकाऱ्याचा हात धोत्रांत—भिकारी मनुष्य बहुधा बेपर्वा असतो.

भिकाऱ्यांचें कधीं दिवाळें निघणार नाहीं—भिकारी मनुष्याजवळ स्वतःचें असें बहुधा कांहींच नसल्यामुळें त्यास दिवाळें निघण्याची भीति नसते. मुळांतच कांहीं नसल्यावर तें गमावण्याचा संभव नसतो.

भिकाऱ्याचें नशीब भिकारी—भिकारी मनुष्य बहुधा दुर्दैवी असतो.

भिकाऱ्याचें लेकरूं लाडकें, म्हाताऱ्याची बायको लाडकी—भिकारी मनुष्याला प्रेमाचें स्थान म्हणजे त्याचें अपत्य होय; त्याप्रमाणें वृद्ध मनुष्यास प्रेमाचें स्थान म्हणजे त्याची बायको.

भिकाऱ्याच्या घरीं, नारायण करी चाकरी—(महानु.) परमेश्वर गरीबाला साहाय्य करतो.

भिकाऱ्याच्या घरीं भीक मागायला गेला, हागतोवरी मार खाल्ला—(व.) जो भीक घालीत नाहीं त्याबद्दल म्हणतात. मागें गोमांतकी म्हण पहा.

भिकाऱ्याच्या पोराक कोमुर्फेचें फेस्त—(गो.) मोठ्या गजबजलेल्या व सुंदर अशा कोमुंर्फेंच्या यात्रेस एखाद्या भिकारड्याच्या पोरानें जाण्याचा वेडगळ हट्ट करण्यासारखें आहे.

भिकाऱ्याच्या पोराक शिरकोंड्याचे(शेळकुंडाचे) खेळ—(कों.) भिकाऱ्यांचे चाळेहि भिकारच असणार.

भिकाऱ्याच्या पोराक शेटां बहू—(कों.) (अशिष्ट) भिकाऱ्याचीं लक्षणें, अंगांगें हीं दारिद्र्यदर्शीच असतात.

भिकाऱ्याच्या पोराला ओकारी फार; भिकाऱ्याला ओकाऱ्या सोळ्या—भिकेचें खाणार त्याला मस्ती फार. मागें पहा.

भिकाऱ्याला ओकारी, मुद्दाम येई दुपारीं—भिकाऱ्याला आवडनिवड असूं नये.

भिकेसरी——**भिकेसरी कीं लंकेसरी**—भिक्षेश्वर पहा.

भिंग——**भिंग देणें**—अभ्रकाचें पुट देणें. 'तरि तें मोतियांसी भिंग देणें। तैसें होईल॥'—ज्ञा १०.१४.

भिंगरी——**पायास भिंगरी असणें**—नेहेमीं भटकत असणें. भोंवरा पहा.

भिजणें——**(एखाद्यांकडे) हात भिजणें**—एखाद्याच्या घरीं जेवण्याचा प्रसंग येणें. बहुतेक जेथें कधीं असा प्रसंग येत नाहीं अशाबद्दल योजतात.

भिज-भिजत कांबळें—(कांबळें चांगलें भिजण्यासाठीं फार वेळ पाण्यांत ठेवावें लागतें.) लांबलेलें काम

भिजत पडणें; भिजत कांबळें--घोंगडें ठेवणें-पडणें—एखादी गोष्ट निकालांत न काढणें, तशीच पडूं देणें, ठेवणें; लांबत जाणें.

***भिजत कांबळें ठेवणें जड होतें**—एखादें काम फार लांबत चाललें म्हणजे दिवसेंदिवस तें करणें जड वाटूं लागतें.

भिजलेलें घोंगडें भिजत पडावयाचें—एकदां काम लांबणीवर पडलें म्हणजे त्यास फार दिरंगाई लागते.

भिजेन पण नाटक पाहीन—हौसेकरितां मनुष्य त्रास सहन करण्यासहि तयार होतो.

भिजवणें——**भिजवणी करणें**—नांगरण्यासाठीं जमीन भिजविणें.

हात भिजविणें—लांच देणें; हात ओला करणें; चिरीमिरी देणें.

भिडें——**भिडीं बांधणें**—दगड रचून चुना लावणें.

भिणें——**भिऊन भिऊन वाग, त्याला म्हसोबा लाग**—भित्यापाठीं ब्रम्हराक्षस पहा.

भिऊन वागे, त्यास देव लागे-भूत बाधे—वरप्रमाणेंच.

भितल्या फाटल्यान-माकशी ब्रम्हराक्षस—(गो.) भित्यापाठीं ब्रम्हराक्षस.

भितल्या भिष्टायतात, आनि पळतल्याक फाटल्यान् लागतात—(गो.) लोक भिणाऱ्याला भिवबतात आणि पळणाराच्या पाठीस लागतात.

भित्यापाठीं-मागें ब्रम्हराक्षस—जो मनुष्य फार भिऊन भिऊन वागूं लागतो त्याच्या पाठीस सर्व लोक लागतात. दुबळ्याला कोणी पाठिराखा नसतो. 'अरे, भित्याच्या मागें ब्रम्हराक्षस; तूं अशी भीति बाळगशील तर उच्च तारांगण यांची माहिती तुला होणार नाहीं.' —शाब १ ३९. Foolish fear doubleth danger.

भिला खुगूर—(गो.) जो भितो तो सुरक्षित राहातो, धाडसी माणूसच अधिक संकटांत पडतो.

भिंत——**भिंत उभारणें**—दोन गोष्टी अलग करणें; दोहोंच्या संबंधाला प्रतिबंध करणें; संबंध तोडणें-फोडणें. 'बाकीच्या जगानें धर्मकारण व राजकारण यांच्यामध्यें चिनी भिंत खुशाल उभारली.'—पाकिस्तानचें संकट,पा.८७.

भिंत उभी राहाणें—आडपडदा, अडथळा येणें; संबंध तुटणें. 'नवराबायकोंत एक दुर्लंघ्य भिंत उभी राहील त्याचा त्यानें क्षणभरसुद्धां विचार केला नाहीं.' --खांडेकर-पहिलें प्रेम १६४.

भिंतीवरचें लिहिणें—भिंतीवरील चित्रें, स्त्रियांनीं भिंतीवर काढलेल्या आकृति.

***भिंती सारव, म्हणे कोनाडे किती**—नसती उठाठेव; नसत्या चौकशा. तु.-गाठोडें उचल म्हणे बाजीराव किदर. उष्टीं काढ म्हणे जेवले किती.

भिंतीला कान असतात—मनुष्यानें गुप्त गोष्टी नेहमीं सावधगिरीनें बोलाव्या. कोण कोठें आडून ऐकत असेल, कोठें कोणास ऐकूं जाईल त्याचा नेम नसतो.

भिंतीस कान, दारास डोळे—वरप्रमाणेंच. आपली गुप्त गोष्ट कोण पाहील व कोणास ऐकूं जाईल याचा नेम नसतो; याकरितां जपून बोलावें.

भितर——**भितर सवाई**—नफा झाला पाहिजे तेथें नुकसान; आंतबट्ट्याचा व्यापार.

भित्रा---भित्रा मनुष्य मरणापूर्वींच कितीदां तरी मरतो--भित्रा माणूस अशा तऱ्हेनें कित्येक वेळां वागतो कीं, तो जिवंत मेला सारखाच. तो स्वाभिमानानें जगत नाहीं. Cowards die many times before the death.-Shakespeare.

भित्री भागूबाई, चुलीपुढें हागुबाई—(व.) एखादा मनुष्य इतका भित्रा असतो कीं तो रात्रीं हागायलासुद्धां बाहेर पडत नाहीं.

भिन्न---भिन्न मैत्री ही क्वचितच पूर्णत्वाला पोहोंचते—तुटलेली मैत्री सांधणें कठिण असतें. तुटणें पहा.

भिन्नरुचिर्हि लोकः।—प्रत्येक मनुष्याची आवड निरनिराळी असते.सबंध श्लोक असा—अथाङ्गराजादवतार्य चक्षुर्याहीति जन्यामवदत्कुमारी । नासौ न काम्यो नच वेद सम्यग्द्रष्टुं न सा भिन्नरुचिर्हि लोकः ॥–रघु ६.३०.

भिरकंडें--भिरकंड्या उडविणें—कुंठित करणें; जेर करणें.

भिरकंड्यांत पडणें—गोंधळणें; घोटाळणें.

भिरभिर---भिराभिर पाहणें—कावरेबावरेपणानें पहाणें; घाबरून जाणें.

भिरभिर फिरणें–हिंडणें--रिकामपणें फिरणें; भटकणें.

भिरभिर बोलणें--घाईनें, जलदीनें बोलणें.

भिरवंडेकरी---भिरवंडेकऱ्याचें पुस्तक--अतिशय अव्यवस्थित ठेविलेलीं कागदपत्रें, पुस्तकें इ.

भिलावा---भिलावा घालणें--बिब्बा घालणें पहा. आक्षेप काढणें.

भिल्ल--भिल्ल राजा वनाचा, तीर मारी नेमाचा--भिल्ल हा जंगलाचा मालक असून तो बाण मारण्यांत पटाईत असतो. स्वभावदर्शक म्हण.

भिल्ला बेरडाला, उणें नाहीं पोराला--भिल्ल व बेरड यांस संतति बहुधा पुष्कळ असते.

भिल्लाची जात फार वांकडी, एक टीर उघडी एक टीर झांकली--भिल्ल मनुष्याचा आपणांवर विश्वास नसल्यामुळें तो बहुधा आपल्याशीं सरळ वागत नाहीं. स्वभाव–वर्तनदर्शक म्हण.

भिल्ली---भिल्ली मारप—(गो.) दारू पिणें.

भिवई---भिंवया मोडणें--भ्रुकुटिभंग; कटाक्ष फेकणें. ‘ भिंवया मोडुनि दावितसे ही नृत्याच्या चातुर्या।’ –कमं. ४.२३.

भिस्त--भिस्त बसणें, जडणें--१ विश्वास बसणें. २ प्रेम बसणें, जडणें.

भिक्षा---भिक्षा घालगे सावित्री म्हणून कोणी घालतो ?—१ भीक मागून कांहीं मिळत नाहीं. स्वपराक्रमानें मिळवावें लागतें. २ भिक्षेकऱ्यानें लीनतेनें वागावें लागतें म्हणजे त्याला मिळतें.

भिक्षेचें अन्न पवित्र—भिक्षान्न हें विरक्तास पवित्र मानतात.

भिक्षापति तो लक्षापति; भिक्षापति कीं लक्षापति; भिक्षेश्वरी किंवा लक्षेश्वरी—भिकारी मनुष्य हा लक्षाधीशाप्रमाणेंच बेपर्वा असतो. कारण त्याच्या गरजा फार थोड्या असतात व त्या तो स्वतः लक्षाधीशाप्रमाणेंच भागवूं शकतो.

भिक्षेश्वर किंवा लक्षेश्वर—लंकेश्वर—[लक्षेश्वर = लक्षाधीश. लंकेश्वर = रावण; हा फार ऐश्वर्यवान होता.] एक अगदीं भिकारी असलेलें बरें किंवा अगदीं अतिशय श्रीमंत असलेलें बरें. मधली स्थिति वाईट.

भिक्षुक---भिक्षुकांची धाम—[धाम = सांथ] दक्षिणेसाठीं भिक्षुकांचा जमाव, घोळका; याचकांचा थवा.

भिक्षुका माता भेटावें, स्थानमात्र पहावें—(महानु.) धार्मिक लोकांना, उपाध्यायांना अवश्य भेटावें; तीर्थें, देवस्थानें पाहात जावींत.

भिक्षु—चतुर्विध–१ कुटचीक, २ बहूदक, ३ हंस आणि ४ परमहंस. हे एकापेक्षां एक वरचढ असतात.

भिक्षुपादप्रसारणन्याय—भिक्षूनें पाय पसरणें. ‘भटाला दिली ओसरी, भट हातपाय पसरी’ याप्रमाणें.

भीं तकीत भात्त—(गो.) बीं तसें भात, पहा. जसें पेराल तसें उगवेल.

भीक---भीक काढणें—अडणच सोसणें; दारिद्र्य अनुभवणें.

भीक घालणें—१ भिक्षा वाढणें, मागितलेली वस्तु देणें. २ (ल.) वचकून असणें. ३ जुमानणें ‘ थोराचें पाठबळ असलें म्हणजे मग काय ? लुंग्या सुंग्या लोकांस कोण भीक घालतो ?’– जग हें असें आहे.

भीक न घालणें—तुच्छ लेखणें; न जुमानणें; पर्वा न करणें.

भीक लागणें—१ फार मागणी असणें. २ कमताई असणें.

भिकेचा डोहळा—ज्या प्रकारची संतति होणार असते त्याची दर्शक अशी वासना गरोदर स्त्रीस होत असते. भिकेची वासना–डोहळा होत असला कीं, पुढें मुलगा भिकारी निपजावयाचा, अशी कल्पना. यावरून दारिद्र्य आणणारी वागणूक, वृत्ति; हीनवृत्ति.

भिकेचे डोहळे लागणें, होणें—संपन्न माणसास दरिद्री माणसाप्रमाणें वागावेंसें वाटणें; दरिद्री वृत्ति होणें.

भिकेवर लक्ष ठेवणें—भीक मागण्याची वेळ येई अशाप्रकारें वागणें; व्यसनी, आळशी, उधळ्या बनणें.

भिकेवर श्राद्ध—१ भिक्षेवर केलेलें श्राद्ध. २ तुटपुंजा व्यवहार.

***सदा पीक, सदा भीक**—पीक पहा. नेहमीं वरचेवर पीक काढीत असलें तरी तें तुटपुंजें असल्यामुळें आबादानी अशी कधींच वाटण्यासारखी स्थिति नसणें.

भीक असून दारिद्र्य कां?—जर भीकच मागावयाची तर ती तुटपुंजी तरी कशास! भिकेनें तरी मग भरपूर मिळवावें.

मागतां येईना भीक, तर तंबाखू खायला शीक—मागणें पहा. (गु.) भिक मागतां न आवडती होय तो तमाकु खातां शिख.

भीक नको पण कुत्रा आवर, आटप—एक भिकारी एका मनुष्याकडे भीक मागावयास गेला असतां त्यानें त्या भिकाऱ्यावर आपला कुत्रा सोडला. त्यावेळीं त्या भिकाऱ्यास असें झालें कीं, आतां हा आपणांस चावणार, तेव्हां कोठून या घरीं भिक्षा मागण्यास आलों! तेव्हां त्यानें मालकाची विनवणी केली कीं, बाबा भीक देऊं नको पण आपल्या कुत्र्यास आटप. यावरून एखादी गोष्ट करावयास जावें तों अशी भयंकर आपत्ति अंगावर यावी कीं ती पहिली गोष्ट बाजूस राहून या आपत्तींतून कशी सुटका करून घ्यावी याचीच विवंचना मागें लागावी, अशा वेळीं म्हणतात. "पण ओळख निघण्याच्या भीतीनें 'भीक नको पण कुत्रा आवर' असें धोरण अवलंबून किसननें पाहिले एकदोन दिवस रफिउद्दीनकडे उघडपणें बघण्याचा प्रसंग देखील टाळला."–काळें पाणी १४५.–पामो ६३४.–गांगा १२५.

उत्तम शेती, मध्यम व्यापार, कनिष्ठ नोकरी, निदानीची भीक, ती मागण्यास शीक—उत्तम पहा.

भीक मंगना पण मशालजी रखना—भीक मागून निर्वाह करावा लागत असला तरी बडेजावी करणें.

भीक मागणाराला दहा घरें;—भीक मागत्या दहा (बारा) घरें; मागत्याला दोन घरें अधिक—भीक मागणाऱ्याला एकानें नाहीं म्हणून सांगितलें तरी त्याबद्दल पर्वा वाटण्याचें कारण नाहीं. त्यास एका ठिकाणीं मिळालें नाहींतर दुसऱ्या ठिकाणीं मिळेल. त्यास सर्व गांव मोकळाच असतो तेव्हां तो सामान्यतः बेपर्वाच असतो.

भीक मागावी आणि जरबहि दाखवावी—भिकाऱ्याला ओकारी; भिकारी असून मिजासखोर. याचकाचें असंबद्ध, अयोग्य वर्तन. तु०– चोर तो चोर आणि शिरजोर.

भीक मागून श्राद्ध होत नाहीं—भिकेवर श्राद्ध पहा. भीक मागून केलेल्या द्रव्यावर जें श्राद्ध तें व्यर्थ. कारण तें नीट होत नाहीं व श्राद्ध केल्याचें फळ पदरांत पडत नाहीं.

भिक मागे भराडी, दाण्यावर नजर करडी—भराडी ही एक भिक्षेकऱ्याची जात आहे. भराडी भीक तर मागतो पण त्यास चांगले व पुष्कळ दाणे लागतात. याप्रमाणें मिजासखोर भिक्षेकरी.

भीक माग्याला बारा घरें, तेरा ओसऱ्या—वर पहा.

भीक शीताक कावळो हागलो—(गो.) भीक मागून आणलेल्या भातांत कावळा हगला. घरचें नसायचें आणि दुसऱ्याचें भीक मागून आणलें तर तेहि बिघडून जायचें, म्हणजे पुरतेंच दुर्दैव.

भिकेची भाकरी आणि म्हणे शिळी कां?—भीक मागणारानें चांगलें वाईट पाहूं नये. मिळेल तें घ्यावें. पण बहुधा भिकारी हा मिजासखोर असतो. तु०– भिकाऱ्याला ओकारी. Beggars cannot be choosers.

भिकेची हुंडी शिंक्याला चढत नसते; भिकेची हुंडी शिकेला लागत नाहीं; भिकेची हुंडी सिगेस चढत नाहीं; भिकेची हुंडी होत नाहीं उतरंडी;—

भिकाऱ्यास जेवढें रोज अन्न मिळतें तेवढें त्यास उदर-निर्वाहास लागतें; त्याला कधीं शिल्लक ठेवावयास मिळत नाहीं. भिकारी मनुष्य कधीं गबर होत नाहीं.–टि ३.१४६. टिच २.५.३३.

भिकेचें अन्न ऊन ऊन—भिक्षेचें अन्न गरम मिळावें अशी अपेक्षा करणें; भिकाऱ्यानें मिजास करणें.

भिकेचे डोहळे आठवले—वाक्प्रचार पहा.

भिकेचे डोहाळे आणि सर्व गांव मोकळे—ज्याला भिकेचे डोहाळे सुचतात त्याला कोण आडविणार ? त्याला गांवाचीहि फूस मिळणार.

भिकेंत कावळा—भिकाऱ्यानें भीक मागून आण-लेल्या वस्तूवर कावळ्यानें झडप घालून न्यावयाचें, असा प्रकार. 'ह्या आठवड्यांत भिकेंत कावळा ह्या म्हणीला अनुसरून तुमच्या खिशावर आपुलकीचा हात कोणीतरी फिरवील'– ' धनुर्धारी ' ११–१०–४१. तु०– उल-पयाची कणीक वाऱ्यानें नेली.

भीकेवर भीक नि दादला वीक—अति उदार मनाच्या व्यक्तीला ही म्हण वापरतात. स्वतःचें पोट कसें-बसें भरतें आहे;वेळ प्रसंगीं उसनवारीवर किंवा भीक मागून भागवावें लागतें, असें असूनहि ती उदार व्यक्ति दुसऱ्याच्या अडचणीच्या वेळीं उदार बुद्धिनें आपलें सर्वस्व भीक मागून मिळविलेलें तर देईलच पण स्वतःच्या दादल्याला विकून ते पैसेहि धर्म करील. अति उदार व्यक्तीच्या उदार-तेला व्यवहारीपणाचा धरबंध नसतो व शेवटीं माती होतें.

भीड—भीड धरणें–संकोच धरणें, बाळगणें.

भीड खरचणें–घालणें; भिडेस घालणें—आपलें वजन खर्च करून कांहीं मागणें; त्यासाठीं आर्जव करणें; आपल्याबद्दल दुसऱ्याचा जो आदरभाव असतो, आपलें जें वजन त्याजवळ असतें त्याचा उपयोग करणें.' न घालिन भिडेस मी जरीहि कार्यलोभी तिला ।'–केका १०. ' भिकंभटानें गोविंदपंतास आपल्या मुलाच्या दक्षिणेची भीड घातली '–कोकि ३८.

भीड चेपणें–मरणें–आदर, दरारा नाहींसा होणें; संकोच न वाटणें. 'माधवरावाची भीड चेपावी हा उद्देश.' –इंप १५५.

भीड धरणें—१ मान ठेवीत असणें; दुसऱ्याला न दुखविण्याविषयीं जपणें. ' भिडले भीड लेशहि मनिं न धरुनि, तेशल्या वायुज, गदीश । '–मोरोपंत. बचकून असणें. २ संकोच, लाज वाटणें. भीड करणें पहा. ' शिष्ट नसावा महा म्याड । शिष्टें न धरावी भीड ।'–एकनाथ अंगद शिष्टाई.–मोशल्य २.२५. ' भीड धरणें असेल तर मोघम चौकशी करूं नये.'

भीड न तुटणें; भीड पडणें—आग्रहाला बळी पडणें; अवज्ञा न करविणें. 'रमरतांचि भीड पडली जीची दीनाचिया दयाळू गड्या.'–मोविराट १९७.

भीड राखणें—आदर ठेवणें; मान देणें. भीड धरणें पहा.

भीड वागविणें—भीड धरणें. ' श्रुतिनिष्ठांचीहि भीड वागविशी ।'–भक्तमयूर केकावली १४.

भिडेला गुंतणें—भीड न तुटणें; आग्रहाला बळी पडणें.

***भीड भिकेची बहीण**—फार भिडस्त स्वभाव असला म्हणजे मनुष्य दरिद्री होण्याच्या मार्गास लागतो.

भीड व्यवहारांत नसावी—अर्थ स्पष्ट आहे. 'व्यवहारीं धरूं नये भीड ।'–मोगदा १.६७.

भिडेभाडे पोट वाढे; भिडे भिडे पोट वाढे; भिडे गेल्यावर पोट वाढता (गो.)—स्त्री भिडस्त असली तर ती एखाद्याच्या कामवासनेला बळी पडून गरोदर राहण्याचा संभव असतो. दुसऱ्याच्या भिडेनें एखादी गोष्ट करायला जावें आणि तीच नेमकी आपल्या अंगावर यावी अशा अर्थानें म्हणतात.

भीड—भीड घेणें—(राजा.) खाजणास मातीची पुस्ती देणें. ही दिली असतां पाणी झिरपत नाहीं.

भीम—भीमरात्र—माणसाच्या वयाच्या ७७ व्या वर्षाच्या सातव्या महिन्याची सातवी रात्र.

भीमसेनी एकादशी—ज्येष्ठ शुद्ध एकादशी. भीम हीच फक्त एकादशी करीत असे यावरून.

भीमगदा म्हाताऱ्ये कूर्टार वे ?—(गो) भीमाची गदा म्हातारीच्या कमरेंत बसणें योग्य होईल का ? आपल्या अंगीं शक्ति असेल तर उन्मत्तांची रग जिरवण्यासाठीं तिचा उपयोग करावा. दुर्बळांना झोडपण्यांत काय होईल ?

भीमाच्या दाढे, सात पांच वडे— भीम हा फार खादाड होता यावरून भीमाच्या भुकेला थोड्याफार अन्नानें

काय होणार ? जेथें पुष्कळच गोष्टींची जरूर असेल तेथें थोड्याफार गोष्टीनें काय निभाव लागणार.

भीर——**भीरकाहूर आणणें**—बेजार करणें; त्रास देणें; भिरभिर आणणें.

भीष्म——**भीष्मप्रतिज्ञा**—भीष्मानें आपल्या पित्याचा सत्यवतीशीं विवाह होणें सुलभ व्हावें म्हणून स्वतः विवाह न करण्याची प्रतिज्ञा करून ती आमरण पाळली. यावरून अतिशय दृढनिश्चय; दृढप्रतिज्ञा; भयंकर पण; कडकडीत व्रत.

***भीष्माला शतंभीष्म आहेच**—शेराला सव्वा शेर कोणीतरी असतोच. शतंभीष्म पहा.

भुई——**भुई उकरणें**—कांहीं सुचेनासें झालें म्हणजे किंवा विमनस्कपणें निष्कारण पायाचीं बोटें भुईवर ओढीत राहणें. गोंधळणें; सुचेनासें होणें. (लाजाळू, दोषी माणसांबद्दल योजतात.)

भुई धरणें—आजारी पडणें.

भुई फोडून जाणें—तोंड लपविणें.

भुई बडविणें—(प्र. साप म्हणून भुई बडविणें.) खोटा आरोप घेणें.

भुई बोम देऊन उठणें—मोठी ओरड करणें.

भुईचा लहान—ठेंगू.

भुईचा सांवरणें—भयंकर आजारांतून उठणें.

भुईच्या तुकड्यावर राहणें—कोठेंतरी राहणें.

भुईत जाणें—खुजट होणें.

भुईत तोंड खुपसणें—लपून बसणें; तोंड लपविणें; तोंड न दाखविणें; नाहींसें होणें. इंप–८९.

भुईला पाठ लागणें—विश्रांतीसाठीं आडवें होणें, झोंपणें; विश्रांति घेणें; पडणें.

***भुई भारु शित्ता केडु**—(गो.) धरणीला भार आणि अन्नाला काळ.

भुईचें अंथरुण आणि आकाशाचें पांघरुण—निराधार स्थिति.

खायला काळ आणि भुईला भार—खाणें पहा.

भुंकणें——**भुंकणारीं कुत्रीं क्वचितच चावतात**—जो मनुष्य तोंडानें फार बडबड करतो त्याच्या हातून क्वचितच कांहीं कृति होते. तु०–A barking dog seldom bites.

भुंकतीं तीं द्यावीं भुंकों। आपण नये त्यांचे शिकों—तुगा ३३६३. जे लोक आपली निंदा करीत असतात त्यांचेकडे लक्ष्य देऊं नये. तु०–कुतरा भुकत वाको भुकवा दे ।–कबीर.

भुकी——भूक पहा. **भुकिस्त गुरूं वळचणी उपसतें**—भुकेलें गुरूं घराच्या जवळपासच हिंडत राहतें व कांहीं खावयास न मिळाल्यास घराचें छप्परच ओढून खातें. पूर्वी घरें गवतानें आच्छादलेलीं असत; त्यांचें छपराचें गवत गुरें ओढून खात.

भुकी तो सदा सुखी—जो मनुष्य अधिक न खातां थोडी भूक राखून खातो त्यास अजीर्णाची कधीं बाधा होत नाहीं व त्यामुळें तो कधीं आजारी पडत नाहीं.

भुकी राखी चौथा कोन—नेहमीं थोडी भूक राखून जेवावें.

भुकेला——**भुकेला ब्राह्मण, जेवलेला मुसलमान यांना रागास आणूं नये**—ब्राह्मण भूक लागली असतां फार तापट बनलेला असतो; याकरितां अशा वेळीं त्याला चिडवूं नये व मुसलमानास यथेच्छ जेवण झाल्यावर आराम करण्याची फार जरूर असते; अशा वेळीं त्यास त्रास देऊं नये.

भुकेलें कोल्हें, काकडीला राजी—भुकेच्या वेळीं जें मिळेल त्यांत मनुष्य समाधान मानतो. आयत्यावेळीं जें उपलब्ध असेल त्यावर मनुष्य आपली गरज भागवतो. एकदां एक कोल्हा एका मळयांत गेला तेथें द्राक्षें वगैरे अनेक फळें होतीं परंतु तीं मांडवावर उंचावर होतीं त्यामुळें त्याच्या हातास येईनात. अखेरीस त्यास एक काकडी जमिनीवर आडवी पडलेली दिसली. तेव्हां पोटांत भूक लागली असल्यामुळें तो मनांत म्हणाला बाकीचीं फळें राहूं द्या तूर्त या काकडीवरच भागवून घेऊं.

भुकेलें गुरूं वळचणीं आढळतें—भुकी पहा.

भुकेलें नाहीं तें जेवील काय? आणि तापलें नाहीं तें निवेल काय?—ज्याच्या पोटांत भूक नाहीं त्याच्यापुढें अन्नाच्या राशी आणून ठेवल्या तरी कांहीं उपयोग नाहीं; त्याप्रमाणेंच ज्याला मुळीं रागच आलेला नाहीं त्याचें शांतवन करण्यांत अर्थ काय? जेथें मुळांतच कांहीं नाहीं तेथें व्यर्थ उपचार कशाला ?

भुकेलें भूत कोडबुळ्याला–कोंवड्याला राजी— अंगांत आलेलें भूत अनेक पदार्थ मागूं लागतें पण ते मिळाले नाहींत व भूक तर जब्बर लागली असली तर कोडबुळें मिळालें तरी त्यावर संतुष्ट होऊन निघून जातें. बकऱ्याऐवजीं कोंवड्यावर भागवितें. निकड लागली म्हणजे मनुष्य जें मिळेल त्यावर गुजारा करतो. (गु.) भुखे भरडो भावे, ने उंघ उकरडे आवे. Hunger finds no fault with the cookery.

भुकेलेला कुत्ता जुत्याला राजी— क्षुद्र मनोवृत्ति क्षुद्र गोष्टीवर निकडीच्या वेळीं तरी राजी राहावयाची.–पाआमा. ५.

भुकेल्याचा भात शिजत नाहीं, बिजवराची बायको वाढत नाहीं—उतावीळ मनुष्याला मुळींच धीर निघत नाहीं. त्याची अतिशय घाई चाललेली असते.

भुक्ति––अगोदर भुक्ति मग भक्ति—प्रथम पोटपूजा केल्याशिवाय कांहीं काम, परमेश्वराची भक्तीहि सुचत नाहीं असा. तु०–आधीं पोटोबा मग विठोबा.

भुट्टा––भुट्टे चोर––१ शेतांतून धान्याचीं कणसें चोरून नेणारा; उचल्या; बारीकसारीक चोऱ्या करणारा. २ खुशामत्या; गोड बोलून कार्यसाधु. ३ आयतोजी; फुकटखाऊ.

भुंडी––भुंडी गाय—१ बिन शिंगी, किंवा शिंगें मागें वळविलीं आहेत अशी गाय. २ (ल.) शांत स्वभावाचा, निरुपद्रवी मनुष्य.

भुताटकी––भुताटकीचें घर––भुतांनीं पछाडलेलें घर; ज्या घरांत पिशाच्चांचे चमत्कार होतात असें घर.

भुतावळ––वेताळाचें मागें भुतावळ आहेच— जसा पुढारी तसे त्याचे अनुचर व ते नेहमीं जवळच असावयाचे.

भुत्या––बायकोचा भुत्या—देवीपुढें भुत्या नाचतो त्याप्रमाणें बायकोपुढें नाचणारा बायकोचा भक्त. बाईलवेडा.

भुरका––भुरक्यांचून जेवण नाहीं, भुरक्यांवांचून बाई नाहीं—आपल्या जेवणांत ताक कढी इ.पातळ पदार्थ भुरकण्यासाठीं असतात. तेव्हां साहाजिकच जेवण भुरकून भुरकून व्हावयाचें. तसेंच कोणीहि बाई घेतली तर ती भुरके मारणारच. त्याशिवाय मजा नाहीं

भुरगें––भुरगें ना बाळ चोट वाजयता टाळ— (गो.) (अरिष्ट) मुलें बाळें कांहीं नसलेला; आगा पिच्छा नसलेला.

भुरगें हागलें म्हूण मांडि कापून वडयनात–– (गो.) मांडीवर मूल हगलें म्हणून मांडी कांहीं कापून टाकीत नाहींत.

भुरगीं कितलीं असत, तर असत शाकेक जायशीं––(गो.) एखाद्यानें बहिऱ्याला विचारावें कीं, 'तुला मुलें किती?' तर त्यानें तोंडलीच्या मांडवाकडे पाहून उत्तर द्यावें कीं 'भाजी पुरेशी आहे?' प्रश्न न समजतां भलतेंच उत्तर देणें. किंवा खंडीभर मुलें या अर्थीहि वापरतात.

भुरग्याचे मळणेक बीं ना भात— ज्या वेळीं मुलें धान्य झोडपतात त्यावेळीं त्यांत बीहि नसतें व भातहि नसतो. मुलांच्या कामांत निष्पत्ति कांहीं नाहीं या अर्थी. अज्ञानी लोकांपासून ते कांहीं तरी चांगल्यांतून चांगले काढतील अशी आशा बाळगूं नये. गोऱ्ह्यानें शेती इ.पहा.

भुरग्यासारकी अर्थ ना, आनी फोंतीसारकी बॉलायकी ना––(गो.) मुलांसारखा आनंद नाहीं आणि फोंतीसारखी बढाई, प्रतिष्ठितपणा नाहीं. फोंत पुढील प्रकाराला म्हणतात. जळती बिडी मांडीवर अथवा हव्या त्या ठिकाणीं टेकून चांगला चटका घ्यायचा व त्या भाजलेल्या जागीं शिशाची गोळी ठेऊन ती दाबून बांधायची. असें केल्यानें थोड्या दिवसांत त्या जागीं एक छिद्र तयार होतें व त्यांतून शरीरांतल्या दोषांचा निचरा होऊं लागतो रोज ती धुवून पुसून स्वच्छ करावी लागते, इतर शरीराचीं नित्य कार्यें एक वेळ राहिलीं तरी चालतील पण फोंतीची हयगय मुळींच चालत नाहीं. म्हणूनच तिला 'बढाईखोर' असें विनोदानें म्हणतात. पोत घेणें.

भुरळ––भुरळ घालणें–पाडणें—१ वेड लावणें. भूल पाडणें. २ फसविणें. 'बांकेरावानें मेल्यानें मेल्यानं तुम्हांला इतकी कशी भुरळ पाडली.'–इंप ५.४९.

भुलणें––भुलले मुरलीच्या नादाला, पशु विसरले जाति वैराला––मंजुळ गायनानें हिंस्रपशूहि आपला स्वभाव विसरून लुब्ध होऊन जातो.

भुसकट––भुसकट काढणें–पाडणें—जेरीस आणणें; दमविणें; थकविणें; मट्ट्यास आणणें.

भुसकट निघणें–पडणें–वासणें—जर्जर होणें; थकणें; दमणें; जेरीस येणें.

भुसंडा––भुसंडा खेळ––१ हानिकारक वागणूक; नाश होईल अशा रीतीनें वागविणें. २ तिरस्कारणें.

भुसा---भुस्सा पडणें—पुरेंपुरें करणें; पुरेवाट करणें; सतावून सोडणें. भुसकूट पहा.

भुसार--भुसार माप--(ल.) झुकतें माप; सढळ हाताचें माप.

भूक---भूक धरणें---१ भूक दाबणें. २ भूक तृप्त, शान्त होणें.

भूक मारणें--भूक दाबून धरणें; उपाशी राहूनच काम करणें,

भूक हरपणें—भूक जिरणें; क्षुधातृप्ति होणें.

भुकें मरणें--उपाशी मरणें.

भुके कंगाल-बंगाल--(कंगालच्या बद्दल बंगाल येत असेल किंवा बंगाली लोक तसे पाहून म्हण तयार झाली असेल.) खावयास ज्याला मिळत नसेल असा; दरिद्री; गरजू. ' माणूस भुकेबंगाल झाले आहे चित्त स्थिर राहात नाहीं. ' -बापूगोप २३७.

भुकेचा कोंवळा असणें—भूक काढण्याचें सामर्थ्य नसणें; भुकेस इळवा असणें; भूक न धरवणें.

भुकेचा मोटला—भूक धरवत नाहीं असा.

भुकेच्या तोंडा—भूक लागली असतां.' देवा कळणा अथवा कोंडा । आम्हां देई भुकेच्या तोंडा॥' -तुकाराम पद (नवनीत ४४८).

***भूक कांढावी ढोरांनीं, दुखणीं काढावीं पोरांनीं**—ढोर पहा. दुखणें पहा.

भूक खाय रुक; भूक खाई रूख—भुकेला लांकडें सुद्धां चालतात. भुकेच्या वेळीं चव, चोखंदळपणा बिलकूल नसतो.

भूक मावेना आणि पोटांत जाईना—पोटांत भूक असून अन्न खाववत नाहीं अशी स्थिति. एखादी गोष्ट जवळ असून व पाहिजे असून तिचा उपभोग घेतां येत नाहीं अशी स्थिति.

भूक हेंच खरें तोंडीं लावणें—भूक लागला असतां मनुष्य तोंडी लावण्याची वाट बघत बसत नाहीं. भुकेस कोंडा, निजण्यास धोंडा. Hunger is the best sauce.

भुकी राखे चौथा कोन-- भुकी तो सुखी. " 'काय श्याम, झालें का जेवणखाण ?' त्यानें विचारलें. 'आज काळे याच्याकडे गेलों होतों. फराळ झाला. पोट भरलें आहे.' शिवाय, भुकी राखे चौथा कोन अशी म्हणहि आहे, मी हंसत म्हटलें. 'भुकी तो सुखी' सखाराम म्हणाला."-साने गुरुजी, जीवनकलह पान ७७. भुकी पहा.

भुके नाहीं अन्न । मेल्यावरी पिंडदान ॥—तुकाराम.आईबाप जिवंत असतां त्यांस पोटभर खाऊं घालावयाचें नाहीं व ते मेल्यावर त्यांच्या तृप्तीसाठीं पिंडदान श्राद्ध करावयाचें. म्हणजे वेळेवर योग्य ती गोष्ट न करतां अवेळीं दुप्पट देखावा करावयाचा.

भूके वखद कोण दिता ?--(गो.) भुकेला औषध कोण देईल ? भुकेसाठीं अन्नच पाहिजे, भूक हा रोग नव्हे.

भुकेक पोळी नाका, निदेक माचो नाका--(गो.) भुकेच्या वेळीं पोळी आणि झोंपेच्या वेळीं पलंगच हवा असतो असें नाहीं. अशा वेळीं कांहींहि चालते.

भुकेक लाज ना, निंदेक मर्यादा ना—(गो.) भुकेला लाज नसते आणि झोंपेला मर्यादा नसते.

भुकेच्या तापें, करवंदीचीं कापें—जठराग्नि तप्त झाला असतां करवंदीचे काप (तुकडे) सुद्धां गोड लागतात. एरव्हीं करवंदें फार आंबट असतात. तु०-भुकेला कोंडा.

भुकेला कोंडा आणि निजायला (-निजेला--झोंपेला--झोंपायला) धोंडा—पोटांत चांगली भूक लागली म्हणजे कोंडासुद्धां गोड लागतो व दमून झोंप येत असली म्हणजे उशाला धोंडा घेतला तरी गाढ झोंप येते. अगदीं बेतावर गोष्ट आली म्हणजे बरें वाईट कोणी पाहात नाहीं.-पामो २३४. ' भुकेला कोंडा, निजायला धोंडा, आणि सुताराला ओंडा ह्या वस्तु बहुमोलाच्या आहेत.'-शाब १.५३. " तेथें निजावयास फरसबंदीवांचून दुसरें कांहीं नव्हतें. तथापि, ' भुके० ' ह्या म्हणीप्रमाणें त्याला तेथें गाढ झोंप लागली. "-मधुमक्षिका. Hunger needs no sauce, sleepiness no pillow.

भुकेला पिकलें काय आणि हिरवें काय—पोटांत भूक सडकून लागली असली व एखादें फळ आढळलें तर तें हिरवें आहे कीं पिकलें आहे हें पाहात न बसतां मनुष्य खाऊन टाकण्याच्या मागें असतो. आयत्यावेळीं मनुष्य फारशी चिकित्सा करीत बसत नाहीं.

भुकेल्याक कूंडो गोडु, नीद आयिल्याक गुंडो मोवु—(गो.) भुकेल्याला कोंडासुद्धां गोड वाटतो आणि झोंप आली कीं खडकसुद्धां मऊ लागतो. भुकेला कोंडा, निदेला धोंडा

भूत—**भूत-भुतें घालणें**—भूतबाधा करविणें. 'जनासि घालितीं भूतें । '—दावि ४८०.

भुतांची घाई—१ भुतांचा झपाटा. २ भुतांची धामधूम.

भुतांची दिवटी—दलदलीच्या जमिनींतून निघणारी ज्वाला. इं. डॅगुन.

भुतानें भागवताचा आधार घेणें—ज्याला जें मुळांतच वावडें किंवा ज्याचा जो शत्रु त्याचीच मदत घेण्याचा प्रसंग येणें. ज्यावर मुळींच विश्वास नाहीं त्याचाच दाखला पुढें करणें. Satan quoting the Bible.

भुतें नाचणें—निर्जन, ओसाड जागीं भुतें असतात अशी समजूत. जागेंत अगदीं कोणी नसणें; जागा भयाण असणें. ' दिवसां उजेडीं ' अशीहि शब्दयोजना वरील वाक्प्रचाराच्या आर्थी आढळते.

***भूत आणि भीति एक गांवचीं**—(गो.) भूत आणि भीति हीं एकाच गांवचीं. दोघांचेंहि नेहमीं साहचर्य असतें.

भूत म्हणतां भूत लागतें-लागावयाचें—एखाद्या गोष्टीचा सारखा ध्यास लागला म्हणजे ती मुळांत नसली तरी तिचा भास होऊं लागतो.

भूत हिंसा देखे डोळां: तोचि ज्ञानाचा अंधळा: (महानु.) ज्याच्या डोळ्यांदेखत हिंसा चालली आहे पण जो ती बंद करण्याची कांहीं खटपट करीत नाहीं तो ज्ञानी असला तरी अंधळाच म्हटला पाहिजे.

भूत हिंसेची आवडी : तीच पापाची चावडी—(महानु.) प्राण्यांची हिंसा करण्याची आवड धरणें म्हणजे पाप होय.

भुताच्या भयानें घेतलें रान, तेथें भेटला बडा सैतान—एका संकटास भिऊन दूर जावें तो दुसऱ्याच्या अधिक भयंकर कचाट्यांत सांपडावें. आगींतून निघून फुफाट्यांत पडणें. चुलींतून निघून वैलांत शिरणें.

भुतान घाढी लिपैलो—(गो.) भुतानें भूत काढण्यासारखें आहे. कांहीं वेळां दुसऱ्याचीं दुःखें नाहींशीं करण्याचा जो विश्वासानें प्रयत्न करतो तोच त्या दुःखांत गुरफटला जातो.

भुताला भूत आणि पानगीला पीठ—जसा रोग तसा उतारा पाहिजे. कंटकेनैव कंटकम् । चोराचीं पावलें चोर ओळखतो.

भुताला भूत झंवतें-झोंबतें-लागतें आणि पानग्याला पीठ मागतें—वर पहा.

भुतें झोटिंग पिठें कांडती—भयंकर जागा; भयानक स्थळ. भुतें नाचणें पहा. ' दिवसास परस्पर मनिं निर्भय भांडती । ज्या स्थळीं भुतें झोटिंग पिठें कांडती ।' —प्रला २४.१२५.

भूप—**भूप सवा भूपाचा, धनिकाचा धनिक, चोर चोराचा**—जसा दुसरा भेटेल तसा; जशास तसा; भल्यास भला व ठकास ठक.

भूल—**भूल-ली येणें**—मतिभ्रंश होणें. ' अहाहा ब्राह्मण वध घडला । कशि मजला भुली आली॥'—कीर्तन२.५.

भुलीचें झाड—भूतबाधा.

भूषण—**भूषण भारी अन् बटव्यांत गारी—(वाजवून पाहिलें तर खळखळ सारी);भूषण बदबदी, अन् अंबाडा खदखदी**—घरावर नाहीं कौल० याप्रमाणें.

भूषण माझ्या बापाचा, गाडी-बैल लोकाचा—(महानु.) दुसऱ्याच्या वैभवाचें तिसऱ्याला भूषण वाटणें.

भूस—**भूस बरॉ जाल्या दिस बरॉ**—(गो.) ज्या दिवशीं जेवण चांगलें मिळेल तो दिवस चांगला.

भूस—**भूस कांडणें**—व्यर्थश्रम कांडणें पहा.

भूस भरणें—यथेच्छ कुटणें, मारणें, चोपणें. भोत भरणें पहा.

भूसानें अंग भरणें—(खळ्यावर असतांना शेतकऱ्याच्या अंगावर भूस उडते.) १ गबर असणें. २ फुगणें.

भूसके लाडू—१ पोकळ गोष्ट. २ नकली भाषण.

***वाऱ्यावर वरात, भूसावर चिठ्ठी**—चिठ्ठी पहा.

भूसके लड्डू खावेसो पस्तावेगा, न खावे सोबी पस्तावेगा—(हिं.) पोकळ गोष्टींत कांहीं अर्थ नसतो. त्यापासून कोणाचाच फायदा होत नाहीं.

भृत्य—**भृत्यकृतं राजनि**—(सं.) सेवकाला माना

पमान किंवा बरेंवाईट हें राजाकडे जातें. चाकर तो बोलून चालून चाकर. त्याच्या कृत्याचें फळ धन्यालाच मिळणार.

भें——शें तो भें, हजार तो बाजार, लाख तो काख——कशास कांहीं ठिकाण नाहीं. कितीहि असलें तरी खिसगणतींत नाहीं.

गोड गारा असत्या तर कोल्ह्याभेणें न ऊरात्या—[गारा=आकाशांतील, किंवा गारगोट्या] आकाशांतून पडणाऱ्या गारा जर गोड लागत असत्या तर त्या कोल्ह्यांनीं कधींच खाउन टाकल्या असत्या.

भेट——भेटबकरा—भेटीसाठीं नजर म्हणून बकरा देणें. १ पूर्वीं गांवांत देशमुख वगैरे वरिष्ठ अधिकारी आले असतां गांवकामर, पाटील त्यास बकरा नजर करीत. २ अद्यापि कांहीं ब्राम्हण जातींतहि लग्नांत वराच्या आईला 'भेटबकरा' या नांवानें कांहीं नजराणा किंवा रुपया देतात. पूर्वीं प्रत्यक्ष बकराच देत असलें पाहिजेत.आतां शब्दावशेष राहिला आहे. ३ (सामा.) नजराणा; आहेर.

***भेटीला आला आणि वेठीला नेला; आला भेटीला, धरला वेठीला** - आपल्याकडे भेटावयास आलेल्या मनुष्यालासच कामास जुपणें. सहज कोणी आले असतां त्यास काम सांगणें.

भेंडा——भेंडाक धरप—(गो.) कमरेस धरणें.

***भेंड्यानें वही केली, वाऱ्यानें उडून गेली**—हलक्या गोष्टीनें काम होत नसतें. भेंड्याच्या काटक्यांचें कुंपण वाऱ्यापुढें कसें टिकणार? 'भेंड्यानें वही केली, वरियाने उडोन गेली, तदन्याये कोट सिध केला उहे'--पेद ३३·१८५.

भेणें——भेण्याभाव कीं भक्तिभाव—ज्या देवास लोक फार भितात त्यास किंवा जो लोकास फार आवडतो, ज्यावर त्यांची श्रद्धा असते अशाच देवांची लोक पूजा करतात. इतर देवतांस कोणी विचारीत नाहीं. ज्या मनुष्याबद्दल लोकांस भीति किंवा आदर वाटत असेल त्यासच कोणी किंमत देतात.

भेरा; भैरा—बहिरा पहा.

***भैऱ्या फुडे गाले आनी कुड्ड्या मुखार नाचले मेळून सारकेच**—(गो.) बहिऱ्यापुढें गाणें व अंधळ्यापुढें नाचणें दोन्हीहि गोष्टी अगदीं निरूपयोगी. गाढवापुढें वाचली गीता, कालचा गोंधळ बरा होता.

भैऱ्याच्या लाती, अंधळ्या हातीं काठी——बहिरें मनुष्य नेहमीं पायानें डवचून दुसऱ्यास एखादि गोष्ट पुन्हां सांगावयास सांगतें व अंधळा मनुष्य आपल्या काठीनें चाचपून पाहात असतो.

भैरव——भैरव दीक्षेचे गोसावी——हे संध्याकाळीं अलख पुकारीत पीठ मागतात.–गांगा १२३.

भैरवाची सेवा असणें-करणें—[भैरव=ब्रहिरव, बहिरा] बहिरा असणें; कान झांकणें; कान न देणें; न ऐकणें. बहिरा पहा.

भैरवी दीक्षा—भैरवी पंथाची दीक्षा, सायंकाळची भिक्षा. हे मागें फिरून भिक्षा घेत नाहींत. व तोंडानें बं-भैरवनाथ म्हणून ओरडतात.

भैरवी यातना—काळभैरवानें केलेली शिक्षा.

भोंकणें——भोंकता तें सुणें चाबता, चाबता तें सुणें भोंकना—(गो.) भुंकणारा कुत्रा क्वचित् चावतो व चावणारा कुत्रा क्वचित् भुंकतो. जे शांत दिसतात तेच घातुक असतात; जे शब्दानें दम देतात त्यांत खराच दम नसतो. तु०--गर्जेल तो वर्षेल काय? A barking dog seldom bites. भुंकणें पहा.

भोग——भोग येणें——नशीबीं येणें 'आलीया भोगासी असावें सादर।'

(देवाला) भोग चढविणें-लावणें——नैवेद्य दाखविणें.

भोगास येणें——अनुभवण्याचा प्रसंग येणें.

भोगरामाची मूर्ति——(महानु.) गणपति असतो त्याप्रमाणें तुंदिलतनु, साजिरागोजिरा.

***भोग आला सरता, वैद्य मिळाला पुरता; भोग आला सरता म्हणजे वैद्य मिळतो पुरता**——आपलें भोक्तृत्व संपलें म्हणजे मगच आपल्या रोगास योग्य औषध मिळतें. तोंपर्यंत केलेले सर्व उपचार व्यर्थ होत. भोग भोगल्यावांचून सुटत नाहीं. तु०—तुका म्हणे भोग सरे। गुणा येती अंगारे॥

भोग फिटे आणि वैद्य भेटे——वरप्रमाणेंच.

भोग संपला पुरता, लोटून घाली परता—(महानु.) भोग संपल्यावांचून अजिबात सुटका होत नाहीं.

तुका म्हणे भोग सरे। गुणा येती अंगारे॥—मनुष्याचें भोक्तृत्व संपलें म्हणजे औषधास गुण येतो. मनुष्याच्या नशीबांत जी रोग वगैरे पीडा भोगावयाची असेल

तिचा काल संपेपर्यंत केलेले सर्व उपाय व्यर्थ होतात व तीच कष्टदशा संपली म्हणजे साधा अंगारासुद्धां गुणकारक ठरतो.

भोगणें——भोगलें थोडें भोगायचें आहे,एवढ्या भोगण्यानें झालें काय—गेले दिवस बरे; पुढील अधिक वाईट आहेत. पुढला दिवस मागल्या दिवसास बरा म्हणवितो. अजून काय झालें आहे खरी परीक्षा तर पुढेंच आहे.

भोगी——भोगी तो रोगी—परिणामावर नजर न देऊन वाटेल त्या वस्तूचा उपभोग घेणारा रोगी होतो.

भोंगूळ——भोंगूळ फिरणें—[भोंगूळ=भुंगा.] दिवा जळत असला म्हणजे तो जर भुंग्याला दिसला तर तो दिव्यावर झडप घालतो व त्यामुळें दिवा विझतो. त्यावरून दिवा मालविणें. पण यांत विकार सुचविला जातो. ‘ आतां आठ वाजलें असतील सारे, तरी यांच्या येथें इतक्यांत भोंगूळ फिरून परि. ’

भोग्या——भोग्या भोंवर, लाख्या ओंबर—[भोंवर=वेश्येच्या नादीं असणारा.] व्यसनी, धश्चोट, लाटेंगगाजी अशा माणसास म्हणतात.

भोग्या मिळेल तशी रात्र काढावी—(अशिष्ट.) जशी वेळ पडेल तसें वर्तन करावें.

भोज——(=भोजन). **भोजया परिखा निमंतण**—(महानु.) [परिखा, परिकांक्षी=संन्याशी] संन्याशाला जेवणाचें निमंत्रण देणें म्हणजे न खात्या देवाला नैवेद्य दाखविल्याप्रमाणें स्वार्थी ठरतें.

भोजन——भोजनभाऊ—केवळ भोजनापुरता संबंध ठेवणारा; पंक्तिबारगीर. ‘ भोजनभाऊ केवळ । बा तुझा चालता काळ, खायाला मिळती सकळ ॥’—अमृतराय. तु.—इं. ‘Cupboard love’

भोजनांत केश होणें—जेवण पचूं न देणें. अन्नांत केस आल्यास अन्न टाकून द्यावें लागतें.—मोशांति ४.६१.

***भोजनभाऊ मिळाले अन् अन्नसत्रीं जेऊं आले**—जेवण्यापुरेसे व तेहि फुकट मिळेल अशा ठिकाणीं एकत्र जमलेले लोक. ज्यांचा अर्थाअर्थी कांहीं संबंध नाहीं असे फुकटचे लोक.

भोजनासारखा लाभ नाहीं, मरणासारखी हानि नाहीं—अर्थ उघड आहे. जेवण पहा.

भोत——मारून भोत करणें; मारता भोत भरणें—[भोत=पोतें] पोत्याप्रमाणें अंग सुजेपर्यंत मारणें खूप मारणें, ठोकणें; मारून मारून अंग सुजविणें.

भोत सुजणें-होणें—अंग खूप सुजणें.

भोपळा——अपेशी भोपळा—भोपळा हा अपयशी आहे म्हणून गांवास जातांना बरोबर नेऊं नये. याच्या उलट ‘ यशाचें गाजर ’ बरोबर न्यावें अशी रूढी आहे.

भ्रमाचा भोपळा फुटणें—भ्रम दूर होणें; एखाद्या गोष्टीबद्दलची असलेली समजूत चुकीची ठरणें.

हातीं भोपळा देणें—१ कांहींहि न देणें. राजा उदार झाला, हातीं भोपळा दिला. २ भिकेस लावणें.

हातीं भोपळा येणें—दरिद्री होणें.

भोपळदेवता—भटक्या मारणारी वयस्क स्त्री.

भोपळसुती—१भोंगळ.२ अव्यवस्थित.३जाडेंभरडें.

भोपळया रोग—लठ्ठपणा; स्थूलता.

भोपळयाचें पेटें—सांगड.‘भोपळयाचें पेटें खांद्यावरी आहे ।’—रूप्र २.१०.

भोपळ्याएवढें पूज्य—(मोठें) शून्य; पूर्ण अभाव. ‘ विद्या, विश्वविद्यालयाची डिग्री, अपूर्व बुद्धिमत्ता, किंवा एखादी अपूर्व कला, या सर्वांचें माझ्याजवळ भोपळ्याएवढें पूज्य होतें. ”—नर्स सुंद्राबाई ४५.—विवि ८.२.३१.

***राजा उदार झाला, हातीं भोपळा दिला**—राजानें फार मोठें औदार्य दाखविलें; तर काय केलें—एक भोपळा दिला. ज्याला कांहीं किंमत नाहीं अशी वस्तु मोठ्या औदार्याचा आव आणून देणें.

तुझोच भोपळो, तुझोच भात, निमताक लावतंय माझो हात—(मालवणी) [भोपळो=भाजी. निमताक=निमित्याला] तुझीच भाजी, तुझेच तांदूळ; फक्त मी शिजवून देत्यें इतकेंच. आपल्याकडे कांहीं श्रेय नसणें. —धनुर्धारी १४-३-४२.

भोंबा——भोंबा करणें-करून सांगणें—बाऊ करणें; फुगवून सांगणें.

भोम——भोम पोरोब करता ती दिवाळी—(गो.) भोम पोरोब करील ती दिवाळी. गांवांतला बडा माणूस बोलेल त्याप्रमाणें गांवांत सगळ्या गोष्टी घडायच्या. तु०—राजा बोले दल हाले.

भोरें—भोऱ्यार भोरकुटी—(गो.) मोठ्या ओझ्यावर लहानसें बोचकें जड होत नाहीं अशा अर्थानें म्हणतात. भरल्या गाड्यास सूप जड नाहीं.

भोंवई—भोंवईस गांठी घालणें—आठ्या घालणें; नापसंती दर्शविणें. 'घाली होवुनि तिर्यग्दृक नतमुख भोंवयासि तो गांठी ।'–मो उद्योग १०.६८.

भोंवचें—भोवचा गेलो तीर्थांतु, मन उरलें घरांतु—(गो.) पुण्य जोडण्यासाठीं तीर्थयात्रेला जावें आणि मन मात्र घरप्रपंचांत घोंटाळत राहावें; म्हणजे काय त्याचा उपयोग ?

भोंवती भागरथ—(गो.) फिरणारी गंगा. गंगा ही कृष्णा, गोदा, वगैरे नद्यांना प्रत्येक वर्षी एकेकीला अशी भेटत असते अशी पुराणांत कथा आहे. तिच्यावरून ही म्हण पडली आहे. एकसारखी आज या घरीं, उद्यां त्या घरीं अशी फिरत राहाणाऱ्या बाईला उद्देशून म्हणतात.

भोंवल्या त्यो प्रदक्षिणा, नी निजता तो नमस्कार—(गो.) फिरतो त्याच प्रदक्षिणा आणि निजतो तोच नमस्कार. नाठाळ मनुष्य जेवढें करील तेंच अधिक मानून घ्यायचें.

भोवन् भोवन् चॉडूणा—(गो.) फिरून फिरून चोडणें या गांवीं एखादा माणूस पुनः पुनः तीच तीच गोष्ट करायला लागला कीं म्हणतात.

भोवंड—भोवंड जिरवणें—रग जिरवणें; दमविणें; थकविणें.

भोवंडी दुकान—फिरतें दुकान.

भोंवरा—पायाला भोंवरा असणें—सारखें फिरत राहणें.

भोंवरा करणें—गाय, म्हैस इत्यादीस स्पर्श केला असतां वर्तुळाकार स्फुरण करणें.

भोंवऱ्यांत सांपडणें—अडचणींत गुंतणें.

भोवळ—भोवळ जिरणें—नक्षा उतरणें; गर्वाचा परिहार होणें.

भोळा—भोळा ग बाई भोळा अन् सगळ्या पापांचा गोळा—दिसायला गरीब भोळा पण सर्व व्यसनें असणारा; दुष्कर्मे करणारा.

भोळा भाव, अंधळा देव—भक्त भोळा व देव अंधळा असला म्हणजे परस्परांचा योग्य मिलाफ दिसतो.

भोळा भाव सिद्धीस जाव-पाव—भोळ्या मनुष्यास त्याच्या कार्यांत त्याच्या सरळ वागणुकीमुळें यश येतें. ' भोळा भाव सिद्धीस जाव । हा उद्धाराचा उपाव ॥' —रामदास–दासबोध.

भोळा भासा द्यावा घ्यावा—चूकभूल द्यावी घ्यावी.

भोळी ग बाई, लुगड्यावर मागते चोळी, खायला मागते पुरणपोळी—वरून भोळेपणा दाखवून कार्य साधणारी स्त्री.

भोळी सीता, चोळी बेता—वरीलप्रमाणेंच. भोळसरपणा दाखवून आप्पलपोटेपणा करणें.

लाभापेक्षां भोळपाची आशा फार—व्यवहारांत फायदा मिळविण्याचें चातुर्य नसून नजरचुकीनें होणाऱ्या फायद्याची अपेक्षा.

भोळ्याचे देव सोळा—भाबड्या भोळ्या माणसाचा प्रत्येकावर विश्वास असतो. त्याला वाटतें प्रत्येक देव आपल्या मागण्या पुऱ्या करील, आपलीं गाऱ्हाणीं दूर करील नि तो साऱ्या देवांना प्रार्थना करीत असतो. तसेंच साधा सरळ स्वभावाचा मनुष्य आपल्या ओळखीच्या प्रत्येक व्यक्ति जीवश्चकंठश्च मित्र समजतो. त्याला आपलीं सुखदुःखें तो मनमोकळेपणानें सांगतो. त्यांत कांहींच पेंचपाच नसतो.

भौम—भौम करी बोम—(महानु.) मंगळाची दृष्टि वाईट असल्यानें वाईट होतें.

भ्रम—भ्रमाचा भोंपळा—भोंपळा पहा. A bag of moonshine.

भ्रमाचा भोंपळा फुटणें—[एका गृहस्थाला आपल्या तळघरांत एक वाळलेला भोंपळा सांपडला. तो हलविला कीं खुळकर वाजत असे. त्यांला वाटलें कीं, यांत आपल्या पूर्वजांनीं पैसे ठेवले असतील. एकदां फार अडचणींत असतां पैशाच्या आशेनें तो त्यानें फोडला तेव्हां नुसत्या बियाच बाहेर पडल्या !] खोट्या कल्पनेचें निरसन होणें. ' आपल्या अंगचा दुर्गुण कितीहि झांकला तरी अखेर भ्रमाचा भोंपळा फुटून फजीती ही व्हायचीच ! '– शं. मो. रानडे.

भ्रमाची मूठ—मूठ जोंपर्यंत वळलेली आहे तोंपर्यंत

तींत काय धरिलें आहे हा भ्रम असतो. झांकली मूठ. पहा.

***भ्रमाचा भोंपळा, चौपाई मोकळा**—जोंपर्यंत मनुष्य भ्रमांत असतो तोंपर्यंत तो वाटेल तशा मनांत कल्पना करतो.

भ्रमाची पुडी, नि हिंगाचा वास—ज्या पुडीच्या आंत काय आहे, काय नाहीं हें उघड दिसत नाहीं ती भ्रमाची पुडी. हिंगाचा वास मोठा प्रबळ असतो, इतका कीं डब्यांतील हिंग काढून घेऊन कित्येक दिवस लोटले असले तरी त्याचा वास निःशेष होत नाहीं; त्यांत हिंग अद्याप असावा असाच भ्रम होतो. गुप्त पुडी किंवा हिंगाचा निव्वळ वास हे अवास्तव कल्पनेचे दर्शक आहेत. 'पूर्वी त्याची श्रीमंती होती आतां भ्रमाची पुडी नि हिंगाचा वास उरला आहे.' म्हणजे नुसता बाह्य देखावा उरला आहे एखादा मोठा मनुष्य काय मोठें कार्य करील आणि काय नाहीं, याचा निश्चय झालेला नसतो अशा प्रसंगीं ही म्हण वापरतात.

भरम भारी, खिसा खाली—जवळ कांहीं नसतांना पुष्कळ श्रीमंतीचा असलेला आव.

भ्रुकुटी—भ्रकुटी चढविणें—उग्र मुद्रा धारण करणें; रागानें बघणें.

म

मऊ—मऊ पडणें-येणें—नरम पडणें; नरमावणें; आवेशाचें भाषण, टारगटपणा, वटवट इ. बंद होणें.

मऊ लागणें—कांहीं विरोध, अडचण वगैरे नसणें 'दक्षिणची फौज म्हणजे मऊ लागलें म्हणजे बेजरब घेणार, कठीण लागलें म्हणजे फिरोन पहाणें नाहीं.'

मऊ लागलें म्हणजे दडपणें—जेथें थोडीफार सवलत मिळेल तेथें सर्व दडपून टाकण्याकडे प्रवृत्ति होणें. 'जों मृदु लागे तों तों दडपी शिशु फार ऊन भातातें।' —मोसभा ४·३७.

***मऊ पाहिलें-सांपडलें कीं कोपरानें खणूं नये; मऊ पाहिलें कीं कोपरानें खणलेंच**—कोपर पहा. एखाद्याच्या चांगुलपणाचा फार फायदा घेऊं नये. मनुष्यास जरासा आधार मिळाला किंवा जरा सैल सोडलें तर तो त्याचा गैरवाजवी फायदा घेतल्याशिवाय राहात नाहीं. तु० (केलें काय) 'स्वयेंहि मृदु म्हणुनि नये भू खणों कोपरानें।'—मो-कृष्ण७९.३०.

मऊ मेणाहूनि आह्मी विष्णुदास, कठीण वज्रास भेदूं ऐसे॥—तुगा (जोग.). आम्ही विष्णुदास मेणाहिपेक्षां मऊ आहोंत. आणि इंद्राच्या हातांतील वज्र फोडून टाकण्याइतके कठीणहि आहोंत. साधु प्रसंगीं फार सौम्यता दाखवितात परंतु कठीण वेळ आली असतां ते जास्त वज्रापेक्षांहि काठिण्य धारण करतात.

मकर—मकरचेष्टा—खोटी बतावणी. नक्राश्रु पहा.

मकट—मकटा हस्तांतु माणिक—माकडाच्या हातांत माणिक. माकडाला माणकाची किंमत काय? माकड पहा.

मकाण—मकाणांत येणें—आटोक्यांत, टप्प्यांत येणें.

मखर—मखरांत बसणें—(मुलीस लग्न झाल्यानंतर प्रथम न्हाण आलें असतां मखर घालण्याची चाल असे.) न्हाण येणें.

मखलाशी—मखलाशी करणें—(ऐति.) सरकारी हुकुमावर वरिष्ठ अधिकाऱ्याची स्वाक्षरी 'मंजूर' या अर्थी लिहिली जात असे; त्यावेळीं तो अधिकारी त्यांत सुधारणा वगैरे करी; त्यावरून सुधारणा करणें; मान्यता देणें २ सजविणें; नीटनेटकें स्वरूप देणें. ३ सांभाळून घेणें; पुरस्कार करणें. 'अहो! जें मनांत होतें तें एकदम बाहेर पडलें. आतां किती जरी कळाकुसरी आणि मखलाशी केली तरी मी फसायची नाहीं.'—जग हें असें आहे.

मख्खी—मख्खी उतरणें—नक्कल करणें; बिनचुक अनुकरण करणें.

मख्खी चूस—तुपांत वगैरे माशी पडल्यास ती चोखून तूप खाणारा; कंजुष; कृपण.

मगर---मगरमिठी---मगरीनें एकदां मिठी मारली म्हणजे ती सुटत नाहीं. यावरून अतिशय घट्ट पकड, छाप. 'अज्ञानाच्या मगरमिठीहून अधिक जाचक अशी गोष्ट नसेल.'—नि.

मगरीनें माणिक गिळणें—मगरीनें गिळलेली वस्तु परत मिळणें अशक्य असतें. कोणतीहि वस्तु परत न मिळणें. तु०—बळानें काढूं ये मणि मकर दाढेंत गिळिला।

***मगराची स्वारी,पाण्यांत भारी**---मगर हा पाण्यांत राहणारा प्राणी आहे. यामुळें त्याचें बळ पाण्यांत विशेष असतें. जमिनीवर त्याची शक्ति चालत नाहीं. तु०—नक्रः स्वस्थानमासाद्य गजेंद्रमपि कर्षति। स एव प्रच्युतः स्थानाच्छुनापि परिभूयते॥

मगरी मगरी,तुझी पाठ मऊ—वास्तविक मगरीच्या ठायीं हा दोष आहे कीं, तिची पाठ अत्यंत कठीण व खरखरीत असते. पण मगरीच्या मिठींत सांपडलेला मनुष्य तिच्या तडाख्यांतून आपला प्राण कसातरी वांचाविण्याच्या उद्देशानें असें म्हणतो. बलिष्ठ दुर्जनाची संकटप्रसंगीं अवास्तवसुद्धां स्तुति करून संकटप्रसंगांतून पार पडणें शहाणपणाचें ठरतें . सुसर पहा.

मंगल---मंगलमूर्ति मोरया होणें---गणपतीचें विसर्जन करतांना असा जयघोष करून त्यास नेऊन पाण्यांत बुडवितात यावरून. कामाचा शेवट होणें; समाप्ति होणें.

मंगलाष्टक घट्ट करणें---लग्नामुंजींतील मंगलाष्टकें नीट म्हणतां येणें, पाठ असणें.

मंगलाष्टक गात बसणें---रडत, चरफडत बसणें.

मंगळ---मंगळ गात बसणें---१ मंगल गीतें गाणें. २ (विपरीतर्थानें) रडत, दुःख करीत बसणें.

मंगळ मातणें-माजणें---बहुधा समारंभामध्यें सर्व गोंधळ उडून जातो व फार अव्यवस्था होते यावरून. १ अव्यवस्थितपणें कसें तरी केलें जाणें (लग्न). २(मंगल कार्यांत) सोवळें ओवळें इ०चा विचार न राहाणें; अनेक माणसें एकत्र आलीं असतां व समारंभाच्या गडबडींत शुचिर्भूतपणा राहात नाहीं यावरून.

***अडलें कोल्हें मंगळ गाय**---अडणें पहा.

मंगळ (ग्रह)---मंगळ करी चंगळ—(महानु.) मंगळ ग्रह अनुकूल असला म्हणजे वैपुल्य प्राप्त होतें.

मगेलें---मगेलें घस्स, तुगेलें फस्स—(गो.) माझें घस्स, तुझें फस्स. म्हणजे दोघेहि आपण सारखेच.

मगेलें जालें थोडें, म्हण वेयान् धाड्लों घोडें--(गो.) एक आपत्ति भोगीत असतां दुसरी आणखी येणें. घरचें झालें थोडें० पहा.

मघा---मघा आणि चुलीपाशीं हगा, नाहीं तर वरतीच बघा; पडतील मघा तर चुलीपुढें हगा, न पडतील मघा तर आकाशाकडे बघा---पडतील मघा०-पडणें पहा.

मचमच---खाणें थोडें मचमच फार---खाणें पहा.

मज---मज पहा फूल वाहा, घर पाहा हगून जा---(व.) माझ्या शरीराकडे पाहाल तर इतके खूष व्हाल कीं देवाप्रमाणें समजून फूल वाहाल, पण माझें घर मात्र अगदीं उकिरड्यासारखें आढळेल. एखादा मनुष्य स्वतःच्या शरीराची-कपड्यांची वगैरे स्वच्छतेची काळजी घेतो पण इतर गोष्टींत गबाळपणा करतो यावरून. स्वतः पुरतांच स्वच्छपणा.

मजें मजें० भ्रांति वजें—(गो.) माझें माझें आणि भ्रांतीचें ओझें. मनुष्य माझें माझें म्हणून मोहांत गुरफटत असतो.

मजो खोंपो तुजि पगडी---(गो.) माझें डोकें, तुझी पगडी. अंधपंगुन्याय.

मजो संसार बरो कीं आंव बरो---(गो.) आत्मपरवृत्ति.

मज्या सारखी तूं जा---(गो.) माझ्यासारखी तूं हो. एका विधवेनें एक सवाष्णबाई तिला नमस्कार करायला आली असतांना तिला वरीलप्रमाणें आशीर्वाद दिला. आपल्यांत कांहीं उणेपणा असला तर तो दुसऱ्यांतहि असावा आणि तो आपल्यासारखा व्हावा असें कांहीं लोकांना वाटतें.

मजल---मजल दर मजल—मध्यें न थांबतां; कूच दर कूच; एकसारखें.

मजल मारणें—मार्ग आक्रमण करणें; पुढें जाणें; प्रगति करणें. 'युरोपिअनांनीं बरीच मजल मारली होती.'

मजला---सातव्या मजल्यावर बसणें—अगदीं उंच जागीं असणें. (ल.) उच्च पदावर आधिष्ठित असणें; घोड्यावर असणें.

मंजा---मंजा उतरणें---[मंजा=कलगीची लावणी] दृष्ट काढणें; हातांनीं ओवाळणें.

मजूर---दिवस बुडे, मजूर उडे---दिवस पहा.

मट्ट---मट्टमाया होणें---(क.) नाहींसें होणें; अगदीं गप्प होणें.

मट्टी---मट्टी पलिद करणें---(ना.) शरिराचा नास करणें; सर्वांची नासाडी करणें.

मट्टयास येणें---मेटाकुटीस येणें पहा.

मठ---मठ, मठसंस्था होणें-बनणें---एखाद्या मठांत ज्याप्रमाणें मठाधिपति व त्यांचे चेले यांचेंच साम्राज्य असतें व तेंच लोक आपापला स्वार्थ साधून घेत असतात त्याप्रमाणें एखादी संस्था सार्वजनिक हिताला निरुपयोगी व केवळ स्वार्थपरायण बनणें.

***आधीं होता मठ, त्याला बांधला तट**---(केसरी.) प्रथम मठ म्हणजे सार्वजनिक कथा, कीर्तन, उपासना करण्याची जागा असतांना तेथें एखाद्या आपमतलबी साधूनें येऊन त्याचा ताबा घेऊन सभोंवतीं तट बांधून इतरांस मज्जाव करणें; अपहार करणें; बळकावून बसणें.

मडकई---मडकैक आखाडे नी कुंडईक बखेडे---(गो.) मडकई नांवाच्या गांवीं गडगे फार आणि आणि कुंडईत तंटे फार.

मडकें---मडक्या तोंडाकइ लोकां तोंड धांपचें कठीण---(गो.) मडक्याचें तोंड झांकण्यापेक्षां लोकांचें तोंड झांकणें कठीण असतें. दहा लोक दहा प्रकारांनीं बोलायला लागल्यावर त्यांना कसें आवरायचें?

मडक्याचा कांठ ओला (आहे) तों वळेल---ज्याप्रमाणें मडक्याची माती ओली आहे तोंच त्याला इष्ट तो आकार देतां येतो, त्याप्रमाणें लहान मुलांस लहानपणींच त्यांची बुद्धि परिपक्व होण्याच्या आधींच इष्ट तें वळण लावतां येतें.

कोंकणांतलें पीक, मडक्यांतली वरव---कोंकणांत मोठें पीक आलें तरी काय? मडक्यांत सांठवण होईल इतकेंच धान्य निघतें. ठराविक मर्यादेबाहेर एखादी गोष्ट जाऊं शकत नसल्यास म्हणतात.

मंडल---मंडल फिरणें---वाटोळें, वर्तुळावर, गोल फिरणें.

मंडलावर धरणें---वाटोळें फिरविणें; घेरावर धरणें (घोडा इ. स).

मडवळ---मडवळा गाढव, हर्दासा तट्टु, फाटीरि घाले तितले व्हांवता--(गो.) परटांचें गाढव आणि हरदासाचें तट्टू हीं बिचारीं पाठीवर लादावें तेवढें वाहून नेतात.

मडवळाघरच्या लग्नाक वस्त्राची जायना भीक---(गो.) परटाच्या घरच्या लग्नाला वस्त्रांना काय तोटा? लोकाकडून धुण्यास आलेले सर्व कपडे त्याचेच!

मडवळाची फातर, जाय ताणे उमळचें---(गो.) धोब्याचा धुण्याचा दगड, वाटेल त्यानें येऊन त्यावर धुवावें. उघड्यावर पडलेली आणि त्यामुळें सार्वजनिक स्वरूपाची झालेली वस्तु. धर्मशाळेंतील उखळ.

मडवळाचें मढें भायेर काढल्याबगर कळाना---(गो.) धोबी नेहमीं लोकांचे कपडे वापरतो त्यामुळें धोब्याचें स्वतःचे कपडे कोणते हें तो मेल्यावर कळावयाचें; म्हणजे खरी स्थिति शेवटीं कळतें.

मंडूक---कूपमंडूकन्याय---कूप पहा.

मंडूकप्लुतिन्याय---बेडकाप्रमाणें उड्या मारीत जाणें; म्हणजे मधला भाग गाळीत जाणें, वाचणें. २. झपाझप मधलें मधलें टाकून केलेलें काम.

मंडूकानुवृत्ति---गाळागाळ; टाळटाळ. सतत, अखंड असें काम न करण्याची प्रवृत्ति.

मढें---मढेंपंचक---वैशाख महिन्यांतील धनिष्ठा, शततारका, पुर्वाभाद्रपदा, उत्तराभाद्रपदा व रेवती या पांच नक्षत्रांचा काल. या कालांत मृत्यु फार होतात अशी समजूत.

मढें हलकें करणें-होणें---(कर्ना.)आप्तइष्ट लोकांनीं मृताकरितां अतिशय शोक करणें.

मढ्याला शृंगार---मढ्याला शृंगार घालून काय उपयोग? यावरून व्यर्थ निरर्थक गोष्ट करणें. 'गांवावर उपकार मढ्याला शृंगार, धर्मशाळेची उठाठेव, दत्तक मुलाचा प्रपंच हें व्यर्थ.' दत्तक पहा. वीरशैव लोकांत मढ्यास कपडे दागिने घालून शृंगारतात व कागदाचा (विमान) डोलारा करून त्यांत बसवून वाजवीत नेतात. म्हण पहा.

मढ्यावरचें, मढ्याच्या टाळ्याचें-टाळूवरचें लोणी खाणें---प्रेतावरील लोणीहि व्यर्थ जाऊं नये म्हणून चाटणें; अतिशय कंजुष वृत्ति; चिक्कूपणा.

*मेलें मढें आगीला भीत नाहीं—जिवंतपणा आहे तोंपर्यंतच भावना विकार होतात. मेल्याप्रमाणें जो माणूस आहे त्याला कशाच्या भावना आल्यात. कोडग्या निगरगट्ट माणसाबद्दल योजतात.

मढें गेलें मसणा, ताजी ना वासना—(गो.) वस्तु नष्ट होतांच तिच्याविषयींची आठवणदेखील न काढणें.

मढें झांकुनियां करिती पेरणी । कुणबियाची वाणी लवलाहे ॥—तुगा ३५९३. व्यावहारिक निदर्यपणा.

देखे मढें, येई रडें—देखणें पहा.

केंस उपटल्यानें काय मढें हलकें होतें?— केंस पहा.

मढ्याला शिणगार (शृंगार) आणि जित्याला विपचार—मेलेल्या माणसाच्या प्रेतास शृंगार चढवावयाचा व जिवंत माणसांकडे दुर्लक्ष करावयाचें, हा मूर्खपणाचा व्यापार होय.

मढ्यास लांकडें आणि दिवाणास पैसा—मनुष्य मेला म्हणजे त्याला जाळावयास लांकडें पुरविणें हें जसें चुकवितां येत नाहीं तसें सरकार कर हाहि चुकवितां येत नाहीं.

मढ्यास शृंगार नाहीं, रयतेला उपकार नाहीं—(व.) मढ्याच्या शृंगाराप्रमाणें रयतेवर सरकारनें कितीहि उपकार केले तरी तिला त्याचें कांहीं वाटत नाहीं.

मणका—मणका(के) ढिला(ले) करणें—१ फार मारणें; बेदम चोपणें. २ अतिशय कष्ट करणें.

मणि—एका माळेचे मणी—एक पहा.

सुतासाठीं मणी फोडणें—आंतील दोऱ्याचा तुकडा मिळावा म्हणून रत्न फोडून काढणें; म्हणजे अत्यंत अल्प लाभासाठीं फार मोठी हानि करून घेणें.

मणि मंगळसूत्र बरोबर असणें—सौभाग्यवती असतां मरण येणें; अहेवपणीं मरणें; चुड्यासुद्धां जाणें. 'माझें मणिमंगळसूत्र मजबरोबर आहे.'—विवि १०.१०.२२५.

मणेर, मण्यार—मण्यारीची सावली पडली म्हणजे मनुष्य मरतें—[मण्यार=एक सर्प विशेष.] अशी समजूत आहे.

मत—मतामतांचा गलबला । कोणी पुसेना कोणाला ।—रामदास. अनेक लोक अनेक मतांचे असले म्हणजे सर्व घोंटाळा माजतो. Many men, many minds.

मतलब—मतलब गरजी बिलंदी—पक्की स्वार्थी-आप्पलपोटी; मतलबी. 'अजाण हुकुमबंदी । नव्हे मतलब गरजी बिलंदी ।'—होला १०१.१३८.

मतलबाशिवाय मनुष्य नाहीं—कोणाहि मनुष्याला स्वार्थ हा सुटत नाहीं.

मति—मति चालणें—विषयांत गति होणें; विषय कळणें; डोकें चालणें.—विवि ८-३-४७.

*मति नाशिल्याक गति ना, गति नाशिल्याक जग ना—(गो.) अक्कल नसलेल्याला जगांत कुठेंच आधार मिळत नाहीं.

मत्ता—काडीची सत्ता आणि लाखाची मत्ता—(बरोबर होत नाहीं.) काडी पहा.

मत्ता मालकाची आणि सत्ता चाकराची—चाकरावर संसार सोंपविला म्हणजे जरी मालकाची वस्तु असली तरी तिचा विनियोग चाकराच्या मर्जीप्रमाणें होतो; चाकराहातीं कारभार.

मंत्र—मंत्र करणें—युक्ति सुचविणें; बुद्धि सांगणें.

मंत्र षडक्षरी—'रामकृष्णहरि' हीं सहा अक्षरें. 'होऊनि सावध उघडिले नेत्र । आठवला मंत्र षडक्षरी ॥' —ब ७७.

(कान) मंत्र सांगणें-फुंकणें—१ चिथविणें. २ चहाडी सांगणें; गुप्तपणें एखादी गोष्ट सांगणें; हळूच सुचविणें.

*मंत्रतंत्र बाब जाणा, दक्षणा घॅव पा हांव जाणा—(गो.) एक ब्राह्मणाचा मुलगा कांहींतरी धार्मिक कृत्य करण्यासाठीं यजमानाच्या घरीं आला असतां यजमानानें त्याला मंत्र म्हणायला सांगितलें तेव्हां तो म्हणालाः—'मंत्रतंत्र मला कांहीं ठाऊक नाहीं. फक्त दक्षणा घ्यायची तेवढी मी जाणतों.' लायकी न दाखवितां मोबदला मिळवूं पाहणारा. पुढें पहा.

मंत्रतंत्र भट्टु जाणा, खांवचें जेवचें हांव जाणा—(गो.) मंत्रतंत्र हें भटाला माहीत; मी फक्त खायचें जेवायचें तेवढें जाणतों.

मंत्र थोडा, थुंका फार—मांत्रिक तोंडांतून मंत्राक्षरें काढण्याऐवजीं थुंकाच फार काढतो. म्हणजे त्याला मंत्र थोडेच येतात. थुंकणें हें तंत्र मात्र तो सारखा करतो. गडबडगुंडा पुष्कळ पण तथ्य फार थोडें; विनाकारण फापट पसारा. खालीं पहा.

मंत्र थोडा फुंकर जास्त; मातिर (मंत्र) थोडा, फुका जास्त (गो.)--वरप्रमाणेंच.

मंत्रानें मुलें होत नाहींत--जें तें काम योग्य मार्गानेंच होऊं शकतें; भलत्याच मार्गानें गेल्यास कार्य साधत नाहीं. तु.–नवसें कन्यापुत्र होती । तरी कां करणें लागे पति ॥–तुगा.

मथिला---**मथिलावेलो नाल्लु**--(गो.) पाठभेद–**वर्षीवैलो नाल्ल**--भिंतीवरचा नारळ. भिंतीवर ठेवलेला नारळ आंतल्या बाजूस पडेल कां बाहेरच्या बाजूस पडेल हें निश्चित सांगतां येत नाहीं. जो मनुष्य कोणत्याच एका बाजूस धड मिळत नाहीं त्याची स्थिति भिंतीवरच्या नारळासारखीच असते. तो कुंपणावरून दोन्हीकडेहि बघत असतो. Sitting on the fence.

मथुरा---**मथुरा गये मथुरादास, गोकल गये तो गोकलदास**—(महानु.) माहेरास गेले माहेरचे, येथें आले तर येथचे, तेथें गेले तेथचे. गंगा गये. पहा.

मथुरेचा पेढा कांहीं निराळा--मथुरेचे पेढे प्रसिद्ध आहेत. आवडत्या स्त्रीच्या चुंबनास त्याची उपमा देतात.

मद---**मदत्रय**—(अ) विद्या, धन, कुल; किंवा (आ) तारुण्य, धन, सत्ता, यांचा मद. ' अहंकाराचिया चाळिया । वरि मदत्रयाचिया उकळिया । '–ज्ञा.७.७५.

मंद----**मंद पडणें**—१ सावकाश, थंडपणें, कसेंतरी चालू असणें (कामधंदा इ.). २ कमजोर होणें (दुखणें इ.).

मदन---**(मुखावरून, तोंडावरून, स्वरूपावरून) मदन ओंवाळणें-ओंवाळुन टाकणें**—हिच्या–यांच्या सौंदर्यापुढें मदनाचें सौंदर्य कांहींच नाहीं हें ठसविण्यासाठीं योजतात.

मदनाचा पुतळा; मदनाची छडी—अत्यंत सुंदर पुरुषास व स्त्रीस लावतात. ' पाहीन ना आतां कसला मदनाचा पुतळा हिला नवरा मिळतो तो !'-पकोधे. ' तूं कशी सुरेख मदनाची छडी आहेस. '–मृच्छ ९.

मद्य---**मद्य घरांत रिगल्यावर बुद्धि घर सोंण्णु वत्ता**—(गो.) दारू घरांत शिरली कीं, बुद्धि तिथून निघून जाते. दारूबाजाला अक्कल राहात नाहीं.

मध---**मधाचें बोट लागणें**—आशा सुटणें; तोंडाला पाणी सुटणें; थोडा लाभ झाल्यामुळें अधिक होईल अशी अपेक्षा उत्पन्न होणें. 'मधाचें बोट लागावयास कारण हेंच जाहालें. '–भाव ५.

मधाचें बोट लावणें-दाखविणें—आशा, लालूच दाखविणें.

मधला–लीं---**मधल्या वाटेस येणें**–इष्ट वस्तु न मिळवितां येणें.

मधली गेली खोड, तर दादला बायली गोड—नवराबायकोच्यामध्यें तिऱ्हाइतानें लुडबुड केली नाहीं तर नवराबायकोचें लवकर मेतकूट जमतें.

मधुर----**मधुरत्रय**—खडीसाखर, मध व तूप.

मधुर त्रिफला—द्राक्षें, डाळिंब व खजूर.

मधून----**मधून विस्तव न जाणें**—विस्तव पहा.

मध्यान्ह---**मध्यान्ह काळाचें कठीण**—पोटास मिळण्याची मुष्कील; अत्यंत गरिबीची स्थिति. 'अंतकालापेक्षां माध्यान्हकाळ कठीण आहे. '–पेद २६.१२४.

***मध्यान्ह समयीं आला कोणी, तरी तो विष्णुसमान मानी**—भर दोनप्रहरीं, जेवणाच्या वेळीं कोणी भिकारी अगर अतिथि आल्यास त्याला विष्णूप्रमाणें मानून त्याचा आदर करावा व त्यास जेवावयास घालावें. मध्यान्हीच्या वेळीं देव भिक्षेकऱ्याचें रूप घेऊन आपल्या दातृत्वाची परीक्षा पाहाण्यास येतो अशी समजूत.

मध्यें – -**मध्यें तोंड घालणें**—संबंध नसतां मध्येंच बोलणें; दुसऱ्याच्या भानगडींत पडणें. तोंड पहा.

***मध्येंच टाकी कार्याला, आरंभशूर म्हणती त्याला**—जो मनुष्य कार्याचा आरंभ करून मध्येंच अर्धवट सोडून देतो त्याला आरंभशूर म्हणतात. तु०–प्रारभ्यते न खलु विघ्नभयेन नीचैः। प्रारभ्य विघ्ननिहता विरमंति मध्याः ।–नीतिश ७३.

मन---**मन उठणें**-**उडणें**--१ वीट येणें; आवडेनासा होणें; कंटाळा, तिरस्कार वाटणें. ' ह्या सखलादी अंगरख्यावरून अलिकडे माझें मन उडालें आहे. ' २ प्रेम नाहींसें होणें; नावडतें होणें (स्त्री वगैरे.)

मन कांपणें--घाबरणें; धास्ती घेणें; दुःख होणें; भीति वाटणें. ' व्यूढोरस्कादिक नव मेले, मन कांपतें कथा-याला । '–मोभीष्म ९.६२.

मन खचणें-कचरणें—धाकधूक वाटणें; अवसान सुटणें; हिंमत सुटणें; हातपाय गळाठणें; कंबर खचणें; धीर सुटणें.

मन खाणें—हुरहुर वाटणें; आपण केलेल्या वाईट

कृत्याबद्दल स्वतःलाच वाईट वाटणें; टोंचणी लागणें; पश्चात्ताप होणें.

मन गडबडणें—मन भीतीनें भरणें; गांगरणें; घाबरणें. ‘ गडबडतें मन वेडें, माणुस मी मी म्हणोनि बडबडतें । ’ –मोशल्य ४.४९.

मन घालणें-देणें–लावणें—लक्ष्य घालणें; विचार करणें; मन एकाग्र करणें; लक्ष लावणें.

मन जाणें—१ इच्छा होणें; हवेसें वाटणें. २ प्रेम जडणें; मन गुंतणें.

मन तुटणें—वीट येणें; आवडेनासें होणें; मनांत कंटाळा, अप्रीति उत्पन्न होणें; मन पराङ्मुख होणें; प्रेम नाहींसें होणें.

मन थोड्यासाठीं निसरडें करणें—अल्प स्वल्प गोष्टीकरतां अंतर देणें; क्षुल्लक फायद्यासाठीं निश्चयापासून पराङ्मुख होणें.

मन दुग्ध्यांत पडणें—मनाचा निश्चय न होणें; मन हेलकावे खाऊं लागणें; संशयांत पडणें; गोंधळणें. ‘ आतां माझें मन दुग्ध्यांत पडलें. ’–बाळ २.१९५.

मन धरणें—१ एखाद्याच्या मनाप्रमाणें वागणें; मर्जी संभाळणें. २ हांजी हांजी करणें; खुशामत करणें. ‘ आदर देखोनि मन धरी। कीर्तीविण स्तुती करी।’–दा२.१०.२५.

मन पाहणें—मनांत काय आहे याचा कयास काढणें; मनाची परीक्षा करणें; (एखाद्याच्या) मनाचा कल अजमावणें; एखाद्याचे विचार त्याचें भाषण, वागणूक इ. वरून ठरविणें.

मन बसणें–लागणें—प्रेम जडणें; मन गुंतणें; (कांहीं गोष्ट करावयास) अनुकूल होणें; अतिशय आवडणें; आसक्त होणें; प्रिय वाटूं लागणें. ‘ नको कचा मज टाकुनि जाऊं, तुजवरि मन हें बसलें रे ।’

मन मनाविणें—मन वळविणें; मर्जी संपादणें; अनुकूल करून घेणें.

मन मानेल तसें करणें—मर्जीप्रमाणें वर्तन करणें; इच्छेस येईल तसें करणें;स्वैर वर्तन करणें;स्वच्छंदानें वागणें.

मन मारणें—मनांतील हेतु, आकांक्षा वगैरे प्रकट न करणें; इच्छा मारणें; इच्छा दाबून ठेवणें; संयम करणें.

मन मिळणें—उभयतांच्या आवडी निवडी सारख्या असणें; स्वभाव जमणें; मेळ बसणें. ‘ स्त्रीपुरुषांचीं मनें मिळालीं नाहींत तर त्यांचा संसार सुखावह होऊं शकत नाहीं. ’

मन मुंडणें—इच्छा नाहींशी करणें. ‘ आधीं मन मुंडा । मन मुंडा । व्यर्थ मुंडितां मुंडा ।’–मृ ६५.

मन मोठें करणें—सहृदयता दाखविणें; उदारपणा दाखविणें; थोरपणानें वागणें.

मन मोडणें—मर्जीविरुद्ध वागणें; मनाविरुद्ध गोष्ट करणें; एखाद्याची आशा विफळ करणें; एखाद्याच्या इच्छेविरुद्ध वागणें; दुःख देणें. ‘ जयाचेनि शब्दें मन मोडे । तो एक पढतमूर्ख । ’–दा २.१०.६.

मन विटणें—कंटाळा, वीट येणें. ‘ बहु वीरक्षय घडला, तेणें बहु जीवितासि मन विटलें । ’–मोभीष्म ११.७४.

मनांत आणणें—१ संकल्प,निश्चय करणें. २ मनावर घेणें; विशेष वाटणें; विचार करणें. ‘ह्यांतलं कांहीं मनांत आणूं नका बरं का ?’–इंप १८.

मनांत–मनीं कढविणें—राग आणणें;संताप आणणें; मनांतल्या मनांत रागानें चूर करणें; जळफळावयास लावणें. ‘निज तेजें भानुला मनीं कढवी ।’–मोविराट ३. १२०.

मनांत–मनीं कालवणें—मनास लागणें, टोंचणें. अंतःकरणांत अतिशय कष्टी होणें; मनास खंती वाटणें; ‘बहुत दुःख मनीं जरि कालवे ! भिउनि ह्यास तयार न बोलवे!’

मनांत गांठ ठेवणें—मनांत वैरभाव, द्वेषबुद्धि, सूड घेण्याची इच्छा जागृत ठेवणें; अढी धरणें.

मनांत गांठ बांधणें–घालणें—पक्कें स्मरण ठेवणें; नीट ध्यानांत धरून ठेवणें; मनांत गोष्ट पक्की ठेवणें.

मनांत चरचरणें—मनास चरका बसणें, चटका बसणें; मनास काळजी, भीति वाटणें; दुःख होणें.

मनांत–मनीं ठेवणें—१ परिस्फुटता न होऊं देणें; एखादी गोष्ट गुप्त राखणें; वाच्यता न करणें. २ विस्मरण न होऊं देणें; ध्यानांत ठेवणें. ‘ चाल पुरा, हें मनींच ठेवून । ’–मोविराट ६.५२.

मनांत–मनीं धरणें–वागविणें—लक्ष्यांत असूं देणें; ध्यानांत ठेवणें; स्मरण ठेवणें. ‘ह्यालागीं तुम्हांशीं बोधिलें। मनीं धराल म्हणोनिया । ’

मनांत नवमण जळणें—मनांतल्या मनांत चरफडणें,

मनांतल्या मनांत संतापणें; मनांत द्वेष, सूड घेण्याची इच्छा जाग्रत ठेवणें.

मनांत भरणें—पसंत पडणें; आवडणें; मन बसणें; प्रेम जडणें.

मनांत मांडे खाणें—व्यर्थ इच्छा धरणें; मनोराज्य करणें. 'तो मनांत मांडे खात होता कीं, मीं पेरलेल्या साखरेस भुलून ही मला वश होईल.'–पामो ७८.–इंप १३५. 'तेव्हां ते मनांत मांडे खाऊं लागले होते कीं,' –V. S. २·१४४.

मनांत म्हणणें—विचार करणें; योजणें; मनन करणें.

मनांत–मनीं म्हणणें—स्वगत बोलणें; स्वतःशीं पुटपुटणें.

मनांतल्या मनांत जळणें—मनांतून रागावणें, संतापणें; आंतल्या आंत जळफळणें; रागानें धुमसत राहणें.

मनांतून उतरणें—अप्रिय होणें; प्रेम उडणें; आवडेनासा होणें; कंटाळा, वीट येणें.

मनानें करणें—(कोणाची सल्ला न घेतां) स्वतःच्या विचारानें करणें; आपल्याच बुद्धीप्रमाणें वागणें.

मनानें घेणें—मनाचा ग्रह होणें; मत बनणें.

मनाला द्रव येणें—मनांत दया, प्रेम इ. कोमल भावना उत्पन्न होणें.

मनाला लावून घेणें—अतिशय दुःख वाटणें; मनास टोंचणें. 'कल्पनेला सुचतील त्या गोष्टी मनाला लावून घेत बसलं म्हणजे खाल्लेलं अन्नसुद्धां अंगीं लागायचं नाहीं.'–एक ४.३.

मनावर घेणें–धरणें—मनापासून करणें; निश्चय करणें; एखादी गोष्ट पत्करणें; तींत मन घालणें; सिद्धीस नेण्यास झटणें. 'झटता तुझा सखा तरि होतें हित, परि न हा मनावरि घे।'–मोभीष्म ३.३.

मनावर लिहून ठेवणें—पक्कें लक्ष्यांत ठेवणें; ध्यानांत धरणें; कायमची आठवण ठेवणें;स्मृतिपटलावर कोरून ठेवणें.

मनास–मनां आणणें—१ लक्ष्य देणें; मानून घेणें. 'आम्ही वेडें बगडें गातों मनाशीं आणा।'–ऐपो १४२. २ समजून घेणें. 'म्हणे पैल ते कोण ललना। कां तप करिते आणीं मना।'–ह २६.२९. ३ मनावर घेणें; महत्त्वाचें मानणें. 'मी रागाच्या वेळीं बोललों तें मनास आणूं नका.'

मनास येणें–वाटणें—आवडणें; पसंत पडणें.'यावा कनककशिपुचा जैसा, तैसाचि हा वध, मनातें।'–मो द्रोण २२.३७. 'वारूबाई ! पाहिलीस का भावजय? येते का मनास ?'–पकोघे.

मनीं जाण होणें—समजणें; कळणें; ओळखणें; जाणणें.

मनीं मानसीं–मनो मानसीं–मनो मनीं नसणें—(एखादी गोष्ट) अगदीं मनांतदेखील आलेली नसणें; स्वप्नींहि नसणें; कधीं विचारांतहि आलेली नसणें.

मनोमन(य) साक्ष—१ मन मनाची साक्ष देतें. ज्यांना परस्परांविषयीं तिटकारा किंवा प्रेम वाटतें अशा मनुष्यास उद्देशून योजतात; एखाद्या गोष्टीबद्दल एकमेकांचे विचार एकमेकांना अंतर्मनानें कळतात याअर्थी. २ मन स्वतःसाक्षी आहे; स्वतःच्या मनांतील अभिप्राय, उद्देश, भाव इच्छा इ. स्वतःस माहीत असतात.

***तुटलें मन आणि फुटलें मोतीं सांधत नाहीं**—तुटणें पहा.

मनइंद्रिया जो न्यासी : तेयाचीच एकादशी—(महानु.) जो मन आणि इंद्रियें यांना उपवास घालतो तोच खरा एकादशी करतो असें समजावें.

मन केला मोठा : कफनी शिवली दोन बोटा—(महानु.) अल्प देणगी देणें. चिक्कू अनुदार माणसाबद्दल म्हणतात.

मन चिंति एक, त्यांत दैव मारी मेख—मनांत एखादा मनोरथ उत्पन्न होतो तो सिद्धीस जाऊं देत नाहीं.

मन चिंती तें वैरीही न चिंती; मन चिंती तें वैरी चिंतीना—अनेकदां कांहीं गोष्टीबद्दल आपल्याला इतकी धास्ती वाटत असते, व शत्रूला आपण इतकें भीत असतों कीं, त्यामानानें शत्रूच्याहि मनांत आपणास अपकार कारावयाचें येत नाहीं. 'शरदः-- मन चिंती तें वैरी चिंतीना; तशांतलं चाललं आहे तुमचं वहिनी.'– एकच प्याला, अंक ३ प्रवेश १.

मन जाणावें बोलानें, झाड जाणावें फुलानें—मनांतील विचार ज्याप्रमाणें तोंडातून निघणाऱ्या उद्गारांवरून कळतात त्याप्रमाणें झाड कोणत्या जातीचें आहे याची परीक्षा त्याच्या फुलांवरून होते, मनुष्याचा स्वभाव

त्याच्या बोलण्यावरून कळतो व झाडाचा गुण फुलांवरून कळतो.

मन जाणें पापा--आपण केलेलें पाप आपल्या मनांतून कधीं जात नाहीं व इतरांस कळलें नाहीं तरी आपल्या मनास त्याची पूर्ण जाणीव असते.

मन जाणें पापा आणि आई जाणे मुलाच्या बापा--जसें स्वतःच्या मनालाच स्वतःचें पाप कळतें, त्याचप्रमाणें या मुलाचा बाप कोण हें फक्त आईलाच माहीत पडतें. इतरांना, प्रत्यक्ष बाप म्हणविणाऱ्यालाहि तें अचूक कळत नाहीं. Ask the mother if the child be like his father.

मन तशी भावु, भावु तशी देवु--(गो.) मनासारखी भावना, आणि भावनेसारखा देव.

ज्याचें मन त्याला ग्वाही देतें--जो-ज्याचें० पहा.

मन थीं भावार्थ--(गो.) विशुद्ध अंतःकरणांत रागद्वेष हे राहूं शकत नाहींत.

ज्याचें मन दुखविलें आहे त्यावर विश्वासूं नये--जो-ज्याचें० पहा.

मन नाहीं थिरीं, उगीच तीर्थ करी; मन नाहीं स्थिरी, बहु तीर्थ करी--(गो.) मन स्थिर नसल्यावर तीर्थयात्रेची खटपट करून काय उपयोग?

मन नाहीं राजी, तो क्या करेगा काजी--मन संतुष्ट नसल्यावर काजीच्या उपदेशाचा काय उपयोग. मनास शांतता मिळाल्याशिवाय गुरु वगैरे सर्व व्यर्थ होत. पाठभेद-मियाबिबी राजी, तो क्या करेगा काजी.

मन पळोन धन--(गो.) मन पाहून धन.

मन पाच्छा पुण दैव गांडू--(गो.) मनानें उदार पण नशिबानें करंटा.

मन पाच्छाई, कपाळ-दैव गांडू--वरील प्रमाणें. मनांत पुष्कळ इच्छा उत्पन्न होतात पण नशीब करंटें असलें तर कांहीं घडत नाहीं.

मनःपूतं समाचरेत्--(सं.) स्वैर वर्तन करणें; मनास वाटेल तसें वागणें. 'आतांचे सुधारलेले लोक यांना नाहीं कांहीं रीत, नाहीं चाल, आपलं मनःपूतं समाचरेत् असं करायला पाहिजे.'-भदि. पूर्ण श्लोक-दृष्टिपूतं न्यसेत्पादं वस्त्रपूतं पिबेज्जलम्। शास्त्रपूतां वदेद्वाणीं मनःपूतं समाचरेत्। -सम. ४८·३.

ज्याचें मन भोळें ताका देव दिता केळें--जो-ज्याचें० पहा.

मन माने तो कायदा--जें आपल्या मनाला योग्य वाटेल तोच नियम आहे असें धरून चालावें. तु०-सतांहि संदेह पदेषु वस्तुषु प्रमाणमन्तःकरणप्रवृत्तयः।-शाकुंतल. आपल्या मनाप्रमाणें जे स्वैर वागतात त्यांना निंदार्थी म्हणतात.

मन मानेल तो सौदा--आपल्या मनाला योग्य दिसेल तें मोल देऊन जिन्नस घ्यावा. आपल्याला पटेल असा सौदा केला म्हणजे तो बरा वाटतो. (गु.) मन मान्युं त्यां जात शी जोवी? Who asks after the pedigree of a swine he is to kill?

मन मिलेसो मेला, चित्त मिलेसो चेला, नहीं तो अकेला भला--जेथें आपलें मन रमेल अशा मंडळींत बसावें, तसेंच ज्याचें चित्त आपणावर जडलें आहे असाच शिष्य असेल तर ठीक, नाहींतर त्यापेक्षां एकटें बसलेलें अधिक चांगलें.

मन मोडूं नये व डोळा फोडूं नये--कोणाच्या मर्जीविरूद्ध वर्तन करूं नये व कोणाच्या डोळ्यावर येईल असें सांगूं नये. तसें केल्यास तो आपला शत्रु होतो.

मन राजा, मन प्रजा--आपणच आपणाला राजा समजावें व आपणच आपली प्रजा समजावें. याप्रमाणें आपल्या मनाला वाटेल तसें वर्तन करावें. स्वतः कडेच दोन्ही अधिकार घेऊन स्वैर वागणूक करणें. 'धर्मग्रंथास बाब्यावर बसवून मन राजा मन प्रजा या न्यायें वाटेल तसें वागणें सुरू केलें.'--नि.४५७.

मन राजा, मन परजा, मनाले कोण वरजा--(व.) [वरजा=वर्जा, वर्ज करणारा, हरकत करणारा] मनच हुकूम सोडणारा राजा, मनच तो हुकूम पाळणारा प्रजाजन, अशी स्थिति असल्यावर मग मनाला विरोध करणारी शक्ति कोणती उरली? कोणतीच नाहीं. मग त्या मनुष्यानें मन मानेल तसें वर्तन केलें तरी कोणी आड येणार नाहीं.

मन रामीं रंगलें, बोलणें वावुगें झालें--एकदां परमेश्वराच्या ठिकाणीं लक्ष्य गुंतल्यावर इतर सर्व गोष्टी अथवा उपदेश व्यर्थ होत.

मन संकल्पाचीं पापें। न जातीं तिर्थाचिया बापें॥--नामदेव. मनानें ठरवून मुद्दाम केलेलीं पापें कशानेंहि धुवून निघत नसतात.

मन सहे तो दान : तन सहे तो स्नान--(महानु.) मनांत येईल तेवढें दान करावें व अंगाला बरें वाटेल तोंपावेतों स्नान करावें. सोसेल तेवढेंच करावें हें चांगलें.

दयामय मन, हेंच खरें भूषण--मनांत दया वागविणें हेंच भूषणास्पद आहे. थोरवीचीं इतर बाह्य लक्षणें निरर्थक होत.

मन हौशी, करम गंडिया—मनांत पुष्कळ चांगल्या चांगल्या गोष्टी कराव्या असें येतें; पण नशीब खोटें असल्यामुळें कांहीं उपाय चालत नाहीं.

मनचें साधे तर दरिद्र कां बाधे—मनांत आलेल्या सर्व गोष्टी जर मनासारख्या होऊं लागल्या तर जगांत कोणी दरिद्री राहणारच नाहीं. तु०—If wishes were horses, beggars would ride.

मनच्या जाणे खुणा, त्यासच म्हणावें शहाणा-- जो दुसऱ्याच्या मनांतील भाव ओळखून वागतो तोच खरा शहाणा. शहाण्याला फार तर्क असतो.

मनमें चंगा, तो काथवटमें गंगा; मनमें चंगा तो काठेवाडमें गंगा; मनमें चंगा तो कटोरिमें गंगा— (हिं.) मनांत जर स्वस्थता असेल तर गंगेचें सुख कुठेंहि मिळूं शकेल. उलट मन असुखी असेल तर गंगेच्या ठिकाणीं जाऊनहि गंगेचा खरा लाभ होणार नाहीं. तेव्हां मुख्य मन सुखी,स्वस्थ पाहिजे.–गांगा २४४.(गु.) मन चंगा तो कथोकमां (अथवा घेर बेठां) गंगा.

मनमें चोदे, राम जाने—(अशिष्ट.) मनानेंहि पाप केलें तरी तें परमेश्वराला कळल्याशिवाय राहात नाहीं.

मनमें न भाव, मुंडी हलाव--मनांत निराळाच हेतु असून वरवर होय म्हणणारा. मोंदू.

मनसा चिंतितं कार्यं दैवमन्यत्र (त्तु) चिंतयेत्— (सं.) आपण एक योजतों व दैवानें दुसरेंच कांहीं योजलेलें असतें. तेव्हां मनुष्य जें जें योजील तें तें होईलच असें नव्हे.–शाब ३.१४. (अ) तारुण्ये च मृता भार्या पातकं किमतः परम् । मनसा चिन्तितं कार्यं दैवमन्यत्तु चिन्तयेत् ॥ (आ) मनसा चिन्तितं कार्यं दैवमन्यत्तु चिन्तयेत् । राजकन्याप्रसङ्गेन गुरुर्भवति भिल्लवः ॥ Man proposes, God disposes.

मनसा चिंतितं कार्यं वाचा नैव प्रकाशयेत् ।-- (सं) पुढला चरण–मन्त्ररक्षणगूढात्मा कार्यसिद्धिं प्रकाशयेत् । पाठभेद–मनसा चिन्तितं कर्म वचसा न प्रकाशयेत्, अन्यलक्षितकार्यस्य यतः सिद्धिर्न जायते ॥ मनांतलें कोणास सांगूं नये.

मान सांगावा जना, अपमान सांगावा मना-- आपला सन्मान झाला असतां लोकांस सांगावें व अपमान झाल्यास तो मनांत ठेवावा.

मना एवढा ग्वाही, त्रिभुवनांत नाहीं--आपलें मन जसें आपण केलेल्या सर्व गोष्टींस साक्ष असतें तशा इतर गोष्टी नसतात.

मनाचा घडा, हाच यशाचा घडा--कोणतेंहि कार्य करण्याचा मनानें दृढ निश्चय केल्यास तें हातून पूर्ण झाल्याशिवाय राहात नाहीं.

मनाचा पातकी : तो आत्मघातकी—(महानु.) ज्याच्या मनांत पाप येतें तो माणूस स्वतःचा घात करून घेत असतो.

मनाचा मोकळा, तोच दावतो गळा--जो दिसावयास मनमोकळा दिसतो तोच एखाद्या वेळीं घातक ठरतो.

मनाचा व्यापारी : लोकाचा भिकारी--(महानु.) एखाद्या अत्यंत ज्ञानी माणसाच्या मनांत फार मोठे मोठे विचार चाललेले असतात, मोठी उलाढाल होत असते, पण तो लोकांच्या दृष्टीनें व्यापारी नव्हे, तर भिकारी.

मनाचा सौदा, तोच खरा धंदा—आपल्या मनास योग्य वाटेल असा व्यवहार करणें हीच धंद्यांतील यशाची किल्ली आहे.

मनाची आडकाठी, चित्तीं जाणे जगजेठी-- आपल्या मनांतील भानगडी फक्त परमेश्वरास कळतात. किंवा परमेश्वरास कळल्याशिवाय राहात नाहींत.

मनाची नाहीं, पण जनाची तरी ठेवावी--(यांत लाज शब्द अध्याहृत आहे.) लोकांना लाजलेंच पाहिजे. लाज पहा.

मनाचें तें पेणें, त्रिभुवन ठेंगणें—(महानु.) मनांतील आकांक्षेपुढें त्रिभुवनहि लहान वाटूं लागतें. इतकी ती आकांक्षा मोठी असते.

मनाचे मांडे मुरगळून खाय—कल्पनासृष्टि नि सत्यसृष्टि यांत जमीनअस्मानाचें अंतर आहे. सत्य कठोर असतें नि कल्पनासृष्टींतील गोष्ट सत्याच्या कसोटीला उतरेल असें नाहीं. कल्पनेनें उभारलेले मनोरे हवेंतच विरून

जातात. भूक लागली असतां कल्पनेनें मांडे तयार करून ते कल्पनासृष्टींत भाजले पण त्यांनीं पोटांतली क्षुधा शमन होईल काय ?

मनाचें मोठेपण, देवाला करावें अर्पण—मनानें उदार होऊन व परमेश्वरावर भरंवसा ठेवून कार्य करीत असावें.

मनाचें वारें, सदा आंगीं भरे—मनुष्याला नेहमीं आपल्या मनाप्रमाणें सर्व गोष्टी कराव्या असें वाटत असतें.

मनाच्या खोडी, तेणें वाढती चरफडी—मन बिघडलें म्हणजे कटकट उत्पन्न होते. आपल्या मनाविरुद्ध कांहीं गोष्टी झाल्या म्हणजे भांडण उत्पन्न होतें.

मनाच्या गुंतागुंती, गुरूवीण न निवती—मनांतील सर्व खळमळ गुरुच्या उपदेशाशिवाय किंवा कोणी पक्का वस्ताद भेटल्याशिवाय जात नाहींत.

मनांत आसल्यार सोपनांत दिसता—(गो.) मनांत असेल तें स्वप्नांत दिसतें. मनीं वसे तें स्वप्नीं दिसे.

मनांत असेल तर मार्ग दिसेल—आपल्या मनांतून खरोखर एखादी गोष्ट करावयाची असली म्हणजे ती कशी पार पाडावी हें लक्षांत येतें. Where there is a will there is a way या म्हणीचा पर्याय.

मनांत आहे, पण बोलतां नये—एखादी गोष्ट मनांत असून सुद्धां बोलणें योग्य नसतें. आपल्या मनांतील सर्वच गोष्टी उघडपणें बोलून दाखविण्यांत फायदा नसतो.

मनांत एक, जनांत एक—आंत बाहेर निराळा असणारा. वरून एक बोलावयाचें व मनांत निराळेंच असावयाचें असा मनुष्य; कपटी; भोंदू.

मनांत ठाय आस जाल्यार मचव्यांतून ठाय आसे—(गो.) मनांत जर इच्छा असेल तर बोटींत सुद्धां जागा आहे. जेथें इच्छा आहे तेथेंच मार्ग आहे. Where there is a will there is a way.

मनांत–मनावर धरील तर वाघाला मारील—एखाद्या मनुष्यांत सामर्थ्य असतें पण मनाचा निश्चय नसतो, त्यामुळें त्याच्या हातून कार्य होत नाहीं, अशा मनुष्यास उद्देशून म्हणतात. मनाच्या निश्चयानें अवघड कार्येंहि पार पडतात पण मन दुबळें असल्यास शक्तीचा कांहीं उपयोग होत नाहीं.

मनांत मनोरे आणि पुढें ताट कोरें—मनांत पुष्कळ इच्छा करावयाच्या पण प्रत्यक्ष दारिद्र्यांत दिवस काढावयाचे.

मनांत मांडे, पदरांत धोंडे—फुकट मनोराज्य. (गु.) मनमां परणीया, मनमां रांडीया.

मनांतुलें मनांतु, जनांतुलें जनांतु, तुळशी पान कानांतु—(गो.) आंत एक आणि बाहेर एक असें आपलें दुटप्पी वर्तन धार्मिकतेचें प्रदर्शन करून छपवूं पाहाणाऱ्याला उद्देशून म्हणतात. सदा शुचिर्भूत असावें म्हणून पूर्वींच्या पिढींतली धार्मिक मंडळी नेहमीं कानांत तुळशीपत्र ठेवीत असत.

मनांतले साधेल तर दारिद्र्य कां (कशाला) बाधेल ?—आपल्या इच्छेप्रमाणें होत गेल्यास कशाची कमतरता असूंच शकणार नाहीं. पण तसें होत नाहीं म्हणून तर पंचाईत.–माझें पुराण पृ. ३७. वर पहा.

मनामाजीं सुखी दुःखी, त्याचें चिन्ह जाणा मुखीं—मनांतील सुखदुःखाच्या भावना चेहऱ्यावर व्यक्त झाल्याशिवाय राहात नाहींत.

मनालागीं सुख देतें, देणें सद्गुणाचें होतें—सद्गुणी मनुष्याच्या मनास नेहमीं सुख होतें,त्याच्या मनास कधीं पापाची टोंचणी लागत नाहीं.

मनाला पटलें पण कृतींत उमटलें पाहिजे—जी गोष्ट एकदां मनाला पटली ती करून दाखविली पाहिजे. एरवीं बोलघेवड्या सुधारकाप्रमाणें नुसतें पटून काय उपयोग.

मनावर घेईल तर वाघ मारील; मरेल पण मनावर घेणार नाहीं—वर 'मनांत धरील०' पहा.

मनास मानेल तो सौदा—मन मानें तो सौदा पहा.

मनासारखा पाहिजे चाकर, तर तुझें तूं कर—(वांय.) आपल्या अगदीं मनासारखें काम व्हावयास पाहिजे असेल तर तें आपणच केलें पाहिजे.कोणताहि दुसरा चाकर माणूस आपल्या मनाजोगें काम करूं शकणार नाहीं.

मनीं असे, तेंच दिसे—आपल्या मनांत ज्या प्रकारचे विचार चाललेले असतात; तशा प्रकारच्या सर्व गोष्टी दिसूं लागतात. " अमेरिकेंतील अध्यक्षाच्या निवडणुकींत रूझवेल्टची फेरनिवडणूक झाल्यास अमेरिका युद्धांत खालीनें येईल; आणि अर्थातच ब्रिटिशांच्या बाजूनें मनीं असे

तेंच दिसे अशा प्रकारची ही विचार सरणी आहे.''—केसरी १३–१२–४०

मनीं असे–वसे तें स्वप्नीं दिसे––जे विचार मनांत वागत असतात त्याप्रमाणेंच स्वप्नें पडतात.–शाब२·१८७.

ज्याचे मनीं कपट, त्याचें होतें तळपट—जो–ज्याचे॰ पहा.

मनीं धरावें तें होतें, विघ्न अवघेंचि नासून जातें––मनाचा पूर्ण निश्चय असला म्हणजे मनांतील संकल्प सिद्धीस जातात व मार्गांत आलेल्या विघ्नांचें निरसन होतें.

मनीं ध्यास वाढे, तेंच स्वप्न रोकडें—मनीं असे तें स्वनीं दिसे पहा.

मनीं नसे–नाहीं भाव, देवा मला पाव––परमेश्वरावर श्रद्धा नसेल तर त्याची कितीहि भक्ति केली तरी तो प्रसन्न होणार नाहीं. अश्रध्देनें केलेलें सर्व कार्य निष्फळ होतें.

मनीं नाहीं नांदणं, दारीं गधे बांधण––(व.) या घरीं दारांत गधे (गाढव) बांधलेले असतात, मला तें अपमानास्पद वाटतें. म्हणून माझें मन या घरांत नांदण्यास घेत नाहीं. दारीं गधे बांधल्याचें निमित्त सांगणें म्हणजे कांहीं तरी सबब सांगणें होय. कांहीं कृत्य मनांतून करावयाचें नसल्यास मनुष्य कांहीं तरी निमित्त उकरून काढतो.

मनीं मांडे खाणें, ते कोरडेच कां खावे ?––जर केवळ मनानें कल्पनाच करावयाची तर ती अर्धवट किंवा दारिद्र्याची कशाला ?

मनीं मांडे खाणें, मनोरथ पुरविणें––मनोराज्य करणें.

मनीं मांडे लक्षितां, तर कोरडे कांहो भक्षितां?–मनांत जर मांडे खातां तर कोरडे कशाला म्हणता वरं पहा !

मनीं मांडे, स्वप्नीं पुऱ्या––सर्व कल्पनेचे खेळ.

मनीं वसे तें ग्रंथीं दिसे—आपल्या मनांतला एखाद्या गोष्टीसंबंधीं निष्कर्ष आपल्याला ग्रंथांतरीं मिळतोच. म्हणजे तो ग्रंथ आपण आपल्या धोरणानें लावतो !

जे मनीं वसेः ते बोलतां होये अनायासें––(महानु.) मनांत असेल तें तोंडावाटे सहज बाहेर पडतें.

मनीं संतोषानें मानी, जिकडे तिकडे मेजवानी–मनांत संतोष वसत असला म्हणजे जें जेवण मिळेल तें मेजवानीसारखेंच वाटतें. असेल त्यांत समाधान मानलें असतां आनंद होतो.

मनें मनास मिळणी, गुणास जाणती गुणी—गुणी लोकच गुणी लोकांची चहा करतात. त्याप्रमाणें सज्जनांचीं मनेंच सज्जनाशीं जुळतात.

मनोजय आणि वासनाक्षय, हाच मनुष्याचा विजय—मनावर विजय मिळविणें आणि आपल्या वासना आपल्या ताब्यांत ठेवणें यांतच खरा मनुष्याचा पराक्रम आहे.

मनोधर्मे नाशीः तैंचि घडे एकादशी (वाराणशी)—(महानु.) धर्माचरणानें मन मारलें म्हणजे आपोआपच एकादशी किंवा काशी घडते. त्यासाठीं आणखी कांहीं करावें लागत नाहीं.

मनगट––मण (न) गट चावणें–चावून घेणें—राग अनावर झाला म्हणजे माणूस स्वतःचेच मणगट चावतो. संतापाचा अतिरेक होणें; दांत ओठ खाणें. निराश होऊन जळफळत बसणें. 'हें वर्तमान अब्दुलअलीनें व नजीबखान यानें ऐकून, मनगटें चावून किल्ल्यावर हल्ला करावा म्हणोन फौज सिद्ध केली.'–भाब ३०. 'भर दरबारांत आपली अवज्ञा झालेली पाहून तो मानी राजा मनगटें चावील.'–उग्र ३.४.

मनगट घेणें—बोंबा मारणें; बोंबलणें.

मनगट धरणें—एखाद्याला कांहीं अपराधाबद्दल धरणें, जाब विचारणें; आरोप ठेवणें.

मनगटांत–मनगटास जोर असणें—द्रव्य, अधिकार, योग्यता इ. बाबतींत समर्थ असणें.

मनगटांतील मास मरणें—असमर्थ असणें.

मनगटावर केंस येणें—कांहीं काम न केल्यामुळें मनगटावर केंस वाढणें. आळशी असणें; नामर्द असणें.

मनगटावर गोणी पडणें–येणें—मोठ्या कष्टाचें काम करावें लागणें. जबाबदारी येऊन पडणें.

मनगटावर तेल–चुना ओतणें घालणें—(बोंब मारण्यासाठीं). १ बोंब मारणें. एखादी विद्या, गोष्ट न आल्यामुळें शंख करावा लागणें. २ आळसाबद्दल रागें भरणें, खरडपट्टी काढणें.

मनगटाशीं मनगट घासणें—बरोबरी, स्पर्धा करणें.

मनगटें खुजवणें—मनगट चावणें पहा.—मो महा-प्रस्था १.२२.

***मनगटाचा जोर, कोटी मनुष्याहून थोर**—स्वतःच्या अंगीं पराक्रम असला व दृढनिश्चय असला म्हणजे कोटी मनुष्यांच्या साहाय्यापेक्षां अधिक आहे.

ज्याच्या मनगटास जोर तो बळी—तु०—बळी तो कान पिळी.

मनगटासारखें मनगट पाहावें-पाहून मुलगी द्यावी—शरीर, वय इ. बाबतींत अनुरूप असा मुलगा पाहावा व त्याच्याशीं आपल्या मुलीचें लग्न करावें. वधूवर सारख्या प्रकृतीचीं असावींत.

मनन---मनन करून पक्केपणीं, शहाणा निश्चय करी मनीं--सुज्ञ मनुष्य कोणत्याहि गोष्टीचा पूर्ण विचार करून नंतर काय तो निश्चय करतो.

मनमाड---मनमाडी, पलंग तोडी--मनमाड येथील विड्याचीं पानें फार उन्मादकारक असतात.

मनु---मनु पालटणें--दुसरा मनु येणें; मन्वंतर होणें; काळ बदलणें; क्रांति होणें.

मनुष्य---मनुष्यांत येणें—१ इतर माणसांप्रमाणें वागावयास लागणें. २ धंदा, व्यवहार इ. चा पुनः जम बसणें, ताळ्यावर येणें.

मनुष्यांतून उठणें--१ शिष्टाचार इ. सर्व सोडणें; स्वैर वर्तन करणें. २ लोकांत राहाण्याचें सोडून देणें; म्हणजे इतकी विपन्नावस्था येणें; अगदीं हीनदशा येणें. ३ मरणोन्मुख होणें; रोगामुळें व्यवहाराला अगदीं निरुपयोगी होणें.

***मनुष्य आपले कामावरी, राहे हुषार सिंहापरी**--मनुष्यानें आपल्या कामाकडे नेहमीं चांगलें लक्ष्य ठेवावें.

मनुष्य ओळखावा बोलानें, वृक्ष ओळखावा फुलानें--(महानु.) मनुष्याच्या बोलण्यावरून त्याची पारख होते. तसेंच फुलावरून झाड कोणतें तें कळतें.

मनुष्य ओळखावे संबंधीं, घोडा जेरबंदी—'घोडा जेरबंदी, मनुष्य संबंधी' पहा.

मनुष्य चिंतितें एक आणि होतें भलतेंच—'मनसा चिंतितं कार्यं दैवमन्यत्तु चिंतयेत्।' पहा.

मनुष्य जाऊ लाभ होऊ—आपला फायदा होत असेल तर एखादा मनुष्य तुटला किंवा जगांतून नाहींसा झाला तरीं हरकत नाहीं अशी एखाद्याची वृत्ति.

मनुष्य जातीचें मोल कृतीच आहे ऐसें बोल—मनुष्याची परीक्षा त्याच्या कार्यावरून होते.

मनुष्य (मुत्सद्दी) ज्या दौलतींत तेंच राज्य--(ऐति.)ज्या राज्यांत मुत्सद्दी माणसें आहेत तेंच खरें राज्य म्हणावें; इतरांचा काय उपयोग.

मनुष्य पाहून शब्द टाकावा व झाड पाहून घाव टाकावा--आपल्याला एखादें कार्य करून घ्यावयाचें असल्यास योग्य मनुष्याकडेच साहाय्याची याचना करावी; इतरांच्या पुढें तोंड वेंगाडूं नये. तसेंच आपल्याला जसें काम असेल तशा प्रकारचें लांकूड असलेलें झाडच तोडावें; नाहीं तर इमारतीकरितां एरंडाचा काय उपयोग.

मनुष्य घटना कीं दैव-वी घटना--या दोहोंमध्यें विधिघटना हीच श्रेष्ठ होय. Man proposes and god disposes. याचा अनुवाद.

मनुष्य हा संवादित्वाचा भुकेलेला असतो—आपल्या प्रश्नाला आपल्याला पाहिजे तेंच उत्तर मिळावें असें प्रत्येकाला साहाजिक वाटतें; तेव्हां प्रश्न विचाऱ्याचा आशय असा असतो कीं, दुसऱ्यानें त्याचें उत्तर "होय अगदीं बरोबर" असें थोडक्यांत नेमकें देऊन त्याचे संवादी समर्थन करावें ह्याला इंग्रजींत Question of a appeal म्हणतात.—वाङ्मयशोभा, डिसेंबर १९४१ पान २५३.

मन्शा उत्तर, गोरवा दावें--(गो.) माणसाला शब्दाचें बंधन आणि जनावराला दाव्याचें. तु०—शहाण्याला शब्दाचा मार व मूर्खाला टोणप्याचा मार.

मनुष्याची धांव राजा पावेतों—मनुष्यांमध्यें सर्व श्रेष्ठ कोण तर राजा; त्याच्याकडेच फार तर मनुष्य फिर्याद घेऊन जाईल.

मनुष्याचे पोटीं, आहे गुह्याची पेटी—मनुष्य हा फार गूढ प्राणी आहे.

मनुष्यानें दिलेलें पुरत नाहीं नि देवानें दिलेलें सरत नाहीं—मनुष्याचें साहाय्य कांहीं झालें तरी मर्यादितच असणार. तें नेहमी वाटेल तेव्हां मिळेलच असें नाहीं. मात्र परमेश्वरी साहाय्य अक्षय टिकतें. 'देवानें दिलेलें सरेना०' पहा.

मनुष्यानें यत्न केला तर तोच त्याला फलद्रुप

झाला—मनुष्यानें प्रयत्न केला तरच त्यास सिद्धी प्राप्त होते.

मनुष्याशीं हजार वेळ काम पडतें—मनुष्याची एकमेकांस अनेकदां गरज लागते.

मनुष्यास काम शहाणें करतें—अनुभवानें मनुष्य शहाणा होतो. तु०—गादी काम शिकवते.

मम—मम म्हणणें—१ आपला म्हणणें; स्वीकार करणें. २ संमति देणें. ३ कोणी जें म्हणेल त्याला विचार न करतां संमति देणें; होयबा असणें. धार्मिक विधींत भिक्षुक यजमानाला नुसतें संकल्पातील पहिलें 'मम' म्हणावयास सांगून पुढले आपणच यजमानासाठीं म्हणतो यावरून.

मर—मरीं जाणें—मरणाच्या पंथास लागणें.

मरीं मरणें—मरेमरेतों कष्ट करणें; जिवाकडे न पाहतां खपणें.

मरीस येणें जाणें—मरणें; मृत्युपंथास लागणें; मरायास टेकणें.

मरगळ—मरग(क)ळ घेणें-मारणें; मरगळीस येणें—१ अतिशय थकवा येणें; मेल्याप्रमाणें स्थिति होणें; अगदीं दमणें. २ फार दमल्याप्रमाणें पडणें; असें ढोंग करणें (हट्टी जनावर, माणुस इ. नें.)

मरगळा घेणें—एका जाग्यावरच खुंटून बसणें; जागा सोडून मुळींच न जाणें; जरा सुध्दां न हलणें.

मरण—खितपणीचें मरण—अनेक दिवस दुखणाईत राहून नंतर येणारें मरण. खितपत पडून राहिल्यानंतर प्राप्त होणारें मरण. 'ज्या अंगावरी केलें शयन तेथून अंग हलवूं नेणे । खितपणीचें आलें मरण । निंदकजन बोलति ॥'

(उद्याचें) मरण आज आणणें—दूरची आपत्ति निकट आणणें; कालांतरानें गुदरणारा अनिष्ट प्रसंग आतांच ओढून घेणें;

(आजचें) मरण उद्यांवर लोटणें—सध्याचा कठीण प्रसंग लांबणीवर टाकणें. अशुभस्य कालहरणम्.

मरण जाणणें-समजणें-कळणें कळूं लागणें—संकटाचीं पूर्व चिन्हें दिसूं लागणें; संकटाची जाणीव होणें.

मरणा आधीं सरणांत घालणें—मृत्यूपूर्वीच जाळून टाकणें; उतावीळपणानें एखाद्या गोष्टीचा नीट निकाल लागण्यापूर्वीच तीबद्दल मत बनवून एखाद्यास शिक्षा करणें. न. चिं. केळकर,—आत्मचरित्र, ४४५.

मरणा माथां-माथेस येणें-पावणें—मरायला लागल्याप्रमाणें होणें; पूर्णपणें थकून जाणें. 'पांच कोस जमीन चालला म्हणजे मरणामाथां येतो.'

(कोणाच्या घरीं) मरणाची वाजंत्री वाजणें—कोणत्याहि संकटाला तोंड देणें; मरण्यास तयार असणें.

मरणाच्या दारीं बसणें—पंथास लागणें-टेकणें—मरण जवळ येणें; आसन्नमरण होणें; आतां मरतो कीं मग मरतो अशा स्थितींत असणें.

मरणादारीं कीं तोरणादारीं (जावें इ.)—शुभप्रसंगीं किंवा अशुभप्रसंगीं (हजर राहावें इ.) म्हण पहा.

मरणानें जिंकलेला-जिंकला—मृत्यूच्या दारांत असलेला; मरावयास टेंकलेला; मरणद्वारीं असलेला.

(आपल्या) मरणानें मरणें—१ स्वाभाविक रीतीनें मरणें. २ (स्वतःच्या दुष्कर्माबद्दल शिक्षा म्हणून) स्वतःवर संकट ओढून घेणें.

मरणाला रात्र आडवी करणें—आजचें संकट उद्यांवर ढकलणें; मरण, एखादा कठिण प्रसंग कांहीं तरी युक्ति योजून लांबणीवर ढकलणें.

मरणीं घालणें—मरूं घालणें; मरावयास टेंकणें; मरणोन्मुख होणें. ' ऐसा कळलाव्या नारदमुनी । मरणीं घातल्या कृष्णकामिणी । ' —जै ७१·१११.

मरणीं मरणें—१ एखाद्यासाठीं मरण पत्करणें; जीव धोक्यांत घालणें. ' ठरणार नाहीं कल्पांतीं । तुला कां भ्रांति । चाल एकांतीं । किती मरूं मरणीं ।' प्रला—९६ पृ. २०८. २ एखाद्याच्या सेवेस तत्पर असणें.

***मरण आणि धारण हीं कोणाच्या हातांत नाहींत**—मृत्यु येणें आणि वस्तूचे भाव कमीजास्त होणें या गोष्टी माणसाच्या हातच्या नाहींत; यांवर माणसाचा मुळींच ताबा नाहीं,

मरण कोणास चुकलें नाहीं—सर्व प्राणी मरणाधीन असतात. मरण कोणास टळत नाहीं. आला प्राणी केव्हांतरी जातोच. तु०—मरणं प्रकृतिः शरीरिणाम् । Death is nature.

मरण ज्याठायीं, चालून जाई आपल्या पायीं—मनुष्याचा जेथें मृत्यू असेल तेथें मनुष्य आपण होऊन

जातो. मनुष्य मृत्यूच्याजागीं आपल्या पायांनीं चालून जातो, असा समज. [एका मनुष्यास मरणाचें फार भय वाटत असे. त्यानें वैद्यांस विचारलें कीं, मरण कशापासून येतें. त्यांनीं सांगितलें कीं पाण्यापासून रोग होतात व रोगापासून मृत्यु येतो. तेव्हां त्या मनुष्यानें गांवांतील पाणी प्यावयाचें सोडून दिलें व तो एका ओढयावर जाऊन पाणी पिऊं लागला. एके दिवशीं ओढयावर जात असतां त्यास वाटेंत मृत्यु भेटला; तेव्हां त्यानें विचारलें कीं, माझा मृत्यु कोठें होणार आहे ? मृत्यूनें सांगितलें कीं, ज्या जागीं तूं उभा आहेस त्याच जागीं तुझा मृत्यु आहे. तेव्हां त्या मनुष्यानें तो गांव सोडून दिला व दुसऱ्या गांवीं तो राहावयास गेला. तेथें राहात असतांना एके दिवशीं तो घोड्यावर बसून फिरावयास निघाला असतां घोडा उधळून तो नेमका त्याच जागीं येऊन घोड्यावरून खालीं पडला व मरण पावला.]

मरण बरें पोण दरिद्र बरें न्हंय--(गो.) मरणापेक्षां दारिद्र्याचें दुःख फार असतें. तु०--दारिद्र्यान्मरणाद्वा मरणं संरोचते न दारिद्र्यम्। अल्पक्लेशम् मरणं दारिद्र्यमनन्तकं दुःखम् ॥ सुर. ६६.३६ 'मरण बरें वा दरिद्रता खोटी।'

मरण हक्क आहे—प्रत्येक मनुष्यास मरण हें निश्चित आहे. मनुष्यो मर्त्यः। Death is our right.

मरणाआधीं खांच व पाण्याआधीं वळण---मृत्यु येण्याच्यापूर्वी पुरण्याकरितां खड्डा करून ठेवणें व पाणी वाहात येण्यापूर्वीच त्यास वळण लावून ठेवणें या गोष्टी पूर्व तयारीच्या दृष्टीनें योग्यच आहेत. मॅनवेरिंग या गोष्टी पुरण्याकरितां तयार करणें असा अर्थ करतो तो चुकीचा दिसतो. बहुधा पुरावयाकरितां खड्डा हे शब्द पुराव्याकरितां खड्डा असे वाचल्यामुळें त्याचा गैरसमज झाला असावा.

मरणा दारीं आणि तोरणा दारीं--(भांडण नसावें)-आप्तमृत्यूसारखा एखाद्यावर प्रसंग ओढवला किंवा एखाद्याच्या घरीं लग्नकार्य निघून मदतीची जरूर असेल तर जुनें भांडण विसरून तेथें मदतीला जावें. 'कुणब्यांत एक म्हण आहे कीं, भांडणाचा मरण दारीं आणि तोरणा दारीं कांहीं संबंध नाहीं.'– जोशी–पुनर्भेट.

मरणानंतर डाक्टराचा काय उपयोग ?—तु० वरातीमागून घोडा.

मरणापरीस-पेक्षां अपेश खोटें-वोखटें—मरणापेक्षां अपयश हें दुःसह असतें. 'मरणाहून अपेश वोखटें.' –भाब ४२. 'त्या बिचाऱ्याला मरणापेक्षां अपेश खोटें असं होऊन गेलं !'–एकच प्याला १. तु०–न भीतो मरणादस्मि केवलं दूषितं यशः।

मरणाला कीं तोरणाला--बाराव्याला कीं बारशाला याप्रमाणें सर्व कालीं। सर्व परिस्थितींत हजर. वर पहा.

मरणाला रात्र आडवी--वर पहा.

मरणारा---**युक्तचि मरणाराला हितपरिणामहि न सोसवे काढा ॥**—ज्याचा मृत्यु निश्चित आहे त्याला रोग घालविणारा काढा आवडत नाहीं. ज्याचा नाशच व्हावयाचा त्याला उपदेश केलेला पटत नाहीं.–मोआदि ९.३९.

मरणें---**मरण्याजिण्यास उपयोगी—कामास पडणें**---ऐनअडचणीस उपयोगाला येणें; ऐनवेळीं मदत करणें,

मरतां मरतां वांचणें--मरणाची वेळ आली असतां निभावणें; भयंकर दुखण्यांतून, संकटांतून बरें होणें.

मरतां मरतां हातपाय झाडणें---आतां कसें तरी बुडणार, मरणार, तेव्हां शेवटचा प्रयत्न करून बघूं ! म्हणून अखेरचा निकराचा प्रयत्न करणें.

मरमरून जाणें-पडणें—वेडा होणें; झुरून मरणें; एखाद्याकरितां जीव टाकणें. 'मरमरून जातें तुजवरून हृदयरंजना। हौसेच्या नगा कंदर्प अभ्रभंजना।'–प्रला ५४.१५६.

मरस मरे—अत्यंत श्रमानें, कष्टानें.

मरायला फुरसत नसणें--अगदीं सर्वकाळ कामांत गुंतलेलें असणें; मुळींच उसंत नसणें.

मरूं घालणें--मृत्युपंथास लागणें; ऱ्हास होत जाणें. '(पुणें) शहर मरूं घातलें आहे !' –ऐले १४.६५४५.

मरूं मरूं करणें--लवकरच मरणार अशीं चिन्हें दिसून येणें; मृत्युपंथास लागणें.

मरून जिणें--पुनर्जन्म होणें. 'गोविंदामृत दृष्टिवृष्टि करितां आतां मरूनी जितों।'

मरून पडणें--१ मेलेला असणें. २ आतिशय बहर येणें (झाडाला); 'आंबे यंदा मरून पडले आहेत.'

मरोपुरेसें-मरोसें करणें—सतावणें; पुरेपुरेसें करणें. ' केव्हां केव्हां थट्टामस्करीनें मरोपुरेसें करी. '—कवठेकर, अपुरा डाव ६५.

मेला जसा—मेल्यासारखा. अगदीं शरमिंधा, ओशाळा.

मेलेल्याला मारणें—पुरी शिक्षा झालेल्याला पुन्हां शिक्षा करणें, हें कृत्य शूरपणाचें किंवा माणुसकीचें नाहीं. ' मेलेल्याला काय मारायचें आहे असें वाटून माझ्याक्यानेंहि जितकें बोलावयाचें योजलें होतें तितकें बोलवलें नाहीं. '—आमच्या इंदूचें शिक्षण, पा. ८६.

मेल्याचा पाड जाणें-होणें—हलका, नीच, मृतप्राय गणला जाणें; मुळींच मान्यता नसणें.

***मरच्या उठिल्लो, घरच्या वळखना**—(गो.) मरायला टेकलेला मनुष्य आपला गोतावळा विसरतो. हताश झालेले लोक आपल्या फायद्यासाठीं नातेवायिकांचा नाश करतात.

मरतंय म्हटलं कीं घोरतंय म्हणणं—एखाद्याच्या संकटास हलकें लेखणें, क्षुल्लक मानणें; एखाद्याच्या तक्रारीस महत्त्व न देणें.

मरतलो म्हळ्यार फुरसत ना—(गो.) मरायचें म्हटलें तरी सवड नाहीं. अत्यंत कार्यव्यास्त मनुष्य आपल्याविषयीं असें म्हणतो.

मरतां मरतां हातपाय झाडावे—अखेरपर्यंत खटपट करीत असावें; शेवटपर्यंत धडपड केल्याशिवाय राहूं नये.

मरावें काशी, किं मरावें मिराशीं—काशीमध्यें तरी मृत्यु यावा किंवा आपल्या वतनाच्या गांवीं तरी मृत्यु यावा.

मरावें परी कीर्तिरूपें उरावें—रामदास. मेल्यानंतरहि माणसाची कीर्ति मागें राहात असेल तर तो कीर्तिरूपानें जिवंतच आहे म्हटलें पाहिजे. तेव्हां माणसानें जिवंतपणीं चांगलें वागून लौकिक मिळवावा.

मरावें नांवाला, किं मरावें गांवाला—कीर्ति मिळविण्यामध्यें देह ठेवावा किंवा आपल्या गांवाच्या उपयोगी पडण्यांत देह झिजवावा.

मरी गाय बम्हनको दान—ब्राह्मणास गाईचें दान करणें पुण्यप्रद आहे खरें. पण मृतप्राय झालेली गाय ब्राह्मणास दान दिली तर ती त्याच्या काय उपयोगी पडणार ! अर्थात्च त्या दानानें काय पुण्य पदरीं पडणार ! कांहीं नाहीं. " फुटायला आलेलें भांडें तुम्ही मला देतां काय ! ' मरी गाय बह्मनको दान करण्यासारखेंच हें कृत्य आहे."

मरुंक लागल्यार चेडे उरनात, आनी जेंवक लागल्यार मुडे उरनात—(गो.) मृत्यू मागें लागला म्हणजे मुलें कितीहि असलीं तरी जगत नाहींत. त्यांची स्थिति दररोजच्या भातासाठीं काढलेल्या तांदुळाच्या पोत्यासारखी होते. कितीहि तांदुळ असले तरी रोज त्यांचेवरच हात पडूं लागला म्हणजे ते सरणारच. तुलना आदा नसतांना खर्च.

मरे तंव करावें, पडे तंव धांवावें—(महानु.) मरणापावेतों कार्य करीत असावें व पडेपर्यंत धांवत राहावें. नेहमीं प्रयत्न करीत असावें.

मेला गुरु उन्हाळ्यांत : बडवी उरु पावसाळ्यांत—(महानु.) ज्यावेळची गोष्ट त्यावेळीं न करणें.

मेली सासू उन्हाळ्यांत : आली आसु पावसाळ्यांत—(महानु.) मागच्याप्रमाणेंच. उन्हाळ्याचें काम पावसाळ्यांत करणें. वेळेवर काम न करतां उशीरानें करणें.

मरत—मरती रात्र झाली—शेवट झाला; अखेर झाली.

***मरत घोडं अन् मातला बळत**—[बळत=बैल] घोडें हडकुळें असलें तरी जवान बैलाला पळण्यांत भारीच.

मरमर—मरमर घेणें—१ मरूं घालणें; मरणासन्न असणें. २ मरणाची धास्ती घेणें; हाय खाणें.

***आपली हाण (हानि) आणि जगाची मरमर**—आपली पहा. स्वतःचें नुकसान करून घेऊन आणखी वर दुसऱ्याकडून दोष घेणें.

मराठमोळा—मराठमोळ्याचा गोषा—[मराठमोळा=मराठे मंडळींतील जुनें बाळबोध वळण] कुलीन घरंदाज मराठ्यांमध्यें गोषाची चाल असते. ' मराठमोळ्याचा गोशा म्हटला म्हणजे पुसूंच नये. '—नि ४३.

मराठा—मराठ्या दिलें चांपें, आंबले संगति घांसु मारलें—(गो.) कुळवाड्याला चांफ्याचें फूल दिलें, पण खाण्याचा पदार्थ समजून त्यानें तें आंबलीबरोबर चावून खाल्लें. ज्याला वस्तूचा उपयोग ठाऊक नाहीं त्याला ती देऊं नये. दिल्यास तिचा दुरुपयोग होतो. तु०—गाढवाला गुळाची चव.

मराठ्या म्हणींचा माल, शहाण्यानें घ्यावा खुशाल—मराठींतील या सुंदर म्हणींचा शहाण्या माणसांनीं योग्य भरपूर उपयोग करावा.

मराठी—-माझी मऱ्हाठी, सर्वार्थी गोमटी—(महा.) माझी मराठी भाषा सर्व प्रकारांनीं चांगली आहे. केवढा मराठीचा अभिमान !

मर्ज—-मर्ज बढता गया, जूं जूं दवाकी—जसजसें औषध द्यावें तसतसा रोग वाढतच जावा. जास्त उपचारानें जास्त अपायच होणें. जितकें जास्त शिकावें तितकें जास्त कुकर्मेत शिरावें, अशी वृत्ति असणाऱ्याबद्दल म्हणतात.

मर्जी—-मर्जी खप्पा-बारीक होणें-जात राहणें—-नाखुषी होणें; न आवडणें. 'श्रीमंत स्वामीची बहुतच मर्जी बारीक जाली आहे'-रा १·२२८.

मर्जी जिंकणें-संपादणें—१ खूष ठेवणें; आपलासा करून घेणें; भीति दाब इ. नसणें; ऊब जिंकणें. २ कृपा मिळविणें.

मर्जी बसणें—आवडणें; कृपा असणें; लोभ जडणें.

मर्जी मोडणें—मनाविरुद्ध करणें; लोभ नाहींसा करणें.

मर्जी राखणें-सांभाळणें असलेला लोभ, कृपा टिकविणें; नाखूष होईल असें न वागणें.

मर्जीतून उतरणें--मर्जी खप्पा होणें; आवडेनासा होणें.

मर्जीस उतरणें—-पसंत पडणें; मनास येणें; आवडणें.

***मर्जी देवाची देवाची । मिथा धांव मनाची**—सर्व गोष्टी परमेश्वराच्या इच्छेनुरूप होत असतात पण मनुष्य उगाच धडपड करून असें व्हावें तसें व्हावें असें म्हणत असतो.

मर्द-मर्दाची मिशी—-मिशी ही पुरुषत्वाचें लक्षण आहे. शूर वीर पुरुष प्रौढी मारतांना, धाक, इशारा देतांना पराक्रम सांगताना, योजतात.

मरद मरे नामको, नामरद मरे नानको—(हिं.) [नानः रोटी, चपाती] वीर कीर्तीसाठीं प्राण अर्पण करतो तर नामर्द भाकरीसाठीं.

मरद्का कान और औरतका थान, जितना दबावे उतनाहि सीत कम लगता है—(हिं.) पुरुषानें कान व स्त्रीचे स्तन जितके दाबून बांधावे तितकी थंडी कमी लागते.

मर्दके गर्दमें रहेना, नामर्दके सरहद्दमें न रहेना—(हिं.) वीर पुरुष.च्या आश्रयाखालीं असावें पण भ्याडाच्या मुलखांतहि राहूं नये.-पामो १७७.

मर्दाची मेर आणि गरतीचें दार---शक्तिवान् मनुष्याचें सामर्थ त्याच्या शेताच्या हद्दीवरून कळून येतें. कोणी त्याची हद्द इकडे तिकडे फिरविण्यास धजावत नाहीं. त्याप्रमाणें कुलीन स्त्रीचें कौलिन्य तिच्या घरावरून कळून येतें; कोणी तिकडे वांकड्या नजरेनेंहि पाहूं शकत नाहीं.

मर्दास वंग, घोड्यास तंग—(महानु.) मर्दमाणसास वंगभस्म ताकदीकरितां द्यावें व घोडा तंगदार ठेवावा.

मर्दांचे पोवाडे, मर्दांनीं गावे—शूर मनुष्यालाच शूराचीं कृत्यें आवडतात. अगिनदास पहा.

मर्दोकी टमटेल-टामटूम, पुरा गांडूका खेल—वरून शौर्याचा आव आणून भ्याडपणा दाखविणें.

मर्दनं गुणवर्धनम् ।--(सं.)मर्दन करण्यानें,खलण्यानें -रगडण्यानें-मारण्यानें जास्त गुणकारी होतो. औषधें जों जों जास्त खलावींत तों तों जास्त गुण देतात. (ल.)विद्यार्थ्यांस मारल्यानें तीं जास्त बुद्धिमान निघतात. सबंध सुभाषित -इक्षुदण्डास्तिलाः शूद्राः कान्ता हेम च मेदिनी । चन्दनं दधि ताम्बूलं मर्दनं गुणवर्धनम् ॥

मर्म—-मर्म भेद तोटका,घेतो प्राणाचा घुटका—दुसऱ्याचा किंचितहि मर्मभेद केला तर त्यास प्राणांतिक दुःख होतें.किंवा दुसऱ्याचा मर्मभेद केला असतां स्वतःच्या प्रसंगीं प्राणांवरहि बेततें.

मर्मी भेद करणाऱ्या भाषणापेक्षां तलवार बरी—मर्मभेदक शब्द जितके झोंबतात तितकी तलवारीची जखमहि झोंबत नाहीं.

मर्यादा—-मर्यादा चालविणें, राखणें—-शिष्टाचाराप्रमाणें वागणें. 'ज्या मर्यादा आहेत त्या चालविल्या असतां कल्याण होतें.'-नाना फडणीस पत्रें १६८.

मर्यादा मोडणें-सोडणें—नियमबाह्य, शिष्टाचारास सोडून वर्तन करणें. 'मर्यादा सोडल्यावर ईश्वरास गोष्ट मानत नाहीं.'-नाना फडणीस पत्रें पा. २४२.

मलबार—-मलबारखंडम् । अन्नस्य पिंडम् । वस्त्रस्य तुंडम् । शीर्षस्य मुंडम् ।—मलबार म्हणजे

मद्रास प्रांत, त्यांचें मुख्य अन्न भात, वस्त्र कमरेभोंवतीं एक पांच हात पंचा, व सर्व डोक्याचें शेंडी राखून केलेलें मुंडण। म्हणजे सामान्यतः तामील वा मद्रासी मनुष्याचें महाराष्ट्रीयांनीं केलेलें वर्णन.–केसरी ७-१--४१.

मला–––मला काय त्याचें!—अशी बेपर्वाईची बेफिकीरीची वृत्ति. मलबारांतील मोपल्यांच्या बंडांत हिंदूंतील पुष्कळांची आपल्या आपद्ग्रस्त जातभाईविषयीं अनिष्ट वृत्ति होती ती दाखवून सावरकर यांनीं हा वाक्प्रचार रूढ केला. यावर त्यांची कादंबरीहि आहे. "आपल्याच बोटचेपी वृत्तीमुळें व आपल्याच 'मला काय त्याचें' या वृत्तीमुळें हा कर आपणावर लादला गेला आहे."—केसरी ३०-१-१९४२.

मला कुंकू लावा (मला झंवा), नी सवाशीण म्हणा—सौभाग्य मिळविण्याकरितां दुसऱ्याच्या गळीं पडणें; मोठेपणासाठीं अब्रुहि गमावणें.

मला कोण वानवे, माझी मीच वानवे—(व.) [वानविणें = स्तुति करणें] माझी स्तुति दुसऱ्या कोणीं करावी, मला शाबासकी दुसऱ्यानें द्यावी हें वास्तविक योग्य; पण दुसऱ्याला जेव्हां माझ्या कृतींत कांहीं विशेष आहेसें वाटत नाहीं तेव्हां मीच स्वतः आपल्या कृत्याबद्दल स्वतःला शाबासकी घेतें; आत्मस्तुति करतें. आपण आपल्यालाच नांवाजणें.

मला झंवा पण पाटलीण म्हणा (पाटिलबाबा); मला पाटलीण म्हणा आणि ढुंगणावर हाणा; मला हाणा आणि पाटलीण म्हणा—(अशिष्ट) वरप्रमाणेंच. रिकाम्या मोठेपणासाठीं अब्रू गमावणें. पाटील पहा.

मला न तुला, घाल कुत्र्याला—तुला न मला० पहा. स्वतःचा स्वार्थ साधत नसेल तर दुसऱ्याच्या लाभाच्या आड येऊन सर्व कार्य बिघडून टाकणें. आपणास अन्न मिळत नसेल किंवा खाववत नसेल तर दुसऱ्यासहि खाऊं न देतां कुत्र्याकडून विटाळून त्यास खावयास घालणें. तु०–ये तु घ्नन्ति निरर्थकं परहितं ते केन जानीमहे।–नीति,

मला नाहीं अब्रू, कशाला घाबरू—(महानु.) अब्रूची चाड नसलेल्या माणसास कशाचीच भीति नसते.

मला नाहीं ठिकाण, हला मांडून द्या दुकान—माझें स्वतःचेंच अद्याप जमलें नाहीं तर मी बायकोची काय व्यवस्था लावणार. कांहीं मागणें करावें तें समर्थीशीं किंवा योग्य प्रसंगीं करावें.

मला नाहीं, तुला साजेना— स्वतःला एखादी वस्तु मिळत नसली म्हणजे ती दुसऱ्यानें घातलेली न पाहवणें व त्यास शोभत नाहीं असें म्हणणें. मत्सरी बुद्धि.

मला शुभकृत्य करा (झंवा) आणि सवाशीण म्हणा—(अशिष्ट.) [शुभकृत्य=संभोग, मैथून] वरप्रमाणेंच. मोठेपणासाठीं अब्रूहि गमावण्याची तयारी असते.

मले पहा, फुलं वहा, माहं घर पहा न् थुकून जा—(व.) मी इतकी सुकुमार आहे व माझें रूप इतकें सुंदर आहे कीं मजकडे पाहण्याबरोबर मजबद्दल आदरबुद्धि तुमचे ठायीं उत्पन्न खास होईल. पण त्याबरोबर मी अशी ऐदी आहे कीं तुम्हीं माझ्या घरांत येऊन पाहाल तर तेथील अव्यवस्थितपणामुळें व घाणेरडेपणामुळें तुमच्या मनाला किळस आल्यावांचून राहणार नाहीं व तुम्ही खास माझा धिक्कार कराल. तेव्हां केवळ रूपानें, बाह्यतः सुंदर असणें पुरें नाहीं तर त्याच्या जोडीला स्वच्छतेची व कष्ट करण्याची संवय पाहिजे. तु०–(महानु.) मला पहाः शेंदूरफूल वहा.

मलिदा–––मलिदा करणें—१ गुधडणें; तुडविणें; नास करणें; २ तिंबणें; मऊ करणें.

मलिदा मिळणें—खावयास मिळणें. (ल.) लांच मिळणें.

***धन्याला धत्तूरा, चाकरास मलिदा**—धनी; चाकर पहा.

मल्लिनाथी–––मल्लिनाथी करणें—टीका, भाष्य करणें. (ल.) खरीखोटीं विधानें सांगून आपलें म्हणणें बरोबर आहे असें भासविणें. मल्लीनाथ या नांवाचा एक मोठा संस्कृत पंडित व टीकाकार होऊन गेला. यानें कालिदासाच्या रघुवंशादि काव्यांवर विस्तृत टीका लिहिल्या आहेत. यावरून भाष्य करणें, टीका करणें, विस्तार करून सांगणें असा सरळ अर्थ होतो. परंतु बहुधा हा वाक्प्रचार उपरोधिक अर्थानें योजतात.

मशाल–––मशाल पाजळणें; दिवसा मशाल लावणें—दिवसां मशाली लावून मिरवित जाण्याचा मान शंकराचार्यांचा किंवा दिग्विजयी पंडिताचा असतो. यावरून अतिशय प्रसिद्धीला येणें; मोठें नांव करणें.

मशालीपुढें दिव्याचा उजेड—मशालीपुढें दिव्याचें तेज किती?—सूर्यापुढें काजवा याचा पर्याय.

मशालजी——उल्लूका भाई मशालजी—उल्लू पहा.

दस घर ज्यादा मागना, पण मशालजी रखना—(हिं.) पैसा मिळविण्यासाठीं जास्त मेहनत करावी; वाटल्यास आणखी दहा घरें हिंडावीं पण मशालजी ठेवण्याची ऐट ही झालीच पाहिजे. शोभेंत उणेपणा दिसतां कामा नये. खोट्या मोठेपणाच्या इभ्रतीला बळी पडून जास्त खर्च, श्रम करणें.

मशीद——चुकला फकीर मशिदींत (शोधावा)—चुकणें पहा.

नमाज करतां मशीद गळयांत पडली—नमाज पहा.

मशिदींतील दिवा, उभा केला दावा—मशीदींतील दिव्यावरून भांडण सुरू करणें; भलत्याच्याच वस्तूवरून कज्ज्या लावणें; अर्थाअर्थी कांहीं संबंध नसतां तंटा सुरू करणें.

मस——तोंडास मस लागणें—कांहीं आळ, आरोप येऊन अप्रतिष्ठा होणें; तोंड काळें होणें.

मसण——मसण उठणें—अत्यंत मोठी प्राणहानि. कत्तल झालेल्या रणांगणासंबंधीं योजतात. त्या ठिकाणीं जणूं मृतांचीं भुतें थैमान घालीत आहेत असें वाटतें.

मसण जागाविणें—स्मशानांतील पिशाच्यांना उठवुन त्यांना कांहीं चमत्कार करावयास लावणें.

मसण माजणें—अतिशय, दाट वाढणें; भरमसाटपणें माजणें (गवत, शेत इ.)

मसण होणें—वैतागून कांहीं उत्तर देणें. 'मला मसण होतं' —मोरप्र२४.

मसणांत गोवऱ्या-हाडें जाणें—मरणाच्या दारांत असणें. वय झालेलें असणें. गोवरी पहा.

मसणांत——मसणीं दिवा लावणें—अयोग्य, निषिध्द, निरर्थक कृत्य करणें.

मसणांतून ओढून काढणें—मरणाच्या बेतांत असलेल्याला जीवदान देणें, उठविणें, त्याचा जीव बचावणें.

मसणांतून ओढून काढलेला—कोणतेंहि काम करण्यास असमर्थ; अत्यंत अशक्त, रोड, किडकिडीत.

***दृष्टीआड, मसणापाड**—आपल्या दृष्टीसमोर नसला म्हणजे तो मसणांत गेल्या प्रमाणेंच म्हणजे मेल्याप्रमाणेंच आहे.

मसणाक वतरीच मसण खांब जाता.—(गो.) मसणांत गेला कीं मसणखांब होतो. ज्या स्थितींत पडावें तशी वृत्ति बनते.

मसणांत गेले तरी कावळयांचा उपद्रव—स्मशानांत वास्तविक भयाण शांतता असते, तेथें कोणी त्रास देणार नाहीं अशी अपेक्षा. पण तेथेंहि कावळयाचा त्रास असतोच. कोठेंहि गेलें तरी कर्मांतील पीडा कांहीं टळत नाहीं.

आचरट खाणें, मसणांत जाणें—आचरट खाणें पहा.

मसणाला तेरा वाटा—मृत्यु येण्याचे मार्ग अनेक आहेत.

मसणीं एकटें नसावें—आपल्या मृत्युसमयीं आपले नातलग आपणाजवळ असावे. राजद्वारे स्मशाने च यस्तिष्ठति स बांधवः।

मसलत उणी पडणें—योग्य सल्ला न मिळणें. योग्य उपाय न होणें; पुरेशी काळजी घेतली न जाणें; फसणें; बुद्धि न चालणें. 'संगत यासि करूं नये परि मसलत पडली उणी।'—राला ८. ८१.

मसलत पडणें—पेंच, पंचाईत पडणें. कांहीं तरी इलाज केला पाहिजे असा प्रसंग ओढवणें.

मस्करी——मस्करी करतां कुस्करी होती; मस्करीची होते कुस्करी—कुस्करी पहा. थट्टेमुळें केव्हां अनर्थ होतो. What begins in play may end in a fray.

मस्त——पडेल हस्त, तर पिकेल मस्त—पडणें पहा.

मस्तक——मस्तक ठेंगणें करणें—विनय धरणें; ताठा सोडणें; नम्र होणें. 'करी मस्तक ठेंगणा। लागे संताचिया चरणा।'—तुगा.

मस्तक डोलविणें—अनुमोदन, संमति दर्शविणें. 'सोडुनि समाधि मस्तक डोलविलें आयकोन देवाचें।'—मोभीष्म २.५.

मस्तक फिरूं लागणें—चक्कर येणें; बायें ग्रुं

लागणें; डोक्यांत दुःख होणें. 'माझें मस्तक फिरूं लागलें.' वि वि. ८-४-६४.

मस्तक हुंगणें—आशिर्वादादाखल लहानाचें मोठ्या माणसानें मस्तक हुंगणें; अवघ्राण करणें. 'हुंगुनि मस्तक हस्तें कुरवाळी तो पितामह त्वरित ।'—मोशांति ७.११.

***दोन हस्तक आणि तिसरें मस्तक**—फक्त नमस्कार करीन; यापलीकडे कांहीं करण्याचें, देण्याचें मला सामर्थ्य नाहीं. केवळ नमस्कार करून मर्जी संभाळण्याचा प्रयत्न करणें; क्षमा मागणें.

मस्तकावर कोड असलेलें चालेल पण मोडबनिया नको—(गुजराथी म्हणीचा अनुवाद) मोडीची खरेदीविक्री करणारा वाणी हा अगदीं हलका समजला जातो. मोडबनिया—बनियामधील एक जात.

मस्ती—मस्तीच्या बळें, खातो अमृतफळें—जो जबरदस्त असतो त्यास लाभ होतो.–तु० धटाई खाई मिठाई.

महंत—जांके संग दसवीस है तांको नाम महंतः–(महानु.) ज्याच्याजवळ पुंजी आहे तो महंत. पैसे बाळगून असणारा मोठा होतो.

महत्त्वाकांक्षा—महत्त्वाकांक्षा हीच खरी परीक्षा—मनुष्य महत्त्वाकांक्षी असला म्हणजे त्याच्या हातून कांहीं तरी काम होतें.

महाकाळ—महांकाळी देव आणि अतिकाळी यजमानीण—जशास तसें; सारखी जोडी. हाड्यावर्ण गजकर्ण.

महागाई—महागाईची पाहावी गांड पण सस्ताईचें न पहावें तोंड—महागाईचा अगदीं कडेलोट झाला तरी व्यापारी बुडत नाहीं पण स्वस्ताईस आरंभ झाल्याबरोबर त्याचें धाबें दणाणतें व अनेकांची मंदींमध्येंच दिवाळीं निघतात.

महाजन—महाजनो येन गतः स पंथाः—(स.) थोर लोक ज्या मार्गानें जातात त्याच मार्गानें जाण्यांत लाभ असतो. थोरांचें अनुकरण करणें फायदेशीर असतें. मूळ श्लोक. श्रुतिर्विभिन्ना स्मृतयश्च भिन्ना नैको मुनिर्यस्य वचःप्रमाणम् । धर्मस्य तत्त्वं निहितं गुहायां महाजनो येन गतः स पंथाः ॥ तु०–ज्या वाटेनें गेले गुरु वरिति छात्र त्याचि वाटे ते ।' –मोद्रोण ११. ३४.

महादेव—महादेवाचें देणें—कंटाळवाणें, अति चिकट, किचकट काम.

महादेवापुढचा—सांबापुढचा नंदी.(ल.)मूर्ख माणुस.

महादेव बडादेव, सब देवनका बाबा—महादेव हा श्रेष्ठ देव असून भोळा म्हणून प्रसिद्ध आहे तो भक्तास वाटेल तो वर देतो यावरून भोळसट मनुष्य.

महादेवाचा गडबडगुंडा—(महानु.)अहिल्येशी जारकर्म केल्यानें महादेवास गौतम ऋषीनें 'तुझे लिंग गळून पडो' असा शाप दिला, तेव्हां ते लिंग गडबडत भूतळावर आलें. शंकर मदनं व्यासि ऋषीभार्याभिलाषितं । ऋषीश्रापं लिंग पतने मेदनी मर्दनस्तथा । –लिंगपुराण. १

महादेवाच्या पिंडीवरला विंचू मारतां येईना कीं सोडतां येईना—विंचू बहुधां खेटराच्या तडाक्यानें ठेंचून मारण्याची रीत आहे. तो जर महादेवाच्या पिंडीवर जाऊन बसला असेल तर त्याला खेटरानें ठेचतां येत नाहीं. कारण त्या खेटराचा मार महादेवाच्या पिंडीला लागून महादेवाचा अपमान व्हावयाचा. बरें त्याला मारूं नये, जाऊं द्यावें तर तो पुढेंमागें कोणाला तरी दंश करणार, अशी मोठी पंचाईत येऊन पडते. ज्या व्यक्तीनें दुसऱ्या सन्माननीय व समर्थ व्यक्तीचा आश्रय केला आहे तिचा नाश करण्याचें मनांत आणलें तरी आश्रयभूत झालेल्या समर्थ व्यक्तीच्या अवकृपेच्या भीतीनें नाश साधणें दुरापास्त आहे.

महानदी—महानदीचा ओघी : समुद्र मर्यादा नुलंघी—(महानु.) महानदी येऊन मिळाली तरी समुद्राची मर्यादा बदलत नसते. म्हणजे मोठेपणा किंवा ऐश्वर्य प्राप्त झालें असतां माणसानें मर्यादा, लीनता सोडूं नये.

महानुभाव—महानुभाव झाला : सर्व कांहीं सोडला—शिवाय मानभाव पहा. (महानु.) महानुभावाची दीक्षा घेतली कीं कांहीं करावयास नको ! उपरोधानें म्हणतात.

महानुभाव काठी काये, उलीसे पोरानें गांड (पाठी) लाल केली—(महानु.) लहान पोरानें मारलें असतां व काठी हातांत असतांहि न मारतां मार खाणारे. तु०–'हा जन डोइये डोइये मारी तरी तुम्हीं डोई ओडवावी कीं'–आचार सूत्र. 'आपण कव्हणाची ताती न कीजेः'

महानुभाव महानुभावःमंगळवार कधीं—(महानु.) मंगळवारीं श्रीचक्रधर स्वामीनें बेलापूर येथून उत्तरा पंथास प्रयाण केल्यामुळें तो वार महानुभाव अशुभ मानतात. 'शाके

वेद नव इंदुभूमि गणीतां संवत्सरे चांगरे । मासे माघ चतुर्थ मंगळीदेने ग्रामे च [illegible] बेलापुरे ॥ गंगातीर त्यजोनिया जीव पाति बीजे करी उत्तरे । माझे चागत जाणोनि चपळता लंघीत देशांतरे ॥--तीर्थमालिका. (शके ११९४ मंगळ माघ चतुर्थी).

संत महानुभावः ब्रह्मविद्येचे ठाव—(महानु.) महानुभाव संतापाशीं ब्रम्हविद्या असते.

राग द्वेष नाहीं मना, तो महानुभाव म्हणा—(महानु.) महानुभावाला राग आणि द्वेष असावयाचे नाहींत. ज्याला नाहींत तोच महानुभव म्हणतां येईल.

महानुभाव यती, (अन्न) पाळें धून पेती—(महानु.) महानुभाव प्रथम पात्र धुवून नंतर पाणी पितात. चाल वर्णिली आहे.

कामक्रोधु नाहीं मानसी, तो महानुभाव संन्यासी—(महानु.) महानुभावाला काम-क्रोध हे विकार नसावेत. तो संन्यासीवृत्तीचा असावा.

ब्रह्मचर्य राखावे, तेणे महानुभाव होआवे—(महानु.) ज्याला ब्रम्हचर्य राखतां येतें त्यानेंच महानुभाव व्हावें. खरे महानुभावी लोक ब्रम्हचर्य व्रतानें राहातात.

महानुभावांचा संगु जोडे, तेणें धर्मु घडे—(महानु.) महानुभावांचा सहवास असला म्हणजे धर्म घडत असतो; तेव्हां त्यांची संगत जोडावी.

महानुभावाचे संग, उन्नतीचे रंग—(महानु.) महानुभावाच्या संगतीनें उन्नति झाली पाहिजे.

महानुभावाच्या संगतीं, उपजे विरक्ती—(महानु.) खरा महानुभाव असा असला पाहिजे कीं, ज्याच्या सहवासापासून विरक्ति मनांत बाणली पाहिजे.

पोटासाठीं अंगीकारी भिक्षा, ती कांहीं महानुभावी दीक्षा?—(महानु.) पोटासाठीं भिक्षेचें व्रत घेणें हें खरें महानुभावी पंथाचें भिक्षाव्रत नव्हे. पंथाची शिस्त, शिकवण म्हणून महानुभावी लोक भिक्षा मागतात.

महापंचमूल—१ बेल, २ ऐरण, ३ टेंटू, ४ पाडळ, ५ शिसव.

महापंचविष—(अ) [अत्यम्लपर्णी कांडीरमालाकंदद्विसूरणैः ।] अत्यम्लपर्णी, कांडीर, मालाकंद (माणक) द्विसूरण (२ सुरण). (आ) शृंगी, कालकूट, मुस्तक, वत्सनाभक, शंखकर्णी.

महापातक—**अवसानघातकी महापातकी**—अवसान पहा.

महापुण्य—**तुरुत दान महापुण्य**—तुर्त पहा.

महापुर—**महा पुरें झाडें जाती । तेथें लव्हाळे राहती ॥ येती सिंधुच्या लहरी । नम्र होतां जाती वरि,**—तुगा (जोग) ७४५. महापुरांत झाडें वाहून जातात पण लव्हाळे राहातात. नम्र झालें असतां मोठमोठ्या संकटांतूनहि मनुष्य पार पडतो.

महाग—**महाग लागणें**—(ल.) त्रासदायक, नुकसानकारक होणें.

महाग होणें—दुष्प्राप्य होणें. भेटण्यास, मिळण्यास मुष्किल अशी स्थिति होणें.

महाभारत—**महाभारत कां माजवीता**—(महानु.) १ महाभारतांतल्याप्रमाणें भांडणें कां करतां असा भाव. २ अवडंबर करणें.

महार—**महारकचका**—महारांप्रमाणें जोरजोराचें भांडण; आरडाओरड.

***महार बसला खुशालीं आणि दोन्ही खळीं जळालीं**—महाराचें काम जागल्याचें अथवा पाहऱ्याचें आहे. त्यानें आपल्या कामांत हयगय केली तर गांवाचें नुकसान होतें.

महार मेला, विटाळ गेला–फिटला—महाराचा विटाळ त्याच्या बरोबर. अनिष्ट गोष्टीचा नाश झाला असतां तिच्याबरोबर तिची अनिष्टता नष्ट होते.

महाराची अडवणी–अडोपर वेशीजवळ–पाशीं—अडोपर पहा. महाराचा अधिकार वेशीजवळ चालतो, गांवांत नाहीं.

महाराची आई चांभार का नेईना; महाराची आई चांभार घेऊ—ज्या गोष्टीशीं आपला संबंध नाहीं तीबद्दल फिकीर कशाला बाळगावी. मला काय त्याचें ही वृत्ति.

महाराची (हंडी) उतरावी, आपली चढवावी—महाराला सर्वांच्या मागूनचे स्थान असतें.

महाराची बाई, चांभार नेई—वर पहा.

महारांचे देवास फटकुरांची पूजा—जशास तसें, तु०–चांभाराच्या देवास खेटरांची पूजा.

महाराचें लाडकें, खेळतें हाडकें—महाराचें मूल हाडकांशीं खेळतें. ज्याच्या त्याच्या प्रमाणें त्याची वर्तणूक असते.

महाराचें लाडकें, गळ्यांत हाडकें—वरप्रमाणें.

महाराला आंतडीं, चांभाराला कातडीं—मेलेल्या ढोराचें मांस नेण्याचा हक्क महाराचा असून चामडें नेण्याचा हक्क चांभाराचा असतो.

महारवाडा—जेथें गांव तेथें महारवाडा—जेथें पहा.

घर कीं, महारवडा—घरांत अतिशय गोंधळ घाण, गलिच्छपणा असला म्हणजे म्हणतात.

तळें पाहून रेड्याला सोडूं नये, महारवाडा पाहून महाराला सोडूं नये—हे गेले कीं तिकडेच गडप.

महारस—महारसाष्टक—१ दरद, २ पारद, ३ सस्य, ४ वैक्रांत, ५ कांत, ६ अभ्रक, ७ माक्षिक, ८ विमल.

महाराष्ट्र—महाराष्ट्र म्हणजे शिपायांची विलायत—(ऐति.) महाराष्ट्र हा शिपायांचा मुलुख आहे. या ठिकाणीं शिपायांचा भरणा फार. हें वीरराष्ट्र आहे. "आज देशाच्या रक्षणासाठीं व उद्यां हिंदूंच्या हक्क संरक्षणासाठीं जेवढें प्रचंड हिंदु सैनिकांचें दल खडें असेल तितकें आवश्यक आहे. 'महाराष्ट्र म्हणजे शिपायांची विलायत' (मुलूख) असें ऐतिहासिक काळीं इंग्रजासुध्दां सर्वांनीं धन्योद्गार काढल्याचें नमूद आहे." केसरी २३-१-४२.

महाराष्ट्रीं असतांचि योग्यता—(महानु.) महाराष्ट्रांत आपण राहिलों तरच योग्यता प्राप्त होईल.

महाराष्ट्रीं असावें—(महानु.) महाराष्ट्रांतच राहावें, त्यासाठीं इतर देश पाहूं नये. महानुभावांची महाराष्ट्राविषयीं फार श्रध्दा दिसून येते.

सदा असावें महाराष्ट्रीं, गंगातीरीं—(महानु.) वरील प्रमाणें. महाराष्ट्रांत ज्या पवित्र गंगेसमान नद्या आहेत त्यांच्या तीरांवर वास्तव्य करावें.

असावें महाराष्ट्रीं, विहीताचारी—(महानु.) महाराष्ट्रांतच चांगलें धर्मनीत्यनुसार वागून नांदत असावें.

महाल—महाल मजकुरावर-खालीं घालणें—लोटणें-टाकणें-नेणें-देणें—जरूर त्यावेळीं न करतां दिरंगाईवर नेणें; पुढें ढकलणें; टाळाटाळ करणें.

महाल मजकुराबर पडणें—पुढें ढकलणें; टाळाटाळ होणें.

महालाला जाणें; महाल करणें—राजानें अंतःपुरांत जाणें; संभोग-सुखार्थ जाणें.

महाला-ली—महाली म्हटलें, घोडें हांक—तुला गौरवून सांगितलें, आतां तरी ऐक.

महिमहि जाणें—(व.) नवल, कौतुक वाटणें.

मळणी—मळणी घालणें—धांगडधिंगा करणें; धिंगामस्ती करणें.

मळणीवर येणें—आयत्यावेळीं येणें. अगोदर कांहीं न करतां फायद्याच्या वेळीं मात्र हजर होणें.

मळणें—मळलेल्या वाटेवर पीक येत नाहीं—ज्या जमीनीवर लोकांची वर्दळ असते तेथें रोप उगवत नाहीं. अनेकांचे पाय पडतात तेथें बीं उगवत नाहीं. यावरून अनेक पुरुष असणाऱ्या स्त्रीला (वेश्येला) संतति होत नाहीं.

मळप—मळपाक माळो आशिलें तरी चडचें कोणीं—(गो.) आकाशाला माळा असला तरी त्यावर चढेल कोण ! 'सुळावरची पोळी' अशा अर्थानें म्हणतात.

मळपारि थुंकिले माथ्यारि (तोंडारि) पडता—(गो.) आकाशावर थुंकलें तर ती थुंकी आपल्याच तोंडावर पडते. सज्जनांची आणि तेजस्वी पुरुषांची निंदा केली तर ती आपल्यालाच बाधते.

मळपारि धूळ उडैल्यारि सूर्य निपतवे?—(गो.) आकाशांत धूळ उडवली म्हणून सूर्य झांकला जात नाहीं. धीरोदात्त पुरुषांचें तेज हें कोणत्याहि कारणानें लोपत नाहीं.

मळमळीत—मळमळीत सौभाग्यापेक्षां झळझळीत(ढळढळीत) वैधव्य बरें—एखादी गोष्ट अर्धवट असण्यापेक्षां मुळींच नसलेली बरी. कारण अर्धवट असल्याचा जास्त त्रास असतो.—निखळलेली हिरकणी, पृ. ८८. Suspense is worse than despair.

मळा—गातां गळा, शिंपिता मळा, लिहितां हातवळा—गातां गळा० पहा.

मक्षिका—प्रथमग्रासे माक्षिकापातः—(सं.) पहिल्या घासाला माशी लागणें. माशी लागल्यानें अन्न उलटून पडतें. तेव्हां पहिल्यानेंच माशी लागल्यानें सर्व जेवणाचा बिघाड होतो. यावरून एखाद्या मोठ्या कार्याच्या आरंभीच

काहीं अडचण उपस्थित होणें व त्यामुळें कार्यसिद्धीविषयीं साशंकता वाटणें. 'प्रथमग्रासे मक्षिकापात जाहालें असे.' –पेद ३७·३८.

मा जने बारबार, जीभ जने एकज बार—एखाद्या स्त्रीला अनेकवार पुत्र होतात; पण जिभेनें शब्द एकदांच उच्चराला जातो. तेव्हां आपल्या शब्दाचें महत्त्व पुत्रापेक्षांहि अधिक मानलें पाहिजे.–पामो २६७.

मा मुळा, बाप गाजर, बेटा निकला समशेर बहाद्दर—ज्याची आईबाप माहित नाहीं अशा मिश्रसंततीस म्हणतात.

माझं——माहं माहं केलं नू व्यर्थ वायां गेलं—(व.) [माहं=माझं] एखाद्यावर आपण खूप प्रेम करावें, माया लावावी, पण त्यानें उपकार न स्मरतां फटकून वागावें. म्हणजे फुकट माझं माझं करण्याचा कांहीं उपयोग नाहीं.

माकड——माकडाची जखम.—(ऐति.) माकड आपल्या जखमेवरची खपली पुन्हां पुन्हां काढून जखमेचा उपचार करतें. व दुसरीं माकडेंहि तेंच करतात. ती बरी होत नाहीं. यावरून अनेक लोक पडल्यामुळें विचका झालेलें काम.

माकडाला काकडी (मिळणें)—अल्पसंतोषी; थोड्याशा लाभावर संतुष्ट होणें.

***घर सांकड आणि बाईल–बायको माकड**—घर पहा.

माकड गेलें लुटी आणि आणल्या दोन मुठी—क्षुद्र मनुष्याच्या हातून क्षुद्रच गोष्ट होऊं शकते; महत्त्वाची गोष्ट होऊं शकत नाहीं.

माकड मारलें आणि पाला हगलें—एखाद्या क्षुल्लक मनुष्याला शिक्षा लावूनहि कांहीं फारसा उपयोग होत नाहीं. निरुपयोगी शिक्षेबद्दल म्हणतात. मोठ्या आशेनें एखादी गोष्ट करावी पण तीपासून कांहीं लभ्यांश मिळूं नये अशी स्थिति.

माकड म्हणतें माझी गांड लाल; माकड म्हणते माझीच—क्षुल्लक मनुष्यहि स्वतःबद्दल फुशारकी मारीत असतो. स्वतःबद्दल उगाच फुशारकी मारणें.

माकडाचे वटकन् दरवेशाचे हातीं—याची पहिली ओळ–पोराचें वटकण पंतोजीच्या हातीं. माकडाला काम कसें करावयास लावावें ही युक्ति दरवेशास बरोबर माहित असते. अस्वल पहा.

माकडा–हाता उज्या कोलती—(गो.) माकडाहातीं कोलीत. असें झाल्यास तें आग लावल्याखेरीज का राहील. याप्रमाणेंच मूर्ख माणसाच्या हातीं सत्ता असणें हें आहे.

माकडा हातांत मातें दिल्यार उवांकइ केसां केडु—(गो.) माकडाच्या हातांत डोकें दिलें कीं त्यांतल्या उवा निवण्यापेक्षां केसच उपटले जायचे. मूर्ख आणि अविवेकी माणसाकडे एखादें काम सोपवलें तर त्याचा आपणालाच त्रास व्हावयाचा.

माकडा हातांतु माणिक दिलें तें ताणें हुंगून पळेलें—(गो.) माकडाला कर्मवशात् माणिक मिळालें तर तें हुंगून पाहील. त्याला त्याचें महत्त्व काय कळणार !

माकडा होर्डिकेक कुंकडा सादु—(गो) माकडाला आमंत्रण द्यायला कोंबड्याचा शब्द. जशी योग्यता तशी त्याची संभावना.

माकडाच्या हातीं कोलीत—वर पहा. 'मग काय माकडाच्या हातीं कोलीत दिल्याप्रमाणें झालें.'–S.V.2. ९४.

माकडाला दिला मेवा, खाऊं कां ठेवूं—माकडाला चांगली वस्तु मिळाली म्हणजे त्याला ती धड खावीशी वाटत नाहीं व ठेवावी तर रहावत नाहीं, अशी त्याची चमत्कारिक स्थिति होते. ज्याला कधीं संवय नाहीं अशाला अपूर्व वस्तूचा उपभोगहि घेणें जमत नाहीं.

माकडास काकडी, खाऊं कां ठेवूं—वरप्रमाणेंच. ज्यास जी वस्तु मिळावयाची नाहीं ती मिळाली असतां ती उपयोगांत बहुतकरून तो आणीत नाहीं असा भावार्थ. तु०—(महानु.) माकडा हातीं काकडी : तीन दिवसां वांकडी. २ माकडाला दावली भाकर : लागला उड्या मारायला.

माकडास काकडी, भिलास झोपडी—जशी काकडी ही वस्तु मर्कटास अपूर्व, त्याचप्रमाणें झोपडी ही भिलास अपूर्व.

माका——माका तुका पडना, वडे वाढूक घडाना; माका तुका पडता, वडे वाढूक घडता—(गो.) मन एक असलें म्हणजे वाटतील त्या गोष्टी मनुष्यें एकमेकासाठीं करतात.

माका तुका बरँ जाल्यार चिंचे पानार नीदू पट्टा—(गो.) परस्परांत प्रेम नांदत असलें तर गरीबींत सुद्धा संसार सुखाचा होतो.

माका नाका तें सगळे संसाराक नाका—(गो.) मला जें मिळत नाहीं तें जगाला मिळूं नये अशी वृत्ति.

केलें तुका, झालें माका—तुका पहा.

माग—**माग काढणें–लावणें**—शोध लावणें; हुडकून काढणें; पत्ता लावणें; एखादा मनुष्य कोणत्या वाटेनें गेला त्याचा तपास रस्त्यावर उमटलेल्या पावलांच्या अनुरोधानें करणें; ठावठिकाणा लावणें, काढणें; पाठलाग करणें.

माग लागणें–उरणें—पत्ता, तपास लागणें; अवशेष राहणें.

माग येणें—मार्गाची, गमनाची खूण असणें, दिसणें. 'देवाजीचा माग येथवरी आला। येथें गुप्त झाला, काय करूं ॥'–तुका. सांवता चरित्र.

मागमूस–मुद्दा मोडणें—ज्या योगानें तपास लागेल तीं साधनें नाहींशीं करणें; ठावठिकाणा, पुरावा नाहींसा करणें.

मांग; मांगणी—**अंगांत मांग शिरणें–येणें**—मांग हा अतिशय तापट, कडक असतो; यावरून अतिशय रागावणें; त्वेष चढणें.

मांगणीची पत्री—आमावास्या, संक्रांत या दिवशीं मांगणीला दिलेलें दान (धान्य, तेल, मीठ इ.).

मांगांत पेडमांग—मांगांत पुनः त्याच्यापेक्षां निष्ठुर अशी पेडमांग म्हणून एक जात आहे. काठिण्य, निष्ठुरता इ. दोषाचें आधिक्य दाखविण्यासाठीं योजतात.

***मांग आणि भलतीच गोष्ट सांग**—मांग हा नेहमीं भलतेंच, कांहीं तरी बोलतो अशी समजूत आहे.

मांगाला मावशी काय आणि भिल्लाला भाची काय—मांग आणि भिल्ल हे लोक नातेंगोतें फारसें पाहात नाहींत, अशी समजूत.

मागचा–चें—**मागचें साल आठवलें आणि चालू साल गमावलें**—हिशोबामध्यें मागचें साल अधिक धरून चालू साल सोडलें म्हणजे हिशोब तेवढाच येणार; मिळून शेवटीं परिणाम एकच.

मागच्या धोवा–वरा तूंच वरा, मारशी पण जेऊं घालशी—पहिला किंवा अनेक दिवस ज्याच्याबरोबर काढले आहेत असाच धनि अथवा नवरा बरा असतो; त्याच्या मनांत कांहीं तरी सहानुभूति, आपलेपणा उत्पन्न झालेला असतो. तात्पुरत्या धन्यांत तोहि नसतो. तो केवळ काम करून घेण्याच्या मागें असतो.

मागणी—**मागणी करणें–घालणें**—ही आमच्या मुलाला वधू द्या म्हणून कन्येच्या पित्याकडे बोलणें करणें; विवाहासाठीं कन्येची तिच्या पालकाजवळ मागणी करणें.

मागणें—**आज्ञा मागणें**—परवानगी घेणें.

मागून घेणें—नवस करणें (देवाला).

***मागतल्याक ना पूतु, नाका म्हणतल्याग नातु**—(गो.) मागतो त्याला मुलगा मिळत, होत नाहीं, नको म्हणणाऱ्याला मुलगा मिळून नातूहि मिळतो.

मागतां येईना भीक, तर तंबाखू खायला शीक—व्यसनी लोकांस आपली तलफ भागविण्यासाठीं दुसऱ्याजवळ मागण्यास संकोच वाटत नाहींसा होतो. तंबाखू खाणाऱ्याचे मित्र पुष्कळ.

मागतां रीण, चलयूतां सोयरीक—(गो.) मागत राहिलें तरच कर्जाऊ दिलेला पैसा मिळतो आणि जिव्हाळ्यानें वागलें तरच आप्तसंबंध टिकून राहातात.

मागत्यास दहा घरें—भिक्षा मागणाऱ्याला एका घरीं भिक्षा मिळाली नाहीं तर तो आणखी दहा घरें फिरतो; त्याला त्याची कांहीं क्षिति वाटत नाहीं. तो कोणाहि एका व्यक्तीवर अवलंबून नसतो.

मागितल्याशिवाय ऋण बुडतें—कर्जाचा तगादा केला नाहीं तर ऋणको स्वतः होऊन कधींहि देत नाहीं; तें बुडण्याची वेळ येते.

मागु कळना भीक तर विडी ओढूक शीक—(गो.) वरप्रमाणेंच. मागतां येईना भीक० पहा. २ भीक मागायला देखील कळत नाहीं आणि विड्या वगैरे व्यसनें मात्र जडवून घेतो.

मांगे भीक, पुछे गांवोकी जमा—भीक मागणारानें गांवचा वसूल किती म्हणून चौकशी करणें. नसती उठाठेव,

मागून कर्तो जेवण, उष्टें काढूक एक जन—(गो.) भीक मागून जेवायचें आणि उष्टें काढायला गडी ठेवायचा. मिजास म्हणतात ती हीच.

मागला—**मागला पाय**—(दुखणें रोग इ. चा). उतार; कमी होत जाणें.

मागला पाय पुढें न घालूं देणें--अडविणें; अगदीं हलूं न देणें; कांहीं सुचेनासें करणें; अडवून धरणें.

मागला पाय पुढें न ठेवणें--जागचें न हलणें; अगदीं ठासून बसणें; नेट धरून बसणें.

मागल्या पायीं--लगेंच माघारें; न थांबतां, चटदिशीं परतून.

मागल्या पायीं परत येणें--ताबडतोब परतणें; गेल्याबरोबर परत फिरणें.

मागल्या सात जन्मांचें वैर साधणें--अतिशय तीव्रतेनें जणूं फार जुनें वैर आहे याप्रमाणें सूड घेणें. 'मागल्या सात जन्मांचं वैर साधण्यासाठीं हीं एकमेकांच्या समोर आलेलीं आहेत.' -एकच प्याला १·२.

***मागला पाय पुढें नाहीं व पुढला पाय मागें नाहीं**--अगदीं इकडे तिकडे हालचाल करतां येत नाहीं अशी स्थिति; अगदीं अगतिक स्थिति.

येरे माझ्या मागल्या, कण्या भाकरी चांगल्या--पूर्वीचा क्रम न सोडणें; मूळपदावर असणें; पुष्कळ दिवस शिकविलें तरी मूळची संवय, खोड सोडीत नाहीं अशास उद्देशून म्हणतात.

येरे माझ्या मागल्या, पाप न जाई बोंबल्या--जन्माच्या संवयी कधीं सुटत नाहींत व त्यामुळें पातकाचा क्षय कधीं होत नाहीं.

मागसणें---**आगसली ती मागसली, मागाहून आली ती गरव्हार झाली**--आगसणें पहा.

मागील---**मागील क्रमाप्रमाणें, होतें बुद्धीचें वावरणें**--बुद्धिःकर्मानुसारिणी पहा.

मागून---**मागून पुढून बाप (च) नवरा**--एक मनुष्य विधुर होता. घरांत बायको मनुष्य पाहिजे म्हणून तो आपल्या मुलाचें लग्न करावयाचें योजून मुलगी पहावयास गेला. पण अखेरीस मुलाच्या ऐवजीं स्वतःच त्यानें तिच्याशीं लग्न लावलें. या प्रकारावरून ही म्हण रूढ झाली आहे. पुन्हां पुन्हां फायद्यासाठीं आपणच पुढें होणें; नेहमीं आपलाच फायदा करून घेणें.

मागून लाथरा, पुढून डसरा--मागच्या बाजूनें त्रास द्यावयाला गेलें कीं जो लाथा झाडतो, पुढून त्रास द्यावयास गेलें कीं जो डसायला धांवतो असा (घोडा). असला माणूस किंवा जनावर असेल तर कोणी त्रास देत नाहीं. तसेंच नाहक कोणी त्रास देऊं लागला असतां सहन करून न घेणारा व त्रास टाळण्याची खटपट करणारा इसम.

मागून आलेलें लोण पुढें पोचविणें--(आट्यापाट्यांच्या खेळांत सर्व पाट्या ओलांडून परत लोण घेऊन येतात यावरून) पूर्वीपासून चालत आलेल्या गोष्टी, परिपाठ पुढें चालू करणें; परंपरा चालविणें.

मागें---**मागें करून टाकणें**--१ शिल्लक टाकणें; मागें ठेवणें; बाजूस काढणें.

मागें घेणें-फिरणें-सरणें-हटणें--परावृत्त होणें; माघार घेणें; टाकून, सोडून देणें (कार्य).

मागें टाकणें--१ शिल्लकेंत ठेवणें; गांठीं पडणें. २ पाठीशीं घालणें; आश्रय देणें. 'मला द्यावें जीवदान टाकावें मागें।' -ऐपो १५९.

मागें पडणें--१ शिल्लक राहणें (पैसा). २ साफ बरें होणें; नाहींसें होणें (दुखणें, त्रास इ.) ३ आठवण न होणें; विसरणें. ४ रद्द होणें; मोडणें (नियम इ.). ५ प्रगति न होणें. ६ महत्त्व जाणें; दर्जा कमी होणें.

मागें पाडणें--शिलकेस टाकणें; सांचविणें.

मागें पुढें करणें--कांकूं, अळंटळं करणें; माघार घेणें.

मागेंपुढें न पाहणें--मुळींच न कचरणें; बेधडक पुढें पाऊल टाकणें.

मागेंपुढें पाहून वागणें--दूरवर विचार करून, सारासार बुद्धि चालवून वागणें.

मागें येणें--विधवा होणें.

मागें राहणें--पिछाडीला असणें. (ल.) पुढें प्रसिद्धीला न येणें; प्रगति खुंटलेली असणें.

मागें लागणें--चिकाटी धरणें; पिच्छा पुरविणें; तगादा करणें.

***मागें एक, पुढें एक**--आंत एक बाहेर एक, याप्रमाणें; माणूस समोर असतां एक बोलणें आणि त्याच्यामागें विरुद्ध बोलणें, किंवा करणें; बोलणें व कृति यांत फरक असणें. 'मागें येक पुढें येक। ऐसा कदापि नाहीं दंडक।' -दा १९·४·१८.

मागें ना पुढें, कुत्रें घेऊन रडे--कोणी आप्तस्वकीय नसलेल्या माणसाबद्दल म्हणतात.

माका नाका तें सगळे संसाराक नाका—(गो.) मला जें मिळत नाहीं तें जगाला मिळूं नये अशी वृत्ति.

केलें तुका, झालें माका—तुका पहा.

माग—माग काढणें-लावणें—शोध लावणें; हुडकून काढणें; पत्ता लावणें; एखादा मनुष्य कोणत्या वाटेनें गेला त्याचा तपास रस्त्यावर उमटलेल्या पावलांच्या अनुरोधानें करणें; ठावठिकाणा लावणें, काढणें; पाठलाग करणें.

माग लागणें-उरणें—पत्ता, तपास लागणें; अवशेष राहणें.

माग येणें—मार्गाची, गमनाची खूण असणें, दिसणें. 'देवाजीचा माग येथवरी आला। येथें गुप्त झाला, काय करूं ॥'-तुका. सांवता चरित्र.

मागमूस-मुद्दा मोडणें—ज्या योगानें तपास लागेल तीं साधनें नाहींशीं करणें; ठावठिकाणा, पुरावा नाहींसा करणें.

मांग; मांगणी—अंगांत मांग शिरणें-येणें—मांग हा अतिशय तापट, कडक असतो; यावरून अतिशय रागावणें; त्वेष चढणें.

मांगणीची पत्री—आमावास्या, संक्रांत या दिवशीं मांगणीला दिलेलें दान (धान्य, तेल, मीठ इ.).

मांगांत पेडमांग—मांगांत पुनः त्याच्यापेक्षां निष्ठुर अशी पेडमांग म्हणून एक जात आहे. काठिण्य, निष्ठुरता इ. दोषाचें आधिक्य दाखविण्यासाठीं योजतात.

***मांग आणि भलतीच गोष्ट सांग**—मांग हा नेहमीं भलतेंच, कांहीं तरी बोलतो अशी समजूत आहे.

मांगाला मावशी काय आणि भिल्लाला भाची काय—मांग आणि भिल्ल हे लोक नातेंगोतें फारसें पाहात नाहींत, अशी समजूत.

मागचा-चें—मागचें साल आठवलें आणि चालू साल गमावलें—हिशोबामध्यें मागचें साल अधिक धरून चालू साल सोडलें म्हणजे हिशोब तेवढाच येणार; मिळून शेवटीं परिणाम एकच.

मागच्या धोवा-वरा तूंच बरा, मारशी पण जेऊं घालशी—पहिला किंवा अनेक दिवस ज्याच्याबरोबर काढले आहेत असाच धनि अथवा नवरा बरा असतो; त्याच्या मनांत कांहीं तरी सहानुभूति, आपलेपणा उत्पन्न झालेला असतो. तात्पुरत्या धन्यांत तोहि नसतो. तो केवळ काम करून घेण्याच्या मागें असतो.

मागणी—मागणी करणें-घालणें—ही आमच्या मुलाला वधू द्या म्हणून कन्येच्या पित्याकडे बोलणें करणें; विवाहासाठीं कन्येची तिच्या पालकाजवळ मागणी करणें.

मागणें—आज्ञा मागणें—परवानगी घेणें.

मागून घेणें—नवस करणें (देवाला).

***मागतल्याक ना पूतु, नाका म्हणतल्याग नातु**—(गो.) मागतो त्याला मुलगा मिळत, होत नाहीं, नको म्हणणाऱ्याला मुलगा मिळून नातूहि मिळतो.

मागतां येईना भीक, तर तंबाखू खायला शीक—व्यसनी लोकांस आपली तलफ भागविण्यासाठीं दुसऱ्याजवळ मागण्यास संकोच वाटत नाहींसा होतो. तंबाखू खाणाऱ्याचे मित्र पुष्कळ.

मागतां रीण, चलयूतां सोयरीक—(गो.) मागत राहिलें तरच कर्जाऊ दिलेला पैसा मिळतो आणि जिव्हाळ्यानें वागलें तरच आप्तसंबंध टिकून राहातात.

मागत्यास दहा घरें—भिक्षा मागणाऱ्याला एका घरीं भिक्षा मिळाली नाहीं तर तो आणखी दहा घरें फिरतो; त्याला त्याची कांहीं क्षिति वाटत नाहीं. तो कोणाहि एका व्यक्तीवर अवलंबून नसतो.

मागितल्याशिवाय ऋण बुडतें—कर्जाचा तगादा केला नाहीं तर ऋणको स्वतः होऊन कधींहि देत नाहीं; तें बुडण्याची वेळ येते.

मागु कळना भीक तर विडी ओढूक शीक—(गो.) वरप्रमाणेंच. मागतां येईना भीक० पहा. २ भीक मागायला देखील कळत नाहीं आणि विड्या वगैरे व्यसनें मात्र जडवून घेतो.

मागें भीक, पुढे गांवोकी जमा—भीक मागणारानें गांवचा वसूल किती म्हणून चौकशी करणें. नसती उठाठेव,

मागून कर्ता जेवण, उष्टें काढूक एक जण—(गो.) भीक मागून जेवायचें आणि उष्टें काढायला गडी ठेवायचा. मिजास म्हणतात ती हीच.

मागला—मागला पाय—(दुखणें रोग इ. चा). उतार; कमी होत जाणें.

मागला पाय पुढें न घालूं देणें--अडविणें; अगदीं हलूं न देणें; कांहीं सुचेनासें करणें; अडवून धरणें.

मागला पाय पुढें न ठेवणें--जागचें न हलणें; अगदीं ठासून बसणें; नेट धरून बसणें.

मागल्या पायीं--लगेंच माघारें; न थांबतां, चटदिशीं परतून.

मागल्या पायीं परत येणें--ताबडतोब परतणें; गेल्याबरोबर परत फिरणें.

मागल्या सात जन्मांचें वैर साधणें--अतिशय तीव्रतेनें जणूं फार जुनें वैर आहे याप्रमाणें सूड घेणें. ' मागल्या सात जन्मांचं वैर साधण्यासाठीं हीं एकमेकांच्या समोर आलेलीं आहेत. ' -एकच प्याला १·२.

***मागला पाय पुढें नाहीं व पुढला पाय मागें नाहीं**—अगदीं इकडे तिकडे हालचाल करतां येत नाहीं अशी स्थिति; अगदीं अगतिक स्थिति.

येरे माझ्या मागल्या, कण्या भाकरी चांगल्या—पूर्वीचा क्रम न सोडणें; मूळपदावर असणें; पुष्कळ दिवस शिकविलें तरी मूळची संवय, खोड सोडीत नाहीं अशास उद्देशून म्हणतात.

येरे माझ्या मागल्या, पाप न जाई बोंबल्या—जन्माच्या संवयी कधीं सुटत नाहींत व त्यामुळें पातकाचा क्षय कधीं होत नाहीं.

मागसणें---आगसली ती मागसली, मागाहून आली ती गरव्हार झाली—आगसणें पहा.

मागील---मागील क्रमाप्रमाणें, होतें बुद्धीचें वावरणें—बुद्धिःकर्मानुसारिणी पहा.

मागून---मागून पुढून बाप (च) नवरा—एक मनुष्य विधुर होता. घरांत बायको मनुष्य पाहिजे म्हणून तो आपल्या मुलाचें लग्न करावयाचें योजून मुलगी पहावयास गेला. पण अखेरीस मुलाच्या ऐवजीं स्वतःच त्यानें तिच्याशीं लग्न लावलें. या प्रकारावरून ही म्हण रूढ झाली आहे. पुन्हां पुन्हां फायद्यासाठीं आपणच पुढें होणें; नेहमीं आपलाच फायदा करून घेणें.

मागून लाथरा, पुढून डसरा--मागच्या बाजूनें त्रास द्यावयाला गेलें कीं जो लाथा झाडतो, पुढून त्रास द्यावयास गेलें कीं जो डसायला धांवतो असा (घोडा). असला माणूस किंवा जनावर असेल तर कोणी त्रास देत नाहीं. तसेंच नाहक कोणी त्रास देऊं लागला असतां सहन करून न घेणारा व त्रास टाळण्याची खटपट करणारा इसम.

मागून आलेलें लोण पुढें पोचविणें--(आट्यापाट्यांच्या खेळांत सर्व पाट्या ओलांडून परत लोण घेऊन येतात यावरून) पूर्वीपासून चालत आलेल्या गोष्टी, परिपाठ पुढें चालू करणें; परंपरा चालविणें.

मागें---मागें करून टाकणें--१ शिल्लक टाकणें; मागें ठेवणें; बाजूस काढणें.

मागें घेणें-फिरणें-सरणें-हटणें—परावृत्त होणें; माघार घेणें; टाकून, सोडून देणें (कार्य).

मागें टाकणें—१ शिल्लकेंत ठेवणें; गांठीं पडणें. २ पाठीशीं घालणें; आश्रय देणें. ' मला द्यावें जीवदान टाकावें मागें । ' -ऐपो १५९.

मागें पडणें—१ शिल्लक राहणें (पैसा). २ साफ बरे होणें; नाहींसें होणें (दुखणें, त्रास इ.) ३ आठवण न होणें; विसरणें. ४ रद्द होणें; मोडणें (नियम इ.). ५ प्रगति न होणें. ६ महत्त्व जाणें; दर्जा कमी होणें.

मागें पाडणें—शिल्केस टाकणें; सांचविणें.

मागें पुढें करणें—कांकूं, अळंटळं करणें; माघार घेणें.

मागेंपुढें न पाहणें—मुळींच न कचरणें; बेधडक पुढें पाऊल टाकणें.

मागेंपुढें पाहून वागणें—दूरवर विचार करून, सारासार बुद्धि चालवून वागणें.

भागें येणें—विधवा होणें.

मागें राहणें—पिछाडीला असणें. (ल.) पुढें प्रसिद्धीला न येणें; प्रगति खुंटलेली असणें.

मागें लागणें—चिकाटी धरणें; पिच्छा पुरविणें; तगादा करणें.

***मागें एक, पुढें एक**—आंत एक बाहेर एक, याप्रमाणें; माणूस समोर असतां एक बोलणें आणि त्याच्यामागें विरुद्ध बोलणें, किंवा करणें; बोलणें व कृति यांत फरक असणें. ' मागें येक पुढें येक । ऐसा कदापि नाहीं दंडक । ' -दा १९·४·१८.

मागें ना पुढें, कुत्रें घेऊन रडे--कोणी आप्तस्वकीय नसलेल्या माणसाबद्दल म्हणतात.

पुढें पाट, मागें सपाट--पुढें पहा.

माघ--माघ वांचल्यावर शिमगॉ नाचूं--(गो.) माघ निर्विघ्नपणें पार पडला तर मग शिमग्याचा खेळ. पुढचें पुढें या अर्थीं. तु०-दसऱ्यांतून जगूं तेव्हां दिवाळी बघूं.

माघीं अळें आणि बेदर्री फळें--माघ महिन्यांत अळें घातलें तर बेंदुराला म्हणजे पोळ्याच्या वेळेस फळें कोठून येणार ? पुढें होणाऱ्या कृतीचें फळ आधीं कसें मिळणार.

माज--माज करणें--१ जनावरांत मैथुनेच्छा उत्पन्न झाली म्हणजे तें ज्या हालचाली करतें त्यास म्हणतात. कामक्षुधा दर्शविणें. २ माजास येणें; माजणें.

माज मोडणें--(जनावराची) कामक्षुधा शमणें. २ खोड मोडणें; गुरमी जिरणें.

माजावर येणें--माज करणें; फळणीस येणें.

माजणें--माजला महार : घालेना जुहार--(महानु.) माजलेला माणूस अदबीनें वागत नसतो. महार वास्तविक जोहार करावयास तयार असावयाचा पण तोच माजलेला.

माजला माळी : गांड पुसेना केळी--(महानु.) वरीलप्रमाणेंच.

माजला वसू, खायास काळ--[वसू=धर्मार्थ सोडलेला बैल; पोळ] बैल फार माजला, विशेषतः धर्मार्थ सोडलेला पोळ खूप माजला तरी त्याचा कांहीं नांगरास जुंपण्याच्या कामीं उपयोग नाहीं; केवळ त्यास खावयास मात्र पुष्कळ लागावयाचें.

माजलें गुरूं, धन्यास मारी--एखादें ढोर फार माजलें म्हणजे तें धन्यासहि शिंगें मारण्यास कमी करीत नाहीं. मूर्ख मनुष्य वैभवास चढल्यास उपकारकर्त्यासहि अपकार करूं लागतो.

मांजर--मांजर आडवें येणें--आपण जातांना मांजर आडवें गेल्यास काम होत नाहीं अशी समजूत. यावरून एखाद्या कामांत अडथळा उत्पन्न होणें; कामाला चांगला शकुन न होणें.

मांजरझाक--(व.) रात्र होण्यापूर्वीची संध्याकाळच्यापेक्षां थोड्या जास्त काळोखाची वेळ. (यावेळीं मांजर दिसत नाहीं.)

मांजर मारणें--मांजर मारणें हें एक पाप समजलें जातें व काशीस जावें लागतें. यावरून पाप करणें.

मांजर मारून काशीस जाणें--प्रथम पातक करून मग पुण्याचा मार्गाचा अवलंब करण्याचा देखावा करणें.

मांजर मुतवणी--कोमटपाणी इ.

माझ्या घरांत मांजर व्याली काय ?--माझें घर वर्ज केलें काय, असें विचारावयाचें झाल्यास म्हणतात. घरांत मांजर विणें चांगलें समजत नाहींत.

मांजराची मावशी--चिचुंद्री. हिला मांजर मारीत नाहीं.

(कुत्र्या-) मांजराचे पाय--कुत्र्याचे पाय पहा.

कुत्र्याचे पाय मांजरावर, मांजराचे कुत्र्यावर करणें--कुत्रा पहा.कांहीं तरी लटपट करणें. 'मारामारीची फिर्याद घरीं आली म्हणजे मांजराचा पाय कुत्र्यावर करून चिमाजीआप्पा व बाजीराव हे एकमेकांस हिकमतीनें सोडवून बापाचा मार चुकवीत.' बाजीराव.

मांजर अगदीं डोळे झांकून दूध पितें--दूध पहा. -संक ३.१.४५.

मांजर आडवें आलें तर तीन पावलें मागें जावें--आपण एखादें काम करावयास जात असतां वाटेंत मांजर आडवें गेल्यास कार्य होत नाहीं अशी समजूत आहे. याकरितां थोडें मागें परतून पुन्हा चालूं लागावें. एखादा अडथळा आल्यास थोडें थांबून कामास पुन्हां लागावें.

मांजर आपल्या पोरांस खातें, तें उंदरांस कसें सोडील--मांजर आपल्या लहान पिलांसहि खातें तेव्हां तें आपल्या शत्रूस खाईल यांत नवल काय ? जो आपल्या स्वजनांसहि त्रास देतो तो शत्रूवर दया करील ही अपेक्षा व्यर्थ होय.

मांजर काढून टाकलें तेथें उंट येऊन पडला--एका लहानशा संकटांतून मुक्तता व्हावी तों दुसरें त्यापेक्षां मोठें संकट येऊन गुदरलें.

मांजर गू लिपैता--(गो.) मांजर स्वतःची घाण लपवितें. मांजर हागल्यानंतर वर माती लोटतें. कांहीं माणसांना आपल्या दुष्कर्मावर पडदा टाकण्याची संवय असते.

मांजर गेलें लुटी आणि आणल्या चार सुठी--जो तो आपल्या सामर्थ्याप्रमाणेंच काम करूं शकतो. माकड पहा.

वाणी मित्र नव्हे, मांजर जितरब नव्हे—वाण्यावर कधींहि विश्वास ठेवूं नये, त्याचा उपदेश उपयोगी पडणारा नसतो. त्याप्रमाणेंच मांजर हें उपयुक्त जनावर नव्हे.

मांजर झालें रोड, म्हणून उंदरांचा चिवाचिवाट—मांजर अशक्त झालें म्हणजे उंदीर गडबड करूं लागतात. वरती कोणी सक्त देखरेख करणारा नसला म्हणजे नोकर-चाकर गडबड करतात.

मांजर नाथिल्ल्या गांवांत हुंदीर राया—(गो.) मांजर नसलेल्या गांवांत उंदीर राजा. सत्तेच्या अभावीं राज्यकारभार चोरांच्या हातीं जातो.

मांजर नाथिल्ले घर उंद्रा राज्य—(गो.) ज्या घरांत मांजर नाहीं तिथें उंदरांचा सुळसुळाट होतो. अधिकारी पुरुष नसला कीं मग सगळाच पोरवडा.

मांजर बावडॅ दॉळॅ धांपून दूध पिता—(गो.) मांजर डोळे झांकून दूध पितें. वर पहा.

काशीस गेल्याचें सांगतो, मांजर मारल्याचें सांगत नाहीं—काशी पहा. वर पहा.

मांजरा खेळ पुण उंद्रा मरण—(गो.) मांजराचा खेळ होतो, पण उंद्राचा जीव जातो. उंदीर पहा.

मांजरा वोडावेली पोणत्ती; माजरा वोडावेली पष्ठी; माजरा वोडावेलो दिवो—(गो.) मातीचा दिवा मांजराच्या डोक्यावर ठेवला तर तो पडणारच. डळमळीत आधारावर आरंभलेल्या गोष्टी पडायच्याच.

मांजरा सट्टी धोनु सुण्या बारसोथाई सोदचें—(गो.) मांजराच्या षष्ठीपूजनापासून तों कुत्र्याच्या बारश्यापर्यंत जें मिळेल तें संपादायचें. अतिलोभी माणसाला उद्देशून म्हणतात.

मांजरा सटयेक आनि उंद्रा बारशाक—(गो.) मांजराच्या संठीला आणि उंदराच्या बारश्याला. एखादा माणूस न संपणारे वायदे सांगू लागला कीं त्याला म्हणतात.

माजरांगेल्या झगड्यांत सुण्यांक पारपत्य—(गो.) मांजरांच्या भांडणांत कुत्र्यांना शिक्षा. 'शिष्यापराधे गुरोर्दंडः' म्हणतात त्याप्रमाणें.

माजराक देखिलो कीर—मांजराला पाहून पोपटाची गाळण होते. भेदरलेल्या माणसाची स्थिति पोपटाप्रमाणेंच असते. आपला वरचढ शत्रु पाहिला कीं मनुष्य घाबरून जातो.

मांजराक मासळी भाजूक लायले गादि—(गो.) मांजराला मासळी भाजायचें काम सांगितलें तर ती आपल्याला मिळयाची आशाच करायला नको.

मांजराचा खेळ होतो पण उंदराचा जीव जातो—उंदीर पहा.—शाब ३.७६.

मांजराचा गू लिंपाचा न छापाचा—निरुपयोगी वस्तु; कांहीं पदार्थ निवळ टाकीव असतात. तसाच कित्येकापासून बिलकूल उपयोग होत नाहीं.

मांजराची जात सुंगटाच्या वासाक—(गो.) [सुंगट=एक मासा.] कोंकणांत मांजर सुंगट खाणाऱ्याकडे टिकून राहतें; तें सुंगट न खाणाऱ्याकडे सहसा टिकत नाहीं. एखाद्या गोष्टीच्या आशेवर बसलेल्या माणसाबद्दल योजितात.

मांजराचे गळ्यांत घांट कोणीं बांधावी?—(स्वसंरक्षणार्थ युक्ति म्हणून सर्व उंदरांनीं, मांजराच्या गळ्यांत घांट बांधल्यानें तिचा आवाज होऊन मांजर आलेलें कळेल, असें ठरविलें; पण घांट बांधण्यास कोणी पुढें होईना यावरून) दिसण्यांत सोपी पण करण्यास अशक्य अशी गोष्ट.

मांजराचो डोळो भोंवड्यार—(गो.) मांजराची दृष्टि दुधाच्या भांड्यावर.

मांजराच्या टाळूला तूप—मांजराच्या टाळूवर तूप घातलें तर त्याला त्याचा वास तर येत असतो पण कोठें आहे तें कळत नाहीं व तें कोड्यांत पडतें. त्याप्रमाणें कोडें पडणें.

मांजरानू गू लिपयिलॅवशेन लिपैना—(गो.) विष्ठा केल्यावर तिच्यावर माती ओढायची असा मांजराचा स्वभावधर्म आहे. एखादा माणूस यःकश्चित् वस्तु लपवून ठेवूं लागला कीं त्याला म्हणतातः—मांजराच्या विष्ठेसारखें कशाला लपवितोस?

मांजरानें दूध पाहिलें परंतु बडगा कोठें पाहिला—प्रत्येकाला लाभाची तेवढी गोष्ट दिसते पण ती मिळविण्याकरितां लागणाऱ्या श्रमांची अगर साहसाची कल्पना नसते. घी देखे लेकिन् बडगा नहीं देखे, पहा.

मांजरापेक्षां माणसेंच या जगांत अधिक आडवीं येतात—मांजर आडवें जाऊन काम न होणें अशा गोष्टी जितक्या घडतात त्यापेक्षां माणसें मध्यें येऊन काम बिघडविल्याच्या गोष्टी जास्त सांपडतील. म्हणजे माणसांपेक्षां मांजरें अधिक बरी असें म्हणण्याची पाळी येते !

मांजराला उंदीर साक्ष—मांजराच्या खटल्यांत उंदरास साक्ष द्यावयाची वेळ आली तर तो मांजराच्या विरुद्ध साक्षी देऊं शकणार नाहीं. त्यास अनुकूलच बोललें पाहिजे. यावरून सर्व आपमतलबी कारभार. उंदीर पहा.

मांजराला घराची आठवण राहते, नि कुत्र्याला मनुष्याची आठवण राहते - मांजर कोठेंहि गेलें तरी परत आपल्या घरीं नेमकें येतें; त्याचप्रमाणें कुत्रा अनेक दिवसांनीहि ओळखीच्या माणसांस ओळखूं शकतो.स्वभावदर्शक म्हण.

मांजरी--मांजरि दांत पिलांक लागनात—(गो.) मांजरीचे दांत पिलांना लागत नाहींत. बाहेर कर्दनकाळ असलेला पुरुष आपल्या पोरांबाळांशीं कठोर असत नाहीं. पुढें पहा.

मांजरीचे उंदरास धरण्याचे दांत वेगळे व तिचे पिलास धरण्याचे दांत वेगळे—मांजरानें दातांनीं पिलांस धरलें तरी त्यास दांत लागत नाहींत पण उंदरास मात्र त्यांपासून इजा होते. यावरून दुटप्पी वर्तन करणारासंबंधीं ही म्हण वापरतात. आंत एक बाहेर एक असें वर्तन.

मांजरीचे दांत तिच्या पिलांस खात नाहींत—(व.) वरप्रमाणेंच. आपलें मनुष्य कितीहि बोललें तरी राग येत नाहीं.

मांजारालीं फुलां—(गो.) गांवांतल्या मुख्याधिकाऱ्याच्या बागेंतल्या फुलांना हात लावला तर त्याचे परिणाम फार वाईट होतात.

माझा-झी-झें---माझा मी—मी एकटा; दुसरा कोणी मदतीस नसतां.

माझेंच नाक वर—कुस्तींत खालीं (उताणा) पडलेल्या माणसाचें नाक साहजिकच वर असणार. या स्थितींत नाक वर असण्याची प्रौढी मिळविणें हें निर्लज्जपणाचें आहे.- हरला तरी ज्याची मुजोरी जात नाहीं अशा माणसासंबंधीं योजतात. निर्लज्ज मनुष्य.

माझें तुझें म्हणणें--हें माझें, हें तुझें अशी वांटणी करणें; भेदभाव करणें; पक्षपाती असणें. ' माझें तुझें हें म्हणशील जेव्हां । परस्परें तुटि पडेल तेव्हां ॥ '–सारुह ७-१२१.

माझें माझें म्हणणें--सर्वत्र स्वार्थ, आपलेपणा ठेवणें; फार लोभ ठेवणें. ' माझें माझें म्हणतोसी । म्हणौनियां ॥ '–दा ३-१०-५०.

माझ्याकडे तरी पाहा--माझा तरि विचार करा ! माझी तरी दया येऊं द्या! मजकरितां तरी असें करूं नका! तु०-'नांदा एकत्र, नको द्वेष करूं मजकडेचि बा पाहे ।'–मो उद्योग २१.११.

माझ्या बा(पा)च्यानें हें होणार नाहीं—ही गोष्ट करण्यास मी अगदीं असमर्थ आहे.

माझा जीव तुझ्यापाशीं आणि तुझा जीव गांवांतल्या लोकांपाशीं--आईचा जीव बाईपाशीं पहा.

माझा माझा, व्यर्थ कबाड बोझा—(महानु.) हें माझें, तें माझें असें करून उगीच पसारा व त्रास करून घेणें. त्याचा कांहीं उपयोग होत नसतो. माझें पहा.

माझा मुलगा दाणा,घरोघरीं माझ्या सुना—असा लेक दाणा० पहा.

माझा होऊन रहा, पण मीक मागून खा—आपला आश्रित आहे असा मोठेपणा घ्यावयाचा पण त्याच्यासाठीं पदराला खार लावून घ्यावयाचा नाहीं.

माझी आहे रांडली थुंक्यानें गांड गिरविडली—(अशिष्ट.) स्वतःच्या पायाखालीं काय जळतें आहे, स्वतः आपण किती निर्लेप आहो याचा कोणी विचार करीत नाहीं.

माझी जागा म्हणणारास पृथ्वी हासते—आजपर्यंत एकाच भूमीचा अनेकांनीं उपभोग घेतलेला असतो व सध्याचा मालकहि फार दिवस राहावयाचा नसतो. तो मेल्यावर दुसरा कोणीतरी तिचा मालक व्हावयाचा असतो. याप्रमाणें जमीनीची मालकी ही तात्पुरती असली तरी प्रत्येक मालक तिला आपली म्हणतच असतो ही गोष्ट हास्यास्पद होय. मनुष्याच्या ठिकाणीं ममत्व फार असतें.

माझी पोर, गुणाची थोर—आपणाला स्वतःचें मूल गुणवान वाटतेंच.

माझी बाई गुणाची, पायलीभर चुनाची—रडत असलेल्या मुलीस समजावितांना थट्टेनें म्हणतात.

माझी बाळी साधी भोळी, तिला लागे नित्य दिवाळी—वर दिसावयास साधेभोळेपणाचा आव आणून सर्वप्रकारें चंगळ करणारास म्हणतात.

माझी मुलगी शिंगी, तिच्यावर माझी जिंदगी—आपल्या मुलीचें कौतुक करणाऱ्या आईबद्दल म्हणतात.

माझी मुलगी सवाई, गल्लोगल्लीं जांवई—स्वैर व्यभिचारी मुलीबद्दल औपरोधिक वचन. तु०-अशी लेक व्हावी तर घरोघर जांवई.

माझें कांहीं तुझें कांहीं, आपापलें जग पाही—तूं कांहीं घे, मी कांहीं घेतों मग उरलेलें इतर आपापलें पाहून घेतील. जो तो स्वतःकडे पाहतो. मनुष्य हा स्वार्थी आहे. —शाब १'७४.

माझें गेलें (जेवण) चुलींत—स्वतःबद्दल वरून बेफिकीरी दाखविणें पण आपला स्वार्थ आधींच पूर्णपणें साधून ठेवणें. एक स्त्री स्वतःच्या जेवणाबद्दल नेहमीं बेफिकीरी दाखवीत असे, व नवऱ्यानें जेवणाबद्दल विचारलें असतां 'माझें जेवण चुलींत,' किंवा 'माझें गेलें चुलींत' असें उत्तर देत असे. परंतु वास्तविक नवऱ्यास कसें तरी जेवण वाढून स्वतःकरितां चांगले पदार्थ करून चुलींत लपवून ठेवीत असे किंवा चांगला तूप वगैरे घातलेला पानगा चुलींत भाजत घालून ठेवीत असे व नवरा बाहेर गेल्यावर खात असे. एके दिवशीं नवऱ्यानें लपून बसून पाहिलें, तेव्हां तिची लबाडी उघडकीस आली.

माझें घरीं काय तोटा, लोटा जांवयाचा गोठा—स्वतःच्या घरीं चांगली समृद्धि असतां जांवयाच्या घरीं राहून कष्ट करण्याचें काय कारण. आईनें मुलीच्या सासरीं राहणें चांगलें नव्हे.

माझें घोडें, जाऊंद्या पुढें—घोडें पहा. जेथें तेथें स्वतःचा बडेजाव, पुढें मिरविणें; किंवा सर्वांच्या आधीं आपलें काम करून घेणें.

माझें घ्या आणि मला पंचांत-पांचांत न्या—पदरचें खर्च करून लोकाकडून न्याय मिळवून घेणें; नसती उठाठेव करविणें, करणें.

माझें तें माझें, तुझें तें माझेंच (-माझ्या बापाचें)—तु०-Tails I win, heads you lose. दोन्ही बाजूंनीं स्वार्थ साधणें. "राष्ट्रीय प्रश्न राष्ट्रीय तत्त्वानुसार सुटावे अशी तळमळ सर शिकंदर हयातखान यांना खरोखरी असेल तर 'माझें तें माझें, तुझें तें माझ्या बापाचें' ही वृत्ति त्यांनीं सोडली पाहिजे."-त्रिकाळ १५-१०-३९.

माझें नांव लाड, जेथें पडेल माझें हाड, तेथें साडेतीनशें गांव उजाड—लाड या नांवाचा एक महार होता. तो अतिशय दुष्ट असून त्यानें अनेक गांव ओसाड पाडले होते. यावरून ही म्हण पडली आहे.-मनेवेरिंग ११०३.

माझें नीट नेटकें, तुझें वांकडें तिकडें—मनुष्याला स्वतःचें सर्व चांगलें दिसतें व दुसऱ्याचें वाईट दिसतें.

माझें बापाचा बडिवार मोठा, पदरीं नाहीं सागरगोटा—वडिलांच्या वैभवाचें वर्णन करीत असावयाचें पण प्रत्यक्ष पाहावें तों दारिद्र्यांत गुरफटलेलें असावयाचें; यावरून म्हणतात.

माझें बाळ गोजिरवाणें, दुसऱ्याचें बाळ किळसवाणें—स्वतःचें मूल चांगलें दिसतें व दुसऱ्याचें घाणेरडें वाटतें.

माझें मन नित्य राजी, खातें भाकर भाजी—भाजी भाकर खाऊनहि जो मनुष्य समाधानानें राहतो तो सुखी असतो.

माझें मला होईना अन् पाहुणा दळून का खाईना—माझें मलाच उरकत नाहीं तर मी पाहुण्याची काळजी कशी घेणार ? वाटल्यास त्यानें स्वतःच आपली तरतूद करून घ्यावी. स्वतःच्याच प्रपंचाला त्रासलेला माणूस दुसऱ्याची एखादी गोष्ट अंगावर घेण्यास नाराज असतो.

माझें माझें आणि भ्रांतीचें ओझें—मनुष्याला नेहमीं हें माझें तें माझें असा मायेचा भ्रम लागलेला असतो. मनुष्य या मायिक संसारांत ममत्व धरून गुंतलेला असतो.

माझें म्हणतां भागला, आणि निवांत राहिला—मनुष्य जिवंत असतो तोपर्यंत माझें माझें म्हणून धडपड करीत असतो; परंतु शेवटीं निमूटपणें सर्व येथेंच टाकून मृत्यूच्या स्वाधीन होऊन निघून जातो.

माझें सावकाराशीं (मोल ?) दामदुपटीचें बोल—स्वतःचें वजन सावकाराजवळ आहे अशी फुशारकी पण सावकार कर्जाऊ रकम दामदुपट केल्यावांचून मात्र राहात नाहीं.

माझ्या कामास नांव ना रूप, बोडकीच्या डोक्यास तेल ना तूप—जसें विधवेच्या डोक्यास तेलें

तूप लावीत नाहींत, तसेंच एखाद्याचें काम चांगलें असलें तरी तिकडे कोणी लक्ष देत नसून चांगलें केल्याबद्दलचा उपयोग होत नाहीं.फुकटाचें 'चांगलें' असें सुद्धां कोणाच्या तोंडातून निघत नाहीं. चीज नसलेल्या कामाबद्दल म्हणतात.

माझ्या दरिद्री वहिणीला, कैसें नेऊं वैकुंठाला— श्रीमंताचें काम कोणीहि करतो, गरीबाकडे मात्र कोणी पाहात नाहीं.

माझ्या नाहीं घरांत, शेजारीं धनसंक्रांत— माझ्या घरीं तर खाण्यास नाहींच पण शेजार घरीं धनसंक्रांत आहे. म्हणजे धन राशीला सूर्य असतो त्या काळीं थंडी फार असल्यानें पाय पोटाशीं जुळून निजावें लागते. तसेंच खाण्यास नसलें म्हणजे पोटांत पाय घालून निजण्याचा प्रसंग येतो. ही स्थिति शेजार घरीं आहे असा अर्थ.

माझ्या मनाची मर्जी, मन खातें करंजी—मनुष्य स्वतंत्र असला म्हणजे तो आपल्या मनाप्रमाणें गोष्टी करून मजेंत असतो. त्याला दुसऱ्या कोणाच्या मर्जीवर अवलंबून राहावें लागत नाहीं.

माटव——माटवाऽकल्ला उबून वचप—(गो.) डळमळीत आधार असलेलें नाहींसें होणें.

माड——माड उतरणें-वाहाणें——माडी काढून विकणें.

माडपीर—माडी पिण्याचें व्यसन असणारा.

***माडाक आनी माडयेक एकुची खडु**——(गो.) नारळाला आणि अळवाला एकच खांच. म्हणजे लहान किंवा मोठें कोणी का असेनात, गत एकच.

आडो माडो, समुद्रासारखा वाढो——लहान मुलास न्हाऊं घालतांना, हा चांगला मोठा होऊं दे ! अशा अर्थी वरील आशिर्वाद वाक्य म्हणतात.

मांड—(फौजेची) मांड उठणें——फौज हल्ल्याच्या तयारीनें निघणें.'परशुरामभाऊ पटवर्धन वगैरे,रास्ते,विंचूरकर सुद्धां, वीस हजार फौजेची मांड उठून नबाबाचे फौजेवर धांवले. –पेब १४९.

मांड काडप-घालप—(गो.) दुकान उघडणें.

मांड जमविणें-मांडणें—घोड्यावर नीट बैठक घेणें; चांगलें बसणें.'जमवून मांड घोड्याला।'--संग्रामगीतें १२४. 'दाटती मांड मांडीला।'--ऐपो २३२.

मांड मांडणें—व्यवस्था लावणें. 'मराठ्यांनीं तेथील रियासतीचा मांड मांडून कोरलईची किल्लेदारी जयवंतरावाकडे दिली.'–कोकी १७.

मांडव——चुटक्यांचे मांडव——चुटकी पहा. पोकळ प्रतिष्ठेचें बोलणें. 'मियासाहेबांनीं चुटक्यांचें मांडव यथास्थित रचून'–नि.

मांडव मेढ रोवणें—लग्नादि प्रसंगीं मांडव घालतांना प्रथम मुहूर्तानें एक मेढ रोवतात. यावरून काम करावयास आरंभ करणें; त्यास मनापासून लागणें.

मांडव दळ—लग्नकार्यानंतर येणारा शीणभाग,थकवा; यामुळें फक्त निजून राहावें असें वाटतें.

मांडवदळ लागणें-येणें——दमणें; भागणें; शिणणें.

मांडवावर वेल चढविणें—एखाद्या गरिबाच्या मुलाचे चार चौघांनीं मिळून लग्न करणें.

***मांडव गेला, थाळ गेला, माझा धेंडा नाचूं द्या**——सर्व कांहीं आटपलें तरी स्वतःची बडेजावी सांगणारा. सर्व संपलें तरी माझें पुढें चालूं द्या म्हणणारा. धेंडा पहा.

दोन मांडवाचा वऱ्हाडी उपाशी—दोन्हीकडील पाहुणा एखादे वेळीं उपाशी राहतो. (इकडे जेवला असेल तिकडे जेवला असेल या समजुतीनें.)

मांडा——कोंड्याचा मांडा करुन खाणें——मांडा हा कोंड्याचा होत नाहीं तर रव्याचा होतो. तथापि गरिबीमुळें व सुग्रणपणा दाखवून कोंड्याचाच तो करून खाणें. स्वच्छ रीतीनें तयार केलेलें गरिबांचें अन्न असेल त्यांत समाधान मानून रहाणें;असेल त्या साधनांत चांगल्या रीतीनें सजविणें, वेळ साजरी करणें.

(मनाचा) मांडा मनांत खाणें; मनांत मांडे खाणें—मनोराज्य करणें, सुखाच्या कल्पनेंत दंग असणें. 'परिमल मनचे मांडे चुरूनिया काय फायदा.'–शारदा.

तोंडाचे मांडे; बोलमांडे—बडबड; गप्पा मारणें; थापेबाजी.

***मांडे करणारीचा शेंबूड पुसावा-काढावा-काढला पाहिजे**——ज्याच्याकडून आपणांस काम करून घ्यावयाचें आहे, जो विशिष्ट कामांत कुशल आहे, त्याची मनधरणी केलीच पाहिजे;त्यास खूष ठेविलें पाहिजे या अर्थी.

सुग्रण झाली म्हणून हाताचे मांडे करीत नाहीं—कितीहि कार्यकुशल मनुष्य असला तरी साधनावांचून

कार्य करूं शकत नाहीं. जशी सामुग्री असेल तसेंच कार्य करूं शकतो.

मांडे केले, हात झाडले—काम संपवून मोकळे. आतां कांहीं मागचें राहिलें नाहीं-संबंध नाहीं, याअर्थी.

मांडी——मांडी उघडी करणें—मांडी दाखविणें पहा.

मांडी चेपणें—लग्नसमारंभांत सूनमुखाच्या वेळीं वरमातेला वधूच्या आईनें द्यावयाचें वस्त्र. हें वस्त्र नेसून किंवा खालीं घेऊन वरमाता सुनेस मांडीवर बसविते.

मांडी ठोकणें—आसन स्थिर करणें; बैठक मारणें; बसणें.

मांडी ठोकून-टेंकून उभें राहणें—दंड थोपटून आव्हान देणें; लढण्यास इ. सज्ज होऊन उभें राहणें.

मांडी ठोकून-टेंकून बसणें—(गायन, लेखन इत्यादिकांविषयीं) आपली उत्कंठा, तयारी दाखविणें.

मांडी थोपटणें—मल्लयुद्धाकरितां सज्ज आहे हें दाखवितांना मांडी, दंड थोपटतात; यावरून तयार असल्याबद्दल इशारा देणें. आव्हान देणें.

मांडी दाखविणें—गुह्यांग दाखविणें (व्यभिचारार्थ). २ स्वतःचें व्यंग उघडें करून दाखविणें. ३ निर्लज्ज होणें.

मांडी देणें—मृत्यूसमयीं मुलगा किंवा तसाच वारस किंवा आधारभूत असलेल्यानें मांडीवर डोकें घेतलें म्हणजे मरणारास निश्चिंती वाटते. मांडी देणारा आपण जबाबदारी घेतली असें दर्शवितो. 'वृद्ध व्याकूळ होतां मांडी द्यायासि या समीप रहा।'—मोउद्योग १२·७०. 'मी चुकलें असेन —अपराध केले असतील—ते आतां विसरा. आणखी मला मांडी द्या, म्हणजे मी सुखाची मरेन.' —पकोघे.

मांडी पालटणें—संततीविषयीं नवऱ्याकडून निराश झालेल्या स्त्रीनें संततीसाठीं परपुरुषगमन करणें.

मांडी बांधणें—निश्चय करणें. 'अधिकें जंवजंव औषधी। सेवायाचि मांडी बांधी।' —ज्ञा १८·१५५.

मांडी मोडणें—१ लेखनव्यवसायास योग्य असें दृढ आसन घालणें. २ लिहिण्यासाठीं घातलेली मांडी बदलणें; आसन, स्थान विचलित करणें; आसन बदलणें. 'पंचवीस बंद ते मांडी न मोडतां लिहीत असत!' —कोराके ६४.

मांडीखालचा—सरावाचा; नेहमींचा बसायाचा; पूर्ण संवयीचा (घोडा). 'स्वारीच्या मांडीखालचा घोडा असावा.'

मांडीखालचें घोडें—हाताखालील व्यक्ति, मनुष्य; हातांतील साधन; संवयीची गोष्ट.

मांडीचें उसें करणें; मांडीवर मान ठेवणें—दुसऱ्याच्या मांडीवर आपलें डोकें टेकणें; त्याच्यावर बिनदिक्कत विश्वास ठेवणें; आपली मान दुसऱ्याच्या हातांत देणें. 'स्वराज्याविषयीं तुमचें मांडीचें उसें केलें आहे.' —पेद ६·२.

मांडीवर उसें ठेवून निजणें—अगदीं विश्वास बाळगणें. 'स्वामीचें मांडीवरी आम्ही उसें ठेवून निजावें आमचे मांडीवरी स्वामींनीं ठेवावें.' —रा ८.४९.

मांडीवर घेणें-देणें—एखाद्याशीं बरोबरीनें वागणें.

मांडीवर घेणें-बसविणें—दत्तक घेणें; पुत्र मानणें.

मांडीवर देणें—दत्तक देणें.

मांडीवर मांडी टाकून-घालून बसणें—(रूढ) अंडावर अंड ठेवून बसणें. निरुद्योगी, स्वस्थ बसणें. आळसांत वेळ घालविणें.

मांडीस मांडी टेंकून-लावून बसणें—१ एखाद्याशीं स्पर्धा करणें, टक्कर देणें. २ बरोबरी करणें. 'पायचीं माणसें मानकऱ्यास मांडीस मांडी लावून बसलें हे चाल चांगली नाहीं.'—हब ५०,

*(**आपली**) **मांडी उघडतां आपणासच लाज वाटते**—स्वतःचीं दुष्कृत्यें उघड करतांना स्वतःस लाज वाटते; स्वतःचीं व्यंगें उघडकीस आणण्याचें कर्म कठीण आहे.

माडू——सोयऱ्यांत साडू, हत्यारांत माडू, भोजनांत लाडू—यावेळीं या गोष्टी शोभून दिसतात, प्रिय वाटतात, महत्त्वाच्या असतात.

मांडूक——मांडूक म्हणता 'हांव रडतां त्यामितीं पावस पडता.'—(गो.) बेडूक म्हणतें, 'मी ओरडायला लागलों कीं पाऊस पडतो.' म्हातारीनें म्हणावें 'माझा कोंबडा आरवतो म्हणून सूर्य उगवतो' त्याप्रमाणें. आपल्याकडे उगीच श्रेय घेणें.

माणकी——माणकीस बोललं, झुणकीस लागलं

—(व.) एकाला उद्देशून बोललेलें दुसऱ्यास लागणें; अप्रत्यक्ष भाषण करणें. तु०—लेकी बोले सुने लागे.

माणिक——कोळशांतलें माणिक—अनेक निरुपयोगी, किंवा निकृष्ट वस्तूंच्या समूहांत एखादी बहुमोल वस्तु असणें.

माशानें माणिक गिळणें—माशानें एकदां माणिक गिळल्यावर तें जसें परत मिळत नाहीं त्याप्रमाणें एखाद्याकडे गेलेली वस्तु परत मिळणें अशक्य असणें.

पदरीं माणिक बाळगणें—चांगला विद्वान् मनुष्य जवळ ठेवणें; ठेवून घेणें.

माणूस——माणूस काणूस ओळखावें-जाणावें-पाहावें-ध्यानांत धरावें—माणसा-माणसांतील भेद लक्षांत आणावा; कोण चांगला, कोण वाईट ओळखावा.

माणसाकाणशीं——मानवी प्राण्याकडून.

माणसाचा अवतार-कांदा-लेक—ठोंब्या, दगड मनुष्य.

माणुसाचें काणूस होणें——मनुष्य ओळखूं येत नाहींसा होणें; आजार, दुःख, काळजी यांमुळें मनुष्य किडकिडीत, कृश होणें; दरिद्री व दुःखी होणें.

माणसांत पडणें—स्थिर स्थावर होणें; आप्तमंडळी जवळ राहणें; स्वकीयांत येणें.

माणसांतून उठणें—स्वैराचारानें वागणें; माणुसकी सोडून वर्तन करणें; मनुष्यास न शोभेल असें वागणें.

भरल्या माणसांतून उठविणें-काढणें-घालविणें——समाजांतून बाहेर टाकणें; मंडळींतून उठविणें; वाळीस टाकणें.

माणसानें काय बोलावयाचें——— (बायकी) १ आतां कांहीं बोलावयाचें उरलेंच नाहीं या अर्थी उद्‌गार. हद्द झाली, सीमा झाली, अखेर झाली याअर्थी. २ आतां यापुढें शब्द करणें -काढणें व्यर्थ.

***माणूस पाहून बोल, झाड पाहून घाव**——मार्गे, मनुष्य पहा.

माणूस फिरलें तर फिरलें पण घराचें वासेहि फिरले——(व.) घरांतल्या मुख्य माणसाची नाराजी झाली ती झालीच. पण त्यामुळें घरांतील लहानमोठीं सर्वच माणसें विरुद्ध झालीं. दैव प्रतिकूल झालें कीं सर्व गोष्टी प्रतिकूल होतात.

माणसाचा येवा बरा पण जावा खोटा——आपल्याकडे पाहुणा मनुष्य आला असतां आनंद होतो पण तो दूर जाण्याच्या वेळीं सर्वांसच वाईट वाटतें.

माणसांत न्हाऊ, पांखरांत काऊ——काऊ पहा.

माणसांत न्हाऊ, जनावरांत कोल्हूं (कोल्हा)—माणसांत न्हावी व जनावरांत कोल्हा मोठा धूर्त असतो.

माणसांतला रांड्या, बायकांतला पांड्या-देशपांड्या—[पांड्या=पाटील, पटवारी] पुरुष मंडळींत कांहींच चालत नाहीं पण बायकांत मात्र बढाई मारणारा.

माणसानें म्हणावें अन् देवानें दुणावें——मनुष्य चिंतितो एक पण परमेश्वर करतो निराळेंच. —पाआमा ५।६.

माणसाला वंग आणि घोड्याला तंग—मनुष्य वंग भस्मानें बलवान् होतो व घोड्याला तंग बांधला असतां तो नीट अवसानांत येतो.

माणसासारखा माणूस, मग पाण्यासारखा कां मुततो ?——पुरुष जर खरा तर इतका कां भित्रा ?

माणें——माणें पडप-लागप—(गो.) गुंगी येणें.

मात——मात करणें—बुद्धिबळाच्या खेळांत शत्रुचे हातीं घोडा वगैरेंनीं राजाचा प्रतिबंध केला असतां डाव होतो ती मात. १ (ल.) अचाट कृत्य करणें. २ वरकडी करणें; प्रतिपक्ष्याला चीत करणें.

मात खाणें—पराजित होणें.

मातणें——मातलेल्या हुंदराक हत्ती म्हणून जातां—(गो.) उंदीर माजला तरी तो हत्ती होत नाहीं.

मातल्या घरीं वाण देऊन काय उपयोगी—ज्याला एखाद्या गोष्टीची पर्वा नाहीं त्याच्या करितां ती गोष्ट करण्यांत अर्थ नाहीं.

बोकड माते आणि आपल्या तोंडीं मुतें——मूर्ख मनुष्य वैभवास चढला असतां फार मूर्खपणाचींच कृत्यें करतो.

माता——माता माउली, फजित पांवली, आस्तुरीनें दुनिया दाविली—मनुष्याला आईपेक्षां बायकोचें कौतुक अधिक वाटतें.

माता वर पाहे संपतीवंत : कन्या वर पाहे वयसा युक्त—(महानु.) आईला जांवई पैसेवाला पाहिजे असतो तर मुलीला तो आपल्या वयाला योग्य असा हवा असतो. तु०—कन्या वरयते रूपं माता वित्तं पिता श्रुतं ।

न मातुः परं दैवतम्—आईपेक्षां श्रेष्ठ दैवत नाहीं. आईची तुलना कशाशींहि होऊं शकत नाहीं. सबंध श्लोक-नान्नोदकसमं दानं न तिथिर्द्वादशीसमा । न गायत्र्याः परो मन्त्रो न मातुः परं दैवतम् ॥

जगांत शोधुनि पाहीं : मातेसारखें दैवत नाहीं : (महानु.) न मातुः परं दैवतम् ।

माती——माती आड करणें-घालणें-टाकणें-ठेवणें—१ (शब्दशः व ल.) मातींत ठेवणें; पुरणें; मातीनें आच्छादणें, झांकणें (प्रेत, धन, ठेवा इ.) २ विसरून जाणें; पुनः पुनः त्याच गोष्टींचा उल्लेख न करणें.

(वर) माती ओढणें—बुझविणें; (दुष्कृत्यांवर) पांघरूण घालणें. (बांदावर माती ओतल्यामुळें गवत चांगलें येतें.)

माती करणें—१ (एखाद्या वस्तूची) नासाडी करणें; तिचा सुखावहपणा हिरावून घेणें. 'न करील कां पित्याची दुर्गतिची मांडली सुरा, माती॥'–मोविराटं १·५९. २(व.) प्रेत दहन करणें; मूठमाती देणें; पुरणें.

(अन्नांत) माती कालवणें—एखाद्याच्या उपजिविकेचें साधन नाहींसें करणें; पोटावर पाय आणणें.

माती खाणें—१ हीनदशा भोगणें. २ पराभव पावणें.

तोंडांत माती घालणें—१फार शोक करणें. २ एखाद्याचा नाश करणें; त्याला बुडविणें.

माती चारणें—धुळीला मिळविणें; नाश करणें 'भानूनें दिलेली मिठाई खाऊन विसूभाऊ त्याला माती चारील.'–अस्तंभा ४९.

माती चारविणें-खावयास लावणें—मल्लयुद्धांत सामनेवाल्यास खालीं घेऊन मातीवर लोळविणें.

माती जड होणें—मरणोन्मुख मनुष्याचें शरीर जड होणें; मरणाच्या दारीं असणें.

माती टाकणें-घालणें-लोटणें—१ बुझविणें. २ (कलह अपराध इत्यादिकावर) पांघरूण घालणें; विसरण्याचा प्रयत्न करणें.'ह्या वादावर आतां माती लोटली पाहिजे. ३ पुरणें

तोंडांत माती पडणें—नाश, नुकसान होणें; प्राप्ती बुडणें;

मातींत माती मिसळणें—प्रेत पुरणें; और्ध्वदेहिक, उत्तरक्रिया करणें,

माती होणें—मातीला मिळणें. १ नाश होणें. 'जें अनया कारण त्याची पळांत हो माती।'–मोआदि ३३·६०. २ खराबी होणें. 'यालागीं श्रवणाची होय माती। परमार्थ प्राप्ति त्यां कैची॥'–भाराबाल ११.१३०. ३ बेकार होणें.

मातीचे कुले—खरा रक्ताचा संबंध किंवा इतर जिव्हाळा नसल्यानें नुसते आम्ही तुमचे असे म्हणणारे लोक, आप्तेष्ट. बळेनें जोडलेले लोक. खरा प्रेमभाव नसून वरवरचें प्रेम दाखविणारी मंडळी. ही संकटाच्या वेळीं मुळींच उपयोगी पडत नाहींत.

मातीचे कुले चिकटविणें—खरा रक्तमांसाचा अवयव अंगाला कायमचा जोडून राहील; पण माती वगैरेचा कसा चिकटून राहील? तो पडणारच. यावरून ओढून ताणून नातें जुळविणें, संबंध राखणें (व्यर्थ).

मातीच्या मोलानें विकणें-देणें—हलक्या दरानें, कमी किंमतीनें विकणें. 'पैशाची फार जरूरी होती, म्हणून मला आपलें सामान मातीच्या मोलानें विकावें लागलें.'

मातींत मिळणें—माती होणें; नाश पावणें. 'मातीच तूं बा! मातींत मिळशिल'–फटका. मातीला मिळणें पहा.

मातींत मिळविणें—धूळ चारणें; पराभव करणें. 'मातींत मिळवुनी यावे।'–संग्राम गीतें ४५.

मातीला देणें-जाणें-येणें—(कर.) प्रेत पुरणें; मढें पुरणें; प्रेतयात्रेला जाणें. 'मातीला गेलों होतों–' 'काल माती दिली–''मातीला चला.' मोत पहा.

मातीला मिळणें—माती होणें; चक्काचूर होणें; अगदीं नाश पावणें. 'मुसळधार कोसळणाऱ्या पावसांत टिकाव धरून राहणारी इमारत दारूच्या शिंतोड्यांनीं मातीला मिळेल!'–एकच प्याला ४.४.

***अति तेथें माती**—कोणत्याहि गोष्टीचा अतिरेक झाल्यानें नुकसान होतें. अति पहा.

जित्या रोटी आणि मेल्या माती—जिता पहा.

दरीची माती दरींत आटते—जेथील गोष्ट तेथेंच पुरते, सरते, लागते.

माति व्हावुनु गुड्यार घालेलि संगति—(गो.) माती वाहून डोंगरावर नेऊन घालणें. जलताडन वगैरे-सारखें निरर्थक व वेडेपणाचें कृत्य.

माती सोण्णु मडकें ना, जीव सोण्णु देवु ना—(गो.) मातीवांचून मडकें नाहीं, आणि जिवावांचून शिव नाहीं.

मातीचे कुल्ले लावल्यानें लागत नाहींत—आपलेपणा मनापासून वाटला पाहिजे; उगाच वरवर दाखवून कांहीं उपयोगी नाहीं.

मातेरें—मातेरें करणें—नाश करणें; धुळीस मिळवणें; दुर्दशा करणें. 'फोडुनि कवच, पळें करि पार्थ खळाचें पळांत मातेरें॥'–मोद्रोण १०·८१·–जै ८८·३५.

मात्रा—मात्रा चालणें—मात्रा लागू पडणें; मात्रेचा परिणाम होणें. 'त्या दुरात्म्याचे यत्न किती पक्केपणाचे आणि कितीही गूढ असले तरी त्यांची मात्रा माझ्यावर काय चालणार आहे?'–शिसं २.१.

मात्रा चालूं न देणें—बल चालूं न देणें; पक्षाचे बेत हाणून पाडणें.

मात्रा न चालणें—वैद्यानें रोग्याला दिलेली मात्रा लागू न पडणें; इलाज न चालणें; सामर्थ्याची प्रौढी कुचकामाची ठरणें. 'पेशव्याच्या सैन्यापुढें आपली मात्रा चालत नाहीं हें पाहून... हैदर पिसाळलेल्या वाघाप्रमाणें चवताळला.' –परशुरामभाऊंचे पराक्रम.

मात्रा लागू पडणें—मात्रेचा गुण येणें. (ल.) इलाज यशस्वी होणें.

मात्रा वर असणें—वर्चस्व असणें.

माथण—माथनी एवढी बायको नाहीं कामाची (पण कातणी एवढं पोर कामाचं)—(व.) [माथण–मोठा घडा. कातणी=कोळी जातीचा किडा. एक क्षुल्लक प्राणी.] स्त्री कितीहि मोठी व सशक्त असली तरी जेथें निवळ धिटाईनें किंवा रुबाबानें काम निभावून न्यावयाचें असतें तेथें तिचा उपयोग होत नाहीं. तेंच एखादा लहान मुलगा असला तर तो काम निभावून नेतो.

माथा–थें—माथा–थें तुकविणें—मान हालविणें आनंदानें मस्तक डोलविणें. 'तियांचे भाओवाणिता। कवीसी माथा तुकाविणें!' –शिशु ६००·

माथां–थीं मारणें—१ एखाद्यावर सोपविणें, विश्वासणें; हवालणें; लावणें; अंगावर टाकणें (काम, धंदा). २ एखाद्यावर घालणें, लादणें (दुष्कृत्य इ.).

माथां वाहाणें—फुलें इ० डोक्यावर टाकणें; समर्पण करणें. 'वाईट इयेनीं माथां धीर गुरु म्हणोनि वाहिला काय?'–मोभीष्म ११·१२१.

(उजळ–उजळता) माथा होणें—आलेला अपवाद इ. दूर होणें.

माथीं बसणें—एखाद्यावर लादणें जाणें.

माथें करणें–बोडविणें—श्मश्रु करविणें. डोकें तासून घेणें.

माथें दुखतें–ठणाणतें–उठतें—सहन होत नाहीं; सोसत नाहीं; मानवत नाहीं. कपाळ उठणें पहा.

माथें फिरणें–भडकणें—वेड लागणें; अतिशय रागावणें.

माथ्याक मिरी लागप—(गो.) डोक्याला मिरी लागणें; आजारी पडणें.

माथ्यांत राख घालणें—(प्र.) डोक्यांत राख घालणें; वैतागणें.

माथ्यावर चढविणें–चढवून–बसवून घेणें—मुलांचें फाजील कोड कौतुक करून त्यांना वाईट वळण लावणें. डोकें पहा.

माथ्यावरचा पदर टाकणें–उतरणें–पडणें—स्वैर होणें; वेश्या बनणें. (पूर्वी बहुतेक सभ्य स्त्रिया डोकीवरून पदर घेत यावरून).

माथ्या वैयलयान हुवार वचप—(गो.) डोकीवरून पाणी जाणें; गंगेंत घोडे न्हाणें. एखाद्या कामाची (मेहनतीची) शिकस्त होणें या अर्थी.

***उरीं केस, माथां टक्कल**—ऊर पहा.

माथां समर्थांचा शिक्का, धाक पडे ब्रह्मादिकां—समर्थाचें घरचें श्वान। त्यास सर्वही देती मान॥ याप्रमाणें.

माथें पडी विश्वदेवा—(गु.) पदरीं पडलें पवित्र झालें, याप्रमाणें.

माथ्याचें दुखणें बरें होईना मुगुटानें, पायाचें न

सुवर्ण जोड्यानें—डोकें दुखूं लागल्यास तें सोन्याच्या मुकुटानें बरें होत नाहीं तसेंच पायाचें दुखणें सोन्याच्या जोड्यानें बरें होत नाहीं.वरवरच्या श्रीमंती उपायांनीं मनाची जखम भरून येत नाहीं. त्यास योग्य तो उपाय करावा लागतो. सर्व गोष्टी पैशानें साध्य होत नाहींत.

पोटांत जळे; माथ्यांत कळे—पोट पहा.

माथ्याक ना तेल आनी मिशाक गंधेल—(गो.) डोक्याला तेल मिळायची पंचाईत आणि मिशांना अत्तर लावून हिंडायचें, हा मूर्खपणा.

माथ्यार पडल्यार पायपासून पावता—(गो.) डोक्यावर ओतलें कीं तें आपोआप पायांपर्यंत येतें. मुख्याला आपलासा केला कीं त्याच्या अंकित असलेले सगळे लोक आपणास साह्य करतात.

माथ्यार पदर, गांड उक्ती—(गो.) डोक्यावर पदर पण ढुंगण उघडें. वरचा देखावा उत्तम राखणें पण आंत कांहींच अर्थ नसणें.

मात्थारिं दांतें दवरून घेवनु, जडु जालेलो जांवई—(गो.) डोक्यावर जातें घेऊन जड झालेला जांवई. शहाणपण किंवा मोठेपणा हीं उसनीं आणलीं म्हणून त्यांचा उपयोग होत नाहीं. तीं अंगीचींच असावीं लागतात.

मात्यारि मारल्यारि जीब फुट्टना—(गो.) डोक्यावर मारलें म्हणून जीभ फुटत नाहीं.

माथ्यावेलें खांदार आयलें—(गो.) ओझें माथ्यावरचें खांद्यावर आलें. वस्तुतः भार कमी झाला नाहीं. पण या अवयवावरचा त्या अवयवावर गेल्यामुळें थोडा कालपर्यंत सुसह्य झाला इतकेंच. डोकें पहा.

मादरचोद—**मादरचोद देवाला त्रेपन टिकल्यांचा पुजारी**—(अशिष्ट.) जसा देव तसा पुजारी.

मादरचोदाची आई पासली पाडून लोळवावी—दुष्टास दुष्टपणानें वागवावें. दुष्टे दुष्टं समाचरेत् ।

मांदरी—**मांदरी कवळप**—(गो.) [मांदरी=चटई.] अंथरूण गुंडाळणें. गाशा गुंडाळणें पहा.

माधुकरी—**माधुकरीचें आणिलें आणि अर्धें पोट भरिलें**—भिक्षेनें कधीं पोट भरत नाहीं

माधेजन—**माधेजना बुद्धिहीना, आधीं पत्राळ मग डोणा**—[माधेजन=माध्यंदिन, यजुर्वेदी. पत्राळ=पत्रावळ. डोणा=द्रोण] यजुर्वेदी प्रायः बुद्धिहीन मंद बुद्धीचे अशी समजूत. तसेंच त्याची पद्धत आधीं पत्रावळ लावून मग द्रोण लावण्याची असते. याच्या उलट ऋग्वेद्यांची पद्धत आधीं द्रोण लावून मग पत्रावळ लावावी. यजुर्वेद्यांच्या कोणा द्वेष्ट्या ऋग्वेद्यानें यजुर्वेद्याला चिडविण्यासाठीं ही निंदात्मक म्हण उपयोगांत आणली असावी.

माध्यंजनाची बोडखी, ऋग्वेद्याची पालखी—(व.) एकाचे जे दुष्ट ते दुसऱ्याचे सुष्ट. एकाचा शकुन तो दुसऱ्याचा अपशकुन. ऋग्वेदी आणि माध्यंदिन या दोघांत इतकें वांकडें आहे.

मान—**मान आडकणें**—पेंचांत,संकटांत सांपडणें.

मान कंवर एक करप—(गो.) मान खालीं वांकवून कामास लागणें.

मान कांट्यावर नसणें—(एखाद्यानें) अतिगर्विष्ठ, उद्दाम किंवा मगरूर असणें.

मान कापणें—१ एखाद्याच्या उपजीविकेच्या साधनाचा नाश करणें; मुंडी मुरगाळणें. 'पार्थ बहु भला तुमच्या तो आजि अपार्थ कापिता माना।' —मोविराट ६·४१. २ विश्वासघात करणें; फसविणें. मोठी हानी करणें. 'तुज उत्तरे! मुलि! दिल्हा स्यां कापायास मान विश्वास!' —मोद्रोण४·४·

मान कापून टाकणें—देणें—मान कापण्याइतका त्याग दाखविणें; आपलें खरेंपण सिद्ध करण्याला वाटेल ती गोष्ट करण्यास तयार असणें. 'मीं आपला...किंवा मान कापून टाकली तरी तुला माझें म्हणणें खरें वाटणार नाहीं. —शाब १·२३८.'

मान खालीं घालणें—१ डोकें खालीं घालणें; नांगी पडणें. २ (ल.) अपमान सहन करण्याचा प्रसंग येणें.

मान चोळणें—(व.) कांकूं करणें.

मान टाकणें—थकणें; शक्तिहीन, निर्बल होणें.

मान टोकाविणें—मानेनें खुणा करणें.

मान डोलावणें, हालविणें—१ रुकार, पसंती, प्रशंसा करण्यासाठीं मान हालविणें; पसंती दर्शविणें; वाहवा, कौतुक करणें. २ कबूल करण्यास भाग पाडणें.

मान ताठ ठेवणें--स्वाभिमान राखणें.

मान तुकविणें—वाहवा, कौतुक करणें. 'काय जिणें जर न घडे करणी तुकवी जियेस जग मान !'–विक ६५.

मान धरणें—१ (ल.) ऐन आणीबाणीच्या प्रसंगीं एखाद्यास अडविणें. २ मानेस कांहीं विकृति झाल्यामुळें ती आखडणें, इकडे तिकडे वळवितां न येणें.

मान धरणें; मानगुटी धरणें--पेंचांत पकडणें; करावयास भाग पाडणें.

मान मुरगाळणें–मोडणें—१ मारणें. (एखाद्याचा) आशाभंग करणें; नाश करणें. २ पूर्णपणें लुटणें; बुडविणें.

मान मुरडणें–मोडणें– १ मुरका मारणें; मान वेळावणें. २ नापसंती दर्शविणें; नाकारणें.

मान मोडणें--१ (राखून ठेवलेला पैसा इ.) नाइलाजास्तव किंवा नाखुषीनें खर्च करणें. 'पांचशें रुपयांची मान मोडली तेव्हां लग्न झालें' २ थोडक्या खर्चासाठीं मोठ्या नाण्याला हात लावणें. 'चार पैशाकरितां रुपयाची मान मोडावी लागली.'

मान मोडून करणें--एकसारखे पुष्कळ वेळ एकाग्रतेनें करणें (काम इ.)

मान वर करणें–काढणें—१ गरिबींतून वैभवास चढणें; दिमाख दाखविणें. २ दुखण्यांतून उठणें; डोके वर करणें ३ बरोबरीच्या नात्यानें बोलणें, पाहणें.

मान वर न करणें—लज्जेनें किंवा नम्रपणानें वागणें.

मान वांकडी करणें—१ संमति अथवा रुकार दाखविण्यासाठीं डोकें एकें बाजूस वळविणें. २ असंमति दर्शविणें.

मान वांकविणें--कबूल करणें; मान्यता दाखविणें; (बहुधा नाइलाजणें) अनुसरणें; नम्र होणें. 'ह्या परिस्थितीसच मान वांकविली पाहिजे.' 'पेशव्यांनासुद्धां नानांच्या अधिकारापुढें मान वाकवावी लागे.'–अस्तंभा ५.

मान सोडविणें—एखाद्यास अडचणींतून, पेंचांतून मुक्त करणें.

मानाचें पान--मान दर्शविण्याकरितां समर्पण केलेली लहान वस्तु. या वस्तूंच्या मोलावर मानाचा दर्जा नसतो. म्ह०–'मानाचें पान गोड.'

मानावर जाणें--(खा.) इष्ट देवतेचा नवस फेडणें.

मानेचा कांटा ढिला होणें--वांकून काम करण्यानें मान दुखणें; अतिशय काम पडणें.

मानेचा कांटा पडणें-- मृत्यु येणें.

(खालच्या) मानेनें चालणें–पाहणें--१ नम्रतेनें विनयानें, सलज्जतेनें चालणें. २ खालीं मान घालून, लाजेनें चालणें.

मानेवर खडा ठेवणें--(काम करतांना इकडे तिकडे पाहूं नये म्हणून.) सक्तीनें करून घेणें.

मानेवर खडा ठेवून काम करून घेणें--अतिशय राबवून घेणें.

मानेवर तलवार–सुरी ठेवणें—एखाद्याला धमकी देणें, भिवविणें; नाश करावयास सिद्ध होणें. 'मलिकंबरानें माझ्या मानेवर तरवार ठेवून जबरदस्तीनें माझ्याकडून तुझा हात मालोजी भोंसल्याच्या पोराच्या हातांत ज्या दिवशीं देववला त्या दिवसापासून तूं मला नकोशी झाली आहेस.' –शिसं २·४.

मानेस झटका देणें--१ बेपर्वाई दाखविणें. २ तोफेस लावणें.–इंप ५.

मानेस–मानगुटीस बसणें--१ गळीं लागणें; खनपटीस बसणें. २ (भूत, पिशाच वगैरेनीं) झपाटणें; पछाडणें. ३ गळ्यांत येणें; डोईवर ओझें पडणें; अवश्य कर्तव्य असणें (करावयाचें काम).

***मान घे मुळ्या, म्हजे मारूंदे उड्या**--जों जों सैल सोडावें तों अधिकच मगरूर होणें.

दे मान तर घे मान, नाहीं तर बस कुत्र्या-समान--स्वतःला दुसऱ्यांनीं मान द्यावा असें असेल आपण दुसऱ्याला तो दिला पाहिजे. He respects him self who respects others,

मान जना, अपमान मना (सांगावा); **मान सांगावा जना, अपमान सांगावा मना; मान सांगावा जनांत, अपमान ठेवावा मनांत**—आपल्या मानाची गोष्ट बाहेर बोलावी पण अपमानाची मनांतच ठेवावी. आपलें चांगलें तेंच बोलावें; म्हणजे लोकांत आपली प्रतिष्ठा राहते.

मानाची भाकर, अपमानाची, तुपसाखर—अपमान होऊन तुपसाखर मिळण्यापेक्षां आदरानें दिलेली

भाकर अधिक गोड लागते. अपमान होऊन वैभव मिळविण्यापेक्षां गरीबींत सन्मानानें राहणें श्रेयस्कर.

मानाची मानाई, महाराची विनाई—(व.) विनाई या देवतेचें महार लोकांत मोठें माहात्म्य मानलें जातें व तिची मोठी मानमान्यता केली जाते. त्यावरून मानाकरितां हटून बसणाऱ्या व्यक्तीला म्हणतात.

मानाचें पान गोड—आदरानें दिलेली क्षुल्लक गोष्टहि आदरानें स्वीकारावी.

मानानें पान खायचें नाहीं, अपमानानें देठ खायचा—आदरानें चांगली गोष्ट सांगत असतांहि ती न मानतां मग अनादर करून घेऊनहि हलकी गोष्ट पतकरावयाची. ज्यास आपला मान ठेवून घेण्याचें कळत नाहीं तो वेळेवर हट्ट करून अपमान करून घेतो.

मानें न खाई पानें, पडपडल्याच खाई कांदे—वरप्रमाणें. आदरानें वागवीत असतां झिडकारावयाचें व मग निमूटपणें सर्व गोष्टी सहन करावयाच्या. कांदे खाण्यांत आनंद पावण्याइतक्या नीच स्थितींत आलेल्या गर्विष्ठ माणसासंबंधीं योजतात.

मानेवर गळूं आणि पायाला जळू—रोग एकीकडे आणि उपाय भलतीकडे.

मानेवैले केंस फाटीर ना जाल्यार पोटार—(गो.) मानेवरचें केंस एकतर पाठीवर पडतील, नाहीं तर पोटावर तरी पडतील. आपणच आपल्या मुलांना व नातेवाईकांना मदत करून सांभाळलें पाहिजे. ते व त्यांचें नशीब म्हणून त्यांस सोडून देतां येणार नाहीं.

मानोपि महतां धनम् (हिं.)—(सं.) श्रेष्ठ लोकांची संपत्ति म्हणजे त्यांचा मान होय. संबंध श्लोक असा–अधमा धनमिच्छन्ति धनमानौ च मध्यमाः। उत्तमा मानमिच्छन्ति मानोहि महतां धनम्॥

मानणें—मानला तर देव, नाहीं तर दगड-धोंडा—परमेश्वराचें अस्तित्व भक्तीवर, देव मानण्यावर अवलंबून आहे. मूर्तीला देव मानला नाहीं तर तो नुसता दगडच दिसणार. त्यावरून एखाद्या वस्तूला विशिष्ट महत्त्व दिलें, दैवत मानलें तर ती वस्तु मानार्ह ठरणार हें उघड आहे. 'माझें व तुझें देवाच्या घरचें नातें असें आहे कीं, मीं तुला सांगावें आणि तूं माझें निमूटपणें ऐकावें. पण मानला तर देव नाहीं तर धोंडा !'–संभाजी.

मानल्यावर देव, ना जाल्यार फातोर—(गो.) वरप्रमाणेंच.

मानलें तर सुख, नाहीं तर दुःख—संसारांत सुख आणि दुःख हीं मानण्यावर अवलंबून आहेत.

मानभाव—महानुभाव पहा. **मानभावाची बायको**—मानभावाची बायको स्वतःचा उदरनिर्वाह भिकेवर स्वतःच करते; नवऱ्यावर तिचा कांहीं बोजा नसतो. यावरून १ स्वावलंबी, स्वतंत्र स्त्री. २ बिनखर्ची उपयोगी पडणारी व्यक्ति, जनावर इ.

मानभावी कावा–मत—आंत एक, बाहेर एक असें वागणें; कपटी वर्तन; डावपेंच. (महानुभाव पंथीयांचें वागणें असें असतें अशी जुनी समजूत)

***मानभावाची बायको आणि गाढवाचें जिरप**—हीं कोणाच्या अंगावर नसतात. जितरब पहा.

करणी कसाबाची, बोलणीं मानभावाचीं; करणें कसाबाचें, बोलणें मानभावाचें—करणी पहा.

मानाय—मानायानी शेतां आनी बटकींनीं घरां जातात—(गो.) मजूर–नोकरांवर विश्वासलें म्हणजे शेतें जातात व बटकींच्यामुळें घरें जातात.

मान्य—मान्य असे तें बोलावें, अमान्य मार्गें न चालावें—जें सर्वमान्य असेल तेंच करावें व बोलावें; उगीच लोकविरुद्ध आचरण करूं नये.

माप—माप कुतऱ्यानें नेणें—एखादी गोष्ट भूतकाळांत समाविष्ट होणें; गतगोष्टींच्या सदरांत पडणें.

माप पदरांत–पदरीं घालणें (लबाडी इ. चें)—साक्षीपुराव्यानिशीं पटवून देणें; सत्यता सिद्ध करून देणें. 'पण त्यांच्या लबाडीचें माप त्यांच्या पदरांत बाजार निरखानें घालण्यास दुसरा पुरावा नव्हता.'–पामो ६२.

माप भरणें—(ल.) आयुष्य संपणें.

माप लागणें; मापीं लागणें—कमी कमी होत जाणें. 'मापीं लागलें शरीर।'–दा ३.९

***माप आणि महापाप; माप पाप**—खोटें माप देणें हें महापातक आहे. (गु.) माप, ने पाप.

मापटें—मापटें बडविणें; मापट्यावर हात घेणें—शंख ठोकणें.

***आपलें तें मापटें, दुसऱ्याचें तें दीड पायली**—

आपली वस्तु लहानशी व गोड दिसते पण तीच दुसऱ्याची फताडी व वाईट दिसते.

माभळभट्ट—कृष्णावतारांत कृष्ण गोकुळांत असतांना एक राक्षस टिळेमाळा असलेल्या भटाचें सोंग घेउन आला होता तो. यावरुन माभळभट्टी म्हणजे ढोंगीपणा.

माभळभटी गंध—कपाळ भरुन लावलेलें गंध.

***लोकाच्या गायी, माभळभट दान देई**—हलवायाच्या घरावर तुळशीपत्र, याप्रमाणें.

मामंजी—मामंजी मामंजी ! बघा माझे डोळे, विका हातांतले वाळे—स्वतःचें कौतुक सांगणाऱ्या सुनेबद्दल म्हणतात.

मामंजी मामंजी ! बघा माझे हात, विका कणग्यांतलें भात—वर पहा.

मामुंजी मामुंजी ! लग्न करा, तुम्हीच बाईल व्हा—भटजी पहा.

मामला—मामला बुडणें—काम नासणें; नुकसान होणें. 'तेथपर्यंत त्यानें पल्ला गांठला कीं, साराच मामला बुडाला.'–शि सं ३-४.

धकाधकीचा मामला—धकाबुकी,झोंबाझोंबी,धांगडधिंगा अशी स्थिति. ज्याला करवत नाहीं, सोसत नाहीं त्यानें चळवळ, राजकारण इ.त पडूं नये. 'धकाधकीचा मामला । कैसा घडे अशक्ताला ॥'–दा १९.१०.२२.

***चोरीचा मामला, हळुहळु बोंबला**—चोरी पहा.

मामा—मामा बनविणें—चेष्टा करणें; पाठीस लागून वेडा करणें.

कामापुरता मामा; कामापुरता मामा आणि ताकापुरती आजीबाई—मतलबापुरतें गोड बोलणें, आदर दाखविणें. काम पहा.

सगळा गांव मामाचा, एक नाहीं कामाचा—गांव पहा.

मामाचा वशिला, आला नाहीं कामाला—वरप्रमाणेंच.

मामाचे घरीं, भाचा कारभारी—भाचा पहा. भलत्याच्याच हातांत विशेषतः लहान व लाडक्या मुलाच्या हातांत कारभार असला म्हणजे तो बिघडतोच. [मातृवंशपरंपरेंत मामानंतर घराचा कारभार भाच्याकडेच वारसानें येतो. कांहीं जातींत (उदा० गारो) भाचा मामाच्या मृत्यूनंतर कायद्यानें मामीचा नवरा होतो.]

मामाच्या म्हशी, भाचीला उठाबशी—व्यर्थ खटाटोप; पाटलाचें घोडें महाराला भूषण–अशा अर्थी.

मामी—मामी मामी एकीकडे व्हा, इचे आईचे गांडींत काठीं घालूं द्या !—(अशिष्ट.) मूर्खपणाची गोष्ट करणें.

माम्या मावशा आहे पण आईची सर कोणा नये—आईसारखें प्रेम कोणी करूं शकत नाहीं.

मामूल—मामूली वहिवाटप्रमाणें—परंपरेप्रमाणें; रूढीप्रमाणें; पूर्वी चालत आल्याप्रमाणें.

माय—माय पोट—एकाच आईच्या पोटीं चांगलीं व वाईट मुलें निपजतात. यावरून सर्वांचा समावेश होणारें काम धंदा इ.; सर्वांना आश्रयस्थान. 'जे अचिंता अनाथांचें मायपोट ।'–ज्ञा ८.१९५.

मायबहिण घेणें—(व.) आईबहिणीवरून शिव्या देणें.

माय मावशी नाहीं; माय मावशी पहात नाहीं—विषयवासना तृप्त करण्यासाठीं अगम्यगमन सुद्धां वर्ज्य न करणाऱ्या दुराचरणी मनुष्यासंबंधीं म्हणतात.

माय विणें—१ आई प्रसूत होणें; मातेनें विशिष्ट गुणांनीं युक्त अशा पुत्रास जन्म देणें. 'परंतु धन्य ! रजपुताची माय रजपुतासच व्याली ! असें गनिमास होतें तरी धुरोळा दृष्टीस पडूं न देते.'भाब ११. २ (ल.) (एखादें काम करण्याविषयीं) छाती, धाडस, हिंमत होणें. 'मला शिवी देण्याला कोणाची माय व्याली आहे पाहतों.'

कोणाची माय व्याली आहे—कोण असा आहे (कीं जो हें करील).

मायेचा–मायचा पूत—(आव्हान करतांना वापरतात) १ खऱ्या आईचा मुलगा. (ल.) पराक्रमी, प्रतापी माणूस. 'असे परिणाम उत्पन्न करणारा कायदा कोणत्या मायेचा पूत निर्माण करण्यास तयार आहे.'–टि ४.९२. २ निंदा, उपहास, इ. अर्थांनेंहि वापरतात.

***माय कापी गळा, तेथें कोण रक्षी बाळा**—मुलाचा घात करूं लागल्यास कोण वांचविणार. तु०–राजा लुटी जरि प्रजाजनाला ।

माय तशी बेटी, गहूं तशी रोटी—खाण तशी माती, पहा.

माय तशी लेक, तमाशा देख—वरप्रमाणेंच. आनुवंशिक गुण व त्याचबरोबर संस्कारांचें महत्त्व यांत वर्णन केलेलें आहे.

माय तशी लेक, मसाला एक—(व.) ज्या प्रकारचें वळण आईला असतें त्या प्रकारचें वळण मुलीला लागणार.

माय तसें लेकरूं, गाय तसें वासरूं—खाण तशी माती. वरीलप्रमाणेंच.

माय तेली, बाप तेलंग, बेटा होई रंगबेरंग—आई तेली बाप माळी, बेटे निकले सुजानअल्ली. आई पहा.

माय बाप हेल्या, लेकरं पाहिलं कोल्ह्या—(व.) आईबाप सशक्त पण मुलें किडकिडीत.

माय मरून बाप मावसा—(व.) आई मेल्यावर बाप मावसा. आई पहा.

माय मरो आणि मावशी उरो; माय मरो पण मावशी न मरो—आई इतकीच किंबहुना जास्त अशी मावशीचीहि माया असते अशी समजूत आहे.—कोकि ८०.

माय मरो पण आस न मरो—मनुष्याची आशा सुटणें. मनुष्यानें निराश होणें हें मातृवियोगाहूनहि वाईट आहे.आशा गेली कीं जीवितांत काय उरलें ?—गांगा २६१.

माय मरो पण पत उरो—मनुष्याची पत किंवा अब्रू ही आईपेक्षांहि श्रेष्ठ आहे.

माय मावली दुनिया पावली, बायको मावली फजिती पावली—(व.) आईच्या पोटीं आपला जन्म होतो व आपल्याला ती जगांत आणते आणि पुरुषार्थ करण्याची संधि देते. तिनें आपणास जन्मच दिला नसता तर आपण पुरुषार्थ कसा केला असता ? त्याच्या उलट, लग्न करून आपण सापत्निक झालों म्हणजे वाढता संसार पाठीस लागतो व द्रव्यार्जनाच्या पायीं मोठी फजिती होते.

माय मेली बाळपणीं, स्त्री तरुणपणीं, पुत्र वृद्धपणीं, विचित्र आहे करणी—वरील सर्व गोष्टी फार दुःखदायक आहेत.

माय वेडी, गू फेडी—(प्र.) माया वेडी, गू फेडी पहा. आईची माया फार वेडी आहे; ती मुलाचा गू काढण्यांत खंत मानीत नाहीं.

माय व्याली पुत्राला, सुख न तियेला—माता पुत्रास जन्म देते परंतु त्यापासून तिला कष्टच प्राप्त होतात.

मायची भईण मावशी, वायटा बऱ्याक् पावशी, पायची भईण काका, कित्याकूच माका नका—(गो.) आईची बहीण मावशी ही बऱ्या आणि वाईट दिवसांतहि उपयोगी पडते; पण बापाची बहीण (आत्याबाई) मला मुळींच नको. (ती कधींच उपयोगी नसते.) आत्याबाईपेक्षां मावशी चांगली.

मायेनं मारलं, राजानं लुटलं, तर फिर्याद कोणाकडे न्यावी—मारापासून मुलाचें रक्षण करणें आईचें कर्तव्य, चोरांना लुटूं न देतां त्यापासून प्रजेचें रक्षण करणें राजाचें कर्तव्य; पण हीं ज्यांचीं कर्तव्यें त्यांनीं न बजावलीं तर निरुपाय आहे; इलाजच खुंटतो असा भावार्थ. तु०—राजा लुटी जरी प्रजाजनाला। माता मारी जरी बाळाला। बंधु विकी जरी निजभगिनीला। शरण कुणा जावें ॥

मायची जिंदगी जावय दान दिता—(गो.) सासूची मिळकत जांवई दान देतो. दुसऱ्याच्या उत्पन्नांवर धर्म करणारा माणूस.

मायनं फोडल्यार मातीयेचे, सुनेनं फोडल्यार तांब्याचे—(गो.) सासूच्या हातून एखादें नुकसान झालें तर त्यांत कांहीं नाहीं म्हणायचें पण सुनेच्या हातून नुकसान झालें तें फार मोठें म्हणून ओरड करावयाची; असा पक्षपात.

मायीक सूनपणा उगडास जायना—(गो.) सुनेला छळतांना सासवेला आपणहि एका काळीं सून होतों, ही आठवण राहात नाहीं.

मायींचेर कोपूनु चरडाक पेट्टु—(गो.) सासवेच्या रागानें मुलीला मार.

मायींनें भेत्तिल्या आयदानांक मोल ना—(गो.) सासूनें फोडलेल्या भांड्याला किंमत नाहीं. तेंच जर सुनेनें फोडलें असतें तर त्याची किंमत भलतीच झाली असती.

माया——माया निवारणें—मायेचें पटल घालविणें, दूर करणें. 'कृपादृष्टीनें पाहसी जया। तयाची माया निवारिसी ॥'

माया पातळ करणें—प्रेम कमी करणें. 'कां प्राणसख्या तूं पातळ केलीस माया।'—प्रला ९२.

माया सांखळणें—अति प्रेम करणें; अपूर्वाई करणें. **मायेंत अटकणें-घोंटाळणें-पडणें-फसणें; मायेंत अटकणें**

गुंतणें–गोवणें–गुंडाळणें—प्रपंचाच्या फेऱ्यांत सांपडणें; प्रवृत्तिमार्ग चालविणें.

मायेन मगाळणें—(कु.) द्रव, पाझर फुटणें.

***माया आणि अनवाळपण विकतें चलेना**—(गो.) प्रेम आणि शुचिर्भूतपणा हीं विकत मिळत नाहींत.

माया रुचली लोकांला, आनंद झाला देवाला—सर्व विश्व हें मायेंत गुरफटलेलें पाहून परमेश्वरास फार आनंद होतो. कारण सर्व सृष्टिक्रम या मायेमुळेंच चालत असतात.

माया वेडी, गू फेडी; माया वेडी, घाण काढी—काम कितीहि किळसवाणें, नीच असो तें करण्यास माया प्रवृत्त करते. आई मुलाचा गू काढतेच कीं नाहीं. —माझें पुराण, पृ. ६०.

माये गॅलँ सेवे चुकूता, सेवे गॅल्या माये चुकता—(गो.) प्रेमपाशांत जखडलेला कर्तव्याला चुकतो, आणि कर्तव्याचा मार्ग चोखाळणाऱ्याला प्रेम करायला सवडच मिळत नाहीं.

मायेक गेलें, सेवेक चुकलें—(गो.) माया करायला दुसरीकडे गेल्यें, पण त्यामुळें कर्तव्य चुकल्यें.

मायेची पेज नि सर्वांगीं तेज—माहेरची पेज० पहा.

मायेचें तोंड खालीं–निराळें—माया, ममता ही वरपांगी, दिखाऊ नसून, ती प्रकट होण्यापेक्षां अप्रकट रहाण्यांतच विशेष आहे; ममता नम्र असते.

मायेचें माहेर आणि न्यायाचें सासर—माहेरीं आपणास प्रेम मिळावें व सासरीं न्याय मिळावा. माहेरीं आपल्याला लोक प्रेमामुळें चांगलें वागवितात पण सासरीं चांगली वागणूक मिळावी अशी अपेक्षा असेल तर आपली पात्रता दाखविली पाहिजे. —शिसं २ २·४.

मायेबगर ओंवी यना आनि शिरेबगर रगत यना—(गो.) मायेवांचून ओंवी येत नाहीं आणि शिरेवांचून रक्त येत नाहीं.

मायेबगर रड ना, उज्या वगर कड ना—(गो.) मायेशिवाय रड नाहीं, जाळाशिवाय कड नाहीं. ज्या गोष्टी-विषयीं आपणांस प्रेम आहे त्याबद्दलच आपणांस वाईट वाटतें. आगीवांचून कड नाहीं, मायेवांचून रड नाहीं.

मायेवांचून रड नाहीं, आगीवांचून–जाळा-वांचून कढ नाहीं—आग, जाळ पहा.—मराठी गद्याचा इंग्रजी अवतार, पृ. ६.

मार—**मार देणें**—१ जिंकणें. २ एखाद्यास चोपणें, ठोकणें.

मार पडणें—मारा पडणें; हल्ला होणें. 'बहु कोस मार्ग सारिला, मार पडली हुजरातिला ।' —ऐपो २८३.

मार बसणें—माराला पात्र, विषय होणें; मार मिळणें.

मार मारणें–देणें—निश्चयानें व नेटानें लागणें (अभ्यास, काम इ. करावयास)

मार मार, मारे मारे करणें–फिरणें–हिंडणें –करीत फिरणें—आपलें दुःख सांगत फिरणें.

माराकुटी करणें—बेदम ठोकणें, मारणें, पिटणें.

***मारमारके जाय, फताहदाद इलाही है**—[ऊर्दु] मोठ्या कडाक्यानें युद्ध केलें तरी विजय देणारा परमेश्वरच आहे. युद्ध तर कर यश परमेश्वराधीन आहे. मामनुस्मर युद्ध च । यशापयशाचा परमेश्वरावर भार टाकून युद्ध करणें.

शहाण्याला शब्दाचा मार, मूर्खाला टोणप्याचा मार—शहाणा पहा.

माराक भूत पळटा.—(गो.) भूत सुध्दां काठीस घाबरतें. भूतपिशाच्च काढणारा भूतबाधा झालेल्या माणसाला सपाटून मार देतो. कारण काय तर तशा मारण्यानें त्याच्या अंगातलें भूत निघून जातें. बडी पहा.

मारापुढें राऊं जाता पोण तोंडापुढें राऊं जायना—(गो.) मारझोड सहन करतां येईल पण कटु वाक्प्रहार सहन होत नाहींत. तु० मारत्याचा हात धरवेल.

मारा भिणें भूत पळतें—माराला भिऊन भूतसुद्धां झाड सोडून जातें.

मारणें—**चपेटा मारणें**—रट्टा देणें. 'बळें मारुती मारताहे चपेटा ।'—राक १.५.

छटा–छाया मारणें—सारखेपणाची लकेर असणें; झांक मारणें; सादृश्य असणें. 'तुमच्या बोलण्यांत तीर्थरूपांच्या बोलण्याची छाया मारती.'

झोंप–डुलक्या मारणें—निद्राग्रस्त होणें; पेंगणें.

घाण–वास मारणें—घाण वास येणें. (एखाद्या वस्तूचा) वास, रंग, रुचि, छटा, लकेर, झांक असणें.

मजा मारणें—चैन करणें; मौज करणें.

मारून उरता न ठेवणें—बेदम, मरेमरे तों मारणें.

मारून पीठ-पिठार करणें—बेदम, बेफाम मारणें.

मारून भूस-भोत भरणें—वरप्रमाणेंच.

*मार शेजाऱ्या साप, मी मुलाबाळांचा बाप—आपण दूर राहून शेजाऱ्याकडून धोक्याचें काम करून घेणें. तु०—पाहुण्याकडून साप मारविणें.

मारशील तर पुढें जाशील—जर तूं मला मारशील तर तूं पुढें जाशील (तुला पुढें काय होईल तें समजेल.) मारण्याचा धाक घालणारास ताकीद देतांना म्हणतात.

मारणाराचा हात धरवतो पण बोलणाराचें तोंड धरवत नाहीं —तोंड पहा.

मारणारापेक्षां तारणारा अधिक आहे.—तारणार। पहा.

मार्तल्या हात धरये, उलयतल्या तोंड धरूंक जायना—(गो.) मारणाराचा हात धरवतो० पहा.

मारतां मारतां मरावें—मनुष्यानें पराक्रम करीत आयुष्याचा व्यय करावा.

मारतां मारतां मारेकारू जाता—(गो.) मारतां मारतां मारेकरी होतो. संवयीनें कोणतीहि गोष्ट अंगवळणीं पडते.

मारली टाळी कीं ओढली थाळी—संध्या करीत असतां शरीरन्यासाच्या वेळीं अस्त्राय फट् म्हणून टाळी वाजवावयाची असते त्यावरून; संध्येला संक्षेप देऊन जेवणाची गडबड करणें.

मारली हांटली येत नाहीं—कांहीं केल्या ऐकत नाहीं, वळत नाहीं, वठणीस येत नाहीं.

मारावा तर वाघ, लुटावें तर अंबर—एखादी गोष्ट करावयाची झाल्यास कांहीं विशेष वाटेल अशी करावी. शिकार करावयाची तर वाघाची तरी करावी व लूटच करावयाची तर भांडार फोडावें म्हणजे कांहींतरी कीर्तीचा किंवा द्रव्याचा लाभ होतो.

मारावा तर हत्ती व लुटावें तर भांडार—वरप्रमाणेंच.

मारावी तरवार, वरावी पद्मीण—पराक्रम केल्याशिवाय सुंदर स्त्री मिळत नाहीं. तु.—A faint heart never wins a fair lady.

मारीन कीं मरेन—एक कार्य तरी करावयाचें किंवा देह सांडावयाचा, अशा निश्चयानें एखाद्या कार्यास लागावें. अर्थं वा साधयेत् देहं वा पातयेत्।

मारीत ताजी तरवार, करीत ताजो कारभार—(गो.) करील त्याचा कारभार०. कारभार पहा.

मारीन कीं मरेन—एक कार्य तरी करावयाचें किंवा देह तरी सांडावयाचा अशा निश्चयानें एखाद्या कार्यास लागावें. अर्थं वा साधयेत् देहं वा पातयेत्।

मारीन कीं मरेन; मारूं किंवा मरूं— या दोहोंपैकीं कोणतें तरी एक होईल. ही तड किंवा ती तड. (गु.) मारवुं, के मरवुं. Either win the horse, or lose the saddle.

मारील त्याची तरवार व करील त्याची विद्या; मारील त्याची तरवार, करील त्याची विद्या, भजेल त्याचा ईश्वर— तरवार पहा.

मारून मुका मिळत नसतो—जबरीनें कोणाचें प्रेम संपादन करतां येत नाहीं.

मारून मुटकून मुसलमान— मुसुलमान लोक जबरीनें मुसुलमान व्हावयास लावतात. असा बळेनें एखाद्या गोष्टीस प्रवृत्त झालेला.

मारून मुटकून वैद्यबुवा—या नांवाचें एक प्रहसन आहे. एखाद्यास ठोकून ठोकून बळेंच वैद्य आहे असें त्याकडून करविणें, वदवून घेणें. बळजबरीनें केलेली गोष्ट.

मारका—मारक्या म्हशीच्या माथां घाव—जशास तसें.—गांगा २४८.

मारता—मारत्याचा गुलाम, पळत्याचा काळ—जबरदस्तापुढें गोगलगायीसारखें व दुबळ्यापुढें मुजोरासारखें वर्तन करणारा.

मारत्याचा हात धरवतो पण बोलणाराचें तोंड धरवत नाहीं—मारणाराचा हात० पहा.

मारत्याचें मागें, पळत्याचें पुढें—वर पहा. एखादा मनुष्य सैन्यामध्यें असून लढाईस गेला असतां आपली फौज दुसऱ्यावर हल्ला करीत पुढें जात असेल तेव्हां सर्वांच्या पाठीमागें राहतो व आपली फौज पळत असेल तर पळण्यामध्यें सर्वांच्या पुढें असतो, अशा भित्रा मनुष्य.

मारत्याचे हात धरवतात पण बोलत्याचें तोंड धरवत नाहीं.—वरप्रमाणेंच. We can hold the

hands of one who strikes but not the mouth of one who speaks.

मारबत–द––मारबत खेदणें––(ना.) हांकून लावणें; हुर्यो करणें.

मारवाडी––मारवाडी हे बहुधा पैशाला चिकट असतात यावरून, कंजूष, चिक्कू.

मारवाडी कावा आणि आपलपोटेपणा––मारवाडी कधीं आपला स्वार्थ सोडीत नाहीं.

मारवाडी मित्र नाहीं, पायखाना पवित्र नाहीं––ज्याप्रमाणें शौचकूप हा कधीं पवित्र मानतां येणार नाहीं त्याप्रमाणें मारवाडी कधीं खरा मित्र होऊं शकत नाहीं.

मारी––मारिनें जाणनातीले घर ना––(गो.) मृत्यूला टाऊक नाहीं असें एकहि घर मिळायचें नाहीं.

मारुति––मारुतीचें शेपूट––सीताशुद्धीसाठीं मारुति लंकेंत गेला असतां तेथें राक्षसांनीं त्याला धरलें तेव्हां त्याचें शेपूट लांब लांब होत चाललें ! यावरून १ लांबत जाणारें काम; पाल्हाळ. २ (कर्ना.) मासबाळी; घोसबाळी.

मारुतीच्या बेंबींत बोट घालणें––एकानें मारुतीच्या बेंबींत सहज बोट घातलें. तेव्हां तेथें विंचू बसला होता तो चावला पण यानें आपली फजीती न सांगतां 'काय गार वाटतें !' असें सांगितलें ! तेव्हां दुसऱ्यानें तसेंच केलें व खोटें सांगितलें. याप्रमाणें आपला अनुभव निराळा असतां तो लपवून ठेवून फसविणें.

***मारुतीच्या बेबींत बोट घालूं नये, घातलें तर हुंगूं नये**––(चुकीनें प्रयोग.) गांडींत बोट इ. मागें पहा.

मार्कंडेय––मार्कंडेयाचें आयुष्य––मार्कंडेय ऋषि चिरंजीव आहे त्याप्रमाणें दीर्घायुष्य. आशीर्वाद देतांना म्हणतात.

मार्ग––मार्ग धरणें––१ निघणें; आपल्या मार्गाला लागणें. २ रस्ता रोखणें; रस्त्याला उपद्रव देणें; वाट मारीत बसणें.

मार्ग–रस्ता फुटणें––१ रस्ता, वाट आढळणें. 'खुंटली समीराची गति। मार्ग न फुटे चालावया।' २ एका वाटेस दुसरा फाटा फुटणें.

मार्ग–रस्ता मळणें––१ एखाद्या देवतेला जाऊन आल्यावर पुन्हां त्याच मार्गावर जाऊन स्वयंपाक करून कुलदेवतेस नैवेद्य दाखवून सवाष्ण–ब्राह्मण घालणें. २ बागेंत भोजन करण्याकरितां व मौज मारण्याकरितां जाणें; वनभोजनासाठीं सहल करणें. (इं.) Picnic 'कांहीं कुटुंबांतून वैशाख अगर ज्येष्ठमासीं नैवेद्य घालण्याची चाल आहे. पण हे नैवेद्य मार्ग मळण्याच्या प्रसंगाचे आहेत; यावेळीं क्षुद्र देवतांना अन्न संतर्पण करतात.'–चित्पावन मासिक, २९-३-४०

मार्ग सुधारणें––वाट धरणें; वाटेला लागणें, जाणें.

मार्गावर येणें–– शुद्धीवर येणें; सुधारणें.

मार्गीं लागणें––१ (आपल्या उद्दिष्ट प्रवासाचा) मार्ग धरणें; निघणें. २ मरणाच्या पंथांत असणें. ३ (एखादें कार्य करण्याच्या किंवा तें कसें करावें हें समजण्याच्या) पंथास लागणें. ४ आरंभिलें जाणें; सुरू होणें (काम, गोष्ट).

माल–––माल खाणें.––(व.) मेवा, मिठाई इ. गोड पदार्थ खाणें.

माल के माल; मालचा माल––वाढ, सुधारणा होणाऱ्या किंवा घट, अपकार होणाऱ्या कामीं लावल्यावरहि ज्याच्यामध्यें बरा-वाईट असा कांहींच बदल होत नाहीं असा पदार्थ (पैसा, माल इ.)

माल वधरणें––(व.) पीक चांगलें येणें.

मालावरचा नाग––१ पैशाचा उपयोग न करतां त्याचें केवळ रक्षण करणारा (कृपण मनुष्य). २ श्रमाशिवाय आयती संपत्ति ज्यास मिळालेली आहे असा (इसम).

***जो माल खपतो तो पिकतो**––जसें खपतें तसें उत्पन्न होतें.–टि ले ४.१५९.

माल खाय गधडी, मार खाय लोधडी––(खा.) गाढव माल खाऊन पळून जातें आणि लोधडीस मार खावा लागतो. अपराध एकाचा नि त्याचें प्रायश्चित्त माल दुसऱ्याला.

माल चोख, पैसा रोख––रोखीचा व्यवहार.

माल तसें मोल––जशी वस्तु असेल तशी तीस किंमत मिळते. (गु.) माल तेवुं मुल. Good article, good price.

माल त्याचे हाल, चोरटे खुशाल––मालकास धतुरा व चोरास मलिदा. शेतकरी वर्षभर राबून शेतात जिन्नस पिकवितो व अखेरीस चोर त्यावर हात मारून

मजा मारतो व शेतकरी उपाशीं मरतो. तु०--मेहनती दिलगिर आणि चोरटे हुशार.

मालाचा पैसा आणि पैशाचा माल—रोखीनें व्यवहार करणें. "हल्लींच्या युद्धांत 'मालाचा पैसा आणि पैशाचा माल' अशी दुकानदारी करण्याची फायदेशीर संधि आली; तेव्हां जुन्या अनुभवाचा फायदा घेऊन अमेरिकन सरकारनें आपल्या दुकानावर मोठ्या अक्षरांत पाटीच लावून टाकली. ती अशी 'टक्का रोख व्यवहार चोख' Cash & carry पैसा रोख आला आतां माल उचला."—केसरी १६-७-४०.

मालक---मालक गैदी आणि मांजर कैदी--मालक गबाळ्या असून मांजरास बांधून ठेवलें तर उंदरांचें फावणारच. स्वतः मालकानेंहि पाहिलें नाहीं व रक्षकहि ठेवला नाहीं तर चोरांची चंगळ होणारच.

असेल मालक शेती तर होती, नाहीं तर माती--शेती स्वतः केल्याशिवाय फायदेशीर होत नाहीं.—गांगा १८०.

जैसा मालकू : तैसा सेवकू—(महानु.) जसा धनी तसा नोकर.

मालकाची नजर व नोकराची कदर--मालकानें स्वतः देखरेख ठेवल्याशिवाय नोकर काळजीपूर्वक काम करीत नाहीं व नोकरानें कितीहि काळजीनें काम केलें तरी मालकाच्या नुसत्या नजरेनें जें काम होतें तें नोकराच्या काळजीनेंहि होत नाहीं.

मालकाचें निघालें दिवाळें, कारभाऱ्यानें केलें तोंड काळें—मालक दिवाळखोर झाल्यास नोकर तोंड दाखवीत नाहींसे होतात.

मालकाचे आधीं चोराची बोंब--धन्याच्या आधीं इतरच लोकांची ओरड चालू होते.–संक ३.२.५०.

मालकाच्या दारीं कुत्रा शेर—कुत्रा मालकाच्या घरांत असला म्हणजे तो फार शूरपणा दाखवितो पण बाहेर पडला कीं शेंपटी घालतो.

मालकाच्या मनाची स्थिति, असे सेवकाचे हातीं—नोकर चांगले नेकीचे असले तरच मालकास स्वास्थ्य मिळण्याचा संभव असतो. नाहींतर त्याला नेहमीं विवंचना लागलेली असते.

मालकाला हवा आणि चोराला खवा—मालक उपाशीं राहतो व चोर मजा करतो. वर पहा.

मालकानें दक्षता बाळगावी आणि नोकरांनीं चाणाक्षता ठेवावी--मालक दक्ष असून नोकर हुशार असतील तर धंद्याला बरकत आल्याशिवाय राहणार नाहीं.

मालमत्ता---मालमत्तेचा सांठा, त्याला हजारों वाटा--संपत्ति असली म्हणजे ती प्राप्त होण्याकरितां हजारों लोक प्रयत्न करीत असतात किंवा ती नाहींशी होण्यास हजारों मार्ग असतात.

माली---माळी पहा.

माली सठयो फुललेशे, कांइ चोटलि तो नहीं लेशे--माळीण रुसली तर फुलें नेईल, वेणी तर नेत नाहीं. (आपलें भाग्य कोणी नेऊं शकत नाहीं.) रुसली गौर तर घेईल सौभाग्य, कांहीं कपाळ तर नेत नाहीं.

माव---मावेचें मंथन, थुंक्याचें काजळ—(मावेचें मंथन=वऱ्हाड गोष्टी; निरर्थक कृति सर्वच खोटें.

माशा---माशा उडवणें—माशा मारणें; स्वस्थ बसणें.

माशा खाणें–गिळणें—१ मूर्ख, गोंधळलेला, बावरा झालेला दिसणें. २ गमणें; रेंगाळणें; चाचपडणें.

माशा मारणें–मारीत बसणें--करण्यास कांहीं नसलें म्हणजे माणूस अंगावर बसणाऱ्या माशाच मारतो ! यावरून निरुद्योगी बसणें. 'तो माशा मारीत बसला होता.'—V. S. 2. १२२.

(नाका–तोंडावरची) माशी न हालणें—अगदीं गरीब स्वभावाचा असणें; गरीब स्वभावामुळें कांहीं न बोलणें.

माशी पादली--(व.) माशी शिंकणें याअर्थी.

माशी लागणें--१ दागिना इ. वरील मुलामा, पातळ पत्रा झिजून आंतील लाख दिसूं लागणें. २ एखादें काम चालू असतां तें मध्येंच थांबणें; अडणें. 'पण कुठें माशी लागली ?' —नाकु ३.७७. पुढें पहा. ३ मळमळूं लागून वांति होणें.

माशी शिंकणें--(हानि किंवा अनर्थकारक गोष्ट घडून येण्यास क्षुल्लक कारण दाखविणाऱ्या माणसाच्या उपहासार्थ योजतात) हरकत येणें; अडथळा येणें. (माशी शिंकणें ही गोष्ट अशक्य तेव्हां असेंच असंभवनीय निमित्तास

कारण सांगून कार्य बंद ठेवणारास उद्देशून उपयोग.) 'मग माशी कुठें शिंकली ?'–इंप.

माशी हागणें––जनावराच्या अंगातील व्रणांवर कीड होण्याचीं चिन्हें दिसणें; आसडी पडणें.

माशीला माशी—मुळांत माशी बसून डाग पडलेला असेल तर तशी माशी काढणें. 'कॉपी टु कॉपी, माशी टु माशी!' असें विनोदानें हुबेहुब लेखी नक्कलेला म्हणतात. जशाची तशीच नक्कल; न समजतां अनुकरण; अंधानुकरण.–नि.४४९.

गुळावरच्या माशा—किंवा साखरेवरले मुंगळे असेंहि म्हणतात. जोपर्यंत गोडी (उत्कर्षाचे दिवस) आहेत तोंपर्यंत मित्र म्हणविणारे लोक.

माशाचा वाघ—माशा पकडणारा कीटक, कोळी.

***माशी आपणास खावविते व दुसऱ्यास ओकून पाडविते**––कित्येक लोक आपलें नुकसान करून घेउन दुसऱ्याचेंहि नुकसान करवितात असा भावार्थ.

माशाहि वारीना व लाजहि राखीना—ही म्हण शेळीच्या शेपटीला उद्देशून आहे. शेळीचें शेंपूट इतकें लहान असतें कीं, तें तिच्या अंगावर बसणाऱ्या माशा वारूं शकत नाहीं; व तिची लाजहि राखूं शकत नाहीं. कशाचा उपयोग नसणारी गोष्ट.

माशीचा खून, फांशीची शिक्षा—क्षुल्लक अपराधास फार मोठी शिक्षा.

मास––मासपक्ष लागला–लोटला—सरला––एक महिना किंवा सहा आठवडे लागले, लोटले. फार दिवस झाले.

मांस––मांस कसणें––चांगलें खालींवर करून मांस भाजणें.

***मांस खाल्लें म्हण हाड गळ्या बांधांत्**––(गो.) मांस खाल्लें म्हणून हाड गळ्यांत बांधीत नाहींत. अनीतिकारक कृत्य करायचें आणि वर त्याची शेखी मिरवायची, असें करणाऱ्या लोकांना उद्देशून म्हणतात.

मासा––माशाचा खंडोबा अन् (सवा) तोळ्याचें कुत्रें––चवलीची कोंबडी, पावली फळणावळ याप्रमाणें.

मासा––माशाचें जाळें—मासे पकडण्यासाठीं जाळें असतें त्याला असंख्य भोकें असतात. त्याप्रमाणें भोकें पडलीं आहेत, फाटलें आहे असें वस्त्र.

माशानें माणिक गिळणें––एखादी वस्तु दुष्प्राप्य अशा रीतीनें गमावणें; दुसऱ्याच्या हातांत जाऊन कष्टसाध्य होणें.

जळा–पाण्यामध्यें मासा झोंप घेतो कैसा। जावें त्याच्या वंशा। तेव्हां कळे॥––जळ, पाणी पहा.

पाण्यांतला मासा पाणी प्याल्या शिवाय कसा राहील—तळें राखील तो पाणी चाखील याप्रमाणें.

समुद्रीं मासे व घरीं भरंवसा––आपल्या आटोक्यांत नसलेल्या वस्तूवर अवलंबून असणें.

तडीवरचो एक मासो रांपणीच्या शंभर माशांपेक्षां बरो—(गो.) एक असतां हातीं पहा.

माशाचें पोराला–पिलाला पोहायाला शिकवायाला नको–लागत नाहीं—माशाला उपजत पोहण्याचें ज्ञान असतें. जन्म स्वभावास शिक्षण लागत नाहीं.

माशान गिळिलें माणिक मेळटा ?––(गो.) माशानें गिळलेलें माणिक फिरून मिळूं शकत नाहीं.

माशानें गिळलेलें मोतीं मिळणें कठीण—वरप्रमाणेंच. एखाद्याच्या हातीं जाऊन दुष्प्राप्य होणें.

जळांत–पाण्यांत राहून माशाशीं वैर—जळ पहा. पाणी पहा.

माहेर––माहेरवास करणें—प्रेम करणें. याच्या उलट सासुरवास करणें.

***माहेराची पेज, सर्वांगास तेज**––१ स्त्रियांना माहेरीं कशीहि स्थिति असली तरी सुख लागतें. २ घरच्या साध्या अन्नाची बरोबरी कशासहि येत नाहीं याअर्थी.

माहेरचें सुख, सासरीं होतें दुःख—नववधूस माहेरवास सुखाचा वाटतो व सासुरवास कष्टदायक वाटतो.

आंवळा खाऊन पाणी पिऊन माहेरीं जावें–(तोंड गोड होतें.) **गाजर खाऊन पाणी पिऊन सासरीं जावें**–(तोंड कडू होतें)—माहेरचा ओढा व सासरचा कंटाळा हा लग्नानंतर नववधूला साहाजिक असतो.

माहेरवाशीण––माहेरवाशीण मुरडणें—माहेरीं आलेली मुलगी सासरीं परत जातांना तिला मुरड घातलेली करंजी मुद्दाम खाऊं घालतात- (म्हणजे ती मुरडून-परतून लवकर माहेरीं येईल अशी समजूत)

माहो——**माहो आणि हिंवाचा लाहो**—माघ महिन्यांत थंडी फार पडते.

माझा——**माझ्या घरीं मी मानाची, माझ्या लेकीच्या घरीं लेक मानाची**—(व.) माझ्या घरीं जसा माझा मान आहे, माझा शब्द कोणी मोडत नाहीं, तशीच माझी मुलगीहि आपल्या घरीं म्ह. सासरीं मानाची राहिली पाहिजे अशी माझी महत्वकांक्षा आहे. माझा जसा येथें मान होत आहे, तसाच मान मीं बनाविलेल्या व्यक्तीला, उदाहरणार्थ माझ्या शिष्याला, त्या संबंधीं जनाला मिळाला म्हणजे पुरले माझे मनोरथ !

माळ——**माळ गौळ्याची**—(ढोबर म्हैस-खेळ) मेलेल्या (बाद झालेल्या) दोन दोन गड्यांनीं एकमेकांचा हात धरून बाकीच्यांस शिवावयास जाणें.

माळ घालणें—१ लग्नांत एकमेकांना वरल्याची खुण म्हणून वराच्या गळ्यांत वधूनें व वधूच्या गळ्यांत वरानें माळ टाकणें. ‘ लग्नार्थीं हिंडतां भूमंडळ । त्यासीं राजकन्या घाली माळ । ’ २ पंढरीचा वारकरी होणें; दर शुद्ध एकादशीस पंढरीची वारी करणें (पंढरीचे वारकरी संप्रदायास अनुसरून वारी स्वीकारल्यावर गळ्यांत तुळशीच्या मण्यांची माळ घालतात. यावरून)

(संसाराची-कामाची) माळ घालणें-पडणें—संसाराची, कामाची व्यवस्था एखाद्याच्या गळ्यांत टाकणें, पडणें. एखादें काम एखाद्याकडे सर्वथैव सोंपविलें जाणें. ‘ मराठी काव्याचें काम करणारा दुसरा पुरुष तयार असता, तर त्यांनीं त्याची माळ आनंदानें त्याच्या गळ्यांत घातली असती !’

माळ घेवन बसप—(गो.) एकसारखी वाट पाहणें; घोसरा काढणें.

***माळ तुटली, कटकट मिटली**—माळकरी हा व्रतस्थ असतो. त्याच्या गळ्यांतील माळ तुटल्यास त्याच्या मागचें नियमांचें लचांड सुटलें असें होतें; यावरून मोकळें होणें; निर्बंध नाहींसे होणें.

एक माळेचे मणी—एक पहा.

माळेचो मणी माळेंत पडलो—(गो.) माळेचा मणी माळेंत येऊन पडला. एखाद्या मंडळींतला बाहेर गेलेला माणूस पुनश्च त्या मंडळींत दाखल होणें.

माळ——**माळावरचा धोंडा; माळधोंडा**—१ एकदां झालेला व्यवहार परत फिरणार नाहीं अशा अर्थाचा भाषणसंप्रदाय. खरेदी करणाराच्या स्वाधीन पशु, जिन्नस इ. करतांना विकणारा इसम हा शब्द योजतो. खारी माती पहा. २ टोणगा; मठ्ठ मनुष्य.

***माळावर बोंबलण्यास पाटलाची परवानगी कशाला**——चावडीबाहेर० पहा.

माळावरची माती कोणीहि उचलावी—बेवारशी माल कोणीहि न्यावा .

माळी——**सुकाळांत साळी, दुष्काळांत माळी**——दुष्काळ पहा.

***देहाचा माळी : इंद्रियाच्या कुटी साळी**——(महानु.) देहाचें रक्षण करणाराला इंद्रियांचें दमन करावें लागतें.

माळी ओळखे मळयांत आणि कुणबी ओळखे खळयांत——(ठाकरी) माळ्याची हुशारी मळ्यावरून कळते, तसेंच कुणब्याला खळ्यांत गांठावा म्हणजे त्याच्या कामाची खरी कल्पना येते.

माळी तसा बाग अन् कोळी तसा धागा—जसा माळी कुशल किंवा काम करणारा असेल तशी त्याची बाग राहील व ज्या जातीचा कोळी असेल त्याप्रमाणें त्याच्या जाळ्याचा दोरा निघेल. तु०-खाण तशी माती. —पाआमा ५.६

साळी व माळी यांच्या बायका दिवसाच्या नव्हेत, फक्त रात्रीच्या—साळ्याच्या बायकोला पांजणी वगैरे करण्याकरितां घराबाहेर काम करावें लागतें व माळ्याच्या बायकोला गांवभर भाजी विकण्याकरितां फिरावें लागतें. तु०-सगळी साळ्याची अर्धी माळ्याची, पहा.

माळ्या घरीं मळे आणि परिटा घरीं शिळें—माळ्या घरीं मळा असावयाचाच. तसा परटाच्या घरीं धोंडा, पाथर असावयाचा. म्हणजे या गोष्टींचें साहचर्य असावयाचेंच.

माळ्याचा मका आणि कोल्ह्यांचें भांडण—दोघांपैकीं एकाचाहि संबंध नसणाऱ्या मालाविषयीं दोन पक्षांचें भांडण या अर्थी योजतात. तु०-‘ सखू ! पाठ घासली तर घासू पण खंडीचा तोटा कसा सोसूं ! ’ यांत कोणाचें शेत ? आणि रिकामें जांवई सासरे यांचें भांडण.

माळ्याचा मळा, कोल्ह्याचें भांडण—अर्थाअर्थी संबंध नसतांना कलह. वर पहा. पाठभेद-माळ्याचा मळा

पाहायचा आणि कोल्ह्यांचें भांडण लावायचें. (पण हा पाठभेद चुकीचा वाटतो.)

माळयाची पोर हिंडती, साळ्याची पोर रडती—माळ्याच्या मुलीला फुलें विकण्यासाठीं सर्व शहरभर फिरावयास मिळतें पण साळ्याच्या मुलीला दिवसभर घरीं बसून कष्टाचें काम करावें लागतें त्यामुळें ती अगदीं रडकुंडीस येते.

माळीण——माळणीचा व्यवहार—आपले जिन्नस दुसऱ्यास द्यावयाचे व आपल्यास पाहिजे असलेले जिन्नस त्यांच्यापासून घ्यावयाचे. ऐनजिनसी अदलाबदल.

***माळीण रुसली तर फुलेंच घेईना**—माळणीचा धंदा फुलबाग लावून तिचें रक्षण करण्याचा; एखाद्यानें माळणीच्या परवानगीशिवाय फुलें तोडलीं व तिचें नुकसान केलें तर ती रुसेल, रागावेल हें खरें; पण रागावून करील काय? काय असें मोठें शासन करील? फारतर आपलीं फुलेंच हिसकावून परत घेईल ना! दुबळा मनुष्य फार रागावला तर करणार काय? जुजबी भरपाई करून घेईल.

माळणीची लाथ खावी पण लोणारणीचा हात लावून घेऊं नये—माळणीनें मारलें तर तिच्या फुलांचा सुवास तरी आपल्या अंगास लागेल. पण लोणारणीनें प्रेमानें जरी कवटाळलें तरी अंग काळें होणार! गंधी पहा.

मिजास——मिजाज–स जाणें—इतराजी होणें; मर्जी खप्पा होणें.

मिजाज–स ठेवणें–राखणें—तब्येत सांभाळणें; मर्जी राखणें.

मिजाशींत येणें–चढणें—गर्वानें फुगणें; डौलांत असणें.

***मिजास पादशाहाची, अवलाद भडभुंजाची**—भडभुंजाच्या पोरानें राजाची ऐट करणें. याप्रमाणें रिकामी बढाई. तु०–भिकाऱ्याला ओकारी.

मिजास पादशाहाची पण चाकरी मशालजीची—मशालजीनें राजासारखा नसता दिमाख दाखविणें.

मिजास बाजीरावाची, कसब पिंजाऱ्याचें—पिंजाऱ्यासारखा हलका धंदा करणारानें बाजीरावाची ऐट आणणें.

मिजास बादशाहाची, नांदणुक फैकाड्याची—ऐट राजासारखी करून प्रत्यक्ष वागणूक दरिद्री रानटी मनुष्याप्रमाणें ठेवणें.

मिजास मोठी, कपाळीं तांबटाची रोटी–तांबटाची (कोंड्याची) रोटी म्हणजे अगदीं हलक्या प्रकारचें खाद्य, ती मिजासखोराला काय उपयोगी? एखाद्या मिजासखोराला तामटाची रोटी मिळणें म्हणजे त्याची दुर्दशा उडणें होय. एखाद्याची मिजास मोठी आहे पण दुर्दैव त्याला कांहीं सुख भोगूं देत नाहीं त्यावेळीं ही म्हण लावतात.

मिजास मोठी, खर्ची थोडी—कंजूष मनुष्यानें श्रीमंतीची ऐट मारणें

मिटकी——मिटक्या मारणें—१ एखादी वस्तु मिळावी अशा आशाळभूतपणानें ओंठ चाटणें. २ सुंदर गोड वस्तु मिळाल्यावर तिचा आनंदानें उपभोग घेणें. 'तो नित्यतृप्त भगवान, विदुरगृहीं भोजनांत दे मिटक्या।'–मोउद्योग ७.७६.

मिटमिटा——मिटमिट्या,शेंबूडचाट्या——ओंगळ, घाणेरडा मनुष्य.

मिठी——मिठी घालणें—-आवळणें; आलिंगन देणें; भेटणें.

चरणीं मिठी घालणें—-पाय धरणें. 'यमुनेसि हलें ओढी, मग चरणीं घालितां मिठी, सोडी।'–मो मंत्रभाग १०.८६९.

मिठी देणें—मिठी घालणें; आवळणें; बंद होणें, करणें. 'चंद्रोदयीं कमळवनें, मिठी देती॥'–ज्ञा १८.७३५.

मिठी पडणें—१ गोडी लागणें. २ मिठी बसणें पहा. ३ ऐक्य होणें.

मिठी बसणें—वीट येणें; शिसारी येणें (एखाद्या गोष्टीचा फार उपभोग घेतल्यावर).

मिणमिण—— मिण मिण दिवा, कृपणाचा केवा, गाजराचा मेवा व हिजड्याचा ढवा—या सर्व गोष्टी भिकार आहेत.

मिण मिण दिवा, कृपणाची–दुष्टाची सेवा—मिण मिण करणाऱ्या दिव्यानें जसा पुरेसा उजेड मिळत नाहीं त्याप्रमाणें कंजूष किंवा दुष्ट मनुष्याची चाकरी केल्यास त्यापासून लाभ होत नाहीं.

मित——मित होय व्यय तर न होई क्षय—काटकसरीनें राहिल्यास कधीं तोटा येत नाहीं.

मित्र---मित्र ऐसा कीजीअे ढालसरीखा होय, सुखमां पीछा पडा रहे, दुःखमां आगळ होय— (गु.) असा मित्र करावा कीं जो ढालीसारखा उपयोगी पडेल; ढाल ज्याप्रमाणें संकटसमयीं पुढें करतां येते व एरवीं पाठीशीं राहते; त्याप्रमाणें मित्र सुखाच्या वेळीं मागें राहील व दुःखाच्या वेळीं पुढें होईल. तु०-- A friend is best found in adversity.

मित्र पैकेकरी, तो निधानापरी—श्रीमंत मित्र असला तर तो एखाद्या ठेव्याप्रमाणें वेळेवर उपयोगी पडतो.

मित्रे मित्रवदाचरेत्--(सं.) मित्राशीं मित्रत्वानें राहावें.

मित्रांची बौद्धिक करमणूक, शिकविते वागणुक --बुद्धिमान मित्रमंडळीशीं जरी सहज गप्पा मारल्या तरी त्यांच्या सहज निघालेल्या चतुर उद्गारांवरून पुष्कळच बोध घेण्यासारखा असतो.

मित्रालागीं युक्ति करणें, कर्ज देऊनियां मागणें —एखाद्या मनुष्याबरोबर आपली मैत्री राहूं नये अशी इच्छा असेल तर त्यास वेळेवर कर्ज द्यावें व त्याची मागणी करावी, म्हणजे तो तोंड दाखविनासा होतो. तु० - Neither a borrower nor a lender be, for loan oft loseth both itself and friend.

मिंधा---मिंधे राहणें-असणें—विटाळशी न होतां गर्भार राहणें, असणें.

मिस्या---मिस्या झाल्या थोर, आतां पाहिजे वर—[मिमी=स्तनाग्र] मुलगी यौवनांत आली म्हणजे तिचें लग्न केलें पाहिजे.

मिया---मिया आणि बीबी व कटकट उभी— नवराबायकोंचे कलह हे व्हावयाचेच. पण ते तात्पुरते असतात.

मिया गिरगये लेकिन् पाव तो उच्चा है—(हिं.) साहेब खालीं पडले पण त्यांचे पाय वरच आहेत ! मोठ्यांच्या मानहानीवर झांकण घालणें.

मिया देता नहीं पुरा तोल--बनिया पहा.

मिया अन बिबी, तगारी उभी---नवरा आणि बायको दोघेच घरांत असल्यामुळें दोघांचीं जेवणें आटोपतांच काम संपतें, मग तगारी म्हणजे ताट (थाळी) उभी करून ठेवण्यास हरकत पडत नाहीं. लहान संसार असला म्हणजे आवरासावर लवकर होते.

मिया बिबी राजी, तो क्या करेगा काजी—(हिं.) वर आणि वधू यांची विवाह करावयाची तयारी असल्यावर काजीच्या पसंती नापसंतीची कोण पर्वा करतो ? त्याला लग्न लावणें भागच असतें. ज्याचें त्याला पसंत पडल्यास इतरांची पर्वा करण्याचें कारण नाहीं.-विक्षिप्त ३.२०१.

मिया मूठभर व दाढी हातभर—दाढी पहा. तु०-- आठ हात लाकूड, नऊ हात घलपी.

मियाचे लाल तुरे, बिबीचे हाल बुरे--पुरे— नवरा फार ऐटबाज असून बायकोकडे मात्र दुर्लक्ष करणारा. स्वतःच्याच मिजाशींत गर्क असणारा नवरा असला म्हणजे त्याचें बायकोकडे दुर्लक्ष होतें.

मिरगी-- मिरगी वर येणें—क्रुद्ध होणें; रागांत येणें; संतापणें.

मिरची---(अंगाला--नाकाला) मिरच्या लागणें --झोंबणें--अंगाला मिरची लागली असतां अंगाची आग होते. यावरून रागावणें; चडफडाट होणें; चरफडणें.

गांडींत मिरच्या फुंकणें--संतापावयास लावणें; त्रास देणें.

गांडींत मिरची फुटणें---आग होणें; भडका होणें; चडफडणें; रागावणें; जळफळणें.

मिरच्यांच्या खलयावर---(देणें इ.) मिरच्यांची कधीं मळणी काढीत नाहींत यावरून कांहीं तरी एक थाप. दुसऱ्याची वस्तु परत न देणें.

मिरज---मिरज मन विरज—मिरज शहराची अपकीर्ति अशा प्रकारची आहे.

मिरवणूक---मिरवणूकीची स्वारी, तिरडी आली खांद्यावरी--मोठ्या थाटानें, गाजावाजा करीत एखाद्याची प्रेत यात्रा करावी तो तें प्रेत तिरडीवरून खालीं यावें. हौसेचा विरस होणें.

मिरवा---मिरवा मिरविणें—डौलानें, दिमाख दाखवीत हिंडणें.

मिरास---मिरास पुरणें—ठेवा, गांठोडें एखाद्या जागीं पुरलेलें असणें; कांहीं हितसंबंध विशिष्ट स्थळीं असणें कीं ज्यामुळें तेथें जाणें, राहाणें भाग आहे. तुझें असुक जागीं काय काम आहे, या अर्थानें योजतात.

***मिरासीचें म्हूण शेत । नाहीं देत पीक उगें—** तुगा ३४३१. आपल्या वाडवडिलांपासून चालत आलेलें

इनाम शेत असलें तरी तें मेहनत केल्याशिवाय कांहीं पीक देत नाहीं; मेहनत केलीच पाहिजे.

मिरी—मिरियान तपलें सखल दवरप—(गो.) ओच्यानें चुलीवरून भांडें खालीं उतरणें. प्रत्यक्ष हात न लावतां वस्त्राच्या व काठ्यांच्या साह्यानें भांडें उतरलें कीं तें सोंवळें ठरतें.

मिरी-रें—मिरसाग्या—मिऱ्याप्रमाणें तिखट, कडक झोंबरें (भाषण, भाषण करणारी व्यक्ति.)

***मिरीं नासलीं तरी जोंधळ्याच्या भावानें जात नाहींत-विकत नाहींत**—नासणें पहा.–v. s.२.७६.

मिरीं नासल्यारि तोरीकई पाच्चे ?—(गो.) मिरीं नासलीं, म्हणून तीं तुरीहूनहि कमी योग्यतेचीं ठरेल का ? श्रीमंत माणूस डबघाईला आला म्हणून तो कांहीं भिकाऱ्याच्या तुलनेला येणार नाहीं.

मिरीं वगडावप सासवा खातीर—(गो.) [सासव= मोहरी.] थोड्या लाभासाठीं मोठें नुकसान करणें.

मिशी—मिशी उतरून देणें—प्रतिज्ञा करणें; पैज मारणें; एखाद्या गोष्टीची निश्चिती सांगतांना म्हणतात.

मिशी कुरवाळणें—प्रौढी सांगणें; ऐट मारणें; पराक्रमाचा गर्व वाहणें; मिशीवर ताव देणें. 'कीं सकळाला लिलालेशें, कुरवाळुनीहि मिशि, खपवी ॥'—मोद्रोण २१.१०५.

मिशी (मिशा) खालीं होणें-उतरणें-खालावणें—मानखंडना होणें; फजिती होणें; नक्षा उतरणें. (एखाद्या पातकाच्या प्रायश्चित्तार्थ सबंध क्षौर करतात, मिशा काढतात, यावरून.)

मिशा खालीं करणें—१ नम्र होणें; मान खालीं घालणें; अपमान होणें. २ अपमान करणें; मान खालीं घालण्यास लावणें.

मिशा पिळणें; मिशास पीळ भरणें—गर्व वाहणें; ऐट मिरविणें; आपला पराक्रम, धमक दाखविणें. 'च्यारी दिवस ते मिशांसि पिळितील ।'—मोउद्योग ४.९८.

मिशा किंवा मिशी भादरणें—फजिती करणें; बेअब्रू करणें; अपमान करणें.

मिशावर खेळप—(गो.) एखाद्यास न भिणें.

मिशावर तांदूळ ठेवून वागणें—मिशावर तांदूळ ठेवला असतां त्या ताठ राहतील तरच तो वर टिकून राहील. यावरून नेहमीं ताठ्यानें वागणें; वर मान करून चालणें. 'शिलेदार म्हणजे मिशीवर तांदुळ ठेवून संसार करावयाचा.'

मिशा-मिशीवर ताव देणें; मिशी-मिशा पाजविणें; मिशांना पीळ भरणें—सूड घेण्याच्या विचाराचें निदर्शक म्हणून मिशावरून हात फिरविणें; तिरस्कारानें, रागानें मिशा वळविणें. २ धमक दाखविणें; प्रौढी मिरविणें. पुढें पहा. 'गंगे ! स्मरतो तुज जो जन, शुचिकर्मीचि होय पळभरि तो । कलिमोह तुझ्या भक्तीं लवतो, उरतीं मिशासि पिळ भरितो ॥'—मो गंगास्तुति १०५.

मिशांना-मिशावर तूप लावणें; मिशावर शीत ठेवणें; मिशीला शीत लावून वागणें—श्रीमंती दाखविणें; पोकळ बाह्यात्कारीं श्रीमंतीचा आविर्भाव करणें; डामडौल करणें.

मिशीचा केंस गहाण ठेवणें.—एक चांगला प्रामाणिक माणूस होता. तो सावकाराकडे जाऊन उसने पैसे मागूं लागला. सावकारानें गहाण काय ठेवतां असें विचारतां त्यानें मिशीचा एक केंस काढून दिला; सावकारानें त्याची पत ओळखून पैसे दिले. हें कळल्यावर दुसरा सावकाराकडे येऊन त्याच तारणावर, नव्हे सर्व मिशा काढून देण्याच्या बोलीनें पैसे मागूं लागला; पण सावकाराला त्याचा विश्वास येत नव्हता; तेव्हां त्यानें पैसे देण्याचें नाकारलें. यावरून अब्रूदार प्रामाणिक माणसाला तारण लागत नसते, त्याची जबान हीच पुरें असते.

मिशयेक घांट बांदिलो—(गो.) मिशाना घंटा बांधलेला. जो मनुष्य अति कुशल असतो त्यालाच ही म्हण लागू आहे.

***मिशा व मतें एकदम फुटतात**—(रा.ग.गडकरी) मनुष्य वयांत आला म्हणजे त्याला जशा मिशा येतात तसाच तो स्वतःचीं मतें म्हणून काहींतरी प्रतिपादन करूं लागतो.

मिशीला शीत लावून वागावें—नेहमीं स्वाभिमानानें, ताठ्यानें वागावें. वर मान करून चालावें; ऐटींत राहावें.

मिशांक ना खोबरेल, दाडाक खंचें मोगरेल ?—(गो.) मिश्यांना खोबरेल मिळत नाहीं तिथें दाढीला मोगऱ्याचें तेल कुठून मिळणार ?

मिश्यो हालयनास्तनां, (फेडे) मिठाई खांयची—

(गो.) मिशा न हालवतां मिठाई खाणें. एखादी गोष्ट गुपचुप पदरांत पाडून घेणें.

मिश्यो हेड जाल्यारि शेट्टि जातवे?—(गो.) मिशा मोठ्या झाल्या म्हणून शेटजी होत नाहीं. शहाणपण वयावर नसतें.

मिशी—-मिस्सी पहा.

मिष्ट—मिष्ट आपणी आणि लिंगदर्शनी—(अशिष्ट.) गोड बोलून हात दाखविणारा; केवळ गोड शब्दांनीं वाटेस लावणारा.

मिष्टान्न भरण करी, त्यास दुखणें भारी—जो नेहमीं गोड पक्वान्नें खातो त्याला अजीर्णाचा विकार होऊन तो आजारी पडतो.

मिष्टान्नमितरे जनाः।—कन्या वरयते रूपं माता वित्तं पिता सुखम् (श्रुतम्)। बांधवाः कुलमिच्छन्ति मिष्टान्नमितरे जनाः॥ लग्नाबाबत पाहतां, मुलीला रूपवान् नवरा पाहिजे असतो, आई जांवयाची श्रीमंती पाहते, तर बाप दोघांना सुख लागेल कीं नाहीं (किंवा वर विद्वान् आहे कीं नाहीं) याचा विचार करतो. सोयरेधायरे कुल कसें आहे हें बघतात, तर इतर लोक लग्नांत लाडू मिळतील म्हणूनच वाट पहातात. यावरून तिऱ्हाईत लोकांना काळजी कसली? तर गोड खाण्याची!

मिस्सी—मिस्सी लावणें—[मिस्सी = दांतवण] दांतांना मंजन लावून वेश्येच्या धंद्याला आरंभ करणें' हा एक विधि आहे. शेसविधी करणें पहा.

मिळकत—मिळकत तीन टक्के, खर्च झाले सात टक्के—आयापेक्षां खर्च जास्त.

मिळण-णी—मिळणीं मिळणें—१ सहमत होणें; एक होणें. 'त्याच्या मनासीं मन मेळवावें। त्यां नित्य त्याचें मिळणीं मिळावें॥' –सारुह ७.१४. २ भेटणें; संयोग होणें.

मिळणीं-मिळणींत—मिळणीस असणें-चालणें-मिळणें—एखाद्याच्या तंत्रानें चालणें; त्याच्याशीं मिळून जाणें; कह्यांत असणें, राहणें.

मिळणी होणें—भेटणें.

मिळणें—मिळत नाहीं भीक तर वैद्यकी शीक—पूर्वी वैद्यांची स्थिति भिकाऱ्यांपेक्षांहि वाईट असे. ते आपल्या औषधांकरितां किंवा तपासणीकरितां फी घेत नसत व लोकहि गरज सरो नि वैद्य मरो या न्यायानें त्यांस समजून कांहीं देत नसत. भीक पहा.

मिळाली चेड, घर मांडवाची मेढ—१ मुलगी मिळाली, तर आतां लग्न होऊं दे. २ समोर सांपडेल त्या स्त्रीवर हात टाकणें.

मिळाली पदवी, बनला ऐदी—एकदां मोठी पदवी प्राप्त झाली म्हणजे मनुष्य आळशी बनतो; त्याची महत्त्वाकांक्षा पूर्ण झाल्यानें त्यास पुढें खटपट करण्यास नेट राहात नाहीं. ही म्हण विशेषतः आजच्या आय्. सी. एस्. होणाऱ्यांस पूर्णांशानें लागू पडते.

मिळाले चहाटळ, शिव्यांची वाचटळ—चार चावट लोक एकत्र जमले म्हणजे त्यांच्यापासून अपशब्दांशिवाय दुसरें काय बाहेर पडणार.

मिळाले बारा भाई, लुटली चंदाबाई—चारचौघे सोळभोक जमून एखाद्या गरीब बाईला नाडणें.

मिळालेली उत्तम कीर्ति, सदां लोकीं प्रकाशती—सुकीर्ति ही चिरंतन व प्रकाशमान राहणारी चीज आहे.

मिळेना भाकर तर पसर साखर—पोटाला जर प्रामाणिकपणें मिळत नसेल तर लाडीगोडी, खुषमस्करी वगैरे लाचारीचे प्रकार केले पाहिजेत.

मिळेल ते दिवशीं तुपाशीं, नाहीं तेव्हां उपाशी; मिळेल तर मेजवानी, नाहींतर उपोषण—असेल तेव्हां चैन करणें व नसेल त्या दिवशीं उपाशीं राहणें. तु०-असेल तेव्हां दिवाळी नसेल त्या दिवशीं शिमगा, पहा.

मिळेल वक्ता पण दुर्मिळ श्रोता—हल्लींच्या काळीं वक्तेच फार. पण त्यांना श्रोते मिळण्याची मारामार पडते.

मिळमिळित—मिळमिळीत सौभाग्यापेक्षां झळझळींत-ढळढळीत वैधव्य शतपटीनें बरें—ढळढळीत पहा. एखादी गोष्ट अर्धवट असण्यापेक्षां नसलेली बरी.--इंप ११२.

मिळवायचें सोपें, पण जिरवायचें-सांभाळायाचें कठीण—१ एखादी वस्तु मिळवणें सोपें असतें पण राखणें त्या मानानें फार कठीण असतें. २ चोरी करणें सोपें पण छपविणें फारच अवघड.

मिळविलें वतन, कर जतन, नाहींतर होईल वपन—आपल्या वाडवडिलांनीं किंवा आपण जर एखादें वतन

मिळविलें असेल तर त्यास नीट जपलें पाहिजे. नाहींतर त्याचा नाश होतो. एकदां वतन मिळविलें म्हणजे तो मनुष्य अगर त्याचे वारस ऐदी बनण्याचा संभव असून तें घालविल्याचीं उदाहरणेंच फार दिसतात. याकरितां अशा लोकांनीं जपून वागलें पाहिजे.

मिळवी कवडी कवडी, एकदम रुपया दवडी—एकदम पै पै करून जमा करीत बसावयाचें व रुपयांनीं घालवावयाचें, असा आयुष्यक्रम ठेवणाऱ्याकडून संचय कसा होणार. तु० - Penny wise and Pound foolish,

मी---मी अन्नावर बसलों आहें--अन्नाची शपथ वाहणें.

मी कोणाचे अगीदुगींत नाहीं—अगीदुगी पहा. दुसऱ्या कोणाच्या भानगडींत न पडणें; केवळ आपल्या पुरेसें पाहणें.

मीच काय तो शहाणा--स्वतःलाच कायतें कळतें अशी प्रौढी मारणारा.

मी तुझी खिरतुपडी खाईन--मी तुझ्यावर मात करीन. कवड्यांच्या खेळांत प्रतिस्पर्ध्याची कवडी मारली म्हणजे आणखी एकदां डाव खेळण्याची संधि मिळते तीस खीरतुपडी किंवा तुप्पी म्हणतात; त्यावरून, दुसऱ्याची कवडी मारणें म्हणजे वर जय मिळविणें;

मी तुझें बारसें जेवलों आहें--मी तुझ्याहून वडील आहें. तुझ्या बारशाच्या वेळीं मी हजर होतों. आपला वरचढपणा,

मी तूं—द्वैतभाव; दुजाभाव; आपुलीकीचा अभाव. 'नाहीं तें नांदाविलें जेणें। मी तूं जगीं ॥' –ज्ञा १५·२८.

मी तूं करणें; मीतूंवर येणें--हमरीतुमरी करणें; वर्दळीवर येणें.

मीमी म्हणणें-बोलणें--स्वतःच्या कर्तृत्वाची बढाई मारणें; ऐट मिरविणें; गर्व वाहणें; अहंपणा दाखविणें. 'जितां बोलती सर्वही जीव मी मीं।' –राम १५. 'भिव्याशी सामना करावयास कोणीहि पुढें जाईनात; मी मी म्हणणारे सारे पहिलवान कचरूं लागले.' '–मी मी म्हणणार लोक प्रायः दिङ्मूढ झाल्यामुळें मात्र पाकिस्थान हा एक भला मोठा बागुल बुवा आहे.' –पाकिस्तानाचें संकट, पान १.

मी म्हणणें--जोरांत असणें; स्वतःचा प्रभाव दाखविणें. 'त्यावेळीं मी कसचा घराबाहेर पडतों, तेव्हां पाऊस मी म्हणत होता.'

मीचें घर खालीं असणें—गर्वाचें, मीपणाचें घर खालीं असणें; गर्वामुळें यश न येणें, उत्कर्ष न होणें.

मी अन् माझा नवरा-नाऱ्या, इतरांचा नको वारा--स्वतःबद्दल व स्वतःच्या पतीमुलांबद्दलच काळजी करणारी व इतरांस दूर ठेवूं पाहणारी स्त्री. बहुधा तरुण स्त्रीस पतीचा सहवास हवासा वाटतो व घरांतील इतर मंडळीची अडचण वाटते.

मी जशी दुसरी, अंगण (घर) तशी ओसरी—एकाप्रमाणेंच दुसरा. भेदभाव कांहीं नसणें. अप्पलपोटेपणाचें मन. उपरोधानें ही म्हण वापरली जाते.

मी तुम्हांला काजी म्हणतों, तुम्ही मला हाजी म्हणा—[हाजी=मक्केची यात्रा करून आलेला मुसलमान] परस्परांनीं परस्परांची स्तुति करणें. "स्पष्टवक्तेपणाचे गोडवे तेवढे आम्ही गातों, तो गुण मात्र आम्हांला रुचत नाहीं, उलट बोचतो, टोचतो; अशी अनिष्ट परिस्थिति सध्यांची आहे. 'मी तुम्हांला काजी म्हणतों, तुम्ही मला हाजी म्हणा!' अशा प्रकारचा पंथ वाढीस लागल्यामुळें माझें काम विशेष बिकट झालें आहे."-- टिकेकर, बातमीदार.

मी न् माही बय, तितलं वऱ्हाड लय—(व.) [बय = बायको] मी व माझी बायको इतकेंच जण समारंभाला जरी हजर असले तरी बस? अत्यंत निकटच्या व खास प्रेमाच्या लोकांबद्दलच जेव्हां एखाद्याची चिंता व्यक्त होते व इतरांबद्दल बेपर्वाई दिसून येते, तेव्हां ही म्हण त्याच्याबद्दल योजतात. तु०–मी आणि माझा नाऱ्या.

मी नाहीं खात नि माझा जीव त्यांत; मी नाहीं खात, माझें मन त्यांत—निस्पृहतेचा आव आणावयाचा पण सारें लक्ष स्वतःचा फायदा कसा होऊं शकतो यांत लागलेलें असावयाचें. एखादी वस्तु कोणीं खाण्यास दिली तर ती नाकारायची पण तो पुन्हां ती वस्तु देईल तर बरें होईल अशी अपेक्षा करावयाची.

मीं पैसे मागितले, त्यानें कान झाडले—कोणाजवळ पैसे मागावयास गेलें म्हणजे तो ऐकूं येत नाहींसें दाखवितो किंवा कांहीं संबंध नाहीं असें दाखवितो. एरव्हीं

बोलावयास अघळपघळ बोलणारे पैशाची गोष्ट काढतांच कानांवर हात ठेवतात.

मीबी राणी तूंबी राणी, पाटाचें कोण आणी पाणी—सर्वच स्त्रिया स्वतःला राणी समजूं लागल्यावर काम कोणीं करावयाचें. आइजी, तूं पहा.

मी भला वाणी, जग देतें गाऱ्हाणीं—वाण्यानें स्वतःबद्दल भलावण करीत असावयाचें. जो तो आपणांला मोठा साव समजतो पण लोकांच्या तक्रारी असतातच.

मी भाग्याची, संगत नको चांडाळाची—दैववान मनुष्यानें करंट्याची संगत केल्यास त्याचें नशीब उघडावयाच्या ऐवजीं त्यास मात्र दारिद्र्य यावयाचें.

मी मरेन, तुला रंडकी करीन—स्वतःचें नाक कापून दुसऱ्यास अपशकुन करणें, याप्रमाणें. स्वतःचेंहि नुकसान व दुसऱ्याचेंहि नुकसान.

मी माझी राणी नि वेटकुळीबाणी, हातपाय ताणी—आपणच आपल्याला मोठें म्हणायचें नि स्वतःच्या मोठेपणाच्या ऐटींत राहून इतरांना तुच्छ लेखायचें, अशा मनोवृत्तीची पुष्कळच माणसें असतात. समाज पण त्यांची योग्य ती किंमत करतो. समाजाला अशा व्यक्तींची मनःस्थिति माहीत असते आणि तो असल्या व्यक्तींशीं तुच्छतेनेंच वागतो. शेवटीं त्या गर्विष्ठ व्यक्तींना स्वतःवरच दांत ओंठ खात स्वस्थ बसावें लागतें.

मी मारीत नाहीं, माझी काठी मारते.—स्वतःच एखादें कृत्य करीत असून नामानिराळें राहण्याचा प्रयत्न करावयाचा.

मी मी आणि कुचल्याची बी—स्वतःचा मोठेपणा जिथें तिथें मिरवून घाण करणाऱ्याबद्दल म्हणतात.

मी वक्ता म्हणून बसूं नये तक्ता—मी बोलणारा, तेव्हां मी नुसता लोडाशीं बसणार! असें करून चालत नाहीं.

मी हांसें लोकाला, शेंबूड माझ्या नाकाला; मी हांसतें दुसरीला आणि शेंबूड माझ्या नाकाला—स्वतःच्या अंगीं दोष असतांना इतरांस नांवें ठेवण्याचा प्रयत्न करणें.—पामो ३८०.

मीपणा टाकशील तर देवपणा पावशील—मनुष्यानें अहंभाव सोडला तर त्यांत व देवांत कांहीं अंतर नाहीं. सोहं किंवा तत्त्वमसि.

मीठ—**मीठ खाणें**—अंगात रग, जोम असणें.

मीठ घालणें—कोणत्याहि खाद्य पदार्थाला गोडी आणण्याकरितां, रसाची पूर्णता करण्याकरितां मीठ घालावें लागतें. २ महत्त्व देणें; भीक घालणें. 'ते दुबळ्या भटभिक्षुकांना मीठ घालतील कीं काय!'—नि १०६८.

पिठांत मीठ घालणें—पुष्कळशा मोठ्या सांठ्यांत थोडीशी भर घालणें; पुष्कळ असून आणखी थोडीशी अपेक्षा असेल अशा ठिकाणीं जरूर ती भर घालणें.

मीठ तोडणें—मीठ कमी करणें; खावयास कमी घालणें. विवाहास मुलगी मोठी झाली तर वाळावी म्हणून तिला मीठ खाऊं न घालणें.

मीठ देणें—(ढोर.) चामडें कठीण करण्याकरितां त्यास मीठ लावणें.

मीठ मोठें खारट असणें—कडक किंवा करडा धनी असणें; मालक मोठा कठोर असणें.

मीठ मोहऱ्या ओवाळणें—दृष्ट काढणें; कौतुक करणें.

(अंगास) मीठ मोहऱ्या लागणें—रागावणें; क्रुद्ध होणें; संतप्त होणें.

मिठापासून मठ्ठ्यावेरी—जेवणाच्या आरंभीं मीठ वाढतात व शेवटीं मठ्ठा वाढतात. यावरून पाहिल्यापासून शेवटपर्यंत.—पाआमा ५.६.

मिठाचा खडा टाकणें—वितुष्ट आणणें; बिघडविणें. 'हंगेरी-जर्मन हितसंबंधांत कोणीं मिठाचा खडा टाकण्याचा प्रयत्न करूं नये.'—केसरी १९-७-४०.

तोंडांत मिठाचा खडा धरणें—तोंडांतून 'ब्र' न काढणें; मिठाची गुळणी करणें. 'बाप जिवंत होता, तों पर्यंत ती नेहमीं तोंडांत मिठाचा खडा धरल्यासारखी जीव मुठींत धरून होती.'—वि. वा. हडप, 'आई.'

मिठाला जागणें—इमान राखणें.

मिठाची गुळणी धरणें—बोलतां येऊं नये म्हणून तोंडांत गुळणी धरतात. यावरून अगदीं न बोलणें; वाचता न करणें. 'ही कल्पनाच त्याच्या अंगावर शहारे आणीत होती. म्हणूनच ती चूक असो अगर नसो, तिचा परिस्फोट न व्हावा म्हणून त्यानें मिठाची गुळणी धरली होती.'—कवठेकर, अपुराडाव १२०.

***नावडतीचें मीठ अळणी**—अळणी पहा.

घाल मीठ, कर नीट--मीठ वगैरे घालून पदार्थ चांगला खाण्याजोगा करावा.

मीठ खाल्लेलो उदाक पितलो--(गो.) ज्यानें मीठ खाल्लें असेल तो पाणी पिईल. ज्याच्या अंगीं दोष असेल तोच त्याच्या निराकरणाचा प्रयत्न करील.

मीठ घालतचि कणु निवरू, सून हाडतचि मायि निवरू--(गो.) मीठ घातलें कीं शिजणाऱ्या पदार्थांचे कण घट्ट होतात आणि सून आणली कीं सासू कठोर होते.

मीठ नाशी भाजी आणि घर नाशी शेजी--ज्याप्रमाणें भाजींत मीठ फार घातलें तर ती बिघडते त्याप्रमाणें शेजारणींचें प्रस्थ फार माजूं दिलें तर त्यापासून आपल्या घरांत कलह लागतो. याकरितां या दोन्ही गोष्टींचा बेतानें उपयोग करावा.

मीठ मिळेना आणि पीठ गिळेना--नुसतें पीठ खातां येत नाहीं व मीठ तर कोठें मिळत नाहीं. याप्रमाणें अर्धवट तुटपुंजी सामुग्री असली म्हणजे नीट कांहीं होत नाहीं व हाल होतात.

मीठ मोहऱ्या आणि पाटीभर गोंवऱ्या--दृष्ट काढा ! या अर्थी उपरोधानें योजतात.

मीठ रुसलें, अन्न बसलें-हटलें--अन्नांत मीठ नसलें तर तें कोणी खाणार नाहीं.

मिठाची केली वाण, लोणच्याची झाली घाण; मिठाची वाण, लोणच्याची घाण--अडक्याची पहा.

मिठावाचून सर्वच अळणी--पदार्थांत मीठ नसेल तर त्याला कांहीं चव लागत नाहीं. मुख्य गोष्ट नसेल तर इतर सर्व गोष्टी असून निरुपयोगी होतात. तु०--Hamlet without the Prince of Denmark.

मीठवाला रडे, नारळवालाहि रडे--समुद्रकांठीं मीठ पिकलें नाहीं व नारळहि झाले नाहींत. दोघेहि समदुःखी. याविषयीं एक गोष्ट आहे.

मीण--**मिणाक आनी धावाकूय एकच**--(गो.) जाराला आणि नवऱ्याला एकच अवस्था असते.

मीन--**मीन मेष**--(फलज्योतिषांत मीन रास, मेष रास पाहून स्वभाव सांगतात त्याप्रमाणें) मेषपात्र; कमकुवत; बलहीन; रड्या.

मीरजाफर--**मीरजाफरी कारस्थान-वृत्ति**--(मीरजाफर हा बंगालचा नवाब सुराजउद्दौल्यानंतर गादीवर इंग्रजांच्या मदतीनें बसला. हा इंग्रजांना फितूर होता म्हणून) फितुरी. 'मि. जिना यांनीं विलायतेंतील पार्लमेंटच्या एका सभासदाला पत्र पाठवून मीरजाफरी कारस्थान सुरू केलें होतें.' केसरी ७-११-४१.

मुका--**मुका मुलगा-नातू होणें**--विवाहित मुलीला प्रथम न्हाण येणें. या न्हाणानंतर लगेच गर्भाधान विधि होत असे, तेव्हां आईबापाला मुलगा किंवा आजोबा आजीला नातू लवकरच होण्याचा आनंद होई. 'त्यांना मुका नातू झाला होता. याच आनंदात धोंडोपंत स्वतःच सुनेला मूळ गेले.'-कवठेकर, अपुराडाव १२४.

मुका राहाणें--(बागलाणी) गप्प बसणें.

मुकें जनावर--घोडा, गाय, म्हैस इ. जनावरांना बोलतां येत नसल्यानें आपले विचार, विकार दाखवितां येत नाहींत. त्यामुळें फार कुचंबणा होत असेल. याच प्रमाणें उपवर कन्या, बालविधवा इ. ची स्थिति असते. तु०-' मुकीं मेंढरें, कुणी हांका ।'

मुका खाल्लें, गू झालें--(गो.) चांगली वस्तु वापरून ती घाणेरडी करून टाकून देणें.

मुकी मारली, हांक ना बोंब; मुकीला हेपललें, हांक ना बोंब--मुक्या स्त्रीस मारलें किंवा कांहीं केलें असतां ओरड होत नाहीं, कारण तिला बोलतां येत नाहीं.

मुकें जेवावें नी मनीं समजावें--(व.) आपल्या समोर ज्या गोष्टी घडत असतील त्यांच्या संबंधानें फाजील चौकशी न चालवितां मनांतल्या मनांतच त्यांचा उलगडा करीत राहावें, म्हणजे आपल्या मनाविरूद्ध गोष्टी घडत असल्यास बाचाबाचीनें आपला मनस्ताप वाढणार नाहीं.

मुक्या, मुक्या, मार द्या बुक्क्या--तोंड दाबून बुक्क्याचा मार, पहा.

मुक्याचे मनीं मंगळवार--मंगळवारीं कोणताहि बेत करूं नये अशी समजूत आहे. मंगळवारी बोलत नाहींत याकरितां मंगळवार असला म्हणजे मुक्याचें मुकेपण उघडकीस येत नाहीं, याकरितां त्याला तोच वार असावा असें वाटतें.

मुक्याला लुटलें, हांक ना बोंब--मुकी मारली० पहा.

मुकाट्यानें--**मुकाट्यानें बसलें म्हणजे सर्व कार्य साधतें**--फार बोललें नाहीं म्हणजे बहुधा कोणी

आपल्या विरूद्ध जात नाहीं व आपला हेतु पूर्ण होतो. तु०–मौनं सर्वार्थसाधनम् ।

मुक्त——मुक्ताच्या देहीं, अभिमानाला ठाव नाहीं—जो मनुष्य विरक्त असतो त्याच्या मनांत अहंभाव नसतो.

मुक्ताफळें——१ तोंडांतून निघालेल्या शब्दांस उपरोधानें मोत्यांची उपमा देतात यावरून, (सुंदर) शब्द, वाक्यें. ' मुक्ताफळें येथें दाखल करून या मोत्यांचा खोटेपणा... ' टिळे, २.१९८. २ शिव्या; अपशब्द.

मुक्ति ——मुक्ति घेणें–पावणें; मुक्तीला पोंचणें——१ मरणें. २ जीव-मुक्त होणें; जन्ममरणाच्या फेऱ्यांतून सुटणें.

मुक्स—मुक्सांतून वाक्सं निघणें—[मुक्स= मुख. वाक्स=वाक्य] बोलणें; मुखावाटें शब्द काढणें. (हेटाळणीच्या स्वरानें बोलताना म्हणतात.)

मुख——मुख पसरणें—आ करणें; तोंड मोठें करणें.

मुखीं बोटें घालणें—आश्चर्य करणें; तोंडांत बोटें घालणें पहा. ' घालुनि ऋषि मुखिं बोटें हा हा ! म्हणती सुयोधना कुटिला ।'–मो.

***मुख पाहून मुशाहिरा आणि घोडा पाहुन खरारा**—ज्याची त्याची योग्यता पाहून ज्यास त्यास मोबदला मिळतो. लायकीप्रमाणें फळ मिळणें.

मुखमस्तीति वक्तव्यम्—(सं.) तोंड आहे म्हणून वाटेल तें बोलावें काय !

मुखमें राम, बगलमें छुरी—(हिं.) पुढला चरण –भणे गणे पण दानत बुरी. आंत एक, बाहेर एक अशी ज्याची कपटी वृत्ति आहे अशाबद्दल म्हणतात. –केसरी २१-२-४१. God in his tongue, and devil in his heart.

मुखीं वदे रामराम नि मनीं दिसे सदा काम—बाहेरून रामनामाचा घोष लोकांना फसविण्यासाटीं चालू ठेवायचा,आपल्या निस्पृहतेचा ढोल वाजवायचा पण मनांत मात्र आपणाला कोण किती पैसे देतो, कोणता भक्त जास्त पैसे देऊं शकेल याची गुरुमाऊली माळ ओढीत असतात. ढोंगी व आपमतलबी लोकांच्या वागणुकीचें यांत गमक आहे.

मुखीं नाम तेव्हां हातीं मोक्ष—तोंडानें परमेश्वराचें नांव घेतलें तर मोक्षाची प्राप्ति होते.

मुखस्तंभ——खावयास अगडबंब, म्हणावयास मुखस्तंभ—अधाशीपणानें खाऊन वेदाध्यायन किंवा विद्या न करणारा.

मुखार——मुखार गेलेल्याक पाय आदळयारि माकशी आशिल्यानें जागीं जांवका—(गो.) पुढच्यास ठेच लागली कीं मागचा शहाणा होतो.

मुखारी चोयनातिलो माकाशी पडता—(गो.) दूर दृष्टि नसलेला माणूस कोणत्याहि व्यवसायांत मागें पडतो.

मुंगळा——मुंगळा–ळी लागणें—(मुंगळा चावला असतां ज्याप्रमाणें आपण ताडकन उठतों, अंग झाडतों त्याप्रमाणें) चेव येणें; अतिशय घाई करणें.

साखरेवरले मुंगळे—साखर आहे तोंपर्यंतच मुंगळे आहेत. (ल.) शालूसोबती; आपल्या जवळ जोंपर्यंत पैसा आहे तोंपर्यंतच जवळ टिकणारे, कामास पडणारे.

***मुंगळा म्हणतो, आई मी भेली उचलतो, बाळा तुझी कंबरच सांगते**—जो तो आपल्या कुवतीप्रमाणें काम करूं शकतो.

मुंगा——मुंगा जिरणें–जिरविणें—गर्व, खुमखुमी ऐट इ. नाहींशी होणें, करणें. ' सहजांत जिरविती सर्व तयाचा मुंगा ।'–ऐप्री.४२४.

***मुंगे पानोपान, माशा घाणोघाण**—पानें असतील तेथें मुंगळे येतात व घाण असेल तेथें माशा जमतात.

मुंगी——मुंगीचा हत्ती करणें—फुगवून सांगणें; पराचा कावळा करणें.

मुंगीची रीघ होणें कठीण—१ अतिशय दाटी असणें; मुळींच जागा, वाव नसणें. २ कोणाचाहि शिरकाव न होणें; पक्का बंदोबस्त असणें.–इंप.

मुंगीच्या पायानें–पावलानें—मुंगीच्या गतीनें; अगदीं हळू हळू. ' लोकांस असें वाटत असेल कीं, मुंगीच्या पावलानें सुधारणा होत जावी. '–केसरी.

मुंगीच्या पायानें चालणें–जाणें–येणें—मुंगी व मनुष्य यांच्या चालीची तुलना केल्यास मनुष्याची अथवा इतर प्राण्यांची गति जास्त असते. तेव्हां मुंगीच्या पायानें चालणें म्हणजे हळू चालणें. वेळेच्या मानानें अगदींच अल्प प्रगति होणें.

मुंगीच्या पायानें येणें आणि हत्तीच्या–घोड्याच्या पायांनीं जाणें—सावकाश येणें आणि त्वरेनें निघून जाणें (संपत्ति, वैभव वगैरेसंबंधीं योजतात.) याच्या उलट हत्तीच्या पायांनीं येणें आणि मुंगीच्या पायानें जाणें. (दुखणें, दुःख इ.)

मुंगीस पंख–पक्ष फुटणें—मृत्यूचीं, विनाशकाळाचीं चिन्हें दिसणें. 'त्याची आयुष्यमर्यादा सरली. म्हणोन त्यास मुंगीस पक्ष फुटतात तैसा प्रकार घडला.'–भाब ३. "सर्वत्रांनीं कल्पना केली कीं, 'मुंगीस पक्ष फुटतात तैशी गत जाहली.' उपाय नाहीं म्हणोन आपले जागां स्तब्ध राहिले."–भाब ४३.

मुंग्या येणें–चढणें—वातविकारामुळें शरीरावयवास बधिरता येणें; अवयव जड होणें.

मुंग्या लागणें—वेदना होणें. मुंग्या येणें पहा.

*मुंगी होऊन साखर खावी पण हत्ती होऊन लांकडें खाऊं–तोडूं–फोडूं नयेत—लहानपणा पत्करून सुस्थितींत असणें बरें म्हणजे मोठेपणाच्या हालांत पडावयास नको. 'मुंगी होउनि साखर खावी। निज वस्तूची भेटी घ्यावी॥'–तुकाराम. तु०–लहानपण देगा देवा। मुंगी साखरेचा रवा॥ १॥ ऐरावती रत्न थोर। त्यासी अंकुशाचा मार॥ २॥ ज्याचे अंगीं मोठेपण। तया यातना कठीण॥ ३॥ तुका म्हणे बरवें जाण। व्हावें लहानाहुनि लहान॥ ४॥–तुगा ११९१.

मुंगीचीया घरा कोण जाई मूळ।—देखोनीया गूळ। धांव घाली॥–तुकाराम. साखरेच्या ठिकाणीं मुंग्या आपसूक चालून येतात. त्यांना कोणी बोलावणें पाठवावें लागत नाहीं. तसेंच १ आपल्या जवळ गुण असला किंवा आपलें तसेंच कांहीं वैशिष्ट्य असलें म्हणजे लोक आपल्या मागें असतात. २ श्रीमंत असतो त्याच्यामागें याचक आपण होऊन धांवत जातात.

मुंगींनीं केली मेहनत पण दगडापुढें कसली करामत—मुंग्यांनीं खूप कष्ट केले तरी त्यांस कांहीं दगड उचलतां येणार नाहीं किंवा त्यास भोक पाडतां येणार नाहीं. क्षुद्र मनुष्यानें कितीहि खटपट केली तरी त्याच्या हातून फार मोठें काम होऊं शकत नाहीं.

मुंगीयेचें मढें तें मुंगीयेंच काढावें—(महानु.) मुंगीचें मढें मुंगीनेंच उचलून न्यावें. लहान गोष्ट लहान माणसानेंच करावी. विशिष्ट गोष्ट विशिष्ट प्रकारानेंच करावी लागते.

मुंगीला पंख फुटलें म्हणजे मरायची निशाणी—पावसाळ्याच्या आरंभीं मुंग्यास पंख फुटतात व तसे पंख फुटले म्हणजे त्या आकाशांत उडूं लागतात व खालीं पडून मरतात. त्याप्रमाणें मनुष्यास गर्व झाला म्हणजे तो गर्वानें फुगतो व मग त्याचा नाश होतो.

मुंगीला मध आणि बुद्धीला मद—मुंगी मध खावयास गेली म्हणजे त्या प्रमाणें त्यास चिकटून राहते व मध तीस सोडवत नाहीं व स्वतःलाहि दूर करून घेतां येत नाहीं त्याप्रमाणें मनुष्याला मद चढला म्हणजे त्याला स्वतःबद्दलचा वाटत असलेला मोठेपणा सोडवत नाहीं व त्यामुळें त्याचा नाश होतो.

मुंगीला मिळाला गहूं, कुठें नेऊं अन् कुठें ठेऊं—एखाद्या क्षुल्लक मनुष्यास अल्पसाहि लाभ झाला तरी तो अगदीं हुरळून जातो.

मुंगीला मुताचा पूर—क्षुद्र माणसास क्षुल्लक गोष्टी पासूनहि भय असते. –दा१५.८.४.

मुंगीला साखर टाकायची आणि मनुष्याचा खून करायचा—कांहीं लोक मोठ्या भूतदयेचा आव आणून मुंग्यास खावयास साखर घालतात व बारुळें शोधीत हिंडतात व अशा रीतीनें जीवजंतूंचें रक्षण करण्याची प्रौढी मारतात पण व्यवहारांत पाहावें तों गरीब कुळांस नाडून, छळून छळून त्यांस मृत्यूच्या द्वारीं पाठवितात. अशा दांभिक कठोर अंतःकरणाच्या व्यवहारी माणसांस ही म्हण लावतात.

मुंगूस——मुंगूस पाहिला आणि साप पळाला—मुंगूस व साप यांचें हाडवैर असून मुंगूस सापास मारतें त्यामुळें साप मुंगसाच्या वाऱ्यास उभा राहात नाहीं. त्याप्रमाणें जबरदस्त शत्रु पाहिला कीं, दुष्ट मनुष्य पलायन करतो.

मुजरा——पात्छाईचे पांच मुजरे—प्रथमदर्शनीं आघाडीवरील पांच वेळां सलाम.

मुजऱ्याक कोण ना, हुलप्याक पंचवीस—(गो.) हुलपा (बिदागी) घेण्याला पुष्कळ परंतु मुजरा करावयाला कोणी नाहीं.

मुंजा——बारा पिंपळावरचा मुंजा—बारा पहा.

मुंजाचा पितर होणें—मुंजा लग्न न झालेला मनुष्य श्राद्धपक्षांत पितृस्थानीं बसूं शकत नाहीं; लग्न झाल्यावर त्याला तो अधिकार येतो. लग्न होणें म्हणजे पितर होण्याचा अधिकार प्राप्त होणें असा अर्थ. 'मी नुसता मुंजाचा पितर झालों, खरें वैवाहिक सौख्य लाभलेंच नाहीं.'

मुंडण——मुंडणपर्वणी——१ हजामतीस योग्य दिवस. २ (ल.) सुट्टीचा दिवस. या दिवशीं हजामतीला फुरसत सांपडते.

तीर्थी गेल्यावांचून मुंडण होत नाहीं—तीर्थ पहा.

मुंडणें——मुंडला जाणें——नागवला जाणें; लुबाडला जाणें.

वैद्याचें चांटलें आणि संन्याशाचें मुंडलें कोणास समजत नाहीं—वैद्याचे खलबत्त्यांचा आवाज होत नाहीं त्या प्रमाणें संन्याशी मुंडण उघड्यावर किंवा घाटावर करीत नाहीं त्याप्रमाणें, कांहीं गोष्टींची बाहेर परिस्फुटता होत नाहीं.

मुडदा-मुडदा पाडणें—ठार करणें.

मुडा-मुड्यांनीं खाल्लें तर वेढ्यांनीं तरी पाऊक जाय—(गो.) एखाद्याकडून पुष्कळसें घेऊन खाल्लें तर थोडें तरी त्याला पोंचविलें पाहिजे.

मुंडा——मुंडो खाल्ल्या तोंडान कुंडो खावप—(गो.) ज्या तोंडानें मुंडा खाल्ला त्याच तोंडानें कोंडा खावयाचा. उच्चपदापासून खालीं घसरण्याचा प्रसंग आहे.

मुंडा——हिजड्याची जोड मुंड्यानें खावी—[मुंडा=हिजड्याबरोबर भिक्षेस असणारा] दोघेहि सारखेच एकत्र मिळतात.

मुंडी——मुंडी मारणें-मारून बसणें—भयानें दबकून बसणें; हातपाय आंखडून बसणें.

मुंडी——मुंडी उडविणें—मान तोडणें. 'हा उडवितों तुझी मी बकऱ्याची जेंवि शिघ्रतर मुंडी !'–मो द्रोण १७.६७.

मुंडी फिरवणें—नको म्हणून मान हलविणें; नापसंती दाखविणें.

मुंडी पिरगाळणें-पिळणें-मुरगाळणें—छळणें; त्रास देणें; सर्वतोपरी नाश करणें.

मुंडी हालविणें-डोलविणें——होस हो करणें; न समजतां कबूली देणें.

चारी मुंड्या चीत करणें——सपशेल आपटणें; पूर्ण पराजय करणें. चार पहा.

मुढा——मुढा माकोजी आणि नकटा टिकोजी—[मुढामाकोजी=बढाईखोर] रिकाम्या बढाया मारणाऱ्या माणसाबद्दल म्हणतात.

मुतणें——उभ्यानें-फेर धरून मुतणें——अगदीं लाजलज्जा सोडून वागणें; लाज सोडणें.

मुतायापुरतें लिंग हातीं धरावें—नीच मनुष्याशीं अगदीं कामापुरता, जरूर तेवढाच संबंध ठेवावा. अधिक ठेवूं नये.

उब्बुनु मुतुच्च रय्याक धांवनु मुतुच्चो मंत्री—(गो.) उभ्यानें मुतणाऱ्या राजाचा धांवत मुतणारा मंत्री. ठकास महाठक. दुष्ट राजाचा मंत्री अति दुष्टच असतो.

गुरु उभ्यानें मुतूं लागले की शिष्यमंडळ (लिंग) धरून मुततात—पुढाऱ्यानें एखादी मूर्खपणाची गोष्ट केली कीं त्याचे अनुयायी त्याच्याहि पुढें जातात.

मुतूंक झाल्यावर चोटली हातांत धरणें—(गो.) गरज लागल्यावर तजविजीस लागणें.

मुद्दई——मुद्दइ सुस्तः गव्हर चुस्त—(म्हानु.) (मुदई=फिर्यादी. गव्हा=साक्षीदार) जो फिर्यादी तो आळशी, मंद पण साक्षीदार मात्र चलाख.

मुदन——मुदन वळणें——(व.) कोमजणें.

मुदल——मुदलांत मुरकुंडी—मांडवलात तूट; नफा न होतां मांडवल जाणें.

मुदलावर येणें—(ल.)मूळ स्वभावावर येणें; पूर्वीचे दुर्गुण पुन्हां दिसूं लागणें.

मुदल नासून कळांतर बुडतां—(गो.) मुदलच गमावून वर आणखी व्याज बुडाल्याबद्दल हांकाटी करणें.

मुदलसे बियाज प्यारा होता है—(हिं.) मुदलापेक्षां व्याजावर जास्त प्रेम असतें.

मुद्दलाची भरपाई, व्याजाची कमताई—मुद्दल भरपूर परत पाहिजे असेल तर फार व्याजाची आशा करूं नये.

मुद्दलाचें घर व्याजांत जातें—एकदां गहाण ठेवलेलें घर व्याज वाढून सावकाराकडे जातें.

मुदी—मुदये थिक बसचप—(गो.) आंगठीच्या कोंदणांत खडा बसवणें.

मुद्रा—मुद्रा देणें—१ दीक्षा देणें (विशेषत: वैष्णव संप्रदायाची, मुद्रा तापवून डाग देणें). २ मर्म सांगणें; गूढ ज्ञान सांगणें. 'ते मुद्रा श्री गोरक्षराया। दिधली मीनीं।'-ज्ञा १८. १७५४.

मुद्रा पडणें—वळण येणें; चेहेऱ्यावर आविष्कार होणें. 'बाहेर युक्तीची मुद्रा पडे। तंव आंत सुख वाढे।' -ज्ञा ६.३६.

मुद्रा लावणें—समाप्तिसूचक शिक्का देणें; खूण करणें. 'म्हणौनि नत्रमींचिया अभिप्रायीं। सहसा मुद्रा लावावया। विहाला मी वायां। गर्व कां करूं॥'-ज्ञा १०.३२.

मुद्रा बावळी व वेष अजागळ—चेहरा व पोषाख दोन्हीहि गबाळपणाचें.

मुद्रा बावळ्याची आणखी नजर कावळ्याची—वरून दिसावयास भोळा पण आंतून लबाड.-संक. ३-१-४३

मुनि—मुनित्रय—पाणिनि, कात्यायन व पतंजलि हे तीन व्याकरणातील द्रष्टे.

मुनिश्राद्ध—मुनीनें केलेल्या श्राद्धांत ब्राम्हणांना काम फार पडून प्राप्ति फारच थोडी होते. यावरून फार काम पण मिळकत थोडी अशाबद्दल म्हणतात.

मुफत—फुकट पहा. **मुफत मिळेल जेऊं, तर बापलेक येऊं**—फुकट पहा. एखादी वस्तु फुकट मिळत असेल तर मनुष्य तीवर यथेच्छ हात मारावयास तयार होतो.

मुफतचें चंदन घास बे लाल्या—वरप्रमाणें.

मुफलस—मुफलससे सवाल हराम है—(हिं.) भिकाऱ्याजवळ मागणें हें अयोग्य.

मुंबई—जिवाची मुंबई करणें—चैन करणें; मजा करणें, मुंबईस सुखसाधनें पुष्कळ, तीं अनुभवणें. 'किंवा एखादा टांगेवाला आपल्या बायकोला तलम मलमलीचें पातळ नेसवून आणि तिला टांग्यांत शेजारीं बसवून चतु:शृंगीला जिवाची मुंबई करायला नेईल.'-अत्रे, नाशिक सा. संमेलन.

पैशाची मुंबई करणें—पैसा घालविणें, उधळणें.

एखाद्याची मुंबई होणें—१एखादा माणूस बेपत्ता होणें. २ व्यापारात बुडणें.

एखाद्या पदार्थाची मुंबई होणें—त्याची नासाडी होणें.

मुंबईचा पारशी, हातांत आरशी—मुंबईचे पारशी लोक हे भपकेबाज असतात.

मुंबईची वसवस आणि कोणी म्हणेना खालीं बस—मुंबईस जो तो आपल्या घाईत असतो त्यामुळें स्वस्थ पणें बसून बोलण्यास कोणास वेळ नसतो.

मुंबईचें पाणी आणि हातपाय ताणी—मुंबईस पूर्वीं पाण्याची फार हाकाटी होती त्यावेळची ही म्हण आहे.

मुबारक—मुबारक करणें—बक्षीस करणें; इनाम देणें. 'शिंकें याशी गांव व महाल मुबारक करून त्यांची कन्या महाराजांनीं आपले पुत्रास केली.'-चित्रगुप्त ५.

मुय—मुय खाता साखर आणि वाघ खाता बरगां—मुंगी खाते साखर आणि वाघ खातो कुजलेले ओंडके. नम्रता धारण करील त्याचा स्वार्थ साधतो. मुंगी पहा.

मुयेक मुताचो प्रसंग—(गो.) मुंगीला मुताचा ओघळसुद्धा प्रलयकालीन महापुरासारखा वाटतो. मुंगीस मुताचा पूर.

मुया—मुयेपर कोयी किसीके काम आता नहीं—(हिं.) मेल्यावर कोणाचा उपयोग नाहीं.

मुये शेरसे जिती बिल्ली भली—मेलेल्या वाघापेक्षां जिवंत मांजर बरें.

मुवे बापकी बडीबडी आंखे—मेल्या म्हशीस दूध फार याप्रमाणें.

मुरका—मुरका मारणें—चेहरा नखरेबाजपणें फिरवणें. लाजून मुरडणें. 'त्यांना पाहून साळू मुरका मारून उभी राहते.' -मोर प्र १५.

मुरकुंडी—(घर) मुरकुंडी-ड्या पडणें—ढब्या पडणें. 'अनेक दिसाची सहज मुरकुंडी वरि पडे।' -सारुह ६.१६२. 'अनंत फंदीच्या लावण्यावर हजारों माणसांच्या मुरकुंड्या पडत.'

मुरकुंडी पाडणें—चीत करणें; जिंकणें.' विषिहराची मुरकुंडी । अमंग पंचकुसुमशरोंचि पाडी ।'-जै १.१००.

मुरकुंडी वळणें—१ गात्रसंकोचन होणें (हास्य, औत्सुक्य, भीति इ. मुळें). २ गर्भगळित होणें. ' मुरकुंडी कंसाची वळली। शस्त्रें हातींचीं गळालीं ।'-हवि ५३.११७. ३ देहभान जाणें.

मुरख-मूर्ख पहा. **मुरख आगल बात, रिजे पण बुजे नहीं**—(गु) मूर्खाला चांगला उपदेश मानवत नाहीं.

मुरखकी सारी रात, चतरकी एकच बात.—(हिं.) मूर्खानें सर्व रात्रभर केलेली बडबड व चतुर मनुष्यानें बोललेलें एकच उत्तर सारखेंच.

मुरखकों बखान सहवे—(हिं.) मूर्खाला स्तुति प्यार असते.

मुरगा——मुरगा बांग न देगा तो सुबा न होवेगी—(हिं.)कोंबडा आरवला नाहीं तर सूर्य उगवण्याचें राहात नाहीं. कोणावांचून अडत नाहीं. या अर्थी.

मुरगी मरे, बच्चे-बचडे दाणादाण—(हिं.)कोंबडी मेली म्हणजे तिच्या पिल्लांची त्रेधा वाताहात उडते; तसा पुढारी मेल्यावर सैनिकांची दाणादाण होते. " 'मुरगी मरी बचडे दाणादाग ' तैसे जिकडील तिकडे पळाले." -भाव. १०२.-भाव १५.

मुरगीके ख्वाबमे, दानाही दाना—(हिं.) कोंबडीला स्वप्न पडणार तें दाण्यांचेंच.

मुरगीस विसमिल्ला तो कशास—क्षुल्लक गोष्टीस गाजावाजा कशाला.-इसं. होकै. ११.

मुरड——मुरडकानवला खाणें—प्रेमाचें माणूस परगांवीं जावयास निघालें असतां तें लवकर परतून यावें म्हणून त्याला शेवटच्या जेवणांत मुरड घातलेला कानवला करून वाढतात यावरून, गांवाहून लवकर परत येणें.

मुरणें——मुरतें तेथेंच जिरतें—जी जमीन भुसभुशीत असते तींतच पाणी जिरतें. जेथें कांहीं साधण्यासारखें असतें तेथेंच कोणी प्रयत्न करतो. जेथें जागा असेल तेथेंच कोणी दोष देतो.

मुरली——घरांत मुरळ्या नाचविणें—मनसोक्त वागणें; स्वैर वागणूक ठेवणें.

मुरी——मुरी मारणें; मुरून बसणें—१ गुडघ्यांत मान घालून बसणें. २ दडून, लपून बसणें.

मुर्मुरी जाणें—(कर.) रागावणें.

मुलगा——मुलगा कीं मुलगी—सांगितलेल्या, किंवा विशिष्ट कामासंबंधीं विचारण्याची सांकेतिक पद्धत, म्हणजे त्या कामाचें काय झालें. काम झालें की न झालें ? झाल्यास मुलगा, न झाल्यास मुलगी असें उत्तर.

***मुलगा देखणा, मात्र अकल उणा**—सुंदर परंतु निर्बुद्ध मनुष्य.

मुलगी——मुलगी उजविणें—मुलीचें लग्न करून टाकणें व तिच्या ऋणांतून मुक्त होणें.

मुलगी गळ्याशीं-गळीं लागणें—मुलगी लग्नाला आली असणें; लग्न एव्हां न झालें तर मोठी कठीण स्थिति आहे. अशी आईबापांना विवंचना लागणें.

मुलगी देऊन मुलगा करणें—जांवई हा मुलाप्रमाणेंच. तेव्हां मुलीला देऊन मुलगा घेण्याप्रमाणें मुलीचें लग्न आहे.

मुलगी सांगून येणें—आमची मुलगी आपल्या मुलाला करून घ्या असें मुलीकडून वरपक्षास सांगून येणें.

मुलगी चालली सासरीं, गळा दाटला अंतरीं—मुलगी सासरीं जाऊं लागली म्हणजे पित्यास दुःख होणें साहाजिक आहे.

मुलगी देऊन जांवयाला आणि ऋण देऊन कुळाला आयुष्य चिंतावें—जांवयाच्या जीवितावर मुलीचें कल्याण अवलंबून व कूळ जर जिवंत राहील तर आपला पैसा परत करील अशी सावकाराची स्थिति. तेव्हां मुलीच्या मातापित्यांनें व सावकारानें अनुक्रमें जांवई व कूळ यांना भरपूर आयुष्य असावें अशी इच्छा केली पाहिजे.

मुलना——मुलना अपराधी, काजीस दंड—मुल्लाच्या अपराधासाठीं काजीला दंड. शिष्याच्या अपराधासाठीं गुरूस दंड. शिष्यापराधे गुरुर्दण्डयः ।

मुलूख——मुलूक-ख उठणें—मुलूख ओसाड पडणें.

(साऱ्या) मुलखाचा——मुलखांतला-मुलखावेगळा-(निराळा); मुलखावरून ओवाळून टाकलेला—अतिशयता, आधिक्य दर्शविणारें विशेषण. नीच, हरामखोर, बदमाष चोर या शब्दापूर्वी येतें. ' किती सांगु हो गुण बाळाचे हही मुलखाचा ।' -मू ६३.

मुलखांत दिवा लावणें--ओसाड प्रदेशांत वस्ती करणें; निर्जन प्रदेश वसविणें.

मुलखावर जाणें--देशत्याग करणें; परागंदा होणें.

मुलखावर उठून जाणें--एखाद्या बरोबर व्यभिचारी स्त्रीनें दूर जाणें.

मुलखास जाणें--१ आपल्या प्रांतीं, मायदेशास परत जाणें. २ कोठेंतरी निघून जाणें.

***मुलखाचें नांव आणि आपलें गांव**--दुसऱ्याच्या नांवावर आपला फायदा करून घेणें. एखाद्या सार्वजनिक कामाकरितां वर्गणी जमवून स्वतःचा तळीराम गार करणें.

मुशारा; मुशाहिरा--**मुख पाहून मुशारा, घोडा पाहून खरारा**--मुख पहा.

मुष्टि--**मुष्टि मोदक देणें**--[मुष्टि मोदक=गुद्दा] गुद्दे मारणें; ठोसे लगावणें. 'कुणबी, माळी, हेटकरी, यांच्या पोरांना मुसलमानांनीं चोपतांना पाहिलें कीं, तो चित्यामारखा धांवून जाऊन त्यांस यथेच्छ मुष्टिमोदक देई.' --बाजीराव.

मुसकट--**मुस्कट फिरविणें-फोडणें-सुजाविणें**--थोबाडींत देणें; चांगली कानशिलांत भडकावणें.

मुस्कटांतलीं वासकटं बाहेर पडणें--(निंदार्थी) बोलणें; आपलें म्हणणें काय तें सांगून टाकणें. मुस्कांतु वाक्सं काढणें पहा.

मुसक्या--**मुसक्या आवळणें--बांधणें**--(कैद्याचे हात मागें बांधतात यावरून) कैद करणें; कैदेंत टाकणें.

मुसलमान--**एखाद्याला मारुन मुटकून--हाणून मुसलमान करणें**--एखादी गोष्ट करण्यास भाग पाडणें; बळजबरी करणें.

घरचे भेणें घेतलें रान, वाटेस भेटला मुसलमान--'घरच्यां भयानें०' घर पहा, "घरचे भेणें घेतले रान, वाटेस भेटला मुसलमान' ती गत आमची जाली." --पेद २६.१२४.

मुसलमान धंद्यानें पिंजारी पण नांवानें खान असतो--मुसलमान लोक हलका धंदा करीत असले तरी आपणास मोठे खानदानीचे समजतात.--चिज. ऑगष्ट १९३६.

मुसलमान भुका, हात सुका--मुसलमान भुकेला असल्यास तो बहुधा खरोखरच कफल्लक असतो.

मुसलमान व बेइमान--मुसुलमानाबद्दल सामान्य लोकांची कल्पना या म्हणींत व्यक्त केली आहे.

मुसलमान श्रीमंत झाला तर मीर होतो, गरीब झाला कीं फकीर होतो, मेला कीं पीर होतो--मुसलमानाच्या निरनिराळ्या अवस्थांतील त्याची पदवी निरनिराळी कशी असते हें या म्हणींत दाखविलें आहे. - चिज. आगस्ट १९३६.

मुसलमान की जात, बारा बरस खांदे पर लेव तोभि एक दिन बोलेगे, साले धीरेसे उतारो!--मुसलमान लोकांची जात अगदीं कृतघ्न व कठोर वृत्तीची असते.

मुसळ--**सगळेंच मुसळ केरांत**--मुसळ केरांत जाणें म्हणजे फारच दुर्लक्ष अंदाधुंदी असणें. कारण केरांत जाण्याइतकें मुसळ लहान नसतें! अत्यंत महत्त्वाच्या गोष्टी-कडे दुर्लक्ष होणें; महत्त्वाचीच गोष्ट विसरणें.--तोबं ६२.

मुसळ नेसणें-पांघरणें-डोक्याला बांधणें--(ल.) निर्लज्जपणानें वागणें; सभ्यतेला सोडून वागणें; आपली अब्रू सोडून निर्लज्जपणाचे आचार करूं लागणें.

मुसळस्नान--कांहीं एक संकल्प किंवा मंत्र न म्हणतां नुसतें उभ्यानें अंगावर पाणी घेणें; अंग न चोळतां घाईनें स्नान उरकणें. 'नकरी देहमळ क्षाळण । मुसळवत् करी स्नान ।'--एभा २३-५००.

मुसळाचें धनुष्य-धनु करणें--अशक्य गोष्ट शक्य करणें.

मुसळाचें धनुष्य होत नाहीं--अशक्य गोष्ट होऊं शकत नाहीं. मानी मनुष्य वांकत नाहीं. 'मुसळाचें धनु नव्हे हो सर्वथा। पाषाण पिळीतां रस कैचा ।'--तुकाराम.

मुसळानें टिऱ्या बडविणें--हुरळणें; अतिशय हर्ष होणें, आनंद होणें. 'थोड्याशा यशानें मुसळानें टिऱ्या बडवून घेऊं नका.'

मुसळास-ला अंकुर फुटणें--१ शक्य कोटींतील पण अत्यंत असंभवनीय अशी कांहीं एक गोष्ट घडून येणें. 'बिसल्याच्या जगदेवराव पाटलांच्या खुनाच्या खटल्यांत न्यायाधिशांनीं संशयाचा फायदा देऊन सर्व आरोपी सोडले तरी पुन्हा त्यानंतर खरे गुन्हेगार शोधण्याची कोशीस करण्यांत आली तसा प्रयत्न हैद्राबादच्या मोगली न्याय खात्याकडून बिदर दंग्यांतून खरे गुन्हेगार शोधून काढण्याची

अपेक्षा करणें म्हणजे मुसळाला अंकुर फुटण्याची अपेक्षा करणें होय.'-केसरी १६-७-४०. २ असाध्य आजार इ. मधून बरें होऊन पूर्वीप्रमाणें व्यवहार करूं लागणें.

अति पतिव्रता, मुसळ देवता—अति पहा.

मुसळास-मुसळाशीं गांठ पडत नाहीं; मुसळा मुसळाची गांठ बांधतां येत नाहीं—दोन सारख्या हेकट आणि दांडग्या माणसांत सलोखा किंवा एकी घडवितां येत नाहीं.

मुहूर्त—**साडे तीन मुहूर्त**—१ चैत्र पाडवा, २ बलि प्रतिपदा (कार्तिक शु॥ १), ३ दसरा, व अर्धा मुहूर्त अक्षयतृतीया किंवा नागपंचमी.

मुहूर्त करणें—(एखाद्या गोष्टीला प्रारंभ करतांना शुभ दिवस, पाहातात यावरून) आरंभ करणें; सुरू करणें. 'हे देह मी ऐसें। मुहूर्त करी॥'-ज्ञा. १४.१४५.

मुहूर्त मेढ रोवणें—कार्याच्या मांडवाची मेढ मुहूर्त पाहून रोवतात. यावरून एखादें काम सुरू करणें.

***म्हुर्तां वेळार सांसवां पिड्डुको एक करप**—(गो.) सुमंगल प्रसंगीं मोहरी व पोत एक करणें. मोहरी व कांचेचे मणी दिसावयास अगदीं सारखे असतात तेव्हां त्यांस निरनिराळे करणें कठीण जातें. लग्नाच्या वेळीं नवरीच्या गळ्यांत मंगळसूत्र बांधावयाचें असतें. व तें त्या शुभहूमुर्तावरच बांधावयाचें असतें. जर तें त्यावेळींच बांधलें नाहीं तर नवरा किंवा नवरी यांस त्रास होतो आणि म्हणूनच तें मंगलसूत्र अगोदरच तयार करून ठेवलेलें असतें. घाईच्या, गर्दीच्या वेळीं घोटाळा करणें.

मुळमुळ—**मुळमुळ रडणें**—हळूहळू, एकसारखें रडणें; आपल्याशींच दुःख करीत बसणें. 'मुळमुळ रडों नको सति सीतेसहि सोडिलें न भोगानें।'-मो विराट १.११३.

मुळा—**मुळ्यांचे ढेकर देणें**—मुळे खाल्ले कीं त्यांचा वास ढेकर बरोबर येतो त्याप्रमाणें गुप्तपणें केलेली किंवा मनांतील गोष्ट उघडकीस आणणें.

मुळी—**मुळ्या पाताळीं गाडल्या जाणें**—१ मुळ्या फार खोल गेलेल्या असणें. २ (ल.) अगदीं खोल रुजणें, दृढ होणें.

मूं; मूंह—**मूंह काला, बख्त उजला**—(हिं.) तोंड वांकडें, दैव फाकडें. तोंड पहा.

मूं बोली सगाई—(हिं.) तोंड देखलें नातें; तोंडापुरतें नातें. 'शरीर संबंधाच्या सगाईपेक्षां मू बोली सगाईवर लोकांचा अधिक विश्वास असे.'-पामो २६७.

मूंह सुये, पेठ कुये—तोंड सुईच्या नेढ्यासारखें, पण पोट कुव्याप्रमाणें (मेंगी गाय पोटांत पाय).

मूंमें घांस-निवाला, शिरपर टोला—एका हातानें खाऊं घालणें व एका हातानें घात करणें; एकीकडे खाऊं पिऊं घालून दुसरीकडे नाश करणें.

मूमें सो पातामें—(हिं.) जसें आंत तसें बाहेर. कपट किंवा भेद नाहीं.

मूग—**मूग आरोगणें-खाणें-गिळणें-गिळून बसणें**—कोणी कांहींहि केल्यास त्यास कांहीं उत्तर न देतां स्वस्थ मुकाट्यानें बसणें. 'आरोगुनी मूग। बैसलासे जैसा बग॥'-तुगा १४६८. 'जो कोणी पुढाकार घेईल त्याला कोणी कांहीं बोललें तरी मूग गिळावे लागतात.'-पकाचे. 'स्त्री गप्प राहिली, मूग गिळून बसली, त्यावेळीं नम्र झाली, तिनें सहनशीलपणा दाखविला, कीं, अन्यायी चढेल, उद्दाम नवऱ्याचा ब्रह्मसंबंध, ब्रह्मराक्षस तिच्या कायमचा मानगुटीस बसलाच म्हणून समजावें.'-सुंद्राबाई ६१.

मूग खाऊन शहाणे—स्तब्ध बसणें; मूग गिळणें; तोंडातून अवाक्षर न काढणें. हेंच अनेक वेळां शहाणपणाचें असतें.

मूठ—**मुठ आवळणें**—दुसऱ्यास देण्याचें थांबणें; चिक्कूपणा करणें, करूं लागणें.

(एखाद्यावर) मूठ घालणें—१ मूठ मारणें पहा. २ त्याच्यावर वर्चस्व ठेवणें; ताब्यांत घेणें; वळवून घेणें.

मूठ दाबणें-चेपणें-गार करणें-भरणें—लांच देणें; लांचाची रक्कम मुठींत किंवा हातांत देणें. 'राजाचा खजिना स्वाधीन असल्यामुळें आपल्या विरुद्ध जो भांडायला उठेल त्याची मूठ गच भरून दिवाणसाहेबांनीं त्यास खालीं बसवून टाकावें.'-नि. 'त्यानें पन्नास रुपयांनीं फौजदाराची मूठ दाबली तेव्हां तो सुटला.'

मूठभर मांस चढणें-येणें-वाढणें—१ लठ्ठ होणें गर्विष्ठ होणें; फायदा झाल्यानें आनंद होणें. २ दुसेजनु

मिळणें; समाधान वाटणें. 'आमची विनंति मान्य केली त्यांत आम्हाला मूठभर मांस आलें.'– इंप १८.

मूठमाती देणें—(प्रेत जमिनींत ठेवल्यावर त्याच्यावर जवळच्या आप्तांनीं व स्नेहीमंडळींनीं मूठ मूठ माती टाकण्याची चाल आहे). पुरणें; उत्तरक्रिया करणें.

मूठ मारणें--मंत्रसामर्थ्यानें दुसऱ्याचा नाश करणें, प्राण घेणें. नाशार्थ चेटूक, जादू करणें. 'तोडुनि धनु, कर्णाची शक्तिहि भंगी, जशीच मूठ कवी।'–मो द्रोण १२.५३.

मूठ सैल सोडणें—१ उधळेपणा करणें. २ सढळ हातानें खर्च करणें.

मुठी-मुठे-मुठ्या मारणें--स्त्री न मिळाल्यामुळें मुष्टिमैथुन करणें. २ (व.) माशा मारीत बसणें; निरुद्योगी राहाणें; आळसानें वेळ घालविणें.

एका मुठीचीं माणसें--एकाच कायद्याखालीं किंवा हुकमतीखालीं येणारीं माणसें.

मुठींत असणें—(एखाद्याच्या) पूर्णपणें किंवा सर्वथैव ताब्यांत, कह्यांत, अधिकारांत असणें. 'श्रोत्यांच्या साऱ्या मनोवृत्ति या वक्त्याच्या जशा काय मुठींत होत्या.'– नि.

मुठींत जाणें—ताब्यांत जाणें; दुसऱ्याच्या वर्चस्वाखालीं राहाणें. 'कांहीं एक विचार न करतां तो त्याच्या मुठींत गेला.'–व.ड. २.९०.

मुठींत जीव धरून राहणें--(कदाचित् जीव जावयाचा म्हणून तो मुठींत ठेवून जपणें). अतिशय भयंकर अवस्थेत काळ कंठणें; अगदीं कांचणींत गासांत, राहणें.

एका मुठीनें—एकदम; एकाच हप्त्यानें, एकाच वेळीं (रुपये देणें घेणें, फडशा पाडणें).

झांकल्या मुठीनें—गुप्तपणें; खरी गोष्ट बाहेर पडूं न देतां; कोणाजवळ काय आहे किंवा कोण कसा आहे तें बाहेर फुटूं न देतां.

***मूठभर मिया, हातभर दाढी**—मिया पहा.

मूठभर मिशा, हातभर दाढी--१ वरप्रमाणेंच. २ बऱ्याच दाढी मिशा ज्याला आहेत अशाबद्दल म्हणतात.

झांकली मूठ सवा लाखाची, उघडली मूठ फुकाची—आपण बोललों नाहीं तोंपर्यंत आपलें अज्ञान झांकून राहील, बोलल्यास तें लोकांना दिसून येईल. अस्फुट किंवा गुप्त आहे तोंपर्यंतच ठीक आहे याअर्थीं. झांकली० पहा.

मूठ भरून दगड मारले तर एक तरी लागेल-- बराचसा चिखल टाकला म्हणजे थोडा तरी चिकटतो. अनेक दोष दिले म्हणजे एखादा तरी लागतो.

मूत---**मूत आणणें**--दुःखानें, भीतीनें मुतेल असें करणें. १ (ल.) अत्यंत त्रास देणें; सतावणें. २ फार निकड लावणें; घाई करणें.

मूत जळप--(गो.) एखाद्याला मोठी योग्यता प्राप्त होणें.

मूत येणें--होणें—१ फार भयभीत होणें. २ अत्यंत कष्टी होणें.

मुतांत दिवा जळणें—अशक्य गोष्ट होणें. कंजूषपणा करणें.

मुतांत माशा-मासोळ्या करणें--मारणें-- अगदीं आळसांत वेळ घालविणें.

मुतानें दिवा पाजळणें-लावणें--अत्यंत जुलुमी असणें, कठोर होणें.

एखाद्याच्या मुतानें दिवा पाजळणें--(व.) एखाद्याच्या सूत्रानें चालणें; एखाद्याच्या इच्छेप्रमाणें वागणें.

मुतानें ज्याची तृषा भागणार, त्याची भूक गुवानें शमणार!--हलकट गोष्ट करणारा दुसरी तसलीच गोष्ट करतो हें निर्विवाद आहे.

मूत्रदशक--हत्ती, रेडा (म्हैस), उंट, बैल (गाय), बोकड (बकरी), मेंढा (मेंढी), घोडा, गाढव, मानुष, मानुषी यांचें मूत्र.

मूर्ख---**मूर्ख आणि वेडा, त्यांची साक्ष सोडा** --मूर्ख व वेड्या लोकांची साक्ष निरुपयोगी असते.

मूर्ख ओकतो, शहाणा गिळतो—मूर्ख मनुष्य आपल्या मनांतील गोष्टी भडाभड बोलून टाकतो. शहाणा मनुष्य त्या ऐकून ध्यानांत ठेवतो.

मूर्ख कांहीं सुचवितो, सुज्ञ उपयोग होतो-- कांहीं कांहीं वेळां मूर्खांच्या बडबडण्यापासूनहि शहाण्या मनुष्याला कांहीं गोष्टी कळून येतात.

मूर्ख गधे कां असतात?--मूर्ख हे गाढव असतात यांत आश्चर्य करण्यासारखें कांहीं नाहीं.

मूर्ख फार बोलतो, आपले हातीं फसतो—मूर्ख आपल्या वायफळ बडबडीनें स्वतःचें नुकसान करून घेतो. तो ज्या गोष्टी जेथें बोलूं नये तेथें बोलून टाकतो व व आपला घात करून घेतो.

मूर्ख मनांतलें सांगतो, शहाणा राखून ठेवतो--मूर्ख मनुष्य मनांतील सर्व गोष्टी बोलून टाकतो व शहाणा मनुष्य मनांतल्या गोष्टी मनांतच ठेवतो.

मूरख मूरख राज करत है, पंडित फिरत भिकारी--(हिं.) मूर्ख लोकांना राज्यसंपत्ति ऐश्वर्य लाभत असते पण विद्वान लोक भीक मागत फिरतात.

मूर्ख मोठी कल्पना करी, अल्प प्राप्त होय तरी—जरा कोठें थोडी प्राप्ति झाली किंवा यश मिळालें तर मूर्ख मनुष्य मनांत मोठ्यामोठ्या कल्पना करूं लागतो व पुढें फसतो.

मूर्ख लवकर कोप करितो, शहाणा विवेकें आवरितो—मूर्ख मनुष्य फार लवकर रागावतो व शहाणा आपलें मन विचारानें आवरून धरतो.

मूर्ख लोक भांडती, वकील घरें बांधती--मूर्ख लोक कज्जे करतात व त्यांच्या पैशानें वकील गबर होऊन घरेंदारें करतात.

मूर्ख वैद्याची मात्रा, वैकुंठाची यात्रा--मूर्ख वैद्यापासून औषध घेतल्यास मृत्यु येण्याचा संभव असतो. "परंतु मूर्ख वैद्याची मात्रा आणि वैकुंठाची यात्रा अशांतला प्रकार सहज होणारच.–छच २४. तु०–मूरख बैदकी मात्रा परलोककी यात्रा.

मूर्ख हा क्वचितच उपदेशाचा स्वीकार करतो—मूर्ख मनुष्याला केलेला उपदेश व्यर्थ होतो.

मूर्खा असे सदां टोंचणी, शहाण्यास ईशारा जाणा—शहाण्या मनुष्यास एकदां इषारा केलेला पुरतो; मूर्खास पुन्हा पुन्हा टोंचावें लागतें. शहाणा पहा.

मूर्खा स्वहिताचें गाणें, ज्ञानी लोक हिताहित जाणे—मूर्खाला स्वार्थापलीकडे कांहीं दिसत नाहीं. शहाणे लोक लोकांचें कल्याण अकल्याण यांचा विचार करतात.

मूर्खाचा दास, सदा उदास—मूर्खाचा चाकर नेहमीं दुःखी किंवा उदास असतो; त्याच्या चाकरीनें कधीं चीज होत नाहीं.

मूर्खाचा बाजार आणि वेड्याचा शेजार—सभोंवतीं मूर्ख मनुष्य जमले किंवा शेजारीं एक वेडा असला म्हणजे सतावून सोडतात.

मूर्खाची बात, हांशील नाहीं त्यांत--मूर्ख माणसाच्या बोलण्यांत कांहीं राम नसतो. त्यावर कधीं विश्वास ठेऊन राहूं नये.

मूर्खाची लीला, अगम्य आहे देवाला—मूर्ख मनुष्याच्या कृती परमेश्वरासहि कळणार नाहींत.

मूर्खाचें अंतःकरण, उथळ असतें जाण--मूर्ख मनुष्याच्या मनांत कांहीं राहात नाहीं.

मूर्खाचें बोलणें, तरंगाप्रमाणें—मूर्खाचे शब्दावर विश्वास ठेवूं नये. तो कधीं बदलेल त्याचा नेम नसतो.

मूर्खाजवळ मांडल्या राशी, दोन्ही हारी आपणास--मूर्खापुढें जर पसंतीसाठीं वस्तूच्या राशी घालून ठेवल्या व सांगितलें कीं, यांतील एक निवड तर तो दोन राशींवर हात ठेऊन या आपणांस पाहिजेत असें म्हणतो. म्हणजे त्याला शहाणपणा मुळींच नसतो.

मूर्खापाशीं पैका येतो, अनादरें निघून जातो--मूर्ख मनुष्यास द्रव्य मिळालें तरी त्यास त्याचा योग्य उपयोग करून घेतां न आल्यामुळें तो त्याच्याजवळ टिकून रहात नाहीं.

मूर्खापुढें कहाणी—निष्फळ प्रयत्न; व्यर्थ श्रम.

मूर्खापुढें वाचली गीता, रात्रीचा गोंधळ बरा होता—मूर्ख मनुष्यास गीतेपेक्षां गोंधळ अधिक आवडतो.

मूर्खापुढें वाचली गीता, हा अध्याय कोणता?—मूर्ख मनुष्यास गीता वाचून दाखविली तरी त्यास कांहीं कळत नसल्यामुळें तिचा उपयोग होत नाहीं.

मूर्खापुढें हात टेंकण्याची पाळी येते—मूर्ख मनुष्यापुढें नाइलाज होऊन आपणासच माघार घ्यावी लागते.

मूर्खाला उपदेश केला, राग आला त्याला—मूर्ख मनुष्यास उपदेश केलेला आवडत नाहीं व त्यास उलट राग येतो.

मूर्खाला कहाणी आणि उपड्या घड्यावर पाणी—मूर्खाला केलेला उपदेश व्यर्थ होतो.

शहाण्याला शब्दाचा मार, मूर्खाला टोणप्याचा

मार—शहाण्यास नुसती सूचना केलेली पुरते पण मूर्खास मारलें तरी कळत नाहीं.

मूर्खास बोध, पालथे घागरीवर पाणी—मूर्खास उपदेश करणें व्यर्थ होतें.

मूर्खाशीं बोध करतां श्रम होय वाणी—मूर्खाला उपदेश करतां करतां तोंड दुखेल परंतु त्याच्यावर कांहींहि परिणाम होणार नाहीं.

मूर्खास शिंगें का असतात ?—मूर्ख मनुष्य दिसावयास इतरांसारखाच असतो पण त्यास बुद्धि नसते एवढेंच.

मूर्खा हातीं कोलीत—माकडाहातीं पद्दा.

मूर्त; मूर्ति—**मूर्त जाईल पण कीर्ति जात नाहीं**—मनुष्याचा देह नश्वर आहे पण कीर्ति अमर असते. तु०—देहे त्यागितां कीर्ति मागें उरावी ।—राम. सूरतसे किरत बडी बिन पंख उडजाय। सूरतती जाती रही कीरत कभी न जाय ॥

मूर्ति तितक्या प्रकृति—प्रत्येक मनुष्याचा स्वभाव निरनिराळा असतो. तु.–Many men, many minds.

मूर्ति भंगली कीं भक्ति खंगली—देवमूर्ति भंगली कीं ती काढून दुसरी बसवावी लागते. एखाद्या पुढाऱ्याबद्दल आदर कमी झाला कीं त्याची भक्ति होत नाहीं. त्याचे अनुयायी गळत जातात.

मूर्ति लहान पण कीर्ति मोठी—दिसावयास लहान व साधारण माणूस पण कामगिरी मोठी असल्यानें कीर्ति मिळालेला, अशाबद्दल म्हणतात. ज्याची कीर्ति थोर तो माणूस जाडजूड, मोठा असावा लागतोच असें नाहीं. –नि २७७. (गो.) मूर्त लहान पण कीर्त व्हड.

मुल—**मुलाचीं हाडें भाजणें**—मुलाचें लग्न करणें. (उद्वेगानें म्हणतात.)

मूलीच्या डोकीवर भंडारा टाकणें—मुलीला मुरळी सोडणें, करणें.

***मूल नाहीं तोंवर खाऊन घ्यावें, सून नाहीं तोंवर लेवून घ्यावें**—एखादी स्त्री सडी असते तोंपर्यंत तीस स्वतःस यथेच्छ खावयास प्यावयास हरकत नसते. पुढें मूल झाल्यावर तें अंगावर पिऊं लागलें म्हणजे त्याला बाधेल म्हणून कांहीं गोष्टी वर्ज्य कराव्या लागतात व तें मागेल व त्यास सोसणार नाहीं म्हणून कांहीं पदार्थ त्याच्या समोर खातां येत नाहींत. त्याचप्रमाणें नवी सून घरांत आली म्हणजे सासूचे अलंकार सुनेस घालावयास देण्याची पद्धति असते.

मूल, भिक्षुक आणि ऋणी, यांस समज नसतो पुर्तेपणीं—लहान मूल, भिक्षुक व कर्जदार यांस कांहीं समजत नाहीं असेंच धरून चालण्याची पद्धति आहे. कारण मूल लहान म्हणून व भिक्षुक व ऋणको यांस यजमान व सावकार यांच्या जवळ काय मागावें हें समजत नसतें. ते मुलासारखे भरमसाट मागतात.

मूल मागावयाला गेली आणि नवरा गमावून आली—देवाजवळ पुत्राकरितां नवस करावयास गेलेली स्त्री नवऱ्याचा मृत्यु घेऊन परत आली. चांगली गोष्ट करावयास जावें तों हातून अनिष्ट गोष्ट घडावी. तु०—पूत मंगनेको गयी और पति खोके आयी.

मूल सैल सोडला, मूर्ख झाला—मुलाला जर स्वैर वर्तन करूं दिलें, शिस्तींत ठेवलें नाहीं तर तो मूर्ख निघतो. तु.–Spare the rod and spoil the child.

मुला, तुझ्या सठीच्या मीं घुगऱ्या खाल्ल्या आहेत—मी तुझ्यापेक्षां वयानें फार मोठा आहें. मला तूं शिकविण्याचें कारण नाहीं. तु.–Teach not your elders.

मुलाची धांव आईपावेतों—मूल प्रत्येक गोष्ट फार तर आपल्या आईला सांगतें. प्रत्येकाची मर्यादा ठरलेली असते. तु०—सरड्याची धांव कुंपणापर्यंत. आंधळ्यांची धांव कुडापर्यंत.

मुलाची परीक्षा डोहाळ्यावरून—स्त्रीला जसे डोहाळे होतात त्यांवरून मुलगा कसा होणार याचा अंदाज करतां येतो. डोहाळ्यांवरून मुलाची परीक्षा. तु०—मुलाचे पाय पाळण्यांत दिसतात.

मुलाचें नाहीं जन्मपत्र, त्यास कैसें कूळ गोत्र ? ज्याच्या जन्माचाच नीट पत्ता लागत नाहीं त्याच्या कुळाची व गोत्राची माहिती कोठून असणार !

मुलाचे पाय पाळण्यांतच दिसतात–दृष्टीस पडतात, ओळखावे—मुलगा पुढें कसा निघणार हें त्याच्या बालपणाच्या क्रीडा व आकांक्षा यांवरून कळून येतें. तु०—The child is father to the man.

मुलाचे लाड करावे, लाडानें वेडे न करावे.—मुलाचे लाड करणें चांगलें पण ते बेतानें केले पाहिजेत त्यास लाडानें बिघडूं देतां कामा नये.

मुलाबरोबर शिकावें व जांवयाबरोबर जेवावें.–जांवई पहा.

मुलाला जपलें तर म्हातारें होईल––मुलाची जर लहानपणीं योग्य काळजी घेतली तरच तें दीर्घायुषी होईल; नाहीं तर अल्पायुषी होण्याचा संभव असतो.

मुलाला द्यावें वाटींत, मूल मागे करवंटींत–नरटींत––जेंवरे पुता वाटींत० पहा.

मुलाला माय, कुटुंबाला गाय—ज्याप्रमाणें मुलाचें त्याची आई पोषण करते त्याप्रमाणें गाईच्या दुधानें कुटुंबाचें पोषण होतें.

मुलास लाड खाण्याचे, विद्येचे नाहींत––खाण्यापिण्यासंबंधीं मुलाचे लाड करावेत पण शिक्षणाचे बाबतींत त्यास सैल सोडून उपयोगीं नाहीं.

मुलीचा नाहीं ठिकाण आणि वऱ्हाड्यांची घाई––नवरी मुलगी निश्चित झाली नाहीं तोंच वऱ्हाडी जमूं लागणें. कशास कांहीं ठिकाण नाहीं तोंच अवांतर लोकांनीं गडबड करणें

मुलें झालीं थोर, तरी आईबापें म्हणती बुद्धि पोर––मुलें मोठीं झालीं तरी आईबापांस तीं अजून लहान व पोरबुद्धीच आहेत असें वाटतें.

मुलें झालीं ना चार? मग झाला संसार––स्त्रीला तीनचार मुलें झालीं म्हणजे तिचा संसार यशस्वी झाला असें समजण्यांत येतें. विशेषतः बिजवर, तिजवर यांच्या बायकांविषयीं ही म्हण लावण्यांत येई. " चार मुलेंच घरांत असतीं तर त्यांना वाढविण्यांत तिचा काळ जातो तेव्हांच. नाहींतरी आमच्यांत म्हणच आहे कीं, 'मुलें झालीं ना चार ! मग झाला संसार.' "–महाराष्ट्र विस्तार मार्च १९४२.

मूल–––**मुले कुठारः**––मुळावरच घाव घालणें. ज्यावर एखाद्या गोष्टीची उभारणी झाली आहे त्यावरच हल्ला चढवून नाहींसा करणें. मूळ मुद्दाच मोडून काढणें. " हा केवळ तूर्तातूर्तचा उपाय झाला, पण समूळ गैरसोय दूर करण्यास 'मूले०' या न्यायाचेंच अवलंबन केलें पाहिजे."–केसरी.

मूस–––**मूस मारप**—(गो.) माशा मारणें, पहा.

मूसाऽ टकली––(गो.) माशीचें डोकें (अगदीं लहान अंश).

मूस–––**मूस उतरणें**-**ओतणें**-**काढणें बनणें**––– (एखाद्या सुंदर व घाटदार शरीराच्या माणसाबद्दल उपयोग) शरीराचा आकार सुंदर असणें. 'काय हो मूस उतरली–ओतली आहे !'

मूस धरणें—(व.) गांठ बसणें, येणें. 'मानेला मूस धरली.'

मुसे येणें—(काव्य.) आकाराला येणें; मूर्त स्वरूप प्राप्त होणें. 'कां नादब्रह्माचि मुसे आलें ।'–ज्ञा. १३.२६८.

(गोष्टीची, बोलण्याची) मूस फुटणें—एखादी गुप्त गोष्ट फुटणें; तिचा बभ्रा होणें, लोकांत पसरणें. 'ऐसा मनसबा जालाची मूस फुटली आहे.'–पेद ६.१४९.

मूस मारुन निजणें—(ताप वगैरे आला असतां) मुडगुशी मारून निजणें; गुडघे पोटाशीं घेऊन व डोकें खालीं करून निजणें.

मूळ–––**मूळ काढणें**-**खणणें**-**झाडणें**-**पुसणें**-**मोडणें**-**मारणें**-**निर्मूळ करणें**—सर्वस्वीं नाश करणें; पूर्ण बिघाड, नाश, उच्छेद, विध्वंस, संहार करणें.

मूळ तुटणें—१ अगदीं छेद, उच्चाटण होणें. 'मुखास येती जरि शब्द मोठे । तुझ्या गुणांचे तरि मूळ तूटे ॥'–सारुह ७.१७. २ संबंध सुटणें; कांहीं लागाबांधा न राहणें. 'मूळ तूटे भवाचें ।'–राम.

मुळाशीं हात घालणें—तत्त्वाशीं गांठ ठेवणें; तत्त्व न सोडणें. 'बाह्योपाधींकडे लक्ष न देतां प्रत्येकानें मुळाशीं हात घातला पाहिजे.'–टि २.५९५.

***मूळ आनी वालूय नाथिल्लो**––(गो.) मूळ ना देठ अशांतली गत. ना आरंभ ना शेवट. कुल शोधून काढण्यास कठीण.

मूळ छेदीः पल्लव छेदुः—(महानु.) ज्याला नुसतीं पानें काढावयाचीं आहेत त्यानें मुळावर घाव घालूं नये.

हरिदासाचें कीर्तन मूळपदावर आलें—हरिदास कीर्तनाच्या आरंभीं एक पद, अभंग किंवा वचन म्हणून विवेचन करतो व पुढें कथा सांगून पुन्हां त्याच पदावर शेवटीं समारोप करतो; यावरून फिरून तीच गोष्ट करणें, सांगणें, इ. पद पहा.

मूळ प्रकृतीचें कारण, स्वरूपा नसे मान—मनुष्य

दिसावयास कसा आहे हें पाहण्यापेक्षां तो स्वभावानें कसा आहे या गोष्टीचा विचार करावा.

मूळ स्वभाव जाईना । त्याचे एळकोट राहीना ॥ —'आधीं होता वाघ्या.' पहा. "चर्चिलचा दुराग्रहहि थोडासा निवळला तरी पण 'मूळ स्वभाव जाईना' ह्या ह्मणीला अनुसरून स्वराज्यदानाचा संकल्प उघड रीतीनें म्हणवेना."—केसरी १३–३–४२. आधीं पहा.–एकच प्याला. १.३.

मुळाक पळयारि नाक उंचारि—(गो.) झाडाच्या मुळाकडे पहा म्हटलें तर वर पाहातो. वेंधळा माणूस.

मूळचाच शहाणा, त्याला फुटला पान्हा—(उपरोधानें) मुर्खानें अधिक मूर्खपणाची गोष्ट करणें.

मुळावरच कुऱ्हाड घातली, फांदी आपोआप गळाली--अर्थ स्पष्ट आहे.

मुळीं आळशी, तांतुह एक चडुं जाल्यां– (गो.) मुळांत आळशी आणि त्यांतून बाळंतीण.

मूळ—-मुळावर जन्मणें—(मुलाचा जन्म मूळ नक्षत्रावर झाल्यास तो जवळच्या नातेवाईकांस वाईट अशी समजूत) मूळ नक्षत्रावर जन्म होणें; दुसऱ्याचा नाश होईल अशा अशुभ मूळ नक्षत्रावर जन्म होणें.

मुळावर येणें–बसणें—एखाद्याच्या नाशाला कारण होणें, असणें (विशेषत: कुयोगावर जन्मल्यामुळें आई-बापांच्या नाशास कारणीभूत झालेल्या मुलाबद्दल उपयोग करतात.) ' नवऱ्याच्या मुळावर आलेली मुलगी, म्हणून तिच्या सासऱ्यानं तिला आमच्या घरीं कायमची परत लावून दिली !'–एकच प्याला १.१.

मूळ—-मूळ जाणें—मुलीला सासऱ्याहून आणण्यासाठीं तिच्या माहेरच्या माणसानें जाणें; बोलावण्यास, आमंत्रण करावयास जाणें.

मूळ धाडणें—लग्नांत वराला, सासरहून मुलीला इ. बोलावणें पाठविणें; घेऊन येण्याकरितां इसम पाठविणें. 'जसें तसें केवळ लग्न काढी । चैद्येश्वरा सत्वर मूळ धाडी ॥' —सारुह ३.३०. 'जनक मूळ करी क्षितिराजया ।'—नागेश सीतास्वयंवर ५५.

***मूळ आलें उठाउठी, धंदा विसरली कारटी**—माहेरचें मनुष्य न्यावयास आलें म्हणजे सुनेला सासरचा कामधंदा सुचेनासा होतो.

जाऊबाई ! जाऊबाई ! मला मूळ आलें, जा पूस नणंदेला—जाऊ पहा.

मृग—-मृगाची पेरणी, हस्तीची लावणी—मृग नक्षत्रावर धान्य पेरावें व हस्तनक्षत्रावर लावावें. ही म्हण तितकी बरोबर दिसत नाहीं, कारण मृग नक्षत्रावर पेरलेलें भात पुनवर्सु किंवा पुष्य नक्षत्रावर लावतात व हस्ताच्या सुमारास तें कापावयास तयार होतें. याकरितां लावणीच्या ठिकाणीं कापणी असावें.

मृगाची लावणी व हस्ताची उगवणी--मृग नक्षत्रांत पेरणी केली म्हणजे हस्तनक्षत्रांत पिकाची वाढ चांगली होते.

मृगाचे आधीं पेरावें आणि बोंबेचे आधीं पळावें—मृग नक्षत्र लागण्याच्या आधींच पेरणी करावी व एखाद्या गोष्टीची परिस्फुटता होण्यापूर्वीच आपण निसटून जावें.

मृग—-मृगजल स्नान करणें--अशक्य गोष्ट करूं पाहणें.

***मृगाचिया अंगीं कस्तुरीचा वास। असे ज्याचा त्यास नसे ठावा ॥**—तुगा ३४४७. हरणाच्या बेंबींत कस्तुरी असून त्याचा वास त्याला येत नाहीं. त्याप्रमाणें मनुष्याच्या हृदयांत परमेश्वर असूनहि त्यास त्याचें ज्ञान होत नाहीं. तु०–देहींच देव असतां कां रे भ्रमतोसि व्यर्थ तूं रानीं । नाभित सुगंधि असतां कस्तुरी मृग शेधि तो फिरे रानीं ॥

मृगया—-मृगया केली राजानें, मागून आलीं पक्वानें—राजानें शिकार करून आपली भूक भागविल्यावर नंतर पक्वानें आल्यास त्यांचा त्याला काय उपयोग. तुं०–भरल्या पोटा उंबर कडू अथवा वराती मागून घोडें.

मृत्यु—-मृत्यु पावणें- मरणें.

मृत्युचा फांसा पडणें--मरण ओढवणें; मरणें. ' भ्रमला सुविचक्षण परि पडले कंठांत मृत्युचे फांसे ।'—मो आदि ४.८२.

मृत्युमुखांत ढकलण —नाश होईल असें करणें; मारणें. 'मृत्युमुखीं कुलकरगुणशर्माकर बालका ढकल हातें ॥ ' —मो द्रोण ४·५.

***मृत्यू बहीरा आहे, तो कोणाची तक्रार ऐतक**

नाहीं—मृत्यू हा कोणतीहि सबब ऐकत नाहीं. म्हणजे मृत्यु कधीं टळत नाहीं.

मृत्यु हा पक्षपाती नाहीं—मृत्यू सर्वांसच येतो.

मृत्यूच्या बाधेला भिऊं नका आणि विद्यार्जन केल्याविण राहूं नका—विद्यासंपादन करण्याच्या कामीं मृत्यूची भीति बाळगूं नये. आमरण विद्याभ्यास करावा. तु०-अजरामरवत्प्राज्ञो विद्यामर्थंच कारयेत्। गृहीत इव केशेषु मृत्युना धर्ममाचरेत्॥

आकांशातील देवाची तुटली दोरी, मृत्यु-लोकचा देव बोंबल्या मारी—एकदां आयुष्याची दोरी तुटली म्हणजे मग मृत्युलोकीं कोणाचें कांहीं चालत नाहीं.

मृदंग—मृदंगास दोहींकडून मार—मध्यस्थ मनुष्यास दोन्ही पक्षांकडूनहि दोष मिळतो.

मृदंगो मुखलेपेन करोति मधुरध्वनिम्—(सं.) मृदंगाला पीठ लावल्यावरच त्यांच्यांतून गोड आवाज निघतो, त्याप्रमाणें तोंड दाबलें म्हणजे मनुष्य गोड बोलूं लागतो. सबंध श्लोक असा—को न याति वशं लोके मुखं पिंडेन पूरितः। मृदंगो मुखलेपन करोति मधुरध्वनिम्॥

मे—मे महिना आला आणि मास्तर मेला—मे महिन्याच्या प्रारंभाला शाळा मास्तरला कामावरून दूर करतात, त्यायोगें शाळाचालकांची त्यांच्या एक महि-न्याच्या पगाराइतकी बचत होते, पण इकडे मास्तराचें कर्म उभें राहतें.

मेख—मेख गाडणें—ठासून उभें राहणें. 'एक जागां मेख गाडली होती.'—भाब १७.

मेख ठेवणें—एखादा करार, कबुलायत करतांना त्यांत विशिष्ट खोंच, अट घालणें, ठेवणें.

मेख बसणें—अडवणूक अटकाव होणें; मेखललें जाणें.

मेख मारणें—१ जोरानें, पुरतेपणीं थांबविणें, बंद करणें; अडकवून ठेवणें (चालू व्यापार, धंदा काम, इ.). २ प्रतिपक्ष्याचें कांहीं न चालेल अशी तजवीज करून ठेवणें, विघ्न आणणें.

मेख सोसणें-घेणें (हातावर)—(वाईट कृत्यें कर-ण्यांत किंवा त्यांजबद्दल दुःख भोगण्यांत) आतिशय धैर्य, रांकटपणा, सोशीकपणा असणें.

मेखा उचटणें-उचलणें-उपटणें; मेखा खांद्यावर घालणें-देणें; मेखाटी खांदाडास देणें—पूर्वी तंबू ठोकण्याकरितां मेखा लागत. तसेंच पडशी वगैरे ठेवण्या-करितां मेखा लागत. तरी सर्व तंबू वगैरे सामान अगर पडशी वगैरे गुंडाळून मेखांसुद्धां खांद्यावर देऊन रवानगी करणें म्हणजे घालवून देणें; हांकून देणें.

मेखा घेणें—१ आपल्यासाठीं सुताराकडून जबर-दस्तीनें फुकट मेखा करून घेणें. २ बळजबरी करणें; जुल-मानें घेणें.

मेखाटी घेणें—१ वेठीस धरून काम करून घेणें. २ ठोकणें; तासडणें; निर्भत्सणें; अतिशय गांजणें.

मेखाटीस बसणें—हट्ट करून बसणें; खनपटीस बसणें पहा.

मेखेवर बसविणें—सरळ नम्रपणें न वागतां वांकडी गोष्ट सांगणें.

***तुम्ही आम्ही एक, कंठाळीला मेख**—आम्ही पहा.

सोन्याची मेख आणि तमाशा देख—तमाशा पहा. पैशानें सर्व कार्यें होतात.

मेंगा—मेंगा दादला, थानांचा काळ—(अशिष्ट). [मेंगा=षंढ] अर्थ स्पष्ट आहे.

मेंगी गाय पोटांत पाय—गोगलगाय पोटांत पाय, याप्रमाणें.

मेंगूळ—मेंगूळगाडें, भगदाड पाडें—माणूस दिसण्यांत बावळा पण मोठा कारस्थानी. तु०-खालीं मुंडी पाताळ धुंडी.

मेघ—मेघ बोळणें-ओळणें—ढग येणें; आकाश अभ्राच्छादित होणें. 'असंभाव्य मेघ ओळला। एकाएकीं चहूंकडे॥'—ह १२-४५.

***मेघाच्या आणि गर्भाच्या भरंवशावर राहूं नये**—आकाशांत ढग आले म्हणजे ते केव्हा कोसळतील हें सांगवत नाहीं त्याचप्रमाणें गरोदर स्त्री दिवस भरले म्हणजे केव्हां बाळंत होईल याचा नेम नसतो.

मेचणें—मेचून असणें—भिऊन, पर्वा बाळगून असणें.

मेज—मेज मांडप—(गो.) दुकान घालणें; सोडावॉटर इ. विकण्याचें दुकान उघडणें.

मेजावैलें केलें काढून इष्टागत—(गो.) दुसऱ्याच्या मेजावरचें केळें काढून तें एखाद्याला द्यायचें आणि त्याची मैत्री जोडायची, असें करणारें संभावित लोकहि थोडे नसतात. पदरचें कांहींहि खर्च न होतां अशांचीं कामें होतात.

मेजावैलें केलें काढून फिर्याद जोट्टा—(गो.) दुसऱ्याच्या मेजावरचें केळें पळवावयाचें व त्याच्या विरुद्ध फिर्याद गुदरावयाची. अशा रीतीनें कांहीं लोक वाद वाढवितात. कोंकणी लोक वाद घालण्यांत मोठे प्रवीण समजले जातात व त्यांतच ते निरानिराळे घोटाळे उत्पन्न करतात.

मेजवानी—मेजवानीची मेजवानी आणि ब्राह्मणचा ब्राह्मण—जेवावयास बोलावून दक्षणा ठेवणें म्हणजे मेजवानी केल्यासारखें होतें व ब्राम्हण जेवावयास घातल्याबद्दलचें पुण्यहि मिळतें. एका गोष्टीनें दोन कार्यें साधणें. तु०—एका धोंड्यानें दोन पक्षी मारणें.

मेट—मेटें पडणें—हातपाय गाळणें, गळणें. ' धांपकांप पडे मेट । '—एभा १२.५७४.

मेट-मेटें मारणें-मारून पडणें—(बैल इ.च्या) शरीराचा लोळा गोळा होऊन पडणें.

मेट-मेटें मारणें-मारून बसणें—पाय दुमडून गुडघ्यावर हनुवटी टेकून बसणें.

मेटा असणें—(माण.) मुडा असणें.

मेटेंखुंटीस—मेटाखुटी—मेटाकुटीस येणें—१ मांडी घातलेली काढून गुडघ्यावर उमें राहणें (एखाद्यास मारण्याकरितां, वादांत वरचष्मा होण्याकरितां). २ नेटानें खेंचण्याकरितां, ओढण्याकरितां गुडघे टेकून उभें रहाणें (मनुष्य, पशु यांनीं). ३ ढोपरखुंटीस येणें; म्हातारपणामुळें गुडघे खचणें. ४ हट्टास पेटणें. ' हमामा घालिती कडोकडी । मेटाखुंटी येऊंनिया । '—ह१०-९५. ५ शिकस्त करून कंटाळणें; अगदीं दमणें, त्रासणें. 'बेकारीनें मेटाकुटीला येऊन शेवटीं त्यानें हा चोरीचा मार्ग पत्करला.'—काणेकर, छोटे चोर व मोठे चोर.

मेटेखुंटीस बसणें—गुडगे टेकणें.

मेटें घालणें—१ रडकुंडीस येणें. २ गुडघ्यांत डोकें खुपसणें. ३गुडघे जमिनीवर टेकणें. ' मेटें घालून सांवरी ।' —वेसीस्व ४·९९.

मेटें घेणें—(मल्लविद्या) खुरमुंडी घेऊन हिसडा देणें.

मेटें टेंकणें—१ गुडघे टेकणें. २ वार्धक्यामुळें, अशक्ततेमुळें गुडघे मोडणें; खचणें. ३ (ल.) खचणें; डगणें.

मेटें धरणें—संधिवातानें गुडघे आंखडणें, दुखणें.

मेटें बसणें—१ वार्धक्यामुळें व अशक्ततेमुळें अवसान खचणें. २ (ल.) कचरणें; कचणें; धीर खचणें.

मेटें वळणें—गुडघे हनुवटीला टेकून गुडघ्याभोंवतीं दोन्ही हातांचा विळखा देऊन बसणें.

मेढ—चिखलांतली मेढ—जिकडे वळवावी तिकडे वळणारी वस्तु इ. म्ह.–चिखलांतली मेढ वांकवावी तिकडे वांकणार. चिखल पहा.

***हातीं लागली चेड आणि घर मांडवाची मेढ**—मांडव पहा.

मेंढरूं—मेंढरांची दावण देवास देणें—पुष्कळ मेंढ्या देवास बळी देणें.

***मेलें मेंढरू आगीला भिईल काय ?**— मेल्यानंतर दुबळ्यालासुद्धां कोणाची भीति नसते. भीति कायती मरणा पर्यंत, त्याच्यापुढें नाहीं.

मेढा—मेढा वाहणें—प्रतिज्ञा करणें. ' वाहुनि मेढा चालिला । ' —एभा १२·१५१. ' भार्गव रामाचा तो वाहियला मेढा । ' —मध्व ५३.

मेंढा—मेंढा येणें—मस्ती येणें.

मेंढी—मेंढी जाते जिवानिशीं खाणार म्हणते घातड—(प्र.) शेळी जाते. शेळी पहा.

मेंढीनें हुरळून वाघाचे पाठीस लागणें—दुर्बळ मनुष्यानें एखाद्या सबळाच्या नादीं लागून आपलें नुकसान करून घेणें. —इंप १७८.

***मेंढ्यांचा गोंगाट आणि लोंकरीची पिछेहाट**—पुष्कळ मेंढ्या बाळगूनहि लोंकर नसणें. फार मेंढ्या पाळल्या व त्यांस राहावयास पैस जागा नसली तर लोंकर कमी मिळते, झाडांची दाटी झाली किं फळें कमी धरतात. Great cry and little wool.

मेण—म्यान पहा. **मेण करणें**—१ म्यानांत तरवार घालणें; कोषित करणें. २ (ल.) झाकणें; वस्त्रादिकांनीं

आच्छादित करणें. 'मेण कर आरसा, सख्यांनो, गुलाल भांगीं नका भरूं।'-प्रला १३६.

*एका मेणांत दोन सुऱ्या (सामावणें-राहणें)— १ कोणतेहि दोन मोठे राजे, विद्वान् प्रतिष्ठित पुरुष परस्पर विरोधी स्वभाव व बुद्धि असलेलीं माणसें, प्रतिस्पर्धी हीं भांडण न करतां शांततेनें एकत्र राहूं शकत नाहींत-अशा अर्थीं वापरतात. 'तुकयाची प्रतिष्ठा वाढतां तेथें। त्याचे मनीं द्वेष उपजत। म्हणे एका मेणांत दोन सुऱ्या निश्चित। समावती कैशा परि॥' २ एक काम दोघांकडे असल्यानें त्या कामाची होणारी दुर्दशा, अव्यवस्था याअर्थी.

मेण---मेण काढणें--(ल.) खूप चोपणें, झोडणें, मारणें.

मेण घालणें--(कु.) मासे धरण्यासाठीं त्रिफळे, गेळफळ, निवंळकांडें इ. कुटून पाण्यांत घालणें.

मेण स्वस्थ होणें--(मनुष्य) लठ्ठ व गुलगुलीत होणें.

मेण होणें--१ नरमाळून सौम्य, शांत होणें. २ शिजून मेणाप्रमाणें मऊ होणें (भात, डाळ इ.).

मेणाची चोटली कढयता—(गो.) ओढून चंद्रबळ आणणें.

*मेणा आंगाचें चरडुं धगालागीं वतां म्हणु भिस डायता—(गो.) मेणाची मुलगी मी विस्तवाजवळ जातें म्हणून भिववते. आपलें एखादें गुपित माहित असलेला माणूस तें उघड करतो म्हणून एकसारखा दमदाटी देऊं लागतो तेव्हां म्हणतात.

मॅणा सॉनें कडैता कडैता—(गो.) आपणास अप्रिय असलेली गोष्ट 'करीन करीन' म्हणून एखादा माणूस प्रत्येक वेळीं धमकी देऊं लागला कीं म्हणतातः-- "'मेणाचें ×× कढवतों कढवतों' असें कशाला म्हणतोस काय करायचें तें करून टाक."

मेणबत्ती---मेणबत्तीस दोन्हीकडून पेट-- मृदंगाला दोन्हीकडून थाप. -पाआमा ५.६.

मेणबत्ती स्वतः जळते आणि लोकाला प्रकाश देते--सज्जन स्वतः झीज सोसून दुसऱ्यावर उपकार करतात. चंदन स्वतः झीजून इतरांस शीतल करतो.

मेतकूट---मेत (थ) कूट जमणें-मिळणें-- स्नेह जुळणें; मन मिळणें; सख्य होणें. 'दिल्लीपति अकबरादिकांनीं रजपुतांशीं चांगलें वागून त्यांच्या मुलींशीं लग्नें लाविलीं इतकें मेतकूट जमविलें.'-निचं.

मेंदू---मेंदू निघणें-नासणें-बाहेर पडणें-- श्रमामुळें टेंकीस येणें.

मेमटा---मेमटा घेतो चिमटा, भडभड्याचा बोभाटा—एखादा घुमा मनुष्य हळूच खोड्या काढतो व गप बसतो आणि भडभड्या स्वभावाच्या मनुष्याबद्दल मात्र ओरड होते. कानफाट्या पहा.

मेर; मेरें---धनी नाहीं मेरें आणि शेत भरलें बेरें—धन्याची नजर नसली म्हणजे शेतांत तण उगवतें. धनि पहा.

मेरा---मेरे उपर तेरे पाव, थोटा म्हणतोय मीच राव--पडलों तरी नाक वर, याप्रमाणें.

मेरे घर भंजन, तेरे घर निसंतान--माझें वाटोळें आणि तुझेंहि वाटोळें.

मेरे मुर्गीकी एकही टांग--एका गृहस्थाजवळ कोंबडी होती. तिचे दोन्ही पाय एकत्र बांधले होते. त्याला तें माहीत नव्हतें आणि तो 'माझ्या कोंबडीला एकच पाय आहे' म्हणून सांगत होता. 'ही कल्पना चुकीची आहे' हें त्याला पटविण्याचा पुष्कळ प्रयत्न केला तरी तो हट्टानें म्हणावयाचा कीं, 'नाहीं! माझ्या कोंबडीला एकच पाय.' तात्पर्य या म्हणींतून हटवादी नि अज्ञानी लोकांच्या मनोवृत्तीचें दिग्दर्शन केलें आहे.

मेरी---मेरी गाय बह्मनको दान—(व) ब्राम्हणाला गाय दान दिल्यानें पुण्य लागतें असें समजून मेलेली गाय ब्राम्हणाला कोणी देऊं लागला तर त्या दानापासून काय पुण्य लागेल? पुण्य लागल्यास ब्राम्हणाच्या उपयोगी पडेल अशी वस्तु दान केली पाहिजे. जिवंत गाय दानास योग्य होय. निरुपयोगी किंवा टाकाऊ झालेला जिन्नस दुसऱ्याला देऊन नांव मिळविण्याची इच्छा बाळगणें, असा भावार्थ.

मेला---मेला मुर्दा उकरणें--उखाळ्या पाखाळ्या काढणें; विसरलेलें भांडण, वैर उकरून काढणें.

मेल्या आईचें दूध प्यालेला असणें--निर्बळ,

निर्जीव, नेभळा असणें. ' आम्हीहि कांहीं मेलेल्या आईचें दूध प्यालेलों नाहींत. '—केसरी २०-३-४२.

मेल्या, तुझी रांड हो—तुझी बायको रांड (विधवा) होवो. म्हणजे तूं लवकर मृत्यु पावोस. ' मेल्या! रांड तुझी हो ऐसें शापी इळूच कृत्या ते ।'—मोवन १२-५८.

मेल्या सारीर वडे भाजून खाणारो—(गो.) चितेवर भाकरी भाजून खाणारा, उलट्या काळजाचा मनुष्य. तु०—(महानु.) मेल्या मुडद्यावर दहीभात खाणारा.

मेल्याचा पाड चढणें-जाणें—प्रेताच्या किंमतीचें होणें; सर्व किंमत गमावणें.

मेल्याचें तळपट हो—(बायकी शिवी) दुष्टाचा सर्व नाश होवो. ' कृष्णा हि म्हणे मेल्या अक्षकरांचें समूळ तळपट हो । '—मोविराट ६-७८.

मेल्यापेक्षां मेला होणें—अतिशय खजिल होणें. ' तात्या त्याच्याशीं अगदीं सरळ रीतीनें पण त्याला मेल्यापेक्षां मेलें व्हावें अशा भाषेनें बोललें. '—V. S. 2.१४९. ' आणि लज्जेमुळें मेल्यापेक्षां मेल्यासारखें त्याला दुःख होईल.'—उग्र ३-४.

मेल्याच्या मागें कोणी मरत नाहीं—दुसरा मेला म्हणून कोणी स्वतां मरत नाहीं; तोटा, नुकसान झालें असतां कोणी आपला जीव देत नाहीं.

मेलास म्हणुन चंद्रास खळें पडत नाहीं—क्षुद्र मनुष्याबद्दल कोणी फिकीर करीत नाहीं.

मेलें कोंबडें आगीला भीत नाहीं—मेंढरूं पहा.

मेलें घोडें व जितें गाढव बरोबर आहे.—घोड्याची आणि गाढवाची कधींहि बरोबरी होऊं शकत नाहीं.

मेलें मढें आगीला भित नाहीं.—मागें पहा.

मेलें माणूस गुणाचें व फाटकें पांघरूण रंगाचें—वस्तु किंवा व्यक्ति निरुपयोगी, नाहींशी झाल्यावर तिची स्तुति करणें. मेल्या म्हशीस पांच शेर दूध, पहा.

मेलं माणूस गोड झालं फुटकं मडकं धड झालं—(१) मनुष्य मेल्यावर त्याच्या अंगच्या सद्गुणाबद्दल त्याचे गोडवे गायले जातात; जसें मडकें फुटल्यावर तें मोठें चांगलें होतें, असें म्हटलें जातें. वास्तविक मडकें फुटल्यावर त्याचा चांगूलपणा ओळखण्याचा किंवा मनुष्य मेल्यावर त्याचे गुण गाण्याचा कांहींच उपयोग नाहीं.

मेलेल्या माणसाची निंदा, न घडो रे! गोविंदा!—अर्थ स्पष्ट आहे.

मेलेल्याला मारणें हा मूर्खपणा आहे—जो मनुष्य अपराध कबूल करतो, किंवा जो अगदींच अगतिक झालेला आहे, असहाय आहे, अशास आणखी त्रास देणें, लाजविणें, हें अयोग्य होय.

मेलेल्याची वायको अन् गेलेल्याचें घर—यांना कोणी मालक नसल्यानें तीं टिकत नाहींत.

मेल्लेल अम्मा दुद पिल्लोलो; मेले अंबे-दुद पियेलो—(गो.) मेलेल्या आईचें दूध प्यायलाय-म्हणजे मूर्ख. शहाण्यासारखा वागणारा मनुष्य मेलेल्या आईचें दूध प्यायलेला नसतो.

मेल्या आईचें दूध प्यालों नाहीं.—मेल्या आईस दूध कोठून असणार? यावरून निःसत्व, दुर्बल असा मनुष्य मी नव्हें असा अर्थ होतो. माझ्यांतहि कांहीं पाणी आहे, सामर्थ्य आहे.(गो.) मेल्या आवयेचें दूध पिलो ना.

मेल्याऽ गांड वरती का खालती—(गो.) मेलेल्या मनुष्याचें मढें कसेंहि पडलेलें असलें तरी त्या बिचाऱ्याला त्याचें काय होय?

मॅल्यांगेर रडटीत्, जाल्ल्यांगेर हांस्तीत्—(गो.) ज्यांच्या घरीं मृत्यु झाला असेल तीं रडतील आणि जन्म झाला असेल तीं हंसतील. सुखदुःख हें त्या त्या प्रसंगावर अवलंबून असतें.

मेल्या गेल्या शिवाय आठवण होत नाहीं—मनुष्य जवळ असतो तोंपर्यंत त्याबद्दल इतकें अगत्य वाटत पण तो दूर गेल्यास मग त्याची वरचेवर आठवण होते.

मेल्यामागें सर्पण आणि तर्पण.—मनुष्य मेला म्हणजे त्याचें और्ध्वदेहिक व उत्तरक्रिया करावी लागते. त्याप्रमाणें एखादी गोष्ट होऊन गेली म्हणजे ती निस्तरावी लागते. एखादें कार्य होऊन गेलें म्हणजे मागून त्याची निरवानिरव करावी लागते.

मेल्या माणसास कशाची शुद्धि?—मनुष्य मेला म्हणजे मागें त्याला वाटेल त्यानें नांवें ठेवावीं, त्याची बाजू घेणारा मग कोणी नसतो.

मेल्या म्हशी बारा शेर दूध—(गो.) मेल्या म्हशीला बारा शेर दूध. जिवंत असेपर्यंत पुष्कळांना एखाद्या माणसाची किंमत वाटत नाहीं. पण तें माणूस मेलें कीं मग त्याच्या लहानसहान गुणांनाहि पर्वताचा आकार देऊन लोक त्याच्याबद्दल हळहळत असतात.

मेल्या म्हशीला दहा शेर-पायलीभर-बारा शेर दूध—वरप्रमाणेंच. मनुष्य मेला म्हणजे त्याचे गुण आठवतात. पण जिवंतपणीं त्यास हजार नांवें ठेवलीं जातात. 'यावर मेल्या म्हशीला दहा शेर दूध असेंहि नानांच्या अभिमान्यांना खिजविण्याकरितां कित्येक म्हणात. V.S.2-72

मेल्याविना स्वर्ग दिसत नाहीं.—स्वतः अनुभव घेतल्याशिवाय एखाद्या गोष्टीचें मर्म बरोबर कळत नाहीं. (गो.)मेल्याबगर स्वर्ग दिसना.

मेल्याचीं मुलें जित्याचे हातीं—ज्याला कोणी संरक्षण करणारा वाली राहिला नाहीं त्या गोष्टीचा ज्याच्या हातीं लागेल त्यानें वाटेल तसा उपयोग करावा.

मेल्याचे डोळे पसा-पंजा एवढे—ज्याच्या हातची सत्ता गेलेली असते त्याला तुमचें कांहीं वांकडें करतां येत नाहीं; त्यास फक्त डोळे मोठे करून फार तर पाहातां येतें. मेलेल्या मनुष्याच्या अथवा सत्ताहीन मनुष्याच्या रागास किंमत नसते.

मेल्याच्या मागें जाववत नाहीं आणि रडल्यावांचून राहावत नाहीं—मृत मनुष्यावर कितीहि प्रेम असलें तरी त्याच्याबरोबर यमलोकास कोणी जाऊं शकत नाहीं, पण त्याबद्दल दुःख तर होतेंच. कांहीं गोष्टी आपल्या मनासारख्या झाल्या नाहींत तर वाईट वाटतेंच पण त्यास कांहीं इलाज नसतो.

मेवा—बाजारचा मेवा, बापलेकांनीं खावा—बाजार पहा.

मेसादेवी—मेसादेवी चोरास धारजिणी—मेसा अथवा महिषी देवता ही चोरांची देवता आहे, तेव्हां तिची त्यांच्यावरच कृपा असते. तिचा प्रसाद इतरांवर होत नाहीं व ती चोरांस चोरीच्या कामांतच यश देते. तु०—जसा भक्त तसा देव.

मेहनती—मेहनती दिलगीर, चोरटे हुशार—चोरटे पहा.—गांगा. २०३.

मेहुणी—राजाची राणी, पाटलाची मेहुणी—मोठेपणा मोठमोठ्यांशीं संबंध दाखविण्यासाठीं वापरतात.

मेहुणी अर्धी बायको—बायकोची बहीण मेहुणीवर बराचसा हक्क असतो व तिच्याकडे अगदीं जवळकीच्या नात्यानें पाहाण्यांत येतें. बायको मेल्यावर मेहुणीशींच लग्न करण्याचा पुष्कळ जातींत रिवाज आहे.

मेहुणी बायको आणि मिंधा संसार—मेहुणीशींच लग्न लावले म्हणजे त्या संसारांत मजा येत नाहीं; कारण तिच्या माहेरचें प्रस्थ अधिक माजतें.

मेळा—मेळे करणें—(कु.) एकत्र जमून गप्पा मारणें.

मेळ्यांत वसणें—श्रीमंती उपभोगणें.

मेळ्यांत मिळणें—मेळ्यांतील एक म्हणून राहाणें; समरस होणें.

मैं—मैं मरुं ताकी लिये, तूं मरे वांकी लिये—(हिं.) मी तुझ्याकरितां मरतों तर तूं दुसऱ्याकरितां मरतोस. तु०—यां चिंतयामि सततं मयि सा विरक्ता। साप्यन्यमिच्छति-जनं स जनोन्यसक्ता। अस्मत्कृते च परिशुष्यति काचिदन्या। धिक्तांच तं च मदनं च इमां च मां च ॥

मैंड—मैंडेची विसाय—(गो.) पावसाळ्यांत सुद्धां सूर्यप्रकाश मिळावा म्हणून सूर्यकिरणें पिंपांत गोळा करणाऱ्या मूर्ख भोयऱ्या लोकांसारखा मूर्ख.

मैत्री—मैत्रीचें व प्रेमाचें ढोंग—वरवर केलेली बतावणी; वरून दाखविलेला आदर. "आंतल्या गांठीचीं माणसें त्यांना नको असतात. कारण ज्याला आपलें म्हटलें त्याच्याशीं त्यांनीं स्वप्नांतीहि कपट केलेलें नाहीं. 'मैत्रीचें सोंग व प्रेमाचें ढोंग' त्यांना नको असतें; कारण असली बतावणीची वर्तणूक त्यांनीं कधींहि केलेली नाहीं."—वझे, माझा चित्रपट परिशिष्ट १.

मैथुन—मैथुनीं विनटला, नाश आला देहाला—जो मनुष्य अतिशय कामासक्त असतो त्याचें शरीर क्षीण होऊन तो लवकर मृत्य पावतो.

मैंद—मैंदाच्या हातांत फांसे—ठकाच्या हातांत फांसे देऊन द्यूत खेळल्यावर तो आपणाला फसविल्याशिवाय कसा राहिल?

मैंदाची नगरी—लबाड लोकांचा कंपू, जमाव, वस्ती.

मैलागिरी–मैलागिरासंगे चंदन सर्व होती। वेळु हे न होती––मलय पर्वतावर चंदनाचीं झाडें होतात, वेळूची होत नाहींत. जशी भूमी असेल तशी वस्तु निर्माण होते. सप्र–२.४१.

मोकल्यार––मोकल्यार मिरी मोकता नाजाल्यार दोंगर चुकता––(गो.) करायचा म्हटलें तर मिऱ्याचा सुद्धां लक्षवेध करील, नाहीं तर डोंगरावरसुद्धां नेम चुकेल. करनकऱ्या स्वभाव.

मोकळा–मोकळा कंठ करणें–करून रडणें–कंठ पहा.

मोकळी मोधाणी, खंडोबाची जानी––कांहीं पाश नसलेली, स्वैर स्त्री खंडोबाची मुरळी बनते. म्हणजे तिचें वर्तन सभ्य नसतें.

मोका––मोका साधणें–संधि साधणें.

मोग–मोग आसा थैं रुसवो, सोयरीक नाथे वसवो––(गो.) प्रेम असेल तिथेंच रुसावें आणि नातलग नसतील तिथें राहावें.

मोगान मेटता, फोगान पेटता– (गो.) भांडण प्रेमानें मिटतें आणि द्वेषानें वाढतें.

मोगाची मावशी चांदन्याक उबो मारता––(गो.) प्रेमळ मावशी आपल्या आवडत्या पुतणीच्या उबा चांदण्यातलीं सुद्धां मारते.

मोंगल––मोंगलाई कारभार–मोंगलांचा, निजामीचा राज्यकारभार. (ल.) अंदाधुंदी; अव्यवस्था. 'मोंगलाई (निजामाचा) कारभार सुस्त अतिशय बहुनायकी आहे.–रा. ३.४४२.

मोंगलाई मसलत–कपटडाव; कारस्थान. 'परंतु मोंगलाई मसलत यांस उमजली नाहीं.'–भाब ४८.

मोंगलाई मसलत करणें––कपट लढविणें. 'असें करितां तुम्हांस कोणी मदत न करी तरी कांहीं मोंगलाई मसलत करून तुम्हीं यश संपादावें.'––भाब १४. 'यांणीं मोंगलाई मसलत करून पाठीवर फौज घेऊन दिल्लीकडे येते झाले.'–भाब २२.

मोगा पूत हांतुळांरि मूत–(गो.) लाडका मुलगा हांतुरुणांत मुतला तरी त्याचें कौतुकच होतें.

मोगु केलो चडु चलोजालो पाडु–(गो.) फाजील लाड केले कीं मुलें बिघडतात.

मोघा–मोघा करतां येईना तो रांजण करूं लागणें––[मोघा=मातीचा लोटा.] लहान काम करतां येत नसतां मोठ्या कामाला हात घालणें हें चुकीचें आहे.

मोचा––मोचे खाणें–बसणें––पायपोस खाणें; जोड्यांचा मार बसणें.

मोचे फेडणें–––जोडे फेकणें. (ल.) तुच्छ) मानणें. 'गजवाजीनृयान प्राप्तता। तेणें गर्वें इंद्रमाथा। मोचे फेडी॥' –एभा ५.१५२.

मोज–––मोजी करणें––काटकसर करणें.

मोजणें–––मोजल्या माण्या, काय खाशील प्राण्या––(व.) मोजल्या मापानें धान्य घेऊन नेमकें अन्न शिजविल्यानें वेळेवर कोणीं जास्त जेवणारे आल्यास किंवा त्यालाच स्वतः जास्त अन्न लागल्यास त्याला उपाशी राहावें लागेल; खाण्याच्या कामांत मोजल्या मापानें समाधान होणें नाहीं.

मोजल्या रुपयांनीं संसार होत नाहीं–संसारांत सर्व गोष्टी अगदीं नियमित प्रमाणांतच होतात असें नाहीं. कमी जास्ती होतच असतें. तेव्हां मोजक्या गोष्टीनें भागत नाहीं.

मोजा––मोजेका घाव, मिया जाने या पाव––ज्याचें दुःख त्याला कळतें. The Wearer best knows where the shoe pinches him.

मोट–––मोट बांधणें–एखाद्याला त्याच्या इच्छेविरुद्ध कांहीं करावयास सांगणें; वेठीस धरणें.

वाऱ्याची मोट बांधणें––असंभाव्य गोष्ट करूं पाहणें.

शिंदळ धरावा खाटेस, चोर धरावा मोटेस; चोर धरावा मोटे आणि शिंदळ धरावी खाटे–चोर पहा.

मोटभर धुणें, गाडाभर भांडीं–अतिशय काम; काबाडकष्ट; श्रमांचें काम.

मोठा–––मोठी मान करणें–उंच मान करणें; छाती काढणें. 'मोठी मान करोनी येथें आलासी.'–सप्र २.५४.

अंग मोठें करणें––लठ्ठ होणें. 'वांक म्हणती मोठें केलें अंग।'–सप्र २.५४.

***मोठा गेला आणि जोहार करून आला**–– [शिवाजीच्या काळीं जोहार हा शब्द शिष्टलोकांत रूढ असे. अद्याप मारवाड्यांत तो आहे.] प्रतिष्ठित मनुष्यानें काम

करावयास म्हणून जावें व केवळ नमस्कार करून कांहीं न बोलतांच परत यावें; याप्रमाणें व्यर्थ खेप, काम केल्याशिवाय फुकटच मोठेपणा मिरवणें.

मोठा घोडा, मस्तीवान थोडा—जो जातीवंत उमदा घोडा आहे तो शांत गंभीर स्वभावाचा असतो, तो उच्छृंखल नसतो. तशींच मोठीं माणसें शांत असतात. क्षुद्र माणसेंच उतावीळ व गडबड करणारीं असतात.

मोठा मनुष्य मान हालवे, मूर्ख तेणें हर्ष पावे—मोठ्या मनुष्यानें सहज पाहिलें तरी क्षुद्र माणसें हुरळून जातात.

मोठा सोयरा, भेटीची शिराणी—थोरा घरीं लेक द्यावी भेटीची शिराणी, पहा. श्रीमान् सोयरा असल्यावर मुलीची भेट होण्याची मोठी मारामार पडते. कारण सासरचे श्रीमान् असल्यामुळें चौकी पाहरे विशेष असतात. माहेरचे गरिब म्हणजे द्रव्यहीन असल्यामुळें त्यांचा तशा ठिकाणीं प्रवेश होण्याची अडचण. तेव्हां भेट होणें तर लांबच राहिलें.

मोठी चूल पिशवी रिकामी करी—मोठ्या चुलीस सामुग्रीहि पुष्कळ लागते, त्यामुळें खर्च अवाढव्य लागतो. घरांत माणसें फार असलीं म्हणजे खर्च फार होतो.

मोठी बोली रायाची, भिक्षा मागून खायाची—मोठमोठ्या राजासारख्या गप्पा मारावयाच्या पण भीक मागून पोट भरावयाचें याप्रमाणें पोकळ बडेजाव, खोटा दिमाख.

मोठी माय मावली, घरीं नाहीं पावली (चावली)—(महानु.) 'बडा घर पोकळ वासा' या प्रमाणें.

मोठे कार्यीं अल्प यत्न चालत नाहीं—मोठें कार्य घडवून आणावयाचें असेल तर त्या प्रमाणें परिश्रम पुष्कळ करावे लागतात.

(जिचे) मोठे कुले, तिला जग भुले—जी पहा.

मॉठें घरा पॉकळ वांशॅ—(गो.) बडा घर पोकळ वासा याप्रमाणें. बाहेरचा डामडौल मोठा असला तरी आंत लक्ष्मी नांदत असेलच असें कोणी समजूं नये.

मोठे घरीं लेक द्यावी, भेटायाची शिराणी—थोर घरीं लेक द्यावी, पहा. वर पहा. मोठ्याच्या आश्रयास लोक येतात.

मॉठँ झाडा कॉणय वेंग मार्तो—(गो.) मोठ्या झाडाला कोणीहि कवटाळतो.

मोठे तितके खोटे—जे लोक दिसावयास थोर दिसतात ते बहुतेक अंतःकरणाचे क्षुद्र असतात.

मोठेपणा बाजारी आणि फायदा नाहीं लवभरी—नांव मोठें लक्षण खोटें. पत पुष्कळ पण किफायत शून्य.

मोठें पोट आईजवळ आणि अवघड झोंप नवऱ्याजवळ—[अवघड झोंप=लवकर जाग येत नाहीं अशी झोंप] मुलांनीं कितीहि दुसरीकडे खाल्लें तरी आईला त्याचें पोट लहानच दिसतें किंवा आईमुळेंच पोट भरतें व नवऱ्याजवळ निजलें असतां झोंप फार लागते; लवकर जाग येत नाहीं. खऱ्या प्रेमाच्या माणसाची ही परीक्षा आहे.

मोठे मोठे म्हाजन करतात गुडांजन, तुकारे पोरा खंयचें गुडगुडीचें व्यसन—(गो.) मोठ्या मोठयाचा जेथें पाड नाहीं तेथें गरीब लोकांना कोण विचारतो ?

मॉठ्या कोणय् दार काट्टा, बारकॅल्या कोण काट्टा ?—(गो.) मोठा माणूस आला कीं सगळेच दार उघडतात. गरीबाला कोण उघडणार ?

मोठ्या गांडी मोठो सुळे—(गो.) मोठ्या गांडीला सूळहि मोठाच पाहिजे. मोठयांच्या अपराधाला शासनहि मोठेंच हवें.

मोठ्या गुणाचा, गू खातो जनाचा—(महानु.) गुण मोठे पण लोकांत किंमत नाहीं ! रिकामा मोठेपणा मिरविणारा.

मोठ्या घरीं, सदा भिकारी—(महानु.) मोठया माणसाकडे, धनिकाकडे याचक नेहमीं असणारच.

मोठ्या झाडाला वारा लागतो—लहान झाडें वारा आला असतां वांकतात त्यामुळें त्यांस वाऱ्यापासून त्रास होत नाहीं पण वादळांत मोठीं झाडेंच मोडून पडतात. त्याप्रमाणें थोर लोकांसच आपत्ति व संकटें यापासून फार त्रास होतो. गरीब माणसांवरून तीं सहज निघून जातात. तु०—महापुरें झाडें जाती । तेथें लव्हाळे वांचती ॥

मोठ्या भांड्याचा मोठा आवाज—मोठें भाडें पडलें असतां अथवा त्यास कांहीं लागलें असतां मोठा आवाज होतो त्याप्रमाणें थोर मनुष्यावरच मोठमोठीं संकटें येतात व त्यांचा गाजावाजाहि फार होतो. गरीबांच्या कष्टांकडे कोणाचें लक्ष जात नाहीं.

मोठ्या मोठ्याचा मार्ग बरा, तोच करावा साजरा—मोठया लोकांचें अनुकरण करावें. तु०—महाजनो येन गतः स पन्थाः ।

मोठ्या लोकाचें, गाडगें भोकाचें—मोठ मोठ्या लोकांचा वरून बडेजाव दिसला तरी प्रत्यक्ष वस्तुस्थिति बहुधा भिकारच असते. तु०–बडा घर पोकळ वासा.

मोठ्या वाऱ्यानें विझतो, अग्नि लहान असतांना तो—विस्तव वास्तविक वाऱ्यानें पेटतो पण तोच विस्तव थोडा असला व वारा फार जोराचा असला तर अधिक पेटण्याऐवजीं तो विझूनच जातो. तु०–वनानि दहते वन्हौ सखा भवति मारुतः। स एव दीपनाशाय कृशे कस्यास्ति सौहृदम् ।

मोठ्याची मोठी इच्छा—थोर लोकांच्या आकांक्षाहि उच्च असतात.

मोठ्याचें दुःखहि मोठेंच—पुढें पहा. 'बलवत्तर विधि देतो थोराला थोरल्याचि तापातें।'–मोभारत. 'ज्याचे अंगीं मोठेपण । तया यातना कठीण ॥'

मोठ्याचें सर्व मोठें—थोर लोकांच्या सर्वच गोष्टी त्यांच्या थोरपणास साजेशा असून मोठ्या असतात.

मोठ्याचा आला गाडा, गरिबाच्या झोंपड्या मोडा––(व.) मोठ्याच्या गाड्याला वाट करून देण्यासाठीं गरिबाच्या झोंपड्या मोडूनहि वाट केली जाते; श्रीमंतांच्या हौसेपुढें गरिबांच्या नुकसानीची कोणी पर्वा करीत नाहीं, असा भावार्थ.

मोठ्याची मोठी इच्छा—वर पहा. A Great man has great desires.

मोठ्याच्या गांडींत शिरूं नये—आपल्यापेक्षां फार मोठ्याचा आश्रय करूं नये. लहान मनुष्यांनीं आपल्यापेक्षां फार वरचढ लोकांशीं स्नेह केल्यास परिणामीं तो घातक होतो. एकदां एक कोल्हा रानांत जात असतां त्यास एक उंट मरून पडलेला आढळला; तेव्हां त्यानें दातांनीं त्याच्या पोटाच्या कातड्यास चीर पाडून तो त्याचें मांस खाण्यास शिरला. पुढें ऊन तापल्यावर त्या उंटाचें कातडें कडक होऊन ती फट रुंद करतां येईनाशी झाली व कोल्ह्यास बाहेर येतां येत नाहींसें झालें. तेव्हां तो येणाऱ्या जाणाऱ्या मनुष्यास विनवूं लागला कीं, माझें म्हणणें ऐकाल तर मी तुम्हांस एक शहाणपणाची गोष्ट सांगेन. एका वाटसरूनें त्यास काय पाहिजे म्हणून विचारल्यावर त्यानें त्यास प्रथम एक घागरभर पाणी आणून त्या उंटाच्या अंगावर ओतण्यास सांगितलें. तें ओतल्यावर तें कातडें नरम पडून त्यास त्या फटींतून बाहेर पडतां आलें. मग त्या वाटसरास शहाणपणाची गोष्ट म्हणून त्यानें सांगितलें कीं 'मोठ्याच्या गांडीत शिरूं नये; शिरल्यास अडकून पडतों व बाहेर निघतां येत नाहीं'.

मोठ्यानें धरलें तर करूं द्यावें कीं जीव द्यावा ? मोठ्याच्या तावडींत सांपडलें कीं अब्रू किंवा जीव यांपैकीं एक गमावण्याची वेळ येते.

मोड––मोड पडणें—नवीन सुरू केलेल्या धंद्यास गिऱ्हाईक येणें, मिळणें; धंदा सुरू होणें, जम बसणें.

(फौजेचा)मोड होणें––पराभव होणें; नाश पावणें. "त्या वेळेस दिल्लीची फौज आली होती तिचा मोड होऊन फौज माघारीं गेली. '–पेब २७.

मोडका––मोडकी काठी, भलताच लाटी—काठी मोडली म्हणजे ती मालकास निरुपयोगी होते व त्यामुळें ती टाकून दिल्यावर किंवा कोपऱ्यांत पडल्यावर कोणीहि घ्यावी. ती बेवारशासारखी होते.

मोडक्या पायांक पिंजकी व्हाण––(गो.) मोडक्या पायाला फाटका जोडा. जशास तसें.

मोडक्या बाजारीं, रोडका शेतकरी—जुन्या बाजारांत चांगले लोक कशास येतात ? तर ज्यास जुनें पानें विकत घ्यावयाचें असेल असेच लोक येणार.

मोडक्या रुकावेलो म्हारु—(गो.) मोडक्या झाडावरचा समंध. एखाद्या कोपिष्ठ माणसाला म्हणतात.

मोडणें––मोडल्या दळाचा सारथी––(ल.) अनाथांचा वाली; दीनजनसहाय्यकारी.

मोडून काढणें—१ मोडता घालणें; निरुत्तर करणें हाणून पाडणें. 'त्यानीं तिला मोडून काढण्याच्या उद्देशानें म्हटलें'–इंप २७. २ पराजित करणें; फजीती करणें. 'त्यांचा हा परिपाक आजि दिसतां या पंडिता मोडिलें। –सारुह ६.६४.

मोडून घेणें––पराभव करून घेणें. 'तयाचा देहदुर्ग हा थारा । मोडूनि घेतला तो वीरा ।'–ज्ञा १८·१०५२.

मोडून येणें––मोडण्या इतकें फळांनीं खचणें (झाड); फार बहर येणें. 'निंब निंबोळियां मोडोनि आला'–ज्ञा ९·४३८.

मोडतोड सोनाराची जोड––मनुष्य दागिन्याची मोडतोड करावयास गेला कीं प्रत्येक वेळीं त्यांस सोनाराचा फायदा होतो.

मोडला कांटा, झाला नायटा——कांट्याचा नायटा होणें पहा.

मोडली तरी राजधानी, भंगलें तरी तीर्थ——राजधानींचें शहर कितीहि मोडकळीस आलें तरी त्याच्या वैभवाची साक्ष दिसतेच; तसेंच तीर्थक्षेत्र जरी ओसाड पडलें तरी त्याचे गतवैभवाचे अवशेष कांहीं तरी राहातातच.

मोडली तर काडी, फुटला तर डोळा——काडी पहा. एखाद्यानें दुसऱ्याच्या डोळ्यांत काडी घातली तर काडी मोडली तर त्याचें फारसें नुकसान होणार नाहीं पण डोळा फुटला तर तो कायमचा अंधळा होईल. एका पक्षास धोका थोडा पण दुसऱ्या पक्षास भयंकर, अशी स्थिती.

मोडिल्या खुर्साक चॅपें कोण काड्टा ?—(गो.) मोडिलेल्या क्रूसाला पाहून हॅट कोण काढणार ? ख्रिस्ती लोक क्रूस दिसला कीं त्याला मान देण्यासाठीं टोपी काढतात. अधिकारच्युत व्यक्तीला कोणीहि मान देत नाहींत.

मोडलें तरी राज्य,तुटला तरी वड आणि अटला तरी समुद्र——या तीन्ही गोष्टी कितीहि जरी ऱ्हास, नाश पावल्या तरी त्यांचें मूळचे वैभव, प्रभाव कांहीं शिल्लक राहतोच.

मोडलेली घडी पुन्हां बसत नाहीं——एकदां घडी विसकटली कीं पुन्हां तशी बसत नाहीं. मैत्रींत एकदा का थोडा बिघाड झाला कीं पुन्हां ती पहिल्याप्रमाणें शुद्ध असूं शकत नाहीं.

मोडता——मोडता काळ—अवनतीचे दिवस;मंदाईचा काळ. 'मोडत्या काळीं जो धर्म करील तो धर्मात्मा.'

मोडता घालणें——नको म्हणणें; अडथळा करणें; हाणून पाडणें. 'मी जरा हात लावूं लागलें म्हणजे मोडता घालता लागलीच !'—एकच प्याला ४.२.

मोडती घेणें——थांबणें; मागें घेणें; खेचणें.

मोडतें गहाण——अमूक वर्षें जमीन उपभोग करून गहाणांतून मोकळी करून द्यावी अशा अटीचें गहाण.

मोडशी——मोडशी उतरणें——खोड जिरणें; अद्दल घडणें; फजीती होणें. 'शिंदे यांचे फौजेस हांसत होते त्यांची मोडशी उतरली.'—भाब ८१.

मोडशी जिरविणें——खोड मोडणें; अद्दल घडविणें. 'हल्लीच्या काळीं एखादा फडक्यासारखा वेडा पीर जर कांहीं गडबड करण्यास आरंभ करील तर सरकार त्याची मोडशी एका क्षणांत जिरवील.'—निचं.

मोडा घालणें——अडथळा करणें; मोडता घालणें पहा. —मो. वामन चरित्र १९५.

मोडी——(बायकांना तोंडावर)मोडी येणें–फुटणें –उठणें—तारुण्य दशा येणें (रजोदर्शनकाल समीप आल्याचें चिन्ह). तोंडावर मुरुम येणें.

मोत——कुत्र्याच्या मोतीनें मरणें——कुत्रा पहा.

मोतीं–मोतीदाणा——मोत्याच्या दाण्यासारखा सुंदर (मनुष्य, अक्षर). 'अक्षर भगवाना नेवास मोती दाणा'—ऐपो १३८. 'श्रीमंत महाराज पेशवे रावसाहेब मोतीदाणा ।' —पोवाडा.

मोत्यांचा भांग——केसांच्या भांगांत घालावयाचा मोत्यांचा दागिना; एक तऱ्हेचा मोत्यांनीं गुंफलेला दागिना. —तुळशीदास शाहीर यांचे पोवाडे.

मोत्यांची ओळ——सुंदर वळणदार अक्षराबद्दल योजतात.

नाकापेक्षां मोतीं जड—मोतीं हें नाकाला शोभा आणण्यासाठीं असतें. मोतीं जड झालें तर नाक तुटण्याचा संभव असतो. यावरुन एखाद्या गौण वस्तूला मुख्य वस्तूपेक्षां अधिक महत्त्व प्राप्त होणें या अर्थी योजतात.

मोतीं फुटलें, नातें तुटलें—पाठभेद–जातें फुटलें, नातें तुटलें. ज्याप्रमाणें फुटलेलें मोतीं सांधतां येत नाहीं त्याप्रमाणें एकदां तुटलेलें मैत्रीचें नातें पुन्हां जोडतां येत नाहीं. तु०—अवज्ञात्रुटितं प्रेम नवीकर्तुं क ईश्वरः । संधिं न याति स्फुटितं लाक्षालेपेन मौक्तिकम् ॥—सुर १५८.२२१.

मोत्याला ढाळ किती असतो—मोत्यांचें स्वतःचें तेज फारसें नसतें, त्यांस अंगावर घालणाऱ्या मनुष्यामुळें शोभा येते.

मोदक——मोदकाला द्रोण घेणें—(बायकांत रूढ). एका सणावारीं एका बाईनें मोदक करण्याचें योजिलें. पण ते न साधल्यामुळें पातळभाजी सारखा प्रकार झाला. अर्थात् त्याकरितां द्रोणाचा उपयोग करावा लागला ! अंगांत कसब नसल्यामुळें करावयाला जावें एक, पण प्रकार होतो दुसरा.

मोनी——मोनी गाय, पोटांत जाय—गोगलगाय पोटांत पाय पहा.

लोकांस हट्टास पेटविणें. 'असें संकट प्राप्त झालें. मोहरा इरेस पडला. आंतून कोणी सल्लयास येईनात.'--भाव ३. ' वेगळाले मोहरे इरेसी घातले पाहे ।'--सप्र.८.७६.

मोहरा इरेस पडणें—वीरानें हट्ट धरणें, अभिमानास गुंतणें. ' यांसि तो मोहरा इरेस पडला तैसें जाहलें. '--भाव १३.

मोहरी — -मोहरी करणें—मोहरी एवढे तुकडे करणें, दाणादाण करणें; फडशा करणें; चक्काचूर उडविणें; पराभव करणें. 'आज कां करुन घेइन मोहरी'–आ अश्वरक्षण 'मीच राम येउनी करीन शत्रु मोहरी ।'–कुशलव्याख्यान.

मोहोर—-मोहोर कुठें आणि अधेली कुठें ?—दोघांमध्यें फार अंतर असलेल्या गोष्टींची तुलना. कोठें इंद्राचा ऐरावत आणि कोठें शामभटाची तटाणी.

मोहोर सोडून घ्यावी व चिंधी फेकून द्यावी—महत्त्वाच्या गोष्टींचा स्वीकार करून क्षुल्लक गोष्टींचा त्याग करावा. सार घ्यावें व असार टाकून द्यावें.

मोहोरा लक्ष आणि आपला भक्ष– –आपलें भक्ष्य हें लक्ष्य मोहरांसारखें आहे.

मोळ-मोळापोटीं केरसुणी——१ जसें झाड तसें बीं. मोळ गवताची केरसुणी होते. २ तुळशीच्या पोटीं भांग, याप्रमाणें.

मोळी——मोळी उचलणें--(मनुष्याला) उभा करणें; उंच करणें; त्याची तळी उचलणें.

मोळी करणें——हातपाय अंगाशीं घेऊन देहाची गठडी करणें.

मोळी टाकणें——-दमलेलें शरीर जमिनीवर टाकून विश्रांति घेणें.

मोळी बुचकळणें——-(थोड्या पाण्यांत) कसें तरी स्नान करणें.

मोक्ष——मोक्ष मिळणें, मिळविणें—सौख्यशिखर गांठणें; कृतार्थ होणें.

मोक्ष होणें——-मरणें; मृत्यु येणें. 'रात्रीं ज्याचा मोक्ष झाला त्याचीं पोतीं उघडण्याकरितां सर्व मंडळी एकत्र झाली.' -विवि १०' ५–७'१२४'

मोक्षाला जाणें—-मरणें; स्वर्गाला जाणें.

मौडा——मौडा तोण्णांतुळी लाब लॅंवप—(गो.) मेलेल्या माणसाच्या तोंडातली लाळ चाटणें. सर्व जाण्याची वेळ आली तरीहि कंजूषपणानें वागणें.

मौडाक खोंचप—(गो.) मेलेल्याला मारणें. ज्या गोष्टीपासून फायदा होण्यासारखा नाहीं ती गोष्ट करावयास धांवण्यासारखें आहे.

मौन——मौन धारण करतो, तो शहाणा दिसतो—कांहीं कांहीं वेळां न बोलणें हेंच शहाणपणाचें ठरतें.

मौनं सर्वार्थसाधनं--(सं.) गप्प बसल्यानें कार्य साधतें. मागें पहा. सबंध श्लोक असा–(अ) आत्मनो मुखदोषेण वध्यन्ते शुकसारिकाः । बकास्तत्र न बध्यन्ते मौनं सर्वार्थसाधकम् ॥–पंच ४.५१. (आ) मुञ्च मुञ्च महासर्प मा मुञ्च विहगोत्तम । उभयोः पतनं दृष्ट्वा मौनं सर्वार्थसाधनम् ॥ Silence is Golden.

मौर्ख्य——मौर्ख्य न प्रगट करावें, आपलें मनांत ठेवावें—मूर्खपणाची गोष्ट मनांत ठेवावी, बोलून दाखवूं नये.

म्लेंच्छ——म्लेंच्छाचिया बांदोडी : त्यासि कोण फोडी—(महानु.) मुसलमानांच्या बंदीवासांतून, पारतन्त्र्यांतून कोण सोडवूं शकणार ?

म्हंगव——म्हंगव त इच्चु झुंबतो—-(अहिराणी) म्हणावें तर विंचू झोंबतो; म्हणजे बोललें तर वाईट लागतें.

म्हज्या——म्हज्या घरा बारा जोता, पुण हांव भीक मागून खातां—(गो.) घरीं शेतीच्या कामासाठीं बैलांच्या बारा जोड्या परंतु घरचे दुसऱ्याच्या भिक्षेवर जगतात. कांहीं श्रीमंत आपल्या आश्रितांना अगदीं गरीबींत वाढवितात.

म्हज्या मामागेर बारा म्हशीं आनि हांव काट्टां उठाबशी--(गो.) माझ्या मामाच्या घरीं बारा म्हशी आणि मी काढतों उठाबशी. आपला अमुक अमुक नातेवाईक मोठा श्रीमंत आहे, असें आढ्यतेनें सांगत निष्क्रियपणें भटकणाऱ्यास उद्देशून म्हणतात.

म्यान--मेण पहा.

म्हणणें——म्हणतो ब्रम्हचारी, उंची वस्त्रें अंगावरी—ब्रह्मचाऱ्यानें शृंगार करणें.

म्हणेल ती पूर्वदिशा, करील तो विधी—बोलण्याप्रमाणें करण्याचें सामर्थ्य. करील ती पूर्वदिशा पहा.

मोन्याक मास हाडंवंचिं उत्रां—(गो.) मुक्याला वाचा फुटेल असे शब्द बोलला.

मोन्याक सपन पडलें, पण सांगून कळना—(गो.) मुक्या माणसाला पुढील धोरण जरी कळलें तरी सांगावयास येत नाहीं.

मोर—मोर नाचतो म्हणून लांडोर नाचते—नाचणें पहा. 'मोर नाचतें तसें लांडोर नाचतें, ह्या रीतीनें नागरिक जन शामभट्टाकडे चित्त देऊन पहात आहेत.'—शाब २.१८३.—मोर प्र ४.

मोर नाचतो म्हणून लांडोर नाचते परंतु शोभत नाहीं—एक करतो म्हणून तसें दुसरा जर करूं लागला तर तें शोभत नाहीं. ज्याचें त्यालाच.

मोर सुंदर पण पाय काळे—मोराचें सर्वांग सुंदर असलें तरी पाय काळे व वेढब दिसतात. प्रत्येक वस्तूमध्यें कांहींतरी वैगुण्य असतें.

मोरापाठीमागें लांडोर—अंधानुकरण;सुईमागें दोरा.

मोरा—मोऱ्याची टिकली—तांबड्या रंगाच्या बैलाच्या कपाळावर पांढरा ठिपका. (ल.) विद्वान् बापाचा मठ्ठ मुलगा.

मोरी—तोंडाची मोरी करणें—अपशब्द बोलणें.

मोरीवर जाणें—(बायकी.) लघुशंकेला, 'पायधुवायला' जाणें. "ती 'मोरीवर' जाऊन परत येते तों सासूबाई आपल्या पुस्तकाच्या पिशवींत कांहींतरी धुंडाळत आहेत हें पाहतांच तिला आश्चर्य वाटलें.'—कवठेकर, अपुराडाव ४०.

मोर्चा—मोर्चा जाणें—१ प्रतिपक्षीयावर हल्ला, गिल्ला करण्याच्या उद्देशानें जाणें. २ एका विवक्षित उद्देशानें प्रेरित झालेल्या लोकांचा तांडा, जमाव पुढें जाणें.

मोर्चे लावणें—१ तोफा डागण्यासाठीं तयारी करणें. २ तोफ डागणें. 'रघुनाथदादा यांस विषाद येऊन कुंभेरीस मोर्चे लाविले.'—भाब ३.

मोल—मोल मातीस मिळणें; मातीमोल होणें—क्षुद्रत्व प्राप्त होणें; किंमत उतरणें; महत्त्व कमी होणें. 'अडाण्यांच्या हातीं गेला कीं, त्याचें मोल मातीस मिळणार'—विवि ८.८.१५२.

मोलास तुटणें—किंमत कमी होणें; किंमतीनें कमी होणें. 'सोन्याचें कडें घडविलें । तरी काय सोनें मोलास तुटलें ।'—ह २१.२६१.

***मोलाचा भात आंखडला हात, फुकाची कढी धांवून धांवून वाढी**—मनुष्य किरकोळ, कमी महत्त्वाच्या गोष्टी देण्याच्या कामीं औदार्य दाखवितो पण भारी किंमतीच्या महत्त्वाच्या वस्तूबद्दल गोष्ट निघाली कीं मागें सरतो.

मोलें घातलें रडाया । नाहीं असूं आणि माया ॥—तुगा (जोग) १७३५. भाड्यानें रडावयास आणलेल्या लोकांस मनापासून थोडेंच दुःख झालेलें असतें; भाडोत्री लोकांच्या ठिकाणीं खरें ममत्व असूं शकत नाहीं. —शाब २.३१४. "म्हणून कोणीं मेलं, कीं ते सर्वांना 'रडायला या' असं आमंत्रितात. हंसतेस काय ? आपल्यांतहि पूर्वी अशींच समजूत असे. आजहि आपल्यांतील अनेक जातींत मोलकरी आणून रडायला बसवितातच.' मोलें॰" काळें पाणी ३७५.

मोलकरणीशीं राहिलें नीट तर ती दळील बारीक पीठ, नाहींतर घरीं नेऊन करील वीट—अर्थ स्पष्ट आहे. नोकरांना सांभाळून घेतलें पाहिजे.

मोव—मऊ पहा.

मोव आस थै खणटा—(गो.) जमीन मऊ सांपडली म्हणजे खणावयास सुरुवात करतात. पण असें करूं नये, एखाद्याचा उगीच कायदा घेऊं नये. गरीबांना लुबाडण्यांत काय अर्थ. तु॰—मऊ सांपडलें म्हणून कोपरानें खणू नये.

मोवू आसा थी कोणयू खण्टा—(गो.) मऊ असेल तिथें कोणीहि खणतात.

मोवारीं—मोवारीचें वंगण घालणें—ममतेनें वागविणें. 'मोवारीचें वंगण घालणारा नाहींसा झाला'—दुर्दैवी मोहरे.

मोसमी—मोसमी धाडप—(गो.) [मोसमी =मोझेंबिक.] काळया पाण्यावर पाठविणें. (गोव्यांतील कैदी मोझांबिकला पाठवितात.)

मोहर—मोहर धरणें—आघाडीवर जाणें; पुढें होणें, निघणें. 'ऐसें म्हणोनी तस्कर । गांवाकडे धरली मोहर ।'

मोहरा माघारीं फिरविणें—तोंड फिरविणें.

मोहरा—मोहरा-मोहरें इरेस घालणें—मोठ्याला अभिमानास गुंतविणें; मोठे मोठें मध्यस्थी घालणें; थोर

म्हणेल तो चुकेल—१ कांहीं कांहीं वेळां बोलणें हाच मूर्खपणा ठरतो, न बोलणें शहाणपणा ठरतो. २ जो करतो त्याच्या हातूनच चुका होण्याचा संभव असतो; जो कांहीं करीत नाहीं त्याच्या हातून चुकाहि होण्याचा संभव नसतो.

म्हसोबा—चाक्या म्हसोबा—आगगाडीला प्रथम हें नांव कांहीं गांवढळ मंडळींनीं दिलेलें होतें. 'चाकाच्या साह्यानें वाहनांवाचून सजीव प्राण्याप्रमाणें भरधांव चालणाऱ्या चाक्या म्हसोबाचें सकुतुहल दर्शन घेण्याकरतां हजारों माणसें आगगाड्यांच्या आवाराभोंवतीं जमा होत. फाटककृत न्या.मू. रानडे चरित्र पा ११०.

दगडाला शेंदूर फासून म्हसोबा बनविणें—नसत्या गोष्टीला महत्त्व आणणें.

म्हाड्डोळ—म्हाड्डोळ पिकला रोस व्हावता, घाटलेंत लोक धावता—(गो.) म्हाडोळ नांवाच्या गांवातील जत्रेला उद्देशून हें वाक्य वापरतात.

म्हातारपण—म्हातारपण हें दुसरें बाळपण आहे—वृद्धपणीं मनुष्य लहान मुलांप्रमाणेंच परस्वाधीन बनतो व त्याच्या शक्तीहि क्षीण होतात.

म्हातार्पणां टवळ रंग—(गो .) म्हातारपणीं टवळीला रंगढंग सुचतात.

म्हातारपणीं, ढवळा मणी—बुड्ढी घोडी लाल लगाम.

म्हतारपणीं नू ढोबळा मणी—(१.)म्हाताऱ्यास वास्तविक नट्टा पट्टा करण्याची आवश्यकता नसते व हौसहि नसते. परंतु तसा आवास्तव शोक एखाद्या म्हाताऱ्यानें दाखविल्यास ही म्हण लावतात. ढोबळ किंवा मोठाले मणी घालून म्हातारपणीं नटण्याचा प्रयत्न केला तर तो हास्यास्पद होईल असा भाव.

म्हातारपणीं पुत्र मेला संकट आलें बापाला—वृद्धपणीं पुत्राचा मृत्यु होणें हीं फार मोठी आपत्ति आहे.

म्हातारपणीं शरीर खंगतें—वृद्धपणीं सर्व शक्ति क्षीण होतात.

म्हातारा—म्हातारा दादला कुंकवाचा आधार—पतिवृद्ध असला तरी त्यामुळें सौभाग्य तर कायम राहतें. तेव्हां मुळींच नसण्यापेक्षां काहीं तरी असलेलें बरें.

म्हातारा दादला जिवाला आधार—वर प्रमाणेंच.

म्हातारा पिकला, शहाणपणाला मुकला—वृद्धपणीं मनुष्याची बुद्धि चालेनाशी होते.

म्हातारा बसे, आपोआप वासे—(अशिष्ट) अर्थ स्पष्ट आहे.

म्हातारा बैल गुणवंता, वृद्धाचारी पतिव्रता—बैल म्हातारा झाला म्हणजे तो खोड्या करीत नाहींसा होतो व वृद्ध स्त्री पतिव्रता होते.

म्हाताऱ्या बैला गुणवंता—(गो.) म्हातारा बैलच चांगला ठरतो. जोंपर्यंत वाईट गोष्टी जुन्या युगांत नाहींत तोंपर्यंत तें युग चांगला उपदेश करण्यास उपयुक्त ठरतें. तरुणपणांतील रंग ढंग नाहीसें झाल्यावर मनुष्य पुढच्या आयुष्यांत गुणवान बनतो. तु. वृद्धा नारी पतिव्रता.

म्हातारे पोराक पोपुर्णेच फेस्त कोणे सांगला ?—(गो.) गरीबाला थोरामोठ्यांच्या उठाठेवी कोणीं सांगितल्या आहेत ?

म्हातारें माणूस अन्नानें बळकट फाटकें सूप शेणानें बळकट—म्हाताऱ्या माणसाला खाऊंपिऊं नीट घातलें तर तें बळकट राहतें, तसेंच सुपाला शेणाचें नेहमीं सारवण असलें तर तें चांगलें टिकतें.

म्हातारा जाल्यारि आजो जागवे ?—(गो.) म्हातारा झाला म्हणून आजा होत नाहीं. ज्ञानवृद्धत्व हें वयावर अवलंबून नसतें.

म्हाताऱ्या बोंवा खाड हालता—(गो.) म्हाताऱ्या नवऱ्याची फक्त दाढी हालते तेवढी पाहून घ्यायची.

म्हाताऱ्या माणसाचें लोणचें घालून ठेवावें—सल्ला मसलतीच्या कामीं म्हातारीं माणसें फार उपयोगी पडतात. तेव्हां त्यांना कधीं विसंबूं नये.

म्हाताऱ्याची मगरमिठी, पोऱ्याची उधळपट्टी—मनुष्य तरुणपणीं खर्चिक व वृद्धपणीं कंजूष असतो.

म्हाताऱ्याच्या बायकोला तांबट्याच्या रोट्या—म्हातारीला कोणी विचारीत नाहीं. तिला कदन्न खावें लागतें.

म्हाताऱ्यानें केलें नांव, तरण्यानें वाहविलें गांव—तरणा पहा.

म्हाताऱ्याला कंठाळींत—पेटींत घालून न्यावें, म्हाताऱ्याला पिपांत ठेविलें पाहिजे—वृद्ध मनुष्यें अनुभवी असतात तेव्हां त्यांचा नेहमीं विशेषतः प्रवासांत

तरुण मंडळीस फार उपयोग होती. अशा संबंधी गोष्टीहि आहेत.–मॅनवेरिंग ६६९.

म्हातारी---घरच्या म्हातारी भोंवतीं जहालपणा करणें--घरीं बडेजावीच्या गप्पा मारणें.–केळे १.१४०.

म्हातारी मेलीसें होणें--(ल.) अतिशय दुःख होणें.

***म्हातारी गाय ब्राह्मणाला दान**—गाय वृद्ध झाली म्हणजे ती पोसण्याचा खर्च करण्यापेक्षां ब्राम्हणाला दान दिली म्हणजे ती पोसण्याचा खर्चहि वांचतो व दान दिल्याचें पुण्यहि मिळतें. तु०--भटास कुचका नारळ.

म्हातारी जाल्यार जांव, बावडी घराक आधार आस--(गो.) बाई जरी म्हातारी झाली तरी तिचा घराला आधार असतो. किरकोळ गोष्ट सुद्धां उपयोगी ठरतें. गवत सुद्धां वारा कोणत्या दिशेनें वाहतो हें दाखवितें.

म्हातारी नास्तना काणिना---(गो.) म्हातारी नाहीं तर कहाणी नाहीं. म्हाताऱ्या बायका लहान मुलांना काउचिउच्या कहाण्या सांगण्यांत प्रवीण असतात.

म्हातारी निबर, कवटाळी जबर---म्हातारीची मिठी पक्की असते. म्हाताऱ्या मनुष्याच्या हातून बहुधा कोणतीहि वस्तू सुटणें कठिण असतें. (ल.) फार म्हातारी माणसें मोठीं कपटी असतात.

म्हातारी वोडकी वड्यांक उपकारता---(गो.) म्हातारी विधवा देखील वडे तळावयास, पोळ्या भाजावयास उपयोगी पडते. तु०–तृणेन कार्यं भवतीश्वराणाम्।

म्हातारी मेली हिवाळयांत, रडूं आलें उन्हाळयांत--म्हातारी मेल्याचें कोणास फारसें जाणवत नाहीं.

म्हातारी मेल्याचें दुःख नाहीं पण काळ सोकावतो–सोकावता उपयोगी नाहीं.—काळ पहा.

म्हातारी लुकड, कामाला फक्कड—(वांय.) म्हातारपणींहि कांहीं बायका कामास मोठ्या बळकट असतात.

म्हातारीचा होऊं नये नवरा आणि तरुणाची होऊं नये बायको.—वृद्ध स्त्री व तरुण नवरा हीं त्रास दिल्याखेरीज सोडीत नाहींत.

म्हातारीनें कोंबडें लपविलें म्हणून उजेडायचें राहात नाहीं—कोंबडा पहा.

म्हादेव---म्हादेव घालप—(गो.) जेवणाच्या वेळीं पार्वतीपते......असा घोष करणें. महादेव पहा.

म्हादेवान बापा व्हारप—(गो.) विचारलेल्या प्रश्नाचें उत्तर न देणें.

म्हापसें---म्हापशाची पेठ, सर्व चट—(गो .) म्हापशाच्या बाजारपेठेंत सर्व जिनसा खपतात.

म्हारोडा—महार पहा.

म्हारोड्यांत शिरणें—जातिभ्रष्ट होणें.

***म्हारोडा पाहून म्हाराला सोडूं नये, तळ पाहून रेडयाला सोडूं नये**—कारण ते जातील तिकडे गप्प गार होतात. महार पहा.

गांव जळाला तरी म्हारोडा बाहेर—गांवाबाहेर महारवाडा असल्यानें त्याला गांवाची झळ लागत नाहीं.

म्हाली—महाली पहा. **म्हाली म्हणा, न् घोडें हाणा**—(व.) पूर्वी सरकारी अधिकारी, तसेच बडे लोक म्हाली म्ह० न्हावी सेवेसाठीं कोठें गेलें तरी बरोबर वागवीत. म्हालीबोवा चाललों मी घोड्यावरून, हो सोबतीला पुढें ! असें मालक म्हणतो. यावरून, जी आज्ञा झाली ती पाळण्याचें काम तुमचें. आज्ञेच्या योग्यायोग्यतेकडे पाहणें तुमच्या कर्तव्यक्षेत्राबाहेर आहे. तुम्ही फजूल पंचाईत करूं नका, असा भाव.

म्हाळ---म्हाळपक्षांतलो भट्टु, आशाड मासांतलो तट्टु--(गो.) भाद्व्यांत भट्टु आषाढांत तट्टू पहा.

म्हाळ म्हैन्यां फागलां सोद्तालॉ खीं कोण--(गो.) [म्हाळ=महालय] भाद्रपद महिन्यांत करटोलीचीं फळें हुडकणें. त्यावेळीं त्यांचा हंगाम निघून गेलेला असतो. यावरून अप्रस्तुत प्रसंगीं एखाद्या गोष्टीचा हव्यास धरणें.

म्हाळकराल्या घराकडेन गोरूं सांडला—(गो.) पितराचें जेवण घालणाऱ्या माणसाच्या घराकडे त्या बाजूला आपलें जनावर गेलेंय म्हणून जाणें हें एक आपलें कारण असतें पण त्यांतला खरा हेतु त्यानें आपणांस जेवावयास बोलवावें हाच असतो. अगे अगे म्हशी मला कां नेशी ?

म्हाळपै---म्हाळपै घरचें ताक मागतल्यानी व्हरच्याक--(गो.) म्हाळपैच्या घरचें ताक मागेल त्याला मिळतें. एखाद्या ठिकाणीं एखादी वस्तु सुलभ असली कीं म्हणतात.

म्हाळपै जोर, समस्ता पॅज—(गो.) म्हाळपैला ताप आणि घरांतल्या सगळ्या माणसांना पेज. घरांतल्या कर्त्या माणसांच्या तब्येतीप्रमाणें सगळे व्यवहार चालतात.

म्हाळपैचे काण—(गो.) आरशांतलें धन. [म्हाळपै नांवाच्या श्रीमंत माणसाच्या कमरेतला सोन्याचा करगोटा खालीं लोंबत असे; तो खालीं पडून आपणांस मिळेल म्हणून त्याच्यामागें पुष्कळ लोक हिंडत असत.]

म्हैस---ज्याचे हातीं काठी त्याची म्हैस—'ज्याचे हातीं ससा तो पारधी' याप्रमाणें. 'तेव्हां जाबसालांत मलकं साहेबांनी बाजीराव यांस जबाब केला कीं महाराजांनी फार दूरवर पाहून कंपनी सरकारशीं दोस्ती ठेवावी, आणखी उत्तर केलें कीं ज्याचे हातीं काठी त्याची म्हैस असें उत्तर केलें.'—पेद ४१ ले.१६६.तु०—जिसका दंडा उसकी भेंस.

म्हैस आपल्या खाजेनें फळते, धन्याला दूध देण्यासाठीं फळत नाहीं—-जो तो आपल्या स्वार्थासाठीं सर्व गोष्टी करीत असतो. (गो.) म्हैस वियेता आपले खाजीक.

म्हैस घेवक सोपें आणि दांवें घेवक जड—(गो.) म्हैस घेणें सोपें पण तिचें दावें विकत घेणें कठीण. कोणचेंहि काम हातीं घेतांना त्याच्या पुढच्या जबाबदाऱ्यांचा जरूर विचार करावा. लग्न करावें पुढल्या अडचणी पाहून.

पाण्यांत म्हैस व वर मोल—पाणी पहा.

म्हैस बडी कां अक्कल बडी—अक्कल पहा.

म्हैस बसली सखलीं, दोन्ही खळीं चुकलीं—-म्हैस खोल दरींत बसली तर तिला कोणत्याहि खळ्यावरचा दाणा मिळणार नाहीं; कारण खळीं उंचावर असतात.

म्हैस विते तें पारड्याकरितां, मालकाकरितां नाहीं—-वर पहा.

म्हैसके आगे बीन-बजाव, ओ बागूल करिती है—-(हिं.) म्हशीच्या पुढें बीन वाजविल्यास ती भीति दाखविते.

म्हशी आशिल्ल्या दंड आसा—-(गो.) ज्याच्या म्हशी असतील त्यालाच त्या एखाद्याच्या शेतांत गेल्याबद्दल दंड भरावा लागेल; ज्याच्याजवळ नसतील त्याला कांहीं नाहीं. 'कर नाहीं त्याला डर नाहीं' अशा अर्थानें ही म्हण वापरतात.

म्हशी आसिल्ल्याक उठावशी आसात—(गो.) ज्याचा व्याप असतो त्यालाच ताप होतो.

म्हईशि घेवंचे फुडे दाव्यां खरेदी ईत्याक?—(गो.) म्हैस घ्यायच्या अगोदर दाव्याची खरेदी कशाला? असें करणें म्हणजे 'बाजारांत तुरी'प्रमाणें अव्यवहारीपणा.

म्हशी वासरूं म्हण कॉयरां लिपूता?—(गो.) म्हैस नव्हे म्हशीचें वासरूं झालें म्हणून तें केरांत लपूं शकेल का? आपण दडवून ठेवणार म्हटलें तरी लहान-सहान अपराधसुद्धां जगाच्या निदर्शनाला येतात.

म्हशी वांसराक झाडीच्यांतु लेकिलें वे!—(गो.) केरांत पडलेल्या रेडकाची कांहींच किंमत नाहीं काय? केरांत पडलेल्या मौल्यवान रत्नाला कांहींच किंमत नाहीं काय?

म्हशी फाट्टीरी पावसु—(गो.) म्हशीच्या पाठीवर पाऊस. म्हशीच्या अंगावर पाऊस पडूं लागला म्हणजे तिला आनंद होतो असें म्हणतात. मनुष्याला विशेष आनंद झाला म्हणजे ही म्हण लागू आहे.

म्हईशिक जर होर्डिक, रेड्याक करका मुंज—(गो.) म्हशीला आमंत्रण द्यायचें तर रेड्याची मुंज केली पाहिजे.कार्याच्या योग्यतेनुरुप त्याची आखणी करावी लागते.

म्हशीचीं शिंगें म्हशीला जड नाहींत (गो.) म्हशीचि शिंगां म्हशीक जड जायनात—म्हशीचीं शिंगें म्हशीला जड होत नाहींत. आईबाप गरीब असले तरी त्यांना आपलीं मुलें जड वाटत नाहींत. "माझा बोजा माझेवर राहिला 'म्हशींची शिंगें म्हशीला जड नाहींत' या म्हणीप्रमाणें माझ्या आपत्तीचें मला कांहींच संकट वाटेना."—माझा चित्रपट व काशीचा संपूर्ण इतिहास,पान ७१.

म्हशीची सेवा आणि दुधाचा मेवा—-म्हशीची चाकरी केली तर भरपूर दूध मिळतें.

म्हशीचें मूत्र म्हशीलाच पाजावयाचें—जेथली वस्तु तेथेंच उपयोगांत आणावयाची; परभारें भागविणें. तु०—तुरीची काठी तुरीवरच झाडावी.

म्हशीपाशीं वाजे विणा, म्हैस वळुनही बघेना—-म्हशीला संगिताचें काय होय! तु०—कोंबड्याला माणिक.

भरवंशाच्या म्हशीला टोणगा—-भरंवसा पहा.

म्हशीवर पाऊस—-मागें पहा.

म्होरु---म्होरु नाचता म्हुण कुंकड नाचता—(गो.) मोर पहा. मोर नाचतो म्हणून कोंबडा नाचतो. मोठ्या लोकांचें अनुकरण करण्याच्या प्रयत्न पुष्कळ लोक करतात. पण तें स्वभावसिद्ध नसल्यामुळें हास्यास्पद होतें.

य

यः---यःपलाय करणें--पळून जाणें; धूम ठोकणें; सूं बाल्या करणें. पुढें पहा. "तंट्याचें मूळच बगलेंत मारून 'यःपलाय' करावें असा त्यांचा बेत होता.'-पामो ५४.

यःपलाय(ते) स जीवति—(सं.)जो पळतो तो जगतो. संकटाच्या वेळीं जीवरक्षणासाठीं पळून जाणें हेंच श्रेयस्कर आहे. सबंध श्लोक असा-उपसर्गेऽन्यचक्रे च दुर्भिक्षे च भयावहे । असाधुजनसंसर्गे यःपलायेत स जीवति॥

य वै पिता स वै पुत्रः- (सं.) जसा पिता तसा पुत्र. आत्मावै पुत्र नामासि ।

यस्य नास्ति स्वयं प्रज्ञा शास्त्रं तस्य करोति किं ?--(सं.)ज्याला स्वतःची बुद्धि नाहीं त्यास शास्त्रांचा काय उपयोग ? त्यास शास्त्रापठनानेंहि कांहीं ज्ञान येण्याचा संभव नाहीं. सर्व श्लोक असा-यस्य नास्ति स्वयं प्रज्ञा शास्त्रं तस्य करोति किम् । लोचनाभ्यां विहीनस्य दर्पणः किं करिष्यति ॥ -सुर ३९.१.

यजमान---यजमान करणें—स्त्रीनें व्यभिचाराचा धंदा करणें; वेश्याव्यवसाय करणें.

यजमान ठेऊन घेणें--१ यजमान करणें. २ एखाद्याच्या ताब्यांत राहाणें.

***यजमान भेटेल त्याप्रमाणें रात्र काढली पाहिजे**—तु०-जसा भोग्या भेटेल तशी रात्र उजडायची. भोग्या पहा.

यजमान भोंपळा, मंडळीचा घोळ--घरचा यजमान मूर्ख असला म्हणजे बाकीच्या मंडळीकडून घोंटाळा उडणारच. मालक मूर्ख असला म्हणजे घरांत गोंधळ होतो.

यजमान मूकवृत्ति आणि पाहुणे वाचस्पति—यजमान स्वस्थ बसतो पण उपऱ्ये पाहुणेच फार बडबड करतात अशी स्थिति. मालक शांत व पाहुणा गडबड्या.

यजमान सुस्त आणि चाकर मस्त--मालक ढिला किंवा आळशी असला म्हणजे चाकर माजोरी होतात; त्यांवर कोणाचा धाक राहात नाहीं.

यजमाना आनंद झाला, फुटाणे वाटी सगळ्याला—एखाद्याला फार आनंद झाला असतां त्यानें फुटाणे वांटून दुसऱ्यास खूष करणें म्हणजे मनाचा क्षुद्रपणा दाखविणें होय.

यजमानाचा रोजगार गेला तरी आचाऱ्यास सवा मणाची धार--यजमानावर जरी संकट आलें तरी त्याची झळ नोकरांचाकरांस लागत नाहीं. ते आपले यथेच्छ पूर्वक्रमाप्रमाणेंच उधळमाधळ करीत असतात.

यजमानाचा होतो पाहुणचार पण पाहुणा होतो थंडगार—कांहीं कांहीं वेळां यजमान पाहुण्याकरितां म्हणून कांहीं विशेष आदर दाखविण्याचे प्रकार करूं लागतो पण त्यांपासून पाहुण्यास आनंद होण्याऐवजीं त्रास मात्र होतो.

यजमानाला उंची शिरपेंच, हुजऱ्याला दारिद्र्याचा पेंच—यजमान इकडे आपल्या शानशोकींत असतो पण त्याचा चाकर दरिद्र्यानें पीडलेला असतो, तिकडे त्याचें लक्ष्य जात नाहीं. कांहीं मालक नोकरांविषयीं अगदीं बेफिकीर असतात.

यत्---यत् दृष्टं तत् नष्टं—(सं.) सर्व वस्तू नाशिवंत आहेत.

यदेकस्य पथ्यं तदन्यस्यापथ्यम्--(सं.) जें एकाला हितकर असतें तें दुसऱ्यास मारक असतें, एकच गोष्ट सर्वांवर सारखाच परिणाम करते असें नाहीं; तर ती एकास तारक तर दुसऱ्यास मारकहि होते.

यद्वा तद्वा भविष्यति--कांहीं तरी होईल; कांहींका होईना ? (अ) यस्य कस्य तरोर्मूलं येन केनापि मिश्रित (घर्षित)म् । यस्मै कस्मै प्रदातव्यं यद्वा तद्वा भविष्यति ॥ (आ) मर्कटस्य सुरापानं तस्य वृश्चिकदंशनम् । तन्मध्ये भूत संचारो यद्वातद्वा भविष्यति ॥

यतः---यतो धर्मस्ततो जयः—(सं.) जी बाजू न्याय्य असेल तिचा विजय होतो. 'जिकडे सुधर्म तिकडे जय युद्धीं; न भ्रमे महाभागा !॥'-मोस्त्रीपर्व ४.१८. (अ) जयोस्तु पांडुपुत्राणां येषां पक्षे जनार्दनः । यतः कृष्णस्ततो धर्मो यतो धर्मस्ततो जयः ॥ (आ) सर्वं त्वमायतीयुक्तं भाषसे प्राज्ञसंमतम् । न चोत्सहे सुतं त्यक्तुं यतो धर्मस्ततो जयः ॥-भारते उद्योगपर्वणि.

यतो रूपं ततः शीलं--(सं.) मनुष्याच्या बाह्यरूपावरून त्याचा स्वभाव ओळखतां येतो.

यत्न---यत्न करून पाहणें—प्रयत्न करणें.

' जें यांत घडेल तुला तें तरि करिं, करुनि यत्न बा पाहे !' —मोद्रोण ३.१२०.

*यत्न करून पाहावा, फळ देवाधीन——मनुष्याच्या हातांत प्रयत्न करणें हें आहे. फळ मिळणें हें ईश्वराधीन आहे. 'प्रयत्न करणें मनुजा हातीं । सिद्धि असे ईशेच्छेवरतीं ।' तु०—यत्ने कृते यदि न सिद्ध्यति कोत्र दोषः ।

यत्न केल्यावर सिद्धि न झाली, दोष नये कपाळीं——आपण प्रयत्न केल्यावर जर यश आलें नाहीं तर त्यांत आपला दोष नसतो. यत्ने कृते यदि न सिद्ध्यति कोत्र दोषः ।

यत्न जोड-जोडी, आळस मोड मोडी——प्रयत्न करीत असावें व आळस करूं नये.

यत्नाचा बडीवार, वानर तरले सागर——प्रयत्नाचें सामर्थ्य फार आहे. प्रयत्न करूनच वानरहि सागराचें उल्लंघन करूं शकले (रामायण).

यत्नावीण कार्य प्राप्ति, होत नाहीं प्राणांतीं——प्रयत्न केल्याशिवाय कधींहि फलप्राप्ति होत नाहीं.

यत्नें आस्था धरून, रिती घेई प्रपादून——मोठ्या आस्थेनें व प्रयत्नपूर्वक चांगल्या चालीरीती अवश्य शिकून घ्याव्यात.

यत्ने कृते यदि न सिध्यति कोऽत्र दोषः——(सं.) यत्न करूनहि यश न मिळेल तर त्याचा दोष आपणाकडे मुळींच येत नाहीं. वर पहा. सबंध श्लोक——उद्योगिनं पुरुषसिंहमुपैति लक्ष्मीः—दैवं प्रधानमिति कापुरुषा वदन्ति । दैवं विहाय कुरु पौरुष मात्मशक्त्या—यत्ने कृते यदि न सिध्यति कोऽत्र दोषः ॥

यत्नेन सर्वं वशः——(सं.) प्रयत्नानें सर्व कांहीं प्राप्त होतें. प्रयत्नांतीं फल.

यत्र——यत्र धूमस्तत्र वन्हिः ।——(सं.) जेथें धूर असेल तेथें अग्नि असलाच पाहिजे. जेथें परिणाम दिसून येतो तेथें त्याचें कारण असलेंच पाहिजे. कारणाशिवाय कार्य घडत नाहीं.—शाब २.२३५.

यंत्र——एखाद्याशीं-एखाद्या भोंवतीं-बरोबर यंत्र-यंत्रतंत्र लावणें-मांडणें-चालविणें-करणें——एखाद्यावर मंत्राचा प्रयोग करणें. (ल.) एखाद्या विरुद्ध कट करणें, व्यूह रचणें.

यथा——यथातथा——कसेंतरी; कौशलें, फारसें समाधानकारक नव्हे असें.

यथास्थित——[यथा=जसें, स्थित=असलेलें] जसें असेल तसें; पूर्वीप्रमाणेंच; यथाक्रम. २ (ल.) पाहिजे तसें; मनाप्रमाणें; रगडून; पुष्कळ; यथेच्छ.

यथेच्छ (पूजा करणें-झोडपणें इ.)——१ भरपूर, पुष्कळ, इच्छेला येईल तितकें (मारणें, करणें, इ.). ' रायबानें याची चांगली यथेच्छ पूजा करायची ती करून शिवाय ········· याला हा बहुमोल पोषाख बहाल केला !'—शिसं ३.४. २ मन मानेल त्याप्रमाणें; स्वैर; अनिर्बंध.

*यथा अनुष्ठान, तथा सिद्धि——ज्याप्रमाणें आपण खटपट करावी त्याप्रमाणें फल प्राप्त होतें. पूर्वी एखादी सिद्धि प्राप्त होण्याकरितां विशिष्ट विधीप्रमाणें अनुष्ठान करीत असत व तसें अनुष्ठान पूर्ण झाल्यास सिद्धि प्राप्त होते अशी तांत्रिकांची समजूत आहे.

यथा गुरु, तथा शिष्य——(महानु.) गुरु तसा चेला.

यथा देव, तथा भक्त——जसा देव तसे भक्त. जसा गुरु, तसा चेला.

यथा देशस्तथा भाषा——(सं.) प्रत्येक देशांत स्वतंत्र भाषा असते. १ देशमारख्याति भाषणम् । २ यथा देशस्तथा-भाषा यथा राजा तथा प्रजाः । तथा भूमिस्तथा तोयं यथा बीजं तथांकुरः ॥

यथान्नं भक्षयेन्नित्यं जायते तादृशी प्रजा——(सं.) जसें अन्न खावें तशीं अपत्यें उत्पन्न होतात. अन्नाप्रमाणें मनुष्याला चांगले वाईट विचार येतात. दीपो भक्षयते ध्वान्तं कज्जलं च प्रसूयते । यथान्नं भक्षयेन्नित्यं जायते तादृशी प्रजा ॥

यथा बीजं तथांकुरः।——वरील प्रमाणेंच. जसें बीं लावावें तसें झाड उगवतें. ' बाकी अतिनिकट सहवासी म्हणतात कीं यथाबीजं तथांकुरं; व अनुभवहि आला आहे.'—पेद ३०.२५०.

यथा भूमिस्तथा तोयम्——(सं.) ज्या प्रकारची जमीन असेल त्याप्रमाणें पाण्याची चव लागते. कांहीं जमीनींत विशिष्ट क्षार असतात व त्या क्षारांची चव त्या जमीनींतील पाण्यास लागते.

यथा यक्षः तथा बलिः—(सं.) देवाप्रमाणें त्याचा नैवेद्य. यादृश पहा.

यथा राजा तथा प्रजा—जसा राजा तशी प्रजा. मागें पहा. (अ) राज्ञि धर्मिणि धर्मिष्ठाः पापे पापाः समे समाः । लोकास्तदनुवर्तन्ते यथा राजा तथा प्रजाः॥ (आ) यथा देशस्तथा भाषा यथा राजा तथा प्रजाः । यथा भूमिस्तथा तोयं यथा बीजं तथाङ्कुरः ॥ (इ) स्वधर्मरूपो राजेन्द्रो दयारूपेण मन्त्रिणः । सेवकाः साधुरूपेण यथा राजा तथा प्रजाः ॥ (ई) राजा राक्षसरूपेण व्याघ्ररूपेण मन्त्रिणः । सेवकाः साधुरूपेण यथा राजा तथा प्रजाः ॥ (उ) अश्विनी सूयते वत्सं कामधेनुस्तुरंगमम् । तथैव सागरो वह्निं यथा राजा तथा प्रजाः ॥

यथा वृक्षः तथा फलं—(सं.) जसें झाड तसें फळ.

यथौषधं स्वादु हितं च दुर्लभम्—(सं.) औषध गोड असून गुणकारी क्वचितच असतें. मोठा दोष काढून टाकण्यास मृदु उपाय क्वचितच सांपडतो.

यथार्थ——यथार्थ ज्ञान हेंच मोक्षाचें साधन—(महानु.) मोक्षप्राप्ति ही यथार्थ ज्ञानानें होत असते.

यदि——यद्यपि शुद्धं लोकविरुद्धं नाकरणीयं नाचरणीयं—(शंकराचार्य चर्पटपंजरी.) जरी एखादी गोष्ट योग्य असली तरी ती जर लोकाचाराविरुद्ध असेल तर ती आचरणांत आणूं नये.

यदुपति——देणें घेणें, यदुपति जाणे—'देणें घेणें श्रीहरी जाणे' पहा.–सह्याद्रि जानेवारी १९४२.

यध्या——अडाणी यध्या, योनीचा नाश——(अशिष्ट.) अडाणी पहा.

यम——यमपुरी—यमाचें शहर, नगर; यमलोक. यमलोकांत पापी लोकांस यातना देण्याचें काम चालूं असतें यावरून जेथें अतिशय यातना होतात, क्लेश पडतात अशी जागा. (ल.) तुरुंग.

यमपुरीचा दंड; यमपुरीचें दुःख——मोठा आजार, भयंकर दुःख, घोर शिक्षा इ.

यमपुरीस-सदनास पाठविणें——१ अतिशय, बेदम मारणें. २ ठार करणें.

यमाचें-यमाजीपंताचें बोलावणें—१ मृत्यु. 'बा! करी त्वरेनें सार्थक जन्माचें । जोंवरी बोलावणें आलें नाहीं यमाचें ॥' २ अतिशय दुष्ट, कडक व्यक्तीकडे जावयाचें असणें. ३ न चुकवितां येणारें काम-बोलावणें.

यमाच्या दाढेंत असणें-पडणें-सांपडणें-नाणें—१ मृत्युमुखांत असणें, पडणें, सापडणें. २ (ल.) मोठ्या संकटांत असणें, पडणें, सापडणें; अतिशय हाल करणाराच्या तावडींत सापडणें.

यमाच्या दाढेंत घालणें-टाकणें—मृत्युमुखांत टाकणें; मोठ्या संकटांत घालणें; अतिक्रूर मनुष्याच्या ताब्यांत देणें, स्वाधीन करणें.

यमाजी भास्कर; यमाजीपंत; यमाजी बाबाजी—यम; मृत्यु.

यमाजी भास्कराचा दरबार—कत्तल; हत्याकांड; एकसारखे जीव घेण्याची घटना.–पामो ५८७.

***यमाजीस (काळास) न भ्यालें तरी गमाजीस भ्यालें पाहिजे**—यमाजी व गमाजी यांच्या स्वभावाची निदर्शक म्हण. गमाजी–औंधकर प्रतिनिधींच्या मुतालिक घराण्यांतील यमाजी शिवदेवाचा मुलगा. यमाजीनें प्रतिनिधींचा पक्ष घेऊन पेशव्यांशीं वैर धरलें होते तोच क्रम गमाजीनें आरंभिला. हा फार क्रूर असे.––ज्ञाको.(ग)३७.

यमापेक्षां विषाची थोरी, तें प्राण्याला तात्काळ मारी.—यमापेक्षांहि विष हें श्रेष्ठ होय; कारण तें मनुष्यास ताबडतोब मारतें.

यमक——यमकाला यमक लावणें-साधणें——१ तोंडास तोंड भेटणें; जशास तसें मिळणें. २ होस हो देणें, होयबा करणें; कशालाहि अनुमति देणें.

यंव——यंव करीन, त्यंव करीन—असें करीन तसें करीन अशी व्यर्थ फुशारकी मारणें.

यंव करीन, त्यंव करीन, माझ्या चोळण्यांत गवत भरुन आग लावीन!—अकारताळेपणा.–विविधवृत्त १२-२-३९.

यवनी——यवनी राज्य बेपर्वा—(ऐति. म्हण.) शिवदिग्विजय ४९.

यवनी—यवनीला नाहीं ठिकाणा, अन् बुधबारचें लग्न—(व.) [यवनी=प्रसूत होणें.संस्कृत योनीपासून.] अद्यापि जिची उत्पत्तिच झाली नाहीं, उत्पत्ति होणार अशी चिन्हें मात्र दृग्गोचर होत आहेत, अशा व्यक्तीच्या लग्नाचा बेत ठरवून दिवसहि मुकरर करणें यासारखे फाजील उतावी-

ळपणाचें अर्थात् मूर्खपणाचें कार्य कोणचें ? 'आतां तर नुसत्या भिंती झाल्यात् तुम्ही त्या घराचें आतांच भाडें ठरवा म्हणतां. यवनीला नाहीं ठिकाण अन् बुधवारचं लग्न.' तु०–बाजारांत तुरी.

यश—यश डोळ्यांवर येणें– यश डोळ्यांत खुपणें; मत्सर वाटणें; असूया वाटणें, पराक्रमाचा हेवा वाटणें. "केशवकुमारांवर आपण मात्सर्याचा आरोप केला नाहीं असा ते निर्वाळा देतात. त्यांच्या मनांत तसें नसेलहि, परंतु त्यांचे शब्द निराळीच ग्वाहि देतात, त्याची वाट काय? माझ्या अल्प बुद्धीनें 'यश डोळ्यांवर येणें' याचा अर्थ 'यश डोळ्यांत खुपणें' असाच होतो. आणि मत्सराशिवाय यश डोळ्यांत खुपतें काय, याचा वाचकांनींच निर्णय द्यावा." –प्रतिभा वर्ष ३ अंक ४.

यश लाभास येणें—श्रमाचा मोबदला मिळणें; श्रम सार्थकीं लागणें; अपेक्षा फलद्रप होणें.

यशाचा विडा उचलणें-घेणें—यश मिळबून येईन अशी प्रतिज्ञा करणें.

यशाचे पर्वत झाले—(ऐति. म्हण.) फार मोठें यश लाभलें.–(अंताजी माणकेश्वर) पया ३१३.

यश अपयश शूराचा वांटा—जो शूर आहे त्यास कधीं यश तर कधीं अपयश येतच असतें. भ्याड मनुष्य कांहीं करीतच नाहीं तेव्हां त्याला या गोष्टींचा संपर्कच नसतो.

यशाच्या पाऊलवाटी, असती अल्प संतुष्टांच्या पोटीं—जे थोडक्यातच संतोष मानतात त्यांच्या वांट्यांस कधीं कधीं थोडें फार यश येतें.

यशासारखें यशस्वी कांहीं नाहीं—यशस्वी होण्यांत सर्व कांहीं येतें.–वि. रा. शिंदे आत्मचरित्र पूर्वार्ध पान ६८. Nothing succeeds like success.

यक्ष—यक्षगंधर्व थबकेल तेथें मूर्ख खुशाल धडकेल—मूर्ख मनुष्यास मागचा पुढचा मुळींच विचार नसतो. ज्या गोष्टीबद्दल यक्षगंधर्वांसहि भीति वाटते त्या गोष्टी मूर्ख मनुष्य बेधडक करूं पाहातो. अखेर पारिणाम अर्थात् त्याचा नाश व्हावयाचा हाच होणार. जी गोष्ट शहाणे सुर्तेहि करूं शकत नाहींत ती गोष्ट मूर्ख मनुष्य मागचा पुढचा विचार न पाहातां करूं धांवतो. पुढील इंग्रजी म्हणीचा पर्याय– Fools rush in where angels fear to tread.

यक्षिणी—यक्षिणीची कांडी फिरणें—यक्षिणीजवळ एक जादूची कांडी असून ती ती फिरविते व चमत्कार घडवून आणते. यावरून अकल्पित रीतीनें स्थिति पालटणें.

यज्ञ—यज्ञपुरुषाय नमः—अग्निहोत्री वरील वचन म्हणून भिक्षा मागतात. भिक्षा मागणें. "नरसिंहभट्ट भोजन झाल्याबरोबर खांद्यावर पडशी टाकून 'यज्ञ पुरुषाय नमः' करण्याकरितां घराबाहेर पडला होता."–शाब २.२८६.

यज्ञ पुरोडाश कावळ्यास काय—१ कोंबड्याला माणिक याप्रमाणें. योग्यता जशी असेल त्या योग्यतेनुरूप त्यास प्राप्त व्हावयाचें अशा ईश्वरी संकेत आहे. २ यज्ञ पुरोडाशाचें पावित्र्य व महत्त्व कावळ्यासारख्या क्षुद्र प्राण्यास कोठून कळणार ?

या—या कानाचा त्या कानाला पत्ता नसणें—मनुष्याचे दोन कान एकाच शरीराचे अवयव असून त्यांची कधीं एकेमेकांशीं गांठ पडत नाहीं किंवा एकाचें दुसऱ्याशीं हितगूज होत नाहीं. एका कानानें ऐकलेली बातमी कधीं दुसऱ्या कानाला कळत-दिसत नाहीं; त्यावरुन निकटसंबंधी किंवा जिवलग असून एकाचें मनोगत दुसऱ्याला नकळणें. लोकांला बातमी न लागूं देणें.

या बोटाचा थुंका त्या बोटावर—बोलणें फिरवणें; शब्द बदलणें;

या हाताचा झाडा त्या हातावर देणें—दुष्कर्माबद्दल लगेंच कोठून तरी शिक्षा मिळणें.

***या कानांत तुळशीपत्र, त्या कानांत बिल्वपत्र**—कानांवर कांहीं पडूं न देणें; न ऐकणें.' या कानांत तुळशी पत्र, त्या कानांत बिल्वपत्र, त्याला न समजे शास्त्र, शंका नको.'–शाब १.१११.

या कानानें ऐकलें, त्या कानानें सोडलें—या कानानें ऐकून त्या कानानें सोडणें. एक पद्य.

याचि देहीं याचि डोळां—याच जन्मांत; आपल्या ह्यातींत; मरणापूर्वी. (मुकुंदराज).

या बिळा माल्हो खिळा, उंदिर गेलो दुसऱ्या बिळा—(गो.) एक बीळ बुजवून टाकलें तर उंदीर दुसऱ्या बिळांत जातो. अनेक पळवाटा असणें.

याची पागोटी त्याच्या डोक्यांत; याचें पागोटें त्याच्या डोक्यावर—एकाची वस्तू घेऊन दुसऱ्याला

देणें व अशा लटपटीवर चरितार्थ चालविणें अशा व्यवहाराला भांडवल नको. पागोटें पहा.

याचें---याचें दार त्याचें दार, ऊठ मेल्या खेटर मार—लोकांच्या दारांवर ठोठावून खेटरें खाणें; दुसऱ्याच्या दारीं जाऊन अपमान करून घेणें. उगाच खोड्या काढून दुसऱ्याकडून फजीति करून घेणें.

याच्या अंगीं तीन मण तिखें जळतें—अतिशय रागीट मनुष्य. तिखें पहा.

याचक---याचक नेहमीं संतुष्ट असतो—याचकानें मिळेल त्यांत समाधान मानण्यांतच त्याचें हित असतें. कारण कांहीं तरी त्याला मिळतच असतें, त्याच्या पदरचें कधीं कांहीं जात नाहीं.

याचकाचा हात खालीं आणि दात्याचा हात वर असतो—दाता देण्यासाठीं हात वर करतो व तो देणार तें घेण्यासाठीं याचकाचा हात त्याखालीं असणार हें उघड आहे. अर्थात् दाता हा याचकापेक्षां श्रेष्ठ आहे.–उग्र २.१.

याचको याचकं दृष्ट्वा श्वानवत् गुर्गुरायते।—(सं.) एक भिकारी दुसऱ्याला पाहून जळफळतो व त्याच्यावर राग काढतो. आपल्याला मिळणार त्यांत हा वांटेकरी होणार याबद्दल साहाजिक मत्सर वाटतो. समान व्यवसायी लोकांत मत्सर वास करतो. दृष्ट्वा यतिर्यतिं सद्यो वैद्यो वैद्यं नटं नटः । याचको याचकं दृष्ट्वा श्वानवत् गुर्गुरायते ॥

याचना---याचना केल्याशिवाय दान मिळणार नाहीं—मागितल्या शिवाय कांहीं मिळत नसतें. प्रयत्नाशिवाय कांहीं साध्य होत नाहीं.

यात्रा---यात्रा केली परोपरीची, भेट नाहीं देवाची—अनेक प्रकारें देवास आळवूनहि देव प्रसन्न न होणें; अनेक खटपटी करून एखाद्याचें मन न वळणें; श्रम व्यर्थ जाणें.

यात्रा चालली पंढरपुरीं, अभक्त होती दुराचारी---पंढपुरास आषाढीची यात्रा चालली म्हणजे जे भक्त असतात ते यात्रेंत सामील होतात व जे अभक्त असतात ते दूर राहातात, ते येत नाहींत. भक्तीच्या प्रवाहांत जे अधिकारी असतात ते सांपडतात, जे दुष्ट असतात ते सांपडत नाहींत.

यात्रा सुखाची, कामें दुःखाचीं---यात्रेंत जाणें मौजचें वाटतें पण काम करण्यास वाईट वाटतें. श्रम नकोत चैन हवी.

यात्रे गेलेल्याक मुंडण जाता—(गो.) यात्रेला जाईल त्याला मुंडण करावें लागतें. मुख्य गोष्ट केली कीं तिच्या आनुषंगिक असलेल्या इतर गोष्टीहि कराव्याच लागतात.

यादव---यादवी--यादव हे श्रीकृष्णाचे वंशज व संबंधी होते. यांचा अंत आपआपसांत दारूच्या धुंदींत भांडाभांडी व मारामारी करण्यांत झाला.यावरून आपसांतील युद्ध; गृहकलह; आपसांतील कलागत.

यादवां कुला नाशाक कांडण पुरो--(गो.) यादवांच्या कुळाचा नाश व्हायला फक्त मुसळ पुरें. सर्व यादव प्रभास क्षेत्रीं एका मुसळाच्या निमित्तानें आपापसांत भांडून नाश पावले या कथेवरून ही म्हण प्रचारांत आली. क्षुल्लक गोष्टीसाठीं आपापसांत भांडून सर्वनाश करून घेणाऱ्या भाऊबंदांना उद्देशून म्हणतात.

यादृश---यादृशो यक्षस्तादृशो बलिः—(सं.) जसा यक्ष तसा बलि. जशास तसें. "पुस्तक (शुद्धिसर्वस्व) संस्कृतांत असून 'यादृशो यक्षस्तादृशो बलिः' या न्यायानें पुस्तकाची भाषा देखील बरीच पांडित्यप्रचुर आहे."–सासं २.३३.

यावत्— यावच्चंद्र दिवाकरौ—चंद्रसूर्य असेपर्यंत; चिरकालिक. दान, इनाम, इ. सनदापत्रांतून हा वाक्प्रचार योजलेला असतो.–गांगा २११.

यावत्तैलं तावद् आख्यानम्–व्याख्यानम्।--आख्यान रात्रीं देवळांत चाले व तेथें दिवे जो वेळपर्यंत तो वेळपर्यंतच तें चाललेलें असावयाचें. तेल सरून दिवे गेले कीं कथाहि बंद. यावरून जोंपर्यंत दिव्यांत तेल आहे तोंपर्यंतच हरदासाचें आख्यान, प्रवचन या गोष्टी चालावयाच्या; मनुष्याजवळ द्रव्य वगैरे असतें तोंपर्यंत त्याची चैन चालते. जोंपर्यंत साधन आहे तोंपर्यंत कार्य चालतें.

युक्ति---युक्तीच्या पोटीं—युक्तीनें; मुत्सद्देगिरीनें; कौशल्यानें.

युक्तीस येणें—मनास येणें; पसंत पडणें; योग्य, युक्त वाटणें, दिसणें. 'बहु बोलणें तयांचें धर्माच्या येइनाचि युक्तिस तें।'–मोशांति ३.८४.

युक्तीयुक्तीनें करणें–घेणें---त्वरा अथवा दांडगाई न करतां सोईनें करणें.

*युक्ति तेथें मुक्ति; (महानु.) युक्तीशिवाये मुक्ती नाहीं—युक्ति असेल तर सुटका होते; युक्तीशिवाय घडगत नाहीं.

युग—युगांतर लोटलें—अतिशय दीर्घ काल झाला. Ages rolled away.

युगे अठावीस विटेवरी उभा—१ चार वेद, सहा शास्त्रें, १८ पुराणें यांच्या अठावीस विटा रचून त्यावर परब्रह्म उभें आहे. उगें यांच्याऐवजीं युगें शब्द रूढ झाला असावा. २ अष्टाविंशतितमे युगे अशी कालगणना करण्याचा प्रत्येक धर्मविधीच्या वेळीं प्रघात आहे. चार युगांची एक चौकडी अशा सात चौकड्या आतांपर्यंत होऊन सातव्या चौकडींतील शेवटचें कलियुग चालू आहे. अशा प्रकारच्या चौदा चौकड्यांचें राज्य रावणास लाभावयाचें होतें तें सीताहरण केल्यामुळें गमावलें. प्रत्येक चौकडींत एक मनु असतो. सध्यां वैवस्वत मन्वंतर चालू आहे.--विठोबाची आरती.

युद्ध—युद्धास तोंड लागणें—युद्ध सुरू होणें. कलहास, मारामारीस, वादास वगैरे आरंभ होणें.

युद्धस्य वार्ता–कथा रम्या—(सं.) युद्धाच्या गोष्टी ऐकावयास फार गोड लागतात पण खरोखरचें युद्ध फार भयंकर असतें. दूरस्थाःपर्वता रम्या वेश्या च मुखमंडने। युद्धस्य वार्ता रम्या च त्रीणि रम्याणि दूरतः ॥--सुर. १५८.२१८. 'ज्यांचा युद्धाशीं कसलाहि संबंध नाहीं. युद्धामुळें ज्यांच्या आंगाला ओरखडा हि उठण्याचा संबंध नाहीं अशा त्रयस्थांना युद्धाच्या कथा केव्हांहि रम्य वाटणें साहाजिक आहे.'—केसरी १३-३-४२.

युष्मादिक—[युष्मत् = तुम्ही] आपण; तुम्हीं; बहुधा उपरोधिक गौरवानें योजतात. याच्या उलट अस्मादिक. 'आतां शौर्याच्या गोष्टी सांगता. पण त्या दिवशीं चोर आले तेव्हां युष्मादिकच पळाले.'

येक—एक पहा. यक तन्दुरुस्ती, हजार न्यामत बरोबर आस्त—(गो.) एका आरोग्याची सर अगाध संपत्तीस येणार नाहीं. (Health is wealth)

याक पोऽऽर आनी बोभाट थोऽऽर—(कों.) एकच मूल असून फार ओरड करणारी. थोड्या गोष्टीचा अतिशय गाजावाजा करणारी.

यॅक वाढ्ल्यान समजूं जाय नाजाल्यार यॅक जेवूतल्यान समजूं जाय—(गो.) वाढणारानें भांड्यांत किती आहे तें पाहून त्या मानानें वाढलें पाहिजे आणि वाढणाऱ्याकडे लक्ष देऊन जेवणारानें तरी अधिक वाढण्याचा आग्रह धरूं नये. नाहींतर मालकाची अब्रू जायची.

येकला—एकला पहा. यॅकल्या जड, दॉघां ल्हौ, तिघांनीं दोंगोर पर्तिला—(गो.) जें एकाला जड तें दोघांना हलकें होतें आणि तीघे मिळाले कीं डोंगरसुद्धां इकडच्या तिकडे करतां येतो.

येकांत—एकांत पहा. येकांतीं लोकांतीं। स्त्रियांसीं भाषण। प्राण गेल्या जाण। करूं नये॥—परस्त्रीशीं कोठेंच भाषण करून नये.

येड—येड करणें—घोड्यास इशारा देणें. 'तुजला मारिन मी, करिन येड।'—ऐपो १२६.

येड देणें—(व.) लगामाच्या इशाऱ्यानें घोड्यास मागें परतविणें.

येडा—वेडा पहा. येड्याले झाइ बायको, माय म्हनूं कां बोय म्हनूं—(अहिराणी) [बोय=आजी] वेड्याला बायको करून दिली तर तो विचारतोः हिला आई म्हणूं कीं आजी म्हणूं.

येणें—येणें जाणें—१ येणें व जाणें म्हणजे भेटीला जाणें किंवा येणें; राबता; दळणवळण. 'श्रीमंताकडे त्यांचें येणें जाणें आहे.' २ येणें व देणें असलेला पैसा; उकळण्याचें कर्ज व फेडावयाचें कर्ज; देण्याघेण्याचा व्यवहार. 'तुम्हीं जा म्हणून सांगतां पण लोकांकडे आमचें येणें जाणें आहे त्याची काय वाट?'

येऊन जाऊन—१ अखेरीस; सरतेशेवटीं. २ आले गेले धरून. ३ फार तर. ४ नेहमीं; सतत.

*येणें ना जाणें, फुकट वेल्हावणें—स्वतःला कोणतीच कला अवगत नाहीं पण आव मात्र असा आणायचा कीं लोकांना वाटायचें, हा खरा कलावंत आहे म्हणून. मग अर्थातच स्वतःचे देव्हारे माजवून घ्यावयाचे; यापुढें त्याची मजल जाऊं शकत नाहीं. फुकटच्या मोठेपणांत खूष.

या नाहीं, बसा नाहीं, आदर सत्कार, तें घर नादार, पण केवळ मूर्खाचा बाजार—ज्या घरीं कोणी गेल्यास त्यास या, बसा, म्हणून आदर दाखवीत नाहींत त्या घराची किंमत कोणी मानीत नाहीं व तेथील लोकांस मूर्ख समजतात.

या या ! माझ्या कपाळाच्या अक्षता पहा— अक्षता पहा.

याहो मुंगळोजी ? गूळ खा—कांहीं जणांचा सल्ला, मसलत वगैरे विचार चालले असतां त्यांत एखादा भलताच कोणी जाऊन त्यांच्यांत तोंड घालतो. तेव्हां ज्यांचा विचार चालला असतो त्यांपैकीं एकजण तोंड घालणारास बोलतो, तुम्हांस कोणीं बोलाविलें.—'याहो मुंगळोजी गूळ खा.'

ये उद्योगा आणि बैस माझ्या खांद्यावर— उद्योग पहा.

ये कुत्र्या, खा माझा पाय—कुत्रा पहा.

येग साळू, आपण दोघी दळूं—रिकामपणीं उद्योग काढणें.

येगे कळी आणि बैस माझे नळीं—भांडण उकरून काढणें.

ये तोंडा ! जा तोंडा !—तोंडाला येईल तें बोलणें अविचारानें बोलणें; बकणें. "कांहीं मतलबी माणसें तुमच्या कानांत वारा भरभरून तुम्हांस तुमच्या प्रिय व्यक्तीच्या बाबत भलताच संशय घेण्यास लावण्याइतकी मनाची तयारी करतील आणि तुम्हीं आपले खुळयासारखे 'ये तोंडा, जा तोंडा' कांहीं तरी बडबडत असेच बसाल."—धनुर्धारी १४-३-४१.

ये दगडा, पड पायावर—मुद्दाम एखादें काम उपस्थित करून त्यांत नुकसान करून घ्यावयाचें असा भावार्थ.

येना जाय, मंगळ गाय—कांहीं एक येत नसतां मोठी गोष्ट करण्यास सिद्ध होणें.

येना मागूंक भीक जाल्यार गुडगुडी ओढूंक शीक—(गो.) भीक मागता येईना तर गुडगुडी ओढावयास शीक. कारण या संवयीमुळें तरी तंबाखूसाठीं मनुष्य दुसऱ्याजवळ भीक मागतो. दुर्गुण व वाईट संवयी स्वाभिमानाला कमीपणा आणतात. तु०—भीक मागतां येईना तर बैदिकी-वैद्यकी शीक.

ये बी लडवू, जा बी लडडू—(क.)रिकामी ये जा.

येरे उंबरा, पडरे तोंडा—(व.) दैवावर हवाला ठेवून जो स्वस्थ बसतो त्यास म्हणतात. अतिशय आळशी मनुष्य.

येरे कुत्र्या, चाव माझ्या पायाला.—वर पहा.

येरे गोष्ट्या, पड रे पायां—(व.) जाणून बुजून एखादें संकट ओढवून घेणें. मागें पहा.

येरे दिवसा, भररे पोटा—कसातरी दिवस घालविणें. पोट भरलें व दिवस लोटला म्हणजें झालें. पाठभेद—भररे पोटा, जायरे दिवसा.

येरे माझ्या पहिल्या मागल्या—पुन्हां पूर्व स्थितीवर येणें; पुन्हां पूर्वीचाच आयुष्यक्रम चालू ठेवणें; पुन्हा मागचेंच बोलणें बोलूं लागणें. 'बडे साहेबांकडे जेव्हां या राणीसाहेबांकडून दाद मागण्यांत येते तेव्हां तात्पुरता बंदोबस्त. परंतु पुढें येरे माझ्या मागल्या.'—विक्षिप्त २·१७४. "परंतु विष्णूचा आपला 'येरे माझ्या मागल्या' हा क्रमच चालावयाचा."—छच १४.

येरे माझ्या मागल्या, कण्या (कढी) भाकरी चांगल्या—आपली पहिली सवेची गोष्ट असेल तीच चांगली, एखाद्या तात्पुरत्या दिखाऊ गोष्टीच्या मागें लागूं नये; ती अशाश्वत असण्याचा संभव असतो.

येरे माझ्या मागल्या, कांदे वांगी रांधल्या—एक कुणब्याची बाई दोन दगड मांडून स्वयंपाक करीत होती. तिनें प्रथमतः कांदे व वांगीं यांची भाजी शिजत लाविली नंतर ती भाकरीचें पीठ मळूं लागली. तेव्हां तिनें आपल्या मनांत विचार केला कीं, भाजी तर झालीच. आतां पांच भाकरी भाजल्या म्हणजे स्वयंपाक तयार होईल व आपल्याला लवकर जेवावयास मिळेल. असा विचार ती करीत आहे तोंच चुलीचा दगड घसरुन भाजीचें पातेलें विस्तवांत पालथें पडलें. तें पाहून त्या बाईनें वरील शब्द म्हटले. तेव्हांपासून ही वरील म्हण प्रचारांत आली असावी. —शाब २·२१३.

येरे माझ्या मागल्या, ताक कण्या चांगल्या—वर पहा.

येरे येरे वाऱ्या, धूळ घेऊन वच-जा काळ्या—वारा येतो व धूळ उडून जाते. सोसाट्याच्या वाऱ्यानें धुळीचे लोटच्या लोट वर उठतात.—आनंद, डिसेंबर १९१७.

उदंड खाल्ला मेवा तर येईना अर्ध भाकरीचा येवा—सुकीं फळें वगैरे कितीहि खाल्लीं तरी अर्ध्या भाकरीनें जें समाधान होतें व भूक शमते तिची सर त्यास येत नाहीं.

येईना न् जाईना, माई (माझं) नांव मैना.— [मैना=फार शहाणी सुग्रण स्त्री] येत जात कांहीं नाहीं,

विद्या किंवा सद्गुण विशेष अंगीं नाहीं पण लोकांत मात्र मोठेपणा मिरविण्याची हौस आहे अशाला ही म्हण लावतात.

येईना न् जाईना आणि उगीचहि राहीना—कांहीं ज्ञान नसतां उगाच वटवट करणारा.

येई वेळे, खाई केळें—जो वेळेवर हजर असतो त्याला लाभ होतो. तु०—हजीर सो वजीर.

येईल तितकें बोलूं नये व खावेल तितकें खाऊं नये—मित भाषण व मित आहार करावा.

येतां जातां खाई अन् ताटीं बसल्या भूक नाहीं; येतां जातां चरती, मंगळवार करती—वरचेवर खाणें असल्यावर प्रत्यक्ष जेवणाच्या वेळीं काय जाणार ? उपास आहे, भूक नाहीं असें म्हणावयाचें पण इकडे एक-सारखा कांहीं तरी खाण्याचा सपाटा !

येईल राजाची राणी, तर भरील परवडीनें पाणी—राजाची राणी जरी पाणवठ्यावर आली तरी तिला सुद्धां पाळी येईल त्यावेळीं पाणी भरण्यास मिळेल; त्याठिकाणीं तिचा अधिकार चालणार नाहीं.

येता-येवा व्हावा, जाता-जावा न व्हावा—पाहुणे मित्र वगैरे आले असतां आनंद होतो, जातांना वाईट वाटतें. म्हणून ते यावेत पण जाऊं नयेत असें वाटतें.

येतील वांग तर फेडतील पांग—तारुण्यांत तोंडावर वांग येणें हें भाग्याचें लक्षण समजलें जातें.

येतें हत्तीच्या पायानें, जातें मुंगीच्या पायानें—दुखणें पहा.

येत्याचा सोबती, जात्याचा बोळवा.--बोळवा पहा.

येत्याच्या चार वाटा, जात्याच्या बारा वाटा—संपत्ति येण्याचे मार्ग नियमित असतात पण जाण्याचे अनेक असतात.

येवंक वचूंक चेड्डू आयलें मरूंक—(गो.) एखा-द्याची 'इकडे ये, तिकडे जा' अशी फुकटच्या फुकट ताबड निघणें.

यो गे लुडबे, वच गे लुडबे—(गो.) कारणा-शिवाय ये जा. निश्चित उद्देशाखेरीज वेळेचा व्यय कर-ण्यासारखें आहे.

येतला—**येतल्या जल्मा सुणें जातलो म्हुण त्या जल्मा गू खावप आसं व्हयं !**—(गो.) पुढच्या जन्मीं कुत्रें व्हावयाचें आहे म्हणून या जन्मांतच विष्ठा खावयास सुरुवात करणें योग्य आहे काय ? या म्हणींत कुत्र्याचा संबंध तितकासा योग्य वाटत नाहीं. कुत्रें विशेष करून विष्ठेच्या शोधार्थ नसतें.

येथें—**येथें उभी तेथें उभी, माझें नांव चांदबीबी**—(महानु.) स्वतःला फार मोठे समजून कांहीं काम न करणें. ऐदी माणसाबद्दल म्हणतात.

येथें कोणाची डाळ शिजत नाहीं—कोणाचें चालत नाहीं. कोणी कोणाची मिजास बाळगीत नाहीं. डाळ पहा. जबरदस्त मनुष्याबद्दल म्हणतात.

येथेंच घोडें पेंड खातें—घोडें पहा. मुख्य अडचण ती तेथेंच आहे; मर्मस्थान तें हेंच; छिद्र, कमीपणा, लबाडी जी आहे ती तेथेंच आहे.

येन—**येन केन प्रकारेण प्रसिद्धपुरुषो भवेत्**—(सं.) एखादा मनुष्य आपला गाजावाजा व्हावा म्हणून वाटेल ती गोष्ट करतो अशा प्रसिद्धिप्रिय मनुष्याबद्दल ही म्हण योजतात. घटं भिंद्यात् पटं छिंद्यात् कुर्यात् वा रासभध्वनिम् (रासभरोहणम्)। येन केन प्रकारेण प्रसिद्धपुरुषो भवेत ॥

येरें—**येरें घुवडावप**—(गो.) [येरें=सुकाणूं] भार्गास लावणें; दिशा दाखविणें.

***येऱ्यान गेलें ना जाल्यार हणयेन गेलें**—(गो.) नाव बुडाल्यावर नावेचें कोणतें टोंक प्रथम बुडालें याबद्दल वाद का ? ना फायदा पण त्रास मात्र. असा वितंडवाद.

येल—**येल पाडणें; येलणें**—(व.) १ चाळे. चेष्टा करणें. २ लाडणें; लाडिकपणानें वागणें; नखरे करणें. —अ. रा. बा. स. ५४२.

येलपाडी गौरा, म्हातारा नवरा—(व.) थोडेंसें कांहीं झालें कीं जी खूप वाढवून सांगतें तिला म्हणतात.

येलपाड्या, तेलघाल्या—(व.) जो मनुष्य भांड-णांत एखाद्याची बाजू घेऊन बोलतो व भांडण मिटवि-ण्याच्या ऐवजीं वाढवितो त्याला म्हणतात.

येवढें—**येवढ्याशा तेवढ्याशावरून**—अगदीं क्षुल्लक गोष्टीमुळें; अल्प कारणानें; फारच थोड्याशा कारणामुळें.

येवा—**उदंड खाल्ला मेवा तर येईना अर्धभा-करीचा येवा**—उदंड पहा. येणें पहा.

येवा व्हावा, जावा नको--येता व्हावा० पहा.

येसवा---**यॅस्वा वागळयान् तूप दिलँ पारँगान् फोंतीं लायलँ**--(गो.) एकानें दिलेलीं वस्तु परभारें दुसऱ्यानें लांबवणें.

येळकोट---एळकोट पहा.

येळकोट करणें--[येळकोट=विजयाची आरोळी.] १ खंडोबाचे भक्त त्याची तळी उचलतांना खंडोबाचा जयजयकार या अर्थी येळकोट असे शब्द गर्जून उच्चारतात. यावरून विजय असो; फत्ते असो. २ (ल.)नाश करणें; फन्ना उडविणें. 'निराशा नाहींशीं होऊन जय मिळण्याची थोडी आशा दिसूं लागल्याबरोबर शत्रूचा येळकोट करण्यासाठीं ते अगदीं उतावीळ होऊन गेले.'--पामो ४८४.

येळापूर---**येळापूर प्रकर्ण**--(महानु.) अर्थ पदार्थ प्राप्ति.

योगक्षेम---**योगक्षेम चालविणें**--चरितार्थ चालविणें; सर्व प्रकारानें काळजी घेणें; संगोपन करणें.

योगाची हंता : ज्ञानाची दैनता :--(महानु.) योगसामर्थ्यापुढें ज्ञान दुबळें दिसतें.

योगी---**योगी लिळा : जगा वेगळा**--(महानु.) योग्याची राहाणी, आचार वगैरे सर्व कांहीं जगावेगळें असतें.

योगीयांचें मानस : कैवल्याची मांदुस :--(महानु.) योग्याचें मन म्हणजे केवळ मोक्षाची खनि. इतकें तें मन ब्रह्मरूप निर्विकल्प असतें.

योग्यता---**योग्यतेनें मिळवी, तें दैवावर न घालवी**--जें आपल्या स्वतःच्या पराक्रमानें मिळण्यासारखें आहे त्याकरितां दैवावर अवलंबून असणें चांगलें नव्हें.

योजक---**योजकस्तत्र दुर्लभः**--(सं.) उपयोग करून घेणारा पाहिजे;तोच दुर्मिळ असतो.तसा चतुर योजना करणारा असल्यास सर्व वस्तूंचा उपयोग होतो. --शाब. १.६१. अमंत्रमक्षरं नास्ति नास्ति मूलमनौषधम् । अयोग्यः पुरुषो नास्ति योजकस्तत्र दुर्लभः॥--सुर १५६.१५८.

योजणें---**योजलेलें साधेल मग दारिद्य कां बाधेल**--मनांतील सर्व इच्छा जर पूर्ण होऊं लागल्या तर जगांत दरिद्री कोणीच राहणार नाहीं.

यौं---यंव पहा. **यौं करेंगा, त्यौं करेंगा**--असें करीन तसें करीन अशा गप्पा.

र

र--**र आणणें**--रडें आणणें; रडविणें. "कीं गगनगतामर मुनि चित्तीं, 'प्रभु परवधूंत आणूं र'॥" --मो हरिवंश १७.३८.

र करणें-गाणें; रचा पाढा वाचणें; रचें गाणें लावणें-सांगणें-मांडणें--१ रडणें; आरडा करणें. २ रडगाणें लावणें, सांगणें; रें रें करणें. ३ रखडणें; कसातरी काळ लोटणें. ४ पोरकटपणानें वागणें; मुलाप्रमाणें रडणें, भेकणें.

रंक---**रंकाचा राव**--दरिद्री मनुष्य राजा बनणें; गरीबाचा श्रीमंत होणें. याच्या उलट 'रावाचा रंक.'

रंकाची मोट बांधणें--गरीब मनुष्याची उचलबांगडी करणें. अनेक दरिद्री मनुष्यें एकत्र आलीं तरी त्यांचा कांहीं उपयोग होत नाहीं.

रकाणा-ना---**रकान्यावर येणें**--(व.) माजणें; जोर येणें.

रकाना---**रकान्यास आणणें-येणें**--रकमेस येणें-आणणें पहा.

रक्कम---**रकमेस आणणें**--मोठा ऐवज करणें; मोल्यवान् बनविणें; फायदेशीर करणें.

रकमेस येणें--१ मूल्यवान् होणें; किंमतीला चढणें. २ (ल.) जेर होणें; वठणीला येणें. ३ किंमत येण्याइतकें स्वरूप प्राप्त होणें.

रक्त---**रक्त आटविणें; रक्ताचें पाणी करणें**--अतिशय श्रम करणें; उरस्फोड करणें; फार मेहनत करणें.

रक्त पडणें--शौच्याच्या वाटें रक्त जाणें.

रक्त पाडणें--(मंत्र जादूटोणा इ.नीं) बाहेर रक्त पडेल असें करणें.

रक्तबीज--१ रक्तापासून उत्पन्न होणारे असुर, राक्षस. २ ढेंकूण.

रक्ताची आण--रक्ताची शपथ; प्राणाची शपथ.

रक्ताचें पाणी (आणि हाडाचे मणी) करणें--अतिशय इमानानें आणि मेहनतीनें कामगिरी करणें. अतिशय कष्ट करणें; फार श्रम करणें; जीवापाड मेहनत करणें.

रक्तानें तोंड धुणें—शपथ घेणें. 'सिंधूच्या पवित्र रक्तानें तोंड धुऊन मीं सांगतों आहे.'—एकच प्याला ५-४.

रक्तास रक्त मिळणें--१ एका जातीचे सर्व लोक एकत्र होणें; जातीस जात मिळणें; एकाच जातीच्या लोकांचा मिलाफ होणें, जूट होणें. २ नातेवाईकांचें जमणें, एक होणें.—मरा. संग्रामगीतें ११६.

***रक्ताचें पाणी, सुखाची कहाणी**—कष्ट केल्याशिवाय सुख मिळत नाहीं.

रग---कामाची रग—कामाचा नेट (क्रि० लावणें); कामाची आच, त्रास, घाई, जाचणूक.(क्रि. लावणें,करणें.)

सावकाराची–देणेदाराची रग-- सावकारांनीं किंवा देणेंदारांनीं मागें लाविलेली टोंचणी, तगादा, त्रास, दुःख, छळणूक.

रग जिरणें–उतरणें— मस्ती शमणें; नरम येणें. ' मदनरगा या त्वरितगती जिरुं देरे । '—प्रला १८७.

रग जिरविणें–मोडणें--खोडकी जिरविणें; खोड मोडणें; शासन करून एखाद्याचा ताठा नाहींसा करणें.

(मनगटाला) रग लावणें--मनगट घट्ट पकडणें; आवळून धरणें, पिळणें; वेदना होतील अशा रीतीनें दाबणें.

रंग---रंग उडणें---१ मूळचा रंग जाणें; फिका होणें; तेज कमी होणें. ५ मजा मारणें; चैन करणें.

रंग उडविणें—मजा करणें चैन करणें.

रंग करणें--मजा मारणें; मौज करणें.

रंग खेळणें--विवाहादि प्रसंगीं एकमेकांच्या अंगांवर रंग उडविणें.

रंग चढणें—१ अंमल, निशा, मद, धुंदी येणें. २ बहर येणें.

रंग दिसणें—एखादी गोष्ट होईलशी वाटणें, आकारास येणें; संभव असणें. 'तरी यापुढें जें एकंदर अवस्थांतर होण्याचा रंग दिसत आहे.'—नि.

रंग भरणें---१ भरास येणें; जोमांत येणें; मजा येणें. ' भलत्या प्रसंगीं भलत्या तालाची चीज सुरू केलीत तर रंग भरेल कां ?'—नाकु ३.४६. २ रंग आणणें. 'रंग भरिती अद्‌भूत ।'—सप्र १०८८. ३ तडजोड करणें.—पया १४०.

रंग मारणें--बाजी मारून नेणें. ' रहस्य राखून रंग मारला ।'—ऐपो २५३.

रंग राखणें; रंगाची मोट बांधणें—विजयानें, वैभवानें हुरळून न जातां सभ्य आणि सौम्य वर्तन कायम ठेवणें; आपल्या प्रतिपक्ष्यांवर वादांत किंवा कांहीं कामांत आपण सरशी मिळविली असतां आपण दिलदारीनें त्याच्याशीं वागणें, त्या सरशीच्या जोरावर त्याच्याशीं कठोरपणा न करणें; त्याला न हिणविणें; अधिक पेंचांत ढकलण्याचा प्रयत्न न करणें. 'त्यानें मी चुकलों असें कबूल केलें तें बस झालें, आतां काय रंगाच्या मोटा बांधावयाच्या आहेत ?'

रंग शिंपणें--होळीचे अगर लग्नाचे वेळीं रंगाचें पाणी उडविणें, फेकणें; रंग खेळणें.

रंगाचा भंग करणें—आनंदाचा विरस करणें.

रंगाच्या मोटा बांधणें--रंग राखणें पहा. (ऐति.) आब राखणें; मान ठेवणें. 'तुम्हीं केलें तें बहुत बहुत उत्तम केलें. रंगाच्या मोटा बहुत बांधाव्या ऐसें नाहीं.' —पया ८९. २ फार हट्ट धरणें; हट्ट पुरा करणें; होईल तें काम साधून घेणें.

रंगांत–रंगास चढणें--शोभा प्राप्त होणें; खुलून दिसणें; पूर्णपणें, पूर्णतेस येणें; विकास पावणें; भरास येणें.

रंगांत जाणें--ऐन ज्वानींत, ऐश्वर्यांत मरणें. पुढील अवदशा न पाहणें.

रंगांत येणें--१ रंगाला येणें; तारुण्यदशा येणें. २ तल्लीन होणें; बहारींत असणें.

रंगांत हमरंग होणें--आहे त्या किंवा मूळच्या गोष्टीला सामील होणें; भरीला भर देणें. 'येथें आल्यानंतर एक दिवसहि सरकार उपयोगाची गोष्ट बोलले नाहींत. उलटें येथील रंगांत हमरंग होऊन तहनामा देतेसमयीं (बोललें)'—पया २४४.

रंगास–रंगारूपास आणणें–येणें चढणें--१ फलद्रूप होणें–करणें; वैभवशाली, सुखावह करणें; आरंभिलेलें कार्य अनुकूल संस्कारादिकांनीं चांगल्या स्थितीला आणणें, येणें. 'माझ्या ग्रंथाचा मी नुसता कच्चा खरडा तयार केला आहे. तो रंगारूपास आणावयास वर्ष दीड वर्ष तरी लागेल.' २ (तिरस्कारार्थी) एखाद्या तऱ्हेस, आकृतीस, विशिष्ट अवस्थेस पोचणें, पोचविणें. 'हा आतां राम म्हणावयाचे रंगास आला.' ३ चांगल्या स्थितीस पोंचणें, आणणें; मिरासी, ऐश्वर्यवान् करणें, होणें.

*रंग जाणे रंगारी आणि धुनूक जाणे पिंजारी--आपआपल्या विद्येंत जो तो प्रवीण असतो, इतरांस त्याचें ज्ञान नसतें.

रंग झाला काळा, अजून नाहीं गेला चाळा—(महानु.) म्हातारपण झालें परंतु रंगेलपणाचा चाळा गेला नाहीं. वयामुळें माणसाच्या वासना थंड पडतात; पण कांहीं म्हाताऱ्या माणसांत ही निवृत्ति आलेली दिसत नाहीं.

रंग भोळा, पोटीं चाळा—वरून दिसावयास भोळसर पण आंतून लबाड, कपटी.

रंग नवा पण ढंग जुना—एखादी जुनीच गोष्ट नव्या स्वरूपांत मांडणें; जुनी वस्तु नवी म्हणून दाखविणें.

रंगीं रंगली, देठीं पिकली—मिरची पिकली म्हणजे लाल होते व देंठ पिंवळा होतो यावरून, तयार होणें; पक्वदशेस येणें; मनुष्य-स्त्री तारुण्यांत येणें.

रगडो---रगडो तिंबंयिल्यारि भिजत वे ?—(गो.) लोखंड कितीहि तिंबलें तरी तें मऊ होणार नाहीं. कठोर पुरुषाची मनधरणी केली म्हणून तो द्रवत नाहीं.

रगडो भांगर झाल्यारि गांवभर वांटयेद्—(गो.) पाठ्यावरवंट्याचें जर सोनें झालें तर तें आपण घेऊनहि गांवभर वाटतां येईल.

रंगड्या---रंगड्या करणें—रंगढंग करणें; चेष्टा, अनिष्ट चाळे आरंभणें. 'यावेळीं तात्या असते तर शिंद्यानें कशा रंगड्या केल्या असत्या त्या पाहिल्या असत्या.' —V. S. २.७१. 'त्या स्त्रीनें त्या शत्रूचें मन दुखवण्याच्या रंगड्या करूं नयेत.'—उग्र ४-४.

रंगड्या जिरवणें—चेष्टा, चाळे बंद करावयास लावणें; शिक्षा लावणें. ' बाजीरावाच्या रंगड्या तेव्हांच जिरवूं व राजसत्ता छिनावून घेऊन त्याच्या प्रजेला दिपवून सोडूं. ' —V. S. २.१६.

रंगण—रंगणांत येणें-१ लढण्यासाठीं योग्य जागीं येणें, सरसावणें; छातीठोक, धैर्यानें लढण्यासाठीं पुढें होणें. २ तोंडावर, समक्ष आरोप करून त्याचा परिणाम भोगण्यास सिद्ध असणें.

रंगणावर धरणें--१ (घोड्याला) काबूत आणण्यासाठीं चाल वगैरे शिकविणें. २ ताशेरा उडविणें; भोसडपट्टी काढणें.

रंगणास येणें---१ रंगास येणें; तयार होणें. २ शिक्षा देण्यास योग्य होणें; प्रायश्चित्त मिळण्याची वेळ येणें. ' तुझी पाठ आतां रंगणासच आली आहे. '

रगत---रगताक रगत अंतर दिना—(गो.) रक्ताला रक्त अंतर देत नाहीं. Blood is thicker than Water.

रंगपूजा—(महानु.) एक पूजाविधि. त्याचा प्रकार खालीलप्रमाणें. " गोरक्ष फोकरून आली: कांहीं गहूं: चणें: जोन्हळें: कांहीं कवडें मागितलें: पांच रंग मिळविलें: काळा: निळा: पिवळा: पांढरा: लोहिवा: मग घेऊनि आली: चौकी रंग भरीले: कुंकुमावरी: हरीत वरी पीत: वरी लोहीव: पांढऱ्यावरी लोहीव: ऐसीया हारीहारी घातलिया: गोसाव्यास तेथें आसन घातलें: आसनी सर्वज्ञ उपविष्ट जालें: श्रीचर्ण प्रक्षाळण: श्रीमुख प्रक्षाळण: गुळवा जाला: मग सर्वज्ञास पूजा केली: मुकुटमाळा: कंठमाळा: बाहुभूषणें: अंगदे: धूपार्ती: मंगळार्ती केली: आरोगणे गुरळावांडा जाला इति ॥"—महानुभावी बोल २२९३. ' जोगेश्वरी अलेया रंगपूजा करणें.'

रंगभूमी---रंगभूमीवर उभा तरी रहा म्हणजे बोलतां येईल—प्रयत्न केल्याशिवाय करतां येत नाहीं; अनुभवाशिवाय कोणतीहि गोष्ट साधत नाहीं याकरितां प्रथम अनुभव घेतलाच पाहिजे.

रगाडा---रामरगाडा—राम पहा.

रगाड्यांत गेलें काय नि आलें काय—जेथें पुष्कळ लोक जमतात तेथें एखादा मनुष्य आल्यागेल्याची दाद लागत नाहीं.

रज---रजाचा गज करणें—१ राईचा डोंगर करणें; अतिशयोक्ति करणें; थोड्याचें जास्ती करणें; एकाचे दहा करणें; अगदीं क्षुल्लक वस्तूला अतोनात महत्त्व देणें; ज्यांत कांहीं अर्थ नाहीं अशा गोष्टी फुगवून सांगणें; पराचा कावळा करणें. २ पुष्कळ काळ पोसणें व चांगला वाढीला लावणें; लहानाचें मोठें करणें.

रंजक---रंजक उडणें-झडणें—१ सुरुंग अगर बार उडणें, झडणें; बंदुका, तोफा यांची फैर झडणें. २ (ल.) कज्जा किंवा भांडण एकदम किंवा जोरानें सुरू होणें.

रंजक खाणें—दारू जळून बार न उडणें.

रंजक देणें-पाजणें-भरणें— एखाद्यास कांहीं काम करावयास भर देणें, उठविणें, चेतविणें.

रंजक पिणें—कान्यावरचीं दारू मात्र जळून बार न उडणें.

रजस्वला---रजस्वला करी वेलासी आघात। अंतर तों हित दुरी बरें ॥--तुगा ३७४४. रजस्वलेनें वेलास स्पर्श केला असतां फळें चांगलीं येत नाहींत; याकरितां विटाळ न कालवावा, दूर अंतर ठेवावें हें बरें.

रजा---तीन दिवसांची हक्काची रजा--(बायकी) विटाळशेपण. यावेळीं बायकांना घरांत कोठेंहि शिवावयाचें नसतें. त्यामुळें नुसतें बसून पुरुषांच्या रजेच्या दिवसांप्रमाणें चैनीनें दिवस काढतां येतात. यावरून विनोदानें म्हणतात.

रजा देणें--निरोप देणें, जाण्याची परवानगी देणें.

रज्जु---रज्जु नास्तनां बांदूनु घालचें--(गो.) दोरीवांचून बांधून ठेवणें. एखाद्याला मायापाशांत बद्ध करणें. प्रेमानें वश करून घेणें.

रज्जुसर्प न्याय—दोरी ही सापाप्रमाणें भासावी याप्रमाणें एखाद्या गोष्टीच्या ठिकाणीं दुसरीचा भास व्हावा.

रडकुंडी---रडकुंडी येणें—रडण्याच्या बेतांत येणें, हिरमुसलें होणें; दुःखी होणें. 'ती आजोबाजवळ गेली आणि अगदीं रडकुंडीस येऊन म्हणते कीं, लोक आतां तोंड नाहीं काढूं देत बरं का !'—पकोघे.

रडणें---रडत राऊत (रडतराव) घोड्यावर बसविणें—निरुत्साही, नालायक मनुष्यावर एखादी कामगिरी बळेंच लादणें. म्हण.—'रडत राऊत घोड्यावर बसविला तर मेल्याची खबर आणितो !' 'त्यांत रडत राऊत घोड्यावर बसविला यापुढें पराजय कशास इच्छावा ?'—भाव ८४.

रडून घर घेणार—कांहीं लोक दैन्य दाखवून आपला कार्यभाग साधतात अशांस अनुलक्षून म्हणतात.

रडून झवणें मागायचें—(अशिष्ट.) विवाहित स्त्रीला नवऱ्याजवळून संभोग सहज मिळतो, त्यासाठीं रडत बसावें लागत नाहीं, तिला हक्कानेंच मिळतो. मर्दानें आपल्या हिंमतीवर कोणतीहि गोष्ट साध्य करावी लागते. त्यासाठीं तोंड वेंगाडून भिक्षा मागणें लाजीरवाणें आहे. दोन पैलवानांच्या कुस्तींत एक पडला. तेव्हां तो आपल्या वस्तादाजवळ यशस्वी पैलवानाबद्दल अनेक तक्रारी सांगूं लागला व ही कुस्ती बरोबर झाली नाहीं असें पंचास सांगण्याबद्दल आग्रह करूं लागला. तेव्हां वस्ताद उत्तर देतो, 'तयारी करून पुन्हां कुस्ती ठरवूं, पण हें बायकासारखं रडून झवणं काय मागतोस ?'

रडून सांडणें—मृत झालें असें समजून शोक करणें. 'एकदां तर सर्वांनीं तिला रडून सांडली सुद्धां.'—झांकली मूठ ६७.

***रडत गान्हाणें, हातीं पुराणें**—काम करून घेणारानें हातांत काठी धरल्याशिवाय व रडगाऱ्हाणें केल्याशिवाय कामच होणें नाहीं.

रडत घोड्यावर बसला तो राऊतकी काय करील—रडत राऊत पहा.

रडत जाई तो मेल्याची खबर आणी—रडक्या मनुष्याच्या हातून कांहीं कामगिरी होऊं शकत नाहीं, तो रतडच परत येतो.

रडत राऊत, काय चालवील औत—ज्या माणसाला दुसऱ्याच्या आधाराशिवाय वाहनावर बसतां येत नाहीं ती व्यक्ति शेतीचें औत स्वतःच्या बळावर चालविणार हें शक्य नाहीं. मंदबुद्धि व परावलंबी नेभळट व्यक्तीचें वर्णन ह्यांत आहे.

रडत राऊत घोड्यावर आणि मौज गांवभर—रडका मनुष्य घोड्यावर स्वार झाल्यास त्याच्या हातून पराक्रम तर होत नाहींच पण त्याची गांवभर फजिती मात्र होते.

रडत राऊत घोड्यावर काय बसतो व तीर काय मारतो ?—वरप्रमाणेंच.

रडतलो चाकरू नाका, कोपतलो यजमानु नाका--(गो.) रडत राऊत चाकर नसावा आणि कोपिष्ठ यजमान नसावा.

रडता राऊत घोड्यावर बसविला तर मेल्याची खबर आणतो.--वर पहा.

रडतराव बहिष्कारवादी--ज्या मनुष्याच्या हातून कांहीं कामगिरी होत नाहीं तो अलिप्त राहूं पहातो.—टिळे ३.१४०.

रडती बायको हांसता पुरुष--यांचा विश्वास धरूं नये. यांच्या बाहेरच्या स्वरुपावरून फसूं नये.(गु.) रडती रांडे ने हसता पुरुषनो विश्वास न करवो.

रडती बायको व हांसता पुरुष, यांची करावी सदा सांड.--वर पहा.

रडतें पोर व गळतें घर—रडक्या पोराची नेहमीं पिरपिर चालतें; कधीं सुखानें झोंप घेऊं देत नाहींत. तसेंच घर गळत असलें म्हणजे त्रास होतो.

रडतो आई आई आणि म्हणतो बाई बाई—रडून रडून काम साधणारा.

रडत्याची शेती, बोंबलत्याचें दुभतें—रडक्या मनुष्याच्या हातून शेती होऊं शकत नाहीं व जो फार बडबडया आहे त्याच्या म्हशीला दृष्ट लागण्याचा संभव असतो; त्यामुळें त्याच्या येथें दुभतें टिकूं शकत नाहीं.

रडत्याच्या डावीकडे व शिवत्याच्या उजवीकडे बसूं नये—रडणाऱ्या मनुष्याच्या डाव्या बाजूस बसल्यास त्याचा डावा हात अश्रू पुसतांना आपल्या अंगावर पडण्याचा संभव असतो व शिवणाऱ्याच्या उजव्या बाजूस बसल्यास सूयी टोंचण्याचा संभव असतो.

रडत्याच्या डावे बाजूस व हांसत्याच्या उजवे बाजूस बसूं नये—रडणाऱ्या मनुष्याच्या डाव्या बाजूस बसल्यास त्याचा अश्रू पुसणारा डावा हात आपणास लागण्याचा संभव असतो व हांसणारा सहज उजव्या हातानें आपल्या पाठीवर थाप मारण्याचा संभव असतो. याकरितां नीट पाहून बसावें.

रडरड रडला आणि शेवटीं झोंपी गेला—लहान मुलें रडून रडून शेवटीं कंटाळून झोंपी जातात; त्यांच्या गाऱ्हाण्याकडे कोणी लक्ष्य देत नाहीं. त्याप्रमाणें नेहमीं कुरकुर करणाऱ्याकडे कोणी लक्ष्य देत नाहीं व शेवटीं त्यास गप्प बसावें लागतें.

रडली तर रडली, काय माणिक मोतीं झडतील?—ही म्हण रडणाऱ्या मुलीला अनुसरून आहे. म्हणजे तिच्या रडण्याचा एवढा धाक कशाला—या अर्थी.

रडून मान आणि पडून दंडवत—आपणच रडून एखादा मान मिळविणें किंवा स्वतःच नम्र होऊन दुसऱ्याकडून नमस्कार घेणें यांत कांहीं शोभा नाहीं.

रडतोंडी—रडतोंडीचा घाट—या नांवाचा एक घाट असून तो चढून जाण्यास कठीण असल्यानें वरील सार्थ नांव आहे. (ल.) दुर्मुखलेला माणूस; रडकी सुरत.

रडी—रडी खाणें-येणें—१ (खेळांत) पराभव कबूल न करणें. चिडणें; रडकुंडीस येणें. २ पराभव पावणें; नामोहरम होणें. 'पांडुरंगे पहा खादलीसे रडी। परि नाम सेंडी धरिली आम्हीं॥'—तुगा १२१८.

रंडी—रंडी मिले तो संसारी, न मिले तो ब्रम्हचारी—(हिं.) बायको मिळाली तर संसार करावयाचा, नाहीं तर ब्रह्मचर्य व्रत आहे म्हणून सांगावयाचें. मिळून परिस्थितीप्रमाणें वागावयाचें.

रंडी रही तो आपसे, नहीं तो सगे बापसे—कुमार्गी स्त्रीचा भरंवसा देतां देत नाहीं. वाईट स्त्रीला किती जपणार.

रंडीका जीव हंडीमें—(हिं.) वेश्येचें लक्ष्य नेहमीं द्रव्यावर असतें.

रण—रणखांब पूजणें—दोन्ही सैन्यामध्यें पुरलेल्या खांबाची पूजा करून लढाईस सुरुवात करणें.

रणतुरा लावणें—रणवाद्यें वाजवीत विजयी वीर डौलानें, तालांत मिरवीत जाणें, चालणें.

रणवार्ता श्रुतं रम्यम्।—युद्धस्य वार्ता रम्या पहा.

रणां पडिल्लिया दुःख ना, लाथे दुःख—(गो.) रणांत पडल्याचें दुःख नाहीं, लाथ बसली त्याचें दुःख वाटतें. मानी पुरुषाला अपमान हा मरणापेक्षांहि दुःसह होतो. अभिमन्यु मोठा पराक्रम करून रणांत पडला तेव्हां जयद्रथानें त्याच्या मस्तकावर लाथ हाणिली. त्याचें विशेष दुःख होऊन अभिमन्यूनें याबद्दल जयद्रथाचा सूड घेण्यास मरतांना कृष्णार्जुनाला विनविलें.

रणदिश—रणदिस होणें—(माण.) बेजार होणें; रंजीस येणें.

रतन—रत्न पहा. **तट्टू माझा रतनघोस, मागें चाले कोसकोस**—तट्टू पहा.

रति—रति इतकी दरज असतां शत्रूस बळ फार येतें—(ऐति.) अगदीं लहान जरी फूट आपल्या पक्षांत असेल तर शत्रु प्रबळ होतो. तेव्हां थोडा देखील भेद असतां कामा नये.—पया २५२.

रत्न—रत्न उकीरड्यांत पडलें तरी परीक्षक त्याची योग्यता समजतो—चांगली वस्तु कोठेंहि असली तरी योग्य मनुष्य तिचें महत्त्व ओळखतो.

रत्नमालेपेक्षां फुलांचीच माळ अधिक जड होते—एखाद्यानें द्रव्य दिल्यापेक्षांहि स्तुति केली असतां तीबद्दल अधिक आभार वाटतात. द्रव्यापेक्षां शब्दांची

किंमत अधिक आहे. ' माझ्यावर स्तुतिसुमनांचा वर्षाव झाल्यानें हा हार अत्यंत जड झाला आहे. बोरकर कवींच्या उक्तीप्रमाणें रत्नमालेपेक्षां फुलांचीच माळ अतिशय जड होते. आपण केलेल्या स्तुतीमुळें हीं साधीं पुष्पेंहि जड वाटतात.'–केसरी १४–६–४०.

रत्नाच्या डोंगरावर फुलला पळस, पण पानें तीनच—पळस गेला थांटा० पहा. मनुष्यास अगदीं वैभवाच्या शिखरावर बसविलें तरी त्याच्या नशीबाप्रमाणेंच त्याचा उपभोग घेतां येतो.

रत्नापेटीं गारगोटी––उत्तम मनुष्याच्या पोटीं कुलक्षणी पुत्र होणें. भांगेंत तुळस.

रत्नाकर–––**रत्नाकर आळविणें**—(समुद्र शांत करणें.)काम न करतां, तसेंच रडत, हात हालवीत परत येणें; अपयश घेऊन येणें. 'हा रडतोंड्या खरा. जेथें कामास पाठवावा तेथून रत्नाकर आळवीत येतो.'

रबाब–––**रबाब करणें**—(व.) धाक दपटशा दाखविणें.

रंभा–––**रंभा म्हणून प्रसिद्धि करावी व राऊताईण निघावी**—[राऊताईण=मोलकरीण; हलकी बाई] अपेक्षेपेक्षां प्रत्यक्ष फार हिणकस, कमी दर्जाचें. डोंगर पोखरून उंदीर याप्रमाणें.

रमणें–––**रमताराम**—कोणी तरी; सहज जाणारा; भटक्या. विशेषतः तीर्थयात्रा करीत हिंडणारा गोसावी, इ.

रमाकांत–––**रमाकांत आळविणें**—१ विष्णूची आराधना करणें. २ (उप.) रडणें–भेकणें; असाहाय्यतेनें गळा काढणें. ३ रमणें; गमणें; रेंगाळणें.

रमारमी–––**रमारमी होणें**—अगदीं बेतशीर होणें; जितत्क्यास तितकें होणें; पुरेसें होणें; शिल्लक न उरतां पुरणें.

रव–––**रव पडणें**—वाट होणें; रहदारी असणें. 'रव पडली पहा उंटे तटे किती सौदागर देशावरले।'–प्रला १२५.'आज मोंगलाची रव पडल्यावर बैले, ढोरें कांहीं तटें आलीं.'–पेद १.१९.

रवण–––**रवणाक कोंबी बसप**—(गो.) कोंबडीनें अंडीं उबवावयाला बसणें. एखाद्या बाईनें एकच काम सुस्तपणें चालवलें तर ती अंडीं उबवावयाला बसली आहे असें म्हणतात.

रवळनाथ–––**रवळनाथाचें कूळ**––१रवळनाथ ही एक क्षुद्र देवता आहे; तेव्हां या देवतेचे उपासक सुद्धां क्षुद्रच असणार. २ (राजा.) अगदीं कंगाल माणूस. ३ (गो.) बावळट माणूस.

रवा–––**रवा काढणें**––सोनें, चांदी इ. चा लहान तुकडा तापलेल्या तेलांतून बाहेर काढणें. आरोप खरा कीं खोटा हें अशा दिव्यावरून ठरवीत. दिव्य करणें. ' त्या सतीनें रवा काढिला.'–बाडबाबा २.६३. ' त्यजुनि भय, स्वस्थ रहा, म्हणवी धर्मींहतासि हा ! न, रवा. ।'–द्रोण २२.३१.

रवि–––**रवि अरुण न्याय**—सूर्याच्या आधीं अरुणोदय होतो त्याप्रमाणें प्रधान गोष्टीपूर्वी दुय्यम किंवा गौण गोष्टीचा लाभ होणें.

रवि कुक्कुट न्याय––कोंबडा उजाडावयाच्या पूर्वी ओरडतो. परंतु तो ओरडला नाहीं, किंवा म्हातारीनें त्यास झांकून ठेवलें तरी सूर्य उगवावयाचा कांहीं राहात नाहीं. ' त्याचें (मुक्तेश्वराचें) काव्य बुडविणें हें एका राजाखेरीज दुसऱ्या कोणासही शक्य नाहीं. कोणी केवढाही पटाईत खळ असला तरी त्यास फार म्हटलें म्हणजे रविकुक्कुट न्यायानें आपल्याजवळच्या किंवा इष्टमित्रांजवळच्या प्रती नष्ट करतां येतील.'–नि.

रवीलासुद्धां जें दिसत नाहीं तें कवीला दिसतें—जें न देखे रवि, तें देखे कवि. कवि पहा. संसारातल्या ज्या घटना सामान्य माणसाला सामान्य वाटतात, त्याच कलावंत लेखक आपल्या दृष्टीनें पाहून सांगूं लागला कीं, वाचकाचें चित्त वेधून घेतात.- ना. सी. फडके, मनोहरची आकाशवाणी.

रस–––**रस पिणारा पिऊन जातो व चरकाचें तोंड पुरतें माखत नाहीं**––ज्याच्या नशीबीं असेल तो फळ उपभोगतो व कष्ट करणारा केव्हां केव्हां उपाशीं मरतो. –गांगा २१९. तु०–मेहनती दिलगीर चोट्टे हुशार.

रसवडे एक झाले आणि वाऱ्यानें द्रोण उडून गेले—गोंधळाची स्थिति; अव्यवस्था. अनेक आचारी असले म्हणजे काम कोणीच करीत नाहीं.

रसातल–––**रसातलास जाणें**—[रसातल=सप्तपातालपैकीं एक] अगदीं निकृष्ट दशेस प्राप्त होणें; पूर्ण नाश होणें.

पोट रसातळास जाणें—फार भूक लागणें.

रसातळास नेणें—पूर्णपणें नाश करणें; सफा बुडविणें.

रस्ता—-रस्तो चुकून गेल्यार दुबारि चमकवुंचें पडता—(गो.) रस्ता चुकला कीं, दुप्पट चालावें लागतें.

रस्त्याची वटवट रिकामी, घरीं आली मामी—स्मशानवैराग्य. रस्त्यांत रहदारी० पहा.

रस्त्याच्या सगरानें, गांव भेटे निश्चयानें—जर रस्त्यानें नीट चालत गेलें तर केव्हां तरी गांवास पोंचतेंच. रस्ता कोणत्यातरी गांवाला नेतोच. प्रयत्न सारखा न सोडतां कार्य करीत गेल्यास फळ मिळतेंच.

रस्त्यांत रहदारी, राजाची आली स्वारी.—-रस्त्यांत लोक कितीहि असले तरी राजाची स्वारी आली म्हणजे सर्व बाजूस होतात. किंवा अडचणींत अडचण.

रस्सी—-रस्सी जलगयी पर बल नहीं गया—सुंभ जळाला पण पीळ राहिलाच, पहा.

रहाट—-रहाटाचा बैल सदोदित वाहे पाणी—कांहीं लोकांस नेहमीं कष्ट करावे लागतात.

रहाना—-रहें झोपडीमें ख्वाब देखे महलका—-(हिं.) झोपडींत राहून महालाचें स्वप्न पाहणें; दरिद्र्याला मोठी इच्छा.

रहे तो अमीर, घटे तो फकीर, मरे तो पीर—(हिं.) जगला तर सरदार, मोडकळीस आल्यास फकीर व मेल्यास पीर, याप्रमाणें ज्या स्थितींत असेल त्या स्थितींत समाधान मानणें; विषाद न दाखविणें.

रहे तो आपथी ने जाय तो सगाबापथी—-(हिं.) दुराचारी स्त्रीचा भरंवसा नसतो.

रहाळ—राहाळीस लागणें—योग्य मार्गास, वाटेस लागणें.

रक्षणें—-रक्ष रक्ष होणें—कोणी रक्षण करा अशी स्थिति होणें. अगदीं अगतिक दशा 'त्राहि भगवान्' होणें.

***रक्षिला एक पैसा, दोहोंचा लाभ जैसा**—एक पैशाची बचत करणें म्हणजे दोन मिळविण्यासारखें आहे. कारण खर्च व्हावयाचा तो न होतां एक शिल्लक राहातो. One pice saved is like two pice earned.

रक्षा—-रक्षा घेऊन जाणें—(खेळ) विजय मिळविणें. सन १८८२ सालीं ऑस्ट्रेलियानें इंग्लंडचा क्रिकेटमध्यें सात धांवांनीं पराभव केला व हा खेळ संस्मरणीय समजला जातो. या वेळेपासून कसोटीच्या सामन्यांत विजय मिळविणें म्हणजे 'रक्षा घेऊन जाणें' असा वाक्प्रचार सुरु झाला.-(केसरी ४.९.३४) To carry the ashes.

राई—-राईचा डोंगर-पर्वत करणें—-पराचा कावळा करणें; एखादी गोष्ट, बातमी वाढवून सांगणें; अतिशयोक्ति करणें. 'आणि कृत्तिकाबाई तुम्ही तर माझ्या मुलींच्या संबंधानें अगदीं राईचा डोंगर केला होता.'-संक ५.३९१.

***राईचा पर्वत केला, संतोष झाला मूर्खाला**—मूर्ख मनुष्यास नेहमीं गोष्टी फुगवून सांगण्यांत आनंद होतो.

राईचा (होतो) पर्वत, रंकाचा (होतो) राव—प्रारंभीं थोडी दिसणारी गोष्टच पुढें वाढून मोठी होण्याचा संभव असतो व दरिद्री मनुष्यहि वैभवास चढून राजा होण्याचा संभव असतो.

राईचा भाव रातीं—-योग्य समयींच योग्य गोष्टी होतात. व तशा त्या झाल्या तरच इष्ट तो फायदा होतो हा भावार्थ.

राईचा भाव रात्रीं गेला—सर्व वेळ सारखी असत नाहीं असा भावार्थ. (गु.) राईना भाव राते गया. Gone is the goose that the great egg did lay.

राईभर नाता और गाडीभर आशनाई—[आशनाई =प्रेम] तिळभर नातें आणि गाडीभर प्रेम.

राऊत—-राऊत असे खरमरा तर घोडा चाले तुरतुरा—स्वार जर चांगला करडा, तडफदार असेल तर घोडा जलद चालतो, नाहीं तर हरदासी तट्टू! यजमान, मालक जर खमक्या असेल तर नोकर काम जलदीनें उरकतात.

राख—-राख सावडणें-टाकणें—प्रेत जाळल्यानंतर ती राख भरून टाकणें.

राख रांगोळी करणें—पूर्णपणें विध्वंस करणें.

***लावली राख, झाला पाक**—भस्म लावल्यानें शुद्धि होते. वर भस्म लावलें म्हणजे आंत हजारों पापें दडतात.

राखेचे डोहाळे, मुलगा राजबींडा कसा निपजेल—ज्या स्त्रीस राख खाण्याचे डोहाळे होतात तिला दारिद्रीच मुलगा व्हावयाचा. राजपुत्रासारखा होणें शक्य नाहीं. डोहाळे

हे भावी मुलाचीं पूर्व चिन्हें होत; त्यांवरून मुलाचीं लक्षणें कळतात.

राखण—राखण लागणें—उपद्रव न होईल असा बंदोबस्त होणें; कांहीं फिकीर नसणें. 'या खिस्तीचे एकदा रुपये भरले म्हणजे चार महिन्यांची राखण लागली.'

राखणीला घालणें—गुरें, मुलें इ. दुसऱ्याकडे संगोपना करितां देणें; त्यांकडे दुर्लक्ष करणें; स्वतःची जबाबदारी दुसऱ्यावर घालणें.

***राखण न करणारा कुत्रा, निकामी बैल व भारभूत झालेला मनुष्य हे नेहमीं कुटुंबाचे शत्रु आहेत**—अर्थ स्पष्ट आहे.

राखण बसला दारांत, चोर शिरला घरांत—निष्काळजीपणानें काम करणें.

राखण्यानें गुरें टाकलीं ह्मणून धनी टाकील काय—गुराखी पहा.

राखशील ओज तर होईल चोज—आपलें तेज दाखविलें तर लोक कौतुक करतील. ज्यांच्यामध्यें कांहीं पराक्रम नाहीं पाणी नाहीं त्यांचें कौतुक लोक करीत नाहींत.

राखावीं बहुतांचीं अंतरें। भाग्य येतें तदनंतरें॥—अनेक लोकांस संतुष्ट ठेवलें असतां मनुष्य भाग्यवान होतो.

राखील तो चाखील—तळें राखील तो पाणी चाखील पहा.–गांगा २०५.

राखील त्याचें घर, खणेल त्याचें शेत—जो जपतो त्यासच घर लखलाभ होतें. व जो श्रम करतो त्याचेंच शेत पिकतें. व्यवस्थित राहणी ठेवून श्रम केल्याशिवाय जगांत कांहीं लाभत नाहीं.

राखील त्याचें शेत—वर पहा.–गांगा ३८२.

राग—राग करणें—एखाद्यावर रागावणें; क्रोध येणें. 'तुमचा राग पाही करिती हे।'–सप्र २.११८.

राग गिळणें—आलेला राग दाबणें; राग न दाखविणें.

राग नाकावर येऊन बसणें—अतिशय लवकर रागावणें.–मोरप्र २८.

रागाच्या हातीं जाणें—लवकर रागावणें.

रागाच्या हातीं देणें—रागाच्या आवेशांत सोडून देणें (मालकी, काम, उद्दिष्ट इ.).

रागानें लाल-हिरवापिवळा होणें—रागाची क्रिया चेहऱ्यावर उमटणें. भयंकर रागावणें.

रागास येणें-भरणें-पेटणें-चढणें—संतापणें; क्रोध येणें. 'बाजीराव साहेब सहसाही रागास न येणारे होते.' –अस्तंभा ११.

***राग आणि मांग सारखाच**—राग हा मांगाइतकाच घातक असतो. मनुष्य रागावला म्हणजे त्यास तारतम्य राहात नाहीं व तो प्रसंगीं क्रूरपणाचीं कृत्यें करतो.

राग खाई आपणास, संतोष खाई दुसऱ्यास—राग आल्यानें स्वतःला त्रास होतो व स्वतःचाच नाश होतो व संतोष बाळगल्यास इतर लोकच आपला हेवा करूं लागतात व दुःखी होतात.

राग दुःखाचें मूळ—रागापासून अनेक प्रकारचें दुःख प्राप्त होतें.

राग मारी आपल्याक, संतोष मारी दुसऱ्याक—(गो.) क्रोधानें आपलेंच नुकसान होतें आणि आपला संतोष हा दुसऱ्यास दुःखदायक असतो. वर पहा.

राग षट्कासी त्यागीः तोची ईश्वराचा लागीः—(महानु.) षड्विकार सोडले म्हणजे माणूस ईश्वराजवळ येतो.

राग मनुष्याचा शत्रु आहे—राग फार घातक असतो.

रागाची स्वारी अश्वाचे पाठीवर—राग फार लवकर येतो.

रागाचें रायतें, उशाचें पायथें—राग आला म्हणजे मनुष्यास उसें पायथें कांहीं समजत नाहींसें होतें, त्याचें भान सुटतें.

रागान कॅलँ रायतँ, आनी दुस्माना जालँ आयतँ—(गो.) रागाच्या भरांत एखादी गोष्ट करावी आणि शत्रूनें त्याचा फायदा घ्यावा, असें पुष्कळ वेळां घडतें.

रांगणें—रांगताना साधेल तें चालतांना बाधेल—ज्या गोष्टी अगदीं लहान मुलांना शोभून दिसतात त्या मोठेपणीं शोभत नाहींत,तर उलट अपायकारक होतात.

रागीट—रागीट स्वभावाचा, कांहीं ना उपयोगाचा—रागीट मनुष्याचा कांहीं उपयोग होत नाहीं.

रागीटाची चाकरी, तलवारीची धार--रागीट मनुष्याची चाकरी करणें म्हणजे तरवारीच्या धारेवर धरल्यासारखें असतें.

रांगोळी---रांगोळी-रांगवळी करणें--राखरांगोळी करणें पहा. (ल.) सत्यानाश करणें; विध्वंस करणें; ठार मारणें. 'ठेंचून करी रांगोळी,'-संग्राम ११.

रांगोळी होणें--समूळ नाश होणें. 'ऐसें साहस करितां होइल तनुची पळांत रांगोळी।'-मो विराट ४.३३.

राघू---राघू जितका जितका बोलतो तितका तितका तो अधिक पिंजऱ्यांत पडतो; जों जों राघू बोले तों तों अधिक पिंजऱ्यांत पडे--पोपट पहा. व्यक्तीनें गुण दाखविले कीं त्या व्यक्तीला सोडू नये असें वाटूं लागतें. व त्यामुळें त्या गुणी व्यक्तीची दुःखदावस्था कमी होत नाहीं तर अधिक वाढते.-टि ३.१४९.

राज---राजकारण राखणें--(ऐति.) राज्याचें हित सांभाळणें. 'तोंडानें फारच गोड बोलून राजकारण राखावें.'-पया ३४५.

राजकारण लावणें--(ऐति.) राजकीय मुद्याचें बोलणें करणें. 'टोपीकरांची जात बेईमान व फरेबी (विश्वासघातकी), एकीकडे राजकारण लावून एकास दगा करतील.'-पया ४६६.

राजदरबारांत गुणी मनुष्यास पुष्कळ शत्रु होतात--अर्थ स्पष्ट आहे. दरबारांत गुणवान मनुष्याचा हेवा करणारे फार असतात.

राजपोर कीं रांडपोर--एक राजपुत्र होणें बरें किंवा अगदीं दरिद्री होणें बरें. मधली स्थिति वाईट.

राजनीतीला सचोटी वावडी असते--राजकारणांत नेहमीं सत्य राखतां येत नाहीं. त्यांत डावपेंच खेळावयाचे म्हणजे सचोटी ठेवतां येत नाहीं.-केसरी २३-१२-४१.

राजविलासी आणि भोंपळा गळयाशीं--राजविलासांत गुंग राहिल्यास शेवटीं नाश होण्याचा संभव असतो.

राजहट्ट, बालहट्ट, आणि स्त्रीहट्ट विधात्यालासुद्धां पुरवावे लागतात--या तीन्ही हट्टापुढें कोणाचें कांहीं चालत नाहीं.-एकच प्याला १-३.

राज---राजमें राज मेघराज,फूलमें फूल कपासका फूल, और दूधमें दूध माका दूध--(हिं.) राजांत मेघराजा, फुलांत कपाशीचें फूल व दुधांत मातेचें दूध हीं श्रेष्ठ आहेत.

राजश्री--(राजाचें वैभव असणारा) १ आदरार्थी संबोधन. २ (उप.) उपहासदर्शक संबोधन, एखाद्याचा गर्व जिरल्यावर लावतात. 'आतां हे राजश्री माझ्या भीमास पाणि लावून।'-मोस्त्री २.२९. 'आपण तें भयंकर रूप दोनदां पाहिलें. पण याचा कोठें भरंवसा बसतो आहे! मग मला असें वाटलें कीं, या राजश्रीची प्रत्यक्षच खात्री करावी.'-विकारविलसित. ३ (सामा.) गृहस्थ, माणूस.

रांजण---रांजणांत गाडगें संपादतें, गाडग्यांत रांजण संपादत नाहीं--(महानु.) मोठ्यांत लहानाचा समावेश होतो पण उलट होत नाहीं.

राजा---राजाप्रधान सोडणें--(बायकी) चातुर्मासांत भात व वरण हे मुख्य पदार्थ वर्ज्य करणें.

राजापासून रंकापर्यंत--श्रीमंतापासून तों गरिबापर्यंत, सर्व दर्जाच्या लोकांत. 'ब्राह्मणाला राजापासून रंकापर्यंत मान मिळत असे.'

***राजा असो, मी तसो, माकांगे रांडे पेजेचो निसो**--(गो.) योग्यता नसतांना दुसऱ्यानें वाईट वागवलें कीं रागावणारा माणूस.

राजा अज्ञ आणि प्रधान समयज्ञ--बहुधा राजा अडाणी असतो व प्रधान चतुर असतो. अशी जुनी समजूत आहे व ही समजूत अनेक जुन्या गोष्टींतून वर्णन केलेली आढळते.

राजा आल्यावर प्रजेक धोको, केदोय घोव बायलेक सोपो--(गो.) राजाचा धाक प्रजेला वाटतो; पण नवरा कितीहि मोठा असला तरी बायको त्याला आपल्या मुठींत ठेवते.

राजा उदार झाला नि हातीं भोपळा दिला--एका गांवांत दोन शेतकरी होते. त्यांच्या राजाचा वाढदिवस जवळ आलासें पाहून त्यांनीं राजाला नजराणा म्हणून आपल्याकडून कांहीं वस्तु देण्याचें ठरविलें. योग्यवेळीं ते दरबारीं गेले. पहिल्या शेतकऱ्यानें आपल्या शेतांत पिकलेले उत्तम भोपळे राजाला नजर केले. तेव्हां राजानें त्याला आपल्या गळयांतील कंठा बक्षिस दिला. दुसरा शेत-

करी छाकटा होता. त्यानें विचार केला कीं, भोपळ्यासारखी कवडीमोल वस्तु नजर केल्यावर राजानें आपल्या गांवकऱ्याला कंठा दिला तेव्हां आपण त्याला किंमती वस्तु नजर करूं म्हणजे आपल्याला मोठें बक्षिस मिळेल. त्याप्रमाणें त्यानें दोन उत्तम गाई राजाला नजराणा म्हणून दिल्या. राजानें त्याचा भाव ओळखला नि त्याला पहिल्या शेतकऱ्यानें दिलेला भोपळा बाक्षिसादाखल दिला. सदर गोष्टीवरून ही म्हण प्रचारांत आली आहे. मोठ्याकडून मोठी अपेक्षा करावी, पण त्यानें उदारतेचा आव आणून अल्पसें द्यावें तशांतली गत.

राजा एकीकडे आणि आपण भलतीकडे—राजाची बरोबरी करूं नये.

राजा कधीं चुकत नाहीं—राजानें कोणतेंहि धोरण आंखलें तरी तें लोकतंत्र–मंत्रिमंडळाच्या सल्ल्यानेंच आंखलें जातें; म्हणून राजा चुकीस पात्र ठरत नाहीं, हें इंग्रजी राज्यनीतीचें सूत्र आहे. The King can do no wrong.

राजा करता ती राटावळ, बोम पोरोब करता ती दिवाळी—(गो.) राजा करील तें राजकारण आणि बोम परब हा गांवांतला बडा माणूस करील ती दिवाळी. सामान्य जनता मोठ्या लोकांच्या पाठीमागून जात असते.

राजा करी तैसे दाम। चाम तेही चालती॥—तुगा ३६६०. राजाच्या आज्ञेनें चामड्याचींहि नाणीं चालतात. राजा सर्व सत्ताधीश आहे; त्याच्या हुकमानें वाटेल तें होतें.

राजा करील ती पूर्व दिशा—राजाची आज्ञा प्रमाण समजली जाते.

राजा करील ती पूर्व दिशा आणि भट सांगेल ती अमावास्या—ज्याप्रमाणें राजकीय बाबतींत राजाच्या शब्दाला मान असतो त्याप्रमाणें धार्मिक बाबतींत पुरोहिताच्या शब्दास मान असतो.

राजा कालस्य कारणं—(सं.) राजाप्रमाणें सर्व परिस्थिति असते. कालो वा कारणं राज्ञः राजा वा कालकारणम्। इतिते संशयो मा भूत् राजा कालस्य कारणम्॥ "मंत्रीमंडळानें बंगालमध्यें जातीय ऐक्यासाठीं जे प्रयत्न चालविले आहेत त्यांना आपला हार्दिक पाठिंबा देण्यासाठींच आम्हीं हे खटले काढून घेउन उदाहरण घालून देत आहों. 'राजा कालस्य कारणम्' या म्हणीप्रमाणें राज्यकर्त्यांना ऐक्य पाहिजे असेल तर देशांत ऐक्यच नांदेल, त्यांना तें नको असेल तर दंगे माजतील. ही गोष्ट डाक्याच्या दंग्यानें व नंतरच्या ऐक्याच्या प्रयत्नानें सिद्ध होत नाहीं काय?"—केसरी १२–५–४२.

राजा खीं रांडे म्हण्टात्—(गो.) एखाद्या माणसाची परोक्ष निंदा करणें.

राजा गांवोगांव हिंडे भटजीचें तोंड झालें रडकुंडें—राजा जर नेहमीं स्वारी शिकारींत भटकूं लागला तर पुरोहितास नित्य नैमित्यिक कार्यें होऊन दक्षिणा कशी मिळणार?

राजा गेला शिकारीला, शत्रू आला घराला—योग्य गोष्ट बाजूस ठेवून भलत्याच गोष्टी करूं लागल्यास शत्रूस फावतें.

राजा जेवते, कावळा टुकनीं लागते—(व.) राजा जेवीत असतो, पदार्थांचा प्रत्यक्ष उपभोग घेत असतो; पण त्याचवेळीं कावळा त्या पदार्थांकडे लालसेनें पहात असतो व आपल्यालाहि त्यांतील भाग मिळेल अशी आशा करीत असतो. एखादा भाग्यवान् भोग्य वस्तूंचा उपभोग घेत असतां अभागी तसाच उपभोग आपणांस मिळेल अशी व्यर्थ आशा करीत बसतो असा भावार्थ.

यथा राजा तथा प्रजा—यथा पहा.

राजा निघाला बाहेरीं, वैभव त्याच्या बरोबरी—राजा राजधानींत नसला म्हणजे ती शून्यवत् भासते कारण राजाचें वैभव त्याच्या बरोबर असतें.

राजा नीतिहीन, जैसी नदी पाण्यावीण—कोरड्या नदीप्रमाणें नीतिहीन राजा निरुपयोगी होय.

राजा पाहिला, नवरा विसरला—नवऱ्यापेक्षां वैभवादिकानें श्रेष्ठ असणाऱ्या पुरुषाला पाहून नवऱ्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या स्त्रीस म्हणतात.

नवरा राजा, बायको राणी—फक्त नवरा बायको अशीं दोनच माणसें घरांत असलीं म्हणजे त्यांस यथेच्छ वागावयास सांपडतें, कोणाची अडचण नसते. मिया अन् बिबी.

राजा प्रसन्न झाला आणि हातीं भोपळा दिला—वर पहा.

राजा बोले, दळ हाले—राजाच्या आज्ञेप्रमाणें सैन्य चालतें. पुढें पहा.

राजा बोले दळ हाले, काजी बोले दाढी हाले—काजी पहा.

राजा बोले दळ हाले, गरीब बोले दाढी हाले—काजी पहा.

राजा बोलेल तो न्याय—न्यायाच्या बाबतींत राजाचा शब्द ही अखेरची गोष्ट होय, त्या पलीकडे जातां येत नाहीं. राजा करील ती पूर्व. (गु.) राजा बोले ते न्याव, ने पासो पडे ते दाव.

राजा भिकारी माझी टोपी घेतली–नेली, राजा भ्याला माझी टोपी दिली—एक गोष्ट [एका उंदराला उकिरड्यावर एक चिंधी सांपडली. त्यानें ती कोतवालीचा धाक दाखवून परटाकडून धुवून, शिंप्याकडून शिवून, पटवेकऱ्याकडून गोंडे लावून घेतली व टोपी सुरेख झाल्या-वर राजाकडे गेला व राजाला टोपी दाखवून हिणवूं लागला. राजानें 'घ्यारे याची टोपी हिसकावून!' असें शिपायांना सांगतांच त्यांनीं तसें केलें; तेव्हां 'राजा भिकारी, माझी टोपी घेतली!' असें उंदीर त्याला म्हणूं लागला. तेव्हां राजानें टोपी परत देवविली. तेव्हां उलट 'राजा भ्याला, माझी टोपी दिली!' असें म्हणत नाचूं लागला.] एखाद्या क्षुद्र व्यक्तीनें मोठ्याशीं बरोबरी करणें व त्याच्या उदार वर्तनाचा अर्थ भलताच लावणें.

राजा मरो कीं राणी सती जावो! आपणास त्याचें काय?—दुसऱ्याच्या भानगडींत सहसा पडूं नये. नसत्या चवकशा करण्यापासून आपला कांहीं फायदा नसतो.

राजा मेहेरबान, गद्धा पेहेलवान—राजाची जर कृपा झाली तर तो गाढवालाहि पेहेलवान बनवूं शकतो.

राजा राजविलासी : कुत्रा पलंगासी :—(महानु.) राजाच्या ऐश्वर्यभोगांत कुत्र्यासारखा क्षुद्र प्राणी जवळ लागतोच.

राजा राज कमावी, दुबळा झोंप कमावी; राजा राज्य करी (कमावी) आणि दुबळा झोंप गमावी—१ राजानें पराक्रम केला तर त्याला राज्य मिळतें पण दुबळ्यानें पराक्रम केला तर तो झोंपी जातो. ज्याच्या त्याच्या कुवती प्रमाणें त्याला फलप्राप्ति होते. २ राजा पराक्रम करून राज्य कमावतो किंवा करतो आणि अशक्त मनुष्य उगाचच राज्याची काळजी करीत स्वतःच्या झोंपेचा नाश करतो.

राजाराणी सुखी, गांवाला धकाबुकी—राजा-राणी आपल्या विलासांत मग्न असतात; त्यांना प्रजेच्या हालअपेष्टांची दादहि नसते.

राजाराणीनं खावं अन् शेजारणीनं पाहावं—(वांय.) मोठ्या शेजाऱ्यापासून लाभ तर होत नाहींच पण अवहेलना मात्र होते.

राजा लुटी जरी प्रजाजनाला—माता मारी निज-बाळाला। बंधू विकी जरी निज भगिनीला। शरण कुणां जावें॥ —शारदा ? राजानें लुटलें, आईनें मुलाला मारलें व भावानें बहिणीला विकलें तर त्याची दाद कशी लागणार.

राजागॅलें पाटॉळँ, मडवळागॅलें गाणपुसणें—(गो.) राजाचें महावस्त्र तें परटाचें ढुंगण पुसणें. चांगल्या किंमतीच्या वस्तूचा भलत्याच माणसानें दुरुपयोग करणें.

राजाचा फायदा हाच प्रजेचा फायदा—राजाचे कायदेकानू नीट असले म्हणजे व्यवहार सुरळीत चालतात. व त्यांत सर्वांनाच लाभ होतो.

राजाचा त्याग, तोच प्रजेचा भोग—राजा आप-मतलबी नसेल व तो निस्पृही व निरिच्छ असेल तर तो प्रजेला पिळून काढीत नाहीं व त्यामुळें प्रजा आबादानींत असते.

राजाची कांती, लोकांच्या हातीं—राजाचें वैभव प्रजेच्या संतोषात असतें. प्रजा असंतुष्ट झाल्यास राजास बदनाम करूं शकते.

राजाची धांव राजाप्रमाणें, गरीबाची धांव त्याप्रमाणें; राजाची धांव राजाप्रमाणें, गरीबाची त्याप्रमाणें जाणे—ज्याच्या त्याच्या कुवतीप्रमाणें जो तो कार्य करूं शकतो. राजा जसें म्हणेल तसें गरीबाला वागावें लागतें.

राजाची राणी ती पाटलाची मेहुणी—राजाची राणी झाली तरी ती दुसऱ्या कोणाची तरी नातेवाईक असूं शकते व तिची बहिण पाटलालाहि दिली असण्याचा संभव असतो, तेव्हां राणी झाली म्हणून कांहीं तिला इतर आप्तसंबंध टाकून देतां येत नाहींत. मनुष्य मोठ्या योग्य-तेला चढला तरी त्यानें आपली मूळची गरिबी विसरूं नये.

राजाची राणी, पिते परळानें पाणी—निकृष्टदशेस आलेलीं थोर माणसें.

राजाची राणी, प्रधानाची मेहुणी—(व.) राजाची

राणी आणि शिवाय प्रधानाची मेहुणी असणारी जी बाई तिचें वैभव अपूर्व असणारच. कोणाचा थाटमाट व तोरा अपूर्व दिसल्यास राजाची राणी इ. म्हणतात.

राजाची राणी ती महानुभावाची केरसुणी--(महानु.) राणीलादेखील महानुभावी माणूस किंमत देत नसतो.

राजाचीं लेकरें काय खातात—राजाचीं लेंकरें झालीं तरी तीं माणसेंच असतात व इतर माणसांप्रमाणें अन्नच खातात.

राजाची शालजोडी, ती परटाची पायघडी--राजाचे कपडे झाले तरी परटाकडे ते धुवावयास आले म्हणजे तो ते वाटेल तसे वापरतो.

राजाची शेंडी न्हाव्याच्या हातीं—राजा झाला तरी त्याला श्मश्रु न्हाव्याकडूनच करून घ्यावी लागते.

राजाची स्वारी भेटीला आली, मागून कराची मागणी आली--एका मनुष्याच्या घरीं राजा भेटावयास आला तेव्हां त्यानें पुष्कळ थाटमाट केला व आपलें वैभव राजास दाखविलें. पण त्याचा परिणाम असा झाला कीं, हा फार श्रीमंत आहे म्हणून त्यानें त्यावर बराच कर बसविला. याप्रमाणें करावयास जावें एक तों भलतेंच होतें, याकरितां राजाशीं तरी जपून वागावें. दुसऱ्या बाजीरावाची अशीच गोष्ट सांगतात.

राजाची स्वारी, मशालजीचा घातवार—ऐन वेळीं अपशकून. "रंगी तालमीच्या दिवशीं माझा आवाज अगदीं बसला.'राजाची स्वारी मशालजीचा घातवार' होऊन भाऊराव म्हणाले, गणूचा आवाज बसला आहे."—बोडस, माझी भूमिका, पान १०९.

राजाची निघाली स्वारी आणि मशालजीचा म्हणे (आला) घातवार—वरीलप्रमाणेंच.

राजाचें कारस्थान, शठांचें अंतर्ज्ञान—राजाचीं कारस्थानें कपटी लोकांस कळून येतात.

राजाचें घरीं बोडक्या प्रधान—अंदाधुंदी.

राजाचें घोडें आणि खासदार उडे—मालकाच्या वैभवाबद्दल चाकरानें फुशारकी मारणें. तु०--पाटलाचें घोडें महाराला भूषण.

राजाचें दुष्कर्म राजाला भोंवतें आणि प्रजेलाहि भोंवतें—राजाच्या अपकृत्यांचें फळ त्याला भोगावें लागतेंच पण त्याबरोबर प्रजेवरहि त्यामुळें आपत्ति येते.

राजाचें नेसणें तें परटाचें-धोब्याचें गांड पुसणें—वर पहा. (गु.) राणीनां चींर, ते धोभीनां ब्लोतियां.

राजाचें पाप राष्ट्राला भोंवतें—वर पहा.

राजाचें फुटलें भांडें त्यांतून पाणी गळतें--राजाला सुद्धां सर्व सृष्टिनियम लागू असतात.

राजाचें शिरी तें परटाचें टिरी--वर पहा.

राजाच्या कारभारीं, वर्ण भेद मस्ती करी--राज्यामध्यें या जातिभेदामुळें फार घोटाळा होतो.

राजाच्या कारभाऱ्याला पोटाचा दरारा—पोटाकरितां मनुष्य राजाची चाकरी करतो.

राजाच्या खजिन्याचें पाणी कधींच आटत नाहीं--राजा सर्व सत्ताधीश असल्यामुळें त्याला कधीं कसलाच तोटा येत नाहीं.

राजाच्या पक्वान्नाला विषाची बाधा—राजाला केव्हां विषप्रयोग होईल याचा नेम नसतो. त्यामुळें त्याला जरी मिष्टान्न खावयास मिळालें तरी त्यामागें भीति ही असतेच.

राजाच्या प्रेमाचा भरंवसा नसतो--बहुधा राजे लोक लहरी असतात त्यामुळें त्यांच्या वृत्ति व कृती चंचल असतात. राजा मित्रं केन दृष्टं श्रुतं वा।

राजाच्या मागून जावें, व सावकाराच्या पुढून जावें—राजाच्या पुढून जाण्यांत धोका असतो तेव्हां त्याच्या पाठीमागून जाणें चांगलें पण सावकाराच्या मागून गेल्यास लोक आपल्यास ऋणको समजण्याचा संभव असतो. तरी आपण त्याचें मिंधें असूं नये व त्याच्या पुढून जावें.

राजाच्या रथाच्या घोड्याचे दोर ध्रुवाच्या ताऱ्याला बांधून ठेवलेले असतात—राजेलोक प्रगतिशील नसतात.—केसरी ३०.३.३४.

राजाच्या सुनेला न्हाण आलं, नि पिंजारी शेटं भादरतो—(अशिष्ट.) फायदा एकाचा व तिसराच त्याबद्दल आनंद करतो.

राजाच्या हातांत पैसा खेळे, प्रजेचें झालें वाटोळें—राजाला द्रव्याची हांव सुटली कीं तो प्रजेला पिळून काढतो व प्रजा निःसत्त्व होते.

राजानें गू खाल्ला तर तो औषधाकरितां आणि गरिबानें खाल्ला तर मात्र तो पोटाकरितां—मोठ्या लोकांनीं कोणतीहि गोष्ट केली तरी लोक त्याचें कौतुक करतात व गरीबानें कांहीं केलें तरी त्यास नांवें ठेवतात.–विक्षिप्त २.१११.

राजानें तुडविलें आणि पावसानें बुडविलें—या गोष्टींची फिर्याद करतां येत नाहीं ?

राजान नागेल्यार आनी पावसान भिजैल्यार कोणा सांगतोलो;—(गो.) राजानें लुटल्यास व पावसानें भिजविल्यास फिर्याद कुठें करावयाची ? वर पहा.

राजानें परणली, राणी झाली—(व.) राजा जी बायको पत्करतो तिला राणीचा मान मिळतो; मोठ्या माणसानें ज्या वस्तूचा अंगीकार केला ती मोठेपणा पावते. तिचा मोठेपणा स्वतःच्या गुणांवर मिळालेला नसतो. तर तो मोठ्याच्या संसर्गानें आलेला असतो. तु०–नीच रतली रायाशीं । तिसी कोण म्हणेल दासी ॥–व्यंस्तो.

राजानें मारलें आणि पावसानें झोडिलें.—याची फिर्याद चालत नाहीं. वर पहा.

राजानें लुटलें, पावसानें भिजविलें, दाद ना फिर्याद–वर पहा.

राजाला आला चांदकोत, बटकी कांहीं सुटेना—उत्तम वस्तु प्राप्त झाली तरी कांहींच्या हीन आकांक्षा सुटत नाहींत. मूळ स्वभाव जाईना०

राजाला खासगी असें कांहींच नसतें, त्याचें तेंच राष्ट्राचें—राजाचे सर्व व्यवहार राष्ट्राच्या हितासाठीं असतात, असावे लागतात.

राजाला दिवाळी काय—राजा रोजच दिवाळी सारखे भोग भोगीत असल्यामुळें त्याला दिवाळी केव्हां येऊन जाते तें समजत देखील नाहीं. नित्याची गोष्ट झाली म्हणजे तिचें महत्त्व वाटत नाहीं.

राजाला दिवाळी ठाउकच नाहीं, गुढीचा पाडवा आलाच नाहीं—वरील प्रमाणेंच. विविधवृत्त २२·३·४२.

राजाला दिवाळी, गरिबाला झोळी—या गोष्टी नित्याच्याच आहेत.

राजाला राज्य (राज्यपद) मिळालें तरी बटकीचें बटिकपण कांहीं सुटत नाहीं—बटीक ती बटीकच राहते. तिला त्या पेशाचें काम करावेंच लागतें, त्यास इलाज नाहीं.–द्वा. गो. वैद्य, चंदावरकर यांचे चरित्र, पृ. ३.

राजाला सदा दिवाळी—वर पहा.

राजालें धुपाटणें, मडवळालें गांडपुसणें—(गो.) राज्याच्या अंग पुसावयाच्या वस्त्राचा उपयोग परीट आपले कुल्ले पुसण्याकडे करतो; मालकांनीं तात्पुरत्या सांभाळण्यास दिलेल्या वस्तूंचा नोकर लोक उपयोग करतात. धोब्याची खरूज मालकाचे कपडे वापरल्यामुळें मालकास होते.

राजे राजांचें दळ हाले आणि प्रजेचे हाल झाले—दोन राजे युद्ध करतात पण त्यांच्या सैन्यांच्या पायमल्लीनें प्रजेचें नुकसान होत असतें याची त्यांस दादहि नसते. मोठमोठ्यांच्या कलहामध्यें गरीब लोकांचा चुराडा होतो.

राजापूर—राजापुरी गंगा—राजापुरची गंगा ही अकस्मात वाहूं लागते व अकस्मात नाहींशी होते; यावरून (लाक्षणिक अर्थानें) अकस्मात होणारी गोष्ट. 'मोठ्या माणसामध्यें असलेलें राष्ट्रीयत्व हेंहि राजापुरी गंगेप्रमाणें एकदम उगम पावत नाहीं.'–केसरी २२·३·४०· 'ही तुझी राजापुरची गंगा केव्हां अचानक अदृश्य होईल कांहीं नेम का आहे ?'–य. गो. जोशी, पुनर्भेट.

राजोबा—राजोबा दखणीः बुडी बेडी रखणीः—(महानु.) राजेन्द्रमुनि महानुभाव यांनी सिंधू नदींतून अटकेपार होतांना नाव बुडूं लागली त्या वेळेस 'चल लंडी होजा पार' असें म्हणून काठी जोरानें नावेवर मारली तेव्हां नाव पार झाली. यावरुन वरील म्हण पडली व अद्यापि लोक ही म्हण वापरून नवस करतात. हे महात्मा महाराष्ट्रीय असून त्यांनी राजवल्लभी नांवाची गीता हिन्दिदोहा चौपाईंत लिहिली. तसेंच श्रीमद्भागवत दोहाचौपाईंत लिहिलें त्यांच्या हातची पोथी अमृतसर मठांत आहे. (संवत् १६८०.)

राज्य—राज्या अंतीं दुर्गती नरक(प्राप्ति)—राजाच्या हातून राज्य करीत असतां अनेक अन्याय होतात त्यामुळें त्याला मरणोत्तर नरकवास येतो अशी समजूत आहे.

राज्याक रायु जाल्यारी आवशी पूतु—(गो.) एखादा राजपुरुष प्रजेचा राजा असला तरी आईचा तो मुलगाच असतो. आई त्याला राजा मानीत नसते व तोहि आईवर प्रजा या दृष्टीनें सत्ता चालवूं शकत नाहीं.

राज्याची बळकटी आणि लोकांची प्रीति—प्रजेचा संतोष हचि राज्याची शक्ति आहे.–टिळे १·४३१.

जैसें राज्याचें चिन्हः तैसें सेवकाचें—(महानु.) 'यथा राजा तथा प्रजा' याप्रमाणें.

राज्या वांचौनि युग नाहीं: अधिकरणा वांचौनि आस्तिपरि नाहीं—(महानु.) युगांत कोणाना कोणाचे तरी राज्य असावयाचेंच त्याप्रमाणें प्रत्येक अस्तित्वांत असणाऱ्या गोष्टीला आधार हा असलाच पाहिजे.

राड—-राड उपसणें—चिखल झालेला काढून टाकणें हें त्रासाचें काम असतें;यावरून कष्टाचें काम करणें.

रांड-—रांड गाऱ्हाणें—विधवांच्या, अबलांच्या तक्रारी. (ल.) पिरपिर, कुरकुर.

रांडवांटा कपाळीं येणें—विधवा होणें; वैधव्य येणें.

रांडसांधीस बसणें--उदास होऊन कोपऱ्यांत खिन्न बसणें.

रांडेचा--रांडलेक. १ बेकायदेशीर संबंधापासून झालेला. २ (ग्राम्य.) पादपूरणार्थक किंवा उद्गारवाचक शब्द. ३ एक ग्राम्य शिवी. रांडेच्या !

रांडेचा; रांडेचा मारलेला—स्त्रीवश; स्त्रीलंपट.

रांडेचा आजार—गर्मी.

रांडेवांचून पाणी पीत नाहीं—आपल्या बायकोला रांडे ! अशी किंवा यासारखी शिंवी दिल्यावांचून तो पाण्याचा थेंब सुद्धां पीत नाहीं. (सतत शिव्या देणाऱ्या नवऱ्यासंबंधीं म्हणतात.)

रांडेसारखा रडणें--बायकांप्रमाणें दैन्य, दौर्बल्य दाखविणें. 'वैरी युद्धास आला आणि तूं रांडेसारखा रडतोस !'–भाव १५.

रांडेहून रांड—अतिशय बुळा, बायक्या (मनुष्य).

रांड्या राऊजी-राघोजी—१ बाहेरख्याली, रंडीबाज. २ बायक्या; नामर्द. ३ बाईलवेडा. ४ बायकांत बसणारा; बायकांमध्येंच वावरणारा.

***रांड ना पोर, जिवाला घोर**--मुलगा, बायको इत्यादि माणसें ज्याला नाहींत त्याला कांहींच घोर किंवा फिकीर नसावी. तो कोठेंहि बसला, उठला तरी चालण्यासारखें असतें; एकट्याचें पोट कसेंहि भरतें. पण रांडा पोरें कांहीं नसून दुसऱ्यासाठीं जो चिंता वाहतो त्याला म्हणतात

रांडपोर कीं राजपोर—दोघेहि स्वच्छंदी असतात; धाक नसतो. राजा पहा.

रांड बायलेक सतरा घोव; रांडा बायले सात घोव—विधवा बाईला सतरा (सात) नवरे. बेवारसी वस्तूवर कुणीहि आपली सत्ता सांगावी.

रांडबिंड म्हणा पण पोटभर वाढा—कसेंहि बोला पण काम करून द्या. आपलें काम झाल्याशीं कारण. स्वार्थासाठीं दुसऱ्याचें बोलून घ्यावें लागतेंच.

रांड, भांड, भैंसा, बिघडे तो होय कैसा?—रांड, कवि, व म्हैस हीं बिघडल्यास फार त्रासदायक व प्रसंगीं अपकीर्तिकारक होतात.

रांड म्हणा, कूंड म्हणा, पोट भर्नु वाढा—(गो.) रांड म्हणा अथवा आणखी कांहीं शिवी द्या पण पोटभर जेवायला वाढा. केवळ अन्नासाठीं कोडगेपणा करणारीं माणसें मानापमान गुंडाळून ठेवतात.

रांडे घरीं मांडे---कुलस्त्रीपेक्षां कुलटा चैनींत असतात.

रांडे घरीं मांडे, लुच्च्या घरीं झेंडे---कुलटा स्त्रिया व धुर्त, लबाड मनुष्य मजेंत असतात.

रांडे लग्नाक सातपांच (सतराइशीं) विघ्न--(गो.) विधवेच्या लग्नाला सतराशें विघ्नें उपस्थित होतात. अपेशी माणसाच्या कार्यसिद्धींत अनेक अडथळे निर्माण होतात.

रांडेची चट्टीपट्टी, भटजीची धोंडभट्टी--वेश्येचा नखरा जसा वरवरचा असतो तसा भिक्षुकहि स्नान न करतांच मोठें कपाळभर गंध लावून मोठ्या धार्मिकपणाचा आव आणतो. पण हीं दोन्ही सोंगें असतात त्यांत खरें कांहीं एक नसतें.

रांडेचो नाद, नी जगाशीं वाद—(कों.) स्वतः वेश्यालंपट असून लोकांनीं नांवें ठेवल्यास त्यांच्याशीं भांडणारा. स्वतः दुर्गुणी असून इतरांस दोष देणारा.

रांडेच्या पोरास दिवसा बाप नाहीं व रात्रीं आई नाहीं--अर्थ स्पष्ट आहे.

रांडेच्या पोरास विटी-दांडूचा खेळ—जसें घर तशी शिकवण.

रांडेच्या लग्नाला छत्तीस-सतरा विघ्नें—आडमार्गी काम करावयास गेलें म्हणजे त्यांत अनेक अडचणी येतात. पाठभेद–नकटीच्या लग्नास० वर पहा.

रांडेजवळ रांड गेली आणि फटरांड झाली—वाईट संगतीनें दुर्गुणांत भरच पडत जाते.

रांडेपरती शिवी नाहीं आणि शिरापरता दंड नाहीं—कुलस्त्रीला रांड ही शिवी सर्वांत वाईट आहे व शिक्षेच्या प्रकारांत देहांतशासन हें सर्वांत मोठें आहे.

रांड्या रावजी आणि बोडक्या भावजी—बाईल-बुद्ध्या, बायल्या माणसाला उद्देशून म्हणतात.

रांड्या रावजी जयारीमा भड--(अहि.) [भड=कणीस काढून घेतलेलें ताट. कडब्याची काडी.] बायल्या माणसाचा कांहीं उपयोग नाहीं.

राणी---**मी राणी तूं राणी, शौचाला पाणी कोण आणी**—तु०-तूं तांडेल मी तांडेल, मग घमत कोण सांडेल.

रात---**रात ओरडणें**—रातकिडा ओरडत असणें; झिल्लीच्या शब्दानें नादणें.

रातवा घेऊन निघणें—रात्र असतांनाच निघणें.

*__रात गये और बातही गये__—(हिं.) रात्र संपली व गोष्टहि विसरली किंवा आटपली. जेव्हांचें तेव्हां, त्याचें मागून कांहीं नाहीं.

रात माका पेट—रात्र ही मायपोट आहे. तिच्या-ठिकाणीं सर्वांनाच आधार मिळतो.

राति उलैलॅ बॉल आनि दिसा जालॅ पालॅ—(गो.) रात्रीं बोललेले शब्द दुसऱ्या दिवशीं विसरणें. वचनाचा कच्चा माणूस.

रातांबा---**रातांबे पिकणें**—उन्हांतून आल्यामुळें श्रमांनीं वगैरे गाल लाल होणें; गालांवर लाली येणें.

रात्र---**वैऱ्याची रात्र जाणें**--अतिशय दुःखांत व हालांत रात्र जाणें. 'रात्र वैऱ्याची मजला गेली । शेज पुष्पाची सुकुनिया गेली ।'-होला. ११६.१५०.

मरती रात्र झाली--शपथेचा एक प्रकार. बंदाखालीं बसणें पहा.

*__रात्र थोडी आणि सोंगें फार__—नाटकांत फार पात्रांचें काम असून नाटकाला वेळ थोडा असला म्हणजे धांदल, अव्यवस्था, अस्वस्थता वगैरे होते. यावरून वेळ थोडा व कामें फार. " 'रात्र०' यामुळें अथपासून इति-पर्यंत सर्व जगाचा संपूर्ण इतिहास कोणाच्यानेंही शिकवणार नाहीं हें उघड आहे."-बाजीराव. तु०-शास्त्रें फार अपार जीवित तुझें अत्यल्प कीं मानवा ।

रात्रंदिवस कांडा, हातीं आला कोंडा--पुष्कळ श्रम करून कांहीं लाभ न होणें.

रात्रभर जागली, कांदाभाकर खाल्ली--खूप कष्ट करून अगदीं अल्प कार्य होणें.

रात्रभर तळी आणि खायाला गेल्यावर अळवाची नळी--वरच्याप्रमाणेंच. फार कष्ट करून अल्प लाभ होणें.

रात्रभर दळी व पोत्यांत पीठ भरी--वरप्रमाणेंच.

रात्रि थोडी, वेस चड—(गो.) रात्र थोडी, सोंगें फार.

रात्रीं कुत्तरें नाहीं घरीं, दिवसा हिंडे दारोदारीं कुत्रें कधीं ठिकाणावर नसतें. धोबीका कुत्ता पहा.

रात्रीं खाती तूप, सकाळीं पाहाति रूप—अतिशय उतावळपणा करणें. तूप पहा. (गु.) रातनां घी खाईने दिसनां डोंगु नहि थवाय.

रात्रीं खातो वाल, दिवसास-सकाळीं फुगवितो गाल--वर प्रमाणेंच.

रात्रीं चोराला वाट, दिवसा भामट्याची गांठ—रात्रीं चोर व दिवसा भामटे याप्रमाणें दोहोंकडून नाग-वणूक.

संकटाखेरीज स्वातंत्र्य नाहीं, रात्री खेरीज सकाळ नाहीं--कष्ट भोगल्याशिवाय फळ मिळत नाहीं.

रात्रीचा दिवस केला, भाग्य आलें उदयाला--रात्रंदिवस परिश्रम करावे तेव्हां भाग्य येतें.

रांदपीण---**रांदपिणी पोरू उपाशीं पण्णां; रांदपिणी-पोर उपाशीं मरना**--(गो.) स्वयंपाकि-णीचा मुलगा कधींहि उपाशीं मरत नाहीं. कारण तिच्याच ताब्यांत सर्व अन्नसामुग्री असते. व ती मुलाच्या जेवणाची तरतूद आधींच करते. ज्याच्या ताब्यांत संपत्ति आहे तो धनकोला द्यावयाच्या अगोदर आपल्या सग्यासोयऱ्यांचेंच हित पाहातो. तु०-तळें राखी तो पाणी चाखी.

रांधणें---**रांधतां येईना ओलीं लाकडें**--नाचतां येईना अंगण वांकडें पहा.

रांधा वाढा, उष्टीं काढा--स्त्रियांमागें एकसारखें घरकाम लागलेलें असतें.

रांधावें तसें जेवावें, करावें तसें पाळावें-भरावें—जशी कृति तसें फळ.

रांदिलें सरता, केलेलें (उलाइलें) उरता—(गो.) रांधलेलें संपून जातें आणि केलेलें बोललेलें मात्र उरतें. दुःशब्द किंवा अपकार हा विसरला जात नाहीं.

रांदुंक कळना जाल्यारि रांदणी वांकडी—राकडा वल्लीं—(गो.) स्वैंपाक करायला येत नाहीं तर म्हणे चूलच वांकडी, किंवा लांकडें ओलीं. कांहींतरी कारण सांगून आपलें अज्ञान लपवणें.

रानूतलेलॉ भुरगॉ उपाशीं पण्णा—(गो.) स्वैंपाकीण बाईचा मुलगा उपाशीं राहात नाहीं. रांधपीण पहा.

रान——रान उठणें—शिकारीच्या वेळीं हांके लोक आरोळ्या देऊन श्वापदांना जागे करतात. तेव्हां तीं धांवपळ करावयास लागतात. यावरून लोक खवळणें; क्रुद्ध होणें. 'म्युनिसिपल इमारतीवर संयुक्त निशाण लावण्याचा ठराव हुजूरपक्षानें फेटाळला त्यामुळें शहरांतील रान उठलें होतें.'—के २२.७.३०.

रान उठविणें—जागविणें—पारधीकरितां धडधड आवाज करून सावजांना जागें करणें. झाडींतून पारध, सावज बाहेर हुसकणें. 'रान उठविल्याशिवाय, जागविल्याशिवाय शिकार कशी सांपडेल?'

रान काढणें—१ जंगल—जमीन लागवडीस आणणें. २ झाडें झोडपून व आरडून ओरडून शिकार उठवणें. ३ रानाचा, जंगलाचा शोध लावणें.

रान खवळणें—१ एखाद्यावर खवळणें, उठणें (रान, श्वापदें). २ अतिशय क्षुब्ध होणें (राग, भूक, लोभ, काम इ०कानीं). 'लवकर जेवायला वाढा, आज इकडे रान फार खवळलें आहे.'

रान घेणें—१ चरण्यास जाणें 'अदृश्याचें रान घेतां नचले कोणाचें।'—सप्र २.१८०. २ रानांत पळून जाणें (गुरांनीं). ३ (ल.) बेढंग मार्गाचा स्वीकार करणें; बारगळणें. रानांत शिरणें पहा.

रानडुकरासारखी मुसंडी— सरळ धाड, हल्ला. 'त्यांची रान डुकरासारखी मुसंडी खरी'—इंप ७७.

रान बदलणें—सोडणें—पारखें होणें—(ल.) आपलें मन किंवा उद्देश बदलणें; एखाद्या संबंधीचा आपला विचार फिरविणें; आपला पूर्वींचा मुद्दा सोडून देणें.

रान भारणें—१ सर्व प्रदेशावर जादू पसरणें; मंत्र टाकणें; नजरबंदी करणें. 'तमाम गारोडी रान भारतो तसा प्रकार त्यानें केला.'—भाब २४. २ (ल.) यथास्थित पैसे चारणें.

रानभरू होणें—१ रस्ता चुकणें; आडरस्त्यास जाणें. २ गोंधळणें; घाबरणें.

रान मानवणें—त्या देशाची हवा इ. प्रकृतीस मानवणें, पसंत पडणें. 'कोंकणच्या माणसास हें रान मानवत नाहीं.'

रान हांकणें—(शिकार उठविण्याकरितां) झाडें झोडपणें व आरडाओरडा करणें.

रानांत आडरानांत पडणें—एकटें सांपडणें; उदास होणें.

रानांत शिरणें—(ल.) (संभाषण प्रसंगीं) सरळ मार्ग सोडून अयोग्य गोष्टी सांगत बसणें; विषयांतर करणें; बहकणें.

रानीं निघणें—रानावनांत जाऊन राहाणें; अरण्य सेविणें. 'ब्रम्ह सुकाळु लाधला तेहीं। जे रानीं रिगाले।'—ऋ १६,

***रान झालें लागी, घरा जाली पैस**—(गो.) रान झालें जवळ आणि घरें झालीं दूर. म्हणजे म्हातारपण प्राप्त होणें, मरण जवळ येणें.

रान भोवूनु राक्कुड मेळनि—(गो.) रानांत फिरूनहि लांकूड न मिळणें. जी वस्तु जिथें मुबलक आहे तिथें जाऊनहि एखाद्याला जर ती मिळूं शकली नाहीं तर त्यापरतें दुसरें दुर्दैव कोणतें?

रानशी घर कोशी बिऱ्हाड—(गो.) रानांतल्या घरांत कोनांत बिऱ्हाड. गरिबीचा संसार.

रानांक वतल्याच्या कुर्टांक कुराडि बांदचि—(गो.) रानांत जाणारा माणूस निःशस्त्र असला तरी मोडून ओढून थोडी लांकडें आणतोच. मग त्याच्या कमरेला कुऱ्हाड बांधली तर विचारायलाच नको. कांहीं साधन नसतांनासुद्धां एखादा माणूस कुठें तरी जाऊन धडपड करून कांहींतरी मिळवतोच. मग त्याच्या हातांत जर एखादें धनार्जनाचें साधन दिलें तर तो पूर्वींपेक्षा अधिक मिळवील यांत काय संशय?

रानाचा वारा व घरचा चारा—घर पहा.

रानांत बाभळ मातुं नये व गांवांत कोळी मातुं

नये—[कोळी=भिस्ती, पाणी घालणार] या दोन्ही गोष्टी तापदायक होतात.

रानांतलीं झाडां कोण शिंपता ?—(गो.) रानांतल्या झाडांना पाणी कोण घालणार ? उपेक्षित माणसांना जवळ करणारे लोक फार थोडे.

रानांतु पावसु पळलेलो गांवांतु आयकना—(गो.) रानांत पाऊस पडलेला गांवांत ऐकूं येत नाहीं. दान करायचें तें सत्पात्रीं करावें. कुपात्रीं दान व्यर्थ होय.

रानांतुल्या मांकडाक गांवां हाण्णु सोळ्ळेले वारी—(गो.) रानांतल्या माकडाला गांवांत आणून सोडणें. विध्वंसक माणूस दूर असलेलाच बरा. त्याला आपल्याजवळ येऊं देणें शहाणपणाचें नाहीं.

रानांतून बाहेर पडण्यापूर्वीं शीळ घालूं नये—संकटांतून बाहेर पडण्यापूर्वींच आनंद प्रदर्शित करूं नये. Do not haloo till you are out of the wood याचा अनुवाद.

रान्नां गेलेल्यानें वजें हाळें, शेजारा गेलेल्यानें झगडें हाळें—(गो.) रानांत गेला त्यानें संसारोपयोगी ओझें आणलें आणि शेजारीं चकाट्या पिटायला गेला त्यानें भांडण आणलें.

रान्नां गेल्यारि वागा भय, घरा आयिल्यारि बायले भय—(गो.) रानांत गेला तर वाघाची भीति आणि घरीं आला तर बायकोची भीति. ज्याला घरांत आणि बाहेर कुठेंहि सुख नाहीं असा दुर्भागी माणूस.

रापा—**रापा लागणें**--एकसारखा पाऊस पडणें.

रापेचा पाऊस--संततधार पाऊस; एकसारखी वृष्टि.

राब—**राब करणें**—(जुन्नरी.) जमीन भाजण्यासाठीं पान पाचोळा वगैरे शेतांत पसरणें. 'त्यानें भातासाठीं राब केला आहे.'

राब जाळणें—(जुन्नरी.) शेतजमीनीवर पान-पाचोळा वगैरे शेतांत पसरून तो जाळून जमीन भाजणें.

राब बरडळणें—भाजलेली जमीन नांगरून दांताळ्यानें ढेकळें फोडून सारखी करणें.

राबाचें पाणी—ज्याचा उपयोग केला आहे असें पाणी.

***राव राबतात, देव कांपतात**—मनुष्यानें श्रम केले म्हणजे त्यास देव सुद्धां भितात. देवास सुद्धां मनुष्याच्या श्रमाचें फळ द्यावें लागतें.

राबेल तो चाबेल--जो कष्ट करील तो पोट भरील. (हिं.) राबेगा तो चाबेगा.

राम—**राम नसणें**—(मारुतीला सीतेनें प्रसन्न होऊन दिलेल्या तिच्या गळ्यांतील रत्नहाराचें एक एक रत्न त्यानें फोडून पाहिलें पण त्यांत रामाची मूर्ति त्यास दिसेना;याप्रमाणें तो सर्व हार त्यानें फोडून टाकला ह्या कथेवरून) सत्त्व, उपयोग, योग्यता, अर्थ नसणें.

रामपहारा—सूर्योदयापासून पाहिले तीन तास; प्रातःकालचा प्रहर. हा फार पवित्र समजला जातो.

रामबाण औषध—रामाचा बाण कधीं व्यर्थ जात नाहीं, तो कारागीर होतो व लक्ष्य वेधतोच. त्याप्रमाणें कधीं व्यर्थ न जाणारें हटकून गुण देणारें औषध. अमोघ उपाय; अचूक योजना.

राम बोलो; राम बोलो भाईराम--कांहीं जातींतून प्रेत स्मशानांत नेतांना म्हणतात यावरुन मरण, मृत्यु, नाश.

राम ह्मणणें-होणें—(मरतांना माणसाच्या तोंडांत रामाचें नांव यावें अशी हिंदूंची समजूत आहे ह्यावरून) मरणें; मरण्यास सिद्ध होणें; मरणोन्मुख होणें.

रामरगाडा—अतिशय गर्दी; खेचाखेच; भीड. रगाडा पहा.

रामराज्य--रामराज्यांत सर्व लोक फार सुखी असत; राम हा फार त्यागी असे. यावरून न्यायाधिष्ठित व अत्यंत सुखदायक अशी राज्यपद्धति. 'जालें रामराज्य काय उणें आम्हांसी। धरणी धरी पिकें गाई बोळल्या म्हैसी।' एकनाथ.

रामराज्य करणें--सुखानें, निर्भयपणें राहाणें, वागणें.

रामराज्य लुटणें—फार मोठें ऐश्वर्य कमावणें. 'पण तुमच्या आशीर्वादानं सावकारांनीं भरल्या घरांत रामराज्य लुटलं !'– एकच प्याला १.२.

रामराम ठोकणें--१ रामराम करणें; वंदन करणें. २ (मनुष्य निघून जातांना रामराम करतो यावरून) रजा घेणें; सोडून जाणें; पळून जाणें. 'विद्यार्थ्यांना परीक्षेला रामराम ठोकणें भाग पडलें.'–केसरी १२.७.३०. 'आणि संसाराला रामराम ठोकून मी असा फकीर बनलों !'–एकच प्याला.

२.२.'कोणाला कळूं न देतां मुरारावानें स्वदेशाला शेवटचा रामराम ठोकण्याचा निश्चय केला.'–V. S. २.१३.

रामाचा बाण—रामबाण. रामाचा बाण ज्याप्रमाणें कधीं निष्फल होत नसे त्याप्रमाणें अचूक प्रभावकारी. 'कायदे कौंसिलपुढें आणलेलें बिल म्हणजे तो कांहीं रामाचा बाण नव्हे किंवा वासव शक्ति नव्हे' (न. चिं. केळकर).

रामाचें नांव—एखाद्या गोष्टीचा पूर्ण अभाव आहे असें जोरानें सांगावयाचें असतां योजतात. 'अजून तरी त्याला पश्चात्ताप झाला होता म्हणालं, तर रामाचें नांव.'

रामाचें नांव घ्यावें लागणें—प्राणास मुकणें. 'सत्यव्रतः–आतां शपथच घातली, तेव्हां सांगितलें पाहिजे. मी सांगतों तें ऐकावें आणि त्याप्रमाणें लागलीच करावें. नाहींतर महाराजांना आणि मला दोघांनाहि रामाचें नांव घ्यावें लागेल. मग कसें?'–महाजनिकृत मोहविलसित नाटक.

रामाय तस्मै नमः—रामाचें नांव पहा.

राम जावचे पैलीं रामायन जाल्लँ!—(गो.) राम जन्मायच्या पूर्वीच वाल्मीकींनीं रामायण रचलें होतें. पुष्कळ वेळां एखादी गोष्ट घडायच्या पूर्वींच ती झाल्याचीं वर्णनें प्रसिद्ध होत असतात.

राम झरूके बैठकर सबका मुझुरा ले, जैसी ज्याकी चाकरी वैसा वांको दे—(हिं.) देव ज्याच्या त्याच्या कृत्यांप्रमाणें बक्षीसें देतो.

राम तूं धणी, अन् शेजारीण पडली कणगीवाणी—'राम तूं धनी!' असें विश्रांति घेतांना रामाचें नांव घेतात. रामाचें नांव घेऊन शेजारणीबद्दल चौकशी आहेच!

राम नाम जपता, केसानें गळा कापता—(गो.) वरून ईश्वरभक्तीचें अवडंबर दाखवायचें व आंतून कपट कारस्थानें करायचीं, अशा वृत्तीचे लोक.

राम नाम जपना, पराय माल अपना—(हिं.) तोंडानें परमेश्वराचें नांव घेत दुसऱ्याचा माल गायब करणें.

रामभरोसे काम—परमेश्वरावर भरंवसा ठेवून काम करणें. कसेंतरी काम करणें; पुढची मागची फिकीर न करतां काम करणें.

राम भला रावण भला, जागा आपल्या हिताला—राम व रावण दोन्ही बाजूला ठेवून आपण आपल्यापुरतें पाहात असावें. इतरांच्या भानगडींत न पडतां स्वतःचें हित पाहात जावें.

राम मर्यो किं रावण मर्यो—(व.) देवळांत पुराण चाललें होतें. रामायणांतील रामरावण–युद्धाचा कथाभाग चालला होता. पुराणिकानें रावण मारल्याची कथा श्रोत्यांना ऐकविली. श्रोत्यांनीं रामचंद्राच्या नांवानें जयजयकार केला. श्रोतृवर्गांत एक गृहस्थ होते. ते आपले डुलक्या घेत होते. त्यांची जयजयकारानें समाधि भंग पावली नि त्यांनीं जवळच्या लोकांना नि शेवटीं पुराणिकांना प्रश्न केला, 'महाराज, आपण कथा सांगितली पण त्यांत राम मेला कां रावण मेला हें सांगा!' पुराणिकानें आपल्या कपाळावर हात मारला. तात्पर्य, एखाद्या गोष्टीची माहिती सांगत असतां त्याकडे लक्ष न देतां, समजावून घेण्याचा प्रयत्न न करतां मागाहून परत त्याची माहिती द्या म्हणून म्हणणारे अनवधानी लोक असतात. त्यांच्या वृत्तीचें यांत दिग्दर्शन आहे. २ सगळें सांगितल्यावर परत मूळ मुद्याकडे वळणें.

रामाकाळीं वानरीं–वानरांना वाचा—ज्या गोष्टीस प्रत्यंतर पुरावा नाहीं त्याबद्दल वाटेल तें बोलावें. शिवाय आज त्याचा कांहींच फायदा नाहीं.

रामापैलीं रामायण—(गो.) रामा आधीं रामायण. काम व्हायच्या पूर्वींच बढाया मारणें. राम जावचे पैलीं पहा.

रामाय स्वति, रावणाय स्वस्ति– कोणाच्याच अध्यांतमध्यांत नसणें; दोघांसहि चांगलें म्हणणें.

रामावांचून रामायण—नाकावांचून चेहरा याप्रमाणें मुख्य गोष्टीशिवाय बाकी सर्व. म्हणजे त्याला कांहींच महत्त्व नाहीं.'आपण कार्ल-मार्क्सचे ग्रंथ अजीबात वाचलेले नाहींत असें ते (स्नोडन) प्रामाणिकपणें सांगत असत. ह्यावरून त्यांचा समाजसत्तावाद हा किती निर्लेप होता हें कळून येतें. कारण कार्ल-मार्क्सखेरीज समाजसत्तावाद आणि रामावांचून रामायण ह्यांत कांहींच फरक नाहीं.' –वि. ह. कुळकर्णी, व्यक्तिचित्रें.

रामाशिवाय रामायण, कृष्णाशिवाय महाभारत–वरीलप्रमाणेंच. मुख्य मुद्याची गोष्ट वगळून सांगितलेलें चऱ्हाट. हॅम्लेटशिवाय हॅम्लेट.–केसरी २७·५·३०.

राम्या जाणे बारा, सोम्या जाणे साडेतेरा—एकापेक्षां एक वरचढ. तु०—तुम झाडोझाड तो हम पानोपान.

राम्यास गळूं, लक्ष्यास-लख्यास अचघणा—कांहीं तरी सबबी सांगणें; दूरान्वित गोष्टीचा बहाणा करणें. —अलंकारप्रकाश १८५.

रामायण—१ रामचरित्रावरचा ग्रंथ. २ (ल) लांब लचक कंटाळवाणी गोष्ट; चऱ्हाट; ३ अस्ताव्यस्त गोष्ट; पसारा; गोंधळ.

ताकापुरतें रामायण—मतलबसाधूपणा. ताक पहा.

रामेश्वर—**रामेश्वराक गेल्यारि शनीश्वरु सोणा**—(गो.) कुठेंहि गेलें तरी दुर्दैव आपली पाठ सोडीत नाहीं.

आग रामेश्वरीं, बंब सोमेश्वरीं—एकीकडे दुखणें तर दुसरीकडे इलाज, याप्रमाणें.— म्युनिसिपालिटी नाटक.

रामोशी—**रामोशाची जात, खालीं सागोती वर भात**—(महानु.) यांत रामोशाचें जीवन दाखवलें आहे. प्रत्येक जातीचें कांहीं वैशिष्ट्य असतें.

राय—**रायाप्पा नाइकाचा फराळ करणें**—थंडा फराळ करणें; फक्त पाणी पिणें. खाशांची पंगत पहा.

रायागेलें मन आनि रुका सावळी तत्तावळी परतता—(गो.) राजाचें मन आणि वृक्षाची सावली केंव्हां उलट फिरेल तें सांगतां येत नाहीं. तु.–राजा मित्रं केन दृष्टं श्रुतं वा ।

राया बायलेक फुल्ला घोश्यानें मारनाफुढें दुकलें—(गो.) राजाची राणी इतकी नाजूक होते कीं तिच्या अंगावर पुष्पगुच्छ टाकला तरी तेवढ्यानें तिला दुखतें. याविषयीं एक गोष्ट आहे यावरून ढोंगीपणा.

राया बाइलेक भिके आशा—(गो.) राजाच्या बायकोला भिकेचे डोहाळे. ज्याला भरपूर असेल त्याला भिकाऱ्याप्रमाणें वागावेसें वाटतें.

रायाचा निशाणीं धाय पडिला : तें पायसरेंहि जाणितला; आणि पांगुळेंहि माणितला—(महानु.) राजानें लढाईला सिद्ध होण्यास जो डंका वाजविला तो पायसर आणि पांगूळ या दोघांनींहि सारखा ऐकला असला पाहिजे. दोघांनाहि कान आहेत. सारखीच जबाबदारी, कर्तव्य असणाऱ्या दोघांबद्दल म्हणतात.

रायाचे घरीं लग्न आणि पाणभरी उड्या मारी—भलत्याच्याच जीवावर उड्या मारणें; मालकाच्या वैभवावर चाकरानें फुशारकी मारणें. महार, पाटील पहा.

रायानें म्हळ्ळेली पूर्वदिशा आणि भट्टानें म्हळ्ळेली अमास—(गो.) राजा करील ती पूर्वदिशा आणि भट सांगेल ती अमावास्या.

रायानें म्हळ्यारि (सांगल्यारि) दळ हालता, भट्टानें म्हल्यारि शेंडी हालता—राजा बोलला कीं सैन्य हालचाल करतें पण ब्राम्हण मंत्र म्हणायला लागला कीं त्याची फक्त शेंडीच हालते. राजा बोले दळ हाले, पहा.

राय्याल्या खण्डाक दोन्नीय तंतुदार; रायाले तरवारीक दों यवशीन धार—(गो.) राजाची तलवार दुधारी असते. राजाला योग्य अयोग्य दोन्हींहि गोष्टी करतां येतात. राजानें जर कांहीं वाईट काम केलें तरी लोकांना तें योग्य असेंच वाटतें.

राव—**राव खालीं आले**—'राव खालीं पडले' असें न म्हणतां 'राव खालीं आले' असें बहुमानार्थी म्हणणें. सौम्यपर्याय. एखादा मोठा मनुष्य घोड्यावरून, किंवा मोठ्या पदावरून खालीं आला असतां त्यांस उद्देशून निघणारा आदरपूर्वक किंवा व्याजोक्तिपर उद्गार.

राव घोड्याखालीं आले—१ वरील प्रमाणेंच. २ राव मेले.

रावाचा रंक—मोठ्या पदावरून निकृष्ट स्थितीस येणें. रंक पहा.

रावाचा रंक होणें—मोठ्या श्रीमान मनुष्यास दारिद्र्य, गरीबी येणें.

***राव करणार-करीत नाहीं तें गांव करतो**—पाठभेद—गांव करी तें राव न करी. गांव पहा.

राव काय जाणे सुकाळ दुकाळ, दहीं भाताला काय दुकाळ !—राजा किंवा श्रीमंत माणूस यांना सर्व दिवस सारखेच. ते नेहेमीच चैनींत असतात. तेव्हां त्यांना दुष्काळ पडला कीं नाहीं याची दाद कशाला असणार?

राव गेले रंक आले, धरित्रीची कहाणी तीच चाले—एक मरून त्याच्या जागीं दुसरा आला तरी सृष्टिक्रमांत बदल नाहीं. जगाची रहाटी सारखी चालली आहे. जुनीं मनुष्यें जातात नवीं येतात पण जग चाललेंच असतें. एका नाट्यछटेंत वरील प्रसंग आहे.

राव पाहावा कां देव पाहावा—याचना करावयाची तर ती एखाद्या लुग्यासुंग्याजवळ करण्यापेक्षां एक राजाजवळ तरी करावी नाहीतर परमेश्वराजवळ तरी करावी.

राव रावताहेत, बैल काफ्ताहेत—मूर्खपणाचें कृत्य करणें.

राव राव गेले रणीं आणि भागूबाईची आली पर्वणी—मोठीं माणसें हजर नसलीं म्हणजे क्षुद्र लोकांचें फावतें.

राव वणंगपाळ, बारा वजीरांचा काळ—(ऐति.) वणगोजी नाईक उर्फ जगपाळ हा विजापूरच्या आदिलशाहींतील एक मराठा सरदार. हा मोठा धाडसी व चळवळ्या असल्यामुळें लढाई निघाली कीं तो तेथें हजर असावयाचा. ह्याचा दक्षिणेंतील मुसलमानी राजांस मोठा वचक होता त्यावरून म्हण पडली.–ज्ञाको ४.४२६.

दख्खनमें सब रानेराव, हागरे गांड्यो मारो घाव—दक्षिणेंतील सर्व रावच, पण सर्व भेदरट व पळपुटे ! इतर प्रांतांत अशी समजूत आहे.

रावाचा रंक होतो आणि रंकाचा राव होतो—जगामध्यें चढउतार हा चालूच आहे. मोठमोठे लोक वैभवापासून च्युत होतात व कनिष्ठ लोक श्रेष्ठ पदास चढतात.

रावांच्या कानावर पगडी अन् घरीं रांड उघडी—घरांत दारिद्र्य असून बाहेर भपका दाखविणारास म्हणतात. एका कानावर पगडी० पहा.

रावण—रावण जळणें; रावणाची लंका जळणें—कानाचीं भोकें बोटांनीं बंद केलीं असतां ऐकूं येणाऱ्या आवाजास म्हणतात.

रावण माजणें–मातणें–होणें—अतिशय ताठेबाज, उद्धट, शिरजोर होणें.

रावणराज्य—रावण हा फार जुलमी राजा होता. यावरून जुलमी राजसत्ता; त्रासदायक राज्यपद्धति; कष्टदायक राजनीति. रामराज्याचे विरुद्ध राज्य.

रावणाचा लेक—फुशारकी मारणारा, कुरेंबाज, अरेराव माणूस.

रावणाचा वाजंत्री—(उप.) डांस.

रावणाची खाई—ज्यांत सर्व कांहीं खपतें, जिरतें, गिळंकृत होतें अशी गोष्ट. 'संसार ही रावणाची खाई आहे, जो पदार्थ आणावा तो गडप होतो.'

रावणाचीच जांभई—(प्र.) कुंभकर्णाचीच जांभई. जांभई पहा. "एकंदरींत, 'षण्मासींचा वायदा' नव्हे तर ही 'रावणाचीच जांभई' अथवा 'कुंभकर्णाची महानिद्रा' च होत चालली आहे !"—छच. ८०.

रावणानें झवलेला व कुंभकर्णानें काढलेला—(आशिष्ट.) ज्याचा आगापिच्छा ठावठिकाणा माहित नाहीं असा. एक शिवी.

रावणाक सत्त घालौंलो; रावणाक सांतली घल्लोलो—(गो.) रावणाचा छत्रधारी. अपूर्व करामतीचा माणूस.

***रावण पडला उताणा, तोंडांत कोणी मुताना**—सीतास्वयंवराच्या वेळीं परशुरामाचें धनुष्य अंगावर पडून रावण जमिनीला खिळला, त्यावेळचें एका काव्यांतील वर्णन. एखाद्या मोठ्या मनुष्यास निकृष्ट दशा आली म्हणजे त्याची कोणीहि हेटाळणी करतो.

रावणा रावणा म्हळे, भुईचे लिंग सोळें—(गो.) 'रावणा; रावणा' अशी हांक मारली आणि लिंग जमिनीवर ठेवलें. [रावणानें शंकराचें आत्मलिंग घेऊन लंकेला जातांना लघुशंका लागली म्हणून एका गुराख्याच्या वेषांत असलेल्या गणपतीजवळ तें दिलें. रावणाची लघवी सरेना तेव्हां इकडे गणपति हात ताटकळल्यामुळें त्याला हांका मारूं लागला. शेवटीं त्यानें तें जमिनीवर ठेविलें ते तेथेंच स्थिर झालें. तें स्थान म्हणजे गोकर्ण महाबळेश्वर.] (ल.) मोठ्या कष्टानें शपथेपुरेसें काम करून मोकळें होणें.

रावणाक खीं भिके दुवाळ; रावणाक भिकेचे दुवाळे—(गो.) रावणाला म्हणे भीक मागायचे डोहाळे लागले. भिक्षेकऱ्याच्या वेषानें रावणाला सीताहरण करण्याची दुर्बुद्धी सुचली आणि तोच त्याच्या नाशाचा पाया ठरला.

रावणाची हे दुर्दशा, आम्हीं खालाविल्या मिशा—रावणाचीहि जर अशी दुर्दशा झाली तर मानव तर क्षुद्र प्राणी आहेत, त्यांचा काय पाड. जेथें मोठमोठ्यांस हीन दशा येते तेथें गरीबागुरीबांची कथा काय ?

रावणाच्या खाईला अडक्याचें दहीं—रावणाचा आहार तो केवढा व त्याला पैशाचें दहीं कसें पुरणार ! अधाशाला थोडें पुरत नाहीं.

रावणास भिकेचे डोहाळे—वर ' रावणाक भिकेचे दुवाळे ' पहा. नीच व हलकट साधनांचें अवलंबन अधोगतीस कारणीभूत होतें याअर्थी.

रावळ---रावळारांतुल्या भात्ताक उंदूर झग-डताति—(गो.) देवळांतल्या भातासाठीं उंदीर झगडतात. दुसऱ्याच्या मालकीच्या वस्तूसाठीं तिऱ्हाइतांनीं आपसांत झगडा करणें.

रावा---जों जों रावा पढे, तों तों पिंजऱ्यांत पडे—राघू पहा. जास्त शहाणपणा दाखविणारीं माणसेंच दुसऱ्यांचे गुलाम बनतात. उलट मूर्ख लोक स्वतंत्र वागतात.

राशी---राशी पुंजीस येणें—राशीस, सांठ्यास पडणें; संग्रहीं पडणें. (खर्च वेंच भागून) निवळ नफा म्हणून उत्पन्न होणें; खिशांत पडणें; संग्रहीं पडणें.

राशीला लागणें; राशीला हात धुवून लागणें—फार मागें लागणें; छळणें. 'हीं दुःखें मानवी समाज उन्नतावस्थेला लागल्यापासून, स्त्रीजातीच्या राशीला हात धुवून लागलेलीं आहेत.'–कवठेकर, अपुराडाव १७२. 'युद्धजन्य परिस्थिति साऱ्या जगाच्या राशीला लागली आहे.'–केसरी ३-११-४१.

राशीस बसणें-असणें-लागणें—ग्रह ज्याप्रमाणें अशुभ राशीस आला असतां त्रासदायक होतो त्याप्रमाणें. १ त्रास देणें; छळणें; पीडा देणें. 'ताराः–नाहीं तरी सुभद्रा सुनंदेच्या फारच राशीला लागल्यासारखें करते.'–गुप्तमंजूष. 'आहेर सर्वांच्या राशीला आहेच.'–दाजी १.२०४. २ खणपटीस बसणें; इष्ट गोष्ट करून घेतल्याशिवाय न सोडणें. ३ मन लावून, एकाग्रतेनें अभ्यास करणें.

राष्ट्र---राष्ट्रांची रचना शाळांतून होत असते--शाळांतील मुलें हीं राष्ट्राचे भावी नागरिक होत. व त्यांच्या शिक्षणावर पुढें राष्ट्राचें वैभव अवलंबून असतें.

राष्ट्राचे पुढारी हेच गरिबाचे कैवारी--राष्ट्रांतील पुढारी हेच गरीबांची दाद लावूं शकतात.

रास---रास मांडणें--नाचणें; नृत्य चालविणें.

रासभ---रासभ धुतला महा तीर्थामाजीं । नव्हे जैसा तेजी शामकर्ण ॥--तुगा ३१११. गाढवास कितीहि तीर्थांत धुतलें तरी त्याचा श्यामकर्ण होणें शक्य नाहीं. गाढवाचा घोडा बनविणें. गाढव पहा.

राहाणें---राहून राहून--पुनः पुनः; मधून मधून; थांबून थांबून. 'राहून राहून मला आश्चर्य वाटतें कीं,' 'या नक्षत्राचा पाऊस एकसारखा लागत नाहीं, राहून राहून पडतो.'

राहाणें ज्या घरीं, तेथें करावी लागे उस्तवारी--ज्या ठिकाणीं आपणांस राहावयाचें असेल त्या ठिकाणची डागडुजी, साफसफाई वगैरे आपणास केली पाहिजे. आपणास पाहिजे असलेल्या वस्तूची निगा आपणच ठेवली पाहिजे.

राहावें तेव्हां रुसूं नये, व जावें तेव्हां पुसूं नये—आपल्या मनांत जर एखाद्या ठिकाणीं राहावयाचें असेल तर रुसण्याफुगण्यांत कांहीं अर्थ नाहीं. गोडी गुलाबीनें राहण्यांत सर्वांसच आनंद होतो व आपणास खरोखरच जावयाचें असल्यास विचारीत बसूं नये; सरळ मार्गाला लागावें.

राह्याला नाहीं झोपडीः खायाला नाहीं मुठडीः--(महानु.) [मुठडी=मुठीभर धान्य] वरच्याच्या उलट स्थिति. कांहीं एक सुखसाधन नसणें.

राह्याला नाहीं सायलीः खायला नाहीं पायलीः--(महानु.) वरीलप्रमाणेंच.

रयाला सपर नाहींः खायला खपर नाहींः--(महानु.) [सपर=छप्पर] राहाण्याला घर नाहीं कीं खाण्यासाठीं एकहि भांडें नाहीं, अशी कंगाल स्थिति.

राह्याला सावलीः खायाला पायलीः—(महानु.) राहाण्याचें घर चांगलें व खाण्यास भरपूर असलें म्हणजे मग कांहीं कमी नाहीं.

राहाट---रहाट पहा.

राहाट घटिकेचेनि दृष्टांते—(महानु.) राहाटगाडग्यांप्रमाणें. रहाटावरील एक गाडगें भरतें व रिकामें होतें; दुसरें तसेच.' याप्रमाणें स्थिति. चक्रनेमिक्रम.

राहु---राहुकेतु मागें लागणें; राहूसारखा मागें लागणें-येणें-पाठ घेणें–राहु व केतु हे चंद्रसूर्यांच्या मागें लागले असून त्यांस ग्रासतात व त्यामुळें ग्रहणें होतात अशी जी जुनी कल्पना आहे तीवरून. खनपटीस बसणें; अतिशय सतावणें; एखाद्याच्या मागें लागून ग्रासण्यास पाहाणें.

राळ---राळ उडविणें-करणें---१ घाबरवून सोडणें; फट फाजिती दैना, दुर्दशा करणें. 'पेशव्यांची व ब्राह्मण मुत्सद्यांची आपलें सर्व कसब खर्च करून राळ उडविली. V. S. २.२४. २ नाश करणें. 'आशा तृष्णा कल्पना काम क्रोध काळ। दुरविलीं शुद्ध बुद्धि केली राळ।'–तुगा ४०६६.

राळ उडविणें-फेकणें—राक्षस प्रवेश करण्याच्या वेळीं राळ उडवीत येत; यावरून खूप गाजावाजा करणें, आरडा ओरड करणें. पौराणिक नाटकांत राक्षसाचें सोंग येत असतांना एक इसम दिवटीवर राळ फेकीत असे. त्यामुळें राक्षसी स्वरूप जास्त प्रखर दिसत असे.

राळा——राळ्याचा थाळा करणें—पराचा कावळा करणें.

***राळ्या एवढें असतें आणि थाळ्या एवढें सांगतें**—वर पहा. अतिशयोक्ति करणें.

राळ्याचा भात पंक्तीला आणि म्हातारा माणूस (नवरा) गमतीला—ज्याप्रमाणें मोठ्या भोजन समारंभांत राळ्याचा भात वाढला असतां त्याची चेष्टा होते त्याप्रमाणें म्हातारा मनुष्य किंवा नवरा हा केवळ चेष्टेचा विषय होतो.

राळ्याचें ढासलें आणि भुतानें तोंड वासलें—[ढासलें=भात इ. शिजविलेला पदार्थ] राळ्याचा जरी खाद्य पदार्थ असला तरी भुतासारख्या अधाशाला तो प्रिय होतो.

राक्षस——राक्षसवेला—तिन्हीसांज. सूर्यास्तानंतरचा संधिकाल.

राक्षसी झोंप—अतिशय गाढ झोंप; कशानेंहि जागा होत नाहीं अशी झोंप.

राक्षसीकडे पाळणें विंदुंलुंक दिल्यावारी—(गो.) राक्षसिणीच्या हातांत पाळण्याची दोरी दिली कीं, ती जोरजोरानें झोंके देऊन बालकाचे हाल करील. धसमुसळ्या माणसाकडे एखादें नाजूक काम दिलें कीं तोहि वर सांगितल्याप्रमाणें त्याची वाट लावतो.

रिकामा——रिकामचोट भाऊमहाराज—एखाद्या लब्ध प्रतिष्ठित माणसाबद्दल उपहासार्थी योजतात.

रिकाम्या पोटीं—कांहीं न खातां;उपाशी असतांना; अनशेपोटी.

रिकाम्याराणी——विनाकारण; निरर्थक.

रिकाम्या हातानें—१ बरोबर कांहीं न घेतां; रिक्त हस्तें. २ काम न करतां; यशस्वी न होतां; हात हलवीत.

***रिकामचोट, गांवास उपद्रव**——(शब्दशः अर्थ अश्लील आहे) रिकामटेकडे लोक गांवांत कुटाळक्या करीत असतात.

रिकामी टवळी, हातीं नाहीं डवली——निष्कांचन; कफल्लक.

रिकाम टेकडी, गांवाशीं वांकडी——रिकामपणीं कलह लावणारी स्त्री.

रिकामटवळा, गांवास उपद्रव——रिकामचोट, रिकाम टवळा पहा.

रिकाम टवळा आणि गांवचा होवळा—[होवळा= उपद्व्यापी; कारभारी] रिकामटेकडा माणूस गांवातल्या तंटाबखेड्यांत पुढाकार घेत असतो. गांवचे कारभार त्याला सुचतात.

रिकामपणाच्या अंतीं, अनेक कल्पना सुचती——मनुष्य निरुद्योगी असला म्हणजे कांहीं तरी भलतेंच चाळे करूं लागतो. तु०–A vacant mind is Satans workshop.

रिकामा कामकरी, सांज सकाळ फेरी—काम नसलें म्हणजे मनुष्य विनाकारण खेपा घालण्यांत वेळ घालवतो.

रिकामा गडी भागला आणि ज्याचें नाहीं काम केलें त्याला राग आला—रिकाम्या मनुष्यानें कोणाचा कांहीं तरी उद्योग करावा व त्यामुळें भलत्यालाच रागयावा. अर्थाअर्थी कोणत्याहि गोष्टीचा संबंध नसता कांहीं तरी कटकट उभी राहणें.

रिकामा डौल आणि घराला नाहीं कौल—पोकळ बडेजाव. घर पहा.

नाकीं नाहीं कांटा, रिकामा ताठा——वरप्रमाणेंच.

रिकामा न्हावी, भिंतीला——कुडाला तुंबड्या लावी——कूड पहा.

रिकामा बनिया क्या करे, इधरकी टोकरी उधर भरे——रिकामटेकड्या माणसाला कांहीं उद्योग नसतात तेव्हां दुसऱ्याच्या चालत्या गाड्याला खीळ घालण्याचे उद्योग ते शोधून काढतात. या नसत्या उठाठेवी करणाऱ्या व्यक्तीला उद्देशून ही म्हण आहे.

रिकामा मापारी कपाळावर हात मारी—काम नसलेला माणूस कर्माला बोल लावतो, वरप्रमाणेंच.

रिकामा सुतार आपले--बायकोचे कुले तासी— रिकामा बरगी कुले तासी——रिकामा न्हावी० पहा. (गो.) रिकामो मेस्त बायलेचे कुले ताशी.

रिकामी आवा, कडकड चावा—जिच्याजवळ कांहीं द्याया--घ्यायास नाहीं तिला बाळगून काय करावयाची ? जिच्यापासून फायदा आहे तिलाच जवळ करणें चांगलें नाहीं का ? उपरोधानें म्हणतात.

रिकामी नार आणि गांवास उसाभर—रिकाम टेकडी स्त्री गांवभर फिरत राहून नसते उपध्याप करते.

रिकामी बाई काय करशी ? आपलं लुगडं फाडून दंड घालशी—एखाद्या स्त्रीस रिकामपण असलें व वेळ जात नसला म्हणजे स्वतःचेंच लुगडें फाडून पुन्हां शिवीत बसते. ज्याला कांहीं उद्योग नाहीं तें मनुष्य विनाकारण कांहीं तरी निरुपयोगी अथवा नुकसानकारक गोष्टी करीत असतें.

रिकामी वाय भन्न कॉणच्यान् पुरी पावयाला ?—(गो.) रिकामी विहीर भरायला कोण पुरा पडेल ? लोभी माणसाचें कोणीहि समाधान करूं शकत नाहीं.

रिकामे आर्म दोघां कय भय—(गो.) रिकामी बंदुक शत्रूवर रोखली कीं ती भरलेली आहे असें समजून शत्रूला भीति वाटते आणि ती रिकामी आहे असें शत्रूला समजलें तर तो आपल्यावर झडप घालील या कल्पनेनें रोखणाराहि घाबरत असतो.

रिकामें मन आणि कुविचाराची धन—वर पहा.

रिकामें मन सैतानाचं धन-सदन; रिकाम्या मना सैतान करी कारखाना—मनुष्याच्या मागें कार्याचा व्याप नसला म्हणजे तो नसते उपद्व्याप करीत असतो. तोच न्याय मानवी मनालाहि लागतो. मन रिकामें असलें कीं, कुकल्पना, कुवासना यांनीं माणसाचें मन काबीज केलेंच म्हणून समजा. तु०—A Vacant mind is Satan's Workshop.

रिकाम्या तळ्यांत कचऱ्याचा सांठा—तळ्यांत पाणी नसलें कीं लोक त्यांत कचरा टाकूं लागतात.

रिकाम्या देवळावर कावळ्याची वस्ती—देवळांत वापर नसला म्हणजे तेथें कावळे राहातात. घरधनी घरीं नसला म्हणजे चोरांचें फावतें.

रिकाम्या पोटास कान नसतात व रात्र ही शहाणपण आणते—पोटांत भूक लागली म्हणजे मनुष्यास दुसऱ्यांनीं कांहीं सांगितलें तरी त्याचा कांहीं उपयोग नसतो व तो रात्र किंवा दिवस न पाहातां पोटाला कसें मिळेल याबद्दल खटपट करतो.

रिकाम्या पोटीं, हातीं नरोटी—मनुष्य भुकेनें व्याकुळ झाला म्हणजे भीक मागण्यास कमी करीत नाहीं.

रिकाम्या मनांत सैतान आपलें दुकान थाटतो—रिकामें मन० पहा.—माटे, उपेक्षितांचें अंतरंग ९१. Idle brain is Satan's workshop.

रिकाम्या माणसा काय करशी ? तर ह्या कानांतलें तानवडें त्या कानांत घालशी—(बायकांत रूढ) [तानवडें=स्त्रियांच्या कानांतील एक दागिना] कोणा एका स्त्रीला रिकामें बसवेना, म्हणून ह्या कांनातला दागिना काढून त्या कानांत घालीत असे. तु०—रिकामा न्हावी कुडाला तुंबड्या लावी.

रिगणें—उदरीं रिगणें—पोटीं येणें; (परमेश्वरानें) गर्भवास पतकरणें. 'रीगसी कवणाच्या उदरीं।'—उषा १७९२.

रिणको—रिणको धनकोचा दास—रिणको हा सर्वस्वीं धनकोचा गुलाम असतो. ऋणको पहा.

रिता—रिताभरला—होय नाहीं; केलें न केलें; बरावाईट; असातसा. 'जें काम मीं सांगितलें त्याचा जाब मला रिताभरला द्यावयाचा होता.'

***रितीं (पोतें) पिशवी उभी राहात नाहीं**—जो निर्धन त्याच्यानें सदाचरणानें चालवत नाहीं.

रिद्धि—(एखाद्याच्या घरीं) रिद्धिसिद्धि पाणी भरणें—रिद्धि आणि सिद्धि या दोन गणपतीच्या दासी, संपत्ति आणि समृद्धि यांच्या दर्शक आहेत. यावरून भरपूर पैसा आणि ऐश्वर्य असणें; फार नशीबवान असणें.

रिबेर—रिबेर वावरीसो वावुरता—(गो.) [रिबेरा=प्राचीन गोव्यांत गलबतावरील गुलाम लोक जेथें काम करीत ती जागा.] अति कष्टाचें काम करणाऱ्या गुलामासारखा राबणारा.

री—री ओढणें—री हा गाण्यांतील एक स्वर आहे. गाणें चालू असतां दुसरा माणूस साथीसाठीं एक सूर म्हणत असतो. त्यावरून १ दुसऱ्याच्या सुरांत सूर मिळविणें. २ दुसऱ्याच्या म्हणण्यासारखें म्हणणें. अनुवाद करणें.

री री करणें—चालणें—१ रेंगाळणें; सावकाश जाणें, होणें. 'त्याच्याजवळ एवढें मोठें सैन्य असूनहि वेढ्याचें काम रीरीच चाललें होतें.'—स्वप ४४४. २ रेंरें करणें.

रीठ—रिठावर दिवा लागणार नाहीं—[रीठ= ओसाड जागा] निःसंतान होऊन घर पडून त्याचें रीठ होईल व तेथें कोणीहि घर बांधणार नाहीं.

रीण—ऋण पहा. **रीण कर्नु काय केलें, काप विकून वाडी दिली**—(गो.) कर्ज काढून कानांतले काप केले होते; पण तेच विकून श्राद्ध करण्याची वेळ आली.

रीण केल्यारि घाण्यांतु हातु—(गो.) कर्ज काढलें कीं हात चरकांत सांपडला असें समजावें.

रीण घेत्तचि रिणगारी उरुता, चलि दित्तचि जांवयि (माव) उरुता—(गो.) कर्ज घेतलें कीं सावकार छळतो,आणि मुलगी दिली कीं जांवई (किंवा सासरा) छळतो.

रीण फिटेल पण हीण फिटत नाहीं—एखाद्याचें काढलेलें कर्ज फेडतां येतें पण एखाद्या गोष्टीमुळें आलेला उणेपणा कधीं भरून येत नाहीं.

रीण बुडलें न मागतां, सोयरीक गेली न पुसतां—(गो.) न मागितल्यानें कर्ज बुडतें आणि विचारपूस न केल्यानें आप्तसंबंध तुटतात.

रीत—रीत न रंवथ आणि खाती गवत—ज्याला रीत भात माहीत नाहीं असा अगदीं पशुतुल्य अडाणी मनुष्य.

रीत बाटली ह्मणून जात थोडीच बाटली—एखाद्या जातींत एखादी वाईट चाल असली तरी तीमुळें त्या जातीस कांहीं सरसहा कमीपणा येत नाहीं. तेवढी रीत सोडली म्हणजे झालें.

रीत भात मोठी, ऐकतो लोकांच्या कानगोष्टी—प्रतिष्ठितपणाचा आव आणून लोकांच्या कानगोष्टींत लक्ष घालणारा; लबाड; धूर्त.

सरळ रीतीचा, अढळ कृतीचा—वर्तनानें सरळ व चांगला कार्यकर्ता.

रुई—रुई स्वस्त होणें—(१) शरीर फुगणें, स्थूल होणें. रुई पिंजली म्हणजे ती आकार मानानें खुप फुगलेली दिसते यावरुन. 'अहो रामराव, आलिकडे मोठी नोकरी लागल्या पासून तुमची रुई बरीच स्वस्त झाली आहे.' कापूस पहा.

रुई—रुईस येणें—रीतीस येणें; प्रघात पडणें; रूढी प्रमाणें असणें.

रुख—रुखा भोजन, कर्ज शीर, और कलहलेली नार। चौथे मैले कपडे, या नरक निशाणी चार॥—(हिं.) रुक्ष भोजन, कर्ज, भांडखोर बायको व मळके कपडे या चार गोष्टी नरकाचीं चिन्हें होत.

रुखा सुखा खायके थंडा पाणी पी,न देख पराइयां चोपडीया न तरसानेजी—(हिं.) ओलें कोरडें जें असेल तें खाऊन थंड पाणी पिऊन रहा, दुसऱ्याच्या पैशाचा लोभ धरूं नको, किंवा कोणीं न दिलें तर त्रासूं नको आपल्या जवळ जें असेल त्यांत सुखासमाधानानें रहावें.

रुचणें—रुचवें, पचवें, पायलीभर वेंचवें, सुखें निद्रायेचें, कामाचें ओडणें, सांगरे वैद्या माझ्या रोगाची भावना—(बायकांत रुढ) [ओडणें= नावड] कोणी एक आपल्यास आजारी समजणारी बाई वैद्याला आपल्या रोगाचें निदान विचारतेः—माझ्या तोंडाला रुचि आहे, अन्न पचतें, झोंप चांगली येते, कामाबद्दल तिटकारा वाटतो; तेव्हां मला रोग तरी कोणता झाला आहे, तें सांगा! चांगला खाता पिता माणूस आजाराचा बहाणा करूं लागल्यास म्हणतात.

रुचेल तें बोलावें,पचेल तें खावें—योग्य तें बोलावें व अजीर्ण होणार नाहीं, असें अन्नसेवन करावें.

रुचि आसा, जिर्वण ना—(गो.) चांगले चांगले पदार्थ आवडतात, पण ते खाल्ले कीं पचन मात्र होत नाहीं. कांहीं माणसांना लोभ पुष्कळ असतो; पण मिळालेलें आत्मसात करण्याची ताकद मात्र नसते.

रुची नेदी अन्न। ज्यांत नसतां लवण॥—तुगा ३५५०. मिठाशिवाय अन्नाला चव येत नाहीं.

रुचीक सोरो नि पतीक पसारो—(गो.) चवीसाठीं म्हणून इकडे दारू संपविली व मासला (वानगी) देऊन देऊन तिकडे दुकान रिकामें केलें.

रुंजी—रुंजी घालणें—भुंग्याप्रमाणें भोंवतीं फिरणें; एकसारखें घोळणें; पुन्हां पुन्हां येणें. 'अगदीं नवें नवें—न अनुभवलेलें, न पाहिलेलें असें कांहीं तरी आपल्या मनांत रुंजी घालीत आहे, असें तिला वाटे.'—कवठेकर, अपुरा डाव ४२.

रुजुवात—रुजुवाती घालणें—कबुली, मान्यता देणें. 'या कलमांवर हुसेननें रुजुवाती घालून मोर्तबेंहि केलीं आहेत.'—गजेंद्रमोक्ष १'४०.

रुजू---रुजू घालणें—ताडून पाहाणें; मान्य करणें. 'येखादें माहाराज साहेबाचें आज्ञापत्र व राजश्री कैलासवासी स्वामीचीं आज्ञापत्रें असतील ते रुजू घालून, हाली राजाज्ञेकडून सनद सादर आहे तेणेंप्रमाणें वर्तणूक करणें.' —पेद ३१.४४.

रुजू पडणें—मान्य होणें. रुजू होणें पहा. 'याउपरी रुजू पडणार नाहीं'—भात्रै ९.४.६६.

रुजू होणें—१ पटणें; मान्य होणें; पसंत पडणें. 'फाकूं नका रुजू जालिया वांचून। सांगाजी कोण धरती धण्या॥'—तुगा ३३६. २ भेटणें; नजर देणें; सन्मुख येणें; अंकित म्हणविणें. 'आम्हांस रुजू जाहले नाहींत.'—मराचि थोशा ३.

रुंड---एक घाव आणि दोन रुंडें (तुकडे)—एक घाव पहा.

रुंद---रूंद केल्यारि पिंदता, लांब केल्यारि मोडता—(गो.) रुंद करायला जावें तर फाटतें आणि लांब करायला जावें तर मोडतें. दुराराध्य माणसाची कशीच समजूत पटत नाहीं.

रुद्र---रुद्रावतार धारण करणें—शंकरानें उग्र स्वरूप धारण केलें म्हणजे तो रुद्रावतार म्हणतात. यावेळीं शंकर अतिशय रागावलेला असतो. यावरून, अतिशय रागावणें, संतापणें.

रुपया---रुपया मोडणें; रुपयाची मान मोडणें—रुपयाची मोड करणें, लहान नाणीं घेणें.

रुपें---रुपेरी डोळे करणें—मरणें. (मेल्यावर डोळे थिजून पांढरे दिसतात यावरून).

रुपेरी बेडी—चाकरी; नोकरी, सेवा; दास्य. 'या रुपेरी बेडींत विलक्षण जादू आहे हें खरें आहे.' —उग्र ३.१

रुप्याचे डोळे होणें—डोळे पांढरे होणें; मरणोन्मुख होणें.

रुप्याच्या तबकामाझारीं, एक नाहीं सुपारी—चांदीचें तबक असून त्यांत एकहि सुपारी नसणें. दिसावयास मोठें पण पोकळ.

रूमडा---रूमडां फोडल्यावर फुसकां भाया येतीत—(गो.) हलक्या गोष्टीपासून विशेषसा लाभ होत नसतो.

रुडी---रुडी पाळ शेळीक धांवता—(गो.) झाडाच्या मुळया पाणी असेल त्या भागाकडे वळतात. जिथें कांहीं लभ्य तिकडेच माणसें धांव घेतात.

रुमाल---रुमाल फिरविणें—(एका पक्षाच्या वरिष्ठानें लढाईत रुमाल फिरवला तर तो दुसऱ्या पक्षाच्या वरिष्ठास शरण गेला असें समजतात. यावरून रुमाल हें तहाचें निशाण बनलें होतें.) हल्ला (लढाई) थांबविण्याची सूचना देणें; इशारत देणें. "त्यावेळेस नबाब अंबारींतून खवासखान्यांत बसले होते, त्यांणीं रुमाल फिरविला." —पेब्र ६६.

रुमाली रस्ते—एकमेकांस काटकोनांत छेदणारे रस्ते. सरळ उभे आडवे रस्ते.

रूं---रूं नाशिल्ल्या पूं काडप—(गो.) गळूं झालेलें नसतांना पू काढणें. निर्धन माणसाकडे खटपट केली तर द्रव्यप्राप्ति कशी होणार ?

रूख---रूख घेणें—(ना.) तोंड देणें.

रूख न देणें—समोर बोलणें न करणें. 'आणि स्वामीकडील घोंडाजी अगर आम्हांसी रूख देत नाहीं." —पेद १०.७२.

रूख मिळविणें—(व.) मिळतें घेणें; सलोखा करणें.

रूख---रूख पळौन साल काड्ची—(गो.) वृक्ष पाहून त्याची साल काढावी. एखाद्याला लुबाडायचें तर त्याची कुवत पाहून लुबाडावें.

रूढि---शास्त्रात् रूढिर्बलीयसी—(सं.)रूढी ही शास्त्रापेक्षां अधिक मानतात.—टि. ४.१०.

रूढी ही पाऊलवाटेसारखी रुंद होत जाते—प्रथम रूढीचा व्यवहार संकुचित असतो. पण पुढें सुधारणा होत जाऊन व्यवहार आपोआप व्यापक बनतो. " 'रूढी ही पाऊल वाटेसारखी रुंद होत जाते,' या आपल्या उपदेशाप्रमाणें येथें कोंकणस्थ प्रभृति कांहीं द्राविडी ब्राम्हणांनीं आमच्याशीं प्रत्यक्ष अन्नादि संबंधाची रूढी ठेवण्यास सुरुवात केली त्याचेंच सुफल म्हणजे आमच्याशीं प्रत्यक्ष संबंध ठेवणारे शेंकडों द्राविड ब्राह्मण अनुकूल झाले." —न. चिं. केळकरकृत गतगोष्टींची पुरवणी (पत्रव्यवहार), पान २८०.

रूढी ही शास्त्राच्या पुढें धांवते—वर पहा.

रूढीचा फेरफार युगायुगीं अपरंपार--रूढीमध्यें कालपरत्वें फेरफार होत जातात.

रूप---**रूप करणें**—सांगणें; निरूपण करणें; वर्णन करणें. 'जरी प्रश्नेचेनि आथिलेपणें । श्रीगुरु सामर्थ्यां रूप कां म्हणें ।'–ज्ञा १०'१४.

रूप पालटणें--१ आकार बदलणें; निराळी आकृति घेणें; वेश बदलणें. 'असो वानररूप पालटोनि । अणुप्रमाण वेष धरोनि ।'—रावि १९.१०१. २ तोंडवळा, रंग, वर्ण, वेष, सोंग इ बदलणें; चेहरा बदलणें.

तूप पिऊन (लागलीच) आरशांत रूप पाहाणें--मागें पहा.

रूप होणें—एखाद्या कामाचा सुपरिणाम होणें, चीज होणें; श्रेय मिळणें; फलदायी होणें. 'जीव देऊन काम करूं द्या पण त्या कामाचें रूप व्हावयाचें नाहीं.'

रूपास येणें--आकार येणें; उत्पन्न होणें; नांवारूपास येणें; चांगल्या स्थितीप्रत येणें; चांगले गुण येऊं लागणें. 'कां इक्षुदंड गाळितां साचार । तयासि सायास लागती फार । शेवटीं रूपास येतां साखर । चवी खाणार जाणती ।'

***रूप दाविलें उंटानें, गाढवानें गाईलें गाणें**—उंटाचें रूप व गाढवाचें गाणें दोन्हीहि बेढब व कर्कश. तु०–अहो रूपमहो ध्वनिः ।

रूप राजाचें आणि करणें खाजदाराचें—दिसावयास सुंदर असून वागणूक भिकारडी असणें.

रूप राजाचें, नांदणूक कैकाड्याची--वरप्रमाणेंच.

रूप रोवें, भाग खावें--रूपवंतापेक्षां भाग्यवंत सुखी. (गु.) रुपनी रडे करमनी खाय.

रूपलावण्य हें तो ईश्वराधीन--रूपाची देणगी ही परमेश्वरी आहे.

रूपवती रडे आणि कर्मवती खाय--सौन्दर्य असून दुर्दैवी असल्यास मनुष्याचे फार हाल होतात. दैव अनुकूल असेल तर बाकी सर्व दोष लपले जातात.

रूपापेक्षां रुपयाकडे लक्ष्य अधिक—पुष्कळ हुंड्याकरितां किंवा पुढें सासऱ्याची दौलत मिळेल या आशेनें कुरूप मुलीशीं लग्न करणारास अनुलक्षून.

रुपुस्त---**रूपुस्ताचीं कामें**—पुढचीं मागचीं कामें.

रूळ---**रूळ फिरविणें**—एखाद्याचा सत्यनाश करणें.

(गाडी इ.) भलत्याच रुळावर नेणें—(इंग्रजी वाक्प्रचाराचा अनुवाद) अप्रस्तुत गोष्ट करणें; बगल देणें. ' प्रश्न भलत्या रूळावर नेऊं नकोस.'–सुदे २३३.

रुळावर लागणें—नीट रस्त्यावर येणें; मार्गाला लागणें.

रेंकणें---**रेंकत येणें**---(म्हैस एखाद्या पदार्थाची आशा धरून ओरडत येते त्याप्रमाणें) लालचीनें धांवत येणें.

रेंग---**रेंग रेंग करणें**—(व.) किरकिर करणें (विशेषतः तान्हा मुलाच्या बाबतींत म्हणतात.)

रेघ---**रेघ ओढून-काढून देणें**—नियम, शिस्त लावून देणें; वळण घालून देणें.

रेघ ओलांडणें—मर्यादा सोडणें.

रेघ न रेघ माहीत असणें—अगदीं खडानुखडा माहित असणें.

रेघ पुसणें—जुनी कल्पना, पायंडा बदलणें; नवीन विक्रम करणें; शर्तीं जिंकणें.

रेघ मारणें—१ खातेव्यवहार बंद करणें. २ पैज लावणें. काट मारणें पहा.

काढल्या रेघेनें-रेघेप्रमाणें चालणें-वागणें—ठरविल्याप्रमाणें चालणें; शिस्तीला धरून वागणें.

रेघेस येणें-चढणें—उत्कर्षास पोचणें; वैभवास चढणें.

रेंच---**रेंच उतरणें**—[रेंच = पाठींत, शरीराच्या गात्रांत येणारा ताठपणा.] १ पाठीच्या शिरा मोडून ती हलकी करणें. २ गर्वहरण करणें; खैरी मोडणें. ' मथिला कसा उतरिता रिपुचा काकुत्स्थवीरसा रेंच । '–मोभीष्म १.१६. ' विस्तर असो तयाचा उतरी शिर हरुनि शौरिसुतरेंच ॥ '–मोसभा २.२९. रेंच मोडणें पहा.

रेंच मोडणें—रग जिरविणें. ' सरकार व नबाब यांनीं टिपूची कुमक करून इंग्रजांचा रेंच मोडावा.'–पया१७९. ' कछव्याचा रेंच मोडून थंड केले.'–पेद २१.७७. ' श्रीमंताचे प्रतापे त्यांचा कांहीं रेंच मोडला तर उत्तम झाले.'–पेद ६. १६५.

रेटा——**दिवस गेला रेटारेटीं आणि दिवे लावून कापूस वेटी**—दिवस पहा.

रेडा——**रेड्यावर पाऊस**—खिसगणतींत नसणें. (ह्मशीवर पाऊस पहा.) ' श्रवणांजलीपुटपेय अशा त्याच्या वाचामृताचें त्यानें मला जबरदस्तीनें पान करविलें, मीहि हृदय कठीण करून शांत रीतीनें सर्व कांहीं ऐकत राहिलों, जणूं रेड्यावर पाऊस.'-काका कालेलकर, 'हिमालयांतील प्रवास,' पान १६३.

***चढणीस घोडा, रेवणीस रेडा**—डोंगरावर चढण्यास घोडा उत्तम व उतरण्यास रेडा चांगला. उतरण पहा.

रेडा गाभणा, तर नव्वा महिना—बैल गाभणा पहा.—पामो ६४६.

रेडा तो रेडा, धारभर तरी ओढा; रेडा रेडा, ह्मणे थोडी धार काढा—रेड्याचे स्तन कितीहि ओढले तरी तो दूध थोडेंच देणार आहे.

रेडा ह्मणत असतो कीं मी दसऱ्यांतून वांचेन तर दिवाळीचा दिवा पाहीन—दसरा पहा. प्राप्त झालेल्या संकटांतून जर वांचलों तर पुढें चांगले दिवस पाहाण्याची गोष्ट.

रेडा रुसला तेल्यावरी, कोरडा खातो पाठीवरी—रेडा तेल्यावर रागावला तर उलट त्यालाच मार मिळतो.

रेडा रुसला तेल्यावरी, तेथें कोण निवाडा करी—रेड्यास तेल्यावर रागवून काय उपयोग ? त्याचें कोणी ऐकणार नाहीं व शेवटीं मार खाण्याची पाळी येणार. चाकरानें मालकावर रुसून उपयोग होत नाहीं; त्यांत शेवटीं त्याचेंच नुकसान होतें.

रेडा रुसला तेल्यावरी, त्याची कोण करील भरोवरी—वरपहा.

रेडेपाडे झगडतत नी झाडांपेडांर काळ—(गो.) रेडा आणि बैल यांची झुंज आणि जवळच्या झाडांवर संक्रांत. मोठ्या माणसांच्या भांडणांत गरीब लोक मरायचे.

रेड्या गांडीकडेन किनरी—(गो.) रेड्याच्या ढुंगणापाशीं अलगूज वाजविल्याप्रमाणें. ज्याला गाण्याची गोडी नाहीं त्याच्या पुढें गाण्यांत काय मजा ! ज्यांना अक्कल नाहीं त्यांना उपदेश करण्यांत तरी काय अर्थ ? गाढवाला गुळाची चव काय ?

रेड्याऽगांडी भरावे खोडो थोडो जाल्यार आनीक भरा—(गो.) निलाजऱ्याला कितीहि लाजविलें तरी तो निगरगट्टच.

रेड्या पाड्यांचें झुंज नि झाडांचें (झाडांमाडास) मरण (झाडांमुळांचें कंदन)—मोठ्याच्या रणधुमाळींत लहानांचा निःपात होतो. वर पहा.

रेड्या फाटीर पावस पडता, रेडो म्हणता व्हडु्ड-वाड्डिका जाता—(गो.) रेड्याच्या पाठीवर पाऊस पडतो आणि रेडा म्हणतो, किती चांगलें होतें !' दुःखांत सुख मानून घेण्याची प्रवृत्ति. रेड्याच्या पाठीवर पाऊस कितीहि पडला तरी त्याचें त्याला कांहींच वाटत नाहीं. तसेंच ताकदवान माणसाला असें तसें कांहीं बाधत नाहीं.

रेड्याचें जोत आणि बायकांचें गोत—वागवणें कठीण.

रेड्याच्या कानीं किनरी वाजविली तरी तो आपली डुरंय सोडीत नाहीं—वर पहा.

रेड्यार पावस पट्टा—(गो.)रेड्याच्या पाठीवर पाऊस पण त्याचा उपयोग काय ? कांहीं वेळां चांगल्या गोष्टींचा मूर्खां कारणीं उगीच व्यय होतो. रेड्याच्या पाठीवर पाऊस. पहा.

रेड्याला सांगितलें ज्ञान, रेडा हागतोय पाटीभर ह्याण—मूर्खाला उपदेश केल्यापासून कांहीं फायदा नाहीं.

रेंद——**रेंदेन्निचा सोरो रेंदेन्निक भल्लो**—(गो.) भंडारणीची दारू भंडारणीच्याच अंगावर आली. ज्याचीं बोटें त्याच्या डोळ्यांत अशा अर्थानें वापरतात;

रेंदेन्निलो सॉरॉ रेंदेन्नी मार्ता—(गो.)भंडारणीची माडीची दारू तिलाच मारते. ज्याचे दांत त्याच्याच घशांत पडणें.

रेव——**रेविंरि बांधिल्लें रावळार**—(गो.) वाळूंत बांधलेलें देऊळ. एखाद्या कार्याचा पाया कच्चा असणें.

रेवें हंचो विणप; रेवेंचो राजू वळप—(गो.)वाळूपासून दोर, तेल काढणें. अशक्य गोष्ट करूं पाहाणें.

रेवेंरी मुतिलें गादि—(गो.) वाळूंत लघुशंका करणें. ती कितीहि केली तरी आंतल्या आंत जिरून जायची. कांहीं माणसेंहि अशीं असतात कीं त्यांच्यावर कोणीं कितीहि उपकार केले तरी त्यांच्या तोंडून कृतज्ञता व्यक्त होत नाहीं. म्हं०—वाळूंत मुतलें, फेंस ना पाणी.

रेवडी——रेवडी उडणें-होणें; रेवड्या वळणें——फाजिती होणें. 'धरली बेदरची वाट, रेवडी झाली,' —ऐपो २३७.

रेवडी उडविणें-वळविणें—फजिती करणें; टर उडविणें. हुरेंवडी उडविणें पहा.

रेवण——चढणीस घोडा, रेवणीस रेडा—[रेवण =दलदलीची किंवा भुसभुशीत जागा] चढण पहा.

रेशीम——रेशमाची गांठ; रेशीमगांठ——१ कधीं न तुटणारा, सुटणारा संबंध (नवराबायको, जिवाशिव, इ. मधील). २ सुखाचा संबंध. 'जगन्निवासा कां अंतरलों रेशिमगांठिला,'—ऐपो ४१०.

रेशमी जोडा कांखेंत घेणें—चांगली वस्तु असली म्हणजे ती जपून वापरावी.

रेषा—रेघ पहा. **रेषा उपटणें-उमटणें**—मनुष्याच्या हातावर त्याच्या भाग्यानुसार रेषा दिसूं लागतात व त्यावरून हस्तसामुद्रिक पाहातात. यावरून दैव उघडणें; भाग्य प्राप्त होणें; लाभ होणें. 'शाहू महाराजांची कृपा म्हणण्यापेक्षां त्यांच्या दैवाची रेषा उमटून ते राज्यलक्ष्मीचा उपभोग घेऊं लागले म्हटलें तरी चालेल.'—मराठ्यांचे पराक्रम.

रेस——रेसभर—[रेस=एक आण्याचा पंचविसावा भाग.] किंचितहि; अणुमात्र. 'एक रेसभरहि मी इथून हालणार नाहीं.'—स्वप १८८.

रोकड——रोकड गांठीं, इजत मोठी—(महानु.) जवळ पुष्कळ पैसा असल्यावर मोठा मान, अब्रू साहजिकच असते.

रोकड व्यवहार श्रीमंतीचा, उधार व्यवहार अधोगतीचा——रोखीचा व्यवहार केल्यास लाभ होतो व उधारीचा व्यवहार केल्यास नुकसानकारक होतो.

रोकड्याचें ताती आनी उदारा कोंबी—(गो.) रोखीनें आणणाऱ्याला अंडें आणि उधारीनें आणणाऱ्याला कोंबडी. दुकानदाराकडे उधारी करून आपली चैन चालवणाऱ्या माणसाला म्हणतात.

रोख—रोख घ्यावें द्यावें, खातें न ठेवावें—नेहमीं रोख व्यवहार करावा, उधारीवर करूं नये.

रोख भाई ठोक—रोखीचा व्यवहार करावा. -गांगा. २२२.

रोखठोक देणें, नकटीशीं जाणें—रोखीने व्यवहार केल्यावर मग हलक्या प्रतीचा माल कां ?

रोखठोक, भवानी चोख—सकाळीं रोखीचा व्यवहार करावा म्हणजे तो सर्व दिवस लाभदायक होतो.

रोखीचें तोंड उजळें, उधारीचें तोंड काळें——रोखीचा व्यवहार फायदेशीर व उधारीचा नुकसानकारक असतो.

रोखीशिवाय खरेदी, तीच व्यापाऱ्याची मंदी——उधारीनें खरेदी करावयाची वेळ आली तर व्यापार चालविणें कठिण.

रोग——रोग पोटांत व औषध डोळयांत——रोग एका जागीं तर औषध भलत्याच जागीं; मग गुण कसा येणार,—केसरी २८-२-४१. तु०—डोळयांत केर कानांत फुंकर.

रोग मसाला, विटल वरण——(व.) नेहमीं रोगट असल्यामुळें त्याचे हातून चांगलें काम होऊं शकत नाहीं. विटलेलें वरण जसें खाण्याला निरुपयोगी तसा तो कामाला निरुपयोगी. 'मला बायको सांपडली आहे, रोग मसाला न् विटलं वरण! सदा आजारी असते.'

रोग, शत्रु आणि ऋण यांची उपेक्षा केली तर अधिक बळावून प्राणनाश करतात—अर्थ उघड आहे. —सुरतसुधन्वा २३.

रोगाचें घर निरुद्योग, मृत्यूचें घर रोग—मनुष्य निरुद्योगी बसला म्हणजे तो रोगी होतो व रोगामुळें पुढें त्यास मृत्यु येतो.

रोगी मेल्यावरी, वैद्य आला घरीं——वराती मागून घोडें.

रोगी वैद्याचें औषध, मोडक्या शस्त्राचें युद्ध——जो वैद्य स्वतःच रोगी असतो तो दुसऱ्यास काय बरें करणार. तसेंच मोडक्या शस्त्रांनीं युद्ध कसें होणार? तुटक्या शस्त्रांनीं युद्ध होऊं शकत नाहीं त्याप्रमाणें स्वतः रोगी असलेल्या वैद्यांकडून दुसऱ्याचा रोग बरा होणें शक्य नाहीं.

रोगीयास द्यावा औषधी: दरिद्रीयांस द्यावा निधि:——(महानु.) रोग्यास औषध दिल्यास तो बरा होईल व दरिद्री माणसास पैसा दिल्यास तो सुखी होईल. तेव्हां योग्य तीच गोष्ट दिली पाहिजे. तु०—दान दारिद्र्याः औषधी रोगीया.

रोग्याला कुपथ्याची चाड---बहुतेक रोगी मनुष्याला अपथ्यकर पदार्थ आवडतात.

रोज---रोज भाकरी, पुरणपोळी सणावारीं---रोज साधें जेवण जेवावें व सणावारी मिष्ठान्न करावें. त्याप्रमाणें नेहमीं साधी राहाणी ठेवावी व प्रसंगानें जरा छानछोकी करावी.

रोज मरे त्याला कोण रडे---तीच तीच गोष्ट वारंवार होऊं लागली म्हणजे तिच्यांतलें स्वारस्य जाऊन तिजकडे दुर्लक्ष होतें. नित्य मरे० पहा.--कवठेकर, अपुराडाव १४४.

रोजगार---रोजगारांत कर्ज आणि तारुण्यांत व्याधि, मग सुख तें लागावें कधीं---धंद्यांत जर कर्ज होऊं लागलें व तरुणपणीं व्याधि जडली तर आयुष्य सुखांत जाणें शक्य नाहीं.

रोटी---रोटी मागणें---(महानु.) घांसदाणा मागणें. एक कर. 'रोटी मागे सातें पातळीं।'--शिशु **१६२.**

रोटीव्यवहार---एकमेकांकडे अन्नव्यवहार करणें, जेवणें. याच्या जोडीला बेटी व्यवहार हा शब्द येत असतो.

रोट्टी मोण्णु तुपांत पळ्ळी---(गो.) पोळीचा तुकडा मोडला पण तो तुपांत पडला. इष्टापत्ति.

रोटी खाना शकरसें, दुनिया खेचना मकरसें---(हिं.) चांगलें मिष्ठान्न खावें व युक्तीनें लोकांस वश करावें.

रोडका---रोडका पण राग फार---बहुधा अशक्त मनुष्य रागीट असतो.

रोडक्याचें चित्त मडक्यांत---अशक्त मनुष्याचें नेहमीं खाण्याकडे लक्ष्य असतें. कारण तो बहुधा रिकामा असतो. त्यास कोठें बाहेर जावेसें वाटत नाहीं म्हणून खा खा करीत असतो.

रोता---रोती सुरत करणें---[रोती सुरत=रडवी मुद्रा; दुःखी चेहरा] रडवें तोंड करणें. दुःखी म्लान दिसणें. 'मारे फौजा गोळा करून शहाजीशीं झटपट खातांखातां हात टेकीला आलांत आणि बसलां आहांत रोती सुरत करून.'--शिसं ३.४,

रोता जावे मूयकी खबर लावे---(हिं.) रडत गेलेला मरणाचीच बातमी आणतो. रडका पहा.

मिया, रोते क्यौं ? सूरतहि वैसी---रडतोस कां तर म्हणे चेहराच तसा ! कांहीं लोक नेहमीं दुर्मुखलेले असतात.

रोंभा---रोंभ्यांत पडणें---बांधा पडणें; रेंगाळणें.

रोम---रोम एका दिवसांत बांधलें गेलें नाहीं---Rome was not built in a day याचा अनुवाद. कोणतीहि गोष्ट तडीस जाण्याला विशिष्ट अवधि लागतो. त्यासाठीं घाई करून उपयोगी नाहीं. 'पी हळद हो गोरी' अशी अवस्था घातक ठरते.

रोस---रोस पुनपोळी एक जाता, द्रोणो वाऱ्यार पडता---(गो.) रस आणि आणि पुरणाची पोळी एक होतात आणि द्रोण वाऱ्यानें उडून जातो. लाग्याबांध्यांचीं माणसें भांडलीं तरी पुन्हां एक होतात आणि कलागती लावणारा माणूस मात्र दूर फेंकला जातो.

रोहिणी---रोहिणीचा मंडप---रोहिणी नक्षत्रांत आकाश अभ्राच्छादित असणें.

रोहिणीचें जळ---मृगजल. 'विषय असत्य रोहिणीचें जळ।'--ब्र १५७.

***रोहिणी डाजे मृग गाजे आर्द्रा वाहे पूर, सहदेव कहे भाडळी घर घर वाजे तूर**---रोहिणींत (हें नक्षत्र असतें. तेव्हां) उकाडा झाला, मृगांत मेघगर्जना झाली व आर्द्रा नक्षत्रांत पूर आले तर सहदेव भाडळीस म्हणतो कीं, घरोघरीं आनंदानें नगारे वाजूं लागतील; म्हणजे त्याकाळीं पीक चांगलें होईल.

रोहिणींचा वाफा, पहिला मुलगा बापा---पाहिला मुलगा संसाराच्या कामांत जसा बापाला लवकर उपयोगी पडतो, तसा रोहिणी नक्षत्राच्या पावसानें तयार झालेला वाफा लवकर पिकास येऊन शेतकऱ्याच्या उपयोगाला येतो.

रोहिणीनें गाळलें अंडें, मृगानें झाडली पाठ, तर पाऊस गेला दिवस तीनशें साठ---रोहिणी आणि मृग नक्षत्रें कोरडीं गेलीं तर दुष्काळ ठेवलेला.

ल

लई——लई वटवट, अन् खाई मटमट—वस्तूचा उपभोग घ्यायचा पण तसें करतांना उगाचच त्या वस्तूला नांवें ठेवायचीं.

लकडा——लकडा लावणें—१ टुमणें लावणें, तगादा, निकड लावणें; नेट लावणें. २ स्वस्थ बसूं न देणें; कांहीं सुचूं न देणें.

लकडी——लकडी दाखविल्याशिवाय–लकडी-वांचून मकडी वळत नाहीं–वठणीस येत नाहीं— धाक दाखविल्याशिवाय कोणी ऐकत नाहीं. मूर्ख मनुष्य मारावांचून वठणीवर येत नाहीं. आक्रमक वृत्ति शिवाय कार्यभाग साधत नाहीं–पामो. ५०

लकडी बिगर मकडी नहीं वठणी आती—(हिं.) वर पहा.

लकडीके बल मकडी नाचे—काठीच्या धाकानें माकड सांगावें तसें नाचतें. वरील म्हण पहा.

लकतर——लकतर, लकतऱ्या गाळणें—फाटकीं वस्त्रें वापरणें. गरिबीची स्थिति.

लंका–दारूची लंका—शोभेच्या दारुचें राक्षस, वानरें, हनुमान इ. असलेलें दारूकाम. रामानें दसऱ्याच्या मुहूर्तानें रावण मारून लंका लुटली याचें स्मृतिदर्शक म्हणून उत्तर हिंदुस्थानांत सिलंगणाच्या वेळेस किंवा दिवाळींत असें दारूकाम करतात. 'कोटेवाला राजा दारूची लंका चार दिवस शहरा बाहेर करुन'–पेब १३१'

लंकादाण——लंकादहन. आक्रसताळेपणा.–कवठेकर.

लंका पेटविणें–जाळणें——शोभेची दारू उडविणें. मारुतीनें लंका जाळली त्यावरून राक्षस, वानर इत्यादी आकाराच्या दारुचे गोळे उडविणें; पेटविणें; आतषबाजी करणें.

लंका लान——(व.) [लान=लांब दूर.] लंका बेट हें एका अतिशय दूरच्या ठिकाणचें प्रतीक घेतलें. ज्या घटनेची अद्याप नीट कल्पनाहि करतां येत नाहीं तिची 'लंका लान' आहे म्हणण्याचा प्रघात आहे. 'आतां तर म्याट्रिकची परीक्षा पास झालास आणि वकीलीच्या परिक्षेच्या गप्पा मारतोस; वकीलीच्या परीक्षेची लंका लान आहे.' तु०—देहली तो बहोत दूर है.

लंका लुटणें——लंकेंत अतिशय संपत्ति आहे अशी समजूत आहे त्यावरून अवाढव्य संपत्ति मिळणें. अतिशय द्रव्य मिळवून आणणें.

लंका होणें——सौंदर्यवान, सालंकृत होणें; अंगावर खूप दागिने घालणें; सोन्यानें मढणें. याच्या उलट लंकेची पार्वती.

लंकेची पार्वती——(लंकेला जाऊनहि शिवपत्नी पार्वती अलंकाररहितच राहिली यावरून) १ अलंकाररहित उंच आणि कृश शरिराची स्त्री; सामान्यतः मुळींच दागिने न घातलेली स्त्री. २ न सजविलेला किंवा खोगीर वगैरे न घातलेला उघड्या पाठीचा घोडा.

लंकेंत जन्मले तितके राक्षसच—(व.) वाईट कुळांत चांगलीं माणसें जन्मणें शक्य नाहीं या अर्थी. दुष्ट भूमीमध्यें सज्जन निर्माण होणें शक्य नसतें.

लंकेंत–लंकेंत सोन्याच्या विटा—लंकेंत पुष्कळ सोनें असलें तरी खर्चहि पुष्कळ. तेव्हां त्याचा आपणांस काय उपयोग ? मिळकतीप्रमाणें खर्चहि जास्त या अर्थानें वापरतात. [लंकेंत एका हजामतीला एक सोन्याची वीट मिळते असें ऐकल्यावरून खूप श्रीमंत होण्यासाठीं एक न्हावी लंकेला गेला. तेथें त्याला हजामतीसाठीं सोन्याच्या विटा मिळूं लागल्या खऱ्या; पण किरकोळ सामानासाठींहि विटाच खर्चाव्या लागत. तेव्हां जास्त मिळकत तसा जास्त खर्च होऊं लागून सांपत्तिक स्थिति पूर्वीचीच.] २ 'अति-परिचयात् अवज्ञा' याअर्थी. लंकेंत सोन्याला मोठीशी किंमत नाहीं. 'शहाबादी शिळांचा कोणत्या कामा करतां उपयोग करावयाचा यासंबंधीं मलखेडच्या रहिवाश्यांचा विवेक सुटल्या सारखा भासला. घरावरील आच्छादन, याच शिळांचें, घरांना कुसवाच्या भिंती याच शिळांच्या, शेतांना कुंपणें याच शिळांचीं व सबंध घरच्या घर केवळ याच शिळांचें बनविलेलें, लंकेंत न्हाव्याला हजामती-बद्दल द्यावयाचें नाणें म्हणजे सोन्याच्या विटा व पायखा-न्यास लावावयासहि सोन्याच्याच विटा ! '–केसरी १३–३–४२

लंकेंतु उबजलेले सगळे रावण न्हयिं—(गो.) लंकेंत जन्मलेले सगळेच कांहीं रावण नव्हेत. एखादी व्यक्ति दुर्जन झाली म्हणून तें कुटुंब किंवा ती जात दुर्जन असत नाहीं.

लंकेंतु भांग्राक मोल ना—(गो.) लंकेंत सोन्याला किंमत नाहीं. एखादी वस्तू जिथें मुबलक असते तिथें तिला विशेषशी किंमत नसते.

लक——लक भावडी, कट्टा–ड्डा उजो—(गो.) नसता खर्च करून ऐट मारणें; ऋण काढून सण साजरा करणें.--आनंद डिसेंबर १९१७.

लखोटा——लखोटा फुटणें—लखोटयांत पत्र असतें. तेव्हां बंद लखोटा फोडल्यावर आंतील बातमी कळते.यावरून ज्ञात होणें; स्पष्ट होणें. 'माझ्या भावी आयुष्य-क्रमाचा लखोटा अजून फुटावयाचा आहे !'–उग्र १.१.

लग——लगीं असणें—वग असणें; संबंध असणें; लागू असणें; वळणांत असणें.

***काम लगीनें होतें किंवा वगीनें होतें**—एखाद्याशीं आप्त--स्नेहसंबंध असेल किंवा त्याच्याकडे वशिला असेल तर आपलें काम झटदिशीं होतें.

लगट--ड——लगट करणें—(वाईट अर्थी) जवळ जाणें; अंगाशीं अंग लावणें. संबंध जोडूं पाहणें; संघटन करण्याचा प्रयत्न करणें.

लगडेस लागणें—लगट करणें; लगटणें. 'जेथें नसे आदर नारदाचा । कदापि या योगविशारदाचा । अद्यापि जेथें शुक बैसला गे । हा विप्र कोणे लगडेस लागे ?॥' ——सारुह ६.९८.

लंगडा——लंगडशादी, पायांत वादी—(हा एक प्रकारचा खेळ आहे.) एक पाय वर उचलून व तो बांधून दुसऱ्या एकाच पायावर उडत चालणें.

लंगडच्या लंगडं अन् गांवखोरी पण चरेना; लंगडा (–डी–डें) तो (–ती–तें) लंगडा(–डी–डें) पण गांवखरीं (–दरीला–धरिनें–गांवाशेजारीं) चरत नाहीं.—जनावर लंगडें आहे पण गांवाशेजारीं कांहीं चरणार नाहीं;त्याला गांवापासून दूर जाण्याची इच्छा फार.शक्तीपेक्षां इच्छा, आकांक्षा अधिक.

लंगडी गाय गांवकुशीं चरेना——वरील प्रमाणेंच.

लंगडेने चोर पकडा,दवडे मिया अंधे—(हिं.)लंगड्याला चोर पकडतां येणें अशक्य आणि अंधळ्याला तर धांवता येणें त्याहिपेक्षां अशक्यच. यावरून अशक्य गोष्ट घडली असें सांगणें.

म्हणी २...५८

वासरांत लंगडी गाय शहाणी; लंगड्या गाईंत वासरूं प्रधान—सर्व दुर्बल असले म्हणजे त्यांत जो थोडा सबल सज्ञानी असतो तो श्रेष्ठ,सत्ताधारी होतो. तु०–अंधळ्यांत काणा राजा.

लगना——लगा दूरसे देनेकू,साथहि बैठी खानेकू—(हिं.) भिकाऱ्याला दुरून द्यावयास लागला असतां तो पानाशेजारींच बसून खाऊं लागला.एखाद्यावर उपकार करूं गेल्यास तो शेफारतो. नीच मनुष्यास आश्रय दिल्यास ते फारच लगट करूं पाहतात.

लंगर——लंगर तोडणें—(माण.)जत्रेंत खंडोबापुढें वाघ्या इ. उपासकानें लोखंडी सांखळी तोडणें. वाघ्या व मुरळी हे दोन खंडोबाचे वाहिलेले भक्त म्हणून प्रसिद्ध आहेत. खंडोबाचे नवरात्राचे दिवसांत विशेषें करून यांच्या अंगांत येतें.व त्यावेळीं, जमिनींत मेख रोवून त्या मेखेला बांधून आधींच तयार ठेवलेली लोखंडी सांखळी हे एका हिसक्यांत तोडतात.

लंगरी काम——अवाढव्य, बेडौल माणूस; लोठया; लडदू.

लगाम——लगाम घालणें—आळा घालणें; नियंत्रित करणें; बंधन घालणें; आटोक्यांत ठेवणें.

लगामीं असणें–राहाणें—आधीन असणें; ताब्यांत असणें. 'हा जन तुमच्याचि असे इतरा कोण्हाचियाहि न लगामीं ?'–मोवन ४.६६. 'पहिल्यापासून राखिलें असतें तर सर्वही आपआपला कारभार करून लगामीं राहतें. '–ऐले१.९१. 'सरदार मात्र लगामीं असावे. मग किरकोळाशीं काय करणें.'–इ.सं.ऐ टि. ४.२०.

लगामीं लागणें—नादीं लागणें; कच्छपीं लागणें; तंत्रानें चालणें; अनुकूल होणें. 'तो मात्र लगामीं लागेल.' –भाब २४.

लगामीं लावणें—वश करणें; दिमतीस लावणें; आपल्या बाजूचें करणें; अनकुल करून घेणें; कामीं लावणें. 'तुम्ही तिकडील जे जमीनदार वगैरे असतील ते सर्व आपले लगामी लावून, त्यांजपासून आबदालीचा अंमल तिकडे होऊं न पावे ऐसें करणें.'–ऐ. टि. भा. २. ले. ३३. 'कोणी येतील याचा समाचार कोरडा घेतला असतां सहजांत महत्त्व व येत येत स्नेहानें वळणांत लगामी लाऊन घेतल्यासारखे लागतात.'–बापूगोप १०.

घोडें एकाचें, लगाम भलत्याचा—एक याचें, एक त्याचें असें करून कार्यांची उभारणी करणें. विसंगति; विजोड. —केसरी. ९-१-४२.

लगामाला मागें, दाण्याला पुढें—खाण्याला आधीं आणि कामाला कधीं मधीं ! एखादा कामचुकार असला म्हणजे तो कामाला चुकारपणा करतो; पण खाण्याच्या वस्तु दिसल्या कीं तो सर्वांच्या आधीं पुढें होतो.

लंगोटी—-लंगोटीचा पदर पसरणें—-एखाद्यास तुझ्याजवळ माझें कांहींच काम नाहीं असें अत्यंत तुच्छतेनें व तिरस्कारपणानें दर्शविणें.

सर्वांशीं गांठ पडावी पण लंगोटीयाराशीं गांठ पडूं नये—लंगोटीयाराला आपली सर्व प्रकारची माहिती असते. इतरांशीं गांठ पडली, तरी कसें तरी निभावून नेतां येतें, पण ज्याला आपली इत्थंभूत माहिती आहे त्याचेपुढें पडच खावी लागतें; म्हणून लंगोटीयाराशीं (वादविवाद प्रसंगीं) गांठ पडूं नये. तु.–ओळखीचा चोर जीवें न सोडी.

लग्न—-लग्न काढणें—लग्नाचें योजणें. 'जसें तसें केवळ लग्न काढी ।'—सारुह ३.३०.

लग्नगंडांत—कर्क-सिंह, वृश्चिक-धनु व मीन-मेष या लग्नांच्या संधीची एक घटका. जसें—कर्काची शेवटची अर्धी व सिंहाची पहिली अर्धी मिळून एक.

लग्न घटिका खोळंबणें—अगदीं अडचणीची वेळ, आणिबाणीचा प्रसंग असणें. (लग्नाचा मुहूर्त साधलाच पाहिजे तेव्हां त्यासाठीं कांहीं एक गोष्टीचा खोळंबा असणें.)

लग्न नाहणें—विवाहविधींत सांगितलेलीं नहाणीं व दुसरे संस्कार करुन घेणें.

लग्ना ऽ माडवा ऽ पोंदच्यान वंचप—(गो.) लग्न झालें नाहीं तरी लग्नाच्या मांडवाखालून जाणें. एखादें कार्य प्रत्यक्ष आपल्या हातुन झालेलें नसलें तरी तें कसें होत असेल, त्याचीं साधनें काय इत्यादि संबंधीची कल्पना करणें.

लग्न आलें घरीं, मग मांडवाची तयारी—आधीं केवळ आळसांत दिवस घालविलें आणि लग्नाचे वेळीं वर वधूच्या घरीं आल्यानंतर वधूच्या घरीं मांडव घालण्याची तयारी केली. अदूरदर्शित्व व आळस. तु०—तहान लागल्यावर आड खांदणें.

लग्न करणार कधीं तर बायको आण आधीं—एखाद्याला सहज सहानुभूतीनें एखादी गोष्ट विचारावी तरी त्यानें उलट आपल्या गळ्यांत पडण्याचा प्रयत्न करावा. तु०—भटो लग्न कां कराना तर तुम्हीच कां व्हाना.

लग्न करुन पाहावें व घर बांधून पाहावें—(अनुभवासाठीं). लग्न जमविल्यानंतर लग्नांतल्या गोंधळाचा व लग्नासाठीं लागणाऱ्या खर्चाचा आधीं अंदाज केला तर नक्की अंदाजापेक्षां जास्त कांहीं तरी जास्त खर्च होतोच व गोंधळहि जास्त होतोच. तीच तऱ्हा घर बांधण्याची. 'लग्न पाहावें करून, घर पाहावें बांधून, आणि टांगा पाहावा ठरवून.'—

लग्न केलें दवडीनें (घाईनें), रडत बसले सवडीनें (सोयीनें)—घाईघाईनें लग्न केलें तर पुढें पश्चात्ताप करण्याची पाळी येते. पुढील इंग्रजी म्हणीचा पर्याय—Marry in haste and repent at leisure.

लग्न केलें नाहीं पण मांडवाखालून तर गेलों असेन—-प्रत्यक्ष माझें लग्न झालें नाहीं म्हणून का मला अशा सोहळ्याचा अनुभव नाहीं ? स्वतःला नसला तरी दुसऱ्याला येणारा अनुभव मनुष्य जाणतो. (गो.) लग्न जालें ना म्हूण माटवा पोंदसून गेलो ना ?

लग्न केल्याशिवाय पिशे वचना, पिशे गेल्याशिवाय लग्न जाईना—-(गो.) लग्न झाल्यावांचून वेड जाणार नाहीं आणि वेड गेल्यावांचून लग्न व्हायचें नाहीं. चक्रापत्ति म्हणतात ती हीच.

लग्न म्हणतें करून पाहा आणि घर म्हणतें बांधून पाहा—लग्न करून पाहावें० पहा.

लग्नय ना नी फोंतूय ना—(गो.) [पोत=तुंबडी] एका माणसानें आपला मेद झडवण्यासाठीं पोत घेतली होती. त्यामुळें त्याचें लग्न होईना. म्हणून त्यानें पोत सोडून टाकली. पण पुढें असें झालें कीं, लग्न तर झालें नाहींच आणि पोत मात्र सुटून गेली.

लग्ना सांगल्यार गर्भदाना पावत्—(गो.) लग्नाला बोलावलें तर गर्भाधानाच्या वेळीं पोचेल. उशीरां येणाऱ्या व्यक्तीला उद्देशून म्हणतात.

लग्नाक हाळ्ळलो तांदूळ शेंसेक खरचलो—-(गो.) लग्नाला आणलेला तांदूळ शेंस भरायला संपून गेला. (गोमंतकाच्या बाजूला सुवासिनी स्त्रीला कुंकू लावून त्यावर तांदूळ चिकटवायचे अशी पद्धत आहे.)

लग्नाची घाई, रिकामी खाई—कोणतेंहि जबाबदारीचें अगर लग्नासारखें जन्माचें काम करायचें असतां गडबडगुंडा केला तर कारण नसतांना दुःखांत होरपळत बसण्याची पाळी येतें.--पाआमा.५।६. वर पहा.

लग्नाची झाली तयारी पण विहिणीला ठिकाण नाहीं—कशास कांहीं ठिकाण नसतां एखादें कार्य करण्याची गडबड करणें.

लग्नाची पोळी आणि आयुष्याची होळी--लग्नासाठीं अव्वाच्या सव्वा खर्च केला असतां काय स्थिति होते हें व्यक्त केलें आहे.

लग्नाचे पाठीशीं आणा—विवाह केला म्हणजे संसारास सुरुवात होते व मग बायको ही जिन्नस आणा, ती जिन्नस आणा, असा रोज मागें लकडा लावते. याप्रमाणें लग्नाबरोबर मागें आणण्याचा लकडा लागतो.

लग्नाच्या अटी, हजाराच्या गोष्टी—-लग्न जमावावयाचें असलें म्हणजे वरपक्ष वाटेल त्या अटी घालूं लागतो व हजाराशिवाय गोष्ट काढीत नाहीं.

लग्नाच्या व्यवहारीं, मुलीची मागणी माहेरीं--लग्न करावयाचें असलें तर मुलीच्या माहेरीं जाऊन तिची मागणी करावी लागते. जी वस्तु प्राप्त करून घ्यावयाची असेल त्याठिकाणीं गेलें तरच ती प्राप्त होते.

लग्नांत विघ्न--दुधांत मिठाचा खडा; आनंदाचा विरस. लग्नासारखा आनंदी आनंद समारंभ चालूं आहे आणि अशावेळीं अचानक अपघात, अपमृत्यु, उत्पात इत्यादि उद्भवणें.

लग्नामध्यें खरचण्यापेक्षां नाचणें फार—कांहीं कांहीं कार्यांत त्याच्या मुख्य गोष्टीसाठीं लागणाऱ्या श्रमापेक्षां व खर्चापेक्षां त्याच्या तदंगभूत कार्यांतच श्रम व खर्च अधिक खर्ची पडतात. लग्नामध्यें पैशाच्या खर्चापेक्षां इकडेतिकडे भटकण्याचेंच काम फार असतें.

लग्नाला गेली आणि बारशाला आली--कांहीं माणसें अति चिकट आणि रेंगाळणारी असतात यावरून. लग्नानंतर, त्याच वधूवरांना मूल होण्याला निदान एक वर्षाचा तरी अवधी खास लागणारच; म्हणजे एखादी रेंगाळणारी बाई जर लग्नाला गेली, तर त्या वधूवरांच्या मुलाचें बारसें उरकून परत येईल. म्हणजे तिला परत यायला वर्ष सव्वा वर्ष तरी लागणारच. तु०-(जेवणाला) बापाबरोबर बसला, आणि आईबरोबर उठला.

लग्नला आले वऱ्हाडी, आणि म्हातारा दम काढी—म्हातारा अगदीं मरायला टेकला आहे. अशाच वेळीं घरीं लग्न उभारलें असलें आणि त्यांतहि वऱ्हाडी मंडळी आली असली, म्हणजे त्याच्या मृत्यूनें कार्यांत विघ्न नको, या भीतीनें म्हणतात.

लग्नाला वीस व वाजंत्र्याला तीस--प्रधान कार्यापेक्षां गौण कार्यासाठीं खर्च जास्त करण्यावरून. सबंध लग्नाला वीसच रुपये खर्च करणें आणि केवळ वाजंत्र्यासाठीं मात्र तीस रुपये खर्च करणें.

लग्नासारखा हर्ष नाहीं, मरणारखा शोक नाहीं--लग्न सोहळा हा अतिशय हर्षदाई आहे. श्री. गडकऱ्यांच्या 'पुण्यप्रभावांत'-जन्मकाळीं आठवणीचा जन्म झालेला नसतो आणि मरणकाळीं आठवणीचेंच मरण ओढवतें म्हणून आयुष्यांतला अत्युत्तम, महत्वाचा आणि आनंदाचा असा जो लग्नाचा काल, त्याची आठवण मात्र तिप्पट जोगनें ताकद धरून राहते...अशा तऱ्हेचा मजकूर आहे. तद्वतच, मरणासारखा शोक नाहीं. इतर कुठल्याहि दुःखापेक्षां मृत्यूचें दुःख अधिक असतें. मग तें दुःख स्वःतच्या ओढवणाऱ्या मृत्यूचें असो, वा इतराच्या मृत्यूचें असो.(गु.)लगनसमान हरख नहिं, ने मोहत समान शोक नहि.

ठिकाण नाहीं लग्नाला, कोण घेईल मुलाला—(शारदा) लग्न व्हावयास ठिकाण नसतां पुढें होण्याऱ्या मुलाला कोण घेईल याबद्दल काळजी अथवा वाटाघाट करणें; कशास कांहीं पत्ता नसतां भविष्य काळीं होणाऱ्या गोष्टीबद्दल व्यर्थ काथ्याकूट करणें.

लघुकथा--**लघुकथेवांचून मासिक नाहीं आणि राजकारणावांचून वृत्तपत्र नाहीं**—(न. चिं. केळकर, केसरी, २९-९-३९.) आज प्रचलित असणारीं कुठलींहि नियतकालिकें चाळून पाहिलीं असतां, याची सत्यता पटून येईल. मासिक म्हटलें कीं त्यांत एकतरी लघुकथा सांपडायचीच. हें जसें आतां अगदीं ठरून गेलेलें, तसेंच वृत्तपत्रांतहि राजकारणाचा कुठल्यातरी प्रश्नाचा पुरस्कार केलेला असतोच.

लघुपंचमूल—शालिपर्णी (सालवण), पृश्निपर्णी

(पाठवण), बृहती (डोरली वांगी), कंटकारिका (रिंगणी) व गोक्षुरक (गोखुरू).

लघुशंका---लघुशंकेस जाणें—लघवी करण्यास जाणें.

लछमी---लछमी तो गौऱ्या वेचें, धनपाळ मागे भीक, अमरसिंग तो मरगये, ठणठणपाळ ठीक—अमरसिंग पहा. तु०—नांव सोनुबाई.

लचकणें; लचका–लोभ लचकला (लचका), डोळा पिचकला (पिचका)—लोभ पहा.

लज--लाज पहा.

लजके (लेजे) आनि पेजके (पेजे) गांठपडना—(गो.) लाजाळू मनुष्याला कांजी सुद्धां प्यावयास मिळत नाहीं. तुम्हांस तुमचें काम तडीस न्यावयाचें असेल तर तुम्ही स्वतः स्वकष्टानें व लाज सोडून तें काम करण्यास तयार व्हा. अतिशय लाज ही भिकेची बहीण आहे. लाजकूर मनुष्याची आयुष्यांत कधींच सरशी होत नाहीं.

लजके गेल्यार पेजेक विघ्न--(गो.) लाजेमुळें मनुष्य कांजीला सुद्धां मुकतो. लाज भाकरी मिळविण्याच्या आड येते. आपल्या योग्यतेला शोभणारीं नाहींत म्हणून कांहीं लोकांना कांहीं कामें करण्याची लाज वाटते.

लजेची कोंबी सांतेंत तांतयां घालता--(गो.) लाजणारी कोंबडी भर बाजारांत अंडीं घालते. लाजून राहणारीं माणसें कित्येक वेळां कमालीचा निर्लज्जपणा करतात.

लज्जा---एक लज्जां परित्यज्य सर्वत्रविजयी भवेत्।--एक लाज सोडली, कीं सारें कांहीं सोडल्यासारखेंच आहे. कोणी कांहीं म्हणो, निंदो अथवा रागावो, त्याचा कांहीं विधिनिषेधच नाहीं. निर्लज्जच ! एक पहा.

लटका---नाकांत नाहीं कांटा आणि लटका ताठा—नाक पहा.

लटका पण–पर नेटका—भपका, झकपक, दर्शनीं चांगलें, ठाकठीक; पण वस्तुतः खोटें, लबाड असें.

लटकें आवंतण, जेवतची खरें—(गो.) चेष्टेनें जेवायचें खोटें आमंत्रण दिलें तरी जेवल्यावर तें खरें होतें. मनाविरुद्ध एखादें काम झाल्यावर मग आपलीहि तशीच इच्छा होती असें सांगणें.

लटकें बोलीलया ओखटें कपाळीं पडे--(महानु.) खोट्याच्या कपाळीं कुऱ्हाडीचा घाव याप्रमाणें.

लटकेचा घर तडवेरी—(कों.) [तडवेरी=शेवट पर्यंत] एखाद्यानें आपलें घर या गांवांत आहे असें खोटेंच सांगितलें व त्याबरोबर आपण जाऊं लागलों तर तो आपलें घर पुढेंच आहे असें म्हणत म्हणत गांवच्या शेवटपर्यंत जाईतोंपर्यंत त्याची लबाडी उघडकीस येत नाहीं. शेवटपर्यंत गेल्यावर मग त्याच्या बोलण्यास कांहीं वाव उरत नाहीं. याप्रमाणें खोट्या गोष्टीचा पिच्छा घेतल्यास शेवटीं तिचा खोटेपणा बाहेर पडतोच.

लटक्या आमंत्रण सारें पुरें पावचें—(गो.) एखाद्या गोष्टीची पुरती शहानिशा करणें.

लटिकियाचें आंवतणें जेविलिया साच। कायत्या विश्वास तोचि खरा॥—तुगा. लबाड मनुष्यास किंवा मनुष्यानें कांहीं काम सांगितलें असतां तें त्यानें केल्यावर खरें समजावयाचें, त्यास ही म्हण योजितात. आंवतण पहा.

लटपटपंची—पोपट ज्याप्रमाणें निरर्थक शब्द बोलतो त्याप्रमाणें निरर्थक केलेली बडबड; स्वतःला अर्थ न समजतां कांहीं तरी बोलणें; पाठ म्हणणें. 'खऱ्या मार्मिक श्रोत्यांस लटपटपंची केल्यानें लेशमात्रहि द्रव येणार नाहीं.' —नि. २ गोंधळ; घोटाळा; गडबड.

लठ्ठ--- लठ्ठंभारती--भारती हा एक गोसाव्यांतील पंथ आहे. त्यावरून लठ्ठ गोसावी म्हणजे कोणी तरी अगडबंब, लठ्ठ मनुष्य; केवळ लठ्ठ असून ज्यास ज्ञान बिलकुल नाहीं, कांहीं समजत नाहीं असा मनुष्य. पर्याय—लठ्ठनिरंजन, लठ्ठामिश्र, लठ्ठाश्रम, लठ्ठेश्वर इ.

लठ्ठालठ्ठी—[लठ = लाठी, काठी) मारामारी; ठोकाठोकी; दांडगाई. 'आम्हा लोकांत एकी तर इतकी कीं यत्किंचित् लाभ होण्याचा सुमार दिसूं लागला न लागला तों लठ्ठालठ्ठी सुरू व्हावयाची.'—केसरी.

लंड---लंडभारती—(निंदार्थी) नागडा गोसावी.

लंडामुंडी—(कु.) भांडणतंटा; शिवीगाळ.

***लंड देवा, भंड पूजा**--(गो.) चांभाराच्या देवाला खेटरांची पुजा अशा अर्थानें म्हणतात.

लंडाक भंड मेळ्ळो--ठकास महाठक भेटणें.

लडका—लडका कमाते आठ तास, पैका कमाते चोविस तास--एखादी गोष्ट करावयास थोडा वेळ लागतो पण तिचे परिणाम निस्तरण्यास फार अवधिपर्यंत काम करावें लागतें. करणें सोपें पण संपादणें कठिण.

लडका रोवे बालोकों, नायी रोवे मुंडायीकों— [हिं.] मुलगा रडतो केसासाठीं तर न्हावी रडतो हजामतीसाठीं.एखाद्याला एखादी वस्तु हवी असते,ती जाऊं नये असें वाटतें; अर्थात्, ती जाऊं लागली तर त्याला वाईट वाटतें. उलट ती वस्तु नाहींशी होण्यांतच दुसऱ्या एखाद्याला आनंद वाटत असेल, तर तो ती वस्तु नाहींशी होत नाहीं म्हणूनच दुःखी होतो.

लडकोंका खेल, चिडियोंका मरन--(हि.) लहान मुलांचा खेळ होतो पण चिमण्यांचें मरण ओढवतें. 'तुमचा खेळ होतो पण आमचा जीव जातो' पहा.

लडदू---येबी लडदू, जाबी लडदू—(क.) रिकाम्या माणसाची येजा; येणें जाणें.

लडबड---द्राविडो लडबडाम्यहम्।—[सं.] इकडून तिकडे, तिकडून इकडे हेलपाटे. लुडबुड; लडबड. गडाच सारवडं० गड पहा.

लढणें---लढून पडणें—मोठ्या औत्सुक्यानें, उत्कंठेनें एखाद्यावर झटून पडणें, तुटून पडणें; एखाद्या वस्तूच्या प्राप्तीची फार मोठी इच्छा बाळगणें व प्राप्तीविषयीं प्रयत्न करणें.

***लढनेकू तुम् और खानेकू हम्; खानेकू मैं और लढनेकू मेरा बडा भाई**—[हिं.] स्वार्थीपणा व कामचुकारपणा. लढायला मात्र दुसरा, मग त्याचें कांहीं होवो, इथें खायला मात्र मी आहें. खाणें पहा.

लढो बाप रोटी पकती है !—(व.) अरे तुमचें अन्न इकडे आम्ही शिजवितोंच आहोंत, रोटीबद्दल फिकीर न बाळगतां तुम्ही खुशाल लढा, भांडा; भांडणास उत्तेजन देणारा भांडणारांना असें म्हणतो. 'आमच्या दोन घराण्यांत भांडण लावून दिलें आणि आपण तमाशा पहात बसलें. लढो बाप रोटी पकती है'

लढाई---लढाईंत बढाया नि खजिन्यांत गोवऱ्या—लढाईच्या गोष्टी फुगवून सांगितल्या जातात आणि खजिना हाणावा तर आंत गोवऱ्या. Truth is the first casuality in war.

लत्ता—लत्तेस शनि असणें -येणें—शनि जन्मराशीपासून द्वितीयस्थानीं असणें. साडेसातीचा तिसरा काळ फारसा वाईट नसला तरी शनि कांहीं तरी फटकारा देऊन जातो, असें सांगतात. याच्या उलट शनि उदरीं असणें–येणें.

लंपट—लंपट रोहिणीचा मृग--रोहिणीनंतर मृग नक्षत्र येतें. एखादीच्या नादीं लागलेला मनुष्य. 'लंपट रोहिणीच्या मृगा मजकडे बघा। अर्धांगी नरद मी जसी जुगलें जुगा।'–होला ७९.११६.

लपेटी; लपेटणें—लपेटीखालीं-लपेटून नेणें—वेळप्रसंग पाहून कावा साधणें; कार्यभाग उरकून घेणें. लपेटी मारुन साधून नेणें; गुप्तता राखून वेळ मारून नेणें; सारवासारव करणें.

लप्पंछप्पं---लप्पंछप्पं चालणें–लावणें–मांडणें—लबाडी,टाळाटाळी, लपवाछपवी करणें. 'हा माल तुम्ही छावणींत कोणाच्या हुकुमानें नेत आहां, हें आम्हांला कळलें पाहिजे. अशी लप्पंछप्पं चालायची नाहीं.'–पामो ४८.

लब---लब खाणें--१ वांकणें; कच खाणें; खचणें (तुळई वासा इ.) २ (ल.) लीन होणें; माघार घेणें; हाय खाणें.

लंब---लंबकर्णाची स्वारी—गाढव (गाढवाचे कान लांब असतात यावरून).

लंबकुचालिंगनतो लिकुचकुचापादताडनं श्रेयः।--[सं.] वृद्धस्त्रीस आलिंगन देण्यापेक्षां तरुणीचा लत्ताप्रहार अधिक गोड असतो.

लंबा करणें—झोडपून काढणें; मारणें; चोप देणें.

लंबा होणें—१ पसार होणें. २ मरणें. ३ पळून जाणें. ४ नाहींसें होणें.

लंबी ताणणें-लावणें-लागणें—आळसानें हातपाय ताणून पसरणें.

लंबे करणें—१ मारणें. २ पळविणें. 'गिलच्यानीं गोखडींत दहापांच बैरागी सत्पुरुष होते तेही बसले ठिकाणीं लंबे केले.'–भाब २८. 'म्हणजे त्याला असा चोप देतों, असा लंबें करतों, कीं देखते रहना जवान !'–शिसं ३.४.

लंबे चालणें—मर्यादातिक्रमण करणें; सिमोल्लंघन करणें.

लबाड---लबाडीवांचून नव्हे—अद्यापि अगदीं खोटा, लबाड आहे.

लबाड वायद्यानें जिंकावा—लबाड मनुष्य नेहमीं वायद्यावारी गोष्टी बोलत असतो. तो जीं कांहीं आश्वासनें

देतो तीं देखील लबाडीचीं असतात आणि वायद्यावारी असतात. तेव्हां त्यास जिंकायचे असेल तर आपणास सुद्धां वायद्याच्याच गोष्टी करणें जरूरीचें असतें किंवा त्यानें जे वायदे दिले असतील त्या वेळीं जाऊन त्याला लाजवावें. शठं प्रति शाठ्यं ।

लबाडाचें आमंत्रण जेवल्यावर खरें—लबाड मनुष्यानें घेतलेली हमी काम झाल्यावर खरी समजावयाची. 'आमंत्रण लटिक्याचें जेविल्याविण सत्य कदापि मानुं नये.' आमंत्रण, लटका पहा.

लबाडाचें खरें कोण मानितो ?—लबाडाचें सारेंच लबाड असतें. त्याचें बोलणें लबाडीचें असतें, त्याचें वागणें लबाडीचें असतें, त्याची सारी कृतीच लबाडीची असते. तेव्हां त्याचें खरें मानायचें तरी कोणतें ? आणि खरें मानणार तरी कोण ?

लबाडी—थोडी तों गोडी, फार तों लबाडी—कोणतीहि गोष्ट मर्यादेंत असते तोंपर्यंत चांगली दिसते. अति झाल्यास विचका होतो. तु०—अतिसर्वत्र वर्जयेत् ।

लबाडीचा व्यवहार लबाडीनें जिंकावा—शठं प्रति शाठ्यं. लबाड वायद्यानें जिंकावा पहा. दुष्टे दुष्टं समाचरेत् ।

लबोड—लबोड शंख-शिंग—(लबोड=लबाड) एका खोट्या शंखाची गोष्ट आहे तीवरुन मोठेपणानें उगीच आश्वासनें द्यावयाचीं पण तशी कृति मात्र करावयाची नाहीं, अशा माणसाबद्दल म्हणतात.

लब्ध—लब्धप्रतिष्ठित—१ कीर्तिमान्; प्रसिद्ध; माननीय. २ (उप.) नवीन कोणतीहि थोरपणाची गोष्ट न करतां वडिलार्जित कीर्तीवर जगणारा. ३ (उप.) खोटीच प्रतिष्ठा मिरविणारा. 'सुधारणेच्या सर्व पद्धती व्यर्थ, पोकळ व त्यांचा उपक्रम करणारे लब्धप्रतिष्ठ.'—नि ३५९.

लंबाण; लमाण—लंबाण-लमाण भाऊ आणि कांदेखाऊ—[लंबाण = १ उंच पण काटकुळा. २ लमाण जातीचा] लमाण लोकांना चालरीत वगैरेची कांहीं अक्कल नसते. कांदा खाल्यानें आपल्या तोंडाचा उग्र वास येईल, चार चौघांत हिंडायचें, तेव्हां कांदा न खाल्लेला बरा, असें त्यांना वाटतच नाहीं; लमाण जातीच्या माणसास आदरानें लमाणभाऊ असें संबोधितात.

ललाट—ललाट रेषा उभी राहणें—दैव अनुकूल, प्रसन्न होणें; नशीब उदयाला येणें.

दैव नाहीं ललाटीं, पाऊस पडला शेताचे कांठीं—दैव, पाऊस पहा.

ललुपत—ललुपतु-लुलुपतु-ललोपतो करणें—दादाबाबा करणें; आर्जव करणें; आंजारणें गोंजारणें. 'आम्ही कांहीं कोठें ललोपतो करीत नाहीं.'—पेद १०६६.

लव—लवं काढली म्हुण मढें हलु जायेना—(गो.) केस कापले म्हणून प्रेत हलकें होत नाहीं. केस पहा.

लवंग—लवंगी मिरची—ही एक प्रकारची बारीक पण अति तिखट अशी मिरची आहे. (ल.) लहान पण फार चलाख, तिखट बोलणारी, फटाकडी स्त्री.

*लवंगेची उष्णता नि वेलचीची सर्दी—श्रीमंत आणि नाजूक प्रकृतीच्या माणसावरून ही म्हण प्रचारांत आली असावी. लवंगेचा गुणधर्म उष्णता आहे आणि वेलची ही थंड आहे. म्हणजे लवंग खाल्ली तर उष्णता वाढते आणि वेलची खाल्ली तर थंडी वाढते, अशी प्रकृति.

लवडा—लवडा दाखविणें—(अशिष्ट.) वत्तूरा, चाट देणें; फसवणूक करणें; विश्वासघात करणें.

लवडेलूट—१ अतिशय रेलचेल; लयलूट. २ (ल.) मातीमोल झालेली स्थिति.

लवड्यावर बसून जाणें—(अशिष्ट.) निघून जाणें; चाट मारून जाणें.

लवण—लवणत्रय—(अ) सैंधव, बिडलोण, व रुचक (टांकणखार). (आ) सैंधेलोण, पादेलोण व बिडलोण.—योर १.१७६.

लवणपंचक—वरील तीन खेरीज औभ्दिद् (जमिनींतील खाऱ्यापाण्याचें मीठ) व समुद्रमीठ.—योर १.१७६.

लवणभंजन करणें—[लवणें + भजणें = नमणें व मान देणें] नम्रता धारण करून गोड बोलणें; विनयाचें आडंबर माजविणें. 'पंडित भेटती समस्तर । लवणभंजन अतिनम्र ।'—एभा १०.१७३.

***लवण तेथें जीवन**—१ जेथें मीठ आहे तेथें पाणी आहे. समुद्राच्या पाण्यापासून मीठ होतें त्याअर्थी मीठ असेल तेथें जवळपास समुद्र असला पाहिजे. २ लवणाशिवाय जीवन अशक्य आहे. मिठावांचून कोणताहि पदार्थ चांगला लागत नाहीं.

लवण मेळवितां जळें । काय उरलें निराळें ॥—(जोग) तुगा १७२३. पाण्यांत मीठ कालविल्यावर तें निराळें असें उरणार नाहीं.

लवणेविनु पाक—(महानु.) मिठाशिवाय स्वयंपाक (व्यर्थ).

लष्कर—लष्करच्या भाकरी भाजणें—निष्कारण दुसऱ्याच्या उठाठेवी करणें. पूर्वी सैन्य एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं जाई तेव्हां त्या त्या ठिकाणच्या लोकांना शिपायांच्या भाकरी भाजण्यासाठीं लावीत त्यावरून हा वाक्प्रचार निघाला आहे. 'पत्र धाडणारा खरोखरच जानकीबाईंच्या कळवळ्याचा होता कीं...... लष्करच्या भाकरी भाजणारा होता?'–रंगराव. 'महाराजांनीं तरी लष्करच्या भाकरी भाजण्याच्या ह्या उपद्व्यापाला संमति देणें रास्त ठरतें काय?'–विविधवृत्त २०-९-४२.

लष्कर दोनशें, न्हावी तीनशें-पांचशें—तु०—एकपट लष्कर, सातपट कतवार. कतवार पहा.

लष्कर सैल, इन्फंट्री बैल आणि पोलीस करील तें होईल—(कर.) मोकळें सुटलेलें लष्कर, लष्करीकामाचा बैल आणि पोलिस या तिघांची सत्ता सारखी अनिर्बंध आहे. ते काय करतील तें होईल. कर्तुंमकर्तुंमन्यथाकर्तुम् शक्ति.

लष्कराला ऊन पाणी, कंठकाला गुळवणी—जबरदस्ताचा खांद्यांवर याप्रमाणें. कंठकास गुळवणी पहा.

लष्करच्या भाकरी कोण भाजील—स्वतःचें काम सोडून नसत्या उठाठेवी कोण करील ?

लसूण—लसणाचा वास कोठें लपत असतो?—लसूण ही उग्र वासाची वनस्पति आहे, तिचा वास सहसा लपून राहात नाहीं. असत्य हें दडविण्याचा यत्न केला तरी तें दडून राहणें अशक्य.

लहणें—ह्याचें मला-माझें लहणें नाहीं—याचें माझें जमत नाहीं, सूत नाहीं; त्याच्या आणि माझ्या मध्यें ममता, स्नेह नाहीं, कसलाहि संबंध नाहीं.

लहर—लहरा मारणें—स्वच्छंदानें विलास, मौज करणें; मजा मारणें.

लहऱ्या पिटणें—(व.)कमालीची उत्सुकता दाखविणें, वाटणें; धावावणें.

लहान—लहान तें छान, मोठें तें खोटें—लहान असतांना जें बरें दिसतें–छान दिसतें तें मोठें असतांना बरें दिसेल, छान दिसेल अशांतला भाग नाहीं.उलट कित्येकदां मोठें वाईट दिसतें. उदा०–माकडाचें वा गाढवाचें पोर लहानपणीं गोजिरवाणें दिसतें, पण तेंच थोर झाल्यावर कुरूप दिसतें.

लहान तोंडीं मोठा घांस—१ आपली लायकी नालायकी न जाणतां एखाद्या कार्यास हात घालणें. शक्ति नसतां करसिद्ध होणें. आपल्या योग्यतेपेक्षां अधिक भार अंगावर घेणें.–शाब २.२७६. 'रघुवंशाच्या महनीय सद्गुणांनीं कानाशीं लागून (कर्णमागत्य) या लहान तोंडीं मोठ्या घांसाला (चापलाव) मला प्रवृत्त केलें आहे.'–चित्रजगत् डिसें १९४२पृ ३८९. २लहान मुलांनीं मोठ्या माणसांस प्रत्युत्तरें देणें; मुलांनीं मोठ्याच्या तोंडी लागणें, बरोबरी करूं पाहणें.

लहानपण देगा देवा । मुंगी साखरेचा रवा ॥—ऐरावत रत्न थोर।त्यासी अंकुशाचा मार॥ ज्याचें अंगीं मोठेपण । तया यातना कठीण ॥ तुका म्हणे जाण । व्हावें लहानाहुनि लहान ॥–तुगा (जोग) ७४४. व्याप नको, मोठेपणा नको, जबाबदारी नको, लहानांत लहान असावें; कारण मोठेपणाबरोबर फार जबाबदारी व दुःखें येतात.

लहान मूर्ति पण थोर कीर्ति—दिसायला लहान दिसलें तरी कित्येकांतील कर्तृत्वशक्ति त्याच्या दिखाऊ अंगोपांगापेक्षां जास्त असते. उदा०–मिरची, विंचू, इ. मूर्ति पहा.

लहान मुलाच्या भाषणास, ऐकावें सावकाश—लहान मूल बोबडें बोलतें तेव्हां त्याचें भाषण ऐकायचें म्हणजे तें काय म्हणतें हें जाणून घ्यायचें असेल, तर नीट लक्ष देऊन ऐकावें; त्याशीं समरस व्हावें.

लहानपणीं दुःख, मोठेपणीं सुख—वास्तविक लहाणपणींच खरें सुख मिळतें.पण खरोखरी पाहातां लहानपणीं, हाल सोसावेत, कष्ट करावेत; कशासाठीं तर मोठेपणीं सुख लागावें म्हणून लहानपणीं मन लावून अभ्यास केला तर मोठेपणीं मानमान्यता, नोकरी, उद्योग धंदा कांहीं मिळण्याचा संभव ! आणि मोठेपणीं जें मिळतें त्यांतलें कांहीं गांठीला लावलें तर वृद्धपणीं सुखानें राहातां येईल.

लहानपणीं विद्या केली, तरुणपणीं फळा आली—विद्येचा प्रभाव. लहानपणीं विद्या अभ्यास केला, म्हणून

नसतात, तर तर लक्ष्मीच्या मोठ्या बहीणीसारखे असतात; कीं जिचें तोंड पाहिल्यावर सारा दिवस दुःखांत, भांडणांत, कटकटींत जायचा ! नांव मोठें लक्षण खोटें. नांव लक्ष्मी, पण खरी अवलक्षणी.

लक्ष्मी पुसेना शंखाला, तो भीक मागे पोटाला—लक्ष्मी ही शंखाची बहीण आहे. पण प्रत्यक्ष लक्ष्मी ही बहीण असूनहि शंख खंकच असतो. "लक्ष्मी जयास भागिनी आणि तात सिंधु ।...इतुकें असोन परि शंख फिरे भिकारी ।"

लक्ष्मीची भयण अवदसा फाटोफाट आसा—(गो.) लक्ष्मीची बहीण अक्काबाई ही तिच्या पाठोपाठच असते. संपत्तीनंतर विपत्ति.

लक्ष्य—लक्ष्यांत घेणें—१ नीट मनांत वागविणें. २ आपल्या बाजूस वळविणें. "वरकडही भागानगरीं अमीन मनसबदार होते. यांची जशी योग्यता, जसा आदर करावा, तशा रीतीनें त्यांचे घरीं जाणें व त्यांस आणणें असें केलें आणि सर्व आपले लक्ष्यांत घेतलें."—श्रीशिवछत्रपति० चरित्र १३६.

लाकूड—लाकूड पडणें—काष्ठपण येणें; लाकडासारखें जड होणें. 'सर्वेंद्रियां लाकुड पडे । स्मृति भ्रमामाजीं बुडे । मन होय वेडें । कोंडे प्राण ॥'-ज्ञा ८.२२७.

लाकूड घळणें-होणें—काठी किंवा काष्ठ याप्रमाणें निर्जीव, निःसत्त्व होणें.

(जिभेस) लाकूड होणें—जिभेला कोरड पडणें; जीभ वाळणें.

लाकडास माकड जोडणें-लावणें—विजोड अशा वधूवरांचें लग्न लावणें; एखाद्या लग्नास हापापलेल्या माणसास कसलीतरी बायको मिळवून देणें.

***ठाकरं नि लाकडं**—(ठाणें) कुणबी लोक ठाकरांना म्हणतात. ठाकूर म्हणजे अक्कलशून्य, असा त्यांचा समज.

लाकूड सायाचें, लेकरूं रायाचें—[साय=साग]—साया वृक्षांचा राया. सर्व लाकडांत सागाचें लाकूड श्रेष्ठ, तद्वत् सर्व लेकरांत राजाचें लेकरूं श्रेष्ठ.

लाकडाची अधोली मोजील खंडोखंडी, फोडली तर एक भाकरहि भाजणार नाहीं—ज्यासाठीं वस्तु तयार केली असेल त्यासाठींच तिचा उपयोग करायचा; भलतीकडे उपयोग केल्यास लाभ नाहीं. लाकडाचा उपयोग जाळण्यासाठीं करतात हें खरें असलें, म्हणून लाकडाच्या ज्या कांहीं इतर वस्तू तयार केलेल्या असतात त्या जर जाळण्यासाठीं घेतल्या तर त्यांच्या उपयोग काय? अधोली-मोजण्याची वस्तु, माप. ही लाकडाची अधोली खंडोखंडी धान्य मोजील; पण तीच जर जाळली तर तिच्या जाळावर मूठभर दाण्याच्या पिठापासून होणारी एक भाकरीहि भाजली जाणार नाहीं.

लाख—लाखपंचोत्र्या—लाखामध्यें ज्याच्या पांचच गोष्टी खऱ्या असतील असा. (ल.) गप्पीदास; थापाड्या.

लाख-लाखाचा माणूस—अत्यंत श्रेष्ठ, योग्य, लायक माणूस.

लाख रुपयांचा—फार महत्त्वाचा; अमोल; अत्युत्कृष्ट.

लाख रुपायांची गोष्ट; लाखांतली गोष्ट—अतिशय महत्त्वाची गोष्ट.

लाखाच्या ठिकाणीं—अतिशय महत्त्वाचें; अमूल्य; बहुमोल. 'तूं मला आतां दहा रुपये दिलेस तर ते लाखांच्या ठिकाणीं आहेत.'

लाखाचे बारा हजार करणें—आंत बट्ट्याचा व्यवहार करणें. जवळ जवळ दिवाळें काढण्याच्या पंथाला लागणें.

लाख्या बारगीर—(ऐति.) दुसऱ्या मल्हारराव होळकरांजवळ लाख रुपये घेऊन चाकरी करणारा एक शिपाई. यानें मल्हाररावाच्या संरक्षणासाठीं जीवहि दिला आहे.

***लाख आणि खाक**—फार मोठे श्रीमंत म्हणून समजले जाणारे लोक बहुधा कफल्लक असतात. लक्षाधीश ते भिक्षाधीश.

दे लाख, घे दोन लाख, देतोस काय तर घेतोस काय—व्यर्थ गप्पा; फुकाच्या बाता. देणें पहा. (गु.) लपोडसंख लाख ! तोके सवा लाख !

लाख नसावा पण साख असावी—संपत्ति नसली तरी पत असावी.

लाख मरोत पण लाखाचा पालनकर्ता-पोशिंदा न मरो—फालतू लाख लोक मेल्यानें फारसें नुकसान नसतें, पण लाखांना जगविणारा माणूस मरूं नये.कारण तो मेल्यास नुकसान फार असतें. कारण त्याच्या एकट्याच्या मरणानें एकदम लाख माणसें उघडीं पडतात. लाख मेलीं, तर

दुसरीं लाख माणसें निपजतात व त्यांनाहि जगवायला हा एकटा पुरा पडतो.

लाखाची मत्ता, काडीची सत्ता—सत्ता ही मत्तेपेक्षांहि श्रेष्ठ ! एका काडीवर सत्ता असणें हें लाखाच्या मत्तेपेक्षां केव्हांहि श्रेष्ठ. नुसती मत्ता असून उपयोगी नाहीं त्याबरोबर सत्तादेखील हवी.

लाखाचें डेंगणें टेकूं द्या कीं शेकूं द्या—(अशिष्ट.) मोठ्याला स्वःचाच बडेजाव, तो दुसऱ्याच्या उपयोगी न पडतां स्वतःचेच सोपस्कार करीत राहील.

लाखोश्री आणि भिकेश्री एकच—मेल्यावर गरीब व श्रीमंत सारखेंच.

घटकेंत लाख्या, नाहींतर फाक्या— शनीसारख्या एखाद्या बलाढ्य ग्रहाची किंवा राज्यकर्त्यांची मर्जी बसली तर तो लगेच आपणास ऐश्वर्याच्या शिखरावर नेतो; उलट मर्जी खप्पा झाली कीं तो तावडतोब धुळीला मिळवितो. चंचल, अस्थिर वैभवाबद्दल म्हणतात.

लाख—लाखेसाठीं मणी फोडणें—(गो.) लाखे-खातिर मणि फुटंवुचो. थोडक्या लाभासाठीं विशेष हानि करणें. सोन्याच्या मण्यांत लाख भरतात तेव्हां एखाद्यावेळीं लाख हवी असेल आणि जवळपास लाख कुठें मिळण्यासारखी नसेल तर जवळचा मणी फोडून आंतली लाख काढून घेणें, हा मूर्खपणा आहे.

लाखोली—(शिव्यांची) लाखोली वाहणें—शिव्याची सरबत्ती झोडणें; भरमसाट शिव्या देणें.

लाग—लाग करणें—हल्ला चढविणें. 'सर्वेचि पिप्लिका करिती लाग। देखोनि माजला कीर्तनरंग।'—दावि २६९.

लाग चालविणें—ठरविल्या क्रमानें किंवा सरणीनें चालू करणें (कांहीं काम, योजना, बेत.)

लाग दवडणें—१ एखाद्या गोष्टीच्या सिद्धीसाठीं आपल्या योजना चालू करणें; मागें लावणें. संधि घालविणें; लाभ दवडणें.

लाग लागणें—लगा साधणें; शिकार मिळणें. 'रति-पति मज पाठीं कां, सये, लागला गे?। यदुकुलतिलकाचा हा कसा लाग लागे।' —सारुह ३.७४.

लाग लावणें— १ (प्राप्तीसाठीं) संधान बांधणें; कांहीं वशिला लावणें, खर्च करणें; हरएक प्रकारें उपयोग, युक्ति योजून काम जुळेलसें करणें. २ मार्ग काढणें; पाठलाग करणें. 'मागोनि लाग लावित नृपबळ येउनि।'—मोआदि १५.६३.

(एखादें काम) लागाला येणें-लागीं लावणें-लागा वर येणें-मिळणें-जुळणें—एखादें काम सुरळीतपणें सुरू होणें किंवा चालू लागणें, सिद्धीच्या मार्गावर असणें, पंथास लागणें. 'माझी पंचायत लागीं लागली.'

लागास येणें—रंगारूपास येणें; फलद्रूप होण्याच्या बेतांत येणें.

लागणें—मुखाला आग लागणें— सत्यानाश होवो, असें इच्छिणें; वाईट चिंतणें. एक शिवी. 'लागो मुखाला आग त्याच्या।'—दावि ७.४५२.

कानास-कानीं लागणें—कानांत सांगणें; कांहीं गुप्त गोष्ट कळविणें; चहाडी करणें कान पहा.

पाठीं लागणें—पिच्छा धरणें; पाठपुरावा करणें. पाठ पहा. 'घर सोडुनिया लागलों स्नेहाचे पाठीं। परिणामीं त्वां लाविली आम्हा आडकाठी।'—होला ८७.१२.

पाणी लागणें—पाणी पहा.

पायीं लागणें—नम्र होणें; पाय धरणें.

(एखाद्यास) लागला जाणें—ऋणी असणें; मिंधा होणें. २ चिकटणें; फार परिचय होणें.

लागू असणें; लागून असणें—१ चिकटणें; मर्जी धरून राहाणें; सामील असणें; संबंध असणें. २ अनैतिक, व्यभिचारी संबंध असणें.

लागू पडणें—(औषध) परिणामकारी, गुणकारी होणें; उपयोगी पडणें.

***लागतील मघा तर चुलीपुढें हागा, नाहींतर ढगाकडे बघा; लागल्या मघा तर सांधीकोनीं हगा, न लागल्या मघा तर ढगाकडे बघा**—मघा नक्षत्राचा पाऊस इतका मोठा पडतो कीं, त्यावेळीं क्षुल्लक कामाला घराबाहेर पडणें मुष्कीलीचें जातें. आणि तो पाऊस नाहींच पडला तर दुष्काळ पडण्याचा संभव अधिक, म्हणून ढगाकडे पाहात बसण्याची वेळ येते.

लागतील स्वाती तर पिकतील मोतीं-पिकेल माणिकमोतीं—स्वाती नक्षत्राचा पाऊस पडेल तर मोतीं निपजतील, भात चागलें पिकेल. तु०—'कीं स्वातीस्तव अब्धिशुक्तिपुटकीं मोती घडे नटकें।'

लागतें मिष्ट पण आहे दुष्ट—लसणीचें तिखट, विषाची कांडी, वर्मी झोंबणारें पण सकृतदर्शनीं कानाला मधुर लागणारें भाषण इ.

लागला तर तीर नाहीं तर तुक्का—तुक्का पहा.

लागली तर शिकार, नाहीं तर भिकार—मिळाल्यास शिकार मिळेल, नाहीं तर ती भिकार आहे असें समजून सोडून देऊं. द्राक्षें अंबट याप्रमाणें.

लागला पंथाला, बोलवा वैद्याला—अगदीं मरणास टेकल्यावर मग वैद्याला बोलावणें; तहान लागल्यावर विहीर खणणें. लग्न आलें घरीं, मग मांडवाची तयारी, पहा.

देखला गोहो, लागला लाहो—नवरा पहिल्याबरोबर लळा लागला. देखणें पहा.

लागली लहर, केला कहर—लहरी मनुष्य लहर लागल्यावर काय करील (म्हणजे चांगलें कृत्य करील, कां वाईट कृत्य करील,) याचा नेम नसतो; तद्वतच, काय करायचें, तें किती करील याचाहि नेम नसतो.

लागे बोट, वाढे पोट—निमित्तमात्र; योगायोग. नुसतें निमित्त होऊन एखादें चांगलें वाईट काम होऊन जाणें.

लागो बाई लागो, सात घरीं लागो—(व.) एका ठिकाणीं लावून दिलेली आग अनेक घरांस पसरावी अशी ज्या बाईची दुष्ट मनीषा तिची ही उक्ती होय. एका ठिकाणीं लागलेली कळ किंवा जुंपलेलें भांडण अनेक ठिकाणीं पसरावें अशी असदिच्छा येथें प्रकट आहे.

लागो भागो दिवाळी—उच्च ध्येय ठेऊन काम करावें. फळ आलें नाहीं तर खचून जाऊं नये. परिणामाकडे लक्ष न देतां कार्य करीत राहणें; लाभ होवो नुकसान होवो दिवाळी ही झालीच समजावें.—पामो ५६५.

लांच—**लांचु घाल्या (दिल्या) शिवाय बोंचु हालना**—(गो.) लांच दिल्यावांचून तोंड उघडत नाहीं.

लांचलुचपत दक्षणा आणि घेई ते तत्क्षणा—जें कांहीं घ्यायचें असेल तें ताबडतोब घ्या, मग तें दान असो, दक्षिणा असो, लांचलुचपत असो! अशा गोष्टी दिरंगाईवर टाकणें म्हणजे त्यावर पाणी सोडणें होय; म्हणून त्या ताबडतोब घ्याव्यात.

लांचलुचपत दक्षणा घेईजे तत्क्षणा, नाहीं तर हात लाविजे वृषणा—(अशिष्ट.) वर पहा.

लाज—**लाज काढणें**—१ अब्रू घालविणें. २ निर्लज्ज म्हणणें. ३ बुरखा घेणें. मारवाडी गुजराथी बायका कोणीं पुरुषानें त्यांच्याकडे पाहिल्यास तोंडावर पदर ओढून घेतात.

लाज झांकणें-राखणें—अब्रू संभाळणें; प्रतिष्ठा ठेवणें. ‘आमची राखावी ती लाज । परंपरा हेंचि काज।’ —एकनाथ.

लाजलावणा—लाज आणणारा; अब्रू घेणारा. ‘हा बेटा वंशांत लाजलावणा निघाला.’—बाळ २.१६१.

लाज लावणें—लाजविणें. ‘त्याला विजय लाज लावि खरी।’—मोकर्ण १६.१.

लाज वांटून पिणें—कशाची फिकिर न करणें; निःसंग बनणें; निर्लज्ज होणें.

लाज होणें—अब्रूला बट्टा येणें; कमीपणा येणें; मानहानी होणें. २ लज्जा वाटणें; संकोच वाटणें; अपमानाचा प्रसंग येणें.’ ‘पतकरा वास तर मोठी लाज झाली.’ —विवि ८.१.८.

***लाज आपल्या मनाची, दांभिक भक्ति जनाची**—आपण आपली स्वतःची लाज धरली पाहिजे; दांभिक भक्तीनें, खोट्या भक्तीनें जन लिडबिडलें आहेत. जगाचा सारा पसारा लबाडीचा आहे.

लाज घातली भिजत, अन् अक्कल घातली शिजत—निर्लज्ज मनुष्य; मूर्ख व निर्लज्ज व्यक्ति.

लाज ना लज्जा आणि दारीं नित्य कज्जा—भांडखोर, भांडकुदळ व्यक्तींची वृत्ति. लाज नाहीं, वृत्ति पूर्ण बेफिकिर बनलेली. परिणामाचा विचार न करणारी व्यक्ति केव्हां, कुठें आणि कुणाशीं भांडेल याचा नेम नसतो.

लाज नाहीं अब्रू, कशाला घाबरूं—निर्लज्ज मी सदा सुखी. लाजहि नाहीं, अब्रू नाहीं. अगदीं निस्संग बनल्यानंतर, निलाजरा झाल्यानंतर तो भिणार तरी कोणाला आणि त्याला भीति तरी कशाची वाटणार?

लाज नाहीं निलटा, गळ्यांत बांधला वरवंटा—[निलटा=निर्लज्ज] निर्लज्जच झाली आहे, लाज सोडली आहे, मग तिकडे कांहींहि होवो अशी वृत्ति. वरवंट्याप्रमाणें सारखे हपके बसले तरी, ते सहन करण्याची (निर्लज्जपणामुळें) ताकद आहे याचें दर्शक.

लाज नाहीं मना, कोणी कांहीं म्हणा—मनच जर बेफिकीर झालें, निर्लज्ज झालें, उद्धट झालें तर कोणी कांहीं बोललें, तरी त्यास त्याचा कांहीं विधिनिषेधच नाहीं. सुखहि नाहीं कीं दुःख नाहीं. तु०—कोणी निंदा कोणी वंदा, आपला स्वहिताचा धंदा.

लाज नाहीं मला, भेटायला येतें तुला—एकदां येऊं नको म्हणून सांगितलं, दोनदां सांगितलं, तीनदां सांगितलें तरी ती पुन्हां पुन्हां तिच्याकडे जातेच आहे. म्हणजे ती कोडगी झाली आहे, निर्लज्ज झाली आहे, लाळघोटेपणा करते आहे.

मनाची नाहीं तर जनाची तरी लाज बाळगावी—स्वतःला एखादी गोष्ट जरी पसंत असली तरी लोक काय म्हणतील याचा विचार करणें अवश्य असतें. आपणाला योग्य वाटलें तरी लोकविरुद्ध आचरण करूं नये. 'यद्यपि शुद्धं लोकविरुद्धं नाचरणीयं ना करणीयम्।'

लाज मेली म्हणजेच मनुष्य धीट होतो—लाज वाटेनाशी झाली पाहिजे; म्हणजे धीटपणा, बेडरपणा अंगीं येतो.

लाजे गेल्यारि पेजे धाटना—(गो.) संकोच धरला तर जेवण मिळत नाहीं.

लाजणें—-हागणाऱ्यानें तरी लाजावें, नाहींतर बघणाऱ्यानें तरी लाजावें—एखादें वाईट कृत्य कोणी (लोकांसमक्ष) करूं लागला, त्याला जरी त्यांत कांहीं वाटलें नाहीं, त्याला जरी लाज वाटली नाहीं, तो जरी पूर्ण निर्लज्ज बनला, तरी मग निदान पाहाणाराला तरी त्याची लाज वाटली पाहिजे. त्यानें तरी निदान आपले डोळे झांकून घ्यावेत. थोडक्यांत, एक निःसंग बनला म्हणून सर्वांनींच निःसंग व्हावें असें कांहीं नव्हे.

लाजू लाजू मेली, त्याच गांवीं गेली—आरंभीं मोठें लाजेचें सोंग आणावयाचें, प्रथम लाजत लाजत पण शेवटीं ती गोष्ट करावयाचीच. प्रथम आढेवेढे घेऊन अखेरीस होकार देणारास म्हणतात. तुल०—(महानु.) लाजतां लाजतां जन्म गेला: हागतां दर्शन केला.

लाट—-लाट उठणें—१ चळवळ, टूम निघणें. २ वादळ होणें.

लाट मोजणें—निरुद्योगी राहणें; निरर्थक गोष्टी करणें.

लाटणें—-लाट्या गंगाजी-गोमाजी-कारभारी-पाटील—कोणीकडून तरी आपला मतलब साधणारा.

लाटा-टा—-लाटा-ठा फिरणें-फिरविणें—दडपून नेणें; रेटणें; गडबडगुंडा, घालमेल घालणें.

लाड—-लाड चालविणें-पुरविणें—हौस पुरविणें, भागविणें; मागितलेली वस्तु देणें.

लाड देणें– अमर्याद प्रीति करणें; कोडकौतुक करणें; लाड करणें. 'कां लाड देशी हो! कान्ह्यातें बाई।'—आपद ८८.

***लाड करा, लोभ करा, लेकरूं लोकाचे आणि हिंग घाला, जिरे घाला, फुलके लाखाचे**—(दुसऱ्याच्या) मुलांचे कितीहि लाड केले तरी तीं मुलें आपल्या उपयोगी पडत नाहींत. तेव्हां आपणांस जी गोष्ट पाहिजे ती आपलीच असली पाहिजे, लाखेस,रख्या हलक्या धान्याचें कितीहि चांगल्या प्रकारें खाद्य केलें तरी चांगल्या धान्याची चव त्याला येणें नाहीं. तेव्हां वस्तु मुळांतच स्वतःची व उंची पाहिजे.

लाडानें वेडें, गुळानें बोबडें—फार लाड केल्यानें मुल वेडें बनतें व फार गूळ खाल्लयास बोबडें बनतें. लहान मूलास योग्य शिस्त लावली नाहीं तर तें बिघडतें.

लाडें खाई हाडें; लाडें लाडें खाई हाडें; लाडें लाडें खाई कुत्र्याचीं हाडें—लाडकें लाडावलेलें मूल आईला फार छळतें व त्यामुळें त्याला स्वतःलाहि कांहीं सुख लागत नाहीं.

लाडें लाडें केलें वेडे; लाडें झाडें वेडें—लाडानें वेडें गुळानें बोबडें–पहा. Spare the rod and spoil the child.

लाडका—-लाडका पूत आणि करट्यांत मूत—मुलाचें भलतेंच लाड पुरविणें.

लाडका लेक आणि दोघांत एक—आईबापाचा एकच मुलगा असला म्हणजे तो त्यांचा फार लाडका असतो.

लाडका लेक म्हणतो, मला शेजाऱ्याच्या घरावर हुळा भाजूं द्या—[हुळा भाजणें=ओला हरभरा भाजणें.] शेजाऱ्याच्या घराचें कांहीं कां होईना, त्याचा विचार करायचा कशाला? कारण लाडका लेक आहे तो काय मागतो आहे—तो म्हणतो आहे मला शेजाऱ्याच्या घराला आग लावून त्यावर हुळा भाजू द्या!

लाडका लेक देवळीं हगे, ढुंगण पुसायला महादेव मागे—वर प्रमाणेंच. लाडावणें पहा.

लाडकासा बाळू, कोलत्याशीं खेळू – मुलास फार लाडावलें म्हणजे तें विस्तवाशीं खेळण्यासारखा मूर्खपणाहि करूं लागतें. निळू पहा.

लाडकी सई, दाल्ल्यानं घेतली डोई—एखादी वस्तु लाडकी असेल, तर ती वस्तु मनुष्य कुठें ठेवील अन् काय करील त्याचा नेम नसतो.बायको लाडकी झाली म्हणून नवरा तिला डोक्यावर घेऊन नाचूं लागला. बाईलबुद्ध्या माणसाबद्दल म्हणतात.

लाडकें पोर देवळीं हगे, गांड पुसायला महादेव मागे—लाडावला गुरव०–पहा.

लांडगा—लांडगेतोड चालविणें—शत्रूवर आवेशानें तुटून पडणें;कत्तल करणें. 'पेशव्यांच्या सैन्यांत विलक्षण वीरश्री संचरून त्यानें केवळ लांडगेतोड चालविली.'–V. S. २.११०. 'जेव्हां जर्मन सैन्यानें फ्रेंच्यांची लांडगेतोड चालविली त्यावेळीं दे माय धरणीं ठाय असेंच अक्षरशः म्हणण्याची फ्रेंचांवर पाळी आली.'–केसरी १-१२-४२.

लांडगेतोड होणें—अचानक छापा घालून आवेशानें कापाकापी करणें; लचके तोडणें. लांडगा आपल्या भक्ष्यावर झडप घालतांना भक्ष्याला आपली चाहूलसुद्धां लागणार नाहीं अशा सावधगिरीनें अचानक झडप घालतो आणि सांपडेल त्या ठिकाणचें सांपडेल तसें लचके तोडीत राहतो, त्यावरून हा वाक्प्रचार प्रचारांत आला असावा. 'चोहोंकडून तोंडें लागून लांडगेतोड झाली.'–भाब ९५.

***लांडगा आला भेटीला, कुत्रा गेला गांवाला**—पाहुण्याची परस्पर बोळवण करणें; (पाहुण्याची) वासलात लावणें; (पाहुण्याला) टाळून जाणें; आपल्यापेक्षां जबरदस्त मनुष्याची गांठ घेण्यापेक्षां त्याला टाळलेलाच बरा.

लांडगा आला रे लांडगा आला !—एक धनगराचें पोर रानांत गुरें राखीत असतां शेजारच्यांची मजा करावी म्हणून वरील वाक्य ओरडला व धांवा ! असा टाहो फोडला; तेव्हां जवळच्या काम करणाऱ्या लोकांनीं आपलें काम टाकून तेथें त्याच्या मदतीला आले पण फसून परत गेले. पुढें खराच जेव्हां लांडगा आला तेव्हां कोणीहि मदतीला धावून आलें नाहीं. "हर हिट्लर ग्रेट ब्रिटनवर स्वारी करणार नि त्यासाठीं तो प्रचंड सिद्धता करीत आहे हें वृत्त वाचकांनीं या युद्धकालांत अनेकदां वाचलें असेल. थोडक्यांत या बातेला आतां 'लांडगा आला रे लांडगा आला' या गोष्टीसारखें स्वरूप प्राप्त झालें आहे."–केसरी २७–१२–४०.

लांडग्याला ग्रास आणि पुढच्याची आस—लांडग्याला एकदां कांहीं दिलें कीं तो फार सोकावतो व पुन्हां मिळण्याची आशा धरतो. भटाला दिली ओसरी.

लांडा—लांडे कारभार करणें—दुसऱ्याच्या कामांत लुडबुड करणें; मध्येंच तोंड घालणें; ढवळाढवळ करणें. 'आम्ही आपसांत भांडूं, एकमेकांच्या उरावर बसूं पण शेजारचे कोणी शेकोजी आमच्या घरांत येऊन लांडे कारभार करावयाला लागले कीं, तें आम्हांला खपवायचें नाहीं.'–नि.

लांडा कारभारी—लुडबुड्या; दुसऱ्याच्या कामांत व्यर्थ पडणारा.

***लांडा बैल हातीं आला तर चोराचा तोटा काय झाला ?**—चोराला कांहीं मिळालें तरी त्याचा फायदाच असतो, कारण त्यास तें फुकटच मिळतें. तेव्हां चोराला लांडा बैल सांपडला तरी फायद्याचीच गोष्ट. चोराय शष्पलाभाय.

लांडा भुंडा-मुंडा हात, दाळ्ळा करी भात—शक्ति नसतां श्रम करण्यास सिद्ध होणें. आपला हात तर तोकडा आहे, थोटा आहे, आणि म्हणे भात करीन. शेवटीं तो नवऱ्यालाच करावा लागणार. अशक्यासाठीं सायास. मुंगळा म्हणतो, आई मी भेली उचलतो, याप्रमाणें.

लांडें लुडबुडतय अन् पाटलाचें गुंडें मोडतय्—लांडा कारभार; व्यर्थ खटाटोप; बेकायदा काम.

लांडें लुडबुडे आणि नाचे पुढें पुढें—झब्बूवृत्ति; फाजील अहंभावाची जाणीव; लायकी नसतां लायकवानांत मिरवण्याची हौस.

लाडावणें—लाडावला गुरव देवळांत हगे, ढुंगण पुसावयाला महादेव मागे—ज्याचे अतिशय लाड केले गेले आहेत, त्याला चांगलें कोणतें, वाईट कोणतें हें कळत नाहीं; युक्तायुक्तत्व कळत नाहीं; शिवाय तो लाडामुळेंच हट्टीहि बनलेला असतो. एखाद्या वस्तूचें युक्तायुक्तत्व कळलें, तरी त्याच्या त्या हट्टी स्वभावामुळें

मोठेपणीं उद्योग धंदा वगैरे त्या विद्येच्या जोरावर चांगला लाभला, लोकांत मानमान्यता मिळाली वगैरे.

ल्हान व्हडा सारखॉ वडॉ—(गो.) लहान थोरांना सारख्याच आकाराचे सारख्या प्रमाणांत वडे वाढणें.तरतमभावाची कल्पना नसणें.

लहानच हिरा बरा, थोर गार कशाला !—मोठ्या गारेपेक्षां लहान हिऱ्याचें मोल अधिक असतें. महत्त्व किंवा मूल्य हें आकारांवर अवलंबून नसून गुणांवर असतें.

लहानाची उपेक्षा करूं नये—लहान असला म्हणून काय झालें;त्याची हेटाळणी करूं नये. तोहि आपल्या कुवतीप्रमाणें कार्य करीतच असतो ! त्याची हेटाळणी करण्यापेक्षां, त्याला नीट हाताशीं धरून दिशा दाखवणें हें थोरमनाचें निदर्शक आहे. उपेक्षा करणें हें हलक्या मनाचें निदर्शन आहे.

लहानाचे लहानच सोयरे—प्रत्येकाची मिळकत त्याच्या व्यापाप्रमाणें व कुवतीप्रमाणें असते. गरीबाला श्रीमंत सोयरा लाभणें बहुधा अशक्य; गरिबाची गरिबाशींच सोयरीक जुळायची.

लहानशी बुटली, सांजसकाळ उटली—घरीं नवरा बायको दोघेच असल्यामुळें ज्यास फारसा खर्च नसतो अशास म्हणतात,

ळळणें—**ळळती गोष्ट; ळळतें बोलणें**—मन बळविणारें, शांत करणारें भाषण.

ळळतें घेणें—हलक्या हातानें, सहज रीतीनें, हळू होणें.

ळळा—**ळळा चालविणें-पुरविणें**—लाड पुरविणें; मनाप्रमाणें करणें, करूं देणें; कोडकौतुक करणें.

ळळा देणें—प्रेम लावणें; माया करणें. 'इंद्रिया ळळा देऊनी ।'–ज्ञा ३·१९४·

***लावशील ळळा, तर पडेल गळां**—जर प्रेम केलें तर प्रेम मिळेल; एरवीं कसें मिळणार ? द्यावें तसें घ्यावें.

लक्ष—**लक्ष चौऱ्याशीं योनी**—चौऱ्याशीं पहा.

लक्षाचा मनुष्य-माणूस—लाख माणूस; अतिशय चांगला, सज्जन, लायक माणूस.

लक्ष प्रदक्षणा, पैसा दक्षणा—जसें काम तसें मोल दिल्याखेरीज तें काम नीट उठत नाहीं. 'पैसा दक्षिणा लक्ष प्रदाक्षिणा' पहा.

लक्षाक एक भक्तु, कोटीक एक मुक्तु—(गो.) लाखांत एकच खरा भक्त निपजतो आणि कोटींत एकच मुक्त होतो.

लक्षाधीश कीं कक्षाधीश; लक्षापति कीं भिक्षापति; लक्षेश्वर कीं भिक्षेश्वर—अतिशय श्रीमंत किंवा अतिशय दरिद्री. ही तड किंवा ती तड.मधली स्थिति बरी नव्हे. तु०–भिक्षेश्वर कीं लक्षेश्वर.

लक्षण—**नांव मोठें आणि लक्षण खोटें**—नांवावरून कल्पना करावी तर तो फार मोठ्या योग्यतेचा माणूस असावा असें वाटतें, पण प्रत्यक्ष कृति पाहावी तर भलतेंच दिसून येतें व अपेक्षाभंग होतो.बृहस्पति हा विद्वान खरा पण म्हणून कांहीं बृहस्पति या नांवाचे सारेच विद्वान असतात असें नव्हे !

लक्ष्मी—**लक्ष्मी अवतरणें**—लक्ष्मीची कृपादृष्टि होणें; समृद्धि येऊन शोभा प्राप्त होणें (कुटुंब, शेत,घरदार, व्यापार इ. स.)

लक्ष्मी मोरीवाटें येणें—गडगंज संपत्ति येणें;लयलूट होणें; ऐश्वर्य लाभणें; वैभव प्राप्त होणें. लक्ष्मी (संपत्ति) दारावाटें, खिडक्यावाटें आली इतकेंच नव्हे, तर तिची इतकी विपुलता (गर्दी) वाढली, कीं पुढें पुढें ती मोरीवाटेंहि आंत आली. म्हणजे इतकी गडगंज संपत्ति आली.

लक्ष्मीचा होरा—(येऊं पाहाणारा) (येत असलेला) भरभराटीचा काल; भाग्योदयकाल; भरभराटीचा संक्रमण काल.

लक्ष्मीची मोठी बहीण—अवदसा; अक्काबाई. (अक्काबाई पहा.)

लक्ष्मीची बहीण-भगिनी—अवदसा; अक्काबाई; दारिद्य. 'प्रसिद्धिविन्मुखतेमुळें नामवंत लेखक असूनहि लक्ष्मीच्या वडिल भगिनीशीं त्यास झगडावें लागतें.'–केसरी १८–७–३९.

लक्ष्मीबाईची दया—लक्ष्मीची कृपादृष्टि लक्ष्मी, संपत्ति प्राप्त होणें.

***लक्ष्मी आली घरा,तडका आड करा**—(महानु.) मोठी संपत्ति मिळाल्यानतर मनाचा क्षुद्रपणा जात नाहीं; उदारपणा येत नाहीं तेव्हां म्हणतात.

लक्ष्मी नामाभिधान, दर्शन जाहल्या न मिळे अन्न—लक्ष्मी हें केवळ नांव, गुण मात्र लक्ष्मीसारखे

नसतात, तर तर लक्ष्मीच्या मोठ्या बहीणीसारखे असतात; कीं जिचें तोंड पाहिल्यावर सारा दिवस दुःखांत, भांडणांत, कटकटींत जायचा! नांव मोठें लक्षण खोटें. नांव लक्ष्मी, पण खरी अवलक्षणी.

लक्ष्मी पुसेना शंखाला, तो भीक मागे पोटाला —लक्ष्मी ही शंखाची बहीण आहे. पण प्रत्यक्ष लक्ष्मी ही बहीण असूनहि शंख खंकच असतो. "लक्ष्मी जयास भागिनी आणि तात सिंधु।...इतुकें असोन परि शंख फिरे भिकारी।"

लक्ष्मीची भयण अवदसा फाटोफाट आसा—(गो.) लक्ष्मीची बहीण अक्काबाई ही तिच्या पाठोपाठच असते. संपत्तीनंतर विपत्ति.

लक्ष्य—लक्ष्यांत घेणें—१ नीट मनांत वागविणें. २ आपल्या बाजूस वळविणें. "वरकडही भागानगरीं अमीन मनसबदार होते. यांची जशी योग्यता, जसा आदर करावा, तशा रीतीनें त्यांचे घरीं जाणें व त्यांस आणणें असें केलें आणि सर्व आपले लक्ष्यांत घेतलें."—श्रीशिवछत्रपति० चरित्र १३६.

लाकूड—लाकूड पडणें—काष्ठपण येणें; लाकडासारखें जड होणें. 'सर्वेंद्रियां लाकुड पडे। स्मृति भ्रमामाजीं बुडे। मन होय वेडें। कोंडे प्राण॥'—ज्ञा ८.३२७.

लाकूड थळणें-होणें—काठी किंवा काष्ठ याप्रमाणें निर्जीव, निःसत्त्व होणें.

(जिभेस) लाकूड होणें—जिभेला कोरड पडणें; जीभ वाळणें.

लाकडास माकड जोडणें-लावणें—विजोड अशा वधूवरांचें लग्न लावणें; एखाद्या लग्नास हापापलेल्या माणसास कसलीतरी बायको मिळवून देणें.

***ठाकरं नि लाकडं**—(ठाणें) कुणबी लोक ठाकरांना म्हणतात. ठाकूर म्हणजे अक्कलशून्य, असा त्यांचा समज.

लाकूड सायाचें, लेकरूं रायाचें—[साय=साग]—साया वृक्षांचा राया. सर्व लाकडांत सागाचें लाकूड श्रेष्ठ, तद्वत् सर्व लेकरांत राजाचें लेकरूं श्रेष्ठ.

लाकडाची अधोली मोजील खंडोखंडी, फोडली तर एक भाकरहि भाजणार नाहीं—ज्यासाठीं वस्तु तयार केली असेल त्यासाठींच तिचा उपयोग करायचा; भलतीकडे उपयोग केल्यास लाभ नाहीं. लाकडाचा उपयोग जाळण्यासाठीं करतात हें खरें असलें, म्हणून लाकडाच्या ज्या कांहीं इतर वस्तू तयार केलेल्या असतात त्या जर जाळण्ययासाठीं घेतल्या तर त्यांच्या उपयोग काय? अधोली-मोजण्याची वस्तु, माप. ही लाकडाची अधोली खंडोखंडी धान्य मोजील; पण तीच जर जाळली तर तिच्या जाळावर मूठभर दाण्याच्या पिठापासून होणारी एक भाकरीहि भाजली जाणार नाहीं.

लाख—लाखपंचोत्र्या—लाखामध्यें ज्याच्या पांचच गोष्टी खऱ्या असतील असा. (ल.) गप्पीदास; थापाड्या.

लाख-लाखाचा माणूस—अत्यंत श्रेष्ठ, योग्य, लायक माणूस.

लाख रुपयांचा—फार महत्त्वाचा; अमोल; अत्युत्कृष्ट.

लाख रुपायांची गोष्ट; लाखांतली गोष्ट—अतिशय महत्त्वाची गोष्ट.

लाखाच्या ठिकाणीं—अतिशय महत्त्वाचें; अमूल्य; बहुमोल. 'तूं मला आतां दहा रुपये दिलेस तर ते लाखांच्या ठिकाणीं आहेत.'

लाखाचे बारा हजार करणें—आंत बट्टयाचा व्यवहार करणें. जवळ जवळ दिवाळें काढण्याच्या पंथाला लागणें.

लाख्या बारगीर—(ऐति.) दुसऱ्या मल्हारराव होळकरांजवळ लाख रुपये घेऊन चाकरी करणारा एक शिपाई. यानें मल्हाररावाच्या संरक्षणासाठीं जीवहि दिला आहे.

***लाख आणि खाक**—फार मोठे श्रीमंत म्हणून समजले जाणारे लोक बहुधा कफल्लक असतात. लक्षाधीश ते भिक्षाधीश.

दे लाख, घे दोन लाख, देतोस काय तर घेतोस काय—व्यर्थ गप्पा; फुकाच्या बाता. देणें पहा. (गु.) लपोडसंख लाख! तोके सवा लाख!

लाख नसावा पण साख असावी—संपत्ति नसली तरी पत असावी.

लाख मरोत पण लाखाचा पालनकर्ता-पोशिंदा न मरो—फालतू लाख लोक मेल्यानें फारसें नुकसान नसतें, पण लाखांना जगविणारा माणूस मरूं नये.कारण तो मेल्यास नुकसान फार असतें. कारण त्याच्या एकट्याच्या मरणानें एकदम लाख माणसें उघडी पडतात. लाख मेलीं, तर

दुसरीं लाख माणसें निपजतात व त्यांनाहि जगवायला हा एकटा पुरा पडतो.

लाखाची मत्ता,काडीची सत्ता—सत्ता ही मत्तेपेक्षांहि श्रेष्ठ ! एका काडीवर सत्ता असणें हें लाखाच्या मत्तेपेक्षां केव्हांहि श्रेष्ठ. नुसती मत्ता असून उपयोगी नाहीं त्याबरोबर सत्तादेखील हवी.

लाखाचें डेंगणें टेकूं द्या कीं शेकूं द्या--(आशिष्ट.) मोठ्याला स्वःचाच बडेजाव, तो दुसऱ्याच्या उपयोगी न पडतां स्वतःचेच सोपस्कार करीत राहील.

लाखोश्री आणि भिकेश्री एकच—मेल्यावर गरीब व श्रीमंत सारखेंच.

घटकेंत लाख्या, नाहींतर फाक्या—शनीसारख्या एखाद्या बलाढ्य ग्रहाची किंवा राज्यकर्त्यांची मर्जी बसली तर तो लगेच आपणास ऐश्वर्याच्या शिखरावर नेतो; उलट मर्जी खप्पा झाली कीं तो ताबडतोब धुळीला मिळवितो. चंचल, अस्थिर वैभवाबद्दल म्हणतात.

लाख---लाखेसाठीं मणी फोडणें—(गो.) लाखे-खातिर मणि फुटंवुचो. थोडक्या लाभासाठीं विशेष हानि करणें. सोन्याच्या मण्यांत लाख भरतात तेव्हां एखाद्यावेळीं लाख हवी असेल आणि जवळपास लाख कुठें मिळण्यासारखी नसेल तर जवळचा मणी फोडून आंतली लाख काढून घेणें, हा मूर्खपणा आहे.

लाखोली---(शिव्यांची) लाखोली वाहणें-- शिव्याची सरबत्ती झोडणें; भरमसाट शिव्या देणें.

लाग---लाग करणें—हल्ला चढविणें. 'सर्वेंचि पिप्लिका करिती लाग। देखोनि माजला कीर्तनरंग।'—दावि २६९.

लाग चालविणें—ठरविल्या क्रमानें किंवा सरणीनें चालू करणें (कांहीं काम, योजना, बेत.)

लाग दवडणें—१ एखाद्या गोष्टीच्या सिद्धीसाठीं आपल्या योजना चालू करणें; मार्गे लावणें. संधि घालविणें; लाभ दवडणें.

लाग लागणें--लग्गा साधणें; शिकार मिळणें. 'रति-पति मज पाठीं कां, सये, लागला गे !। यदुकुलतिलकाचा हा कसा लाग लागे।' —सारुह ३.७४.

लाग लावणें-- १ (प्राप्तीसाठीं) संधान बांधणें; कांहीं वशिला लावणें, खर्च करणें; हरएक प्रकारें उपयोग, युक्ति योजून काम जुळेलसें करणें. २ मार्ग काढणें; पाठलाग करणें. 'मागोनि लाग लावित नृपबळ येउनि।'—मोआदि १५.६३.

(एखादें काम) लागाला येणें-लागीं लावणें-लागा वर येणें-मिळणें-जुळणें—एखादें काम सुरळीतपणें सुरू होणें किंवा चालू लागणें, सिद्धीच्या मार्गावर असणें, पंथास लागणें. 'माझी पंचायत लागीं लागली.'

लागास येणें--रंगारूपास येणें; फलद्रूप होण्याच्या बेतांत येणें.

लागणें---मुखाला आग लागणें—सत्यानाश होवो, असें इच्छिणें; वाईट चिंतणें. एक शिवी. 'लागो मुखाला आग त्याच्या।'—दावि ७.४५२.

कानास-कानीं लागणें—कानांत सांगणें; कांहीं गुप्त गोष्ट कळविणें; चहाडी करणें कान पहा.

पाठीं लागणें—पिच्छा धरणें; पाठपुरावा करणें. पाठ पहा. 'घर सोडुनिया लागलों स्नेहाचे पाठीं । परिणामीं त्वां लाविली आम्हा आडकाठी।'—होला ८७.१२.

पाणी लागणें—पाणी पहा.

पायीं लागणें—नम्र होणें; पाय धरणें.

(एखाद्यास) लागला जाणें--ऋणी असणें; मिंधा होणें. २ चिकटणें; फार परिचय होणें.

लागू असणें; लागून असणें--१ चिकटणें; मर्जी धरून राहाणें; सामील असणें; संबंध असणें. २ अनैतिक, व्यभिचारी संबंध असणें.

लागू पडणें—(औषध) परिणामकारी, गुणकारी होणें; उपयोगी पडणें.

***लागतील मघा तर चुलीपुढें हागा, नाहींतर ढगाकडे बघा; लागल्या मघा तर सांधीकोनीं हगा, न लागल्या मघा तर ढगाकडे बघा**—मघा नक्षत्राचा पाऊस इतका मोठा पडतो कीं, त्यावेळीं क्षुल्लक कामाला घराबाहेर पडणें मुष्कीलीचें जातें. आणि तो पाऊस नाहींच पडला तर दुष्काळ पडण्याचा संभव अधिक, म्हणून ढगाकडे पाहात बसण्याची वेळ येते.

लागतील स्वाती तर पिकतील मोतीं-पिकेल माणिकमोतीं--स्वाती नक्षत्राचा पाऊस पडेल तर मोतीं निपजतील, भात चागलें पिकेल. तु०—'कीं स्वातीस्तव अब्धिशुक्तिपुटकीं मोती घडे नटकें।'

लागतें मिष्ट पण आहे दुष्ट—लसणीचें तिखट, विषाची कांडी, वर्मी झोंबणारें पण सकृतदर्शनीं कानाला मधुर लागणारें भाषण इ.

लागला तर तीर नाहीं तर तुक्का—तुक्का पहा.

लागली तर शिकार, नाहीं तर भिकार—मिळाल्यास शिकार मिळेल, नाहीं तर ती भिकार आहे असें समजून सोडून देऊं. द्राक्षें अंबट याप्रमाणें.

लागला पंथाला, बोलवा वैद्याला—अगदीं मरणास टेकल्यावर मग वैद्याला बोलावणें; तहान लागल्यावर विहीर खणणें. लग्न आलें घरीं, मग मांडवाची तयारी, पहा.

देखला गोहो, लागला लाहो— नवरा पहिल्याबरोबर लळा लागला. देखणें पहा.

लागली लहर, केला कहर—लहरी मनुष्य लहर लागल्यावर काय करील (म्हणजे चांगलें कृत्य करील, कां वाईट कृत्य करील,) याचा नेम नसतो; तद्वतच, काय करायचें, तें किती करील याचाहि नेम नसतो.

लागे बोट, वाढे पोट—निमित्तमात्र; योगायोग. नुसतें निमित्त होऊन एखादें चांगलें वाईट काम होऊन जाणें.

लागो बाई लागो, सात घरीं लागो—(व.) एका ठिकाणीं लावून दिलेली आग अनेक घरांस पसरावी अशी ज्या बाईची दुष्ट मनीषा तिची ही उक्ती होय. एका ठिकाणीं लागलेली कळ किंवा जुंपलेलें भांडण अनेक ठिकाणीं पसरावें अशी असदिच्छा येथें प्रकट आहे.

लागो भागो दिवाळी—उच्च ध्येय ठेऊन काम करावें. फळ आलें नाहीं तर खचून जाऊं नये. परिणामाकडे लक्ष न देतां कार्य करीत राहणें; लाभ होवो नुकसान होवो दिवाळी ही झालीच समजावें.—पामो ५६५.

लांच—लांचु घाल्या (दिल्या) शिवाय बोंचु हालना—(गो.) लांच दिल्यावांचून तोंड उघडत नाहीं.

लांचलुचपत दक्षणा आणि घेई ते तत्क्षणा—जें कांहीं घ्यायचें असेल तें ताबडतोब घ्या, मग तें दान असो, दक्षिणा असो, लांचलुचपत असो! अशा गोष्टी दिरंगाईवर टाकणें म्हणजे त्यावर पाणी सोडणें होय; म्हणून त्या ताबडतोब घ्याव्यात.

लांचलुचपत दक्षणा घेईजे तत्क्षणा, नाहीं तर हात लाविजे वृषणा—(अशिष्ट.) वर पहा.

लाज—लाज काढणें—१ अब्रू घालविणें. २ निर्लज्ज म्हणणें. ३ बुरखा घेणें. मारवाडी गुजराथी बायका कोणीं पुरुषानें त्यांच्याकडे पाहिल्यास तोंडावर पदर ओढून घेतात.

लाज झांकणें-राखणें—अब्रू संभाळणें; प्रतिष्ठा ठेवणें. 'आमची राखावी ती लाज। परंपरा हेंचि काज।' —एकनाथ.

लाजलावणा—लाज आणणारा; अब्रू घेणारा. 'हा बेटा वंशांत लाजलावणा निघाला.'—बाळ २.१६१.

लाज लावणें—लाजविणें. 'त्याला विजय लाज लावि खरी।'—मोकर्ण १६.१.

लाज वांटून पिणें—कशाची फिकिर न करणें; निःसंग बनणें; निर्लज्ज होणें.

लाज होणें—अब्रूला बट्टा येणें; कमीपणा येणें; मानहानी होणें. २ लज्जा वाटणें; संकोच वाटणें; अपमानाचा प्रसंग येणें.' 'पतकरा वास तर मोठी लाज झाली.' —विवि ८.१.८.

***लाज आपल्या मनाची, दांभिक भक्ति जनाची**—आपण आपली स्वतःची लाज धरली पाहिजे; दांभिक भक्तीनें, खोट्या भक्तीनें जन लिडबिडलें आहेत. जगाचा सारा पसारा लबाडीचा आहे.

लाज घातली भिजत, अन् अक्कल घातली शिजत—निर्लज्ज मनुष्य; मूर्ख व निर्लज्ज व्यक्ति.

लाज ना लज्जा आणि दारीं नित्य कज्जा—भांडखोर, भांडकुदळ व्यक्तींची वृत्ति. लाज नाहीं, वृत्ति पूर्ण बेफिकिर बनलेली. परिणामाचा विचार न करणारी व्यक्ति केव्हां, कुठें आणि कुणाशीं भांडेल याचा नेम नसतो.

लाज नाहीं अब्रू, कशाला घाबरूं—निर्लज्ज मे सदा सुखी. लाजहि नाहीं, अब्रू नाहीं. अगदीं निस्संग बनल्यानंतर, निलाजरा झाल्यानंतर तो भिणार तरी कोणाला आणि त्याला भीति तरी कशाची वाटणार?

लाज नाहीं निलटा, गळ्यांत बांधला वरवंटा—[निलटा=निर्लज्ज] निर्लज्जच झाली आहे, लाज सोडली आहे, मग तिकडे कांहींहि होवो अशी वृत्ति. वरवंट्याप्रमाणें सारखे हपके बसले तरी, ते सहन करण्याची (निर्लज्जपणामुळें) ताकद आहे याचें दर्शक.

लाज नाहीं मना, कोणी कांहीं म्हणा—मनच जर बेफिकीर झालें, निर्लज्ज झालें, उद्धट झालें तर कोणी कांहीं बोललें, तरी त्यास त्याचा कांहीं विधिनिषेधच नाहीं. सुखहि नाहीं कीं दुःख नाहीं. तु०—कोणी निंदा कोणी वंदा, आपला स्वहिताचा धंदा.

लाज नाहीं मला, भेटायला येतें तुला—एकदां येऊं नको म्हणून सांगितलं, दोनदां सांगितलं, तीनदां सांगितलें तरी ती पुन्हां पुन्हां तिच्याकडे जातेच आहे. म्हणजे ती कोडगी झाली आहे, निर्लज्ज झाली आहे, लाळघोंटेपणा करते आहे.

मनाची नाहीं तर जनाची तरी लाज बाळगावी—स्वतःला एखादी गोष्ट जरी पसंत असली तरी लोक काय म्हणतील याचा विचार करणें अवश्य असतें. आपणाला योग्य वाटलें तरी लोकविरुद्ध आचरण करूं नये. ' यद्यपि शुद्धं लोकविरुद्धं नाचरणीयं ना करणीयम् ।'

लाज मेली म्हणजेच मनुष्य धीट होतो—लाज वाटेनाशी झाली पाहिजे; म्हणजे धीटपणा, बेडरपणा अंगीं येतो.

लाजे गेल्यारि पेजे धाटना—(गो.) संकोच धरला तर जेवण मिळत नाहीं.

लाजणें—**-हागणाऱ्यानें तरी लाजावें, नाहींतर बघणाऱ्यानें तरी लाजावें**—एखादें वाईट कृत्य कोणी (लोकांसमक्ष) करूं लागला, त्याला जरी त्यांत कांहीं वाटलें नाहीं, त्याला जरी लाज वाटली नाहीं,तो जरी पूर्ण निर्लज्ज बनला,तरी मग निदान पाहाणाराला तरी त्याची लाज वाटली पाहिजे. त्यानें तरी निदान आपले डोळे झांकून घ्यावेत. थोडक्यांत, एक निःसंग बनला म्हणून सर्वांनींच निःसंग व्हावें असें कांहीं नव्हे.

लाजू लाजू मेली, त्याच गांवीं गेली—आरंभीं मोठें लाजेचें सोंग आणावयाचें, प्रथम लाजत लाजत पण शेवटीं ती गोष्ट करावयाचीच. प्रथम आढेवेढे घेऊन अखेरीस होकार देणारास म्हणतात. तुल०–(महानु.) लाजतां लाजतां जन्म गेलाः हागतां दर्शन केला.

लाट—**-लाट उठणें**—१ चळवळ, टूम निघणें. २ वादळ होणें.

लाट मोजणें—निरुद्योगी राहणें;निरर्थक गोष्टी करणें.

लाटणें—**-लाट्या गंगाजी-गोमाजी-कारभारी-पाटील**—कोणीकडून तरी आपला मतलब साधणारा.

लाटा-टा—**-लाटा-ठा फिरणें-फिरविणें**—दडपून नेणें; रेटणें; गडबडगुंडा, घालमेल घालणें.

लाड—**-लाड चालविणें-पुरविणें**—हौस पुरविणें, भागविणें; मागितलेली वस्तु देणें.

लाड देणें– अमर्याद प्रीति करणें; कोडकौतुक करणें; लाड करणें. ' कां लाड देशी हो ! कान्हयातें बाई । '–आपद ८८.

***लाड करा, लोभ करा, लेकरूं लोकाचे आणि हिंग घाला,जिरे घाला,फुलके लाखाचे**—(दुसऱ्याच्या) मुलांचे कितीहि लाड केले तरी तीं मुलें आपल्या उपयोगी पडत नाहींत. तेव्हां आपणांस जी गोष्ट पाहिजे ती आपलीच असली पाहिजे, लाखिस.रख्या हलक्या धान्याचें कितीहि चांगल्या प्रकारें खाद्य केलें तरी चांगल्या धान्याची चव त्याला येणें नाहीं. तेव्हां वस्तु मुळांतच स्वतःची व उंची पाहिजे.

लाडानें वेडें, गुळानें बोबडें—फार लाड केल्यानें मुल वेडें बनतें व फार गूळ खाल्लयास बोबडें बनतें. लहान मूलास योग्य शिस्त लावली नाहीं तर तें बिघडतें.

लाडें खाई हाडें; लाडें लाडें खाई हाडें; लाडें लाडें खाई कुत्र्याचीं हाडें—लाडकें लाडावलेलें मूल आईला फार छळतें व त्यामुळें त्याला स्वतःलाहि कांहीं सुख लागत नाहीं.

लाडें लाडें केलें वेडे; लाडें झाडें वेडें—लाडानें वेडें गुळानें बोबडें–पहा. Spare the rod and spoil the child.

लाडका—**-लाडका पूत आणि करट्यांत मूत**—मुलाचें भलतेंच लाड पुरविणें.

लाडका लेक आणि दोघांत एक—आईबापाचा एकच मुलगा असला म्हणजे तो त्यांचा फार लाडका असतो.

लाडका लेक म्हणतो,मला शेजाऱ्याच्या घरावर हुळा भाजूं द्या—[हुळा भाजणें=ओला हरभरा भाजणें.] शेजाऱ्याच्या घराचें कांहीं कां होईना,त्याचा विचार करायचा कशाला ? कारण लाडका लेक आहे तो काय मागतो आहे—तो म्हणतो आहे मला शेजाऱ्याच्या घराला आग लावून त्यावर हुळा भाजू द्या !

लाडका लेक देवळीं हगे, ढुंगण पुसायला महादेव मागे—वर प्रमाणेंच. लाडावणें पहा.

लाडकासा बाळू, कोलत्याशीं खेळू — मुलास फार लाडावलें म्हणजे तें विस्तवाशीं खेळण्यासारखा मूर्खपणाहि करूं लागतें. निळू पहा.

लाडकी सई, दादल्यानं घेतली डोई—एखादी वस्तु लाडकी असेल, तर ती वस्तु मनुष्य कुठें ठेवील अन् काय करील त्याचा नेम नसतो.बायको लाडकी झाली म्हणून नवरा तिला डोक्यावर घेऊन नाचूं लागला. बाईलबुद्ध्या माणसाबद्दल म्हणतात.

लाडकें पोर देवळीं हगे, गांड पुसायला महादेव मागे— लाडावला गुरव०—पहा.

लांडगा——लांडगेतोड चालविणें—शत्रूवर आवेशानें तुटून पडणें;कत्तल करणें. 'पेशव्यांच्या सैन्यांत विलक्षण वरिश्री संचरुन त्यानें केवळ लांडगेतोड चालविली.'–V. S. २.११०. 'जेव्हां जर्मन सैन्यानें फ्रेंच्यांची लाडगेतोड चालविली त्यावेळीं दे माय धरणीं ठाय असेंच अक्षरशः म्हणण्याची फ्रेंचांवर पाळी आली.'—केसरी १-१२-४२.

लांडगेतोड होणें—अचानक छापा घालून आवेशानें कापाकापी करणें; लचके तोडणें. लांडगा आपल्या भक्ष्यावर झडप घालतांना भक्ष्याला आपली चाहूलसुद्धां लागणार नाहीं अशा सावधगिरीनें अचानक झडप घालतो आणि सांपडेल त्या ठिकाणचें सांपडेल तसें लचके तोडीत राहतो, त्यावरून हा वाक्प्रचार प्रचारांत आला असावा. 'चोहोंकडून तोंडें लागून लांडगेतोड झाली.'—भाव ९५.

***लांडगा आला भेटीला, कुत्रा गेला गांवाला**— पाहुण्याची परस्पर बोळवण करणें; (पाहुण्याची) वासलात लावणें; (पाहुण्याला) टाळून जाणें; आपल्यापेक्षां जबरदस्त मनुष्याची गांठ घेण्यापेक्षां त्याला टाळलेलाच बरा.

लांडगा आला रे लांडगा आला !—एक धनगराचें पोर रानांत गुरें राखीत असतां शेजारच्यांची मजा करावी म्हणून वरील वाक्य ओरडला व धांवा! असा टाहो फोडला; तेव्हां जवळच्या काम करणाऱ्या लोकांनीं आपलें काम टाकून तेथें त्याच्या मदतीला आले पण फसून परत गेले. पुढें खराच जेव्हां लांडगा आला तेव्हां कोणीहि मदतीला धावून आलें नाहीं. "हर हिटलेर ग्रेट ब्रिटनवर स्वारी करणार नि त्यासाठीं तो प्रचंड सिद्धता करीत आहे हें वृत्त वाचकांनीं या युद्धकालांत अनेकदां वाचलें असेल. थोडक्यांत या वार्तेला आतां 'लांडगा आला रे लांडगा आला' या गोष्टीसारखें स्वरूप प्राप्त झालें आहे."—केसरी २७–१२–४०.

लांडग्याला ग्रास आणि पुढच्याची आस— लांडग्याला एकदां कांहीं दिलें कीं तो फार सोकावतो व पुन्हां मिळण्याची आशा धरतो. भटाला दिली ओसरी.

लांडा——लांडे कारभार करणें—दुसऱ्याच्या कामांत लुडबुड करणें; मध्येंच तोंड घालणें; ढवळाढवळ करणें. 'आम्ही आपसांत भांडूं, एकमेकांच्या उरावर बसूं पण शेजारचे कोणी शेकोजी आमच्या घरांत येऊन लांडे कारभार करावयाला लागले कीं, तें आम्हांला खपवायचें नाहीं.'—नि.

लांडा कारभारी—लुडबुड्या; दुसऱ्याच्या कामांत व्यर्थ पडणारा.

***लांडा बैल हातीं आला तर चोराचा तोटा काय झाला?**—चोराला कांहीं मिळालें तरी त्याचा फायदाच असतो, कारण त्यास तें फुकटच मिळतें. तेव्हां चोराला लांडा बैल सांपडला तरी फायद्याचीच गोष्ट. चोराय शष्पलाभाय.

लांडा भुंडा-मुंडा हात, दाळ्या करी भात— शक्ति नसतां श्रम करण्यास सिद्ध होणें. आपला हात तर तोकडा आहे, थोटा आहे, आणि म्हणे भात करीन. शेवटीं तो नवऱ्यालाच करावा लागणार. अशक्यासाठीं सायास. मुंगळा म्हणतो, आई मी भेली उचलतो, याप्रमाणें.

लांडें लुडबुडतय अन् पाटलाचें गुंडें मोडतय्— लांडा कारभार; व्यर्थ खटाटोप; बेकायदा काम.

लांडें लुडबुडे आणि नाचे पुढें पुढें—झब्बूवृत्ति; फाजील अहंभावाची जाणीव; लायकी नसतां लायकवानांत मिरवण्याची हौस.

लाडावणें——लाडावला गुरव देवळांत हगे, ढुंगण पुसावयाला महादेव मागे—ज्याचे अतिशय लाड केले गेले आहेत, त्याला चांगलें कोणतें, वाईट कोणतें हें कळत नाहीं; युक्तायुक्तत्व कळत नाहीं; शिवाय तो लाडामुळेंच हट्टीहि बनलेला असतो. एखाद्या वस्तूचें युक्तायुक्तत्व कळलें, तरी त्याच्या त्या हट्टी स्वभावामुळें

तो माघार घ्यायला तयार नसतो, मग त्यांत नुकसान होवो वा कुणाला वाईट वाटो ! त्याची त्याला फिकीर नसते.

लाडू--लाडू खायला घालणें--विवाहादि मंगल-कार्य होणें. 'लाडू कधीं खायला घालणार ?'–मोरप्र १४.

लांडोर----मोर नाचतो म्हणून लांडोरहि नाचते (पण शोभत नाहीं)--(निंदार्थी उपयोग) अंधानुकरण योग्य नाहीं. मोर पहा.

लाण---लाण करणें—ताणणें; लांबवणें; मजल आणणें, पोंचविणें.

लात-लाथ---लाथ मारणें—१ लाथेनें मारणें. २ त्याग करणें; टाकून देणें; झिडकारणें. 'संसारासि मारुनि लाथा। केला तत्त्वतां देशोधडीं।' एकनाथ. 'सूर्याचा प्रकाश ही एक सृष्टींतील...देणगी आहे तिचा अव्हेर करणें म्हणजे संपत्तीवर लाथ मारणें असाच अर्थ होईल.'– ग. ज. आगाशे.

लाथ मारून पाणी काढणें--प्रयत्नें साध्य करून घेणें; कष्टानें, मेहनतीनें कह्यांत घेणें, शक्य करून घेणें. 'आमचे भाऊजी आहेतच तसे ! लाथ मारतील तिथं पाणी काढतील !'–दाजी १.२४६.

लात हाणणें—लाथ मारणें; मारपीट करणें.–शल्य १.१०.

***लातबुकी आणि सदासुखी**--धाक असला म्हणजे सारें कांहीं सुरळीत होतें. मार असला म्हणजेच जो नीट असतो, त्याबद्दल म्हणतात. तु०–लकडीके बल मकडी नाचे. लाथाबुक्क्यांचा मार सदैव खावून खावून जो पुरा कोडगा बनला, त्यांत त्याला कांहीं विशेष खंती वाटेनाशी होतें त्याला अनुलक्षून ही म्हण आहे.

लातबुकी, भाकर सुकी—सर्व प्रकारांनीं छळ होणें. छळाला सीमा न राहाणें. पुष्कळ लाथा आणि गुद्दे व भाकरीहि सुकी (कोरडी=तुपाशिवाय). छळ असून शिवाय खाण्याचे हाल.

लातनका देव बातेनं समजत नाहीं—(व.) एखादा मनुष्य कोडगा असला व त्याच्या दोषांबद्दल आपण त्याला शब्दानें बोललों तरी तो वाटेवर येत नाहीं; पण मार देतांच त्याची समज पटते. 'चांभाराच्या देवाला खेटराची पूजा' असा ह्या म्हणीचा अर्थ.

लातोंके भूत (देव) बातोंसे नहीं मानते—वर पहा.

लाथ मारीन तिथें पाणी काढीन--मला हिंमत आहे, शक्ति आहे, जोर आहे. या जोरावर मी वाटेल तें करीन.–एकच प्याला ३.४.

लाथ मारील तेथें पाणी काढील—वर पहा.

लाथ मारीन तर भात काढीन--तुझ्या पोटावर लाथ दिली तर त्यांतील भात बाहेर पडेल; तेव्हां उगाच गमजा कशास ?

लाथ सोसते पण बात सोसत नाहीं—मार सहन होतो, पण बोलणें सहन होत नाहीं. नुसत्या बोलण्यानेंच एकमेकांत वितुष्टें आल्याचीं उदाहरणें आहेत. टोला मारला तर तेवढ्या वेळपर्यंतच काय वेदना होतील त्या; पण पुढें त्याची फारशी आठवण राहात नाहीं. पण तेंच शाब्दिक टोला मारला तर त्याची आठवण सहसा बुजली जात नाहीं.

लादा---लादावादीचें काम—एखाद्यावर बळेनें लादल्यामुळें कसें तरी अव्यवस्थित झालेलें काम.

लाद्र---लाद्रूलॅ काडलॅ हजार आनि प्रेद्रू कॅलॉ काजार—(गो.) लाद्रूकडचे हजार रुपये कर्ज काढून पेद्रूचें लग्न करणें. 'परस्पर पावणे तेरा' अशा अर्थांनें वापरतात.

लांब---लांब-लांबडा करणें—१ वाढविणें. २ चोपणें; मारणें ठोकणें; सफा करणें; लंबा करणें.

जीभ लांब करणें—फार बोलणें; वटवट करणें; निरर्थक बडबड करणें; कुचकें पाद्रें बोलणें; वर्मीं बसेल असें बोलणें.

लांबकान्या—गाढव. 'माणसांचें कान लहान असतां त लांबकान्याप्रमाणें कां वागतात ?'–नपुक ९.

लांब जिभेची—भारी वटवट करणारी बाई; दुरुत्तरें करणारी बाई. 'ज्या लाडक्या लांब महाजिभांच्या। तशाच त्या मानित जाय भाच्या॥'–सारुह ७·११०.

लांब बसणें—विटाळशी असणें. विटाळशेपणीं बायका कोणाला विटाळ होऊं नये म्हणून लांब बसतात.

कान लांब होणें—गाढवपणा करणें; मूर्ख होणें. (गाढवाच्या लांब कानांवरुन वाक्प्रचार) आपले कान लांब झाले म्हणजे पर्यायानें आपण गाढव झालात असें म्हणणें.

लांबीवर पडणें—लांबणीवर पडणें;पुढें ढकललें जाणें.

***लांब गेली लपायला आणि भूत गेलें चापायला**—जवळच्या त्रासाला कंटाळून दूर जावें तों तिथेंहि कसला तरी व्याप उद्भवावा अन् त्यापासून त्रास व्हावा अशी तऱ्हा. गांवच्या भयानें घेतलें रान—पहा.

लांब लांब कासोटे । मिरविती आंबुलियां पुढें—शिशु ८९१. वायकापुढें हे मोठ्या कासोट्याचे पुरुष दिमाख दाखवितात. भागुबाई.

लांबा साथ तुतो जीयाय, मरे नहीं पण मांदो थाय—(गु.) मोठ्याप्रमाणें करावयास गेलें कीं मरण जरी ओढवलें नाहीं तरी दुखणें येतें; म्हणून समर्थांच्या बरोबर स्पर्धा करूं नये.

लांबण—लांबण लावणें—चऱ्हाट वळणें; पाल्हाळ लावणें. (व.) एकाच गोष्टीविषयीं वारंवार व पुष्कळ वेळ बोलणें.

लांबणीवर घालणें-टाकणें-लोटणें—पुढें ढकलणें; दूर सारणें.

लाभ—भेटीचा लाभ देणें—(बहुमानार्थी प्रयोग) भेट घेणें; भेटणें.

लाभा येणें—लाभणें.

***लाभ दिसे, मुद्दल नासे**—पुढील लाभाच्या आशेनें एखाद्याला पैसे द्यावे आणि लाभ न होतां मुद्दलमात्र बुडावें, अशा प्रसंगीं म्हणतात. जास्त व्याजाच्या लोभानें मुद्दलच बुडण्याचा पुष्कळ वेळां प्रसंग येतो.

लाभ ना नफा, रिकामा धका—ज्यांत लाभ नाहीं अशी व्यर्थ खटपट; बेफायदा धडपड.

लाभ पांचाचा आणि वस्त्र दहाचें—लाभ थोडा पण हानि जास्त.

लाभ, मृत्यु आणि हानि हीं कोठेंहि गेलें तरी टळत नाहींं—मनुष्याच्या मागें सुख, दुःख आणि नाश ह्या अवस्थात्रयी आहेतच; कुठें वाटेल त्या ठिकाणीं गेलें तरी त्या टाळूं शकत नाहीं.

लाभ सांगावा जनाला आणि हानि सांगावी मनाला—ज्या गोष्टीमुळें आपली वाहवा होईल, चहा होईल, कीर्ति वाढेल,त्याच गोष्टी बाहेर चार लोकांत बोलून दाखवणें इष्ट; कारण त्यापासून आपली वाहवा वाढते, चहा जास्त होते, कीर्ति दुणावते. आणि हानिकारक गोष्टी बोलल्यास या उलट स्थिति होते. म्हणून त्या कोणाजवळ बोलूं नयेत; फारतर आपल्या मनाशींच उगाळीत बसावें, पण त्याची वाच्यता—परिस्फुटता करूं नये.

लाभापेक्षां भोळ्याची आशा फार—सरळ मार्गानें होणाऱ्या नफ्यावर संतुष्ट न होऊन दुसऱ्याच्या चुकीचा फायदा घेऊं पाहाण्याची आशा; त्याच्या नजर चुकीवरून फायदा काढूं पाहाण्याची वृत्ति.

लाभालाभौ, जयाजयौ—सुखदुःख, जयपराजय हीं सर्व आयुष्यांत, एका मागून एक असतातच. तेव्हां त्यांस सारखेंच मानून मनुष्यानें यत्न केल्यास श्रमाचें सार्थक होतें. 'सुखदुःखे समे कृत्वा लाभालाभौ जयाजयौ। ततो युद्धाय युज्यस्व नैवं पापमवाप्स्यसि ॥'

लाभाविणें मैत्री तोडूं नये—मैत्री, ही खरें पाहातां तोडूंच नये; पण प्रसंगच पडला, तर निदान त्यांत कांहीं फायदा, लभ्यांश वगैरे आहे अशी खात्री करून घेतल्याशिवाय तरी मैत्री तोडण्याच्या फंदांत पडूं नये. तु०—तुपाशिवाय उष्टें खाऊं नये.

लाल—लाल बनणें—(व.) श्रीमंत, गब्बर होणें.

लाल बावटा-कंदील-दिवा दाखविणें—कांहीं धोका आहे अशी सूचना देण्यासाठीं लाल निशाणी योजतात. यावरून १ धोक्याची सूचना देणें. २ प्रतिकूल होणें.

लालन—लालनाद्बहवो दोषास्ताडनाद्बहवो गुणाः।—तस्मात्पुत्रं च शिष्यं च ताडयेन्नतु लालयेत् ॥ लाड करण्यानें, माया करण्यानें दोष उद्भवतात आणि धाक दाखवल्यानें, वर्चस्व ठेवल्यानें, किंबहुना मारल्यानें गुणवृद्धि होते.

लाला—लालाभाईचा चुरमा—१ रेलचेल; मुबलकपणा. २ बेसुमार चैन, मौज.

लालाभाईचा चुरमा आणि शेटजी सडक—हलवायाच्या घरावर तुळशीपत्र याप्रमाणें.

लांव—लांव तरी सासू, डांकीण तरी आई—कसेंहि असलें तरी सोसलें पाहिजे. आपल्या माणसांना टाकतां येत नाहीं.

लांवेंचे चणे लांवेंन खांवचे—(गो.) हडळीला ठेवलेले चणे, हडळीनेंच खायचे. इतरांना ती गोष्ट शक्य होणार नाहीं. एखादें काम एखाद्या ठराविक युक्तिबुद्धीच्या माणसांकडूनच होण्यासारखें असलें व इतरांना तें जमण्यासारखें नसलें कीं म्हणतात.

लावणी——लावणी तोडणें—एकानें दौलतजादा करून लावणी म्हणण्यास सांगितली असतां दुसऱ्यानें जास्त पैसे देऊं करून निराळीच लावणी म्हणण्यास सांगणें.

लावणी——लावणी लावणें—१ तुलना करणें. 'कृष्णागरु आणि मलयानिल। लावणी लावितां मोल तुटे।'—भवि २.२४. २ व्यवहारी उपयोग करणें. 'वर्तल्याविण शिकवी। ब्रह्मज्ञान लावणी लावी।'—दा २.१०.३६.

लावणें——लावून घेणें—(बायकी) न्हाणें, सोवळें इ. साठीं उभें वस्त्र वेढून घेणें.

लावून पाहणें—ताडून पाहणें; परस्परांची किंमत, योग्यता इ. ठरविणें.

लावून बोलणें—टोमणें मारणें; दुसऱ्याला झोंबेल असें बोलणें.

***लावण्यामागें धांवणं, तोंड केंविलवाणं**—(व.) विशेष कळकळीचा ज्याचा संबंध नाहीं फक्त मुद्दाम लावून घेतलेला कांहीं संबंध आहे त्याच्यापासून कांहीं लाभ होईल या आशेनं केंविलवाणें तोंड करून त्याच्यामागें हिंडण्यांत काय लाभ? त्याला काय कींव येणार? बिन कळकळीच्या माणसाला दैन्य दाखवून दया उत्पन्न करून घेण्याची आशा फुकट आहे.

लावली राख, झाला पाक—[पाक=शुद्ध,निर्मळ] अंगाला राख लावून मोकळा झाला. राखेखालीं जुनी पापें छपविलीं. तु०—गायीला शिवून विटाळ घालवला. गंगेत बुडी मारून मुक्त झाला.

लाविल्यास कांरे महारा कांट्या, लाविल्या पण पाटिल, वाऱ्यानें (उडून) गेल्या—सांगितल्या कामाचा परतंत्र बुद्धीचा. पाटलानें कांट्या लावायला सांगितलें; गेला आणि कांट्या लावून आला.पण त्या नीट व्यवस्थित लावायला हव्यात, उडून जातां कामा नये, याची काळजी घेणें जरूर होतें; तें ध्यानीं न घेतां काम केलें. कसें तरी कामकरणें; कामाची टाळाटाळ करणें, वेठ मारणें.

लावशील लळा तर पडेल गळां—माया घ्यावी, माया द्यावी. प्रेमानें प्रेम मिळत असतें. लळा पहा.

लावीन फडी आणि जाईन वाडी—[फडी=रूपयांच्या पंक्ती. वाडी=सावंतवाडी.] पैसे खर्च केलें म्हणजे कोठेंहि जातां येते व कांहींहि करता येते.

लावण्य—लावण्य शोभे गुणाच्या पोटीं आणि सुगंध पाहिजे फुलाच्या देठीं—गुणांतच खरें सौंदर्य आहे. एखादी स्त्री अत्यंत स्वरूपान आहे पण तिच्याठायीं दुर्गुण आहेत तर तिच्या सौंदर्याचा उपयोग काय? तिच्याकडे कोणी लक्ष सुद्धां देणार नाहीं; पण तेंच ती सद्‌गुणी असेल तर तिच्या गुणाबरोबरच सौंदर्याचीहि चहा होते. तिच्या त्या गुणामुळें तिचें सौंदर्य शोभून दिसतें; तीच तऱ्हा फुलाचीहि.बाभळीलासुद्धां फुलें येतात पण केवळ वासाअभावीं त्याची आसक्ति कुणाला वाटत नाहीं. कैकेयी सुंदर नव्हती अशांतला भाग नाहीं पण तिच्या दुर्गुणामुळें तिच्या साऱ्या सौंदर्याची माती झाली.

लावालावी——लालावी करणें—कलागत लावणें; भांडण लावणें; चुगली सांगणें; कानाशीं लागणें.

लांस——लांस घालप—(गो.) लिलांव बोलणें.

लासणें——लाशिल्या उंगठ्यावर मुतिशि ना—(गो.) भाजलेल्या अंगठ्यावर लघुशंका देखील करायचा नाहीं मग औषध करणें दूरच. दुसऱ्याला दुःख झालें तरी त्याच्यासाठीं यत्किंचित्‌हि स्वार्थाग किंवा अंगमेहनत न करणारीं माणसेंहि भेटतात कधींमधीं. कापणें पहा.

लाशिल्या घरा वांसो—(गो.) जळत्या घराचा वांसा ओढून घेणें; वस्तूचा संपूर्ण नाश होण्याची वेळ आली असतांना जें कांहीं हाताला मिळेल तें खरें, असें समजून तें घेणें.

लाशिल्यार तेल—जळणाऱ्या वस्तूंवर तेल ओतण्या सारखें जळणाला जळणाची मदत. तुलना:—आगींत तेल.

लासलु——लासलु मासळेक कुस्सली चिंच—(गो.) जळलेल्या अगर भाजलेल्या मासळीला कुजलेली चिंच. वाईट माणसाला अधिक वाईटाची संगत.

लाही——लाही उडणें—१ एकसारखा मोठा भाडिमार, वर्षाव होणें (गोळ्या,शिव्या इ.चा.). २ हां हां म्हणतां विक्री होणें; खपून जाणें.

लाही करणें—नाश करणें. 'हा जीव माझा तुजला न लाहे। करीन याची तरि आजि लाहे।'—सारुह ४.२३.

लाही फुटणें—मोठा मारा होऊन नाश होणें. 'अठरा घटका लाही फुटली।'—ऐपो २२४.

लाही भाजणें—१ गदमदणें; उबगणें. २ उन्हाच्या झळ्या लागणें व तलखी होणें. ३ अतिशय नाश करणें;

लाहा करणें. 'जसे भडभुंजे लाह्या भाजतात तशी गत केली.' –भावा २३.

लाही लाही होणें; लाहा होऊन जाणें—अतिशय संताप येणें; अंगाची आग आग होणें. 'हा अत्याच्यार पाहून सारखी लाही लाही होत होती.'–स्वप १४५.

लाह्याचें खाणें आणि मुलीचें जिणें सारखेंच-–धान्य भिजवून, तें वाळवून नंतर तापलेल्या वाळूंत तें भाजून काढलें म्हणजे लाही तयार होते. धान्यावर इतके सोपस्कार करून लाही तयार झाल्यावर ती तशीच खाण्यानें कांहीं तिला चव येत नाहीं. पुन्हां ती ताकांत अगर दुधांत भिजवतात, कधीं तिला फोडणीहि देतात आणि मग खातात. थोडक्यांत, दुसऱ्याच्या उपयोगी पडावें म्हणून बिचारें धान्य आपलें सारें जिणें हालअपेष्टांत आणि कष्टांत घालवतें, तद्वतच मुलीचेंहि असतें. ती उपजल्यापासूनच तिच्यावर संयमाचें दडपण आणण्यांत येतें, तिचें जिणें कष्टासाठीं व दुसऱ्याच्या कारणीं पडण्यासाठीं आहे अशी शिकवण तिला देण्यांत येते व खरोखरींच तिचें आयुष्य संयमांत, परधार्जिणेपणांत व कष्टांत जातें. तु०–शेळी जाते जिवानिशीं.

लाळ---लाळ उठणें—तोंडास पाणी सुटणें. 'परि अमृताहि उठी लाळ।'–अमृ १०.२०.

लाळ गळणें—(ल.) दृढ स्नेह, मैत्री असणें.'काय त्या दोघांची लाळ गळती.'

लाळ गाळणें—अतोनात किंवा फाजील स्तुति करणें. 'राजांच्या पदरीं लाळ गाळणारे पुष्कळ असतात.'

लाळ घोटणें—तोंडाला पाणी सुटणें, अभिलाष धरणें. 'देखुनी तुझें रूप वेडावलें भूप। अंतरीं घोटिती लाळा।'–मध्व ३४;–ह ३४.७. २लांगूलचालन करणें. 'विश्वामित्रानें मेनकेपुढें लाळ घोटावी?'–नारुकु ३.४७.

लाळेन चणे गोड—(गो.) एखादी प्रिय व्यक्ति आपल्याविषयीं कठोरपणा धरीत असली तरी आपण तिच्याविषयीं आपलेपणानें पाहाणें व तिचें वर्तन आहे त्या स्थितींत गोड मानून घेणें.

लाळेनें चणे गोड करावे–भिजवून खावेत—चण्याबरोबर दुसरें कांहीं नसल्यास आपलीच लाळ त्यांत घालून मिटक्या मारीत खावें. आपलें कसेंतरी समाधान मानून, आहे ती स्थिति गोड करून राहावें; स्वतःच आपला मान राखून घेऊन प्रतिष्ठेनें राहावें.

लिखना---तकदीरका लिखा, कभी नहीं चूका--(हिं.) नशिबांत असेल तें कधींहि टळायचें नाहीं.

एक लिखा और सौ–हजार बखा--(हिं.)कागदावर लिहिलेली एक ओळ हजार तोंडी पुराव्याबरोबर आहे. यांत लेखी पुराव्याचें महत्त्व वर्णिलें आहे. एक पहा.

लिंगदेह---लिंगदेह बाजेवरी : घाली स्थूळदेहीं साबरी--(महानु.) नुसता देहदंड मात्र करावयाचा पण मन विलासांत मग्न! देहाप्रमाणें मनालाहि निवृत्ति आली पाहिजे.

लिपि---लिपिमात्र पुस्तक, योनिमात्र स्त्री—अनेक भाषांत अनेक प्रकारचे ग्रंथ असतात त्याप्रमाणें जगांत अनेक प्रकारच्या स्त्रिया असतात.

लिंबू---लिंबू तोंडावर फुटणें—तोंडावर तजेला, टवटवी दिसणें; तोंड तेजस्वी असणें.

लिहिणें---लिनां आणि भिकार चिनां—(कों.) लिहिणं हें भिकार चिन्ह.

लिहिणें ना पुसणें, कोरे कागद वाचणें—खोटी प्रौढी मिरवणें; उगाच डामडौल दाखवणें. एखादी व्यक्ति रटफसुद्धां जाणीत नाहीं, पण आव मोठा पंडितासारखा. लोकांना बनविण्यासाठीं मारे कागद घेऊन वाचन करीत असल्याचा बहाणा करावयाचा नि प्रत्यक्ष पाहावें तों स्वारी कोरा कागद तोंडासमोर धरून बसलेली. कांहीं येत नसलें तरी आपण सर्वज्ञ आहों असा आव आणावयाचा. पण सत्य झाकलेलें राहात नाहीं.

लिहितां पुसतां, चारी दप्तरा चलयेतां—अष्टपैलू मनुष्यास उद्देशून योजतात. उपजत गुणाचा, अतिशय बुद्धीचा तल्लख.

लिहितां हातवळा, गातां गळा, शिंपतां मळा--गातां गळा पहा.

लुका---समुद्रास गेला लुका तों सुका--समुद्र पाण्यानें सदोदित भरलेला पण झाला मात्र पाणी मिळालें नाहीं; असा रडतराऊ.

लुगट---लुगट विकचें घड्येर आनि फूल विकचें वावले--(गो.) कापड विकावें घडी करून

आणि फूल विकावें दोऱ्यांत गुंफून. म्हणजे त्यांना अधिक किंमत येतें.

लुगडें---सात लुगडीं, शेटें उघडीं—(अशिष्ट.) विपुलतेचा योग्य उपयोग न करणें; विपुलतेचा उपयोग करतां न येणें. सात साड्या पहा.

लुगड्याची घडी मोडली, तिची किंमत कमी झाली—सुरळीत आहे तोंपर्यंतच कुठलीहि वस्तु ठीक, पण एकदां त्यांत ढवळाढवळ झाली कीं त्या वस्तूचें महत्त्व कमी झालेंच !

लुटणें---लुटलासरे परटा, (तो म्हणे) लुटल्या आयाबाया—परटाकडे चोरी झाल्यास त्याचें काय जावयाचें आहे ! त्याचे गरीब ग्राहक मात्र नागवणार ! परमारे पावणे तेरा.

लुडबुडा---लांडें लुडबुडे आणि नाचे पुढें पुढें—दुर्बल, पंगू, असमर्थ किंवा झब्बू माणसेंच पुढें पुढें करतात. चांगलीं मागें राहतात. लांडा पहा.

लुळा---लुळ्या पांगळ्या श्रीमंतीपेक्षां धट्टीकट्टी गरिबी बरी—श्रीमंती आहे पण शरीर रोगी किंवा दुर्बळ आहे; तर अशा माणसाला काय सुख असणार ? त्यापेक्षां गरीबी पण त्याबरोबर निरोगी व सशक्त अशी प्रकृति ही बरी.

लूट---लूट मारणें--लुटणें.

लुटीचे गहूं आणि बापाचें श्राद्ध--वडिलांचें श्राद्ध करून पुण्य मिळविण्यासाठीं गहूं लुटण्याचें पाप करणें. लुटीवर दानधर्म व पुण्य.

लेक---लेक असली जरी तरी परघरीं जाणारी---स्वतःची असून स्वतःच्या कारणीं न पडणारी वस्तु. पोटचा गोळा असला, तरी तो आपल्यासाठीं नाहीं. कधीं तरी परक्याच्या घरींच लोटायचा आहे तो.

लेक होईतों ल्यावें, सून येईतों खावें--आपली खाण्यापिण्याची व दागीन्याची हौस फेडून घ्यावयाची ती सून आणि लेक होण्यापूर्वी. पुढें पोक्तपणें निर्लोभी वृत्तीनें वागावयाचें असतें.

लेकाचें निघालें वऱ्हाड, कीं सासूनें करावें वेगळें बिऱ्हाड--मुलाचें लग्न झालें कीं त्याचा स्वतंत्र संसार थाटून देणें व स्वतः वेगळें राहणें हेंच उत्तम.

लेकी बोले, सुने लागे—सासू प्रत्यक्ष सुनेला न रागें भरतां सुनेच्या वागण्याबद्दल आपल्या लेकीला बोलते. उद्देश असा कीं, सुनेनें त्यापासून बोध घ्यावा. अन्योक्ति. एकास मध्यें घालून दुसऱ्यास बोलणें. "उलट ज्यांना हा हुकूम लागू नव्हता अशांनीं केवळ भीतीनें टिळकांचें नांव व घर वर्ज केलें. 'लेकी०' एकाला धाक घातला कीं तो सर्वांना लागावयाचा."—टिच ३.१.६-

लेकीला चिंधी, सुनेला बाजूबंदी—घोरणी वृत्ति. लेक, कितीहि झालें तरी परघरीं जाणारी; तिला बाजूबिंदी घातली, तर तिच्याबरोबर ती बाजूबिंदीहि परघरीं जायची, त्यापेक्षां ती एकटीच जाते आहे हें पुरें नव्हे का ? सून काय दुसऱ्याची लेक असली, तरी ती आतां आपली झालेली. आपल्या सत्तेची तिला बाजूबिंदीच नव्हे, तर सबंध सोन्यानें मढवून काढली तरी कुठें जायची नाहीं. ती जशी घरींच राहणार, तसेंच तें सारें सोनेंहि घरींच राहाणार. सामान्यतः या उलट वृत्ति आढळते. लेकीचेच लाड होतात.

लेकीला तूपसाखर, सुनेला मीठभाकर—लेक म्हणजे पोटचा गोळा आहे. त्यावर माया केव्हांहि जास्तच असायची. शिवाय ती परघरीं जाणारी, सारी माया कठोर करून तिला परघरीं लोटायचें, मग कांहीं गोडधोड तिला घालावेंसें वाटणारच. सून कांहीं झालें तरी परक्या घरून आलेली. नेहमीं खायला काळच ती. तिच्यावर खरी माया कशी असेल !

लेकीस धमक, सुनेस चमक—मुलीस धाक दाखविल्यानें सुनेस भीति उत्पन्न होऊन ती काम चांगलें करितें. लेकी बोले, सुने लागे.

लेकरूं---लेकरूं ना बाळ, वाजविती टाळ—ज्याच्या घरीं पोरेंबाळें नाहींत त्यांस कांहीं काम नसतें; तेव्हां त्यांना रिकामपणीं टाळ कुटीत बसण्यास कांहीं हरकत नसते.

लेकरूं मांडीवर हगल्यास वडील मांडी तोडतील असें नाहीं—रा ३.१०. (ऐति.) स्वजन, आप्त यांकडून आपली नुकसानी झाली तर आपण त्यासाठीं त्यांना टाकीत नाहीं. त्यांच्यासाठीं कांहींहि झालें तरी सोसतोच. तु०—मूल मांडिवरि हागलें। तें बा कोणें त्यागिलें।—तुगा ४३४६.

लेंकरां-गुरांनीं वाडा साजरा—मुलें ही राष्ट्राची संपत्ति म्हटली जाते व गुरें ही शेतीची संपत्ति म्हटली

जाते. जी शेतीची व राष्ट्राची संपत्ति, तीच घराचीहि संपत्ति ! कारण घर, वाडा, कुटुंब हें सारें राष्ट्रांपैकींच होय. तेव्हां लेकरांनीं व गुरांनीं जो वाडा समृद्ध असेल, तोच उत्तम, तोच शोभिवंत. संतति–संपत्ति यानें कुटुंबाची समृद्ध स्थिति.

लेख——लेखांत मेख—(महानु.) लिहिण्यांत मख्खी आहे. (हिं.) लेखमें मेख.

लेखणी——लेखणी चालविणें——लिहिणें; लेखांत गुंतवणें.–गांगा २३४.

लेखणी शिवार्पण करणें——पुन्हां न लिहीणें; पुन्हां त्याच्या वाटेस न जाणें,त्याच्या फंदांत न पडणें; तशी प्रतिज्ञा करणें. ' कांहीं गोष्टी महाराजांनीं मंजूर केल्या तर त्यांच्या विरुद्ध लिहिण्याची आमची लेखणी शिवार्पण करूं '–विक्षिप्त ३.१७०.

लेखणीचा घड—लिहिण्यांत वाकबगार, कुशल लेखक.

लेखणीस चंग बांधणें—उत्तम वळणदार अक्षर लिहिणें; लिहिण्याचा धंदा करणें.

लेखण्या करणें—१ तुकडे करणें. २ विभाग पाडणें (सैन्य इ.चे). ३ ठार मारणें.

***लेखणीबहादरापेक्षां हातबहादर जास्त**——लिहिणारापेक्षां लढाई करणारा जास्त. श्रेष्ठ तु०—Sword is mightier than the pen.

लेखणें——लेकल्यार देवु, ना जाल्यार फातरु—(गो.) मानला तर देव नाहींतर दगड.

लेंड——लेंडसुखास येणें—प्रेमभरानें तल्लीन होणें; प्रेमभरानें देहभान विसरणें.

***एकाच लेंडाचे तुकडे, एक परमाळ्तलो नी एक घाणतलो**—एक लेंड्या दोन कुडके पहा.

लेंडी——लेंड्या गाळणें–टाकणें—भेदरून जाणें; भीतीनें गडबडून जाणें; अतिशय घाबरणें. (जनावर भ्यालें अडतां लेंड्या लेंड्या हगतें.)

लेढ——लेढ पाडणें—(व.) [लेढ=वीर्य, रेत] सक्त मेहनत करून घेणें.

लेना——लेना एक और देना दो—(हिं.) एक घ्यायचें पण द्यायचें दोन.एक घेईन पण दोन देईन. बहुधा मारामारीचे प्रसंगीं वापरतात.

लेजे दान की दीजे प्राण; लेजेदे दान लेजेदे प्राण—शरण किंवा मरण पतकरणें. " लोकांस 'लेजेदे दान लेजेदे प्राण' तैसे घडलें."–भाव १०६.

लेनेकू ना देनेकू, लढनेकू मजबूत—(हिं.) घेण्या-देण्याचें कांहीं बोलूं नका, फार तर लढायला सांगा; त्याला तयारी आहे.

लेनेगयी पूतको, खोआयी खसमको——मूल मागावयास गेली पण मूल दूरच राहिलें, पातिव्रत्य मात्र गमावून आली.एक मिळण्यासाठीं दुसरें घालवून बसणें.तु०—Many go out for wool, come home shorn.

लेंढार——लेंढार पाठीस लागणें—पुष्कळ मुलें बाळें असणें; मुलांचा त्रास मागें असणें.

लोक——लोकांचीं घरेंदारें पुजणें—सारखें लोकांच्या घरीं जाणें; या घरांतून त्या घरांत असें नेहमीं लोकांकडे जाणें.

लोक आणि ओक—लोकमत हें अतिशय वाईट, तिरस्करणीय, ओकारीप्रमाणें त्याज्य असें आहे, अशी कांहींची समजूत.

लोक आले ताकाला, बायकोला संताप आला——कंजूषवृत्ति; आपल्या घरचें कांहीं द्यायचें नसलें, आणि अशांत कोणी कांहीं मागायला आलें तर जिवाचा संताप करून घ्यायचा. किंवा अशावेळीं संताप साहाजिकच येतोहि.

लोक उपवाशी आणि राजा अधाशी——लोकां-जवळ कर–सारा वगैरे भरायला कांहीं नाहीं. ते अगदीं अशक्त होऊन बसले आहेत आणि इकडे तर राजा तें कांहीं जाणायला तयार नाहीं. उलट तो इतका अधाशी झाला आहे कीं, तो लोकांना पिळून काढायलाहि मागें पुढें पाहात नाहीं. तेव्हां साहाजिकच वरील उद्गार निघतात.

लोककार्याचा मोबदला म्हणजे कार्य केल्याचा दाखला—लोककार्य करणें म्हणजे लोकांची उन्नति करणें (आर्थिक वा बौद्धिक) मग ज्या तळमळीनें कार्य केलें असेल त्या प्रमाणांत आपल्या कार्याला यश आलेलें पाहून समाधान वाटतें आणि समाधान वाटणें म्हणजे मोबदला मिळाल्या-सारखें आहे.

लोकनिंदा झांकावी आणि कर्तव्याची जागृति करावी—कार्य सारखें करीत राहिलें पाहिजे,कार्यांत नेहमीं

जागृत राहावें. लोकनिंदा ऐकूं आली तर तिकडे दुर्लक्ष करावें; नाहींपेक्षां कार्य पार पाडणें बहुधा अशक्य असतें.

लोकमताचा मान, राजाचा घेतो प्राण—लोकमत खवळलें ह्मणजे एकट्या राजाचें तिथें काय चालणार ? कारण त्याला त्याच लोकांवर राज्य करायचें असतें. अशा वेळीं लोकमताला नमून राहाणें म्हणजे आपला स्वाभिमान सोडणें होय. आणि स्वाभिमान नाहीं त्याचें जिणें व्यर्थ होय.

लोक म्हणती बुवाबुवा । न कळे गुलामाचा कावा ॥—बुवाबाजी करणाऱ्या गुरूबद्दल तुकारामबोवांचे उद्‌गार.–गांगा २८७.

लोक म्हणून खाणार, बाप म्हणून कोण देणार ?—लीनता धरली तर सारें कांहीं मिळतें; दंडेलीनें काय मिळणार ?

लोकशाही आली, बादशाही गेली—लोकसत्ताक पद्धति ज्या ठिकाणीं रुढ झाली आहे तिथें राज्यसत्ताक पद्धतीला महत्त्व कसें चढणार ? उलट ती नामशेष होत जाणार. साहजिकच लोकशाही येणें म्हणजेच बादशाही जाणें होय.

लोकसांग्या न् भीकमाग्या—(व.) [लोकसांग्या= लोकाजवळ सांगणारा; फुसकी गोष्टसुद्धां गुप्त न ठेवतां लोकांना सांगणारा.] ज्या मनुष्याला कांहींहि हळू हळू सांगतां येत नाहीं, लोकांजवळ ती सांगितल्याशिवाय ज्याच्यानें राहवत नाहीं त्या भिकारवृत्तीच्या माणसाला अनुलक्षून ही म्हण आहे.

लोक हांसतो म्हणून बहिराहि हांसतो—प्रवाहपतित. लोक कां हांसतात, कशासाठीं हांसतात हें कांहीं कळलेलेंहि नसतें, पण केवळ लोक हांसायला लागले म्हणून आपण हांसायचें व आपला कमीपणा झांकू पाहायचा.

लोकका डर ना परलोकका डर—(१) ज्यास लोकांची किंवा परमेश्वराचीहि भीति वाटत नाहीं असा; बेडर; कोणास न मानणारा. किंवा (२) परमेश्वरापेक्षां लोकांना आधीं भ्यावें अशा समजुतीचा.

लोका ऐकवी चतुर वाणी, करणी करतो मूर्खावाणी—ढोंगी, बडबड्या, मोरे उपदेशाच्या लंब्याचवड्या बाता मारणारा, नीतीचे पोवाडे गाणारा आणि स्वतः मात्र कृतीनें वाईट तु०–लोकां सांगे ब्रह्मज्ञान, आपण मात्र कोरडा पाषाण.

लोका नागौन जोडलें, गांवच्या चोरान नाडलें—(गो.) लोकांना नागवून मिळवलेलें धन दुसराच कोणी तरी हरण करून नेतो.

लोका सांगावें, तसें स्वयें आचरावें—प्रतिष्ठा वाढविण्याचें लक्षण. जें लोकांना सांगायचें आहे, जो उपदेश करायचा आहे, तें प्रथम स्वतः आचरणांत आणावें. नाहींपेक्षां त्याचा प्रभाव लोकांवर पडत नाहीं. तेव्हां प्रथम आधीं आचरणांत आणावें, व मग सांगत सुटावें. तु०–बोलावें तैसें चालावें. आधीं केलें, मग सांगितलें.

लोका सांगे गेण, ढुंगणाखालीं शेण—(कुण.) [गेण=ज्ञान] ' लोकां सांगे ब्रम्हज्ञान० 'प्रमाणें.

लोका सांगे ब्रह्मज्ञान, आपण कोरडा पाषाण—लोका ऐकवी चतुरवाणी, करणी करतो मूर्खावाणी पहा.

लोकांगेरि पोल्यांक छिद्रां, आमगेरि सांदणांक छिद्रां—(गो.) लोकांच्या घरीं घावनांना छिद्रें पडतात तर आमच्या घरीं सांदणांनाच छिद्रें पडतात. लोकांपेक्षां आपलें सगळेंच कांहीं विशेष अशी बढाई मारणें.

लोकांचा थुंका आणि आपला बुक्का—लोकांना आपल्या वस्तूची मग ती कितीहि मोलाची असो किंमत वाटत नाहीं; ते तिला कस्पटाप्रमाणें लेखतात.

लोकांची प्रीति, हीच राजाची संपत्ति—ज्या लोकावर राज्य करायचें, ते लोक जर खूष नसतील, तर राज्यांत अनेक चळवळी, दंगेधोपे माजून सारीच बेबंदशाही उद्भवण्याचा संभव फार. पण तेच लोक जर खूष असतील, लोकांची प्रीति जर राजावर असेल, तर राज्य शासन सुरळीत चालेल, आणि राज्यशासन सुरळीत चालणें म्हणजेच संपत्ति समृद्ध करण्यासारखें आहे.

लोकांची मरकी, वैद्यांची हरकी—गांवांत रोगराई वाढून फार मृत्यु होऊं लागले कीं वैद्याची पोळी पिकते. दुसऱ्याला जें दुःखदायक तें त्यांना सुखदायक होतें.

लोकाचे जिवावर, दरोडा गांवावर—गांवावर दरोडा घालायचा आहे, पण स्वःची हिंमत नाहीं, स्वतःच्या अंगीं ताकद नाहीं; पण आपला हा कमीपणा झांकून ठेवून लोकांच्या हिंमतीवर, ताकदीवर (जिवावर) दरोडा घालायचा. दुसऱ्यावर अवलंबून मोठें कार्य करण्याची अपेक्षा धरणें व्यर्थ आहे.

लोकाचें तट्टू, किती मी नटूं—(क.) उसन्या वस्तूवर ऐट करणें.

लोकाचे दोन पैसे देणें, फेड करूं कशानें—आकिंचनाचें बोल, असाहाय्यतादर्शन. कर्ज झालें आहे खरें, पण त्याची फेड करायला आतां कांहीं साधन नाहीं, तेव्हां काय करूं ? असें हताश झालेल्याचे हे उद्गार.

लोकांचें लेणें लाजीरवाणें, आपलें लेणें गोजीरवाणें—उसना अलंकार आणून घालणें ही लज्जास्पद गोष्ट होय. स्वतःची वस्तु मग ती साधी का असेना ती अंगावर घेणें भूषणास्पद आहे.

लोकाचें लेणें लेग लुचरे, मागायला आली देग कुत्रे--उसने अलंकार आणून नटून गेलें व तेथें वस्तूची मालकीण मागावयास आली म्हणजे अपमान व फजीति होते. त्यापेक्षां उसना शृंगार न केलेलाच बरा.

लोकांचें शिकलें, वडगांव विकलें—लोकांच्या नादीं लागून भलतीच गोष्ट करणें. परक्याची बुद्धि ऐकून आपलें नुकसान करून घेणें.

लोकाच्या जिवावर, गांड ठेवली पेवावर--दुसऱ्यावर विसंबून आपला नाश करून घेणें. तु०-जो दुसऱ्यावरी विश्वासला । त्याचा कार्यभाग बुडाला ॥

लोकाच्या डोळ्यांत बोट लवकर जातें--दुसऱ्याचे दोष चटकन दिसतात. We are better judges of others than ourselves.

लोकाच्या बायकोला शृंगार साज; लोकाच्या बायकोला अलंकार घालून काय उपयोग?—ज्यावर आपली सत्ता नाहीं त्यावर केलेला खर्च वायांच जाणार, त्यापासून आपणास कांहीं सुख नाहीं.

लोकांच्या माथं, तुळजापुरा जातं—(व.) आपल्या हिंमतीवर काम पार न पाडतां लोकांच्या भरंवशावर काम पार पाडतो असा अर्थ.

लोकांच्या साहायाची अपेक्षा, खऱ्या अंतःकरणाची दिशा—लोकांच्या मदतीची आशा बाळगण्यापेक्षां आपल्या सदसद्विवेकबुद्धीस योग्य वाटेल त्याप्रमाणें करणें अधिक चांगलें. तु०-ऐकावें जनाचें करावें मनाचें.

लोकांच्या साहाय्याची गरज नाहीं, हीच दुःखाची ग्वाही—१ कुणाच्या साहाय्याशिवाय सुखाची वृद्धि होणें शक्य नाहीं, उलट साहाय्याचें अभावीं सुखाला ओहोटीच लागेल, तेव्हां साहजिकच दुःखाला सुरुवात होईल. दुःखाचे वेळींहि जर साहाय्य न मिळालें, अथवा घेतलें नाहीं, तर दुःख दुणावेल. २ ज्याला दुसऱ्याच्या मदतीची जरूर लागत नाहीं, त्यापासून दुःख दूर असतें.

लोकांनीं घातली सरी म्हणून आपण घालूं (नये) दोरी—लोकांचें अनुकरण करण्यापेक्षां आपली लायकी, शक्ति आणि कुंवत पाहून कोणतीहि गोष्ट करावी. लोकांनीं सरी गळ्यांत घातली, आणि आपल्याला नसतांना जर सरी गळ्यांत घालण्याचा हव्यास दुणावला, तर ती नाहीं म्हणून काय दोरी घालायची ? कां फांस घ्यायेचा ?

लोकांना बुडविलें आणि आपण अन्नवस्त्र मिळविलें--स्वार्थी अभिलाषा; आपलेपणाची फक्त जाणीव. गरिबांच्या मुंड्या मुरगळून श्रीमंत झालेल्या लोकांना उद्देशून प्रचारांत आलेली म्हण.

लोंकर--लोंकर आणायला जायचें आणि हजामत होऊन यायचें—दुसऱ्याचें घेऊन यायला पाहावें तों पदरचेंच जातें. (हिं.) लेने गई पूत, और खो आई खसम.

लोखंड--लोखंडाचे चणे खाणें—अतिशय कडक तपश्चर्या करणारे साधु अशातऱ्हेनें वासना मारतात, देहदंड करतात; यावरून खडतर तपश्चर्या करणें; फार कष्ट सोसणें. तु०-चणे खावे लोखंडाचे । मग ब्रम्हपदीं नाचे ॥

लोखंडाचे चणे खावविणें-चारणें—अत्यंत जाच, अपमान करणें, हाल अपेष्टा करणें, त्रास देणें. खडे चारणें पहा. 'खावाविले चावविले लोहाचे शत्रनें प्रतप्त चणे ॥'—मोकर्ण ३९·१.

***लोखंड उज्याशिवाय मऊ जायना**—(गो.)विस्तवांत टाकल्यावांचून लोखंड मऊ होत नाहीं. संकटाची आंच लागल्यावांचून माणसाचा ताठरपणा कमी होत नाहीं.

लोटपोट--लोटपोट करणें-होणें—हांसून हांसून मुरकुंडी वळणें; फार हांसणें. 'हंसून हंसून ती लोटपोट होऊन गेली.' ---पप्रे ४२.

लोटा--लोटा घडता येईना आणि अहिरीचा इसारा--अहिरी पहा.

लोडणा--दाराला अडणा, गाडीला कडणा, म्हशीला लोडणा (असावा)—दाराला अडसर, गाडी उलथून पडूं नये म्हणून तिला टेंकू द्यायचे जें साधन तें

काडणें व म्हैस पळून जाऊं नये म्हणून तिच्या गळ्यांत घालायवाचें तें लोडणें या तिन्हींची अवशक्यता फार आहे.

लोढणें—–लोढणें गळ्यांत अडकवणें-घेणें— गुरें लांबवर जाऊं नयेत म्हणून त्यांच्या गळ्यांत लाकूड बांधतात यावरून, कांहीं त्रास मुद्दाम मागें लावून घेणें. अनिष्ट तापदायक गोष्ट स्वीकारणें. 'पाकिस्थानचें लोढणें गळ्यांत अडकावून घेतल्याशिवाय राष्ट्रीय सरकार स्थापन होणें शक्य नाहीं.'

लोढणें मागें लागणें-लावणें—पिच्छा पुरविणें; लचांड मागें लागणें.

लोण—–लोण उतरणें—दृष्ट काढणें; मीठमोहऱ्या ओवाळून टाकणें. 'तुम्हा निद्रा मज आज्ञा ते स्वभावें। उतरूनी जिवें जाइन लोण।'–तुगा ४३७.

लोण करणें—ओवाळणें; ओवाळून टाकणें, 'तदां सेवेसि कीर शरीरें। लोण कीजे॥'–ज्ञा १७.२०७.

लोण—–लोण बारगळणें—एखादा नियम उल्लंघिल्यामुळें निरुपयोगी होणें, फुकट जाणें. 'असा आजपर्यंत कोणी राजकर्त्यांनें किंवा शास्त्रकारानें कायदा किंवा कानू केलेला आठवत नाहीं कीं अमुक एक विषयास अमुक अमुक पृष्ठें लागावीं. ती शास्त्रोक्त मर्यादा उल्लंघिली कीं, लोण बारगळलें.'–चिपळूणकर.

मागून आलेलें लोण पुढें पोंचविणें—(आट्यापाट्यांच्या खेळावरून वाक्प्रचार) मागपासून आलेली गोष्ट, चालू पुढें चालविणें. 'जे आपले आचार विचारांच्या कसोटीला लावीत नाहींत ते गाढ विश्वास शृंखलांनीं निगडीत झाल्यामुळें मागून आलेलें लोण डोळे मिटून पोंचविणें एवढेंच आपलें कर्तव्य समजतात.'–आगरकर.

लोणारी—–गाढव गूळ हागूं लागलें तर लोणारी भीक कशाला मागतील ?—क्षुल्लक वस्तुपासून विपुलता वाढली, गरजा भागूं लागल्या, तर कोण कुणाची पर्वा करील ?

लोणाऱ्याचें गाढव सोडल्याबरोबर उकीरडा फुंकत राहावयाचें—प्रत्येक प्राणी हा आपल्या स्वभाव धर्माप्रमाणेंच वागणार. फक्त जोपर्यंत बंधनाची मर्यादा असतें तोंपर्यंत तो फार तर तेवढें बंधन पाळतो, एकदां बंधन सुटलें, कीं तो त्या मर्यादेबाहेर आपल्या स्वभावधर्मानुसार गेल्याशिवाय राहात नाहीं. उकीरड्यावर लोळणें हाच गाढवाचा स्वभावधर्म. तें जोंपर्यंत बांधलेलें असतें तोंपर्यंत नाइलाज म्हणून वा अशक्यता म्हणून तें तेथेंच असतें, पण सोडलें, कीं प्रथम उकीरड्यावरच जायचें.

लोणी—–लोणी खाऊन ताक देणें—स्वतःचा स्वार्थ साधून उरेल तें दुसऱ्यास देणें; चांगला भाग आपण घेऊन निःसत्त्व, शेष भाग दुसऱ्यास देणें. 'हजार युरोपियन कामगार सर्व लोणी खाऊन ताक मात्र आमच्या वांट्यास देतात.'–टि २.५१२.

लोणी लावणें—अंडास लोणी लावणें, पहा.

लोणकढी—–लोणकढी थाप-बात—ज्याप्रमाणें लोण्याचें कढविलेलें तूप ताजें असतें त्याप्रमाणें अगदीं नवीन गप्प; थाप; खोटी बातमी. 'पण मला आपण आपली तसबीर द्यायची कबूल केली ना ? कां लोणकढी दिलीत ?'–फाल्गुनराव.

लोण्याच्या पुऱ्या तुपांत तळणें—न घडणाऱ्या गोष्टीची चिकित्सा करणें; अशक्य गोष्ट शक्य होणें.

लोण्यांत दांत येणें-फुटणें—अत्यंत शांत, सौम्य माणूस असभ्य, रागीट, कठोर बनणें.

लोण्यास दांत फुटणें—उपकार कर्त्यांशीं कृतघ्नपणें वागणें.

लोणयांतुलो अग्गोळु—(गो.) लोण्यांली बट. लोण्यांत जरी केसाची बट ठेवली तरी तिला लोणी मुळींच चिकटत नाहीं.

लोण्यापेक्षां मऊ—अतिशय गरीब; अतिशय लीन. तु०–'मऊ मेणाहूनि आम्ही विष्णुदास।' 'परंतु बायको पुढें त्याचें मन लोण्यापेक्षां मऊ होतें.'–इंप १२४.

एका डोळ्यांत लोणी आणि एका डोळ्यांत चुना घालणें—पंक्तिप्रपंच करणें; भेदभाव करणें.

लोणी आस्स जाल्लारी तूप कोरूंक तोटोवु आस्सवे—(गो.) लोणी तयार असल्यावर तुपाला काय उशीर ? साधनें उपलब्ध तर यश सुकर. अनुकूलता आणि साधनें तयार असल्यानंतर साध्याला काय उशीर ?

लोणी दूधताक, पळवी रोगाचा धाक—लोणी, दूध, ताक हे अतिशय पाचक आणि आरोग्यदायक पदार्थ आहेत; यांच्या सेवनानें सहसा रोग जडणें शक्य नसतें; इतकेंच नव्हे तर रोग्याचा रोगहि नाहींसा होऊं शकतो.

लोण्याची सुद्धां सवत साहवत नाहीं—स्त्रियांना अगदीं निर्जीव निरुपद्रवी सवत देखील खपत नाहीं, इतक्या त्या मत्सरी असतात.

प्रसंग पडला कीं लोण्यालाहि दांत फुटतात—लोण्यांस दांत फुटणें पहा. वेळ उद्भवल्यावर शांत स्वभावाचा मनुष्य देखील अत्यंत रागीट, कठोर होऊं शकतो. –निरभ्रचंद्र १९७. तु०–'कारण पडेल तेव्हां नामर्दाचाही मर्द होतो.'–राजसंन्यास.

लोण्याहून मऊ असली तरी सासू आणि जखिण असली तरी आई––सासू तीं सासू व आई ती आई. सासू थोडी तरी कठोर असणार व आई जखिणीप्रमाणें खाष्ट असली तरी तिला मुलीबद्दल कांहीं माया ही वाटणारच.

लोथ–ध–––लोथी–ध––धी पाडणें—१ समूळ नाश करणें; धुव्वा उडविणें (सैन्य इ. चा); मरेपर्यंत एखाद्याला मारणें, बुकलणें.

लोभ–––लोभ जोडणें—प्रेम उद्भवणें;प्रीतिचा पाझर फुटणें; आकृष्ट होणें; लालसा दुणावणें. 'ज्यावर एकंदर लोकांचा लोभ जडला असे त्यांत आल्पिष्टनच्या खालोखाल सदरहू मालकम साहेब यांचें नांव होतें.'–नि ८८.

***लोभ लचकला नि डोळा पिचकला; लोभ लचका, डोळा पिचका**––लोभानें एखादी गोष्ट करावी पण तिजपासून सुख न लागतां ती दुःखास कारणीभूत होते. एखाद्याबद्दलचें प्रेम नष्ट झालें म्हणजे तें माणूस वाईट दिसूं लागतें.

लोभ लचकला, पान्हा सुटला––एखाद्याबद्दल प्रेम वाटूं लागलें कीं लागलीच तो हवासा वाटूं लागतो.

लोभाला बळी पडला, घरादाराचा नाश झाला—अति आशा करावयास गेले म्हणजे जवळचेंहि सर्वस्व जातें.

लोभावृत्ति कारणें,नित्य होतीं भांडणें—भांडणाचीं खरीं कारणें–लोभ, हावरेपणा इ.

लोभी–––लोभीयाचे ध्यानांत धन वसणें––जो ज्या प्रवृत्तीचा असेल, तो तशीच वासना ठेवील. त्याच्या आकांक्षां त्याच्या प्रवृत्त्यनुसारच राहातील. 'जैसें लोभियाचें ध्यानांत धन वसतें तैसें जाहलें.'–भाव ३९.

लोभी धनी, सज्जनाला अवमानी––लोभी मनुष्याला, स्वतःच्या स्वार्थाखेरीज कांहींच दिसत नाहीं, दुसऱ्याच्या अंगचे सद्‌गुण सुद्धां स्वार्थांधतेनें दिसत नाहींत. तेव्हां तो कुणाचा पाणउतारा करील याचा नेम नसतो.

लोभी मनुष्याची श्रद्धा, तृप्त होईना कदां––लोभी (हावऱ्या) मनुष्याची इच्छा, अभिलाषा, केव्हांहि तृप्त होणें शक्य नसते. ज्याची इच्छा तृप्त होते, तो लोभीच नव्हे. अभिलाषेचें सातत्य हेंच लोभत्याचें लक्षण.

लोभी माणूस धन जोडतो आणि उदार माणूस धन उधळतो—लोभी स्वभावाचा मनुष्य पै पैसा साठवीतच राहाणार, त्यांतली कवडीहि गमावणार नाहीं; पण उलट मनुष्य उदार असेल; तर तो जवळ कांहींच ठेवणार नाहीं.

लोभ्याला भोग नको आणि रागावणाराला शांति नको––लोभी मनुष्य असतो, त्याची प्रवृत्ति नेहमीं नेहमीं वापराकडे नसते; वस्तूचा वापर करण्यापेक्षां तिचें जतन करण्यांतच त्याला सुख वाटतें. तसेंच, रागीट मनुष्य शांत असणें शक्य नसतें; शांतता ही त्याच्या पांचवीला पुजलेली नसतेच. म्हणजेच त्याला शांतता प्रिय नसते. सदा भांडणें कटकटी यांतच त्याला सुख वाटतें. म्हणून लोभ्याला भोग (वापर) नको असतो.व रागवणाराला शांति नको असते.

लोभ्यालि थैली असून रिती, गरीबालि नास्तनां रिती––(गो.) लोभ्याची थैली पैसा असून रिकामी आणि गरिबाची पैसा नसून रिकामी. गरीब आणि लोभी यांच्यामध्यें तत्त्वतः कांहीं फरक नाहीं.

लोमडी–––लोमडीके शिकारको जाय्ये, शेरका सामान करालिजाये—कोल्ह्याच्या शिकारीस वाघाच्या शिकारीची तयारी करावी लागते.

लोलंगत–––लोलंगता तोडणें– १ इच्छेचा नाश करणें; अनासक्त होणें; लोलमुक्त होणें. २ (व.) हांजी हांजी करणें

लोह–––लोहपंचक– १ सोनें, रुपें, तांबें, जंग (जस्त) व नाग (शिसें).२ सोनें, रुपें तांबें, त्रपु (कथील) व लोखंड हें द्वितीय पंचलोह.

***लोह परिसाची न साहे उपमा–––**साधूला लोखंड व परीस यांची उपमा लागू पडत नाहीं; कारण परीस फक्त लोखंडाचेंच सोनें करतो पण इतर धातूचें करीत नाहीं; तर साधु कोणीहि मनुष्य कशाहि प्रकारचा आला तरी त्यास

पावन करतो. 'लोह परीसाची न साहे उपमा। सग्दुरुमहीमा आगाधची।'

लोहार---लोहाराची कुऱ्हाड किंवा हातोडा—[एकदां मोगल पातशहा व पोर्तुगीज यांची लढाई चाललेली होती. पातशाहाचे लोक तारापूर लुटीत होते त्यावेळीं एका लोहाराच्या घरावर त्यांनीं हल्ला केला. लोहारानें दाराआड राहून तीनचारशें लोक नुसत्या कुऱ्हाडीनें मारलें.] या म्हणीचा प्रचार वसई–तारापुराकडे आहे.

लोळणें---लोळुन लोळुन माळियेर पावलो--(गो.) लोळत लोळत माडीवर चढणें.स्वार्थासाठीं कोडगेपणा करणें.

व

वई----वईवरून अंबट होणें--क्षुल्लक कारणावरून रागावणें. वहीवरून० पहा.

***वईक एकु खुंटु, घराक एक म्हातारी**--(गो.) कुंपणाला जसा खुंट तसें म्हातारें माणूस हें घराला आधारभूत असतें.

वयिनें पर्सु खाल्ल्यारि राकचे कोणें? (गो.) कुंपणानेंच जर शेत खाऊन टाकलें तर त्याची राखण कोण करील? विश्वस्तानेंच दगा दिला तर त्याला उपाय काय? कुंपण पहा.

वकर---वकर थोडा, दिमाख बडा—पराक्रम थोडा पण ऐट जास्त; पोकळ बढाईखोर.

वकील---वकीलपत्र घेणें—एखाद्याचा पक्ष घेणें; एखाद्याची बाजू उचलून धरून भांडणें; दुसऱ्याकरितां भांडत राहणें.

वकूफ---वकूफ थोडा व दिमाख बडा--वकर पहा.

वक्कल---वक्कल, वकील आणि वैद्य--हे तीन वकार आहेत. वेश्या, वकील व वैद्य हे तिन्ही परोपजीवी लोक असून इतर जणास नागविण्यास कारण होतात.

वक्त---वक्ताची वेळ--कठीण वेळ;आणीबाणीचा प्रसंग.

वक्र--वक्रीं येणें–जाणें–असणें–होणें—१एखादा ग्रह पुढें न जातां मागें येणें. म्हणजे मेषापासून वृषभाकडे न जातां मागें मीनेकडे येणें. २ वांकडा असणें, वागणें.

वखत---वखत पडे बांका तों गधेको कहना काका--बखत पहा.

वखवख---वखवख करणें—१ भूकभूक करणें. २ रागारागानें दटावून बोलणें; संतापणें. ३ उपहास, छळ करणें.

वंग—घोड्यास तंग, पुरुषास वंग—तंग पहा.

वंचणें---वंचले शरीर दीधले रोगासीः वचले द्रव्य दीधले चोरासी—(महानु.) मोठ्या निगेनें राखलेलें शरीर रोगाच्या स्वाधीन करावें, किंवा मोठ्या काळजीनें जतन करून ठेवलेलें द्रव्य चोराला द्यावें,त्याप्रमाणें.

वचन---वचन गुंतणें—शब्दानें गुंतणें; भाक दिलेली असणें; वचन दिलेलें असणें. 'आम्ही स्वाभाविक बोललों, वचन कांहीं गुंतलें नाहीं.'–मराचिंशिच १५.

वचन शेटावर ठेवणें—धुडकावणें; सांगितलेलें मुळींच न मानणें. 'वचन सेंटावरी। त्याचें ठेवूनि धिक्कारी॥' –तुगा ३१३६.

वचन हातावर धरणें--(पति, वरिष्ठ इ.च्या) तोंडातून शब्द पडल्यबरोबर त्याप्रमाणें वागणें, शब्द झेलणें. 'विनीतें वैदर्भी पतिवचन हातावरी धरी।'–सारुह ७५२.

वचनाचा खरा धड—शब्दास जागणारा;दिलेलें वचन पूर्ण करणारा.'खरा लोककल्याणेच्छु व देशाभिमानि पुरुष म्हटला म्हणजे...तो वचनाचा धड असला पाहिजे.'–नि.

वचनाच्या आज्ञेत–अर्ध्या वचनांत असणें–वागणें—अतिशय आज्ञधारक असणें.

वचनांत-वचनीं गोवणें—एखाद्याला त्याच्याच शब्दांत गुंतविणें; त्यानें बोलल्याप्रमाणें करावयास लावणें. 'सत्यभामेसी वचनीं गोवून कैसें नेतोसी दयार्णवा॥'–ह २०.१४३.

वचनांत–वचनीं राहणें—आज्ञेप्रमाणें वागणें; आज्ञेंत असणें. 'वचनीं राहुनि काम मनांतील पुरवी ऐशी त्याजिली रामा।'–मराठी ६.पु (१८७६) १७६.

वचनास धरणें—बोलल्याप्रमाणें करण्यास लावणें. 'थोर आहे त्यास कोठें धरावें. वचनास धरावें. आधीं थोरांनी एकाचा अभिमान धरूं नये; धरिला तरी सिद्धीस न्यावा.' –रा २.६२.

वचनास मान देणें—सांगण्याप्रमाणें करणें; विनंतीला मान देणें. 'उत्तर म्हणे बहु बरें देउनि वचनास मान आलीस।'–मोविराट ३.१५.

वचने का (किं) दरिद्रता—नुसतें बोलण्यानें जर काम होत आहे, त्यासाठीं पदराला जर खार लागत नाहीं तर नुसतें बोलण्यास कमीपणा कशाला? बोलायला काय जातें? (अ) प्रियवाक्य प्रदानेन सर्वे तुष्यन्ति जन्तवः। तस्मात्तदेव वक्तव्यं वचने का दरिद्रता।–सुर १५५.८३. (आ) हस्तादपि न दातव्यं गृहादपि न दीयते। परोपकरणार्थाय वचने किं दरिद्रता।–सुर १५५.११९.

वचपा—वचपा काढणें—१ उट्टें काढणें; एका बाबतींत झालेलें नुकसान दुसरीकडे भरून काढणें. २ सूड घेणें; भरपाई करून घेणें.

वचस्—वचस्येकं मनस्येकं कर्मण्येकं दुरात्मने—दुष्ट मनुष्य तोंडानें एक गोष्ट बोलतो, त्याच्या मनांत दुसरीच असते व व तो तिसरीच कांहीं तरी करतो. ओठांत एक आणि पोटांत एक. मनस्यन्यद्वचस्यन्यत्कार्येचान्यद् दुरात्मनाम्। मनस्येकं वचस्येकं कर्मण्येकं महात्मनाम्॥–सुर ५५.५० तु०– अहो कुटिलबुद्धीनां दुर्ग्राह्यमसतां मनः। अन्यद्वचसि कण्ठेन्यदन्यदोष्ठपुटेस्थितम्।–सुर ५६.८७.

वजन—वजन पडणें—किंमत असणें; छाप राहणें.

वजन पाडणें—आपलें म्हणणें मानलें जाईल असा वरचष्मा, दरारा, दाब ठेवणें. दुसऱ्याजवळ आपली किंमत राहील असें करणें. 'एकास उठावें एकास उठा म्हणावें. आपलें वजन त्यावर पुरतें पाडावें.'–इ. सं. ऐ च. ११५.

***वजनाचा धोंडा आणि फुंकण्याचा कोंडा**—दिसावयास धोंड्यासारखा जड पण उपयोगाच्या दृष्टीनें पाहूं गेल्यास कोंड्यासारखा हलका.

वजा—वजा करणें—१ उणें करणें. २ काढून टाकणें. 'नोकरीवरून लोक वजा केले.'

***वजा वाटोळें, डोईवर गाठोळें**—हिशोब केला असतां शेवटीं पूज्य उरणें. काम करून हातांत कांहीं फल न येणें.

वज्र—आठ वज्र—१ वज्र, २ पाशुपात, ३ सुदर्शन, '॥' भीमाची गदा.

वज्रलेप होणें—चुन्यामध्यें कात व गूळ घालून तयार केला म्हणजे त्यास वज्र म्हणतात व त्याचा लेप पक्का होतो; यावरून पक्कें होणें, कायम होणें, कधींहि न पुसलें जाणें, अभेद्य होणें. 'आमच्या आजेसासूबाई एकदां कोणाचें नांव घ्यावयाचें नाहीं असें म्हणाल्या कीं, मग तें वज्रलेप झालें समजावें'–पकोघे.

वज्रलेपो भविष्यति।—कायम होतें, कधींहि जात नाहीं, अभेद्य होतें. सबंध श्लोक असा–(अ) अन्यक्षेत्रे कृतं पापं पुण्यक्षेत्रे विनश्यति। पुण्यक्षेत्रे कृतं पापं वज्रलेपो भविष्यति॥–सम ५९.६. (आ) शिवस्थाने कृतं पापं वज्रलेपो भविष्यति॥–सम ६०.२३.

वटकण—पोराचें वटकण पंतोजीच्या हातीं, माकडाचें वटकण दरवेश्याच्या हातीं—[वटकण= दाबांत ठेवण्याची किल्ली] माकड पहा.

वट्टे—वट्टे आस्सुनु कटें काडप—(गो.) वाट्या असतांना नारळाच्या कवट्या वापरण्यांत काय मजा! संपत्ति असतांना कंजूषपणा कां?

वठणें—वठणीवर–वठणीस येणें—१ ताळ्यावर येणें; मऊ येणें. २ वश होणें; ताब्यांत, आटोक्यांत येणें. 'तददुर्दशा न करितां निस्तेज मज वठेल काय मही।' –मोसभा ३.३५.

वठ्या—वठ्या मारणें–हाणणें–ठोकणें—जेवणावर ताव मारणें; जेवण करणें; एखाद्या पदार्थाचा समाचार घेणें.

वड—वड पिकणें—(ल.) अनेकांना उपजीविकेचें साधन तयार होणें.

वडाची साल पिंपळाला लावणें; वडाचें पान पिंपळाला लावणें—एकाची गोष्ट दुसऱ्यास चिकटविणें; ज्यांचा कांहीं परस्पर संबंध नाहीं अशा गोष्टी एकत्र जोडणें.

*वड चडीया, पिंपळ चडीया, हगरी हेटलना हेटल—कोठें जरी गेलें तरी दैव सोडीत नाहीं.

वडलांनू बांधलो वड, तेच्याफुडे आडवो पड —(गो.) गतानुगतित्व. तु०—तातस्य कूपोयमिति ब्रुवाणः।

वड पिकला आणि कावळयाला मुखरोग झाला; वडास आलीं वडफळें, कावळ्यास आलें रूं—आला मुखरोग—चांगले दिवस आले असतां उपभोगाचें सामर्थ्य जाणें.

वडाची साल पिंपळास व पिंपळाची साल वडास—वर वाक्प्रचार पहा.

वडे वानोळया, फडे पानोळया—(व.) मोठ्या अधिकाऱ्याला प्रसन्न करून घेण्याकरितां त्याच्याकडे कांहीं फळफळावळ किंवा इतर चांगल्या पदार्थांची नजर पाठवितात परंतु वडे किंवा फडे इ. त्यायोग्य पदार्थ नव्हत. कुचकामाचे किंवा मोल फारच थोडे पडणारे पदार्थ याबद्दल ही म्हण वापरतात. 'काय केलं होतं जेवायला नवल विशेष, वडे वानोळया न् फडे पानोळया ! विशेष कांहींहि नव्हतें. आपलें मामुली सार्धे जेवण.'

वड्यचें तेल वांग्यावर (काढणें)—(वड्याचें उरलेलें तेल वांग्याच्या फोडणीला घालतात) एकाचा राग भलत्यावर काढणें. " जयंतराव तुझ्या हातून निसटून गेला त्याचा राग या गरिबावर काढतेस ? ' वड्याचें तेल वांग्यावर !' "-श्रमसाफल्य २.१.-शाब २.१८.९.-गांगा२२१. (गो.) वड्या तेल वांयग्याक गेलें.

वडारी—-वडाऱ्याचा भोगा, फटकऱ्याचा सोगा —ज्याचें भूषण त्याच्याप्रमाणें.

वडील—-वडीलांचीं खेटरें घेऊन पळणारा—- वडिलांची अवज्ञा करणारा.

वडीलाचा राखी मान : भाग्य ये धांवून— .(महानु.) वडील माणसाचा मान राखल्यास भाग्य आपोआप येतें.

वडिलांचें बुडुख, नाचे तुडुक तुडुक—म्हाताऱ्या माणसांची अडगळ वाटूं लागते.

वडिलांच्या चाली, भीतीमुळें पाळी—-मनुष्य पूर्वीची परंपरा कांहीं धाक असेल तरच पाळतो.

वडिलांनीं बांधला वड, त्याचे पुढें आडवा पड —वड पहा.

वणति—--वणति आसल्यारि चितारो (केदनांइ) वरवंयेद्—(गो.) भिंत असली तर चित्रें केव्हांहि काढतां येतील.

वणति धुल्यारि (धुलेतितुलो) चोकोलुचि—- (गो.) भिंत धुवावी तेवढा चिखलच निघायचा. कोळसा उगाळावा तितका काळाच अशा अर्थानें वापरतात.

वण—-वणीं देणें—-(कों.) वनांत नेऊन मारणें. —लोक २.३१.

वणवण—--वणवण करीत हिंडणें--अतिशय श्रम करणें, कष्ट करीत फिरणें: ' उगेच वणवण हिंडोन ।' —दा १९.६.२४.

वणवा—--वणव्यांत वाळल्याबरोबर ओलेंहि जळावयाचेंच—-वणव्यांत वाटेल तें जळतें. हें ओलें, हें वाळलेलें असा भेद तेथें नसतो. सरसकट सर्वांवर आपत्ति ओढवते. " आणि ' वणव्यांत वाळल्यांबरोबर ओलेंहि जळायचेंच' ह्या न्यायानें इतरही हिंदुमात्रावर होती असेंच खरें !"—छच १९.

वत—--वत आशिल्ल्या सावली जाय आनि सावली आशिल्ल्या वत् जाय—(गो.) उन्हांत असलेला छायेची अपेक्षा करतो आणि छायेंत बसलेला ऊन्ह मागतो. तात्पर्य प्रत्येक माणूस असंतुष्ट.

वतन—--वतन गाडलें असणें—कायमचा हक्क असणें; जुना, नेहमींचा अधिकार असणें. (निंदार्थी प्रयोग) 'तूं नित्य येथें येऊन बसतोस, काय येथें तुझें वतन गाडलें आहे !'

वदणें—--वदतोव्याघातः—उघड विरोध; स्पष्ट विसंगतता; उघड असणाऱ्या विरुद्धतेचें प्रतिपादन करण्याविषयीं योजतात. 'त्याला काळेंपाणी कां म्हटलें, तें त्याला कळलें—नव्हे, काळें पाणी ह्या नांवाहून दुसरें यथार्थ नांव त्याला दिलें असतें तर तें वदतोव्याघातच कसें झालें असतें तें त्याला पटलें !'—काळें पाणी १३५.

वंधा—--वंधा घालणें—(व.) तुटलेली दोरी ताग लावून पुनः वळणें.

वधू—--वधू न्हाली, वाफा शिंपला—नवऱ्या मुलीच्या न्हाण्याला बरेंच पाणी लागणार. तें वायां जाऊं न देतां झाडांकडे लावून देणें.एका गोष्टींत दोन कार्यें साधणें.

वंध्या——वंध्यापुत्र-सुत; वंध्येची सुता—वांझेचें मूल म्हणजे अशक्य गोष्ट. ' वेगळेपणाची माता। ते लटिके वंध्येची सुता । '–दा ६.१०.३५.

वंध्यामैथुन—हें अगदीं निष्फळ ! यावरुन निष्फल, व्यर्थ परिश्रम, व्यापार, व्यवहार इ.

वनवास——वनवास आणणें—(वनवास हा दुःखद असतो.) त्रास देणें; नकोनकोसें करणें; छळ करणें.

वन्हि——वन्हिधूमन्याय—जेथें धूर असतो तेथें अग्नि असतो, हा साहचर्य सिद्धांत. यत्रयत्र धूमः पहा.

वय——वयांत येणें—१ तारुण्यांत येणें; यौवनदशा प्राप्त होणें; सज्ञान होणें. २ विवाहाला योग्य होणें. ' ती वयांत आल्यानंतर तिच्या बापानें तिचें लग्न करून दिलें. ' –मराठी ३ रें पु. (१८७३) पृ. २०.

***वय तशी प्रवृत्ति**—मनुष्याच्या बुद्धीमध्यें वयाप्रमाणें पालट होत जातो.

वयोगते किं वनिताविलासः—वृद्धपणीं तरुणीशीं विलास कसा होणार ? जोंपर्यंत तारुण्य आहे तोंपर्यंतच तो केलेला बरा. योग्य वेळीं त्या त्या काळचीं कार्यें करावीं; मग अवेळीं तीं होत नाहींत. तु०–वयसि गते कः कामविकारः। शुष्के नीरे कः कासारः। क्षीणे वित्ते कः परिवारो। ज्ञाते तत्त्वे कः संसारः ॥–चर्पटपंजरी.

वयम्——वयं पञ्चाधिकं शतम्—(सं.)कौरव शंभर होते व पांडव पांच होते. यांचें परस्परांत वैर होतें पण परकीय शत्रूशीं झुंजतांना ते एक म्हणजे एकशेंपांच होऊन लढत. यावरून आपसांत कितीहि दुही असली तरी परकीय शत्रूशीं एक होऊन विरोध करणें. 'परस्परविरोधेन वयं पञ्च ते शतम् । अन्यैः साकं विरोधेन वयं पञ्चोत्तरं शतम् ॥–सम ५९.८.

वर——वरचष्मा करणें-होणें—वरचढपणा दाखविणें; श्रेष्ठता प्राप्त होणें, स्थापित करणें; वरिष्ठपणा मिळणें, प्राप्त होणें.

वर डोकें काढणें—ऊर्जितावस्थेस येणें. ' ताराबाईनें नातवाला साताराची गादी साधून देऊन वर डोकें काढलेलें जिजाबाईला मानवलें नाहीं. '–भक्तमयूरकेका ५.

वर पडणें—(वस्तु, गोष्टी) तत्परतेनें करूं लागणें. ' अलीकडे तो कादंबऱ्यांवर पडला आहे. '

आकाश वर पडणें—मोठें संकट कोसळणें. ' म्हणे रामीरामदास वरी पडो आकाश । '–दावि १७.१४२.

वर पाहणें—लज्जा, शंका, भीति न वाटणें; धीटपणा असणें; उजागरीनें बघणें. 'पापाला वर पाहण्याचा धीर होत नाहीं.'–पुण्यप्रभाव १३७.

वर येणें—जास्त होणें;अधिक होणें. ' रे गुलामाच्यानों, माझी गोदी काय वर आली आहे ?'–मोरप्र १६.

वरून खालीं घालून घेणें—खालीं उडी टाकणें; खालीं येणें, उतरणें. ' दत्ताजी शिंदे यांनीं वर्तमान ऐकून घोडियावरून खालीं घालून घेतलें.'–भाब १६.

वरूनच उतरलें पाहिजेत !—पितर खालीं आले पाहिजेत (तरच काम झालें तर होईल याअर्थी.) अशक्य कोटींतील गोष्ट.'गीताः–हं ! तोंडच्या गोष्टी असतील अगदीं ! वरूनच उतरले पाहिजेत तुमचे ?'–एकच प्याला ३.२.

***वर लुगडं, खालीं उघडं**—जेथें गुप्तता राखिली पाहिजे तेथें न राखतां भलत्याच जागीं गुप्तपणा राखणें. जेथें पाहिजे तेथें नसून भलत्याच ठिकाणीं तजवीज करणें. पाठभेद–ज्याकरितां लुगडें, तें उघडें.

वर वऱ्हाडास गेलें तरी घोडें करड—घोड्यास देशांत खावयास मिळेना म्हणून वर वऱ्हाडांत गेलें; तरी तेथेंहि हाडकुळेंच राहिलें. कोठेंहि गेलें तरी पळसाला पानें तीनच.

वरच्यास हात, खालच्यास लाथ—आपल्या वरिष्ठापुढें अगदीं नमून हात जोडून असावयाचें पण हाताखालच्या किंवा ताब्यांतील लोकांवर जुलूम करावयाचा, अशी वृत्ति.–केले. १.१६४.

वरतीं अक्षता, मध्यें गोपीचंदन, खालीं रक्षा—(उप.) सारखा न शिजलेला भात. वर हिरवा, मध्यें गचगोळा व तळांत करपलेला.

वरतीं मोल, पाण्यांत म्हैस—पाण्यांत म्हैस पहा.

वरलीं जड, सोयरीक गोड—घरचीं वडील माणसें त्रासदायक वाटतात व नवीं सोयरीं (बायको इ.) गोड होतात.

वरल्या देवाची तुटली दोरी, खालचे देव बोंबा मारी—हा अभंग आहे. जेथें मोठमोठ्या लोकांची डाळ शिजत नाहीं तेथें गरीबागुरीबांची काय दाद लागणार ?

वरल्या वैद्याची (दैवाची) तुटली दोरी, खालचा वैद्य काय करी ?—वरप्रमाणेंच. जेथें आयुष्य संपलें असेल तेथें वैद्य तरी काय करणार ?

वरून मस्ती आणि पोटांत धास्ती—वर मोठा बेपर्वाईचा, वैर्यांचा आव आणावयाचा पण पोटांतली भीति तशीच असते. खोटी वीरश्री.

वरून वरून नटून जाई आणि काळीज बोका खाऊन जाई—वरवर उपचार.

वर—-वरं प्राणत्यागो न पुनरधमानामुपगमः।—(सं.) नीच मनुष्यांच्या संगतीपेक्षां मरण बरें. सबंध श्लोक असाः—वरं शून्या शाला न च खलु वरो दुष्टवृषभः, वरं वेश्या पत्नी न पुनरविनीता कुलवधूः। वरं वासोऽरण्ये न पुनरविवेकाधिपपुरे। वरं प्राणत्यागो न पुनरधमानामुपगमः॥ —हितोपदेश.

वरं प्राणपरित्यागो मानभंगेन जीवनात्—(सं.) अपमानापेक्षां मरण बरें.

वरमेको गुणी पुत्रो—(सं.) अनेक मूर्ख पुत्रांपेक्षां एक गुणवान पुत्र चांगला. वरमेको गुणी पुत्रो न च मूर्खशतान्यपि। एकश्चन्द्रस्तमो हन्ति न हि तारागणोपिच ॥—हितोपदेश.

वरहि वरायास पाहिजे समज।—वर मागण्यासहि अक्कल लागते. "पार्थ म्हणे, 'गोविंदा, न्यस्तायुध तूंचि पाहिजेस मज'। मागे सैन्य सुयोधन; वरहि वरायास पाहिजे समज॥"—मोरोपंत. याबद्दल हरिदास अनेक गोष्टी सांगतात. एका मनुष्यास देवी प्रसन्न झाली व त्यास तीन वर दिले. एका वरानें त्यानें आपली कुरूप स्त्री सुंदर व्हावी म्हणून मागितलें, तेव्हां त्याची स्त्री सुंदर बनली. ही गोष्ट राज्याच्या कानीं जाऊन त्यानें त्या स्त्रीस आणावयास मेणा पाठविला. मेण्यांतून त्या स्त्रीस नेत असतां यानें तिला आस्वलीचें रूप प्राप्त व्हावें असें दुसऱ्या वरानें मागितलें. राजानें मेणा उघडून पाहातांच आस्वलास पाहून तीस परत घेऊन जाण्यास सांगितलें. तेव्हा त्यानें पुन्हां आपली बायको पहिल्यासारखी (कुरूप) व्हावी अशी प्रार्थना करून तिन्ही वर फुकट घालविले. याच्या उलट एका अंधळ्यानें, माझ्या नातवाच्या डोक्यावर राजछत्र धरलेलें मला पाहूं दे, असा एकच वर मागितला. पण यामुळें स्वतःला दृष्टि, संतति व राज्यपद अशा तीन गोष्टी मिळविल्या.

वर—-वरपक्षाचें पारडें जड असणें—लग्नांत नवऱ्यामुलांकडील माणसांना मोठा मान असतो; त्यांचें कांहीं मागणें असो तें पुरविलें जातें. 'पण वरपक्षाचें पारडें किती जड आहे याचा विचार नाहीं केलांत !'—उग्र १.४.

***वर न्हाला वाफा शिंपला**—वधू पहा.

वरमाय बरी तर वऱ्हाडयांची सोय सारी—विहीण चांगली असेल तर वऱ्हाडयांची सोय चांगली होते. पुढाऱ्यांप्रमाणें वागणूक मिळते.

वरमाय शिंदळ तर वऱ्हाडणीचा गोंधळ; वरमाय शिंदळ मग वऱ्हाडणीकडे काय बोल—वर प्रमाणेंच पण विरुद्ध अर्थाची म्हण. जसा पुढारी तसे अनुयायी.

वरावांचून बायको नाहीं, आणि मनुष्यावांचून वर नाहीं.—पति असल्याशिवाय स्त्री सौभाग्यवती होऊं शकत नाहीं. व मनुष्य असल्याशिवाय तो पति होऊं शकत नाहीं; या गोष्टी परस्परांवर अवलंबून असतात.

वरकल—-वरकलगोटी—[वरकल=कसोटीचा दगड] सराफ.

वरण—-वरणभात—नवऱ्यापेक्षां बायको मोठी असें विजोड दांपत्य. 'आतां अंमळ मुलगा आहे बसक्या बांध्याचा आणि पोरीची जात पडली उफाड्याची, म्हणून वरणभात व्हावयाची भीति !'—गडकरी, 'वेड्यांचा बाजार.

भातापेक्षां वरण जास्त असणें—नवऱ्यापेक्षां बायकोला मोठी असणें. वरणभात पहा.

***वरणेवीन वरणभात : ताकेवीन ताकभात**—(महानु.) जें पाहिजे तेंच नाहीं म्हणजे त्या घटनेला कांहीं अर्थ नाहीं. कोरडें नांव.

वरण दाटणी आणि बायको आटणी—अटणी पहा.

वर वर मिळता : लग्न कोण करता—(महानु.) जर पतिसुख किंवा पत्नीसुख सहज बाहेर मिळतें तर लग्न कशाला हवें ? पण तसें होत नाहीं म्हणून लग्नाचा मार्ग पत्करावा लागतो.

वरण—-वरण लावणें—१ वर्णी, सोय लावणें. २ प्राप्तीचें साधन मिळवून देणें.

वरदळ—-वरदळीस-वरदळीवर येणें—भांडूं लागणें; हमरीतुमरीवर येणें.

वरमणें---नाक खाजवलें तर नकटें वरमतें—नाक पहा.

वरवंटा---वरवंटा फिरणें--एखाद्या वस्तूवर वरवंटा फिरला असतां तिचें चूर्ण होतें; यावरून नष्ट होणें; नाश होणें; जमीनीस मिळणें. 'वरवंटा फिरविणें' असाहि प्रयोग रूढ आहे. 'सर्वांवर सारखा वरवंटा फिरविला जात आहे.'—टिव्या. 'हिटलर दडपशाहीचा वरवंटा प्रथम आमच्यावर फिरवल्यावांचून राहाणार नाहीं.'—प्रो. फडके-वादळ.

वरवड---वरवडा भोळा : अंतरीं चाळा--(महानु.) दिसण्याला माणूस भोळा पण त्याचे आंतून जे चाळे चालतात ते कांहीं विपरीतच.

वरवडी भक्ति मोठी : आंत वासना खोटीः--(महानु.) वर मोठा भक्तीचा डौल दिसतो, पण वासना पाहावी तर तिला न शोभेल अशी म्हणजे भक्ति अंतरंगांत मुळींच बाणलेली नाहीं.

वरवर---वरवर—दिखाऊ; बाह्यतः; दर्शनी; पोकळ.

वरवर करणें--कामाचा देखावा करणें; ढोंग, कृत्रिमपणा करणें.

***वरवर आर्जव करी, घार त्याचे अंतरीं**--जो वरूनवरून नम्रपणें बोलतो त्याच्या मनांत कपट असण्याचा संभव असतो.

वरवर माया, उपाशी नीज (माझी) बया—वरून बोलण्यांत खूप कळकळ दाखवावयाची पण तिच्या पोटांत कांहीं आहे कीं नाहीं उपाशी आहे कीं काय, हें पाहावयाचें नाहीं. याप्रमाणें दिखाऊ प्रेम, वरवरची प्रीति.

वरवर माया करती, तोंड झांकून खाती--बोलावयास गोड बोलून खावयाच्या वेळीं मात्र आपण एकटेंच चोरून खावयाचें. वरवर प्रेम दाखवून स्वार्थी वृत्ति ठेवणें.

वरवरचे देखावे नेहमींच फशी पाडतात—मनुष्यानें केवळ वरून दिसणाऱ्या गोष्टीवर भरंवसा ठेवूं नये.

वरसणें—वरसला कहर, तरी सोडूं नये शहर—कितीहि संकटें आलीं तरी आपला गांव सोडून जाऊं नये. किंवा शहर सोडून खेड्यांत जाऊं नये.

वरा---वऱ्याची माती वऱ्याक--(कु.) जेथलें तेथें. तेथीलच वस्तु घेऊन काम, संपादणी करणें.

वराडी---वर्डीके मंटपांतु पाड्या शोधुनु आयला—(गो.) बैल हारवला म्हणून शोधण्यासाठीं लग्न मंडपांत जाण्यासारखें. हरवलेला बैल लग्न मंडपांत कधींच येणार नाहीं; कारण तेथें माणसांची बरीच वरदळ असते. जो मनुष्य बैल हरवलाय या सबबीवर लग्न मंडपांत त्यास शोधण्यास जातो, त्याचा खरा उद्देश बैल शोधण्याचा नसून ती सबब असते. त्यास लग्नाचें आमंत्रण नसतें, तेव्हां तो बैलाच्या सबबीवर लग्नास हजर राहाण्याचा प्रयत्न करतो.

वरात---वरात काढणें—(उपहासार्थी) धिंड काढणें; हांकून लावणें.

***वाऱ्यावर वरात आणि दर्यावर हवाला; वाऱ्यावर वरात, भुसावर चिठ्ठी**—वारा पहा.

वरातीमागून घोडें—(कोतवाली घोडा वराती पुढें लागतो) घोडें पहा. एखादी गोष्ट होऊन गेल्यावर त्याची साधनसामुग्री येणें. पुढें पहा. "ऐन वेळ निघून गेल्यावर दुसरी आघाडी निर्माण करण्याचें ठरविल्यास 'वराती मागून घोड्या' इतकाच तिचा उपयोग होणार आहे."—केसरी २७-१०-४२.

वरातीमागून, घोडें व्याह्यामागून पिढें—[पिढें= आसन, पाट] वरातीपूर्वी घोडें पाहिजे व व्याही आल्याबरोबर यांना बसावयास पाट दिला पाहिजे; पण या दोन्हीं गोष्टींना उशीर.

वरावर्द---वरावर्दीचें सामान--फिरकोळ सामान.

वरिष्ठ--- वरिष्ठाला हात, कनिष्ठाला दांत-लाथ—आपल्याहून मोठ्या माणसाची स्तुति करावयाची व हलक्या माणसाला त्रास द्यावयाचा अशी वृत्ति.

वरु---वरु मिळ्ळो शेंडून गेलो—(गो.) अचानक द्रव्य मिळून तें अचानक नाहींसें होणें.

वरु मोडचल्लेकडे कासु खर्चनि—(गो.) जिथें शेकड्यांनीं दानधर्म केला तिथेंच पैसा पैसा देऊन वेळ भागवण्याचा प्रसंग येऊं नये.

वरैत---वरैतु केला सुखाला, दमडी मिळेना कुंकवाला—(महानु.) नवरा करावयाचा तो सुखासाठीं पण इकडे पाहावें तों तिच्याजवळ याच्या नांवाने कुंकू

त्यापायली दमडी देखील नाहीं. मग त्यापासून काय सुख मिळणार ?

वर्ण---वर्णानां ब्राह्मणो गुरुः ।—ब्राम्हण हे सर्व वर्णांत श्रेष्ठ व बुद्धिमान आहेत. गुरुरग्निर्द्विजातीनां वर्णानां ब्राह्मणो गुरुः । पतिरेको गुरुः स्त्रीणां सर्वत्राभ्यागतो गुरुः ॥–हितोपदेश. वैशेष्यात्प्रकृतिश्रेष्ठ्यान्नियमस्य च धारणात् । संस्कारस्य विशेषाच्च वर्णानां ब्राम्हणः प्रभुः॥ –सम ६०.२१.

वर्तमानपत्र---दिव्यांत वात आणि वर्तमानपत्रांत जाहिरात—(अर्वाचीन म्हण) दिव्यांत वात घातल्यानें जसा उजेड पडतो त्याप्रमाणें वर्तमानपत्रांत जाहिरात दिल्यानें जाहिरातीचा विषय लोकांपुढें येतो, व त्यांना कळतो.

वर्दळ---वर्दळ घालणें—भांडत बसणें; हुजत घालणें; वाद घालीत बसणें. 'शंकराचार्यांशी वर्दळ घालीत बसण्यांत कांहीं अर्थ नाहीं.'–आगर ३.१४३.

वर्दळीवर येणें—वर्दळीस येणें—भांडणास प्रवृत्त होणें; एकेरीवर येणें; तंटा करणें; हातघाईवर येणें. 'ते दोघे बोलतां बोलतां एकदम वर्दळीवर आले.' 'वर्दळीस यावें काय त्यांनीं ।'–

वर्म---वर्मे चर्मे छेदणें—आरपार छेदणें; वर्मांवर आघात करणें; अगदीं वर्मावर प्रहार करणें; गुह्य मागापर्यंत प्रवेश करणें; अंडीं पिलीं बाहेर काढणें.

***वर्मस्पर्शापस्य वर शिरछेदु चांग**—(महानु.) वर्मावर घालण्यापेक्षां डोक्यावर घाव घातलेला बरा. माणसाला घाव वर्मी लागलेला सहन होत नसतो; त्यापेक्षां मृत्यु बरा असें वाटतें.

वर्ष---वर्षाचा दिवस; वर्षादिसाचा दिवस—१ वर्षांतून एकदां येणारा दिवस; सणवार. २ वार्षिक–दिन. ३ श्राद्धदिन.

***वर्ष साठ, विठोबानें केला पाठ**---जो मनुष्य साठ वर्षांचा होईपर्यंतहि परमेश्वराकडे लक्ष्य देत नाहीं त्याच्यावर देवहि कृपा करीत नाहीं.

वर्षाचे ३६५ दिवस पाऊस पडत नाहीं---सर्वच दिवस सारखे नसतात. एखादा काल अनुकूल असला म्हणजे तो सदोदित तसाच राहील असें नाहीं. " इंदूर देणगीचें मुद्दल आपण खाऊन खर्च केलें याचा पश्चात्ताप त्यांचे मनास वारंवार होई पण अशा देणग्या यापुढें आपणांस वारंवार मिळतील अशा भ्रांत कल्पनेवारी हे पैसे त्यांचे हातून खर्चले गेले. पण 'वर्षांचे ३५६ दिवस पाऊस पडत नाहीं' हें त्यांच्या लक्षांत आलें नाहीं."—केसरी २५–११–४१.

वऱ्हाड---वऱ्हाड निघणें—१ लग्नकरितां मंडळी निघणें. २ (उप.) पिंड निघणें; चंबू गवाळें आटवावें लागणें.

वऱ्हाडी मंडळी---वरवधूपक्षाचें लोक; विवाहाकरितां जमलेले पाहुणे वगैरे.

***वऱ्हाडणीला पापड जड**—(महानु.) बळेंच नाजूकपणा किंवा दुसऱ्या पक्षाचा उणेपणा दाखवावयाचा.

वऱ्हाडी आले धांवून, नवरदेव गेला उठून—समारंभांतील मुख्य व्यक्ति नसतांना इतरांनीं गोंधळ माजविणें.

वला---वल्या वणतिक फातरू मारल्यारि—(गो.) ओल्या भिंतीवर दगड मारला तर तो तिच्यांत रुतून बसतो. मन अपक्व असलें कीं कसल्याहि वाईट विषयांना त्याच्यांत घर करून राहायला सांपडतें.

वली---वलीको वलीही पछानता है—(हिं.) एक संत दुसऱ्याला ओळखतो.

वल्हा---वल्हा–ल्हे करणें—भाग पाडणें; आग्रह करणें.

वशिला---वशिल्याचें तट्टू—ओळखी वशिल्यानें नोकरीला लागलेला बहुधा नालायक माणूस.वशिल्याशिवाय कोठें संधान जमत नसतें असें ठरून गेल्यानें नोकरीला लागलेला माणूस; हा 'वशिल्याचे तट्टू' असला पाहिजे असा समज. 'स्टाफ एफिशिअंट आहे कीं वाशिल्याचीं तट्टं ?'—दाजी १.१६.

वषट्— वषट्कार—१ आहुति;हवि.२ जाळपोळ; लुटालूट. ३ अल्पांश, अस्तित्व नसणें. 'त्याचे घरीं जेवणास तुपाचा वषट्कार होता.' ४ निर्वंश; नाश.

वसकाडा---वसकाडे देणें—(व.) हिडिस फिडिस करणें.

वसणें---सोनें पाहावें कसून, माणूस पाहावें वसून—त्याप्रमाणें सोन्याची परीक्षा कसोटीवर घासून करतां येते त्याप्रमाणें मनुष्याची परीक्षा त्याच्या सहवासावरून करतां येते.

मनीं वसे तें स्वप्नीं दिसे—मन पहा.

वसंत---वसंत खेळणें—वसंतोत्सव करणें; रंग खेळणें. 'जें सिंहासनीं राजत्व जोडे। तें वसंत खेळतां न मोडे।'—एभा.१३·७०१.

वसंताचें बोलणें—नुसतें गोडगोड बोलणें; मधुर भाषण.

***वसंत ऋतूंतील बोरूंचीं बेटें, वाढतीं असंख्यात फाटे**—वसंत ऋतूंत सर्वच गोष्टींस बहर येतो तसा निरुपयोगी झाडांसहि येतो.

वसवस---वसवसगोत्री—सदा वसवस करणारा, चिडणारा.

वसवसा---वसवसा खाणें—धास्ती घेणें; भिणें. 'आम्हीहि वसवसा खाऊन निघून आलों.'—ख ३५२६.

वसुधा---वसुधैव कुटुंबकम्।—सर्व पृथ्वींतील लोकांस आपल्या कुटुंबांतील व्यक्तीप्रमाणें मानणारा. उदारचरितानां तु वसुधैव कुटुंबकम्। उदार पहा.

वसु---वसु नारायण—पोंळ.(ल.) स्वच्छंदी, स्वैर वर्तनाचा माणूस. "आणि बाकीच्या वेळांत यथेच्छ आणि अनिर्गल 'वसु नारायणं' बोकळावें, खेळावें, हाणामाऱ्या कराव्या, कुत्र्यांचीं पिलें, माकडें, कबुतरें ह्यांच्या मागें नाचावें, बागडावें, ओरडावें, आरडावें, अशी मनसोक्त आवाडाव करावी."—छच ७.

***मांजला वसू खायास काळ**—कांहीं कामधाम न करतां नुसता बसून खाणारा असतो त्यास निंदार्थी म्हणतात.

वस्तरा---वस्तऱ्यानें कापला गळा आणि सुरीनें कापला मळा—१ हळूच गुप्तपणें आपलें कार्य साधून एखाद्याचा नाश करणें. २ आपलेंच ः त्र आपणास घातक होणें; गुप्तशत्रु असणें.

वस्तरें---वस्तऱ्या, वस्तरा जाण—(गो.) ठसका लागणें; अळसूद जाणें.

वस्ती---वस्तीस राहाणें—मुक्काम करणें; उतरणें.

वस्तु---वस्तूची नाहीं माहिती, असून काय मूर्खाला हातीं—ज्या वस्तूचा उपयोग माहीत नाहीं ती वस्तु एखाद्या मूर्खाच्या हातांत असून काय उपयोग ?

वस्त्र---वस्त्र आड करणें---लज्जा रक्षणासाठीं नेसणें. 'जुनेर आड करुन चार लोकांत कसे बरें यायचे बाहेर !'—एकच प्याला.

वस्त्र कांट्यावर घालणें-घालून ओढणें—वस्त्र कांट्यांवर घातलें किंवा त्यावरून ओढलें तर फाटल्याशिवाय कसें राहील ? यावरून जाणून बुजून नाशास प्रवृत्त होणें. 'दुर्योधन दुःशासन, कर्ण, कृप, द्रोण, भीष्म ज्या कटकीं। त्यांत मरेनचि शिरतां कांट्यांवरि घालितां चिरे पटकी॥'—मोविराट ३·४१· कांट्यांवर घालणें पहा.

एका वस्त्रानें निघणें; एका वस्त्रानिशीं घराबाहेर पडणें—(अंग शब्दाच्या समवेत) एका अंगवस्त्रानें निघणें पहा.

वस्त्रें देणें—(दिवाणगिरी इ. चा)अधिकार देणें; नेमणूक करणें; जागा देणें.

काळीं वस्त्रें देणें---पदच्युत करणें; काढून टाकणें. (शब्दशः व ल.)

वस्त्रें होणें—१ अधिकार प्राप्त होणें. २ (विपरीत लक्षणेनें) अधिकारावरून दूर होणें.

वस्त्रांतर होणें-करणें— पोषाख बदलणें, वेषांतर करणें.

***लाभ पांचाचा आणि वस्त्र दहाचें**--लाभ पहा.

वस्त्रपूतं जलं पिबेत्।--पाणी गाळून प्यावें. मनःपूतं पहा. संबंध श्लोक असा—दृष्टिपूतं न्यसेत्पादं वस्त्रपूतं पिबेज्जलम्। शास्त्रपूतां वदेद्वाणीं मनःपूतं समाचरेत्॥

वस्त्राआड जग-जन नागवें—वरून कितीहि फरक दिसला तरी अंतर्यामीं सर्व सारखेंच असतात.

वस्त्राचा संन्यासी : वंद्य जगत्राशीं—(महानु.) एखादा संन्यासी एकाच वस्त्राइतकी मालमत्ता जवळ असतांना देखील सर्व जगाला वंदनीय होऊन राहतो.

वस्त्रानें भगवें : भक्तीनें नागवें—(महानु.) भगवें वस्त्र संन्यासी धर्माचें द्योतक म्हणून वापरावयाचें पण मनांत ईश्वरभक्ति मुळींच नसावयाची. अंतर्बाह्य सारखें पाहिजे.

वहना---वहेती गंगा, रमता साधु—बहेता पानी निर्मला, बधा गंधेलाहो। साधु सो रमता भला, दाग न लागे को॥ (महानु.) वाहतें पाणी शुद्ध निर्मल असतें पण तेंच कुंडांत सांचलेलें घाण राहतें. त्याचप्रमाणें

हिंडता, प्रवासी साधु शुद्धचरित असतो. त्यापासून लोकांना पीडा होत नाहीं.

वहाण---पायींची वहाण, पायींच छान—ज्या दर्जाचा माणूस त्याच दर्जावर असला पाहिजे. त्याला वरचा दर्जा देतां उपयोगी नाहीं.

वही---वहीला जमा करणें—जमाखर्चात जमेच्या बाजूला धरणें. (ल.) ताब्यांत घेणें, स्वतःच्या समजणें. 'जाधवः--आणि जगदेव, कोठवळ्याला म्हणावें या मुसलमानणी तुझ्या वहीला जमा करून घे.'

वहींत खोडाखोंडी, हातीं राही बेडी—खोटे जमाखर्च ठेवून त्यांत खोडाखोड केल्यास शिक्षा होते.

वही---वहीवरून अंबट होणें—बहुल्याच्या चार कोंपऱ्यास चार मडक्यांच्या उतरंडी असतात. लग्न आटोपल्यानंतर त्यांपैकीं दोन वरपक्षांकडे व दोन वधू पक्षाकडे जावयाच्या असतात. त्यांत लहानमोठे, चांगले वाईट असा मतभेद होऊन दोन्ही पक्षांत भांडण होणें; यावरून अगदीं क्षुल्लक कारणावरून वितुष्ट येणें.

वहू--वधू पहा.

वळ--वळ उठला पण संशय फिटला—कोरडा पहा. "वळ उठला पण संशय फिटला' ह्या म्हणीप्रमाणें, बायकोला केडगांवीं हालअपेष्टा सोसाव्या लागल्या खऱ्या, पण बरें होण्याचा तिचा संशय फिटला. म्हणून पुन्हा औषधोपचारासाठीं आम्हीं पुण्यास आलों." माझा चित्रपट व काशीचा संपूर्ण इतिहास, पान ६२. मार्गे गोष्ट पहा.

वळख---वळखी चोर जिवानिशीं मारता—(गो.) ओळखीचा चोर जिवानिशीं मारतो. ओळख पहा.

वळचण---वळचणीचा वासा--(ल.) खेटून असलेला शेजारी (विशेषतः ऋण, उसनेपासने यासंबंधी योजतात.)

वळचणीची पाल—आडून कानवसा घेणारी व्यक्ति

भुकेलें गुरूं वळचण ओढतें--भुकेलें पहा.

वळचणीचें पाणी आढ्याला जात नाहीं—वळचण खालीं व आढें वर असतें तेव्हां खालचें पाणी वर कसें चढणार? वरचेंच खालीं स्वाभाविक उतरतें. १ निसर्गाविरुद्ध गोष्ट घडून येत नाहीं. २ लहान मनुष्य कितीहि श्रेष्ठ झाला तरी त्याला मर्यादा असते. तो फार मोठा होऊं शकत नाहीं.

वळण---वळण-णें बांधणें--(ल.) मैत्री संपादन करणें; संधान बांधणें.

वळणावर जाणें—अनुसरणें; प्रमाणें चालणें, वागणें; सदृश असणें. 'हा अगदीं बापाच्या वळणावर गेला.'

वळणीं-वळणीस आणणें--येणें---वठणीस आणणें-येणें. 'तव विक्रमाविणें पळभरिहि न येतीच खळ बळें वळणीं।'—मोनामरसायन २०.

पाण्याआधीं वळण बांधावें—पाणी पहा.

वळणाचें पाणी वळणानेंच जाईल—पाणी सखल जागेकडेच वहात जातें. निसर्गाप्रमाणेंच गोष्टी होतात; जसें वळण लावावें तसें लागतें

वळणानें वाट सुटत नाहीं—अपवादानें नियम मोडत नाहीं.—पाआमा. ५.६.

वळता---वळता देणें; वळतें करणें—१ परत देणें; फेड करणें; परत करणें. २ वजा करणें.

वळतीस येणें---वठणीस येणें; वळणें. 'त्यांनीं धनीण बहु दक्ष असें म्हणावें। घेवोनि धाक हृदयीं वळतीस यावें।'-अवां. ३८२.

वळवणी आलें आणि तळवणी घेऊन गेलें--अळवणी पहा.

वळसा--वळसा होणें—गोंधळ, गडबड होणें. 'विचारे या व्हावा निखिल निज राज्यांत वळसा।'—सारुह ६. १२४.-शिली १४.१७१.

खाकेंत कळसा आणि गांवास वळसा—खाक पहा.

वळाण---वळाण पडणें—वाफसा येणें; पाऊस पडून गेल्यावर जमीन पुरेशी कोरडी होणें.

वळू---वळू दाखविणें—गाय, घोडी वगैरेस बैल, घोडा देणें; त्यांस गर्भधारणा करविणें, फळविणें.

वांई--वांई वैराट, बोलणें सैराट--(वैराट=विराटाचा प्रदेश) वांईकडील लोक स्वैर, वाटेल तसें बोलतात.

वाईट---वाईट करणें—नाश करणें; अहित करणें.

वाइटावर असणें—द्वेष करणें; अहित चिंतणें.

***वाईट कर्मे हीं काळोख्या रात्रीं केलीं जातात--**कृष्णकृत्यें उघडपणें करतां येत नाहींत, तीं चोरूनच करावीं लागतात.

वाईट खोडी, नाश करिती घडोघडीं---एकदां मनुष्यास दुर्गुण लागले म्हणजे त्याचा हळूहळू नाश होतो.

वाईट चांगले बोल, त्यांचे समान तोल---वाईट आणि चांगले दोन्हीहि प्रकारचे शब्द बोलण्यास श्रम सारखेच लागतात, मग चांगले शब्द बोलण्याच्या ऐवजीं वाईट शब्द कां वापरावे ?

लोकांचें वाईट चिंतलें कीं आपलें अगोदर वाईट होतें---तु०-चिंती परा येई घरा.

वाईट जागेवर उगां जातां, वाईटपणा येतो माथां---भलत्याच ठिकाणीं सहजहि गेलें असतां आपणांवर अपवाद येण्याचा संभव असतो.

वाईट तें लवकर व्हावें आणि चांगल्याच्या मार्गांत विघ्नें येऊन तें लांबणीवर पडावें---अनेकदां जगांत असा अनुभव येतो कीं, वाईट गोष्टी फार त्वरेनें घडून येतात व चांगल्या गोष्टी व्हावयास फार काळ लागतो.-केसरी ६-१०-३९.

वाईट बोलण्यापेक्षां पळणें बरें---तोंडून अपशब्द काढण्यापेक्षां तेथून दूर जाणें चांगलें.

वाईट संगत वाईट संवयी जडविते---कुसंगतीनें दुर्गुण जडतात.

वाईट सुरुवात वाईटांतच अंत पावते---आरंभ वाईट झाल्यास शेवटहि तसाच होतो.

वाइटांतून चांगलें निघतें---कधीं कधीं वाईट गोष्ट घडण्याचा परिणाम उपकारक ठरून ती निवारण्याकरितां म्हणून एखादें चांगलें कृत्यच हातून घडतें. 'हिंदुस्थानांत वृत्तस्वातंत्र्य जवळ जवळ नामशेष झाल्यासारखेंच आहे. परंतु वाईटांतून चांगलें निघतें म्हणतात त्याप्रमाणें या सरकारी जाचामुळेंच वृत्तव्यवसायकांना आपण संघटित व्हावें असें जाणवूं लागलें.'-केसरी २०-१२-४०. 'वार्षिक सभा भरण्यापूर्वी संचालक मंडळाचे अध्यक्ष व इतर सदस्य यांतील साधे तपशीलाचे मतभेद चवाठ्यावर आले ही गोष्ट अनिष्ट असली तरी वाईटांतून कांहीं चांगलें हें निघतेंच.'-केसरी २३-१-४०.

वाईटापेक्षां चांगलें बोले, चांगल्यानें मान हाले---तोंडांतून अपशब्द बाहेर काढण्यापेक्षां चांगलें बोलावें.

वाक्---वाक् समुद्रीं रिंगालेः तें तरकाच्या आवर्ती पडलें---(महानु.) समुद्रांत ज्याप्रमाणें भोंवरे त्याप्रमाणें व्याख्यान चर्चा यांतून तर्कवितर्क असतात. मोठ्या भाषणांत जे तर्क लढविले जातात त्यांतून सुटण्याची सोय नसते; तेव्हां भाषणच करूं नये हें चांगलें.

वांकडा-डी-डें---वांकडी पगडी करून---दिमाखानें; बेमुरवतीनें.

वांकडी मान करून पाहाणें---तुच्छतादर्शक दृष्टि टाकणें; अवज्ञादर्शक रीतीनें पाहणें.

वांकडी वाट---१ आडरस्ता; बाजूचा रस्ता. २ कुमार्ग; वाममार्ग.

वांकडी वाट करणें---मुद्दाम राजरस्ता सोडून येणें; बुध्या येणें. 'वांकडी वाट कोणीकडे केली !'-होला २७.

वांकडी समजूत---१ प्रतिकूल ग्रह; दुराग्रह. २ तेढ; द्वेष.

वांकडें दाखविणें---वेडावणें.

वांकडें पडणें---वितुष्ट येणें. 'बाहेर वांकडें न पडे तें करणें'-पया १२५.

वांकडें पाऊल---दुर्वर्तन; दुराचार; व्यभिचार.

वांकडें पाऊल पडणें---आडमार्गास जाणें; नीतिभ्रष्ट होणें; दुराचारास प्रवृत्त होणें.

वांकडें होणें (केसांचें अग्रदेखील)---यत्किंचितहि नुकसान न होणें; कांहींहि वाईट न होणें; हानि न होणें; भय प्राप्त न होणें. तु०-परि सत्यकवच असतां वक्र न होईल अग्र केसांचें ।-हरिश्चंद्राख्यान.

वांकड्या नजरेनें पाहणें---मनांत दुष्ट हेतु धरून पाहणें; कामुक दृष्टीनें पाहणें.

***वांकडा वासा आला कीं खळगाहि वांकडाच खणला पाहिजे.**---वांकडया मेढीला वांकडाच दर पहा.

वांकडी ना तिकडी तरी गांवाची भाकर---महाराला गांवांत हक्कानें मिळणारी भाकरी कशीहि असली तरी ती हक्काची म्हणून त्यानें गोड करून घेतली पाहिजे. आपला हक्क कधीं सोडूं नये.

वांकडी पगडी तिरपी मान, घरांत असेल तर देवाजीची आण.---एका कानावर पागोटें घालून मान तिरपी करून मोठ्या डौलानें रस्त्यांतून चालतो पण घरांत कांहीं खाण्यास असेल तर देवाचीच शपथ. तु०-एका कानावर पगडी, घरीं रांड उघडी.

वांकडें बोट घातल्याशिवाय तूप निघत नाहीं—बोट पहा.

वांकडे मेढीस वांकडेंच नेम करावें लागतें; वांकड्या मेढीला वांकडा नेम—जशी वस्तु, व्यक्ति असेल त्याचप्रमाणें तिची व्यवस्था लाविली पाहिजे. सरळाला सरळ, वांकडयाला वांकडें.

वांकडे झाडीं, वांकडी छाया—वांकडया झाडाची सावली वांकडीच पडणार. जशी वस्तु तसें तिचें कार्य, परिणाम वगैरे.

वाकनीसी---वाकानिशी करणें--तूप वाढणें. तूप वाढणें ही पानें वाढण्यांतील अखेरची व समाप्तीची क्रिया आहे त्याप्रमाणें वाकानिशी ही कागद करण्यांतील शेवटची क्रिया आहे; यावरून लक्षणेनें.

वाकळ---वाकळ फाडणें—व्यर्थ बडबड करणें.

वांकुल्या---वांकोल्या दाखविणें--वेडावणें. 'मारुतिशिं माकडानें दाखविल्या स्वांतहेतु वांकोल्या ।'—मो द्रोण १७·६१.

वाखा---वाखे होणें—(व.) त्रास, कष्ट होणें; हाल होणें.

वाखाणणें---वाखाणला गुरव देवळांत हगला—नांवाजणें पहा. ज्याच्यावर विश्वास ठेवावा, त्यानेंच दगा द्यावा. भरंवशाच्या म्हशीला टोणगा याप्रमाणें.

वांगड---वांगड केलों नी धगड झालों—[वांगड =सोबत] (कों.) उपयोगी पडल्याचें फळ मिळालें !

वागणें---वागायला निघणें—मनुष्य आजारांतून उठून हिंडूं फिरूं लागणें.

***वाग ग सुने पहिल्यासारखी, मी हो सासुबाई तुमच्या सारखी**—घरांत नवीन आलेल्या व्यक्तीस घरांतील माणसासारखेंच वळण लागतें.

वागविणें---वागवून घेणें--संभाळून घेणें; निभावून घेणें.

वांगा---वांगें पाहाणें--तिरळें पाहाणें.

वांगें---नाकानें वांगीं सोलणें—खोटा दिमाख, सोवळेपणा मिरविणें. नाक पहा.—नर्स सुंद्राबाई ६१.

वांगें वाढीस लागणें—वंश चालू रहाणें.

वांगें होणें—सत्यनाश होणें.

वांग्याचें भूत—वांग्याचें भूत करणें, बनविणें; भूत समजून वांग्याला भिणें. 'जरा थांबा ! तुमच्या मनांवर भुरळ घालणारा जादूगार जन्माला आला आहे तो तुमच्या वांग्याचें लवकर भूत बनवील !'—माझी जीवनयात्रा ४९२.

वांग्याचें भूत होणें—एक करावयास जावें तों दुसरेंच विपरीत होणें. 'हिंदुस्थानच्या राजकीय सुधारणेंत वांग्याचें भूत किंवा गणपतीचें माकड गोलमेज परिषदेंत कसें झालें याचा अनुभव आलाच आहे.'—केसरी १८–८–३६.

वाघ--वाघ डांभणें--गान्याजवळ वाघ आल्यावर त्यावर मारा करील अशी बंदूक बांधून ठेवणें. डांभणें पहा.

वाघडोळ्या—मोठ्या, बटबटीत, पाणीदार डोळ्याचा.

वाघाचा डोळा—रुपया.

वाघाची मावशी—मांजर. एखाद्या बाईला मांजरीची उपमा देण्यासारखें आहे. 'वाघाची मावशी, आहे का माहित । चला या दावितें आपुले घरांत ।'—मा त्र्यं.पटवर्धन.

वाघाचें कातडें पांघरणें—ढोंग करणें; शक्तीचा आव आणणें; सामर्थ्याची पोकळ घमेंड मारणें. पंचतंत्र गोष्ट. एका गाढवानें वाघाचें कातडें पांघरल्याची इसापनीतींत गोष्ट आहे.

***वाघ आणि मोर यांचें सख्य असतें**—वाघाच्या दांतांच्या फटींत मांस अडकलेलें असतें त्यामुळें त्याचे दांत दुखतात. मोर आपल्या चोचीनें तें मांस काढून घेऊन त्याला दुःखमुक्त करतो. अशा प्रकारें तो वाघावर उपकार करीत असल्यानें वाघ त्याला मारीत नाहीं. तद्वत मगर आणि सॅण्ड-पायपर पक्ष्याचें सख्य असतें अशी रानटी लोकांत परंपरागत कथा आहे.—मौज दिवाळी अंक १९३४.

वाघ पडला बावीं, केळडें गांड दावी—(को.) एखादा थोर मनुष्य अडचणींत सांपडला म्हणजे कोणीहि नीच मनुष्य त्याची हेटाळणी करूं शकतो.

वाग पडलो घाळी, केलदें दाखेता नाळी—(गो.) पिंजऱ्यातल्या वाघाला माकड सुद्धां वाकुल्या दाखवितें. तु०–पिंजरीं जरी व्याघ्र सांपडे, बायका मुलें मारितीं खडे !

वागु पिंजऱ्यांत पडताचि कोणाइ ताका फातर मारतीत—(गो.) वाघ पिंजऱ्यांत अडकला कीं पोरेंसोरें सुद्धां त्याच्यावर दगड मारतात.

वाघ बकरीं एके जागीं पाणी पितात--अतिशय शांतता, निसर्गतः वैरीहि असणारांनीं आपलें वैर विसरलेलें असणें.

वाघ म्हटलें तरी खातो, वाघोबा म्हटलें तरी खातो--दुष्ट मनुष्याला कितीहि गौरविलें तरी तो आपला दुष्टपणा टाकीत नाहींच मग उगाच त्यास मोठेपणा तरी कशास द्यावा. त्याच्या दुष्टपणाची तरी त्यास जाणीव द्यावी.

वाघ म्हटलें (ला) तरी खातो आणि वाघोबा म्हटलें (ला) तरी खातो मग वाघरूं म्हणून दोन हात करून कां न मरा - वर प्रमाणेंच.–विक्षिप्त १.१४.

पिंजऱ्यामध्यें वाघ सांपडे, बायकामुळें मारती खडे--वर पहा.–टि ४.२८९.

वाघा तोण्णांतली गाई--(गो.) वाघाच्या तोंडांतली गाय सोडविण्यासारखेंच अचाट काम.

वागा पील जाल्लें तरी पालो खाइद वे ?—(गो.) वाघाचें लहान पिल्लू झालें तरी तें पाला खाणार नाहीं. प्रतिष्ठित माणूस लहान असला तरी तो आपल्या इभ्रतीला कमीपणा येईल अशी कोणतीहि गोष्ट करणार नाहीं.

वागापोटा कोलो जल्मा आयला—(गो.)वाघाच्या पोटीं कोल्हा जन्मास येण्यासारखें आहे. मोठ्या आई-बापाच्या पोटीं जन्मास येऊन करंटा निघण्यासारखें आहे. तु०—हिऱ्याच्या पोटीं गारगोटी, सिंहाच्या पोटीं कोल्हा, सूर्याच्या पोटीं शनैश्वर.

वागा पोराक दुदानें पोसल्यार मूळचो स्वभाव सोडना—(गो.) वाघाच्या पिल्लाला दूध घालून वाढवलें म्हणून तें आपला मूळ स्वभाव सोडणार नाहीं,

वागा मळयारि खाता, मामा मळयारि खाता—(गो.) वाघ म्हटलें तरी खातो, आणि मामा म्हटलें तरी खातो, कोणत्याहि प्रकारानें ज्याचा अनुनय करतां येत नाहीं असा मनुष्य. वर पहा.

वाघा मांस कॉल्या सांपडप—(गो.) कोल्ह्याला वाघाचें मांस सांपडणें. माणसाला त्याच्या योग्यतेहून अधिक मोलाची वस्तु मिळणें.

वागा मिश्येरि कोल्लो खेळता—(गो.) वाघाच्या मिशांशीं कोल्हा खेळतो. धूर्त लोक क्रूर माणसालासुद्धां खेळणें बनवून सोडतात.

वागाक गायीची आण घाल्लेले गादि—(गो.) वाघाला गायीची शपथ घातली तरी ती तो हटकून मोडायचा. कारण गाय मेली तरी त्याची चंगळच.

वागाक मारच्याफुडे चामड्या खरेदी--(गो.) वाघाला मारायच्या आधींच त्याच्या चामड्याच्या विक्रीची भाषा करणें.

वागाकइ वासरा वोब चढ--(गो.) वाघापेक्षांहि वासराचा ओरडा अधिक. सूर्यापेक्षां तापलेली वाळूच अधिक चटके देते.

वाघाचा कान कां रुईचं पान, कुणाला ठाव ?--एका गुराख्यानें मीं वाघ पाहिला असें सांगतां त्याला तो दाखवितां येईना. तेव्हां रुईचें पान दाखवून हा मला वाघाचा कान वाटला, अशी तो संपादणी करूं लागला. यावरून पराचा कावळा करणें.

वाघाचा वाढा वाढत नाहीं--वाघ अनेकांचा घात करतो पण त्यापासून त्याला कांहीं फारसा लाभ होत नाहीं. त्याचें कांहीं गोत वाढत नाहीं. तो शेवटीं एकटाच राहतो व मरतो. त्याप्रमाणें दुष्ट मनुष्याची कधीं भरभराट होत नाहीं. पर्याय—वाघाचे वाडे वसत नाहींत.

वाघाची खोड काढूं नये—दुष्ट मनुष्याच्या वाटेस जाऊं नये. तु०–Arouse not the sleeping lion.

वाघाची फेरी, जिवाला मारी—दुष्ट मनुष्याची दृष्टि आपणांकडे वळली म्हणजे कांहीं तरी संकट यावयाचेंच.

वाघाची शिकार करणारा वाघाच्या हातूनच मरावयाचा व महापुरांत पोहणारा कधींतरी पाण्यांत बुडूनच मरावयाचा—चढेल तो पडेल, पोहेल तो बुडेल. अर्थ स्पष्ट आहे.--पामो ६४६.

वाघाचे पोटीं कोल्हे—वर पहा.

वाघाचे वाडे वसत नाहींत—वर पहा.

वाघाच्या घरीं शेळी पाहुणी—दुष्ट मनुष्याच्या तावडींत दुर्बल मनुष्य सांपडणें.

वाघाच्या शिकारीची तयारी करावी तेव्हां कोल्हा हातीं लागतो; कोल्ह्याचे शिकारीस वाघाची तयारी--प्राप्त करून घ्यावयाची गोष्ट लहान असली तरी त्याच्या प्राप्तीची तयारी फार मोठी केली पाहिजे. लहानशा तयारीनें भागत नाहीं.—मधुमक्षिका.

वागा फुडँ वांस्वलॉ बॉब—(गो.) वाघापेक्षांहि आस्वलाची ओरड मोठी. शूरापेक्षां भित्रा माणूसच अधिक वटवट करतो.

वाघावशेन हाडचँ, आनि कॅल्यावशेन् विकचँ—(गो.) वाघाप्रमाणें खूप मिळवावें आणि कोल्ह्याप्रमाणें त्याचा धूर्तपणें उपयोग करावा.

वाघास मारता हात आणि पाळता हात, हे दोन्ही सारखेच—दुष्टास अहितकर्ता व हितकर्ता हे दोन्ही सारखेच, अशा अर्थी ही म्हण योजितात.

वाघीण—-वाघीणीचें दूध—वाघिणीचीं पिलें तिचें दूध पिऊन जशीं शूर, पराक्रमी बनतात त्याप्रमाणें शौर्य, पराक्रम देणारी गोष्ट. विष्णुशास्त्री चिपळूणकर इंग्रजी शिक्षणाला वाघिणीचें दुध म्हणत असत तें यामुळेंच. इंग्रजी शिकून माणसें हुशार व कर्तबगार बनतात, अशी त्यांची समजूत.

वाचणें—-वाचली गीता, झाला रिता—ज्याच्या मनावर सदुपदेशाचा कांहीं परिणाम होत नाहीं असा. तु०—गाढवापुढें वाचली गीता. गाढव पहा.

वांचणें—-वांचून वरल्यारि वेंचून खांवयेद—(गो.) जीव जगला तर भीक मागून पोट भरतां येईल. जीवच गेला कीं सगळेंच संपलें.

वाचा—वाचा उलटणें-पालटणें-परतणें-फिरणें-मुरडणें—बोलणें खुंटणें; बोलणें खोटें पडणें; मागें घेण्याची पाळी येणें; गप्प बसावें लागणें.

वाचा नरकांत घालणें-घालविणें—खोटें बोलणें; वचन मागें घेणें.

वाचा फुटणें—बोलूं लागणें; बोलण्याची शक्ति येणें.

वाचा बसणें—बोलण्याची शक्ति नाहींशी होणें; वाणी खुंटणें; बोबडी वळणें.

वाचा विटाळणें—१ खोटें बोलणें; वचन न पाळणें. २ व्यर्थ भीड घालणें; निरर्थक शब्द वेचणें, खर्च करणें.

वाचाळ—-वाचाळ पंचविशी पंचांग—बडबड; वटवट; चऱ्हाट. 'तिची वाचाळ पंचविशी आतां सारखी चालू झाली.'—गणपतराव.

वाचाळपंचविशी लावणें—बडबड करणें.

वाच्यता—-वाच्यता करणें—परिस्फुटता करणें; गुप्त गोष्ट फोडणें; जाहीर करणें.

वाजणें—-बारा वाजणें—घटिका पूर्ण भरणें; नाशाची वेळ येणें; नाश होणें.

वाजणें गाजणें—१ गर्जना, गडगडाट, कडकडाट इ. होणें. २ गाजावाजा प्रसिद्धि, बोभाटा, बोभा होणें.

वाजती घांट—फार बोलणारा मनुष्य; बडबड्या; वाचाट.

वाजतें वारें; वाजता वारा—वारा सोसाट्याचा असला म्हणजे फार आवाज होतो यावरून. संकट; आपत्ति. ' उभयतांस मी वाजतें वारें। '—अफला १.४. 'तुम्हावरी वाजत वारा येथैनि धरिजेल।'—सूत्रपाठ १०४.

***वाजता थै गाजता**—(गो.) जेथें जेथें वाजतें तेथें तेथें कांहींतरी समारंभ असतोच. ज्या ठिकाणीं धूर त्या ठिकाणीं विस्तव असायचाच.

वाजता थयं नाचता—(गो.) ज्यांच्या अंगांत संचार होतो अशीं माणसें जिथें वाद्य सुरू असेल तिथें जाऊन नाचूं लागतात. ज्याला धन आणि प्रतिष्ठा आहे त्याच्याकडेच सगळयांचा कल झुकतो अशा अर्थानें म्हणतात.

वाजंत्री—-वाजंत्र्याची नळी, पुरणाची पोळी, व स्मशानांतील होळी जगांत सारखी चालू आहे—जगामध्यें आनंदाचे व दुःखाचे प्रसंग निरनिराळया ठिकाणीं क्रमानें चालूच रहावयाचे; त्यांत कधीं खंड पडत नाहीं. जगरहाटी ही सारखी चाललेली असते, त्यांत कोणास सुख कोणास दुःख होतच असतें.

वाजी—-वाजीवर गोमाशी ताजी—फक्त संपत्काळाचे मित्र. ताज्या घोड्यावरच्या गोमाशा. घोडा पहा. 'वाजीवर गोमाशी ताजी । तैसे गुलाम करिती हांजी ।'—अमृत ७३.

वाजी—-वाजी येणें—कंटाळा येणें. 'किती बोऊं बाजी आलें। डाग ढळेना '—दावि ५००.

वांझ—-वांझ-झी तिथी-तीथ—ज्या दिवशीं कोणतेंहि कर्म, विधि विहित नसते असा दिवस.

वांझी पुनव-पुर्णिमा—पौष पौर्णिमा. या दिवशीं बरींच मुलें असलेल्या स्त्रीस सवाष्ण बोलावतात.

वांझ ती वांझ नि लोकांच्या पोरावर लळा—स्वतःला अपत्य नसतां दुसऱ्याच्या अपत्यांवर प्रेम करणें. स्वतःची गोष्ट नसतां इतरांची प्रिय असणें.

वांज वियेंवक आनी दुकळ येवक एक जाले—(गो.) वांझ बाईला मूल झालें तोंच इकडे दुष्काळ सुरू

झाला. कांहीं गोष्टी आपणांस कष्टानें प्राप्त होतात पण त्या गोष्टींभोंवतीं बऱ्याचशा संकटाचा गराडा पडलेला असतो. तु०–नकटीच्या लग्नाला सतरा विघ्नें.

वांझ वियोंस, काळ पडोंस––(गो.) वर प्रमाणेंच. वांझ व्यायला आणि काळ पडायला एकच वेळ आली.

वांजेक बाळंत्र्या पिडा इते गोत्तु ?—(गो.) वांझेला बाळंतिणीच्या वेदनांची काय कल्पना ?

वांझेची आली पाळी आणि गांवाची झाली होळी—वांझेस मूल होण्यास आणि गांवाला आग लागण्यास एकच वेळ आली वर प्रमाणेंच.

वांझेला प्रसुतीच्या वेदना माहीत नसतात;वांझेला वेणा काय माहीत ?—प्रसूति पहा.न हि वंध्या विजानाति गुर्वीं प्रसववेदनाम्। 'प्रसवे तीच अभिज्ञ (शल्या) तैसी न वांझ वेणेची ॥'–मोकर्ण.

वांझेस कातबोळ कशाला ?––कातबोळ पहा.

वांझेस संतान, उदारास धन हीं दोन्ही देवास अर्पण—वांझेस पुत्र देणें व उदारला धन देणें या गोष्टी परमेश्वरास अर्पण करण्याइतक्याच पुण्यकारक आहेत.

वांझोटी––वांझोटी आणि संन्याशाची लंगोटी––दोन्ही निष्फळ.

वाट––वाट करणें—१ मार्ग करून देणें. २ (ल.) वर्तनक्रम ठरविणें; मार्ग दाखवून देणें;व्यवस्था,मांडणी वगैरे करणें. ३ नाहींसा करणें; दूर करणें. 'तेव्हेळीं शिशुपाळाचे राऊत। पारकेयांवरी वाट करितु।'–शिशु ९६४.

वांकडी वाट करणें—आडवळणास जाणें; मुद्दाम मार्ग सोडून जाणें; वळसा घेणें. वांकडा पहा.

वाट घडणें—मार्ग निघणें; परिणाम, गति होणें. 'अद्वैतशास्त्र नावडे यासी। पुढें वाट घडेल कैसी।'

वाट चुकणें––आकस्मिक भेटणें. अनेक दिवसांनीं घरीं आलेल्यास म्हणतात.'आज फार दिवसांनीं वाट चुकला.' –मोर १३.

वाट धरणें—१ मार्ग अडविणें; रोखून धरणें. 'एवढ्या रानामध्यें जाण। वाट धरून बैससी कोण।'–रावि. २ मार्गप्रतिक्षा करणें; वाट पाहाणें. ३ निघून जाणें.

वाट पाडणें––वाटेंत चोरी करणें; लुटणें; दरोडा घालणें. ' किरातसंगें घाट पाडित।'–रावि १.१०५.

वाट पाहणें––मार्गप्रतिक्षा करणें; खोळंबून राहणें; वाटेकडे डोळे लावून बसणें.

देखली वाट पाहणें-करणें—गेल्या मार्गानें परत येणें.

वाट फुटेल तिकडे जाणें––वाटेल तिकडे, वेळ प्रसंग येईल त्याप्रमाणें अगोदर कांहीं न ठरवून जाणें. 'त्यांस सांगोन पाठविलें जे, तुम्हांस वाट फुटेल तिकडे जावें.'–ख ७६२८.

वाट मारणें––मार्गांत गांठून लुटणें; वाटेंत दरोडा घालणें.

वाट लागणें––निकाल लागणें; उरकणें; संपणें; खलास होणें; विल्हेस लागणें; दूर होणें; नष्ट होणें.

वाट लावणें—१ निकालांत काढणें; विल्हेवाट करणें. २ खाऊन टाकणें; संपविणें. ३ मोडून तोडून टाकणें, नाश करणें. ४ मार्गांतून दूर करणें; हांकलून देणें.

वाट वावरणें––निरर्थक खेप घालणें; व्यर्थ हेलपाटा घालणें.

वाट वाहणें––रहदारी असणें; रहदारी चालू असणें; वाटसरू, प्रवासी वगैरेनीं वाट गजबजलेली असणें; वापर असणें. ' तुका म्हणे वाहे वाट। वैकुंठीची घडघडाट।'

वाट वाहती करणें––वाट मोकळी करणें; घालवून देणें; वाटेस लावणें. ' मग जाणतया जें विरू। तयाची वाट वाहती करू।'–ज्ञा १६.५७.

वाट सरणें––आंत्रमार्ग निरुद्ध होणें; आंतड्याला विकार होऊन रेच होणें. ' या बक्यानें क्षुधामांद्य होणार, बहुधा वाट सरली असेल. '–मौन यौवना.

वाट सुधारणें––पळणें; चालतें होणें; पाय काढणें. 'आपली वाट सुधार कसा.'– तोबं १७.

वाट होणें––परिणाम, गति होणें; निकाल लागणें.

वाटा घेणें––लुटणें; लुबाडणें.' तुजकारणें चोर घेती वाटा। तूं झुंजविली वीरा सुभटा।'–कालिका १४.६६.

चार वाटा करणें––उधळणें; दूर दूर करणें; विखुरणें; पळविणें; घालविणें.

चारहि–बारा वाटा मोकळ्या—पूर्ण स्वातंत्र्य; सर्व जग फिरावयास मोकळें असणें; स्वैरस्थिति; अनिर्बंध गति.

वाटा लावणें—वाटेस लावणें पहा. ' लाटून वाटा लाविलें। विचारें अविचारासी।'–दा ५.९.४८. बळें लावितो लोभ दाटूनि वाटा।'–दावि ३६४.

तिवाटांची माती येत नाहीं-समजत नाहीं—पूर्ण अज्ञान; कांहीं न समजणें.

वाटे-वाटेला जाणें—खोडी करणें; कुचेष्टा करणें.

वाटे-वाटेवर येणें—शुद्धीवर येणें; योग्य मार्गास लागणें; ताळ्यावर येणें; व्यवस्थित वागूं, बोलूं, करूं लागणें; वर्तनक्रम सुधारणें.

वाटे-वाटेस लावणें—१ मार्गास लावणें; रास्त मार्ग दाखविणें. २ निरोप देणें; पाठवणी करणें; रवानगी करणें. ३ हांकून देणें; घालविणें.

वाटेचा पाय-वाटेचें पाऊल आड वाटेस पडणें—कुमार्गास लागणें; चुकी होणें.

वाटेवर आणणें—ताळ्यावर आणणें; सुधारणें; योग्य मार्गावर आणणें. 'गंगे जा वाटेवरि आण, अभय द्यावया न हा भागे।'–मोउद्योग १३.५६.

वाटेवर पडणें—सहज प्राप्य असणें; सुलभ असणें; सुसाध्य असणें. 'माझी मुलगी वाटेवर पडली आहे?'–भाब १२.

मधल्या वाटेस—दोहोंच्या मध्यें; दोहों मार्गांपैकीं कोणताहि न पतकरतां, कोणाचाहि फायदा न घेतां (क्रि० येणें, जाणें, नेणें, आणणें).

वाटेस लागणें—१ चालू होणें; योग्य मार्गानें जाणें. २ नाहींसें होणें; संपणें. वाट लावणें पहा.

वाटेस लावणें—१ योग्य मार्गास लावणें. 'सर्वत्र धर्मरक्षक राजे आहेत लाविती वाटे।'–मोकर्ण २९.४६. २ निरोप देणें; पाठवणी करणें; हांकून लावणें.–मोरुक्मिणी ४९. 'आले होते त्यासी लाविलें वाटेसी।'–सप्र २. ११५.

***वाट पाहे दम धरी, वाटे दिवस उदास तरी**—वाईट दिवस आले असले तरी मनुष्यानें धीर धरावा व पुढील काळावर लक्ष द्यावें म्हणजे वाईट दिवसहि निघून जातात व चांगले येतात.

वाट बुजविल्यानें चोर बुजत नाहीं—वाट बंद केली तरी चोराचा प्रतिबंध होत नाहीं. त्यास धरलेंच पाहिजे. क्षुल्लक उपाय करून संकट टळत नाहीं. त्यास तोंड देऊन त्याचा बरोबर बंदोबस्त केला पाहिजे.

वाट विचारीत विचारीत लंकेक थाई वचयेद—(गो.) वाट विचारीत विचारीत लंकेपर्यंत सुद्धां जातां येईल. चौकस मनुष्यास इष्टफल मिळतें.

वाटे घाटे रामराम–(व.) एखाद्या मनुष्याशीं मामुली परिचय मात्र आहे, विशेष संघटन अथवा मैत्री नाहीं असें दर्शविणारी ही म्हण आहे. रस्त्यांत, नदीच्या घाटावर, पाणी आणण्याचे जागीं सहज वाटेवर किंवा पाणी भरण्याच्या ठिकाणीं जर एखाद्या मनुष्याची गांठ पडली तर रामराम मात्र होतो; विशेष बोलाचाल होत नाहीं. अर्थात् संघटन किंवा विशेष ओळख नाहीं असा तो मनुष्य आहे असा भाव.

वाटे निराळें बसावें--दुसऱ्याच्या मार्गांत येऊं नये. योग्य स्थान पाहून बसावें. रामदास

वाटेचा फांटा, तीन गांवचा हेलपाटा--वाट फुटेल तेथें भलत्याच वाटेस लागल्यास तीन गांवाचा हेलपाटा पडण्याचा संभव असतो. याकरितां जेथें वाट फुटते तेथें नीट विचार करून भलत्याच मार्गानें न जातां योग्य मार्गानें जावें.

वाटेचा वाटसरू, त्याचें नशीब कशाचें थोरु—वाटेनें प्रवास करणारा मनुष्य नशीबवान असेलच असें नाहीं.

वाटेन वच्या वागा, मका येवनु खागा; वाटेन वचण्या वागा-वाटे वैल्या वागा, म्हाका येवन खागा--(गो.) जाणाऱ्या वाघा मला येऊन खा. संकट येण्यापेक्षां त्याला बोलाविणारे कांहीं असतात. तु०–आव कुत्ता मेरेकू काट. आन बे कुत्ता खा मेरा पाव.

वाटेर बासिल्याक भोमान ना--(गो.) वाटेंत बसणारा माणूस जाणाऱ्या येणाऱ्याच्या पायांनीं लाथाडला जातो.

वाटेला नाहीं फांटा, तर वाटे हेलपाटा--सरळ रस्ता कंटाळवाणा होतो.

वाटेवरचा झरा-डवरा, सर्वांचा सोयरा—रस्त्यावरचा पाण्याचा झरा प्रवाशांस फार सुखदायक असतो. त्याप्रमाणें सज्जन हे सर्वांस आश्रय देणारे असतात.

वाटेवरचा हरभरा वाटेल त्यानें खावा--रस्त्यावरच्या वस्तु कोणीहि जाणारा येणारा नेऊं शकतो. माळवरची माती पहा.

वाटेवरचा हरि, रामराम करी---वाटेंत देऊळ लागल्यास सहज त्या देवाला नमस्कार करावा. देखल्या देवाला दंडवत पहा.

वाटणें---वाटेल तें करावें आणि प्रसिद्धीला यावें--कांहींतरी करून पुढें येणाराबद्दल म्हणतात. तु०--घटं भिंद्यात् पटं छिंद्यात् कुर्याद्रासभध्वनिम्। येन केन प्रकारेण प्रसिद्धः पुरुषो भवेत्। 'कांहितरी करणें, जगीं या प्रसिद्धिला येणें।'--सन्मित्रसमाजमेळा-पद.

वांटणें---वांटी तो बोटें चाटी--जो मनुष्य एखादी वस्तु अनेकांस वाटण्याचें काम करतो त्यास बहुधा असा अनुभव येतो, कीं वांटतां वांटतां सर्व संपून त्यास स्वतःस कांहीं उरत नाहीं. जो मनुष्य अनेकांस मदत करतो त्याला वेळेवर कोणी मदतीस येत नाहीं.

वांटी त्याला पाटी--पाटींतले जिन्नस वांटणाराला शेवटीं पाटींत स्वतःलाच कांहींच उरत नाहीं. वरप्रमाणेंच.

वाटणें---वाटली डाळ करणें--१ संपुष्टांत आणणें. २ नामशेष करणें; जवळजवळ नाहींसें करणें. ३ उगाच चवीपुरतें खाणें.

वॉटरलू---वॉटरलूची लढाई ईटन येथील क्रिकेटच्या मैदानावर झाली-जिंकली--ईटनच्या विद्यालयांत जे शिस्त व शौर्यादि गुण इंग्रजांनीं कमाविले त्याच्या जोरावर वॉटर्लू येथें विजय मिळविला.

वाटाणा---वाटाण्याच्या अक्षता लावणें--अक्षता पहा. 'बाबा हातोहात तुम्हांला वाटाण्याच्या अक्षता देतील.'--भाऊबंदकी १३७.

वाटी---वाटी नको, करवंटी पाहिजे--जेवरे-पुता वाटींत पहा.

वाटींत उटणें, लावीत सुटणें--इतक्या माणसांना जिन्नस पुरेल कीं नाहीं याचा विचार न करतां त्याची विल्हेवाट करणें. व्यवस्थितपणा, दूरवर विचार नसणें.

वाटींत सांडलें काय आणि ताटांत सांडलें काय, एकच--वाटींतला पदार्थ जसा पोटांत जाणार तसा ताटांतलाहि जाणार. तेव्हां पदार्थ कोठेंहि पडला तरी तो मिळणार त्याच पोटाला म्हणजे माणसाला. यावरून एकच हितसंबंध असणें; भिन्नता नसणें.-शाब २.२८१.

वाटोळा---वाटोळें करणें; वाटोळें लांबोळें करणें--(शून्य हें वाटोळें असतें यावरून) नाश करणें; समूळ नष्ट करणें. 'सुयशाचें करिल कां न वाटोळें।'--मोउद्योग ७.२६.

वाटोळें होणें--नाश होणें. 'कलियुगाचेमुळें, झालें धर्माचें वाटोळें॥'--नामदेव. 'स्वतःच्या संसाराचं वाटोळं केलंत, दुसऱ्याच्या संसाराचं वाटोळ केलंत!'--एकच प्याला ३.२.

वाटोळ्या खुराचा, नाश करील घरादारांचा--वाटोळा खूर असलेला घोडा बाळगण्यास अतोनात पैसा लागतो. घोड्याचे वाटोळे खूर असणें हें अशुभ लक्षण आहे. वाटोळा खूर असें सोदा, लुच्चा असणाऱ्या माणसास लक्षणेनें म्हणतात.

वांठ---वांठीचा पिता--[वांठ=म्हशीचें वांसरू, रेडी] (सांकेतिक) मूर्ख, जड बुद्धीचा.

वाडा---वाड्यावरचें भाडें, हेंच धंद्यावरचे दरोडे--धंद्यांतील बराचसा पैसा जागेच्या भाड्यांत खर्च होतो.

वाढ---वाढीस-वाढणीस लागणें--१ रुंद, उंच होऊं लागणें; लठ्ठ होत जाणें. २ खुंटलेली वाढ पुन्हां सुरू होणें.

वाढणें---वाढणें वर्तणें--पालन पोषण होणें; संभाळ होणें. 'तुमच्या अन्नावर वाढलों व वर्तलों तो मी तुमचाच आहें.'

वाढून ठेवणें-ठेवलेलें असणें--तयार असणें; खोळंबून, वाट पाहात असणें; (दुःख, त्रास, इ.)

***वाढणारी वाढतां, पण दौलो नाडतां**--(गो.) वाढणाऱ्या बाईला खूप वाढावें अशी इच्छा आहे. पण तिच्या हातांतली पळी लहान असल्यामुळें तिच्यांत अधिक मावूंच शकत नाहीं. श्रीमंत माणसाला दान देण्याची इच्छा झाली आणि त्यानें पुष्कळ दिलें तरी ज्यांच्या हस्तें तें द्यायचें ते मधले कारभारी याचकाच्या हातीं सगळेच्या सगळें पडूं देत नाहींत.

वाडतलो आपलो आसल्यारि कोटग्यांतु जेंवयेत--(गो.) वाढणारा आपला असला तर लांकडाच्या पाळ्यांत देखील जेवतां येईल.

वाढत्या अंगाला वाढता अंगरखा--जसें कार्य तशीं साधनें. जसें काम तशी योजना.

वाढल्यापेक्षां चहाडता गोड; वाढल्यापेक्षां चहाडले गोड--चहाडणें पहा.

वाढलली चली, कुसलाली पोवळी--(गो.) वाढलेली मुलगी ही सुपारीच्या कुजलेल्या कोंबा (पोया) प्रमाणें असते. पोवळी किंवा पोवा (या) यापासून सुपारीस फळ वाढतें. तो कुजला म्हणजे फळ कुठचें येणार ?

वाढले चेङ्क मोंडलेल्या घराक्—(गो.) वाढलेली मुलगी कोणाहि भिकाऱ्याच्या पदरांत बांधली जाते.

वाडिलें नाका सांडिलें जाय--(गो.) वाढलेलें नको; सांडलेलें हवें.

वाढिल्या व्हांक्र वॅळ ना मूर्त (गो.) वाढलेल्या मुलीच्या लग्नाला वेळ नाहीं आणि मुहूर्त नाहीं.

वाङ्क हाळ्ळे वेळार नांका म्हणता, कुणब्या जांवयिं तट्टी व्हांयता—(गो.) सासऱ्या घरीं गेल्यावर वाढायला आणलें असतां संकोचानें नको म्हणायचें आणि त्याच्या घरचें काम मात्र पुष्कळ करायचें असा कुणब्यांच्या जांवयाचा रिवाज असतो.

वाङ्क नज जाल्यारि हात उष्टो—(गो.) वाढावयाचें नसल्यास हात उष्टा आहे असें सांगणें. खोटें कारण पुढें करून काम टाळावयाचें.

वाढे वाढे, अक्कल काढे—वयाबरोवर अक्कल येत जाते.

वाळ्ळेकडे जेवचें देवळा पवळेरि निदचुंचें—(गो.) कोण वाढील त्या घरीं जेवायचें आणि देवळाच्या भींतीवर झोंपायचें. निरुद्योगी भटक्याची अशीच तऱ्हा असते.

वाढा——वाघाचा वाढा वाढत नाहीं—वाघ पहा.

वाढे——उंसांत जाऊन वाढें आणणें—समृद्धीच्या स्थळाहून क्षुद्र वस्तु आणणें.

वाण——वाण मारणें--निस्तेज होणें; फिके पडणें.

वाणमाऱ्या—निस्तेज; फिका; दुर्मुखलेला.

वाण गाईचा करणी कसावाची--जात चांगली पण कृति वाईट.

खोटें वाण लागणें—घेतलेला नग वाईट निघाल्यास म्हणतात. फसणें. 'आपल्याला खोटें वाण लागलें नाहीं ही खात्री करावयाची होती.'—रम्य रात्री पा. १२३.

वाण गाईचा, प्रजापती गाढवाचा--(अशिष्ट.) चांगली जात पण वर्तन घाणेरडें.

वाण घुशीचें खाणें म्हशीचें—दिसावयास लहान पण खादाड.

वाणांत उणें गुणांत आगळें--एखादी वस्तु बाह्यात्कारीं निरस असेल पण गुणांत सरस असेल.

वाण—सुन्या घरीं वाण देणें--अपात्र अशा जागीं उपकार करणें; निरुपयोगी जागीं सामर्थ्य वेंचणें.

वाणाचें सोडून तोंडल्यास आणि आमंत्रण सोडून भिक्षेस—चांगली वस्तु टाकून भिकार गोष्टीची अपेक्षा करणें.

वाणणें——वाणलें तितकें घाणलें--एखाद्याची फार स्तुति करावयास लागावें तों तो शेफारून भलतीच गोष्ट करून आपणास पश्चात्तापास कारण होतो.

वाणी——वाण्याचें लिहिणें; वाण्याचा जमाखर्च—वेडेवांकडे अक्षर; लबाडीचा जमाखर्च.

वाणी चोरून गूळ खातो—दुकानदार कधीं आपल्या दुकानांतला माल उघडपणें वापरीत नाहीं. कारण लोकांच्या डोळयावर येण्याचा संभव. तु०—आपलेंच खावें पण चोरून खावें.

वाणी जिरवी धन अन्, म्हैस जिरवी कण—वाणी लोकांजवळ असलेलें द्रव्य बाहेर उमटून पडत नाहीं. त्या जवळ द्रव्य किती आहे याचा अंदाज होत नाहीं. अथवा द्रव्य आहे कीं नाहीं हेंहि समजत नाहीं. तें जसें गुप्त असतें तसें म्हशीचें खाणें गुप्त आहे; म्हणजे तिनें कितीहि खाल्लें तरी वर दिसत नाहीं.

वाणी तुष्टो पिष्ट मुष्टिं ददाति । राजातुष्टो ग्राम मेकं ददाति ।—वाण्याची स्तुति केल्यास फारतर एक मूठ पीठ देईल पण राजा प्रसन्न झाला तर एक गांव मिळण्याचा संभव असतो.

वाणी देईल काय प्राणी खाईल काय; वाण्या देशील काय अन् प्राण्या खाशील काय---वाणी क्वचितच उदार बुद्धीचा असतो; तो बहुधा मापांतहि काटकसर करीत असतो.

वाणी मित्र नव्हे, मांजर जितरब नव्हे—वाणी कधीं मित्राप्रमाणें उदार बुद्धीनें स्नेहानें वागणार नाहीं त्याचप्रमाणें मांजर हें कष्टाचें जनावर नव्हे.

देरे वाण्या, खारे प्राण्या—वाणी देईल तें खाणें; कांहींहि चौकशी, चिकित्सा वगैरे न करतां वाण्यावर विश्वास

टाकून सामान आणावयाचें असा कांहींचा क्रम असतो. पण त्यामुळें वाणी फसवितो व माल वाईट येतो. बाजार करतां न येणाऱ्या माणसांबद्दल निंदार्थी वापरतात.

वाण्याचा गूळ वाण्यानें चोरून खावा; वाणी गूळ खाई परी मांडी आड घेई—वर पहा.

वाण्याची कसर आणि वणजाऱ्याची सफर बरोबर--या गोष्टी कधीं सरत नाहींत. त्यांस अंत नाहीं.

वाण्याची दुकानदारी, रिकामें पोतें करिते उधारी--वाण्यानें उधारीवर व्यापार केला तर त्याचें भांडवल जातें.

वाण्याचें गडबडतंय, मिठारणीचें दुणावतंय आणि तेलिणीचें हरवतंय--तेलवाली पहा.

वाणी----वाणीत्रय--(महानु.) १ अतीत वाणी= ईस्मरे तो दुर्लभ. २ परावाणी=चैतन्य देवतादि. ३ अमोघवाणी = नामस्मरणें अभिमानु अति;

***वाणी गाईची, करणी कसाबाची**--वाण पहा.

वाणीनें झिटकारिलें पण हृदयानें धरिलें--तोंडानें कठोर शब्द बोलूनहि दया दाखविणें. तोंडानें निष्ठुर पण हृदयानें मृदु.

वात---घातो जळवरेक व्याख्यान—'यावत्तैलं तावदाख्यानम् ।'

वातट-ड—शेळी जाते जिवानिशीं, खाणार म्हणतो वातडशी--शेळी पहा.

वाताडें----वाताडें पडणें—थोडया किंमतींत पुष्कळ मिळणें; एकदम, अचानक लाभ होणें.

वाथ्या-- वाथ्या कुटणें—काथ्या कुटणें पहा.

वाद---वाद घालणें—चर्चा करणें. 'वाद पंडितासीं घालूं आम्ही।.'—सप्र २.१२.

वाद सांगणें—आव्हान, स्पर्धा, बरोबरी करणें. 'अजगव शार्ङ्गीसीही स्वबळें सांगेल वाद कर्णातें।'—मोकर्ण २४.१८.

***वादविवाद केला, निष्कर्म हातीं आला**—चर्चा केल्यानें प्रश्नाचा निर्णय न होतां कार्यहानि होते.

वादविवादाची वाटावाट झाली, शेवटीं चालू व्यवस्था पसंत केली—पुष्कळ चर्चा केल्यावर शेवटीं पूर्वीचाच क्रम आचरण्यांत आणणें म्हणजे मिथ्या काथ्याकूट करणें आहे.

वादाच्या भांडणांत वर्दळ उत्पन्न होते—अनेकदां सहज वादविवाद करतांना कलह उत्पन्न होतो. वादेवादे जायते शीर्षभंगः।

तुका म्हणे वादें। वायां गेलीं ब्रह्मवृंदें ॥—जोगतुगा ५१६. वाद करकरून ब्राम्हण समुदाय वायां गेला. ब्राम्हणांचें सर्व शहाणपण वादविवाद करण्यांत खर्च होतें. प्रत्यक्ष कार्य कांहीं हातून होत नाहीं.

वादे वादे जायते तत्त्वबोधः।—वाद केल्यानें चांगलें तत्त्वविवेचन होऊन ज्ञानप्राप्ति मिळते.—शाब २.२२२. सबंध श्लोक असा—'मार्गे मार्गे निर्मलं ब्रम्हवृन्दं, वृन्दे वृन्दे तत्त्वचिन्तानुवादः। वादे वादे जायते तत्त्वबोधो, बोधे बोधे भासते चन्द्रचूडः ॥'

वादळ---वादळानंतर शांतता होते आणि दुःखानंतर सुख येतें—ज्याप्रमाणें वादळ गेल्यावर वातावरण शांत होतें त्याप्रमाणें दुख भोगल्यानंतर सुखाची प्राप्ति होते.

वादी-वादी प्रतिवादी हीं न्यायाधिशाची हातीं—वादी व प्रतिवादी या दोघांचेंहि हिताहित न्यायाधिश ाच्या मर्जीवर अवलंबून असतें.

वादी---वादीकरितां म्हैस मारणार—थोड्या लाभाकरतां मोठी हानि करून घ्यावयाची.

वाद्य---वाद्य वाजविणें—बोंबलणें; बोंबलत बसणें; अर्जुन वाद्य करणें. अर्जुन पहा.

वान---वान मारणें—रुप बिघडणें; रूपाचें तेज पूर्वीपेक्षां कमी होणें.

वान---वान वोच्चुनु मुधळ्यालग्गी सांगता; वायन वचून म्हादळ्याक सांगता—(गो.) उखळ पडघमाकडे जाऊन आपली कैफियत सांगतें. उखळाला एकाच बाजूनें मुसळाकडून मार बसतो पण पडघमाला मात्र दोहोबाजूंचा मार सहन करावा लागतो. यातना भोगणारी माणसें समाधानासाठीं जास्त क्लेशांनीं युक्त अशा माणसांकडे जातात.

वान्नांत बैसूनु कांडणा मार चुकवूच्याक जात्तवे ? —(गो.)उखळांत बसल्यावर मुसळाचा मार कसा चुकवितां येईल ? दुर्जनांच्या सहवासांत अपमान हा ठेवलेलाच.

वानर—-वानर तेल;वानरी तेल;वानरी तेलाचा प्रकार—[एका नगरांतील राजा आपल्या लाडक्या मुलासाठीं बागेंतील वानरांना पुष्कळ व चांगलें खाऊं घालीत असे. त्या वानरांचा जो पुढारी होता त्यानें त्यांना बजावलें कीं, आज आपण चैनींत आहों पण लवकरच आपला सर्वांचा नाश होईल. कारण राजपुत्राची गाडी ओढणारा मेंढा हा फार अचपळ आहे व तो पुष्कळदां स्वयंपाकघरांत घुसून अन्नाला तोंड लावतो तेव्हां आचारी हातीं लागेल तें घेऊन त्याला मारून बाहेर घालवितात. एखादे वेळीं जळत्या लाकडानें त्यांनीं त्याला मारलें तर या मेंढ्याच्या अंगावरची लोंकर पेटेल व तो पळत सुटेल.जवळच घोडशाळा आहे;तेथें गवत असल्यानें तीहि पेटेल व आंतील घोडे भाजतील. राजा नंतर शालिहोत्र वैद्यांना यावर औषध विचारील व ते सांगतील कीं, वानरांची चर्बी लावल्यावर घोडे बरे होतील. हा उपाय करण्यासाठीं राजा तुम्हांला येथें आयते धरून सरसकट मारील. तेव्हां येथून चला कसे ! पण हा सल्ला दुसऱ्या वानरांनीं ऐकला नाहीं व ते वरील भविष्याप्रमाणें नाश पावले—अशी पंचतंत्रांत कथा (५·१०) आहे.] अविचारी वागणुकीमुळें ओढवणारी आपत्ति, नाश. 'पुढें विनाशकाळें येणार भविष्य आलें तेव्हां वानरी तेलाचा जैसा प्रकार तैसा प्रकार घडला.' —भाब २.

वानराचें घर—[वानराला रात्रीं थंडी लागूं लागली म्हणजे तो म्हणतो उद्यां घर बांधलें पाहिजे अं ! पण दुसऱ्या रात्रीं तसेच !] अडचण भासली तरी ती निवारण्याची तरतूद न करणें अथवा दिरंगाईवर टाकणें अशा अर्थी. 'वानराच्या घराप्रमाणें समितीनें आपलें कार्य दिरंगाईवर न टाकतां या रसायनिक धंद्याचा विकास करण्यास त्वरित झटावें.'—केसरी २१–११–३९.

वानर काये जाणें आल्याची चक्की—(महानु.) 'गाढवाला गुळाची चव काय' याप्रमाणें.

वानर लकडी–शेक–शेकणीचीं लांकडें—वानरें शेकोटीसाठीं लाकडें जमवितात पण तीं पेटावितां न आल्यानें त्यांस शेक तर लागतच नाहीं पण धूर मात्र होतो.

वानर म्हणतें पहाट झाली म्हणजे घर बांधूं— वानराचें घर पहा. चालढकलीवर टाकणें. 'आज माझा किती एक दिवसांचा विचार आहे. परंतु वानर ०—तशी गत झाली.'—कीर्तनें, थो. मा. प्र. ६.

वानरीनें माया टाकली, पोर घातलें पायातळीं— एका नदीकांठीं एक वानरी आपलें पोर घेऊन राहात होती नदीला पूर आला तेव्हां ती पोरीला घेऊन झाडावर जाऊन बसली.पाणी चढूं लागलें तशी वर वर जाउं लागली. पोराच्या अंगाला पाणी लागूं लागलें तशी पोर तिनें डोक्यावर घेतलें. पण डोक्यापर्यंत पाणी येऊं लागलें तेव्हां मात्र आपला जीव वांचविण्यासाठीं पोर पायाखालीं घालून ऊभी राहिली व पोर मरूं दिलें. गोष्टीचें तात्पर्य अखेरीच्या क्षणीं स्वतःचा जीव अत्यंत जिव्हाळ्याची वस्तूहि पणाला लावून रक्षण करावा हें उचित. तु०---आत्मानं सततं रक्षेद्दारैरपि धनैरपि ।

वानवाचटोळ होणें—(व.) सत्यनाश होणें.

वापरणें–वापरण्यांत असलेली किल्ली गंजत नाहीं—पुढें पहा.—श्राव २·२०२.

वापरल्यानें किल्ली उजळ, उद्योगानें शरीर चंचळ —किल्ली वापरांत असली म्हणजे गंजत नाहीं त्याप्रमाणें नेहमीं उद्योग करीत असल्यास शरीर चपळ राहतें.

वापसें वापश्याचें ऊन—(व.) शरदृतूंतील ऊन; विश्वामित्राचें ऊन; अति कडक ऊन. (इं.) ऑक्टोबर हीट.

वाफ—(तोंडाची) वाफ दवडणें—उच्चार करणें; बोलणें; सांगणें. तोंड पहा. 'तुझं मन निष्पाप आहे— निष्पाप असेल, तर तूं जा......ही वाफ कशाला दवडतेस ?' —कवठेकर, अपुरा डाव ५८.

वाफ धरी वेळीं, हंसे तोच खळीं—जो वेळेवर वाफसा धरला असतां पेरणी करतो त्याच्या खळ्यांत धान्य खूप आल्यानें त्यास आनंद होतो. कार्याची संधि साधीत असावें.

वांबूरी—वांबुरीमागें धामोरी, तिच्यामागें खोसपुरी—हीं एकापुढें एक अहमदनगर जिल्ह्यांत गांवें आहेत.

वाम—वामकुक्षि—भोजन झाल्यानंतर विश्रांतीकरितां घ्यावयाची थोडीशी निद्रा. 'दुपारची वामकुक्षि मात्र चुकूं देऊं नये.'—नि.

वामन—वामनमूर्ति—वामन अवतारांत विष्णु ठेंगणा होता यावरून बुटका, ठेंगू मनुष्य. विशेषतः लहानसर पण पराक्रमी पुरुषास म्हणतात. 'एवढा नेपोलियन

बादशहा......ती स्वारी स्वतः कशी होती म्हणाल तर वामनमूर्ति !'–नि.

वाय——वाय वाय करणें—(व.) बडबड करणें.

वायगोळा——वायगोळा (पोटांत) उठणें—वायगोळा विकार असल्यावर पोटांत मोठी गांठ–गोळा उभा राहातो. यावरून भीति उत्पन्न होणें. पोटांत धाकधुक होणें. 'या भीतीचा वायगोळा क्षणोक्षणीं पोटांत उठत होता.'–न. चिं. केळकर–माझी गाडी कशी चुकली ?

वायट——वायट वार्ता फट जायना—दुष्ट वार्ता सहसा खोटी ठरत नाहीं.

वायदा——वायद्यावर येणें—चालढकल करूं लागणें; लांबणीवर टाकूं पाहणें.

वायां——वायां जावो न देई, धनधान्य त्याचे बाहीं—जो कधीं एक दाणाहि फुकट जाऊं देत नाहीं त्याचें धन धान्य कधीं सरत नाहीं.

वायू——वायू सरणें–मोकळा होणें—पाद येणें; अपानवायु बाहेर पडणें.

वायु सोडणें–मोकळा करणें—पादणें; अपान वायु सोडणें.

वायूची मोट—(प्र.) वाऱ्याची मोट, अशक्य गोष्ट.

वार——वार असणें–करणें—विशिष्ट वारीं उपवास करणें.

वार घेणें—गरीब विद्यार्थ्यांचा, वारकऱ्याचा जेवणाचा विशिष्ट दिवस घेणें; ठराविक दिवशीं त्यास जेवूं घालणें.

वारा——वारा घालणें—पंखा, चवरी वगैरे साधनांनीं हवेस चलन देऊन वारा लागेल असें करणें.

वारा घेणें–खाणें–पिणें—१ (वासरें वगैरे) मोकाट सैरांवैरां पळूं लागणें; उड्या मारूं लागणें. २ (ल.) निर्बंध झुगारून देऊन स्वैर वर्तन करणें; मोकाट सुटणें; अद्वातद्वा वागणें; उन्मत्त होणें. 'जेव्हां गर्भभंग होईल तेव्हांच ठिकाण पाहतील; नाहींतरी वारा घेताती.'–पेद २४.१४. 'स्वरूप तुमचें पाहून पापिणी जीव आमचा प्याला वारा!'–होला १०२. 'तेणें करून रांगडे बहुत वारा प्याले'–पेद २१.१७७.

वारा न घेणें, न पडूं देणें—अगदीं अलिप्त, दूर राहणें; किंचितहि संबंध न येऊं देणें; संसर्ग टाळणें.

वारा पडणें—वारा वाहावयाचा बंद होणें; वारा नसणें.

वारापाणी–वारासार होणें—१ उपेक्षा, हेटाळणी होणें. 'झालें वारापाणी वज्र तव भयेंचि देव कां पावे।'–मोअश्व १.१०६. २ (व.) विल्हेवाट लागणें.

वारा पिणें—१ वारा घेणें पहा. २ दुःखी, उदासीन, उत्साहहीन, खिन्न, उद्विग्न होणें. ३ उन्मत्त, अनावर होणें. 'वारा प्यालेलें वासरूं.'

वारा फिरणें—मत बदलणें; स्थिति पालटणें.

वारा फुंकून खाणें–राहाणें—१ उपासमार होणें; उपाशीं दिवस काढणें. २ फारच चोखंदळपणा करणें.

वारा–वाऱ्याची मोट बांधणें—अशक्य गोष्ट करूं जाणें.

वारा मोकळा करणें–सोडणें—अपानवायु सोडणें; पादणें. 'वारा सरतां मोठी फजीति।'–दा १८.१०.२०.

वारा लागणें—संसर्ग लागणें; संबंध येणें.

वारा लागूं न देणें—किंचितहि दुःख होऊं न देणें. 'लागो द्यावा न यास परि वारा।'–मोअश्व ४.१२९.

वाजता वारा लागूं न देणें—किंचितहि त्रास न सोसणें; स्वतःस अणुमात्र तोशीस लागूं न देणें; अजीबात त्रास टाळणें.

वारा वाजणें—वारा वाहणें; जोराचा गार वारा सुटणें. 'वारा वाजतां करपती ओलीं पिकें।'–दा ९.८.२९.

वारा वाजेल–येईल–वाहील तशी पाठ फिरविणें–पाठ देणें—परिस्थितीप्रमाणें वर्तन करणें. 'तरी तो वारा येईल तशी पाठ देणारा.'–V. S. २.१३१

कानांत वारा शिरणें—रानोमाळ भटकणें (जनावराप्रमाणें); स्वैराचारानें वागणें.

वारा होणें—वाताहात होणें. 'हळहळ बहु झाली होय संसार वारा।'–सारुह ३.७३.

वारें घेणें—अवसान धरणें; जोर करणें. 'फिरंगी याच्या लोकांनीं वारें घेतलें आहे.'–ब्रप ७७.

वारें लागणें—संसर्ग होणें. 'संपत्तीचें वारें सृष्टीच्या आरंभापासूनहि आजपर्यंत कसें तें मुळींच लागलें नाहीं'–नि.

वाऱ्याचा उपद्रव—१ हवेंतील फरकामुळें होणारी पीडा, बाधा. २ पटकीची साथ.

वाऱ्याचा बुंद--हवेचा अल्पांश; किंचितहि वायूचें वाहणें; बारीकशी झुळूक (बहुधा नास्तिपक्षीं).

वाऱ्याची मोट--(ज्याप्रमाणें वारा एका गाठोड्यांत बांधणें अशक्य त्याप्रमाणें) परस्परांपासून दूर व भिन्न अशा अनेक वस्तु अथवा व्यक्ति एकत्र आणण्याची व ठेवण्याची क्रिया; अनिर्बंध वस्तूंचें एकत्रीकरण. (हें अशक्यप्राय असतें.)

वाऱ्याचें घोडें—(वाऱ्यानें चालणारें) जहाज, गलबत, नौका.

वाऱ्याबरोबर-शीं भांडणें--कोणी भांडावयास नाहीं म्हणून वारा हाच प्रतिपक्षी धरून त्याच्याशीं भांडणें. अतिशय भांडखोर असणें; नसते कलह उकरून काढणें.

वाऱ्याला लाथा मारणें—निष्फळ काम करणें.

वाऱ्यावर टाकणें--अजिबाद सोडून देणें; टाकून देणें; पूर्णपणें त्याग करणें; हयगय, दुर्लक्ष करणें.

वाऱ्यावर भारे बांधणें—मनोराज्य करणें.

वाऱ्यावर सरणें--१ कुठें तरी भटकणें; वाहावत जाणें; कांहीं तरी भरमसाट बोलत सुटणें. २ अवखळ होणें; आडदांडपणा करणें; स्वैर वागणें.

वाऱ्यावशीं-वाऱ्यसाई-वाऱ्याबाग — वाऱ्याच्या गतीच्या अनुरोधानें; प्रवाहाबरोबर; प्रवाहाच्या दिशेनें.

वाऱ्यास उभा न करणें-राहूं न देणें-न राहाणें--स्वतःपासून दूर ठेवणें; संबंध न ठेवणें; संसर्ग टाळणें. 'एकादा मृगराजसिंह तारुण्याच्या भरांत असतां इतर श्वापदें त्याच्या वाऱ्यासही उभीं न राहतां.........पळत सुटतात.'-पामो ८.

वाऱ्यास देणें--उपणणें; वारवणें; वारसंडणें.

***वारा आला पाऊस गेला**--एकामुळें दुसरी गोष्ट घडली. 'आजमितीस तरी त्यांचें बोलणें वारा आला पाऊस गेला इतक्याच स्वरूपाचें ठरलें आहे.'-केसरी २ ७-४०.

वारा खेळकर व अग्नि खोडकर--वारा वरचेवर दिशा बदलीत असतो व अग्नीपासून आग लागण्याचा संभव असतो; याकरितां यांचेशीं जपून वागावें.

वारा पाहून-येईल तशी पाठ द्यावी--परिस्थिति पाहून वर्तन करावें.

वारा पाहून पाठ द्यावी, कार्याची सिद्धि साधावी--परिस्थितित्यनुरूप वागल्यास कार्यसिद्धि होते.

वारा प्यालेल्या वासराला पुढचें दिसत नाहीं--बेभान, उन्मत्त माणसास पोंच नसतो; त्याला सारासार विचार राहात नाहीं.

वारा फिरला कीं शिडाचीं तोंडें फिरतात—जसा वारा वाहील त्याप्रमाणें गलबताचें शीड फिरवावें लागतें. परिस्थितीप्रमाणें वर्तन करावें लागतें.

वारा बेवारशी, पाऊस उपवाशी—या दोघांवरहि विसंबता येत नाहीं.

वारा येईल तसें उडवावें--जशी वार्ता कानीं पडेल व जिनसाचा भाव ऐकण्यांत येईल त्याप्रमाणें विकावें.

वारे आनि उजो ऐकडे मेळेले गादि—(गो.) वारा आणि अग्नि यांचा संयोग झाला कीं मग अनर्थाला काय पारावार !

वारें आयिल्लें तशि शीड (सूप) दिवचें; वारें येता तसें सूप दिवचें--(गो.) धान्य वारवतांना वारें येईल तसें त्या दिशेनें सूप धरणें. प्रसंगाप्रमाणें वागून वेळ निभावून नेणें अशा अर्थानें वापरतात. तु०-वारा येईल त्याप्रमाणें पाठ देणें.

वारें आहे तों उपणून घ्यावें—तवा तापला आहे तों भाकरी भाजून घ्यावी. वारा असेल तों धान्य वारवावें.

वारे चोवुनु मोट्ट मंदप--(गो.) वारा पाहून निघण्याची तयारी करावयाची. परिस्थित्यनुरून बेत.

वारँ भरिल्लँ शीत मुठीयना—(गो.) वारें लागलेला भात फडफडीत होतो आणि मग त्याची मूद मारतां येत नाहीं. एकदां माणूस उच्छृंखल झाला कीं मग त्याला आवरणें कठीण असतें.

वारा वाजेल-वाहील तशी पाठ करावी-ओवावी-द्यावी; वारा पाहून पाठ द्यावी, वारावाहेल तसें करावें, वारा पाठीवर घ्यावा—१ वाऱ्याच्या प्रवाहाबरोबर जावें, वारा वाहील त्या दिशेनें जावें, वाऱ्याच्या अनुरोधानें जहाज हांकारावें, त्याच्या विरुद्ध जाऊं नये. २ (ल) वेळ पडेल तसें प्रसंग ओळखून वागावें.

'वारा येइल पाठ तशी कर, कशास घे मागें !'–कविचिमण, पारव्यास.

वाऱ्यान जर कोयूर वता, सान्न कित्या जाय ?—(गो.) वाऱ्यानें केर गेला असता तर झाडणी कशाला हवी होती ?

वाऱ्यानें आलें वावटळनें गेले—जसें आलें तसें गेलें.

वाऱ्यानें वाळतो, थुंकीनें भिजतो—ज्यांत कांहींच राम नाहीं असा. क्षुल्लक; फार नाजूक.

वाऱ्यावर जेवायचें पारावर निजायचें—ज्याला कोठें घरदार नाहीं व आगापिछा नाहीं असा मनुष्य.

वाऱ्यावर ज्याचें पान, त्याचा सदा अपमान—वाऱ्यावर जेवणाचें पान असेल तर तें उडून जाईल, त्यावर केर पडेल. तसें जो नेहमी संभाव्य आपत्तींत असतो त्यावर दुःखी कष्टी होण्याची नेहमी पाळी येते. याचा दोष परिस्थितीकडे; तेव्हां खट्टू होऊन कसें भागणार ?

वाऱ्यावर वरात, भुसावर चिठ्ठी–भूसपर ठेंगा––दर्यांवर हवाला–वरात म्हणजे पैसा देण्याविषयीं चिठ्ठी. ती वाऱ्यावर देणें म्हणजे कांहीं तरी करणें; बेजबाबदारीचें निष्काळजीचें काम. ताळमेळ नसलेली गोष्ट करणें. कांहींतरी अनिश्चित. असंबद्ध गोष्ट करूं पाहाणें.

वाऱ्या वाऱ्या धोपट खुंटीचा पोपट––कशास कांहीं ठिकाण नाहीं असें कांहीं तरी करणें.

वाराणसी–––येषां क्कापि गतिर्नास्ति तेषां वराणसी गतिः—ज्याला कोठें थारा नाहीं त्याला काशींत स्थान मिळतें. किंवा निराधाऱ्याला काशी आठवते.

वारी–––वारी होणें––१ गंमत होणें; चालणें. 'यदुपति उठतां हे वारि होऊं निघाली।'–सारुह ५.४१. २ खेप, पाळी होणें.

वारिस येणें––वांख्यास येणें; उरण; राहाणें.

वारी–––वारी सोडवणें––(को.) ग्रामदेवतेसमोर महारानें स्वतःच्या पोटावर तरवारीनें वार करणें. एक व्रत, दिव्य. तोडून घेणें.–आडिवऱ्याची महाकाळी ३२.

वारूळ–––वारूळ वाढलें म्हणून कांहीं पर्वताएवढें होत नाहीं—एखादी क्षुल्लक गोष्ट कितीहि मोठी झाली तरी तिच्या वाढीस मर्यादा असते; ती कांहीं प्रमाणाबाहेर मोठी होऊं शकत नाहीं; त्याप्रमाणें एखादा क्षुद्र मनुष्य कितीहि मोठ्या पदास चढला तरी त्याला खऱ्या थोर मनुष्याची योग्यता येऊं शकत नाहीं.

वारुळांत साप आणि वर मारणें—(ऐति. म्हण.) इ. स. १७६९ त हैदरअल्ली हा बिदनूरचे झाडींत लपून बसला असतां थोरले माधवरावांनीं श्रीरंगपट्टणपर्यंत स्वारी केली, तीस अनुसरुन ही म्हण योजली आहे. ठरलेलें काम सोडून भलतेंच करणें. रोग एकीकडे व इलाज भलतीकडे.

वार्ता–––वार्ता नसणें—नांव नसणें; अजीबात कांहीं नसणें; अस्तित्व नसणें. 'सृष्टीची नाही वार्ता सर्वही ऐक्यता ।–दा ५.६.४९.

वाल–––वालोवाल निसंतान; आटतां वाल, पिटतां वाल, वाल वाल निसंतान—अटणें पहा.

वाली–फळ वालीक जड—(गो.) वेलीचें फळ वलीला जड होत नाहीं. गरिबाचीं मुलें कितीहि गरीब असलीं तरी त्याला जड होत नाहीत. तु०–म्हशीचीं शिंगें म्हशीस जड नाहींत.

वाल्या–––वाल्या कोल्यानें रांजण भरला, कारण झालें पश्चात्तापाला—पुढें वाल्मीकि ऋषि बनलेला वाल्या कोळी यानें लूटमार करून संपत्तीनें व पापांनींहि रांजण भरले पण पुढें त्याला याबद्दल पश्चात्तापच झाला. पाप करणारा सुखी होऊं शकत नाहीं.

वांव चुकली कीं गांव चुकला–चुकतो—थोडें अंतर रस्ता चुकला कीं ज्या गांवीं जावयाचें आहे तें मिळणारच नाहीं. ज्या गांवाला जायचें त्याच्या वाटेनें जर न जातां दुसऱ्याच वाटेला लागलों तर इच्छित गांवीं न जातां भलत्याच गांवीं पोहचूं. त्याप्रमाणें थोडें का ध्येय सुटलें तर इष्टफळ मिळत नाहीं. 'हिंदु सभेनें स्वतःच भावी काल व त्या काळांत होणाऱ्या घडामोडीचें चित्र आपल्या डोळ्यापुढें ठेऊन आपलें राजकीय धोरण ठरवावें, हेंच इष्ट होय. वांव चुकली कीं गांव चुकतो म्हणतात हें लक्ष्यांत घेऊनच मार्ग ठरवावा ह्यांतच हिंदुस्थानचें हित आहे. '–केसरी १३–९–४०.

वाववळ–––वाहुटलीचें वारें चार घटका राहात नाहीं––[–पेद ४१.४]. मोठें वारें फार वेळ टिकत नाहीं. गाजावाजा, अवडंबर करण्यामध्यें फार दम नसतो. तु०–Barking dogs do not bite.

वावडी---वावडी करणें—फजीती करणें; दुर्दैवडी उडविणें.

***वावडी वांवभर आणि शेपूट गांवभर**—आठ हात लांकूड आणि नऊ हात धलपी.-केसरी २०-५-३०.

वासना---वासना तशीं फळें; वासना तसें फळ : वासने सारखें फळ—ज्याप्रमाणें इच्छा करावी (म्हणजे चांगलें वाईट चिंतावें) त्याप्रमाणें आपल्याला फळ मिळतें, म्हणजे आपलें चांगलें वाईट होतें. 'सिंधुः–म्हणतात ना, वासना तशीं फळें !'-एकच प्याला ४.५.

वासन ने मसणा—(व.) वासनेला बळी पडल्यानेंच मनुष्याचा अंतीं घात होतो. खूब खाण्यांत वासना ठेवली तर एखादे वेळीं खाण्यानें पोट फुगून मनुष्य मरावयाचा संभव आहे.

वासना मरे, देव पूजा करे—वासना नाहींशी झाल्या म्हणजे देवपूजेची आठवण होते.

वासनेचा खोटा, पाण्याचा तो गोटा—(महानु.) ज्याला वासना असतात तो माणूस पाण्याच्या गोट्याप्रमाणें बेभरवंशाचा असतो. तो अगदीं निरुपयोगी होतो.

वासनेच्या पोटीं, असती कर्माच्या कटकटी—मनुष्याच्या वासनेमुळें त्याच्या मागें सर्व संसाराची पीडा लागलेली असते.

वासनेच्या पोटीं, सगळ्या जगाची रहाटी—सर्व जग वासनेच्या मागें लागून धडपडत असतें.

वासरूं--वारा प्यालेलें-कानांत वारें शिरलेलें वासरूं—सैरावैरां धांवणारें, मो ाट सुटलेलें वासरूं. (ल.) अद्वातद्वा वागणारा, मोकाट माणूस.

वासरूं होऊन प्यायला अन् गोऱ्हा होऊन उडाय ला उशीर नाहीं—(व.) वासरूं लहान असतांना, अगतिक स्थितींत असतांना, गाईला पितें व गाईबद्दल त्याला मोठें प्रेम वाटतेंसें दिसतें. पुढें त्याला तारुण्य प्राप्त झालें व तो गोऱ्हा झाला म्हणजे आईची ओळख सुद्धां विसरतो व तिच्यावर उडण्याला तयार होतो. जो मनुष्य आपलें काम साधावयाचें असलें म्हणजे कमालीची लीनता दर्शवितो व काम झा लें कीं उपकार विसरून उपकारकर्त्यांवरच उलटतो, त्यास अनुलक्षून म्हण आहे.

वासरा कानांतु वारें रिगिल्यावारि—(गो.) वासराच्या कानांत वारें भरलें कीं तें चौखूर उधळतें. एखादा माणूस बेफाम झाला कीं त्याला म्हणतात.

वासरांत लंगडी गाय प्रधान–शहाणी—गाय पहा.

वासरें झालीं गाईला, आनंद झाला गवळ्याला—गाय प्रसूत होऊन तीस वांसरूं होतें पण गवळ्यास दूध मिळेल म्हणून आनंद होतो. गाय पहा.

वासलात---वासलात लावणें---१ अखेर करणें. निकाल लावणें; फन्ना करणें. २ लांबण लावणें; कंटाळवाणें, चऱ्हाट सांगत बसणें.

वासा---खाल्ल्याघरचे वासे मोजणें—कृतघ्नपणा करणें. खाणें पहा.

***घर फिरलें कीं घराचे वासेहि फिरतात**—घर पहा.

वाशाच्या गांडींत एक खिळा पण आढ्याच्या गांडींत सतरा---कर्त्यांच्या मागेंच फार लचांडें लागतात.

वाहणें---चिंता वाहाणें---काळजी करणें; कसें होईल याबद्दल बेचैन असणें.

वाटा वाहणें—वाटेंत गर्दी होणें असणें. ' सदा सर्वदा वाहती सर्व वाटा। '--राक १.२.१४.

वाहता झरा—(ल.) सारखा अखंड पुरवठा (पैसा इ.चा) व त्यामुळें चंगळ, रेलचेल.

वाहता रस्ता—सारखी रहदारी चालू आहे, अशी स्थिति.

वाहती ओटी—गरोदर बाळंत होणारी स्त्री.

वाहती कूस—१ वरील प्रमाणें. २ चालू, सुरू असणें, होणें. ' पावसाची वाहती कूस झाली. '

वाहती गंगा–धार—चालता काळ; भरभराटीची स्थिति; सुकाळ; चंगळ.

वाहती वाट—१ वाहता रस्ता. २ वाहती कूस पहा. ३ आरंभ; सुरुवात.

वाहत्या गंगेंत हात धुवुन घेणें—गंगा पहा.

वाहती गंगा आणि चालता धर्म—जोपर्यंत आपणास अनुकूल असेल तोपर्यंत पुण्य कृत्यें करावीं त्याकरितां वेळ घालऊं नये. गंगा पहा.

वाहते ती गंगा साचतें तें डबकें--गंगा पहा.

वाहत्या घोड्यावर दोन गोणी जास्त--जो घोडा कधीं तक्रार करीत नाहीं सारखा माल वाहून नेतो त्याच्याच पाठीवर आणखी ओझें घालतात. A Willing horse is always saddled.

वाहत्या नदींत आपण एकाच पाण्यांत दोनदां पाय ठेऊं शकत नाहीं—फायद्याची वेळ पुन्हां पुन्हां येत नसते तेव्हां ती येईल त्यावेळीं ' वाहत्या नदीत आपण एकाच पाण्यांत दोनदा पाय ठेवूं शकत नाहीं. अशी इंग्रजी भाषेंत म्हण आहे. त्याप्रमाणें गेलेल्या मोक्याचा फायदा मागून येता येत नाहीं तो ज्या त्या वेळींच घ्यावयाचा असतो.'–केसरी २८–१९–४१.

वाहत्या पाण्याला दोष नाहीं—वाहतें पाणी बहुधा स्वच्छ असतें.

वाहीला तो ओढा आणि राहीली ती गंगा; 'वाहिली ती गंगा, राहिलें तें तीर्थ—गंगा पहा. प्रगतीचा विचार करतांना झालेल्या चुका उगाळण्यांत अर्थ नाहीं. त्या पासून योग्य तो धडा घ्यावा म्हणजे झालें. वाहिली ती गंगा राहिलें ते तीर्थ अशी दृष्टी ठेविली पाहिजे १६–३–४९ पान १२.

वाहील त्याची शेती--जो शेती घरीं स्वतःकरतो त्यासच ती लाभदायक होते. दुसऱ्यावर अवलंबून अगर मजूरीनें केल्यास फायदा होत नाहीं. करील त्याचें शेत.

वाहन--वाहनांत वाहन पाय व हत्यारांत हत्यार हात—(ऐति.) पाय आणि हात हीं कोणत्याहि काळीं आपल्याला चांगलीं उपयोगी पडतात.–भा.इ.सं.त्रै.

वाहवटीला लागणें--वाहावत जाणें; प्रवाहांत वाहून जाणें ' पण कांहीं एक उपयोग न होता नाव स्वाधीन न राहून वाहवटीला लागली.' छच ५७.

वाही---वाही गुंतणें--एखाद्या गोष्टीच्या नादीं लागणें.

वाळ---वाळीत टाकणें–घालणें--समाजबाह्य करणें, जाती वगैरेच्या बाहेर टाकणें.

वाळीत–वाळीस पडणें--जातिबाह्य, भ्रष्ट होणें; बहिष्कार पडणें.

वाळणें---वाळत राहणें—(कर.) उपाशी राहणें.

वाळी---वाळी भाजीक लसणें फण्णा—(गो.) क्षुद्र वस्तूला महत्त्व देणें.

वाळु---वाळूची भिंत—न टिकणारी अशाश्वत गोष्ट.

वाळूंत–वाळूवर–वाळूमध्यें मुतणें—निरर्थक गोष्ट करणें; निष्फळ काम.

वाळूच्या कणाचा दोरा, कधीं न होय पुरा—वाळूचे दोर होत नाहींत. अशक्य गोष्ट.

वाळूंत मुतलें, फेस ना पाणी—याचा मागमूस राहात नाहीं. निरर्थक गोष्ट.

वाळूंत मुतलें वळ ना वोल—वर प्रमाणेंच.

वाळुक---वाळकाचा हारा ताकाचा डेरा—फार दिवस राहात नाहींत–लवकर सरतात. तेव्हां या गोष्टी जवळ असणाऱ्या मालकानें चढून जाऊं नये. क्षणभंगुर टिकणाऱ्या भरभराटीच्या काळांत माणसानें फार गर्व करूं नये.

वाळकाची चोरी, आणि बुक्यांचा मार—लहान अपराधास हलकी शिक्षा.–विक्षिप्त. ३.१९६.

वाळकाची चोरी शिक्षा झाली दरबारी—क्षुल्लक अपराधास मोठी शिक्षा.

वाळकावर सुरी पडली किंवा सुरीवर वाळुक पडलें तरी वाळकाचा नाश—कोणत्याहि स्थितींत फक्त एकाचेंच नुकसान, नाश. दोन विषम दर्जाच्या माणसांत कलह लागल्यास हलक्या दर्जावर असणाऱ्या माणसासच त्याचे फळ भोगावें लागतें. तु०–सासूचा पाय सुनेला किंवा सुनेचा पाय सासूला लागला तरी सुनेनेंच नमस्कार करावयाचा.

वाळे तापस--(गो.) टवाळी करणें, निंदा करणें.

विकट---विकटोपशास्त्री--ठोंब्या, मूर्ख माणूस विद्यार्थी.

विकटांत अध्ययन;विकटोपर्यंत अध्ययन–ज्ञान—अगदींच थोडें कोतें ज्ञान. अकटोपासून विकटोपर्यंत पहा. ' धार्मिक व सामाजिक विषयासंबंधानें आमच्या लोकांचें ज्ञान विकटोपर्यंत जाऊन थडकलें होतें.'–आगरकर.

विकणें–विकत आळ—विकत खरूज पहा.

विकत कज्जा; विकता कज्जा–कलागत–कुरापत—आपल्या हट्टानें, मूर्खपणानें आपणांवर ओढून घेतलेलें भांडण, लचांड, नसता उपद्याप.

विकत खरूज–खोकला; विकता खोकला—स्वतःच्या पैशांनी, कृतीनी, ओढून घेतलेला त्रास लचांड.

विकत घेणें—१खरेदी करणें; मोलानें घेणें २(ल.) प्रेमानें किंवा उपकारानें एखाद्यास गुलाम करणें. ' राम म्हणे साधो त्वां वांचविलें घेतलें विकत मातें! ' मोवन ११-१३०. ३ (एखादा अनर्थ) मुद्दाम आपणांवर ओढून आणणें. ' सावध रे कां घेसी मंदा खळनायका विकत मरण ।'–मोविराट ११.१३०.

विकत घोर–पाप–पीडा–फजिती–मौन–रोग लचांड, विघ्न, श्राद्ध—(सामान्य अर्थीनें) विकत खोकला; आपणच स्वतःवर ओढवून घेतलेलें संकट त्रास इ. 'हें पाहून शेटजी भिवून जाऊन आपल्या अंगावर घेतलेलें श्राद्ध टाकून देतील असें पुष्कळांस वाटतें.' टि.४.९०.

विकत तंटा—विकत कजा पहा.

विकत श्राद्ध घेऊन तर्पण–सव्यापसव्य करणें –पिंडदान करणें—(मृताची उत्तरक्रिया, श्राद्ध करण्यास वारस नसल्यास कोणी तरी त्या वेळेपुरता वारस होतो यावरून) आपल्या मागें कांहींतरी उपद्व्याप, लचांड लावून घेऊन त्रास भोगीत बसणें.–विक्षिप्त ३.१८०.

विकत श्राद्धाचीं पिंडें पाडणें—वर प्रमाणेंच. –विक्षिप्त ३.२४८.

विकतें श्राद्ध घेवून् डावे उजवे, करन्—(गो.) विकत श्राद्ध घेतलें म्हणजे जानवें डावें उजवें करावयाला पाहिजे. आनंद डिसेंबर १.१७.

विकला असणें—१ एखाद्याच्या आधीन असणें, गुलाम असणें. २ खुषीचा गुलाम, अंकीत बनणें.

विकतची कळ, पादत पळ—विकतचा कजा पहा. नसतें लचांड मागें लावून घेऊं नये.

पिकेल तसें विकेल—पिकणें पहा.

विकल्प—विकल्प तेथें महा पाप । पाप तेथें संताप । संताप तेथें अज्ञान अमूप । वसतसे सर्वदा ॥—विकल्पाच्या पोटीं काय काय आपत्ति सांठविल्या असतात. तें सांगितलें आहे. दास २.२२५.

विकोप—विकोप(च्या)स जाणें—१ अतिशय राग भडकणें. २ कुपथ्यानें जास्त बिघडणें रोग, क्षत इ. ३ चिरडीस जाणें; चिघळणें, ४ बेसुमार होणें; अतिशय चढणें (किंमत, इ.) ५ नाश होणें, बिघडणें.

विख—विख घेववतें पण भिख घेववत नाहीं—भिकेपेक्षां मरण बरें असें वाटतें, भीक पहा.

विखातलो किडो विखांतच जिवेता—(गो.) विषांतला किडा विषांतच जगतो. एखाद्यास वाईटाची आवड झाली म्हणजे त्यांतच सुख वाटूं लागतें. विषकृमि.

विचकट—विचकट बोलणें—कांहीं तरी अद्वातद्वा, आचरट बोलणें, अश्लील भाषण करणें; असभ्य बोलणें.

विचकणें—(त्याचे) विचकलें (तो नाश पावला) धुळीस मिळाला.

विचकून पाहणें—सूक्ष्म दृष्टीनें बारकाईनें पाहणें.

विचार—विचार जागविणें—(प्र .) विवेक जागविणें पहा.

विचारांत पडणें—चिंता उत्पन्न होणें; काळजी वाटणें. 'चिमणी पडली खिरा । चिमणा पडला विचारा.'

विचार सारासार, सोनें भारंभार—सारासार विचार हा सोन्यासारखा बहुमोल आहे.

विचाराचा पाया, चुक अपाया—वेळींच नीट विचार केला व कोणतेंहि काम विचाराच्या आधारें केलें म्हणजे त्याचा परिणाम अनिष्ट होत नाहीं.

विचारांचा सुकाळ पण शब्दांचा दुष्काळ—विचारांची प्रगति होत जाते पण त्या मानानें शब्द वाढत नाहींत. "१९१४ च्या युद्धाला आपण महायुद्ध म्हणत होतों. १९३९ च्या युद्धांला महा-महायुद्ध म्हणावें लागेल.अशा वेळीं विचारांचा सुकाळ पण शब्दाचा दुष्काळ ही म्हण खरी ठरते. पण आणखी पंचवीस वर्षांनीं युद्ध जुंपलें तर महा हें आश्चर्य दर्शक विशेषण दोहोंच्या ऐवजी तीन वेळां लावून महा–महा–महायुद्ध म्हणाल झालें.'–सह्याद्रि जुलै १९४०.

विचाराची तूट, तेथें भाषणाला ऊत—जेथें कांहीं मुद्दा नसतो तेथें केवळ शब्दावडंबर माजवून वेळ मारून न्यावी लागते.

विचारांत उदार व आचारांत अनुदार—मोठमोठ्या कल्पना मनांत आणून उदारपणाच्या कल्पना तोंडून उच्चारावयाच्या पण वागतांना मात्र फार जपून व जुन्या मताप्रमाणें वागावयाचें असा. तु. इ. Liberal in Thoughts and conservative in action.

विचारी तो विचारी, धपका लावी तो लष्करी ---जो प्रत्येक गोष्ट विचारपूर्वक करूं पाहतो त्याचा वेळ विचार करण्यांतच जातो व जो धडाक्यानें करतो तो करून जातो.

विंचू---सांबाच्या पिंडीवरला-देव्हाऱ्यावरला विंचू---देवाला मारल्याप्रमाणें होईल म्हणून अशा जागीं बसलेल्या विंचवाला जोड्यानें मारतां येत नाहीं; त्यानें सोंव्याचा आश्रय केला असतो; अशा प्रकारचा दुष्ट माणूस.

विंचूकांटा---विंचवासारखे दंश करणारे प्राणी; साप, विंचू, इंगळी वगैरे. 'अंधारांत बसलांत म्हणून म्हटलें हो! विंचू कांटा असतो, दिवा लावून बसायला नको का म्हटलें आहे कोणीं?'--मकोधि.

अंगाला सहस्र विंचू लागणें---हजारों विंचवांनीं नांग्या मारल्याप्रमाणें अतिशय यातना असणें; फार दुःख असणें.

विंचू डसतो व ढेकळाआड जाऊन दडतो---विंचू ज्याप्रमाणें हळूच नांगी मारून दडून बसतो त्याप्रमाणें कांहीं लोक निमूटपणें दुसऱ्यास त्रास देऊन मागें दडून बसतात.--तु०--A stab in the dark.

सर्प विंचू नारायण परी। वंदावे दुरून॥--तुका. दुष्टांना लांबून नमस्कार करावा, त्यांचा सहवास नको.

विंचू मराठा आणि साप ब्राह्मण--सापाची पूजा करतात, तो ब्राह्मणाप्रमाणें उच्च वर्णीय समजला जातो. विंचू हा दुसऱ्या वर्णाचा म्हणजे मराठा जातीचा मानतात. जनावरांतहि चातुर्वर्ण्य मानलें आहे.

विंचू व्याला नि टोकर झाला--- टोकर पहा. विंचवी व्यायली म्हणजे पिलें तिच्या पोटांतून बाहेर पडतात व ती विंचवी पोकळ अथवा फोल होऊन मरते त्याप्रमाणें मुलाबाळांसाठीं खूब खटपटी करून जेव्हां एखादा मनुष्य स्वतः कांहीं सौख्य किंवा फायदा न होतां व्यर्थ कष्टी होतो, तेव्हां ही म्हण उपयो[ग]ांत आणतात. पाठभेद--विंचू व्याला टोळ झाला.

विंचवाचा पिंजरा आणि चौकर माझा मावसा---कशाचा कांहीं संबंध नसतां उगाच जोडलेलें नातें. वास्तविक कांहीं संबंध नसतां कोठून तरी लांबचा संबंध जोडून दाखविणें. तु०--बदरायण संबंध.

विंचवाचा मंत्र येईना आणि चालला सापाचे बिळांत-भोंकांत हात घालायला--अंगांत सामर्थ्य नसतां एखादी मोठी गोष्ट करण्याचें साहस करूं लागणें; आपल्या शक्तीपेक्षां मोठें कार्य अंगावर घेणें.

विंचवाचें बिऱ्हाड पाठीवर---विंचवाचें मुख्य हत्यार त्याची नांगी ती त्याच्या नेहमीं पाठीवर वळवलेली असते. त्या प्रमाणें कांहीं लोक नेहमीं आपलीं साधनें आपल्या जवळ बाळगीत असतात.

विंचवाचें विष नांगींत---विंचवाची सर्व शक्ति त्याच्या नांगींत असते; तें त्याचें मर्मस्थान आहे.

विंचवाला खेटरांचा मार- विंचवास जोड्यानें मारतात. जशास तसें.

विंचवीण नाचते आणि विंचू ताल धरतो---परस्परांची प्रशंसा करणारे.

विजय---विजयाला धनी आम्ही, पराजयाला कारण तुम्ही---यश मात्र माझें व अपयश परक्याचें, अशी स्वार्थी वृत्ति. वाक्य--'नॉर्वेंत दोस्तांचा पराभव झाला त्याचें खापर नॉर्वेजियन लोकांच्या माथीं मारण्याचा प्रयत्न इंग्लंडमध्यें सुरू झाला आहे. विजयाला धनी आम्ही पराजयाला कारण तुम्ही! ही वृत्ति छोट्या राष्ट्रांच्या मनांत दोस्तांविषयीं आपलेपणा उत्पन्न करणारी नाहीं.'--केसरी १०-५-४०.

विजार---विजार शिवयितलो मुतच्याक वट्ट दावरनावे?---(गो.) जो विजार शिवील तो तिच्यात लघवीसाठीं भोंक अवश्य ठेवील. एखादें कार्य करायला निघालेला शहाणा माणूस त्याच्यांतल्या पुढच्या अडीअडचणींची आगाऊच तरतूद करून ठेवतो.

विजार शिवेल त्याला लघवीस वाट ठेवण्यास सांगावी लागत नाहीं---वरील प्रमाणेंच. जो मुख्य काम करतो तो तदनुषंगिक कार्येंहि करतोच. जो इजार करील० पहा.

विजोगाचा दिवा--(व.) विचित्र, विलक्षण माणूस.

विटणें---विटलेलें मन जुळत नाहीं आणि फुटलेलें मोतीं सांधत नाहीं; विटलें मन आणि फुटलें मोतीं सांधत नाहीं-- मन पहा.

विटाळ---विटाळ करून घेणें--विधवेनें वपन करून घेणें; हजामत करविणें.

विटाळ कालवणें—विटाळ पसरणें; एकापासून दुसऱ्यास याप्रमाणें दोष सर्वंभर होणें.

विटाळ जाणें—१ वेळीं अवेळीं रजःस्राव होणें. २ रजःस्राव होण्याचें अजिबात बंद होणें.

***नवरा आला वेशीपाशीं, नवरी झाली विटाळशी**—एखाद्या मंगलप्रसंगीं अकस्मात् विघ्न उत्पन्न होणें.

विटाळशेपणीं नवऱ्याचें प्रेम—अशा अस्पृश्य परिस्थितींत सहवासाची फार इच्छा होणें. भलत्याच वेळीं केलेला अतिप्रसंग.

विटाळें—**विटाळांत धरणें**—पंचांत, धरणें.—मक्षा. भीष्म. अ. ५८.

विठ्ठल—**विठ्ठल सवाशीण-सवाष्ण**—(जिनें विठ्ठलाचें भजन करीत संन्यस्त वृत्तीनें काळ कंठावा अशी विधवा) विकेशा विधवा. 'गतभर्तृकेच्या मनांत तसला झोंक पाहिजे असेल तर तिनें अगोदर विठ्ठल सवाष्ण झालें पाहिजे.'—आगर ३.११.

विडा—**विडा उचलणें**—पूर्वीं एखादी महत्त्वाची कामगिरी कोणास सांगावयाची झाली म्हणजे राजा दरबारांत विडा मांडून तो कोणासहि उचलण्यास आव्हान देत असे व जो मनुष्य तो विडा उचलील त्यानें ती कामगिरी पतकरली असें समजण्यांत येत असे. यावरून प्रतिज्ञा करणें; एखादी गोष्ट करण्याचें अंगावर घेणें. 'त्यांनीं ज्याच्या रक्तानें नाहाण्याबद्दल विडा उचललेला आहे ते कोण?'—उषःकाल. 'विडा पैजेचा उचलूं नको.'—अफला. 'अमका म्हणतो आजपासून चहा सोडला, तमक्यानं विडासुद्धां खायचा नाहीं असाच विडा उचलला.'—एकच प्याला. 'कल्पनेच्या बाहेर नाश फजीति झाल्यावांचून राघोबाला पेशवाई देण्याचा विडा उचललेले इंग्रज, पेशव्यांच्या बरोबर तह करण्यास तयार झाले नाहींत.'—V. ङ. २.१७८.

विडे देणें—दरबार बरखास्त करतांना, मोहिमेवर जाण्यास निरोप देतांना पूर्वी विडे देण्याची चाल असे. यावरून, निरोप देणें.

विडा लागणें—(व.) विडा खाल्ल्यावर त्यामुळें बेचैन होणें.

***विड्याच्या कामाला तोडा घालवायचा**—(क.) थोड्या लाभाकरितां मोठी हानि करून घेणें.

विडी—**वीडि वेडतल्या ताळो पळे, पुड्डि ताणतल्या दोळे पळे, पान खातल्या आंगण पळे**—(गो.) विडी ओढणाराचा गळा, तपकीर ओढणाऱ्याचे डोळे, आणि पानतंबाखू खाणाराचें अंगण हीं पाहण्यासारखीं नसतात.

विणची वेळ—संध्याकाळची वेळ; सूर्यास्त समय.

विणणें—**विणणाऱ्या कोळ्याची बायको नागवी**—कोळी आपल्या शरीरांतून सारखा तंतु काढीत असतो पण त्याचा त्याला कांहीं उपयोग होत नाहीं. स्वतःच्या कृत्याचा स्वतःस फायदा न मिळणें. तु०—कुंभाराक मडकें खड ना. चांभाराची रंडी, सदा पायीं उघडी.

विणें—**विणारणीच्या वेदना विणारीण जाणे-विते ती जाणते; व्यालीच्या वेदना व्यालीस कळेत, वांझेस काय समजे**—प्रसूतीच्या वेदना केवढ्या असतात याची कल्पना वांझबाईला नसणार. कष्टाचा अनुभव असतो त्यालाच त्याची तीव्रता समजते.

विलो तो भिलो हा?—(गो.) ज्यानें जन्म दिला तो पोसायला भीत नाहीं.

व्याली आणि चाटावयास विसरली—१ ज्या आईनें मुलांचें नीट संगोपन केलें नाहीं तिला म्हणतात. नुसता जन्म दिला पण पुढची काळजी घेतली नाहीं. २ निष्काळजीपणाचें काम करणें; अर्धवट काम करणें.

वितंड—**वितंडवाद**—आपला पक्ष बळकट नाहीं असें दिसून आलें असतां हेकेखोरपणानें वाटेल तशीं विधानें करून स्वपक्षसमर्थन करणें. 'वितंडवादांत शिरणें, किंवा शेषं कोपेन पूरयेत् ही युक्ति लढविणें यांतहि तो वेळेनुसार मागें घेत नसे.'—नि.

विंदुरु—**विंदुरु आणि मजारू**—(गो.) उंदरामांजराप्रमाणें स्वाभाविक वितुष्ट. उंदीर पहा.

विंदुरान आलें खेल्लाघरी—(गो.) आलें खाल्लेल्या उंदराप्रमाणें. उंदरानें जर आलें खाल्लें तर तो बेचैन होतो. ज्यावेळीं मनुष्य वाईट परिस्थितींत सांपडतो त्यावेळीं आपण म्हणतो कीं त्याची स्थिति आलें खाल्लेल्या उंदराप्रमाणें झाली आहे.

विंडुळा—**विंडुळ्यावेलें गीत कीर्तनांतु येवुना**—(गो.) झोपाळ्यावरचें गाणें देवपूजेच्या वेळीं उपयोगी पडत नाहीं. प्रेमगीतांचा उपयोग देवतेच्या पूजनार्थ होत नाहीं प्रत्येक गोष्टीला काळवेळ आहे.

विद्या---विद्या आली हातां, गुरूशीं देती लत्ता---गुरुपासून विद्या प्राप्त झाल्याबर त्याला न मानणें.

विद्याधनं सर्वधनप्रधानम्—(सं.) विद्या ही सर्वश्रेष्ठ संपत्ति आहे. न चोरहार्यं न च राजहार्यं । न भ्रातृभाज्यं न च भारकारी॥ व्यये कृते वर्धत एव नित्यं । विद्याधनं सर्वधनप्रधानम् ।

विद्या नसे ज्या: पशु गणावे त्या—(महानु.) विद्या येत नसलेला माणूस पशूंप्रमाणेंच होय यांत शंका नाहीं. तु०–विद्या नसे ज्या पुरुषास कांहीं ।......पशूमध्यें सत्य तया गणावें ॥–वामन.

विद्यानाम नरस्य रूपमधिकम्—(सं.) विद्या हें पुरुषास स्वरूपापेक्षां श्रेष्ठ भूषण आहे. सबंध श्लोक–विद्या नाम नरस्य रूपमधिकं प्रच्छन्नगुप्तं धनं । विद्या भोगकरी यशः सुखकरी विद्या गुरूणां गुरुः॥ विद्या बन्धुजनो विदेशगमने विद्यापरं दैवतं । विद्या राजसु पूज्यते न हि धनं विद्याविहीनः पशुः ॥

विद्या मित्रं प्रवासेषु भार्या मित्रं गृहेषु च—(सं.) ज्याप्रमाणें घरीं मनोविनोदनास किंवा सल्ला देण्यास स्त्री उपयोगी पडते त्याप्रमाणें प्रवासांत विद्या उपयोगी पडते.

विद्या (शास्त्र) मोठी आहे, जगणें थोडें आहे--सर्व विद्या शिकावयाची म्हटल्यास आयुष्य पुरणार नाहीं. अनंतशास्त्रं बहुलाश्च विद्या, अल्पश्च कालो बहुविघ्नता च । Life is short, art is long.

विद्या मोठी, बुद्धि खोटी—बुद्धीपेक्षां विद्या श्रेष्ठ होय.

विद्याविहीनः पशुः—विद्या नसलेला माणूस निवळ पशूप्रमाणें समजावा.–शाब २.३०३. 'विद्या नाम नरस्य रूपमधिकं' पहा.

विद्याहीन वांचे: जिणें गर्धवाचें--(महानु.) विद्या न करतां आयुष्य काढणें हें गाढवांच्या जिण्याप्रमाणें आहे.

विद्यया लभते सर्वं विद्या सर्वत्र पूज्यते--विद्येनें सर्व प्राप्त होतें याकरितां विद्येस सर्वत्र मान मिळतो.

विद्वत्ता---विद्वत्ता पाघळणें--विद्वान् असून मूर्खपणा करणें.

विद्येची उघाणी: वाण्याचा दुकानीं--(महानु.) वाण्याच्या दुकानीं विद्येची बरोबर परीक्षा होते. आपल्याला काय येतें व किती उपयोगी पडतें याची पारख जिन्नस खरेदी करतांना होते.

विद्वान्---विद्वान् माणसाला, व्यवहारदक्षतेनें झोला दिला—विद्वान् मनुष्य बहुधा व्यवहारांत तितका दक्ष नसतो.

विद्वान् सर्वत्र पूज्यते—विद्वान् मनुष्याचा गौरव सर्वत्र होतो. विद्वत्वं च नृपत्वं च नैव तुल्यं कदाचन । स्वदेशे पूज्यते राजा विद्वान् सर्वत्र पूज्यते ॥

विद्वानेव विजानाति विद्वज्जनपरिश्रमम्।—(नहि वंध्या विजानाति गुर्वी प्रसववेदनाम् ॥) विद्वान् माणसाला विद्येच्या कामांत काय काय परिश्रम पडतात हें एक विद्वानच जाणूं शकतो.

विद्वानोको शिंग नहीं, और मुर्खको पुच्छ नहीं---(हिं.) विद्वान् मनुष्याला कांहीं शिंग नसतें व मूर्खाला शेपटी नसते. ते इतर माणसांसारखेच असतात.

विधवा---विधवेला कुंकवाची उठाठेव कशाला—कुंकू पहा.

विधि---विधी करणें—(सांकेतिक)(लहान मुलानें) मलमूत्र विसर्जन करणें.

विधिनिषेध नसणें—धरबंध नसणें; अस्तिनास्ति असा कांहीं निर्बंध नसणें. विशेषतः हें करावें-खावें, हें करूं-खाऊं नये असा कांहीं एक विचार नसणें. 'एका जनार्दनीं छंद । हृदयीं तथा गोविंद । नाहीं विधि आणि निषेध । कृष्णावांचूनि दुसरा ।'–एकनाथ.

विधिनिषेध लोपला, भ्रांति पडे लोकांला—विधिनिषेध सर्व नाहींसे झाले तर लोकांस काय करावें आणि काय नाहीं याचा संशय उत्पन्न होतो.

विधि----विधि चुकल्याविण नियम करी, मनुष्य हा चुकांची शिदोरी—फक्त ब्रह्मदेवाला चुकल्यावांचून यथाप्रमाण वागतां येतें. मनुष्याच्या हातून असंख्य चुका होत असतात.

विनय---विनयशीलता हें एक अहंकाराचें भाषांतर आहे--मनुष्य जेव्हां आपण होऊन विशेष नम्रतेचा आव आणतो तेव्हां त्याला खरोखर स्वतःबद्दल जास्त अहंकार वाटत असतो.–न. चिं. केळकर.

विनायक---विनायकं प्रकुर्वाणो रचयामास वानरम्—(सं.) एक मनुष्य गणपतीची मूर्ति करीत असतां

सोंड पुढें लावायची ती पाठीमागें लावली गेली; त्यामुळें गणपति होण्याच्या ऐवजीं वानर झाला. यावरुन करावयास जावें एक व व्हावें भलतेंच अशी गति झाली असतां म्हणतात. 'विनायक करायला बसलं कीं नेमकं वानरच व्हायचं !'–आमच्या इंदूचें शिक्षण.

विनाश––विनाशकाळीं विपरीत बुद्धि होणें––पुढें पहा. 'दुर्गावतीः–बाबासाहेब, विनाशकालीं विपरीत बुद्धि होते असें म्हणतात, त्याचा प्रत्यय तुमच्यासंबंधानें मला क्षणोक्षणीं येत आहे !'–उग्र ४.२. "तों गृहकलह होऊन 'विनाशकाळीं विपरीत बुद्धि' जहाली."–भाव. २३,९२.

***विनाशकाले विपरीतबुद्धिः**––(सं.)मनुष्याचा नाश व्हावयाचा असला म्हणजे त्याला कांहीं सुचेनासें होऊन भलत्याच गोष्टी करण्याकडे त्याची प्रवृत्ति होते.–पामो ११०. "अं. २ प्र. ४ मधलें लुकजीचें वर्तन 'विना०' या श्लोकोक्तीस अनुसरुन होत असल्याचें दर्शविलें आहे."–शिवसंभव (प्रस्तावना);–श्रमसाफल्य २.१.(अ) न भूतपूर्वं न कदापि वार्ता हेम्नः कुरंगो न कदापि दृष्टः । तथापि तृष्णा रघुनंदनस्य विनाशकाले विपरीतबुद्धिः ॥ (आ) हरिःफरी वृश्चिकरेणुरंभा विनाशकाले फलमुद्वहन्ति । यथातथा सज्जन-दुर्जनानां विनाशकाले विपरीतबुद्धिः॥ सम.–६१.३२–३३. "महायुद्धाच्या संकटाचें निवारण करण्यासाठीं सरकारासच हिंदुस्थानांत लष्करवाढीची अत्यंत गरज भासत असतां निरुपद्रवी कार्यक्रमांवर बेकायदेशीरपणाची गदा हाणली जावी, याविषयीं कोणासहि उद्वेग वाटून 'विनाशकाले विपरीत बुद्धि' असेच उद्गार विचारी माणसांच्या तोंडून बाहेर पडतील."–केसरी ९–८–४०.

विनाशकाळे विपरीत बुद्धि, कपाळ फोडून बांधली चिंधी––असा महानुभाव लोकांत पाठ आहे. 'विनाशकाले०' पहा.

विनाशकाळे विपरीत बुद्धि, विकली घोडी घेतली गधी––(महानु.) वरील प्रमाणेंच.

विनोद––विनोद, हास्य आणि थट्टा हीं मित्रत्वाचें विष आहे––मैत्री राखावयाची असेल तर फारशी थट्टा, विनोद व हास्य करणें हें टाळावें.

विपरीत––विपरीत ज्ञानाचा कोंभ फुटणें––चूक होणें; भ्रम होणें.

विपरीत बुद्धीचा उगम, विनाश काळाचा आरंभ––विनाशकाले० पहा.

विभु––विभु रचणें––व्यूह रचणें; कट करणें. 'मेकॉलेनें असें दर्शविलें आहे कीं, बर्कनें वॉरेन हेस्टिंग्जवर जो एवढा विभु रचला, तो केवळ त्याच्या राक्षसी कृत्यांचा अतिशय संताप येऊन गेल्यामुळेंच.'–नि.

विभूति––विभूतीचें मूळ, रेड्याचे गांडींत––ज्याला विभूति–भस्म म्हणतात ती शेणाची राख असते व शेण हें रेडा हगतो तेव्हां मिळतें. याप्रमाणें अनेक ऐश्वर्यवान् व्यक्तिहि मूळच्या गरीब स्थितींतील असतात.

वियोग––वियोग ही आठवणीची स्मरणी आहे––वियोगावरचेंत ज्याचा वियोग झाला असेल त्याची एकसारखी आठवण होत असते.–सह्याद्री सप्टेंबर १९४१.

विरक्त––विरक्तस्य तृणं भार्या––(सं.) विरक्त मनुष्याला बायकोहि करपटाप्रमाणें वाटते.'उदारस्य तृणं वित्तं शूरस्य मरणं तृणम् । विरक्तस्य तृणं भार्या निःस्पृहस्य तृणं जगत् ॥–सुर. १५६. १४७.

विरक्ति––मनाची विरक्तिः याच देहीं मुक्ति––(महानु.) मनामध्यें विरक्ति असली म्हणजे जिवंतपणींच मुक्ति मिळल्याप्रमाणें होतें. विकार–वासना ही नसली म्हणजे मनुष्य मुक्तच.

विरजण––विरजण घालणें––[विरजण=दुधाचें दहीं करण्यास ताक घालतात त्यास म्हणतात. विरजण घातल्यानें दुधाची गोडी जाते.] १ आंबवणें; मुकणें. 'सर्व सुखाला विरजण घालणार ना ?'–रत्नप्रभा २२. 'लोक बार्तेवर विरजण घालण्याकरितां तिनें हजारों प्रयत्न केले.' –इंप ४०. २ एखाद्याचें मन दुसऱ्याविषयीं कलुषित करणें, बिघडविणें; मोडता घालणें; आड येणें; निरुत्साह करणें.

विरजण घालणें––पाडणें––विफल करणें; नासणें; बिघडविणें; फिसकटविणें; अडथळा आणणें.

विरजण पडणें––विफल होणें; नासणें; बिघडणें.

विरह––विरहें झुरती : प्रेमें मुरती:––(महानु.) विरह झाल्यास झुरणीस लागते व प्रेम मिळाल्यावर अगदीं रंगून जाते. अशी प्रियजनाची अवस्था भक्ताला पाहिजे.

विरूप––विरूप बायको आपली, सुरूप बायको लोकाची––सुंदर स्त्रियेकडे सर्वांची नजर असते; कुरूप

स्त्रीकडे कोणी पाहात नाहीं. तेव्हां नवऱ्याशिवाय तिच्या वाटेस कोणी जात नाहीं.

विरोध---विरोधाच्या पोटीं प्रगति असते-- All progress is through collinct याचा अनुवाद. कांहीं अडचण, अडथळा असेल तरच माणूस हात पाय हालवितो व प्रगति करतो.

विलग---विलगेस लावणें---दूर करणें; बंदोबस्त करणें; बाजूस काढणें. 'ही किरकीर विलगेस लावा।'--पला ६.१३.

विलायत---विलायती झांपड नि तिनें आपलेपणाचा भाजला पापड---हल्लीं मनुष्यांचे डोळे विलायती गोष्टींनीं दिपून गेले आहेत व त्यामुळें आपल्याकडलि गोष्टी टाकाऊ, वाईट म्हणून समजल्या जातात.

विलास---विलास करते जिवाला, शिळें पाणी देवाला---स्वतः चैन करून देवाची मात्र उपेक्षा करणें.

विलासाचें पोतें, अन् सव्वाहात रितें---(व.) मनुष्य विलासी म्हणजे ऐषआरामी असला तर मेहनती मनुष्याप्रमाणें तो पोतीं भरून भरून न आणतां सव्वा हात रितीं म्हणजे खूप रिकामी ठेवतो; म्हणजे तीं त्याला सोपीं जातात. शौकी मनुष्याला नेहमीं कमतरता असते.

विल्हा-ल्हे---विल्हे करणें-लावणें; विल्हेवाट लावणें---१ शेवट करणें; निकाल लावणें; २ योग्य ठिकाणीं ठेवणें, लिहिणें इ. 'दुसाला दप्तरीं विल्हे लावला.' --वाडबाबा २.८५.

विल्हेस करणें-देणें-लावणें---हवालीं, स्वाधीन करणें; ताब्यांत देणें.

विल्हेस लागणें---व्यवस्था लागणें; बंदोबस्त होणें. 'तुका म्हणे तरी लागलें विल्हेसी।'--तुगा १८४५.

विल्हेस लावणें---१ वर पहा. २ वर्गवारीनें, प्रतवारीनें जुळविणें.

विवाह---विवाहाच्या कारणीं, नको अमंगळ वाणी---शुभ कार्यामध्यें अभद्र बोलूं नये. याच्या उलट --शुभ बोलरे नाऱ्या, बोडक्या झाल्या साऱ्या.

विवेक---विवेक जागविणें---विचार करून करणें; तारतम्य बुद्धि वापरणें. 'ते अनुभवी जाणती सम्यक। त्यांनीं विवेक जागविला।'

***विवेकाचा जाळ, करी विराटाचा बाळ**---१ फार विचार डोक्यांत आले म्हणजे मनुष्य दुर्बल व कृतिशून्य होतो. २ विराटपुत्र उत्तरासारखा मनुष्य सारासार विचार सोडून भलतीच गोष्ट करतो.--पाआमा ५.६.

विवेकें क्रिया आपुली पालटावी। अती आदरें शुद्ध क्रीया धरावी॥---राम. मनुष्यानें विचार करुन त्याप्रमाणें आपल्या आचरणांत बदल करावा व मोठ्या आदरानें सदाचार पाळीत जावें.--गांगा २९८.

विश्वामित---विश्वामित्र सृष्टि---विश्वामित्र ऋषीनें प्रतिसृष्टि निर्माण केल्याची कथा आहे. ही सृष्टि विपरीत, विरोधी क्रियेची होती. माणसाच्या डोक्याप्रमाणें नारळ; गाईऐवजीं म्हैस; घोड्याऐवजीं गाढव वगैरे गोष्टी या सृष्टींत होत्या. यावरुन विपरीत, उलट गोष्ट, क्रिया.

विश्वामित्री---म्हैस. 'विश्वामित्री पोटीं तवाचा अवतार। नांव महाखर चांडाळाचें॥'--तुगा० २८४५.

विश्वास---विश्वास पुरणें---पूर्ण विश्वास बसणें. "मुसलमान सरदार यांशीं राजकारण करणें, बोलणें, विश्वास पुरत नाहीं. तेव्हां भावासिंग अहित कळलें."--श्रीशिवछत्रपतिचरित्र १२२. यासारखाच 'धीर पुरणें' असा वाक्प्रचार सांपडतो. (कित्ता पृ. १२७)

***विश्वास घातकी, महापातकी**---जो मनुष्य विश्वासघात करतो तो अतिशय पातकी असतो.

विश्वासघातकी म्हणून जगांत वावरण्यापेक्षां मृत्यु काय वाईट---विश्वासघात करण्यापेक्षां मरण पतकरावें.--टिसू २५८.

विश्वासाचा ठेवला घरीं; चारी सुना गरवार करी---एखाद्यावर अति विश्वास टाकल्यावर त्यानें निंद्यकर्म करून सपशेल फसविणें.

विष--विष मानणें---अत्यंत तिरस्कार, तिटकारा करणें.

विषकृमिन्याय---विषांतील किड्यांना ज्याप्रमाणें विषापासून बाधा होत नाहीं ते त्यांतच जिवंत राहातात त्याप्रमाणें दुर्जनांच्या संगतींत असलेल्या दुर्जनांस त्यांपासून बाधा होत नाहीं.

विषाची परीक्षा पाहणें---एखादा भयंकर प्रयोग, साहस, धाडस करणें.

विषवृक्षन्याय—आपल्या हातानें लावलेल्या वृक्षास जरी विषारी फळें आलीं तरी तो स्वतः तोडून टाकणें योग्य नाहीं. ज्याला एकदां आपला म्हटलें त्याचे हातून कुकर्म घडलें तरी त्याचा आश्रय तोडणें चांगलें नव्हे; कुपुत्र झाला तरी तो आपलाच मानला पाहिजे.

विच्चा मंत्र ना गोत्त, सर्पा बिळां हातु—(गो.) विषावरचा मंत्र ठाऊक नसतांना सापाच्या बिळांत हात घालणें हें धोक्याचें असतें. शत्रूच्या कारवाया त्याच्या-वरच उलटविण्याचें सामर्थ्य नसेल तर त्याच्या वाटेस जाऊं नये.

विषाची परीक्षा कशास पाहावी—विनाकारण धोक्यांत जीव कां घालावा.

विषांतला किडा साखरेंत मरतो.—दुष्ट मनुष्याला सज्जनांचा सहवास सहन होत नाहीं.

विषादप्यमृतं ग्राह्यम्—(सं.) वाईट गोष्टींतहि जर चांगल्याचा अंश असेल तर तो घ्यावा.

विषानें विष उतरतें—एक विष दुसऱ्या विषास मारक असतें. भयंकर गुन्ह्यास तसेंच भयंकर शासन द्यावें लागतें.

विषापासून जरी मिळालें, तरी अमृत करूं नये निराळें—अमृत हें जरी विषापासून उत्पन्न झालें असलें तरी त्याचा गुण अमृताप्रमाणेंच असणार. सज्जन हा दुर्जनाच्या वंशांत जरी जन्मला असला तरी तो स्वतः सज्जन असला म्हणजे त्यास मान देण्यास हरकत नाहीं.

विष्णु---विष्णुश्रृंखलायोग--वामनद्वादशीच्या पूर्व दिवशीं एकादशीविद्ध द्वादशी असून श्रवणनक्षत्र असेल तर हा योग होतो.

विष्णूचीं तीन पदें—दोन भुवयांमधील प्रदेश.--योर १·२६.

***विष्णु शंकर परमेश्वरानें, हृदयाचें घेतलें ठाणें**—मनुष्याच्या देहांत परमेश्वर वास करीत असला म्हणजे मग त्याला विष्णु किंवा शंकर कोणत्याहि नांवानें हांक मारली तरी सारखेंच.

विसर---विसर पडणें-घालणें—विसरावयास लावणें. 'जो मातृस्नेहाचा चित्तीं स्नेहें निजें विसर घाली ।' --सोभीष्म ४·३९·

विसरत बोलणें---असंबद्ध, विसंगत बोलणें; विचूक बोलणें. 'डुलत चालणें । विसरत बोलणें । नेणों काकहास्य करणें । श्री हरी नाथासीं ।'

विसरीं पाडणें--विसरविणें; विसरावयास लावणें.

विसवा----अठराविसवे (विश्वे) दारिद्र्य—अठरा पहा.

विस्तव----विस्तव आड मधून जाणें--वितुष्ट. हाडवैर असणें.

वर विस्तव ठेवणें--नाश करणें. 'आतां सगळ्या महाराष्ट्रावर विस्तव ठेवायला हरकत नाहीं.'–इंप १७३.

विस्तवावर तेल घालणें--आगींत तेल ओतणें पहा.

विस्तवाशीं खेळणें—संकट ओढवून घेणें; धोक्यांत जीव घालणें; साहस करणें; धोक्याचें काम करीत असणें.

***विस्तवाजवळ तूप नेल्यास वितळतें**—पुरुषाच्या दृष्टीस स्त्री पडली म्हणजे त्याचे मन विचलित होतें. घृत कुम्भसमा नारी तप्तांगारसमः पुमान् । तु०--मात्रा स्वस्रा दुहित्रा वा नैकशय्यासनो भवेत् । बलवानिंद्रियग्रामो विद्वांस-मपि कर्षति ॥–सुर १५४.४५.

विस्तवामध्यें ओलेंहि जळतें आणि कोरडेंहि जळतें—आगींत सुक्या लांकडांबरोबर एखादें ओलें घातलें तरी तें जळतें.कांहीं वाईट गोष्टीमुळें चांगलाहि बिघडतो.

विहंगम---विहंगममार्ग—जवळचा, लवकर कार्य साधणारा मार्ग; त्वरित्कार्यसिद्धीची रीत. याच्या उलट पिपीलिकामार्ग (मुंगीची चाल). 'पिप्लिका मार्गें हळूहळू घडे । विहंगमें फळासि गांठी पडे ।'–दा २०.२.१०.

विहंगमावलोकन—(इं.) Bird's eye view ला प्रतिशब्द. पक्षी वरून उडतांना खालचें पाहातो त्याप्रमाणें दुरून एका टप्प्यांत, एकत्रितपणें सर्व परिस्थितीची पाहाणी करणें; स्थूल अवलोकन.

विहीण---विहीण झालें नाहीं तरी मांडवा-खालून गेलें आहे—एखाद्या गोष्टीचा अनुभव नसला तरी दुसऱ्याचें पाहून ज्ञान असणें किंवा कांहीं संबंधामुळें ज्ञान होणें. लग्न पहा. Many can pack the cards that can not play.

विहीणीचा पापड वाकडा—विहिणीला रुसण्याला फारसें मोठें कारण लागत नाहीं. माझ्या पानांतला पापड वाकडाच आहे, एवढेंहि निमित्त पुरतें.

विहिणीला केला आहेर, सावकार बसला बाहेर—विहिणीला आहेर करण्याकरितां कर्ज काढणें हा मूर्खपणा आहे.

विहीर—विहिरींत ढकलणें-लोटणें—प्राण घेणें; जीव घेणें. 'मला विहिरींत लोटली असती तरी बरं झालं असतं.'—मोरप्र. ३४.

***विहिरींत खारें तर पोहऱ्यांत कोठून येईल गोडें**—मुळांत जसें असेल तसेंच आपणांस मिळणार. मूळ वस्तु कडू असली तर आपल्यास गोड कशी मिळेल.

विळा—इळा पहा.

पुढें चालतो विळा आणि मागें चालतें तोंड—(ठाकरी) शेतकऱ्याला धान्य निघाल्याबरोबर खायला लागतें.

विळ्याला नसतें म्यान व जाठाला नसते विद्या—जाठ हा आडमुठा असतो. 'जाठ सुधारला तर लसणावर धाड घालील. रीतभात शिकला तर फार फार तर पायपुसण्यानें नाक साफ करील. जाठ बेभान झाला तर त्याला आवरण्याला देवच लागेल.'—चित्रमयजगत् आगस्ट १९३६ पान ७४६.

वीचि—वीचितरंग न्याय—पाण्यांत एक लाट उत्पन्न होते, तिला मागची आणखी पुढें ढकलतें; हिला तिच्या मागची, असें होत होत क्रमाक्रमानें सर्व लाटा किनाऱ्यावर आपटून फुटतात. त्याप्रमाणें एक पिढी जाऊन दुसरी; दुसरी मागून तिसरी असा क्रम, राहाटी.

वीज—विजेचें चमकणें—क्षणांत वीज लखलख करून नाहींशी होणें. (ल.) क्षणीकपणा; क्षणभंगुरता; पाण्यावरचा बुडबुडा.

***वीज कडकडली आणि परळावर पडली**—खूप संतापून शेवटीं एखाद्या क्षुल्लक गोष्टीवर राग काढणें.

वीज कडकडली पण वडावर पडली—मनुष्य पुष्कळ संतापला पण शेवटीं त्यानें आपला राग भलत्याच गोष्टीवर काढला म्हणजे म्हणतात.

वीत—आपल्यापुरती-भोंवतीं वीत काढणें—संकटप्रसंगीं आपल्याचपुरती फक्त सावधगिरी बाळगणें; दुसऱ्याच्या स्वास्थ्याविषयीं बेपर्वा असणें.

वीतभर पोट-पोटाची खळगी—पोटाचा आकार फार मोठा नसतो, सारा वीतभर. पण तेवढी भरण्यास कोण खटाटोप, यातायात इ. 'या वीतभर पोटासाठीं सर्व उठाठेवी.'—विवि ८.२.२१.

***विती एवढें पोट। परि केवढा त्याचा बोभाट**—१ श्याम. वर प्रमाणेंच.

वितीस चुकलें म्हणजे वांवेस चुकलें—प्रारंभीं थोडी चूक केली म्हणजे पुढें मोठी चूक हातून होते. लहान चूक मोठ्या चुकीस कारणीभूत होते.

वीर—इ(ई)र पहा. विरेंत घालणें—बुद्धिबळाच्या डावांत राजास शह देणारें मोहरें व राजा यांमध्यें एक मोहरें टाकणें. कोणी मध्यें घालणें.

वीर—वीरपीर—(निंदार्थी) बोंबल्या; अरेराव; धटिंगण. (प्रशंसार्थी) उत्साही, धाडशी माणूस.

वीरभद्र—दक्षयज्ञप्रसंगीं दक्षास मारण्याकरितां शंकरानें उत्पन्न केलेला वीर मानसपुत्र. यावरून अत्यंत भेसूर स्वरूपाचा, दुराग्रही व नाशकारक मनुष्य.

वीरशय्या—रणभूमि.

वीरशैवांचीं अष्टावरणें—१ गुरु, २ लिंग, ३ जंगम, ४ पादोदक, ५ प्रसाद, ६ विभूति, ७ रुद्राक्ष, व ८ मंत्र.

वीस—वीस नखांची बाधा; वीसनखीची बाधा—१ गुह्य रोग; गुप्त रोग; स्त्रीजन्य रोग. २ व्यभिचाराचें व्यसन, रंडीबाजी. ३ (बायकी) गर्भारपण; पोटिशी राहणें. 'कसला रोग अन् कसलें काय? वीसनखीची बाधा झालेली.'—झांसू ११.

विशी एकूणविशी—विसाचें एकूणवीस होणें. १ आंत बट्ट्याचा व्यापार होणें; तूट येणें; नुकसान होणें. २ कमी प्रमाण, कमी जोरें असणें. 'आतां आपली प्रकृति कशी आहे? कांहीं विशी एकूणविशी वाटते का?

वीस करतां खिसमिस—(गो.) वीशीचा तरुण प्रेमाच्या तावडींत सांपडावयाचाच.

वीस गांव तेथें तीस गांव—बऱ्याचशा मोठ्या गोष्टींत थोड्या कमी अधिकाचा हिशोब नसतो. गप्पाच मारावयाच्या मग त्यांत पुष्कळच भर घातली म्हणून काय हरकत. अतिशयोक्तीला कांहीं प्रमाण नसतें, ती वाटेल तेवढी करावी. ऐशीं तेथें पंच्यायशीं.

विशीं विद्या आणि तिशीं धन—माणसाला विद्या विसाव्या वर्षापर्यंत येते व संपत्ति मिळावयाची असेल तर ती तीस वर्षांपर्यंतच मिळते, पुढें फारशी आशा नसते.

"'विशीं विद्या आणि तिशीं धन' अशी एक आपल्यामध्यें पुरातण म्हण आहे."—छच. ३६.

विशीं विद्या, तिशीं धन, चाळिशीं मरण— मागें पहा.

विशीची गर्दी आणि चाळिशीची सर्दी—मनुष्य विशींत असला म्हणजे तो आपल्या कामाच्या गडबडींत असतो, तो नेहमी धांदलींत असतो व चाळीशींत गेला म्हणजे बहुधा आजारी असतो.

वीसां नाहींतर तिसां, नाहीं तर जसाचा तसा—विसाव्या वर्षी शहाणपण नाहीं आलें तर तिसाव्या वर्षी येईल पण तिसाव्या वर्षींहि न आलें तर मात्र तो (मनुष्य) आहे तसाच जन्मभर रहाणार.

वृत्ति----वृत्तीला बांध घालणें ती बुद्धि आणि बांध राहूं देत नाहीं ती बद्धी--आपल्या स्वैर वर्तनाला जिच्यामुळें आळा बसतो ती खरी बुद्धि होय. व जी तसा आळा घालीत नाहीं तिला बुद्धी न म्हणतां कुबुद्धि किंवा बंधन करणारी म्हणावें.

वृथा---वृथा वृष्टिःसमुद्रेषु वृथा तृप्तेषु भोजनं----(सं.) समुद्रावर पडणारा पाऊस आणि आधींच पोटभर जेवलेल्या मनुष्यास दिलेलें भोजन व्यर्थ होत. भुकेपोटींच अन्न गोड लागतें.

वृद्ध---वृद्धप्रमदान्याय---(सं.) जरठतरुणी दांपत्य असलें म्हणजे जरठ पतीची अवहेलना होते. 'हे अवहेलना करणारे मात्र कल्पनेचे जड ठरुन वृद्धप्रमदान्यायानें उपहास्य होतात.'—नि ७९.

***वृद्ध तो सर्वत्र पूज्य**—(महानु.) वृद्ध माणसें सर्व ठिकाणीं पूज्य असतात.

वृद्धा नारी पतिव्रता---(सं.) म्हातारपणीं माणूस सोवळा होतो. तरुणपणचे ढंग राहात नाहींत व शरीर विकल असल्यानें तो साहाजिकच सच्छीलपणें वागतो. तु०--म्हातारपणीं ढवळा मणी. (अ) अशक्तस्तु भवेत्साधुर्ब्रम्हचारी च निर्धनः। व्याधितो देवभक्तश्च वृद्धा नारी पवित्रता॥ (आ) आर्ता देवन्नमस्यन्ति तपः कुर्वन्ति रोगिणः। निर्धना दानमिच्छन्ति वृद्धा नारी पतिव्रता॥ (इ)आदौ वेश्या पुनर्दासी पश्चाद्भवति कुट्टिनी। सर्वोपायपरिक्षीणा वृद्धा नारी पतिव्रता॥

वृद्धा नारी पतिव्रता, ढवळा नंदी (म्हाताऱ्या बैला) गुणवंता—वृद्ध स्त्री पतिव्रता बनते व म्हातारा बैल साळस होतो.

वृद्धाचा मरूं नये पूत, तरण्याची मरूं नये बाईल--म्हातारपणी मुलाची फार जरूरी, तशीच तरण्याला बायकोची जरूरी. तेव्हां त्यांच्या अभावीं फार हाल होतात.

वृक्ष---कोणत्या वृक्षाचा पाला--कःपदार्थ. झाड पहा. 'वृक्षाचा कोणत्या पाला।'—विक. ४९.

वृक्ष नेदी फळ। काय करी वसंत काळ॥—(तुगा.) एकाच्या दोषाबद्दल दुसऱ्याला जबाबदार कसे धरतां येणार? झाडें फळें देत नाहींत म्हणजे झाडांस फळें लागत नाहींत त्यास वसंत ऋतूनें काय करावें.

वृक्षामध्यें एक साया आणि बरकड साऱ्या आया बाया--सर्व झाडें कांहीं तरी उपयोगी आहेतच. परंतु त्या सर्वांमध्यें सर्वांत अधिक उपयोगी असें फक्त सागाचें झाड आहे. त्याप्रमाणें सर्व स्त्रिया कोणत्या तरी प्रकारें उपयोगी पडण्यासारख्या असतात, परंतु त्या सर्वांत फक्त आईच अधिक उपयोगी पडणारी असते. बाकीच्या सर्व आयाबाया होत. त्या आईची सर करणार नाहींत.

वेखंड—वेडा त्राणी वेखंडाचा पसारा—वेडा पहा.

वेंग---वेंग-वेंगाटी मारणें;वेंगाटीत वेणें-धरणें—मिठी मारणें; कवळणें; बहुपाशांत धरणें.

वेंगेवर घेणें—कडेवर घेणें.

वेगळा---वेगळा घालणें—वेगळें काढणें; विभक्त करणें. 'मर्जीहि वद्धपण आलेंलेकीं वेगळे घातलें।'—दा. ३.५.३३.

वेगळा---वेगळाल मंदपातु धाराळत्व—(गो.) परक्याच्या मांडवांत उदारपण; म्हणजे हलवायाच्या घरावर तुळशीपत्र याप्रमाणें.

वेगळ्याला दंतापस्सी अवंगेलो ओणुव चंग यो—(गो.) दुसऱ्याच्या दांतापेक्षां स्वतःच्या हिरड्या असलेल्या चांगल्या. दुसऱ्यांचे दांत आपल्याला जेवणाच्या कामी कांहींच उपयोगाचे नाहींत. स्वतःला दांत नसले तरी शेवटीं अन्न चावण्यास हिरड्यांचा उपयोग होतो. स्वावलंबी असणें हेंच खरोखर चांगलें.

वेचणें---नांव लक्ष्मी व गोवऱ्या (गवऱ्या) वेची—नांवाच्या उलट परिस्थिति. लक्ष्मी पहा.

वेज---वेजीं उतरणें—मोतीं गुंफण्याकरितां त्यास छिद्र पाडतात. हें छिद्र वैल होऊन फार मोठें झालें म्हणजे

त्या मोत्याची किंमत कमी होते. त्याप्रमाणें मनुष्याची योग्यता कमी होते. 'शिंदे होळकर एवढे लढते सरदार असतां त्यांची केवळ हिंमत हरली. वेजीं उतरली. यांची गत अशी होऊन गेली.'–भाव. ३०४.

वेट---वेट वळणें---१ एकजूट होणें; संघशक्तीनें काम होणें. २ गर्दी, खेचाखेंच करणें; एकावर एक पडणें. 'फौजेचा त्या किल्ल्यावर मोठा वेट वळला.' ३ हैराण करणें.

वेंटु लाशिलें तरी वळ वचना—(गो.) सुंभ जळलें तरी पीळ जात नाहीं.

वेठ---वेठ करणें-काढणें-घळणें; वेठीचें करणें-वारणें—कसेंबसें, निष्काळजीपणाणें, निरुत्साहानें काम करणें.

वेठीस धरणें—आपल्या कामासाठीं एखाद्याला ताब्रडणें; त्याला तें काम करण्याला भाग पाडणें.

वेठीधर्मान गोंय--(गो.) वेठीच्या धर्मानें गोवें. म्हणजे वेठीला धरून नेल्यानें गोवें पहाण्याला मिळालें बाइटांतून चांगलें निवणें.

***वेठीची बिगार आणि घोड्याची चंदी**--वेठीचें काम केल्यावर जें मिळेल तेंच पदरांत पाडून घ्यावें. घोड्याची चंदी बाहेर पडली तरी पुष्कळ.

वेठीचें घोडें धरून लढाई मारणें होत नाहीं---उसन्या गोष्टीनें काम साधत नाहीं. फुकटच्या साधनांनीं कार्य घडून येत नाहीं.

वेठीच्या घोड्यास तरवडाचा फोंक—घोडें स्वतःचें नसलें म्हणजे त्याला वाटेल तसें मारणें, त्याचे हाल करणें.

वेठीया काम आणि पोटिया चाकर--वेठीचें काम कितीहि केलें व पोटावारी कितीहि राबलें तरी जवळ कांहीं उरत नाहीं.

वेड---वेड काढणें-पांघरणें—वेड्याचें सोंग घेणें; मुद्दाम वेड्यासारखें करूं लागणें.

वेड घेऊन पेडगांवास जाणें---आपला मतलब साधण्यासाठीं मुद्दाम वेड पांघरणें.

वेड पिकणें; वेडाचा पाऊस पडणें---१ एखाद्या गोष्टीबद्दल पुष्कळांना फाजील जिज्ञासा उत्पन्न होणें; एखादी वेडसर वाटणारी गोष्ट पुष्कळजणांनीं करणें; सर्वजणांनीं वेड्यासारखें वागणें. २ असमंजसपणा, अविचार बोकाळणें.

वेड भरणें--वेडा होणें.

वेड भरविणें-लावणें---१ एखाद्या गोष्टीबद्दल वेडा करणें; नादीं लावणें. २ घोटाळ्यांत पाडणें.

आले वेडसर पाहुणे । ते तों जगाचे मेहुणे ॥
वेडा मनुष्य सर्व जगाशीं नातें सांगतो.—गांगा २२९.

वेडाच्या वेणींत पेड--कोणत्याहि एका कल्पनेनें वेडे झालेले लोक हे संपूर्ण वेडानें वेडावलेल्या वेडापेक्षां प्रेक्षकांची अधिक करमणूक करतात. Method in madness (न. चिं. केळकर यांची म्हण.)

वेडा---वेडा पाऊस—सारखा न पडणारा, कांहीं वैचित्र्य दाखविणारा पाऊस. 'वेडा पाऊस बैलाच्या एका शिंगावर पडतो व दुसरें कोरडें राहतें.' हास्य विनोद मीमांसा, पान ८५.

वेडें पीक---१ अतिशय पिक; अंदाजाबाहेर आलेलें पीक २ गर्दी, लयलूट; आधिक्य.

वेडेवांकडें होणें—(सांकेतिक) जिवावरचें संकट येणें; मरणें. (स्त्रीला) वैधव्य येणें.

वेड्यांचा बाजार—वेडे लोकांचा, वेडेचार करणाऱ्यांचा समुदाय; मूर्ख अडाणी माणसांची टोळी.

वेडा झाला व कामांतून गेला—वेडा मनुष्य निरुपयोगी असतो.

***वेडा मनुष्य नग्न आहे कीं नेसला आहे हें दुसऱ्यानें पहावें.**—वेडा झालेला मनुष्य देहभानावर नसतो सबब तो वेडा कीं चांगला याची पारख लोकांनीं करावयाची.

वेडा वाणी वेखंडाचा पसारा--वेड्या वाण्याच्या दुकानांत वेखंड. वेखंड हें एक कडू औषध आहे. तेव्हां दुकानावर पाहावें. तों वाणी स्वतः वेडा व माल पाहावा तर वेखंडाशिवाय कांहीं नाहीं, मग तेथें व्यापार कसा चालणार. पाठभेद–वेडा वाणी, लोखंडाचा पसारा.

वेडियाच्या गांवा जावें वेडें होऊनिया यावें--वेड्याच्या गांवांत शहाणा गेल्यास त्यास वेड लागावयाचें. त्याच्या शहाणपणाचा तेथें कांहीं उपयोग होत नाहीं.

वेडीचें सोंग घेतलें म्हणजे पाटाव फाडला पाहिजे--ज्याचें सोंग घेतलें असेल त्याच्या प्रमाणें कृति केली पाहिजे. आपण ज्या स्थानावर असूं त्या स्थानास योग्य असें वर्तन केलें पाहिजे.

वेडीला सासर काय आणि माहेर काय-- वेडीला सासर माहेर सारखेंच. तिला आपलें परकें, लहान मोठें, चांगलें वाईट यांतील फरकच कळत नसतो.

वेडेचार, गाढवाला मंगळवार--वेडयाला व गाढवाला सर्व वार सारखेच;तो नेहमीं मूर्खपणाच करीत राहणार.

वेडें झवलें, गदगदां हसलें--वेड्याला संभोगसुखाची कल्पना नसते. त्यावेळीं तो नुसता हंसत राहातो. अडाणी माणसाला कितीहि मुद्देशीर सांगितलें तरी त्याला तें कळत नाहीं.

वेडें पुसतें भैऱ्याला वाट जाती हिवऱ्याला— वेडा आणि बहिरा यांची गांठ पडली असतां परस्परांस कांहीं बोध होणें शक्य नाहीं.

वेडे मेजवान्या करिती, शहाणे येऊन स्वस्थ बसून खाती—उगाच मेजवान्या करणारे बहुधां मूर्ख असतात. शहाणे जे असतात ते अशा मेजवान्यांना जाऊन यथेच्छ खातात. त्यांना बरेंच होतें. Fools make feasts and wise men eat them-French. —सवि १०८५.

वेडें वांकडें गाईन। दास तूझा-देवाचा म्हणवीन॥ —परमेश्वराची भक्ति कशीहि केली तरी परमेश्वर आपल्या दासास उपेक्षीत नाहीं.

वेडे वाकडे चाले आणि वाघाला पाहून पळे— एरव्हीं गडबड करणारा मनुष्य जबरदस्त प्रतिस्पर्धी भेटला कीं मागें पाय काढतो.

वेडेयाचे विकार बाहीर प्रकटेति: शिहाणे याचे विकार अच्छादति—(महानु.) वेड्या माणसाला आपले विकार झाकतां येत नाहींत त्यामुळें ते दुसऱ्यांना लागलीच कळून येतात. पण शहाणा माणूस आपले विकार दाबून ठेवतो.

वेड्यांचा बाजार, खुळ्यांचा शेजार—हीं दोन्ही सारखींच.

वेड्यांचा बाजार, जीव झाला बेजार—वेड्यांच्या बाजारांत शहाणा मनुष्य त्रासून जाणारच.

वेड्यांचा बाजार नी पिशांचा सौदा—वेडे आणि पिसे एकत्र आले असतां सर्वत्र गोंधळच उडावयाचा.

वेड्यानें वही लावावी आणि वाऱ्यानें उडवून न्यावी—वेड्यानें वई-कुंपण घातली तर ती टिकणार कशी? ती वाऱ्यानें उडून गेल्यास आश्चर्य नाहीं.

वेडयाला घातला खोडा आणि तो म्हणतो घोडा —वेड्याला खोडा आणि घोडा सारखाच.

वेण---वेणी गांडि होडि, तिगेली मर्जी जोडी —(गो.) जी विहीण श्रीमंत असते तिचीच मर्जी संभाळली जाते.

वेणा---वेणाण्या देणें—१ प्रसूतिसमयीं कष्ट भोगणें, यातना सोसणें. २ परमावधीचा प्रयत्न करणें; अतिशय कष्ट सोसणें.

वेणी---वेणीफणी करणें—वेणी घालणें; प्रसाधनाविधि, वेशभूषा करणें. 'अनुसूया सती करी वेणीफणी। आनंदाची धणी दिली मज॥'—मो. सीतागीत १६.

वेत---वेतभरि विणचें, हातभरि थुंटचें—(गो.) वीतभर विणायचें आणि हातभर तोडायचें, असें झाल्यास ती पुच्छप्रगतिच म्हणावी लागेल.

वेताळ---वेताळ पूर्वस्थळीं येणें---(वेताळ पंचविशींतील गोष्टीवरून) एखादी व्यक्ति तीवरील नियंत्रण कमी झाल्यावर पहिल्याप्रमाणें वागणें, तिनें पूर्वीचा पेशा पत्करणें.वठणीवर येणें. 'आला वेताळ पुन्हां पूर्वस्थळावर!' —श्रमसाफल्य २.१.२

वेताळाची स्वारी—१ वेताळ आणि त्याचे अनुयायी यांचा संचार. २ मसणवटींत, रानांतील, दलदलींत, दिसणारा प्रकाश व प्राण्यांचीं शरीरें व वनस्पति हीं कुजत पडलीं असतां त्यांतून निघणारा एखादा ज्वालाग्राही (वायू) हा असावा.-निबंधमाला प.न १८७.

वेताळाच्या चुड्या—स्मशानांत किंवा रणभूमि वगैरे अस्थि पडलेल्या ठिकाणीं त्या अस्थींतून फॉस्फरस निघत असतो. कारण फॉस्फरस हा नुसती हवा लागूनहि पेटतो. ह्या ज्वाला काळोख्या रात्रीं स्पष्ट दिसतात. पण त्या फार क्षणिक असतात त्यांस भोळे लोक वेताळाच्या चुड्या म्हणतात.—श्री. स. घारपुरे, "स्यूत सौतिक" पान ३७६.

वेताळाचे मागें भुतावळ—पुढाऱ्यामागें असणारे अनुयायी त्याच्याप्रमाणेंच असावयाचे.

वेताळाला नाहीं बायको आणि धावगा देवीला नाहीं घोव—जशास तशाची गांठ.

वेत्ता--वेत्ता चुकिल्लो, वांवाक चुकलो, वांवाक चुकिल्लो गांवाक चुकलो—(गो.) एकदा माणूस चुका करूं लागला कीं एकीला लागून दुसरी अशा मोठ्या-मोठ्या चुकाच करीत जातो. वांव पहा.

वेद--वेदवाक्य—अगदीं वेदाइतकें प्रमाणभूत; शिरोधार्य, अगदीं अवश्य ग्राह्य असें वचन इ. ‘ साव-ळ्याचा शब्द म्हणजे अगदीं वेदवाक्य वाटतं त्यांना.’—खांडेकर, पहिलें प्रेम १७५.

एखाद्याचे वेद हरणें—त्याच्या सर्व युक्त्या, बेत इ. फसून तो कर्तव्यमूढ बनणें; कांहीं मार्ग न सुचणें.

वेदु शिकूनु भेदु करनये—(गो.) विद्वान् माण-सानें समाजांत वा व्यक्तीव्यक्तींत फूट पाडणें हें चांगलें नव्हे.

वेदांती--वेदांत्यापेक्षां धादांत्या बरा—नुसती चर्चा करीत बसणारापेक्षां अनुभवानें काम करणारा अधिक चांगला. केवळ उपपत्ति जाणणाऱ्या विद्वानापेक्षां धोपट-मार्गानें काम करणारा चांगला. लोकहितवादीनें या विष-यावर एक लेखच लिहिला आहे. [धादांती म्हणजे व्यवहारी] धादांत्यापासून जगास फायदा फार होतो. तोच वेदांती माणूस आळशी, आप्पलपोटा असतो; त्याचा कोणास उपयोग होत नाहीं.—लोकहितवादी लेख संग्रह (शिळाछाप) पृ. ९२८-३१.

वेध—जयाचा वेधु : तयासी प्राप्ति—(महानु.) ज्याचा वेध किंवा ध्यास लागतो त्याचीच प्राप्ति होत असते. तेव्हां निष्ठा ठेविली म्हणजे फल मिळतें.

वेय--वेयालॉ वेय, बाबुल्यालॉ जांवय, तॅवय पोसांतळा हांवयू—(गो.) बादरायण संबंध.

वेल--वेल मांडवी-मांडवास जाणें-वाढणें—मुलें बाळें होणें; कुटुंब, संसार वाढणें.‘प्रिय पुत्रातें भेटुनि रडुनि म्हणे मांडवास जा वेला ।’—मो आश्रम ४.२.

वेल विस्तार वाढणें—वंश वाढणें. (आशिर्वादांत योजतात.)

वेलीं जाणें—वाढणें; विस्तारणें. ‘ जैसा वर्षाकाळु गगनीं । पाल्हेजे नवघनीं । तैसें आकार जात अज्ञानीं । वेलीं जाय ॥’—ज्ञा १५.१५२;—एभा २६.२५०.

***वेल तसें फळ**—झाड तसें फळ, बीज तसा अंकुर याप्रमाणें.

वेलीस दुःख नाहीं, बाळकास दुःख नाहीं—कोणासहि उपसर्ग पोंचणार नाहीं अशी वागणूक.

वेश्या--वेश्याजनांचे डागिणे, पाहूं नये घरं-दाज स्त्रियेनें--वेश्येचा शृंगार गरतीच्या काय उपयोगी.

वेश्येची काडीमोड, रोज चाले घडामोड--वेश्या रोज नवीन यजमान करीत असते.

वेश्येनें केल्या दाटणी आणि मूर्खाच्या वाढल्या चैनी--वेश्येनें दम दिला कीं मूर्ख माणूस तिला खूष करण्यासाठीं आपल्या चैनीचा खर्च वाढवितो.

वेसांक आणि तांच्या केसांक रातिचेंचि चोवंका—(गो.) वेश्या आणि त्यांचे केस हीं रात्रींच तेवढी चांगली दिसतात.

वेष---वेष असावा (धरावा) बावळा । अंतरीं असाव्या नाना कळा ॥—वरून दिसावयास गबाळें पण मनांत चातुर्य बाळगावें. —दा. १५.१.३१.

वेसु घालुनु नाचबा म्हळ्यारि जातवे ?—(गो.) सोंग घेतल्यावर नाचणार नाहीं म्हणून कसें चालेल ?

वेष्ट--वेष्ठ लावणें—(व.) वेडावणें; वेडावून दाखविणें.

वेस—वेशीं--वेशीवर--वेशीला बांधणें.-टांगणें—मोठ्यानें, जाहीर सांगणें; स्पष्ट, उघड करणें; सर्वांना माहीत होईल असें करणें. ‘हें माझें वेड मी चवथ्या लेखांत जनतेच्या वेशीवर टांगलें आहे.’—केका आर्या १.

वेशीवरचा आरसा—(ज्यांत वाटेल त्यानें तोंड पाहावें असा) वेश्या; नाइकीण. ‘हा स्पष्टाचि वेशीवरचा आरसा आल्या गेल्याचा’—मनोविजय.

दुखणें वेशीस बांधणें—दुःख, दुःखणें, पहा.

***वेशींत मारलें गावांत सांगू नका**--वेशींत अप-मान झाला तर तो साऱ्या गांवाला कळल्याशिवाय कसा राहील. चव्हाट्यावर घडलेल्या गोष्टीचा बभ्रा होणारच.

वेसण---वेसणीला झटका दिला म्हणजे नाकाला कळ लागती—चांगली शिक्षा केली म्हणजे मनुष्य वठणीवर येतो. तु०—नाक दाबलें कीं तोंड उघडतें.

वेळ---वेळ अवेळ--योग्य अयोग्य समय; अनुकूल प्रतिकूल काल. चांगली वाईट वेळ.

वेळ मारून नेणें—प्रसंग साजरा करणें; निभावून नेणें.

वेळ वाहणें—बरें वाईट होण्याचा समय असणें.

वेळाकाळाला कामास येणें--प्रसंगविशेषीं, अडीअडचणीला उपयोगी पडणें.

वेळेचा गुण—शुभाशुभ वेळेचा कार्यांवर होणारा परिणाम.

तये वेळेचा तो गुण—एखाद्यावेळीं सर्व गोष्टी बिघडून जातात. तर कांहीं तरी प्रसंगीं कांहीं गोष्टी सहज घडून येतात. अशा प्रकारें एखाद्या वेळेचा गुण चांगला अगर वाईट असतो.-सप्र.२.३३.

***वेळ आली पण काळ नाहीं आला**--काळ पहा. मृत्यु होण्याचा संभव असून तो चुकणें. अपमृत्यु टाळणें.

वेळ आली म्हणजे सर्व कांहीं होतें—अनुकूल काल प्राप्त झाला म्हणजे सर्व गोष्टी साध्य होतात.

वेळ ना वखत, गाढव गेलें भोंकत--मूर्ख मनुष्य वेळीं अवेळीं वाटेल तें बडबडत असतो.

वेळ ना वखत, पाहुणा गेला कुंथत--भलत्याच वेळीं पाहुणा आला तर त्यास जेवावयास मिळत नाहीं.

वेळ ना वार, खादाड मागे जोगवा—अघाशी मनुष्य वेळीं अवेळीं खावयास मागतो.

वेळ ना वारीं, गाढव आलें पारीं--मूर्ख मनुष्यास योग्य अयोग्य प्रसंग कळत नाहीं.

वेळु नि काळु कोणाचिइ वाट पळेना—(गो.) वेळ आणि मृत्यु हा कोणासाठीं थांबत नाहीं.

वेळ निघून जातो पण शब्द राहतो—मनुष्यानें तोंडांतून शब्द फार जपून काढावे. कारण बोललेला शब्द परत घेतां येत नाहीं व तो विसरलाहि जात नाहीं. कोणाची कशीहि अडचणीची वेळ असली तरी ती निभावून जाते पण बोललेला शब्द मागें राहतो.

वेळ पळौन खेळ खेळचो—(गो.) प्रसंग पाहून थट्टा मस्करी करावी.

वेळु येनाफुडे काळु फाटी लागता--(गो.) आयुष्यांत कधीं नाहीं ती सुसंधि यावी आणि ती येते न येते तोंच रोग आणि मृत्यु यांनीं धाड घालावी, यापरतें दुर्दैव कोणतें.

वेळु वांकडो आयलो, गाडवा पायु धरलो—(गो.) वेळ वांकडी आली कीं यःकश्चित माणसाला सुद्धां नमावें लागतें. तु०-अडला नारायण गाढवाचे पाय धरी.

वेळार वेळ, शिगम्यार खेळ--(गो.) वेळेच्या वेळेला गोष्टी झालेल्या चांगल्या. रंगपंचमीच्या दिवशींच रंग उडविण्यांत एक प्रकारची मजा असते.

वेळींच जो जागे, तो भीक कां मागे—जो मनुष्य वेळेवर सावध राहतो त्यांचेवर आपत्ति कधीं येत नाहीं.

वेळेला खाई खस्त, तोच दोस्त--जो आपल्या वेळेवर श्रम करून उपयोगी पडतो व झीज सोसतो तोच खरा मित्र समजावा. तु०-आपदि मित्रपरीक्षा.

वेळेला केळें आणि वनवासाला सिताफळें—उपासाला केळं०. उपास पहा.

वेळेसच केळ लागतें—प्राप्तकाळ आल्यावांचून फळ लागत नाहीं.

वेळेस एक टांका घातल्यास पुढील नव टांकण्याची बचत होते—एक टांचा समयीं मारल्यानें नऊ टांचे वांचवितो. एक पहा.

वेळेस चुकला तो मुकला--जो वेळीं येत नाहीं त्याला कांहीं मिळत नाहीं. याच्या उलट हजीर तो वजीर.

वेळू---वेळवावर बसविणें--(अशिष्ट.) फसविणें चकविणें; हातावर तुरी देणें.

घरांत वारा हात वेळू फिरतो आहे--घरांत अत्यंत दारिद्र्य दिसत आहे. टोकर पहा.

वैकुंठ----वैकुंठसमाराधना--वधूपक्षानें वरपक्षास दिलेली मेजवानी.

वैजीण---वैजीणीकडे उपस्थ(पोट) निवबुंचे—सुईणीजवळ योनि, पोट दडवून कसें चालेल? जो आपणाला सोडवण्यासाठीं आला असेल त्याला घडलेल्या सगळ्या गोष्टी सांगणें जरूर असतें. तु०-सुइणीपुढें चूत लपवून चालत नाहीं.

वैतरणी---जित्याक कुळकर्णी, मेल्याक वैतरणी--(गो.) जिवंतपणीं कुळकर्णी त्रास देतो व मेल्यावर

स्वर्गसुखाच्या आड वैतरणी ही नरकाची नदी येते. म्हणजे कोठेंहि सुख नाहीं.

वैदिक---एकापेक्षां एक वैदिक—प्रत्येक जण शहाणा (शास्त्र्यांच्या सभेविषयीं निंदाव्यंजक प्रयोग).

वैद्य---वैद्यबोवाची माळा, बाजेखालीं उतरा---(व.) एखादा वैद्य असा अपेशी असतो कीं माळा दिल्याबरोबर रोग्याला गुण पडण्याऐवजीं रोगी आसन्नमरण होऊन त्याला खालीं काढावें लागतें.

वैद्य भेटला कच्चा, प्राण येई पोराचा—अर्धवट ज्ञान असलेला वैद्य आणला म्हणजे रोगी दगावण्याचाच संभव फार.

वैद्य रोगी, भुरटा जोगी--स्वतः रोगी असलेला वैद्य व तात्पुरतें वैराग्य घेतलेला बैरागी यांचा कांहीं नेम नाहीं.

वैद्याचीं पोरें गालगुंडानें मेलीं—स्वतःचा स्वतःला उपयोग नाहीं या अर्थी. Who goes more bare than the shoemaker's wife.

वैद्याचं घोटलं नि तर्थीचं मुंडलं कळत नाहीं—अनेक औषधि खलांत घोटून वैद्यानें एखादी माळा तयार केली म्हणजे त्यांत त्यानें कोणकोणत्या औषधि टाकल्या हें सहसा कोणी ओळखूं शकत नाहीं. त्याचप्रमाणें तीर्थावर तीर्थविधि करतांना तीर्थोपाध्यायानें यात्रेकरूला वाटेल तसें मुंडलें म्हणजे नागविलें तरी सामान्य जनास समजत नाहीं. धंदेवाइकाची लबाडी सामान्य जनास सहसा ओळखतां येत नाहीं. पुढें पहा.

वैद्याचें वाटलें आणि संन्याशाचें मुंडलें कोणास समजत नाहीं—या गोष्टीचा आवाज होत नाहीं किंवा वैद्याला रोग्याबद्दल काय समजलें किंवा संन्याशाचें काय लुबाडलें गेलें हें समजण्याला मार्ग नसतो.

वैद्यांचें भांडण व रोग्याचें कांडण—दोन वैद्य एका रोग्यास पाहावयास बोलावले म्हणजे व त्यांच्यामध्यें मतभेद झाला म्हणजे रोगी दगावण्याचाच संभव फार.

वैद्यानां शारदी माता--(सं.) पावसाळ्यानंतरचा शरदृतु हा वैद्यांस आईप्रमाणें सुखकारक, लाभदायक असतो; कारण या कालांत पुष्कळ लोक आजारी पडतात. वैद्यानां शारदी माता पिताच कुसुमाकरः। यमदंष्ट्रा स्वसा प्रोक्ता हितभुङ्मितभुग्रिपुः॥

वैपीं---वैपे वच्चुनु काप्पणी करप--(गो.) वैपेला जाऊन हजामत करणें. वैपीम् हें खेडें कोचीन बंदराच्या उत्तरेस आहे. कोचीनहून वैपीमला जावयाचें म्हणजे दोन आण्याचा खर्च आहे; कारण होडींतून खाडी ओलांडावी लागते. कोचीनला राहाणाऱ्यांना हजामतीला दोन आणे द्यावे लागतात. पण तेच वैपीमला न्हावी एक आण्यांत हजामत करतात. तेव्हां जो मनुष्य एक आणा वांचविण्यासाठीं दोन आणे होडीला देऊन वैपीमला हजामतीला जातो तो एकंदर तीन आणे खर्च करतो. दिडकीसाठीं भांडणारा मूर्खपणानें रुपया खर्चतो. तु०—कोंकणांत नारळ फुकट मिळतात.

वैर---वैर उगविणें--सूड घेणें.

वैर चाळणें--शत्रुत्व करणें. 'हें देहमासी। वैर चाळी अहर्निसी॥'--भाए ५०६.

वैरोद्धार करणें--सूड उगविणें.

***वैर करावें तर निदान स्वाभिमान बाळगावा**--एखाद्याबरोबर जर आपण वैर करीत असलों तर त्याच्याशीं वागतांना स्वाभिमान तरी ठेवावा. आपल्या कांहीं फायद्यासाठीं त्याच्याकडे जाऊं तरी नये. वैर तर पुरें वैर.—सह्याद्रि, डिसेंबर १९४१.

वैरा---मणाचा वैरा घरीं असणें--मोठें कुटुंब, परिवार असणें.

वैराग्य---वैराग्यमाला घेणें; वैराग्यमालेंत पडणें--संसारत्याग करून वैरागी होणें; विरक्ति उपजणें.

प्रसूति वैराग्य, स्मश्यान वैराग्य हीं क्षणभरच टिकतात--प्रसूतीच्या वेदना होऊं लागल्या म्हणजे विषयविलास पुन्हां नको असें वाटतें, तसेंच कोणी मेलेला पाहिला म्हणजे संसार हा खोटा आहे, माणूस हा शेवटीं एकटाच जातो अशी विरक्ति येते. पण या वैराग्याच्या कल्पना फारच थोडा वेळ टिकतात. पुन्हां माणूस त्याच गोष्टी करतो.

वैराग्य आला बाह्या: अंतरीं नाहीं माया—(महानु) वर वैराग्य दिसतें. पण आंत पाहावी तो कठोरता.

वैराग्य कडकडतो: फोडणीसाठीं तडफडतो—(महानु.) एकीकडे मोठ्या वैराग्याच्या गोष्टी सांगावयाच्या व मी मोठा विरक्त आहें असें दाखवावयाचें.

पण घरांत भाजीला फोडणी कमी झाली तर रागावतो व तीसाठीं जिवाचा आटापिटा करतो !

वैराग्य कडकडला : इंद्रियासाठीं तडफडला--(महानु.) कडकडीत वैराग्य दाखवावयाचें पण वासनातृप्तीसाठीं हपापलेलें असावयाचें; असा ढोंगीपणा. खरें वैराग्य अंगीं नाहीं.

वैराट---वांई वैराट, बोली सैराट--वांई पहा.

वैरी--वैरी न चिंती तें मन चिंती--मन पहा.

वैरियाचा देव जाला तर काई दगडे फोडावा--(महानु.) आपल्या शत्रूकडील पूज्य वस्तु त्याला देवतुल्य वाटणारी गोष्ट भ्रष्ट नष्ट करणें गर्हणीय आहे.

वैऱ्याच्या उरावर पाय द्यावा--वैऱ्याची कधीं भय करू नये. खऱ्या कामांत कोणाचें भय धरूं नये.

वैऱ्याला उराशीं आणि कैवाऱ्याला दाराशीं--कांहीं लोक शत्रूला आदर दाखवितात व आपल्या पक्षाच्या लोकांबद्दल बेपर्वा असतात.

वैला---वैले देव कोपले जाल्यार सकले देव किते करतले?--(गो.) वरचे देव रागावल्यावर खालचे देव काय करणार. ईश्वर कोपला तिथें माणूस काय उपयोगी पडणार ?

वैष्णव---वैष्णवी भात--वैष्णव केळीचें सोपट जाळून त्याच्या राखेचा टिळा लावतात, त्यावर गोपीचंदनाचा नाम व शेवटीं अक्षता. याप्रमाणें भाताच्या भांड्यांत खालीं करपलेला, मध्यें गिचा व वरतीं तांदूळ (कच्चा)--याप्रमाणें शिजवलेला भात.

वोढा---वोढा बांधणें; वोढा घेणें--(महानु.) वैराग्यनिष्ठ महानुभाव भिक्षुक पोटावर पट्टा गच्च बांधतात; त्यायोगें अन्नोदक आहार फार कमी प्रमाणांत जातो. म्हणजे अल्प आहार घेऊन शरीर शोषण करण्याचा एक विधि.

वोढा सोडणें--(महानु.) जास्त आहार घेणें. वोढा सोडल्यावर जास्त आहार जातो. यावरून आपल्या मात्रेहून जास्त भोजन करणें; रेटून जेवणें.

वोरेतु---वोरेतु बेडिक्की जावो, वोकल बेडिकी जावो, बडी भट्टा दुड्डु हत्तारी उड्डेयी--(गो.) नवरा विधुर होवो किंवा बायको विधवा होवो भटाला आपली दक्षिणेची जरूरी. तो आपला हात दक्षिणेसाठीं पुढें करतोच. यावरून भटांचा आप्पलपोटेपण चांगलाच निदर्शनास येतो. तु०--नवरी मरो, कीं नवरी मरो उपाध्याला दक्षिणेशीं कारण.

वोहटळ---वोहटळीला दिवा--(महानु.) वावटळ सुटल्यावर दिवा कसा राहाणार ? तेव्हां त्याचा उपयोग नाहीं.

वोहोळ---वोहोळाला खळगा जामीन--ओहोळ पहा.

व्यक्ति---व्यक्ति, तितक्या प्रकृति--प्रत्येकाचें मत निराळें; तेव्हां जितकीं माणसें तितकीं निरनिराळीं मतें होतात. Many men, many minds. पिण्डे पिण्डे मतिर्भिन्ना । 'व्यक्ति तितक्या प्रकृति, प्रकृति तितकीं मतं, आणखी मतं तितके मार्ग, असा प्रकार होऊन आज जबाबदार आणि बेजबाबदार लोकांना सर्वांनाच बारा वाटा मोकळ्या होऊन बसल्या आहेत.'--एकच प्याला ३.३.

व्यतिपात---व्यतिपातावर जन्मणें-होणें--व्यतिपात हा एक कुयोग आहे. यावरून अवलक्षणी खोडकर मुलगा, कुयोगावर जन्मला असला पाहिजे असें समजतात.

***व्यतिपात भद्रा सूर्याची संतति**--व्यतिपात भद्रा इत्यादि योग सूर्यामुळें होतात. यास्तव त्यांस सूर्याची संतति म्हटलें आहे. सूर्य जसा खडतर ग्रह आहे तसेच हे योग अनिष्ट फलदायक आहेत, असें मानतात. एखाद्या दुष्ट मनुष्याची संततीहि दुष्टच निघाली असें दर्शविण्यास ह्या म्हणीचा उपयोग करतात.

व्यभिचारी---व्यभिचारी मनीं, स्वस्त्रीला तैसें गणी--जो मनुष्य स्वतः दुराचारी असतो त्यास आपल्या स्त्रीबद्दलहि तसाच संशय येतो.

व्यवहार---व्यवहार ज्ञान हें मनुष्य जीविताचें मुख्य अंग आहे--मनुष्याला आयुष्यांत व्यवहारज्ञान अत्यंत अवश्य आहे.

व्यसन---व्यसनी पुत्र कुलीनाला, शुद्ध जळांतुनी जैसा नाला--कुलीन बापाचा व्यसनी मुलगा म्हणजे स्वच्छ पाण्यांत येऊन मिळणाऱ्या घाणेरड्या नाल्याप्रमाणें असतो.

समान व्यसनाचें सख्य--एकाच व्यवसायाच्या लोकांची एकी होत असते किंवा संवयीच्या सारखेपणामुळें

तरी सख्य होतें. किंवा सामान्य संकटांत पडलेल्यामध्यें स्नेहभाव उत्पन्न होतो.

व्याज---**व्याज दिसे आणि मुद्दल भासे; व्याजनारायण मुद्दलनारायण; व्याजाचे आशेनें मुद्दलाचा नाश; व्याजाला सोकला ऐनाला-मुद्दलाला मुकला**---अधिक व्याजाची आशा केल्यास मुद्दलहि जातें.

व्याध---**व्याधाच्या गाण्यांत मृग वेडा होतो**---कित्येक लोक मायावी भाषणावर भरंवसा ठेऊन फसतात. व दुष्टाच्या फासांत जाऊन अडकतात असा भावार्थ.

व्याप---**जेथें व्याप, तेथें संताप**---फार पसारा केला म्हणजे तो त्रासदायक होतो. 'हें सत्य अत्यबाधित, तेथें संताप जे स्थळीं व्याप.।'-मो. आर्याकेकावली ९४.

जितका व्याप, तितका संताप---व्याप वाढविला तर तो तापास कारण होतो. तेव्हां आपल्यामागें फार लचांडें लावून घेतलीं कीं सारखा त्रास ठेवलेलाच. More work more responsibility. 'जितका व्याप तितका संताप हें तूं पुर्तें मनास आणून ठेवणें. तूं जितका व्याप करशील तितका संताप होईल.'-पेद १९.२.

व्यापार---**अव्यापारेषु व्यापार**---अव्यापार पहा. 'आपण केला हा शहाणपणा नसून खरोखर अव्यापारेषु व्यापार केला अशी त्याची मनोमन खात्री झाली'-दाजी, भा. १ पा. १३७. 'भलता अनभिज्ञ माणूस या नसत्या अव्यापारेषु व्यापारांत पडला तरी सरकारचें त्यांत कांहीं नुकसान नाहीं.'-केसरी ३-११-४२.

व्यापार करतां सोळा बारा---व्यापारांत कधीं लाभ तर कधीं तोटा व्हावयाचाच.

व्यापार करितां सोळा बारा, शेती करतां डोईवर भारा---उदीम करतां पहा.

ज्याचा जो व्यापार तो त्यांनींच करावा---'जेनुं काम तेनुं ठाय' पहा.

ज्याचा जो व्यापार। तेथें असावें खबरदार।---(रामदासी म्हण.)-अर्थ उघड आहे.

व्यापारास धक्का दिल्यानें तरवार बोथट होते---व्यापार चांगला चालला नाहीं तर त्याच्या फायद्यावर पोसलें जाणारें सैन्यहि नीट ठेवतां येणार नाहीं.

व्यापारी हे पैशाकरितांच जगतात आणि पैशाकरितांच मरतात---व्यापाऱ्यांची दृष्टि केवळ पैशाकडे असते.

व्याप्ति---**व्याप्तीवांचून प्राप्ति नाहीं; व्याप्तीशिवाय प्राप्ती ना**---खटपट केल्याशिवाय द्रव्य मिळत नाहीं. उद्योगावांचून फल नाहीं.

व्यारु---**केल्लेलो चड्ड जावुनु हात्तातुं आयलें धुपाटणें**---(गो.) कुवतीच्या बाहेर व्यवहार केले म्हणजे पैशांऐवजीं धुपाटणें हातीं यायचें.

व्याल---**व्यालनकुलन्याय**---सर्प आणि नकुल यांचें वैर असतें यावरून हाडवैर. अहिनकुलन्याय पहा.

व्याही---**व्याही पाहुणा आला तरी रेडा दुभत नाहीं**---कोणाकरितां झालें तरी अशक्य गोष्ट शक्य होत नाहीं. पाहुणा पहा.

व्याह्यां जावयां तुपाचा पेला आणि घरचा पाहुणा उपाशीं मेला---व्याही जांवई यांची सरभराई करतां करतां पाहुण्याची उपेक्षा होते.

व्यूह---**व्यूह ढांसळून टाकणें**---बेत फुकट घालविणें; मसलत बिघडविणें; कटाचा उच्छेद करणें. 'या माझ्या मूर्ख मुलांनां कांहीं सांगितलें नाहीं तर हा माझा व्यूह ढांसळून टाकील.'-गुप्तमंजूष.

व्यूह रचणें---कट करणें; मसलत करणें; एखाद्या विरुद्ध कारस्थान करणें.

व्रत---**व्रत असणें**---वर्ज असणें. 'गुळाचें आम्हासि व्रत आहे'-सप्र. २.८१.

तीळ खाऊन व्रत मोडणें---अगदीं क्षुल्लक कारणासाठीं, फायद्यासाठीं बाणा, नेम सोडणें.

व्हंकल---**व्हंकल मोनी व्होरेत मोनो**--(गो.) नवराहि मुका आणि नवरीहि मुकी, असें झाल्यावर व्यवहार कसा व्हायचा?

व्हंकल मोरूं वरेत मोरूं, आमाचि दक्षणा आपकां मेवदि--नवरा मरो, नवरी मरो, आमची दक्षिणा मिळाली कीं काम झालें.

व्हंड---**व्हंडान खाल्यार ओखताक, दुबळ्यान खाल्यार पोटाक**--(गो.) मोठ्यानें खाल्लें तर औषधासाठीं; लहानानें अथवा गरीबानें खाल्लें तर पोटासाठीं. जग

श्रीमंतांची वाईट कृत्यें झांकतें पण तींच गरीबांचीं असलीं कीं उघडीं करतें.

व्हडलें---व्हडलें घर--(गो.) मोठें घर म्हणजे यमाचें घर.–वसईची मोहीम.

व्हडली मासळी धाकले मासळेक खाता—(गो.) मोठा मासा लहान माशाला खातो. मात्स्यन्याय. बळी तो कान पिळी.

व्हडें---व्हडँ पैलीं घट्ट करूं जाय, मागीर भाडें कॅन्नाय मॅळर--(गो.) होडी आधीं चांगली तयार केली पाहिजे. ती चांगली असल्यावर भाडें केव्हांहि मिळेल.

व्हावचें---व्हावंचा न्हयींतु हात धुंवचें--(गो.) लोकांचें काम चाललें असतां त्यांतच आपलेंहि साधून घेणें. वाहात्यागंगेंत हात धुणें.

व्हांवतलें आसल्यारि मेल्लेगादि पडयेद--(गो.) वाहून नेणारे असले तर मेल्याप्रमाणें पडून राहायला कांहींच हरकत नसते.

व्हांवते उदकाक भ्रष्ट ना--वाहत्या पाण्याला विटाळ नाहीं.

व्हावा---व्हावा चांद नाहीं तर राहावें वांझ—मुलगा व्हावा अशी प्रत्येकाची इच्छा ! परंतु सद्गुणी पोर पोटीं आलें तर तें कुळाचें नांव उजळ करील, कुलदीपक ठरेल. 'खायला काळ, भुईला भार' अशा संतानापेक्षां मुलींच नसलेलें बरें.

व्हावा निधि तर द्या प्रतिनिधि---कर पाहिजे तर मत दिलें पाहिजे. No taxation without representation.

व्हावें नदीचा गोटा पण येऊं नये वतनदाराचे पोटीं--वतनदाराच्या वंशांत जन्मण्यापेक्षां दगड झालेलें बरें. बहुतेक वतनदारांचीं मुलें मूर्ख असतात.

श

शक---शक चालणें—सत्ता असणें; अधिकार चालणें.'ज्याचा राजकीय अंमल त्याचा शक चालावयाचा. छत्रादिकाप्रमाणें शक हेंहि महा राजचिन्ह आहे.'–टिसू २६८.

शकट---शकटभेद--रोहिणी या शकटाकृति नक्षत्रांतून एखादा ग्रह किंवा चंद्र यानें जाणें. १ भेद करणें;फळी फोडून जाणें. २ फूट; अंतःकलह.–पेद५.८२; पया २५४. ३ लांड्यालबाड्या; युक्तया प्रयुक्तया 'वृंदेसी करुनिया शकटभेद । वधिला जालंदर रणरंगीं ।'–निगा १०३. ४ (सापा.) कारस्थानें; मसलती.

शंकर---शंकर करणें--श्रीकाराप्रमाणें, श्री शंकर असें पत्रावर सहीवजा लिहिणें. होळकर राजे अशी स्वदस्तुरी करतात. 'तुमच्या वाडिलांस नोकरी देण्यांत येत आहे असा मजकूर लिहून शंकर केला.'–विक्षिप्त ३·६१.

***शंकर मारतो मुठाळया, नंदी म्हणतो माझें लग्न करा**--जेथें मालकालाच कांहीं मिळत नाहीं तेथें चाकरानें आपणांस लाभ होईल अशी अपेक्षा करावयाची किंवा त्यासाठीं निकड लावावयाची.

शंकरा गळयांत रुंडांचो साज---(गो.) शंकराच्या गळ्यांत रुंडमाळांचें अलंकार. जसा माणूस तसा त्याचा वेष.

शंकराच्या घरीं, विष्णु झाला भिकारी---शंकर हा जोगी असून अगदीं पूर्ण कफल्लक आहे. त्याच्याजवळ कांहींच नसतें त्यामुळें त्याच्या घरीं विष्णु आला असतां त्यालाहि त्याच्या प्रमाणेंच राहावें लागतें. त्याला कांहीं मिळत नाहीं. दरिद्र्याच्या घरीं गेल्यास कोणताहि लाभ होणें शक्य नाहीं.

शंका---शंका घेणें-बाळगणें---लाज, भिति वाटणें.

शंका धरणें—भिति, धाक वाटणें; संकोच वाटणें. 'लज्जावती फार तथापि त्याची । शंका न सीता धरि हो पित्याची ।'

शंका ही पुढच्या कार्याची तरतूद असते—(न. चिं. केळकर) मनुष्याला एखाद्या गोष्टीची शंका आली

म्हणजे मग तो विचार करूं लागतो व भविष्यकाळाबद्दल कांहीं तरी अंदाज करून पूर्व तयारी करून ठेवतो.–त्रिकाळ २-११-३९.

शकुन---शकुन गांठ घालणें–बांधणें--एखादा चांगला शकुन दिसला असतां त्याचें कांहीं तरी फळ मिळणार अशा अपेक्षेनें वस्त्रास गांठ बांधून ठेवून त्या शकुनाचा पुढील लाभाशीं संबंध जोडीत असत यावरून. १ पूर्णपणें मनावर बिंबवणें; पक्कें ध्यानांत ठेवणें. २ खात्री असणें; पक्का अंदाज असणें. 'इकडे तीं तिथें वाघोबाच्या तडाक्यांतून कसचीं पार पडतात अशी त्यानें शकुनगांठ बांधून ठेवली.'–संभाजी

शकुन गांठ देणें—पुढें अमुक अमुक होणार असें मनावर पक्कें बिंबवून ठेवणें. वर पहा. 'स्ववस्त्रप्रांतीं हे त्वरित शकुनग्रंथि दिधली ॥'–सारुह ८.३८.

शकून बांधणें – शकून गांठ बांधणें. 'शकुन बांधोन ठेवी लगबगी । करूं कार्यार्थीं लगबग ।'–दावि.७·४०७.

शकून–शकुनांत असणें–चालणें–वागणें—वचन किंवा आज्ञा दिल्याप्रमाणें वागणें.

शकुनांत घेणें—१ एखाद्याशीं संबंध ठेवणें. २ सल्ला मसलत घेणें.

शकुनि--शकुनि चतुष्टय--१ १दुर्योधन,२ दुःशासन, ३ शकुनि, ४ कर्ण.२ दुष्ट इसमांची टोळी;चांडाळ चौकडी.

शकुनिमामा—१ दुर्योधनाचा मामा शकुनि हा फार कपटी होता यावरून कपटी कारस्थानी मनुष्यास हा वाक्प्रचार योजतात. २ श्रीमंताचे, थोर मनुष्याचे मामा किंवा ज्यांना बहुतेक लोक मामा या नांवानें संबोधितात, त्यांना विनोदानें, म्हणतात. तुल०–जांगील मामा.

शकुनिमामाची युक्ति—कपटाची वागणूक; लबाडीची युक्ति. 'शेवटीं त्यांच्या बुद्धीप्रमाणें अशी एक शकुनीमामासारखी युक्ति सुचली कीं, ती युक्ति एकदम सर्वांना पसंत होऊन.'—आमच्या आयु० आठवणी ६१.

शक्ति---शक्ति तेथें भक्ति—जो देव बलवान असतो ज्याच्यापासून आपणास अपाय होईल अशी भीति वाटते त्याच देवाची सर्व लोक उपासना करतात. दुर्बलाकडे कोणी पाहात नाहीं. थोर लोकांच्या भजनीं सर्व लोक लागतात; गरीबाकडे कोण जातो?

शक्तिचतुष्टय--१ आशा, २ मनीषा, ३ तृष्णा, ४ कल्पना.

***शक्तीकई युक्ति होड**—(गो.) शक्तीपेक्षां युक्ति मोठी.

शक्तीनें जायनात्तिलें युक्तीनें जात्ता—(गो.) शक्तीनें जी गोष्ट होत नाहीं ती युक्तीनें साध्य होते.

शक्तीपेक्षां युक्ति बरी—शक्तीनें काम करण्यापेक्षां तें युक्तीनें साधणें अधिक फायदेशीर असतें. सामर्थ्य खर्च करण्यापेक्षां बुद्धीनें कार्य साधणें अधिक हितकर असतें.

शक्र---तक्रं शक्रस्य दुर्लभम्—तक्र पहा.

शंख---शंख करणें—१ बोंब मारणें. 'सात्यकि निघे,म्हणे कुरुभट हो हूं शंख करुनि मुख सुजवा।'–मोद्रोण ११.३५. २ मोठमोठ्यानें ओरडणें. 'पैशाच्या कलशावर नजर ठेवून वकील शंख करीस असतो.'–सत्तेचे गुलाम.

शंख करावयास लावणें—बोंबलत बसविणें. 'विश्वामित्राला शंख करावयाला लावून इंद्रसभेचा रस्ता धरला.'–नाकु ३·७८.

शंखतीर्थ घेणें—बोंब मारणें. 'बापलेकांचें भांडण जहालें । लेकीं बापास मारिलें । तंव ते मतिनें घेतलें । शंखतीर्थ ॥'–दा ३-५-१९.

शंख वाजणें—१ संपणें; खलास होणें. २ पराभूत होणें. ३ बोंबाबोंब होणें.

***शंख अडोशी, शंख पडोशी, शंख शंखके भाई शंख घरके व्याह होई तो शंख मिले जावाई; शंख अडोसी, शंख पडोसी, शंखके घर शादी भई शंखहि मिले जवाई ?**—मूर्खांचा बाजार.

शंखोबा ! तर ओबा, दे लाख (दोन हजार) तर घे सव्वालाख (तीन हजार), देतोस काय तर घेतोस काय ?--बचने किं दरिद्रता पहा. दे लाख तर घे दोन लाख ० पहा.

शठ चोर जार, इनको ताडनका अधिकार—(हिं.) लबाड लोक, चोर व जार यांस दुसऱ्यास मारण्याचा अधिकार स्वयंसिद्धच असतो. तो कोणी द्यावा लागत नाहीं. यांच्या हातांस सापडलें कीं मार मिळावयाचाच.

शठं प्रति शाठ्यम्;शठे शाठ्यं समाचरेत्—कपटी मनुष्याला कपटानेंच जिंकलें पाहिजे. संबंध श्लोक असा–कृते प्रतिकृतिं कुर्याद्हिंसने प्रतिहिंसितम् । तत्र दोषं न पश्यामि शठे शाठ्यम् समाचरेत ॥–सम. ६३-९.शठं प्रति

शठं ब्रूयादादरं प्रति चादरम् ! तत्र दोषो न भवति दुष्टे दुष्टं समाचरेत् ॥–सम ६४·१०.

शठे प्रति लाठ्यं—शठाला लांठीच दाखविली पाहिजे. जशास तसें वागावें.–उग्र २-६.

शड्डु—-शड्डू ठोकणें—दंड थोपटणें; आव्हान करणें; सामन्यास तयार होणें. 'त्यानें शडडू ठोकावा व तूं गप बसावें हें लांच्छनास्पद आहे.'

शणै—-शणैचो जांवै चुनो खाता, चुनो खाता तोंड फोपेलें—(गो.) शणैबाबूच्या जांवयाची त्याला चुना खातां येतो म्हणून स्तुति केली गेली आणि त्यानेंहि पण स्तुतीसाठीं चुना खाण्यास आरंभ केला पण शेवटीं झालें काय ? त्याचें तोंड मात्र चांगलेंच होरपळून सुजलें. स्तुतीसाठीं कांहीं लोक अगदीं हपापलेले असतात व दुसऱ्यांना खूष करण्यासाठीं स्वतःच मूर्ख बनतात.

शत—-शतक्रतु-कृत्य करणें—शंभर यज्ञ केले असतां इंद्रपदाची प्राप्ति होते अशी समजूत आहे. यामुळें इंद्रास शतक्रतु असें म्हणतात. याकरितां इंद्रपदाच्या आशेनें आतांपर्यंत अनेकांनीं शंभर यज्ञ करण्याचा प्रयत्न केला पण मध्यंतरीं इंद्रानें विघ्न केल्यामुळें कोणीच यशस्वी झाला नाहीं. (ल.) पराक्रम करणें. 'कुंजपुरा गारदीच्या मदतीनें तुमच्या हातीं लागला, म्हणून तुम्ही कोणता मोठा शतक्रतु केलात ?'—पामो १८९. 'आम्ही राजांनीं प्रजांचें हरएक जुलमापासून रक्षण करावें, हा आमचा धर्म आहे. तो आम्हीं पाळिला, तर मोठा शतक्रतु केला असें नाहीं.'—मधुमक्षिका. 'आपण कांहीं मोठें शतकृत्य केलें असें मात्र समजूं नको.'–उग्र ४-४.

शतक्रतु संपादणें—शतक्रतु करणें पहा. 'आपणासी कुटिलतेनें वर्तणूक करून कोणता शतक्रतु संपादणें आहे याचा विचार आपणच चित्तीं आणावा.'—पेद ३३-४६.

शतपावली करणें—जेवण झाल्यानंतर थोडा वेळ इकडे तिकडे फेऱ्या घालणें; अन्नपचन होण्याकरितां जेवणानंतर थोडावेळ चालणें, हिंडणें, फिरणें.

कोणा शतभोजन : कोणा सहस्र भोजन :—(महानु.) एकाच्या एक तर दुसऱ्याला दुसरें. कांहीं ताळमेळ नसणें किंवा माणूस पाहून त्याला कमजास्त मान देणें.

शतं भीष्म—भीष्म हा सत्यप्रतिज्ञ म्हणून प्रसिद्ध आहे. त्यानें जी आजन्म ब्रम्हचर्य पाळण्याची शपथ घेतली ती आमरण पाळली तेंव्हा शंभर भीष्मांप्रमाणें म्हणजे भीष्मापेक्षांहि शंभर पटीनें अधिक करारी मनुष्य. 'कवीनें तत्काळ उत्तर केलें कीं, ऐसे दाते शतंभीष्म बहुत आहेत; परंतु ऐसा यांचक कोणीं तुम्हीं पाहिला नसेल.'—शिवाजी. सप्तप्र. चरित्र.

शतं तत्र पंचोत्तरशतम्—शंभर तेथें एकशें पांच. ज्या कामाकरितां मनुष्य शंभर रुपये खर्च करावयास तयार होतो तेथें तो आणखी पांचाकरितां कांहीं मागें घेत नाहीं. थोडें कमीजास्त झालें तरी मनुष्य करतोच. थोडक्याकरितां घासाघीस न करणें. तु०—ऐशीं तेथें पंच्यायशीं.

शतश्लोकैश्च पंडितः।—शंभर श्लोक पाठ येऊं लागल्याबरोबर आपणांस पंडित म्हणविणारा. थोडक्याशा ज्ञानानें हुरळून जाणारा. तु०–अर्ध्या हळुकुंडानें पिवळी होणारी.

शत्रु—शत्रूची उपेक्षा ही दुःखाची अपेक्षा—शत्रूकडे प्रारंभींच लक्ष्य न दिलें तर तो पुढें बलाढ्य होऊन आपणांस त्रासदायक झाल्याशिवाय राहणार नाहीं.

शत्रूमध्यें भेद केला, हातीं तरवार कशाला—शत्रूला भेदानें जिंकल्यास तरवारीचें कारण पडत नाहीं. कपटेन शत्रुः पहा.

शनि—-शनि उदरीं येणें—१ जन्म राशीस शनि असणें. २ मोठा लाभ होणें.

शनि दृष्टीस येणें—बारावा शनि येणें.

शनि पालटणें—अनिष्ट दिवस जाणें किंवा येणें. शनि ज्याच्या राशीस येतो त्याला दिवस वाईट येतात, अशी समजूत आहे. तो अडीच वर्षें एकेका राशीस असतो. 'तारीख २२ जून १८९७ ते २२ डिसेंबर १८९९ इतके दिवस म्हणजे बरोबर अडीच वर्षें नातूबंधूंची अटक टिकली. म्हणून नातूबंधूंचा शनि पालटला अशी टिळकांनीं ज्योतिषविषयक उपमा दिली.'—टिच २. १.१२-१३.

शनि लत्तेस येणें—शनि जन्म राशीच्या पुढील राशीस येणें.

शनीचा फेरा येणें-चालणें—शनि ग्रहाचें अशुभ राशीस येणें; साडेसाती येणें.

शनि करी हानि—शनीची वक्रदृष्टि असल्यावर नाश होतो.

सूर्यापोटीं शनैश्चर—शनि हा सूर्यपुत्र आहे अशी पौराणिक समजूत आहे. सूर्य हा तेजस्वी व शुभ ग्रह असून शनि हा काळा व अशुभ आहे यावरून थोर मनुष्याच्या पोटीं कुलक्षणी पुत्र जन्मल्यास हा वाक्यप्रचार योजतात.

शनिवार——शनिवाऱ्या तेली—बेने इस्रायल. हिंदु तेली आपले घाणे सोमवारीं बंद ठेवतात व बेने इस्रायल हे यहुदी असल्यामुळें ते तेल्याचा धंदा करतात तरी आपले घाणे त्यांचा सुटीचा दिवस जो शनिवार त्या दिवशीं बंद ठेवतात म्हणून त्यांस शनिवारे तेली म्हणतात.

***न कर्त्याचा–देत्याचा वार शनिवार**—न पहा.

शनैः——शनैः पंथाः शनैः कंथाः—हळू हळू करीत राहावें या अर्थी. संबंध श्लोक असा—शनैः पन्थाः शनैः कन्थाः शनैः पर्वतलङ्घनम् । शनैर्विद्या शनैर्वित्तं पञ्चैतानि शनैः शनैः।

शपथ——शपथ वाहावयाला–शपथेला मोकळा असणें–होणें—एखादें काम मुळींच केलें नाहीं असा दोषारोप येऊं नये, आपलें मन खाऊं नये म्हणून तें थोडेंसें किंवा कसें तरी करणें.

शपथ सोडणें—शपथेंतून मोकळें करणें. 'शपथ सुटली, कुंभाराची घागर फुटली, हत्तीवरून साखर वाटली.'

***शपथ केली वाहावयाला, भाकरी केली खावयाला**—भाकरी आणि शपथ यांचा काय संबंध ? भाकरीची शपथ घेतली तरी ती खायला कांहीं हरकत नाहीं. याप्रमाणें आपणाला वेळेवर पाहिजे तसें बोलावें व पाहिजे तसें करावें असा न्याय. किंवा भाकरी ज्याप्रमाणें खाण्यासाठींच केलेली असते त्याप्रमाणें शपथ ही वाहण्यासाठींच असते. तेव्हां ती केव्हांहि बेधडक वाहावी असा मतलबी पुरस्कार.

शपथ घेतली तेव्हां माझ्या तोंडांत सूत होतें—लहान मुलें शपथ लागूं नये म्हणून तोंडांत काळें सूत धरतात. दुटप्पी वर्तन करणें; शपथ तर घ्यावयाची पण ती मानावयाची नाहीं अशी आधींच मनाची तयारी करून ठेवावयाची. याप्रमाणें दिखाऊ वर्तन करून पुन्हां त्याच्या उलट वागणूक करणें.–मोर प्र. ११.

शफरी——शफरी फर्फरायते—मासळी उडूं लागते; थोड्याशा वैभवानें हुरळून जाणें. अल्प लाभानें फुगून जाणें. 'अगाधजलसंचारी न गर्वं याति रोहितः । अंगुष्ठोदकमात्रेण शफरी फर्फरायते ॥'–सुर २३५.२.

शब्द——शब्द खाणें—लिहितांना, बोलतांना शब्द गाळणें.

शब्द खालीं न पडणें—शब्दाला किंमत देणें; शब्द मानणें; शब्दाप्रमाणें वर्तन करणें; आज्ञा मान्य करणें.

शब्द खालीं पडूं न देणें—उत्तराला प्रत्युत्तर देणें. प्रत्येक वाक्यास उलट बोलणें.

शब्द झेलणें—आज्ञेप्रमाणें वागणें, शब्दास मान देणें. –'राजकारस्थानी पुरुष आणि सेनापति यांचे शब्द त्यांच्या आमदानींत सगळे लोक झेलीत असतात'–ओक.

शब्द टाकणें—१ मागणी, विनंति करणें. २ शिफारस करणें; भलावण करणें; एखाद्याबद्दल बोलणें.

शब्द ठेवणें–लागणें–लावणें—दोष देणें; नांवें ठेवणें. 'माझेनि दोषें पावलों खेद । हा तुज कासया ठेवणें शब्द ।'–मुक्तेश्वर. 'त्वत्सम साधु न लागों देती स्वयशासि शब्द ते राजे ।'–मोवन २.३६.

शब्द राहणें—कांहीं बोलावयाचें बाकी राहणें; आरोप, दूषण उरणें. 'आमच्या या बाबतींत शब्द राहिला नाहीं.' –मोर प्र. २७.

शब्द लागूं–लावूं देणें—दोष पत्करणें; दोषास प्राप्त होणें; नांव ठेवूं देणें. 'सत्यप्रतिज्ञ पांडव लागूं देती न आपणा शब्द ।'–मोविराट ४.६३.

शब्द लावणें—दोष देणें; ठपका ठेवणें. 'आणखी स्वामींनीं एक शब्द लाविला कीं राजश्री छत्रपति स्वामीचीं भेटी जाहली ते समयीं बहुमान जाहाला, तेव्हां आमचा मान काढिला नाहीं. म्हणून शब्द लाविला.'–रा ८.४७. 'तुमच्या विचारास आलें तें तुम्हीं केलें. आम्ही तुम्हास शब्द कशास लाऊं ?'–पेद ३०.३५.

शब्दाचा मार—कानउघडणी; खरडपट्टी; इषारा; ताकीद. म्ह०–शहाण्यास शब्दाचा मार, वेड्यास टोणप्याचा.

शब्दांची कसरत—बोलण्यांतील चातुर्य; लपंडावी भाषा. 'भाषा आणि तपश्चर्या, वचनांचे कष्ट, शब्दांची कसरत या गोष्टींची जरूर असते.'–नाकु. ३.४.

शब्दाबाहेर पाऊल न टाकणें—आज्ञेप्रमाणें वागणें शब्द राखणें; शब्दास मान देणें. 'मी आपल्या शब्दाबाहेर कधींहि पाऊल टाकणार नाहीं.'—विवि.

शब्दाला मान देणें—म्हणण्याप्रमाणें करणें; तत्पर-तेनें ऐकणें; शब्द खालीं पडूं न देणें. तु०—' हा नरवासव देईल न, सलोकपमृत्युच्याहि, मान, रवा.॥'—मो द्रोण २२।३१.

***शब्दांचा सुकाळ, तेथें बुद्धीचा दुकाळ**—जो मनुष्य फार बडबड करतो त्याच्या बोलण्यांत तथ्य फारच थोडें असतें; चतुर मनुष्यास आपलें मनोगत थोडक्या शब्दांत व्यक्त करतां येतें. त्यास शब्दांचें भारुड लागत नाहीं.

शब्दांचा सिंधु व अकलेचा एक बिंदु—चातुर्य-हीन बडबड; अर्थहीन वाचाळपणा.

शब्दांपेक्षां कृतीचा परिणाम लोकांवर शतप-टीनें अधिक होतो—अनेक शब्द बोलण्यापेक्षां थोडेसेंहि प्रत्यक्ष काम केल्यास तें अधिक फलदायक होतें.

शंभर—शंभर नंबरी सोनें—सोन्याच्या चिपावर प्रतीचे नंबर टाकतात यावरून उत्कृष्ट प्रतीचें; पूर्ण गुण असलेलें.

शंभर पाहणें—खिसगणतींत नसणें; पर्वा नसणें. 'तुझ्या सारखे शंभर पाहिलेत.'

शंभर सवें ऐंशीचा धंदा—आंतबट्ट्याचा व्यापार.

शंभर बुड्या मारून अंग कोरडें दाखविणारा—अनेक लबाडया करून न सांपडणारा.

शंभर रुपये तोळा बोलणें—मितभाषी असणें; जरूर तेवढेंच बोलणें.

शंभर वर्षें भरणें—मनुष्याचें आयुष्य शंभर वर्षांचें असतें यावरून शंभर वर्षे पूर्ण होणें म्हणजे मृत्युसमय जवळ येणें; आयुष्य सरणें. 'तुला जी कबब हकीकत माहीत असेल ती सगळी सांग. नाहींतर तुझीं शंभर वर्षें आतां भरलींच समज.'—मथुरा. 'माझीं पुरीं शंभर वर्षें भरलीं.'—अस्तंभा. १९१.

शंभर हातांत न देणें—दूर राहणें; अलिप्त असणें.

***शंभर आचारी नि स्वयंपाकाची नासाडी**—वाजवीपेक्षां जास्त लोक एखाद्या कामांत पडले कीं त्यांचा परस्परांस उपयोग होण्याच्या ऐवजीं घोंटाळाच होण्याचा संभव अधिक असतो. Too many cooks spoil the broth.

शंभर काशीकर आणि एक नाशिककर—काशीकर पहा. नाशिकचा मनुष्य काशीच्या मनुष्यापेक्षांहि अधिक लबाड असतो असा आशय.

शंभर तोंडलीं एक भोपळें—(गो.) शेंकडों लहान वस्तूंच्या किमतीनें एक मोठी वस्तु विकत घ्यावी लागते. तु०—एकश्चंद्रस्तमो हन्ति नच तारागणोपि वा।

शंभर दिवस चोराचे एक दिवस सावाचा; शंभर दिवस सावाचे एक दिवस चोराचा—या म्हणी परस्पर विरुद्ध आहेत. पहिलीचा अर्थ असा होतो कीं जगांत लबाड मनुष्यांचीच अधिक चलती असते व प्रामाणिक मनुष्य एखाद्या वेळींच यशस्वी होतो. उलट दुसऱ्या म्हणीचा असा अर्थ होईल कीं, प्रामाणिक मनुष्य शंभर दिवस कष्ट करून मिळवील तितकें चोर एका दिव-सांत घेऊन जातो किंवा मिळवूं शकतो.

शंभर वर्षें कागा, हजार वर्षें नागा—काग पहा. कावळ्याला शंभर वर्षे आयुष्य असतें तर सापास हजार वर्षें असतें. तो कात टाकून पुन्हां तरुण होतो.

शंभर शहाणे पण अकल एक—शहाणे मनुष्य कितीहि आले तरी शेवटीं एकच गोष्ट सांगतात. शहाणा मनुष्य प्रत्येक गोष्टीचा जो निकाल देतो तो बहुधा इतर सर्व शाहण्यांस पटण्यासारखाच असतो.

शंभर सुवेतें पुरवतील पण एक दुवेत पुरवत नाहीं—चांगल्या शंभर बाळंतपणांत होणार नाहींत इतके कष्ट एका गर्भपातांत किंवा जुळ्याच्या बाळंतपणांत होतात.

शंभरके भये साठ, आधे गये नाठ, दस् देएंगे, दस् दिलाएंगे, दस्का देना क्या?—(हिं.) असा अप-मतलबी खाबू हिशेब. (अगोदर शंभराचे साठ करून घ्यावयाचे; त्यापैकीं निम्मे बाद; उरलेल्या तिसांपैकीं दहा दिले—दहा देतां येतील; राहिले दहा. मग हे कशाला द्यावयाचे?)

शंभरांत फूल, हजारांत काणा, सर्वांत अंधळा दाणा—(व.) ज्याच्या डोळयांत फूल पडलें असेल तो शंभर डोळसांत शहाणा असतो, काणा माणूस हजार माणसांत शहाणा तर अंधळा असणारा सर्वांत शहाणा समजावा.

शमनावीर---शमनाविराची कांडी फिरविणें—[शमनाबीर=एक क्षुद्र मुसलमानी देवता, संबंध] हात चलाखी करणें; लबाडी, लुच्चेगिरी करणें.

शय्या---शय्यादान करणें--१ उत्तरक्रियेंतील एक दान. मृताची शय्या ब्राम्हणास दान देणें. सती जाणें. ' शय्यादान करणें मला आणून द्या शीर !'–पला ४०.१०४.

***शय्या पाळीतां : आणिकेसी न रमे कांताः**—(महानु.) जर स्त्रीची कामना पुरवीत गेलें तर तिचें मन दुसऱ्यावर जात नाहीं.

शरण---शरण असणें—आश्रय मागणें.

शरण आलिया मरण चिंतणें--आश्रय मागावयास आलेल्या मनुष्यास धोका देणें. ' शरण आलिया मरण चिंतूं नये (हे) समर्थास उचित होय.'–भाव. ३२.

शरणचिठी देणें--शरण आलों असें चिठीवर लिहून देणें; अगदीं शरण येणें.

शरण येणें--दया, क्षमा मागणें; आश्रयार्थ जाणें. ' याल्लागीं तूं अर्पी सीता। शरण जाईं आयोध्यानाथा। –एकनाथ–रामायण.

***शरण आइल्याक मरण ना**--(गो.)जो शरण येतो, त्याचें मरण चुकतें. शरणागताला अभयदान द्यावें या शास्त्रवचनाला अनुसरून ही म्हण बनली आहे.

शरण आलेल्यास मरण चिंतूं नये--शरणागताला जीवदान द्यावें, त्याचा नाश इच्छूं नये. ' शरण आलियाचा अंगीकार करावा, शरण येईल त्यास मरण चिंतूं नये, ऐसें धर्मशास्त्रीं वाक्यप्रमाण सबलपक्षीं होतच आहे,' –भाव ५.

शरण आल्याचें मरण मोजूं नये--वरप्रमाणें. शरण आलेल्याला जीवदान द्यावें.–आनंद डिसेंबर १९१७.

शरपंजर---शरपंजरीं पडणें--(भीष्म मृत्यूच्या वेळीं बाणांच्या पलंगावर निजला होता यावरून) १ दुखण्यानें झिजत पडणें; अंथरुणास खिळणें. २ संकटांत सांपडणें.

शरम---शरम पार पाडणें--लाज राखणें. 'बहादरकी शरम पार पाडावे.' –भाव. ५.

***शरम करी नरम आणि भरम करी गरम**—मनुष्य लज्जेनें नम्र होतो व भ्रमानें रागावतो.

शरारत---शरारती मामला--(ना.) द्वेषबुद्धीनें घेतलेलें बालंट.

शरीर---शरीर कमावणें--बलवृद्धि करणें. ' शरीर कमावून बसावयाचें पण अक्कल गमावून बसावयाचें' –राजसंन्यास १५.

शरीर वेंचणें--देह झिजविणें.

शरीरसंबंधावर येणें--हातघाईवर येणें; आंगचटीस जाणें; मारामारी करावयास तयार होणें.

शरीराची ढगळ--शरीराची झीज, कृशता (दुगवण इ. मुळें आलेली).

शरीराची दामटी (वळणें)--कृषता; रोडपणा.

शरीराची घलपी-ढलपी—शरीर काठीप्रमाणें होणें.

***शरीर देवाचें, धन कुबेराचें**—मानवी देह ही परमेश्वराची देणगी आहे; तसेंच धन प्राप्त होणें ही कुबेराची कृपा आहे.

शरीर सोकलें देखलिया सुखा। कदान्न हे सुखा मान्य नाहीं॥—एकदां मनुष्य सुखावला व चांगलें मिष्टान्न खाण्याची त्यास संवय झाली म्हणजे त्याला रुक्ष अन्न आवडत नाहींसें होतें.

शरीराचा गेला तोल, झाला मातीमोल—एकदां मनुष्याच्या शक्ति क्षीण झाल्या व त्याचें शरीर त्याच्या ताब्यांत राहात नाहींसें झालें म्हणजे तो कुचकामाचा होतो.

शरीरांत पित्त नि संसारांत वित्त (अवश्य पाहिजे)—पित्तरस हा अन्न पचन होण्यास जितका आवश्यक आहे तसेंच द्रव्य हें संसाराचा गाडा सुरळीत चालण्यास अवश्य आहे.

शरीरावरून नकळे ज्ञान, उंचीवरून न कळे मान--मनुष्याचें ज्ञान त्याच्या बाह्य स्वरूपावरून कळून येत नाहीं. त्याचप्रमाणें मनुष्याला त्याच्या शरीराच्या आकारावरून मान मिळत नाहीं तर त्याच्या बुद्धीवरून ज्याप्रमाणें त्याच्या ज्ञानाचें मापन होतें त्याप्रमाणें त्याच्या गुणांप्रमाणें लोक त्याचा आदर करतात.

शर्त---शर्त होणें—बेसुमार होणें; अगदीं मर्यादेस पोंचणें.

शलाका---शलाकापरीक्षा--एखाद्या ग्रंथाची शलाकापरीक्षा करणें म्हणजे त्या ग्रंथांत कोठेंहि एक

सळई घालून कोणतेंहि पान उघडणें व तेंच पान वाचून त्यावरून त्या ग्रंथाची योग्यता ठरविणें. याप्रमाणेंच त्या ग्रंथाचें अध्ययन केलेल्या मनुष्याचीहि परीक्षा घेण्याची पद्धति पूर्वी होती. यावरून एखाद्या वस्तूचा कोणतातरी थोडा अंश पारखून पाहून त्यावरून त्या वस्तूची परीक्षा करणें; चांचणी.

शलाकाप्रश्न--एखाद्या प्रश्नांचें उत्तर पाहावयाचें झाल्यास समोर असलेल्या एखाद्या ग्रंथांत सळई घालून कोणतेंहि पान उघडून त्यांतील मजकुरावरून अनुकूल प्रतिकूल उत्तर पाहणें.

शश-- -**शशविषाण-शृंग**--सशाचें शिंग हें नसतेंच तेव्हां कोठून मिळणार? यावरून अप्राप्य वस्तु; खपुष्प.

शष्प--शेट पहा.

शष्पलाभ--क्षुल्लक लाभ. 'चोराय शष्पलाभाय.'

शष्पाची किंमत न देणें—कःपदार्थ मानणें; मुळींच महत्त्व न मानणें.

शष्पाची सर नसणें--कवडीमोल, अगदीं क्षुद्र नीच असणें.

शष्पसाठीं लिंग लासणें--थोडक्या लाभासाठीं मोठी हानि करून घेणें.

शष्प देणें न् शष्प घेणें—कोणताहि लाभ नसणें; बिनाकारण खटपट, निरर्थक खटाटोप.

शष्प देणें न शष्प घेणें, बहुत काय लिहिणें, लोभ करावा हे विनंति—(अशिष्ट.)कांहीं देणें घेणें नाहीं, कांहीं जरूरी नाहीं या अर्थी.

शष्पें भादरल्यानें-खरवडून काढल्यानें मढें हलकें होत नाहीं—(अशिष्ट.) किरकोळ उपाय करून मोठें कार्य साधत नाहीं. केस पहा.

शष्पें धुतलीं म्हणून रेशीम होत नाहीं—भिकार गोष्टीस कितीहि उपचार केले तरी तिला सुंदर बनवितां येत नाहीं. गाढवास धुतलें तर तें घोडा होत नाहीं.

शस्त्र—-**शस्त्र तुळणें-तोलणें**—१ बरोबर हत्यार धरणें. २ शस्त्र परजणें.

एखाद्यावर शस्त्र धरणें—१ हत्यार घेऊन उठणें; नाशास उद्युक्त होणें. २ वाईट करण्याविषयीं कंबर बांधणें, कसणें; एखाद्याच्या पाठीस लागणें; दांत धरणें.

शह—-**शह देणें**—बुद्धिबळामध्यें प्रतिपक्षाच्या राजावर आपल्या एखाद्या मोहऱ्याचा मारा होत असल्यास राजा हलविणें भाग पडतें; यामुळें असा मारा करणें यास शह देणें म्हणतात, यावरून १ हुसकावून लावणें. २ राजास मोहऱ्यानें शह देणें. ३ भीति दाखविणें.

शह राखणें—दाबांत ठेवणें. 'वरकड अवघे एकत्र होऊन गनिमाचा शह राखोन स्वामीस संतोषानें पाववणें.' –शारो. ७.

शहास गुंतणें— वचनबद्ध होणें; बांधलें जाणें; ज्यांतून सुटका नाहीं अशा संकटांत सांपडणें.

शहर—-**शहरचा कसा, खेड्याचा पसा**—शहरांत नोकरी करून पिशवीभर पगार आणला तरी खेड्यांतील एक पसाभर धान्याच्याच बरोबरीनें तो होतो. नोकरीच्या पैशापेक्षां शेताचें उत्पन्न केव्हांहि फायद्याचें.

शहराची आग छोटी, पोटाची आग मोठी—एखाद्या गांवास लागलेल्या आगीपेक्षां पोटांतील भुकेचें महत्त्व अधिक आहे; कारण तीमुळें मनुष्य अधिक हैराण होतो.

शहरांत मिळवावें आणि खेडेगांवांत जाऊन खावें—शहरांत पैसा कमावतां येतो पण तेथें महागाई फार. तेव्हां तो खेडयांत खर्चून चांगलें खातांपितां येतें.

शहरांतलें व्हावें कुत्रें पण गावढांतलें होऊं नये माणूस—शहरांत हलाखींत राहावें लागलें तरी बरें पण खेडयांतील सुखाची वस्तीहि चांगली वाटत नाहीं.

शहा—-**शहा किंवा बादशहा**—राजा काय किंवा महाराजा काय, सारखेच.

नेसेन तर शहाचें नेसेन नाहीं तर नागवी बसेन—नेसेन पहा. एकाच गोष्टीकरतां गैरवाजवी हट्ट. तु०-खाईन तर तुपाशीं.

शहाणपणा—**शहापणाचा दिवा लागणें**—मूर्खपणा करणें; अक्कल चालविणें. 'तुमच्या शहापणाचा दिवा लागला.'–मोरप्र. २१.

शहाणपण वयावर नसतें—-वयानें वृद्ध मनुष्य शहाणाच असतो असें नाहीं. तरुण मनुष्यहि बुद्धिमान असूं शकतो. शहाणपण बुद्धीवर अवलंबून असतें. मॅसिडोनियनच्या फिलिप राजानें ग्रीसमधील निरनि-

राळ्या संस्थानांचे वकील बोलावले असतां अथेन्स येथून गेलेला वकील अगदीं तरुण असून त्यास दाढीहि आलेली नव्हती. तेव्हां त्यास फिलिप राजानें 'आपल्या संस्थानांत कोणी वृद्ध वकील नव्हता काय?' असा प्रश्न विचारला. तेव्हां त्यानें 'शहाणपण हें दाढीवर अवलंबून असतें असें आम्हांस वाटतें तर आम्ही एक लांब दाढीचा बोकडच आपणाकडे पाठवून दिला असता?' असें उत्तर दिलें.

शहाणा--शहाणी होणें—(ल.) न्हाती धुती, ऋतुमती होणें; वयांत येणें.

साडेतीन शहाणे--१ विठ्ठल सुंदर परशरामी (निझामाचा दिवाण), २ पुरुषोत्तम ऊर्फ देवाजीपंत चोरघोडे (नागपूरकर भोसल्याचा दिवाण,) ३ सखाराम बापू बोकील, ३॥ नाना फडनवीस. सख्या, देवा, विठला.

शहाण्याची खरवड--मठ्ठ मनुष्य.

***अति शहाणा त्याचा बैल रिकामा**--अति पहा.

शहाणा नडतो, पोहणारा बुडतो; शहाणा नाडतो, पोहणारा बुडतो—[नडणें=फसणें] जो मनुष्य फार बुद्धिवान असतो त्याला हातीं घेतलेल्या कामांत पुढें येणाऱ्या अनेक अडचणी आधींच दिसूं लागतात त्यामुळें तो घाईनें काम न करतां थांबत थांबत काम करतो व मधून मधून अडून बसतो. त्याप्रमाणेंच चांगलें पोहणाऱ्या माणसासच पाण्याचें भय मुळींच वाटत नसल्यामुळे तो अधिक साहस करतो व त्यांत बुडून मरतो. जो कांहींच करीत नाही त्याला कधीं आपत्ति येत नाहीं.

शहाणा शत्रु पुरवला पण मूर्ख नोकर नको-- मूर्ख नोकराकडून काम करून घेण्यापेक्षां शहाण्या शत्रूशीं दोन हात करणें कमी त्रासदायक असतें.

शहाण्या खुलत्या, गाढवाच्या चुलत्या--(व.) शहाणा शहाणा म्हणून एखाद्यावर कामगिरी सोपवावी, पण त्यानें अति शहाणपणा करून ठेवावा. शहाणी झाली म्हणून ती शहाणपणाच करील असें नाहीं. दुसऱ्या दृष्टीनें ती गाढवाची मूर्खाची चुलती असल्यामुळें मूर्खपणा करील हे संभवनीय आहे. अति शहाणा त्याचा बैल रिकामा.

शाण्याक् उत्रां मार आनी पिशा चाबका मार-- (गो.) शहाण्याला शब्दांचा मार आणि मूर्खाला चाबकाचा मार.

शहाण्याचा चाकर व्हावें पण मूर्खाचा (धनी) जामिन होऊं नये; शहाण्याचा व्हावें चाकर पण मूर्खाचा होऊं नये धनी—चाकर पहा. (गो.) शाण्याचो जावचो चाकोर पोण पिश्याचो धनी जाव नये.

शाहण्याची एक बात, मूर्खाची सारी रात— मूर्खानें रात्रभर जरी अनेक प्रकारच्या गोष्टी सांगितल्या तरी त्यांना शहाण्या मनुष्यानें सांगितलेल्या एका गोष्टीचीहि सर येणार नाहीं. शहाण्या मनुष्याच्या एका शब्दास जें महत्त्व आहे तें मूर्खाच्या अनेक गोष्टींसहि नाहीं.

शहाण्याची बलाई दूर—शहाण्या मनुष्यापासून संकटें दूर असतात.

शहाण्याची रात आणि मूर्खाची हयात--शहाणा मनुष्य एका रात्रींत जें काम करूं शकतो तें मूर्खाकडून सर्व जन्मांतहि होत नाहीं.

शहाण्याची लाथ, मूर्खाची खेव--मूर्खाच्या आलिंगनापेक्षां शहाण्याची लाथ पुरवली. शहाण्या मनुष्याकडून तिरस्कार झालेला पुरवला पण मूर्खाचें प्रेमहि त्रासदायक होतें.

शहाण्याचे खावे जोडे पण मूर्खाचे खाऊं नये पेढे--शहाण्याकडून अपमान झालेला पतकरला पण मूर्खाकडून होणारा सन्मान नको.

शहाण्याचे डोळे त्याच्या डोकीं, कामा मूर्ख चाले काळोखीं—शहाणा मनुष्य आपल्या बुद्धीनें कार्य करूं शकतो व मूर्ख मनुष्य काळोखांत असल्या प्रमाणें चांचपडत असतो.

शहाण्याचें तीन ठिकाणीं! शहाण्याचा गू तीन ठिकाणीं---स्वतःला शहाणा समजणारा एक मनुष्य काळोखांतून जात असतां त्याचा पाय विष्टेवर पडला. कोठें तरी उजेडाच्या ठिकाणीं जाऊन आपला पाय कशानें भरला आहे हें पाहावयाचें सोडून त्या शहाण्यानें आपल्या पायाला काय लागलें याची तेथल्या तेथेंच शहानिशा करण्याचें ठरविलें. त्यानें पायाला लागलेली विष्टा थोडी होतांत घेऊन बोटांनीं चाचपून वगैरे पाहिली. तथापि तेवढ्यावरून तें काय आहे याचा त्याला निर्णय करतां येईना. तेव्हां वासावरून परीक्षा करावी असें त्यानें योजिलें व विष्टेनें भरलेलीं बोटें नाकाजवळ नेलीं. वासावरून त्याला पाय कशानें भरला याचा निर्णय करतां आला; पण बोटें नाकाला लागून नाकालाहि विष्टा लागली!

अशा रीतीनें पाय, हात व नाक अशा तीन ठिकाणीं त्या शहाण्याला विष्ठेचा प्रसाद मिळाला. म्हणून ' शहाण्याचें तीन ठिकाणीं ! (गो.) शाण्याक तींकडेन, पिशाक एकेकडेन.

शहाण्याचे सुलते गाढवाचे चुलते--शहाण्या सुलत्या० पहा.-नि ११६२.

शहाण्याला इशारा, नि मूर्खाला खेटराचा मारा--शहाण्याला समज द्यायला नुसते शब्द पुरेसे असतात, पण मूर्खाला धडा देण्यासाठीं जास्त कडक उपायाचा अवलंब करावा लागतो. व्यक्ति पाहून साधनांचा उपयोग करावा. शहाण्यास शब्दाचा मार, पहा.

शहाण्याला मार शब्दाचा आणि मूर्खाला मार टोणप्याचा – काठीचा – चाबकाचा; शहाण्याला शब्दाचा मार—टिच २-४-५६.**शहाण्याला शब्दाचा, मूर्खाला खेटराचा (मार)**--वर प्रमाणेंच. तु०-(गो.) शाण्याक उतरां मार, पिशाक चाबका मार.

शहाण्यास इशारत, मूर्खास टोंचणी—वर प्रमाणेच.

शहाण्यास एक बात, मूर्खाला सारी रात; शहाण्याची एक बात, मूर्खाची सारी रात--वर पहा. शहाण्यास एका शब्दानें सांगितलेलें समजतें. पण मूर्खाजवळ रात्रभर वाटाघाट केली तरी त्यास कळत नाहीं. ' शहाणिया पुरें एकचि वचन । विशारती खूण तेंचि त्यासि ॥' –तुगा २७७८.

शहाण्यास वंदन, मूर्खास कंदन—जगामध्यें शहाण्या मनुष्यास मान मिळतो मूर्खाला मार खावा लागतो.

शहाणीव---आपल्या शहाणीवा : जाणें पुढीलांच्या मनोभावाः--(महानु.) स्वतःच्या शहाणपणानें पुढें असणाऱ्यांच्या मनांत काय आहे हें ओळखतो.

शहाण्णव--शाण्णव कुळी, शाण्णवकुळींचे राजे--क्षत्रियांचे चंद्र व सूर्य वंशांतील असे दोन मोठाले भेद असून त्यांत ९६ कुळें आहेत. सह्याद्रिखंडांत या शाण्णव कुळांतील राजांचीं नांवें पुढीलप्रमाणें दिलीं आहेतः १ अनुज २ देवक, ३ पृथु, ४ ऋतुपर्ण, ५ जय, ६ सुभ्रीम, ७ सौवाम, ८ सुमंत, ९ कौंडिण, १० मंडुक, ११ कुशीक, १२ मार्तंड, १३(कामपतीचे पुत्र सोमवंशी) पद्म, १४ शाम १५ पृथु, १६ श्रीधर, १७ ब्रह्मज, १८ चंपक,१९ शार्दूल, २० नोल, २१ विद्यत्पति, २२ सुरब्रह्म, २३ रघु, २४ माधव २५ शैल, २६ मान, २७ श्रीपति, २८ शल. २९ नकुल, ३० शैल, ३१ भूरथ, ३२ यदु, ३३ पौंड्रिक, ३४ जधव, ३५ मन्मथ, ३६ पार्थिव, ३७ रंधक, ३८ प्रघोष, ३९ शशी, ४० दात, ४१ सारंग, ४२ वज्रदंष्ट्र, ४३ देव, ४४ मंत्रोद्धव, ४५ श्रीमाल, ४६ मपुरण्य, ४७ सुरसेन, ४८ नरहरी, ४९ मंडक, ५० भार्गव, ५१ सुग्रीव, ५२ सहस्त्रधर, ५३ चैत्र, ५४ धर्म, ५५ रिपु, ५६ शाश्वत, ५७ दान, ५८ शाल्मली, ५९ जायव, ६० विदर्भ, ६१ ६१ प्राणनाथ, ६२ वैजयंत, ६३ पार्थिव, ३४ भूरिसेन, ६५ पृषद, ६६ वासुकी, ६७ कीर्तिमान, ६८ सुवर, ६९ गोगज, ७० अतिवार, ७१ सुदेष्ण, ७२ सक्मरथ, ७३ सुरथ, ७४ महाराज, ७५ अरिमर्दन, ७६ प्रीतिनाम, ७७ सहस्त्रजित, ७८ चित्ररथ, ७९ सीम, ८० आदि,८१ गज, ८२ असीमहीधर, ८३ श्वेत, ८४ सुक्षेत्र, ८५ महाविद्वान, ८६ सुविद्वान, ८७ कामद, ८८ श्रीधर ८९ प्रजापाळ, ९० देववार, ९१ ध्रुववंश, ९२ स्वायंभुमनूचा रघुवंश, ९३ वैवस्वतमनूचा जनकवंश, ९४ पुरूचा कुरुवंश, ९५ यदुवंश, ९६ सूर्यवंश शिवराज. 'छप्पन्नदेशींचे राजेश्वर। शाण्णवकुळींचें राजकुमर ।'–मुवन ६.१०९. वरील यादींत पृथु शैल वगैरे नांवें दोनदां आलीं आहेत.

शहानिशा---शहानिशा करणें—चौकशी करणें; भवति न भवति करणें; संदिग्धता घालविण्याचा प्रयत्न करणें.

शहामत---शहामत करणें—बहादुरी करणें.

शहारा--शहारा करणें--गाय बैल वगैरे जनावरास खडा मारला असतां जेथें तो खडा लागतो तेथील अंग थरारून तो भोंवऱ्याप्रमाणें केस फिरवतो यास भोंबरा करणें, शहारा करणें असें म्हणतात. भोंवरा करणें.

शाई ---शाई घालणें—एखाद्या मजकुरावर शाई ओतली म्हणजे ता वाचतां येईनासा होतो यावरून नाश करणें.

शाई देणें--बयाणा देणें.

शाईचा पुडा; शाईची पुडी--शाई लावलेली मृदंगाची बाजू.

शाई-ही---शाई-ही शिरस्ता--१ सामान्य रिवाज; चालरीत; रूढी. २ राजरीत. ' चांगलें माणूस मिळऊन शाई शिरस्त्याचें मर्द माणूस पाहून.'–समारो १-१३.

शाका——शाका करणें—कापून टाकणें; ठार मारणें. ' आतां गनीम मागतील ते रुपये द्यावे किंवा बायका मुलें यांची शाका करून चालून घेऊन मरावें. ' —माबं ४.

शाखा——शाखाचंद्रन्याय——आकाशांतील चंद्र दाखवावयाचा असल्यास एखाद्या झाडांच्या खांदीपासून त्याचें अंतर सांगून दाखवितात; यावरून जवळच्या वस्तूवरून एखाद्या वस्तूचा बोध करणें.

शागिर्द——शागिर्द पेशा——१ उमेदवार विद्यार्थि; छात्र; शिष्य. २ नोकर चाकर. “खर्चाची बेगमी व शागिर्द पेशा व दरमहा यथायोग्य नेमून ’—संभाजी चरित्र. ३ राजघराण्यासंबंधी घरगुती कामें करणारें खातें. ४ शागिर्दाची वृत्ति.

शाण——शाणे धरणें—(तंजा.) धार लावणें.

शाणव—शहाण्णव पहा.

शाणव श्राद्धें——१२ अमावास्या, ४ युगादि, १४ मन्वादि, १२ क्रांति, १२ धृति, १२ व्यतिपात, १५ महालय, ५ अष्टक, ५ अन्वष्टक, ५ पूर्वेद्युः.

शांत——शांतम् पापम्—(ईश्वर करो ! असें पाप न होवो !) मुळींच नको ! असें कसें होईल ! या निषेधार्थी वापरतात. ' जग कित्ती कित्ती बदललय् हें बघ —अग, शांतम् पापम् करणारे पूर्वीचे लोक दिसेल आतां राहिले नाहींत !’—कवठेकर, अपुरा डाव २०१.

शांति——शांति तेथें लक्ष्मीची वस्ती—ज्या घरांत शांतता नांदते तेथेंच समृद्धि पण असते. कलहाच्या निषेधार्थी वापरतात.

शांति, क्षमा, दया । अलंकार आंगीं । अभंग प्रसंगीं । धैर्यवंत ॥—धैर्यवान् लोकांच्या अंगीं शांति, क्षमा, दया हीं वास करीत असल्यानें त्यांचा कोणत्याहि प्रसंगीं धीर सुटत नाहीं.

दुःखास उपाय कांहीं, शांतीशिवाय नाहीं—सर्व दुःखांवर एक उपाय म्हणजे तीं शांतपणें सहन करणें हा होय. Patience is the best remedy for grief. —सवि २७०५.

शान——शानगुमान करणें—नाहींसा करणें; बेपत्ता करणें.

शाप——शाप वठणें—हानि होणें; कार्य बिघडणें.

शापादपि शरादपि —१ शापानें भस्म करण्यास व युद्धानें ठार करण्यास समर्थ. ब्राम्हण हे आपल्या शत्रूचा नाश शाप देऊन अगर युद्ध करून यांपैकीं कोणत्याहि उपायांनीं करूं शकतात. ते ऋषी आणि योद्धेहि असतात. द्रोणाचार्याला हें विशेषण चांगलें लागू पडे. अग्रतश्चतुरो-वेदाः पृष्ठतः सशरं धनु । इदं ब्राम्हमिदं क्षात्रं शापादपिशरादपि॥ २ (ल.) व्यवहार आणि विद्या या दोहोंत पारंगत. ३ धर्म आणि कार्य यांत सारखाच निपुण. ४ मुत्सद्दी आणि शिपाई. ५ शाप किंवा शर म्हणजे साम किंवा युद्ध याप्रकारें; किंवा वरील दोन्हीं प्रकारांनीं.

शामळू——शामळूभाई——गुजराथी लोक सांभळो हा शब्द वरचेवर वापरतात यावरून, गुजराथी लोकांना (उपहासानें) म्हणतात.

शारीर——शारीरिक शक्ति दुराचारानें नासते—दुर्वर्तन केल्यास शरीराचा ऱ्हास होतो.

शाल——मायेची शाल घालणें——निरतिशय प्रेम, माया करणें. ' घालील शाल जो मायेची तिजवरी ।' —शारदा.

शालजोडींतून मारणें देणें; शालजोडींतला देणें-मारणें—आडून, उपरोधिक रीतानें बोलणें; टोमणा मारणें. ' जुलमी अम्मलदाराचा अगर राजाचा स्वभावच असा असतो कीं, ते आपल्या जवळ जीं माणसें बाळगतात तीं अशीं असावीं कीं त्यांस कोणीं शालजोडींतील मारले तरी त्यांनीं शालजोडीच्या मऊपणाचीच तारीफ करीत रहावें’—टि २.१२८.

शालजोडीला कांबळाचें-रकट्याचें ठिगळ—एखाद्या सुंदर पुरुषास किंवा स्त्रीस कुरूप बायको किंवा नवरा मिळाला म्ह. म्हणतात. शालजोडी फाटली असेल तर तीस त्याच जातीच्या वस्त्राचें ठिगळ दिलें पाहिजे म्हणजे जमून दिसतें; त्याप्रमाणें नवरा-बायको परस्परांस शोभून दिसलीं पाहिजेत.

शास्त्र——शास्त्र बेचाळीस प्रकारें अधित—(महानु.) ४ पदार्थ. ३ तीन्ही सृष्टी. ४ युगें. ३ मतित्रय. ४ दानें. १२ प्रकरणें. ४ चतुर्विध कर्मफळें. ४ काक्षादि चतुष्टय. ४ ज्ञानें—शाब्द, अपरोक्ष, सामान्य, विशेष.

शास्त्रार्थ करणें—नांवाला करणें.

शास्त्रास – शास्त्राचा–शास्त्रापुरता–शास्त्रार्थास असणें–नसणें—केवळ नांवाला असणें, नसणें.

शास्त्रप्रवीण : तो द्रव्यहीन :—(महानु.) पंडित माणूस बहुधा दरिद्री असतो. श्री आणि सरस्वती एकेजागीं नांदत नाहींत हें ठरलेलेंच आहे. याच्या उलट ' द्रव्य-संपूर्ण, तया नसे शास्त्रज्ञान.'

***शास्त्रवेदाची व्हाटी : लोके केली उफराटी** :—(महानु.) वेदशास्त्रांत असलेल्या चालीरीती लोकांनीं सोडून भलत्याच अंगिकारल्या आहेत.

शास्त्र (शास्त्रांत) सांगावयाचें आणि वस्त्रांत हगावयाचें; शास्त्र सांगे आणि चुलीशीं हगे—-तोंडानें शहाणपणाच्या गोष्टी सांगून प्रत्यक्ष मूर्खपणाची वागणूक करणें.

द्रव्य संपूर्णः तया नसे शास्त्रज्ञान :—(महानु.) श्रीमंत माणूस बहुधा विद्याहीन असतो. वर पहा.

शास्त्रात् रूढिर्बलीयसी—शास्त्रापेक्षां रूढी, व्यवहार बलवत्तर होय. रूढी जर फार दिवसांची असेल व त्या गोष्टीला शास्त्राचा आधार नसेल तर रूढीलाच शिष्टजन मान्यता देतात.

शास्त्रांत पढावें आणि शेतांत खपावें—शास्त्र यावयास पठन पाहिजे व शेती चांगली होण्यास श्रम केले पाहिजेत.

शास्त्राला अंत नाहीं आणि मनुष्याला आयुष्य पुरत नाहीं—अनंत पारं किल शब्दशास्त्रं स्वल्पं तथायुर्बहवश्च विघ्नाः । Life is short, art is long.

शास्त्रें आलीं, रूढी पळाली—शास्त्रामुळें रूढी मागें पडत चालली. ' शास्त्रात् रूढिर्बलीयसी' या म्हणीच्या उलट म्हण.

शाळिग्राम—-काळा काळा शाळिग्राम, गोरा गोरा मुसलमान—-काळा माणूस शालिग्राम देवाप्रमाणें पूज्य असतो पण गोरा मुसलमानाप्रमाणें त्याज्य असतो; अशा अर्थानें लहान मुलें गोऱ्या मुलास चिडविण्यास म्हणतात. काळ्याची तरफदारी यांत आहे.

शाळू—-शाळू मित्र–सोबती—शेतांत शाळू पिकला म्हणजे तो खावयास जमणारे त्यावेळेपुरते मित्र; सुगीचे मित्र; खाबू सवंगडी; फक्त वेळेवर खावयास जमणारे पण कामाच्या वेळेस पळणारे मित्र; थोड्या दिवसाचा मित्र.

शिंक—-शिंकेचा शकून—आपण एखादी गोष्ट बोलण्याच्या वेळीं जर शिंक आली तर ती होणार असें मानतात व सत्य असें म्हणतात. ' रोज तुला शिंकेचा शकून पटतो'–तोबं २६.

शिंक म्हणे मी जोशी, पाद म्हणे मी परदेशी—शिंकेवरून शकून पाहातात व पादणाऱ्यास घालवून देतात.

शिकणें–शिकविणें—-न मिळे भीक तर कांहीं तरी शीक—अलीकडे शिकलेले लोक फार झाले असून ते बेकार असतात व त्यांस भिकाऱ्याइतकीहि प्राप्ति होत नाहीं यावरून म्हणतात.

शिकवलेली बुद्धि अपुरी तेणें कमी पडे शिदोरी-- उसनी अक्कल वेळेवर उपयोगी पडत नाहीं. शहाणपण उपजत लागतें तें शिकवून येत नाहीं व अशा पढवून दिलेल्या बुद्धीनें पोट भरतां येत नाहीं.

शिकवलेली बुद्धि आणि बांधलेली शिदोरी पुरत नाहीं–कामास येत नाहीं– वर पहा.

शिकेल त्याची विद्या—विद्या शिकल्यावांचून येणार नाहीं; जो शिकेल त्याला ती येईल. (गु.) शिखे तेनी विद्या. Learn not, and know not.

शिकंदर—मॅसिडोनियाचा राजा आलेक्झांडर हा फार दैववान् व वैभवशाली होता यावरून भाग्यशाली, शूर, धूर्त असा अर्थ होतो.

शिकंदर ताले—उचीचे ग्रह.

शिकंदर नशीब असणें—दैव अतिशय अनुकूल असणें.

शिकंदराची दिवाल—१ याजूज व माजूज नांवाच्या रानटी लोकांपासून संरक्षण व्हावें म्हणून शिकंदरानें बांधलेली एक अत्यंत भक्कम अशी भिंत. २ अढळ, अभेद्य गोष्ट. ' व खेही कायम राहील जैशी शिकंदराची दिवाल. ' –खरे ८७७.

शिकल—-शिकल उडणें—अवमान होणें; लज्जित होणें.

शिकल उतरणें—- १ तेज कमी होणें. २ अपमान करणें, होणें.

शिकस्त---**शिकस्त करणें**--पराभूत करणें; नाश करणें. ' गनिमांनीं कधीं मोंगलाशीं युद्ध करून मोंगल शिकस्त केला नव्हता. '-भाब ८१.

शिकस्त खाणें---हार खाणें. ' शिकस्त खाऊन तोंही फिरला।'-ऐपो २१०.

शिकस्त होणें---१ हताश होणें; दमणें; थकणें; निरुपाय होणें. २ नष्ट, भग्न होणें. 'फौज शिकस्त झाली.' -भाब ११. 'राजश्री सुभेदारांकडील लोकाची शिकस्त झाली. '-दिमरा २१६५.

शिकार---**शिकार उठायला आणि कुत्रं हागत उभे राहण्याला गांठ पडणें**---भलतीच गोष्ट मलत्याच वेळीं घडणें ऐनवेळीं फसगत होणें; लाभाच्या प्रसंगीं चुकणें.

साधली तर शिकार, नाहींतर भिकार---लागो भागो दिवाळी. द्राक्षें अंबट या प्रमाणें.

शिकारीच्या वेळीं कुत्रीं हगावीं---(महानु.) ऐनवेळीं किंवा ज्या वेळीं कर्तबगारी दाखवावयाची त्यासवेळीं मागें सरणें.

शिकारोखा---**शिकारोखा करणें-मिळवणें-दाखविणें-लावणें**---अधिकार गाजविणें; वर्चस्व, स्वामित्व ठेवणें.

शिंकाळें---शिंकें पहा.

शिंकाळ्याचें सुटलें, मांजराला फावलें---आयता लाभ. मांजर पहा.

शिंकें---**शिंक्याला हात पुरणें**---(व.) मुलगी वयांत येणें; ऋतुस्नात होणें.

***शिंकें तुटलें, बोक्याचें साधलें; शिंक्याचें तुटलें-सुटलें आणि बोक्याचें पिकलें-बनलें**---आयता लाभ होणें; अचानक प्राप्ति होणें.

शिंक्याला अंबा : खालीं मारा बोंबाः---(महानु.) अप्राप्य गोष्टीसाठीं हाव.

शिक्का---**शिक्का मोर्तब करणें**---सनदेवर शेवटीं अधिकाराची मुद्रा उठवितात व व्यवहार पुरा करतात. शेवट, समाप्त करणें; त्यासंबंधींचें श्रेय मिळविणें. ' हो, तोंवर दुसऱ्यांचें सगळें वाढणें होईल, मग आयत्यावेळीं बाईसाहेब हळूहळू शिक्का मोर्तब करावयाला येतील डौलानें ! '---आमच्या आयु० आठवणी १४५. ' त्या ठरावावर शिक्का मोर्तब करण्यासाठीं समीतीची बैठक मुंबईला बोलावली.'---केसरी.

शिक्का मोर्तब बसणें---कायम होणें. (उप.) दोषारोप येणें; दोषी ठरणें.-केसरी २७-५-३०.

शिखंडी---हा द्रुपदाचा पुत्र. हा प्रथम स्त्री असून नंतर पुरुष झाला. यावरून नपुंसक, तृतीय प्रकृति पुरुष या अर्थानें योजतात.

शिखर---**शिखरास जाणें**---पराकाष्ठा होणें.

शिखरास हात पोंचणें---कृतकृत्य होणें; मनोरथ सफळ होणें.

शिखरापुरीस जाणें---(विनोदानें.) गर्वाची बाधा होणें.

शिखरीं काठ्या लावणें---कान्होबाच्या मठीस येणारे भक्त लोक आपल्या निशाणांच्या उंच उंच काठ्या यात्रेच्या वेळीं शिखरास टेकतात. असें केलें म्हणजे यात्रा सफळ होते असें मानतात यावरून. ध्येय साध्य होणें; अंगीकृत कार्य तडीस जाणें.

शिखरीं पोट लागणें---पोट फुगणें, मोठें होणें, वाढणें.

शिखा---**शिखानष्ट**---मुसुलमान हे शेंडी ठेवीत नाहींत यावरून (ल.) धर्मलंड. ' शिखानष्टा दुष्टा करुनि राणें शिक्षा निजकरीं ! '-पु. बा. जोशी.

शिखा मागें लावणें---झेंगट मागें लागणें.

शिखासूत्रावर येणें---शेंडी उपटण्यास व जानवें तोडण्यास तयार होणें; संन्यास घेण्याची तयारी करणें; अतिशय वैतागणें.

शिखा स्वस्थानीं साजरी---जेथली गोष्ट तेथेंच शोभते. डोक्याची शेंडी काढून पाठीस लावली तर ती शेपटी सारखी दिसून पशुत्व येईल यावरून.

शिंग---**शिंग फुंकणें**---शिंग वाजवून सूचना देणें; जाहीर करणें; उघड रीतीने प्रसिद्धी देणें. ' त्याला शहाजीनें वजीरीच्या कामावरून काढवलें याचा अर्थ मोंगल सरकारशीं जंग सुरू केल्याचें त्यानें शिंग फुंकलें, असाच घेतला पाहिजे !'-शि सं. १.३.

शिंगावर घेणें---शिंगें मारणें; टक्कर घेणें; तोंड देणें, लढणें,

शिंगें असणें—कांहीं प्राण्यांस शिंगें असतात व कांहींस नसतात त्यांवरून त्यांतील फरक कळतो यावरून, भेद असणें (निषेधार्थी वापरतात.) 'दहा वाजण्याला कांहीं शिंगें आहेत काय ?'

शिंगें फुटणें—वासरें वगैरे वयांत आलीं म्हणजे त्यांस शिंगें फुटतात यावरून मोठें होणें, कळूं लागणें, अति शहाणपणा करणें.

शिंगें मोडून वासरांत-गोऱ्ह्यांत शिरणें—वांसरांस शिंगें नसतात म्हणून गाईनें आपलीं शिंगें मोडून ती जर वांसरांत जाऊन बसली तरी तिला कोणी वासरूं मानणार नाहीं यावरून १ जाणत्या माणसानें पोरकटपणा करणें. २ अज्ञपणाचें ढोंग करणें.

***शिंग तिकडें शिंगोटी**—[शिंगोटी=शिंगाच्या जनावराच्या विक्रीवर कर] शिंगाचें जनावर म्हटलें कीं सरकारी कर आलाच. मुख्य गोष्टीबरोबर आनुषंगिक गोष्टी असतात.

शीग तिकडे शिंगोटी, गांड तिकडे लंगोटी—वरप्रमाणेंच.

शिगमा—शिमगा पहा.

शिगमो सल्लो कवता उर्लो—(गो.) शिमगा संपला तरी त्याचें कवित्व शिल्लक राहातें. सुखाचे प्रसंग निघून गेल्यावर हीनदशा प्राप्त होते त्याला उद्देशून म्हण.

शिगम्यांत पावस, चौथींत गीम—(गो.) शिमग्यांत पाऊस आणि गणपतीच्या वेळीं ऊन हें सृष्टिनियमाविरुद्ध घडणाऱ्या कांहीं गोष्टीप्रमाणें आहे.

शिंगरूं—'' घोडें मेलें ओझ्यानें आणि शिंगरूं यडताकानें-हेलपाट्यानें—घोडा पहा.

शिजणें—शिजता थी कर्पतां—(गो.) शिजणें तिथें करपणें. पुष्कळशा चांगल्या गोष्टी होतात त्यांत एखादी वाईटहि व्हायचीच. म्हणून त्याबद्दल खेद करणें योग्य नव्हे.

शिजलेला भात जेवावयास काय ?—आयती वस्तु मिळाल्यावर ती कोणीहि घेईल.

शिजलेला माझ्या घोवाक वाढ, तुझ्या घोवाक भुकेचो उपाय सांगतय—(कों.) केवळ आपला स्वार्थ पाहणें.

शिजे तंव धीर नाहीं त्यास पिकेपर्यंत धीर कोठचा ?—अधीर मनुष्यास अल्पहि धीर नसतो.

शिजे तों धीर धरवतो पण निवे तों धीर धरवत नाहीं; शिजेपर्यंत दम निघतो पण निवेपर्यंत दम निघत नाहीं—मनुष्य प्रथम पुष्कळ धीर धरून असला तरी अखेरी अखेरीस फलप्राप्तीच्या ऐनवेळीं फार उतावीळ होतो. 'हिंदुस्थानांत परत जाण्याची वेळ लांब असली म्हणजे कांहींच वाटत नाहीं, ती वेळ जसजशी जवळ येईल तस तसें मन अधिकच अधीर होतें. शिजेपर्यंत दम निघतो; पण निवेपर्यंत धीर धरवत नाहीं.'–कॅ. लिमये, सैन्यांतील आठवणी, पान ६२.

शिटाऊ—शिटाऊ बंदर—लबाड, सोदे, भामटे वगैरे तऱ्हेच्या लोकांनीं भरलेलें बंदर. 'गुरुजी या परिचे। सिष्य शिटाऊ बंदरीचे !॥'

शिटाऊ बंदरी—धूर्त; ठक; सोदा.

शिटाचें शिंगरूं—हीन अवलादीचा घोडा.

शिंतोडा—शिंतोडा टाकणें उडविणें—(घाणींत किंवा घाणेरड्या पाण्यांत दगड टाकल्यास त्याचे शिंतोडे अंगावर उडून अंग किंवा कपडे घाण होतात.) थोडासा दोष, कलंक लावणें; कुत्सितपणें बोलणें.

शिंदळ—शिंदळ धरावी खाटीं-खाटेवर, चोर धरावा हाटीं—वाटेवर मनुष्यास मुद्देमालासकट पकडून त्याच्या अंगीं गुन्हा लावावा.

शिंदळ रांडेला बाऱ्या बुध्या, कपाळ फोडून बांधिल्या चिंध्या—व्याभिचारी स्त्री अनेक प्रकारचीं ढोंगें करते व कपट दाखविते.

शिंदळाची आई, गुराख्याचें आलें, आणि कुणब्याचें गेलें—कळून येत नाहीं.

शिंदळाची आई, चोराची नाहीं—एकूण एकच.

शिंदळीच्या दारीं हत्ती पण सतीच्या घरीं नाहीं बत्ती—जगामध्यें दुर्जनांची भरभराट व सज्जनांची दैन्यावस्थाच दिसून येते.–अग्रणी १-७-४०.

शिंदळीनें शिंदळपण केलें पातिव्रतेचें मन कां गेलें—नीच मनुष्यानें दुर्वर्तन केलें तर त्यांत कांहीं नवल नाहीं पण सज्जनाच्या हातून किंचितहि चूक झाल्यास ती मात्र सहन होत नाहीं.

शिंदळीला पोराची कसली आशा; शिंदळीला पोराची आशा आहे—व्यभिचारी स्त्री व्यभिचार

करणें तो स्वतःच्या सुखासाठीं, मूल होण्याच्या आशेनें नव्हे. दुर्जन प्रत्येक गोष्ट स्वार्थी हेतूनेंच करीत असतो.

शिंदळकी धरावी शेजे--गुन्हेगाराला मुद्यासह पकडावा.

शिदें--शिदेंभरि बिकडा आशिल्लो पावसांतु भाईर पण्णा--(गो.) टोपलीभर आठळ्या ज्याच्या घरीं आहेत तो पावसांत बाहेर पडत नाहीं. ज्यानें पावसाळ्याची शिधासामुग्री घरांत भरून ठेवली असेल तो त्या काळांत सुखानें राहातो.

शिदोड--शिदोडासारखें फुगणें--[शिदोड= गांडूळ] (व.) व्यर्थ रुसून बसणें.

शिदोरी--शिकविलेली बुद्धि आणि बांधलेली शिदोरी--शिकविणें पहा.

शिंप--शिंप मारणें-उतरणें--तिरकस काप देणें.

शिंपेला पोट लागेस्तूर खाणारा--अतिशय अधाशी.

शिंपियानीं दर्या उसपुं येता--(गो.) शिंपल्यांनीं पाणी उपसलें म्हणून समुद्र रिता पडत नाहीं.

शिंपणें--शिंपणीचा ऊंस--पाटाच्या पाण्यावर होणारा ऊंस. याचे उलट पुरणीचा ऊंस.

शिंपळगांवचा पिंपी--वर्णव्यत्यासाचें उदाहरण. एक शिंपी रानांतुन चालला असतां त्यास चोरांनीं धरलें तेव्हां तो अतिशय घाबरला व त्यांनीं तूं कोण म्हणून दरडावून विचारतांच घाबरून पिंपळगांवचा शिंपी म्हणण्याऐवजीं शिंपळगांवचा पिंपी असें म्हणाला.

शिपाई--शिपाईगिरी करणें--(ऐति. म्हण.) मर्दुमकी दाखविणें; क्षात्रधर्म पाळणें. 'जरूर संकट पडलें तेथेंच नेटून शिपाईगिरी करावी.'

***शिपायाच्या पोरा तुला कशाला हवी गुरूकिल्ली, छातीवर बंदूक,पड खालीं**--शिपायाच्या मुलाला युद्धाशिवाय दुसऱ्या कांहीं गोष्टींत गम्य नसतें.

शिंपी--शिंपी कापड चोरतो व चोरल्याबद्दल शिलाई मागतो--शिंप्याकडे कपडा शिवायास दिला म्हणजे तो दिलेल्या कपडांतील कांहींतरी कापड चोरून ठेवतोच व वर आणखी पैसे मागतो.

सोनार शिंपी कुळकर्णी आप्पा--कुळकर्णी पहा.

शिंप्याचा कसा-खिसा आणि दळणारणीचा पसा--शिंपी थोडेंतरी कापड चोरतो व दळणारीण पसाभर तरी पीठ किंवा धान्य चोरून नेतेच. दळणें पहा.

शिंप्याच्या घरीं सुई कारभारीण--शिंप्याचा सर्व कारभार सुईवर अवलंबून असतो.

शिंप्यानें कातरलें, लोहारानें ठोकलें--या गोष्टीबद्दल तक्रार करून उपयोगी नाहीं, तो त्यांचा धंदाच आहे.

शिंप्याला सुई, कुटुंबाला बाई--ज्याप्रमाणें शिंप्याचें सुईवांचून चालत नाहीं त्याप्रमाणें कुटुंबांत स्त्री असल्याशिवाय चालत नाहीं.

शिबरी--शिबरी करणें--बैलानें गाईचें मलमूत्र हुंगून तोंड वर करणें; कामविकारयुक्त होणें.

शिमगा--शिमगा करणें--१ बोंबलणें. २ निंदा करणें; खडे फोडणें.

शिमग्याचा मंत्र--बोंब; शंखध्वनि.

***आहे-असेल ते दिवस दिवाळी, नाहीं-नसेल ते दिवस शिमगा**--मनुष्यानें वैभव आहे तोंवर भोगून घ्यावें, नसेल तेव्हां दारिद्र्य हें आहेच. कांहीं लोक जवळ असेल तेव्हां बेसुमार खर्च करतात व जवळचें सरलें म्हणजे अगदीं दीनवाणे होतात. त्यापेक्षां नियमितपणें राहिल्यास दैन्याची पाळी येणार नाहीं.

शिमगा गेला-जाई आणि कवित्व राहिलें-राही--शिमग्याचा सण संपला तरी त्यांतील अश्लील उखाणे बरेच दिवस मुलांच्या तोंडीं राहतात. एखादी वाईट गोष्ट घडली म्हणजे तिचे परिणाम तावडतोब नाहींसे न होतां कांहीं दिवस तरी मागें राहिल्याशिवाय राहात नाहींत. शिगमा पहा.

शिमग्याच्या आधींच बोंब--एखादी गोष्ट होण्यापूर्वीच तिच्याबद्दल आरडाओरड, तक्रार करणें.

शिमग्याच्या तेलाला धार ना बोळ--धर्मार्थ मिळालेल्या गोष्टीच्या गुणांकडे फारसें लक्ष्य देण्यांत अर्थ नाहीं.

शिरजोर--चोर तो चोर घरधन्याहून शिरजोर--चोर पहा.

शिराळशेट--शिराळशेट(टी)चें राज्य--क्षणभुंगर ऐश्वर्य. पूर्वी विजापूर येथें एक शिराळशेट या

नांवाचा सावकार होता; त्याचेवर बादशहाची मर्जी प्रसन्न होऊन त्यानें त्यास साडेतीन घटका राज्य करण्याची परवानगी दिली. तेवढ्या वेळांत त्यानें अनेक लोकांस इनामें सनदा वगैरे कायमच्या देऊन टाकल्या. सर्व साडेतीन घटका तो सारखा सनदांवर शिक्के ठोकीत होता. साडेतीन घटका भरल्यावर त्याची सत्ता गेली. यावरून क्षणिक वैभव; ऐश्वर्य. याच्याबद्दल महाराष्ट्रांत श्रावण वद्य पष्ठीस उत्सव करण्यांत येतो

शिर्ल्य--शिर्ल्य सणके रघत पिवप—(गो.) पालीसारखें दुसऱ्याचें रक्त पिऊन राहणें. पाल कांहीं अंतरावरून माणसाचें रक्त शोषून घेते असें म्हणतात. ही म्हण हांजीहांजी करून पोट भरणाऱ्या परान्नपुष्ट माणसाला चांगलीच लागू आहे.

शिलंगण--शिलंगणाचें सोनें पाहिजे त्यानें लुटावें—दसऱ्याच्या दिवशीं शिलंगणास जातात व आपट्याचीं पानें सोनें म्हणून आणतात व वांटतात. त्या पानांची कांहीं किंमत नसल्यामुळें कोणीहि वाटेल तेवढीं तीं घ्यावीं; त्यास कांहीं धरबंद नसतो. दसरा हा लष्करी स्वारीस आरंभ करण्याचा दिवस असल्यामुळें लढाईंत आणलेली लूट वांटून घेण्यावरून ही चाल पडली असावी.

शिलेदारी---शिलेदारी करणें—चैन करणें; रंगढंग करणें.

शिलेदाराची झोळी—भाल्यावर भाले आडवे टाकून केलेली शय्या. शिलेदाराच्या शूर मरणानंतर दिलेला मान. 'आमचे शिलेदाराची झोळी हीच पालखी.'

***आयजीच्या जिवावर बायजी उदार, बहिणीच्या जिवावर भाऊ शिलेदार**--दुसऱ्याच्या जिवावर चैन करणें; मोठेपणा मिरविणें. आयजी पहा.

शिलेदारबुवा, सणकाडीचा दिवा—नांव मोठें, लक्षण खोटें.

घरमें नहिं जवारी, बहार करताय शिलेदारी—(हिं.) बाहेर भपका पण घरीं दारिद्र्य.

शिलेदारी झोंक, पगडीला भोंक—(माळवी.) वरवर डामडौल पण आंत कांहीं नाहीं. अगा अगा देसाया० पहा.

शिव---शिवचतुर्दशी--माघकृष्ण चतुर्दशी; महाशिवरात्र.

शिवदीक्षा घेणें--(थट्टेनें.) वैरागी बनणें; राख फासणें.

शिवपंचाक्षरी मंत्र-- ॐ नमःशिवाय हा मंत्र.

शिवमुहूर्त—सूर्योदयाबरोबरचा पहिला मुहूर्त, सकाळच्या साडेतीन घटकांचा काल.

शिव शिव करणें-म्हणणें—१ दुःखोद्गार काढणें; खेद दर्शविणें. २ तिरस्कार, उद्वेग दाखविणें.

शिव शिव! हे प्राणनाथ !—(नाट्य.)शोकाची नांदी. मराठी भाषेंत पदांच्या पहिल्या चरणाला जसें ध्रुवपद लागत असतें तसें पौराणिक नाटकांत पूर्वी नायिकेच्या शोकाच्या आरंभीं स्त्री पात्रानें 'शिवशिव हे प्राणनाथ,' किंवा 'हरहर ! रे परमेश्वरा! ' असें म्हणून शोकास आरंभ करावयाचा असे. जसें हरिश्चंद्राची तारामती, उत्तररामायणांत सीता, द्रौपदीवस्त्रहरणांत द्रौपदी अशा पात्रांना वरील शब्दांनीं शोक करावा लागे.-शं. बा. मुजुमदार.

शिवाची पूजा— ही पूजा बारा वर्षे करूनहि एक दिवस चुकली कीं व्यर्थ होते. यावरून अतिशय कडक व्रत.

शिवावरचा बेल उचलणें-काढणें-घेणें—एक प्रकारचा शपथविधि. दिव्य करणें.

***शिवावरचा बेल चुकेल पण हें चुकणार नाहीं**—एखादी कधींहि न टळणारी गोष्ट दाखवितांना योजतात.

शिव भेटे, संशय फिटे—परमेश्वरच प्रत्यक्ष भेटला म्हणजे मग कोणत्याच संशयास जागा राहात नाहीं. जीव व शिव यांच्या ऐक्याची खूण पटली म्हणजे सर्व मायाजालाचा निरास होतो.

शिवस्य हृदयं विष्णुः विष्णुस्य हृदयं शिवः—(अशुद्ध पाठ) शिव व विष्णु हे एकरूपच आहेत त्यांमध्यें अभेद आहे असें हा वाक्प्रचार दाखवितो. शिवाय विष्णुरूपाय विष्णुश्च शिवरूपिणी । शिवस्य हृदयं विष्णुः विष्णोश्च हृदयं शिवः ॥

शिवस्व—शिवाला अर्पण केलेली किंवा वाहिलेली वस्तु; अशी वस्तु घेणें हे पातक होय. यावरून जी वस्तु घ्यावयाची नाहीं, जीस स्पर्श करावयाचा नाहीं अशी वस्तु. 'रावणा तुझीं दहा शिरें। मीच छेदितों नखाग्रें ॥ परी तीं शिवस्व अपवित्रें। म्हणोनी करें स्पर्शेंना।'-एकनाथ-अंगदशिष्टाई.

शिवकांची——शिवकांचीचे चोर—(गो.) शिवकांचीचे म्हणजे कांजीवरमचे सोदे. दिल्लीचा सोदा, पुण्याचा भामटा याप्रमाणें.

शिवरात्र——शिवरात्र, जितना दिन उतनी रात्र; शिवरात्र, जेवढा दिवस तेवढी रात्र—शिवरात्रीला रात्र आणि दिवस सारख्या तासांचे असतात.

शिवण——तोंडाला शिवण बसणें—तोंड शिवलेलें असणें. तोंडांतून शब्द बाहेर न येणें; बोलावयास जागा न राहणें. 'तोंडाला कां शिवण बसली?'–सूर्यो २१६.

शिवणें——शिवतां सरेना, खातां पुरेना—ज्याप्रमाणें मनुष्याला रोज अन्न खावें लागतें त्याप्रमाणें वरचेवर कपडेहि शिवणें अवश्य असतें. या दोन्ही गोष्टी कायमच्या मागें लागलेल्या आहेत.

शिवणें——शिवावयाचें नसणें—रजस्वला असणें; विटाळशी बसणें.

शिवाशिव करून घेणें—(बायकी.) हजामत करून घेणें. २ विटाळ करणें, कालवणें.

शिवूं नयेशी–शिवूनशी होणें—अस्पर्श, विटाळशी होणें.

शिवरा——शिवरा भिंवरा पिकणें—मूळ सीना आणि भीमा यांच्या कांठची शेतें पिकणें असा अर्थ; पुढें सामान्यार्थी धान्य, शेत, पिकणें; पीक येणें.

शिवरात्र——एकादशीच्या घरीं शिवरात्र पाहुणी—उघड्यापाशीं नागडा गेला याप्रमाणें. समान दरिद्री असल्यावर परस्परांना काय मदत होणार? 'ब्रिटनच्या साहाय्याविषयीं बोलावयाचें तर एकादशीच्या घरीं शिवरात्र पाहुणी असेंच म्हणावें लागेल.'—केसरी २६–९–४६.

शिवा——शिवालिखित—पार्वतीनें लिहिलेला मुहूर्त, ज्योतिष, शुभाशुभ वेळ. 'शिवालिखिताचे मुहूर्तें रात्रीं बाहेर निघाले.'–भा ब. ८६.

शिवाजी——जिवा तोवर शिवा;होता जिवा म्हणून बचला–वांचला शिवा—(शिवकालीन म्हण.) जिऊ महाला हा शिवाजीचा अंगरक्षक होता. अफजुलखान वधाच्या प्रसंगीं यानें शिवाजीस वांचविलें होतें. महाला म्हणजे न्हावी.–शिवादिग्विजय व भाइसं. पंचसंमेलनवृत्त. जिवा पहा.

शिवापूर——शिवापूरचा राया अन् आजूबाजूच्या आयाबाया—(वांय.) (शिवाजी) एकच फक्त शूर, बाकीचे भागूबाई. तु०–एक बाजी और सब पाजी.

शिंशप——शिंशपाचोद्य—[शिंशप=अशोक वृक्ष] रावणानें सीतेस अशोकाच्या वृक्षाखालींच किंवा अशोकवनांतच कां ठेविली यासंबंधीं चर्चा. (ल) व्यर्थ काथ्याकूट.

शिश्न——शिश्नोदरपरायण—केवळ खाऊन पिऊन चैन करणारा; भोजनार्थी व कामार्थी.

शिष्ट——शिष्टाई करणें—मध्यस्थी करणें; सामोपचाराच्या गोष्टी सांगून कलह मिटविणें.

शिष्टाचार करणें—१ लोकव्यवहारास अनुसरून एखादी गोष्ट करणें. २ केवळ वाईट दिसूं नये म्हणून वरवर करणें (मनापासून नव्हे) लौकिकासाठीं एखादी गोष्ट करणें.

शिष्ट——शिष्ट तेवढें अयाशिष्ट—जेवढें अतिशय योग्यतेचें तेवढेंच तग धरीत असतें. Survival of the fittest.

शिष्टागमने अनध्यायः—(सं.)पाहुणा आला असतां गुरूस त्याच्या बरोबर बोलावयाचें वगैरे असल्यामुळें त्या दिवशीं शिष्यांस पाठ देतां येत नाहीं. याकरितां त्या दिवशीं सुटी देण्यांत येत असे

शिष्य——शिष्य पडला, गुरु अडला—मार्गामध्यें शिष्य पुढें व गुरु मागें असें चालत असतात. शिष्य पुढें असल्यामुळें वाटेंत त्यास ठेंच वगैरे लागून तो पडला कीं, गुरु सावध होऊन पुढें पाऊल टाकीत नाहींसा होतो. दुसऱ्याच्या चुकीवरून शहाणपण शिकणें. किंवा शिष्याच्या अनुपस्थितीमुळें गुरूचें कार्य अडून बसणें.

शिश्यागेल्या चुकीक गुरुक दंड—(गो.) शिष्याचा अपराध आणि गुरूला दंड.

शिष्याचा अपराध, गुरूला दंड—वरप्रमाणें.

शिष्याचें करणें, गुरूला आलें धरणें—शिष्याच्या दुष्कृत्यामुळें गुरूस त्रास भोगावा लागतो. तु०–राजश्चामात्यजा दोषाः पत्नी दोषास्तु भर्तरि । तथा शिष्यार्जितें पापं गुरुः प्राप्नोति निश्चितम् ॥

शिष्याचे कान गुरुचे हातीं—चेला पहा.

शिष्यादिच्छेत्पराजयम्—(सं.) शिष्यानें आपल्यावर ताण करावी असें खरे गुरु इच्छितात. ' प्रार्थुनि मागाति पुत्रच्छात्रांपासुनि भले परिवातें ।'-मो उद्योग १३-१७२. 'अर्थात् शिष्यादिच्छेत्पराजयम् ह्या प्रकारची अत्युच्च आनंदाची स्थिति, वर्ष दीड वर्षांपूर्वी आपला धाकटा भाऊ शाळेंत जात नाहीं म्हणून, खट्टू झालेल्या विनायकरावांस अनुभवण्यास मिळून दोघे भाऊ अत्यंत प्रेमानें एकजीव झाले.'—छच १७.

शिष्यीण—शिष्यिणीशीं भक्ति : केव्हां मिळे गुरुमूर्ति—(महानु.) साधकाचें प्रेम शिष्यिणीवर जडल्यावर गुरूचा प्रसाद त्याला कधीं मिळणार ?

शिष्यापराधे गुरोर्दंडः—(सं.) शिष्याच्या चुकीचा भुरदंड गुरूला. वर पहा.—शाव २-१९८ "बॉसवेलच्या ग्रंथाविषयीं लिहिण्याचा जेव्हां प्रसंग आला तेव्हां वरील टीकाकारानें ' शिष्यापराधे गुरोर्दण्डः ' या न्यायाचा विपर्यय करून बिचाऱ्या शिष्यावर आपली लेखणी मनमुक्त झाडून घेतली. "—नि.

शिसरी—शिसरी दोळ्यांतुले उदक, फालसाक भुलताती लोक—(गो.) नक्राश्रु हे नेहमीं खोटे असतात, पण खोट्या वस्तूलाच जग अधिक भुलतें.

शिस्त—शिस्त धरणें—हत्यार उपसणें; कडक अंमल चालविणें. ' हिंदुधर्मावर त्यांनीं फारच शिस्त धरली.'—पामो ७.

शिस्तवी करणें—नेम धरणें.

शिळा—शिळा बिब्बा—फार चेंगट, धिमा माणूस.

शिळी ओटी—गर्भाधानविधीनंतर दुसऱ्या दिवशीं सकाळीं आई मुलीची ओटी भरते ती.

शिळया कढीला ऊत आणणें—शिळी कढी नुसती ठेवली तर कढ येत नाहीं पण तिच्याखालीं विस्तव पेटविला तर ती शिळी असली तरी पुन्हां उकळूं लागते. यावरून मिटलेलें भांडण पुन्हां उकरून काढणें. जुने वाद उकरून काढणें. (मूळ फारसी म्हणीवरून)

***शिळा कुटका उरेना : नांव अन्नपूर्णा**—(महानु.) नांव सोनूबाई० याप्रमाणें निरर्थक नांव.

शिळी भाकर ताकानें गोड व वाईट बायको पोरानें गोड—भाकर पहा.

शिळं पाकं खाल, तुम्ही बांगडीसे व्हाल—शिळें पाकें खाऊं नका, वाळाल !' असें बायकोचें नवऱ्याला काळजीनें सांगणें किंवा वरून दिसावयास गौरवाचें पण आंतून खवचटपणाचें सांगणें. नवऱ्यास शिळें पाकें चांगल्या निमित्तानें घालणाऱ्या बायकोचे शब्द. शिळें खालें तर मनुष्य बांगडीसारखा वाळका होईल.

शीं—शियांसारखें दुहेस ना शियात कोन मेलोसो ना—(गो.) थंडीसारखें दुखणें नाहीं पण थंडीनें कोणी मेला असें झालेलें नाहीं.

शीं करतली शिलीना आनि का करतलो कावळो ना—(गो.) शी ! असा शब्द करणारा सरडा नाहीं कीं का ! करणारा कावळा नाहीं. असा निर्जन प्रदेश; अगदीं एकटें असणें.

शीग—शीग सोडणें—(व.) संगत सोडणें.

शीग माप देणें—शीग लागेल असें मापून देणें. १ चांगलें माप देणें. २ चांगली भरपाई करणें.

शिगेस चढणें—शिखरास जाणें; पूर्णत्वास पोंचणें. 'कीं बहु चढला तुजा मद शिगेला ।'—मोउद्योग १३.३३.

शीड—शीड अर्या करणें—शीड उतरणें; शीड गुंडाळणें.

शीड उतरणें—(ल.) अपयश येणें; मानहानि होणें.

शीड उभारणें-हाकारणें—१ शीड लावून वारा धरणें; गलबत चालू करणें. २ (ल.) भरभराट होणें.

शीड चढणें—उत्कर्ष होणें; ऐश्वर्य प्राप्त होणें.

शीड धरणें—(ल.) घोड्यानें चालतांना ऐटीनें मान वर करणें.

शीण—शीण भीण फिटणें—वयांतील अंतरामुळें वाटणारा आदर, भीति, दरारा कमी होणें.

शीण भीण फेडणें—आदर, भीति कमी करणें.

शीत—शीत सुता संमंद—(गो.) अन्नवस्त्राचा संबंध.

शितापुडँ मीठ खावप्—(गो.) भाता आधीं मीठ खाणें. उतावळेपणा.

***शीत ना रोस, जांभ्या फळार**—(गो.) ना भात ना आमटी, फक्त जांभयांचा फराळ.

शीत राहिलं हंड्या तर झोप नाहीं ठांड्या—

अधाशी मनुष्याला घरांत अन्न असलें तर तें खाल्ल्या-वांचून झोंप येत नाहीं.

शीत शिज्जुनु पेज जली--(गो.) शिजलेला भात जर बराच वेळ शिजत राहिला तर त्याची पेजच तयार होते. तांदुळ पाणी असलेल्या भांड्यांत घालून उकळवतात, कांहीं वेळां नंतर तें पाणी काढून टाकतात. जर पाणी काढून टाकलें नाहीं तर सर्व भाताची पेजच तयार होते. प्रत्येक गोष्टीला काळवेळ आहे

शिता आसल्यार भूतां जायतीं—(गो.) तुमच्या जवळ भरपूर अन्न असेल तर तुमच्या भोंवतीं भुतें जमतील. श्रीमंत माणसाभोंवतीं स्तुतिपाठकांचा व मित्रांचा घोळकाच असतो. तु०-'शितें जोंवरी भुतें भोंवतीं, कोण कुणाचा सरवा जिवा।'. असतील शितें तर मिळतील भुतें.

शितावरून भाताची परीक्षा—अल्पांशावरूनहि सर्व पदार्थांची परीक्षा करतां येते; चांचणी घेतली असतां सर्व गोष्टींचे गुणावगुण कळतात. 'येणेंचि सिद्धि कळली, जाणति एकेंहि; बायका, शीतें।'-मोद्रोण १५.७१. -आजोच २०३. Every bird is know nby its note.

असतील शितें तर मिळतील भुतें—शिता असल्यार० पहा." 'असलीं०' ही सर्वत्र चाल आहे परंतु ज्या काली नवती सिते तीं मिळवावयाची भुते याचा सीलसिला मागील आपल्या ध्यानांत आहेच."—बापूगोप १२८.

जेथ शीतें ः तेथ भूतें—(महानु.) 'असतील शि०' पहा.

शीर---शीर-शिरें उचलणें--१ वर डोकें काढणें; पुढें येणें. २ प्रबळ होणें. 'लेकिन ज्यांनीं ज्यांनीं हिंदुस्थानांत शिरें उचललीं, त्यांचीं शिरें पाटीलबावांनीं फोडिलीं.'-ऐ. टि. भा. १-ले. १३.

शीर उतरून ठेवणें--मान कापून घेणें; स्वतःचा जीव घेणें. 'महाराज, मी आपलें शिर उतरून ठेवलें तरी आपणाला माझा विश्वास येणार; नाहीं तर माझा निरुपाय आहे.'-शाब्र ३. २३.

बसण्याला शीर काढून हांथरणें--बसावयास शीर देणें; प्राणार्पण करणें. 'बसल्याला सिर काढून हातरू। अडल्या वेळेस नको रागे भरूं।'-होला ७९.११५.

शीर मुंडणें—संन्यास घेणें.

म्हणा १...६८

शीर हातावर घेणें--१ धाडसाचें काम करावयास सिद्ध होणें. २ जिवावर उदार होणें.

शीर साष्टांग नमस्कार— नमन; नम्रपणानें केलेला सपशेल आडवा नमस्कार. १शीर, २खांदे, २हात, २पाय, १ छाती (अष्टांग) टेकून केलेला नमस्कार.

शिरा तोरा असणें; शिरातुरा असणें--वरचढ असणें.

शिरातोरा-शिरातुरा लावणें-दाखविणें-मिरवणें -वर्चस्व गाजविणें.

शिरावर असणें-जागें राहणें; शिरीं असणें--एखाद्याच्या संरक्षणासाठीं तत्पर असणें. 'श्रीरामा तूं स्वामी अससी माझ्या शिरावरी जागा ॥'-मोकेका आर्या. 'शिरीं आहे रामराज। औषधाचें कोण काज।'-रामदास.

शिरावर घेणें--अंगावर जबाबदारी घेणें, पत्करणें. 'पेशवाईच्या संरक्षणाची जोखीम आम्हीं आमच्या शिरावर घेतली आहे.'-अस्तंभा १७.

शिरीं भार वाहाणें--जबाबदारी पतकरणें. 'शिरीं भार वाहेन बोले पुराणीं।'-राम ३४.

***शीर सलामत तों पगड्या पचीस-पचास--**स्वतः मनुष्य खंबीर असेल व जीवंत राहील तर पुढें तो अनेक पराक्रम करण्याची शक्यता असते.

शीर सलामत तर पगड्या पंचाएेशीं--वरप्रमाणें. -पामो ५८५. दाजी १.१९.

शीर सुरी तुझ्या हातीं-सर्वस्वीं दुसऱ्याच्या आधीन होणें; पूर्णपणें दुसऱ्याच्या ताब्यांत जाणें; दुसऱ्यावर अवलंबून असणें.

शीर---शिरा घेणें; शीर घेणें-काढणें-तोडणें-देणें--शीर तोडून रक्त काढणें.

(जनावराला, बायकोला) शीर फुटणें--दूध वाहूं लागणें.

(घोड्याला, पोराला) शीर फुटणें— जोरानें वाढीस लागणें.

शिरा ताणणें—जोरानें, मोठ्यानें बोलणें.

शिरा ताणणें-ताणून ओरडणें-बोलणें-भांडणें रडणें-वाद करणें— मोठ्यानें, जोर जोरानें हांका मारणें.

शिरा-शीर तोडणें—(घोडा) खची करणें.

शिरा निघणें—कृश होणें; अशक्त होणें.

शिरा फुगवणें—रागानें शिरा तटतटून उठणें.

शींव—-शिंवेवरून वारा न जाणें—संबंध नसणें; स्पर्शहि नसणें; अलिप्त असणें. ' शिवावरून न गेला हो निंद्य कर्मपर्वत ।'—दावि. ७.२८७.

शिवाणीं उभा न करणें-उभा न राहूं देणें—दाराशीं, हद्दीशीं उभा न करणें.

शिवेंवयलें मढें— (गो.) दोन गांवच्या शिवेवर मढें पुरलें कीं तें दोन्ही गांवांच्या भांडणाला कारण होतें.

शुक—-शुकनालिका न्याय—पोपट धरण्याकरितां एक नळी टांगून ठेवतात. ती नळी फिरत असते. पोपट वर बसला व हलला कीं ती फिरून तो खालीं येऊन उलटा टांगला जातो पण तो पायांत ती नळी घट्ट धरून ठेवतो, सोडीत नाहीं; त्यामुळें टांगलेला राहतो. त्यास पाय सोडल्यास पडूं अशी भीति वाटत असते, यामुळें पाय न सोडल्यामुळें तो बंदिवान होतो व पारध्यास सांपडतो. 'शुकें नळिकेशीं गोवियेले पाय। विसरोनि जाय पक्ष दोन्ही ।।' —तुगा ३०५२.

शुकपाठ—पोपटपंची; नुसतें बोंडानें बडबडणें. ' पहिल्या पिढींत सुधारणेचा शुकपाठ झाला तो पुरा झाला.'—भावबंधन पा. ४१.

शुकाचार्य—शुकाचार्य हे अत्यंत विरक्त असे योगी व आजन्म ब्रह्मचारी होते. यावरून अत्यंत विरक्त ब्रह्मचारी, निरभिलाषी; विशेषतः स्त्रियांपासून अलिप्त असा मनुष्य.

शुक—-शुक असणें-होणें—निर्जन, शांत होणें.

शुक करणें—मांजराला हांकलतांना शुक असा शब्द वापरतात. यावरून निवारण, प्रतिबंध करणें.

शुक्र—-शुक्राचार्य—शुक्राचार्यांचा एक डोळा वामनानें फोडल्यामुळें तो एका डोळ्यानें अंधळा होता. यावरून एका डोळ्यानें अंधळा असणारास म्हणतात.

शुक्र—-शुक्रकाष्ठ—मूळ शब्द शुष्ककाष्ठ=गुरांच्या गळ्यांत लोढणें बांधलेलें असतें तें; यावरून एखादें गळ्यांत आलेलें लचांड; एखादी मागें लागलेली ब्याद; एकसारखा पाठीस लागलेला मनुष्य.

शुक्रकाष्ठ (पाठीस) लागणें—एखादें लचांड मागें लागणें. ' आत्महत्येचें शुक्रकाष्ठ आपल्याच मागें लागेल म्हणून.'—दाजी १.१०२.

***बोलायला गेलें सुपाष्ट,पायीं पडलें शुक्रें काष्ट**—एका बाईनें अधिक स्पष्ट बोलून आपल्या नवऱ्यावर खोड्यांत पडण्याचा प्रसंग आणला अशी एक गोष्ट आहे. यावरून नसत्याच भानगडींत तोंड घातलें असतां अंगावर चोरपड येते.

शुचि—-शुचिभूमिगतं तोयं—जमीनींतील पाणी नेहमीं स्वच्छ असतें. शुचिभूमिगतं तोयं शुचिर्नारी पतिव्रता । शुचिः क्षेमकरो राजा संतोषी ब्राम्हणः शुचिः ।। --सुर १५६.१४३.

शुचिर्नारी पतिव्रता—पतिव्रता स्त्री ही नेहमीं शुद्ध असते. वर पहा.

शुचिर्भूतपणा हाच मुळीं दैवी अंश होय—शरीर सर्व प्रकारें शुचिर्भूत असलें कीं मन पवित्र राहूं शकतें व मन शुद्ध व सरळ असलें तर आपलें अखिल जीवन पवित्र होतें.—वैद्यकृत चंदावरकरचरित्र.

शुद्ध—-शुद्ध गोष्ट लोकविरुद्ध झाली, ती आचरूं नये कदा काळीं—लोकमताविरुद्ध मुळींच जाऊं नये. यद्यपि शुद्धं० पहा.

शुद्धबीजा पोटीं । फळें रसाळ गोमटीं॥—तुकाराम. चांगल्या बीपासून चांगलाच वृक्ष निर्माण होऊन त्यास रसाळ फळें येतात. जसें बी तसा वृक्ष. झाड तसें फळ.

शुद्धि—-शुद्धीवर आणणें—देहभानावर आणणें; ताळ्यावर आणणें.

शुद्धीवर येणें—सावध होणें; दोष, व्यसनें इ. टाकून नीट वागणें.

शुनि—-शुनिया नांव मोगरा : तो नेयोनय देवद्वारा—(महानु.) कुत्र्याचें नांव मोगरा असें आहे तथापि तो देवळाच्या बाहेरचा ठेवावा. तु०-पायींची वाहाण, पायींच छान.

शुभ—-शुभ बोलरे नाऱ्या, मांडवाला आग लागली; शुभ बोलरे नाऱ्या, बोडक्या झाल्या साऱ्या—तारतम्यज्ञान नसलेल्या मुलाला लग्नाच्या वेळीं

चांगलें बोलावें असें पढविलें असतांहि तो वरीलप्रमाणें अशुभ बोलला. असमयोचित, अमंगल भाषण करणें.

शुभ बोलत असावें—तोंडानें नेहमीं चांगलें बोलत असावें.

शुभस्य शीघ्रं—चांगली गोष्ट तावडतोब करून टाकावी.

शुंभ—या नांवाचा एक दैत्य होता. याचा देवीनें वध केला. यावरून धष्टपुष्ट पण बुद्धीनें जड असा मनुष्य; मद्दड, मूर्ख, ठोंब्या. 'शठ शुंभ कातरू।'–दा २.३.२९.

शुष्क—शुष्काशुष्की—निष्फळ; व्यर्थ; कोरडेंच; बेफायदा.

शून्य—शून्यमंदिर—आंत देवमूर्ति नसलेलें देऊळ; मशीद. 'शिवशिव जगन्निवासा कैसी गत जानकीस हे घडली। श्रीशाळिग्राम शिळा यवनाचे शून्यमंदिरीं पडली॥' –स्फूटआर्या.

शून्य स्थानीं पडणें—निष्फल, निरर्थक होणें. 'जरि जेवणार ते रोगिष्ट। तरि ते सुगरणीचे कष्ट। शून्यस्थानीं पडियेले॥'

शूर—शूरस्य मरणं तृणं।—(सं.) शूर मनुष्याला मृत्यु हा कस्पटाप्रमाणें असतो. संबंध श्लोक असा–उदारस्य तृणं वित्तं शूरस्य मरणं तृणम्। विरक्तस्य तृणं भार्या निःस्पृहस्य तृणं जगत्॥–सुर १५६.१४७.

शूराला मरण तृणसमान आहे.—वर पहा.

शूर्प—शूर्पणखा—रावणाची बहीण एक राक्षसी. ही अत्यंत कुरूप व भयंकर होती. यावरून एखादी कुरूप स्त्री; विद्रूप स्त्री.

शृंग—शृंगापत्ति—इकडे आड, इकडे विहीर अशा दोन अडचणींत सांपडणें. (इं.) डायलेमा.

शृंगार—शृंगार केला तातडी,निघाली अंगाची कातडी—घाईंघाईनें शृंगार केला कीं नुकसान आलेंच.

शृंगारलेला हत्ती रिकामाच चाले—जो हत्ती केवळ मिरवणुकीमध्यें शोभेकरितां सजविलेला असतो, तो निरुपयोगी असतो. कोतवाली घोडा याप्रमाणें.

शें—शें थें सवायशें, कळंतरा खेचें में—(गो.) शंभर उसने मागायचे तर एकशें पंचवीस कां नकोत? व्याजाचें एवढें भय का? बेपर्वाई माणूस फिकिर न करतां जास्त कर्ज काढीत असतो.

शें तों में, हजार तों बाजार, लाख तों काख—मनुष्याला शंभर रुपयांपर्यंत कर्ज असतें तोंपर्यंत भय वाटतें, हजार झालें म्हणजे तो फारशी फिकीर करीत नाहीं व लाख झालें म्हणजे मुळींच दिवाळें काढून मोकळा होतो.

शेला शेळी, हजारास गाय—(व.) कर्जाचा निकाल करण्यासाठीं शंभर रुपयाचे फेडीसाठीं शेळी आणि हजार रुपयांचेसाठीं गाय सावकारास देतात.

शेक—शेक लागणें—झळ लागणें; चट्टा बसणें.

शेकणें—शेकणें हें अर्धा वैद्य आहे—अनेक रोग केवळ शेकण्यानें बरे होतात.

शेकीन साकीन, तझें मन राखीन—(व.) खटपट करून कोणतेहि प्रकारें तुझी मर्जी राखीन पण पैसे मिळावयाचे नाहींत.

शेख आलम—शेख आलम मरगये, घर घर पानी करगये—[दक्षिण हैद्राबादेस निजामाच्या पदरीं कोणी शेख आलम नांवाचा सरदार होऊन गेला, त्यानें एक अति मोठें तळें बांधून सर्व हैद्राबाद शहरास व आसमंतातील प्रदेशांत पाण्याची अतिशय समृद्धि केली; यावरून वरील म्हण पडली आहे.]

शेख डल्ला—उपर अल्ला, नीचे अल्ला, बीचमें शेख डल्ला—शेखडल्ला या नांवाचा हैद्राबादेस पूर्वी एक अट्टल चोर होऊन गेला. त्याला कोणीं, तुझ्या दुष्कृत्याबद्दल देवाघरीं झाडा द्यावा लागेल, असें म्हटल्यास तो वरील उत्तर देई. भाविकास देवाचें महत्त्व, भीति; दुष्टास कसला देव!–भारतवर्ष ऐति. गोष्टी ४०.

शेख महंमद—शेख महंमदी डोलारा–मनोराज्य—शेख महंमद यानें केलेलें मनोराज्य जसें क्षणांत ढासळलें त्याप्रमाणें नुसता कल्पनेचा डोलारा उभारणें. शेख महंमद नांवाच्या लहानशा व्यापाऱ्याचें कांचेच्या भांड्याचें दुकान होतें. एकदां तो भावी ऐश्वर्याचें मनोराज्य करीत होता व बादशहाची मुलगी आपली पत्नी झाल्यावर तिला आपण क्षुल्लक गोष्टीसाठीं अशी लाथ मारूं, असा विचार करून खरोखरीच त्यानें लाथ झाडली. तों त्याचीं कांचेचीं भांडीं फुटलीं व मूळ भांडवलच मुद-

लांत नष्ट झालें. 'मि. फिशर यांची ही कल्पना केवळ शेख महंमदी मनोराज्य नव्हे.'–केसरी ६-११-४१.

शेखमिरे—–शेखमिरे, गोकुळअष्टमी—बाईला शेखमिरे हे एक जुने जहागीरदार आहेत. पुढें पहा.

शेख मिऱ्याचा डोला, पर्वतीच्या पायऱ्या——निबंधमाला. अर्थाअर्थी संबंध नसणें.

शेखसल्ला—-शेखसल्ली विचार—मनोराज्य करणाऱ्या एका गरीब लहान मुसलमान व्यापाऱ्याची गोष्ट आहे. वर पहा. मनोराज्य. 'परंतु या शेखसल्ली विचाराचा आज काय उपयोग?'–एका शिपायाचें आत्मवृत्त ३४४.

शेंग—-सारी रात्र जागली, शेंगावांगीं रांधलीं—हलक्या कामाकरितां अफाट श्रम. मेहनत फार पण त्यामानानें फळ थोडें.

शेंगाड—-शेंगाडी शिपायक—(गो.) शेंदाड शिपाई.

शेज—-शेज पडणें-लागणें—क्रमप्राप्त होणें; रांगेस लागणें.

शेजेस घालणें—नवरानवरीस प्रथमच एकत्र निजविणें.

शेजेस येणें—१ (घोडा) झोंपण्याकरितां बसणें, लवंडणें. २ भरून येणें; खपली धरणें; माठळणें (जखम).

***शेजेचो एक नी पेजेचो एक**—(कों.) एका वेळीं एक पुरुष, दुसऱ्या वेळीं दुसरा. वेश्येसंबंधीं म्हणतात.

शेजेवरची घालवायची आणि बाजाराची पालवायची—-स्वतःच्या स्त्रियेला धिक्कारून वेश्येची मनधरणी. व्यभिचारी मनुष्याबद्दल म्हणतात.

शेजार- -शेजारचा शेन गोड: पण घरची म्हातारी दोड:–-(महानु.)दुसऱ्याचें सर्व चांगलें व आपलें वाईट अशी कांहीं जणांची वागणूक असते.

शेजारची व्होकाल कुड्डी-कुवडी—(कु.) [व्होकाल=नवरी. कुड्डी=अंधळी.] जवळचें वाईट दिसतें. "मध्यंतरीं तुमच्या कृतीचा असाच थोडासा दुरुपयोग होता. 'शेजारची व्होकाल कुवडी' अशी जी एक मालवणी म्हण आहे, तसें तुमचें त्यावेळीं चाललें होतें." –धनुर्धारी २६–१०–४१.

शेजारी— शेजाऱ्याची केली उधारी, देण्याची नाहीं तयारी—शेजाऱ्याची उधारी जर ती फेडतां येत असली तरच करावी. शेजी पहा.

शेजाऱ्याचें पोर पाजाऱ्याकडे ठेवावें;शेजाऱ्याचें पोर पाजाऱ्याचे घरीं (गहाण)—कोणाचें तरी कोणाला देणें; कांहीं तरी घोंटाळा करणें.

शेजाऱ्याच्यानें घरें आणि पाहुण्याच्यानें पोरें होतीं तर मग काय?—स्वतः कष्ट केल्याशिवाय फळ मिळत नाहीं.

शेजारीण—शेजारणी बाई तुला न् मला शिंदळ म्हणतात—स्वतःबरोबर दुसऱ्यालाहि दुर्गुणांच्या माळकेंत ओढणें; निंद्यगोष्टींत जोडीदार पाहणें.

शेजारणीचें देणें थोडें आणि मनाची भूक वाढे—-शेजारणीनें आपणांस एखादा पदार्थ दिला तर तो ती थोडाच देते; त्यामुळें मनाचें समाधान न होतां उलट तो पदार्थ खाण्याची इच्छा मात्र वाढते. चुटमुटकी गोष्ट मिळाली तरी तीमुळें समाधान न होतां उलट असंतोष मात्र वाढतो.

शेजारणीच्या गेली रागें। कुतऱ्यांनीं घर भरलें मागें॥—(तुकाराम.) शेजाऱ्यावर रागावून घर सोडल्यास त्यांत कुणी शिरणारच. दुसऱ्यावर राग काढण्याकरितां स्वतःचें नुकसान करून घेणें हा मूर्खपणा आहे.

शेजारणीच्या पोळ्यांवर रस काढणें—(कों.) दुसऱ्याकरितां व्यर्थ श्रम करणें.

शेजारणीनें पोरां पोसल्यारि आवइ त्याकइ?—(गो.) शेजारणीनें मुलें संगोपिलीं तर आई कशाला हवी? आपलें काम आपण जितक्या आत्मीयतेनें करूं तितकें दुसरा तिऱ्हाईत माणूस करणार नाहीं.

शेजान्निलें चेडूं मुलं—(गो.) शेजारणीची मुलगी चांगली असली तरी चांगली वाटत नाहीं. 'अतिपरिचयादवज्ञा' म्हणतात ती अशीच.

शेजी—-शेजीघरीं गोकूळ,जीव माझा व्याकूळ—दुसऱ्याचें वैभव पाहून मत्सर वाटणें.

शेजी देईल काय आणि मन धायेल काय?—शेजारीण पहा. वर पहा.

शेजी नांदे, कांजी तर लाधे; शेजी नांदो, कांजी लाधो—शेजारीण नांदती असली तर कधीं कधीं निदान पेज तरी मिळण्याचा संभव असतो. ती न नांदल्यास कांहींच लाभ नसतो. याकरितां दुसऱ्याचें बरें चिंतल्यास कांहीं तरी लाभ होण्याचा संभव असतो, वाईट चिंतून कांहीं लाभ होत नाहीं.

शेजीबाईची कढी, धांवधांव वाढी--दुसऱ्याच्या गोष्टीबद्दल औदार्य दाखविणें. हलवायाच्या घरावर०.

शेजीचा भात अन् आईचा हात--शेजारणीनें किंवा दुसऱ्या कोणीं कितीहि केलें तरी आईची सर येणार नाहीं. आईनें कांहीं न देतां नुसता हात फिरविला तरी मुलाला सुखाचें वाटतें.

शेजीची केली आस, तिळातिळ तुटे मांस—दुसऱ्यांवर अवलंबून राहिल्यास कार्यभाग न साधतां काळजी मात्र लागते.

शेजीचें उसणें, सवेंच देणें, न देईल तर तिच्या पूर्वजाला उणें—शेजारणीकडून आणलेलें उसनें ताबडतोब परत करावें. नाहींतर आपल्याला वाईटपणा येतो. वाटल्यास लांबच्या माणसाचें उसनें काढावें पण जवळच्याचें काढूं नये.

शेजीचें घेणें, सवाई देणें—शेजारणीपासून उसनें धान्य वगैरे घेतलें तर तें दिलें तरी ती पुन्हां मागते किंवा जास्त सांगते.

शेजीच्या घरीं डुमडुम वाजे, कुंकवासाठीं कपाळ खाजे--शेजारणीच्या घरीं आनंदोत्सवानिमित्त किंवा समारंभानिमित्त वाद्यें वाजूं लागतांच एखाद्या उतावळ्या बाईला आमंत्रण नसतांच तेथें जाण्याची अत्युत्कट इच्छा होते. तेथें गेल्यावर रिवाजाप्रमाणें इतर बायकांबरोबर आपलेंहि कुंकू वगैरे लावून आतिथ्य करतीलच अशी तिला खात्री असते. उत्सवप्रसंगांत मिरावण्याची हौस असणाऱ्या बाईला ह्मणतात.

शेजीनें अडविलें आणि पुढें गाढव दडविलें—शेजारणीकडून फायदा तर नाहींच पण एकसारखा त्रास होतो.

शेजीनें कोंबडा झांकला म्हणून कांहीं उजाडण्याचें राहत नाहीं—सृष्टिक्रम हे अबाधित चालत राहतात; ते कोणी कांहीं अडवूं शकत नाहीं.

शेजीनें घातला भात आणि आईनें फिरविला हात—शेजारणीनें चांगलें खाऊ जेऊं घातलें तरी त्याला आईनें मायेनें पाठीवर नुसता हात फिरविल्याचीहि सर येणार नाहीं. आईच्या व शेजारणीच्या प्रेमांत जमीन अस्मानाचें अंतर असतें.

शेजीनें दिलें बोट, त्यानें काय भरलें पोट--शेजारणीनें थोडें फार दिल्यानें कांहीं सोय होत नाहीं. वरवरच्या उपचारानें कांहीं कायमचें समाधान मिळत नाहीं.

शेजीनें दिलेलें पुरेना, देवानें दिलेलें सरेना--शेजारणीनें कितीहि दिलें तरी तें कांहीं जन्मभर पुरत नाहीं, पण परमेश्वरानें दिलेली जोड जन्माची असते.

शेजीवांचून-विणें सरेना आणि घडीभर पटेना; शेजीशीं पटेना, नि शेजीवांचून करमेना--शेजारणीची नेहमीं जरूर तर लागतें पण घटकाभर पटत मात्र नाहीं.

शेज्या गांवचा माळी, आठा दिवसां पाळी—(व.) माळ्यानें आपल्या मळ्यांतील पिकाला एक दिवसाआड तरी मोटेनें पाणी दिलें पाहिजे पण ज्या गांवीं मळा त्या गांवीं तो माळी राहात नसेल, शेज्या गांवीं, म्ह० शेजारच्या गांवीं राहात असेल तर तो तेथून येऊन आठा दिवसांनीं पाण्याची पाळी देऊं शकेल व मग पीक चांगलें येईल असा भरंवसा नाहीं. त्यावरून जो नियमित काम न करतां अधून मधून करतो त्यास अनुलक्षून ही म्हण आहे.

शेट---शेट पडल्यार भट धांवता भट पडल्यार कोण धांवता ?—(गो.) शेटजी पडला तर त्याच्या मदतीला भटजी धांवतो पण भटजीच पडला तर तो कुणाच्या मदतीची अपेक्षा करणार ? श्रीमंताचें काम करावयास वाटेल तो तयार असतो पण गरीबास कोणीच मदत करीत नाहीं.

शेट रिवणां सांतली कुसमणां—(गो.) सोनार रिवाला-एका खेड्याला तर त्याची छली दुसऱ्या कुसमण खेड्याला ! धांदरटपणा.

शेट शहाणा आणि बैल पाठवळ--[पाठबळ= स्वारी वाहाण्यास चांगला तयार] दोन्ही चांगल्या गोष्टींचा योग.

शेट शृंगारसर बाजार उलगडो--(गो.) धनिकाचा जामानिमा होऊन तो बाजारांत जाईपर्यंत भरलेला बाजार ओसरूनहि गेला. तयारी करीपर्यंत समय निघून जाणें. दिरंगाई; संथपणा.

शेट सव्वा शेर आणि लिंग अडीच शेर-- अध्या पहा.

शेटी शेटी खंय वतां? म्हाड्डोळां म्हाड्डोळां! शेटी शेटी खंय आसलो गा? मसणांत--(गो.) एक गृहस्थ म्हार्दोळच्या जत्रेला जात असतां कुंडई गांवच्या चढणीवर दुसऱ्या एका माणसानें त्याला विचारलें कीं, 'तूं कुठें चाललास?' त्यावेळीं 'म्हाड्डोळा, म्हाड्डोळा,' असें जोरांत उत्तर देऊन तो पुढें सरकला. त्यावेळीं त्याला उमेद होती कीं, जत्रेंतल्या जुगारांत आपण खूप पैसे मिळवूं आणि रात्रभर सर्व प्रकारची मजा करूं. पण प्रकार घडला उलटा. त्याचे सगळे पैसे जुगारांत खपले आणि रात्रभर वेड्यासारखें भटकत त्याला जागरण करावें लागलें. सकाळीं परत घरीं जात असतांना त्याच चढणीवर दुसरा एक माणूस त्याला भेटून त्यानें विचारलें कीं, 'कुठें गेली होती स्वारी?' तेव्हां 'मसणांत!' असें त्याला उत्तर मिळालें. कारण कालचा त्याचा नूर यावेळीं पार ओसरला होता. माणूस उमेदीवर असला कीं त्याला कोणाचीहि पर्वा वाटत नाहीं आणि संकटें व हानि झाली कीं मग त्याला स्वतःच्या जिवाचासुद्धां उबग येतो.

शेटी हातान् कान तोपिल्ला बरी--(गो.) सोनाराकडून कान टोंचणें. सोनार पहा.

शेटीचे आणि माझे एकोदर्शी--स्वत अल्प गोष्ट करून दुसऱ्याच्या बरोबरीनें श्रेय घेऊं इच्छिणारा. दुसऱ्याचे शंभर व स्वतःचा एक असतां दोघांमिळून एकशें एक असें सांगून अर्धें श्रेय उपटणारा. तु०--सगळ्या गलबतांत अर्धी सुपारी माझी.

शेटीचोय गुण आनी कानाचोय गुण--(गो.) कांहीं गुण सोनाराचे तर कांहीं गुण कानाचे. चांगल्या गोष्टीचें श्रेय एकट्यानेंच आपणाकडे घेऊं नये. त्यांत दुसऱ्याचाहि अंशभाग असतो.

शेट--**शेटांसाठीं प्रजापति जाळून घेणें**-- क्षुल्लक फायद्यासाठीं मोठें नुकसान करून घेणें. मागें पहा.

शेटें उपटून भारा-भारे बांधणें--रिकामटेकडे असणें; कांहीं तरी भलतेच उद्योग करीत असणें.

शेटाचा फांटा अन् तिसरा वांटा--कोणाचा कांहीं संबंध नसतां एखाद्या कामाचें श्रेय घेऊं पाहणें.

शेटाचा फोटा अन् कोसाचा हेलपाटा--पैसा दक्षणा आणि लक्ष दक्षणा याप्रमाणें.

शेटानें आंबे पडत नाहींत--क्षुल्लक गोष्टींनीं कार्य साधत नाहीं.

शेटांसाठीं शिष्ण जळायचें--वर पहा. [शिष्ण =शिश्न] गुह्यभागावरचे केंस नेहमीं काढण्याचा त्रास नको म्हणून तीं जाळून टाकावीं अशी एकानें युक्ती सुचविली; त्याला वरील उत्तर आहे. श्रम वांचविण्यासाठीं कांहीं भलतेंच करून घेणें. कोणतीहि गोष्ट नेहेमींच्या पद्धतीनेंच झाली पाहिजे.

शेटें उपटून मढें हलकें होत नाहीं--क्षुल्लक उपायांनीं मोठें संकट टळत नाहीं. केस पहा.

शेटें जाळून कोळसे होत नाहींत--वर पहा.

शेंडा--**शेंडा ना बुडखा**--ज्याला आरंभ किंवा शेवट कांहींच नाहीं असें; मुळींच नाहीं; कांहीं तरी. पूर्ण अभाव; नास्तित्व. 'मोरोपंतांचे ग्रंथ उगीच चाळून जो पाहील त्यास सुद्धां कळून येईल कीं वरील गोष्टीस शेंडा ना बुडखा.'--नि.

शेंडफळ--झाडयाच्या शेंडयावरचें फळ. यावरून. १ म्हातारपणचें अपत्य. २ अखेरची गोष्ट. 'असेंब्लीच्या कामाला अवघीं दोन शेंडफळें राहिलीं होतीं.'--सासं२.१७०.

शेंडे सलाम--दुरून केलेला नमस्कार; कांहीं न बोलतां नुसता केलेला नमस्कार.

शेंड्यागोड्यास येणें--धान्य पोटरीस येणें; कणसें बाहेर पडण्याच्या स्थितींत असणें.

शेंड्यावर बसून झाड तोडणें--भलतीच गोष्ट करणें; आत्मघात करून घेणें.

शेंडी--**शेंडी फुटणें**--१ अंदाजापेक्षां जास्त, वर वाढणें; अपेक्षेबाहेर जाणें. २ एखाद्या कामांतून दुसरें काम निघणें.

शेंडी राखणें—१ शेंडी ठेवण्याचा विधि करणें; चौल करणें. २ हिंदुत्व सांभाळणें.

एखाद्याच्या हातीं शेंडी सांपडणें-गुंतणें—दुसऱ्याच्या हातीं आपली शेंडी गेली म्हणजे तो वांकवील तसें वाकावें लागतें. त्याच्या कचाट्यांत, तडाख्यांत सांपडणें.

शेंडी हातीं येणें-जाणें—स्वाधीन ठेवणें, होणें. 'चपल कालाच्या वाहत्या रसाला तुच्छ मानून कालाची शेंडी हातांत धरून आसन स्थिर करून...'—सत्त्वपरीक्षा.

शेंडीला गांठ देणें-मारणें एखाद्याच्या शेंडीला लहान मुलाप्रमाणें गांठ मारणें म्हणजे त्याच्याहून आपण मोठे असें समजणें. वर कडी करणें; अक्कल शिकविणें; वरचष्मा करणें. 'अरे हा दक्षिणचा हुप्पा वस्ताद खरा, पण याच्याहि शेंडीला गांठ देईन तर मी नांवाचा मृत्तिकाभूषण चटोपाध्याय.'—जग हें असें आहे.

शेंडीला फुलें बांधणें—दुसऱ्याला त्याच्या दृष्टीनें सुंदर बनवून खूष करून आपला मतलब साधणें; खूष करणें; पुढें पुढें करणें.

***शेंडी झाड,पान वाढ; शेंडी सोडली;कीं भाकर मोडली;शेंडी झाडली पत्रावळ वाढली**—स्नानानंतर व जेवणापूर्वी संध्या, देवपूजा, इत्यादि कोणतीच उपाधि मागें न ठेवतां स्नान झाल्याबरोबर जो जेवण्यासाठीं पानावर बसतो अशा पुरुषाला अनुलक्षून ही म्हण आहे. शेंडी झाडणें स्नान आटोपल्याचें दर्शक आहे.

शेंडी तुटो कीं पारंबी तुटो—अखेरपर्यंत न ढळण्याचा निश्चय; कोणत्याहि गोष्टीचा बरावाईट शेवट होईपर्यंत एकाच मार्गानें जाणें. 'आतां शेंडी तुटो कीं पारंबी तुटो, आयत्या वेळीं सुतकाचा घोटाळा न हो म्हणजे झालें.' मायेचा बाजार.

शेंडीची आणि शेटांची रास एकच—दोन्हीहि केंसच. एकाच प्रकारच्या पण भिन्न महत्त्वाच्या गोष्टी.

शेंण्ड्यर्ले सोण्ण आंड्यये फुलां माळप—(गो.) केंसांत फुलें माळायचीं तीं गुडघ्याला बांधणें. एखाद्या वस्तूचा स्थानव्यत्यास झाला कीं म्हणतात.

शेण—**शेण खाणें**—१ निंदा करणें. 'तोंडावर कोण बोलेल पण मागून मात्र शेण खातात !'—मोरप्र-१५. २. व्यभिचार करणें; भलतीच गोष्ट करणें. ३. एक शिवी. 'मग शेण खायला मला कशाला आणले.' नामन २१.

शेणगोळे घालणें—चुकीचें, अव्यवस्थित झालेलें काम दुरुस्त, बरोबर करणें.

शेण थापणार—आळशी;निरुद्योगी; षंढ; बेहिमती.

शेणसडा करणें—नाश करणें. 'तेव्हां चार पलटणांचा शेणसडा केला. ज्यानें तृण तोंडांत धरिलें तो वांचला !'—पेब्र १७६.

शेणामेणाचा—दुर्बल; निःशस्त्र; अत्यंत मऊ. 'तो शेणामेणाचा होता तो आतां लोखंडाचा झाला.'

शेणामेणाचे लोखंडाचे होत जाणें—प्रथम दुर्बल असून हळूहळू बलाढ्य होत जाणें. 'दिवसें दिवस शेणामेणाचे (ते) लोखंडाचे होत चालिले.'—भाब ४७.

शेणाचा दिवा लाविणें—ज्याचें दिवाळें निघालेलें असेल त्याच्या दारांत शेणाचा दिवा लावून ठेवतात! हेतु असा कीं, हें घर आत मृतमाणसाचें आहे अशी समजूत व्हावी. दिवाळें काढणें.

शेणाचा पोहो—शेणाची रास,गोळा, लगदा. (ल.) दुर्बल, षंढ, नालायक मनुष्य, मद्दड जनावर, प्राणी.

शेणार काढप—(गो.) जमीनदोस्त करणें; नुकसान करणें.

***शेण खालीं पडलें म्हणजे माती घेतल्याशिवाय वर येत नाहीं; पडलेलें शेण माती घेऊन उठतें; शेण जमिनीला पडलें कीं कांहींतरी घेतल्याशिवाय निघत नाहीं; शेण पडलें तर माती घेऊन उठतें-उठेल**—एखाद्यावर उगाच दोषारोप केला असतां त्याला कांहीं तरी धर लागल्यावांचून राहात नाहीं.

शेणा थापो जमिनीर पडलो तर माती घेतल्याशिवाय उठता ?—(गो.) शेण जमिनीवर पडलें कीं माती घेतल्यावांचून उठत नाहीं. वरप्रमाणेंच.

शेणा दुड्डू तणा बाद—(गो.) शेणाचा पैसा गवतासाठीं खलास व्हायचा.

शेणाची सटवाई आघाड्याची काडवात—जसा देव तसा उपचार.

शेणांतुले किडे एकदीस उबजले आनेकदीस मेले—(गो.) शेणांतले किडे एक दिवस उपजतात आणि

एखादे दिवशीं मरून जातात. कोण त्यांची खिसगणती ठेवतो ?

शेणांतुल्या किड्याक शेणा वासु ना—(गो.) शेणांतल्या किडयाला शेणाची घाण येत नसते. पापकृत्यांच्या कर्दमांत लोळणाऱ्या माणसाला पाहून दुसऱ्याला कींव आली तरी त्याला त्यांतच गोड वाटतें. तु०—शेणामाजीं वाडे बांधुनि राहति शेणकिडे !—सावरकर.

शेणचें—शेणला थंय सोधचें—(गो.) हरवलेल्या ठिकाणींच शोधलें असतां सांपडतें. इतरत्र आटापीट करण्यांत अर्थ नसतो.

शेणिलॅं गोरूं कर्मळे तळयांत—(गो.) हरवलेलें गुरूं कर्मळयाच्या तळयांत सांपडायचें ! 'चुकला फकीर मशीदींत' या अर्थानें म्हणतात. 'चुकिलॅं गोरूं धामापूरच्या तळ्यांत' पहा.

शेणी—एखाद्यावर शेणी रचणें—जाळणें; नाहींसे करणें. 'लोकलाजेवरी रचिल्या शेणी ।'—मध्व २२८.

शेणी आशिल्ल्यो थापॅ झालॅं आणि थापॅ आशिल्लॅं शेणी जाल्यो—(गो.) सुकें असलेलें ओलें व ओलें असलेलें सुकें झालें. दैवयोगानें अशा घटना घडतात.

शेणी बुडाल्या थापे तरले— कांहीं लाभ, कांहीं हानि.

शेणीस जाऊं कां सशास जाऊं ?— कोठून तरी घराबाहेर पडण्याकरितां शेतकऱ्याची सून सासूस विचारते. मनांतील हेतु बाहेर जाऊन येण्याचा, प्रियकरास भेटण्याचा असतो.

शेणै—शेणैमाम पाज्या गेलो कित्या म्हळ्यार खबर ना—(गो.) अर्धवट माणूस ठराविक ठिकाणांत गेला पण आपण येथें कशाला आलों तें त्यालाच ठाऊक नाहीं. धांदरट माणसाला उद्देशून म्हणतात.

शेत—शेत उतरणें—शेत चांगलें पिकणें.

शेत घरांत असणें-ठेवणें-करणें—स्वतः कसणें.

शेत तोडणें—भाताच्या कोवळ्या रोपांवर रोग पडणें. —कृषि २३६.

शेतसनदी शिपाई—लष्करी नोकरीबद्दल सनदेसह शेत मिळालेला शिपाई. 'जेथें किल्ले आहेत तेथें किल्लेदार शेतसनदी शिपाई ठेवीत.'—नि १०६१.

शेत सोसणें—रोप वाळणें. एक रोग.

भरल्या शेतांतून काढणें उठविणें-ढकलणें—हातातोंडाशीं आलेला घांस काढून घेणें.

शेतानें कुंपण खाणें—वास्तविक कुंपणानें शेत खाणें असा वाक्प्रचार आहे. तथापि याचाहि अर्थ होऊं शकेल. ज्याचें रक्षण करावयाचें तोच रक्षणकर्त्यांवर उलटणें. 'शेतानेंच कुंपण खाल्यावर दाद कोणास मागावयाची ?'—सुंदराबाई ९६.

शेत करतां हारकली अन् सारा देतां टराकली—(वांय.) शेती करतांना आनंद झाला पण सारा द्यावयाची वेळ आली तेव्हां कष्टी झाला. फळ पाहिजे, पण कष्ट, खर्च इ. नको.

शेत खाल्लं लोघडीनं अन् मार खाल्ला गधडीनं—(अहिराणी) [लोघडी=नीलगाय, रोही]. 'चोर सोडून संन्याशाला सुळी' या म्हणीप्रमाणें अर्थ.

शेत गेलें कटाळयानें, घर गेलें इटाळानें—शेतांत कष्ट करावयाचा कंटाळा केला तर शेत सावकाराकडे जातें व घरांत एकसारखी सोवळ्याची ओवळ्याची कटकट लावली तर घरांतील शांति बिघडते.

शेत धोंडाळ, बायको तोंडाळ, गवत गोंडाळ—गवत पहा.

शेत पिकत नाहीं, पेठ पिकते—एखाद्या भागांतील शेतांत जरी एखादा विशिष्ट माल पिकला नाहीं तरी दुसऱ्या कोठेंतरी परप्रांतांत तो माल पिकून या पेठेंतील बाजारपेठेच्या गांवांत विकायला येतो व तेथें मिळूं शकतो. 'भगर आमच्या गावांत होत नाहीं पण आमच्या बाजारांत मिळते; शेत पिकत नाहीं पण पेठ पिकते.'

शेतभर कापूस पिकला आणि पिंजला गेला—जर कापसाचीं वस्त्रें विकलीं गेलीं नाहींत. तर कापूस पिकून पिंजला जाऊन उपयोग काय ? —य. न. केळकर, 'भूतावर भ्रमण'

शेत वाणीचें, गांव सोयऱ्याचें—वाणी ही एक जोंधळ्याची उत्तम जात आहे. सर्व शेतांमध्यें वाणीचा जोंधळा पिकणारें शेत उत्तम व सर्व गांवांत सोयऱ्याचें गांव उत्तम. कारण तेथें आदरसत्कार होऊन बडदास्त चांगली ठेवली जाते. [मॅनवेरींगनें सोयऱ्याचें गांव असल्यामुळें त्यास धान्य द्यावें लागतें त्यामुळें शेत चांगलें

असूनीहि त्याची किंमत कमी होते असा अर्थ लावला आहे तो चुकीचा दिसतो.]

शेताआड चोरी आणि नवऱ्याआड शिंदळकी—या गोष्टी सहज पचूं शकतात व उघडकीस आणण्यास कठीण असतात.

शेता जाय पावसु, पुता जाय आवसु—(गो.) शेताला पाऊस आणि मुलाला आई अवश्य हवी.

शेतावरी ज्याचें राहणें, त्यासी कांहीं नसे उणें—जो शेतकरी शेतावर राहतो त्याला कोणत्याहि गोष्टीची कमतरता पडत नाहीं. शेतांत त्याच्या सर्व गरजा भागतात.

शेताचा आरा (मोड), गाईचा गोऱ्हा व पाळण्यांतील हिरा हे केव्हां तरी उदय काळ आणतीलच आणतील.-अर्थ स्पष्ट आहे.-ज्ञा.को.(क.) ६४५

शेताचें झाकड(ण) पाड व घराचें झाकण स्त्री—[पाड = डोंगर ?] शेताला डोंगराचा आसरा व घराला स्त्रीचा.

शेताचें फूल, चालवी जगाची चूल—सर्व जग शेतांतील अन्नावर जगत आहे.

शेतांत नसावा कुंदा आणि गांवांत नसावा निशुंदा--जसा कुंदा शेताची घाण करतो तसा कुलकर्णी (निविसिंदा तु लेखकः) गांवाची करतो.-गांगा २२३.

शेतांतली सुपारी नासली, पैसा पासरी विकली--शेतांत सुपारी होत नाहीं, बागेंत होते, तेव्हां कांहीं तरी मारलेली थाप.

शेताला आतारी, घराला म्हातारी--शेताला आडतवाला जसा नेहमीं लागतो तशी घराची राखण म्हातारी करते.

शेतकरी सुखी तर जग सुखी—शेतकरी जर सुखी असेल तरच जगाला धान्यहि मिळेल, नाहीं तर सर्वत्र दुष्काळहि पसरेल. शेतकऱ्याजवळ धान्य व द्रव्य असेल तरच इतर लोकांचे धंदे चालतात.

शेतकऱ्याची हसणवारी, त्याला ठार मारी—शेतकरी एकदां कर्जबाजारी झाला कीं तें कर्ज त्याला कधीं फेडतां येत नाहीं व तो सर्वस्वीं बुडतो.

शेतकऱ्याचें मरण शेतीं, बायकोचें वेतीं—शेतकरी शेत कसीत असतांनाच त्यास मृत्यु येतो व स्त्रिया बहुधा बाळंतपणाचा परिणाम होऊन मरतात.

शेतकऱ्याला खांद्यावर घोंगडी, शिळी भाकरी पोट भरती। बामणाला तूपपोळी मरमर चोळी॥—(ठाकरी) तमाशांतील म्हण. शेतकऱ्याला पुष्कळ कष्ट करूनहि जेमतेम पोटापुरतें मिळतें पण ब्राह्मणाला मरेपर्यंत तूपपोळी ! यावरून ब्राह्मणांच्या, पांढरपेशांच्या सुखी जीवनाविषयीं खालचे वर्ग किती लाचावलेल्या दृष्टीनें पाहतात हें दिसून येतें.

शेतकऱ्यास मरण्यासहि फुरसत नसते—शेतकऱ्यास रात्रंदिवस काम करावें लागतें.-केसरी ७-३-३९ पान ४.

शेती— शेती करी जिवाची माती—शेतीचा धंदा अतिशय कष्टकारक आहे.

शेती होय धननाश, ना धनी पास—शेताच्या मालकानें स्वतः जर प्रत्येक गोष्टीवर नजर ठेविली नाहीं तर त्याचें अतोनात नुकसान होतें.

शेंदाड—शेंदाड शिपाई—एक मनुष्य आपला पराक्रम दाखविण्यासाठीं शेंदाडावर तरवार चालवून दाखवीत असे. एकदां परचक्र आलें असतां व त्यास पुढें केलें असतां तो पळून गेला. किंवा, एका शौर्याची फुशारकी मारणाऱ्या माणसाच्या अंगावर तो रात्रीं घरांत शिरतांना शेंदाडें मारिलीं असतां तो भिऊन ओरडूं लागला. यावरून केवळ शेंदाडें कापणारा शिपाई म्हणजे घरींच पराक्रम दाखविणारा पण रणांगणावरून पळून जाणारा भित्रा, भेकड मनुष्य.

शेंदूर—शेंदूर उतरणें—१ मूर्तीवरील शेंदराचें वेष्टण सुटणें; मूर्तीनें कवच टाकणें. २ अपमान, अवज्ञा करणें.

दगडाला शेंदूर फासून देव करणें—दगड पहा.

शेंदरें माखियेला धोंडा, पूजा करितीं पोरें रांडा—दगडाला शेंदूर फांसला कीं त्याचा देव होतो व मग त्याची सर्व लोक पूजा करूं लागतात.

शेंपडी—शेंपडेक बांधला सूप, बिळाक वचूंक ना रीघ—(गो.) आधींच बीळ लहान आणि त्यांत शेपटीला सूप बांधून उंदीर जायला लागला तर त्याला प्रवेश कसा मिळायचा ? आपलेंच काम आपणाला उरकत नसतांना दुसऱ्याचें गळ्यांत घेणें. उंदीर मावेना बिळीं० पहा.

शेंपूट—शेंपूट अडकणें—कांहीं कारणानें बाहेर पडतां न येणें; भानगडींत सांपडणें.

शेंपूट घालणें—(प्र.) गांडींत शेपूट घालणें. भिऊन पळणें

गांडींत शेंपूट घालणें-घालून बसणें—भिणें; गांड पहा.

शेंपूट ठेवणें-राहणें—१ एखादी गोष्ट पुरी न करणें, न होणें; अर्धवट टाकणें, राहणें. २ बराचसा भाग उरकून थोडाच बाकी उरणें. 'हत्ती गेला शेपूट राहिलें.'

शेंपूट लांबविणें—वाढवीत जाणें; दिरंगाई करणें.

शेंपूट हालविणें—कुत्रा धन्यापुढें शेपूट लाडीगोडी करून हालवितो यावरुन खुशामत करणें. 'तुम्ही माझाच तुकडा खाऊन माझ्या दुस्मानापुढें शेंपूट हालवतां आणि माझ्यावरच भुंकतां यांतच तुमची काय किंमत ती दुनियेला कळलीच आहे!'—शिसं २.२.

शेंपटाचा हत्ती करणें—पराचा कावळा करणें.

अंगावरचें-जिवावरचें शेंपटीवर गेलें—जीव पहा.

*** हत्ती गेला, शेंपूट राहिलें**—मुख्य भाग संपला, आतां थोडेंच राहिलें याअर्थी. थोडें राहिलें तेव्हां दम काढा; त्यासाठीं भांडू नका असें सांगण्यासाठीं वापरतात. तु०—विक्रिते करिणि किमङ्कुशे विवादः।

शेंबूड—शेंबूड फेडणें—नाक शींकरणें.

शेंबडांत माशी गुंतणें-घोटाळणें—एखाद्या कामांत आशेनें राहणें; त्यांत सांपडणें व त्यांतून बाहेर निघणें अशक्य होणें.

शेंबडांत लोळणें—संसारांत गुरफटणें.

***शेंबूड माझ्या नाका आणि मी हांसें लोका**—मी पहा.

शेर—पदरात शेर बांधणें—एखाद्यावर उदर-निर्वाहासाठीं अवलंबून असणें.

***शेर शिजविला आणि बिस्तव विझविला**—१ स्वतःचें थोडकेंच काम आटोपून दुसऱ्यास दिरंगाईबद्दल दोष देणारास म्हणतात. २ थोडक्यांत कारभार आटो-पणाऱ्या घरधनिणीस म्हणतात.

शेरभर तूप घळकेवरी, जात्याची पंगत उखळा वरी—शेरभर तुपांत जात्यापासून उखळापर्यंत मोठ्या पंक्तीला जेऊं घालणें अशक्य. थोड्या साहित्यांत पुष्कळांचें समाधान करूं इच्छिणें.

शेरभर पुरणाला वाटावें किती आणि नकट्या नाकाला नटावें किती—थोडक्याशा गोष्टींचा उगाच गाजवाजा करणें.

शेरभर वरयो घ्या आणि माका गांवकरीण म्हणा—स्वतः घस सोसून मोठेपणा मिळवूं पाहणें. तु०—माझें घ्या अणि मला पांचांत न्या.

शेर सरतो, खाटलें कुदतें—खावयास मिळालें म्हणजे सर्व गोष्टी सुचतात.

शेरा तांदुळा खाणें काय? बायको मेली जिणें काय? काठी मोडली टेंकणें काय?—या तीन्ही परिस्थिती श्रेयस्कर नाहींत. यांत संकट, आपत्ति ओढवते.

शेरांत घालावें, आठवें झाकण ठेवावें—इतका लहानसर!

शेर—शेर होणें—माजणें. 'त्यास गोविंदपंत यांचें शीर कापून आणल्यावर मागतीं गिलेचे शेर जाले.' —माब १०८.

*** शेराला सवाशेर**—[शेर=वाघ] एक शेर तर दुसरा त्याहून सवाई. ठकास महाठक. 'लॉर्ड कर्झन यांना बडतर्फ केलें नव्हतें हें खरें, पण शेराला जगांत सव्वाशेर म्हणून एक आहे असें कबूल करावें लागलें हीच त्याला शिक्षा.'—टिच २. ४. ५६.. (गो.) शेराक सवाई शेरू.

शेराला सवाशेर भेटला म्हणजे निशा होते—जबरदस्ताशीं गांठ पडली म्हणजे खरी बलाची परीक्षा होते.

शेरास सवाशेर आहेतच—जगांत एकापेक्षां एकें वरचढ आहेत. तेव्हां गर्व कोणी बाळगूं नये. Measure for measure. Diamond cuts diamond.

शेला—शेला घालणें—दुखवट्याचीं वस्त्रें देणें.

शेला पागोटें—१ बहुमानाचीं वस्त्रें, आहेर. २ सरकारी अधिकाऱ्यांचा एक हक्क.

शेला पागोटें करणें—पोशाख करणें.

शेला पागोटें याचा आदिअंत बक्षिस—(सांकेतिक अशिष्ट.) शेटें बक्षीस देणें; फजीति करणें; उपहास करणें.

शेलेसावळीचा—शेला व शमला असलेला; अकडबाज; ऐटबाज. ' शेले सांवळीचे झुंजार वीर। पांच शतें पैं ॥'—कथा ४.६.१७५.

***शेला पांघरला आणि हिंवानें मेला**--मोठेपणाच्या नांवाखालीं स्वतःची हानि करून घेणें.

शेलें---**शेलें करप**—(गो.) हांजी हांजी करणें.

शेव----**शेव घालणें**—१ वस्त्राचा पदर हलवून बोलावणें. २ पदरानें दिवा मालविणें.

शेव घेणें—ओसरणें; कमी होणें.

शेव देणें--**पोहोंचविणें**—साथ करणें.

शेव बाधणें—(कु.) वाईट संगति लागणें.

शेव येणें--पदर येणें ऋतुमती होणें.

शेव लावणें—१ अनुमोदन देणें. २ मदत करणें.

शेव लावणें—जमीन वरवर उकरणें.

शेवट---**शेवट घेणें**—अखेरीस नेऊन पोंचाविणें; समाप्त करणें.

शेवट होणें— मरणें.

शेवटची पालखी--प्रेताची तिरडी.

शेवटच्या आदितवारीं--कधींहि नव्हे; कदापि नाहीं; केव्हांहि नाहीं. On the day after doomsday.

शेवटच्या बांधण्यास पाणी सोडणें--अखेरच्या अटी सांगणें

शेवटास जाणें--- तडीस लागणें; पुरें होणें. पुढें पहा. ' कारभाराचा खर्च तर जोरावरीनें, आजपर्यंत कोठेंही कारभार शेवटास गेले नाहींत.'

शेवटास लागणें—तडीस जाणें; फत्ते होणें. 'आम्ही तुम्हांस आपलें कार्यासाठीं आणिलें तें कार्य आमचे तुमच्यानें शेवटास लागतें असें आमच्या दिसण्यांत येत नाही.' —पेब २१.

शेवटची काडी, कंबरडें मोडी—अखेरच्या एखाद्या गोष्टीनेंहि सर्व कार्याचा नाश होणें. The last straw breaks the camel's back.

शेवटीं गोड तें गोड— ज्याची अखेरी चांगली होते ती गोष्ट सर्वांसच आवडते. All is well that ends well.

शेंवती—**शेंवतीपूजन देणें**—शेंवतीपूजन, सीमांत पूजन करणें. 'कृष्णास पूजन शेवती। नकळे देता दिवस व्हाती।'—एरुस्व १५.११.

शेष---**शेषं कोपेन पुरयेत्**—(सं.)जिव्हा वादविवाद करतांना प्रतिपक्ष्यास कांहीं तर्कसिद्ध उत्तर देतां येत नसेल तेव्हां त्याच्यावर रागावून त्यास अपशब्द बोलून गप्प करणें. " परंतु ' शेषं कोपेन पूरयेत् " अशाप्रकारें जें आपण आरंभिलें आहे, यावरून माझ्याकडेस कमीपणा येणार नाहीं. "--शाब १.१११. " शेवटीं 'शेषं०' या न्यायानें माझ्यावर थोडेंसें रागावूनहि तिनें माझी उलट समजूत घालण्याचा प्रयत्न केला."—आ. इंदूचें शिक्षण १०१.

शेंस---**शेंस घालणें**—देवाला वाहिलेल्या मुलीचें देवाबरोबर लग्न लावणें.

शेंस भरप—(गो.) ओटी भरणें.

शेस मारप--(गो.) भूत संचारलेल्या झाडाच्या अंगावर तांदूळ मारणें.

शेंसविधि--वेश्याकर्माचा दीक्षाविधि; विधियुक्त कौमार्यभंग.

शेंसफूल तितक्या रंवला—(गो.) [शेंसफूल = डोक्यांत घालावयाचें स्त्रियांचें भूषण. रंवलां=राहिलें] कोणा एका स्त्रीची सर्व अलंकाराची हौस फिटली , फक्त शेंस फुलाची हौस तेवढी राहिली. अर्थात् फाजिल चोंजले असा अर्थ.—विविधवृत्त १५-२-३९.

शेसाळा--- **शेसाळे शेसाळे, शेजार पिसाळे**--- रागीट माणूस शेजाऱ्यावरच उसळतो.

शेळकुंड---**शेळकुंडाची आग व पिलाची जाग** —(कों.) गोवरींचा विस्तव, मुलांचीं सोवत निरुपयोगी.

शेळी---**शेळीचें शेंपूट**--शेळीचें शेंपूट धड माक्षिकानिवारण करूं शकत नाहीं आणि धड अब्रूहि झाकूं शकत नाहीं. इतकें तें आंखूड असतें. यावरून कशालाच उपयोगी न पडणारी वस्तु. 'ब्रिटिश साम्राज्य म्हणजे शेळीचें शेपूट.' 'ज्या प्राणार्पणानें हातचा, आपण होऊन घालविलेला डाव परत आपल्या हातीं येत नाहीं , त्या प्राणार्पणाच्या भाषेला, तेजस्वी विचार म्हणण्याऐवजीं शेळीचें शेपूट म्हणणें अधिक शोभेल. कारण त्यानें धड मक्षिकानिवारणहि होत नाहीं आणि धड अब्रूहि झांकली जात नाहीं.' - केसरी ८-११-४०.

शेळी जाते जिवानिशीं, खाणारा म्हणतो वातड (कशी); **शेळीचा जातो जीव, आणि खाणारा म्हणतो वातड**—जीव पहा.--शाब १.११६;-नर्स सुंद्राबाई.

शेळी मेंढी गटः तेथ काय लागे कुकुटः—(महानु.) जेथें शेळी मेंढी देखील फस्त केली तेथें कोंबड्याचा पाड काय ?

शेळीचें कातडें आणि लांडग्याचें आंतडें—कोडगा लबाड माणूस.--अग्रणी १–७–४०.

शेळीचे कान खाटका हातीं-गोसाव्याचे हातीं—कान पहा.

शेळीचें शेंपूट अब्रूहि झाकीना व माशाहि वारीना--वाक्प्रचार पहा.-गांगा २५५.

शेळीच्या गळ्यांतील थान धरतां येत नाहीं, दूधहि देत नाहीं—अजागलस्तन. ' सावरी वाढिन्नल्या सरळा। बरी फळ नाहीं आंत पोकळा। कां स्तन आले गळां। शेळिये जैसे ॥' --ज्ञा. ९.७४.

शेळीच्या मुताची मानली चाड, आणि शेळी मुतते कुंपणाच्या आड--एखाद्या गोष्टीला जों जों महत्त्व देत जावें तों तों ती अधिक दुष्कर होत जावी. एखाद्यास वाजवीपेक्षां अधिक मान दिल्यास त्यास उलट गर्वच वाटूं लागतो.

शेळीसारखें खाणें आणि गांवांत फिरणें—स्वैरवर्तन.

शेळ्यांत लांडगा आणि बायकांत हांडगा—बायकांत पुरुष लांबोडा या अर्थी. "गुलव्वाचे विसर्जनास मी गेलों म्हणजे मुली 'शेळ्यांत लांडगा आणि बायकांत हांडगा' असें म्हणून माझी टिंगल करीत. "--वि. रा. शिंदे, आत्मचरित्र पूर्वार्ध पान ९८.

शेळें---शेळें शीत निवाचो--(गो.) गार भात निवत टाकण्यासारखें. बिन फायद्याच्या गोष्टी करण्यांत काय फायदा ?

शेळें शिताक वारें घाल्लेले म्हणके—(गो.) शिळया भाताला फुंकर कशाला ? जुनी गोष्ट उकरून काढून तिच्यासाठीं विवाद करण्यांत अर्थ नसतो.

शैल---शैल तुटणें—बुद्धि पालटणें. ' त्यानंतर शिद्दीचे शैल तुटले. '—शिवच. ५५.

शैल---शैले शैले न माणिक्यं—रत्नें प्रत्येक डोंगरावर सांपडत नाहींत. त्याप्रमाणें चांगली गोष्ट सर्व ठिकाणीं असते असें नाहीं. क्वचित कोठें तरी असते. सबंध श्लोक असा—शैले शैले न माणिक्यं मौक्तिकं न गजे गजे। साधवो नहि सर्वत्र चंदनं न वने वने॥

शोध---शोध ठेवणें— लक्ष ठेवणें; चौकशी करणें.

शोधु करुनी पाहे : धीरज मौल्य वस्तु आहे:—(महानु.) [धीरज = धैर्य ?] धैर्य म्हणजे अमोलिक वस्तु आहे खास.

शोधु चडू, बोधु थोडो—(गो.) चिकित्सा फार पण ज्ञान कमी.

शोधक---शोधकस्तत्र दुर्लभः ।—' योजकस्तत्र दुर्लभः ' यावरून बनविलेली म्हण.

शोभणें---शोभेल तें बोलावें, पचेल तें खावें—रुचेल तें बोलावें, पहा.

शोभा---शोभा करणें--भूषविणें; गौरविणें. (उप.) फजीती करणें; धिःकार, अपमान करणें. ' चिंतोपंत वगैरे तीन असामींस शोभा करून किल्ल्यावर टाकणार. '—ख ५१३०.

शोभा होणें—फजिती होणें. 'तुमची नको का शोभा व्हायला ? ' — भा २५.

शौक---शौकदाद इलाही है--उपभोग घेणें हें ईश्वराच्या कृपेवर अवलंबून आहे.

शौकिन---शौकिन बुढिया चटइका लहंगा—बुड्ढी घोडी लाल लगाम याप्रमाणें. म्हातारी शृंगार करायला निघाली व चटईचा लंघा नेसली.

शौच---शौच होणें--१ शौचास लागणें, होणें; भीतीनें परसाकडेस होणें. २ (ल.) भिणें.

***शौच्याहून आल्या नि तुरी शिजल्या**--तुरी शिजायला कसला वेळ लागतो ? शौच्याला जातांना शिजायला लावाव्या नि परत आल्यावर पाहावें तो तेवढ्या ५।१० मिनिटांत त्या शिजून तयार, असा दृष्टांत देऊन एखादें काम किती सोपें आहे नि आपण किती अल्पावधींत तें करूं हें दाखविण्यासाठीं उपरोधानें ही म्हण योजितात.

श्मशान---श्मशान रुदन-रोदन--१ वायफळ, व्यर्थ शोक, २ वरवरचा शोक.

श्मशान विरक्ति-वैराग्य--मृत्यु पाहून उपजलेलें वैराग्य; त्यावेळीं संसाराबद्दल वाटणारा तिटकारा; तात्कालिक विरक्ति, वैराग्य. पण हें फार वेळ टिकत नाहीं.

श्याम—शामसुंदर बेटी चुला फुंकने बैठी, और नकटा बेटा चावडीवर बैठा--मुलगी अतिसुंदर असली तरी तिला स्वयंपाकघरांतच राहावें लागतें. व मुलगा नकटा जरी असला तरी तो चावडींत जाऊन बसतो. स्त्रीपुरुष यांना समाजांत कोणतें स्थान मिळतें हे यांत ध्वनित केलेलें आहे.

श्रम---श्रम टाकणें—दुःख परिहार होणें. 'तो स्वामीच्या देखिलें आश्रमातें । कांहीं चित्तें टाकिलें हो श्रमातें।'

श्रम मागून घेणें-- श्रमाबद्दल खेद व्यक्त करणें. 'घडलें श्रम मागून घेतो '--पला २०. ४१.

श्रमानुसार लाभ--कष्ट तसें फळ.

श्रमाविणें जिणें । तर होवो अन्नाविणें ॥—श्रम केले नाहींत तर अन्न मिळत नाहीं.

श्रवण---श्रवणभक्ति करणें—नवविधा भक्तींपैकीं श्रवणभक्ति ही एक आहे. नुसतें ऐकणें, कान देणें.

श्राद्ध---शहाण्णव श्राद्धें—अमावास्या १२, युग ४, मनु १४, संक्रांति १२, वैधृति १३, व्यतिपात १३, महालय १६, अन्वष्टक्य ८, पूर्वेद्यु. ४. अमायुगमनुक्रांति वैपातमहालया । अन्वष्टक्यांच पूर्वेद्युः षण्णवत्यः प्रकीर्तिताः ॥

विकत श्राद्ध घेऊन सव्यापसव्य करणें—नसती पीडा, लचांड मागें लावून घेणें.

श्री---श्रीची गांठ--गांड फोडणें-- श्री हे अक्षर काढणें; पाटीवर बसणें; लेखनास आरंभ करणें; लिहितां येणें. 'अद्याप श्रीची गांड फोडतां येत नाहीं, म्हणे मी शहाणा !'

श्रीच्या मागोमाग ग येतो—श्रीगणेशा०यामध्यें श्री नंतर ग हें अक्षर असतें. यावर कोटी करून श्री म्हणजे लक्ष्मी आल्यानंतर ग म्हणजे गर्व येतो. द्रव्य मिळालें कीं गर्व वाढतो.

श्रीखंड---श्रीखंडाचा बेत, दह्याला त्रास—भलत्याच मनुष्याची कुरकुर.

श्रीगणेश---श्रीगणेशा—श्रीगणेशायनमः असा धडा नवीन अक्षर शिकणाऱ्या मुलास प्रथम घालून देतात. (ल.) कार्यारंभ; पहिला धडा; सुरुवात. 'एकादा अक्षरशत्रू हमाल असो, किंवा कवींचा कवि, आणि संजीवनी विद्येचा धनी एकादा शुक्राचार्य असो, दोघांचाहि या शास्त्रांतला श्रीगणेशा एकच—हा एकच प्याला !'—एकच प्याला ४.४ 'तुम्ही गेले दिवशींच मी (स्वयंपाकाचा) श्रीगणेशा केला.'--दाजी १.८६.

श्रीगणेशाचें वळण घालणें—धडा देणें. 'त्याला नम्रतेच्या श्रीगणेशाचें वळण घालून द्यायचें आहे.' --उग्र ३.४.

श्रीगणेशायनमः—प्रारंभ; सुरुवात. 'पहिली श्री० ची झटापट लुतुफ्खानानें प्रत्यक्ष आपल्या डोळ्यानेंच पाहिली होती.'--पामो २१७.

श्रीमंत—श्रीमंताचा नातु--श्रीमंतीची ऐट आणणारा निर्धन मनुष्य.

***श्रीमंत लोक परावलंबी, सामर्थ्य नाहीं अंगीं**-श्रीमंत लोकांस स्वतः कोणतीहि गोष्ट करावयाची संवय नसते व ते प्रत्येक बाबतींत दुसऱ्यावर अवलंबून असतात.

श्रीमंताचा आला गाडा नि गरिबाच्या वाटा मोडा—पाठभेद--अडाण्याचा आला गाडा नि गरिबांची घरें मोडा. अडाणी पहा.

श्रीमंताचा केर नि गरिबचा शेर--श्रीमंत नि गरीब यांच्या गरजांत, रहाणींत फरक असतो. श्रीमंतांना ज्या गोष्टीची किंमत वाटत नसते, गरिबाला ती मोलाची वाटते. श्रीमंतांच्या उष्टावलेल्या पदार्थांवर गरीब पोट भरतात.

श्रीमंताचा केर भरला, दारिद्र्याचा शीण सरला--श्रीमंताच्या घराचा केर गोळा केला तरी दरिद्र्याचें दारिद्र्य जातें.

श्रीमंताची बायको लाडकी, भिकाऱ्याचें पोर लाडकें—धनवानाचे स्त्रीस काम करण्याची शरम वाटते व भिकाऱ्याचे पोरांस भीक मागण्यास शरम वाटते. या मुळें तीं काम करीत नाहीत म्हणून दोन्ही लाडकीं.

श्रीमंताचें खरकटें आणि गरिबाला पक्वान भेटे--श्रीमंतानें टाकलेलें खरकटेंहि गरिबास मिष्टान्नासारखें असतें.

श्रीमंताचें जळूं नये घर, तरुणाची मरूं नये बायको व वृद्धाचा मरूं नये पुत्र--मागें पहा.

श्रीमंताचें मूल नि गरिबाची बायको लाडकी असते—श्रीमंतास बहुधा मूल होत नाहीं त्यामुळें एखादें झाल्यास ते त्याचे फार लाड करतात. त्याचप्रमाणें

गरिबास सहसा बायको मिळत नाहीं त्यामुळें तोहि बायकोचे फार लाड करतो.

श्रीमंतानीं गू खाल्ला तर औषधासाठीं व गरिबांनीं खाल्ला तर पोटासाठीं—मागें पहा.–पामो १५.

श्रीमंताला वाटी, गरिबाला नरोटी--पात्रतेप्रमाणें सत्कार.

श्रीमंताला शाली, गरीबाला वाकळी—योग्यते प्रमाणें आहेर.

श्रीमंताला हाय हाय, गरिबाला खाय खाय—श्रीमंतास अनेक दुःखें पाठीशीं लागलेलीं असतात त्यामुळें तो नेहमीं विवंचनेंत असतो व गरीब भुकेनें तरफरडत असतो.

श्रीमंती खाशाचीः घरीं कळा जोशाची---(महानु.) मोठा श्रीमान् माणूस जेव्हां दरीद्रीपणानें राहातो तेव्हां म्हणतात.

श्रीमंतीला उतरती कळा आणि गरिबीला चढती कळा—श्रीमंत खालीं व गरीब वर असा चक्रनेमिक्रम चालतो.

श्रीमन्महा—धार्मिक कृत्याच्या आरंभीं श्रीमन्महागणाधिपतये नमः असें म्हणून सुरुवात करतात. प्रारंभ. "झाल्या स्वाऱ्या जेधवा आसनस्थ, शास्त्र्यांनीं 'श्रीमन्महा' घोष केला,"–काव्यकिरीट पृ. ५१. 'आमच्याकडे इकडे अधिकारी मंडळांत कलहाचा श्रीमन्महा हेस्टिंग्स व त्याचे कौन्सिलदार यांनीं पहिल्या पासूनच केला.'- केसरी.

श्रीमुख---श्रीमुखांत देणें—थोबाडींत मारणें. 'ऐकतांच दीव्ही श्रीमुखांत जेव्हां।'--सप्र२.८१.

श्रुत---श्रुत करणें—ऐकविणें; सांगणें; सुचविणें.

श्वा, युवा, मघवा--(कुत्रा, तरुण व इंद्र) एका सूत्रांत या तीघांना पाणिनीनें गोविलें आहे. आपल्या ज्याचा कांहीं एकमेकांशी संबंध नाहीं, ज्यांची योग्यता फार भिन्न आहे अशा गोष्टी एका शेजारीं एक मांडणें; एकत्र आणणें. विवेकवान् पाणिनि एकसूत्रे श्वानं युवानं मघवानमाह।,

श्वास---श्वास सोडावयास लावणें—उसासा टाकविणें; आशा भंग करणें. 'सोडाया लावू श्वास।' --मरा संग्रा, ५६.

***श्वासु आसवरेक घ्यासु आसता**--(गो.) शेवटचा श्वास चालू असेपर्यंत लोभ सुटत नाहीं.

श्वास तो आस—आस पहा.

ष

षट्--ड्---षट्कर्णीं होणें-जाणें--सहा कानांना म्हणजे तीन माणसांना कळणें. गुप्त गोष्ट फुटणें. 'मोठे कार्यांची चर्चा षट्कर्णीं झाली असतां दौलतींत नाश पडावयाचा.'–शिवदि ८४. षट्कर्णो भिद्यते मन्त्रश्चतुष्कर्णः स्थिरो भवेत्। तस्मात्सर्वप्रयत्नेन षट्कर्णं वर्जयेत् सुधीः ॥—पंचतंत्र १.११२.

षड् अरि—१ काम, २ कोध, ३ लोभ, ४ मोह, ५ भय, ६ शोक.

षड् उपशास्त्र--१ शैव, २ सांख्य, ३ नैयायिक, ४ चार्वाक ५ बौद्ध, ६ जैन.

षड् ऊर्मी—१ शोक, २ मोह, ३ जरा, ४ मृत्यु, ५ क्षुधा, ६ पिपासा.

षड् ऋतु—१ वसंत, २ ग्रीष्म, ३ वर्षा, ४ शरद, ५ हेमंत, आणि ६ शिशिर.

षट् कर्मे--(अ) ब्राह्मणानें आचरावयाचीं सहा कर्मेंः १ अध्ययन, २ अध्यापन, ३ दान, ४ प्रतिग्रह, ५ यजन, आणि ६ याजन.–पंचदशकर्में पहा. (आ) वैश्यानें आचरावयाचीं षट्कर्में--१ यजन, २ अध्ययन, ३ दान, ४ कृषि, ५ गोरक्ष, ६ वाणिज्य. (इ) तंत्रशास्त्रांतील सहा कर्मेंः--१ जारण, २ मारण, ३ उच्चाटण, ४ मोहन, ५ स्तंभन, आणि ६ विध्वंसन. (ई) ब्राह्मणाच्या उपाजीविकेचीं सहा साधनेंः—१ कणवृत्ति, २ प्रतिग्रह, ३ याचना, ४ कृषि, ५ व्यापार, आणि ६ गोरक्षण किंवा वार्धुषिकवृत्ति (सावकारी).

षट् कोश--१ त्वचा, २ रुधिर, ३ मांस, ४ मज्जा, ५ अस्थि, ६ मेद.

षड् गुण—समग्र (अ) १ ऐश्वर्य, २ धर्म, ३ यश, ४ श्री, ५ ज्ञान, आणि ६ वैराग्य,

(आ) राजशासनांतील– १ संधि, २ विग्रह, ३ यान, ४ संस्थान, ५ आसन, व ६ द्वैधीभाव.

(इ) विक्रम राजाचे--१ उद्योग, २ साहसकर्म, ३ धैर्य, ४ बळ, ५ बुद्धि, ६ पराक्रम. (सिंहासनी)

(ई) गायनांतील १--सुस्वर, २ सुरस, ३ सुराग ४ मधुराक्षर, ५ सालंकार, ६ प्रमाण.

षड् गुणैश्वर्य- १ यश, २ श्री, ३ कीर्ति, ४ विज्ञान, ५ औदार्य, ६ वैराग्य.

षट् चक्रें—योगशास्त्रांतील (अ) १ मूलाधार, २ लिंग, ३ नाभि, ४ हृत्, ५ कंठ, ६ मूर्ध. हीं देहाच्या नाडीवर असतात. (आ) १ आधारचक्र गुदस्थान, २ स्वाधिष्ठानचक्र लिंगस्थान, ३ मनपुरचक्र नाभिस्थान, ४ अनुहातचक्र हृदयस्थान, ५ विशुद्धिचक्र कंठस्थान, ६ ज्ञानचक्र भ्रूस्थान.

षड् दर्शनें—(अ) १ सौर, २ शाक्त, ३ गाणपत्य, ४ शैव, ५ वैष्णव, ६ स्कांद. (आ) १ सांख्य, २ योग, ३ न्याय, ४ वैशेषिक, ५ मीमांसा, ६ वेदांत.

षड् दळ—लिंगस्थान. सहापाकळ्यांचीं नावें— १ व्यति, २ वारुणी, ३ रोहिणी, ४ अमूर्ती, ५ परिपूर्ती.

षट् पारतंत्र्यें--पारतंत्र्यें पहा.

षड् दोष—सहा दोषः १ झोप, २ जडत्व, ३ भीति, ४ क्रोध, ५ आळस, ६ चेंगटपणा. षड्दोषाः पुरुषेणह हातव्या मूतिमिच्छता । निद्रा तन्द्रा भयं क्रोध आलस्यं दीर्घसूत्रता ॥–हितोपदेश, मित्रलाभ ३४.

षण् नकार--सहा प्रकारें नकार देणें. मौनं कालविलम्बश्च प्रयाणं भूमिदर्शनम्। भृकुटबन्य मुखीवार्ता नकारः षड्विधः स्मृतः ॥

षट् प्रश्न—चार पुरुषार्थ, ५ जगताच्या उत्पत्तीचें कारण व ६ खरें ईश्वरी तत्त्व; या सहाचें ज्ञान असणारा सिद्ध पुरुष.

षड् भाव—(अ) षड्रिपु पहा. (आ) १ जायते, २ अस्ति, ३ वर्धते, ४ विपरिणमते (प्रौढ होणें), ५ अपक्षीयते (क्षीणता) ६ नश्यति (मृत्यु).

षड् रस—१ मधुर, २ कटु, ३ कषाय, ४ आम्लक, ५ क्षार आणि ६ तिक्त हे सहा रस.

षड् राग—१ मालव, २ मल्लार, ३ श्रीराग, ४ वसंत, ५ हिंदोल, ६ कर्नाट.

षड् रिपु--१ काम, २ क्रोध, ३ मोह, ४ लोभ, ५ मद, ६ मत्सर.

षड् लवण—१ मीठ, २ सैंधव, ३ संचळ, ४ बीडलोण, ५ रोमक, ६ पांसव. (निघंटु)

षड् वार्तिक--(महानु.) १ श्रुति, २ स्मृति ३ बुद्धाचार, ४ मार्गरुढी, ५ वर्तमान, ६ लौकिक.

षड् विकार--(अ) १ जायते (उत्पन्न होणें), २ अस्ति (राहणें), ३ वर्धते (वाढणें), ४ विपरिणमते (तारुण्यांत येणें), ५ अपक्षीयते (जरा येणें), ६ विनश्यति (मरणें). (आ) षड्रिपु पहा.

षट् शास्त्रें—(अ) षडंगें पहा. (आ) षडदर्शनें पहा. (इ) दोन न्याय, दोन मीमांसा, सांख्य आणि योग.

षट् सुख--सहा सुखें--१ पैसे मिळणें, २ नेहमीं निरोगी प्रकृति, ३ प्रेमी व ४ मधुर भाषण करणारी बायको, ५ आज्ञेप्रमाणें वागणारा पुत्र, ६ पैसा मिळवून देणारी विद्या जवळ असणें. अर्थागमो नित्यमरोगिता च प्रिया च भार्या प्रियवादिनी च । वैश्यश्च पुत्रोऽर्थकरी च विद्या षड् जीवलोकस्य सुखानि राजन् ॥–हितोपदेश प्रस्ताविका १९.

षडंग--(अ) दोन हात, दोन पाय, मस्तक आणि कटि. (आ) १ शिक्षा, २ कल्प, ३ व्याकरण, ४ ज्योतिष, ५ छंद, ६ निरुक्त.

षडंगन्यास—संध्या, देवपूजा इ. वेळीं १ हृदय, २ शिर, ३ शेंडी, ४–५ दोन हात, ६ नेत्र (ललाट) यां सहा अंगांना स्पर्श करून टाळी वाजवितात.

षडक्षरीमंत्र-- (अ) 'कसें करूं काय करूं' असा विचार करीत बसणें. (आ) ॐ नम. शिवाय।

षडूर्मि—१ शोक, २ मोह, ३ क्षुधा, ४ तृष्णा, ५ जन्म, व ६ मरण.

षट्कर्णी करणें आणि घोटाळयांत पडणें; षट्कर्णी झालें आणि मन घोटाळयांत पडलें— अनेकांना कळल्यामुळें मसलत बिघडली व फार मोठा विचार पडला. कोणत्याहि गोष्टींचा बभ्रा झाला कीं असेंच होतें.

षड्योग कपिलाषष्ठी--१ भाद्रपद मास, २ कृष्णपक्ष, ३ षष्ठी, ४ मंगळवार, ५ रोहिणी, ६ व्यतिपात हे सहा योग ज्यावेळीं एकत्र जुळतात ती. (धर्मसिंधु)

षंढ--षंढाला जनानखाना, भेरटाला चतुरंग सेना—(सारखीच निरुपयोगी). अर्थ उघड आहे. तु०—नपुंसकाला पद्मीण.

षण्मास—षण्मासीचा वायदा—कांहीं पद्यमय कोड्यांच्या शेवटीं कोडें सोडविण्यास सहा महिन्यांची मुदत दिलेली असते; उदा० रामाचा जनिता तथा यमपिता हे दोन्ही बंधू कसे । सूर्याची भगिनी यमासी जननी हें कैंवि नातें असे । सूर्याचा पुतण्या यमासि म्हणतो मी बाप तूझा कसा । बोले विठ्ठल हा पदार्थ उमगा षण्मासिचा वायदा ॥ " एकंदरींत, 'षण्मासींचा वायदा' नव्हे तर 'ही रावणाचीच जांभई' अथवा होत चालली होती."—छच ८०

षोडश—षोडश कला (चंद्राच्या)--१ शंखिनी, २ पद्मिनी, ३ लक्ष्मी, ४ कामिनी, ५ पयोष्णी, ६ ऐश्वर्य वर्धिनी, ७ आश्चर्यदा, ८ आल्हादा, ९ व्यापिनी, १० मोदा, ११ मोहिनी, १२ प्रमापदा, १३ क्षीरवर्धिनी, १४ वेगवर्धिनी, १५ विकासिनी, १६ सोमिनी. (आ) अमृता मानदा पूषा तुष्टी पुष्टी रतिर्धृतिः। शशिनी चंद्रिका कांतिर्ज्योत्स्ना श्रीः प्रीति रेव च । अंगदाच तथा पूर्णा स्मृतां षोडशैवै कलाः॥

षोडश महादानें—१ तुला पुरुष, २ हिरण्यगर्भ, ३ ब्रम्हांड, ४ कल्पवृक्ष, ५ गोसहस्र, ६ हिरण्य कामधेनु, ७ हिरण्याश्व, ८ हिरण्याश्वरथ, ९ पंचलांगलक, १० धरा, ११ विश्वचक्र, १२ कल्पलता, १३ सप्तसागर, १४ रत्नधेनु, १५ महाभूतघट, १६ कामधेनु.

षोडश मातृका—गौरी पद्मा शची मेधा सावित्री विजया जया । देवसेना स्वधा स्वाहा मातरो लोकमातरः। शांतिः पुष्टिर्धृतिस्तुष्टि : कुलदेवात्मदेवता :।

षोडश शृंगार—सोळा शृंगार पहा.

षोडश संस्कार—सोळा संस्कार पहा.

षोडशोपचार--१ आवाहन, २ आसन, ३ पाद्य, ४ अर्घ्य, ५ आचमन, ६ स्नान, ७ वस्त्र, ८ यज्ञोपवीत, ९ गंध, १० पुष्प, ११ धूप, १२ दीप, १३ नैवेद्य, १४ दक्षिणा, १५ प्रदक्षिणा, १६ मंत्रपुष्प.

***प्राप्ते तु षोडशे वर्षे गर्दभी अप्सरा भवेत्; षोडश वर्षा भवेत् कन्या अप्सरा सुंदरी वेत्**—सोळाव्या वर्षी प्रत्येक स्त्री कुरूप असली तरी अप्सरेसारखी सुंदर दिसूं लागते. अप्राप्तयौवना नारी न कामाय न शान्तये। संप्राप्ते षोडशे वर्षे गर्दभी चाप्सरायते॥

—————

स

सई—सई करणें—१ सर करणें. ' किल्ला सई करून देतों तुला ।'—ऐपो ५३. २ मार्ग आक्रमण करणें; पोंचणें. ' आपण संध्याकालपर्यंत मकाण सई करूं. '

सई—सई करणें—(व.) बसविणें. ' चाकांत सई करणें. '

सई होणें—(व.) बरोबर नेटकें होणें; बरोबर होणें. ' चाकांत आस सई होणें. '

(कोणी एक माल) सई करणें–म्हणणें—(माल) घेण्याचे ठरविणें; कबूल करणें; निश्चित ठरविणें.

सई—सई भरणें—(कर.) गल्लींत गोटी टाकणें.

सकट—सकट घोडे बारा टके—सर्व घोडयांची सरसकट किंमत प्रत्येकीं बारा रुपये प्रमाणें. म्हणजे सर्वांस एकाच मापानें तोलणें; सारखे मानणें; एकाच दर्ज्याचे समजणें; सर्वांस सारखें वागविणें.

संकट—संकट घालणें—(हट्ट धरून) अडचणींत टाकणें; संकटाची गोष्ट करावयास सांगणें; सांकड, भार घालणें. ' मी तुला कांहीं संकट घातलें नसतां...' —नामना ७३.

संकटामोर उभा राहणें—संकटास तोंड देणें.

***संकटकाल थोरपणा दाखवितो**--श्रेष्ठ मनुष्याची परीक्षा अडचणीच्या वेळीं होते. मित्रस्वजनबंधूनां बुद्धेर्धैर्यस्य चात्मनः। आपन्निकषपाषाणे नरो जानाति सारताम्॥ —सुर. १५३. १५.

संकटकाल हा मित्रत्वाची कसोटी आहे—आपत्तीच्या वेळींच खरी मित्राची परीक्षा होते. जानीयात्संगरे भृत्यान्बांन्व्यसनागमे। आपत्कालेषु मित्राणि भार्यां च विभवक्षये॥—सुर १५५.९८. आपदि मित्रपरीक्षा शूरपरीक्षा रणांगणे भवति। विनये वंशपरीक्षा स्त्रियःपरीक्षा तु निर्धने पुंसि॥ —सुर. १७०. ७५५.

संकटकाल हा वाईटाचें घर आहे—एकदां आपत्ती यावयास लागल्या म्हणजे मग त्या अनेक येतात. सर्व प्रातिकूळ गोष्टी आपल्या संकटकालीं घडून येतात.

संकटकालीं मित्रचि वाली—संकटामध्यें आपलें रक्षण आपल्या मित्राकडूनच होतें.

संकटकाळीं सौद्याची भाषा बोलूं नये—आपल्या किंवा दुसऱ्याच्या अडचणीच्या वेळीं कोणत्याहि गोष्टींत फारशी घासाघीस न करतां काम साधून घ्यावें व अडचण दूर करावी. दुसऱ्याच्या संकटाचा फायदा घेऊं नये.

संकट टळलें, हायसें वाटलें--संकटांतून एकदां बाहेर पडलें म्हणजे जीव थाऱ्यावर येतो.

संकट येतकंच व्यंकटरमणा—(गो.) संकटें, आपत्ती येऊं लागल्या म्हणजेच मनुष्य ईश्वराच्या कृपेची याचना करतो; एरवीं बेफिकीर राहातो.

संकटाचें निवारण देवाचें स्मरण— परमेश्वराचें स्मरण केलें असतां तो कोणत्याहि आपत्तींतून पार पाडतो.

संकटीं ईश्वर साहाय--आपत्कालीं परमेश्वराचें स्मरण केलें असतां तो मार्ग दाखवितो. "तों 'संकटीं ईश्वर सहाय' तसें जाहलें. प्रत्यक्षास प्रमाण डोहांत पाणी बायकांस मांडीभर लागोन नदीपार झाल्या."–भाब. २८.

संकटीं उपयोगी पडतो, तोचि मित्र खरा असतो—खऱ्या मित्राची कसोटी आपत्कालीं होते. वर पहा. A friend in need is a friend indeed.

संकटीं दुसरें संकट येतें--संकटामागून संकट उद्भवतें. तु०—छिद्रेष्वनर्था बहुलीभवन्ति ।

सकल— **–सकल जें चमके नच हेम तें ।**—(कवि चंद्रशेखर) 'चकाकतें तेवढें सोनें नसतें' पहा.

सकळ यातीमध्यें ठक हा सोनार— सोनार पहा. सोनार आणि झारेकरी पहा.–तुगा ३३९०.

संकल्प—**–संकल्प आणि सिद्धि यांच्यामध्यें परमेराची इच्छा उभी असते**—एकच प्याला १.१. मनुष्यानें जो संकल्प केला असेल त्याप्रमाणेंच अखेर पर्यंत घडतें असें मुळींच नाहीं. पुष्कळ वेळां संकल्प पुरा होण्याच्या ऐन वेळेस कांहीं संकट उभें राहून सिद्धि हातची जाते. पण ईश्वर कृपा करतो तेव्हां सुरळीत होतें. There is many a slip between the cup and the lip.

संकल्प करचे कित्तरी अमृतघडि खर्चली—(गो.) संकल्प करतां सुमुहूर्त टळून जाणें. फाजील विचार करून सुसंधि वायां दवडणाऱ्याला उद्देशून म्हणतात.

संकलपाखालीं पर्वणी (संपायची)— प्रारंभीच्या पूर्वतयारीमध्येंच सर्व वेळ जाऊन मुख्य गोष्ट बाजूला राहणें. नमनाखालीं रात्र सरून कीर्तन मुळींच न होणें.

सत्य संकल्पाचा दाता भगवान ।—सत्य पहा.

सकळ—**–सकळ घालावें पोटीं, गोड बोलावें होटीं**--(महानु.) सर्व अपराध विसरून जाऊन अपराध्याशीं गोड बोलावें हाच चांगुलपणा.

संकळीत—**–संकळीत बोलणें**---(व.) संदिग्ध बोलणें.

सकार—**–सकार मारणें**--स्वीकारल्याचा शेरा मारणें. याचे उलट नकार.

सकाळ—**–सकाळ वकाळ**—(ना.) झटपट; न रेंगाळता.

सकाळचा तारा—शुक्र ज्यावेळीं प्रहाटे पूर्वेकडे दिसतो त्यावेळीं त्यास Morning Star किंवा सकाळचा तारा म्हणतात.

सकाळीं उठून एखाद्याचें तोंड बघणें—सकाळीं चांगल्या प्राण्याचें दर्शन झाल्यास सबंध दिवस चांगला जातो. याच्या उलट वाईट अभद्र व्यक्ति किंवा प्राणि यांचें तोंड सकाळीं पाहूं नये;कारण ते आपल्यास हटकून अपशकून करतात, अशी समजूत. 'सकाळीं उठून तुमचं तोंडसुद्धां बघूं नये कोणीं ।'–एकच प्याला १.२.

***सकाळ ही रात्रीची मुलगी आहे**--रात्रीपासून सकाळ होते. तेव्हां रात्रीचा कांहीं गुणधर्म सकाळमध्यें उतरलेला असणारच.–किरण ९-९-१८७७.

सकाळच्या चंद्रासारखें,गरिबाला धन पारखें—ज्याप्रमाणें सकाळीं आकाशांत दिसणारा चंद्र निस्तेज असतो त्याचा प्रकाश पडत नाहीं त्याप्रमाणें गरीब मनुष्य निर्धन असतो.

सकाळीं फासे आणि दुपारीं सोंगट्या— सर्व वेळ जुगारांत घालविणें; कांहीं काम न करणें; सारादिवस खेळत असणें.

सकाळीं सौभाग्यवती,संध्याकाळीं गंगाभागीरथी---एकदां लाभ तर दुसऱ्या वेळीं शिव्या. राग लोभ क्षणिक. 'घटकेंत सौभाग्यवती, घटकेंत गंगाभागीरथी.'–गंगा पहा.

सकुटुंब—**–सकुटुंबी मोक्षा जाउं पांताये**--(महानु.) सहकुटुंब मोक्षाला जाऊं पाहातो आहे ! फार मोठी आकांक्षा.

सुकुमार—**–सुकुमाराची राशी**—अत्यंत सुकुमार, नाजूक.

सुकुमार सऊ, घोरपडी इतकी मऊ—नाजूकपणाचा आव आणणारी राकट दांडगट जी स्त्री तिच्याबद्दल म्हणतात.

संक्रांत---संक्रांत बसणें-येणें—संक्रांत ज्या वाहनावर बसते, ज्या ज्या गोष्टींचा संक्रांत स्वीकार करते त्या महाग होतात, त्यांवर आपत्ति येते अशी समजूत आहे. यंदा संक्रांत कशावर बसली आहे असें विचारण्यांत येतें. अशुभ काल येणें; आपत्ति ओढवणें. 'तुझ्या माझ्या सुखावर ही संक्रांत बसली तरी तिळमालाच्या प्रीतीनेंहि गोड बोलून आपण आजचा सण साजरा केला पाहिजे.'—एकच प्याला, ५.१.

संक्रांतीचें गाडगें डोक्यावर फुटणें—बदनामी होणें; आळ येणें.

सखा---सखा देवा विठ्ठला—सखारामबापु बोकील, देवाजीपंत चोरघडे, व विठ्ठल सुंदर. साडेतीन शहाणे पहा.

सखाहि गेला न् टकाहि गेला---[सखा=आवडता मनुष्य. टका, टका धन, पैसा.] कोणी प्रिय मनुष्य आजारी पडला. त्याच्या औषधपाण्याप्रीत्यर्थ व शुश्रुषेप्रीत्यर्थ त्यानें अमूप द्रव्य खर्च केलें; तरी पण उपयोग न होतां तो प्रिय मनुष्य अखेर मेलाच, तेव्हां लोक म्हणतात, 'त्याचा सखा हि गेला टकाहि गेला.' महानु०--सख्यासाठीं टका गमविला.

सखी---सखीचा लाल—श्रेष्ठ मातेचा पुत्र. अतिशय उदार, धर्मात्मा.

सखू- सखू पाठ घांसली तर घासूं पण खंडीचा तोटा कसा सोसूं--घरचें खाऊन दुसऱ्याची उठाठेव करणें; लष्करच्या भाकरी भाजणें.—[एक होता शेतकरी. त्याची एक लग्न झालेली मुलगी होती. जांवई व मुलगी दिवाळसणास आलेली होती; परत जाते वेळीं त्यांना पोंचाविण्यास सासरा कांहीं अंतरपर्यंत गेला; वाटेंत त्यास एक शेत लागलें, तेव्हां जांवई सासऱ्यास म्हणतोः काय राव, ह्या शेतांत किती धान्य पिकेल. सासऱ्यानें उत्तर दिलें: तीन खंडी. त्यावर जांवई म्हणालाः दोन खंडी. कोणीहि आपला दुराग्रह सोडीना. होतां होतां दोघे वर्दळीस आले. जांवयानें सासऱ्यास उताणे पाडून तो त्याच्या छातीवर बसला आणि जमिनीला त्याची पाठ घासूं लागला. कोणाचा पक्ष घेऊन भांडण मिटवावें हें मुलीला समजेना. शेवटीं ती बापास म्हणाली, "बाबा! जाऊं द्या, माघार घ्या." तेव्हां तो म्हणाला, "सखू, पाठ घांसली तर घासूं, पण खंडीचा तोटा कसा सोसूं?"

सख्खा---सख्खा सावत्र भाऊ जेथें जन्मला तें घर बुडालें—जेथें भाऊबंदकी उत्पन्न होते त्या घराचा नाश होतो.—टिसू २७९.

सख्खे भाऊ पक्के वैरी—भावाभावांचें क्वचितच सख्य असतें, बहुधा त्यांत वितुष्ट येतें.

सख्ख्या जावा, उभा दावा; सख्खे भायजी उभे दायजी—सख्या जावा व सख्खे भाऊ यांचें क्वचितच पटतें.

संख्या---संख्येला भरती, गुणांना ओहोटी—गुणवान नसलेलीं माणसें अनेक असलीं तरी त्यांचा कांहीं उपयोग नसतो. फार मुलें झालीं म्हणजे त्यांत बुद्धिवान कमी असतात. झाडाला फार फळें आलीं म्हणजे तीं मोठीं व इरसाल होत नाहींत.

संग---संग तसा रंग--मनुष्याचा स्वभाव त्याच्या सवंगड्याप्रमाणें होतो. संगति : संगदोषेण.

असंगाशीं संग प्राणाशीं गांठ---असंग पहा.

संगत-ति--संगतगुण की सोबतगुण--सहवासानें परस्परांचे गुण परस्परांस जडतात.

संगत--संगत संतन की कर ले तो गढत गढत गढ जाय--सज्जनांची मैत्री केल्यास ती सारखी वाढत जाते ती कधीं आटत नाहीं.

संगति—संगतिः संगदोषेण सती च मतिविभ्रमा-कुजनांची संगति केल्यास सज्जनांचाहि बुद्धिभ्रंश होतो. दुर्जनांचे गुण सज्जनासहि बाधक झाल्याशिवाय राहत नाहींत. लौकिक श्लोक असाः-संगतिः संगदोषेण सती च मति विभ्रमा ॥ एकरात्रप्रसंगेन काष्ठघंटाविटंबना ॥ [एक गाय फार गरीब होती. ती नेहमीं सायंकाळीं रानांतून चरून सरळ घरीं येई. एक दिवशीं तिची एका उनाड गाईशीं गांठ पडली. त्या उनाड गाईस रात्रीं दुसऱ्याच्या शेतांत चोरून शिरून चरण्याची खोड होती त्या उनाड गाईबरोबर ही गरीब गायहि त्या रात्रीं घरी न जातां बाहेर राहिली व तिच्याबरोबर एका मळ्यांत रात्रीं चरावयास शिरली. त्या गाईची चाहूल मालकास लागून

तो पहावयास आला तेव्हां उनाड गाईस रोजची संवय असल्यामुळें ती चाहूल लागतांच पळून गेली व गरीब गाय त्या मालकाच्या हातीं लागली. तेव्हां त्यानें तिला धरून तिच्या गळ्यांत लोढणें बांधलें. याप्रमाणें कुसंगतीनें एक रात्रच बाहेर राहिल्याबद्दल त्या गाईच्या गळ्यांत कायमचें लोढणें बांधले गेलें.] –शाब २. १९६.

संगतीच्या लोभें , मेले दोघे—एकमेकांच्या सहवासानें दोघांचाहि अधःपात होणें. एका घातकी मनुष्याची संगत केल्यास संगत करणाराचाहि घात होतो.

संगनमत—-संगनमत करणें—ऐक्य करणें; मिलाफ करणें; गट्टी करणें; सहकार्य करणें; एकमत होणें.

संगमनेर—-संगमनेरचा सोळा, आणि धांदरफळचा गोपाळा—अतिशय लुच्चा माणूस. संगमनेर व धांदरफळ हीं गांवांचीं नांवें आहेत.

सगर—-सगराचें नगर अन् नगराचें सगर बनणें–(व.) [सगर=पाऊलवाट. मनुष्य अथवा ढोर अनेकदां एका अरुंद वाटेनें गेलें म्हणजे जी खुणेची वाट पडते तिला सगर म्हणतात.] ज्या जागीं आज केवळ सगर मात्र दिसतो व रहदारी नसते त्या जागीं कांहीं योगायोगामुळें कालांतरानें शहर वसतें; त्याच्या उलट आज जेथें भरभराटलेलें शहर असतें तेथील वैभव गेलें, व्यापार धंदा बसला म्हणजे शहर नामशेष होतें व रान वाढून त्यांतून एखादा सगर मात्र दृग्गोचर होतो. परिस्थितीच्या प्रभावामुळें उच्चनीच दशा प्रत्येक ठिकाणाला येत राहतात.

सगरी—-सगरी रैन बंनबंन फीरी, भोर भयी कव्वेसें डरी—(हिं.) सगळी रात्र रानांत भटकली पण सकाळीं कावळ्याला भ्याली ! (जारिणी सतीचा आव आणतात तेव्हां म्हणतात.)

सगळा—-सगळा गांव मामाचा आणि एक नाहीं कामाचा; सगळा गांव मामाचा, कोणी नाहीं कामाचा; सगळा गांव बाबाचा, आणि कोणी नाहीं माझ्या कामाचा—सगळा गांव सोयऱ्यांनीं भरलेला असला तरी वेळेवर कोणी उपयोगी पडत नाहीं. कितीहि आप्तसंबंधी असले तरी संकटकाळीं कोणी मदत करीत नाहीं.

सगळा गांव भिकारी, तेथें कोण करील बरोबरी (सरोभरी) ?—जेथें सर्वच भिकारी असतात तेथें आपल्या तोलाचे कोण असणार—आपली व्यवस्था कोण ठेवणार.

सगळा स्वैंपाक तयार झाला आणि विसरली मिठाला— सर्व पदार्थ चांगले झाले तरी मिठावांचून सर्व अळणी, बेचव लागतात. मुख्य गोष्टच विसरून बाकी सर्व गोष्टी केल्या तरी त्यांचा कांहीं उपयोग नसतो.

सगळीच उघडी आणि पायाशीं चौघडी—सर्व अंग उघडें टाकून पायगतीं चौघडी ठेवून निजल्यास लज्जारक्षण कशी होणार ? पुष्कळ साधनें असून त्यांचा जर योग्य उपयोग केला नाहीं तर त्यांचा काय फायदा ? योग्य ठिकाणीं जरूर त्या गोष्टीचा उपयोग केला पाहिजे.

सगळी दिवस तळी, खांवक गेल्या अळवाच्या नळी—(कों.) सगळा दिवस वडे वगैरे तळी पण खावयास शेवटीं अळूच्या नळीच ! दिवसभर काम करून फळ पाहावें तों अगदीं क्षुल्लक.

सगळी बायको साळ्याची, अर्धी बायको माळ्याची आणि ऋणकरी बायको ब्राह्मणाची; सगळी साळ्याची, अर्धी माळ्याची, धनीण तेल्याची आणि ऋणकरीण ब्राह्मणाची—साळ्याची बायको सर्व दिवस त्यास त्याच्या कामांत मदत करते; माळ्याची बायको फुलें वेचणें, विकणें, माळा करणें वगैरे काम करून त्याला अर्ध्या कामांत मदत करते; तेल्याची बायको स्वतः कष्ट करीत नाहीं पण तेल्यानें काढलेलें तेल विकण्याचा वगैरे सर्व व्यवहार ती पाहते; पण ब्राह्मणाची बायको कांहीं एक काम न करतां नुसती बसून खाते. गांगा २३४.

सगळी रात कथा केली, काकाशिणीच्या गाणीं गेली—(गो.) अनेक प्रकारें पटवून देऊनहि एखाद्या मूर्खाला न समजणें.

सगळीं बोटां सारखीं नसतात—(गो.) सगळीं बोटें सारखीं नसतात. एकाच आईबापांची मुलें स्वभावांनी, गुणांनीं निरनिराळीं असतात. तु० पांची बोटें सारखीं नसतात; मूर्ति तितक्या प्रकृति.

सगळीं सोंगें येतात पण पैशाचें सोंग येत नाहीं—सर्व, सारीं पहा. (गो.) सगळीं सवंगां हाड येतात, पैशाचे सवंग मात्र हाडुं नजो ' तरतुदीला पैसा पाहिजेना ! तो कोठें आहे ? सगळीं सोंगे०'–संभाजी.

सगळॅ करूं कर्तात, पुण दॅवा कडचॉं दिष्टॉं डॉळ्यांवता—(गो.) समारभांत इतर सगळ्या शिष्टाचाराच्या सगळ्या गोष्टी सढळ हातानें होतात; पण धर्मकृत्यांत मात्र काटकसर होते.

सगळे गलबतांत अर्धी सुपारी माझी—दुसऱ्याच्या मोठ्या मालमत्तेपुढें आपल्या क्षुल्लक गोष्टीची काळजी वाहाणें, हा फार नागडा स्वार्थ आहे. एका माणसानें मालानें भरलेल्या गलबतांत आपली एक अर्धी सुपारी टाकली व गलबत किनाऱ्यावर पोंचून त्यांतील माल उतरणें चालू झालें तेव्हां सर्व गलबतांतील अर्धी सुपारी मागूं लागला !

सगळें घेतां अर्धे जाई—एखाद्या गोष्टीचें सर्वच फळ आपणास मिळावें, इतरांस मुळींच त्याचा वांटा मिळू नये असा हट्ट धरल्यास आपणास शेवटीं अर्धेंहि पदरांत पडेतं नाहीं व सर्वच जातें याकरितां कोणत्याहि गोष्टींत आपला हेका तुटेपर्यंत चालवूं नये.

सगळें ज्याला समजलें तो सगळें क्षम्य समजतो—फार ज्ञानी माणसाला दुसऱ्याचा मोठा अपराधहि क्षम्यच वाटतो. To understand all-is to pardon all इंदू काळे व सरला भोळे.

सगळें झालें आणि शेंसफुलावर आलें—(उप.) सर्व दागिन्यांची हौस पुरली आतां डोक्यांतला दागिना (शेंसफूल) राहिला ! मागें शेंसफूल पहा. अति सोस.

सगळें डोकें गेले तरी हरकत नाहीं पण तिळभर नाक जाऊं देऊं नये—प्राण गेला तरी अब्रूला धक्का लागूं देऊं नये; आपली प्रतिष्ठा कधीं गमावूं नये.

सगळे पालखीपदस्थ होतील तर भोई कोण होईल ?—सगळेच मालक होऊं लागल्यास चाकर कोणी व्हावें. तु० तुम तांडेल हम तांडेल, घमत कोण वांडेल !

सगळें मुसळ केरांत—पुष्कळ गोष्टी करून मुख्य, महत्त्वाची तेवढीच न केल्यास म्हणतात. अति निष्काळजी माणसाला ही म्हण पूर्णपणें लागू आहे.

सगळे वेळ सोपे दोनपारची वेळ कठीण—(गो.) सगळ्या वेळा सोप्या असतात पण दोन प्रहरची जेवणाची वेळ मोठी कठीण असते. सर्व संभाळून नेतां येतें पण भूक संभाळवत नाहीं. भुकेच्या वेळीं खाणें पाहिजेच.

सगळो दिस उघडी (नागडी) नी न्हातानां धरली मांडी—(गो.) दिवसभर विवस्त्र रहाते आणि स्नान करतांना मात्र कमरेभोंवतीं गुंडाळून घेते. आचरटपणाचा नमुना.

सगळो माजो गांव, पाय दवरूंक ना ठाव—(गो.) सगळा गांव आपलाच; पण बसायला मात्र जागा नाहीं.

सगळा लाडू एका घासानें गिळूं जायना—(गो.) सगळा लाडू एकदम गिळण्याचा प्रयत्न करूं नये. मिळालें तरी तें धीमेपणाणें खावें.

सगळया जगाचा, मान आहे रूढीला—रूढीला सर्व जग मान देतें. तु०—शास्त्राद्रुढिर्बलीयसी.

सगळया फळ्णेक एकच ' व '—(गो.) तीच तीच गोष्ट पुन्हां सागणें. कंटाळा येईपावेतों कोणतेंहि काम करणें. (स्लेटपाटी प्रचारांत येण्यापूर्वी लाकडाची फळी (फळणी) वापरण्यांत होती. तिच्यावर धुळीनें लिहित. तिच्यावर एकच व एवढें अक्षर पुन्हा पुन्हा लिहिणें.)

सगळया भाताचा वैश्वदेव—स्वयंपाक झाला म्हणजे थोडा भात घेऊन त्याचा वैश्वदेव करून देवास आहुति देण्याची रीत आहे. पण वैश्वदेवासच जर सर्व भात खर्च केला तर जेवावयास काय राहणार ? याप्रमाणें प्रास्ताविक गोष्टींतच सर्व खर्च केल्यास मुख्य कार्य कसें व्हावयाचें ?

सगळया भितर हुंबरघाट कठीण—(गो.) सगळया घाटांत उंबरघाट कठीण असतो. उंबरघाट पहा.

सगळया शास्त्राचें सार, सुखें करावा संसार—सर्व शास्त्रें मनुष्यानें या जगांत सुखानें कसें रहावें हेंच सांगण्याकरितां उत्पन्न झालीं आहेत.

सगळयाक दिता म्हणतलो कोणाकई दीना—(गो.) सगळयांना देतों म्हणणारा माणूस कोणासच देत नसतो.

सगळयाचीं पावलें हत्तीच्या पावलांत—एका मोठ्या कार्यांत अनेक लहानसहान कामें उरकतात. हत्ती पहा.

सगळयांची विष्टा कावळे खाय—(गो.) कावळा सगळयांची विष्टा खातो. सर्वांच्या पापाचा धनी एक. कावळा पहा.

सगळ्यांनीं सांगितलें आयकूंका, मनाक दिशिलें करका—(गो.) ऐकावें जनाचें आणि करावें मनाचें.

सगा---सग्याची चोरी, मायेशी मात्रागमन---मित्राची चोरी करणें हें मातृगमनाइतेंकच निंद्य आहे.

सग्या सोयऱ्यानीं गर्दी केली त्यांच्यासाठीं पुरण पोळी---सर्व नातेवाईक जमले म्हणजे चमचमीत जेवण करून चैन करतात. पण यजमानाचें कांडात निघतें.

संगीत---संगीतानें आनंद झाला, साप विसरला द्वेषाला--संगीत हें इतकें सर्व प्राणिमात्रास प्रिय आहे कीं सापहि तें ऐकून डोलूं लागतो व क्षणभर आपला दुष्ट स्वभाव विसरून जातो.

संग्रह---संग्रहीं असणें राहणें--१ जवळ असणें. २ पदरी असणें. 'स्वल्प काळींच संग्रहीं राहती.'--दावि २५

सच्ची---सच्चीच्या घरी कुत्ती, शिंदळीच्या घरीं हत्ती---पाठभेद--सतीच्या घरीं० सती पहा. अनीतीनें वागणाऱ्या माणसांची जगांत चलती दिसते. पण सत्त्वशील माणसें दरिद्री असतात. असा उलटा न्याय जगांत आढळतो त्याला उद्देशून ही म्हण आहे.

सजगणी---सजगणी रोकडी, कंबर कांगे वांकडी? [अशिष्ट] पैसा रोख दिला आहे मग अशी अळंटळं कां ? पैशाप्रमाणें योग्य मोबदला पाहिजे.

सजण---सजण सोडूं नये, डोळा फोडूं नये --डोळा तर फुटूं नये---मैत्री कधीं तोडूं नये व त्याबरोबरच स्वार्थ सोडूं नये. दोन्ही गोष्टी सांभाळाव्या. तु० डोळा-तर फुटूं नये, काडी तर मोडूं नये.

सजणां जाय घोकीत राहे, चोरां जाय निश्चिंत राहे---आपल्या मित्रानें आपली वस्तु नेली तर आपण त्यानें नेली, त्यानें नेली अशी कुरकूर करीत असतों पण चोरानें ती नेली तर गुपचीप बसतों. म्हणजे सुखानें कोणाला कांहीं देववत नाहीं.

सजणें---सजलेलं सोंग मागें राहूं द्या अन् माझें रेडकूं म्होरं नाचूं द्या--[वांय.] माझें घोडें जाऊं द्या पुढें, याप्रमाणें.

सजीव---सजीव तुळशी तोडा, पूजा म्हणती निर्जीव दगडा---तुळस हें सजीव झाड आहे; त्याचीं पानें तोडून निर्जीव दगडाची पूजा करणें हा उलटा व्यापार आहे. दीन जनांची उपेक्षा करून किंवा त्यांस नागवून परमेश्वराची भक्ति करणें व्यर्थ आहे.

सज्जन---सज्जन दुःखातें न मोजी, दुःख वसे दुर्जनास---सज्जनास कितीहि संकटें आलीं तरी तो त्याचें दुःख मानीत नाहीं, निमूटपणें सोसतो. पण दुष्ट मनुष्य मात्र त्याबद्दल सारखी कुरकुर करीत असतो.

सज्जनकू सज्जन मिले घडे ग्यानकी बात, दुर्जनकू दुर्जन मिले दो बुकी दो लात; सज्जनकू सज्जन मिले तो चंदनमे कपूर, दुर्जनकू दुर्जन मिले तो भांगमे धत्तूर---सज्जनांचा सहवास घडल्यास तत्वज्ञानाबद्दल चर्चा होते व दुर्जनांची एकमेकांशी गांट पडल्यास लाथाळी होते.

सज्जनाला मान, दुर्जनाला अपमान---सज्जनांचा सर्वत्र आदरसत्कार होतो व दुष्टांचा अपमान होतो.

सटवा---सटवा मल्हारी---अर्धवट बावळट मनुष्य.

सटवाई सटवी---सटवाईचीं सटवीचीं अक्षरें; सटवीचें लिहिणें---सटवी मुलाच्या सहाव्या दिवशीं त्याच्या कपाळावर त्याचें भाकीत लिहून ठेविते अशी समजूत. ब्रह्मलिखित; प्रारब्ध.

सटवाईला नाहीं नवरा आणि म्हसोबाला नाहीं बायको---अनुरूप अशी जोडी. तु० हाड्यावर्ण गजकर्ण.

सटवीनें लिहिलें भाळीं, तें न चुके कपाळीं --कदाकाळीं---विधिलिखित कधीं टळत नसतें.

सटवाजी---सटवाजीराव ढमाले---एका फ्रेंच प्रहसनावरून या नांवाचें एक प्रहसन लिहिण्यांत आलें आहे. त्यांतील या नांवाचें मुख्य पात्र हा फार घमेंडखोर व मोठेपणाचा आव आणणारा होता. त्याची कांहीं धूर्त लोकांनीं फसवणुक केली यावरून मूर्ख, भोळसट, मोठेपणाची घमेंड बाळगणारा मनुष्य.

सटी--ठी---सटी कवळप---(गो.) षष्ठीपूजनाच्या वेळचें पूजेजवळील एकूण एक सामान सुईण नेते. त्यावरून आपला गाशा गुंडाळणें.

सटी---सटी जागविणें---बाळंतिणीच्या सहाव्या दिवशीं सटीची पूजा करून रात्रीं जागरण, पूजन वगैरे करणें. --वटसावित्रीचें गाणें ३३.

सटी सामाशीं---१ केव्हांतरी. २ प्रसंगानें, क्वचित कधीं.

सटयेक जेवप (गो.) जन्मापासूनची माहिती असणें. बारशाला जेवणें याप्रमाणें.

सटयेक मीठ वाडप—(गो.) अगदीं बाळपणापासून ओळखीचें असणें.

सटे गोपाळ—धूर्त; लबाड; फसव्या.

सटे गोपाळी— लबाडी; फसवणूक.

सडक——**साती सडका** सर्व जरूर त्या गोष्टी.

*__लालाभाईचा चुरमा आणि शेटजी सडक__— दुसऱ्याच्या जिवावर औदार्य दाखविणें.

सडक दमेल का चालणारा दमेल—चालणाऱ्या मनुष्याला श्रम होत असतात; रस्ता तसाच कायम असतो.

सडका——**सडका-सडेल बोंबील**—अत्यंत कृश कुरुप माणूस.

सपाट——**सपाट सुपली**—(थट्टेनें) चपटें नाक. नकटा, चपट्यानाकाचा.

सपाट होणें—साफ होणें; नाहींसा होणें. 'जेगीं होती सपाट संशय'– एभा २९.५१९.

सपाट घोंगडें, बारा सन्या—(व.) घोंगडें कसेंहि असलें, चांगलें अगर विरविरीत विणलेलें कसेंहि असलें तरी किंमत सारखीच बारा सन्या किंवा सहा आणे, असें मानणें मूर्खपणाचें होय. चांगल्या वाईटाचा भेदाभेद न ठेवतां साऱ्याची सारखीच योग्यता मानणें या अर्थी ही म्हण आहे.

संपुट——**संपुटींत शिरणें**—[संपुटी=कान] ऐकूं येणें.

संपुष्ट——**संपुष्टांत येणें**—१ घटणें; कमी होणें. 'त्या मानानें संस्थानिकांची (सत्ता) किती संपुष्टांत येत चालली आहे हेंहि दिसतच आहे.'–सासं.२.१९४. २ मुठींत सांपडणें; ताब्यांत येणें.

संपूर्ण——**संपूर्ण कळावंतीची खाण**——सर्वगुणसंपन्न; सर्व कला अवगत असणारा.

सप्त——**सप्तांगें (राज्याचीं)**—स्वामी, अमात्य, सुहृत्, कोष, राष्ट्र, दुर्ग व बल हीं सात अंगें. 'देवाचिया दानोदकाचिये धारे : राय सप्तांगेंसीं जाति पुरें'–नरेंद्र रुक्मिणीस्वयंवर ३१८.

सप्त अंत्यज——१ रजक, २ चर्मकार, ३ नट, ४ बुरूड, ५ कोळी, ६ म्लेंच्छ, ७ भिल्ल.

सप्त अधिकारी—१ राजा, २ मंत्रि, ३ न्यायाधिपति, ४ मेधेश, ५ रसाधिपति, ६ अग्रधान्येश, ७ पश्चाद्धान्येश [पंचांग].

सप्त अनल—१ कालानल, २ क्रव्यानल, ३ वडवानल, ४ सहस्रानल, ५ विषानल, ६ भुवानल, ७ हारानल.

सप्त अप्सरा—१ रंभा, २ घृताची, ३ मेनका; ४ तिलोत्तमा, ५ मंजुघोषा, ६ उर्वशी, ७ सुकेशी.

सप्त अवस्था—१ अज्ञान, २ आवरण, ३ विक्षेप, ४ परोक्षज्ञान, ५ अपरोक्ष ज्ञान, शोकभंग, ७ निरंकुशा तृप्ति.

सप्त उपचार—१ पाचन, २ रेचन, ३ क्लेदन (स्वेदन), ४ शमन, ५ मोहन, ६ स्तम्भन, ७ मर्दन.

सप्त उपधातु——१ रस–कफ, २ रक्त–पित्त, ३ मांस–नाक कान, डोळे यांचा स्राव, ४ मेद–घाम, ५ अस्थि–केश व नखें, ६ मज्जा–स्निग्धता, ७ शुक्र–ओज.

सप्त उपविषें——१ रुई, २ निवडुंग, ३ धोतरा, ४ कळलावी, ५ कण्हेर, ६ गुंज, ७ अफू.

सप्त ऋषि—(अ) १ कश्यप, २ अत्रि, ३ भरद्वाज, ४ विश्वामित्र, ५ गौतम, ६ जमदग्नि, ७ वसिष्ठ. (आ) १ मरीचि, २ अत्रि, ३ अंगिरस, ४ पुलस्ति–स्त्य, ५ पुलह, ६ क्रतु, ७ वसिष्ठ.

सप्त करणें—१ बव, २ बालव, ३ कौलव, ४ तैतिल, ५ गर, ६ वणिज, ७ विष्टि.

सप्त कला——१ मांसधरा, २ रक्तधारिणी, ३ मेदोधरा, ४ श्लेष्मधारिणी, ५ मलधरा, ६ पित्तधरा, ७ रेतोधरा.

सप्तकांड——१ बालकांड, १ अयोध्याकांड, ३ अरण्यकांड, ४ किष्किंधाकांड, ५ सुंदरकांड, ६ युद्धकांड, ७ उत्तरकांड (रामायण).

दिवसाचे सप्तकाल—१ उषःकाल, २ प्रातःकाल, ३ संगवकाल, ४ माध्यान्हकाल, ५ अपराण्हकाल, ६ सायंकाल, ७ निशीथकाल.

सप्तकीर्ति लक्षणें— १ दान, २ पुण्य, ३ विद्या, ४ वक्तृत्व, ५ काव्य, ६ आर्जव, ७ शौर्य.

सप्त कुलाचल-पर्वत—(अ) १ महेंद्र, २ मलय, ३ सह्य, ४ शुक्तिमान, ५ गंधमादन, ६ विंध्य, ७

पारियात्र. (आ) १ हिमवान, २ गंधमादन, ३ नैषध, ४ विंध्य; ५ माल्यवान, ६ पारियात्रक, ७ हेमकूट.

सप्तगुण--नवऱ्यामुलाचे सात गुण; १ कुल, २ शील, ३ पालक, ४ विद्या, ५ द्रव्य, ६ शरीर; व ७ वय. या सातगुणांची परीक्षा करून मुलगी द्यावी. कुलं च शीलं च सनाथता च विद्या च वित्तं च वपुर्वयश्च । एतान् गुणान् सप्त परीक्ष्य देया कन्या बुधैः शेषमचिन्तनीयम् ॥ पंचतंत्र.

सप्त चिरंजीव—१ अश्वत्थामा, २ बलि, ३ व्यास, ४ हनुमान, ५ बिभीषण, ६ कृप, ७ परशुराम.

सप्त चैतन्य—१ मुख्य शाश्वत ब्रम्हचैतन्य, २ ईश, ३ जीव, ४ प्रमाण, ५ प्रमातृ, ६ प्रमेय, ६ फल.

अग्नीच्या सप्त ज्वाला-जिव्हा—सप्त अनल पहा. १ काली, २ कराली, ३ मनोजवा, ४ सुलोहिता, ५ सुधूम्रवर्णा, ६ स्फुलिंगिनी, ७ विश्वदासा.

सप्त ताल—१ सरळा, २ तरळा, ३ स्वयंभा, ४ बाळा, ५ वृजा, ६ अमिता, ७ स्तंबा.

सप्त तुर्यावस्था—१ चैतन्यत्व, २ स्वरूपाभिमान, ३ परमानंद भोग, ४ सोहंदेवता, ५ त्रिगुणातीत, ६ मूर्धिस्थिति, ७ परावाणी.

सप्तदुर्व्यसन—[चार काम व तीन क्रोध] १ द्यूत व मद्यसेवन, २ गायनाच्या ठायीं आसक्ति, ३ शिकारीचा छंद, तसेंच ४ स्त्रियांचे ठायीं आसक्ति, बहुत बोलणें, ५ उग्र दंड, ६ पारुष्य, ७ अर्थदूषण.--श्रीशिवछत्रपतिचरित्र ९१.

स्वर्गाचीं सप्तद्वारें—१ तप, २ दान, ३ शम, ४ दम, ५ ऱ्ही, ६ आर्जव, ७ सर्वभूतानुकंपा.

सप्त द्वीप--१ जंबु, २ कुश, ३ प्लक्ष, ४ शाल्मली, ५ क्रौंच, ६ शाक, ७ पुष्कर. 'नवखंडे सप्तद्वीपें । छपन्न देशींच्या रायांचीं स्वरूपें ।'--ह २८.६४.

सप्त धातु—(अ) १ रस, २ रक्त, ३ मांस, ४ मेद, ५ अस्थि, ६ मज्जा, ७ शुक्र. (आ) शरीरांतील १ अस्थि, २ नाडी, ३ मज्जा, ४ मांस, ५ त्वचा, ६ रक्त, ७ नख. (इ) १ सोनें, २ रुपें, ३ तांबें, ४ कथिल, ५ नाग, ६ तीक्ष्ण, ७ कांसें. (ई) १ सोनें, २ रुपें, ३ तांबें, ४ शिसें, ५ जस्त, ६ पितळ, ७ लोखंड. 'मग सप्त धातूंच्या सागरीं । तहानेला घोंट भरी ।'--ज्ञा ६.२३५

सप्त धान्यें---(अ) १ सातू, २ गहूं, ३ साळ, ४ तीळ, ५ राळे; ६ सावे, ७ हरभरे. (आ) १ साळी, २ यव, ३ तीळ, ४ उडीद, ५ राळे, ६ गहूं, ७ मसुरा.

सप्त नद—१ शोण, २ सिंधु, ३ हिरण्यबाहु, ४ कोक, ५ घर्घर, ६ लोहित, ७ शतद्रु. यांतील दोहोंबद्दल ब्रह्मपुत्र व शिवनद हे पर्यायानें येतात.

सप्त नपुंसक—१ एकांग, २ मर्मच्छेदज, ३ ईर्षक, ४ असेक्य, ५ कुंभीक, ६ सौगंधिक, ७ महाषंढ. (-निघंट).

सप्त नरक—१ क्षारकर्दम, २ रक्षोगणभोजन, ३ शूलप्रोक्त; ४ दंदशूक, ५ अवटानिरोध, ६ पर्यावर्तन, ७ सूचिमुख. (-भागवत).

सप्त पदार्थ—१ द्रव्य, २ गुण, ३ कर्म, ४ सामान्य, ५ विशेष, ६ समवाय, ७ अभाव.

सप्त पदार्थविद्या—१ शिल्पविद्या, २ जलविद्या, ३ वातविद्या, ४ दर्शनविद्या, ५ नादविद्या, ६ विद्युल्लताविद्या, ७ चुंबकविद्या.

सप्त पर्ण—एक खाद्य. १ द्राक्षें, २ डाळिंब, ३ खजूर, यांचा रस. ४ साखर, ५ मध, ६ तूप, ७ मसाला.

सप्त पाताल--(अ) १ अतल, २ वितल, ३ सुतल, ४ तलातल, ५ महातल, ६ रसातल, ७ पाताल. 'अतळ वितळ सुतळ । महातळ आणि तळातळ । रसातळ आणि पाताळ । सातवें तें ॥'--कथा ६.४.७९. (आ) १ भूतळ, २ भवांगतळ, ३ भिन्नतळ, ४ आदितळ, ५ आधारतळ, ६ सर्वांतळ, ७ उभयानकुळतळ. (-शिवनिबंध).

सप्त पुऱ्या--१ अयोध्या, २ मथुरा, ३ माया (हरिद्वार), ४ काशी, ५ कांची, ६ अवंतिका (उज्जयनी), ७ द्वारावती.-एभा १८.१५०.

सप्तप्रकार वधूपरीक्षा---१ कुल; २ शील, ३ वपु, ४ वय, ५ विद्या, ६ वित्त, ७ सनाथता. (--धर्मसिंधु.)

सप्त प्रकृति--सप्तविध प्रकृति पहा.

सप्त प्रयाग--१ रुद्रप्रयाग, २ नंदप्रयाग, ३ कर्णप्रयाग, ४ देवप्रयाग, ५ पार्बतीप्रयाग, ६ राघवप्रयाग, ७ प्रयागराज.

सप्त ब्रह्मपुत्र—१ मरीचि, २ अत्रि, ३ अंगिरा, ४ पुलस्ती, ५ पुलह, ६ क्रतु, ७ वसिष्ठ. (--गुरुचरित्र)

सप्त भूमिका--ज्ञानी जीवाच्या सात भूमिका. (अ) १ शुभेच्छा, २ विचारणा, ३ तनुमानसा, ४ सत्त्वापत्ति, ५ असंसक्ति, ६ पदार्थाभाविनि, ७ सूर्यावगाहिनी. (आ) १ शुभेच्छा, २ विचारणा, ३ तनुमानसा, ४ सत्त्वापात्ति, ५ सुलीनता ६ संश्लिष्ठता, ७ संप्रज्ञाता. (इ) १ भक्ति, २ ज्ञान, ३ वैराग्य, ४ सलोकता, ५ समीपता, ६ सरूपता, ७ सायुज्यता. 'सप्तभूमिका परब्रह्मीं।' सप्र ७०४२.

सप्त मातृका—१ ब्राह्मी, २ माहेश्वरी, ३ कौमारी, ४ वैष्णवी, ५ वाराही, ६ इंद्राणी, ७ चामुंडा.

सप्त मृत्तिका—(अ) १ गज, २ अश्व, ३ रथ, ४ चतुष्पथ, ५ गोष्ठ, ६ वल्मीक, ७ हाट (संगम) या जागेंतील मृत्तिका. (आ) १ अश्व, २ गज, ३ वल्मीक, ४ संगम, ५ वेस, ६ राजद्वार व ७ यज्ञ या जागेंतील मृत्तिका.

सप्त मौक्तिकस्थानें--१ शिंप, २ डुक्कर, ३ सर्प, ४ शंख, ५ मत्स्य, ६ बेडूक, (किंवा वेळू), ७ हत्ती. (-निघंट प्रकाश.)

सप्त रंग--१ तांबडा, २ नारिंगी, ३ पिवळा, हिरवा, ५ निळा, ६ पारवा, ७ जांभळा.

सप्त रक्त—१ तळहात, २ पायांचे तळवे, ३ नेत्रांचे कोपरे; ४ जीभ ५ ओठ, ६ पडजीभ; आणि ७ नखें हे शरीराचे बाह्य आरक्तवर्ण अवयव ते.

सप्त राज्यांगें--१ राजा, २ अमात्य, ३ मित्र, ४ धनागार, ५ देशभूमि, ६ दुर्गमस्थान, ७ सेना.

सप्त लक्षणें--व्यसनें—१ जारण, २ मारण, ३ विध्वंसन, ४ स्तंभन, ५ मोहन, ६ वशकिरण, ७ उच्चाटण. 'जारण मारण विध्वंसन। स्तंभन मोहन वशीकरण। उच्चाटण हें सप्तलक्षण।'--विपू १·५३. 'सप्तवेसनीं जयाचें मन। तो एक मूर्ख॥'–दा २·१·१६·

सप्त लोक—१भूलोक (पृथ्वी), २ भुवर्लोक (पृथ्वी व सूर्य यांमधील), ३ स्वर्लोक (सूर्य व धृव यांमधील इंद्रादि देवतांचा), ४ महर्लोक (सूर्य व नक्षत्रांचा), ५ जन लोक (ब्रम्हदेवाच्या मानस पुत्रांचा), ६ तपोलोक (तपस्वी लोकांचा), ७ सत्यलोक (ब्रह्मदेवाचा).

सप्तवायु--१ भूवायु, २ आवह, ३ प्रवह, ४ उद्वह, ५ संवह, ६ सुवह, ७ परावह.

सप्तविधा प्रकृति—राज्याचे सात मुख्य आधार-- (अ) १ राजा, २ मंत्री, ३ नगर, ४ भूमि, ५ कोश, ६ सेना, ७ मित्र, (आ) १ वात, २ कफ, ३ पित्त, ४ वातपित्त; ५ वातकफ, ६ कफपित्त, ७ समप्रकृति.

सप्तसंपत्ति--१ जनसंपत्ति; २ धनसंपत्ति; ३ पुत्र संपत्ति, ४ कलत्र संपत्ति, ५ विद्या संपत्ति, ६ यौवन संपत्ति, ७ शरीर संपत्ति.

सप्त सभा—१इंद्रसभा, २ वरुणसभा, ३ कुबेरसभा, ४ ब्रह्मसभा, ५ यमसभा, ६ मयसभा, ७ वैकुंठसभा. (पांडवप्रताप).

सप्त समुद्र-सागर—१ क्षार, २ इक्षुरस, ३ सुरा, ४ घृत, ५ क्षीर, ६ दधि, ७ शुद्धोदक.–'इयेवरी सप्तसागर, मध्यें मेरू महा थोर।'–दा ४.१०.१४.

सप्त सुषुप्ति-अवस्था—१ प्राज्ञाभिमानी,२ तमोगुण, ३ शिवदेवता, ४ भोगानंदस्वरूप, ५ पश्यंतीवाणी, ६ हृदयस्थान, ७ कारणदेह.

सप्त सूर—(स्वर)१ षड्ज, २ ऋषभ, ३ गांधार, ४ मध्यम, ५ पंचम, ६ धैवत, ८ निषाद.

सप्त स्कंध—वायु मंडलाचे सात भाग--१ आवह, (अवाह) (भूमीपासून मेघमंडलापर्यं), २ प्रवह, (प्रवाह) (मेघमंडलापासून सूर्यमंडलापर्यंत) ३ उद्वह (तिसऱ्या मंडलांतील), ४ सह (चंद्रमंडलापासून नक्षत्रमंडलापर्यंत), ५ विवह (वैवह) (नक्षत्रमंडलापर्यंत), ३ षठापरा (शनिमंडलापासून सप्तर्षिपर्यंत) ७ परिवाह (सप्तर्षिपासून ध्रुवापर्यंत).

सप्त स्मृतिगामी—१ दत्तात्रेय, २ नारद, ३व्यास, ४ शुक, ५ मारुति, ६ कार्तवीर्य, ७ गोरक्ष.

सप्त हरीतकी—(अ) १ विजया, २ रोहिणी, ३ पूतना, ४ अमृता, ५ चेतकी, ६ अभया, ७ जीवंती, पर्याय, [आ.] १ अभया, २ चेतकी, ३ पथ्या, ४ पूतना, ५ हरीतकी, ६ जया, ७ हैमावती.

सप्त क्षार—१ तिल, २ अपामार्ग, ३ करंज, ४ पालाश, ५ अर्क, ६ यव, ७ चिंचा.

***सप्तसमुद्र शोधून गार मिळविली**— अनेक कष्ट करून क्षुल्लक गोष्टीची प्राप्ति होणें.

संपत—-संपत भारी : सदा लोकांच्या दारीं—(महानु.) यांत उपरोध आहे. मोठा श्रीमंत पण नेहेमीं असतो लोकाकडे. मग श्रीमंत कसला?

सफर—-सफर साधणें—प्रवासाचा हेतु साध्य होणें; शिकार साधणें.

सफाई—-सफाई होणें—समेट होणें; तंटा मिटणें. 'इतक्या अवकाशांत उभयता सरदार यांनीं विनीवाले यांशीं मिळवून घेऊन लिवर्गांची सफाई झाली.'—पेब७७.

सब—-सब खाव, घडवण लाव—सर्व सोनें खाऊन वर घडणावळ मागणें. मागें पहा.

सब घोडे बारा टक्के—सर्वांस एकाच माळेंत गोवणें. 'तपाशिलांत शिरावयाचें तर सब घोडे बारा टक्के असा न्याय करणें हास्यास्पद होईल.'—सासं २.३५५. 'जनक्षोभांतलें राज्याला धक्का लावण्याचें सामर्थ्य नाहींसें झाल्याबरोबर सब घोडे बारा टक्के हा न्याय गाजण्याला विलंब लागला नाहीं.'— फाटक, रानडेचरित्र, पा १८३.

सब घोडे बारा टक्के, गुणावगुणाला पारखे—गुण—अवगुणांची परीक्षा न करतां सर्वांस सारखेंच वागविणें.

सब छोडे मेरा रब न छोडे—(हिं.) सर्वांनीं सोडलें तरी चालेल पण ईश्वरानें सोडूं नये.

सब् जगें साप तेडा चले, लेकिन बिलमें सीधा घुसे—(हिं.) सर्व ठिकाणीं साप वाकडा चालतो पण बिळांत सरळ शिरतो. मनुष्य इतर गोष्टींत छक्के पंजे लढवतो पण स्वार्थाच्या बाबतींत माल एकच दृष्टि ठेवतो.—पामो ३२८.

सबबुटी भलताच कुटी—[सबबुटी=डावाशेवटीं एकटी राहिलेली सोंगटी] जिला कोणी उरले नाहीं अशा स्त्रीला कोणी तरी फसवितो.

सब मिलना पण लंगोटीयार नहीं मिलना—दुसरा कोणी भेटला तरी चालेल पण लंगोटीयार भेटूं नये. आपल्या बाळमित्रास आपली लहानपणचीं सर्व अंडीं पिलीं ठाऊक असतात तेव्हां तो भेटला असतां आपल्या चारचौघांत असलेल्या मानप्रतिष्ठेस बाध येण्याचा संभव असतो. तसेंच तो बरोबरीच्या नात्यानें वागूं लागतो यामुळेंहि आपला अपमान होण्याचा संभव असतो.

सब शहाणे, अक्कल एक—कितीहि शहाणे लोक एकत्र आले तरी शेवटीं सर्वांचें मत एकच पडतें.

सब सारख्या मुखपारख्या—सर्व कुवर्तनी स्त्रिया एकत्र जमल्या म्हणजे सर्वच तोंडें लपविण्याचा प्रयत्न करतात.

सबका दाता राम—परमेश्वर सर्वांसच देणारा आहे.

सबका सुनना और दिलका करना—'ऐकावें जनाचें, करावें मनाचें,' पहा. 'सबका०' या मताचे ते (गणपतराव) असल्यानें बाबामाऊंच्या सारखें वादांत न पडतां,.........स्वमतानें ठरविलेलाच अभिनय ते करीत असत.'—गणपतराव चरित्र ११०.

सब सुनारकी, एक लव्हारकी—सो सुनारकी पहा.

सबसे चूप भली—सर्व गोष्टींत मौन धरणें ही गोष्ट चांगली.—शाब १·१३८· मौनं सर्वार्थसाधनम् ।

सबसे जान प्यारी, सबसे जीव प्यारा—सर्व गोष्टींपेक्षां जीव प्रिय असतो.

सबसे मथुरा न्यारी;—मथुरा शहर हें सर्व शहरांहून निराळेंच आहे प्रत्येक गोष्टींत कांहीं तरी वैशिष्ट्य असतेंच.

सबसे मेरी चूप—गप बसणें सर्वांत चांगलें.—विक्षिप्त १.५३.

सबंध—-सबंध गलबतांत माझी अर्धी सुपारी—फार मोठ्या कार्यांत आपण अत्यंत अल्प भाग घेऊन यशाचें श्रेय मिळवूं पहाणें. सुपारी पहा.

संबंध—-संबंध सुटला आणि तंटा मिटला—आपण एखाद्या माणसाचा संबंध सोडला म्हणजे आपोआपच तंट्याचा निकाल लागतो.

अनोळखी संबंधापेक्षां ओळखीचाच संबंध बरा—(इंग्रजी म्हणीचा अनुवाद) संबंध फार दिवसांचा असेल व स्वभाव, गुणदोष इ. माहीत झाली असतील तर अगदीं नवीन संबंधापेक्षां हाच जुना बरा असें वाटणें साहाजिकच आहे. ओळखीमुळें दुष्टपणाला कांहीं आळा बसतो. "मि. चर्चिल यांच्याशीं बोलतांना त्यांची मि. यूसाची थोडी बाचाबाची झाली. बोलण्याच्या ओघांत त्यांनीं 'अनोळखी संबंधापेक्षां ओळखीचाच संबंध बरा' हा इंग्रजी वाक्प्रचार वापरला असें दिसतें; पण असें म्हणण्यांत त्यांनीं कोणता अपराध केला हें समजत नाहीं."—केसरी २३-१-४२.

सबील—-सबील करणें—कसेंहि करून द्रव्य

गोळा करणें. ' खर्च तोडून अदवानीवर सबील करावी '— रा ५.१८७.

सब्बारी——सब्बारी किळक्कारी गेल्लारी पोर्वोतु आस्स; सावार उदेतेक गेल्ह्यार पर्वत आस— (गो.) पूर्वेकडे जाणाऱ्याला शेवटीं पर्वतच आढळतो. अशा प्रकारचीच एक म्हण मल्याळीमध्यें आहे. एकेकाळीं गौड सारस्वत लोक कोचीन व त्रावणकोर या समुद्रालगतच्या प्रदेशांत राहात होते. हा प्रदेश पूर्व बाजूनें मलय पर्वतानें वेढलेला आहे व तेथील राहाण्यावरूनच ही म्हण प्रचारांत आली असावी. ह्या म्हणीचा खरा गर्भितार्थ अजून समजलेला नाहीं.

सब्बारी जालारी विकट— (गो.) अति तेथें माती. कोणत्याहि गोष्टीचा अतिरेक परिणामीं घाईट होतो. अति सर्वत्र वर्जयेत् !

सभा——सभा जिंकणें—वादविवादांत यश मिळवणें; फड मारून नेणें.

*__सभा हंसली माकड हंसलें__—सर्व हंसलें म्हणजे मूर्ख मनुष्य कांहीं न समजतां हंसूं लागतो. मूर्ख मनुष्य न कळतांच दुसऱ्याचें अनुकरण करून स्वतःचें हंसें करून घेतात.

सभागी——सभागी–सभाग्य साधून जाय निधि, अभागी मागें मृत्तिका शोधी—भाग्यवान माणसाला सहज संपत्ति लाभते पण अभागी माणसाला कांहीं प्राप्त होत नाहीं.—भाव १६.

संभाळ——संभाळ ठेवणें—(ऐति.) रक्षण, प्रतिपाळ करणें. 'शिपाई लोकांचा संभाळ सरदार समर्थ न ठेवीत तरी त्यांचा जीवनोपाय कोणत्या प्रकारें होईल.'

संभाळीं करणें—हवालीं करणें; स्वाधीन, सुपूर्त करणें.

संभाळून घेणें—वागवून घेणें; चुका वगैरेकडे काणाडोळा करणें.

सभ्य——सभ्यांस भूषण, चोरांस दूषण——जी गोष्ट प्रतिष्ठित माणसास भूषणास्पद वाटते तीच चोरांस दूषणास्पद वाटते. चांगले गुण दुर्जनांस आवडत नाहींत.

सम——समतोल आहाराची वाण, करी शरीराची घाण—आहारांत सर्व प्रकारचें अन्न नसेल तर शरीराची खराबी होते.—केसरी ५–१२–३९.

समदुःखें हीं एकीस कारण होतात——समदुःखी लोक एकत्र आले असतां त्यांत परस्पर सहानुभूति उत्पन्न होऊन त्यांचें ऐक्य होतें. समानशीलव्यसनेषु सख्यम् ।

समज——समज आहे पण उमज नाहीं—ज्ञान असून एखादी गोष्ट नीटपणें लक्ष्यांत येत नाहीं.

समजणें——समजूं लागणें—वयांत येणें; सज्ञान होणें.

समजूत——समजूत पाडणें—१ समजावून देणें; पटविणें. २ तडजोड करणें.

समय——समय चुकणें——संधि गमाविणें. ' जरि काय मजकडे तूं आजि न येतास समय चुकतासा ।' —मोभीष्म. १२.३६.

एखाद्यावर समय पडणें–येणें——कठिण प्रसंग येणें; संकट ओढवणें.

समय साधणें–सांभाळणें——योग्य संधीचा फायदा घेणें; वेळ साधणें. 'रणांगणाचा समय साधिति ।' —ऐपो २१७. 'समय सांभाळुनी आगळें उत्तराचीं भेदी वज्र तयापरी ॥'—तुगा ३६१३.

समयाचे शिरीं––समयास––समयीं उपयोगी पडणें——वेळेवर कामास येणें, साहाय्य होणें.

समयानुसार वर्तणूक—प्रसंगाप्रमाणें वागणूक.

समयु वत्तांचि मनुष्यु मरताचि परतना—(गो.) गेलेली वेळ आणि मेलेला माणूस परत येत नाहीं.

समर्थ——समर्था घरचें श्वान, त्याला सर्व देती मान—मोठ्याच्या आश्रयास असणारा नीचहि मोठेपणा पावतो. 'समर्थांचें घरीचें श्वान । त्यास सर्वही देती मान ।' देवीदास–व्यंस्तो १७.

समर्थाचिया ठाया : निधान ये आपसया—(महानु.) समर्थ माणसांना निधान आपोआप लाभतें. त्यासाठीं खटपट करावी लागत नाहीं.

समर्थांचीं पाळीं उघडत तों दुर्बलांचे प्राण जातात——मोठ्या माणसांस दुर्बल माणसांच्या संकटांची जाणीव होईपर्यंत किंवा त्यांच्या कानापर्यंत यांचीं गाऱ्हाणीं जाईपर्यंत दुर्बल लोक अगदीं हैराण होतात.

समर्थांची सांठवण पण दुर्बळाची नागवण—मोठे लोक द्रव्याचा संग्रह करूं लागले कीं तो सर्व गरीब लोकांस मिळून जमवतात. या म्हणींत कधीं ' सांठवण '

बद्दल ‘ सांडवण ’ शब्द येतो पण त्याचा बरोबर अर्थ होत नाहीं. तु०–(गु.) सबलाना साला थाय, पण नबलाना बनेवी न थाय.

समर्थाशीं भांडूं नये—मोठ्याशीं वैर करूं नये. कारण ते गरीबालाच नुकसानकारक होतें.

समय—-समयो चुकला : कार्य हुकला :—(महानु.) कोणतीहि गोष्ट वेळेवर केली नाहीं तर ती बिघडते.

समशेर—-समशेर करणें—तरवार गाजाविणें. ‘ ज्यांनीं ज्यांनीं समशेर केली ।’–ऐपो २३७.

समशेर शिकंदरची आणि अक्कल बृहस्पतीची—शूरांमध्यें शिकंदर हा शूर होऊन गेला व बुद्धिवानांमध्यें बृहस्पति हा सर्वांत बुद्धिवान होऊन गेला. त्यांच्याप्रमाणें ज्यांच्या ठिकाणीं शौर्य व बुद्धि असेल त्यास अनुलक्षून ही म्हण वापरतात.

समाईक घोडें पाण्यावांचून मेलें—अनेकांच्या मालकीचें एक जनावर असलें म्हणजे त्याच्याकडे कोणीच लक्ष्य देत नाहीं व तें आबाळ होऊन मरतें.

समाचार—समाचार घेणें—१ चौकशी, विचारपूस करणें; काळजी घेणें. ‘धौम्यापासुनी गोपापर्यंत जिणें स्वयें समाचार । घ्यावा श्रिततापहर श्रीगंगेचा जिचा समाचार ॥’–मोसभा ४.७६.२. (ल.) मारणें; ठोकणें. खरपूस पहा. रागें भरणें.–‘तान्हें मूल घरीं ठेवून सिनेमाला जाणाऱ्या सुनेचा चांगला समाचार घ्यावा असेंहि त्यांना क्षणभर वाटलें. ’–वि. स. खांडेकर–पूल.

समाटणें—समाटून नेणें—(माण.) मिळतें करून घेणें.

समानशीलव्यसनेषु सख्यम्—(सं.) एकाच स्थितींतील, वृत्तींतील लोक साहाजिकच एकत्र होतात.--शाब-१.१६४. छच ४३. [अ] स राघवेन्द्रो हृतराजदारः स वानरेन्द्रो हृतराजदारः । एवं तयोरध्वनि दैवयोगात् समानशिलव्यसनेषु सख्यम्॥ [आ] मृगा मृगैः सङ्गमनुव्रजन्ति गावश्च गोभिस्तुरगास्तुरङ्गैः । मूर्खाश्च मूर्खैः सुधियः सुधिभिः समान शीलव्यसनेषु सख्यम् ॥

समारंभ—-समारंभाच्या वेळीं माहेरीं जावें, सर्वदा सासुसासरे सेवावे—कांहीं विशेष प्रसंग असेल तरच एखाद्या स्त्रीनें आपल्या माहेरीं जावें; तेथें नेहमीं वरचेवर जाणें चांगलें नाहीं. पण नेहमीं सासरीं राहून सासुसासऱ्यांची सेवा करावी; म्हणजे तिला संसारांत यश येतें.

सामिध—-सामिध शेकणें—स्मार्ताग्नि समारोपतांना त्यावर एक समिध शेकून ठेवतात. म्हणजे पुन्हां अग्नि सिद्ध करतांना या समिधेचा उपयोग करून अखंडता राखिली जाते. १ नांवाला करणें. २ बंद ठेवणें. ‘ तेव्हां कांहीं वर्षें या सभेची समिध शेकण्यास हरकत नाहीं.’–-आगरकर ३.१२०

समिधा फुलें दुरवा, हा ब्राह्मणाचा ठेवा--ब्राह्मणाला महत्त्वाच्या गोष्टी म्हटल्या म्हणजे पूजेचीं व होमाचीं साधनें होत. कारण त्याचें मुख्य काम पूजाअर्चा, होमहवन करणें हें होय.

समीकरण—-समीकरण घालणें—दोन तुल्यपद संख्यांचें उदाहरण सोडविण्यासाठीं घालणें. (ल.) प्रश्न घालणें.

समीकरण बसविणें---दोन तुल्य गोष्टींची सांगड घालणें.

समीकरण सोडणें –सोडविणें–उदाहरणांतील अव्यक्तांची किंमत काढणें. एक गोष्ट दुसरी बरोबर आहे हें सिद्ध करणें.

समुद्र—-समुद्रा फळ--(गो.) समुद्राचें फळ. कल्पनेचे खेळ; हवेंतले किल्ले.

समुद्राची दांडी—समुद्र किनाऱ्यावरील वाळूचा बांध. या ठिकाणीं लाटा फुटतात.

समुद्रांत पाणी आणून सोडणें—जेथें समृद्धि आहे तेथेंच पुनः देणें. तृप्तास भोजन घालण्याप्रमाणें. To carry coals to Newcastle.

समुद्रांत पावसु पळ्ळेले वारी—(गो.) समुद्रांत पाऊस पडला म्हणून त्याचा कांहीं उपयोग नाहीं.

समुद्रांत सुई पाहणें–शोधणें—अप्राप्य वस्तु मिळण्याचा प्रयत्न करणें; व्यर्थ प्रयत्न करणें. To look for a needle in a haystack.

साता समुद्रापलीकडे—अत्यंत दूर; फार लांबच्या देशांत. ‘साता समुद्रांपलीकडे राजानें केला भात, एक एक शीत नऊ नऊ हात. ’—उखाणा.

साता समुद्रापलीकडे ठेवणें—दुष्प्राप्य स्थळीं ठेवणें; फार जपून ठेवणें; अत्यंत दक्षतेनें सांभाळणें.

***समुद्र पाठीवर घ्यावा, तोंडावर घेऊं नये**— बलवंताशीं सामना देणें कठीण आहे. तेव्हां त्याच्याशीं मिळतें घेणेंच केव्हाहि चांगलें. त्यायोगें त्याचें साहाय्य मिळून कार्य लवकर पार पडतें. खवळलेल्या दर्यांत नाव घालून, विरुद्ध दिशेच्या प्रवाहांतून वल्हें मारीत पैलतीर गांठतां येत नाहीं. उलट प्रवाहाच्या दिशेनें नाव हाकारली तर आपल्याला प्रवाहाचें साहाय्य होतें.

समुद्र पोवनु पावल बरी उधुकांतु मेल्लो—(गो.) समुद्र पोहुन गेला पण गुडघाभर पाण्यांत बुडाला. एखादा मनुष्य मोठमोठ्या संकटांतून पार पडतो पण शेवटीं मात्र एखाद्या लहान संकटांतच आपला जीव गमावून बसतो.

समुद्र फुटला, सर्व लोक बुडाला-- मोठें संकट आलें असतां सर्वांचा नाश होतो.

समुद्रा उदक मापुं जातकिं, वेळेवेलीं रेंव मोघंच्याक जाता?—(गो.) समुद्राचें पाणी आणि किनाऱ्यावरची वाळू कोण मोजूं शकेल?

समुद्राक जायफळ—(गो.) एवढ्या अफाट समुद्रांत एवढेंसें जायफळ पडलें तर तें कुठून गवसायचें? तु०— कोटश्च कीटायते.

समुद्राक वयि बांदयेद, उलैतल्यागेलें तोंड बांदूक जायिना—(गो.) समुद्राला कुंपण घालतां येईल पण बोलणाऱ्याचें तोंड मात्र बांधतां येणार नाहीं.

समुद्राचें अर्घ्य समुद्राला—समुद्रांत उभें राहून समुद्राचेंच पाणी ओंजळींत घेऊन समुद्राला अर्पण करणें म्हणजे ज्याची देणगी घ्यावयाची त्यांतीलच थोडी त्याला परत करणें. जेथील तेथें करून पुरें करणें.

समुद्राचें मीठ डोंगराचे आंवळे (मिळणें)— दोन परस्पर विरुद्ध परस्परापासून फार अंतरावरच्या गोष्टी एकत्र येणें.

समुद्राच्या खाऱ्या पाण्यानें तोंड धुवून ये— एखादी दुष्कर अशक्य गोष्ट करून येण्यास सांगणें. नागझरी पहा.

समुद्रांत गेला लुका, तों समुद्र झाला सुका-- दुर्दैवी मनुष्य कोठेंहि गेला तरी त्याचें दुर्दैव त्यास सोडीत नाहीं.

समुद्रांत जाऊन—पडून कोरडा-सुका—-१ लटेवा तसा फायदा करून घेण्याची सुसंधी आली असतांना जो ती घालवितो, असा अभागी, नालायक माणूस. २ करून सवरून मोकळा; दुष्कर्मांत गढलेला पण पुन्हां उजळमाथ्यानें वावरणारा. ३. हातांत सर्व गोष्टी येऊन शेवटीं हातांत काहीं न राहणें.

तु०—पाषाण आंत शुष्कचि वाहो वरि थोर सिंधुचा ओघ।—मो. मंत्र १०.२७९.

समुद्रांत जाऊन कोरडा, तो काय करील बापुडा --वर पहा.

समुद्रांत बुडी मारून शंख हातीं लागला— दुर्दैवी मनुष्यास अगदीं धनाच्या राशीवर ठेवलें तरी त्याला त्याचा कांहीं लाभ होत नाहीं.

समुद्रांत बुडून मेलेल्यांकाई खोऱ्यांत बुडून मेलेले चड--(गो.) समुद्रांत बुडून मेलेल्या लोकांपेक्षां दारूंत बुडून मेलेलेच अधिक.

समुद्राला कोरड पडली, आणि सूर्याला आग लागली——अशक्य गोष्ट घडून आली असें सांगणें.

समुद्राला झुरळाची गरज लागते-लागली-- मोठ्या माणसाला देखील केव्हां केव्हां क्षुल्लक व्यक्तीची गरज लागते. गोष्ट—परशुरामानें समुद्र हटविण्यासाठीं जेव्हां बाण सोडले तेव्हां समुद्रानें परमेश्वराला आळविलें. परमेश्वरानें झुरळें पाठवून परशुरामाचे बाण कुरतडून टाकविले.

समुद्राला समुद्राची व आकाशाला आकाशाची उपमा दिली पाहिजे—अतुलनीय गोष्टी. गगनं गगनाकारं सागरः सागरोपमः।

समुद्रास दूखणें शिंपींत औषध--मोठे कार्य करावयाचें असतां क्षुल्लक उपाय योजणें.

समुद्रीं मासे व घरीं भरवसे—अनिश्चित गोष्टीवर विश्वास ठेवणें. Counting chickens before they are hatche.d

समुद्रीं शयन विष्णूचें आणि शंकर स्मशानीं नाचे--दोघेहि कफल्लक.

समूळ——समूळ खणून काढणें--नायनाट करणें. 'चालू झोटिंग पाच्छाई समूळ खणून काढण्यास लागलें पाहिजे.'-विक्षिप्त २,१०५

समूलं च विनश्यति--पूर्ण नाश होणें. [अ] वनानि दहते वह्निर्वनमूलानि रक्षति। ब्राह्मणक्षोभितो बह्निः समूलं च विनश्यति ॥ [आ] अन्यायोपार्जितं द्रव्यं

वैशावर्षाणि तिष्ठति । प्राप्ते चैकादशे वर्षे समूलं० ॥ [इ] पिपीलिकार्जितं धान्यं मक्षिकासंचितं मधु । लुब्धेन संचितं द्रव्यं समूलं० ॥—सम ६८.३२–३४.

समेट——समेट ही एक मोठी सिद्धि आहे.— योग्य वेळीं समेट करण्याचें ज्यास साधतें त्याला अनेक गोष्टी साध्य करतां येतात.

सर——सर करणें— जिंकणें; फत्ते करणें; तडीस नेणें.

सर–री——सर पावणें–येणें— बरोबरी होणें. ' माझी न पाविजे त्वां मत्तताताची तुझ्या न सरि तातें ।' —मोआदि १०.१४. ' पूर्वज्यांची तुलना करून कित्येकांनीं असें मत प्रदर्शित केलें आहे कीं, त्यांची सर अलीकडच्यांत कांहींच येणार नाहीं.'—नि.

सरकार—— सरकार कामास येणें— लढाईत मरणें.

सरकाराचे गोटांत शिरणें.—— सरकारच्या कह्यांत जाणें; सरकार सांगेल त्याप्रमाणें चालणें. ' सरकाराच्या गोटांत शिरून आमच्या लोकांच्या माना मुरगळण्याचे दिवस गेले.'—केसरी.

सरकारी पाहुणा—— (ल.) कैदी. कैद्याचा खर्च सरकार चालवितें यावरून. ' सरकारी पाहुण्यांची बडदास्त सरकार नीट ठेवीत नाहीं.' —के १२।७।३०.

सरकारचें तेल पदरांत—शेल्यांत घ्यावें—— दिवाण पहा.

सरकाराला आणि भाकरीला तोंड नाहीं— भाकरी वाटोळी असल्यानें कोठूनहि मोडतां येतें. त्याप्रमाणें सरकाराला कोठल्याहि बाबतींत जबाबदार धरावें. अमुकच एका गोष्टींत सरकाराचा हात आहे असें नाहीं. सर्वत्र सरकार भरलेलें आहे.

सरकी——सरकी चारणें— [सरकी = १ कापसाचें बीं. २ ' सर ' ही पदवी.] गुरास सरकी घातल्यास तें पुष्ट होतें व चांगलें दूध देतें. त्याप्रमाणें सरकार आपल्या बगलेंतल्या माणसांना ' सर ' हा किताब देऊन त्यांचा बहुमान करतें. हेतु हा कीं, त्यांनीं यापुढेंहि आपल्याशीं एकनिष्ठ राहावें.

सरडा——सरड्याप्रमाणें घटकेंत रंग पालटणें—सरड्याचा रंग ऋतुमानाप्रमाणें बदलतो त्याप्रमाणें जो मनुष्य आपले विचार किंवा शब्द वरचेवर बदलतो त्याबद्दल म्हणतात.

सरड्याची धांव कुंपणापर्यंत—— सरडा जास्तींत जास्त धांवेल कोठपर्यंत तर कुंपणापर्यंत; त्याच्यापुढें नाहीं. त्याप्रमाणें मर्यादित संकुचित काम, कुवत.—गांगा. १५५. (गो.) सरड्याची धांव वयेमेरेन. ' इंग्रजी ही किति केलें तरी परभाषा; तिच्यांत आमची मजल " सरड्याची धांव कुंपणापर्यंत " या न्यायानेंच जावयाची. " (न. चिं. केळकर.)

सरड्याची धांव कुंपण गांठते आणि गरीबाची ताकद तोकडी पडते—— जो तो आपल्या कुवतीप्रमाणें कार्य करूं शकतो.

सरण—— सरणाला कीं तोरणाला— बऱ्या वाईट प्रसंगीं; चांगल्या व वाईट दोन्ही प्रसंगीं साहाय्य करणें, सहभागी असणें. तु०—बाराव्याला व बारशाला.

सरणावर नुसतें भाजून खावपी—— (गो.) दुसऱ्याच्या चितेवर मासळी भाजून खाणारा, स्वार्थी आणि पाषाणहृदयी माणूस.

सरणें—ठाव सरणें— मरणें. ' ऐशा दोघांचा सरला ठावो ।'—उषा १६०३.

सरूं डरूं करणें—— मागें पुढें करणें; मनाचा निश्चय न ठरतां दोलायमान दशा होणें. ' आजपर्यंत सरूं डरूं करतां करतां आज कोठें त्याचें निश्चित ठरलें कीं पाठवावें मुलीला कॉलेजांत !'

सरोसरोसर होणें— नकोसा होणें.

***सर सरक घोड्या पाणी खोल—** संकटापासून दूर असणें.

सरणाऱ्याचें सरतें, कोठवळ्याचें पोट दुखतें— खरचणाराचें० पहा.

सरली सुगी आणि बसली-बैस उगी— कुणबी शेतकरी हंगामानंतर रिकामाच राहतो. सुगी पहा. लहान मुलें जोंपर्यंत घरांत आडखाणें असतें तोंपर्यंत तें केव्हां खाऊन टाकीन असें त्यांना होतें व तें संपल्यावर तीं स्वस्थ बसतात. पण पुरवून खा म्हटलें तर त्यांना धीर निघत नाहीं, अशावेळीं म्हणतात.

सरले श्रम सुखाचे— एखाद्या गोष्टीसाठीं खटपट करीत असतां ती गोष्ट साध्य झाल्यावर पडलेल्या दगदगी-

चाहि एक प्रकारें आनंद वाटतो. क्लेशःफलेन हि पुनर्नवतां विधत्ते ।

सरता---सरतापालव—अखेरची स्थिति; शेवटची घटका, वेळ. 'तुम्ही लग्नाचे सरत्या पालवी आला.'

सरते काळाक वराति बुद्ध—(गो.) 'विनाशकाले विपरीतबुद्धिः'–विनाशकाल आला कीं बुद्धि उलटी होते.

सरपटणें--सरपटून जाण्यांत सर्प--ज्याला त्याला त्याच्या गुणावरून नांव मिळतें.

सरबत्ती---सरबत्ती उडणें-झडणें—होणें—तोफेचा बार होणें. तोफ उडणें. २ (ल.) ताशेरा उडणें; बोलाचाली, भांडण होणें. ३ धांदल, गडबड उडणें.

सरमड---सरमडाचें मखर केलें, तेंहि वाऱ्यानें उडून गेलें—मागें पहा.

सरसकट---सरसकट गुडघाभर पाणी—सरासरी पाण्याची खोली गुडघाभरच. याहून जास्त नाहीं. म्हणजे अगदीं कमी खोल, उथळच म्हणावें अशा सारखी विद्वत्ता, बुद्धि, कामगिरी इ.

सरसकट बारा टक्के— सब घोडे बारा टक्के पहा. —शाब. १.१६२.

सरळ---सरळ सोडणें—(वांय.) गायींची धारन काढतां तिच्या वासरास सर्व दूध पिऊं देणें.

***सरळ कीर्तीचा, अढळ प्रीतीचा**—सरळपणें वागणारा.

जो सरळ : तो जलदी मरल—(महानु.) सरळपणा हा नाशाला कारण होतो. वांकडें झाड फार दिवस टिकतें.

सराफ---सराफी कावा--१ सराफी धंद्यांतील कौशल्य, २ कंजूषपणा.

***सराफ सोयरा नव्हे, मांजर जितरब नव्हे**.--मांजर पहा.

सरासरी---सरासरी गुडघ्याइतकें पाणी—सरसकट पहा. नदीच्या एकंदर पात्राची ठिकठिकाणची खोली पाहून जी सरासरी काढली ती 'पाणी गुडघ्याइतकें आहे' अशी आली. पण यावरून नदींतून सहज चालत जातां येईल असें मात्र नाहीं. [नदींत 'सरासरी गुडघाभर पाणी' असें ऐकून एकजण, नदीपार होणें अगदीं सोंपें आहे असें समजून पाण्यांतून जाऊं लागला. तेव्हां त्याला कांहीं ठिकाणीं पाणी बरेंच खोल लागलें व तो बुडाला. सरासरी काढण्याची रीत त्याला माहीत नसल्यानें त्याला वाटलें सर्वत्र पाणी गुडघाभरच असेल !]

सरी---सरी मारणें—(कांसारी.) गोल भांड्यास किनार काढणें.

सरी येणें---(व.) गळ्याच्या हाडांत दुखणें; हसळी येणें.

* **शेजाऱ्यानें सरी घातली म्हणुन आपण काय दोरी घालून घ्यावयाची**--एकीनें घातली सरी०. एक पहा.

सरूपता---सरूपता मुक्ति मिळणें—ईश्वराशीं रूपसादृश्य प्राप्त होणें. चार मुक्तींपैकी तिसरी अवस्था. यावरून तद्रूप होणें. 'इंग्रजीच्या सहवासानें मराठी भाषेला सरूपता मुक्तिच मिळाल्यावर तिचा आधींचा देह कोठें राहिला.' –नि.

सरोवर---सरोवर नाहणें— सती जावयास निघालेल्या स्त्रीनें विधिपूर्वक तळ्यांत स्नान करणें.

सर्त---सर्तीनें जाता जें अर्थांन जायना--(गो.) चढाओढीनें होतें तें पैसे खर्चून होत नाहीं.

सर्द--- सर्द होणें— थंडगार पडणें; बेहिम्मत होणें. "फौज लुटली गेली; हेंहि वर्तमान आलें याजवरून खान सर्द होऊन जयशिंग यास बोलले."— श्री शिवछत्रपति चरित्र १०४. 'तेव्हां मात्र तो सर्द झाला.'--V.S २. १२.

(मनांत) सर्द होणें—नाखूष होणें; खप्पामर्जी होणें.

सर्प—साप पहा.

सर्पा बोढावेलें माणिक—(गो.) सर्पाच्याफणेवरचा मणि कितीहि तेजस्वी आणि मूल्यवान असला तरी तो काढून घेणें दुर्घट.

सर्पाला दूध पाजून वाढविणें—दुष्टावर उपकार करणें; दुष्टास आश्रय देणें.

सर्प डसलेल्यास दोरीचें भय— ज्याला सर्प चावला असतो तो दोरीलाहि भितो. ज्याला संकटाचा अनुभव येतो तो फार भिऊन वागूं लागतो. Once bit, twiceshy.

सर्प गेला घसरण राहिली—दुष्ट मनुष्य हातचा निसटून गेल्यावर त्याबद्दल होत असलेली चर्चा.

सर्प वांकडा तिकडा पळाला तरी नीटच भोकाचे तोंडीं जाईल—सब् जागे साप तेडा० मागें पहा.

सर्पाक आणि वागाक दुकवुनु सोण्नये—(गो.) सर्पाला आणि वाघाला दुखवुन सोडूं नये. हे दांत धरतात व केव्हांना केव्हां तरी सूड घेतात.

सर्पाक उश्या घेऊन निदाली संगाति—(गो.) साप उशाला घेऊन झोंपणाऱ्या माणसाला झोंप कुठून येणार?

सर्पाला दूध पाजिलें तर विषच ओकणार—दुष्टाला कितीहि चांगली वागणूक दिली तरी त्याच्या अंगचा दुष्टपणा जात नाहीं. तु०—तुका म्हणे सर्पा पाजिलिया क्षीर। वमितां विखार विष जालें ॥

सर्पीण व्याली, तिचीं पोरें भीतीनें पळालीं; सर्पीण व्याली, पिलें पळतीं रानोमाळीं—सर्पीण ही इतकी भयंकर असते कीं तिचीं पोरेंहि तिला भितात. दुष्ट मनुष्यांचीं अपत्येंहि त्यांचेवर प्रेम करूं शकत नाहींत.

सर्पण—सर्पणाचा काळ, चुलींतला जाळ—चुलींत जाळ पाहिजे तर त्याला भारी सर्पण लागतें.

सर्रास—सर्रास संधि कुणा न बंदी—सर्वांना मुक्तद्वार. 'भाउजींचें घर म्हणजे सर्रास संधि कुणा न बंदी' –पाआमा ५. ६. Opportunity to all & restriction to none.

सर्व—सर्वच अध्याय अटोपला—१ अखेरी होणें; संपणें; खलास होणें. २ मरणें.

सर्वांची मेहुणी—१ मुरळी; भावीण. २ वेडसर स्त्री.

सर्वांच्या विचारास येणें—सर्वांस पटणें; मान्य होणें.

सर्व क्रिया खोटी : सख्य दाल रोटी—(महानु.) पोटाला अन्न प्रथम मिळविलें पाहिजे; नाहींतर कितीहि दुसऱ्या गोष्टी केल्या तरी त्या सर्व व्यर्थ होत.

सर्व गुरु भाऊ : कामा न येऊं—(महानु.) बंधु, गुरुबंधु, म्हणून म्हणावयाचे पण कामास कोणी उपयोगी नाहीं. तुल०—सारा गांव मामाचा.

सर्व घरीं त्याच परी, न सांगे तीच बरी—सर्वकडे एकच तऱ्हा. तेव्हां त्याबद्दल कोठें गाऱ्हाणें न करणें बरें. घरोघरीं० पहा.

सर्वच पदार्थ पांढरे नाहींत—जगांत सर्व गोष्टी कांहीं सारख्या नसतात.

सर्वच वेळ साजे तर सारेच होतील राजे—श्रीशिवाजी महाराजासारखी परिस्थिति जर साऱ्याच मराठ्यांना मिळाली असती तर सारेच राजे झाले असते पण—प्रत्येकाला उत्तम संधि मिळत नाहीं, नि गेलेली संधिहि परत येत नाहीं हा भावार्थ.

सर्व जनाला मित्र करी, त्याची मित्रता नसे खरी—जो मनुष्य सर्वांशींच गोड होऊं पाहतो त्यावर कोणीच विश्वास ठेवीत नाहीं.

सर्व नाशाय मातुलः—मामा हा सर्वप्रकारें नाश करतो.–सुंद्राबाई १०४. दुर्मंत्री राज्यनाशाय ग्रामनाशाय कुंजरः। श्यालको गृहनाशाय सर्वनाशाय मातुलः ॥

सर्वनाशे समुत्पन्ने अर्धं त्यजति पंडितः।—सर्वच जातें आहे असें दिसून आल्यास शहाणे लोक अर्धें देऊन मिटवितात. सर्व जायची वेळ आल्यास अर्ध्यावर तडजोड करावी. [अ] सर्वनाशे समुत्पन्ने ह्यर्धं त्यजति पंडितः। अर्धेन कुरुते कार्यं सर्वनाशो न जायते ॥ [आ] मामस्पर्शय पुष्पवत्यहमहो पुष्पेण किं पातकं। पुष्पिण्या सह संगमेन पुरुषस्याधीयुषं क्षीयते। अस्पृष्ट्वा सकलायुषं क्षयति चेत्तस्यार्धनाशो वरः, सर्वस्यापि विनाशकालसमये अर्धं त्यजेत्पाण्डितः॥- साइंसमं ऐले २.१९९. "हरप्रयत्नाने 'सर्व नाशे०' या न्यायानें वागून तो (प्रिन्सपाल) आणि त्याचे सरकार शेवटीं हिटलरच्या आंस कक्षेंत जाणार याविषयीं मात्र शंका नाही." –केसरी १७·६–४१.

सर्व पाहिलें पण तांब्याचे शष्पाचा गोसावी नाहीं पाहिला—अशक्य गोष्ट सांगणें.

सर्व भेटावें पण लंगोटीयार भेटूं नये—सब मिलना पहा.

सर्व माया मिथ्या बाजीगरी, काय तूं हे मानिली आहे खरी—जग हें सर्व मायेचा पसारा असून नुसता मायिक देखावा आहे परंतु मनुष्य त्यासच खरा मानतो.

सर्व यार मिळावे पण लंगोटीयार न मिळावा—मागें पहा.

सर्व रस्ते रोमकडे जातात--All roads lead to Rome याचा अनुवाद. सर्व मार्ग एकाच ध्येयाकडे नेतात असें सांगतांना योजतात. तु०--सर्वदेवनमस्कारः केशवं प्रति गच्छति। "सर्व रस्ते रोमकडे जातात' त्याप्रमाणें आज देशाची स्थितीच अशी झाली आहे कीं, कौन्सिलांतल्या किंवा कौन्सिलाबाहेरच्या माणसासहि कायदेभंग केल्याशिवाय गत्यंतर नाहीं."--माझी जीवनयात्रा ५०५. 'सर्व रस्ते रोमकडे जातात अशी इंग्लिश भाषेंत म्हण रूढ आहे त्याप्रमाणें मुस्लिम लीगच्या सर्व सभा व परिषदा पाकिस्तानाच्या मागणींत परिसमाप्त होतात.'--केसरी २२।४।४१.

सर्व रामायण सांगितलें तरी म्हणे रामाची सीता कोण--सर्व गोष्ट ऐकून त्यांतील महत्त्वाची गोष्टसुद्धां न कळणें.

सर्वशून्या दरिद्रता--दारिद्र्यामुळें सर्व जग शून्यवत वाटतें. आविद्याजीवनं शून्यं दिक् शून्या चेदबांधवा। पुत्रहीनं गृहं शून्यं सर्वशून्या दरिद्रता॥ --सम ६७·१९.

सर्वसंग्रह कर्तव्यः कः कालो फलदायकः--सर्व गोष्टींचा संग्रह करून ठेवीत जावें, कोणत्या वेळेस कोणती उपयोगी पडेल याचा कांहीं नेम नाहीं.

सर्व सिद्ध आणि चुलीचें पोतेंरें--जेवणाची सर्व तयारी आहे म्हणून सांगावयाचें व पहावयास जावें तों चुलीस पोतेरें घालण्यापासून आरंभ असावयाचा. मुळांत कांहींच नसून सर्व काम पूर्ण झालें आहे असें सांगणें.

सर्व सुख नाहीं कोणाला, उगाच करी वलगैला---सर्व बाजूंनीं सुखी असा प्राणि जगांत कोणी नसतो. मनुष्य व्यर्थ गडबड करीत असतो पण प्रत्येकास कांहीं ना कांहीं तरी विवंचना लागलेली असते. जगीं सर्व सुखी असा कोण आहे। विचारी मना तूंचि शोधूनि पाहे॥ रा. मनाचे श्लोक.

सर्व सोंगें आणतां येतात पण पैशाचें सोंग आणतां येत नाहीं; सर्व सोंगांत पैशाचें सोंग कठीण--इतर गोष्टी कशाहि भागवितां येतात पण पैशावांचून चालत नाहीं.--टि ४. ११.

सर्व सोडलें, सोनारपण मांडलें---(गो.) सगळें सोडलें आणि सोनाराचें दुकान उघडलें. सगळ्या गोष्टी सोडून स्वार्थत्यागी म्हणून लौकिक मिळवायचा आणि नेमकी एखादी चांगल्या फायद्याची जागा पटकावायची.

सर्व सोपें उद्योगानें आणि कठीण आळसानें--उद्योग पहा. उद्योग केल्यास सर्व कांहीं साध्य होतें पण आळस केल्यास कांहीं साधत नाहीं.

सर्वांपुढें जाववतें पण दैवापुढें कोठें जावें जाववत नाहीं? सर्वांच्या पुढें धांववेल पण दैवाच्या पुढें धांववत नाहीं--दैव हें बलवत्तर आहे. इतर गोष्टींस उपाय करतां येतात पण दैवास कांहीं येत नाहीं. सर्व गोष्टी दैवाप्रमाणें घडून येतात त्या बदलतां येत नाहींत.

सर्वारंभास्तंडुला : प्रस्थमूलाः--कोणतेंहि कार्य करावयाचें झाल्यास प्रथम पोटाची अथवा द्रव्याची व्यवस्था करावी लागते; त्याशिवाय कांहीं चालत नाहीं. तु०--वीणावंशश्चंदनं चन्द्रभाराः शय्या यानं यौवनस्थास्तरुण्यः। नैतद्रम्यं क्षुत्पिपासार्दितानां सर्वारम्भास्तण्डुलप्रस्थमूलाः॥--सूर ६६.४०. शय्या वस्त्रं चन्दनं चारुहास्यं वीणा वाणी सुन्दरी या च नारी॥ न भ्राजन्ते क्षुत्पिपासातुराणां सर्वारम्भास्तण्डुलाप्रस्थमूलाः॥ सूर ९६.२.--पामो १६६. [एकदां एक गुरु व त्याचे दोन शिष्य एका राजकन्येच्या लग्नाला चालले होते. त्यांस वाटेंत एका चास पक्षाचें दर्शन झालें. तेव्हां दर्शन झालें असतां धनलाभ होतो पण डावा गेल्यास अधिक फळ मिळतें, असें गुरूनें शिष्यांस सांगितलें. तेव्हा एक शिष्य आपणास चास डाव्या हातास जावा अशाकरितां वाट सोडून त्याच्या बाजूस गेला परंतु चास उडून दुसरीकडे गेला; अशा रीतीनें पाठलाग करतां करतां चास डावा टाकण्यास त्यास सायंकाळ झाला. तेव्हां तो तसा टाकून मग तो राजधानीकडे गेला. इकडे गुरु व एक शिष्य राजधानीस पोंचून राजकन्येच्या लग्नास उपस्थित झाले व त्यांस पुष्कळ द्रव्य मिळालें. इकडे हा शिष्य उशीर झाल्यामुळें गांवाजवळ येतो तों वेशी बंद असल्यामुळें बाहेर मारुतीच्या देवळांत निजला. रात्रीं तेथें एक यक्ष व यक्षिणी आली व त्यांस त्या शिष्याची हकीकत माहिती असल्यामुळें त्यांनीं एक गंमत करावयाचें ठरविलें. त्यांनीं त्या शिष्यास उचलून राजकन्येच्या महालांत ठेवलें व त्याठिकाणीं असलेल्या राजपुत्रास मारुतीच्या देवळांत ठेवलें व त्यांच्या कपड्यांची

अदलाबदल केली. रात्रीं राजकन्या येते तों हा पलंगावर गाढ निजलेला पाहून तिनें त्यास उठवून पुढील श्लोकाचा प्रथम अर्ध म्हणून दाखविला; तेव्हां त्या शिष्यानें उत्तरार्ध म्हटला. तेंव्हां त्यास भूक लागली आहे असें समजून तिनें त्यास प्रथम यथेच्छ भोजन घातलें व नंतर ती तेथें निद्रिस्त झाली. पहांटेस यक्षयक्षिणींनी पुन्हां त्यांची अदलाबदल केली. दुसऱ्या दिवशीं राजकन्या म्हणूं लागली कीं, राजपुत्र हा माझा पति नव्हे तर दुसराच कोणी पुरुष रात्रीं येथें असून तो फार चतुर पंडित होता. तेव्हां दुसऱ्या दिवशीं तिनें पंक्तीमध्यें तूप वाढावयास घेऊन त्या श्लोकाचा प्रथमार्ध म्हटला. जेव्हां त्या शिष्याच्या पंक्तींत आली तेव्हां त्यानें उत्तरार्ध म्हटला; मग तिनें त्यास ओळखून त्याच्याबरोबरच विवाह केला.

सर्वांवर उपकार करा, साधी वृत्ति धरा, घर सौख्यानें भरा—नेहमीं दुसऱ्याच्या उपयोगी पडून सरळ वागणूक ठेवली तर सुख होतें.

सर्वांस औषध आहे, पण स्वभावास नाहीं.—सर्व गोष्टी बदलतां येतात पण मनुष्याचा स्वभाव बदलतां येत नाहीं. स्वभावो दुरतिक्रमः ।

सर्वे गुणाः कांचनमाश्रयन्ति ।—श्रीमंत मनुष्याच्या ठिकाणीं सर्व गुण असतात असें याचक लोक भासवितात व मोठेपणा देतात. एक द्रव्य असलें म्हणजे सर्व कांहीं साध्य असतें. यस्यास्ति वित्तं स नरः कुलीनः । स पंडितः सः श्रुतिमान् गुणज्ञः । स एव वक्ता स च दर्शनियो सर्वे गुणाः कांचनमाश्रयंति ॥

सर्वांनीं पालकींतु बसल्यारी व्हावतलें कोण—(गो.) सगळेच पालखींत बसले तर मग त्या वाहायच्या कोणीं ! सगळ्यांनींच पुढारीपणा घेऊन चालत नाहीं. कांहींनीं अनुयायीहि बनलें पाहिजे.

सल—सल चढणें—विषाद वाटणें ; शल्य लागणें.

सलीं लागणें—पोटांत सल वाढल्यामुळें झिजून आजारी पडणें.

सलाम—सलाम बादज सलाम—अनेक नमस्कार.

सलामीचा हात—कुस्ती, पट्टा इ. खेळतांना प्रथम मंगलार्थ करावयाचा हात.

*__दाम करी काम, बिबी करी सलाम__—दाम पहा.

सलामत—सलामत बे सलामत—विशेष सुरक्षित ; सुखरूप. ' ईश्वर त्यांस सलामत बे सलामत राखो. '—ग ११. ३४.

शीर सलामत तो पगडी पचास—शीर पहा.

सब—सब सोनारकी, एक लोहारकी—सोनार पहा.

सब के साठ करना और बडोंका नाम चलाना—(व.) व्यापारांत शंभर रुपयांचे साठ रुपये करणें म्हणजे जबर तोटा खाणें होय. हा एवढा तोटा जर होतो तर तो व्यापार एकदम सोडून कां देत नाहीं, असें म्हणाल, तर बड्यांच्या म्ह. वाडवडिलांच्या नांवाला त्यायोगें डाग लागेल. त्यांनीं या धंद्यावर संपत्ति व कीर्ति मिळविली. केवळ नांव राखण्यासाठीं वाटेल ती बूड सहन करणाराला अनुलक्षून ही म्हण योजतात.

सवकणें—सवकला कोल्हा, गू खातो ओला—एखाद्या मनुष्यास एकदां एखादा नाद लागला म्हणजे त्या नादाच्या पायीं तो आपणास अत्यंत हीन दशेस आणतो.

सवकलो कोल्हो, अजीर्णान मेलो—(कों.) फार खावयाची संवय झाल्यावर अजर्णानें अंत झाल्यास नवल नाहीं.

सवकल्या भुता, चला जाऊं कालच्या शेता—एकदां एखाद्या मनुष्यास एकाद्या गोष्टीची गोडी लागली म्हणजे ती वरचेवर करावीशी वाटते. तु०—Habit is second nature.

सवंग—सवंग लोकप्रियता—फार कष्ट न करतां मिळणारा लौकिक, कीर्ति.

सवंग सवदा—लयलूट; भरपूर; स्वस्ताईची कमाल.

* **सवंग सवदा हगवण लावी; सवंग सौदा हगवणीस काळ**—एखादी गोष्ट स्वस्त मिळाल्यास ती खूप खाऊन आजारी पडण्याचा संभव असतो. स्वस्त मिळाली म्हणून एखादी गोष्ट भरमसाटपणें घेऊं नये.

संवर्णे—सवर्णी पडप—(गो) पांखरांची किलबिल होणें.

सवत---सवतइसाळा येणें--सवतीमत्सर उत्पन्न होणें.

सवत लागणें--एखाद्या बाईची सवत (नवऱ्याची पूर्वीची बायको) मेलेली असली कीं तिला (नंतर केलेल्या बायकोला) पहिली बायको भूत होऊन छळते, सुखानें नांदूं देत नाहीं त्याला म्हणतात.— स्त्री मासिक, आक्टेबर १९४१ पान १४३.

सवतीमत्सर--सवतीमध्यें नेहमीं परस्पर पराकाष्ठेचा मत्सर असतो यावरून उभा दावा; वैर, कट्टा द्वेष.

***सवत पाहून शृंगार आणि शेजार पाहून संसार**--सवतीस मत्सर वाटणार नाहीं इतकेंच नटावें व शेजारणीस मत्सर वाटणार नाहीं अशा तऱ्हेनें रहावें; सहसा दुसऱ्याच्या डोळ्यांत येणार नाहीं अशी वागणूक ठेवावी.

सवत साहवते पण सवतीचें जापें साहवत नाहीं— [जापें=संतति] सवतीचीं मुलें आपल्या मुलांच्या मुळावर आहेत अशा समजुतीनें सावत्र मुलांना बायका पाण्यांत पांहातात.

सवत साहीना आणि मूल-लेंकरूं होईना— स्वतःला मूल होत नाहीं व त्यासाठीं नवऱ्यानें दुसरें लग्न केलेलेंहि खपत नाहीं. स्वतःला एखादी गोष्ट करतां येत नाहीं व दुसऱ्यानें केलेली पाहावत नाहीं अशी स्थिति.

राळ्याचें कांडण, सवतीचें भांडण—राळा पहा. राळे कांडले असतां जसा आवाज होत नाहीं तशी सवती सवतींची नेहमीं धुसफूस चालू असते पण मोठें कडाक्याचें भांडण होत नाहीं. 'राळ्या राळ्याचें कांडण। सवतीसवतींचें भांडण।' असें एक गाणें आहे.

सवतवणी साघवणी--पावसाचा शिंतोडा; भुरभूर.

संवय--- संवय बोले आणि जीभ हाले-- ज्या मनुष्याला नेहमीं बोलण्याची संवय असते त्यास गप्प राहवत नाहीं.

संवयी ह्या सहज लागतात व वाईट संवयी ठार मारतात---संवयी न कळत जडत जातात. चांगली संवय लागल्यास हरकत नाहीं पण वाईट संवयी लागल्यास त्या सोडतां येत नाहींत व शेवटीं घातास कारण होतात.

संवयेचो हात तोंणा वता--(गो.) संवयीचा हात तोंडांत जातो. माणूस प्रकृतिधर्म सोडूं शकत नाहीं.

संवसाठ---संवसाठीं-ससाठीं, बारा मासीं— साठ संवत्सर व बारा महिने इतका दीर्घ काळ. दीर्घकालिक वायदा.

सवा---सवामणाची बिडी--१ अतिशय जड ओझें; फार मोठी जबाबदारी. २ विवाहित स्त्रीस जन्मभर पोसावयाची जसते व ती मोठी जबाबदारी असते. यावरून विवाहित स्त्री, पत्नी. ' आठरावें वर्ष पुरें होऊनहि पायांत सवामणाची बिडी ठोकली नाहीं असे मुलगे आतां पूर्वीपेक्षां जास्त सांपडतील.'–नि. " जरी लहानपणींच ह्यांच्या वडिलांनीं ह्यांचीं 'हाडें भाजण्याचा' किंवा ह्यांच्या पायांत ' सवामणाची बिडी ' अडकावून ह्यांस ' चर्तुभुज ' केलें होतें. "—छच १०१.

सवाहाती—(खाटिक.) मेंढीचें आंतडें; हें सवा हात लांब असते.

सवाई---सवाई जमा—अवांतर जमा; शेतकरी व इतर गांवकरी यांवरील एक सालपट्टी.

सवाई सूट–वजा–बाद—साऱ्याच्या एकपंचमांशची सूट.

सवाईची दोरी—तंबूच्या मधील खांबांस बांधून ताणून मेखांस बांधलेली दोरी.

सवाईची मिति—दरमहा दर शेंकडा सवा रुपाया प्रमाणें व्याजाचा दर.

सवाय तांगा गवाय—(गो.) [तांग=१६ पैचें एक चलन] अल्प मोबदल्यांवर कोणासाठींहि साक्ष देणें.

सवाय---सवाय खाण पोंट फुगुं--(गो.) स्वस्ताइचें खाणें खाऊन पोटफुगीची व्यथा जडायची.

सविनय---सविनय कायदेभंग—अहिंसा, अनत्याचार या मार्गानें सरकारी कायदे मोडणें. सत्याग्रह (इं.) Civil disobedience.

सव्य---सव्य घालणें—(देवाला, मोठ्याला) उजवीकडे ठेवून डावीकडे फिरणें; प्रदक्षिणा घालणें. 'घालूनि सव्यें मग अंबिकेला।'–सारुह ७.८९.

सव्यापसव्य--१ डावा उजवा. २ उलट सुलट; शुद्धाशुद्ध. 'सव्य अपसव्य भोंवंडी गदा। '–एरुस्व ९.४८. ३ श्राद्धाच्या वेळीं जानवें इकडून तिकडे फिरवावें लागतें यावरून, यातायात; खटपट.

सव्यापसव्य करण्याची पाळी येणें—यातायात पडणें, करावी लागणें

संशय---संशय वाटणें,-येणें--(सांकेतिक) शौचास पुनः जावेसें वाटणें; मलशुद्धि बरोबर झाली नसल्यानें असा संशय येणें.

* **संशय फिटेना, देव भेटेना**--मनांतील शंका फिटल्याशिवाय परमेश्वरदर्शन होत नाहीं. चित्तशुद्ध झाल्याशिवाय परमेश्वरप्राप्ति होत नाहीं. त्याचप्रमाणें कोणतीहि गोष्ट संशयीवृत्तीनें केल्यास फल मिळत नाहीं.

संशय म्हणजे चुकी--एखाद्या गोष्टीबद्दल संशय घेणें म्हणजे त्यांत चूक दाखविण्यासारखें आहे.

संशयाचें भूत, तेथें काय करी धूप—मनाला एकदां संशयाची बाधा झाली म्हणजे तिचें निरसन करणें कठीण असतें.

संशयाहून थोर, पाप नाहीं घोर—संशयापेक्षां मोठें पातक नाहीं.

संशयी--संशयि मन सावळेक भित्ता—(गो.) संशयी मन सावलीलासुद्धां भिते.

ससा---ससे धोके बाळगणें-करणें-लागणें— सशासारखी धास्ती वाटणें.

ससा भानवसीं येणें; ससें भाणवसियांस सांपडणें--ससा चुलीच्या मागें सांपडावा याप्रमाणें आयतें भक्ष्य तावडींत येणें, हातांत सांपडणें, तोंडांत येऊन पडणें; घर बसल्या प्राप्ति होणे. ‘ जेवीं ससा भाणवसा आला । तो मुके प्राणा ॥ ’—कथा ४-७-१२०. ‘ नजीबखान रोहिला ससें भाणवासियास सांपडतें तैसा आला आहे. आजिचे समयीं सोडूं नये.’--भा ब. ४१. ‘याप्रमाणें आज केवळ ससें भाणवासियास सांपडतें तैशी शिकार सांपडली आहे सत्वर येऊन पोचावें. ’--भा ब ५०.

ससेहोलपट(ड)--सशास एकदम सर्वांनीं घेरुन मारानें त्याप्रमाणें चोहोंकडून मारा. मारामारी; मारा, मारा, अशी गडबड, घांदल. ‘ मारा, मारा असें होऊन ससेहोलपट होऊन एक ठार झाला. ’—भाब १५. ‘ अशी ससेहोलपड घोड्याचा धनी आणि हे घोडे चोर ह्यांची चालली असतां, आतां गांठणार तो आपणांस ! ’--छच ३२.

***ससा उठायला कुत्रें हागायला बसायला गांठ पडणें**--लाभ होण्याच्या वेळीं कांहीं तरी विघ्न येणें. शिकार पहा.

ससाकुतरें निघालें काशीयात्रेला, ससा आधीं पोहचला--ससा सरळ पळत जातो, कुत्रा वाटेंत दगड आढळला कीं हुंगून तंगडी वर करून मुततो; यामुळें जरी शिकारींत सशास कुत्रा पकडतो तरी सहज पळतांना कुत्रा मागेंच राहातो. कुत्रा पहा.

सशा ! जा वश्या—कांहीं झालें तरी मनुष्य आपल्या वंशाकडे जावयाचा.

सशाचे पारधीस-शिकारीस वाघाचा पुरावा-सरंजाम—थोडें काम करावयाचें असलें तरी तयारी भरपूर पाहिजे.

सशाच्या पारधीला वाघाच्या शिकारीच्या तयारीनें जाणें--वरप्रमाणेंच. ‘ परंतु सशाच्या पारधीला वाघाच्या शिकारीच्या तयारीनें जायचें, हें धोरण त्यांचें बळकट असल्यामुळें दाजीसाहेब घोरपड्याच्या बुद्धीला त्यांनीं भ्रंश पाडला असावा. ’–V. S. २.१६.

सशाला खळगा जामीन—ससा लपण्यासाठीं खळग्याचा आश्रय करतो. मांजराला उंदराची साक्ष.

ससें उठलें, कुत्रें हगटलें—वर पहा. अवसानघात.

संसार---संसार उभारणें— गृहस्थाश्रम चालविणें. ‘ मुक्ताबाईनें एखाद्याचा संसार नसता का उभारला. ’ --नामना २१.

संसार करणें--१ गृहकृत्य करणें. २ (बे.) ताडाचें पान कापून ताडी मोघ्यांत पाडणें.

संसार मांडणें---संसारास सुरुवात करणें; घर करणें.

संसार मातींत जाणें--संसाराचा बिघाड होणें. ‘ नवरा बायको विजोड असली म्हणजे संसार मातींत जातो. ’–मोरप्र २५.

संसारयात्रा आटपणें-संपविणें—मरणें.

संसार वारा होणें—संसाराचा गोंधळ उडणें; जीव मट्टयास येणें. ‘ हळ हळ बहु झाली होय संसार वारा मजवरि फिरली हे दैवदुर्वार धारा ’ ॥—सारुह ३.७३.

संसार वृथा करणें-जाणें—संसाराचा नाश करणें, होणें. ‘ तुकयाची ज्येष्ठ कांता । मेली अन्न अन्न करितां । येणें लज्जा वाटे चित्तीं । संसार गेला कीं ॥’

संसार हांकणें—प्रपंच योग्य रीतीनें चालविणें.

संसाराचा गाडा—प्रपंच; व्यवहार.

संसाराचा मांडव करणें--(व.) संसार हाच कोणी राहावयाचा मोठा वाडा. तो मोडून टाकून त्याच सामानानें राहाण्याकरितां जुजबी मंडप उभारणें सर्वथैव मूर्खपणाचें ठरतें. त्याप्रमाणें संसार-गृहाचा बिघाड करून घेणें मूर्खपणाचें होय. त्यावरून संसाराचा विचका करून घेणें.

संसाराची मात्रा करणें—सर्व प्रपंचाचा नाश करणें.

संसाराचें ओझें-जोखड—जोखड जसें मानेवर बसतें तसा संसार अंगावर येऊन बसतो. प्रपंचाची जबाबदारी.

संसारांत माती कालवणें—संसार नासणें. सुखानें संसार करूं न देणें. 'आणखी तुमच्या सोन्यासारख्या सोज्वळ संसारांत माती कालवली !'—एकच प्याला ४.५.

संसारांतून उठविणें--संसार करूं न देणें; संसार मोडणें. 'अहो. मी असतों तरी सुद्धां जन्माचं संसारांतून उठाविलं असतं !'—एकच प्याला १.४.

संसाराला लाथ मारणें—संसार टाकून देणें. विरक्त होणें.

संसारावर-संसारास पाणी घालणें—संसाराचा नाश करणें. 'म्हणती आतां संसारा घालूं पाणी । परी अन्न देऊं चक्रपाणी, '—ह १६.११६.

संसारावर वीज पडणें—संसाराचा नाश होणें. 'म्हणे संसारावरी वीज पडो 'दावि ७.४४१.

***संसार कहाणी : मृगजळा वाणी :**--(महानु.) संसार हा मृगजळाप्रमाणें मायावी आहे.

संसार केला एकटीनें , वाहून नेला फुकटीनें--एखाद्या व्यक्तीच्या श्रमाचा दुसऱ्यानें फायदा घेणें.

संसार केला घाई घाई, म्हातारपणाला कांहींच नाहीं--अव्यवस्थितपणें , उतावळपणें संसार केल्यास पुढील तरतूद करतां येत नाहीं.

संसार केला नारीं, नवरा पडला ऋणाच्या भरीं—संसारामध्यें स्त्रीचें प्राबल्य झाल्यास बहुधा कर्ज होण्याची भीति असते.

संसार केला युक्तीनें, घर खाल्लें फुकटीनें—घर धनिणीनें काटकसरीनें संसार करून जवळ पुंजी जमवावी व नवऱ्यानें ती एखाद्या भलत्याच स्त्रीवर खर्च करावी.

संसार पाण्याचा बुडबुडा—संसार हा क्षणभंगुर आहे.

संसार राकूनु परमार्थ साधका--(गो.) संसार राखून परमार्थ साधावा. तु०—आधीं प्रपंच करावा नेटका। मग परमार्थ विवेका।

संसार त्यागी : देवा लागीः-(महानु.) देवप्राप्तीसाठीं संसार सोडावा लागतो.

हा संसार मिठा, आगे किस दिठा; हा संसार गोड, पुढचा काय घोर—आज तर मजा आहे, पुढचें कोणी पाहिलें आहे ? पुढल्या काळाविषयीं बेफिकीरी.

संसार वाढवावा तितका वाढतो व तोडावा तितका तुटतो--अर्थ स्पष्ट आहे. विषयाप्रमाणें संसाराचें प्रमाण जसें ठेवावें तसें राहातें. 'हा सवसार वाढिवला तितका वाढतो. तोडिला तितका तुटतो.'—पेद १९.२.

संसार वायां गेला, जेणें टाकिलें पोराबाळाला--ज्याला आपलीं मुलें बाळें संभाळतां येत नाहींत त्याचा संसार व्यर्थ होय.

संसाराचें ओझें मनाचें, पाय धरा विठोबाचे—संसारांतील मन काढून तें परमेश्वराचे चरणीं लावल्यास सद्गति मिळते.

संसाराच्या आटाआटीं, करणें लागे कष्टीं--संसार करावयाचा म्हटला म्हणजे अनेक प्रकारची यातायात करावी लागते.

संसाराच्या बारा वाटा--संसारांत अनेक भानगडी असतात.—दावि. ७.४२०.

संसारात उंचारि आसका, परमार्थांतु मुळांतु वचका--(गो.) संसारांत उचस्थान मिळवावें आणि परमार्थांत अगदीं खोल खोल शिरावें.

ससेमिरा—**ससेमिरा मागें लागणें-लावणें**—पिच्छा पुरविणें; तगादा करणें; हचांड लागणें. सिंहासन बत्तिशींत स-से-मि-रा या चार आद्याक्षरांचा श्लोक आहे.

संस्कृत—**संस्कृताच्या पोटीं : निफजली मऱ्हाटीः**—(महानु.) मराठी भाषा संस्कृतोपन्न आहे. व ती संस्कृताप्रमाणेंच उच्च आहे; यावरून, चांगल्यापासून चांगलें होतें.

सस्ता---**सस्ता सुकाळ**--लायलूट,

सस्ताईची भाजी, बायको झाली राजी—स्त्रीला संसारांत यथेच्छ जिन्नस पुरवले म्हणजे ती खूष असते.

सस्ताईची वरव हगवणीला काळ—एखादा जिन्नस स्वस्त मिळाला म्हणून तो खाल्ला तर त्यापासून प्रकृतीत बिघडण्याचा संभव असतो. वस्तु पुष्कळ मिळाली तरी तिचें सेवन मित करावें. सवंग सवदा हगवण लावी.

सस्तीस मस्ती, शिंदळीस हत्ती—जगामध्यें ज्याला वैभव प्राप्त होतें तो उन्मत्त होतो व बहुधा दुर्जनांची नेहमीं चलती असते. सज्जनांस कोणी विचारीत नाहीं.

सस्तें भाडें शिरपूर यात्रा—शिरपूर गांवीं यात्रेस जाण्याचें मनांत होतेंच. त्यांत कमी भाडें आहे. मग यात्रेस जाण्यास काय हरकत आहे. भाडें थोडें पडलें म्हणून घरचें काम सोडून जाणें चांगलें नव्हे. यावरून केवळ थोडा लाभ झाला म्हणून आपलें काम सोडून त्याच्या पाठीमागें जाणें. तु०—अलीकडची झोन तिकिटें. फुकटचें झोन तिकिटे मिळालें म्हणून उगाच प्रवास करणें.

सहज——सहजं किल यद्विनिंदितम् न खलु तत्कर्म विवर्जनीयम्—पशुमारणकर्मदारुणो अनुकंपामृदुरेव श्रोत्रियः।—शाकुंतल. जें वरून दोषास्पद दिसलें तरी तें प्रत्येक कर्म वाईटच असतें असें नाहीं.—गांगा. २४५.

सहज गेलें गोठ्यांत तर रुपाया पडला ओठ्यांत—(अश्लील) गोठ्यांत दडून बसलेल्या पुरुषानें अशा सहज तेथें आलेल्या स्त्रीशीं संभोग करून तिला त्याबद्दल रुपाया द्यावा व त्या स्त्रीला तो लाभ वाटावा अशी स्थिति.

सहज गेलें वाडग्यांत : चार पैसे गाडग्यांत—(महानु.) भीक मागणारावर ही म्हण आहे.

सहज जाईन कुंपांत, चार आणे सुपांत; सहज जाईन वाड्यांत, चार आणे गाड्यांत; सहज डोळा फिरकावीन,चार आणे टरकावीन—१ वरील प्रमाणेंच. सहज थोडें काम केलें तर मी पैसे मिळवीन अशी प्रौढी.

सहज जिची लीला, तीस कशास पाहिजे भांग टिळा—जिची सहज लीला पहा.

सहज पकेसो मीठाहो—(महानु.) सहज केलेली गोष्ट चांगली होते.

सहज पडे, दंडवत घडे—सहज पडले असतां परमेश्वराला नमस्कार होणें. इच्छा नसतां एखादी चांगली गोष्ट हातून घडणें. "'सहज०' अशी कांहीं कांहीं वेळेला मोठी मजेदार हकीगत होतें."—य. गो. जोशी, पुनर्भेट.

सहज बिल्वदळ गळे आणि व्याधास मुक्ति मिळे—शिवलीलामृतांतील व्याधाच्या कथेवरून. त्यानें त्याच्या डोळ्याआड येणारीं बेलाचीं पानें तोडून टाकलीं तीं खालीं असलेल्या पिंडीवर पडून त्यास पुण्य मिळालें यावरुन, आपण अजाणतां केलेल्या कृतीनें आपणास लाभ होणें.

सहज मिले सो दूध बराबर,मांग लिया सो पानी—(हिं.) जी गोष्ट सहज मिळते ती दुधासारखी असते व मागून मिळते ती पाण्यासारखी असते. जी श्रम केल्याशिवाय किंवा आपणांकडे कमीपणा घेतल्याशिवाय प्राप्ति होते तिची किंमत अधिक असते. ज्या गोष्टीबद्दल याचना करावी लागते तिचें महत्त्व आपण कमी मानतो.

सहज सोनार भेटे, वराक चव्वल तुटे—(गो.) प्रत्येकासाठीं खर्च करीत राहिल्यास आपल्या जवळची पुंजी हळूहळू खलास होईल.

संहति——संहति : कार्यसाधिका—समवायोहि दुस्तर ॥ ऐक्यानें कार्य साधतें व ज्यांचें ऐक्य असतें त्यांचा नाश करणें कठीण असतें. अल्पानामपि वस्तूनां संहतिःकार्यसाधिका। तृणैर्गुणत्वमापन्नैर्बध्यन्ते मत्तदमान्तिनः॥ बहूनामल्पसाराणां समवायो दुरत्ययः। तृणैर्विधीयते रज्जुर्बध्यन्ते तेन दान्तिनः॥—सुर. ८३·२·३.

सहद——सहदांतली माशी सहदांत—[सहद=मध] सहद हा एक गोड व चिकट पदार्थ आहे, व तो माशीस मोठा प्रिय आहे. माशी गोडाच्या लोभानें सहदावर धांवते व त्याला चिकटून पडते व शेवटीं त्यांत मरते सुद्धां. जेव्हां मनुष्य एखाद्या कामाला आवडीमुळें अडकून पडतो, कांहीं केल्या त्याच्याबाहेर निघत नाहीं तेव्हां म्हणतातः काय चिकट आहे हा. याची सहदांतली माशी सहदांत राहाते.

सहदेव——सहदेवाचे ठोके—सहदेवाचे भविष्यविषयक आखाडे.

सहदेवानें प्रश्न विचारावा आणि भाडळीनें उत्तरें द्यावीं—ज्योतिषग्रंथामध्यें सहदेवभाडळी संवाद असतो. यावरून मिलाफाची ठराविक उत्तरें. "'सह... द्यावी' अशा प्रकारच्या लिखाणामुळें प्रसिद्धीस आलेले श्री. भरुचा यांनीं बॅ. जिनास तेरा प्रश्न विचारले."

सहन——सहनशीलता कडवट परि अंतीं तिचें फळ मिष्ट—सहनशीलता धारण करणें प्रथम जरा कडू वाटतें पण अखेरीस तिच्यापासून गोड फळ मिळतें.—तु०

टाकीचे घाय सहाणें, देवकळा पावणें. Patience is better itself, but bears sweet fruit.—सवि २७०४.

सहा—षट् पहा. **सहा उपदर्शनें**—१ योगाभ्यास, २ संन्यास, ३ जैन, ४ बौद्ध, ५ प्राभाकर, ६ चार्वाक.

सहा गुण—१ ज्ञान, २ वैराग्य,३ ऐश्वर्य,४ ख्याति, ५ यशश्री, ६ औदार्य. 'ज्ञान वैराग्य ऐश्वर्य ख्याति। यशश्री औदार्य स्थिति। हे साही गुण वसिष्ठासी असती।' –भारा बाला १५.३३५.

सहा नकार—१ मौन, २ विलंब, ३ भ्रूभंग, ४ अधोवदन, ५ गमन, ६ विषयांतर.

सहा महीन्यांची जांभई—अतिशय विलंब लागणारी गोष्ट. A suit in chancery.

सहा राग—१ भैरव, २ मालकंस, ३ हिंदोल, ४ दीपक, ५ श्रीराग, ६ मेघमल्हार.

सहा वकार—१ वस्त्र, २ विद्या, ३ वपु, ४ विनय, ६ वाणी, ६ वित्त.

सहा सामान्य धर्म—१ विभाज्यत्व, २ निर्भेद्यता, ३ परिमेयता, ४ आकृति, ५ जडत्व, ६ आकर्षत्व. (पदार्थविज्ञान).

सहा सुभे—१ औरंगाबाद, २ वऱ्हाड, ३ खानदेश, ४ विजापूर, ५ गोवळकोंडें, ६ बेदर. हे मोंगलांचे सहा सुभे होते.

***सहा महिने नळकांड्यांत घातलें तरी कुत्र्याचें शेंपूट वांकडें तें वांकडें**—कुत्रा पहा.

सही—**सही करणें**—नक्की करणें. 'एकशें शिक्का रुपयांस ग्रंथ कोतवाल यांनीं सही केला असतां...'–घाको ७१.

सही सलामत—सुखरूप; सुरक्षित. 'ती बापडी आजतागाईत सही सलामत आहे.'–भावं ५. 'त्याहि अग्निदिव्यांतून सहीसलामत निसटला.'–य. गो. जोशी, पुनभेट.

सहीसही—१ तंतोतंत. 'केव्हां केव्हांतर सहीसही माझेच प्रवेश मी पाहतों आहें असें मला आढळून आलें.' –सुदर्शन ११. २ हळूहळू; सहज. 'नासवानें महंमदखांचें कपट ओळखून चिडून जाऊन सहीसही तान घेतली.'–शास्त्रकार व कलावंतांचा इतिहास ६०.

सह्याजीराव—१ ज्याला नुसतें सही पुरतें येतें असा निरक्षर. २ केवळ सह्या करणारा; बाहुलें.

सळ—**सळ लागला: वळ नाहीं उमटला**—(महानु.) [सळ=वादी] अडचण काढली पण फलप्राप्ति झाली नाहीं.

सळणें—**सळो कां पळो असें करणें**—अतिशय त्रासून सोडणें. 'इंग्रजांस सळो का पळो करून सोडल्या-खेरीज ते कांहीं देणार नाहींत.'–केले २.२.४७. 'आजू बाजूच्या परिवारालाही तुमची कार्यें सळो कीं पळो करून सोडीत असतात.'–दाजी, भाग १ पा. २०४.

सळो कीं पळो असें होणें—अगदीं धांदल उडणें. 'परवांपासून कॉलेज सुरू झालें कीं मग काय सळो कीं पळो असें व्हावयाचें.'– आजोच २२१.

साई—**साईचा पाऊस**—(कुण.) स्वाती नक्ष-त्रांत पडणारा पाऊस.–मसाप २.३.६५.

साईत—**साईत सुईत**—साहित्य, सामान वगैरे. 'साईत सुईत काय लागावयाचें तें तयार कर जा.'–बाळ २.१०६.

साक—**साकेनें पाणी पिणें**—हाताच्या ओंजळीनें पाणी पिणें.

साकी—**साकी पाकीचा**—१ पतीचा; अब्रूचा. २ नेकीचा; शीलाचा.

सांकड—**घर सांकड,बाईल माकड**—घर पहा.

सांकर—**सांकर लागणें**—अडथळा होणें (प्रवाह इ. स).

सांकव-सांकू-सांकवारी चोंडोवनु फळें ताणप—फळयांच्या पुलावरून जाऊं लागल्यावर पुलाच्या फळ्या काढून घेणें. अगोदर धाडशी काम करावयास उत्तेजन द्यावयाचें व मागून त्यास त्रास देण्यास सुरुवात करावयाची अशी वृत्ति.

साख—**साख सुरत**—१ टुमदार, प्रमाणशीर. २ सुरेख; नीटनेटकें; झकपंक. 'साखसुरत पोशाख बिशाग केला कीं मोठा संभावित दिसतो.'–विवि ८.८.१५५. ३ पद्धतशीर; सशास्त्र; योग्य. ४ पटेल असें तयार केलेलें. ५ उघडपणें. 'सहज साखसुरत जनाना चालला असता,' –सूर्यग्र ११. ६ प्रत्यक्ष; साक्षात.–खिपु १.१५.

साखर——साखर खावप—(गो.) साखरपुडा करणें; विवाह निश्चित करणें.

साखरचुंबा—(बालभाषा) गोड पापा; चुंबन. 'अरुणानें नभःश्रीचा साखरचुंबा घेतला.'—विविधवृत्त (स्त्री हृदय) १९२८ खास अंक.

साखर झोंप——साखरेसारखी मधुर झोंप. उन्हाळ्यामध्यें पहांटेच्या वेळीं लागणारी सुखकर झोंप. (सामा.) पहांटेची झोंप. 'लग्न म्हणजे संसाराचा सूर्योदय होण्याच्या आधींच ही साखर झोंप होय.'—रंकाचें राज्य ७. 'त्याला कळून चुकलें कीं, आपली साखर झोंपेची अपेक्षा आपणाला फार महाग पडणार.'—हडप, पेशवाईचा पुनर्जन्म, पृ. १७०.

साखरपुडा करणें——मुलगी ठरवावयास गेल्यावेळीं मुलीच्या हातांत 'साखरपुडा' (खाऊ) देतात यावरून लग्न ठरविणें; वाङ्‌निश्चय करणें. 'तिच्या सासरच्या मंडळींनीं मुलीला घरीं नेऊन साखरपुडाहि केला.'—स्वप ६५.

साखर पेरणें—पसरणें——१ गोड गोड बोलून वश करण्याचा प्रयत्न करणें. 'याप्रमाणें दिली मनमुराद साखर पसरून आणि आलो निघून!'—उग्र. १.१. २ तोंड देखल्या गोड गोड बोलणें; थापा देणें. 'तो मनांत मांडे खात होता कीं, मीं पेरलेल्या साखरेस भुलून ही मला वश होईल.'—पामो ७९.

साखरेचा——(सांकेतिक) मुका; पापा; चुंबन.

साखरेची साल काढणें—अतिशय सूक्ष्म छाननी करणें. 'साखरेची साल काढण्याचा हा यत्न पाहून आमच्या पंडित मंडळीस संतोष होईल.'—नि ५११.

साखरेची साल काढणारा—१ फार चोखंदळ; चोचले करणारा. २ अतिशय कडक, खाष्ट, चिकित्सक, दोषैकदृष्टि माणसाबद्दल म्हणतात.

साखरेची सुपारी—अतिशय गोड बोलणारा; गोड स्वभावामुळें लोकांस आवडणारा. 'हरिपंत साखरेची सुपारी. बोलून दाखवनार नाहीं.'—साइसंम ऐले २.२३.

साखरेची सुरी—वरून गोड पण मर्मभेदी भाषण (गो.) साखरे सुरी. 'या चांडाळाच्या उरांत साखरेची सुरी भोंसकून केसानेंच मान कापली पाहिजे.'—संभाजी.

साखरेनें तोंड भरणें; तोंड भरून—तोंडात साखर घालणें——चांगलें बोलल्याबद्दल गोड बक्षिस देणें; तोंड गोड करणें.

साखरेवर मुंगळे—जेथें लाभ असेल तेथें गोळा होणारे. तु०—'Cupboard love'.

***साखर खाईल तर ढेकर देईल**—एखाद्याला लाभ झाला म्हणजे तो संतुष्ट होतो.

साखर पसरली आणि पोर नाडली—गोड गोड थापा देऊन एखाद्या मुलीस फसविणें.

हातावर साखर आणि मानेवर कातर—गोड बोलून गळा कापणें.

साखर—साखरेचा खाणार, त्याला देव देणार—जो चांगली इच्छा करतो त्याला चांगला लाभ होतो. जशी इच्छा तसें फळ.—शाब २. २०४.

साखरेची गोडी व तुपाची चव सांगतां येत नाहीं—कांहीं गोष्टी अनुभवाशिवाय कळत नाहींत.

साखरेचें बोलणें आणि निखाऱ्याचें वागणें——बोलतांना गोड पण वागतांना दुष्ट. धनुर्धारी

साखरेच्या गोण्या बैलाचिये पाठीं——कांहीं लोक नुसते भारवाहक असतात. त्यांच्या जवळ चांगल्या वस्तू असून त्यांच त्यांना कांहीं उपयोग करतां येत नाहीं. साखरेच्या गोण्या बैलाचिये पाठीं। तयासि शेवटीं करबाडें॥ मालाचे पै पेटे वाहताती उंटें। तयालागीं कांटे भक्षावया॥—तुगा ३०१८.

साखरेविना सांजा व स्त्रीविना संसार व्यर्थ—या दोन गोष्टींचा चांगला मिलाफ झाल्याशिवाय त्यास गोडी येत नाहीं.

साखरेला मुंग्या येणारच——जेथें कांहीं लाभ होण्याची आशा असते तेथेंच लोक जातात.

सांग——सांगसंपूर्ण—पूर्ण व समग्र.

सांगसरभरा——१ सर्व प्रकारची संपूर्ण मदत. बोलण्यानें, गौरवानें शिफारस करून मदत करणें. 'त्यानें स्वतः कांहीं दिलें नाहीं पण माझी सांग सरभरा अशी केली कीं माझें लग्न झालें. २ शाब्दिक मदत; थापा. 'हें देईन, तें देईन.' म्हणतां माझी सांगसरभरा केली.

सांग सोनें, कधींहि न होय जुनें——ज्या सोन्यांत हीण अंश मुळींच नसतो, जें पूर्णांशानें सोनेंच असतें त्याचें

तेज कधींहि कमी होत नाहीं. पूर्णपणें सद्गुणी मनुष्यास कधींच दोष लागत नाहीं.

सांग——सांग काम्या ओनाम्या—स्वतःची बुद्धि मुळींच नसलेला; केवळ सांगितलेलें तेवढेंच काम करणारा.

सांगसुगरण–सुग्रण—बोलण्यांत हुशार; नुसती तोंड पाटीलकी करणारी.

सांगणें——(संकटें दुःख इ. नीं) अवघड–कठीण जड सांगणें—(त्यांचा) परिणाम कठीण होणें.

सांगून येणें—(मुलगी) विवाहासाठीं देऊं करणें.

***सांगणें सोपें, करणें कठीण**––बोलणें सोपें, करणें कठीण.

सांग पाटला काय लिहूं, चावडीवर कधीं जाऊं—पटवारी आपल्या गांवच्या पाटलाला विचारतो व 'पाटीलबोवा सांगा या प्रकरणांत अधिकाऱ्याकडे काय रिपोर्ट करावयाचा; तसेंच मीं चावडीवर कोणत्या वेळीं हजर व्हावयाचें तेंहि सांगा.' पटवारी स्वतःच्या जबाबदारीवर कांहीं न करतां जबाबदारी पाटलावर टाकतो. जबाबदारींतून सुटूं पाहाणाऱ्या मनुष्याचें वर्तन असें असतें.

सांग सैरटा, ऐक भैरटा––सांगणारें सैरट आणि ऐकणारें बहिरट. दोन अर्धवट मनुष्यांची गांठ पडली म्हणजे त्यांतून घोटाळ्याशिवाय काय बाहेर पडणार' ?

सांगचें पुराण आणि खावचें शेण––(गो.) चांगल्या गोष्टींचा दुसऱ्याला उपदेश करायचा आणि आपण स्वतः दुर्वर्तन करायचें. पुराणांतली वांगीं पुराणांत याप्रमाणें.

सांगण्याचे सांगणी आणि बैल गेले रांगणी—सांगोवांगी कामें करून होत नाहींत.

सांगण्याचें प्रयोजन काय। व्हटाळी वांचून तट्टू न जाय––एक सांकेतिक सूचना देणाऱ्या गाण्याचा हा चरण आहे. एकंदरींत दोरीशिवाय घोड्यास पाहिजे तिकडे नेतां येत नाहीं. एखादें काम दुसऱ्याकडून करून घ्यावयाचें असल्यास त्यास पेंचांत धरल्याशिवाय तो तें करीत नाहीं.

सांगण्यात करण्यांत पुष्कळ फेर असतो––बोलण्यांत आणि कृतींत फार अंतर असतें. बोलणें सोपें, करणें कठिण.

सांगत ती चाकरी, दीत तो मुशारो—(गो.) धनी सांगेल तें काम करायचें आणि देईल तें वेतन घ्यायचें.

सांगतल्याक एक तोंड, आयकतल्याक दोन कान—(गो.) सांगणाराचें तोंड एक असतें पण ऐकणारा दोन कानांनीं ऐकतो. मुळांत लहान असलेली बातमी एकाकडून दुसऱ्याकडे तिथून तिसऱ्याकडे जातांना विस्तार पावते.

सांगता तुझें तोंड, ऐकतत माझे कान, जिभे रांडे मट्ट न्हव——(गो.) लोकांनीं सांगितलेलें ऐकावें पण तें दुसऱ्याला सांगत सुटूं नये.

सांगतां येतें पण करवत नाहीं—दुसऱ्यास सांगणें सोपें असतें पण स्वतः करणें अवघड असतें.

सांगायला गेलें तें टांगायला नेलें––एक करतां एक होणें. चांगलें सांगावयाला जावें तों भलताच अर्थ करणें. नसत्या भानगडींत पडलें असतां आपत्ति ओढवते.

सांगावें, कवण्या ठाया जावें। कवणातें स्मरावें कैसें काय करावें। कवण्या परि मीं राहावें।—दत्ताच्या एका पदांत वरील चरण आहेत. 'कृष्ण कारस्थानें साधुसंतांचें पवित्र स्थान म्हणून गणल्या गेलेल्या केडगांव बेटांत व्हावींत हें पाहून वरील पद आठविल्याशिवाय रहात नाहीं.'—माझा चित्रपट व काशीचा संपूर्ण इतिहास पान ७०.

सांगितलेली बुद्धि जाते मग भांडवल जातें––आधीं बुद्धि जाते मग भांडवल जातें पहा.

सांगितलेली बुद्धि, बांधलेली सिदोरी किती दिवस पुरणार ?––शिकवलेली बुद्धि पहा.

सांगी तर सांगी, म्हणे वडाला वागीं––भलतीच गोष्ट सांगणें; अशक्य गोष्ट खरी म्हणून सांगणें.

सांगीतल्या कामाचा दिल्या अन्नाचा–भाकरीचा—द्यावें तेवढें पोटास खाऊन सांगितलें तें काम करणारा; पूर्णपणें स्वाधीन, आज्ञाधारक; सर्वस्वी ताब्यांतील व्यक्ति.

सांगितलेल्यापेक्षां केल्यानें बरें, डोसकें आपटून मेल्यानें बरें—तोंडानें बोलण्यापेक्षां एखादी गोष्ट करून दाखवावी म्हणजे तींत किती श्रम पडतात तें कळतें.

सांगुन सांगुन दांता जाल्यो कणयो आनि ओंठा जाल्यो शिंपल्यो—(गो.) वारंवार उपदेश करणें.

सांगून सवरून प्राण जावा, आणि उघड्या डोळ्यांनीं खेळ पाहावा––आपल्या समोर आपला नाश होत असलेला पहाणें.

सांगेल तें कारण आणि बांधील तें तोरण—-सर्व प्रकारें काल अनुकूल असणें; बोलल्याप्रमाणें गोष्टी करण्याची सत्ता असणें; सर्व प्रकारें अधिकार चालता असणें.

सांगोवांगी, सांगी, वडाला वांगीं—-कर्णोपकर्णी जाणाऱ्या गप्पा; बाता; थापा.

सांगड—-सांगड घालणें—-संबंध जोडून देणें. 'वरील दोन कल्पनांची सांगड घालून दिली आहे.' -टिळे ४. ११.

सांगड तोडणें—(राजा.) ग्रामदेवतेस बलिदान करणें.—आडि महा. ८.

सांगडीस धरणें—निकट संबंध होई असें करणें.

सागर—- सागराच्या पोटीं, चिखलाची भरती— सागर हा मोठा व संपन्न म्हणून त्याच्या पोटांत पहावयास जावें तो चिखल आढळतो. याप्रमाणें एखादी मोठी वरून भव्य व सुंदर वस्तु पाहून तिचें अंतरंग पहावयास जावें तों निराशा होते. वरून मोठ्या दिसणाऱ्या गोष्टी आंतून तशाच असतात असें नाहीं.

सागरांत खसखस—दर्यामें खसखस; सिंधूंत विंदु; अनेक असंख्य गोष्टींत एखादी क्षुल्लक गोष्ट. 'मुनि ह्मणति, अर्जुनीं तव शक्ति, जसी सागरांत खसखसरे! ॥' -मो. द्रोण. २. ६३.

सागरगोटा—-सागरगोटे पिळले म्हणून काय तेल निघणार आहे?—-अशक्य गोष्ट करूं पाहणें.

सांगली—-सांगली बहुत चांगली—सांगली शहराचा लौकिक असा होता.

सांगोसाचा बैल किवणानें मेला—-एकाच्या बैलाला किवण झालें होतें त्या किवणाकडे पहावयास व उपचार करण्यास दुसऱ्यास सांगितलें; दुसऱ्यानें तिसऱ्यास याप्रमाणें परस्परांस सांगून प्रत्यक्ष कोणींच उपचार न केल्यामुळें तो बैल मेला. मूळ ह्मण-दुसंगीचें ढोर किवणानें मेलें.

सागेलागे—-सागेलागे—(सांगणें + लागणें), सांगितल्याबरोबर कामाला लागणारें; लबाड्या, कपट इ.त साथीदार; सहाय्यक; अनुयायी; साथी.

साच—-साचको आंच नहीं—-खऱ्याला भय नाहीं.

सांचणें—-सांचलेलें पाणी, किती दिवस देईल धणी—साचलेलें पाणी पुरवठ्यास येत नाहीं. त्याप्रमाणें सांचलेलें द्रव्य फार दिवस पुरत नाहीं.

सांचा—-सांचा पडणें—-सांठणें. 'तिळें तिळें पुण्य सांचा पडे। तरि हें बहुतां जन्मीं जोडे।' -तुगा. ७१२.

साज—-साज न शोभा, माकडाला झुबाः—-(महानु.) माकडाला अंगरखा घालण्याचें कारण नाहीं व तो त्याला शोभतहि नाहीं. यावरून अनवश्यक गोष्टीचें अकारणत्व दाखवितांना योजतात.

सांज—-सांज धरणें—सांजेला काढलेल्या दुधाचें तूप करून त्यांत वात बुडवून देवापुढें दिवा लावणें.

सांज सोंवळें—-सायंकाळीं स्नान न करतां नुसतें ओंवळें वस्त्र सोडून सोंवळें वस्त्र नेसणें.

साजक; सानक—-साजक, सानक रोटी—अन्नाची शपथ, बेलभंडारा उचलणें. 'तिनें तत्समयीं सानक रोटी दिली.' -भाव २५. 'आतां तुह्मीं मला आज्ञा केली तरी मजला साहेबी साजक रोटी द्यावी.' -भाव २१.

साजणें—-साजेना शोभा, माजराला झुबा,—मांजराला मोठा झगा घालून चांगला दिसत नाहीं. योग्य ठिकाणीं योग्य वस्तूच चांगली दिसते. वर पहा.

साजेल तें ल्यावें शोभेल तें बोलावें—आपणास शोभतील अशींच वस्त्रें भूषणें ल्यावीं व योग्य दिसेल असेंच भाषण करावें.

साटा—-साटा झाला, पण काटा नाहीं गेला—[साटा=उसाचा किंवा जवारीचा धांडा; तो उंच फोकासारखा वाढलेला असतो.] आजारानें शक्ति क्षीण होऊन त्याच्या शरीराचा जणो साटा बनला तरी त्याचा ताठा अद्यापि कायम आहे.

साटा—-साटें लोटें—१ आपल्या घरची मुलगी दुसऱ्याच्या घरीं व दुसऱ्याची मुलगी आपल्या घरीं आणण्याचा प्रकार. २ मोबदला; देवाण घेवाण.

* **साटेंलोटें आणि जन्माचें खोटें**—साटेलोट्यानें केलेलें लग्न क्वाचितच सुखदायक होतें.

साठ—-साठ मल्लांचे पेंच—१ हातमुरड, २ बैठक, ३ डंकी, ४ झडप, ५ खोच, ६ कसोटा,

७ चक्रीकसोटा, ८ दुम, ९ दस्ती, १० नागपेंच, ११ भुष्टा, १२ दंडमुरड, १३ आवळा, १४ नागमुरड, १५ झटका, १६ लुकान, १७ थाप, १८ धोबीपछाड, १९ हुलकस, २० कुंद्याची टांग, २१ मानेची टांग, २२ बैठक, २३ मोळी, २४ चाट, २५ तावबगली, २६ तबकफाड, २७ पाठपेंच, २८ उडाव, २९ बैठक-आंतली, ३० गोदी, ३१ गम, ३२ कलावा, ३३ कटि-बंध, ३४ कंबरफेंक ३५ थाप, ३६ मागीलबैठक, ३७ लंगोट, ३८ कानसळई, ३९ चितपछाड, ४० कला-जंग, ४१ मानदाब, ४२ दाब, ४३ दंडबोट, ४४ गळ-खोडा, ४५ कातरी, ४६ उभा कसोटा, ४७ स्वारी, ४८ कैची, ४९ कुंदा, ५० कंबरखोडा, ५१ घाणा, ५२ हातचढाव, ५३ गळखोडा. ५४ हरणफास, ५५ बाळसांगडा, ५६ गोणीलोट, ५७ लाटण, ५८ मोर-पेच, ५९ दसरंग, ६०.--(जययुक्तिमाला)

साठ संवत्सर---१ प्रभव, २ विभव, ३ शुक्ल, ४ प्रमोद, ५ प्रजापति, ६ अंगिरा, ७ श्रीमुख, ८ भाव, ९ युवा, १० धाता, ११ ईश्वर, १२ बहु-धान्य, १३ प्रमाथी, १४ विक्रम, १५ वृष, १६ चित्रभानु, १७ सुभानु, १८ तारण, १९ पार्थिव, २० अव्यय, २१ सर्वजित् , २२ सर्वधारी, २३ विरोधी २४ विकृति, २५ खर, २६ नंदन, २७ विजय, २८ जय, २९ मन्मथ, ३० दुर्मुख, ३१ हेमलंबी, ३२ विलंबी, ३३ विकारी, ३४ शार्वरी, ३५ प्लव, ३६ शुभकृत्, ३७ शोभन, ३८ क्रोधी, ३९ विश्वा-वसु, ४० पराभव, ४१ प्लवंग, ४२ किलक, ४३ सौम्य, ४४ साधारण, ४५ विरोधकृत् , ४६ परि-धावी, ४७ प्रमादी, ४८ आनंद, ४९ राक्षस ५० नल, ५१ पिंगल, ५२ कालयुक्त, ५३ सिद्धार्थी, ५४ रौद्र, ५५ दुर्मति, ५६ दुंदुभि, ५७ रुधिरोद्गारी, ५८ रक्ताक्षी, ५९ क्रोधन, ६० क्षय.

साठा वर्षांनीं सुंठ फुलावयाची---आल्यास (सुंठीस) साठ वर्षांनीं फुलें येतात. क्वचित् दृष्टीस पडणारी गोष्ट. कपिला षष्ठीचा योग.

साठी उलटणें --म्हातारपण येणें.

साठी बुद्धि---म्हातारचळ; बुद्धिभ्रंश.

साठी बुद्धि नाठी होणें---म्हातारपणामुळें बुद्धीस मालिन्य येणें. 'आमची साठी बुद्धि नाठी जाली.'--भा. ब. ९.९. म्हण पहा.

साठीच्या घरास पोंचलेला---वृद्ध. 'तो साठीच्या घरास पोहोंचला आहे.'--केसरी १७-५-३०.

***साठ वर्षें रामायण रामास सीता काय होय.** --कितीहि सांगितलें ऐकलें तरी बोध न होणें.

साठा आणि वाठा--साठाव्या वर्षांपासूनच सुदृढतेला व यशाला चढ लागतो. केसरी ८-५-३४.

साठी बुद्धि नाठी---माणसाला साठ वर्षे वयाला झाली कीं त्याची बुद्धि पूर्वीसारखी तरतरीत राहूं शकत नाहीं. ती चळते , भ्रष्ट होते; ती बौद्धिक कामास निकामी ठरते. 'सर्व भोंवतालीं नूतनवय मिळाले, ते तुमचे हिताचे. आणि आम्ही वृद्ध, आमची साठी बुद्धि नाठी.' --पामो २१. 'साठीची बुद्धि नाठी । हातीं धरून काठी ॥' दावि ७·३२७ "सुभेदार, तुमची 'साठी बुद्धि नाठी' तैसा विचार जाला आहे."--भाब ७६.

साठी बुद्धि नाठी आणि पोरें लागलीं पाठीं--- म्हातारपणीं बुद्धि मंद होते व पोरें चेष्टा करूं लागतात. पाठभेद---साठी बुद्धि नाठी, हातांत घेऊन काठी, लागला पोरांचे पाठीं.

सांड---सांड जाणें---शेतांतील पाणी वाहून जाण्यासाठीं ठेवलेल्या सांडीची खिंड वाहून जाणें. --कृषि २०९

सांड देणें, करणें--१ जाऊं देणें, जाण्यास परवा-नगी देणें. 'मग टाकीं सांड देऊनि त्यासीं। पाठवीं मजपासीं सत्वर।'--भवि. ५६. ७७. २ दुर्लक्ष, कानाडोळा करणें. ३ टाकून देणें; फेंकणें. 'बाह्यकुटुंब करी सांड.'

सांडण---सांडण सांडणीं टाकणें--दृष्ट काढ-ण्यासाठीं ओवाळून टाकणें. 'अगणित निज हातीं सांडणीं टाकवीतीं।' सारुह २. ८७.

सांडणी---सांडणीस टाकणें-घालणें-पाडणें -- मनांतून घालविणें; विसरणें.

सांडणी पडणें--विसरलें जाणें.

सांडणें---सांडिती नित्य नेम कर्म, बोलती कालिकालाचें वर्म---दररोजचीं नित्य नैमित्तिक कृत्यें

न करतां बेडरपणें मृत्यूबद्दलहि क्षुद्रतेनें उल्लेख करणारे कांहीं धृष्ट लोक असतात त्यांस उद्देशून म्हटलें आहे.

सांडिल्याचें मन धांकडेन—(गो.) मनुष्याचें कांहीं हरवलें की तो दहा ठिकाणीं तें शोधावयास लागतो. एखाद्याचें कांहीं हरवलें तर तो तें परत मिळविसाठीं हजारों क्लृप्त्या योजतो.

सांडी——सांडी धरणें पडणें—हार खाणें; मागें राहणें. ' पदोपदीं त्वां धरिजेत सांडी.'--सारुह ७. ११९.

सांडीमांडी—टाकणें, पुन्हां घेणे असा व्यापार; घरसोड. (ल.) यातायात; त्रास. ' सांडीमांडी मागें केल्या भरोवरी, अधिकचि परी दुःखाचिया.--तुगा ३०८.

साडू——सोयऱ्यांत साडू, भोजनांत लाडू——हे श्रेष्ठ व अधिक प्रिय असतात. मागें पहा.

पाहुण्यांत साडू,हत्यारांत माडू——घातकी असतो.

साडे——साडेतीन पीठें--(अ) १ तुळजापुरची भवानी, २ मातापूरची रेणुका, ३ जोगाईचे आंब्याची योगेश्वरी, ३॥ कोल्हापुरची महालक्ष्मी. (आ) १ तुळजापूरची भवानी, २ कोल्हापूरची अंबाबाई, ६ माहूरचीरेणुका ,३।। सप्तशृंगीचीदेवी.

साडेतीन पोशाक-ख, वस्त्रें—पूर्वी राजदरबारांत किंवा इतर सोहोळ्यांत मानकऱ्यांना पुढील साडेतीन वस्त्रें देत. १ पागोटें (तिवट), २ शालजोडी किंवा , शेला ३ पायजामा किंवा झगा करण्यासाठीं महामुदी या उंची वस्त्राचा तुकडा, ३।। पटयासाठी किनखापीचा अर्धा तुकडा (अर्धे ठाण)

साडेतीन मुहूर्त—१ बलिप्रतिपदा, २ वर्ष प्रतिपदा, ३ दसरा , ३।। अक्षय्य तृतीया अथवा नागपंचमी.

साडेतीन राव--पेशवाईंत ३॥ राव होऊन गेले. १ मुरारराव घोरपडे, २ भवानराव प्रतिनिधि, ३ गोपाळराव पटवर्धन, ३॥ थोरले माधवराव पेशवे.

साडेतीन शहाणे—पेशवाईंत पुढील ३।। शहाणे होते. १ सखारामबापु बोकील, २ देवाजीपंत चोरघोडे, ३ विठ्ठल सुदर परशरामी, ३।। नाना फडणवीस.

साडेतीन हात नशीब——फार मोठें नशीब; अनुकूल काल.

साडे पंधरें, पन्हरें— सोनें सोन्याच्या १५।। रु. तोळा भावावरून हें नांव पडलें असावें. ' कां साडेपंधरया रजतवणी । तैशी स्तुतीचीं बोलणीं ।'--ज्ञा १०·१५. ' साडे पन्हरेयाचीं सरळें। देवो देईले हातीं ।–धवळे उ. १९

साडे भावार्थी—वरून भोळा पण आंतून पक्का लबाड; बकवृत्ति.

साडेसहा सुभे--१ विजापूर, २ दौलताबाद, ३ अहमदनगर, ४ बऱ्हाणपूर, ५ हैदराबाद, ६ औरंगाबाद, ६॥ नागपूर (अर्धा).–शिदि २०.

साडेसाती; साडे सातीचा फेरा--१ एखाद्याची जन्म राशी व तिच्यामागची व पुढची राशी हीं क्रमावयास लागणारा शनिग्रहाचा साडेसात वर्षांचा काळ. २ दुर्दैव; संकटकाल.

साडेसाती येणें-लागणें—१ शनि आपल्या जन्मराशीस, मागील व पुढील राशीला येणें (वरील प्रमाणें.) २ संकटकाल प्राप्त होणें; आपत्ति ओढवणें. ३ एखादी नको असलेली, छळणारी व्यक्ति आपल्यामागें येणें–लागणें.

साडेसाती सरणें—संकटकाल संपणें; भोग सरणें. ' पण इतक्यांतच त्यांची साडेसाती सरली नाहीं. ' --पामो१५७.

साडे---साडे करणें---१ संपविणें, खलास करणें; खातें बंद करणें. २ काढून लावणें; गचांडी देणें. ३ खरडपट्टी काढणें.

साडे चालणें—हाल होणें. ' महाराजांच्या हुकुमानें त्याच्या मुलाचे साडे चालले आहेत. 'विक्षिप्त २.१०९.

सात—सप्त पहा.

सात आश्चर्यें--१ आकाशाला खांब नाहीं २ तळहाताला केंस नाहीं, ३ समुद्राला झांकण नाही, ४ घोड्याला स्तन नाहीं, ५ देवाला आईबाप नाहीं. ६ जिभेला हाड नाहीं, ७ केसाला रक्त नाहीं.

सात जन्मीं तप केलें—अतिशय श्रम करणें. ' पाठीमागें सात जन्मीं तप केलें असल्यासच माझ्या धन्यासारखा नवरा मिळेल. ' -वि वि ८. ४.६६.

साता जन्मींचीं पातकें पळून जाणें—सर्व दोष दूर होणें.

सात ताड उंच--अतिशय उंच.

सात धातु—१ सोनें, २ चांदी, ३ पितळ, ४ तांबें, ५ शिसें ५ कथिल, ७ पोलाद.

सात पांच करणें--विसंगतपणें, ताळ मेळ नाहीं असें करणें, बोलणें.

सात मौक्तिक स्थानें—१ शिंप, २ डुकराचें-मस्तक, ३ सर्पाचें मस्तक, ४ शंख, ५ मत्स्य, ६ बेडुक, ७ हत्ति.

सात लज्जा, लाज—१ जनलज्जा, २ मनोलज्जा ३ वयोलज्जा, ४ धर्मलज्जा, ५ कर्मलज्जा, ६ जातिलज्जा, ७ कुललज्या.

सात लाजा पदरीं बांधणें--अतिशय निर्लज्ज असणें.

सात वार—१ रविवार, २ सोमवार, ३ मंगळवार, ४ बुधवार, ५ गुरुवार, ६ शुक्रवार, ७ शनिवार.

सात सडका—उष्णतेमुळें हत्तीच्या गंडस्थळांतून वाहणारे मदाचे सात स्रोत.

सात सडका सुटणें—१ स्वच्छंदी, स्वैर बनणें. २ मातणें; उन्मत्त होणें.

सात सवाईनें—सात पटीपेक्षां अधिक.

सात साया, सायास करणें—अतिशय काळजी, कष्ट घेणें; फार सोपस्कारानें वागविणें.

साता काळजाच्या पलीकडे ठेवणें--फार फार जपणें.

साता गुणांचा खंडोबा—१ अनेक दुर्गुण, खोडी असलेला. २ अनेक व्याधी, रोग असलेला. सतरा, अठरा पहा.

साता जन्मांचा वैरी--हाडवैरी ' डोक्यांत दगड घातला तर साता जन्मांचा वैरी सुद्धां रडायला लागेल. ' --भा. २७.

साता नवसाचा—फार नवस करून झालेला, म्हणून अतिशय लाडका. ' साता नवसांचें हें एकुलतें एक लाडकें बाळ । उडण्याबागडण्यांताचि बाळपणीं घालवीतसे काळ ॥ ' मोगरे.

साता समुद्राच्या पलीकडे—अतिशय दूर.

साता समुद्राच्या पलीकडे ठेवणें—फार बंदोबस्तानें कोणास मागमूस लागू न देतां ठेवणें.

साता समुद्रांत खारावलेला इंग्रज—फार बेरकी; अतिशय व्यवहार चतुर; लबाड.

साता सायासांनीं--फार परिश्रमांनीं.

साताचो आकडो करप--(गो.) अंगाची मुटकुळी करून झोपणें.

सात किल्ले आणि बावन्न दरवाजे—पक्का कडेकोट बंदोबस्त.

सात खाय, पांच खाय आणि वैद्या माझा हात पाह्य—खातांना सुमार ठेवावयाचा नाहीं व मग वैद्याकडे धांव घ्यावयाची.

सातजणी सुइणी, लेंकरूं वळणी वळणी—(व.) कारभारी फार झाले म्हणजे कामाचा नाश होतो. मुलाच्या जन्माच्या वेळीं सुइणी फार झाल्या म्हणजे लेंकराची निगा कोणीच नीट ठेवीत नाहींत. कारण कोणा एकावर जबाबदारी नसते.

सात दिवसाचा उपवाशी, त्याला कशाची एकादशी—अगदीं हातघाईस आलेल्या मनुष्यास वेळवार पाहतां येणें शक्य नसतें.

सात पाच रंभा, पाण्याचा नाहीं टिंबा—घरांत पुष्कळ बायका असून सुद्धां काम कोणासच करावयास नको.

सात पावलें बरोबर चाललें कीं सख्य निर्माण होतें—लग्नांत सप्तपदीचा हेतु हाच असतो. सहचारी असेल तर साहाजिक स्नेह उत्पन्न होतो. वि. स. खांडेकर, " अविनाश "

एकपुती रडे आणि सातपुती रडे—एकपुती पहा.

एकपुतीही रडे, सातपुतीही रडे, जिला काहीं नाहीं तीही रडे--एकपुती पहा.

सात रुपयाचें पातळ नेसायाचें, अर्ध्या हळकुंडानें पिवळें व्हावयाचें—थोडक्या गोष्टीनें गर्व करूं लागणें; थोड्याशा वैभवानें हुरळून जाणें.

सात लुगडीं, ढोटें उघडीं—(आशिष्ट) एखाद्या मनुष्याजवळ कितीहि वैभव असलें तरी तो दरिद्यासारखा वागतो अशा मनुष्यास अनुलक्षून म्हणतात.

सात लुगडीं सदा उघडी—वरप्रमाणेंच पण जरा शिष्ट प्रकारची म्हण.

सात शिदोरी खाई तरी माय म्हणे माझी गोपी रोडेली-- आईला कधीं आपलें मूल चांगलें सशक्त, खादाड दिसतच नाहीं. तिला उगाच वाटतें कीं, मूल वाळत चाललें. खोटाच कांगावा करणें.

सात साडे तरी भागुबाईचे कुले उघडे— वर पहा.

सात सुगरणी आणि भोपळा अळवणी—अनेक कार्यकर्ते झाले म्हणजे काम बिघडतें. Too many cooks spoil the broth.

सात हात तवसें नऊ हात बी.—[तवसें = काकडी] अतिशयोक्ति. तवसें पहा.

सात हात लाकूड नऊ हात झिलपी, ढलपी-- वरील प्रमाणें. सात हात लाकडाची नऊ हात झिलपी पडली असें सांगणें ह्मणजे भयंकर अतिशयोक्ति करणें होय.

सांत--सातें गेल्याशिवाय दर कळना—(गो.) बाजारांत गेल्यावाचून भाव कळत नाहीं.

सातेक गेल्लो पिसो, घरा आशिल्लो शाणो— (गो.) बाजारांत जाऊन खरेदी करणारा वेडा ठरतो. व घरांत राहिलेला शहाणा ठरतो.

सातारा---सातारा, बहूत म्हातारा--पुण्या-साताऱ्याविषयीं समजूत. पुण्यापेक्षां सातारा जुनें तेव्हां 'सातारें ह्मातारें पुणें जुनें' अशीहि जुळविलेली म्हण आहे.

सातारें--सातारें आणि म्हातारें, आठ आणि घाट --[घाट=घात] सात महिन्याचें झालेलें मूल पुष्कळ काळ वांचतें पण आठ महिन्यांचें फार वांचत नाहीं.

सातुल---सातुल बायांत पडलें पोण स महिन्याचो चिकोल गेलो--(गो.) सांतुल विहिरींत पडली ही गोष्ट जरी वाईट झाली तरी सहा महिन्यांचा डोक्यांत सांठलेला चिखल गेला ही गोष्ट चांगली झाली. अचानकपणें एखादें संकट येऊन त्याच्या योगानें एखादी वाईट खोड जाणें.

सातेरी---सातेरीक अभिषेकाचें मरण--(गो.) वारुळाच्या देवाला अभिषेक घातल्यावर तो मातीचा असल्यानें वाहून जाईल. गरिबाला मानमरातब मिळणें म्हणजे तो सांभाळतांना त्याला अनेक प्रकारें त्रास होतात.

साथ---साथ मुसळ गात—(व) [साथ = सहवास, मैत्री. गात=खाटेला आधार भूत असणारा लांकडी भक्कमदांडा किंवा फळी.] मुसळ किंवा गात यांची ताठपणांत व भक्कमपणांत बरोबरी करणारी व्यक्ति ती साथ मुसळ गात होय. आडदांड व जबरदस्त व्यक्ति असा भाव.

भात सोडावा साथ सोडूं नये—भाताचें खाणें जर मुख्य असेल तर वेळेनुसार तो सोडावा किंवा जेवण बाजूस ठेवूनहि आपल्या सहकाऱ्याची संगत राखावी.

साद---साद घालणें—१ हांक मारणें. केक १२८. २ (कों) गागणें.

साद धरणें—पडल्यामुळें किंवा भीतीमुळें मुलाच्या रडण्याचा आवाज तोंडांतून न निघणें; श्वास कोंडून घरणें.

साद परतणें—आवाज बदलणें ; पक्वावस्था दर्शित होणें.

सादर---सादर करणें—१ पाठविणें; रवाना करणें. २ हजर करणें; पावता करणें.

सादर होणें—उपस्थित होणें, हजर राहाणें. विदेसीं मेले मरणें। तयांसि संस्कार देणें । अथवा सादर होणें ॥ तो सत्व गुण॥ ' दा. २. ७.७४,

सांधा--धा--धी--सांधा बसणें—बरोबर जुळणें; जम बसणें.

सांधीचा पदार्थ; सांधीतली वस्तु--१ टाकाऊ, निरुपयोगी वस्तु. २ विधवा. ३ गुप्त किंवा खासगी ठिकाणींच उपयोगी पडणारी वस्तु. ४ वेगळी काढून ठेवलेली वस्तु.

सांधींत---सांधींत बसणें—१ एकीकडे,एकांतात बसणें (नवऱ्याच्या मृत्यूनंतर विधवेनें) २ मागें पडणें, राहाणें.

सांधींतला व्यवहार—गुप्त खाजगी व्यवहार.

सांधींतली गोष्ट--गुप्त व्यवहार

सांधींतली सावकारी; सांधीतला व्यापार— गल्लीकुचींतील धंदा.

सांधींतलें मडकें--विधवा.

सांदीचं काढायचं अन् सदरेला मांडायचं-- (वाय.) आडबाजूची घाण काढून ती दर्शनीं ठेवावयाची. आंतलीं बिंगें, काळेंबेरें जाहीर उघड करणें.

सांधींतली गोष्ट उजेडांत आणूं नये— गुप्त गोष्ट फोडूं नये.

साधणें---साधली तर बुडी, नाहींतर उडी-- एखादें काम करण्याचा प्रयत्न करून पाहावा. साधलें तर ठीकच, नाहीं साधलें तरी त्यांत कांहीं फारसें नुकसान नाहीं.

साधली तर भट्टी, नाहींतर पैजार पट्टी-- भट्टीचें काम असें असतें कीं, यशस्वी झाल्यास फायदा होतो नाहींतर जोडे खाण्याची पाळी येते.

साधली तर शिकार, नाहीं तर भिकार-- प्रयत्न करून पहावा, साधलें तर लाभ नाहीं तर त्यांत अर्थ नव्हता म्हणून समाधान मानून घ्यावें. द्राक्षें आंबट याप्रमाणें.

साधलें तर आपलें, फसलें तर लोकाचें— दुसऱ्यांच्या पैशानें व्यवहार केल्यास, किंवा धोका दुसऱ्यावर ठेऊन व्यवहार करणारा फायदा झाल्यावर आपला म्हणतो व नुकसान झालें तर लोकांवर टाकतो.

साधलें तर काम, नाहींतर सटक सीताराम-- एखादा आगापिच्छा नसलेला मनुष्य एखादें काम करावयास जातो जर जमलें तर ठीकच नाहींतर स्वतः मोकळाच; त्यांत स्वतःस घस कांहींच नाहीं.

साधल्या---आळीचें मधल्या फळीचें-- कांहीं लोक नेहमीं आपल्या स्वार्थांकडे पाहात असतात. ज्या बाजूस लाभ होणार असेल ती बाजू हे धरतात व नेहमीं धोक्याचा वेळीं आपलें रक्षण होईल अशी काळजी घेतात (बुडण्याच्या प्रसंगीं मधली फळी धरून बसतात म्हणजे बुडाले तरी कडेचे बुडावे).

साधील तो दैवाचा नाहींतर फुटक्या कर्माचा --जो यशस्वी होतो त्यास भाग्यवान समजतात व जो अयशस्वी होतो त्यास अभागी म्हणतात.

साधील त्याचा जयजयकार, फसेल त्याचा धिक्कार (ही जगाची रीत आहे)--- लोक नेहमीं यशस्वी मनुष्याचा उदोउदो करीत असतात व अयशस्वी माणसाची छीथुः करतात. कोणी कारणांचा वगैरे विचार करीत नाहीं.

साधेल तितकें सई-- मनुष्यानें जेवढें होईल तेवढें करून पाहावें, जितकें प्रत्यक्ष घडेल तितकेंच केल्या सारखें तरी होतें. गॅरिबाल्डी. १०९

साधन---साधनचतुष्टय-- ब्रह्मप्राप्तीचे चार उपायः--१ वस्तुविवेक, २ वैराग्य, ३ शमदमादि षट्संपत्ति, ४ मुमुक्षुत्व-एरुस्व ६.५६ 'साधनचतुष्टादि हातगुंडी। दुर्ग पावेल शोभेसी ॥' स्वानु. १०.२-१०

साधन मोडावें : साध्य जोडावें-- (महानु.) साधनावरच भर न देतां साध्य असेल तें साधल्यावर साधन सोडून द्यावें.

साधनी---साधनींत येणें असणें— [साधनी = (इं.) लेव्हल बॉटल.] समपातळींत; सपाट असणें; क्षितिज समांतर असणें.

साधी---साधी भोळी आणि वसईचीं केळीं —वसईचीं केळीं वरून सामान्य दिसतात पण लागतात फार गोड. वरून भोळेपणा दाखवून काम साधणारी.

साधी राहणी, उच्च विचार सरणी-- श्रेष्ठ मनुष्यांपुढें हें ध्येय बहुधा असतें. Plain living and high thinking.

साधु जरी झाला, भोग न सुटे तयाला-- १ मनुष्य कितीहि विरक्तपणाचा आव आणूं लागला तरी कांहीं गोष्टींचें सेवन केल्याशिवाय त्यांचें चालत नाहीं व समोर आलेल्या चांगल्या गोष्टीचा स्वीकार न करणें त्याच्या हातून घडत नाहीं. किंवा २ महान साधु जरी असला तरी भोक्तृत्व सुटत नाहीं. देवादिकांनाहि आपत्ति सोसाव्या लागल्या आहेत.

साधूसंगें साधु भोंदूसंगें भोंदू वादूसंगें वादू होत असे— रामदास.--मनुष्य संगती प्रमाणें वागतो.

साधवो न हि सर्वत्र चंदनं न वने वने-- ज्याप्रमाणें प्रत्येक रानांत चंदन होत नाहीं त्याप्रमाणें जिकडे तिकडे कांहीं साधु सांपडत नाहीं; खरे साधु क्वचित कोठें असतात. शैले शैले न माणिक्यं मौक्तिकं न गजे गजे। साधवो नहि सर्वत्र चंदनं न वने वने॥

साधूची निंदा, मूर्खानें केला रूवदा-- मूर्ख लोक नेहमीं निंदा करण्याचा जणूं धंदाच पतकरतात.

साधुचें नातें, तेवढ्याच्च पुरतें-- साधु हा प्रत्येक गोष्टीशीं अगदीं जरूरीपुरता संबंध ठेवतो; त्याचा संबंध चिरकाल राहणें शक्य नाहीं. कारण तो कशावरहि आसक्ति ठेवित नाहीं.

साधूसे साधू मिले तो होय दोन दोन बाता --दोन साधूंची गांठ पडली असतां तत्वज्ञानासंबंधी चर्चा होते.

साध्य---साध्य साधनीं ज्ञान पूज्य--(महानु.) साध्यसाधनाचें ज्ञान अजीबात नसणें.

सान---सान तोंडाक होड्ड घांसु—लहान तोंडी मोठा घांस.

साधूंना भूतकाळ असतो आणि पापी गुन्हेगारांना भविष्यकाळ असतो—Saints have past and sinners have future. सज्जन माणसांनीं मागें अनेक दुष्कृत्यें केलेलीं असतात म्हणून त्यांचा भूतकाळ अविचारणीय असतो. गुन्हेगार म्हणून शिक्षा झालेल्यांना भविष्यकाळांत आपलें वर्तन सुधारतां येतें आणि त्यांच्या भूतकालावर पडदा पडतो.

साप---साप साप म्हणून भुई धोपटणें-बडविणें--मुळांत कांहीं नसतां व्यर्थ एखादा दोष लावून दोषी ठरवूं पाहणें. मुळांत कांहीं नसतां उगाचच कांगावा करणें. अंगीं नसता दोष चिकटविणें. 'पण अशारीतीनें सरकारी बंदोबस्तीच्या पाश्चात्य प्रदर्शनाचे भरांत भलत्याच वेळीं साप साप म्हणून भुई बडविण्याचा हास्यास्पद प्रकार होतो, सासं. २. ३६०.- आमच्या आयु. आठवणी १५४.

सापाची जीभ--लहान शस्त्राला म्हणतात,

सापाची मावशी—एक प्रकारचा सरडा;साप सुरळी.

सापावर काठी मारणें—दुष्टाच्या वाटेस जाणें; दुष्टास शासन करणें.

साप काटा मूं खाली—सर्पानें एखाद्याला दंश केला तर त्या रक्तमांसानें सापाचें मुख कांहीं भरुन येत नाहीं, तर तें रिकामेंच्या रिकामें राहतें. सापाच्या चावण्याचा त्याला स्वतःला कांहींच फायदा होत नाहीं. 'तुला वाटतें कीं शेजाऱ्याचें नुकसान करण्यानें त्याला इजा देण्यानं आपलें समाधान होईल, पण नाहीं, साप काटा मूं खाली राहणार.'

साप खाई, तोंड रितें—दुष्ट माणसानें स्वतःला कांहीं फायदा नाहीं असें दुष्टकृत्य करणें. वर पहा.

साप खाय खार आणि तोंड रितें रहाय (राही)—वरपहा.

साप गळ्यापाशीं, औषधें हिमालयापाशीं---दुखणें एकीकडे व उपचार भलतीकडे दुःख नजीक असून उपाय-दूर असणें. तहान लागल्यावर आड खणूं पाहाणें.

साप न म्हणावा बापडा, नवरा न म्हणावा आपला; साप म्हणूं नये बापडा आणि नवरा म्हणूं नये आपला—सापावर व नवऱ्यावर विश्वास टेवूं नये. मत्सरी स्त्रीचें मत.

साप मारावा पुरा, नाहींतर सूड घेईल खरा—दुखविलेला साप सूड कधीं ना कधीं घेतोच. तेव्हां त्याला पुरा मारला पाहिजे. दुष्ट मनुष्यास दुखविला असतां त्याचा पुरा बंदोबस्त करावा; नाहींतर तो सूड घेतल्याशिवाय रहात नाहीं.

साप मरे न लाठी तूटे—साप तर मरावा पण लाठी मोडूं नये. (एक अरिष्ट निवारतांना दुसरें ओढवून घेऊं नये.)

साप म्हणूं नये धाकलो, बामण म्हणूं नये बापलो--(कों.) सापाची व ब्राह्मणाची उपेक्षा करूं नये.

साप रखे पाल, जीका होगा काल--सर्प बाळगणें हें मरणास तयार होण्याप्रमाणेंच आहे.

साप सब जगे तेढा पर आपने बीलमें सीधा—मागें पहा. दुष्ट माणूस घरीं तेवढा नीट असतो.

साप समजला आणि झोडपलें दोरीला—साप समजून दोरीला मारणें. मुळांत कांहीं नसतां भ्रमानें कांहीं तरी करणें. 'पण उगीच साप म्हणून दोरखंड झोडपण्यांत काय अर्थ ?'—फाल्गुनराव.

सापाचा मुंगुस वस्ताद त्याचा—सापाचा जबरदस्त शत्रु मुंगुस हा आहे.

सापाची संगती, इंद्राला आहुति—इंद्राय तक्षकाय स्वाहा पाहा.

सापाच्या विणीच्या गांवाला तिडका—एका नीच माणसाच्या इलकट कृत्यांनीं सगळ्या समाजाला त्रास होतो. —पाआमा ५.६.

सापाबरोबर बांधला बेडूक आणि एक नाहीं राहिला हाडूक—बेडकाची व सापाची गांठ घातल्यास साप बेडकास खाऊन टाकणारच. जबरदस्ताशीं दुबळ्याची सांगड घातल्यास दुबळ्याचें मरण ठरलेलेंच.

सापाला दूध पाजलें असतां गरळ-विषच ओकेल—मागें पहा,

सांपडणें---सांपडला तर चोर, नाहीं तर बादशाहाहून थोर--मागें पहा.

सांपळा——सांपळा वळणें-राहाणें—नुसती हाडें राहणें.

सांपळयांत सांपडणें--अडकणें--पडणें--गुंतणें—अडचणींत सांपडणें.

सांपळयामध्यें वाघ (व्याघ्र) सांपडे, बायकामुळें मारिती खडे—थोर व्यक्ति संकटांत सांपडली असतां तिची स्थिति अगदीं असाहाय व केविलवाणी होते. याचा फायदा हलके लोक घेतात व या व्यक्तीला हिणवितात. 'पंजररुद्धव्याघ्राप्रति लोक निशंक मारितात खडे।'—मोरोपंत.

साफ——साफ करणें--१ स्वच्छ करणें; धुणें, पुसणें. छाटून टाकणें. सफा करणें. 'जो आढळेल त्यास पाहातांच त्याचे कान व नाक साफ करीत जावें.'--रा ५.६६.

सांब——सांबापुढचा—१ नंदी. २ मूर्ख माणूस. **सांबाचा अवतार**—अत्यंत भोळा मनुष्य.

सांबा मुखावेलो नंदी, कामाना धामाना—(गो.) शंकरापुढचा नंदी शेतकामाला काय उपयोगाचा?

सांबाच्या पिंडीवर बसलेला विंचू—सांबाचा अनादर होईल म्हणून अशा विंचवाला तेथल्या तेथें जोड्यानें मारवत नाहीं. मोठ्याच्या आश्रयानें निर्भय बनलेली नीच व्यक्ति. 'सिंधू, नवऱ्याच्या पोटांत दडी धरून बसलेल्या या दारूची तुम्ही कदर केलीत म्हणून सांबाच्या पिंडीवर बसलेल्या विंचवाच्या नांगीप्रमाणें ती तुम्हां सर्वांना अजून छेडते आहे!'—एकच प्याला ४.२.

सांबाला बेल आणि विष्णूला तुळशी--प्रत्येकाची आवड निरनिराळी असते.

साबडाळा——साबडा भावडा; साबळा भाबळा भोळा; गरीब.

सांबर——सांबरच्या तळावांत जें पडतें तें मीठ होतें—कांहीं वस्तू आपला गुण दुसऱ्यास देतात परंतु दुसऱ्याचा घेत नाहींत. उलट कांहीं स्वत्व विसरून दुसऱ्यांत अगदीं विलीन पावतात. 'सांबरच्या तलावांत जें पडतें तें मीठ होतें अशी म्हण आहे. त्याप्रमाणें महाराष्ट्रीयांनीं त्या त्या प्रांतांत विरून जाणें शक्य नाहीं व हितकारक नाहीं.'—केसरी ३-५-२७.

सांबरें करणें—१ सांवरणें. २ (व.) आजूबाजूच्या काड्या गोळा करून त्या विस्तवांत किंवा गुरापुढें टाकणें.

साबीक——ब-दस्तूर साबीक—पूर्वील वहिवाटी प्रमाणें. 'जहाजांचें येण्याजाण्याविशीं मजकूर बदस्तूर साबीक लिहिणेंत न आला.'—वाडसमा २.६५.

सांभाळ——सांभाळ टाकणें—(व.) सोंपाविणें; मरतांना बाप अज्ञान मुलांना एखाद्या जवळच्या व कळकळीच्या नातलग माणसावर सोंपावितो तें.

साम——साम, दाम [दान], दंड व भेद—हे एखाद्याला आपल्याकडे वळविण्याचे चार उपाय आहेत. यापैकी एक नाहींतर दुसरा असा रीतीनें पडताळून पाहावयाचे असतात. 'सामें सांगितल्या नायकत तेव्हां दंडें सांगावें.'—रा३.३३. (गु.) साम दाम ने भेद भणाय, पछीथी चोथो दंड उपाय.

सामर्थ्य——सामर्थ्य आहे चळवळीचें—रामदास. एखादें कार्य करावयास नेटानें उद्योग आरंभला तर त्या कार्याला जोर चढतो. त्याचें बल साहाजिक वाढतें. सामर्थ्य आहे चळवळीचें। जो जो करील तयाचें। परंतु आधीं भगवंताचें। अधिष्ठान पाहिजे॥' ही आज्ञा थोरल्या महाराजांनीं पाळिली म्हणून त्यांना या स्वराज्याचा भक्कम पाया घालतां आला."—गजेंद्रमोक्ष १.७९.

साम्राज्य——साम्राज्याची नड ती आमची सवड—परकीय राज्य असलें म्हणजे त्यांस त्यांच्या अडचणीच्या वेळीं गांठलें असतांच कांहीं फायदा होण्याचा संभव असतो.--केसरी.

साम्राज्याचें अडलें व आमचें फावलें—वरप्रमाणेंच.

साम्राज्याच्या गरजा, येती आमच्या काजा—त्याचप्रमाणें.

साया——साया, वृक्षांचा राया--सागाचें झाड हें सर्व झाडांमध्यें श्रेष्ठ होय.

साय——साय जैशी दुधावरी, तैशी ब्रह्मीं मायेची उजरी—ज्याप्रमाणें दुधावर साय येते ती जरी वेगळी दिसते तरी दुधाचीच बनलेली असते त्याप्रमाणें या संसारांतील माया ही ब्रह्मावरील एक पटल आहे.

सायखडा——सायखड्याचें बाहुलें—कळसूत्री बाहुलें. 'सायखडियाचे बाहुलें। नाचवी त्या सूत्रें नाचलें'॥ —भावि २.२५०.

सायास—सायास न घडे तें सहज घडे—ज्याला श्रम लागत नाहींत तें सहज होतें

सार—सार करणें—(व.) बोळवण करणें; पाठवणी करणें; निरोप देणें.

सारखे—सारखे सारखे, कोणी न पारखे—सारख्या वयांची व मतांची मंडळी एकत्र आली म्हणजे त्यांत लहान मोठा किंवा चांगला वाईट निवडण्यांत कांहीं अर्थ नाहीं. सर्व सारखेच असतात.

सारख्याला सारखा-खे चला जाऊं द्वारका-के—दोन सारखीं माणसें मिळालीं म्हणजे त्यांचें मेतकूट जमतें.

सारथी—अडल्याचा सारथी भगवान्—अडणें पहा.

सारवणें—सारवलें तिनें हरवलें, रांगोळी घातली तिनें मिळविलें—प्रथम कष्टाचें काम करणाऱ्याची कांहींच किंमत नाहीं; उलट त्याला नांवें ठेवावयाचीं व मागाहून वरवर दिसणारें दिखाऊ जुजबी काम करणाऱ्यास मात्र फायदा. असा जगाचा उलटा न्याय आहे.

सारवा भिंती, म्हणे कोनाडे किती—नसती चवकशी करणें.

सारवा सारव—सारवासारव करणें—कसें तरी समाधान करणें; कांहीं तरी खुलासा करणें; खरें न सांगतां वेळ मारून नेणें. 'तो प्रयत्न अपेशी ठरल्यानें ती नुसती शत्रूचें बळ चाचपून पाहण्याची चुणूक होती असें दर्शवून रोमेलला सारवासारव करावी लागली.'—केसरी १७-११-४१.

सारा—सर्व पहा. **सारा गांव जलगया, काले मेगीया पानी दिया**—गांव जळाल्यावर पाऊस; नाश झाल्यावर उपाय.

सारा गांव मामाचा आणि एक नाहीं कामाचा—सर्व पहा.

सारा गांव शेती आणि कण नये हातीं—दिसावयास समृद्धि असून प्रत्यक्ष हातांत कांहीं नसणें.

सारा चोरांचा बाजार—जेथें सारेजण लबाड, सिद्ध साधक असतात, कोणीहि त्यांत चांगला आढळत नाहीं तेथें वैतागानें वरील उद्‌गार निघतात. 'इथून तिथून सारा चोरांचा बाजार!—'एकच प्याला १.२.

सारा दिन उरनि उरनि, रात चरखा परनि—सारा दिवस रिकामा घालवून रात्रीं सूत काढणें. तु०—दिवस गेला उटारेटीं०

सारा दिवस पिसा पिसा, चपनी भर नहीं आटा—सारा दिवस दळून भांड्याभरहि पीठ नाहीं. पुष्कळ वेळ काम करून फळनिष्पत्ति कांहींच नाहीं.

सारा दिवस चर पण शिवरात्री कर—दिवसभर खात राहून पुन्हां उपास आहे म्हणून सांगणें.

सारा मुलुख फिरला आणि रिकामा आला—निष्फळ फेरा.

सारी नवरी चांग आणि एका डोळ्यांत वांग—सर्व शरीर सुंदर असून डोळ्यांत फूल असेल तर त्या सौंदर्याचा काय उपयोग.

सारी रात कांडी दळी, खाऊं गेल्या आळवाची नळी—पुष्कळ कष्ट करून पदरांत कांहीं न पडणें. दळी या ऐवजीं तळी पाहिजे. सर्व पहा.

सारी रात्र-रात जागली, रेंगा-कांदे वांगीं रांधलीं—जागणें पहा.

सारी रात्र जागली आणि वांगें भाजी रांधली—वरील प्रमाणेंच.

सारी रात दळी आणि चाळणींत भरी—पुष्कळ कष्ट करून फळ पहावयास जावें तों अगदीं अल्प.

सारी रात मूर्खाची, एस घडी चतुराची—सर्व पहा. 'सारी रात्र मूर्खाची घडी चतुराची एक जिवलगा। शोध करून अंतरीं अर्थ यांतील कायतो बघा।'—होला. ५३।८३.

सारी साळ्याची, अर्धी माळ्याची, हातपाय उरावर आलेली ती बामणाची—सगळी पहा.

सारीं सोंगें येतात पण पैशाचें सोंग येत नाहीं—मागें पहा.

सारें झालें शिसफूल मात्र राहिलें—मागें पहा.

सारें ठेवायास जागा मिळतें पण मुलगी ठेवायास जागा मिळत नाहीं—आपली बहुमोल वस्तु असेल तरी ती दुसरीकडे ठेवण्यास जागा मिळूं शकते पण मुलगी सुरक्षित ठेवण्यास आईबापाच्या घराखेरीज कोठें जागा आढळत नाहीं. दुसरीकडे विश्वासानें मुलगी ठेवावी तर तिच्या अब्रूवर घाला पडण्याची मोठी भीति! स्त्रियांच्या बाबतींत कोणावर विश्वास टाकतां येत नाहीं.

साऱ्या रात सांगितली गीता, रातचा गोंधळ बरा होता--गीतेंत तत्त्वज्ञानाचा उपदेश भरला आहे. ज्याला तत्त्वज्ञान समजण्याची पात्रता नाहीं, त्या विषयाची आवड नाहीं त्याला गीता सांगण्यांत वेळ घालविणें फुकट आहे. त्याला ग्राम्य गोंधळच बरा वाटतो. उपदेश करण्यांत वेळ घालवूनहि एखाद्यानें आपल्या पूर्वपारीचैत आचरण वर्तनाबद्दल आसक्ति दाखविल्यास ही वापरतात.

साऱ्या सोंगाची भलाई, पैशाचें सोंग साधत नाहीं—वर पहा.

सारासार--सारासार विचार केला, प्राणी आला जन्माला—एकंदर सर्व नीट विचार करून पाहतां असें दिसतें कीं हा जन्म व्यर्थ आहे.

सारीपाट---सारीपाट खेळतां, खटपटीकरितां—आपलें काम साधण्यासाठीं कांहींहि करणें, सोंगट्याहि खेळणें; निदान खेळांत तरी जिंकून एखाद्या स्त्रीस वश करणें.

सारोखी--सारोखीच्या गोष्टी सांगणें—सविस्तर सबबी खुलाशाच्या गोष्टी सांगणें.

सार्थक--सार्थकीं लागणें—यथायोग्य विनियोग होणें.

सार्वजनिक--सार्वजनिक त्रास हा मनुष्याला जवळ आणतो—सामुदायिक संकटांत मनुष्यांची एकमेकांबद्दल सहानुभूति वाढते.

साल---साल गेलें म्हणून संसार गेला काय—एक वर्ष संपलें तरी मनुष्याचा व्यवहार चालूच राहतो. वर्षामागून वर्षे गेलीं तरी रोजचा दिनक्रम चाललेलाच असतो, त्यांत कांहीं एक फरक पडत नाहीं.

सालझाडा---सालझाडे झाले आणि लग्न आटोपलें—वरात घरांत आली म्हणजे विवाहसमारंभ समाप्त होतो.

साल---पाठीचें साल जाणें—चट्टा लागणें; नुकसान येणें.

***साल खातल्याक इतलो दंड, केळें खातल्याक कितलो ?**—(गो.) साल खाणाराला जर एवढा दंड झाला तर केळें खाणाराला किती होईल ?

सालंकृत---सालंकृत कन्यादान—अंगावर दागदागीने घालून विवाहप्रसंगीं कन्या वरास अर्पण करणें. एरवीं नुसती अष्टपुत्री नेसवून कन्यादान करतात. याच्या उलट गिळंकृत कन्यादान.

साळंकृत का गिळंकृत--मुलगी द्यावयाची ती सालंकृत कन्यादान करून, हुंडा वगैरे देऊन द्यावयाची कीं, तीबद्दल पैसे घेऊन द्यावयाची.

जसा पाहिला साला तशी सालेची बहीण—(महानु.) ' जसा बाप तसा लेक ' याप्रमाणें.

साव---साव केला चोराला, न्याय नाहीं गांवाला—चोरावरच विश्वास टाकल्यावर त्याच्या हातून लोकांचें कल्याण कसें व्हावयाचें.

सावकार----सावकाराचा नातू—जवळ पैसा नसून श्रीमंतींत राहणारा मनुष्य.

सावकारी मंत्र—(थट्टेनें) सावकार आलेली ठेव आपल्या तिजोरींत ठेवतांना म्हणतो--धरजाव, मरजाव, विसरजाव.

***सावकाराची बाकी, सदा आहे प्राणघातकी**--सावकाराचें देणें हें नेहमीं त्रासदायक असतें.

सावकाचें देणें सगळ्या कुळाला नडतें--एकदां घरांत कर्ज शिरलें म्हणजे तें सर्व कुळाचा नाश करतें.

सावकाराची सौख्यगती, वाऱ्या वादळा वरती--सावकारास कधीं चैन पडत नाहीं; त्याला नेहमीं आपल्या रकमेची धास्ती वाटत असते व एकंदर परिस्थिति कशी असते त्याची त्यास काळजी लागलेली असते. ऋणकोस जर हंगाम चांगला गेला तरच त्यास पैसे मिळावयाचे असतात.

सावकाराच्या उरावरून जावें, सरकाराच्या पाठीमागून जावें--सावकाराचें कांहींहि देणें लागूं नये म्हणजे त्याच्या समोरून छाती काढून चालता येतें. माल सरकारचे कायदेकानू निमूटपणें पाळावेत.

सावकाश---सावकाशीवर घेणें--सावकाश चालू देणें; संथपणें करणें.

सावट---सावट पाहाणें--[सावट = छाया] (माण) प्रतिबिंब पाहणें.

सावटीखालीं झाड वाढत नाहीं--वर सावली असल्यास झाड वाढत नाहीं. एखादा चांगला कर्तबगार माणूस दुसऱ्या तशाच माणसाचा दुय्यम असेल तर

त्याला पुढें येणें अशक्य होतें. त्यानें स्वतंत्रपणें काम केलें तरच त्याची योग्यता कळून येते. ' सावटीखालीं जसें झाड वाढत नाहीं, तसेंच परकीय सत्तेखालीं अभिवृद्धि होणें काठिण.'--टिसू. १३६.

सावत्र---सावत्र आई, विषय जाई—सावत्र आईच्या हाताखालीं वागावयाचें म्हणजे कधीं सुख लागावयाचें नाहीं.

सावध---सावधपणें यत्न करावा, देव तेथेंचि जाणावा--दक्षतेनें वागल्यास परमेश्वर साहाय्य करतो.

सावधान---सावधान शब्द ऐकिला, रामदास पळाला--रामदासस्वामी हे विवाहप्रसंगीं शुभमंगल सावधान हे शब्द ऐकतांच प्रपंचास भिऊन पळाले. ते साधु होऊन अनेकांस मार्गदर्शक बनले.

सावधानता असावी, नीतिमर्यादा राखावी--नेहमीं दक्षतेनें, नीतीनें व मर्यादेनें वागत असावें.

सावली---सावली करणारा--दिव्य करणाऱ्याचा प्रतिस्पर्धी.

सावली पडणें—१ पूर्वचिन्हें होणें. २ परिणाम होण्याइतकें जवळ, आटोक्यांत असणें. ' नवव्या मासाची सावली पडल्यावर बाळंत झाली तर पोरास भय नाहीं.' ३ परिणाम होणें; अनुकरण करणें.

सावली पायांखालीं येणें-असणें—माध्यान्ह होणें.

सावली येणें—शीतलता, निवारा मिळणें. ' सहज कठिण आहे काळ जो हा उन्हाळा, प्रगट परम तेथें होय माध्यान्ह वेळा। तदपि हरिकृपेची सावली यास आली, सहज निजसुखाची थोर विश्रांति झाली॥ '—सारुह ४. ७६.

सावलीस उभा न राहणें—टाळणें;संबंध येऊं न देणें.

सावल्या गेल्या—संध्याकाळ झाली.

***सावलीला भ्याला, आणि भुताला बिलगला**—लहानसें संकट टाळण्याचा प्रयत्न करीत असतां मोठें संकट अंगावर ओढवून घेणें.

सांवळा---सांवळा गोंधळ मांडणें--(सांवळा गोंधळ=१ हलका, करमणुकीचा प्रकार; तमाशा , वगैरे . २ गुप्त व्यभिचार , अनाचार, इ.) अव्यवस्थितपणें, अनाचारानें वागणें; शिष्टमान्य गोष्टींस फांटा देऊन चालणें. ' सुधारणेच्या नांवाखालीं सुधारकांनीं जो सावळा गोंधळ मांडला आहे, धर्माचा जो उच्छेद मांडला आहे, तो आम्हांला नको आहे !'-एकच प्याला २.३.

सावळें---सावळें हुसकटणें—लुगडें झाडणें. ' रांडेनें सावळें हुसकटलें तर झाडास बांधिले असतां झाड घेऊन बारा कोस पळतील. '—भा ब ६८.

सावित्री---सावित्रीबाई भिक्षा वाढा म्हटल्यानें कोणी वाढीत नाहीं--भीक मागून कांहीं ती मिळत नाहीं, प्रयत्न करावा लागतो.

साष्टांग---साष्टांग नमस्कार घालणें--(उप.) सपशेल लोटांगण घालणें; शरणागति कबूल करणें; हात जोडणें पहा.

सासम---सासमा गुडो करता, मुयेची हस्ति करता--(गो.) मोहरीचा डोंगर आणि मुंगीचा हत्ती करणें. तु०-पराचाकावळा.

सासर---सासर माहेर करणें--१ मुलीची लग्नानंतर विचारपूस करणें; आईबापाप्रमाणें तिची काळजी घेणें.

सासर माहेर बुडविणें—सासर आणि माहेर यांना आंचविणें; त्यांना बट्टा लावणें. ' भिक्षा द्याया गेलें रेषेच्या बाहेर। सासूर माहेर बुडवाया॥ '—मो सीता गीत ४६.

***वेडीला सासर काय माहेर काय**—(सारखेंच). वेडया माणसाला कोठेंहि राहिलें तरी सारखेंच असतें. समज नसल्यामुळें सुखदुःखाची कल्पना बेताचीच असते.

सासरचे बोल, रेशमाच्या गांठी--रेशमाची गांठ मऊ, नाजूक पण सुटण्यास कठीण; त्याप्रमाणें सासरच्या माणसांचे टोमणे असतात.

सासरचे वाटे बोंडगीचे कांटे, माहेरचे वाटे केगदीचे हाते--(कों.) सासरीं जाणें कष्टप्रद वाटतें, माहेरीं जाणें सुखकर वाटतें.

सासरीं आली, चूत विसरली--(अशिष्ट.) ज्या कामाकरितां जावयाचें त्याचें मुख्य साधन विसरणें. जेवावयास जाऊन तोंड विसरणें.

सासरीं एकादशी, माहेरीं शिवरात्र-- दोहींकडून उपासमार.

सासरीं गेली म्हणून काय शिंदळ झाली—सासरीं म्हणजे नवऱ्याचे घरीं राहाण्यानें बायकांच्यावर शिंदळकीचा आरोप येत नसतो. इतर घरीं राहिल्यास मात्र

संभव आहे. पाठभेद--सासऱ्या गेली म्हणून काय शिंदळ झाली ?

सासरीं जातां कुचकुच कांटे, माहेरीं येतां हरीख वाटे--वर पहा.

सासरीं शिवरात्र, माहेरीं एकादशी, आजोळीं जावें तर वामनद्वादशी--सर्व ठिकाणीं सारखीच विपन्नावस्था. वर पहा.

सासरीं शिवरात्र, माहेरीं नवरात्र--नवरात्रांत उपास असतात. वरील प्रमाणेंच.

सासरीं सासू, माहेरीं मावशी--दोहींकडे हाल.

सासरा--सासरा सुखी, जांवई दुःखी--मुलगी वाईट असेल तर सासरा आपली मुलगी उजवली म्हणून सुखी होतो तर जांवई वाईट बायको गळयांत पडली म्हणून दुःखी होतो.

सासुरवास--सासरवासापेक्षां वनवास बरा--मुलींना सासुरवास हा रानांत राहण्यापेक्षां त्रासदायक असे.

सासू--सासू गेली-मेली ठीक झालें, घरदार हातीं आलें; सासू मेली बरें झालें। शिकें मडकें हातीं आलें॥--सुनेला सासू मेल्याबरोबर सर्व सत्ता हातांत आल्याचा आनंद होतो.

सासू गेली शेजारीं आणि सून गेली माहेरीं--सासू जरा दूर गेल्याबरोबर सून तिचा डोळा चुकवून बाहेर जाते. म्हणजे दोघीहि उठवळ. सासू बरी असेल तरच सून नीट वागते.

सासू नाहीं घरीं आणि नणंद जाच करी--घरांत सासू नसली तर नणंदेचा तोरा चालतो; मिळून सुनेचे हालच.

सासू नाहीं ती साधी, सून नाहीं ती बाधी आणि अखंड न्हाती ती गांवची चोदी--जिला सासू नाहीं ती साधीभोळी असते, जिला सून नाहीं ती तापदायक असते व जिला मुलबाळ कांहींच नाहीं ती व्यभिचारी असते.

सासूपणा आला म्हणजे सूनपणाचा जाच विसरते--प्रत्येक सासू ही प्रथमतः सून असतेच व तेव्हां तिला तिच्या सासूनें केलेल्या जाचाची जाणीव असते. पण यावरून कांहीं ती आपल्या सुनेस जाच केल्याशिवाय राहात नाहीं. ती आपला सासूपणा गाजवतेच.

सासूबाईचें निघालें मढें, सूनबाईला आलें माहेरचें घोडें--सासूच्या मरणाची घाई चालली असतां तिकडे लक्ष्य न देतां सून माहेरीं जाण्याची तयारी करूं लागते. सासूची पर्वा नसणें.

सासू मेली उन्हाळयांत, आसू आले पावसाळयांत--एखाद्या गोष्टीचा संबंध भलतीकडेच लावणें.

सासू सांगे सुनेस बूध, आपण पी ऊन ऊन दूध--सासू सुनेला फार खाऊं नये, मिताहार करावा म्हणून सांगत असतां स्वतः मात्र ऊन ऊन दूध पिते.

सासू सांजोऱ्या तळे, माझा जीव जळे--सासू सांजोऱ्या तळत असतां सुनेला त्या मिळावयाच्या नसतात म्हणून ती मनांत जळफळत असते.

सासू सासरे सांगतील ते ऐकावें, तेच उपास तापास करावें--सुनेनें जीं व्रतवैकल्यें करावयाचीं तीं घरची रूढी असेल त्याप्रमाणें व सासूसासरे सांगतील त्याप्रमाणेंच करावीं. सुनेनें सर्वतोपरीं सासूसासऱ्याच्या मर्जीप्रमाणें वागावें.

सासूसुनेचीं भांडणें, सगळ्या गांवाला आमंत्रणें--सासूसुनेचें भांडण जुंपलें कीं सर्व गांव जमा होतो.

सासवेचे दोंदावर-जिवावर जांवई उदार--आईजीच्या जिवावर० आईजी पहा.

सासूचा पाय सुनेला लागला किंवा सुनेचा पाय सासूला लागला तरी सुनेनेंच पायां पडावें--वडील व लहान यांचीं गांठ पडली म्हणजे नेहमीं लहानानेंच नम्रता धारण करून वडिलांचे सोसलें पाहिजे.' कल्याणार्थं सुनेनें सासूचें जेविंतेवि सोसावें॥'

सासूची जाहली होळी तर सूनबाई म्हणते खाईन पुरणाची पोळी--सासूच्या मरणापासून सुनेस आनंद होतो.

सासूची झाली होळी तर सून म्हणते वाजवीन टाळी--वर प्रमाणेंच.

सासूची वाईट खोड, नवरा व मी असलें गोड मग इला येतो फोड--मुलगा व सून यांचें प्रेम सासूस सहन होत नाहीं.

सासूचें अवघड ठिकाणीं दुःख आणि जांवई वैद्य--अवघड पहा.

सासूचे गुण घे ग सुने, नेसग जुनें दानखडें—(व.) [दानखडें = लुगडें] सासू म्हातारी असल्या-मुळें तिला नटण्याची स्वाभाविकच आवड नसते. ती जुनीं लुगडीं नेसून सुद्धां निर्वाह करते. सासूचें उदाहरण घेऊन सुनेनेंहि मोठ्या काटकसरीनें, नटणें टाकून संसार चालविला असतां तें पाहून सुनेच्या फाजील काटकसरीची थट्टा करण्याच्या इराद्यानें व भलत्या बाबतींत सासूचें अनुकरण निरुपयोगी आहे हे दर्शवितांना ही लावतात.

चार-दोन दिवस सासूचे, चार-दोन दिवस सुनेचे—ज्याप्रमाणें सासू अधिकार गाजवून घेते त्याप्रमाणेंच सुनेलाहि तसें वागण्याची पाळी येते, म्हणजे प्रत्येकाला अधिकाराचे दिवस कधीं ना कधीं प्राप्त होतात. Every dog has his own day.--टिळक चरित्र, भाग १. ४७९,

सासूमागें सून नाचे—१ सुनेला सासूच्या कलाप्रमाणेंच चालावें लागतें. २ सासू गेल्यावर मागें सून चैन करते.

सासूला मार आणि सुनेला धाक—तु०--लेकी बोले सुने लागे.

सख्या सासूला लागला पाय, मामेसासू रागानें जाय—ज्याला अपकार होतो तो न रागावतां भलत्यानेंच रागावणें.

सख्या सासूला दिली लाथ, चुलत सासूचा कापला कान, मामे सासू मागते मान—जेथें सून सख्या व चुलत सासूची परवा करीत नाहीं तिच्या पासून मामेसासूनें मान मिळण्याची आशा करणें व्यर्थ आहे. जेथें महत्त्वाच्या व्यक्तीस कोणी विचारीत नाहीं तेथें लुंग्यानें सुंग्यानें आपली प्रतिष्ठा मिरविणें व्यर्थ होय.

सासूसाठीं रडे सून, बाई सुटलें मी काचांतून—सासू मेली म्हणून सून तिच्याकरितां अश्रू ढाळतांना पाहून लोकांना सूनबाईला सासूबद्दल वाटत असलेलें प्रेम कौतुकास्पद वाटतें. पण सूनबाईचें ते दुःखाश्रू नसून आनंदाश्रू असतात. सासूच्या जाचांतून सुटका झाली म्हणून तिला हायसें वाटतें. पण ही अंदरकी बात लोकांना कशी कळणार? अरेराव नि दुष्ट वरिष्ठाची बदली झाल्यावर हाताखालचे लोक त्याला पार्टी देतात तशांतला प्रकार.

सासूसाठीं रडे सून । भाव अंतरींचा भिन्न ॥—जोगतुगा. ५५०. वरप्रमाणेंच.

सासूसाठीं वेगळीं झाली, सासूच पुन्हां वांट्यास—वांटणीस आली--सासूचा जाच नको म्हणून एका सुनेनें वेगळेंपण करून घेतलें व सर्व भावांची वाटणी झाली. अखेरीस सासूस कोणीं सांभाळावें हें ठरवितानां त्या सुनेच्या नवऱ्यास च सासूस सांभाळण्याचें काम पतकरावें लागलें. मिळून त्या सुनेच्या कपाळची सासू कांहीं सुटली नाहीं.

साहस—साहसाशिवाय संपत्ति—लक्ष्मी मिळत नाहीं; साहस केल्यावांचून संपत्ति मिळत नाहीं; साहसे श्रीः प्रतिवसति ।—शेवटचें वचन मृच्छकटिक नाटकांतील आहे. कांहीं धाडस केलें तरच पैसा मिळण्याचा संभव. व्यापारांत धाडसच असतें, म्हणून व्यापाऱ्यांना लक्षाधीश होतां येतें. No adventure, no gain.

साहेब—साहेबलोकांची टोपी जशी फिरवावी तशी फिरते—युरोपियन टोपीची पुढची बाजू व मागची बाजू यांत फारसा फरक नसतो यामुळें ती वाटेल तशी फिरवितां येते; त्याप्रमाणें त्यांच्या बोलण्याचा अर्थहि वरचेवर बदलतो. 'तीन कोनी टोपी जिकडे फिरेल तिकडे सारखीच.' पद्य.-विक्षिप्त. ३.२३६.

साहेबका घर दूर है, जैसी लंबी खजूर । चढे तो चाखे प्रेम रस, गिरे तो चकना चूर ॥—परमेश्वराचें घर दूर आहे; तेथें उंच खजूराच्या झाडावर चढून जाण्यासारखें आहे. वर पोंचलें तर खजूरासारखा प्रेमरस मिळतो पण मध्येंच सोडून देऊन खालीं पडलें तर चक्काचूर होतो. परमेश्वरप्राप्तीचा मार्ग बिकट आहे पण अंतीं सौख्यमय आहे. पण मध्येंच सोडल्यास घात होण्याचा संभव असतो.

साळ—साळ घालणें-मांडणें—१ शाळा काढणें. २ दुकान मांडणें.

साळसूद—१ शालाशुद्ध; ज्यास रीतभात ठाऊक आहे असा; योग्य प्रकारें, रीतीनें वागणारा. २ कोणताहि अत्याचार न करणारा; निष्पाप, सरळ मनुष्य.

साळ—साळ घालणें—(विणकाम) लांब ताणा करण्याकरितां खुंट्या वगैरे मारणें.

साळ—साळ नासली म्हूण कुंड्या पाण्ट जाय ना—(गो.) साळ नासली म्हणून ती कोंड्याहून कमी दर्जाची ठरत नाहीं. मोठा माणूस विपन्नावस्थेला गेला तरी त्याची नि भिकाऱ्याची बरोबरी होत नाहीं. तु०— नासली मिरीं जोंधळ्यांस हार जात नाहींत.

साळ फेंकल्याबरोबर भाताचें पीक डोलूं शकत नाहीं--कोणतीहि गोष्ट एकदम होऊं शकत नाहीं. तु०--पी हळद हो गोरी.--के १४.८३६.

साळका---साळकाया माळकाया--कोणी तरी साळू, माळू वगैरे बायका. कोणी तरी स्त्रिया. तुच्छतादर्शक स्त्रियांविषयीं वापरावयाचा वाक्प्रचार.

साळके गोळके; साळकोजी माळकोजी—कोणी तरी; अलबते गलबते; फालतू.

साळी---सगळी-सारी साळ्याची, अर्धी माळ्याची—सगळी पहा.

साळ्याची गाय माळ्याचें वासरूं—इकडून एक वस्तु तर तिकडून दुसरी याप्रमाणें जमवाजमव करणें; अनेक ठिकाणांहून सामान आणून तयारी करणें.

साळ्याची गाय माळ्याची वासरी, दावितें मालकाची नादारी—एकाची एक तर दुसऱ्याची दुसरी वस्तु यांचा जोड केल्यास त्यांत दैन्य दिसून येतें.

साक्ष---मनोमय साक्ष—मनाची पूर्ण खात्री.

साक्ष घालणें-- समक्ष पाहिल्याची हमी घेणें; सही करणें.

साक्ष भोजन—सहभोजन; पंगत. ' साक्षभोजन पाहिजे वनांतरीं ।' --सप्र १५.

साक्षी येणें--अनुभवास येणें. ' तुका म्हणे साक्षी आलें । तरी केलें प्रगट ॥ ' --तुगा ३६८७.

सिंचन---सिंचन करतां मूळ, ओलावें सकळ—झाडाच्या मुळाशीं पाणी घातलें म्हणजे तें सर्व झाडास मिळतें. त्याप्रमाणें मनुष्याच्या मनास वळविलें म्हणजे तो वळतो.

सिता---सितात्रय--(तीन शर्करा) [गुडोत्पन्ना, हिमोत्था, मधुरा] गुळापासून झालेली, हिमोत्पन्न, व मधुर (काकवी).

सितार---सितारेन म्होव काडल्यार तोंडांत पडटा ?—(गो.) लांब दांड्यानें काढलेला मध तोंडांत जात नाहीं. यशाला श्रमाशिवाय दुसरा मार्ग नाहीं. श्रमाविण फल नाहीं.

सिंदी---सिंदी पिणार पितो सिंदीः बायकोच्या अंगावर मिळेना चिंधी--(महानु.) स्वतःच्या व्यसनाला पैसा खर्च करावयाचा व बायकामुलांना हालांत ठेवावयाचें.

सिंदीः नदीः दंदीः याचा गांवीं न वसावें--(महानु.) सिंदीचें झाड, नदी किंवा भांडकुदळ असणाऱ्या गांवीं राहूं नये. त्यापासून नसता उपद्रव होतो.

सिद्ध---सिद्धसाधक—एकानें दुसऱ्याची साथ करून डाव साधणारे. एकानें सिद्ध पुरुष (बोवा) व्हावयाचें व दुसऱ्यानें त्याचें स्तोम माजवावयाचें असा प्रकार.

सिद्धीस आणणें-नेणें— तडीस नेणें; पुरें करणें.

सिद्धौषधपंचक--१ तैलकंद, २ सुधाकंद, ३ क्रोडकंद, ४ रुदंतिका, ५ सर्पनेत्रयुत.

***सर्व सिद्ध आणि चुलीस पोतेरें**--सर्व पहा.

सिद्धि गेली बारावर्षें—(महानु.)लुई पाई नांवाच्या सिद्धास एक राजा शरण आला असतां त्यानें त्यांस गांवांत भिक्षा मागून आणण्यास सांगितलें; तो दिवसा न जातां रात्रीं गेला त्यास उत्तर. ज्यावेळचें काम त्यावेळीं न केल्यास व्यर्थ होतें.

सिद्धांत---सिद्धांत करणें--ठरविणें; निश्चित करणें. ' संभाजीमहाराज यांचा विवाह करावा असा सिद्धांत करून पिलाजी सिरके यांचे कन्येचा शरीरसंबंध सिद्धांत करून, '--श्रीशिवछत्रपति चरित्र १२१.

सिंधु---सिंधु कीं बिंदु--अतिशय विपुल अथवा मुळींच नाहीं.

सिनाल---सिनाल करप --(गो.) खूण करणें.

सिनाल जावप--(गो.) पक्षघात होणें.

सियामी---सियामीजूळें--जुळे सयामी भाऊ. जुळा पहा. 'तेथें झालेलें काम म्हणजे निम्मी मशीद व निम्में देउळ असें किं, सियामी जुळ्याप्रमाणें झालें.'

सिर—शीर पहा.

सिरपर जुती, हातपर रोटी- पोटास द्यावें, काम घ्यावें.

सिवणें—शिवणें पहा.

***सिवता ताज्या उजव्या हाताक आनी रडत त्या डाव्या हाताक बस नये ?**--(गो.) शिवणाऱ्याच्या उजव्या हाताला बसूं नये. सुई टोचण्याचा संभव असतो आणि रडणाऱ्याच्या डाव्या हाताला बसू नये, शेंबूड अंगावर उडण्याचा संभव असतो.

सिंह ---सिंहावतार धारण करणें—अतिशय रागावणें.

सिंहावलोकन (न्याय)—सिंह पुढें जात असतां मधून मधून मागें वळून पाहात असतो अशी समजूत आहे. यावरून एकदां पूर्व गोष्टींचें अवलोकन समालोचन करणें; मागील गोष्टीचा आढावा घेणें; 'सिहावलोकनें करून। पहा मागील अनुसंधान।'–ह. २५.४७.

सिंह नखें महाक्रूर, लेखणी त्याहून निष्ठूर—लेखणी ही सिंहाच्या नखांपेक्षां भयंकर आहे.

सिंह सवन, सुपुरुष भाषण कदली फल एकवार—(हिंदी) सिंहीण एकदांच विते, सज्जन एकदांच बोलतो, केळ एकदांच पसवते. तु०–एकवचनी, एकबाणी.

सिंहाचा पाश, प्राणाचा नाश—सिंहाच्या पंजांत सांपडलें कीं प्राण जावयाचाच.

सीग—शीग पहा.

सिगेला येणें–लागणें—शेवटची मर्यादा गांठणें; कळस होणें. 'तुका म्हणे सिगे भरूं आलें माप। वियोग संताप झाला तुझा।'–तुगा १५४५. 'बरवेपण सिगेसि आलें।'—व्यं ६६.

सीता—सीतेचा पोल्हारा—एक प्रकारची मोठी कवडी.

सीतेचे पोहे—एक प्रकारचें गवताचें बीं.

***सीता कीं संग्राम**—रामानें रावणास निरोप पाठविला कीं, सीता तरी दे नाहींतर युद्ध कर. याप्रमाणें शत्रूला कठीण अटी घालतात तेव्हां योजतात.

सीता गेली वनवासा आणि पाठीमागें लागली अवदसा–कर्कशा—सीता राज्यत्याग करून वनवासास गेली तरी तिच्या मागचे हाल कांहीं चुकले नाहींत.

सीता, मंदोदरी, तारा, त्यांत माझी भागाबाई–साळू सारा–धरा—(उप.) माझी ही भागा किंवा साळू सीता मंदोदरीप्रमाणें पतिव्रता आहे! उपरोधानें, उपहासानें म्हणतात.

सीता मंडोदरी तारा आणि तेतूर माजां भागलां सारा—(कु.) वरीलप्रमाणेंच सीता मंडोदरी तारा वगैरे पंच कन्यामध्यें आपली गणना करून घेण्याची इच्छा. —विविधवृत्त १५-१-३९.

सीता, मंदोदरी, तारा, त्यांत हें आमचं रांडरूं धरा!—एखाद्या दुराचरणी स्त्रीला व्याजोक्तीनें म्हणतात.

सीतेला हरण कसें केलें—सीतेचें रावणानें हरण केलें, याचा अर्थ न समजून रामायण ऐकणारा एक श्रोता विचारतो कीं, सीता मनुष्य असतां तिचें हरण (पशु) कसें केलें. यावरून पूर्णपणें अज्ञान. सर्व रामायण ऐकल तरी कांही बोध न होणारा मंदबुद्धी मनुष्य.

सीतेसारखी नारी पण तीही गेली चोरी—सीतेसारखी आदर्श स्त्री असतांहि तिला कर्मदशा सुटली नाहीं. 'सीतेसारखें रत्न चोरून नेलें।'

सीधा—सीधे वारस—बापानंतर मुलगा, त्यानंतर त्याचा मुलगा याप्रमाणें सरळपणें चालत आलेला वारस. याच्या उलट तेढे वारस. 'पेशव्यांनीं सीधे वारस व तेढे वारस यांजकडे इनामें चालविल्याबद्दल उदा.–हरणें आहेत.'—इनाम १०१.

सीमा—सीमा सांडणें—मर्यादा सोडणें. 'तेथें येशकीर्ति प्रतापें। सीमा सांडिली।'—दा. १५. २. २१.

सुई—सुईचे अग्रीं–तोंडीं मृत्तिका—सुईच्या अग्रावर राहणारी माती फार थोडी असते. यावरून अत्यल्प वस्तु.

सुईच्या गांडींत दोरा ओवणें—(अशिष्ट.) एकामागून एक काम सांगणें.

सुवे मोन्नारी रब्बवप; सुये तोंकार रावप—(गो.) सुईच्या अग्रावर उभे करणें; कडक शिस्त व कायदा पाळावयास लावणें.

***जिकडे सुई तिकडे दोरा; सुई मागून दोरा**—नवरा तिकडे बायको.–जिकडे पहा.

सुई न लागे त्यास कुऱ्हाड—क्षुल्लक गोष्टीकरितां मोठा आटापीटा करणें.

सुई मागून दोरा—एकामागून दुसरी गोष्ट क्रमानें येणें. 'लष्करी नोकरीची सक्ति हिंदी जनतेवर तूर्त करण्याची सरकारची इच्छा नाहीं असें घोषित करण्यांत येत असलें तरी सुई मागून दोरा यावा त्याप्रमाणें हे सगळे प्रकार हिंदुस्थानात येणार हें हल्लींच्या युद्धस्थितीवरून दिसतें.'–केसरी २-७-४०.

सुईमागें दोरा—आणि बायकोमागें नवरा. जिकडे सुई. जिकडे पहा.

सुईमागें दोरा, संसाराचा पसारा—नवरा व

बायको यांचा सर्व संसार असतो व एकामागून एक हळू हळू अनेक वस्तु लागूं लागतात.

सुईमागें दोरा, सांधी वस्त्रांचा पसारा—सुई दोऱ्यानें वस्त्रें सांधतां येतात.

सुईनें जाणाऱ्यास कुदळ कुऱ्हाड कशाला—वर पहा.

सुईनें काडीचें खेरान—(गो.) सुईनें होणाऱ्या कामाला कुदळीची जरूर काय ? तु०—नखानें काम होतें तेथें कुऱ्हाड कशाला ?

सुईण—सुईण आहे तों बाळंतपण होऊन घ्यावें—जोंपर्यंत साधनें आहेत, सोयी आहेत तों कार्य उरकून घ्यावें.

सुइणीच्या जिवावर कोणी गरवार होत नाहीं—आनुषंगिक गोष्टीवर अवलंबून कोणी मुख्य कार्याचा भार घेत नाहीं.

सुईणीपासून रेटं लपवून भागत नाहीं; सुईणीपुढें चूत लपत नाहीं; सुईणीपुढें रेटें-शष्पें लपवून काय उपयोग—सुईणीपुढें लाज धरतां येत नाहीं. तिला सर्व अंग उघडें करून दाखवावेंच लागणार. त्याप्रमाणें ज्याकडून उपाय करून घ्यावयाचा त्याला सर्व गुपित उघड करून दाखविलेंच पाहिजे.

सुईणीपुढें चेटा लपणार नाहीं—मूल झालेलें सुईणीला समजावयाचेंच, तेव्हां तें तिच्यापुढें काय लपून राहाणार ! ज्याला अवश्य कळावयाचें त्याच्यापुढें झांकून चालत नाहीं. 'सुईणीपुढें चेटा। काय लपविशी चाटा।' —तुगा ६२३.

सुईणीपुढें चेष्टा चालावयाच्या नाहींत—(वरील म्हणीचें विकृत किंवा सभ्य स्वरूप असावें) भलत्याच पुढें लटका आव आणून चालत नाहीं.

सुकणें—सुकलेलें पान न्हंय झालेलें सांग—म्हाताऱ्या म्हणून निरूपयोगी झालेल्या माणसाला न झेंपेल असें काम सांगणें.

सुका-की-कें—सुका लफडा-डें—निरर्थक व्याद.

सुकी कांकडी—फ ऱ्या-म ऱ्याचे खेळांत आपलें कांहींहि न गमावतां विरुद्ध बाजू जिंकणें.—श्यामची आई.

सुको जागर-जागोर—(गो.) निष्फळ, निरर्थक काम; बीन फायद्याची गोष्ट. उदा०—'भागिदारांकडून नागविलें जाण्याची संभाव्यता कोर्ट-कचेरीच्या पायीं व्यत्यय,' —धनुर्धारी ११-१०-४१.

सुक्या झाडास बांक लावणें—वाळलेलें झाड वांकत नाहीं यावरून व्यर्थ श्रम करणें.

सुक्या सुज्यावर पोट भरणें—कांहीं नसेल तेथेंहि आपल्या हिंमतीनें उत्पन्न करून निर्वाह करणें.

सुक्यो पोळयो—(गो.) हवेंतले बंगले बांधणें; मनांत मांडे खाणें.

***सुके गांडीक ओलो बिबो;सुके गाणीं बिबो**—(गो., निरोग्याला औषध देणें. इजा नसतांना औषध. एखाद्या गोष्टीचा जेव्हां आपण दुरूपयोग करतों त्यावेळेस ही म्हण वापरतात.

सुके गांडीला बिबवा—वर पहा.

सुक्याबरोबर ओलें जळतें—एकदा आग लागली कीं वाळलेल्या बरोबर ओलेंहि जळतें. वाइटाबरोबर चांगचांगल्याचीहि दशा होते. वाळणें पहा.

सुकाळ—सुकाळ सौदा, हगवण लावी-हगवणीस काळ—अगदीं स्वस्त माल बहुधा वाईट असतो व त्यापासून रोग उत्पन्न होतात. सवंग पहा.

सुकुमार—सुकुमार बिबी आणि चावका जोगी, चाबुक तुटला पण वळ नाहीं उठला—नाजुकपणाचा आव आणणारी व्यभिचारी स्त्री. अशा स्त्रीस कितीहि शिक्षा केली तरी तिची खोडी जात नाहीं पण वरून माल मोठ्या नाजुकपणाचा आव आणते. नाजुक पहा.

सुकुमार सऊ, घोरपडीइतका मऊ—(उप.) नाजुकपणाचा आव आणणाऱ्या स्त्रीस उद्देशून म्हणतात.

सुकुमार स्त्री चोरवाट धरी, मनुष्याचे पर खालीं करी—नाजुकपणाचा आव आणणारी स्त्री चोरुन व्यभिचार करते व माणसास तोंडघशीं पाडते.

सुकृति—सुकृतीच्या पोटीं जन्म घेई प्रीति—सद्गुणामुळें दुसऱ्याच्या मनांत प्रेम उत्पन्न होतें.

सुख—सुखं च मे शयनं च मे—सुखदायक आयुष्यक्रम. "आतां परचक्राची वार्ताही न उरल्यामुळें (आमच्या

लोकांना) ' सुखं च मे शयनं च मे ' एवढा काय तो प्रकार उरला आहे. "- नि.-केसरी १०-५-३०.

सुखादुःखाचा सोबती-वांटेकरी—सर्व काळीं टिकणारा मित्र, जिवलग मित्र.

सुखाचा जीव दुःखांत घालणें—आपण होऊन संकट ओढवून घेणें. ' तीं साधनें मला सर्वोपरी अनुकूल असतां तीं हातची गमावून सुखाचा जीव दुःखांत घालण्याचें आणि तुम्हांबरोबर भटक्या मारीत फिरण्याचें मला कांहीं एक प्रयोजक नाहीं ! '–शिसं १.२.

सुखाचा धनी-प्राणी-जीव—सुखानंद; सुखांत राहणारी, लोळणारी व्यक्ति.

सुखाचा भाऊबंद-भागी-वांटेकरी-सोबती—सुख मिळत असतां जमलेलीं माणसें; चैनीचे मित्र; शाळू सोबती,

सुखाचा वांटा—सुखमय स्थिति.

सुखाचा वारा—१ सुखदायक वार्ता. ५ सुखाचा शब्द; गोड बोलणें.

सुखाचा शब्द—मृदु, मधुर भाषण; गोड बोलणें.

सुखाचा सोहळा भोगणें—समारंभांतील नहाणें, जेवणें वगैरे करणें.

सुखाची आईबाई—ऐश्वर्यांतील सहचारिणी; सुखावेळची सहवासांतील स्त्री; सखी.

सुखाची घडी—सुखदायक वेळ, प्रसंग.

सुखाची भाकर-री—सुखाचा उद्योग; बिनकष्टाची नोकरी, धंदा; सुखानें होणारा निर्वाह.

सुखाचें माहेर—१ सुखदायक स्थळ; आनंदाची जागा. ' वक्षस्थळ तैसें रुंदावलें । सर्व सुखाचें माहेर ।' २ आजोळ.

सुखाचें शरीर—१ सुखोपभोगानें पोसलेलें शरीर; कष्टाला तयार नसलेलें, कष्ट सहन न होणारें शरीर. २ निरोगी देह.

सुखांत पडणें—सुख लागेल अशा स्थितींत असणें; सुखी होणें.–मो रुक्मिणी ४७.

सुखांत माती कालविणें—सुख नाहींसें करणें; दुःख देणें. ' कितीकांच्या सुखांत माती कालविण्याकरितां इ. स. १८६२ पर्यंत जगावें ! असो !'–V.S. २.९३.

सुखास आंचविणें—सौख्य गमावणें. ' त्याप्रसंगानें तो सर्व सुखास आंचवला.'–विवि १०.१०.२२६.

सुखास पडणें-येणें-वाटणें—सोपें होणें. बरें वाटणें.

सुख पाहतां जवापाडें । दुःख पर्वता एवढें ॥—जोग तु. गा ६३. संसारांत सुख जवाप्रमाणें किंचित् आहे आणि दुःखमात्र पर्वता एवढें मोठें आहे.

सुख सांगचें सुखेस्ताक आणि दुःख सांगचें दुःखेस्ताकू—(गो.) सुख सांगावें सुखी माणसाला आणि दुःख सांगावें दुःखिताला. म्हणजे त्याला सहानुभूति वाटते. समानशीलव्यसनेषु सख्यम् ।

सुख सांगते, बूड घाणते—तोंडानें सांगते सुखी आहे म्हणून प्रत्यक्ष पाहावें तों घाणींत खितपत असणें.

सुख सांगावें जना (ला), दुःख सांगावें मना (ला)—आनंदाची गोष्ट लोकांना कळवावी पण दुःखाची गोष्ट स्वतःजवळच ठेवावी. दुसऱ्यास दुःखाचे सहभागी होणें नको असतें. (गो.) सुख जनाक सांगका, दुःख मनाक सांगका. तु०– जन हे सुखाचे, दिल्या घेतल्याचे।

सुख साहेबाचं, घोडं विसाजीबोवाचं—(व.) येथें साहेब श्रीमंत व प्रतिष्ठित गृहस्थाचें प्रतीक म्हणून व विसाजीबोवा दरिद्री क्षुल्लक गृहस्थाचें प्रतीक म्हणून घेतले आहेत. गृहस्थाला सुखोपभोग तर पाहिजेत-श्रीमंत व प्रतिष्ठित गृहस्थाला मिळूं शकतात तसे, पण याची परिस्थिति पाहावी तर ती हीन दर्ज्याच्या मनुष्याला शोभेशीः उदाहरणार्थ, याचें घोडें पहा, तें दरिद्री मनुष्यालाच शोभेल. पण आपल्या योग्यतेपलीकडे सुखोपभोग मिळण्याची मात्र याची इच्छा आहे.

सुख हें दुःखाचें मोल देऊनच मिळतें—आधीं दुःख मग सुख. कष्ट केल्याशिवाय सुख मिळत नाहीं.

सुख हें सुखानें मिळत नाहीं—वरील प्रमाणेंच. सुख मिळविण्यास श्रम पडतात.

सुखस्य दुःखस्य न कोपि दाता—सुख आणि दुःख हीं स्वतःच्या कर्मामुळेंच प्राप्त होत असतात, कोणी देऊन घेऊन मिळत नसतात.–शाव २.१९५. सबंध श्लोक —सुखस्य दुःखस्य न कोऽपि दाता परो ददातीति कुबुद्धिरेषा । अहं करोमीति वृथाभिमानः स्वकर्मसूत्रग्रथितो हि लोकः ॥

(महानु.) जिला कामाची संवय नाहीं, नुसतें मिरवायास पाहिजे ती दुसरी कामसूबाई काम करीत असतां उगीचच आपण कांहीं करतों आहों असें दाखवितें.

सुगरण-सुग्रण झाली म्हणून हाताचे मांडे करीत नाहीं— जरी चतुर कारागीर आहे, तरी त्याचेजवळ कामाची सामग्री नसली तर त्यास आपलें काम करून दाखवितां येत नाहीं, अशा अर्थी ही म्हण योजितात. योग्य साधनाशिवाय कौशल्य दाखवितां येत नाहीं.

सुगरण सांताची, हिरव्या-शेवाळल्या दांताची—सुगरण म्हणून नांवाजणी करावी व पाहावयास जावें तों दांतावर शेवाळ आलेली. कारण तेहि नीट घांसलेले नसावयाचे. सौंदर्याचा किंवा साटोपपणाचा लौकिक बाहेर असून प्रत्यक्ष प्रकार उलट अनुभवास येणें. बाहेरून झकपक पण आंतून गलिच्छ.

सुगरण सू आणि डोक्यांत ऊ—वर प्रमाणेंच. सुगरण म्हणून लौकिक असून पाहावयास जावें तों डोक्यांत उवा.

सुग्रणीचा शेंबूड दुसऱ्यांनीं काढावा लागतो—सुगरणीला लागेल ती मदत करावयास तयार असलें पाहिजे कारण ती आपलें कौशल्य खर्च करून उत्कृष्ट स्वयंपाक करतेना. त्याप्रमाणें कर्तबगार, पराक्रमी माणसाच्या दिमतीला अवश्य जावें, त्याची मर्जी सांभाळावी. तु०-मांडे करणारणीचा शेंबूड काढावा.

सुगरणींची लागली चाड, सुगरण लपे खांबा आड—सुगरणीची जरूर लागली म्हणून पाहावयास जावें तों ती दूरदूरच जाते. एखाद्या व्यक्तीची एखाद्या गोष्टीबद्दल कीर्ति ऐकून एखाद्या कामाकरितां तिच्याकडे जावें तों ती परीक्षेची वेळ समजून उलटा लपूं लागते व आपली परीक्षा होऊं देण्याचें टाळते. किंवा एखाद्याला महत्त्व आलें कीं त्याचा भाव चढतो.

सुगवणें—सुगवलें तर सूत, नाहीं तर जीवंत भूत—एखादा मनुष्य नीट वळला तर ठीक असतो नाहीं तर अतिशय त्रासदायक होतो. वळलें तर सूत पहा.

सुगी—सुरली सुगी, बैस उगी—सरणें पहा.

सुजणें—सजलें भूत—अत्यंत आसक्त, लुब्ध. म्हण पहा.

सुजें मोठेपण—मनुष्य सुजून लठ्ठ झाला असतां त्या लठ्ठपणाचा कांहीं उपयोग नसतो; उलट तें रोगाचें चिन्ह असतें. १ मृत्यूच्या वेळची सूज. २ अत्यंत निरुपयोगी वस्तु. सूज पहा.

***सुजलें भूत कोडबुल्यास राजी**—मनुष्य अगदीं घायकुतीस आला म्हणजे वाटेल त्या गोष्टीवर भागवून घेतो; मग त्याचा हट्ट, तोरा वगैरे सर्व नाहींसा होतो.

सुजलेल्या गालास तेल लावणें—(ल.) अपमान झालेल्या मनुष्याची सहानुभूति दाखवून समजूत करणें. 'कायदेशीर चळवळीस यश येईल असें म्हणणाराच्या थोबाडींत मि. मोर्ले यांनीं जी ही चापट दिली आहे ती सहन करून सुजलेल्या गालास सिंपथीचें तेल लावून जर कोणी अद्याप भैक्ष्यवृत्तीचें किंवा सहानुभूतीचें पोवाडे गाण्यास तयार असेल तर तो वेडा किंवा निर्लज्ज समजला पाहिजे.'–टि. ३.९३.

सुजिलें तोंड हासक उपकारना, रडूक उपकारना—(गो.) तोंड सुजलें म्हणजे धड हंसूहि येत नाहीं व रडूंहि येत नाहीं. मोडतोड झालेली वस्तु ठेवतांहि येत नाहीं, बरें टाकूनहि देववत नाहीं.

सुजीचें मोठेपण काय कामाचें—शक्ति वाढून अंग मोठें व्हावें, नुसतें अंग सुजून जाड होण्याचा कांहीं उपयोग नाहीं; त्याप्रमाणें ज्यापासून अधिक पीडा होणार असा मोठेपणा कांहीं उपयोगाचा नाहीं.

सुटणें—सुटलेले केस पाठीला शरण—आहे त्या स्थितींत राहावें लागणें; अनन्यगतिक.

सुटी—सुटी करणें—(कु.) नीट करणें; निवडणें.

सुंठ—गांडींत सुंठ फुंकणें—एखाद्याच्या मनांत भराविणें; एखाद्याचें मन फिरविणें; कान फुंकणें.

साठावर्षीं सुंठ फुलणें—नशीब फळफळणें.

सुंठ मोडणें—१ (अनिष्ट गोष्ट) टाळणें. २ कडूपणा आणणें; बेरंग करणें. 'त्यांनीहि "जें वृत्त मला माहीत नाहीं त्याचें नांव कसें सांगूं" अशीच थोडी सुंठ मोडली.'–प्रो. पंगु--सीतास्वयंवर. पृ. ३२.

सुंठीसारखा मागें लागणें— लकडा लावणें. 'मला सोळावें वर्ष लागलें नाहीं तोंच घरांत माझ्या लग्नाच्या गोष्टी सुरू झाल्या. सुंठीसारखी आई बाबांच्या मागें लागली,"–अंधारांतली वाट, पृ. ११४.

सुखस्यानंतरं दुःखं दुःखस्यानंतरं सुखम् ।— ानंतर दुःख व दुःखानंतर सुख येत असतें. सुखामध्येंच ाचें बीज व दुःखामध्यें सुखाचें बीज असतें.–शाब १९५.२१८. (अ) सुखस्यानंतरं दुःखं दुःखस्यानन्तरं म्। द्वयमेतद्धि जन्तूनामलङ्घ्यं दिनरात्रिवत् ॥ (आ) हिली ओळ तीच)। न नित्यं लभते दुःखं न नित्यं भते सुखम् ॥ (इ) (पहिली ओळ तीच)। सुखदुःखा- लोके नेहास्त्येकमनन्तरम् ॥

सुखा भोज्या, मठा निद्रा, अती विषय लंपटा। र्घ द्वेषी, बहु क्रोधी, धश्चोटं पंचलक्षणम्॥ –धश्चोट पहा.

सुखाचा जीव दुःखांत घालूं नये— विनाकारण गावर साहस ओढवून घेऊं नये.

सुखाचा जीवः लागतें हींव––(महानु.) सुखी ायुष्य कंठलेल्या माणसाला कष्ट मुळींच सोसवत नाहींत.

सुखाचा राजा, रोडगा ताजा––मॅनवेरिंगनें याचा र्थ राजा हा सुखी असला पाहिजे व रोडगा हा ताजा सला पाहिजे असा दिला आहे. परंतु वास्तविक अर्थ ाजा रोडगा खावयास मिळणें हें सर्व सुखांत श्रेष्ठ सुख आहे सा असावा.

सुखाचा शब्द देखील नाहीं––अत्यंत केविलवाणी स्थिति. कोणाची सहानुभूति देखील मिळत नाहीं. विशेषतः या स्त्रीजवळ तिचा पति धड गोड बोलत नाहीं अशा त्रीबद्दल म्हणतात.

सुखानें पुण्याचा क्षय, दुःखानें पापाचा क्षय— सुख भोगण्यानें जवळ असलेल्या पुण्याचा संचय संपतो व दुःख भोगण्यानें कृत पातकाचा निरास होतो अशी समजूत आहे. सुखदुःख हीं पूर्वसंचितावर अवलंबून असतात अशा समजुतीची द्योतक प्रस्तुत म्हण आहे.

सुखामागें दुःख आहेच––सुख भोगून केव्हांतरी सरतेंच व पाठीमागून दुःख भोगण्याची पाळी येते. जगामध्यें सुखदुःखें हीं एका पाठीमागून एक येत असतात. सुख- स्यानन्तरं दुःखं पहा. Joy and sorrow are today and tomorrow.

सुखार्थिनः कुतो विद्या कुतो विद्यार्थिनः सुखम् —सुखाची अपेक्षा करणाऱ्याच्या हातून किंवा सुखावलेल्या मनुष्याच्या हातून विद्याभ्यास होऊं शकत नाहीं व विद्याभ्यास मनापासून करणारास सुख मिळत नाहीं. मूळ श्लोक असाः— सुखार्थी त्यजते विद्यां विद्यार्थी त्यजते सुखम् । सुखार्थिनःकुतो विद्या कुतो विद्यार्थिनः सुखम् ॥ —सु॰ १५८·२१६. सुखार्थीच त्यजेद्विद्यां विद्यार्थी च त्यजेत्सुखम्–असा पहिला वेगळा चरण समपद्य मध्यें आहे.

सुखाला सोबत लागते पण दुःखाला एकटेपणानें जगावें लागतें—(प्र. के. अत्रे–उद्यांचा संसार) सुखाचे सोबती भेटतात पण दुःखाच्या वेळीं कोणी टिकत नाहीं. सुखाचा भाऊबंद–सोबती पहा. (गु.) सुखना सात संगाथी, ने दुखनो एक संगाथी.

सुखासाठीं बाईल केली, अंगाला काचकुयरी लावली—(व.) काचकुयरी अंगाला लावली कीं अंग भयंकर खाजतें; सुखासाठीं मनुष्य लग्न करून बायको आणतो पण जर तिच्यापासून सुख न लागतां उलट काच कुयरी लागल्याप्रमाणें तकलीफच होत गेली तर बायको दुःखास कारण ठरते. सुखासाठीं कांहीं उपाय योजला व तो दुःखाला कारण झाला म्हणजे असें म्हणतात.

सुखा––सुका पहा. सुखे तडीवर उगाच जीव देतो—कोरड्या नदींत जीव देण्याचा प्रयत्न करणें; मूर्ख- पणाची गोष्ट करणें.

सुगड––सुगडाचा सण येतो पण म्हातारडीचा सण येत नाहीं––वर्षांतून एक दिवस सुगडाच्या नांवाखालीं मडक्यांस देखील महत्त्व मिळतें पण म्हाताऱ्या स्त्रीला जगांत एक दिवसहि कोणी विचारीत नाहीं.

सुगंधि त्रिफला––१ जायफळ, २ सुपारी व ३ लवंग यांचें मिश्रण.

सुगंधाविण पनसाला, मधुर फळांचा लाभ झाला—फणसाचीं फुलें जरी सुगंधी नसलीं तरी फळें गोड असतात. प्रत्येकांत कांहीं तरी गुण असतोच. एखाद्या गोष्टींत विशिष्ट गुण नसेल तर ती कांहीं टाकाऊ होत नाहीं.

सुगंधी केतकीला फळें नाहीं, ती अंगीं कांटे बाही––केतकीला जरी सुगंध असला तरी तिला फळ येत नाहीं व अंगाला कांटे असतात. याप्रमाणें ज्या ठिकाणीं एक गुण असतो तेथें इतर बाबतींत वैगुण्यहि असतेंच. सर्वतोपरी निर्दोष व गुणी अशी वस्तु मिळणें कठिण.

सुगरण–सुगरीण–सुग्रण––सुगरीण करी मांडेः

सुंठीवांचून खोकला गेला--खोकला आला असतां सुंठ देतात. पण ती न देतांच खोकला जाणें म्हणजे परभारें पीडा टळणें; आपोआप आपत्ति नाहींशी होणें.

सुडुक--सुडुक सोंवळें, बुडुख ओंवळें--(सुडुक, बुडुख हीं म्हाताऱ्याचीं विशेषणें आहेत.) एकीकडे सोंवळ्या बद्दलचें फार बंड माजवावयाचें व एकीकडे गलिच्छपणानें वागवावयाचें. वस्त्र सोंवळें पण अंग अमंगळ.

सुणें--सुणें खयंय माल्यार दोंक्यार कुडता--कुत्र्याला त्याच्या शरीराच्या कुठल्याहि भागाला मार लागला तरी पायांनीं लंगडतें.

सुणें मांजराची सोयरीक, दिवसभर लडायेक--(गो.) कुत्र्यामांजराची सोयरीक झाली कीं दिवसभर त्यांचें भांडण सुरू व्हायचें. दोन बोलभांड माणसें एकत्र आलीं कीं तींहि तसेंच करतात.

सुणें संतांतु गेल्लावरी--(गो.) कुत्र्याला बाजारांत पाठविण्यासारखें. कुत्र्याला जर बाजारांत कांहीं वस्तू खरेदी करण्यासाठीं पाठविलें तर त्याला त्या खरेदी करतां येत नाहींत. एखादा मनुष्य जर सोपाविलेलें काम न करतां तसाच हात हालवीत आला तर त्याची मात्र गत खरेदी साठीं बाजारांत पाठविलेल्या कुत्र्याप्रमाणें होते.

सुण्यां तोंडांक हात कोणें घालचो--(गो.) कुत्र्याच्या तोंडांत हात कोणीं घालावा ? दुर्जनावर विश्वास ठेवणें धोक्याचें असतें.

सुण्या भीवुनु न्हंई, सुण्या यजमानाक--(गो.) कुत्र्याला भिऊन मी नाहीं पळालों तर कुत्र्याच्या मालकाला. कुत्र्यापेक्षां तोच अधिक अंगावर येतो.

सुण्या हजार गोत्रां--(गो.) कुत्र्याला हजार गोत. एखाद्या माणसाची सतरा ठिकाणीं कामें असणें.

सुण्याक दिवची वाट, उण्याक देवची पाठ--(गो.) कुत्र्याला, बाजुला होऊन वाट द्यावी आणि बोलभांड माणूस भेटला कीं त्याच्याकडे पाठ करून चालूं लागावें.

सुण्याक पालखेंत बसैलो तरी हाडकाक पळौन उडी घेतां--(गो.) कुत्र्याला पालखींत बसवून मिरवलें तरी हाडूक दिसल्यावर तें लगेंच खालीं उडी मारतें. स्वभाव हा दुरतिक्रम आहे.

सुण्याक सलगी दिल्यारि माथ्यारि चढता--(गो.) कुत्र्याला सलगी दाखवली कीं तें डोक्यावर चढतें. हलक्या माणसाला बरोबरीनें वागवूं लागल्यास तें उद्दाम बनतें.

सुणाक सोघोळो नार्लु--(गो.) साल न काढलेला संबंध नारळ कुत्र्याला देणें. साल न काढलेला सबंध नारळ जर कुत्र्याला दिला तर आंतलें खोबरें खातां येत नाहीं म्हणून त्याचा त्याला कांहींच उपयोग होत नाहीं. ज्या गोष्टीची ज्याला जरूरी नाहीं किंवा उपयोग नाहीं ती गोष्ट त्याला देण्यांत काय अर्थ ?

सुण्याची शेंपडी नळयें घाली म्होण्ण नीट जायना;सुण्याची शेपटी नळयेंत घातली तरी वांकडी--कुत्र्याचें शेपूट नळींत घातलें तरी सरळ होणार नाहीं. दुष्ट, तेढा स्वभाव कांहीं केल्या बदलत नाहीं.

सुण्यानें भोंकल्यारि स्वर्गु तग्गु येत्तवे ?--(गो.) कुत्रा वर तोंड करून भुंकला म्हणून स्वर्ग खालीं पडत नाहीं. क्षुद्र माणसाच्या रागामुळें कांहींहि नुकसान होत नसतें.

सुतली--सुतली मारप--(गो.) [सुतली=सुतळीचा तोडा.] क्षुल्लक चोरी करणें.

सुतळीचा तोडा--सुतळीचा लहान तुकडा. अगदीं अल्प किंमतीची वस्तु. ‘ घरांत सुतळीचा तोडासुद्धां आपला म्हणायला राहिला नाहीं.’-मी.

सुताड--सुताड गोताड जुळणें-असणें--१ एकमेकांचें गुह्य समजणें. २ परस्पर नातें संबंध असणें.

सुताड पुनव--श्रावणी पौर्णिमा. देवास या दिवशीं पोवती वाहतात, श्रावणी करून जानवीं घालतात.

सुताडें गोताडें; सुताडें गुताडें; सुताडें गाताडें; सुताड गुताड--१ फार दूरचें नातें वगैरे. २ दूरचे व्यापारी संबंध. ३ सुतांची गुंतागुंत.

सुतार--सुतार बांधणें--पतंगास दोरा बांधण्यासाठीं फांसा करणें.

सुतार--सुताराचा चेहरा--सुतार कधीं वेळेवर कामावर यावयाचा नाहीं.–चित्रमय जगत्, ऑगष्ट १९३६. पान ७४६.

सुतारके मनमें बमूलिका--(हिं.) सुताराच्या मनात बाभळ. चांभाराचें लक्ष जोड्याकडे याप्रमाणें.

जो तो आपल्याच गोष्टीचा विचार करीत असतो.--(गु.) सुथारनु मंन बाबालिये.

सुंद---सुंदोपसुंदी--सुंद आणि उपसुंद हे मोठे बलाढ्य राक्षस भाऊ भाऊ होते. ते एकजुटीनें होते तोंपर्यंत सर्वांना भारी होते. पण एका स्त्रियेच्या नादाला लागून दोघे भांडूं लागले व मेले. यावरून आपसांतील तंटे.--केसरी २-१०-३६.

सुंदर---सुंदर कृति त्याची सुंदर मूर्ति--Beautiful is that beautilul does याचा अनुवाद. ज्याची कृति सुंदर तो खरोखरच सुंदर असला पाहिजे किंवा सुंदर माणसाकडूनच सुंदर कृति होत असते.

सुंदर स्त्री आणि समाधान, मनुष्याचें उत्तम धन--मनुष्याला सुंदर स्त्री मिळणें व समाधानी वृत्तींत राहावयास मिळणें हें सर्व धनापेक्षां अधिक आहे.

सुंदरी सदाचरणावीण, नासलें दुधाप्रमाण--ज्याप्रमाणें नासलेलें दूध टाकून देण्याच्या उपयोगी असतें त्याप्रमाणें दुराचारी स्त्री सुंदर असली तरी ती त्याज्य होय.

सुदाम दरिद्र--सुदामासारखें दारिद्र्य. सुदामा हा कृष्णाचा बालमित्र असून अतिशय दरिद्री होता.

सुदामदेव--अगदीं रोड माणूस.

सुदामदेवाचें वस्त्र--फाटक्या चिंध्या.

सुदाम पोहे; सुदाम्याचे पोहे--सुदामानें कृष्णाच्या भेटीसाठीं थोडे पोहे नेले होते; पण त्याच्या मोबदल्यांत त्याला सोन्याचें गांव मिळालें. १ कदान्न; भिकार खाणें, दान. २ विनयानें आपल्या देणगीबद्दल, मेजवानीबद्दल वापरतात.

सुधा---सुधा बोलरे नान्या, बोडक्या झाल्या सान्या--शुभ बोलरे पहा.

सुध्याला दोन गोणी--(ठाकरी) जो न कुरकुरतां काम करतो त्याला अधिक काम! To saddle a willing horse.

सुधारणा---सुधारणेचें सार, दिव्याखालीं अंधार--कितीहि सुधारणा केली तरी तिच्या मागें सर्व गोंधळ आढळला असतां म्हणतात.

सुना--(दिवस) सुना जाणें--१ खंड पडणें. २ व्यर्थ निष्फळ जाणें.

सुना-सुनावा पडणें--मोकळा पडणें.

सुन्या घरीं वाण देणें--ज्या घरीं वस्ती नाहीं, अशा घरीं वाण दिल्यास तें कोणी घेत नाहीं व परत येतें. यावरून खोटीच एखादी गोष्ट केल्याचा आव आणणें. To do great things in a corner.

सुना घर कुत्तेका राज--घरांत माणसें राहात असलीं म्हणजे कुत्रें आंत घुसूं लागल्यास त्याला हाकलतात. पण घर सुनें असलें कीं मग तेथें कुत्र्याला सुभाच असते. अटकाव करणारा कोणी दिसत नाहीं असें पाहून कोणाहि हलकटानें वाटेल तसा धुडगूस घालावा.

सुन्न---सुन्न पडणें--निश्चल पडणें.

सुन्न होणें--१ बधिर होणें. २ (व.) थक्क होणें.

सुपारी---सुपारी देणें--ठरलें असें दाखविण्यासाठीं वाजंत्री, गोंधळी, ब्राह्मण इ. कांस सुपारी देतात. १ निश्चित करणें; ठरविणें. २ आमंत्रण देणें.

सुपारी सोडणें--लग्नांत वधुवरांनीं परस्परांच्या मुठींतील सुपारी काढून घेणें.

सुपारीचें फूल--सुपारीचे काप बिबव्याच्या तेलांत तळून केलेलें एक औषध.

तारवांत अर्धी सुपारी--सगळ्या गलबतांत अर्धी सुपारी माझी पहा.

सुपारी इतकें खाते, दुपारीं परसाकडे जाते--(बे.) अगदीं नाजूक स्त्री.

सुफळ---सुफळ बोलरे नान्या! रंडक्या झाल्या सान्या, मांडवाला आग लागली! अरे असें बोलूं नये! पिंडाइतका भात द्या म्हणजे मढ्यासारखा पडतो--(व.) नान्याला सूचना केली कीं शुभ बोलत जा, परंतु त्याला भूक लागली होती. तेव्हां शुभाशुभाची फिकीर न करतां लग्नमंडपांत जमलेल्या बायकांकडे पाहून तो म्हणतोः इतक्या रंडक्या आहेत. व मांडवाला काय आग लागली आहे. म्हणून मला कोणी जेऊं घालीत नाहीं. 'असें अशुभ बोलूं नये,' म्हणून म्हणतांच पिंड, मढें वगैरे अशुभ कल्पना सुचवून, तो फार बहकतो. अशुभ शब्द उच्चारण्याची जों जों मनाई करावी तों तों एखाद्याला जास्त जास्त स्फुरण चढतें. शुभ पहा.

सुंभ---सुंभ जळतें-जळेल-जळला तरी पीळ जळत नाहीं; सुंभ जळे पण बळ न जळे; सुंभ

जळलें पण पीळ निसवत नाहीं; सुंभ जळलें तरी वळ वचना—कांहीं माणसें अशीं आहेत कीं त्यांना कितीहि शिक्षा केली तरी त्यांच्या वाईट संवयी सुटत नाहींत, किंवा तडफदार माणसांना वाईट दिवस आले तरी त्यांची तडफ जात नाहीं.

सुंबु नात्तिले मंधप; सुंब नाशिले बांदप--(गो.) दोरीशिवाय बांधणें. मनुष्य कोणच्याच दोऱ्यांनीं बांधला गेला नसतांना सुद्धां बंधनाचीं, गुलामगिरीचीं दुःखें अनुभवूं शकतो.

सुरत---**रडकी सुरत**—रडवा चेहेरा; दुर्मुखलेला.

*__मिया क्यौं रोते ? सुरतच वैसी__--मियाजी, रडतां कां ? दुसरा म्हणतो त्यांचा चेहराच तसा ! रडक्या चेहऱ्याच्या माणसाबद्दल म्हणतात.

सुरत बिचारी जाति रहे, कीरत कबू न जाये--शरीर सौंदर्य नश्वर आहे पण कीर्ति अजरामर असते.

सुरतसे कीरत बडी--शरीरापेक्षां कीर्ति मोठी असते. देहे त्यागितां कीर्तिं मागें उरावी।

सुरतेचा भला, कमरेचा ढिला--दिसावयास सुंदर पण अशक्त, दुर्बल.

सुरत---**सुरती म्हैस अंबवणावारी**--(सुरती रुपया, सुरती मोती, सुरती चुना वगैरे शब्दप्रयोग सुरत शहरावरून पडले आहेत.) सुरती म्हशीला खर्च फार लागतो.

सुरी---**घे सुरी, घाल उरी**– तडकाफडकी; अविचारानें एखादी गोष्ट करणें.

सुरू खुरु—**सुरू खुरू आणि नकट्याचा गुरु**—नुसत्या सुरेख चेहऱ्याचा माणूस काय उपयोगी या अर्थी.

सुरू खुरू आणि लेखणीचा बोरू—चांगल्या बोरू प्रमाणें सुंदर चेहऱ्याचा व उपयुक्त.

सुरू खुरू सापिका आणि नकटा तिरूका—[सापिका = १॥ रुका. तिरूका = तीन रुके] सापिका तिरुक्यापेक्षां कमी किंमतीची. सुंदर चेहऱ्याच्या माणसाची किंमत कधीं कधीं नकट्यापेक्षांहि कमी असते.

सुलखणें-सुलाखणें---**तावून सुलाखून**—तापवून भोंक पाडून (सोन्याची परीक्षा करितात). नीट परिक्षा करून; कसोटी लावून.

सोनें सुलखावें, माणूस पारखावें--सुलखणीनें सोन्याची परीक्षा करावी त्याप्रमाणें बोलून चालून माणसाची परीक्षा पाहावी. सोनें पहा.

सुलतानी---**अस्मानी सुलतानी**—अस्मान पहा.

सुलतानी कोस--टिपू सुलताननें ठरविलेला ५ मैलांचा कोस.

*__सुलतानीला तोंड देतां येतें पण अस्मानीला काय करणार__—राजानें केलेल्या अन्यायाचा प्रतिकार करतां येतो पण परमेश्वरी कोपास कांहीं इलाज करतां येत नाहीं. 'टाकी खांदतां खांदतां शेतकरी दमून घामाघूम होत. असें करतां करतां पायाचे खडकाचे खालीं टाकी जाऊन विहिरी धडाधड कोसळत. सुलतानीला तोंड देतां येते पण अस्मानीला काय करणार.'–पाणकळा ५३.

सुलेमान---**सुलेमानी दगड**—अकीक जातीचा दगड. याचे मणी करून गळ्यांत घालतात. हा दगड औषधी आहे.

सुवर्ण---**सुवर्ण धातूचा मार्ग**—किमया. 'कां सुवर्ण धातूचा मार्ग। दृष्टिबंधणें लागवेग।'–दा. ५.२.३.

सुवर्णमध्य—दोन टोंकांच्या परस्पर विरुद्ध गोष्टींचा समेट करण्यासाठीं योजलेला मध्यमार्ग. इं. 'गोल्डन मीन'ला प्रतिशब्द. मधला मार्ग; तडजोड; एरंडोली न्याय.

सुवर्णवेष्टित रोखे---कमालीची सुरक्षितता असलेले रोखे; सरकारी रोखे. Gilt-edged Securities.

सुवर्णाचें गोकर्ण तोंडात धरून जन्मास येणें—कांहीं माणसांना जन्मतःच उत्कृष्ट परिस्थितीची जोड मिळाल्यामुळें पुढील आयुष्यांत कर्तबगारी करून नांवारूपास चढतां येतें. (To be born with silver spoon in the mouth.)

सुवर्णाची माळ, करंडांत घाल—नाजूक शरूवर नाजूकच हत्यार चालवावें.

सुवर्णाचें ताट कुडाचा आधार—सोनें पहा.

सुवर्णाच्या पायरयाः तरी काई डोईये चालो येइल—(महानु.) सोन्याच्या पायऱ्या झाल्या म्हणून काय डोक्यानें त्यावरुन जातां येईल ! तु०–सोन्याची सुरी झाली म्हणून काय उरांत खुपसणार ?

सुवास---**सुवासमें सुवास चंदन, बंधनमें प्रेमबंधन**—सर्व सुवासांत अत्यंत उत्तम सुवास चंदनाचा

असतो व सर्व बंधनांत प्रेमाचें बंधन हें अधिक दृढ असतें.

सुबेर---सोयर पहा.--**सुबेर ना सुतक**— कांहीं संबंध नाहीं. जो मेला असतां किंवा ज्याचा घरीं कोणीं जन्मलें असतां सुतक किंवा सोहेर धरावा लागत नाहीं इतका दूरचा.

सुवेळ---**सुवेळीं दान, दुप्पट जाण**—योग्य वेळीं दिलेल्या गोष्टीची किंमत दुप्पट असते.

सुसंगत----**सुसंगति हा गाढवाचा सद्‌गुण**— मनुष्य व्यवहारांत नेहमींच सुसंगतपणें वागूं शकतोच असें नाहीं. विशेषतः मुत्सद्यास आपलीं मतें परिस्थितीप्रमाणें बदलावीं लागतात. Consistency is the virtue of an ass.

सुसर---**सुसरबाई ! तुझीच पाठ मऊ; सुस्वरीबाई ! तुझी पाठ किती मऊ**--प्रसंग पडला म्हणजे दुष्ट माणसाचीहि खोटी प्रशंसा करून आपला फायदा करून घ्यावा लागतो. त्याखेरीज इलाजच नसतो.-सुंद्राबाई ११६. [एका कोल्ह्याला नदीपार व्हावयाचें होतें.तेव्हां त्यानें सुसरीला थाप दिली कीं, मला पलीकडे नेऊन आण म्हणजे तुला तिकडला खाऊ देईन. सुसर फसली. तिनें त्याला पाठीवर घेतलें. पाठीवर असतांना कोल्ह्यानें तिचें वर्णन सुरू केलें: " सुसरीबाई, तुझि पाठ कशी ? कापसाची मोट तशी ! सुस्वरीबाय, तुझि कातडी मऊ, डपाशीं लाऊं आणि दोन पदें गाऊं ! सुस्वरीबाई, तुझे डोळे कसे ? लोग्याचे गोळे तसे ! सुस्वरीबाई, तुझें नाक कसें ? कोल्हापुरी माप तसें ! " पुढें कोल्हा पळून गेला. -लोककथा २. २३०.]

सुसरीणबाई तुझी पाठ कशी ? तर कापसाची मोट तशी—आपल्याला गरज असली म्हणजे दुष्टाचीहि सज्जन म्हणून स्तुति करावी लागते. वर पहा.

सुस्त---**सुस्त असतां पहारेकरी, गनीम येतो भीतरीं**—पहारेकरी असावध असले म्हणजे शत्रूस प्रवेश मिळतो. निष्काळजीपणा केला म्हणजे नुकसान होतें.

सुळकांडी---**सुळकांडी देणें**—शुकांडी देणें.

सुज्ञ- -**सुज्ञ दुष्टाचे हातीं,सत्ता कांहीं न देती**--- शहाणे लोक दुष्टांच्या हातीं कधींहि अधिकार देत नाहींत.

सू ; सूं—**सू काढणें-हांकणें-दपटणें-दवडणें**— (घोड्यास) जोरानें पळविणें, हाकणें.

सूं निघणें-पळणें-सुटणें-धांवणें— वाऱ्याच्या वेगानें पळणें, जाणें. इ.

सूंबाल्या-सूंझ्या करणें—वेगानें निसटणें, पळणें.

सू म्हणता स्वर्गाला जाऊन पोहोंचणारा— थोडक्या गोष्टीनें हुरळून जाणारा; किंचित् माहिती होतांच फार दूरचें अनुमान काढणारा.

सूची---**सूचीकटाह न्याय**—सुई व कढई एकदम घडावयाची असतां आधीं सुई घडतात. यावरून दोन कामें करावयाचीं असतां लहान आधीं करून टाकावें.

सूचिप्रवेशे मुसलप्रवेशः ।; सुचिप्रवेशान्मुसलप्रवेशः ।—चंचुप्रवेश पहा.

सूज---**सुजीयेचें मोटेपण : वज्रकीटकीयेचें रोडकेपण**— (महानु.) सूज येऊन दिसणारा फुगीरपणा किंवा वज्रकीटकाचा रोडपणा ही केवळ दिखाऊ असतात. (वज्रकीटक=एक किडा)

सूड—**सूड घेणें-उगविणें**—उट्टें काढणें.

सूत---**सूत असणें**—जमतें असणें; स्नेहसंबंध असणें.

सूत जमणें--जुळणें; मैत्री जमणें.

नाकाशीं सूत धरणें—मरणोन्मुख अवस्था होणें. नाक पहा.

सूत नसणें--न जमणें; स्नेह, मैत्री नसणें.

सूत बांधणें—संबंध जोडणें; धागा लावणें.

मूठभर सूत बांधणें-देणें—(स्नेहाचें चिन्ह म्हणून) पागोटें बांधणें.

सुताचा तोडा—सुतळीचा तोडा पहा. १ सुताचा तोडलेला तुकडा. २ कःपदार्थ; अत्यंत हलक्या किंमतीची वस्तु.

सुतान डोंगर खेडावप--(गो.) डोंगराला सूत वेढण. अशक्य, निरर्थक, गोष्ट करणें.

सुतानें चंद्राला ओवाळणें--चंद्राला सूत वाहतात यावरून. चंद्र पहा.

सुतानें सूत लागणें- -एका गोष्टीच्या योगानें दुसरी गोष्ट समजणें.

सुतानें स्वर्ग-स्वर्गास गांठणें-जाणें-चढणें—किंचित् अंश समजला असतां सर्व गोष्ट जाणणें. लहानशा गोष्टींत सर्व मोठा तर्क बांधणें. (गो.) सुताक धरून स्वर्गारि चल्लो.

सुतास लागणें--सुरळीत चालू होणें.

सुतास-सुतींपातीं लागणें—सुरळीतपणें चालू लागणें.

सुतास-सुतीं-सुतींपातीं चालणें-लावणें--सुरळीत चालणें, लावणें.

सुतासाठीं मणि फोडणें बरोबर नाहीं—क्षुल्लक वस्तूसाठीं मौल्यवान वस्तूचा नाश करणें; थोड्या फायद्यासाठीं मोठा तोटा करून घेणें.

सूत---सूत उवाच; सुतोवाच—सगळीं पुराणें सूतानें शौनकास सांगितलीं असून प्रत्येक कथेच्या आरंभीं हा प्रारंभ असतो; प्रारंभ करणें.

सूत्र---सूत्र जमणें—गट्टी जमणें.

सूत्रें हातीं घेणें--पुढारीपण पत्करणें; पुढारी होणें; नेतृत्व करणें. ' लेखकांनीं क्रांतिकारक नेतृत्वाचीं सूत्रें हातीं घ्यावीत.' (अत्रे नाशिकसंमेलन.)

सून---सून आली घराला आणि सासूसासऱ्याला आनंद झाला—पहिल्या मुलाचा विवाह होऊन नवीनच सून घरांत आली म्हणजे सासुसासऱ्यास फार आनंद होतो.

सून गोटो खायना, मडकेंत काय ना—(गो.) सासू सुनेच्या कोत्या भुकेची तारिफ करते; पण खरें पाहातां अन्न शिजविलेलीं भांडीं रिकामींच असतात! कोत्या भुकेच्या सुनेनें अन्नाचा अगोदरच फडशा उडविलेला असतो. तु०-माझें जेवण चुलींत.

सून नाय ती सासू बरी, आनी सासू नाय ती सून बरी--सासूसुनांचें कधीं पटत नाहीं त्यामुळें जिला स्वतःला सून नाहीं ती सासूपणा दाखवीत नाहीं व जिला सासू नाहीं ती सूनहि आपलें उग्र स्वरूप दाखवीत नाहीं. यामुळें यांस प्रसंगच न पडल्यामुळें त्या वरून बऱ्या वाटतात.

सून नेकीची आणि कड घेते लेकीची---सुनेची वागणूक बरोबर आहे हे ठाऊक असूनहि सासू नेहमीं तिची बाजू न घेतां आपल्या मुलीची बाजू घेते.

सून मायबहीण नाहीं, जांवई गोत नाहीं--सून प्रायः सासूशीं प्रेमानें वागत नाहीं. त्यांचें एकमेकाविषयीं बहिणीप्रमाणें प्रेम असणें अशक्यप्राय; त्याचप्रमाणें जांवयाला आपल्या सासूसासऱ्याविषयीं आपल्या गोतांतल्या माणसाप्रमाणें कळकळ वाटणें अशक्यप्राय होय.

सूनमुख बघून झाली गार, नी पुढें फजितीस नाहीं पार—प्रथम सून आली म्हणजे सासूस मोठी धन्यता वाटते व फार आनंद होतो पण पुढें रोज तंटे सुरू होऊन फजितवाडा होतो.

सून सांगे गोष्टी, सासू अंगण लोटी—सासूला काम करावयास लावून आपण गप्पा मारीत बसणारी सून.

आधीं करते सून सून, मग करते फुणफुण--अगोदर सुनेसाठीं ध्यास घेतलेला असतो पण प्रत्यक्ष सून आल्यावर तिचा दुस्वास करावयाचा अशी सासूची तऱ्हा. आधीं पहा.

सुन साहीना, लेकरूं होईना—चुकीची म्हण' सवत साहीना पहा.

सुना करतात गोष्टी, सासूनें काढावी उष्टी, मग होते तंट्याची वृष्टि, सारे घरदार कष्टी, हीच दुःखकारच प्रपंच सृष्टि, त्यापेक्षां धारण करावी संन्यास यष्टी, मग पिष्टमुष्टीनें होते पुष्टी—अर्थ स्पष्ट आहे. संसार हा दुःखमय आहे याकरितां वैराग्य धारण करावें.

कशी गे सुने, घरासाखी !—कशी पहा.

सुनेक स्वराज्य जाल्यारि मायिक बाणाशिऱ्या पाटु—(गो.) सुनेच्या हातांत संसार आला कीं सासूच्या नशीबीं जाडें भरडें लुगडें.

सुनेचा उघडेना डोळा, तेव्हां सासूबाईनें फिरवावा पोतेऱ्याचा बोळा—सून आळसानें निजून राहून लवकर उठली नाहीं म्हणजे सासूला स्वतःच काम करण्याची पाळी येते. सुनेपुढें सासूचें कांहीं चालत नाहीं.

सुनेचा पाय सासूला लागला तरी सुनेनें नमस्कार करावयाचा व सासूचा पाय सुनेला लागला तरी सुनेनेंच नमस्कार करावयाचा--(गो.) सुनेचो पाय लागल्यार सुनेनं पायां पडूंक जाय आनि मायचो पाय लागल्यार सुनेनच पायां पडूंक जाय -- सासु पहा.

सुनेचा मेला मावसभाऊ आणि चेडवाची मेली जाऊ, बाहेरची पीडा बाहेर—सुनेच्या माहेरचें व लेकीच्या सासरचें कोणी मेलें तरी त्याचा सोहेर सुतक कांहीं नसतो; त्याबद्दल वाईट वाटण्याचें कारण नाहीं.

चार दिवस सासूचे चार दिवस सुनेचे—चार पहा.

कल्याणार्थ सुनेनें सासूचें जेवें तेवें सोसावें—कल्याण पहा.

सुनेनें मारिलें सासूला आणि नवरा तेथून पळाला—सून सासूचे हाल करूं लागली म्हणजे तिच्या मुलास ते पाहवत नाहींत पण बायकोपुढें कांहीं चालत नाहीं म्हणून तो आपला पाय काढतो.

सुनें फुडे खावचें; धुये पुढें भोगचें—(गो.) सून येण्यापूर्वी खाऊन घ्यावें, तोंपर्यंत घरांत आपली सर्व मालकी असते व मुलगी होण्यापूर्वी वस्त्रें भूषणें लेऊन घ्यावीं, नाहींतर पुढें मुलगी हौसेनें तीं घालते व तिला नाहीं म्हणतां येत नाहीं.

सुनेला दडपण सासू—सुनेला सासूच वठणीस आणूं शकते.

सुनेला सासू आणि मुलाला पंतोजी—ज्याप्रमाणें सुनेला वळण लावावयास सासू लागते त्याप्रमाणें मुलास वळण लावावयास मास्तर लागतो.

सुनेला स्वातंत्र्य मोकळें, म्हातारी पीठ दळे—सून स्वतंत्र झाली म्हणजे आपण इकडे तिकडे भटकत राहते व सासूला दळण्यासारखीं कामें करावयास लावते.

सूप फडफडणें-वाजणें—लग्नसोहळा आटोपून देवकोत्थापन झालें म्हणजे भटजी ज्यांत देवकप्रतिष्ठापन केलें असतें तें सूप रिकामें करून सामिधेनें सर्व घरभर वाजवीत जातो. उद्देश हा कीं आतां कार्य संपलें; ज्यांना जावयाचें असेल त्यांनीं जावें; यावरून कार्य संपणें.

सुपाएवढें काळीज होणें—आनंदानें हृदय प्रफुल्लित होणें.

भरल्या गाड्यास सूप जड काय—पुष्कळ काम असेल तेथें त्यांत आणखी थोडी भर पडली तरी त्याचें कांहीं वाटत नाहीं.

सूपभर तेंडलीं नी एक भोंपळा—(कों) लहान लहान अनेक गोष्टींची बरोबरी एक मोठी गोष्ट करूं शकते.

सुपांतले हंसतात, आधणांतले तपेल्यांतले रडतात—(गो.) **सुपांतले हांसतात, ओंखळांतले रडतात**—सुपांतले तांदूळ हांसतात पण उखळींतले किंवा जे नुकतेच उकळत्या पाण्यांत वैरले आहेत ते मात्र रडतात. मागून सुपांतले आधणांत जावयाचेच असतात ! संकटग्रस्तांना थोडावेळपर्यंत संकटमुक्त असलेले हांसतात. संकट येणार हें ठाऊक असतांहि माणूस बेफिकीर असतो.

सुपांतील हंसती आणि जात्यांतील रडती—वरप्रमाणेंच. येथें शिजले जाण्याच्या संकटाऐवजीं दळले जाण्याचें संकट. “ सुपांतील हंसती आणि जात्यांतील रडती हाही दृष्टांत जाणावा. प्रस्तुत आमचें हातात ग्रास जात्यांतील आहे.” भाव ७५-७६.

सूर—सूर ओढणें—गाणाराच्या सुराची साथ करणें. २ पाठिंबा देणें; पहिला म्हणाला असेल तसें म्हणणें; अनुवाद करणें. ‘सूर ओढण्याला त्यानें त्याला नोकर म्हणून ठेवला.’ —कोकि. ५४८

सूर काढणें—रडणें,

सूर धरणें—१ स्वर संभाळणें. २ (आट्यापाट्या) मधली पाटी धरणें. ३ साथ देणें; सूर ओढणें पहा.

सूर बंद होणें—१ श्वास बंद होणें. २ मरणें.

सूर वाहणें—१ श्वासाचा अडथळा नसणें; तो चालू असणें २ (एखाद्या गोष्टीची) शक्यता, संभव दिसणें; मनाचा कल होणें. (कोणत्या नाकपुडींतून श्वास चालू आहे हें पाहून अनुकूल कां प्रतिकूल हें ठरवितात.)

सूर्य—सूर्य तपतो आहे—सूर्याची शपथ.

सूर्य दाखविण्याकरतां दिवटी पेटविणें—सूर्याला कोणी दाखविण्याचीच गरज नाहीं. दिवटी घेऊन तो दाखविणें म्हणजे अगदीं हास्यास्पद नव्हे तर मूर्खपणा आहे. मोठ्या विद्वान माणसाचा लहान क्षुद्र माणसानें परिचय करून देणें अशाच प्रकारचें होईल.

एखादें कृत्य सूर्य प्रकाशांत येणें—एखादी खाजगी गोष्ट, गुप्त कृत्य उघडकीस येणें.

सूर्यवंशी—सूर्य उगवल्यानंतर निजून उठणारा; उशीरा निजून उठणारा.

सूर्याचे आड—सूर्य प्रकाशांत.

सूर्याचे घोडे दाखविणें; सूर्याचीं हरणें पिलें

दाखविणें—मुलाचे कान धरून त्यास वर उचलणें. तु० समुद्र किंवा काशी ची वाट दाखविणें; बोरीस बोरें आणणें.

सूर्यापुढें काजवा, सूर्यापुढें काडवात—काजवा, काडवात पहा.

सूर्यावर थुंकणें—सूर्यावर थुंकल्यास त्याचें कांहींच वाईट होत नाहीं; उलट आपल्याच तोंडावर थुंका येतो- थोर व्यक्तीची निंदा करणें.

सूर्यावर भुंकणें—थोर व्यक्तीची निंदा करणें.

सूर्य अस्त व मजूर मस्त—सूर्य मावळल्याबरोबर मजूर काम बंद करून घरीं जातो. तु. दिवस मावळला मजूर उडाला.

हा सूर्य आणि हा जयद्रथ—दोन्ही गोष्टी समोरासमोर आहेत पहा ! असें दाखविणें; रुजवात घालणें; एखाद्याचा दोष पुराव्यासह पदरीं घालणें [अभिमन्युवधानंतर अर्जुनानें सूर्यास्तापूर्वी जयद्रथाला मारण्याची घोर प्रतिज्ञा केली .तेव्हां कौरवांनीं जयद्रथाला चांगलें सुरक्षित ठेविलें. यामुळें अर्जुनाला अग्निकाष्ठें भक्षण करण्याची वेळ येणार ही कृष्णाला भीति वाटून त्यानें सूर्याआड सुदर्शनचक्र घातलें. तेव्हां काळोख पडला व जयद्रथ आता निर्भय आहे असें समजून अर्जुनाची आत्महत्या पाहाण्यास बाहेर पडला. ही संधी साधून कृष्णानें सुदर्शन दूर करून अर्जुनाला ' हा सूर्य आणि हा जयद्रथ' असें दाखवून दिलें तेव्हां अर्जुनानें जयद्रथाला सहज मारलें] ' गड्या तुझ्या एका मुलीचा तर अनुभव तुला आलाच. आतां दुसऱ्याही मुलीचा येईल ! हा सूर्य आणि हा जयद्रथ व्हायला फार अवकाश नको. '—अतिपीड.

सूर्यप्रकाशाखालीं नवी अशी कोणतीच गोष्ट घडून येत नाहीं—जगामध्यें अगदीं नवीन अशी गोष्ट बहुधा क्वचितच होते.

सूर्य शिळा, अग्नि ओवळा, आणि गंगा पारोशी म्हणतां येत नाहीं—सूर्य कधींहि थंड होत नाहीं म्हणून तो शिळा म्हणतां येत नाहीं. अग्नि पाहिजे त्या जातीचा, हवा त्या ठिकाणचा असला तरी तो सर्व जातींत चकतो. सबब त्यास ओवला म्हणता येत नाहीं. आणि ज्या पाण्यानें पारोशीपणा नाहींसा होतो, तेंच जीचें रूप आहे अशी गंगा पारोशी म्हणतां येत नाहीं. तीर्थोदकंच वन्हिश्च नान्यतः शुद्धिमर्हतः। भवभूति उत्तररास.

सूर्यापुढें दिवटी आणि हनुमंतापुढें कोल्हाटी—सूर्याचा प्रकाश दिवटीहून कितीतरी मोठा; तसें मारुतीच्या पुढें कोलांट्या मारणें हास्यास्पद ठरेल. तो तर त्यांत केवढा प्रवीण. क्षुल्लक गोष्टीची प्रौढी मोठ्या गोष्टी पुढें मिरवणें.

सूर्याच्या पोटीं शनैश्वर—शनि पहा. ' सूर्याच्या पोटीं शनैश्वर आला नाहीं. प्रतिसूर्य उदय पावला ' दि. वा. दिवेकर—स्वभावचित्रें.)

सूर्या पोटीं शनि आला सारा लोक भांबावला—उत्कृष्ट गोष्टी पासून वाईट गोष्टींची उत्पत्ति झाली म्हणजे जगाला फार आश्चर्य वाटतें.

सूर्या पोटीं शनैश्चर—शनि हा सूर्याचा मुलगा समजतात. तेव्हां बाप किती चांगला तर मुलगा किती वाईट व दुष्ट. चांगल्या आईबापाच्या पोटीं दुर्गुणी मुलगा निघाल्यास म्हणतात.

सूर्याला ग्रहण लागलें सर्व गांवाला सुतक आलें—मोठ्या माणसावर आपत्ति आली म्हणजे तिची झळ सर्वांस लागते.

सूळ—सूळ घेणें—कष्टप्रद काम अंगावर घेणें.

सुळावर चढविणें—सुळी देणें. हालहाल करणें; गांजणें; त्रास देणें. ' तूं इतकी नको मला सुळावर चढवूं त्यासाठीं '—वि. वि. ८२.३१.

सुळावरची पोळी—सुळावर टांगलेली पोळी घेण्यास लागले असतां जीव जाण्याची पाळी येते. तें अतिशय साहसाचें धोक्याचें काम आहे. यथास्थितपणें निभावलें असतां बरें नाहींतर सर्वस्व नाशादिक मोठें संकटाची संभावना ज्यांत असते ते कांहीं एक अवघड कर्म त्यास म्हणतात.

सुळीं देणें—सुळावर बसवून जीव घेणें. ठार मारणें. साहसांत लोटणें.

सुळीं द्यावयाची वेळ—भर दुपार; अतिशय कडक ऊन असल्यास म्हणतात.

सृष्टि—सृष्टि नव्यानें, नवी करणें—बदललेल्या जीवन क्रमास आरंभ करणें.

जशी दृष्टि तशी सृष्टि—जसें पाहावें तसें दिसतें. आपण ज्या दृष्टिकोनांतून पाहावें त्याप्रमाणें जग वाटूं लागतें. धर्माला कोणी वाईट दिसेना व दुर्योधनाला कोणी चांगला दिसेना.

प्रतिजीवीं सृष्टि भिन्न—प्रत्येक व्यक्ति अथवा प्राणि अगदीं निरनिराळ्या प्रवृत्तीचा असतो. दोन अगदीं सारख्या गोष्टी कधींच आढळत नाहींत.

सृष्टीचें निरीक्षण, हेंच देवाचें देवपण—या सर्व सृष्टिकडे पाहिलें म्हणजे ती निर्माण करणाऱ्या परमेश्वराच्या अस्तित्वाबद्दलची व त्याच्या सामर्थ्याची कल्पना होते.

सेज—सेजे येणें—निजणें.

सेतु—सेतु बांधक मर्कट नव्हती साचे—ज्यांनी एवढा सेतु बांधण्याचें काम केलें तीं कांहीं सामान्य माकडें नव्हतीं. सम. ८. ७२.

सेवा—सेवाचोर—नोकरींत चुकारपणा करणारा.

सेवा करील तो मेवा खाईल—जो कष्ट करील त्यास फल मिळेल.

कर सेवा खा मेवा : कर मजदूरी खा चुरीः—(महानु.) काम करावें व यथास्थित चांगलें खावें प्यावें.

करा सेवा, खा मेवा; ज्यानें केली सेवा। तो खायील मेवा. जो करील सेवा। तो खाईल मेवा.—(महानु.) जो कष्ट करील तो फळ चाखेल. मेहनत करणाऱ्याला लाभ होतो.

उत्तमाची सेवा नीकी हीनाची ओखटी नायकी " नीच सेवा विशेखी : अपयशरूप :—(महानु.) चांगल्यांची नोकरी करणें बरें पण वाईटाचा पुढारीहि होऊं नये. नीच माणसाच्या सेवेपासून कधींहि यश मिळणें नाहीं.–तु.कल्पतरू खालीं असीजे परि खदिरावरी न बैसीजे.

सैतान—सैतानखाना—अघोर कर्म्यांचा संघ; सैतानांचा कंपू. " मावळे लोक हे शिवाजीचा सैतानखाना आहे.' म्हणून बोलले." श्रीशिवछत्रपति चरित्र १०४.

सैन्य—सैन्य अफाट आलें कर्तव्यनिष्ठेला विसरलें—पुष्कळ लोकांची गर्दी असली पण त्यांत व्यवस्था नसली अथवा कर्तव्य निष्ठ माणसें नसलीं तर त्याचा कांहीं उपयोग नाहीं.

सैंपाक—सैंपाकाचें घर घाणेरडें आणि बैठकीचें घर साजरें—स्वयंपाकघरांत घाण असून केवळ बैठकीचें घर स्वच्छ ठेवलें तर तो दिखाऊपणा काय उपयोगी ? बसण्याच्या जागेप्रमाणेंच खाण्याची जागाहि स्वच्छ पाहिजे. बाह्य देखावा नुसता दाखवून उपयोग नाहीं. अंतर्बाह्य स्वच्छता पाहिजे.

सय्या—सैय्या भये कोतवाल अब किसकी डर है—आपला मित्रच कोतवालाच्या जागेवर असल्यावर मग भ्यावयाचें कोणाला ? आतां स्वैर वागण्यास कांहीं हरकत नाहीं.

सैरा—सैरा वैरा—इतस्ततः; अस्ताव्यस्त.

सैरा वैरा पळणें-होणें—उधळून जाणें, पांगणें,

सैरा—एक कान सैरा, एक कान बहिरा—(व.) [सैरा=नीट, चांगला] एक चांगला व एक वाईट. दोन्ही सारखे, नसणें.

सैराट—वाई वैराट, बोली सैराट—वाई पहा.

सैल— सैल सोडणें—दाबांत न ठेवणें.

सैल दोरी देणें सोडणें—आपला वचक न बसविणें; ताबा न ठेवणें, वाटेल तसें वागू देणें.

सो—सो कव्वोमे एक बगलाभी सरस है—शंभर कावळ्यांत एक बगळा श्रेष्ट आहे. तु०–एकोपि गुणवान्पुत्रो निर्गुणै :किं शतेन तै :। एकश्चन्द्रो जगश्चक्षुर्नक्षत्रैः किं प्रयोजनम्॥.

सो घाट और एक बसरी कांठ—मनुष्य बाहेरच्या जगांत कितीहि फिरला तरी घरासारखें सुख नाहीं. धार्मिक ठिकाणचें शंभर घाट नि घराच्या ओटीचा एक कोपरा बरोबर आहे. आपलें नि तेंच शेवटी कामास येतें हा भावार्थ.

सो दिन चोरको एक दिन सावका—चोराची जरी नेहमीं चलती असली तरी एक दिवस तरी सज्जनास अनुकूल असा काल येतो व चोराची चोरी उघडकीस येऊन सज्जनाची सरशी होते.

सो बाघेलखंडी तो एक बुंदेलखंडी—बाघेलखंडांतले लोक वाघाप्रमाणें पण ते बुंदेलखंडापुढें हात टेकतात. बुंदेलखंडी फार भांडखोर. तेव्हां त्यांच्याबद्दल म्हण. गजेंद्रमोक्ष २.२७६.

सो शाने एक मत—सर्व शहाण्यांचे एक मत.–तु० शंभर शाहाणे अक्कल एक जाणे.

सो सोनारकी एक लव्हारकी—सोनाराचे अनेक घाव व लोहाराचा एक घाव सारखाच. क्षुल्लक माणसांनीं

केलेल्या अनेक गोष्टी मोठ्या मनुष्यानें केलेल्या एका गोष्टीबरोबरहि येऊं शकत नाहींत.

सो हाट एक ओटेका काठ--सो घाट वर पहा.

सोई; सोय-सोई करणें--१ व्यवस्था लावणें. २ (व.) ठोकणें.

सोई बसविणें--(ना.) खोडकी, नांगी मोडणें.

सोई, सोय धरील, जाणिल तो सोयरा, वर्म पाहील तो वैरी--जो आपली सोय पाहातो आपणांस अनुकूल गोष्टी करतो त्यासच आपला आप्त समजावें व जो आपलें उणें पाहतो त्यास शत्रु समजावें आपल्या आप्त माणसानें जर आपल्याला वेळेवर मदत केली नाहीं तर तो आप्त कसला?

सोकणें--सोकली मेंढी तेंच राम (धुंडी)—सवकली पहा.

सोकल्या भुता चल जाऊं कालच्या, मागल्या शेता—सवकणें पहा.

सोंग--सोंग करणें—१ हुबेहुब नक्कल करणें; अनुकरण करणें. २ ढोंग करणें; खोटेपणानें वागणें.

सोंग केलें सजून, दिवटी गेली विझून—पुष्कळ तयारी करून एखादी गोष्ट करावयास जावें तों आयत्या वेळीं कांहीं तरी विघ्न येऊन सर्व बिघाड व्हावा.

सोंग ना शास्तर, हागायले गेला मास्तर--(व.) एखाद्यानें कांहीं अनपेक्षित किंवा चमत्कारिक वर्तन केल्यास म्हणतात. हें सोंग म्हणावें अथवा हा बाह्याचार केवळ लोकांस दाखविण्यासाठीं म्हणावा, तर तसें दिसत नाहीं. 'हें काय वधूपरीक्षण म्हणावें, सोंग ना शास्तर हागायले गेला मास्तर!'

सोंगासारखी संपादणी, (करावी लागते)--जसें सोंग घ्यावें त्याप्रमाणें बतावणी केली पाहिजे. तसें वरून वागलें पाहिजे. जी जागा पत्करली तशी वागणूक केली पाहिजे.

रात्र थोडी, सोंगें फार--वेळ थोडा व कामें फार. कामें फार असलीं म्हणजे म्हणतात. The day is short and the work is much.

सारीं सोंगें येतात पण पैशाचें सोंग येत नाहीं—सारीं पहा.

सोंग्या ढोंग्या, पांडुरंगा !—(व.) कांहींतरी बतावणी करून आपलें काम साधणारा.

सोचना--सोचते सोचते पागल हो जाओगे—विचार करकरून वेडे व्हाल. फार विचार करणें वाईटच.

सोट--सोट बहिरी, भैरव, सोटेपीर बारगीर, भैरव, सुंभ, सुलतान--१ गले लठ्ठ, आडदांड माणूस २ सडेसोठ; फटिंग.

सोडणें---सोडवून ठेवणें--पळवाट ठेवणें.

सोड आऊत आणि हो मोरबाचा राऊत--(ऐति.)मोरो तानदेव होनप हा मलिकंबरच्या मृत्यूनंतर पुणें जिल्ह्यांत बंडखोर बनला होता. बरेच शिपाई स्वार याच्या पदरीं राहिले. यावरून वरील म्हण त्यावेळीं प्रचारांत आली. शिवाजीनें यास क्षमा करून देशपांडे पण दिलें. —मध्ययुगीत चरित्रकोश.

सोड मेंढी लाग लांडग्याच्या पाठीं--हातचें सोडून पळत्याच्या पाठीं लागणें.

सोडला तर पळतो, धरला तर चावतो—धरणें, मागें पहा.

सोडलेला बाण आणि बोललेला शब्द परत येत नाहीं--एकदां हातून घडलेली गोष्ट मागें घेतां येत नाहीं.

सोडी लाज तो करी काज--भिडेनें काम साधत नाहीं. आपलें काम साधावयाचे असलें म्हणजे थोडी भीड मर्यादा बाजूला ठेवावी लागते.

सोडल्या रूढी, भलतीच कडे उडी--एकदां मनुष्यानें रूढ मार्ग सोडून वर्तन करावयास सुरवात केली म्हणजे तो कोणीकडे वहावत जाईल त्याचा नेम राहात नाहीं.

सोना--सोतेको सोता, कब जागता है—एका निजलेल्याला दुसरा निजलेला कधीं उठवणार आहे? आंधळ्याचा वांटाड्या अंधळा याप्रमाणें.

सोनार---सोनारानें कान टोंचणें--मुलाचे कान सोनारानें टोंचल्यास मूल टोंचून देतें; घरीं टोंचावयास लागलें तर अकांडतांडव करतें. यावरून योग्य मनुष्यानें कान उघाडणी करणें. 'सोनारानें कान टोंचावें त्याप्रमाणें एका इंग्रज लेखकाचा यासंबंधीचा उतारा दाखल केल्याशिवाय आमच्या महाराष्ट्रीय वाचकांना ही गोष्ट पटणारहि नाहीं.

सोनारी कावा—सोनारानें सोनें चोरण्याचें कसब; फसवेगिरी लबाडी.

सोनार आणि कोणाला होणार—सोनार हा लबाड असतो अशी समजूत आहे तो कोणालाहि फसविल्यावांचून राहात नाहीं.

सोनारभाई त्याचा भरंवसा नाहीं—सोनारावर भरंवसा ठेवूं नये. सोनारशिंपी० पहा.

सोनार मारे बार बार, खुदा मारे एक बार—तेलीण राखे धारोधार पहा. 'व्रणरोगाचा बीजसंभव गूढ असल्यामुळें त्याच्या उद्भवाची व प्रसाराचीं परिक्षा करण्यासाठीं...अनेकविध शास्त्राची जरूरी भासते. इतकीं सर्व साधनें एकत्र होऊन या रोगाची चिकित्सा, संशोधन व उपचार होण्यास मोठें कार्य साहित्य लागेल . पण तीं सर्व सोय वरील म्हणीप्रमाणें टाटा मेमोरियल ट्रस्टच्या एकाच प्रचंड देणगीनें झाली आहे.'–केसरी ४–३–४१. वरील वाक्यांत ही म्हण सौ सोनारकी, एक लोहारकी या अर्थी चुकीनें वापरली आहे.

सोनार व झारेकऱ्याशीं गांठ—अगदीं कृपण, कद्रु माणसाशी संबंध येणें.

सोनार शिंपी कुलकर्णी आप्पा यांची, तिघांची संगत नकोरे बाप्पा—कुळकर्णी पहा.

सोनार सोन्याआड आणि शिंपी कपड्याआड—सोनार सोनें चोरतो व शिंपी कापड चोरतो.

सोनाराकडून कान टोंचला म्हणजे कान दुखत नाहीं—वर पहा.

सोनाराचे पाहाणें आगटींत—आगटी पहा.

सोनाराचा मासा, शिंप्याचा कसा कि दळणाऱणीचा–दाणेवाल्याचा पसा—शिंपी पहा.

सोनाराच्या कानीं गेलं वालभर उणं जालं—(व.) सोनार गिऱ्हाईकाला फसविल्याशिवाय कदापि राहणार नाहीं असा लोकांचा ग्रह आहे. तो केव्हां कसा फसविल व गोत्यांत आणील सांगतां येणार नाहीं. अमुक अमुक इसम सोन्याचा अमुक अमुक दागिना अमुक वजनाचा घडविण्यास देणार आहे अशी नुसती वार्ता जरी सोनाराच्या कानीं गेली तरी पुढें तें सोनें त्याजकडे घडविण्यास आणतांच खोटीं वजनें वापरून, दांडी मारून अनेक युक्त्या करून निदान–वालभर तरी सोनार कमी आणीलच आणील. ज्यांचा व्यवहारांत अल्पहि संबंध आला तरी जे लोक लबाडी केल्याशिवाय कधीं रहावयाचे नाहींत त्यांस उद्देशून ही म्हण आहे.

सोनारानें कान टोंचले तेव्हां शुद्धीवर आला—योग्य माणसाकडूस शासन मिळालें म्हणजे मनुष्य वठणीवर येतो.

सोनूबाई—नांव सोनूबाई, हातीं, पायीं कथलाचा वाळा—नांव पहा.

सोनूबाईनं चोरली सरी आणि साळुबाईच्या गळ्यांत बांधा दोरी—एकाचा अपराध व भलत्यालाच दंड.–संक. ५.३.८७.

सोनें—बावन कसी सोनें—१ मुळींच हिणकस नसलेलें सोनें; अगदीं अस्सल सोनें. २ शुद्ध वर्तनाचा प्रामाणिक माणूस.

सोनें आणि सुगंध—उपयुक्त व सुंदर; दिसण्यांत चांगली व फायदेशीर देखील(गोष्ट).तु०–सोनें आणि परिमळे.

सोनें गाळणें—सोनें आटून शुद्ध करणें.

सोनें होणें—एखादी वृद्ध व्यक्ति सुखा समाधानांत संतति–संपत्ति असतांना वारली म्हणजे 'तिचें सोनें झालें' असें म्हणतात. उत्तम गति प्राप्त होणें.

सोन–ओळख—दसऱ्याचें सोने (आपट्याचें पान) वांटतांना झालेली ओळख. नुसती तोंड ओळख.

सोनकावळा शिवणें—(सांकेतिक) विटाळशी होणें; पांढरा कावळा शिवणें.

सोनखत—माणसाची विष्ठा, ही खताला फार चांगली असते.

सोनचिडी–चेडी—१ डोंबाऱ्याची कसरतीचे खेळ दाखविणारी स्त्री, बाहुली. २ प्रौढकुमारी; घोडनवरी.

सोनताव—(ल.) खरडपट्टी; ताशेरा.

सोनपावडा—(कुत्सितपणें) गरीब; दुर्दैवी.

सोनेरी टोळी—हरतऱ्हांनी लोकांना फसवून धाडसानें वावरणारी लबाडांची टोळी.

सोन्याचा दिवस—आनंदाचा, महत्त्वाचा दिवस.

सोन्याचा धूर निघणें–पाऊस पडणें; सोन्यानें दांत किसणें—अतिशय श्रीमंती असणें–येणें. 'पुण्याकडे सोन्याचा धूर निघूं लागला.'–पामो १०.

सोन्याची लंका करणें---गडगंज संपत्ति सांठविणें. 'सोन्याच्या राशी रचून वडिलांनीं घराची सोन्याची लंका करून ठेविली होती.'-एकच प्याला १.२.

सोन्याची सीता---नवऱ्याची लाडकी म्हणून दागिन्यांनीं मढविलेली बायको.

सोन्याचे कान करून ऐकणें---मोठ्या दक्षतेनें, लक्ष्यपूर्वक ऐकणें. 'सुभाषबाबूचें भाषण असलें कीं ती तें अगदीं सोन्याचे कान करून ऐकावयाची.'-उगवत्या सूर्याचा काळोख १७५.

सोन्याचें गोकर्ण तोंडांत धरणें---गर्भश्रीमंत असणें; श्रीमंताच्या पोटीं जन्मास येणें. To be born with a silver spoon in the mouth -'वास्तविक पं. जवाहरलाल हे सोन्याचें गोकर्ण तोंडांत धरूनच जन्मास आलेले'-दि. वा. दिवेकर-स्वभावचित्रें.

सोन्याचें हाड---नेहमीं उत्कर्ष होणारा मनुष्य.

सोन्याहून पिवळें---अतिशय उत्तम.

सोन्याहून पिवळें होणें---फार कल्याणप्रद गोष्ट घडून येणें. 'आमच्या वन्सं सती गेल्या. किती त्या पुण्यवान्. त्यांचें सोन्याहून पिवळें झालें.'-पामो ४४२.

सोनें असल्यास लाखेस काय तोटा---महत्त्वाची गोष्ट हातीं असल्यावर तिला लागणारी आनुषंगिक क्षुल्लक गोष्ट मिळविणें फारसें जड पडत नाहीं. (गो.) सोन असल्यार लाखे दुकोळ ना.

सोनें उत्तम पण कान खातें---चांगली वस्तुहि केव्हां केव्हां अपायकारक असते. तेव्हां अशा अपायकारक वस्तूंपासून जरी त्या उत्तम असल्या तरी दूर राहणें बरें.

सोनें आणि परिमळ; सोनें आणि परिमळें, इक्षुदंडा लागती फळें---अगोदर सोनें व त्यांतून त्याला जर सुवास असेल तर काय बहार? दुधांत साखर याप्रमाणें.

सोनें केलें देवानें आणि सोन्याचा देव केला माणसानें---एखादी क्षुल्लक गोष्ट करून तीबद्दल बढाई मारणें व मोठ्या गोष्टीचा विसर पडणें. एखाद्याच्या आश्रयानें थोडासा पराक्रम दाखवून त्याबद्दल फुशारकी मारणें पण मूळ त्या गोष्टीस कारणीभूत होणारी आधारभूत गोष्ट विसरणें.

सोनें गहाण, मामा जामिन---**सोनें गहाण ठेवणें, मामा जामीन देणें; सोनें गहाण त्याला मामा जामीन कशास? सोनें गहाण असल्यास वर जावयाची मध्यस्ती (भीड) कशाला**---जेथें आपला माल चांगला आहे, तेथें दुसऱ्याची शिफारस कशाला.

चकाकतें तें सर्व सोनें नव्हे---चकाकणें पहा.

सोनें नाहीं गुंजभर न् बायको मागे रत्नहार---जवळ कांहीं नसतां मोठमोठे बेत करणें.

सोनें पाहावें कसून; माणूस पाहावें वसून---सोन्याला कस लावून त्याची परीक्षा करावी व माणसाची परीक्षा त्याच्या बोलण्याचालण्यावरून करावी. (हिं.) सोना जाने कसी, और मानस जाने बसी.

सोन्यासाठीं चिंधीची चाड---(महानु.) सोन्याला संभाळण्यांठीं क्षुद्र माणसाची सुरवत.

सोनें मातींत पडल्यानें मृत्तिकारूप होत नाहीं---थोर मनुष्य कांहीं काळ खालावला तरी त्याचा थोरपणा जात नाहीं, तो नीचाच्या पायरीस पोचत नाहीं.

सोनें मिळतें पण तान्हें मिळत नाहीं---द्रव्य मिळवणें सोपें आहे पण मूल होणें कांहीं मनुष्याच्या हातांचें नाहीं.

सोनें सलखावें, माणूस पारखावें---वर पहा. सुलखणें पहा.

सोनेका गडवा और पितलेकी पैंडी---चांगल्या व हीन वस्तूंचा विजोड संच.

सोनेका निवाला खिलाना, और शेरके नजरोसें देखना---सुलांचे खाण्यापिण्याचे लाड करावेत पण करड्या धाकांत ठेवावे, त्यांच्यावर चांगली नजर ठेवावी.

सोनेकी चिडया, हाथसे उडगयी---स्वाधीनची संपत्ति हातांतून गेली.

सोनेकी चेडी (चिडिया), हात लगी है---फार मोठा लाभ होणें.

सोन्यारुपयाचा वारा आणि खुर्दयाचा भारा---सोनेंरुपें थोडें असलें आणि खुर्दा ओझेंभर असला तरी त्यांची किंमत सारखीच. अनेक बारीक सारीक गोष्टी एका मोठ्या गोष्टीची बरोबरी करूं शकत नाहींत.

आधीं सोन्याचा उंबरठा होऊं दे मग कपाळ फुटूं दे---'सोन्याचा उंबरठा होवो, कपाळ जावो फुटुनी।' -सुधाकाव्य ४३ पहा.

सोन्याचा कांहीं गुण, सोनाराचा कांहीं गुण; कांहीं गुण सोन्याचा, कांहीं गुण सोनाराचा--फलाचें श्रेय थोडथोडें प्रत्येकाला आहेच. कार्यसिद्धीला निरनिराळे गुण लागतात.-नीशाप्र. २६२.

सोन्याचा गुण सवागीला-- (लागत नाहीं) चांगल्या गोष्टींचा सहवास असला तरी त्यामुळें त्याचा गुण प्रत्येक संबद्ध वस्तूला लागतोच असें नाहीं. त्या वस्तूंची तशी पात्रता पाहिजे. गुजराथी, मारवाडी, लिंगायत वगैरेंचा व्यापारी गुण शेंकडों वर्षांच्या सहवासानें आम्हाला घेतां आला नाहीं.

सोन्याचा चौफुला, नुसता रिकामाच पडला--उत्कृष्ट वस्तूचें चीज न होणें.

कांहीं सोन्याचा तर कांहीं सवागीचा गुण असणें-- वर पहा.

सोन्याचा द्यावा होन पण घराचा देऊं नये कोन--कितीहि द्रव्य खर्च झालें तरी हरकत नाहीं, पैसा द्यावा पण घरीं आश्रय देऊं नये, घरांत कोणाचा हात शिरकूं देऊं नये.

सोन्याची झारी, पाणी नाहीं माझारी--नुसता मोठा संबंध असून उपयोगी नाहीं त्यापासून प्रत्यक्ष कांहीं उपयोग झाला पाहिजे. कोरडी विहीर उपयोगी नाहीं.

सोन्याची परीक्षा आगींत घ्यावी व आप्तांची परीक्षा विपत्तींत करावी--मित्र पहा.

सोन्याची बुली पाहिली म्हणजे दगडाचा देव देखील गांड वासतो--(अशिष्ट.) एखाद्याला सोन्याचा लांच दिला म्हणजे तो कितीहि मोठा असला तरी नम्र होतो. सोन्यानें कोणालाहि वश करतां येतें.

सोन्याची मातब्बरी आणि गुंजेची बरोबरी--सोनें गुंजांनी जोखतात. श्रीमंती, सामर्थ्य मोठें पण किंमत कवडीची. नुसत्या मातबरीचा कांहीं उपयोग नसतो.

सोन्याची मेख, तमाशा देख--पैशानें सर्व कांहीं करतां येतें.

सोन्याची सुरी विधवेची आणि काळी गळसुरी सवाष्णीची--विधवा चैनींत असतात व सुवासिनीस कष्ट करुन दैन्यांत वागावें लागतें.

सोन्याची सुरी कोण घालतो उरीं ? सोन्याची सुरी झाली म्हणून काय ती उरांत खोवावी; सोन्याची सुरी नको घालूं उरीं; सोन्याची सुरी झाली म्हणून उरांत भोसकून घेण्यांत अर्थ नाहीं; सोन्याची सुरी झाली म्हणजे पोटांत खुपसुन घेतां येत नाहीं--सुरी पहा.-विक्षिप्त ३. ४५१. टि. ४.१८५.

सोन्याचे उंबरे होऊं द्या, आणि डोकें फुटूं द्या--प्रथम वैभव तर प्राप्त होऊं द्या मग त्याच्यापासून काय झळ लागावयाची असेल ती पाहतां येईल. सोन्याचे दरवाजे दारवंटे० ' पहा.

सोन्याचें ताट असलें तरी त्याला कुडाचें उटिंगण-उठिंगण पाहिजे--लागतें; सोन्याचे ताटास कुडाचा आधार--सोन्याचें ताट कुडालाच टेकून ठेवावें लागतें. मोठ्या वस्तूलाहि, क्षुद्रवस्तूचा आधार लागतो. ' सोन्याचें ताट झलें तरी त्यास कुडाचें उठिंगण पाहिजे.'-पेब ४८.

सोन्याचे दरवाजे होवोत व ठसठसां लागोत; सोन्याचे दारवंटे व्हावे आणि कपाळास लागावे--मागें पहा. संतति, संपत्ति तापदायक होणार असली तरी ती लाभूं दे.

सोन्याचें पान वावटळीनें उडत आलें--सोन्याचें पान म्हणजे अत्यंत वैभवशाली भाग्यवान पुरुष. याचें दर्शनहि क्वचितच घडतें. सोन्याचें पान वावटळीनें उडून येऊन यदृच्छेनें एखाद्या स्थळीं पडून त्याला महत्त्व आणतें. एखाद्या भाग्यवानाचें अकल्पितपणें आपल्याकडे येणें घडल्यास ही म्हण उपयोजतात. 'आपल्या दर्शनाचा अलभ्य लाभ झाला. पण काय हो हें सोन्याचें पान वावटळीनें कोणाकडे उडत आलं ?'

आधीं सोन्याचें, वरि जडावाचें--सोनें आणि सुगंध दुधांत साखर-अशा अर्थी.-बलवंत, (रत्नागिरी.) ८-१०-४१

सोन्याचे वाळे आणि कथिलाची पाटली--विजोड संच.

सोन्याच्या तुलनेला गुंजांनीं मान दिला--उत्कृष्ट वस्तूची किंमत करण्यासहि केव्हां केव्हां क्षुल्लक गोष्टींची जरूर लागते.

सोन्यापेक्षां घडणावळच मोठी--मूळ मालापेक्षां मजूरी जास्त. मुख्य गोष्टीपेक्षां आनुषंगिक गोष्टीचें महत्त्व अधिक झाल्यास म्हणतात.

सोन्यासाठीं सोड जीव—नेहमीं संपत्तीसाठीं कासावीस होऊन धडपडणाराबद्दल म्हणतात.

सोन्यासाठीं चिंधीची गरज—सोनें झालें तरी तें बांधण्यासाठीं चिंधी लागतेच. त्याप्रमाणेंच कितीहि मोठा मनुष्य झाला तरी त्याला लहान मनुष्याची केव्हां तरी गरज लागतेच.

सोप—सोप पडणें—बाजरी, जोंधळा वगैरेवर कीड पडणें.

सोपाण—सोपणानं सोपण खालतें—(गो.) एकेक पायरी उतरत जावें तसतसा माणूस खालीं खालीं येतो. एकदां उतरती कळा लागली कीं थांबत नाहीं.

सोनोरी—सोनोरी जावें कीं नानोरी जावें—(महानु.) मन द्विधा होणें. (सोनोरी–नानोरी हीं गांवें आहेत.)

सोबत—सोबत संगत—लहानमोठी बरीवाईट मैत्री.

सोबती—सोबती वेल्हाळ—संगत धरण्यासारखा.

सोबती संगती—मित्र; सहचर.

***सोबती गोड बोलला आणि केसानें गळा कापला**—वरून मैत्री दाखवून, गोड गोड बोलून आंतून घात करणें.

सोवळें—सोवळें बांयत पडलें, पुण कोवळें नितळ जालें—(गो.) ख्रिश्चन बाई कधींच आंघोळ करीत नाहीं. ती विहीरींत पडल्यामुळें तिची आयतीच आंघोळ झाली व केसहि पण स्वच्छ झाले. इष्टापति.

सोम—सोम करी खोम—(महानु.) फलज्योतिष शास्त्रांत असें सांगितलें आहे कीं, सोमाची दृष्टि असेल तर खोम होतें.

सोम साळी नि मंगळ जाळी—चंद्र हा शीतकर आहे व मंगळ हा दाहक आहे. परस्परविरुद्ध ग्रह.

सोमवती—सोमवती घालणें—सोमवारीं अमावास्या आली म्हणजे बायका १०८ फुलें दान करतात यावरून १ पुष्कळ (संख्येनें) असणें २ पुष्कळांच्या घरीं भटकणें.

सोमवार—सोमवार पावे : बेलेसी लिंगा धावे : सोमवार पाहे : बेलपत्री लिंगा वाहे:—(महानु.) सोमवारीं शिवलिंगाला बेल वाहावा.

सोमसूत्र—सोमसूत्री प्रदक्षिणा—[सोमसूत्र= गायमुख कुंड] शंकरास घालावयाची प्रदक्षिणा. प्रथम मुखाकडून प्रदक्षिणा घालीत कुंडापर्यंत यावयाचें आणि तें न ओलांडता मागें वळून पुन्हा दुसऱ्या बाजूनें कुंडापर्यंत येऊन परत फिरून मूळ जाग्यावर येणें.

सोमेश्वर—सोमेश्वर आणि रामेश्वर या देवस्थानांची नांवें जोडीनें येतात; यावरून म्हणी पडल्या आहेत. रामेश्वर पहा.

सोमेश्वराला नागवला आणि रामेश्वराची पूजा केली, बांधली—एकाला लुबाडून दुसऱ्याची धन करणें.

आग रामेश्वरीं व बंब सोमेश्वरीं—एकीकडे रोग व दुसरीकडे इलाज.—म्युनिसिपालिटी नाटक. सिनेमा.

सोमाजी—सोमाजी सकळकळ्या—सोमाजी नांवाचा एक कवि सर्व कलांत पारंगत होता. त्यावरून सर्व कलाकोविद् माणूस. उपरोधानेंहि वापरतात.

सोय—सोई पहा.

सोय करणें—(व.) सरळ करणें; ठोकणें; चोप देणें.

सोय बसविणें—(व.) खोडकी मोडणें.

सोईचें बोलणें—सरळ पटेल असें बोलणें.

सोईवर येणें—ताळ्यावर देणें.

सोय जाणेल तो सोयरा—सोई पहा. 'तूं सोय जाणसी बहु, दीनाचा सोयरा खरा सुभगा।' मोआर्या केका. १७१. तु०–तो आप्तोत्तम, कामा ये जो धांवोनि अवसरीं विषमीं।'—मो. अमृत १.६२.

सोयरा—सोयरा पाहावा रुसून, सोनें पाहावें कसून—सोयऱ्याची परीक्षा त्यावर रुसलें असतां तो कशी समजूत करतो यावर अवलंबून असते व सोन्याची परीक्षा कसावर घासून करावयाची असते.

सोय धरील तो सोयरा, वर्म पाहील तो वैरी—सोई पहा.

सोयरा सुखाचा, विसावा भक्ताचा—परमेश्वर हा भक्ताचा आश्रय व आप्त असून तोच भक्ताच्या सुखदुःखाची काळजी घेतो.

सोयरें दूर आसका, बायं लागिं आसका—(गो.) नातेवाईक दूर असावेत आणि विहीर जवळ असावी.

सोयरे जेवणापुरते-- (ऐति.) सोयऱ्यांचा उपयोग इतर प्रसंगीं नाहीं. जेवणाच्या वेळीं त्यांना मान द्यावा. 'सोयरे झाले तरी जेवणा पुरते. क्षात्रधर्मास अंतर करता येत नाहीं. '– जनकोजी शिंदे.

सोयऱ्यांत साडू, हत्यारांत माडू, भोजनांत लाडू—साडू पहा. –'दृढतर तिळवे हे गोड अत्यंत लाडू, प्रिय परम जसे हो सोयऱ्यांमाजि साडू ॥'–साह्द ३.५५.

सोयऱ्यांत साला हत्यारांत भाला—वरप्रमाणें.

सोयऱ्यांनीं भरला गांव, जेवायला नाहीं ठाव—बघावयास जावें तों सर्व गांवांत आप्तसंबंधी असून जेवावयाची सोय मात्र एकाहि ठिकाणीं होऊं नये अशी स्थिति. बरवरचा आप्तपणा दाखविणारे पण मनापासून अगत्य न दाखविणारे लोक. बहू सोयरेधायरे मित्र लोकीं । परी संकटीं एक नाहीं विलोकीं ॥

सोयऱ्यापासून लांब आणि पाण्यापासून जवळ–मनुष्यानें घर बांधावयाचें तें आप्त मंडळीपासून दूर बांधावें म्हणजे कटकट वांचते व पाण्यापासून जवळ बांधावें म्हणजे पाण्याचे हाल होत नाहींत.

सोया—**सोया मुवा, बराबर है**—निजला आणि मेला बरोबर.

सोरो—**सोऱ्या बल**—(गो.) दारूचें पीप. लठ्ठमाणसाला उद्देशून म्हणतात.

सोरोप—साप पहा.

सोरोप म्हण नयें धाकलों, आणि घोव म्हण नयें आपलों—(गो.) सापाचें पिल्लूं लहान म्हणून त्याची गय करूं नये. आणि नवरा वरून साधा दिसला तरी तो आपल्याशीं निष्ठेनें वागेल असें समजू नये.

सोलीव—**सोलीव दारिद्य**—अत्यंत गरीबी.

सोंवळा—**सोंवळी करणें**—नवरा मेल्यानंतर डोक्याचे केस काढावयास लावणें. विकेशा करणें. ' अजून तुमच्या मुलीविषयीं कोणास कांहींच समजलें नाहीं, तोंवरच तिला तुम्ही झटपट सोवळी करून व शुद्ध करून घ्या सोवळी केलीत, तिचें वपन केलेंत कीं तिचा दोष जाईल. '—सुंदराबाई. १४

सोंवळी गोबाई—१ काशींतील एक पवित्र देवी. २ अत्यंत सोवळी बाई.

सोंवळी होणें—केशवपन करणें.

सोंवळें आकाशीं वाळतें—वस्त्र ओलें करून कशाचाहि स्पर्श न होतां तें वाळविलें म्हणजे तें सोवळ्यांत आहे असें मानतात, तें निःसंशयच सोवळें राखावयाचें म्हटलें तर आकाशीं ह्म. अधान्तरीं वाळत घालावें लागेल; नाहीतर ज्या वस्तूच्या आधारावर तें वातलें जाईल त्या वस्तूच्या स्पर्शानें तें दूषित होईल. त्यावरून मुलखावेगळें सोवळें करणाराचें ' सोवळें आकाशीं वाळतें ' असें म्हणतात.

सोंवळें घेणें— बाळंतपणानंतर दीड महिन्यानें पूर्ववत् सोवळें नेसून देवधर्म करूं लागणें.

सोंवळें सोडणें—रुखवताचे वेळीं वराकडून वधूचे आईस जें खण लुगडें देतात तें.

सोंवळी गऊबाई, ओवळ्यामध्यें तुकडे खाई—सोंवळ्याचा आव आणून ओवळ्यानें खाणारी. उगाच वरवर सोंवळ्याचा हिमाख दाखविणारी ढोंगी स्त्री. व पहा.

सोंवळें ओंवळें आणि माया हीं सांगून येत नाहींत—ज्याप्रमाणें सोंवळ्या ओंवळ्याचा आचार हा मनापासून पटला तरच करतां येतो. कितीहि सांगितलें शिकविलें तरी साधत नाहीं. त्याप्रमाणें प्रेम हें सांगून येत नाहीं. तें मनांत आपोआपच उत्पन्न झालें पाहिजे.

सोंवळें झालें दाट, खाटकाच्या घरावरून वाट—सोंवळ्याचा फार बडेजाव गाणाऱ्या मनुष्याची वाटच जर गलिच्छ जागेंतून असेल तर त्याच्या सोंवळ्याच्या वल्गना व्यर्थ होत. खोटा दिमाख दाखविणारास म्हणतात.

सोंवळें दाट आणि अर्धवाट—अर्धवाट सोवळें दाट पहा.

सोस—**सोस करणें–धरणें**—अतिलोभ करणें. ' वाउगा तूं न करी सोस । दृढ घाली तूं कास । धरीं पा विश्वास । विठ्ठल चरणीं ॥'

सोस धेवडी मावशी—अति हांवरी लोभी स्त्री.

* **सोशील तोटा, तो होईल मोठा**—जो पड खातो तो पुढें महत्त्वास चढतो. जगांत पड खाऊनच अनेक कामें साधतात. किंवा मोठेपणा मिळविण्यास पदराला खार लावून घ्यावा लागतो.

सोसा— ससा पहा.

सोरया भोवडेक गेल्यार वाघा भोवडे साहित्य जाय—(गो.) सशाच्या शिकारीला वाघाच्या शिकारीची

तयारी. प्रयत्न मोठा करावा तेव्हां लहान फळ हातीं लागतें. प्रयत्नांत कसूर करूं नये.

सोद्यांक आयली खरस, सुण्यांक जालें मुतूंक–(गो.) पळून पळून ससांना लागला दम आणि त्यांच्या पाठीस लागलेल्या कुत्र्यांना मुतायला झालें. त्रास सोसणारा आणि त्रास देणारा दोघेहि शेवटीं दमतात.

सोळा—सोळा आणे—रुपयाचे आणे सोळा असतात यावरून. १ संपूर्ण. २ उत्कृष्ट. ३ भरपूर. ४ तंतोतंत.

सोळा कन्या (दक्षाच्या)—१ स्वाहा; २ स्वधा, ३ उमा, ४ मूर्ति, ५ उन्नति, ६ ऱ्ही, ७ क्रिया, ८ तितिक्षा ९ पुष्टि, १० तुष्टि, ११ शांति, १२ मेधा, १३ दया, १४ मैत्री, १५ बुद्धि, १६ श्रद्धा.

सोळा कळा—चंद्राच्या.(अ) १ शंखिनी, २ पद्मिनी, ३ लक्ष्मणी, ४ कामिनी, ५ पोषिणी, ६ पुष्टिवर्धनी, ७ आल्हादिनी, ८ अश्वपदिनी, ९ व्यापिनी, १० प्रमोदिनी, ११ मोहिनी, १२ प्रभा, १३ क्षीरवर्धनी, १४ वेधवर्धनी, १५ विकासिनी, १६ सोभिनी. (–कथाक०)

(आ) १ शंखिनी, २ पद्मिनी, ३ लक्ष्मीणी, ४ कामिनी, ५ पक्षिणी, ६ व्यापिनी, ७ विद्या, ८ मोहिनी, ९ प्रमोदिनी, १० मिथुनी, ११ विकाशा, १२ अमृता, १३ अमृतसंजीवनी, १४ नीचवाणी, १५ ज्ञानदृष्टि १६ सत्रावी. (–मूळस्तंभ).

सोळा कळीं तपणें—१ चंद्र सोळा कलांनीं युक्त असणें. २ (ल.) हातीं पैसा, अधिकार इ. भरपूर असणें.

सोळा कामधेनु—१ यमुना, २ सुनंदा, ३ सुशीला, ४ सुरभी, ५ कपिला, ६ कापिलाधरा, ७ कमोदिनी, ८ मधु, ९ सिद्धि, १० पूर्णभद्रा, ११ महासिद्धि, १२ संभूती, १३ ब्रह्महतना, १४ मोक्षा, १५ वसुमती, १६ प्रवीणा.(—काशीखंड)

सोळा गुणांचा खंडोबा—(प्र.) अठरा गुणांचा खंडोबा पहा.

सोळा ध्रुवताल—१ जयंत, २ शेखर, ३ उत्साह, ४ कंदर्प, ५ जयमंगल, ६ मधुर, ७ निर्मल, ८ कुंतल, ९ कमला, १० चारी, ११ नंदन, १२ चंद्रशेखर, १३ कामद, १४ विजय, १५ तिलक, १६ ललित (—गायनप्रकाश.)

सोळाबारा-सोळाचे बारा करणें—कमी जास्त किंमत घेऊन विकणें. 'आमची उपेक्षा करून बाहेर रोकडीनें कापड घेतां आज सोळांचे बारा करून कोणी उदमी रोकडीने व्यवसाय करितो.'—बापूगोप ५२.

सोळा मातृका—पुण्याहवाचनांतील– १ गौरी, २ पद्मा, ३ शची, ४ मेधा, ५ सावित्री, ६ विजया, ७ जया, ८ देवसेना, ९ स्वधा, १० स्वाहा, ११ माता, १२ लोकमाता, १३ धृति, १४ पुष्टी, १५ तुष्टी, १६ कुळदेवता.

सोळा मासिकें—१ आद्य, २ ऊन, ३ द्वितीय, ४ त्रैपाक्षिक, ५ तृतीय, ६ चतुर्थ, ७ पंचम, ८ ऊनषाण्मासिक, ९ षाण्मासिक, १० सप्तम, ११ अष्टम, १२ नवम, १३ दशम, १४ एकादश, १५ द्वादश, १६ ऊनाब्दिक.

सोळा मुहूर्त—१ रौद्र, २ श्वेत, ३ मैत्र, ४ चार्व, ५ जयदेव, ६ रोचन, ७ वैतुर, ८ अभिजित, ९ रावण, १० बालव, ११ बिभीषण, १२ नंदन, १३ याम्य, १४ सौम्य, १५ भग, १६ सावित्र. (—शिवालिखित)

सोळा शृंगार—(अ) १ मज्जन, २ वस्त्र, ३ अलक्तक, ४ केशपाश ५ सौगंध्य, ६ भूषण, ७ मुखसुवास, ८ कज्जल, ९ भाषण, १० हास्य, ११ चातुर्य, १२ चालन, १३ पातिव्रत्य, १४ गान, १५ कटाक्ष, १६ क्रीडा.

(आ) १ तैलाभ्यंगस्नान, २ चीर, ३ कंचुकी, ४ कुंकुम, ५ काजळ, ६ कुंडलें, ७ हार, ८ मोतीं, ९ केश १० नूपुरें, ११ चंदन, १२ कंबरपट्टा, १३ तोडे, १४ तांबूल, १५ बांगड्या, १६ चतुरता.

(इ) चार चतुष्पद, चार खगपद, चार फल, फूल चार, राधाजीके बदनपर ये सोळा सिनगार॥ (दोहरा) ४ चतुष्पद— १ तुरंगवत् घुंगट, २ कुरंगवत् नेत्र. ३ गजगती चालणें, ४ सिंहाप्रमाणें कंबर.

४ खगपद—१ कोकिळा स्वर, २ भ्रमराकृति भोंवया, ३ शुकचंचुवत नाक, ४ मीनखंजनाक्षवत् चंचलता. (मीनवत् अक्ष)

४ फळें—१ कपित्थवत् कुच, २ दाळिंबबीजवत् दंत, ३ आम्रबीजवत् हनुवटी, ४ प्रवाळापरी अधर. ४ फुलें— १ चंपकवत् कांती, २ केतकीवत् सुगंध, ३ कमलाकृती नाभि, ४ गुलाबापरी गाल.

सोळा संस्कार—१ हिंदुधर्मांत माणसाला जन्मापासून मरणापर्यंत पुढील सोळा संस्कार असतात. –१ गर्भा-

धान, २ पुंसवन, ३ अनवलोभन, ४ विष्णुबली, ५ सीमंतोन्नयन, ६ जातकर्म, ७ नामकरण, ८ निष्क्रमण, ९ सूर्यावलोकन, १० अन्नप्राशन, ११ चूडाकर्म, १२ उपनयन, १३ महानाम्नी, १४ समावर्तन, १५ विवाह, १६ और्ध्वदेहिक. या नांवासंबंधीं एकवाक्यता नाहीं. २ (ल.) आयुष्यांत भोगावे लागणारे बरेवाईट सर्व प्रसंग.

सोळा सूक्ष्म भूतें--पंचतन्मात्रा, पंच ज्ञानेंद्रियें, पंच कर्मेंद्रियें व मन.

सोळबांड चक्रबांड; सोळाबाण; चक्रबाण-चक्रबाण—उडाणटप्पू.

सोळावा संस्कार करणें—मारणें; ठार करणें. 'सर्वांचा सोळावा संस्कार करावा या विचारांत आहेत ?' --ख ७५७२.

* **संगमनेरचे सोळा आणि घांदरफळाचा गोपाळा**—संगमनेर पहा.

सोळा हात लुगडी-साडी, नि अर्धी तंगडी उघडी—ही म्हण गुजराथी लोक महाराष्ट्रीय स्त्रियांस उद्देशून म्हणतात. कारण सोळा हात लुगडें घेऊन सुद्धां तंगडी उघडी राहते; अशा रीतीनें ते आपल्या (त्यांच्या) स्त्रियांच्या नेसण्याच्या पद्धतीचें समर्थन करतात.

सोळा वर्षें पुत, मग मित्र—मुलगा सोळा वर्षांचा झाला म्हणजे त्यास बरोबरीच्या नात्यानें वागवावें. प्राप्ते तु षोडशे वर्षे पुत्रमित्रसमाचरेत् ।

सोक्षमोक्ष---सोक्षमोक्ष लागणें-होणें; सोक्ष नाहीं तर मोक्ष—कांहीं तरी निकाल लागणें-लावणें; बरा वाईट कांहीं तरी शेवट करणें-होणें. 'या गोष्टीचा काय तो सोक्षमोक्ष झाल्यावरच तो आला असता तर बरें झालें असतें.'-प्रो. फडके, प्रतिज्ञा २०६.

सौ---सौ घाटःएक ओसरीचा काठः—(महानु.) चांगल्या घाटावर बसण्यांत जें सुख लागतें त्यापेक्षां आपल्या ओसरीच्या कांठावर बसण्यांत जास्त सुख वाटतें. स्वतःचें घर कसेंहि असलें तरी तेंच आपणांस सुखाचें होतें. सो घाट पहा.

सौंदर्य---सौंदर्याला अलंकाराची जरूरी नसते—जी स्त्री स्वाभाविकच सुंदर असते तिला अलंकारांनीं नटविण्याची गरज नसते.

सौभाग्य---सौभाग्य चिन्ह—कुंकू, बांगड्या, मंगळसूत्र इ.

सौभाग्य तंतू—मंगळसूत्र.

सौभाग्य द्रव्य—हळदकुंकू.

सौभाग्य मिरवणें-लावणें—सौभाग्यवतीनें आपल्या सवाष्णपणाचा तोरा मिरवणें; अहेवपण भोगणें.

सौभाग्य संन्यास घेणें—सोंवळी होणें; केशवपन करणें. 'वडिलांच्या वर्ष श्राद्धाच्या वेळीं आईनें सौभाग्यसंन्यास घेतला.' —विविधवृत्त १६.८.३६ पान १५.

सौभाग्याचा टिका—कुंकू.

* **गौर रुसली आणि सौभाग्य घेऊन बसली**—गौर पहा.

स्तन--- स्तना आणि वृषणा, साक्षीदारा आणि जामीना, फुकट हिसके चौघाजणा--- (अशिष्ट.) अर्थ उघड आहे. सुरतप्रसंगीं पहिल्या दोघांना व न्यायकचेरीच्या कामांत दुसऱ्या दोघांना व्यर्थ हिसके बसतात.

स्तोम— स्तोम माजविणें—एखाद्याची प्रतिष्ठा वाढविणें. फार स्तुति करणें. 'महाराष्ट्र विद्यापीठ इंग्रजी भाषेचें आणि पंडिती विद्येचें स्तोम माजवणारें असें होतां कामा नये?'-अत्रे नासिक संमेलन भाषण.

स्त्री--- स्त्रीचें सोनें होणें--उतारवयांत अहेवपणीं मरणें. सोनें पहा.

स्त्रीच्या नाकावर पदर येणें--(विधवा बायका तोंड झांकून घेतात, वैधव्य येणें.

स्त्रीचरित्रं देव नेणतीः ऐसी लोकीं वदंती-- (महानु.) स्त्रियेचेंचरित्र देवहि जाणीत नाहीं असा प्रवाद आहे

स्त्रीबुद्धिः प्रलयंगता—प्रलयान्तिका- प्रलयावहा—स्त्रियांची बुद्धि ऐकिली असतां नाश होतो. 'त्यांनीं (सईबाईनें) उत्तर केलें. आम्ही स्त्रिया. स्त्रीबुद्धिः प्रलयंगता असें शास्त्र. साहेबांजवळ मोठेमोठे विचारकर्ते कारकून व सरदार आहेत त्यांची सल्ला घ्यावी.'–श्री शिवछत्रपति चरित्र ३६; भाव २४,८३ संबंध श्लोक असा--आत्मबुद्धिः सुखायैव गुरुबुद्धिर्विशेषतः । परबुद्धिर्विनाशाय स्त्रीबुद्धिः प्रलयावहा (प्रलयंगता, प्रलयांतिका), ॥ तु. ०– स्त्रीबुद्धि येगें मजसी पडेना । आरंभिलें कार्य सिरा चढेना । स्त्रीबुद्धि हे नित्य अनर्थकारी ॥' –सारुह ८-१२.

स्त्रीरत्नं दुष्कुलादपि—सुंदर व गुणवती स्त्री नीच कुलांतील असली तरी तिचा स्वीकार करावा. विषादप्यमृतं ग्राह्यममेध्यादपि कांचनम् । नीचादप्युत्तमां विद्यां स्त्रीरत्नं दुष्कुलादपि॥ —सुर १५५.९६.

स्त्री सहसा प्रवृतेना : प्रवर्तली तर निवर्तेना:—(महानु.) स्त्री स्वभाव असा असतो कीं, स्त्री सहसा एकदम कोठल्याहि नव्या गोष्टीकडे वळावयाची नाहीं, पण एकदां का वळली तर ती गोष्ट कदापि सोडणार नाहीं.

न स्त्री स्वातंत्र्यमर्हति-- स्त्रीस कधींहि स्वतंत्रतेनें वागूं देऊं नये; तिचें नेहमीं कोणीतरी रक्षण करीत असावें. पिता रक्षति कौमारे, भर्ता रक्षति यौवने । पुत्रस्तु स्थविरे भावे न स्त्री स्वातंत्र्यमर्हति ॥ (मनु,) सुर. १६६. ५७५.

स्त्रिया सधनानुकुल होत—-स्त्रिया नेहमीं द्रव्याला वश होतात.

स्त्रियांचीं वर्मे स्त्रियांस माहीत— स्त्रियांचीं गुप्त कृत्यें स्त्रियांसच कळतात.

स्त्रियांचा जीव पति— स्त्रिया पूर्णपणें पतीवर अवलंबून असतात. पतीशिवाय त्यांना जगांत स्थानच नाहीं. The husband is the life of the woman

स्त्रियांचें चरित्र आणि पुरुषांचें भाग्य; स्त्रीचें चरित्र पुरुषांचें भाग्य--स्त्रियांची वर्तणूक व पुरुषांचें दैव यांचा कोणी नेम सांगूं शकत नाहीं.

(अ) राष्ट्रस्य चित्तं कृपणस्य वित्तं मनोरथं दुर्जन मानुषाणाम् । स्त्रियश्चरित्रं पुरुषस्य भाग्यं देवो न जानाति कुतो मनुष्यः ॥—सुर १७२. ८२९.

(आ) अश्वप्लुतं वासवगर्जितंच स्त्रिणां चचित्तं पुरुषस्य भाग्यम् । अवर्षणं चाप्यतिवर्षणंच देवो न जानाति कुतो मनुष्यः ॥ सुर १७२. ८२८.

(इ) भूपस्य चित्तं कृपणस्य वित्तं मनोरथं मानुषदुर्जनस्य । स्त्रियाश्चरित्रं पुरुषस्य भाग्यं देवो न जानाति कुतो मनुष्यः ॥—समपद्य. ७३. ८९.

स्त्रियांना मेणाची-लोण्याचीहि सवत खपत नाहीं--स्त्रिया या सवतीच्या बाबतींत अतिशय असहिष्णु असतात.

स्त्रियेचा विश्वासुः कव्हणी न धरावा—(महानु.) स्त्रियांवर कोणी विश्वास ठेऊं नये.

स्थल-- **आधीं जल मग स्थल**--प्रथम पाण्याची सोय पाहिजे. ती असेल तर मग जागा पाहावी.

स्थाली ---**स्थालीपुलाक न्याय**--- शितावरून भाताची परीक्षा. थोडी चांचणी करून सर्वांवर अभिप्राय देणें. " या गोष्टीवरून साठे यांच्या धारणाशक्तीची स्थाली पुलाक न्यायानें चांगली अटकळ करतां येते. " —विवि.

स्थावर---**स्थावर विष**— खनिज किंवा वनस्पतीचें विष. याच्या उलट प्राणिज विष. मूल, पत्र, फल, पुष्प, साल, क्षीर, नार, चीक, धातु आणि कंद असे या विषाचे दहा प्रकार आहेत.

स्थिति--**स्थिति ओळखणें**--जागा, अवस्था ओळखणें.

स्थितीरीती--चालचालणूक; वागणूक.

स्थितीवर येणें असणें—योग्य स्थळीं, अवस्थेप्रत असणें.

स्थिर---**स्थिरबुद्धि**--मन चलबिचल न होणें. मनाची अचंचलता. २ (ल.) मंदबुद्धि; जाड्य.

स्थिर वेळा--रात्रीच्या किंवा दिवसाच्या ३० घटकांच्या आठ विभागांपैकीं आठवा विभाग.

स्नान--- **स्नान संध्या**— १ स्नान, संध्या, पूजा इ. रोजचा धार्मिक विधी. २ (ल.) लांचलुचपत.

स्नान सांगणें--जेवणापूर्वी स्नान करण्याची सूचना देणें. ही सूचना म्हणजे जेवणाचें बोलावणेंच होय. -श्यामची आई.

* **स्नान करून पुण्य घडे तर पाण्यांत बेडूक काय थोडे**--- केवळ तीर्थांत स्नान केल्यानें कांहीं पुण्य लागत नाहीं. तसें होतें तर सर्व बेडूक स्वर्गास जाते.

स्नानसंध्येचा कंटाळा, हातीं सोंगटीचा-सोंगट्यांचा चाळा--देवधर्माकडे लक्ष्य न देतां जुगार खेळण्यांत वेळ घालविणारा व्यसनी मनुष्य.

स्नानागारीं धांवला, हुषारी आली आंगाला--स्नान केल्यानें मनुष्याला हुषारी येते.

स्नुषा---**स्नुषातक्रन्याय**--एक स्त्री एका बाईच्या घरीं ताक मागावयास गेली असतां घरांत सून होती व सासु बाहेर गेली होती. सुनेनें ताक नाहीं म्हणून सांगितलें. तेव्हां ती स्त्री परत येत असतां वाटेंत सासू भेटली. तिनें विचारल्यावरून झालेली गोष्ट

तिला सांगितल्यावर ती म्हणाली सून कोण नाहीं म्हणून सांगणार ? चला आमच्या घरीं. त्याप्रमाणें ती स्त्री घरीं आल्यावर सासूनें पाहिलें तो घरांत ताक नव्हतें. तेव्हां तिनें पुन्हां नाहीं म्हणूनच सांगितलें आणि वर म्हणते कीं, नसलें म्हणून काय झालें, सून कोण सांगणार नाहीं म्हणून ! घराची मालकीण मी आहें. मी नाहीं म्हणून सांगेन पाहिजे तर, पण सुनेस काय अधिकार ?

स्नेह---स्नेहांत,-स्नेहावर पाणी घालणें— मित्रभाव तोडणें.

स्पष्ट—स्पष्टोक्तीच्या अंगीं निष्ठा नको वाउगी—फार स्पष्टोक्तीनें बोलणें कांहीं व्यवहारांत फायदेशीर होत नाहीं.

स्मरणशक्ति—जनतेची स्मरणशक्ति अल्पजीवी असते—इंग्रजी म्हणीचा अनुवाद. बऱ्यावाईट गोष्टी तेवढ्या वेळपुरत्याच लोकांच्या लक्ष्यांत राहतात तेव्हां लोकमताची फारशी पर्वा करूं नये या अर्थी. ' जनतेची स्मरणशक्ती अल्पजीवी असते अशी म्हण आहे नाहीं तर सरदार पटेल यांनीं पुणें बैठकींत केलेलें भाषण त्यांचे पुढें टाकून त्यांना जाब विचारला गेला असता. --केसरी २३-१-४२

स्मशान— श्मशान पहा.

स्मशानांत गेलें तरी कावळ्यांचा उपद्रव— कावळा पहा.

स्मशानीं बसावें, पण एकटें नसावें—अगदीं एकांतांत गेलें तरी किंवा सर्व जगाचा सहवास सोडला तरी बरोबर कोणीतरी सहचर किंवा मित्र असावा. अगदीं एकलकोंड्यानें राहूं नये. मनुष्यानें संगत कधीं सोडूं नये. तु०- भात सोडावा पण साथ सोडूं नये.

स्मृति— स्मृतिशेष होणें.— १ नुसती स्मृति मात्र राहणें. २ मागें आठवण ठेवणें; नांव मागें ठेवणें. यावत्‌चंद्रदिवाकरौ सतेज अवस्थेंत कायम टिकणें, आठवण राहणें. ' महात्मे कालाच्या पोटांत नष्ट होऊं शकत नाहींत. आणि ते कालवश होऊन स्मृतिशेष होतात--दि. वा. दिवेकर, " स्वभाव चित्रें " पान १. ' मरावें परी कीर्तिरूपें उरावें, '

स्वकपोल--- स्वकपोलकल्पित— स्वरचित; स्वतःच कल्पना करून लिहिलेलें. म्हणजे सत्य नव्हे असें; खोटें; काल्पनिक.

स्वच्छता- -स्वच्छतेनें कामें होतात, संदेहानें नाश.--(ऐति.) नानाफडणिसांचें वचन.-पत्रा २२९. मनांत कपट न ठेवतां वागलें तर कार्य भाग साधतो' दुसऱ्यासंबंधीं साशंकवृत्ति धरून वागल्यास कार्यनाश ठेवलेलाच.

स्वजाति---स्वजातीय एकत्र राहती— एका जातीचे लोक एकत्र जमतात. Birds of the samo feathrer.

स्वतः---स्वतःची स्वतः पूजा करणें—१ नट्टा पट्टा करणें. २ स्वतःची प्रशंसा करणें; आत्मश्लाघा. ३ अहं ब्रम्हास्मि या जाणिवेनें सच्चिदानंद भोगणें. ' स्वतांची स्वयें खूप पूजा केली। म्हणोनीच कांहीं ध्वजा लावियेली. ।'–बिल्वदळ

स्वतःची लांबी मोजणें—(इंग्रजीचा अनुवाद) हात पाय ताणून निजणें. " एकंदरींत आम्हांस वाटलें आलेलें विघ्न बरेंच लोकर निभलें. " जय केदार " की म्हणून पुनः आंथरूण पकडलें. व आपली स्वतःची लांबी मोजली " — केदारखंडयात्रा पान ३९.

स्वतःचें नाक कापून अपशकून करून घेणें; स्वतःचें नाक कापून घेऊन दुसऱ्यास अपशकून-अवलक्षण करणें—नाक पहा. -टि.४.१४२-विक्षिप्त ३.१९९

स्वतःच्या पोळीवर तूप ओढणें— अतिशय स्वार्थी बनणें.— केसरी ३१-५-३०.

***स्वतः केली तर शेती, नाहीं तर फजिती**— शेती स्वतः केली तरच फायदेशीर होते नाहींतर नुकसानकारक होते.

स्वतः मागितलें तर ताक मिळेना तें निरोपानें दूध येणार आहे !--जेथें स्वतःच्या शब्दाची देखील किंमत नाहीं तेथें परभारे निरोपानें कसचें काम होणार !

स्वतः मेल्यावांचून स्वर्ग दिसत नाहीं—अनुभवाशिवाय शहाणपणा येत नाहीं. ---आपण पहा.

स्वतां स्वतांला साहाय्य करी। ईश्वर त्याला धरी करीं। ---यत्न तों देव जाणावा। God helps those who help themselves.

स्वतः ज्ञान नाहीं व सांगितलेलें ऐकत-ऐकायचें नाहीं--स्वतः बुद्धि नसून जो दुसऱ्याच ऐकत नाहीं त्याचा शेवटीं नाश होतो.

स्वतःचा हेतु साधण्याकरितां दुर्जन मनुष्य शास्त्रांतील आधार घेतो.— मनुष्य आपलें समर्थन करण्यासाठीं सोईस्कर अशीं शास्त्रांतील वचनें आधाराकरितां देतो. तु० – Satan citing the Bible.

स्वतःची मोरी तेथें मुतायची काय चोरी— आपल्या वस्तूचा पाहिजे तसा उपयोग करणें आपल्या स्वाधीनचें असतें. त्यास दुसऱ्याच्या परवानगीची जरूर नाहीं.

स्वतःचें अज्ञान आणि बाबावाक्याचें प्रमाण— स्वतःला कळत नसलें म्हणजे दुसरा म्हणेल तें प्रमाण मानावें लागतें.

स्वतःचे दोष स्वतःला दिसत नाहींत.— मनुष्याला स्वतःच्या चुका कळत नाहींत.

स्वतःच्या पोटासाठीं, खोट्या गोष्टींची हकाटी— स्वार्थासाठीं खोटें बोलण.

स्वतंत्र-- **स्वतंत्र नरक बरा पण परतंत्र मोक्ष कामाचा नाहीं**— स्वातंत्र्यानें कष्टांत राहणें चांगलें पण पारतंत्र्यांत सुखाचें राहणें नको. तु० Better to reign in hell than to serve in heaven.

स्वत्व-- **सत्वनिवृत्ति करणें**-- मालकी हक्क सोडणें.

स्वदेश---**स्वदेशीं चोरी आणि परदेशीं भीकभिक्षा**--एखादी गोष्ट आपली हक्काची असतांना ती घेण्यास चोरी वाटते व दुसऱ्याकडे तीसाठीं भिक्षा मागण्याचा प्रसंग येतो. – स्मृति चित्रें ४. ६७

स्वधर्म---**जो ईश्वरें विहीला : तो स्वधर्मु आपला**---(महानु.) परमेश्वरानें घालून दिलेला धर्म तोच आपला स्वधर्म होय.

स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः ।— आपल्या धर्मांत मरण बरें पण परधर्मांचें नांव नको. श्रेयान् स्वधर्मो विगुणः परधर्मात्स्वनुष्ठितात् । स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः ॥ --गीता ३-३५.

स्वनिष्ठ---**स्वनिष्ठ क्रिये पस्य परनिष्ट क्रिया थोर**---(महानु) स्वतःसाठीं काम करण्यापेक्षां दुसऱ्यासाठीं काम करणें हा थोरपणा होय.

स्वप्न---**स्वप्न नसणें**--आस्तित्व नसणें; स्वप्नांतही न आढळणें.

स्वप्न पाहून जागा होणें—अनुभवावरून शाहणें होणें. २ गोष्ट खरी नसणें

स्वप्नाचें भाकीत सांगणें--स्वप्नाचा अर्थ लावणें.

स्वप्नात ठाऊक नसणें--कधींहि पाहिलेलें नसणें मुळींच ज्ञान नसणें —मो रुक्मिणी १०.

स्वप्नीं नसणें-- अत्यंताभाव असणें; मुळींच नसणें.

स्वप्नीं नेणणें—मुळींच माहीत नसणें.

स्वप्नीं पुऱ्या मांडे खाणें—मनोराज्य करणें.

***स्वप्नांत पाहिलें आणि जागीं झालें**--भास होणें; कल्पना मनांत येणें; मनोराज्य करणें.

स्वप्नांतलें सुख आणि आरशांतलें मुख-- हीं खरीं व टिकाऊ नव्हत.

स्वप्नींची भेट, वायूची मोट—या गोष्टी खऱ्या नव्हेत.

स्वप्नींच्या राज्यदानाला, राजा हरिश्चंद्र सिद्ध झाला-- हरिश्चंद्रानें स्वप्नांत दिलेलें राज्यदानहि प्रत्यक्ष दिलें. इतका तो प्रामाणिक व सत्यवचनी होता.

स्वबालक---**स्वबालकाचें पोषण, नाहीं वाटत कठीण**--मातेला आपल्या अपत्याचें पोषण करणें कठीण वाटत नाहीं.

स्वभाव---**मूळ स्वभाव जाईना**---मूळ पहा.

स्वभाव तशी विद्वत्ता— स्वाभाविक बुद्धि असेल त्या मानानें ज्ञान प्राप्त होतें.

स्वभाव वांकडा, तो नीट न होय बापडा— मूळचा स्वभाव बदलत नाहीं.

स्वाभावानें जो चांगला सदा सुख असे त्याला— ज्याचा स्वभाव चांगला असतो त्याला कोणी शत्रु उत्पन्न होत नाही त्यामुळें तो सुखी होतो.

स्वभावाला औषध नाहीं—स्वभाव कधीं बदलत नाही.

स्वभावो दुरतिक्रम--स्वभावाला औषध नाहीं य स्वभावो हि यस्यास्ति स नित्यं दुरतिक्रमः । श्वा यदि क्रियते राजा तत् किं नाश्नात्युपहम् ॥ –हितोपदेश.

स्वयं---**स्वयं नष्टः परान्नाशयति**--स्वतःचा नाश करून दुसऱ्याचाहि नाश करणारा.

स्वयंपाक--- **स्वयंपाकीण एक, पाहुणे पंचवीस**— करणारा एक व खाणारे पुष्कळ.

स्वर—-स्वर देणें—गाण्याची साथ करणें.

स्वर भजणें, वाहणें—शकुन पहातांना प्रारंभीं कोणत्या नाकपुडींतून स्वर वाहतो हें पहातात. अनुकूल मत, कल असणें.

स्वराज्य—-स्वराज्याचा रुपाया बद्द नाहीं, तो खणखणीत वाजतो—स्वराज्यामध्यें वाटेल त्या गोष्टी करतां येतात.

स्वराज्याची तहान सुराज्यानें भागत नाहीं—स्वातंत्र्याची सर केवळ चांगल्या राज्यव्यवस्थेस येत नाहीं. –टि. ३.१७३.

स्वराज्याची प्राप्ति, हचि खरी सुखोत्पत्ति—स्वातंत्र्य हेंच सर्व सुखाचें साधन आहे.

स्वर्ग—-स्वर्ग ठेंगणा होणें—अतिशय गर्व होणें; कृतकृत्य झालों असें वाटणें. 'इंग्रजांस प्रस्तुत स्वर्ग ठेंगणा झाला आहे.' –रा १'१५७. पुढें पहा.

स्वर्ग दोन बोटें उरणें—गर्वानें फुगून जाणें. 'ह्या वेळेस भाऊसाहेबांना स्वर्ग दोन बोटें उरला होता.'—पामो२०

स्वर्गाची वाट—मृत्युपंथ; मृत्यु.

स्वर्गास पाठविणें—टार मारणें. 'त्या पांचालातें गुरुराज स्वर्गासि पाठवी राजा !'–मो.द्रोण २.३०.

(एखाद्यांत आणि) स्वर्गांत दोन बोटें अंतर उरणें—स्वर्ग दोन बोटें उरणें पहा. 'मी तुम्हाला गेल्या वर्षी भेटलों तेव्हां तुम्हांत आणि स्वर्गांत दोन बोटें अंतर होतें पण आतां एकच राहिल्यासारखें दिसतें.' —विवि.

स्वर्गास हात पोचणें; स्वर्गीं ध्वज लावणें—सर्वांत मोठें असें कार्य हातून होणें; अत्युच्च पद प्राप्त होणें; कृतकृत्य होणें.

*स्वर्गलोकीं वैतरणी आणि मृत्यु लोकीं कुलकर्णी—या दोघांतून पार पडल्याशिवाय इष्ट प्राप्ति होत नाहीं.

स्वर्गा आणि संसारा जायतँ अंतर आसा—(गों.) जमीन अस्मानाचें अंतर.

स्वर्गाला गेला पौर्णिमेला आणि परत आला अमावस्येला—एका ठिकाणीं स्थिर न राहाणारा.

स्वर्गावर स्वारी, मरणाची तयारी—स्वर्गास जाणें म्हणजे मृत्यु पतकरणें होय.

स्वर्गीं गेला कपाळकरंटा, त्याला तेथून मिळाला फांटा—दुर्दैवी मनुष्य कोठेंहि गेला तरी त्याचें दैन्य चुकत नाहीं.

स्वस्त–स्वस्ताचा माल हगवणीला काळ—सवंग सवदा पहा.

स्वस्त्री—स्वस्त्रीसही कार्यापुरतें, पाचारावें–स्पर्शावें निरुतें—स्वतःच्या स्त्रीबरोबर कामापुरताच संबंध ठेवावा. अतिशय सहवास करूं नये.

स्वस्थ—-स्वस्थ आहे आपले मनीं, त्यास निद्रा लागे दिनरजनीं—ज्याला मनःस्वास्थ्य लाभतें त्यास गाढ झोंप येते.

स्वस्थपणें थोडें खाणें, तेंचि अंगीं लागणें—शांतपणें घाई न करतां थोडें अन्न खाल्लें म्हणजे तें नीट पचतें.

स्वस्थे को वा न पंडितः।—सर्व यथास्थित असल्यावर कोणीहि शहाणपणाच्या गोष्टी सांगू शकतो; पण प्रसंगीं सर्वांची कसोटी लागते.–केसरी १६ ८ ४०.
(अ.) मंत्रिणां भिन्नसंधाने। वीराणां शस्त्रवारणे। कार्यें परीक्ष्यते प्रज्ञा। स्वस्थे को वा न पंडितः॥ (आ) मंत्रिणां भिन्नसंधाने। भिषजां सान्निपातिके। कर्मणि व्यज्यते प्रज्ञा। स्वस्थे को वा न पंडितः॥–सुर १६४.५०७.पंच.१.१४३.

स्वहित—-स्वहितावर पाणी सोडणें—स्वार्थाचा त्याग करणें. 'सोडील स्वहितीं पाणी=यापुढें।'—वि. क ८.

स्वातंत्र्य—स्वातंत्र्याची तळमळ आणि ओल्याची खळखळ, कधींहि थांबत नाहीं—परतंत्र मनुष्यानें स्वातंत्र्यार्थ सारखी धडपड केली पाहिजे.

स्वातंत्र्याचें निंद्य कार्य बरें, परि नको पारतंत्र्याचें वारें—स्वातंत्र्यांत नीच काम करावें लागलें तरी हरकत नाहीं पण पारतंत्र्य नको.

स्वाधीन—-स्वाधीन आलें तें आपलें झालें—आपल्या हातांत असेल तेंच आपलें.

स्वारी—-स्वारी करणें—हल्ला चढविणें.

स्वारी शिकारी—१ लढाया, मोहिमा इ. २ लवाजमा; मिरवणूक.

*स्वारीची तयारी न मशालजीचा धातवार—राजा पहा.

स्वार्थ---स्वार्थत्यागी देशसेवा, तात्काल नेते वैभवा--स्वार्थत्यागपूर्वक देशसेवा केल्यास मोठेपणा प्राप्त झाल्याशिवाय राहात नाहीं.

स्वार्थाक दोळे ना—(गो.) स्वार्थ हा अंधळा असतो, त्याला दुसऱ्याची हानि दिसत नाहीं.

स्वार्थाचा ओढा : तोचि नरकाचा खोडा :--(महानु.) स्वार्थाकडे दृष्टि असली म्हणजे मनुष्याला नरकच मिळणार.

गुंतला स्वार्था : चुकला परमार्था :--(महानु.) स्वार्थ साधण्यास जो पाहातो त्याला परमार्थ मिळत नसतो.

स्वार्था मुखारि परमार्थ खंचो ?—(गो.) स्वार्थापुढें परमार्थ कुठला ?

र्थासाठीं : ज्ञान वाटीः—(महानु) स्वार्थासाठीं तरी ज्ञान दान करावें. दुसऱ्याला ज्ञानी करण्यांत आपलाच फायदा असतो.

स्वार्थी धर्मासाठीं : लाभु ठेवी पोटीं :--(महानु) स्वार्थी माणसाचा धर्म लोभमूलक असतो.

स्वावलंबन---स्वावलंबनासारखा कायदेशीरपणा नाहीं व मनगटासारखा राजदंड सुद्धां नाहीं—स्वतःस आपल्या मताप्रमाणें वागण्यास मोकळीक असावी व स्वतःच्या अंगीं सामर्थ्य असावें; म्हणजे सर्व गोष्टी साध्य होतात.

स्वाहा---स्वाहा करणें— १ अग्नीमध्यें आहुति देतांना देवतेचें नांव घेऊन तिला ‘ स्वाहा ’ असा मंत्र म्हणतात. यावरून भक्ष्यस्थानीं योजणें; खाऊन टाकणें; गट्ट करणें; गिळकृंत करणें. २ अपहार करणें.

ह

हक-क---हक करणें--देहांत शिक्षा करणें. मदरु १-१६.

हक न हक; हक ना हक; हकनाक— १ न्यायानें किंवा अन्यायानें; विशेषतः अन्यायानें. २ सकारण वा अकारण. ३ नाहक; विनाकारण. ‘ आज दीड महिना हक नाहक फिरतो.’—चंद्रचूडदप्तर १.१३७. ‘ वेधिलें चित्त हकनाक उशीर लाविला। ’—प्रला १३१.

हक हरामाचा-हलालाचा— वाजवी व न्याय्य, बरोबर, कायदेशीर,

हक हिशेबाचा—निर्विवाद हकाचा.

हक-क होणें— मरणें. ‘नजबखानास राजयक्ष्मा रोग होऊन हक जाला.’—मद बा. १.११८

हकाटकांत-हकाटकांत-हकाटकास येणें— १ तावडींत सांपडणें; ताब्यांत येणें. २ मर्जीस येणें; संमत असणें. ३ आंकड्यांत, हिशेबांत बसणें.

हकाटकांत आटपणें-उरकणें-जाणें-गुजरणें-मरणें—ऐन उमेदींत, भर तारुण्यांत मरणें.

हका हरामाचा— १ भल्याबुऱ्या मार्गानें; न्याय्य अन्याय्य रीतीनें मिळविलेला. २ अप्रामाणिक; लबाडीचा.

हकाचे दाणे—खळ्यावर मळणी झाल्यावर मोतेरें व कांहीं दाणें महारास हक म्हणून द्यावयाचे असतात ते.

हककर, हलालकर, दिनमें सोबार कर—चांगली गोष्ट वाटेल तेव्हां करावी.

हक कहनेसे अहमक बेजार—खरें बोलणाऱ्याचा मूर्खांना राग येतो.

हक न पावे इनाम—हकाचें मिळत नाहीं तर इनाम कोठलें ?

हगणें —हगरा फोडणें—रेंच मोडणें पहा. ‘आपलें पुंण्यें प्रतापें त्यांचा हागरा मोडिला’ ---पेंद १२·४५.

हगलें मुतलें—१ (ल)बारीक सारीक गोष्ट,क्षुद्र चुका वगैरे. २ खासगी गोष्ट. ३ गुवेलें; घाणीनें बरबटलेलें.

हगीर मुतीर--(ल.) घाबरलेला; गोंधळलेला; दुःख भीति इ. मुळें देहभान सुटलेला.

हग्या मार—अतिशय जोराचा मार. ‘त्यांच्या आजूबाजूस दुसऱ्या शिपायांचा मोठा घोळका होता तो तर गोळ्यांच्या हग्यामारानें कढ आलेल्या पाण्यावरच्या बुडबुड्याप्रमाणें थै थै नाचूं लागला.’—पामो ४८०.

***हग ओक आणि स्वर्ग लोक**—हग ओक लागली की मृत्युपंथास लागला असें समजावें. पटकीनें मनुष्य बहुधा तावडतोब मरतो.

हगल्यानें लाजावें कीं बघत्यानें लाजावें—जो दुष्कृत्य अथवा घाणेरडी गोष्ट करतो त्यास वास्तविक त्या गोष्टीची लाज वाटावयास पाहिजे; परंतु प्रत्यक्ष पाहतां त्यास त्याचें कांहींच वाटत नसून बघणारासच लाज वाटावी हें आश्चर्य होय. कांहीं लोक निर्लज्जपणें दुष्कृत्यें करीत असतात व तीं पाहून इतरांस मात्र घृणा उत्पन्न होते. (गो.) हागतल्याक न जाल्यार पळैतल्याक तरी लाज असूक जाय.

हगलें ना (नाहीं) पोट गेलें एकच—एकच गोष्ट दाखविण्याकरितां कोणताहि शब्द योजला तरी अर्थ एकच होतो.

हगलेलें घाणल्याशिवाय राहात नाहीं—दुष्कृत्य उघडकीस आल्याशिवाय राहात नाहीं.

हगल्यापाशीं बसावें हाणल्यापाशीं बसूं नये—अपकृत्य निस्तरावें पण अपकर्त्याशीं स्नेह करू नये.

हगल्यापेक्षां निपटणें बरें—स्वतः घाणेरडें कृत्य करण्यापेक्षां दुसऱ्यानें केलेलें निस्तरणें अधिक चांगलें.

हगायला गेला, तिकडे गांड विसरला; हगूंक जाऊन गांड विसरणें—एखादी गोष्ट करावयाचें पतकरून त्यांतील मुख्य साधनाचीच दाद नसणें.

हागूंक गेल्यारि मूतुंक विसरता—(गो.) शौचाला गेल्यावर लघुशंका करायची विसरतो. बांदरट माणूस.

हागून आलें अन् तुरी शिजल्या का ? ; हागून आलों तरी तुरी शिजल्या नाहींत ?—उतावीळपणा. तुरी शिजण्यास फार वेळ लागतो.

हगे तो तगे—ज्याला शौचाला नीट होतें आहे, ज्याच्या शौचाची कांहीं तक्रार नाहीं तो धडधाकट असतो.

हगवण—हगवणीं बायको, नागवणीं सोयरा; हगवणीला जायको, नागवणीला सोयरा—हगवणी सारखें दुखणें झालें असतां स्वतःची स्त्रीच शुश्रूषा करण्यास उपयोगी पडते व जवळ कांहीं नाहींसें झाल्यास आप्तच वेळेवर उपयोगी पडतात.—मांगा २२५.

आपण हागेः शिव्या देऊं लागेः—(महानु.) आपण वाईट कृत्य करून दुसऱ्याला दोष द्यावयाचा.

हगवणीची गांड, तंबाकूचें तोंड— सारखें चालू राहावयाचें.

फुकाची भाजी, हगवणीस काळ— सवंग पहा, स्वस्त पहा.

हंगे—हंगे तंगे (म्हणतां)— १ टाळाटाळीनें; २ हां हां म्हणतां; एकदम.

हजर; हजीर; हाजीर—हाजीर जबाब—त्वरित उत्तर; समयसूचक उत्तर.

हजेरीची फौज—नेहमींचें खडें सैन्य.

हजेरी घेणें—१ उपस्थितीची, हजर असल्याबद्दलची नोंद करणें. २ (ल.) जाब विचारणें; खुलासा मागणें; खरडपट्टी काढणें. 'तुमच्या पतिराजांनीं ज्या तऱ्हेनें तुमची हजेरी घेतली तसं त्यांनीं करायला नको होतं !'—सकाळ-सुधा मावशी.

***हजीर तो वजीर**—जो वेळेवर जाग्यावर उपस्थित असतो त्याचें कार्य साधतें. मागाहून आल्यास कार्य होत नसतें.

हाजीर सो वजीर, गैरहाजीर सो गधा—मोगलांचे कारकिर्दीत बादशहाच्या सन्निध असणाराला खूप फायदा करून घेतां येई. त्याला प्रधानपदहि मिळे पण दूर मुलखावर असलेला मात्र गाढव ठरत असे. तो प्रधानपदाला नालायक ठरे. कारण जवळचे लोक त्याची नालस्ती करण्यास मागेंपुढें पाहात नसत. जो वेळेवर हजर असेल त्याला लाभ होईल नि वेळेवर नसणारांना कांहींच मिळावयाचें नाहीं हा भावार्थ.

हजरका बेटा, गैरहजरका कुत्ता—वक्तशीर हजर असेल तर तो लाभाला अधिकारी होतो पण गैरहजर असेल तर लाभाला मुकतो. तु०-हजीर तो वजीर.

हजरकू हुजत नहीं—डोळ्यानें दिसणाऱ्या गोष्टीला साक्ष नसते.

हजाम—एक निजाम, सब हजाम— निजाम पहा.

हजार—हजार पांचशें पाऊस पडणें—शितोडे येणें; उगाच निमित्ताला पावसाचे थेंब येणें.

***हजार आफत है, एक दिल लगानेमें**—प्रेमांत अनेक विघ्नें येतात.

हजार नियामत और एक तनदुरस्ती—एक आरोग्य हें हजार सुखाच्या बरोबर आहे.

हजार बका (आणि) एक लिखा---हजार तोंडी सांगितलेल्या गोष्टींपेक्षां एक लिहिलेली गोष्ट (लेखी दस्त ऐवज) अधिक महत्त्वाची असते. एक लिखा और सौ बका पहा.

हजार बोडक्या, एक केसकरीण---१ विधवा स्त्रिया अनेक असल्या तरी त्यांस एका सौभाग्यवती स्त्रीची बरोबरी करतां यावयाची नाहीं; २ अनेक निराधारांमध्यें एखादीच समर्थ व्यक्ति. केस पहा.

हजार वळसे आणि एक गांठ---दोरीचे हजार वेढे देण्यापेक्षां एक गांठ मारणें अधिक पक्कें असतें. बारीक-सारीक शंभर गोष्टींपेक्षां एक उत्तम गोष्ट अधिक महत्त्वाची होय. 'पण करायच्या आहेत काय त्या बाराशें भानगडी घेऊन ? हजार वळसे अन् एकच गांठ.' - दार्जी, भा. १ पा. २३२.

हजाराचा बसे घरीं, दमडीचा येराझारा घाली-उठबैस करी---मोठ्यांची हालचाल कांहींच नसतां लहान सान माणसांची मात्र उगाच धांवपळ. जेव्हां हलक्या लोकांच्या हातीं कार्याचीं सूत्रें येतात तेव्हां म्हणतात.

हट-ट्ट---**हट्ट जिरणें**---समजूत पडणें; वळणें.

हटाचे हातीं देणें---हट्टास पेटणें; हट्ट चालविणें. 'दोहींतून एक मनीं धरून मान्य करणें. हटाचे हाती न देणें'---श्रीशिवछत्रपतिमहाराज चरित्र १४४; इं. सं. तंजावर घराणें ३६;-पत्रसारसंग्रह २३३२.

हट्टास पेटणें---आग्रह धरून बसणें; जिद्दीस येणें.

हट---**हटास ओघळ जाणें**--[हट=बाजार] रेल-चेल होणें.

*__हट गोड आहे पण हात गोड नाहीं__---बाजारांतला माल चांगला आहे पण स्वयंपाकीण सुग्रण नाहीं. दोन्ही चांगले असतील तरच पाकनिष्पत्ति चांगली होणार.

हटांत तुरी, भट भटणीला मारी---बाजारांत तुरी पहा.

हटीं जेवण, मठीं निद्रा---खाणावळींत जेवून धर्म-शाळेंत निजणें. कोठें आधार नाहीं असा मनुष्य.

हटाऊ---**हटाऊ गुरु आणि शिटाऊ चेला**-गुरु आणि शिष्य एकाच तऱ्हेचे म्हणजे ढपरी, लबाड. शिटाऊ पहा.

हडकणें---**हडकती सासू, ना धडकता भावा**---कोणीतरी धाकांत ठेवणारी वरचढ व्यक्ति पाहिजे. अडपणें पहा.

हडपणें---**हडपला अग्नी आणि बळाची प्रीती, हे क्वचित् फार वेळ टिकती**---केवळ पंख्यानें वारा घालून जागृत केलेला विस्तव आणि बळेंच करायास लावलेलें प्रेम हीं फार वेळ टिकत नाहींत. उसन्या गोष्टी फार काळ लाभत नसतात.

हडसणें---**हडसून खडसून**---१ जोरानें ओढून. २ ठोकून. ३ निक्षून; बजावून. ४ उघडपणें; राजरोस. ५ रोख ठोक; स्पष्टपणें. ६ हमखास.

हडळ---**हडळीला नाहीं नवरा आणि खवि-साला नाहीं बायको**---जशास तसें. म्हसोबा सटवाई पहा.

हंडा---**हंडापळी**---(ल.) विजोड दांपत्य; नव-ऱ्यापेक्षां नवरी मोठी. वरणभात पहा.

हंड्यांतील एक शीत पहावें---स्थाली पुलाक न्याय. शीतावरून भाताची परीक्षा.

*__हंडाभर दुधांत चिमूटभर मीठ__---पुष्कळ चांगल्या गोष्टींत एक वाईट गोष्ट सर्वांची घाण करते.

हडावणें---**हडावणें बडावणें**---घुडकावणें.

हंडी---**हंडीं मडकीं**---(सामा.) स्वयंपाकाचीं भांडीं, भांडींकुंडीं, सामान, इ.

हंडीवर हंडी फुटणें---नुकसान होणें.-विवि ८-८-१४७.

हंडीशीं हंडी फुटणें--- खचाखेच होणें; फार दाटी असणें.

एक हंडी उतरविणें आणि दुसरी हंडी चढ-विणें--- एकास खालीं आणून दुसऱ्यास वैभवास चढ-विणें. 'महाराजांची हांडी उतरावी, आणि आपली हांडी चढवावी.'-भाब ७.

*__हंडींत असलं म्हणजे लांडीला झोंप नाहीं__---(ठाकरी.) कणग्यांत धान्य आहे तोंपर्यंत ठाकरांच्या बायका वाटेल तसा खर्च करतात.

हंडींत शीत असलें म्हणजे लांडीला झोंप कशाला येते---वर प्रमाणेंच. जवळ थोडें फार असेल

तें खाऊन फन्ना केल्याशिवाय उतावळ्या माणसास चैन पडत नाहीं. तु०--काग म्हारणी उताणी शिंग भरलं दाण्यांनीं.

हंडीबाग---हंडीबाग होऊन ढोल कुटण्यास तयार होणें—दुसऱ्याच्या तंत्रानें बोलूं लागणें. –विक्षिप्त ३.५०.

हड्डी---हड्डी नरम करणें--बेदम मारणें.

हडुं---हडुयांत-कलकलणें--(गो.) छाती धडधडणें.

हड्या व्रण---हड्याव्रण (वर्ण) आणि गजकर्ण—हे दोन्ही रोग सारखेच वाईट व लवकर न बरे होणारे आहेत. त्याप्रमाणें दोन सारख्याच वाईट माणसांबद्दल योजतात.

हणगोबा---हणगोबा करणें— १ चढविणें; बळेंच घोड्यावर बसविणें. २ ऐदी आळशी बनविणें. ३ परदेशीं गेलेला माणूस येणार न येणार, याचें भाकीत पाहण्यासाठीं शेणाची प्रतिमा करणें.

मारून मुटकुन-कुटुन हणगोबा करणें---बळेंच काम करून घेणें.

हणमंत--हनुमंत पहा.

हणमंताचें शेंपूट—मारुतीचें शेंपूट पहा. लांबलचक गोष्ट; चिकट, न संपणारें, वाढत जाणारें त्रासदायक काम.

***गांव जळला तरी हणमंत बाहेर**—गांव पहा.

हताळणें---हतळा हतळीचा प्रकार—चोरी मारी; लांबवा लांबव. 'रावबाजींच्या कारकीर्दीतला हतळा-हतळीचा प्रकार.'–V. S. २.६९.

हत्त---हत्ता कट्टीक कण्णटी जायचो? हात फोडाक हारसो जाय व्हय?---(गो.) हातावरचा फोड पहावयास आरशाची काय जरूरी? समक्ष घडलेल्या गोष्टीबद्दल साक्षी पुराव्याची जरुरी काय? तु०–हातच्या कांकणाला आरसा नको.

हत्ती--पडेल हत्ती तर पाडील भिंती—[हत्ती –हस्त नक्षत्र] हस्त नक्षत्राचा पाऊस चांगला पडला तर घरांच्या भिंती पडण्याचा संभव असतो.

हत्ती लोळे, पाऊस गळे--हस्त नक्षत्राचा पाऊस फार जोराचा असतो.

हत्तीची उगवणी व मृगाची लावणी--मृग-नक्षत्र लागलें असतां लावणी केली म्हणजे हस्त नक्षत्रांत कापणी करण्याची वेळ येते.

हत्तीचें उथाण—हस्त नक्षत्राच्या वेळचा उकाडा.

हत्ती---हत्ती दारांत झुलणें—मोठ्या राजेरजवाड्यांजवळच हत्ती असतात, यावरून अत्यंत श्रीमंती असणें; गजांतलक्ष्मी प्राप्त होणें.

हत्तीचा अंकुश—चोपून काम करून घेणारा. मोठ्या मनुष्यासहि आपल्या जरबेंत वागवणारा.

हत्तीचा पाय—ज्याच्या औदार्यानें ऐश्वर्यानें लोकांचा संसार चालतो असा मनुष्य; अनेकांना पोटाला लावणारें काम, धंदा इ.

हत्तीचें कातडें—मन थोडें कठीण निगरगट्ट करणें. जास्त निगरगट्ट म्हणजे 'गेंड्याचें कातडें' असाहि वाक्प्रचार आहे. 'कोणाची खोडी आपण होऊन न काढण्याची बुद्धि ठेवावी, पण आपण स्वतः असें वागत असल्यावरहि जर विनाकारण दुसऱ्यानें गैरसमज करून घेतला तर मग खुशाल मन निगरगट्ट करावें. जगाशीं वागतांना अगदीं गेंड्याचें नसलें तरी हत्तीचें कातडें थोडेसें पांघरून वागावें.'–न. चिं. केळकर, वाङ्मयशोभा सप्टेंबर १९४१.

हत्तीचें मढें-प्रेत--१ अवाढव्य, न पेलणारें काम. २ फार कंटाळवाणें, त्रासदायक काम.

हत्तीच्या गंडस्थळीं बसणें---थोर वैभवास चढणें.

हत्तीच्या दांतासारखे दांत असणें—हत्तीला दाखवावयाचे व खावयाचे असे दोन प्रकारचे दांत असतात. वर्तन दुटप्पी असणें.

हत्तीच्या पायानें जाणें-येणें---ह्याच्या उलट मुंगीच्या पायानें जाणें. एकदम जोरानें जाणें, येणें. रोग, दुखणें हत्तीच्या पायांनीं येतें व मुंगीच्या पायांनीं जातें, असें म्हणतात.

हत्तीच्या पायीं देणें—हत्तीनें तुडवून ठार मारण्यासाठीं त्याच्या पायाशीं ठेवणें, बांधणें. एक शिक्षेचा प्रकार. 'मीच तुला हत्तीच्या पायीं देतों.'--इंप ११२.

हत्तीवर बसणें—मदांध होणें; चढून जाणें.

हत्तीशीं गाडा खेळूं नये—(ऐति. म्हण)–इब २८,

हत्ती बरोबर फार सलगी करूं नये, त्याची चेष्टा करूं नये, ती अंगाशीं येते.

हत्तीशीं टक्कर घेऊं नये--बलिष्ठाशीं वैर करूं नये.

हत्तीसारखें वतन--गडगंज संपत्ति; अलोट वैभव.

***हत्ती गटगट,मुंगीला कटकट**—जाईल तेथें हत्ती, नाहीं तेथें कांहीं नाहीं याप्रमाणें. निरर्थक असे मोठाले खर्च मनुष्य करतो, पण लहान खर्च करण्यासाठीं वाद्यंग घालित बसतो. यांत मनुष्याचा अप्रयोजकपणा दर्शविला जातो. –केसरी ११–५–२६. तु०–उंट रिचवला पण मुंगीला दचकला.

हाती गुढरीला नीका : जोगी मुंडिला नीका :—(महानु.) हत्ती जसा फुकट शृंगारला जातो तसा जोगी फुकट मुंडला जातो. त्याला खरी विरक्ति लाभलेली नसते.

हत्ती गेला शेंपूट उरलें; हत्ती गेला आणि शेंपूट अडकलें; हत्ती गेला आणि शेंपटाशीं अडकला—एखादें कार्य बरेंचसें होऊन थोडक्याकरितां अडून पडणें; महत्त्वाचा भाग संपून थोडासाच उरणें व तो बांध्यांत पडणें. पुढें पहा.

हत्ती गेला आणि शेंपटाला कोण रुसतो—मोठी गोष्ट, खर्च झाल्यावर उरलेल्या लहानासाठीं कोण खटखट करतो ? तु०– विक्रीते करिणि किमङ्कुशे विवादः ।

हत्ती चालतो आणि कुत्रें भुंकतें-भुंकतात--'हाथी चाल चलत गति अपनी, कुतर भुकत वाकु भुकवा दे।'—कबीर. थोर पुरुष आपल्या मार्गानें चालून आपलें कार्य करीत असतात; दुर्जन लोक त्यांची निंदा करीत असतात तिकडे ते लक्ष्य देत नाहींत व त्या हलक्या लोकांच्या विरोधाचा कांहीं परिणामहि होत नाहीं. (गो.) हस्ति वत्तालि, व सुणें भोंकतालें.

हती पादता (पाता) हती पादता (पाता) फुस्स—(गो.) हत्तीसारखा मोठा प्राणि ज्यावेळीं पादतो त्या वेळीं लोकांची कल्पना असते कीं, त्याचा आवाजाहे फार मोठा होईल. पण तसें कांहींच होत नाहीं. मोठ मोठया गोष्टींबद्दलच्या अपेक्षा शेवटीं फोल ठरतात. तुलनाः– भ्रमाचा भोपळा फुटणें. डोंगर व्याला उंदीर झाला.

हत्ती पोसवतो पण मुलगी-लेक-माहेरवाशीण नाहीं पोसवत--मुलीचें, विशेषतः वयांत आलेल्या, पालनपोषण करणें हें हत्ती सांभाळण्यापेक्षां अवघड काम आहे. मुलीची सासरीं रवानगी कधीं होईल याची चिंता यामुळेंच आईबाप करीत असतात.--छच ८८. "मुलीचे बापभाऊ एकदां लग्न लावून देऊन टाकून टाकलेली ही ब्याद पुन्हां जन्मभर विनाकारण गळ्यांत घेण्यास तयार नसतात. 'हत्ती पोसवतो पण लेक पोसवत नाहीं' अशी म्हणच पडली आहे."–कमलाबाई टिळक कृत स्त्री–जीवनविषयक कांहीं प्रश्न ६७.

हत्ती पोसवेल पण बायको पोसवत नाहीं— वरप्रमाणेंच, पण मुलीबद्दल बायकोची जबाबदारी हींत आहे.

हत्ती बुडतो अन् शेळी ठाव मागते—हत्ती बुडण्याइतकें पाणी असलें म्हणजे शेळी बुडणारच. तिनें पाणी किती खोल आहे यांची चौकशी करणें व्यर्थ आहे. पण असें असून मूर्खपणाचें आचरण करणें.

हत्ती फिरवा गांवोगांव, ज्याचा हत्ती त्याचें नांव— ज्याची सत्ता त्याची मत्ता.

हत्ती भागलो ह्मोण घोड्या ऽ घोडवळींत राबाना (गो.); हत्ती रोडला तरी घोडवळींत राहात नाहीं—थोर मनुष्य कितीहि खालावला तरी तो नीच मनुष्या इतका खालीं जात नाहीं. कितीहि गरिबी आली तरी मूळचा मोठेपणाचा अंश राहातोच.

हत्ती वाळला म्हणून त्यास गोठ्यांत बांधू नये–एकाद्या थोर व्यक्तीस वाईट दिवस येऊन तिचें महत्त्व कमी झालें तरी तिला कःपदार्थ मानणें योग्य नव्हे.–सह्याद्रीच्या पायथ्याशीं ३१५. वर पहा.

हथी हजार दुबले तनका, तोभी सव्वा लाख टकेका--हत्ती कितीहि दुबळा झाला तरी त्याची किंमत सवा लाख रुपये असते.

हत्ती होऊन लांकडें खाणें, मुंगी होऊन साखर खाणें--गर्वानें आपदा येते तर नम्रतेनें सुख लाभतें.

हत्तीचा झाला सवदा आणि अंकुशाचा पडला वांधा—मोठें काम होऊन जाऊन क्षुल्लक कारणासाठीं मतभेद होणें. अंकुश पहा. तु०–विक्रीते करिणि किमङ्कुशे विवादः।

हत्तीचें ओझें, हत्तीनें उचलावें—थोर लोकांचीं कामें थोर लोकच करू जाणें. इतरांस तीं झेंपत नाहींत.

हत्तीचे दांत खायाचे वेगळे व दाखवावयाचे वेगळे--दुटप्पी वर्तन. खायाचे दांत निराळे. खाणें पहा. (गु.) हाथीना दांत चाववाना जुदा, जे देखाडवाना जुदा.

हत्तीचे दांत, नाहीं मागें जात—ज्याप्रमाणें हत्तीचे दांत एकदां बाहेर पडले म्हणजे ते परत आंत जात नाहींत त्याप्रमाणें थोर मनुष्यानें एकदां शब्द उच्चारला म्हणजे तो परत घेत नाहीं.

हत्तीचे हत्ती मेले बुडान, गाढव इचारतात पाणी किती म्हणून—(कों.) जेथें मोठमोठ्यांची डाळ शिजत नाहीं तेथें एखाद्या क्षुद्र मनुष्यानें लुडबुड करण्यास जाणें. हत्ती बुडतो अन शेळी ठाव मागते, पहा.

हत्तीच्या आहारांत लाखों मुंग्यांचा आहार चालतो--थोरांच्या खर्चांत अनेक गरीबांचा समावेश होणें.

हत्तीच्या दाढेमध्यें मिऱ्याचा दाणा—दर्यामें खसखस.

हत्तीच्या पायांत-पावलांत सर्वांचे पाय-पावलें; हत्तीच्या पायांत सगळ्यांचे पाय येतात; हत्तीच्या पायांत सर्व जनावरांचे पाय--मुख्य व्यक्तीमध्यें सर्व आश्रित, दुय्यम व्यक्तींचा समावेश होतो.-गांगा १८१. सर्वं पदं हस्तिपदे निमग्नम्। (गो.) हस्ते पादु. (गु.) हाथीना पगमां सौनो पग आवी जाय.

हत्तीच्या पायीं येतें, मुंगीच्या पायीं जातें--एखादें दुखणें वगैरे एकदम मोठ्या जोरानें येतें पण बरें होतें तेव्हां फार सावकाशपणें बरें होतें. तु०—Misfortunes come on wings and depart on foot.

हत्तीबरोबर बैलाचें वारगोळें—[वारगोळें= सर्कत; इरजिक] सबलाबरोबर दुर्बलाची सांगड घातल्यास दुर्बलाची प्राणांतिक अवस्था होते.

हत्तीला अंकुश केवढा असतो-पाहिजे—अंकुश पहा.

हत्तीला अंकुश आणि घोड्याला चाबूक—असल्याशिवाय काम होत नाहीं.

हत्तीला ओढाळ कुणीं म्हणावें--हत्तीपेक्षां वरचढ प्राण्यासच हत्तीस नांवें ठेवतां येतील.

हत्तीला रोडगा आणि गुराला कडबा--जशी ज्याची योग्यता असते तशी त्याची संभावना होते.

हत्तीला सुपाचें ओझें--हत्ती किती तरी ओझें वाहून नेतो तेव्हां त्याला सुपाचें ओझें मुळींच वाटत नाहीं. तु०—भरल्या गाड्याला सूप जड नाहीं. 'या नव्या वाढीमुळें पगाराच्या व भत्त्याच्या रूपानें ४॥ लाखांचा बोजा खजिन्यावर पडेल. पण महायुद्धाच्या प्रचंड खर्चांत ही भर म्हणजे हत्तीला सुपाचें ओझें.'—के २५-७-१९४१.

हत्तीला हमालाची जरूर लागत नाहीं--हत्ती आपली सोंड, पाय इ. आपणच उचलूं शकतो. तु०—म्हशीचीं शिंगें म्हशीला जड नाहींत.

हत्तीवर अंबारी, धनी कर्जबाजारी--मालकाची दैन्यावस्था असून त्यानें किंवा आश्रितांनीं तोरा मिरविणें.

हत्तीशीं टक्कर घेऊं नये; हत्तीशीं वारगोळें करूं नये—मोठ्याशीं सांगड घालून घेऊं नये. वर पहा.

हस्ते पोट्टांतु गाडुव--(गो.) हत्तीच्या पोटांत गाढव सहज मावूं शकतें. मोठ्यांत धाकट्याचा सहज समावेश होतो.

हस्ते रूपानें पालो खावच्याकइ मुयेरूपानें साकर खांवची बरी--(गो.) हत्ती होऊन पाला खाण्यापेक्षां मुंगी होऊन साखर खाणें चांगलें. तु०—लहानपण देगा देवा। मुंगी साखरेचा रवा॥—तुकाराम.

हस्तेरि बसतल्यानें हस्तेरि बसका, गाडवारि बसतल्यानें गाडवारि बसका—(गो.) माहुतानें हत्तीवर आणि वडाऱ्यानें गाढवावर बसावें. त्यांनीं आपलें स्थान बदललें कीं फजीती. जो तो आपापल्या जागीं बरा.

हस्तेरि बसल्यारि रायु न्हयिं, पायानें चमकल्यारि गरीब न्हयिं—(गो.) हत्तीवर बसला म्हणून राजा होत नाहीं आणि पायीं चालला म्हणून गरीब ठरत नाहीं.

हत्याण---**हत्याण करणें; हत्याणास येणें**--जनावरानें माजास येणें; संभोगेच्छा दर्शविणें.

हत्यार---**हत्यार करणें**—घाव घालणें; मारणें. 'तूं लेंकरूं आहेस तुजवर आधीं हत्यार करावें हा धर्म नाहीं. तूं आधीं हत्यार कर अथवा निघोन जा.'—दामाडे हकीकत १० (कासं.)

एखाद्यावर हत्यार धरणें—त्याला मारूं इच्छिणें, त्याचा छळ करणें.

हत्यारें खालीं ठेवणें---शत्रु शरण आल्यावर त्याची

हत्यारें काढून घेतात. यावरून शरण जाणें. ‘इंग्रजांनीं हत्यारें खालीं ठेवलीं व पराजय कबूल केला.’ इंप १२१.

सोयऱ्यांत साडू, भोजनांत लाडू आणि हत्यारांत माडू—भोजन, साडू, सोयरा पहा.–कोकि. ८०.

हद—हद न चुके सो नगर फिरे—जो सरळ मार्गानें जातो त्याला कोठेंहि अडथळा येत नाहीं व तो गांवभर फिरला तरी वाट चुकत नाहीं.

हदाल—हदाल पार्वती-पारोती— अतिशय स्थूल, फोपशी बाई; फातिमा.

हनुमंत-मान—हणमंत पहा.

***गांव जळाला हनुमंत निराळा**—गांव पहा.

सूर्यापुढें दिवटी, हनुमंतापुढें कोल्हाटी—सूर्य पहा.

हनोज—हनोज देहली दूर आस्त—(फा.) अत्यंत मोठें कार्य हातीं घेणें आणि यश दूर असणें. देहली पहा.

हपाप—हपापाचा माल गपापा—दुसऱ्याचें आपण बळकावलेलें तिसराच आपणाकडून हिसकावून घेऊन जातो. अन्यायानें मिळविलेली वस्तु टिकत नाहीं, जशी येते तशी जाते.

हबेलंडी—हबेलंडी उडणें—त्रेधा होणें; तिरपीट उडणें. “‘आम्ही यंव केलें, त्यंव केलें, मराठ्यांची अशी हबेलंडी उडविली’ वगैरे खोट्यानाट्या गप्पा सांगून खानानें त्यांस चार शिव्याही हांसडल्या.”–बाजीराव.

हबेलंडी उडविणें—दुर्दशा, दाणादाण करणें. ‘दुराणी फौजेच्या तोंडावर तोफांची सरबत्ती करून भडभुंजे लाह्या भाजतात तशी तिची त्यानें हबेलंडी उडविली.’–पामो ५३५. [हबेलंडी=हल+बे+लंडी किंवा हा! बे लवंडी किंवा लंडी, म्हणजे अरे बायल्या! ठीक आहे!]

हम—हम करेसो कायदा—मी करीन तो कायदा. म्हणजे मन मानेल तसें वागणें; जुलमी, अरेरावी वर्तन. “साम्राज्यसत्तेविरुद्ध संस्थानिक काय करूं शकणार? शेवटीं ‘हम करेसो कायदा’ च बलिष्ठ ठरला.”–केसरी १२–९–४१.

हमरीतुमरी करणें; हमरीतुमरीवर येणें—एकेरीवर, वर्दळीवर येणें; जोरानें भांडू लागणें. ‘आपलें कार्य जर साधून घ्यावयाचें असेल तर त्या कार्यसाधकाशीं सलोख्यानें वागणें यांत शहाणपणा आहे कीं त्याशीं नेहमीं हमरीतुमरी करणें हा शहाणपणाचा मार्ग आहे?’–नि.

हमराह—हमराह करणें—गोळा करणें. ‘फौज हमराह करून सुभापातशाई याजवर आणून घालावे.’–होकै७.

हमाल—काळा हमाल, गोरा ढमाल—काळा पहा.

हयगय—हयगीनें काम ठेविलें, तें समजा व्यर्थ गेलें—एखाद्या गोष्टीकडे दुर्लक्ष केलें असतां ती बिघडून जाते.

हयात—हयात मुलाकात-मुलाखत—(पत्रव्यवहारांत) तुम्ही आम्ही जगून भेट होणें; जिवंत भेट.

हयातीचा दम असला तर—वरील प्रमाणेंच. तुम्ही आम्ही जगलों वांचलों तर.

हयातीची घागर अन् ज्ञानाचा सागर—शास्त्रें थोर अपार असून जीवित अत्यल्प आहे.–पाआमा. Life is short, art is long.

हर—हर म्हळयार बर—(गो.) करावयास सांगितलें एक आणि करतो दुसरेंच.

हर—हरहर हिंदुर्न यवनः—(प्र.) शिव शिव न हिंदु० धड ही बाजू नाहीं कीं ती नाहीं. शिव पहा. “जोंवर स्त्री ही स्वतंत्रपणें अर्थोत्पादन करण्यास समर्थ नाहीं किंवा जोंवर कायदेशीर रीत्या पित्याच्या व इतर मालमत्तेवर तिचा वारसा हक्क पोंचत नाहीं, तोंवर विवाह विच्छेदासारख्या सुधारणांनीं हिंदु स्त्रीचें दैन्य दूर न होतां उलट तिची ‘हरहर न हिंदुर्न यवनः’ अशी स्थिति होईल.”–कमलाबाई टिळक, स्त्री-जीवनविषयक कांहीं प्रश्न ७६.

हरहर महादेव!—ही मराठ्यांची रणगर्जना असे, पण आज भोजनाची पंगत जेवणास आरंभ करतांना हा उद्गार काढते! ‘पार्वतीपते हरहर महादेव!’ असा सबंध पाठ आहे. २ (ल.) नायनाट, सत्यानास.

हरहर म्हणटले जायते जाण आसात, खणिक उडी मारतलो कोण आसा! हरहर म्हणपी जायते असत पण खणींत उडी एकल्यानच मारूक जाय—(गो.) शब्दशूर पुष्कळ असतात पण

वेळ आली असतां जिवावर उदार होऊन संकटांत उडी घेणारा माणूस विरळाच.

हरहर म्हणणारे पुष्कळ, सती जाणारी एकटी—बोलणारे पुष्कळ करणारे थोडे.

हरा नाहीं आणि केशवा-शिवा नाहीं—अगदीं तोंडातून ब्र न काढतां गप्प बसणें. एक नाहीं कीं दोन नाहीं.

हरा शिवा, गोविंदा !—वरील प्रमाणें. १ नांव नाहीं. २ आपल्याकडे कांहीं नाहीं असें सांगणें.

हरण—हरणकाळजी—(यासंबंधीं एक गोष्ट आहे) फार चिंता. 'हरण काळजी फारच बाई मी मला दिलासा कोणी द्याग ।'—पला ४.२.

हरण फाशांत; घालणें-पाडणें—अडचणींत आणणें.

हरण फाशांत सांपडणें—पडणें—अडचणींत सांपडून हताश होणें.

पोटांत हरणाचें काळीज शिरणें—भ्याड बनणें; अतिशय भीति वाटणें. 'तुम्ही एवढे मनुष्य, दुराणी तो दृष्टीस पडेनात, रांडापोरें घोडीं ओढतात, तुमच्या पोटांत हरणांचीं काळजें कशीं शिरलीं ?'—भाब ९१.

हरणाचें कुरण, त्यांत कशाचें धोरण ?—जेथें सर्वच दुबळे तेथें कार्याची अपेक्षा कशी करावयाची ?

हरण—हरण केलेला पदार्थ, जवळ नाहीं राहात—१दुसऱ्यानें नेलेली वस्तु आपणास पारखी होते. २ हपापाचा माल गपापा.

हरणें—हरेल त्याच्या डोक्यावर (ओझ्याचा) हारा—ज्याचा पराजय होईल त्याच्या माथीं सर्व नाश लादावयाचा. "१९१४ च्या पापकाळांत सगळ्यांच्याच चुका झाल्या असें असतां, एकट्या जर्मनीवर सर्व जबाबदारी टाकली, हा व्हर्सायच्या तहानें मोठा अन्याय केला असें जर्मनी प्रतिनिधींचें म्हणणें होतें. पण Woe to the conquered अशी इंग्रजींत म्हण आहे म्हणजे 'हरेल त्याच्या डोक्यावर (ओझ्याचा) हारा' त्याप्रमाणें घडलें."—केसरी ९-७-४०.

हरताळ—हरताळ पडणें—दुर्मीळ होणें; वाण पडणें.

बाजारांत हरताळ पडणें—व्यवहार बंद होणें; दुकानांस कुलूप लागणें. भीति, आदर, निषेध इ. व्यक्त करण्यासाठीं व्यापाऱ्यांनीं आपले व्यवहार, दुकानें इ. बंद ठेवणें.

हरताळ—हरताळ फासणें—[हरताळ = एक प्रकारची पिवळी पूड] १ लिहिलेल्या अक्षरांवर हरताळ लावून मजकूर रद्द करणें. (पूर्वी पोथ्या लिहितांना लिहिलेला मजकूर चुकला असेल तर त्यावर हरताळ फाशीत.) २ केलेलें रद्द करून टाकणें; नामंजूर करणें. ३ दोष देणें.

हरताळ लागणें—रद्द होणें.

हरताळ लावणें—रद्द करणें; हरताळ फासणें पहा. 'हरताळें लाविलें रायालागीं ।'—सप २.६१. 'हरिहराच्यानेंहि त्यास हरताळ लाविला जाणार नाहीं, मग तुझी माझी काय कथा !'—शाब १.१३७.

हरदासी—हरदासी घोडा-तट्टू—हडकुळें, ठेंगणें, रें रें करीत चालणारें घोडें.

हरदासाची बिदागी, कटकटीची रवानगी—हरदासाला एकदां बिदागी देऊन टाकली म्हणजे त्याची कथा ऐकण्याचा तरी त्रास चुकतो.

हरभरे—हरभरे खाऊन हात धुणें—(व.) हातधुण्याची आवश्यकता नसते तरी तसें करणें.

हरभऱ्याचे झाडावर चढणें—खोट्या स्तुतीला भुलणें, फुशारणें; खुलणें.—गांगा २०५. 'हा कोणी विलक्षणच मनुष्य दिसतो. याला एकादे वेळीं तूं फार चांगला साधा माणूस दिसतोस असे कोणीं म्हटलें असेल तेवढ्यावरच स्वारी हरभऱ्याचे झाडावर चढली आहे.'—अतिपीड० 'आम्ही त्यांस गोड शब्द बोलून ममताळूपणानें वागवूं लागलों म्हणजे ते लागलेच हरभऱ्याच्या झाडावर चढून आमची बरोबरी करावयास लागतात.'—मधुमक्षिका.

हरभऱ्याच्या झाडावर चढविणें-बसविणें—आपलें काम करून घेण्यासाठीं एखाद्याची खोटीच स्तुति करणें, खुलाविणें; हुरळून सोडणें; बनविणें. 'पण आज दासोपंत दिगंबरला हरभऱ्याच्या झाडावर चढावयाचें राजकारण लढवत होते.'—रम्यरात्री पा. १०३.

हरवणें— कामाच्या वेळीं हरवते व जेवायच्या वेळीं मिरवते—काम नको म्हणून कामाच्या वेळीं कोठें

तरी चुकवून जावयाचें पण जेवण्याच्या वेळेला पुढेंपुढें करावयाचें, कारण जेवण पाहिजे ना !

हरवलेलें गुरूं करमळीच्या तळ्यांत—एखादें गुरूं चुकलें असेल तर तें करमळीच्या तळयावर सांपडायचें. करमळीचें तळें गोमांतकांत तिसवाडी जवळ आहे. 'चुकिल्लें गोरू घामपूरच्या तळयांत पहा.

हरवस—**हरवस करणें**—(माण.) हरवून घेणें; आपत्ति ओढवून घेणें.

हरवी—**हरवि खोली पिकल्ले खोलीयेक हांसतां**—(गो.) हिरवें पान पिकल्या पानाला हंसतें. आपल्यालाहि एक दिवस तीच अवस्था येणार आहे ही जाणीव त्याला नसते. तु०—आधणांतले रडतात, सुपांतले हसतात.

हटयें सोत्तल्याक पिकल्लें मेळ्ळें—(गो.) हिरवें फळ शोधणाऱ्याला पिकलेलें मिळालें तर मग अधिकच भाग्य.

हरळी—**हरळी प्रसाद**—१ हरदासी तट्टू; मर-तुकडा घोडा. २ कुचकामी नोकर.

हरळीची मुळी—हरळी उपटली तरी तिची मुळी सबंध नाहींशी होत नाहींच. पुन्हां पुन्हां हरळी उगवते. यावरून, छळ, त्रास इ. सोसूनहि टिकाव धरणारी जात. २ गेलेली जमीन, अधिकार इ० पुन्हां मिळवूं पाहणारा माणूस; वतनदार इसम. ३ पुन्हां पुन्हां उचल कर-णारा रोग.

***हरळ सुखावली, तेथें शेती भुखावली**—ज्या शेतांत हरळी माजते तेथें शेतीची खराबी होते. कारण जेवढी जागा हरळीनें व्यापली जाते तेवढ्या जागेवर पीक येत नाहीं.

हरळीची मुळी खुडून खुडून खावी—हरळी हें गवत असें आहे कीं जों जों खुडावें तों तों तें वाढत असतें. याप्रमाणें घरचें शेत असलें म्हणजे त्यांत खपून कसाहि निर्वाह होतो.

हरा—हारा पहा.

हराम—**हरामाचा माल, गाल झाले लाल**—फुकटाचें मिळालें म्हणून यथेच्छ खाऊन लठ्ठ होणें.

हरामाचा माल जिरत नाहीं—दुसऱ्याची घेतलेली वस्तु लाभत नाहीं.

हरा-रे वारा-रे; हरा होरा; हरे-होरे; हरा वारा देव्हारा; हरे वारे देव्हारे—मोठ्या भपक्याची बडेजावाची पण क्षणिक गोष्ट; तात्पुरती गोष्ट.

हरा वारा देवारा, ताकाचा डेरा (दोन दिवसाचा)—फार दिवस न टिकणारी गोष्ट.

हारा वारा वारा वर्षं देव्हारा;हारा होरा देव्हारा फार दिवस चालत नाहीं—उगाच एखाद्याचा फुकट देव्हारा माजविणें किंवा मुळांत कांहीं नसता एखाद्याचा फार गाजावाजा करूं गेल्यास तो फार दिवस टिकत नाहीं.

हरि हरिदिन—एकादशी.—जैअ १७.१२४.

हरिदिशा— पूर्व दिशा. 'हरीदिशेप्रति गमन करी' —जैअ १६.२.

हरिपद—मेषसंपात; महाविषुव.

हरिवासर—१ द्वादशीचा प्रथम पाद तिथिवासर, २ आषाढ, भाद्रपद व कार्तिक या महिन्यांतील शुद्ध द्वादशीचा व अनुक्रमे अनुराधा, श्रवण व रेवती या नक्षत्रांचा योग; नक्षत्र वासर.

हरि विठ्ठल—१ नामोच्चार. २ समाप्ति; नाश. ३ फजीती, बोंब अशा अर्थी वापरतात.

हरि हरि म्हणत बसणें—स्वस्थ परमेश्वर चिंतन करीत काल घालविणें.

हरीचा लाल—१ चैनी रंगेल मनुष्य. 'डफ तुणतुणें वाजविणारे हरीचे लाल कोण असतील !'—स्वप २५. गांगा २१२. २ कोणी तरी. 'सत्याची कास धरूनच आपली पुंजी साठविणारे हरीचे लाल जगांत कोठें बरे सांपडतील.' —ना. म. भिडे.

***हरि मारील पण गुरु तारील**—आपला गुरु असेल तर तो आपले परमेश्वराच्या कोणापासूनहि रक्षण करतो.

हरि हरि आणि कोण देईल पलंगावरी—(ठाकरांतील म्हण) स्वस्थ बसून कांहीं मिळणार नाहीं. कष्ट करावे तेव्हां मिळते. असेल हरि तर देईल खाटल्यावरी या म्हणीच्या उलट.

हरोज—**हरोज नया कुवा खोदना, और नया पानी पीना**—रोज नवीन विहीर खणून नवीन पाणी पिणें. रोज प्रथमपासून सुरवात करणें, रोजचें अन्न रोज मिळवून खाणें.

हरोज— हरोज नया कुवा खोदना, और नया पानी पिना--रोज नवीन विहीर खणून नवीन पाणी पिणें. रोज प्रथम पासून सुरवात करणें, रोजचें अन्न रोज मिळवून खाणें.

हर्ष काल हा पाप काल असतो---हर्ष काळींच मनुष्याचा विवेक सुटण्याचा जास्त संभव. "हर्ष काल हा पाप काल असतो असें जें वचन आहे त्यांत तथ्य नाहीं असें कोण म्हणेल ? आपल्या चालत्या काळीं संधिसाधू मुत्सद्दी बेतालपणें वागतात; त्याचें फळ पुढें मागें मिळाल्याशिवाय राहत नाहीं." केसरी २५-६-४०; २६-२-३७.

जया हर्षना शोकःतो पावे ब्रह्मलोकः--(महानु.) ज्याला आनंद किंवा दुःख कांहीं नाहीं तो मुक्तच असतो व ब्रम्हलोकाला जातो.

हलकट-हलकट पणें वागणें, डाग लावून घेणें—नीचपणाचें कृत्य केल्यास कालिमा लागल्याशिवाय राहात नाहीं.

हलका-कानाचा हलका; हलक्या कानाचा—वाटेल त्याचें ऐकून त्यावर विश्वास ठेवणारा; स्वतःची बुद्धि, तारतम्य न वापरणारा. 'त्याच मकाजीनें व रामजीनें मिळून माझ्या भावाच्या नाहीं नाहीं त्या चहाड्या सांगण्यास आरंभ केला आणि भाऊसाहेब किती हलक्या कानाचे आहेत याचा अनुभव तुला आहेच.' —मथुरा.

जिवाचा-मनाचा हलका —संकुचित दृष्टीचा.

बुद्धीचा हलका —मठ्ठ; जड.

हलका पडणें—कमजोर, दुर्बल होणें. 'नबाब हलके पडले. परंतु तसेच चालून आले.' —मराचिर[1] ३१.

हलका पतला—(व.) दुर्बल; कृश; किरकोळ.

***हलका द्रव्याश्चर्य मानी, मोठा कीर्तीनें वर्णी**—हलकट मनुष्यानें एखाद्याची संपत्ति पाहिल्यास त्यास त्या बद्दल कौतुक वाटतें व यानें हें कसें मिळविलें असेल असे विचार त्याच्या मनांत येतात पण थोर मनुष्यास एखाद्याच्या लौकिकाबद्दल आदर वाटतो; संपत्तिची त्यास हलक्या माणसाप्रमाणें भुरळ पडत नाहीं. Mean Men admire wealth great men glory-- सवि २३१२.

हलकें नांव पडलें ज्याचें, जन्मवरी तेंच त्याचें—-एकदां मनुष्याची हलकट म्हणून दुष्कीर्ति झाली म्हणजे ती कायमची होते. ती बदलणें फार कठीण असतें.

हलके मनाचे, ते अल्प संतोषाचे--हलकट वृत्तीचीं माणसें अल्प संतोषी असतात. अर्ध्या हळकुंडानें पिवळा. Light minds are pleased with trifles.—

हलक्या मोलाची, कांसाळीयेंचा ओंटीची, अनि गॉलभर दुधाची—(गो.) अल्पमोली बहुगुणी.

हलक्याला त्रास देऊं नये—हलकट मनुष्याच्या वाटेस जाऊं नये.

हलक्याचें छेडावें, वाईट ऐकून घ्यावें--हलकट मनुष्याच्या तोंडीं लागूं नये नाहींतर तो बोलेल तें ऐकून घ्यावें लागतें.

हलक्याचे पोटांत कांहीं गुह्य राहत नाहीं—नीच मनुष्याला एखादी गोष्ट कळली असतां ती त्याच्या हातून गुप्त राहूं शकत नाहीं.

हलवाई---हलवाईकी दुकान, और दादाजीके फाते--सासूचे पैशावर जांवई उदार.

हलवायाच्या घरावर, दुकानावर तुळशीपत्र, ब्रम्हार्पण— पदराला खार न लावतां दुसऱ्याची वस्तु तिसऱ्याला देणें; आईजीच्या जिवावर बाईजी उदार, याप्रमाणें.-गांगा. १९५ उग्र ४.१.

हलवायाचे दुकानीं राहून उपाशी-- जवळ समृद्धि असतांहि तिचा उपभोग घेण्याचें नशीबीं नसणें. पाण्यांत राहून कोरडा.

हलामला--हला मला दिवस भला, धनी मेला तर बोडा गेला--(कों.) चाकर मनुष्य कसा बसा आपला दिवस भरण्याकडे पाहात असतो. धनी मेला किंवा जिवंत असतो याची त्यास परवा नसते.

हलाल---हलाल करणें--मुसुलमानी धर्म शास्त्राप्रमाणें पशु मारणें.

हलाली हरामी—१ बरेंवाईटपणा. २ भला बुरा. 'हलाली हरामीची गांठ पडली तर यांस मारूं न द्यावी'—भाब. ८१.

हल्या---हल्या हल्या करणें—(कर) टुमणें लावून काम करून घेणें. ह्या ह्या करणें, या प्रमाणें.

हल्या गाभणा तर पायली पायली दूध देतो---तोंड देखलें बोलणें. बैल रेडा पहा. तु०-बैल गाभणा तर नक्का महिना.

हल्ला—- हल्ला हरकत करणें— अडथळा आणणें; त्रास देणें; तंटा बखेडा करणें.

हवा—- हवा खाणें— सहल करणें; उघड्या जागेंत वाऱ्यावर फिरणें, बसणें इ.

हवा खेळणें— हवा मोकळेपणानें वाहणें; पुष्कळ वारा असणें.

हवा बिघडणें—- १ अनारोग्य असणें; हवा दूषित होणें. २ अराजकता माजणें; गोंधळ, अव्यवस्था असणें. 'इंग्रज वजीर आदि करून हवा बिघडली आहे, यांत शिरूं पावणार नाहींत.'—महादजी शिंदे पत्रें ५०१.

हवाई जहाज—विमान.

हवेंतील बंगले—मनोराज्य. मनचे मांडे. Castles in the air.

हवाल भुंडी पातळ धुंडी—मागें पहा. खाल मुंडी पहा.

हंस—-हंसक्षीर न्याय-विवेक—पाणी व दूध एकत्र केलेलें असल्यास हंस पक्षी त्यांतील दूध पिऊन पाणी तेवढें निराळें काढतो अशी समजूत आहे. त्यावरून बरें वाईट एकत्र असतां त्यांतील चांगलें तेवढें निवडून घेणें.

हंस पक्षी न्याय देतो, पाणी निवाडितो— वर पहा.

हंसालागीं जें मिष्टान्न। तें न हंसीलागी जाण॥ —जें एकाला गोड वाटतें तें दुसऱ्याला आवडे-लच असें नाहीं. भिन्नरुचिर्हि लोकः।—केसरी. १०-४-३४.

हंसे मुक्ता नेली, मग केला कलाकलाट काकांनीं।—थोर पराक्रमी मनुष्य आपलें कार्य साधून जातो व मग हलकट लोक मागून विनाकारण आरडाओरड करीत असतात. 'हंसे मुक्ता नेली मग केला कलकलाट काकानी, हाकांनीं नभ भरलें, जाय सुरांच्याहि नाद हा कानीं॥' —मो-रुक्मिणी विवाह कथा.

हं(हां)सणें—-खापरानें हंसणें—खापरावर जमलेल्या मशीनें पेट वेणें.

हंसत गौरी-पार्वती—हंसत मुख स्त्री.

हंसत शिंदळ—१ नखरेबाज परंतु प्रत्यक्ष व्यभि-चारी नव्हे अशी [स्त्री]. २ हंसण्याची खोड असलेला [पुरुष]. ३ हंसवून फसविणारा, भुरळ पाडणारा.

हंसत हंसत,-हंसतां हंसतां दांत पाडणें— थट्टा आहे असें दाखवून, न रागावतां एखाद्याची फजीती करणें, नाश करणें. [गु.] हसीनें हाड भांज.

कोणी हंसता नाहीं पोसता नाहीं—अत्यंत पोरका ज्याची कोणी काळजी घेत नाहीं असा.

हसती (हस्ती) दंत भेट-ओळख—ज्या भेटींत नुसतें एकमेकाकडे पाहून हसणें होतें अशी भेट; दृष्टादृष्ट झाली असतां नुसतें स्मित करण्यापुरती ओळख.

हंसत्याबरोबर हसणें रडत्याबरोबर रडणें— वारा येईल तशी पाठ देणें.

हंसुन गोड (साजरें) करणें— १ गोड बोलून वेळ मारून नेणें. दुसऱ्याचा राग घालविणें. २ गोड बोलून फसविणें.

हंसण्याचा निकूर झाला, शंभू वैतागाला गेला. —हंसण्याची पराकाष्ठा होऊन एखाद्यास राग येणें. मस्क-रीची कुस्करी होणें.

हांसत कर्म करावें भोगावें रडत तेंचि परिणामीं —मो वन११.८०. एखादें दुराचरण करतांना माण-साला आनंद वाटत असतो पण त्याचा परिणाम भोगतांना मात्र रडूं येतें. करावें तसें भरावें. तु०—हसाद्भिर्यत्कृतं कर्म क्रोशाद्भिरनुभूयते।

हंसतमुखी सदा सुखी—जो मनुष्य हंसतमुख असतो तो बहुधा सुखी असतो.

हंसतल्या गेले दांत भाभीर—(गो.) हंसणाऱ्याची उपेक्षा करणें व आपलें स्वीकृत कार्य चालू ठेवणें.

हंसता आहे पुसता नाहीं; हंसायला आहेत, पोसायला नाहींत—एखाद्या मनुष्याला हंसणारे पुष्कळ असतात पण त्याची चौकशी करुन त्याचें दुःख निवारण करण्याची अगर त्यास मदत करण्याची कोणी काळजी घेत नाहीं.

हंसता पुरुष रडती रांड अंतरी असती सदा द्वाड; हंसता पुरुष रडती रांड याची करावी सांड-हेळसांड—जो मनुष्य नेहमीं हंसतमुख असतो व जी स्त्री

नेहमीं रडावयास लागते तीं बहुधा खोल मनाची असून कांगावखोर असतात.

हंसती बायको रडता पुरुष कामाचीं नाहींत—नेहमीं हंसणारी स्त्री बहुधा चवचाल असते व रडवा पुरुष दुर्बल असतो यामुळें अशीं माणसें निरुपयोगी होत.

हंसतील त्याचे दांत दिसतील—लोकांनीं नांवें ठेवल्यास त्याची पर्वा न करणें. 'लोकं हंसलीं तर हंसलीं, हंसतील त्यांचे दांत दिसतील'' असें म्हणाली'—आमच्या इंदूचें शिक्षण ४८'

हंसतीला पाहुणा रडतीलाही पाहुणा—घरीं पाहुणा आला म्हणजे आनंद झाला किंवा वाईट वाटलें तरी पाहुण्यास जेवावयास घालणें भागच असतें मग उगाच दुःखी कष्टी होण्यांत काय अर्थ, आनंदानें केल्यास सर्वांसच बरें वाटतें.

हांसतो दादलो आणि रडति बायल हांचो विश्वास मोच थोडो—(गो.) हंसणारा पुरुष आणि रडणारी बाई यांचा विश्वास धरूं नये. या गोष्टी कृत्रिमपणें केल्या जातात.

हंसरा पुरुष आणि रडकी बायको यांचें तोंड पाहूं नये—वर पहा.

हंसरें मूल गुलाबाचें फूल—हंसरे मूल गुलाबाच्या फुलाप्रमाणें नाजूक व आनंददायक असतें.

हंसे त्याला बाळसें—जो नेहमी हंसतो तो नेहमीं निरोगी रहातो व लठ्ठ होतो. Laugh and be fat.

हंसे रडे गीत गाय, संसारचं सुख काय—या संसारांत कधीं मनुष्य आनंदानें हंसतो, मजेनें गाण्याच्या ताना मारतो, तर कधीं दुःख प्राप्त झाल्यामुळें त्याला रडें कोसळतें. अशा या सुखदुःखमिश्रित संसारांत निर्भेळ सुख मनुष्याला कधीं तरी लाभलें आहे काय ? नाहीं. जो चंचल वृत्तीचा मनुष्य क्षणांत सुखी तर क्षणांत दुःखी होतो त्याच्या वृत्तीची चंचलता ही म्हण दर्शविते. तो हंसल्याचें सुख मानूं नये व रडल्याचें दुःख मानूं नये हें योग्य.

मी-आपण हंसें लोकाला शेंबूड माझ्या-आपल्या नाकाला—दुसऱ्याला ज्या दोषाबद्दल हंसावयाचें तोच दुर्गुण आपल्या अंगी असणें. माणसानें प्रथम आपल्या पायाशीं पहावें.

हंसोळी-हसोळी खाणें—[हसोळी=एक रानफळ] यांतील 'हस' वर्णावरून कोटी. बेफाम असणें.

हस्त-हस्तसंकोच—हात आंखडणें; कृपणता; चिक्कपणा.

हस्तें परहस्तें—स्वतः किंवा दुसऱ्यांकडून; प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणें.

हस्ती-हस्ती-तोंडांतुळो कोब्बु—(गो.) हत्तीच्या तोंडचा ऊंस कधींच काढतां येत नाहीं. मिळण्यास अवघड वस्तु.

हस्ती नात्तिल्ले आरत—(गो.) हत्ती शिवाय आरती. लाबणकोरच्या बाजूस मोठ्या प्रशस्त आणि श्रीमंत अशा देवळांतून हत्तीकडून देवास आरती ओवाळतात.

हस्ती परदळा जो भंगी, तया पायीं नमरे मुंगी—जो एवढा मस्त हत्ती परचक्राचाहि नाश करतो त्याला आपल्या पायानीं मुंगी कांहीं चिरडतां येत नाहीं, ती त्याच्या पायाखालीं सांपडणें कठिण असतें. मोठमोठ्या शत्रूस पादाक्रांत करणाऱ्या वीर पुरुषासहि केव्हांकव्हां एखाद्या क्षुद्र मनुष्यासहि अपाय करतां येत नाहीं.

हस्ती मस्तावला लानें होतो मृदंगाला—मस्त हत्ती सुद्धां संगीताच्या नादानें लुब्ध होऊन मऊ येतो.

हस्ती संगांतु मुंबुर; हतयां हिंडांत मुसक—(गो.) हत्तीच्या कळपांत डांस. दर्यांमे खसखस.

हस्ती सुकलारी गोट्टयांतु मंघप आस्सवे !; हती सुकल्यारुय गोठ्यांत बांदप आस व्हय—वाळून बारीक झालेला हत्ती गाईच्या गोठ्यांत कां बांधता येणार आहे ? मोठ्या माणसांचा मोठेपणा कांहीं कारणानें जरी नाहींसा झाला तरी त्यांना कांहीं साधारण माणसांत गणतां येत नाहीं.

हस्तीक घांट मंधुका वे !;-हतयाक घांट बांदूक जाय व्हय,—(गो.) हत्तीच्या गळ्यांत घंटा बांधण्यांत काय अर्थ ? हत्ती हा एवढा अजस्र प्राणी आहे कीं, त्याच्या आगमनाची समज लोकांस देण्यासाठीं त्याच्या गळ्यांत घंटा बांधण्याचें कांहींच कारण नाहीं. मोठ्या माणसाच्या गुणांची जाहिरात करण्याची कांहींच जरूरी नसते. ते आपोआप कळतात.

हळकुंड—**हळकुंडाचे पोटीं शिळकुंड उपजणें**—भांगेंत तुळस.

अर्ध्या हळकुंडानें पिंवळें होणें.—अर्ध्या पहा.

हळकुंडासाठीं लग्न मोडणें.—क्षुल्लक कारणासाठीं मोठ्या कार्याची हानि करणें.

हळद——उष्टी हळद—वधूच्या अंगास सुगंधयुक्त जी हळद लाविली जाते तिचा अवशेष वरास लावण्यासाठीं नेतात ती.

हळद उतरणें—लग्नांत लावलेली हळद मंगल समारंभानें काढून टाकणें. लग्नांतून मोकळें होणें.

हळद काढणें—हळद उतरणें; बाळंतपण, लग्न वगैरे नंतर स्नान घालणें.

हळद खेळणें.—मराठ्यांत लग्नाच्या दुसऱ्या दिवशीं नवरा नवरी स्नानापूर्वी एकमेकांच्या तोंडांत हळद घालण्याचा खेळ खेळतात. (कऱ्हाड) वधुवरांनीं परस्परांवर हळद उडविणें.

हळद लागणें—१ विवाहाचे दिवशीं वधूवरास हळद लावतात. यावरून विवाह संस्कार होणें. २ वैभवास चढणें. ३ भाव चढणें; दुर्मिळ होणें. 'मुहूर्त पाहुनी हळदी लागली ।'—सप्र. २. १७३.

हळदीचा गाभा—अत्यंत सुंदर रंग; अंगकांति.

हळदीचा डाग लागणें,——विटाळ होणें.—विवाहानंतर लवकरच वैधव्य-विधुरावस्था येणें; नांवाला लग्न होणें.

पी हळद आणि हो गोरी—पी पहा.

हळदीपासून नवरा बोहरा: त्याला कितीक सावरा—(महानु.) लग्नापासूनच अभद्रा, सत्यानाश करणारा तर त्याला किती सांभाळून घेणार. मूळचाच वाईट असल्यास त्याला कोण किती सुधारणार !

हळमळ——हळमळ टळणें—कटकट जाणें; पीडा टळणें.

हळयेरै——हळयेरै ना आनि फळयेरै ना—(गो.) एखाद्याच्या बोलण्यांत स्वास्थ्य अथवा धरबंद नसणें.

हळवट——हळवट बुद्धीचा—उथळ बुद्धीचा; अल्पज्ञ.

हळवट भुकेचा—भूक सहन न होणारा.

हळहळ——हळहळीचा-हळखळीचा माल—जो विकण्याचें जिवावर येतें असा माल; विकणारास मनस्ताप देणारा माल,

हळू——हळू चाल वाटे, मोठा पल्ला गांठे—हळू हळू चालण्यास पुष्कळ दूर वाट असली तरी न दमतां चालत जातां येतें. भराभर चालल्यास मनुष्य दमतो. त्याप्रमाणें हळू हळू काम करीत गेल्यास मोठमोठीं कामेंहि पार पाडतां येतात. घाईनें केल्यास फसण्याचा संभव असतो. Fair and Softly goes far in a day.

हळू बोल्या, गोंधळ घाल्या.—हळू हळू बोलून मध्यें कामांत अडथळा आणणारा.

हळू हळू पुरती चाल, धांवणाराचे मोठे हाल.—सावकाश, धीमेपणानें काम केल्यास नीट होतें, घाईनें नासतें. वर पहा. Slow & Steady win the race.

हा——हा मी का तो मी—स्वतःबद्दलच संशय उत्पन्न होणें.

हा रामपहारा आहे—एक प्रकारची शपथ.

ही काळरात्र चालली आहे—एक शपथ.

'हीच की हिची आवय' म्हळ्ळेले गादि—(गो.) एक नवरदेव इतके दडिशहाणे होते कीं सासू रुखवत घालायला आली तेव्हां तिला पाहून त्यानीं शेजारच्या गृहस्थाला विचारलें-' मला जी मुलगी देणार आहेत ती ही कीं हिची आई ?' तारतम्य न वापरणें; बेअकलीपणा दाखविणें.

ह्या बोटाची थुंकी त्या बोटावर करणें—मधल्या बोटावर थुंका घालून, अनामिका व तर्जनी या बोटाच्या साहाय्यानें मधल्या बोटाचा अनुक्रम बदलून दाखविणें असा खेळ मुलें करतात. १ वरचेवर बोलणें बदलणें; चंचलवृत्ति दाखविणें; २ हातचलाखी करणें; फसविणें.

ह्या बोटावेलो निथु त्या बोटार काढता.—(गो.) ह्या बोटावरची थुंकी त्या बोटावर करणें. घटकेंत बोलणें फिरवणें.

हा घोडा आणि हें मैदान.—घोडा मैदान पहा.

हॉ चोरू, हॉ म्हारू.—(गो.) हा सूर्य व हा जयद्रथ या म्हणीप्रमाणें.

हा दाम हें काम—रोख पैसा दिला कीं काम ताबडतोब होतें.- गांगा. २६८.

हा सूर्य हा जयद्रथ—समोरा समोर गोष्टी मांडणें. सूर्य पहा. पार्था वो रवि हा, जयद्रथहि हा, हें लक्ष लावा

बरें। बोले अर्जुन 'लाविलें.' हरि वदे, 'मारीं.' जगच्छेखरें। ऐसें त्याप्रति बोधितां झडकरीं त्या सैंधवाचा गळा। केला तोडुनि अर्धचंद्रविशिखें कीं मस्तकावेगळा. ॥'—वामन (जयद्रथवध.) द्रोण १४६. 'जयंतरावाला बोलावतों म्हणजे हा सूर्य आणि हा जयद्रथ होऊन निकाल लागेल.'—श्रमसाफल्य २·१.

हा हात मोडला तर काई हा हातु मोडाया—(महानु.) एका नुकसानीबरोबर दुसरें नुकसान आपण होऊन करून घ्यावें काय? तें शहाणपणाचें नाहीं.

हॅा हात हॅ हाता वळखना—(गो.) उजव्या हाताचा डाव्या हाताला विश्वास नाहीं.

ही बाई विंचवाला सुद्धा कामाला लावील—कोणालाहि स्वस्थ बसूं देणार नाहीं.

हें काय आहे बाई! तर आहे मसणवटींतील माती—नसत्या चवकशीस भलतेंच उत्तर देणें.

हेच डोळे आणि हेच तमाशे—जीवंतपणीं नानातऱ्हेच्या गोष्टी पाहण्याचा प्रसंग येणें.

हें चित्र पहा व तें चित्र पहा—तुलना करा या अर्थी. शेक्सपीयरच्या हॅमलेट नाटकांतील एका वाक्याचें मराठींत वरीलप्रमाणें भाषांतर आहे. 'हें चित्र पहा व तें चित्र पहा. असें अभिमानानें दाखवायला सांपडेल.' —केळकर. टिळक चरित्र भा, १—पा. १२८.

हॅ बिळा माल्हा खिळा, उंदीर चल्लॉ दुसऱ्या बिळा—(गो.) हें बीळ बुजवलें तर उंदीर दुसऱ्याच बिळांत जातो. इलाज, उपाय पुरा पडत नाहीं.

हें माझें तें माझें आणि काबाड ओझें—सर्व माझें माझें करून आटापीटा करणें; फार हव्यास केला तर त्रास होतो. माझें माझें० पहा.

हेंहि गेलें तेंहि गेलें—दोहींकडून फसवणूक.

ह्या कानानें ऐकिलें आणि ह्या कानानें सोडून दिलें—ऐकलेली गोष्ट मनांत न ठेवणें, मनावर न घेणें. कान पहा.—पामो ३२५. तु०—नळी फुंकिली सोनारें, इकडून तिकडे गेलें वारें.

ह्या पोटाचें पाड जिणें, हाचे खातीर घेवचें उणें—(गो.) पोटामुळें लोकांकडून अपमान पावण्याची पाळी येते.

ह्या बोटाची वेदना त्या बोटास येत नाहीं—शेजारीं असलेल्याला देखील वेदना होत नाहीं. म्हणजे दुसऱ्याच्या दुःखाची जाणीव येत नाहीं.

ह्या हाताचा झाडा त्या हातावर घ्यावा लागतो—एका हातानें केलेल्या पातकाचें प्रायश्चित दुसऱ्या हातानें घ्यावें लागतें. म्हणजे दुष्कृत्याचें फळ तात्काळ भोगावें लागतें.

हां——**हां हां म्हणणें**—प्रतिकार, निषेध करणें.

हां हां म्हणतां——चट्टदिशीं; त्वरेनें. 'सुचिरक्षुधित ब्राह्मण हां हां म्हणतांही वाढिल्या ताटीं।'—मोकृष्ण ८६२२·

हां हां म्हणतां करणें—(हां हां हा निषेधार्थी उद्गार आहे) ताबडतोब करणें; निषेध करीत असतांच उरकणें.

हांक——**हांक कानावर न जाणें. हाक कानीं न पडणें-ऐकूं न येणें**—'कीं न श्रवणीं गेली ही माझी हाक, हा कसा तर्क।'—मो. संशयरत्न २०.

हांक देणें—१ हाक मारणें. मोशल्य १.७७. २ ओ देणें; जबाब देणें. ३ उपयोगीं पडावयास तयार होणें.

हांक ना बोंब!—१ बिन बोभाट. २ तक्रार ऐकूं न जाणें.

हांक फोडणें—मोठ्यानें ओरडणें. 'एहि क्वास्युपमन्यो बत्स अशी हाक फोडितां थोर।'-मो आदि २.४०.

हांक बोंब—आरडा ओरड; हाकाटी.

हांक मारणें—१ बोलावणें. २ पार पाडणें. 'मद्व्रति हे अन्याचें येथें मारील काय हांक बळ।' मोवन. ६.३. ३ साहाय्यासाठीं धांवा करणें, बोलावणें. 'मला संकटसमईं हांक मारावयास जागा स्वामीचे पाया शिवाय दुसरी नाहीं.' —बापूगोप २१०.

हांक होणें—ओरड होणें. 'तों मागें गाजुदीखान गेला म्हणोन हांक जाली.'—भाब २९.

हांका मारणें—ओरड करीत बसणें. 'कां न तुम्हीहि परिसा मारित आलों अशाच हांका मी।'—मोउद्योग ११.५१.—मोविराट ५.१९.२ कार्य फिसकटणें. ३ बजावणें. 'हांका मारित होतों मी कीं हे राक्षसीतनयमाया।' —मोभीष्म ९.४५.

हांकेसी ते हांक सांदे—हांकेला ओ देणें. —राम. क.१.३.२७.

हांकणें—**-कावळे हांकणें**—(चिपळूण) देशावरून चिपळुणास गूळ जो जातो तो बाहेर उघड्यावर वाळत टाकतात त्याचें कावळ्यांपासून रक्षण करणें या कामासाठीं म्हणजे कावळे हांकण्यासाठीं मुद्दाम माणसें ठेविलेलीं असतात. कावळे हांकण्याची नोकरी करणें.—नर्स सुंद्राबाई २९–३०.

हाकम—**-हाकम होर, मूहमें मारे**— सत्तेपुढें शहाणपण नाहीं.

हाकारणें—**-आषाढी आणि रूण हाकारी**—आषाढ पहा.

हाग—**-हाग नाहीं भीत वाघाला; हागोबाच्या पुढें वाघोबाची भीति नाहीं**—परसाकडे लागली आहे असा माणूस वाघाला भीत नाहीं. देहधर्म किंवा मनोविकार इतके प्रबळ असतात कीं ते आपला अविष्कार करण्यास कशालाहि भीत नाहींत. तु०-कामातुराणां न भयं न लज्जा।

हागरा—**-हागऱ्या फुडें-मूखार वागरें खेचें?**—(गो.) वर पहा.

हागोडा—**-हागोडें काम**—(गो.) अव्यवस्थित, अपुरें काम. हागिरडें काम.

हांजी—**-हांजी हांजी करणें-म्हणणें**-(हां? जी? असे सेवकवृत्तीचें उत्तर) खुशामत करणें; पुढें पुढें करणें.

हां जी? हो जी?—अगदीं सेवेला तत्पर आहे अशी दास्य वृत्ति. खुशामतीची वृत्ति. तु०-मूर्खस्य चाष्ट चिन्हानि शीका टीका च मालकी। प्रतिष्ठा लम्बधोत्राणि हाजी हांजी च योग्यता॥

हाट—**-हाट गोड कीं हात गोड**—बाजारांतले जिन्नस चांगले म्हणून स्वयंपाक चांगला लागतो कीं करणारी कुशल आहे म्हणून लागतो. स्वयंपाकाचा चांगलेपणा शिधासामुग्रीवर व स्वयंपाक करणारावरहि अवलंबून असतो.

हाटांत तुरी, भट भटणीला मारी- रांडे वरण कां करीनास?—हट पहा.

हॉटेल—**-हॉटेलमें खाना, मसीदमें सोना**—हटीं जेवण मठीं निद्रा, याप्रमाणें.

हाड—**-हाडकपाळ्या**—१ दुर्दैवी; कपाळकरंटा; शिरजोर; बेपर्वा.

हाड गळुन मांस येणें—(उप.) लठ्ठ होणें; हाडें, बुजणें. 'हाड गळोनी आलें मांस। माझें दुःख तुम्हां नेणवे कैसें॥'-तुगा २९५७.

हाडाचा—१ मूळचा; जातीचा. २ स्वभावाचा.

एका हाडाचा-हाडा मासाचा—एकाच जातीचा कुळीचा.

हाडाचा खंबीर,- कणखर- कठीण— बेंळकट; खबरदार; कणखर प्रकृतीचा.

हाडाचा खरा चांगला भला—अस्सल, जातिवंत.

हाडांचा चुना-चुरा-हाडांचा चूर-हाडांचीं काडें-हाडांचें पाणी, मणी-हाडांच्या फुंकण्या करणें होणें.—शरीर झिजविणें, झिजणें; अत्यंत परिश्रम करणें, पडणें 'बाबा रे, फलज्योतिष विद्या, जिचा अभ्यास तूं करीत आहेस, ती इतकी कठीण आहे कीं तिजसाठीं हाडांचीं काडें करावीं लागतात.'-शाब १.१९;११७.

हाडांचा पंजर-सांपळा—अस्थिपंजर; अगदीं कृश; अस्थिचर्म देह.

हाडानें काढून मासानें पाठ घेणें—(व.) लठ्ठ होणें.

हाडाला-हाडीं खिळणें—अंगांत मुरणें, दृढमूल होणें.

हाडाला-हाडीं, लागणें—१ वर्मी लागणें. २ त्रासदायकपणें चिकटणें; ३ फार काळजी लागणें.

हाडाला-हाडीं फांसण्या घालणें-मारणें—जिव्हारीं टोंचून बोलणें.

हाडांवर-हाडीं घाव घालणें—१ वर्मच्छेद करणें. २ कठोरपणानें वागविणें.

हाडावर चोट असणें—१ जबाबदारी असणें. २ (व. ना) तोशीस लागणें.

हाडांशीं लग्न लावणें—म्हाताऱ्याशीं लग्न लावणें.

हाडीं विसावणें—हाडीं शिरणें, तेथेंच दृढमूल होणें. (वैर रोग इ.)

हाडीं शुद्ध—जातीनें शुद्ध.

हाडें उजवणें-भाजणें-शेकणें—कसें तरी लग्न उरकणें "जरी लहानपणींच, ह्यांच्या वडिलांनीं ह्यांचीं

'हाडें भाजण्याचा' किंवा यांच्या पायांत 'सवामणाची बेडी' अडकवून ह्यांस " चतुर्भुज केलें होतें."–छच १०१.

हाडें घुसळणें—१ अतिशय काम करणें. २ सतावणें; गांजणें; छळणें. 'नमितां हि, आठवुनि अपकृति, हाडें नित्य मंदनर घुसळी ॥'–मोहरिवंश. १.४.

हाडें झिजविणें—कष्ट करणें. 'त्यांच्या सेवेंत जन्मभर हाडें झिजवून तरी काय उपयोग'–इंप ५९.

हाडें दग्घली—(महानु) पापनाश झाला (साधुसेवेनें).

हाडें निघणें—हाडें दिसूं लागणें; अगदीं रोडे होणें.

हाडें मोडणें, खिळखीळीं करणें—हाडें घुसळणें पहा. अतिशय गांजणें.

हाड तिकडे शेंपूट जाड, तोंड पाहून जेवण वाढ––मनुष्याच्या मोठेपणाप्रमाणें त्याचा आदरसत्कार होतो.

हाड मोडल्यावांचून काम होत नाहीं.––स्वतः कष्ट केल्याशिवाय हातून कांहीं घडत नाहीं.

हाडवैर चांगलें नाहीं, सूर्यचंद्र मेले त्याच्यापायीं.––कोणाशींहि दीर्घ द्वेष करणें घातक ठरतें. अशा दीर्घद्वेषामुळेंच सूर्य व चंद्र हे राहू केतूं कडून पिडा पावले.

हाडाचा मणी, रक्ताचें पाणी.—अतिशय कष्ट करणें.

हाडचें–––हाडली पड खाल्ली पड––(गो) जेवढें आणलें तेवढें खाल्लें. हातावरचें पोट.

हाडा––हाडा रजपूत––हाडा ही रजपुतांतलि एक फार कडवी जात आहे त्या लोकांच्या स्वभावावरून, (ल.) हेकट माणूस तु०-(गु) खाडा खसे पण हाडा नहि खसे.

हाडू बायल्या—(ना.) रांड्या राघोजी; भ्याड.

हाडूक–––गळ्याशीं-दाराशीं हाडूक बांधणें—१ रखेली राखणें. २ त्रासदायक काम अंगावर ओढून घेणें.

हाडूक दाराशीं––दाराला रोवणें, लावणें, पुरणें––जातिबहिष्कृत करणें.

हाडकें काडकें––१ शेतीचीं जनावरें व आउतें. २ झिजलेलें व हाडहाड उरलेलें शरीर.

हांडी–––हांडीर आसा चेडो, भोंवतो सगलो वाडो,–हांडीर आस चेडो, सोदता सगळो वाडो––(गो.) मूल कडेवर आणि आई शोधते सर्व गांवभर. खाकेंत पोर नि गांवांत डांगोरा.

हाणणें–––म्हणून पाडणें––१ जमीन दोस्त करणें. २ निष्फल करणें; खोडून काढणें; रद्द करविणें.

हाणत्याच्या मागें, पळत्यांच्या पुढें—नेहमीं आपल्या जीवास जपून वागणें. अगदीं भेकड माणसाबद्दल म्हणतात.

हात––हात आंखडणें—१ सढळपणें न देणें. देण्याचें प्रमाण कमी करणें २ देण्याचें बंद करणें,

हात आटोपणें—हात बाजूला घेणें; हातानें करीत असलेली गोष्ट बंद करणें; हस्तक्रिया बंद पाडणें.

हात आवरणें—१ हात आटोपणें, आखडणें. 'मग विनवावें कीं, द्या सूदा यश नावरा करा जेवा ॥' –मोद्रोण ५.८६. २ एखाद्या कार्यापासून परावृत्त होणें 'ऐकेल वचन माझें आवरिल द्रेषिकाळ हात र्णी ॥'–मोकर्ण ४६.४४–मोद्रोण ५.८६.

हात इचकणें—(व) हात मोडणें.

हात उगारणें–उचलणें—मारावयास प्रवृत्त होणें.

हात उचलणें—१ आपण होऊन बक्षिस देणें. २ हातीं घेणें (काम धंदा इ.)

हात ओढवणें—१ घेण्यासाठीं झांप टाकणें. २ तोंडापुढें हात करणें, ओवाळणें. दिवे ओवाळणें पहा.

हात ओला करणें—१ जेवणें, अन्न घेणें. २ लांच देणें. 'शिपायाचा हात ओला करावा लागत नव्हता.'–शाब २-२४६ 'यजमानाची भेट घेऊं इच्छिणारानें त्यांचा हात ओला केला नसला तर ते यजमानास भलतेंसलतें सांगून देतात.'—शाब १·११८.

हात ओला होणें.—१ जेवण मिळणें. २ लांच मिळणें. 'हा गृहस्थ हात ओला व्हावा म्हणून येणार नव्हे कां' वि.वि. १०-५-७.१२६

हात ओवाळणें—(तोंडापुढें) 'दिवे ओवाळा!' या अर्थानें. तुच्छता दर्शविणें.

हात करणें—१ शस्त्राचा वार करणें (सामा.) मारणें. हात टाकणें पहा, २ पहा, बोथाटी इ. चा डाव

करणें, ' फिरविणें ३ वादाविवाद, युद्ध करणें. दोन हात करणें असा प्रयोग.

हात कापून देणें; हात गुंतणें—लेखानें बांधून घेणें, बांधलें जाणें; लेखी करार करून देणें.

हातखंडा असणें— एखादें कार्य हमखास पार पाडण्याच्या कामीं कौशल्य, पटाईतपणा अंगीं असणें.

हातखुरपणीचें लोणी—हातखुरप्या नारळाचें खोबरें.

हात गगनाला पोंचणें-पोंचविणें— महत्कृत्य करणें, करविणें. ' तिनें त्यांचे हात गगनाला पोंचविलें असें त्याला वाटलें. '—V. S. 2. १३५.

हात गहाण ठेवणें—१ हाताचा उपयोग न करणें २ हात न लावणें.

हातघाईवर, हातघाईस येणें—१ उतावीळ होणें २ मारामारीला प्रवृत्त होणें.

हात घालणें—१ पतकरणें. २ एखादी गोष्ट करण्यासाठीं हात पुढें करणें. ' मग विभुवसनासी त्याचीया हात घाली ।—आनंदतनय. ३ ढवळाढवळ करणें; मध्यें पडणें. ' पिकेटिंग केलें म्हणजे सरकारास हात घालतां येतो. '—केसरी १७-६-३०.

भुईस हात घालणें—कुस्तीमध्यें हात जमिनीस घासतात त्यावरून ' हातु घातला भुईसी ' चोभा. उषा. ६६

हात घेणें—(खेळांत) डाव जिंकणें.

हात चढणें—प्राप्त होणें ' अनुताप चढालिया हात । क्षणार्धं करी विरक्त ।' एभा. २६.२०.

हात चालणें—१ हातानें काम करीत असणें. ' थाळा पुढें येतांच माझा हात चालू झाला.—वि वि १०-१०-२३१. २ काम करण्याचें सामर्थ्य असणें. ३ हातांत सत्ता, संपत्ति असणें. ४ एखादी गोष्ट करतां येणें. ५ युक्ति, इलाज, उपाय चालणें.

हात चालविणें.—१ हत्यार चालविणें; शस्त्रानें मारणें. ' न्यायाच्या अभावीं त्याला हात चालवावेसें वाटणें रास्तच होईल. ' कार्य चालू असणें —टि. १०२२ ' सतारीवर हात शेजारच्या खोलींत चालत आहे असें त्यांनीं ताडलें '—वि.वि. ८.१.६

हात चेपणें—लांचाचे पैसे मुकाट्यानें हातांत देणें, हात दाबणें. लांच देणें.

हात चोळणें—राग अनावर झाला म्हणजे माणूस वैरी समोर नाहीं तेव्हां कुंठीत होऊन हातावर हात घाशीत राहातो. यावरून रागानें चरफडणें; अगतिक होऊन मनांत तडफडणें. ' शल्य सुयोधन वाक्यें कोपे चोळी करें करा... ' ।—मोकर्ण २१.१३-मोशांति ४.३८. ' बोळविलें परलोकीं, बहुतांकरवीं स्वहस्त चोळविले. —मो. द्रोण. १८।५२.

हात चोळीत बसणें.—हातची संधी निघून गेली म्हणजे माणसाला स्वतःचाच संताप येतो नि अशावेळीं स्वतःच्या चुकीबद्दल त्याला कोणाला जबाबदार धरतां येणार? स्वस्थ बसल्याशिवाय मार्ग नाहीं त्याला. स्वतःवरच चरफडणें.

हात जोडणें—१ नमस्कार करणें. २ प्रार्थना करणें. ३ शरण जाणें. ' स्तवितो भाट तसा कीं वाटे जोडील हात पोराशी ॥—मो द्रोण ३.६२. ४ अव्हेरणें. ' दानश्री त्याहुनि बहु दुग्धासहि हात जोडितो मीन ' —मोबृह ८. ५ नको असें दर्शविणें; नमस्कार असो ! याअर्थीं.—मो गोपीगोडवा. ६०.

हात झाडणें—१ झिडकारणें. २ निराशेनें सोडून देणें ३ काम उरकून मोकळे होणें. म्ह०—मांडे केले, हात झाडले.

हात टाकणें—१ पोहतांना पाण्यावर हात मारणें. २ प्रहार करणें; मारणें.

हात टेकणें—१ असमर्थता कबूल करणें; मट्ट्यास येणें. ' आमचे आजोबा म्हणजे कसले भांडणारे वस्ताद ! पण त्यांनींसुद्धां हात टेकले. '—पकोघे. २ अशक्त होणें. ३ दमणें, थकणें.

हातटेकीला येणें—हात टेकणें; दमणें थकणें. ' मारे फौजा गोळा करून शहाजीशीं झटपट खातां खातां हातटेकीला आलांत आणि बसलां आहांत रोती सुरत करून ! ' -शिसं ३.४.

हात तोडणें—स्वलेखानें बांधून घेणें. हात कापुन देणें, पहा.

हात थावरणें—हात आवरणें, आटोपणें. ' प्रवदवन करित होता बहुभास्वर थावरूनि हात रणीं ।'—मोस्त्री. ६.५१.

हात दगडाखालीं सांपडणें—अडचणींत असणें; विपरीत परिस्थितींत सांपडलेलें असणें. दगड पहा. 'आपला हात दगडाखालीं सांपडला आहे हें ओळखून गोकुळा वागत होती...'—खांडेकर-पहिलें प्रेम १५५.

हात दाखविणें-दावणें-१ ज्योतिषापुढें हात करणें. (भविष्य सांगण्यासाठीं) २ अहितकारक परिणाम करणें. ३ सामर्थ्य दाखविणें. 'शक्रादि देव असते तरि त्यांसहि दावितोंच हात रणीं' मोभीष्म ३.४. ४ वैद्यापुढें रोग-निदान करण्यासाठीं हात करणें. ५ हातानें वस्तु दाखविणें. ६ पारिपत्य करणें; शिक्षा देणें. 'अगोदर तंट्यांत पडूं नये आणि एकदां पडल्यावर प्रतिपक्षाला चांगलाच हात दाखविल्याशिवाय राहूं नये'—विकारविलसित. 'चांगला असतों तर एकेकाला असा हात दाखविला असता, कीं एका तोंडाचीं दोन तोंडें झालीं असतीं. —एकच प्याला.

हात दाखवून अवलक्षण करणें-चिंतणें—ज्योतिषाला स्वतः होऊन हात दाखविला म्हणजे तो बरें-वाईट भविष्य सांगणारच. वाईट भविष्य मनाला खातें त्यापेक्षां हात न दाखविलेलाच बरा. स्वतः होऊन एखादी आपत्ति ओढवून घेणें. 'हात दाखवून अवलक्षण करून घेतलंस खरं!'—एकच प्याला-दाजी १.१७२.

हात दाबणें—मुकाट्यानें हातांत लांचेची वस्तु देऊन हात मिटतात. यावरून लांच देणें. 'त्यानें आपल्यास मदत करावी म्हणून त्याचे हात दाबावे असें एकदां मनांत येतें.-विवि. १०-९-२१०.

हात देणें—१ मदत करणें, 'घडतां अधःपतन मज पुण्यें देतिल न हात परिणामीं'-मोआदि १९-३२. 'फार काय सांगावं, पाण्यांत बुडत असलेल्या बालविधवेला एकाद्यानं हात दिला तर तो तिला बाहेर काढण्याऐवजीं नरकांत ढकलीत आहे इतकं मानण्याची आमच्या आर्य मनाची वृत्ति होऊन बसली आहे!' —एकच प्याला. २ चोरणें, ३ खाण्यावर ताव मारणें, ४ खेळांत स्पर्श करणें.

हात धरणी माप—मापाच्या कडेस हात धरून घेतलेलें माप.

हात धरणें—१ अडविणें; हरकत करणें. २ बरोबरी करणें. तुल्यबल-गुण-असणें. ३ लाच देणें. ४ लग्न करणें; पाणिग्रहण करणें. 'एक्याच लग्नसमयीं अवघ्या करीं तो। हातें धरीं जगहि जो निमिषें करीतो॥—वामन, द्वारकाविजय, १.७.

हात धरून काढून लावणें—सक्तीनें हांकून देणें. 'तुम्हाला हात धरून येथून काढून लावीन'-इंप. ६२.

हात धरून जाणें—एखाद्या बरोबर दुराचारासाठीं घरांतून निघून जाणें; पळून जाणें; व्यभिचारी होणें.

हात धुणें—१ जेवणें; अन्न घेणें. हात ओला करणें. 'आजन्मांत मी त्याचे दारांत हात धुतला नाहीं. २ एखाद्या कामांतून आपलें अंग काढून घेणें.

हात धुवून पाठीस लागणें—जेवणाचा जो काय खंड पडेल तेवढाच, बाकी जेवण झाल्याबरोबर त्या कामाला लागणें. कांहीं विसावा न घेतां खंड न पाडतां पिच्छा पुरविणें. चिकाटीनें मागें लागणें. हट्टानें एखाद्याच्या नाशास, समाप्तीस उद्युक्त होणें.-'एकूण दैव आपल्या पाठीस हात धुवून लागलें आहे'-मूकनायक.

हात न बनणें—(व.) रजस्वला असणें; गुंता, विटाळ येणें.

(तोंडापुढें) हात नाचविणें—हात ओवाळणें. हातवारे करणें.

(दहा जणांचे अनेकांचे) हात पडणें—अनेकांनीं मिळून संपविणें.

हात पडणें—जिवंतपणीं नाहीं पण निदान मेल्यावर तरी एखाद्याच्या प्रेताचें दर्शन होणें.

हात पसरणें—याचलेली वस्तु घेण्यासाठीं याचक हात पुढें करतो. यावरून भीक मागणें.

हात पाटिलकी—१ हातानें ठोकणें, २ बोलण्यापेक्षां कृति. याचे उलट तोंड पाटिलकी. ३ हस्त चापल्य, उचलेगिरी.

हात पान्ह्यास लागणें-येणें—वासरूं, अंबोण इ. शिवाय जनावरानें दुध देणें, पान्हा सोडणें.

हातपाय खोडणें—१ अवयव आंखडणें. २ प्रतिबंध करणें.

हातपाय गळणें, गाळणें—१ अशक्त होणें. २ नाउमेद होणें.

हातपाय गुंडाळणें—१ हातपाय आंखडणें. २ अडथळा करणें.

हातपाय चोळणें.—१ चरफडणें; हात चोळणें पहा. २ शिव्याशाप देणें.

हात पाय जोडून बसणें—स्वस्थ बसणें.–गांगा ३४४.

हातपाय झाडणें—१ हातपाय गुंडाळणें पहा. २ सुटकेसाठीं हातापायांचा उपयोग करणें. ३ धडपड करणें. ‘ नयनें फिरवी झाडी करचरण म्हणे पुरे, रडे तदपी । ’ –मोमंत्र १०·१२२.

हातपाय ताणणें—सुखानें, निष्काळजीपणानें हातपाय ताणून पडणें.

हातपाय धोडावपू—(गो.) आटापीटा करणें.

हातपाय पसरणें—१ हातपाय गुंडाळणें पहा. २ व्याप वाढविणें. ३ आळस करणें. ४ मागणी वाढत जाणें.

हातपाय पाखडणें—अंतकाळच्या वेदनेनें, संतापानें हातपाय झाडणें.

हातपाय पांघरून पोटाळुन बसणें—स्वस्थ जेठा मारून बसणें ; आळशासारखें बसणें.

हातपाय फुटणें—(पैसा इ.) १ जाण्यास लागणें, उधळपट्टी सुरू होणें; पंख फुटणें. हातापायास भेगा पडणें ३ लबाडींत तरबेज होणें; लबाड्या करणें. ४ अंदाजापेक्षां वाढणें; अधिक होणें.

हातपाय फोडणें–लावणें—१ मूळ अंदाजांत भर घालणें. २ नटाविणें, थटाविणें. ३ मागून वाढविणें (काम, दर खर्च इ.) ४ लबाड्यांनीं सजवून दाखविणें.

हातपाय मोकळे करणें—फार वेळ बसून राहिल्यानें हातपाय आंखडल्या सारखे होतात ते फिरण्यानें पुन्हां पूर्ववत कार्यक्षम होतात. फिरणें; सहल करणें.

हातपाय मोडणें–मोडून येणें—१ताप येण्यापूर्वीचीं चिन्हें होणें; अंग मोडून येणें; निरंगळी येणें २ निर्बल, असमर्थ करून टाकणें, २ हरकत घेणें.

हातपाय सोडणें—अंतकाळीं हातपाय ताठ करणें, ताठ होणें.

हातपाय हलविणें—आळस टाकणें, स्वस्थ बसून न राहाणें; उद्योग करणें.

हात पाहणें—ज्योतिषी भविष्य सांगण्यासाठीं व वैद्य नाडीवरून रोगनिदान करण्यासाठीं दुसऱ्याचा हात पहातो. ‘ मग मनिं म्हणे पित्याचा पहातसे हात काय नासत्य ॥’–मो विराट १.१२१

(ढुंगणाला) हात पोंचणें—कृतकृत्य होणें.ढुंगण पहा.

हात (ता–तो) फळी—१ गुद्दागुद्दी; झोंबी. ‘ मजलों भिडे हातोफळी ।–ह १९.१४३. २ पट्कन तात्काळ.

(जिभेचा) हात फाटणें—रुचि वाढणें. ‘ जेथ जिव्हेचा हातु फाटे । ’–ज्ञा १८.२४९.

हात फिरणें.—व्यवस्थित, साफसूफ ठेवणें; जिन्नसांकडे लक्ष्य जाणें.

(अंगावरून) हात फिरवणें—१ प्रेमानें कुरवाळणें. ‘रामहि मला पुसोनि । प्रेमें मजवरूनि हात फिरवूनी।’ –मोउद्योग १३.१८३. २ उजळा देणें; साफसूफ करणें; व्यवस्थित ठेवणें.

(डोक्यावरून) हात फिरविणें—लग्गा, डल्ला मारणें.

हात बसणें—१ एकसारखें लिहित वाचीत इ. बसणें. २ अक्षराचें वळण बसणें. ३ एखादें काम संवयीनें उत्तम करतां येणें; कौशल्य प्राप्त होणें. मनांत ठसणें.

हात बळकट करणें—इं. To strengthen hands चें भाषांतर. जोर, शक्ति वाढविणें; मदत देणें. ‘ त्यामुळे पर्यायानं सरकारचे हात बळकट करणारी चळवळ आहे हे कॉंग्रेसवाल्यांच नेहमींचं विधान प्रभाकरनें केलं ’–प्रतिज्ञा १०७.

हात बांधणें—१ मर्यादा घालणें. २ अडथळा आणणें.

हात भिजणें—१ दक्षणा देणें. (दक्षणा ओली करून देतात.) २ अन्न घेणें; जेवणें, हात ओला होणें पहा. ‘ एक महिनाहि असा जात नव्हता कीं भिक्षुकांचे हात भिजत नाहींत.’– इंग्र.परा. ५.३.३ लांच देणें.

हात मारणें—१ (पैसा इ.) बळकावणें. २ (अन्नावर) ताव मारणें. ३ विविध क्रिया करणें.

हात भिट्टीला येणें—(माण.) हात धाईवर येणें.

हात मिळवणें—१ घाव घालणें; ‘ नमस्कारानें जलदी करून हात मिळविला जाऊन । ’–ऐपो. ३९०. २ (कुस्तींत) सलामी घेणें.

हात भेटीं—हात गुडघ्यावर देऊन आळसांत. म्ह.–दिवस गेला हातभेटीं, चांदण्याखालीं कापूस वेटी.

हात मोडणें—१ असाह्य; मितहीन होणें. २ देणगी, बक्षीस नाकारणें.

हात राखून काम करणें; चालविणें—टंमळमंगळ करणें; पूर्ण समाचार न घेणें; थोडें थोडें करणें.–'भगीरथ, असेल वेडेवांकडे प्रश्न विचारतां याचं कारण एवढंच कीं, मघांपासून तुम्हीं हात राखून काम चालविलं आहे.'–एकच प्याला.

हात राखून खर्च करणें—काटकसर करणें; उधळेपणा न करणें.

हात रिकामी—विधवा–बदलापूर १७४.

हात लागाना—(गो.)विटाळशी असणें. हात न बनणें.

हातलागास–हातलागी येणें–असणें—आटोक्यांत, अवसानांत येणें.

हातलाग्या—अनुयायी; अनुकूल असणारा. 'तुमचे हातलागे लोक असतील'–वाडबाबा १·६

हातलावणी करप—(गो.) वेश्येचा चिरा उतरणें. [हात लावणी=वेश्येची पुरुषसमागमाची पहिली रात्र.]

हात लावणें—१ स्पर्श करणें; शिवणें; मारण्यासाठीं तयार होणें.

हात लावणें, हातभार लावणें—मदत करणें.

हात लाव्या—हाताळ; चोरटा.

हात वहाणें—१ हत्यार चालविणें. ' परि परमाप्रिय अर्जुन त्यावरि याचा न हात वाहिल'–मोउद्योग १२.५४. २ प्रवृत्त होणें.

हात वळणें—१ सराव होणें; हात बसणें पहा. २ प्रवृत्त होणें.

हात सैल सोडणें—सढळपणें खर्च करणें.

हात सोडणें—१ लोभ न करणें. २ संगति सोडणें.

हात स्वर्गाला पोहोंचणें—कृतकृत्य होणें; ध्येय गांठणें, शतकृत्य करणें. 'नोकरी मिळाली म्हणजे तुझे हात कांहीं स्वर्गाला पोहोंचणार नाहींत.' –प्रो. ना. के. बेहेरे–आजकालचीं पोरें.

हात हातांत देणें—लग्नाच्या वेळीं वधूचा हात वराच्या हातांत देतात. लग्न लावणें. ' एखाद्या तरुणीचा हात माझ्या हातांत दे. '–भा. ४९.

हात हालवीत येणें–हालवीत परत येणें—(वस्तु हातांत असली म्हणजे हात हालवितां येत नाहींत.) काम न करितां रिकामें परत येणें. ' राजाजींना जिनांकडून हात हलवीतच परत यावें लागलें.'–केसरी २१-११-४२.

हातचा घड—नीटनीटकें काम करणारा.

हातचा पाडणें—१हातांतील सोडणें. २ एखाद्यास त्याच्या ताब्यांतील वस्तुस मुकविणें.

हातचा फोड—तळहातावरील फोड. फार प्रिय माणूस. तळहात पहा.

हातचा मळ—(हस्तामलक) सहज घडणारी गोष्ट; सोपी गोष्ट. 'सरळ, सोपी, बालिका बोध भाषा कशी वापरावी हें म्हणजे माझ्या हाताचा मळ आहे.' –कीच.

हातांचा राखून ठेवणें—आपल्या हातांत एखादी युक्ती, उपाय ठेवणें. 'सर्व उपाय हरले तर हातचा राखून ठेवलेला बाण फुकट जात नाही.'–केसरी २१-६-३०

हातचा सुटा—सढळ हाताचा.

हातचें सोडणें—जवळचें, स्वाधीनचें जाऊं देणें, याचा त्याग करणें. 'सदय हृदय तो हा हातिचें काय सोडी'—सारुह ४·८०.

हातचें सोडुन पळत्यामागें जाणें—जवळचा लाभ सोडून देऊन दुसऱ्या लाभाची आशा करणें.–गांगा २३७

हातचें हातीं, हातच्या हातीं, हातो हातीं—ताबडतोब; लगेच.

हाता खांद्यावर खेळविणें—लाड करणें; पालनपोषण करणें. 'सवाई माधवरावास जो तो हाताखांद्यावर खेळवीत असे' –अस्तंभा. १४

हाताखालीं—१ सत्तेंत; स्वाधीन. २ दुय्यमपणें. ३ सहजगत्या; जातांजातां.

हाताखालीं घालणें—हस्तगत करणें; ताब्यांत घेणें. 'याजकरितां तो हाताखालीं घालण्याची संधि हातून दवडूं नये.'—विवि १०·५-७·१७७. 'ही शिकार आपल्या हाताखालीं घालण्याजोगी आहे असें त्याला वाटलें.'–पामो ५१.-अस्तंभा ७.

हाता चढणें—प्राप्त होणें; मिळणें."येथें उदासीनपणें रहातां । चढेल अद्वैत निधान हाता॥" —सारुह ८.११०

हाता तोंडाशीं गांठ पडणें—१खावयास सुरवात करणें; खाण्याखेरीज इतर कांहीं न करणें २ कार्यास घाईनें आरंभ

होणें. ३ बोंब मारणें. ४ जेमतेम खाण्यापुरतें मिळणें; गरीबी असणें. 'जॉन्सननें एवढा इकडचा डोंगर इकडे केला, पण पुनः हातातोंडाशीं गांठ आहे ती आहेच.' –नि.

हाता तोंडाशीं येणें––१ तारुण्यांत येणें. २ होतकरू होणें. ३ फल देण्याच्या स्थितीस येणें.

हाता निराळा, वेगळा—पूर्ण सिद्ध; पुन्हां हातांत घेण्याची जरूरी नाहीं असा. २ एकीकडे; बाजूस.

हातां पायां, हातीं पायीं पडणें, लागणें—१ गयावया करणें. २ शरण जाणें.

हातांपायांचा चौरंग होणें—पेटके येणें; त्यामुळें हातपाय आंखडणें.

हातापायाचे डगळे होणें-पडणें-मोडणें—अंग शिथिल होणें.

हातांपायांचे ढीग पडणें होणें—भीतीनें, आजारानें असहाय्य होणें.

हातांपायांच्या फुंकण्या होणें—अशक्तता येणें.

हाताबोटांवर नाचविणें—अगदीं स्वाधीन ठेवणें.

हाता बोटावर येणें—ओझें डोक्यावरून खांद्यावर खांद्यावरून हातावर, हातावरून बोटावर व शेवटीं बोटावरून खालीं याप्रमाणें उतरत येतें. यावरून संपूर्ण व्हावयाच्या बेताला येणें, बेत जवळ जवळ पार पडणें असा अर्थ. ' शेत खरेदी करण्याचें काम हाता बोटावर आलें पण काय झालें कोण जाणें सर्व फिसकटलें.'

हाता बोटावर येणें; हातावर येणें––लवकर होण्याच्या बेतांत असणें.

हातचा आंवळा, मळ,—हातचा मळ पहा.

हातचे कांकण असणें—उघडउघड असणें.

हाताचा उदार-मोकळा-सढळ—सहज देणारा; मोठा दाता.

हाताचा कुशल––कसबी; निपुण.

हाताचा जड-बळकट-थंड—१ चिक्कू; कृपण. म्ह०–हाताचा जड आणि बोलून गोड. २ मंद.

हाताचा जलद––चलाख.

हाताचा फटकळ—मारकट.

हाताची थट्टा––थट्टेनें मारणें.

दोहों हाताचे चार हात करणें, होणें—लग्न करणें, होणें.

या हाताचे त्या हातावर—ताबडतोब; जेव्हांचे तेव्हांच

या हाताचे त्या हाताला कळूं न देणें—अत्यंत गुप्तपणें करणें.

हाताचे पायावर लोटणें—पुढें ढकलणें; लांबणीवर टाकणें.

हाताचे बोटांवर मोजतां येण्यासारखे––दहापेक्षां कमी, फार थोडे.

हाताचे मांडे करणें––(व.)मांडे करण्याचें सर्व साहित्य तयार असल्याखेरीज बाई कितीहि सुग्रण असली तरी निव्वळ आपल्या हाताच्या बळावर ती मांडे करूं शकत नाहीं. तसें मनुष्य कितीहि चतुर व शहाणा असला तरी योग्य साहित्याभावीं तो कार्य घडवून आणूं शकत नाहीं.

हाताचे लाडू होणें—खरजेनें मुठी मिटून ठेवाव्या लागणें.

हाताच्या धोरणानें घेणें––मारणें, बुकलणें.

हातांत कंकण बांधणें––(यज्ञ करावयास आरंभ करण्यापूर्वी यजमान हातांत दीक्षासूत्र बांधीत असे. यावरून) प्रतिज्ञा करणें.

हातांत काय तागडू मिळाला––(व.) काय लाभ झाला.

हातांत नारळाची आई देणें—(नारळाची आई =करवंटी) भिक्षेकरी हातांत नरोटी घेऊन भिक्षा मागतात. भिक्षा मागावयास लावणें.'तुझ्या हातांत नरोटी देईन......; तरच नावांची होईन.' -रंगराव.

हातांत मीठ देणें—हातांत मीठ देऊन शपथ घेवविली म्हणजे माणूस निमकहराम (विश्वास घातकी) होत नाहीं. शपथ घेवविणें. 'जे अड्डे जिंकावयाचे ते हातांत योग्य मार्गानें मीठ देऊन जिंकले गेलेले आहेत.'–लोकशक्ति २२-२-४२.

हातांत हात घालणें––१ लांच देणें, हात दाबणें. २ मित्रत्व करणें, स्नेहानें वागणें. ३ पाणिग्रहण, विवाह करणें; ४ परपुरुषाबरोबर जाणें.

हातांत हात देणें—१ मित्रभावानें, विश्वासानें वागणें. २ लग्न करणें, मो. रुक्मिणी, २४.

रिकाम्या हातानें—कांहीं घेऊन न येतां; कांहीं नसतां; १ सामुग्री शिवाय २ कांहीं काम न करतां.

आडव्या हातानें घेणें— १ चोरून घेणें. २ झिडकारणें.

आडव्या हातानें चारणें—बाजूनें, तोंडांत हात घालून चारणें. औषधोपचार करणें घोडा वगैरेस.

हातार फळ—(गो.) रोकडी प्रचीती येणें.

हाताला चढणें—प्राप्त होणें. हात चढणें पहा. 'संसार कशाचा जरि न हाताला चढली' –राला ११२.

हाताला येईल तें—जें कांहीं हातांत सांपडेल तें.

हाताला लागणें—बिघडलेल्या वस्तूंतून कांहीं अंश उपयोगास येणें.

हाताला वंगण लावणें—लांच देणें.

हाताला हात लावणें— १ पती धर्मसंस्कारास बसला असतां पत्नीनें त्याच्या जवळ बसून हातास हात लावणें. २ दुसऱ्यानें केलेल्या कामाच्या फळांत वांटेकरी होणें. ३ नुसती अनुमति देणें; होयबाची वृत्ति स्वीकारणें.

हातावर असणें—पूर्णपणें साध्य असणें.

हातावर गहूं असणें––हातावर गव्हासारखी आकृति असेल तर त्या माणसाला यश लाभतें अशी समजूत. –कोणत्याहि कामांत यश असणें.–पकोघे प्रकरण १२.

हातावर घेणें–आणणें–काढणें––तारण गहाण न ठेवतां पैसे उसने घेणें.

हातावर तुरी देणें; हातावर तुरी देऊन–निसटून–पळून जाणें; हातावर हात देऊन पळून जाणें; हातावर हात मारून पळून जाणें—देखत देखत फसविणें; फसवून निघून, पळून जाणें. 'एवढ्या प्रयत्नानें जिजाऊला मीं याच्या ताब्यांत आणून दिलें, तिला कैदेंत ठेवण्याचें याच्याकडून कबूल करवलें, आणि शेवटीं याच्या हातावर तुरी देऊन निसटून जायची ती गेलीच!' –शिसं ३.१. 'पहा तुझ्या हातावर तुरी देऊन तुझी मुलगी कशी हिसकावून घेतों ती!' –उग्र २.१.

हातावर दिवस काढणें–लोटणें—मोठ्या कष्टानें संसार चालविणें.

हातावर देऊन कोंपरावर तोडणें––थोडा लाभ दाखवून मोठी हानि करणें.

हातावर धरणें––हातानें संभाळीत रहावयास लावणें (लहान मुलानें).

हातावर पाणी पडणें––जेवणानंतर आंचविणें.

हातावर पिळकणें—लांच देणें.

हातावर पोट भरणें; संसार चालविणें—अंगमेहनत करून उदरनिर्वाह करणें.

हातावर मिळविणें—मिळवावें व खावें अशी स्थिति.

हातावर येणें—अगदीं जवळ येऊन ठेपणें.

हातावर येणें–लागणें, हातावर दूध देऊं लागणें वासराशिवाय पान्हवणें.

हातावर शीर घेऊन असणें–घेणें—जिवावर उदार होऊन साहस करण्यास सिद्ध होणें. 'हीं हातावर शिरें घेतलेलीं माणसें! यांचें काय विचारतां!'–शिसं ४.२.

हातावर हात चोळणें—चरफडणें. हात चोळणें पहा.

हातावर हात मारणें—१ संमति दर्शविणें; टाळी देणें. खूण पटली असें दाखविणें; टाळी देणें. वचन देणें. 'द्विजागमाचा हरि हेतु जाणे । अक्रूर हस्तावरि हस्त हाणे॥''–सारुह ५.२४. ३ 'त्यांनीं हातावर हात मारून एकमेकांना वचनें दिलीं.'–मोरप्र २५.

हातावरचा संसार; हातावरचें पोट––रोज मजुरी, कामधंदा करून गुजारा.

हाताशीं स्वर्ग येणें –जय मिळणें; कृतकृत्य होणें. 'हाताशीं आला स्वर्ग।–' मरासंग्राम. १३०.

हातास चढणें–-मिळणें. हाता चढणें पहा. कशी हातास चढशील नारी। ही फिकीर पडली भारी।' –प्रला. ९६. २०८.

हातास येणें––मिळणें; फायदा होणें. 'सकळ नृप पहातां पार्थसारथ्य केलें, यदुपति तुज तेथें काय हातास आलें?' । –सारुह ६. १४३.' कळलें वांच्छित होसिल शुचि तैं येईल वर तुझ्या हाता॥'–मोकर्ण २२.३.

हातास हात मिळणें––हातघाईवर येणें. 'हातास हात मिळाल्यावर कोण कुणास मारतो याची शुद्धि राहिली नाहीं.'–वि.वि. ८.३.४५.

हातीं धरणें—१ आश्रयाखालीं घेणें. साहाय्य देणें, घेणें. २ मोकाट सोडणें (जीभ, तोंड, पोट इ.)

हातीं धोंडे घेणें— १ विरुद्ध उठणें. २ वेड्यासारखें करणें.

हातीं पायीं उतरणें-सुटणें-मोकळी होणें— सुखरूपपणें बाळंत होणें.

हातीं पायीं जीभा फुटणें—एकसारखें बोलत असणें. 'हातीं पायीं फूटती ज्यास जीभा। जेव्हां तेव्हां बोलतां वाद ऊभा॥'—सारुह ६.५९.

हातीं पायीं ठेवणें-धावणें-येणें-रेवणें—जाड्य, सुस्ती येणें.

हातीं पायीं येणें— सुस्ती येणें; अंग जड होणें. 'आम्ही सगळींजणं कण्या पितांच त्या हातीं पायीं आल्या.'—केसरी १-७-३०

हातीं भोपळा घेणें-देणें—भिक्षा मागणें, मागावयास लावणें.

हातो पान; हातो दान—१ एकाच्या हातून दुसऱ्याच्या हातांत याप्रमाणें. २ चहूंदिशीं; लवकर. ३ हां हां म्हणतां.

हातोहात-ती येणें—मारामारी करणें.

***हात ओला तर मित्र भला; हात ओला तर मैत्र भला; नाहींतर पडला अबोला**—जोपर्यंत आपल्याजवळ संपत्ति असेल व आपणाकडून कांहीं प्राप्ति होण्याची आशा असेल तोपर्यंतच आपणाशीं आपले मित्र नीट वागतात. तसें नसलें कीं, विचारीत नाहींसे होतात. (गु.) हाथ ओला तब जग भला.

हात खोरणें असतां हात कां जाळावा—[हात खोरणें =कलथा, झारा.] जर हातांत धरावयास झारा वगैरे असेल तर हात भाजून घेण्यांत काय अर्थ आहे. आपल्या हाताखालीं काम करण्यास माणसें असतां त्यांस काम सांगण्याऐवजीं स्वतः करणें हें योग्य नव्हे. साधनें असतां गैरसोय कां करावी?

हातगुण भो बरो, भांगार आपळ्यारि माती जाता—(गो.) सोन्याला शिवला तर त्याची माती होते अशा हातगुणाचा माणूस.

हात गोड कीं हाट गोड—हाट पहा.

हात गोड नाहीं, हाट गोड—[हाट = बाजार; अर्थात बाजारांतील जिन्नस.] एखादा जिन्नस चांगला झाला असतां व तसा होण्याचें श्रेय तो पदार्थ करणाऱ्या स्त्रीस द्यावयाचें नसतां म्हणतात. पदार्थ चांगला होण्याचें कारण करणारीचा सुगरणपणा नसून त्यांत घातलेले जिन्नस होत.

हात घरांत घातला तरी कोरडाच—कितीहि मदत केली तरी आपला बेईमान! कृतघ्न माणसाबद्दल म्हणतात.

आपला हात जगन्नाथ— मनुष्याच्या हातांत सत्ता आली व वर कोणी पाहणारें नसलें म्हणजे तो वाटेल तशी चैन करून घेतो. घरांत एकटीच स्त्री असली सासुसासरा नसले म्हणजे ती वाटेल तसे पदार्थ करून खाऊं शकते तिला कोणी विचारणारें नसतें.

हात जळूं नये म्हणून खोरणें हातीं घेतलें (धरलें)—(व.) आपल्याला तकलीफ पडूं नये म्हणून दुसऱ्या कोणाची मदत मोलानें अगर मेहनतीनें घेतली; आपले हात जळूं नयेत म्हणून खोरण्याप्रमाणें दुसऱ्याचा उपयोग केला. त्याला ही म्हण लावतात.

हात तरी कापावा, नाहीं तर खेकडा तरी मारावा—आपण बिळांत हात घालून खेंकडा पकडतों तेव्हां खेंकडाहि आपल्या आंकड्यानीं धरणाऱ्याचा हात असा बळकट पकडतो कीं हात तरी कापावा नाहींतर खेंकडा तरी मारावा. To Catch a Tartar. याप्रमाणें.

हात धरल्या रेडका, शेंडी धरल्या बोडका; हातीं धरलं तर रेडकं आणि डोई धरलं तर बोडकं—ज्याच्यापासून कांहीं लाभ होऊं शकत नाहीं, जो सहसा आपल्या कामीं उपयोगीं पडूं शकत नाहीं, अशाबद्दल म्हणतात. डोई पहा.

हात पसरी तो हातारी, न देईल तो भिकारी—लहान मुलें एखादी गोष्ट मागावयाची असतां म्हणतात. यांत आपण तर मागण्यास तयार आहों पण देणारानें न दिल्यास त्याच्याच मनाचा क्षुद्रपणा व्यक्त होतो असें त्यास भासविण्याचा उद्देश असतो व असें म्हटल्यानें त्याच्याकडे येणारा कमीपणा चुकविण्यासाठीं तो द्यावयास तयार होतो. नाहींतर द्यावयाचें नसल्यास 'हातावर हगली म्हातारी' असें म्हणून मुळींच देत नाहीं.

हात पसरी दरिद्री, देईना तो भिकारी— सुबत्तेचा काळ. असा काळ असतां जो मागूं जाईल तो दरिद्री व न देईल तो क्षुद्र मनाचा.—शाब २.२८८,

हात पाय काड्या ढेर वाढ्या; हातपाय काड्या पोट-ढेऱ्या वढ्या; हातपाय रोड्या, पोट लोड्या; हातापायाच्या काड्या, पोटाचा वांबू-ढेऱ्या— ज्याचे हातपाय कृश असून पोट मोठें असतें अशास म्हणतात.

हातपाय पोटीशीं, गांड परदेशी—हातपाय पोटाशीं घेऊन वेडा-वांकडा निजणाऱ्याबद्दल म्हणतात. ज्याचें संरक्षण करावयाचें त्याचें न करतां भ्याडाप्रमाणें भलतेंच धरून बसावयाचें.

हात-पाय रावले, किते करूं बायले ?—(गो.) अशक्तपणामुळें काम होत नाहीं, तेव्हां आतां मी काय करूं ? असें बायकोला म्हणतो आहे. अगदीं असमर्थ असणें.

हात पाय लुले, पण जीभ चुरचुर बोले; हात-पाय लुले तोंड चुरचुरा चाले-चणचणा बोले— ज्या मनुष्यामध्यें पराक्रम नसून नुसताच चुरचुर बोलतो अशा मनुष्यास म्हणतात. (गु.) हाथ पगनुं लंगडुं, ने जमादारनुं जोम.

हात फिरे, तेथें लक्ष्मी ठरे-फिरे— १ ज्या घरीं केरकचरा काढून स्वच्छता ठेविली जाते त्या घराला शोभा प्राप्त होते. २ उद्योगी मनुष्याची भरभराट होते.पुढें पहा.

हात फिरे तेथें लक्ष्मी फिरे व तोंड फिरे तेथें अवदसा फिरे—जो मनुष्य श्रम करतो त्यास धन प्राप्ति होते व जो नेहमीं बडबडत असतो किंवा जेथें नेहमीं कलागत चालते तेथें दारिद्र्य येतें.

हात बाटला तरी जात बाटत नाहीं— एखादा निषिद्ध पदार्थ खाल्ल्यानें कांहीं जाति बहिष्कृत होत नाहीं.

हात बाटवावा परंतु हाड बाटवूं नये— परधर्मी-यांच्या हातचें एखादे वेळेस खाल्ल्यास हरकत नाहीं परधर्मांत जाऊं नये; त्यांच्याशीं लग्नव्यवहार करूं नये. ' परजाती-मध्यें आपणास न जाण्याची जेवढी म्हणून पराकाष्ठा होईल तेवढी करावी आपल्यामध्यें एक म्हण आहे कीं, हात०— आजोच १६७.

हातभर काकडी सव्वाहात बी; हातभर लांकूड, नऊ हात ढलपी—अतिशयोक्ति, गप्पा.

हात सुटूं कुळी वचूं—(गो.) एका माणसानें खेकडा पकडण्यासाठीं बिळांत हात घातला असतां खेक-ड्यानें तो आपल्या नांगीच्या चिमट्यांत घट्ट पकडून ठेवला. कांहीं केल्या सुटेना. तेव्हां तो माणूस म्हणतो कीं खेकडा न मिळाला तर न मिळो पण एकदाचा माझा हात सुटूं दे. जिवावर प्रसंग येतो तेव्हां माणसाला लोभ सोडणें अपरिहार्य होतें.

हात हात ताजीम आणि पसा पसा रामराम— वरून दिखाऊ आदर सत्कार.

हाथको हात पहच्याने—(हिं.) हाताला हात ओळ-खतो. तु०—चोराचीं पावलें चोर ओळखतो.

हातचा नीट तो खडकावर भरील पोट— ज्याला हातानें करतां येतें तो कोठेंहि रानांत पडला तरी त्याला पोटाला मिळण्याची काळजी पडत नाहीं. तो कोठेंहि आपलें पोट भरूं शकतो.

हातचे कांकणास आरसा कशास ?-आरसा लागत नाहीं— आपल्या हातांतलें कांकण समोर डोळ्यानें दिसतें. आपली पाठ पहावयाची झाली तर आरसा लागेल. जी गोष्ट प्रत्यक्ष दिसत आहे तीस प्रत्यंतर पुराव्याची जरूर नाहीं.–शाब २.२२४. तु०-तुका म्हणे असें हातींचे कांकण। तयासी दर्पण विल्हाळक ॥–तुगा २७८१. हातींच्या कांकणा। कायसा आरसा ॥–तुकाराम.

हातचे घालविणें, निराश बसणें— जवळचें घाल-वून मागून हताश होऊन बसणें.

हातचे सोडावें, दैवावर घालावें, मूर्खानें सांगावें तसें त्यानें चालावें—हातची संधि गमावून दैवास दोष देणें व मूर्खांच्या सल्ल्यानें वागणें सारखेंच.

हातचें सोडून देऊन पळत्याच्या पाठीस लागूं नये—जवळ असेल तें घालवून दूरचें मिळण्याची आशा करणें व्यर्थ होय. तु०–1 A bird in the hand is worth two in the bush. 2 Quit not certainly for hope.-Scoth. सवि २८६२. (गु.) हाथमानुं मेलीने कारवमानुं लेवा जाय.

हातचो चणो म्हार खायना—(गो.) महा पातकी मनुष्य.

हातमे नहीं कवडी बजारमें दवडी—जिन्नस आणण्यास हातीं पैसा असल्याशिवाय बाजारांत दौडत जाण्याचा काय उपयोग ?

हातां आयिले तोंडा पावना—हातांत सांपडले म्हणून तें तोंडांत पडलेच असा नेम नाहीं. तु०—

There is many a slip between the cup and the lip.

हातां ना कास ताकां खंचें कैलास ? --[गो.] ज्याच्या हातांत पैसा नाहीं त्याला कैलास कुठून दिसायचा ?

हाता नाडे आनी कांकणकरा पाड—[गो.] हात निबर आणि म्हणे सोनाराला बांगड्याच भरतां येत नाहींत आपला अवगुण दुसऱ्यावर ढकलणें.

हातां पावनातिलें फुल देवाक—(गो.) जें फूल हाताला येत नाहीं ते 'देवाला राहूं दे' म्हणून सोडून देण्यांत भक्तीची भावना दिसत नाहीं.

हाता वेल्या पोटाचो--रोज मिळवून रोज खाणारा गरीब माणूस.

हाता खालचे लोका, तुच्छ मानूं नका—जे लोक आपल्या हाता खालीं काम करीत असतात त्यांचा कधीं अपमान करूं नका अगर त्यांस हिणवूं नका.

हाताचा जड आणि बोलून गोड; हाताचा जड तोंडाचा गोड--तोंडानें केवळ साखर पेरून प्रत्यक्ष हातून कांहीं न सोडणारा; बोलण्यांत पचळ पण हाताचा चिक्कू.

हाताचा हताळ पुरवतो पण तोंडाळ पुरवत नाहीं--तोंडाळ पहा.

हाताचीं पांची बोटें सारखीं नसतीं कोठें; एका हाताचीं बोटें पण सारखीं नाहींत--१ जगांत सर्व मनुष्यें कांहीं सारखीं नसतात. निरनिराळ्या लोकांचा स्वभाव निरनिराळा असतो. २ एकाच पारीस्थितींतील माणसांतहि फरक असतो.

हाताची मूठ, धान्याची लूट--मूठ मूठ धान्याहून जास्त द्यावयाचें नाहीं पण धान्याची लूट केली अशी बढाई; पोकळ बडेजाव.

हातांत असलेल्या एक पक्ष्याची किंमत झुडपांत असलेल्या दोन पक्ष्यांपेक्षां जास्त आहे--जवळ असलेल्या गोष्टीचें महत्व दूर असलेल्या किंवा पुढें मिळावयाच्या वस्तूपेक्षां अधिक असतें पुढील इंग्रजी म्हणीचा पर्याय.— A bird in hand is worth two in the bush,

हातांत कळसा आणि गांवाला वळसा— कांखेंत कळसा पहा.

हातांत कांहीं काम, तोंडीं रामनाम— तोंडानें रामनाम घेतांना ऐकून लोकाला वाटेल कीं हा संसारनिवृत्त निःस्वार्थी आहे. पण हा नेहमीं कांहीं ना कांहीं कामाला चाललाच असतो. म्हणजे याची संन्यासवृत्ति केवळ वरवरची असते.

हातांत झोळी सर्व गांव उकळी—एक भिक्षा मागावयास सुरवात केली कीं सर्व गांव मोकळा.

हातांत नासून पापी—[गो.] वृत्तीचा उदार पण गरीब माणूस.

हातांत नाहीं अडका बाजारांत चालला (चालली) धडका—वर पहा. [गु.] हाथमां नदि कोडी, ने उभीं बजारे दोडी.

हातांत नाहीं अडका भिंतीला जाऊन धडका-- जवळ पैसा नसल्यावर काय करणार ? पैसा असेलतर इप्सित साध्य होईल.

हातांत नाहीं चवली लग्न करावयास धांवली— जवळ कांहीं नसतां लग्नाचा बेत करणें. जवळ साधनें कांहीं नसतां मोठें कार्य अंगावर घेणें.

हातांत पळूलेले पदरात पडतां--(गो.) हातांत आलेलें आपल्या पदरांत पडलेंच असें सांगतां येत नाहीं. पुष्कळदां ऐन प्राप्तीच्या वेळीं कांहीं एक संकट उद्भवतें.

हातांत पै आणि बोलणें करतो लई--(क.) जवळ अल्प साधनें असतां मोटमोठ्या कार्यांच्या गोष्टी सांगणें.

हातांतल्या आंगठ्या गेल्या तरी बोटें कायमच आहेत कीं नाहींत—वैभव गेलें तरी मूळ वस्तु, शरीर कायमच असल्यावर वैभव केव्हांहि मिळवितां येतें. If rings are lost, here are the fingers still. तु. शीरसलामत तो पगडी पचास.- पुरुषार्थ आगष्ट १९३९ पान ५०.

हातांनी देतां हायहाय आणि चोरांनी नेतां गप्प रहाय; हातांनी देतां आणि चोरांनी नेतां--आपण होऊन कोणाला उचलून देववत नाहीं दिल्यास दुःख वाटत असतें पण तेंच चोरानें उचलून नेलें म्हणजे अगदीं मुकाट्यानें बसावें लागतें.

हातानें होईना, तोंड घेतें, करते घाई--स्वतः कोणतीहि गोष्ट करण्याचा पराक्रम नसतां तोंडानें मोठमोठ्या बाता मारावयाच्या.

हातानें होईना मुळा, तोंडाचा जाईना चाळा-- स्वतःच्या कडून कांहींच कर्तृत्व होत नाहीं पण ज्याच्या

तोंडाची टकळी मात्र सारखी चालू असते. अंगानें दुर्बळ असल्यामुळें ज्याचें बल केवळ तोंडांत आलेलें असतें असा मनुष्य या म्हणीनें दर्शविला जातो.

हातानें उबारनातिली साण भांगरानें बांदताचे व्हांवली—(गो.) जी सहाण बाईला हातानें उचलत नव्हती तीच सोन्यानें मढवून घेतल्यावर गळ्यांत वागवतां आली. दागिन्याचा हव्यास.

हातानें दिवनु पाय धरचे—(गो.) हातानें थप्पड मारायची आणि मग लगेच पाय धरायचे. हा प्रकार आधीं अपमान करून मागाहून क्षमायाचना करण्यापैकींच आहे.

हातापायास दुःख (श्रम) तर पोटास सुख—श्रम केले तर पोटभर खावयास मिळतें.

हातापायासाठीं, ठेवा कांहीं गांठीं—मनुष्याचे जोंपर्यंत हातपाय चालत आहेत तोंपर्यंत त्याचें सर्व यथास्थित चालत असतें; पण ते थकले म्हणजे कठिण पडतें याकरितां हातपाय थकल्यावर काय करावयाचें याची योजना कांहीं तरी केली पाहिजे.

हाताबोटांवर काम येतें, शेवटीं फसतें—एखादें काम अगदीं संपावयाच्या बेतास येऊन बिघडतें अशा वेळीं म्हणतात.

हाताभायर गेल्ली वोस्त आनी तोंडाभायर गेल्लें उत्तर परतँ यना—(गो.) हाताबाहेर गेलेली वस्तु आणि तोंडाबाहेर गेलेला शब्द परत येत नाहीं.

हाताला पडे चोळा, तेव्हां मिळे गोळा—(ठाकरी) कष्ट केल्याशिवाय अन्न मिळत नाहीं.

हातावर पोट भरलें आणि दिवस काढले—कशीबशी दररोज श्रम करून गुजराण करणें.

हातावर मिळवायचं आणि पानावर खायचं—(ठाकरी) हातातोंडाशीं गांठ. जेवढें मिळतें तेवढें लगेच खाण्याला खर्च होतें.

हातावर मिळविणें, पानावर खाणें—रोजच्यारोज श्रम करून निर्वाह करणें.

हातावर साखर आणि गळ्यावर कातर—तोंडानें गोड बोलून किंवा वरून प्रेम दाखवून मागें गळा कापायचा अथवा घात करावयाचा असें तोंडपुजे पण घातकी लोकांबद्दल म्हणतात.

हातावरची भाकर माझी, तव्यावरची तुझी—तवा पहा. (हिं.) तवेकी तेरी, हाथकी मेरी.

हातास काय केंस आले?—मी काय म्हातारा झालों? मी काय दुर्बल आहे. ज्या भागास श्रम पडत नाहींत तो भाग घांसत नाहीं म्हणून तेथें केंस उगवतात. हातास अथवा तळहातास केंस येणें म्हणजे निरुद्योगांत काळ घालविणें व हातानें कांहीं होत नाहीं अशी स्थिति येणें.

हातीं आला ताजवा, अन् सारा दिवस नागवा—हातांत मालकी आली म्हणजे मनुष्य इतका हुरळून जातो कीं त्याला स्वतःचीहि शुद्धि राहात नाहीं.

हातीं आला, तो लाभ झाला—जेवढें प्रत्यक्ष पदरांत पडेल तेवढाच लाभ खरा. भविष्यकालीन गोष्टीबद्दल खातरी देतां येत नाहीं.

हातीं आला ससा तो गेला कसा—दैवानें मिळालें तें कर्मानें नेलें.

हातीं आलें आणि पवित्र झालें—पदरीं पडलें पवित्र झालें पहा.

हातीं आलें घ्यावें, थोर लाभा न धांवावें—दूर असलेल्या मोठ्या लाभाच्या नादीं गुंतण्यापेक्षां जो प्रत्यक्ष थोडा लाभ होत असेल तो पदरांत पाडून घ्यावा.

हातीं कवडी, विद्या दवडी—कवड्यांनीं खेळणाऱ्या लहान मुलांस म्हणतात. जो मनुष्य सोंगट्या खेळण्याकरितां नेहमीं हातांत कवड्या घेतो म्हणजे जो खेळाच्या अगर जुगाराच्या नादीं लागतो, त्याच्या हातून विद्याभ्यास होणें शक्य नाहीं.

हातीं काम, मुखीं नाम—हातानें काम करीत असावें व तोंडानें परमेश्वराचें नामस्मरण करीत असावें.

हातीं काम, मुखीं विद्या—हातानें काम करीत असावें व तोंडानें कांहीं तरी पाठ म्हणत असावें किंवा अध्ययन करीत असावें.

हातीं घेतला फडा, बसणार वेडा—[फडा= केरसुणी] एकानें हातांत केरसुणी घेऊन झाडावयास सुरुवात केल्यावर दुसऱ्यानें तेथें बसून राहाणें शहाणपणाचें नाहीं. आपण जाण्याची ही सूचनाच समजून ताबडतोब चालूं लागावें.

हातीं घोडा धरून चालावें, दमल्यावर स्वार व्हावें—जोंपर्यंत पायांनीं चालतां येत असेल तोंपर्यंत

जवळ घोडा असला तरी त्याच्याबरोबर चालतच जावें व दमल्यास त्याचेवर बसावें. जोंपर्यंत आपणास स्वतः एखादी गोष्ट करतां येत असेल तोंपर्यंत दुसऱ्याचें साहाय्य मिळत असलें तरी घेऊं नये. मात्र जवळ असावें व जेव्हां जरूर लागेल तेव्हां घ्यावें.

हातीं दाम, बिबी करी सलाम—जवळ पैसा असला म्हणजे कोणीहि आपली खुशामत करतो.

हातीं धरला रोडका, डोई धरला बोडका—डोई पहा.

हातीं ना पदरीं आणि हाटा चालली विद्री—जवळ कांहीं पैसा नसतां बाजारांत जाणें हा मूर्खपणा आहे. हातांत नाहीं अडका पहा.

हातीं नाहीं अडका, बाजारांत घ्यायला चालला धडका—अडका पहा.

हातीं नाहीं दाम, मग कोण करतो काम—आपल्याजवळ पैसा नसेल तर आपलें काम कोण ऐकेल?

हातीं (हातांत) नाहीं रुका, त्येच्या तोंडावर थुंका—ज्याच्याजवळ द्रव्य नसतें त्याचा सर्वत्र अपमान होतो.

हातीं नाहीं बोवा : काये जेवा :—(महानु.) रिकामा आग्रह,

हातीं पायीं चाळा, बोल ठेवी कपाळा—आपण स्वतःच्या आपल्या कृतीनें घात करून घेऊन नशीबास दोष लावणें.

हातीं पायीं जिभा फुटणें—फार फार बोलणें; अतिशय वावदूक असणें. ' जेव्हां येती भार नैय्यायिकांचे; गोळा होती प्राण मीमांसकांचे ॥ हातीं पायीं फूटती ज्यांस जिभा जेव्हां तेव्हां बोलतां वाद उभा ॥ '—सारुह ६.५९.

हातीं भाला, जेऊं घाला—जबरदस्तीनें आपलें काम करून घेणें. पूर्वी भालाईत लोक खेड्यापाड्यांतून असा जुलूम करीत असत. पाठभेद—खांद्यावर भाला जेवायला घाला. खांदा पहा.

हातीं भोपळा, देश मोकळा—एकदा भीक मागावयाचें ठरविलें कीं दाही दिशा मोकळ्या. मग कोणाची लाज धरण्याचें कांहीं कारण नाहीं.

हातीं लागली चेड आणि धर मांडवाची मेढ—चेड पहा. हातांत मुलगी आल्याबरोबर मग न थांबता तेथल्या तेथेंच लग्न उरकून घ्यावयाचें. अतिशय उतावीळ घाई करण्याबद्दल म्हणतात.

हातीं वावडीची दोरी, मुलें नाचती परोपरी—ज्याप्रमाणें वावडी उडवीत असतां तिचा दोरा हातांत धरला म्हणजे तिच्या गतीप्रमाणें मागें पुढें इकडे तिकडे नाचावें लागतें त्याप्रमाणें एखादें काम पत्करलें म्हणजे मग त्याच्या अनुषंगानें इकडे तिकडे हेलपाटे घालावे लागतात.

हातीं सोंगट्या फासे, दैव त्याला हांसे—जो मनुष्य फांसे व सोंगट्या घेऊन जुगार खेळूं लागतो त्याचें नशीब बहुतेक त्यास दगा देतें.

हांतरणें—अंथरणें पहा.

***हांतरण्याला गरम पांघरण्याला गरम-नरम, मग निजण्याला कां वाटावी शरम ?**—सर्व यथास्थित असल्यावर मनुष्यानें चैन करण्यास काय हरकत आहे ?

हांतरूण—अंथरूण पहा.

***हांतरूण पळौन पाय पातळावचे; हांतुळाताकित पाय निडुंवुंका**—(गो.) अंथरूण पाहून पाय पसरावेत; अंथरूण पाहून पाय पसरणें, पाहा.

हांतरूणावर आलेलीला नको म्हणायचें, मग खुणावीत बसायचें—(अनिष्ट.) हातांत आलेला लाभ सोडून मागून तळमळत बसून खटपटी करण्यांत काय अर्थ.

हातोडा— हातोड्याचा घाव पडला म्हणजे कांचचा चुरा होतो पण हिरा ऐरणींत शिरतो—सामान्य माणूस मारानें, धाकानें वंगतो पण जबरदस्त दाद देत नसतो.--चित्रमयजगत्. मार्च १९४२.

हात्—हात् तुझ्या कामांत भट पडो !—कामांत भट पडणें, पहा. " 'हात्॰' ही शापोक्ति याच कारकीर्दीत (रावबाजींच्या) घडलेल्या भटांच्या गोष्टींवरून उत्पन्न झाली."—एल्फिन्स्टन चरित्र १.१६७.

हातेण; हात्याण—हातेण(णें)करणें; हात्याणास येणें—जनावरानें माज करणें. ' पडल्या एका शिंग्यावरि बहु शिंग्या करूनि हातेणें । '—मो उद्योग १३.२१७.

हाथी—हाथी निकल गयो, दूम अटक रही—हत्ती गेला, शेंपूट राहिलें. हत्ती पहा.

हाथीका बोझा, हाथीही उठाता है—सोझ्याचा भार मोठाच उचलू जाणें.

हानि—हानि, लाभ, मृत्यु, हीं सांगून येत नाहींत —मनुष्याचें नुकसान केव्हां होईल, तसाच त्यास लाभ केव्हां होईल व त्यास मृत्यु केव्हां येईल हें कांहीं सांगतां येत नाहीं.

हाय—हाय खाणें-घेणें—१ जिवास लावून घेणें. २ भीति वाटणें.

हाय घालणें—ध्यास घेणें; धोसरा काढणें.

हाय दोस; हाय दोस-दोस्त धुला-दुला—(क्रि. घालणें, माजणें, उठणें, भांडणें करणें). मोहरमांत ताबुतांच्या व स्वाऱ्यांच्या मिरवणुकींत वरील प्रकारचे उद्गार काढून लोक छाती पिटीत जात असतात अशा वेळीं सर्वत्र गोंधळ, गडबड सुरू असते. त्यावरून गडबड; गोंधळ; अव्यवस्था. [' हाये दोस्त दूल्हा ' म्हणजे हायहाय, मित्रा नवरदेवा ! असा मूळ अर्थ. हसन आणि हुसेन यांच्या लग्नानंतर लवकरच करबलाच्या लढाईत त्यांना मृत्यु आला. तेव्हां त्यासाठीं शोक करीत वरील उद्गार मुसलमान लोक ताबुताच्या वेळीं काढतात. डोले या त्यांच्या कबरींचीं प्रतीकें होत. पण आज मुसलमान ताबूत मिरवीत नेऊन गोंधळ, धिंगामस्ती मात्र करतात. यावरून वाक्प्रचार पडला.]

हाय पतकरणें-मोकलणें—पश्चात्ताप करणें.

हाय सोडणें-देणें-घालणें—उसासा टाकणें.

हायहाय करणें—१ मत्सरानें जळफळणें. २ दुःख, शोक करणें. –गांगा. २६०.

हायसें वाटणें—स्वस्थता वाटणें.

हायीस येणें; हायास येणें-आणणें—मट्टयास येणें; थकणें; जेरीस येणें ' असे अडचणींत मोंगल पडून हाईस आले. ' –पेब १५०.

हायस—हायस लावन मासो काढता—(गो.) गळाला आमिष लावून मासा पकडणें.

हार—हार खाणें-घेणें-जाणें-मानणें-पत्करणें —१ माघार घेणें; 'पराभूत होणें.' 'चलाखपणांत आम्ही कोणत्याहि लोकांस हार जाणार नाहीं. '–नि. २ तोटा सोसणें. ३ शरण जाणें; आपला कमीपणा कबूल करणें. ' पावेल मजपुढें, हा, घेउनियां हार, विप्र, तापातें।' –मोद्रोण २३.२५.

हारीं जाणें—पराभव पावणें. हार जाणें पहा.

***हार खाली-मानली(कीं)झगडा तुटला**—जेव्हां वादविवाद होत असेल, किंवा तंटा माजेल तेव्हां एका पक्षानें मागें घेतलें म्हणजे आपोआपच भांडण मिटतें. तेव्हां पड खाऊन तंटा मिटवावा.

हारजित कोणाचे स्वाधीन नाहीं—आयुष्यामध्यें नेहमींच कोणी यशस्वी होतें असें नाहीं, यशापयश हें मनुष्याच्या हातांत नसून दैवाधीन आहे.

हार मानली पण झगडा तुटो—आपली बाजू लंगडी पडली तरी हरकत नाहीं पण कोणीकडून तरी तंटा मिटावा.

हार—हार उट्टा म्हुण गांयडोळ उट्टा—(गो.) मोठ्या सापानें उडी मारली म्हणून क्षुद्र जंतूनें उडी मारण्यांत काय फायदा ! आपल्यापेक्षां अतिश्रेष्ठ माणसाची नक्कल करण्यांत काय फायदा !

हार म्हटल्या मार, ससो म्हटल्या सांभार—(गो.) हार म्हटल्यास मार समजणारा व ससा म्हटलें असतां सांबर समजणारा. ज्यास कांहींच कळत नाहीं असा.

हारसड—हारसडीस आणणें—आटोक्यांत, मर्यादेंत आणणें.

हारसडीस येणें—आटोक्यांत येणें.

हारा—वाळकाचा हारा आणि ताकाचा डेरा—गरीबांचें अन्न.

हाराभर काम आणि भाराभर दाम—पुष्कळ काम केल्यास पुष्कळ मजूरी मिळते.

हाल—हाल कुत्रा न खाणें—अगदीं विपन्न स्थिति येणें; कोणीहि विचारीत नाहीं असें होणें. 'साल कुत्रा न खाणें' असा मूळचा पाठ असावा. चामडें इतकें वाळलेलें कीं, तें कुत्रा देखील खाणार नाहीं असा त्याचा अर्थ.

हालांत ख्याल—विपत्तीमध्येंहि चैन करणें. अडचणीच्या प्रसंगींहि आनंदांत असणें.

हाल—हाल खुशामत, ताजा रोजगार—तात्पुरतें ठीक असणें.

हाल खुशामत, ताजी रोटी—रोज खुशामत केली कीं चांगलें चमचमीत खावयास मिळतें.

हाल गया अहवाल गया, दिलका खियाल न गया—(हिं.) सर्व गेलें पण स्वभाव राहिला.

हालगो – हालगो मालगो, दिवस घालगो—कसें बसें काम करून दिवस घालविणें.

हालणें—हालतां त्या फातरार उबें रांवचें म्हय—(गो.) हालत्या दगडावर उभे राहाण्यांत काय फायदा ? उभे राहाण्याचा पाया नेहमीं बळकट असा पाहावा. मदतीची अपेक्षा मदत करणाऱ्यापासूनच करावी.

हाले तिकडे तोले—न्यायाचा कांटा पैसेवाल्याकडे जसा जितका झुकतो, तितका तसा निर्धन मजूर दरिद्र्यांकरतां झुकत नाहीं. " हाले तिकडे तोले " हा जगाचा सिद्धांतच आहे.–धनुर्धारी, दिवाळी अंक १९–१०–४१.

हालविणें—हालवून जागा करणें—१ आयासानें स्थान मिळविणें. २ मुद्दाम, बळेनें उठविणें. ३ स्पष्टपणें, जोरानें सूचना देणें, बजावणें. परिणामाविषयीं जाणीव देणें.

हालवून खुंटा बळकट करणें—खुंटा पहा. 'हालवूनि खुंट । आधीं करावा बळकट ॥'–तुगा ३६३४.

हालवले हात तर मिळेल भात—काम केल्याशिवाय पोटाला मिळत नाहीं.

हालवून खुंटा बळकट केला, सारा प्रयत्न फसला—शंका राहूं नये म्हणून ती दूर करून घेण्यास जावें तों मुदलांतच सर्व बिघडतें.

हालेसा—हालेसा ! वावराक येरे. हांव भुरगो मगां. हालेसा ! जेवक येरे, हांव मान्याय मगा—(गो.) आलेसा पहा. कामाच्या वेळेला आपण लहान म्हणून सांगून तें चुकवणें व खाण्याच्या वेळीं आपण मोठा या अधिकारानें सर्वांच्या पुढें येणें.

हाव—हाव करणें—हवे हवेसें करणें; मिळण्यासाठीं धडपडणें,

हाव घालणें—आशा धरणें. ' मार्जारें देखिला लोणियाचा गोळा । लावूनिया डोळा हाव घाली । '

हावभरी भरणें-होणें—अतिशय उत्सुक होणें; लोभ सुटणें.

हावेनें–हावेस–हावें भरणें—१ उत्सुकतेनें पत्करणें. २ चिकाटीनें करणें; मन घालून प्रयत्न करणें. ३ फार महत्वाकांक्षी बनणें, ४ हट्टास पेटणें. ' तो त्यावरि नकुल उठे भरले दोघेहि संगरीं हावें ।'–मोकर्ण ४५.३४.

हांव— हांव खाता तां निबार दादा खातां तां मऊ—मी खातों आहे तें निबर आहे, दादा खातो तें मऊ आहे. आपलें तें वाईट, दुसऱ्याचें तें चांगलें, असें मानण्याची वृत्ति.

हांव जेवतां आनि तुका भुकेचें वकद दितां—शिजलेलें अन्न मी जेवतों आणि तुला भूक लागली असेल तर भुकेचें औषध देतों. दुसऱ्याच्या दुःखाविषयीं सहानुभूति न धरतां त्याला डावलून आपलाच स्वार्थ साधणें.

हांव पैलीं ओझेली, माका कित्या जाय भाडेली—(गो.) मी ओझीं वाहातों तर मला हमाल कशाला पाहिजे. हमालाला दुसरा हमाल कशाला ?

हांव हांसता देसाक. देस हांसता म्हज्या भेसाक—(गो.) मी माझ्या देशाकडे पाहून हांसतों, आणि देश माझ्या कपड्याकडे पाहून मला हांसतो. जेव्हां आपण दुसऱ्याकडे पाहून हांसतों, तेव्हां दुसरेहि आपल्या व्यंगाकडे पाहून हांसतात.

हांव हांसतां लोकांक, शेंबुड म्हज्ना नाखाक—(गो.) मी हांसे लोकाला शेंबूड आपल्या नाकाला पहा.

हांवें कॅललें व्यर्थ गेलें आनि धावा मागल्यान चेड्डू ओगि गेलें—(गो.) (आईबापांनीं) पालनपोषण केलेलें व्यर्थ ठरतें आणि मुलगी नवऱ्याच्या पाठोपाठ निमूटपणें चालूं लागते.

हावरा— हावऱ्या हावऱ्या सण कधीं, सगळ्या –साऱ्या गांवाच्या आधीं—अधाशी मनुष्यास नेहमीं सण असावा असें वाटत असतें.

हाशील—हाशील करणें—१ नफा, फायदा करूं जाणें. २ (उप.) गमविणें, घालविणें.

***हाशिल कॅल्या वाशील जाता**—(गो.) फायद्याला म्हणून जावें तर तोटा होतो.

हास्य—हास्यवदनी असतो, तो गुह्य झांकून ठेवतो—जो मनुष्य नेहमीं हंसतमुख असतो तो खोल मनाचा असतो, तो कधीं आपल्या मनांतील गुप्त गोष्टी कोणास कळूं देत नाहीं. उ०–हंसता पुरुष, रडती रांड. An open countenance often conceals close thoughts. –सवि. ४२७.

हास्य विनोद रुदन, स्त्रियांचे स्वाधीन—हंसणें, विनोद करणें व रडणें या गोष्टी स्त्रियांस स्वाभाविकच असतात.

हिकमत--हिकमत केली मोठी आणि घोरपड आली कंठीं--एखादी गोष्ट करण्यांत मोठें चातुर्य दाखवावयास जावें तों ती गळ्यांत येऊन एखादी भानगड अंगावर यावी अशी स्थिति.

हिंग—हिंगतुपास-तुपावारीं—(क्रि. जाणें, खर्चणें). नेहमींच्या घरखर्चासाठीं; प्रपंचासाठीं.

हिंग लावणें; हिंग लावून विचारणें-पुसणें-मानणें-मोजणें—(नकारार्थी प्रयोग) हिंग हा महाग असल्यानें फक्त मेजवानीच्या वेळच्या पदार्थांत घालीत. यावरून महत्त्व, आदर देणें, काळजीनें विचारपूस करणें; काळजी घेणें.

हिंग हगणें—रोग इ. मुळें अशक्त बनणें; आजारी असणें; रोडावत जाणें.

हिंगणें वाफणें—पदार्थांस प्रथम हिंग लावून मग फोडणीस टाकतात. (लक्षणेनें व निषेधात्मक वापरतात.) १ आरंभहि नसणें; अपुरें राहणें. २ शेत जमिनीस वाफ धरणें. ३ शेत भांगलणें. ४ आजारांतून बरें होऊं लागणें.

हिंगालोण्याचा—(ना.) अशक्त व नाजूक प्रकृतीचा.

हिंगाष्टक—१ सुंठ, २ जिरें, ३ पिंपळी, ४ओवा, ५ सैंधव, ६ जिरें, ७ शहाजिरें, व ८ हिंग यांचें चूर्ण.

हिंगाचा खडा—१ त्रासदायक गोष्ट, व्यक्ति. २ गडबड्या, तल्लख माणूस.

हिंगाचा वास--संपत्ति, अधिकार नाहींसे होऊन मागें राहिलेला लौकिक. काप गेले भोकें राहिलीं, या अर्थी.

हिंगाचें पोतें--१ पूर्वीची मोठी पण आतां केवळ पोकळ लौकिक राहिला आहे अशी व्यक्ति. २ जवळ पुंजी असलेला माणूस.

***हिंग गेला आणि बास राहिला**—प्रतिष्ठा, मोठेपणा, वैभव गेलें पण त्याचा लौकिक, स्मृति मात्र राहिली. हिंगाचा वास पहा. -गांगा ८९. (गु.) हिंग जाय पण दबडु गंधाय.

हिंगजिऱ्यापुढें, कोथिंबिरीचा काय वास ? तरणीताठी सासूबाई, सुनेचा होतो त्रास--अर्थ उघड आहे. ज्या ठिकाणीं तरुण विधवा सावत्र सासू असते तेथें याचें प्रत्यंतर येईल.

हिंगण---हिंगणानें हिंगपण केलें तरी चंदनानें चंदनपण केलें पाहिजे—[हिंगण = एक क्षुद्र झाड] हिंगणाची आणि चंदनाची बरोबरी होत नाहीं. थोराची व नीचाची तऱ्हा एक नसते. ‘ कल्पतरु आणि बाभूळ । हिंगण आणि मलयागर ॥’

हिंगे--हिंगे तांब्या तिंगे पाणी, तुम्ही ही घ्यान् मले ही द्या—(व.) ऐदी मनुष्य, ज्याला उठण्या बसण्याचा कंटाळा, त्याला पाणी आणावयास सांगितल्यावर तो बसल्या जागेवरूनच तांब्या व पाणी ठेवण्याचें ठिकाण दाखवितो. व उलट तुम्ही पाणी घेऊन मजकरितांहि आणा असें म्हणतो. आयतोबा मनुष्यांस ही म्हण लावितात.

हिजडा---हिजड्यांनीं जोडचें,मुंड्यांनीं खावचें; हिजड्याची जोड मुंड्यानें खावी—मुंढा हा हिजड्याचा सोबती किंवा नोकर असतो. एकानें मिळवावें व दुसऱ्यानें खावें, उपटावें. याअर्थी.

हिडगा---हिडग्याची व्याली गाय, खांद्यावर वासरूं, जत्रेला जाय—[हिडगा = भटक्या, उनाड, लहरी माणूस.] बेफिकीर उनाड माणसाला कशाचीहि काळजी नसते.

हिंड---हिंडांतलें गोरूं हिंडांत आयलें—(गो.) एखाद्यानें समानशील मंडळींत आपला समवेश करून घेणें.

हिंडणें---हिंडणवारे करणें-लागणें—उगाच भटक्या मारणें; इतस्ततः फिरणें.

हिंडावें मुंडावें—तीर्थयात्रा करणें व संन्यास घेणें. ‘ नलगे हिंडावें मुंडावें कांहीं । साधनाची आटाआटी ॥’

हिंडणें नारदाचें आणि निजणें कुंभकर्णाचें—हीं अचाट म्हणून प्रसिद्ध आहेत व कधीं सरावयाचीं नाहींत.

हिडिंबा—ही भीमाची स्त्री व घटोत्कचाची आई होती. ही फार अक्राळ विक्राळ असल्यामुळें एखाद्या धिप्पाड, ओंगळ किंवा कुरुप स्त्रीस हिची उपमा देतात.

हित—हिताची हितखोर व जन्माची फजितखोर—सुनेस उद्देशून सासू म्हणते.

हिताचे मामंजी ठेवले घरीं, आणि चौघी सुना गरभार करी—मागें पहा. एखाद्यावर मोठा विश्वास

टाकावा व त्यानेंच बेमालूम फसवावें अशी स्थिति झाली म्हणजे म्हणतात.

न हिंदु र्न यवनः—धड इकडेहि नाहीं व धड तिकडेहि नाहीं असा मागें न मध्यें पहा.··टि ४.३६९.

हिमटा—हिमटा घेई चिमटा, न जाऊन बसे कोणटा—(व.) [हिमटा=नीच, बेहिमती मनुष्य.कोणटा=कोपरा.] एक दुसऱ्याला चिमटा घेतो. दुसऱ्याच्या खोड्या करतो, व मग त्याचे परिणाम अथवा शिक्षा टाळण्यासाठीं निमूटपणें एका कोपऱ्यांत जाऊन बसतो असा मनुष्य यांत वर्णिला आहे. आपण साळसूद असल्याचें तो वरपांगीं दाखवीत असला तरी तो खटयाळ व लबाड समजावा.

हिमटी घेई चिमटा न् भडभडीचा बोभाटा—कांहीं माणसें हळूच आपण मागें राहून खोडया करतात व नेहमीं खोडकर म्हणून प्रसिद्ध असतात. त्यांच्या नांवानें माल ओरड होते.

हिमटें लागलें वाढूं, आणि खादाड लागलें रडूं—जेवण्याच्या वेळीं जर कंजूष, हिमट्या माणसाकडे वाढावयास दिलें तर खादाड माणसास उपाशीं राहण्याची पाळी यावयाची. कंजुष माणसाकडून अधाशी माणसाची तृप्ति कशी होणार ?

हिमटी—हिमटी काढून रडणें—(कु.) ओक्साबोक्सीं रडणें.

हिंमत—हिंमत हरणें—अवसान नाहींसें होणें; गडबडणें.

हिंमत धरणें, मग हरणें किंवा जिंकणें—मनुष्यानें कधीं धैर्य सोडूं नये, मग यश मिळो किंवा न मिळो. –सवि २६६७. 1 Over shoes, over boots 2 In for a penny, in for a pound.

***हिंमत मर्दा, मदत खुदा**—मनुष्यानें धैर्य धरून कार्यास आरंभ केला तर त्यास परमेश्वर साहाय्य करतो. "आतां 'हिंमत मर्दा मदत खुदा' मारतां मारतां मरावें. नजीबखान म्हणजे कोण जिन्नस ? चढतें घोडियानिशीं उडवून टाकूं."–भाब ४४; भाव. ७ (गु.) हिम्मते मरदां, मददे खोदा, पादशहाकी बेटी फकीरसे बिहा. A man of courage never wants weapons.

हिमाईत-यत—हिमाइतीचा गाढव;हिमाइतीची गधडी—१ आवडतें गाढव. २ आवडता पण नालायक आश्रित.

***हिमायतीची गधडी, लाथा मारिते**—थोराचा आश्रय असणाऱ्या मनुष्याकडून काम बरोबर होण्यास अडचणी येत असतात.

हिमाइतीचा गाढव तेजीला लाथा मारी—थोराचा आश्रय असलेला नीच मनुष्य श्रेष्ठ पुरुषांचाहि अपमान करतो.

हिमालय—हिमालयावर पाऊस आणि सिंधमध्यें पीक—हिमालयावर पाऊस पडतो त्यामुळें सिंधु नदीस पूर येऊन तिच्या कांठच्या पिकांस पाणी मिळतें व ती चांगलीं येतात.एका चांगल्या गोष्टीचा दूरवर परिणाम होतो.

हियें—हियें घालणें—छाती फुटणें. 'जो गाजत जंव आइकती । तंव उभेचि हिये घालिती ।' –ज्ञा. १. १६३.

हिया फोडणें—अंतःकरण खुलें करून बोलणें. 'येणें माने जियाचें । हियें फोडावें ॥' –ज्ञा ९.३५.

हिरकणी—हिरकणी ती हिरकणी, गारगोटी लाजिरवाणी—हिरा तो हिरा, गार ती गार; पहा.

हिरडा—हिरडा खावा आणि जायफळाचा कैफ जाणावा—हलकी गोष्ट घेऊन सुद्धां भारी गोष्टीची प्रतिष्ठा, गुण इ, दाखविणें. कोंडयांचा मांडा याप्रमाणें.

हिरवा—हिरवा भाजला खाणें—(अन्न कसेंहि असलें तरी अधाशी, भुकेला माणूस जसा ते कसोशीनें फन्ना करतो त्याप्रमाणें) अतिशय त्रास देणें, छळणें.

हिरवी झेंडी दाखविणें—हिरवें निशाण दाखविलें असतां मार्ग मोकळा आहे असें मानतात यावरून मोकळें सोडणें, पूर्ण वाव देणें. 'अल्ली बाहादूरखान ह्यास १४४ कलमाखालीं हिरवी झेंडी दाखविली पाहिजे –विविधवृत्त ३–१०–३७. Green sign.

हिरव्याला भाजलेलें सांपडलें—फायदा होणें. निरभ्रचंद्र २०२.–झांकली मूठ २४.

हिरसा—हिरसें तट्टू—१ नाठाळ तट्टू. २ बढाईखोर व्यक्ति. ३ व्यसनी; व्यभिचारी. 'लंडेगुंडे हिरसे तट्टू त्यांची संगत धरूं नको.'–अफला.

हिरा--हिरा दिव्रा--पक्का मूर्ख.

***हिरा उकिरड्यांत पडला तरी चमकतांना राहात नाहीं**--श्रेष्ठ मनुष्याचें तेज विपत्तींतहि लुप्त होत नाहीं.

हिरा ठेवितां ऐरणीं । वांचे मारितां जो घणीं तोचि मोल पावे खरा । करणीचा होय चुरा ॥--हिरा हा ऐरणीवर ठेवून मोठ्या हातोड्यानें त्याजवर मारलें असतांहि जो फुटला नाहीं तोच खऱ्या किंमतीला उतरतो दुसरे जे बनावट असतात त्यांचें घावाबरोबर पीठ होतें. [करणीचा=बनावट]-तुगा २५ (जोग कृत).

हिरा तो हिरा, गार ती गार--हिरा हा गारेपेक्षां केव्हांहि श्रेष्ठ ठरणार. या दोघांची योग्यता कधींहि केव्हांहि सारखी होणें नाहीं. त्याप्रमाणें थोर माणसें हीं केव्हांहि थोरच व हलकीं तीं हलकीं राहातात. तु.--(अ) जरि उकिरड्यांत पडला, मळला न हिरा तथापि सामान्य ।-मोसन्मणिमाला २७. (आ) आंतहि अधचि. गारा वेचुनि टाकील कां कवि हिऱ्यातें ?॥-मो आदि, २९-४२' (इ) जरि कोंडिला तरि हिरा, स्तवि-विलाचि शिरीं चढे न शिरगोळा ।--मो आदि २८.४४.

हिरा मुखसे ना कहे, लाख हमारा मोल--हिरा कांहीं आपल्या तोंडानें आपली किंमत लाख रुपये आहे असें सांगत नाहीं. उत्तम मनुष्याच्या गुणांची परीक्षा जग करतें. त्याला स्वतःच्या गुणांची टिमकी वाजवावी लागत नाहीं.

हिऱ्याची परीक्षा घणावांचून होत नाहीं--वर पहा. आपत्कालांत थोर माणसांचे गुण चांगले कसाला लागतात.

हिऱ्याच्या खड्याला, सोन्याचेंच कोंदण पाहिजे--मागें पहा.

हिऱ्यापोटीं गारगोटी--तुळशींत भांग पहा. चांगल्या थोर माणसाचा मुलगा जर वाईट निघाला तर म्हणतात.

हिंव--हिंव भरलें चंद्राला आणि ताप भरला सूर्याला--चंद्र व सूर्य या दोघांनाहि लाजविलें, अशा अर्थी. तु.-चंद्राला म्हणते उगवूं नको सूर्याला म्हणते मावळूं नको.

हिंवर--हिंवर तरूची शीतल छाया--हिंवर हें एक कांटेरी झाड आहे. हिंवराच्या छायेंत बसूं नये असा संकेत आहे. यावरून निरुपयोगी गोष्ट.

हिंवशी--हिंवश्या पाण्याच्या भाकरी खाणें--(व.) काळजी नसणें.

हिंवाळा--हिंवाळा भोगी, पावसाळा रोगी, उन्हाळा जोगी--उन्हाळा पहा.

हिशेब; हिशोब; हिसाब--हिशेब ठेवणें--जुमानणें; मानणें. " 'गारद्यांचा हिशेब आम्हीं ठेवीत नाहीं.' असें गारद्यांनीं ऐकतांच गारदी चपापले."-पेब ८७.

हिशोब-हिसाब असणें--पर्वा असणें; किंमत, महत्त्व असणें. 'या उपरीही गनीमाकडे राहाणेंच असेल तरी सुखेंच राहाणें. तुमचा हिसाब तो काय आहे ?'-रा १५.३४२.

हिसाब काय आहे--काय किंमत आहे ? एवढी भीति कशाला ! या अर्थी. 'गनीमाचा हिसाब काय आहे ?......तुम्हीच लोक या राज्याची पोटतिडीक धरिता तेव्हां औरंगजेबाचा हिसाब धरीत नाहीं.'-रा १५ ले. ३४७.

हिसाब धरणें प्रतिष्ठा बाळगणें; पर्वा करणें.

***हिशेब कवडीचा, बक्षिस लाखाचें**--हिशेब द्यावयाच्या वेळेस अगदीं कवडीपासून द्यावयाचा. पण बक्षीस देण्याची वेळ आली म्हणजे अतिशय उदार. बक्षिस म्हणून वाटेल तितकें पण हिशेब अगदीं चोख पैनूपैचा पाहिजे. हिशेबाला रती० पहा. (गु.) हिसाब कोडीनो ने बख्शेश लाखनी. (हिं.) हेसाब जव जव, बख्शेश सो सो.

हिशेबाची तोंड मिळवणी, कारकुनाची करणी--कसा तरी हिशोब लिहून दोन्हीं तोंडांची बरोबरी करणें, जमा व खर्च बरोबर दाखविणें; हिशोबांत गडबड करून बाकी शून्य दाखविणें, हें कारकुनी कौशल्य आहे.

हिशेबाला रती आणि बक्षिसाला हत्ती--मनुष्यानें हिशेबाच्या बाबतींत अगदीं रतीपासून हिशोब ठेवावा त्यांत मुळींच देखील कसर सोडूं नये. आणि देणगी देण्याच्या वेळीं मात्र मग मागेंपुढें पाहूं नये.

हिशेबीं द्यावें घ्यावें, बापालाहि न सोडावें--हिशोबी देणें घेणें निघेल तें कोणालाहि सोडूं नये. व्यवहारांत नेहमीं चोख असावें.

हिशेबीं नाडतो, आणि पेंवणार बुडतो--जो मनुष्य हिशोबांत फार खाराखोरी करणारा असतो त्यालाच

पुष्कळदां चट्टा बसतो व पोहणारा असेल तोच एखाद्या वेळीं अधिक साहस करून बुडतो.

हिस्सा---हिश्शाचा हिस्सा, हिंवर चिंचेचा भाचा आणि त्याला आला उल्हास--आपल्या कुटुंबांतील कोणी लहान जरी वांटेकरी असला म्हणजे तो कोठला तरी संबंध लावून आपला हिस्सा मागूं लागतो.

हिळा---हिळया हात खिळया लायूना--(गो.) कांहींहि काम न करतां आळसांत काळ दवडणें.

हीण---रीण फिटेल पण हीण फिटणार नाहीं--ऋण, रीण पहा.

हीर---हीर भाजणें--(ल.) शौर्य, तेज इ. चा नाश करणें; मऊ आणणें. 'काळाग्नि हा रुद्ररूपी रामराजा भाजिल हिरवा हीर।'-मध्व ६६.

हुक्का--हुक्कापाणी बंद करणें--[हुक्कापाणी=खाणें पिणें इ. व्यवहार] वाळींत टाकणें; जातिबहिष्कृत करणें. जातींतील माणसें एकमेकांपासून हुक्का घेऊन पितात पण जातींतून कोणी बाहेर गेला म्हणजे त्याच्याबरोबर हुक्का ओढीत नाहींत कीं त्याला हुक्का देत नाहींत.

हुंगणें--हुंगून खायचें आणि कुंथून हगायचें--खातांना फार खाराखुसणीं करावयाची व शौचासहि होत नाहीं म्हणून तक्रार करीत असावयाचें. तोळा मासा प्रकृति. फार जपून वागणें. चोखंदळ माणसाविषयींहि म्हणतात.

हुच्चा--हुच्चाभाई मणी--१ क्षुद्र, हलकट माणूस. २ मूर्ख, बेअक्कली माणूस.

हुचे दिवाणी--हुरळून जाऊन धाडसाचें काम करूं पाहणारा माणूस. हुचभाई.

हुजूर---हुजुराला मुजरा आणि हुजऱ्याला मुजोरा--मोठ्या मनुष्यांशीं नम्रतेनें वागणारा व हलक्या लोकांशीं उरमटपणानें वागणारा.

हुडा--जिवाचा हुडा करणें--(व.) जिवाचा आटापिटा करणें.

हुंडा--हुंडा बैल--(ल.) मूर्ख माणूस.

हुंड्या कपाळाचा--अरुंद कपाळाचा.

हुंडा--हुंडा घेऊन लग्न करणें, कंटकशय्येवर निजणें--फार हुंडा घेऊन लग्न करण्यांत पुष्कळदां धोका असतो. कारण जो मोठा हुंडा द्यावयास तयार होतो त्याच्या मुलीमध्यें कांहीं दोष असण्याचा संभव असतो. तसेंच श्रीमंताची मुलगी संसाराला सुखावह होत नाहीं. A great dowry is a bed full of brambles -सवि १२०.

हुतुतु--हुतुतु घालणें--धिंगाणा घालणें. हुतुतूच्या खेळांत फार गोंधळ, दांडगाई होते.

हुतुतु माजणें--गोंधळ होणें. 'कोणाची (घोडीं) हातीं लागलीं आणि कोणी वेड्यासारखे इतस्ततः फिरूं लागले ! सर्वांची एकच हुतुतु माजली !'-पामो ४४.

हुतुतूची घाई होणें--गोंधळ, गर्दी, गडबड होणें. हातघाई माजणें. 'हुतुतूची घाई थडीमर झाली. '-भा १०५.

हुंदीर--उंदीर पहा.

हुंदीर मलाकाक गेलो--(गो.) मलाकाला जाऊन परत आलेला उंदीर स्वतःच्या शहाणपणांत कांहीं भर घालीत नाहीं. साधारण प्रतीचे लोक परदेशांस जाऊन आले म्हणजे उगीचच आपल्या ज्ञानाचा टेंभा मिरवीत असतात, त्यांस ही म्हण उत्तम रीतीनें लागू पडते. तु.--उंदीर मस्कतास गेला पहा.

हुंद्राक मांजर गवाय--(गो.) उंदराला मांजर साक्ष. उंदीर पहा.

हुद्दा--हुद्दा आपले हातीं आहे तर दुष्टांशीं सावध राहे--ज्याच्या हातांत अधिकार असेल त्यानें दुष्ट मनुष्यांशीं काळजीपूर्वक वागावें. कारण ते अधिकार असणारांचा मत्सर व द्वेष करतात आणि त्यांचा अधिकार बळकावण्याची किंवा जाण्याची तरी इच्छा करतात.

हुद्दा तराळकीचा, तोरा देशमुखीचा--कामगिरी पाहावी तर महाराची पण डौल आहे देशमुखीचा हलका माणूस मोठ्याचा डौल आणतो तेव्हां म्हणतात.

हून्नारी--हुन्नारी हून केल्यारी काम ससार जाता--(गो.) संधि येतांच ताबडतोब काम केलें कीं तें सोपें जातें.

हुमण--हुमण दांडगा--(माण) रानवट; अडाणी.

हुरडा--हुरडाफुंक्या--भाजलेलीं कणसें चोळून फुंकून हुरडा काढणारा (गडी) २ (ल) भित्रा; पळपुटा.

३ रिकामटेकडा. ४ आडदांड; उद्धट. ५ (नुसत्या हुरड्यावर राहणारा) अन्नाला मोताद झालेला; फाक्या मारणारा.

हुरमत -- हुरमतखाऊ - घेऊ- घेणा— लाज आणणारा; अब्रू घालविणारा; लौकिक बुडविणारा.

हुरळणें- हुरावणें—हुरळली--हुरावली मेंढी, लागली लांडग्याच्या मागें— मेंढी ही लांडग्याचें भक्ष्य असल्यानें तिनें त्याच्याकडे आपण होऊन जाणें हें मूर्खपणाचें आहे. हुरळून आपल्याच नाशास कारण होणें.

हुरळली शेळी, लागली लांडग्याच्या पाठीस— वरील प्रमाणेंच.—पामो १५०.

हुरूप—हुरूप उठणें—उत्साह वाढणें; उमाळा येणें. 'घनःश्यामाचीं हे सरस वचनें विप्र परिसे,महा आनंदाचे हुरुप उठती त्याजसरिसे ।' —सारुह ५.८१.

हुरुरू—हुरुरू करणें--हुर्यो, हुर्रेवडी उडविणें; फजीता करणें. ' घालुनि गांठि अधर्महि धर्माची करिल कां न बा हुरुरू ॥' —मो द्रोण १०.६४.

हुर्यो–हुर्रेवडी—हुर्यो-हर्रेवडी उडविणें -करणें- Hip Hip Hurrah असे तीन वेळां आनंदोद्गार पाश्चात्य लोकांत काढतात. Hurreh (हुर्रे) हा क्षुब्धतावाचकहि उद्गार आहे. यावरून पची, फजीति करणें.

हुलहुल—हुलहुल आणि कुत्र्यावर झूल--[हुलहुल=चाई, धांदल] घाईनें कांहींतरी करणें.

हुल्या मारणें—(क.) व्यर्थ मेहनत करणें.

हुश्श—हुश्श करणें—१ दमल्यावर सुस्कारा टाकणें. २ हुसकावणें; हाकलणें.

हुळहुळणें—हुळहुळली मेंढी,लागली वाघाच्या पाठीं—हुरळली मेंढी पहा.

हूं—हूं कीं(कां)चूं करणें-म्हणणें--(नकारार्थी प्रयोग, १ अवाक्षर काढणें; कांहीं एक बोलणें. २ निषेध दर्शविणें.

हूं म्हणणें–करणें --१ ऐकतों आहे असें दाखविणें; साथ देणें. २ रुकार, अनुमोदन देणें. 'पात्र प्रियसुखभोगातें हो, सुंदरी ! म्हण हूं मात्र ॥'—मोपंचशती रामायण २४६. ३ दुःखोद्गार काढणें. ४ दबकावणें; अवमानणें.—मोद्रोण ५.१६.

***हूं तर पुढें हो तूं; हूं म्हणेल त्यानें पुढें व्हावें**—जो प्रथम बोलेल, सुचवील, रुकार देईल त्यानें धोका पतकरावा. कांहीं अप्रिय किंवा धोक्याची गोष्ट करावयाची असल्यास जो कोणी योजना सुचवितो त्याच्याच गळ्यांत तिची व्यवथा घालतात.

हूं तर भांडीं घास तूं; हूं म्हणणाऱ्यानें भांडीं घासावीं—वरील प्रमाणेंच. (गो.) हूं म्हळ्या तपलं घास तूं.

हूं हूं करा, ढोमनं भरा ढोमन्याची माह्या सोय करा—(व.) [ढोमनें=जेवण्याचे पदार्थ ज्यांत वाढून ध्यावयाचे असें मोठें भांडें.] हूं हूं हा रडगाण्याचा वाचक शब्द आहे. पदार्थ कितीहि रगड वाढला, ढोमनें भरून पदार्थ वाढला तरी याचें आपलें हूं हूं करणें, रडगाणें व जास्त मागणें सुरूच. ज्याचें रडगाणें कांहीं केलें तरी संपावयाचेंच नाहीं त्याला अनुलक्षून हें म्हणणें आहे.

हून—ऊन पहा. **हून उदाक निववुनु पियंका—(गो.)** कढत पाणी निववून प्यावें. उतावळेपणानें कोणतीहि गोष्ट करूं नये.

हूल—हूल पडणें--आवाई उठणें; संकटाची सूचना होणें. "इकडे शहरामध्यें मोठी हूल पडली त्यामुळें सरदार तयार होऊन आले.'—पेब्र ८६.

हूलीवर घालविणें—चढवून देणें. "पण बहिरनाकाला हूलीवर घालायला 'माझी पोरें मी देतों आणि किल्ला घेतों,' असें आपण म्हणत राहिलें पाहिजे हें त्यानें ओळखलें होतें."—माटे, उपेक्षितांचें अंतरंग १४५.

हृदय—हृदयपालट करणें- -मन, वृत्ति बदलणें. (इं.) Change of heart. 'प्रेमानें पाप्याचा हृदयपालट करावयाचा, न झाल्यास योग्य तो उपाय योजावयाचा.' —गजेंद्रमोक्ष १-२०६.

हृदय फाटून जाणें; हृदय फुटणें—फार दुःख होणें; हाय खाणें; फार वाईट वाटणें. ' आतांच्या लोकांना तो पाहाता तर त्याचें हृदय फाटून जातें !'—शाव्र ३.२०.

हृदय भरून येणें-दाटणें--गहिंवरणें. 'तों हृदय भरोनी येतें ।'—संग्रामगीतें २४.

हृदयाचें पाणी करणें—१ अतिशय कष्ट घेणें; जीव तोडून करणें. २ कळकळ; जिव्हाळा धरणें. 'मि. आर्थर सुर

हे आपल्या हृदयाचें पाणी करून ज्या भाषेंत बोलत आहेत त्या भाषेंत जिवंतपणा आहे.'-केसरी ६-३-४२.

हृदयांत प्रकाश पडणें--उमजणें; वस्तुस्थितीचें बरोबर ज्ञान होणें. 'याचा सुभेदारांच्या हृदयांत चांगला प्रकाश पडला.'-V. S. २.५९.

***हृदयाचा उन्हाळा आणि डोळ्यांचा पावसाळा**—मनांत प्रेमाचा ओलावा नसतां डोळ्यांतून खोटे अश्रू काढणें; हृदय कठीण असून वरवर प्रेमभाव दाखविणें.-धनुर्धारी.

हेका---हेका धरणें- करणें—हट्ट चालविणें.

हेकड---हेकड कुणबी, दुगणी दाम--अडाणी मजुर लावला तर दुप्पट खर्च येतो.

हेकड कुणबी सातदां रांधे—हेंकोंडा पहा.

हेकडे---हेकडे न्हायिं, तेकडे वांयिं—(गो.) इकडे आड नि तिकडे विहीर अशा कातींत सांपडणें. इकडे पहा.

हेंकोंडा---हेंकोंडा कुनबी दुनला रांधे अन् त्याची बायको तीनदां रांधे—(व.) [हेंकोंडा= अडाणी] अडाणी माणूस असला तर त्याला स्वयंपाकाचा अंदाज वगैरे साधत नाहीं, त्यास पुन्हांपुन्हां रांधावें लागतें. याची बायको तर त्याच्याहि पेक्षां अडाणी असल्यानें तिला अनेक वार रांधावें लागतें. त्यावरून अडाणी माणसास कोणतेंहि कार्य सौकर्यानें व झटपट करतां येत नाहीं; त्याला पुन्हां पुन्हां तीच खटपट करावी लागते असा अर्थ. "पाहिल्याच खेपेस टिपण करतांना संपूर्ण ग्रंथाचा कर्ता, ग्रंथाचें नक्की प्रकरण, पान, इ. माहिती लिहून ठेविली नाहीं; आतां बसला आहे पानें उलटीत व डोळे फोडीत. 'हेंकोंडा कुनबी दुनला रांधे न् त्याची बायको तिनदां रांधे.' तशी गत करीत."

हेंगड---हेंगडतिफड; हेंगडतट्टू; हेंगडमेंगड—अडाणी, हेंगाडा माणूस.

हेंगडमत—१ अडाणी बुद्धि. २ हट्ट; मंदपणा; हेंगाड.

हेंगडीप्रधान—हेगडे प्रधान हा खंडोबाचा अधिकारी आहे. (ल.) अजागळ; रेंग्या माणूस.

हेंगाडा---हेंगाडदासी--हट्टी स्त्री.

***हेंगाड दासी, दादला नाशी**—हट्टी स्त्री नवऱ्याशीं बिघाड करते.

हेंगाडा कुणबी दुणा रांधे, धन्याला खर्च फार लागे—अजाण--अडाणी कुणबी पहा.

हेट---हेटचा वारा—दक्षिणेकडील वारा.

हेटबाहेरचा वारा—नैऋत्येकडील वारा.

***हेटची घाण, उपरची खाण**—[हेट=दक्षिण] दक्षिणेचा वारा वाईट पण उत्तरेचा चांगला.

हेटीमेटी---हेटीमेटी खालीं-वारीं नेणें-घालविणें—हलगरजीपणानें गमवणें; दूर करणें.

***दिवस गेला हेटाहेटी-हेटीमेटी-हाटीमेटी-रेटारेटी, चांदण्याखालीं (दिवा लावून) कापूस वटी**—दिवस पहा.

हेडुक---हेडुक लावणें--(माण.) वांकडें लावणें; तेढें बोलणें.

हेंडे होळकर—१ होळीचें होळकर पहा. २ दंगेखोर, बंडखोर.

हेपलणें---हेपलणें; हेपल्या मारणें--संभोगक्रिया करणें.

हेमाड---हेमाडःमहादाश्रमाच्या पांतीचा;हेमाड द्विज तो ब्रह्मसानः त्या पांतीचा मी पापी कृतघ्नः—(महानु.) रामदेव यादवाचा करणाधिप हेमाद्रि व महदाश्रम या दोघांनीं चक्रधराचा छळ केला (बेलापूर उत्तरार्ध चरित्र व जाखदेपाठ चरित्र पहा.) तेव्हां महानुभावी लोक या म्हणींचा उच्चार रोज दोन वेळां करतातच. ब्रम्हसान संन्यासी हेमाद्रीचा गुरु होता. हेमाद्री, महादाश्रम व ब्रम्हसान या तीघांनीं मिळून चक्रधराचा घात केला त्यांच्या पंक्तींतला मी पापी कृतघ्न असा भावार्थ.

हेरणें---हेरून फेरून—१ फेरफार करून. २ पुन्हां पुन्हां वारंवार. ३ इकडे तिकडे, उलथा पालथ करून.

हेला---जन्माला आला हेला,आणि पाणी वाहतां वाहतां मेला--अडाणी मनुष्यास जन्मभर कष्ट सुटत नाहींत व कांहीं फायदा होत नाहीं. ज्या माणसाचा कांहींहि लौकिक नसतो, जो नुसतेच काबाडकष्ट करतो त्याबद्दल म्हणतात.

हेल्याच्या कानीं किंगरी वाजविली तरी तो आपली हूंय सोडीत नाहीं—टोणगा पहा. मूर्ख

सदुपदेशानें कधीं सुधारत नाहीं. तु०-गाढवा पुढें वाचिली गीता०.

हेवा—-हेवा आणि नाचार करणें, रक्तमांस आटवणें—दुसऱ्यांचा मत्सर करण्यांत स्वतःचा कांहीं फायदा होत नसून विनाकारण त्रास मात्र होतो. Excess and envy waste the flesh and the spirit.—सवि ९८८.

हेवा करणाऱ्याला शंका नसते, मूर्खाला विचार नसतो—मत्सरी मनुष्य कधीं आपल्या मताबद्दल शंका सुद्धां धरीत नाहीं. त्याला नेहमीं आपणच बरोबर असून दुसरे चूक आहेत असें वाटत असतें व मूर्ख मनुष्य कधीं विचार करीत नाहीं.

हेवा करणाऱ्याशीं दोस्ती, करुं नये कल्पांतीं—मत्सरी मनुष्यांशीं स्नेह करूं नये.

हेवा दावा, नकटी गेली चांगदेवा—स्वतः व्यंग असणारा मनुष्य इतरांचा हेवा करतो.

हेव्यामुळें अंतःकरणास आणि शरीरास यातना—मत्सरी माणसाला मनस्ताप तर होतोच पण त्याची प्रकृतिहि बिघडते.

हैक—-हैक म्हणतां ब्रह्महत्या—थैक पहा.

हैप(ब)त—-हैप(ब)त खाणें-घेणें—अतिशय घाबरणें; धास्ती वाटणें; हाय खाणें. 'फौजेनें हैबत खाल्ली. आतां तह ठरवावा.'—होकै १२.

हैराण—-हैराण होणें—(व.) आजारी होणें; फजीत होणें.

हैरुं—-हैरुं धावता म्हणु गायंडळु धांवता—(गो.) हरीण धांवतें म्हणून गांडुळ धांवायला लागलें तर त्याचा प्राणच जायचा. आपली कुवत न ओळखतां दुसरा करतो म्हणून आपण तीच गोष्ट करायला जाणें हें फायद्याचें नसतें.

हैव—-हैवहि गेलें नि दैवहि गेलें—हेंहि गेलें नि तेंहि गेलें. दुहेरी नुकसान. "हैवहि गेलें नि दैवहि गेलें. लग्नानंतर जो तो आपापल्या घरीं जातो. पण फशीं पडते बिचारी मुलगी."—महाराष्ट्र परिचय, जून १९४०, पान २९.

हो—-हो ना करणें—अनमान करणें; कचरणें; कांकूं करणें.

हो म्हणणें-भरणें-करणें; होस हो मिळविणें-म्हणणें-लावणें-जोडणें-करणें-देणें—१ कोणी कांहीं म्हटलें, सांगीतलें कीं त्याला संमति देणें. 'आजीचा माझ्या लग्नाबद्दलचा नाद चालला होताच आणि...... बाबाही आतांशा तिला होस हो देऊं लागले होते.'—पकोघे. २ साथ देणें; पाठपुरावा करणें.

होकल—-होकल मरूं, नाजाल्यार न्हवरो मरूं, होवळ्यो रहात वर्णाक—(गो.) नवरा मरो कीं नवरी मरो, वऱ्हाडी बायका आपल्या वरणासाठीं घाबऱ्या झाल्या आहेत. त्यांना जेवणच दिसत आहे ! तु०-नवरा मरो कीं नवरी मरो, उपाध्याला दक्षिणेशीं कारण.

होकलेक् कोण वाखाणूतलो होकलेची आवय नाय झाल्यावर !—(गो.) नवरीची आई हजर नसतांना नवरीला कोण वाखाणतो ?

होकलेलीं चिन्नां वाळ्याच्या कैलार—(गो.) नवरीची पारख लग्नाच्या वेळीं, ती पायांत तोडे घालण्याच्या वेळींच होते. थोड्या गोष्टीवरून सारा स्वभाव, वागणूक कळते. शितावरून भाताची परीक्षा.

होकलेलीं चिन्नां सव्यार कळटात—(गो.) नवऱ्या मुलीची संस्कृति तिच्या लग्नाच्या वेळच्या वागणुकीवरूनच कळून येते.

होट—ओठ पहा.

होटाचें वाळणें-जिरणें—बाल्यावस्था ओलांडणें.

होटांवर दूध दिसणें—बाल्यावस्था असणें. ओठ पिळला तर दूध निघतें, पहा.

***होटोंसे अभी, दुधकी बो नहीं गयी**—[हिं.] ओंठावरील दुधाचा वास अजून गेला नाहीं. इतकें लहान वय [गु.] हजी तो मोहमां दुध्या दांत छे [इं.] Your mamma's milk is scarce out of your nose yet.

होड—-होड रुका सावळेंतु सगळेच रावच्याक पळेताति—(गो.) मोठ्या वृक्षाच्या सावलींत बसायला सगळेच धडपडतात. मोठ्याच्या आश्रयाची सर्वजण अपेक्षा धरतात.

होड रुकाक वारें लागचें चड—(गो.) मोठा वृक्ष उन्मळून पडायला वाराहि तसाच जोरदार लागतो. थोर माणूस लहान सहान संकटाला डगमगत नाहीं.

होडां गांडि सगळेइ धुतात, गरिबा तोंड पळेता कोण ?--(गो.) मोठ्याची गांडसुद्धां धुतील; पण गरिबाचें तोंडहि पाहाणार नाहींत असे लोक आढळतात.

होड्या घर लासूं नये, गरिबा बायल मोर नये—(गो.) श्रीमंताचें घर जळूं नये आणि गरीबाची बायको मरूं नये.

होडा घरच्या पितळेक थाइ भांगार म्हणताति—(गो.) मोठ्यांच्या घरची पितळसुद्धां सोनें म्हणून समजली जाते. मोठ्याचा उणेपणा झांकला जातो.

होडांसांगाति व्यारु नाका, हुनासांगाति मेण नाका—(गो.) मोठ्यालोकांशीं व्यवहार करूं नये आणि आगीजवळ मेण ठेऊं नये. नुकसान होतें.

होडें--होडें ताणप—(गो.) १ होडी चालविणें. २ (ल.) ताणून देणें; निजणें.

होणें--होऊन जाणें—१ जवळ जवळ होणें. २ खलास होणें.

होणार चुकतें काय ?--जें व्हावयाचें तें कधीं चुकत नाहीं. तु०-यदभावि न तद्भावि भावी चेन्नतदन्यथा। 'होणार चुकेल काय हो तात ?'-मोभीष्म १.६.

होणार टळत नसतें—ज्या गोष्टी व्हावयाच्या असा-ईश्वरी नेमानेम असतो त्या टाळतां येत नाहींत.

होत होत हळूहळू; दिवसेंदिवस. "उपास न पडतां रोजबरोज खायाला सांपडे आणि होत होत घोडीं तवाना होत ऐसें करणें."-रा ८ '२८.

होता कीं नव्हता करणें—समूळ नाहींसें करणें; नामशेषहि न ठेवणें. 'सगळे मराठे एकत्रित होऊन झटून मदत करतील तर दक्षिणेंत मुसलमान होता कीं नव्हता असें करून टाकीन.'--संभाजी.

होती कळा—चढती कळा.

होती नव्हती तितकी केली—खूप खरडपट्टी काढली.

होती वस्त; होता माल—वाढत्या प्रमाणांत किंमत, चांगुलपणा असणारी वस्तु.

होती वाट--उघडलेला मार्ग.

होती वेळ; होता काळ—योग्य संधि; हंगाम.

होयीस होय म्हणणें-उठविणें-करणें—हासे हो करणें, पहा. दुसऱ्याच्या दडपणामुळें रुकार देणें.

***होणें जाणें ईश्वराधीन**—सर्व गोष्टी परमेश्वराच्या हातांत असतात.

होईना कांहीं आन् जिवाची लाही--हातून कांहीं होत नाहीं, पण मन मात्र तडफडत असतें. अगतिक अवस्थेंत मनुष्य बेचैन होतो त्या वेळीं वापरतात.

होऊं नये कोणाची बायको आणि होऊं नये कोणाचा चाकर--कोणाचे होऊं नये चाकर पहा.

होणार जैसी गती त्या प्रकारें: प्रभाव चित्तांत तैसा विकारे:--(महानु.) जशी ज्याची गत व्हावयाची असते तशी त्याला बुद्धि होत असते. त्या गतीकडे नेणारे विकार माणसाच्या मनांत प्रबल होऊन राहातात.

होणार सोडील पण सोनार सोडणार नाहीं--एखाद्या वेळीं भवितव्यता चुकेल पण सोनार सोनें चोर-ल्याशिवाय राहणार नाहीं. तु०-सोनार शिंपी.

होणारी कीं सोनारी—वरप्रमाणेंच.

होणारें न चुकेल, होईल तरी ब्रह्मा तया आडवा ।--ब्रह्मदेव आड आला तरी भवितव्यता चुकत नाहीं.

होता जिवा म्हणून वांचला शिवा—जिवा पहा. अफजुलखानाचा सरदार सैय्यद बंडा, हा शिवाजीवर चालून आला. त्याला जिऊ झाल्या सकपाळ (राहणार कोंडवली, प्रांत जावळी) यानें ठार केला, यावरून पड-लेली म्हण.-ऐपो २०.

होता देवाच्या भेटी, तेणें तुटती जन्माच्या गांठी—परमेश्वराची भेट झाल्यास जन्म मरणाच्या फेऱ्यांतून मुक्तता होते.

होतां राज्यक्रांति, होय द्रव्याची प्राप्ति--राज्य-क्रांति झाली असतां द्रव्यप्राप्ति होते अशी समजूत आहे.

होती आली वेळ म्हणजे गाजराचें होतें केळ--प्रसंगीं क्षुल्लक वस्तूसहि महत्त्व येतें.

होती रग, केली धग--रग जिरवणें.

होतील बाळ, तर फेडतील काळ—मुलगे असले तर कधीं तरी कुटुंबास ऊर्जितावस्थेस आणूं शकतात.

होते आंबे गरे, तोंवर भट बामण बरे--खाव-यास असलें म्हणजे सर्व भोंवतीं जमून गोड गोड बोलूं लागतात.

होय तैसें जाय, जन तमाशा पाहाय--कांहीं का होईना लोक आपले गंमत पहावयास तयार असतात.

होय द्रव्यप्राप्ति मग चाले आठवती— जवळ पैसा असला म्हणजे अनेक थेर सुचतात.

होशील सुने कुणासारखी तर सासूबाई तुम्हां-सारखी—घरांतील सुनेला जसें सासू वळण लावील तशी ती वागूं लागते.

होतव्यता---जैशी होतव्यता तैसी उपजे बुद्धिः--(महानु..) भवितव्यता माणसाला ओढीत असते व त्याला जें कांहीं करण्याची बुद्धि होते ती तरी यामुळेंच.

होन---होना पायली होणें--फार महाग होणें.

होम---होमकुंडीं घालणें-टाकणें-देणें-पडणें सांपडणें--आपत्तींत लोटणें, पडणें इ०.

होरद्दत---होरद्दतासांगाति जेवणखाण, होकलें सांगाति न्हाण माकण--(गो.) जावईबुवांच्या बरोबर असणाऱ्यांना जेवणखाण चांगलें मिळतें आणि नवऱ्या-मुलीबरोबर असणाऱ्या मुलींचें न्हाणें थाटमाटाचें होतें. तु०--जांवयाबरोबर जेवावें, मुलाबरोबर शिकावें.

होरद्दतु चोयता होकलें तोंड, पुरोहितु चोयता दक्षिणे तोंड--(गो.) नवरामुलगा वधूचें तोंड पाहातो आणि पुरोहित दक्षिणा भरपूर आहे कीं नाहीं तें पाहातो. ज्याचा जो स्वार्थ असतो तो तो पाहातो.

होलगडणें---होलगडून पडणें- ठेचाळून पडणें (जनावरानें).

होवळा---रिकामटवळा आणि गांवचा होवळा—रिकामा मनुष्य गांवच्या उठाठेवी करतो.

होळकर---होळकरी टाकी--जेजुरी हें होळकर घराण्याचें देवस्थान. तेथें नेहमीं त्या सरकारचीं कांहींना कांहीं बांधकामें चालू असतात. त्यामुळें त्या ठिकाणीं अनेक इमारती दिसतील. यावरून कधीं न संपणाऱ्या किंवा फार दिवस चालणाऱ्या कामासंबंधानें म्हणतात. रेंगाळणाऱ्या कामास कोणी कंटाळला म्हणजे 'तुझी होळ-करी टाकी चालू दे, म्हणजे काम शेवटास जाईल' असे धीराचे शब्द सांगण्यांत येतात.--भारतवर्ष, जुन्या ऐति. गोष्टी, पृ. १९.

होळी---होळी करणें—१ होळी पेटविणें. २ जाळपोळ करणें, उध्वस्त करणें. 'साधुबिभीषण गृह संरक्षी, लंकेची करी होळी ।'--मो. पंचशती रामायण २८०.

होळी शिंपणें--होळीच्या दिवसांत पडणारा पाऊस.

अंगाची होळी होणें--(ताप, राग इ. नें) अंगाची आग होणें; संताप होणें.

होळीची पोळी--१ होळीकरतां नैवेद्य दाखवा-वयास आणलेली पोळी. २ ही पोळी घेण्याचा किंवा प्रथम नैवेद्य दाखविण्याचा एक मान असतो.

होळीचे होळकर—१ शिमग्यांतील खेळये. २ अलबत्ये गलबत्ये; गमत बघावयास जमलेले लोक. ३ अजागळ, अव्यवस्थित लोक.

***होळी जळाली नि थंडी पळाली**—होळीनंतर हिंवाळा संपतो.

होळी नि शिमगा चैत्र अन् पाडवा—फाल्गुन व शिमगा असे दोन महिने व चैत्र व पाडवा असे दोन महिने धरून केलेला खोटा हिशोब. 'होळीन् शिमगा अन् चैत न् पाडवा करून शान याज उकळावं लागतंया, तवा कुठं सावकारी चालतिया.'--नवाकाळ २२-७-२५.

होळीचा होळकर व मोलाचा रडणार---दोघां-सहि कांहीं वाटत नसतें; दोघेहि बेजबाबदार कोणीतरी जमलेले लोक.

होळीची बोंब तीन चार दिवस--(व.) होळीच्या दिवसांत बोंब मारण्याची मुभा असते. तो हंगाम निघून गेला कीं बोंबा मारणें आपोआप थांबतें. तसें लोकमता-विरुद्ध कांहीं आचरण आपण केलें तर लोक शिव्या देण्यास व उपहास करण्यास सुरवात करतात; पण थोड्याच दिवसांत त्यांची ही कटकट आपोआपच थंडावते.

हौद----हौद भरे तो फवरा छुटे—मूळ खजि-न्यांत पाणी असेल तर कारंजांत येईल. आडांत असेल तर पोहऱ्यांत येणार.

हौदसे गयी, तो बुंदसे आती नहीं--बुंदसे गयी० याच्या उलट. ही म्हण चुकीची आहे.

हौशी---हौशी अन् म्हाताऱ्याची गौशी--- [गौशी=ठेवलेली; रखेली.] म्हातारपणाचे चाळे.

हौस---हौस बडी, खर्ची थोडी---मनांतून

इच्छा खूप चांगलें व्हावें अशी पण हातानें कृपण, अशी वृत्ति. थोडयांत पण चांगलें व्हावें अशी इच्छा.

हौस वडी खर्ची थोडी, बसावयास गेलों तर लंगडी घोडी--इच्छा खूप चांगली पण द्रव्य व साधनें अगदीं भिकार.

हौस भारी अन् हुलग्या मठाची केली न्याहरी—हौसेची म्हणून क्षुद्र गोष्ट करावयाची. हौसेला मोल नाहीं याच्या उलट.

हौस राजाची, नांदणूक खासदाराची—राजाची ऐट आणून भिकाऱ्यासारखें वागणें.

हौसकू मोल नहीं, गद्धेकू अक्कल नहीं--हौसेला मोल नाहीं व गाढवाला अक्कल नाहीं; मनुष्य हौसेकरितां वाटेल तितकी रक्कम खर्च करतो; अशावेळीं त्यास कोणी आडवूं शकत नाहीं व मूर्खाला कितीहि शहाणपणा शिकविला तरी त्याचा कांहीं उपयोग होत नाहीं.

हौसेनें केला पति, त्याला भरली रगतपिती--एखादी गोष्ट मोठ्या हौसेनें करावयास जावें तों त्यांत निराशा पदरीं यावी.

हौसेनें केला पति, परी झाली संसाराची माती—वरप्रमाणेंच.

हौसेनें केला वर, त्याला भरला दिवसां खोकला रात्रीं ज्वर!; हौसेनें केला वर त्याला भरला हिंवज्वर; हौसेनें दादला केला, तो रांडबाज निघाला—अर्थ उघड आहे.

क्ष

क्षण---क्षण देणें--[क्षण=श्राद्धाच्या आमंत्रणासाठीं ब्राह्मणाच्या हातावर द्यावयाचे दर्भ.] १ श्राद्धासाठीं ब्राह्मणास सांगणें. २ आमंत्रण देणें.

क्षण---क्षणं चित्तं क्षणं वित्तं—आयुष्य वैभव हें क्षणभंगुर आहे. एखादा मनुष्य अस्थिर वृत्तीचा असला म्हणजे त्याबद्दल योजतात.

क्षणं चित्तं क्षणं वित्तं क्षणं जीवति मानवः—(सं.) संसार हा क्षणभंगुर आहे.

क्षण धन काया, जाऊं न द्या वायां--द्रव्य व काल यांचा व्यर्थ व्यय करूं नये. प्रत्येक पैशाचा कांहीं तरी सदुपयोग करीत असावें.

क्षणभंगुर संसार; संसार क्षणभंगुर आहे—सर्व जग हें क्षणिक आहे, तसेंच आपण ज्या प्रपंचांत अगदीं गढून जातों तो अगदीं क्षणिक व नश्वर आहे.

क्षणविध्वंसिनः कायाः न चिंता मरणे रणे—[सं] ज्या अर्थीं देह हा क्षणभंगुर आहे व त्याचा नाश केव्हां होईल त्याचा नेम नाहीं त्याअर्थीं मनुष्यानें रणांगणांत येणाऱ्या मृत्यूला भिऊं नये.

क्षणशःकणश्चैव विद्यामर्थंच साधयेत्—(सं.) मनुष्यानें विद्या व धन हीं जेथें जेथें अल्पांशानें कां होईनात मिळतील तेथून तेथून जमा करावीं.

क्षणिक---क्षणिक बुद्धि असणें (त्याचें) जिणें व्यर्थ—ज्या मनुष्याची बुद्धि स्थिर नसते त्याचें आयुष्य व्यर्थ होय.

क्षणिकसुख आणि देहाची माती--भलत्याच ठिकाणीं विषयसेवन केल्यास त्या क्षणिक सुखाकरितां शरीरास कायमची पीडा होण्याचा संभव असतो.

क्षति---क्षति-क्षिति बाळगणें—पर्वा करणें; विधिनिषेध बाळगणें; मनावर परिणाम होऊं देणें.

क्षमा---क्षमावान सर्व जाणतो-साधतो--जो मनुष्य क्षमाशील असतो त्याचा कोणाशीं विरोध येत नाहीं. त्यामुळें त्याला आपलें कार्य साधतां येतें.

क्षमाशस्त्र जया नराचिया हातीं। दुष्ट तयांप्रति काय करी॥--तुगा ३४६४. क्षमाशील मनुष्याचें दुष्ट देखील कांहीं वांकडें करूं शकत नाहीं. क्षमाशस्त्रं करे यस्य दुर्जनः किं करिष्यति। अतृणे पतितो वन्हिः स्वयमेवोपशाम्यति॥

क्षमेसारखें तप नाहीं--क्षमाशील बनणें ही गोष्ट फार कठिण आहे; त्यास फार संयम दाखवावा लागतो.

क्षमेसारखें भूषण नाहीं—क्षमा हा फार शोभादायक अलंकार आहे.

क्षमेसारखें शस्त्र नाहीं--क्षमाशील मनुष्य सर्वांस जिंकू शकतो; त्याच्यापुढें सर्व नम्र होतात. क्षमाशस्त्र जया० पहा.

क्षांति---क्षांतितुल्यं तपोनास्ति—क्षमा हें अत्यंत श्रेष्ठ तप आहे. वर पहा. क्षान्तितुल्यं तपो नाऽस्ति न तोषात्परमं सुखम् । नाऽस्ति तृष्णापरो व्याधिर्न च धर्मो दयापरः ॥

क्षार---क्षारत्रय—१ सज्जीखार, २ जवखार व ३ टाकणखार.

क्षारदशक—१ शिव (शेगट), २ मूलक (मुळा), ३ पलाश, ४ चुक्रिका (चुका), ५ चित्रक, ६ आर्द्रक, ७ निंबसंभव, ८ इक्षु (ऊंस), ९ शैखरिक (अघाडा), १० मोचक (केळ) या दहा वनस्पतींपासून निघणारे रस.

क्षारपंचक—यव, मुष्कक, सर्ज, पलाश व तिल. १ पळसाचा खार, २ तिळाच्या काड्यांचा क्षार, ३ मोरव्याचा क्षार, ४ सज्जीक्षार, ५ जवखार यांचें मिश्रण.

क्षारषट्क--(अ) धव (धावडा), अपामार्ग, कुटज (कुडा), लांगली, तिल, मुष्कक. (आ) १ अपामार्ग, २ कुडा, ३ गुळवेल, ४ कळलावी, ५ पुष्करमूळ, ६ तिलनाल.

क्षाराष्टक—१ पळस, २ निवडंग, ३ आघाडा, ४ चिंच, ५ रुई, ६ जव, ७ मोरवावृक्ष, ८ तिलनाल. या आठ क्षार वृक्षांचा समूह.

क्षीण---क्षीणा नरा निष्करुणा भवंति।— (सं.) जे लोक विपन्न स्थितीला पोचलेले असतात त्यांचें अंतःकरण कठोर होतें.

क्षीर---क्षीर नीर न्याय—दूध व पाणी एकत्र मिसळलें असतां त्यांचा अगदीं एकजीव होतो व तीं परस्परांपासून वेगळीं दाखवितां येत नाहींत. त्याप्रमाणें पूर्णपणें मिसळणें, एकरूप होणें. पूर्णतः सामील होणें.

क्षीर नीर निवडणें; क्षीरनीर विवेक--दूध व पाणी एकत्र असतां वेगळें करणें, हंसपक्षी दूधपाण्याच्या मिश्रणांतून दूध तेवढें वेगळें काढतो अशी समजूत आहे. त्याप्रमाणें चांगले वाईट यांच्या गल्लतींतून चांगलें असेल तेंच निवडून घेणें. 'चातुर्य तुझें कवणांत आहे। या क्षीरनीरा निवडोन पाहें ॥'—सारुह ४.१२

क्षुधा---क्षुधातुराणां न रुचिर्न वेला (पक्वं)- भुकेलेला मनुष्य चांगलें किंवा वाईट व शिजलेलें किंवा कच्चें हें पहात बसत नाहीं; तो जसें पुढें येईल तसें खाऊं लागतो. कामातुराणां पहा.

क्षुधित---क्षुधितास अभक्ष्य कांहीं नाहीं— भुकेलेला मनुष्य वाटेल तें खातो. भुकेला कोंडा० पहा.

क्षुधेसारखा शत्रु नाहीं—भुकेसारखी पीडा शत्रूहि देऊं शकत नाहीं.

क्षुल्लक---क्षुल्लक वस्तूच्या रक्षणीं, मूल्यवान् वस्तूची नको हानी--क्षुल्लक वस्तु रक्षण करण्याकरितां महत्त्वाची वस्तु गमावूं नये.

क्षेत्र---क्षेत्रांतील न्हावी--१ क्षेत्रांत न्हाव्यावर कर असतो व त्याचा हात व हत्यार वाईट असतें. तो क्षौराचे पैसे शहरांतील चांगल्या न्हाव्यापेक्षांहि अधिक घेतो. शिवाय धर्म म्हणून वेगळे पैसे मागतो.–गांगा. २८८. २ एकाच्या डोक्याचा थोडा पट्टा काढून ठेवून दुसरे गिऱ्हाईक घेतात व पाहिल्यास ताटकळत ठेवतात. यावरून, अपुरें काम करून सोडणारा.

ज्ञ

ज्ञाता---ज्ञात्यानें अनुमानानें परीक्षा करावी- जाणता मनुष्य सर्व गोष्टी केवळ तर्कानें आकलन करतो. त्यास फारसें सांगावें लागत नाहीं.

ज्ञान---ज्ञानमठांत बसणें—१ आध्यात्मचिंतनांत काळ घालविणें. २ गर्व बाळगणें.

ज्ञान जाणे तो जाणता नोहे: क्रिया करीतुसे तो जाणता:--(महानु.) नुसतें ज्ञान असून उपयोग नाहीं, जो त्याप्रमाणें क्रिया करतो तोच खरा जाणता.

ज्ञान धांवतें पण शहाणपण रांगतें—मनुष्याला ज्ञान पुष्कळ मिळवितां येतें व तें लौकरहि प्राप्त करून घेतां येतें पण त्यामानानें शहाणपण अगर बुद्धीची तीव्रता अगर प्रगल्भता वाढत नाहीं; तिला वेळ लागतो. तु०-अकलेपेक्षां विद्या जास्ती ओझ्याप्रमाणें वाढती. Knowledge comes but wisdom lingers.

ज्ञानलवदुर्विदग्धं ब्रह्मापि नरं न रंजयति ।—अल्पज्ञ मनुष्याची समजूत करणें ब्रह्मदेवासहि कठिण असतें. अज्ञः सुखमाराध्यः सुखतरमाराध्येत विशेषज्ञः । ज्ञान०॥

ज्ञानाचा कंटाळा आला, त्यानें संशय स्वीकारिला—ज्याला ज्ञानप्राप्तीचा कंटाळा येतो तो प्रत्येक गोष्टींबद्दल संशय दाखवूं लागतो.

ज्ञानाचा पुढारीः करणाचा पेंढारीः—(महानु.) ज्ञानाच्या बाबतींत अग्रस्थान मिळविलेला माणूस कृतींत पेंढाऱ्याप्रमाणें भासतो; ज्ञान आणि कृति यांमध्यें मेळ नसतो.

ज्ञानाच्या गोष्टी भारी, सून सासूला मारी—सून ज्ञानाच्या गोष्टी ऐकून शहाणी झाली म्हणजे सासूचा अपमान करूं लागते.

ज्ञानानें आत्मज्ञान होतें—खरें ज्ञान झाल्यास मनुष्यास ब्रह्मज्ञान प्राप्त होतें.

ज्ञानावीण जी जी कळा, ती ती मानावी (जाणावी) अवकळा—ज्ञानाशिवाय दुसऱ्या सर्व गोष्टी अथवा विद्या कितीहि चांगल्या दिसल्या तरी त्या अयोग्य समजाव्या.

ज्ञानें काहीं फुगती, काहीं लवती—ज्ञानप्राप्तीमुळें कांहींस गर्व होतो तर कांहीं विनयी होतात.

ज्ञानेन हीनाः पशुभिःसमानाः—ज्यांस ज्ञान नाहीं ते पशुसमान मानावे.

ज्ञानी—**ज्ञानी कैसा जाणावाः दहा लक्षणें बांधे जीवा**—(महानु.) अक्रोध, वैराग्य इ. दहा लक्षणांनीं जो स्वतःला बांधून घेतो म्हणजे हे दहा गुण ज्याच्या ठिकाणीं असतात तो ज्ञानी. 'दश लक्षणें' पहा.

ज्ञानी तोच पुण्यवान—खरा ज्ञानी मनुष्यच पुण्यवान असतो.

जे ज्ञानीयाचें ज्ञानः तें लोकांचें अज्ञानः—(महानु.) जो मोठा ज्ञानसंपन्न असतो त्याची विद्वत्ता सामान्य लोकांना कळत नाहीं.

ज्ञानीसे ज्ञानी मिले तो रसकी लुटालुट, ज्ञानीसे अज्ञानी मिले तो उलटी माथाकूट; ज्ञानीसे ज्ञानी मिले वह बात बात और बात, गद्धासे गध्दा मिले वह लात, लात और लात—मागें पहा.

ज्ञानोबा—**ज्ञानोबाचा मुलगा दगडोबा**—ज्ञानी मनुष्याच्या पोटीं ठोंब्या मुलगा येणें. तुळशींत भांग.

ज्ञान्याचा एका, नाम्याचा तुका, व कबीराचा शेखा—(वारकरी लोकांत रूढ) ज्ञानदेवाचे अवतार एकनाथ, नामदेवाचा अवतार तुकाराम, व कबीराचा शेख महंमद.-आजगांवकरकृत महाराष्ट्र कवि चरित्र, भाग १ पान २३९.